# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

**वर्ष ४४ वे** **अंक ३४ वा** **फेब्रुवारी २०२६**

# ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन विशेषांक

**मुख्य संपादक**

**प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक**
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद
प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**कार्यकारी संपादक**

**प्रा. डॉ. साहेबराव हिवाळे**
प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,
विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर जि. छ.संभाजीनगर

**प्रा. डॉ. सुधीर येवले**
प्राध्यापक व विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग,
कालिकादेवी महाविद्यालय, शिरूर कासार, जि. बीड

**संपादक समिती सदस्य**

डॉ. सुधीर येवले, डॉ. अनिल जायभाये, डॉ. अविनाश वर्धन,
डॉ. ज्योती गगनग्रास, डॉ. रवींद्र वाघ, डॉ. हरीश पेटकर, डॉ. संपत काळे,
डॉ. नलिनी बोरकर, डॉ. विनोद खेडकर, डॉ. बाबुराव जाधव

**संपादकीय सल्लागार मंडळ**

प्रा. डॉ. उत्तम भोईटे, प्रा. डॉ. दा. धो. काचोळे, प्रा. डॉ. अरुण चव्हाण, प्रा. डॉ. स्मिता अवचार,
प्रा. डॉ. संजय सांळुके, प्रा. डॉ. जगन कराडे, डॉ. प्रशांत सोनवणे

**संपर्क पत्ता**

**अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,**
**द्वारा:** समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४
**Website:** www.mspmonline.com **Email:** marathisocio@gmail.com

**सुचना: या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेली मते ही त्या त्या लेखकांची आहेत. या मतांशी मराठी समाजशास्त्र परिषद अथवा संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असेलच असे नाही.**

## समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्व व इतर बाबी विषयीचे निवेदन (नियतकालिकांच्या नोंदणी संबंधी नियम ८ प्रमाणे)


## प्रकाशन स्थळ

## मराठी समाजशास्त्र परिषद

द्वारा: समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४

**नियतकाल: वार्षिक (ISSN 2230-7745)**

**मुद्रकाचे नाव :** प्रा. डॉ. साहेबराव हिवाळे व प्रा. डॉ. सुधीर येवले (कार्यकारी संपादक)

**मुद्रण स्थळ :** छत्रपती संभाजीनगर.

**प्रकाशकाचे नाव : प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद.**
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : द्वारा - समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४.

**संपादकाचे नाव : प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक**
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता: प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

मालकाचे नाव : **मराठी समाजशास्त्र परिषद**
पत्ता : द्वारा - प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४.

**अक्षर जुळवणी:** डॉ. जयसिंग सिंगल


मी, प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

**डॉ. लक्ष्मणसिंग साळोक**
प्रकाशक

## संपादकीय......

मराठी समाजशास्त्र परिषदेने सुरू केलेली समाजशास्त्र संशोधन पत्रिका ही मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र असून १९८३ मध्ये स्थापन झालेल्या मराठी समाजशास्त्र परिषदेने डिसेंबर १९८७ मध्ये समाजशास्त्र संशोधन पत्रिका या नावाने संशोधन पत्रिकेची सुरुवात करण्यात आली. त्यावेळच्या पहिल्या अंकाचे संपादक मंडळात डॉ. वि.वि. देशपांडे, डॉ. सुधा काळदाते. डॉ. द. ना. धनागरे, डॉ. पु. ल. भांडारकर ही नामांकित मंडळी होती. १९८७ पासून ही संशोधन पत्रिका आत्तापर्यंत नियमितपणे प्रकाशित होत आहे. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३५ व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या अनुषंगाने प्रकाशित होणारा या पत्रिकेचा ३४ वा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हास संपादक या नात्याने मनस्वी आनंद होत आहे.

भारतीय समाज जीवनाची मुळ ग्रामीण संस्कृतीत खोलवर रुजलेली आहेत. कृषी, परंपरा, आप्तसंबंध आणि प्राथमिक स्वरूपाच्या संबंधावर आधारलेला असलेला ग्रामीण समाज आज वेगाने बदलत आहे. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण व याबरोबर येणारे शिक्षण आणि तंत्रज्ञानामुळे ग्रामीण समाजाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. ग्रामीण समाज जीवनात होणारे हे बदल काही प्रमाणात सकारात्मक असले, तरी त्याचबरोबर अनेक गंभीर आव्हाने देखील या परिवर्तनातून निर्माण होत आहेत.

पारंपरिक ग्रामीण समाज स्वयंपूर्ण आणि स्वायत्त होता. शेती हे उपजीविकेचे मुख्य साधन होते. आज मात्र शेतीवर आधारित हि अर्थव्यवस्था अनेक संकटाचा सामना करतांना दिसत आहे. अपुरे कृषी भांडवल, हवामातील प्रतिकूल बदल आणि अस्थिर बाजार यांमुळे शेतकरी पूर्णपणे अडचणीत आला आहे. परिणामी ग्रामीण समुदाय मोठ्या प्रमाणावर शहरांकडे स्थलांतरीत होत आहेत. याचा परिणाम प्रत्यक्ष अप्रत्यक्ष ग्रामीण समाज जीवनावर होऊन अनेक सामाजिक समस्या उदयास येत आहे.

तंत्रज्ञान ग्रामीण जीवनातील परिवर्तनास कारणीभूत ठरत आहे. इंटरनेट आणि मोबाईलच्या माध्यमातून विविध क्षेत्राचे डिजिटलायझेशन होत आहे. समाज कल्याणकारी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्याविषयक योजना, ग्रामीण भागातील लोकांपर्यंत पोहचलेल्या असल्या तरी अद्याप या क्षेत्रात खूप मोठे आव्हान समोर आहे. कारण भारतातील आजही असे काही वाडी, वस्ती, तांडे आणि खेडे आहेत की ती विकासाच्या लाभापासून वंचित आहे. किंबहुना त्यांना मुख्य प्रवाहात आणणे देशातील यंत्रणेला शक्य झालेले नाही. वाढत्या शहरीकरणामुळे आज ग्रामीण भागातील पारंपरिक कला, व्यवसाय आणि स्थानिक संस्कृती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. ग्रामीण समाजासमोरील आणखी एक महत्त्वाचे आव्हान म्हणजे जातीय तणाव, बेरोजगारी आणि दारिद्र्य यामुळे ग्रामीण जीवनात अधिक गुंतागुंत निर्माण होत चालली आहे. महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने काही अंशी सकारात्मकता दिसत असली तरी दुसऱ्या बाजूला महिलावरील अन्यायाच्या प्रकरणांची संख्या मात्र वाढत आहे. ग्रामीण समाजाच्या शाश्वत विकासासाठी प्रभावी धोरणांच्या अंमलबजावणीची नितांत गरज आहे. शेतीला उद्योगाचा दर्जा देणे, सामाजिक समतेसह स्थानिक संसाधनाच्या माध्यामातून रोजगारनिर्मिती, मोफत आणि दर्जेदार शिक्षण व आधुनिक आरोग्य सुविधा, तसेच नव-तंत्रज्ञानाची उपलब्धता आणि उपयोग या दिशेने ठोस पावले उचलली पाहिजेत कारण ग्रामीण समाज विकसित झाला तरच देशाला सर्वसमावेशक विकासाचे ध्येय साध्य करता येईल.

याच दृष्टीने या अधिवेशनाचा विषय निश्चित करून त्यावर दि.१७ व १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ नाशिक संचलित, कला व वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर, जि. नाशिक आणि मराठी समाजशास्त्र संस्था संचलित मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने होत आहे. या परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील विविध अभ्यासक आपल्या शोध निबंधाच्या माध्यमातून विचार मंथन करणार आहेत आणि या शोध निबंधाचे कायमस्वरूपी लिखित स्वरुपात जतन व्हावे या उद्देशाने त्याचे संपादन करून एक महत्त्वपूर्ण दस्ताऐवज आपल्यासाठी उपलब्ध करून देत आहोत. यासाठी मराठी समाजशास्त्र संस्था संचलित मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ज्या वेगवेगळ्या दहा संशोधन समितीच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यभरातून एकूण १५१ शोध निबंध आलेत. या शोध निबंधाचे संपादन करताना असे जाणवले की, शोध निबंध लिहितांना संशोधक हे बहुधा तांत्रिक बाबीकडे दुर्लक्ष करतात. यावर मराठी समाजशास्त्र संस्था संचलित मराठी समाजशास्त्र परिषद भविष्यात काही उपाय योजना निश्चितच करेल असा विश्वास वाटतो.

संशोधन समितीचे समन्वयक डॉ. सुधीर येवले, डॉ. अनिल जायभाये, डॉ. अविनाश वर्धन, डॉ. ज्योती गगनग्रास, डॉ. रवींद्र वाघ, डॉ. हरीश पेटकर, डॉ. संपत काळे, डॉ. नलिनी बोरकर, डॉ विनोद खेडकर, डॉ. बाबुराव जाधव यांनी संपादन करण्यास व हा अंक पूर्णत्वाकडे घेऊन जाण्यास व प्राध्यापकांसाठी मराठी समाजशास्त्र संस्था संचलित मराठी समाजशास्त्र परिषद देत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोधनिबंध पुरष्कारसाठी एक आणि संशोधक विद्यार्थ्यांसाठी डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोध निबंध पुरष्कारसाठी एक असे यावर्षी प्रत्येक संशोधन समितीच्या समन्वयकाकडून प्रत्येकी दोन शोध निबंध घेऊन त्यांचे नामांकन करण्यात या संशोधन समितीच्या समन्वयांचा मोठा वाटा आहे, त्यामुळे संयोजकांना उत्कृष्ट शोधनिबंध निवडताना सोपे गेले व प्रत्येक शोध निबंधाचे वाचन झाल्यामुळे शोध निबंध निवडताना पारदर्शकता आणण्यासाठी मदत झाली. त्यामुळे संपादक या नात्याने आम्ही सर्व संशोधन समिती समन्वयकांचे मनापासून आभारी आहोत.

संपादक या नात्याने मराठी समाजशास्त्र संस्था संचलित मराठी समाजशास्त्र परिषदचे अध्यक्ष प्रो. डॉ. लक्ष्मणसिंह साळोक, सचिव प्रो. डॉ. कालिदास भांगे, कोषाध्यक्ष प्रो. डॉ. प्रियदर्शन भवरे व सर्व कार्यकारणी सदस्य तसेच संयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य व संयोजक डॉ. विनोद निरभवणे आदीचे मनपूर्वक आभारी आहोत.

**मुख्य संपादक**
प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक

**कार्यकारी संपादक**
प्रा. डॉ. साहेबराव हिवाळे — प्रा. डॉ. सुधीर येवले

# *INDIAN SOCIOLOGICAL SOCIETY*


**Flat No. 1046, Sector-C, Pocket-1**
**Vasant Kunj, New Delhi 110 070**
Phone: 011-26132510
Email: societyinsoso@gmail.com, Website: www.insoso.org


Estd. 1951


***PRESIDENT***
**Dipti Rajan Sahu**
Professor
Department of Sociology
University of Lucknow
Lucknow-226007
presidentinsoso@gmail.com
Mob: 9415014116
***SECRETARY***
**Arvinder Ansari**
Professor
Department of Sociology
Jamia Millia Islamia,
New Delhi-110025
secretaryinsoso@gmail.com
Mob: 9899451465
***TREASURER***
**Dilip Ramdas Khairnar**
Professor
Department of Sociology
Post Graduate and Research Centre, Deogiri College, Chhatrapati Sambhajinagar, Maharashtra
dilipkhairnar9@gmail.com
Mob: 932540234
***MEMBERS***
**Alok Kumar Meena**, Jaipur
alokkumarmeena10@gmail.com
**Anshu Kedia**, Lucknow
akedia43@yahoo.in
**Ramesh H. Makwana**, Gujarat
drrhmakwanaspu@yahoo.com
**Sudha Khokate**, Bengaluru
sudhaarunjeji@hotmail.com
**Vinita Singh**, Ranchi
vinitasingh77@yahoo.co.in
**Bibhuti Bhushan Malik**, Lucknow
bbmalik57@gmail.com
**Pramod Kumar Shukla**, Gorakhpur
pramod8929@gmail.com
**Sandeep Murlidhar Chaudhari**, Aurangabad
sm.chaudhari1@gmail.com
**Sanjay Nilkanth Kolekar**, Pune
mrsanjay0@gmail.com
**Khwaja Mohammed Ziyauddin**, Hyderabad
ziyadse@gmail.com
**Nilika Mehrotra**, New Delhi
nilikam@gmail.com
**Rajni Bala**, Batala
drrajnibala@gmail.com
**Rukmini Sen**, New Delhi
rukmini@aud.ac.in
**Sudeshna Mukherjee**, Bengaluru
sudeshna_socio@rediffmail.com

***SECRETARY (OFFICE)***
**Boinu Vaiphei**
*E-mail: societyinsoso@gmail.com*
Phone: 011-26132510
Mobile: 7217679262

BV




**Message from the President,**
**Indian Sociological Society**

**Greetings from the Indian Sociological Society!**

**It gives me great pleasure to be associated with the 35th National Conference of the Marathi Samajshastra Parishad, jointly organised by Arts & Science College, Sinnar, Nashik, and Marathi Samajshastra Sanstha. The conference theme, "Changing Nature of Rural Society and Its Challenges," is highly pertinent and sociologically significant, especially in the context of rapid social, economic, and cultural transformations.**

**I am confident that the deliberations at this conference will foster meaningful academic engagement and contribute to a deeper understanding of contemporary rural realities. I congratulate the organisers for their commendable efforts and wish the conference every success.**

**Best Regrads,**



**Prof. Dipti Ranjan Sahu**
**President**
**Indian Sociological Society 2026-2027**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शोधनिबंधाचे शीर्षक | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| | **संशोधन समिती ०१: महाराष्ट्र सातत्य आणि परिवर्तन : : समन्वयक - प्रा. डॉ. सुधीर येवले** | | |
| १ | नाशिक जिल्ह्यातील आडगाव गावातील ग्रामीण सातत्य आणि परिवर्तन: एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. उमेश बाळासाहेब शिंदे | ०१ |
| २ | ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद: एक समाजशास्त्रीय अभ्यास | जिजाबाई साहेबराव गोसावी | ०३ |
| ३ | ग्रामीण महिला सक्षमीकरण आणि माध्यमे यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. पुनम काकड | ०७ |
| ४ | अशासकीय सामाजिक संस्थांचे ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात व परिवर्तनात योगदान | प्रा.डॉ.सुनील अजाबराव पाटील | १० |
| ५ | अशासकीय सामाजिक संस्थांचे ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासातील योगदान | प्रा.पी. एम. कांबळे | १३ |
| ६ | विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेले पर्यावरणीय बदल आणि ग्रामीण लोक जीवनातील रूपांतरण संदर्भ : नाशिक जिल्हा | प्रा. पूजा हिरामण गांगोडे | १६ |
| ७ | विवाह संस्था आणि कुटुंब संस्थामधील परिवर्तन | प्रा. सीमा आनंद गुरव | २० |
| ८ | वनराई सामाजिक संस्थेचे ग्रामीण विकासातील योगदान समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. बालाजी नरवटे | २२ |
| ९ | महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची सद्यस्थिती: एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ.राजकुमार मुकुंदराव गांधले | २५ |
| १० | मुलींच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण: एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. कोमल राकेश भोसले | २७ |
| ११ | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ: महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासातील भूमिका आणि आव्हाने एक अभ्यास | मनिषा बाबुराव भागवत / डॉ. डी. आर. दामोदर | २९ |
| १२ | भारतीय गावांचे पुनर्मूल्यांकन: वसाहतवादी कल्पनांपासून समकालीन ग्रामीण वास्तव | प्रा. कांबळे संजयकुमार | ३१ |
| १३ | प्राथमिक महिला शिक्षकांच्या भूमिका संघर्षाचा अभ्यास: बीड तालुक्याच्या संदर्भात | विशाखा वि. भिल्लारे | ३९ |
| १४ | ग्रामीण भागातील कुटुंब संस्थेचा बदलता प्रवाह: एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.डॉ. रामराव धेनू चव्हाण | ४१ |
| | **संशोधन समिती ०२: जागतिकीकरण आणि विकास : : समन्वयक - डॉ. अनिलकुमार जायभाये** | | |
| १५ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील ग्रामीण समाजाचे चित्रण: एक समाजशास्त्रीय समीक्षा | डॉ. मोगले धनंजय नागोराव | ४४ |
| १६ | जागतिकीकरणाचा महाराष्ट्रातील ग्रामीण लघु उद्योगांवरील परिणाम: एक अभ्यास | डॉ. नितिन उद्धवराव जाधव | ४६ |
| १७ | जागतिकीकरणाच्या प्रवाहानंतर भारतीय शेतीव्यवस्थेवर झालेले परिणाम: एक समाजशास्त्रीय चिंतन | प्रा. (डॉ.) चंद्रकांत कांबळे | ४९ |
| १८ | जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर परिणाम - एक सामाजिक अध्ययन | डॉ. पी. एन. वाघ | ५२ |
| १९ | जागतिकीकरण आणि महाराष्ट्रातील महिला धोरणे: एक समाजशास्त्रीय अभ्यास | सोनाली भाऊसाहेब अडसूळ | ५५ |
| २० | जागतिकीकरण आणि शेती उद्योग | प्रा. डॉ. विलास भगवानराव भिल्लारे | ५८ |
| २१ | जागतिकीकरण, बाजाराभिमुखता आणि शेती व्यवसाय: समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास | एकनाथ रतन पात्रे | ६१ |
| २२ | जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर परिणाम: एक विश्लेषणात्मक अभ्यास | प्रा. डॉ. सुधाकर एल. जाधव / जयेश हिरालाल ढोले | ६२ |
| २३ | जागतिकीकरणाचे ग्रामीण विकासावरील परिणाम | प्रा. डॉ. राजुरकर सुमेध सुभाषराव | ६५ |
| २४ | शेतीपलीकडील उपजीविका: नव-उदार धोरणे, जोडधंदे आणि ग्रामीण तरुणांचे संरचनात्मक संकट | नागेश शेळके / अनिल जायभाये | ६८ |
| | **संशोधन समिती ०३: लिंगभाव असमानता आणि वर्जिततेचे प्रश्न : : समन्वयक - डॉ. अविनाश वर्धन** | | |
| २५ | महाराष्ट्रातील ग्रामीण मुलींच्या शिक्षणाच्या घटत्या प्रमाणाचे समाजशास्त्रीय विश्लेषण | श्री. जगदीश केशवराव ससाणे | ७३ |
| २६ | जळगाव तालुक्यातील ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार: कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय | राजेश फकिरा धुंदले | ७६ |
| २७ | देवदासी स्त्रियांच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनांचा अभ्यास | भिमराव दत्तु मोटे / डॉ. संजय बी. साळुंके | ७९ |
| २८ | वृध्द महिलांचे आरोग्य आणि लिंगभाव समस्या: एक समाजशास्त्रीय अभ्यास | कु. कोमल जादुगर बनकर / डॉ. वाय. आर. घोडके | ८३ |
| २९ | परभणी जिल्हयातील महिलांचे सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटांचे योगदान | डॉ. नानासाहेब बालासाहेब पाटील / प्रा. जे. के. टोंपे | ८६ |
| ३० | बदलत्या ग्रामीण समाजात कृषीक्षेत्रातील महिलांचे अदृश्य श्रम व सामाजिक असमानता | सरिता रामसिंग डोंगरजाळ | ८९ |
| ३१ | ग्रामीण महिला सशक्तिकरणात बिगर शासकीय संस्थांची भूमिका | डॉ. चांगदेव निवृती मुंढे | ९३ |
| ३२ | नाशिक जिल्हयातील ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य, शासकीय योजना व उपाय योजना: एक चिकित्सक अभ्यास | डॉ. दिपक हरिभाऊ शिंदे | ९६ |
| ३३ | ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद: संदर्भ: नाशिक जिल्हा | प्रा. वर्षा रुपेश मुळाणे | १०० |
| ३४ | अनुकंपा धर्तीवर शासकीय कार्यालयात नोकरी करणाऱ्या महिलावर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचारांचे परिणाम आणि उपाय | कांबळे रावसाहेब हरिबा / डॉ. जो. पी. कोकणे | १०३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | जलजीवन मिशन योजनेचा ग्रामीण महिलांच्या जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास | डॉ. मंजुषा मुरलीधर रसाळ | १०५ |
| ३६ | ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद | छाया शिवाजी सौंदरमल / डॉ. एम. के. सवई | १०९ |
| ३७ | डिजिटल युगात सायबर सुरक्षा, ऑनलाइन छळ आणि डिजिटल साक्षरतेचे महिलांसमोरील आव्हाने | डॉ. सुधीर आश्रुबा येवले / डॉ. दत्ता तंगलवाड / प्रा. चित्ररेखा सुधीर येवले | ११३ |
| ३८ | छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण महिलांमध्ये प्रसूतिपूर्व काळजीचे ज्ञान आणि वापराचे सामाजिक मूल्यमापन | डॉ. बालासाहेब बब्रुवान शेंडगे | ११५ |
| ३९ | ग्रामीण भागातील महिलांचा मालमत्ता अधिकार: कायदेशीर तरतुदी आणि सामाजिक वर्जिततेचा संघर्ष | डॉ. अविनाश शिवाजी वर्धन | ११९ |
| ४० | ग्रामीण महिलांवरील सामाजिक वर्जितता: ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे आणि लिंगभेद | प्रो. (डॉ.) सतिश सर्जेराव देसाई | १२३ |
| ४१ | ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार : कारणे व प्रतिबंधात्मक उपाय | निर्मला कारभारी वाघ | १२७ |
| ४२ | ग्रामीण महिला सबलीकरणापुढील आव्हाने: एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. प्रांजली कदम | १२९ |
| ४३ | कुटुंबसंस्थेत दलित - आदिवासी महिलांचे स्थान आणि धार्मिक नियंत्रण | प्रा. संदिपकुमार भाऊराव रायबोले / डॉ. कमलकिशोर इंगोले | १३१ |
| **संशोधन समिती ०४: प्रसार माध्यमे आणि समाज : : समन्वयक - डॉ. ज्योती गगनग्रास** | | | |
| ४४ | माणदेशी तरंग वाहिनी - ग्रामीण महिलांचे विचारतरंग | प्रा. श्रुती तांबे | १३४ |
| ४५ | ग्रामीण महिला सक्षमीकरण : प्रसार माध्यमांची भूमिका | डॉ. ज्योती सुहास गगनग्रास | १३६ |
| ४६ | सत्योत्तर जग: ग्रामीण समाज आणि डिजिटल विषमता व गैरमाहितीचे/अपमाहितीचे पैलू | डॉ. मेघा देशपांडे | १३८ |
| ४७ | ग्रामीण भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्यावरील वार्तांकनाचे माध्यमांमधील प्रतिनिधित्व: एक संरचनात्मक आणि समाजशास्त्रीय विश्लेषण | पूजा यादव | १४२ |
| ४८ | ग्रामीण भागातील परिवर्तनात माध्यमाची भूमिका | कविता अशोक मोराडे | १४५ |
| ४९ | मराठी चित्रपटांमधील ग्रामीण सामाजिक वास्तवाचे स्थित्यंतर: समाजशास्त्रीय आशय विश्लेषण | प्रा. डॉ. सुनिल माधवराव सिसोदे | १४७ |
| ५० | ग्रामीण समाजावर माध्यमांचा प्रभाव: एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. शशिकांत भाऊसाहेब माळोदे | १५० |
| ५१ | ग्रामीण समाजावर माध्यमांचा प्रभाव | बंडू भाऊसाहेब पाटेकर | १५२ |
| ५२ | डिजिटल माध्यमे, विकास आणि बदलते ग्रामीण लॅंडस्केप : एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रियांका तानाजी हावाळे | १५५ |
| ५३ | ग्रामीण भागातील परिवर्तन आणि माध्यमांची भुमिका | डॉ. गजानन सोनुने / डॉ. जयसिंग सिंगल | १५६ |
| ५४ | ग्रामीण समाजावर सामाजिक माध्यमांचा पडलेला प्रभाव: एक समाजशास्त्रीय अभ्यास | रेखा गौतम साळवे | १५९ |
| ५५ | शेतकरी कुटुंबावर दूरदर्शन कार्यक्रमांचा परिणाम: एक समाजशास्त्रीय अभ्यास -विशेष संदर्भ बुलढाणा जिल्हा | युवराज तेजराव वाघ / प्रा. डॉ. मधुकर हरी चटसे | १६१ |
| ५६ | ग्रामीण भागातील सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक बदलांवर समाज माध्यमांचा प्रभाव-एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. रमेश धोंडीराम राठोड | १६४ |
| ५७ | प्रसार माध्यमे आणि ग्रामीण समाज : एक सामाजिक व विकासात्मक अभ्यास | शुभांगी गोविंदराव चौधरी / डॉ. स्निग्धा आर. कांबळे | १६७ |
| **संशोधन समिती ०५: नागरी समाज : : समन्वयक - डॉ. रवींद्र वाघ** | | | |
| ५८ | नाशिक जिल्हयातील ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य, शासकीय योजना व उपाय योजना: एक चिकित्सक अभ्यास | डॉ. दिपक हरिभाऊ शिंदे | १७१ |
| ५९ | महात्मा गांधींच्या ग्रामनीतीची उपेक्षा आणि ग्रामीण बेरोजगारांची समस्या एक अध्ययन | प्रा. डॉ. मारोती बामणे | १७५ |
| ६० | नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढता प्रभाव | प्रा. डॉ. ज्ञानेश्वर काशिनाथ भामरे | १७७ |
| ६१ | नागरीकरणाचा ग्रामीण जीवनावरील परिणाम: मुर्शिदाबादवाडी गावाचे व्यष्ठी अध्ययन | डॉ. मंजुषा मोतीराम नळगीरकर | १७९ |
| ६२ | नागरीकरण, ग्रामीण शिक्षण व शासकीय धोरणे: समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. संदीप पालवे | १८३ |
| ६३ | नागरीकरणाचा ग्रामीण उद्योगावरील प्रभाव: एक संशोधनात्मक अभ्यास | डॉ. शीला महादेव रामपुरे | १८७ |
| ६४ | ग्रामीण महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांचा अभ्यास | डॉ. सुषमा जालिंदरराव तांगडे | १९० |
| ६५ | भारतातील ग्रामीण-शहरी स्थलांतर आणि आव्हाने | रेखा चांदू गवलवाड | १९२ |
| ६६ | नागरीकरण आणि ग्रामीण कुटंबाचा बदलता कल एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. साळुंके जयसिंग ज्ञानदेव | १९५ |
| ६७ | ग्रामीण व नागरी भागातील बालकामगारांच्या समस्या व उपाय | धर्मा हिम्मत कोळी | १९७ |
| ६८ | नागरीकरणाचा ग्रामीण शिक्षणावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास | नम्रता पंडितराव म्हस्के | २०१ |
| ६९ | मराठवाड्यातील नागरी विकास: समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. साहेब विरभद्रराव पडलवार | २०३ |
| ७० | औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगार: कौशल्ये आणि प्रशिक्षणाचे महत्व: एक सामाजिक अभ्यास | प्रियदर्शन देवानंद ताजणे | २०४ |
| ७१ | ग्रामीण भागातील नवीन रोजगाराच्या संधी | प्रा. रोहिणी मारुती शेलार | २०७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७२ | नागरी समाज आणि परिवर्तन | प्रा.डॉ.विनोद काळू निरभवणे | २०९ |
| ७३ | नागरी समाजातील महिला सक्षमीकरणावर प्रभाव करणाऱ्या मुलभूत घटकांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. वाल्मिक धुडकु इंदासे | २१४ |
| **संशोधन समिती ०६: कृषक समाज आणि स्थित्यंतरे : : समन्वयक - डॉ. हरीष पेटकर** | | | |
| ७४ | ग्रामीण कृषि व्यवस्थेमध्ये महिलांचा दर्जा व भूमिका | डॉ. एच. यू. पेटकर | २१७ |
| ७५ | ग्रामीण कोरकू आदिवासी माता व बाल आरोग्यातील असमानता (लैंगिक भूमिका, संस्कृती आणि स्व-काळजी यांचा परस्परसंबंध) | सुरज जगदीश पवार | २२० |
| ७६ | ऊस उत्पादन, दर (FRP) आणि शेतकरी आर्थिक सुरक्षितता: एक सूक्ष्म अभ्यास | ऋतुराज गायकवाड / डॉ. साहेबराव हिवाळे | २२३ |
| ७७ | ग्रामीण भागातील कृषी व्यवस्थेमध्ये काम करणाऱ्या शेतमजूर महिलाच्या समस्या- एक समाजशास्त्रीय अभ्यास | सिमा मुकुंद कांबळे | २२७ |
| ७८ | भारतीय कृषी आणि आधुनिकीकरणाचा सहसंबंध | डॉ. सुनील प्रल्हाद गायगोल | २३० |
| ७९ | भारतीय कृषीतील संरचनात्मक परिवर्तन आणि शेतमजुरांचे सीमांतीकरण | डॉ. नागेश त्रींबक शेळके / प्रा. रोहोकले मयुर सूर्यभान | २३४ |
| ८० | ग्रामिण समाज व एकल शेतकरी महिलांसमोरील आव्हाने | साईनाथ साटवजी कुंभारे / डॉ. ए. टी. शिंदे | २४० |
| ८१ | झिरो बजेट नैसर्गिक शेती व ग्रामीण कृषिव्यवस्था: एक शाश्वत विकासाचा उपाय | डॉ.सुजाता सुरेश पाटील | २४३ |
| ८२ | ग्रामीण महिलांच्या आरोग्य विकासामध्ये महिला परिचरिकांची भूमिका: विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा | प्रज्ञा सुभाषराव आझादे / प्रा. डॉ. आर. एस. गोरे | २४६ |
| ८३ | ग्रामीण समाजातील कृषी व्यवस्थेमधील ऊस तोड कामगार महिलांचा दर्जा व भूमिका | गोरखनाथ बळीराम वगवाड / प्रो. डॉ. माधव मोरे | २४९ |
| ८४ | भारतीय ग्रामीण समाज आणि महिला | प्रा. हर्षला दौलस सूर्यवंशी | २५३ |
| ८५ | भारतातील ग्रामीण महिलांचे ग्रामीण विकासातील योगदान — एक अध्ययन | डॉ. बळीराम परशराम अवचार | २५५ |
| ८६ | मेळघाटमधील ग्रामीण कोरकू आदिवासींच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनावर समाज माध्यमांचा प्रभाव | लालचंद्र मिरसु सावलकर / डॉ. एच. यु. पेटकर | २५९ |
| ८७ | ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप व कृषीव्यवस्था | प्रा. डॉ. संजय भगत | २६३ |
| ८८ | आधुनिकीकरणामुळे कृषीव्यवस्थे समोरील आव्हाने | प्रा. आनंद गो. मनवर | २६५ |
| ८९ | भारतातील ग्रामीण कृषी व्यवस्था आणि सुशिक्षित बेरोजगारांची सद्यस्थितीः एक समाजशास्त्रीय अध्ययन | दिलीप दामु कुमरे | २६६ |
| ९० | आधुनिकीकरणाचा ग्रामीण कृषी विकासावर झालेला परिणाम | भागवत मंचक मोरे / डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण | २६८ |
| ९१ | आधुनिकीकरणाचा ग्रामीण कृषी विकासावर झालेला परिणाम | सविता भगवान बडे | २६९ |
| ९२ | ग्रामीण विकासामध्ये महिलांचे योगदान | डॉ आल्टे शशिकांत मुकुंदराव | २७२ |
| ९३ | ग्रामीण भागातील गायरानधारक शेतकऱ्यांचे प्रश्न | संदीप कारभारी कापडणे / डॉ. मधुकर हरी चाटसे | २७३ |
| ९४ | महाराष्ट्रातील कृषी पर्यटन : विकासाच्या संधी आणि आव्हाने | प्रा.डॉ. नवनाथ श्रीरंग शिंदे | २७७ |
| ९५ | सेंद्रिय शेती आणि हवामान बदलाचे ग्रामीण शेतीवरील परिणाम | मोनाली देशमुख | २७९ |
| **संशोधन समिती ०७: सामाजिक चळवळी आणि परिवर्तन : : समन्वयक - डॉ. संपत काळे** | | | |
| ९६ | एलिनॉर ऑस्ट्रॉम यांची डिझाइन प्रिन्सिपल्स व गडचिरोली जिल्ह्यातील शंकरपूर गाव : एक समाजशास्त्रीय अध्ययन | पुरुषोत्तम चांदेकर | २८२ |
| ९७ | सांगलीच्या हळदीची कथा : एक सामाजशास्त्रीय अभ्यास | दिपाली विशाल गडदे | २८५ |
| ९८ | ग्रामीण समाजातील जात वास्तव : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. किरण सुरवसे | २८८ |
| ९९ | लिंग असमानता आणि ग्रामीण शिक्षण | प्रा. किशन काशिनाथ घोगरे | २९१ |
| १०० | भारतातील ग्रामीण बेरोजगारीचे स्वरूप आणि प्रमाणः विशेष संदर्भ छत्रपती संभाजीनगर जिल्हा | नलिनी जाधव | २९५ |
| १०१ | ग्रामीण भागातील शिक्षण | साहेब बाबुराव लहाडे / डॉ. एम. के. सवई | २९७ |
| १०२ | महाराष्ट्रातील नैसर्गिक आपत्तींचे गावगाड्यावर होत असलेले परिणाम: समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. संपत काळे | २९९ |
| १०३ | कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंगलज तालुक्यातील बिगर शासकीय संघटनांचे ग्रामीण शाश्वत विकासातील पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रातील योगदान | डॉ. सतिश नामदेव धनवडे | ३०२ |
| १०४ | ग्रामीण लोकांचे प्रश्न आणि विकासाचे धोरण | प्रा. डॉ. दिवाकर एच उराडे | ३०५ |
| १०५ | ग्रामीण समाजातील लोकांचे प्रश्न आणि विकासाचे धोरण : एक अभ्यास | प्रा. डॉ. जाधव विजय | ३०८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०६ | पर्यावरण चळवळी व महिला : ग्रामीण समाजातील उपजीविका, लिंग आणि संघर्ष | डॉ.वर्षा भूषण कांबळे | ३१० |
| १०७ | अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण लोकांचे प्रश्न आणि विकासाचे धोरण: एक अभ्यास | इप्तीसाम नूरमहम्मद पठाण / डॉ. जाधव मनिषा विजय | ३१२ |
| १०८ | ग्रामीण समाजातील सामाजिक परिवर्तन : कुटुंब, विवाह व लिंगभूमिकांतील बदल | भुरेलाल सुरजबन्सी / जयसिंग सिंगल | ३१४ |
| १०९ | सामाजिक चळवळी आणि परिवर्तन : समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास | विजय किसन शेळके | ३१८ |
| ११० | मराठा आरक्षण आणि युवकांची स्थिती: ( विशेष संदर्भ - मराठवाडा ) | डॉ. सुनील व्यंकटेश सामग | ३२२ |
| १११ | पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दुष्काळ निर्मुलन ते सम न्यायी पाणी वाटप चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास (सांगली जिल्हा विशेष) | डॉ संजय शामराव कांबळे | ३२५ |
| **संशोधन समिती ०८: नागरिकांची कर्तव्ये : : समन्वयक - डॉ. नलिनी बोरकर** | | | |
| ११२ | ग्रामीण विकासाची आव्हाने: एक समाजशास्त्रीय अभ्यास | जयश्री सुखदेव बोराडे | ३३० |
| ११३ | ग्रामीण समाज: बालकांचे हक्क आणि वास्तव: एक अध्ययन | डॉ. जयमाला पुंडलिकराव लाडे | ३३२ |
| ११४ | ग्रामीण समाजातील लिंगभाव आणि कुटुंब व्यवस्था | डॉ. माधुरी झाडे | ३३७ |
| ११५ | ग्रामीण विकासाची आव्हाने | डॉ. मोनाली यशवंत बहादुरे | ३४० |
| ११६ | ग्रामीण समाजातील जात आणि धर्मविषयक आव्हाने | डॉ. पांडूरंग रा. मुठ्ठे / प्रा. बी. पी. पवार | ३४३ |
| ११७ | ग्रामीण विकासाची आव्हाने, खाटिक समाज आणि आर्थिक व सामाजिक विकास : एक समाजशास्त्रीय अभ्यास | राजू दिपक खराटे | ३४६ |
| ११८ | ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने | प्रा. स्मिता अशोक पाटील / डॉ. रामचंद्र भिसे | ३४९ |
| ११९ | ग्रामीण समाजातील लिंगभाव रूढीः आव्हाने आणि सक्षमीकरण | डॉ. विनोद श्रावण शेंडे | ३५३ |
| १२० | ग्रामीण समुदायातील शिक्षण आणि विकास : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. सीमा विनायक पाटील | ३५५ |
| १२१ | ग्रामीण विकासातील नागरिकांची कर्तव्ये: सामाजिक, आर्थिक आणि लिंगदृष्टिकोन | कु. साक्षी सतीश देसाई | ३५८ |
| **संशोधन समिती ०९: हिंसा, गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार : : समन्वयक - डॉ. विनोद खेडकर** | | | |
| १२२ | ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप व आव्हाने: एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. सलीम अहेमद शेख | ३६० |
| १२३ | सोशल मिडिया आणि डिजिटल पेमेंट प्रणाली: वाढत्या सायबर गुन्ह्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. गोपाल एम. गांगर्डे | ३६३ |
| १२४ | ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप व आव्हाने | प्रा. डॉ. व्ही. जी. चव्हाण | ३६५ |
| १२५ | भारतीय समाजातील महिला गुन्हेगारीचे पारंपरिक आणि आधुनिक स्वरूप: एक समाजशास्त्रीय अभ्यास | मनिषा आनंद भाकरे | ३६७ |
| १२६ | सायबर गुन्हेगारी ग्रामीण भागात वाढता प्रसार | डॉ. राजू बुरीले | ३७१ |
| १२७ | ग्रामीण विकासाच्या योजनांवर भ्रष्टाचाराचा परिणाम | डॉ. राजेंद्र बगाटे | ३७५ |
| १२८ | ग्रामीण समाजातील जातपंचायती: परंपरा आणि आधुनिकता यामधील संघर्ष | आकांक्षा भूषण कांबळे | ३७९ |
| १२९ | भारतातील काळा पैसा: एक समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. प्रकाश साहेबराव काळवणे | ३८२ |
| १३० | सायबर गुन्हेगारीचा भारतात वाढता प्रसार: एक समाजशास्त्रीय अध्ययन | भाकरे प्रिया आनंद | ३८५ |
| १३१ | तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि डिजिटल पेमेंटमुळे ग्रामीण भागात वाढणारे गुन्हे | प्रा. चिन्मयी धर्मेंद्र मराठे / डॉ. सागर लोकनाथ बडगे | ३८७ |
| १३२ | ग्रामीण हिंसेचे पारंपरिक आणि आधुनिक स्वरूप: समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. विनोद बी. खेडकर | ३९० |
| १३३ | ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने | प्रा. डॉ. मेघराज रामहरी शिंदे | ३९४ |
| १३४ | बालगुन्हेगारांचे सामाजिक अध्ययन: विशेष संदर्भ संभाजीनगर जिल्हा | प्रा. डॉ. एस. के. राठोड / अंकोश गंगाराम जाधव | ३९६ |
| **संशोधन समिती १०: सिमांतिक समूह (जात, जमात, अल्पसंख्याक, भटके-विमुक्त समुदाय आणि वर्ग) वर्जिततेचा प्रश्न : : समन्वयक - डॉ. बाबुराव जाधव** | | | |
| १३५ | ग्रामीण समाजातील सामाजिक असमानता: एक समाजशास्त्रीय अध्ययन | बाबुराव जाधव | ४०० |
| १३६ | ग्रामीण भागातील जातीवाद आणि दलित आत्याचार : एक समाजशास्त्रीय अभ्यास | पूजा कैलास पगारे / डॉ. लक्ष्मणसिंग साळोक | ४०५ |
| १३७ | बालविवाह एक सामाजिक समस्या: समाजशास्त्रीय विश्लेषण | डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे | ४०८ |
| १३८ | आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात बचत गटाची भूमिका (माविम अंतर्गत महिला बचत गटाच्या विशेष संदर्भात) | डॉ. श्रीनिवास एन. पिलगुलवार / प्रा. प्रवीण दिगांबर मुधोळकर | ४१४ |
| १३९ | महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती-जमातीची सद्यस्थिती एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. डॉ. चव्हाण सुखदेव गोविंदराव | ४१८ |
| १४० | नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण आदिवासी समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने | प्रा. विनायक संजय लाडे | ४२१ |
| १४१ | मराठवाड्यातील ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यां समोरील आव्हाने | ज्ञानेश्वर शिवाजी आकृपे | ४२३ |
| १४२ | भिल्ल जमातीच्या विवाहाचे बदलते स्वरूप - एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. डॉ. सुनिल अजाबराव पाटील/ प्रा. गावित हरिदास जकु | ४२६ |
| १४३ | मराठवाड्यातील वैदू जमात एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा) | प्रो. डॉ. दिगंबर एम. तंगलवाड | ४२८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४४ | सिमांतिक समूहातील वैदू भटक्या जमातीचा पारंपरिक व्यवसायातील बदलते स्वरूप व आव्हाने | अशोक भीमराव वाघमोडे | ४३१ |
| १४५ | परधान आदिवासी जमात: जातीय स्मृती, मौखिक परंपरा आणि सांस्कृतिक ओळखीचे बदलते स्वरूप | संजिवनी श्रीकांत जाधव / डॉ. संदिप गोरे | ४३४ |
| १४६ | ग्रामीण भागातील आदिवासी मुलांच्या शिक्षणातील बदलते स्वरूप आणि आव्हाने - विशेष संदर्भ नांदेड जिल्हा | प्रा. महेश शंकरराव हंबर्डे | ४३८ |
| १४७ | ग्रामीण समाजातील जातिवाद व दलित महिलांवरील अत्याचार: एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रणाली अशोक धनेधर / प्रा. डॉ. मधुकर चाटसे | ४४१ |
| १४८ | छत्रपती संभाजीनगर शहरातील अनुसूचित जातीतील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा अभ्यास | शुन्यता मधुकर सावंत | ४४३ |
| १४९ | आदिवासी समाजाचे बदलते स्वरुप | कौशल्या चांगुजी खिल्लारे | ४४६ |
| १५० | अनुसूचित जमातीच्या घटनात्मक हक्कांची लुट: प्रति-संस्कृतीकरण आणि छद्म-संस्कृतीकरणाचा एक चिकित्सक अभ्यास | अनिस शरीफ तडवी / डॉ. सादिक बागवान | ४४७ |
| १५१ | ग्रामीण भागातील महिलांचे बदलते स्वरूप: एक समाजशास्त्रीय अभ्यास | उषा मनोहर काटे | ४५३ |
| १५२ | समाजमाध्यमे आणि येवला तालुक्यातील ग्रामीण समाजातील बदल: एक समाजशास्त्रीय अभ्यास | कु. स्नेहा संजय आहेर | ४५५ |
| १५३ | महिला शेतकऱ्यांच्या प्रगतीमध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सहभाग : समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून एक अभ्यास | प्रा. स्वाती हरिभाऊ काटे / प्राचार्य डॉ रामचंद्र भिसे | ४५८ |
| १५४ | छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जननी व शिशु सुरक्षा योजनेचे कार्यान्वयन व परिणाम : एक विश्लेषणात्मक अभ्यास | सुजाता स्वामी कनके / डॉ. बाळासाहेब. ब. शेंडगे | ४६२ |
| १५५ | ग्रामीण विकासामध्ये महिलांचे योगदान | सोनाली तुकाराम गायके | ४६४ |

# नाशिक जिल्ह्यातील आडगाव गावातील ग्रामीण सातत्य आणि परिवर्तन: एक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. उमेश बाळासाहेब शिंदे** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र व मानवशास्त्र विभाग, के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

**गोषवारा:** या संशोधन लेखाचा उद्देश नाशिक जिल्ह्यातील आडगाव गावातील ग्रामीण सातत्य (Rural Continuity) आणि परिवर्तन (Rural Change) यांचा अभ्यास करणे हा आहे. या अभ्यासात भारतीय समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास यांनी मांडलेला संरचनात्मक प्रकार्यवाद सिद्धांत व समाजशास्त्रीय संकल्पना संस्कृतीकरण, पाश्चिमात्यीकरण आणि आधुनिकीकरण या सिद्धांतांचा वापर करण्यात आला आहे. जलदगतीने बदलणाऱ्या ग्रामीण समाजात परंपरा आणि आधुनिकता यांचा संघर्ष व समन्वय कसा घडतो याचे विश्लेषण या लेखात करण्यात आले आहे.

**प्रस्तावना:** भारतीय समाजव्यवस्थेत गावाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. आडगाव हे नाशिक जिल्ह्यातील एक महत्त्वाचे गाव असून ते नाशिक शहरापासुन 1० कि. मी. अंतरावर आहे. भौगोलिकदृष्ट्या हे गाव सुपीक जमिनींसाठी ओळखले जाते. द्राक्ष, कांदा, डाळिंब, भाजीपाला ही येथील प्रमुख पिके आहेत. लोकसंख्येचा मोठा भाग शेती वा शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांत औद्योगिक वसाहती, शिक्षणसंस्था आणि वाहतूक सुविधा विकसित झाल्यामुळे या गावाच्या सामाजिक रचनेत बदल होत आहेत.

आडगाव हे नाशिक शहरालगत असुन त्याला एक सांस्कृतिक इतिहास आहे. नाशिक परिसराला रामायणकालीन महत्व आहे. (पंचवटी परिसर), त्यामुळे आडगाव परिसर देखील त्या धार्मिक-सांस्कृतिक प्रभावाखाली विकसित झाला. तसेच आडगावालगत राष्ट्रीय महामार्ग (एनएच-३) गेल्यामुळे वाहतुक सोईसुविधा उपलब्ध झाल्या आहेत. आडगाव गावात पूर्वी खुप पाण्याचे आड होते. त्यावरून त्याला आडगाव असे नाव पडले. ग्रामीण समाज हा पारंपरिक मूल्ये, धार्मिक श्रद्धा, जातिनिहाय व्यवस्था, कृषीप्रधान अर्थव्यवस्था आणि सामूहिक जीवनशैलीवर आधारित राहिलेला आहे. आडगाव गावात बारा बलुतेदार आणि अलुतेदार अशी रचना देखील दिसून येते. गावात ग्रामदेवतेच्या उपसानेचा, यात्रांचा मोठा वारसा आहे. संयुक्त कुटुंब पद्धती, पारंपारिक व्यवसायाचे जतन आजही होताना दिसून येते. तथापि, स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण, औद्योगिकीकरण, नागरिकरण, तंत्रज्ञान आणि जागतिकीकरण यांमुळे ग्रामीण समाजात मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले. महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील आडगाव हे असेच एक गाव आहे, जे ग्रामीण परंपरा टिकवून ठेवत असतानाच आधुनिकतेकडे झुकत आहे. या बदलांची समाज मिळविण्यासाठी भारतीय समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास याचा संरचनात्मक प्रकार्यवाद सिद्धांत व समाजशास्त्रीय संकल्पना उपयुक्त ठरतात. त्याच्या आधारे, ग्रामीण सातत्य आणि परिवर्तन यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे.

**संशोधनाचा उद्देश:** आडगाव गावातील पारंपरिक ग्रामीण जीवनपद्धतींचा अभ्यास करणे. गेल्या काही दशकांत घडलेल्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बदलांचे विश्लेषण करणे. ग्रामीण सातत्य आणि परिवर्तन प्रक्रिया समजून घेणे.

**अध्ययन पद्धती:** संशोधनामध्ये वेगवेगळ्या घटकांच्या अभ्यासासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करावा लागतो. माहिती संकलनाच्या पद्धतीचा वापर करून "नाशिक जिल्ह्यातील आडगाव गावातील ग्रामीण सातत्य आणि परिवर्तन: एक समाजशास्त्रीय अध्ययन" या विषयाच्या शास्त्रीय अभ्यासासाठी खालील संशोधन पद्धती अवलंबण्यात आली. यामध्ये नमुना निवड नाशिक जिल्ह्यातील आडगाव गावातील ४० नमुने यासाठी निवडण्यात आले. या संशोधन विषयासाठी खालील दोन स्त्रोतांद्वारे तर ते संकलित करण्यात आली. एक प्राथमिक स्त्रोत संशोधन विषयाची तथ्य प्रामुख्याने या स्त्रोतावर अवलंबून आहेत. यामध्ये निरीक्षण ही संशोधना संबंधी अद्यावत माहिती मिळवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे साधन मानले जाते. अनुसूचित द्वारे मुलाखती सामाजिक संशोधनांमध्ये अनुसूची मुलाखत अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या संशोधनासाठी **आडगाव गावातील** अनुसूची प्रश्नांच्या आधारावर त्या मुलाखती घेण्यात आल्या. प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करून काही निष्कर्ष काढण्यात आले. द्वितीय स्त्रोतात **आडगाव गावाची** माहिती घेण्यासाठी वेगवेगळ्या स्त्रोतांचा आधार घेण्यात आला. यामध्ये शोधनिबंध, विविध संशोधन पत्रिका, संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे नियतकालिके, साप्ताहिके अहवाल व इतर अभ्यासकांनी केलेले संशोधन इत्यादीच्या आधारे संदर्भ साहित्याचा द्वितीय स्त्रोत म्हणून वापर करण्यात आला. **आणि त्यातून आवश्यक असणारी माहिती घेण्यात आलेली आहे.**

**सैद्धांतिक चौकट:** हा अभ्यास प्रामुख्याने भारतीय समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास याचा संरचनात्मक प्रकार्यवाद सिद्धांत व समाजशास्त्रीय संकल्पना यावर आधारित आहे. त्याच्या आधारे, ग्रामीण सातत्य आणि परिवर्तन यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे.

**तथ्यांचे विश्लेषण:** "नाशिक जिल्ह्यातील आडगाव गावातील ग्रामीण सातत्य आणि परिवर्तन: एक समाजशास्त्रीय अध्ययन" या विषयाच्या समाजशास्त्रीय अभ्यासासाठी मुलाखत अनुसूची बनवण्यात आली होती. यामध्ये नमुना निवड नाशिक जिल्ह्यातील आडगाव गावातील ४० नमुन्याचे विश्लेषण करण्यात आले. त्यावरून पुढील मुद्दे दिसून आलेत.

**आडगावमधील ग्रामीण सातत्य:**

**कृषिप्रधान जीवनशैली:** शेती ही अजूनही प्रमुख उपजीविका आहे. शेतीशी निगडीत सण, निबायत, बैलपोळा यांसारख्या परंपरा जपल्या जात आहेत. आजही बैलाच्या मदतीने शेती केली जाते. बऱ्याच घरांमध्ये जनावरे – गाई, म्हशी पाळले जातात. शेतीला जोड धंदा म्हणुन दुग्धव्यवसाय देखील केला जातो.

**कुटुंबपद्धतीतील सातत्य:** आजही आडगावमध्ये संयुक्त कुटुंबपद्धतीचे अस्तित्व दिसते. वडीलधारी मंडळींचा सन्मान, परंपरागत विवाह पद्धती, वधूवर निवडीत कुटुंबाचा सहभाग अशा प्रथा टिकून आहेत.

**धार्मिक व सांस्कृतिक परंपरा:** ग्रामदेवतेची यात्रा, जत्रा, कीर्तन, भजन, वारकरी संप्रदायाची परंपरा या गोष्टी गावाच्या सांस्कृतिक सातत्याचे उदाहरण आहेत. गावात आजही गावातील सर्व लोक सकाळी मंदिरामध्ये जाऊन दर्शन घेतात. गावात वेगवेगळ्या यात्रा उदा. दगडोबा महाराज यात्रा, दत्त जयंती निमित्त यात्रा तसेच चंपाषष्टीच्या दिवशी खंडोबा यात्रा भरते. श्रावण महिन्यात सप्ता असतो त्या वेळेस सात दिवस कीर्तन आणि प्रवचन असते.

**शिक्षण आणि जाणीवेत झालेला बदल:** आधुनिक शिक्षणामुळे तरुण पिढी अधिक जागरूक व विचारशील झाली आहे. उच्च शिक्षणामुळे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**तांत्रिक परिवर्तन:** ड्रिप सिंचन, पॉलीहाऊस शेती, ट्रॅक्टर, थ्रेशर, मोबाईल ॲप आधारित बाजारपेठेची माहिती यामुळे शेती पद्धती बदलत आहेत.

**स्थलांतर आणि शहरी संपर्क:** शहरातील नोकऱ्यांसाठी व शिक्षणासाठी युवक नाशिक, पुणे, मुंबईकडे स्थलांतर करत आहेत. या प्रक्रियेमुळे ग्रामीण जीवनात शहरी मूल्यांचा प्रवेश होत आहे.

**कुटुंबरचनेतील बदल:** लहान व विभक्त कुटुंबांची संख्या वाढते आहे. महिलांचे आर्थिक सहभाग वाढत आहे.

**संस्कृतीकरणाचा प्रभाव:** आडगावमध्ये अनेक मागास सामाजिक गट उच्च सामाजिक गटांचे राहणीमान, आचार आणि प्रतिष्ठा स्वीकृत करत आहेत. शिक्षण व नोकरीला सामाजिक दर्जाचे प्रतीक मानले जाते.

**पाश्चिमात्यीकरणाचा प्रभाव:** आधुनिक शिक्षण, इंग्रजी माध्यमाचा प्रसार, मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया यामुळे जीवनशैली पाश्चिमात्यीकृत झाली आहे.

**आधुनिकीकरणाची प्रक्रिया:** सरकारी योजना, बँकिंग व्यवस्था, डिजिटल इंडिया, उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत अशा योजनांचा प्रभाव दिसून येतो. आजही आडगाव मध्ये पारंपारिक व्यवसाय टिकुन आहेत. आजही आडगाव गावात सुतार गल्ली, डोहार गल्ली, अशा नावाने ओळखले जाते. आजही वंशपरपरेने केले जाणारे व्यवसाय उदा.सुतार काम, चांभार काम, शिंपी केली जातात. परंतु त्यात परिवर्तन होताना दिसुन येते. सुतार काम करणारे आज बंगल्याच्या ग्रील वैगेरे कामे करताना दिसतात. नासिक हे गाव महानगरपालिकेत असुनही गावात पोलीसपाटील याची नियुक्ती आहे. आजही वडीलधारीमंडळी पंच म्हणुन न्याय निवाड्याचे काम करताना दिसुन येतात. थोडक्यात आडगाव गावगाडयात पारंपारिकता टिकुन असुन त्यात सातत्य आणि परिवर्तन दिसुन येते.

**निष्कर्ष:** सदर संशोधन अभ्यासातून असे स्पष्टपणे दिसून येते की, नाशिक जिल्ह्यातील आडगाव गाव हे ग्रामीण समाजाच्या सातत्य आणि परिवर्तन या दोन्ही प्रक्रियांचे सजीव उदाहरण आहे. या गावाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि संस्थात्मक रचनेत पारंपारिक मूल्ये टिकून असतानाच आधुनिकतेचे प्रभावही क्रमाक्रमाने रुजताना दिसून येतात. भारतीय समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास याचा संरचनात्मक प्रकार्यवाद सिद्धांत व समाजशास्त्रीय संकल्पना यावर आधारित आहे. की ग्रामीण समाजातील परिवर्तन ही एक नैसर्गिक व सातत्यपूर्ण प्रक्रिया असून ती परंपरेचा संपूर्ण नाश न करता तिचे रूपांतर करते.

खालील निष्कर्ष या अभ्यासातून दिसून येतात

1) आडगाव गावातील **कुटुंबपद्धतीत परंपरेचे सातत्य** आजही लक्षणीय प्रमाणात दिसून येते. संयुक्त कुटुंबपद्धती, वडीलधाऱ्यांचा सन्मान, विवाह ठरविताना कुटुंबाचा सहभाग आणि पारंपरिक कौटुंबिक मूल्ये यांमुळे ग्रामीण समाजातील सामाजिक स्थैर्य टिकून आहे. तथापि, या परंपरागत व्यवस्थेत हळूहळू बदल घडून येत असून विभक्त कुटुंबांची संख्या वाढत आहे, हे ग्रामीण कुटुंबरचनेतील संक्रमणाचे द्योतक आहे.

२) **कृषीप्रधान अर्थव्यवस्था** ही आडगावच्या ग्रामीण जीवनाचा कणा आहे. शेती ही आजही प्रमुख उपजीविकेचे साधन असून बैलपोळा, निंबायत यांसारख्या कृषी-सांस्कृतिक परंपरा टिकून आहेत. मात्र, आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतीची पारंपरिक स्वरूपात बदल होत असून शेती हळूहळू बाजाराभिमुख आणि व्यावसायिक बनत आहे. यावरून ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णतः पारंपरिक न राहता संक्रमण अवस्थेत असल्याचे स्पष्ट होते.

३) गावातील **धार्मिक व सांस्कृतिक जीवनात सातत्य** प्रकर्षाने जाणवते. ग्रामदेवतेची यात्रा, कीर्तन-भजन, वारकरी संप्रदाय, हरिनाम सप्ताह यांसारख्या परंपरांमुळे सामाजिक एकात्मता आणि सामूहिकता टिकून आहे. या धार्मिक उपक्रमांमुळे गावातील सामाजिक सलोखा, नैतिक मूल्ये आणि सामूहिक ओळख बळकट होत असल्याचे दिसून येते.

४) आधुनिक शिक्षणामुळे आडगावमधील तरुण पिढीमध्ये **सामाजिक जाणीव, बौद्धिकता आणि आकांक्षा** वाढलेल्या दिसतात. उच्च शिक्षणामुळे ग्रामीण युवकांचा दृष्टिकोन व्यापक झाला असून ते केवळ शेतीपुरते मर्यादित न राहता विविध व्यावसायिक क्षेत्रांकडे वळताना दिसतात. यामुळे ग्रामीण समाजात सामाजिक गतिशीलता (Social Mobility) वाढत आहे.

५) **तांत्रिक परिवर्तनामुळे ग्रामीण जीवनशैलीत लक्षणीय बदल** घडून येत आहेत. ड्रिप सिंचन, पॉलीहाऊस शेती, कृषी यांत्रिकीकरण, डिजिटल माध्यमांचा वापर यामुळे उत्पादनक्षमता वाढली असून माहितीपर्यंतचा प्रवेश सुलभ झाला आहे. यावरून ग्रामीण विकासात तंत्रज्ञानाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत असल्याचे स्पष्ट होते.

६) ग्रामीण युवकांचे **शहरी भागांकडे होणारे स्थलांतर** हे आडगावच्या सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे कारण ठरले आहे. स्थलांतरामुळे शहरी मूल्ये, आधुनिक जीवनशैली, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि उपभोगप्रधान संस्कृती ग्रामीण जीवनात प्रवेश करत आहेत. परिणामी, ग्रामीण समाजात पारंपरिक आणि आधुनिक मूल्यांमध्ये संघर्ष तसेच समन्वय दोन्हीही आढळतो.

७) आडगाव गावातील **महिलांच्या भूमिकेत सकारात्मक बदल** होताना दिसतो. महिलांचा आर्थिक व्यवहारात, निर्णयप्रक्रियेत आणि सामाजिक जीवनात वाढता सहभाग हा ग्रामीण समाजातील लैंगिक भूमिकांतील बदल सूचित करतो. तथापि, हा बदल सर्व स्तरांवर समान प्रमाणात घडलेला नसून तो अद्याप प्रक्रियाधीन अवस्थेत आहे.

८) या अभ्यासातून **संस्कृतीकरण, पाश्चिमात्यीकरण आणि आधुनिकीकरण** या समाजशास्त्रीय प्रक्रिया स्पष्टपणे दिसून येतात. मागास सामाजिक गट उच्च सामाजिक गटांचे आचार-विचार स्वीकारत आहेत, तर आधुनिक शिक्षण, इंग्रजी भाषा, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे जीवनशैलीत पाश्चिमात्य प्रभाव वाढत आहे. त्याचबरोबर शासकीय योजनांमुळे ग्रामीण समाज आधुनिक प्रशासकीय आणि आर्थिक व्यवस्थेशी जोडला जात आहे.

९) आडगावमधील **पारंपारिक व्यवसाय आणि जातीनिहाय वस्ती रचना** आजही टिकून असली तरी त्यात लवचिकता आणि परिवर्तन दिसून येते. वंशपरंपरागत व्यवसाय पूर्णतः लोप पावलेले नसून त्यांनी आधुनिक बाजाराच्या गरजांनुसार स्वतःला रूपांतरित केले आहे. यावरून ग्रामीण समाजात बदल हा नकारात्मक न राहता अनुकूलनाच्या स्वरूपात होत असल्याचे दिसते.

1०) महानगरपालिकेच्या हद्दीत असूनही गावातील **पंचपरंपरा, पोलीस पाटील यांसारख्या पारंपारिक सामाजिक नियंत्रण यंत्रणा** आजही कार्यरत आहेत. यावरून असे दिसते की आधुनिक प्रशासनासोबतच पारंपरिक संस्थाही ग्रामीण समाजात आपली उपयुक्तता टिकवून आहेत.

एकूणच या अभ्यासातून असा निष्कर्ष काढता येतो की, आडगाव गावातील ग्रामीण समाज हा **स्थिर किंवा पूर्णतः बदललेला नसून, तो संक्रमण अवस्थेत आहे**. परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील समन्वयातून ग्रामीण समाज नवे स्वरूप धारण करत आहे. त्यामुळे आडगाव गावाचा अभ्यास हा केवळ एका गावापुरता मर्यादित न राहता, महाराष्ट्रातील तसेच भारतीय ग्रामीण समाजातील व्यापक परिवर्तन प्रक्रियेचे प्रतिनिधित्व करणारा ठरतो.

**संदर्भसूची**


१) देशमुख, शरद. (२०1०). *ग्रामीण समाजशास्त्र*. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.
२) फडके, य. दि. (२००५). महाराष्ट्रातील ग्रामीण समाज. पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन.
३) साठे, श्रीकांत. (२०1२). भारतीय समाजरचना आणि परिवर्तन. औरंगाबाद : विद्या प्रकाशन.
४) पाटील, बी. एस. (२००८). ग्रामीण विकास आणि सामाजिक परिवर्तन. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
५) भोसले, अनिल. (२०1५). महाराष्ट्रातील ग्रामीण जीवन. मुंबई : ग्रंथाली प्रकाशन.
६) जाधव, रमेश. (२०11). भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था. पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस.
७) महाराष्ट्र शासन. (२०२०). ग्रामीण विकास धोरणे व अंमलबजावणी. मुंबई : ग्रामीण विकास विभाग.
८) Srinivas, M. N. (1९६२). Caste in Modern India and Other Essays. Bombay: Asia Publishing House.
९) Dube, S. C. (1९५५). Indian Village. London: Routledge & Kegan Paul.
1०) Desai, A. R. (1९८८). Rural Sociology in India. Bombay: Popular Prakashan.
11) Government of India. (२011). Census of India २011. New Delhi: Office of the Registrar General and Census Commissioner, India.
1२) Government of India. (२०२1). Census of India २०२1 (Provisional Reports). New Delhi: Office of the Registrar General and Census Commissioner, India.
1३) Government of Maharashtra. Maharashtra State Gazetteer: Nashik District. Mumbai: Government Press.
1४) Government of India. Rural Development Reports. New Delhi: Ministry of Rural Development.
1५) Mukherjee, R. (1९७४). The Rise and Fall of the East India Company. New Delhi: People's Publishing House.


# ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**जिजाबाई साहेबराव गोसावी** समाजशास्त्र विभाग, कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सिडको, नाशिक

**सारांश:** भारताच्या स्वातंत्र्यप्राप्ती नंतर शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात देखील शिक्षणाचा प्रसार वाढला. तर हे शासकीय, खाजगी पातळीवर देण्यासाठी अनेक शाळा महाविद्यालयांची निर्मिती करण्यात आली. भारतीय समाजात स्वातंत्र पूर्वी भारतातील महिलांना शिक्षण मिळावे यासाठी अनेक समाज सुधारक आणि प्रयत्न केले शिक्षणाचा प्रसार केला. यात सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी आपले योगदान मोठ्या प्रमाणात दिले. स्वातंत्र प्राप्ती नंतर भारतातील विविध राज्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार केला गेला. महाराष्ट्र राज्यात देखील शैक्षणिक कार्य मोलाची कामगिरी करणारे भाऊराव पाटील यांच्या नावाचा आदराने उल्लेख करावा लागेल. मुलींना प्राथमिक, माध्यमिक शिक्षण मिळवून देण्यासाठी भाऊराव पाटील यांचे मोलाचे कार्य महाराष्ट्राला लाभले. शिक्षणामुळे मानवी जीवनातील विविध क्षेत्रात परिवर्तन घडून येते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होणे, त्याच्या काल्पनिक शक्तीचा विकास होणे, त्याच्यात आत्मविश्वास निर्मिती करणे, रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध करून देणे, यामुळे शिक्षण हे प्रत्येक माणसाच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक मानला गेला. शिक्षणाने जीवनातील अनेक समस्यांबाबत सहज मार्ग काढता येतो, असे असतानाही ग्रामीण भागातील मुलींची शिक्षणाबाबत असणारी स्थिती ही अत्यंत दयनीय आहे. ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणामागे अडथळा असण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांच्यात असणारे अज्ञान आणि आत्मविश्वासाचा अभाव हे आहे. शिक्षणामुळे अज्ञानाचे प्रमाण कमी होऊ लागते. महिलांच्या संदर्भात अनेक समस्या महिला सोडवण्यास सक्षम होते परंतु भारतीय समाजात महिलांच्या शिक्षणाकडे पाहण्याचा पारंपारिक दृष्टिकोन हा पूर्वीपासूनच उदासीन आहे. भारतीय समाजामध्ये नागरी भागात पुरुष साक्षरता आणि स्त्री साक्षरता यातील अंतर जरी कमी असले तरी ग्रामीण भागात

स्त्रियांचे शिक्षणाबाबत असणारी परिस्थिती ही तुलनात्मक दृष्टया अत्यंत दयनीय आहे. ग्रामीण भागात पुरुष व स्त्रिया यांच्या शिक्षणातील अंतर हे मोठ्या प्रमाणात जाणवते. भारतीय समाजात असणारा पारंपारिक दृष्टिकोन ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणावर प्रभाव करतो. पारंपरिक दृष्टिकोनानुसार स्त्रियांचे कार्यक्षेत्र हे कुटुंबापुरताच मर्यादित असून कुटुंबाची जबाबदारी स्वीकारणे हे महिलांचे प्राथमिक कर्तव्य मानले जाते. याचा परिणाम बघता ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणातील समस्या मोठ्या प्रमाणात भासतात.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असून मुलींना शिक्षित करणे सामाजिक विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. तथापि भारतातील ग्रामीण समाजामध्ये मुलींच्या शिक्षणाला आजही विविध अडथळ्यांना सामोरे जावे लागते. आजही भारतीय समाज रचनेमध्ये पितृसत्ताक समाज रचना, तसेच पारंपारिक मूल्य व्यवस्था, ग्रामीण भागात असणारी आर्थिक दुर्बलता, बालविवाह यासारख्या लिंगभेदात्मक दृष्टिकोन यामुळे ग्रामीण मुलींच्या शिक्षणात असमानता निर्माण होते. प्रस्तुत संशोधन लेखात ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे आणि लिंगभेदाचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले असून, त्यांचे सामाजिक परिणाम व उपाय योजना यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**मुख्य शब्द:** ग्रामीण समाज, मुलींचे शिक्षण, लिंगभेद, पितृसत्ताक समाज

---

**प्रस्तावना:** समाजशास्त्राच्या दृष्टीने शिक्षण हे सामाजिकीकरणाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. ग्रामीण समाजात शिक्षणावर सामाजिक संरचना, संस्कृती, मूल्य व्यवस्था व सत्ता संबंधांचा प्रभाव दिसून येतो. भारतीय ग्रामीण समाज हा प्रामुख्याने पितृसत्ताक असल्याने मुलींच्या शिक्षणाकडे आजही भारतीय समाजामध्ये दुय्यम दृष्टिकोन ठेवून पाहिले जाते. यामुळे भारतीय समाजामध्ये शैक्षणिक विषमता व सामाजिक असमानता अधिक तीव्र होत आहे.

**संशोधनाचे महत्त्व:** प्रस्तुत संशोधन हे ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणातील समस्या समजून घेण्यासाठी केले जात असून, या संशोधनामुळे ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण घेताना येणाऱ्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अडचणींचे वास्तव्य चित्र समोर येते. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील समाजात मुले- मुली यांच्या शिक्षणाबाबत असलेल्या असमानता, सामाजिक रूढी, प्रथा, परंपरा ह्या सारख्या समस्या अधोरेखित होतात. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व समाजापुढे आणून दिल्यास लिंग समानता, महिला सक्षमीकरण व सामाजिक न्याय यांना चालना मिळेल. शिक्षणात खंड पडण्याची कारणे समजल्यामुळे मुलींची शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय योजना सुचविता येतील. त्याचप्रमाणे पालकांची भूमिका व दृष्टिकोन समजून घेतल्याने त्यांच्या शिक्षणाविषयी सकारात्मक बदल घडून आणण्यासाठी मदत होईल. समाजशास्त्र शिक्षण शास्त्र व महिला अध्यक्ष क्षेत्रातील विद्यार्थ्यांना संशोधकांना हा अभ्यास संदर्भ उपयोगी ठरेल मुलींचे शिक्षण वाढल्यास आरोग्य अर्थकारण सामाजिक विकास यात सुधारणा होऊन देशाच्या सर्वांगीण विकास, प्रगतीस हातभार लागण्यास मदत होईल.

**संदर्भ साहित्य आढावा:**

१) **Government of Maharashtra (Girls' Education Reports):** महाराष्ट्र सरकारच्या अहवालात राज्यातील ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील यश, अनुपस्थिती, शाळा सोडण्याची कारणे आणि शैक्षणिक कार्यक्रमांची प्रभावीता यांचे विस्तृत मापन आहे. हे ठिकाणी, विशेषतः ग्रामीण जिल्ह्यांमध्ये मुलींच्या उपस्थितीत सुधारणा आणि अजूनही राहिलेले अडथळे हे विश्लेषित केले.

२) **UNICEF India (Girl's Education and Gender Equality):** UNICEF च्या अभ्यासानुसार, ग्रामीण भागातील मुली सामाजिक अपेक्षा, लैंगिक भेदभाव आणि सुरक्षिततेशी संबंधित चिंता यामुळे शाळेतून वेळेवर बाहेर पडतात. त्यात मासिक पाळी व्यवस्थापन व स्वच्छतागृह सुविधांचा अभाव मुलींच्या उपस्थितीत मोठा घटक आहे. हे अभ्यास परिणाम **Rural Education Programme** साठी धोरणात्मक सूचना बनविण्यात मदत करतात.

३) **National Education Policy (NEP) २०२० :** NEP २०२० मध्ये मुलींच्या शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. यामध्ये जेंडर-न्युट्रल धोरणे, शिष्यवृत्तींची तरतूद, सुरक्षित शाळा परिसर, आणि संप्रेषण माध्यमे यांचा समावेश आहे. ग्रामीण भागातील मुलींच्या सहभागासाठी नव्या कार्यक्रमांची रूपरेषा दिली आहे आणि विद्यमान अडथळ्यांवर मात करण्यासाठी धोरणात्मक उपाय सुचवले आहेत.मुलींच्या शिक्षणातील प्रगती व अडथळे विश्लेषित केले आहेत. ग्रामीण भागातील मुलींच्या उपस्थितीत आणि पूर्णत्वात लिंगभेद आढळले असून, शिक्षण प्रवेश ते शिकवण यातील लिंग-आधारित असमानता विविध देशांमध्ये दिसून आली. हा आढावा ग्रामीण भारताच्या संदर्भातही उपयुक्त ठरतो. कारण सामाजिक-सांस्कृतिक घटक मुलींच्या शाळा पूर्ण करणे कठीण करतात **UNESCO (Education for All २०००-२०१५)**

४) **Desai & Andrist (Gender Scripts and Age at Marriage):** हे संशोधन लिंगभेद आणि विवाहाची वयोमर्यादा यांच्यातील संबंधांचा अभ्यास करते . ग्रामीण भागातील मुलींचे लवकर विवाह होणे हे शिक्षण संपुष्टात येण्याचे प्रमुख कारण आहे. समाजातील लैंगिक भूमिका (gender scripts) आणि कौटुंबिक अपेक्षा मुलींच्या शिक्षणावर परिणाम करतात. त्यामुळे शिक्षण जगातील सामाजिक बांधिलकीचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

५) **Tilak (Education and Development in India):** Tilak यांच्या कार्यात शिक्षण आणि सामाजिक विकास यांच्यातील संबंधावर जोर दिला आहे. हे ग्रामीण शिक्षणातील आर्थिक व व्यवस्थापकीय अडचणी, सरकारी योजनेची पूर्तता, शिक्षकांची गुणवत्ता आणि विद्यार्थी अनुपस्थिती यांसारख्या मुद्द्यांचा सखोल अभ्यास करतात. मुलींच्या शिक्षणाला धोरणात्मक व आर्थिक दृष्ट्या प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**६) Nambissan (Sociology of Education in India):** Nambissan यांचे काम भारतीय शैक्षणिक व्यवस्थेतील सामाजिक प्रभाव, विविधता आणि असमानता यांचा अभ्यास करते. ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणावर कुटुंब, जातीय भूमिका आणि आर्थिक स्थिती यांचा परिणाम कसा होतो हे वर्णन केले आहे. हे सामाजिक-सांस्कृतिक परिप्रेक्ष्य ग्रामीण विद्यार्थिनींच्या अनुभवांना सखोलतेने समजून घेण्यास मदत करते.

**७) Mukhopadhyay & Seymour (Practising Gender Justice in Education):** हे साहित्य लैंगिक न्याय (Gender Justice) आणि शैक्षणिक प्रणालीतील लैंगिक भेदभाव कमी करण्यावर केंद्रित आहे. ग्रामीण शाळांमध्ये मुलींसाठी सुरक्षित व समर्थनात्मक वातावरण निर्माण करण्याचे उपाय, महिला शिक्षकांची संख्या वाढवणे व पालक-समुदाय सहभाग वाढवणे यांसारख्या उपायांवर भर दिला आहे.

८) **Banerjee (Education, Poverty and Gender in Rural India):** Banerjee यांचा अभ्यास भारतातील ग्रामीण भागातील गरिबी, लिंगभेद आणि शिक्षणातील असमानता यांचा परस्परसंबंध पाहतो. गरीब घरातील मुलींना शिक्षणाचा सर्वात कमी लाभ मिळतो. त्यामुळे आर्थिक व सामाजिक दुराव्याचे प्रभाव अभ्यासात स्पष्ट होते.

**संशोधनाची उद्दिष्टे:** ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील सामाजिक व आर्थिक अडथळ्यांचा अभ्यास करणे. ग्रामीण समाजातील लिंगभेदाचे स्वरूप समजून घेणे. लिंगभेदाचे शैक्षणिक व सामाजिक परिणाम विश्लेषण करणे. समाजशास्त्रीय उपाय योजना सुचविणे.

**गृहीतके:** ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणावर सामाजिक व सांस्कृतिक परंपरांचा नकारात्मक प्रभाव पडतो. ग्रामीण कुटुंबामध्ये आजही मुलांच्या तुलनेने मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य कमी दिले जाते. आर्थिक दुर्बलता ही ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील एक प्रमुख अडथळा आहे. बालविवाहप्रथा ग्रामीण मुलींच्या शिक्षणात अडथळा निर्माण करते. घरगुती कामांची जबाबदारी मुलींवर अधिक असल्यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधा शाळा वाहतूक स्वच्छतागृहे अपूर्वा स्वरूपाचे असल्यामुळे मुलींचे शाळेत जाण्याचे प्रमाण कमी आहे. ग्रामीण समाजातील लिंग भेदात्मक मानसिकता मुलींचे शिक्षणावर प्रतिकूल परिणाम करते. शासकीय योजना व सवलतींची माहिती नसल्यामुळे ग्रामीण मुली त्यांचा पुरेपूर लाभ घेऊ शकत नाही.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंधाचे लिखाण करण्यासाठी "ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद एक समाजशास्त्रीय अभ्यास" या विषयाची निवड करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण याबाबत असणारे विविध प्रश्न, समस्या या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. संशोधन पद्धती प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन करण्यासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. तथ्य संकलन करण्यासाठी दुय्यम स्त्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित शोध प्रबोधनकांचा वापर करण्यात आला आहे. तसेच वर्तमान, मासिक, इंटरनेट इत्यादी साधनसामग्रीचा देखील उपयोग करण्यात आलेला आहे. दुय्यम माहिती स्त्रोतांमध्ये समाजशास्त्रीय ग्रंथ, संशोधन लेख, शासकीय अहवाल, जनगणना व राष्ट्रीय शैक्षणिक अहवालांचा वापर करण्यात आलेला आहे.

**ग्रामीण समाज रचना व मुलींचे शिक्षण:** ग्रामीण समाज रचनेत कुटुंब, जात, धर्म व परंपरा यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. मुलींना प्रामुख्याने गृहिणी व मातृत्वाच्या भूमिकेत पाहिले जाते. परिणामी शिक्षणाला दुय्यम स्थान दिले जाते.

**ग्रामीण मुलींच्या शिक्षणाची सद्यस्थिती: आकडेवारी**

**साक्षरता दर** (*Literacy Rate India):*

| अनु क्र | घटक | साक्षरता दर % |
|---|---|---|
| १) | पुरुष | ८२.४ % |
| २) | स्त्रिया | ६५.८% |

(Censes of India Literacy Rate)

**शालेय गळती दर** (*Dropout Rate – Rural Areas):*

| **अ. क्र.** | **शैक्षणिक स्तर** | **शैक्षणिक स्तर मुलगे (%)** | **मुली (%)** |
|---|---|---|---|
| १) | प्राथमिक | ६.९ | ८.२ |
| २) | माध्यमिक | 1७.० | २1.० |
| ३) | उच्च माध्यमिक | २९.० | ३५.० |

**शाळा सोडण्याची प्रमुख कारणे:**

| **अ क्र** | **घटक** | **साक्षरता दर %** |
|---|---|---|
| १) | घरगुती काम व जबाबदाऱ्या | ३२% |
| २) | आर्थिक अडचणी | २७% |
| ३) | लवकर विवाह | 1८% |
| ४) | सुरक्षिततेचा अभाव | 1३% |
| ५) | शाळेची दूरवरची अंतर | 1०% |

**ग्रामीण मुलींचे शिक्षणातील प्रमुख अडथळे**

**१) मुलींच्या शिक्षणात केला जाणारा भेदभाव:** उपनिषद काळाचा विचार केल्यास मुलींना शिक्षण देण्याचे प्रमाण भारतीय समाजात महत्त्वपूर्ण मानले जाते. मैत्रेय, गार्गी यासारख्या महिलांचा उल्लेख पूर्वीपासून करण्यात येतो. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हेच प्रमाण कमी होत जाते. याला कारण म्हणजे मुलींच्या शिक्षणात केला जाणारा भेदभाव होय. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर शहरी भागाबरोबरच

ग्रामीण भागात देखील शिक्षणाचा प्रसार होत असला तरी तुलनात्मकदृष्ट्या ग्रामीण कुटुंबात मुलींच्या शिक्षणाबाबत मोठ्या प्रमाणात भेदभाव दिसून येतो. मुलगी ही विवाहानंतर दुसऱ्याच्या घरी जाणार आहे. मुलगी म्हणजे परक्याचे धन, तिला शिक्षण देऊन आपल्याला कोणत्या स्वरूपाचा फायदा होणार नाही. या भावनेतून मुलगी दहावी किंवा बारावी पास होतास त्या मुलीच्या विवाहबाबत विचार केला जातो. यातून मुलींच्या शिक्षणाबाबत मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण होतात.

**२) बालविवाह:** भारतीय शासनाने बालविवाह करणे कायद्याने गुन्हा म्हणून जरी जाहीर केलेले असले तरी ग्रामीण भागात असणाऱ्या पारंपरिक प्रथा, परंपरा यांचा पगडा आजही कायमस्वरूपी आपल्याला दिसून येतो. याचा परिणाम म्हणजे ग्रामीण भागात बालविवाहाची प्रथा, शिक्षण क्षेत्राला ठरणारा मोठा अडथळा आहे. ज्या वयात मुलींनी शिक्षण घ्यावे. त्याच वयात तिचा विवाह करून तिच्यासाठी असणारे शिक्षणाचे दारे कायमस्वरूपी बंद होतात.

**३) स्थानिक सुविधांचा अभाव:** ग्रामीण भागामध्ये थोड्याफार प्रमाणात का असेना शिक्षणाचे महत्त्व मुलींच्या पाल्यांना प्राप्त करून दिले जाते. त्याचा परिणाम स्वरूप ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाच्या सुविधा जेमतेम स्वरूपात निर्माण होतात. परंतु माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन सुविधा आजही ग्रामीण भागात निर्माण झालेल्या नाही. याचा परिणाम स्वरूप प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची अवस्था तर बिकट आहेच परंतु माध्यमिक उच्च माध्यमिक शाळेत प्रवेश घेण्याबाबत मुलींच्या पटसंखेत गळती दिसून येते. त्याचप्रमाणे शिक्षकांची कमतरता, शिक्षकांची अनास्था, शिक्षकांचे शाळेत गैरहजर राहण्याचे प्रमाण या स्वरूपाच्या बिकट समस्या आजही ग्रामीण भागाला भेडसावत आहे.

**४) नैसर्गिक आपत्ती:** रोगराई, भूकंप, महापूर, अवर्षण, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे भारतातील खेडी त्रस्त झालेली आहे. नैसर्गिक संकटात सर्वात जास्त परिणाम ग्रामीण भागातील शेती उत्पादनावर होतो. शेतीचे उत्पादन कमी होते. या परिस्थितीत आधीच मुलींच्या शिक्षणाबाबत नकारात्मक दृष्टिकोन पारंपरिक भारतीय समाजात असल्याकारणाने तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे मुलींच्या शिक्षणातील खर्च पालकांना परवडत नाही. यातून मुलींना आपले शिक्षण अर्ध्यावरच सोडावे लागते.

**५) लैंगिक अत्याचार:** ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कितीतरी किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. अशा स्वरूपात या मुलींना लैंगिक स्वरूपाच्या अत्याचारांना देखील सामोरे जाण्याची भीती पालकांमध्ये असते. लैंगिक अत्याचाराबाबत घडणाऱ्या घटना ह्या ग्रामीण परिसरातील सातत्याने घडत असतात. मुलींची छेड काढणे, बलात्कार यासारख्या समस्यांबाबत पालकांच्या मनामध्ये भीती निर्माण होते. अशा घटनांमुळे ग्रामीण कुटुंब उद्ध्वस्त होण्याची शक्यता असते आणि केवळ याच भीती पोटी ग्रामीण भागातील मुलींसाठी शिक्षणाची दारी हे कायमस्वरूपी बंद केले जातात.

**६) पारंपरिक दृष्टिकोन:** ग्रामीण समाजातील लोकांचा मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा पारंपारिक दृष्टिकोन आजही बदललेला नाही. तो नकारात्मक स्वरूपाचा असल्याने मुलींना शिक्षणात गळतीच्या समस्येला सामोरे जावे लागते. ग्रामीण भागामध्ये वंश सातत्य, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि कुटुंबातील सदस्यांच्या सेवा एवढ्या पुरता त्यांचा मुलीं बाबत असणार दृष्टिकोन हा विकसित झालेला दिसून येतो. याचा परिणाम म्हणजे ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केले जाते. शासनाने मुलींच्या शिक्षणासाठी ६ ते १४ वर्षाच्या खालील मुला-मुलींना मोफत शिक्षण, त्याशिवाय मुलींच्या शिक्षणासाठी केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली सर्व राज्य सरकारच्या शैक्षणिक सोयी सवलती सुविधा देण्याचा जरी प्रयत्न केलेला आहे, तरी ग्रामीण भागात असणारा पारंपरिक दृष्टिकोन यामुळे मुलींच्या शाळेतील गळतींचे प्रमाण हे मोठ्या प्रमाणात दिसून येते.

**७) वाहतुकीच्या सुविधांचा अभाव:** मुलींच्या शिक्षणातील गळतीच्या प्रमाणात वाहतुकीच् सुविधांचा अभाव हे एक महत्त्वपूर्ण कारण आपल्याला स्पष्ट करता येईल. कारण ग्रामीण भागात आजही वाहतुकीच्या सुविधा मोठ्या प्रमाणात विकसित झालेल्या नाही. ग्रामीण भागाचे असणारे खराब रस्ते, वाहनांचा तुटवता यामुळे शाळेत ये जा करण्यासाठी मुलींना अनेक प्रकारचे समस्यांना तोंड द्यावे लागते. परिणाम स्वरूप या मुली शिक्षणापासून वंचित राहतात.

**८) पितृसत्ताक व्यवस्था व लिंगभेद:** ग्रामीण समाजातील पुरुषप्रधान मूल्य व्यवस्था, मुलींचे शिक्षणावर मर्यादा, शिक्षण हे मुलींसाठी अनावश्यक आहे अशी समाज रूढी आहे.

**९) आर्थिक विषमता:** दारिद्र्यमुळे कुटुंबातील मर्यादित संसाधने मुलींचे शिक्षणासाठी वापरली जातात. मुलींच्या शिक्षणाला खर्च म्हणून पाहिले जाते.

**१०) बालविवाह व घरगुती जबाबदाऱ्या:** लवकर विवाह व घर कामाची जबाबदारी यामुळे मुलींचे शिक्षण अर्धवट सोडले जाते.

**११) जातीय व सामाजिक भेद:** अनुसूचित जाती जमाती व वंचित समूहातील मुलींना दुहेरी भेदभावाचा सामना करावा लागतो.

**१२) शासनाच्या धोरणांची समाजशास्त्रीय समीक्षा:** शासनाने विविध योजना राबवल्या असल्या तरी त्यांची अंमलबजावणी सामाजिक मानसिकतेची विसंगत ठरते. धोरणात्मक यशासाठी सामाजिक परिवर्तन आवश्यक आहे

**निष्कर्ष:** भारतातील साक्षरतेच्या दरात लिंगभेद स्पष्ट दिसून येतो. ग्रामीण भागात मुलींची साक्षरता मुलांपेक्षा लक्षणीय कमी आहे, विशेषतः माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर. हे भेद मुख्यतः सामाजिक-सांस्कृतिक कारणांमुळे असून मुलींना शाळा सोडण्याची संभाव्यता पुरुषांपेक्षा जास्त आहे. या आकड्यांद्वारे ग्रामीण भागातील शिक्षणातील असमानता मांडली जाते.

ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे हे केवळ शैक्षणिक नसून समाजशास्त्रीय समस्या आहे. लिंगभेद व पितृसत्ताक मानसिकता नष्ट केल्याशिवाय शैक्षणिक समानता शक्य नाही समाज रचनेत परिवर्तन घडवून आणणे ही काळाची गरज आहे.

**उपाययोजना व सूचना:** ग्रामीण समाजात लिंग समते विषयी जनजागृती निर्माण करणे. कुटुंब समुदाय पातळीवर मानसिकतेत बदल करणे. मुलींसाठी सुरक्षित व अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्माण करणे. सामाजिक संस्थांचा व स्वयंसेवी संघटनांचा सहभाग नोंदविणे. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देणारी धोरणे निर्धारित करणे.

**संदर्भसूची:**

- G. B. (२०१३). *Sociology of Education in India*. New Delhi: Oxford University Press Banerjee, N. (२०१६). *Education, Poverty and Gender in Rural India*. Economic and Political Weekly, ५1(२६), ४५–५२.
- Desai, S., & Andrist, L. (२०1०). *Gender Scripts and Age at Marriage in India*. emography, ४७(३), ६६७–६८७.
- Government of India २०२1 educational statistics at a glance
- Government of India. (२०11). *Census of India २०11: Education and Literacy*. New Delhi: Registrar General of India.
- Government of India. (२०२०). *National Education Policy (NEP) २०२०*. Ministry of Education, New Delhi.
- Government of Maharashtra. (२०1८). *Girls' Education and Social Development Reports*. Mumbai: Department of Education.
- Mukhopadhyay, M., & Seymour, D. (२०1२). *Practising Gender Justice in Education*. Oxford: Oxfam Publications.
- Tilak, J. B. G. (२००७). *Education and Development in India: Critical Issues in Public Policy*. New Delhi: Orient Longman.
- UNESCO २०२० gender equality in education
- UNESCO. (२०1५). *Education for All २०००–२०1५: Achievements and Challenges*. Paris: UNESCO Publishing.
- UNICEF. (२०1९). *Girl's Education and Gender Equality in India*. New Delhi: UNICEF India.
- गाडगीळ म २०1७ भारतीय ग्रामीण समाज पुणे कॉन्स्टीनेटल प्रकाशन.
- देशपांडे न २०1९ स्त्री आणि समाज नागपूर विद्या प्रकाशन.
- सेन अमर्त्य, २०1८ Development as Freedom.

# ग्रामीण महिला सक्षमीकरण आणि माध्यमे यांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. पुनम काकड** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

**गोषवारा:** ग्रामीण महिला सक्षमीकरणात माध्यमांची भूमिका: माध्यमे ग्रामीण महिलांमध्ये शिक्षण, आरोग्य, कुटुंबनियोजन, पोषण, कायदेविषयक हक्क आणि शासकीय योजनांविषयी जागरूकता निर्माण करतात. आकाशवाणीवरील महिला केंद्रित कार्यक्रम, दूरदर्शनवरील महिला सक्षमीकरण विषयक मालिका आणि जाहिराती महिलांमध्ये आत्मविश्वास वाढवतात. स्वयं-सहायता गट, बचत गट आणि सूक्ष्म वित्त योजनांची माहिती माध्यमांद्वारे महिलांपर्यंत पोहोचते. ग्रामीण महिलांची साक्षरता अद्यापही पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. निरक्षरता आणि अल्पशिक्षणामुळे माध्यमांपर्यंत पोहोच मर्यादित राहते. मात्र रेडिओ व लोकमाध्यमे यांसारखी सुलभ माध्यमे ग्रामीण महिलांपर्यंत प्रभावीपणे पोहोचताना दिसतात. यावरून असे स्पष्ट होते की माध्यमांची प्रभावीता ही साक्षरतेच्या पातळीशी थेट संबंधित असते. माध्यमे ग्रामीण महिला सक्षमीकरणासाठी प्रभावी साधन असली, तरी त्यांचा परिणाम आपोआप किंवा एकसारखा होत नाही. साक्षरता, आर्थिक स्थिती, सामाजिक रचना आणि तंत्रज्ञान उपलब्धता या घटकांवर माध्यमांच्या प्रभावाचे स्वरूप अवलंबून असते. योग्य नियोजन, समावेशक धोरणे आणि ग्रामीण महिलांच्या गरजांनुसार माध्यमांचा वापर केल्यास सक्षमीकरणाची प्रक्रिया अधिक प्रभावीपणे साध्य होऊ शकते. ग्रामीण महिला सक्षमीकरणासाठी माध्यमे ही परिवर्तनाची प्रभावी सामाजिक शक्ती आहे. समावेशक, लिंग-संवेदनशील आणि शिक्षणाभिमुख माध्यम धोरणे राबविल्यास ग्रामीण महिलांचे सामाजिक व आर्थिक स्थान अधिक बळकट होऊ शकते.

**परवलीचे शब्द :** महिला सक्षमीकरण, माध्यमे, शिक्षण, आरोग्य

**प्रस्तावना:** ग्रामीण महिला सक्षमीकरण ही भारतीय समाजाच्या विकासप्रक्रियेतील एक मूलभूत, व्यापक आणि दीर्घकालीन परिवर्तनाची संकल्पना आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून आजही देशातील मोठा लोकसंख्येचा भाग ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. ग्रामीण समाजरचना ही ऐतिहासिकदृष्ट्या परंपरागत, पितृसत्ताक, जातीय विषमतेवर आधारित आणि लिंगभेदाला पोषक अशी राहिली आहे. या संरचनेत महिलांचे स्थान दुय्यम मानले गेले असून त्यांची भूमिका प्रामुख्याने घरगुती कामकाज, शेतीपूरक श्रम आणि कुटुंबीयांची देखभाल यापुरती मर्यादित ठेवली गेली. परिणामी ग्रामीण महिलांना शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन, निर्णयप्रक्रिया आणि सार्वजनिक जीवनातील सहभाग या क्षेत्रांमध्ये दीर्घकाळ वंचित राहावे लागले आहे. भारतीय ग्रामीण समाजाची रचना ही ऐतिहासिकदृष्ट्या कृषीआधारित, जातीय स्तरांवर विभागलेली आणि पितृसत्ताक मूल्यव्यवस्थेवर आधारित आहे. या समाजरचनेत महिलांचे स्थान दुय्यम मानले गेले आहे. स्त्रीचे मुख्य कार्य घरगुती काम, शेतीपूरक श्रम आणि कुटुंब पालनापुरते मर्यादित राहिले. वारसा हक्क, मालकी हक्क, शिक्षण आणि सार्वजनिक निर्णयप्रक्रिया यांपासून ग्रामीण महिलांना दीर्घकाळ वंचित ठेवण्यात आले. त्यामुळे महिला सक्षमीकरण ही केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक पुनर्रचनेची प्रक्रिया ठरते. ग्रामीण महिलांचे आरोग्य हे सक्षमीकरणाशी थेट निगडित आहे. मातामृत्यू, कुपोषण, रक्तक्षय आणि अपुऱ्या आरोग्यसेवांमुळे महिलांचे जीवनमान खालावते. माध्यमांद्वारे आरोग्यविषयक माहिती, लसीकरण, प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतरची काळजी, स्वच्छता आणि पोषण यांविषयी जनजागृती केली जाते. आशा व अंगणवाडी सेविकांच्या कार्यात माध्यमे पूरक भूमिका बजावतात. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेने समानता, सामाजिक न्याय आणि स्त्री-पुरुष समतेची मूल्ये मान्य केली असली, तरी प्रत्यक्ष सामाजिक वास्तवात ग्रामीण महिलांच्या जीवनात अपेक्षित बदल घडून आलेले दिसत नाहीत. निरक्षरता, दारिद्र्य, बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार, आरोग्यविषयक दुर्लक्ष, आर्थिक अवलंबित्व आणि सामाजिक रूढी-परंपरा या समस्या आजही ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणात

अडथळा ठरत आहेत. त्यामुळे महिला सक्षमीकरण ही केवळ कल्याणकारी योजना किंवा आर्थिक मदतीपुरती मर्यादित न राहता ती सामाजिक मानसिकता, मूल्यव्यवस्था आणि सत्तासंबंध यामध्ये परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया ठरते.

या संदर्भात माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आणि निर्णायक ठरते. माध्यमे ही समाजातील माहिती, ज्ञान, मूल्ये आणि विचारांचे वहन करणारी प्रभावी सामाजिक संस्था आहे. माध्यमांच्या माध्यमातून समाजातील दुर्बल घटकांपर्यंत माहिती पोहोचवणे, जाणीव-जागृती निर्माण करणे आणि परिवर्तनाची प्रक्रिया वेगवान करणे शक्य होते. ग्रामीण महिलांच्या संदर्भात माध्यमे त्यांना शिक्षण, आरोग्य, कायदेविषयक हक्क, शासकीय योजना, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक सहभागाबाबत जागरूक करण्याचे कार्य करतात. विशेषतः रेडिओ, दूरदर्शन, लोकमाध्यमे आणि अलीकडील काळातील डिजिटल माध्यमे ग्रामीण महिलांच्या जीवनात नवे पर्याय आणि संधी उपलब्ध करून देत आहेत. आजच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात माध्यमांचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. पारंपरिक माध्यमांबरोबरच डिजिटल आणि सामाजिक माध्यमांनी ग्रामीण महिलांसाठी संवादाचे, अभिव्यक्तीचे आणि आर्थिक संधींचे नवे दालन खुले केले आहे. स्वयं-सहायता गट, महिला उद्योजकता, ग्रामविकास योजना आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील महिलांचा सहभाग यामध्ये माध्यमांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे दिसून येते. मात्र दुसरीकडे डिजिटल दरी, साक्षरतेचा अभाव आणि माध्यमांमधील स्त्रीचे रूढीवादी चित्रण ही आव्हानेही तितकीच महत्त्वाची आहेत.

म्हणूनच ग्रामीण महिला सक्षमीकरण आणि माध्यमे यांचा परस्परसंबंध समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासणे अत्यंत आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधन लेखात ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत माध्यमांची भूमिका, योगदान, मर्यादा आणि भविष्यातील शक्यता यांचा सविस्तर व विश्लेषणात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) ग्रामीण महिला सक्षमीकरणाची संकल्पना स्पष्ट करणे. २) माध्यमांचे प्रकार आणि त्यांची सामाजिक भूमिका समजावून सांगणे. ३) ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणात माध्यमांचे योगदान अभ्यासणे.

**अभ्यासपद्धती:** हे संशोधन दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे. यामध्ये शोधनिबंध, विविध संशोधन पत्रिका, संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे नियतकालिके, साप्ताहिके अहवाल व इतर अभ्यासकांनी केलेले संशोधन इत्यादीच्या आधारे संदर्भ साहित्याचा द्वितीय स्रोत म्हणून वापर करण्यात आला.

**ग्रामीण महिला सक्षमीकरण: संकल्पना व सैद्धांतिक चौकट:** यात महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात समान संधी, अधिकार आणि निर्णयक्षमता प्रदान करण्याची प्रक्रिया होय. अमर्त्य सेन यांचा 'क्षमता दृष्टिकोन' *(Capability Approach)* हा सक्षमीकरणाचा महत्त्वाचा सैद्धांतिक आधार आहे. त्यांच्या मते विकास म्हणजे केवळ उत्पन्नवाढ नसून व्यक्तीच्या निवडी, स्वातंत्र्य आणि क्षमतांचा विस्तार होय. ग्रामीण महिलांच्या संदर्भात सक्षमीकरण म्हणजे शिक्षण, आरोग्य, रोजगार, माहिती आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणे.

**संदर्भ साहित्याचा आढावा:** ग्रामीण महिला सक्षमीकरण आणि माध्यमे या विषयावर देशी-विदेशी पातळीवर समाजशास्त्र, स्त्रीअभ्यास, ग्रामीण विकास आणि माध्यम अभ्यास या शाखांमध्ये विविध संशोधन झालेले आढळते. या अभ्यासांचा आढावा घेतल्यास ग्रामीण महिलांच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषण, सक्षमीकरणाची प्रक्रिया आणि माध्यमांची भूमिका स्पष्टपणे समजून घेता येते. एम. एन. श्रीनिवास (१९६६) यांनी *Social Change in Modern India* या ग्रंथात ग्रामीण समाजातील परिवर्तनाची प्रक्रिया स्पष्ट करताना परंपरा, जातव्यवस्था आणि आधुनिकतेचा प्रभाव विशद केला आहे. जरी त्यांनी थेट महिला सक्षमीकरणावर भर दिलेला नसला, तरी ग्रामीण सामाजिक रचनेतील स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचे सूचक विश्लेषण त्यांच्या लेखनात आढळते. ए.आर. देसाई (२००५) यांनी ग्रामीण समाजशास्त्र या ग्रंथात ग्रामीण भारतातील वर्गरचना, आर्थिक विषमता आणि सामाजिक बदल यांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते ग्रामीण महिलांचे शोषण हे आर्थिक अवलंबित्व व सामाजिक असमानतेशी निगडित असून सक्षमीकरणासाठी संरचनात्मक बदल आवश्यक आहेत. एस.सी. दुबे (१९५५) यांच्या *Indian Village* या अभ्यासात भारतीय खेड्याचे सूक्ष्म समाजशास्त्रीय चित्रण आढळते. दुबे यांनी ग्रामीण महिलांची कौटुंबिक व सामाजिक भूमिका स्पष्ट केली असून त्यांच्या मर्यादित निर्णयक्षमतेवर प्रकाश टाकला आहे. अमर्त्य सेन (१९९९) यांनी मांडलेला *Capability Approach* हा महिला सक्षमीकरण अभ्यासाचा महत्त्वाचा सैद्धांतिक पाया मानला जातो. त्यांच्या मते महिलांचे सक्षमीकरण म्हणजे उत्पन्नवाढ नव्हे, तर शिक्षण, आरोग्य, स्वातंत्र्य आणि निवडींचा विस्तार होय. ग्रामीण महिलांच्या संदर्भात माध्यमे ही क्षमतावृद्धीची प्रभावी साधने ठरू शकतात. स्त्रीवादी विचारवंतांनी (*Feminist Scholars)* ग्रामीण महिलांच्या प्रश्नांचा अभ्यास पितृसत्ताकतेच्या चौकटीतून केला आहे. त्यानुसार माध्यमांमधील स्त्रीचे चित्रण अनेकदा रूढीवादी असून ते सक्षमीकरणाऐवजी लिंगभेद पुनरुत्पादित करते. त्यामुळे लिंग-संवेदनशील माध्यमांची गरज अधोरेखित केली जाते. भारतातील महिला व माध्यमे या विषयावर केलेल्या संशोधनांमध्ये असे आढळते की रेडिओ, दूरदर्शन आणि लोकमाध्यमांनी ग्रामीण महिलांमध्ये आरोग्य, शिक्षण आणि कुटुंबनियोजनाबाबत सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. विशेषतः आकाशवाणीवरील महिला केंद्रित कार्यक्रमांचा ग्रामीण महिलांवर मोठा प्रभाव दिसून येतो.

डिजिटल माध्यमांवरील अलीकडील अभ्यास दर्शवितात की स्मार्टफोन व इंटरनेटमुळे ग्रामीण महिलांना आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाच्या नव्या संधी मिळाल्या आहेत; मात्र डिजिटल दरी, साक्षरतेचा अभाव आणि सामाजिक निर्बंध ही मोठी आव्हाने आहेत. वरील संदर्भ साहित्याच्या आढाव्यातून असे स्पष्ट होते की ग्रामीण महिला सक्षमीकरण ही बहुआयामी प्रक्रिया असून माध्यमे त्यामध्ये परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून कार्य करतात. तथापि, बहुतांश अभ्यासांमध्ये ग्रामीण महाराष्ट्राच्या संदर्भातील माध्यमे व महिला सक्षमीकरण यांचा एकत्रित सखोल अभ्यास मर्यादित असल्याचे दिसून येते. प्रस्तुत संशोधन लेख हा त्या अभ्यासातील पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करत

**तथ्यांचे विश्लेषण:** ग्रामीण महिला सक्षमीकरण आणि माध्यमे या विषयाशी संबंधित उपलब्ध तथ्ये, शासकीय अहवाल, समाजशास्त्रीय अभ्यास यांचा एकत्रित विचार केल्यास काही ठळक वास्तव समोर येते. हे तथ्य विश्लेषण ग्रामीण भारतातील महिलांच्या स्थितीचे बहुआयामी स्वरूप स्पष्ट करते. प्रथम, साक्षरतेविषयक तथ्ये पाहिली असता असे आढळते की ग्रामीण महिलांची साक्षरता अद्यापही पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. निरक्षरता आणि अल्पशिक्षणामुळे माध्यमांपर्यंत पोहोच मर्यादित राहते. मात्र रेडिओ व लोकमाध्यमे यांसारखी सुलभ माध्यमे ग्रामीण महिलांपर्यंत प्रभावीपणे पोहोचताना दिसतात. यावरून असे स्पष्ट होते की माध्यमांची प्रभावीता ही साक्षरतेच्या पातळीशी थेट संबंधित असते. दुसरे महत्त्वाचे तथ्य म्हणजे आरोग्य व पोषणाशी संबंधित माहितीचा अभाव. शासकीय अहवालांनुसार ग्रामीण महिलांमध्ये रक्तक्षय, मातामृत्यू आणि कुपोषणाचे प्रमाण तुलनेने जास्त आहे. माध्यमांद्वारे चालविल्या जाणाऱ्या आरोग्यविषयक मोहिमांमुळे (लसीकरण, प्रसूती सेवा, स्वच्छता) महिलांमध्ये जागरूकता वाढल्याचे दिसून येते. त्यामुळे माध्यमे आरोग्य सक्षमीकरणाचे प्रभावी साधन ठरतात. तिसरे तथ्य आर्थिक सक्षमीकरणाशी संबंधित आहे. स्वयं-सहायता गटांशी (*SHGs)* जोडलेल्या महिलांमध्ये उत्पन्ननिर्मिती, बचत सवय आणि आत्मविश्वास वाढलेला दिसून येतो. माध्यमांद्वारे या गटांची माहिती, यशोगाथा आणि प्रशिक्षण कार्यक्रम प्रसारित झाल्यामुळे महिलांचा सहभाग वाढल्याचे विविध अभ्यासांतून स्पष्ट होते. येथे माध्यमे प्रेरक (*Motivational)* घटक म्हणून कार्य करतात.

चौथे तथ्य राजकीय सहभागाबाबत समोर येते. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढले आहे. तथापि, अनेक ठिकाणी महिलांचा सहभाग नाममात्र किंवा प्रतीकात्मक असल्याचे आढळते. माध्यमांद्वारे राजकीय जाणीव, हक्कांची माहिती आणि नेतृत्व प्रशिक्षण दिल्यास महिलांचा प्रभावी सहभाग वाढू शकतो, हे तथ्य अभ्यासातून दिसून येते. पाचवे महत्त्वाचे तथ्य म्हणजे डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव. स्मार्टफोन आणि इंटरनेटमुळे काही ग्रामीण महिलांना शिक्षण, व्यवसाय आणि बाजारपेठेशी थेट संपर्क साधण्याची संधी मिळाली आहे. तथापि, डिजिटल दरी, खर्च, भाषा अडचणी आणि सामाजिक निर्बंध यांमुळे सर्व महिलांना या संधी समानरित्या उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा प्रभाव असमान स्वरूपाचा आहे. सहावे तथ्य माध्यमांमधील स्त्रीप्रतिमेबाबत आहे. अनेकदा माध्यमांमध्ये स्त्रीचे रूढीवादी, मर्यादित किंवा उपभोगवादी चित्रण आढळते. यामुळे सक्षमीकरणाऐवजी पितृसत्ताक मूल्यांची पुनरुत्पत्ती होण्याचा धोका निर्माण होतो. म्हणूनच लिंग-संवेदनशील माध्यम धोरणांची आवश्यकता अधोरेखित होते.

एकूण तथ्य विश्लेषणातून असे स्पष्ट होते की माध्यमे ग्रामीण महिला सक्षमीकरणासाठी प्रभावी साधन असली, तरी त्यांचा परिणाम आपोआप किंवा एकसारखा होत नाही. साक्षरता, आर्थिक स्थिती, सामाजिक रचना आणि तंत्रज्ञान उपलब्धता या घटकांवर माध्यमांच्या प्रभावाचे स्वरूप अवलंबून असते. योग्य नियोजन, समावेशक धोरणे आणि ग्रामीण महिलांच्या गरजांनुसार माध्यमांचा वापर केल्यास सक्षमीकरणाची प्रक्रिया अधिक प्रभावीपणे साध्य होऊ शकते.

समाजशास्त्रीय विश्लेषण: समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून माध्यमे ही सामाजिक बदलाची यंत्रणा म्हणून कार्य करतात. माध्यमे मूल्यसंक्रमण, सामाजिक जाणीव आणि नव्या ओळखी निर्माण करतात. ग्रामीण महिलांच्या संदर्भात माध्यमे पितृसत्ताक मूल्यांना आव्हान देत समतावादी दृष्टिकोन रुजवण्याचे कार्य करतात.

**निष्कर्ष:** ग्रामीण महिलांची साक्षरता अद्यापही पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. निरक्षरता आणि अल्पशिक्षणामुळे माध्यमांपर्यंत पोहोच मर्यादित राहते. मात्र रेडिओ व लोकमाध्यमे यांसारखी सुलभ माध्यमे ग्रामीण महिलांपर्यंत प्रभावीपणे पोहोचताना दिसतात. यावरून असे स्पष्ट होते की माध्यमांची प्रभावीता ही साक्षरतेच्या पातळीशी थेट संबंधित असते. ग्रामीण महिला सक्षमीकरण आणि माध्यमे यांचे नाते परस्परपूरक आहे. माध्यमे केवळ माहिती देत नाहीत, तर मानसिकता बदलण्याचे कार्य करतात. योग्य धोरणे, लिंग-संवेदनशील माध्यम सामग्री आणि तंत्रज्ञानाचा समावेशक वापर केल्यास ग्रामीण महिलांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरण प्रभावीपणे साध्य होऊ शकते. ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण हे भारतीय लोकशाही, सामाजिक न्याय आणि शाश्वत विकासाचे प्रमुख अधिष्ठान आहे. माध्यमे या प्रक्रियेतील प्रभावी साधन असून ती महिलांना आवाज, ओळख आणि संधी प्रदान करतात. भविष्यात माध्यमांचा नियोजित व संवेदनशील वापर केल्यास ग्रामीण भारतातील महिला परिवर्तनाच्या केंद्रस्थानी येऊ शकतात. ग्रामीण महिला सक्षमीकरणासाठी माध्यमे ही परिवर्तनाची प्रभावी सामाजिक शक्ती आहे. समावेशक, लिंग-संवेदनशील आणि शिक्षणाभिमुख माध्यम धोरणे राबविल्यास ग्रामीण महिलांचे सामाजिक व आर्थिक स्थान अधिक बळकट होऊ शकते.

## संदर्भसूची

१) देसाई, ए. आर. (२००५). ग्रामीण समाजशास्त्र. पुणे : साकेत प्रकाशन.
२) फुले, महात्मा ज्योतिराव (२००२). स्त्री-शिक्षण विषयक लेखन. पुणे : महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ.
३) आंबेडकर, डॉ. बाबासाहेब (१९९०). स्त्री प्रश्न व सामाजिक न्याय. मुंबई : सुगावा प्रकाशन.
४) पाटील, शरद (२०१०). भारतीय ग्रामीण समाजरचना. औरंगाबाद : दिशा प्रकाशन.
५) देशमुख, व्ही. टी. (२०१५). ग्रामीण विकास आणि महिला सक्षमीकरण. नागपूर : विदर्भ ग्रंथनिर्मिती मंडळ.
६) जाधव, मीना (२०१८). महिला चळवळ आणि माध्यमे. पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन.
७) पवार, सुनीता (२०१६). ग्रामीण महिला आणि स्वयं-सहायता गट. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
८) काळे, आर. बी. (२०१९). डिजिटल माध्यमे आणि ग्रामीण समाज. नाशिक : यश प्रकाशन.
९) महाराष्ट्र शासन (२०२१). महिला व बालविकास विभाग : वार्षिक अहवाल. मुंबई.
१०) आकाशवाणी, पुणे (२०१७). ग्रामीण महिला कार्यक्रमांचे मूल्यमापन अहवाल.
११) Sen, Amartya (१९९९). Development as Freedom. Oxford University Press.
१२) Srinivas, M. N. (१९६६). Social Change in Modern India. Orient Longman.
१३) Dube, S. C. (१९५५). Indian Village. London : Routledge.
१४) Desai, A. R. (२००५). Rural Sociology in India. Popular Prakashan.

१५) UNESCO (२०१४). Gender Equality and Media Development. Paris.
१६) World Bank (२०१२). World Development Report: Gender Equality and Development. Washington DC.
१७) Agarwal, Bina (१९९४). A Field of One's Own: Gender and Land Rights in South Asia. Cambridge University Press.
१८) Government of India (२०२०). Digital India Programme: Impact on Women. New Delhi.
१९) McQuail, D. (२०१०). McQuail's Mass Communication Theory. Sage Publications.
२०) UN Women (२०१८). Turning Promises into Action: Gender Equality in Media. New York.

# अशासकीय सामाजिक संस्थांचे ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात व परिवर्तनात योगदान

**प्रा. डॉ. सुनील अजाबराव पाटील** समाजशास्त्र विभागप्रमुख, उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, दहिवेल. ता.साक्री. जि. धुळे

**सारांश:** भारतात आणि त्यातल्यात्यात ग्रामीण समाजात समाज प्रबोधनाची परंपरा शेकडो वर्षापासून अस्तित्वात आहे.भारतीय समाजातील एक महत्वाचा भाग म्हणजे ग्रामीण समाज होय. भारतात ग्रामीण समाजात राहणारी लोकसंख्या अधिक आहे. आजही जवळपास ६५ टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात राहते तर महाराष्ट्राचा विचार केला तर ५८% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते हळूहळू शहरीकरणाचे प्रमाण वाढत आहे. त्याच प्रमाणात ग्रामीण भागातील समस्याही वाढतांना दिसत आहेत म्हणून ग्रामीण विकासावर विचार होणे गरजेचे आहे. ग्रामीण विकासासाठी शासकीय स्तरावर आतापर्यंत सतत प्रयत्न सुरू आहेत ग्रामीण भागातील समस्यांचा विचार करून विकासाच्या योजना राबविल्या जातात, केंद्र सरकार अनेक योजना राज्यपातळीवर राबवते परंतु त्या सर्वच योजना योग्य पद्धतीने राबवल्या जात नाहीत केंद्र व राज्य सरकार यांचा समन्वय बऱ्याचदा दिसून येत नाही, काही वेळेस स्थानिक स्तरावर योग्य अंमलबजावणी त्या योजनांची होत नाही गाव पातळीवर नियोजन नसते म्हणून परिणामकारक अंमलबजावणीसाठी गाव पातळीवर सर्व यंत्रणांचा समन्वय साधून त्यावर नियंत्रण ठेवावे व लोकसहभागातून तसेच स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने विकास कसा होईल हा विचार ग्रामीण भागात वर्तमानात महत्त्वाचा ठरत आहे. आधुनिक भारतातील ग्रामीण विकासात एनजीओ चे योगदान महत्त्वाचे आहे. देशाचा विचार केला तर जवळ एक लाखापेक्षा जास्त स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी अनेक अशासकीय संस्था, संघटना या विविध क्षेत्रात अग्रेसर आहेत. बिगर सरकारी संघटनामार्फत केल्या जाणाऱ्या कार्यामुळेच ग्रामीण भागातील विकासात निरंतरता व शाश्वतता आढळून येते.

**मुख्य शब्द:** ग्रामीण समाज, स्वयंसेवी संघटना, विकास, शाश्वतता, परिवर्तन.

**प्रस्तावना:** आपल्या भारतीय समाजाचा अभ्यास केलातर असे लक्षात येते की भारतात शतकानुशतके समाज प्रबोधनाची परंपरा अस्तित्वात असल्याचे दिसून येते अनेक संत, समाज सुधारक, महात्मे यांनी ग्रामीण समाजाची सेवा व प्रबोधन केले हाच वारसा आजही आपल्या राज्यात व देशात सुरू आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात संत महात्म्यानंतर समाजातील विविध संस्थांच्या रूपाने समाज विकासाची कार्य केली केली व ही परंपरा शाश्वत ठेवली ती महात्मा ज्योतिबा फुले सत्यशोधक समाज, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, राजा राममोहन रॉय, संत गाडगेबाबा यांनी जातिभेद नष्ट करून स्त्री शिक्षण, सतीबंदी, बाल विवाह प्रतिबंध, विधवा पुर्नविवाह अशा अनेक सामाजिक, आर्थिक, व राजकीय क्षेत्रात सुधारणावादी तसेच ग्रामीण समाज मनाला जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. याच कार्याची प्रेरणा घेऊन आज समाजातील अशासकीय सामाजिक संस्थां म्हणजेच स्वयंसेवी संस्था कार्य करत आहेत.

भारतात ग्रामीण समाजात राहणारी लोकसंख्या अधिक आहे. आजही जवळपास ६५ टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात राहते तर महाराष्ट्राचा विचार केला तर ५८% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते हळूहळू शहरीकरणाचे प्रमाण वाढत आहे परंतु त्याच प्रमाणात ग्रामीण भागातील समस्याही वाढताना दिसत आहेत म्हणून ग्रामीण विकासावर विचार होणे गरजेचे वाटते. ग्रामीण समाजाचा आरंभ हाच मानवी संस्कृतीचा आरंभ आहे जवळपास 1२ लाख वर्षांचा शेती समाजाचा इतिहास आहे ग्रामीण समाजाची ओळख ही शेतीमध्येच आहे परंतु हळूहळू ग्रामीण विकासाची प्रक्रिया बदलत केली आर्थिक विकासाशी सामाजिक विकासाचा संबंध आला आणि यातूनच ग्रामीण विकासाची प्रक्रिया गतिमान होत गेलेली दिसून येते. ग्रामीण विकासासाठी सरकारी स्तरावर आतापर्यंत नेहमी प्रयत्न सुरू आहेत ग्रामीण भागातील समस्यांचा विचार करून विकासाच्या योजना राबविल्या जातात केंद्र सरकार अनेक योजना राज्यपातळीवर राबवते परंतु त्या सर्वच योजना योग्य पद्धतीने राबवल्या जात नाहीत केंद्र व राज्य सरकार यांचा समन्वय बऱ्याचदा दिसून येत नाही काही वेळेस स्थानिक स्तरावर योग्य अंमलबजावणी त्या योजनांची होत नाही गाव पातळीवर नियोजन नसते म्हणून परिणामकारक अंमलबजावणीसाठी गाव पातळीवर सर्व यंत्रणांचा समन्वय साधून त्यावर नियंत्रण ठेवावे व लोकसहभागातून तसेच स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने विकास कसा होईल हा विचार ग्रामीण भागात वर्तमानात महत्त्वाचा ठरत आहे. स्वयंसेवी संस्था या समाज विकासाच्या काम करणाऱ्या खाजगी संस्था असतात त्यांना नॉन गव्हर्मेंट ऑर्गनायझेशन(NGO) असे म्हटले जाते. आधुनिक भारतातील ग्रामीण विकासात एनजीओ चे योगदान महत्त्वाचे आहे. देशाचा विचार केला तर जवळ एक लाखापेक्षा जास्त स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत म्हणून संशोधकाने ग्रामीण भागातील विकासात स्वयंसेवी संस्थांची भूमिका नेमकी कशा स्वरूपाची आहे? स्वयंसेवी सस्थांचे प्रकार कोणते? कोणकोणत्या क्षेत्रात स्वयंसेवी संघटना कार्यरत आहेत? या मुद्द्यांवर आपल्या संशोधनातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाचा उद्देश**: प्रस्तुत संशोधनकार्यासाठी संशोधकाने खालील उद्देश डोळ्यासमोर ठेवले आहेत. १) स्वयंसेवी संस्थांचा अर्थ समजून घेणे. २) ग्रामीण विकासात स्वयंसेवी संस्थांची भूमिका काय आहे हे तपासणे. ३) ग्रामीण विकासाची प्रक्रिया समजून घेणे. ४) ग्रामीण विकासात स्वयंसेवी संस्था समोरील आव्हाने कोणती? हे अभ्यासणे.

**संशोधनाची गृहीतके**: प्रस्तुत संशोधन विषयावर अभ्यास करत असताना पुढील उपकल्पना डोळ्यासमोर ठेवून संशोधनाला चालना दिलेली आहे. १) ग्रामीण विकासात स्वयंसेवी संघटनांची योगदान महत्त्वाचे आहे. २) समाजाच्या विविध क्षेत्रात अशासकीय संस्था कार्यरत आहेत परिणामी ग्रामीण विकासाची प्रक्रिया नेहमी सुरू असते. ३) शासनाच्या सर्वच योजना ग्रामीण घटकांपर्यंत पोहोचत नाहीत. ४) शासनाच्या बरोबरीने स्वयंसेवी संस्था या समाज विकासात अग्रेसर आहेत.

**संशोधन तंत्र व पद्धती:** प्रस्तुत संशोधन विषयात संशोधन करीत असताना प्रामुख्याने निरीक्षण व मुलाखत या तंत्रांच्या आधारे प्राथमिक तथ्य संकलित केलेली आहेत तसेच ग्रंथालय अभ्यास पद्धतीचा उपयोग करून, विविध संदर्भ ग्रंथ, त्रैमासिके, मासिके, वर्तमानपत्र व विविध संकेतस्थळांचा आधार घेऊन दुय्यम तथ्य संकलित केलेली आहेत.

**विषय विश्लेषण:** स्वयंसेवी संस्थांचा अर्थ वा संकल्पना- गैरशासकीय संघटनांना स्वयंसेवी संस्था असे म्हटले जाते *(Non Government Organization)* आज या संस्था *NPO (Non Profitable Organization)*म्हणून ही ओळखल्या जातात. संयुक्त राष्ट्र- "शासकीय नियंत्रणापासून स्वतंत्र असलेल्या कोणत्याही प्रकारच्या खाजगी संघटनेस बिगर शासकीय संघटना असे म्हणतात". खंडाकडे चंद्रकांत-"मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने लोकपयोगी कार्य करणाऱ्या पण शासकीय यंत्रणेचा भाग नसलेल्या ऐच्छिक संघटनेस बिगर शासकीय संघटना म्हणजेच स्वयंसेवी संघटना असे म्हणतात". एकंदरीत वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर स्वयंसेवी संघटनेचे स्वरूप स्पष्ट करता येईल.

स्वयंसेवी संघटना या सार्वत्रिक असतात म्हणजेच जगातील सर्वच देशात या संघटनांची अस्तित्व पहावयास मिळते विकसित अविकसित विकसनशील अशा सर्वच प्रकारच्या देशांमध्ये स्वयंसेवी संघटना स्थापन आहेत व त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. स्वयंसेवी संघटनेची विविध स्तर दिसून येतात स्थानिक क्षेत्रीय राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय अशा विविध पातळीवर स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर रेड क्रॉस, मानवी हक्क आयोग, लाइन्स क्लब, रोटरी क्लब अशा विविध स्वयंसेवी संघटना कार्यरत आहेत. ग्रामीण विकासाची संकल्पना ही व्यापक स्वरूपाची आहे. या संकल्पनेचे अनेक पैलू आहेत गावांचा विकास म्हणजेच ग्रामीण विकास असेही म्हटले जाते. प्रा. एम. एन श्रीनिवास यांच्या मते गाव हे समाजाचे मास्टर की आहे. गावाचा विकास झाला तरच समाजाचा विकास होईल. ग्रामीण भागातील उपलब्ध साधनसामग्रीचा, खनिज संपत्तीचा व पर्यावरणाचा योग्य वापर करून ग्रामीण जनतेला समाधान पर जीवन जगता यावे अशी परिस्थिती निर्माण करणे म्हणजे ग्रामीण विकास. 1९५० च्या शतकात अमेरिकन समाजशास्त्रज्ञांनी भारतीय खेड्यांचा अभ्यास करून ग्रामीण समाजशास्त्र योगदान दिले. प्लेटो यांनी असे म्हटले होते की - "भारतीय समाजाचे चारित्र्य हे भारतीय खेड्यातून प्रतिबिंबित होते". ग्रामीण समाजाच्या अभ्यासामुळे ग्रामीण संस्कृती सर्वांना माहीत झाल्यामुळे गावाच्या विकासाचे प्रश्न सोडवण्यासाठी योजना आखायला मदत झाली. विकासाच्या नजरेने गावाकडे बघितले जाते. ग्रामीण विकासाच्या प्रश्नातूनच नवनवीन समाजशास्त्रीय परिभाषा आल्यात. स्वातंत्र्यानंतर राज्याने ग्रामीण विकासाची जबाबदारी घेतली. ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजना केंद्र आणि राज्य पातळीवर आखल्यात गाव कसे असेल? तर राज्यांनी जसा आरसा दिला तसे गाव निर्माण होईल. महात्मा गांधींच्या विचारानुसार गावाचा विकास राज्य करणार नाही तर गावातल्या लोकांनाच गावाचा विकास करावा. पंडित जवाहरलाल नेहरू असे म्हणतात-"राज्याच्या सहभागाने व बाहेरच्या मध्यस्थीने ग्रामीण भागाचा गांधीजी व पंडित नेहरू यांच्या विचारातील एकसमान विचार धागा आहे तो म्हणजे ग्रामीण भागाच्या विकासात केवळ शासनाचे योगदान पुरेसे नाही तर त्यासाठी विविध यंत्रणांची, संस्थांची मदत घेऊन ग्रामीण भागाचा विकास करता येऊ शकतो हा विचार प्रबळ झाला.

संशोधकाच्या मते ग्रामीण विकासाची प्रक्रिया निरंतर सुरू आहे ही प्रक्रिया दीर्घकालीन असून गुंतागुंतीची आहे या प्रक्रियेत सरकार प्रयत्नशील आहे सरकारच्या विविध योजना विशेषता कृषी क्षेत्र स्वयंरोजगार ग्रामीण विकास आरोग्य विषय महिला व बालकल्याण वृद्ध अपंग युवा आरोग्य या अनुषंगाने राज्य शासन व केंद्र सरकार पुरस्कृत योजना सुरू आहेत. परंतु या योजनांची अपेक्षित फलनिष्पत्ती दिसून येत नाही शासनाच्या सर्वच योजना खेड्यातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचत नाहीत देयकर्ता व लाभार्थी यांच्यातील नोकरशाहीच्या अकार्यक्षमतेमुळे अनेक मर्यादांमुळे योजनांमधून ग्रामीण विकास होऊ शकला नाही असे संशोधकास वाटते. म्हणूनच केंद्र व राज्य सरकार सोबत आज स्वयंसेवी संस्थांचा सहभाग व सहकार्य हे अत्यावश्यक व गरजेचे आहे असे निदर्शनास येते. स्वयंसेवी संस्थांच्या बाबत दोन विचारधारा आहेत- *A) Non based on Government. B) Not created to earn profit.* काही स्वयंसेवी संस्था 1००% अनुदानित असतात तर काही संस्था कोणतीही अनुदान घेत नाहीत अशा दोन्ही पातळीवर कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आढळतात.

काही स्वयंसेवी संस्था पूर्णतः किंवा अंशतः चॅरिटेबल ट्रस्टवर आधारित असतात. स्वयंसेवी संस्था या प्रामुख्याने मानवाचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्नशील असतात त्यात कल्याणकारी कामे व शासनाच्या विविध योजनांमध्ये सहभागी होणाऱ्या संस्थांचा एक प्रकार असून दुसरा प्रकार हा निश्चित कार्यासाठी वाहून घेतलेल्या संस्थांचा असतो. उदाहरणार्थ-शिक्षण, आरोग्य, महिलांचे सक्षमीकरण, रोजगार, माहितीच्या अधिकारासाठी काम करणाऱ्या संस्था, पर्यावरण संवर्धनासाठी काम करणाऱ्या संस्था, अशा विविध क्षेत्रात स्वयंसेवी संस्था कार्य करतात. ग्रामीण विकासाच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या भारतातील गैर सरकारी संघटनांचे फेडरेशन हे"अवॉर्ड"(Award) नावाने ओळखले जाते. *(Association of voluntary agencies in rural development)* हे अवॉर्ड चे

पूर्ण रूप असून त्याचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे या फेडरेशनची स्थापना ही 1८६० च्या सोसायटी ॲक्टनुसार 1९५८ मध्ये झाली आहे.

**अवॉर्ड फेडरेशनची प्रमुख उद्दिष्टे:** १) गैर शासकीय संघटनांच्या मदतीने ग्रामीण भागाचा विकास करणे. २) ग्रामीण समाजाच्या जलद विकासासाठी प्रयत्न करणे. ३) ग्रामीण समाजाच्या विकासासाठी आर्थिक निधीची उभारणी करणे. ४) ग्रामीण भागात काम करणाऱ्या भारतातील व विदेशातील संघटनांसोबत समन्वय साधून त्यांच्याबरोबर संपर्क प्रस्थापित करणे. ५) विविध परिषद व त्याच्या सत्रांचे आयोजन करून ग्रामीण भागातील प्रश्नांसंबंधी सर्व स्वयंसेवी संघटनांना एकत्रित करून हे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांच्यासोबत चर्चा करणे. ६) ग्रामीण विकासाविषयीची माहिती सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविणे.

**ग्रामीण विकासात स्वयंसेवी संस्थांचे योगदान:** स्वयंसेवी संस्था या ग्रामीण भागात विविध क्षेत्रात कार्य करतात त्यानुसार त्यांच्या कार्यातील विविध सांगता येईल. अ) प्रतिबंधात्मक दृष्टिकोनाने कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था (*Prevention approach)* ब) उपचारात्मक दृष्टिकोन आणि कार्य करणाऱ्या संस्था (*Creative approach)* क) पुनर्वसन क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था (*Prohibitive approach).* ड) विकास क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था (*Development Sector).* म्हणजेच ग्रामीण भागातील विविध प्रश्न व समस्या तसेच परिस्थिती नजरेसमोर ठेवून लोकांचे जीवनमान सुरळीत करून त्यात सुधारणा जागृती केली तरच त्यांचा विकास होईल. पुढे काही स्वयंसेवी संस्थांचा परिचय व कार्य स्पष्ट केलेले आहे. **संस्कृती संवर्धन महामंडळ** या स्वयंसेवी संस्था अंतर्गत अरुण बालग्राम या अनाथ मुलांचे वस्तीगृह चालवले जाते. **सेव्ह दी बेबी गर्ल**-स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी या प्रकल्पाची माहिती पोहोचवण्यासाठी ही संस्था कार्य करते. डॉ. अभय बंग व राणी बंग यांनी गडचिरोली सारख्या दुर्गम आदिवासी भागात सुरू केलेली"**सर्च**" ही स्वयंसेवी संस्था या माध्यमातून अशिक्षित तरुणीला बाळंतपणा संदर्भात परिचारिकेचे प्रशिक्षण दिली व ते यशस्वीपणे कार्य करीत आहे. "**चैतन्य**"ही स्वयंसेवी संस्था सुद्धा कोठारी यांनी राजगुरुनगर, पुणे येथे सुरू केली या संस्थेमार्फत महिलांना बचत गटाच्या माध्यमातून प्रशिक्षण व स्वयंरोजगार निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य करीत आहे. "**चेतना**"ही स्वयंसेवी संस्था गुजरात राज्यात वैद्यकीय क्षेत्रात मोफत वैद्यकीय मदत पुरवणे व आरोग्याविषयी जनजागृती करणे यासाठी कार्यरत आहे. "**यशदा**" पुणे येथील ही स्वयंसेवी संस्था गरजूंना मदत करण्याचे कार्यकर्ते तसेच विविध शासकीय विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. "**युवा**"गरिबी निर्मूलन संदर्भात कार्य करणारी प्रचार व प्रसार यासाठी लोकांपर्यंत विचार पोहोचणारी संस्था आहे. "**स्वच्छ**"ही स्वयंसेवी संस्था पुणे येथे असून गांडूळ प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन, जैव शेती या क्षेत्रात कार्य करीत आहे. "*Water"*"**वॉटर** "भारत व जर्मन देशांच्या संयुक्त विद्यमाने ही राष्ट्रीय स्वयंसेवी संस्था नगर धुळे नाशिक या जिल्ह्यात जनसंधारण व मृदा संधारण या संदर्भात कार्य करीत आहे. "**क्राय अँड केअर**"यासारख्या या शासनाच्या चांगल्या कामांना प्रसिद्धी मिळावी यासाठी कार्य करतात. "**समर्थ अभियान**"ही स्वयंसेवी संस्था स्वयंपूर्ण भारत भविष्यात २०४७ मध्ये कसा असेल? विकसित होण्यासाठी समाजाच्या कोणत्या क्षेत्रात कार्य करावे लागेल या संदर्भात कार्य करणारी संस्था आहे. "**प्रभात विकास मंच**", सातपुडा ग्रामीण विकास संस्था"या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला व युवकांना रोजगार देण्यासाठी, बचत गट स्थापन व कौशल्य विकास आधारित प्रशिक्षण देण्यासाठी धुळे जिल्ह्यात कार्यरत असून जिल्ह्यातील अनेक हातांना काम मिळाले आहे. "**चक्रधर स्वामी बहुउद्देशीय संस्था**"कळवण जिल्हा नाशिक येथील ही सहर्षी संस्था आदिवासी समाजातील तरुण पदवीधर महिला शेतकरी यांना विविध योजनांची माहिती उपलब्ध करून देतात तसेच विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी लागणारी कागदपत्रे विविध फॉर्म तसेच मार्गदर्शन करीत असतात तसेच सुशिक्षित आदिवासी युवकांना नोकरी संदर्भातील अद्यावत माहिती पुरवण्याचे कार्य करीत आहे. "**चिपको**"पर्यावरण बचत व संवर्धन संदर्भात सुंदरलाल बहुगुणा यांच्या प्रेरणेने सुरू झालेले आंदोलन अनेक स्वयंसवी संस्था यात कार्यरत आहेत. "**सप्तशृंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था**, धुळे"या संस्थेच्या माध्यमातून HIV व TB रोगांसाठी आधार केंद्र चालवले जाते जवळपास ६५० पुरुष बचत गटांची स्थापना करून रोजगार निर्मिती केली असून अनेक ग्रामीण बेरोजगार हातांना स्वयंपूर्ण बनवले आहे. तसेच २८ HIV भागीदांचे संसार उध्वस्त होण्यापासून वाचविले आहे. "**भिल्ल सेवा मंडळ**-पंचमहाल, गुजरात, "वनवासी सेवा मंडळ", "आदिम सेवा संघ"अशा स्वयंसेवी संस्था ठक्कर बाप्पांच्या कार्याने प्रेरणा घेऊन गुजरात, महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील आदिवासी भागात कार्य करत आहेत. "**नवजीवन**", "**आम्रपाली**", "**उत्कर्ष**", **स्पर्श**", **शेड** (SHED) अशा विविध संस्था महाराष्ट्रात ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात नवीन उमेद, स्वयंरोजगार, मानसिक आधार, या उद्देशाने कार्य करीत आहेत. "**श्रमिक महिला संस्था**"1९७1 मध्ये महिलांसंबंधी कार्य करणारी मार्क्सवादी विचारांनी प्रेरित असलेली ही स्वयंसेवी संघटना श्रमिक महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचे कार्य करते आहे. "**मातृसेवा संघ**"1९६1 मध्ये नागपूर येथे या संस्थेमार्फत पंचवटी वृद्धाश्रम सुरू झाला. "ग्राहक चळवळी संदर्भात प्रसिद्ध समाजसेवक अण्णा हजारे यांनी सुरू केलेली"**RTI** (राईट टू इफॉर्मेशन) म्हणजेच माहितीचा अधिकार याला अनुसरून कार्य करणाऱ्या देशभरात अनेक सेवाभावी संस्था असून त्या जनता व प्रशासन यातील दुवा म्हणून काम करत आहे. ”**एज्युकेट गर्ल्स**”२००७ पासून ही स्वयंसेवी संस्था शाळा बाह्य मुलींची ओळख पटवून त्यांना सरकारी शाळेत प्रवेश देणेसाठी कार्य करते .आज २० लाखाहून अधिक मुली शाळेत प्रवेशित आहेत .या कार्यामुळे या संस्थेला आशिया खंडातील सर्वात मोठा सन्मान ‘रॅमन मॅगेसेस’ पुरस्कार प्राप्त केलेला आहे.

वरील उल्लेख केलेल्या स्वयंसेवी संस्था ह्या प्राथमिक स्वरूपातील स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण समाजातील लोकांची जीवनमान उंचावण्यासाठी तसेच महात्मा गांधीजींनी"खेड्याकडे चला"या संदेशाला अमलात आणण्यासाठी व भारताला महासत्ता होण्यासाठी ग्रामीण भागातील निसर्ग, पर्यावरण, साधन संपत्तीचा योग्य विनियोग, स्वयंरोजगार, महिला मॅगेसेस क्षमीकरण, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, शेती शिक्षण, कुपोषण याबाबत सुविधा उपलब्ध करून ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान बदलावे

याची व ग्रामीण समाजाचा शाश्वत सामाजिक, आर्थिक, आरोग्य विषयक विकास करण्यामध्ये अग्रेसर असणाऱ्या गैरसरकारी संघटनांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे असे स्पष्ट निदर्शनास येते.

**स्वयंसेवी संघटना या ग्रामीण विकासातील विविध क्षेत्रात काम करीत आहेत** -जसे की 1) अतिमागास ग्रामीण भाग. २) ग्रामीण भागातील लोकांच्या मानवी हक्कांसाठी. ३) ग्रामीण भागातील लोकांना मानवी हक्कांचे प्रशिक्षण देण्यासाठी. ४) ग्रामीण भागातील लोकांना घरे बांधण्यासाठी मार्गदर्शन करणे. ५) ग्रामीण विकासामध्ये लोकांचा सहभाग वाढविणे. ६) ग्रामीण भागाच्या संपूर्ण विकासासाठी सरकारी यंत्रणा व स्थानिक लोकांना प्रेरित करून प्रोत्साहन देणे. ७) ग्रामीण भागातील तळागाळातील तरुणांमध्ये नेतृत्व गुण निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे. ८) ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शन करणे. ९) प्रवीण भागात शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करणे. 1०) ग्रामीण समाजातील लोकांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्नशील असणे. 11) ग्रामीण भागातील बेकारी दूर करण्यासाठी प्रयत्न करणे तसेच अनेक स्वयंसेवी संघटनांनी ग्रामीण उद्योगाची निर्मिती तसेच गृह उद्योगांची निर्मिती करून अनेक तरुणांना उद्योगाचे प्रशिक्षण देण्याचे कार्य हाती घेतले आहे. 1२) विविध स्वयंसेवी गैरसरकारी संघटना या सामाजिक कल्याणच्या उद्देशाने कार्य करीत आहेत त्यामध्ये ग्रामीण भागातील लोकांचे आरोग्य, स्वच्छता, पोषण आहार, कुटुंबकल्याण, स्त्रियांचा विकास, दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी प्रयत्न तसेच रोजगारासाठी चे कार्य या गैरसरकारी संघटना करीत आहेत. तसेच ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी अनेक स्वयंसेवी संस्था संघटना या विविध क्षेत्रात अग्रेसर आहेत- १) पाणी व्यवस्थापन, २) शेतीसंबंधीचे प्रशिक्षण. ३) कुटुंब कल्याण व आरोग्य, ४) शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे. ५) शेती व जमीन विकास संबंधीच्या विविध क्रिया. ६) ग्रामीण पर्यावरणाचे रक्षण करणे, प्रदूषण नियंत्रण तसेच सामाजिक वनीकरणाचे उपक्रम राबविणे. ७) अनुसूचित जाती व जमातीतील महिलांच्या विकासासाठी प्रयत्न करणे. ८) ग्रामीण समाजातील गरीब लोकांची माहिती घेऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विविध संशोधन प्रकल्प राबविणे. ९) ग्रामीण भागातील दुर्बल लोकांसाठी शिक्षण व्यावसायिक प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे. १०) ग्रामीण भागात बचत गट निर्माण करणे त्यांना प्रशिक्षण देणे व त्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करणे.

एकंदरीत देशाच्या विकासात व शासनासोबत केंद्र पातळीवर व राज्य पातळीवर तसेच स्थानिक पातळीवर अनेक लहान मोठ्या बिगर सरकारी संस्था स्वयंप्रेरणेने कार्य करीत आहेत. या स्वयंसेवी संघटनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांच्या विकासासाठी परस्पर समन्वय साधून कार्य करीत आहेत ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी स्वयंसेवी संघटनांचे योगदान फार महत्त्वाचे आहेत. काही स्वयंसेवी संस्थांना अनुदान मिळते तर काही संस्थांना अंशतः अनुदान मिळते तर काही संस्थांना अनुदान मिळतच नाही तर काही संस्था अनुदान घेतही नाहीत केवळ समाजसेवा, देश सेवा या भावनेने हजारो स्वयंसेवी संघटना भारतातील ग्रामीण भागात कार्य करीत आहेत त्यामुळे देशातील व विविध राज्यातील दुर्गम, डोंगरी, आदिवासी ग्रामीण तसेच शहरी भागातही ज्या ठिकाणी प्रशासकीय यंत्रणा अपूर्ण पडतात तसेच शासकीय यंत्रणांचा लाल्फीतशाहीच्या थंड कारभारामुळे जो भाग योजनांपासून परिणामी सामाजिक आर्थिक राजकीय विकासापासून वंचित राहतो त्याला विकासाच्या प्रवाहात आणणे, गरजू लोकांना आधार देणे, स्वतःच्या पायावर उभी करणे, पुनर्वसन करणे यासारखी समाज उपयोगी कार्य बिगर सरकारी संघटनामार्फत होतात त्यामुळेच ग्रामीण भागातील विकासात निरंतरता व शाश्वतता आढळून येते.

**संदर्भ ग्रंथ:**


१) Dr.H.Ramakrishna (२०1३), "the emerging role of NGOs in rural development of India: an assessment", IJSSIR Vol.२(४)
२) Ashok Kumar Sarkar (Ed)-"enjoys and globalization, development and organizational facts.
३) देसाई.ए.आर(२०1२), 'भारतीय ग्रामीण समाजशास्त्र' रावत पब्लिकेशन, जयपूर.
४) बन्सल राजीव (२००९), 'ग्रामीण समाजशास्त्र ', एस.बी.पी.डी. पब्लिकेशन, आगरा
५) भामरे ज्ञानेश्वर(२०२५), 'ग्रामीण समाजशास्त्र' प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
६) देसाई दत्ता, (२००८) 'आजचा सुधारक' मधील लेख.
७) दैनिक दिव्य मराठी लेख ०1/०९/२०२५.
८) http:/www.foundsforngos.org.


# अशासकीय सामाजिक संस्थांचे ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासातील योगदान

**प्रा.पी. एम. कांबळे** समाजशास्त्र विभागप्रमुख, कर्मवीर रावसाहेब थोरात कला व वाणिज्य महाविद्यालय, वणी, नाशिक.

**गोषवारा:** अशासकीय सामाजिक संस्था समाजातील मागासलेले, गरीब व वंचितांच्या हक्कांसाठी लढतात. अशासकीय संस्था ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक क्षेत्रात सकारात्मक व शाश्वत बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असतात. ग्रामीण समुदायाच्या विकासात शिक्षण, सामाजिक पायाभूत सुविधा, उद्योजगता हे सर्व महत्वाची भूमिका बजावतात. ग्रामीण विकासाची व्याप्ती व्यापक व विस्तृत आहे. आर्थिक प्रगतीबरोबरच महिला व मुलांचा विकास, सामाजिक प्रगती, जीवनमानात सुधारणा, सक्षमीकरणासारखे उपक्रम यांचा समावेश होतो. ग्रामीण विकास कार्यक्रमांचा उद्देश ग्रामीण समुदायांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीला चालना देणे हा आहे.ग्रामीण विकासाचा उद्देश ग्रामीण समुदायांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे, ग्रामीण लोकांच्या सहभागाने ग्रामीण जीवनात सुधारणा घडवून आणणे हा आहे. ग्रामीण क्षेत्राचा अविकसित विकास हा ग्रामीण

अर्थव्यवस्थेच्या विकासात एक प्रमुख अडथळा आहे. महिला मंडळे आणि युवा मंडळे यासारख्या जबाबदार लोकसंख्येला चालना देण्यासाठी पूर्णपणे नियोजित प्रयत्न व योजना राबविणे गरजेचे आहे.

**प्रस्तावना:** अशासकीय सामाजिक संस्था समाजात परिवर्तन घडवून आणणारे प्रभावी माध्यम आहे. त्यांचे प्रमुख कार्य ग्रामीण समाजाचे सक्षमीकरण करणे, ग्रामीण योजनांचा विस्तार करणे होय. ग्रामीण समाजात परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य करणे होय. अशासकीय सामाजिक संस्थेस नागरी समाज संघटना, गैर सरकारी संघटना, स्वयंसेवी संघटना या नावाने ओळखले जाते. एक असे संघटन आहे की जे सरकारपासून स्वतंत्र असून लोकांद्वारे सामाजिक, आर्थिक, आणि पर्यावरणीय मुद्यांवर कार्य करण्यासाठी बनविले जाते. ज्याचा मुख्य उद्देश समाजामध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे आणि कल्याणकारी कार्य करणे होय. हे संघटन गैर लाभकारी संघटन असते. ज्यास ट्रस्ट, धर्मादाय ट्रस्ट, सोसायटीच्या रुपात संबोधले जाते. या संस्था स्वास्थ्य, शिक्षण पर्यावरण, मानवाधिकार, विकास या सारख्या क्षेत्रात कार्य करताना दिसून येतात. उदा. अक्षय पत्र फाऊनडेशन, इस्कॉन बेंगलोर शाखेद्वारे कार्य करते. हे संघटन शिक्षण क्षेत्रात कार्य करीत असून भारतातील विद्यार्थ्यांना निशुल्क भोजन उपलब्ध करून देण्याचे कार्य करते. लायन्स क्लब अंतरराष्ट्रीय सेवा संघटन असून स्थानिक आणि वैश्विक स्तरावर सामुदायिक सेवा, मानव सहाय्यता, स्वास्थ्य सेवा क्षेत्रात कार्यरत आहे. पर्यावरण संरक्षण व मधुमेह जागृकतेवर कार्य करते. त्यांचे ब्रीदवाक्य आम्ही सेवा करतो असे आहे. पुण्यातील रोटरी क्लब जेथे व्यवसाय, व्यावसायिक आणि समुदाय नेते समुदायात आणि जागतिक स्तरावर गरिबी, भूक, अन्न या विषयांवर प्रकल्पाद्वारे सेवा प्रदान करतात तसेच जगात जागरूकता वाढविण्यासाठी स्वयंसेवा देतात. त्यांच्याकडून सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. तसेच हे संस्था सामुदायिक सेवा व सदस्यांसाठी नेटवर्किंगद्वारे संपर्क साधतात. पोलिओ निर्मुलन, विविध प्रकल्पांद्वारे आरोग्य, शिक्षण तसेच पर्यावरण यासारख्या स्थानिक लोकांच्या गरजा पूर्ण करतात. नेटवर्किंग व सामजिक उद्देशांसाठी रोटेरीयन सदस्यांना इतर नेत्यांशी जोडतात. रोटरी क्लबचे कार्य उल्लेखनीय आहे. शिक्षण, आरोग्य, समाजसेवा, पर्यावरण संरक्षण या क्षेत्रात ही स्वयंसेवी संस्था कार्य करते.

**संशोधनाचे उद्दिष्ट:** १) ग्रामीण भागात सेवाभावी संस्थांची भूमिका व त्यांचे कार्य जाणून घेणे. २) ग्रामीण जनतेच्या जीवनावर त्यांच्या कार्याचा आरोग्य, शिक्षण, महिला व बाल कल्याण तसेच पर्यावरण चळवळीत काय प्रभाव पडला हे तपासून पाहणे. ३) ग्रामीण विकास कार्यक्रमांचा उद्देश ग्रामीण समुदायांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीला चालना देणे व संतुलित विकास करणे हा आहे. ४) ग्रामीण विकासाचा उद्देश ग्रामीण समुदायांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्याच्या प्रयत्नात ग्रामीण लोकांच्या सहभागाने ग्रामीण जीवन सुधारण्याचे तंत्र शोधणे हा आहे.

**संशोधनाचे गृहीतकृत्ये:** १) सेवाभावी संस्थांच्या कार्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रात सामाजिक व आर्थिक विकासास गती मिळते. २) सेवाभावी संस्थांच्या कार्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्यविषयक जनजागृती व सुविधेत वाढ झाली आहे. ३) सेवाभावी संस्थांच्या हस्तक्षेपामुळे ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा सुधारला आहे. ४) सेवाभावी संस्थांचे ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात प्रभावी योगदान राहिले आहे. ५) सेवाभावी संस्थांच्या कार्यामुळे युवकांमध्ये कौशल्य विकास व रोजगाराच्या संधीत वाढ झाली आहे.

**संशोधनाचे महत्व:** ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासात सेवाभावी संस्थांचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. शासकीय यंत्रणेवर मर्यादा पडत असताना या संस्था थेट गावपातळीवर कार्य करून परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य करतात. शिक्षण क्षेत्रात प्रौढ साक्षरता. कौशल्य विकास कार्यक्रम, गरीब व होतकरू मुलांसाठी वाचनालये, वसतीगृहे, शिष्यवृती मिळवून देणाचे कार्य करतात. आरोग्य व स्वच्छतेच्या क्षेत्रात माता - बाल आरोग्य कार्यक्रम, आत आरोग्य तपासणी शिबिरे, पोषण व आरोग्य जनजागृती करतात. शेती व ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात शाश्वत शेती पद्धतीचे प्रशिक्षण, बचत गट स्थापन करणे, स्वयंरोजगार व लघुउद्योगांना प्रोत्साहन दिले जाते. ग्रामीण भागात दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमांच्या यशात सेवाभावी संस्थांचे योगदान महत्वाचे आहे. ग्रामीण भागात स्वावलंबन व सहभागात्मक विकास घडवून आणण्यात सेवाभावी संस्था महत्वाची भूमिका बजावतात.

**संशोधन आढावा:** पु. ल. देशपांडे, ग्रामीण समाजातील बदल, ग्रामीण समाजाच्या स्थितीचा आणि त्यामधील बदलांचा अभ्यास करणारा एक महत्वाचा ग्रंथ. या ग्रंथात ग्रामीण समाजाच्या बदलत असलेल्या विविध सामाजिक संस्थांची भूमिका तपासण्यात आली आहे. सुबोध चौधरी - "अशासकीय संस्थांची कार्यपद्धती", अशासकीय संस्थांच्या कामकाजाची प्रक्रिया, त्यांची उद्दिष्ट्ये व त्यांच्या कार्यावर आधारीत उत्कृष्ट ग्रंथ. अनंत काणेकर - "ग्रामीण सामाजिक परिवर्तन :एक विश्लेषण " अशासकीय सामाजिक संस्थांचा ग्रामीण समाजाच्या परिवर्तनात विविध स्तरांवर सहभागाविषयी विस्तृत व सखोल अभ्यास करण्यात आला आहे. इ. श. देशमुख – "सामाजिक संस्था आणि परिवर्तन " समाजामध्ये बदल घडवून आणणाऱ्या संस्थांचा कार्यभार, ग्रामीण क्षेत्रात त्यांचा प्रभाव व त्यांच्या कार्यक्षमतेवर विचार करण्यात आला आहे. महात्मा गांधी "ग्रामीण विकास आणि गांधीजींचा दृष्टीकोन", महात्मा गांधींच्या विचारधारेतून ग्रामीण समाजातील बदलांसाठी अशासकीय संस्थांचा कसा उपयोग होऊ शकतो यावर माहिती देण्यात आली आहे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेषनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक व द्वितीयक तथ्य संकलन करून संशोधन कार्य पूर्ण करण्यात आले आहे. संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी संदर्भ ग्रंथ तसेच वेबसाईटचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधन विश्लेषण:** ग्रामीण भागात अशासकीय सामाजिक संस्थांनी शिक्षण क्षेत्रात योगदान दिले आहे. ग्रामीण भागात आश्रम शाळा व वसतीगृहे उभारली. मुलींच्या शिक्षणाला चालना दिली व गळतीचे प्रमाण कमी केले. त्यांनी स्पर्धा मार्गदर्शन, प्रौढ साक्षरता या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शेती व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक भाग म्हणून आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, सेन्द्रिय शेती, पडीत जमीन, पाणलोट क्षेत्र विकास, जलसंधारण प्रकल्प, शेतकरी उत्पादक गट स्थापन केले. तसेच आरोग्य क्षेत्रात माता व

बालआरोग्य, मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, या क्षेत्रात कार्य केले. कुपोषण निर्मुलन, लसीकरण जनजागृती, शौचालय बांधणी या क्षेत्रात महत्वाचे कार्य केले. महिलांनी सक्षम व स्वावलंबी व्हावे यासाठी स्वयं सहायता बचत गट स्थापन केले. उद्योजगता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, त्यासाठीन कौशल्य विकास कार्यक्रम राबविले. सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात देखील उल्लेखनीय कार्य केले. व्यसनमुक्ती अभियान, अंधश्रद्धा निर्मुलन, हुंडाबंदी, कौटुंबिक समुपदेशन, जातीभेद, अस्पृश्यता निर्मुलन व धर्मभेद दूर करण्यासाटी पराकाष्ठेचे प्रयत्न केले. पर्यावरण संवर्धनात जागतिक स्तरावर ग्रीन पीस सारखी स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी, वृक्षारोपण, ग्रामपंचायतीचा सहभाग, पर्यावरण संवर्धनाचे शिक्षण, जलसंवर्धन, जलसंधारण इत्यादीच्या माध्यमातून जनजागृती केली. आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील महामारीच्या काळात वैद्यकीय मदत पुरविणे तसेच अन्न, पाण्याची मदत, दुष्काळ, पूर, पुनर्वसन व पुनर्बांधणी या क्षेत्रात कार्य केले. सेवाभावी संस्था एक गैर लाभकारी संघटन म्हणून ओळखली जाते. सेवाभावी संस्थेचा उद्देश वंचितांचा विकास करणे, समाजाची सेवा करणे. स्वास्थ्य व बालकांचा विकास या क्षेत्रात कार्य करणे होय. बहुउद्देशिय संस्था दिव्यांग मुले, मानसिक दृष्टीने दिव्यांग वयस्कर व्यक्तींना साहाय्य करते. याशिवाय माता -बाल आरोग्य, पर्यावरण, शिक्षण, महिला सक्षमीकरण या क्षेत्रात महत्वाचे कार्य करते. सकाळ माध्यम समूहाचे तनिष्का व्यासपीठ सरकार, उद्योग व स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने ग्रामीण सामाजिक परिवर्तन अभियानांतर्गत स्वच्छता आणि कौशल्य विकासासाठी कार्य करते.

अशासकीय संस्था ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक क्षेत्रात सकारात्मक व शाश्वत बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असतात. ग्रामीण समुदायाच्या विकासात शिक्षण, सामाजिक पायाभूत सुविधा, उद्योजगता हे सर्व महत्वाची भूमिका बजावतात. ग्रामीण विकासाची व्याप्ती व्यापक व विस्तृत आहे. आर्थिक प्रगतीबरोबरच महिला व मुलांचा विकास, सामाजिक प्रगती, जीवनमानात सुधारणा, सक्षमीकरणासारखे उपक्रम यांचा समावेश होतो. ग्रामीण विकास कार्यक्रमांचा उद्देश ग्रामीण समुदायांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीला चालना देणे हा आहे. ग्रामीण लोकांच्या सहभागाने ग्रामीण जीवनात सुधारणा घडवून आणणे हा आहे. ग्रामीण क्षेत्राचा अविकसित विकास हा ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात एक प्रमुख अडथळा आहे. महिला मंडळे आणि युवा मंडळे सारख्या जबाबदार लोकसंख्येला चालना देण्यासाठी पूर्णपणे नियोजित प्रयत्न करणे व योजना राबविणे गरजेचे आहे.

ग्रामीण विकासामध्ये पारंपारिक मूल्यांमध्ये सतत परिवर्तन घडवून आणणे समाविष्ट आहे जेणेकरून वैज्ञानिक ज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विस्तार होत असलेला समूह एकत्रित केला जाऊ शकेल. भारतातील विकासाची व्याप्ती विस्तृत आहे. त्यात केवळ आर्थिक प्रगतीच नाही तर महिला आणि बाल विकास सक्षमीकरण, जीवनाची गुणवत्ता समाविष्ट आहे. स्वयंसेवी संस्था वंचित तसेच दुर्गम प्रदेशांमध्ये आरोग्यसेवा, शिक्षण, आपत्ती निवारण उपक्रम यासारख्या आवश्यक सेवा प्रदान करतात. कृषी क्षेत्रात असंख्य स्वयंसेवी संस्था सक्रीय आहेत. विविध उपक्रमांमध्ये सहभागी आहेत. मानव आणि प्राण्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे आणि नियमीत आरोग्य तपासणी शिबीर, घरांमध्ये सुधारणा करणे, धूररहीत वातावरण निर्माण करणे यासारखे प्रयत्न मानव व प्राण्यांच्या आरोग्य स्थितीत सुधारणा करण्याचे कार्य करतात. विकासासाठी गावे दत्तक घेणे, अन्न, पिण्याचे पाणी, पूर दरम्यान निवारा या सारख्या जगण्यासाठी मुलभूत गरजांचा पुरवठा करणे. ग्रामीण युवकांसाठी सामुदायिक विकास. योजना कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात पाणी, उर्जा, शैक्षणिक संस्था, या सारख्या संस्थांची सुविधा तसेच पायाभूत सुविधा नसल्याने त्यांचा संतुलित विकास होत नाही. सध्याच्या काळात ग्रामीण तरुणांना आणि विशेषतः ग्रामीण महिलांना उद्योजगता विकास क्षेत्रात सक्षम करण्यात प्रचंड यश मिळाले आहे.

**निष्कर्ष:** सेवाभावी संस्था लोकसहभागातून विकास घडवून आणतात. सशक्त व आत्मनिर्भर समाज निर्माण करण्यासाठी मदत करतात. ग्रामीण विकासात स्वयंसेवी संस्था सरकारी आणि खासगी क्षेत्रातील प्रयत्नांमुळे निर्माण झालेल्या कमतरता दूर करून प्रभावीपणे भूमिका बजावतात. ते स्थानिक समुदायातील गरजा समजून घेऊन शिक्षण, आरोग्यसेवा, शेती तसेच सामाजिक-आर्थिक क्षेत्रातील परिस्थिती सुधारण्यासाठी आवश्यक उपाय अंमलात आणतात. या संस्था स्थानिक समुदायांशी थेट संवाद साधतात. नोकरशाहीतील अनेक प्रकारचे अडथळे, निधीची कमतरता यासारखी आव्हाने त्यांच्या समोर असूनही स्वयंसेवी संस्था नवनवीन उपक्रम राबवतात. समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध असतात. स्वयंसेवी संस्थाचा तत्काळ सेवा पुरविण्याबरोबरच शाश्वत विकास, क्षमता बांधणी, धोरणात्मक प्रभाव पडलेला दिसून येतो. समृद्ध समाज निर्माण करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, सरकार तसेच समुदायांमध्ये सतत सहकार्य, सुसंवाद असणे आवश्यक आहे. महिलांचची निर्णय क्षमता वाढली, आर्थिक सहभाग वाढला, सामाजिक प्रतिष्ठेत सुधारणा दिसून आली, पर्यावरण जागृती वाढली. संशोधनातून असा निष्कर्ष निघतो की, सेवाभावी सामाजिक सामाजिक संस्थांचा प्रभाव शाश्वत आणि दीर्घकालीन बदलांसाठी अत्यंत महत्वाचा आहे. परंतु यासाठी स्थानिक नेतृत्व, स्वयंसेवी संस्था तसेच ग्रामीण लोकांमध्ये समन्वय असणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१. देशमुख श. प. (२०२१)ग्रामीण विकास आणि स्वयंसेवी संस्था, विद्या प्रकाशन, पुणे.
२. जोशी अ. र. (२००८)स्वयंसेवी संस्था :संकल्पना व अ कार्य कैलास प्रकाशन, औरंगाबाद.
३. पाटील. भा. रा. (२०१२)ग्रामीण विकासात अशासकीय संस्थांची भूमिका, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर
४. यशदा (२०१४) स्वयंसेवी संस्थांचे प्रशासन व व्यवस्थापन, यशदा प्रकाशन, पुणे.
५. देशपांडे स. म. (२०११) सामाजिक कार्य आणि ग्रामीण विकास, प्रशांत प्रकाशन नाशिक.

# विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेले पर्यावरणीय बदल आणि ग्रामीण लोक जीवनातील रूपांतरण (संदर्भ : नाशिक जिल्हा)

**प्रा. पूजा हिरामण गांगोडे** समाजशास्त्र विभाग, के. टी. एच. एम. महाविद्यालय नाशिक.

**गोषवारा:** प्रस्तुत संशोधनामध्ये नाशिक जिल्ह्यात राबवण्यात आलेल्या विविध विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेले पर्यावरणीय बदल आणि त्याचा ग्रामीण लोक जीवनावर झालेला बहु आयामी परिणाम समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासण्यात आला आहे. औद्योगिक, रासायनिक, धरणे, रस्ते व बांधकाम प्रकल्पांमुळे जल प्रदूषण, वायु प्रदूषण, मातीची गुणवत्ता घट, जैव विविधतेचा ऱ्हास तसेच मानवी आरोग्याशी संबंधित समस्या निर्माण झाल्या आहेत. या पर्यावरणीय बदलांमुळे पारंपरिक शेती, पशु पालन व नैसर्गिक संसाधनावर आधारित उपजीविकेवर परिणाम झाला असून रोजगार, स्थलांतर, सामाजिक संबंध आणि जीवनशैलीत लक्षणीय बदल घडून आले आहेत. औद्योगिकरण, शहरीकरण आणि पायाभूत सुविधांचा विस्तार यामुळे राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली. मात्र या विकास प्रक्रियेचा ग्रामीण भागावर, विशेषतः पर्यावरणावर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाल्याचे वास्तव आहे. ग्रामीण पर्यावरण हे शेती, जलस्रोत, वन संपदा आणि जैव विविधतेवर आधारित असल्यामुळे कोणताही विकासात्मक हस्तक्षेप थेट ग्रामीण समाजाच्या जीवनावर परिणाम करतो. नाशिक जिल्हा हा कृषी, औद्योगिक व धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचा असून येथे धरणे, औद्योगिक व रासायनिक प्रकल्प, महामार्ग, नागरी विस्तार आणि बांधकाम प्रकल्प मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आले आहेत. या प्रकल्पांमुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या असल्या तरी पर्यावरणीय संतुलन बिघडले आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पर्यावरणीय बदल हे केवळ नैसर्गिक स्वरूपाचे नसून ते सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बदलांना कारणीभूत ठरतात. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेले पर्यावरणीय बदल आणि ग्रामीण लोक जीवनातील रुपांतराचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**प्रस्तावना:** स्वातंत्र्योत्तर भारतात विकास ही संकल्पना प्रामुख्याने आर्थिक वाढ, औद्योगिकीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विस्ताराशी जोडली गेली. मोठे उद्योग, धरणे, रस्ते, महामार्ग, नागरी गृहनिर्माण आणि औद्योगिक वसाहती यांद्वारे देशाच्या आर्थिक प्रगतीस गती देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र या विकास प्रक्रियेचा सर्वाधिक आणि थेट परिणाम ग्रामीण भागावर झाल्याचे वास्तव आहे. ग्रामीण पर्यावरण हे शेती, जलस्रोत, वनसंपदा, माती आणि जैवविविधतेवर आधारित असल्यामुळे कोणताही विकासात्मक हस्तक्षेप ग्रामीण समाजाच्या जीवनावर खोलवर परिणाम करतो. नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा जिल्हा असून तो कृषी, औद्योगिक, धार्मिक आणि भौगोलिकदृष्ट्या विशेष स्थान राखून आहे. द्राक्षे व इतर पिकांच्या शेतीसाठी प्रसिद्ध असलेला हा जिल्हा, औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत वेगाने पुढे गेला आहे. औद्योगिक व रासायनिक प्रकल्प, धरणे, महामार्ग, शहरी विस्तार आणि मोठ्या प्रमाणावरील बांधकाम प्रकल्पांमुळे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात लक्षणीय बदल घडून आले आहेत. या विकास प्रकल्पांमुळे रोजगाराच्या काही संधी निर्माण झाल्या असल्या, तरी त्याच वेळी पर्यावरणीय असमतोल वाढल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पर्यावरण ही केवळ नैसर्गिक किंवा भौतिक संकल्पना नसून ती मानवी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाशी घट्टपणे जोडलेली आहे. पर्यावरणातील कोणताही बदल मानवी जीवनशैली, उपजीविका, आरोग्य, सामाजिक संबंध आणि मूल्यव्यवस्थेवर परिणाम करतो. विकास प्रकल्पांमुळे जलप्रदूषण, वायुप्रदूषण, मातीची सुपीकता कमी होणे, वनक्षेत्र घटणे आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्यांचा थेट परिणाम ग्रामीण समाजाच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. ग्रामीण लोकजीवन प्रामुख्याने शेती, पशुपालन आणि नैसर्गिक संसाधनांवर अवलंबून असते. पर्यावरणीय बदलांमुळे पारंपरिक उपजीविकेची साधने संकटात सापडली असून अनेक ग्रामीण कुटुंबांना पर्यायी रोजगार शोधण्यासाठी स्थलांतर करावे लागत आहे. यामुळे ग्रामीण समाजाच्या सामाजिक रचनेत बदल घडून येत असून कुटुंबसंस्था, सामुदायिक जीवनशैली आणि सामाजिक ऐक्य यावर परिणाम होत आहे. तसेच प्रदूषणामुळे आरोग्याशी संबंधित समस्या वाढताना दिसतात, ज्याचा आर्थिक आणि सामाजिक भार ग्रामीण समाजावर पडतो. या पार्श्वभूमीवर विकास आणि पर्यावरण यांतील संबंधाचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते. विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेले पर्यावरणीय बदल आणि त्यातून ग्रामीण लोकजीवनात घडून आलेले रूपांतरण समजून घेतल्याशिवाय शाश्वत विकासाची दिशा ठरवता येणार नाही. म्हणूनच प्रस्तुत संशोधनात नाशिक जिल्ह्यातील विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेले पर्यावरणीय बदल आणि ग्रामीण लोकजीवनातील रूपांतरणाचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा :** अमिता बविस्कर (२०११) - अमिता बविस्कर यांनी भारतातील विकास प्रकल्प आणि पर्यावरणीय बदल यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे. त्यांच्या मते धरणे, औद्योगिक व मोठे पायाभूत प्रकल्प हे केवळ आर्थिक विकास घडवत नाहीत, तर स्थानिक समुदायांचे विस्थापन, उपजीविकेचा ऱ्हास आणि सामाजिक संघर्ष निर्माण करतात. विकास प्रक्रियेमुळे नैसर्गिक संसाधनांवर ताण वाढतो आणि ग्रामीण समाजाच्या पारंपरिक जीवनपद्धतीत बदल होतो. बविस्कर यांनी पर्यावरणीय ऱ्हास आणि सामाजिक असमानता यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला आहे. त्यांच्या अभ्यासातून विकासाच्या नावाखाली पर्यावरणीय प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. ग्रामीण समाजाच्या दृष्टीने विकास प्रकल्प कसे समस्या निर्माण करतात हे समजून

घेण्यासाठी त्यांचे लेखन अत्यंत उपयुक्त ठरते. उलरिच बेक (१९९२) - उलरिच बेक यांनी 'Risk Society' या संकल्पनेद्वारे आधुनिक औद्योगिक समाजातील जोखमी अधोरेखित केल्या आहेत. त्यांच्या मते औद्योगिक आणि तांत्रिक विकासामुळे प्रदूषण, आरोग्य समस्या आणि पर्यावरणीय संकटे वाढतात. या जोखमी सर्व समाजघटकांवर परिणाम करतात, मात्र ग्रामीण आणि दुर्बल समुदायांवर त्याचा परिणाम अधिक तीव्र असतो. बेक यांच्या अभ्यासातून विकास आणि पर्यावरणीय असुरक्षितता यांतील नाते स्पष्ट होते. ग्रामीण भागात औद्योगिक प्रकल्पांमुळे निर्माण होणाऱ्या जोखमी समजून घेण्यासाठी ही संकल्पना महत्त्वाची ठरते. नाशिक जिल्ह्यातील औद्योगिक विकासाच्या परिणामांच्या विश्लेषणासाठी बेक यांचे विचार मार्गदर्शक आहेत. अँथनी गिडन्स (२००९) - अँथनी गिडन्स यांनी आधुनिकीकरण, विकास आणि सामाजिक बदल यांतील परस्परसंबंध स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते विकास ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून ती सामाजिक संस्था, जीवनशैली आणि मूल्यव्यवस्थेत मूलभूत बदल घडवून आणते. विकासामुळे पारंपरिक ग्रामीण समाज आधुनिकतेकडे वळतो आणि या प्रक्रियेत अनेक सामाजिक तणाव निर्माण होतात. गिडन्स यांनी विकास प्रक्रियेतील सकारात्मक व नकारात्मक दोन्ही पैलू अधोरेखित केले आहेत. ग्रामीण समाजावर विकास प्रकल्पांचा दीर्घकालीन सामाजिक परिणाम समजून घेण्यासाठी त्यांचे लेखन उपयुक्त ठरते. वंदना शिवा (२००५) - वंदना शिवा यांनी पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि स्थानिक समुदायांचे हक्क यांवर भर दिला आहे. त्यांच्या मते आधुनिक विकास धोरणांमुळे नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर होतो आणि ग्रामीण समाजाची पारंपरिक शेती व उपजीविका धोक्यात येते. त्यांनी पर्यावरणीय ऱ्हास आणि ग्रामीण महिलांच्या उपजीविकेतील संकट यांचा संबंध स्पष्ट केला आहे. लोककेंद्रित आणि पर्यावरणपूरक विकासाशिवाय शाश्वत प्रगती शक्य नाही, असे त्या ठामपणे मांडतात. ग्रामीण पर्यावरणाच्या अभ्यासासाठी त्यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत.

रामचंद्र गुहा (२०००) - रामचंद्र गुहा यांनी पर्यावरणवादाचा इतिहास आणि विकास—संरक्षण यांतील संघर्ष यांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते भारतातील पर्यावरणीय समस्या या सामाजिक व आर्थिक विषमतेशी निगडित आहेत. औद्योगिक व विकास प्रकल्पांमुळे ग्रामीण व आदिवासी समाजावर अन्याय होतो, असे ते नमूद करतात. गुहा यांनी पर्यावरण चळवळींच्या माध्यमातून ग्रामीण समाजाच्या भूमिका स्पष्ट केल्या आहेत. विकास आणि पर्यावरण यांतील संघर्ष समजून घेण्यासाठी त्यांचे लेखन उपयुक्त ठरते. सुनीता नारायण (२०1८) - सुनीता नारायण यांनी पर्यावरणीय धोरणे, औद्योगिक प्रदूषण आणि शाश्वत विकास यांचा अभ्यास केला आहे. त्यांनी जल व वायुप्रदूषणाचा ग्रामीण आरोग्यावर होणारा परिणाम स्पष्ट केला आहे. विकास प्रकल्पांमुळे पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन कसे होते, हे त्यांनी दाखवून दिले आहे. धोरणात्मक पातळीवर पर्यावरण संरक्षण आवश्यक असल्याचे त्या अधोरेखित करतात. ग्रामीण पर्यावरणाच्या संदर्भात त्यांचे लेखन महत्त्वाचे ठरते. एम. एम. सर्निया (१९९७) - Cernea यांनी विकास प्रकल्पांमुळे होणारे विस्थापन आणि पुनर्वसन यांचे सखोल विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते विस्थापनामुळे ग्रामीण समाजाचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक नुकसान होते. योग्य पुनर्वसन धोरणे नसल्यास विकास प्रकल्प सामाजिक समस्या निर्माण करतात. ग्रामीण समाजावर विकास प्रकल्पांचा परिणाम समजून घेण्यासाठी त्यांचे मॉडेल उपयुक्त ठरते. एच. एम. माथूर (२०11) - माथुर यांनी भारतातील पुनर्वसन व पुनर्स्थापन धोरणांचा अभ्यास केला आहे. विकास प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या ग्रामीण समुदायांसाठी प्रभावी धोरणांची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे. धोरणात्मक अपयशामुळे ग्रामीण समाजावर दीर्घकालीन परिणाम होतात, असे ते नमूद करतात. नाशिक जिल्ह्यातील विकास प्रकल्पांच्या अभ्यासासाठी त्यांचे लेखन उपयुक्त आहे. महाराष्ट्र शासन — पर्यावरण अहवाल (२०२०) - महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण अहवालांमध्ये औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि विकास प्रकल्पांमुळे झालेल्या पर्यावरणीय बदलांची सविस्तर माहिती दिली आहे. जलप्रदूषण, वायुप्रदूषण, मातीचा ऱ्हास आणि ग्रामीण आरोग्य समस्या या अहवालांत नमूद आहेत. हे अहवाल प्रस्तुत संशोधनासाठी तथ्यात्मक आधार प्रदान करतात. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम UNDP (२०१९) - UNDP च्या मानव विकास अहवालांमध्ये विकास, पर्यावरण आणि मानवी जीवनमान यांतील संबंध स्पष्ट करण्यात आला आहे. पर्यावरणीय ऱ्हासामुळे मानवी विकासावर कसा परिणाम होतो, हे या अहवालांत दाखवले आहे. शाश्वत व समावेशक विकासाशिवाय ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास शक्य नाही, असे या अहवालातून स्पष्ट होते.

**संशोधनाची उद्दिष्टे: १)** नाशिक जिल्ह्यातील प्रमुख विकास प्रकल्पांचे स्वरूप व विस्तार यांचा अभ्यास करणे. २) विकास प्रकल्पांमुळे ग्रामीण पर्यावरणात निर्माण झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे. ३) पर्यावरणीय बदलांचा ग्रामीण लोकजीवनावर होणारा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिणाम समजून घेणे. ४) विकास प्रकल्पांमुळे ग्रामीण भागातील उपजीविका, आरोग्य व स्थलांतर प्रक्रियेत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे. ५) शाश्वत विकासाच्या दृष्टीने समाजशास्त्रीय उपाययोजना सुचविणे.

**संशोधन गृहीतके: १)** नाशिक जिल्ह्यातील विकास प्रकल्पांमुळे ग्रामीण पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. २) पर्यावरणीय बदलांमुळे ग्रामीण लोकांच्या पारंपरिक उपजीविकेवर नकारात्मक परिणाम झाला आहे. ३) विकास प्रकल्पांमुळे ग्रामीण भागात स्थलांतर, आरोग्य समस्या व सामाजिक बदल वाढले आहेत.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) व विश्लेषणात्मक (Analytical) संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यातील विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेले पर्यावरणीय बदल आणि त्याचा ग्रामीण लोकजीवनावर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही स्त्रोतांमधून माहिती संकलित करण्यात आली आहे. संशोधनाची पद्धत पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

**प्राथमिक स्त्रोत:** या संशोधनासाठी प्राथमिक माहिती थेट क्षेत्रातून संकलित करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील स्थानिक रहिवासी, शेतकरी, मजूर, महिला, युवक आणि विकास प्रकल्पांमुळे प्रभावित कुटुंबे यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून माहिती गोळा करण्यात आली आहे. प्रश्नावली (Questionnaire) पद्धतीचा वापर करून पर्यावरणीय बदल, आरोग्य समस्या, उपजीविकेतील बदल, स्थलांतर आणि जीवनमान यासंबंधी माहिती संकलित करण्यात आली आहे. तसेच काही निवडक उत्तरदात्यांच्या सखोल

मुलाखती (Interview) घेण्यात आल्या आहेत. क्षेत्रनिरीक्षण (Field Observation) पद्धतीद्वारे ग्रामीण पर्यावरणातील प्रत्यक्ष बदलांचे निरीक्षण करण्यात आले आहे. या प्राथमिक स्रोतांमुळे संशोधनाला वास्तवाधारित आणि अनुभवाधिष्ठित माहिती प्राप्त झाली आहे.

**दुय्यम स्त्रोत:** दुय्यम माहिती विविध प्रकाशित व अप्रकाशित स्रोतांमधून संकलित करण्यात आली आहे. यामध्ये पर्यावरण, विकास व ग्रामीण समाज यांवरील पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके, शासकीय अहवाल, पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवाल, जनगणना अहवाल, वर्तमानपत्रांतील लेख तसेच इंटरनेटवरील विश्वासार्ह संकेतस्थळांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासन व भारत सरकारच्या पर्यावरणविषयक अहवालांचा विशेष उपयोग करण्यात आला आहे. या दुय्यम स्रोतांमुळे प्राथमिक माहितीचे विश्लेषण व तुलनात्मक अभ्यास करणे शक्य झाले आहे. वरील प्राथमिक व दुय्यम स्रोतांच्या आधारे संकलित माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व अर्थ लावून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत

**विकास प्रकल्पांमुळे झालेले पर्यावरणीय बदल:** नाशिक जिल्ह्यातील औद्योगिक, रासायनिक, धरण, महामार्ग, औद्योगिक वसाहती आणि मोठ्या प्रमाणावरील बांधकाम प्रकल्पांमुळे ग्रामीण पर्यावरणात व्यापक व दीर्घकालीन बदल घडून आलेले दिसून येतात. औद्योगिक व रासायनिक प्रकल्पांमधून बाहेर पडणारे प्रक्रिया न केलेले सांडपाणी अनेक ठिकाणी थेट नद्या, ओढे व नाल्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे जलप्रदूषणाची समस्या तीव्र झाली आहे. गोदावरी नदी व तिच्या उपनद्यांमध्ये पाण्याची गुणवत्ता खालावली असून पिण्याच्या पाण्यातील घातक रासायनिक घटकांचे प्रमाण वाढले आहे. याचा थेट परिणाम मानवी आरोग्य, शेतीसाठी वापरले जाणारे पाणी आणि पशुपालनावर होत आहे. त्याचप्रमाणे औद्योगिक सांडपाणी, रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे भूजल प्रदूषित होत असून अनेक ग्रामीण भागांमध्ये भूजल पातळी सातत्याने खालावत असल्याचे आढळते.

औद्योगिक चिमण्यांतून बाहेर पडणारे धूर, विषारी वायू, वाढती वाहतूक आणि बांधकाम प्रकल्पांतील धूळ यांमुळे ग्रामीण भागातील हवेची गुणवत्ता कमी झाली आहे. पूर्वी तुलनेने स्वच्छ असलेले ग्रामीण वातावरण आता वायुप्रदूषणाने ग्रस्त होत असून श्वसनविकार, दमा, डोळ्यांची जळजळ व त्वचारोग यांसारख्या समस्या वाढताना दिसून येतात. यासोबतच रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा सतत वाढता वापर, औद्योगिक घनकचरा आणि बांधकाम मलबा यांमुळे मातीतील सेंद्रिय घटकांचे प्रमाण कमी झाले असून जमिनीची सुपीकता घटत चालली आहे. परिणामी शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होत असून शेतकऱ्यांचे उत्पन्न अस्थिर झाले आहे. धरणे, महामार्ग, औद्योगिक वसाहती आणि गृहनिर्माण प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर शेतीयोग्य जमीन अधिग्रहित करण्यात आल्यामुळे शेती क्षेत्र सतत कमी होत आहे. यासोबतच जंगलतोडीमुळे वनक्षेत्रात घट झाली असून जैवविविधतेवर गंभीर परिणाम झाला आहे. अनेक स्थानिक वनस्पती व प्राणीप्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर असून परिसंस्थेचे संतुलन बिघडले आहे. या सर्व पर्यावरणीय बदलांमुळे स्थानिक पातळीवर तापमानवाढ, अनियमित पर्जन्यमान, दुष्काळ व अतिवृष्टीसारख्या घटना वाढताना दिसून येतात. एकूणच विकास प्रकल्पांमुळे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण निर्माण झाला असून शाश्वत विकासाचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

**ग्रामीण लोकजीवनातील रूपांतरण:** विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय बदलांचा ग्रामीण लोकजीवनावर थेट व अप्रत्यक्ष असा बहुआयामी परिणाम झालेला दिसून येतो. पर्यावरणीय ऱ्हासामुळे पारंपरिक शेती, पशुपालन आणि नैसर्गिक संसाधनांवर आधारित उपजीविका संकटात सापडली आहे. शेती उत्पादनातील घट, वाढता खर्च आणि अनिश्चितता यांमुळे ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न कमी झाले असून अनेकांना पर्यायी व अस्थिर रोजगार शोधावा लागत आहे. परिणामी ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतराचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे, ज्याचा परिणाम ग्रामीण समाजाच्या लोकसंख्या रचनेवर आणि कुटुंबसंस्थेवर होत आहे. जल व वायुप्रदूषणामुळे ग्रामीण भागात श्वसनविकार, त्वचारोग, पचनसंस्थेचे आजार तसेच इतर दीर्घकालीन आजारांचे प्रमाण वाढले आहे. सार्वजनिक आरोग्य सुविधा मर्यादित असल्यामुळे आरोग्यावर होणारा वाढता खर्च ग्रामीण कुटुंबांसाठी आर्थिक ओझे ठरत आहे. यासोबतच स्थलांतर, बेरोजगारी आणि आर्थिक अस्थिरतेमुळे सामाजिक संबंधांमध्ये ताणतणाव वाढत असून पारंपरिक सामुदायिक जीवनशैली व सामाजिक ऐक्य कमजोर होत चालले आहे.

पर्यावरणीय संकटे, उत्पन्नातील अनिश्चितता आणि आरोग्य समस्या यांमुळे ग्रामीण लोकजीवनात असुरक्षिततेची भावना वाढली आहे. जीवनमानाचा दर्जा खालावत असून गरिबी, कर्जबाजारीपणा आणि भविष्यासंदर्भातील भीती ग्रामीण समाजात वाढताना दिसून येते. त्याचबरोबर शहरीकरण व औद्योगिकीकरणाच्या प्रभावामुळे ग्रामीण संस्कृती, परंपरा, मूल्ये आणि जीवनशैलीत बदल घडून येत आहेत. या संपूर्ण प्रक्रियेत स्त्रिया, बालके, वृद्ध आणि दुर्बल घटकांवर सर्वाधिक ताण पडत असून पर्यावरणीय बदल आणि विकास प्रकल्पांनी ग्रामीण लोकजीवनाचे स्वरूप मूलभूतरीत्या रूपांतरित केले आहे. ग्रामीण लोकजीवनातील रूपांतरण

विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय बदलांचा ग्रामीण लोकजीवनावर थेट, अप्रत्यक्ष आणि दीर्घकालीन परिणाम झालेला दिसून येतो. ग्रामीण समाजाच्या आर्थिक, सामाजिक, आरोग्यविषयक आणि सांस्कृतिक रचनेत मूलभूत स्वरूपाचे रूपांतरण घडून आले आहे. हे रूपांतरण पुढील मुद्द्यांद्वारे अधिक सविस्तरपणे स्पष्ट करता येते.

**उपजीविकेतील संरचनात्मक आणि व्यावसायिक बदल:** पर्यावरणीय ऱ्हासामुळे पारंपरिक शेती, पशुपालन आणि नैसर्गिक संसाधनांवर आधारित उपजीविका अस्थिर झाली आहे. शेती उत्पादनातील घट, खर्चात वाढ आणि अनिश्चितता यांमुळे ग्रामीण कुटुंबांना असंघटित व अस्थिर रोजगार स्वीकारावा लागत आहे.

**कुटुंबसंस्था आणि सामाजिक संबंधांतील बदल:** स्थलांतर, बेरोजगारी व आर्थिक अस्थिरतेमुळे संयुक्त कुटुंब पद्धती कमकुवत होत आहे. सामुदायिक सहकार्य, परस्पर साहाय्य आणि सामाजिक ऐक्य यामध्ये घट होत चालली आहे.

**जीवनमान, गरिबी आणि सामाजिक असुरक्षितता:** अनियमित उत्पन्न, वाढता आरोग्य खर्च आणि पर्यावरणीय संकटांमुळे ग्रामीण लोकजीवन अधिक अस्थिर झाले आहे. गरिबी, कर्जबाजारीपणा आणि भविष्यासंदर्भातील असुरक्षिततेची भावना वाढत आहे.

**ग्रामीण ते शहरी स्थलांतर आणि लोकसंख्या रचनेतील बदल:** रोजगाराच्या मर्यादित संधी, शेतीतील संकट आणि पर्यावरणीय समस्या यांमुळे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर वाढले आहे. यामुळे ग्रामीण भागात वृद्ध व महिलांची संख्या वाढत असून सामाजिक रचना बदलत आहे.

**आरोग्यविषयक समस्या आणि सार्वजनिक आरोग्यावर परिणाम:** जल व वायुप्रदूषणामुळे श्वसनविकार, त्वचारोग, पचनसंस्थेचे आजार, तसेच कर्करोगासारख्या गंभीर आजारांचे प्रमाण वाढले आहे. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अपुरी असल्यामुळे ग्रामीण कुटुंबांवर आर्थिक व मानसिक ताण वाढत आहे.

**सांस्कृतिक रूपांतरण आणि मूल्यांतील बदल:** शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण संस्कृती, परंपरा, सण-उत्सव आणि जीवनशैलीत बदल होत आहेत. पारंपरिक मूल्यांऐवजी उपभोगप्रधान मूल्ये प्राधान्याने दिसून येत आहेत.

**स्त्री, बालक आणि दुर्बल घटकांवरील परिणाम:** पर्यावरणीय ऱ्हास व उपजीविकेतील संकटांचा सर्वाधिक भार स्त्रिया, बालके, वृद्ध व दुर्बल घटकांवर पडतो. पाणी संकलन, आरोग्यसेवा, घरगुती कामे आणि उत्पन्नवाढीची दुहेरी जबाबदारी प्रामुख्याने स्त्रियांवर येत आहे. ग्रामीण लोकजीवनातील रूपांतरण विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय बदलांचा थेट व अप्रत्यक्ष परिणाम ग्रामीण लोकजीवनावर झालेला दिसून येतो. ग्रामीण समाजाच्या सामाजिक, आर्थिक, आरोग्यविषयक व सांस्कृतिक जीवनात मूलभूत स्वरूपाचे रूपांतरण घडून आले आहे. हे रूपांतरण पुढील मुद्द्यांद्वारे स्पष्ट करता येते.

**उपजीविकेतील संरचनात्मक बदल:** पारंपरिक शेती, पशुपालन व जंगलावर आधारित उपजीविका पर्यावरणीय ऱ्हासामुळे संकटात सापडली आहे. शेती उत्पादनात घट झाल्याने अनेक कुटुंबांचे उत्पन्न कमी झाले आहे. परिणामी ग्रामीण लोकांना अस्थिर व अल्पकालीन रोजगारांकडे वळावे लागत आहे.

**ग्रामीण ते शहरी स्थलांतरात वाढ:** रोजगाराच्या मर्यादित संधी, शेतीतील अनिश्चितता आणि पर्यावरणीय संकटांमुळे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. यामुळे ग्रामीण भागातील तरुण लोकसंख्या कमी होत असून कुटुंबसंस्था दुर्बल होत आहे.

**आरोग्यविषयक समस्या आणि वाढता खर्च:** जल व वायुप्रदूषणामुळे श्वसनविकार, त्वचारोग, पचनसंस्थेचे आजार, तसेच दीर्घकालीन आजारांचे प्रमाण वाढले आहे. आरोग्यसेवा मिळविण्यासाठी ग्रामीण कुटुंबांना अधिक खर्च करावा लागत असून त्यामुळे आर्थिक ताण वाढत आहे.

**सामाजिक रचना व संबंधांतील बदल:** स्थलांतर, बेरोजगारी व आर्थिक अस्थिरतेमुळे संयुक्त कुटुंब पद्धतीवर परिणाम झाला आहे. सामुदायिक सहकार्य, परस्पर साहाय्य व सामाजिक ऐक्य कमी होत चालले आहे.

**जीवनमान व जीवनशैलीतील अस्थिरता:** अनियमित उत्पन्न, आरोग्य समस्या आणि पर्यावरणीय संकटांमुळे ग्रामीण लोकजीवनात अस्थिरता निर्माण झाली आहे. जीवनमानाचा दर्जा खालावत असून भविष्यासंदर्भातील असुरक्षिततेची भावना वाढत आहे.

**सांस्कृतिक रूपांतरण:** ग्रामीण समाजाच्या परंपरा, सण-उत्सव, मूल्ये आणि जीवनशैलीवर विकास प्रक्रियेचा प्रभाव पडत आहे. शहरी संस्कृतीचा प्रभाव वाढत असून पारंपरिक ग्रामीण सांस्कृतिक ओळखीत बदल घडून येत आहेत.

**स्त्री, बालक आणि दुर्बल घटकांवरील परिणाम:** पर्यावरणीय ऱ्हास आणि उपजीविकेतील संकटांचा सर्वाधिक परिणाम स्त्रिया, बालक आणि वृद्धांवर होत आहे. पाणी संकलन, आरोग्याची जबाबदारी आणि घरगुती कामांचा ताण प्रामुख्याने स्त्रियांवर वाढलेला दिसून येतो. ग्रामीण लोकजीवनातील रूपांतरण पर्यावरणीय बदलांचा थेट व अप्रत्यक्ष परिणाम ग्रामीण लोकजीवनावर झालेला दिसून येतो. हे रूपांतरण पुढील मुद्द्यांतून स्पष्ट करता येते.

**उपजीविकेतील बदल:** पारंपरिक शेती व पशुपालनावर आधारित उपजीविका कमी उत्पन्नाची ठरत आहे. पर्यावरणीय ऱ्हासामुळे शेती उत्पादन घटल्याने ग्रामीण लोकांना पर्यायी रोजगार शोधावा लागत आहे.

**ग्रामीण ते शहरी स्थलांतर:** रोजगाराच्या मर्यादित संधी आणि शेतीतील अनिश्चिततेमुळे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे. यामुळे ग्रामीण समाजाची लोकसंख्या रचना बदलत आहे.

**आरोग्य समस्या:** जल व वायुप्रदूषणामुळे श्वसनविकार, त्वचारोग, पचनसंस्थेचे आजार आणि इतर दीर्घकालीन आरोग्य समस्या वाढल्या आहेत. आरोग्यावरील वाढता खर्च ग्रामीण कुटुंबांसाठी आर्थिक ओझे ठरत आहे.

**सामाजिक संबंधांतील बदल:** स्थलांतर, बेरोजगारी आणि आर्थिक अस्थिरतेमुळे कुटुंबसंस्था व सामुदायिक जीवनशैलीवर परिणाम झाला आहे. पारंपरिक सामाजिक ऐक्य कमी होत चालले आहे.

**जीवनमानातील अस्थिरता:** पर्यावरणीय संकटे, उत्पन्नातील अनिश्चितता आणि आरोग्य समस्या यांमुळे ग्रामीण लोकजीवनात अस्थिरता वाढली आहे. जीवनमानाचा दर्जा घसरत असल्याचे चित्र दिसून येते.

**सांस्कृतिक बदल:** ग्रामीण समाजाच्या परंपरा, मूल्ये आणि जीवनशैलीवर विकास प्रक्रियेचा प्रभाव पडत असून सांस्कृतिक रूपांतरण घडून येत आहे. ग्रामीण लोकजीवनातील रूपांतरण पर्यावरणीय बदलांमुळे ग्रामीण लोकजीवनात मूलभूत स्वरूपाचे रूपांतरण घडून आले आहे. पारंपरिक शेती व पशुपालनावर आधारित उपजीविका कमी उत्पन्नाची ठरत असून अनेक कुटुंबे पर्यायी रोजगाराच्या शोधात आहेत. परिणामी ग्रामीण ते शहरी स्थलांतर वाढले आहे. प्रदूषणामुळे श्वसनविकार, त्वचारोग, पचनसंस्थेचे आजार यांसारख्या आरोग्य समस्यांमध्ये वाढ झाल्याचे आढळते. सामाजिक संबंधांमध्ये ताणतणाव, सामुदायिक जीवनशैलीत बदल आणि जीवनमानातील अस्थिरता ही ग्रामीण लोकजीवनातील महत्त्वाची वैशिष्ट्ये ठरत आहेत.

**निष्कर्ष:** या संशोधनातून नाशिक जिल्ह्यातील विकास प्रकल्पांमुळे पर्यावरणीय बदल होऊन ग्रामीण लोकजीवनावर दीर्घकालीन परिणाम झाल्याचे स्पष्ट होते. पर्यावरणीय संतुलनाकडे दुर्लक्ष करून केलेला विकास ग्रामीण समाजाच्या सामाजिक व आर्थिक

रचनेवर गंभीर परिणाम घडवू शकतो. म्हणून विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणारा शाश्वत व समावेशक विकास ग्रामीण समाजासाठी अत्यावश्यक आहे.

**शिफारसी:** ग्रामीण पर्यावरणाचे संवर्धन आणि लोकजीवनाचे संरक्षण करण्यासाठी काही महत्त्वाच्या शिफारसी मांडता येतात. विकास प्रकल्पांसाठी पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अधिक काटेकोरपणे राबविणे आवश्यक आहे. स्थानिक लोकांचा विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढविणे गरजेचे आहे. तसेच प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर कायदे व त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे आणि शाश्वत विकासाच्या धोरणांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची:**

१) Baviskar, A. (२०11). *Environment and development in India*. New Delhi: Oxford University Press.
२) Beck, U. (1९९२). *Risk society: Towards a new modernity*. London: Sage Publications.
३) Giddens, A. (२००९). *Sociology* (६th ed.). Cambridge: Polity Press.
४) Shiva, V. (२००५). *Earth democracy: Justice, sustainability and peace*. New Delhi: Zed Books.
५) Guha, R. (२०००). *Environmentalism: A global history*. New Delhi: Oxford University Press.
६) Guha, R., & Martinez-Alier, J. (1९९७). *Varieties of environmentalism: Essays north and south*. London: Earthscan.
७) Narain, S. (२०1८). *Conflicts of interest: My journey through India's green movement*. New Delhi: Penguin Random House India.
८) Baviskar, A., & Ray, R. (२०11). *Elite and everyman: The cultural politics of the Indian middle classes*. New Delhi: Routledge.
९) Cernea, M. M. (1९९७). *The risks and reconstruction model for resettling displaced populations*. World Development, २५(1०), 1५६९-1५८७.
१०) Mathur, H. M. (२०11). *Resettlement and rehabilitation in India: Policy and practice*. New Delhi: Routledge.
११) Government of India. (२०1४). *Environmental impact assessment notification*. New Delhi: Ministry of Environment, Forest and Climate Change.
१२) Government of Maharashtra. (२०२०). *State of environment report*. Mumbai: Government Press.
१३) World Bank. (२००४). *Involuntary resettlement sourcebook: Planning and implementation in development projects*. Washington, DC: World Bank.
१४) United Nations Development Programme. (२०1९). *Human development report: Beyond income, beyond averages, beyond today*. New York: UNDP.

# विवाह संस्था आणि कुटुंब संस्थामधील परिवर्तन

**प्रा. सीमा आनंद गुरव** समाजशास्त्र, विभाग, राजश्री शाहू महाविद्यालय, कोल्हापूर

**प्रस्तावना:** भारतीय समाजात विवाह संस्था आणि कुटुंब संस्था या दोन मूलभूत सामाजिक संस्था मानल्या जातात. परंपरेने या संस्थांनी सामाजिक नियंत्रण, संस्कार, नातेसंबंधांची जपणूक व सामाजिक स्थैर्य राखण्याचे कार्य केले आहे. मात्र औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणाचा प्रसार, स्त्री-पुरुष समानतेची जाणीव, आर्थिक स्वावलंबन, जागतिकीकरण व तांत्रिक प्रगती यांमुळे विवाह व कुटुंब संस्थांमध्ये लक्षणीय परिवर्तन घडून आले आहे. या संशोधनाचा उद्देश विवाह पद्धती, कुटुंबाची रचना, कुटुंबातील भूमिका, मूल्यव्यवस्था व नातेसंबंधांतील बदलांचा अभ्यास करणे हा आहे.

मानवी समाजाच्या उभारणीत विवाह संस्था आणि कुटुंब संस्था या दोन अत्यंत महत्त्वाच्या सामाजिक संस्था मानल्या जातात. समाजाच्या सातत्यासाठी, सामाजिकीकरणासाठी तसेच सामाजिक मूल्ये, परंपरा व संस्कार पुढील पिढीकडे हस्तांतरित करण्यासाठी या संस्थांची भूमिका मोलाची राहिली आहे. विवाह संस्थेमुळे स्त्री-पुरुषांमधील संबंधांना सामाजिक मान्यता मिळते, तर कुटुंब संस्था व्यक्तीच्या सामाजिक, भावनिक व नैतिक विकासाची पहिली शाळा म्हणून कार्य करते. परंपरागत भारतीय समाजात विवाह हा धार्मिक संस्कार मानला जात होता आणि कुटुंब व्यवस्था प्रामुख्याने संयुक्त स्वरूपाची होती. विवाहाचे निर्णय कुटुंब व समाज घेत असत, व्यक्तिगत निवडीला मर्यादित स्थान होते. पती-पत्नी, पालक व मुले यांच्या भूमिका निश्चित आणि परंपरागत मूल्यांवर आधारित होत्या. मात्र आधुनिक काळात समाजरचनेत घडून येणाऱ्या व्यापक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बदलांमुळे विवाह व कुटुंब संस्थांमध्ये लक्षणीय परिवर्तन झाले आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणाचा प्रसार, स्त्री शिक्षण व स्त्री सक्षमीकरण, आर्थिक स्वावलंबन, तांत्रिक प्रगती, माध्यमांचा प्रभाव आणि जागतिकीकरण यांसारख्या घटकांनी विवाह व कुटुंब संस्थांवर मोठा प्रभाव टाकला आहे. परिणामी प्रेमविवाह, आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहांचे प्रमाण वाढले असून विवाहाचे वय वाढत आहे. तसेच संयुक्त कुटुंब पद्धतीऐवजी विभक्त (न्यूक्लिअर) कुटुंबांचा प्रसार होताना दिसतो. याचबरोबर घटस्फोट, पुनर्विवाह, एकल पालक कुटुंबे, सहजीवन (Live-in Relationship) यांसारख्या नव्या प्रवृत्ती समाजात उदयास येत आहेत. कुटुंबातील पारंपरिक भूमिका बदलत असून स्त्री-पुरुष समानतेची संकल्पना बळकट होत आहे. या सर्व परिवर्तनांचा समाजरचनेवर तसेच व्यक्तीच्या जीवनशैलीवर दूरगामी परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर विवाह संस्था आणि कुटुंब संस्था मधील परिवर्तनाचा अभ्यास करणे सामाजिक बदलांची दिशा समजून घेण्यासाठी अत्यंत आवश्यक ठरते.

**पूर्वसाहित्याचा आढावा:** विवाह संस्था ही मानवी समाजातील एक अत्यंत प्राचीन आणि मूलभूत सामाजिक संस्था आहे. तिचा उगम नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक गरजांमधून झाला आहे. १) आदिम मानव व नैसर्गिक गरजा - आदिम काळात मानव समूहात राहत होता. यामध्ये स्त्री-पुरुषांचे संबंध अनियंत्रित स्वरूपाचे होते. तसेच संततीचा सांभाळ, संरक्षण आणि सामाजिक स्थैर्याची

गरज निर्माण झाली. या गरजांमुळे नियंत्रित लैंगिक संबंध आणि पुढे विवाहाची संकल्पना उदयास आली. २) कुटुंब संस्थेची निर्मिती मुलांच्या संगोपनासाठी स्थिर पुरुष-स्त्री संबंध आवश्यक ठरले. पित्याची ओळख, वारसा व नातेसंबंध निश्चित करण्यासाठी विवाह उपयुक्त ठरला. त्यामुळे विवाह → कुटुंब संस्था → समाज अशी साखळी तयार झाली. ३) सामाजिक नियंत्रणाची गरज- समाजात नैतिकता व शिस्त राखण्यासाठी नियम आवश्यक होते. विवाहाने लैंगिक संबंधांना सामाजिक मान्यता दिली.आणि विवाह संस्था ही सामाजिक नियंत्रणाचे साधन बनली. ४) आर्थिक कारणे- मालमत्ता, वारसा, श्रमविभागणी यांचे नियमन करण्यासाठी विवाह आवश्यक ठरला. पुरुष आर्थिक जबाबदारी तर स्त्री गृहव्यवस्थापन अशी भूमिका विकसित झाली. ५) धार्मिक व सांस्कृतिक प्रभाव- धर्माने विवाहाला पवित्र दर्जा दिला. हिंदू धर्मात विवाहाला संस्कार मानले गेले. धार्मिक विधी व परंपरांमुळे विवाह संस्था अधिक मजबूत झाली. ६) समाजशास्त्रज्ञांचे मत-मॅक्लेनन (McLennan) : स्त्री अपहरण व बहुपत्नीत्वातून विवाहाचा उगम, मॉर्गन (Morgan) : समूह विवाहातून एकपत्नी विवाहाचा विकास, वेस्टरमार्क (Westermarck) : जैविक व नैसर्गिक भावनांतून विवाह निर्माण झाला.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) पारंपरिक कुटुंब पद्धतीतून आधुनिक कुटुंब पद्धतीकडे झालेल्या संरचनात्मक बदलांचा अभ्यास करणे. तसेच कुटुंब संस्थेमध्ये (संयुक्त कुटुंब ते विभक्त कुटुंब) झालेल्या बदलांची कारणे शोधणे. २) शिक्षण, औद्योगिकीकरण, शहरीकरण, जागतिकीकरण व माध्यमे यांचा विवाह व कुटुंब संस्थेवर झालेला प्रभाव अभ्यासणे. ३) विवाह व कुटुंब संस्थांतील बदलांचा स्त्री—पुरुष नातेसंबंधांवर व भूमिकांवर झालेला परिणाम अभ्यासणे. विवाह संस्था व कुटुंब संस्था यामधील परिवर्तनामुळे निर्माण झालेल्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे (घटस्फोट, कौटुंबिक संघर्ष, एकल पालकत्व इ.). ४) आधुनिक समाजात विवाह व कुटुंब संस्थेची सध्याची स्थिती व सामाजिक उपयुक्तता समजून घेणे.

**संशोधन गृहीतके:** १) आधुनिक समाजात विवाह संस्थेच्या स्वरूपात लक्षणीय परिवर्तन झालेले आहे. २) पारंपरिक संयुक्त कुटुंब पद्धतीऐवजी विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण वाढले आहे. ३) शिक्षणाचा स्तर वाढल्याने विवाहाबाबतचे निर्णय अधिक वैयक्तिक झाले आहेत. ४) शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे कुटुंब संस्थेच्या कार्यात बदल झाला आहे. ५) स्त्रियांच्या शिक्षण व रोजगारामुळे विवाह व कुटुंबातील भूमिकांमध्ये बदल झाला आहे. प्रेमविवाह, आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहांचे प्रमाण वाढत आहे. विवाह व कुटुंब संस्थांतील परिवर्तनामुळे कौटुंबिक नातेसंबंध अधिक समताधिष्ठित होत आहेत. माध्यमे व तंत्रज्ञानाचा विवाह व कुटुंब जीवनावर मोठा प्रभाव पडत आहे. ६) विवाह संस्थेतील बदलांमुळे घटस्फोट, विलंबित विवाह व एकल पालकत्वाचे प्रमाण वाढले आहे.

**अध्यन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंध प्रथम व दुय्यम साधन सामुग्रीवर पुस्तके, वर्तमानपत्रे तसेच इंटरनेट द्वारे माहिती गोळा करून विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**तथ्य संकलन पद्धती:**_भारतातील विवाह संस्था आणि कुटुंब संस्था यामधील परिवर्तन याचा अभ्यास करण्यासाठी तसेच आज २1व्या शतकातील स्थिती जाणून घेण्यासाठी संशोधकाने कोल्हापूर जिल्यातील सानेगुरुजी भागातील २० महिलाकडून प्रश्नावली भरुन घेऊन त्याचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**तथ्य विश्लेषण:**_विवाह संस्था आणि कुटुंब संस्था मध्ये परिवर्तन" झाले आहे का? त

| | **विवाह संस्थेतील बदल झाले आहेत का?** | | **कुटुंब संस्थेत बदल झाले आहेत का?** | |
|---|---|---|---|---|
| **पर्याय** | **प्रतिसादक संख्या** | **टक्केवारी** | टक्केवारी | प्रतिसादक संख्या |
| होय | १४ | ७०% | १६ | ८०% |
| नाही | ४ | २०% | २ | १०% |
| सांगता येत नाही | २ | १०% | २ | १०% |
| एकून | २० | १०० | २० | १००% |

वरील तक्त्यानुसार ७०% महिलांनी विवाह संस्थेमध्ये परिवर्तन झाले आहे असे स्पष्टपणे मान्य केल आहे. २०% महिलाच्या मते काही प्रमाणात बदल झाला असून केवळ १०% महिलांना कोणतेही परिवर्तन जाणवत नाही. वरील तक्त्यानुसार ८०% महिलांनी विवाह संस्थेमध्ये परिवर्तन झाले आहे असे स्पष्टपणे मान्य केल आहे. 1०% महिलाच्या मते काही प्रमाणात बदल झाला असून केवळ 1०% महिलांना कोणतेही परिवर्तन जाणवत नाही.

**निष्कर्ष:**

विवाह संस्था कोणत्याही एका कारणामुळे निर्माण झालेली नसून, नैसर्गिक गरजा + सामाजिक स्थैर्य + आर्थिक आवश्यकता + धार्मिक मान्यता या सर्व घटकांच्या एकत्र परिणामातून विवाह संस्थेचा उगम झाला. सद्य संशोधनातून असे स्पष्ट होते की विवाह संस्था आणि कुटुंब संस्था या दोन्ही संस्थांमध्ये सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनांमुळे लक्षणीय बदल झाले आहेत. पारंपरिक विवाह पद्धतींच्या तुलनेत आज प्रेमविवाह, आंतरजातीय विवाह, आंतरधर्मीय विवाह व उशिरा विवाह यांचे प्रमाण वाढताना दिसते. विवाह ही केवळ धार्मिक व सामाजिक संस्था न राहता ती आता व्यक्तीच्या स्वातंत्र्य, समजूतदारपणा व परस्पर सहमतीवर आधारित संस्था होत चालली आहे. संयुक्त कुटुंब पद्धती ऐवजी विभक्त (न्यूक्लिअर) कुटुंब पद्धतीकडे झुकाव वाढलेला आढळतो, विशेषतः शहरी भागात. स्त्री शिक्षण, रोजगार व आर्थिक स्वावलंबनामुळे कुटुंबातील स्त्रीची भूमिका व स्थान बदलले असून निर्णय प्रक्रियेत तिचा सहभाग वाढलेला आहे. विवाहातील नातेसंबंध पूर्वी कर्तव्यप्रधान होते, तर सध्या ते भावनिक, समताधिष्ठित व परस्पर अपेक्षांवर आधारित झालेले दिसतात. घटस्फोट, विभक्त राहणे (Live-in relationship) व पुनर्विवाह यांसारख्या संकल्पनांकडे समाजाचा दृष्टिकोन हळूहळू अधिक स्वीकाराहं होत आहे.औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षण, माध्यमांचा प्रभाव व

जागतिकीकरण यांचा विवाह व कुटुंब संस्थेतील परिवर्तनावर मोठा प्रभाव दिसून येतो. कुटुंबाची कार्ये (सामाजिकरण, आर्थिक सुरक्षितता, भावनिक आधार) काही प्रमाणात बदलली असून काही कार्ये बाह्य संस्थांकडे हस्तांतरित झालेली दिसतात. परंपरा व आधुनिकता यांचा संगम विवाह व कुटुंब संस्थेमध्ये आढळतो; पूर्णतः परंपरेपासून तुटलेले किंवा पूर्णतः आधुनिक असे स्वरूप अद्याप दिसत नाही.

**संदर्भ:**


1. Deshpande, S. H. (२०१२). भारतीय समाज : संरचना आणि परिवर्तन. पुणे: श्री विद्या प्रकाशन.
2. Ghurye, G. S. (२००९). भारतीय समाजशास्त्र. पुणे: पॉप्युलर प्रकाशन.
3. Karve, I. (२०१०). हिंदू समाजातील कुटुंब व्यवस्था. पुणे: पॉप्युलर प्रकाशन.
4. Mhetre, R. D. (२०१५). कुटुंब, विवाह आणि सामाजिक परिवर्तन. औरंगाबाद: कैलास प्रकाशन.
5. Patil, S. M. (२०१४). ग्रामीण व शहरी कुटुंब पद्धती. कोल्हापूर: शिवराज प्रकाशन.
6. Phadke, Y. D. (२०१६). भारतीय कुटुंब व्यवस्था आणि बदलते प्रवाह. नाशिक: प्रशांत प्रकाशन.


# वनराई सामाजिक संस्थेचे ग्रामीण विकासातील योगदान समाजशास्त्रीय विश्लेषण

**प्रा. बालाजी नरवटे** सहायक प्राध्यापक, शिक्षण प्रसारक संस्थेचे, श्री. ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय, संगमनेर

**गोषवारा:** भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर ग्रामीण विकासासाठी शासकीय पातळीवर विविध योजनांच्या माध्यमातून अनेक पातळ्यांवर प्रयत्न सुरु आहे. ग्रामीण विकासामध्ये स्वयंसेवी संस्थांचे योगदानही अत्यंत महत्वाचे मानले जाते. महाराष्ट्रातील वनराई सामाजिक संस्था ही ग्रामीण भागातील जलसंधारण, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि लोकसहभागावर आधारित विकास कार्यासाठी ओळखली जाते. प्रस्तुत संशोधन लेखाचा उद्देश वनराई सामाजिक संस्थेच्या ग्रामीण विकासातील योगदानाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे हा आहे. विशेषतः संस्थेच्या जलसंधारण विकास कार्याचे विश्लेषण करणे, त्यांच्या कार्यातील लोकसहभागाचा आढावा घेणे आणि ग्रामीण विकास प्रक्रियेत वनराई सामाजिक संस्थेचे महत्त्व समजून घेणे हे या अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत. या संशोधनासाठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून व्यष्टी अध्ययन पद्धतीद्वारे वनराईच्या उपक्रमांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. माहिती संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. सदर अभ्यासातून असे दिसून येते की, जलसंधारणाच्या कामांमुळे केवळ पाणी उपलब्धतेत वाढ झाली नाही, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न, रोजगाराच्या संधी आणि गावातील सामाजिक ऐक्य यामध्येही सकारात्मक बदल घडून आला आहे. लोकसहभागामुळे विकास प्रक्रिया अधिक टिकाऊ व लोकाभिमुख झाल्याचे स्पष्ट होते. सदर संशोधन लेखातून असे अधोरेखित होते की, वनराई सामाजिक संस्था ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात केवळ तांत्रिक हस्तक्षेप करणारी संस्था नसून, ती ग्रामीण समाजात सहभाग, स्वावलंबन आणि सामुहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारी एक महत्वाची समाजपरिवर्तनाची शक्ती आहे.

**प्रस्तावना:** भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के लोकसंख्या ही खेड्यांमध्ये आजही वास्तव्य करत असल्याचे दिसून येते. भारताचा शहरी भाग, ग्रामीण भाग आणि आदिवासी भाग अशा तीन भागांत विभाजन असल्याचे दिसून येते. आजही आपल्याला ग्रामीण आणि आदिवासी भाग अविकसित असल्याचे दिसून येते. भारताचा विकास साधायचा असेल तर एवढ्या मोठ्या प्रमाणावरील लोकांना वगळून चालणार नाही. म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात भारताने कृषी, औद्योगिक विकासाबरोबरच ग्रामीण विकासावरही भर दिलेला दिसून येतो. ग्रामीण विकासाचा उद्देश हा अज्ञानी व गरीब लोकांमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि मानसिक वागणुकीमध्ये बदल घडवून ग्रामीण लोकांच्या राहणीमानात सुधारणा करणे हा आहे. ग्रामीण भागातील लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून असल्यामुळे आणि जास्तीत जास्त शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे शेतीचा विकास होताना दिसून येत नाही. ग्रामीण स्तरावरील जनतेला सामाजिक, आर्थिक व राजकीय स्तरावर पाठबळ देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विविध प्रयत्न केल्याचे दिसून येते. ग्रामीण विकास योजनांद्वारे रोजगार निर्मिती, स्वच्छता, पाणी, आरोग्य, शिक्षण, घरकुले, रस्ते, दळणवळण व वीज इत्यादींसाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. त्याचबरोबर स्वयंसेवी संस्था पातळीवरही ग्रामीण विकासासाठी अनेक बिगरशासकीय स्वयंसेवी संस्था पुढाकार घेत आहेत. या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासासाठी जलसंधारण विकास कार्यक्रम, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, कृषी विकास, लिंगभाव विकास यासाठी काम होताना दिसून येत आहे. याचाच भाग म्हणून वनराई सामाजिक संस्था ही लोकसहभागातून ग्रामीण विकास करण्यासाठी अनेक पातळ्यांवर प्रयत्न करत आहे. सदर संशोधन लेखामध्ये वनराई सामाजिक संस्थेचे ग्रामीण विकासातील योगदानाचे समाजशास्त्रीय विश्लेषण केले जाणार आहे.

**अध्ययनाचे उद्देश:** वनराई सामाजिक संस्थेचे जलसंधारण विकास कार्याचे विश्लेषण करणे. वनराईच्या कार्यातील लोकसहभागाचा आढावा घेणे. वनराई सामाजिक संस्थेचे ग्रामीण विकासातील महत्त्व समजून घेणे.

**संशोधन पद्धती:** सदर सामाजिक संशोधन हे गुणात्मक संशोधन पद्धतीच्या माध्यमातून केलेले आहे. या संशोधन लेखात वनराई या सामाजिक संस्थेचे व्यष्टी अध्ययन केलेले आहे. तथ्य संकलन प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांच्या आधारे करण्यात आले आहे.

**तथ्यांचे विश्लेषण:** मोहन धारिया यांनी सन १९८२ मध्ये त्यांनी वनराई या सामाजिक सामाजिक संस्थेअंतर्गत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. परंतु, या संस्थेची सार्वजनिक विश्वस्त कायद्याखाली नोंदणी १९८६ साली झाली होती. या संस्थेअंतर्गत वनीकरण,

पाणलोटाची कामे तसेच आदर्श गाव निर्मितीची कामे केली जातात. या संस्थेने त्यांच्या कामातून "गावातील पाणी गावातच आडवा आणि शेतातील पाणी शेतातच आडवा" असा मंत्र लोकांना दिला. त्याप्रमाणेच पावसाळ्यात पडणाऱ्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडवून तो जमिनीत मुरविणे आणि त्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे नियोजनपूर्वक वापर करण्याचे महत्त्व वनराई या संस्थेअंतर्गत लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. तसेच वनराई संस्थेअंतर्गत लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात विकासाचे कार्यक्रम हाती घेतले.

कुऱ्हाडबंदी, चराईबंदी, कुटुंबनियोजन व आरोग्य, व्यसनमुक्ती तसेच चूल तेथे गोबरगॅस आणि घर तेथे संडास अशा स्वरुपाची कामांची सुरुवात अनेक गावांमध्ये वनराई संस्थेच्या सहकार्याने केली. आपल्या परिसरांमध्ये पडणाऱ्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडवून मुरविण्याच्या प्रयत्न या संस्थेअंतर्गत करण्यात येत होता. याशिवाय वनशेती, फळशेती, फुलशेती, दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन, रेशीमउद्योग आणि हस्तव्यवसाय या सारख्या प्रकल्पांनाही सुरुवात केली. स्वतःच्या श्रमातून आपला परिसर आत्मनिर्भर व स्वयंपूर्ण करण्यासाठी गावकऱ्यांना उद्युक्त करण्याचा व महाराष्ट्रात असंख्य आदर्श गावे तयार करण्याचा प्रयत्न वनराई या संस्थेने केला (वनराई, १९९३). पुरंदर तालुक्यातील केतकावळे या गावात प्रथम वनराई संस्थेने आपल्या कार्याची सुरुवात केली. आज महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये ही कामे चालू आहेत. अशा प्रकारे महाराष्ट्रभर अनेक गावांमध्ये सर्वकष विकासाचे कार्य वनराई संस्थेअंतर्गत आणि अन्य संस्थांच्या सहयोगाने चालू आहे. त्यामध्ये ग्रामीण स्वच्छता व आरोग्य, साक्षरता, व्यसनमुक्ती, सुधारित शेती, वनशेती, फळशेती, रेशीम शेती, दुग्धविकास, कुक्कुटपालन, रोपवाटिका, सुधारित बियाणे वाटप, शेतकरी व कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण, गोबरगॅस व संडास, महीला बचत गट, पडीक जमीन व पाणलोट क्षेत्र विकास, बांधावरील शेती अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांचा समावेश आहे.

**वनराईची उद्दिष्ट्ये:** एकात्मिक ग्रामीण विकास, पडीक जमिनीवर तसेच अन्य ठिकाणी वनीकरण करणे, पाणलोट क्षेत्र विकास करणे, जनसमूहाच्या सहभागातून स्वावलंबी, स्वच्छ आणि हरित खेडी निर्माण करून शहरांकडे होणारे लोकांचे स्थलांतर रोखणे, बगीचे, वने आणि अन्य सुविधांनी युक्त अशी आरोग्यदायी शहरे नियोजनपूर्वक निर्माण करणे. महिला आणि युवक यांचे सबलीकरण करणे, गतिमान विकासासाठी आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे.

**वनराई एक जनआंदोलन:** स्वयंपूर्ण खेडी तयार व्हावीत या उद्देशाने वनराई संस्था महाराष्ट्रातील २५० खेड्यात कार्यरत आहे. स्थानिक पातळीवरच रोजगार निर्मितीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, परिवार नियोजन, निरक्षरता निर्मुलन, प्रत्येक घरासाठी स्वच्छता गृह आणि गोबरगॅस, पशुपालन, आधुनिक तंत्रांच्या सहाय्याने शेती, स्वावलंबी आणि स्वच्छ हिरवीगार खेडी याकरिता वनराई आग्रही आहे. लोकांच्या सक्रीय सहभागातून वनराई हे आता एक प्रभावी जन आंदोलन झाले आहे. वनीकरणाचे कार्य एकांगी नसून सर्वकष स्वरूपाचे आहे. जमीन, पाणी, निसर्ग आणि माणूस यांचे योग्यप्रकारे नियोजन झाले तरच पर्यावरणाचा आणि सर्वांचाच विकास साधला जाऊ शकतो ही वनराई संस्थेची निश्चित भूमिका आहे. सर्वसामान्य जनतेचा वनीकरणाच्या कार्यात सहभाग मिळविण्यासाठी वनराई संस्थेमार्फत महाराष्ट्रभर शेतकरी, निसर्गप्रेमी कार्यकर्ते, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या बैठका, परिषदा, प्रशिक्षण शिबीरे व अभ्यासदौरे आयोजित करण्यात येतात. त्याचप्रमाणे सार्वजनिक उत्सवांच्या माध्यमातून पर्यावरणाविषयी माहिती देणारी प्रदर्शने भरविली जातात.

**पाणलोट क्षेत्र विकास:** सर्व गावाची व परिसराची भौगोलिक आणि नैसर्गिक परिस्थिती लक्षात घेऊन, पडेल तेथे पावसाचे पाणी अडविण्यासाठी आणि मुरविण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने सर्व पाणलोट क्षेत्रातील जमिनीवर मृदसंधारण केले पाहिजे. यासाठी चर, चेक डॅम्स, नालाबंडिंग, तलाव, बंधारे, भूअंतर्गत बंधारे, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे इ. कोठे व कसे घेता येतील याचा विचार करून तशी उपाययोजना केली पाहिजे. ही गरज लक्षात घेऊन वनराई संस्थेच्या वतीने तसेच चाळीसगाव जि. जळगाव येथील वनश्री संस्था व शिरूर येथील जय मल्हार कृषी विकास प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने महाराष्ट्रभर सुमारे एक लाखापेक्षा अधिक एकरवर शास्त्रीय पद्धतीने पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्य लोकांच्या सहभागातून सुरु केले. वनराई आणि मानवलोक ता. आंबेजोगाई या दोन संस्थांनी मिळून लातूर आणि बीड जिल्ह्यात सुमारे जवळजवळ पन्नास हजार एकरवर पाणलोट क्षेत्र विकास केला (धारिया, १९९७).

पाणलोट विकास संकल्पनेत प्रामुख्याने माती ही राष्ट्रीय संपत्ती मानून, तिच्या संवर्धनावर भर देणे सर्वाधिक आवश्यक आहे. महाराष्ट्रामध्ये ४४ हजार १८५ पाणलोट असून, वनराई संस्थेने ९ हजार ९५२ पाणलोट पूर्ण केली आहेत. केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय पुरस्कृत 'वसुंधरा एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमा'अंतर्गत वनराई संस्थेद्वारा कोकणातील ५२ गावांमध्ये सुमारे ७५ हजार एकरवर पाणलोट विकासाचे काम झाले आहे असे मोहन धारिया म्हणतात (धारिया, २०१३).

**वनराई बंधारा:** सुधारित शेती, फळबाग आणि वनविकास, कुरणविकास, कुऱ्हाडबंदी, चराईबंदी, बायोगस प्लांट, पडीक जमीन विकास आणि पाणी आडवा- पाणी जिरवा मोहीम वनराई संस्थेमार्फत मोठ्या प्रमाणात राबविण्यात येतात. पावसाळा सुरु झाला की नाले, ओढे आणि नद्यांचे प्रवाह सगळीकडे वाहू लागतात. शेताशेतामध्ये जिथे पाऊस पडतो, तिथे पाणी तुडुंब भरते. लहान-मोठ्या गावातून जाणारे छोटे नालेही या प्रवाहात सहभागी होतात. योग्य नियोजन केले तर या प्रकारे वाहून जाणारे पाणी काही प्रमाणात जागेवरच अडविता येते, आणि त्याद्वारे ते जमिनीत मुरवून भूगर्भातील पाण्याच्या पातळीतही वाढ करता येते. या दृष्टीकोनातून वनराई संस्थेने सिमेंटच्या रिकाम्या पोत्यांचे आणि जाळीचे दगडी बंधारे विकसित केले. स्थानिकरित्या उपलब्ध असणारी माती, रेती यासारखे साहीत्य सिमेंटच्या रिकाम्या पिशव्यांमध्ये भरून ग्रामस्थांच्या श्रमदानातून वाहत्या पाण्यात 'वनराई पोत्याचे बंधारे' उभारले जातात. माती आणि रेतीचे मिश्रण पिशव्यांमध्ये सैलसर भरल्यास बंधारे अगदी घट्ट होतात आणि वाहते पाणी रोखू शकतात. सप्टेंबर-ऑक्टोबर पासून फेब्रुवारी अखेरपर्यंत या बंधाऱ्यामुळे वाहणारे सर्व पाणी अडविले जाऊ शकते. पाणी आडवा-पाणी जिरवा मोहीमेअंतर्गत वनराईने विकसित केलेले सिमेंटच्या रिकाम्या पोत्यांचे अनेक कच्चे बंधारे महाराष्ट्रामध्ये नाशिक, नागपूर, अमरावती, अकोला, नगर, यवतमाळ, लातूर, रायगड आणि विशेषतः पुणे जिल्ह्यातील दुष्काळी अशा आंबेगाव, पुरंदर, हवेली, खेड, इंदापूर

तालुक्यांमध्ये गावकऱ्यांच्या सहभागातून उभारले गेले आहेत. ज्या ठिकाणी गावकरी श्रमदानाला तयार असतील त्या ठिकाणी सिमेंटच्या आणि खतांच्या रिकाम्या पोत्यांचे कच्चे बंधारे उभारण्यासाठी लागतील तेवढी पोती पुरविण्याचे काम वनराई संस्था करते. त्याचप्रमाणे गबियन म्हणजे जाळीच्या दगडी बंधाऱ्यासाठी लागणारी जाळीही वनराई पुरविते. १९९४ मध्ये २५ लाख पोत्यांचा वापर करून असे ५००० बंधारे महाराष्ट्रामध्ये उभारण्याचा प्रयोग वनराईने केला आहे.

वनराई आणि अन्य स्वयंसेवी संस्थांनी सुचविलेल्या खेड्याच्या परिसरातच पाणलोट क्षेत्र विकास करण्याचा कार्यक्रम महाराष्ट्र सरकारने स्वीकारला आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीवर मात करीत अनेक खेडी टँकरमुक्त झाली आहेत. सिमेंटच्या रिकाम्या पिशव्यात वाळू किंवा खडी भरून तयार केलेले वनराई बंधारे राज्यात लोकप्रिय झाले असून सीसीटी, लूज बोल्डर्स पद्धतीनेही पाणी अडविले जात आहे. श्रमदानाने वनराई संस्थेमार्फत २, १०, ८२७ वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत. या कार्यक्रमासाठी आता महाराष्ट्र सरकारने रोजगार हमी योजनेअंतर्गत मान्यता दिली आहे. याखेरीज गॅबियन बांध, मातीचे बांध, वनतळी, शेततळी, सीसीटी इ. माध्यमांतून पाणी साठविण्यात येत आहे. त्यामुळे कित्येक गाव टँकरमुक्त होण्यास मदत झाली आहे. वनराई बंधारे उभारले आहेत अशा ठिकाणी शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा, करडई अशा सारख्या पिकांना १-२ पाण्याच्या पाळ्या दिल्या तरी जिरायत पिकापेक्षा दीडपट वाढ पिक उत्पादनात सहजपणे होऊ शकते. तसेच विहीरींचे पाणी वाढले आहे. बंधाऱ्यामुळे साठलेल्या पाण्यावर उत्तम पिक घेतले गेल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. (काळोखे, १९९४). माथ्यापासून पायथ्यापर्यंत विविध छोटे व कमी खर्चाचे कार्यक्रम राबवून पाणी अडविण्याचा वा मुरविण्याचा कार्यक्रम सर्वत्र राबविण्यात आला. सी.सी.टी., सलग समपातळीतील चर, दगडी बांध, मातीचे बांध, रिकाम्या पोत्यांचे वनराई बांध, पाझर तलाव, शेततळी, गाळ काढून तलावाची सफाई आदी अनेक प्रकारची कामे वनराई संस्थेमार्फत केली जातात. या सर्वांचा परिणाम म्हणून गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गोंदिया, धुळे, ठाणे, रायगड इत्यादी जिल्ह्यांतील अनेक गावे टँकरमुक्त झाली. काही गावांना पूर्वी जानेवारीच्या सुरुवातीपासूनच टँकर लावावा लागत असे तेथे आता मे महिन्याच्या अखेरीला टँकरने पाणीपुरवठा करावा लागला आहे (धारिया, २०१६).

**वनराई बंधाऱ्यापासून होणारे फायदे:**

- अत्यंत कमी खर्चात हा बंधारा पूर्ण होतो, या बंधाऱ्यासाठी फक्त रिकाम्या पोत्यांची किंमत द्यावी लागते. इतर सर्व कामे श्रमदानाने होऊ शकतात.
- कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक ज्ञानाची गरज नसल्याने दोन चार शेतकरी एकत्र येऊनही वनराई बंधारा बंधू शकतात.
- एकाच नाल्यावर चार पाच वनराई बंधारे बांधले असता फार मोठ्या प्रमाणावर पाणी अडविता येते.
- पावसाळ्यानंतर वाहून जाणारे पाणी अडविले जाते आणि त्याचा वापर पिण्यासाठी तसेच शेतीसाठी होऊ शकतो. तसेच हे पाणी जमिनीत मुरल्यामुळे आसपासच्या भागातील विहीरींचे पाणीही वाढते.
- वनराई बंधाऱ्यांना कोणत्याही प्रकारची देखरेख, डागडुजी वा दुरुस्ती लागत नाही.
- स्टील, सिमेंट, रेती इ. वस्तू बाहेरून आणण्याची आवश्यकता नाही. गावातूनच सिमेंटची पोती घेऊन आणि श्रमदानातून वनराई बंधारे बांधले जातात.
- सध्याच्या आर्थिक परिस्थितीच्या काळात एखादे चेक डॅम बांधण्यासाठी जेवढा खर्च येईल त्याच्या व्याजापेक्षाही कमी रकमेत बंधारा होत असल्याने आर्थिक दृष्टीने अत्यंत उपयुक्त.
- वनराई बंधारे बांधण्यासाठी गाव पातळीवर ग्रामस्थांनी एकत्रित येण्याची गरज असल्याने आवश्यक ते नेतृत्वही विकसित होते. (गोमरकर, २००६).

**वनराईच्या कामातील लोकसहभाग:** भारतातील साडेपाच लाख खेडेगावांचा शिस्तबद्ध सर्वंकष विकास साधायचा असेल तर स्थानिक नेतृत्व निर्माण करून जनतेचा प्रत्यक्ष सहभाग मिळविणे खूप गरजेचे आहे. त्याकरिता वनराई संस्थेने गावातच सर्वंकष विकासाचे काम सर्वांच्या सहकार्याने सुरु करण्याचा निर्णय घेतला. पुरंदर तालुक्यातील केतकावळे गावातील गावकऱ्यांनी श्रमदानातून गावाकडे जाणारा रस्ता तयार केला. घर तेथे गोबरगॅस पूर्ण करण्यासाठी एका वर्षातच जवळजवळ १०० खड्डे श्रमदानातून घेतले आणि गोबरगॅस सयंत्रे उभी केली. गावाजवळ असलेल्या डोंगरावर वनीकरणाचा आणि कुरणविकासाचा कार्यक्रम राबविला. संपूर्णपणे चराईबंदी सुरु झाली. जनावरांची गरज भागवून एक वर्षातच गावाच्या महसुली उत्पन्नापेक्षाही अधिक उत्पन्न केवळ गवतापासूनच मिळू लागले. गावातील जनावरांचे दुधाचे उत्पादन वाढले, शाळेजवळ केलेल्या वनराईमुळे मुले निसर्गरम्य परिसरात बागडू लागली. नागरिकांच्या श्रमदानातून आणि वनराई संस्थेच्या सहकार्यातून झालेला हा बदल पाहण्यासाठी विविध गावांचे शेतकरी भेट देऊ लागले आणि त्यातूनच महाराष्ट्रभर वनराई आदर्श गावांची मालिका १९८८-८९ पासून सुरु झाली. खेड्यांच्या विकासाचे काम वनराईने प्रथम 'श्रमशक्तीतून ग्रामविकास' या योजनेद्वारा सुरु केले. कोणत्याही कामात लोकांचा सहभाग असला तर ते काम किंवा योजना चांगल्या प्रकारे यशस्वी होऊ शकते.

शासकीय पातळीवर/ स्तरावर लोकसहभाग मिळणे कठीण असते. परंतु स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून लोकसहभाग सहज मिळू शकतो. म्हणून लोककार्यक्रमात शासनाचा सहभाग ही वनराईची भूमिका होती. ही भूमिका आता शासकीय यंत्रणेने स्वीकारली आहे. सामाजिक वनीकरणखात्याने व वनखात्याने लोकसहभागातून सयुंक्त व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. या योजनेमुळे महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात लाखो वृक्ष लावले. खेडी हिरवीगार होण्यास मदत झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेतून केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजना स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून राबविण्यास सुरुवात झाली. त्यासाठी वनराईने या संस्थेने महत्त्वाची भूमिका पार पडली (वारघडे, २०१६).

**भूजल पातळी:** वनराईने रत्नागिरी जिल्ह्यात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम राबविला. प्रकल्प राबवितेवेळी मृद आणि जल संधारणाची अनेक कामे पूर्ण केली होती. त्यामुळे प्रकल्प भागातील भूजल पातळी २ मीटरने वाढली (वनराई, २०११-१२).

**परतीचे स्थलांतर:** ग्रामीण भागाच्या स्वयंपूर्णतेचा आग्रह वनराईकडून सातत्याने करण्यात येत आहे. या धोरणामुळे ग्रामीण भागामध्ये फायदेशीर अशा रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. गावडेवाडी आणि वरंध या गावामध्ये अनुक्रमे १३५ आणि ३५ परिवारांचे पुणे-मुंबई शहारातील गलिच्छ झोपडपट्ट्यांमधून स्वयंपूर्ण खेड्यांकडे स्थलांतर होऊन एका नव्या प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे. या परिवारांना आता चांगले जीवनमान प्राप्त होत आहे. वनराईने रत्नागिरी जिल्ह्यात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम राबविला. या कार्यक्रम भागात १०५४ कुटुंब १५० दिवसासाठी शहरांमध्ये कामासाठी स्थलांतर करत असायचे. परंतु हा कार्यक्रम राबविल्यानंतर तेथील लोकांना गावातच रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या. त्यामुळे तेथील ६३३ कुटुंबच फक्त १५० दिवसाठी रोजगारची स्थलांतरील होऊ लागले (अहवाल वनराई, २०११-१२). वनराईच्या माध्यमातून वरंध गावातील तरुणांना गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याने रोजगारासाठी पिक प्रक्रिया उद्योगाचे प्रशिक्षणही वनराईच्या माध्यमातून विविध प्रशिक्षण केंद्रात देण्यात आले; त्यामुळे शहरात गेलेली तब्बल ६७ कुटुंबे गावात परत आली. (वाघे, २०११).

वनराई आणि केंद्र सरकारचा इलेक्ट्रॉनिक्स विभाग यांनी पुरंदर तालुक्यातील देवडी येथे सुरु केलेल्या ग्रामीण विकास कार्यक्रमांमुळे या अवकासित भागाचे चित्र बदलू लागले आहे. संस्थेतर्फे वृक्षलागवड, गोबर गॅस प्रकल्प, पाझर तलाव, फलोत्पादने, महिलामंडळे, दूध सोसायट्या हे उपक्रम येथे राबविले जात आहेत. या उपक्रमासंदर्भात मोहन धारिया म्हणतात, 'जेमतेम सातवीपर्यंत शिकलेल्या तरुणांनी आणि महिलांनी इलेक्ट्रॉनिक्सचा वापर करून बांबूचे दिवे, पेनस्टँड, फुलदाणी अडी वस्तू तयार केल्या आहेत. या वस्तूंच्या विक्रीद्वारे त्यांना रोजगाराचे नवे साधन निर्माण झाले आहे' (वनराई वृत्त, १९९२).

**निष्कर्ष:** वनराई सामाजिक संस्थेच्या पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, वनराई बंधारे या कार्यक्रमातून ग्रामीण विकासासाठी महत्वाचे योगदान देण्यात आले आहे. ग्रामीण विकासात लोकसहभागाची भूमिका खूप महत्वाची असते. एकूणच वनराईच्या कार्यक्रमांमध्ये सकारात्मक स्वरूपाचा लोकसहभाग दिसून आलेला आहे. या कामांमुळे गाव खेड्यांमध्ये परतीचे स्थलांतर घडून येताना दिसून येत आहे. गावांचा विकास घडवून आणावयाचा असेल तर सकारात्मक स्वरूपाचे काम करून लोकसहभागातून विकास घडून येऊ शकतो हे वनराईच्या कामांमधून दिसून येते.

**संदर्भ सूची:**


१. इरावल्ली, प्रसन्ना. *बाजार पाण्याचा हिंदुस्थान बिव्हरेज प्रा. लि. चा महाराष्ट्राच्या संदर्भात केलेला अभ्यास.* जागतिकीकरन आणि महाराष्ट्र जल, जंगल, जमीन आणि शासन. पुणे: नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टडीज. (पान क्र. २४३ ते २७४).
२. काळे, संपत. (२०१६). *लोकाभिमुख जलनियोजन जलसुरक्षेचा खात्रीशीर मार्ग.* वनराई विशेषांक: जल नियोजन आणि व्यवस्थापन. पुणे:वनराई. पान क्र. २६९ ते २७४.
३. काळोखे, ज. वि.. (१९९४). *वनराई बंधारा देई पिकांना थारा.* वनराई. जानेवारी, १९९४. पान क्र. ४ ते १०.
४. गोमरकर, श्री. स.. (२००६). *वनराई बंधारे.* वनराई. मे, २००६. पान क्र. २१ ते २२.
५. गोमरकर, श्री.. (२००९). *पाणलोट क्षेत्र विकास- वनराई बंधाऱ्यांचे योगदान.* वनराई. सप्टेंबर, २००९. पान क्र. २३ ते २६.
६. धारिया, मोहन. (१९९७). *ग्रामीण विकास भविष्यातील वाटचाल.* वनराईची वाटचाल. वनराई. जुलै, १९९७. पान क्र. ७ ते १२.
७. धारिया, मोहन. (१९९८*). पाणी, पाणी....* वनराई. मे, १९९८. पान क्र. ३ ते ६.
८. धारिया, मोहन. (२०१६). *पावसाची अनिश्चितता- जलसंवर्धनासाठी जनआंदोलन.* वनराई. मे, २०१६. पान क्र. ४ ते ६.
९. वाघे, खंडूजी. (२०११). *वनराईने केला वरंधगावचा कायापालट.* वनराई. जुलै, २०११. पान क्र. २९ ते ३१.
१०. वाडेकर, अमित. (२०१५). *महाराष्ट्रातील दुष्काळ: समस्या आणि उपाययोजना.* पुणे: वनराई, वर्ष चोवीसावे. अंक तिसरा. मार्च २०१५. पान क्र. ६ ते ७.
११. वारघडे, सुरेशचंद्र. (२०१६). *वनराईचा संकल्प- खेड्यांचा कायाकल्प.* वनराई. ऑगस्ट, २०१६. पान क्र. ११ ते १४.


# महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची सद्यस्थिती: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ.राजकुमार मुकुंदराव गांधले** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉमर्स व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे महाविद्यालय अहिल्याश्रम, नाना पेठ पुणे

**प्रस्तावना:** शिक्षण हा मानवी जीवनाचा पाया आहे आणि प्राथमिक शिक्षण हा त्या पायाचा सर्वात महत्त्वाचा दगड आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१-अ नुसार, ६ ते १४ वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. महाराष्ट्र हे देशातील प्रगत राज्य मानले जाते, जिथे 'शिक्षण सोहळा' आणि 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' यांसारख्या मोहिमा राबवल्या गेल्या आहेत.

**संशोधन विषयाची पार्श्वभूमी:** महाराष्ट्राला महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांसारख्या समाजसुधारकांचा शैक्षणिक वारसा लाभला आहे. १९६० मध्ये राज्याची निर्मिती झाल्यापासून प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी जिल्हा परिषदांच्या माध्यमातून मोठी यंत्रणा उभारण्यात आली. मात्र, जागतिकीकरण आणि खाजगीकरणाच्या युगात सरकारी शाळांसमोर मोठी आव्हाने उभी राहिली आहेत.

**संशोधनाची गरज व महत्त्व:**

- **ग्रामीण-शहरी दरी:** ग्रामीण आणि शहरी भागातील शिक्षणाच्या गुणवत्तेत असलेली तफावत तपासणे.
- **डिजिटल तफावत:** कोरोना काळानंतर ऑनलाइन शिक्षणामुळे निर्माण झालेली दरी अभ्यासणे.

- **गळतीचे प्रमाण:** प्राथमिक स्तरावर शिक्षण सोडून देणाऱ्या विद्यार्थ्यांची कारणे शोधणे.
- **गुणवत्ता:** विद्यार्थी केवळ साक्षर होत आहेत की त्यांना संकल्पना समजून घेता येत आहेत, हे पाहणे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाच्या सध्याच्या पायाभूत सुविधांचा अभ्यास करणे. २) प्राथमिक शिक्षणासाठी राबवल्या जाणाऱ्या शासकीय योजनांच्या प्रभावीपणाचे मूल्यमापन करणे. ३) प्राथमिक शिक्षणासमोरील प्रमुख समस्या शोधणे आणि त्यावरील उपाययोजना सुचवणे.

**संशोधन गृहीतके:** १) महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शाळांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा अभाव आहे. २) शासकीय योजनांचा लाभ सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांपर्यंत पूर्णपणे पोहोचत नाही. ३) खाजगी शाळांच्या वाढत्या प्रभावामुळे जिल्हा परिषद शाळांच्या पटसंख्येवर परिणाम होत आहे.

**संशोधन पद्धती:** या संशोधनासाठी '**वर्णनात्मक संशोधन पद्धती**' वापरण्यात आली आहे.

**द्वितीयक स्त्रोत:** शासकीय अहवाल (Economic Survey of Maharashtra), 'प्रथम' संस्थेचा 'असर' (ASER) अहवाल, आणि शिक्षण विभागाची सांख्यिकी.

**नमुना निवड:** महाराष्ट्रातील काही निवडक जिल्हा परिषद आणि खाजगी शाळांचा अभ्यास.

**महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची सद्यस्थिती:** सध्या महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाचे दोन मुख्य प्रवाह दिसतात: **शासकीय (Z.P./N.P.)** आणि **खाजगी (Aided/Unaided).**

- **पटसंख्या:** खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे पालकांचा ओढा वाढला आहे.
- **शिक्षक-विद्यार्थी प्रमाण:** आरटीई (RTE) नुसार ३० विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक असणे बंधनकारक आहे, जे बऱ्याच ठिकाणी पाळले जाते, परंतु दुर्गम भागात शिक्षकांची कमतरता आहे.
- **डिजिटल शिक्षण:** अनेक शाळांमध्ये 'डिजिटल क्लासरूम' उभारले गेले आहेत, परंतु त्यांच्या देखभालीचा प्रश्न कायम आहे.

**८. शासकीय योजना व उपक्रम**

महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी शासन विविध स्तरांवर प्रयत्न करत आहे. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल:

- **निपुण भारत अभियान (FLN):** पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (Foundational Literacy and Numeracy) यावर आधारित ही योजना आहे. इयत्ता ३ री पर्यंतच्या प्रत्येक मुलाला वाचता, लिहिता आणि मूलभूत गणित करता आले पाहिजे, हे याचे मुख्य ध्येय आहे.
- **पंतप्रधान पोषण योजना (पूर्वीची माध्यान्ह भोजन योजना):** केवळ भूक मिटवणे हा उद्देश नसून, मुलांमधील कुपोषण कमी करणे आणि शाळेतील गळती (Drop-out rate) रोखणे हा यामागचा मुख्य हेतू आहे. महाराष्ट्रात आता यात 'अंडी' किंवा 'केळी' यांसारख्या अतिरिक्त आहाराचा समावेश केला जात आहे.
- **मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (RTE - २५% आरक्षण):** खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलांसाठी २५% जागा आरक्षित ठेवल्या जातात, ज्याचे शुल्क शासन भरते.
- **समग्र शिक्षा:** यामध्ये 'सर्व शिक्षा अभियान', 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान' आणि 'शिक्षक शिक्षण' या तिन्हींचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. यातून शाळांना संगणक लॅब, ग्रंथालये आणि क्रीडा साहित्यासाठी अनुदान मिळते.
- **आनंददायी शनिवार:** मुलांच्या दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी दर शनिवारी 'दप्तरमुक्त शाळा' आणि सहशालेय उपक्रम राबवले जातात.
- **प्राथमिक शिक्षणासमोरील प्रमुख समस्या**

केवळ सोयीसुविधा असून चालत नाही, तर व्यवस्थेमध्ये काही मूळच्या अडचणी आहेत:

1. **विद्यार्थी गळती आणि स्थलांतर (Migration Issue):** विशेषतः मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांची मुले ६ महिने स्थलांतरित होतात. यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडतो आणि कालांतराने ती मुले कायमची शाळा सोडून देतात.
2. **कमी पटसंख्येच्या शाळांचे समायोजन:** शासकीय धोरणानुसार २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे जवळच्या मोठ्या शाळेत विलीनीकरण केले जात आहे. यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचा शाळेचा प्रवास वाढून शिक्षणात अडथळे निर्माण होत आहेत.
3. **शिक्षणामधील 'डिजिटल डिव्हाइड' (Digital Divide):** शहरी शाळांमध्ये हाय-स्पीड इंटरनेट आणि टॅब्लेट्स आहेत, तर ग्रामीण भागात वीजपुरवठा खंडित होणे आणि इंटरनेट रेंज नसणे यामुळे ई-लर्निंगचा फायदा सर्वांना समान मिळत नाही.
4. **प्रशासकीय कामाचा ताण:** शाळांमधील माहिती ऑनलाईन भरण्याचे (उदा. UDISE+, संचमान्यता, शालार्थ) काम शिक्षकांनाच करावे लागते. यामुळे त्यांचा शिकवण्याचा प्रत्यक्ष वेळ प्रशासकीय कामात खर्च होतो.

**उपाययोजनांसाठी ठोस सूचना:** संशोधन निष्कर्षानुसार खालील बदल आवश्यक वाटतात:

- **मोबाईल स्कूल (फिरती शाळा):** स्थलांतरित मजुरांच्या मुलांसाठी त्यांच्या वस्तीवरच शिक्षणाची सोय करणे.
- **विशेष शिक्षक भरती:** कला, क्रीडा आणि संगणक या विषयांसाठी प्रत्येक केंद्रावर स्वतंत्र शिक्षकांची नियुक्ती करणे.
- **शाळा दत्तक योजना:** कॉर्पोरेट कंपन्यांच्या (CSR) माध्यमातून ग्रामीण शाळांचा कायापालट करणे.
- **मातृभाषेतून शिक्षण:** प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षणावर भर देणे.

**निष्कर्ष:** महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती सुधारण्यासाठी शासनाने अनेक पावले उचलली असली, तरी अंमलबजावणीत अजूनही त्रुटी आहेत. गुणात्मक शिक्षणासाठी केवळ इमारती बांधून चालणार नाही, तर शिक्षकांचे प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता (वाचन, लेखन, गणित) विकसित करण्यावर भर देणे आवश्यक आहे. सरकारी शाळांना 'मॉडेल स्कूल' बनवल्यास खाजगीकरणाचा वाढता प्रभाव कमी होऊ शकतो.

**सांख्यिकीय विश्लेषण (तक्ते):** खालील तक्ते महाराष्ट्रातील शैक्षणिक स्थितीचे दर्शन घडवतात:

**तक्ता क्र. १: महाराष्ट्रातील शाळांची व्याप्ती (अंदाजे आकडेवारी)**

| शाळांचा प्रकार | संख्या (अंदाजे) | नियंत्रण संस्था |
|---|---|---|
| शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था | ६५, ०००+ | जिल्हा परिषद, मनपा, नपा |
| खाजगी अनुदानित | २१, ०००+ | खाजगी संस्था (शासनाचे अनुदान) |
| खाजगी विनाअनुदानित | १५, ०००+ | खाजगी संस्था |
| एकूण | १, ०१, ०००+ | |

**तक्ता क्र. २: मूलभूत सुविधांची उपलब्धता (टक्केवारीमध्ये)**

| सुविधा | उपलब्ध शाळा (%) | कमतरता (%) |
|---|---|---|
| पिण्याचे शुद्ध पाणी | ९६% | ४% |
| मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह | ९२% | ८% |
| संगणक संच / लॅब | ५५% | ४५% |
| इंटरनेट सुविधा | ३५% | ६५% |
| खेळाचे मैदान | ७०% | ३०% |

**संशोधनाचे विशेष विश्लेषण:**

**१. दप्तराचे ओझे:** उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार मुलांच्या वजनाच्या १०% पेक्षा जास्त दप्तराचे वजन नसावे. महाराष्ट्रातील अनेक शाळांनी 'एकात्मिक पाठ्यपुस्तके' (महिनावार पुस्तके) सुरू करून हे ओझे कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**२. शाळा सिद्धी:** शाळांचे स्वयं-मूल्यमापन करण्यासाठी केंद्र शासनाने सुरू केलेला हा उपक्रम महाराष्ट्रात प्रभावीपणे राबवला जातो. यामध्ये शाळांना 'अ', 'ब' किंवा 'क' श्रेणी दिली जाते.

**संदर्भसूची**

१. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, वार्षिक अहवाल २०२४-२५.
२. ASER (Annual Status of Education Report) - २०२३.
३. शिक्षण हक्क कायदा (RTE) २००९ - नियमावली.
४. डॉ. जे. पी. नाईक - भारतीय शिक्षण पद्धती वरील लेख.
५. प्रदीप आगलावे- सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे.
६. डॉ. बी. एम. कऱ्हाडे - पाश्चात्य समाजशास्त्रीय विचारवंत.

# मुलींच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. कोमल राकेश भोसले** डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे कला महाविद्यालय, नाना पेठ पुणे.

**प्रस्तावना:** शिक्षण हा मानवी विकासाचा पाया आहे. 'मुलगी शिकली, प्रगती झाली' हे ब्रीदवाक्य आपण सर्वत्र पाहतो, परंतु आजही माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर मुलींच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण चिंताजनक आहे. शिक्षणाच्या हक्काचा कायदा (RTE) असूनही, अनेक सामाजिक आणि आर्थिक कारणांमुळे मुलींना आपले शिक्षण अर्ध्यावरच सोडावे लागते. स्त्री साक्षरतेचा दर वाढला असला, तरी गळतीचे (Drop-out) आव्हान अजूनही कायम आहे.

**संशोधन विषयाची पार्श्वभूमी:** स्वातंत्र्यानंतर भारताने शिक्षण क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. मात्र, ग्रामीण आणि दुर्गम भागातील मुलींच्या बाबतीत चित्र वेगळे आहे. प्राथमिक स्तरावर प्रवेश घेणाऱ्या मुलींची संख्या मोठी असली, तरी इयत्ता ८ वी नंतर हे प्रमाण वेगाने घटताना दिसते. लिंगभेदाची परंपरा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांमुळे मुलींच्या शिक्षणात खंड पडत आला आहे.

**संशोधनाची गरज व महत्त्व:**

- **सामाजिक समतोल:** समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मुलींचे शिक्षण महत्त्वाचे आहे.
- **आर्थिक सबलीकरण:** मुलगी शिकली तर ती आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होते, ज्यामुळे गरिबीचे दुष्टचक्र थांबण्यास मदत होते.
- **धोरण निश्चिती:** गळतीची नेमकी कारणे शोधल्यास सरकारला अधिक प्रभावी शैक्षणिक धोरणे आखता येतील.
- **जागरूकता:** पालकांना आणि समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी या संशोधनाची गरज आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) माध्यमिक स्तरावरील मुलींच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण अभ्यासणे. २) मुलींच्या शाळा सोडण्यामागील प्रमुख कारणांचा शोध घेणे. ३) शाळा सोडल्यामुळे मुलींच्या आयुष्यावर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करणे. ४) गळती रोखण्यासाठी कार्यान्वित असलेल्या शासकीय योजनांचा आढावा घेणे.

**संशोधन गृहीतके:** १) ग्रामीण भागात शहरी भागाच्या तुलनेत मुलींच्या गळतीचे प्रमाण जास्त आहे. २) कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींमध्ये शाळा सोडण्याचे प्रमाण अधिक आहे. ३) शाळांमधील भौतिक सुविधांचा अभाव (उदा. स्वच्छतागृहे) हे गळतीचे एक प्रमुख कारण आहे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी '**वर्णनात्मक संशोधन पद्धती**' वापरली आहे.

**प्राथमिक माहिती:** प्रत्यक्ष भेटी, प्रश्नावली आणि मुलाखती याद्वारे गोळा केली जाईल.

**दुय्यम माहिती:** सरकारी अहवाल (UDISE), जनगणनेची आकडेवारी, विविध शैक्षणिक लेख आणि इंटरनेटवरील विश्वसनीय स्रोतांचा वापर केला जाईल.

**मुलींच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण: सद्यस्थिती** - भारतातील शैक्षणिक गळतीचे प्रमाण पाहताना आपल्याला टप्प्यानुसार बदल जाणवतो. ***UDISE+ (Unified District Information System for Education)*** च्या ताज्या आकडेवारीनुसार, प्राथमिक स्तरावर (इ. १ ली ते ५ वी) गळतीचे प्रमाण अत्यंत नगण्य (साधारण ०.८% ते १.५%) झाले आहे. मात्र, खरी समस्या माध्यमिक स्तरावर सुरू होते.

- **माध्यमिक स्तर** (Secondary Level): इयत्ता ९ वी आणि १० वी मध्ये मुलींच्या गळतीचा सरासरी दर **१३.७% ते १५%** च्या आसपास आहे. काही मागास जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण **२०% ते २५%** पर्यंत जाते.
- **उच्च माध्यमिक स्तर** (Higher Secondary): १० वी नंतर ११ वी मध्ये प्रवेश घेताना अनेक मुली शिक्षण कायमचे थांबवतात. व्यावसायिक शिक्षणाकडे वळणाऱ्या मुलींचे प्रमाण मुलांच्या तुलनेत कमी आहे.
- **प्रादेशिक तफावत:** शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण आणि आदिवासी भागात गळतीचे प्रमाण दुप्पट आहे.

**मुलींच्या शिक्षणातील गळतीची कारणे (सविस्तर माहिती)**

**अ) आर्थिक कारणे: गरिबी आणि प्राधान्यक्रम:** आर्थिक चणचण हे मुलींच्या गळतीमागील सर्वात मोठे आणि मूळ कारण आहे. याचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे: जरी सरकारी शाळांमध्ये शिक्षण मोफत असले, तरी गणवेश, वह्या, खासगी शिकवणी आणि प्रवासाचा खर्च गरीब पालकांना पेलवत नाही. अशा वेळी "मुलगा कमवता होईल" या विचारातून मुलाच्या शिक्षणावर खर्च केला जातो आणि मुलीचे शिक्षण थांबवले जाते. ग्रामीण भागात जेव्हा आई-वडील शेतमजुरीसाठी किंवा वीटभट्टीवर कामासाठी जातात, तेव्हा मुलींना त्यांच्यासोबत मजुरीसाठी नेले जाते. यातून मिळणारे ५०-१०० रुपये कुटुंबासाठी महत्त्वाचे वाटतात, ज्यामुळे मुलीचे शाळा सुटते. कुटुंबावर कर्ज असल्यास मुलीला कामाला लावून ते फेडण्याचा प्रयत्न केला जातो, जो तिच्या शिक्षणाच्या मुळावर येतो.

**ब) घरकाम व कौटुंबिक जबाबदारी:** मुलींना लहानपणापासूनच 'गृहिणी' म्हणून पाहिले जाते, ज्यामुळे त्यांच्या खांद्यावर अकाली जबाबदाऱ्या येतात: जर आई-वडील कामावर जात असतील, तर लहान भावंडांना घरी सांभाळण्याची जबाबदारी मोठ्या मुलीवर येते. यामुळे तिला शाळेत जाता येत नाही. पाणी भरणे, सरपण गोळा करणे, स्वयंपाक करणे आणि साफसफाई करणे या कामात मुलीचा दिवसातील मोठा वेळ जातो. यामुळे ती अभ्यासात मागे पडते आणि हळूहळू शाळेबद्दलची गोडी संपून गळती होते. ऊसतोड कामगार किंवा बांधकाम मजुरांचे कुटुंब कामासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित होते. या स्थलांतरामध्ये मुलींच्या शिक्षणाची साखळी तुटते आणि त्या पुन्हा शाळेत परतत नाहीत.

**क) सामाजिक व सुरक्षा कारणे:** शाळा घरापासून ३-४ किमी लांब असल्यास, मुलीला पायी पाठवणे पालकांना सुरक्षित वाटत नाही. रस्त्यातील छेडछाडीच्या भीतीपोटी मुलीचे शिक्षण १० वी नंतर थांबवले जाते. आजही अनेक समाजात मुलगी 'परक्याचे धन' मानली जाते. "जास्त शिकून काय करायचे? शेवटी चूल आणि मूलच सांभाळायचे आहे, " ही संकुचित वृत्ती बालविवाहास आणि पर्यायाने गळतीस कारणीभूत ठरते. आजही अनेक जिल्ह्यांमध्ये १३ ते १६ वयोगटातील मुलींचे विवाह लावून दिले जातात. लग्नानंतर सासरच्या जबाबदाऱ्यांमुळे शिक्षण पूर्ण करणे अशक्य होते. गावापासून हायस्कूल लांब असल्यास रस्त्यातील छेडछाड किंवा अपहरणाच्या भीतीपोटी पालक मुलीला शाळेत पाठवणे बंद करतात.

**ड) शैक्षणिक व भौतिक कारणे:** शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र आणि कार्यान्वित स्वच्छतागृहे नसणे हे किशोरवयीन मुलींसाठी मोठे संकट असते. मासिक पाळीच्या काळात सोयींअभावी त्या ५-६ दिवस गैरहजर राहतात, ज्यामुळे कालांतराने अभ्यासात खंड पडतो.

**शासकीय योजना व उपक्रम:** शासकीय योजनांचा हेतू हा आर्थिक आणि सामाजिक अडथळे दूर करणे आहे:

- **समग्र शिक्षा अभियान:** शाळेच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा आणि मुलींसाठी हॉस्टेलची सोय.
- **कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (KGBV):** वंचित घटकांतील मुलींसाठी विशेष निवासी शाळा.
- **सायकल वाटप योजना:** ग्रामीण भागातील मुलींना सायकलींचे वाटप, ज्यामुळे गळतीचे प्रमाण कमी झाले आहे.
- **मिड-डे मील योजना:** यामुळे पालकांवरील जेवणाचा आर्थिक भार कमी होतो आणि हजेरी वाढते.

**उपाययोजना व सूचना:** संशोधनाच्या आधारे खालील उपाय सुचवता येतील: १) प्रत्येक गावात शिक्षण समितीने गळती झालेल्या मुलींची यादी करून त्यांना पुन्हा शाळेत आणण्यासाठी 'घरोघरी भेट' मोहीम राबवावी. २) १० वी नंतर मुलींना कौशल्य आधारित कोर्सेस (उदा. नर्सिंग, टेलरिंग, कोडिंग) उपलब्ध करून द्यावेत जेणेकरून पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटेल. ३) शाळांमध्ये सॅनिटरी पॅड्स उपलब्ध करणे आणि या विषयावर वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे. ४) शिष्यवृत्तीची रक्कम थेट (DBT) पालकांऐवजी मुलीच्या बँक खात्यात जमा करावी.

**निष्कर्ष:** मुलींच्या शिक्षणातील गळती ही केवळ शैक्षणिक समस्या नसून ती एक गंभीर सामाजिक समस्या आहे. केवळ कायदे करून किंवा मोफत सवलती देऊन हे प्रमाण शून्यावर येणार नाही. त्यासाठी समाजाच्या मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे. जेव्हा पालकांना खात्री पटेल की 'शिक्षण' हे त्यांच्या मुलीच्या सुरक्षित भविष्याचे साधन आहे, तेव्हाच ही गळती थांबेल.

**संदर्भसूची**
१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP २०२०) अहवाल.
२. वार्षिक शैक्षणिक स्थिती अहवाल (ASER).
३. भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (UDISE अहवाल).
४. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
५. समाजशास्त्रीय मासिके आणि शोधनिबंध.
६ प्रदीप आगलावे-सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे
७ डॉ. बी. एम. कऱ्हाडे - पाश्चात्य समाजशास्त्रीय विचारवंत -

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ: महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासातील भूमिका आणि आव्हाने एक अभ्यास

**मनिषा बाबुराव भागवत** संशोधिक विद्यार्थीनी, मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम.
**डॉ. डी. आर. दामोदर** मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम.

**सारांश:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हे महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी भागांना जोडणारे सर्वात मोठे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पुरविणारा निमशासकीय स्तरावरील महाराष्ट्र शासनाचा एक विभाग आहे. ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासासाठी सार्वजनिक वाहतूक महत्त्वाची असून, ग्रामीण लोकांना शहरी भागासोबत जोडल्या जावे, रोजगार, शिक्षण, आरोग्य सुविधा आणि आर्थिक व्यवहार सहज उपलब्ध व्हावेत यासाठी महामंडळाची भूमिका महत्त्वाची आहे. प्रस्तुत संशोधन पत्रिका ही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने मागील दशकापासून आतापर्यंत विविध योजनांद्वारे ग्रामीण भागात वाढवलेली बस गाड्यांची सेवा, डिजिटल तिकीटिंग, ग्रामीण मोबाईल ॲप मार्फत उदा. फोन-पे, गुगल-पे इ. वापर, तसेच इंटरनेट, वायफाय इ. डिजिटल सेवा वापर, विशेष सेवा योजना, पर्यटन सेवा आणि शालेय बस सुविधा देऊन ग्रामिण विकासामधील भूमिकेची गत साहित्याच्या आधारे विश्लेषणात्मक मांडणी करते. तथापि, आर्थिक तोटा, जुनाट फ्लीट, मनुष्यबळा अभावी निर्माण होणाऱ्या समस्या, निर्जळ बस रूट आणि वाहतूक सेवा टिकवण्यासाठी भेडसावणाऱ्या समस्या, वेळोवेळी उत्पन्न होणाऱ्या अडचणीवर धोरणात्क उपाययोजना सुचविल्या आहेत. ही संशोधन पत्रिका अन्य संशोधकासाठी, धोरणकर्त्यासाठी, महामंडळात कार्यरत कर्मचाऱ्यासाठी उपयोगी ठरेल.
**महत्वाचे मुद्दे:** सार्वजनिक वाहतुक, ग्रामीण विकास, महिलांना रोजगाराच्या संधी, आर्थिक तोटा, कर्मचारी समस्या

**प्रस्तावना:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हा सार्वजनिक उपक्रम महाराष्ट्र सरकारच्या अंतर्गत काम करणारा प्रमुख सार्वजनिक वाहतूक पुरवठादार आहे. हा उपक्रम ग्रामीण तसेच शहरी भागांना जोडून महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचा पाया मजबूत करतो. ग्रामीण भागात राहणाऱ्या नागरिकांसाठी सार्वजनिक बस सेवा हे महत्त्वाचे वाहतुकीचे साधन आहे जिथे खासगी वाहतूक सेवा उपलब्ध नसते किंवा महाग असते. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे मिशन म्हणजे *महत्वाचे डिमांड असलेल्या मार्गांवर स्वस्त, सुरक्षित, विश्वासार्ह बस सेवा पुरवणे आहे.* ग्रामीण भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना, महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना, कामगारांना व अन्य प्रवाशांना रोजचा प्रवास बस शिवाय कठीण आहे. तसेच नवीन तंत्रज्ञानाद्वारे तिकीटिंग, मोबाइल ॲप सेवांचा स्वीकार ग्रामीण भागातील नागरिकांनी केला आहे.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची ग्रामीण महाराष्ट्रातील भूमिका:**

**ग्रामीण-शहरी भागातील महत्वाचा दुवा:** आपल्या दळणवळणाच्या साधानाद्वारे ग्रामीण भागांना जिल्हा मुख्यालये, बाजारपेठा, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये यास जोडते जेणेकरून नागरिकांचे सामजिक व आर्थिक आयुष्य सुलभ व सुखकर होईल. MSRTC च्या नेटवर्कमुळे गावांतील तरुणांना शहरी संधी मिळतात आणि ते रोज प्रवास करून शिक्षण व रोजगार करू शकतात.

**डिजिटल तिकीटिंग आणि सुविधा:** मोबाईल ॲप व डिजिटल तिकीटिंगच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रवाशांना तिकीट खरेदी अधिक सोयीस्कर झाली आहे. २०२५ मध्ये MSRTCचे नवीन मोबाइल ॲप ग्रामीण महाराष्ट्रातील १० लाखांहून अधिक वापरकर्त्यांनी उपयोगात आणले आहे ज्यामुळे तिकीट खरेदी, बस वेळा व प्रवास नियोजन अधिक सुलभ झाले आहे.

**विशेष सेवा योजना:** वर्ष २०२५ मध्ये MSRTC ने Package Tours योजना यशस्वीरित्या राबवली ज्यामुळे ४, ०३९ टूर पूर्ण झाली आणि महसूल वाढला आहे, ज्यामुळे ग्रामीण पर्यटन व पर्यटनाशी संबंधित रोजगार वाढले. तसेच MSRTC शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी त्यांना परवडणाऱ्या दरात बस सेवा उपलब्ध करून देत आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण-सहली अधिक परवडणारे झाले आहेत.

**समावेशी रोजगार संधी:** महाराष्ट्र सरकारने आदिवासी समुदायातील १६३ महिलांना बस चालक म्हणून प्रशिक्षित करण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे ग्रामीण महिला सशक्तीकरणाला व रोजगाराला चालना मिळाली आहे. गेल्या दशकामध्ये प्रकाशित झालेल्या वेगवेगळ्या माहितीच्या आधारे केलेल्या विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये महिलांची वाढती नियुक्ती ही केवळ रोजगारनिर्मितीपुरती मर्यादित नसून ग्रामीण विकास, सामाजिक समावेश आणि महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांना वाहक, चालक तसेच प्रशासकीय पदांवर संधी

मिळाल्यामुळे त्यांचे आर्थिक स्वावलंबन वाढले असून सामाजिक प्रतिष्ठेतही सकारात्मक बदल दिसून येतो. सार्वजनिक वाहतूकसारख्या परंपरागतपणे पुरुषप्रधान क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढणे हे लैंगिक समानतेच्या दृष्टीने एक प्रगत पाऊल मानले जाते (MSRTC, २०२२).

अभ्यासातून असेही आढळते की महिला कर्मचारी प्रवाशांशी अधिक संवेदनशील, संयमशील व सहकार्याची भूमिका घेत असल्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांसाठी प्रवास अधिक सुरक्षित व विश्वासार्ह बनतो. विशेषतः ग्रामीण भागात, जिथे महिलांच्या प्रवासासंबंधी सुरक्षिततेचे प्रश्न अधिक गंभीर असतात, तेथे महिला वाहक व कर्मचारी उपस्थितीमुळे प्रवासी अनुभवात सुधारणा झाल्याचे निरीक्षण नोंदवले जाते. यामुळे सार्वजनिक वाहतुकीवरील लोकांचा विश्वास वाढण्यास हातभार लागतो. तथापि, MSRTC मधील महिलांच्या नियुक्तीसमोरील आव्हानेही तितकीच गंभीर असल्याचे दिसून येते. अनियमित कामाच्या वेळा, रात्रीच्या पाळ्या, लांब पल्ल्याच्या बस मार्गांवरील कामामुळे महिला वाहकांना कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि व्यावसायिक आयुष्य यांचा समतोल साधणे कठीण जाते. विशेषतः ग्रामीण पार्श्वभूमीतील महिलांसाठी ही समस्या अधिक तीव्र स्वरूपात जाणवते. याशिवाय, अनेक बस डेपो व थांब्यांवर महिलांसाठी आवश्यक असलेल्या स्वतंत्र स्वच्छतागृह, विश्रांतीगृह आणि सुरक्षित पायाभूत सुविधा अपुऱ्या असल्याचे आढळते. सामाजिक मानसिकता व लैंगिक पूर्वग्रह हे देखील एक महत्त्वाचे आव्हान आहे. चालक व तांत्रिक पदांवर महिलांची नियुक्ती आजही काही प्रमाणात साशंकतेने पाहिली जाते. "सार्वजनिक वाहतूक ही पुरुषांची नोकरी आहे" अशी पारंपरिक धारणा महिलांच्या व्यावसायिक प्रगतीस अडथळा ठरते. तसेच, प्रशिक्षण, पदोन्नती व निर्णयक्षम पदांवर महिलांचे प्रतिनिधित्व तुलनेने कमी असल्याचेही माध्यमिक डेटामधून दिसून येते.

थोडक्यात, MSRTC मधील महिलांची भूमिका ग्रामीण विकासाच्या व्यापक प्रक्रियेशी निगडित असून ती आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक स्तरावर सकारात्मक परिणाम घडवून आणत आहे. मात्र, ही भूमिका अधिक प्रभावी करण्यासाठी महिला-केंद्रित धोरणे, सुरक्षित व अनुकूल कार्यपरिसर, तसेच समान संधींची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. अशा उपाययोजनांद्वारे MSRTC केवळ वाहतूक सेवा देणारी संस्था न राहता ग्रामीण महिला सक्षमीकरणाची एक महत्त्वाची यंत्रणा ठरू शकते.

**MSRTC चे आर्थिक व सेवा अवलोकन:**

**सेवा विस्तार:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (MSRTC) आपल्या बससेवा अधिक प्रभावी आणि सर्वसामान्य नागरिकांना उपयोगी ठराव्यात यासाठी फ्लीट व मार्ग विस्तारावर भर दिला आहे. नव्या बसेसचा समावेश करून तसेच ग्रामीण व दुर्गम भागांतील मार्गांवर नियमित सेवा सुरू करून प्रवाशांच्या प्रवासाच्या संधी वाढवण्यात आल्या आहेत. विशेषतः ग्रामीण मार्गांवर पुन्हा सुरू करण्यात आलेल्या ३ x २ आसन रचनेच्या बसांमुळे प्रवाशांना अधिक आरामदायी, सुरक्षित आणि किफायतशीर प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली आहे. या बसेसमुळे प्रवासासाठी जास्त जागा, बसताना-सुटताना सुलभता आणि दीर्घ अंतराच्या प्रवासात आराम मिळतो. फ्लीट विस्तारामुळे बसची वारंवारता वाढली असून, त्यामुळे प्रवाशांना वेळेवर बस उपलब्ध होऊ लागली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि कामगार वर्गासाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

एकंदरीत, MSRTC च्या फ्लीट आणि मार्ग विस्तार धोरणामुळे ग्रामीण भागांमध्ये प्रवाशांची संख्या वाढली असून, दळणवळण अधिक सुलभ, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख बनले आहे. यामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळण्यासही महत्त्वाची मदत होत आहे.

**पारदर्शकता आणि प्रशिक्षण:** MSRTC आणि राष्ट्रीय अप्रत्यक्ष कर व सीमाशुल्क प्रशिक्षण अकादमी (NADT) यांच्यात झालेल्या प्रशिक्षण करारामुळे कर्मचाऱ्यांच्या कौशल्यात आणि कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे. या प्रशिक्षणामुळे कर्मचारी प्रशासन, आर्थिक शिस्त, नियमांचे पालन आणि सेवा वितरण प्रक्रियेबाबत अधिक सक्षम बनतील. परिणामस्वरूप, निर्णय प्रक्रिया अधिक स्पष्ट व जबाबदार होईल. तसेच, नियोजित आणि मानकाधिष्ठित प्रशिक्षणामुळे कामकाजात पारदर्शकता वाढेल, अनियमितता कमी होतील आणि सेवांची गुणवत्ता सुधारेल. प्रवाशांशी व्यवहार करताना कर्मचारी अधिक व्यावसायिक दृष्टिकोन स्वीकारतील, ज्यामुळे जनतेचा MSRTC वरील विश्वास अधिक बळकट होईल. एकूणच, MSRTC—NADT प्रशिक्षण करार हा केवळ कर्मचाऱ्यांच्या विकासापुरता मर्यादित नसून, तो सार्वजनिक सेवा व्यवस्थेमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कार्यातील आव्हाने:**

**आर्थिक ताण:** MSRTC समोर सध्या मोठ्या प्रमाणावर आर्थिक आव्हाने उभी आहेत. बससेवा चालवण्यासाठी लागणारा इंधन खर्च, देखभाल, कर्मचारी वेतन, विमा व प्रशासकीय खर्च सतत वाढत आहेत. त्याच वेळी महिला, ज्येष्ठ नागरिक आणि इतर सामाजिक गटांसाठी दिल्या जाणाऱ्या सवलतींमुळे महामंडळाला दररोज सुमारे ३ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. ही सामाजिकदृष्ट्या आवश्यक योजना असली तरी तिचा थेट आर्थिक भार MSRTC वर पडतो. त्यामुळे राज्य सरकारकडून पुरेशी व वेळेवर सबसिडी मिळणे अत्यंत आवश्यक ठरते; अन्यथा सेवांची गुणवत्ता व विस्तार मर्यादित होण्याची शक्यता निर्माण होते.

**जुनाट बस फ्लीट:** MSRTC च्या बस फ्लीटमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणावर जुनाट आणि कालबाह्य बसेस वापरात आहेत. या बसांमुळे वारंवार ब्रेकडाऊन होतात, देखभाल खर्च वाढतो आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण होतात. वातानुकूलनाचा अभाव, अस्वच्छता आणि प्रवासातील असुविधांमुळे प्रवाशांचा एकूण अनुभव घटत आहे. जरी नवीन बसेस टप्प्याटप्प्याने फ्लीटमध्ये समाविष्ट केल्या जात असल्या तरी त्यांचा वेग अपेक्षेइतका नसल्याने जुनाट बसांवरील अवलंबित्व कायम आहे.

**मार्गांचे आर्थिक टिकाव:** ग्रामीण व दुर्गम भागांतील अनेक मार्ग आर्थिकदृष्ट्या तोट्यात चालतात. प्रवाशांची संख्या कमी असली तरी सामाजिक जबाबदारी म्हणून MSRTC ला हे मार्ग चालवावे लागतात. मात्र सातत्याने तोट्तील मार्ग चालवल्यामुळे

महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर ताण येतो. काही विभागांनी अशा मार्गांचे पुनर्रचना, वारंवारता कमी करणे किंवा बंद करण्याचा विचार केला आहे. तथापि, असे निर्णय घेताना ग्रामीण जनतेच्या दळणवळणाच्या गरजांचा विचार करणे आवश्यक आहे.

**सेवांचे अव्यवस्थापन व संप:** कर्मचाऱ्यांचे वेतन, पदोन्नती, सेवा अटी आणि धोरणांवरील मतभेद हे MSRTC साठी कायमचे आव्हान ठरले आहेत. वेळोवेळी होणाऱ्या संपामुळे बससेवा विस्कळीत होते आणि त्याचा थेट फटका ग्रामीण भागातील प्रवासी, विद्यार्थी, कामगार आणि रुग्णांना बसतो. अशा परिस्थितीत जनतेचा विश्वास कमी होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे संवाद, सामंजस्य आणि दीर्घकालीन कर्मचारी धोरणे राबविणे अत्यावश्यक आहे.

**ग्रामीण विकासातील प्रभाव:**

**आर्थिक समावेश:** MSRTC ची बससेवा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानली जाते. या सेवेमुळे ग्रामीण व्यापारी, शेतकरी आणि उद्योजकांना शहरी बाजारपेठांशी जोडण्याची संधी मिळते. कृषी उत्पादनांची विक्री, हस्तकला वस्तूंचा व्यापार तसेच पर्यटनाशी संबंधित व्यवसायांना यामुळे चालना मिळते, परिणामी ग्रामीण उत्पन्न वाढीस मदत होते.

**शिक्षण व आरोग्य सुविधा:** ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरी शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था तसेच आरोग्य केंद्रे, रुग्णालये सहजपणे गाठता येतात. नियमित व परवडणारी बससेवा उपलब्ध असल्यामुळे शिक्षण आणि आरोग्य सेवांपर्यंतचा प्रवेश सुलभ होतो, ज्याचा थेट परिणाम ग्रामीण लोकांच्या जीवनमान सुधारण्यावर होतो.

**समाजातील समावेश:** MSRTC ची परवडणारी बससेवा महिला, वृद्ध, दिव्यांग आणि कामगार वर्गासाठी विशेष महत्त्वाची आहे. सुरक्षित आणि नियमित सार्वजनिक वाहतूक उपलब्ध झाल्यामुळे हे घटक सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रवाहात अधिक सक्रियपणे सहभागी होऊ शकतात. त्यामुळे सामाजिक समावेश, समान संधी आणि समतोल विकासाला चालना मिळते.

**पुढील संशोधनासाठी सूचना व उपाय:** MSRTC चे आर्थिक पुनरुज्जीवन कार्यक्रम अंमलात आणणे. वाहतूक सेवा टिकावासाठी ग्रामीण-विशिष्ट बस मार्गांची योजना बनवणे. नवीन बस, इलेक्ट्रिक वाहने आणि डिजिटल साधने वाढवणे. किसान, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सबसिडी धोरणाचे संतुलन राखणे. कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि सेवा व्यवस्थापन सुधारणा यावर भर देणे.

**निष्कर्ष:** MSRTC हे सार्वजनिक वाहतूक नेटवर्क ग्रामीण महाराष्ट्रातील सामाजिक-आर्थिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. हे ग्रामीण-शहरी भागांमध्ये कनेक्टिव्हिटी वाढविणे, रोजगार संधी उपलब्ध करणे, शिक्षण व आरोग्य सुविधा सुलभ करणे इत्यादी महत्त्वाचे परिणाम साध्य करते. तथापि आर्थिक ताण, जुनाट फ्लीट, सेवा टिकाव समस्या आणि कर्मचारी मुद्दे यांसारखी आव्हाने आजही आहेत. योग्य धोरणात्मक निर्णय, आर्थिक पुनरुज्जीवन आणि सेवा सुधारणांद्वारे MSRTC ग्रामीण महाराष्ट्र समुदायाच्या विकासात आणखी महत्त्वाची भूमिका बजावू शकेल.

**संदर्भ सूची:**

१) Government of Maharashtra. (२०१९). Economic survey of Maharashtra २०१८—१९. Mumbai: Directorate of Economics and Statistics.
२) Government of Maharashtra. (२०२२). Economic survey of Maharashtra २०२१—२२. Mumbai: Directorate of Economics and Statistics.
३) Ignited Minds Journals. (२०२१). Role of MSRTC in rural connectivity and regional development. Journal of Social and Rural Economic Research, ८(२), ४५—५६.
४) Jagran. (२०१९, June १२). Maharashtra government trains tribal women as MSRTC bus drivers. Dainik Jagran.
५) Maharashtra State Road Transport Corporation. (२०१६). Annual administrative report २०१५—१६. Mumbai: MSRTC.
६) Maharashtra State Road Transport Corporation. (२०१८). Annual administrative report २०१७—१८. Mumbai: MSRTC.
७) Maharashtra State Road Transport Corporation. (२०२०). Annual administrative report २०१९—२०. Mumbai: MSRTC.
८) Maharashtra State Road Transport Corporation. (२०२२). Annual administrative report २०२१—२२. Mumbai: MSRTC.
९) Mid-Day. (२०२४, July १५). MSRTC earns revenue through package tour scheme. Mid-Day.
१०) NDTV. (२०२२, October 11). MSRTC strike disrupts rural transport services across Maharashtra. NDTV India.
११) Navbharat Live. (२०२५, January २०). MSRTC mobile app gains popularity in rural Maharashtra. Navbharat Live.
१२) Punekar News. (२०२३, August ५). MSRTC faces challenges due to loss-making rural routes. Punekar News.
१३) The Times of India. (२०२३, September १८). MSRTC to scrap old buses, modernization remains slow. The Times of India.
१४) The Week. (२०२४, May 11). MSRTC expands rural bus services with new fleet additions.

# भारतीय गावांचे पुनर्मूल्यांकन: वसाहतवादी कल्पनांपासून समकालीन ग्रामीण वास्तव

**प्रा. कांबळे संजयकुमार** स्त्री आणि लिंगभाव विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**सार:** भारतातील सामाजिक मानववंशशास्त्र आणि समाजशास्त्र हे वसाहतवादी सरकारच्या या जाणीवेतून उद्भवले की भारतीय सामाजिक जीवन आणि संस्कृतीचे ज्ञान, जे प्रामुख्याने खेड्यांमध्ये संघटित आणि आकार घेत होते, ते त्याच्या सुरळीत प्रशासनासाठी आवश्यक आहे. ब्रिटिश प्रशासकांना तसेच सामाजिक शास्त्रज्ञांना खेड्यांच्या समुदायांचा अभ्यास करण्यास प्रोत्साहित केले गेले जेणेकरून त्यांना प्रत्यक्ष माहिती मिळेल, विशेषतः जातीव्यवस्था आणि आदिवासी जीवन आणि संबंधित सामाजिक-आर्थिक आणि राजकीय संघटनांबद्दल. हा शोधनिबंध 'भारतीय गाव' या संकल्पनेचे टीकात्मक पुनर्परीक्षण करतो, वसाहतवादी मानव-वंशशास्त्रापासून स्वातंत्र्योत्तर समाजशास्त्र आणि समकालीन विद्वत्ता, विशेषतः सुरिंदर एस. जोधका यांच्या अलीकडील योगदानापर्यंतच्या संकल्पनात्मक उत्क्रांतीचा मागोवा घेतो. हे खेडे - एकेकाळी बंदिस्त, स्वयंपूर्ण, सुसंवादी सामाजिक एकक म्हणून

बांधले गेले होते - मार्केट विस्तार, स्थलांतर, कृषीव्यवस्थेतील बदल आणि नवउदारमतवादी विकासाच्या संदर्भात संरचनात्मक आणि वैचारिक परिवर्तन कसे घडले याचे मूल्यांकन करते. हा अभ्यास जात, वर्ग, लिंगभाव संबंध, ग्रामीण-शहरी सातत्य आणि राज्य हस्तक्षेपांची देखील चौकशी करतो, त्यांना व्यापक समाजशास्त्रीय आणि मानववंशशास्त्रीय वादविवादांमध्ये स्थान देतो. पेपर असा निष्कर्ष काढतो की भारताच्या सामाजिक रचनेला समजून घेण्यासाठी गाव केंद्रस्थानी आहे, स्थिर अस्तित्व म्हणून नाही तर स्पर्धा, असमानता आणि आकांक्षांचे गतिमान स्थान म्हणून.

**महत्वाचे शब्द:** भारतीय गाव, ग्रामीण समाजशास्त्र, जात, विकास, ग्रामीण-शहरी संबंध, जातिव्यवस्था, प्रबळ जाती, नातेसंबंध, कुटुंब, कृषी संबंध, सत्ता आणि अधिकार, स्तरीकरण, लिंगभाव संबंध, परंपरा आणि बदल, जागतिकीकरण आणि आधुनिकीकरण.

---

**परिचय: भारतीय गावाची कल्पना:** गावाचा अभ्यास एक मूलभूत सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक एकक म्हणून केला जातो, ज्यामध्ये स्वतःच्या संस्था, नियम आणि शक्ती संरचना असतात.या संकल्पना विद्वानांना गावे वेगळ्या किंवा स्थिर घटकांसारखी नव्हे तर गतिमान आणि बदलत्या सामाजिक जागा म्हणून समजून घेण्यास मदत करतात .भारतातील ग्रामीण अभ्यासाची परंपरा सामाजिकशास्त्रांमध्ये अनुभवजन्य संशोधनासह जोडलेली आहे. वैज्ञानिक समज ग्रामीण अभ्यासातून सुरू झाली आहे. वसाहतवादी काळात सुरू झालेला हा अभ्यास १९६० च्या दशकापर्यंत वर्चस्व गाजवत राहिला, परंतु त्यात विविधता होती. राष्ट्रीय आणि जागतिक परिस्थितीतील बदलांमुळे गेल्या काही दशकांमध्ये ग्रामीण अभ्यासात लक्षणीय बदल झाले आहेत. 'ग्रामीण अभ्यास' क्षेत्रातील तज्ज्ञांचे योगदान महत्त्वाचे आहे, ज्यामध्ये गावांचा कारागृहात्मक दृष्टिकोन समाविष्ट आहे. ग्रामीण विकास आणि हरित क्रांती यासारख्या धोरणांमध्ये गावांचा समावेश आहे, गांधीजी, नेहरू, आणि आंबेडकर यांचे विचार यात संदर्भित आहेत. सामाजिक शास्त्रज्ञांनी जात, लैंगिकता, अर्थव्यवस्था आणि धर्माच्या संदर्भात ग्रामीण जीवनाचा अभ्यास केला आहे, ज्यामुळे समस्यांवर नवीन दृष्टिकोन उभा राहतो.

ग्रामीण अभ्यासाने ठोस विश्लेषणात्मक पद्धती विकसित केल्या आहेत, आणि जागतिक बाजारपेठा, डिजिटल तंत्रज्ञान यांचा ग्रामीण जीवनावर प्रभाव आहे. भारतीय गावांचा अभ्यास १८ व्या शतकात जमिनीच्या मालकीच्या सर्वेक्षणाद्वारे सुरू झाला. २० व्या शतकात मुनरो, मेटकाफ, मेन आणि बाडेन-पॉवेल यांचे अनुभवजन्य संशोधन उल्लेखनीय आहे. लोणीकंद गावाचे अध्ययन दीर्घकालीन सामाजिक बदलांचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाचे आहे, ज्यामध्ये थॉमस कोट्स, जी.एस. घुर्ये आणि पॉलीन कोलेंड यांच्या अभ्यासांचा समावेश आहे. मँडेलबॉम आणि ओरेन्स्टाईन यांनी गावाला मूलभूत सामाजिक एकक म्हणून संबोधलं, ज्याचे स्वरूप सामुदायिक मालकीच्या एकात्मिक समुदायाचे आहे. गांधींनी गावाचा गौरव केला, परंतु ब्रिटिश राजवटीमुळे गावाची अधोगती झाली. स्वातंत्र्योत्तर काळात, गावाला भारतीय समाजाचे मूलभूत एकक मानले जात राहिले. समाजशास्त्रज्ञांनी १९५०-६० च्या दशकात ग्रामीण जीवनाचे गहन संशोधन केले, ज्याने भारतीय सामाजिक विज्ञानाच्या इतिहासात नवीन टप्पा उभारला. या "गावांच्या अभ्यासांनी" भारतीय समाजाच्या फील्डवर्क-आधारित समजुतींचा विकास केला, जो पुस्तकी दृष्टिकोनापेक्षा भिन्न होता.

**संशोधन प्रश्न:**

१) वसाहतवादी उपलब्धता भारतीय गावाची कोणती प्रतिमा तयार करण्यात आली आणि ती कोणती राजकीय गरज होती?
२) पुढील उत्तरोत्तर समाजशास्त्रीय अभ्यासकांनी गाव संकल्पनेला कोणत्या प्रकारे आव्हान दिले?
३) जात, वर्ग व लिंगभाव संबंध ग्रामीण सामाजिक रूपात कोणती भूमिका घेतात?
४) संस्कृतीच्या स्थानावर गावपातळीवर जातीचे आणि लिंगाचे राजकारण कसं घडतं?
५) राज्य धोरणे ग्रामीण परिवर्तनावर कसा प्रभाव टाकतात?
६) समकालीन ग्रामीण-शहरी द्वैत कसे धूसर होत आहे?

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) भारतीयांच्या गावाचा संकल्पनात्मक उत्क्रांतीचा अभ्यास करणे.
२) ग्रामीण समाजातील संरचनात्मक असमानता स्पष्ट करणे.
३) विकास व परिवर्तनाच्या प्रक्रियेचा ग्रामीण जीवनावर परिणाम लक्षात घेणे.
४) समकालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक संबंधांचे आधारे ग्रामीण-शहरी पुनर्वाचन करणे.
५) ग्रामीण समाजशास्त्राला समजून घेवून ग्रामीण समाजशास्त्राचे महत्व अधोरेखित करणे .

**संशोधक पद्धती:** हा लेख दुय्यम स्रोत आधारित गुणात्मक संशोधन आहे. समाजशास्त्र ग्रंथ, संशोधक लेख, ग्रामीण मोनोग्राफ, आणि समकालीन अभ्यास (विशेषतः सुरिंदरसिंग जोधका शोध) संशोधनीय चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

**पद्धतशीर योगदान आणि मर्यादा:** सुरुवातीच्या वसाहतवादी विद्वान-प्रशासकांनी भारतीय समाजाचे वर्णन स्वयंपूर्ण 'लहान प्रजासत्ताक' - त्याच्या गावांचा एकत्रित समूह म्हणून करणे पसंत केले. हा दृष्टिकोन भारतीय समाजाच्या प्रचलित घटनेतून नव्हे तर परक्या भूमीवर साम्राज्य एकत्रीकरण करण्याच्या अनिवार्यतेमुळे निर्माण झाला. स्वातंत्र्यानंतर, भारतीय समाजाचा जातीय दृष्टिकोन गावाच्या दृष्टिकोनापेक्षा जास्त झाला. सामाजिक गटांचे लेबलिंगभाव आणि वंशावळींची नोंद प्रशासनात पूर्णपणे केंद्रस्थानी आल्यामुळे गावाचे महत्त्व कमी झाले. स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतरच्या काळात राष्ट्रवादीच्या दृष्टिकोनांवर नजर टाकल्यास असे दिसून येते की विचार आणि व्यवहाराच्या वेगवेगळ्या प्रवाहांनुसार गावाची कल्पना वेगवेगळी होती. उदाहरणार्थ, गांधी आणि आंबेडकरांच्या धारणा दर्शवितात की स्पर्धात्मक राजकीय अजेंड्यांनी भारतीय गावाच्या विविध आदर्शीकरणांवर/टीकेवर कसा महत्त्वपूर्ण प्रभाव पाडला. त्याच वेळी, या सर्व दृष्टिकोनांनी गावाला वैचारिक आणि राजकीय वादविवादाच्या केंद्रस्थानी आणण्यास

मदत केली. भारताच्या 'पुस्तकीय दृष्टिकोना'ऐवजी 'क्षेत्रीय दृष्टिकोना'चा वापर करून ग्रामीण अभ्यासांनी महत्त्वाचे योगदान दिले. तथापि, त्यांना मर्यादा देखील होत्या:

• सहभागी निरीक्षणावर अवलंबून राहिल्यामुळे वर्चस्ववादी-जातीय पक्षपात.
• सीमांत गटांचे (दलित, स्त्रिया, भूमिहीन कामगार) कमी प्रतिनिधित्व.
• संघर्ष आणि बदलाकडे दुर्लक्ष करून स्थिरतेचे रोमँटिकीकरण.
• राजकीय अर्थव्यवस्था आणि बाजार प्रक्रियांकडे मर्यादित लक्ष.

या मर्यादांमुळे नंतरच्या दशकांमध्ये अधिक गंभीर आणि संरचनात्मक विश्लेषणाचा मार्ग मोकळा झाला.

**भारतीय राजकीय विचारसरणीतील गाव:**

***गांधींचे आदर्श गाव:*** गांधीजींनी गावाला भारताचे नैतिक केंद्र म्हणून कल्पना केली - साधे, स्वावलंबी, साम्यवादी. या दृष्टिकोनाने राष्ट्रवादी विचारसरणीवर प्रभाव पाडला परंतु जाती अत्याचार आणि पदानुक्रमांकडे दुर्लक्ष केले.

***नेहरूंची विकासात्मक अवस्था:*** नेहरूंनी औद्योगिकीकरणाला प्राधान्य दिले पण गावांना नियोजित विकास, वैज्ञानिक शेती आणि संस्थात्मक सुधारणांची आवश्यकता असलेली ठिकाणे म्हणून पाहिले.

***आंबेडकरांची मूलगामी टीका:*** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गावांबद्दल वापरलेले **मूळ इंग्रजी उद्धरण** असे आहे: **"What is the village but a sink of localism, a den of ignorance, narrow-mindedness and communalism?" (Dr. B. R. Ambedkar**, *Annihilation of Caste* (१९३६) तसेच समाविष्ट: **Dr. Babasaheb Ambedkar: Writings and Speeches**, Vol. 1, Government of Maharashtra, Education Department.) आंबेडकरांच्या टीकात्मक लेखनात रोमँटिक प्रतिनिधित्वांना आव्हान देण्यात आले आणि ग्रामीण सामाजिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्या जातीय हिंसाचाराचा पर्दाफाश करण्यात आला.हे स्पर्धात्मक दृष्टिकोन राज्य धोरण आणि समाजशास्त्रीय शिष्यवृत्तीला आकार देत राहतात.भारतीय गावांचा अभ्यास विविध सामाजिक, धार्मिक, आणि आर्थिक परिस्थितींच्या चित्रणात अधिक जटिलता आणतो. ग्रामीण समाजशास्त्राच्या अध्ययनामुळे भारतीय समाजातील विकास प्रक्रियेचा मूलभूत आधार समजून घेता येतो, जो आधुनिक भारताच्या सामाजिक स्थिरतेसाठी अत्यंत आवश्यक ठरतो.भारताच्या ग्रामीण भागाला ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि राजकीय महत्त्व आहे, पण आधुनिक चर्चांमध्ये तो मागासलेपणा आणि प्रांतविरोध म्हणून प्रस्तुत केला जातो. ग्रामीण आणि शहरीय प्रणालींचे संबंध एकमेकांशी जुळलेले आहेत. युद्धोत्तर काळात भारतीय उच्चभ्रू समाजाने ग्रामीण गरिबी नैसर्गिक मानली. गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांच्या विचारांमुळे भारतीय गावाची व्याख्या विकसित झाली. गांधीने समुदायावर विश्वास ठेवला, नेहरूने वर्गीय वास्तवावर लक्ष केंद्रित केले, तर आंबेडकरने गावाला जातीय शोषणाचे केंद्र मानले.उत्तरोत्तर कालावधीत जमीन फलकीकरण, हरित क्रांती यामुळे ग्रामीण सत्ता आणि सामाजिक कार्यक्रमांचे पुनर्रचन झाले. उदारीकरणामुळे शेतीच्या अर्थव्यवस्थेतील लक्ष शहराकडे वळले, ज्यामुळे सामाजिक-वास्तवात बदल झाले. ग्रामीण आणि शहरी विभाग यांना स्थिर मानण्याचे विचार विस्थापीत होत आहेत. कोविड-१९ च्या लॉकडाऊनमुळे ग्रामीण भागात परतीची लाट आली आणि शेतकरी आंदोलनाने ग्रामीण समाजाची गतिशीलता दर्शवली. ग्रामीण भारताचे स्वरूप गतिशील आहे, जो ऐतिहासिक व सांस्कृतिक प्रक्रियांद्वारे विकसित होतो.

**भारतातील ग्रामीण अभ्यास: चार प्रमुख सामाजिक-मानवशास्त्रीय दृष्टिकोन:** भारतातील ग्रामीण अभ्यास चार प्रमुख सामाजिक-मानवशास्त्रीय दृष्टिकोनांवर आधारित आहे: उत्क्रांतीवादी, वांशिक सांस्कृतिक, संरचनात्मक-कार्यात्मक आणि मार्क्सवादी. उत्क्रांतीवादी दृष्टिकोन ग्रामीण समुदायांच्या वाढीच्या काळातील टप्प्यांवर लक्ष केंद्रित करतो, ज्यात पुरातत्त्वीय आणि ऐतिहासिक डेटा वापरून कृषी प्रणालींच्या विकासाची पुनर्बांधणी केली जाते. या अभ्यासांमध्ये सामान्यीकरण मिथक आणि लोककथा यांचा उपयोग केला जातो, आणि गावे तसेच जमीन प्रणालींचा ऐतिहासिक संदर्भ आणि तुलनात्मक उत्क्रांती क्रमाचा अभ्यास केला जातो. बॅडेन-पॉवेल यांच्यासारख्या अभ्यासकांनी भारतातील जमीन व्यवस्थेवर आधारित ग्रामीण समुदायांच्या उत्क्रांतीच्या योजनेचा अभ्यास केला, ज्यात सामुदायिक मालकीपासून एकल जमीनदार मालकीपर्यंतचा प्रवास समाविष्ट आहे. वांशिक-सांस्कृतिक दृष्टिकोन सामान्यतः सामुदायिक अभ्यासांद्वारे सामाहित केला जातो, ज्यात ग्रामीण आणि आदिवासी समुदायांचे सांस्कृतिक क्षेत्र उपयुक्त ठरते. यामध्ये रेडफिल्डच्या विश्लेषणात्मक मॉडेलचा संदर्भ घेतला जातो, जिथे 'छोटी परंपरा' आणि 'महान परंपरा' यांच्यातील संबंधांचा अभ्यास केला जातो. सिंगर आणि मॅरियट यांच्या कार्यांनी या दोन परंपरांचा संवाद समजून घेतला आहे, जिथे 'जमाती' ते 'उदयोन्मुख शेतकरी' व 'प्रोटो शेतकरी' यांचा संदर्भ मिळतो. भंडारी आणि गोस्वामी यांनी आदिवासी समाजातील बदलांचा अभ्यास करताना जात रचनेला 'महान परंपरा' संदर्भाने घेतले. अशा प्रकारे, या अभ्यासांनी शेतकरी आणि आदिवासी समाजांची एक अद्वितीय टायपोलॉजी तयार केली आहे, ज्यात सांस्कृतिक घटकांच्या परस्परसंवादावर केंद्रित करून ग्रामीण समाजाच्या आकलनासाठी महत्त्व दिले आहे.

**भारतीय गावांचा अभ्यास:परिवर्तन आणि विकास:** भारतीय आणि परदेशी मानववंशशास्त्रज्ञांनी १९५०-६० च्या दशकात ग्रामीण अभ्यास सुरू केला, ज्यामध्ये एमएन श्रीनिवास, एससी दुबे, डीएन मजुमदार आणि आंद्रे बेतेई यांचे उपयुक्त योगदान आहे. त्यांनी जात, नातेसंबंध, विधी, कृषी रचना आणि सत्ता संबंधांचे सखोल क्षेत्रीय अध्ययन केले. एससी दुबे यांचे "इंडियन व्हिलेज" आणि एमएन श्रीनिवास यांचे लेखन ग्रामीण समाजशास्त्र, संस्कृती आणि बदल यांचा अभ्यास करतात. सुरिंदर एस. जोधका यांचे "द इंडियन व्हिलेज: रुरल लाईव्हज इन द २१स्ट सेंच्युरी" समकालीन विश्लेषण प्रदान करतो, ज्यामध्ये आधुनिक भारतातील सामाजिक संरचना, जात, अर्थशास्त्र आणि राजकारण यांचे विकसित केलेले चित्र आहे. आंद्रे बेतेई, डी.एन. मजुमदार, आणि यान ब्रेमन यांचे लेखन कृषी व्यवस्था, लिंगभाव, जमीन, आणि स्थलांतर यांवर लक्ष केंद्रित करते. 'कास्ट, क्लास अँड पॉवर' आणि 'पालनपूर' या पुस्तकांमधील

चर्चांनी तंजावरमधील स्तरीकरण आणि गावाच्या अर्थव्यवस्थेवर भाष्य केले आहे. दुबे यांचे "इंडियन व्हिलेज" भारतातील गावांचे अध्ययन समृद्ध करते. मॅककिम मॅरियट यांचे "व्हिलेज इंडिया" लहान समुदायांवर प्रकाश टाकते, तर आंद्रे बेतेई आणि इतरांनी तमिळ गावातील सामाजिक स्तरीकरणाचे विश्लेषण केले आहे. सुरिंदर एस. जोधका यांनी ग्रामीण वास्तवाचे आधुनिक दृष्टिकोनातून विचार केले आहेत, विशेषतः "द चेंजिंग व्हिलेज इन इंडिया" च्या संदर्भात. २० व्या शतकात, गावांना बंद आणि स्वतंत्र प्रणाली मानले गेले, आणि सर चार्ल्स मेटकाफ यांनी गाव एकाधिकारवादी अस्तित्व समजले. मानववंशशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय अभ्यासांचे परिणाम दर्शवितात की भारतीय गाव कधीच स्वयंपूर्ण नव्हते. स्थलांतर, आंतर-गाव अर्थव्यवस्था आणि धार्मिक तीर्थयात्रा यांनुसार गावांचे बाह्य जगाशी संबंध होता. आधुनिकीकरणामुळे ग्रामीण-शहरी संवाद वाढला आहे. मँडेलबॉम आणि ओरेन्स्टाईन यांच्या मते, गाव एक मूलभूत सामाजिक एकक आहे, जिथे स्थानिक ओळखीची भावना सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक संबंधांवर आधारित आहे. गांधीजींनी ग्रामीण जीवनाचे साधेपण औदासीनतेशी दोन हात केले आहेत.स्वातंत्र्यानंतर गावांचा समाजशास्त्राच्या अभ्यासात प्रमुख मुद्दा बनला. १९५०-६० च्या दशकांमध्ये शेतकऱ्यांच्या वर्गाचा अभ्यास नव्या आकर्षणाचा स्रोत बनला. "ग्रामीण समुदाय" कांसेप्टने कामगारांच्या परस्परावलंबीत संबंध जोडले. दीपंकर गुप्ता यांचे 'रुर्बन' विचार ग्रामीण भारताची शहरी अर्थव्यवस्थेशी एकत्रितता दर्शवितात. गावे विविधतेने भरणारे हवे असले तरी अंतर्गत भागीदारीमध्ये भेदभावित आहेत. विद्यमान विचारविज्ञानाने गावे खरे आणि बाह्य जगाशी संवाद साधण्याचे स्थळे मानले जातात. दुबे, पॅरी, हिल्बर्ट, आणि ठाकूर यांच्या संशोधनांनी गावांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक पायाभूत रचनेत महत्वाचे बदल दर्शवले आहे. बाजार अर्थव्यवस्थेच्या प्रभावाने काही पारंपरिक गाव संरचनांत बदल झाले आहेत. श्रीनिवास व दुबे यांच्या विचारांनी गावांच्या सामाजिक रचनेच्या जटिलतेचे दर्शन घडवले आहे. १९५०-६० च्या दशकात भारतीय आणि परदेशी मानववंशशास्त्रज्ञांच्या अभ्यासाने जात, नातेसंबंध, विधी, कृषी रचना आणि सत्ता संबंधांचे सखोल क्षेत्रीय अभ्यास केले. प्रमुख ग्रंथांमध्ये एससी दुबे यांचे 'इंडियन व्हिलेज' आणि एमएन श्रीनिवास यांचे लेखन समाविष्ट आहे. आंद्रे बेतेई, डी.एन. मजुमदार, आणि जान ब्रेमन यांच्या संशोधनाने कृषी व्यवस्था आणि लिंगभाव, जमीन, आणि स्थलांतराचे मुद्दे उभे केले आहेत. दुबे यांच्या 'इंडियन व्हिलेज' ने ग्रामीण समाजाचे महत्त्व जाणवले आहे. १८ व्या शतकात सुरुवात झालेल्या भारतीय गावांवरच्या चर्चेने २० व्या शतकात तंत्रज्ञानाच्या क्रांतीचे विदारक दृष्टिकोन समोर आणले.

**भारतीय गावातील वसाहतीकालीन अभ्यासाचे स्वरूप:** अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकातील मुनरो, मेटकाफ, मेन आणि बाडेन-पॉवेल सारख्या वसाहती प्रशासकांनी भारतीय गावाची उभारणी एका छोट्या प्रजासत्ताकाच्या रूपात केली : स्थिर, अलिप्त, सुसंवादी आणि स्वयंपूर्ण. या प्रतिनिधित्वाने भारताला अपरिवर्तनीय आणि पूर्व-आधुनिक म्हणून चित्रित करून प्रशासकीय हितसंबंधांची पूर्तता केली. तथापि, ऐतिहासिक मानववंशशास्त्राने हे दावे खोडून काढले आहेत की गावे नेहमीच व्यापक नेटवर्कमध्ये अंतर्भूत होती - स्थलांतर, आंतर-गाव विवाह, धार्मिक अभिसरण, कारागीर देवाणघेवाण आणि कृषी बाजारपेठा. अशाप्रकारे, अलिप्ततेची वसाहती प्रतिमा अनुभवजन्य वास्तवापेक्षा राजकीय रचना होती. "गावगाडा" हा त्र्यंबक नारायण आत्रे यांचा १९१५ मध्ये प्रकाशित मौलिक मराठी ग्रंथ आहे, जो ग्रामीण महाराष्ट्रीय समाजशास्त्र, लोककथा आणि ग्रामीण जीवनाचा विचार करतो. हे पुस्तक ग्रामीण परंपरा, मिथक आणि सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करते.ग्रामीण महाराष्ट्रातील समृद्ध सांस्कृतिक रचनेचा, चालीरीतींचा, लोककथांचा, पुराणकथांचा आणि सामाजिक-आर्थिक वास्तवांचा शोध घेतो.ग्रामीण जीवन आणि समाजशास्त्र समजून घेण्यासाठी मराठी साहित्यातील एक पायाभूत ग्रंथ.

**स्वातंत्र्योत्तर समाजशास्त्रीय दृष्टिकोन:** समाजशास्त्रीय दृष्टिकोनानुसार, कार्यात्मकता गावांमध्ये स्थिरता निर्माण करणारी एक संघटित प्रणाली मानते, तर संघर्ष सिद्धांत सामाजिक असमानतेला शोषणाचे स्वरूप मानतो, ज्यामुळे वर्ग संघर्ष निर्माण होतो. प्रतीकात्मक संवादवाद सूक्ष्म संवादांवर लक्ष केंद्रित करतो, तर उत्तरआधुनिक दृष्टिकोन गावांच्या गतिमान स्वरूपाचे वर्णन करतो, ज्यावर जागतिकीकरणाचा परिणाम आहे. भारतीय गावांचा सामाजिक मानववंशशास्त्रीय अभ्यास हिंदू धर्मग्रंथांच्या संदर्भात जात आणि सामाजिक स्थितीचे गाढ आणि लवचिक दृष्टिकोन प्रदर्शित करतो. 1९५०-६० च्या दशकात ग्रामीण अभ्यास महत्त्वाचा ठरला, महात्मा गांधींनी गावांच्या सांस्कृतिक मूल्यांवर लक्ष केंद्रित केले, वसाहतवादी दृष्टिकोनामुळे गावांना भारतीय ओळखीच्या प्रतीकांमध्ये स्थान मिळाले. वसाहतवादोत्तर काळात, समाजशास्त्रज्ञांनी ग्रामीण अभ्यासावरील लक्ष केंद्रित केले, जात, वर्ग व लिंगभाव यांचा अभ्यास सुरू झाला.

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण समाजशास्त्र अधिक महत्त्वाचे झाले, विशेषतः कृषीप्रधान समाजांच्या संदर्भात. प्रारंभिक अभ्यासांनी स्थानिक समुदायांवरील अधिक लक्ष केंद्रित केले, जसे आंद्रे बेतेई यांचे "स्टडीज इन अ‍ॅग्रेरियन सोशल स्ट्रक्चर", ज्याने कृषी संबंधांवर प्रकाश टाकला. 1९६० च्या दशकात ग्रामीण अभ्यासात प्रगती झाली, ज्यामुळे ग्रामीण विकासाच्या धोरणांना दिशा देणारे साहित्य निर्मिती झाली. ग्रामीण जीवनाचे आदर्शचित्रण आव्हानांना सामोरे गेला, परंतु भारतीय ग्रामीण अध्ययनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. श्रीनिवास यांच्या "प्रभुत्वशाली जाती"चे सिद्धांत ग्रामीण लोकसंख्येमधील जातीच्या पदानुक्रमाचे प्रभाव समजून घेतात. जातिव्यवस्थेचे शाश्वतपणा कुटुंबात आहे, पण विभक्त कुटुंबांचा कल देखील वाढत आहे. जमिन महत्त्वाचा आर्थिक घटक असून, जातीय पदानुक्रमामुळे जमिनीच्या मालकीत परिवर्तन झाले आहे. भूमिहीन कामगारांचा वाढ अनौपचारिक अर्थव्यवस्थेत दिसतो. कोविड-1९ चा परिणाम विविध सामाजिक मुद्द्यांना उजाळा देतो, ज्यामध्ये असमानता आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांचा समावेश आहे. राजकीय हस्तक्षेप आणि बिगर-राज्य संस्थांचा ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण सहभाग असतो, तरीही अनेक अडथळे विद्यमान आहेत. संध्या नरे-पवारच्या ' तिची भाकरी कोणी चोरली' आणि 'पुन्हा गावगाडा' या पुस्तकांमध्ये जात, लिंगभाव आणि सत्तेच्या गुंतागुंतीचे तीव्र वास्तववादाने चित्रण केले आहे. 'भाकरी' दलित-बहुजनांचा श्रम आणि हक्क दर्शवते, 'चोरणे' म्हणजे अन्याय. पुन्हा गावगाडात गावातील सत्तासंरचना आणि लोकशाहीतले येणारे अन्याय उलगडले जातात. लेखिका ग्रामीण हिंसा,

उपेक्षा, आणि स्त्री-दलित अनुभवांना आवाज देतात, आदर्श गावकल्पनेला नाकारून सामाजिक न्यायाशिवाय लोकशाही अपूर्ण असल्याचे दर्शवतात. या परिस्थितीवर गंभीर प्रश्न उपस्थित केलेले आहेत.

**भारतीय गावाची वैशिष्ट्ये परिभाषित करणे:** भारतीय गावांमध्ये अंतर्गत आणि बाह्य विविधतेचा समावेश आहे. ग्रामीण समाजांमध्ये सामाजिक संबंध आणि संस्थात्मक व्यवस्था विविध गटांमध्ये गुंतागुंतीची आहे. विद्वानांनी असे सिद्ध केले आहे की गावाचा व्यापक अस्तित्वाचा भाग म्हणून अस्तित्व आहे आणि ते पूर्णपणे स्वयंपूर्ण नाही. गावाने भारतीय समाजाचे प्रतिनिधीत्व करणे सुरू ठेवले असून, ते त्यांच्या रहिवाशांसाठी ओळखीचा एक स्रोत आहे. सामाजिक ढांचे असूनही, एकरूपतेची भावना गावकऱ्यांमध्ये विद्यमान आहे. आधुनिक अभ्यासांनी दर्शवले की गावांमध्ये शहरी भागांबरोबर अधिक संवाद आहे, परंतु गावाबद्दल काही नकारात्मक दृष्टिकोनही आहेत. जात आणि वर्ग भेदाने गावांमध्ये स्पर्धा वाढवली आहे आणि सामाजिक असमानता विस्तारित झाली आहे. तथापि, गावाची एकता समजण्यासाठी संवादाची चौकट वापरण्यात आली आहे. विकास चर्चा आणि सरकारी योजनांमुळे गावकऱ्यांमध्ये नवीन दृष्टिकोन तयार झाला आहे. या विविधतेच्या पार्श्वभूमीवर, गावांचे जीवन आणि समाज वाढत आहे, तरीही संघर्ष आणि बाह्य जगाशी संबंध देखील ओळखले जातात.

**राज्य, विकास आणि ग्रामीण परिवर्तन:** स्वातंत्र्योत्तर काळात राज्य हस्तक्षेप - जमीन सुधारणा, समुदाय विकास कार्यक्रम, हरित क्रांती, पंचायती राज आणि मनरेगा - यांनी ग्रामीण भारताचे आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

तरीही त्यांचे परिणाम असमान राहिले आहेत: • हरित क्रांतीने कृषी उत्पादनात परिवर्तन घडवून आणले परंतु वर्चस्व असलेल्या जातींना विशेषाधिकार दिले. • जमीन सुधारणांमुळे पारंपारिक पदानुक्रम कमकुवत झाले परंतु क्वचितच जमिनीचे समानतेने पुर्नवितरण झाले. • मनरेगाने ग्रामीण उत्पन्नात विविधता आणली परंतु गळती आणि विसंगत अंमलबजावणीचा सामना करावा लागला. राज्य धोरणांनी एकाच वेळी ग्रामीण असमानता बदलली आणि पुनरुत्पादित केली.

**ग्रामीण-शहरी द्वैताचा पुनर्विचार करणे:** समकालीन अभ्यास ग्रामीण आणि शहरी यांच्यातील कठोर विभागणी नाकारतात .

जोधका दाखवतात की: • गावे बाजारपेठा, शहरे, डिजिटल नेटवर्क आणि स्थलांतर प्रवाहांशी वाढत्या प्रमाणात एकत्रित होत आहेत. • कोविड-१९ च्या उलट स्थलांतरामुळे ग्रामीण मुळांचे केंद्रस्थान उघड झाले. • उपभोगवाद, शिक्षण, गतिशीलता आणि बिगर-कृषी रोजगार यांच्या सीमा धूसर झाल्या आहेत. अशाप्रकारे, गाव हे एका वेगळ्या जगाचा नाही तर ग्रामीण-शहरी सातत्यचा भाग म्हणून समजले जाते.

**भारतीय कृषीप्रधान समाजामध्ये लक्षणीय बदल आणि प्रश्न:** भारतातील शेती समाज व अर्थव्यवस्थेचा मूळ भाग आहे; कृषीवर कामगारांचा मोठा वर्ग अवलंबून आहे. वसाहती काळात, शोषणकारी जमीन महसूल प्रणालीमुळे शेतकऱ्यांमध्ये असमानता निर्माण झाली होती, ज्यामुळे विविध शेतकरी चळवळींना जन्म झाला. स्वातंत्र्यानंतर, भूतकाळातील सुधारणा झाल्यानंतरही कृषी असमानता कायम राहिली, ज्यामुळे श्रीमंत शेतकऱ्यांचा एक नव्या वर्गाची निर्मिती झाली. हरित क्रांतीच्या काळात, यांत्रिकीकरण व उच्च उत्पादन देणाऱ्या बीजांनी शेतकऱ्यांना फायदा केला, परंतु लहान शेतकऱ्यांना महागड्या कच्च्या मालाचा त्रास झाला. जागतिकीकरणाने शेतकऱ्यांना जागतिक बाजारात प्रवेश दिला, ज्यात कॉर्पोरेट शेतीचा प्रभाव व किंमत वधारण्यासारखी आव्हाने आली. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, कृषी संबंध अर्ध-सरंजामी व अर्ध-भांडवलशाही आहेत. जातिस्थान व आर्थिक स्थितीमुळे असमानता वाढत आहे. सध्या शेतकऱ्यांचे आंदोलन, आत्महत्यांचा वाढता दर, ग्रामीण-शहरी स्थलांतर, व हवामान बदल प्रमुख मुद्दे आहेत. आंदोलनांना कॉर्पोरेटायझेशनवर भीती आहे, तर आत्महत्यांचा वाढता दर कर्ज व पीक अपयशामुळे आहे. कृषी बदलांचे सामाजिक परिणाम मोठे आहेत; काही प्रदेशांमध्ये जातीचे वर्चस्व कमी होऊ लागले आहे, तर शेतकरी राजकारणाने उभारणी घेतली आहे. आर्थिक असमानता वाढत आहे, जरी स्त्रियांचा शेतीमध्ये सहभाग अपेक्षेपेक्षा कमी आहे. शिक्षण व गतिशीलता अद्याप पायाभूत सुविधांच्या अभावामुळे डळमळीत आहेत. भारतातील गावांमध्ये आरोग्यसेवा, शिक्षण, रोजगार संधी, व जलस्रोतांचे मुद्दे प्रमुख आहेत. आरोग्यसेवा कमी असल्यामुळे डॉक्टर व औषधांचा अभाव निर्माण झाला आहे. शिक्षणात अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे तरुणांना आधुनिक कौशल्ये प्राप्त होणे कठीण आहे. ग्रामीण विकासासाठी समुदाय सहभाग व समावेशक धोरणांची आवश्यकता आहे; जेणेकरून विकासाचे वातावरण निर्मिती होईल.

**भारतातील ग्रामीण अभ्यासाचा संदर्भ काय होता?:** ग्रामीण अभ्यासाची मुख्य संकल्पना सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक आयामांच्या समावेशाने बनलेली आहे, जिथे गावाला एक सामाजिक एकक मानले जाते. जातिव्यवस्था ग्रामीण जीवनाचा केंद्रबिंदू आहे, जी सामाजिक पदानुक्रमावर प्रभाव टाकते. पारंपरिक सेवा संबंधांवर असलेली जजमानी व्यवस्था, आर्थिक व राजकीय प्रभाव, कुटुंब, विवाह नियम व वंश व्यवस्था यांचे महत्त्व आहे. कृषी संबंध आर्थिक पाया आहेत, तर स्थानिक सत्ता संरचना निर्णय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतात. ग्रामीण स्तरीकरणात जात, वर्ग, आणि लिंगभाव यांवर असमानता आहे. जागतिकीकरण आणि आधुनिकीकरणामुळे ग्रामीण जीवनात अंतर्गत व बाह्य बदल होत आहेत. १९५० आणि १९६० मध्ये भारतीय ग्रामीण जीवनाच्या अभ्यासात पाश्चात्य शैक्षणिक समुदायाची रुची वाढली; रॉबर्ट रेडफिल्डचा 'लहान समुदाय' संकल्पना अभ्यासात वापरली गेली. जोधका यांच्या अध्ययनानुसार गावे शहरी अर्थव्यवस्थेशी एकत्रित आहेत, तरी जात महत्त्वाची आहे. वसाहती ज्ञान आणि राजकीय अर्थव्यवस्था याबाबत विविध दृष्टिकोनांनी गावाला स्वायत्त संस्था मानले गेले. आंद्रे बेटेइ आणि जे.सी. हीस्टरमन यांनी स्थानिक संघर्ष उघड केले, तर बिपन चेद्रा व पार्थ चॅटर्जी यांचे कार्य राष्ट्रवादाचा प्रभाव दर्शवते. शरद जोशी शेतकऱ्यांच्या समस्यांवर राजकीय धोरणांतील दोष व बाजारपेठेतील विकृतीचे अध्ययन करतात. ग्रामीण अभ्यास, विकास, वाणिज्य, व शेतकऱ्यांचे जीवन यांचा अद्ययावत दृष्टिकोन विकसित करत आहे.

**जात, समुदाय आणि लोकशाही:** भारतीय ग्रामीण अभ्यास आणि उप-पर्यायी शिष्यवृत्ती एकत्रितपणे दैनंदिन जीवनात जात, समुदाय आणि लोकशाही कशा एकमेकांना छेदतात हे समजून घेण्यासाठी एक शक्तिशाली दृष्टीकोन देतात. वर सूचीबद्ध केलेले विविध साहित्य - समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, आत्मचरित्र आणि अहवाल - एकत्रितपणे भारतीय ग्रामाच्या रोमँटिक कल्पनेला आव्हान देते आणि त्याऐवजी ते पदानुक्रम, प्रतिकार आणि बदलाने आकार घेतलेल्या एक स्पर्धात्मक जागेच्या रूपात प्रकट करते.

**जातीच्या सत्तेचे ठिकाण म्हणून गाव:** सुरुवातीच्या ग्रामीण अभ्यासांमध्ये ग्रामीण भारताचे चित्रण अनेकदा सुसंवादी आणि स्वयं-नियमन करणारे असे केले गेले होते. तथापि, *दलित आणि उच्च जाती* (ए. सत्यनारायण), *द सोशल कन्स्ट्रक्शन ऑफ कॅपेसिटी इन अ तमिळ व्हिलेज* (एल.एन. वेंकटरमण) आणि *ब्लाइंडनेस ऑफ इनसाइट* (दिलीप एम. मेनन) सारख्या पुस्तकांमध्ये जाती दररोजच्या संवाद, संसाधनांची उपलब्धता आणि गुणवत्तेच्या कल्पना कशा रचतात हे उघड केले आहे. या अभ्यासातून असे दिसून येते की जात ही केवळ धार्मिक पदानुक्रम नाही तर जमीन मालकी, कामगार संबंध आणि स्थानिक संस्थांद्वारे पुनरुत्पादित केलेली भौतिक व्यवस्था आहे.

**जिवंत अनुभव आणि दलित प्रतिपादन:** *उपरा* (लक्ष्मण माने), *अँट्स अमंग एलिफंट्स* (सुजाता गिडला), *इंटररोगेटिंग माय चांडाल लाईफ* (मनोरंजन बयापारी) आणि *स्पीकिंग प्लेनली: अ शुद्राज स्टोरी* यासारख्या आत्मचरित्रात्मक आणि साहित्यिक कृती ज्ञानाचा एक प्रकार म्हणून जिवंत अनुभव दर्शवतात. हे कथानक अपमान, बहिष्कार आणि संघर्षाला केंद्रस्थानी ठेवून उच्चभ्रू शैक्षणिक प्रवचनाला विस्कळीत करतात, तर शिक्षण, स्थलांतर आणि राजकीय एकत्रीकरणाद्वारे प्रतिपादनाचे दस्तऐवजीकरण देखील करतात. *दलित स्त्रिया: पर्यायी राजकारणाचे पायोनियर्स* मध्ये अधोरेखित केलेले दलित स्त्रियांचे आवाज, लिंगभाव भावाला दडपशाही आणि प्रतिकाराचा एक महत्त्वाचा अक्ष म्हणून सादर करून जात विश्लेषणाला आणखी गुंतागुंतीचे करतात.

'एक भाकर तीन चुली' कादंबरी ग्रामीण स्त्रीच्या अस्तित्वाचा एक ठळक दृष्टांत आहे. देवा झिंजाड यांची ही कादंबरी त्यांच्या आईच्या जीवनावर आधारित आहे, जी पारंपरिक कथांमधील स्त्रीच्या दुःखांचे प्रतिनिधित्व करते. यामध्ये परंपरेतील शोषण, कौटुंबिक संघर्ष आणि नैतिक मूल्यांच्या तुटवड्याचे चित्रण आहे. स्त्रीच्या आयुष्यातील सत्वपरीक्षा, समाजातील अपमान, आणि तिला दिलेल्या अत्याचारांचे प्रखर वर्णन या कादंबरीत केले गेले आहे. कादंबरीचा नायक जीवनाच्या प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करणारी एक जिद्दी स्त्री आहे, जी सासरच्या आणि माहेरच्या अपमानाला सामोरे जात असते. पारंपारिक भारतीय कुटुंबव्यवस्थेमध्ये स्त्रीच्या स्थानाला वेगळा नेणारा एक कटु सत्य आहे. सामाजिक स्वीकृती आणि मानवी अस्तित्वाची चाड हरवत जाणारी स्त्री आपल्या परिसरात एकाकी पडलेली आहे. अपमान सहन करत असली तरी विद्रोह करणे तिच्यासाठी अशक्य वाटत आहे. तिच्या संघर्षाला समाजाने आधार द्यायला पाहिजे, परंतु उलट तिला शोषणाचे साधन बनवण्यात येतं. कादंबरीत समाजाची ही नकारात्मक मानसिकता चिंतनीय आहे, जी भारतीय संस्कृतीच्या नैतिक मूल्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते.

**लोकशाही, निवडणुका आणि राज्य:** अनेक कामे अत्यंत असमान सामाजिक संरचनांमध्ये लोकशाही कशी कार्य करते यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात. *अनेक* ग्रंथांमधून असे दिसून येते की निवडणूक सहभाग आपोआप सामाजिक न्यायात रूपांतरित होत नाही. स्थानिक पातळीवर जात, पक्षीय राजकारण आणि हिंसाचार कसा एकमेकांशी जोडलेला असतो, ज्यामुळे लोकशाही स्पर्धा अनेकदा संघर्षात बदलते. भारतीय लोकशाहीची रचना खालीपासून वर (bottom-up) आहे, परंतु प्रत्यक्षात गावांमध्ये जातीय विषमता, हिंसाचार आणि पक्षीय वर्चस्वाचे प्रभाव दिसतात. ग्रामसभा लोकशाहीच्या थेट संस्थांपैकी आहे, पण सामाजिक आणि आर्थिक श्रेण्या यामुळे सर्व नागरिकांचा समावेश होत नाही. वरच्या जाती आणि सधन वर्गांचा ताबा असतो, ज्यामुळे दलित, आदिवासी आणि गरीब घटकांचा सहभाग कमी राहतो.गावपातळीवरील निवडणुका जातीय शक्तिसंतुलनाचे प्रतिबिंब दर्शवतात. येथे उमेदवारी जातीवर आधारित असते, मतदाता दबावाखाली काम करतात, आणि इतर अनैतिक साधनांचा वापर केला जातो. बहुतांश वेळा दलित सरपंच असूनही प्रत्यक्ष सत्ता वरच्या जातींकडे असते, ज्यामुळे दलितांचे प्रतिनिधित्व औपचारिक बनते. हिंसाचार हा फक्त शारीरिक नसून संरचनात्मक, जसे की सार्वजनिक अपमान किंवा आर्थिक बहिष्कार, यामुळे दलितांचे स्थान कमी होते. निवडणुकीच्या काळात हा हिंसाचार तीव्रतेने वाढतो. राज्यसत्ता कधी कधी जातीय वर्चस्वाचे साधन बनते, कारण पोलिस आणि प्रशासन जातीय सामाजिक संरचनेमध्ये गुंतलेले असतात.पक्षीय राजकारण हे जातीय अंकगणितावर आधारित आहे, ज्यामुळे राजकीय पक्ष खासकरून मतांच्या स्थिरतेसाठी जातींवर लक्ष केंद्रित करतात. या सर्व प्रक्रियांच्या फलितामुळे गावातील लोकशाही औपचारिक राहते आणि सामाजिक समतापर्यंत पोहोचत नाही. समाजातील नागरी प्रतिष्ठा आणि समता आवश्यक आहे, अन्यथा गावातील लोकशाही अपूर्णच राहील.

**गतिशीलता, स्थलांतर आणि नवीन आकांक्षा:** जात ही शक्तिशाली असली तरी ती स्थिर नाही. *इंडिया मूव्हिंग* (चिन्मय तुम्बे) आणि *ड्रीमर्स* (स्निग्धा पूनम) स्थलांतर, शिक्षण आणि तरुणांच्या आकांक्षा हे पारंपारिक पदानुक्रमांना अस्थिर करणाऱ्या शक्ती म्हणून नोंदवतात. तरीही, नवउदारमतवाद आणि जातीवरील अभ्यास दर्शवितात की, गतिशीलता असमान आहे आणि बहिष्काराचे नवीन प्रकार बहुतेकदा जुन्या स्वरूपांची जागा घेतात.एकत्रितपणे, हे काम असा युक्तिवाद करतात की आधुनिक भारत समजून घेण्यासाठी लोकशाही आणि विकासाच्या अमूर्त आदर्शांच्या पलीकडे जाऊन गावे, समुदाय आणि दैनंदिन जीवनात सत्ता कशी कार्य करते याचे परीक्षण करणे आवश्यक आहे. जात ही केंद्रस्थानी राहते, परंतु राजकारण, प्रतिकार आणि सामाजिक बदलांद्वारे ती सतत वाटाघाटी केली जाते. अशा प्रकारे भारतीय ग्रामीण आणि उप-पर्यायी अभ्यास अपरिहार्य राहतात - ग्रामीण भूतकाळाचे अवशेष म्हणून नाही तर भारताचे वर्तमान आणि भविष्य समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण साधने म्हणून.

**भारतीय गावांचे २१ व्या शतकातील जीवन आणि त्यांच्यातील बदलांचे विविध पैलू :** "द इंडियन व्हिलेज: रुरल लाईवज इन द २१स्ट सेंच्युरी" या पुस्तकात सुरिंदर सिंग जोधका भारतीय ग्रामीण जीवनाच्या बदलत्या स्वरूपाचे विश्लेषण करतात. गावांचे

महत्त्व कमी झालेले असले तरी त्यांच्या भूमिकेत अद्याप काहीही कमी झालेले नाही. जोधका गाव आणि शहर यांच्यातील भेद समजून घेत असताना या दोन्हीच्या भविष्यातील संबंध स्पष्ट करतात. गांधीजींच्या विचारामुळे गावांची महत्त्वाकांक्षा आणि आंबेडकरांचे लोकशाही विचार या ठिकाणी सूर देतात, त्यामुळे ग्रामीण समस्या दूर करण्यासाठी केंद्रीकृत नियोजनाचे महत्त्व अधोरेखित होते.

ग्रामीणता आणि शहरीकरण हे एकमेकांवर अवलंबून आहेत, असे जोधका स्पष्ट करतात. जागतिकीकरणामुळे या भेदांत गडबड होत असून, कोविड-१९ च्या काळात शेतीकडे नवीन दृष्टिकोनाने पहावे लागले. लॉकडाऊनच्या काळात गावांकडे स्थलांतरित लोकांनी प्रवास केला, ज्यांनी ग्रामीणतेच्या ओळखीला नवीन प्रकाश दिला. जोधका यासंदर्भात सांगतात की, कृषि क्षेत्रातील श्रमाचे शोषण मुख्यत्वे जोखले गेले पाहिजे, कारण यामुळे शेतकऱ्यांचे संघर्ष किंवा आर्थिक अडचणी परिणामकारक स्वातंत्र्य प्राप्त करण्यात अडथळा आणू शकतात. ग्रामीण भागातील बदलांचे विविध पैलू जोधकाने विश्लेषित केले आहेत, जसे की सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजनैतिक घडामोडी. पुस्तक वाचनास उपयुक्त आहे कारण ते विविध मुद्द्यांवर विचार करते आणि ग्रामीण जीवनातील बदलांचे महत्त्व अधोरेखित करते. जोधकाचे विचार आधुनिक तंत्रज्ञानामुळे ग्रामीण जीवनात येणारे परिवर्तन दर्शवितात, जे एका नव्या मांडणीसाठी महत्वपूर्ण ठरते.पुस्तकात सुरुवात एक किस्स्यासंदर्भात केली आहे, जिथे जोधका एका माजी आय ए एस अधिकाऱ्याच्या गावाबाबतच्या नॉस्टॅल्जियावर प्रकाश टाकतात. या गंभीर चकमकीत, त्यांनी गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांच्या आदर्श दृष्टींपासून अलग भिन्न दृष्टिकोनातून भारतीय खेड्यांचे वास्तव केले आहे. जोधका पारंपरिक गावांचे स्थान समजून घे पहातात आणि सरकारच्या योजनांचा ग्रामीण जीवनावर होणारा प्रभाव दर्शवितात.

सारांशात, "द इंडियन व्हिलेज" या पुस्तकात भारतीय गावांच्या बदलत्या वास्तवाचे व्यापक भान ठेवलेले आहे, जे आजच्या ग्रामीण जीवनातील गतिशीलतेवर प्रकाश टाकते. जोधकाचा दृष्टिकोन ग्रामीण समाजातील बदलांचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे, म्हणून ते ग्रामीण भागाच्या भविष्यातील विकासाला प्रोत्साहन देणारे ठरते.

**'रेझिस्टींग डिस्पोसेशन: द ओडिशा स्टोरी' - पुस्तकाचा आढावा:** "गण छडीबा नहीं, जामी छड्डीबा नाही" एक प्रमुख युद्ध पुकार, विविध जिल्ह्यांतील पवित्र पर्वत, नद्या आणि प्रवाहांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेळी प्रतिध्वनित होते, ओडिशातील जमिनीच्या ताब्यातील लोकांच्या प्रतिकाराचे सार टिपते. "गाव सोडब नाही (आम्ही आमचे गाव आणि जंगल सोडणार नाही)" या गीताशी संबंधित आहे, जे आदिवासी समाजाच्या जल-जंगल-जमीन हक्कांवरील संघर्षावर आधारित आहे.गीताच्या विकास नावाच्या शोधांचे एकत्रीकरण, जंगलतोड, खनिज शोषण, विस्थापन आणि पर्यावरणीय नाश यावर टीका करते.आदिवासी, विद्यार्थी, व सामाजिक कार्यकर्ते यांना हे गाणे भावनात्मक साधन मानले जाते. हे गाणे अनेक वर्षांनंतर भावनिक करत आहे. अनेकांनी याला "आदिवासी संघर्षाचे गीत/गीत" म्हटले आहे. एकूणच, हे गीत आजही सामाजिक, पर्यावरण संरक्षण आणि आदिवासी अधिकारांतून अत्यंत सुसंगत आहे.

रंजना पाधी आणि निगमानंद सदांगी यांचे ताजे पुस्तक *'रेझिस्टींग डिस्पोसेशन: द ओडिशा स्टोरी'* हे वैविध्यपूर्ण अनुभव, दैनंदिन संघर्ष आणि आदिवासी, दलित, शेतकरी आणि मच्छिमार यांच्या आत्म्याला उत्तेजन देणारे क्रोध, दु:ख, निराशा आणि सामर्थ्य यांसारख्या अनेकविध भावनांचे वेगळे भांडार आहे. स्वतंत्र नेहरूवादी राज्यापासून समकालीन नवउदारमतवादी काळापर्यंत प्रतिकार चळवळ. १९५० च्या दशकात हिराकुड, बाल्को ते वेदांत आणि पॉस्को येईपर्यंत खाण, धरण आणि कॉर्पोरेट प्रकल्पांविरुद्धच्या लोकांच्या लढाईचा इतिहास मॅपिंग. या पुस्तकात हिराकुड, रेंगाली, गंधमर्दन, बालियापाल, चिलीका, काशीपूर, नियामगिरी, कलिंगभाव नगर, ढिकिया आणि ओडिशातील इतर विविध जिल्ह्यांमध्ये विल्हेवाटीच्या विरोधात उभे राहिलेल्यांचा आवाज नोंदवला गेला आहे. हे जात, वर्ग आणि लिंगभाव चौकटीतून औद्योगिक प्रकल्प आणि राज्य प्रशासनाला लोकांचा विरोध समजून घेण्यासाठी एक समृद्ध स्रोत प्रदान करते.

हे पुस्तक आदिवासी, दलित, शेतकरी आणि मच्छीमार लोकांच्या प्रतिकाराच्या साक्ष वाचण्यावर केंद्रित आहे. व्ही गीता यांनी या पुस्तकाला "भारताच्या बदलत्या राजकीय अर्थव्यवस्थेचा मार्ग" असे संबोधले. तिच्या पुस्तकाच्या वाचनात, विल्हेवाटीने प्रभावित झालेल्यांनी सांगितलेले प्रतिकार ऋषी वाचताना तिला नम्र वाटले. वेगवेगळ्या कथनांचे वाचन हा तिच्यासाठी एक नम्र अनुभव होता, ज्याप्रमाणे लोक भूतकाळातील प्रत्येक कथेत (हिराकुड ते पॉस्को विरोधी चळवळीपर्यंत) त्यांच्या संघर्षांची आठवण करून देतात आणि भूतकाळातील आशा वर्तमानात जिवंत ठेवतात. तिच्यासाठी, पुस्तकाने मोठ्या हिंसाचाराच्या वापरासह शक्तीच्या बदलत्या स्वरूपाकडे देखील लक्ष वेधले - लोकांचा प्रतिकार रोखण्यासाठी निमलष्करी दलांचा वापर आणि भांडवल आणि राज्य यांच्यातील एकत्रित संबंध जे प्रतिकाराच्या वेगवेगळ्या कथा हलवल्या गेल्यामुळे अधिकाधिक स्पष्ट होत गेले.

**समाजशास्त्रीय विचारसरणीतील भारतीय गाव:** भारतीय गावाचा अभ्यास समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्रात दीर्घकाळ मध्यवर्ती वेळ आहे. वसाहतवादी केंद्र कम्युनिटी ते वसाहतोत्तर व समकालीन अभ्यास, भारतीयाला कधी स्वयंपूर्ण समुदाय, कधी "लाहान", तर कधी सत्ता, संघर्ष आणि बदलांचे म्हणणे मांडले आहे.प्रारंभ वसाहतवादी अभ्यासामध्ये (हेरी मेन, स्टर) भारतीय गावाला प्राचीन समूह जमीनधारणेवर आधारित आणि तुलनेने स्थिर एकक म्हणून पाहिले. या विसाव्या समुदायाच्या मध्यकाळात मजुमदार, वायसर, मॅरियट यांसारखे अभ्यासकांनी सखोल क्षेत्रीय अभ्यासांद्वारे जात नातेसंबंध, विधी आणि दिनदिन जीवनाचेवार वर्णन केले. मॅरीटने "लहान" समुदाय ही संकल्पना मांडून गावाच्या सांस्कृतिक एकात्मतेवर भर दिला.एम.एन. श्रीनिवास यांनी ग्रामीण -अभ्यासाला भारतीय पायाभूत आधार दिला. सहभागी, निरीक्षण, संस्कृती आणि प्रबळ या संकल्पनेद्वारे त्यांनी ग्रामीण समाज, गतिशीलता आणि बदल स्पष्ट केले. ऑस्कर लुईस यांनी गटबाजी, मता आणि संघर्षातून एकसंध नैतिक समुदाय समूहाने अधोरेखित केले.नंतरच्या राजकीय-आर्थिक अभ्यासांमध्ये (रॉबर्ट वेड, ब्रेमन) गावाला, संघर्ष, वर्गसंबंध आणि राज्य हस्तक्षेप चौकटी समजावून

घेतले. मनीष ठाकूर आणि इतर समकालीन अभ्यासकांनी "गाव" हे एक तटस्थ वास्तव नसून ऐतिहासिक, वैचारिक आणि प्रचलित प्रक्रिया घडवून आणलेली संकल्पना असल्याचे स्पष्ट केले.

एकूणच, भारतीय गावाचा अभ्यास स्थिर आणि रोमँटिक प्रतिमंथ दूर राजकारणाचे कारण बदलणारे, अंतर्गत आणि व्यापक सामाजिक-आर्थिक प्रक्रिया जोडलेले सामाजिक अवकाश म्हणून विकसित झाले आहे.भारतातील खेड्यांचा अभ्यास विविध महत्त्वाच्या कारणांमुळे आवश्यक ठरला आहे. युद्धोत्तर काळात, समाजशास्त्रज्ञांनी पारंपारिक सामाजिक व्यवस्थेचा प्रामाणिक लेखाजोखा प्रदान केला आणि विकास संस्थांसाठी ग्रामीण भारताचे प्रोफाइल तयार केले. ग्रामीण पुनर्बांधणी कार्यक्रमांचे मूल्यांकन आवश्यक ठरले, ज्यासाठी समाजशास्त्रज्ञांनी गृहनिर्माण, शिक्षण, आरोग्य व जमीन एकत्रीकरणासारख्या विविध आव्हानांवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी नियोजन प्रक्रियेत अर्थशास्त्रज्ञांना वेगळा दृष्टिकोन प्रदान केला, ग्रामीण समुदायाचे सांस्कृतिक जीवन आणि त्यांच्या गतिशीलता यांचा अभ्यास करून. हे गुणात्मक विश्लेषण संभाव्यत: परिमाणात्मक दृष्टिकोनांपेक्षा अधिक माहितीपूर्ण होते. खेडे ऐतिहासिक सातत्य आणि स्थिरतेसह समाज प्रक्रियेवर प्रभाव टाकणारी महत्त्वाची एकक होती. तथापि, सर्व समाजशास्त्रज्ञ विकास कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेले नव्हते आणि काहींनी व्यावसायिक दृष्टिकोन ठेवला, ज्याद्वारे मानववंशशास्त्रज्ञांनी सामाजिक संस्थांचे ज्ञान दिले, पण आर्थिक दृष्टिकोनासाठी आवश्यक सैद्धांतिक आधाराचे अभाव होता.

**निष्कर्ष:** ग्रामीण समाज मानवी जीवनाचा पाया आहे आणि विकास प्रक्रियेचा मुख्य आधार आहे. गाव शतकानुशतके अस्तित्वात आहेत, ज्यामुळे ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व वाढले आहे. भारतातील ग्रामीण अभ्यासामुळे भारतातील विविध प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध गटांच्या सामाजिक-सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनाबद्दल समाजशास्त्रीय ज्ञानाचा एक पद्धतशीर, समृद्ध आणि विशाल संच निर्माण झाला. अनेक संकल्पना विकसित झाल्या आणि पद्धतशीर सुधारणा झाल्या आणि या अभ्यासांद्वारे वादविवाद आणि चर्चा सुरू झाली जी स्थूल स्तरावर सामाजिक बदलाच्या प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त ठरली. तथापि, अनेकांनी असे म्हटले आहे की खंड लिहिले गेले असले तरी, भारतातील ग्रामीण अभ्यासाने सामाजिकशास्त्रातील प्रमुख सैद्धांतिक चर्चामध्ये फारसे योगदान दिले नाही. तरीही, या अभ्यासांमुळे पुढील समाजशास्त्रीय संशोधनाला चालना मिळाली आणि सर्वसाधारणपणे भारतीय समाजात आणि विशेषतः ग्रामीण समाजात सामाजिक बदलाच्या चालू प्रक्रियेच्या विविध पैलूंना समजून घेण्यासाठी आणि त्यांचा अर्थ लावण्यासाठी एक मजबूत आधार आणि अंतर्दृष्टी प्रदान केली. राष्ट्रवादी कल्पनाशक्ती आणि विकासाची चर्चा नेहरूंच्या 'द डिस्कव्हरी ऑफ इंडिया' मध्ये भारताच्या सांस्कृतिक समृद्धतेवर लक्ष केंद्रित करते, जिथे नेहरूंचे विचार आधुनिकतावादी असूनही गांधीवादी तत्त्वांशी विसंगत आहेत. राधाकमल मुखर्जी ग्रामीण विकासाच्या एकात्मिक दृष्टिकोनाचे समर्थन करतात. व्ही.जी. रानडे व जे.बी. शुक्ला यांच्या ग्रामीण जीवनाबद्दलच्या अध्ययनातून महत्त्वपूर्ण माहिती मिळवली जाते, परंतु नंतरच्या विद्वानांनी त्यांच्या अभ्यासांची टीका केली आहे. विकास एन. पांडे यांचे "ग्रामीणतेचे पुनर्प्रस्तुतीकरण" शैक्षणिक व धोरणात्मक संदर्भातील चर्चात्मक संरचनेवर आधारलेले आहे. एस पी सेन यांनी संपादित केलेल्या कामात ऐतिहासिक आत्मचिंतनाची महत्ता अधोरेखित करण्यात आली आहे. एरिक स्टोक्स कृषी राजकारणात शेतकऱ्यांचा प्रतिकार दर्शवतात, तर लॉईड व सुसान रुडोल्फ वसाहतोत्तर भारतातील धोरणांची चर्चा करतात. बी.आर. आंबेडकर यांच्या विचारांमध्ये जातीची विषमता स्पष्ट होते . एकत्रितपणे, या सर्व अभ्यासांनी ग्रामीण भारताच्या ऐतिहासिक निर्मितीचा व सामाजिक संघर्षांचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

एस.सी. दुबे यांच्या मते, गाव भारतीय सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे घटक आहेत, त्यामुळे त्यांच्या कार्य आणि उत्क्रांतीचा सखोल अभ्यास आवश्यक आहे. औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे ग्रामीण विकासावर प्रभाव पडत आहे. लेखात ग्रामीण-शहरी द्वैतवाद, सामाजिक-राजकीय परिवर्तन व उपजीविका यांचे विवेचन केले आहे. हरित क्रांती व जागतिकीकरणामुळे विस्थापन व असमानता वाढली आहे. शहरीकरणाने स्थलांतराचे प्रमाण वाढवले आहे, ज्याने ग्रामीण सामाजिक रचनेवर परिणाम केला आहे. 'स्वयंपूर्ण व स्थिर गाव' ही वसाहतीची प्रतिमा नाकारली जात आहे. ग्रामीण बदल, जात, वर्ग, व लिंगभाव यांचे विश्लेषण केले जाते. आधुनिक विद्वत्तेने 'गाव' आणि 'शहर' यांतील विभाजनालाही आव्हान दिले आहे. आजच्या ग्रामीण वास्तवात डिजिटल नेटवर्क आणि उच्च शहरीकरणामुळे सामाजिक अवकाश बदलत आहे. अशाप्रकारे गावाला एक सूक्ष्म रचना म्हणून केवळ मान्यता मिळाली नाही तर ते हळूहळू राष्ट्रीय विकास नियोजन आणि राजकीय-सांस्कृतिक जाणीवेचा एक महत्त्वाचा पैलू बनले आहे.भारतीय गावाची संकल्पना एक गतिमान संघर्षाचे स्थान आहे, जिथे सामूहिक आकांक्षा आणि असमानता समाविष्ट आहे, म्हणून पुनर्मूल्यांकन आवश्यक आहे.आधुनिक भारतात, ग्रामीण समाजशास्त्र हे एक प्रगतीशील सामाजिक शास्त्र आहे ज्याला लक्षणीय महत्त्व आणि निकड प्राप्त झाली आहे.

## संदर्भ सूची


१) Beteille, A. (१९७४) *Six Essays in Comparative Sociology*, Delhi: Oxford University Press.

२) Beteille, A. (१९८०) The Indian Village: Past and Present' in E.J. Hobsbawm et. al. eds. *Peasantsin History: Essays in Honour of Daniel Thorner*, Calcutta: Oxford University Press.

३) Beteille, A.(१९९६) *Caste, Class and Power: Changing Patterns of Stratification in a Tanjore Village*. Delhi: Oxford University Press.

४) Bliss, Christopher J., and Nicholas Stern. १९८२. *Palanpur: The Economy of an Indian Village*. Clarendon Press.

५) Breman, J. (१९८७) *The Shattered Image: construction and Deconstruction of the Village in Colonial Asia*, Amsterdam: Comparative Asian Studies.

६) Dube, S.C.(१९५५) *Indian Village*, London: Routledge and Kegan Paul.

७) Dumont, L. and D.F. Pocock. (१९५७) *Village Studies, Contributions to Indian Sociology*, 1(1):२३-४1.

८) Dumont, Louis. १९७०. ';The 'Village Community' from Munro to Maine'. Religion/Politics and History in India. Paris/The Hague: Mouton Publishers. 11२–1३२

९) Elwin, Verrier. १९३९. *The Baiga*. J. Murray.

१०) Elwin, Verrier. 1९४७. *The Muria and Their Ghotul*. Oxford University Press.
११) Etienne, Gilbert. २०1४. *Indian Villages: Achievements and Alarm Bells, 1९५२–२०1२*. Graduate Institute Publications.
१२) Jodhka, S. S. (1९९८) 'From "book view" to "field view": Social anthropological constructions of the Indian village'. *Oxford Development Studies*, २६(३): ३11-३३1.
१३) Jodhka, Surinder S. (ed.). २०1२. *Village Society*. Orient Blackswan.
१४) Lewis, Oscar. 1९५८. *Village Life in Northern India: Studies in a Delhi Village*. University of Illinois Press.
१५) Maine, Henry Sumner. 1८७1. *Village Communities in the East and West*. H. Holt and Company.
१६) Majumdar, D.N. (1९५५ ed.) *Rural Profiles*, Lucknow: Ethnographic and Folk Culture Society.
१७) Marriott, Mckim. (1९५५) Village India: Studies in the Little community, Chicago: The University of Chicago Press.
१८) Slater, Gilbert (ed.). 1९1८. *Economic Studies, Vol I: Some South Indian Villages*. Oxford University Press.
१९) Srinivas, M. N. (1९७५) 'Village studies, participant observation and social science research in India'. *Economic and political weekly*, 1०(३३/३५): ३८७-1३९४.
२०) Srinivas, M.N. (ed.). 1९५५. *India's Villages*. West Bengal Govt. Press.
२१) Srinivas, M.N. 1९७६. *The Remembered Village*. University of California Press.
२२) Thakur, Manish (२०1४) *Indian Village: A Conceptual History,* New Delhi: Rawat.
२३) Wade, Robert. 1९९८. *Village Republics: Economic Conditions for Collective Action in South India*. Cambridge University Press.
२४) Wiser, William H., and Charlotte V. Wiser. 1९६४. *Behind Mud Walls, 1९३०–1९६०*. University of California Press.

# प्राथमिक महिला शिक्षकांच्या भूमिका संघर्षाचा अभ्यास: बीड तालुक्याच्या संदर्भात

**विशाखा वि. भिल्लारे** संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, बलभीम महाविदयालय, बीड.

**गोषवारा:** प्रस्तुत अभ्यासाचा मुख्य उद्देश मराठी बीड तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या सामाजिक भूमिका त्यांच्या व्यावसायिक आणि कौटुंबिक जीवनातील संघर्ष आणि बीड तालुक्यातील महिला शिक्षणाच्या ऐतिहासिक व सामाजिक संदर्भाचा सखोल अभ्यास करणे हा होता. महिला शिक्षिका शिक्षण व्यवस्थेमध्ये आणि ग्रामीण समाजामध्ये बदल घडवून आणण्यासाठी कशाप्रकारे योगदान देतात तसे त्यांना कोणत्या विशिष्ट समस्यांना तोंड द्यावे लागते हे तपासणी हे उद्दिष्ट होते. प्रस्तुत अभ्यासासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धती वापरण्यात आली. बीड तालुक्यातील विवाहित कार्यरत महिला शिक्षकाकडून माहिती गोळा करण्यात आली. माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली मुलाखती आणि निरीक्षण यासारख्या साधनांचा वापर करण्यात आला .या संशोधनामध्ये महिला शिक्षकांच्या भूमिका संघर्ष, कार्य कुटुंब संघर्ष, व्यावसायिक जबाबदारी आणी कौटुंबिक जबाबदाऱ्या, लैंगिक भूमिका, नोकरी समाधान आणी सामाजिक सांस्कृतिक घटक यांचा अभ्यास करण्यात आला.

**मुख्य शब्द:** भूमिका संघर्ष, कार्य कुटुंब संघर्ष, व्यावसायिक जबाबदाऱ्या, कौटुंबिक जबाबदाऱ्या, लैंगिक भूमिका, कामाचा ताण, नोकरी समाधान, सामाजिक सांस्कृतिक घटक.

**प्रस्तावना:** बीड तालुक्यातील महिला प्राथमिक शिक्षकांच्या भूमिका संघर्षाचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी, या अभ्यासात शिक्षण सामाजिक रचना लिंगभेद आणि आर्थिक आव्हानांच्या संदर्भात त्यांच्या भूमिकेचे विश्लेषण केले जाते. महिला शिक्षिकांना अनेक संघर्षमय परिस्थितीला तोंड द्यावे लागते. यामध्ये भूमिका संघर्ष, कार्य कुटुंब संघर्ष, व्यावसायिक जबाबदाऱ्या, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि लैंगिक भूमिका, कामाचा ताण नोकरी समाधान सामाजिक सांस्कृतिक घटक यांचा समावेश असतो. आजच्या आधुनिक काळात महिला सर्व क्षेत्रात आघाडीवर आहेत. विशेषतः शिक्षण क्षेत्रात महिलांचे प्रमाण मोठे आहे. प्राथमिक स्तरावर लहान मुलांच्या मानसिकतेचा विचार करता महिला शिक्षिका अधिक प्रभावी मानला जातात. मात्र हे काम करत असताना त्यांना घर आणि नोकरी अशा दोन भिन्न आघाड्यांवर एकाच वेळी लढावे लागते ज्यातून भूमिका संघर्ष निर्माण होतो. कार्य आणि कुटुंब संघर्षामध्ये भारतीय समाजात आजही घराची आणि मुलांच्या संगोपनाचे मुख्य जबाबदारी महिलेचीच मानली जाते. प्राथमिक शिक्षिका जेव्हा शाळेत जाते तेव्हा तिच्याकडून एक आदर्श शिक्षिका मार्गदर्शक आणि प्रशासक म्हणून अपेक्षा असतात दुसरीकडे घरी परतल्यावर तिच्याकडून आदर्श पत्नी, सून आणि माता म्हणून तितक्या तत्परतेने काम करण्याची अपेक्षा ठेवली जाते. या परस्परविरोधी अपेक्षांमुळे मानसिक ताण वाढतो. कामाचे स्वरूप आणि व्याप्ती प्राथमिक शिक्षकेला केवळ शिकून चालत नाही, तर तिला विद्यार्थ्यांचे मूल्यमापन, पोषण आहार, व्यवस्थापन, जनगणनेसाठी शैक्षणिक कामे आणि विविध शासकीय अहवाल तयार करावी लागतात. हे काम वेळेत पूर्ण करण्याच्या जबाबदारीमुळे कौटुंबिक वेळेवर गदा येते.

**अभ्यास क्षेत्राची पार्श्वभूमी:** बीड तालुक्यातील महिला शिक्षकांची भूमिका आणि त्यांच्या संघर्षाची पार्श्वभूमी अत्यंत गौरवशाली आणि संघर्षाने भरलेली आहे. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाचे जननी सावित्रीबाई फुले यांचा वारसा पुढे नेत बीड मधील महिला शिक्षकांनी शिक्षण क्षेत्रात मोलाची योगदान दिले आहे. बीड तालुक्यातील महिला शिक्षिकांच्या संघर्षाची पार्श्वभूमी खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घेता येईल:

**१) ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमी:** बीड जिल्हा हा भौगोलिकदृष्ट्या मागास आणि दुष्काळी भाग मानला जातो. अशा परिस्थितीत ग्रामीण भागात मुलींना शाळेत आणणे आणि त्यांना टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान होते. सुरुवातीच्या काळात महिला

शिक्षिकांना सामाजिक विरोधाचा सामना करावा लागला, मात्र त्यांनी चिकाटीने आपले काम सुरू ठेवले. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद सारख्या संघटनांच्या माध्यमातून महिलांनी आपले प्रश्न मांडण्यास सुरुवात केली.

**२. ग्रामीण भागातील शैक्षणिक क्रांती:** बीड तालुक्यातील वाड्या-वस्त्यांवर शिक्षणाची गंगा पोहोचवण्यात महिला शिक्षिकांचा वाटा मोठा आहे. ऊसतोड कामगारांची मुले, स्थलांतरित कुटुंबे आणि वंचित घटकातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी 'शाळाबाह्य मुले' मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली.

**३. हक्क आणि अधिकारांसाठी लढा:** महिला शिक्षिकांना केवळ शैक्षणिकच नव्हे, तर प्रशासकीय पातळीवरही संघर्ष करावा लागला. यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो: ऑनलाईन बदल्यांमधील त्रुटी आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे होणारी ओढाताण याविरोधात महिला शिक्षिकांनी वेळोवेळी आवाज उठवला आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये स्वच्छतागृहांची अनुपलब्धता आणि प्रवासाच्या साधनांची कमतरता यावर मात करत त्या कार्यरत आहेत. अशैक्षणिक कामांचा बोजा कमी करण्यासाठी बीडमधील विविध शिक्षक संघटनांनी जिल्हाधिकारी आणि शिक्षण विभागाकडे पाठपुरावा केला आहे.

**४. संघर्षातून मिळालेले यश:** बीड तालुक्यातील अनेक महिला शिक्षिकांनी नाविन्यपूर्ण प्रयोग करून शाळांचा दर्जा सुधारला आहे. 'आदर्श शिक्षक' पुरस्कारांमध्ये बीडमधील महिला शिक्षिकांचे प्रमाण लक्षणीय आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून (Digital Schools) अध्यापन करण्यात त्या आघाडीवर आहेत.

**५. वर्तमान स्थिती:** आज बीड तालुक्यातील महिला शिक्षिका केवळ अध्यापनच करत नाहीत, तर त्या सामाजिक प्रश्नांवरही भाष्य करत आहेत. स्त्रीभ्रूण हत्या रोखणे, बालविवाह रोखणे आणि मुलींच्या आरोग्याबाबत जनजागृती करणे यामध्ये त्यांची भूमिका मोलाची ठरत आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:** १) कौटुंबिक आणि व्यावसायिक जबाबदाऱ्यांमधील संघर्षाचा अभ्यास करणे. २) भूमिका संघर्षाची कारणे शोधणे. ३) कामाच्या ठिकाणच्या वातावरणाचा परिणाम तपासणे. ४) संघर्षाचा आरोग्यावर होणारा परिणाम अभ्यासणे. ५) संघर्ष निवारण्याच्या पद्धती अभ्यासणे. ६) सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीनुसार तौलनिक अभ्यास.

**अभ्यासाची गृहीतके:**

**१.** प्राथमिक महिला शिक्षिकांना शाळेतील अध्यापनाचे काम आणि घरातील कौटुंबिक जबाबदाऱ्या (मुले, सण-उत्सव, पाहुणे) यांचा मेळ घालताना मोठ्या प्रमाणावर मानसिक तणाव आणि भूमिका संघर्षाला सामोरे जावे लागते.

**२.** बीड तालुक्यातील ग्रामीण भागात काम करणाऱ्या शिक्षिकांना दळणवळणाच्या अपुऱ्या सोयींमुळे घरापासून शाळेपर्यंतच्या प्रवासात जास्त वेळ खर्च करावा लागतो, ज्यामुळे त्यांच्या कौटुंबिक जीवनावर परिणाम होऊन भूमिका संघर्ष वाढतो.

**३.** शालेय अध्यापनासोबतच निवडणुका, जनगणना आणि विविध शासकीय सर्वेक्षणे यांसारख्या अशैक्षणिक कामांच्या जबाबदारीमुळे महिला शिक्षिकांच्या मूळ भूमिकेत अडथळे निर्माण होतात.

**४.** ग्रामीण भागातील पारंपरिक सामाजिक चौकटीमुळे महिला शिक्षिकांकडून 'एक आदर्श सून/पत्नी' आणि 'एक आदर्श शिक्षिका' अशा दोन्ही भूमिकांत परिपूर्णतेची अपेक्षा केली जाते, जो त्यांच्या संघर्षाचा मुख्य घटक असतो.

**५.** सततच्या धावपळीमुळे आणि दुहेरी भूमिकेमुळे महिला शिक्षिकांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर (उदा. पाठदुखी, निद्रानाश, चिडचिड) नकारात्मक परिणाम होतात.

**६.** ज्या शाळांमध्ये मुख्याध्यापक आणि सहकारी शिक्षकांचे सहकार्य सकारात्मक असते, तिथे महिला शिक्षिकांचा भूमिका संघर्ष कमी प्रमाणात आढळतो.

**संशोधन पद्धती:** उपरोक्त अभ्यासाच्या उद्दिष्ट आणि गृहीतकाच्या अनुषंगाने बीड तालुक्यातील महिला प्राथमिक शिक्षकांच्या भूमिका आणि संघर्षाचा समाजशास्त्रीय अभ्यास या विषयाच्या संशोधनासाठी गुणात्मक संशोधन पद्धती आणि वर्णनात्मक संशोधन पद्धती यांचा एकत्रित विचार केला आहे. यासाठी क्षेत्रीय अभ्यास याचा आधार घेतला आहे. उद्देश पूर्ण नमुना निवड संशोधनाच्या उद्दिष्टानुसार बीड तालुक्यातील महिला शिक्षकांची निवड केली. सहेतुक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून याद्दच्छिक नमुना निवड पद्धतीने शिक्षकांचे व्यक्तिगत अनुभव, भूमिका आणि संघर्ष समजून घेण्यासाठी मुलाखती घेतल्या. त्यामुळे त्यांच्या भावना आणि दृष्टिकोन सविस्तरपणे मांडता आल्या. निरीक्षण शिक्षकांच्या कामाच्या ठिकाणाचे आणि त्यांच्या सामाजिक वातावरणाचे निरीक्षण करून माहिती गोळा केली. माहितीचे विश्लेषण गुणात्मक माहितीचे विश्लेषण मुलाखती आणि निरीक्षणातून मिळालेल्या माहितीच्या विषयावर विश्लेषण केले. ज्यामुळे त्यांच्या संघर्षाच्या आणि भूमिकेचे सखोल अर्थ उलगडले.

**अभ्यासाचे महत्त्व:** प्राथमिक महिला शिक्षण संघर्ष अभ्यास' हा केवळ भूतकाळाचा आढावा नसून, महिलांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया रचणारा एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक आणि सामाजिक दस्तऐवज आहे.

**निष्कर्ष:** प्राथमिक महिला शिक्षिका या शिक्षण व्यवस्थेचा कणा आहेत. त्यांचा संघर्ष प्रामुख्याने वेळेचे नियोजन, कौटुंबिक पाठिंबा आणि कामाच्या ठिकाणच्या पायाभूत सुविधा यांच्याशी निगडित आहे. त्यांना योग्य सोयी-सुविधा आणि सन्मान मिळाल्यास त्या शिक्षण क्षेत्रात अधिक मोलाचे योगदान देऊ शकतात.

**१. दुहेरी जबाबदारीचा ताण:** महिला शिक्षिकांना घर आणि शाळा अशी दुहेरी भूमिका पार पाडावी लागते. कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि शाळेचे अध्यापन कार्य यामुळे त्यांच्यावर मानसिक आणि शारीरिक ताण असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

**२. ग्रामीण भागातील आव्हाने:** ग्रामीण भागात काम करणाऱ्या महिला शिक्षिकांना प्रवासाच्या अपुऱ्या सोयी, निवासाची गैरसोय आणि असुरक्षितता यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो.

**३. शैक्षणिक दर्जा उंचावण्यात महत्त्वाची भूमिका:** प्राथमिक स्तरावर महिला शिक्षिका विद्यार्थ्यांमध्ये मातृत्त्वाच्या भावनेतून संस्कार करतात. यामुळे मुलांची शाळेतील गळती कमी होण्यास आणि उपस्थिती वाढण्यास मदत होते, असा निष्कर्ष निघतो.

**४. सामाजिक आणि मानसिक संघर्ष:** अनेकदा पुरुषप्रधान मानसिकतेमुळे कामाच्या ठिकाणी महिला शिक्षिकांना भेदभावाचा किंवा सहकाऱ्यांच्या असहकार्याचा सामना करावा लागतो. आपल्या हक्कासाठी त्यांना सतत संघर्ष करावा लागतो.

**५. आर्थिक स्वावलंबन आणि आत्मविश्वास:** नोकरीमुळे महिला शिक्षिकांमध्ये आर्थिक स्वावलंबन आले असून त्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली आहे. समाजात त्यांना आदराची स्थान मिळाले असले तरी, कामाच्या व्यापापुढे त्यांना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करावे लागते.

**६. तंत्रज्ञानाचा वापर:** आधुनिक काळात डिजिटल शिक्षणाशी जुळवून घेताना सुरुवातीला संघर्ष करावा लागला, तरीही महिला शिक्षिकांनी तंत्रज्ञान आत्मसात करून अध्यापन अधिक प्रभावी केल्याचे दिसून येते.

**संदर्भ:**

१. देशमुख, नंदा सी. (२०1३). मराठवाडा विभागातील महिला आणि शिक्षण. International Journal of English Language, Literature and Translation Studies.
२. कुलकर्णी, भुजनराव. (१९९८). मराठवाडा : विकास अभ्यास व चिंतन. औरंगाबाद : पद्मा प्रकाशन.
३. पाटील, स्मिता. (२०1६). महाराष्ट्र राज्यातील वरिष्ठ महाविद्यालये व विद्यापीठांमधील महिला शिक्षकांच्या शैक्षणिक समस्या व संधींचा अभ्यास. ResearchGate.
४. मिश्रा, आर. सी. (२००५). महिला शिक्षण. नवी दिल्ली : A.P.H. पब्लिशिंग कॉर्पोरेशन.
५. शिंदे, टी. डी. (२०२२). ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील महिला शिक्षकांच्या समस्या. SRJIS
६. पर्चुरे, तारा भालचंद्र. (n.d.). महाराष्ट्रातील महिला शिक्षणाचा इतिहास
७. "Empowering rural Indian women through education: the role of teachers in overcoming socio-economic barriers", ResearchGate:
८. "A study on work life balance of female teachers in Ernakulam district", ResearchGate, २०२४.
९. "Role conflict and psychological well-being in school teachers: A cross-sectional study from Southern India", ResearchGate

# ग्रामीण भागातील कुटुंब संस्थेचा बदलता प्रवाह : एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. रामराव धेनू चव्हाण** सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख, शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव जि. लातूर.

**गोषवारा:** भारतीय समाजात कुटुंब संस्था ही एक महत्त्वाची सामाजिक संस्था मानली जाते. मानवाच्या गरजांच्या पूर्ततेसाठी समाजव्यवस्थेत सामाजिक संस्थांची भूमिका महत्त्वाची असते. विवाहातून कुटुंब संस्था उदयास आली. त्यामुळे कुटुंबात नातेवाईकांची एक श्रृंखलाच निर्माण होते. कुटुंब ही अत्यंत महत्त्वाची, मूलभूत व सार्वत्रिक स्वरूपाची एक सामाजिक संस्था आहे. प्रजोत्पादन व बालसंगोपन करणे ही कुटुंबाची प्रमुख कार्य असून कुटुंबात पती-पत्नी आणि त्यांच्या मुलांचा समावेश असतो. भारतीय ग्रामीण समाजात संयुक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. आज संयुक्त कुटुंबाच्या विघटनामुळे विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आली आहे. त्यामुळेच आधुनिक कुटुंबात आप्तसंबंधीयांचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत आहे. आज वर्तमान काळात औद्योगिकरण, नागरीकरण, शिक्षण, पाश्चात्य संस्कृती, व्यक्तिवादी मूल्यांचा प्रभाव व लोकशाही शासनप्रणाली इत्यादी घटकांमुळे ग्रामीण भागातील कुटुंब संस्थेत अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण भागातील कुटुंब संस्थेचा बदलत्या प्रवाहाचा समाजशास्त्रीय दृष्टीने अध्ययन करण्यात आले आहे.

**मुख्य शब्द :** ग्रामीण समाज, कुटुंबसंस्था, आधुनिकता, कालसापेक्षता, स्थित्यंतरे.

**प्रस्तावना:** जगाच्या पाठीवर असा एकही समाज नाही की, जेथे कुटुंबाचे अस्तित्व नाही. भारतीय समाजात मानवाने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी निर्माण झालेली व केलेली जी व्यवस्था असते. त्यालाच सामाजिक संस्था म्हटले जाते. प्राचीन काळापासूनच विवाह, कुटुंब, धर्म, जाती, राजकीय संस्था इत्यादी सामाजिक संस्था अस्तित्वात आहेत. त्यापैकी कुटुंब ही फार प्राचीन, मूलभूत, सार्वत्रिक आढळणारी एक महत्वपूर्ण आणि पायाभूत अशी सामाजिक संस्था आहे. म्हणून चार्लस कुले यांनी कुटुंबाला समाजातील 'प्राथमिक समूह' असे म्हटले आहे. तर पार्सनच्या मते कुटुंब हा मानवी समाजातील अतिशय महत्त्वाचा असा लहान समूह आहे. मानवाची माणूस म्हणून जडणघडण करण्यासाठी कुटुंब ही महत्वाची सामाजिक संस्था आहे. कारण व्यक्तीचा जन्मापासूनच कुटुंबाशी संबंध येतो. बालसंगोपन करणे, व्यक्तिमत्त्वाचा विकास, संरक्षण व सामाजिकरण करणे इत्यादी महत्त्वाच्या कार्यासाठी कुटुंबाचा फार महत्वपूर्ण व सिंहांचा वाटा आहे. म्हणून मानवी जीवनात कुटुंब संस्थेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विवाह संस्थेच्या माध्यमातून कुटुंबाची निर्मिती होते. त्यामुळे आप्तसंबंधाची श्रृंखला निर्माण होऊन कुटुंबातील सदस्यांचे परस्परसंबंध स्नेहपूर्ण, भावनात्मक, आत्मीयतेचे, जिव्हाळ्याचे व अनौपचारिक स्वरूपाचे संबंध असतात. तसेच कुटुंबातील व्यक्तीमध्ये आम्हीपणाची भावना आढळून येते. विशेष म्हणजे भारतीय ग्रामीण समाजात संयुक्त कुटुंब पद्धती आढळते. संयुक्त कुटुंब हे ग्रामीण समाजाचे एक प्रमुख वैशिष्ट्ये आहे. ज्या कुटुंबात दोनपेक्षा जास्त पिढ्यांचे सदस्य एकत्र राहतात. त्या कुटुंबाला संयुक्त कुटुंब म्हणतात. म्हणजेच आजी-आजोबा, मुले, सुना, नातवंडे इत्यादी एकत्र राहतात. आजही ग्रामीण भागात काही प्रमाणात संयुक्त कुटुंब पद्धती आढळते. परंतु आज अनेक कारणांमुळे ग्रामीण समाजातील कुटुंबसंस्थेच्या रचनेत व कार्यात बदल झाले आहेत. नागरिकरण, औद्योगीकीकरण, शिक्षण, नवीन अर्थव्यवस्था, पाश्चात्त्य संस्कृती, व्यक्तिवादी दृष्टिकोन आणि लोकशाही शासनप्रणाली इत्यादी

घटकांच्या प्रभावामुळे ग्रामीण भागातील कुटुंब संस्थेत कालसापेक्ष अनेक परिवर्तन झाले आहेत. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण भागातील कुटुंब संस्थेच्या बदलत्या प्रवाहाचा समाजशास्त्रीय दृष्टीने आढावा घेण्याचा प्रयत्न संशोधकांनी केलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:** १) कुटुंब संस्था ही संकल्पना समजून घेणे. २) ग्रामीण भागातील कुटुंब संस्थेच्या परिवर्तनाचा आढावा घेणे.

**शोधनिबंधाची गृहीतकृत्ये:** १) कुटुंब संस्था ही एक मूलभूत व सार्वत्रिक स्वरूपाची सामाजिक संस्था आहे. २) ग्रामीण भागातील कुटुंबाच्या रचनेत आणि कार्यात कालसापेक्ष बदल झाले आहेत.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे. त्याचबरोबर तथ्य संकलनासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके ,वर्तमानपत्रे ,मासिके व इंटरनेट इत्यादी दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**कुटुंब या संकल्पनेचा अर्थ आणि व्याख्या:** एलमर यांनी आपल्या 'Sociology of Family' या पुस्तकात 'Family' या शब्दाची सर्वप्रथम उत्पत्ती सांगितली आहे. 'Family' हा शब्द 'Famalus' या लॅटिन शब्दापासून तयार झाला असून हा लॅटिन शब्द अशा मानवी समूहाकडे निर्देश करतो की, ज्यात माता-पिता, त्यांची मुले, इतकेच नव्हे तर गुलाम व नोकर यांचाही समावेश होतो. परंतु हे स्पष्टीकरण शाब्दिक स्वरूपाचे असल्याचे निदर्शनास येते. 'कुटुंब' या संकल्पनेचा मूळ व महत्त्वाचा अर्थ विस्तृत स्वरूपाचा आहे. म्हणून कुटुंबाचा अर्थ समजावून घेण्यासाठी समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्यांचा परामर्श घेणे आवश्यक आहे. **इलिएट व मेरिल यांच्या मते-** "कुटुंब म्हणजे पती-पत्नी आणि त्यांची मुले या सर्वांचा मिळून झालेला एक जैविक व सामाजिक समूह होय." **बर्जेस व लॉक यांच्या मते-** " विवाह, रक्तसंबंध व दत्तक विधानाद्वारे एकत्रित आलेल्या व्यक्तींच्या समुच्चयास कुटुंब असे म्हणतात." **मॅकआयव्हर आणि पेज यांच्या मते-** "लैंगिक संबंधावर आधारलेला, प्रजोत्पादन व मुलांचे संगोपन करणारा टिकाऊ स्वरूपाचा समूह म्हणजे कुटुंब होय." यावरून हे लक्षात येते की, कुटुंबामध्ये पती-पत्नी व त्यांच्या मुलांचा समावेश झालेला असतो. तसेच कुटुंबातील सर्व सदस्य एकाच निवासात राहतात. म्हणून त्यांच्यामध्ये परस्परसंबंध असून हक्क व कर्तव्याची जाणीव असते.

**आधुनिक काळात ग्रामीण भागातील कुटुंबसंस्थेत झालेले परीवर्तन:** परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे कोणत्याही समाजात परिवर्तन घडून येते. याचाच परिणाम असा की, समाजातील कोणतीही सामाजिक संस्था स्थिर स्वरुपाची नसून त्यात अनेक स्थित्यंतरे होतात. त्यापैकी कुटुंब ही ग्रामीण भागातील प्रभावी सामाजिक संस्था आहे. परंतु नागरिकरण, औद्योगीकीकरण ,शिक्षण, नवीन अर्थव्यवस्था, पाश्चात्त्य संस्कृती, व्यक्तिवादी दृष्टिकोन व लोकशाही शासनप्रणाली इत्यादी घटकांच्या प्रभावामुळे ग्रामीण भागातील कुटुंबाच्या रचनेत आणि कार्यात दिवसेंदिवस होणाऱ्या परीवर्तनाचा आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**१) कुटुंबाच्या आकारात बदल :** पूर्वीच्या काळी ग्रामीण भागातील कुटुंबाचा आकार मोठा होता. परंतु आजच्या उद्योगप्रधान समाजात लहान कुटुंब सुखी आणि सोयीस्कार ठरत आहेत. औद्योगीकरण, शिक्षण, नवीन अर्थव्यवस्था यामुळे ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंबाची जागा विभक्त कुटुंबाने घेतली आहे. विभक्त कुटुंबात पती-पत्नी व त्यांची मुले इतकेच सदस्य असतात. कारण आजच्या वर्तमान काळात ग्रामीण समाजातही संतती नियमानाचा स्वीकार केला जातो आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कुटुंबाचा आकार दिवसेंदिवस लहान झाल्याचे निदर्शनास येते.

**२) पितृसत्ताक अधिकारांचा ऱ्हास :** पारंपारिक ग्रामीण कुटुंबातील सर्व सत्ता पित्याच्या हाती एकवटलेली होती. त्यांना विरोध करण्याची कोणाचीही हिंमत नव्हती. त्यावेळी स्त्रीला संपत्तीत वाटा नव्हता. कोणत्याही कार्यात स्त्रियांचे मत विचारात घेतले जात नव्हते. आधुनिक काळात मात्र स्त्री-पुरुषांच्या सत्तेत व अधिकारात मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे. पुरुषाप्रमाणे स्त्रियांनाही कायद्याने समान अधिकार मिळाले आहेत. त्यामुळे कुटुंबात पतीच्या मताइतकेच पत्नीचे मतदेखील विचारात घेतले जाते, हा ग्रामीण कुटुंबातील एक महत्त्वाचा बदल आहे.

**३) व्यक्तीगतहितास प्राधान्य :** प्राचीन ग्रामीण कुटुंबामध्ये सामूहिक हितास व्यक्तिगत हितापेक्षा फार महत्त्वाचे मानले जात होते. त्यावेळी कुटुंबात आम्हीपणाची व सहकार्याची भावना प्रबळ होती. आज मात्र व्यक्तीची प्रतिष्ठा व यश हे त्याच्या कर्तृत्वावर अवलंबून असल्यामुळे कुटुंबातील इतर सदस्यांपेक्षा कोणताही व्यक्ती स्वतःच्याच हिताचा जास्त विचार करतो. यावरून असे लक्षात येते की, आज कुटुंबातील सदस्यातही स्वार्थी वृत्ती प्रकर्षाने आढळून येते.

**४) विवाहाच्या संदर्भात परिवर्तन:** आज विवाहाच्या संदर्भात बरेच बदल झाले आहेत. विवाहाच्या वयात वाढ झाल्याने बालविवाह कायद्याने गुन्हा समजला जातो. तसेच आंतरजातीय विवाह व प्रेम विवाह याचे प्रमाण वाढत आहेत. मुलामुलींचा विवाह ठरविताना पूर्वी कुटुंबप्रमुखाचा निर्णय अंतिम होता. परंतु आजच्या काळात प्रत्येकाला आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. त्यामुळे वधू आणि वर यांची परस्पर पसंती विचारात घेतली जाते. त्यामुळे आपल्या जोडीदाराची निवड स्वच्छेने केली जात आहे.

**५) स्त्रियांच्या दर्जात व भूमीकेत बदल :** परंपरागत भारतीय ग्रामीण भागातील कुटुंबात स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ होता. त्यावेळी स्त्रीचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' ऐवढ्यापुरतेच मर्यादित होते. परंतु अलीकडच्या काळात स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळाली. त्यामुळे स्त्रियांच्या दर्जात आणि भूमिकेत क्रांतिकारक बदल झाले आहेत. म्हणूनच आज स्त्रिया विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. कुटुंबात स्त्रीचा दर्जा उंचावला असल्याने तिच्या एकंदरीत कौटुंबिक आणि सामाजिक भूमिकेत बदल घडवून आले आहेत.

**६) व्यक्तिगत हितसंबंधास महत्त्व :** पूर्वीच्या ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंबात वैयक्तिक हितापेक्षा कौटुंबिक हिताचाच विचार केला जात असे. कुटुंबातील सदस्यांमध्ये एकमेकांबद्दल त्यागाची भावना होती. पण सध्याच्या काळात कौटुंबिक हितापैक्षा वैयक्तिक हिताला विशेष प्राधान्य आहे. व्यक्तीचा स्वार्थ दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कुटुंबातही पूर्वीसारखे एकमेकांबद्दल असलेला जिव्हाळा, आपुलकी व प्रेम दिसून येत नसून आज कौटुंबिक दुरावा निर्माण होत आहे.

**७) घटत चाललेले आप्तसंबंध :** पूर्वीच्या काळात ग्रामीण भागातील कुटुंबात असणारे आजी-आजोबा, काका-काकी, चुलत भावंडे इत्यादी नातेवाईकांना फारच महत्त्व होते. परंतु आजच्या वर्तमान काळात आप्तसंबंधीयाच्या संदर्भात असलेली आत्मीयता

दिवसेंदिवस लोप पावत चाललेली आहे. आजची मुले शुद्धि आपल्या आई-वडिलांकडे दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील लहान कुटुंबातील अनेक वृद्ध आई-वडिल हलाखीचे जीवन जगत आहेत. तसेच भावकी-भावकीत व भावा-भावातही वैमनस्य दिसून येते आहे. कारण आज कोणालाही कोणाची गरज वाटत नाही. म्हणून प्रत्येक जण फक्त आपल्या स्वतःचाच विचार करून कौटुंबिक जीवन जगत आहे.

**८) प्रजोत्पादनाच्या कार्यातील बदल :** पूर्वीच्या काळी ग्रामीण कुटुंबात प्रजोत्पादनावर कोणतीही मर्यादा नव्हती. त्यावेळी गर्भवती असलेल्या स्त्रीची विशेष काळजी घरच्या घरी घेतली जात होती. दाईच्या मदतीने प्रसूतीही घरच्या घरी होत होती. परंतु आजच्या जमान्यात नैसर्गिक प्रसुती झाली नाही तर दवाखान्यात शस्त्रक्रिया करून गर्भवतीला आणि तिच्या होणाऱ्या बाळाला जीवदान दिले जाते. विशेष म्हणजे पती-पत्नीमध्ये भौतिक आनंद घेण्यासाठी मुलांना जन्म न देण्याचे फॅड निर्माण झाले असले तरी आजही कुटुंबातील प्रजोत्पादनाचे कार्य पूर्णतः बंद झाले नाही.

**९) सामाजिक संरक्षणातील परिवर्तन :** पूर्वीच्या काळी व्यक्तीच्या सर्व प्रकारच्या गरजा कुटुंबातच पूर्ण केल्या होत्या. त्याकाळी प्रत्येक व्यक्तीला कुटुंबातच आर्थिक, सामाजिक व मानसिक संरक्षण मिळत होते. त्यामुळे कुटुंबाला अधिक महत्त्व होते. परंतु आज हे कार्य राज्यसंस्थेकडे गेल्याचे दिसून येते. आजच्या वर्तमान काळात राज्याने सुरू केलेल्या जीवनविमा, निवृत्तीवेतन, लाडकी बहीण इत्यादी सारख्या अनेक योजनांमुळे कुटुंबाचे हे कार्य संपुष्टात आल्याचे निदर्शनास येते.

**१०) शैक्षणिक कार्य :** ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंब हे अनौपचारिक शिक्षणाचे केंद्र होते. कुटुंबातच मुला-मुलींना रुढी, परंपरा, व्यावसायिक, धार्मिक व सांस्कृतिक स्वरूपाचे शिक्षण घरच्या घरी वडीलधाऱ्या मंडळींकडून दिले जात होते. त्यामुळी मुला-मुलींचे सामाजीकरण आपोआपच घडून येत होते. परंतु आधुनिक काळात औपचारिक शिक्षण देण्यासाठी ग्रामीण भागात अनेक मोठमोठ्या शैक्षणिक संस्था निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबातील नोकरी व व्यवसाय करणाऱ्या आई-वडीलांना आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यासाठी वेळ कमी पडतो. म्हणून दोन वर्षाच्या मुलास 'प्ले ग्रुपमध्ये' प्रवेश दिला जातो. त्याचबरोबर आज ग्रामीण समाजाच्या कुटुंबातून अनेक मुलं-मुली शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ इत्यादी ठिकाणी शिक्षण घेत असून उच्च शिक्षण घेऊन मोठमोठ्या पदावर आज कार्यरत असल्याचे दिसून येतात.

**११) मनोरंजनाच्या कार्यातील बदल :** भारतीय ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंब हे मनोरंजनाचे केंद्र होते. कुटुंबातील वयस्कर मंडळीकडून सर्वांचे मनोरंजन केले जात होते. त्यात प्रामुख्याने संस्कारक्षम गोष्टी, कोडी, एखादी कथा सांगणे, गप्पागोष्टी व बैठेखेळ इत्यादीचा वापर करण्यात येत होता. परंतु आज कुटुंबातील करमणुकीच्या आधुनिक साधनात प्रचंड बदल झाला असून त्यात सिनेमा, क्लब, नाटक, क्रीडांगणे, रेसकोर्स, वाचनालय, टीव्ही, संगणक व मोबाईल इत्यादींचा समावेश झालेला दिसून येतो.

**निष्कर्ष:** भारतीय ग्रामीण समाजात कुटुंब संस्था प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. ग्रामीण समाजात कुटुंब ही पायाभूत, मुलभूत व सार्वत्रिक स्वरूपाची सामाजिक संस्था आहे. ग्रामीण समाजातील कुटुंब प्रमुखाची सत्ता संपुष्टात येऊन तरुण वर्गाला कुटुंबात स्थान मिळाले आहे. ग्रामीण समाजातील कुटुंबातही शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. औद्योगिकरणामुळे ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंबाचे विघटन झाल्याने केंद्र कुटुंब अस्तित्वात आले आहे. आधुनिक काळात ग्रामीण भागातील कुटुंबात शिक्षणामुळे स्त्रियांच्या दर्जात दिवसेंदिवस प्रगती झाली आहे. आज ग्रामीण भागातील अनेक कुटुंबात आंतरजातीय विवाह व प्रेमविवाह घडून येत आहेत. ग्रामीण भागातील कुटुंबात मनोरंजनासाठी मोठ्या प्रमाणात मोबाईलचा वापर केला जात आहे. सद्यस्थितीत ग्रामीण भागातील कुटुंब संस्थेत झालेल्या परिवर्तनास अनेक घटक जबाबदार आहेत.

**सारांश:** अशाप्रकारे भारतीय ग्रामीण भागातील कुटुंब संस्थेच्या रचनेत आणि कार्यात आमुलाग्र बदल झाला आहे. शहरीकरण, औद्योगीकीकरण व शिक्षणाचा प्रसार इत्यादी घटकामुळे ग्रामीण भागातील कुटुंबसंस्थेत कालसापेक्ष स्थित्यंतरे झाल्याचे निदर्शनास येते. तरीही व्यक्तीच्या जडणघडणीत व समाजाच्या अस्तित्वासाठी आजही कुटुंब संस्था अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे हे नाकारता येत नाही.

**संदर्भ ग्रंथसूची:**

१) सिंग, योगेंद्र. (२००९). सोशल चेंज इन इंडिया, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे.
२) अलका, राणी. (२०१३). भारत में पारीवारीक समाजशास्त्र का विकास, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.
३) बारबिड, भगवान. (१९७५). सामाजिक संस्था, शारदा प्रकाशन, नांदेड.
४) सूर्यवंशी, विजय. (१९९७). सामाजिक संस्था आणि सामाजिक गट, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
५) वरखडे, सोनाली. (२०१२). मूलभूत सामाजिक संस्था, अरुणा प्रकाशन, लातूर.
६) काचोळे, दा.धो. (१९९८). भारतीय समाजरचना, कैलास पब्लिकेशन्स औरंगपुरा, औरंगाबाद.
७) तोटरे, मनोहर. (२००८). मूलभूत सामाजिक संस्था, अरुणा प्रकाशन, लातूर.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील ग्रामीण समाजाचे चित्रण: एक समाजशास्त्रीय समीक्षा

**डॉ. मोगले धनंजय नागोराव** वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर

**गोषवारा**: अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील ग्रामीण समाजाचे चित्रण अत्यंत वास्तववादी,अनुभवी,आणि शोषित वर्गाच्या व्यथांचे संवेदनशील प्रतिबिंब आहे. त्यांच्या कथा ,कादंबऱ्या,आणि लोककाव्यातून गोरगरीब ,शेतकरी,शेतमजूर, आदिवासी आणि बहुजन समाजाच्या संघर्षाना केंद्रस्थानी ठेवून साहित्याची कौशाल्यात्मक उभारणी केली आहे. ज्यामध्ये ग्रामीण समाजाची संस्कृती,परंपरा,सामाजिक संरचना याचे आजही चित्रण जिवंत पहावयास मिळते. जागतिकीकरणाच्याप्रवाहात सुध्दा अण्णाभाऊंच्या कथा ग्रामीण समाजाचे मोल सांगून जातात. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून ग्रामीण महाराष्ट्राचे जे चित्रण केले आहे, ते अत्यंत वास्तववादी, विद्रोही आणि माणुसकीची साक्ष देणारे आहे. त्यांनी केवळ निसर्ग किंवा खेडेगावातील शांतता न दाखवता, तिथल्या संघर्षाला वाचा फोडली.

**प्रस्तावना:** ग्रामीण समाज हा भारतीय सामाज जीवनाचा अविभाज्य भाग आहे. महात्मा गांधी सातत्याने म्हणायचे खरा भारत पाहावयाचा असेल तर खेड्यात चला तिथे आपणाला ग्राम संस्कृतीचे चित्र पहावाय्स मिळेल. अण्णा भाऊ साठे यांनी सुध्दा आपल्या साहित्यातून ग्रामीण समाजाचे चित्रण केले आहे. गावातील राहणीमानातून समाजाचे चित्र चित्र स्पष्ट केले आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक समाजसुधारक, विचारवंत, क्रांतिकारक, साहित्यकांचे योगदान लाभले आहे. यासर्वांच्या प्रयत्नामुळेच महाराष्ट्राची पायाभरणी झाली आहे हे सांगणे क्रमप्राप्त ठरते. साहित्यकृतीचाहि वाटा समाज जागृतीत मोठा आहे. अर्थातच अण्णाभाऊसाठेंचे सुध्दा साहित्य क्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या साहित्यकृतीमुळे समाजाला नवी उर्जा आणि प्रेरणा मिळाली आहे. १९व्या शतकात ब्रिटीशांच्या राजकीय आणि शैक्षणिक प्रवाहातून अनेक समाजसुधारकांचाआणि साहित्याकांचा उदय झाला. यातीलच एक साहित्यिक म्हणजे अण्णभाऊ साठे होय. अण्णाभाऊंच्या साहित्यामुळे समाजाला नवी प्रेरणा मिळाली हे कोणीही नाकारू शकत नाही. खऱ्या अर्थाने साहित्याच्या रूपातून अण्णाभाऊची क्रांतीची सुरुवात झाली.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये** :१.लोकशाहीर अण्णाभाऊंच्या साहित्यातील ग्रामीण समाजरचनेचा आलेला संदर्भ शोधणे. २. लोकशाहीर अण्णाभाऊंच्यासाहित्यातील ग्रामीण सौंदर्य शोधणे. ३. लोकशाहीर अण्णाभाऊच्या साहित्याचे योगदान जागतिकीकरणाच्या प्रवाहात टिकून आहे हे शोधणे

**गृहीतके:** १. अण्णाभाऊंच्यासाहित्याचे योगदान आजही समाजाला दिशादर्शक आहे. २. अण्णाभाऊचे साहित्य ग्रामीण सामाजिक संरचनेचा परिचय करून देते. ३. जागतिकीकरणाच्या प्रवाहातही या साहित्याने आपले स्थान आणि वेगळेपण टिकवून ठेवले आहे

महाराष्ट्राच्या वैचारिक आणि सामाजिक जडणघडणीत अनेक संताचे, साहित्यकांचे आणि समाजसुधारकांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. पुरोगामी महाराष्ट्राचा इतिहास मांडताना एक उत्कृष्ट साहित्यिक म्हणून अण्णा भाऊ साठे यांचे नाव प्रामुख्याने पुढे येते. ते एक महान आणि क्रांतिकारक लेखक होते एवढेच नाही तर दलित समाजातील थोर साहित्यिक होते. अस्पृश्य समजल्या जाणा-या मांग जातीत जन्म झाल्याने धर्मव्यवस्थेने त्यांच्यावर केलेला अन्याय आणि अनुभवास आलेली परिस्थिती त्यांनी आपल्या साहित्यातून चित्रित केली आहे. म्हणूनच त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीतून समाजाची वास्तवता आणि मार्क्सवाद ओसंबून वाहताना दिसून येतो. *त्यांच्या फकिरा* (१९५९) या कादंबरीला इ.स. १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. त्यांचे एकूण १३ कथासंग्रह, ३२ कादंबऱ्या,३ नाटके,१४ पोवाडे, १ प्रवासवर्णन - माझा रशियाचा प्रवास, शाहिरी, लोकनाट्य इ.साहित्यकृती त्यांची प्रसिध्द आहे. त्यांचे साहित्य प्रभावशाली असूनही जातीच्या चौकटीमुळे त्यांना प्रसिध्दी मिळाली नाही. स्वत: त्यांना उपेक्षित आणि अपमानित जीवन जगावे लागले आहे. परंतु त्यांच्या साहित्यातील वास्तववाद फार काळ दबून राहिला नाही. दलित वर्गात जशी जशी जागृती होऊ लागली. तसे तसे त्यांचे साहित्य प्रेरणादायी ठरत गेले. अण्णा भाऊंचे साहित्य त्याकाळातील उच्चभ्रू साहित्यकाला लाजवेल असेच होते. परंतु दलित साहित्यिक म्हणून त्यांची उपेक्षा झाली आहे हे दिसून येते. त्यांच्या साहित्यकृतीतून मार्क्सवादाचे विश्लेषण दिसून येते. म्हणजेच त्यांच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव होता. हि वास्तवता अभ्यासकाला मानावी लागते. 'जात' हा फॅक्टर केवळ महाराष्ट्रातच आहे असे नाही तर संबंध भारतभर हा फॅक्टर लागू असल्याने कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांमध्ये प्रतिभा असूनही ती त्यांना दाखवता येत नाही. त्यामुळे हे लोक उपेक्षित राहतात त्यापैकीच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे एक होते. अण्णाभाऊंनी वयाच्या पंधराव्या वर्षापासून म्हणजे १९३५ साली कवने रचायला सुरुवात केली. आणि जीवनाच्या अखेरीपर्यंत म्हणजे १९६९ पर्यंत लिहित गेले. 'फकिरा' सारख्या चित्रपटात सावळ्या मांगाची भूमिका साकारणाऱ्या अण्णा भाऊना प्रचंड, चिरंतन उर्जा लाभली होती. त्यांना हि उर्जा त्यांच्या वाट्यास आलेल्या यातनादायक परिस्थितीने, कार्ल मार्क्सने,लेनिनने दिली होती. सर्जनशील लेखक आणि ध्येयनिष्ठ,लढाऊ कार्यकर्ता या दोन्हींचा उफळता संगम खऱ्याअर्थाने अण्णा भाऊमध्ये पहावयास मिळतो. तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अण्णा भाऊंचे योगदान त्यांच्या नेतृत्व गुणांचा हा आविष्कार दाखवून देतो.

अण्णा भाऊना मुंबईतील विषमता मनाला असह्य करून टाकते जो श्रम करून मुंबईला आर्थिक राजधानी बनवतो त्याच्या नशिबी उपासमारी असणे हे अन्यायकारक आहे. अण्णा भाऊ म्हणतात की," हि पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नव्हे तर कष्टकरी, कामकरी यांच्या तळहातावर तरलेली आहे." जे लोक तळहातावर पृथ्वी पेलतात त्यांनाच उपेक्षित जीवन जगावे लागते याची खंत

अण्णाभाऊना वाटत असे. म्हणूनच त्यांनी आपल्या कथा, कादंबरी, शाहिरी, पोवाडे, वगनाट्य इ. साहित्यातून प्रचलित व्यवस्थेवर प्रहार करण्यास सुरुवात केली.अण्णाभाऊच्या प्रत्येक कथेतून समतावादाचे प्रतिबिंब चित्रित होत असते. जे जगले तेच अण्णाभाऊनी मांडले. सामान्य माणसाचा जगण्याचा संघर्ष, बंड,विद्रोह आणि मानवी मूल्यांचे याचे यथार्थ दर्शन त्यांच्या साहित्यातून पहावयास मिळते. १९४२-४३ साली त्यांनी 'स्मशानातील सोनं' ही कादंबरी लिहली. त्यातून त्यांनी भीमा नावाचे परिस्थितीला झुंज देणारे पात्र उभे केले. अठराविश्व दारिद्र्यात पिछाडत असलेल्या समाजाचे चित्रण त्यांनी केले. भीमा नावाचा नायक स्मशानातील पुरलेल्या प्रेताच्या तोंडातील सोने चोरत असतो अशामध्येच त्यांची बोटे प्रेताच्या दातात अडकून तुटली जातात. इतके भिषण कथानक अण्णा भाऊंनी केले आहे. गरीबीमुळे माणूस लाचारीचे जिणे पत्करतो. नको त्या परिस्थितीचा सामना करतो. हे वाचकाला त्यांना दाखवून द्यायचे आहे. आणि या वाचकांच्या स्फूर्तीतून त्यांना मानव मुक्तीची चळवळ उभी करायचे आहे असे स्पष्ट दिसून येते. त्यांच्या प्रत्येक कथेतील नायक जगण्याचा संघर्ष उभा करतो, अन्यायाचा तिरस्कार करतो, तसेच त्यांच्या कथेतील असलेली स्त्री नायिका कधीही आपले चारित्र्य गहाण ठेवत नाही, तर ती कोणत्याही परिस्थितीत चारित्र्य सांभाळते, ती कधीच चारित्र्य विकत नाही. म्हणजेच उपेक्षित वंचित वर्ग आपल्या चारित्र्याला महत्व देतो तो स्वाभिमानी असतो हे अण्णाभाऊनी वास्तव मांडले आहे. आणि हाच स्वाभिमान त्यांनी समाजव्यवस्थेत पेरण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या साहित्यातील समतावाद हा पूर्णतः स्वाभिमान आणि सत्यावर आधारलेला आहे. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. अण्णा भाऊ हे समतावादी प्रवृत्तीचे होते १९४४ मध्ये दत्ता गवाणकर आणि अमर शेख या शाहिरांच्या सोबत त्यांनी लालबावटा कला पथक स्थापन केले. याद्वारे त्यांनी अनेक सरकारी निर्णयांना आव्हान दिले होते. भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्या मोर्च्यातील घोषणा अशी होती, "ये आझादी झूठी है, देश कि जनता भूखी है!" म्हणजेच गोऱ्या लोकांची सत्ता जाऊन ब्राम्हणशाही प्रस्थापित होणे, मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे आणि पुन्हा पेशवाई येणे म्हणजे स्वातंत्र्य होय अशी साखळी त्यांना मान्य नव्हती. अण्णा भाऊ साठे हे शाळेत शिकलेले नाहीत, केवळ दीड दिवस ते शाळेत गेले नंतर तेथील सवर्णांकडून होणाऱ्या भेदभावामुळे त्यांनी शाळा सोडून दिली. पण त्यांच्यात अंगजातच प्रतिभा होती ती साहित्यरुपाने दरवळत राहिली. पहिल्यांदा ते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित झाले. अण्णा भाऊच्या वाट्याला केवळ पन्नास वर्षाचे आयुष्य मिळाले एवढयातच त्यांनी हा साहित्याचा आणि समाजजागृतीचा पसारा मांडला आहे. धर्माच्या नावाखाली पिडीत असलेल्या लोकांचे दुखणे त्यांनी चव्हाट्यावर आणायला सुरुवात केली. त्यांच्या संवेदनशीलतेतून कामकरी, कष्टकरी,शोषित व धर्माने नाकारलेल्या लोकांच्या जीवन यातना आणि त्यांचा संघर्ष साहित्याच्या माध्यमातून जगासमोर येऊ लागला. पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. धर्मांध आणि धनिक लोकांचा कुटील डाव आणि त्यांच्याकडून होणारा छळ अण्णा भाऊ आपल्या शब्दरूपी कथा, काव्यातून मांडू लागले, यातून लोकांच्या जाणीव विकसित होऊ लागल्या आणि यामुळे प्रस्थापित व्यवस्थेला हादरे बसू लागले. अण्णा भाऊच्या प्रत्येक कथेतून, पोवाड्यातून, काव्यातून, वगनाट्यातून नायक अथवा नायिकेने जगण्यासाठी केलेला संघर्ष समोर येतो अन्यायाच्या विरोधात पेटून उठण्याचा लढा दिसून येतो. पिडीत, शोषित,परिस्थितीतीने गंजून गेलेल्या कुटुंबाचा अथवा माणसाचा संघर्ष आहे. बाबासाहेबांनीही वंचित समाजाला सन्मानाने जगायला मिळावे म्हणूनच लढा दिला. बाबासाहेबांच्या आणि अण्णाभाऊच्या विचारात साम्य होते. दोघांचाही लढा मानवमुक्तीसाठीच होता. बाबासाहेबानी मांडलेले तत्त्वज्ञानच जगाला तारू शकेल असा विश्वास अण्णा भाऊना होता म्हणूनच त्यांनी आपल्या समाजबांधवांना बाबासाहेबांनी सांगितलेला मार्ग अनुसरण्यास सांगतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या 'फकिरामध्ये, त्यांनी आपल्या समुदायाला पूर्ण उपासमारीपासून वाचवण्यासाठी ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरूद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले. नायक आणि त्याच्या समुदायाला नंतर ब्रिटिश अधिकारी अटक करतात आणि छळ देतात, आणि अखेरीस फकिराला फाशी देऊन ठार मारले जाते. सांगण्याचा तात्पर्य की अण्णाभाऊंचा नायक परिस्थितीने गांजलेला आहे तरी पण तो स्वाभिमान विकत नाही. यातूनच त्यांना समाजाचे वास्तव चित्रण दाखवून समाजवाद पेरायचा आहे हे दिसून येते.

अण्णा भाऊना दोन व्यक्तिमत्व आदर्श होते मॅक्झीम गार्की आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर. दलित समाजाला सन्मान प्राप्त व्हावा अशी तळमळ दोघांच्याही विचारात होती. म्हणूनच अण्णा भाऊना यांचा आदर्श होता एवढेच नाही तर मॅक्झीम गार्कीचा छोटासा पुतळा मृत्युपर्यंत अण्णा भाऊनी जवळ जपला होता. सांगण्याचा मतितार्थ की अण्णा भाऊ हे समाजवादी होते. त्यांचा समाजवाद हा सत्य,समता,बंधुता यावर आधारला होता. आणि तो समाजवाद त्यांच्या प्रत्येक कथा,कादंबरी,पोवाडा,शाहिरी या साहित्यातून जनसामान्यापर्यंत पोहचतो. समाज प्रबोधनासाठी अण्णा भाऊंनी पुढीलप्रमाणे साहित्यनिर्मिती केली आहे. अकलेची गोष्ट (लोकनाट्य),अमृत,आघात,आबी (कथासंग्रह), आवडी (कादंबरी), इनामदार (नाटक, १९५८,) कापऱ्या चोर (लोकनाट्य), कृष्णाकाठच्या कथा (कथासंग्रह), खुळंवाडा (कथासंग्रह),गजाआड (कथासंग्रह),गुऱ्हाळ,गुलाम (कादंबरी), चंदन (कादंबरी), चिखलातील कमळ (कादंबरी), चित्रा (कादंबरी, १९४५),चिरानगरची भुतं (कथासंग्रह), १९७८), नवती (कथासंग्रह),निखारा (कथासंग्रह), जिवंत काडतूस (कथासंग्रह),तारा,देशभक्त घोटाळे (लोकनाट्य, १९४६), पाझर (कादंबरी),पिसाळलेला माणूस (कथासंग्रह), पुढारी मिळाला (लोकनाट्य, १९५२),पेंग्याचं लगीन (नाटक),फकिरा (कादंबरी, १९५९),फरारी (कथासंग्रह),मथुरा (कादंबरी), माकडीचा माळ (कादंबरी, १९६३),रत्ना (कादंबरी), रानगंगा (कादंबरी), रूपा (कादंबरी),बरबाद्या कंजारी (कथासंग्रह, १९६०), बेकायदेशीर (लोकनाट्य, १९४७),माझी मुंबई (लोकनाट्य), मूक मिरवणूक (लोकनाट्य), रानबोका, लोकमंत्र्यांचा दौरा (लोकनाट्य, १९५२), वारणेचा वाघ (कादंबरी, १९६८), वैजयंता (कादंबरी), वैर (कादंबरी), शेटजींचे इलेक्शन (लोकनाट्य, १९४६),

सुगंधा, सुलतान (नाटक), कविता आणि माझा रशियाचा प्रवास (प्रवासवर्णन),पोवाडे व लावण्या इ. अर्थातच ज्यांना ज्यांना अण्णाभाऊ खऱ्या अर्थाने समजतील तो त्यांचे साहित्य समाजात पसरवत राहील. म्हणूनच अण्णाभाऊ साठे समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचे उद्‌गाते ठरतात. सत्य आणि अहिंसा यांचा परस्परसंबंध इतका घनिष्ठ आहे कि या दोन तत्वांना परस्परापासून वेगळे करता येत नाही सत्यावर निस्सीम अशी अण्णाभाऊची निष्ठा होती. परंतु आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा ही ते देतात. गावकुसाबाहेरील लोकांचे जगणे, त्यांच्या वाट्याला येणारा अपमान आणि त्यातून निर्माण होणारा विद्रोह त्यांनी लेखणीतून जिवंत केला.अण्णाभाऊंच्या साहित्यातील ग्रामीण स्त्री ही केवळ अबला नाही. ती धीट, स्वाभिमानी आणि संकटात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढणारी आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांचे कष्ट आणि त्यांची जिद्द त्यांच्या साहित्यात ठळकपणे जाणवते.त्यांनी ग्रामीण भागाचे वर्णन करताना काल्पनिक सौंदर्य रंगवले नाही. वारणा नदीचा विस्तार त्यांनी सांगितला.

**निष्कर्ष:** अण्णाभाऊंचे योगदान महाराष्ट्राच्या ग्रामीण समाजाच्या जडणघडणीत अधिक महत्वाचे आहे. पुरोगामी व संयुक्त महाराष्ट्राच्या बांधणीसाठी सुध्दा त्यांचे योगदान राहिले आहे. त्यांच्या साहित्यातून मानवी मुल्यांची प्रेरणा सदैव वाचकाला होत राहील. आणि अण्णा भाऊंचे साहित्य ज्या ज्या वाचकाला समजेल तो न्यायासाठी बंड करून उठेल. कारण त्यांच्या साहित्यातील प्रत्येक नायक जगण्यासाठी संघर्ष करतो पण परीस्तीतीचा गुलाम होत नाही. तर तो त्या व्यवस्थेच्या विरोधात पेटून उठतो सामाजिक समतेसाठी लढा देतो. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून ग्रामीण महाराष्ट्राचे जे चित्रण केले आहे, ते अत्यंत वास्तववादी, विद्रोही आणि माणुसकीची साक्ष देणारे आहे. त्यांनी केवळ निसर्ग किंवा खेडेगावातील शांतता न दाखवता, तिथल्या संघर्षाला वाचा फोडली. अण्णाभाऊंच्या ग्रामीण चित्रणात केंद्रस्थानी 'माणूस' आहे, तो ही प्रामुख्याने दलित, शोषित आणि कष्टकरी वर्गातील. 'फकिरा', 'वारणेचा वाघ' यांसारख्या कादंबऱ्यांतून त्यांनी ग्रामीण भागातील मांग, महार, रामोशी या समाजाचे जगणे आणि त्यांच्यावर होणारे अन्याय प्रभावीपणे मांडले आहेत. अण्णाभाऊंचे ग्रामीण जीवन केवळ गरिबीचे नाही, तर ते प्रतिकाराचे आहे. त्यांच्या कथांमधील नायक अन्यायापुढे झुकत नाही.'फकिरा' कादंबरीत फकिरा हा स्वतःच्या समाजाच्या भुकेसाठी आणि हक्कासाठी व्यवस्थेशी दोन हात करताना दिसतो. गावातील 'पांढरपेशा' वर्ग आणि 'कष्टकरी' वर्ग यांच्यातील दरी त्यांनी स्पष्टपणे दाखवली. अण्णाभाऊचे साहित्य म्हणजे वर्तमान काळात चिंतनाला नवी दिशा देणारे ठरत आहे. आज प्रस्थापित साहित्य विचार आणि त्याचे मापदंड बदलत जात आहेत नवीन समीक्षा मुल्ये रुजत आहेत. परंतु अण्णा भाऊचे साहित्य नव्या पिढीला प्रेरणादायकच ठरेल केवळ दीड दिवसाच्या औपचारिक शिक्षणाचा लाभ झालेला मातंग समाजातील अण्णाभाऊसारखा माणूस अंतरराष्ट्रीय स्तरावर एक साहित्यिक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त व्हावी हा एक मोठा चमत्कारच मानवा लागेल. अशा पद्धतीने त्यांच्या साहित्यातून ग्रामीण समाजाचे वास्तव चित्रण मांडण्याचा प्रयत्न केला आहे ग्रामीण समाजाच्या व्यथा समजल्याशिवाय ग्रामीण समाजचा विकास होणार नाही म्हणून या समाजाचे चित्रण रेखाटण्याचा उद्देशाने अण्णा भाऊनी केलेले साहित्य जागतिकीकरणाच्या प्रवाहात सुध्दा अधिक महत्वाचे ठरते.

**संदर्भ:**


1. गायकवाड, अशोक, संपादक. *न्यायचक्र साप्ताहिक.* अण्णा भाऊ साठे जयंती विशेषांक, ऑगस्ट २०१३, अनुप प्रकाशन, सोलापूर, पृ. ३४–३५, ३७.
2. गीते, विलास. *अण्णा भाऊ साठे.* साहित्य अकादमी, २००२.
3. किशोर, राज. *दलित राजनिती की समस्याएँ.* वाणी प्रकाशन, २००६.
4. जोखे, विजयकुमार. *अण्णा भाऊ साठे: चरित्र आणि कार्य.* नालंदा प्रकाशन, २००२.


# जागतिकीकरणाचा महाराष्ट्रातील ग्रामीण लघु उद्योगांवरील परिणाम: एक अभ्यास

**डॉ. नितिन उद्धवराव जाधव** संशोधक विद्यार्थी

**गोषवारा:** जागतिकीकरण ही १९९० नंतर भारताच्या आर्थिक धोरणात झालेली एक महत्त्वाची संरचनात्मक प्रक्रिया असून तिचा प्रभाव देशातील विविध क्षेत्रांवर दिसून येतो. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लघु उद्योग हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कणा मानले जातात. रोजगारनिर्मिती, स्थानिक संसाधनांचा वापर, कौशल्य विकास आणि उत्पन्नवाढ यामध्ये या उद्योगांचे योगदान लक्षणीय आहे. प्रस्तुत शोधनिबंधात जागतिकीकरणामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण लघु उद्योगांवर झालेले सकारात्मक व नकारात्मक परिणाम अभ्यासले आहेत. जागतिकीकरणामुळे तंत्रज्ञान, बाजारपेठेची उपलब्धता, निर्यात संधी आणि खासगी गुंतवणूक वाढली असली तरी त्याचबरोबर स्पर्धा वाढणे, भांडवलाची कमतरता, परदेशी उत्पादनांशी असमान स्पर्धा, स्थानिक उद्योगांचे अस्तित्व संकटात येणे अशा समस्याही उद्‌भवल्या आहेत. हा अभ्यास दुय्यम माहितीवर आधारित असून विविध शासकीय अहवाल, संशोधन लेख, पुस्तके व नियतकालिकांचा आधार घेतला आहे. अभ्यासातून असे स्पष्ट होते की योग्य धोरणात्मक पाठबळ, आर्थिक मदत, कौशल्य प्रशिक्षण आणि तांत्रिक सहाय्य मिळाल्यास जागतिकीकरण हे ग्रामीण लघु उद्योगांसाठी संधी ठरू शकते. अन्यथा ते ग्रामीण औद्योगिक विकासासाठी अडथळा ठरू शकते.

**प्रस्तावना:** १९९१ नंतर भारताने स्वीकारलेले उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण (LPG) धोरण हे भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे वळण ठरले. जागतिकीकरण म्हणजे विविध देशांच्या अर्थव्यवस्था, बाजारपेठा, तंत्रज्ञान, भांडवल, उत्पादन प्रक्रिया आणि सेवा यांचा परस्पर संबंध अधिक दृढ होण्याची प्रक्रिया होय. या प्रक्रियेमुळे केवळ औद्योगिक व शहरी क्षेत्रच नव्हे तर ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही दूरगामी परिणाम झाले आहेत. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये, जिथे ग्रामीण भागातील

लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे, तेथे जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर होणारा प्रभाव अभ्यासणे अत्यंत आवश्यक ठरते. महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य मानले जात असले तरी राज्यातील मोठा भाग ग्रामीण असून तेथे शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर आधारित अर्थव्यवस्था आढळते. ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योग हे ग्रामीण रोजगारनिर्मितीचे, उत्पन्नवाढीचे आणि स्थानिक संसाधनांच्या उपयोगाचे महत्त्वाचे साधन आहेत. हातमाग व वस्त्रोद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग, साखर उद्योग, दुग्धव्यवसाय, हस्तकला, मातीची भांडी, लोहारकाम, लाकूडकाम, तसेच ग्रामीण सेवा उद्योग यांचा महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा आहे. हे उद्योग कमी भांडवलात सुरू करता येतात आणि स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देतात. जागतिकीकरणामुळे ग्रामीण लघु उद्योगांसमोर संधी आणि आव्हाने अशा दोन्ही बाबी उभ्या राहिल्या आहेत. एकीकडे आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता, सुधारित उत्पादन पद्धती, जागतिक बाजारपेठेपर्यंत पोहोच आणि निर्यात संधी वाढल्या आहेत. विशेषतः अन्नप्रक्रिया, सेंद्रिय उत्पादने, हस्तकला व ग्रामीण उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी वाढलेली दिसून येते. दुसरीकडे, मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांची वाढती स्पर्धा, स्वस्त परदेशी उत्पादने, भांडवलाची कमतरता, विपणन कौशल्यांचा अभाव आणि गुणवत्ता मानकांची अडचण यांमुळे अनेक ग्रामीण लघु उद्योग संकटात सापडले आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत ग्रामीण लघु उद्योग टिकून राहतील की नाही, हा एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही उद्योग जागतिकीकरणाशी जुळवून घेत पुढे जात असताना अनेक पारंपरिक उद्योग बंद पडलेले दिसतात, ज्यामुळे ग्रामीण बेरोजगारी, स्थलांतर आणि सामाजिक-आर्थिक असमतोल वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाचा महाराष्ट्रातील ग्रामीण लघु उद्योगांवर झालेला प्रभाव समजून घेणे आणि त्याचे सखोल विश्लेषण करणे आवश्यक आहे.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील ग्रामीण लघु उद्योगांवर जागतिकीकरणाचा नेमका काय परिणाम झाला आहे, हे समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते. प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश म्हणजे जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या संधी, अडचणी आणि त्याचा ग्रामीण औद्योगिक विकासावर झालेला प्रभाव यांचे चिकित्सक विश्लेषण करणे होय.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** जागतिकीकरण व ग्रामीण लघु उद्योगांवरील परिणाम या विषयावर मराठी भाषेत विविध अभ्यासकांनी संशोधन केले आहे. खालील अभ्यासांमधून प्रस्तुत संशोधनासाठी सैद्धांतिक व अनुभवजन्य आधार प्राप्त होतो. देशमुख (२०१२) यांनी त्यांच्या "जागतिकीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था" या पुस्तकात जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील उत्पादन संरचनेत झालेले बदल स्पष्ट केले आहेत. त्यांच्या मते, जागतिक बाजारपेठेशी जोडल्या गेल्यामुळे काही ग्रामीण उद्योगांना संधी मिळाल्या असल्या तरी बहुसंख्य लघु उद्योग स्पर्धेमुळे अडचणीत आले आहेत. पाटील (२०१४) यांनी "महाराष्ट्रातील ग्रामीण औद्योगिक विकास" या अभ्यासात ग्रामीण लघु उद्योगांच्या वाढीतील अडथळ्यांचे विश्लेषण केले आहे. त्यांनी भांडवलाची कमतरता, तांत्रिक ज्ञानाचा अभाव आणि विपणन मर्यादा या समस्या अधोरेखित केल्या असून जागतिकीकरणामुळे या समस्या अधिक तीव्र झाल्याचे नमूद केले आहे. कुलकर्णी (२०१६) यांनी "जागतिकीकरण: संधी आणि आव्हाने" या लेखात ग्रामीण उद्योगांवरील सामाजिक-आर्थिक परिणामांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील रोजगाराच्या स्वरूपात बदल झाला असून पारंपरिक व्यवसायांवर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. शिंदे (२०१७) यांनी "ग्रामीण लघु उद्योग आणि रोजगारनिर्मिती" या संशोधनात असे प्रतिपादन केले आहे की लघु उद्योग ग्रामीण बेरोजगारी कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात; मात्र जागतिकीकरणाच्या काळात त्यांना शासनाच्या संरक्षणात्मक धोरणांची गरज आहे. जाधव (२०१८) यांनी "महाराष्ट्रातील MSME क्षेत्राचा विकास" या लेखात जागतिकीकरणानंतरच्या काळात ग्रामीण लघु उद्योगांसाठी शासनाच्या योजनांचा आढावा घेतला आहे. त्यांच्या अभ्यासानुसार धोरणांची अंमलबजावणी प्रभावी न झाल्यास ग्रामीण उद्योगांना अपेक्षित लाभ मिळत नाही. जोशी (२०२०) यांनी"जागतिकीकरण आणि ग्रामीण सामाजिक बदल" या पुस्तकात जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाजरचनेवर आणि उद्योगांवर झालेल्या परिणामांचे विश्लेषण केले आहे. त्यांनी असे नमूद केले आहे की आर्थिक बदलांसोबतच सामाजिक विषमता देखील वाढली आहे. सावंत (२०२१) यांनी "ग्रामीण विकासात लघु उद्योगांचे योगदान" या संशोधनात लघु उद्योगांच्या शाश्वत विकासासाठी तांत्रिक प्रशिक्षण, वित्तीय सहाय्य आणि बाजारपेठेची गरज अधोरेखित केली आहे. वरील साहित्याच्या अभ्यासातून असे स्पष्ट होते की जागतिकीकरणाचा ग्रामीण लघु उद्योगांवर मिश्र स्वरूपाचा परिणाम झालेला असून प्रस्तुत अभ्यास या संशोधनातील निष्कर्षांना अधिक व्यापक संदर्भात समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

**संशोधनाचे उद्देश:** 1. जागतिकीकरणाचा महाराष्ट्रातील ग्रामीण लघु उद्योगांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे. 2. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या संधी व अडचणींचे विश्लेषण करणे. 3. ग्रामीण लघु उद्योगांच्या शाश्वत विकासासाठी उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धती:** सदर शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. अभ्यासासाठी दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला असून शासकीय अहवाल, संशोधन लेख, पुस्तके, नियतकालिके, आर्थिक सर्वेक्षणे आणि संकेतस्थळे यांचा आधार घेतला आहे. माहितीचे वर्गीकरण करून तिचे तुलनात्मक व चिकित्सक विश्लेषण करण्यात आले आहे. प्राप्त माहितीच्या आधारे निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात आल्या आहेत.

जागतिकीकरणामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण लघु उद्योगांवर झालेले परिणाम जागतिकीकरणामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण लघु उद्योगांवर बहुआयामी परिणाम झालेले दिसून येतात. १९९१ नंतर भारतात स्वीकारण्यात आलेल्या जागतिकीकरणाच्या धोरणामुळे देशाच्या आर्थिक रचनेत मूलभूत बदल घडून आले. महाराष्ट्रासारख्या औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्यात याचा प्रभाव अधिक तीव्रतेने जाणवला. विशेषतः ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योगांवर जागतिकीकरणाचे परिणाम संमिश्र स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. काही उद्योगांना नव्या संधी उपलब्ध झाल्या, तर अनेक उद्योगांसमोर अस्तित्वाचे आव्हान उभे राहिले. खाली जागतिकीकरणामुळे

महाराष्ट्रातील ग्रामीण लघु उद्योगांवर झालेले सकारात्मक व नकारात्मक परिणाम उदाहरणांसहित स्पष्ट करण्यात येत आहेत. जागतिकीकरणामुळे ग्रामीण लघु उद्योगांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रवेश झाला. उदाहरणार्थ, विदर्भ व मराठवाडा भागातील अन्नप्रक्रिया उद्योगांमध्ये पॅकेजिंग, शीतसाठवण (Cold Storage) व गुणवत्ता नियंत्रणाच्या आधुनिक पद्धती वापरात आल्या. यामुळे उत्पादनाचा दर्जा सुधारला व उत्पादनक्षमता वाढली. दुग्धव्यवसायात स्वयंचलित दुध संकलन केंद्रे, दूध शीतकरण यंत्रणा यांचा वापर वाढल्याने ग्रामीण दुग्धव्यवसाय अधिक व्यावसायिक झाला. मात्र, अनेक लघु उद्योगांना आधुनिक यंत्रसामग्रीसाठी आवश्यक भांडवल उपलब्ध न झाल्यामुळे ते तांत्रिकदृष्ट्या मागे पडले. त्यामुळे तंत्रज्ञानाचा लाभ काही मर्यादित उद्योगांपुरताच केंद्रित राहिला. जागतिकीकरणामुळे ग्रामीण उद्योगांसाठी स्थानिक बाजारपेठेपुरती मर्यादा राहिली नाही. महाराष्ट्रातील हातमाग, हस्तकला, वारली चित्रकला, पैठणी साडी, कोल्हापुरी चप्पल यांसारख्या पारंपरिक ग्रामीण उत्पादनांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी वाढली. काही स्वयं-सहायता गट व सहकारी संस्थांनी ऑनलाइन विक्री आणि प्रदर्शनांच्या माध्यमातून आपल्या उत्पादनांना जागतिक स्तरावर पोहोचवले. तथापि, जागतिक बाजारपेठेतील गुणवत्ता मानके, प्रमाणिकरण (Certification), ब्रँडिंग आणि विपणन कौशल्यांचा अभाव यामुळे बहुसंख्य ग्रामीण लघु उद्योग निर्यात क्षेत्रात टिकू शकले नाहीत. परिणामी बाजारपेठेचा लाभ काही निवडक उद्योगांनाच झाला. जागतिकीकरणामुळे ग्रामीण बाजारपेठेत परदेशी व मोठ्या औद्योगिक कंपन्यांची उत्पादने मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाली. स्वस्त आणि आकर्षक पॅकेजिंग असलेली उत्पादने ग्रामीण ग्राहकांना सहज उपलब्ध होऊ लागली. उदाहरणार्थ, ग्रामीण भागातील साबण, तेल, कपडे, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ यांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांनी स्थानिक उद्योगांवर वर्चस्व मिळवले. याचा थेट परिणाम म्हणजे अनेक ग्रामीण लघु उद्योगांची विक्री घटली. स्थानिक तेलघाणे, लघु वस्त्रोद्योग, पारंपरिक खाद्यपदार्थ निर्मिती उद्योग हळूहळू बंद पडले किंवा मर्यादित स्वरूपातच टिकून राहिले. ग्रामीण लघु उद्योग हे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणारे क्षेत्र आहे. जागतिकीकरणामुळे काही उद्योगांमध्ये रोजगाराच्या संधी वाढल्या, विशेषतः अन्नप्रक्रिया, दुग्धव्यवसाय आणि निर्यातक्षम हस्तकला उद्योगांमध्ये. महिलांवर आधारित स्वयं-सहायता गटांना काही प्रमाणात रोजगार व उत्पन्नाच्या संधी उपलब्ध झाल्या. परंतु, अनेक पारंपरिक उद्योग बंद पडल्यामुळे ग्रामीण बेरोजगारी वाढली. रोजगाराच्या शोधात तरुणांचे शहरी भागाकडे स्थलांतर वाढले. त्यामुळे ग्रामीण समाजरचनेत असमतोल निर्माण झाला. जागतिकीकरणाच्या काळात स्पर्धेत टिकून राहण्यासाठी भांडवलाची आवश्यकता वाढली. मात्र ग्रामीण लघु उद्योगांना बँक कर्ज, वित्तीय सहाय्य आणि गुंतवणूक सहज उपलब्ध होत नाही. मोठ्या उद्योगांच्या तुलनेत ग्रामीण उद्योगांना पतपुरवठा कमी प्रमाणात मिळतो. परिणामी, अनेक उद्योग आधुनिकीकरण करू शकले नाहीत. सरकारी योजना अस्तित्वात असल्या तरी त्यांच्या अंमलबजावणीत अडचणी, माहितीचा अभाव आणि प्रशासकीय अडथळे यांमुळे अपेक्षित लाभ सर्व उद्योगांपर्यंत पोहोचलेला नाही. जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात आर्थिक विषमता वाढल्याचे दिसून येते. काही प्रगत, तांत्रिकदृष्ट्या सक्षम उद्योग आणि उद्योजकांनी जागतिकीकरणाचा लाभ घेतला, तर अल्पभांडवली व पारंपरिक उद्योग मागे पडले. त्यामुळे ग्रामीण भागात उत्पन्नातील तफावत वाढली. विशेषतः अनुसूचित जाती-जमाती, महिला व पारंपरिक कारागीर वर्ग यांना जागतिकीकरणाचा मर्यादित लाभ मिळाल्याचे दिसते. त्यांच्या उद्योगांना संरक्षण आणि विशेष सहाय्याची गरज वाढली आहे. जागतिकीकरणामुळे ग्रामीण जीवनशैली व उपभोगाच्या सवयींमध्ये बदल झाला. आधुनिक आणि ब्रँडेड उत्पादनांकडे ग्रामीण ग्राहकांचा कल वाढला. परिणामी, पारंपरिक हस्तकला, स्थानिक वस्तू आणि ग्रामीण सेवा उद्योगांची मागणी घटली. काही उद्योगांनी आधुनिकतेशी जुळवून घेत नवे स्वरूप स्वीकारले, तर काही उद्योग लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.

**निष्कर्ष:** जागतिकीकरणाचा महाराष्ट्रातील ग्रामीण लघु उद्योगांवर संमिश्र परिणाम झालेला दिसून येतो. आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठेची व्याप्ती आणि गुंतवणूक संधी यामुळे काही उद्योगांना लाभ झाला आहे. मात्र बहुसंख्य ग्रामीण लघु उद्योगांना वाढत्या स्पर्धेमुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो आहे. योग्य धोरणात्मक हस्तक्षेप, आर्थिक सहाय्य, कौशल्य विकास आणि बाजारपेठेतील संरक्षण न मिळाल्यास जागतिकीकरण ग्रामीण उद्योगांसाठी अडथळा ठरू शकते. त्यामुळे राज्य व केंद्र सरकारने ग्रामीण लघु उद्योगांना जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सक्षम बनविण्यासाठी विशेष उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. प्रस्तुत अभ्यासातून असे स्पष्ट होते की जागतिकीकरणाचा महाराष्ट्रातील ग्रामीण लघु उद्योगांवर परिणाम संमिश्र स्वरूपाचा झालेला आहे. जागतिकीकरणामुळे ग्रामीण उद्योगांच्या कार्यपद्धतीत, उत्पादन प्रक्रियेत आणि बाजारपेठेशी असलेल्या संबंधांमध्ये महत्त्वाचे बदल घडून आले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता, सुधारित उत्पादन साधने, माहिती व दळणवळण सुविधांचा विस्तार आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेपर्यंत पोहोच यांमुळे काही ग्रामीण लघु उद्योग अधिक स्पर्धात्मक बनले आहेत. विशेषतः अन्नप्रक्रिया उद्योग, दुग्धव्यवसाय, हस्तकला व सेंद्रिय उत्पादनांशी संबंधित उद्योगांना जागतिकीकरणामुळे नवीन संधी उपलब्ध झालेल्या दिसून येतात. तथापि, जागतिकीकरणाचे सर्व लाभ ग्रामीण लघु उद्योगांना समान प्रमाणात मिळालेले नाहीत. बहुसंख्य ग्रामीण उद्योग अल्पभांडवली, पारंपरिक तंत्रज्ञानावर आधारित आणि कौशल्य मर्यादित असल्यामुळे वाढत्या जागतिक स्पर्धेत टिकून राहू शकले नाहीत. परदेशी व मोठ्या औद्योगिक कंपन्यांच्या स्वस्त आणि दर्जेदार उत्पादनांमुळे स्थानिक बाजारपेठेत ग्रामीण लघु उद्योगांची मागणी घटली. परिणामी अनेक पारंपरिक उद्योग बंद पडले किंवा अत्यंत मर्यादित स्वरूपात चालू राहिले. याचा थेट परिणाम ग्रामीण रोजगारावर झाला असून बेरोजगारी व शहरी स्थलांतरात वाढ झाल्याचे दिसून येते. जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक विषमता वाढल्याचेही निरीक्षणात येते. काही निवडक, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि बाजारपेठेशी जोडलेले उद्योग प्रगती करत असताना, अल्पसंख्याक, महिला, पारंपरिक कारागीर आणि दुर्बल घटकांशी संबंधित उद्योग मागे पडले आहेत. शासनाच्या विविध योजना अस्तित्वात असल्या तरी त्यांची अंमलबजावणी अपुरी असल्यामुळे सर्व ग्रामीण लघु उद्योगांना अपेक्षित लाभ मिळालेला नाही. या सर्व चर्चेच्या आधारे असे निष्कर्ष काढता येतात की जागतिकीकरण हे ग्रामीण लघु उद्योगांसाठी ना पूर्णतः संधी आहे, ना पूर्णतः धोका. योग्य धोरणात्मक हस्तक्षेप, आर्थिक व तांत्रिक सहाय्य, कौशल्य विकास कार्यक्रम, प्रभावी विपणन व्यवस्था आणि स्थानिक

उत्पादनांचे संरक्षण या बाबींची अंमलबजावणी झाल्यास जागतिकीकरण ग्रामीण लघु उद्योगांच्या शाश्वत विकासाचे प्रभावी साधनठरू शकते. अन्यथा, ते ग्रामीण अर्थव्यवस्थेतील असमतोल आणि समस्या अधिक तीव्र करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**शिफारशी:** 1. ग्रामीण लघु उद्योगांना जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी भांडवलाची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे बँक कर्ज, सूक्ष्म वित्त, अनुदाने व कमी व्याजदराच्या कर्ज योजना अधिक सुलभ व पारदर्शक कराव्यात. स्वयं-सहायता गट, सहकारी संस्था आणि लघु उद्योजकांना पतपुरवठा करताना जामिनाच्या अटी शिथिल कराव्यात. आर्थिक सहाय्याच्या योजनांची माहिती ग्रामीण उद्योजकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे गरजेचे आहे. 2. जागतिकीकरणाच्या काळात ग्रामीण लघु उद्योगांना आधुनिक तंत्रज्ञान व कौशल्यांची गरज आहे. त्यामुळे उत्पादन तंत्र, गुणवत्ता नियंत्रण, पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि डिजिटल विपणन यासंदर्भात नियमित प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विद्यापीठे व खासगी क्षेत्राच्या सहकार्याने ग्रामीण उद्योजक व कामगारांसाठी कौशल्य विकास केंद्रे स्थापन करणे आवश्यक आहे. 3. ग्रामीण लघु उद्योगांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विक्रीसाठी विशेष विपणन यंत्रणा उभाराव्यात. ई-कॉमर्स, प्रदर्शन, मेळावे आणि ब्रँडिंगच्या माध्यमातून ग्रामीण उत्पादनांना ओळख मिळवून द्यावी. 'स्थानिक उत्पादनांना प्राधान्य' देणारी धोरणे प्रभावीपणे राबवली पाहिजेत. 4. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या असमान स्पर्धेत ग्रामीण लघु उद्योगांचे संरक्षण करणे गरजेचे आहे. त्यासाठी आयात धोरणांमध्ये संतुलन, कर सवलती, कच्च्या मालावर अनुदान आणि क्लस्टर आधारित औद्योगिक विकास धोरणे राबवावीत. तसेच सहकारी संस्था, उद्योग संघटना आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण उद्योगांना संस्थात्मक पाठबळ देणे आवश्यक आहे.

**संदर्भ:**


1. Ahluwalia, Isher Judge. *Economic Reforms in India.* Oxford University Press, 2011.
2. Bardhan, Pranab. *Awakening Giants, Feet of Clay.* Princeton University Press, 2010.
3. Datt, Ruddar, and K. P. M. Sundharam. *Indian Economy.* S. Chand, 2014.
4. देशमुख, अ. र. *जागतिकीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था.* कॉन्टिनेंटल प्रकाशन, २०१२.
5. जाधव, क. द. "महाराष्ट्रातील MSME क्षेत्राचा विकास." *आर्थिक विकास समीक्षा,* खंड १५, अंक १, २०१८, पृ. ६२—७०.
6. जोशी, म. स. *जागतिकीकरण आणि ग्रामीण सामाजिक बदल.* साई प्रकाशन, २०२०.
7. कुलकर्णी, र. व. "जागतिकीकरण: संधी आणि आव्हाने." *महाराष्ट्र आर्थिक चिंतन,* खंड २१, अंक १, २०१६, पृ. ४५—५६.
8. Patil, S. M. *Rural Industrial Development in Maharashtra.* Shivaji University Press, 2014.
9. Planning Commission of India. *Twelfth Five Year Plan.* Government of India, 2013.
10. Reddy, V. *Globalization and Rural Development in India.* Orient Blackswan, 2020.
11. Reserve Bank of India. *Report on MSME Sector.* RBI, 2020.
12. Savanta, N. P. "Contribution of Small Industries in Rural Development." *Gramin Vikas Abhyas*, vol. 18, no. 2, 2021, pp. 91—100.
13. Sen, Amartya. *Development as Freedom.* Knopf, 1999.
14. Shinde, P. J. "Rural Small Industries and Employment Generation." *Indian Journal of Social Research*, vol. 9, no. 2, 2017, pp. 78—86.
15. World Bank. *Globalization and Growth.* World Bank, 2018.


# जागतिकीकरणाच्या प्रवाहानंतर भारतीय शेतीव्यवस्थेवर झालेले परिणाम: एक समाजशास्त्रीय चिंतन

**प्रा. (डॉ.) चंद्रकांत कांबळे** समाजशास्त्र विभागप्रमुख वसुंधरा कॉलेज, सोलापूर

**गोषवारा:** जागतिकीकरणामुळे शेती व्यवसायावर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्हीही परिणाम झालेले आहेत. खरे पहिले तर जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाल्या असल्या तरी स्पर्धा आणि खर्च मात्र भयानक वाढला आहे. परंतु जागतिकीकरणाचा एक फायदा असा कि, शेतीत आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित बियाणे आणि मशिनीकरणाचा वापर वाढत आहे.ज्यामुळे उत्पादन क्षमता आणि निर्यात वाढली आहे शेतकऱ्यांना उच्च मूल्यांच्या पिकासाठी नवीन बाजारपेठ मिळाली असून विदेशी गुंतवणूक खाद्य प्रक्रिया क्षेत्रात वाढ झाली आहे. परंतु नकारात्मक बाजूचा विचार केला तर आंतरराष्ट्रीय स्पर्धेमुळे छोट्या शेतकऱ्यांना कमी किमती मिळतात आणि सबसिडी सुद्धा कमी मिळते त्यामुळे हेक्टरी खर्च वाढला आहे. औद्योगिकरणामुळे ग्रामीण भागात बेरोजगारी वाढली आहे पारंपारिक शेतीवर परिणाम झाला आहे बहुराष्ट्राच्या रेट्यामुळे भारतीय शेतमालांची स्पर्धा खूपच कमकुवत झाली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढण्याचे महत्वाचे कारण म्हणजे वाढलेले जागतिकीकरणाचे जाळे होय.ग्रामीण उद्योग, लघुद्योग, पारंपारिक उद्दिग, हस्तुद्योग,ग्रामीण कला परंपरा, शेती व्यवसाय जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे खूपच अडचणीत आला आहे. काही काळानंतर याबाबी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत हि बाबा भारतीय अर्थव्यवस्था मजबूत ठेवण्यासाठी चिंताजनक आहे. भारताची शेतीव्यवस्था जागतिकीकरणाच्या प्रवाहानंतर धोक्यात आली आहे हे सत्य नाकारणे कठीण आहे.

**प्रस्तावना:** प्रस्तुत शोधनिबंधात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा परिणाम शेती आणि पर्यायाने समाज जीवनावर कसा झाला आहे.याचा सबंध स्पष्ट करण्यचा प्रयत्न केला आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे आणि आपली राष्ट्रीय अर्थ व्यवस्था शेतीवर आधारली आहे. अर्थातच सांगण्याचा तात्पर्य कि, भारत हा कृषीप्रधान देश आहे, भारताची अर्थव्यवस्था मजबूत करायचे असेल तर

प्रथमतः शेतीला व शेतीला पूरक असणाऱ्या घटकांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. औद्योगिकीकरणानंतर भारताची कृषी व्यवस्था दिवसेंदिवस अशक्त होत चालली आहे. भारतीय शेती व्यवस्थेला आज अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. शेतीतील अडथळे कोणते आहेत हे अभ्यासण्याची गरज आहे. जगतीकीकरणाच्या प्रवाहानंतर शेतीव्यवसायाचे अनेक समीकरणे बदलले आहेत. जगाची एकच बाजारपेठ निर्माण करण्याच्या हेतूने जगातील अनेक देश एकत्र येऊन जागतिकीकीकरणाचा प्रवाह सुरु केला आहे. शेतकरी हा शेतीचा मुख्य केंद्रबिंदू आहे. शेती करणारा समुदाय असल्याने शेती व्यवस्था आजपर्यंत टिकून आहे. शेती हा आजही महत्त्वाचा व्यवसाय आहे. आणि शेतीव्यवसाय केवळ रोजगाराचा प्रमुख प्रकार नाही तर मानवी जीवन,सृष्टी आणि सामाजिक व्यवस्था अबाधित ठेवण्याचा आधार देखील बनतो. वाढत्या लोकसंख्येमुळे वसाहत वाढली असून त्याचा पर्यावरणावर परिणाम होत आहे. म्हणजे पर्यावरणाच्या हानीला मानवच जबाबदार आहे. बदलत्या काळानुसार आणि नैसर्गिक बदलानुसार शेतीमध्ये बदल होणे अपरिहार्य आहे, निसर्गाच्या स्वरूपामुळे समाजव्यवस्थेतही फरक आहे. हवामान बदल हे शेतीसाठी जबाबदार असतात. कारण ते कृषी व्यवस्थेवर परिणाम करतात. नैसर्गिक वातावरणाचा सामाजिक व्यवस्थेशी संबंध आहे. नैसर्गिक घटना आणि वातावरण आणि सांस्कृतिक मूल्ये यांच्यातील संबंध शोधण्यासारखा असतो. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे, तेथे अनेक जाती-धर्म भाषा आणि प्रदेश आहेत. अशा भूप्रदेशात भौगोलिक विविधता हि आढळते. भारतातील हि सामाजिक अवस्था सुध्दा शेतीकडे दुर्लक्ष करण्यासाठी जबाबदार आहे. पृथ्वीला प्राप्त झालेल्या सौर किरणोत्सर्गातील सागरी प्रक्रियांमधील फरक, प्लेट टेक्टोनिक्स आणि ज्वालामुखीचा उद्रेक आणि नैसर्गिक जगामध्ये मानवी प्रेरित बदल यांचा समावेश असलेल्या घटकांमुळे होतो. हे नंतरचे परिणाम सध्या ग्लोबल वॉर्मिंगला कारणीभूत आहेत आणि हवामानातील बदलांचा वापर मानवी विशिष्ट प्रभावांचे वर्णन करण्यासाठी केला जातो. हवामान बदल आणि शेती या परस्परसंबंधित प्रक्रिया आहेत. या दोन्ही घटना जागतिक स्तरावर घडतात. ग्लोबल वॉर्मिंगचा या घटकांच्या तापमान कार्बन डायऑक्साइड हिमनदीसह शेतीवर परिणाम करणाऱ्या परिस्थितीवर लक्षणीय परिणाम होण्याचा अंदाज आहे. एकूणच हवामान बदलाचा शेतीवर होणारा परिणाम या परिणामांच्या संतुलनावर अवलंबून असेल.

हा शोधनिबंध म्हणजे हवामानातील बदलांचा कृषी व्यवस्थेवर परिणाम करण्याचा प्रयत्न आहे. हवामान बदलाचा परिणाम कृषी उत्पादनावर होतोच पण त्याचा समाजावरही मोठा परिणाम होतो. कोणतीही समाजव्यवस्था ही नैसर्गिक घटकांनी बनलेली असते. सामाजिक आणि भौगोलिक तत्त्वाशी समन्वित सामाजिक व्यवस्था समाज स्थिर आहे. त्यामुळे हवामान बदलाचा सामाजिक व्यवस्था आणि कृषी व्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करणे. जागतिक हवामानातील बदलांच्या कृषीवर होणाऱ्या परिणामांचे मूल्यांकन केल्याने शेतीचे उत्पादन जास्तीत जास्त वाढवण्यासाठी शेतीचा योग्य अंदाज लावण्यास आणि अनुकूल करण्यास मदत होऊ शकते. त्याच वेळी, शेतीवर प्रामुख्याने कार्बन डायऑक्साइड मिथेन आणि नायट्रस ऑक्साईड यांसारख्या हरितगृह वायूंचे उत्पादन आणि उत्सर्जन याद्वारे हवामानातील बदलांवर लक्षणीय परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे, परंतु पृथ्वीच्या जमिनीच्या आवरणातही बदल करून उष्णता आणि प्रकाश शोषून घेण्याची क्षमता बदलू शकते. अशा प्रकारे किरणोत्सर्गी सक्तीमध्ये योगदान देते. या संशोधनासाठी संशोधकाने भारतीय कृषी व्यवस्था आणि भारतातील पर्यावरणातील बदलांचा अभ्यास केला आहे.

**उद्दिष्टे**: १. हवामानातील बदल आणि त्याचे शेतीशी संबंधित प्रश्नांकडे लक्ष देणे आणि समाजजीवनावर होणारा परिणाम शोधणे २. कृषी व्यवस्थेतील अलीकडील बदल भौगोलिकदृष्ट्या बदल झाले आहेत ते समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून स्पष्ट करणे. ३. जागतिकीकरणाच्याधोरणाचा शेती व्यवसायावरील झालेला प्रभाव आणि त्यातून झालेले सामाजिक सांस्कृतिक बदल याचा आढावा घेणे.

**गृहीतक**: या समस्येसाठी या प्रणालीसाठी काही गृहितकांचा विचार केला जातो. १. स्वातंत्र्यानंतर शेती व्यवस्थेला दुय्यम स्थान मिळाले आहे. २. निसर्ग ही पृथ्वीवरील सर्वोच्च शक्ती आहे आणि त्याच्याशी बदलणाऱ्या प्रक्रीयाशी संबंध समाजजीवन पद्धतीचा आहे. ३. हवामानातील बदलांचा परिणाम कृषी व्यवस्थेवर होतो आणि त्यातून सामाजिक संरचना बदलत जाते.

शेती हे आतापर्यंतचे सर्वात मोठे पाणी वापर क्षेत्र आहे, जे जगभरातील नद्या आणि जलचरांमधून कृषी घरगुती आणि औद्योगिक उद्देशांसाठी काढल्या जाणाऱ्या एकूण पाण्यापैकी ७४ टक्के आहे. बऱ्याच विकसनशील देशांमध्ये सिंचन हे सर्व पाणी उपसल्या जाणाऱ्या ९२% पर्यंत प्रतिनिधित्व करते आणि ते अन्न उत्पादन आणि सुरक्षिततेमध्ये मोठी भूमिका बजावते. शेती हे भौतिक सामाजिक-संस्थात्मक आणि तांत्रिक आर्थिक घटकांचे कार्य आहे, जे निसर्गात गतिमान आहेत उत्पादन वाढवणे आणि अन्नधान्य अतिरिक्त निर्मिती या मूळ उद्देशाने बदलत राहते. पारंपारिक शेती प्रणाली आधुनिक शेतीमध्ये परिवर्तनाच्या प्रक्रियेत आहे जी स्वतः समानतेच्या संचातून जात आहे आणि सामान्यत: अधिक जलद बदलांमध्ये आहे. त्यामुळे शेतीमध्ये नवे आयाम जोडले गेले आहेत ज्याचा या संबंधित पद्धतीचा अभ्यास आणि विश्लेषण करणे आवश्यक आहे. यापैकी बहुतेक देशांच्या कृषी विकास धोरणे सिंचित शेती सुधारण्याच्या आणि वाढविण्याच्या शक्यतेवर अवलंबून असतात. गेल्या दोन दशकांमध्ये जगभरातील पर्यावरणविषयक चिंता आणि जागरुकता यामुळे वार्मिंग व्हॅली प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यावर पर्यावरणीय पैलूंचा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. बहुतेक विकसनशील देशांमध्ये कृषी हा एक प्रमुख क्रियाकलाप आहे. जसजशी आर्थिक वाढ आणि विकास होत जातो तसतसे प्रसिद्ध विचारधारेनुसार शेतीचे महत्त्व कमी होत जाते. सिंचन योजनेमुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचे मूल्यांकन करण्यासाठी भारताला कोणतीही औपचारिक अट बंधनकारक नव्हती. काही मोठ्या धरण प्रकल्पांमध्ये किमान दोन पर्यावरणीय मापदंडांचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, भारतातील पावसाच्या नोंदी साठ स्टेशनसाठी साठ पाच ते ऐंशी वर्षांच्या कालावधीसाठी उपलब्ध आहेत. दुर्मिळ गाळ आणि पाणी साचण्याची शक्यता, या दोन मापदंडांचे प्रामुख्याने धरणाच्या जीवनावर आणि कमांड एरियातील कृषी उत्पादकतेवर होणाऱ्या परिणामांचे मूल्यांकन करण्यात आले. अशी परिस्थिती टाळण्यासाठी पर्यावरण

जागरूकता निर्माण करणे आणि नसर्गिक संशाधनाची प्रक्रियांची योग्य अंमलबजावणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जागतिकीकरण (Globalization) म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडण्याची प्रक्रिया होय. १९९१ च्या आर्थिक सुधारणांनंतर भारतीय शेतीवर जागतिकीकरणाचे खोलवर परिणाम झाले आहेत. जागतिकीकरणाच्या परिणामांचे सविस्तर विश्लेषण दिले आहे:जागतिकीकरणामुळे जगात विकसित झालेले प्रगत तंत्रज्ञान, सिंचन पद्धती (ठिबक, तुषार सिंचन) आणि आधुनिक शेती अवजारे भारतीय शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली.संकरित आणि दर्जेदार बियाणांच्या उपलब्धतेमुळे पिकांच्या उत्पादकतेत वाढ झाली.

जागतिक बाजारपेठेच्या मागणीनुसार पिकांचा दर्जा सुधारण्याकडे कल वाढला. जागतिक बाजारपेठ खुली झाल्यामुळे भारतीय शेतीमाल (उदा. द्राक्षे, हापूस आंबा, मसाले, कापूस) परदेशात निर्यात करणे सोपे झाले, ज्यामुळे परकीय चलन मिळू लागले.शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात आल्यामुळे बटाटे, टोमॅटो यांसारख्या पिकांना चांगली बाजारपेठ मिळाली.प्रगत देशांमधील शेतीला मोठ्या प्रमाणावर अनुदान (Subsidy) मिळते, त्यामुळे त्यांचा शेतमाल स्वस्त असतो. अशा स्वस्त मालाशी स्पर्धा करताना भारतीय शेतकऱ्यांना अडचणी येतात.रासायनिक खते, कीटकनाशके आणि संकरित बियाणे यांच्या वाढत्या वापरामुळे शेतीचा खर्च वाढला, परंतु त्या प्रमाणात शेतमालाला भाव मिळाला नाही. जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांमुळे सरकारला शेतीवरील काही अनुदाने कमी करावी लागली, ज्याचा थेट फटका सामान्य शेतकऱ्यांना बसला.बियाणे आणि खतांच्या बाजारपेठेत मोठ्या खाजगी कंपन्यांचे वर्चस्व निर्माण झाले, ज्यामुळे शेतकरी बियाणांसाठी स्वतःवर अवलंबून न राहता कंपन्यांवर अवलंबून राहू लागला.उत्पादन खर्च वाढल्याने आणि पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढला, ज्यातून शेतकरी आत्महत्येसारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या. अधिक उत्पादनाच्या हव्यासापोटी रासायनिक खतांचा अतिवापर झाला, ज्यामुळे जमिनीचा पोत बिघडला आणि भूजल पातळी खालावली.आधुनिक कृषी क्षेत्रामध्ये शेताचा आकार मोठा आहे, लोकसंख्या कमी आहे आणि एकूण उत्पादकता जास्त आहे. साध्या विभागणीद्वारे मिळालेला निव्वळ परिणाम असा आहे की पारंपारिक शेतीच्या तुलनेत आधुनिक शेतीमध्ये प्रति युनिट श्रमिक उत्पादकतेचे प्रमाण खूप जास्त आहे. पारंपारिक शेतीच्या तुलनेत आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये सुप्रसिद्ध आहेत, आधुनिक शेतजमिनी अधिक भांडवलीकृत, व्यावसायिक यांत्रिकीकृत आणि विशेषीकृत आहेत. ते बाजार आणि सहाय्यक उद्योगांशी अधिक एकत्रित आहेत. ब्राह्मण हा हिंदू जातिव्यवस्थेचा एक स्तराचा वर्ग आहे ज्यांना एकेकाळी पुजारी पूजक संगीतकार किंवा स्तोत्रांचे पठण केले जात असे. विविध जातींचे पीक उत्पादन आणि उत्पादकता यांचा तुलनात्मक अभ्यास दर्शवतो की ब्राह्मण उत्तरदाते इतर जातींच्या तुलनेत चांगल्या स्थितीत आहेत. अनुसूचित जातींना सुरुवातीच्या काळापासून सेवा आणि कामगार वर्ग म्हणून ओळखले जाते. शेतीतील जागतिक फरक लक्षात घेता, धार्मिक पूजेच्या भूमिकेत कृषी कार्ये सामाजिक बंधने आणि निषिद्धांच्या अधीन असावीत हे आश्चर्यकारक नाही. सामाजिक प्रणाली होल्डिंग आणि फील्ड सिस्टमवर आणि फील्डमध्ये प्रवेशयोग्यतेच्या संबंधित समस्यांच्या पॅटर्नवर आपली छाप सेट करते. शेतीमधील तांत्रिक बदल म्हणजे संशोधनाद्वारे विकसित केलेल्या शेती तंत्राचा अवलंब करणे आणि विविधता आणण्यासाठी आणि उत्पादनात वाढ आणि शेतकऱ्यांना अधिक आर्थिक परतावा देण्यासाठी गणना करणे समाविष्ट आहे. सामाजिक संबंधांचा कोणताही सामान्य सिद्धांत नाही जो कृषी प्रणालीच्या स्थानिक वितरणाचे स्पष्टीकरण देण्यासाठी योग्यरित्या लागू केला जाऊ शकतो परंतु समुदायांमधील आणि समुदायांमधील सामाजिक फरक एंटरप्राइझच्या निवडीसह शेतीच्या कामाच्या प्रमाणात आणि प्रकारावर परिणाम करतात. शेतीचा नेहमीच सामाजिक जीवनाशी संबंध राहिला आहे. या यंत्रणेकडे शेतकरी आत्महत्यांची नोंद केली जाते. सामाजिक व्यवस्था कृषी विकासाशी संबंधित आहे. जात आणि प्राथमिक व्यवसाय इतके जोडलेले आहेत की ते सहसा एकमेकांचे समानार्थी म्हणून घेतले जातात. पूर्वी प्रत्येक जातीचा स्वतःचा एक व्यवसाय होता जो वंशपरंपरागत असायचा आणि इतरांच्या शोधात त्याचा त्याग करायचा. जातीची शुद्धता फक्त धार्मिक पुस्तकांमध्येच असते. तांत्रिक प्रगतीमुळे व्यावसायिक संरचनेतही बदल झाले आहेत. एकूणच जात-व्यवसाय गतिशीलता, जात-व्यवसाय संबंध अजूनही सूक्ष्म पातळीवरून बाहेर पडतात. समाजव्यवस्थेच्या या प्रश्नाला ही सूचना. समाजाच्या सांस्कृतिक परंपरा या संस्कृतीचे मूल्य शेतीशी संबंधित आहे. इन्स्ट्रुमेंटल तापमान रेकॉर्डमध्ये स्पष्ट होणारी तापमानवाढ अनेक स्वतंत्र वैज्ञानिक गटांद्वारे दस्तऐवजीकरण केलेल्या विस्तृत निरीक्षणांशी सुसंगत आहे. हरितगृह परिणामामुळे जागतिक तापमानवाढीमुळे जलविज्ञान चक्र, जमिनीतील ओलावा, पर्जन्यवृष्टी इत्यादींवर परिणाम होण्याची अपेक्षा आहे ज्यामुळे शेतीसाठी नवीन आव्हाने निर्माण होतील. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून पृथ्वीच्या वातावरणाच्या आणि महासागरांच्या सरासरी तापमानात होणारी वाढ आणि त्याचे अनुमानित सातत्य. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून, पृथ्वीचे सरासरी तापमान ०.८ c ने वाढले आहे आणि १९८० पासून सुमारे दोन तृतीयांश वाढ झाली आहे. हवामान प्रणालीची तापमानवाढ स्पष्ट आहे आणि शास्त्रज्ञांना नव्वद टक्क्यांहून अधिक खात्री आहे की ते प्रामुख्याने आहे. ग्रीन हाऊसच्या वाढत्या एकाग्रतेमुळे होतो. जीवाश्म इंधन जाळणे आणि जंगलतोड यासारख्या मानवी क्रियाकलापांमुळे तयार होणारे वायू.

**निष्कर्ष:** ग्लोबल वॉर्मिंगमुळे जग चिंतेत आहे, तापमानात वाढ झाल्याने शेतीचा प्रश्न वाढला आहे. हिमालयाच्या वाढत्या हिमनद्या वितळण्यामुळे सिंचनाच्या व्यवहार्यतेवर परिणाम होईल ज्याचा परिणाम आपल्या अन्न उत्पादनावर मोठ्या प्रमाणात होतो. तापमान आणि पर्जन्यमानातील किरकोळ बदलांचा तृणधान्ये, फळे, मसाले आणि औषधी वनस्पतींच्या गुणवत्तेवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. नैसर्गिक ऋतूप्रमाणे झालेले बदल सामाजिक वर्तनावरसुध्दा परिणाम करतात. मानव स्वतःच्या बुद्धिमत्तेची नैसर्गिक हानी करण्याचा आणि त्यांना जीवनाच्या नवीन प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करत असला तरी त्याचा परिणाम पर्यावरणावर होतो. जागतिकीकरणामुळे भारतीय शेतीला आधुनिकतेची जोड मिळाली असली, तरी लहान आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसमोर आर्थिक स्थिरता टिकवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. तथापि, शेतीचा घसरणारा वाटा ही एक घटना आहे आणि ती केवळ तुलनेने दीर्घकाळानंतर जाणवते. हवामान बदलाचा शेतीवर गंभीर परिणाम होतो आणि त्याचा गंभीर परिणामसमाजजीवनावर होतो,

या दोन्ही समस्यांकडे तातडीने लक्ष दिले पाहिजे. सेंद्रिय शेती आणि शाश्वत शेतीचे अनेक फायदे लक्षात घेता, हवामानातील बदल तसेच सामाजिक समता आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेच्या दृष्टीने संशोधन, वैयक्तिक, गुंतवणूक, वित्तपुरवठा आणि एकूणच सरकारी आणि आंतरराष्ट्रीय एजन्सींच्या समर्थनाचा अधिक लक्षणीय वाटा असावा. शाश्वत शेतीकडे वळले पाहिजे. शेतीच्या विकासासाठी सिंचन आणि ठिबक सिंचनाची व्यवस्था करणे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास पूर्णपणे वाढवणे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांना पीक विम्याचे संरक्षण देऊन त्यांचे कर्ज माफ करावे.

**संदर्भ:**

1. Ghose, Arpita. *Globalization, Agriculture Development and Food Security in India.* Deep Publication, 2011.
2. घारपुरे, विठ्ठल. *मानवी भूगोल.* पिंपळापुरे प्रकाशन, १९९८.
3. नूर मोहम्मद. *सोशियो-डायमेन्शन्स ऑफ ॲग्रिकल्चर.* संकल्पना प्रकाशन, १९९२.
4. शाह, वि. *पर्यावरण विज्ञान.* विद्या प्रकाशन, २००७.
5. सह, शंकर. *हवामान बदल आणि अन्न सुरक्षा.* के. के. प्रकाशन, २०१४.

# जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर परिणाम - एक सामाजिक अध्ययन

**डॉ. पी. एन. वाघ** समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री.जे.एस.पी.एम. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धानोरा जि. गडचिरोली.

**सारांश:** जागतिकीकरणामुळे भारतातील ग्रामीण समाजात व्यापक बदल घडून आले आहेत. कृषी, उद्योग, रोजगार, शिक्षण, आरोग्य, संस्कृती, पर्यावरण आणि सामाजिक रचनेवर त्याचा बहुआयामी प्रभाव पडला आहे. जागतिकीकरणाने ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेला वेग दिला असला तरी आर्थिक असमानता, सांस्कृतिक एकसुरीकरण, पर्यावरणीय समस्या, स्थलांतर आणि सामाजिक मूल्यव्यवस्थेतील ढासळणारे प्रवाह यासारख्या आव्हानांना ग्रामीण समाजाला सामोरे जावे लागत आहे. या अभ्यासात गुणात्मक व मात्रात्मक पद्धतीच्या आधारे ग्रामीण समाजातील बदलांचे सखोल विश्लेषण केले असून जागतिकीकरणाच्या सकारात्मक व नकारात्मक परिणामांचे संतुलीत चित्र मांडले आहे. अभ्यासाच्या शेवटी ग्रामीण विकासासाठी आवश्यक धोरणात्मक शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत. संशोधनातून असे आढळून आले की, जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठ व पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या असल्या तरी आर्थिक विषमता, पारंपारीक उद्योगांचा ऱ्हास, कर्जबाजारीपणा व पर्यावरणीय समस्या याही वाढल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या शाश्वत विकासासाठी समतोल व लोकाभीमुख धोरणांची आवश्यकता आहे. या संशोधन पेपरमध्ये जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाजातील शेती, रोजगार उद्योग, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, पर्यावरण व सांस्कृतिक जीवनात झालेले बदल सविस्तरपणे अभ्यासले आहेत.

***बिजसंज्ञा:*** *जागतिकीकरण, ग्रामीण समाज, विकास, आर्थिक बदल आणि सांस्कृतिक परिणाम.*

**प्रस्तावना:** अलिकडे काही दशकांपासून जागतिकीकरण ही संकल्पना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातील बदलांचे केंद्रस्थान बनली आहे. 1991 नंतर भारताने उदारीकरणाची धोरणे स्वीकारल्या नंतर देशातील उद्योग, सेवा व्यापार, कृषी, शिक्षण, तंत्रज्ञानआणि जीवनशैली यामध्ये जलद परिवर्तन घडले. हे परिवर्तन केवळशहरी भागांपुरते मर्यादीत न राहता ग्रामीण भागातील सामाजिक संरचना अर्थव्यवस्था सांस्कृतीक जीवन पर्यावरणीय स्थिती आणि जीवनमान यालाही मोठ्या प्रमाणत प्रभावित करू लागले. ग्रामीण भारताचे स्वरूप पारंपारीकतेपासून आधुनिकतेकडे आणि बंद अर्थव्यवस्थेकडून खुल्या बाजारपेठेकडे झुकू लागले. या पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर काय परिणाम झाला आहे. ग्रामिण जीवनातील परंपरा, मूल्य-व्यवस्था, अर्थव्यवस्था, सामाजिक रचना, सांस्कृतिक ओळख आणि आधुनिकतेतील संघर्ष कसा बदलला आहे, याचे वैज्ञानिक पद्धतीने परीक्षण करणे आवश्यक ठरते. या संशोधन प्रबंधाचा उद्देश ग्रामीण समाजातील विविध घटकांवरशेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, महिला, युवक, कुटुंबरचना, स्थलांतर, संस्कृति, पर्यावरण आणि तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रांवर जागतिकीकरणाचे अल्पकालीन व दिर्घकालीन परिणाम काय झाले याचा सर्व स्पर्श अभ्यास करणे हा आहे. ग्रामीण भागावर जागतिकीकरणाचे प्रभाव सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोनही अंगांनी पाहता येतात. एका बाजूला उत्पादन क्षमतेत वाढ, डिजीटल सुविधा, बाजारपेठेत विस्तार, उद्योजकतेचे नवे मार्ग,शिक्षण आणि आरोग्य सेवेची गुणवत्ता उंचावने हे फायदे दिसून येतात. तर दुसऱ्या बाजूला आर्थिक असमानता, सांस्कृतिक एकसुरीकरण पर्यावरणीय ऱ्हास, स्थलांतरण, कर्जबोजा, उपभोगवाद आणि पारंपारीक जीवनमुल्यांचे विघटन यासारख्या समस्याही प्रकर्षाने दिसून येतात. या सर्व प्रक्रियेचे सखोल सामाजिक विश्लेषण प्रस्तूत संशोधनात केलेले आहेत.

**जागतिकीकरणाची संकल्पना:** जागतिकीकरण म्हणजे जगातील विविध देशांमधील आर्थिक, सामाजिक , सांस्कृतिक, राजकीय आणि तांत्रिक देवाणघेवाणीची परस्परसंबंधित प्रक्रीया, यात व्यापार, गुंतवणूक, उत्पादन,माहिती देवाणघेवान, मानवी स्थलांतर, शिक्षण आणि तंत्रज्ञान यांचा परस्पर संबंध दृढ होतो. जगतिकीकरण म्हणजे विविध देशांमधील आर्थिक, सामाजिक, राजकीय व तांत्रीक क्षेत्रांतील परस्परसंबंध वाढविण्यासाठी प्रक्रिया, ज्यामुळे व्यापार, भांडवल, तंत्रज्ञान, माहिती व सेवांची आंतरराष्ट्रीय पातळीवर मुक्त देवाणघेवाण होउन जग ऐकमेकांशी अधिक जोडले जाते.

**जगतिकीकरणाच्या व्याख्या:** जागतिकीकरणाचा अर्थ वेगवेगळा लावला जातो. परंतु सोप्या शब्दात सांगायचे झाल्यास जागतिकीकरण म्हणजे एखाद्या देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थकारणाशी संलग्न करणे जोडून देणे होय. असे असले तरी जागतिकीकरणा संबंधी विविध अर्थ तज्ञांनी दिलेल्या व्याख्या अभ्यासने उपयुक्त ठरते, त्यापैकी काही व्याख्या पुढील प्रमाणे आहेत-

**रुसी मुनी** यांच्या मते, जागतिकीकरण म्हणजे खुली स्पर्धा आणि नवेतंत्रज्ञान यातुन उतपादकता आणि उत्पादन वाढविणे तसेच संपुर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि वस्तु व सेवा यांची विक्री करणे होय. 2. **सिटी कुरीयण** यांच्या मते, विविधता असलेल्या अर्थ व्यवस्थेचा समुह होय. परस्परातील व्यवहारातुन आणि वैयक्तिक उदिष्टे साध्य करण्याच्या प्रक्रियेतुन कालांतराने एक वैशिष्ट्यपूर्ण अर्थव्यवस्था अस्तित्वात येते. त्यास जागतिकीकरण किंवा जागतिक अर्थव्यवस्था म्हणतात. 3. **श्रमवण कुमारसिंग**, जागतिकीकरणा विषयी म्हणतात, जगातिल सर्वच राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजारपेठेत जगातिल साधन सामग्रीचे आणि भांडवलाचे सहजतेनी परिचलन निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

**पूर्व साहित्याचा आढावा**: जागतिकीकरणाच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी अनेक संशोधकांनी विविध अंगांनी योगदान दिलेले आहेत. देसाई (2019) यांनी ग्रामीण उपजिविकेवर जागतिकीकरणाचे निर्माण केलेल्या संधी व जोखमीचे विश्लेषण केले. पाटिल (2020) यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणामुळे झालेल्या उद्योगवृधींचा सविस्तर अभ्यास केला असून त्यांनी कंत्राटी शेती,निर्यात संधी आणि डिजिटल बाजारपेठेचे फायदे अधोरेखीत केले. युएनडीपी (2020) च्या दक्षिण आशिया अहवालात ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य, महिला विकास आणि मानवि विकास निर्देशांकातीलसुधारणा यांचा जागतिकीकरणाशी सबंध अधोरेखीत केला आहे. जाधव (2017) यांनी ग्रामीण सामाजिक रचनेतील बदल कुटुंब व्यवस्था पिढीजात मूल्ये आणि सांस्कृतिक परिवर्तन यावर प्रकाश टाकला आहे. कुमार (2020) यांनी कृषी बाजार सुधारणा आणि शेतकऱ्यांच्याउत्पन्नातील बदलांचे विश्लेषण करून जागतिकीकरणामुळे बाजारभावातील अस्थिरता वाढल्याचे मत व्यक्त केले आहे. तसेच अन्न व कृषी संघटना (FAO 2020) यांनी जैवविविधता, मातीची गुणवत्ता आणि कृषी उत्पादनाच्या सुरक्षिततेशी संबंधित मुद्यांची चर्चा केली आहे. या सर्व साहित्याच्या आधारे स्पष्ट होते की, जागतिकीकरण ग्रामीण समाजाला एका बाजूला आधुनिकतेच्या दिशेने प्रगती करण्याची प्रेरणा देते. तर दुसरीकडे पारंपारीक जीवनशैली पर्यावरणीय संतुलन सामाजिक समानतेसमोर आव्हाने उभी करते. प्रस्तूत अभ्यास या आधीच्या संशोधनाला पुरक ठरत ग्रामीण समाजातील बदलांचे समग्र चित्र स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाचे उद्देश** - या संशोधनाचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण समाजातील विविध अंगावर जागतिकीकरणाचे परिणाम ओळखणे त्यांचे विश्लेषण करणे आणि ग्रामीण विकास प्रक्रीयेतील संधी व आव्हाने स्पष्ट करणे. अभ्यासाचे उद्देश पुढील प्रमाणे आहे. 1. जागतिकीकरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था,शेती, उद्योग, रोजगार यांच्यात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे. 2. ग्रामीणसमाजातील सांस्कृतिक मूल्ये, परंपरा, वर्तन, कुटुंब रचना आणि जीवनशैली यावर झालेल्या परीणामांचे विश्लेषण करणे. 3. शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि युवकांच्या जीवनमानातील बदलांचे परीक्षण करणे. 4.) जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या सामाजिक आर्थिक विषमता, स्थलांतर, गरीबी आणि पर्यावरणीय समस्यांचा अभ्यास करणे. 5. ग्रामीण विकास धोरणांसाठी शिफारशी सुचवीने.

**संशोधनाची गृहितकृत्ये**: संशोधनाकरीता खालिल गृहितकृत्याची मांडणी केलेली आहे. 1. जागतिकीकरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला याचा शोध घेणे. 2. जागतिकीकरणाचा सांस्कृतिक मूल्ये व कुटुंबरचना यावरील परिणामांचा अभ्यास करणे. 3. शिक्षण, आरोग्य, आणि महिलांच्या जीवनशैलीवर जागतिकीकरणाचा परिणाम झालेला आहे. 4. जागतिकीकरणामुळे समाजात समस्या निर्माण झालेल्या आहेत याचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती**: जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर परिणाम याविषयीचा अभ्यास करण्यासाठी काही संशोधन पद्धतींचा वापर करण्यात आलेला आहेत त्या पुढील प्रमाणे - या अभ्यासात वर्णणात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधनासाठी प्राथमिकव द्वितीयक माहीतीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमीक माहीती ग्रामीण भागातील शेतकरी, ग्रामीण मजूर, महिला बचतगट सदस्य, स्थानिक उद्योजक व सामाजिक कार्यकत्यांशी केलेल्या अनौपचारिकसंवाद व निरीक्षणाच्या आधारे संकलीत करण्यात आली. द्वितीयक माहिती पुस्तके, साहित्य समिक्षा, सरकारी अहवाल, जर्नल्स, संस्थांचे दस्ताऐवज, संशोधन लेख, गावपातळीवरील माहिती, सामाजिक निरीक्षण आणि तज्ज्ञांच्या मुलाखती या स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला. ग्रामीण भागातील सामाजिक आणि सांस्कृतिक स्थिती समजून घेण्यासाठी विषय आधारीत विश्लेषण तसेच तुलनात्मक विश्लेषण वापरले गेले. सांख्यिकीय माहितीचा आधार घेवून शेती, रोजगार, अर्थव्यवस्था आणि स्थलांतरातील प्रवृत्तींचे प्रमाणात्मक विश्लेषणकेले.

**जागतिकीकरणाचा ग्रामीण शेतीवर परिणाम**: जागतिकीकरणामुळे ग्रामीण शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. सुधारीत बियाने, रासायनिक खते, कीटकनाशके, यांत्रिकीकरण व सिंचन प्रकल्पांमुळे उत्पादन क्षमता वाढली आहे. निर्यातक्षम पिकांना चालना मिळाल्याने काही शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे. कृषी बाजार समित्या ईनाम व डिजिटल व्यवहारामुळे बाजारपेठेशी थेट संपर्क निर्माण झाला आहे. मात्र याचबरोबर दुसरीकडे शेतीवरील उत्पादन खर्च वाढला असून शेतकरी कर्जबाजारी होत आहे. पारंपारीक पिकांचे क्षेत्र कमी होउन रोख पीकांवर भर दिला जात आहे. जागतीक बाजारातील किंमत चढउतारांचा थेट परीणाम शेतकऱ्यांवर होत आहे. त्यामुळे शेतीतील अनिश्चितता वाढली आहे. पारंपारीक अन्नपिकांचे क्षेत्र कमी होउन रोख पिकांवर भर दिला जात आहे. यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून लहान व सीमांत शेतकऱ्यांची स्थिती अधिक बिकट होत आहे. कर्जबाजारीपणा, आत्महत्यांचे वाढते प्रमाण हे या प्रक्रियेचे गंभीर पीरणाम आहेत.

**ग्रामीण उद्योगावर परीणाम**: जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात अन्नप्रक्रीया उद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुट पालन, स्वयंम रोजगार व महिला बचत गटांना नविन संधी उपलब्ध होत आहे. सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना बाजारपेठ मिळू लागली आहे. ग्रामीण पर्यटन व सेवा क्षेत्रांचा विस्तार झाला आहे. एकीकडे अन्नप्रक्रिया उद्योग, साखर कारखाने, दुग्धसंघ, कुक्कुटपालन व शेळीपालन व्यवसाय यांचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे.बहुराष्ट्रीय कंपन्या व खसगी उद्योगांनी ग्रामीण भागात गुंतवणूक केल्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. स्वयंमदत गट, महिला बचतगट, सूक्ष्म वित संस्था व सरकारी योजनांमुळे ग्रामीण उद्योजकतेला चालना

मिळाली आहे. ग्रामीण उत्पादनांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे काही प्रमाणात ग्रामीण उत्पन्नात वाढ झाली आहे. जागतिकीकरणामुळे ग्रामीण कुटीर व हस्तकला उद्योगांवर विपरीत परिणाम झाला आहे. स्वस्त आयात माल, यांत्रिक उत्पादन व मोठ्या कंपन्यांच्या स्पर्धेमुळे हातमाग, विणकाम, कुंभारकाम, चामडी उद्योग यांसारखे पारंपारीक व्यवसाय मागे पडले आहेत. स्थानिक कारागीरांचे कौशल्ये व अनुभव दुर्लक्षित झाले असून अनेक कुटीर उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील पारंपारीक रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत.

**ग्रामीण रोजगारावर परीणाम**: पारंपारीक हस्तकला, हातमाग व कुटीरउद्योग स्वस्त आयात मालामुळे अडचणीत आले आहे. ग्रामीण कारागीरांचे कौशल्य दुर्लक्षित झाले असून अनेकांना रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतरण करावे लागत आहे. त्यामुळे ग्रामीण समाजात बेरोजगारी व सुशिक्षितबेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. जागतिकीकरणमुळे ग्रामीण भागात काही नविन रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत. अन्न प्रक्रिया, उद्योग, दुग्ध व्यवसाय, ग्रामीण पर्यटन, सेवाक्षेत्र, बांधकाम क्षेत्र, व स्वयंम रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. मनरेगा योजनेमुळे ग्रामीण भागात तात्पुरता रोजगार उपलब्ध झाला आहे. डिजिटल तंत्रज्ञानामुळे काही प्रमाणात ऑनलाइन सेवा व लघू उद्योग विकसीत होत आहे. परंतु रोजगाराच्या शोधात मोठ्याप्रमाणावर ग्रामीण शहरी स्थलांतरण होत आहे. तरूणवर्ग शहरांकडे वळत असून गावांमध्ये वृद्ध महिला व लहानमुले यांचे प्रमाण वाढत आहे. स्थलांतरामुळे ग्रामीण कुटुंब संस्थेवर ताणपडत असून सामाजिक व मानसीक समस्या वाढत आहेत. रोजगारातील असुरक्षितता ही जागतिकीकरणाची गंभीर समस्या ठरत आहे.

**सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर परीणाम**: जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाजात शिक्षण व आरोग्य सुविधांचा विस्तार झाला आहे. महिलांचे सक्षमीकरण, डिजीटल साक्षरता व माहितीचा प्रसार हे सकारात्मक बदल आहेत. परंतु उपभोगवाद,भौतिकवाद व पाश्चात्त्य संस्कृतिचा प्रभाव वाढल्याने स्थानिक परंपरा व लोक संस्कृतिचा ऱ्हास होत आहे. संयुक्त कुटुंब पद्धती कमजोर होत चालली असून विभक्त कुटुंबाचे प्रमाण वाढले आहे. मात्र दुसरीकडे जागतीकीकरणामुळे उपभोगवाद व भौतिकतावाद ग्रामीण समाजात वाढला आहे. टिव्ही, इंटरनेट, सोशल मिडीया, व जाहीरातीमुळे पाश्चात्त्यसंस्कृतीचा प्रभाव वाढत आहे. स्थानिक परंपरा लोककला, सणउत्सव, बोलीभाषा, सांस्कृतिक मुल्यांचा ऱ्हास होत आहे. याबरोबरच सामाजिक विषमता वाढतांना दिसून येत आहे. आर्थीकदृष्ट्या सक्षम व दुर्बल घटकामधील दरी अधिक स्पष्ट झाली आहे. त्यामुळे ग्रामीण समाजातील सामाजिक सलोखा धोक्यात येत आहे.

**पर्यावरणावर परीणाम**: जागतिकीकरणाचा ग्रामीण पर्यावरणावर झालेला परीणाम हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. वाढती लोकसंख्या, औद्योगीकीकरण, रासायनीक शेती व वाढता उपभोग यामुळे नैसर्गीक संसाधनांवर प्रचंडताण पडत आहे. रासायनीक खतांचा व कीटक नाशकांचा अतिरेक झाल्यामुळे जमीनीची सुपिकता कमी होत आहे.

भूजलाचा अतिउपसा, जलस्त्रोताचे प्रदूषण, जंगलतोड व जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या ग्रामीण भागात तीव्र होत आहे. औद्योगीक प्रकल्प धरणे व खाणकामामुळे अनेक ग्रमीण भागात विस्थापनाच्या समस्या निर्माण झाल्या आहे. हवामान बदलाचा परीणाम शेती उत्पादनावर स्पष्टपणे दिसून येत असून दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाउस यासारख्या संकटांना ग्रामीण समाज समोर जात आहे. म्हणूनच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकासाला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे.

**निष्कर्ष**: जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाजात विकासाच्या संधी निर्माण झाल्या असल्यातरी त्याचे फायदे सर्व घटकांपर्यंत समान रीतीने पोहचलेले नाही. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या शाश्वत विकासासाठी स्थानिक गरजांनूसार धोरणे, पर्यावरण संरक्षण व पारंपारीक उद्योगांना पाठबळ देणे आवश्यक आहे. या अभ्यासातून असे स्पष्ट होते की जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाजात अनेक सकारात्मक बदल घडून आले आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठ, पायाभूत सुविधा, शिक्षण व आरोग्य सेवांचा विस्तार झाला आहे. तथापी याच बरोबर आर्थिक विषमता वाढणे, पारंपारीक उद्योगांचा ऱ्हास, कर्जबाजारीपणा बेरोजगारी, सांस्कृतिकऱ्हास, पर्यावरणीय समस्या यासारख्या गंभीर परीणामांनाही ग्रामीण समाज सामोर जात आहे म्हणूनच जागतिकीकरण ही संपूर्णतः लाभदायक किंवा संपूर्णतः घातक प्रक्रीया नसून योग्य धोरणांच्या आधारे ग्रामीण समाजाच्या विकासासाठी वापरणे आवश्यक आहे. ग्रामीण विकासाचा समतोल साधण्यासाठी स्थानिक गरजा, सामाजिक वास्तव व पर्यावरणीय शाश्वतता यांचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

**शिफारशी**: 1. ग्रामीण भागात सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यात यावे. 2. पारंपारीक कुटीर व हस्तकला उद्योगांना आर्थीक व तांत्रीक सहाय्य द्यावे. 3. ग्रामीण रोजगार निर्मीतीसाठी स्थानिक पातळीवर उद्योग व सेवा क्षेत्र विकसीत करावे. 4. महिला बचत गट व स्वयंम रोजगार उपक्रमांना अधिक पाठबळ द्यावे. 5. पर्यावरण संरक्षण व नैसर्गीक संसाधनांचे संवर्धन यावर भर द्यावा. 6. डिजिटल साक्षरता शिक्षण सुविधा ग्रामीण भागात अधिक व्यापक कराव्यात. 7. जागतिकीकरणाच्या धोरणांची अंमलबजावणी करतांना ग्रामीण समाजाच्या हिताचा प्राधान्याने विचार करावा.

**संदर्भ:**


1. आहुजा, राम. *भारतीय समाजशास्त्र*. रावत पब्लिकेशन, 2010.
2. गिडेन्स, अँथनी. *जागतिकीकरण: संकल्प व परिणाम*. पॉलिटी प्रेस, 2006.
3. घुर्ये, जी. एस. *ग्रामीण समाजशास्त्र*. पॉप्युलर प्रकाशन, 2004.
4. देशमुख, आर. बी. *ग्रामीण विकास व परिवर्तन*. विद्या प्रकाशन, 2015.
5. देसाई, ए. आर. *आधुनिक भारतातील सामाजिक बदल*. ओरियंट ब्लॅक्स्वान, 2012.
6. भारत सरकार. *ग्रामीण विकास अहवाल*. ग्रामीण विकास मंत्रालय, 2018.
7. मिश्रा, एस. के., आणि व्ही. के. पुरी. *भारतीय अर्थव्यवस्था*. हिमालय पब्लिशिंग हाउस, 2016.
8. भांगे, का., आणि चांगदेव मुंडे. *विकासाचे समाजशास्त्र*. चिन्मय प्रकाशन, 2016.

# जागतिकीकरण आणि महाराष्ट्रातील महिला धोरणे: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**सोनाली भाऊसाहेब अडसूळ** संशोधक विद्यार्थिनी, समाजशास्त्र विभाग,न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर (स्वायत्त)

**सारांश:** जागतिकीकरण ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून ती सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि लैंगिक संरचनांवर खोलवर परिणाम करणारी व्यापक सामाजिक प्रक्रिया आहे. या संशोधन लेखाचा उद्देश जागतिकीकरणाचा महाराष्ट्रातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनावर झालेला प्रभाव आणि त्या अनुषंगाने राबविण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य महिला धोरणांचा (१९९४ व १९९८) समग्र आढावा घेणे हा आहे. जागतिकीकरणामुळे महिलांना शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, उद्योजकता आणि राजकीय सहभागाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. तथापि, अस्थिर रोजगार, कमी वेतन, सामाजिक सुरक्षा अभाव, काम—जीवन समतोलाचा अभाव, सांस्कृतिक दबाव आणि मानसिक ताणतणाव यांसारखी आव्हानेही वाढलेली दिसून येतात. नॅन्सी फ्रेझर, ब्लमबर्ग रे लेसर, अँग्रेस फ्लाविया, बॅनर्जी निर्मला आणि एनलो सिथिया यांच्या समाजशास्त्रीय विचारांच्या आधारे या लेखात जागतिकीकरणाचे महिलांवरील असमान व द्वंद्वात्मक परिणाम विश्लेषित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य महिला धोरणे ही जागतिकीकरणाच्या प्रभावांना सामोरे जाण्यासाठी स्थानिक पातळीवर राबविण्यात आलेली महत्त्वपूर्ण धोरणात्मक प्रतिक्रिया असून, स्वयं-सहायता गट, महिला उद्योजकता, शिक्षण, आरोग्य, सामाजिक जागरूकता आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण यांच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरणाचा प्रयत्न करण्यात आला आहे. अभ्यासातून असे स्पष्ट होते की, केवळ धोरणात्मक हस्तक्षेप पुरेसा नसून सामाजिक मानसिकतेतील बदल, प्रभावी अंमलबजावणी आणि महिलांचा निर्णयक्षम सहभाग वाढवणे ही स्त्री सक्षमीकरणासाठी अनिवार्य अट आहे.

**कीवर्ड्स:** जागतिकीकरण, महिला धोरणे, स्त्री सक्षमीकरण, महाराष्ट्र, समाजशास्त्

**प्रस्तावना:** मानवी समाजाचा इतिहास सतत सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतून घडत आलेला आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण तसेच विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे विसाव्या शतकात जागतिकीकरणाची प्रक्रिया वेगाने विस्तारली. अँथनी गिडन्स (1994) यांच्या मते, जागतिकीकरण म्हणजे केवळ आर्थिक एकीकरण नव्हे, तर सामाजिक संबंध, सांस्कृतिक मूल्ये आणि सत्तासंरचना यांचा जागतिक स्तरावर झालेला विस्तार होय. जागतिकीकरणाचा प्रभाव समाजातील विविध घटकांवर असमान पद्धतीने झालेला दिसून येतो. विशेषतः महिलांच्या जीवनावर या प्रक्रियेचे परिणाम अधिक गुंतागुंतीचे आणि द्वंद्वात्मक स्वरूपाचे आहेत. एकीकडे जागतिकीकरणामुळे महिलांना शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, डिजिटल तंत्रज्ञान आणि सार्वजनिक क्षेत्रातील सहभागाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत; तर दुसरीकडे पारंपरिक लैंगिक भूमिका, पितृसत्ताक सामाजिक रचना, असमान सत्ता-संबंध, अस्थिर रोजगार आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव हे अडथळे अद्यापही कायम आहेत. या बदलत्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीवर राज्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे निर्माण होणाऱ्या संधींचा लाभ महिलांपर्यंत पोहोचवणे आणि त्याचबरोबर निर्माण होणाऱ्या असमानता व असुरक्षिततेला सामोरे जाण्यासाठी महाराष्ट्र राज्याने महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने विविध धोरणात्मक उपाययोजना राबविल्या आहेत. महाराष्ट्र राज्य महिला धोरणे (1994 व 1998) ही या संदर्भातील महत्त्वाची पावले असून, ती स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणासाठी संस्थात्मक चौकट प्रदान करण्याचा प्रयत्न करतात. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन लेखात जागतिकीकरणाचा महिलांच्या जीवनावर झालेला प्रभाव आणि महाराष्ट्र राज्याच्या महिला धोरणांची भूमिका यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे: १.** जागतिकीकरणाचा महाराष्ट्रातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर झालेला प्रभाव अभ्यासणे. **२.** महाराष्ट्र राज्य महिला धोरणे (१९९४ व १९९८) यांचे स्वरूप व उद्दिष्टे समजून घेणे. **३.** महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात धोरणांची परिणामकारकता तपासणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक (Descriptive and Analytical) स्वरूपाचे असून, यासाठी मुख्यतः द्वितीयक माहिती स्रोतांचा (Secondary Data Sources) वापर करण्यात आला आहे. संशोधनाच्या उद्दिष्टांनुसार प्राथमिक माहिती संकलनाऐवजी उपलब्ध साहित्याचा सखोल अभ्यास करून निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या अभ्यासासाठी विविध प्रकारच्या द्वितीयक स्रोतांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये समाजशास्त्र, स्त्री-अभ्यास (Women Studies), विकास अध्ययन आणि जागतिकीकरणाशी संबंधित पुस्तके, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नलमधील लेख, सरकारी अहवाल, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे दस्तऐवज, तसेच केंद्र व राज्य सरकारच्या महिला धोरणांशी संबंधित अधिकृत कागदपत्रे यांचा प्रामुख्याने उपयोग करण्यात आला आहे. याशिवाय अँथनी गिडन्स, नॅन्सी फ्रेझर, ब्लमबर्ग रे लेसर, बॅनर्जी निर्मला यांसारख्या समाजशास्त्रीय व स्त्रीवादी विचारवंतांचे लेखन सैद्धांतिक चौकट (Theoretical Framework) म्हणून वापरण्यात आले आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करताना समाजशास्त्रीय विश्लेषण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. जागतिकीकरणाचा महिलांच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनावर होणारा प्रभाव आणि महाराष्ट्र राज्य महिला धोरणांची भूमिका यांचा तुलनात्मक व समीक्षात्मक अभ्यास करण्यात आला आहे. धोरणात्मक दस्तऐवजांचे विश्लेषण करताना त्यांची उद्दिष्टे, अंमलबजावणीची प्रक्रिया आणि प्रत्यक्ष परिणाम यांचा अभ्यास करण्यात आला आहे. संकलित माहितीची विश्वासार्हता राखण्यासाठी प्रामुख्याने अधिकृत, प्रमाणित व संदर्भयोग्य स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. विविध स्रोतांमधून प्राप्त झालेल्या

माहितीची परस्पर तुलना करून निष्कर्ष अधिक वस्तुनिष्ठ व संतुलित ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अशा प्रकारे द्वितीयक माहितीच्या आधारे जागतिकीकरण व महिला धोरणांच्या संदर्भातील समाजशास्त्रीय वास्तव समजून घेऊन स्त्री सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न या संशोधनात करण्यात आला आहे.

**जागतिकीकरणाचे महिलांवरील सामाजिक-आर्थिक परिणाम:** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जगभरातील श्रमबाजार, उत्पादन पद्धती आणि सामाजिक संरचना यामध्ये मूलभूत बदल घडवून आणले आहेत. या प्रक्रियेचा महिलांवर झालेला परिणाम द्वंद्वात्मक स्वरूपाचा असून, संधी आणि आव्हाने दोन्ही एकाच वेळी निर्माण झालेली दिसून येतात. एकीकडे महिलांचा श्रमबाजारातील सहभाग लक्षणीयरीत्या वाढलेला असला, तरी दुसरीकडे त्या सहभागाचे स्वरूप बहुतेक वेळा असंघटित, अस्थिर आणि कमी वेतनाचे राहिले आहे.

ब्लमबर्ग रे लेसर (1989) यांच्या मते, जागतिकीकरणाच्या काळात महिलांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असल्या तरी त्या प्रामुख्याने असंघटित क्षेत्रात केंद्रित झालेल्या आहेत. निर्यातप्रधान उद्योग, वस्त्रोद्योग, इलेक्ट्रॉनिक असेंब्ली, सेवा क्षेत्र, घरगुती कामे आणि कंत्राटी स्वरूपाचा रोजगार यामध्ये महिलांचे प्रमाण वाढले आहे. तथापि, या क्षेत्रांमध्ये रोजगाराची स्थिरता नसणे, कमी वेतन, दीर्घ कामाचे तास, कामगार हक्कांचा अभाव आणि सामाजिक सुरक्षेची कमतरता ही प्रमुख वैशिष्ट्ये आढळून येतात. परिणामी महिलांचे आर्थिक स्वावलंबन मर्यादित स्वरूपाचे राहते.

नॅन्सी फ्रेझर (1989) यांच्या मते, जागतिकीकरणामुळे कल्याणकारी राज्य (Welfare State) संकल्पना कमकुवत होत असून सामाजिक सुरक्षा जाळे संकुचित झाले आहे. याचा सर्वाधिक विपरीत परिणाम महिलांवर होतो, कारण पारंपरिक समाजरचनेत कुटुंब, संगोपन, वृद्धांची काळजी आणि घरगुती जबाबदाऱ्या यांचा भार प्रामुख्याने महिलांवर असतो. सार्वजनिक सेवांचे खाजगीकरण, खर्चकपात आणि सामाजिक सुरक्षा योजनांतील मर्यादा यांमुळे महिलांची दुहेरी जबाबदारी (Double Burden) अधिक तीव्र झालेली दिसून येते. आर्थिक क्षेत्रासोबतच जागतिकीकरणाचे सामाजिक परिणामही महिलांच्या जीवनावर खोलवर प्रभाव टाकतात. शहरीकरण, स्थलांतर आणि बाजाराभिमुख संस्कृतीमुळे महिलांच्या पारंपरिक सामाजिक भूमिकांमध्ये बदल होत असला, तरी पितृसत्ताक मूल्यव्यवस्था पूर्णतः बदललेली नाही. त्यामुळे महिलांना एकाच वेळी आधुनिकता आणि परंपरा यांमधील ताणतणावाचा सामना करावा लागतो. शिक्षण व तंत्रज्ञानामुळे महिलांची जाणीव, आकांक्षा आणि आत्मभान वाढले असले, तरी कौटुंबिक नियंत्रण, लैंगिक भेदभाव आणि निर्णय प्रक्रियेत मर्यादित सहभाग ही वास्तवस्थिती कायम आहे. तसेच जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या उपभोगप्रधान संस्कृतीचा परिणाम महिलांच्या शरीरप्रतिमेवर, मानसिक आरोग्यावर आणि सामाजिक ओळखीवरही होतो. माध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या सौंदर्याच्या व यशाच्या कल्पना महिलांवर सामाजिक दबाव निर्माण करतात. यामुळे ताणतणाव, असुरक्षितता आणि मानसिक समस्यांचे प्रमाण वाढताना दिसून येते. एकूणच जागतिकीकरणामुळे महिलांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत काही प्रमाणात सुधारणा झालेली असली, तरी ही सुधारणा असमान आणि अपुरी आहे. संरचनात्मक असमानता, सामाजिक सुरक्षा अभाव आणि पितृसत्ताक सत्तासंबंध यांच्या पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाचे लाभ सर्व महिलांपर्यंत समानपणे पोहोचलेले नाहीत. त्यामुळे महिलांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणासाठी केवळ बाजाराधिष्ठित प्रक्रिया पुरेशी नसून, प्रभावी राज्य हस्तक्षेप, संवेदनशील धोरणे आणि सामाजिक परिवर्तनाची आवश्यकता अधोरेखित होते.

**महाराष्ट्र राज्य महिला धोरणे: एक आढावा:** महाराष्ट्र राज्याने स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने देशपातळीवर अग्रगण्य भूमिका बजावलेली असून, या अनुषंगाने राबविण्यात आलेली महाराष्ट्र राज्य महिला धोरणे (1994 व 1998) ही महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणासाठी महत्त्वाची धोरणात्मक पावले ठरली आहेत. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर महिलांसमोर निर्माण झालेल्या नव्या संधी व आव्हानांना प्रतिसाद देण्याच्या उद्देशाने ही धोरणे तयार करण्यात आली आहेत. महाराष्ट्र राज्य महिला धोरण 1994 हे राज्यातील महिलांसाठी स्वतंत्र व सर्वसमावेशक धोरण म्हणून उदयास आले. या धोरणाचा मुख्य उद्देश महिलांना शिक्षण, आरोग्य, रोजगार, कायदेशीर संरक्षण आणि सामाजिक सुरक्षितता उपलब्ध करून देणे हा होता. महिलांच्या साक्षरतेत वाढ, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन, माता-बाल आरोग्य सुधारणा, पोषण कार्यक्रम तसेच स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध यांसारख्या मुद्द्यांवर या धोरणात विशेष भर देण्यात आला. तसेच महिलांविरोधातील हिंसा, छळ व अन्याय यांना आळा घालण्यासाठी कायदेशीर उपाययोजनांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. यानंतर लागू करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य महिला धोरण 1998 मध्ये स्त्री सक्षमीकरणाची संकल्पना अधिक व्यापक आणि कृतीप्रधान स्वरूपात मांडण्यात आली. या धोरणात महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. स्वयंरोजगार, स्वयं-सहायता गट (Self-Help Groups), बचत गट, सूक्ष्म वित्तपुरवठा, कौशल्य विकास आणि उद्योजकता विकास यांद्वारे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ग्रामीण व शहरी भागातील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध विकास योजनांचा समन्वय साधण्यावर भर देण्यात आला. दोन्ही धोरणांमध्ये महिलांच्या राजकीय सहभागालाही महत्त्व देण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांसाठी आरक्षण, निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवणे आणि नेतृत्व विकास कार्यक्रम राबविणे ही धोरणांची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. यामुळे महिलांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढला असला, तरी प्रत्यक्ष सत्तावाटप आणि निर्णयक्षम अधिकारांच्या बाबतीत अजूनही मर्यादा दिसून येतात. तथापि, या धोरणांची अंमलबजावणी करताना अनेक अडथळे समोर आले आहेत. अंमलबजावणीतील प्रशासकीय मर्यादा, अपुरी आर्थिक तरतूद, योजनांची माहिती महिलांपर्यंत न पोहोचणे, तसेच ग्रामीण व मागास भागातील महिलांचा मर्यादित सहभाग ही प्रमुख आव्हाने आहेत. यासोबतच पितृसत्ताक सामाजिक मानसिकता, पारंपरिक रूढी-परंपरा आणि लैंगिक असमानता यांमुळे धोरणांचे अपेक्षित परिणाम पूर्णतः साध्य झालेले नाहीत. एकूणच, महाराष्ट्र राज्य महिला धोरणे ही स्त्री सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले असली, तरी केवळ धोरणात्मक घोषणांपुरते मर्यादित न राहता त्यांची

प्रभावी, समन्वयित व संवेदनशील अंमलबजावणी आवश्यक आहे. सामाजिक दृष्टिकोनातील बदल, महिलांची जागरूकता, आणि स्थानिक पातळीवरील सक्रिय सहभाग यांच्या माध्यमातूनच या धोरणांचे खरे उद्दिष्ट साध्य होऊ शकते.

**निष्कर्ष:** प्रस्तुत अभ्यासातून असे स्पष्ट होते की जागतिकीकरण ही प्रक्रिया महिलांच्या जीवनावर एकसंध किंवा एकसमान परिणाम करणारी नसून ती संधी व आव्हाने यांचे द्वंद्वात्मक वास्तव निर्माण करणारी आहे. जागतिकीकरणामुळे महिलांना शिक्षण, रोजगार, तंत्रज्ञान, स्वयंरोजगार आणि सार्वजनिक क्षेत्रातील सहभागाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या असल्या, तरी या संधी सर्व महिलांपर्यंत समानपणे पोहोचलेल्या नाहीत. विशेषतः ग्रामीण, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील महिलांसाठी अस्थिर रोजगार, कमी वेतन, सामाजिक सुरक्षा अभाव आणि दुहेरी जबाबदारी यांसारख्या समस्या अधिक तीव्र झालेल्या दिसून येतात. अभ्यासात असेही आढळून येते की महाराष्ट्र राज्याने स्त्री सक्षमीकरणाच्या दिशेने राबविलेली महिला धोरणे (1994 व 1998) ही राज्यस्तरावर महत्त्वपूर्ण व प्रगत पावले आहेत. या धोरणांद्वारे महिलांच्या शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन, स्वयं-सहायता गट, कायदेशीर संरक्षण आणि राजकीय सहभाग यांसारख्या क्षेत्रांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तथापि, या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी अद्यापही अनेक मर्यादांना सामोरी जात आहे. प्रशासकीय अडथळे, अपुरी संसाधने, योजनांची मर्यादित माहिती, तसेच पितृसत्ताक सामाजिक मानसिकता यांमुळे धोरणांचे अपेक्षित लाभ सर्व स्तरांवरील महिलांपर्यंत पोहोचताना अडथळे निर्माण होतात. महिलांच्या सक्षमीकरणासाठी केवळ धोरणात्मक हस्तक्षेप पुरेसा नसून सामाजिक दृष्टिकोनातील मूलभूत बदल आवश्यक असल्याचे या अभ्यासातून अधोरेखित होते. महिलांना निर्णय प्रक्रियेत सक्रिय व अर्थपूर्ण सहभाग मिळणे, त्यांचे नेतृत्व कौशल्य विकसित होणे आणि कुटुंब तसेच समाजपातळीवर समानतेची मूल्यव्यवस्था रुजणे ही स्त्री सक्षमीकरणाची मूलभूत अट आहे. तसेच जागतिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक व सामाजिक असुरक्षिततेला सामोरे जाण्यासाठी राज्याची भूमिका अधिक संवेदनशील, समावेशक आणि उत्तरदायी असणे आवश्यक आहे. एकूणच, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्त्री सक्षमीकरण साध्य करण्यासाठी धोरणात्मक सुधारणा, सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक बदल हे परस्परपूरक घटक म्हणून एकत्रितपणे कार्यरत असणे गरजेचे आहे. बाजाराधिष्ठित विकास प्रक्रियेला सामाजिक न्याय आणि लैंगिक समानतेची जोड दिल्याशिवाय महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण साध्य होऊ शकणार नाही. त्यामुळे भविष्यातील विकास धोरणे आखताना स्त्री-अनुभव, लैंगिक संवेदनशीलता आणि सामाजिक समावेशन या घटकांना केंद्रस्थानी ठेवणे अत्यावश्यक ठरते.

**संदर्भ:**


1. Banerjee, Nirmala. “Dreams of Modernity: Women and the Nehruvian Era.” *Economic and Political Weekly*, vol. 33, no. 17, 1998.
2. Blumberg, Rae Lesser. “Towards a Feminist Theory of Development.” *Feminism and Sociological Theory*, edited by W. Wallace, Sage, 1989.
3. Buch, Nirmala. “State Welfare Policy and Women, 1950—1975.” *Economic and Political Weekly*, vol. 29, no. 48, 1994.
4. Enloe, Cynthia. *Bananas, Beaches and Bases: Making Feminist Sense of International Politics*. University of California Press, 1989.
5. Fall, Y., editor. *Gender, Globalization and Resistance*. Aword Press, 1999.
6. Flavia, Agnes. “A Stream of Mirages.” *Indian Express*, 1994.
7. Fraser, Nancy. “Women, Welfare, and the Politics of Need Interpretation.” *Politics and Social Theory*, edited by L. Lassman, Routledge, 1989.
8. Gothoskar, Sujata, et al. “Maharashtra’s Policy for Women.” *Economic and Political Weekly*, vol. 29, no. 48, 1994.
9. Guru, Gopal. “Co-opting the Movement.” *Economic and Political Weekly*, vol. 29, no. 32, 1994.
10. Haider, Sameena. “National Policy for Women in India 1996: A Critique.” *Social Scientist*, vol. 25, no. 5/6, 1997, pp. 3—14.
11. Mahadevan, J. “The Indian State and Patriarchy.” *State and Nation in the Context of Social Change*, edited by S. Satyamurti, Oxford University Press, 1994.
12. Mehanta, A. “The Indian State and Patriarchy.” *State and Nation in the Context of Social Change*, edited by S. Satyamurti, Oxford University Press, 1994.
13. Maharashtra Government. *Draft Women Policy*. Government of Maharashtra, 1994.
14. *Draft Women Policy*. Government of Maharashtra, 1998.

# जागतिकीकरण आणि शेती उद्योग

**प्रा. डॉ. विलास भगवानराव भिल्लारे**, सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमूख, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड

**गोषवारा:** भारतीय अर्थव्यवस्था प्रमुख्याने शेती क्षेत्रावर अवलंबून असल्याने म्हणून कृषीप्रधान अर्थव्यवस्था ही ओळख निर्माण झाली.भारतातील जवळपास पन्नास टक्के पेक्षा अधिक लोक शेती व्यवसाय करतात. शेती आणि शेती संलग्नित व्यवसाय त्यांचा उपजिविकेचे मुख्य स्त्रोत आहेत. भारताने उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण हे धोरण स्वीकारल्याने शेती उद्योगात महत्वपूर्ण बदल घडून आले. पूर्वी शेती ही पांरपरिक उपजीविकेपुरती मर्यादीत होती, पंरतु आज मात्र व्यावसायिक, बाजाराभिमुख, उद्योगासंबधी बनली. जागतिकीकरणाचे परिणाम सामाजिक जीवनाच्या सर्व घटकांवर पडला. भारतीय समाजव्यवस्थेत जागतिकीकरणाचे जाळे अनेक व्यापक स्वरूपात पसरले. आज जागतिकीकरणाचे युग असल्यामुळे माहिती तंत्रज्ञान, भांडवल, बाजारपेठा आणि सेवा यांचा मुक्तपणे व्यवहारीक सहसंबध वाढल्याने यांचा समाजव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्रावर परिणाम पडलेला दिसून येतो. शेती उद्योगावर जागतिकीकरणाचा परिणाम पडलेला असून जागतिकीकरणामुळे ग्रामीण आणि शहरी सामाजिक रचनेत बदल होत आहे.

***कोडशब्द:*** *जागतिकीकरण, शेती उद्योग, शेती पुरक व्यवसाय, माहिती तंत्रज्ञान, व्यवसाय, व्यापार, सामाजिक बदल आणि परिर्वतन*

**प्रस्तावना:** भारत हा कृषी प्रधान देश असून भारतातील बहुसंख्य लोक शेती व्यवसाय करतात. त्याच प्रमाणे शेती संलग्नित व्यवसाय करतात. पूर्वीपासूनच शेती व शेती आधारित उद्योग हेच भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रमुख घटक राहिलेले दिसून येतात. म्हणून भारतातील कृषी अर्थव्यावस्था ही शेतीसंबधित असल्यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम या स्वरूपात शेती उद्योगावर पडत आला. एंदरीत शेतीला भारतीय अर्थव्यवस्थाचा कणा म्हटले जाते. कारण की, भारतातील बहुसंख्य लोक शेती व्यवसाय करतात. भारतात शेती करणाऱ्याचे प्रमाण अधिक आहे. भारतातील जवळपास आज 60 ते 70 टक्के लोक शेती व्यवसाय करतात. शेती आणि शेती संलग्नित व्यवसाय त्यांचा उपजिविकेचे मुख्य स्त्रोत असल्याने शेतीवरच भारतातील अर्थव्यवस्था अवंलूबन आहेत. जागतिकरण आणि शेती यांचा विचार केला तर असे लक्षात येते की, भारतातील अर्थव्यवस्था ही शेती आणि शेतीच्या संलग्नित अनेक व्यवसाय यावर आधारिलेली आहे. भारताने 1991 मध्ये आर्थिक उदारीकरणाची धोरणे स्वीकारल्यानंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियामुळे भारतातील समाजव्यवस्थेत बदल घडून आले. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणांचा पाया रचला. यामुळे भारतातील अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. यालाच एल.पी.जि.या धोरणामुळे भारत इतर देशांच्या बरोबरीने विकासाच्या आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. या जागतिकीकरणाच्या प्रवाहात भारतातील समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था जागतिक क्षेत्राबरोबर जोडली गेली. यामुळे भारतात सामाजिक विषमता, सांस्कृतिक संक्रमण, विदेशी गुतवणूक, आयडी क्षेत्रामध्ये विस्तार, नवीन रोजगाराच्या संधी यामध्ये वाढ झाली. जागतिकीकरणामुळे आणि शेती उद्योगासंबधी चर्चा केली आहे.

**संशोधन साहित्याचा आढावा:** साहित्य पुर्नरवलोकन हा एक आढावा लेख असून या अर्थाने साहित्याचा अभ्यासाचे अलोकन करून साहित्याचा थोडयात आढावा पुढील प्रमाणे- फरताडे एस. बी यांनी जागतिकीकरण आणि भारत यांच्या संबधी अभ्यास केला असून जागतिकीकरण आणि भारतातील जागतिकीकरणामुळे झालेल्या विकासावर चर्चा केली. जागतिकीकरणाचे भारताला होणारे फायदे आणि जागतिकीकरणाचा परिणामावर लक्षकेंद्रित केले. तर रक्षित मदन बागडे यांनी जागतिकीकरण आणि भारतीय दारिद्रय या लेखात उद्योग क्षेत्रातील रोजगारी, सेवा क्षेत्रातील रोजगारी, शेती क्षेत्रातील रोजगारी आणि भारतातील दारिद्रय या घटकावर लक्षकेंद्रित केले. त्यासाठी त्यानी विविध आकडेवारी यांचा साहारा घेवून जागतिकीकरण आणि भारतीय दारिद्रय यांचा सहसंबधाविषयी चर्चा केलेली दिसून येते. श्रीनिवास पिलगुलवार यांनी जागतिकीकरणाचा भारतीय शेती व्यवसायावर परिणाम यासंबधी अभ्यास केला असून मार्क्सवादी दृष्टिकोणातून जागतिकीकरणाचा संकल्पना विषयी चर्चा केली त्याच बरोबर जागतिकीकरणाचा भारतीय शेती व्यवसायावर झालेल्या परिणाम यावर सविस्तर चर्चा केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-** १. जागतिकीकरण ही संकल्पना अभ्यासणे २. जागतिकीकरण आणि शेती उद्योग यासंबधी चर्चा करणे.

**संशोधनाची गृहितके:-** १. जागतिकीकरणामुळे शेती उद्योग क्षेत्रात विकास आणि परिर्वतन झाले. २. जागतिकीकरणामुळे भारतीय समाजव्यवस्थेवर परिणाम झाला.

**संशोधन पद्धती** :हा संशोधन निबंध गुणात्मक आणि परिणामात्मक दोन्ही पद्धतीवर आधारित आहे संशोधनात्मक निबंध लिहिताना मुख्यत्वे दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आलेला आहे, या सोबतच शासकीय अहवाल, वर्तमानपत्रातील लेख, मासिकातील लेख, इंटरनेटवरील स्त्रोताचा वापर करून विश्लेषणात्मक पद्धतीने या शोध लेखामध्ये आढावा घेण्यात आलेला आहे.

**जागतिकीकरण आणि शेती उद्योग यासंबधी विवेचन:** समाजशास्त्रीय दृष्टिने जागतिकीकरण संबधी अँथनी गिडन्स यांच्या मते, जागतिकीकरण म्हणजे जागतिक सामाजिक संबंधांची तीव्रता होय, ज्यामुळे दूरवरच्या ठिकाणांना अशा प्रकारे जोडले जाते की स्थानिक घटनांवर दूरवर घडणाऱ्या घटनांचा परिणाम होतो आणि याउलट. तर डेव्हिड हेल्ड यांच्या मते, जागतिकीकरण म्हणजे सामाजिक संबंध आणि व्यवहारांच्या स्थानिक संरचनेत बदल घडवून आाणणारी प्रक्रिया आहे. ज्यामुळे आंतर-खंडीय प्रवाह आणि नेटवर्क तयार होतात. जागतिकीकरण म्हणजे जगभरातील विविध देशांची अर्थव्यवस्था, संस्कृती, समाज आणि राजकारण

यांच्यातील वाढत असणारी परस्पर अवलंबित्व आणि एकात्मता म्हणता येईल. तंत्रज्ञान, व्यापार, भांडवल आणि विचाराची देवाण-घेवाण यामुळे विविध देश जागतिक स्तरावर ऐकमेकांशी जोडले गेले. यांचा परिणाम विविध देशातील समाजव्यवस्थेवर पडला. त्यामुळे सामाजिक संरचनेत बदल व परिवर्तन होत गेले. गावापासून ते जागतिक पातळीवर तसेच त्या- त्या राष्ट्रातील संरचना बदलत आहे. कारण आर्थिक विकासाबरोबर सामाजिक आणि संस्कृतिक संरचनेत सुध्दा जागतिकीकरणाचा प्रभाव पडला. जागतिकीकरण केवळ आर्थिक आणि विकास प्रकिया संबधी मर्यादीत नसून जागतिकीकरण ही प्रकिया व्यापक स्वरूपाची आहेत. जागतिकीकरणामुळे वस्तू, सेवा, माहिती आणि तंत्रज्ञान यांचा प्रसार व प्रचार होत असल्याने आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक संबध जोडले जाते. जागतिकीकरण ही एक मुक्त अर्थव्यवस्थेंचा भाग असल्याने अनेक राष्ट्रानी यांचा स्वीकार केला. यामुळे आयात आणि निर्यात, व्यापार, शेती उद्योग, छोटे - मोठे उद्योग करण्यासाठी संधी आणि भांडवल मिळू लागले. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्पर एकमेंकांबरोबर व्यापार, व्यवसाय, उद्योग उभारणी केली जात आहे. यांचा परिणाम राष्ट्रा- राष्ट्रांमध्ये व्यवाहारीक हितसंबध जापसण्यास मदत होत आहे. विकसित आणि अविकसित राष्ट्रांमध्ये प्रामुख्याने विविध क्षेत्रामध्ये व्यापारी करार, उद्योग, आयात- निर्यात धोरण आखले जात आहे.

**जागतिकीकरण आणि शेती उद्योग:** भारताला आज जागतिकाकरणाचा स्वीकार करून जवळपास 35 वर्षे झालेली आहे. जागतिकीकरणामुळे शेती उद्योग, व्यापार, व्यवसाय अशा अनेक क्षेत्रात मोठयाप्रमाणात विकास झाला. जागतिकीकरणामुळे शेती उद्योगांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली. तंत्रज्ञानाचा प्रसार व प्रचार झाला तसेच परदेशी गुंतवणूक वाढली. नव-नवीन शेती उद्योगांच्या संधी निर्माण झाल्या. यामुळे शेती उद्योग उभे करण्यास व त्यांचे विस्तार करण्यास मदत झाली. त्यामुळे शेतीला पूरक उद्योगांमध्ये एक प्रकारे स्पर्धा निर्माण झाली. शेती पुरक उत्पादनातील वाढ, खर्च, साहित्य, तंत्रज्ञान, सेवा आणि मागणी वाढत असल्याने अर्थव्यवस्थेत उद्योगांना चालना मिळाली. शेतीव्यवस्थेत सुधारणा व उत्पदानातील वाढ करण्याच्या विविध सोई - सुविधा व संधी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना कोणत्या प्रकारचे बि- बियाणे वापरावे, उत्पादन कशा पध्दतीने करावे व वाढवावे, कोणते पिक घ्यावे, कोणता व्यवसाय व उद्योग करावा यासंबधी शेतकऱ्यांना स्वतंत्र मिळाले. शेतकरी शेतीशी पूरक उद्योग करू लागल्याने अधिक उत्पादन होईल अशा पध्दतीचे पिके व शेती उद्योग करू लागली. शेती पूरक असलेले कुक्कूटपालन, शेळी पालन, दुग्ध व्यवसाय, मशरूम शेती, रेशिम शेती, मधमाशी पालन, मत्स्य पालन, या यासारखे उद्योग करू लागले.

जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न विकण्यासाठी बाजारपेठा निर्माण केल्या गेल्या. शेतीतील उत्पन्नचे विक्रीसाठी अनेक ठिकाणी छोटया- मोठया बाजारपेठ निर्माण झाल्या. अन्न प्रक्रिया उद्योगाच्या सतत वाढीमुळे शेतकरी नगदी पिंकाना प्रोत्साहन देवू लागले. कारण अन्न प्रक्रियेत वापरण्यात येणाऱ्या पिके शेत उत्पदानाला चांगला भाव मिळते. त्यामुळे शेती उद्योगाला पूरक वातावरण निर्माण झाले. कारण ज्युस, जॅम, दही, जिपस, लोनच, पापड, शेवाया इत्यादी पॅक बंद अन्न असणारे खादयपदार्थ तयार करू लागले. यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील लोकांना रोजगार मिळू लागला. शेती उद्योगावर जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे शेती उत्पन्नात वाढ झाली आणि शेती पुरक व्यवसाय पुढे येवू लागले. वेगवेगळे तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येवू लागल्यामुळे बाजारपेठामध्ये कृषी उत्पादनाला थेट मागणी येऊ लागली. फळ, भाज्या, फुलांची मोठ्या प्रमाणात शेतकरीशेती करू लागले. ज्यामुळे कृषी उत्पादनामध्ये भरघोस वाढ झाली आहे. अन्नधान्यांचे उत्पादन हंगामी स्वरूपाचे असून हंगामात होत असल्यामुळे अधिक उत्पादनामुळे मालाचे भाव कोसळतात. मात्र कोल्ड स्टोअरींग, पॅकींग या सारख्या सुविधामुळे शेतकऱ्यांना नुसकान टाळता येवू लागले. दळणवळणाच्या साधनांमध्ये वाढ झाली. शेतीला उपयुक्त असणारे आत्याधुनिक तंत्रज्ञान सहज उपल्बध झाले. शेतकरी आज आधुनिक पध्दतीने शेती करू लागले. कारण शेतीसाठी लागणारे साहित्ये, अवचारे, साधने हे अत्याआधूनिक स्वरूपाची बाजारांमध्ये आली. शेतीसाठी ट्रॅक्टर, रोटावेटर, सीड ड्रिल, इत्यादी. अनेक व आधूनिक यंत्र व साधने मिळू लागली. त्यामुळे पांरपारीक शेती कसण्याच्या पध्दतींमध्ये आलुग्राम बदल झाला व शेती करणे सोईस्कर झाले. कारण की शेतकऱ्यांना शेतीमध्ये काम व कष्ट अधिक करून ही पाहिजे त्या प्रमाणे शेतातील उत्पन्न मिळत नव्हते. परतु जागतिकीकरणामुळे बाजार पेठामध्ये नव-नवीन बि-बियाणे, रासायिनीक खेत, औषधी, यंत्र, साहित्य यांचा वापर करणाऱ्याचे प्रमाण वाढ आहे. यामुळे कमी कष्ट आणि अधिक उत्पन्न होवू लागली. शेती उत्पदानाला चांगल्या प्रकारे किंमत मिळू लागली.जागतिकीकरणाचा अंतर्भाव झाल्याने समाजव्यवस्थेत अनेक क्षेत्रात परिर्वतन झाले. विज्ञान व तंत्रज्ञान, दळणवळण, व्यापार, व्यवसाय, उद्योग आणि विशेषत:शेती उद्योगावर विशेष प्रभाव पडला. जैवतंज्ञान, जीवशास्त्र आणि वनस्पती यामध्ये नवनवीन शोध व संशोधनामुळे मोठया प्रमाणात अन्न धान्य, बीज, पाल्या-भाज्या आणि फळ, झाडे या विविध वांणाचे बीज निर्माण करण्यात आली. प्राणी, पक्षी यामध्ये ही नवनवीन जाती विकसित झाल्या. जागतिकीकरणामुळे विविध क्षेत्रामध्ये झपाडयाने आणि वेगाने नवनवीन शोध आणि तंत्रज्ञान यामुळे शेती उद्योगात अधिक प्रगती व विकस झाला. यांचा परिणाम कृषी क्षेत्रातील उत्पादन आणि शेतीच्या उत्पादन अन्न प्रक्रिया मध्ये अनेक व्यवसाय व उद्योग उभे राहिले. यामुळे स्थानिक ठिकाणी रोजगार निर्माण झाले.

शेती व्यवसायाशी संबधित इतर पुरक व्यावसाय करण्याच्या अनुषंगाने प्रयत्न केले जात असून विकास आणि प्रगती हा दृष्टिकोन ठेवून अधिक - अधिक उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न होत आहे. यामुळे शेतीला असलेले निगडित व्यवसाय मोठया प्रमाणात करता येवू लागले. यामुळे आर्थिक व्यवस्था सुधारण्यास मदत होवू लागली. आधुनिक पध्दतीने प्रत्यक्ष तसेच ऑनलाईन स्वरूपात मोठया प्रमाणात व्यापार, व्यवसायाचे व्यापक स्वरूप पाहयाला मिळते. इंटरनेट, मोबाईल ॲप्स, डिजिटल प्लॅटफॉम तसेच ई- कॉमर्सच्या माध्यमातून शेतकरी, व्यापारी आणि ग्राहक अशा पध्दतीने जलद मार्गानी व्यवयाय, व्यापार, कंपन्याना शेती संबधित उत्पादने विकण्याची प्रक्रिया आज बगायाला मिळत आहे. शेतकऱ्यांना शेतमालाच्या विक्रीसंबधी तसेच बाजारातील दरांची किंवा किंमतीची तात्काळ, अचूक व पारदर्शक माहिती मिळू लागली. शेतकऱ्यांना पावसाचे प्रमाण, तापमान, अवकाळी पाऊस, गारपीट,

हवामानातील बदलांसंबधी माहिती मिळत असल्यामुळे पीकांचे व्यवस्थापन, पेरणी, मशागत, खेते, फवारणी, काढणी, विक्री या संबधी माहिती मिळू लागली. यामुळे पिंकाचे नुकसान टाळता येवू लागले. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे शासनाची माहिती विविध विभागाचे संकेतस्थळावर उपल्बध झाल्याने शेतकऱ्यांना व नागरिकांना थेट माहिती पाहता येते. प्रशासकीय आदेश, सुचना, निर्णय, योजना, परिपत्रके इत्यादी माहिती मिळू लागली. विविध क्षेत्रातील नवनवीन शोध व संशोधनामुळे शेती बरोबर लघुउद्योग निर्माण करता आले. शेती उद्योगावर जागतिकीकरणाचा प्रभाव पडलेला असून यांचा शेती उद्योगात अनेक बदल व परिर्वतन झाले.हा जो परिणाम झाला त्याला जागतिकीकरणाच्या प्रभावाने झाला असून जागतिकीकरण आणि शेती उद्योग यांचा जवळचा संबध आहे. शेती उद्योग क्षेत्रात झपाटयाने जे बदल व परिर्वतन झाले त्याला कारणीभूत जागतिकीकरण असल्याचे मान्य करावे लागेल. कारण जागतिकीकरणामुळे शेती उद्योग स्थानिक पातळीवरून जागतिक पातळीवर केले जात आहे. आधुनिक तंत्रज्ञान, ऑनलाईन विक्री व जागतिक स्तरावर व्यापारामुळे शेती उद्योगाला अधिक गती निर्माण होत असून व्यावसायिक स्पर्धा निर्माण होत आहे.

**भारतीय समाजव्यवस्थेवर जागतिकीकरणाचा पडलेला परिणाम:** जागतिकीकरणामुळे समाजव्यवस्थेत आर्थिक, सामाजिक,व सांस्कृतिक क्षेत्रात परिर्वतन झाली आहे.समाज व्यवस्थेतील लोकांच्या राहणीमात, वेशभूषेत, परंपरा, रूढी-चालीरिती, संस्कृती मध्ये परिर्वतने होत आहे. याजागी विदेशी संस्कृतीचे मिश्रण होत आहे. कारण अनेक बाबतीत स्थानिक संस्कृतीच्या सण-समारंभात विदेशी अनुकरणाचे प्रवाह बगायाला मिळते.जागतिकीकरणामुळे भारतीय समाज व्यवस्थेत संयुक्त कुटूंबपध्दतीची जागा विभक्त कुटूंबपध्दतीकडे वळताना दिसत आहे. त्यामुळे शेती उद्योगाशी संबंधित कामांसाठी ग्रामीण भागातील लोक शहरांकडे स्थलांतर झाल्यामुळे ग्रामीण कुटुंबरचनेत बदल होत आहे. शेती उद्योगामध्ये व्यापारीकरण होत असल्यामुळे स्त्रियांचा सहभाग वाढ आहे. शेती उद्योग, व्यवसाय, शिक्षण, राजकारण अशा विविध क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग दिसून येत आहे.

जागतिकीकरणाचा शेती उद्योगावर परिणाम होत आहे. आज संपूर्ण शेती उद्योग जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली असलेले दिसून येते. जागतिकीकरणामुळे विदेशी भाडवल अधिक वाढल्याने यामुळे स्थानिक शेतमालाचे दर कमी होवू लागले. जागतिकीकरणामुळे बाजारातील चढ- उतारांचा थेट परिणाम शेतकऱ्यांवर होवू लागला. कारण शेतमालाला स्थिर दर मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास अडचण निर्माण होत आहे. यांत्रिकीकरणामुळे मजुरांची गरज कमी झाल्यामुळे शेतीतील रोजगार कमी झाले. यामुळे ग्रामीण भागात बेरोजगाराची समस्या वाढली. ग्रामीण भागातील लोक शहरांकडे स्थलांतर होत आहे. मात्र शहरातही रोजगार मिळत नसल्यामुळे बेरोजगाराचे प्रमाणात सतत वाढ होत आहे. त्यामुळे, गरीबी, मागासलेपण, कर्जबाजारीपणा, दारिद्रयात वाढ होत आहे. शिक्षण, आरोग्य जीवनशैली आणि सामाजिक जाणीवांमध्ये सकारात्मक परिर्वतन झाले असले, तरी त्याच बरोबर सामाजिक विषमता, ग्रामीण आणि शहरी अंतर, बेरोजगारी, वाढती लोकसंख्या यामुळे परिणाम होत आहे.

जागतिकीकरणाच्या परिणाम पर्यावरणावर होत आहे. यामुळे नैसर्गिक आपत्ती, हवामान बदल, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, शेतकऱ्यांना अनेक संकटाना सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ झाली. कारण शेतीसाठी लागणाऱ्या खर्चामध्ये वाढ झाली आणि कर्जबाजारीपणा, गरीबी, बेरोजगारी यात वाढ होत आहे. तसेच कुटुंबाची जबाबदारी, मुला-मुलींचे शिक्षण, विवाह, आर्थिक कर्जाचा ताण- तणाव, मानसिक असंतुलन बिघाडते, भविष्याची चिंता वाढते, सामाजिक प्रतिष्ठेला थक्का बसतो अशा अनेक कारणाने शेतकरी आत्महत्या कडे वळत असल्याचे सध्याची स्थिती व आकडेवारी वरून लक्षात येते.

कृषी क्षेत्रातील पारंपारिक पध्दती नष्ट होत असून आधुनिक पध्दतीने जागा मिळवली. सेंद्रिय उत्पादनांमध्ये घट होऊन रासायनिक खते, बी बियाणे, औषधांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढ झाली. औधेगिकीकरण, प्रदूषण, रसायनांचा वापर यामुळे श्वसनाचे आजार, त्वचारोग आणि इतर आरोग्यावर परिणाम होत आहे. शहरीकरणाची व्याप्ती वाढत असल्यामुळे शेतीचे क्षेत्र मोठ-मोठया इमारतींसाठी जात आहे. जागतिकीकरणामुळे शेती उत्पन्नात वाढ झाली असली तरी मोठमोठे कारखाने, कंपन्या, खदानी यामुळे पिकणारी शेत जमिनी कमी होऊ लागली. सेंद्रिय शेतीचे अस्तित्व संपुष्टात येताना दिसत आहे. वाढते शहरीकरणालगत रस्तेय, इमारती, कार्यालय आणि विकास यासाठी शेती व्यापली जात आहे, जमिनीचे तुकडीकरण होत आहे. शेती, जंगल तोड मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. यांचा परिणाम पर्यावरणावर होत आहे.

**निष्कर्ष:** जागतिकीकरणामुळे बाजार पेठ, तंत्रज्ञान आणि निर्यात व आर्यातीच्या संधी व सुविधा वाढल्या असल्या तरी मात्र शेतकऱ्यांच्या आर्थिक अस्थिरता, गरीबी, कर्जबाजारीपणा, रोजगार, पर्यावरणीय ऱ्हास, सामाजिक- आर्थिक विषमता वाढत आहे. शेती उद्योगाचा विकास करण्यासाठी शेतीला पूरक धोरणे, योजना, शेती मालाला हमी भाव देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना शेतीतील उत्पन्न वाढविण्यासाठी शासकीय अनुदान, उपाय, कर्ज, त्याच बरोबर शाश्वत शेती करण्यासाठी प्रयत्न करणे. विकास करण्याच्या दृष्टिने सामाजिक आणि सर्वसमावेशक, शाश्वत, समतोल साधण्यासाठी मानवी मुल्य, सांस्कृतिक आणि आर्थिक विकास यांचा संमन्वय साधने आश्यक आहे.

**शिफारशी:** 1.जागतिकीकरणाच्या धोरणांचा शेती उद्योगावर होणारा परिणाम लक्षात घेवून धोरणे आखण्यात यावी. 2. स्थानिक शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत स्थान मिळण्यासंबधी प्रशिक्षण देण्यात यावे. 3. भारतीय समाजव्यवस्थेत जागतिकीकरणामुळे होणाऱ्या विपरीत परिणामावर उपाय शोधावे. 4. शेती उद्योग धोरणावर अधिक लक्षकेंद्रित करण्यात यावे जेणेकरून ग्रामीण भागातील लोंकाना त्यांचा लाभ घेता येईल. 5. शेती उद्योगाच्या विकासासाठी शेतीसंबधी रोजगाराला चालना देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**संदर्भ:**

1. देशपांडे, स्नेहा विनायक. *शाश्वत आणि सर्वसमावेशक जागतिकीकरण.* विशाल प्रकाशन कंपनी.

2. दरवडे, विजय आनंदराव ."जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजजीवनावरील प्रभाव." *International Journal of Researches in Social Science and Information Studies*, vol. VIII, no. 3, 2022, pp. 228–230, e-ISSN 2347-8268.
3. फरताडे, एस .बी ."जागतिकीकरण आणि भारत." *Current Global Reviewer*, special issue, no. I, vol. 10, 2018, ISSN 2319-8648.
4. पिलगुलवार, श्रीनिवास ."जागतिकीकरणाचा भारतीय शेती व्यवसायावर परिणाम." *Chronicle of Humanities and Cultural Studies*, vol. 3, no. 6, 2017, ISSN 2454-5503.
5. पेटकर, एच .यू ."जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर झालेला परिणाम: .ध्ययनएक अ" *International Journal of Advance and Applied Research*, vol. 18, 2025, ISSN 2347-7075.
6. राठोड, रमेश धोंडीराम ."जागतिकीकरण प्रक्रिया आणि भारतीय शेती." *Indian Streams Research Journal*, vol. 4, no. 10, 2014, ISSN 2230-7850.

# जागतिकीकरण, बाजाराभिमुखता आणि शेती व्यवसाय: समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास

**एकनाथ रतन पात्रे** संशोधन विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** सदर लेखात जागतिकीकरण, बाजाराभिमुखता आणि भारतीय शेती व्यवसाय यांमधील परस्परसंबंधांचा समाजशास्त्रीय अभ्यास समाजशास्त्रीय समस्यांच्या आधारे करण्यात आला आहे. १९९१ नंतरच्या उदारीकरण—खासगीकरण—जागतिकीकरण धोरणांमुळे शेती व्यवसायाचे व्यापारीकरण, भांडवलीकरण आणि तंत्रज्ञानाधिष्ठितीकरण झाले. या प्रक्रियेत किमतीतील अस्थिरता, कर्जबाजारीपणा, करार शेती, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रभाव, ग्रामीण स्थलांतर, लिंगभेद आणि पर्यावरणीय संकटे तीव्र झाली. दुय्यम माहितीवर आधारित या अभ्यासात गिडेन्सचा जागतिकीकरण सिद्धांत, वॉलरस्टाईनची जागतिक व्यवस्था संकल्पना आणि भारतीय ग्रामीण समाजशास्त्रज्ञांचे विचार वापरून समस्यांचे विश्लेषण केले आहे. निष्कर्षतः, शेती विकासासाठी बाजारकेंद्री दृष्टीकोनाबरोबरच सामाजिक न्याय, शाश्वतता आणि शेतकरी सक्षमीकरण यांना केंद्रस्थानी ठेवणारी धोरणे आवश्यक असल्याचे अधोरेखित केले आहे.

**प्रस्तावना:** जागतिकीकरण ही आधुनिक काळातील एक व्यापक आणि बहुआयामी सामाजिक प्रक्रिया आहे. आर्थिक उदारीकरण, आंतरराष्ट्रीय व्यापार, तंत्रज्ञानाचा प्रसार आणि भांडवलाची मुक्त हालचाल यांमुळे जागतिकीकरणाला गती मिळाली. भारताने १९९१ नंतर स्वीकारलेल्या उदारीकरण—खासगीकरण—जागतिकीकरण (LPG) धोरणांचा सर्वाधिक परिणाम भारतीय शेती व्यवसायावर झाला. पारंपरिक उपजीविकेवर आधारित शेती हळूहळू बाजाराभिमुख, स्पर्धात्मक आणि भांडवली स्वरूप धारण करू लागली. या प्रक्रियेत शेती व्यवसायाशी निगडित सामाजिक संबंध, ग्रामीण समाजरचना, वर्गीय विषमता, शेतकरी जीवनमान आणि पर्यावरणीय समतोल यांमध्ये मूलभूत बदल घडून आले. त्यामुळे जागतिकीकरण आणि शेती व्यवसाय यांचा समाजशास्त्रीय समस्या दृष्टिकोनातून समाजशास्त्रीय अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**संशोधन समस्या:** जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे भारतीय शेती व्यवसाय बाजाराच्या नियंत्रणाखाली गेला आहे. उत्पादन खर्च वाढ, किमतीतील अस्थिरता, कर्जबाजारीपणा, लहान शेतकऱ्यांचे शोषण, पर्यावरणीय संकटे आणि ग्रामीण असमानता या समस्या तीव्र झाल्या आहेत. त्यामुळे मुख्य संशोधन समस्या अशी मांडता येईल :"जागतिकीकरण व बाजाराभिमुखतेमुळे भारतीय शेती व्यवसायात कोणते सामाजिक, आर्थिक व संरचनात्मक प्रश्न निर्माण झाले असून त्यांचा ग्रामीण समाजरचनेवर कसा परिणाम होत आहे?"

**अध्ययनाची उद्दिष्टे:** जागतिकीकरणाच्या संकल्पनेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करणे. जागतिकीकरणामुळे शेती व्यवसायात झालेले संरचनात्मक बदल समजून घेणे. बाजाराभिमुख शेतीमुळे निर्माण झालेल्या शेतकरी समस्यांचे विश्लेषण करणे. ग्रामीण समाजरचनेवर, वर्गीय संबंधांवर व लिंगभेदावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे. शाश्वत शेती व सामाजिक न्यायाच्या दृष्टीने उपाय सुचवणे.

**संशोधन गृहितके:** जागतिकीकरणामुळे शेती व्यवसाय अधिक बाजाराभिमुख व भांडवली झाला आहे. या प्रक्रियेत लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांची असुरक्षितता वाढली आहे.जागतिकीकरणाने ग्रामीण समाजातील वर्गीय व लिंगाधारित विषमता तीव्र केली आहे

**संशोधन पद्धती:** सदर लेखासाठी दुय्यम माहितीचा (Secondary Data) वापर करण्यात आला आहे. शासकीय अहवाल, समाजशास्त्रीय ग्रंथ, संशोधन लेख, जर्नल्स व आकडेवारी यांचा आधार घेतला आहे. विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पद्धतींचा वापर करून समाजशास्त्रीय समस्यांच्या आधारे अभ्यास मांडण्यात आला आहे.

**सैद्धांतिक चौकट:** अँथनी गिडेन्स यांचा जागतिकीकरण सिद्धांत, इमॅन्युएल वॉलरस्टाईन यांचा जागतिक व्यवस्था सिद्धांत तसेच योगेंद्र सिंग व ए. आर. देसाई यांचे भारतीय ग्रामीण समाजावरील विचार या अभ्यासाची सैद्धांतिक चौकट ठरतात. या सिद्धांतांच्या आधारे जागतिकीकरणामुळे निर्माण होणारे शक्तिसंबंध, वर्गीय असमानता आणि शोषण स्पष्ट करता येते.

**समस्येचे विश्लेषण :बाजाराभिमुखता व किंमत अस्थिरता:** जागतिक बाजाराशी जोडल्या गेल्यामुळे शेती उत्पादनांच्या किमती आंतरराष्ट्रीय मागणी—पुरवठ्यावर अवलंबून राहिल्या आहेत. याचा सर्वाधिक फटका लहान शेतकऱ्यांना बसतो.

**कर्जबाजारीपणा व आर्थिक ताण:** उच्च दर्जाची बियाणे, खते व तंत्रज्ञानासाठी शेतकरी कर्जावर अवलंबून राहतो. उत्पन्न अनिश्चित असल्याने कर्जफेडीचा प्रश्न गंभीर बनतो.

**करार शेती व बहुराष्ट्रीय कंपन्या:** करार शेतीमुळे शेतकरी कंपनीवर अवलंबून राहतो. निर्णयस्वातंत्र्य कमी होते आणि एकपिकीय शेतीमुळे पर्यावरणीय धोके वाढतात.

**ग्रामीण समाजरचना व स्थलांतर:** शेतीतून मिळणारे अपुरे उत्पन्न, बेरोजगारी व अस्थिरता यांमुळे ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढले आहे. संयुक्त कुटुंबपद्धतीचे विघटन होत आहे.

**लिंगभेद व महिला शेतकरी:** महिला शेतीत मोठे योगदान देतात; मात्र जमीन मालकी, कर्ज व बाजारपेठेपर्यंत त्यांचा मर्यादित प्रवेश आहे. जागतिकीकरणाने हा लिंगभेद अधिक स्पष्ट केला आहे.

**पर्यावरणीय संकटे:** रासायनिक खतांचा अतिवापर, भूजल उपसा व जैवविविधतेचा ऱ्हास यामुळे शेती शाश्वततेपुढे गंभीर आव्हाने उभी राहिली आहेत.

**उपाययोजना व शिफारसी:** किमान आधारभूत किंमत प्रभावीपणे राबवणे. लहान शेतकऱ्यांसाठी सुलभ कर्ज व विमा योजना. सहकारी व स्थानिक बाजारपेठांचे बळकटीकरण. सेंद्रिय व शाश्वत शेतीला प्रोत्साहन. महिला शेतकऱ्यांना जमीन व संसाधनांवर हक्क.

**निष्कर्ष:** समाजशास्त्रीय समस्यांच्या आधारे पाहता, जागतिकीकरणाने शेती व्यवसायात संधी निर्माण केल्या असल्या तरी त्याचबरोबर गंभीर सामाजिक व आर्थिक समस्या उभ्या केल्या आहेत. त्यामुळे शेती विकास हा केवळ बाजाराच्या तत्त्वांवर न राहता सामाजिक न्याय, पर्यावरणीय शाश्वतता व ग्रामीण सक्षमीकरणावर आधारित असणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


1. Desai, A. R. *Rural Sociology in India*. Popular Prakashan, 2010.
2. Giddens, Anthony. *Runaway World: How Globalisation Is Reshaping Our Lives*. Profile Books, 1999.
3. Government of India. *Agricultural Statistics at a Glance*. Ministry of Agriculture and Farmers' Welfare, various years.
4. Singh, Yogendra. *Modernization of Indian Tradition*. Rawat Publications, 2007.
5. Srinivas, M. N. *Social Change in Modern India*. Orient Blackswan, 2008.
6. Wallerstein, Immanuel. *World-Systems Analysis: An Introduction*. Duke University Press, 2004.


# जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर परिणाम: एक विश्लेषणात्मक अभ्यास


**प्रा. डॉ. सुधाकर एल. जाधव** समाजशास्त्र विभाग प्रमुख,जे.के. शाह आदर्श महाविद्यालय निजामपूर-जैताणे, ता. साक्री जि. धुळे

**जयेश हिरालाल ढोले** संशोधक विद्यार्थी, क.ब.चौ. उमवि ,जळगाव



**गोषवारा:** मानवी जीवनाचा इतिहास बघितला तर मानव अगदी आदिम काळापासून मानव स्वत:ची उपजीविका भागविण्यासाठी वेगवेगळे फळे, कंदमुळे खात असे आणि गुहेत राहत असे. निसर्ग चक्रात जसजसे बदल होत गेले तसतसे मानवी जीवनातही बदल होत गेले. जागतिकीकरण (Globalization) ही आधुनिक काळातील एक व्यापक, बहुआयामी आणि गतिमान प्रक्रिया आहे. जागतिकीकरण हे आधुनिक युगातील जलद घडणारी प्रक्रिया आहे. यात प्रगती, व्यापार, दळणवळण, भांडवलशाहीचे बदलते स्वरूप इत्यादी घटकांचा प्रभाव होत असतो. व्यापार, भांडवल, तंत्रज्ञान, माहिती, श्रम आणि संस्कृती यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर मुक्त वहन यामुळे जग जागतिक खेडे बनत आहे. भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये जागतिकीकरणाचा प्रभाव विशेषतः ग्रामीण भागावर मोठ्या प्रमाणावर पडलेला दिसून येतो. ग्रामीण भागात शेती, हस्तव्यवसाय, लघुउद्योग, लोकसंस्कृती आणि नैसर्गिक संसाधनांवर आधारित अर्थव्यवस्था पाहायला मिळते. त्यामुळे जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर होणारा परिणाम समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. या शोध निबंधात जागतिकीकरणाची संकल्पना, त्याची वैशिष्ट्ये, ग्रामीण विकासाची संकल्पना, तसेच जागतिकीकरणाचे ग्रामीण विकासावर होणारे सकारात्मक व नकारात्मक परिणाम आणि काही उपाययोजना यांचा आढावा घेण्यात आलेला आहे.


**प्रस्तावना:** भारतात १९९१ पासून जागतिकीकरणाला सुरुवात झाली. जागतिकीकरण म्हणजे विविध देशांतील अर्थव्यवस्था, बाजारपेठा, उत्पादन पद्धती, सेवा, संस्कृती व जीवनशैली यांचे एकमेकांशी होणारे एकत्रीकरण. हर्शल भामरे म्हणतात कि जेथे स्थानिक वस्तूंची किंवा घडामोडींची जागतिक स्तरावर स्थानांतरणाची प्रक्रिया होय. जागतिकीकरण म्हणजे जगभरातील देश, अर्थव्यवस्था, समाज आणि संस्कृती यांना तंत्रज्ञान, व्यापार, वाहतूक आणि विचारांच्या देवाणघेवाणीतून एकमेकांशी जोडणारी प्रक्रिया आहे, ज्यामुळे जागतिक स्तरावर परस्परावलंबन आणि एकात्मता वाढते. यामुळे राष्ट्रीय सीमा कमी होऊन वस्तू, सेवा, भांडवल, लोक आणि कल्पना यांचा प्रवाह सुलभ होतो आणि संपूर्ण जग एका मोठ्या बाजारपेठेसारखे बनू लागते. जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूंची किंवा घडामोडींची जागतिक स्तरावर स्थानांतरणाची प्रक्रिया. ह्या संज्ञेचा उपयोग बहुधा आर्थिक जागतिकीकरणाच्या संदर्भात केला जातो. जागतिकीकरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचे जगाच्या अर्थव्यवस्थेबरोबर एकत्रीकरण करणे. जगातील विविध देशांमधील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि तंत्रज्ञानविषयक परस्परसंबंध अधिक दृढ होण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण. 20 व्या शतकाच्या शब्दकोशानुसार जागतिकीकरण म्हणजे जगभर पसरणे, एकाच वेळी संपूर्ण जगाचा किंवा जगातील सर्व लोकांचा विचार करणे, त्यात व्यापार, विदेशी थेट गुंतवणूक, भांडवल प्रवाह, प्रवास आणि तंत्रज्ञान

यांच्या प्रसाराच्या माध्यमाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थांसाठी खुले केले जाते. आंतरराष्ट्रीय व्यापार सुलभ होणे, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विस्तार, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानातील क्रांती, भांडवली गुंतवणुकीचा मुक्त प्रवाह, जागतिक स्पर्धा आणि बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था ही जागतिकीकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. भारताने 1991 नंतर स्वीकारलेल्या उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण (LPG) धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक बाजाराशी अधिक जोडली गेली.

**ग्रामीण विकासाची संकल्पना:** ग्रामीण विकास म्हणजे केवळ शेती उत्पादनात वाढ करणे एवढेच नव्हे, तर ग्रामीण भागातील लोकांचे सर्वांगीण उन्नती साधणे होय. ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण समाजाचा विकास होय. विकास म्हणजे केवळ आर्थिक वृद्धी नव्हे, तर वृद्धीबरोबर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात परिवर्तन घडून येणे. यात उत्पन्नवाढ, रोजगारनिर्मिती, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, सामाजिक न्याय, स्त्री-सशक्तीकरण, पर्यावरण संरक्षण आणि जीवनमान उंचावणे या सर्व घटकांचा समावेश होतो. ग्रामीण विकास हा मानवी विकासाशी निगडित असून तो दीर्घकालीन, समतोल आणि शाश्वत असणे अपेक्षित आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास: रक्षित बागडे** - 'जागतिकीकरण आणि भारतीय दारिद्र्य' या शोधनिबंधात लिहतात कि, भारताच्या संदर्भात जागतिकीकरणाच्या प्रयोगाला सुरवातीपासूनच विरोध तसेच अनेक बुद्धिवंतांनी याचे समर्थनही मोठ्या प्रमाणात केले आहे. म्हणजेच जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर सकारात्मक व नकारात्मक परिणाम झालेला आहे. **विलास गायकवाड** यांनी 'जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण समाज जीवनावरील प्रभाव' या लेखात स्पष्ट करतात कि, जागतिकीकरणामुळे विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात अमुलाग्र बदल झाल्याने याचा ग्रामीण समाजावर अनुकूल प्रभाव पडल्याचे लक्ष्यात येते.

**उद्दिष्टे:** १. जागतिकीकरणामुळे ग्रामीण जीवनाचे बदलते स्वरूप अभ्यासणे. २. ग्रामीण विकासासाठी कारणीभूत असलेल्या घटकांची माहिती घेणे. ३. ग्रामीण विकासावर परिणाम करणाऱ्या सकारात्मक व नकारात्मक परिणामाचा विश्लेषण करणे.

**गृहीतके:** जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर सकारात्मक व नकारात्मक परिणाम होत आहे. ग्रामीण संस्कृती, बोली, भाषा, रीतीरिवाज आणि पारंपारिक बी-बियाणे इत्यादी घटकांचे जतन करणे आवश्यक आहे.

**अध्ययन पध्दती:** प्रस्तुत शोधनिबंधात वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे. त्यासाठी प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी द्वितीयक तथ्यांचा आधार घेण्यात आला आहे.

**जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर सकारात्मक परिणाम**

**कृषी क्षेत्रातील बदल:** जागतिकीकरणाचा ग्रामीण शेतीवर परिणाम झालेला दिसून येतो. हा परिणाम काही ठिकाणी जासतो प्रमाणात तर काही ठिकाणी कमी प्रमाणात आढळतो. जागतिकीकरणामुळे कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, उच्च उत्पादक बियाणे, सिंचन व्यवस्था, कीटकनाशके आणि खतांचा वापर वाढला. आज ग्रामीण भागातील शेतकरी सुद्धा शेतीसाठी आधुनिक अवजारे वापरतो. जसे कि तुषार सिंचन, ठिबक सिंचन इत्यादी. त्यामुळे पिकांचे उत्पादन मोठ्याप्रमाणात होते. परिणामी निर्यातक्षम पिकांचे उत्पादन वाढविण्यास प्रोत्साहन मिळते. रक्षित मदन बगळे म्हणतात कि, जागतिकीकरणाची प्रक्रिया आर्थिक तसेच सामाजिक बदलवार भर देते. म्हणजेच ग्रामीण भागात फळे, भाजीपाला, फुलशेती, कापूस, ऊस यांसारख्या नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढला. जागतिकीकरणामुळे ग्रामीण शेतकरी कमी कालावधीत, थोड्या मेहनतीत जास्त उत्पादन व उत्पन्न घेऊ लागला.

**बाजारपेठेचा विस्तार:** जागतिकीकरणामुळे ग्रामीण बाजारपेठेला महत्वाचे स्थान निर्माण झाले. दूरदूरचे व्यापारी ग्रामीण बाजारपेठेत येऊ लागले. त्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल गावातल्या गावात किंवा जवळच्या बाजारपेठेत आपला अन्न-धान्य तसेच भाजीपाला विकत असतो. ग्रामीण उत्पादकांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली. कृषीमाल, दुग्धजन्य पदार्थ, हस्तकला, कुटीर उद्योगांची उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारात पोहोचू लागली. ई-मार्केटिंग, ऑनलाईन प्लॅटफॉर्म आणि निर्यात धोरणांमुळे ग्रामीण उत्पादनांना नवीन संधी मिळाल्या.

**रोजगाराच्या संधी:** जागतिकीकरणामुळे विविध तज्ज्ञ मार्ग दर्शकांकडून बहुमूल्य मार्गदर्शन मिळते. लोकांमध्ये ज्ञानाची वृद्धी होत असते. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक शेतमालावर प्रक्रिया करू लागले. बहुराष्ट्रीय कंपन्या, अन्नप्रक्रिया उद्योग, कापड उद्योग, माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित सेवा, ग्रामीण बीपीओ (BPO) यांमुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. जागतिक बाजारपेठेत हाताने बनवलेल्या वस्तूंची (हस्तकला, हातमाग) मागणी वाढली. त्यामुळे स्वयंरोजगार कंत्राटी शेती आणि सेवा क्षेत्रात काही प्रमाणात रोजगार वाढला. तसेच जागतिकीकरणामुळे ग्रामीण पर्यटन व्यवसायाला, ऐतिहासिक स्थळांना विशेष महत्व प्राप्त झाले. जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन मिळाले.

**पायाभूत सुविधांचा विकास:** देशाच्या विकासाठी पायाभूत सुविधांची अत्यंत आवश्यकता आहे. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या भागात तर पायाभूत सुविधांचा विस्तार जास्त झालेला नसतो. परंतु, जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात चांगले रस्ते, चांगल्या प्रमाणात वीजेचा पुरवठा, पाण्याची उपलब्धता, दूरसंचार, इंटरनेट, गोदामे, इत्यादी गोष्टी उपलब्ध झाल्या. या सुविधांमुळे ग्रामीण जीवनात गतिशीलता आली आणि बाजाराशी संपर्क सुलभ झाला.

**शिक्षण व कौशल्य विकास:** जागतिकीकरण आणि शिक्षण यांचा जवळचा संबंध आहे. जागतिकीकरणामुळे मोठ्या शहरात शिक्षणाचा विस्तार मोठ्या प्रमाणात झालेला आहे. त्याचप्रमाणे गाव-पाड्यात सुद्धा हळूहळू विस्तार होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, युवक आणि पालकांमध्ये शिक्षणाचे महत्व वाढत आहे. त्यामुळेच, उज्वला लोणकर आपल्या लेखात लिहितात कि, जागतिकीकरणाला आधुनिक माहिती तंत्रज्ञांवर व शिक्षण पद्धतींवर तासेस विविध विषयातील ज्ञानात्मक माहितीवर प्रभाव दिसून येतो. जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तसेच खासगी शैक्षणिक संस्था, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे, कौशल्य विकास कार्यक्रम इत्यादी घटकांना नवीन कौशल्यांचे प्रशिक्षण मिळू लागले. माहिती तंत्रज्ञानामुळे व जागतिकीकरणामुळे ज्ञानाचा प्रसार वेगाने होत आहे.

**जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर नकारात्मक परिणाम:**

**कृषीक्षेत्रावर परिणाम:** जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा वाढली, पण विकसित देशांच्या तुलनेत भारतीय शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान कमी झाल्याने त्यांना स्पर्धा करणे कठीण झाले. सरकारी गुंतवणुकीत घट, टउद्योग आणि सेवा क्षेत्राकडे लक्ष केंद्रित झाल्याने कृषी क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक घटली, ज्यामुळे पायाभूत सुविधांचा विकास खुंटला. शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि रोजगारर कृषी विकासाचा दर कमी झाल्याने रोजगार वाढ थांबली. शेतीत भांडवली गुंतवणूक कमी झाली आणि ग्रामीण भागातील रोजगार कमी होऊन स्थलांतर वाढले. आर्थिक अस्थिरता, जागतिक किमतींच्या चढ-उतारांचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होऊ लागला, त्यामुळे आर्थिक अनिश्चितता वाढली. विशिष्ट पिकांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे ग्रीन रिव्होल्यूशनचा फायदा गहू आणि तांदळासारख्या पिकांनाच अधिक झाला, तर डाळी आणि काही तेलबियांसारख्या पिकांना त्याचा पुरेसा लाभ मिळाला नाही, त्यामुळे विषमता वाढली. लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली, शेतीची जमीन मात्र तेवढीच किंबहुना जमिनीचा आकार कमी झाला. त्यामुळे उत्पादन खर्च वाढला, तर पिकांची गुणवत्ता आणि दर्जा याकडे दुर्लक्ष झाले. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीची सुपीकता खालावलेली आहे. लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांवरील परिणाम जागतिक स्पर्धेमुळे लहान शेतकरी टिकाव धरू शकले नाहीत. आयात धोरणे, किमतीतील चढउतार आणि उत्पादन खर्च वाढल्यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले. काही ठिकाणी शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले. शेती ही उपजीविकेऐवजी नफ्याचा व्यवसाय बनल्याने अन्नधान्याऐवजी नगदी पिकांवर भर दिला गेला. त्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला. पारंपरिक शेती पद्धती आणि जैवविविधता धोक्यात आली.

**स्थानिक उद्योगांचे नुकसान:** ग्रामीण भागात चालणारे लघु उद्योग, कुटिरोद्योग, मासेमारी, वस्त्रोउद्योग इत्यादी उद्योगावर नव्या आर्थिक धोरणामुळे वेगवेगळ्या अडचणी निर्माण झालेल्या आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या स्वस्त व दर्जेदार वस्तूंमुळे स्थानिक कुटीर व हस्तव्यवसायांना मोठा फटका बसला. पारंपरिक व्यवसाय लयाला जाण्याची भीती निर्माण झाली.

**सांस्कृतिक परिणाम:** जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील स्थानिक बोलीभाषा, भाषा, लोककला, परंपरा, रीतीरिवाज आणि सामाजिक नीतिमूल्ये ऱ्हास होऊ लागली आहे. उपभोगवादी संस्कृतीचा प्रसार झाल्याने सामाजिक नातेसंबंधांवर परिणाम झाला.

**पर्यावरणीय समस्या:** औद्योगिकीकरणामुळे जलप्रदूषण, वायुप्रदूषण खूप मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तसेच रासायनिक खतांचा अतिवापर, जलस्रोतांचा अति उपसा यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास झाला. मातीची सुपीकता कमी होणे, पाण्याची टंचाई आणि प्रदूषण या समस्या ग्रामीण भागात वाढल्या आहे.

**शासनाची भूमिका व उपाययोजना:** जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण विकास समतोल आणि शाश्वत ठेवण्यासाठी शासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA), राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान (NRLM), प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, डिजिटल इंडिया, कौशल्य भारत, शेतकरी उत्पादक संघटना (FPO) यांसारख्या योजनांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार मिळतो. मात्र या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

**शाश्वत ग्रामीण विकासासाठी दिशा:** जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर होणारा परिणाम संतुलित करण्यासाठी काही महत्त्वाच्या बाबी आवश्यक आहेत. स्थानिक संसाधनांचा शाश्वत वापर, लहान शेतकऱ्यांना संरक्षण व सहाय्य, जैविक शेतीला प्रोत्साहन, ग्रामीण उद्योगांचे संवर्धन, शिक्षण व आरोग्यावर गुंतवणूक, तसेच स्थानिक संस्कृतीचे जतन. जागतिकीकरण स्वीकारताना स्थानिक गरजांना प्राधान्य, ग्रामीण भागातील पारंपारिक बी-बियाणे जतन व संवर्धन करणे, सेंद्रिय शेती करणे, तसेच सामाजिक नीतिमूल्ये अंगीकृत करणे महत्त्वाचे ठरेल.

**निष्कर्ष:** संपूर्ण समाजाला जागतिकीकरणाने व्यापले आहे. ग्रामीण संरचनेत बदल होत आहे. जागतिकीकरण ही अपरिहार्य आणि प्रभावी प्रक्रिया असून तिचा ग्रामीण विकासावर दुहेरी परिणाम झालेला दिसतो. एका बाजूला आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठेचा विस्तार, रोजगाराच्या संधी आणि पायाभूत सुविधांचा विकास झाला आहे; तर दुसऱ्या बाजूला लहान शेतकऱ्यांचे प्रश्न, विषमता, पर्यावरणीय ऱ्हास आणि सांस्कृतिक बदलही वाढले आहेत. त्यामुळे जागतिकीकरणाला पूर्णतः नाकारता येत नाही किंवा अंधपणे स्वीकारताही येत नाही. गरज आहे ती योग्य धोरणे, सामाजिक न्याय आणि शाश्वत विकासाच्या चौकटीत जागतिकीकरणाचा उपयोग करून ग्रामीण भारताचा सर्वांगीण विकास साधण्याची व भारताने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत टिकून राहून आपली प्रगती करत असतांना ग्रामीणज जीवन व नेसर्गिक साधनसंपती यांचेही संवर्धन होणे गरजेचे आहे. अशा संतुलित दृष्टीकोनातूनच ग्रामीण समाज समृद्ध, स्वावलंबी आणि सक्षम बनू शकतो.

**संदर्भ:**


1. बागडे, रक्षित. *जागतिकीकरण आणि भारतीय दारिद्र्य.* 2013.
2. गायकवाड, विलास. "जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण समाजजीवनावरील प्रभाव." 2018.
3. कोल्हे, तुकाराम. "जागतिकीकरणाचे ग्रामीण भागावरील परिणाम." *UGC Approved Journal*, 2018.
4. लोणकर, उज्ज्वला. "जागतिकीकरण आणि शिक्षण." *Review of Research*, vol. 7, no. 8, 2018, UGC Approved Journal.
5. "जागतिकीकरण." *विकिपीडिया (मराठी)*, mr.wikipedia.org/wiki/जागतिकीकरण. Accessed day month year.
6. "जागतिकीकरणामुळे ग्रामीण लोकांसाठी रोजगाराच्या संधी." *Google Search*, www.google.com/search?q=जागतिकीकरणामुळे+ग्रामीण+लोकांसाठी+रोजगाराच्या+संधी. Accessed day month year.

# जागतिकीकरणाचे ग्रामीण विकासावरील परिणाम

**प्रा. डॉ. राजुरकर सुमेध सुभाषराव** समाजशास्त्र विभाग, श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा.जि.धाराशिव

**गोषवारा:** जागतिकीकरण हे जगातील अर्थव्यवस्था, संस्कृती आणि समाज यांना एकत्र जोडण्याची प्रक्रिया आहे, ज्याचा ग्रामीण विकासावर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतो. हा शोध निबंध जागतिकीकरणाच्या ग्रामीण विकासावरील प्रभावांचा अभ्यास करतो, विशेषतः भारताच्या संदर्भात. प्रस्तावनेच्या माध्यमातून जागतिकीकरणाची व्याख्या आणि ग्रामीण विकासाची गरज स्पष्ट केली जाते. पूर्व साहित्याच्या अभ्यासात विविध अभ्यासकांच्या मतांचा आढावा घेतला आहे,. गृहीतकृत्ये अशी आहेत की जागतिकीकरण ग्रामीण विकासाला गती देते पण असमानता वाढवते. अध्ययन पद्धती दुय्यम डेटा आणि साहित्य विश्लेषणावर आधारित आहे.तथ्यांच्या विश्लेषणात असे दिसते की भारतात जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात रस्ते, वीज आणि शिक्षण सुविधा सुधारल्या आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळतो; निष्कर्ष असा की जागतिकीकरण ग्रामीण विकासासाठी संधी देते पण जोखीमही आणते, ज्यासाठी स्थानिक धोरणे आवश्यक आहेत. शिफारशींमध्ये ग्रामीण संस्थांना मजबूत करणे, तंत्रज्ञान वापर वाढवणे आणि टिकाऊ विकासावर भर देणे समाविष्ट आहे.

**प्रस्तावना:** जागतिकीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यात जगातील विविध देशांच्या अर्थव्यवस्था, संस्कृती, तंत्रज्ञान आणि समाज एकमेकांशी जोडले जातात. ही प्रक्रिया १९९० च्या दशकात भारतात उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या माध्यमातून वेगाने वाढली. ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानात सुधारणा, जसे की पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी वाढवणे. जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात विदेशी गुंतवणूक वाढते, ज्यामुळे नवीन बाजारपेठा उघडतात पण स्थानिक अर्थव्यवस्था प्रभावित होते.भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण लोकसंख्या ७०% पेक्षा जास्त आहे, त्यामुळे ग्रामीण विकास हा भारताच्या एकूण विकासाचा कणा मानला जातो कारण देशातील मोठा लोकसंख्या भाग ग्रामीण भागात राहतो. त्यामुळे जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे अत्यंत आवश्यक ठरते. जागतिकीकरणाचा प्रभाव समजून घेणे आवश्यक आहे. हा निबंध जागतिकीकरणाच्या दुहेरी प्रभावांचा अभ्यास करतो.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** जागतिकीकरण व ग्रामीण विकास या विषयावर विविध अभ्यासकांनी संशोधन केले आहे.पूर्व अभ्यास दाखवतात की जागतिकीकरण ग्रामीण विकासावर मिश्र प्रभाव टाकते. मेरिल (२००६) नुसार, जागतिकीकरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत बदल होतात, जसे की मजुरी कमी होणे, पूर्ण-वेळ रोजगार कमी होणे आणि स्थानिक कर आधार कमी होणे.अमेरिकेत, जागतिकीकरणाने शेती निर्यात वाढवली आहे, ज्यामुळे एक तृतीयांश उत्पादन परदेशात विकले जाते, पण आयात वाढल्याने आव्हाने आहेत. भारतात, जागतिकीकरणाने ग्रामीण भागात पायाभूत सुविधा सुधारल्या, जसे की रस्ते आणि वीज, पण सांस्कृतिक क्षरण आणि पर्यावरण नुकसान झाले आहे. आर.शर्मा (2010) यांनी जागतिकीकरणामुळे कृषी उत्पादनक्षमता वाढल्याचे नमूद केले आहे. अ.सेन (2012) यांच्या मते, जागतिक बाजारपेठेच्या प्रभावामुळे ग्रामीण शेतकरी असुरक्षित झाला आहे. रिहान (2013) नुसार, जागतिकीकरण ग्रामीण विकासासाठी नवीन संधी देते पण गरीबी आणि असमानता वाढवते. इतर अभ्यास रोमानियासारख्या देशात जोखीम आणि संधी दाखवतात, जसे की संसाधनांचा शोषण वाढणे. वर्ल्ड बँक (2018) च्या अहवालानुसार ग्रामीण भागात पायाभूत सुविधा व रोजगार संधी वाढल्या असल्या तरी उत्पन्न विषमता वाढली आहे.

**अध्ययनाचे उद्देश:** १. जागतिकीकरणाच्या ग्रामीण विकासावर सकारात्मक प्रभावांचा अभ्यास करणे. २. नकारात्मक प्रभावांचे विश्लेषण करणे, जसे की रोजगार आणि पर्यावरण. ३. भारत आणि इतर देशांच्या उदाहरणांद्वारे प्रभाव समजून घेणे. ४. ग्रामीण विकासासाठी शिफारशी सुचवणे.

**गृहीतकृत्ये:** १. जागतिकीकरण ग्रामीण विकासाला गती देते पण असमानता वाढवते. २. सकारात्मक प्रभाव (जसे की बाजार प्रवेश) नकारात्मक प्रभावांपेक्षा (जसे की बेरोजगारी) जास्त आहेत. ३. स्थानिक धोरणे जागतिकीकरणाच्या नकारात्मक प्रभावांना कमी करू शकतात.

**अध्ययन पद्धती:** हा अभ्यास दुय्यम डेटावर आधारित आहे. साहित्य अभ्यास, अभ्यासपत्रे आणि अहवालांचे विश्लेषण केले गेले. डेटा स्रोतांमध्ये जेटीर, कॉर्नेल आणि फेडरल रिझर्व्ह बँकेच्या प्रकाशनांचा समावेश आहे. गुणात्मक विश्लेषण वापरून सकारात्मक आणि नकारात्मक प्रभावांची तुलना केली. आकडेवारी आणि उदाहरणांचा वापर केला, जसे की भारतातील विदेशी कंपन्या आणि अमेरिकेतील निर्यात.

**तथ्यांचे विश्लेषण:** जागतिकीकरणाच्या ग्रामीण विकासावर सकारात्मक प्रभावांचा सखोल अभ्यास केला असता. यात आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार, निर्यात वाढ, पायाभूत सुविधांचा विकास (जसे की रस्ते, वीज आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी), शिक्षण-आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा आणि ग्रामीण भागातील उत्पन्न वाढ यांचा समावेश आहे. उदाहरणार्थ, भारतात १९९१ नंतरच्या उदारीकरणानंतर कृषी निर्यात १९९०-९१ मध्ये सुमारे ₹६,००० कोटींवरून २०२०-२१ मध्ये ₹३,०५,४६९ कोटींवर पोहोचली आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळाला.

**जागतिकीकरणाच्या नकारात्मक प्रभावांचे विश्लेषण केले असता विशेषतः रोजगार, पर्यावरण आणि सामाजिक असमानता यांच्या संदर्भात.** यात बेरोजगारी वाढ, मजुरी कमी होणे, असंगठित क्षेत्रातील कामगारांचे शोषण, पर्यावरणीय नुकसान

(जसे की अतिउत्खनन, प्रदूषण आणि पाण्याची टंचाई), सांस्कृतिक आणि ग्रामीण-शहरी असमानता वाढ यांचा अभ्यास आहे. अलीकडील अभ्यास दर्शवितात की जागतिकीकरणामुळे ग्रामीण महिलांमध्ये कामगारांचे स्त्रीकरण (feminization of labour) वाढले आहे, पण पारंपरिक असमानता कायम राहिली आहे.

**भारत आणि इतर देशांच्या (जसे की चीन, व्हिएतनाम, आफ्रिका) उदाहरणांद्वारे जागतिकीकरणाचे ग्रामीण विकासावरील प्रभाव समजून घेतला असता,** भारतात सकारात्मक प्रभाव (निर्यात वाढ, FDI द्वारे तंत्रज्ञान) आणि नकारात्मक (लहान शेतकऱ्यांवरील स्पर्धा) दिसतात. चीनमध्ये ग्रामीण भागात औद्योगिकीकरण आणि गरीबी कमी झाली, तर आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेत लहान शेतकऱ्यांना मोठ्या कंपन्यांकडून धोका वाढला. व्हिएतनाममध्ये तांदूळ निर्यात वाढल्याने शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारले.

**ग्रामीण विकासासाठी व्यावहारिक शिफारसी सुचवणे आणि धोरणात्मक सूचना.**यात स्थानिक संस्था मजबूत करणे, टिकाऊ कृषी धोरणे, कौशल्य विकास कार्यक्रम, पर्यावरण संरक्षण नियम आणि समावेशक जागतिकीकरणासाठी सरकारी हस्तक्षेप यांचा समावेश आहे. उदाहरणार्थ, भारतात कृषी मूल्य साखळी मजबूत करणे आणि ग्रामीण महिलांसाठी कौशल्य प्रशिक्षण वाढवणे आवश्यक आहे

देशांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संबंध अधिक दृढ होत जातात. व्यापार, भांडवल, तंत्रज्ञान, माहिती व श्रम यांच्या मुक्त प्रवाहामुळे जागतिक अर्थव्यवस्था अधिक एकात्मिक होत आहे. भारताने १९९१ नंतर स्वीकारलेल्या उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण (LPG) धोरणांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेतही मोठे बदल घडून आले. ग्रामीण विकास हा भारताच्या एकूण विकासाचा कणा मानला जातो कारण देशातील मोठा लोकसंख्या भाग ग्रामीण भागात राहतो. त्यामुळे जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे अत्यंत आवश्यक ठरते.जागतिकीकरणाने ग्रामीण विकासात सकारात्मक बदल घडवले. भारतात, रस्ते आणि वीज सुविधा सुधारल्या, ज्यामुळे शेतकरी शहरी बाजारपेठेत उत्पादने विकू शकतात. शिक्षणात सुधारणा झाली, मुलींची शाळा उपस्थिती वाढली आणि तांत्रिक शिक्षण रोजगार देते. जागतिक बाजारपेठेत प्रवेशामुळे उत्पादन मूल्य वाढते; उदाहरणार्थ, ४६०० विदेशी कंपन्या ग्रामीण बाजारपेठेत सक्रिय आहेत. अमेरिकेत, शेती निर्यात एक तृतीयांश आहे, ज्यामुळे कर आधार मजबूत होतो. मात्र, नकारात्मक प्रभावही आहेत. मजुरी कमी होते, पूर्ण-वेळ रोजगार कमी होतो.पर्यावरणीय नुकसान, जसे की अतिशोषण आणि प्रदूषण, वाढते. सांस्कृतिक क्षरण होते, जसे की पाश्चात्य प्रभाव आणि स्थानिक ज्ञानाचे नुकसान. भारतात, विदेशी पेटंट्स भारतीय वनस्पतींवर दावा करतात. बेरोजगारी वाढते आणि गरीबी स्त्रीकरण होते.

**जागतिकीकरणाचे ग्रामीण विकासावरील परिणाम: तथ्यांचे विश्लेषण, सकारात्मक परिणाम**

**कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला:** जागतिकीकरणामुळे कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढलेला दिसून येतो. उच्च उत्पन्न देणाऱ्या बियाण्यांचा वापर, ठिबक व तुषार सिंचन पद्धती, रासायनिक व जैविक खतांचा समतोल वापर तसेच कृषी यांत्रिकीकरणामुळे उत्पादनक्षमता वाढली आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या सहभागामुळे कृषी संशोधनाला चालना मिळाली असून शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे. परिणामी, काही भागांमध्ये शेती अधिक व्यावसायिक स्वरूपाची बनली आहे.

**ग्रामीण बाजारपेठांचा विस्तार झाला:** जागतिकीकरणामुळे ग्रामीण बाजारपेठा केवळ स्थानिक मर्यादेत न राहता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचल्या आहेत. कृषी मालाच्या विक्रीसाठी खुल्या बाजारपेठा, ई-नाम (e-NAM) सारख्या डिजिटल माध्यमातून वापर तसेच खाजगी व्यापाऱ्यांचा सहभाग वाढल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजार मिळू लागला आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत चलन प्रवाह वाढला असून बाजाराभिमुख शेतीचा विकास झाला आहे.

**ग्रामीण उद्योग व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण झाल्या:** जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात लघु, मध्यम व कुटीर उद्योगांना चालना मिळाली आहे. अन्न प्रक्रिया उद्योग, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, हस्तकला व ग्रामीण पर्यटन यांसारख्या उपक्रमांमुळे स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. स्वयं सहाय्यता गट (SHGs) व सूक्ष्म वित्त संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचा आर्थिक सहभाग वाढला असून ग्रामीण विकासाला गती मिळाली आहे.

**माहिती तंत्रज्ञानामुळे ग्रामीण भाग जागतिक पातळीशी जोडला गेला:** माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे ग्रामीण समाज जागतिक पातळीशी जोडला गेला आहे. मोबाईल फोन, इंटरनेट, डिजिटल सेवा व सामाजिक माध्यमांमुळे शेतकऱ्यांना बाजारभाव, हवामान अंदाज, शासकीय योजना व कृषी सल्ला सहज उपलब्ध होऊ लागला आहे. यामुळे ग्रामीण लोकांमध्ये जागरूकता वाढून निर्णयक्षमता सुधारली आहे.

**जागतिकीकरणाचे ग्रामीण विकासावरील नकारात्मक परिणाम**

**लघु व सीमांत शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले:** जागतिकीकरणामुळे कृषी क्षेत्र जागतिक बाजारपेठेशी जोडले गेले असले तरी त्याचा प्रतिकूल परिणाम लघु व सीमांत शेतकऱ्यांवर अधिक झाला आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेमुळे कृषी मालाच्या किमतीत चढ-उतार होऊ लागले असून उत्पन्नात अस्थिरता निर्माण झाली आहे. अल्प भूधारक शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, महागडी बियाणे व खते परवडत नसल्यामुळे त्यांचे उत्पादन खर्च वाढले आणि नफा कमी झाला. परिणामी, अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

**कृषी उत्पादन खर्च वाढला:**जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आधुनिक कृषी निविष्ठांचा वापर वाढला आहे. सुधारित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, यांत्रिकीकरण आणि सिंचन सुविधा यामुळे उत्पादन वाढले असले तरी त्याचा खर्च लक्षणीयरीत्या वाढलेला आहे. वाढत्या खर्चाच्या तुलनेत उत्पादनांना योग्य भाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच दुर्बल झाली.

**ग्रामीण बेरोजगारी व स्थलांतर वाढले:** जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील पारंपरिक रोजगार संधी कमी झाल्या आहेत. शेतीतील यांत्रिकीकरणामुळे मजुरांची गरज घटली असून ग्रामीण उद्योगांवरही मोठ्या कंपन्यांचा दबाव वाढला आहे. परिणामी, ग्रामीण बेरोजगारी वाढून मोठ्या प्रमाणावर ग्रामीण-शहरी स्थलांतर सुरू झाले आहे. याचा परिणाम शहरांवरील लोकसंख्येच्या ताणात वाढ होण्याच्या स्वरूपात दिसून येतो.

**स्थानिक हस्तकला व कुटीर उद्योगांना फटका बसला:** जागतिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर स्वस्त आणि यांत्रिक पद्धतीने तयार होणाऱ्या वस्तू बाजारात उपलब्ध झाल्या आहेत. यामुळे स्थानिक हस्तकला, कुटीर व पारंपरिक उद्योगांना मोठा फटका बसला आहे. ग्रामीण कारागिरांना त्यांच्या उत्पादनाला बाजार मिळणे कठीण झाले असून अनेक पारंपरिक व्यवसाय नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे ग्रामीण संस्कृती व रोजगाराच्या संधींवरही विपरीत परिणाम झाला आहे.

**गृहीतकृत्ये (सुधारित आणि विस्तारित स्वरूप)** **१.**जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात कृषी निर्यात, तंत्रज्ञानाचा प्रसार आणि पायाभूत सुविधांचा विकास होतो, ज्यामुळे एकूण विकास गतिमान होतो. मात्र, हे फायदे मुख्यतः मोठ्या शेतकरी, व्यावसायिक आणि शहरी-जोडलेल्या ग्रामीण भागांना मिळतात, ज्यामुळे लहान शेतकरी, मजूर आणि मागास भागातील असमानता (income inequality) वाढते. अलीकडील अभ्यास दर्शवतात की आर्थिक जागतिकीकरण (trade openness आणि FDI) विकसनशील देशांमध्ये असमानता वाढवते, विशेषतः ग्रामीण भागात. **२.** जागतिकीकरणाचे सकारात्मक प्रभाव (जसे की जागतिक बाजार प्रवेश, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि उत्पन्न वाढ) नकारात्मक प्रभावांपेक्षा (जसे की बेरोजगारी वाढ, मजुरी कमी होणे आणि पर्यावरणीय नुकसान) जास्त प्रभावी असतात. भारतासारख्या विकसनशील देशात जागतिकीकरणाने कृषी क्षेत्रात निर्यात वाढवली (उदा. तांदूळ आणि कापूस निर्यात) आणि ग्रामीण उत्पन्नात सुधारणा केली आहे, ज्यामुळे एकूण सकारात्मक प्रभाव जास्त दिसतो. मात्र, हे गृहीतकृत्य चाचणीय आहे कारण काही अभ्यास दर्शवतात की नकारात्मक प्रभाव (unemployment आणि wage disparities) विशेषतः लहान शेतकरी आणि असंगठित क्षेत्रात जास्त आहेत, आणि सकारात्मक प्रभाव सर्वत्र समान वितरित होत नाहीत. वर्तमान संशोधनानुसार, सकारात्मक प्रभाव (export-led growth) जास्त असल्याचे दिसते, पण ते असमान असतात. **३.** योग्य स्थानिक आणि राष्ट्रीय धोरणे (जसे की कौशल्य विकास, पर्यावरण संरक्षण नियम आणि समावेशक विकास कार्यक्रम) जागतिकीकरणाच्या नकारात्मक प्रभावांना कमी करू शकतात आणि सकारात्मक प्रभावांना वाढवू शकतात. जागतिकीकरणाच्या जोखमी (inequality, job loss आणि environmental degradation) कमी करण्यासाठी सरकारी हस्तक्षेप, जसे की कृषी मूल्य साखळी मजबूत करणे, ग्रामीण महिलांसाठी कौशल्य प्रशिक्षण, टिकाऊ शेती धोरणे आणि FDI नियमन आवश्यक आहे. अभ्यास दर्शवतात की मजबूत धोरणे (policy interventions) असमानता कमी करतात आणि ग्रामीण विकासाला समतोल बनवतात.

**निष्कर्ष:** **१.** जागतिकीकरण ही एक जटिल प्रक्रिया आहे, जी भारतातील ग्रामीण विकासावर सकारात्मक तसेच नकारात्मक प्रभाव टाकते. १९९१ च्या आर्थिक सुधारणांनंतर जागतिकीकरणाने ग्रामीण अर्थव्यवस्थेला जागतिक बाजारपेठेशी जोडले, ज्यामुळे कृषी निर्यात वाढली, तंत्रज्ञानाचा प्रसार झाला आणि पायाभूत सुविधा (रस्ते, वीज, डिजिटल कनेक्टिव्हिटी) सुधारल्या. उदाहरणार्थ, कृषी निर्यातीत लक्षणीय वाढ झाली असून, ग्रामीण भागात उत्पन्न वाढ, कौशल्य विकास आणि जागतिक मूल्य साखळीमध्ये सहभाग यासारख्या संधी निर्माण झाल्या आहेत. विशेषतः ग्रामीण महिलांसाठी उत्पन्न निर्मिती आणि कौशल्य वृद्धीच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत, ज्यामुळे जीवनमानात सुधारणा दिसते.मात्र, हे फायदे असमान रीतीने वितरित झाले आहेत. **२.** जागतिकीकरणामुळे आर्थिक आणि सामाजिक असमानता वाढली आहे; मोठ्या शेतकरी आणि व्यावसायिकांना जास्त लाभ मिळाला, तर लहान शेतकरी, मजूर आणि मागास ग्रामीण भागातील लोकांना स्पर्धा, कमी मजुरी, बेरोजगारी आणि भाग-वेळ रोजगार यांसारख्या आव्हानांना सामोरे जावे लागले. पर्यावरणीय नुकसान (अतिउत्खनन, प्रदूषण, पाण्याची टंचाई), सांस्कृतिक क्षरण आणि पारंपरिक ज्ञानाचे नुकसान हे प्रमुख नकारात्मक प्रभाव आहेत. अलीकडील अभ्यास (२०२०-२०२५) दर्शवतात की आर्थिक जागतिकीकरण असमानता कमी करू शकते, पण सामाजिक आणि राजकीय जागतिकीकरणाने ती वाढवली आहे. ग्रामीण महिलांमध्ये कामगारांचे स्त्रीकरण (feminization of labour) वाढले असून, पारंपरिक लिंग आणि जाती आधारित असमानता कायम राहिली आहे. **३.** एकूणच, जागतिकीकरण ग्रामीण विकासासाठी संधींचा दरवाजा उघडते, पण त्याची जोखीम आणि असमानता वाढवते. कारण फायदे मुख्यतः निवडक गटांना मिळतात. योग्य स्थानिक आणि राष्ट्रीय धोरणे (कौशल्य विकास, टिकाऊ कृषी, पर्यावरण संरक्षण नियम, समावेशक कार्यक्रम आणि कृषी मूल्य साखळी मजबूत करणे) या नकारात्मक प्रभावांना कमी करू शकतात आणि सकारात्मक प्रभावांना सर्वसमावेशक बनवू शकतात. **४.** शेवटी, जागतिकीकरण हे टाळता येणारे नाही, पण ते नियंत्रित आणि समतोल रीतीने स्वीकारणे आवश्यक आहे. भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण विकासासाठी जागतिकीकरणाला टिकाऊ, समावेशक आणि मानवी केंद्रित बनवणे हे भविष्यातील प्रमुख आव्हान आहे. यासाठी सरकारी हस्तक्षेप, स्थानिक संस्थांचे सशक्तीकरण आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा योग्य वापर आवश्यक आहे, जेणेकरून ग्रामीण भारत खऱ्या अर्थाने जागतिक विकासाचा भाग बनेल आणि कोणीही मागे राहणार नाही.

**शिफारशी: १. स्थानिक संस्थांना मजबूत करणे आणि ICT वापर वाढविणे.**ग्रामीण विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, स्वयं सहाय्यता गट आणि शेतकरी उत्पादक संघटनांना (FPOs) अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. या संस्थांमार्फत निर्णयप्रक्रियेत स्थानिक सहभाग वाढवता येईल. तसेच माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा (ICT) प्रभावी वापर करून शेतकऱ्यांना बाजारभाव, हवामान अंदाज, कृषी सल्ला व शासकीय योजनांची माहिती सहज उपलब्ध करून देता येईल. डिजिटल साक्षरता वाढवल्यास ग्रामीण समाज अधिक सक्षम व आत्मनिर्भर बनेल.**२. टिकाऊ शेतीसाठी धोरणे लागू करणे.**जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर कृषी विकास टिकाऊ असणे अत्यंत आवश्यक आहे. सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती, पाण्याचा

कार्यक्षम वापर, मृदा संवर्धन आणि जैवविविधतेचे संरक्षण यांसाठी प्रभावी धोरणे राबवावीत. उत्पादनवाढीबरोबरच पर्यावरणीय संतुलन राखणारी शेती पद्धती स्वीकारल्यास दीर्घकालीन ग्रामीण विकास साध्य होऊ शकतो. **३. शिक्षण आणि रोजगार कार्यक्रम वाढवणे.** ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था अधिक दर्जेदार आणि रोजगाराभिमुख करणे गरजेचे आहे. कौशल्य विकास प्रशिक्षण, व्यावसायिक शिक्षण, डिजिटल कौशल्ये आणि उद्योजकता विकास कार्यक्रम वाढवल्यास ग्रामीण युवकांसाठी स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील. यामुळे ग्रामीण बेरोजगारी व शहरांकडे होणारे स्थलांतर कमी करता येईल. **४. पर्यावरण संरक्षणासाठी नियम कडक करणे.** जागतिकीकरणामुळे वाढलेल्या औद्योगिक व कृषी क्रियांमुळे पर्यावरणावर ताण वाढलेला आहे. त्यामुळे जलस्रोतांचे संरक्षण, मृदा प्रदूषण रोखणे, रासायनिक खतांचा मर्यादित वापर आणि जैवविविधतेचे संवर्धन यासाठी कडक नियमांची अंमलबजावणी आवश्यक आहे. पर्यावरणपूरक विकास धोरणे स्वीकारल्यास ग्रामीण भागात शाश्वत विकास साध्य करता येईल.

**संदर्भ:**


1. Merrill, Mary. *Impact of Globalization on Rural Communities: Social and Economic Impacts*. Cornell University, 2006.
2. "Impact of Globalization on Rural Communities: Social and Economic Impacts." *Cornell University eCommons*, ecommons.cornell.edu/bitstream/handle/1813/3951/Merrill_USAIN2006SI-RI.pdf. Accessed day month year.
3. Palaniturai, G., and Ramesh R. *Globalization and Rural Development*. Concept Publishing Company, 2010.
4. Rahaman, M. M. *Impact of Globalization on Rural Development*. 2013.
5. Reardon, Thomas, and C. Peter Timmer. "Transformation of Agri-Food Systems." *Globalization and Rural Development*, 2005.
6. Sahai, Suman. "India's Plant Variety Protection and Farmers' Rights Legislation." *Global Intellectual Property Rights*, 2002.
7. Scharmer, Otto. *Presencing: Learning from the Future as It Emerges*. Helsinki School of Economics, 2000.
8. Sen, Amartya. *Development as Freedom*. Oxford University Press, 2012.
9. Sharma, Ramesh. *Globalization and Rural Development in India*. Academic Press, 2010.
10. Shaikh, Z. "Impact of Globalization on Social and Cultural Values in India." n.d.
11. Tan, B. S. "The Consequences of Innovation." *Innovation Journal*, vol. 9, no. 3, 2004.
12. World Bank. *World Development Report*. World Bank, 2018.


# शेतीपलीकडील उपजीविका: नव-उदार धोरणे, जोडधंदे आणि ग्रामीण तरुणांचे संरचनात्मक संकट


**नागेश शेळके** समाजशास्त्र विभाग, न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज,अहिल्यानगर

**अनिल जायभाये** सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर, लातूर



**सारांश:** या लेखात जागतिकीकरण आणि नव-उदार आर्थिक धोरणांच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भारतातील तरुणांच्या उपजीविकेतील संरचनात्मक संकटाचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात आला आहे. पारंपरिक शेतीतील वाढता उत्पादन खर्च, अस्थिर बाजारभाव, नैसर्गिक अनिश्चितता आणि राज्यसंरक्षणाचा अभाव यांमुळे शेती ही ग्रामीण कुटुंबांसाठी सुरक्षित उपजीविकेचे साधन राहिलेले नाही. परिणामी ग्रामीण तरुण शेतीपलीकडील दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, डेअरी आणि लघुउद्योग अशा जोडधंद्यांकडे वळताना दिसतात. नव-उदार धोरणांमध्ये 'स्वयंरोजगार' व 'उद्योजकता' म्हणून गौरवले जाणारे हे जोडधंदे प्रत्यक्षात ग्रामीण तरुणांना आर्थिक स्थैर्य देण्यात अपयशी ठरत असल्याचे या लेखातून स्पष्ट होते. Karl Polanyi यांच्या बाजारविस्थापन संकल्पनेच्या आधारे शेतीच्या बाजारीकरणामुळे निर्माण झालेली असुरक्षितता विशद केली आहे. Henry Bernstein यांच्या *petty commodity producers* या संकल्पनेद्वारे जोडधंद्यांमध्ये अडकलेल्या ग्रामीण तरुणांची भांडवली व्यवस्थेतील मर्यादित व अस्थिर स्थिती उलगडली आहे. Surinder Jodhka यांच्या अभ्यासाच्या आधारे शेतीची घसरलेली सामाजिक प्रतिष्ठा आणि नोकरी-केंद्रित आकांक्षांचे राजकारण विश्लेषित केले आहे. तसेच Satish Deshpande यांच्या वर्ग व जातीय असमानतेच्या चौकटीतून नव-उदार 'उद्योजकता' संकल्पनेतील असमान संधींचे वास्तव मांडले आहे. ग्रामीण तरुणांचे जोडधंद्यांतील अपयश हे वैयक्तिक अकार्यक्षमतेचे द्योतक नसून, नव-उदार धोरणांनी निर्माण केलेल्या कर्जव्यवस्था, बाजाराधारित जोखीम, सामाजिक अवमान आणि संस्थात्मक संरक्षणाच्या अभावाचे परिणाम आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या चर्चेत तरुणांचे प्रत्यक्ष अनुभव, कर्जसंकट, सामाजिक प्रतिष्ठा आणि मानसिक आरोग्य यांना केंद्रस्थानी ठेवणे ही काळाची गरज असल्याचे हा लेख अधोरेखित करतो.



**Keywords:** ग्रामीण अर्थव्यवस्था, जागतिकीकरण, नव-उदार धोरणे, जोडधंदे, कर्जबाजारीपणा, सामाजिक प्रतिष्ठा


ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणजे केवळ शेतीवर आधारित उपजीविका असे सरळ आणि एकरेषीय समीकरण मानणे आजच्या बदलत्या सामाजिक-आर्थिक वास्तवाशी विसंगत ठरत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात दीर्घकाळ शेती ही ग्रामीण समाजाच्या उपजीविकेचा, सामाजिक संरचनेचा आणि सांस्कृतिक ओळखीचा केंद्रबिंदू राहिली. मात्र गेल्या तीन दशकांत, विशेषतः १९९१ नंतर स्वीकारलेल्या जागतिकीकरण, खासगीकरण आणि उदारीकरणाच्या नव्या आर्थिक धोरणांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरूप मूलतः बदलले आहे. आज ग्रामीण उपजीविका ही बहुआयामी, अस्थिर आणि मोठ्या प्रमाणावर बाजारावर अवलंबून झालेली दिसते.

शेतीतील वाढता उत्पादन खर्च—जसे की बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, सिंचन, मजुरी—यामुळे शेतीचा आर्थिक भार लक्षणीयरीत्या वाढलेला आहे. त्याचवेळी शेतमालाच्या किमती मात्र स्थिर किंवा हमीभावाच्या संरक्षणाखाली न राहता खुल्या बाजाराच्या चढ-उतारांवर अवलंबून राहिल्या आहेत. यासोबतच हवामान बदल, पावसाची अनियमितता, दुष्काळ, अतिवृष्टी

यांसारख्या नैसर्गिक अनिश्चिततेमुळे शेती अधिक जोखमीची बनली आहे. या सर्व घटकांमुळे ग्रामीण कुटुंबांसाठी शेती ही सुरक्षित व शाश्वत उपजीविकेचे साधन राहिलेली नाही. या पार्श्वभूमीवर ग्रामीण कुटुंबे आणि विशेषतः तरुण पिढी शेतीवर पूर्णतः अवलंबून राहण्याऐवजी विविध पर्यायी मार्ग शोधताना दिसतात. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, डेअरी व्यवसाय, लघुउद्योग, किराणा दुकाने, वाहतूक सेवा अशा विविध जोडधंद्यांचा स्वीकार हा या बदलत्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनलेला आहे. धोरणात्मक पातळीवरही या जोडधंद्यांकडे ग्रामीण विकास, स्वयंरोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाचे साधन म्हणून पाहिले जाते. त्यामुळे जोडधंदे हे ग्रामीण संकटांवरील उत्तर म्हणून मांडले जातात. मात्र प्रत्यक्ष वास्तवात हे जोडधंदे ग्रामीण तरुणांना अपेक्षित आर्थिक स्थैर्य देताना अपयशी ठरत असल्याचे अनेक अभ्यास आणि अनुभवांतून स्पष्ट होते. बहुतेक जोडधंदे भांडवलप्रधान, बाजारावर अवलंबून आणि शासकीय संरक्षणापासून वंचित आहेत. वाढता खर्च, अस्थिर दर, कर्जावर आधारित गुंतवणूक आणि सामाजिक मान्यतेचा अभाव यांमुळे जोडधंदे उत्पन्ननिर्मितीपेक्षा कर्जनिर्मितीचे साधन बनतात. परिणामी ग्रामीण तरुण आर्थिक, सामाजिक आणि मानसिक असुरक्षिततेच्या गर्तेत अडकतो. या संदर्भात ग्रामीण तरुणांचे जोडधंद्यांतील अपयश हे वैयक्तिक अकार्यक्षमता किंवा चिकाटीच्या अभावाचे परिणाम नसून, बदलत्या आर्थिक धोरणांनी आणि बाजाराधिष्ठित विकास मॉडेलने निर्माण केलेल्या संरचनात्मक मर्यादांचे परिणाम म्हणून पाहणे आवश्यक ठरते. प्रस्तुत अभ्यास ग्रामीण महाराष्ट्रातील या बदलत्या वास्तवाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मागोवा घेतो आणि जोडधंद्यांच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या नव्या समस्या, कर्जसंकट आणि तरुणांच्या अस्थिर जीवनस्थितीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो.

**जागतिकीकरण आणि शेतीचे बाजारीकरण:** Karl Polanyi (1944) यांनी *The Great Transformation* या ग्रंथात मांडलेली "बाजाराचे समाजापासून विलगीकरण (disembedding of the market)" ही संकल्पना भारतीय शेतीच्या सध्याच्या स्थितीचे आकलन करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. Polanyi यांच्या मते, जेव्हा बाजारव्यवस्था समाजाच्या नैतिक, सांस्कृतिक आणि सामाजिक चौकटींपासून स्वतंत्रपणे कार्य करू लागते, तेव्हा ती आर्थिक प्रगतीऐवजी सामाजिक अस्थिरता, विषमता आणि असुरक्षितता निर्माण करते. भारतीय शेतीच्या संदर्भात जागतिकीकरणानंतर नेमकी हीच प्रक्रिया घडताना दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शेतीवर राज्याचे नियंत्रण आणि संरक्षणात्मक धोरणांचे वर्चस्व होते. हमीभाव, अनुदाने, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि शासकीय खरेदी या माध्यमातून शेतीला सामाजिक उपजीविकेचे साधन म्हणून पाहिले जात होते. मात्र १९९१ नंतर स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणांमुळे शेती हळूहळू बाजाराच्या तर्कावर आधारित बनली. जागतिकीकरणामुळे भारतीय शेती थेट राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजाराशी जोडली गेली. परिणामी शेतमालाच्या किमती जागतिक मागणी—पुरवठा, निर्यात—आयात धोरणे आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हस्तक्षेपावर अवलंबून राहिल्या. या प्रक्रियेत शेती ही केवळ उत्पादनाची क्रिया न राहता 'माल' (commodity) बनली. Polanyi यांनी सांगितलेल्या *"fictitious commodities"*—जमीन, श्रम आणि पैसा—यांच्या संकल्पनेनुसार शेतीतील जमीन आणि श्रम हे बाजाराच्या तर्कात ओढले गेले. मात्र बाजारातील जोखीम पूर्णपणे शेतकऱ्याच्या माथी आली. उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत असताना (बियाणे, खते, औषधे, सिंचन, मजुरी), शेतमालाच्या किमती मात्र अनिश्चित राहिल्या. यामुळे शेती ही उत्पन्नाचे सुरक्षित साधन न राहता उच्च जोखमीची उपजीविका बनली.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात ही प्रक्रिया अधिक तीव्रतेने अनुभवास येते. कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त, पाण्याची असमान उपलब्धता आणि बाजारापर्यंत पोहोचण्यातील अडचणी यांमुळे शेतकरी अधिक असुरक्षित स्थितीत आहेत. जागतिकीकरणानंतर कापूस, कांदा, ऊस, सोयाबीन यांसारख्या नगदी पिकांवर भर वाढला. मात्र या पिकांचे दर जागतिक बाजाराशी जोडले गेल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी अस्थिरता निर्माण झाली. एकाच हंगामात भाव कोसळणे किंवा निर्यातबंदी लागू होणे हे प्रकार शेतकऱ्यांसाठी आर्थिक धक्का ठरतात. Polanyi यांच्या *double movement* या संकल्पनेनुसार बाजाराच्या अमर्याद विस्ताराला समाजाकडून प्रतिकार अपेक्षित असतो. मात्र भारतीय शेतीच्या बाबतीत हा सामाजिक संरक्षणाचा प्रतिकार कमकुवत ठरलेला दिसतो. राज्याने शेतीपासून माघार घेतल्यामुळे बाजाराच्या दडपणापासून शेतकऱ्यांचे संरक्षण करणारी यंत्रणा दुर्बल झाली आहे. परिणामी शेतकरी आणि ग्रामीण तरुण स्वतःच्या पातळीवर संकटांचा सामना करण्यास भाग पडतात. या परिस्थितीत शेती ही केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक संकटाचे केंद्र बनते. शेतीवर अवलंबून असलेल्या ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न अनिश्चित होते, कर्जाचे प्रमाण वाढते आणि सामाजिक प्रतिष्ठा ढासळते. शेतीला पूरक म्हणून स्वीकारलेले जोडधंदेही बाजाराच्या त्याच तर्कावर चालत असल्यामुळे तेही अस्थिर ठरतात. अशा प्रकारे जागतिकीकरण आणि शेतीचे बाजारीकरण ग्रामीण समाजातील असमानता, कर्जबाजारीपणा आणि मानसिक तणाव वाढवणारी प्रक्रिया ठरते. Polanyi यांच्या विश्लेषणाच्या आधारे असे म्हणता येते की भारतीय शेतीचे बाजारीकरण हे केवळ आर्थिक परिवर्तन नसून सामाजिक संबंधांचे, उपजीविकेच्या सुरक्षिततेचे आणि ग्रामीण जीवनाच्या स्थैर्याचे पुनर्रचना करणारे परिवर्तन आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण तरुण या परिवर्तनाचे सर्वाधिक असुरक्षित घटक ठरत असून, त्यांच्या जीवनातील अस्थिरता ही जागतिकीकरणाच्या संरचनात्मक परिणामांचीच अभिव्यक्ती आहे.

**जोडधंदे: नव-उदार व्यवस्थेतील भ्रामक पर्याय:** नव-उदार आर्थिक व्यवस्थेत ग्रामीण विकासाच्या चर्चेत 'जोडधंदे', 'स्वयंरोजगार' आणि 'उद्योजकता' या संकल्पनांना मध्यवर्ती स्थान दिले जाते. राज्याच्या कल्याणकारी जबाबदाऱ्या कमी होत असताना, ग्रामीण दारिद्र्य, बेरोजगारी आणि शेतीतील संकटांवरील उपाय म्हणून जोडधंद्यांचे सादरीकरण केले जाते. मात्र या धोरणात्मक मांडणीमागील गृहितक असे आहे की बाजारात प्रवेश मिळाल्यास ग्रामीण तरुण आपोआप उद्योजक बनतील आणि आर्थिक स्वावलंबन साध्य करतील. Henry Bernstein (2010) यांच्या कृषी राजकीय अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहता, ही मांडणी अत्यंत भ्रामक ठरते. Bernstein यांच्या मते नव-उदार भांडवली व्यवस्थेत छोटे उत्पादक *petty commodity producers* म्हणून कार्य करतात. म्हणजेच ते स्वतःचे श्रम आणि साधने वापरून उत्पादन करतात, परंतु बाजारावर त्यांचे कोणतेही नियंत्रण नसते. उत्पादनाचा धोका पूर्णपणे

उत्पादकावर असतो, मात्र किमती, पुरवठा साखळी आणि नफा भांडवलशाही यंत्रणेद्वारे ठरवले जातात. ग्रामीण जोडधंद्यांची स्थिती नेमकी याच चौकटीत बसते. दुग्धव्यवसायाचे उदाहरण घेतल्यास, नामदेव रसाळ यांच्या अनुभवातून हे स्पष्ट होते की दुग्धव्यवसाय हा 'स्वयंरोजगार' म्हणून जरी सादर केला जात असला, तरी प्रत्यक्षात तो अत्यंत खर्चिक आणि जोखमीचा व्यवसाय आहे. चारा, औषधे, जनावरांची निगा, कामगार, दूध वाहतूक, गोठा बांधणी अशा सर्व बाबींवरील खर्च सातत्याने वाढत जातो. मात्र दुधाचा दर शेतकरी किंवा दुग्ध उत्पादक ठरवू शकत नाही. डेअरी संघ, खासगी कंपन्या किंवा बाजारातील मध्यस्थ यांच्याकडून दर निश्चित होतो. परिणामी उत्पादन खर्च आणि विक्री दर यांमध्ये वाढती दरी निर्माण होते. Bernstein यांच्या *"squeeze on petty producers"* या संकल्पनेनुसार, छोटे उत्पादक उत्पादन खर्च वाढत असतानाही बाजारातील स्पर्धेमुळे दर वाढवू शकत नाहीत. ही 'squeeze' जोडधंद्यांच्या बाबतीत अधिक तीव्रतेने दिसते. त्यामुळे जोडधंदे उत्पन्न वाढवण्याऐवजी कर्जावर आधारित उपजीविकेचे साधन बनतात. दुग्धव्यवसाय सुरू करण्यासाठी घेतलेले कर्ज, जनावरांची खरेदी, गोठा बांधणी, वाहतुकीसाठी वाहन, चारा साठवण—या सर्वांसाठी कर्जाची गरज भासते. व्यवसाय स्थिर होण्याआधीच कर्जाचा डोंगर वाढत जातो. नव-उदार व्यवस्थेतील 'उद्योजकता' ही संकल्पना व्यक्तीवर जबाबदारी ढकलणारी आहे. व्यवसाय अपयशी ठरला, तर त्याचे कारण संरचनात्मक मर्यादा नसून व्यक्तीची अकार्यक्षमता असल्याचा अर्थ लावला जातो. परिणामी ग्रामीण तरुणांचे अपयश वैयक्तिक पातळीवर दोषारोपाच्या चौकटीत अडकते. ही प्रक्रिया समाजशास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाची आहे, कारण ती राज्याच्या अपयशाला झाकते आणि बाजाराला नैसर्गिक व अपरिहार्य मानते. यासोबतच जोडधंद्यांना सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव असल्यामुळे हे व्यवसाय केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिकदृष्ट्याही अस्थिर ठरतात. ग्रामीण समाजात 'नोकरी' आणि 'शेती' यांच्यातील प्रतिष्ठेच्या श्रेणीकरणात जोडधंदे पूरक, दुय्यम आणि तात्पुरते मानले जातात. त्यामुळे जोडधंद्यातील उत्पन्न अस्थिर असल्यास विवाह, सामाजिक मान्यता आणि दीर्घकालीन नियोजन यांवर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. अशा प्रकारे नव-उदार धोरणांतर्गत जोडधंदे हे ग्रामीण तरुणांसाठी मुक्तीचा मार्ग न ठरता आर्थिक आणि मानसिक सापळा बनतात. हे अपयश वैयक्तिक नसून संरचनात्मक आहे. Bernstein यांच्या मते, जोपर्यंत उत्पादनाचे साधन, बाजार आणि किंमतनिर्धारण यांवर उत्पादकांचे नियंत्रण प्रस्थापित होत नाही, तोपर्यंत 'स्वयंरोजगार' ही संकल्पना भांडवली व्यवस्थेतील असमानतेला अधिकच तीव्र करते. एकूणच, ग्रामीण महाराष्ट्रातील जोडधंद्यांचा अनुभव हा नव-उदार विकास मॉडेलच्या मर्यादा स्पष्ट करणारा आहे. जोडधंद्यांना पर्याय म्हणून मांडण्याऐवजी, शेती व ग्रामीण उपजीविकेला संरचनात्मक संरक्षण देणे आणि बाजाराच्या असमान तर्काला आवर घालणे हीच दीर्घकालीन सामाजिक न्यायाची दिशा ठरू शकते.

**कर्जव्यवस्था आणि पतसंस्थांचे वर्चस्व:** १९९१ नंतर स्वीकारलेल्या नव-उदार आर्थिक धोरणांमुळे ग्रामीण भारतातील वित्तीय व्यवस्थेचे स्वरूप लक्षणीयरीत्या बदलले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राज्याने स्वीकारलेली कल्याणकारी भूमिका—ज्यात राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून शेती व ग्रामीण उपजीविकेला कर्जपुरवठा केला जात होता—हळूहळू संकुचित होत गेली. नव-उदार धोरणांतर्गत राज्याने थेट हस्तक्षेप कमी करून बाजाराधिष्ठित वित्तीय शिस्तीवर भर दिला. परिणामी ग्रामीण भागात औपचारिक बँकिंग व्यवस्थेपर्यंत पोहोच अधिक किचकट आणि मर्यादित झाली. राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज मिळवण्यासाठी शेतजमीन नावावर असणे, सातबारा स्वच्छ असणे, जुनी थकबाकी नसणे, तसेच विविध कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक ठरते. ग्रामीण समाजातील अनेक तरुण संयुक्त कुटुंबपद्धतीत राहतात, जिथे जमीन वडीलधाऱ्यांच्या नावावर असते किंवा खातेफोड झालेली नसते. अशा परिस्थितीत हे तरुण औपचारिक बँकिंग व्यवस्थेच्या बाहेर ढकलले जातात. परिणामी त्यांच्या समोर भांडवल उभारणीसाठी खाजगी पतसंस्था, सहकारी पतसंस्था किंवा सावकारी हेच व्यवहार्य पर्याय उरतात. खाजगी पतसंस्थांचे वर्चस्व हे नव-उदार व्यवस्थेतील राज्याच्या माघारीचे थेट परिणाम म्हणून पाहता येते. या संस्था कर्ज देताना कागदपत्रांची अट कमी ठेवतात, कर्ज तत्काळ उपलब्ध करून देतात आणि जमीन नावावर नसली तरी तारण स्वीकारतात. त्यामुळे शेती, जोडधंदे, घरबांधणी, लग्न किंवा नोकरीसाठी लागणारा खर्च भागवण्यासाठी ग्रामीण तरुण या संस्थांकडे आकर्षित होतात. मात्र या सुलभतेमागे दडलेली जोखीम म्हणजे अत्यंत उच्च व्याजदर आणि कठोर परतफेडीच्या अटी. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही कर्जव्यवस्था केवळ आर्थिक व्यवहार नसून सामाजिक नियंत्रणाची आणि शोषणाची प्रक्रिया ठरते. कर्ज घेताना ग्रामीण तरुणांना तात्काळ दिलासा मिळतो, मात्र दीर्घकालीन दृष्टीने हे कर्ज त्यांच्या सामाजिक व आर्थिक आयुष्यावर गहिरा परिणाम करते. कर्ज फेडण्यासाठी शेती व जोडधंद्यांमधून येणारे अस्थिर उत्पन्न अपुरे पडते. परिणामी हप्ते थकतात, व्याज वाढत जाते आणि कर्जाचा डोंगर निर्माण होतो. या प्रक्रियेचा सर्वात गंभीर परिणाम म्हणजे वाडीलोपार्जित जमिनीची जप्ती. जमीन ही केवळ उत्पादनाचे साधन नसून ग्रामीण समाजात ती प्रतिष्ठा, ओळख आणि सुरक्षिततेचे प्रतीक आहे. जमिनीवर जप्ती येणे म्हणजे केवळ आर्थिक नुकसान नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाच्या सामाजिक अस्तित्वावर आघात होणे होय. जमीन गमावल्यामुळे कुटुंबाची आर्थिक स्वायत्तता नष्ट होते, पिढ्यान्-पिढ्यांची उपजीविकेची व्यवस्था कोलमडते आणि सामाजिक अपमानाची भावना तीव्र होते. या कर्जसंकटाचा मानसिक परिणामही तितकाच गंभीर आहे. सतत कर्जफेडीचा ताण, पतसंस्थांचा दबाव, सामाजिक नजरेतून होणारे अवमूल्यन आणि भविष्यातील अनिश्चितता यांमुळे ग्रामीण तरुण मानसिकदृष्ट्या खचतात. चिंता, नैराश्य आणि आत्मगौरवाचा ऱ्हास ही या प्रक्रियेची महत्त्वाची लक्षणे ठरतात. अनेक वेळा या मानसिक तणावामुळे कुटुंबातील संबंध बिघडतात, पिढ्यांमधील संघर्ष वाढतो आणि संपूर्ण कुटुंब विस्कळीत होते. एकूणच, कर्जव्यवस्था आणि पतसंस्थांचे वाढते वर्चस्व हे नव-उदार विकास मॉडेलमधील संरचनात्मक अपयश अधोरेखित करते. राज्याच्या संरक्षणाशिवाय बाजाराधारित वित्तीय व्यवस्था ग्रामीण समाजासाठी मुक्तीचा नव्हे तर असुरक्षिततेचा मार्ग ठरते. त्यामुळे ग्रामीण कर्जसंकटाकडे वैयक्तिक अपयश म्हणून नव्हे, तर सामाजिक-आर्थिक धोरणांनी निर्माण केलेल्या संरचनात्मक अन्याय म्हणून पाहणे आवश्यक ठरते.

**ग्रामीण तरुण, नोकरी आणि प्रतिष्ठेचे राजकारण:** ग्रामीण भारतातील सामाजिक संरचनेत गेल्या काही दशकांत मोठे परिवर्तन झाले आहे. Surinder Jodhka (2012) यांच्या मते, जागतिकीकरण आणि नव-उदार आर्थिक धोरणांनंतर ग्रामीण समाजात शेतीची सामाजिक प्रतिष्ठा सातत्याने घसरत चालली आहे. पूर्वी शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नव्हे तर सामाजिक ओळख, सन्मान आणि स्वायत्ततेचे प्रतीक मानली जात होती. मात्र बाजाराधिष्ठित विकास मॉडेलमुळे शेती ही अस्थिर, जोखमीची आणि कमी प्रतिष्ठेची क्रिया म्हणून पाहिली जाऊ लागली आहे. या बदलत्या मूल्यव्यवस्थेत 'नोकरी'—विशेषतः सरकारी नोकरी—ही सुरक्षितता, स्थैर्य आणि सामाजिक सन्मानाचे प्रमुख प्रतीक बनली आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण तरुण मोठ्या प्रमाणावर स्पर्धा परीक्षांकडे वळताना दिसतात. एमपीएससी, पोलीस भरती, शिक्षक, लिपिकीय सेवा यांसारख्या नोकऱ्या केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक उन्नतीचे साधन मानल्या जातात. ग्रामीण कुटुंबांमध्येही तरुणांनी 'शेतकरी' न राहता 'नोकरीवाला' व्हावे, हीच अपेक्षा प्रबळ होताना दिसते. परिणामी शेती किंवा जोडधंदे हे तात्पुरते किंवा अपयशानंतरचे पर्याय म्हणून पाहिले जातात. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहता, ही प्रक्रिया *aspirational restructuring* दर्शवते—जिथे तरुणांच्या आकांक्षा त्यांच्या वास्तवाशी विसंगत ठरतात. दशकानुदशके स्पर्धा परीक्षांची तयारी करूनही नोकरी न मिळाल्यास ग्रामीण तरुण अस्वस्थतेला सामोरे जातात. ही अस्वस्थता केवळ बेरोजगारीमुळे नसून, सामाजिक मान्यता न मिळण्याच्या भावनेतून निर्माण होते. 'नोकरी नाही' म्हणजे 'प्रतिष्ठा नाही' असा सरळ अर्थ लावला जातो. त्यामुळे तरुणांचे आत्ममूल्य नोकरीशी घट्टपणे जोडले जाते. या परिस्थितीत शेती किंवा जोडधंद्याकडे परतणे हे सामाजिकदृष्ट्या अपयश म्हणून पाहिले जाते. शहरात राहून, क्लास लावून, पार्ट-टाईम काम करूनही नोकरी न मिळाल्यावर गावाकडे परतणारा तरुण स्वतःला आणि समाजालाही 'पराभूत' वाटतो. परिणामी शेती ही निवडीची नव्हे तर मजबुरीची उपजीविका बनते. ही भावना ग्रामीण समाजातील पिढ्यांमधील तणाव वाढवते. वडीलधाऱ्यांसाठी शेती ही अजूनही प्रतिष्ठेची बाब असते, तर तरुणांसाठी ती अपयशाची आठवण ठरते. या प्रतिष्ठेच्या राजकारणात जात, वर्ग आणि शिक्षण यांचाही महत्त्वाचा वाटा आहे. उच्च शिक्षण घेतलेल्या ग्रामीण तरुणांसाठी शेती किंवा जोडधंदे अधिकच अवमूल्यित ठरतात. पदवी, पदव्युत्तर किंवा पीएच.डी. शिक्षण घेतल्यानंतर शेती करणे हे 'शिक्षणाचा अपमान' म्हणून पाहिले जाते. परिणामी शिक्षणाने सामाजिक गतिशीलता देण्याऐवजी अनेक वेळा निराशा आणि विस्थापन निर्माण केलेले दिसते.या प्रक्रियेचा मानसिक परिणामही गंभीर आहे. नोकरी न मिळाल्यामुळे तरुणांमध्ये नैराश्य, चिंता आणि आत्ममूल्याचा ऱ्हास दिसून येतो. सततच्या अपयशामुळे स्वतःकडे अपयशी म्हणून पाहण्याची प्रवृत्ती वाढते. समाज आणि कुटुंबाकडून येणारा अप्रत्यक्ष दबाव या मानसिक ताणाला अधिक तीव्र करतो. काही वेळा या अस्वस्थतेचे रूप आक्रमकता, स्थलांतर किंवा सामाजिक अलिप्तता अशा स्वरूपात प्रकट होते.एकूणच, ग्रामीण तरुण, नोकरी आणि प्रतिष्ठेचे राजकारण हे केवळ रोजगाराच्या प्रश्नापुरते मर्यादित नसून, ते ग्रामीण समाजातील बदलत्या मूल्यव्यवस्थेचे प्रतिबिंब आहे. Jodhka यांच्या विश्लेषणाच्या आधारे असे म्हणता येते की शेतीची प्रतिष्ठा घसरत असताना नोकरी ही नव्या सामाजिक ओळखीचे केंद्र बनली आहे. मात्र मर्यादित नोकऱ्या आणि वाढत्या आकांक्षा यांतील तणाव ग्रामीण तरुणांना अस्थिरतेच्या आणि मानसिक खच्चीकरणाच्या दिशेने ढकलत आहे. या प्रश्नाकडे केवळ रोजगारनिर्मितीच्या चौकटीतून नव्हे, तर सामाजिक प्रतिष्ठा, ओळख आणि आत्ममूल्य यांच्या व्यापक समाजशास्त्रीय संदर्भातून पाहणे आवश्यक ठरते.

**जात, वर्ग, लिंगभाव आणि असमान संधी:** भारतीय समाजातील असमानतेचे स्वरूप समजून घेताना केवळ आर्थिक निकष पुरेसे ठरत नाहीत. Satish Deshpande (2003) यांच्या मते, भारतातील सामाजिक विषमता ही बहुआयामी असून ती वर्ग, जात, शिक्षण, सांस्कृतिक भांडवल आणि सामाजिक नेटवर्क यांच्यातील परस्परसंबंधांतून निर्माण होते. नव-उदार आर्थिक धोरणांमध्ये 'सर्वांसाठी संधी' आणि 'उद्योजकता' या संकल्पना सार्वत्रिक स्वरूपात मांडल्या जात असल्या, तरी प्रत्यक्षात या संधी सर्व सामाजिक गटांसाठी समान नसतात. ग्रामीण तरुणांच्या संदर्भात ही असमानता अधिक तीव्रतेने प्रकट होते. नव-उदार व्यवस्थेतील 'उद्योजक व्हा' ही घोषणा व्यक्तीच्या क्षमतेवर आणि प्रयत्नांवर भर देणारी आहे. मात्र Deshpande यांच्या विश्लेषणानुसार, व्यक्तीची क्षमता ही सामाजिक संरचनेपासून स्वतंत्र नसते. ग्रामीण तरुणांकडे आर्थिक भांडवल मर्यादित असतेच, परंतु त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे त्यांच्याकडे सामाजिक आणि सांस्कृतिक भांडवलाची कमतरता असते. व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती, संपर्क, विश्वासार्हता आणि बाजाराशी जोडणारी साखळी या सर्व गोष्टी समाजातील विशिष्ट वर्ग आणि जातीय गटांकडेच अधिक प्रमाणात उपलब्ध असतात. जात ही ग्रामीण समाजातील संधी-वाटपाची महत्त्वाची यंत्रणा राहिली आहे. उच्च जातीय किंवा प्रस्थापित सामाजिक गटांकडे पारंपरिकपणे जमीन, भांडवल, व्यापारातील अनुभव आणि राजकीय-सामाजिक संपर्क असतात. त्यामुळे त्यांना व्यवसाय सुरू करताना किंवा बाजारात प्रवेश करताना तुलनेने कमी अडथळ्यांना सामोरे जावे लागते. याउलट मागास, दलित किंवा भटक्या जमातींतील ग्रामीण तरुणांकडे भांडवलाचा अभाव, सामाजिक अविश्वास आणि संस्थात्मक भेदभाव यांचा सामना करावा लागतो. परिणामी समान धोरणात्मक संधी असूनही त्यांच्या यशाची शक्यता मर्यादित राहते. Deshpande यांच्या *"graded inequalities"* या संकल्पनेनुसार, भारतीय समाजातील विषमता ही थरथरित स्वरूपाची आहे. ग्रामीण तरुणांच्या बाबतीत ही विषमता शिक्षण, व्यवसाय आणि रोजगार या तिन्ही पातळ्यांवर दिसून येते. उच्च शिक्षण घेतले असले तरी सामाजिक नेटवर्क नसल्यामुळे अनेक तरुण बाजारात टिकू शकत नाहीत. बँक कर्ज, सरकारी योजना किंवा बाजारातील संधी मिळवण्यासाठी आवश्यक असलेली 'ओळख' आणि 'विश्वास' (credibility) ही सामाजिकदृष्ट्या वितरित असते. यामुळे नव-उदार धोरणांतील 'समान संधी' ही संकल्पना केवळ तात्त्विक ठरते. ग्रामीण तरुणांना 'उद्योजक व्हा' असे सांगणे म्हणजे त्यांना आधीच असलेल्या असमानतेकडे दुर्लक्ष करून जोखीम स्वीकारायला लावणे होय. व्यवसाय अपयशी ठरला की जबाबदारी व्यक्तीवर ढकलली जाते, मात्र संरचनात्मक मर्यादा अदृश्य केल्या जातात. ही प्रक्रिया समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'individualization of failure' म्हणून ओळखली जाते.

ग्रामीण महाराष्ट्रातील जोडधंद्यांच्या संदर्भात ही असमानता स्पष्टपणे दिसते. दुग्धव्यवसाय, शेळीपालन किंवा लघुउद्योग यांसाठी भांडवल, जागा, बाजाराशी संपर्क आणि सहकार्य आवश्यक असते. मात्र या सर्व घटकांचा लाभ काही विशिष्ट सामाजिक गटांपुरताच मर्यादित राहतो. परिणामी जोडधंदे हे सामाजिक गतिशीलतेचे साधन न बनता विद्यमान वर्ग—जातीय विषमता पुनरुत्पादित करणारी यंत्रणा ठरतात. एकूणच, Satish Deshpande यांच्या विश्लेषणाच्या आधारे असे म्हणता येते की ग्रामीण तरुणांसाठी नव-उदार विकास मॉडेल 'समान संधी' निर्माण करण्यात अपयशी ठरत आहे. वर्ग, जात आणि सामाजिक भांडवल यांतील असमानतेमुळे 'उद्योजकता' ही काही मोजक्या गटांसाठीच शक्य होते. त्यामुळे ग्रामीण तरुणांचे अपयश वैयक्तिक नसून सामाजिक संरचनेत रुजलेले आहे. या वास्तवाचा स्वीकार केल्याशिवाय ग्रामीण विकासाच्या धोरणात्मक चर्चेला सामाजिक न्यायाची दिशा मिळू शकणार नाही. या संशोधनातून असे स्पष्ट होते की ग्रामीण तरुणांचे जोडधंद्यांतील अपयश हे त्यांच्या वैयक्तिक अकार्यक्षमतेचे किंवा परिश्रमांच्या अभावाचे परिणाम नसून, जागतिकीकरण आणि नव-उदार आर्थिक धोरणांनी निर्माण केलेल्या खोलवर रुजलेल्या संरचनात्मक मर्यादांचे फलित आहे. Karl Polanyi (1944) यांनी मांडलेल्या *market disembeddedness* च्या संकल्पनेनुसार, जेव्हा बाजारव्यवस्था समाजापासून वेगळी होते, तेव्हा सामाजिक अस्थिरता वाढते. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत जोडधंद्यांच्या संदर्भात ही प्रक्रिया प्रकर्षाने दिसून येते. शेती आणि ग्रामीण उपजीविका बाजाराच्या अनिश्चित तर्कावर सोडल्याने ग्रामीण तरुणांना जोखीम स्वीकारावी लागते, मात्र त्या जोखमींपासून संरक्षण देणारी सामाजिक व संस्थात्मक यंत्रणा उपलब्ध राहत नाही. Henry Bernstein (2010) यांच्या विश्लेषणानुसार, नव-उदार व्यवस्थेत ग्रामीण तरुण *petty commodity producers* म्हणून अडकतात. जोडधंदे हे त्यांच्यासाठी आर्थिक मुक्तीचे साधन ठरण्याऐवजी कर्ज, अस्थिर उत्पन्न आणि बाजारावर अवलंबित्व यांचा सापळा बनतात. दुग्धव्यवसाय, शेळीपालन किंवा लघुउद्योग यांसारख्या उपक्रमांमध्ये उत्पादन खर्च वाढत असताना, उत्पन्नावर कोणतीही हमी नसते. परिणामी जोडधंदे हे उत्पन्नवाढीपेक्षा कर्जवाढीचे कारण बनतात. Surinder Jodhka (2012) यांनी अधोरेखित केल्याप्रमाणे, ग्रामीण समाजात शेती आणि ग्रामीण व्यवसायांची सामाजिक प्रतिष्ठा घसरत चालली आहे. या पार्श्वभूमीवर जोडधंद्यांकडे पाहण्याची दृष्टी ही मजबुरीची आणि दुय्यम स्वरूपाची बनते. ग्रामीण तरुणांसाठी 'नोकरी' हीच प्रतिष्ठेची प्रमुख ओळख ठरत असताना, जोडधंदे सामाजिक मान्यता मिळवण्यात अपयशी ठरतात. ही सामाजिक अवहेलना तरुणांच्या आत्ममूल्यावर आणि मानसिक आरोग्यावर खोल परिणाम करते. Satish Deshpande (2003) यांच्या वर्ग—जात विश्लेषणातून असेही स्पष्ट होते की जोडधंद्यांतील अपयश सर्वांसाठी समान नसते. वर्ग, जात, सामाजिक नेटवर्क आणि सांस्कृतिक भांडवलातील असमानतेमुळे काही गटांना बाजारातील संधी सहज उपलब्ध होतात, तर बहुसंख्य ग्रामीण तरुण संरचनात्मक अडथळ्यांमध्ये अडकतात. 'उद्योजक व्हा' ही नव-उदार घोषणा या असमानतेकडे दुर्लक्ष करते आणि अपयशाची जबाबदारी व्यक्तीवर ढकलते. या सर्व विश्लेषणाच्या आधारे असे म्हणता येते की, जोपर्यंत जोडधंदे राज्यसंरक्षण, हमीभाव, कमी व्याजदराची कर्जव्यवस्था, तांत्रिक सहाय्य आणि सामाजिक मान्यता यांच्या चौकटीत येत नाहीत, तोपर्यंत ते ग्रामीण तरुणांना आर्थिक स्थैर्य देऊ शकणार नाहीत. ग्रामीण विकासाच्या धोरणात्मक चर्चेत केवळ उत्पादन आणि उद्योजकतेवर भर न देता, तरुणांचे प्रत्यक्ष अनुभव, वाढते कर्जसंकट, सामाजिक असुरक्षितता आणि मानसिक आरोग्य यांना केंद्रस्थानी ठेवणे अत्यावश्यक आहे. अखेरीस, ग्रामीण विकासाचा प्रश्न हा केवळ आर्थिक वाढीचा नसून सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. ग्रामीण तरुणांच्या उपजीविकेच्या संघर्षाकडे संरचनात्मक दृष्टिकोनातून पाहिल्याशिवाय आणि बाजाराच्या जोखमींपासून त्यांना संरक्षण दिल्याशिवाय शाश्वत आणि समावेशक ग्रामीण विकास शक्य होणार नाही.

**संदर्भ:**


1. Bernstein, Henry. *Class Dynamics of Agrarian Change*. Fernwood Publishing, 2010.
2. Deshpande, Satish. *Contemporary India: A Sociological View*. Penguin Books, 2003.
3. Jodhka, Surinder S. *Caste*. Oxford University Press, 2012.
4. Polanyi, Karl. *The Great Transformation: The Political and Economic Origins of Our Time*. Beacon Press, 1944.

# महाराष्ट्रातील ग्रामीण मुलींच्या शिक्षणाच्या घटत्या प्रमाणाचे समाजशास्त्रीय विश्लेषण

**श्री. जगदीश केशवराव ससाणे** सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्रविभाग,भाई तुकाराम कोलेकर महाविद्यालय, नेसरी.

**सारांश:** महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न हा केवळ शैक्षणिक धोरणांचा परिणाम नसून, तो समाजरचनेतील मूल्यव्यवस्था, आर्थिक-सांस्कृतिक अडथळे, लैंगिक असमानता आणि ग्रामीण-शहरी भेद यांचा एकत्रित परिणाम आहे. मागील दशकभरात महाराष्ट्राने एकूण साक्षरतेत आणि उच्च शिक्षणातील प्रवेशात प्रगती साधली असली तरी, मुलींच्या शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणातील सातत्याने घटत चाललेले प्रमाण चिंतेचा विषय ठरत आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून या घटत्या प्रमाणामागील घटकांचे स्पष्ट विश्लेषण करून संभाव्य उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

**प्रस्तावना:** शिक्षण हा सर्वांगीण विकासाचा मुख्य पाया मानला जातो. परंतु भारतीय समाजात, विशेषतः ग्रामीण भागात, शिक्षणाच्या समान संधी मुलगा आणि मुलगी या दोघांना सारख्या मिळत नाहीत. महाराष्ट्रासारख्या सामाजिकदृष्ट्या प्रगत राज्यातही मुली शिक्षणाच्या बाबतीत मागे पडताना दिसतात. शालेय शिक्षणात ड्रॉपआउटचे प्रमाण, उच्च शिक्षणातील अपुरा सहभाग, लग्नाळू वयात शिक्षण खंडित होणे, सामाजिक रूढी-परंपरा आणि आर्थिक असमानता हे सर्व मुद्दे या समस्येला अधिक तीव्र करतात. म्हणूनच या विषयाचा समाजशास्त्रीय पातळीवरील अभ्यास अत्यावश्यक मानला जातो.

**अभ्यासाचा हेतू आणि उद्दिष्टे:** या संशोधनाचा मुख्य हेतू म्हणजे मुलींच्या शिक्षणातील घटत्या प्रमाणामागील समाजशास्त्रीय कारणांचा अभ्यास करून त्यावरील उपाय सुचविणे. विशेष उद्दिष्टे पुढीलप्रमाणे. महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील मुलींचा शाळा/महाविद्यालयातील सहभाग तपासणे. कुटुंब, समाज, आर्थिक परिस्थिती आणि सांस्कृतिक मूल्यव्यवस्था यांचा मुलींच्या शिक्षणावर होणारा प्रभाव विश्लेषित करणे. शैक्षणिक धोरणे, सरकारी योजना आणि त्यांची अंमलबजावणी यांचा प्रत्यक्ष परिणाम समजून घेणे. समस्येवर लागू शकतील अशा उपाययोजना प्रस्तावित करणे.

**संशोधन पद्धत:** हे संशोधन गुणात्मक स्वरूपाचे असून समाजशास्त्रीय विश्लेषणावर आधारित आहे. उपलब्ध अहवाल, शासकीय आकडेवारी, पूर्वीच्या संशोधनांचे निष्कर्ष, वृत्तपत्रीय लेख, धोरणनियम आणि सामाजिक सूचनांचा वापर करून तपशीलवार विश्लेषण करण्यात आले आहे. समाजातील घटकांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास करण्यासाठी संरचनावाद, स्त्रीवाद, संघर्ष सिद्धांत तसेच सामाजिक भूमिका सिद्धांतांचा आधार घेतला आहे.

**विश्लेषण:** महाराष्ट्रातील ग्रामीण मुलींच्या शिक्षणाबाबतचे सांख्यिकी विश्लेषण मुख्यतः साक्षरता दर (literacy rate), सकल नावनोंदणी गुणोत्तर (Gross Enrolment Ratio - GER), शाळा सोडण्याचे दर (dropout rates) आणि लिंग समता निर्देशांक (Gender Parity Index - GPI) यावर आधारित आहे. हे विश्लेषण नवीनतम उपलब्ध आकडेवारीवर (मुख्यत: २०२३-२४ आणि २०२४-२५ पर्यंतच्या अंदाजांवर) आधारित आहे. महाराष्ट्राची एकूण साक्षरता दर ८२.३४ टक्के आहे, ज्यात पुरुष ८८.३८ टक्के आणि स्त्रिया ७५.८७ टक्के आहेत. ग्रामीण भागात हे दर काहीसे कमी आहेत, आणि मुलींमध्ये लिंग अंतर (gender gap) आणि शहरी-ग्रामीण फरक (urban-rural disparity) दिसून येतो. खालील विश्लेषण राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय ट्रेंड्स, सुधारणा आणि आव्हाने यांचा समावेश करते.

**साक्षरता दर:** ग्रामीण मुलींचा साक्षरता दर: महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील एकूण साक्षरता दर सुमारे ७७.०१ टक्के आहे (२०११ जनगणनेनुसार, परंतु २०२४ पर्यंतच्या अपडेट्सनुसार सुधारित). ग्रामीण मुलींचा विशिष्ट दर सुमारे ७०.४ टक्के (राष्ट्रीय ग्रामीण स्त्री साक्षरता दराशी तुलना करता) आहे, जो पुरुषांच्या ८४.७ टक्के पेक्षा कमी आहे. २०११ ते २०२४ दरम्यान ग्रामीण स्त्री साक्षरतेत १४.५ टक्के वाढ झाली आहे (५७.९३ टक्के वरून ७०.४ टक्के)ट्रेंड आणि विश्लेषण: महाराष्ट्राची एकूण स्त्री साक्षरता ८४.८ टक्के (२०२५ अंदाज) आहे, परंतु ग्रामीण भागात हे कमी आहे कारण आर्थिक अडचणी, बालविवाह आणि शाळांची अपुरी सुविधा यामुळे राष्ट्रीय स्तरावर ग्रामीण साक्षरता ७७.५ टक्के आहे, ज्यात महाराष्ट्र वरच्या क्रमांकावर आहे (उदा. मुंबई उपनगर ८९.९ टक्के, परंतु नंदुरबारसारख्या ग्रामीण जिल्ह्यात ६४ टक्के). २०२५ पर्यंत महाराष्ट्राची स्त्री साक्षरता ७०.३ टक्के पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, परंतु ग्रामीण मुलींमध्ये हे ६५-७० टक्के च्या दरम्यान राहिले आहे. **तुलना:** राष्ट्रीय ग्रामीण स्त्री साक्षरता ७०.३ टक्के आहे, ज्यात महाराष्ट्र केरळ (९४ टक्के) नंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे, परंतु बिहार (६६.१ टक्के) सारख्या राज्यांपेक्षा चांगले8c3f0d. ग्रामीण भागात लिंग अंतर १४-१६ टक्के आहे, जे शहरी भागापेक्षा जास्त आहे.

**सकल नावनोंदणी गुणोत्तर:** ग्रामीण मुलींचे GER: प्राथमिक ते आठवीपर्यंत महाराष्ट्रातील मुलींचे GER ९८.३ टक्के (प्राथमिक) ते ८३.७ टक्के (उच्च प्राथमिक) आहे. उच्च शिक्षणात (१८-२३ वर्षे) महाराष्ट्राचे एकूण GER ३५.३ टक्के आहे, ज्यात स्त्रिया ३३.३ टक्के आहेत. ग्रामीण भागात हे कमी आहे, कारण २०२४ मध्ये ४ वर्षांच्या मुलींचे पूर्व-प्राथमिक GER ८३.३ टक्के आहे, परंतु दुय्यम स्तरावर ते घटते.

**ट्रेंड आणि विश्लेषण:** २०१७-२२ दरम्यान GER ३१.१ टक्के वरून ३५.३ टक्के पर्यंत वाढले, ज्यात मुलींची वाढ पुरुषांपेक्षा जास्त आहे. ग्रामीण भागात पूर्व-प्राथमिक ते प्राथमिक स्तरावर ९५ टक्के पेक्षा जास्त नोंदणी आहे (उदा. गुजरात, महाराष्ट्रमध्ये ९५ टक्के+). परंतु उच्च स्तरावर (दुय्यम) हे ६१.१ टक्के आहे, जे आर्थिक आणि सांस्कृतिक अडथळ्यांमुळे. राष्ट्रीय GER २७.३ टक्के आहे,

ज्यात महाराष्ट्र वर आहे. **तुलना:** अनुसूचित जमाती (ST) मुलींचे GER १४.४-१६.५ टक्के आहे, जे कमी आहे. ग्रामीण भागात मुलींचे GER पुरुषांपेक्षा २-४ टक्के कमी आहे.

**शाळा सोडण्याचे दर: ग्रामीण मुलींचे:** महाराष्ट्रात प्राथमिक स्तरावर मुलींचा dropout दर ० टक्के आहे, उच्च प्राथमिक १.६ टक्के, आणि दुय्यम १०.६ टक्के (२०२१-२२). ग्रामीण भागात हे दर जास्त आहेत, कारण आर्थिक समस्या आणि अपुरी शाळा (उदा. १,६१० गावांमध्ये प्राथमिक शाळा नाहीत).

**ट्रेंड आणि विश्लेषण:** २०१८-२२ दरम्यान dropout दर कमी झाले (प्राथमिक १.१ टक्के वरून ० टक्के), परंतु दुय्यम स्तरावर १२.८ टक्के वरून १०.६ टक्के पर्यंत. ग्रामीण मुलींमध्ये ११ वर्षांनंतर dropout वाढतो, कारण घरगुती कामे, बालविवाह आणि शाळांची दुरावा. राष्ट्रीय स्तरावर दुय्यम dropout १२.६ टक्के आहे, ज्यात महाराष्ट्र कमी आहे (६.८ टक्के). **तुलना:** मुलींचा dropout दर मुलांपेक्षा कमी आहे (९.६ टक्के vs ११.५ टक्के), परंतु ग्रामीण भागात लिंग अंतर जास्त आहे. उत्तर प्रदेश (७.६ टक्के) सारख्या राज्यांपेक्षा महाराष्ट्र चांगले, परंतु केरळ (० टक्के) सारख्या नाही.

**लिंग समता निर्देशांक: ग्रामीण मुलींचे GPI:** प्राथमिक स्तरावर GPI ०.९९ आहे, परंतु दुय्यम आणि उच्च शिक्षणात घटून ०.९६-०.९० पर्यंत जाते. उच्च शिक्षणात GPI १.०१ आहे, ज्यात मुलींची नोंदणी पुरुषांपेक्षा थोडी जास्त.

**ट्रेंड आणि विश्लेषण:** २०१७-२२ दरम्यान GPI १.०१ वरून १.०६ पर्यंत वाढले आणि नंतर १.०१ वर स्थिर झाले, जे लिंग समतेची सुधारणा दर्शवते. ग्रामीण भागात GPI कमी आहे कारण सांस्कृतिक अडथळे (उदा. मुलींना घरगुती कामे). राष्ट्रीय GPI ०.९८ आहे, ज्यात महाराष्ट्र चांगले आहे. **तुलना:** अनुसूचित जमातींमध्ये GPI ०.७८ आहे, जे कमी आहे. ग्रामीण भागात शहरीपेक्षा लिंग अंतर २७.२ टक्के जास्त आहे.

**मुलींच्या शिक्षणातील घटत्या प्रमाणाची कारणमीमांसा: कुटुंबव्यवस्था आणि लैंगिक भूमिका:** भारतीय कुटुंबव्यवस्थेत मुलगा हा 'कुटुंबाचा आधार' आणि मुलगी ही 'कुटुंबाची जबाबदारी' म्हणून पाहिली जाते. त्यामुळे मुलांच्या शिक्षणावर खर्च करणे कुटुंबांना अधिक योग्य वाटते. मुलींना घरकाम, भावंडांची काळजी किंवा आर्थिक अडचणींमध्ये आईला मदत करण्याची अपेक्षा असल्याने त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. विशेषतः अल्प-आर्थिक वर्गात "मुलीवर केलेला खर्च वैयक्तिक मालमत्तेत परिवर्तित होत नाही" असा चुकीचा समज असल्याने त्यांचे शिक्षण दुय्यम राहते.

**आर्थिक कारणे:** गरीबी हा मुलींच्या शिक्षणातील अडथळ्यांपैकी सर्वात महत्त्वाचा घटक आहे.ग्रामीण भागात घरातील आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यास मुलींना शालेय शिक्षणाऐवजी मजुरी, शेतीकाम किंवा घरकामासाठी वापरले जाते.उच्च शिक्षणातील वाढते शुल्क, वाहतुकीचा खर्च आणि सुरक्षिततेच्या अभावामुळे पालक मुलींना पुढील शिक्षणासाठी संधी देण्यास कचरतात. **सामाजिक-सांस्कृतिक परंपरा:** मुलींचे लवकर लग्न करणे, कुटुंबाचा मान-सन्मान, जाती-जमातीतील प्रथा आणि धार्मिक मूल्यव्यवस्था या गोष्टी शिक्षणात मोठा अडथळा निर्माण करतात. अनेक समाजघटकांमध्ये मुलगी 'घर सांभाळणारी' म्हणून ओळखली जाते. त्यामुळे उच्च शिक्षण हा तिच्या भूमिकेशी विसंगत मानला जातो. लग्नानंतर सासरी जाण्यामुळे अध्ययन पूर्ण होण्याची शक्यता कमी राहते.

**सुरक्षिततेचे प्रश्न:** शहरी भागातही मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने पालक असुरक्षित वाटतात. दूरवर शाळा/महाविद्यालये असल्यास प्रवासातील अडचणी, छेडछाड, सार्वजनिक वाहतुकीची कमतरता यामुळे पालक 'शिक्षण थांबवणे' हा पर्याय स्वीकारतात. ग्रामीण भागात तर उच्च शिक्षणाची सुविधा जवळपास नसल्याने हे प्रमाण अधिक गंभीर होत जाते. मुंबईत ३६ दिवसात ८२ मुलं बेपत्ता झाली आहेत. त्यामुळे पाल्कांच्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. जुने ते डिसेंबर महिन्यात १३४ मुलं गायब झाले असून त्यात ८६ मुलींचाही समावेश आहे. त्यामुळे मुंबईत लहान व शाळकरी मुले किती धोक्यात आहेत याची प्रचीती येते. मुंबईत सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही लावून देखील मुलं-मुली गायब होत आहेत. त्यामुळे पोलीसापुढे हे आव्हान असून ते मुलांना शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. मुंबईसारख्या मेगासिटीत हि अवस्था आहे तर बाकीच्या ठिकाणी काय होत असेल?

**शाळांच्या सुविधा आणि शिक्षक वर्ग:** अनेक शाळांत स्वतंत्र स्वच्छतागृहांची कमतरता मुलींसाठी शिक्षण सोडण्याचे मोठे कारण ठरते. महिला शिक्षकांचा अभाव, बर्याच ठिकाणी असलेले शाळेतील असुरक्षित वातावरण, वर्गांची गुणवत्ताहीनता यामुळे मुली शाळेत टिकत नाहीत. काहीकाही ठिकाणी तर चार वर्गासाठी एकच शिक्षक पाहायला मिळतात. गेल्या ५ वर्षांत महाराष्ट्रात बंद पडलेल्या मराठी शाळांची नेमकी आकडेवारी उपलब्ध नसली तरी, कमी पटसंख्येमुळे अनेक शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत, काही ठिकाणी बंद झाल्याचे वृत्त आहे (उदा. मुंबईत १० वर्षांत १०० शाळा बंद), आणि भविष्यातही अशा शाळांची संख्या वाढण्याची भीती आहे, ज्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या तुलनेत मराठी माध्यमाच्या शाळांचा समावेश आहे. विशेषत:, पटसंख्या ५ पेक्षा कमी असलेल्या शाळा बंद करण्याचा सरकारचा विचार होता, पण शिक्षक संघटनांच्या विरोधामुळे काही आदेश मागे घेण्यात आले, तरीही मराठी शाळांची संख्या घटत आहे.

**डिजिटल दरी:** कोविड-१९ नंतर ऑनलाईन शिक्षणाला महत्त्व वाढले. मात्र डिजिटल साधनांची उपलब्धता आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटीतील तफावत मुलींसाठी मोठ्या प्रमाणात शिक्षण खंडित होण्यास कारणीभूत ठरली. मोबाईल किंवा संगणकावर मुलांनाच प्राधान्य दिले जात असल्याने मुली मागे राहतात.

**समाजशास्त्रीय सिद्धांतांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण:**

**स्त्रीवादी सिद्धांत:** स्त्रीवादी विचारानुसार शिक्षणातील असमानता ही पितृसत्ताक रचनेचे परिणाम आहे. मुलगी ही दुय्यम नागरिक मानली जात असल्याने तिच्या विकासाला संधी कमी मिळते. शिक्षण हा स्त्रीसक्षमीकरणाचा मुख्य मार्ग असल्याने पितृसत्ताक मूल्यांना तो धोका वाटतो.

**संघर्ष सिद्धांत:** संघर्ष सिद्धांतानुसार समाजातील आर्थिक संसाधनांचे असमान वितरण शिक्षणातील विषमता वाढवते. उच्च आर्थिक वर्गातील मुलींना शिक्षणाची संधी मिळते पण निम्न आर्थिक वर्गातील मुलींना ती मर्यादित राहते. त्यामुळे सामाजिक गटांमध्ये विषमता कायम राहते.

**संरचनात्मक कार्यवाद:** या सिद्धांताच्या दृष्टीकोनातून बघितल्यास समाजातील पारंपरिक भूमिकांमुळे मुलींच्या शिक्षणाला कमी महत्त्व दिले जाते. समाजाची एकूण रचना काही पद्धतींना 'योग्य' आणि काहींना 'अयोग्य' ठरवते. मुलींनी घर पाहणे आणि मुलांनी उत्पन्न कमवणे—ही भूमिकावाटणी शिक्षणातील तफावत वाढवते.

**महाराष्ट्रातील विद्यमान शासकीय योजना आणि त्यांचा प्रभाव :**महाराष्ट्र शासनाने मुलींच्या शिक्षणासाठी अनेक योजना राबवल्या आहेत. १. कन्या शिक्षण सुकन्या योजना, २. सायबर सुरक्षा कार्यक्रम, ३. सशक्त बालिका अभियान, ४. मोफत सायकल योजना, ५. शिष्यवृत्ती योजना या योजनांमुळे काही प्रमाणात प्रगती झाली असली तरी अंमलबजावणीत सातत्य नसणे, जनजागृतीचा अभाव, गरजू मुलींपर्यंत पोहोच न होणे यामुळे अपेक्षित बदल दिसून येत नाहीत.

**परिणामांचा सामाजिक विकासावर होणारा प्रभाव:** १.मुलींच्या शिक्षणातील घटता सहभाग समाजाच्या प्रगतीला थेट अडथळा निर्माण करतो. २. महिलांचे शिक्षण कमी असल्यास आर्थिक विकासाची गती मंदावते. ३. कुटुंबाचे आरोग्य, मुलांचे पोषण, लोकसंख्येवर नियंत्रण आणि सामाजिक स्थैर्य या सर्वांवर त्याचे दुष्परिणाम दिसतात. ४. शिक्षित स्त्री ही घर, समाज आणि अर्थव्यवस्थेला अधिक योगदान देऊ शकते. त्यामुळे मुलींच्या शिक्षणात घट होणे म्हणजे समाजाच्या विकासात घट होणे.

**उपाययोजना:**

**शैक्षणिक सुविधा सुधारणा:** ग्रामीण भागात उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन संस्था वाढवणे गरजेचे आहे. स्वतंत्र व स्वच्छ स्वच्छतागृहे, महिला शिक्षक, सुरक्षित परिसर त्याचबरोबर पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वतंत्र महिला कक्ष ई. उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**जनजागृती आणि सामाजिक परिवर्तन:** कुटुंब आणि समाजात मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगणे हि काळाची गरज बनली आहे. आजही ग्रामीण भागात मुलींचे विवाह लवकर लावून दिले जातात. तसे होऊ नये म्हणून धार्मिक नेते, स्थानिक संस्था, स्वयंसेवी संस्था यांच्या साहाय्याने व्यापक मोहीम राबवून मुलींच्या शिक्षणाचे महत्व समजला पटवून देणे आवश्यक आहे. मुलगी शिकली तरच प्रगती होते हे लोकांच्या मनावर बिंबवले जाने गरजेचे आहे.

**आर्थिक सक्षमीकरण:** शिष्यवृत्ती, मोफत वाहतूक, वसतिगृहे, मोफत गणवेश व पुस्तके यांचा विस्तार करून गरीब कुटुंबांना 'शिक्षणासाठी आर्थिक प्रोत्साहन' देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात पालकांची स्थिती नाजूक असते. अशावेळेस ते लहान मुलांना एकतर सोबत कामाला घेऊन जातात किंवा घर सांभाळायला ठेवतात. जरी 'मुलीना मोफत शिक्षण' योजना शासनातर्फे राबवली जात असली तरी त्याचे फारसे चाल्गले परिणाम ग्रामीण भागात तरी होताना दिसून येत नाहीत.

**सुरक्षिततेची हमी:** हा सध्या गंभीर मुद्दा झाला असून मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेत आणि प्रवासमार्गात महिला सुरक्षेची योग्य व्यवस्था नसल्याचे हे परिणाम आहेत. ग्रामीण भाग असे किंवा शहरी भाग असो मुलीना व महिलांना सुरक्षित बस सेवा उपलब्ध करून देणे, शाळेतील वातावरण सुरक्षित असणे, लांबपल्याच्या शाळेसाठी रस्त्यात सुरक्षेच्या उपाययोजना आमलात आणणे, शाळा व महाविद्यालय परिसरात तसेच प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे ई. उपाय योजिता येतील.

**डिजिटल सुविधा उपलब्धता:** इंटरनेट, टॅब्लेट/मोबाईल, ई-लर्निंग साहित्य यांची उपलब्धता वाढवून डिजिटल शिक्षणात मुलींना प्राधान्य देणाऱ्या योजना शासकीय व गाव स्तरावर राबवणे गरजेचे आहे. त्यासाठी अगोदर प्रत्येक शिक्षकाला डिजिटल साक्षर बनवणे आवश्यक आहे. कारण आज बहुतांशी असे शिक्षक/शिक्षिका आहेत कि ज्यांना इंटरनेट, इ-लर्निंग या गोष्टी हाताळता येत नाहीत. शिवाय ज्यांना या गोष्टींचे ज्ञान आहे त्यांनी इतरांना डिजिटल साक्षर करणे गरजेचे आहे. मोबाईलवर नको त्या गोष्टी पाहता शालेय ज्ञान प्राप्त करून ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष:** महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणातील घटते प्रमाण ही बहुआयामी समस्या आहे. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, लैंगिक आणि पायाभूत घटक एकत्र येऊन ही समस्या तीव्र बनवतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, मुलींचे शिक्षण हे केवळ व्यक्तीगत प्रगतीसाठी नाही तर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. म्हणूनच शासन, समाज, कुटुंब आणि स्वयंसेवी संस्था यांनी एकत्रितपणे कार्य करून मुलींच्या शिक्षणातील अडथळे दूर करणे गरजेचे आहे. योग्य धोरणे, जनजागृती आणि पायाभूत सुविधा यांचा समन्वय साधला तर महाराष्ट्रातील मुलींचे शिक्षण पुन्हा वाढती दिशा घेऊ शकते.

**समारोप:** महाराष्ट्र हे भारतातील प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते, ज्यात एकूण साक्षरता दर ८३ टक्के पर्यंत पोहोचला आहे (२०२१ जनगणना). तथापि, या प्रगतीच्या मागे मुलींच्या शिक्षणातील घटते प्रमाण ही एक गंभीर समस्या दडलेली आहे, जी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, लिंगभेद, आर्थिक असमानता, सांस्कृतिक बंधने आणि संस्थागत अपयश यांचा परिणाम आहे. या संशोधन पेपरमध्ये, महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणातील घटत्या प्रमाणाचे विश्लेषण करण्यात आले आहे, ज्यात प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील नामांकन, ड्रॉपआऊट दर आणि साक्षरता पातळीचा अभ्यास करण्यात आला. उपलब्ध आकडेवारीनुसार (UDISE+ २०२४-२५ आणि NSSO ७५वी फेरी), महाराष्ट्रात ९ वी व १० वी वर्गातील मुलींचा ड्रॉपआऊट दर १०.३ टक्के आहे, जो मुलांच्या १२.६ टक्के पेक्षा कमी असला तरी, उच्च माध्यमिक स्तरावर नामांकनात ५२.४ टक्के पर्यंत घट होते. मुंबईसारख्या शहरी भागातील महिलांच्या महाविद्यालयांमध्ये नामांकनात ५ टक्के ची घट (२०१९-२०२४) दिसून येते, जी राज्यव्यापी ट्रेंडचे प्रतिनिधित्व करते. शेवटी, महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणातील घटते प्रमाण हे सामाजिक न्यायाच्या अभावाचे लक्षण आहे, जे केवळ आकडेवारी नाही तर एक सांस्कृतिक क्रांतीची गरज दर्शवते. शिक्षित महिला हे राष्ट्राच्या प्रगतीचे आधारस्तंभ आहेत, आणि या

समस्येचे निराकरण केल्यास महाराष्ट्र खऱ्या अर्थाने समावेशक आणि समृद्ध राज्य बनू शकेल. हे संशोधन समाजशास्त्रज्ञ, धोरणकर्ते आणि शिक्षकांसाठी एक आवाहन आहे की, बदलाची सुरुवात सामाजिक मानदंडांपासून करावी, जेणेकरून प्रत्येक मुलीला शिक्षणाची संधी मिळेल आणि राज्याची प्रगती अखंड राहील.

**संदर्भ ग्रंथ:**


१) डॉ. शांता साठे – *भारतातील स्त्री आणि समाज* – महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.
२) डॉ. शीलादेवी खाडिलकर – *स्त्री अभ्यास: एक समाजशास्त्रीय दृष्टिकोन* – प्राज्ञ प्रकाशन, पुणे.
३) वीणा मजूमदार – Education and Women's Equality – Concept Publishing House, New Delhi.
४) Leela Dube – Women and Kinship: Comparative Perspectives on Gender in South and South-East Asia – Sage Publications.
५) Amartya Sen – Development as Freedom – Oxford University Press.
६) Savitribai Phule Writings – Selected writings on women's education – various editions.
७) Dr. S.C. Dube – Indian Society – National Book Trust.
८) Ravinder Kaur – Women, Education and Empowerment in India – Sage Publications.
९) M.N. Srinivas – Social Change in Modern India – Orient BlackSwan.
१०) Patel, Asha – Women's Education in India: Present Status and Future Strategies – Anmol Publishers.
११) Economic and Political Weekly (EPW) – Girls' Education, Gender Gap, Rural Education संबंधित विविध लेख.
१२) Journal of Social and Economic Development – Gender Inequality in Schooling.
१३) International Journal of Education and Development – Barriers to Girls' Education in Developing Countries.
१४) Indian Journal of Gender Studies – Women's Empowerment and Education in India.
१५) Research Journal of Social and Life Sciences – Dropout Causes among Rural Girls.
१६) Journal of Educational Planning and Administration (JEP&A) – Gender Disparities in Indian Education.
१७) राष्ट्रीय शिक्षण नीति (NEP 2020) – भारत सरकार, शिक्षण मंत्रालय.
१८) National Family Health Survey (NFHS-5) – Ministry of Health & Family Welfare.
१९) U-DISE+ Reports (2021–2024) – School Education Statistics in India.
२०) UNICEF Report on Girls' Education in India - भारतातील मुलींच्या शिक्षणावरील वार्षिक अहवाल.
२१) UNESCO Global Education Monitoring Report - Gender disparity in education.
२२) NITI Aayog - Women Empowerment Index Reports.
२३) Maharashtra Human Development Report - Government of Maharashtra.
२४) राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (NSO) - Education Statistics Reports.
२५) महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग - वार्षिक अहवाल (2018–2024).
२६) महिला व बालविकास विभाग - बालिका शिक्षण संबंधित धोरणे व योजना.
२७) शिष्यवृत्ती योजना यांच्या अधिकृत मार्गदर्शक सूचना.
२८) Maharashtra Economic Survey - शिक्षणविषयक आकडेवारी.
२९) TATA Institute of Social Sciences (TISS) - Gender and Education Studies Reports.
३०) Pratham NGO – ASER Reports (Annual Status of Education Report). CARE India - Girls' Education Challenges in Rural Areas.
३१) CRY (Child Rights and You) - Child Education Status Reports.
३२) SEWA & MAJLIS - Women's rights and education.
३३) IGNOU eGyankosh - Women Studies & Education Modules.


# जळगाव तालुक्यातील ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार: कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय

**राजेश फकिरा धुंदले** संशोधक विद्यार्थी, नूतन मराठा कॉलेज, जळगाव.

**गोषवारा:** भारतीय ग्रामीण समाज हा परंपरा, रूढी, मूल्ये आणि सामाजिक नातेसंबंधांवर आधारित असला तरी अलीकडच्या काळात जागतिकीकरण, औद्योगिकीकरण, शिक्षणाचा प्रसार, स्थलांतर आणि माध्यमांच्या प्रभावामुळे त्याच्या रचनेत लक्षणीय बदल घडून येत आहेत. या बदलांचा थेट परिणाम ग्रामीण महिलांच्या जीवनावर होताना दिसून येतो. एका बाजूला शिक्षण, रोजगार, आर्थिक स्वावलंबन आणि सार्वजनिक जीवनातील सहभागाच्या संधी वाढत असताना दुसऱ्या बाजूला ग्रामीण महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराच्या घटना अजूनही मोठ्या प्रमाणावर आढळतात. घरगुती हिंसाचार, लैंगिक छळ, हुंड्यासाठी होणारा छळ, कौटुंबिक अत्याचार, बालविवाह आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या समस्यांनी ग्रामीण महिलांचे जीवन असुरक्षित बनले आहे. सदर संशोधनाचा मुख्य उद्देश ग्रामीण समाजाच्या बदलत्या स्वरूपाच्या पार्श्वभूमीवर महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराची सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक कारणे समजून घेणे आणि त्यावर प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय सुचवणे हा आहे. या अभ्यासासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून पुस्तके, संशोधन लेख, शासकीय अहवाल आणि इतर दुय्यम स्रोतांच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. अभ्यासातून असे स्पष्ट होते की पितृसत्ताक मानसिकता, आर्थिक अवलंबित्व, अशिक्षण, दारिद्र्य, बेरोजगारी, दारूचे व्यसन आणि कायद्याची अपुरी अंमलबजावणी ही ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचाराची प्रमुख कारणे आहेत. निष्कर्षतः असे आढळते की केवळ कायदे अस्तित्वात असणे पुरेसे नसून महिलांचे शिक्षण, आर्थिक सबलीकरण, सामाजिक जागृती आणि स्थानिक पातळीवरील संस्थांची सक्रिय भूमिका अत्यंत आवश्यक आहे. ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महिलांविरुद्ध हिंसाचार रोखणे ही काळाची गरज आहे.

**प्रस्तावना:** ग्रामीण समाज हा भारतीय समाजव्यवस्थेचा कणा मानला जातो. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या आजही ग्रामीण भागात वास्तव्यास असून त्यांचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवन परंपरागत संरचनेवर आधारित आहे. शेतीप्रधान अर्थव्यवस्था, संयुक्त कुटुंबपद्धती, जातीव्यवस्था, धार्मिक श्रद्धा, रूढी-परंपरा आणि पितृसत्ताक मूल्ये ही ग्रामीण समाजाची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात. या सामाजिक रचनेत महिलांचे स्थान परंपरागतरीत्या दुय्यम राहिलेले दिसून येते. महाराष्ट्रातील जळगाव जिल्हा हा प्रामुख्याने ग्रामीण व कृषीप्रधान जिल्हा असून कापूस, केळी, ज्वारी, बाजरी यांसारखी पिके येथे मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर आणि स्थलांतरित मजूर वर्ग हे जळगाव जिल्ह्याच्या ग्रामीण समाजाचे महत्त्वाचे घटक आहेत. परंपरागत अर्थव्यवस्था आणि सामाजिक संरचनेमुळे महिलांचे जीवन मोठ्या प्रमाणावर कुटुंब, शेती आणि घरगुती कामांपुरते मर्यादित राहिले आहे. अलीकडच्या काळात शिक्षणाचा प्रसार, दळणवळण व तंत्रज्ञानाचा विकास, महिला बचत गट, स्वयं-सहायता गट, पंचायत राज व्यवस्था आणि विविध शासकीय योजनांमुळे ग्रामीण समाजात काही प्रमाणात सामाजिक परिवर्तन घडून येत आहे. महिलांचे शिक्षण, रोजगार आणि सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढताना दिसत असला तरी या बदलांचा लाभ सर्व महिलांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नाही. विशेषतः ग्रामीण महिलांच्या बाबतीत पितृसत्ताक मानसिकता, सामाजिक नियंत्रण आणि कौटुंबिक दबाव अजूनही प्रभावी आहे. जळगाव तालुक्यातील ग्रामीण भागांमध्ये महिलांना निर्णय प्रक्रियेत दुय्यम स्थान दिले जाते. घरगुती हिंसाचार, दारूच्या व्यसनातून होणारा छळ, आर्थिक शोषण, हुंड्यासाठी होणारा त्रास, लैंगिक अत्याचार आणि सामाजिक बहिष्कार या समस्या आजही प्रकर्षाने दिसून येतात. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या बदलत्या स्वरूपाच्या पार्श्वभूमीवर महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराचा अभ्यास करणे समाजशास्त्रीय, शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार हा विषय गेल्या काही दशकांपासून समाजशास्त्र, स्त्री-अभ्यास, मानवशास्त्र आणि विकास अध्ययन या क्षेत्रांमध्ये महत्त्वाचा संशोधन विषय ठरलेला आहे. देश-विदेशातील अनेक समाजशास्त्रज्ञ, स्त्रीवादी विचारवंत, अभ्यासक तसेच शासकीय व अशासकीय संस्थांनी महिलांविरुद्ध हिंसाचाराच्या स्वरूपाचा, कारणांचा आणि परिणामांचा अभ्यास केला आहे. या सर्व अभ्यासांमधून असे स्पष्ट होते की महिलांविरुद्ध हिंसाचार ही केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक समस्या नसून ती सामाजिक संरचना, सांस्कृतिक मूल्ये आणि सत्तासंबंधांशी निगडित असलेली एक व्यापक सामाजिक समस्या आहे.भारतीय संदर्भात ग्रामीण महिलांचे जीवन हे अनेक स्तरांवरील असमानतेने ग्रस्त आहे. जात, वर्ग, लिंग, शिक्षण आणि आर्थिक स्थिती या घटकांचा एकत्रित परिणाम महिलांच्या जीवनावर होताना दिसतो. याच पार्श्वभूमीवर ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचाराचा अभ्यास अधिक महत्त्वाचा ठरतो. अनेक अभ्यासकांनी असे निदर्शनास आणले आहे की ग्रामीण समाजातील पारंपरिक पितृसत्ताक रचना महिलांना अधीनस्थ स्थानावर ठेवते आणि त्यातूनच हिंसाचाराला सामाजिक मान्यता मिळते. देशमुख (२०१६) यांनी आपल्या अभ्यासात ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराची तुलनात्मक मांडणी केली आहे. त्यांच्या संशोधनानुसार ग्रामीण भागात घरगुती हिंसाचाराचे प्रमाण शहरी भागाच्या तुलनेत अधिक आहे. त्यांनी पारंपरिक सामाजिक रचना, आर्थिक अस्थिरता, पुरुषप्रधान मानसिकता आणि महिलांचे आर्थिक अवलंबित्व या घटकांना ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचारासाठी जबाबदार धरले आहे. त्यांच्या मते ग्रामीण समाजात कौटुंबिक हिंसाचाराला अनेकदा "खाजगी बाब" म्हणून पाहिले जाते, ज्यामुळे महिलांना न्याय मिळण्याची शक्यता कमी होते. कुमारी (२०१८) यांनी ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचाराचा आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे. त्यांच्या संशोधनात असे आढळते की अशिक्षण, बेरोजगारी आणि उत्पन्नाचे मर्यादित स्रोत यांमुळे ग्रामीण महिला आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून राहतात. या आर्थिक अवलंबित्वाचा गैरफायदा घेऊन अनेक वेळा महिलांवर शारीरिक, मानसिक आणि आर्थिक हिंसाचार केला जातो. कुमारी यांनी असेही नमूद केले आहे की महिलांचे शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन वाढल्यास हिंसाचाराच्या घटनांमध्ये घट होऊ शकते. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या (NCRB, 2021) अहवालातून महिलांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांचे सांख्यिक स्वरूप समोर येते. या अहवालानुसार महिलांविरुद्ध नोंदवले जाणारे गुन्हे, विशेषतः कौटुंबिक हिंसाचार, छळ आणि लैंगिक अत्याचार, यामध्ये ग्रामीण भागातील घटनांचे प्रमाण लक्षणीय आहे. मात्र अनेक अभ्यासकांचे मत आहे की ग्रामीण भागातील वास्तविक परिस्थिती आकडेवारीपेक्षा अधिक गंभीर आहे, कारण सामाजिक दबाव, भीती, प्रतिष्ठेचा प्रश्न आणि कुटुंबाचा विरोध यांमुळे अनेक प्रकरणे नोंदवली जात नाहीत. महाराष्ट्र शासनाच्या (२०२०) अहवालानुसार राज्यातील ग्रामीण भागात महिलांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसून येते. विशेषतः कौटुंबिक हिंसाचार, हुंड्यासाठी छळ आणि मानसिक अत्याचाराच्या तक्रारी ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर येतात. या अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की कायदे अस्तित्वात असतानाही त्यांच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे आहेत, जसे की पोलीस यंत्रणेची उदासीनता, महिलांमध्ये कायदेशीर जागृतीचा अभाव आणि सामाजिक दबाव. पाटील (२०१८) यांनी ग्रामीण महिलांचे सामाजिक प्रश्न, कौटुंबिक भूमिका आणि सामाजिक नियंत्रण यांचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांच्या मते ग्रामीण समाजातील पितृसत्ताक सत्ता रचना महिलांच्या वर्तनावर कठोर नियंत्रण ठेवते आणि त्यातूनच हिंसाचाराला पोषक वातावरण निर्माण होते. कुलकर्णी (२०१९) यांनी ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचाराचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे. त्यांच्या संशोधनानुसार महिलांविरुद्ध हिंसाचारामागे केवळ वैयक्तिक मानसिकता नसून सामाजिक रचना, सांस्कृतिक मूल्ये आणि कायद्याच्या अंमलबजावणीत असलेली कमकुवतता ही कारणे आहेत. त्यांनी असेही नमूद केले आहे की ग्रामीण भागात महिला बचत गट, स्वयं-सहायता गट आणि स्थानिक संस्था सक्रिय झाल्यास महिलांना हिंसाचाराविरोधात आवाज उठवण्याचे बळ मिळू शकते. डॉ. डी. व्ही. पवार यांचे ग्रामीण स्त्रियांच्या समस्या आणि उपाययोजना हे कार्य ग्रामीण स्त्रियांच्या जीवनस्थितीचा समग्र समाजशास्त्रीय आढावा घेणारे महत्त्वाचे साहित्य आहे. या ग्रंथात लेखकाने ग्रामीण समाजातील पितृसत्ताक रचना, परंपरा आणि आर्थिक अवलंबित्व यांच्या संदर्भात स्त्रियांच्या समस्या समजावून सांगितल्या आहेत. बालविवाह, हुंडा प्रथा, कौटुंबिक हिंसाचार, निर्णय प्रक्रियेत मर्यादित सहभाग, शिक्षणाचा अभाव तसेच आरोग्य सुविधांची कमतरता

या समस्या ग्रामीण स्त्रियांच्या दैनंदिन जीवनावर कशा प्रकारे परिणाम करतात, हे लेखकाने वास्तववादी पद्धतीने मांडले आहे. शेती व घरगुती उत्पादन प्रक्रियेत ग्रामीण स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे असले तरी त्यांच्या श्रमांना आर्थिक व सामाजिक मान्यता मिळत नाही, हा मुद्दा लेखक ठळकपणे अधोरेखित करतो. तसेच शिक्षणाच्या अभावामुळे स्त्रियांची सामाजिक जाणीव आणि हक्कांविषयीची जागरूकता मर्यादित राहते, असे निरीक्षण नोंदवले आहे. या समस्यांवर उपाय म्हणून स्त्री शिक्षणाचा प्रसार, स्वयं-सहायता गटांद्वारे आर्थिक सक्षमीकरण, कौशल्य विकास कार्यक्रम आणि कायदेविषयक जागृती यांवर भर देण्यात आला असून, ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत स्त्री-सक्षमीकरणाला केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक असल्याचा निष्कर्ष लेखक मांडतो. स्त्रीवादी विचारवंतांनी महिलांविरुद्ध हिंसाचाराकडे सत्तासंबंधांच्या दृष्टीने पाहिले आहे. त्यांच्या मते पितृसत्ताक समाजव्यवस्थेत पुरुषांना मिळणारी सत्ता टिकवून ठेवण्यासाठी महिलांवर हिंसाचाराचा वापर केला जातो. ग्रामीण समाजात ही सत्ता अधिक दृढ असल्यामुळे महिलांना विरोध करणे कठीण जाते. महिलांविरुद्ध हिंसाचारावर भरपूर संशोधन झाले असले तरी ग्रामीण समाजाच्या बदलत्या स्वरूपाच्या संदर्भात, विशेषतः जळगाव तालुकासारख्या विशिष्ट भौगोलिक आणि सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या भागांचा अभ्यास तुलनेने मर्यादित आहे. बहुतेक अभ्यास राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पातळीवर केंद्रित आहेत. त्यामुळे स्थानिक स्तरावर, ग्रामीण समाजातील सामाजिक बदल आणि महिलांविरुद्ध हिंसाचार यांच्यातील परस्परसंबंधाचा अभ्यास करण्याची आवश्यकता अधोरेखित होते. जळगाव तालुक्यातील ग्रामीण समाजाच्या बदलत्या स्वरूपाच्या पार्श्वभूमीवर महिलांविरुद्ध हिंसाचाराची कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय यांचा अभ्यास केल्यास धोरणात्मक नियोजन, सामाजिक हस्तक्षेप आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी उपयुक्त दिशा मिळू शकते.

**अध्ययनाचे उद्देश: १.** जळगाव तालुक्यातील ग्रामीण समाजाच्या बदलत्या स्वरूपाचा ग्रामीण महिलांच्या जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे. **२.** ग्रामीण महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराची प्रमुख सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक कारणे शोधणे. **३.** ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार प्रतिबंधासाठी प्रभावी उपायांचा अभ्यास करून योग्य शिफारशी सुचवणे.

**गृहीतकृत्ये: १.** जळगाव तालुक्यातील ग्रामीण समाजातील पितृसत्ताक मानसिकता आणि पारंपरिक मूल्यांमुळे महिलांविरुद्ध हिंसाचार वाढलेला आहे. **२.** आर्थिक अवलंबित्व, दारिद्र्य आणि बेरोजगारीमुळे ग्रामीण महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराचे प्रमाण अधिक आहे. **३.** शिक्षण, सामाजिक जागृती आणि स्थानिक पातळीवरील हस्तक्षेप कार्यक्रमांमुळे महिलांविरुद्ध हिंसाचारात घट होऊ शकते.

**अध्ययन पद्धती:** या संशोधनात ग्रामीण महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराच्या स्वरूपाचा, त्यामागील कारणांचा आणि त्यावरील उपाययोजनांचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक या दोन्ही पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. अभ्यासासाठी प्रामुख्याने दुय्यम माहितीचा आधार घेण्यात आला असून संबंधित विषयावरील पुस्तके, संशोधन लेख, प्रबंध, शासकीय व अशासकीय संस्थांचे अहवाल, जनगणनेची माहिती तसेच विश्वसनीय इंटरनेट स्रोत यांमधून आवश्यक माहिती संकलित करण्यात आली आहे. उपलब्ध माहितीचे काळजीपूर्वक वाचन व वर्गीकरण करून ग्रामीण महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक परिस्थितीचा परस्पर संबंध लक्षात घेऊन विश्लेषण करण्यात आले आहे. यासोबतच विविध अभ्यासकांचे निष्कर्ष आणि शासकीय धोरणे यांचा तुलनात्मक अभ्यास करून प्रतिबंधात्मक उपायांची उपयुक्तता समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, जेणेकरून संशोधन विषयाशी संबंधित वास्तव परिस्थिती अधिक स्पष्टपणे मांडता येईल.

**तथ्यांचे विश्लेषण:** जळगाव तालुक्यातील ग्रामीण भागाशी संबंधित शासकीय अहवाल, पूर्वी झालेले संशोधन अभ्यास तसेच उपलब्ध सामाजिक निरीक्षणांचा अभ्यास केल्यास ग्रामीण महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचारामागे सामाजिक व आर्थिक घटकांचा परस्परसंबंध स्पष्टपणे दिसून येतो. तालुक्यातील बहुतांश ग्रामीण कुटुंबे शेतीवर अवलंबून असून अल्पभूधारक शेती, अनिश्चित पर्जन्यमान, वाढते उत्पादनखर्च आणि मर्यादित रोजगार संधी यांमुळे आर्थिक अस्थैर्याची स्थिती निर्माण झालेली आहे. या आर्थिक असुरक्षिततेमुळे कुटुंबांत तणाव वाढताना दिसतो आणि त्याचा प्रत्यक्ष परिणाम महिलांवर होणाऱ्या शारीरिक, मानसिक तसेच आर्थिक हिंसाचाराच्या स्वरूपात प्रकट होतो. जळगाव तालुक्यातील ग्रामीण महिलांचे योगदान शेती, पशुपालन आणि घरगुती उत्पादन प्रक्रियेत महत्त्वाचे असले तरी त्यांना स्वतंत्र आर्थिक घटक म्हणून मान्यता मिळत नाही. त्यांच्या श्रमांना कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत आवश्यक स्थान न मिळाल्यामुळे महिलांचे आर्थिक अवलंबित्व कायम राहते. या पार्श्वभूमीवर पुरुषांचे दारूचे व्यसन हा एक गंभीर सामाजिक घटक म्हणून पुढे येतो. विविध अहवाल व निरीक्षणांतून असे आढळते की दारूच्या व्यसनामुळे कौटुंबिक उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो, वादविवाद वाढतात आणि महिलांवरील हिंसाचार तीव्र स्वरूप धारण करतो. तसेच, ग्रामीण महिलांनी शिक्षण, स्वयंरोजगार किंवा बाह्य रोजगाराच्या संधी स्वीकारण्याचा प्रयत्न केल्यास त्यास अनेक वेळा कुटुंबातील पुरुषांकडून तसेच समाजाकडून विरोध केला जातो. या विरोधामागे प्रामुख्याने पितृसत्ताक सामाजिक रचना आणि पारंपरिक विचारसरणी कारणीभूत असल्याचे दिसून येते. स्त्रीच्या सार्वजनिक क्षेत्रातील सहभागाकडे संशयाच्या दृष्टीने पाहिले जाते आणि त्यामुळे तिच्या स्वावलंबनाच्या प्रयत्नांना मर्यादा येतात. परिणामी सामाजिक बदलांची प्रक्रिया संथ गतीने घडताना दिसते.

जळगाव तालुक्यातील ग्रामीण महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांविषयी मर्यादित माहिती असल्याचेही या विश्लेषणातून स्पष्ट होते. कौटुंबिक हिंसाचारासंबंधी कायदे, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया आणि उपलब्ध शासकीय यंत्रणा यांची माहिती अपुरी असल्यामुळे अनेक प्रकरणे नोंदवली जात नाहीत. सामाजिक प्रतिष्ठेचा प्रश्न, बदनामीची भीती आणि गावपातळीवरील दबाव यांमुळे महिलांना हिंसाचार सहन करावा लागतो. एकूणच या विश्लेषणातून असे दिसून येते की जळगाव तालुक्यातील ग्रामीण समाजात शिक्षण, माध्यमे आणि विकास योजनांमुळे काही प्रमाणात परिवर्तन होत असले तरी सामाजिक मानसिकता आणि संरचनात्मक बदल अद्याप मर्यादित आहेत. त्यामुळे ग्रामीण महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराचा प्रश्न केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक पातळीवर न पाहता, तो व्यापक सामाजिक-आर्थिक संदर्भात समजून घेणे आवश्यक ठरते.

**निष्कर्ष:** सदर संशोधनातून असे स्पष्ट होते की ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार ही एक बहुआयामी आणि गुंतागुंतीची सामाजिक समस्या आहे. ही समस्या केवळ आर्थिक किंवा कायदेशीर घटकांपुरती मर्यादित नसून तिची मुळे सामाजिक रचना, सांस्कृतिक मूल्ये, पितृसत्ताक मानसिकता आणि पारंपरिक विचारसरणीत खोलवर रुजलेली आहेत.ग्रामीण समाजात होत असलेले शिक्षण, विकास आणि आधुनिकतेचे बदल महिलांसाठी नवीन संधी निर्माण करत असले तरी सामाजिक मानसिकतेत अपेक्षित बदल होताना दिसत नाही. आर्थिक अवलंबित्व, दारिद्र्य, बेरोजगारी आणि दारूचे व्यसन यांसारख्या घटकांमुळे महिलांवर होणारा शारीरिक, मानसिक आणि आर्थिक हिंसाचार अधिक तीव्र होतो. तसेच महिलांना कायदेशीर हक्कांची माहिती नसणे, सामाजिक प्रतिष्ठेची भीती आणि स्थानिक पातळीवरील आधार व्यवस्थेचा अभाव यामुळे अनेक प्रकरणे दडपली जातात. या संशोधनातून असेही निष्कर्ष निघतात की केवळ कायदे अस्तित्वात असणे पुरेसे नाही. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, सामाजिक जागृती, महिलांचे शिक्षण, आर्थिक सबलीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची सक्रिय भूमिका ही महिलांविरुद्ध हिंसाचार रोखण्यासाठी अत्यावश्यक आहे. ग्रामपंचायत, स्वयं-सहायता गट, महिला बचत गट आणि सामाजिक संस्था यांनी समन्वयाने कार्य केल्यास ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण शक्य आहे. ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी महिलांविरुद्ध हिंसाचार रोखणे ही काळाची गरज आहे. महिलांना सुरक्षित, सन्मानजनक आणि समानतेचे जीवन मिळाल्याशिवाय खऱ्या अर्थाने सामाजिक विकास साध्य होऊ शकत नाही.

**शिफारशी:** या संशोधनातून समोर आलेल्या निष्कर्षांच्या आधारे ग्रामीण महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचारास आळा घालण्यासाठी बहुआयामी आणि दीर्घकालीन स्वरूपाच्या उपाययोजना राबविण्याची आवश्यकता आहे. सर्वप्रथम ग्रामीण भागात महिलांसाठी सातत्यपूर्ण आणि स्थानिक गरजांनुसार रचलेले जनजागृती कार्यक्रम राबविणे गरजेचे असून, त्यामध्ये महिलांचे कायदेशीर हक्क, उपलब्ध शासकीय योजना आणि तक्रार नोंदविण्याच्या प्रक्रिया यांची माहिती देणे आवश्यक आहे. यासोबतच महिला बचत गट आणि स्वयं-सहायता गटांना केवळ आर्थिक सहाय्य न देता प्रशासकीय मार्गदर्शन, कौशल्य विकास आणि विपणनाशी संबंधित प्रशिक्षण देण्यात यावे, जेणेकरून महिलांचे आर्थिक स्वावलंबन अधिक सक्षम होईल. ग्रामपंचायत स्तरावर महिलांविरुद्ध हिंसाचार प्रतिबंध समित्यांची स्थापना करून स्थानिक पातळीवर तक्रार निवारणाची व्यवस्था बळकट करणे महत्त्वाचे ठरेल. तसेच ग्रामीण महिलांसाठी समुपदेशन केंद्रे आणि कायदेशीर मदत सेवा सहज उपलब्ध करून देण्यात याव्यात, ज्यामुळे हिंसाचारग्रस्त महिलांना मानसिक आधार व न्यायप्रक्रियेत प्रवेश मिळू शकेल. याशिवाय, केवळ महिलांवर लक्ष केंद्रित न करता पुरुषांसाठीही लैंगिक समानता, कौटुंबिक जबाबदारी आणि अहिंसक वर्तन यांवर आधारित प्रशिक्षण व संवाद कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे, कारण सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया ही स्त्री-पुरुष दोघांच्या सहभागाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही

**संदर्भ सूची:**

1) Deshmukh, S. (2016). *Violence against rural women in India.* New Delhi: Sage Publications.
2) Kumari, R. (2018). *Domestic violence and rural women.* Indian Journal of Social Studies, 12(2), 45 - 56
3) National Crime Records Bureau. (2021). *Crime in India 2021.* New Delhi: Government of India.
4) Government of India. (2006). *Protection of Women from Domestic Violence Act, 2005.* New Delhi: Ministry of Law and Justice.
5) देशमुख, अ) .2017). *ग्रामीण समाजशास्त्र.* पुणे.विद्या प्रकाशन :
6) पाटील, स) .रा .2018). *ग्रामीण महिलांचे सामाजिक प्रश्न.* औरंगाबाद.कैलास प्रकाशन :
7) कुलकर्णी, म) .2019). *ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार.एक समाजशास्त्रीय अभ्यास :*
8) संशोधन पत्रिका, 5(1), 23—34.
9) महाराष्ट्र शासन. (2020). *महिलांविरुद्ध गुन्हे: महाराष्ट्र अहवाल.* मुंबई: गृह विभाग.
10) पवार, डी. व्ही.(n.d.). *ग्रामीण स्त्रियांच्या समस्या आणि उपाययोजना.* पुणे: अरहत प्रकाशन

# देवदासी स्त्रियांच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनांचा अभ्यास

**भिमराव दत्तु मोटे** संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
**डॉ. संजय बी. साळुंके** मार्गदर्शक, समाजशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** समाजात स्त्रियांना समान हक्क, समान संधी आणि सर्वत्र सन्मान मिळणे साठी सर्व क्षेत्रांमध्ये जसे शिक्षण, व्यवसाय, राजकीय, कुटुंब, आणि समाज अशा सर्व ठिकाणी स्त्रियांना उन्नती करण्यातही प्रयत्न अखंडपणे सुरु आहेत. हे बदल सामाजीक न्याय, आर्थिक प्रगती, शिक्षण आणि आरोग्य आणि राजकीय सहभाग अशा सर्व क्षेत्रातून होत आहे. आणि अजूनही मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. परंपरागत मानसिकता, रूढी, परंपरा, शिक्षणाचा अभाव, महिलांना कमी मोबदला, कौटुंबिक जबाबदारी अशा अनेक कारणानी त्यांना कमी लेखले जाते. स्त्रियांची उन्नती साधण्यासाठी महिलांचे शिक्षण आणि सशक्तीकरण, योग्य मोबदला, सर्वत्र संधी, कायदेशीर हक्क देणे, असे विविध उपाय करावे लागतात. जगात सर्वत्र त्यासाठी मोठा लढा उभारून महिलांना सर्व हक्क मिळवून देत आहेत. भारतात पुरुष व स्त्री दोघानाही समान हक्क दिले आहेत. महिलांच्या उन्नतीसाठी सामाजिक अधिकार, आर्थिक मदत, आरोग्य सेवा, विविध क्षेत्रात महिलांना आरक्षण असे उपाय करत आहेत तसेच भारतामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या प्रथा आहेत त्यामध्ये स्त्रियांशी संबधित असलेल्या बालविवाह सतीप्रथा, देवदासी प्रथा आशा अनेक कु-प्रथा अस्तित्वात आहेत. देवदासी म्हणजे आजन्म अविवाहित राहून गणिका वृत्तीने देवदेवतांची सेवा करणारी अथवा नवस फेडण्यासाठी देवतांना अर्पण केलेली स्त्री. देवदासी याचा अर्थ हिंदू देवतेस मूर्तीस पूजा करावयाच्या प्रतिमास देवळास किंवा धार्मिक संस्थास देवदासी किंवा जोगतीण म्हणून किंवा अन्य

कोणत्याही नावाने समर्पित केलेली स्त्री असा आहे. आज भारत २१ व्या शतकात विविध क्षेत्रात प्रगती करीत आहे. परंतु भारतात देवदासी सारखी प्रथा आपल्याला दिसून येते. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात कि एखाद्या राष्ट्राची प्रगती तेव्हाच होईल जेव्हा त्या राष्ट्रातील महिलांची प्रगती होईल परंतु आज देशात वास्तविकता काही वेगळीच दिसून येते. अनेक प्रश्नांना महिलांना तोंड द्यावे लागत आहे. कारण भारतीय समाजात स्त्रीवर लादलेले निकृष्ठ जीवन हेच तिची दुरवस्था असण्याचे कारण आहे. त्यातूनच देवदासी सारखी प्रथा अस्तित्वात आलेली आहे. देवाला नवस फेडण्यासाठी आपल्या मुलींना देव आणि देवीना देवदासी म्हणून सोडणे किंवा वाहने ही एक अनिष्ट कुप्रथा प्राचीन काळापासून या देशात चालू आहे. मानवी संस्कृतीला आणि समाजाला काळिमा फासणारी व स्त्रियांचे सर्व प्रकारचे शोषण करणारा अमानुष प्रकार आहे. हा प्रकार गेली हजारो वर्ष देवाधर्माच्या नावावर निरंकुशपने चाललेला आहे. तो अमानुष प्रकार बंद व्हावा देवदासीना समाजात मानसन्मानाने जगता यावे स्त्रियांचे शोषण थांबावे व देवदासी च्या चळवळी च्या माध्यमातून या कु-प्रथा नष्ट होणे गरजेचे आहे. आज पाहिलं गेले तरी देवदासी हा एक चिंतेचा विषय आहे. त्यामुळे या विषयावर संशोधन होणे खूप महत्वाचे आहे.

**मूळ शब्द:** देवदासी, लिंगभाव -असमानता, शोषण, संस्कृती

---

**प्रस्तावना:** मानवी जीवनामध्ये स्त्री आणि पुरूष हे दोन महत्वाचे घटक मानले जातात. त्यांच्यामुळेच मानवजात वृद्धिंगत झालेली आहे. असे असले तरी पुरूषाला जेवढे महत्वाचे स्थान दिले, त्या प्रमाणात स्त्रीला दिले नसल्याचे दिसून येते. पुरूषप्रधान संस्कृतीमुळेच स्त्रीवर अनेक प्रकारे बंधने लादलेली आहेत. समानतेच्या पातळीवर स्त्री अद्याप ही पुढे आलेली नसल्याचे दिसते. प्राचीन काळापासून स्त्रीला अशाप्रकारे दुय्यम स्वरूपाची वागणूक दिलेली आहे. शिक्षण घेण्यासाठी तिला अधिकार नव्हता. मात्र महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले हया समाजसुधारक दांपत्यामुळे स्त्री शिक्षणाच्या प्रवाहात आल्यामुळे तिचा हळूहळू विकास होऊ लागला. मात्र अज्ञान, अंधश्रद्धा, देवभोळेपणा, दारिद्रय आदी गोष्टींमुळे स्त्रीवर अन्याय अत्याचार होत राहिला. देव आणि धर्माचा तिच्यावर प्रभाव असल्यामुळे अनेक अनिष्ट चालीरीतींमध्ये ती गुंतली गेली. साहजिकच धार्मिक जीवनामध्येही तिच्यावर अत्याचार होत राहिले. स्त्रीची जाणीवजागृती नसल्यामुळेच स्त्री अन्यायाच्या गर्तमध्ये अडकल्याचे जाणवते. भारतामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या प्रथा अस्तित्वात असल्याचे दिसून येतात. त्यामध्ये स्त्रियांशी संबधित असलेल्या बालविवाह, सतीप्रथा, केशवपन पडदापध्दती, बहुपत्नीत्व, स्त्रीशिक्षण, स्त्रीभ्रूणहत्या या समस्या महत्वपूर्ण होत्या. देवदासी म्हणजे 'आजन्म अविवाहित राहून गणिका वृत्तीने देवदेवतांची सेवा करणारी अथवा नवस फेडण्यासाठी देवतांना अर्पण केलेली स्त्री.' भारतीय संस्कृती कोषानुसार, 'जी स्त्री देवाची सेवा करून गणिकावृत्तीने जीवन जगते ती म्हणजे देवदासी होय. भारतीय समाजविज्ञान कोषानुसार, 'देवदासी म्हणजे आईवडील अथवा पालकांकडून समारंभपूर्वक व विधीपूर्वक देवाच्या सेवेसाठी अर्पण केलेल्या मुली.' १९२९ च्या मद्रास देवदासी निर्मूलन कायद्यानुसार, 'देवदासी म्हणजे कोणतीही अविवाहित हिंदू स्त्री जिला मंदिरांच्या सेवेसाठी देवीला वाहिले जाते.' १९३४ च्या मुंबई देवदासी संरक्षण कायद्यानुसार, 'देवदासी म्हणजे कोणतीही अविवाहित स्त्री जिला एखादया हिंदू देवाला, देवमूर्तीला, देवळांना किंवा धार्मिक संस्थांना वाहिले जाते.' तर कर्नाटकच्या १९८१ च्या देवदासी पुनर्वसन कायद्यानुसार, 'देवदासी म्हणजे जी स्त्री देवाला सोडली जाते ती म्हणजे देवदासी होय.' थोडक्यात देवीचा नवस फेडण्यासाठी लोक आपल्या मुलींना देवाला अर्पण करत त्यांना देवदासी म्हणत.

**जगातील विविध संस्कृतीमधील देवदासी प्रथा:** देवदासी म्हणजे जी स्त्री देवाची सेवा करून गणिका वृत्तीने जीवन जगते ती म्हणजे देवदासी होय. ' किंवा "एखादया देवतेला नवसाने वाहिलेली मुलगी म्हणजे देवदासी होय." जगातील निरनिराळ्या प्राचीन संस्कृतीत देवदासी प्रथा अस्तित्वात होती. साधारणपणे बॅबिलोन, इंका, सुमेरिया, इजिप्त, सिरिया, अर्मोनिया, लिडिया, ग्रिस, रोम, खाल्डिया इ. संस्कृतीत देवदासी प्रथा होती. यावरुन ही प्रथा प्राचीन असल्याचे दिसून येते. यात बॅबिलोन संस्कृती ही फार प्राचीन संस्कृती मानली जाते. इ.स. पूर्व ५००० वर्षापूर्वी अस्तित्वात असलेल्या या संस्कृतीत मिलिटा देवीची ८०० पौंड वजनाची सुवर्णाची मूर्ती होती. या संस्कृतीच्या नियमानुसार तेथील प्रत्येक स्त्रीने तिच्या आयुष्यात एकदा तरी परपुरुष संबंध ठेवला पाहिजे असे मानले जाई. अनेक सौभाग्यवती, कुमारी स्त्रिया सुध्दा देवीच्या मंदिरात येवून बसत आणि जो पुरुष जिच्या पदरात चांदीचे नाणे टाकील तो पुरुष देवीच्याच इच्छेने पाठविलेला आहे असे समजून या स्त्रिया त्या पुरुषाबरोबर संबंध ठेवीत असत. ती स्त्री प्रसंगी कुमारी असल्यास त्या पुरुषाबरोबर विवाह्वी घडून येत असे. म्हणजेच मिलिटा देवीला देवदासी वाहण्याची प्रथा बॅबिलोनियन संस्कृतीमध्ये होती असे दिसते. बॅबिलोन संस्कृतीप्रमाणे पेरु देशातील प्राचीन इंका संस्कृतीमध्ये देवदासी जोगिणीची मठसंस्था होती. ही संस्था मुख्य मंदिराच्या आश्रयाखाली चालत असे. देवाच्या मूर्तीसमोर रात्रभर बसून मंत्रपठण करावे लागे. देवतेसाठी पहारा ठेवावा लागे. काहीजण विद्यार्जनासाठी मंदिराच्या परिसरामधील वनश्रीमध्ये जावून बसत. काही लहान मुलीही सूर्यदेवतेच्या सेवेला वाहिलेल्या असत. त्याही मठामध्ये रहात व तेथील स्त्री व्यवस्थापिकेच्या कडक शिस्तीखाली त्यांना आपले आयुष्य कंठावे लागत असे. या मुलींना शिक्षणासह इतरही कामे करावी लागत असत. त्यामध्ये मठातील अग्नीकुंडलावर जागता पहारा ठेवणे, मंदिरासाठी लागणारे कापडाचे पडदे तयार करणे, त्यावर उत्तमोउत्तम कलाकुसरीची कामे करणे, मुख्य धर्मगुरुचे कपडे तयार करणे इ. कामाचा समावेश केलेला होता. यातील एखादया तरुण कुमारिकेने तेथील नियमांचा भंग केला तर, तिला तेथे जिवंत पुरुन टाकीत. इतकेच नव्हे तर तिच्या संबंधीत प्रियकराला देखील सुळावर चढवीत असत. असे मठातील वातावरण होते. इंका संस्कृतीप्रमाणे प्राचीन सुमेरियन संस्कृतीमध्येही प्रत्येक घरटी मुलगी देवाला वाहिलेली असली पाहिजे आणि तिने आपल्या शिलाचा भंग करुन देवदासी म्हणून राहिले पाहिजे असा दंडक होता." तसेच लिडिया, सिरिया, अर्मोनिया, खाल्डिया, इजिप्त व अन्य प्राचीन संस्कृतीमध्येही देवदासीची प्रथा होती. तेथे अस्टार्ट, बाल, अमॉस, याहवे या देवतांच्या देवदासी असत. बॅबिलोन संस्कृतीत इश्तार मातृदेवतेलाही देवदासी वाहिल्या जात होत्या.

ही देवता अखंड कुमारिका समजली जात होती. तिचे वैशिष्ट्य म्हणजे भाजीपाला, पशुप्राणी निर्माण करणे हे होते. तिच्या सेवेसाठी अनेक देवदासी स्त्रिया असत. प्राचीन इजिप्तमध्ये ॲमोन नावाच्या देवतेला मुली वाहण्याची प्रथा असल्याचा उल्लेख आढळून येतो.

**लिंगभाव असमानता व स्त्रीवादी दृष्टिकोन:** भारतीय समाजात एकीकडेस्त्रीला पवित्र देवता, माता, लक्ष्मी रूपात पाहिले जात आणि दुसरीकडे पुर्णतः विरोधी धरणा असल्याचे निदर्शनास येते. स्त्रीला राजस्व काळात अशुध्द मानले जाते तसेच विधवा स्त्रीया, परित्यक्तास्त्रीया यांना अशुभ मानुन तिला समाजाच्या प्रवाहापासुन बाजुला सारले जाते आणि विविध चाली-रीती गैरसमजुती रूढी परंपराचा आधार घेवुन स्त्रीचे महत्व कमी केले जाते. आणि पुरूष हा कसा वंशाचा दिवा, बापाचा उत्तराधिकारी, कुटूंबाचे पोषण करणारा श्रेष्ठ मानुन पुरूषाला महत्वाचे स्थान दिले व स्त्रीयांना गौण स्थान दिले जाते. समाजशास्त्रामध्ये लिंग आणि समाज या दोन्हीही संकल्पना महत्वाच्या आहेत. लिंग अधारे स्त्री आणि पुरूष असा भेदभाव केला जातो. तसे स्त्री आणि पुरूष निसर्ग नियमाप्रमाणे समानच आहेत परंतू समाजात स्त्रीयांना दिले जाणारे स्थान, प्रतिष्ठाहक्क अधिकार, शिक्षणाच्या संधी, सामाजिक प्रगतीचे अधिकार यावर स्त्रीयांचा दर्जा अवलंबुन असतो. कोणत्याही समाजातील स्त्रीचा सामाजिक दर्जा त्या स्त्रीला पुरूषाच्या तुलनेत कौटुंबीक सामाजिक, राजकीय, अर्थिक सांस्कृतीक क्षेत्रात किती व कोणत्यासंधी मिळतात स्त्रीया कोणेती कर्तव्य पार पाडतात यावर अवलंबुन असतो.

**धार्मिक आणि सांस्कृतिक रूढींचा प्रभाव**: देवदासींच्या प्रश्नाशी धार्मिक व सांस्कृतिक संदर्भ निगडीत आहेत. मानवी जीवनात धार्मिक व सांस्कृतिक मान्यता म्हणजे उत्सव, सणवार, धर्माच्या बदलणाऱ्या आयामांची गतिमान मानसिकता होय. धर्म आणि संस्कृती यात लक्ष्मणरेषा आखता येत नाही. धार्मिक भावनेचा संबंध जेव्हा व्यवसाय, राजकारण, नैतिकता इत्यादी गोष्टींशी जुळतो तेव्हा अनेक प्रश्न निर्माण होतात. जॉन क्युबर यांनी धर्माला सांस्कृतिक व्यवहाराचे प्रतीक मानले आहे. पावित्र्य, विश्वास, सांवेगिक भावना इत्यादींनी युक्त असे सांस्कृतिक प्रगत वर्तन म्हणजे धर्म होय, असे त्यांचे मत आहे. विज्ञान व शिक्षण यामुळे धर्माचे सामाजिकतेत परिवर्तन होत आहे. त्यामुळे धर्म म्हणजे केवळ धार्मिक मान्यता नव्हे तर सामाजिक वास्तवावर धर्म निर्धारण झाले पाहिजे, असा विचार प्रस्तुत होत आहे. जीवनाची धारणा करतो तो धर्म. सामाजिक संस्था, विचारप्रणाली, उत्सवविधी नैतिकता आणि जीवनाकडे सौंदर्यदृष्टीने तसेच मानवतेच्या दृष्टीने आपण किती व कसे पाहतो यावर ही धारणा अवलंबून असते. या सर्व गोष्टींमध्ये नवीन भौतिकवादी दृष्टिकोन सांस्कृतिक प्रभावी घटक परिवर्तन घडवून आणत असतात. कोणत्याही कारणाने का होईना देवाला मुलगी वाहणे ही धार्मिक गोष्ट मानली जाते. स्त्रियाही पाच घरे जोगवा मागतात. गळ्यात देवीच्या नावाने मणी बांधतात. त्याला 'गंड दर्शन' म्हणतात. देवी आपल्या अंगात संचार करते, आपणास भविष्यकाळ समजतो, देवपण येते, अशा अनेक समजुती देवीला अर्पण करणाऱ्यांमध्ये आणि देवदासींमध्ये आहेत. समाजही त्यांना मान्यता देतो. धार्मिक कार्यात त्यांना मान दिला जातो. देवदासी परंपरा चालू ठेवली नाहीतर देवी कोपते, घराण्यातील मुले जगत नाही, कुटुंबाची प्रगती होत नाही, महारोग आजार लागतो अशा कल्पना धर्माच्या नावाखाली दृढमूल झालेल्या असतात. यात धार्मिक कारण, अंधश्रद्धा ह्याच गोष्टी प्रधान असतात. कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमेवर देवदासींची संख्या याच कारणामुळे फार मोठी आहे. 'जट' येणे म्हणजे साक्षात यल्लम्माची कृपाच मानली जाते. थोड्याफार सामान्य कारणासाठी देवीची अवकृपा मानली जाते.

**देवदासी एक धार्मिक प्रथा:** भारतात अनेक परंपरा व रितीरिवाज आहेत, त्यातल्या काही प्रथा आजही अस्तित्वात आहेत, तर काही संपल्या. अशीच एक जुनी प्रथा देवदासींची होती. तुम्ही ही देवदासी हा शब्द कधीतरी नक्कीच ऐकला असेल. देवदासी या शब्दाचा अर्थ देवाची दासी म्हणजेच सेवा करणारी असा होतो. ही हजारो वर्षे जुनी प्रथा आहे, पण कालांतराने ती कुप्रथा बनली. देवदासी प्रथा सहाव्या शतकात सुरू झाली होती. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने या प्रथेवर बंदी घातली होती. मात्र, आताही दक्षिण भारतातील अनेक मंदिरांमध्ये देवदासी परंपरा दिसून येते. पद्म पुराण, मत्स्य पुराण, विष्णु पुराण आणि कौटिल्य अर्थशास्त्रातही देवदासी प्रथेचा उल्लेख आहे, असं म्हणतात. प्राचीन काळी देवदासींचे खूप महत्त्व होते आणि त्यांच्याकडे आदराने, सन्मानाने पाहिलं जायचं. त्याकाळी देवदासी दोन प्रकारच्या असायच्या. त्यातील एक मंदिरात सेवा करणाऱ्या आणि दुसऱ्या नृत्य करणाऱ्या होत्या. देवदासीचे हळूहळू कुप्रथेत रूपांतर झाले. सुरुवातीला कुमारी मुलीचं लग्न देवाशी केलं जायचं. त्यामुळे प्रत्येक मंदिरात देवदासींसाठी एक पुजारी नेमण्यात आले होते. ते पुजारी देवदासींना देवतांशी भेट घालून देण्याच्या नावाखाली स्वतःशी शारीरिक संबंध ठेवायला सांगायचे. हळूहळू श्रीमंत लोकही देवदासींचे शोषण करू लागले आणि नंतर त्या गरोदर राहिल्यावर त्यांना सोडून दिलं जायचं. त्यामुळे ही प्रथा कधी कुप्रथा झाली हे कळालंच नाही आणखी सुद्धा मोठ्या प्रमाणात गुप्त पद्धतीने सुरु आहे.

**देवदासींच्या समस्या:** देवदासी ही प्रथा मानवी समाजाला लागलेले एक ग्रहण आहे. यल्लमाशी (देवीशी) मुलीचे लग्न लावून दिले जाते. एकदा का मुलीचे लग्न लावून दिले की त्या मुलीला दुसरा विवाह कायदेशीर करता येत नाही. तिला देवीच्या नावावर पोट भरावे लागते. गावोगावी यल्लमाचा जग घेऊन भटकावे लागते. लहान वयातच त्यांना ही कामे करावी लागतात. परंतु देवदासी जर वयात आल्यावर तिच्या खऱ्या अर्थाने शोषणाला सुरुवात होत असते. आणि अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते.

**आर्थिकदृष्ट्या मागासलेपणा एक समस्या:** आर्थिकदृष्ट्या मागासलेपणा ही अत्यंत महत्त्वाची समस्या आहे. घरची गरिबीची परिस्थिती असल्यामुळे मुलीला सांभाळणे त्यांना जमत नाही म्हणून त्या देवदासी देवीच्या नावाने जोगवा मागून पोट भरतात. त्यातून जे त्यांना मिळते त्यामध्ये त्यांचे पोट देखील भरत नाही. म्हणून त्यांना सुरुवातीला देहविक्री करावी लागते व शेवटी वेश्या व्यवसाय करूनच देवदासीला आपले पोट भरावे लागते. समाजसुद्धा देवदासीला उपभोगाचे साधन म्हणूनच तिला पहातो व तिचा उपयोग करून घेतो. यातूनच समाज तिचे आर्थिक, सामाजिक व नैतिक शोषण करतो. हे सर्व अनैतिक मानले जात नाही.

**पुरुष (झुलवा) प्रथा एक समस्या :-** देवदासीची काळजी घेणारा पुरुष (झुलवा) तिला पाहिजे असतो. तो तिचा पती असत नाही तर तिची काळजी घेणारा समजला जातो. त्यानंतर ती देवदासी दुसरा-तिसरा पुरुष (झुलवा) करते आणि कालांतराने ती आपोआप वेश्या

व्यवसायाकडे वळते. या प्रथेमुळे देवदासींच्या बाबतीतच नव्हे तर तिच्यापासून जन्मलेल्या मुलांच्या जीवनात त्या मुलांचा काही दोष नसताना सुद्धा त्यांना समाजात गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागते. कारण यातून जन्मलेल्या मुलांना समाजात कायदेशीर हक्क / दर्जा मिळत नाही. ही मोठी समस्या मानली जाते.

**वृद्धापकाळातील समस्या:** देवदासी ही त्या कुटुंबाचे आर्थिकदृष्ट्या कमावती स्त्री म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. जो पर्यंत ती तरुण आहे तोपर्यंत तिच्या जीवावर घरातील सर्वजण आपले जीवन चांगले जगत असतात परंतु ती वृद्ध झाली की तिचे उत्पन्न थांबते. ती जोगवा मागू शकत नाही किंवा वेश्या व्यवसाय करू शकत नाही. तिला तिचे शरीर साथ देत नाही. अशा वेळेला घरातील सर्व मंडळी तिच्याकडे ढुंकून सुद्धा बघत नाहीत व म्हातारपणी तिची कोणीही काळजी घेत नाही. उपासमारीची वेळ तिच्यावर येते व ती भीक मागून जगते आणि बेवारस म्हणून तिला मरावे लागते.

**देवदासी व्यवस्था आणि महिलांचे जीवन:** मंदिरात सेवेसाठी मुलीला सक्तीने अर्पण केले जाते. कोइम्बतूरमध्ये, अशा मुलींच्या मंदिरात प्रवेशानिमित्त केल्या जाणाऱ्या धार्मिक विधींमध्ये एक प्रकारचा विवाह सोहळा समाविष्ट आहे."त्रावणकोरच्या मंदिरांमध्ये काम करणाऱ्या तरुणींना देवदासी म्हणतात" त्यांच्या समर्पण आणि जीवनशैलीचे खालील वर्णन उल्लेखनीय आहे कारण, त्यांच्या जीवनातील नीच क्रियाकलापांकडे दुर्लक्ष करूनही, ते देवतेशी लग्न का करतात हे स्पष्ट करते. देवदासींच्या लग्नाचा मूळ उद्देश असा होता की देवतेशी लग्न झाल्यानंतर, त्या सामान्य घरगुती जीवनाचा त्याग करतील आणि त्यांचे उर्वरित आयुष्य देवतेच्या सेवेसाठी समर्पित करतील. हिंदू मंदिरांमध्ये देवदासींची स्थिती रुग्णालयातील सुईणी सारखी असू शकते. अभिषेक काळातील विधी - दासीचा देवतेशी विवाह करण्याचा विधी अजूनही दासीच्या कलंकित जीवनाच्या खुणा आहेत, जे आजच्या काळाच्या अगदी विरुद्ध आहे. अशा पद्धतीने लग्न करणारी मुलगी सहसा ६ ते ८ वर्षांच्या दरम्यान असते. स्थानिक मंदिरातील देवता वर म्हणून काम करते. तेव्हापासून, ती त्या देवाची पत्नी बनते. असे समजले जाते की तिने तिचे उर्वरित आयुष्य कर्तव्य दक्षतेने आणि गंभीरपणे त्या देवतेच्या सेवेसाठी समर्पित केले आहे, जसे पवित्र वैवाहिक बंधनांनी बांधलेली एक समर्पित पत्नी तिचे उर्वरित आयुष्य देवाला समर्पित करते. तिच्या पतीची सेवा. या सर्व गुणांनी युक्त असलेल्या देवदासींचे जीवन निःसंशयपणे अत्यंत पवित्र आणि निष्कलंक होते. आजही, मंदिर तिला आधार देते. मंदिरातील उत्सवांमध्ये ती उपवास करते. अपमारगम समारंभाशी संबंधित सात दिवसांचा उपवास हे त्याचे एक उदाहरण आहे. या उपवासात, तिने कठोर शिस्त पाळली पाहिजे. ती फक्त एकदाच जेवते, आणि तेही मंदिरात. याचा अर्थ असा की किमान या सात दिवसांच्या कालावधीत, तिला मृत्यूपर्यंत आज्ञा दिल्याप्रमाणे तिचे जीवन जगले पाहिजे. तिच्या काही दैनंदिन क्रियाकलाप खूप मनोरंजक वाटतात. ती दररोज संध्याकाळी आरतीत भाग घेते, देवाचे गुणगान करते, त्याच्यासमोर नाचते आणि जेव्हा त्याची मिरवणूक जवळून जाते,

**देवदासीचे स्वरुप व व्याप्ती:** देवदासी म्हणजे आजन्म अविवाहित राहून गणिका वृत्तीने देवदेवतांची सेवा करणारी स्त्री होय. अशी तिची व्याख्या पूर्वीपासून केली जात होती. पण आज मात्र धनिकांच्या संभोगसुखासाठी आरक्षित केलेली स्त्री अशी तिची व्याख्या केली जाते म्हणजेच काळानुसार देवाच्या सेवेत असणाऱ्या देवदासी भोगदासी कशा बनल्या व त्याचे स्वरुप सतत कसे बदलत गेले याचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधामध्ये केलेला आहे. याशिवाय त्यांच्या विवाहविधीचे स्वरुप, त्यांना पाळाव्या लागणाऱ्या प्रथा, परंपरेचे स्वरुप, त्यांना जवळ ठेवावी लागणाऱ्या निरनिराळया प्रतिकांचे स्वरुप एकूणच त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवन कसे आहे याच्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**उद्दिष्टे:** सदर शोध निबंधाची उदिष्टे खालील प्रमाणे नमूद केले आहेत १. देवदासी प्रथेच्या धार्मिक आणि सांस्कृतिक मुळांचा शोध घेणे. २. लिंगभाव समानतेच्या आधारे या प्रथेच्या निर्मूलनासाठी उपाययोजना सुचवणे. ३. देवदासी प्रथेमुळे स्त्रियांच्या लैंगिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्यावर झालेल्या परिणामांचे विश्लेषण करणे.

**देवदासी सोडण्याची प्रमुख कारणे:** १.देवदासी डोक्यातील केसांच्या जटा वाढवणे. २. मुल बाळ होण्यासाठी देवीला नवस बोलणे. ३. रोगापासून संरक्षण व्हावे किंवा तो बरा व्हावा म्हणून नवस बोलणे

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत संशोधन विषयांचा अभ्यास करताना मी समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. देवदासी प्रथेच्या मुळापर्यंत जाण्याचा माझ्या संशोधनाचा प्रमुख भाग असल्याने मी समाजशास्त्रीय संशोधन पध्दती अवलंबली आहे. उपलब्ध झालेल्या संदर्भसाधनांचे अंतर्गत व बहिर्गत परिक्षणाद्वारे सत्यता तपासून मगच संशोधन लिखाणाकरीता वापर केला आहे. सध्याच्या परिस्थितीत देवदासी, तिचे वास्तव जीवन, राहणीमान, समाजाचा व सरकारचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन, समाजात त्यांना मिळणारी दुय्यम प्रकारची वागणूक, समाजातील तिचे स्थान या सर्वांचे विवेचन माझ्या प्रस्तुत संशोधनात केलेले आहे.

**ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भ:** गावाबाहेर राहणाऱ्या या देवदासी घरोघरी जाऊन जोगवा किंवा भिक्षा मागतात. घराघरांतून जे साहित्य मिळेल त्यांमधून त्यांचा उदर्निवाह केला जातो. मात्र कोणतेही घर आणि ओळख नसलेल्या या देवदासींच्या बाबत अनेक घटना आणि गुन्हे घडत असतात. गावातील प्रतिष्ठित व्यक्तींकडून या स्त्रियांवर अनेकदा लैंगिक अत्याचार केल्याचे दिसून आले आहे. या बाह्यसंबंधातून जन्माला आलेल्या बाळांच्या नशीबी देखील हेच आयुष्य पुढे येते. देवदासींच्या मुलांच्या शिक्षणाच्या आणि भविष्याचा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. या मुलांना त्यांच्या वडिलांची नावे देखील दिली जात नसल्यामुळे त्यांना समाजामध्ये मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. देवदासी मुली मंदिरात पूजा, नृत्य (जसे की भरतनाट्यम) आणि इतर धार्मिक सेवा करत असतात. ही प्रथा दक्षिण भारतात, विशेषतः कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्रात, सहाव्या ते बाराव्या शतकापर्यंत व्यापक होती. त्या काळात देवदासींना सामाजिक आदर होता. त्या मंदिरांच्या कला आणि संस्कृतीचे रक्षक होत्या आणि राजे आणि सम्राट त्यांना आर्थिक मदत करत असत. पण सध्याच्या काळामध्ये होणाऱ्या त्यांच्या शोषणाचे आणि अत्याचारांचे प्रमाण वाढले आहे. यामुळे देवदासी परंपरा ही काळाच्या ओघामध्ये शोषणाचे ठरत आहे.

**स्त्री-पुरुष असमानतेतील विचारधारा:** भारतीय समाजात स्त्रिया पवित्र व दैवी वा ईश्वरी आहेत अशी धारणा प्राचीन काळापासूनच आहे. स्त्रियांच्या नावासमोर देवी हा शब्द जोडण्याचा प्रभात आजच्या काळातही सुरू आहे. या धारणेच्या पूर्णतः विरोध असणारी धारणा देखील भारतीय समाजात फक्त रुजली आहे ती म्हणजे मासिक धर्म या कारणामुळे स्त्रिया या अशुद्ध वा प्रदूषित असतात. स्त्रियांच्या स्थितीबाबतच्या अशा धारना अत्यंत प्रभावी असल्याचे सर्वच समाजात दिसून येते. अशा धरणा विचारधारेच्या मुळाशी असतात वर्ण व जातीच्या श्रेष्ठ कनिष्ठ व्यवस्थेत पुरुषां प्रमाणेच स्त्रिया देखील समाविष्ट आहेत. कनिष्ठ मानल्या जाणाऱ्या जातीमधील स्त्रिया चरित्रहीन असतात असे श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या जातीमधील काही स्त्रिया मानतात तर या उलट श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या जातीमध्ये स्त्रियांबाबत कनिष्ठ जातीमधिल स्त्रियांचे अनेक पूर्वग्रह असल्याचे दिसून येतात.सामाजिक संरचनात्मक दृष्टीने पितृसत्ताक व्यवस्था हे स्त्री पुरुष असमानता निर्माण होण्याचे एक प्रमुख कारण आहे.

**समारोप:** अशाप्रकारे असे म्हणता येईल की समाजात सुव्यवस्था राखणे पुनरावलोकनाधीन आहे ते धार्मिक विधी करत असत, मंदिर स्वच्छ आणि नीटनेटके ठेवत असत, मूर्तीसमोर दिवे लावत असत आणि नृत्य, संगीत आणि वाद्यांद्वारे भक्तीपूर्ण वातावरण निर्माण करत असत, ज्यामुळे लोकांना मंदिराकडे आकर्षित केले जात असे. सर्व स्तरातील लोक देवदासी बनण्यास मोकळे होते. धार्मिक परंपरेच्या रूपात उगम पावलेली ही प्रथा मध्ययुगीन समाजात अनेक वाईट गोष्टींमध्ये अडकली होती. देवदासींद्वारे मंदिरात पवित्रता आणि अध्यात्म स्थापित करण्याची विचारसरणी मनोरंजनाचे आणि महिलांच्या शोषणाचे साधन बनली. पवित्र मानल्या जाणाऱ्या देवदासींना वेश्याव्यवसायात भाग पाडले जात असे. मंदिर प्रशासन आणि राज्यासाठी त्या उत्पन्नाचे साधन होत्या. अत्यंत वाईट ही कु प्रथा होती ती आज ही गुप्त पद्धतीने सुरु आहे याकडे गांभीर्याने बघण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची :**

1. जोशी महादेवशास्त्री (संपा.), 'भारतीय संस्कृतीकोश', खंड ४, भारतीय संस्कृतीकोश मंडळ प्रकाशन, पुणे, १९६७, पू. ४४७.
2. काब्राल इसा मारीयू, 'गोमंतकातील देवदासी चिखलातून हिऱ्याच्या खाणीकडे', पैंगीणकर अजित (संपा.), 'गोमंतक मराठी समाज हीरक महोत्सव गौरवग्रंथ विशेषांक', १९८६, पू. नाही.
3. कुलकर्णी मदन, 'देवदासी यल्लमाच्या जोगतिणी', विजय प्रकाशन, नागपूर, १९९४, पू. १५१.
4. बोरकर बा.भ., प्रस्तावना, 'भाविण', प्रिया प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, १९८६, पृ. ५.
5. भारतीय समाज संरचना आणि समस्या – डॉ प्रदीप आगलावे
6.समकालीन भारतातील अनुवाद मंजुषा गोसावी
7.धर्माचे समाजशास्त्र प्रा.जागीरदार
8. शीतला सहाय, देवदासी सती प्रथा और कन्या हत्या और भारतीय साहित्य में महिलाओ पर अभद्र कहावतें २०२२, सिद्धार्थ बुक्स
9. राजेश ह्जेला, कुप्रथा के नाम पार यौन उत्पिडन समाज कल्याण, नई दिल्ली मे २००१
10. पंडित महादेवशात्री जोशी, भारतीय संस्कृती कोषखंड ७ भारतीय प्रेस पुणे १९७९ पृ. २९५
11. उत्तम कांबळे देवदासी आणि नग्नपूजा, सयानी प्रभादेवी रोड मुंबई जून २००२
12. वसंत राजस, देवदासी शोध आणि बोध सुगावा प्रकाशन पुणे २००४
13.डॉ.रा.चि ढेरे, लोकसंस्कृतीचे उपासक, पुणे १९९६ पृ.५१

# वृध्द महिलांचे आरोग्य आणि लिंगभाव समस्या: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**कु. कोमल जादुगर बनकर** संशोधक विद्यार्थी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर.
**डॉ. वाय. आर. घोडके** मार्गदर्शक, समाजशास्त्र विभाग, वसंतदादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा. बीड

**गोषवारा**: भारतीय समाजव्यवस्थेत वृध्दत्व ही केवळ एक जैविक प्रक्रिया नसून ती एक सामाजिक आणि सांस्कृतिक समस्या देखील आहे. प्रस्तुत शोधनिबंधात वृध्द महिलांच्या आरोग्यावर लिंगभाव कशा प्रकारे परिणाम करतो, याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मागोवा घेण्यात आला आहे. पुरुषप्रधान संस्कृती, आर्थिक परावलंबित्व आणि कौटुंबिक संरचना यांमुळे वृध्द महिलांना आरोग्याच्या बाबतीत अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. या अभ्यासासाठी दुय्यम स्रोत आणि उपलब्ध साहित्याचा आधार घेण्यात आला आहे. संशोधनाअंती असे दिसून येते की, वृध्द महिलांचे आरोग्य हे केवळ शारीरिक नसून ते त्यांच्या सामाजिक स्थानाशी आणि लिंगभावाधारित भेदभावाशी निगडित आहे. त्यांच्या आरोग्याच्या समस्यांकडे 'दुर्लक्षित घटक' म्हणून पाहिले जाते, ज्यासाठी धोरणात्मक बदलांची आवश्यकता आहे. वृध्द महिलांच्या आरोग्यावर लिंगभाव कशा प्रकारे परिणाम करतो, याचा शोध घेण्यात आला आहे.

**मुख्य शब्द:** वृध्द महिला, लिंगभाव, आरोग्य समस्या, समाजशास्त्रीय दृष्टिकोन, पितृसत्ताक पध्दती, सामाजिक दुर्लक्ष

**प्रस्तावना:** मानवी जीवनाचा प्रवास हा बालपण, तारुण्य, आणि वृध्दत्व अशा विविध टप्प्यातून होत असतो. 'वृध्दत्व' ही एक नैसर्गिक आणि अपरिहार्य प्रक्रिया असली, तरी तिचे सामाजिक अनुभव पुरुष आणि स्त्रियांसाठी भिन्न असतात जागतिक स्तरावर वैदयकीय क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे मानवाचे सरासरी आयुर्मान वाढले आहे. ज्याला आपण 'लोकसंख्येचे वृध्दत्व' म्हणतो मात्र या वाढत्या लोकसंख्येत वृध्द महिलांचे प्रमाण लक्षणीय आहे, ज्याला समाज शास्त्रात "वृध्दत्वाचे स्त्रीकरण" (Feminization of Ageing) असे म्हटले जाते. भारतीय समाज हा पितृसत्ताक पद्धतीवर आधारलेला आहे. या व्यवस्थेत स्त्रीच्या जन्मापासूनच तिच्या वाट्याला दुय्यमत्व येते. तारुण्यात कौटुंबिक जबाबदारया, बाळंतपण आणि घरकाम यात स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणारी स्त्री

जेव्हा वृध्दत्वाच्या उंबरठ्यावर पोहोचते, तेव्हा तिला अनेक गुंतागुतीच्या समस्यांना सामोरे जावे लागते. पुरुषांच्या तुलनेत माहिलांचे वृध्दत्व अधिक कष्टदायक ठरण्याचे मुख्य कारण म्हणजे 'लिंगभाव' हे आहे. 'लिंगभाव' हा शब्दप्रयोग समाजशास्त्रीय अर्थाने जेव्हा आपण करतो, तेव्हा त्याला एक विशिष्ठ अर्थ असतो. या नवीन अर्थानुसार 'जेंडर' या संज्ञेचा वापर स्त्री पुरुषांची सामाजिक व सांस्कृतिक व्याख्या स्पष्ट करण्यासाठी करतात, ज्याला 'लिगंभाव' अस म्हणतात. स्त्री व पुरुषांच्या भूमिका यांत समाजात जो भेद केला जातो तो समजूल घेण्यासाठी या संकल्पनेचा उपयोग होतो. जॉन स्कॉट यांच्या मते, 'लिंगभाव' फक्त लिंगाने स्त्री-पुरुष अनुभवातून निर्धारित होत नाही. तर वंश, वर्ग, राष्ट्रीयता यांमधून स्त्रीत्व आणि पुरुषत्व घडते. लिंगभावाचा अनुभव त्यामुळेच सार्वत्रिक नसून तो वंश, वर्ग, राष्ट्रीयता यांतून घडतो. कुटुंबांव्यतिरिक्त शिक्षण व्यवस्था, प्रसार-माध्यम व मित्र-मैत्रिणींचा गट हे देखील अशा प्रकारच्या लिंगभावात्मक सामाजिकीकरणाची म्हणजेच नैसर्गिक मानलेल्या गेलेल्या, पितृसत्तेला अपेक्षित असलेल्या भेदांवर आधारित 'स्त्रीत्वांच्या' आणि 'पुरुषत्वाच्या' साचांमध्ये मुलींना आणि मुलांना घडविले जाण्याची महत्वाची माध्यमे आहे. उदा. शालेय पाठ्यपुस्तकातून, चित्रपटातून, मालिका व जाहिरातींमधून आई ही नेहमी प्रेमळ, मायाळू, काळजी करणारी, स्वयंपाक व घरातील कामकरणारी, त्यागी अशी तिची प्रतिमा दाखविली जाते. याउलट वडील हे नेहमी वर्तमानपत्रा वाचनारे, शाळा व महाविद्यालयामध्ये अभ्यासक्रमाबरोबरच शिक्षकांचा विद्यार्थ्यांसोबतचा व्यवहार, खेळ, अध्यापन पद्धती, शिस्त प्रिय, कार्यालयीन काम करणारे इत्यादीमधून स्त्री- पुरुषत्त्वाचे साचे घट्ट केले जातात. भारतासारख्या जात-वर्गीय समाजरचना असलेल्या देशात 'स्त्रीत्वाचे' आणि 'पुरुषत्वाचे' साचे जात-वर्ग निहाय बदलतात. त्यामुळे भारतातील जात-पितृसत्ता टिकून राहू शकते. स्त्री किंवा भारतातील स्त्री' हा एकजिनसी कोटीक्रम नसून प्रत्येक स्त्री व पुरुष त्यांच्या जातीच्या तसेच वर्गाच्या कोंदणात घडलेल्या स्त्रीत्वाच्या व पुरुषत्वाच्या साच्याचे परिपाक आहे. लिंग आणि लिंगभाव यांच्यातील नैसर्मिक वर्गीकरणाला छेद देऊन लिंगभावाचे सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ आधोरेखित करणारी प्रगत मांडणी ही स्त्री-पुरुष विषमतेच्या प्रश्नासंदर्भातले प्रगत आकलन विकसित होण्यास व त्यावर आधारित राजकीय कृती कार्यक्रम ठरवण्यास दिशादर्शक ठरत आहे.

**पूर्व साहित्याचा आढावा :** *Himabindu M. Human Ageing study of rural women in Andhra Pradesh (2002)* या संशोधनामध्ये आंध्र प्रदेशातील ग्रामीण भागातील वृध्द स्त्रियांचा अभ्यास केला आहे. वृध्द स्त्रियांची भारतातील संख्या, जातीय रचना, व्यवसाय आणि उत्पन्न, शिक्षण, धर्म, विवाह या सर्व घटकांची सविस्तर माहिती यात दिलेली आहे. वृध्द स्त्रियांचा सामाजिक दर्जा किंवा स्थान, कुटुंबातील असलेले संबंध, मुलगा व सुनेशी असलेले संबंध, नातवाशी असलेले संबंध, त्यांच्या आरोग्याविषयी समस्या, उपचाराच्या पद्धती, त्यांची व्यसनाधिनता व त्यांना शेवटी आधार देण्याची माहिती या पुस्तकामध्ये सविस्तर मांडलेली आहे. *Sharma M. L. and Dak T. M. Aging in India', (1987)* या पुस्तकामध्ये लेखकाने भारतातील वृध्दत्वाची समस्या, वृध्दत्वासंबंधीची भारत सरकारची धोरणे व कार्यक्रम जगातील इतर देशांशी तुलना इत्यादी बाबींचा समावेश केलेला आहे. उत्तर भारतातील खेड्यामधील वृद्धांचा बदलता दर्जा, ग्रामीण नागरी वृद्धांचे प्रश्न, वृध्दांचे मानसिक प्रश्न, वृध्द आणि सामाजिक स्तरीकरण, तरुणांचा वृद्धांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, कुटुंबातील वृध्द स्त्रियांचे जीवन, सैन्यातील व्यक्तींचा सेवा निवृत्तीचा प्रश्न, वृध्द आणि आरोग्य, जेष्ठ नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा, इतरांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आदि घटकांसंबंधी माहिती या पुस्तकात त्यांनी सविस्तरपणे मांडली आहे. ***नागपूरकर पद्माकर 'वृध्दत्वाची शान', (२००६*** 'वृध्दत्वाची शान' या पुस्तकामध्ये लेखकाने आधुनिक कुटुंब पद्धतीचे चित्रण केले आहे. यामुळे वृध्दांच्या समस्यांचे केंद्रबिंदू हे विभक्त कुटुंब आहे. कारण त्यामुळे वृध्दांकडे दुर्लक्ष झाले. तसेच वृध्दाबद्दलची आत्मियता बदलत गेली असे मत मांडले आहे. ***आंबिले विलास 'वृध्दापकाळातील शस्त्रक्रिया' (२००२)*** यामध्ये लेखकाने वृध्दपकाळातील कराव्या लागणाऱ्या शस्त्रक्रिया बद्दल विस्तृतपणे माहिती दिली. त्यामध्ये अपेंडिक्स, श्वासनलिकेतील अडथळा, अल्सर, रक्तस्राव, आतड्यास पीळ, मोतीबिंदू, कान, नाक, घसा या शस्त्रक्रिया ताबडतोब करणे कसे आवश्यक आहे. हे उदाहरणासहीत स्पष्ट केले आहे.

**संशोधन उदिदष्टे:** १. वृध्द महिलांच्या.आरोग्य आणि लिंगभाव यांचा परस्पर संबंध तपासणे. २. सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा आरोग्यावर होणारा परिणाम अभ्यासणे. ३. वृध्द महिलांच्या कौटुंबिक स्थितीचे विश्लेषण करणे.

**गृहितके:** १. वृध्द महिलांच्या आरोग्याच्या समस्या या केवळ शारीरिक नसून त्या सामाजिक आणि लिंगभाव विषमतेतून निर्माण झालेल्या आहेत. २. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी नसलेल्या वृध्द महिलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. ३. कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत सहभाग कमी असल्यामुळे महिलांना वेळेवर उपचार मिळत नाहीत.

**अध्यापन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंध हा पुर्णपणे द्वितीयक स्रोतांवर आधारित आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रस्तुत विषयाशी संबंधित पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, विविध शासकीय अहवाल, शासकीय संकेतस्थळे, लेख, प्रकाशित व अप्रकाशित शोधप्रबंध इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

**तथ्य विश्लेषण:** भारतीय पितृसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रियांच्या दर्जाबाबत चढउतार कालानुसार निदर्शनास येतो. कारण वैदिक कालखंडात स्त्रीयांचा दर्जा उंच होता. परंतु जसजसा सुलतानशाहीचा कालखंड सुरू झाला तेव्हा स्त्रियांच्या दर्जात मोठ्या प्रमाणात घसरण झालेली दिसून येते, म्हणजेच भारतीय समाजात पूर्वीपासूनच लिंगाच्या आधारे भेदभाव केलेला आढळून येतो. स्त्री-पुरुष विषमतेमुळे अनेक प्रकारच्या अधिकाराकांपासून महिलांना वंचित ठेवलेले दिसून आले. जरी भारतीय संविधानामध्ये समानता प्रस्थापित करण्यासाठी तरतुदी केल्या असल्या तरी प्रत्यक्षात लिंगभाव विषमता वा असमानता असल्याचे आढळते.

**लिंगभाव आणि वृध्दत्व:** एक दुहेरी ओझे समाजशास्त्रात दुहेरी जोखीम नावाची एक संकल्पना आहे. वृध्द महिलांच्या बाबतीत ही संकल्पना ततोतंत लागू होते. त्यांना एकाच वेळेस दोन आघाड्यांवर संघर्षचा सामना करावा लागतो. वृध्द झाल्यामुळे समाजात मिळणारी दुय्यम वागणूक. स्त्री असल्यामुळे जन्मापासुन सोसावा लागणारा भेदभाव.आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात या दोन्ही गोष्टी

एकत्रितपणे त्यांच्या आरोग्यावर आणि सामाजिक स्थितीवर परिणाम करतान, पुरुषांच्या तुलनेन स्त्रियांचे आयुर्मान जास्त असते. परंतु ते वाढीव आयुष्य अनेकदा व्याधी, एकाकीपणा आणि गरिबीने ग्रासवेने असते.

**वृध्द महिलांचे आरोग्य: शारीरिक आरोग्य:** जीर्ण होत जाणाऱ्या देहाच्या समस्या महिलांचे शारीरिक आरोग्य हे त्यांच्या तरुण-पणातील पोषण आणि जीवनशैलीवर अवलंबून असते. भारतारारख्या देशात जिथे स्त्रिया कुटुंबाच्या पोषणाची जबाबदारी घेतात पण स्वत: च्या आहाराकडे दुर्लक्ष करतात तिथे वृध्दपकाळात त्यांचे गंभीर परिणाम दिसतात.

**अस्थिसुषिरात :-** रजोनिवृत्तीनंतर स्त्रियांच्या शरीरातील 'इस्ट्रोजेन' या संप्रेरकाची पातळी कमी होते. यामुळे हाडांची घनता कमी होऊन ती ठिसूळ बनतात. साध्या पडण्यानेही गंभीर फ्रॅक्चर होण्याचा धोका वृध्द महिलांमध्ये सर्वाधिक असतो.

**ॲनिमिया आणि कुपोषण:** आयुष्यभर लोहाची कमतरता आणि प्रसूतीनंतरच्या अपुऱ्या विश्रांतीमुळे अनेक वृध्द महिलांना दीर्घकालीन ॲनिमिया असतो, ज्यामुळे त्यांना सतत थकवा आणि अशक्तपणा जाणवतो.

**सांधेदुखी आणि संधिवात:** वर्षानुवर्षे केलेले शारीरिक कष्ट आणि घरकाम यामुळे गुडघे, कंबर आणि हातांच्या सांध्यांची झीज झालेली असते. हे आजार त्यांना अंथरुणाला खिळवून ठेवू शकतात, ज्यामुळे त्यांचे स्वातंत्र्य हिरावले जाते.

**असंक्रामक रोग:** उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयाचे विकार वृध्द महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात. ग्रामीण भागात या आजारांचे निदान वेळेवर होत नाही, कारण महिला आपल्या त्रासाला 'वय झाले' असे समजून दुर्लक्षित करतात.

**मानसिक आरोग्य: अदृश्य वेदना आणि सामाजिक दुर्लक्ष:** मानसिक आरोग्य हा वृध्द महिलांच्या बाबतीत सर्वात दुर्लक्षित भाग आहे. उतारवयात मेंदूमध्ये होणारे बदल आणि बदलती सामाजिक परिस्थिती यामुळे अनेक मानसिक समस्या निर्माण होतात.

**डिमेंशिया आणि अल्झायमर:** विस्मरण होणे ही केवळ वृध्दत्वाची खूण नसून तो एक गंभीर आजार असू शकतो. वृध्द महिलांना घरातील गोष्टी विसरणे किंवा ओळखीच्या माणसांना न ओळखणे अशा समस्यांना सामोरे जावे लागते, ज्यामुळे त्यांचे कुटुंबातील स्थान अधिक असुरक्षित होते.

**नैराश्य:** "माझी आता कोणालाच गरज नाही" ही भावना वृध्द महिलांमध्ये नैराश्याला जन्म देते. मुलांचे स्थलांतर, रिकामे घर आणि सामाजिक संवादाचा अभाव यामुळे त्या एकाकी पडतात.

**चिंता आणि भीती:** भविष्याची चिंता, मरणाची भीती आणि "आजारी पडले तर मुलांवर ओझे होईल का?" ही सततची टांगती तलवार त्यांच्या मानसिक शांततेचा भंग करते.

**झोपेचे विकार:** शारीरिक वेदना आणि मानसिक ताणामुळे निद्रानाशाची समस्या उद्भवते, ज्याचा परिणाम पुन्हा त्यांच्या शारीरिक प्रकृतीवर होतो.

**भावनिक आरोग्य: नातेसंबंध आणि अस्तित्वाचा संघर्ष:** भावनिक आरोग्य हे व्यक्तीला मिळणारा आधार आणि तिचे स्वतःबद्दलचे मूल्य यावर अवलंबून असते. वृध्द महिलांच्या बाबतीत त्यांचे भावनिक जग हे पूर्णतः कुटुंबाभोवती केंद्रित असते.

**वैधव्याचा आघात:** पतीच्या निधनानंतर वृध्द महिलेचे सामाजिक आणि भावनिक कवच नष्ट होते. पितृसत्ताक समाजात पतीच्या मृत्यूनंतर महिलेला मिळणारी वागणूक बदलते, ज्यामुळे तिच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण होते.

**दुय्यम स्थान आणि निर्णय प्रक्रियेतून वाद:** एकेकाळी घराची कर्तीधर्ती असणारी स्त्री जेव्हा वृध्द होते, तेव्हा घरातील महत्त्वाच्या निर्णयांतून तिला वगळले जाते. तिची मते विचारात न घेणे हे तिच्या आत्मसन्मानाला तडा देणारे असते.

**काळजीवाहूची भूमिका:** अनेकदा वृध्द महिला स्वतः आजारी असतानाही आपल्या आजारी पतीची किंवा नातवंडांची काळजी घेण्याची जबाबदारी पार पाडत असतात. या दुहेरी जबाबदारीमुळे त्यांची भावनिक कुचंबणा होते.

**आर्थिक असुरक्षितता:** स्वतःचे उत्पन्न किंवा मालमत्ता नसल्यामुळे छोट्या गोष्टींसाठीही इतरांकडे हात पसरावे लागणे, हे त्यांच्या भावनिक आरोग्याला हानी पोहोचवते. यामुळे त्यांच्यात 'परावलंबित्वाची अपराधी भावना' निर्माण होते.

**लिंगभाव आणि आरोग्याचा संबंध:** वृध्द महिलांच्या या समस्यांकडे आपण 'लिंगभाव' चष्म्यातून पाहिले तर काही महत्त्वाचे निष्कर्ष निघतात:

**आरोग्य सेवांमधील भेदभाव:** कुटुंबात पैसा कमी असेल तर पुरुषाच्या उपचारांना प्राधान्य दिले जाते आणि महिलेच्या आजाराकडे दुर्लक्ष केले जाते.

**अज्ञान आणि अंधश्रद्धा:** आजही अनेक ग्रामीण भागात महिलांच्या आजारांना 'बाहेरची बाधा' समजून उपचाराऐवजी अघोरी उपाय केले जातात.

**कौटुंबिक हिंसाचार:** वृध्दपकाळातही अनेक महिलांना शारीरिक किंवा प्रामुख्याने शाब्दिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते. म्हातारी झाली म्हणून टोमणे मारणे किंवा दुर्लक्ष करणे हा देखील एक प्रकारचा छळच आहे.

**निष्कर्ष:** वृध्द महिलांचे आरोग्य हे केवळ जैविक नसून ते सामाजिक आहे. पितृसत्ताक पद्धतीमुळे स्त्रियांच्या आरोग्याला शेवटचे प्राधान्य दिले जाते.विधवा महिलांच्या आरोग्याच्या समस्या विवाहित वृध्द महिलांपेक्षा अधिक गंभीर आहेत. पौष्टिक आहाराचा अभाव आणि आयुष्यभराचे कष्ट हे वृध्दत्वातील आजारांचे मुख्य कारण आहे.वृध्द महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी केवळ वैद्यकीय उपचारांची गरज नसून समाजाच्या मानसिकतेत बदल होण्याची गरज आहे. जोपर्यंत लिंगभावाधारित भेदभाव संपत नाही, तोपर्यंत वृध्द स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. त्यांच्यासाठी विशेष सरकारी योजना आणि सामाजिक सुरक्षा कवच असणे काळाची गरज आहे.

**शिफारशी:** १. सरकारने वृध्द महिलांसाठी विशेष आरोग्य विमा योजना राबवाव्यात. २. स्थानिक पातळीवर (ग्रामपंचायत/नगरपालिका) वृध्द महिलांसाठी विनामूल्य आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करावीत. ३. समाजाची मानसिकता

बदलण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे. ४. वृध्द महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पेन्शन योजना अधिक प्रभावी करावी.

**संदर्भ :**

१. भसीन कमाला, तांबे कुत्री (२०१०), लिंगभाव समजून घेताना, लोकवाङ्मय गृह प्रकाशक, मुंबई पृ. क्र. ११
२. बोधनकर सुधीर, अलोगों विवेका (२००३), सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ. क्र.७
३. Malancha Chakrabarty (२०२४),observer research foundation, published on April
४. विनायक साखर कर (२०२१), वृध्द महिलांच्या समस्या, बालाजी प्रकाशन, नागपूर, पृ. क्र.४८

# परभणी जिल्हयातील महिलांचे सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटांचे योगदान

**प्रा. डॉ. नानासाहेब बालासाहेब पाटील** संशोधक मार्गदर्शक माधवराव पाटील महाविद्यालय पालम जि. परभणी
**प्रा. जे. के. टोंपे** समाजशास्त्र विभागप्रमुख, स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा जि. परभणी

**गोषवारा:** प्रस्तुत संशोधन "महिला स्वयंसहाय्यता बचत गटाचा आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास संदर्भः परभणी जिल्हा" महाराष्ट राज्यातील मराठवाडा विभागातील परभणी जिल्हयाच्या नऊ *(९)* तालुक्यामध्ये करण्यात आला. प्रमुख उद्दिष्टये मध्ये परभणी जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटाद्वारे महिलांना रोजगार स्वावलंबन, सक्षमीकरण व आर्थिक, व्यवस्थापकीय स्थिती तसेच लाभार्थी कुटूंबाच्या राहणीमानातील बदलांचा अभ्यास आहे. संपूर्ण तालुक्यामधून २५ स्वयंसहाय्यता बचत गटाची म्हणजे एकूण २०० स्वयंसहाय्यता बचत गटात कार्यरत महिलांचील निवड करण्यात आली. सदरील अभ्यासात सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला. सक्षम प्रश्नावलीच्या मार्फत वास्तविक माहिती गोळा करण्यात आली. प्रश्नावली मध्ये सर्व उद्दिष्टयावर आधारित प्रश्न तयार करण्यात आले ज्यामुळे संपूर्ण संकल्पना समजण्यास मदत झाली. बचत गटामार्फत महिलांचे सक्षमीकरणात असे स्पष्ट होते की महिलांना समान संधी *(१०० टक्के)*, लिंग भेदभाव *(६५.५२ टक्के)*, अनेक हिंसाचारापासुन मुक्ती *(४७.५० टक्के)*, आर्थिक स्वांतत्र *(८२.५० टक्के)*, विविध समित्यामध्ये महिलांचा सहभाग *(७७.५० टक्के)*, जिवनाशी संबंधीत बाबीच्या निवडीकरीता पूर्णपणे स्वातंत्र *(३९ टक्के)*, व इतर सक्षमीकरण उदा शिक्षण *(१०० टक्के)*, आरोग्य *(७२.५० टक्के)*, आहार *(८१ टक्के)*, कायदेविषयक जागरूकता *(२४.५० टक्के)*, स्वतः निर्णय घेण्याचे सामर्थ्य *(४४.५० टक्के)*, सामूहिक निर्णय घेण्यासाठी दृढ निर्णय घेण्याची योग्यता *(२२.५० टक्के)*, परिवर्तन घडवून आणण्याच्या योग्यतेबाबत सकारात्मक विचार *(२६ टक्के)*, योग्य निर्णय घेण्यासाठी माहिती व इतर साधने उपलब्ध *(४४ टक्के)*, वैयक्तीक किंवा सामुहिक सामर्थ्यामध्ये सुधारणा घडवण्याचे कौशल्य आत्मसात *(३७.५० टक्के)*, अखंड व स्वपुरस्कृत विकास प्रक्रिया व परिवर्तनास सहभाग *(२१ टक्के)*, स्वतःची सकारात्मक प्रतिमा तयार करणे *(६१* बचत गट आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षम *(७९.५० टक्के)*, मुलींना शिकविणे *(१०० टक्के)*, अंधश्रध्देचे प्रमाण कमी *(१०० टक्के)* व स्थानिक संस्थेचे सदस्य *(२४.५० टक्के)* सक्षमीकरणाचे विविध पैलू आहेत.

**प्रमुख शब्द**: परभणी जिल्हा, सक्षमीकरण, स्वयंसहाय्यता, बचत गट.

**प्रस्तावना: ग्रामीण महिला सक्षमीकरण:** अमेरिका व फ्रेंच स्वातंत्राच्या जाहिरनाम्यात महिला सक्षमीकरणाचे पहिले प्रतिबिंब पडलेले दिसते. त्यात स्त्री व पुरुषांसाठी समान अधिकाराची तरतूद करण्यात आली. १९ व्या शतकात विल्यम थॉम्पसन जॉन स्टुअर्ट मिल यासारख्या साहित्यिकांनी स्त्रिमुक्तीचा विचार तत्कालीन समाजात रूजवण्याचा प्रयत्न केला स्त्रियांवर होण-या अत्याचाराचे व अन्यायाचे प्रमुख कारण तिचे आर्थिक परावलंबन होय, म्हणून अर्थाजनाची योग्य संधी उपलब्ध करून देवून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होणे महत्वाचे आहे. स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असली म्हणजे तिच्या पाठीशी विकास नक्कीच आहे. भारताच्या ग्रामीण अविकसित अर्थव्यवस्थेमुळे शेतक-यांच्या आर्थिक गरजा पूर्ण होत नसून त्याचा परिणाम म्हणजे आज होत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या होय. यावरील उपाय म्हणजे स्वतःची सहाय्यता स्वतःच करणे परंतू कोणतीही एकटी व्यक्ती येणा-या समस्येला तोंड देऊ शकत नाही. सर्वांनी संघटीत होऊनच समस्या सुटू शकतात. या विचाराने प्रेरित होऊनच ग्रामीण भागातील काही महिलांनी संघटीत होऊन या कार्याला सुरुवात केली. यात पैसा अथवा भांडवल उभे करणे ही समस्या त्यांना प्रामुख्याने भेडसावत होती. तरीही तुटपुंज्या रक्कमेतून अल्पशिक्षित गरीब ग्रामीण महिला रोजगाराच्या संधी शोधत असतानाच त्या संघटीत होत गेल्या व मिळालेल्या मजूरीतून दर महिन्याला थोडी थोडी रक्कम बँकेत त्यांच्या गटाच्या खात्यात टाकत गेल्या. ही बचत करण्यासाठी त्यांना अतिशय कष्ट करावे लागते. विविध समस्यांना तोंड द्यावे लागले.

**महिला सक्षमीकरणात बचत गटाची भूमिका:** ग्रामीण क्षेत्रातील महिलांचे आर्थिक, सामाजिक, मानसिक सबलीकरण प्रभावीपणे होत आहे. ग्रामीण महिला साक्षर होत आहेत व त्या संघटीत होत आहेत. ग्रामीण महिलांचा व्यक्तिमत्व विकास होत आहे. ग्रामीण भागातील शेतक-यांच्या होत असणा-या आत्महत्येवर महिला बचत गट एक उपाय ठरत आहे. महिलांना अडचणीवर मात करण्याचे कौशल्य त्यांच्या अंगी या बचत गटामुळे निर्माण झाले आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टये:** परभणी जिल्हयातील महिलांचे सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके:** महिलांचे सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान अधिक आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** ***रसाळ (१९९८)*** यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थानाबद्दल उल्लेख केला, बचत गटाच्या माध्यमातून स्त्रीचे आर्थिक सबलीकरण हे मोठ्या प्रमाणात होताना आपणास पहावयास मिळते. ती स्वतःच्या पायावर उभी राहून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनल्याने ती स्वतःचे निर्णय स्वतःच घेते व सबल बनते. यावरून आपणास बचत गट म्हणजे काय सांगताना म्हणता येते की, बचत गट म्हणजे महिला सक्षमीकरणाची दिशा. ***सोलापुरे राजशेखर (२०१२)*** यांनी महिला विकासः प्रश्न पैलू प्रवासात बचत गटाचा अभ्यास केला. बचत गटास शिक्षणाची जोड मिळाली तर महिला समीकरण झाल्याशिवाय राहणार नाही. तसेच महिला बचत गटांनी सामाजिक कार्यात भाग घेतला पाहिजे. बचत गटांस समाज कार्यांची आवड निर्माण झाली, समाज कार्य करण्याचे प्रशिक्षण बचत गटाला मिळाले तर निश्चितच समाजाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. असे झाले तर भारतीय महिला बचत गटाच्या माध्यमातून सक्षम होतील. ***रोडे (२०१३)*** यांच्या निष्कर्षात महिला सक्षमीकरणासाठी स्वयंसहाय्यता बबत गटासाठी महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याशिवाय महिला सबलीकरण होत नाही त्यामुळे शासकीय स्तरावर महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी काही नवीन योजनांची घोषणा तयार करण्यात आली. समाजात आवश्यक कायदे, सुरक्षात्मक तरतूद आणि त्याची अंमलबजावणी करणारी पुरक व सक्षम प्रशासकीय व्यवस्था असणे अत्यंत गरजेचे आहे. ***शर्मा व साहा (२०१५)*** यांच्या मते, ग्रामीण महिलांचे व मुलांचे आरोग्य संवर्धन, शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक विकास करण्याच्या हेतूने बचत गटाची चळवळ खूप महत्वकांक्षी ठरली आहे. कुटुंबातील स्त्रीचा विकास झाला तर मुलांच्या आणि कुंटूबाचा खरा विकास होईल या प्रेरणेने बचतगटामध्ये महिला सहभागी होतात. बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण वेगाने होऊ शकते. याचा अनुभव गेल्या काही वर्षात महाराष्ट्राच्या स्वावलंबी होण्यासाठी बचत गटाचा मोठा फायदा झाला आहे. महिला बचत गटांची निर्मिती वेगाने झाली आहे. त्याला शासनानेही प्रोत्साहन दिले.

**संशोधन पध्दती:** सदरील अभ्यास हा प्राथमिक आणि माहिती मुलाखत अनुसूचीद्वारे व प्रश्नांवलीद्वारे संपूर्ण जिल्हयातुन २५ स्वयंसहाय्यता बचत गटाची एकूण २०० महिलांची random sample निवड करून अभ्यास करण्यात आला. त्याची मांडणी तक्त्याद्वारे व आलेखाद्वारे करून विश्लेषण करण्यात आले आहे. द्वितीय माहिती परभणी जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी, नाबार्डचे वार्षिक अहवाल, जिल्हयातील बँकाचे स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या, सभासद संख्या, भांडवल इ. द्वारे तसेच पुस्तके, मासिके, पाक्षिके याद्वारेदेखील दुय्यम माहिती जमा केली गेली.

**तथ्यांचे विश्लेषण व निष्कर्ष:** परभणी जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटांचे महिलांचे सक्षमीकरणात योगदान तक्ता क्रमांक १ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. १: परभणी जिल्हयात महिलांचे सक्षमीकरणात स्वंयसहाय्यता बचत गटांचे योगदान**

| अ. क्र. | महिलांचे सक्षमीकरणात स्वंयसहाय्यता बचत गटांचे योगदान | | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | समाजातमधील संसाधनांचा उपयोग करण्याकरिता महिलांना समान संधी मिळाली किंवा नाही | होय | २०० | १०० |
| | | नाही | ०.०० | ०.०० |
| २ | विचार व प्रत्यक्ष कृती करताना लिंग भेदभाव कमी झाले असे वाटते का ? | होय | १३१ | ६५.५२ |
| | | नाही | ६९ | ३४.५० |
| ३ | समाजातमधील संसाधनांचा उपयोग करण्याकरिता महिलांना समान संधी मिळाली किंवा नाही | होय | २०० | १०० |
| | | नाही | ०.०० | ०.०० |
| ४ | बचत गटामध्ये समाविष्ट झाल्यानंतर अनेक प्रकारच्या हिंसाचारापासून मुक्ती मिळाली असे वाटते का ? | होय | ९५ | ४७.५० |
| | | नाही | १०५ | ५२.५० |
| ५ | बचत गटामध्ये समाविष्ट झाल्यानंतर आर्थिक स्वातंत्र्य लाभले किंवा नाही | होय | १६५ | ८२.५ |
| | | नाही | ३५ | १७.५ |
| ६ | सर्व महत्वाचे निर्णय घेणा-या विविध समित्यामध्ये महिलांचा सहभाग वाढला ? | होय | १५५ | ७७.५ |
| | | नाही | ४५ | २२.५ |
| ७ | जिवनाशी संबंधीत बाबींच्या निवडीकरिता पूर्णपणे स्वतंत्र मिळाले ? | होय | ७८ | ३९.० |
| | | नाही | १२२ | ६१.० |

(स्त्रोत: प्रश्नावली)

**विचार व प्रत्यक्ष कृती लिंग भेदभाव:** परभणी जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटाचे सदस्यांत ६५.५२ टक्के ताभार्थ्यांना विचार व प्रत्यक्ष कृती करतांना लिंग भेद भाव कमी झाले असे वाटते. ३४. ५० सदस्यांना विचार व प्रत्यक्ष कृती करतांना लिंग भेदभावचा सामना करावा लागतो.

**समाजामधील संसाधनांचा महिलांना समान संधी:** वरील तक्त्यानुसार शंभर टक्के परभणी जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटाचे सदस्यंना समाजामधील संसाधनाची महिलांना समान संधी मिळाली.

हिंसाचारापासून बचत गटांचे सदस्यांना ६५.५२ टक्के लाभार्थ्यांना विचार व प्रत्यक्ष कृती करताना लिंग भेद भाव कमी झाले असे वाटते ३४.५० टक्के सदस्यांना विचार व प्रत्यक्ष कृती करतांना लिंग भेदभावचा सामना करावा लागतो. वरील तक्त्यानुसार असे स्पष्ट होते की ८२.५० टक्के लाभार्थ्यांना बचत गटामध्ये समाविष्ट झाल्यानंतर आर्थिक स्वातंत्र लाभते तर १७.५० टक्के महिलांना आर्थिक स्वातंत्र लाभले तर १७.५० टक्के महिलांना आर्थिक स्वातंत्र लाभले नाही. परभणी जिल्हयातील

स्वयंसहाय्यता बचत गटाचे ७७.५० टक्के लाभार्थ्यांना लाभार्थ्यांचे सर्व महत्वाचे निर्णय घेणा-या विविध समित्यामध्ये त्याचे सहभाग वाढला तर २२.५० सदस्य निर्णय घेणा-या महिलांचा सहभाग नाही.

वरील तक्त्यानुसार असे दिसू येते की, परभणी जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटाचे ३९ टक्के सदस्यांना जीवनाशी संबंधीत बाबीच्या निवडीकरीता पूर्णपणे स्वतंत्र मिळाले तर अद्याप ६१ टक्के सदस्या पूर्णपणे स्वंतत्र मिळालेले नाही. परभणी जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत सक्षमीकरणाचे विविध मार्ग उदा, शिक्षण, आरोग्य, आहार व कायदेविषयक जागरूकता हे प्रमुख घटक आहे. वरील तक्त्यानुसार असे स्पष्ट होते की, शिक्षण, आगोदर आहार व कायदेविषयक जागरूकता, स्वयंसहाय्यता बचत गटांचे सदस्यांना अनुक्रमे १०० टक्के, ७२.५० टक्के, ८१.०० टक्के व २४.५० टक्के मार्ग खुले झाले तसेच ०.०० टक्के, २७.५० टक्के, १९.०० टक्के व ७५.५० टक्के सदस्यांना सक्षमीकरणचे मार्ग खुले झाले नाही. स्वयंसहाय्यता बचत गटाचे ४४.५० टक्के सदस्यांना गटामध्ये समाविष्ट झाल्यानंतर स्वतः निर्णय घेण्यास सामार्थ्य मिळाले तर ५५ टक्के महिलांना स्वतः निर्णय घेण्यास सामर्थ्य मिळाले नाही. २२.५० टक्के परभणी जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटाच्या सदस्यांना सामुहिक निर्णय घेण्यसाठी दृढ निश्चय घेण्याची योग्यता प्राप्त झाली असून ७७.५० टक्के सदस्यांना सदस्याना ही योग्यता प्राप्त झाली नाही.

परभणी जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटाचे २६ टक्के सदस्यांना असे वाटते परिवर्तन घडवून आणण्याच्या योग्यतेबाबत सकारात्मक विचारसरणी आत्मसात झाली तर ७४ टक्के सदस्यांना विचारसरणी आत्मसात झाली नाही. योग्य निर्णय घेण्यासाठी माहित व इतर साधनांची उपलब्धता ५६ टक्के सदस्यांना झाली तर ४४ टक्के सदस्यांना असे साधने उपलब्ध झाले नाही. असे दिसून येते की, ३७.५० सदस्यांना वैयक्तिक किंवा सामुहिक सामर्थ्यांमध्ये सुधारणा घडवण्याचे कौशल्य आत्मसात करण्याची योग्यता प्राप्त झाली तर अशी योग्यता ६२.५० टक्के लाभार्थ्यांना हि योग्यता प्राप्त झाली नाही. परभणी जिल्हयात स्वयंसहाय्यता बचत गटाचे २१ टक्के सदस्यांना अखंड व स्वपुरस्कृत विकास प्रक्रिया व परिवर्तनास सहभाग वाढला असून ७१ टक्के महिलांचे सहभाग नाही. स्वतःची सकारात्मक प्रतिमा तयार करणे व नकारात्मक गोष्टीवर ताबा मिळविण्याचा बाबतीत ६१ टक्के बचत गटातील सदस्यांना मदत झाली तर ३९ टक्के सदस्यांना मदत झाली नाही. परभणी जिल्हयातील बचत गट आर्थिक व सामाजिक सक्षम आहे तसेच लाभार्थी स्वयपूर्ण झाले असे लाभार्थ्यांना वाटते तर १९.५० सदस्यांना ही प्रतिक्रीया नकारात्मक दिली. स्वयंसहाय्यता बचत गटात आल्यानंतर, परभणी जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटाचे शंभर टक्के महिलांना मुलींना शिकविले पाहिजे असे वाटते. शंभर स्वयंसहाय्यता बचत गटाचे महिलांना बचत गटात समाविष्ट झाल्यानंतर अंधश्रध्देचे प्रमाण कमी झाले, असे वाटते.

**राजकीय पक्षाचे सदस्य:** वरील तक्त्यानुसार असे निदर्शनास येते की, शंभर टक्के स्वयंसहाय्यता बचत गटाचे सदस्य कोणत्या ही राजकीय पक्षाचे सदस्य नाही.

**स्थानिक संस्थेचे सदस्य:** स्थानिक संस्थेचे सदस्याबाबत २४.५० टक्के व ७५.५० टक्के परभणी जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटांचे सदस्य अनुक्रमे सदस्य आहे व सदस्य नाही असे वरील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**शिफारशी:** महिलांचे सामाजिक दृष्टिकोनातून सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी शासनाबरोबरच समाजातील सर्वच घटकांनी त्याला पाठींबा दिला पाहिजे व महिलांनीदेखील आपली जबाबदारी ओळखून भूमिका पार पाडली पाहिजे. महिलांचे शैक्षणिक दृष्टिकोनातून सक्षमीकरण होण्यासाठी व स्त्री साक्षरता वाढण्यासाठी पालकांनी मानसिकता बदलली पाहिजे. शासनानेही महिलांना मोफत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाने महिलांच्या सुरक्षिततेची हमी घेतली पाहिजे. त्यासंबंधीच्या कायद्याची कडक अंमलबजावणी केली गेली पाहिजे.

**संदर्भ सुची:**


1. मनिषकुमार. (२०१२). *महिला सशक्तीकरण दशा और दिशा.* दिल्ली: मधुर बुक्स प्रकाशन.
2. मुलानी, एम.यु. (२००६). *महिला स्वयंसहाय्यता बचत गट.* पुणे: डायमंड पब्लीकेशन्स.
3. पाटील सुधाकर (२०१३). बचत *गटाचे महत्व योजना.* १६ (३): १२५-१२९.
4. रसाळ, आर.पी. (१९९८). *भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान.* योजना. १९ (२): १३१-१४१.
5. रोडे, ज्योती. (२०१३). *भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान राष्ट्रीय अभ्यास समितीच्या अहवालाची संक्षिप्त आवृत्ती.* मुंबई: पॉप्युलर प्रकाशन.
6. सोलपुरे, राजशेखर. (२०१२). *महिला विकास: प्रश्न-पैलू-प्रवास.* लातूर: अरुणा प्रकाशन.
7.तडकसकर, चौधरी नंदिनी. (२००८). *महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी महिला आघडीचे योगदान.* नांदेड: अल्फा पब्लिकेशन.

# बदलत्या ग्रामीण समाजात कृषीक्षेत्रातील महिलांचे अदृश्य श्रम व सामाजिक असमानता

**सरिता रामसिंग डोंगरजाळ** समाजशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापित छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** प्रस्तुत संशोधन बदलत्या ग्रामीण समाजाच्या पार्श्वभूमीवर कृषीक्षेत्रातील महिलांचे अदृश्य श्रम आणि त्यांच्याशी निगडित सामाजिक असमानतेचा समाजशास्त्रीय अभ्यास करते. भारतीय ग्रामीण समाजाची सामाजिक-आर्थिक रचना कृषीआधारित असून कृषी व संलग्न क्षेत्रांत महिलांचा श्रम सहभाग मोठ्या प्रमाणात आढळतो. तथापि, या श्रमांना आर्थिक मूल्य, सामाजिक मान्यता व निर्णयक्षम अधिकार प्राप्त होत नाहीत. पुरुषांचे नागरी स्थलांतर, कृषीचे स्त्रीकरण, तांत्रिक बदल व पितृसत्ताक सामाजिक रचना यांमुळे ग्रामीण महिलांवरील श्रमभार वाढलेला दिसून येतो. सदरील अध्ययनासाठी गुणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून सहेतुक नमुना निवड तंत्राद्वारे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील १० गावांमधून एकूण ५० ग्रामीण महिलांची निवड करण्यात आली. प्रस्तुत अध्ययनावरून असे निदर्शनास आले की, ग्रामीण महिलांकडे जमीन मालकीचा अभाव असून त्यांचे श्रम प्रामुख्याने “विना वेतन” किंवा “कौटुंबिक सहाय्य” म्हणून गणले जातात. उत्पन्ननिर्मितीत महिलांचा सहभाग असला तरी खर्च व आर्थिक निर्णयांवर त्यांचा मर्यादित अधिकार आहे. शिक्षणाचा अभाव, कौटुंबिक जबाबदाऱ्या व सामाजिक दृष्टिकोन हे आर्थिक स्वावलंबनातील प्रमुख अडथळे आहेत. बदलत्या ग्रामीण समाजात "कृषीचे स्त्रीकरण" होत असले तरी सामाजिक, आर्थिक व मालकी हक्कांच्या बाबतीत लिंगसमानता अद्याप साध्य झालेली नाही. त्यामुळे कृषीक्षेत्रातील महिलांच्या अदृश्य श्रमांना औपचारिक मान्यता देणे, जमीन मालकी व निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवणे तसेच पितृसत्ताक सामाजिक मानसिकतेत परिवर्तन घडवणे ही अत्यावश्यक गरज आहे.

**मुख्य शब्द:** कृषीक्षेत्रातील महिला, अदृश्य श्रम, सामाजिक असमानता,ग्रामीण समाज, पितृसत्ताक रचना

**प्रस्तावना:** भारतीय ग्रामीण समाजाची सामाजिक-आर्थिक रचना प्रामुख्याने कृषीव्यवस्थेवर आधारित आहे. या कृषीव्यवस्थेत महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असूनही त्यांच्या श्रमांना पुरेशी आर्थिक व सामाजिक मूल्य मिळत नाही. बदलत्या ग्रामीण समाजात कृषी उत्पादन पद्धती, रोजगार स्वरूप, स्थलांतर व तंत्रज्ञान यामध्ये बदल होत असतानाही महिलांची स्थिती तुलनेने दुर्बलच राहिलेली दिसून येते. या पार्श्वभूमीवर कृषीक्षेत्रातील महिलांचे अदृश्य श्रम, त्यांच्यावरील सामाजिक असमानता आणि ग्रामीण समाजातील परिवर्तनाचा परिणाम यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार स्तंभ असलेल्या कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठा आहे. शेतीकाम, पशुपालन, गृहद्योग, कौटुंबिक जबाबदाऱ्या या सर्व क्षेत्रात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून त्यांना त्यांचे योग्य मूल्य मिळत नाही. भारतीय ग्रामीण समाजाची रचना ही प्रामुख्याने कृषी आधारित आहे. या कृषी अवस्थेत ग्रामीण महिलांचा सहभाग अत्यंत व्यापक असतानाही तो बहुतेक वेळा अदृश्य म्हणून ओळखला जातो. बदलत्या ग्रामीण समाजात शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, शासकीय योजना यामुळे ग्रामीण महिलांच्या स्थितीत मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. परंतु अजूनही ग्रामीण समाजात पितृसत्ताक सामाजिक रचना अत्यंत प्रभावी आहे. यामुळे महिलांना आर्थिक संसाधनावर नियंत्रण मिळत नाही तसेच कौटुंबिक व सामाजिक निर्णय प्रक्रियेत दुय्यम स्थान मिळते.

**ग्रामीण समाजातील परिवर्तन आणि त्याचा कृषिक्षेत्रावर परिणाम:** ग्रामीण समाजात अनेक परिवर्तन घडत आहेत. कृषी तंत्रज्ञानाचा वापर, शेती करण्याची पद्धत, शिक्षणाचा प्रसार, पुरुष वर्गाचे नागरी भागात स्थलांतर या घटकांचा कृषीक्षेत्रावर मोठा परिणाम झाला आहे. पुरुषांचे नागरिक स्थलांतर वाढले आहे. अल्प शेती, आर्थिक अडचणी, कमी उत्पन्न, कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे नोकरीच्या शोधात अनेक पुरुष वर्ग हे शहराकडे स्थलांतरित जातात. परिणामी गावाकडे शेतीचा, कौटुंबिक जबाबदाऱ्याचा संपूर्ण भार हा महिलांवर पडतो. ग्रामीण भागात कार्यरत महिलांपैकी सुमारे ७५ टक्क्यांहून अधिक महिला कृषी व संबंधित कामांमध्ये गुंतलेल्या आहेत. परंतु त्या तुलनेत महिलांना निर्णयक्षम अधिकार, मालकी हक्क किंवा सामाजिक प्रतिष्ठा हव्या तेवढ्या प्रमाणात प्राप्त झालेली नाही. PLFS २०२३-२४ नुसार, ग्रामीण महिलांचा कामगार सहभाग दर (FLFPR) मध्ये २०१७-१८ पासून २३ टक्के वाढ झाली असून महाराष्ट्रात महिलांचा कृषी कामगारांमध्ये वाटा ५० टक्के पेक्षा जास्त आहे. यावरून असे दिसून येते की, बदलत्या ग्रामीण समाजात कृषीचे स्त्रीकरण झाले असून त्यातून निर्माण होणारी सामाजिक व आर्थिक समानता अद्याप साध्य झालेली नाही. FAO नुसार, महिलांना समान संसाधने मिळाल्यास विकसनशील देशांत कृषी उत्पादकता वीस ते तीस टक्क्यांनी वाढू शकते. संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केले आहे, जे महिलांच्या भूमिकेला जागतिक ओळख देते आणि लिंग समानता, अन्न सुरक्षा आणि हवामान बदलाशी लढण्यासाठी सशक्तीकरणावर भर देते. नागरीकरण, स्थलांतर आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेतीत काम करणाऱ्या मजुरांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न प्रभावित होते. २०२४-२५ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार राज्याचे अर्थव्यवस्था ७.३ टक्क्याने वाढले असून कृषी आणि संलग्न क्षेत्र ८.७ टक्क्याने वाढले आहे. कृषी काम, पशुपालन, कौटुंबिक जबाबदाऱ्या तिहेरी घटकांचा भार महिलांवर पडल्यामुळे ग्रामीण महिलांची शारीरिक, मानसिक ताणतणावात वाढ होत आहे. तंत्रीकीकरण, आधुनिक कृषी तंत्रज्ञांना आणि हरितक्रांतीमुळे महिलांना मिळणारे रोजगारांचे दिवस कमी होत असून चार दिवसाचे काम काही दिवसात तर काही दिवसाचे काम काही तासात होते.

**कृषीक्षेत्रातील महिलांचे अदृश्य श्रम:** ग्रामीण समाजाच्या दृष्टिकोनातून महिलांच्या कामाचा विचार करताना प्रथम हे लक्षात ठेवावे लागते की त्यांना प्रजनन आणि उत्पादन हे दोन प्रकारची कामे करावी लागतात. मुलांना जन्म देणे, त्यांचे संगोपन करणे, कुटुंबातील

इतर सदस्यांची, खाण्यापिण्याची, स्वच्छतेची, त्यांच्या आजारपणाची काळजी घेणे ही सर्व कामे महिलांच करतात. कुटुंबप्रमुख हा पुरुषच असला पाहिजे अशी विचारसरणी ग्रामीण समाजात रुजलेली असल्यामुळे महिलांचे स्थान नेहमी दुय्यमच राहते. महिलांनी घर काम करावे आणि पुरुषांनी अर्थोत्पादनाचे अशी श्रम विभागणी समाजात आहे. याचा अर्थ कुटुंबातील सर्व कामे, जबाबदाऱ्या या महिलांनी पार पाडाव्या परंतु याचबरोबर महिलांनी शेती कामासाठी श्रम करावे आणि पतीला अर्थोत्पादनात सहाय्य करून पतीच्या ताब्यातील मिळकतीत भर टाकावी. घर काम करून शेती कामात सहभाग द्यावा ही प्रथा ग्रामीण भागात रुजलेली दिसून येते. शेती कामामुळे महिला घर कामातून शेती कामात अधिकाधिक खेचली जाते. त्यांना घरकाम आणि शेतीकाम अशा दुहेरी भूमिका निभवाव्या लागतात. परंतु ग्रामीण महिलेचे कुटुंबातील काम असो वा शेतातील त्यांच्या कामाचे मूल्यमापन होत नाही. त्यांच्या कामाच्या मोबदल्यात त्यांना कोणत्याही प्रकारचे मुल्य दिले जात नाही. भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी हा मुख्य आधार असून महिलांचा या क्षेत्रातील सहभाग अतिशय मोठा आहे.ग्रामीण महिलांच्या एकूण रोजगारातील सुमारे ७६.९ टक्के भाग कृषी आणि संलग्न क्षेत्राशी जोडलेला आहे.कृषीक्षेत्रातील महिलांचे श्रम बहुआयामी आहेत. पेरणी, निंदणी, कापणी, मळणी, पशुपालन, शेतीमाल प्रक्रिया तसेच घरगुती जबाबदाऱ्या ही सर्व कामे महिलांकडून नियमितपणे करून घेतली जातात. तथापि, या श्रमांना बहुतेक वेळा "कौटुंबिक सहाय्य" किंवा "विना वेतन काम" म्हणून गणले जाते. यामुळे महिलांचा श्रम सहभाग प्रत्यक्षात मोठा असतानाही त्याचे आर्थिक मूल्यांकन होत नाही. हीच स्थिती "महिलांचे अदृश्य श्रम" या संकल्पनेला अधोरेखित करते. हे श्रम 'अदृश्य' राहण्याचे मुख्य कारण म्हणजे महिलांना 'शेतकरी' म्हणून ओळख मिळत नाही. बहुतेक काम विना वेतनाचे असून ते घरगुती कामाचा भाग म्हणून गणले जाते. तसेच साधनसंपत्ती आणि निर्णय घेण्याचे अधिकार पुरुषांकडे केंद्रित राहतात.

**कृषीक्षेत्रातील महिलांवरील सामाजिक असमानता:** कृषीक्षेत्रातील महिलांना केवळ श्रमाच्या बाबतीतच नव्हे तर सामाजिक व आर्थिक अधिकारांच्या बाबतीतही असमानतेला सामोरे जावे लागते. जमीन मालकी, आर्थिक निर्णय, कर्जसुविधा, सरकारी योजना आणि सामाजिक प्रतिष्ठा या सर्व क्षेत्रांत महिलांची स्थिती दुय्यम आहे. सर्वसाधारणपणे सांपत्तिक व इतर उत्पादक साधन सामग्रीवर पुरुषांचा अधिकार असतो. कायद्याने स्त्रियांना संपत्तीविषयक अधिकार दिलेले आसतील तरीही वास्तवात मात्र अनेक सांस्कृतिक, भावनिक कारणांमुळे स्त्रियांचे संपत्तीवर किंवा उत्पादन, सामग्रीवर नियंत्रण नसते. त्यामुळे त्यांना कायमच परावलंबित्व स्वीकारावे लागते. पुरुषप्रधान व्यवस्था ही स्त्रियांच्या श्रमावर, प्रजोत्पादनावर, लैंगिकतेवर आणि वारसा हक्कावर असलेल्या नियंत्रणावर उभी आहे. हे घटक पुरुषप्रधान व्यवस्थेचा भौतिक पाया असून कुटुंबव्यवस्था, धर्मव्यवस्था, प्रसारमाध्यमे, कायदा व्यवस्था हे त्या व्यवस्थेचे खांब आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार, भारतात महिलांच्या नावावर असलेली जमीन मालकी १३ टक्क्यांपेक्षा कमी आहे. याशिवाय, NSSO व PLFS अहवाल दर्शवतात की ग्रामीण भागातील बहुसंख्य महिलांना उत्पन्न खर्च व आर्थिक निर्णय घेण्याचा स्वतंत्र अधिकार नाही.पितृसत्ताक सामाजिक रचना, परंपरागत मूल्ये आणि लिंगाधारित कामवाटप यामुळे महिलांचे श्रम शोषित राहतात आणि सामाजिक असमानता अधिक दृढ होते.पितृसत्ताक व्यवस्था, सांस्कृतिक नियम आणि संसाधनांवर पुरुषांचे नियंत्रण यामुळे असमानता टिकून राहते. NFHS-5 (२०१९-२१) आणि Agriculture Census (२०१५-१६) नुसार, महिलांकडे कृषी जमिनीची मालकी फक्त ११-१४ टक्के आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यांतही हा वाटा मर्यादित आहे. जमीन मालकीचा अभाव महिलांना कर्ज, अनुदान, आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि सरकारी योजनांचा (जसे PM-KISAN) लाभ घेण्यापासून रोखतो. महिलांचे वेतन पुरुषांपेक्षा २०-३० टक्के कमी असते, आणि निर्णय घेण्याचे अधिकारही मर्यादित राहतात. सामाजिक दृष्टिकोन महिलांना 'शेतकऱ्याची पत्नी' म्हणून पाहतो,न की स्वतंत्र शेतकरी म्हणून. याचाच अर्थ असा की हे घटक पुरुषप्रधान व्यवस्थेचा भौतिक पाया असतात. त्यांच्या मार्फत पुरुषप्रधानता इतकी खोलवर मूळ धरते की ती नैसर्गिकच वाटू लागते.

**अध्ययनाचे उद्देश:** **१.**कृषीक्षेत्रातील महिलांच्या अदृश्य श्रमांचे स्वरूप अभ्यासणे. २. महिलांच्या श्रम व सामाजिक असमानतेतील संबंध समजून घेणे. ३. बदलत्या ग्रामीण समाजात महिलांच्या स्थितीचे विश्लेषण करणे.

**गृहिकृत्य:** "कृषीक्षेत्रात महिलांचा श्रम सहभाग मोठ्या प्रमाणात असूनही त्यांना सामाजिक, आर्थिक व मालकी हक्कांमध्ये समान स्थान मिळत नाही."

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी गुणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे. सहेतुक नमुना निवड तंत्राचा वापर करून छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील दहा गावांची निवड करण्यात आली असून, प्रत्येक गावातून पाच अशा एकूण ५० ग्रामीण महिलांचा नमुन्यात समावेश करण्यात आला आहे. प्राथमिक माहिती संकलनासाठी मुलाखत अनुसूची तंत्राचा वापर करण्यात आला असून दुय्यम स्त्रोतांमध्ये प्रकाशित-अप्रकाशित संशोधन साहित्याचा उपयोग केला आहे.

**विश्लेषण व अर्थनिर्णयन: तक्ता १: कृषीक्षेत्रातील महिलांचे शेतीवरील मालकी हक्क**

| अ. क्र. | शेतीवरील मालकी हक्क | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | स्वतः च्या नावांवर | ० | ० टक्के |
| ०२ | पतीच्या नावावर | १४ | २८ टक्के |
| ०३ | सासूच्या नावावर | १३ | २६ टक्के |
| ०४ | सासऱ्याच्या नावावर | ०३ | ०६ टक्के |
| ०५ | लागू नाही (शेती नाही) | २० | ४० टक्के |
| | एकूण | ५० | १०० टक्के |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, एकूण उत्तरदात्यापैकी कोणत्याही महिलेच्या स्वतःच्या नावावर शेतीची मालकी नाही. ३४ टक्के शेती ही कुटुंबातील पुरुष सदस्यांच्या नावावर आहे. यात सर्वाधिक प्रमाणात २८ टक्के शेती ही पतीच्या नावावर, ६

टक्के सासऱ्यांच्या नांवावर आणि २६ टक्के शेती ही सासूच्या नावावर असल्याचे निदर्शनास येते. ४० टक्के उत्तरदात्यांना शेती नसून ती मोलमजुरी, मिळेल ते काम करणाऱ्या आहेत. ही आकडेवारी ग्रामीण समाजातील पितृसत्ताक मालकी व्यवस्थेचे प्रतिबिंब दर्शवते. महिलांचा शेतीकामातील सहभाग मोठ्या प्रमाणात असतानाही मालकी हक्कांपासून त्या वंचित राहतात. परिणामी महिलांचे श्रम "अदृश्य श्रम" म्हणून गणले जातात व त्यांना निर्णयप्रक्रियेत स्थान मिळत नाही.

**तक्ता २: उत्पन्न खर्च करण्याचा अधिकार दर्शविणारा तक्ता :**

| अ . क्र. | उत्पन्न खर्च करण्याचा अधिकार | उत्तरदाता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | स्वतः | १२ | २४ टक्के |
| ०२ | पती व मुले | २० | ४० टक्के |
| ०३ | कुटुंबातील इतर | ११ | २२ टक्के |
| ०४ | वरील सर्व | ०७ | १४ टक्के |
| एकूण | | ५० | १०० टक्के |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, केवळ २४ टक्के महिलांना स्वतःच्या उत्पन्नावर खर्च करण्याचा अधिकार आहे. याउलट ४० टक्के महिलांच्या बाबतीत उत्पन्न खर्चाचा निर्णय पती व मुले घेतात, तर २२ टक्के महिलांमध्ये कुटुंबातील इतर सदस्य हा निर्णय घेत असल्याचे दिसते.यावरून स्पष्ट होते की महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य मर्यादित स्वरूपाचे आहे. उत्पन्न मिळवण्यात महिलांचा सहभाग असला तरी त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार त्यांच्या हाती नसतो. ही परिस्थिती ग्रामीण महिलांवरील आर्थिक अवलंबित्व आणि सामाजिक असमानतेकडे निर्देश करते.

**तक्ता ३: आर्थिक स्वावलंबनातील अडथळे दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | महिलांच्या आर्थिक स्वावलंबनातील अडथळे | उत्तरदाता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | शिक्षणाचा अभाव | २२ | ४४ टक्के |
| ०२ | कौटुंबिक जबाबदाऱ्या | ११ | २२ टक्के |
| ०३ | समाजाचा नकारात्मक दृष्टिकोन | ०७ | १४ टक्के |
| ०४ | प्रशिक्षणाची अनुपलब्धता | ०५ | १० टक्के |
| ०५ | वरील सर्व | ०५ | १० टक्के |
| एकूण | | ५० | १०० टक्के |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, ४४ टक्के ग्रामीण महिलांना असे वाटते की, महिलांचे आर्थिक स्वावलंबनातील सर्वात मोठा अडथळा हा शिक्षणाचा अभाव आहे. २२ टक्के महिलांना कौटुंबिक जबाबदाऱ्या, १४ टक्के महिलांना समाजाचा नकारात्मक दृष्टिकोन तर १० टक्के महिलांना प्रशिक्षणाची अनुपलब्धता या कारणांमुळे ग्रामीण महिलांना आर्थिक स्वावलंबी होण्यास अडथळा निर्माण होतो. १० टक्के महिलांनी वरील सर्व घटक एकत्रितपणे अडथळे असल्याचे नमूद केले आहे. ही आकडेवारी ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण व सामाजिक दृष्टिकोनात बदल यांची नितांत गरज असल्याचे अधोरेखित करते.

**तक्ता ४: सामाजिक कार्यक्रमांतील महिलांचा सहभाग दर्शविणारा तक्ता:**

| अं. क्र. | सामाजिक कार्यक्रमांतील सहभाग | उत्तरदाता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम | १४ | २८ टक्के |
| ०२ | राजकीय सहभाग/ महिला बचत गट | ०४ | ०८ टक्के |
| ०३ | सामुदायिक कार्यक्रम | १० | २० टक्के |
| ०४ | शैक्षणिक व आरोग्यविषयक कार्यक्रम | ०२ | ०४ टक्के |
| ०५ | कोणताही सहभाग नाही | २० | ४० टक्के |
| | एकूण | ५० | १०० टक्के |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, २८ टक्के महिलांचा सहभाग धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांपुरताच मर्यादित आहे. केवळ ८ टक्के महिलांचा राजकीय सहभाग किंवा महिला बचत गटांमध्ये सहभाग असल्याचे आढळते. सामुदायिक कार्यक्रमांमध्ये २० टक्के महिलांचा सहभाग आहे, तर शैक्षणिक व आरोग्यविषयक कार्यक्रमांमध्ये केवळ ४ टक्के महिलांचा सहभाग दिसून येतो. विशेष म्हणजे ४० टक्के महिलांचा कोणत्याही सामाजिक कार्यक्रमात सहभाग नाही. यावरून ग्रामीण महिलांची सामाजिक गतिशीलता मर्यादित असल्याचे स्पष्ट होते. घरगुती व कृषी कामांच्या ओझ्यामुळे तसेच सामाजिक बंधनांमुळे महिलांचा सार्वजनिक व निर्णयक्षम कार्यक्रमांतील सहभाग कमी राहतो.

**गृहितकृत्य पडताळणी:** प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितकृत्य मांडण्यात आला आहे: "कृषीक्षेत्रात महिलांचा श्रम सहभाग मोठ्या प्रमाणात असूनही त्यांना सामाजिक, आर्थिक व मालकी हक्कांमध्ये समान स्थान मिळत नाही."

**गृहितकृत्य पडताळणीसाठी वापरलेले निर्देशक:** प्रस्तुत संशोधनात गृहितकृत्य पडताळणीसाठी गुणात्मक (Qualitative) व वर्णनात्मक (Descriptive) संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. ग्रामीण महिलांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे आकलन करण्यासाठी शेतीवरील मालकी हक्क, उत्पन्न खर्च करण्याचा अधिकार, महिलांच्या आर्थिक स्वावलंबनातील अडथळे तसेच सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमांतील सहभाग हे प्रमुख निर्देशक निश्चित करण्यात आले आहेत. हे निर्देशक ग्रामीण महिलांचे श्रम योगदान, आर्थिक स्वायत्तता, निर्णय प्रक्रियेत सहभाग व सामाजिक स्थान यांचे स्पष्ट चित्र उभे करतात. या

निर्देशकांच्या आधारे क्षेत्रीय माहितीचे वर्णनात्मक व अर्थनिर्णयात्मक विश्लेषण करून गृहितकृत्यांची पडताळणी करण्यात आली. आहे.

**गृहितकृत्य पडताळणीचे विश्लेषण: तक्ता क्रमांक. १** मधील विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, एकाही उत्तरदाता महिलेच्या स्वतःच्या नावावर शेतीची मालकी असून बहुसंख्य शेती ही पती, सासू किंवा सासऱ्यांच्या नावावर आहे. महिलांचा शेतीकामातील सहभाग मोठा असतानाही मालकी हक्कांपासून त्या वंचित असल्याचे दिसून येते. ही स्थिती ग्रामीण समाजातील पितृसत्ताक मालकी व्यवस्थेचे प्रतिबिंब आहे.

**तक्ता क्रमांक. २** च्या आधारे असे निदर्शनास येते की, केवळ काही महिलांनाच स्वतःच्या उत्पन्नावर खर्च करण्याचा स्वतंत्र अधिकार आहे. बहुसंख्य महिलांच्या बाबतीत आर्थिक निर्णय पती किंवा कुटुंबातील इतर सदस्य घेतात. यावरून ग्रामीण महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य मर्यादित स्वरूपाचे असल्याचे स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक. ३** मधील माहितीवरून शिक्षणाचा अभाव, कौटुंबिक जबाबदाऱ्या, समाजाचा नकारात्मक दृष्टिकोन व प्रशिक्षणाची अनुपलब्धता हे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनातील प्रमुख अडथळे असल्याचे दिसून येते. हे घटक महिलांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सशक्त होण्यापासून रोखतात.

**तक्ता क्रमांक. ४** च्या विश्लेषणातून असे आढळते की, सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमांतील महिलांचा सहभाग अत्यल्प आहे. बहुसंख्य महिलांचा सहभाग धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांपुरताच मर्यादित असून राजकीय, शैक्षणिक व निर्णयक्षम कार्यक्रमांमध्ये सहभाग नगण्य आहे. ही परिस्थिती ग्रामीण महिलांची सामाजिक गतिशीलता मर्यादित असल्याचे दर्शवते.

**गृहितकृत्य पडताळणीचा निष्कर्ष:** वरील सर्व गुणात्मक निर्देशकांचे एकत्रित विश्लेषण करता असे स्पष्टपणे दिसून येते की, कृषीक्षेत्रात महिलांचा श्रम सहभाग मोठ्या प्रमाणात असूनही जमीन मालकी, आर्थिक निर्णय, सामाजिक सहभाग व अधिकारांच्या बाबतीत त्यांना समान स्थान प्राप्त झालेले नाही.

म्हणून प्रस्तुत संशोधनातील गुणात्मक व वर्णनात्मक विश्लेषणाच्या आधारे मांडलेले गृहितकृत्य सत्य ठरते.

**निष्कर्ष:** प्रस्तुत अध्ययनातून असे दिसून येते की,बहुसंख्य महिलांच्या नावावर शेतीची मालकी नाही. जमीन मालकीचा अभाव असल्यामुळे महिलांना शासकीय योजना, कर्जसुविधा, आधुनिक तंत्रज्ञान आणि निर्णयप्रक्रियेतून वंचित राहावे लागते. तसेच आर्थिक दृष्ट्या पूर्णतः दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागते. बदलत्या ग्रामीण समाजात कृषीक्षेत्राचे स्वरूप बदलत असले तरीही महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती अपेक्षित प्रमाणात सुधारलेली नाही. आर्थिक उत्पन्न मिळवण्यात महिलांचा सहभाग असला तरी त्यावर खर्च करण्याचा अधिकार बहुतांश वेळा पती किंवा कुटुंबातील इतर सदस्यांकडे असतो. यामुळे महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य मर्यादित राहते. ग्रामीण महिलांचा कृषी व संलग्न क्षेत्रांतील श्रम सहभाग मोठ्या प्रमाणात असतानाही त्यांच्या श्रमांना अद्याप "अदृश्य" स्वरूप दिले जाते. शेतीकाम, पशुपालन, घरगुती कामे आणि कौटुंबीक जबाबदाऱ्या यात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असले तरी त्याचे आर्थिक मूल्यांकन होत नाही. शिक्षणाचा अभाव, कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक दृष्टिकोन आणि प्रशिक्षणाची अनुपलब्धता हे घटक महिलांच्या आर्थिक स्वावलंबनातील प्रमुख अडथळे असल्याचे अभ्यासातून दिसून आले आहे. सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमांतील महिलांचा सहभाग अत्यल्प असून, त्यांची सामाजिक गतिशीलता मर्यादित आहे. ही परिस्थिती पितृसत्ताक सामाजिक रचनेचे द्योतक असून, महिलांवरील सामाजिक असमानता अधिक दृढ करते.

**शिफारशी:** ग्रामीण महिलांच्या नावावर जमीन मालकी नोंदणीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष शासकीय योजना राबवाव्यात. महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून अधिकृत ओळख देऊन कर्ज, अनुदान व कृषी योजनांचा थेट लाभ द्यावा. ग्रामीण महिलांसाठी शिक्षण, कौशल्य विकास व कृषी प्रशिक्षण कार्यक्रम वाढविणे आवश्यक आहे. महिला बचत गट, स्वयंरोजगार आणि सूक्ष्म वित्तपुरवठा माध्यमातून आर्थिक स्वावलंबन बळकट करावे. पितृसत्ताक मानसिकतेत बदल घडवण्यासाठी सामाजिक जनजागृती कार्यक्रम राबवावेत. घरगुती व कृषी क्षेत्रातील महिलांच्या अदृश्य श्रमांना आर्थिक व सामाजिक मान्यता द्यावी. ग्रामसभा, स्थानिक स्वराज्य संस्था व सामाजिक संघटनांमध्ये महिलांचा सहभाग वाढवावा. ग्रामीण महिलांसाठी शैक्षणिक व कौशल्यविकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत. महिलांचा सामाजिक व राजकीय सहभाग वाढवण्यासाठी प्रोत्साहनात्मक धोरणे राबवावीत.

**संदर्भ:**

1. जाधव, निर्मला. (2015). भारतीय स्त्री प्रश्न आकलनाच्या दिशेने. औरंगाबाद: ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ; हरिती पब्लिकेशन्स.
2. अमृतकर, प्रशांत. (2014). स्त्री आणि राजकारण: पंचायत राज्य संस्थेतील स्त्री सहभाग. औरंगाबाद: चिन्मय प्रकाशन.
3. Food and Agriculture Organization of the United Nations. (2023). The status of women in agrifood systems. Rome: FAO.
4. Food and Agriculture Organization of the United Nations. (2025). International Year of the Woman Farmer 2026. Rome: FAO.
5. Ministry of Statistics and Programme Implementation. (2024). Periodic Labour Force Survey (PLFS): Annual report, July 2023—June 2024. New Delhi: Government of India.
6. International Institute for Population Sciences (IIPS) & ICF. (2021). National Family Health Survey (NFHS-5), 2019—21: India fact sheet. Mumbai: IIPS.
7. Ministry of Agriculture and Farmers Welfare. (2016). Agriculture census 2015—16. New Delhi: Government of India.
8. United Nations General Assembly. (2024). Resolution A/RES/78/279: International Year of the Woman Farmer, 2026. New York: United Nations.

# ग्रामीण महिला सशक्तिकरणात बिगर शासकीय संस्थांची भूमिका

**डॉ. चांगदेव निवृती मुंढे** समाजशास्त्र भाग,गोदावरी कनिष्ठ व वरिष्ठ कला महाविद्यालय अंबड जि. जालना.

**प्रस्तावना**: जगातील प्रत्येक देशातील नागरिकांच्या कल्याणाची जबाबदारी ही त्या-त्या देशातील शासन यंत्रणेची असते. शासन यंत्रणेद्वारे लोकांच्या विकासाच्या व कल्याणाच्या विविध योजना आखल्या जातात व त्या प्रभाधीपणे राबविण्याचा देखील प्रयत्न केला जातो. परंतु जेव्हा शासनयंत्रणा लोकांचा विकास साधण्यास तसेच लोकांच्या मुलभूत गरजा भागविण्यामध्ये कमी पडतात . तेव्हा समाजातील लोकांचा व प्रामुख्याने संपूर्ण समाजाचाच विकास खुंटतो. अलिकडच्या काळामध्ये लोकांच्या विकासासाठी तसेच त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक बिगर शासकीय संघटना पुढे आल्या आहेत. प्रस्तुत पेपर मध्ये आपण बिगर शासकीय संघटनांची महिला सशक्तिकरणातील भूमिका सविस्तरपणे अभ्यासणार आहोत.या घटकामध्ये आपण ग्रामीण महिला सशक्तीकरणात बिगर शासकीय संघटनांची भूमिका, बिगर शासकीय संघटना आणि दुर्बल घटकांचे कल्याण, विशेषत: ग्रामीण महिलांच्या सशक्तिकरणात बिगर शासकीय संघटनांची भूमिका, मुलांच्या -मुलींच्या विकासातील बिगर शासकीय संघटनाची भूमिका आणि बिगर शासकीय संघटनांच्या कार्याचा आढावाआपण या प्रकरणात सविस्तरपणे अभ्यासणार आहोत. महिला सशक्तिकरणाच्या माध्यमातून आपण ग्रामीण भागातील व एकूणच ,स्त्री-मुक्ती, स्त्री-पुरुष समानता आणि स्त्री शक्ती या संकल्पना आपण येथे काही प्रमाणात समजून घेणार आहोत. स्त्री संघटना, महिला आघाडी, स्त्री आधार केंद्र, स्त्री मुक्तीची चळवळ, स्त्रियांचे सबलीकरण, सक्षमीकरण, स्त्रियांच्या स्वयंसेवी संस्था, स्त्रियांसाठीचे आरक्षण या सर्व विषयांशी लोक सध्या परिचित होताना दिसून येत आहेत. मात्र स्त्री प्रश्नाविषयीची जाण ही संयुक्त राष्ट्रांनी (United Nation) १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केल्यानंतरच वाढली आणि वर उल्लेख केलेल्या संकल्पनांचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. याचाच परिणाम म्हणून आज स्त्रीशक्ती, स्त्रीमुक्ती आणि स्त्री-पुरुष समानतेची चळवळ ही अर्थकारण, समाजकारण आणि राजकारणाच्या चर्चा विश्वाच्या केंद्रस्थानी येऊन ठेपली आहे.स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजातील स्त्री-जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर या काळात चर्चा सुरू झाली.

**महिला सशक्तीकरणाचा इतिहास:** महिला सशक्तीकरणाला खऱ्या अर्थाने भारतामध्ये जी सुरुवात झाली ती खालील समाज सुधारकांच्या योगदानातूनच झाली असे म्हटले तर वावगे होणार नाही. महिला सशक्तिकरण म्हणजे प्राचीन काळापासून ते मध्ययुगापर्यंत समाज जोखडातून वा बंधनातून मुक्ती करणे होय. महिलांच्या समाजमुक्तीची वा समाज व्यवस्थेच्या बंधनातून मुक्तीसाठी केलेली पहिली चळवळ म्हणजे सशक्ति करण्याचे पहिले पाऊल होय आणि त्याची सुरुवात खालील समाज सुधारकांच्या योगजनातूनच सुरू झालेली आहे. आधुनिकीकरणाचे जनक राजा राममोहन रॉय, केशवचंद सेन, ईश्वरचंद विद्यासागर, लोकहितवादी गोपाल हरी देशमुख, भाऊ दाजी, महात्मा जोतिबा फुले, गोपाल गणेश आगरकर, महादेव गोविंद रानडे, पंडिता, रमाबाई रानडे, काशिबाई कानिटकर, डॉ. आनंदीबाई जोशी, लक्ष्मीबाई टिळक, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृतिशील योगदानामुळे भारतीय समाजामध्ये प्रबोधनाची परंपरा समृद्ध झाली.१८२९ मध्ये सती प्रथेवर कायदेशीर बंदी घालण्यापासून ब्रिटीश शासनाने स्त्रियांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना हात घालण्यास सुरूवात केली. तसेच विवाहाच्या संमतीचे वय काय असावे हा प्रश्न चर्चिला गेला त्यामागे बालबिबाह प्रथेला रोखण्याचा हेतू होता. विधवांचे केशवपन आणि परंपरेने त्यांच्या पुर्नविवाहाबर लादलेली बंदी, हे देखील ब्रिटीशकाळात कळीचे प्रश्न होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार असावा त्यांच्यामध्ये शिक्षणप्रसार व्हावा याचाही आग्रह समाजसुधारकानी धरला .स्त्रीशक्तीला भारतामध्ये खऱ्या अर्थाने जागे करून त्याच्यात आत्मभान निर्माण करण्याला प्रारंभ १९ व्या शतकात झाला परंतु या काळात स्त्रियांची चळवळ उभी राहिली नाही. १८८५ मध्ये कॉंग्रेसची स्थापना झाली. १९१५ पर्यंत म्हणजे पहिल्या ३० वर्षात अपवाद वगळता, महिला उपस्थित नसायच्या .या सभांमध्ये न्या. महादेव गोविंद रानडेयांचा पुढाकार असे ,अशा परिषदांमधून समाजातील स्त्रियांचा दर्जा, त्याचे प्रश्न मांडले जात होते. पण राजकारण आणि समाजकारणाचे हे प्रारंभीचे सख्य फार काळ टिकले नाही. वसाहतवादी ब्रिटीश सत्तेशी लढताना त्या स्वातंत्र्य चळवळीत, म्हणजे कॉंग्रेस व्यासपीठावर आणि संघटनेत, स्त्रियाचे प्रतिनिधित्व नसणे महात्मा गांधीजींना खटकले आणि त्यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसच्या संघटनेत आणि चळवळीत स्त्रियांचा सहभाग प्रयत्नपूर्वक बाढविण्यात आला व महिला सशक्तीकरणाला चालना मिळाली. समाजातील ५० टक्के घटक असलेल्या स्त्रियांच्या प्रश्नाचा फारसा विचार न करताच स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या २५ वर्षातील आर्थिक विकासाचे धोरण तयार केले गेले होते. परंतु स्त्रियांच्या वाट्याला दुःखच आल्याचे दिसून येते. भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार पुरूषांप्रमाणे स्त्रियांनाही दिला. सध्या मतदानाचा अधिकार १८ वर्षांनंतर प्राप्त होतो. मात्र राजकीय सत्ता संरचनेत स्त्रियांना आजदेखील स्थान मिळाले नाही. पंचायत राज योजनेअंतर्गत ग्रामीण विकासासाठी महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला गेला आहे. पंचायतराज योजनेतील तीनही सरातील महिलांचा सहभाग व महिला सशक्तिकरण यांचा सुसंयोग दिसून येतो. ग्रामीण महिलांच्या सशक्तिकरणात बिगर शासकीय संस्थांच्या भूमिकेत व पंचायत राज मधील सहभाग यामध्ये बिगर शासकीय संस्थेने केलेली जनजागृती ही अतिशय महत्त्वाची आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या जनजागृतीसाठी बिगर शासकीय संस्था अर्थात एनजीओ यांनी फार मोठे योगदान दिलेले आहे. आज पर्यंत ग्रामीण महिलांच्या सशक्तीकरणात सर्वप्रथम बिगर शासकीय संस्था, शासकीय ध्येय धोरणे व शासकीय योजनांचे योगदान महत्वपूर्ण आहे. तरीसुद्धा या सर्व प्रक्रियेत महिलांचा सहभाग अत्यंत कमी असल्याचे दिसून येते.

**उद्दिष्टे :** १. महिला सशक्तिकरण ही संकल्पना जाणून घेणे. २. बिगर शासकीय संघटना व त्यांची कार्य समजून घेणे. ३. ग्रामीण महिला सशक्तीकरणात बिगर शासकीय संघटनांची भूमिका जाणून घेणे.

**गृहीतकृत्ये:** १. महिला सशक्तिकरण कशाला म्हटले जाते ते स्पष्ट दिसत नाही. २. बिगर शासकीय संघटनांची भूमिका व कार्य नेमके काय आहेत हे समजत नाही. ३. ग्रामीण महिला सशक्तीकरणात बिगर शासकीय संघटनांची भूमिका कशा प्रकारचे योगदान देते जाणून घेणे आवश्यक आहे.

**तथ्ये संकलन:** कोणत्याही संशोधनासाठी तथ्य संकलनाची आवश्यकता असते आणि ती दोन प्रकारातून केली जाते. तथ्ये संकलन प्राथमिक व दुय्यम स्रोताच्या आधारे केले जाते. आपण

सदरील संशोधन पेपर साठी संकलित केलेले जे तथ्ये आहेत ते दुय्यम स्रोताच्या आधारावरील आहेत.

**संशोधनाचे महत्त्व:** सदरील संशोधनाचा विषय हा तसे पाहता वर वरचा व साधा दिसून येतो . परंतु एकूण समाजातील 50 टक्के भाग असणाऱ्या महिलाच्या सशक्तिकरणाचा व त्यातल्या त्यात ग्रामीण भागातील महिलांच्या सशक्तिकरणाचा विषय आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या सशक्तिकरणा कोणत्याही एका घटकाचा प्रभाव अधिक व स्पष्ट न दिसता त्याला अनेक कारणे व घटक जबाबदार आहेत . ग्रामीण भागातील महिलांच्या जनजागृतीसाठी शासकीय व बगर शासकीय सेवाभावी संस्था अनेक वर्षापासून कार्यान्वित झालेल्या दिसून येतात. आज मी तिला अशा कार्य करणाऱ्या सर्व शासकीय व बगर शासकीय संस्थांच्या हाताला काही अंशी यश प्राप्त झालेले आहे असे वाटते. सदरील संशोधन पेपरा चा उपयोग अभ्यासक, विद्यार्थी, संशोधक व तत्सम प्रकारच्या अभ्यासकांना काही अंशी माहिती उपलब्ध करून देण्यास उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

**महिला सशक्तिकरण म्हणजे काय:** महिला सशक्तीकरण म्हणजे महिलांना शिक्षण, आरोग्य, आर्थिक आणि राजकीय अशा सर्व क्षेत्रांमध्ये समान संधी, अधिकार आणि निर्णय घेण्याची क्षमता देणे, ज्यामुळे त्या स्वावलंबी, सक्षम आणि आत्मविश्वासाने समाजात पुरुषांच्या बरोबरीने उभे राहू शकतील आणि समाजाच्या विकासात पूर्णपणे योगदान देऊ शकतील. यात स्त्रियांचे हक्क, सामाजिक आणि आर्थिक अडथळे दूर करणे, आणि त्यांना त्यांच्या आयुष्याचे निर्णय स्वतः घेण्यास सक्षम बनवणे समाविष्ट आहे.

**महिला सक्षमीकरणाचे मुख्य पैलू:**

**शैक्षणिक सशक्तीकरण:** मुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि शिक्षणातील असमानता दूर करणे, जेणेकरून त्यांना ज्ञान आणि कौशल्ये मिळतील.

**आर्थिक सशक्तिकरण**: महिलांना रोजगार, आर्थिक स्वातंत्र्य आणि संपत्तीवर नियंत्रण मिळवून देणे, जेणेकरून त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील.

**सामाजिक सशक्तिकरण**: समाजात समान दर्जा मिळवून देणे, रूढीवादी विचार आणि भेदभावांना आव्हान देणे, आणि महिलांना सामाजिक कार्यात सक्रियपणे सहभागी करणे.

**राजकीय सशक्तिकरण**: निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवणे, त्यांना राजकीय नेतृत्वाची संधी देणे आणि त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवण्यास सक्षम करणे.

**कायदेशीर सशक्तिकरण**: कायद्यांद्वारे महिलांना संरक्षण देणे, त्यांच्या हक्कांची अंमलबजावणी करणे आणि कायद्याच्या कक्षेत न्याय मिळवून देणे.

**मानसिक आणि भावनिक सशक्तिकरण:** महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना स्वतःच्या आयुष्याचे निर्णय घेण्यास प्रवृत्त करणे आणि त्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणे.

थोडक्यात, महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना त्यांच्या पूर्ण क्षमतेने जगण्यासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार, संधी आणि संसाधने उपलब्ध करून देणे, जेणेकरून त्या कोणत्याही अडथळ्यांशिवाय समाजात समान आणि सन्माननीय जीवन जगू शकतील.

वरील महिला सशक्तिकरण हे ग्रामीण क्षेत्रातील महिलांच्या सशक्तिकरणा कसं रुजवता येईल त्यांची जनजागृती कशी करता येईल यासाठी बिगर शासकीय संघटनांनी केलेले योगदान हे अतिशय अनमोल आहे. ग्रामीण भागातील महिला शहरी भागातील महिलांपेक्षा सशक्तिकरणासाठी अधिक जागृत नसतात किंवा त्यांच्यापर्यंत तशा प्रकारची जनजागृती ची साधने उपलब्ध झालेली नसतात. अशावेळी बिगर शासकीय संस्था अधिक महत्त्वाची भूमिका बजावतात असे निदर्शनास आले आहे. शासनाने सुद्धा अनेक प्रयत्न केलेले आहेत परंतु शासकीय प्रयत्नांपेक्षा बिगर शासकीय संस्थांचा प्रभाव ग्रामीण महिला सशक्ति करण्यात अधिक दिसून येतो. ग्रामीण महिलांच्या सशक्तिकरणात वरील दर्शवलेल्या सर्व पैलूंमध्ये बिगर शासकीय संस्था यांच्या पुढाकाराने अधिक सशक्तिकरण करण्यास बळकटी मिळालेली आहे. उदा. बालविवाहाला बंधन घालण्यासाठी अनेक संस्थांनी पुढाकार घेतलेला दिसून येतो. याशिवाय आर्थिक स्वावलंबनासाठी शासनाच्याच ध्येय धोरणांची अंमलबजावणी कशी करावी व स्वतःचा विकास करून घेऊन सशक्त कसं बनावं यासाठीचे अनेक कार्य प्रशिक्षण केंद्र बगर शासकीय संघटनांनी केलेले आहेत. आज वेगवेगळे वैचारिक अधिष्ठान आणि उद्दिष्ट स्वीकारून असंख्य बिगर शासकीय संघटना (NGOs) ग्रामीण महिलाच्या सशक्तिकरणासाठी काम करीत आहेत. यापैकी काही बिगर शासकीय संघटना या ग्रामीण महिला साक्षरतेचे काम करीत आहेत. काही संघटना ग्रामीण महिलांच्या अनेक प्रश्नांपैकी मूलभूत प्रश्नांकडे अधिक लक्ष देत आहेत. प्रामुख्याने ग्रामीण महिला आरोग्य, शिक्षण, प्रशिक्षण, निवारा व स्त्रियांच्या रोजगाराच्या प्रश्नासंबंधी लढा देत आहेत. काही संघटना व महिला चळवळी पर्यावरणाच्या प्रश्नावर काम करीत आहेत. तसेच विकास प्रकल्पातून होणारे विस्थापन व या विस्थापनातून निर्माण होणारे विस्थापितांचे प्रश्न यासबधी स्त्रियामध्ये सामूहिकरित्या जाणीव जागृती करण्याचे काम करीत आहेत. या सर्वांचा एकत्रित परिणाम झालेला दिसून येतो. या लढ्यामुळे आज प्रसाररमाध्यमे, साहित्य क्षेत्र, कला क्षेत्रामध्ये तसेच विविध राजकीय पक्षाच्या आघाडीमध्ये महिलांची स्वतंत्र आघाडी निर्माण केली जात आहे आणि यावरून समाजामध्ये लिंगविषमाधिष्ठीत विषमता हळूहळू कमी होताना दिसून येते. याशिवाय ग्रामीण भागातील महिलांना वेगवेगळे व्यवसाय संधी उपलब्ध करून देण्याचे काम केले जाते. उदा. महाबळेश्वर शेजारी मधाचे गाव म्हणून प्रसिद्ध आहे. या गावामध्ये सर्व

गावातील महिलांचा व्यवसाय हा मध संकलन करणे हा असल्यामुळे या गावाला मधाचे गाव म्हणून ओळखले जाते. असे आज ग्रामीण भागातील महिलांच्या व्यवसायाच्या अनुषंगाने अनेक मार्गातून सशक्तीकरण झालेला आहे .अलिकडच्या काळामध्ये एन जी ओ. ची भूमिका ही स्त्रियांच्या उन्नतीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. एन.जी.ओं. द्वारे महिलाच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी ,आरोग्य, जाणीवेसंदर्भात, शिक्षणासंदर्भात तसेच त्यांच्या कुटुंबातील दर्जासदर्भात आज एन.जी.ओं. महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. आज महिलासंबंधी कार्य करणाऱ्या अनेक एन.जी.ओं द्वारे महिलासाठी घरे, स्वच्छतेच्या सवयी, आरोग्य सेवा, शिक्षण, पोषण आहार, वा सर्व बाबीसंबंधी अत्यत महत्त्वपूर्ण कार्य केले जात आहे. स्त्रियांच्या प्रश्नासबंधी काम करणाऱ्या अनेक एन.जी.ओं. चे ध्येय हे गरिब सत्ताहिन स्त्रियांच्या हितासाठी त्यांच्या विकासासाठी काम करणे हे आहे. महिलांच्या प्रश्नासंदर्भात काम करणाऱ्या एन.जी.ओं. मध्ये सन १९२७ साली स्थापन झालेली "ऑल इंडिया वुमन कॉन्फरन्स" (All India Women's Conference AIWC) या संघटनेचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. ही संघटना गांधी व पाश्चात्य उदारमतवादी विचारानी प्रेरित आहे. या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट हे स्त्रीयांचे कल्याण करणे हे आहे. सध्या या संघटनेचे एक लाख सदस्य व संपूर्ण भारतभर या संघटनेच्या ४०० शाखा आहेत. ही संघटना प्रामुख्याने कुटुंबनियोजन, बालकल्याण, स्त्रीयांसाठी आवश्यक असणारी वसतीगृहे आणि अपारंपारिक उर्जा स्त्रोत या क्षेत्रामध्ये प्रामुख्याने काम करीत आहे. या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट हे स्त्रियांचा समाजातील दर्जा उंचावणे व त्यांची विविध प्रश्नांपासून सोडवणूक करणे हे आहे.श्रमिक महिला संस्था ही संघटना देखील महिलासंबंधी कार्य करणारी महत्त्वाची संघटना आहे. या संघटनेची स्थापना ही सन १९७१ मध्ये झाली. ही संघटना मार्क्सवादी विचारांनी प्रेरित आहे. ही संघटना प्रामुख्याने मध्यमवर्गीय ,श्रमीक व ग्रामीण महिलांसाठी अत्यंत महत्वाचे कार्य करते."सेल्फ एम्प्लॉइड घुमन्स्, असोसिएशन (Self Employed Women's Assocaition - SEWA) ही गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे महिलासंबंधी कार्य करणारी संघटना आहे. ही संघटना प्रामुख्याने असंघटित क्षेत्रामध्ये काम करणान्या महिलांसंबंधी काम करते या संघटनेद्वारा लक्षावधी महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

**मुलींच्या विकासातील बिगर शासकीय संघटनांची भूमिका:** मुले-मुली (Children) ही प्रत्येक राष्ट्रांची संपत्ती असतात .कारण या मुलांवरच त्या राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. अनेक कारणामुळे विकसित व अविकसित राष्ट्रामधील मुलांचे भवितव्य हे सुरक्षित नसल्याचे दिसून येते. विकसनशील राष्ट्रांमध्ये प्रत्येक वर्षी सुमारे १५ मिलीयन मुले ही मृत्युमुखी पडतात तर सुमारे १२० मुले ही प्रत्येक मिनीटास जन्म घेतात. भारतामध्ये पाच वर्षाखालील ७५ मिलीयन मुले ही कुपोषित आहेत. तसेच जन्मलेल्या तीन मुलांपैकी एक मूल हे कमी बजनाचे जन्मते पाच वर्षाखालील मुलांमध्ये प्रत्येकी सात मुलांपैकी एकाचा मृत्यू होतो असे प्रत्येक वर्षाला ३ मिलीयन मुले मृत्युमुखी पडतात.जन्मास येणाऱ्या प्रत्येक मुलास आरोग्य, योग्य पोषण आहार, शिक्षण आणि संरक्षण मिळत नाही. दरिद्री अवस्थेमध्ये अनेक लोक राहत असलेने ते आपल्या मुलास घर, कुटुंबाचे संरक्षण तसेच ते आपली पालकत्वाची जबाबदारी नीटपणे पेलू शकत नाहीत. अतिशय दारिद्रयामधील मुली ही रसत्यावर (Streets), बस स्टेशन, रेल्वे स्टेशन, मार्केट आणि इतर ठिकाणे याठिकाणी दिसतात व या वातावरणात त्यांच्या नैसर्गीक वाढीमध्ये अडथळे निर्माण होतात .८० मिलीयन मुले - मुली ही शाळेपासून वंचित आहेत. तसेच ०४ मिलीयन मुले ही बालकामगार म्हणून काम करतात दि नॅशनल प्लॅनिंग कमिशन नुसार भारतामध्ये १४ वर्षाखालील ०.५ टक्के मुले ही अनाथ आहेत.

**ग्रामीण महिलांच्या सशक्तीकरणात बिगर शासकीय संघटनांची (एन.जी.ओ.) ची भूमिका:** भारतातील बिगर शासकीय संघटनांनी (NGOs) एकत्रित येऊन एका फेडरेशनची स्थापना केली आहे. या फेडरेशनच्या माध्यमातून या बिगर शासकीय संघटना ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या, प्रश्न व समाज कारणांसबंधी एकत्रित येऊन चर्चा करतात. या फेडरेशनच्या माध्यमातून सर्व बिगर शासकीय संघटना, की ज्या ग्रामीण भागातील लोकाच्या विकासासाठी काम करतात त्या एकमेकाना सहकार्य करतात व एकमेकांबरोबर समन्वय साधून काम करतात. ग्रामीण विकासाच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या भारतातील बिगर शासकीय संघटनांचे फेडरेशन हे अवॉर्ड (Award) या नावाने ओळखले जाते. अवॉर्ड चे पूर्ण रूप "Association of Voluntary Agencies in Rural Development हे असून त्याचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे .अवॉर्ड वा फेडरेशनची स्थापना ही सोसायटीज् अक्ट १८६० नुसार १९५८ साली झाली आहे. अवॉर्ड या फेडरेशनचे एकूण १२ संस्थापक सदस्य आहेत.

**अवॉर्ड (Award) फेडरेशनची प्रमुख उद्दिष्ट्ये:** अवॉर्ड फेडरेशनची प्रमुख उद्दिष्टधे ही पुढील प्रमाणे आहेत. १. बिगर शासकीय संघटनांच्या सहकार्याने ग्रामीण भागाचा विकास करणे, २ ग्रामीण भागाच्या जलद विकासासाठी प्रयत्न करणे. ३. ग्रामीण विकासासंबंधीची माहिती लोकांपर्यंत पोहचविणे. ४. सेमिनार व कॉन्फरन्स्चे आयोजन करून ग्रामीण समस्येसंबंधी सर्व बिगर शासकीय संघटनांना एकत्रित करून या समस्या सोडविण्याबाबत त्यांच्यासोबत चर्चा करणे. ५. ग्रामीण समाजाच्या विकासासाठी निधीची उभारणी करणे. ६. ग्रामीण विकास क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या भारतातील विदेशातील संघटनांबरोबर समन्वय साधून त्यांच्या बरोबर संपर्क प्रस्थापित करणे.

**ग्रामीण विकासासाठी बिगर शासकीय संघटना (NGOs) ज्या क्षेत्रामध्ये काम करतात ती प्रमुख क्षेत्रे:** भारतामध्ये ग्रामीण विकासासाठी बिगर शासकीय संघटना (NGOs) या अनेक क्षेत्रामध्ये काम करीत असून ग्रामीण विकासामध्ये बिगर शासकीय संघटनांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. बिगर शासकीय संघटना (NGOs) ग्रामीण विकासाच्या ज्या क्षेत्रामध्ये प्रामुख्याने काम करीत आहेत ती क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत. १. अतिमागास ग्रामीण भाग. २. ग्रामीण भागातील साधन संपत्ती ३. ग्रामीण भागातील लोकांच्या व महिलांच्या मानवी हक्कासाठी. ४. ग्रामीण भागातील महिलांना लोकाना मानवी हक्कांचे प्रशिक्षण देणे. ५. ग्रामीण भागातील लोकांना घरे बांधण्यासाठी मार्गदर्शन करणे. ६. ग्रामीण भागामध्ये संघटनांची स्थापना तसेच सामाजिक कृती गटाची स्थापना करणे. ७ सामाजिक कृती गटाच्या माध्यमातून शासकीय व बिगर शासकीय संघटनांमध्ये समन्वय साधणे. ८.

ग्रामीण विकासामध्ये लोकांचा सहभाग वाढविणे. ९. ग्रामीण भागाच्या संपूर्ण विकासासाठी शासन यंत्रणा व लोकांना प्रेरित करणे व प्रोत्साहन दणे. १०. ग्रामीण भागातील लोकाच्या मनामध्ये राष्ट्रीय एकात्मता रूजविणे. ११ ग्रामीण लोकांमध्ये शांतता व एकता प्रस्थापित करणे. १२. ग्रामीण भागातील तळागाळातील युवकांमध्ये नेतृत्वगुण निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे. १३. ग्रामीण लोकांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न करणे. १४. ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे. १५. ग्रामीण भागामध्ये साक्षरता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे. १६. कुपोषण समस्येसंबंधी ग्रामीण भागातील लोकांना सहकार्य करणे. १७. ग्रामीण भागातील अशिक्षितपणा कमी करणे. १८. ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे, १९. लोकसंख्या वाढीस आळा घालण्यासाठी प्रबोधन करणे, २०. बिगर शासकीय संघटना या ग्रामीण भागातील बेकारी दूर करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. ग्रामीण बेकारी दूर करण्यासाठी अनेक बिगर शासकीय संघटनांनी ग्रामीण उद्योगांची निर्मिती तसेच गृहोद्योगांची निर्मिती करून बेकार तरूणांना उद्योगांचे प्रशिक्षण देण्याचे कार्य हाती घेतले आहे. २१. अनेक बिगर शासकीय संघटना या सामाजिक कल्याणासाठी प्रामुख्याने काम करीत आहेत. त्यामध्ये ग्रामीण लोकांचे आरोग्य, स्वच्छता, पोषण आहार, शिक्षण, कुटुंब कल्याण, बालकांचा विकास, स्त्रियांचा विकास, दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी प्रयत्न तसेच त्याच्या रोजगारासाठीचे कार्य बिगर शासकीय संघटना करीत आहेत.

**ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी बिगर शासकीय संघटनांचे (NGOs) योगदान:** ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी बिगर शासकीय संघटनांद्वारे (NGOs) पुढील क्षेत्रामध्ये प्रामुख्याने काम केले जाते. ती क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत. १. शेती आणि जमीन विकास संबंधीच्या क्रिया. २. पाणी व्यवस्थापन व्यवस्था (लहान व मध्यम स्वरूपाची) ३. शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे व शेतीसंबंधीचे शिक्षण. ४. कुटुंब कल्याण आणि आरोग्य. ५. अनुसूचित जाती व जमातीतील महिलांच्या विकासासाठी प्रयत्न. ६. ग्रामीण भागातील दरिद्री लोकांची माहिती घेऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी संशोधन प्रकल्प राबविणे. ७.ग्रामीण पर्यावरणाचे रक्षण करणे, प्रदूषण नियंत्रण व सामाजिक वनीकरणाचे उपक्रम राबविणे इ. थोडक्यात, असे म्हणता येईल की ग्रामीण महिलांच्या सशक्तीकरणामध्ये बिगर शासकीय संघटनांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. कारण ग्रामीण महिलांपर्यंत सशक्तिकरणाच्या शासकीय योजना व विकासाच्या संधी पाहिजे त्या प्रमाणात पोहोचत नाहीत. ज्या काही पोहोचतात त्यांचा उपयोग करून कसा घ्यावा हेही स्पष्ट माहीत नसलेले दिसून आले आहे. अशावेळी अशा एनजीओ महिलांसाठी फार मोठे मोलाचे योगदान देणारे कार्य करताना दिसून आलेले आहेत. महिला सशक्तीकरणासाठी आवश्यक असलेल्या विविध पैलू व विविध क्षेत्रांचे मार्गदर्शन, प्रशिक्षण, व नवनवीन उपक्रम राबवून त्यांना सशक्त होण्यासाठी लागणाऱ्या सर्व घटकांचे मार्गदर्शन करतात व साहित्य सुद्धा पुरवण्याचे काम करतात. शासनाच्या सुद्धा विविध उपक्रमांबरोबर बगर शासकीय संघटना समन्वय साधून महिला सशक्तीकरणामध्ये महत्त्वाचा वाटा उचलतात. उदाहरणार्थ बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक सहाय्यता व व्यावसायिक करण याला खूप चालना देण्याचे काम अशा भगर शासकीय संघटनांच्या माध्यमातून झालेले दिसते. याशिवाय पशुपालन व्यवसाय करणाऱ्या महिलांना पशुपालन कसे करावे याचा फायदा कसा घ्यावा या सर्व बाजूचे प्रशिक्षण देऊन व्यावसायिकरण कसे करावे याचे सुद्धा प्रशिक्षण दिलेले अनेक उदाहरणे आहेत. ग्रामीण महिलांच्या विकासात व सशक्तिकरणात बगर शासकीय संघटनांचे योगदान अनमोल असल्याचे दिसून आले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. डी. एन. धनागरे संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव .
२. पाटील बी .पी, बिगर सरकारी संस्था आणि विकास, (दूर शिक्षण केंद्र, समाजशास्त्री भाग)शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय कोल्हापूर
३. Asok Kumar Sarkar (Ed.) - 'NGOs and Globalization, Developmental and Organizational Facets'.
४. R. Sooryamoorthy and K. D. Gangarde - NGOs in India A Cross Sectional Study
५. S. N. Pawar, J. B. Ambekar and D. Shrikant - NGOs and Development, The Indian Scenario.
६. विकिपीडिया.

# नाशिक जिल्हयातील ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य, शासकीय योजना व उपाय योजना: एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. दिपक हरिभाऊ शिंदे** सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, के.टी,एच.एम.कॉलेज नाशिक

**प्रस्तावना:** कोणत्याही समाजाची वास्तविक परीस्थिती जाणून घ्यावयाची असेल तर त्यासठी सर्वोत्तम उपाय म्हणजे स्त्रियांचे आरोग्यस्थिती समजावून घेणे होय. जगभरात आर्धी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. तसे पहिले तर आरोग्यदायी जीवन प्राप्त करून देणे हे प्रत्येक राज्याचे कर्तव्य आहे. चांगले आरोग्य मिळविणे हा प्रत्येक नागरिकांचा हक्क आहे. आरोग्य हा मानवी विकासाचा मूलभूत घटक आहे. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी स्त्रियांचे आरोग्य सक्षम असणे अत्यावश्यक आहे. भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य अनेक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक घटकांवर अवलंबून आहे. नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा जिल्हा असून येथे आदिवासी, डोंगराळ, दुष्काळग्रस्त तसेच शेतीप्रधान ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणावर आहे. या भागातील ग्रामीण स्त्रिया शेती, मजुरी, घरकाम, पशुपालन अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळत असतात. मात्र या कष्टप्रद जीवनशैलीत स्वतःच्या

आरोग्याकडे दुर्लक्ष होणे हे एक सामान्य वास्तव आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्याची सद्यस्थिती, त्यांच्यापुढील समस्या, कारणे आणि उपाय योजनांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यस्थितीचा अभ्यास करणे. २) ग्रामीण स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख आरोग्य समस्यांची ओळख पटवणे. ३) आरोग्य समस्यांमागील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक कारणांचा अभ्यास करणे. ४) शासनाच्या आरोग्यविषयक योजना व त्यांची प्रभावी अंमलबजावणी यांचे विश्लेषण करणे. ५) ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य सुधारण्यासाठी उपाय योजना सुचवणे.

**गृहीतकृत्य:** ग्रामीण स्त्रियांच्या जीवनात अतिश्रम व अपुरा आहार मिळतो. अशिक्षितपणामुळे ग्रामीण स्त्रियांमध्ये आरोग्य योजनांची जनजागृती कमी आहे. महिलांना त्यांच्या हक्कांची आणि योजनांची माहिती नसते. ग्रामीण आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक सुविधा, औषधे आणि प्रशिक्षित कर्मचारी कमी आहे. वरील सर्व घटकांचा सर्वाधिक प्रभाव स्त्रीयांच्या आरोग्यावर होतो.

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत अध्ययनाचा मुख्य हेतू नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख आरोग्य समस्यांचा अभ्यास करणे, स्त्रियांमधील कुपोषण समस्या, बालविवाह समस्या अभ्यास करणे हा आहे. तसेच या ग्रामीण स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख आरोग्य समस्यांचा, शासनाच्या आरोग्यविषयक योजनांची चिकित्सक समाजस्थितीचा अभ्यास तृणमूल पातळीवर केला आहे. या अभ्यासात संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही अभ्यास पद्धतींचा वापर केला आहे. तसेच सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला. प्राथमिक माहिती निरीक्षण व उपलब्ध अहवालांच्या आधारे घेतली असून दुय्यम माहिती शासकीय अहवाल, जनगणना, संशोधन लेख, पुस्तके व नियतकालिकांमधून संकलित करण्यात आली आहे. अभ्यास क्षेत्र म्हणून नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भाग निवडण्यात आला आहे.

**संशोधनाची तंत्रे:** प्रस्तुत अध्ययनात अनुसूची (Interview schedule ) अनौपचारिक मुलाखती (Informal Interview ) व्यष्टी अध्ययन (Case Study) तंत्रे वापरली आहेत. तसेच द्वितीय स्रोतांचा वापर केला आहे.

**संशोधनाची व्याप्ती:** प्रस्तुत संशोधन हे नाशिक जिल्ह्यातील तीन तालुक्यांशी (दिंडोरी, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर) निगडीत आहे.या तीन तालुक्यांची सहेतुक संशोधन पद्धतीने निवड करण्यात आली. या तालुक्यातील गावांमधील निवडक २० अंगणवाडी सेविकांच्या व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सेविकांच्या प्रत्यक्ष मुलाखत अनुसूची भरून घेतली आहे.

**नाशिक जिल्ह्याची सामाजिक व ग्रामीण पार्श्वभूमी:** नाशिक जिल्हा भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असून येथे ग्रामीण लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे. दिंडोरी, कळवण, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, पेठ, सुरगाणा यांसारख्या तालुक्यांमध्ये दुर्गम व आदिवासी भाग आढळतो. ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. पावसावर आधारित शेती, अपुरा रोजगार, स्थलांतर आणि गरिबी या घटकांचा ग्रामीण जीवनावर प्रभाव आहे. या परिस्थितीचा थेट परिणाम ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यावर होताना दिसतो. नाशिक जिल्ह्यात ग्रामीण भागात ५७.४७ टक्के लोक राहतात. तर शहरी भागात ४२.५३ टक्के लोक राहतात.




**ग्रामीण स्त्रियांचे प्रमुख आरोग्य समस्या:** भारत हा कृषिप्रधान देश असून आजही मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. ग्रामीण समाजरचनेत स्त्रीला कुटुंबाचा केंद्रबिंदू मानले जाते. शेती, घरकाम, मुलांचे संगोपन, वृद्धांची सेवा अशा अनेक जबाबदाऱ्या ग्रामीण स्त्रिया अविरतपणे पार पाडत असतात. मात्र या सर्व जबाबदाऱ्यांमध्ये स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होणे ही ग्रामीण स्त्रियांची मोठी समस्या आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कारणांमुळे ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्याशी संबंधित अनेक गंभीर समस्या निर्माण झालेल्या दिसतात.

**कुपोषण आणि अन्नसुरक्षेची समस्या:** ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्य समस्यांमध्ये कुपोषण ही सर्वात गंभीर समस्या आहे. घरातील पुरुष आणि मुलांनंतर शेवटी स्त्री अन्न घेते, अशी पद्धत अनेक ठिकाणी आजही आढळते. परिणामी स्त्रीला पुरेसे पोषणमूल्य मिळत नाही. लोह, कॅल्शियम, प्रथिने, जीवनसत्त्वे यांचा अभाव स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. यामुळे अशक्तपणा, थकवा, प्रतिकारशक्ती कमी होणे, आजारपणाचे प्रमाण वाढणे अशा समस्या निर्माण होतात. गर्भवती आणि स्तनदा मातांमध्ये कुपोषणाचे परिणाम अधिक गंभीर स्वरूपाचे असतात.

**मातृआरोग्याशी संबंधित समस्या: ग्रामीण** भागात आजही सुरक्षित प्रसूती सुविधा अनेक ठिकाणी अपुऱ्या आहेत. गर्भधारणेदरम्यान नियमित तपासणी न होणे, पोषण आहाराचा अभाव, प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता यामुळे मातृआरोग्य

धोक्यात येते. घरगुती प्रसूती, अस्वच्छ वातावरण आणि अज्ञानामुळे आई व बाळ दोघांच्याही जीवाला धोका निर्माण होतो. प्रसूतीनंतर होणारे संसर्ग, रक्तस्राव, मानसिक ताण या समस्या ग्रामीण स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसतात.

**रक्तक्षय (ॲनिमिया):** ग्रामीण स्त्रियांमध्ये रक्तक्षयाची समस्या फार मोठ्या प्रमाणावर आढळते. मासिक पाळी, अपुरे पोषण, वारंवार होणारी प्रसूती आणि आरोग्य सेवांचा अभाव यामुळे रक्तक्षय वाढतो. रक्तक्षयामुळे चक्कर येणे, श्वास घेण्यास त्रास, कामात उत्साह नसणे, डोकेदुखी यांसारखी लक्षणे दिसतात. दीर्घकाळ उपचार न झाल्यास गर्भधारणेदरम्यान धोका वाढतो आणि मातामृत्यूचे प्रमाणही वाढू शकते.

**मासिक पाळीविषयक समस्या:** ग्रामीण भागात मासिक पाळीबाबत अजूनही अनेक अंधश्रद्धा आणि गैरसमज आहेत. स्वच्छतेच्या साधनांचा अभाव, सॅनिटरी पॅड्सची अनुपलब्धता किंवा त्यांचा वापर करण्याबाबत संकोच यामुळे स्त्रियांना अनेक संसर्गजन्य आजार होतात. मासिक पाळीदरम्यान वेदना, अनियमित पाळी, जंतुसंसर्ग, पांढरा पडणे अशा समस्या दुर्लक्षित केल्या जातात. योग्य मार्गदर्शन व उपचार न मिळाल्याने या समस्या गंभीर स्वरूप धारण करतात.

**प्रजनन आरोग्य समस्या:** ग्रामीण स्त्रियांमध्ये लवकर लग्न आणि लवकर मातृत्व ही एक सामान्य बाब आहे. वारंवार गर्भधारणा, गर्भनिरोधक साधनांची माहिती नसणे किंवा त्यांचा वापर न करणे यामुळे स्त्रीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. गर्भाशयाचे आजार, योनीसंसर्ग, गर्भाशय खाली येणे (प्रोलॅप्स) अशा समस्या मोठ्या प्रमाणावर आढळतात. सामाजिक लाज आणि संकोचामुळे स्त्रिया डॉक्टरांकडे जाणे टाळतात.

**मानसिक आरोग्य समस्या:** ग्रामीण स्त्रियांच्या मानसिक आरोग्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. सततचे कष्टाचे काम, आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, पतीचे व्यसन, कौटुंबिक हिंसा, निर्णयस्वातंत्र्याचा अभाव यामुळे स्त्रियांमध्ये नैराश्य, तणाव, चिंता यासारख्या मानसिक समस्या वाढतात. मात्र मानसिक आजारांना समाजात आजही कलंक मानले जाते, त्यामुळे उपचार घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

**स्वच्छता आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित समस्या:** ग्रामीण भागात स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहे यांचा अभाव अनेक ठिकाणी आढळतो. महिलांना लांब अंतरावरून पाणी आणावे लागते, यामुळे शारीरिक थकवा वाढतो. अस्वच्छ पाण्यामुळे अतिसार, टायफॉईड, पोटाचे विकार यांसारखे आजार होतात. उघड्यावर शौचास जाण्याची समस्या स्त्रियांसाठी विशेषतः धोकादायक असून त्यामुळे संसर्ग आणि सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण होतात.

**कामाचे ओझे आणि शारीरिक आजार:** ग्रामीण स्त्रिया घरकामासोबत शेतीकाम, पशुपालन, मजुरी अशी अनेक कामे करतात. सततचे श्रम, विश्रांतीचा अभाव आणि अपुरा आहार यामुळे पाठदुखी, सांधेदुखी, कंबरदुखी यांसारखे आजार होतात. वय वाढल्यावरही काम थांबत नाही, त्यामुळे दीर्घकालीन आजारांचे प्रमाण वाढते.

**आरोग्यसेवांपर्यंत मर्यादित पोहोचतात:** ग्रामीण भागात आरोग्य केंद्रांची संख्या कमी असणे, तज्ज्ञ डॉक्टरांची अनुपलब्धता, वाहतुकीची अडचण आणि आर्थिक मर्यादा यामुळे स्त्रियांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. अनेकदा आजार गंभीर झाल्यावरच उपचार घेतले जातात. सरकारी योजनांची माहिती नसणे किंवा त्यांचा लाभ न मिळणे हीदेखील एक मोठी समस्या आहे.

**शिक्षणाचा अभाव आणि जागरूकतेची कमतरता:** ग्रामीण स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण तुलनेने कमी असल्याने आरोग्यविषयक माहिती आणि जागरूकता कमी असते. आजारांची लक्षणे ओळखणे, योग्य उपचार घेणे, पोषणाचे महत्त्व समजणे याबाबत माहिती नसते. अंधश्रद्धा, पारंपरिक उपचारांवर अतीविश्वास यामुळे वैज्ञानिक उपचारांकडे दुर्लक्ष होते.

**ग्रामीण स्त्रियांसाठी शासनाच्या आरोग्यविषयक योजना व त्यांची प्रभावी अंमलबजावणी: एक विश्लेषण:** भारत हा खेड्यापाड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. आजही देशातील मोठा लोकसंख्या वर्ग ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. ग्रामीण समाजव्यवस्थेत स्त्रीला अत्यंत महत्त्वाचे स्थान असून ती कुटुंब, शेती, पशुपालन, घरगुती उद्योग आणि सामाजिक जीवनाचा कणा मानली जाते. मात्र एवढ्या मोठ्या योगदानाच्या तुलनेत ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्याकडे दीर्घकाळ दुर्लक्ष झालेले दिसते. कुपोषण, मातृमृत्यू, बालमृत्यू, रक्तक्षय, संसर्गजन्य आजार, मानसिक तणाव अशा विविध आरोग्य समस्यांनी ग्रामीण स्त्रिया ग्रस्त आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाने ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्य सुधारण्यासाठी विविध आरोग्यविषयक योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा उद्देश, स्वरूप, अंमलबजावणी आणि परिणाम यांचे विश्लेषण करणे अत्यंत आवश्यक आहे.

**ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्याची पार्श्वभूमी:** ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य अनेक घटकांवर अवलंबून असते. लवकर लग्न, वारंवार गर्भधारणा, अपुरा पोषण आहार, शिक्षणाचा अभाव, आरोग्य सेवांची मर्यादित उपलब्धता आणि सामाजिक रूढी-परंपरा यांचा स्त्रियांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होतो. यामुळे मातृमृत्यूचे प्रमाण ग्रामीण भागात तुलनेने अधिक दिसते. ही परिस्थिती सुधारण्यासाठी शासनाने विविध धोरणात्मक उपाययोजना आखल्या आहेत.

**राष्ट्रीय आरोग्य अभियान:** ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान ही एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात आरोग्य सेवा बळकट करण्यावर भर देण्यात आला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि सामुदायिक आरोग्य केंद्रे यांच्या माध्यमातून गर्भवती महिला, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य सेवा पुरवली जाते. मातृ व बाल आरोग्य, कुटुंब नियोजन, लसीकरण, पोषण यावर या अभियानाचा विशेष भर आहे.

**जननी सुरक्षा योजना:** जननी सुरक्षा योजना ही ग्रामीण स्त्रियांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. सुरक्षित प्रसूतीला प्रोत्साहन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. गर्भवती महिलांना संस्थात्मक प्रसूतीसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. त्यामुळे ग्रामीण भागात घरगुती प्रसूतीचे प्रमाण कमी होऊन रुग्णालयातील प्रसूतीचे प्रमाण वाढले आहे. यामुळे मातृमृत्यू आणि नवजात बालमृत्यूच्या प्रमाणात काही प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते.

**जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम**: या कार्यक्रमांतर्गत गर्भवती महिला आणि नवजात बाळांना मोफत आरोग्य सेवा देण्याची तरतूद आहे. मोफत तपासणी, औषधे, प्रसूती सेवा, रुग्णालयात राहण्याची सुविधा आणि वाहतूक खर्च शासनाकडून दिला जातो. ग्रामीण स्त्रियांसाठी ही योजना आर्थिकदृष्ट्या अत्यंत लाभदायक ठरली आहे. आर्थिक अडचणीमुळे उपचार टाळण्याचे प्रमाण या योजनेमुळे कमी झाले आहे.

**प्रधानमंत्री मातृ वंदना योजना:** ही योजना गर्भवती आणि स्तनदा मातांसाठी राबवली जाते. पहिल्या गर्भधारणेदरम्यान महिलेला टप्प्याटप्प्याने आर्थिक मदत दिली जाते. या योजनेचा उद्देश गर्भवती महिलांचे पोषण सुधारणे आणि त्यांना आरोग्य तपासणीसाठी प्रोत्साहित करणे हा आहे. ग्रामीण भागात पोषणाचा अभाव लक्षात घेता ही योजना अत्यंत उपयुक्त आहे. मात्र माहितीच्या अभावामुळे अनेक पात्र महिलांना या योजनेचा लाभ मिळत नाही.

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना:** अंगणवाडीच्या माध्यमातून राबवली जाणारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यात महत्त्वाची भूमिका बजावते. गर्भवती व स्तनदा महिलांना पूरक आहार, पोषण सल्ला, आरोग्य तपासणी व लसीकरण यांचा लाभ दिला जातो. अंगणवाडी सेविका ग्रामीण भागात आरोग्य जनजागृतीचे महत्त्वाचे कार्य करतात. मात्र अपुरा निधी, साधनसामग्रीचा अभाव आणि कामाचा ताण यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीत मर्यादा दिसून येतात.

**राष्ट्रीय पोषण अभियान**: ग्रामीण स्त्रियांमधील कुपोषण दूर करण्यासाठी राष्ट्रीय पोषण अभियान राबवले जाते. गर्भवती महिला, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुली हे या योजनेचे प्रमुख लाभार्थी आहेत. पोषणविषयक माहिती, संतुलित आहाराचे महत्त्व आणि पोषण स्थितीचे परीक्षण या बाबींवर भर देण्यात येतो. ही योजना योग्य पद्धतीने राबवली गेल्यास ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यात लक्षणीय सुधारणा होऊ शकते.

**राष्ट्रीय किशोरवयीन आरोग्य कार्यक्रम:** ग्रामीण किशोरवयीन मुलींच्या आरोग्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे. मासिक पाळी स्वच्छता, पोषण, मानसिक आरोग्य, लैंगिक व प्रजनन आरोग्य याबाबत मार्गदर्शन केले जाते. किशोरवयात योग्य आरोग्य सवयी लागल्यास भविष्यातील मातृआरोग्य सुधारण्यास मदत होते. मात्र सामाजिक संकोच आणि अंधश्रद्धांमुळे या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी अनेक ठिकाणी अडथळ्यांना सामोरी जाते.

**आशा सेविकांची भूमिका**: आशा सेविका ग्रामीण आरोग्य यंत्रणेचा कणा मानल्या जातात. त्या गावपातळीवर गर्भवती महिलांची नोंदणी, आरोग्य तपासणीसाठी प्रोत्साहन, लसीकरण, प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतरची काळजी याबाबत महत्त्वाचे कार्य करतात. शासनाच्या विविध योजनांचा लाभ ग्रामीण स्त्रियांपर्यंत पोहोचवण्यात आशा सेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र मानधन कमी असणे आणि कामाचा ताण अधिक असणे ही मोठी अडचण आहे.

**योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी:** नाशिक जिल्हा हा विस्तृत भूभाग असलेला जिल्हा असून, ग्रामीण, आदिवासी, भूभागाने व्यापलेला आहे. दुर्गम आदिवासी भागातील आरोग्य सेवा या पुर्षा नाहीत. तसे पहिले तर शासनाने अनेक योजना सुरू केल्या असल्या तरी त्यांची अंमलबजावणी सर्वत्र प्रभावी झालेली नाही. माहितीचा अभाव, प्रशासकीय अडथळे, भ्रष्टाचार, अपुरी आरोग्य यंत्रणा, तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आणि रस्त्यांची दुरवस्था, बर्याच ठिकाणी नदीवर पूल नाहीत, सरकारी व सार्वजनिक वाहतुकीची समस्या यामुळे योजनांचा अपेक्षित लाभ ग्रामीण स्त्रियांपर्यंत पोहोचत नाही. अनेकदा कागदपत्रांच्या अडचणींमुळे महिलांना योजनांपासून वंचित राहावे लागते. पितृसत्ताक कुटुंबात सर्व निर्णय हे पती, किंवा पुरुष घेतात. त्यात पती व्यसनी असेल तर तो स्त्रीयांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो.

**निष्कर्ष** :१. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य हे अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. कुपोषण, अपुरी आरोग्यसेवा, सामाजिक बंधने आणि आर्थिक अडचणी यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. २. योग्य धोरणे, प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती आणि स्त्री सक्षमीकरणाच्या माध्यमातून या समस्यांवर मात करता येऊ शकते. ग्रामीण स्त्री निरोगी असेल तर कुटुंब, समाज आणि राष्ट्राचा विकास अधिक सक्षम होईल. त्यामुळे ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्याकडे केवळ कल्याणकारी नव्हे तर विकासात्मक दृष्टीने पाहणे अत्यंत आवश्यक आहे. ३. अल्पशिक्षित किंवा अशिक्षित स्त्रियांना आरोग्यविषयक माहिती कमी असते. गरिबीमुळे पोषक आहार व वैद्यकीय उपचार परवडत नाहीत. आरोग्य केंद्रे दूर असणे, वाहतुकीचा अभाव आणि खर्चाची भीती यामुळे स्त्रिया उपचार टाळतात. ४. सामाजिक रूढी व परंपरा स्त्रियांच्या आरोग्यावर मर्यादा आणतात. स्त्रियांनी वेदना सहन कराव्यात, आजार लपवून ठेवावेत अशी मानसिकता आजही काही भागांत दिसते. निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग कमी असल्याने आरोग्यविषयक निर्णय स्वतः घेता येत नाहीत.

**उपाय योजना व शिफारसी:** १. ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य सुधारण्यासाठी सर्वांगीण उपायांची आवश्यकता आहे. सर्वप्रथम पोषण सुधारणा महत्त्वाची आहे. पूरक आहार योजना प्रभावीपणे राबवणे, स्थानिक पातळीवर पोषण बागा विकसित करणे आणि संतुलित आहाराबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. २. प्रजनन व मातृत्व आरोग्यासाठी संस्थात्मक प्रसूतीला प्रोत्साहन देणे, नियमित तपासण्या आणि प्रसूतीनंतरची काळजी घेणे आवश्यक आहे. मासिक पाळी स्वच्छतेबाबत शाळा व ग्रामस्तरावर प्रबोधन करणे गरजेचे आहे. ३. प्राथमिक आरोग्य केंद्रे सक्षम करणे, मोबाईल आरोग्य सेवा सुरू करणे आणि दुर्गम भागांसाठी विशेष आरोग्य पथके नेमणे आवश्यक आहे. आरोग्य विमा योजनांची माहिती देऊन स्त्रियांना उपचारासाठी प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. ४. मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन केंद्रे, महिला बचत गट आणि स्वयं सहायता गटांचा वापर करून आधार व्यवस्था निर्माण करता येईल. शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबनामुळे स्त्रिया आरोग्याबाबत अधिक जागरूक होतील. ५. ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्य समस्या सोडवण्यासाठी सर्वांगीण प्रयत्नांची गरज आहे. महिलांचे शिक्षण वाढवणे, पोषण आहार योजना प्रभावीपणे राबवणे, प्राथमिक आरोग्य केंद्रे सक्षम करणे, मातृ व बाल आरोग्य सेवांचा विस्तार करणे आवश्यक आहे. मासिक पाळी स्वच्छतेबाबत जनजागृती,

गर्भनिरोधकांची उपलब्धता, मानसिक आरोग्याविषयी समुपदेशन या उपाययोजना महत्त्वाच्या ठरतात. स्वयं-सहायता गट, आशा सेविका आणि अंगणवाडी सेविका यांची भूमिका अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. ६ .ग्रामीण स्त्री ही कुटुंबाची आणि समाजाची आधारस्तंभ आहे. तिचे आरोग्य सुदृढ असेल तरच कुटुंब आणि समाजाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. त्यामुळे ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्य समस्यांकडे गांभीर्याने पाहून योग्य उपाययोजना राबवणे ही काळाची गरज आहे. स्त्री निरोगी असेल तरच निरोगी समाजाची निर्मिती होऊ शकते. ७. महिलांना त्यांच्या हक्कांची आणि योजनांची माहिती मिळणे गरजेचे आहे. आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक सुविधा, औषधे आणि प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आशा व अंगणवाडी सेविकांचे मानधन वाढवून त्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि महिला बचत गटांचा सहभाग वाढवल्यास योजनांची परिणामकारकता वाढू शकते. ८. ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यासाठी शासनाने राबवलेल्या योजना या अत्यंत महत्त्वाच्या आणि आवश्यक आहेत. मात्र केवळ योजना अस्तित्वात असणे पुरेसे नाही, तर त्यांची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. ग्रामीण स्त्री निरोगी असेल तरच कुटुंब, समाज आणि देशाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. त्यामुळे शासन, समाज आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करून ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यात सकारात्मक बदल घडवून आणणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भसूची**

१. Dwivedi Purnima 2008, Problem of Women Health and Malnutrition in Indian Social Perspective

२. Viswanathan Brinda, Agnihotri Archana, Double Burden of Malnutrition in India: Decadal changes among Adult men and Women. Madras School of Economics Aug. 2020.

३. Manjunatha, L.B., Rao DUM, Hajory Dipika, Roy. R, Burman Singh Rashmi, Social Beliefs, Customs and Superstitions Associated with care of mother and New Born Baby: A case study from Bundelkhand Region in Central India. Indian Res. J. Ext. Edu. 17 (1); January, 2017.

४.जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नाशिक जिल्हा, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, २०१२, पृ क्र १ ते १२.

५.पवार, पंडितराव, वसंत पवार (संपा ) (२००५), 'जनस्थान' ७८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नाशिक स्वागत समिती, नाशिक, लेखाचे नाव - कृषीक्षेत्रात अग्रगण्य नाशिक जिल्हा, लेखक, प्रा डॉ. सतीश श्रीवास्तव, पृ क्र ९९.

६. http://hdl.handle.net/10603/231004

७. http://www.who.int/

८. अनौपचारिक मुलाखती

# ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद: संदर्भ: नाशिक जिल्हा

**प्रा. वर्षा रुपेश मुळाणे** समाजशास्त्र विभाग,के.टी.एच.एम महाविद्यालय नाशिक

**गोषवारा:** प्रस्तुत संशोधनामध्ये नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद या सामाजिक वास्तवाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करण्यात आला आहे. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असली तरी ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाच्या समान संधी मिळण्यात आजही अनेक अडथळे येत आहेत.ग्रामीण समाजात आजही मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत पालक जागरूक नाहीत असे म्हणण्यापेक्षा मुलांच्या व मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत पालक दुजाभाव करीत असतात मुलगी शिकून काय करणार? ही पालकांची भावना अजूनही दूर झालेली नाही."चूल आणि मूल"एवढ्याच कामासाठी मुलींचा वापर करतात. मोठ्या आणि महत्त्वपूर्ण अशा बदलांच्या उंबरठ्यावर आपण आज उभे आहोत,परंतु आजही ग्रामीण मुलींची स्थिती संतोषजनक नाही.ग्रामीण मुलींचे मुलांच्या तुलनेत अधिक शोषण झालेले दिसते.नाशिक जिल्ह्यातील मनोली,दरी, दुगांव, धोंडेगाव ,नागलवाडी कोचरगाव ही खेडी (नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भाग) नमुना म्हणून निवडण्यात आली या गावांमध्ये सामाजिक ,आर्थिक मागासलेपणा, पारंपारिक पितृसत्ताक, मूल्य व्यवस्था दारिद्र्य ,भौगोलिक दुर्गमता, शाळांचे अंतर सुरक्षितेचा अभाव आणि लवकर विवाह यासारख्या कारणांमुळे मुलींच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसून येते. या संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम माहिती संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे .तालुका निहाय साक्षरता दर शाळा सोडण्याचे प्रमाण पालकांचा दृष्टिकोन आणि शासकीय योजनांचा प्रभाव यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. या अभ्यासातून असे आढळून आले की मुलींच्या शिक्षणातील अडथळे हे केवळ आर्थिक नसून सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाचे आहेत. प्रस्तृत संशोधनाच्या आधारे योग्य निष्कर्ष काढून मुलींच्या शिक्षणासाठी उपयुक्त शिफारशी सुचवण्यात आल्या आहेत. हा संशोधन लेख ग्रामीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरू शकतो.

**प्रस्तावना:** भारत हा खेड्यांचा देश आहे.आज ही भारतात २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ६८.८४ लोकसंख्या ग्रामीण भागामध्ये राहते. कोणतेही समाजाची वास्तविक परिस्थिती जाणून घ्यायची ठरल्यास एक महत्त्वाचे माध्यम म्हणजे त्या समाजातील मुलींची व विशेष करून ग्रामीण मुलींची परिस्थिती काय आहे हे जाणून घेणे.त्यांना काय अधिकार आहे?त्यांच्या जीवनामधील अनेक मूलभूत समस्यांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीची मूलभूत साधन आहे.शिक्षणामुळे व्यक्तीचा बौद्धिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास घडवून येतो. भारतीय संविधानाने शिक्षणाचा हक्क सर्व नागरिकांना दिला असला तरी प्रत्यक्षात ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाच्या संधी समान प्रमाणात उपलब्ध होत

नाहीत.विशेषत:ग्रामीण समाजातील पितृसत्ताक रचना परंपरागत मूल्ये आणि सामाजिक रूढ़ी मुलींच्या शिक्षणात अडथळा निर्माण करतात. ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षण,मुलींची कुचंबना घरात व दारात मुलींचे होत असलेली मुस्काटदाबी याविषयी फार कमी बोलले जाते.त्यांच्यावरील अन्याय कमी होत नाही यात मुलींनी पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे मुलींवर होणारे अन्याय मुलींनी सक्षमरित्या सामना करून सोडवले पाहिजे त्याशिवाय मुलींची प्रगती अशक्य आहे ही शक्ती मुलींमध्ये फक्त शिक्षणामुळेच येऊ शकते. शिक्षण घेतल्यामुळे आपल्या जीवनाला एक दिशा मिळते संजीवनी मिळते. ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाला फारसे महत्त्व दिले जात नाही.कनिष्ठ व आदिवासी मुलींच्या शिक्षणाचे तर फारच हेळसांड होताना दिसते.म्हणून मी नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचे ठरवले त्यासाठी नमुना म्हणून आदिवासी काही खेडे,वस्त्या, पाडे या गावांची नमुना म्हणून निवड केली.यात मला असे आढळून आले की या गावांमध्ये मुलींच्या शिक्षणाची स्थिती समाधानकारक नसून अनेक सामाजिक आर्थिक अडथळ्यांमुळे मुली शाळाबाह्य होत असल्याचे जाणवले. ग्रामीण समाजात मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अजूनही बदललेला नाही.मुलींना घर काम, शेतीकाम, लहान भावंडांची जबाबदारी .आणि लवकर विवाह यासाठी शिक्षण सोडावे लागते.लग्नाच्या वेळी तिचे मत विचारले जात नाही. लग्नानंतर कुटुंबात मुलींना सासुरवास सोसावा लागतो.नवऱ्याने झोडपले तरी या मुली मनात दु:ख जिरवतात त्यांना सासू, सासरे, नणंद, दीर या सर्वांकडून बोलणी खावी लागतात.मारहाण होते.शेतीत सुद्धा ऊन, वारा, पाऊस ,थंडी यांची फिकीर न करता त्या ढोरासारख्या राबतात.ग्रामीण मुलींचा छळ व सासुरवास याबाबत तक्रार करण्यात यापुढे येत नाही.त्यासाठी त्यांच्यामध्ये स्वतः च्या हक्काची जाणीव करून देवून त्यांना आत्मनिर्भय बनवणे.स्वत:चे सामर्थ्य, क्षमता यांचा विकास करणे आणि आपल्या वरील अन्याय करणाऱ्या विरुद्ध आवाज उठविणे जरुरीचे आहे हे फक्त शिक्षणाने साध्य होईल. ग्रामीण मुलींच्या बाबतीत दुर्दैवाची गोष्ट अशी की,ह्या मुली शेती,हस्त उद्योग आणि इतर अनेक आर्थिक कार्यक्रमात महत्त्वाची भूमिका बजावत असताना सुद्धा त्यांना समाजात असमान दर्जा दिला जातो आहे.विविध गुंतागुंतीच्या सामाजिक, आर्थिक घटकांमुळे मुलींचा आर्थिक सामाजिक शैक्षणिक विकास होत नाही.आणि त्या आपल्या मूलभूत अधिकारापासून दूरच राहतात आणि मूळ प्रवाहात येण्याची त्यांना संधीच मिळत नाही. त्यामुळे "ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद" हा विषय समाजशास्त्रीय अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**संदर्भ साहित्याचा अभ्यास:** मी संशोधनासाठी निवडलेला विषय ग्रामीण शिक्षण व लिंगभेद या विषयावर राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनेक संशोधन झालेले आहेत. भारताच्या जनगणना अहवालानुसार ग्रामीण भागात स्त्री साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी आहे.UNESCO आणि UDISE+ अहवालानुसार मुलींची शाळा सोडण्याचे प्रमाण माध्यमिक स्तरावर अधिक आढळते. या संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे .माहिती जाणून घेण्यासाठी वर्तमानपत्रे,लेख, रिसर्च पेपर, इंटरनेट, विकिपीडिया यांच्या माध्यमातून मिळालेल्या दृष्टिकोनातून लिहिलेले लेख संशोधन बातम्या .मुख्यतः ही सर्व माहिती गोळा करीत असताना इंटरनेट हे माध्यम वापरण्यात आले.इंटरनेटवर असलेल्या विविध लेखांचे निरीक्षणात्मक वाचन केले असतामुलींच्या वेगवेगळ्या समस्या आणि त्यावरील उपाय योजना कोणत्या आहेत हे समजले. भारतात स्त्री शिक्षणासाठी महात्मा ज्योतिबा फुले,सावित्रीबाई फुले,नंतरच्या काळात धोंडो केशव कर्वे इत्यादींमुळे स्त्री शिक्षणाला चालना मिळाली स्वातंत्र्योत्तर भागात स्त्रियांना राजकीय हक्क देण्यात आले जिल्हा परिषद स्तरापर्यंत ५० टक्के आरक्षण मिळाले परंतु आजही अनेक समस्या आहेत. मेरी वॉलस्टोन काफ्ट यांनी " ए विंडो केशन ऑफ दि राईट्स वॉक वुमेन १७९२" या आपल्या ग्रंथात स्त्रीवादाची मांडणी केली आहे.शिक्षण आणि विकासाची संधी दिल्यास स्त्रिया देखील पुरुषांप्रमाणे आपले क्षमता सिद्ध करू शकतात असा त्यांचा दावा आहे . जॉन स्टुअर्ट मिल यांनी सब्जेक्शन ऑफ वुमेन्स१८६९या पुस्तकाद्वारे स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीचा प्रश्न ऐरणीवर आणला. फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सिमॉ द बोवुवा यांनी" दि सेकंड सेक्स"(१९४९) या ग्रंथातून श्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांविषयी लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये ताराबाई शिंदे यांचे नाव आग्रही आहे.त्यांनी पुरुषप्रधान व्यवस्था आणि जातीव्यवस्था यांना विरोध करणारे लेखन केले सन १८८२ मध्ये प्रसिद्ध झालेले " "स्त्री- पुरुष तुलना" हे त्यांचे पुस्तक भारतातील पहिली स्त्रीवादी लेखन समजले जाते. सन १८८८ मध्ये पंडिता रमाबाई यांचे ' द हाय फास्ट हिंदू वुमन हे पुस्तक प्रसिद्ध झाले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील स्त्री शोषणाला येथील धार्मिक आणि परंपरांची पार्श्वभूमी कारणीभूत असल्याचे स्पष्ट केले.मनुस्मृति, नारद स्मृती, पुराणे, रामायण, महाभारत इ. च्या माध्यमातून स्त्रीला गुलाम केले.हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रियांना मालमत्तेचा आणि घटस्फोटाचा अधिकार असावा याचे तर्कशुद्ध समर्थन केले. महात्मा गांधींच्या मते स्त्रियांना देखील पुरुषांप्रमाणे हक्क व स्वातंत्र्य मिळाले पाहिजे.पंडिता रमाबाई यांनी विधवांच्या उन्नतीसाठी मुंबईला 'शारदा सदन' ही संस्था काढली. अलीकडच्या काळात प्रसिद्ध झालेल्या स्त्रीवादी लेखनात मीरा कोसंबी यांच्या "क्रॉसिंग थ्रेशोल्डस"फॅमिनिस्ट एस्सेज इन सोशल हिस्टरी या पुस्तकाचा उल्लेख करता येईल.त्यात महाराष्ट्रातील पंडिता रमाबाई, भारतातील पहिल्या कार्यरत स्त्री डॉक्टर रखमाबाई यांसारख्या स्त्रियांच्या जीवनावरील निबंध आहेत.महाराष्ट्रामध्ये दलित स्त्रियांच्या दृष्टिकोनातून सामाजिक वर्ग,जात इत्यादी बाबींच्या संदर्भात लेखन केले गेले त्यामध्ये शर्मिला रेगे यांचे लेखन महत्त्वाचे आहे ' रायटिंग कास्ट,रायटिंग जेंडर,रीडिंग दलित वुमेन्स, टेस्टिमोनोज यामध्येदलित स्त्रियांच्या आत्मचरित्रावर त्यांनी लिहिलेल्या निबंधांचे संकलन आहे.लीला दुबे यांनी मानव व शास्त्रातील लिंगभावाची शोधमोहिम या ग्रंथातून लिंगभाव गोतावळा आणि संस्कृती यांचा अभ्यास करताना बरीचशी परस्परांशी संबंधित असणारी अभ्यास क्षेत्र खुली केली. बिना अग्रवाल ह्या एक स्त्रीवादी लेखिका आहेत. त्यांनी स्त्रीयांचे जमिनीवरील आणि नैसर्गिक संपत्तीवरील हक्क आणि स्त्रियांचे श्रम या विषयावर लेखन केले आहे.जेंडर अँड ग्रीन गव्हर्नर्स प्रा. पोकळे एस. एम.ग्रामीण स्त्रियांच्या मूलभूत समस्या आणि उपाययोजना शासनाच्या विविध योजना प्राथमिक शिक्षणात सर्व शिक्षा अभियान मोहिमेमुळे मुलींच्या शिक्षणाला प्रेरणा मिळाली.शासनाने मुलींच्या शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी मुलींचा उपस्थिती भत्ता सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना,मोफत गणवेश,मोफत

पुस्तके,सावित्रीबाई फुले मागासवर्गीय शिष्यवृत्ती योजना,विद्या वेतन शाळेला ये जा करण्यासाठी राजमाता जिजाऊ मोफत सायकल योजना,एसटीने मोफत प्रवास करण्यासाठी अहिल्याबाई होळकर योजना,कस्तुरबा गांधी बालिका निवासी विद्यालय,मानव विकास योजना,तसेच लेख वाचवा,लेक शिकवा यासारख्या अनेक योजनांच्या माध्यमातून मुलींच्या शिक्षणासाठी शासन प्रयत्न करीत आहे त्यांना त्यात काही अंशी यश मिळाले.पण पूर्ण यश मिळालेले नाही त्याची अनेक कारणे आहेत.त्या कारणांचा विचार करून त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. एवढ्या योजना आखून सुद्धा ग्रामीण मुलींना म्हणावी तशी संधी मिळत नाही हे वास्तव नाकारून चालणार नाही.

**संशोधनाचे उद्देश:** प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख उद्देश पुढील प्रमाणे आहेत:- १) नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील सद्यस्थिती अभ्यासणे. २) नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण पार्श्वभूमी मधील मुलींचे महाविद्यालयीन शिक्षणातून वगळले जाण्याची सामाजिक,आर्थिक, राजकीय तीव्रता तुलनात्मकरीत्या अभ्यासणे. ३) वगळल्या गेलेल्या मुलींच्या वरिल परिणाम, त्यांची भूमिका,मते, आकांक्षा ,निराशा यांचा अभ्यास करणे ४) समाजात ग्रामीण मुलींचे स्थान व प्रतिष्ठा उंचावणे ५) आर्थिक ,राजकीय, शासकीयक्षेत्रातील सर्व पातळ्यांवरील निर्णय प्रक्रियेत ग्रामीण भागातील मुलींना पुरेशी व प्रभावी प्रतिनिधित्व देऊन विकासाच्या मधुर फळांचा लाभ घेण्यासाठी त्यांना सक्षम,समर्थ बनवणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. ६) ग्रामीण भागातील मुलींच्या आर्थिक,कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक,परिसर विषयक उणिवांमुळे त्यांच्या शिक्षणात उद्‌भवणाऱ्या समस्यांवर उपाययोजना सुचवणे. ७ )मुलींच्या शिक्षणावर मुलींच्या शिक्षणावर लिंगभेदाचा होणारा परिणाम समजून घेणे.

**गृहीतकृत्ये:** प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहीतकांची निश्चिती करण्यात आलेली आहे:- १) ग्रामीण मुलींचे आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्यांच्या आर्थिक अधोगतीचे कारण त्यांच्या शैक्षणिक मागासलेपणात आहे. २) नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणात लिंगभेद अस्तित्वात आहे. ३) आर्थिक गरिबी व सामाजिक रूढी या मुलींच्या शिक्षणातील प्रमुख अडथळे आहेत. ४) दुर्गम व आदिवासी गावांमध्ये मुलींची शाळा सोडण्याचे प्रमाण अधिक आहे. ५) शासकीय योजना प्रभावीपणे राबविल्यास मुलींच्या शिक्षणात सुधारणा होऊ शकते आणि त्यांचा दर्जा उंचावेल समाजकारण,अर्थकारण, कौटुंबिक प्रक्रिया इत्यादींमध्ये मुलींना मानाचे स्थान उपलब्ध होईल यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे.

**अध्ययन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला.

**प्राथमिक स्त्रोत:** प्राथमिक माहिती संकलनासाठी प्रश्नावली,मुलाखती व निरीक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला संशोधन अभ्यासासाठी नाशिक जिल्ह्यातील मनोली, दरी, वाडगांव, धोंडेगांव, दुगांव, नागलवाडी या गावांमधील पालक विद्यार्थिनी व शिक्षक यांच्याशी संवाद साधण्यात आला.त्यांच्या विविध अडचणींच्या संशोधनात्मक दृष्टिकोनातून आढावा घेतला.

**दुय्यम स्त्रोत:-** दुय्यम माहिती जनगणना अहवाल,शासकीय दस्तऐवज,शिक्षण विभागाचे अहवाल, संशोधन ग्रंथ व नियतकालिकांमधून संकलित करण्यात आली महिला संदर्भात संदर्भ ग्रंथ,शासनाचे विविध उपक्रम,माहितीपत्रके या विषया संदर्भात प्रकाशित पुस्तके मासिके व इंटरनेट यांच्यातून द्वितीय तथ्य संकलन केले.तसेच मुलींची शैक्षणिक,सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधा रून त्यांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी ज्यांनी ज्यांनी ज्यांनी -ज्यांनी तळागाळापर्यंत जाऊन काम केले त्यांच्या कार्याचा आढावा घेतला.

**तथ्यांची विश्लेषण:**

**तालुका व गावनिहाय शैक्षणिक स्थितीचे विश्लेषण:** नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाची स्थिती समान नाही. मनोली दुगाव ,दरी, धोंडेगांव, वाडगांव, नागलवाडी ही गावे नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात असून येथे आदिवासी जास्त आहे.

**शाळा सोडण्यामागील कारणांचे विश्लेषण:** या गावांमध्ये प्राथमिक स्तरावर मुलींचा शाळेत प्रवेश समाधानकारक असला तरी माध्यमिक स्तरावर शिक्षण सुरू ठेवण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होत जाते.मनोली, नागलवाडी यासारख्या गावांमध्ये माध्यमिक शाळा गावापासून लांब अंतरावर असल्यामुळे मुलींच्या नियमित उपस्थितीवर परिणाम होतो.

सुरक्षित वाहतूक सुविधा नसल्यामुळे अनेक पालक मुलींना पुढील शिक्षणासाठी पाठविण्यास अनिच्छुक दिसतात. हेच पालक मुलांना मात्र शिक्षणासाठी पाठवतात यातून लिंगभेद दिसून येतो.इयत्ता आठवी नंतर शाळा सोडण्याचे प्रमाण वाढते

**आर्थिक घटकांची विश्लेषण:** मनोली, दरी, नागलवाडी या गावांमध्ये बहुतांश कुटुंबे शेती व मजुरीवर अवलंबून आहेत आर्थिक मर्यादांमुळे कुटुंबे शिक्षणासाठी मर्यादित खर्च करू शकतात.अशा परिस्थितीत मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते,तर मुलींचे शिक्षण दुय्यम मानले जाते यामुळे आर्थिक असमानतेची रूपांतर शैक्षणिक असमानतेत होते.

**लिंगभेदाचे सामाजिक स्वरूप:** अभ्यास क्षेत्रातील गावांमध्ये लिंगभेद केवळ शिक्षणा पुरता मर्यादित नसून तो सामाजिक विचार सरणीत खोलवर रुजलेला आहे.मुलींच्या शिक्षणाबाबत लग्नानंतर घर सोडायचे आहे किंवा "घर कामातच उपयोग आहे", मुलगी म्हणजे परक्याचे धन अशी मानसिकता अजूनही आढळते. त्यामुळे मुलींच्या शिक्षणावर गुंतवणूक करणे अनेक पालकांना अनावश्यक वाटते.

**लवकर विवाह व घरगुती जबाबदारी:** आदिवासी व ग्रामीण भागात मुलींचा लवकर विवाह हा शिक्षणातील एक मोठा अडथळा आहे.विवाहपूर्व काळातच मुलींवर घर काम,भावंडांची जबाबदारी,शेती काम सोपवली जाते.परिणामी शिक्षणात सातत्य राहत नाही.

**शासकीय योजनांचा प्रभाव:** शासनाच्या युद्ध योजना जसे की शिष्यवृत्ती,सायकल योजना व मोफत गणवेश यामुळे प्राथमिक शिक्षणात मुलींची उपस्थिती वाढलेली दिसते.मात्र माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर या योजनांचा प्रभाव मर्यादित राहतो,कारण सामाजिक व सांस्कृतिक अडथळे अधिक प्रभावी ठरतात. एकूणच या अभ्यासातून असे दिसून येते की नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण

भागात मुलींच्या शिक्षणातील अडथळे हे बहुआयामी स्वरूपाचे आहेत.आर्थिक गरिबी, सामाजिक रचना,पितृसत्ताक विचारसरणीआणि भौगोलिक अडचणी यांचा एकत्रित परिणाम मुलींच्या शैक्षणिक प्रगतीवर होतो.

**निष्कर्ष:** प्रस्तुत संशोधनातून असे निष्कर्ष निघतात की, १) नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद आजही तीव्र स्वरूपात अस्तित्वात आहे. २) मनोली, दरी, नागलवाडी, वाडगांव, या गावांमध्ये सामाजिक आर्थिक अडचणी परंपरागत विचारसरणी व शैक्षणिक सुविधांचा अभाव हे मुख्य घटक आहेत.

**शिफारशी:** १) ग्रामीण मुलींसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना राबवाव्यात. २) शाळांपर्यंत सुरक्षित वाहतूक सुविधा उपलब्ध कराव्यात. ३) पालकांमध्ये शिक्षणाविषयी जागृती निर्माण करावी. ४) ग्रामीण शाळांमध्ये महिला शिक्षकांची संख्या वाढवावी. ५) स्थानिक स्वराज्य संस्थांचा शिक्षणात सक्रिय सहभाग वाढवावा.

**संदर्भ सूची:**

1. Mill,J.S.(1869). The subjections of Women, London:Longmans, Green,Reader,and Dyer
2.Beauvoir,S.de.(1949). The Second Sex(H.M.Parshley,Trans) New York:Alfred A.Khpof.
3. Ambedkar,B.R.(1946, August). Speech on the Hindu Code Bill.NewDelhi: Government of India.
4. Shinde,T.(1882/1998).Stri-Parush Tulana(S.G.Malshe,Ed). Pune: Popular Prakashan
5. Pokale,S.M.(2015). Gramin Striyanchya Mulbhut Samasya ani upay yojana,Beed: Lokmanya Tilak Mahavidyalaya.
6. Government of India.(2011).Census of India 2011.NewDelhi: Office of the Registrar general of India.
7. Desai.N.S Krishnaraj,M.(2004 Women and Society in India.New Delhi Ajanta publications.
8.Velaskar.p.(2010). Inequality in Indian education. New Delhi: Sage Publication
9. National council of educational research and training. (2018) Education and society new Delhi: NCERT
10. Government of Maharashtra. (2020) Report on girl's education in rural Maharashtra. Mumbai: School Education Department
11. Ministry of education (2021). UDISE+report on School Education in India.New Delhi: Government of India

# अनुकंपा धर्तीवर शासकीय कार्यालयात नोकरी करणाऱ्या महिलावर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचारांचे परिणाम आणि उपाय

**कांबळे रावसाहेब हरिबा** संशोधक विद्यार्थी
**डॉ. जो. पी. कोकणे** समाजशास्त्र विभाग, विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

**प्रस्तावना:** हिंसाचार अत्यंत गंभीर आणि संवेदनशील विषय आहे. आजही महिला एखाद्या पर पुरूषाला मोकळेपणाने बोलले जावू शकत नाही. भारतीय समाज व्यवस्थेत पितृसत्ताक कुटुंब पध्दती आहे. आणि कुटुंबात पुरूषाची सत्ता चालते. विवाहनंतर महिला, पत्तीच्या घरी राहायला येते. कुटुंबात महिलांचा दर्जा दुय्यम असतो. महिलांनी पुरूषांच्या पतीच्या आज्ञेत राहावे. जी महिला पती व कुटुंबाची सेवा मनापासून करते ती महिला पतिव्रता मानली जाते. महिला कितीही शिकली व नोकरी करीत असली तरी ती पुरूषांपेक्षा कनिष्ठ समजली जाते. अशीही पुरूषांची समजूत आहे. पुरूष प्रधान संस्कृतित महिलांना नेहमीच कनिष्ठत्व दिले जाते. महिला ही उपभोगाची वस्तू आहे ही पारंपारिक मानसिकता आहे. महिलांना शिक्षण, संपत्ती, सत्ता, हे अधिकार असले तरी, धर्माचा आधार घेवून महिलांवर जास्तीत जास्त बंधने लादली गेली होती. बालविवाह, हुंडाप्रथा, सती प्रथा, यासारखे अन्यायकारक चालीरीतीनी हजारो महिलांचे आयुष्यच कमी केले होते. ब्रिटिश काळात राजा राममोहन रॉय, ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यासारख्या भारतीय समाजसुधारकांची महिला स्वातंत्र्याची चळवळ आणि ब्रिटिशांचा महिला विषय पाश्चत्या दृष्टीकोन यामुळे ब्रिटिशानी भारतीय समाजातील चालीरीती बंद कारण्यासाठी कठोर कायदे केले. तरीही आज 21 व्या शतकातील भारतीय महिलानंवर होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक अत्याचारांचे प्रमाण मात्र दिवसें दिवस वाढतच चालले आहेत.

**कौटुंबिक अत्याचार:** शारीरिक वा मानसिक अत्याचार म्हणजे. महिलांवरील शारीरिक छळ, लैंगिक अत्याचार, तोंडी व भावनिक अत्याचार, आर्थिक अत्याचार, म्हणजे शारीरिक महिलांवरील अत्याचार होय. कौटुंबिक अत्याचार म्हणजे शारीरिक शाब्दिक, लैंगिक, मानसिक वा आर्थिक छळ, शिवीगाळ करणे, मूल जन्माला येत नसल्यामुळे तिला हिनवणे, तिचा आपमान करणे, दुखापत करणे, किंवा महिलेला जीव धोक्यात घालण्यास भाग पाडणे, महिलांना तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्ते पासून दर करणे, घराबाहेर हाकलून देणे या सर्वांचा समावेश कौटुंबिक अत्याचार यात केला जातो. भारतीय समाजात महिलांना असुरक्षित आणि मानहानीला सामोरे जावे लागत आहे. आपल्या समाजात आजही भंवरीदेवी विशाखा या मलिांवरील घटना घडत आहेत. शासकीय कार्यालयात कामाच्या ठिकाणी मलिा कर्मचाऱ्यावर होणाऱ्या कौटुंबिक व लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा 2013 लागू करण्यात आला. हा कायदा या एखाद्या शासकीय संस्थेत 10 पेक्षा जास्ती महिला काम करतात. त्यांना लागू होता. हा कायदा 19 डिसेंबर 2013 पासून सुरू करण्यात आला. आज आपण या समाजात जीवन जगत आहोत त्या समाजात घरगुती अत्याचार, शारीरिक छळ, हा समाजाचा अविभाज्य भाग बनलेला आहे. महिलांवरील घरगुती वा कौटुंबिक अत्याचार हा सामान्य बनलेला दिसून येतो. भारतीय वृत्तपत्रामध्ये महिला आणि मुलींवरील अत्याचार आणि हिंसाचाराची बातमी आल्याशिवाय एकही दिवस जात नाही. शुल्लक गोष्टीसाठी महिलांना दिली जाणारी वाईट वागणूक, छेडछाड, लैंगिक छळ, बलात्कार आणि खून हे आपल्या वर्तमानपत्रांचे नेहमीच सदर बनले आहे. महिलो पतीने रॉकेल टाकून मारले, अथवा महिलेने स्वत:ला फासावर लटकवले, इत्यादी. मथळे सरांस दररोज

नजरेस पडतात. हुंड्यामुळे होणारा मृत्यू हा अनेकदा पीडितेने भोगलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या अनुभवाचा अंतिम परिणाम आहे. साधारणता महिला मृत्यू झाल्यावर त्या महिलाचे वडील वा नातेवाईक दखल घेतात. याच अध्ययनातून वास्तव चित्र मांडण्यासाठी महिलांवरील अत्याचार हा विषय मांडण्यात आला आहे.

**उद्दिष्टे: १.** महिलांवरील होणाऱ्या कौटुंबिक अत्याचाराचा अभ्यास करणे. २. महिलावरील हिंसाचाराच्या स्वरूपाचा अभ्यास करणे. ३. कौटुंबिक अत्याचारापासून महिलांचे संरक्षणाचे कायदेशीर मार्ग समजून घेणे. ४. शासकीय सेवा करणाऱ्या महिलांचे शिक्षण व कौटुंबिक छळ हिंसाचार यातील परस्पर संबंध जाणून घेणे.

**संशोधनाचे गृहितके: १.** शासकीय कार्यालयीन नोकरी करणाऱ्या महिलांचे शिक्षण आणि कौटुंबिक अत्याचार यांचा अतिशय जवळचा सहसंबंध आहे. २. कौटुंबिक अत्याचार व शा.नोकरी करणाऱ्या महिला व्यावसायिक बाबतचा परस्पर संबंध आहे. ३. कौटुंबिक अत्याचार कायदा २००५ च्या विषयी शासकीय कार्यालयात नाकरी करणाऱ्या महिला त्यांची जाणीव करून देणे.

**कौटुंबिक अत्याचार/म्हणजे काय**: कौटुंबिक अत्याचार ही एक अशी समस्या आहे की, जी, महिलांच्या शारीरिक मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम करते. अत्याचारांची भीती, छळवणूकीसह महिलांच्या गतिशीलतेवर कायम स्वरूपीच्या अडथळा, ठरला आहे. आणि संसाधने व मुलभूत प्रक्रियेत त्यांचा प्रदेश मर्यादित करत आहे. कौटुंकि अत्याचाराचा अर्थ कौटुंबिक अत्याचार म्हणजे "कुटुंबातील प्रौढ व्यक्तीकडून अथवा घरातील एखाद्या नातेवाईकाकडून महिलेचा शारीरिक छळ अत्याचार किंवा शारीरिक शोषणाची धमकी देणे होय" यामध्ये शारीरिक, भावनिक व लैंगिक शोषण करणे, तसेच संपत्तचा नाश करणे होय. कौटुंबिक अत्याचार हे हिंसाचार करणारी व्यक्ती आणि त्याला सामोरे जाणारी महलिा यातील शक्तीचे असंतुलन राखण्यासाठीचे वर्तन नियंत्रित करण्याचे स्वरूप होवू शकते. कौटुंबिक अत्याचाराचे विविध प्रकार सांगितले जातात. जसे की, शारीरिक हिंसा वा लैंगिक अत्याचार, भावनिक अत्याचार धमकाविणे, आर्थिक संपत्ती पासून दूर ठेवणे वा अत्याचाराच्या धमक्याचा समावेश यात होतो. शारीरिक हल्ले, मारणे, हकलणे, व शास्त्राने धमकविणे, मानसिक अत्याचार किंवा लैंगिक जबरदस्ती याचा समावेश होतो. अप्रत्यक्ष शारीरिक अत्याचारात महिलांच्या वस्तूचा नाश करणे, महिलेच्या जवळच्या वस्तू फेकून देणे, शारीरिक हिंसेच्या व्यतिरिक्त, पती, पत्नीच्या अत्याचारामध्ये बऱ्याच वेळी मानसिक, भावनिक शोषणाचा विचार असतो. पीडित महिला स्वत:ला व मुलांमुलीसह इतराना शारीरिक हिंसेच्या मौखिक धमक्यांसह हिंसा, अपमान, धमक्या हल्ले याही बाबींचा समावेश असतो. पीडित महिलेला आपल्या नातेवाईकांना भेटण्यापासून थांबविणे, पीडित महिलांच्या सामाजिक संबंधाची तोडफोड करणे आणि त्या महिलांना सामाजिक संपर्कापासून दूर ठेवणे, तसेच अध्यात्मिक गैरवर्तन हा वेवगळ्या स्वरूपाचा गैरवापर होत असतो. महिला वरील शाररिक व मानसिक हानी, या उपचारांची अवश्यकता असते. अथवा कायमस्वरूपी इजा खूनापर्यंत गंभीर स्वरूपाच्या असू शकतात.

**कौटुंबिक अत्याचारांचे परिणाम:** कौटुंबिक अत्याचारांचे मुळ बळी या महिला आणि लहान मुले जातात. कोणत्याही क्षेत्रात महिला पुरूषापेक्षा कमी नाहीत हे २१ व्या शतकातील सत्य आहे, तरीपण महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनेचे प्रमाण कमी होताना आढळून येत नाही. विवाहित महिला जवळजवळ २/३ तृतीयंश महिला घरगुती अत्याचाराला बळी पडतात. १५ ते ४० वयोगटातील ७० टक्के महिला जबरदस्तीने लैंगिक अत्याचाराला, बलात्काराला सामोरे जातात. महिलांना मारहाण करणे याचे सर्वात सामान्य बाब म्हणजेच मुलीच्या वडीलांकडून हुंड्याची मागणी करणे, हुंड्याच्या मागणीनुसार वधूला जाळणे, उपाशी ठेवणे, तिच्याशी वैवाहिक संबंध ठेवण्यास नकार देणे, पत्नीला न सांगता धराबाहेर जाणे, सासू-सासऱ्याची काळजी न घेणे, इत्यादी माहितीव्दारे घरातील सदस्यांकडून महिलांवर प्राणघातक हल्ला घडवून आणणे. हुंड्याच्या हवासामुळे मुला-मुलीच्या इच्छा, पतीच्या मद्यपान हीतर ग्रामीण समाजातील महिलांवरील घरगुती अत्याचारांची प्रमुख कारण मानले जातात.

**कौटुंबिक अत्याचाराचे परिणाम:**

**शिक्षण आणि कौटुंबिक अत्याचार:** भारतीय समाजातील महिलांना सातत्याने अत्याचाराला सामोरे जावे लागत असले तर त्याला कुटुंबातील मुलाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते. आणि स्वत:आणि मुलाची काळजी घेवू शकत नाही. कौटुंबिक अत्याचार हा शिक्षणाचा अधिकार कमी होत असतो. मुला-मुलींच्या वाढत्या शिक्षणामुळे अत्याचार घडण्याची शक्यता कमी असते.

**पुरूषाचा सहभाग आणि कौटुंबिक अत्याचार:** कुटुंबात जर सातत्याने हिंसक वातावरण तयार झाल्याने महिलाचा अधिकार आत्मसन्मानाच्या धोरणावर व निर्णय घेण्याच्या विचारात सहभागी होण्याच्या मार्गावर वाईट परिणाम घडून सामाजिक संबंध समाप्त होण्याची शक्यता असते.

**शारीरिक आरोग्य आणि कौटुंबिक अत्याचार:** कुटुंबात महिलावर शारीरिक अत्याचार लैंगिक अत्याचार बलात्कार, विनयभंग, लैंगिक छळ महिलांकडून शारीरिक संबंध यामुळे महिलातील मानसिक आरोग्याचा प्रश्न निर्माण

होतो. लैंगिक छळाच्या आघातामुळे महिला सामाजिकरीत्या खच्चीकरण करून, महिलामध्ये शारीरिक, मानसिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. यातून शारीरिक संबंधात बिघाड, नशा येणाऱ्या मादक द्रव्याचे अधिक सेवन, लैंगिक नैराश्य, यातूनच झोपेच्या समस्या अधीक वाढतात. महिलाच्या स्वाभिमानाची, नासाडी होते.

**ताणतनाव आणि कौटुंबिक अत्याचार:** कुटुंबातील सदस्याचे वाईट झालेले आरोग्यात्मक वर्तन यातून तणाव आणि दबावाची भावना तयार होते.

**मुला-मुलीवर होणारे परिणाम आणि कौटुंबिक अत्याचार:** कुटुंबात सातत्याने अत्याचार घडून येत असल्याने त्याचा परिणाम मुला मुलींच्या आरोग्यावर होतो. याव्दारे असे सांगितले जाते की, ३.३ लाख पेक्षा अधिक मुला-मुलींच्या शोषणाची प्रत्यक्ष बळी ठरलेली आढळून आले आहे. पती-पत्नी यातील अत्याचारामुळे शारीरिक व मानसिक समस्या उद्भवतात.

**कल्याणकारी कायदे:** जिल्ह्या महिला समिती, लैंगिक चळवळी विरोधी कायदा, गर्भलिंग निदान कायदा, प्रसुती सुविधा कायदा, कौटुंबिक न्यायालयीन कायदा, छेडछाड गमरा लैंगिक गुन्हेकायदा, बालविवाह प्रतिबंध कायदा, हुंडा प्रतिबंध कायदा, भारतीय संविधानाच्या कलम 14 नुसार स्त्री-पुरूष भेदभावापासून मुक्त आणि कलम १५ व्दारे स्त्री-पुरूष समानता कलम १६ नुसार जीवीत व स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचा महिलांना दिला आहे. तरी भारतीय समाजातील समाज सुधारक, विचारवंत समाजाचे परिवर्तन करण्यास कमी पडत आहेत. समाज सुधारण्या करीता समाज प्रबोधन चळवळ आणि भाषणे पुरेसे नसतात. तर दंड, शिक्षा, शक्ती ही महत्वाची आहे. म्हणून कौटुंबिक अत्याचार, हिंसाचार हा कायदा केंद्रीय सरकारने बंधनकारक केला आहे.

**कौटुंबिक अत्याचारावरील उपाय:** **१.** पीडित महिलाला विशेष कार्यक्रमाना उपस्थित राहण्याचे बंधनकारक करणे. २. प्रतिवादीला कौटुंबिक अत्याचारापासून परावृत्त करण्याच्या बंधनाखाली ठेवणे. ३. शासकीय धर्तीवर अनुकंप नोकरी, करणाऱ्या महिलाकडे समाजाचा पाहण्याा दृष्टीकोण चांगला असावा. ४. शासकीय कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून मुक्त करण्यायत अपयशी ठरणारा कोणताही कर्यालयीन अधिकारी यांच्याकडून दंड घेतला जाईल. ५. कौटुंबिक अत्याचार झालेल्या महिलेची व साक्षीदार यांची ओळख उघड करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला ५०००/- रूपये दंड आकारण्यात येईल. ६. कोर्टाने निर्दिष्ट केलेल्या कालावधीकरीता प्रतिवादीला सामान्य निवास स्थानातून वेगळे करणे.

**संदर्भ ग्रंथ:**

1) कौटुंबिक अत्याचार आणि कायदा - ॲड अभया शेलकर
2) भारतीय समाज और जातीवाद -ईंजिनिअर डी.के.
3) लोकसत्ता 12 ऑक्टोबर, 2023 पृ.क्र. 10
4) Twwair Sidharth Sexxual Harassment of wamen at workplace A practical Guide=
5) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या - डॉ. सुधा काळदाते.
6) भारतीय समाज आणि समस्या, डॉ. भा. कि. खडसे.

---

# जलजीवन मिशन योजनेचा ग्रामीण महिलांच्या जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास

**डॉ. मंजुषा मुरलीधर रसाळ** समाजशास्त्र विभाग, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा

**गोषवारा:** प्रस्तुत अभ्यास भारत सरकारच्या ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने २०१९ साली जलजीवन मिशन ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू झाली त्या संदर्भात आहे. ग्रामीण भागात पाण्याची जबाबदारी प्रामुख्याने महिलांवर असल्यामुळे या योजनेचा सर्वाधिक परिणाम महिलांच्या जीवनावर होतो. सदरील संशोधनात बीड जिल्ह्यातील मौजे हिंगणी या गावातील महिलांच्या जीवनावर जलजीवन मिशन योजनेमुळे झालेल्या सामाजिक, आरोग्यविषयक व आर्थिक परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे. हे संशोधन प्राथमिक व दुय्यम माहिती वर आधारित आहे. या अभ्यासातून असे दिसून आले की, हिंगणी गावात जलजीवन मिशनमुळे पाण्यासाठीचा संघर्ष कमी होऊन, सामाजिक सलोखा वाढून, महिलांचे आरोग्य, सुरक्षितता, स्वच्छता व पर्यावरणीय जाणीव लक्षणीय सुधारली आहे. महिलांचा वेळ, श्रम, आरोग्य आणि सामाजिक सहभागात सुधारणा होऊन महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने जलजीवन मिशन योजनेची भूमिका महत्वपूर्ण दिसून आली

**मुख्य शब्द**: जलजीवन मिशन, पाणीपुरवठा, महिलांचे सक्षमीकरण, आरोग्य, सामाजिक परिवर्तन

---

**प्रस्तावना:** पाणी ही मानवाच्या जीवनाची मूलभूत गरज असल्याने पिण्याचे स्वच्छ व सुरक्षित पाणी उपलब्ध असणे हे मानवी सन्मानाशी सबंधित आहे. भारतासारख्या कृषीप्रधान आणि ग्रामीण देशात पाणीपुरवठ्याचा प्रश्न केवळ भौतिक सुविधेचा नसून तो सामाजिक, आर्थिक आणि लिंगाधारित असमानतेशी संबंधित आहे. ग्रामीण भागात आजही पाण्याची उपलब्धता ही मर्यादित, असमान आणि अनेक ठिकाणी असुरक्षित स्वरूपाची असल्याचे दिसून येते. ग्रामीण समाजव्यवस्थेत पाण्याशी निगडित जबाबदाऱ्या प्रामुख्याने महिलांवर असल्याने पिण्याचे पाणी आणणे, साठवणे, घरगुती वापरासाठी व्यवस्था करणे ही कामे महिलांना दररोज करावी लागतात. पाण्याचे स्रोत दूर असणे, अपुरे पाणी, अनियमित पाणी पुरवठा आणि पाण्याची गुणवत्ता या समस्यांमुळे महिलांचा मोठा वेळ, श्रम आणि ऊर्जा खर्च होत असतो. त्यामुळे महिलांच्या आरोग्यावर, शिक्षणावर, आर्थिक सहभागावर आणि सामाजिक सहभागावर ही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे पाणीपुरवठ्याचा प्रश्न हा केवळ तांत्रिक नसून महिलांच्या जीवनाशी निगडीत असलेला सामाजिक प्रश्न आहे. याच पार्श्वभूमीवर भारत सरकारने ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर दीर्घकालीन आणि शाश्वत उपाय म्हणून जलजीवन मिशन ही महत्त्वाकांक्षी योजना २०१९ साली सुरू केली. या योजनेचा मुख्य उद्देश "हर घर-नल से जल" असून त्यानुसार प्रत्येक कुटुंबाला प्रतिदिन प्रति मानसी ५५ लिटर नियमित, सुरक्षित आणि पुरेशा प्रमाणात नळाद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा आहे. बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त व पाणीटंचाईचा सामना करणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. अशा परिस्थितीत जलजीवन मिशनसारख्या योजनेचा प्रत्यक्ष ग्रामीण जीवनावर, विशेषतः महिलांच्या जीवनावर काय परिणाम झाला आहे, याचा स्थानिक पातळीवर अभ्यास करणे महत्वाचे वाटल्याने प्रस्तुत अभ्यास करण्यात आला. बीड जिल्ह्यातील मौजे हिंगणी, तालुका बीड या गावात जलजीवन मिशन अंतर्गत नळाद्वारे पाणीपुरवठा २०२४ मध्ये सुरू झाल्यानंतर ग्रामीण महिलांच्या दैनंदिन जीवनात कोणते सामाजिक, आरोग्यविषयक, आर्थिक बदल झाले आहेत, याचा अभ्यास करणे हा या अध्ययनाचा मुख्य उद्देश आहे.

**अभ्यास क्षेत्र (Study Area):** प्रस्तुत संशोधनाचे अभ्यास क्षेत्र हे बीड जिल्ह्यातील मौजे हिंगणी, तालुका बीड हे गाव असून या गावात सार्वजिक पाणवठे असून उन्हाळ्यात शेतातून दूरवरून पाणी आणावे लागत होते. सदर संशोधनासाठी निवडलेल्या गावाची एकूण लोकसंख्या २१०० इतकी असून, गावातील एकूण मतदारसंख्या १२५१ आहे. गावच्या महिला सरपंच म्हणून सौ. कमल सखाराम वायसे कार्यरत आहेत त्यांच्या कार्येकालात ही योजना पूर्ण झाली आहे.

**संशोधनाची गरज आणि महत्त्व:** प्रस्तुत अध्ययन हे ग्रामीण महिलांच्या जीवनात पाणीपुरवठ्यामुळे झालेल्या बदलांचे स्थानिक पातळीवर मूल्यमापन करण्यासाठी, पाणी आणण्यासाठी लागणाऱ्या वेळेत झालेली बचत, श्रमांमध्ये घट आणि आरोग्यविषयक सुधारणा इत्यादीच्या माध्यमातून योजनेची परिणामकारकता स्पष्ट करण्यासाठी महत्वाचे आहे. भविष्यातील पाणीपुरवठा योजना अधिक शाश्वत, महिला-केंद्रित आणि प्रभावी करण्यासाठी हा अभ्यास मार्गदर्शक ठरू शकतो.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. जलजीवन मिशन योजनेमुळे ग्रामीण महिलांच्या जीवनात झालेले सामाजिक, आर्थिक, आरोग्यविषयक बदल प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारे अभ्यासण्यात आले. या संशोधनासाठी प्राथमिक माहितीवर मुख्य भर देण्यात आला असून, दुय्यम माहितीचा वापर ही करण्यात आला आहे. हिंगणी गावातील महिलांची संख्या ६२० असून त्यापैकी नमुना निवड पद्धतीच्या गैर संभाव्यता नमुना निवडीतील प्रकारापैकी सोयीस्कर नमुना पद्धतीने ५० (८%) महिलांची निवड करण्यात आली. प्राथमिक माहिती संकलनाच्या स्रोतापैकी संरचित प्रश्नावलीच्या आधारे मौजे हिंगणी येथील नमुन्यातील ५० महिलांकडून प्राथमिक माहिती संकलित केली. निरीक्षणाच्या माधमातून ही घरगुती नळजोडणी, पाणी साठवण पद्धती व दैनंदिन वापराचे पाणी इत्यादीचा अभ्यास केला आहे. संकलित प्राथमिक माहितीचे विश्लेषण टक्केवारी, सारणी आणि आलेखीय सादरीकरणाच्या माध्यमातून केले आहे.

**साहित्याचा आढावा:** पूरक साहित्याकरीता जलजीवन मिशन, ग्रामीण पाणीपुरवठा व महिलांचे सक्षमीकरण या विषयांवरील ग्रंथ अहवाल, योजना पुस्तिका, नियतकालिकालीकातील संशोधन लेख यांचा अभ्यास करण्यात आला.

**१. कृष्णा दास आणि पूनम कुमारी (२०१८)** यांनी Women and Water in Rural India हा शोध निबंध लिहिला. या संशोधन निबंधात भारतातील ग्रामीण भागातील पाण्यामुळे महिलांवर होणाऱ्या सामाजिक-आर्थिक परिणामांचे विवेचन केले आहे.

**२. एसबीआय बँकेच्या Jal Jeevan Mission & Women's Empowerment-** या संशोधन अहवालानुसार जलजीवन मिशनमुळे ग्रामीण भागात पाणी उपलब्धतेचा स्तर वाढल्याने महिलांचा वेळ व श्रम बचत होत आहे ज्यामुळे त्या कृषी, स्वयंरोजगार व अन्य आर्थिक उपक्रमांमध्ये त्या सहभागी होत आहेत.

३. **Ministry of Jal Shakti (Department of Drinking Water and Sanitation)** च्या वार्षिक अहवाल २०२४-२५ नुसार जल जीवन मिशन मुळे महिलांमध्ये पाणी आणण्याची काळजी कमी झाली आणि सुरक्षित पाणी उपलब्धतेमुळे महिलांच्या आरोग्यात सुधारणा होऊन त्यांचा सामाजिक सहभाग वाढत आहे असे नमूद केले आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे (Objectives of study):** १. जलजीवन मिशनमुळे महिलांच्या आयुष्यात झालेला बदल अभ्यासणे; २. महिलांच्या जीवनावर झालेल्या सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यासणे; ३. ग्रामीण भागात झालेले सामाजिक परिवर्तन अभ्यासणे.

**अभ्यासाची गृहितके (Hypothesis of study)** १. जलजीवन मिशनमुळे महिलांची पाणी भरण्याची वेळ कमी झाली आहे.
२. महिलांच्या आरोग्यात सुधारणा झाली आहे. ३. महिलांचा सामाजिक सहभाग वाढला आहे.

**संकल्पनात्मक चौकट (Conceptual Framework):** महिला सक्षमीकरण या संकल्पनेनुसार संसाधनांपर्यंत सहज प्रवेश झाल्यास महिलांची निर्णयक्षमता, स्वावलंबन व सामाजिक स्थान सुधारते. जलजीवन मिशनमुळे पाण्याच्या सहज उपलब्धतेमुळे महिलांचे सक्षमीकरण कसे घडते, हे या संकल्पने आधारे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. मूलभूत गरजांचा दृष्टीकोन (Basic Needs Approach) हा पाणी मूलभूत गरज असल्याने त्याची उपलब्धता झाल्यास महिलांचे जीवनमान सुधारते का? हे या दृष्टीकोनानुसार अभ्यासले आहे. या दोन संकल्पनात्मक चौकटीच्या आधारे जलजीवन मिशन योजनेचा ग्रामीण महिलांच्या जीवनावर झालेला परिणाम शास्त्रीय पद्धतीने अभ्यासला आहे.

**संशोधनाच्या मर्यादा (Limitations of the Study):** प्रस्तुत अभ्यास मौजे हिंगणी एका गावापुरता मर्यादित असून प्रतिसादक महिलांच्या वैयक्तिक अनुभवांवर आधारित माहिती व प्रत्यक्ष निरीक्षण करून अभ्यासाच्या उद्दिष्टांच्या मर्यादेत केला आहे.

**अभ्यासाचा कालखंड (Period the Study):** प्रस्तुत अभ्यास हा मौजे हिंगणी गावात जलजीवन मिशन ही योजना मे २०२४ मध्ये सुरळीत सुरू झाल्यापासून एक वर्षानंतर म्हणजेच जून २०२५ मध्ये करण्यात आलेला आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण (Analysis of data Collection):**

**संकलित माहितीचे विश्लेषण: सारणी क्र. ०१: जलजीवन मिशनमुळे झालेले सामाजिक परिवर्तन** (बहुप्रतीसादक सारणी)

| अ.क्र. | परिवर्तनाचा प्रकार | एकूण (५० पैकी) | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १. | पाणवठ्यावरील भांडने कमी | ४५ | ९० |
| २. | आवश्यक तेवढे पाणी मिळणे सोपे | ४६ | ९२ |
| ३. | जातीय सलोखा वाढून संघर्ष कमी | ४९ | ९८ |
| ४. | अपघात कमी | ४६ | ९२ |
| ५. | शौचालयच्या वापरात वाढ | ४९ | ९८ |
| ६. | परसबाग | २५ | ५० |




सारणी क्र. १ वरून जलजीवन मिशन योजनेमुळे पाणवठ्यावरील पाण्यासाठीची भांडणे कमी झाल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात मासिक पाळीत स्पर्श टाळला जातो त्यामुळे पाणी भरताना ते प्रकर्षाने जाणवते व मानसिक कुचंबना होत होती, ती आता जाणवत नाही. ग्रामीण भागात घरोघरी पाणी आल्यामुळे पूर्वीची सार्वजनिक पाणवठ्यावरील जातीय व महिला मधील भांडेने कमी होऊन जातीय सलोखा निर्माण झाल्याचे दिसते. त्याचबरोबर पाणी मिळवण्याकरिता होणारे अपघात, मारामारी कमी झाली असे ९० % पेक्षा ज्यास्त प्रतिसादक महिला सांगतात. घरोघरी नळाला पाणी आल्यामुळे शौचालय वापरणे सुरु झाल्याचेही प्रमाण (९८%) दिसून आले. प्रत्येक घरी शोषखड्डा असल्यामुळे पूर्वीची परसबागेची संकल्पना पुनर्जीवित झाल्याचे दिसून येते.

**सारणी क्र.: २ महिलांच्या जीवनावर झालेला परिणाम**

| अ.क्र. | महिलांच्या जीवनावर झालेला परिणाम | एकूण (५०पैकी) | प्रमाण( टक्के) |
|---|---|---|---|
| १. | रात्रीचे जागरण कमी | ४५ | ९० |
| २. | कुटुंबियांना वेळ (आजरी, वृद्ध, मुलांचा अभ्यास इत्यादी) | ४६ | ९२ |
| ३. | घरगुती व्यवसायाला वेळ ( शीलाई,किराणा दुकान, बचतगट,शेती) | ४८ | ९६ |
| ४. | आजारपण कमी ( कंबर, मान,पाठ,इत्यादी.) | ४६ | ९२ |
| 5. | स्वतःकरिता वेळ (भजन, टी.व्ही., मोबाईल) | ४८ | ९६ |
| ६. | मासिक पाळीतील त्रास कमी | ५० | १०० |
| ७. | छेडछाड, भांडणे कमी | ४९ | ९८ |

**(बहुप्रतीसादक सारणी)**




सारणी क्रमांक २ वरून महिलांच्या जीवनावर झालेला परिणाम अभ्यासला असता पाणी घरात आल्यामुळे ९० % प्रतिसादक महिलांच्या मते जागरण कमी झाले, आता तो वेळ कुटुंबीयांना देता येऊ लागला आहे. वेळेची बचत झाल्यामुळे घरगुती व्यवसाय जसे की, शिलाई काम, किराणा दुकान चालवणे, बचत गट, शेती, आणि मजुरीला वेळ मिळू लागला असे ९६% प्रतिसादक महिला सांगतात. त्याचबरोबर दुरून पाणी आणल्यामुळे विशेषतः कंबर दुखी, मान, पाठ इत्यादी आजार महिलांना होत होती परंतु घरात पाणी आल्यामुळे ९२ % महिला प्रतिसादक सांगतात की, हे आजार कमी झालेले आहेत. तसेच दुरून पाणी आणण्याचा वेळ बचत झाल्यामुळे स्वतः करिता तो वेळ देता येऊ लागला. या वेळेमध्ये टी.व्ही. सिरीयल पाहणे, सध्या मोबाईल वरती रिल्स पाहाणे आणि सामाजिक सहभाग वाढून भजन- कीर्तनालाजाण्यासाठी व बचत गटाला वेळ मिळू लागला आहे असे ९६ % प्रतिसादक महिला सांगतात. पाणी अत्यावश्यक असल्याने अनेक वेळा महिलांना स्वयंपाक घरात अथवा इतर कामे करण्याकरिता मासिक पाळीत दूर ठेवले जात जाते परंतु पाणी आणताना मात्र त्यांना मासिक पाळी मध्ये सुद्धा पाणी आणावे लागत होते त्यामुळे मासिक पाळीतील शारीरिक त्रास घरगुती नळामुळे कमी झाला असे १००% प्रतिसादक महिला सांगतात. विशेष म्हणजे दूरवरून शेतातून व सार्वजनिक

पाणवठ्यावरून पाणी बहुतेक वेळा रात्री आणावे लागत होते त्यामुळे गावात अनेक वेळा छेडछाड, भांडणे इत्यादीचा धोका होता परंतु तो कमी झाल्याचे ९८ % प्रतिसादक महिलांच्या प्रतिसादावरून दिसून येते.

**ठळक निरीक्षणे (Salient Findings):**

- पाणवठ्यावरील पाण्यासाठीची भांडणे कमी, आवश्यक तेवढे पाणी मिळणे सोपे, जातीय सलोखा- संघर्ष कमी, अपघात कमी आणि शौचालयच्या वापरात वाढ झाल्याचे ९० % पेक्ष्या ज्यास्त प्रतिसादक महिला सांगतात तर अभ्यासलेल्या ५०% घरामध्ये परसबाग दिसून आली.
- महिलांच्या जीवनावर झालेला परिणाम अभ्यासताना जागरण कमी होणे, कुटुंबियांना (आजरी, वृद्ध, मुलांचा अभ्यास) यांना वेळ देता येतो, घरगुती व्यवसायाला वेळ (शीलाई, किराणा दुकान, बचतगट, शेती, मजुरी) देता येत आहे, आजारपण कमी (कंबर, मान, पाठ, इत्यादी.), स्वतःकरिता वेळ (भजन, टी.व्ही., मोबाईल), मासिक पाळीतील त्रास कमी आणि छेडछाड, भांडणाचा धोका कमी झाला आहे असे ९० % पेक्ष्या ज्यास्त प्रतिसादक महिला सांगतात.

**निष्कर्ष (Conclusion):**

- जलजीवन मिशन मुळे घरोघरी नळपाणी पुरवठा सुरू झाल्याने ग्रामीण महिलांचे दैनंदिन जीवन सुलभ, सुरक्षित व सन्मानजनक झाले आहे. पाणवठ्यावरील पाण्यासाठी होणारी भांडणे कमी झाल्याने ही योजना सामाजिक तणाव कमी करणारी ठरली आहे.
- पाणीटंचाईमुळे निर्माण होणारा असंतोष व अनिश्चितता लक्षणीयरीत्या घटली आहे.
- जलजीवन मिशनने सामाजिक समानतेला चालना दिली आहे.
- पाणी आणताना होणारे अपघात कमी झाल्याने महिलांची शारीरिक सुरक्षितता वाढली व आरोग्यजोखीम कमी झाली आहे.
- दारात पाणी उपलब्ध झाल्यामुळे शौचालच्या वापरात वाढ झाल्याने जल जीवन मिशन व स्वच्छता अभियान यांचा परस्परपूरक व सकारात्मक संबंध स्पष्ट होतो.
- घरोघरी शोषखड्डे झाल्यामुळे महिलांनी परसबागेत फुलझाडे, भाजीपाला लागवड केल्याचे दिसून आले. यामुळे घरगुती पातळीवर पर्यावरणपूरक सवयी, अन्नसुरक्षा व सौंदर्यदृष्टीचा विकास होताना दिसून येतो.
- महिलांना कुटुंबासाठी वेळ देता येऊ लागला आहे. घरगुती व्यवसायांना आता नियमित वेळ मिळाल्यामुळे आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळाली आहे.
- पाणी आणण्यात बचत झालेली वेळ महिला स्वतःच्या विश्रांती, मनोरंजन व धार्मिक-सांस्कृतिक उपक्रमांसाठी वापरु लागल्या आहेत.
- मासिक पाळीच्या काळात पाणी आणताना होणारा शारीरिक व मानसिक त्रास कमी झाल्यामुळे महिलांचा सन्मान, आरोग्य व मासिक पाळीतील गोपनीयता सुरक्षित झाली आहे.
- दूरवरून रात्री पाणी आणताना होणारी छेडछाड व असुरक्षिततेच्या घटना कमी झाल्याने जलजीवन मिशनमुळे महिलांची सुरक्षितता वाढल्याचे दिसते.
- थोडक्यात, या अभ्यासावरून असे दिसते की, जलजीवन मिशनमुळे घरोघरी नळपाणी उपलब्ध होणे हे महिलांच्या जीवनातील कष्ट, असुरक्षितता व आजार कमी करून त्यांना सन्मान प्राप्त करून देणारे सबलीकरणाचे प्रभावी साधन ठरले आहे.

**संकल्पनात्मक चौकटीच्या आधारे विश्लेषण:** प्रस्तुत अभ्यासात घरगुती नळाद्वारे पाण्याची उपलब्धता झाल्यामुळे महिलांना दररोज पाणी आणण्यासाठी कष्टप्रद श्रमांपासून मुक्तता मिळाली आहे. वेळेचा उपयोग त्यांनी कुटुंब, आरोग्य, मुलांचे शिक्षण व स्वतःच्या विकासासाठी केल्याचे आढळून आले. यामुळे महिलांचा आत्मसन्मान व आत्मविश्वास वाढून कौटुंबिक निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढलेला दिसून येतो या वरून महिला सबलीकरण करण्यास ही योजना महत्वाची ठरली आहे.

जलजीवन मिशन ही योजना केवळ पाणीपुरवठ्यापुरती मर्यादित न राहता मूलभूत गरजांच्या पूर्ततेतून मानवी विकासाला चालना देणारी योजना ठरली आहे. मौजे हिंगणी (बीड जिल्हा) या गावाच्या उदाहरणातून जलजीवन मिशनचा ग्रामीण विकास प्रक्रियेत आणि विशेषतः महिलांच्या सक्षमीकरणात असलेला निर्णायक वाटा ठळकपणे अधोरेखित होतो.

**गृहीतकांची पडताळणी:** जलजीवन मिशनमुळे ग्रामीण महिलांची पाणी भरण्याची वेळ कमी (९२%) झाली आहे. महिलांच्या आरोग्यात सुधारणा (९२%) झाली आहे. तसेच सामाजिक सहभाग वाढला हे मौजे हिंगणीच्या अभ्यासातून स्पष्टपणे होते.

**निरीक्षण:** प्रस्तुत अभ्यास करताना असे आढळून आले की, नळ पट्टी न भरण्याची मानसिकता दिसून आली. अनेक महिला नळाला पाणी आल्यानंतर पाणी वाया जाताना नळ बंद करण्याची तसदी घेताना दिसल्या नाहीत. विशेषतः सार्वजनिक नळाच्या बाबतीत महिला बरोबर पुरुष ही निष्काळजी दिसले. वाया जाणारे अर्थात मुद्दामहून वाया घालवून ते पाणी जवळच्या बागेला अथवा विहिरीत गुपचूप सोडताना दिसले.

**शिफारस:** 'हर घर- नल से जल' हे जल जीवन मिशनचे ध्येय असून महिलांच्या जीवनामध्ये आनंद आणणारी योजना असल्याने ती शास्वतपणे चालू राहावी याकरिता ठोस यंत्रणा उभा करणे गरजेचे आहे. कारण देखभाल आणि दुरुस्ती खर्च कसा करावा हा प्रश्न ग्रामपंचायतीसमोर आहे. याकरिता शासनाने ठोस निधी द्यावा किंवा तो उभारण्यासाठी कसोशीचे प्रयत्न ग्रामपंचायत पातळीवर होणे गरजेचे आहे.

**संशोधन करताना आलेल्या अडचणी:** घरकाम, वैक्तिक व्यवसाय, मजुरीमुळे महिलांना माहिती देण्यास वेळ नव्हता. या बरोबरच छेडछाड, आरोग्य आणि मासिक पाळी यासारख्या विषयावर माहिती संकलित करताना कुटुंबीय आणि पुरुष मांडळी सोबत असल्याने कसोटी लागली.

**भविष्यातील संशोधनाची दिशा:** सदरील अभ्यास हा जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठ्यापुरता आणि एका गावापुरता मर्यादित न ठेवता अभ्यासाचे विश्ववाढून आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, सामाजिक सलोखा, पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक उपजीविका व प्रशासन या सर्व क्षेत्रांवर झालेल्या बहुआयामी परिवर्तनाचा अभ्यास करण्यास वाव आहे.

**संदर्भग्रंथ ( Reference Books):**


१. देशमुख, अ. र. (२०१५). ग्रामीण विकास आणि महिलांचे सक्षमीकरण. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
२. जाधव, स. व. (२०१८). महिला सक्षमीकरण : संकल्पना व वास्तव. औरंगाबाद: साई पब्लिकेशन्स.
३. महाराष्ट्र शासन. (२०२०). जलजीवन मिशन : मार्गदर्शक सूचना. मुंबई: पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग.
४. कुलकर्णी, श. र. (२०१४). ग्रामीण महिलांचे सामाजिक-आर्थिक जीवन. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.
५. गायकवाड, रा. त. (२०१९). ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व स्वच्छता. लातूर: प्रतिभा प्रकाशन.
६. Government of India. (*2019).* Jal Jeevan Mission: Operational guidelines. Ministry of Jal Shakti, Department of Drinking Water and Sanitation, New Delhi.
७. Ministry of Jal Shakti. Department of drinking water and Sanitation (*2021).* Jal Jeevan Mission: Annual report *20*24-25. Government of India, New Delhi.
८. UNICEF. (*2019).* Drinking water, sanitation and hygiene in India. UNICEF India.
९. World Health Organization. (*2017).* Guidelines on drinking-water quality (*4*th ed.).
१०. https://www.researchgate.net/publication/393039275_Women_and_Water_in_Rural_India
११. https://sbi.bank.in/documents/13958/43951007/181024-How+Har+Ghar+Jal+has+initiated+a+social+revolution.pdf/7db81e44-25b6-4bae-dd9c-2508849d896b?t=1729255635219


# ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद


**छाया शिवाजी सौंदरमल** संशोधक

**डॉ. एम. के. सवई,** सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख, दगडोजीराव देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाळूज


**प्रस्तावना:** महिला शिक्षण हा आजच्या आधुनिक काळात विशेष चर्चेचा विषय आहे. उच्चशिक्षणातील महिलांचा सहभाग हा देशाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासाचा एकक मानला जातो. महिला शक्ती ही सुदृढ व सक्षम बनविणे समाजाची व शासनाची जबाबदारी आहे. कारण महिला देशाचे भविष्य घडविणारी शक्ती आहे. भारतात जवळपास अर्धी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. आज खूप साऱ्या स्त्रियांनी आपल्या कर्तव्याच्या जोरावर जगात, समाजात, कुटुंबात नाव मिळवून प्रगती केली आहे. देशाला विकसित बनवण्यासाठी तसेच विकासाचे लक्ष प्राप्त करण्याकरिता महिला शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. याकरिता शासनाने विविध अशा योजना देखील आखलेल्या आहेत. परंतु विविध योजना असूनही आपल्या देशात अनेक भागांमध्ये स्त्रिया ह्या असुरक्षित व अशिक्षित असलेल्या दिसून येतात. पूर्वी स्त्रियांचे क्षेत्र **'चूल आणि मूल'** या पर्यंतच मर्यादित असे. परंतु आता महिलांनी चूल आणि मुल सोबतच देश आणि विदेशाकडे, तसेच समाजात, कुटुंबात, इतर क्षेत्रात- विविध ठिकाणी सुद्धा लक्ष द्यायला सुरुवात केली आहे. मानवी हक्काविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारांना मान्यता मिळालेली आहे. तरी देखील आज ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात स्त्रियांचे निर्धन व निरक्षर राहण्याचे प्रमाण दिसून येते. भारताची जनगणना २००१ व २०११ नुसार, औरंगाबाद जिल्ह्यातील साक्षरता एकूण ८६.५७ टक्के आहे. औरंगाबाद तालुक्यामधील साक्षरतेचे प्रमाण ग्रामीण भागातील एकूण ७३.६२ टक्के आहे. यापैकी पुरुषांची साक्षरता ८५.०१ टक्के, स्त्रियांची साक्षरता ६१. २० टक्के आहे. पुरुषांच्या साक्षरता पेक्षा स्त्रियांची साक्षरतेचे प्रमाण ग्रामीण भागात कमी आहे हे दिसून येते. सामाजिक परिवर्तनामध्ये खऱ्या अर्थाने उच्च शिक्षण महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. परंतु भारतातील ग्रामीण भागात स्त्रियांचे उच्च शिक्षणाचे प्रमाण नगण्यच आहे. भारतातील ग्रामीण स्त्रियांच्या शिक्षणाला अनेक घटक, अडथळे जबाबदार आहेत. आजच्या आधुनिक जीवनात जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण आणि तंत्रयुगात मुलींनी शिक्षण घेणे फार महत्त्वाचे आहे. शिक्षण ही काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील मुलीना शिक्षण घेत असताना त्यांना कोणकोणत्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक तसेच शैक्षणिक समस्यांना सामोरे जावे लागते. याचाच अभ्यास या शोध निबंधात करण्यात येत आहे.

**शोध निबंधास प्रवेश:** आजही अनेक शहरी व ग्रामीण भागात महिला स्वतः स्वतःचा निर्णय घेऊ शकत नाहीत. ह्या स्त्रियांना पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे त्यांची निर्णय घेण्याची क्षमता वाढविणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात स्त्रिया शिक्षणाच्या क्षेत्रात आजही मागे आहेत. ग्रामीण महिलाकडे घर सांभाळणे आणि मुलांचा सांभाळ या अनुषंगानेच बघितले जाते. त्यामुळे तिच्या शिक्षणाकडे नकारात्मक दृष्टीनेच पाहिले जाते. आज देखील ग्रामीण भागात काही रुढी-परंपरामुळे मुलींना शिक्षणासाठी पाठवले जात नाही. 'मुलींनी शिकून काय करायचे' हा दृष्टिकोन ग्रामीण समाजात विकसित झालेला आहे. त्याचबरोबर कमी वयात विवाह हा पण ग्रामीण महिलांच्या शिक्षणातील मोठा अडसर ठरलेली बाब आहे. ज्या वयात शिक्षण घेता यायला पाहिजे त्या वयात तिच्यावर अनेक जबाबदाऱ्या दिल्या जातात व शिक्षणाचे दार बंद केले जाते. स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार जरी होत असला तरी कुटुंबात मुलीच्या शिक्षणातील दिल्या जाणाऱ्या सोयी—सुविधाबाबद दुजाभाव केला जातो. मुलांच्या शिक्षणाबाबत आग्रह केला जातो, तसा मुलींच्या शिक्षणाबाबत केला जात नाही. फक्त मुलींच्या विवाहवर लक्ष केंद्रित केले जाते.ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाची विकासाची परवड नेहमीच झालेली आहे. शिक्षणाशिवाय कोणतीही व्यक्ती व समाज समृद्ध, परिपूर्ण व स्वाभिमानी जीवन जगू शकणार नाही हे सत्य व सर्वमान्य आहे. तळागळातील सर्वांपर्यंत शिक्षण पोहोचावे यासाठी शासकीय, निमशासकीय आणि विविध स्तरावरून आतापर्यंत अनेक प्रयत्न झालेले आहेत. शिक्षणाची व्याप्ती, शिक्षणाचा प्रसार समाजाच्या सर्वच स्तरापर्यंत होत असताना दिसून येत आहे. महाविद्यालयीन शिक्षणाची संधी ही आपल्या देशातील सर्व समाजातील

गटापर्यंत पोहोचवण्याचे कार्य शासनामार्फत होत आहेत, परंतु तरी ही आजमितिला दर्जेदार शिक्षण सर्वच विद्यार्थ्यापर्यंत पोहोचले नाही ही वस्तुस्थिती आहे.

**शिक्षणाचा अर्थ:** शिक्षण ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. परंतु नैसर्गिक प्रक्रिया असली तरी समाजामध्ये सफलतेने, कुशलतेने जीवन व्यतीत करण्यासाठी व्यक्तीला निसर्गप्राप्त शिक्षणावर विसंबून राहता येणार नाही. अनेक गोष्टी ह्या जाणीवपूर्वक, प्रयत्नपूर्वक शिकाव्याच लागतात. देशात प्राचीन काळापासून ज्ञानार्जन व ज्ञानदानाची परंपरा चालत आलेली आहे व तिचा काळानुसार विकासही होत आहे. आज संगणकाच्या युगात शिक्षणाने विकासाची मोठी झेप घेतलेली आहे.

**शिक्षणाची व्याख्या:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर- 'व्यक्तीला जाणीव देते ते शिक्षण होय'. स्वामी विवेकानंद- ' ज्या शिक्षणाने माणूस जीवनात आपल्या पायावर उभा राहू शकतो तेच खरे शिक्षण' डॉ. बाबासाहेब आंबेडकर- ' जे शिक्षण माणूस घडविते तेच खरे शिक्षण होय.'

**शिक्षणाचे महत्त्व:** समाजामध्ये शिक्षणाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षणाच्या माध्यमातूनच व्यक्ती, समाज, राष्ट्र याची प्रगती होते. शिक्षणाशिवाय कोणतीही व्यक्ती समृद्ध परिपूर्ण व स्वाभिमानी जीवन जगू शकतच नाही. शिक्षण ही प्रकाशित, प्रबुद्ध आणि समर्थ करण्याची प्रक्रिया आहे. समाजाची व राष्ट्राची प्रगती होण्यासाठी व शिक्षणाचे सार्वत्रिकरण होण्यासाठी मुले व मुली या दोघांनीही शिक्षण मिळणे गरजेचे आहे .

**शोध निबंधाची व्याप्ती:** प्रस्तुत शोध निबंधाचे अध्ययन क्षेत्र छ.संभाजीनगर जिल्हामधील वरूडकाजी पंचायत समिती गणातील जयपूर, बनगाव,व गेवराई कुबेर.. ह्या तीन ग्रामीण भागातील क्षेत्रापुरतेच मर्यादित आहे.

**वरुडकाजी:** छ.संभाजीनगर जिल्ह्यामधील छ. संभाजीनगर तालुक्यांतर्गत वरुड काजी हे गाव आहे. वरुडकाजी हे गाव पंचायत समिती गण म्हणून ओळखले जाते.

**साक्षरता:** २०११ मध्ये वरुडकाजी गावाचे साक्षरतेचे प्रमाण महाराष्ट्राच्या ८२.३४ टक्के तुलनेत ७१.७४ टक्के होते. पुरुष साक्षरता ८३.८३ टक्के, तर महिला साक्षरता प्रमाण ५९.५२आहे. वरुडकाजी पंचायत समिती गण म्हणून ओळखले जाणाऱ्या या पंचायत समिती गणांमध्ये एकूण दहा ग्रामीण गावे आहेत. त्यापैकी **जयपुर, बनगाव व गेवराई कुबेर** ही तीन ग्रामीण गावे शोध निबंधासाठी घेण्यात आलेली आहेत.

**उद्दिष्टे:** सदरील शोध निबंधाचे खालील प्रमाणे उद्दिष्टे आहेत १) ग्रामीण मुलींच्या सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे. २) ग्रामीण मुलींच्या शिक्षणात येणाऱ्या अडथळ्यांचा अभ्यास करणे. ३) ग्रामीण मुलींच्या विविध समस्यामधील लिंगभेदाचा परिणाम अभ्यासणे.

**गृहीतकृत्य:** १_ग्रामीण मुलींची सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा मागासलेली दिसून येते. २) ग्रामीण मुलींना शिक्षण घेत असताना अनेक समस्यांना, अडथळ्यांना सामोरे जावे लागते.

**शोध निबंधाचे साहित्य:** संबंधित संशोधनपर शोध निबंध तयार करत असताना 'वर्णनात्मक संशोधन आराखडा' वापरण्यात आलेला असून प्राथमिक स्रोत व दुय्यम स्रोत याचा वापर करण्यात आलेला आहे.

**नमुना निवड:** शोधनिबंधासाठी निवडण्यात आलेल्या विश्वाचा किंवा समग्रचा संपूर्णपणे अभ्यास करणे शक्य नसते. कारण समग्राचा पूर्ण अभ्यास करण्याकरता लागणारा वेळ हा जास्त असल्याकारणाने व समग्र मोठा असेल तर समग्राची संपूर्ण माहिती घेणे अशक्य बाब असल्याने संपूर्ण समग्राचा अभ्यास करणे ऐवजी समग्रातील निवडक घटकाकडून जी माहिती जमा केली जाते., त्या घटकाच्या समूहाला 'नमुना' असे म्हणतात. गैर संभवता नमुना निवड अंतर्गत, सहेतूक नमुना निवड पद्धतीचा वापर केलेला आहे.
जयपुर, बनगाव व गेवराई कुबेर या गावातील माध्यमिक व उच्च माध्यमिक ग्रामीण मुलींची शैक्षणिक स्थितीचा अभ्यास मुलाखत अनुसूचित द्वारे करण्यात आलेला आहे. एकूण ५० ग्रामीण मुलींची माहिती संकलित करण्यात आली आहे.

**प्राथमिक स्रोत:** प्राथमिक तथ्य संकलनात संशोधिकेने स्वतः अध्ययन क्षेत्रात जाऊन समस्येच्या संबंधित माहिती, मुलाखत अनुसूची प्रश्नावली व निरीक्षण इत्यादीच्या सहाय्याने जमा केलेली आहे.

**दुय्यम स्रोत:** यामध्ये संदर्भ ग्रंथ, लेख, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, पी.एचडी चे प्रबंध, जर्नल्स, शासकीय अहवाल, व इंटरनेट इत्यादीचा समावेश करण्यात आलेला आहे.

**तथ्यांचे विश्लेषण :**

**ग्रामीण मुलींच्या सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास:** १) ग्रामीण मुलींच्या कुटुंबांची व्यवसायिक स्थितीचे अध्ययन केले असता असे दिसून येते की, मोठ्या प्रमाणावरील कुटुंबे म्हणजे १२ टक्के शेती, ६६ टक्के मजुरी, व २२ टक्के इतर कार्य, करणाऱ्या व्यवसायात गुंतलेली दिसून येतात. २) ग्रामीण मुलींच्या कुटुंबातील स्त्री- पुरुषांचे शैक्षणिक प्रमाण असंतुलित दिसून आले. या मुलींच्या कुटुंबामध्ये निरक्षरांचे प्रमाण पुरुषांमध्ये ९.४५ टक्के तर स्त्रियांमध्ये १४.५३ टक्के म्हणजे स्त्रियांचे निरक्षरांचे प्रमाण सर्वात जास्त दिसून येते. ३) शिक्षण घेतलेल्या पुरुषांची टक्केवारी ६५ टक्के तर स्त्रियांची टक्केवारी ४८.८० टक्के एवढी आहे. ४)ग्रामीण भागातील ५० नमुना मुलीपैकी ३३ (६६ टक्के) मुलींचे कुटुंबप्रमुख मजुरी, शेती+मजुरी ०६(१२ टक्के), शेती +जोडधंदा ०४ (०८ टक्के), मजुरी+ जोडधंदा करणारे, ०५(१० टक्के) कुटुंब आहेत. तर ०२ (०४ टक्के ) मुलीचे कुटुंबे ही दुकाने असणारे आहेत. तसेच खाजगी सरकारी नोकरी असणारे एकही मुलीचे कुटुंब आढळून आले नाही. ५) ग्रामीण भागातील मुलींच्या घराचे स्वरूप पाहता विटा मातीच्या भिंती व पत्रे असलेले घरांचे प्रमाण २१ (४२ टक्के ) सर्वाधिक, तर त्या पाठोपाठ सिमेंट, विटा, दगड, विटाच्या भिंती व पत्रे असलेले घरांचे प्रमाण ११ (२२ टक्के) अत्यंत अल्प आहे. ६) ग्रामीण भागातील मुलींच्या कुटुंबांची सामाजिक स्थितीचे अध्ययन केले असता सामाजिक स्थिती वेगवेगळी असल्याचे दिसून आली. प्रत्येकाच्या चालीरीती, रूढी –

परंपरा, धार्मिक स्थिती, देवदेवता विषयक स्थिती वेगवेगळी असल्याचे दिसून येते. येथे बहुसंख्य समाज देववादी, श्रद्धाळू व भक्ती भावनाने पूजा करणारे आहे. थोडक्यात ग्रामीण भागातील मुलींच्या कुटुंबाकडे शेतजमीन नाही, २४ टक्के अल्पभूधारक, ७६ टक्के भूमिहीन कुटुंबे आहेत. सर्वाधिक भूमिहीन कुटुंबे असून असून त्यांना आपली उपजीविका भागविण्यासाठी मजुरी किंवा इतर व्यवसाय करावी लागतात. त्यांची आर्थिक परिस्थिती तितकीशी चांगली नाही. तसेच देववादी प्रवृत्ती जास्त दिसून येते.

**ग्रामीण मुलींच्या शिक्षणात येणाऱ्या अडथळयांचा अभ्यास.**१) जयपुर व बनगाव या गावामध्ये पूर्व प्राथमिक व प्राथमिक पर्यंत शाळा आहेत. तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची सुविधा या गावांमध्ये नाही. गेवराई कुबेर या गावांमध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक उच्च माध्यमिक शाळेची सुविधा उपलब्ध आहे. जयपुर पासून ०४ किलोमीटर बनगाव पासून ०१ किलोमीटर व गेवराई कुबेर पासून ०४ किलोमीटर अंतरावर माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा आहे. २) माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या ही ६२ टक्के सर्वाधिक तर उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण ३८ टक्के म्हणजे कमी आहे. ३) ग्रामीण भागातील घरापासून जवळ शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या ७८ टक्के, तर बाहेरगावी नातेवाईकाकडे राहून शिक्षण घेणारे मुलींची संख्या २२ टक्के अत्यंत अल्प आहे. ४) शाळेतील पाठ्यक्रम व भौतिक सुविधा सर्व चांगले आहेत असे म्हणणाऱ्यांचे मुलींचे ३२(६४ टक्के )प्रमाण सर्वाधिक व त्या पाठोपाठ सरासरी १८ (३६ टक्के) म्हणणाऱ्या मुलींचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. ५) जयपुर बनगाव व गेवराई कुबेर या ग्रामीण गावात शासकीय बसची सुविधा उपलब्ध नाही. ५० नमुना मुलींपैकी ५० ही मुलींची प्रतिक्रिया १०० टक्के शासकीय बसचे सुविधा नाही व खाजगी वाहतूक वाहनांची सुविधा आहे अशी आलेली आहे. ६) ग्रामीण मुलीचे १४ (२८ टक्के) मत, पालकांची शिक्षण देण्यासाठी सर्व खर्च करण्याची तयारी आहे तर २५ (५० टक्के) मुलींचे मत या मताच्या विरोधात दिसून येते ११ (२२ टक्के) मुलींचे मत सांगता येत नाही असे आहे. ७) उत्तरदात्याला शिक्षण देण्याकरिता शिक्षणावरील खर्च पालक का करू शकत नाही याचे सर्वात जास्त कारण मुलींच्या कुटुंबांची बिकट आर्थिक परिस्थिती म्हणणाऱ्या मुलींचे प्रमाण ५४ टक्के, तर शिक्षणाची पालकांना नावड म्हणणाऱ्या १० टक्के व शिकून नोकरी लागत नाही हा पालकाच्या दृष्टिकोन सांगणाऱ्या मुलींचे प्रमाण ०८ टक्के म्हणजेच आर्थिक परिस्थितीमुळे म्हणणाऱ्या मुलींपेक्षा ४६ टक्क्यांनी प्रमाण कमी आहे असे दिसून येते.

**थोडक्यात ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद:**

**शिक्षणाचा असमान दर्जा:** ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा दर्जा समान नाही. ग्रामीण भागात सोयी सुविधा अध्यापन इमारत इत्यादी बाबतीत अनेक अडचणी दिसून येते. ग्रामीण भागातून मुलींचे शिक्षणाला फारसे महत्त्व दिले जात नाही. त्या तुलनेत शहरी भाग काही प्रमाणात विकसित आहे.

**भौतिक सुविधांचा अभाव:** मुलांना शाळेचे आकर्षण वाटावे अशा सुविधा शाळेत असणे गरजेचे आहे. काही शाळांचा अपवाद सोडला तर अनेक शाळांना भौतिक सुविधांची कमतरता दिसून येते. ग्रामीण भागातील मुलींकरता स्वतंत्र वर्ग, बैठक व्यवस्था, पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्था, क्रीडांगण, प्रयोगशाळा, शालेय इमारत, ग्रंथालय, स्वच्छतागृह, स्त्री शिक्षिका इत्यादी बाबींची कमतरता असल्याकारणाने मुलींना शाळेत नकोसे वाटते.

**पालकांचे दारिद्य:** भारत हा कृषिप्रधान देश आहे. बहुसंख्य जनता ही ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागात बऱ्याच प्रमाणात दारिद्र्याची समस्या आढळते. घराला आर्थिक हातभार लावण्यासाठी मुलींना सोबत कामाला नेले जाते. ग्रामीण मुलींची आर्थिक परिस्थिती जर ठीक नसली तर त्यांच्या आई-वडिलांना दोघांनाही कामावर जावे लागते. अशावेळी मुलगी म्हणून तिला घरातील सर्व कामे करावे लागतात व त्यांच्या लहान भावंडांना सांभाळावे लागते.

**गळतीची ही समस्या:** ग्रामीण मुलींच्या शिक्षणात गळती ही समस्या मोठ्या प्रमाणात आहे. चौथी सातवी नंतर मुलींची गळतीची समस्या जास्त जाणवते. बरेच पालक आपल्या मुली मोठ्या झाल्यानंतर त्यांना मुलांसोबतच्या शाळेत पाठवीत नाहीत. तर काही मुली वारंवार एकाच वर्गात नापास होत राहिल्यामुळे शाळा सोडतात.

**पालकांची उदासीनत:** पालक जर निरक्षर, अडवणी, अज्ञानी, असल्यास मुलींच्या शिक्षणाबाबत उदासीन दिसून येतात. मुली म्हणजे परक्याचे धन तिला शिकून शेवटी ती दुसऱ्याच्याच घरी जाणार, त्यामुळे तिला शिकवून फायदा काय? त्यामुळे मुलीच्या शिक्षणाला अडथळा निर्माण होतो.

**शैक्षणिक सुविधाचा अभाव:** गावात शैक्षणिक सुविधा नसल्यास व घरापासून शाळेचे अंतर दूर असल्यास पालक अशावेळी मुलींना शाळेत पाठवण्यास नाकार देतात. दळणवळणाच्या सुविधा अभावी देखील त्यांना अडचणी निर्माण होतात.परिणामी दळणवळणाच्या अभावी मुली शाळेत जात नाहीत

**लैंगिक अत्याचाराची समस्या:** आधुनिक काळात महिलांच्या संदर्भात लैंगिक अत्याचाराची घटना सातत्याने समोर येत आहेत. ग्रामीण भागात सुद्धा अशा घटना घडत असल्याकारणाने त्यांचा परिणाम पालकाच्या मानसिकतेवर होत आहे. याचा परिणाम शिक्षणामध्ये खंड पडत आहे. लैंगिक अत्याचाराच्या घटना मुळे ग्रामीण कुटुंब उध्वस्त होण्याची भीती असते. म्हणून पालक मुलींना माध्यमिक व महाविद्यालयीन व उच्च शिक्षणासाठी बाहेर पाठवण्यासाठी तयार होत नाहीत.

**लिंगभेद**: लिंगभेद म्हणजे एखाद्या गटाला किंवा व्यक्तीला पक्षपातीपणा किंवा पक्षपाती वर्तन दाखवण्याची कृती. घरात याचे एक उदाहरण असे असू शकते की मुलींकडून स्वयंपाक आणि साफसफाईसारख्या घरगुती कामांमध्ये मदत करण्याची अपेक्षा केली जाऊ शकते. अशा भूमिकांबद्दलचा एक सामान्यीकृत दृष्टिकोन किंवा पूर्वकल्पना आहे. रूढीभेद सकारात्मक किंवा नकारात्मक असू शकतात. लिंगभेदाचा ग्रामीण मुलींवर शिक्षण, आरोग्य, आर्थिक आणि सामाजिक स्तरावर गंभीर परिणाम होतो, ज्यामुळे त्यांना कुपोषण, कमी शिक्षण, बालविवाह, हिंसा आणि रोजगाराच्या संधींचा अभाव यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो

**ग्रामीण स्त्री शिक्षण:** ग्रामीण भागाचा सर्वांत मोठा शैक्षणिक प्रश्न आहे तो शिक्षणाच्या सार्वतीकरणाचा. शिक्षण सर्व मुलापर्यंत पोहोचलेले नाही. अनेक मुले आणि त्यातही विशेषतः मुली शिक्षणापासून पूर्णतः वंचितच आहेत. मुलीच्या शिक्षणाची अवस्था ग्रामीण भागात आजही बिकट आहे. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीमध्ये स्त्रियांचा ग्रामीण विकासाचा प्रश्न आणि ग्रामीण भागातील शिक्षणाचा प्रश्न यांचा विचार करण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आह. ग्रामीण भागच्या विकासाची परवड नेहमी झालेली आहे. ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा खेडोपाडी गेली. तथापि ग्रामीण जीवन आणि नागरी जीवन यांच्यातील संख्यात्मक तसेच गुणात्मक विकासाचे अंतर वाढतच गेले. विषमताची उंचच उंच, रुंदच रुंद व लांबच लांब अशी भिंत दोन्हीच्या मध्ये उभी राहिली. स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण ग्रामीण भागात कमी आहे. ग्रामीण स्त्रियांच्या शिक्षणात अनेक अडथळे आहेत. आई-वडिलांचे लक्ष शिक्षणाच्या बाबतीत मुली पेक्षा मुलांकडे जास्त असते. आठवी ते दहावीपर्यंत मुलींचे हळूहळू गळती होत जाते. पदवी स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या ही कमी प्रमाणात दिसून येते. म्हणूनच शिक्षण हा एकमेव असा मार्ग आहे ज्याने स्त्री जागृती होऊ शकते. भारतात स्त्री शिक्षणाचा प्रसार प्रामुख्याने शहरी भागात झाला असून ग्रामीण स्त्रिया अधिक प्रमाणात शिक्षणापासून वंचित आहेत. डॉ. राधाकृष्णन यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व सांगताना म्हटले की, "सर्वसाधारण शिक्षण स्त्री – पुरुषांना द्यायचे असेल, तर ही संधी प्रथम स्त्रीला दिली पाहिजे. कारण संस्कृती संक्रमण व संवर्धन हे स्त्री शिक्षणामुळेच होते. देशाचा, समाजाचा, गावाचा व घरचा जर विकास करायचा असेल तर मुलावर बालपणी योग्य संस्कार होण्यासाठी स्त्री शिक्षण फार महत्त्वाचे आहे." शिक्षणामुळे स्त्रियांना आपल्या व्यक्तिमत्त्वाची, स्वायतेची जाणीव होते. स्त्री फक्त माता व पत्नी एवढ्यापुरतेच मर्यादित भूमिकेत न राहता, बदलत्या समाजाच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी तिला स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणणे आवश्यक आहे. कुटुंबाच्या व पर्यायाने समाज व राष्ट्राच्या स्त्रियांना घडवण्यासाठी व वेगवेगळ्या उद्दिष्टासाठी ग्रामीण स्त्री शिक्षणाची गरज आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ८० टक्के लोकसंख्या वाड्यावस्त्यांत व खेड्यापाड्यात असलेली दिसतात. आपल्या देशातील या बांधवाकडे डोळसपणे पाहिले तर अजूनही अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी, चालीरीती, परंपरा आणि दारिद्र्यातून हा समाज पूर्णतः बाहेर पडू शकला नाही, ही बाब निश्चितच सर्वांना अस्वस्थ करणारी आहे. अजूनही ७० टक्के जनता दारिद्र रेषेखाली जीवन जगत आहे. दुर्गम भागातील समाजाच्या शिक्षणाची समस्या जटील बनलेली आहे. आधुनिक तंत्रज्ञान व विविध क्षेत्रातील वाढते ज्ञान याची फळे ग्रामीण जनतेला अद्यापही चाखायला मिळालेली नाहीत.

**गृहीतकृत्याची पडताळणी: १.**ग्रामीण भागातील मुलींच्या कुटुंबांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती मागासलेली दिसून येते, हे सत्य ठरले आहे. २. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, हे गृहीतकृत्य सत्य ठरले आहे.

**शिफारशी:** ग्रामीण भागातील मुलींना गाव पातळीवर शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा दळणवळणाच्या समस्यांमुळे अनेक अडचणी निर्माण होतात. त्यासाठी शासनाने सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न केले पाहिजे. ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी शैक्षणिक प्रगती मधून सामाजिक प्रगती होण्यासाठी विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे याकरिता महाराष्ट्र शासनामार्फत विविध शासकीय योजना शिष्यवृत्ती देण्यात येतात, परंतु विविध शासकीय योजनांची माहिती ग्रामीण भागातील विद्यार्थ्यापर्यंत पोहोचली जात नाही. माहिती करून देण्यासाठी विविध स्वयंसेवी संस्था मार्फत या विद्यार्थ्यापर्यंत शासकीय योजनांची शिष्यवृत्ती त्यांची माहिती देवून त्यांचे फायदे, विद्यार्थ्यांना समजावून सांगावेत जेणेकरून त्यांची शैक्षणिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

**समारोप:** एकंदरीतच महिला शिक्षणासाठी समाजाचा महिलांच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा दुय्यम आहे. त्याचबरोबर त्यांच्या शिक्षणात सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सुविधांचा अभाव दिसून येतो. शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी, वाहतुकीच्या साधनाचा अभाव आणि वाढत्या लैंगिक अत्याचाराच्या घटना या न त्या कारणाने महिलांच्या शिक्षणावर फार मोठा विपरीत प्रभाव पडत असताना दिसून येतो. महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. महिलांचे जर सबलीकरण करायचे असेल तर स्त्रीला शिक्षण देणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

१) डॉ. सौ. उज्वला. के. सदावर्ते, (२००६), 'मराठवाडा आणि स्त्री शिक्षण' आदित्य पब्लिकेशन, नांदेड.
२) सुरवसे एम. पी. (१९८९), "ग्रामीण शिक्षण आणि ग्रामीण विकास", नूतन प्रकाशन, पुणे.
३) ओकले,ऐन.,(१९७२),'सेक्स जेंडर अंड सोसायटी,' एशगेट पब्लिशिंग लिमिटेड, इंग्लंड.
४) डॉ दिलीप खैरनार., 'आधुनिक भारतातील सामाजिक समस्या,' चेतन्य प्रकाशन, औरंगाबाद.
५) इंटरनेट.(भारताची जनगणना २००१- २०११)

# डिजिटल युगात सायबर सुरक्षा, ऑनलाइन छळ आणि डिजिटल साक्षरतेचे महिलांसमोरील आव्हाने

**डॉ. सुधीर आश्रुबा येवले** प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख कालिकादेवी महाविद्यालय, शिरूर (का), बीड
**डॉ. दत्ता तंगलवाड** महिला कला महाविद्यालय, गेवराई, बीड.
**प्रा. चित्ररेखा सुधीर येवले** समाजशास्त्र विभाग, स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड.

**सारांश:** आधुनिक डिजिटल युगात डिजिटल प्लॅटफॉर्म वापरताना महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. हे संशोधन या समस्येवरील तांत्रिक उपायांबद्दल महिलांना किती माहिती आहे, यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करते. तसेच, सायबर सुरक्षेच्या उपायांबद्दल त्यांची जागरूकता आणि अशा ऑनलाइन छळाच्या प्रकरणांमध्ये कायदेशीर मदत मिळवण्याबद्दल महिलांना किती माहिती आहे, यावरही हे संशोधन लक्ष केंद्रित करते. या संशोधन समस्येसाठी आवश्यक डेटा मिळवण्यासाठी, संशोधकाने उद्देशपूर्ण नमुना निवड पद्धतीचा वापर केला. पूर्वनिर्धारित प्रश्नावलीच्या मदतीने संशोधकाने प्राथमिक माहिती गोळा केली. या अभ्यासाच्या निष्कर्षांवरून असे दिसून येते की बहुतेक महिलांना तांत्रिक उपायांबद्दल पुरेशी माहिती नाही आणि या समस्यांसाठी कायदेशीर मदत मिळवण्याबाबत जागरूकता मोहीम राबवण्याची गरज आहे.
**मुख्य शब्द**: सोशल मीडिया, युवक, महिला आणि सोशल मीडिया, सायबर सुरक्षा, ऑनलाइन छळ, डिजिटल साक्षरत

**प्रस्तावना:** सध्याच्या डिजिटल युगात, महिला इंटरनेटवर सोशल मीडियावरील सामग्रीचा वापर करत आहेत. या स्पर्धात्मक जगात त्या या तांत्रिक प्रगतीचा आणि डिजिटल फायद्याचा लाभ घेत आहेत. परंतु त्याच वेळी, या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या मुक्त आणि न्याय्य वापरामध्ये अनेक आव्हाने आहेत. सायबरसुरक्षा म्हणजे आपण आपले संगणक आणि डेटा अनधिकृत प्रवेश, चोरी, नुकसान किंवा व्यत्ययापासून संरक्षित करणे. त्यामुळे, या अभ्यासात, संशोधकाने त्या आव्हानांचा अभ्यास करण्याचा आणि त्यावर संभाव्य उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. विविध प्रदेशांमध्ये महिलांना ऑनलाइन छळापासून संरक्षण देण्यासाठी विद्यमान कायदेशीर चौकटींच्या परिणामकारकतेचे मूल्यांकन करणाऱ्या सर्वसमावेशक अभ्यासाची आवश्यकता आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि इतर ऑनलाइन सामग्री प्रदान करणारी साधने या प्लॅटफॉर्मचा वापर करताना महिलांना येणाऱ्या समस्यांवर काम करत आहेत, आणि या समस्यांचा सामना करण्यासाठी सर्व संभाव्य तांत्रिक उपाय प्रदान करण्याचा प्रयत्न करत आहेत. या अभ्यासात, संशोधकाने त्यांची परिणामकारकता आणि ग्रामीण व शहरी वापरकर्त्यांमधील तफावत, तसेच साक्षरतेच्या पातळीवर आधारित काही विभाजन आहे का, याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व तांत्रिक प्रगती तेव्हाच उपयुक्त ठरेल जेव्हा वापरकर्ते त्यांचा अचूक वापर करतील. अन्यथा, त्रुटींमुळे पुन्हा गैरवापर, सायबरसुरक्षेचे धोके आणि इंटरनेटवरील डेटा गोपनीयतेबद्दल चिंता निर्माण होऊ शकते. ऑनलाइन छळाचे मानसिक परिणाम म्हणजे चिंता, उदास वाटणे, नैराश्य आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मपासून, विशेषतः सोशल मीडियापासून दूर राहणे. त्यामुळे या डिजिटल युगाच्या महिलांवर होणाऱ्या दीर्घकालीन मानसिक परिणामांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

**पार्श्वभूमी आढावा: सिट्रॉन, डी. के.** (२०१४): डॅनियल सिट्रॉन यांनी ऑनलाइन छळ आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीची तक्रार करण्यासाठी यंत्रणा पुरवणाऱ्या ऑनलाइन साधने आणि प्लॅटफॉर्मवर लक्ष केंद्रित केले. त्या यावर जोर देतात की, इंटरनेट वापरताना लोकांना त्यांच्या वंश, लिंग किंवा इतर ओळखीमुळे गंभीर छळाला सामोरे जावे लागू शकते. आणि या गोष्टी वास्तविक जगातील द्वेषपूर्ण गुन्ह्यांसारख्याच आहेत, त्यामुळे त्या गांभीर्याने घेतल्या पाहिजेत. त्या पीडितांना मदत करण्यासाठी आणि इंटरनेट प्रत्येकासाठी एक सुरक्षित ठिकाण बनवण्यासाठी चांगल्या कायद्यांची आणि संरक्षणाची गरज आहे याबद्दलही बोलतात. **क्लार्क, सी.** (२०१९): या अभ्यासात ऑनलाइन छळाचा सामना करण्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भूमिकेवर आणि महिलांविरुद्धच्या ऑनलाइन गैरप्रकारांविरुद्ध लढण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता किती प्रभावीपणे कार्य करते यावर काम केले गेले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांचा दैनंदिन वापर आणि सहभाग वाढत आहे, ती मानवी समाजाचा अविभाज्य भाग बनणार आहे, त्यामुळे वर नमूद केलेल्या समस्येवरील तांत्रिक उपायांवर प्रकाश टाकणारा हा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. **मॉरिसन, एम., आणि जॅनकोविच, एल. (२०२१):** मॉरिसन आणि जॅनकोविच चर्चा करतात की तंत्रज्ञान महिलांना ऑनलाइन छळापासून स्वतःचे संरक्षण करण्यास कशी मदत करू शकते. ते विविध साधने आणि संसाधनांचा अभ्यास करतात, जे महिलांना सायबरबुलिंग आणि गैरवर्तनाविरुद्ध बचाव करण्यासाठी सक्षम करू शकतात. लेखिका सुरक्षित ऑनलाइन जागा निर्माण करण्यासाठी आणि महिलांना छळाविरुद्ध आवाज उठवण्याचा आत्मविश्वास देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या महत्त्वावरही लक्ष केंद्रित करतात. त्यांचा विश्वास आहे की, योग्य साधनांसह, महिला ऑनलाइन धोक्यांचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करू शकतात आणि त्यांना प्रतिसाद देऊ शकतात.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये:** १. सायबरसुरक्षेच्या क्षेत्रात महिलांना सामोऱ्या जाणाऱ्या आव्हानांचा अभ्यास करणे; २. ऑनलाइन गैरवर्तनापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी असलेल्या तांत्रिक उपायांबद्दल महिलांमधील जागरूकता पातळी शोधणे: ३. ऑनलाइन छळापासून महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या सध्याच्या कायदेशीर चौकटीच्या परिणामकारकतेबद्दल महिलांना किती आत्मविश्वास आहे, याचा अभ्यास करणे.

**गृहितके:** १. महिलांना ऑनलाइन छळ, गैरवर्तन आणि सायबरबुलिंगचा सामना करावा लागतो. २. महिलांवरील ऑनलाइन छळावर तंत्रज्ञानावर आधारित उपायांबद्दल महिलांमध्ये जागृतीचा अभाव आहे. ३. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर गैरवर्तन आणि छळाविरुद्ध आवाज उठवताना महिलांना सुरक्षित वाटत नाही.

**अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा:** प्रस्तुत संशोधन कार्य महिलांच्या ऑनलाइन छळावर, महिलांच्या सायबर सुरक्षेवर आणि त्यांच्या डिजिटल साक्षरतेवर लक्ष केंद्रित करते, त्यामुळे प्रतिसाद केवळ महिला प्रतिसादकर्त्यांकडूनच गोळा करण्यात आले. तसेच, प्रतिसादकर्त्यांचा वयोगट १८-३५ वर्षे आहे. या संशोधन कार्यात वृद्ध आणि अल्पवयीन प्रतिसादकर्त्यांच्या प्रतिसादांचा समावेश नाही.

**अभ्यासाची गरज आणि महत्त्व:** तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या या युगात प्रत्येक मानवाचे जीवन सुलभ आणि अधिक अत्याधुनिक झाले आहे. पण जर ही प्रगतीच अडचणींमध्ये बदलली, तर जीवन विषारी होईल. प्यू रिसर्च सेंटरच्या (२०२१) अहवालानुसार, महिला, विशेषतः तरुण महिला, ऑनलाइन छळाच्या गंभीर प्रकारांना, जसे की लैंगिक छळ आणि शारीरिक हिंसेच्या धमक्यांना, बळी पडण्याची शक्यता अधिक असते. हा अभ्यास मराठवाडा प्रदेशातील बीड मधील महिलांचा या समस्येबाबत अभ्यास केला आहे. विविध शैक्षणिक पार्श्वभूमी आणि विविध उत्पन्न गटांतील महिलांकडून प्रतिसाद गोळा केल्याने त्यांच्या समस्यांचे वेगळेपण समोर येते.

**अभ्यासाची कार्यपद्धती:** प्रस्तुत संशोधन कार्यात संशोधकाने प्राथमिक माहिती गोळा करून तिचे विश्लेषण केले. प्राथमिक माहितीसोबतच, संशोधकाने विविध शोधनिबंध, नियतकालिके आणि पुस्तकांमधून दुय्यम माहितीचाही वापर केला.

**नमुना निवड:** अभ्यासाची उद्दिष्ट्ये आणि गृहितकांनुसार संशोधकाने प्राथमिक माहिती गोळा केली. त्या माहिती संकलनासाठी, संशोधकाने एक संरचित प्रश्नावली तयार करून त्यासाठी स्वऐच्छिक नमुना निवड पद्धत अवलंबण्यात आली. एकूण ८० महिला प्रतिसादकर्त्यांकडून प्रतिसाद गोळा करण्यात आले.

**माहितीचे संकलन:** संशोधकाने या संशोधन क्षेत्रातील एकूण ८० प्रतिसादकर्त्यांची निवड केली आहे आणि गूगल फॉर्म्सच्या मदतीने, निवडलेल्या प्रतिसादकर्त्यांना एक पूर्वनिर्धारित प्रश्नावली पाठवून संबंधित प्राथमिक माहिती गोळा केली आहे. संशोधकाने विविध संशोधन नियतकालिके, मासिके आणि वेबसाइट्समधील संबंधित माहितीसाठी दुय्यम स्रोतांचाही संदर्भ घेतला. प्राथमिक माहिती गोळा केल्यानंतर, संशोधकाने संकलित केलेल्या माहितीची पडताळणी केली आणि नंतर अभ्यासाची गृहितके तपासण्यासाठी आणि या अभ्यासाच्या संशोधन समस्येवर संभाव्य उपाय शोधण्यासाठी तिचे विश्लेषण केले.

**विश्लेषण आणि स्पष्टीकरण:** प्रस्तुत अभ्यासातील प्रतिसादकर्त्यांना ते नियमितपणे सोशल मीडिया वापरतात की नाही आणि ते दररोज तिथे किती वेळ घालवतात, याबद्दल प्रश्न विचारण्यात आले. ॲम्नेस्टी इंटरनॅशनल इंडियाच्या (२०१८) एका संशोधन अहवालातून हे स्पष्टपणे दिसून येते की, भारतात ऑनलाइन छळाचा सामना केलेल्या बहुसंख्य महिलांनी पीडितेलाच दोष दिला जाईल या भीतीमुळे आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वासाच्या अभावामुळे या घटनांची तक्रार कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांकडे केली नाही. या संशोधनाचा प्राथमिक डेटा दर्शवितो की, ऑनलाइन सायबरसुरक्षा घटनांची तक्रार करताना महिलांना खालील सर्वात मोठ्या अडथळ्यांचा सामना करावा लागतो:

**सारणी: १ सायबर गुन्ह्याच्या घटनांची तक्रार करताना महिलांना येणारे अडथळे**

| अ.क्र. | अडथळाप्रकार | एकूण (८० पैकी ) | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | तक्रार कशी करावी याबद्दल माहितीची जाणीव परंतु माहितीचा अभाव | ७५ | ९३.७५ |
| २ | बदल्याच्या कारवाईची भीती | ४१ | ५१.२५ |
| ३ | अधिकारी/प्लॅटफॉर्मवर विश्वासाचा अभाव | ३५ | ४३.७५ |
| ४ | औपचारिक किंवा अनौपचारिक जागरूकता शिक्षण नाही | ८० | १०० |

**(बहुप्रतीसादक सारणी)**

सारणी क्रमांक ०१ वरून सायबर गुन्ह्याच्या घटनांची तक्रार करताना महिलांना कोणते कोणते अडथळे येतात ही अभ्यासले असता प्रतिसादक महिलांच्या मते तक्रार कशी करावी कोठे करावी हे माहीत नाही असे जवळपास ९३.७५ टक्के प्रतिसादक महिला सांगतात तर ४३.७५ टक्के महिला तक्रार केल्यास ज्यांच्याकडे तक्रार करून त्यांच्यावर विश्वास नसल्याचे बोलून दाखवले. तर ५१.२५ टक्के प्रतिसादक महिलांच्या मते,तक्रार केली तर त्याचा बदला म्हणून आपणावरच परत कार्येवाही होईल ही भीती बोलून दाखवली. तर १०० प्रतिसादक महिलांना या बाबतीत कोणतेही औपचारिक किंवा अनौपचारिक जागरूकता शिक्षण मिळालेले नाही.

**सायबर गुन्ह्याच्या घटनांची तक्रार करण्यासाठी** विविध तांत्रिक उपाय उपलब्ध आहेत, परंतु वापरकर्त्यांना त्यांची माहिती असल्यास ते उपयुक्त ठरतील. या अभ्यासात संशोधकाला असे आढळून आले की, वापरकर्त्यांचा एक मोठा वर्ग आक्षेपार्ह आणि अपमानास्पद सामग्रीची तक्रार करणे आणि गोपनीयता सेटिंग्ज योग्यरित्या सक्षम करणे यांसारख्या तांत्रिक उपायांशी परिचित नाही. जर त्यांना या उपायांची माहिती नसेल, तर ते अशा घटनांना अधिक बळी पडू शकतात. खालील सारणी विविध डिजिटल प्लॅटफॉर्मवरील रिपोर्ट पर्यायाच्या वापराविषयी आहे:

**सारणी क्र.:२ तक्रारीचा डिजिटल प्लॅटफॉर्मवरील रिपोर्ट पर्यायाच्या वापराविषयीची माहिती**

| अ.क्र. | तक्रारीचा डिजिटल प्लॅटफॉर्मवरील रिपोर्टसाठी पर्यायची माहिती | एकूण | प्रमाण ( टक्के) |
|---|---|---|---|
| १ | पुरेशी माहिती नाही | ३५ | ४३.७५ |
| २ | थोडी माहिती | २५ | ३१.२५ |
| ३ | मला याबद्दल पुरेशी माहिती आहे | २० | २५ |
| | **एकूण** | **८०** | **१००** |

**ठळक निरीक्षणे:** संशोधन अभ्यासावर आधारित संशोधन निष्कर्ष: १. सायबरसुरक्षेच्या बाबतीत उच्चशिक्षित महिलांना यावरीलतांत्रिक उपायांची अधिकजाणीव आहे परंतु माहितीचा आभाव आहे. २. जवळपास सर्वच महिला प्रतिसादकर्त्यांना महिलांच्या सायबरसुरक्षेबद्दल कोणतेही औपचारिक किंवा अनौपचारिक जागरूकता शिक्षण मिळाले नाही. ३. बहुतेक प्रतिसादकर्त्यांना त्यांच्या

खाजगी डेटाच्या आणि पोस्ट केलेल्या माहितीच्या संभाव्य गैरवापराबद्दल चिंता वाटते. ४. फेसबुक आणि इंस्टाग्रामसारखे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ऑनलाइन छळासाठी अधिक प्रवण आहेत. ५. प्रतिशोधाची भीती आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांवरील विश्वासाचा अभाव ही देखील महिला ऑनलाइन छळाविरुद्ध आवाज न उचलण्यामागील कारणे आहेत.

**निष्कर्ष:** विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्म वापरताना महिलांना गंभीर छळ आणि गोपनीयतेच्या समस्यांना सामोरे जावे लागते. कालांतराने अनेक तांत्रिक उपाय आले आहेत, परंतु त्याबद्दल वापरकर्त्यांमध्ये जागृतीचा अभाव आहे. जवळपास अर्धे वापरकर्ते मूलभूत गोपनीयता सेटिंग्जशी परिचित नाहीत. परिणामी, त्या एकतर डिजिटल प्लॅटफॉर्मपासून दूर राहणे निवडतात किंवा सायबर सुरक्षा आणि ऑनलाइन छळाची काळजी न घेता त्यांचा वापर करतात. जर औपचारिक किंवा अनौपचारिक शिक्षणाद्वारे ही उणीव भरून काढली गेली, तर या डिजिटल युगात महिलांना कमी आव्हानांना सामोरे जावे लागेल आणि डिजिटल जग त्यांच्यासाठी एक सुरक्षित आणि अधिक आरामदायक ठिकाण बनेल. डिजिटल प्लॅटफॉर्म वापरताना कधीकधी महिलांना ऑनलाइन छळाचा सामना करावा लागतो, परंतु त्यांना त्यावरच्या तांत्रिक उपायांची माहिती नसते. त्यामुळे, याबद्दल जागरूकता पसरवण्याची गरज आहे. निष्पक्ष आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आणखी एक आव्हान आहे. १. अद्ययावत मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स सायबरसुरक्षा आणि महिलांचे ऑनलाइन छळापासून संरक्षण करण्यासाठी मदत करतील, परंतु त्यासाठी त्यांच्या वापराचे प्रशिक्षण आणि त्याबद्दल जागरूकता मोहीम आवश्यक आहे. २. प्रतिसादकर्त्यांना असे वाटते की, महिलांचा ऑनलाइन छळ रोखण्यासाठी सध्याचे कायदे आणि नियामक प्रणाली पुरेशा सक्षम नाहीत. त्यामुळे, हे डिजिटल जग महिलांसाठी अधिक आरामदायक बनवण्यासाठी मोठे सुधारणा आणि विश्वसनीय अंमलबजावणी आवश्यक आहे. ३. सामाजिक नियम, धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक मूल्ये यांसारखे सामाजिक नियामक घटक महिलांचा ऑनलाइन छळ कमी करण्यासाठी आणि महिलांची सायबरसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतात. त्यासाठी डिजिटल सामाजिकीकरण प्रक्रिया अधिक समृद्ध करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


१) देशपांडे, नी. (२०१९). महिला आणि सामाजिक परिवर्तन. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.
२) पाटील, स. र. (२०२०). डिजिटल युग आणि भारतीय समाज. औरंगाबाद: विद्या प्रकाशन
३) कुलकर्णी, म. (२०१८). महिला सक्षमीकरण: संकल्पना आणि वास्तव. नागपूर: राष्ट्रदीप प्रकाशन
४) जोशी, अ. (२०२१). डिजिटल माध्यमे आणि महिलांची सुरक्षितता. समाजशास्त्र दर्पण, १२(२), ४५—५२.
५) महाराष्ट्र शासन. (२०२०). महिला व बालविकास विभागाचा वार्षिक अहवाल. मुंबई: शासन प्रकाशन.
६) देशमुख, प्रा. र. (२०१९). सायबर गुन्हे आणि महिला. भारतीय समाजशास्त्र संशोधन पत्रिका, १०(१), ६०—६८.
७) Amnesty International India. (2018). Trolling, Abuse, and Harassment: The Online Violence Faced by Indian Women.
८) Chertoff, M., & Simon, T. (2015). The Impact of Cybersecurity on Global Economy. Journal of Global Security Studies, 1(2), 105-116.
९) Citron, D. K. (2014). Hate Crimes in Cyberspace. Harvard University Press.
१०) Clarke, C. (2019). The role of artificial intelligence in combating online harassment. Journal of Digital Ethics, 2(1), 15-29. 11. 11.
११) Morrison, M., & Jancovich, L. (2021). Empowering women through technology: Tools for self-defence against online harassment. Women's Studies International Forum, 84, 102372.
१२) Castells, M. (2010). The Rise of the Network Society. Oxford: Blackwell Publishing. United Nations. (2020). Gender Equality and Women's Empowerment in the Digital Age. New York: UN Publications.
१३) World Economic Forum. (2021). Global Gender Gap Report. Geneva: WEF.
१४) Gurumurthy, A., & Chami, N. (2017). Digital Technologies and Feminist Futures. Bangalore: IT for Change.
१५) OECD. (2018). Bridging the Digital Gender Divide. Paris: OECD Publishing.
१६) Henry, N., & Powell, A. (2016). Technology-facilitated sexual violence: A literature review. Violence Against Women, 22(4), 397-418.
१७) National Crime Records Bureau (NCRB). (2021). Crime in India Report. New Delhi: Government of India.
१८) Chertoff, M., & Simon, T. (2015). The Impact of Cybersecurity on Global Economy. Journal of Global Security Studies, 1(2), 105-116.


# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण महिलांमध्ये प्रसूतिपूर्व काळजीचे ज्ञान आणि वापराचे सामाजिक मूल्यमापन

**डॉ. बालासाहेब बब्रुवान शेंडगे** प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर. (महाराष्ट्र)

गर्भधारणा हा स्त्रीच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. बाळाला जन्म देणे हा मातेसाठी दुसरा जन्म मानला जातो. गर्भधारणेच्या काळात स्त्रीचे शरीर अनेक बदलांमधून जात असते. हा काळ खूप गुंतागुंतीचा मानला जातो. या काळात स्त्रीमध्ये अनेक शारीरिक आणि मानसिक बदल होतात. इतकेच नाही, तर अनेकदा स्त्रीला गर्भधारणेदरम्यान आणि प्रसूतीच्या वेळी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. जर प्रसूतिपूर्व काळात मातेच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले गेले किंवा तिची योग्य काळजी घेतली गेली नाही, तर ही परिस्थिती अनेकदा माता आणि बाळ दोघांसाठीही जीवघेणी ठरू शकते. आपल्या देशात दरवर्षी हजारो महिला गर्भधारणेदरम्यान, प्रसूतीपूर्वी किंवा नंतर योग्य काळजी न मिळाल्याने किंवा प्रसूतीदरम्यानच्या गुंतागुंतीमुळे मृत्युमुखी पडतात. आकडेवारीनुसार, दरवर्षी सुमारे ४५,००० महिला बाळाला जन्म देताना आपला जीव गमावतात. २०१८ मध्ये, जागतिक स्तरावर

सुमारे २.५ दशलक्ष नवजात बालकांचे मृत्यू नोंदवले गेले, त्यापैकी २२ टक्के (५४९,०००) मृत्यू केवळ भारतातील होते. त्याचप्रमाणे, २०१७ मध्ये जागतिक स्तरावर एकूण २९५,००० माता मृत्यूंपैकी ११ टक्के पेक्षा जास्त मृत्यू भारतात नोंदवले गेले.[१] जर गर्भधारणेदरम्यान योग्य काळजी घेतली गेली, तर माता आणि बाळ दोघांचेही आरोग्य राखले जाऊ शकते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, निरोगी माता आणि मुले हीच समाजाची खरी संपत्ती आहे. गर्भधारणा हा स्त्रीच्या आयुष्यातील एक कठीण काळ असतो, कारण ती अनेकदा मुलीपासून आई बनते. आई होण्यासाठी स्वतःमध्ये महत्त्वपूर्ण बदल करणे आवश्यक असते.[२] गर्भधारणा हा काही आजार नाही, परंतु ही एक आरोग्यविषयक जोखीम आहे, ज्यामध्ये गर्भाच्या जगण्यासाठी आणि विकासासाठी मातेच्या सर्व प्रणालींमध्ये लक्षणीय बदल होतात. तरीही, या बदलांमुळे मॉर्निंग सिकनेस, छातीत जळजळ आणि बद्धकोष्ठता यांसारखे आजार देखील होऊ शकतात.[३] गर्भधारणेदरम्यान, निरोगी बाळाच्या वाढीसाठी निरोगी आहार आणि जीवनशैली आवश्यक आहे आणि त्याचे बाळाला दीर्घकालीन आरोग्य फायदे मिळू शकतात.[४] गर्भधारणेदरम्यान, गर्भवती महिलेला तिचे शारीरिक आरोग्य राखण्यासाठी आणि निरोगी बाळाला जन्म देण्यासाठी प्रसवपूर्व काळजी सेवा मिळतात. प्रसवपूर्व काळजी म्हणजे गर्भवती महिलेला तिच्या गर्भधारणेदरम्यान आरोग्य व्यावसायिकांकडून मिळणारी काळजी. याला कधीकधी गर्भधारणा काळजी किंवा मातृत्व काळजी असेही म्हणतात. प्रसवपूर्व काळजी म्हणजे गर्भवती महिलांची नियमित आरोग्य तपासणी, ज्यामध्ये गर्भधारणेसंबंधी कोणतीही लक्षणे नसतानाही, लक्षणे नसलेले आजार किंवा गुंतागुंतीच्या प्रसूतीविषयक परिस्थितीचे निदान करणे आणि जीवनशैली, गर्भधारणा व प्रसूतीबद्दल माहिती देणे यांचा समावेश असतो. भारतात, प्राथमिक आरोग्य सेवा (सामुदायिक काळजी) प्रसवपूर्व काळजीसाठी जबाबदार आहे. प्रत्येक समुदायाकडे प्रसवपूर्व काळजीची योजना असावी आणि कायद्यानुसार समुदायांना सुईणीद्वारे प्रदान केलेली प्रसवपूर्व काळजी देणे बंधनकारक आहे. प्रसूतीशास्त्र आणि स्त्रीरोगशास्त्रातील विशेषज्ञ देखील निरोगी गर्भवती महिलांना प्रसवपूर्व काळजी देतात. प्रसवपूर्व काळजी म्हणजे गर्भधारणेदरम्यान महिलांचे पद्धतशीर पर्यवेक्षण करणे, जेणेकरून गर्भाच्या वाढीच्या प्रगतीवर लक्ष ठेवता येईल आणि आई व गर्भाचे आरोग्य सुनिश्चित करता येईल. योग्य प्रसवपूर्व तपासणी आईला आवश्यक काळजी प्रदान करते आणि आईमधील ॲनिमिया, प्री-एक्लॅम्पसिया आणि उच्च रक्तदाब इत्यादी गर्भधारणेतील गुंतागुंत आणि गर्भाची मंद/अपुरी वाढ ओळखण्यास मदत करते. १.४२ अब्जाहून अधिक लोकसंख्येसह भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. सर्वेक्षणानुसार, देशाची ६५ टक्के (२०२१ ची आकडेवारी) लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आणि ४७ टक्के लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. खराब सामाजिक-आर्थिक परिस्थितीमुळे, विविध अभ्यासांनी प्रसूतिपूर्व काळजी घेण्यावर परिणाम करणारे सर्वात सामान्य घटक ओळखले आहेत: मातेचे शिक्षण, पतीचे शिक्षण, वैवाहिक स्थिती, उपलब्धता, खर्च, कौटुंबिक उत्पन्न, महिलांचा रोजगार, माध्यमांचा संपर्क आणि प्रसूतीसंबंधी गुंतागुंतीचा इतिहास. महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे, बहुतेक गर्भवती महिलांना प्रसूतिपूर्व काळजीबद्दल योग्य माहिती नसते. हा शोधनिबंध महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण महिलांच्या प्रसूतिपूर्व काळजीच्या ज्ञानावर आणि पद्धतींवर केंद्रित आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:** १. प्रसूतिपूर्व काळजी सेवांची संकल्पना स्पष्ट करणे. २. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण महिलांमध्ये प्रसूतिपूर्व काळजीच्या ज्ञानाची पातळी तपासणे. ३. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सार्वजनिक रुग्णालयांमधील प्रसूतिपूर्व काळजी सेवांच्या (ANC) गुणवत्तेचे मूल्यांकन करणे. ४. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सार्वजनिक रुग्णालयांमधील प्रसूतिपूर्व काळजी सेवांच्या (ANC) वापराची आणि परिणामांची तपासणी करणे. ५. छत्रपती संभाजीनगर द जिल्ह्यातील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये प्रसूतिपूर्व काळजी सेवा (ANC) मिळवण्यातील अडथळे ओळखणे. ६. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये प्रसूतिपूर्व काळजी सेवांमधील (ANC) अडथळे दूर करण्यासाठी प्रभावी उपाय सुचवणे. अभ्यासासाठी वापरलेली कार्यपद्धती- हे संशोधन एक अनुभवजन्य अभ्यास आहे. संशोधकाने विश्लेषणासाठी प्राथमिक आणि दुय्यम दोन्ही प्रकारच्या माहितीचा वापर केला आहे. संशोधकाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३०० कुटुंबांचे सर्वेक्षण केले आणि उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसुचीद्वारे प्राथमिक माहिती गोळा केली. माहितीचे विश्लेषण माहितीचे वर्गीकरण, सारण्या आणि टक्केवारीच्या मदतीने केले आहे.

**प्रसूतिपूर्व काळजीची संकल्पना:** प्रसूतिपूर्व काळजी म्हणजे गर्भवती महिलांची नियमित आरोग्य तपासणी, ज्यामध्ये गर्भधारणेसंबंधी कोणतीही लक्षणे नसतानाही, लक्षणे नसलेले रोग किंवा गुंतागुंतीच्या प्रसूतीसंबंधी परिस्थितीचे निदान करणे आणि जीवनशैली, गर्भधारणा व प्रसूतीबद्दल माहिती प्रदान करणे समाविष्ट आहे. प्रसूतिपूर्व काळजी (ANC) सेवांना देशाच्या प्राथमिक आरोग्य सेवा प्रणालीतील एक प्रमुख घटक मानले जाते, ज्याचा उद्देश निरोगी समाज निर्माण करणे हा आहे.[५] प्रसूतिपूर्व काळजीचे व्याप्ती (किमान एक भेट) म्हणजे दिलेल्या कालावधीत जिवंत बाळाला जन्म दिलेल्या १५ ते ४९ वयोगटातील ज्या महिलांना गर्भधारणेदरम्यान किमान एकदा प्रक्शिषित व कुशल आरोग्य कर्मचाऱ्यांकडून (डॉक्टर, नर्स किंवा सुईण) प्रसूतिपूर्व देखभाल सेवा मिळाली, त्या महिलांची टक्केवारी, कुशल आरोग्य कर्मचारी म्हणजे असे मान्यताप्राप्त आरोग्य कर्मचारी सुईण, डॉक्टर किंवा नर्स इत्यादी ज्यांना सामान्य (गुंतागुंत नसलेल्या) गर्भधारणा, प्रसूती आणि प्रसूतीनंतरच्या तात्काळ अत्यवश्यक सेवांचे व्यवस्थापन करण्यासाठी, तसेच महिला आणि नवजात बालकांमधील गुंतागुंत ओळखणे, व्यवस्थापन करणे आणि पुढील उपचारांसाठी संदर्भित करण्याच्या आवश्यक कौशल्यांमध्ये शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन पारंगत केले गेले जाते. प्रशिक्षित आणि अप्रशिक्षित दोन्ही प्रकारच्या पारंपरिक दाईंना यातून वगळण्यात आले आहे.[६] प्रसूतिपूर्व भेटींमुळे गर्भवती महिलांपर्यंत अशा आरोग्य सेवा पोहोचवण्याची संधी मिळते, जे त्यांच्या आणि त्यांच्या बाळांच्या आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरू शकतात. प्रसूतिपूर्व देखभालीच्या विविध मॉडेल्सच्या परिणामकारकतेच्या पुनरावलोकनावर आधारित, जागतिक आरोग्य संघटना (WHO) किमान चार प्रसूतिपूर्व भेटींची शिफारस करते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये प्रसूतिपूर्व देखभाल भेटींचे स्वरूप स्पष्टपणे नमूद केले आहे,

ज्यात खालील गोष्टींचा समावेश असावा: रक्तदाब मापन, बॅक्टेरियुरिया आणि प्रोटीन्युरियासाठी मूत्र तपासणी, सिफिलिस आणि तीव्र ॲनिमिया शोधण्यासाठी रक्त तपासणी, वजन/उंची मापन (ऐच्छिक).[७] गरोदरपणात प्रसूतिपूर्व काळजी घेतल्याने मातांचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रभावी असलेल्या हस्तक्षेपांची हमी मिळत नाही. जागतिक आरोग्य संघटनेने शिफारस केल्यानुसार, किमान चार वेळा प्रसूतिपूर्व काळजी घेतल्यास, प्रसूतिपूर्व भेटींदरम्यान प्रभावी मातृ आरोग्य हस्तक्षेप मिळण्याची शक्यता वाढते.

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आरोग्य सेवा आणि प्रसूतिपूर्व काळजी सेवा (ANC):** छत्रपती संभाजीनगर हे मराठवाडा विभागाची राजधानी आहे, ज्यात नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा राज्य सरकार आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या जाळ्यामधील एक महत्त्वाचा दुवा आहे. मुख्य जिल्हा आरोग्य अधिकारी हे सरकारच्या धोरणांनुसार आरोग्य आणि कुटुंब कल्याण कार्यक्रम राबवण्यासाठी जबाबदार असतात. त्यांच्या अंतर्गत, प्रजनन आणि बाल आरोग्य अधिकारी जिल्ह्यात RCH उपक्रम राबवण्यासाठी जबाबदार असतात. खालील सारणी औरंगाबाद जिल्ह्यातील आरोग्य सेवा पायाभूत सुविधांची स्थिती दर्शवते.

| **तक्ता:१** | **छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आरोग्य सेवा पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळ** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सूचक | | | क्रमांक | सूचक | क्रमांक |
| गावे | | | १३१४ | प्रसूतीगृहे | २० |
| ग्रामपंचायत | | | ८५१ | प्राथमिक आरोग्य केंद्रे (पीएचसी) | ७१ |
| अंगणवाडी | | | ३६५६ | प्राथमिक आरोग्य सेवा उपकेंद्रे | २८६ |
| रुग्णालये | | | १८ | डॉक्टर | ४८० |
| जिल्हा सरकारी रुग्णालये | | | ०२ | परिचारिका | १४२५ |
| आरोग्य कर्मचारी | पुरुष | ३२७ | ४५९ | स्रोत: जिल्हा सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण, औरंगाबाद, २०१७. | |
| | महिला | १३२ | | | |

सारणीमध्ये दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या जिल्हा सामाजिक आर्थिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात १३१४ गावे, ३५२९ अंगणवाड्या, ५०५ सरकारी डॉक्टर, १३६८ परिचारिका, ३४८० अंगणवाडी सेविका, ३२७ आरोग्य कर्मचारी, १३२ मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्त्या (आशा), १३ रुग्णालये, २१ प्रसूतिगृहे, ७१ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २८४ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे आणि १ सरकारी रुग्णालय आहे. ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) आणि त्याच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या इतर घटकांची, उदा सामुदायिक आरोग्य केंद्रे (CHC), सरकारी एएनएम, आशा कार्यकर्त्या आणि अंगणवाडी सेविका इत्यादींची भूमिका खूप महत्त्वाची आहे. मुळात, महिलांच्या आरोग्याच्या बाबतीत, प्रसूतिपूर्व काळजी सेवांच्या (ANC) प्रभावी अंमलबजावणीसाठी या घटकांच्या कार्यपद्धतीचे मूल्यांकन करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु, लोकसंख्येची वेगाने वाढ आणि जिल्ह्याच्या विस्तारामुळे, सध्याचे मनुष्यबळ आणि आरोग्य सुविधा जिल्ह्यासाठी अपुरे आहेत. गरीब आणि ग्रामीण लोकांना चांगल्या आणि परवडणाऱ्या आरोग्य सुविधा देण्यासाठी आरोग्य सुविधांचा दर्जा वाढवण्याची गरज आहे.

**गर्भवती महिलांचे प्रसूतिपूर्व काळजीबद्दलचे ज्ञान, जागरूकता आणि समज:** प्रसूतिपूर्व काळजी (ANC) ही माता मृत्यूदर कमी करण्याच्या उद्देशाने आखलेल्या धोरणांपैकी एक आहे, कारण यामुळे गर्भधारणेच्या सुरुवातीच्या काळातच जोखमीचे घटक ओळखणे आणि ते कमी करणे शक्य होते. हे एक वास्तव आहे की, दर्जेदार सेवा आणि पद्धतींद्वारे प्रसूतिपूर्व तपासणीमुळे गर्भधारणा सुधारू शकते. गेल्या काही दशकांत, सुशिक्षित महिलांनी कुशल आरोग्य सेवा प्रदात्याकडून प्रसूतिपूर्व तपासणी करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतलेला दिसून येतो, कारण शिक्षणामुळे या सर्वसमावेशक आरोग्य सेवेच्या महत्त्वाविषयी त्यांची जागरूकता वाढली आहे. ग्रामीण भागातील महिलांमध्ये प्रसूतिपूर्व काळजी सेवांचा कमी वापर होण्यामध्ये कुटुंब व मातांचा शैक्षणिक दर्जा आणि त्यांचे वय महत्त्वाची भूमिका बजावते. गेल्या काही दशकांत भारतात महिलांच्या शिक्षणाला महत्त्व दिले गेले आहे, सरकारने महिलांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत आणि याचा महिलांच्या जीवनावर खोलवर परिणाम झाला आहे, परिणामी, उत्तर्दात्यांचा साक्षरता दर उच्च असलेला आढळून आला. ३०० उत्तर्दात्यांपैकी ९९.७ टक्के (२९९) महिला उत्तर्डत्या साक्षर होत्या. साक्षर व्यक्तींपैकी बहुतेक उत्तर्दात्यानी (४३.३ टक्के) त्यांचे माध्यमिक शिक्षण पूर्ण केले होते. निरक्षर लोकांपेक्षा साक्षर व्यक्ती त्यांच्या आरोग्याबद्दल अधिक जागरूक असतात. याच कारणामुळे संशोधकाला असे आढळले की ९२ टक्के पेक्षा जास्त उत्तर्डत्या महिला नियमित आरोग्य तपासणी करतात. कारण, गर्भवती महिलेची नियमित आरोग्य तपासणी तिच्या स्वतःच्या तसेच तिच्या बाळाच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाची असते याची जाणीव असलेली दिसून आली. गर्भधारणेदरम्यान नियमित आरोग्य तपासणी केली गेली होती की नाही हे जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारण्यात आला होता, ज्यावर ९७.३३ टक्के (२९२) प्रतिसादकर्त्यांनी नियमित आरोग्य तपासणी केल्याचे उत्तर दिले. प्रसूतिपूर्व काळजी सेवा माता आणि मुलांसाठी चांगले आरोग्य प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. हे त्यांच्या परिसरात उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवांच्या ज्ञानावर आणि वापरांवर अवलंबून असते. गर्भधारणेदरम्यान मातेची वारंवार आणि नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. ज्या मातेला कोणतीही गुंतागुंत नाही, तिची पहिल्या भेटीपासून २८ व्या आठवड्यापर्यंत दरमहा तपासणी केली पाहिजे. या संदर्भात, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सरकारी रुग्णालय, आरोग्य कर्मचारी (आशा), एएनएम आणि अंगणवाडी कार्यकर्त्यांची भूमिका खूप महत्त्वाची आहे.

प्राप्त माहितीवरून असे दिसून येते की, बहुतेक महिला उत्तरदात्यानी, म्हणजेच ४४.७६ टक्के (१७१) महिलांनी खाजगी डॉक्टरांकडून उपचार व आरोग्यविषयक सल्ला घेतला, त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्राचा क्रमांक लागतो, जिथे २०.२० टक्के (८१) महिलांनी उपचार व आरोग्यविषयक सल्ला घेतला. १६.२३ टक्के (६२) महिलांना आशा कार्यकर्तीकडून मदत मिळाली, ११.२५

टक्के (४३) महिलांनी जिल्हा सरकारी रुग्णालयात उपचार व आरोग्यविषयक सल्ला घेतला आणि ६.५४ टक्के (२५) महिलांना सहाय्यक परिचारिका (ANM) कडून आरोग्यविषयक मदत मिळाली. यावरून असे दिसून येते की बहुतेक महिला खाजगी डॉक्टरांकडून उपचार घेतात. गर्भवती महिलांनी उंची, वजन, रक्तदाब यांसारख्या मूलभूत चाचण्या आणि तपासण्या पूर्ण करणे आवश्यक आहे; रक्त आणि लघवी तपासणी, अंतर्गत अवयवांची तपासणी, पोटाची तपासणी यांसारख्या चाचण्या अत्यावश्यक प्रसूती काळजीचा भाग आहेत, ज्या गर्भधारणेवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक आहेत. संशोधकाने गर्भधारणेदरम्यान मिळालेल्या आरोग्य सेवेचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न केला आणि त्याचे प्रतिसाद खालीलप्रमाणे आहेत-

| **तक्ता २** | **आरोग्य समस्येच्या उपचारांसाठी आरोग्य सेवांचे ठिकाण** | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसाद | |
| | | वारंवारिता | टक्केवारी |
| ०१ | अशा | ६२ | १६.२३ |
| ०२ | ANM | २५ | ६.५४ |
| २३ | प्राथमिक आरोग्य केंद्र | ८१ | २०.२० |
| ०४ | जिल्हा रुग्णालय | ४३ | ११.२५ |
| ०५ | खासगी डॉक्टर | १७१ | ४४.७६ |
| एकूण प्राप्त झालेले प्रतिसाद | | ३८२ | १०० |
| उत्तरदाते | | ३०० | |
| स्रोत: नमुना सर्वेक्षण २०१७ | | | |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, ३०० उत्तरदात्यांपैकी ३५.८ टक्के (२३५) उत्तरदात्यांनी वजन मोजण्याच्या सुविधेचा लाभ घेतला, ३.१ टक्के (२२४) उत्तरदात्यांनी नियमित रक्तदाब तपासणीचा लाभ घेतला आहे आणि २४.९ टक्के उत्तरदात्यांना गर्भधारणेदरम्यान लोह आणि फॉलिक ॲसिडच्या गोळ्या मिळाल्या आहेत. केवळ ५.२ टक्के (३४) महिला उत्तरदात्यांनी वरीलपैकी कोणत्याही सेवेचा लाभ घेतलेला नाही.

गर्भधारणेदरम्यान महिलेला तिच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. या काळात नियमित आरोग्य तपासणीची गरज असते. आजकाल ग्रामीण भागातील महिलाही त्यांच्या आरोग्याबाबत जागरूक आहेत. गर्भधारणेदरम्यान घ्यावयाच्या खबरदारीबद्दल त्यांना पूर्ण माहिती आहे. महिला प्रतिसादकर्त्यांनी गर्भधारणेदरम्यान नियमित आरोग्य तपासणी कोणत्या ठिकाणी केली, हे जाणून घेण्यासाठी एक प्रश्न विचारण्यात आला होता.

**प्रसूतीपूर्व काळजी सेवा मिळविण्यातील अडथळे:** गेल्या दशकात, राष्ट्रीय आकडेवारीनुसार, प्रसूतीपूर्व काळजी सेवांचा वापर यासह आरोग्य निर्देशक ग्रामीण भारतात ६० टक्के इतके खराब होते.[८] उद्दिष्ट आणि वास्तवातील अंतर लक्षात घेऊन, ग्रामीण आरोग्य सेवा वितरण प्रणाली आणि लोकांची आरोग्य स्थिती सुधारण्यासाठी एप्रिल २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (एनआरएचएम) सुरू करण्यात आले. सरकारी आरोग्य सुविधांद्वारे प्रदान केलेल्या प्रसूतीपूर्व काळजी सेवांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी गावपातळीवर मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्ते (ASHAs) सुरू करण्यात आले. प्राथमिक आरोग्य सेवा स्तरावरील सहाय्यक परिचारिका सुईणी (ANM) आणि डॉक्टरांच्या देखरेखीखाली, आशांना समुदाय आणि प्राथमिक स्तरावरील सरकारी आरोग्य क्षेत्रामधील दुवा निर्माण करण्याची योजना आखण्यात आली. आरोग्य सेवा प्रदात्यांच्या या गटांनी, अंगणवाडी सेविकांसह (AWW) देशातील ग्रामीण आरोग्य सेवांचा पाया तयार केला आहे. या मिशन अंतर्गत, सर्वसमान, परवडणारी आणि दर्जेदार माता आरोग्य सेवा सार्वत्रिक उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे, तसेच समाजातील वंचित घटकांमधील गर्भवती महिलांच्या आरोग्य स्थितीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे.[९]

प्रस्तुत अध्ययनात असे आढळून आले की प्राथमिक आरोग्य केंद्रे लाभार्थ्यांसाठी प्रसूतीपूर्व काळजी सेवांचे सर्वात सामान्य स्रोत आहेत तरीही ज्या ९७.३३ टक्के (२९२) महिला उत्तर्दात्यानी प्रसूती काळात नियमित उपचार घेतले आहेत, त्यापैकी ६३ टक्के (१८९) प्रतिसादकर्त्यांनी खाजगी रुग्णालयात नियमित आरोग्य तपासणी केली आहे. सर्व महिलांना योग्य वेळी दर्जेदार प्रसूतीपूर्व काळजी मिळायला हवी. परंतु गुणवत्ता, विशेषतः भारतातील आरोग्यसेवेच्या परिस्थितीत, अजूनही अस्पष्ट दिसते. आरोग्यसेवा पुरवठादारांच्या काळजीच्या गुणवत्तेबद्दल निष्पक्ष माहिती मिळवणे देखील एक आव्हान आहे.[१०] बहुतेक अभ्यासांमध्ये महिलांचा आरोग्यसेवेबद्दल नकारात्मक दृष्टिकोन, सेवांचा खर्च, आर्थिक समस्या, उपचार घेण्यासाठी बराच वेळ वाट पाहणे आणि खराब वाहतूक सुविधा हे प्रसूतीपूर्व देखभालीतील प्रमुख अडथळे म्हणून नमूद केले गेले आहे. ग्रामीण भारतात प्रसूतीपूर्व काळजी मिळविण्यातील अडथळ्यांपैकी एक म्हणजे आरोग्यसेवेबद्दल महिलांचा नकारात्मक दृष्टिकोन दिसून आला. गर्भवती महिला आणि आरोग्यसेवा पुरवठादारांमधील संबंध खूप महत्वाचे आहेत आणि गर्भधारणेच्या सुरुवातीच्या काळात नंतरच्या प्रसूतीपूर्व देखभालीवर परिणाम करू शकतात. आर्थिक अडथळ्याचा ग्रामीण भारतातील प्रसूतीपूर्व काळजी सेवेवरही परिणाम होतो. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने अनेक गर्भवती महिला गर्भधारणेदरम्यान नियमित उपचार घेण्यास नकार देतात. केवळ आर्थिक अडथळे दूर केल्याने आरोग्यसेवेची उपलब्धता वाढते. संघटनात्मक अडथळ्याचा प्रसूतीपूर्व काळजी सेवेवरही परिणाम होतो. ग्रामीण भारतात आरोग्य तपासणी केंद्रांचा अभाव आहे. गेल्या काही वर्षांत जिल्ह्याच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ दिसून येत आहे. परंतु, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सध्याचे मनुष्यबळ आणि आरोग्य सुविधा अपुऱ्या आहेत. अपुऱ्या सुईणी सेवा प्रदात्यांमुळे आणि जास्त लोकसंख्येमुळे, सर्व लाभार्थीवर लक्ष केंद्रित करणे आणि लक्ष देणे कमी होते. त्यामुळे आरोग्याशी संबंधित विविध समस्या वाढतात.

**प्रमुख निष्कर्ष:** प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) आणि सामुदायिक आरोग्य केंद्रे (CHC), सरकारी एएनएम, आशा कर्मचारी आणि अंगणवाडी कर्मचारी इत्यादी PHC अंतर्गत काम करणाऱ्या इतर घटकांची भूमिका ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी खूप महत्त्वाची आहे. जिल्ह्याच्या लोकसंख्येतील जलद वाढ आणि विस्ताराची तुलना करता, सध्याचे मनुष्यबळ आणि आरोग्य
सुविधा जिल्ह्यासाठी अपुरी आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आरोग्य सेवा केंद्रांची कमतरता असल्याने बहुतेक उत्तरदाते खाजगी रुग्णालयांमध्ये त्यांची आरोग्य तपासणी करताना दिसून येतात. ग्रामीण भागातील महिलांमध्ये एएनसी सेवांचा कमी वापर होण्यात मातांची शैक्षणिक स्थिती आणि त्यांचे वय महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. ग्रामीण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा उच्च साक्षरता दर असल्याने संशोधकांना उत्तरदात्यांमध्ये त्यांच्या आरोग्याबद्दल जागरूकता आढळली. प्रस्तुत संशोधनात प्रसूतीपूर्व काळजी सेवेतील काही मुख्य अडथळे दिसून आले उदा. आरोग्य सेवेबद्दल महिलांचा नकारात्मक दृष्टिकोन, महागड्या सेवांचा खर्च, उत्तरदात्यांची कमकुवत आर्थिक स्थिती, आरोग्यविषयक काळजी घेण्यासाठी बराच वेळ वाट पाहणे आणि खराब उपचार. प्रसूतीपूर्व देखभाल ही गर्भवती महिलांना गर्भधारणेदरम्यान आरोग्य व्यावसायिकांकडून मिळणारी काळजी आहे. याला कधीकधी गर्भधारणा विषयक काळजी किंवा प्रसूती काळजी असेही म्हणतात. दरवर्षी सुमारे ४५,००० महिलाना बाळाला जन्म देताना आपला जीव गमावावा लागतो. योग्य प्रसूतीपूर्व तपासणीमुळे मातांना आवश्यक आरोग्यविषयक देखभाल मिळते आणि गर्भधारणेतील कोणत्याही प्रकारच्या गुंतागुंती ओळखण्यास मदत होते ज्यामुळे प्रसुतीदरम्यान निर्माण होणाऱ्या संभाव्य समस्या दूर करता येतात.

**संदर्भ:**


1. Gautam, Anand. (2021). *Challenges in Improving Utilization of Antenatal Care Services in Rural Bihar*, India. Retrieved from - https://www.sylff.org/news_voices/29208/
2. Barclay L, and Others. (1997). *Becoming a mother—an analysis of women's experience of early motherhood*. J Adv Nurs.;25(4):719-28.
3. Shakoor F, Begum W, Khan AA. (2016). *Antenatal care: an approach through Unani system of medicine*. IJMPR, Vol;4(5):301-2.
4. Laishram J, Mukhia S, Thounaojam UD, Devi HS, Panmei J. (2013). *Knowledge and practice of antenatal care in an urban area*. Ind Med Gaz. Issue;24:101-6.
5. Roy M.P. and Others.(2013). *Determinants of utilization of antenatal care services in rural lucknow*, India. J Family Med Prim Care. 2013 Jan;2(1):55-9.
6. Unicef. *antenatal-care*- https://data.unicef.org/topic/maternal-health/antenatal-care/
7. Unicef. *antenatal-care*- https://data.unicef.org/topic/maternal-health/antenatal-care/
8. IIPS (2000). *National Family Health Survey (NFHS-2*), *1998-99.* International Institute for Population Sciences (IIPS) and Macro International. Mumbai, India.
9. Roy M.P. and Others.(2013). *Determinants of utilization of antenatal care services in rural lucknow*, India. J Family Med Prim Care. 2013 Jan;2(1):55-9.
10. Avegen. *The Challenges in Antenatal Care and the Potential for Technology*. Retrieved from https://www.avegenhealth.com/resources/the-challenges-in-antenatal-care-and-the-potential-for-technology.


# ग्रामीण भागातील महिलांचा मालमत्ता अधिकार: कायदेशीर तरतुदी आणि सामाजिक वर्जिततेचा संघर्ष

**डॉ. अविनाश शिवाजी वर्धन** सहाय्यक प्राध्यापक, आजरा महाविद्यालय, आजरा शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**सारांश:** प्रस्तुत हा शोधनिबंध ग्रामीण भागातील महिलांच्या मालमत्ता अधिकारांचा कायदेशीर आणि सामाजिक दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करतो. भारतीय संविधानातील समानतेचे तत्त्व आणि हिंदू उत्तराधिकार कायदा (सुधारित २००५) यांमुळे महिलांना वडिलोपार्जित मालमत्तेत मुलांइतकाच समान हक्क प्राप्त झाला असला, तरी ग्रामीण वास्तवात त्याची अंमलबजावणी आव्हानात्मक असल्याचे दिसून येते. कोल्हापूर जिल्ह्यातील पेरणोली गावातील १२५ महिलांच्या सर्वेक्षणावर आधारित हा अभ्यास स्पष्ट करतो की, पितृसत्ताक मानसिकता, सामाजिक दबाव आणि कौटुंबिक संबंध तुटण्याची भीती (९२.८ टक्के) यांमुळे बहुसंख्य महिला आपल्या हक्कांचा त्याग करतात. सदर संशोधनातून असे समोर आले आहे की, केवळ ८ टक्के महिलांना २००५ च्या कायद्याची सखोल माहिती आहे. मालमत्ता हक्क मागणाऱ्या महिलेला समाजात 'लोभी' किंवा 'स्वार्थी' म्हणून हिणवले जाते (८६.४ टक्के), ज्यामुळे महिला स्वतःहून मौन स्वीकारतात. तसेच, जमिनीचे तुकडीकरण आणि पर्यायी संपत्तीचा अभाव यांसारखी आर्थिक कारणेही महिलांना हक्क मागण्यापासून परावृत्त करतात. निष्कर्षतः केवळ कायदेशीर तरतुदी पुरेशा नसून, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक दृष्टिकोन बदलण्यासाठी प्रशासकीय हस्तक्षेप व कायदेशीर साक्षरता अनिवार्य आहे.

**मुख्य शब्द**: हिंदू उत्तराधिकार कायदा (२००५), ग्रामीण महिला, मालमत्ता अधिकार, पितृसत्ताक मानसिकता, हक्क सोड पत्र, सामाजिक वर्जितता (Social Taboos), लैंगिक समानता

**प्रस्तावना:** ग्रामीण भागातील महिलांचा मालमत्ता अधिकार हा सामाजिक न्याय, आर्थिक स्वावलंबन आणि लैंगिक समानतेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. भारतीय संविधान, हिंदू उत्तराधिकार अधिनियम (सुधारित २००५), तसेच विविध कायदेशीर तरतुदींमुळे महिलांना मालमत्तेवर समान हक्क मान्य करण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात ग्रामीण समाजात या हक्कांची अंमलबजावणी मर्यादित स्वरूपातच दिसून येते. पितृसत्ताक मानसिकता, रूढी-परंपरा, सामाजिक दबाव, अज्ञान आणि आर्थिक अवलंबित्व यांमुळे महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांपासून वंचित राहावे लागते. भारतात वारसाहक्कावरून महिलांवर होणाऱ्या अत्याचारांची स्वतंत्र 'हेड' अंतर्गत आकडेवारी बऱ्याचदा 'कौटुंबिक हिंसाचार' (Domestic Violence) किंवा 'मालमत्ता वाद' या श्रेणीत मोडते. नॅशनल

क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) आणि राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS) २०२३ च्या अहवालानुसार भारतात महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांची एकूण संख्या सुमारे ४.४८ लाख इतकी नोंदवली गेली आहे. राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण NFHS-5 नुसार साधारण ३२ टक्के विवाहित महिलांनी त्यांच्या जीवनात कधी ना कधी भौतिक, लैंगिक किंवा भावनिक हिंसा अनुभवली आहे. विद्युत भागवत या भारतातील एक अग्रगण्य स्त्रीवादी अभ्यासक यांच्या मते, "पितृसत्ताक पद्धती केवळ पुरुषांच्या मनात नसते, तर ती स्त्रियांच्याही मनाची अशी घडण करते की, स्त्रिया स्वतःच स्वतःच्या दुय्यमत्वाचे समर्थन करू लागतात. लिंगभेद हा निसर्गदत्त नसून तो समाजाने जाणीवपूर्वक निर्माण केलेला एक सांस्कृतिक आराखडा आहे." मालमत्ता अधिकार नाकारला जाणे हे केवळ आर्थिक नुकसान नसून महिलांच्या सामाजिक प्रतिष्ठा, निर्णयक्षमता आणि स्वातंत्र्यावरही परिणाम करणारे आहे. या पार्श्वभूमीवर सदर शोधनिबंधात ग्रामीण महिलांच्या मालमत्ता अधिकारांशी संबंधित कायदेशीर तरतुदी, त्यांची सामाजिक वास्तवातील स्थिती, तसेच सामाजिक वर्जिततेशी चाललेला संघर्ष यांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

**संविधानिक व कायदेशीर तरतुदींची पार्श्वभूमी:** भारतीय संविधानाने कलम १४ नुसार सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता आणि कलम १५ नुसार लिंगावर आधारित भेदभाव करण्यास मनाई केली आहे. याच संविधानिक मूल्यांच्या आधारावर महिलांच्या मालमत्ता अधिकाराची जडणघडण झाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात हिंदू महिलांच्या मालमत्ता अधिकाराला कायदेशीर स्वरूप देण्यासाठी 'हिंदू उत्तराधिकार कायदा, १९५६' हा कायदा संमत झाला. मात्र, या मूळ कायद्यात 'सहवारसदार' (Coparcener) संकल्पनेत केवळ पुरुषांचा समावेश होता. मुलींना केवळ वडिलांच्या स्वकष्टार्जित संपत्तीत वाटा मिळत असे, परंतु वडिलोपार्जित मालमत्तेत त्यांना मुलांप्रमाणे अधिकार नव्हते. ही तरतूद उघडपणे लिंगभाव असमानता दर्शवणारी होती. संविधानातील 'समानतेच्या' तत्त्वाला खऱ्या अर्थाने लागू करण्यासाठी ९ सप्टेंबर २००५ रोजी हिंदू उत्तराधिकार कायद्यात सुधारणा करण्यात आली. या सुधारणेनुसार: मुलींना मुलांप्रमाणेच जन्मतः 'सहवारसदार' म्हणून अधिकार प्राप्त झाला. वडिलोपार्जित मालमत्तेत मुलींना मुलांइतकाच समान हिस्सा, समान जबाबदाऱ्या आणि समान अधिकार मिळाले. लग्नानंतरही मुलीचा आपल्या वडिलांच्या मालमत्तेवरील हक्क अबाधित राहण्याची तरतूद करण्यात आली. २०२० मधील 'विनीता शर्मा विरुद्ध राकेश शर्मा'1 खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, मुलीचा मालमत्तेतील हक्क हा तिच्या जन्माशी जोडलेला आहे. ९ सप्टेंबर २००५ पूर्वी वडिलांचा मृत्यू झाला असला तरीही, मुलीला मुलाप्रमाणेच समान वाटा मिळेल. अशा प्रकारे, संविधानाने दिलेला समानतेचा हक्क हा कायद्याच्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा पाया ठरला आहे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी खालीलप्रमाणे संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:** १. हिंदू उत्तराधिकार कायद्यातील २००५ च्या सुधारणेबाबत ग्रामीण महिलांच्या जागरूकतेचा अभ्यास करणे.

२. मालमत्ता अधिकार मागताना महिलांना येणाऱ्या सामाजिक आणि कौटुंबिक अडचणींचे विश्लेषण करणे.

३. 'हक्क सोड' पत्राच्या वाढत्या प्रवृत्तीमागील कारणांचा शोध घेणे.

**गृहीतक:** १. ग्रामीण महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण आणि हिंदू उत्तराधिकार कायद्यातील (२००५) सुधारणेबाबतची त्यांची जागरूकता यामध्ये सकारात्मक सहसंबंध आहे. २. ग्रामीण भागात मालमत्तेत हिस्सा न मागण्यामागे 'माहेरचे नाते तुटण्याची भीती' आणि 'सामाजिक प्रतिष्ठा' हे घटक कायद्याच्या अंमलबजावणीपेक्षा अधिक प्रभावी ठरतात.

**संशोधन आराखडा:** हे संशोधन 'वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक' (Descriptive & Analytical) स्वरूपाचे असेल. यामध्ये केवळ स्थितीचे वर्णन न करता, 'हक्क सोड' पत्रामागील सामाजिक कारणांचे विश्लेषण केले जाईल.

**नमुना निवड पद्धती:** ग्रामीण भागाचा विस्तार मोठा असल्याने 'स्तरबद्ध यादृच्छिक नमुना निवड' (Stratified Random Sampling) पद्धतीचा वापर करावा. प्रस्तुत शोधनिबंधासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यामधील पेरणोली या गावाची निवड केली आहे. तर उत्तरदाते म्हणून १८ वर्षांवरील विविध वयोगटातील महिला यामध्ये विवाहित, अविवाहित, विधवा आणि परित्यक्ता अशा १२५ महिलांची निवड केली आहे. माहिती संकलनाची साधने: प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टानुसार माहिती दोन स्तरांवर संकलित केली आहे.

**प्राथमिक माहिती:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक माहिती संकलित करण्यात प्रश्नावलीचा तसेच मुलाखत तंत्राचा उपयोग केला आहे. तसेच गावातील महिला बचत गटांशी चर्चा करून सामाजिक वर्जिततेचे स्वरूप समजून घेतले आहे. दुय्यम माहिती: प्रस्तुत शोधनिबंधासाठी सरकारी अहवाल, जनगणना, जुने शोधनिबंध आणि वर्तमानपत्रातील लेख, वेबसाईट व संदर्भ ग्रंथांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाच्या मर्यादा:** प्रस्तुत संशोधन केवळ पेरणोली गावातील महिलांच्या मालमत्ता अधिकार व वर्जितता यापुरते मर्यादित असेल.

**माहितीचे विश्लेषण:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे उत्तरदात्या महिलांकडून जी माहिती संकलित करण्यात आलेली आहे. त्या माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

| **वयोगटानुसार वितरण:** | | | | **शिक्षण स्तरानुसार वितरण** | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **क्र.** | **वयोगट** | **संख्या** | **टक्केवारी** | **शिक्षण स्तर** | **संख्या** | **टक्केवारी** |
| १ | १८–२५ | ३२ | **२५.६** टक्के | १० **वी** | ५३ | ४२.४० टक्के |
| २ | २५–३५ | ४६ | ३६.८ टक्के | १२ **वी** | ३**३** | २६.४० टक्के |
| ३ | ३६–४६ | २८ | २२.४ टक्के | **पदवी** | १२ | ९.६० टक्के |
| ४ | **४७ व त्यावरील** | १९ | १५.२ टक्के | **पदव्युत्तर** | ६ | ४.८० टक्के |
| ५ | **एकूण** | १२५ | १०० टक्के | **इतर** | २१ | १६.८ टक्के |
| | | | | **एकूण** | **१२५** | १०० टक्के |

प्रस्तुत शोधनिबंधातील बहुसंख्य उत्तरदात्या महिला २५-३५ वयोगटातील असल्यामुळे अभ्यासात सक्रिय, कुटुंबीय जबाबदाऱ्या असलेल्या महिलांचे अनुभव अधिक प्रतिबिंबित झालेले दिसतात. बहुसंख्य उत्तरदाता २५-३५ वयोगटातील असणे हे Life Cycle Theory च्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. या टप्प्यावर महिला विवाहोत्तर भूमिका, मातृत्व, गृहव्यवस्थापन आणि कौटुंबिक निर्णयप्रक्रियेत सक्रीय असतात. मात्र 'निर्णय घेण्याची सत्ता' (Decision-making Power) मर्यादित असल्याचे दिसते. त्यामुळे कायदेशीर हक्क असतानाही त्यांची अंमलबजावणी होत नाही. वरील तक्त्यामधील बहुसंख्य महिला दहा४२.४० टक्के) व बारावी (२६.४ टक्के) शिक्षणापर्यंत शिकलेल्या असून उच्च शिक्षणाचे प्रमाण कमी म्हणजेच केवळ (९.६ टक्के) आहे. याचा कायदेशीर जागरूकतेवर थेट परिणाम होतो. बहुसंख्य महिलांचे शिक्षण माध्यमिक स्तरावर मर्यादित असणे हे सांस्कृतिक भांडवलाच्या कमतरतेचे द्योतक आहे. शिक्षण हे कायदेशीर साक्षरतेचे मुख्य साधन असते. शिक्षणाचा अभाव, कायद्याची अपुरी माहिती अधिकारांचा वापर न करणे, अशी साखळी प्रक्रिया येथे स्पष्ट दिसते.

| **व्यवसायानुसार वितरण** | | | | **वैवाहिक स्थिती** | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **क्र.** | **व्यवसाय** | **संख्या** | **टक्केवारी** | **स्थिती** | **संख्या** | **टक्केवारी** |
| **१** | शेती व गृहिणी | १०५ | ८४.०० टक्के | विवाहित | ९७ | ७७.६० टक्के |
| **२** | व्यवसाय (स्वयंरोजगार) | १४ | ११.२० टक्के | विधवा | १९ | १५.२० टक्के |
| **३** | नोकरी | ६ | ४.८० टक्के | परित्यक्ता | ९ | ७.२० टक्के |
| एकूण | | १२५ | १०० टक्के | एकूण | १२५ | १०० टक्के |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, ८४.०० टक्के महिला शेती व गृहिणी असल्यामुळे त्यांचे उत्पन्नावर नियंत्रण नाही. त्या शेती करत असल्या तरी शेतीची मालकी अथवा शेतीतून येणारे उत्पन्न यावर त्यांची थेट मालकी नाही. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या अवलंबून असलेल्या महिलांचे प्रमाण जास्त असल्यामुळे मालमत्ता हक्क मागण्याची क्षमता मर्यादित राहते. नोकरी करणाऱ्या महिला उत्तरदात्या केवळ 6 म्हणजेच ४.८० टक्के आहे. यामध्ये ही सरकारी नोकरी करणारी महिला एकही नाही. नोकरी करणाऱ्या महिला या कापड दुकान, किराणा माल दुकान अथवा काजू कारखान्यामध्ये कामाला आहेत. मार्क्सवादी स्त्रीवादी दृष्टिकोनानुसार, उत्पादन साधनांवरील मालकी नसणे म्हणजे सत्ता नसणे. त्यामुळे मालमत्ता हक्क मागणे हे महिलांसाठी आर्थिक जोखमीचे ठरते. उत्तरदात्या महिलांमध्ये विवाहित महिलांचे प्रमाण ९७ म्हणजेच (७७.६० टक्के) आहे. या विवाहित महिलांवर माहेर व सासर या दुहेरी सामाजिक दबावाचा प्रभाव अभ्यासात स्पष्ट दिसतो. महिलांना 'मुलींना समान हक्क आहेत' याची माहिती असली तरी २००५ च्या कायद्याबाबत अनभिज्ञता आढळते. हे कायदा कागदोपत्री अस्तित्वात पण सामाजिक जीवनात अनुपस्थित असल्याचे दर्शवते. ईमिल डूरखाईच्या यांच्या मते, कायदा तेव्हाच प्रभावी ठरतो जेव्हा तो सामाजिक नैतिकतेचा भाग बनतो.

**कायदेशीर माहितीबाबत जागरूकता**

| **क्र.** | **प्रश्न** | **हो** | **नाही** |
|---|---|---|---|
| **१** | मुलींना समान वारसा अधिकार | १०७ | १८ |
| **२** | २००५ कायदा माहित | १५ | ११० |
| **३** | मुलीचे नाव वारस म्हणून बंधनकारक | ११० | १५ |

वरील तक्ता हे स्पष्ट करतो की, 'मुलीना समान वारसा अधिकार आहे' याची माहिती १०७ महिलांना आहे. 'मुलीचे नाव वारस म्हणून बंधनकारक आहे' याची ही कल्पना बहुसंख्य ११० महिलांना आहे. पण ही केवळ सामान्य हक्कांची माहिती असली तरी विशिष्ट कायद्याबाबतची सखोल माहिती केवळ १५ उत्तरदात्या महिलांना आहे. ही माहिती अपुरी आणि अपघाती स्वरूपाची आहे. महिलांना 'मुलींना समान हक्क आहेत' याची माहिती असली तरी २००५ च्या कायद्याबाबत अनभिज्ञता आढळते.

**माहितीचे स्रोत:** वरील तक्ता हे स्पष्ट करतो की, कायदेशीर माहितीचा प्रमुख स्रोत कुटुंब असल्यामुळे माहिती पक्षपाती किंवा अपूर्ण असण्याची शक्यता अधिक आहे. कुटुंब हा प्रमुख माहिती स्रोत असणे हे प्राथमिक समाजीकरणाचे वर्चस्व दर्शवते. मात्र पितृसत्ताक कुटुंबात दिली जाणारी माहिती पुरुषसत्ताक मूल्यांना पोषक असते. त्यामुळे कायदा 'नियंत्रणाचे साधन' न राहता 'समजुतीचा विषय' ठरतो.

**मालमत्ता हक्क न मागण्याची कारणे:** महिला वडिलोपार्जित मालमत्तेमध्ये हक्क न मागण्याची कारणे कोणकोणती आहेत हे दर्शवली आहेत. उत्तरदात्या महिलांनी एका पेक्षा अनेक कारणे निवडली आहेत. भावनिक आणि सामाजिक कारणे कायदेशीर कारणांपेक्षा अधिक प्रभावी ठरतात. पितृसत्ताक मूल्यव्यवस्था स्पष्टपणे दिसून येते. माहेरचे संबंध तुटण्याची भीती हे सामाजिक बहिष्कार (Social Exclusion) व भावनिक ब्लॅकमेल यांचे उदाहरण आहे. महिला 'आज्ञाधारक मुलगी' या भूमिकेत अडकलेली दिसते, जी Gender Role Socialization चे प्रत्यक्ष उदाहरण आहे. वरील तक्ता हे स्पष्ट करतो की, मालमत्ता हक्क मागणाऱ्या महिलेला नकारात्मक लेबलिंग केले जाते. प्रस्तुत संशोधनातील उत्तरदात्या महिला पैकी १०८ म्हणजेच ८६.४० टक्के महिलांना लोभी अथवा स्वार्थी ठरवले जाण्याची भीती वाटते. ज्यामुळे महिलांचे मौन बळकट होते. मालमत्ता हक्क मागणाऱ्या महिलेला 'लोभी' ठरवणे हे नैतिक लेबलिंग आहे. हे लेबल महिलांना समाजमान्य चौकटीबाहेर ढकलते. परिणामी महिला स्वतःहून आत्मनियंत्रण (Self-regulation) स्वीकारतात.

**अल्प मालमत्ता आणि महिलांचा नकार:** ग्रामीण भागात, विशेषतः कोल्हापूरसारख्या डोंगराळ किंवा मध्यम भूधारणा असलेल्या भागात, जमिनीचे तुकडीकरण (Fragmentation of Land) ही एक मोठी समस्या आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या मालमत्ता अधिकाराचा विचार करताना केवळ कायद्याची बाजू पाहून चालत नाही, तर त्यामागील व्यावहारिक आणि आर्थिक कारणांचा वेध

घेणे आवश्यक ठरते. कमला भसीन यांची 'पितृसत्ता आणि मालमत्ता' या विषयावरील मांडणी अत्यंत मूलभूत आणि स्पष्ट आहे. त्यांच्या मते, मालमत्तेवर ताबा नसणे हे स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे सर्वात मोठे कारण आहे. त्यांच्या मते, पितृसत्ता (Patriarchy) केवळ सामाजिक प्रथांवर अवलंबून नसते, तर ती 'संसाधनांच्या नियंत्रणावर' उभी असते. जोपर्यंत उत्पादनाची साधने (जमीन, पैसा, घर) पुरुषांच्या ताब्यात असतात, तोपर्यंत स्त्रियांचे त्यांच्यावर असणारे अवलंबित्व संपत नाही. मालमत्ता ही केवळ आर्थिक बाब नसून ती कुटुंबातील 'निर्णय घेण्याची क्षमता' ठरवते. ज्याच्याकडे जमीन, त्याच्याकडे सत्ता, असा हा साधा नियम त्यांनी मांडला. कमला भसीन यांनी याला 'अदृश्य श्रम' म्हटले आहे. मालमत्ता हक्क नसल्यामुळे महिलांच्या कष्टाची गणना उत्पादक कामात होत नाही. पेरणोली गावातील सर्वेक्षणादरम्यान असे प्रकर्षाने दिसून आले की, अनेक कुटुंबांकडे असलेली वडिलोपार्जित जमीन किंवा जंगम मालमत्ता अत्यंत अल्प स्वरूपाची आहे. या 'अल्प मालमत्तेच्या वास्तववादामुळे' महिला आपले हक्क नाकारताना दिसतात, ज्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

**जमिनीचे तुकडीकरण आणि आर्थिक व्यवहार्यता:** ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेती हे उत्पादनाचे मुख्य साधन आहे. मात्र, वारसा हक्काने जमिनीचे सतत विभाजन होत गेल्यामुळे सद्यस्थितीत अनेक कुटुंबांकडे केवळ काही गुंठे किंवा १-२ एकरच जमीन उरली आहे. अशा परिस्थितीत, जर महिलांनी आपला कायदेशीर हिस्सा मागितला, तर जमिनीचे आणखी लहान तुकडे होतील. जमिनीचे तुकडीकरण वाढल्यास त्यावर आधुनिक पद्धतीने शेती करणे किंवा ट्रॅक्टरसारखी अवजारे वापरणे कठीण होते. परिणामी, शेती आर्थिकदृष्ट्या अपयशी ठरेल आणि भावाचे कुटुंब संकटात येईल, या भीतीपोटी अनेक महिला स्वतःहून हक्काचा त्याग करतात.

**पर्यायी संपत्तीचा अभाव:** शहरी भागाप्रमाणे ग्रामीण कुटुंबांकडे रोख रक्कम, मुदत ठेवी किंवा सोन्याच्या स्वरूपात मोठी जंगम मालमत्ता नसते. हिंदू उत्तराधिकार कायद्यानुसार मालमत्तेत समान हिस्सा असला, तरी प्रत्यक्षात तो हिस्सा जमिनीच्या स्वरूपातच द्यावा लागतो. भावाकडे बहिणीला देण्यासाठी 'पर्यायी रोख रक्कम' (Cash Compensation) उपलब्ध नसल्यामुळे, बहिणीला केवळ जमिनीवरच दावा करावा लागतो. जमिनीचा तुकडा घेण्यापेक्षा तो भावाकडेच राहू देणे महिलांना व्यावहारिकदृष्ट्या योग्य वाटते.

**भावनिक गुंतवणूक आणि माहेरचा आधार:** ग्रामीण संस्कृतीत 'माहेर' ही केवळ एक वास्तू नसून तो महिलांसाठी एक भावनिक सुरक्षिततेचा आधार असतो. अल्प जमिनीसाठी हक्क मागितल्यास भावाशी असलेले संबंध कायमचे बिघडण्याची शक्यता असते. १०-१५ गुंठे जमिनीच्या आर्थिक मूल्यापेक्षा, संकटकाळी धावून येणारा भाऊ आणि माहेरचा सन्मान महिलांना अधिक मोलाचा वाटतो. ही भावनिक गुंतवणूक (Emotional Investment) कायदेशीर हक्कांपेक्षा अधिक प्रबळ ठरते.

**व्यवस्थापन आणि न्यायालयीन खर्च:** अल्प मालमत्तेसाठी कायदेशीर लढा देणे ग्रामीण महिलांना परवडणारे नसते. कोर्ट-कचेरीचा खर्च, वकिलांची फी आणि वारंवार होणाऱ्या फेऱ्या यांचा विचार करता, मिळणाऱ्या जमिनीचे मूल्य त्या खर्चापेक्षा कमी असते. मालमत्तेचा हिस्सा मिळवण्यासाठी करावा लागणारा व्यवस्थापन खर्च आणि मानसिक त्रास लक्षात घेता, हक्क सोडणे हाच सोपा मार्ग असल्याचे महिलांना वाटते. थोडक्यात सांगायचे तर, ग्रामीण महिलांचा मालमत्ता अधिकार नाकारण्यामागे केवळ पितृसत्ताक दबाव नसून, मालमत्तेची अल्प उपलब्धता आणि आर्थिक विसंगती हे देखील तितकेच मोठे घटक आहेत. मालमत्तेचा प्रश्न हा केवळ हक्काचा नसून तो 'उदरनिर्वाहाच्या साधनाशी' जोडलेला आहे.

**निष्कर्ष:** प्रस्तुत संशोधनातून पेरणोली (ता. आजरा) गावातील महिलांच्या मालमत्ता अधिकाराबाबत खालील निष्कर्ष समोर येतात:

१. बहुसंख्य महिलांना (८८ टक्के) हिंदू उत्तराधिकार कायदा २००५ बद्दल सखोल माहिती नाही. 'मुलींना हक्क आहे' हे केवळ ढोबळमानाने माहित आहे, मात्र कायद्याच्या प्रक्रियेचे पूर्ण ज्ञान नसल्याने त्या हक्क मिळवू शकत नाहीत.

२. ९२ टक्के प्रकरणांमध्ये महिलांकडून 'हक्क सोड' पत्र लिहून घेतले जाते. हे स्वेच्छेने नसून 'Consent without Choice' (निवड नसलेली संमती) या प्रकारचे आहे.

३. 'माहेर तुटण्याची भीती' (९२.८ टक्के) हे सर्वात मोठे कारण आहे ज्यामुळे महिला हक्क नाकारतात. ग्रामीण भागात भावा-बहिणीच्या नात्याला मालमत्तेच्या विरुद्ध उभे केले जाते. एक प्रकारचे सामाजिक आणि भावनिक ब्लॅकमेल केले जाते.

४. मालमत्ता हक्क मागणाऱ्या महिलेला 'लोभी' किंवा 'घरफोडी' म्हणून हिणवले जाते. या नकारात्मक लेबलिंग अर्थात सामाजिक बहिष्कारामुळे महिला स्वतःहून मौन स्वीकारतात.

५. माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये कायदेशीर साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे, जे त्यांच्या आर्थिक परावलंबित्वास कारणीभूत ठरते.

६. 'ग्रामीण भागात मालमत्तेचा अधिकार' हा केवळ कायद्यावर अवलंबून नसून तो 'मालमत्तेची उपलब्धता' आणि 'उपजीविकेचे साधन' यांवर अवलंबून आहे. जेव्हा मालमत्ता जीवननिर्वाहासाठी अपुरी असते, तेव्हा महिला 'कायदेशीर न्याया' पेक्षा 'कौटुंबिक सामंजस्याला' प्राधान्य देतात. हे महिलांचे उदात्तीकरण नसून ती एक सामाजिक-आर्थिक हतबलता आहे.

**गृहीतकांची पडताळणी:**

**गृहीतक १:** शिक्षणाचे प्रमाण आणि कायदेशीर जागरूकता यांमधील सहसंबंध

**गृहीतक:** 'ग्रामीण महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण आणि हिंदू उत्तराधिकार कायद्यातील (२००५) सुधारणेबाबतची त्यांची जागरूकता यामध्ये सकारात्मक सहसंबंध आहे.'

**पडताळणी:** हे गृहीतक सिद्ध होते. सर्वेक्षणातील ४२.४० टक्के महिला केवळ १० वी पर्यंत शिकलेल्या आहेत आणि उच्च शिक्षणाचे (पदव्युत्तर) प्रमाण केवळ ४.८० टक्के इतके अल्प आहे. अभ्यासात असे दिसून आले की, ८८ टक्के महिलांना (११० पैकी १२५) २००५ च्या कायद्याची सखोल माहिती नाही. शिक्षणाचे प्रमाण माध्यमिक स्तरावर मर्यादित असल्यामुळे कायदेशीर साक्षरतेचा अभाव

दिसून येतो. संशोधनानुसार, कमी शिक्षण हे महिलांच्या अधिकारांचा वापर न करण्यामागील प्रमुख कारण आहे, ज्यामुळे शिक्षण आणि जागरूकता यातील थेट संबंध स्पष्ट होतो.

**गृहीतक २:** सामाजिक घटक विरुद्ध कायदेशीर अंमलबजावणी

**गृहीतक:** 'ग्रामीण भागात मालमत्तेत हिस्सा न मागण्यामागे 'माहेरचे नाते तुटण्याची भीती' आणि 'सामाजिक प्रतिष्ठा' हे घटक कायद्याच्या अंमलबजावणीपेक्षा अधिक प्रभावी ठरतात.'

**पडताळणी:** हे गृहीतक भक्कमपणे सिद्ध होते. तब्बल ९२.८० टक्के महिलांनी माहेरचे संबंध तुटण्याच्या भीतीने हक्क नाकारला आहे. मालमत्ता हक्क मागणाऱ्या महिलेला ८६.४० टक्के समाज 'लोभी' किंवा 'स्वार्थी' समजतो. या सामाजिक बदनामीच्या भीतीमुळे किवा सामाजिक प्रतिष्ठा आणि लेबलिंग महिला स्वतःहून मौन स्वीकारतात. ९२ टक्के प्रकरणामध्ये महिलांकडून 'हक्क सोड' पत्र लिहून घेतले जाते, जे सामाजिक दबावाचे प्रत्यक्ष रूप आहे. कायद्याने समान हक्क दिले असूनही, ग्रामीण भागात 'भावनिक गुंतवणूक' (Emotional Investment) आणि 'सामाजिक बहिष्कार' (Social Exclusion) हे घटक कायद्याच्या अंमलबजावणीपेक्षा अधिक प्रबळ ठरत आहेत. थोडक्यात, संशोधनातील दोन्ही गृहीतके अभ्यासाअंती खरी ठरली आहेत. ग्रामीण भागात कायद्यापेक्षा सामाजिक समजुती आणि कौटुंबिक हितसंबंधांचा प्रभाव अधिक आहे, ज्यामुळे महिला 'हक्क असूनही वंचित' राहत आहेत.

**शिफारसी:** ग्रामीण भागातील महिलांच्या मालमत्ता हक्कांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी खालील उपाययोजना सुचवता येतील: केवळ कायदे करून चालणार नाही, तर ग्रामपंचायत आणि 'महिला बचत गटा' अथवा कोणत्याही माध्यमातून 'हिंदू उत्तराधिकार कायद्याची' सोप्या भाषेत माहिती पोहोचवणे आवश्यक आहे. 'हक्क सोड पत्र' घेताना महिलेची बंद दाराआड (In-camera) तहसीलदार किंवा सक्षम अधिकाऱ्यासमोर स्वतंत्र मुलाखत घेणे बंधनकारक करावे, जेणेकरून तिच्यावर कोणताही कौटुंबिक दबाव नाही याची खात्री पटेल. 'मालमत्तेत हिस्सा घेणे म्हणजे नात्याचा अंत नव्हे' यावर ग्रामीण कुटुंबांचे समुपदेशन होणे गरजेचे आहे.

**सामाजिक वर्जितता आणि संघर्षाचे मुद्दे:** ग्रामीण भागात कायद्यापेक्षा सामाजिक समजुतींचा प्रभाव अधिक असतो, ज्यातून खालील संघर्ष उद्भवतात. १. 'हक्क सोड' पत्राचा दबाव: भावा-बहिणीच्या नात्यात कटुता येऊ नये म्हणून मुलींकडून जबरदस्तीने किंवा भावनिक ब्लॅकमेल करून 'हक्क सोड' पत्रावर स्वाक्षरी घेतली जाते. २. सासरची मालमत्ता हीच तुझी संपत्ती: 'लग्नात हुंडा दिला म्हणजे तुझा वाटा मिळाला' अशी चुकीची धारणा आजही समाजात रूढ आहे. ३. माहेर तुटण्याची भीती: मालमत्तेत हिस्सा मागितल्यास माहेरचे दरवाजे कायमचे बंद होतील, ही भीती ग्रामीण महिलांसाठी सर्वात मोठी वर्जितता आहे. ४. पुरुषप्रधान मानसिकता: कुटुंबाची जमीन घराबाहेर (दुसऱ्याच्या घरी/जावयाच्या घरी) जाऊ नये, ही संकुचित वृत्ती विकासात अडथळा ठरते.

**प्रतिबंधात्मक उपाय आणि शिफारसी:**

१. वारसा हक्काबाबत ग्रामसभेमध्ये महिलांसाठी विशेष चर्चासत्रे आयोजित करावीत.

२.अंगणवाडी सेविका आणि आशा स्वयंसेविकांमार्फत महिलांना त्यांच्या हक्कांची साधी-सोपी माहिती द्यावी.

३. कुटुंबातील वादांवर कायदेशीर लढाईऐवजी सामोपचाराने तोडगा काढण्यासाठी ग्रामीण भागात केंद्रे असावीत.

थोडक्यात, केवळ कायदा करून समाजात बदल घडत नाही. जोपर्यंत ग्रामीण भागातील 'मुलगाच वंशाचा दिवा' आणि 'मुलगी परक्याचे धन' ही मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत हिंदू उत्तराधिकार कायद्याचा उद्देश पूर्णपणे साध्य होणार नाही. महिलांची मालमत्तेतील मालकी हे केवळ त्यांचे हक्क नसून ते त्यांच्या आत्मसन्मानाचे आणि आर्थिक स्वातंत्र्याचे साधन आहे.

**संदर्भ सूची :**

१. देसाई, सत्यजित ए. (संपादित), मुल्ला - हिंदू लॉ (Mulla Hindu Law), २४ वी आवृत्ती, लेक्सिसनेक्सिस, २०२०.
२. NCRB (National Crime Records Bureau) २०२३ चा अहवाल.
३. २०२० मधील सर्वोच्च न्यायालयाचा 'विनीता शर्मा विरुद्ध राकेश शर्मा' हा निकाल.
४. भागवत विद्युत, The Weave of Women's Lives in India' आणि 'स्त्रीवादी सामाजिक विचार' (प्रतिमा प्रकाशन).
५. कमला भसीन, 'Understanding Gender', published by Women Unlimited, 2000.
६. कमला भसीन, 'पितृसत्ता क्या है?', राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, १९९३.

# ग्रामीण महिलांवरील सामाजिक वर्जितता: ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे आणि लिंगभेद

**प्रो. (डॉ.) सतिश सर्जेराव देसाई** प्राचार्य, श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज पांचगणी

**गोषवारा:** समाज आणि राष्ट्रांमध्ये शाश्वत विकास साध्य करण्यासाठी महिलांचे शिक्षण महत्त्वाचे आहे आणि ते मूलभूत मानले जाते. जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांचा समान सहभाग सुनिश्चित केल्याशिवाय कोणतेही राष्ट्र वैभवाच्या उंचीवर पोहोचू शकत नाही. मूलभूत हक्क, संसाधने आणि महिलांसाठी संधींचे असमान वितरणासह लिंगभेद सुरूच आहे (एस्थर आणि इतर, २०२०). बहुतेक विकसनशील देशांमध्ये, विशेषतः दक्षिण आशियाई प्रदेशात, महिला शिक्षणाच्या संधी समाधानकारक नाहीत आणि अनेक सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि कौटुंबिक अडथळे अडथळे निर्माण करतात. पितृसत्ताक मानसिकतेने निर्माण केलेले हे परस्परांना छेदणारे अडथळे महत्त्वाची भूमिका बजावतात आणि महिलांच्या शिक्षणाच्या जीवनावर आणि यशावर लक्षणीय नकारात्मक परिणाम करतात (युनिसेफ, २०२०). तथापि, अलिकडच्या दशकांमध्ये महिला शिक्षणात लक्षणीय प्रगती दिसून आली आहे. महिला शिक्षणात उच्च यश मिळवणाऱ्या म्हणून स्वतःला सिद्ध करतात आणि विविध क्षेत्रात मोठी जबाबदारी स्वीकारतात.

परंतु दुर्दैवाने ही संख्या खूपच मर्यादित आहे. ग्रामीण भारतातील विशेषता महाराष्ट्रातील महिला व मुलींच्या शिक्षणातील अडथळे समजून घेणे हा या संशोधन पेपरचा मुख्य उद्देश आहे.

**कीवर्ड:** ग्रामीण महिला, पितृसत्ता, शाश्वत विकास, लिंग भेदभाव

---

**प्रस्तावना:** जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांचा समान सहभाग सुनिश्चित केल्याशिवाय कोणतेही राष्ट्र वैभवाच्या शिखरावर पोहोचू शकत नाही. कोणत्याही समाजात आणि राष्ट्रात शाश्वत विकास साध्य करण्यासाठी महिला शिक्षण हा मूलभूत घटक आहे. तथापि, मूलभूत हक्कांचे असमान वितरण आणि महिलांसाठी संधी यासह सतत लिंगभेद दिसून आला आहे. (एस्थर आणि इतर, २०२०). अलिकडच्या दशकात बहुतेक विकसित देशांनी महिला साक्षरता दरात लक्षणीय सुधारणा केली आहे आणि या देशांमध्ये महिला पुरुषांच्या बरोबरीने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात भाग घेतात. महिलांचे उत्पादक कामातील हे योगदान राष्ट्रांच्या सामाजिक-आर्थिक विकासात मोठे योगदान देते. भारतमध्ये विशेषतः महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात हि परिस्थिती वेगळी आहे आणि लिंगभेद हा एक व्यापक मुद्दा आहे, जो महिलांच्या सक्षमीकरणावर परिणाम करत आहे (आराधना, २०२०). महिलांच्या शिक्षणाची स्थिती पुरुषांच्या तुलनेत असमान आहे. त्यांच्या शिक्षणाच्या बाबतीत महिलांना अनेक कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रादेशिक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. हे महिलांच्या जीवनावर आणि शिक्षणावर लक्षणीय नकारात्मक परिणाम करतात. समुदायांमधील पितृसत्ताक दृष्टिकोन आणि पालकांकडून मुली आणि मुलांमध्ये भेदभाव महिलांच्या शिक्षणातील सर्वात मोठ्या अडथळ्यांपैकी एक बनले आहेत (युनिसेफ, २०२०). ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाची स्थिती अत्यंत वाईट आहे, कारण चारपैकी एक मुलगी शाळेत जात नाही किंवा त्यांचे मूलभूत प्राथमिक शिक्षण पूर्ण करत नाही. प्रत्येक पाच मुलींपैकी एकीचे लग्न १८ व्या वाढदिवसापूर्वी होते आणि लग्नाच्या पंधरा महिन्यांच्या आत गर्भवती होते. खराब मानसिक आणि शारीरिक आरोग्य, कुपोषण आणि जास्त घरगुती भार महिलांवर आणि त्यांच्या येणाऱ्या पिढीवर देखील परिणाम करतात (UNFPA, २०२०)

**संशोधन उद्दिष्टे:** ग्रामीण भागातील लिंगभेद व पितृसत्ताक रचना स्पष्ट करणे ग्रामीण भागातील महिला शिक्षणाबाबत कुटुंबाचा दृष्टिकोन समजून घेणे. ग्रामीण भारतातील विशेषता महाराष्ट्रातील महिला व मुलींच्या शिक्षणाबाबत महिलांना येणाऱ्या सामाजिक-सांस्कृतिक अडथळ्यांचा शोध घेणे. महिला शिक्षण सुधारण्यासाठी येणाऱ्या अडथळ्यांना तोंड देण्यासाठी योग्य उपाययोजना सुचवणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधन पेपर दुय्यम स्रोतावर (Secondary Data) आधारित आहे. संशोधनासाठी पुस्तके जर्नल आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या साहित्याचाव शासकीय अहवालांचा आधार घेण्यात आला आहे. या अभ्यासात अनेक स्रोतांकडून मिळालेल्या डेटाचे विश्लेषण केले आहे, ज्यात हे समाविष्ट आहे: • वार्षिक शैक्षणिक स्थिती अहवाल (ASER) सर्वेक्षण (२०१५-२०२३) • राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS-५, २०१९-२१) • शिक्षणासाठी एकीकृत जिल्हा माहिती प्रणाली (UDISE+) डेटा (२०१८-२०२३) • जनगणना डेटा (२०११) आणि लोकसंख्या अंदाज • शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीवरील सरकारी अहवाल हा दुय्यम डेटा विविध राज्ये आणि लोकसंख्याशास्त्रीय गटांमध्ये नोंदणी, धारणा आणि शिक्षण परिणामांमधील ट्रेंडची मॅक्रो-लेव्हल समज प्रदान करतो.

**भारतातील विशेषतः ग्रामीण महिलांची सामाजिक वर्जितता:** भारतातील एकूण लोकसंख्येच्या ७२.२ %लोकसंख्या खेड्यात राहते. यात महाराष्ट्रात १००० पुरुषांमागे ९६६ स्त्रिया आहेत. शिक्षण आणि इतर मूलभूत सुविधांच्या अभावी आजही ग्रामीण भागातील स्त्री, पुरुष पारंपरिक व्यवस्थेत बंदिस्त आहेत. गावगाड्यातील स्त्रियांचे वेगवेगळ्या पातळ्यांवर होणारे शोषण आजपर्यंत कोणत्याही सिद्धांतनात पुरेशा प्रमाणात मांडले गेलेले नाही. भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजही भारतात ६० ते ६५ टक्के लोक पारंपरिक पद्धतीने शेती व्यवसाय करतात. शेती व्यवसायात कोणत्याही एका जातीचा समावेश नसून महाराष्ट्रातील अनेक जाती शेती आणि शेतीला पूरक उद्योग, व्यवसाय करतात. शेती आणि शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या जातीजमातीतील स्त्रिया श्रमव्यवस्थेत पुरुषांइतकाच किंवा पुरुषांपेक्षा अधिक वाटा देत असतात. जातीच्या उतरंडीवर स्त्रियांच्या श्रमाची तीव्रता वाढत जाते. आणि तेवढाच त्यांचा सामाजिक दर्जा घसरत जातो. शिक्षणासारख्या मूलभूत गरजेपासून आपल्या सगळ्याच मानवी अधिकारापासून संविधान निर्मितीच्या ७५वर्षानंतर देखील या स्त्रिया वंचित आहेत. या सगळ्या स्त्रियांचे प्रश्न जात आणि धर्माच्या आधारे पुरुषसत्ताक व्यवस्था नियंत्रित करत असते. अलुतेदारी आणि बलुतेदारी व्यवस्थेत वसाहत काळापूर्वी विनिमयाचे साधन पैसा नसून शेतात उत्पन्न झालेले पीक असे, त्यामुळे संपूर्ण गावगाडा शेतीवर अवलंबून असे. शेतकरी शेतीचा मालक असल्यामुळे आणि बाकी सगळे त्याच्यावर अवलंबून असल्यामुळे आणि या सगळ्यांवर पुरोहितशाही, सावकारशाही आणि सरंजामशाहीचे वर्चस्व असल्यामुळे ही व्यवस्था विषमतामूलक होती. अशा परिस्थितीत स्त्रिया समाजरचनेच्या सगळ्यात तळाशी होत्या. मुळात या स्त्रियांमध्ये व्यवस्थेने निर्माण केलेली सामाजिक आणि आर्थिक दरी असली आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या संघर्षाची वेगवेगळी प्रारुपे समाज जीवनात अस्तित्वात असली तरी या स्त्रियांची सामंजस्याची पातळी प्रगल्भ होती. त्यांच्यातील भगिनीभावाची समज निर्माण झालेली होती. त्याचे अवशेष वसाहत काळापासून आजतागायत उद्ध्वस्त होत जाणाऱ्या गावगाड्यात दिसतात. या स्त्रियांची विभागणी वर्ण-जाती आणि धर्मव्यवस्थेत झाल्यामुळे त्यांच्या एकत्वावर, भगिनीभावावर फार चर्चा झाली नाही. विशिष्ट काळातील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्थित्यंतरानुसार गावगाड्याची परिस्थिती बदलत गेली या बदलत्या परिस्थितीत स्त्रियांचे जगणे बदलले. भारतातील आणि विशेषतः ग्रामीण महाराष्ट्रातील महिलांची सामाजिक वर्जितता (Social Exclusion) ही एक अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया असून तिचे मूळ पुरुषप्रधान संस्कृती, जात व्यवस्था आणि आर्थिक विषमता यांत खोलवर रुजलेले आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून याचे विश्लेषण खालील मुद्द्यांच्या आधारे करता येईल:

**पुरुषसत्ताक पद्धती आणि लिंगाधारित श्रमविभागणी:** ग्रामीण भागात महिलांना प्रामुख्याने घरगुती कामांसाठी आणि शेतीतील कमी मजुरीच्या कामांसाठी मर्यादित ठेवले जाते. कुटुंबातील महत्त्वाचे निर्णय (आर्थिक, मालमत्ता, शिक्षण) पुरुष घेतात, ज्यामुळे स्त्रियांची स्वायत्तता संपते. 'चांगली पत्नी आणि आई' या पारंपरिक प्रतिमांमुळे स्त्रियांना सार्वजनिक क्षेत्रात वावरण्यावर मर्यादा येतात.

आर्थिक वर्जितता आणि संसाधनावरील मालकीचा अभाव: ग्रामीण महाराष्ट्रातील बहुतांश महिला शेतमजूर म्हणून काम करतात, परंतु त्यांच्याकडे जमिनीची मालकी नसते. समान कामासाठी पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी वेतन दिले जाते.नवीन तंत्रज्ञान आणि बँकिंग व्यवहारांपासून ग्रामीण महिलांना दूर ठेवले जाते, ज्यामुळे त्यांचे आर्थिक परावलंबन वाढते.

शिक्षण आणि आरोग्याची वर्जितता: ग्रामीण भागात आजही मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते, ज्यामुळे मुलींचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण जास्त आहे. कुपोषण आणि ॲनिमिया (रक्तक्षय) यांसारख्या समस्या ग्रामीण महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात, कारण कुटुंबात त्यांच्या आहाराकडे दुर्लक्ष केले जाते.

**जात आणि सामाजिक वर्जितता**: वर्जिततेचा अनुभव सर्व स्त्रियांना सारखा नसतो. दलित आणि आदिवासी महिलांना लिंगाधारित भेदभावासोबतच जातीय भेदभावाचा दुहेरी फटका बसतो. त्यांना केवळ सामाजिकच नव्हे तर भौगोलिकदृष्ट्याही (उदा. वस्त्यांचे विलगीकरण) मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले जाते. महाराष्ट्रातील विशेषतः विदर्भासारख्या भागात शेतकरी आत्महत्यांमुळे विधवा झालेल्या महिलांना प्रचंड सामाजिक बहिष्काराचा सामना करावा लागतो. नवऱ्याने सोडून दिलेल्या स्त्रियांना समाजात 'अशुभ' मानले जाते आणि त्यांना अनेक धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांतून वर्ज्य केले जाते

**हिंसाचार आणि असुरक्षितता:** घरगुती हिंसाचार ही ग्रामीण भागातील एक गंभीर समस्या आहे. अनेकदा दारूचे व्यसन आणि पुरुषी अहंकार यातून स्त्रियांना शारीरिक व मानसिक छळाला सामोरे जावे लागते.

ग्रामीण महाराष्ट्रातील महिलांची वर्जितता ही केवळ वैयक्तिक नसून ती संस्थात्मक आहे. महिलांची वर्जितता ही समाजातील पारंपरिक भूमिकांचे परिणाम मानली जाते. पुरुषप्रधान समाजात संसाधनांवर नियंत्रण पुरुषांकडे असल्याने महिलांना दुय्यम स्थान मिळते. ग्रामीण महाराष्ट्रातील महिलांची सामाजिक स्थिती ही अनेक ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घटकांमुळे वर्जिततेकडे झुकलेली आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता ही वर्जितता केवळ लिंगभेदापुरती मर्यादित नसून ती सामाजिक संरचना, परंपरा, आर्थिक साधनसंपत्ती आणि राजकीय सहभाग यांच्याशी निगडित आहे. ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाला कमी प्राधान्य दिले जाते, ज्यामुळे त्यांचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण मर्यादित राहते. पितृसत्ताक व्यवस्था महिलांना घरगुती भूमिकेतच मर्यादित ठेवते. महिलांना आरोग्य सुविधा व रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होतात. कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक अत्याचार आणि स्त्री भ्रूणहत्या यांसारख्या समस्या महिलांच्या सामाजिक सहभागाला रोखतात. महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग कमी असल्याने त्यांचा आवाज समाजात ऐकू येत नाही. रोजगार व मालकी हक्कांपासून वंचित राहिल्यामुळे महिलांची आर्थिक स्वायत्तता मर्यादित राहते. महाराष्ट्रातील महिलांचे लोकसभेतले प्रतिनिधित्व अत्यल्प आहे, ज्यामुळे धोरणनिर्मितीत त्यांचा सहभाग कमी राहतो. महिलांच्या वर्जिततेला सामाजिक अन्याय मानून समानतेसाठी संघर्ष आवश्यक ठरतो.

**ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील शिक्षणातील लिंगभाव असमानता:** लिंगभेद म्हणजे व्यक्तींना त्यांच्या लिंगाच्या आधारावर दिले जाणारे प्राधान्यपूर्ण वर्तन आणि पूर्वग्रहदूषित गृहीतके. हा पक्षपात सामाजिक नियम आणि शक्तीच्या गतिशीलतेद्वारे प्रकट होतो जे विशिष्ट लिंगांना इतरांपेक्षा प्राधान्य देतात, समाजातील संसाधने, भूमिका आणि जबाबदाऱ्यांच्या वितरणावर परिणाम करतात. लिंगभेद केवळ लिंगभावाच्या रूढींनाच बळकटी देत नाही तर विशिष्ट लिंगांना उपलब्ध असलेल्या संधी मर्यादित करून आणि सामाजिक प्रक्रियांमध्ये पूर्णपणे सहभागी होण्याच्या आणि त्यांचा लाभ घेण्याच्या त्यांच्या क्षमतेवर परिणाम करून लिंगभाव समानता साध्य करण्याच्या प्रयत्नांना लक्षणीयरीत्या अडथळा आणतो. ग्रामीण महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणातील लिंगभाव असमानता (Gender Inequality) ही केवळ साक्षरतेच्या आकड्यांपुरती मर्यादित नसून, ती संधी, संसाधने आणि सामाजिक मानसिकतेशी निगडित आहे. प्लॅन इंटरनॅशनल नुसार, ही विषमता खोलवर रुजलेल्या सामाजिक नियमांमधून उद्भवते. या असमानतेचे प्रमुख पैलू खालीलप्रमाणे आहेत

१. साक्षरता आणि नोंदणी दरातील तफावत; महाराष्ट्रात पुरुषांचा साक्षरता दर ९१.५% आहे, तर महिलांचा ८०.६% आहे. ग्रामीण भागात तर २१.५% लोक निरक्षर आहेत, ज्यात महिलांचे प्रमाण अधिक आहे. शिक्षणात गळतीचे प्रमाण (Dropout Rate) अधिक आहे. प्राथमिक स्तरावर मुलींची नोंदणी ९३% असली तरी, माध्यमिक स्तरावर ती ६४% पर्यंत खाली येते. ग्रामीण भागात १० वी पूर्ण करणाऱ्या मुलींचे प्रमाण ५०% पेक्षाही कमी आहे. ७ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील साक्षरता दर २००७-०८ मध्ये ७९.१ टक्क्यांवरून २०१७-१८ मध्ये ८६.३ टक्क्यांपर्यंत वाढला (ग्रामीण भागात ८१.४ टक्के आणि शहरी भागात ९२.९ टक्के). महिला साक्षरता दर (८०.६ टक्के) पुरुषांपेक्षा तुलनेने कमी होता(९१.५ टक्के). (बॅलार्ड ब्रीफ)

२. मुलींच्या शिक्षणातील पायभूत अडथळे: शाळांचे अंतर आणि मुलींची सुरक्षितताअसल्याने ग्रामीण भागात प्राथमिक शाळा जवळ असल्या तरी, माध्यमिक शाळांसाठी ४५.३% घरांना लांबचे अंतर कापावे लागते. प्रवासातील असुरक्षिततेमुळे पालक मुलींचे शिक्षण थांबवतात (महालॅब रिपोर्ट). ग्रामीण शाळांमध्ये पायाभूत सुविधाचा अभाव असल्याने स्वतंत्र स्वच्छतागृहांचा अभाव आणि मासिक पाळीच्या काळातील असुविधांमुळे मुलींच्या उपस्थितीवर परिणाम होतो (युनिसेफ).गरिबीमुळे पालक मुलाच्या शिक्षणावर खर्च करणे पसंत करतात, तर मुलीला घरकामात मदतनीस किंवा मजुरीसाठी वापरले जाते (CRY इंडिया)

३. डिजिटल डिव्हाइड (Digital Divide): आधुनिक काळात शिक्षणासाठी तंत्रज्ञान महत्त्वाचे झाले आहे, परंतु ग्रामीण भागात स्मार्टफोन आणि इंटरनेटच्या वापरात मुली मागे आहेत. ९०% तरुणांकडे स्मार्टफोन असले तरी, मुलींपेक्षा मुलांकडे त्याचे मालकी हक्क जास्त आहेत, ज्यामुळे मुलींच्या माहिती मिळवण्याच्या संधीवर मर्यादा येतात (न्यूझरील एशिया)

४. सांस्कृतिक आणि सामाजिक अडथळे: मुलींबद्दलच्या सांस्कृतिक पद्धती आणि रूढी त्यांच्या खोलवर रुजलेल्या सांस्कृतिक पद्धतींमुळे त्यांना शैक्षणिक संधी नाकारतात. कुटुंबाशी संबंधित मूल्ये जसे की मुलांचे शिक्षण घेणे आवश्यक आहे, तर मुलींनी घराची काळजी घेतली पाहिजे आणि यामुळे कुटुंबे त्यांच्या मुलींना शाळेत प्रवेश देत नाहीत.सामाजिक अपेक्षा, भेदभाव आणि पारंपारिक लिंग भूमिकांमुळे मुलींना समान संधी मिळत नाही आणि यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो आणि त्यांच्या गळतीचे प्रमाण वाढते. ASER सेंटरच्या संशोधन संचालक सुमन भट्टाचार्य यांनी टिप्पणी केली की, *“मुलींनी सामाजिक आणि कौटुंबिक अपेक्षांनुसार वागावे आणि स्वतंत्र कृती करण्यापासून दूर राहावे ही अपेक्षा त्यांच्यापैकी अनेकांच्या जीवनाची आणि विचारांची स्पष्ट रचना करते. मग तरुणींमध्ये कुतूहल, टीकात्मक विचारसरणी आणि जोखीम घेण्याचे धाडस कसे विकसित होऊ शकते?”*

जानेवारी २०२० मध्ये, संयुक्त राष्ट्र बाल निधीने एक अहवाल प्रकाशित केला ज्यामध्ये असे दिसून आले की, जागतिक स्तरावर, "सर्वात गरीब घरातील तीनपैकी एककिशोरवयीन मुलगी कधीही शाळेत गेली नाही." भारतीय संदर्भात, उच्च शिक्षण संस्थांमध्ये जास्त महिला प्रवेश घेतात आणि पुरुषांपेक्षा दहावीच्या बोर्ड परीक्षा उत्तीर्ण करण्यात अधिक यशस्वी होतात, परंतु ८४% महिलांना त्यांच्या पदवी पूर्ण करण्यापासून रोखले जाते. नवीनतम आकडेवारीनुसार , महिला साक्षरता ६४.६% आणि पुरुष साक्षरता ८०.९% आहे.

**महिला शिक्षण सुधारण्यासाठी येणाऱ्या अडथळयांना तोंड देण्यासाठी योग्य उपाययोजना** ग्रामीण महाराष्ट्रातील महिला आणि मुलींच्या शिक्षणात येणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक अडथळ्यांवर मात करण्यासाठी खालीलप्रमाणे बहुआयामी उपाययोजना करता येतील:

१. आर्थिक सक्षमीकरण आणि प्रोत्साहन: मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी पालकांना आर्थिक प्रोत्साहन दिले जावे. महाराष्ट्रातील लेक लाडकी योजना अंतर्गत मुलीला १८ वर्षांपर्यंत टप्प्याटप्प्याने १ लाख १ हजार रुपयांची मदत दिली जाते. महाराष्ट्र सरकारने २०२४-२५ पासून ८ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींसाठी व्यावसायिक अभ्यासक्रमांची (Engineering, Medical, etc.) १००% शिक्षण फी माफ केली आहे. माध्यमिक स्तरावरील गळती रोखण्यासाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती सारख्या योजनांचा प्रभावी विस्तार करणे आवश्यक आहे.

२. पायाभूत सुविधा आणि सुरक्षितता: लांब अंतरावरील शाळांमुळे होणारी गळती थांबवण्यासाठी 'मानव विकास मिशन' अंतर्गत मोफत बस सेवा आणि सायकलींचे वाटप अधिक व्यापक करावे. शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र आणि स्वच्छ स्वच्छतागृहे आणि मासिक पाळी व्यवस्थापन (Menstrual Hygiene Management) सुविधा उपलब्ध करून दिल्यास उपस्थिती वाढते.दुर्गम भागातील मुलींसाठी 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय' (KGBV) सारख्या निवासी शाळांची संख्या वाढवणे हा एक प्रभावी पर्याय आहे.

३. सामाजिक मानसिकता आणि समुदाय सहभाग: 'बेटी बचाओ बेटी पढाओ' सारख्या मोहिमांमार्फत मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व सांगून बालविवाहासारख्या प्रथांविरुद्ध लोकचळवळ उभी करणे गरजेचे आहे. ग्रामीण शाळांमध्ये महिला शिक्षकांचे प्रमाण वाढवल्यास पालकांचा विश्वास वाढतो आणि मुलींना एक 'रोल मॉडेल' मिळते. ग्रामपंचायत आणि शाळा व्यवस्थापन समितीमध्ये (SMC) महिलांचा सहभाग वाढवून मुलींच्या शैक्षणिक प्रश्नांवर स्थानिक पातळीवर तोडगा काढणे.

४. लवचिक शिक्षण पद्धती: ज्या मुली घरकामामुळे शाळेत जाऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी 'डिजिटल जेंडर ॲटलस' आणि ऑनलाइन शिक्षण साधनांचा वापर करून शिक्षणाची दारे खुली करावीत. पारंपरिक शिक्षणासोबतच कौशल्य विकास (Vocational Training) दिल्यास मुलींना आर्थिक स्वावलंबन मिळवणे सोपे जाते.

या उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकार, स्वयंसेवी संस्था (NGOs) आणि स्थानिक समुदाय यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:** ग्रामीण महाराष्ट्रात मुलींच्या शिक्षणासाठी आरटीई (RTE) कायदा आणि विविध सरकारी योजनांमुळे नोंदणी वाढली असली तरी, गुणवत्तेचे शिक्षण आणि ते पूर्ण करण्यातील अडथळे दूर करण्यासाठी सामाजिक बदलाची गरज आहे.लैंगिकता, वयवाद, वंशवाद, सक्षमता आणि विषमतावाद आणि इतर सर्व प्रकारच्या भेदभावात रुजलेल्या असमानता नष्ट करणे आवश्यक आहे. शिक्षणाची उपलब्धता सुधारण्यात लक्षणीय प्रगती झाली असली तरी, ग्रामीण मुलींना दर्जेदार शिक्षण पूर्ण करावे आणि त्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे विस्तारित जीवनाच्या संधींमध्ये रूपांतर करावे याची खात्री करण्यात मोठी आव्हाने आहेत. ग्रामीण महिलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक आणि पायाभूत सुविधांमधील अडथळ्यांना एकाच वेळी संबोधित करणारा एकात्मिक दृष्टिकोन आवश्यक आहे. मुलींच्या सक्षमीकरणासाठी आणि सामाजिक बदलासाठी शिक्षणाची परिवर्तनीय क्षमता. शिक्षणाचे निकाल आणि परिवर्तनशील क्षमता यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी अशा दृष्टिकोनाने नोंदणीच्या पलीकडे जाऊन शिक्षण टिकवून ठेवणे आवश्यक आहे.

**References:**


1. Esther, G.G., Rocío, J.F., & Pilar, A. (2020). Education for Sustainability and the Sustainable Development Goals: Re-Service Teachers' Perception
2. UNFPA. (2020). Report on Funding for gender equality and the empowerment of women and girls in humanitarian programming. https://www.unfpa.org/sites/default/files/pub
3. United Nations International Children Education Funds. (2020). Gender equality in south Asia.https://www.unicef.org/rosa/what-we-do/gender-equality.
4. https://plan-international.org/learn/what-is-gender-inequality/
5. Directorate Of Economics And Statistics, Planning Department,, Government Of Maharashtra, Mumbai. https://mahades.maharashtra.gov.in/files/report/EDUCATION_STATE_002.pdf

6. Annual Status of Education Report (ASER). (2023). Annual status of education report (rural) 2022. ASER Centre.
7. Chandrasekhar, S., Rani, P., & Sahoo, S. (2022). Household resource allocation and educational investment decisions in rural India: Evidence from a mixed-methods study. Journal of Development Studies, 58(4), 634-651. https://doi.org/xxxx
8. Chaudhary, R., & Verick, S. (2019). Distance, transportation infrastructure, and girls' education: Evidence from rural India. Journal of Development Economics, 140, 242-259. https://doi.org/xxxx
9. Datta, A., & Bhattacharyya, P. (2017). Constraints of marriage and the effects of migration on girls' education in India. Education, Gender and Development, 22(2), 159-176. https://doi.org/xxxx
10. Jha, J., & Choudhary, R. (2021). The Mid-Day Meal Scheme and its impact on educational outcomes in rural India. Economic of Education Review, 82, 102106. https://doi.org/xxxx
11. Kumar, A., & Gupta, S. (2021). Safety first: Parental concerns and girls' access to secondary education in rural Rajasthan. International Journal of Educational Development, 81, 102327. https://doi.org/xxxx
12. Mehta, S., & Singh, K. (2022). Economic determinants of educational outcomes for rural girls: A panel study from six Indian states. World Development, 149, 105698. https://doi.org/xxxx
13. Ministry of Education. (2021). Samagra Shiksha: An integrated scheme for school education. Government of India.
14. Ministry of Women and Child Development. (2023). Beti Bachao Beti Padhao: Implementation guidelines for state governments/UTs. Government of India.
15. Mohanty, S. (2021). Intersectionality and educational inequality: A case study of Dalit girls in rural India. Comparative, Education Review, 65(3), 517-539. https://doi.org/xxxx
16. Nayar, U. (2022). Girls' education in India: Progress and challenges. Oxford University Press.
17. Patel, R. (2020). School infrastructure and girls' educational outcomes: Evidence from rural India. Education Economics, 28(2),186-203. https://doi.org/xxxx
18. Raj, A., Saggurti, N., Balaiah, D., & Silverman, J. G. (2020). Early marriage and its association with educational attainment and maternal health outcomes in five North Indian states. International Journal of Gynecology & Obstetrics, 150(2), 246-253. https://doi.org/xxxx
19. Sahoo, S. (2020). Kasturba Gandhi Balika Vidyalaya (KGBV) and girls' education in India: An evaluation. Journal of Education Policy, 35(6), 820-843. https://doi.org/xxxx
20. Sen, A. (2020). Development as freedom: The capability approach revisited. Oxford University Press.
21. Sharma, A., & Jain, D. (2021). Gender bias in educational investments: Evidence Research Paperfrom rural households in North India. Indian Journal of Gender Studies, 28(1), 24-47. https://doi.org/xxxx
22. Unterhalter, E. (2019). The many meanings of quality education: Politics of targets and indicators in SDG. International Journal of Educational Development, 68, 1-12. https://doi.org/xxxx

# ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार : कारणे व प्रतिबंधात्मक उपाय

**निर्मला कारभारी वाघ** संशोधक विद्यार्थीनी, समाजशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** भारतीय ग्रामीण समाजामध्ये महिला कुटुंब व समाजाचा महत्त्वाचा आधारस्तंभ असल्या तरी त्यांना विविध प्रकारच्या हिंसाचाराला सामोरे जावे लागते. शारीरिक, मानसिक, लैंगिक व आर्थिक हिंसाचार ही ग्रामीण महिलांची गंभीर सामाजिक समस्या आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये ग्रामीण महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराची संकल्पना, कारणे, परिणाम तसेच त्यावरील प्रतिबंधात्मक उपायांचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात आला आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, कायदेविषयक जागृती व सामाजिक सहभाग यांद्वारे हिंसाचार रोखता येऊ शकतो, हे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**प्रस्तावना:** भारतीय समाजरचना ही ऐतिहासिकदृष्ट्या पितृसत्ताक स्वरूपाची राहिली आहे. या समाजरचनेत स्त्री-पुरुष यांच्यातील भूमिका, अधिकार व जबाबदाऱ्या ठरवताना स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले आहे. विशेषतः ग्रामीण समाजामध्ये परंपरा, रूढी, अंधश्रद्धा, अशिक्षण व आर्थिक परावलंबन यांमुळे महिलांचे जीवन अधिक मर्यादित झालेले दिसते. ग्रामीण महिला या शेती, कुटुंबव्यवस्था, पशुपालन व घरगुती अर्थव्यवस्थेचा कणा असतानाही त्यांचे श्रम, योगदान व अधिकार दुर्लक्षित राहतात. ग्रामीण भागात महिलांविरुद्ध होणारा हिंसाचार हा केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न नसून तो एक गंभीर सामाजिक समस्या आहे. कौटुंबिक हिंसाचार, हुंड्यासाठी छळ, बालविवाह, लैंगिक शोषण, मानसिक त्रास, कामाच्या ठिकाणी होणारा छळ अशा विविध स्वरूपात हा हिंसाचार प्रकट होतो. अनेक वेळा सामाजिक दबाव, बदनामीची भीती, आर्थिक अवलंबित्व व कायदेविषयक अज्ञान यांमुळे महिला हा अन्याय सहन करतात. स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या संरक्षणासाठी विविध कायदे, योजना व धोरणे अस्तित्वात आली असली तरी ग्रामीण पातळीवर त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे हिंसाचाराची समस्या अजूनही कायम आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचाराची कारणे, स्वरूप, परिणाम व प्रतिबंधात्मक उपाय यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

**उद्दिष्टये:** १) ग्रामीण महिला हिंसाचाराचा संकल्पना स्पष्ट करणे. २) भारतीय समाजात हिंसाचाराचे स्वरूप जाणून घेणे. ३) हिंसाचाराची कारणे शोधणे. ४) ग्रामीण महिला हिंसाचार थांबविण्यासाठी उपाययोजना सूचविणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधन पेपर हा वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे. या अभ्यासामध्ये ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार ही सामाजिक समस्या समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. संशोधनासाठी मुख्यतः दुय्यम माहिती स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी माहिती संकलन करताना समाजशास्त्रीय ग्रंथ, संशोधन लेख, नियतकालिके, महिला व बालविकास मंत्रालयाचे शासकीय अहवाल, राष्ट्रीय व राज्यस्तरीय सर्वेक्षण अहवाल, तसेच स्वयंसेवी संस्थांचे संशोधन अहवाल यांचा आधार घेण्यात आला आहे. उपलब्ध माहितीचे संकलन करून तिचे वर्गीकरण, तुलना व विश्लेषण करण्यात आले आहे. व त्या आधारेच संशोधन विषयाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे

**ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचाराची संकल्पना:** महिलांवरील हिंसाचार म्हणजे सामान्यत कोणत्याही वयोगटातील, कोणत्याही जातीच्या आणि जातीच्या महिलांवरील अपराध, गुन्हे कोणत्याही प्रकारचे असू शकतात. सहसा, त्यात खून, अत्याचार, विनयभंग,बलात्कार आणि बालहत्या,आणि घरगुती हिंसाचार यांचा समावेश असतो.दरवर्षी भारतात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढतच आहे. 2012 मध्ये भारतातील महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण 4 % होते, म्हणजे सरासरी तीन मिनिटांतच एक महिला हिंसाचाराला बळी पडते.भारतातील महिलांवरील गुन्हे अनेक रूप धारण करतात. ग्रामीण होणारे महिलांविरुद्ध हिंसाचार म्हणजे महिलांवर केवळ स्त्री असल्यामुळे, मानसिक, लैंगिक किंवा आर्थिक स्वरूपाचे अन्यायकारक व अत्याचारी वर्तन होय.

**ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचाराचे स्वरूप:** ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार विविध स्वरूपांत प्रकट होतो. हे स्वरूप समजून घेतल्याशिवाय समस्येची तीव्रता लक्षात येत नाही.

**१] शारीरिक हिंसाचार** : मारहाण, उपासमार, जबरदस्तीने श्रम करून घेणे, वैद्यकीय उपचार न देणे इत्यादी प्रकार शारीरिक हिंसाचारात मोडतात. हा हिंसाचार अनेकदा कौटुंबिक पातळीवर घडतो.

**२] मानसिक हिंसाचार**: सतत अपमान करणे, संशय घेणे, धमकी देणे, चारित्र्यावर शंका घेणे, घरातून हाकलून देण्याची भीती दाखवणे अशा प्रकारे महिलांवर मानसिक दबाव टाकला जातो.

**३] लैंगिक हिंसाचार** : जबरदस्ती, संमतीशिवाय लैंगिक संबंध, वैवाहिक बलात्कार, लैंगिक शोषण हे ग्रामीण महिलांसाठी गंभीर प्रश्न आहेत.

**४] आर्थिक हिंसाचार** : महिलांच्या उत्पन्नावर नियंत्रण ठेवणे, मजुरी न देणे, मालमत्ता व वारसा हक्क नाकारणे, कर्जासाठी महिलांचा गैरवापर करणे.

**ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचाराची कारणे:** महिलांवरील होणाऱ्या हिंसाचाराबाबत विविधता आढळून येते. आज समाजात महिलांवरील होणाऱ्या अत्याचारामध्ये सर्वप्रथम पालकांच्या मुला, मुलीमधील दृष्टीकोनातील फरकामुळे बराच प्रभाव पडत आहे. बालवयापासून मुलींना टोचून बोलले जाते. हुंड्यासाठी सतत छळ केला जातो. हुंडापध्दतीमुळे अनेक मुलींचे विवाह मोडले जातात. एकटी महिला पाहून तिच्यावर बलात्कार केला जातो. निर्भया हत्याकांड सारखे प्रकारची पुर्नवृत्ती केली जाते. कौटुंबिक व सामाजिक विघटनामुळे मुलांवरील नियंत्रण कमी होऊन अशी मुले गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतात. पत्नीला होणाऱ्या मारहानीमध्ये आईवडिलांना व नातेवाईकांना उध्दटपणे बोलणे, चारित्र्यावर संशय घेणे, स्वंयपाक बिघडणे, पती व्यसनी असणे, मुलांवरुन वाद होणे या व अशा अनेक कारणामुळे महिलांवर अत्याचार होतात.

**१. पितृसत्ताक सामाजिक व्यवस्था:** पुरुषप्रधान विचारसरणीमुळे महिलांना दुय्यम स्थान दिले जाते, निर्णय प्रक्रियेत सहभाग नसणे .

**२. अशिक्षण व अज्ञान** - शिक्षणाच्या अभावामुळे महिलांना आपले हक्क व कायदे माहित नसतात.

**३. आर्थिक परावलंबन** - उत्पन्नाचे स्वतंत्र साधन नसल्यामुळे महिलांना अन्याय सहन करावा लागतो.

**४. दारू व व्यसनाधीनता** - पुरुषांच्या व्यसनामुळे कौटुंबिक हिंसाचार वाढतो.

**५. हुंडा प्रथा हुंडाबळी आणि अनिष्ट प्रथा:** ग्रामीण भागात हुंड्यासाठी लग्न मोडणे किंवा सासरी शारीरिक-मानसिक अत्याचार करणे

**६. बालविवाह** – अल्पवयीन मुली मानसिक व शारीरिक हिंसाचाराला बळी पडतात.

**७. कायद्यांची अपुरी अंमलबजावणी** – कायदे असूनही अंमलबजावणीत त्रुटी.

**८. सामाजिक दबाव व बदनामीची भीती** –अब्रू जाण्याच्या भीतीने किंवा समाजाच्या दबावामुळे हिंसाचार सहन करणे.

**प्रतिबंधात्मक उपाय:** दिवसेंदिवस महिलांवर अन्याय, अत्याचार, हिंसाचार, खून होण्याचे प्रमाण वाढत आहे. अशा हिंसाचाराला वेळीच आळा बसावा म्हणून काही उपायांचा अवलंब केल्यास ही समस्या सुटू शकेल.

**१.आर्थिक सक्षमीकरण**: महिला बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे.

**२.कायदेशीर साक्षरता**: हिंसाचाराविरोधात कायदे (कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५) याविषयी जनजागृती करणे.

**३.शिक्षण:** ग्रामीण मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे.

**४.पोलीस हेल्पलाइन आणि वन स्टॉप सेंटर**: ग्रामीण भागात पोलीस हेल्पलाइन नंबर (१०३) आणि वन स्टॉप सेंटर्स (ओ.एस.सी.) ची माहिती पोहोचवणे, ज्यामुळे तत्काळ मदत मिळेल.

**५.सामुदायिक हस्तक्षेप**: स्थानिक ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था (NGO) आणि पुरुषांच्या सहभागाने लैंगिक समानता रुजवणे.

६.ग्रामीण भागात हिंसाचाराच्या घटना उघडकीस आणण्यासाठी आणि सुरक्षित वातावरण निर्मितीसाठी समुपदेशन केंद्र आणि ग्रामसभांमध्ये हा विषय मांडणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**: ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार ही बहुआयामी व संरचनात्मक समस्या आहे. तिची मुळे पितृसत्ताक व्यवस्था, अशिक्षण व आर्थिक परावलंबनात आहेत. महिलांचे शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, कायदेविषयक जागरूकता आणि सामाजिक दृष्टिकोनात बदल घडवून आणल्यास ही समस्या कमी करता येऊ शकते. ग्रामीण महिलांचे सशक्तीकरण हाच हिंसाचार प्रतिबंधाचा सर्वात प्रभावी मार्ग आहे.

**संदर्भग्रंथ :**

१. माधवी, कवि, २००६, महिला कल्याण आणि विकास, नागपूरः विद्या प्रकाशन.
२. गोटे, शुभांगी, २००४. महिला सबलीकरण स्वरुप व समस्या, औरंगाबादः वरद पब्लिकेशन.
३. सरोदे, असिम, २००७. कौटुंबिक हिंसाचार आणि कायदा.
४. घाटगे, जयंत, १९९९. समकालीन भारतातील सामाजिक समस्या, कोल्हापूर : सकाळ प्रिंटिंग प्रेस.

५. घोष, बी.एन. – Women and Development in India
६. भारत सरकार – महिला व बालविकास मंत्रालय अहवाल
७. समाजशास्त्रीय नियतकालिके, संशोधन लेख, NGO reports

# ग्रामीण महिला सबलीकरणापुढील आव्हाने: एक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. प्रांजली कदम** नेताजी सुभाषचंद्र बोस, महाविद्यालय, नांदेड.

**गोषवारा:** ग्रामीण समाज हा भारतीय सामाजिक रचनेचा कणा मानला जातो आणि या समाजाच्या सर्वांगीण विकासात ग्रामीण महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. तथापि, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक अडथळ्यांमुळे ग्रामीण महिलांचे सबलीकरण अपेक्षित गतीने घडत नाही. पितृसत्ताक समाजरचना, शिक्षणाचा अभाव, आर्थिक परावलंबन, रूढी-परंपरा व सामाजिक असमानता ही ग्रामीण महिला सबलीकरणासमोरील प्रमुख आव्हाने आहेत. या शोध निबंधात ग्रामीण महिला सबलीकरणाची संकल्पना स्पष्ट केली असून, त्यापुढील सामाजिक आव्हानांचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच ग्रामीण महिला सबलीकरणासाठी आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला आहे. महिला सक्षम झाल्यास कुटुंब, समाज व राष्ट्राच्या विकासाला गती मिळते, हे या अभ्यासातून अधोरेखित होते.

***कीवर्ड्स :*** *ग्रामीण महिला, सबलीकरण, पितृसत्ता, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन*

**प्रस्तावना: "मी स्त्रीच्या प्रगतीवरून समाजाची प्रगती मोजतो."** - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

हा विचार भारतीय समाजातील महिला सबलीकरणाचे सामाजिक महत्त्व स्पष्टपणे अधोरेखित करतो. याच अनुषंगाने असेही म्हटले जाते की, "**स्त्री सक्षम झाली, तर कुटुंब सक्षम होते; कुटुंब सक्षम झाले, तर समाज सक्षम होतो.**" ही संकल्पना ग्रामीण महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेचे मूळ तत्त्व दर्शवते. ग्रामीण समाज हा भारतीय सामाजिक रचनेचा कणा मानला जातो आणि या समाजाच्या जडणघडणीत ग्रामीण महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. शेती, पशुपालन, कुटीर उद्योग, मजुरी, घरगुती व्यवस्थापन तसेच सामाजिक व सांस्कृतिक परंपरा जपण्यामध्ये ग्रामीण महिला मूक पण निर्णायक भूमिका बजावत असतात. तथापि, या व्यापक योगदानाच्या तुलनेत ग्रामीण महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात अपेक्षित असा समान दर्जा व सन्मान मिळालेला नाही, ही एक गंभीर सामाजिक वास्तवता आहे. महिला सबलीकरण म्हणजे केवळ महिलांना कायदेशीर हक्क बहाल करणे नव्हे, तर त्यांना आत्मनिर्भर बनवणे, निर्णयप्रक्रियेत सक्रिय सहभाग देणे आणि स्वतःच्या जीवनाविषयी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देणे होय. ग्रामीण भागात पितृसत्ताक समाजरचना, परंपरागत रूढी, शिक्षणाचा अभाव, आर्थिक परावलंबन आणि सामाजिक बंधने यांमुळे महिला सबलीकरणाची प्रक्रिया अनेक अडथळ्यांना सामोरी जात आहे. परिणामी ग्रामीण महिलांचे श्रम, कौशल्य आणि क्षमता असूनही त्या विकासाच्या मुख्य प्रवाहापासून काही प्रमाणात दूर राहतात.

आजच्या बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत ग्रामीण महिला सबलीकरण हा केवळ स्त्रियांचा प्रश्न नसून तो संपूर्ण ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासाशी निगडित आहे. कारण महिला सक्षम झाल्यास कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीला गती मिळते, हे समाजशास्त्रीय अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. म्हणूनच ग्रामीण महिला सबलीकरणापुढील आव्हानांचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषण करणे काळाची गरज बनली आहे. या शोध निबंधात ग्रामीण महिला सबलीकरणाच्या संकल्पनेचा आढावा घेताना, त्यासमोरील प्रमुख सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक आव्हानांचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे.

**संशोधन विषयाचा उद्दिष्टे:** ग्रामीण महिला सबलीकरणाची संकल्पना समजून घेणे. ग्रामीण महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे. ग्रामीण महिला सबलीकरणापुढील प्रमुख आव्हाने स्पष्ट करणे.

**संशोधन विषयातील गृहीतकृत्य:** ग्रामीण समाजातील पितृसत्ताक व्यवस्था महिला सबलीकरणास अडथळा ठरते. शिक्षणाचा अभाव हे ग्रामीण महिला सबलीकरणातील प्रमुख आव्हान आहे. आर्थिक स्वावलंबनामुळे ग्रामीण महिलांचे सबलीकरण सुलभ होते. महिला सबलीकरणामुळे कुटुंब व समाजाचा सर्वांगीण विकास होतो.

**प्रस्तुत विषयाची संशोधन पद्धती:** सदर शोध निबंधासाठी दुय्यम माहिती संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये समाजशास्त्रीय ग्रंथ, संशोधन लेख, शासकीय अहवाल, जनगणना माहिती व संबंधित संशोधन साहित्याचा आधार घेण्यात आला आहे. माहितीचे विश्लेषण वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने करण्यात आले आहे.

**महिला सबलीकरण संकल्पना:** महिला सबलीकरण म्हणजे महिलांना स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता, आत्मविश्वास, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक सहभाग मिळवून देणे. केवळ कायदेशीर हक्क देणे म्हणजे सबलीकरण नव्हे, तर प्रत्यक्ष जीवनात त्या हक्कांचा उपयोग करता येणे हे खरे सबलीकरण होय.

**ग्रामीण महिला सबलीकरणापुढील आव्हाने:-**

**पितृसत्ताक समाजरचना:** ग्रामीण समाजात पितृसत्ताक समाजरचना ही प्रमुख सामाजिक व्यवस्था म्हणून कार्यरत आहे. या व्यवस्थेमध्ये पुरुषांना सत्ता, अधिकार व निर्णयप्रक्रियेतील प्रमुख स्थान दिले जाते, तर महिलांना दुय्यम स्थानावर ठेवले जाते. विवाह, शिक्षण, रोजगार, मालमत्ता व कौटुंबिक निर्णय हे बहुतेक वेळा पुरुषांकडून घेतले जातात. महिलांचे श्रम घरगुती व शेतीकामापुरते मर्यादित समजले जातात आणि त्यांना आर्थिक व सामाजिक मान्यता मिळत नाही."भारतीय समाजातील कुटुंबसंस्था ही पुरुषप्रधान

असून स्त्रीचे जीवन परंपरा व रूढींच्या चौकटीत बांधले गेले आहे" (जी. एस. घुर्ये) पितृसत्ताक विचारसरणीमुळे महिलांचा आत्मविश्वास कमी होतो व त्यांची निर्णयक्षमता विकसित होत नाही. परिणामी महिला सबलीकरणाची प्रक्रिया प्रभावीपणे राबवली जात नाही.

**शिक्षणाचा अभाव:** ग्रामीण भागात महिलांच्या शिक्षणाकडे आजही दुय्यम दृष्टिकोनातून पाहिले जाते. अनेक ठिकाणी मुलींचे शिक्षण प्राथमिक स्तरावरच थांबते. लवकर विवाह, घरगुती जबाबदाऱ्या, दारिद्र्य आणि सामाजिक बंधने यांमुळे मुली शिक्षणापासून वंचित राहतात. शिक्षणाअभावी महिलांना रोजगाराच्या संधी, कायदेशीर हक्कांची जाणीव तसेच सामाजिक-राजकीय जागरूकता प्राप्त होत नाही. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचा पाया मानले असून त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, "विद्या विना मती गेली,मती विना नीति गेली, नीति विना गति गेली,गति विना वित्त गेले,वित्त विना शूद्र खचले,इतके अनर्थ एका अविद्येने केले." (महात्मा फुले). या विचारातून शिक्षणाचा अभाव हा केवळ वैयक्तिक समस्या नसून तो संपूर्ण समाजाच्या अधोगतीचे कारण ठरतो, हे स्पष्ट होते. ग्रामीण महिलांच्या शिक्षणावर होणारे दुर्लक्ष त्यांच्या आत्मविश्वासाच्या विकासास, विवेकबुद्धीला व निर्णयक्षमतेला मर्यादा घालते. त्यामुळे शिक्षणाचा अभाव हा ग्रामीण महिला सबलीकरणातील एक मूलभूत व दीर्घकालीन अडथळा ठरतो.

**आर्थिक परावलंबन:** ग्रामीण महिलांचे आर्थिक योगदान मोठ्या प्रमाणात असूनही त्यांना आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त होत नाही. शेती, पशुपालन, कुटीर उद्योग व मजुरीत महिलांचे श्रम महत्त्वाचे असतात; परंतु उत्पन्नावर व संसाधनांवर पुरुषांचे नियंत्रण असते. मालमत्तेवरील हक्क, बँक व्यवहार व आर्थिक निर्णयांमध्ये महिलांचा सहभाग मर्यादित असतो."आर्थिक स्वावलंबनाशिवाय स्त्रीचे सामाजिक सबलीकरण केवळ घोषणाच ठरते" (नीलिमा देशमुख – स्त्री आणि विकास). आर्थिक परावलंबनामुळे महिलांचा आत्मसन्मान कमी होतो आणि निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित राहतो.

**परंपरागत रूढी व अंधश्रद्धा:** ग्रामीण समाजात परंपरागत रूढी, प्रथा व अंधश्रद्धांचे बंधन महिलांवर अधिक प्रमाणात दिसून येते. बालविवाह, हुंडा प्रथा, स्त्री–पुरुष असमानता, विधवांबाबत भेदभाव यांसारख्या रूढी महिला सबलीकरणात अडथळा निर्माण करतात. अंधश्रद्धांमुळे महिलांना सामाजिक अन्याय व शोषण सहन करावे लागते."स्त्री शिक्षणाशिवाय समाजाची नैतिक व बौद्धिक प्रगती अशक्य आहे" (सावित्रीबाई फुले). शिक्षणाच्या अभावामुळे रूढी व अंधश्रद्धांमुळे महिलांचा व्यक्तिमत्त्व विकास खुंटतो आणि त्या विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहतात.

**राजकीय सहभागाचा अभाव:** ग्रामीण महिलांचा राजकीय सहभाग तुलनेने कमी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण असले, तरी अनेक वेळा प्रत्यक्ष निर्णय पुरुष प्रतिनिधी घेतात. महिलांचे प्रतिनिधित्व केवळ नाममात्र स्वरूपाचे राहते. राजकीय शिक्षण व जागरूकतेचा अभाव महिलांच्या नेतृत्वगुणांच्या विकासात अडथळा ठरतो. "लोकशाहीची खरी कसोटी म्हणजे दुर्बल घटकांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग" (राजनीतिक विचार – भारत सरकार अहवाल). राजकीय सहभागाशिवाय महिला सबलीकरण पूर्णत्वास जाऊ शकत नाही.

**निष्कर्ष:** ग्रामीण महिला सबलीकरण हे ग्रामीण विकासाचे केंद्रबिंदू आहे. सामाजिक रचना व मानसिकता हे प्रमुख अडथळे ठरतात. शिक्षण व आर्थिक स्वावलंबन अनिवार्य घटक आहेत. शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. राजकीय सहभाग प्रत्यक्ष असणे गरजेचे आहे.आरोग्य व डिजिटल सुविधा महत्त्वाच्या आहेत. महिला सक्षमीकरणाने सामाजिक प्रगती वेगवान होते.

**उपाय:** लिंगसमता मूल्यांची सामाजिक पातळीवर जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. ग्रामीण मुलींचे शैक्षणिक सातत्य सुनिश्चित करणे गरजेचे आहे. महिलांचे आर्थिक स्वावलंबन बळकट करणे आवश्यक आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून सामाजिक जनजागृती करणे आवश्यक आहे. महिलांचा निर्णयप्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढवावा. ग्रामीण महिलांसाठी दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करावी. महिलांची डिजिटल साक्षरता वाढवणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. डॉ. प्रदिप आगलावे - "सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे" श्री साईनाथ प्रकाशन नागपूर
२. रा.ना. घाटोळ - " सामाजीक संशोधन तत्वे आणि पद्धीमंगेश प्रकाशन नागपूर
३. जी.एस. घुर्ये - "Indian Social Organisation" पॉप्युलर बुक डेपो, मुंबई
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - "हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनीती" सुगावा प्रकाशन औरंगाबाद
५. महात्मा फुले - "शेतकऱ्याचा असूड" पॉप्युलर प्रकाशन पुणे
६. सावित्रीबाई फुले - "काव्य फुले" स्वयंप्रकाशित पुणे
७. नागनाथ कोत्तापल्ले - "स्त्री-पुरुष तुलना" सायन पब्लिकेशन पुणे
८. नीलिमा देशमुख - "स्त्री आणि विकास" पॉप्युलर प्रकाशन पुणे
९. पाटील शरद - "भारतीय ग्रामीण समाज" मुंबई : लोकवाङ्मय गृह.
१०. माधवी कुंटे - "स्त्री सूक्त" डायमंड पब्लिकेशन पुणे

# कुटुंबसंस्थेत दलित - आदिवासी महिलांचे स्थान आणि धार्मिक नियंत्रण

**प्रा. संदिपकुमार भाऊराव रायबोले** संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
**डॉ. कमलकिशोर इंगोले** मार्गदर्शक सहाय्यक प्राध्यापक रा. सु. बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट

**गोषवारा :** भारतीय समाजव्यवस्थेत कुटुंबसंस्था ही सामाजिकरण, मूल्यसंवर्धन आणि सामाजिक नियंत्रणाची एक महत्त्वाची संस्था म्हणून कार्य करते. या कुटुंबसंस्थेच्या चौकटीत दलित—आदिवासी महिलांचे स्थान हे अत्यंत गुंतागुंतीचे आणि बहुपदरी स्वरूपाचे आहे. या महिलांचे जीवन केवळ स्त्री म्हणून नव्हे, तर जात, जमात, वर्ग आणि धर्म या सर्व घटकांच्या परस्परसंबंधातून घडते. प्रस्तुत संशोधनात कुटुंबसंस्थेत दलित—आदिवासी महिलांचे स्थान आणि त्यांच्यावर असलेले धार्मिक नियंत्रण यांचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. पारंपरिक धार्मिक संकल्पना, रूढी, परंपरा, व्रतवैकल्ये, शुचिता—अशुचिता यांसारख्या धार्मिक मूल्यांच्या आधारे महिलांच्या दैनंदिन जीवनावर नियंत्रण ठेवले जाते. मासिक पाळी, प्रसूती, विवाह, विधवा अवस्था यांसारख्या नैसर्गिक व सामाजिक अवस्थांना धार्मिक बंधनांशी जोडून महिलांना कुटुंबातील निर्णयप्रक्रियेपासून दूर ठेवले जाते. यामुळे त्यांचे सामाजिक, आर्थिक आणि मानसिक शोषण अधिक तीव्र होते. दलित—आदिवासी महिलांना कुटुंब, समाज आणि धर्म या तिन्ही पातळ्यांवर दुहेरी व तिहेरी वंचिततेला सामोरे जावे लागते. तथापि, शिक्षणाचा प्रसार, संविधानिक हक्कांची जाणीव, महिला स्वयं-सहायता गट आणि सामाजिक चळवळी यांमुळे या नियंत्रणाला विरोध करण्याची प्रक्रिया हळूहळू दृढ होत आहे. प्रस्तुत अभ्यासातून कुटुंबसंस्थेतील पितृसत्ताक व धार्मिक नियंत्रणाच्या संरचना उलगडून दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, दलित—आदिवासी महिलांच्या सशक्तीकरणासाठी सामाजिक जागृती आणि समताधिष्ठित कुटुंबसंस्थेची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

**बीज शब्द :** कुटुंबसंस्था, दलित महिला, आदिवासी महिला, पितृसत्ता, धार्मिक नियंत्रण, सामाजिक वर्ज्यता, जातीय भेदभाव, लैंगिक असमानता, परंपरा व रूढी, सांस्कृतिक नियंत्रण, धार्मिक संकेत व आचार, स्त्री-अधिकार, सामाजिक शोषण, कौटुंबिक सत्ता-संबंध, सामाजिक परिवर्तन.

**प्रस्तावना :** भारतीय समाजरचनेत कुटुंबसंस्था ही सामाजिक जीवनाची मूलभूत व प्रभावी संस्था मानली जाते. व्यक्तीचे सामाजिकरण, मूल्यनिर्मिती, संस्कार आणि वर्तननियंत्रण यांची सुरुवात कुटुंबातूनच होते. मात्र हीच कुटुंबसंस्था अनेक वेळा सामाजिक विषमता, भेदभाव आणि वर्चस्व टिकवून ठेवण्याचे साधन ठरते. विशेषतः दलित—आदिवासी महिलांच्या बाबतीत कुटुंबसंस्थेतील त्यांचे स्थान अत्यंत दुय्यम आणि मर्यादित स्वरूपाचे आढळते. या महिलांना स्त्री असण्याबरोबरच जातीय व जमातीच्या ओळखीमुळे दुहेरी किंवा तिहेरी वंचिततेला सामोरे जावे लागते. दलित—आदिवासी महिलांचे जीवन केवळ आर्थिक गरिबीपुरते मर्यादित नसून त्यावर धार्मिक परंपरा, रूढी, अंधश्रद्धा आणि पितृसत्ताक मूल्यांचा खोलवर प्रभाव आहे. कुटुंबसंस्थेत धार्मिक नियंत्रणाच्या माध्यमातून महिलांच्या वर्तनावर, विचारांवर आणि निर्णयक्षमतेवर मर्यादा घातल्या जातात. मासिक पाळी, विवाह, मातृत्व, विधवावस्था यांसारख्या जैविक व सामाजिक अवस्थांना धार्मिक शुचिता—अशुचितेच्या चौकटीत बांधले जाते. यामुळे महिलांचे स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि सामाजिक सहभाग कमी होतो.

दलित—आदिवासी समाजातील कुटुंबसंस्था एकसंघ स्वरूपाची नसून ती प्रादेशिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घटकांनुसार भिन्न स्वरूपात आढळते. काही ठिकाणी आदिवासी समाजात तुलनेने लवचिक लैंगिक भूमिका दिसून येतात, मात्र मुख्य प्रवाहातील धर्मसंस्था, ब्राह्मणी संस्कृती आणि आधुनिक पितृसत्ताक प्रभावामुळे या समाजांमध्येही महिलांवरील नियंत्रण अधिक कठोर होत गेले आहे. त्यामुळे परंपरागत समतेचे काही अंश हळूहळू नष्ट होत असल्याचे दिसून येते. धार्मिक नियंत्रण हे केवळ आध्यात्मिक मर्यादांपुरते न राहता ते सामाजिक सत्ता-संरचनेचे प्रभावी साधन बनले आहे. देव-देवता, कर्म-सिद्धांत, पाप—पुण्य, आणि पूर्वजांच्या रूढी यांचा आधार घेऊन महिलांना आज्ञाधारक, सहनशील व मौन स्वीकारणारी भूमिका निभावण्यास प्रवृत्त केले जाते. याचा परिणाम म्हणून महिलांचे शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि निर्णयप्रक्रियेतले स्थान मर्यादित राहते. सदर संशोधनाचा उद्देश कुटुंबसंस्थेत दलित—आदिवासी महिलांचे स्थान स्पष्ट करणे तसेच धार्मिक नियंत्रणाचे स्वरूप, कारणे आणि परिणाम यांचा अभ्यास करणे हा आहे. सामाजिक न्याय, लैंगिक समता आणि महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने या विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण असून, समताधिष्ठित व विवेकनिष्ठ समाजनिर्मितीसाठी या प्रश्नांचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**पुर्व साहित्याचा आढावा :** १. उमा चक्रवर्ती यांच्या "Gendering Caste: Through a Feminist Lens" (2003) या पुस्तकात कुटुंबसंस्था आणि धर्मसंस्थेतील पितृसत्ताक रचनेचे विश्लेषण केले आहे. "ब्राह्मणी पितृसत्ता" या संकल्पनेद्वारे स्त्रीवर होणारे धार्मिक नियंत्रण स्पष्ट केले आहे. दलित महिलांचे लैंगिक व सामाजिक जीवन कुटुंबसंस्थेत धर्माधारित नियमांनी नियंत्रित केले जाते. मासिक पाळी व विवाहाशी संबंधित रूढी महिलांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालतात. हा अभ्यास दलित महिलांच्या स्थानाच्या विश्लेषणासाठी महत्त्वाचा आहे. २. शर्मिला रेगे यांनी "Writing Caste/Writing Gender" (2013) या ग्रंथात दलित स्त्रीवादाच्या दृष्टिकोनातून कुटुंबसंस्थेचे विश्लेषण केले आहे. त्यांनी धार्मिक कर्मकांडांना स्त्री नियंत्रणाचे साधन मानले आहे. उपवास, व्रत आणि धार्मिक शुचिता यांद्वारे महिलांवर मानसिक बंधने लादली जातात. दलित महिलांचे शिक्षण व सार्वजनिक सहभाग त्यामुळे मर्यादित राहतो. हा अभ्यास प्रस्तुत संशोधनाला सैद्धांतिक दिशा देतो. ३. लीला दुबे यांनी "Women and Kinship: Comparative Perspectives on Gender in South and South-East Asia" (1997) या ग्रंथात कुटुंबसंस्थेतील नातेसंबंध व धार्मिक रूढींचा स्त्रियांच्या स्थानावर

होणारा प्रभाव स्पष्ट केला आहे. विवाह, वारसा आणि धार्मिक विधी हे स्त्री नियंत्रणाची साधने असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. दलित व आदिवासी महिलांच्या बाबतीत कुटुंबसंस्था अधिक बंदिस्त स्वरूपाची असल्याचे त्या अधोरेखित करतात. धार्मिक परंपरांमुळे महिलांचे श्रम अदृश्य राहतात. हा अभ्यास कुटुंबसंस्थेतील लैंगिक असमानतेचे विश्लेषण करण्यास उपयुक्त ठरतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. कुटुंबसंस्थेत दलित–आदिवासी महिलांचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थान अभ्यासणे.
२. दलित–आदिवासी महिलांवर कुटुंबसंस्थेमार्फत असलेल्या धार्मिक नियंत्रणाच्या स्वरूपाचे विश्लेषण करणे.
३. धार्मिक रूढी, परंपरा व अंधश्रद्धांचा महिलांच्या निर्णयप्रक्रिया आणि स्वातंत्र्यावर होणारा परिणाम तपासणे.
४. कुटुंबातील शुचिता–अशुचिता, व्रतवैकल्ये व धार्मिक संकेतांमुळे महिलांच्या दैनंदिन जीवनावर होणारे परिणाम समजून घेणे.
५. शिक्षण, सामाजिक जागृती आणि कायदेशीर हक्कांमुळे धार्मिक नियंत्रणात होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहिते :**

१. कुटुंबसंस्थेत दलित–आदिवासी महिलांचे स्थान पुरुषांच्या तुलनेत दुय्यम आहे.
२. धार्मिक परंपरा व रूढींच्या माध्यमातून दलित–आदिवासी महिलांवर सामाजिक व मानसिक नियंत्रण ठेवले जाते.
३. धार्मिक शुचिता–अशुचिता संकल्पनांचा महिलांच्या स्वातंत्र्य, आरोग्य व निर्णयक्षमतेवर नकारात्मक परिणाम होतो.
४. शिक्षणाचा स्तर वाढल्यास दलित–आदिवासी महिलांवरील धार्मिक नियंत्रण कमी होत जाते.
५. कुटुंबातील पितृसत्ताक रचना धार्मिक नियंत्रण बळकट करण्यास कारणीभूत ठरते.

**संशोधन पद्धती :** सदर संशोधनासाठी दलित–आदिवासी महिलांच्या सामाजिक, कौटुंबिक आणि धार्मिक स्थितीशी संबंधित अधिकृत डेटाबेस, जनगणना अहवाल, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (NSS), राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS) तसेच सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागाच्या अहवालांचे साहित्य पुनरावलोकन व विश्लेषणाची पद्धत अवलंबण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे कुटुंबसंस्थेचे स्वरूप आणि विशेषतः दलित–आदिवासी महिलांवरील धार्मिक नियंत्रणाशी संबंधित विद्यमान सैद्धांतिक व अनुभवजन्य साहित्याचा सखोल आणि सर्वसमावेशक आढावा घेण्यात आला आहे. धार्मिक परंपरा, रूढी, कर्मकांड, पितृसत्ताक मूल्ये आणि जातीय-जमाती आधारित सामाजिक संरचना यांचा कुटुंबसंस्थेतील महिलांच्या स्थानावर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी समाजशास्त्रीय, स्त्रीवादी, आंबेडकरी आणि आदिवासी अध्ययनाशी संबंधित साहित्याचा आधार घेण्यात आला आहे. अधिकृत स्त्रोतांकडील वर्तमान माहिती तसेच संख्येने मर्यादित असलेल्या काही क्षेत्रीय अभ्यासांच्या मदतीने दलित–आदिवासी महिलांची कौटुंबिक निर्णयप्रक्रियेतली भूमिका, धार्मिक निर्बंध, सामाजिक वर्तननियंत्रण आणि स्वायत्ततेची पातळी यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या अभ्यासामध्ये सैद्धांतिक चर्चा, कुटुंबसंस्थेतील सत्ता-संबंध, धार्मिक नियंत्रणाचे स्वरूप आणि त्याचे सामाजिक परिणाम यांचा परस्परसंबंध तपासण्यात आला आहे. विद्यमान महिला-केंद्रित सैद्धांतिक व अनुभवजन्य साहित्यातून मिळालेल्या अंतर्दृष्टीच्या आधारे, दलित–आदिवासी महिलांच्या समूह-विशिष्ट समस्यांचे सम्यक आकलन करण्यासाठी प्राथमिक सर्वेक्षणावर आधारित सखोल क्षेत्रीय अभ्यासाची आवश्यकता असल्याचे हे संशोधन अधोरेखित करते.

**तथ्यांचे मुद्देनिहाय विश्लेषण :**

**१) कुटुंबातील स्थान व निर्णयप्रक्रिया:** दलित–आदिवासी महिलांचे कुटुंबातील स्थान दुय्यम स्वरूपाचे आढळते. विवाह, शिक्षण, रोजगार, अपत्यसंख्या आणि आर्थिक व्यवहार यांसारख्या महत्त्वाच्या निर्णयांमध्ये महिलांचा सहभाग अत्यल्प आहे. पुरुषप्रधान मानसिकता आणि पारंपरिक सामाजिक रचना यांमुळे महिलांना निर्णयकर्तीपेक्षा निर्णय पाळणारी भूमिका बजावावी लागते. याचा थेट परिणाम त्यांच्या स्वातंत्र्यावर आणि आत्मविश्वासावर होताना दिसतो. याशिवाय, कौटुंबिक निर्णयप्रक्रियेत वय, वैवाहिक स्थिती आणि जातीय ओळख यांचा महिलांच्या सहभागावर मोठा प्रभाव पडतो. अनेक वेळा महिलांचे मत केवळ औपचारिकरीत्या विचारात घेतले जाते, प्रत्यक्ष निर्णय मात्र पुरुषच घेतात. निर्णय प्रक्रियेतील हा वंचितपणा महिलांच्या नेतृत्वक्षमतेच्या विकासात अडथळा निर्माण करतो. परिणामी महिलांना स्वतःच्या जीवनाशी संबंधित निर्णय घेण्याचा अधिकार मर्यादित राहतो. कुटुंबातील सत्ता-संबंध अधिकाधिक असमतोल बनतात.

**२) श्रमविभागणी व आर्थिक योगदान:** दलित–आदिवासी महिला घरगुती काम, शेतीमजुरी, वनोपज संकलन आणि कुटुंबीयांची देखभाल यांसारख्या अनेक जबाबदाऱ्या पार पाडतात. मात्र या श्रमांना आर्थिक मूल्य किंवा सामाजिक मान्यता मिळत नाही. महिलांचे आर्थिक योगदान अदृश्य राहिल्यामुळे कुटुंबातील त्यांचे स्थान अधिक दुर्बल बनते. स्त्रिया दिवसातील दीर्घ काळ श्रम करीत असतानाही त्यांना "उत्पादक" म्हणून ओळखले जात नाही. या अदृश्य श्रमांमुळे महिलांचे आरोग्य, विश्रांती आणि वैयक्तिक विकास दुर्लक्षित राहतो. आर्थिक योगदानाला मान्यता न मिळाल्यामुळे महिलांचे आर्थिक स्वातंत्र्यही मर्यादित राहते. परिणामी कुटुंबातील आर्थिक निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग कमी राहतो. ही परिस्थिती लैंगिक असमानतेला अधिक बळ देते.

**३) धार्मिक रूढी व सामाजिक नियंत्रण:** कुटुंबसंस्थेत धार्मिक रूढी, परंपरा आणि कर्मकांडांच्या माध्यमातून महिलांवर नियंत्रण ठेवले जाते. व्रतवैकल्ये, उपवास, देव-देवतांची पूजा आणि धार्मिक नियमांचे पालन करण्याची जबाबदारी प्रामुख्याने महिलांवरच टाकली जाते. या धार्मिक बंधनांमुळे महिलांचे वैयक्तिक स्वातंत्र्य मर्यादित होते आणि त्यांना प्रश्न विचारण्याची संधी कमी मिळते. धर्माला नैतिकतेचा आधार मानून महिलांकडून आज्ञाधारकता अपेक्षित केली जाते. धार्मिक नियमांचे उल्लंघन केल्यास महिलांना दोषी ठरवले जाते. यामुळे स्त्रियांमध्ये भीती, अपराधभावना आणि आत्मसंशय निर्माण होतो. धार्मिक नियंत्रण हे सामाजिक वर्चस्व टिकवण्याचे साधन बनते. त्यामुळे महिलांच्या विचारस्वातंत्र्यावर गंभीर मर्यादा येतात.

**४) शुचिता - अशुचिता संकल्पना:** मासिक पाळी, प्रसूती, विधवावस्था आणि काही धार्मिक प्रसंगांमध्ये महिलांना अपवित्र मानले जाते. या काळात महिलांना धार्मिक व सामाजिक उपक्रमांपासून दूर ठेवले जाते. अशा संकल्पनांमुळे महिलांमध्ये न्यूनगंड, मानसिक तणाव आणि सामाजिक अलगाव निर्माण होतो. शुचिता–अशुचिता या संकल्पना महिलांच्या जैविक प्रक्रियांना नकारात्मक अर्थ देतात. त्यामुळे स्त्रीदेहाबद्दल लाज आणि अपराधभावना निर्माण केली जाते. या नियमांमुळे महिलांचे आत्ममूल्य कमी होते. सामाजिक सहभागावर मर्यादा येतात. दीर्घकालीन परिणाम म्हणून मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो.

**५) शिक्षण व जागृतीचा प्रभाव:** शिक्षणाचा स्तर वाढल्यास धार्मिक नियंत्रणाला विरोध करण्याची क्षमता वाढते. शिक्षित महिलांमध्ये अधिकारांची जाणीव अधिक असून त्या कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करतात. तथापि, अल्पशिक्षित किंवा अशिक्षित महिलांमध्ये धार्मिक बंधनांचे पालन अधिक प्रमाणात आढळते. शिक्षणामुळे महिलांमध्ये तर्कशक्ती आणि आत्मविश्वास विकसित होतो. त्या परंपरांकडे चिकित्सक दृष्टिकोनातून पाहू लागतात. शिक्षित महिलांचा सामाजिक सहभागही तुलनेने अधिक असतो. मात्र शिक्षणाच्या संधींचा अभाव अजूनही मोठ्या प्रमाणात आढळतो. त्यामुळे शिक्षणाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचणे आवश्यक ठरते.

**६) दुहेरी व तिहेरी वंचितता:** दलित–आदिवासी महिलांना स्त्री, दलित/आदिवासी आणि गरीब या तिन्ही ओळखीमुळे दुहेरी किंवा तिहेरी शोषणाला सामोरे जावे लागते. कुटुंबसंस्था, समाज आणि धर्म या तिन्ही पातळ्यांवर त्यांचे स्थान कमजोर राहते. या बहुपदरी वंचिततेमुळे महिलांचे जीवन अधिक संघर्षमय बनते. सामाजिक संरक्षणाची साधने मर्यादित राहतात. राज्याच्या धोरणांचा लाभ अनेक वेळा प्रभावीपणे मिळत नाही. परिणामी महिलांचे सक्षमीकरण अपूर्ण राहते. या समस्यांकडे आंतरविभागीय (intersectional) दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

**७) बदलते प्रवाह व मर्यादा :** स्वयं-सहायता गट, महिला संघटना आणि सामाजिक चळवळींमुळे महिलांमध्ये आत्मभान वाढत असले तरी पितृसत्ताक कुटुंबरचना आणि धार्मिक परंपरा अजूनही प्रभावी आहेत. त्यामुळे बदलांची प्रक्रिया संथ गतीने होत आहे. महिला संघटनांमुळे आर्थिक व सामाजिक जागृती वाढत आहे. काही प्रमाणात निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढलेला दिसतो. मात्र खोलवर रुजलेल्या धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांमुळे परिवर्तनास मर्यादा येतात. बदल टिकाऊ होण्यासाठी पिढ्यानपिढ्यांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. त्यासाठी सातत्यपूर्ण सामाजिक हस्तक्षेप गरजेचा आहे.

**निष्कर्ष** : कुटुंबसंस्थेत दलित–आदिवासी महिलांचे स्थान अद्यापही दुय्यम असून निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग अत्यल्प आहे. धार्मिक रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धांच्या माध्यमातून महिलांवर सामाजिक व मानसिक नियंत्रण ठेवले जाते. शुचिता–अशुचिता संकल्पनांचा महिलांच्या आत्मसन्मान, आरोग्य आणि सामाजिक सहभागावर नकारात्मक परिणाम होतो. कुटुंबातील पितृसत्ताक रचना धार्मिक नियंत्रण बळकट करण्यास कारणीभूत ठरते. दलित–आदिवासी महिलांना जातीय, लिंगाधारित आणि आर्थिक अशा दुहेरी व तिहेरी वंचिततेला सामोरे जावे लागते. शिक्षणाचा स्तर वाढल्यास महिलांवरील धार्मिक नियंत्रणात घट होत असल्याचे दिसून येते. स्वयं-सहायता गट, सामाजिक चळवळी आणि संविधानिक हक्कांची जाणीव यांमुळे महिलांमध्ये आत्मभान वाढत आहे. कायदेशीर तरतुदी असूनही त्यांची अंमलबजावणी कुटुंब व समाजपातळीवर मर्यादित आहे.

**शिफारसी** : दलित–आदिवासी महिलांच्या शिक्षणाला प्राधान्य देण्यासाठी विशेष शैक्षणिक योजना प्रभावीपणे राबवाव्यात. कुटुंबसंस्थेत महिलांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढवण्यासाठी सामाजिक जनजागृती कार्यक्रम राबवावेत. धार्मिक अंधश्रद्धा व रूढींविरोधात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्यासाठी कार्यशाळा व चर्चासत्रांचे आयोजन करावे. महिला स्वयं-सहायता गट, बचत गट आणि संघटनांना अधिक आर्थिक व प्रशासकीय बळ द्यावे. दलित–आदिवासी महिलांच्या हक्कांविषयी संविधानिक आणि कायदेशीर साक्षरता वाढवावी. आरोग्य, स्वच्छता आणि मासिक पाळीविषयक विषयांवर सामाजिक व धार्मिक गैरसमज दूर करण्यासाठी विशेष मोहिमा राबवाव्यात. कुटुंब व समाजपातळीवर लिंगसमतेचा विचार रुजवण्यासाठी पुरुष सहभाग कार्यक्रम राबवावेत. धार्मिक संस्था आणि स्थानिक नेत्यांनी समतावादी व मानवतावादी मूल्यांचा प्रचार करावा.

**संदर्भ सुची :**


1. Ambedkar, B. R. (1948). The Hindu social order: Its essential principles.
2. V. Moon (Ed.), Dr. Babasaheb Ambedkar: Writings and Speeches (Vol. 3, pp. 3–22). Mumbai: Government of Maharashtra.
3. Chakravarti, U. (2003). Gendering caste: Through a feminist lens. Kolkata: Stree. (pp. 11–45)
4. Rege, S. (2013). Writing caste/writing gender: Narrating Dalit women's testimonies. New Delhi: Zubaan. (pp. 17–52)
5. Khakha, V. (2015). Tribes and Indian society. Economic and Political Weekly, 50(43), 59–65.
6. Deshpande, A. (2011). The grammar of caste: Economic discrimination in contemporary India. New Delhi: Oxford University Press. (pp. 89–120)
7. Government of India. (2016). National Family Health Survey (NFHS-4): India report. Mumbai: International Institute for Population Sciences. (pp. 205–232)
8. Government of India. (2011). Census of India 2011: Social and cultural tables. New Delhi: Office of the Registrar General of India. (pp. 87–110)
9. Dubey, L. (1997). Women and kinship: Comparative perspectives on gender in South and South-East Asia. Tokyo: United Nations University Press. (pp. 23–54).

# माणदेशी तरंग वाहिनी - ग्रामीण महिलांचे विचारतरंग

**प्रा. श्रुती तांबे प्राध्यापक** समाजशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

ग्रामीण महिलांचे प्रश्न मुख्य प्रवाही माध्यामात क्वचितच प्रसारित होतात. तसेच वृत्तपत्रे, आकाशवाणी व दूरदर्शन वाहिन्यांवर सामान्य महिलांच्या दृष्टिकोनातून समस्या व उपाय मांडले जात नाहीत. माणदेशी फाउंडेशन ह्या संस्थेने महिला सक्षमाकरणाच्या त्यांच्या कार्याचा भाग म्हणून *माणदेशी तरंग वाहिनी* हे महिलांचे प्रश्न व त्यांची मते मांडणारे समुदाय रेडिओ स्टेशन गेली अनेक वर्षे चालवला आहे. विशेष म्हणजे हे रेडिओ स्टेशन महिलांनी चालवलेले एक वौशिष्ट्यपूर्ण रेडिओ स्टेशन आहे. प्रस्तुत संशोधनपर निबंधात ह्या माणदेशी तरंग वाहिनेचे विश्लेषण तीन प्रकारे केले आहे. एक, एकविसाव्या शतकातील अभिनव माध्यम म्हणून, दोन, माणदेश सारख्या दुष्काळी, मागास भागातील महिलांना आवाज देणारे माध्यम म्हणून व तीन, ग्रामीण भागातील सामाजिक परिवर्तनाचा एक सशक्त प्रयत्न म्हणून. ह्या संशोधनासाठी गुणात्मक पध्दतीशास्त्राचा वापर करून माणदेशी तरंग वाहिनीवरील कार्यक्रमांचे आशय विश्लेषण केले आहे. ह्या संशोधनातून नवभांडवलशाही, नवउदारीकरणाच्या काळातही छोट्या संस्था, संघटना सामान्य ग्रामीण स्त्रीचा आवाज जगापर्यंत तिच्याच माध्यमातून पोचवू शकतात, हा निष्कर्ष पाहणीअंती हाती आला आहे.

**संशोधन प्रश्न व पध्दतीशास्त्र**-प्रस्तुत अध्ययनाच्या केंद्रभागी पुढील संशोधनपर प्रश्न होता. नवउदारमतवाही बहुराष्ट्रीय प्रसारमाध्यम साम्राज्याच्या काळात वंचित, शोषित ग्रामीण महिलांचे पर्यायी माध्यम उभे रहू शकते का? असे माध्यम त्या स्त्रियांचे सशक्तीकरणाचे साधन म्हणून सुरू राहू शकते का? होल्सटी (*1969*) यांच्या मते आशय विश्लेषण म्हणजे संज्ञापनाच्या निवडक वैशिष्ट्यांविषयी वस्तुनिष्ठ व सुव्यवस्थेत आडाखे बांधण्याचे तंत्र. रे पोसन (*1995*) यांनी गुणात्मक आशय विश्लेषणाचे एकूण चार दृष्टिकोन विशद केले आहेत प्रस्तुत अभ्यासात यातील सूत्रबद्ध विश्लेषण हे तंत्र वापरले आहे. या प्रकारच्या विश्लेषणात संहितेत दडलेल्या तत्त्व प्रणालीचे विश्लेषण करता येते. पॉसन म्हणतात की यातील प्रमुख कल्पना ही प्रसार माध्यमातील संदेशाच्या निर्मितीमागे दडलेली उद्दिष्टे शोधणे हे असते. यातील रणनीती एखादा विषय निवडून त्याचे अतिशय सविस्तर विश्लेषण करणे व त्यातून दडलेली उद्दिष्टे, तसेच लेखकांचे हेतू शोधून काढणे हे असते. रे पोसन यांनी मांडलेली ही सूत्रबद्ध विश्लेषणाची पद्धत अनेक शास्त्रज्ञांनी रेडिओ व दूरदर्शन वाहिन्यांवरील आशयासाठीही वापरली आहे.

विशेषतः समुदाय रेडिओ ही कल्पना अलीकडच्या काळात अतिशय महत्त्वाची ठरलेली आहे विकासाचा संदेश, समाज परिवर्तनाचा संदेश,कुप्रथा नष्ट करणे यासाठी अशा प्रकारचे समुदाय रेडिओ अतिशय उपयुक्त ठरतात. त्यामुळे समुदाय रेडिओवरील संदेशांचे आशय विश्लेषण देखील अशा प्रकारे करता येते. ह्या अभ्यासात रे पॉसन ह्यांनी सांगितलेली पध्दत वापरून माणदेशी तरंग वाहिनीचे विश्लेषण केले आहे.

**सैध्दांतिक भूमिका-** प्रतिनिधित्व' ही संज्ञा सामाजिक माध्यमांच्या विश्लेषणातील महत्वपूर्ण संज्ञा म्हणून ओळखली जाते. लोकशाहीचे चौथे स्तंभ म्हणून माध्यमांकडे बघत असताना ही माध्यमे सर्व समाजघटकांचे प्रतिनिधित्व एकसारख्या प्रमाणात करतात का, हा प्रश्न संयुक्तिक ठरतो. समाजातील सर्व गटांचे प्रतिनिधित्व करत असताना सर्वसामान्य वर्गातून येणाऱ्या व्यक्तींच्या प्रश्नांची मांडणी सामाजिक माध्यमांनी करणे आवश्यक असते. परंतु सामाजिक माध्यमांच्या झालेल्या बाजारीकरणामुळे नवउदारमतवादी काळात सामाजिक माध्यमे ही विशिष्ट आर्थिक, सांस्कृतिक गटातून येणाऱ्या व्यक्तींसाठी नफ्यावर आधारित अजेंडा राबवताना दिसतात. ते समजून घेण्यासाठी स्टुअर्ट हॉल यांनी **प्रतिनिधित्वाचे राजकारण** ही संकल्पना मांडली. त्यांच्या मते सामाजिक माध्यमे ही फक्त प्रतिमा निर्माण करत नाहीत तर त्याही पलीकडे जाऊन अनेक अर्थांनी पूर्ण असलेल्या प्रतिमांचे पुनर्प्रस्तुतीकरणात महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात. हॉलच्या मते ते समजून घेण्यासाठी मुख्यत्वेकरून एखाद्या घटनेचे किंवा प्रतिमांचे मूळ अर्थ आणि प्रत्यक्षातील सादरीकरण यांच्यामध्ये ज्या कमतरता आहेत त्यांची चिकित्सा करणे. त्यादृष्टीने **मुख्य प्रवाही माध्यमे आणि पर्यायी माध्यमे** यांच्या भूमिकांची तुलना आवश्यक ठरते.

**आशय विश्लेषण-** भारतातील ग्रामीण महिलांचे आजचे वास्तव बघितले, तर तरुण विवाहित स्त्रिया ह्या महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या आहेत. परंतु विवाहानंतर ग्रामीण भागात राहणाऱ्या स्त्रियांना इतरांशी फारसा संपर्क ठेवता येत नाही. घरकाम, शेतीचे काम ह्यात गुंतून गेलेली महिला अनेकदा गुरांचा गोठा, शेतातले काम, घरचा स्वयंपाक आणि जळण जमा करणे, गुरांना चरायला नेणे किंवा इतर घरकामात अडकून जाते. त्यामुळे ती बाहेर पडू शकत नाही. ह्या ग्रामीण सुशिक्षित महिलेचे व्यक्तिमत्व खुरटते.

त्याचबरोबर शासकीय योजना, कौटुंबिक उत्पन्नाची साधने वाढवण्यासाठीच्या योजना आणि उपाय त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. ग्रामीण भागातील महिलांना नियमितपणे आरोग्य साधने उपलब्ध नसतात आणि मुख्य प्रवाही प्रसारमाध्यमांमधून विशेष करून ग्रामीण महिलांच्या आरोग्याविषयीचे वेगळे कार्यक्रम फारसे होताना दिसत नाहीत. माणदेशी तरंग वाहिनीने या सर्वच मुद्द्यांकडे लक्ष दिलेले दिसते आणि त्यांच्या कार्यक्रमांमध्ये हे मुद्दे वारंवार आणले जातात. आसपासच्या गावातील महिलांच्या यशोगाथा, घराची स्वच्छता, गावाची स्वच्छता, बचत, आरोग्य सुविधा, घरगुती उपाय, रोजगार निर्मितीचे उपाय, स्थानिक पंचक्रोशीतील स्त्री-पुरुषांचे नवे उपक्रम यात आवर्जून सांगितले जातात.

तरंगवाहिनीचा दुसरा भाग आहे तो शासकीय योजनांची माहिती सामान्य स्त्रियांपर्यंत सातत्याने पोहोचवणे. दर कार्यक्रमांमध्ये भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांवर भर दिला जातो. त्या योजनांचे लाभार्थी म्हणून अर्ज करण्यासाठी सामान्य महिलांना उत्तेजन दिले जाते. तसेच या योजनांचा लाभ घेण्यासाठी कोणते अर्ज करावेत, कोणती अर्हता

आसावी, काय अटी आहेत याचीही सविस्तर माहिती दिली जाते. तसेच स्थानिक शेतकरी समुदायांमध्ये कोणत्या प्रकारच्या सेवा सुविधा विविध सामाजिक संस्था उपलब्ध करून देत आहेत, त्याचीही माहिती दिली जाते. आजकाल खेड्यामध्ये ग्रामीण महिला देखील स्वतःचे छोटे मोठे शेती आधारित उद्योग चालवत आहेत. अशा प्रकारच्या कुटीरोद्योग चालवणाऱ्या स्त्रिया किंवा छोटा-मोठा उद्योग धंदा करणाऱ्या स्त्रियांना विविध प्रकारची माहिती दिली जाते आणि एकीचे बळ महत्त्वाचे आहे हेही त्यांच्यावर ठसवले जाते. तरंगवाहिनी मधील तिसरा महत्त्वाचा घटक आहे, तो माणदेशी संस्कृती. माणदेशातील प्रथा, परंपरा, लोककथा, लोकगीते ही सर्व तरंगवाहिनीवरून सादर केली जातात. त्यासाठी स्थानिक महिलांच्या तुकड्या प्रशिक्षित केलेल्या आहेत.

चौथा घटक आहे माणदेशी फाउंडेशनचे जे विविध उपक्रम आहेत, उपक्रमांविषयीची जाणीव जागृती माणदेशातल्या खेड्यापाड्यांमध्ये पसरवणे. पाचवा आणि शेवटचा घटक आहे स्थानिक समुदायांमध्ये रेडिओच्या माध्यमातून स्पर्धा घेणे, कथा कहाण्या सांगणे, लोकगीते आणि वेगळ्या प्रकारच्या कविता किंवा गाणी, तसेच विनोदी चुटकुले, हास्यविनोद याला देखील तरंगवाहिनीवर स्थान मिळते. या पाच वेगवेगळ्या उद्दिष्टांच्या आधारे तरंगवाहिनीवरील कार्यक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाते. माणदेशी तरंग वाहिनी ची सुरुवात ही विशेषतः स्त्री उद्योजक आणि स्त्री प्रवर्तक यांच्या असामान्य यशोगाथा सर्वांसमोर आणण्यासाठी केली गेली. तसेच दुष्काळग्रस्त भागातील ग्रामीण महिलांनी स्वतःला केवळ शोषित, मागास, दुःखी कष्टी समजू नये, तर स्व विकासासाठी आणि कुटुंबाच्या समुदायाच्या विकासासाठी पुढे येऊन एकत्रितपणे प्रयत्न करावेत, यासाठी ही रेडिओ वाहिनी सातत्याने बांधिलकीने प्रयत्न करताना दिसते.

आज या तरंगवाहिनीचे यश वाखाणण्याजोगे आहे. आज घडीला त्यांचे एकूण दीड लाखाच्यावर श्रोते *110* खेड्यांमध्ये आणि त्याच्या वाड्या वस्त्यांमध्ये पसरलेले आहेत. एकूण *50* किलोमीटरच्या परिघामध्ये हा समुदाय रेडिओ चालवला जातो आणि अगदी अलीकडच्या काळात एक नवी झेप तरंगवाहिनीने घेतली. ती म्हणजे नवे तरंगवाहिनीचे मोबाईल ॲपही आता आणलेले आहे. या सर्व यशोगाथेविषयी बोलताना शुभांगी विरकर म्हणतात की, 'मी बोनिवडी गावात राहते. आज टीव्ही आणि मोबाईल फोनचे युग आहे. परंतु माझ्या गावातले सगळे लोक मात्र आजही माणदेशी तरंग वाहिनी सतत ऐकत असतात. इतकेच नाही तर समुदाय रेडिओवर कोणते नवे प्रोग्राम घेतले जातील, काय प्रसारित होईल, याची आतुरतेने आम्ही सगळे वाट बघत असतो. अन्य एक महिला सांगते, की, *'90.4* एम एच झेड वरचे कार्यक्रम ऐकल्यावर माझ्या सामान्य ज्ञानात खूप भर पडलेली आहे. आज मला राजकारण, आर्थिक व्यवहार, बिजनेस, उद्योगधंदे या सगळ्याच गोष्टींविषयी केवळ माहितीच मिळाली आहे असे नाही, तर जगाच्या बरोबरीने पुढे जाण्याची प्रेरणा या तरंगवाहिनीच्या माध्यमातून मिळाली आहे.'

माणदेशी तरंग वाहिनी या सामुदायिक रेडिओचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामान्य महिला याच्यात निवेदिका आहेत, कार्यक्रमाच्या प्रोड्युसर आहेत. लेखक आहेत आणि सादरकर्त्याही आहेत. माणदेशी तरंगवाहिनीचे अनेक कार्यक्रम हे स्त्रियांचे आरोग्यविषयक सशक्तीकरण, स्त्रियांचे शैक्षणिक सशक्तिकरण आणि स्त्रियांचे आर्थिक सशक्तीकरण यासाठी केले जातात, **सखी साजणी** नावाच्या एका कार्यक्रमातून स्त्रियांमध्ये आर्थिक साक्षरता वाढावी, त्यांच्यात छोटे व्यापार आणि उद्योग करण्याची कौशल्य विकसित व्हावीत, तसेच आर्थिक बचत आणि कणखरपणा यावा, यासाठीची माहिती दिली जाते. विविध छोट्या-मोठ्या युक्त्या देखील सांगितल्या जातात. दुसरा एक कार्यक्रम आहे, **माझी रेडिओ शाळा** या कार्यक्रमामधून कोविडच्या काळामध्ये रोजच्या जगण्यातील साध्या साध्या वैज्ञानिक दृष्ट्या महत्त्वाच्या गोष्टी आणि कोविड पासून स्वतःचा बचाव करण्याच्या युक्त्या सांगितल्या गेल्या. तिसरा कार्यक्रम दिसतो तो **रेडिओ डॉक्टर** यात केवळ आरोग्यावर लक्ष केंद्रित करून अनेक गोष्टी सातत्याने दिल्या जातात

**निष्कर्ष**- माणदेशी तरंगवाहिनी ही पर्यायी प्रसारमाध्यमाचे एक उत्तम उदाहरण आहे. ही रेडिओ वाहिनी पर्यायी प्रसारमाध्यमांचे एक उत्तम उदाहरण आहे. ह्या वाहिनीविषयीची माहितीपत्रके, कार्यक्रमांचे आशय विश्लेषण ह्यातून खालील निष्कर्ष हाती आलेले आहेत-

१. बहुराष्ट्रीय नवभांडवलशाही माध्यमांच्या कालखंडात हा समुदाय रोडियो हे एक प्रेरणादायी उदाहरण आहे.

२. स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक, आरोग्यविषयक सशक्तीकरणासाठीह्या रेडिओने अत्यंत महत्वाचे कार्य केले आहे.

३. माणदेशी तरंग वाहिनी हे सामान्य महिलांच्या प्रतिनिधित्वाचे एक उत्तम उदाहरण आहे. पारंपरिक समाजव्यवस्था, पुरुषसत्ता, कुटुंबव्यवस्था व गावरहाटी यातील स्त्रियांच्या कुचंबणेवर हा एक महत्त्वाचा उपाय ठरला आहे. कारण स्त्रिया मोकळेपणाने आपली मते, विचार व्यक्त करत आहेत. म्हणजेच ह्या वाहिनीने प्रतिनिधित्वाचे राजकारण पर्यायी पध्दतीने करण्याचा प्रयत्न केला आहे.

४. प्रसारमाध्यमातील वर्जीततेला सामान्य ग्रामीण महिलांनी या रेडिओ वाहिनीतून एक सशक्त उत्तर दिले आहे.

५. पुरुषसत्ताक समाजात व्यवस्थाबदलासाठी स्त्रियांनी पुढे होऊन कर्तेपण घेणे हे महत्त्वाचे मानले जात नाही, परंतु माणदेशी तरंग वाहिनी रेडिओच्या माध्यमातून महिलांनी स्वतःचे प्रश्न स्वतः सोडवण्याला प्राधान्य दिलेले दिसते. त्या दृष्टीने त्यांनी स्वतःला प्रशिक्षित केले आहे व सशक्तही केले आहे.

# ग्रामीण महिला सक्षमीकरण: प्रसार माध्यमांची भूमिका

**डॉ. ज्योती सुहास गगनग्रास** समाजशास्त्र विभाग प्रमुख आणि उपप्राचार्य मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड पुणे

**प्रस्तावना:** महिला सक्षमीकरण ही आजच्या काळाची गरज आहे कारण ते समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे; शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक-राजकीय हक्कांद्वारे महिलांना सक्षम केल्याने आत्मविश्वास वाढतो, लैंगिक असमानता कमी होते, आणि कुटुंब व देशाच्या प्रगतीत त्यांचा पूर्ण सहभाग सुनिश्चित होतो, ज्यामु सशक्त,विकसित आणि न्यायपूर्ण समाज घडतो. महिला सक्षमीकरण काळाची गरज (निबंध)आजच्या आधुनिक युगात, 'महिला सक्षमीकरण' हा शब्द केवळ एक नारा नसून, समाजाच्या प्रगतीचा आधारस्तंभ बनला आहे. महिलांना शारीरिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्तरावर सक्षम करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. ही संकल्पना काळाची गरज का आहे, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण महिला सक्षमीकरण : प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत म्हटवाची आहे प्रसार माध्यमांची महिलाना सक्षम करण्यात महत्वाची भूमिका आहे
**कळीचे मुद्दे** : महिला सक्षमीकरण, सर्वांगीण विकास, माध्यमे, सक्षम

---

**संशोधनाची उदीष्टे:** महिला सक्षमीकरणाची ग्रामीण भागातील परिस्थिती अभ्यासणे, महिला सक्षमीकरणाची आवश्यकता पडताळून पहाणे, महिला सक्षमीकरणाचे मार्ग अभ्यासणे, महिला सक्षमीकरणाचे फायदे अभ्यासणे.

**महिला सक्षमीकरणाची आवश्यकता:** समाजाचा समतोल विकास: कोणताही समाज तेव्हाच प्रगती करू शकतो जेव्हा समाजातील अर्ध्या लोकसंख्येला, म्हणजेच महिलांना, समान संधी मिळतात. महिलांना सक्षम केल्याने राष्ट्राच्या विकासाला गती मिळते.आर्थिक स्वातंत्र्य: महिलांना शिक्षण आणि नोकरीच्या संधी मिळाल्यास त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनतात. यामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लागतो.शिक्षण आणि आरोग्य: शिक्षणामुळे महिलांना त्यांचे हक्क आणि जबाबदाऱ्यांची जाणीव होते. आरोग्यपूर्ण जीवन जगणे, कमी मुले जन्माला घालणे आणि त्यांच्या मुलांचे भविष्य घडवणे यासाठी शिक्षित आणि निरोगी महिला महत्त्वाची भूमिका बजावतात.लैंगिक असमानता संपवणे: महिला सक्षमीकरणामुळे समाजात रुजलेली लैंगिक भेदभाव आणि असमानतेची भावना कमी होते. स्त्रियांना समान वेतन, समान संधी आणि निर्णय प्रक्रियेत स्थान मिळते.आत्मविश्वास आणि नेतृत्व: जेव्हा महिलांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळते, तेव्हा त्यांच्याआत्मविश्वास निर्माण होतो आणि त्या नेतृत्वाची भूमिका घेण्यासाठी पुढे येतात.विशेष करून ग्रामीण महिला साक्षमीकरणाचा विचार करताना आज ही 60 ते 65 टक्के आपली जनता ग्रामीण भागात वास्तव्य करते या महिलांचे साक्षमि करण होणे ही गरजेची बाब आहे.

**संशोधन पद्धती:** सदर संशोधनात दुय्यम संशोधन स्तोत्राचा वापर केला आहे.

**सक्षमीकरणाचे मार्ग:** कोण कोणत्या माध्यमातून महिला सक्षमीकरण साध्य होऊ शकेल हे खलील मार्गांचा विचार करता स्पष्ट होऊ शकेल

**शिक्षण:** मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, उच्च शिक्षणासाठी संधी उपलब्ध करणे.

**समान वेतन:** समान कामासाठी समान वेतन कायद्याची अंमलबजावणी करणे.

**राजकीय सहभाग:** स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते संसदेपर्यंत महिलांचा सहभाग वाढवणे.

**आरोग्यसेवा:** महिलांसाठी उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करणे.

**सामाजिक बदल:** बालविवाह, हुंडाबळी आणि कौटुंबिक हिंसाचार यांसारख्या वाईट प्रथांविरुद्ध जागरूकता निर्माण करणे

**महिला सक्षमीकरणाचे मुख्य पैलू:**

**शिक्षण आणि जागरूकता:** महिलांना शिक्षित करणे, त्यांना त्यांचे हक्क आणि उपलब्ध संधींची माहिती देणे.

**आर्थिक स्वातंत्र्य:** रोजगार, कौशल्य प्रशिक्षण आणि मालमत्तेवर नियंत्रण मिळवून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे.

**सामाजिक समानता:** समाजात पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळवणे आणि सामाजिक रूढींना आव्हान देणे.

**राजकीय सहभाग:** निर्णय प्रक्रियेत आणि धोरण निर्मितीत महिलांचा सहभाग वाढवणे.

**आत्मविश्वास आणि स्वावलंबन:** महिलांमध्ये आत्म-सन्मान वाढवणे आणि स्वतःच्या जीवनावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम करणे.

**महिला सक्षमीकरणाचे फायदे:**

**सर्वांसाठी विकास:** सशक्त महिला अर्थव्यवस्थेला गती देतात आणि सर्वांसाठी संधी निर्माण करतात.

**सुधारित आरोग्य आणि पोषण:** कुटुंबातील आरोग्य, पोषण आणि शिक्षणात सुधारणा होते.

**लवचिक समुदाय:** महिलांना सक्षम केल्याने अधिक स्थिर आणि लवचिक समुदायांची निर्मिती होते.

माध्यमे, विशेषतः डिजिटल माध्यमे, ग्रामीण महिलांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या सक्षम करण्यासाठी एक शक्तिशाली साधन बनली आहेत, ज्यामुळे त्यांना संधी मिळतात आणि त्यांचे जीवनमान सुधारते, असे अनेक अभ्यास दर्शवतात. त्याचवेळी, माध्यमांनी या महिलांचे योग्य प्रतिनिधित्व करणे आणि त्यांना आवाज देणे हे देखील महत्त्वाचे आहे, असे संशोधनातून स्पष्ट होते. महिला सक्षमीकरण म्हणजे शिक्षण, आरोग्य, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये महिलांना समान हक्क, संधी आणि अधिकार देणे, जेणेकरून त्या स्वतःचे निर्णय घेऊ शकतील, आत्मनिर्भर होतील आणि समाजात समान दर्जा प्राप्त करू शकतील; ही प्रक्रिया महिलांना सक्षम बनवून लैंगिक असमानता दूर करते आणि सामाजिक बदलांना चालना देते. यासाठी जागरूकता, कौशल्य विकास आणि संसाधनांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण महिला सक्षमीकरणात प्रसारमाध्यमे (रेडिओ, टीव्ही, वर्तमानपत्रे,

सोशल मीडिया) महत्त्वाची भूमिका बजावतात. ती माहितीचा प्रसार, कायदेशीर हक्कांबद्दल जागरूकता, आरोग्य व शिक्षणाविषयी प्रबोधन आणि डिजिटल साक्षरतेद्वारे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनवण्यास मदत करतात। 'उमेद' अभियानासारख्या योजनांचा प्रसार करून, माध्यमे ग्रामीण महिलांना मुख्य प्रवाहात आणतात.

**ग्रामीण महिला सक्षमीकरणात प्रसार माध्यमांची भूमिका:** माध्यमे ग्रामीण महिलांना आरोग्य, स्वच्छता, स्त्री शिक्षण आणि कायदेशीर हक्कांची माहिती देऊन जागरूक करतात सोशल मीडिया आणि इंटरनेटद्वारे महिलांना घरगुती उत्पादने विकण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध होते. डिजिटल माध्यमातून बँकिंग, आधार, रेशन कार्ड यांसारख्या सेवांची माहिती मिळते. आकाशवाणी आणि टीव्हीच्या माध्यमातून ग्रामीण भागात सामाजिक सुधारणा, अंधश्रद्धा निर्मूलन आणि कौटुंबिक आरोग्य (पोषण) यावर सकारात्मक प्रभाव पडतो 'उमेद' (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) आणि महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) सारख्या शासकीय योजनांची माहिती पोहोचवून महिला स्वयं सहाय्यता समूहांना सक्षम करणे. प्रसार माध्यमे महिलांना ग्रामपंचायत आणि स्थानिक स्वराज्य संस्थेतील कामांबद्दल प्रोत्साहन देतात, ज्यामुळे निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढतो आज चित्रफिती, चित्रपट, मालिका, महिलांसाठी राबविलेले विविध कार्यक्रम या माध्यमातूनही जन जागृतीचे प्रमाण वाढले आहे. याचा सदुपयोग होणे म्हात्वाचे आहे लवचिक समुदाय: महिलांना सक्षम केल्याने अधिक स्थिर आणि लवचिक समुदायांची निर्मिती होते.

**निष्कर्ष:** ग्रामीण महिला सक्षमीकरण ही केवळ महिलांची गरज नसून, संपूर्ण समाजाची आणि राष्ट्राची गरज आहे. सावित्रीबाई फुले, ज्योतिबा फुले आणि त्यांच्या सारख्या असंख्य चळवळीत काम केलेल्या अनेक स्त्रियांनी समाजसुधारकांनी दाखवलेल्या मार्गावर चालून, शिक्षण आणि हक्कांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करणे काळाची आवश्यकता आहे. जेव्हा महिला खऱ्या अर्थाने सक्षम होतील, तेव्हाच एक समृद्ध, विकसित आणि न्यायपूर्ण भारताचे स्वप्न साकार होईल. ग्रामीण महिला सक्षमीकरणात माध्यमांची भूमिका दुहेरी आहे: माध्यमे शिक्षणाद्वारे, जागरूकता पसरवून आणि संधींची माहिती देऊन ग्रामीण महिलांना सक्षम करतात (उदा. डिजिटल मीडियातून व्यवसाय, कौशल्ये शिकणे), तर याच माध्यमांमध्ये अनेकदा ग्रामीण महिलांचे चुकीचे चित्रण किंवा कमी प्रतिनिधित्व असू शकते; मात्र, महिला पत्रकार आणि सामुदायिक रेडिओच्या माध्यमातून त्यांना आवाज मिळत आहे, ज्यामुळे त्यांचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सशक्तीकरण होण्यास मदत होते, असे विविध अभ्यास दर्शवतात, असेही दिसून येते विविध अभ्यास दाखवतात, असे दिसून येते.

माध्यमे, विशेषतः डिजिटल माध्यमे, ग्रामीण महिलांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या सक्षम करण्यासाठी एक शक्तिशाली साधन बनली आहेत, ज्यामुळे त्यांना संधी मिळतात आणि त्यांचे जीवनमान सुधारते, असे अनेक अभ्यास दर्शवतात. त्याचवेळी, माध्यमांनी या महिलांचे योग्य प्रतिनिधित्व करणे आणि त्यांना आवाज देणे हे देखील महत्त्वाचे आहे, असे संशोधनातून स्पष्ट होते. महिला सक्षमीकरण म्हणजे शिक्षण, आरोग्य, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये महिलांना समान हक्क, संधी आणि अधिकार देणे, जेणेकरून त्या स्वतःचे निर्णय घेऊ शकतील, आत्मनिर्भर होतील आणि समाजात समान दर्जा प्राप्त करू शकतील; ही प्रक्रिया महिलांना सक्षम बनवून लैंगिक असमानता दूर करते आणि सामाजिक बदलांना चालना देते. यासाठी जागरूकता, कौशल्य विकास आणि संसाधनांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. थोडक्यात, प्रसार माध्यमे ही ग्रामीण महिलांसाठी माहितीचे, शिक्षणाचे आणि विकासाचे एक अत्यंत प्रभावी साधन ठरत आहेत.

**संदर्भ:**


1.#महिला_सशक्तिकरण #शिक्षा_सबका_अधिकार #स्वास्थ्यजागरूकता #शिक्षित_महिला #ruraldevelopment #gramsansad #panchayatiraj

2.Ministry of Panchayati Raj, Government of India Ministry

3.DOI: https://doi.org/10.29070/991z9172

4.https://nirdpr.org.in/nird_docs/jrd/hindi/grameenvikas261016.pdf

5 International Journal of Advance and Applied Research www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075Impact Factor – 8.141Peer Reviewed Bi-MonthlyVol. 6 No. 18March - April - 2025

6 पाटील, भा. ग. (2015). ग्रामीण समाज: रचना आणि परिवर्तन. कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.

7 देशपांडे, सुजाता. (2016). समाज, माध्यमे आणि परिवर्तन. मुंबई: लोकप्रिय प्रकाशन.

8 नारायण, सुनेत्रा सेन. (2017). भारतीय समाज आणि नवे माध्यम. नवी दिल्ली: राजकमल प्रकाशन.

9. कुलकर्णी, शैलजा. (2018). ग्रामीण समाजातील माध्यमांचा सामाजिक प्रभाव. समाजशास्त्र संशोधन पत्रिका, 6(1), 45–58.

10 जाधव, आर. बी. (2019). माध्यमे आणि ग्रामीण विकास. भारतीय समाजशास्त्र, 12(2), 89–101.

11. जोशी, मंगला. (2019). स्त्री, माध्यमे आणि ग्रामीण समाज. स्त्री अभ्यास जर्नल, 7(2), 54–69.

# सत्योत्तर जग: ग्रामीण समाज आणि डिजिटल विषमता व गैरमाहितीचे/अपमाहितीचे पैलू

**डॉ. मेघा देशपांडे** समाजशास्त्र विभाग, मॉडर्न कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे.

**सारांश:** प्रस्तुत शोधनिबंध सत्योत्तर समाजाच्या पार्श्वभूमीवर विसाव्या शतकातील इंटरनेट क्रांती आणि त्यातून निर्माण झालेल्या 'माहिती समाजा'चा (Information Society) व विशेष करून ग्रामीण समाजाचा आढावा घेतो. २०२५ पर्यंत जगातील ६ अब्ज आणि भारतातील ९५० दशलक्ष लोक ऑनलाइन झाले असून, भारतात ग्रामीण वापरकर्त्यांचे प्रमाण (५७%) शहरी भागापेक्षा अधिक झाले आहे. मात्र, ही संख्यात्मक वाढ गुणात्मक समसमानता दर्शवत नाही, हे या शोधनिबंधाचे मुख्य सूत्र आहे.ही विषमता जातीय रचना, लिंगभाव (Gender) आणि आर्थिक आणि आधारभूत संरचने विषयीच्या विषमतेशी कशी जोडलेली आहे, व त्याच बरोबर गैरमाहिती आणि अपमाहितीचे तंत्र आणि त्याचे ग्रामीण समाजावरील परिणाम याचे विश्लेषण केले आहे.

**महत्त्वाचे शब्द** :सत्योत्तर युग, ग्रामीण समाज गैरमाहिती आणि अपमाहिती, डिजिटल विषमता

**प्रस्तवाना:** विसाव्या शतकातील विज्ञान आणि तंत्रज्ञानातील सर्वात मोठ्या प्रगतींपैकी एक म्हणजे इंटरनेट आणि वर्ल्ड वाइड वेबचा उदय, ज्याने केवळ आपल्या जगण्याच्या आणि काम करण्याच्या पद्धतीच नव्हे, तर माहितीची देवाणघेवाण आणि प्रसाराच्या पद्धतीही बदलल्या आहेत. १९५० च्या दशकापासूनच्या सतत बदलणाऱ्या समाजाचा आढावा घेतल्यास, आपल्या लक्षात येते की डिजिटल क्रांतीचा विकसनशील इतिहास माहिती युगातील संगणक तंत्रज्ञान, नेटवर्क तंत्रज्ञान आणि दूरसंचार तंत्रज्ञानाच्या प्रगतीशी जवळून जोडलेला आहे. यालाच आपण ‘माहितीचे युग’ असे म्हणतो. कॅस्टेल्स (२०१०) आणि डाइक (२००६) यांनी या प्रकारच्या समाजाचे वर्णन करण्यासाठी 'माहिती समाज' आणि 'नेटवर्क समाज' या संज्ञांचा वापर केला आहे. आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ (ITU) द्वारे प्रसिद्ध झालेल्या 'फॅक्ट्स अँड फिगर्स २०२५' नुसार, २०२५ मध्ये जगातील ऑनलाइन लोकसंख्या २४० दशलक्षाहून अधिक लोकांपर्यंत वाढली आहे. (आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ (ITU) ही डिजिटल तंत्रज्ञानासाठी संयुक्त राष्ट्रांची एक संस्था आहे) जागतिक स्तरावर, २०२५ मध्ये अंदाजे ६ अब्ज लोक – म्हणजेच जगाच्या लोकसंख्येच्या सुमारे तीन-चतुर्थांश – इंटरनेट वापरत आहेत. "ज्या जगात डिजिटल तंत्रज्ञान दैनंदिन जीवनाच्या अनेक बाबींसाठी आवश्यक आहे, त्या जगात प्रत्येकाला ऑनलाइन असण्याचा फायदा घेण्याची संधी मिळाली पाहिजे," असे आयटीयूच्या सरचिटणीस डोरीन बोगदान-मार्टिन म्हणाल्या. "हा अहवाल अधोरेखित करतो की आजची डिजिटल दरी वेग, विश्वसनीयता, परवडणारी किंमत आणि कौशल्ये यांद्वारे कशी परिभाषित केली जात आहे, आणि सार्वत्रिक कनेक्टिव्हिटीच्या आमच्या ध्येयासाठी काम करत असताना या सर्व गोष्टींना आपण प्राधान्य दिले पाहिजे." भारताविषयी आयएएमएआय (IAMAI) ने प्रसिद्ध केलेल्या एका अहवालानुसार, ग्रामीण भागातील कनेक्टिव्हिटीमधील जलद वाढ, शॉर्ट-व्हिडिओच्या वापरामध्ये वाढ आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (AI) वाढत्या स्वीकारामुळे, २०२५ मध्ये भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या ९५० दशलक्षांवर पोहोचली आहे. या अहवालातून असेही समोर आले आहे की, भारतातील सक्रिय इंटरनेट वापरकर्त्यांपैकी ५७ टक्के वापरकर्ते ग्रामीण भारतातील आहेत, म्हणजेच अंदाजे ५४८ दशलक्ष सक्रिय वापरकर्ते. या अहवालात असेही नमूद केले आहे की, ४४ टक्के वापरकर्त्यांनी व्हॉइस सर्च, इमेज-आधारित सर्च, चॅटबॉट्स आणि एआय फिल्टर्स यांसारख्या एआय-सक्षम वैशिष्ट्यांचा वापर केला आहे. "इंटरनेट वापरकर्त्यांची ही वाढ ग्रामीण भारतामुळेच होत आहे, जिथे आता अंदाजे ५४८ दशलक्ष सक्रिय इंटरनेट वापरकर्ते आहेत," असे अहवालात म्हटले आहे. ग्रामीण भागांमध्ये आता भारतातील ५७ टक्क्यांहून अधिक सक्रिय इंटरनेट वापरकर्ते आहेत आणि त्यांची वाढ शहरी भारताच्या तुलनेत जवळपास चौपट वेगाने होत आहे, जे डिजिटल तंत्रज्ञानाचा स्वीकार कुठे आणि कसा वाढत आहे यामध्ये एक संरचनात्मक बदल दर्शवते, असेही त्यात नमूद केले आहे. अचूक माहितीची उपलब्धता हा आर्थिक संधी, सामाजिक समावेश आणि कल्याणाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. परंतु कुटुंबे आणि समुदायांमधील असमानता माहितीच्या उपलब्धतेमध्ये विषमता निर्माण करू शकते. अशा विषमता इतर प्रकारच्या उपेक्षितावस्थेशी संबंधित असू शकतात, ज्यामुळे व्यक्तींची त्यांना मिळालेली माहिती तपासण्याची आणि पडताळण्याची क्षमता मर्यादित होते (उदा. शिक्षणाची निम्न पातळी,स्थानीय भाषेमध्ये तथ्य तपासणीच्या यंत्रणा उपलब्ध नसणे इत्यादी ), आणि गैरमाहितीला बळी पडण्याची शक्यता वाढते. उच्च-गुणवत्तेची माहिती शोधण्याचा खर्च खूप जास्त असू शकतो, त्याच वेळी ऑनलाइन माहितीची उपलब्धता वाढल्याने गैरमाहितीची उपलब्धता देखील वाढू शकते. या माहिती तंत्र ज्ञानाच्या वाढत्या काळात 'सत्योत्तर' जगात, या माहितीचे स्वरूप अनेकदा पडताळण्यायोग्य तथ्यांवरून लक्ष हटवून भावनिक प्रतिध्वनी, सनसनाटीपणा आणि वैचारिक कथाकथनावर केंद्रित करते. हे वातावरण गैरमाहिती (अनवधानाने झालेल्या चुका) आणि अपमाहिती (जाणूनबुजून सांगितलेली खोटे ) या दोन्हींच्या प्रसाराला गती देते. २०१६ च्या ब्रेक्झिट सार्वमत आणि अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीनंतर 'पोस्ट-ट्रुथ' (सत्योत्तर) हा शब्द प्रचलित झाला, जो अशा वातावरणाचे वर्णन करतो. जिथे वस्तुनिष्ठ वास्तवापेक्षा वैयक्तिक श्रद्धा आणि भावनिक आवाहनांना अधिक महत्त्व दिले जाते. या बदलाच्या यंत्रणे मध्ये काही विशिष्ट गोष्टींचा समावेश आहे. अचूक माहितीपेक्षा व्हायरल होणाऱ्याआशयाला महत्त्व देतात.

याराजकीय वातावरण ,घडामोडी पासून आरोग्याविषयी रोचक दिसणाऱ्या किंवा घाबरविण्याऱ्या अवैज्ञानिक माहिती गैरसमज यापासून पुरुषप्रधान रूढींपर्यंतचे असत्यापित दावे वेगाने पसरतात. या खोट्या कथांचा प्रसार वाढत असताना, पारंपरिक संस्थांवरील जनतेचा विश्वास सातत्याने कमी होत असतो. या बदलत्या जगाच्या पार्श्वभूमीवर , हा शोधनिबंध खालील बाबींचा शोध घेतो: १) डिजिटल असमानता व गैरमाहितीचे/अपमाहितीचे विविध पैलू २) त्याचा ग्रामीण समाजावरील परिणाम.

**संशोधन पद्धति:** हा शोधनिबंध दुय्यम माहितीवर आधारित आहे. संशोधन विषयाची सखोल माहिती मिळविण्याच्या आणि त्यातील अंतरछेदिता समजून घेण्याच्या दृष्टीने विश्लेषणासाठी संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टिकोनाचा वापर करण्यात आला आहे.

**सैद्धांतिक चौकट:** रॉबर्ट पुटनम यांनी सामाजिक भांडवलाची व्याख्या सामाजिक संस्थांमधील अशा घटकांच्या रूपात केली, जे परस्पर फायद्यासाठी सामूहिक वर्तन आणि सहकार्याकडे नेतात, जसे की सामाजिक जाळे, सांस्कृतिक नियम किंवा स्वतः विश्वास. पुटनाम यांच्या मते, सामाजिक भांडवल हे स्वतंत्र घटनांच्या स्वरूपात किंवा एकाकी व्यक्तींमध्ये निर्माण होत नाही; उलट, ते शहरापासून ते अगदी देशव्यापी स्तरांपर्यंतच्या सामाजिक वर्तन आणि जाळ्यांची एकूण बेरीज असते. डिजिटल जगाने सामाजिक भांडवलाच्या आधीच गुंतागुंतीच्या संकल्पनेत आणखी नवीन गुंतागुंतीचे थर जोडले आहेत. आज, सामाजिक भांडवलाचा अभ्यास केवळ ते काय शक्य करते यासाठीच नव्हे, तर ते कशाला वगळते यासाठीही केला जातो. मजबूत सामाजिक बंध कल्याणाला कसे हातभार लावू शकतात हे आपण पाहू शकतो, परंतु ते असमानता, समूहविचार किंवा सामाजिक गटांमधील अलिप्तता यांनाही बळकटी देऊ शकतात. रॉबर्ट पुटनम यांनी केलेला फरक स्पष्ट करतो की, विश्वसनीय नेटवर्कद्वारे चुकीची माहिती कशी पसरते. (क्लॅरिज, २०२१) या सामाजिक भांडवलीच्या चौकटीच्या आधारावर सामाजिक पार्श्वभूमीवर रचलेल्या वैयक्तिक संबंधांची गुंतागुंत समजून घेतली जाउ शकते तिथेच संरचनात्मक विषमता आणि सूचना तंत्रांचा उपयोग यातील सबंध जाणून घेण्याकरिता भारतात जिथे समाज वर्ग,जात,धर्म इत्यादी आधारांवर विभागलेला आहे,फक्त ‘डिजिटल दरी’ या चौकटीतून या विषमतेला समजून घेणे अशक्य आहे कारणपारंपारिक "डिजिटल दरी" सिद्धांत अनेकदा फक्त "सुविधा असलेल्या" विरुद्ध "सुविधा नसलेल्या" लोकांचाच विचार करतो. परंतु ‘डिजिटल असमानता सिद्धांत’ (हर्गिटाई आणि डिमॅगिओ) पाच प्रमुख मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करतो - १) डिजिटल दरी. कोणाला इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे, कोणाला नाही, आणि यात कसा बदल झाला आहे? २) इतर प्रकारच्या माहिती तंत्रज्ञानाच्या वापराच्या तुलनेत इंटरनेटची उपलब्धता आणि वापर अधिक की कमी किंवा असमान आहे? ३) इंटरनेटची सुविधा असलेल्या व्यक्तींमधील असमानता. ४) इंटरनेटची उपलब्धता आणि वापर लोकांच्या जीवनातील संधींवर परिणाम करतो का? ५) बदलते तंत्रज्ञान, नियामक वातावरण आणि इंटरनेटची औद्योगिक रचना यामुळे या सगळ्या तंत्र ज्ञानावर व त्यावर आधारित मिडिया आणि माहितीचे विविध तंत्रांवर कोणाचा अधिकार असेल? सतत बदलणारे शक्ती आणि सत्तेचे समीकरण यावर कसा प्रभाव टाकू शकतील. (डिमैगियो, पी., हरगिट्टई, ई., सेलेस्टे, सी., और शैफ़र, एस.२००४) यामुळे जीवनातील संधींवर परिणाम होऊ शकतो आणि माहितीची पडताळणी करण्यास असमर्थ असलेल्या गट आणि माहितीने समृद्ध असलेल्या गट यांच्यातील दरी वाढू शकते.

**साहित्य पुनरावलोकन:** हर्गिटाई (२०२१) आणि अरोकिया सामी (२०२६) यांसारख्या विद्वानांचा असा युक्तिवाद आहे की, ग्रामीण भागात स्मार्टफोनचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला असला तरी, "डिजिटल सज्जता" अजूनही कमी आहे. उदाहरणार्थ, ग्रामीण तामिळनाडूमध्ये, संशोधनातून असे दिसून आले आहे की ८५% विद्यार्थी स्मार्टफोन वापरतात, परंतु त्यापैकी केवळ २०% जण माहिती सामायिक करण्यापूर्वी तिची नियमितपणे पडताळणी करतात (सामी, २०२६) संशोधनातून असे दिसून येते की ग्रामीण वापरकर्ते अनेकदा 'वॉल्ड-गार्डन' इंटरनेट अनुभवात वावरतात, जिथे त्यांचे ब्राउझिंग व्हॉट्सॲप किंवा फेसबुकसारख्या झिरो-रेटेड सोशल मीडिया प्लॅटफॉर्मपुरते मर्यादित असते. यामुळे माहितीची पोकळी निर्माण होते, जिथे स्थानिक भाषांमध्ये उच्च-गुणवत्तेची, तथ्य-तपासलेली माहिती उपलब्ध नसते (गजानोवा इत्यादी, २०२२) कोविड-१९ महामारीनंतरच्या अभ्यासांमधून यावर जोर देण्यात आला आहे की, ग्रामीण भागातील 'सत्याचा ऱ्हास' यामुळे लसीकरणाबद्दलची अनिच्छा किंवा हिंसाचारासारखे मूर्त नुकसान होते, कारण चुकीच्या माहितीचा प्रसार होण्याचा वेग, संथ गतीने चालणाऱ्या आणि मजकूर-बहुल तथ्य-तपासणी प्रयत्नांच्या पोहोचपेक्षा खूप जास्त असतो. (सुल्ताना, शरीफा और फुसेल, सुसान. २०२१ ) ओकेर्के आणि इतर अभ्यासाकांद्वारे सादर केलेल्या निष्कर्षांवरून असे दिसून येते की, व्यापक गैरसमज आणि ऐकीव माहितीमुळे ग्रामीण आफ्रिका कोविड-१९ संबंधित चुकीची माहिती आणि माहितीच्या साथीच्या ओझ्याखाली दबलेला आहे. (ओकेर्के इत्यादी २०२०).

**विश्लेषण:**

**डिजिटल विषमता:** ग्रामीण भारतातील डिजिटल विषमतेला कारणीभूत असलेल्या प्रमुख घटकांपैकी एक म्हणजे पायाभूत सुविधांचा अभाव. अनेक ग्रामीण भागांमध्ये वीज आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटीची विश्वसनीय उपलब्धता ही एक मोठी समस्या आहे, ज्यामुळे तेथील रहिवाशांना डिजिटल साधनांचा वापर करता येत नाही. अलिकडच्या वर्षांत मोबाईल इंटरनेटचा वापर वाढला असला तरी, ग्रामीण भागातील कनेक्शनची गुणवत्ता आणि वेग अनेकदा सेवा मिळवण्यासाठी अपुरे असतात.

आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ (ITU) द्वारे प्रसिद्ध झालेल्या 'फॅक्ट्स अँड फिगर्स २०२५' या अहवालाच्या अंदाजानुसार डिजिटल कनेक्टिव्हिटीच्या विस्तारात सतत प्रगती होत असल्याचे दिसून येत असले तरी, डिजिटल कनेक्टिव्हिटीच्या गुणवत्तेतील

फरकांकडेही या अहवालाने लक्ष वेधले आहे, ज्यामुळे वापरकर्त्यांना इंटरनेटच्या वापराचा कसा फायदा होतो यावर परिणाम पडू शकतो. सेंटर फॉर इकॉनॉमिक डेटा अँड ॲनालिसिस (सेडा), अशोका विद्यापीठ आणि दूरसंचारवरील सर्वसमावेशक मॉड्यूलर सर्वेक्षण, ८० वी फेरी, एनएसएस, २०२५ यांनी भारतातील इंटरनेटची स्थिती शहरी आणि ग्रामीण भागांमधील स्पष्ट दरी अधोरेखित केली आहे. ९१.६ टक्के शहरी कुटुंबांकडे इंटरनेटची सुविधा असल्याचे दिसून येते, तर ग्रामीण भागात हाच आकडा ८३.३ टक्क्यांपर्यंत खाली येतो. याचा अर्थ असा की, दर ६ ग्रामीण घरांपैकी १ घर (१६.७ टक्के) इंटरनेटपासून वंचित आहे. हे प्रमाण शहरी कुटुंबांच्या तुलनेत दुप्पट आहे, जिथे दर १२ घरांपैकी केवळ १ घर (८.४ टक्के) इंटरनेटशिवाय आहे. या व्यतिरिक्त वेगवान इंटरनेट अजूनही शहरी भागातील लोकांचा विशेषाधिकार आहे, ग्रामीण भागात मोबाइल इंटरनेटमुळे जवळपास सार्वत्रिक कनेक्टिव्हिटी मिळत असली तरी, वेगवान आणि विश्वसनीय ब्रॉडबँडसाठी आवश्यक असलेली पायाभूत सुविधा शहरी भागांमध्येच केंद्रित राहिली आहे, ज्यामुळे ग्रामीण वापरकर्त्यांच्या उच्च-गती इंटरनेट सेवांचा पूर्णपणे फायदा घेण्याच्या क्षमतेवर परिणाम होत आहे. अलीकडे, सामाजिक कल्याण योजना, रोजगार आणि सेवांची उपलब्धता डिजिटल प्रणालींद्वारे नियंत्रित केली जात आहे. डिजिटल प्रणालींमुळे अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार कमी होईल, अशी अपेक्षा केली जात आहे. ग्रामीण कामगारांकडून (आदिवासी, सामाजिकदृष्ट्या मागासलेले, महिला आणि इतर अल्पसंख्याक) अखंड इंटरनेट, सातत्यपूर्ण बायोमेट्रिक प्रवेश, ॲप्सची माहिती आणि यातील आलेल्या त्रुटि समजून घेण्या विषयी डिजिटल साक्षरतेच्या अभावी सरकारी सेवांच्या वंचित घटकांपर्यंत योजना पोहोचवण्यात असमानता निर्माण होत आहे.अचूक माहितीच्या अभावी परीघेवारील समाज मुख्यधारेपासून दूर फेकली जातात.

**संरचनात्मक असमानता आणि डिजिटल विषमता:** भारतातील डिजिटल विषमतेचे विश्लेषण एकच समस्या म्हणून करता येणार नाही. आधीपासून अस्तित्वात असलेल्या सामाजिक-आर्थिक विषमतेचा विचार करणेही महत्त्वाचे आहे, आणि भारतामध्ये विविध सामाजिक-आर्थिक विषमता दिसून येतात, जसे की जातीय उतरंड, ग्रामीण-शहरी दरी, क्षमतेतील असमानता आणि वर्गीय विषमता. जाति-आधारित असमानतांमुळे डिजिटल दरी अधिक रुंदावली आहे, ज्यामुळे दलित आणि आदिवासींसारख्या समाजातील वंचित घटकांना डिजिटल ज्ञान मिळवण्यात अडचणी येत आहेत. ग्रामीण भारतात जाति-आधारित भेदभाव मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे आणि ही सामाजिक रचना डिजिटल संधींच्या समान वितरणाशी सुसंगत नाही (गुरुमूर्ती आणि चामी, २०२०). उच्च-जातीय कुटुंबे इंटरनेटच्या वापरामध्ये आघाडीवर आहेत, तर अनुसूचित जमाती (एसटी) सर्वात मागे आहेत—ग्रामीण भारतात ८ टक्के गुणांनी त्या पिछाडीवर आहेत. ग्रामीण भागात सर्वत्र ऑप्टिकल फायबर कनेक्टिव्हिटीची कमतरता आहे, तरीही उच्च-जातीय कुटुंबांमध्ये (६.८ टक्के) ही सुविधा मिळण्याची शक्यता अनुसूचित जाती (२.५ टक्के) किंवा अनुसूचित जमातीच्या (२.१ टक्के) कुटुंबांपेक्षा अडीच पटीने अधिक आहे. ग्रामीण भागात, १०० पैकी केवळ ६ अनुसूचित जातीच्या कुटुंबांपर्यंत (६.१ टक्के) आणि १०० पैकी सुमारे ७ अनुसूचित जमातीच्या कुटुंबांपर्यंत (६.५ टक्के) वायफाय पोहोचते, जे उच्च-जातीय कुटुंबांमध्ये दिसणाऱ्या प्रसाराच्या (१४.५ टक्के) निम्म्यापेक्षाही कमी आहे. (थॉमस स्नेहा 2025) भारतातील जातीय-आधारित डिजिटल विषमता ही वंचित जाती समूहांच्या ऐतिहासिक सामाजिक-आर्थिक वंचनेत रुजलेली आहे.जातीय-आधारित डिजिटल विषमता ही वंचित जाती समूह आणि इतरांमधील शैक्षणिक पातळी आणि उत्पन्नातील फरकांमुळे असू शकते. (राजम, वी., रेड्डी, ए.बी., और बनर्जी, एस. 2021).

**लिंगभाव आधारित असमानता:** राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (२०१९-२१) नुसार, भारतातील केवळ एक तृतीयांश (३३%) महिलांनीच कधीतरी इंटरनेट वापरले आहे, तर पुरुषांच्या बाबतीत हे प्रमाण निम्म्याहून अधिक (५७%) आहे. ग्रामीण भारतात ही दरी आणखीच मोठी आहे, जिथे पुरुषांनी इंटरनेट वापरण्याची शक्यता महिलांपेक्षा दुप्पट आहे (४९% विरुद्ध २५%). जीएसएमए (GSMA) च्या मोबाईल लिंगभेद अहवाल (२०२१) नुसार, ग्रामीण भारतातील केवळ २५% महिलांकडे स्मार्टफोन आहे, तर पुरुषांमध्ये हेच प्रमाण ४१% आहे. याच अहवालात असेही नमूद केले आहे की, महिलांकडे मोबाईल फोन असले तरी, ते वापरण्यासाठी त्यांना अनेकदा कुटुंबातील पुरुष सदस्यांकडून परवानगी घ्यावी लागते. या निर्बंधामुळे तथ्य-पडताळणी संसाधनांपर्यंत पोहोचण्याची आणि ऑनलाइन माहितीची सत्यता पडताळण्याची त्यांची क्षमता मर्यादित होते. ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन (२०२२) च्या अभ्यासात असे आढळून आले की: भारतातील ७०% पेक्षा जास्त गैरमाहिती व्हॉट्सॲपद्वारे पसरवली जाते.तथ्य-तपासणीच्या १५% पेक्षा कमी प्रयत्न स्थानिक भाषांवर केंद्रित आहेत.ग्रामीण भागातील केवळ ५% महिलांनीच ऑनलाइन मिळालेल्या बातम्यांची सत्यता सक्रियपणे तपासल्याचे सांगितले. महिलांना मोबाईल इंटरनेटच्या सुविधेचा अभाव असण्यामध्ये पारंपरिक सामाजिक नियमांची मोठी भूमिका असते. त्यांची सामाजिक भांडवल पितृसत्तेच्या नियमांद्वारे नियंत्रित होत असते.अनेक ग्रामीण कुटुंबांमध्ये, कौटुंबिक रचनेत महिलांच्या भूमिकांसंबंधीच्या पारंपरिक नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. अश्या सामाजिक अपेक्षा आणि बंधनांमध्ये मासिक पाळी, गर्भधारणा आणि लसीकरणाबद्दलचे खोटे दावे अनेकदा महिलांना आरोग्य सेवा घेण्यापासून परावृत्त करतात. अचूक माहितीच्या अभावी ग्रामीण महिला, विशेषतः ज्या डिजिटल बँकिंगसाठी नवीन आहेत, त्या अनेकदा फिशिंग घोटाळे, कर्ज फसवणूक आणि बनावट गुंतवणूक योजनांना बळी पडतात. भारतीय रिझर्व्ह बँकेने केलेल्या २०२२ च्या सर्वेक्षणानुसार, ग्रामीण भागातील डिजिटल फसवणुकीच्या ३६% प्रकरणांमध्ये अशा महिलांचा समावेश होता, ज्यांना फसवून त्यांच्याकडून बँकिंग तपशील मिळवण्यात आले होते.

**प्रसार माध्यमे आणि गैरमाहिती:** ग्रामीण समाजात सामाजिक भांडवल हे एखादी व्यक्ती किती घट्ट विणलेल्या गटाचा भाग आहे यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. यामुळे इतर वापरकर्त्यांवरील परस्पर संबंधांमुळे लोक अनेकदा कमी विश्वासार्ह असलेल्या पोस्ट्सची कोणतीही चौकशी न करता त्या जशाच्या तशा स्वीकारतात. व्हॉट्सॲपसारख्या सोशल नेटवर्कमध्ये, अनेक विश्वासू व्यक्तींकडून एखाद्या दाव्याची पुनरावृत्ती झाल्यास 'सामाजिक पडताळणी' झाल्याचा एक खोटा आभास निर्माण होतो, ज्यामुळे ती माहिती एखाद्या अधिकृत स्रोतापेक्षा अधिक विश्वसनीय वाटू लागते. याच प्रकारे कुटुंब आणि शेजाऱ्यांमध्ये घनिष्ठ संबंध असतात. ग्रामीण भागात हे प्रमाण अधिक असते.उदा. "मी माझ्या व्यक्तीवर विश्वास ठेवतो, म्हणून त्याने पाठवलेल्या लिंकवरही विश्वास ठेवतो." या मुळे चुकीची माहिती लौकर पसरते. स्थानीय भाषेत माहिती तपासण्याची यंत्रणा सरलतेने उपलब्ध नसल्या मुळे कोणतीही माहिती किंवा बातमी किती तथ्यपूर्ण आहे हे जाणून घेण्याची प्रक्रिया कठिण होते.

ग्रामीण भागात बाह्य गटांशी (तज्ञ, शास्त्रज्ञ, पत्रकार)संबंध अनेकदा कमकुवत असतात. या अभावी, माहितीचे बुडबुडे आणि इको चेंबर्स (प्रतिध्वनी कक्ष ) तयार होतात ज्यांना बाहेरून कोणताही सुधारणात्मक प्रतिसाद मिळत नाही(गोंदावे.इत्यादी २०२६). व्हॉट्सॲप, फेसबुक आणि यूट्यूबसारखे प्लॅटफॉर्म ग्रामीण बातम्यांवर वर्चस्व गाजवतात (६४% अवलंबित्व), आणि दुरुस्तीच्या माहितीपेक्षा लैंगिक भेदभावाच्या अफवा किंवा कोविड लसीबद्दलच्या भीती (वंध्यत्वाचे दावे) अधिक वेगाने पसरवतात. (ग्रामीण-फैक्ट-चेकर्स-फॉर-कम्युनिटी नैरेटिव-रिपोर्ट, २४-२५) संशोधकांच्या मते सोशल मीडिया लोकांना नियमितपणे त्यांच्या विश्वासांशी जुळणाऱ्या पोस्ट्स दाखवतो, ज्यामुळे फिल्टर बबल्स (माहितीचे बुडबुडे) आणि माहितीचे इको चेंबर्स (प्रतिध्वनी कक्ष) तयार होतात (एतान बक्शी, सोलोमन मेसिंग, और लाडा ए. एडामिक. २०१५) या मुळे गैरमाहिती व अपमाहितीचे प्रकार घडतात. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर जीवनातील संधींवर परिणाम करतो. सत्योत्तर जगात, ग्रामीण लोकसंख्येची बातम्यांची सत्यता पडताळण्याची असमर्थता खराब आरोग्य किंवा चुकीच्या राजकीय निवडींना, मानसिक आरोग्याच्या समस्या याला कारणीभूत ठरते, ज्यामुळे त्यांच्यात आणि 'माहिती-समृद्ध' शहरी लोकांमध्ये दरी वाढते.

**निष्कर्ष:** आजच्या माहितीच्या युगात माहितीचे विविध तंत्र समाजात आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याकरिता महत्वाचे आहे. अचूक महितीचा प्रसार आणि डिजिटल विषमता दूर करण्यासाठी ग्रामीण क्षेत्रात आधारभूत संरचना तयार करण्याबरोबर ग्रामीण समुदायांमध्ये मजबूत पकड असलेल्या तळागाळातील संस्थांच्या पाठिंब्याने, डिजिटल आणि माध्यम साक्षरता मुहीम राबविली जाऊ शकते, जेणेकरून नवीन सोशल मीडिया वापरकर्त्यांना बातम्यांची विश्वासार्हता तपासण्यासाठी आवश्यक कौशल्ये मिळतील. तथ्य - पडताळणीची (Fact-checking) डिजिटल साधने उपयुक्त असली, तरी ग्रामीण भागातील तांत्रिक मर्यादांमुळे ती सर्वांपर्यंत पोहोचतीलच असे नाही. त्याऐवजी, माहिती स्वीकारताना आणि ती पुढे पाठवताना लोकांच्या दृष्टिकोन आणि वर्तणुकीत बदल घडवून आणणे अधिक व्यवहार्य ठरेल. या दृष्टीने काही संस्था आणि संगठन काम करत आहेत. डिजिटल साक्षरतेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या काही महत्त्वाच्या संस्थांपैकी, महिलांच्या नेतृत्वाखालील 'चंबळ मीडिया' ही मीडिया संस्था ग्रामीण महिलांसोबत या क्षेत्रात सक्रियपणे सहभागी आहे. FactShala (फॅक्टशाळा) ही भारतातील सर्वात मोठी माध्यम साक्षरता मोहीम आहे. 'DataLEADS' आणि 'Google News Initiative' यांच्या सहकार्याने ही संस्था ग्रामीण भागातील लोक, महिला आणि विद्यार्थ्यांना ऑनलाइन माहिती कशी तपासावी, याचे प्रशिक्षण देते. Digital Empowerment Foundation (DEF): या संस्थेचा 'MILaap' (Media Information Literacy Awareness and Action Program) हा उपक्रम ग्रामीण भागात चुकीच्या माहितीविरुद्ध लढण्यासाठी लोकांना सक्षम करत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे या विषयीच्या धोरण निर्मिती मध्ये ग्रामीण सहभाग कसं वाढविला जाऊ शकतो यावर विचार करणे गरजेचे आहे.

सत्योत्तर जगात जगताना डिजिटल, माध्यम आणि माहिती साक्षरता व्यक्तींना मानवी हक्कांच्या सार्वत्रिक जाहीरनाम्यात नमूद केलेल्या माहिती आणि कल्पना शोधण्याचा, प्राप्त करण्याचा आणि प्रसारित करण्याचा हक्क यासह विविध मानवी हक्कांचा प्रभावीपणे वापर करण्यास अनुमती देते व सक्षम बनविते.

**संदर्भ:**


1. Measuring digital development Facts and Figures 2025,International Telecommunication Union Telecommunication Development Sector https://trello.com/b/CNTZKDbD/facts-and-figures-2025).
2. INTERNET IN INDIA 2024 https://www.iamai.in/sites/default/files/research/Kantar_%20IAMAI%20report_2024_.pdf
3. Claridge, T. (2021, October 1). Evolution Of The Concept Of Social Capital. Institute for Social Capital. https://www.socialcapitalresearch.com/evolution-of-the-concept-of-social-capital/
4. DiMaggio, P., Hargittai, E., Celeste, C., & Shafer, S. (2004). "From Unequal Access to Differentiated Use: A Literature Review and Agenda for Research on Digital Inequality". In Neckerman, K. (Ed.), Social Inequality (pp. 355-400). New York: Russell Sage Foundation.
5. Arokia Samy, Prasanth. (2026). Digital literacy and post truth challenges in the rural academic ecosystem of Tamil Nadu. Discover Education. 5. 10.1007/s44217-025-01073-6.
6. Elena Gadjanova, Gabrielle Lynch, Ghadafi Saibu, Misinformation Across Digital Divides: Theory And Evidence From Northern Ghana, *African Affairs*, Volume 121, Issue 483, April 2022, Pages 161–195
7. Sultana, Sharifa & Fussell, Susan. (2021). Dissemination, Situated Fact-checking, and Social Effects of Misinformation among Rural Bangladeshi Villagers During the COVID-19 Pandemic. Proceedings of the ACM on Human-Computer Interaction. 5. 1-34. 10.1145/3479580.
8. Okereke, M., Ukor, N. A., Ngaruiya, L. M., Mwansa, C., Alhaj, S. M., Ogunkola, I. O., Jaber, H. M., Isa, M. A., Ekpenyong, A., & Lucero-Prisno, D. E. (2020). COVID-19 Misinformation and Infodemic in Rural Africa. *The American journal of tropical medicine and hygiene*, *104*(2), 453–456.
9. Bansal Prachi (2025).India's digital divide and the consequent welfare bias https://360info.org/indias-digital-divide-and-the-consequent-welfare-bias/

10. Sneha Thomas (2025), "One Nation, Many Disconnects: Mapping India's Home Internet Gaps" *Centre for Economic Data and Analysis (CEDA), Ashoka University.* Published on ceda.ashoka.edu.in
11. Gurumurthy, A., & Chami, N. (2020). Digital divide and the need for inclusive policies in rural India. Economic and Political Weekly, 55(22), 35-42.
12. Rajam, V., Reddy, A.B., & Banerjee, S. (2021). Explaining Caste-based Digital Divide in India. *ArXiv, abs/2106.15917.*
13. Sneha Thomas (2025), "Unplugged and Unseen: The Caste Divide in Connected India" *Centre for Economic Data and Analysis (CEDA), Ashoka University.* Published on ceda.ashoka.edu.in
14. The Mobile Gender Gap Report 2021- https://www.gsma.com/solutions-and-impact
15. https://www.orfonline.org/expert-speak/exploring-indias-digital-%20provides%20data,in%20Figures%202%20and%203.
16. Eytan Bakshy, Solomon Messing, and Lada A. Adamic. 2015. Exposure to ideologically diverse news and opinion on Facebook. Science 348, 6239 (2015), 1130–1132. & Eli Pariser. 2011. The Filter Bubble: What The Internet Is Hiding From You (1 ed.). Penguin Books Limited, London, UK.
17. Rural-Fact-Checkers-for-Community_Narrative-Report-1.pdf https://ppl-ai-file-upload.s3.amazonaws.com
18. Gondwe, G., Madrid-Morales, D., Tully, M., & Wasserman, H. (2026). Misinformation and Digital Inequalities: Comparing How Different Demographic Groups Get Exposed to and Engage with False Information. *Mass Communication and Society*, *29*(1), 1–15.
19. "Gendered Disinformation: Deepening Perspectives and Designing Responses," an initiative led by Meedan in collaboration with The Quint, Digital Rights Foundation, and Chambal Media. https://khabarlahariya.org/disinformation-and-disempowerment-the-gendered-experience-in-rural-india/


# ग्रामीण भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्यावरील वार्तांकनाचे माध्यमांमधील प्रतिनिधित्व: एक संरचनात्मक आणि समाजशास्त्रीय विश्लेषण

**पूजा यादव** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे.

**सारांश:** भारताच्या ग्रामीण लोकसंख्येच्या मोठ्या भागासाठी शेती हा उपजीविकेचा प्राथमिक स्रोत आहे, तरीही हे क्षेत्र कर्जबाजारीपणा, अस्थिर बाजारपेठा, घटते शासकीय पाठबळ आणि हवामानाशी संबंधित धोके यांसारख्या गंभीर आणि दीर्घकाळच्या संरचनात्मक संकटाचा सामना करत आहे. या संकटाच्या सर्वांत दु:खद परिणामांपैकी एक म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या सतत होणाऱ्या घटना, जी केवळ वैयक्तिक दुर्दैवी घटना नसून व्यवस्थेतील व्यापक उणिवांचे प्रतिबिंब आहे. अनेक दशकांच्या धोरणात्मक हस्तक्षेपांचा उद्देश शेतीची लवचिकता सुधारणे हा असला तरी, शेतकरी आणि शेतमजुरांमधील आत्महत्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. त्याच वेळी, माध्यमांमधील याबाबतचे वार्तांकन हे अनेकदा या मृत्यूंना केवळ एक प्रासंगिक घटना म्हणून सादर करते, ज्यामुळे संरचनात्मक घटकांकडे दुर्लक्ष होते. हा शोधनिबंध शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा एक समाजशास्त्रीय घटना म्हणून अभ्यास करतो आणि माध्यमांचे प्रतिनिधित्व लोकांची समज आणि धोरणात्मक चर्चेला कसे आकार देते याचे विश्लेषण करतो. हा अभ्यास कृषी संकट आणि त्याच्या प्रतिनिधित्वाची सर्वसमावेशक समज मांडण्यासाठी सरकारी अहवाल, साहित्य आणि माध्यम विश्लेषणांमधून मिळालेल्या दुय्यम पुराव्यांचे विश्लेषण करतो.

***मुख्य शब्द:*** *कृषी संकट, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, माध्यम सादरीकरण, ग्रामीण संकट, भारत*

**प्रस्तावना:** भारतीय शेती देशातील जवळपास निम्म्या कार्यबलाला रोजगार देते आणि मोठ्या ग्रामीण समुदायांना आधार देते, तरीही तिचा राष्ट्रीय सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये (जीडीपी) सुमारे १५% वाटा आहे. तिच्या सामाजिक-आर्थिक महत्त्वा असूनही, शेतीला वाढता उत्पादन खर्च, वस्तूंच्या अस्थिर किमती, पर्यावरणीय अनिश्चितता आणि कमकुवत संस्थात्मक पाठिंबा यांसारख्या दीर्घकालीन आव्हानांचा सामना करावा लागत आहे. या संरचनात्मक दबावांमुळे शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये उपजीविकेची व्यापक असुरक्षितता निर्माण झाली आहे, जी आत्महत्यांच्या वाढत्या घटनांमध्ये दिसून येते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही केवळ वैयक्तिक मानसिक संकटे नसून, प्रणालीगत दबावांमुळे निर्माण झालेली सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या रुजलेली एक घटना आहे. आर्थिक आणि धोरणात्मक पैलूंच्या पलीकडे, या घटनांबद्दल लोकांचे मत घडविण्यात माध्यमांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. माध्यमे प्रणालीगत संकटाची सखोल समज दृढ करू शकतात वा केवळ वैयक्तिक कथांवर लक्ष केंद्रित करून त्याचे महत्त्व कमी करू शकतात.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये:** भारतातील ग्रामीण कृषी संकटाचे संरचनात्मक स्वरूप समजून घेणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागील सामाजिक कारणांचे विश्लेषण करणे, माध्यमे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे चित्रण कसे करतात याचे परीक्षण करणे, आणि माध्यमांचे सादरीकरण लोकांचे मत आणि धोरणात्मक चर्चेवर कसा प्रभाव टाकते हे समजून घेणे.

**संशोधन पद्धती:** हे संशोधन पूर्णपणे दुय्यम डेटावर आधारित आहे जे येथून प्राप्त झाले आहे: सरकारी प्रकाशने जसे की भारतातील अपघाती मृत्यू आणि आत्महत्या (ADSI) अहवाल;नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरो (NCRB) डेटा;समवयस्क-पुनरावलोकन केलेले शैक्षणिक साहित्य आणि समाजशास्त्रीय विश्लेषण;मीडिया अहवाल आणि पत्रकारिता लेख; आणि मागील मीडिया फ्रेमिंग अभ्यास. अभ्यासात गुणात्मक विश्लेषण आणि व्याख्यात्मक समाजशास्त्रीय पद्धती वापरल्या आहेत.

**साहित्य समीक्षा:** ऐतिहासिक पुरावे दर्शवतात की, १९९५ ते २०१८ दरम्यान, जवळपास ४००,००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, म्हणजेच तीव्र आर्थिक असुरक्षितता आणि संरचनात्मक विषमतेमुळे दररोज अंदाजे ४८ आत्महत्या झाल्या आहेत. (एनसीआरबी डेटा २०२३). साहित्यात दिलेल्या प्रमुख कारणांमध्ये कर्जबाजारीपणा, नापिकी, बाजारातील अस्थिरता आणि धोरणात्मक दुर्लक्ष यांचा समावेश आहे. हे घटक अनेकदा जमिनीच्या मालकी मधील असमानता, जातीय गतिशीलता आणि

पर्यावरणीय जोखमीशी जोडलेले असतात. समाजशास्त्रज्ञ यावरही जोर देतात की शेतकऱ्यांच्या आत्महत्या या वैयक्तिक कमकुवतपणामुळे नसून, असमानता आणि सामाजिक तणावामध्ये रुजलेल्या आहेत. माध्यमातील अभ्यासक अधोरेखित करतात की ग्रामीण समस्यांना अनेकदा सातत्यपूर्ण प्रसिद्धी मिळत नाही, आणि जेव्हा त्यांचे वृत्तांकन केले जाते, तेव्हा ते तात्कालिक, भावनिक दृष्ट्या मांडलेल्या कथांपुरते मर्यादित असते, जे व्यापक प्रणालीगत परिस्थितीशी जोडले जात नाही. (आर्मस्ट्राँग, २०२०; बाबू, २०१७). या सर्व अभ्यासांनंतरही, संरचनात्मक कारणे आणि माध्यमांतील प्रतिनिधित्वाचे सामाजिक चौकटीत एकाच वेळी विश्लेषण करणाऱ्या अभ्यासांमध्ये एक पोकळी आहे, जी भरून काढण्याचा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

**सैद्धांतिक चौकट:** मार्क्सवादी/संघर्ष सिद्धांत: हा सिद्धांत कृषी संकटाची मुळे संरचनात्मक असमानता आणि भांडवलशाही बाजारपेठेच्या शक्तींच्या दबावात असल्याचे मानतो. (पटनायक, २००७).

स्त्रीवादी दृष्टिकोन: हे दृष्टिकोन कृषी संकटाच्या अनेकदा दुर्लक्षित राहिलेल्या लैंगिक आयामांवर, विशेषतः शेतकरी कुटुंबांतील महिलांवरील ओझ्यावर प्रकाश टाकतात. माध्यम मांडणी सिद्धांत: हा सिद्धांत दाखवतो की माध्यमे वास्तविक घटनांचे विशिष्ट पैलू कसे निवडतात आणि त्यावर जोर देतात, ज्यामुळे लोकांची समज आणि धोरणात्मक लक्ष आकार घेते. माध्यम मांडणी सिद्धांत सूचित करतो की, मुद्दे ज्या प्रकारे सादर केले जातात, त्याचा प्रेक्षकांच्या आकलनावर परिणाम होतो (एंटमन, १९९३).

**शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची आकडेवारी:** राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (NCRB) च्या २०२३ च्या अहवालानुसार, भारतात शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये १०,७८६ आत्महत्या झाल्या. यापैकी, ४,६९० शेतकरी होते आणि ६,०९६ शेतमजूर होते. २०२३ मध्ये देशभरात नोंदवलेल्या एकूण १,७१,४१८ आत्महत्यांपैकी ६.३% हे शेतकरी आत्महत्याचे प्रमाण आहे. (NCRB, २०२३).राज्याच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्र आणि कर्नाटकसारख्या राज्यांमध्ये या आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे, जिथे दुष्काळप्रवण परिस्थिती, एकाच पिकाची लागवड करण्याची पद्धत आणि बाजारातील संरचनात्मक दबावामुळे ग्रामीण भागातील संकट अधिक तीव्र झाले आहे.

**भारतातील ग्रामीण संकट:** भारतीय शेतीला ग्रासणारे संकट बहुआयामी आहे: वाढता उत्पादन खर्च : विशेषतः वाढत्या व्यापारीकरणामुळे बियाणे, खते, कीटकनाशके, ऊर्जा आणि सिंचनाचा खर्च वाढला आहे. कर्जावरील अवलंबित्व: औपचारिक संस्थात्मक कर्जाच्या मर्यादित उपलब्धतेमुळे लहान आणि अल्पभूधारक शेतकरी अनेकदा अनौपचारिक, जास्त व्याजदराच्या कर्जावर अवलंबून असतात. हवामानातील अनिश्चितता - हवामान बदलामुळे वाढलेला अनियमित पाऊस, दुष्काळ आणि पूर यामुळे पीक नापिकीचा धोका वाढतो. बाजारातील अस्थिरता: किमतीतील चढ-उतारामुळे शेतकऱ्यांना अनेकदा किफायतशीर भाव मिळत नाही, ज्यामुळे त्यांना नाइलाजाने कमी किमतीत विक्री करावी लागते. किमान संस्थात्मक पाठिंबा: पीक विमा योजनांचा पुरेसा वापर होत नाही आणि विस्तार सेवा व ग्रामीण पायाभूत सुविधा अपुऱ्या आहेत.या सर्व परिस्थितींमुळे अशी स्थिती निर्माण होते, जिथे अगदी लहान धक्क्यांमुळेही असुरक्षित शेतकरी तीव्र संकटात सापडतात आणि अत्यंत गंभीर परिस्थितीत आत्महत्येसारखे पाऊल उचलतात.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण:** शेतकऱ्यांच्या आत्महत्या केवळ वैयक्तिक शोकांतिका नाहीत, तर त्या संरचनात्मक आणि संस्थात्मक दबावांमुळे सामाजिकरित्या निर्माण झालेले परिणाम आहेत.

आर्थिक आणि संस्थात्मक ताण: दीर्घकालीन आर्थिक असुरक्षितता, सततचे कर्ज आणि किमान संस्थात्मक संरक्षण यामुळे शेतकरी धोके आणि असुरक्षिततेच्या चक्रात अडकतात. अभ्यासातून असे दिसून येते की, शेतकरी अनेकदा कर्जाच्या सापळ्यात अडकतात, ज्यातून बाहेर पडणे जवळजवळ अशक्य असते, विशेषतः जेव्हा पीक नापिकी किंवा बाजारात मंदी येते. सामाजिक अपेक्षा आणि सांस्कृतिक दबाव: ग्रामीण भारतात, आर्थिक अपयश म्हणजे केवळ उत्पन्नाचे नुकसान नाही, तर सामाजिक प्रतिष्ठा आणि सन्मानाचेही नुकसान आहे, ज्यामुळे मानसिक ताण वाढतो. समाजशास्त्रीय संशोधनातून असे दिसून येते की, कुटुंबाची काळजी घेणे यांसारख्या सामाजिक अपेक्षा पूर्ण करण्यात अपयश आल्यास, तणाव वाढू शकतो आणि आत्महत्येचा धोका वाढू शकतो. संरचनात्मक असमानता आणि जातीय पैलू: संशोधनातून असे दिसून येते की, लहान/अल्पभूधारक शेतकरी आणि ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित जातीय गटांमध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. हे जमीन मालकीच्या पद्धती आणि संसाधनांच्या उपलब्धतेमध्ये अंतर्भूत असलेल्या व्यापक सामाजिक असमानता प्रतिबिंबित करते. (देशपांडे, २००२; पटनायक, २००७).

**शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे माध्यमांतील चित्रण:** शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबद्दलची लोकांची समज घडवण्यात माध्यमांचे वार्तांकन महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, तरीही वार्तांकनाचे स्वरूप अनेकदा सखोल संरचनात्मक अंतर्दृष्टीला मर्यादित करते. ही प्रक्रिया बर्जर आणि लकमन यांच्या या कल्पनेचे प्रतिबिंब आहे की, वास्तव हे संस्थात्मक कथांच्या माध्यमातून सामाजिकरित्या रचले जाते.

**प्रासंगिक आणि सरलीकृत वार्तांकन:** भारतातील मुख्य प्रवाहातील वृत्तपत्रे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना अनेकदा प्रासंगिक घटना म्हणून सादर करतात. ती व्यापक संरचनात्मक समस्यांशी सातत्याने न जोडता केवळ एकाकी प्रकरणांवर किंवा संक्षिप्त कथांवर लक्ष केंद्रित करतात. उदाहरणार्थ, भारतीय वृत्तपत्रांच्या वार्तांकनाच्या परिमाणात्मक आशय विश्लेषणातून असे दिसून येते की, वृत्तसंस्था शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर बातम्या देत असल्या तरी, त्या अनेकदा नापिकी किंवा कर्ज यांसारख्या तात्काळ कारणांवर भर देतात, परंतु धोरणात्मक असुरक्षितता किंवा कृषी क्षेत्रातील संरचनात्मक संकट यांसारख्या प्रणालीगत घटकांबद्दल मर्यादित संदर्भ देतात. (बाबू, २०१७; आर्मस्ट्राँग इत्यादी, २०२०). ५५ भारतीय वृत्तपत्रांतील लेखांच्या अलीकडील फ्रेमिंग अभ्यासात असे आढळले की, आत्महत्येच्या वार्तांकनात दुष्काळाला आत्महत्येशी सरलीकृत पद्धतीने जोडले गेले होते, आणि आर्थिक अडचणी व उपजीविकेतील व्यत्यय यांसारख्या जटिल सामाजिक-आर्थिक तणावांना व्यापक सामाजिक-राजकीय विश्लेषणाशिवाय एकत्र गटबद्ध केले गेले होते.

या वार्तांकनात पुरुष शेतकऱ्यांवर लक्ष केंद्रित केले जात होते आणि हवामान बदल किंवा लिंग-आधारित परिणाम यांसारख्या सखोल विषयात्मक चौकटी टाळल्या जात होत्या. (डॉकेन, २०२५).

**मर्यादित संदर्भीकरण:** अनेक माध्यम फ्रेमिंग अभ्यासांमधून असे दिसून येते की, वार्तांकनामध्ये संस्थात्मक पतप्रणाली, बाजारातील किमतीतील चढउतार आणि शेतीसाठीच्या सार्वजनिक पाठिंब्यात घट यांसारख्या मूळ कारणांचा संदर्भ अनेकदा नसतो. हे आशय विश्लेषणाद्वारे नोंदवलेल्या एका व्यापक प्रवृत्तीचे प्रतिबिंब आहे की, माध्यमांचे वार्तांकन विश्लेषणात्मक खोलीपेक्षा बातमीयोग्यतेला प्राधान्य देते, ही प्रवृत्ती भारतीय जनमाध्यमांमधील आत्महत्येच्या वार्तांकनाच्या अभ्यासांमध्ये नोंदवली गेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात, या प्रवृत्तीचा अर्थ असा आहे की, विशिष्ट आत्महत्येच्या घटना मानवी भावनांना आवाहन करणाऱ्या दृष्टिकोनातून नोंदवल्या जात असल्या तरी, ग्रामीण कर्जबाजारीपणा किंवा नवउदारमतवादी धोरणांचे परिणाम यांसारख्या मूळ संरचनात्मक परिस्थितीबद्दल जनतेला शिक्षित करण्यासाठी कोणताही सातत्यपूर्ण प्रयत्न केला जात नाही त्यामुळे वाचकांना आत्महत्या या प्रणालीगत संकटांऐवजी वैयक्तिक शोकांतिका आहे अशी धारणा होते.

**माध्यमांची भूमिका: समर्थन किंवा सहानुभूती वाढवणारे माध्यम:** काही अभ्यास माध्यमांच्या भूमिकेकडेही लक्ष वेधतात, जी तीव्र संकट अधोरेखित करते आणि शेतकऱ्यांसाठी समर्थन करते. वृत्तपत्रांतील लेखांच्या अभ्यासात असे आढळून येते की, माध्यमांनी अशी कथानके सादर केली ज्यात शेतकऱ्यांचे संघर्ष, ज्यात दुष्काळ, उपजीविकेचे नुकसान आणि सरकारी जबाबदारी यांचा समावेश होता. तथापि, असे वार्तांकन व्यापक कृषी धोरणांच्या समस्यांशी जोडण्याऐवजी मोठ्या प्रमाणात एकाच कारणावर आधारित आणि वरवरचे राहिले. (एंटमन, १९९३).

**प्रादेशिक आणि संरचनात्मक वृत्तांकनातील विषमता:** भारतीय माध्यमांतील वृत्तांकनावरील संशोधनातून असमान प्रतिनिधित्वाची बाब समोर येते — जिथे काही विशिष्ट प्रदेशांना आणि प्रकरणांना अधिक महत्त्व दिले जाते, तर इतरांना अधूनमधून प्रसिद्धी मिळते किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. या असमानतेमुळे, अधिकृत साथरोगविषयक आकडेवारीच्या तुलनेत, माध्यमांतील वृत्तांतांमध्ये संकटग्रस्ततेची व्याप्ती आणि आत्महत्यांचे स्वरूप पूर्णपणे प्रतिबिंबित होत नाही.

**माध्यमे आणि वास्तवाची सामाजिक निर्मिती:** माध्यमे केवळ घटनांचे वृत्तांकन करत नाहीत, तर ती फ्रेमिंग, निवड आणि कथनात्मक महत्त्वावर भर देऊन सामाजिक वास्तवाची निर्मिती करतात. माध्यमे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर कशी चर्चा करतात, हे सार्वजनिक आकलन, राजकीय वादविवाद आणि धोरणात्मक प्राधान्ये यांना आकार देते.

**वैयक्तिक विरुद्ध संरचनात्मक कथांची निर्मिती:** वैयक्तिक कथा, प्रासंगिक वृत्तांकन आणि सरलीकृत कारणांवर (उदा. दुष्काळामुळे पीक निकामी होणे) भर देऊन, मुख्य प्रवाहातील माध्यमे अशा सार्वजनिक चर्चेला हातभार लावतात, जी आत्महत्यांना प्रणालीगत तणावाऐवजी वैयक्तिक दुर्दैवाचे कारण ठरवते. यामुळे आर्थिक असुरक्षितता, अपुरा संस्थात्मक पाठिंबा, हवामानाचा धोका आणि बाजारातील अस्थिरता यांसारख्या व्यापक कृषी समस्यांची दृश्यमानता कमी होते. (आर्मस्ट्राँग इत्यादी, २०२०).

**सार्वजनिक आकलन आणि धोरणांवर परिणाम:** जेव्हा शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रामुख्याने वैयक्तिक शोकांतिका म्हणून सादर केल्या जातात, तेव्हा सार्वजनिक संवाद विश्लेषणात्मक न राहता भावनिक राहतो. परिणामी, धोरणात्मक प्रतिसाद देखील प्रतिक्रियात्मक आणि अल्प-मुदतीचे असण्याचा धोका असतो. जे अनेकदा कृषी संरचनांच्या पद्धतशीर सुधारणेऐवजी एक-वेळच्या मदत पॅकेजेसवर किंवा कथनावर आधारित उपायांवर लक्ष केंद्रित करतात.

**सांस्कृतिक परिणाम:** प्रासंगिक मीडिया फ्रेमिंगचा समाजावर शेतकऱ्यांच्या ओळखीबद्दलच्या दृष्टिकोनावरही परिणाम होतो. मानवी-रुचीचे वृत्तांकन सहानुभूती निर्माण करू शकते, परंतु ते नकळत ग्रामीण दुःखाच्या सरलीकृत मानसिक प्रतिमांना बळकटी देऊ शकते, ज्यामुळे जटिल संरचनात्मक वास्तव झाकोळले जाऊ शकते.

**निष्कर्ष:** भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्या संरचनात्मक आर्थिक ताण, संस्थात्मक अंतर आणि सामाजिक दबावांमध्ये गुंतलेल्या आहेत. एनसीआरबी आणि अनेक शैक्षणिक स्रोतांकडून मिळालेल्या माहितीवरून असे दिसून येते की या आत्महत्या वैयक्तिक तुरळक संकटांपेक्षा असुरक्षिततेच्या खोलवर रुजलेल्या परिस्थितीचे प्रतिबिंबित करतात. संरचनात्मक विश्लेषणापेक्षा प्रासंगिक रिपोर्टिंगला प्राधान्य देणारी मीडिया फ्रेमिंग सार्वजनिक समज मर्यादित करू शकते आणि धोरणात्मक जबाबदारी रोखू शकते. या संकटाचे निराकरण करण्यासाठी बहु-स्तरीय संरचनात्मक सुधारणांची आवश्यकता आहे - ज्यामध्ये संस्थात्मक कर्जाची चांगली उपलब्धता, प्रभावी विमा यंत्रणा, स्थिर बाजार संरचना आणि मजबूत ग्रामीण पायाभूत सुविधांचा समावेश असावा. तसेच पद्धतशीर कारणे सातत्याने अधोरेखित करणाऱ्या मीडिया पद्धतींचा समावेश आहे. ही घटना ग्रामीण भारतात सामाजिक पुनरुत्पादनाच्या संकटाचे प्रतिबिंबित करते, जिथे आर्थिक उदारीकरणामुळे धोका वाढला आहे तर संस्थात्मक संरक्षण कमकुवत आहे. अशा मृत्यूंना वैयक्तिकृत करणारे मीडिया कथानक कृषी प्रणालींमध्ये अंतर्भूत असलेल्या स्ट्रक्चरल हिंसाचाराला अस्पष्ट करण्याचा धोका पत्करतात.

**संदर्भ:**

आर्मस्ट्राँग, जी., विजयकुमार, एल., पिर्किस, जे., जयसीलन, एम., गुरुराज, जी., आणि व्हाइटफोर्ड, एच. (२०२०). भारतातील आत्महत्यांच्या वार्तांकनाचा माध्यमांचा अनुभव. पीएलओएस वन, १५(८), e0239280. https://doi.org/10.1371/journal.pone.0239280

बाबू, जे. एम. (२०१७). भारतीय वृत्तपत्रांमधील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे वार्तांकन: एक आशय विश्लेषण. रिसर्च ॲडव्हान्सेस इन जर्नलिझम ॲंड मास कम्युनिकेशन.

सीएमएस मीडिया लॅब. (२००६). जीवनासाठी पत्रकारिता: भारतीय माध्यमांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रतिनिधित्वावर एक दृष्टिक्षेप. सीएमएस इंडिया.

देशपांडे, एस. (२००२). कृषी संकट आणि कृषी सुधारणा. इकॉनॉमिक ॲंड पॉलिटिकल वीकली, ३७(४६), ४६६१—४६६५.

डोकन, एम. (२०२५). भारतीय वृत्तपत्रांमधील दुष्काळ आणि आत्महत्यांच्या फ्रेमिंगचा शोध. डिस्कव्हर सस्टेनेबिलिटी. स्प्रिंगर. https://doi.org/10.1007/s44155-025-00315-0

दुर्खाईम, ई. (१८९७/१९५१). आत्महत्या: समाजशास्त्रातील एक अभ्यास (जे. ए. स्पॉल्डिंग आणि जी. सिम्पसन, अनुवादक). फ्री प्रेस.
एंटमन, आर. एम. (१९९३). फ्रेमिंग: एका खंडित प्रतिमानाचे स्पष्टीकरण करण्याच्या दिशेने. जर्नल ऑफ कम्युनिकेशन, ४३(४), ५१–५८.
राष्ट्रीय गुन्हे नोंद विभाग. (२०२३). भारतातील अपघाती मृत्यू आणि आत्महत्या २०२३. गृह मंत्रालय, भारत सरकार.
पटनायक, यू. (२००७). भुकेचे प्रजासत्ताक. सोशल सायंटिस्ट, ३५(९/१०), ९–३५.

# ग्रामीण भागातील परिवर्तनात माध्यमाची भूमिका

**कविता अशोक मोराडे** सहाय्यक प्राध्यापिका, समाजशास्त्र व मानसशास्त्र विभाग,के.टी. एच. एम. महाविद्यालय नाशिक.

**गोषवारा:** ग्रामीण भागातील परिवर्तन ही सतत चालणारी प्रक्रिया असून त्यामध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व तांत्रिक बदलांचा समावेश होतो. या परिवर्तनामध्ये माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. पारंपरिक माध्यमे जसे की वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरदर्शन तसेच आधुनिक डिजिटल माध्यमे मोबाइल, इंटरनेट, सोशल मीडिया यांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेपर्यंत माहिती, जनजागृती व नवविचार पोहोचतात. शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान, सरकारी योजना, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण व रोजगाराच्या संधी यांची माहिती माध्यमांमुळे ग्रामीण समाजाला उपलब्ध होते. माध्यमे ग्रामीण लोकांच्या समस्या, अपेक्षा व संस्कृती समाजासमोर मांडण्याचे कार्यही करतात. त्यामुळे ग्रामीण भागातील सामाजिक जाणीव वाढून विकासप्रक्रियेला गती मिळते. अशा प्रकारे ग्रामीण परिवर्तन घडवून आणण्यात माध्यमे प्रभावी साधन म्हणून कार्य करतात.

**प्रस्तावना:** भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या एकूण लोकसंख्येचा मोठा भाग ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. पारंपरिक जीवनशैली, शेतीवर आधारित अर्थव्यवस्था, सामाजिक रूढी-परंपरा आणि स्थानिक संस्कृती ही ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये राहिली आहेत. मात्र विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे, शिक्षणाच्या प्रसारामुळे आणि जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे ग्रामीण भागात झपाट्याने परिवर्तन घडून येत आहे. या परिवर्तन प्रक्रियेत माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. मुद्रित माध्यमे, रेडिओ, दूरदर्शन, तसेच आधुनिक डिजिटल व सामाजिक माध्यमांनी ग्रामीण जनतेपर्यंत माहिती, ज्ञान आणि नव्या विचारांचा प्रसार केला आहे. शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, शासकीय योजना, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, स्वच्छता आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्यात माध्यमांनी प्रभावी योगदान दिले आहे. माध्यमांमुळे ग्रामीण समाजाचा दृष्टिकोन अधिक व्यापक झाला असून सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बदलांना गती मिळाली आहे. अशा प्रकारे ग्रामीण भागातील परिवर्तनाची प्रक्रिया समजून घेण्यासाठी आणि त्या प्रक्रियेत माध्यमांची भूमिका अभ्यासण्यासाठी हा विषय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने माध्यमांचा सकारात्मक व परिणामकारक प्रभाव समजून घेणे ही काळाची गरज आहे.

**माहितीचे विश्लेषण:** ग्रामीण भारत हा देशाच्या सामाजिक-आर्थिक रचनेचा कणा आहे. शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार, स्त्री-सक्षमीकरण आणि लोकशाही सहभाग या क्षेत्रांत ग्रामीण भागात होत असलेले परिवर्तन वेगाने पुढे जात आहे. या परिवर्तनात माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

**माहिती व जनजागृती:** वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन आणि डिजिटल माध्यमांमुळे शासकीय योजना, कृषी तंत्रज्ञान, आरोग्यविषयक सल्ले आणि शिक्षणाच्या संधी ग्रामीण लोकांपर्यंत पोहोचल्या. उदाहरणार्थ, हवामान अंदाज, पीक विमा, सेंद्रिय शेती, पोषण आहार याबाबतची माहिती शेतकऱ्यांना योग्य निर्णय घेण्यास दिसा देते.

**शिक्षण व कौशल्यविकास:** शैक्षणिक कार्यक्रम, ई-लर्निंग, मोबाईल ॲप्स आणि यूट्यूब चॅनेल्समुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व कौशल्ये मिळू लागली. स्पर्धा परीक्षा, डिजिटल साक्षरता आणि व्यावसायिक प्रशिक्षण यामुळे रोजगारक्षमतेत वाढ झाली.

**सामाजिक बदल व स्त्री-सक्षमीकरण:** माध्यमांनी स्त्री शिक्षण, स्वयंसहायता गट, आरोग्य-स्वच्छता, बालविवाह प्रतिबंध यांसारख्या मुद्द्यांवर सकारात्मक जनमत तयार केले. यशोगाथा दाखवून महिलांचा आत्मविश्वास वाढवण्यात माध्यमांची भूमिका निर्णायक ठरली.

**लोकशाही सहभाग व पारदर्शकता:** स्थानिक प्रश्नांना आवाज देणे, ग्रामसभांची माहिती, हक्क-कर्तव्यांची जाणीव आणि प्रशासनावर सामाजिक दबाव निर्माण करणे-यामुळे ग्रामीण लोकांचा लोकशाही प्रक्रियेत सहभाग वाढला.

**डिजिटल माध्यमांची वाढती ताकद:** स्मार्टफोन, सोशल मीडिया आणि इंटरनेटमुळे ग्रामीण उद्योजकता, ई-मार्केट, थेट ग्राहकांपर्यंत पोहोच शक्य झाले. मात्र, चुकीची माहिती (फेक न्यूज) हा धोका असल्याने माध्यम साक्षरता आवश्यक आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा अभ्यास करणे. २) ग्रामीण परिवर्तन प्रक्रियेत विविध माध्यमांची (वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ, सामाजिक माध्यमे)भूमिका समजून घेणे. ३) माध्यमांद्वारे ग्रामीण जनतेमध्ये जनजागृती कशी घडते याचा अभ्यास करणे. ४) ग्रामीण विकास योजनांची माहिती माध्यमांद्वारे लोकांपर्यंत कितपत पोहोचते याचे विश्लेषण करणे. ५) माध्यमांचा ग्रामीण लोकांच्या विचारसरणी, जीवनशैली व निर्णय प्रक्रियेवर होणारा परिणाम अभ्यासणे. ६) नव्या तंत्रज्ञान व डिजिटल माध्यमांचा ग्रामीण समाजावर होणारा प्रभाव समजून घेणे. ७) ग्रामीण भागातील समस्यांवर माध्यमे कशी प्रकाश टाकतात याचा अभ्यास करणे. ८) ग्रामीण परिवर्तनास गती देण्यासाठी माध्यमांचा प्रभावी वापर कसा करता येईल याबाबत सूचनांची मांडणी करणे.

**तथ्य संकलनाची साधने:** दुय्यम तथ्याच्या आधारे वरील माहितीचे विशलेषण करण्यात आलेले आहे. यात पुस्तके,मासिके, इंटरनेट,इ वापर प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आह

**निकष: १.** ग्रामीण परिवर्तन हे माध्यमांशिवाय अपूर्ण आहे. २. जबाबदार, सत्याधिष्ठित आणि समावेशक माध्यमे ग्रामीण विकासाला वेग देऊ शकतात. त्याचबरोबर माध्यम साक्षरता वाढवणे. ३. स्थानिक भाषांना प्राधान्य देणे आणि ग्रामीण प्रश्नांना सातत्याने व्यासपीठ देणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा (ग्रामीण परिवर्तन):**

**ग्रामीण विकासाची संकल्पना आणि बदल:** ग्रामीण विकास हे शेती, रोजगार, सामाजिक सुविधा, शिक्षण व जीवनमान सुधारणे या सर्वांचा समावेश करणारे विस्तृत क्षेत्र आहे. ग्रामीण लोकसंख्या, त्यांची आर्थिक स्थिती व समाजरचना यांचे बदल अभ्यासणारे साहित्य या मुद्द्याभोवती केंद्रित आहे.

**ग्रामीण विकास:** मराठी विश्वकोश मध्ये ग्रामीण भागातील आर्थिक आणि सामाजिक समस्या (जसे की शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा) यांचे ऐतिहासिक आणि आधुनिक संदर्भातून विश्लेषण केले आहे. यात सामाजिक रूढी व परंपरागत विचारधारांपासून आधुनिक तंत्रज्ञान व पायाभूत योजनांकडे संक्रमणाचे वर्णन आहे. विविध अभ्यासात म्हटले आहे की ग्रामीण भागातील परिवर्तन हे फक्त आर्थिक प्रगती नाही तर सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचा परिणामही आहे. जसजशी माहिती व तंत्रज्ञान ग्रामीण भागात पोहोचते तसतसे लोकांचे विचार, रोजगार व सामाजिक नेटवर्क बदलतात.

**माध्यमांची भूमिका:** माध्यम (media) अथवा संप्रेषण माध्यम ग्रामीण बदल प्रक्रिया आणि सामाजिक परिवर्तनात महत्त्वाचा घटक मानले गेले आहेत. खालील अभ्यास याचे विविध पैलू दर्शवितात:

**Mass Media आणि ग्रामीण विकास:** International Journal of Food and Nutritional Sciences मध्ये प्रकाशित अभ्यासानुसार टीव्ही, रेडिओ, छापील व डिजिटल मीडिया ग्रामीण भागात माहिती प्रसारित करण्याद्वारे लोकांना कृषि ज्ञान, आरोग्य जागृती आणि सामाजिक व्यवहार याबद्दल जागृत करतात. मीडिया सामाजिक बदल घडविण्याच्या प्रक्रियेत मध्यस्थी भूमिका बजावते आणि ग्रामीण—शहरी माहिती अंतर कमी करते. या अभ्यासात खालील मुद्दे आढळतात: मीडिया कृषि, आरोग्य, शिक्षण आदी क्षेत्रातील माहिती ग्रामीण जनतेपर्यंत सुलभ करते. समाजातील रूढी, परंपरा आणि नवनवीन सामाजिक विचार यांच्यातील तणाव आणि बदल यांचे विश्लेषण माध्यमाच्या विषयवस्तूमुळे झालेले परिणाम स्पष्ट केले आहेत.

**पारंपारिक आणि सामुदायिक माध्यमांची प्रभावी भूमिका:** सामुदायिक रेडिओ किंवा लोक रेडिओचा अभ्यास सांगतो की, हे माध्यम स्थानिक समस्या, कृषी माहिती, आरोग्य आणि सामाजिक कार्यक्रम याबद्दल सीधे संवाद साधते आणि ग्रामस्थांना सहभागी बनवते. सामुदायिक रेडिओ कार्यक्रमांमध्ये स्थानिक गरजा व लोकांचा सहभाग यांवर विशेष भर दिला जातो. हे संदर्भ स्पष्ट करतात की ,साध्या माध्यमांपेक्षा स्थानिक स्तरावर निर्मित मीडिया अधिक प्रभावी ठरते कारण ती स्थानिक भाषा, सांस्कृतिक संदर्भ आणि आवश्यकतेनुसार माहिती पुरवते.

**Folk Media आणि डिजिटल माध्यमांचा बदल:** अभ्यास Fostering Development and Community Resilience मध्ये सांगितले आहे की फोक मीडिया आणि साहित्य हे पारंपारिक माध्यम असून ते स्थानिक संस्कृती टिकविणे, शिक्षण देणे व समुदायाला एकत्र आणणे यासाठी महत्त्वाचे आहेत. या पारंपारिक माध्यमांना आज डिजिटल प्लॅटफॉर्म्स जोडले जात आहेत ज्यामुळे माहिती अधिक प्रचंड प्रमाणावर समाजात पसरते.

या संदर्भाने पुढील मुद्दे स्पष्ट केले आहेत:लोककला, कथाकथन, नृत्य, पारंपारिक तंत्रांचा वापर करून शिक्षण व जागृती केली जाते.

**ग्रामीण बदलातील ICT आणि मीडिया:**

**ICT आणि लोकशासन:** सूचना व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) चा वापर ग्रामपंचायत, ऑनलाईन सेवा, ई-शासन आणि बोलणी/शासन प्रक्रिया यांसाठी महत्त्वाचा ठरला आहे. संशोधनात म्हटले आहे की ICT ग्रामीण भागातील माहिती प्रसार, सेवा वितरण आणि लोक सहभाग वाढविण्यात मदत करते.

**डिजिटल विभाजन आणि आव्हाने:** अनेक अभ्यासांमध्ये हा दृष्टिकोन मांडला जातो की डिजिटल मीडिया सूचना पोहोचवण्यात अतुलनीय आहे परंतु डिजिटल विभाजन (digital divide) हा गंभीर आव्हान आहे ज्यामुळे काही लोकांपर्यंत माहिती पोहोचत नाही किंवा समान संधी मिळत नाहीत. 1. ग्रामीण भागातील परिवर्तन हे आर्थिक तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक स्तरावर घडणारी प्रक्रिया आहे जी तंत्रज्ञान, रोजगार, शिक्षण आणि अन्य विकास घटकांमुळे दिसून येते. 2. माध्यमांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. Mass Media माहिती प्रसारित करून सामाजिक बदल, जनजागृती, आरोग्य व कृषी शिक्षण यांना चालना देतात. 3. पारंपारिक आणि सामुदायिक माध्यम — विशेषतः रेडिओ किंवा लोक मीडिया — स्थानिक संदर्भ आणि गरजा लक्षात घेऊन अधिक प्रभावी बदलात योगदान देतात. 4. फोक आणि डिजिटल माध्यमे सांस्कृतिक टिकाव आणि व्यापक संवाद साधण्यासाठी दोन महत्त्वाचे पूरक साधन आहेत. 5. ICT आणि ऑनलाईन साधने ग्रामीण लोकांना जागतिक माहितीपरिसराशी जोडतात पण डिजिटल विभाजनावर लक्ष देणे आवश्यक आहे

**शिफारशी:** 1. ग्रामीण माध्यम साक्षरता वाढवणे, 2. ग्रामीण नागरिकांसाठी डिजिटल व माध्यम साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत. 3. स्थानिक भाषेतील व आशयपूर्ण माध्यम सामग्री असावी. 4. ग्रामीण गरजांनुसार स्थानिक भाषेत शेती, आरोग्य, शिक्षणविषयक कार्यक्रम वाढवावेत. 5. समुदाय आधारित माध्यमांना प्रोत्साहन द्यावे. 6. समुदाय रेडिओ, ग्रामपत्रिका व स्थानिक डिजिटल प्लॅटफॉर्म मजबूत करावेत. 7. महिला व युवकांसाठी विशेष माध्यम उपक्रम राबवावे. 8. महिलांचे सक्षमीकरण व युवकांच्या कौशल्यविकासासाठी माध्यमांचा प्रभावी वापर करावा. 9. शासन योजना व हक्कांची प्रभावी प्रसिद्धी करावी. 10. सरकारी योजनांची

माहिती विश्वासार्ह माध्यमांतून सातत्याने प्रसारित करावी. 11. डिजिटल पायाभूत सुविधा सुधारणे. 12. इंटरनेट कनेक्टिव्हिटी, वीजपुरवठा व तांत्रिक साधने ग्रामीण भागात वाढवावीत. 13. चुकीच्या माहितीवर नियंत्रण ठेवावे. अफवा व दिशाभूल करणाऱ्या मजकुरावर नियंत्रण ठेवण्यासाठी माध्यम जागरूकता वाढवावी

**संदर्भ**


1. ग्रामीण विकास — मराठी विश्वकोश (ग्रामीण परिवर्तनाची मूलभूत व्याख्या आणि सामाजिक/आर्थिक मुद्दे)
2. ग्रामीण विकास में सामुदायिक रेडिओ की भूमिका — ISCA Journal (सामुदायिक मीडिया भूमिका)
3. देशपांडे, श. (2015). ग्रामीण समाजशास्त्र. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
4. पाटील, भा. (2017). ग्रामीण विकास: संकल्पना व प्रक्रिया. औरंगाबाद: कैलाश प्रकाशन.
5. कुलकर्णी, ग. स. (2014). भारतातील ग्रामीण परिवर्तन. नागपूर: विद्या प्रकाशन.
6. मोरे, अ. (2016). माध्यमे आणि समाज. मुंबई: साकेत प्रकाशन.
7. जाधव, र. (2018). ग्रामीण भागातील प्रसारमाध्यमांची भूमिका. पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस.
8. Rogers, E. M. (2003). Diffusion of innovations (5th ed.). New York: Free Press.
9. Melkote, S. R., & Steeves, H. L. (2015). Communication for development: Theory and practice. New Delhi: Sage Publications.
10. Schramm, W. (1964). Mass media and national development. Stanford: Stanford University Press.
11. Chambers, R. (1983). Rural development: Putting the last first. London: Longman.
12. Singh, K. (2009). Rural development: Principles, policies and management. New Delhi: Sage Publications.
13. Desai, V. (2012). Role of media in rural development. Indian Journal of Social Development, 12(2), 215—228.
14. Patil, S. K. (2016). Media and social change in rural India. Journal of Rural Studies, 8(1), 45—52.
15. Ministry of Rural Development, Government of India. (2022). Annual report. Retrieved from https://rural.nic.in
16. UNESCO. (2020). Media and information literacy for rural development. Retrieved from https://www.unesco.org
17. "Study of the Sociological Impact of Mass Media on Rural Development" — International Journal of Food and Nutritional Sciences (Mass media आणि rural development)
18. Exploring Traditional Media's Impact on Social Empowerment in Rural India — Journal of Neonatal Surgery (Traditional media व ग्रामीण सशक्तीकरण)
19. ग्रामीण विकास — मराठी विश्वकोश (ग्रामीण परिवर्तनाची मूलभूत व्याख्या आणि सामाजिक/आर्थिक मुद्दे)
20. ग्रामीण विकास में सामुदायिक रेडिओ की भूमिका — ISCA Journal (सामुदायिक मीडिया भूमिका)
21. Fostering Development and Community Resilience: Role of Folk Media and Literature (Traditional & digital media साठी संदर्भ)
22. ICT in Local Self Governance: A Study of Rural India — ICT आधारित मीडिया आणि विकास संदर्भ (optional)
23. Fostering Development and Community Resilience: Role of Folk Media and Literature (Traditional & digital media साठी संदर्भ)
24. ICT in Local Self Governance: A Study of Rural India — ICT आधारित मीडिया आणि विकास संदर्भ (optional)


# मराठी चित्रपटांमधील ग्रामीण सामाजिक वास्तवाचे स्थित्यंतर: समाजशास्त्रीय आशय विश्लेषण

**प्रा. डॉ. सुनिल माधवराव सिसोदे,** सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभागप्रमुख, कै.म.दि.सिसोदे कला, वाणिज्य व डॉ.उषाताई तनपुरे विज्ञान महाविद्यालय, नरडाणा ता.शिंदखेडा जि.धुळे

**सारांश:** मराठी चित्रपटसृष्टी ही भारतीय प्रादेशिक सिनेमाच्या पटलावर सामाजिक जाणिवांचे प्रगल्भ चित्रण करणारी एक सशक्त धारा आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचा मुख्य उद्देश "मराठी चित्रपटांमधील ग्रामीण जीवनाचे समाजशास्त्रीय आशय विश्लेषण" करणे हा आहे. या संशोधनात १९५० ते २०२४ या विस्तीर्ण कालखंडातील चित्रपटांचा आढावा घेण्यात आला असून, ग्रामीण महाराष्ट्राचे चित्रण 'रोमँटिसिझम'कडून 'कठोर वास्तववादाकडे' कसे बदलत गेले, याचे चिकित्सक विश्लेषण केले आहे. या अभ्यासात संख्यात्मक आकडेवारीऐवजी चित्रपटांच्या कथा, पात्ररचना, संवाद आणि दृश्य प्रतिमा (Visual Imagery) यांच्या सूक्ष्म विश्लेषणावर भर देण्यात आला आहे. अँटोनियो ग्राम्शी यांच्या 'सांस्कृतिक अधिसत्ता' (Cultural Hegemony), एम.एन. श्रीनिवास यांची 'संस्कृतीकरण' आणि लॉरा मल्व्ही (Laura Mulvey) यांच्या 'मेल गेज' (Male Gaze) या सिद्धांतांच्या आधारे, हा शोधनिबंध ग्रामीण भागातील जातीय संघर्ष, कृषी अरिष्ट, विस्थापन, मानसिक आरोग्य आणि लिंगभाव (Gender) या विषयांचे डीकोडिंग करतो. 'टिंग्या', 'कासव', 'कोर्ट', 'जयंती' आणि 'पाणी' (२०२४) यांसारख्या चित्रपटांच्या माध्यमातून, हा अभ्यास ग्रामीण समाजव्यवस्थेतील संरचनात्मक हिंसा आणि बदलत्या नैतिक मूल्यांचा वेध घेतो.

***महत्वाचे शब्द:*** *ग्रामीण समाजशास्त्र, सांस्कृतिक अधिसत्ता, कृषी अरिष्ट, जातीय गतिशीलता, मराठी नवप्रवाह चित्रपट, लिंगभाव राजकारण.*

**प्रस्तावना:** सिनेमा हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते समाजाच्या सांस्कृतिक आणि राजकीय जडणघडणीचे एक दृष्य दस्तऐवज (Visual Document) असते. महाराष्ट्राच्या समाजजीवनात मुंबईसारख्या महानगरांचे स्थान मोठे असले, तरी राज्याचा सांस्कृतिक आत्मा हा ग्रामीण भागात वसलेला आहे. १९५० च्या दशकातील 'सांगत्ये ऐका' सारख्या तमाशापटांपासून ते २०२४ मधील 'पाणी' आणि 'नाच गं घुमा' पर्यंत, मराठी सिनेमाने ग्रामीण जीवनाचे विविध पैलू मांडले आहेत. तथापि, या चित्रणात सातत्याने बदल होत

गेले आहेत. १९५०-७० च्या दशकात ग्रामीण भाग हा सरंजामशाही मूल्यांचे (Feudal Values) आणि 'पाटलांच्या वाड्याचे' केंद्र होते. १९८०-९० च्या दशकात तो विनोदाचा आणि उपहासाचा विषय बनला. परंतु २००० नंतरच्या जागतिकीकरणाच्या युगात, 'नवप्रवाह' (New Wave) सिनेमाने ग्रामीण भागातील 'कृषी अरिष्ट', 'पाणीटंचाई', 'जातीय हिंसाचार' आणि 'विस्थापन' यांसारख्या गंभीर प्रश्नांना वाचा फोडली आहे. प्रस्तुत शोधनिबंध या बदलांचा सखोल समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून वेध घेतो.

**संशोधन पद्धती:** या अभ्यासासाठी **गुणात्मक आशय विश्लेषण (Qualitative Content Analysis)** पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. ही पद्धत मजकूर (Text), संवाद आणि दृश्यांमधील सुप्त अर्थ (Latent Meaning) उलगडण्यासाठी वापरली जाते.

**सैद्धांतिक चौकट:**

**सांस्कृतिक अधिसत्ता:** अँटोनियो ग्राम्शी यांच्या सिद्धांताचा वापर करून ग्रामीण भागातील उच्चवर्णीय आणि श्रीमंत वर्गाचे वर्चस्व कसे टिकवून ठेवले जाते किंवा त्याला कसे आव्हान दिले जाते, हे तपासले आहे.

**संस्कृतीकरण:** एम.एन. श्रीनिवास यांच्या संकल्पनेचा वापर करून कनिष्ठ जातीतील पात्रांचा सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न आणि त्यातील संघर्ष अभ्यासला आहे.

**मेल गेज:** लॉरा मल्व्ही यांच्या सिद्धांताद्वारे चित्रपटांमधील स्त्रियांचे चित्रण आणि पुरुषी नजरेचा प्रभाव तपासला आहे.

**नमुना निवड:** 'हेतूपूर्ण नमुना निवड' (Purposive Sampling) पद्धतीचा वापर करून १९५० ते २०२४ या काळातील सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या चित्रपटांची निवड केली आहे.

ग्रामीण अवकाश आणि सत्तेचे राजकारण: ग्रामीण महाराष्ट्र हा केवळ निसर्गरम्य परिसर नसून तो सत्तेच्या संघर्षाचे कुरुक्षेत्र आहे, हे मराठी सिनेमाने प्रभावीपणे मांडले आहे.

**गावकीचे राजकारण आणि 'वळू':**उमेश कुलकर्णी दिग्दर्शित **'वळू' (२००८)** हा चित्रपट वरकरणी एका वळू बैलाला पकडण्याची गोष्ट वाटत असली, तरी त्यामागे गावातील सूक्ष्म राजकारण दडलेले आहे.

**समाजशास्त्रीय विश्लेषण:** 'वळू' हे गावातील विस्कळीत समाजव्यवस्थेचे प्रतीक आहे. गावचा सरपंच, वन अधिकारी आणि गावकरी यांच्यातील संघर्ष हा सत्तेचा संघर्ष आहे. हा चित्रपट 'गाव' (Gaon) ही एकजिनसी (Homogeneous) संकल्पना नसून ती विविध हितसंबंधांनी भरलेली जागा आहे, हे अधोरेखित करतो.

**विकासाचे मॉडेल आणि 'देऊळ': 'देऊळ' (२०११)** हा चित्रपट जागतिकीकरण आणि बाजारीकरणाच्या काळात 'विकासाची' व्याख्या कशी बदलत आहे, यावर भाष्य करतो.

**धर्माचे बाजारीकरण:** केश्या या साध्या तरुणाला झालेला देवाचा साक्षात्कार आणि त्याचे रूपांतर स्थानिक राजकारणी (भिकाजी) एका भव्य मंदिराच्या प्रोजेक्टमध्ये करतात. 'विकास' म्हणजे काय? मंदिर की हॉस्पिटल? हा प्रश्न चित्रपट उपस्थित करतो. यात ग्राम्शींची 'अधिसत्ता' (Hegemony) दिसून येते, जिथे सत्ताधारी वर्ग धर्माचा वापर करून आपले वर्चस्व कायम ठेवतो.

कृषी अरिष्ट आणि मानसिक आरोग्य: एक नवी मांडणी (Agrarian Crisis and Mental Health: A New Narrative) मराठी सिनेमाने केवळ शेतकरी आत्महत्यांची आकडेवारी न मांडता, त्यामागील मानसिक आणि सामाजिक कारणे शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

**'टिंग्या' आणि 'गाभ्रीचा पाऊस': हतबलतेचे चित्रण: टिंग्या (२००८):** मंगेश हाडवळे यांचा हा चित्रपट एका लहान मुलाची (टिंग्या) त्याच्या बैलावरील (चितंग्या) प्रेमाची कथा आहे. जेव्हा दुष्काळामुळे आणि कर्जामुळे वडिलांना बैलाला कत्तलखान्यात विकावे लागते, तेव्हा कृषी संकटाची भीषणता लहान मुलाच्या नजरेतून समोर येते. हे चित्रण केवळ आर्थिक नसून ते भावनिक विस्थापनाचे (Emotional Displacement) आहे. **गाभ्रीचा पाऊस (२००९):** सतीश मनवर यांचा हा चित्रपट विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्याच्या मानसिक अवस्थेचे चित्रण करतो. आत्महत्या हा केवळ वैयक्तिक निर्णय नसून तो व्यवस्थेच्या अपयशाचा परिणाम आहे (Durkheim's Anomic Suicide), हे यातून दिसते. यात 'ब्लॅक ह्युमर' (Black Humor) वापरून शेतकऱ्याची असहायता मांडली आहे.

**'पाणी' (२०२४): सामूहिक लढा आणि पर्यावरण:** आदिनाथ कोठारे दिग्दर्शित **'पाणी' (२०२४)** हा चित्रपट हनुमंत केंद्रे यांच्या सत्यकथेवर आधारित आहे.

**समाजशास्त्रीय आशय:** दुष्काळ हा केवळ नैसर्गिक आपत्ती नसून ती एक सामाजिक समस्या आहे. लग्नासाठी मुली मिळत नाहीत म्हणून गावातील तरुण एकत्र येऊन जलसंधारणाचे काम करतात. हे 'सामुदायिक सहभागाचे' (Community Participation) आणि 'सामाजिक भांडवलाचे' (Social Capital) उत्तम उदाहरण आहे. पाणीटंचाईमुळे होणारे सामाजिक परिणाम (उदा. विवाहातील अडचणी) यात प्रभावीपणे मांडले आहेत. जातवास्तव, संस्कृतीकरण आणि विद्रोह (Caste Reality, Sanskritization, and Resistance) नागराज मंजुळे यांच्या आगमनाने मराठी सिनेमात 'दलित सौंदर्यशास्त्राचा' (Dalit Aesthetics) उदय झाला.

**'फँड्री': संस्कृतीकरणाचा विरोधाभास: 'फँड्री' (२०१३)** मध्ये जब्या हा कैकाडी समाजाचा मुलगा उच्चजातीय मुलीवर प्रेम करण्यासाठी स्वतःचे दिसणे बदलण्याचा, नवीन कपडे घालण्याचा प्रयत्न करतो. एम.एन. श्रीनिवास यांच्या मते, हे 'संस्कृतीकरणाचे' (Sanskritization) लक्षण आहे. परंतु, समाजाची रचना त्याला स्वीकारत नाही. शेवटी जेव्हा तो कॅमेऱ्यावर दगड मारतो, तेव्हा तो संस्कृतीकरणाचा मार्ग नाकारून 'विद्रोहाचा' (Resistance) मार्ग स्वीकारतो.

**'सैराट' आणि 'जयंती': आंतरजातीय संबंध आणि अस्मिता: सैराट (२०१६):** हा चित्रपट ऑनर किलिंग (Honor Killing) आणि जातीय हिंसेचे वास्तव मांडतो. यात आर्ची (मराठा) आणि परश्या (दलित) यांचे प्रेम हे पितृसत्ताक आणि जातीय वर्चस्वाला

(Caste Hegemony) दिलेले आव्हान आहे. **जयंती (२०२१):** शैलेश नरवाडे यांचा हा चित्रपट दलित तरुणांमधील 'अस्मितेचा शोध' (Identity assertion) मांडतो. नायक 'संत्या' सुरुवातीला चुकीच्या इतिहासाला बळी पडतो, पण नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार वाचून त्याचे वैचारिक परिवर्तन होते. हे 'संस्कृतीकरणा'च्या पलीकडे जाऊन 'प्रबोधनाचे' (Enlightenment) चित्रण आहे.

**'कोर्ट': न्यायव्यवस्थेतील जातीय पूर्वग्रह:** चैतन्य ताम्हाणे यांचा **'कोर्ट' (२०१४)** हा चित्रपट भारतीय न्यायव्यवस्थेतील सुप्त जातीयवादावर (Latent Casteism) प्रकाश टाकतो. नारायण कांबळे या दलित लोकशाहिरावर (Folk Singer) टाकलेले खोटे आरोप आणि कोर्टातील संथ कामकाज हे व्यवस्थेच्या असंवेदनशीलतेचे लक्षण आहे. यात कायद्याचे राज्य (Rule of Law) आणि सामाजिक वास्तव यातील दरी स्पष्ट होते.

**लिंगभाव, पितृसत्ता आणि स्त्रीचे स्थान:** मराठी चित्रपटांनी स्त्रियांच्या शोषणासोबतच त्यांच्या सक्षमीकरणाचाही (Empowerment) प्रवास मांडला आहे. **'जोगवा': देवदासी प्रथेविरुद्धचा लढा: 'जोगवा' (२००९)** हा चित्रपट ग्रामीण महाराष्ट्रातील जोगता आणि जोगतीण (देवदासी) प्रथेवर आधारित आहे.

**लिंगभाव आणि धर्म:** तायप्पा (पुरुष) आणि सुली (स्त्री) यांना देवीला अर्पण केल्यामुळे त्यांचे लैंगिक आणि सामाजिक शोषण होते. तायप्पाला साडी नेसावी लागते, जे त्याच्या पुरुषत्वाला (Masculinity) आव्हान देते. हा चित्रपट धर्म आणि पितृसत्तेच्या (Patriarchy) युतीचा पर्दाफाश करतो आणि शेवटी दोन्ही पात्रे या जोखडातून मुक्त होतात.

**'बाईपण भारी देवा' आणि 'नाच गं घुमा': मध्यमवर्गीय स्त्रीचे प्रश्न:**

**बाईपण भारी देवा (२०२३):** सहा बहिणींच्या कथेतुन स्त्रियांचे मानसिक आरोग्य, Menopause आणि 'सिस्टरहूड' (Sisterhood) यावर भाष्य केले आहे. हे चित्रण ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही स्तरांवरील स्त्रियांना जोडणारे आहे.

**नाच गं घुमा (२०२४):** परेश मोकाशी यांचा हा चित्रपट 'मालकीण' (Employer) आणि 'मोलकरीण' (Domestic Worker) यांच्यातील वर्गीय संबंधांवर (Class Relations) आधारित आहे. हे नाते केवळ आर्थिक नसून ते भावनिक अवलंबित्व (Emotional Dependence) आणि सत्तेच्या राजकारणाचे आहे. घरकाम हे 'अदृश्य श्रम' (Invisible Labor) कसे आहे, हे हा चित्रपट अधोरेखित करतो.

**विस्थापन, भटके विमुक्त आणि वृद्धांचे प्रश्न :**

**'मुळशी पॅटर्न': जमिनीचे राजकारण आणि हेजेमोनिक मॅस्क्युलिनिटी**

**'मुळशी पॅटर्न' (२०१८)** हा चित्रपट जमिनी गमावलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांचे गुन्हेगारीकरण मांडतो.

**हेजेमोनिक मॅस्क्युलिनिटी:** आर.डब्ल्यू. कॉनेल यांच्या सिद्धांतानुसार, नायक राहुल जेव्हा जमीन गमावतो, तेव्हा तो गमावलेली प्रतिष्ठा परत मिळवण्यासाठी हिंसेचा मार्ग निवडतो. ही हिंसा म्हणजे त्याचे 'पुरुषत्व' सिद्ध करण्याचा प्रयत्न आहे.

**'ख्वाडा': भटक्यांचा संघर्ष:**

भाऊराव कऱ्हाडे यांचा **'ख्वाडा' (२०१५)** हा चित्रपट धनगर समाजाच्या (Shepherd Community) व्यथा मांडतो. वन खात्याचे नियम आणि शेतकऱ्यांचे राजकारण यात भरडला जाणारा हा समाज 'गावाचा' ही नाही आणि 'शहराचा' ही नाही. हे अस्तित्वाचे संकट (Existential Crisis) चित्रपटात प्रभावीपणे आले आहे.

**'जुना फर्निचर': वृद्धांची हेळसांड:**

महेश मांजरेकर यांचा **'जुना फर्निचर' (२०२४)** हा चित्रपट बदलत्या कुटुंबव्यवस्थेत (Nuclear Family) वृद्धांच्या स्थानावर प्रश्नचिन्ह उभे करतो. आपल्याच मुलांकडून होणारे दुर्लक्ष आणि त्याविरुद्ध दिलेला कायदेशीर लढा, हे समाजातील ढासळत्या नैतिक मूल्यांचे द्योतक आहे.

चर्चा आणि निष्कर्ष: प्रस्तुत गुणात्मक विश्लेषणावरून खालील निष्कर्ष समोर येतात:

**ग्रामीण 'आयडिल'चा (Idyll) अस्त:** मराठी सिनेमाने आता 'गावाचे' रोमँटिक चित्रण सोडून दिले आहे. 'वळू' आणि 'देऊळ' सारख्या चित्रपटांनी गावातील गटबाजी आणि राजकारण उघडे पाडले आहे.

२ **पात्रांचे सबाल्टर्न (Subaltern) स्वरूप:** पूर्वीचे नायक हे प्रामुख्याने पाटील किंवा देशमुखी असत. आताचे नायक हे 'फँड्री'मधील जब्या (दलित), 'ख्वाडा'मधील धनगर किंवा 'नाच गं घुमा'मधील मोलकरीण आहेत. हे 'सामाजिक समावेशाचे' (Social Inclusion) लक्षण आहे.

**लिंगभाव भूमिकांमधील बदल:** 'सैराट'मधील आर्ची किंवा 'जोगवा'मधील सुली या केवळ बळी (Victim) न राहता त्या व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या 'एजंट' (Agents of Change) बनल्या आहेत.

**संशोधन अंतर (Research Gap):** अद्यापही आदिवासी समाजाचे आणि ग्रामीण भागातील 'डिजिटल दरी'चे (Digital Divide) चित्रण अपुरे आहे. भविष्यात यावर अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. थोडक्यात, समकालीन मराठी सिनेमा हा महाराष्ट्राच्या समाजशास्त्रीय अभ्यासासाठी एक समृद्ध स्रोत (Rich Resource) बनला आहे. तो केवळ रंजन करत नाही, तर समाजाला आरसा दाखवण्याचे आणि अस्वस्थ करण्याचे काम करतो.

## संदर्भ सूची (References)

1.Donoghue, M. (n.d.). The work of Antonio Gramsci is important to the theoretical underpinnings of Critical Discourse Analysis. *University of Oxford*.

2.Harad, T. (2023). A Critical Lens to Understand Gender and Caste Politics of Rural Maharashtra, India. *CASTE: A Global Journal on Social Exclusion*, 4(1), 46–53.

3. Ingle, H. S. (2022). *Marathi Cinema, Cultural Space, and Liminality: A History*. Oxford University Press.

4. Jaiswal, Y. (2023). Nomadic communities move from one place to another. *International Journal of Research in Humanities and Social Sciences*, 11(11).

5. Karhade, B. (Director). (2015). *Khwada* [Film]. Chitraksha Films.
6. Kothare, A. (Director). (2024). *Paani* [Film]. Purple Pebble Pictures.
7. Manjrekar, M. (Director). (2024). *Juna Furniture* [Film]. Satya Saiee Films.
8. Manjule, N. (Director). (2013). *Fandry* [Film]. Navalakha Arts.
9. Manwar, S. (Director). (2009). *Gabhricha Paus* [Film]. Prashant Pethe.
10. Mokashi, P. (Director). (2024). *Naach Ga Ghuma* [Film]. Hiranyagarbha Manoranjan.
11. Mulvey, L. (1975). Visual Pleasure and Narrative Cinema. *Screen*, 16(3), 6–18.
12. Paik, S. (2017). Mangala Bansode and the Social Life of Tamasha: Caste, Sexuality, and Discrimination in Modern Maharashtra. *Biography*, 40, 170-198.
13. Srinivas, M. N. (1952). *Religion and Society among the Coorgs of South India*. Oxford University Press.
14 Tarde, P. (Director). (2018). *Mulshi Pattern* [Film]. Abhijeet Bhosale Genuine Production.
15. Wani, A. (2016). *Fantasy of Modernity: Romantic Love in Bombay Cinema of the 1950s*. Cambridge University Press.

# ग्रामीण समाजावर माध्यमांचा प्रभाव: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. शशिकांत भाऊसाहेब माळोदे** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र व मानवशास्त्र विभाग,के. टी. एच. एम. कॉलेज, नाशिक

**गोषवारा:** माध्यमे ही आधुनिक समाजातील एक प्रभावी सामाजिक संस्था म्हणून उदयास आली असून, त्यांच्या प्रभावामुळे सामाजिक संबंध, मूल्यव्यवस्था, संस्कृती आणि जीवनशैलीत आमूलाग्र बदल घडून येत आहेत. भारतीय ग्रामीण समाज हा परंपरागत, कृषीप्रधान व समुदायाधारित असल्यामुळे माध्यमांचा प्रभाव येथे विशेष स्वरूपाचा दिसून येतो. प्रस्तुत संशोधन लेखात ग्रामीण समाजावर छापील माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि नवमाध्यमे (सोशल मीडिया) यांचा सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय स्तरावर होणारा प्रभाव समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासण्यात आला आहे. माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे ग्रामीण समाज अधिक माहितीप्रधान, जागरूक आणि परिवर्तनशील झाला असला, तरी सांस्कृतिक ऱ्हास, चुकीची माहिती, मूल्यसंक्रमण आणि सामाजिक तणाव यांसारख्या समस्या देखील निर्माण झाल्या आहेत. या अभ्यासातून माध्यमांचा ग्रामीण विकासासाठी सकारात्मक व संतुलित वापर करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.
***परवलीचे शब्द:*** *ग्रामीण समाज, माध्यमे, सामाजिक बदल, नवमाध्यमे*

**प्रस्तावना:** भारतीय समाजरचनेत ग्रामीण समाजाला ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो आणि आजही देशातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. ग्रामीण समाजाची ओळख ही परंपरा, रूढी, लोकसंस्कृती, जातव्यवस्था, कुटुंबसंस्था आणि स्थानिक सामाजिक संबंध यांवर आधारित आहे. पारंपरिक ग्रामीण समाज हा तुलनेने स्थिर, बंदिस्त आणि बदलास संथ प्रतिसाद देणारा मानला जात असे. माहितीचा प्रसार मुख्यतः मौखिक परंपरा, धार्मिक विधी, लोककथा, ग्रामसभा आणि स्थानिक नेत्यांमार्फत होत असे. त्यामुळे ग्रामीण समाजातील लोकांचा बाह्य जगाशी संपर्क मर्यादित होता. झपाट्याने झालेल्या विस्तारामुळे ग्रामीण समाजाच्या जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल घडून आले. रेडिओ, दूरदर्शन, वृत्तपत्रे, तसेच अलीकडील काळात मोबाईल फोन, इंटरनेट आणि सोशल मीडिया यांच्या व्यापक प्रसारामुळे ग्रामीण समाज माहितीच्या मुख्य प्रवाहात सहभागी झाला आहे. माध्यमांनी ग्रामीण समाजाला केवळ माहितीपुरवठा करणारी साधने म्हणून न राहता सामाजिक परिवर्तनाची प्रभावी शक्ती म्हणून स्वतःची भूमिका सिद्ध केली आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून माध्यमे ही एक स्वतंत्र सामाजिक संस्था मानली जातात. माध्यमे समाजातील मूल्ये, विचारसरणी, वर्तनपद्धती आणि सामाजिक संबंधांवर प्रभाव टाकतात. ग्रामीण समाजात माध्यमांचा प्रभाव अधिक तीव्रतेने जाणवतो, कारण हा समाज पारंपरिकतेतून आधुनिकतेकडे संक्रमणाच्या अवस्थेत आहे. माध्यमांच्या प्रभावामुळे ग्रामीण समाजात शिक्षणाबाबत जागरूकता वाढली, आरोग्यविषयक माहिती पोहोचली, सरकारी योजना व धोरणांची माहिती मिळू लागली आणि राजकीय सहभाग वाढला. यामुळे ग्रामीण लोकांचे जीवन अधिक गतिमान आणि परिवर्तनशील झाले आहे. त्याचबरोबर माध्यमांनी ग्रामीण संस्कृतीवरही खोल परिणाम केले आहेत. एकीकडे लोककला, लोकसंगीत, ग्रामीण सण-उत्सव आणि स्थानिक परंपरांना माध्यमांमुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आहे. परंतु दुसरीकडे शहरी आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव ग्रामीण समाजावर वाढताना दिसून येतो. जीवनशैली, पोशाख, भाषा, मूल्ये आणि कौटुंबिक संबंध यांमध्ये बदल होत असून पारंपरिक ग्रामीण संस्कृतीसमोर नवीन आव्हाने उभी राहत आहेत. नवमाध्यमांच्या आगमनानंतर ग्रामीण समाजातील संवादाची रचना पूर्णतः बदलली आहे. आज ग्रामीण तरुण पिढी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सक्रिय असून ती माहिती, मनोरंजन आणि सामाजिक संवादासाठी माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करत आहे. यामुळे ग्रामीण समाज अधिक खुला आणि जागतिक बनत असला, तरी चुकीची माहिती, अफवा, सांस्कृतिक एकरूपता आणि सामाजिक तणाव यांसारख्या समस्या देखील निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे माध्यमांचा ग्रामीण समाजावर होणारा प्रभाव हा केवळ सकारात्मक नसून त्यामध्ये नकारात्मक पैलूही आहेत. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. कृषीविषयक माहिती, बाजारभाव, हवामान अंदाज, आरोग्यविषयक जनजागृती, महिला सशक्तीकरण आणि शिक्षण प्रसार यासाठी माध्यमांचा प्रभावी वापर होऊ शकतो. परंतु त्यासाठी माध्यम साक्षरता, स्थानिक भाषेतील आशय आणि समाजाभिमुख माध्यम धोरणांची आवश्यकता आहे. माध्यमांचा प्रभाव समजून घेण्यासाठी समाजशास्त्रीय विश्लेषण आवश्यक ठरते, कारण ते सामाजिक बदलांची प्रक्रिया, सामाजिक विषमता आणि सांस्कृतिक संक्रमण यांचे सखोल स्पष्टीकरण देते. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन लेखात ग्रामीण समाजावर माध्यमांचा प्रभाव समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून

अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या अभ्यासातून माध्यमे ग्रामीण समाजातील सामाजिक रचना, संस्कृती, शिक्षण, अर्थव्यवस्था आणि राजकीय जाणीव यांवर कसा प्रभाव टाकतात, तसेच ग्रामीण विकासासाठी माध्यमांचा संतुलित वापर कसा करता येईल, याचा शोध घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे: १.** ग्रामीण समाजातील माध्यमांच्या वापराचे स्वरूप समजून घेणे, **२.** माध्यमांचा ग्रामीण सामाजिक रचना व संबंधांवर होणारा प्रभाव अभ्यासणे, **३.** ग्रामीण संस्कृती, मूल्ये व परंपरांवर माध्यमांच्या परिणामांचे विश्लेषण करणे

**सैद्धांतिक चौकट:** प्रस्तुत अभ्यास **माध्यम प्रभाव सिद्धांत**, **आधुनिकीकरण सिद्धांत** आणि **सामाजिक परिवर्तन सिद्धांत** यांच्या आधारावर केला आहे. माध्यम प्रभाव सिद्धांतानुसार माध्यमे लोकांच्या विचारसरणी, दृष्टिकोन आणि वर्तनावर प्रभाव टाकतात. आधुनिकीकरण सिद्धांत ग्रामीण समाजात तंत्रज्ञान व माध्यमांमुळे होणाऱ्या बदलांचे स्पष्टीकरण देतो. सामाजिक परिवर्तन सिद्धांतानुसार नवीन संस्था व तंत्रज्ञान पारंपरिक सामाजिक रचना बदलतात. ग्रामीण समाजात माध्यमे ही बदल घडवणारी प्रमुख संस्था ठरली आहे.

**संशोधन पद्धती:** या संशोधनासाठी दुय्यम माहिती स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. विविध जर्नल्स, समाजशास्त्रीय पुस्तके, संशोधन लेख, सरकारी अहवाल आणि ग्रामीण विकासाशी संबंधित अभ्यासांचा आधार घेण्यात आला आहे.

**तथ्य विश्लेषण:** तथ्य विश्लेषण वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने करण्यात आले आहे.

**ग्रामीण समाजावर माध्यमांचा प्रभाव:**

**सामाजिक जीवनावर माध्यमांचा प्रभाव:** माध्यमांमुळे ग्रामीण समाजातील सामाजिक जाणीव लक्षणीयरीत्या वाढली आहे. जातीय भेदभाव, अंधश्रद्धा, बालविवाह, हुंडा पद्धत, स्त्री-पुरुष असमानता यांसारख्या सामाजिक प्रश्नांवर माध्यमांद्वारे चर्चा सुरू झाली आहे. सामाजिक प्रबोधन करणारे कार्यक्रम आणि मोहिमांमुळे ग्रामीण लोकांमध्ये सामाजिक हक्कांची जाणीव निर्माण झाली आहे तसेच स्वयंसेवी संस्था व सामाजिक चळवळींना माध्यमांमुळे व्यापक व्यासपीठ मिळाले आहे.

**सांस्कृतिक जीवनावर प्रभाव:** माध्यमांनी ग्रामीण संस्कृतीवर दोन प्रकारे परिणाम केला आहे. एकीकडे लोककला, लोकसंगीत, लोकनृत्य आणि ग्रामीण सण-उत्सव यांना प्रसिद्धी मिळाली आहे तर दुसरीकडे शहरी व पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण वाढले आहे. पारंपरिक मूल्ये, संयुक्त कुटुंब पद्धत आणि सामूहिक जीवनशैलीवर माध्यमांच्या प्रभावामुळे बदल घडून येत आहेत.

**शैक्षणिक व माहितीपर परिणाम:** शैक्षणिक कार्यक्रम, ऑनलाइन शिक्षण, कृषीविषयक माहिती, आरोग्यविषयक जनजागृती आणि सरकारी योजनांची माहिती माध्यमांद्वारे ग्रामीण भागात पोहोचत आहे. यामुळे ग्रामीण भागातील साक्षरता, आरोग्यजाणीव आणि कौशल्यविकास वाढत आहे. विशेषतः तरुण पिढीमध्ये शिक्षणाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आहे.

**आर्थिक व विकासात्मक प्रभाव:** माध्यमांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेतही बदल घडून आले आहेत. शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान, बाजारभाव, सरकारी अनुदाने आणि रोजगाराच्या संधींबाबत माहिती मिळत असल्याने ग्रामीण लोक आर्थिकदृष्ट्या अधिक जागरूक झाले आहेत. स्वयंरोजगार, बचतगट आणि उद्योजकतेला माध्यमांमुळे चालना मिळाली आहे.

**राजकीय जाणीव आणि लोकशाही सहभाग:** माध्यमांनी ग्रामीण समाजात राजकीय जाणीव वाढवली आहे. निवडणुका, राजकीय पक्ष, सरकारी धोरणे आणि हक्क याबाबत माहिती मिळाल्यामुळे ग्रामीण लोक लोकशाही प्रक्रियेत अधिक सक्रिय झाले आहेत. माध्यमांनी जनमत घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**माध्यमांचे नकारात्मक परिणाम:** ग्रामीण समाजावर माध्यमांचा प्रभाव जितका सकारात्मक आहे, तितकाच तो नकारात्मक देखील आहे. माध्यमांचा अतिरेकी, अयोग्य व असंतुलित वापर ग्रामीण समाजात अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक समस्या निर्माण करत आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, माध्यमे सामाजिक परिवर्तनाचे साधन असतानाच ती सामाजिक तणाव, मूल्यसंघर्ष आणि असमानता वाढवणारी घटक देखील ठरू शकतात. चुकीची माहिती, अफवा आणि सामाजिक तणाव: नवमाध्यमांच्या प्रसारामुळे ग्रामीण भागात माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे; मात्र माहितीची सत्यता तपासण्याची क्षमता मर्यादित असल्यामुळे अफवा आणि चुकीची माहिती मोठ्या प्रमाणावर पसरते. सोशल मीडियावरील अप्रमाणित संदेश, राजकीय प्रचार, धार्मिक किंवा जातीय आशय यांमुळे ग्रामीण समाजात भीती, गैरसमज आणि सामाजिक तणाव निर्माण होतो. काही प्रसंगी यामुळे सामाजिक संघर्ष, हिंसा आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाल्याचे दिसून येते.

**सांस्कृतिक ऱ्हास आणि मूल्यसंघर्ष:** माध्यमांमधून सातत्याने प्रसारित होणारी शहरी व पाश्चिमात्य जीवनशैली ग्रामीण समाजातील पारंपरिक संस्कृतीवर प्रभाव टाकत आहे. पोशाख, भाषा, विवाहसंस्था, कुटुंबव्यवस्था आणि नैतिक मूल्ये यांमध्ये बदल होत असून, पारंपरिक ग्रामीण संस्कृती हळूहळू दुर्लक्षित होत आहे. यामुळे जुनी व नवी मूल्यव्यवस्था यांच्यात संघर्ष निर्माण होतो. विशेषतः तरुण पिढी आणि ज्येष्ठ पिढी यांच्यातील दरी अधिक वाढताना दिसून येते.

**तरुणांमध्ये व्यसनाधीनता आणि मानसिक समस्या:** ग्रामीण तरुणांमध्ये मोबाईल फोन, सोशल मीडिया आणि ऑनलाइन गेमिंगचा अतिरेकी वापर वाढत आहे. यामुळे वेळेचा अपव्यय, अभ्यासातील एकाग्रतेचा अभाव, झोपेचे विकार आणि मानसिक तणाव निर्माण होत आहेत. समाजशास्त्रीय अभ्यासानुसार माध्यमांचे अतिरेकी आकर्षण सामाजिक संवाद कमी करून व्यक्तीला आभासी जगात अधिक गुंतवते, ज्यामुळे सामाजिक एकाकीपणा आणि मानसिक अस्थिरता वाढते.

**सामाजिक असमानता आणि डिजिटल दरी:** माध्यमांचा लाभ सर्व ग्रामीण घटकांना समान प्रमाणात मिळत नाही. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, अशिक्षित आणि वृद्ध लोक माध्यमांपासून वंचित राहतात, तर शिक्षित व आर्थिकदृष्ट्या सक्षम लोक अधिक लाभ घेतात. यामुळे ग्रामीण समाजात 'डिजिटल दरी' निर्माण होत असून सामाजिक असमानता अधिक तीव्र होते. माध्यमे सामाजिक समता निर्माण करण्याऐवजी काही वेळा विषमता वाढवणारी ठरतात.

**स्त्री प्रतिमा आणि लैंगिक असमानता:** माध्यमांमधील जाहिराती, मनोरंजन कार्यक्रम आणि चित्रपटांमधून स्त्रीची वस्तूकरण करणारी प्रतिमा ग्रामीण समाजातही पोहोचते यामुळे स्त्रीविषयक पारंपरिक पूर्वग्रह अधिक बळकट होतात आणि लैंगिक असमानता टिकून राहते. काही प्रसंगी महिलांवर सामाजिक दबाव आणि कौटुंबिक अपेक्षा वाढतात.

**उपभोगवादी संस्कृती आणि आर्थिक दबाव:** माध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या जाहिराती आणि उपभोगवादी जीवनशैलीमुळे ग्रामीण समाजात कृत्रिम गरजा निर्माण होत आहेत. आधुनिक वस्तू, मोबाईल, कपडे आणि जीवनशैली यांचे आकर्षण वाढल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवर खर्चाचा दबाव निर्माण होतो. यामुळे कर्जबाजारीपणा व आर्थिक तणाव वाढण्याची शक्यता असते.

**निष्कर्ष:** प्रस्तुत अभ्यासातून असे दिसून येते की माध्यमे ही ग्रामीण समाजातील सामाजिक परिवर्तनाची प्रभावी साधने आहेत. माध्यमांनी ग्रामीण समाज अधिक माहितीप्रधान, जागरूक आणि परिवर्तनशील केला आहे. तथापि, माध्यमांचा सकारात्मक व संतुलित वापर सुनिश्चित करण्यासाठी माध्यम साक्षरता, स्थानिक भाषेतील आशय आणि जबाबदार माध्यम धोरणांची आवश्यकता आहे. योग्य नियोजनाच्या आधारे माध्यमे ग्रामीण विकासाचे प्रभावी साधन ठरू शकतात.

**संदर्भसूची:**

१. श्रीनिवास, एम. एन. (मराठी अनुवाद) (२०१०). आधुनिक भारतातील सामाजिक बदल. हैदराबाद: ओरिएंट ब्लॅक्स्वान.
२. देशमुख, अ. रा. (२०१२). ग्रामीण समाजशास्त्र. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.
३. गायकवाड, व्ही. डी. (२०१४). ग्रामीण संस्कृती आणि माध्यमांचा प्रभाव. लोकसंस्कृती अभ्यास, ५(१), २३—३५.
४. पाटील, भा. ग. (२०१५). ग्रामीण समाज: रचना आणि परिवर्तन. कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
५. देशपांडे, सुजाता. (२०१६). समाज, माध्यमे आणि परिवर्तन. मुंबई: लोकप्रिय प्रकाशन.
६. नारायण, सुनेत्रा सेन. (२०१७). भारतीय समाज आणि नवे माध्यम. नवी दिल्ली: राजकमल प्रकाशन.
७. कुलकर्णी, शैलजा. (२०१८). ग्रामीण समाजातील माध्यमांचा सामाजिक प्रभाव. समाजशास्त्र संशोधन पत्रिका, ६(१), ४५—५८.
८. जाधव, आर. बी. (२०१९). माध्यमे आणि ग्रामीण विकास. भारतीय समाजशास्त्र, १२(२), ८९—१०१.
९. जोशी, मंगला. (२०१९). स्त्री, माध्यमे आणि ग्रामीण समाज. स्त्री अभ्यास जर्नल, ७(२), ५४—६९.
१०. पवार, एस. एन. (२०२०). नवमाध्यमे आणि ग्रामीण तरुण. समाजविज्ञान समीक्षा, ८(२), ६६—७८.
११. कुलकर्णी, रोहिणी (२०२१), तंत्रज्ञानाचा ग्रामीण जीवनावर प्रभाव, पुणे, जनकल्याण प्रकाशन.
१२. भोसले, ए. के. (२०२२). सोशल मीडिया आणि ग्रामीण समाजातील बदल. समाजशास्त्रीय दृष्टिकोन, १०(१), १०१—११५.

# ग्रामीण समाजावर माध्यमांचा प्रभाव

**बंडू भाऊसाहेब पाटेकर** सहायक प्राध्यपक, समाजशास्त्र विभाग, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** भारताचा मोठा लोकसंख्येचा भाग ग्रामीण क्षेत्रात राहतो. ग्रामीण समाजाच्या जीवनावर माध्यमांचा प्रभाव अत्यंत व्यापक व बहुआयामी आहे. माहिती, ज्ञान, प्रबोधन, मनोरंजन आणि जनजागृती यांचे प्रभावी साधन म्हणून माध्यमे ग्रामीण समाजात महत्त्वाची भूमिका बजावतात. पारंपरिक, इलेक्ट्रॉनिक तसेच डिजिटल व सोशल माध्यमांनी ग्रामीण समाजाच्या जीवनशैलीत मोठे बदल घडवून आणले आहेत.या शोधनिबंधात ग्रामीण समाजावर माध्यमांचा शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, मानसिक व नैतिक प्रभाव अभ्यासलेला आहे. रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे तसेच मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे ग्रामीण जनतेला शिक्षण, आरोग्य, शेती, शासकीय योजना, बाजारभाव आणि रोजगाराच्या संधींबाबत जलद माहिती मिळू लागली आहे. यामुळे साक्षरता, आरोग्य-जागरूकता, महिला सक्षमीकरण आणि आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे.माध्यमांमुळे ग्रामीण समाजात सामाजिक सुधारणा, अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्री—पुरुष समानता आणि लोकशाही मूल्यांचा प्रसार झाला आहे. लोककला व ग्रामीण संस्कृतीला नवे व्यासपीठ मिळाले असले तरी शहरी व पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे पारंपरिक मूल्यांवर काही प्रमाणात परिणाम झाला आहे.त्याचबरोबर माध्यमांचे काही नकारात्मक परिणामही दिसून येतात. चुकीची माहिती (Fake News), नैतिक मूल्यांचा ऱ्हास, तरुणांमध्ये मोबाईल व सोशल मीडियाचे व्यसन, वेळेचा अपव्यय, उपभोगवाद आणि कौटुंबिक नात्यांमध्ये दुरावा ही आव्हाने निर्माण झाली आहेत.माध्यमे ही ग्रामीण समाजातील परिवर्तनाची शक्ती आहे. माध्यमांचा विवेकपूर्ण, संतुलित व जबाबदार वापर केल्यास ग्रामीण समाज अधिक सक्षम, जागरूक प्रगत होऊ शकतो. माध्यम साक्षरतेवर भर देणे आणि सकारात्मक वापराला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे.

***मुख्य शब्द*** - माध्यम, ग्रामीण समाज, प्रभाव, माहिती, परिवर्तन.

**प्रस्तावना:** भारताचा आत्मा ग्रामीण भागात राहतो,सुमारे तीन चतुर्थांस लोकसंख्या ग्रामीण भारतात राहते आणि शेती किंवा पारंपारिक व्यवसायात गुंतलेली आहे त्या दुर्गम भागात लोकांच्या जीवनात माहिती आणि विचारांच्या देवाणघेवाणीचे एकमेव साधन म्हणजे माध्यमे. कोणत्याही राष्ट्राचा चौथा आधारस्तंभ म्हणून ओळखल्या जाणारे प्रिंट आणि इलेक्ट्रोनिक दोन्ही माध्यमांवर एक महत्वाची सामाजिक जबाबदारी आहे.ही माध्यमे भारतीय ग्रामीण समाजाला माहिती देण्यासाठी, प्रबोधन करण्यासाठी,शिक्षित करण्यासाठी काम करू शकतात.माध्यमे आणि समाज यांच्यात परस्पर प्रभाव आहे. माध्यमांची भूमिका म्हणजे जनतेला अचूक, वेळेवर, रचनात्मक आणि गंभीर माहिती पोहोचवणे. ते ग्रामीण नागरिकांना शिक्षित करण्यासाठी विविध उपक्रम, प्रणाली आणि प्रक्रीयाबद्दल तपशील प्रसारित करू शकते. निरोगी मनोरंजन प्रदान करणे देखील माध्यमांच्या जबाबदाऱ्यांमध्ये येते. समाजात बदल घडवून आणण्यासाठी मानसिकता निर्माण करण्यासाठी माध्यमे लोकांना विकासाबद्दल संदेश देत आहेत. माध्यमे ही समाजाच्या

जडणघडणीतील एक अत्यंत प्रभावी शक्ती मानली जातात. माहिती, ज्ञान, विचार, मनोरंजन आणि जनजागृती यांचा प्रसार करणारे माध्यमे समाजाचा आरसा म्हणून ओळखली जातात. ग्रामीण समाज हा भारतीय समाजाचा कणा आहे. भारतातील मोठ्या लोकसंख्येचा निवास आजही ग्रामीण भागात आहे. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या जीवनपद्धतीवर, विचारसरणीवर, संस्कृतीवर आणि विकासप्रक्रियेवर माध्यमांचा होणारा प्रभाव अभ्यासणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात माध्यमांनी ग्रामीण समाजाच्या पारंपरिक चौकटी बदलण्यास सुरुवात केली आहे. या शोधनिबंधात ग्रामीण समाजावर माध्यमांचा शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, मानसिक व नैतिक अशा विविध अंगांनी सविस्तर विचार केला आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे:** १. ग्रामीण समाजावर माध्यमांचा शैक्षणिक प्रभाव अभ्यासणे. २. ग्रामीण समाजावर माध्यमांचा सामाजिक प्रभाव अभ्यासणे. ३. ग्रामीण समाजावर माध्यमांचा सांस्कृतिक प्रभाव अभ्यासणे. ४. ग्रामीण समाजावर माध्यमांचा आर्थिक प्रभाव अभ्यासणे.

**शोध निबंधाची गृहीतके:** १. ग्रामीण समाजावर माध्यमांचा शैक्षणिक प्रभाव पडला आहे. २. ग्रामीण समाजावर माध्यमांचा सामाजिक प्रभाव पडला आहे. ३. ग्रामीण समाजावर माध्यमांचा सांस्कृतिक प्रभाव पडला आहे. ४. ग्रामीण समाजावर माध्यमांचा आर्थिक प्रभाव पडला आहे.

**संशोधन पद्धती:** ग्रामीण समाजावर माध्यमांचा प्रभाव याचे अध्ययन करणे हा प्रमुख उद्देश या शोधनिबंधाचा असून प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्रोताचा उपयोग करण्यात आला आहे.

**सैद्धांतिक दृष्टीकोन:** माध्यमे ही समाजाची एक महत्वाची संस्था असून ती समाजाच्या स्थैर्यास व विकासास हातभार लावतात. शिक्षण,आरोग्य,शेतीविषयक माहिती ग्रामीण भागात पोहोचवणे तसेच सामाजिक एकात्मता वाढवणे.वैज्ञानिक दृष्टीकोन व आधुनिक मुल्यांचा प्रसार करण्यासाठी माध्यमे ग्रामीण समाजाच्या प्रगतीस उपयुक्त ठरतात. म्हणूनच माध्यमांचा प्रभाव समजून घेण्यासाठी कार्यात्मक (Functional) दृष्टीकोन प्रस्तुत शोधनिबंधासाठी घेण्यात आला आहे.

**माध्यमांची संकल्पना व स्वरूप:** माध्यम म्हणजे संदेश एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवणारे साधन. समाजातील विचारप्रवाह,घटना,समस्या,धोरणे आणि मूल्ये लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य माध्यमे करतात.माध्यमे ही केवळ माहिती देणारी साधने नसून ती समाजमन घडवणारी प्रभावी यंत्रणा आहे.

**माध्यमांचे मुख्यतः तीन प्रकार मानले जातात: पारंपरिक माध्यमे २. इलेक्ट्रॉनिक माध्यमे ३. डिजिटल व समाज माध्यमे.**

**पारंपरिक माध्यमे आणि ग्रामीण समाज:** पारंपरिक माध्यमांचा ग्रामीण समाजाशी फार जुना आणि घट्ट संबंध आहे. कीर्तन, प्रवचन, भारूड, तमाशा, पोवाडा, लोकनाट्य, भजन,जत्रा,उत्सव ही माध्यमे ग्रामीण समाजात जनजागृतीचे प्रभावी साधन ठरली आहेत. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात या माध्यमांचा उपयोग देशभक्ती, सामाजिक सुधारणा आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी करण्यात आला. ग्रामीण समाजात आजही पारंपरिक माध्यमांना विश्वासार्हता आहे. कारण ही माध्यमे स्थानिक भाषा, बोली आणि संस्कृतीतून संवाद साधतात. त्यामुळे सामाजिक संदेश प्रभावीपणे पोहोचतात.

**इलेक्ट्रॉनिक माध्यमे : रेडिओ व दूरदर्शन:** रेडिओ हे ग्रामीण समाजासाठी पहिले प्रभावी आधुनिक माध्यम ठरले. कमी खर्चात,वीज नसतानाही चालणारे रेडिओ ग्रामीण भागात लोकप्रिय झाले. शेतीविषयक कार्यक्रम, हवामान अंदाज, आरोग्यविषयक माहिती, लोकसंगीत, बातम्या यामुळे ग्रामीण जनतेला ज्ञान मिळाले.दूरदर्शनमुळे ग्रामीण समाजाच्या जीवनशैलीत मोठा बदल झाला. शैक्षणिक कार्यक्रम, मालिका, चित्रपट, बातम्या, चर्चा कार्यक्रम यांमुळे ग्रामीण समाजाचा संपर्क बाह्य जगाशी वाढला.

**डिजिटल व समाज माध्यमांचा उदय:** मोबाईल, इंटरनेट आणि स्मार्टफोनमुळे ग्रामीण समाजात डिजिटल क्रांती घडली आहे. सोशल मीडिया, यूट्यूब, व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम यांमुळे ग्रामीण व्यक्ती थेट जागतिक पातळीवर जोडली गेली आहे. माहितीचा वेग, व्याप्ती आणि प्रभाव प्रचंड वाढला आहे.

**ग्रामीण समाजावर माध्यमांचा प्रभाव: ग्रामीण समाजावर माध्यमांचा सांस्कृतिक प्रभाव:** माध्यमांनी ग्रामीण संस्कृतीला नवे व्यासपीठ दिले आहे. लोककला, लोकसंगीत, ग्रामीण उत्सव यांचा प्रचार झाला आहे. परंतु शहरी व पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव वाढल्याने पारंपरिक मूल्यांवर परिणाम झाला आहे.ग्रामीण तरुणांची भाषा, वेशभूषा, जीवनशैली बदलत आहे. सांस्कृतिक द्वंद्व निर्माण झाले आहे.

**ग्रामीण समाजावर माध्यमांचा शैक्षणिक प्रभाव:** माध्यमांनी ग्रामीण शिक्षणव्यवस्थेत अमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. शैक्षणिक वाहिन्या, ऑनलाईन वर्ग, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, डिजिटल पुस्तके यांमुळे शिक्षणाची दारे खुली झाली आहेत. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी माध्यमे वरदान ठरली आहेत.माध्यमांमुळे साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. पालकांमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता वाढली आहे. मुलींच्या शिक्षणाला चालना मिळाली आहे.

**ग्रामीण समाजावर माध्यमांचा सामाजिक प्रभाव:** सामाजिक सुधारणांमध्ये माध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे.अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता, जातिभेद निर्मूलन, स्वच्छता अभियान, व्यसनमुक्ती, आरोग्य जागृती या विषयांवर माध्यमांनी प्रभावी जनजागृती केली आहे.माध्यमांमुळे ग्रामीण समाज अधिक खुले, प्रश्न विचारणारे आणि बदल स्वीकारणारे बनत आहे. मात्र काही वेळा सामाजिक परंपरांशी संघर्ष निर्माण होतो.

**ग्रामीण समाजावर माध्यमांचा आर्थिक प्रभाव:** शेतीविषयक माहिती, बाजारभाव, शासकीय योजना, कर्जसुविधा यांची माहिती माध्यमांमुळे उपलब्ध होत आहे. डिजिटल व्यवहार, ऑनलाईन विक्री, ई-मार्केटमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळाली आहे.महिला बचतगट, स्वयंरोजगार, स्टार्टअप्स यांना माध्यमांनी चालना दिली आहे.

**ग्रामीण समाजावर माध्यमांचा राजकीय प्रभाव:** राजकीय जागरूकता वाढवण्यात माध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे. मतदानाचा अधिकार, शासकीय योजना, लोकशाही मूल्ये यांची माहिती ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचते. सोशल मीडियामुळे राजकीय सहभाग वाढला आहे.मात्र अफवा, चुकीची माहिती, राजकीय ध्रुवीकरण यांचा धोका वाढला आहे.

**ग्रामीण युवक आणि माध्यमे:** ग्रामीण युवक माध्यमांमुळे अधिक महत्त्वाकांक्षी, जागरूक आणि आधुनिक बनत आहेत. करिअर, व्यवसाय, स्पर्धा परीक्षांची माहिती मिळत आहे. मात्र सोशल मीडियाचे व्यसन, वेळेचा अपव्यय ही आव्हानेही आहेत.

**ग्रामीण महिला आणि माध्यमे:** माध्यमांनी ग्रामीण महिलांच्या जीवनात क्रांती घडवली आहे. शिक्षण, आरोग्य, हक्क, रोजगार यांविषयी जागरूकता वाढली आहे. महिला सक्षमीकरणात माध्यमांची भूमिका मोलाची आहे.

**माध्यम साक्षरतेची गरज:** ग्रामीण समाजासाठी माध्यम साक्षरता अत्यंत आवश्यक आहे. योग्य व चुकीची माहिती ओळखण्याची क्षमता विकसित करणे गरजेचे आहे. शासकीय व सामाजिक पातळीवर प्रशिक्षण आवश्यक आहे.

**माध्यमांमुळे ग्रामीण समाजावर मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल झालेले दिसून येतात.**

**माहिती व जागरूकता वाढली:** पूर्वी ग्रामीण भागात माहिती पोहोचण्यास उशीर होत असे. आज रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया यांमुळे सरकारी योजना, अनुदाने, विमा योजना, कर्ज सुविधा हवामान अंदाज, बाजारभाव आरोग्य, शिक्षण, स्वच्छता यांची माहिती वेळेत मिळू लागली आहे. त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थ अधिक जागरूक झाले आहेत.

**शेतीमध्ये सुधारणा व उत्पादन वाढ:** माध्यमांमुळे ग्रामीण शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान नवीन बियाणे, खत, औषधे पीक संरक्षण, सेंद्रिय शेती बाजारातील दरांची माहिती मिळत आहे. कृषी कार्यक्रम, यूट्यूब चॅनेल, कृषी ॲप्स यामुळे उत्पादनात वाढ आणि नुकसानात घट झाली आहे.

**शिक्षणाचा प्रसार:** माध्यमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दूरदर्शनवरील शैक्षणिक कार्यक्रम ऑनलाइन क्लासेस, यूट्यूब, डिजिटल शिक्षण स्पर्धा परीक्षांची माहिती मिळू लागली आहे. त्यामुळे शिक्षणाची आवड वाढली व ग्रामीण शैक्षणिक स्तर उंचावला आहे.

**आरोग्यविषयक सुधारणा:** माध्यमांद्वारे लसीकरण माता-बाल आरोग्य स्वच्छता, पोषण आहार रोगप्रतिबंधक उपाय यांची माहिती मिळाल्याने ग्रामीण समाजात आरोग्यविषयक जागरूकता वाढली आहे व अंधश्रद्धेला आळा बसला आहे.

**सामाजिक बदल व प्रबोधन:** माध्यमांमुळे जातीय भेदभावाविरोधी विचार स्त्री-पुरुष समानता बालविवाह, हुंडा, अंधश्रद्धा विरोध यासारख्या विषयांवर जनजागृती झाली. ग्रामीण समाज अधिक प्रगत व विचारशील बनत आहे.

**माध्यमांमुळे ग्रामीण समाजावर मोठ्या प्रमाणात नकारात्मक बदल झालेले दिसून येतात.**

**चुकीची व अपुरी माहिती:** माध्यमांमधून अनेकदा अप्रामाणिक बातम्या, अफवा, अपूर्ण किंवा अतिरंजित माहिती पसरवली जाते. यामुळे समाजात गैरसमज, भीती, तणाव व दंगली निर्माण होऊ शकतात.

**सामाजिक तणाव व द्वेष वाढणे:** काही माध्यमे जातीय धार्मिक प्रादेशिक विषयांवर भडक बातम्या दाखवतात. त्यामुळे समाजात फूट, द्वेषभावना व असहिष्णुता वाढते.

**नैतिक मूल्यांचा ऱ्हास:** माध्यमांमधील अश्लीलता हिंसाचार गुन्हेगारी दृश्ये यांचा विशेषतः तरुणांवर वाईट परिणाम होतो. संस्कार, शिस्त व नैतिकता कमी होण्याची शक्यता वाढते.

**तरुण पिढीवर दुष्परिणाम:** सोशल मीडिया व डिजिटल माध्यमांमुळे मोबाईलचे अतिवापर व्यसनाधीनता अभ्यासाकडे दुर्लक्ष, मानसिक ताण, नैराश्य असे प्रश्न निर्माण होत आहेत.

**वेळेचा अपव्यय:** माध्यमांचा अतिरेकामुळे टीव्ही,सोशल मीडिया, मनोरंजन कार्यक्रम यात मौल्यवान वेळ वाया जातो. त्यामुळे उत्पादकता कमी होते.

**अंधानुकरण व ग्राहकवाद वाढ:** जाहिराती व सेलिब्रिटी प्रभावामुळे दिखाऊ जीवनशैली गरज नसलेल्या वस्तूंची खरेदी कर्जबाजारीपणा वाढतो. ग्रामीण व शहरी समाजात ग्राहकवादी प्रवृत्ती वाढते.

**कौटुंबिक नात्यांवर परिणाम:** माध्यमांच्या अतिवापरामुळे कुटुंबीयांमध्ये संवाद कमी एकत्र वेळ घालवण्याचे प्रमाण घटते यामुळे कौटुंबिक नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो.

**उपाययोजना व भविष्यातील दिशा:** ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी माध्यमांचा संतुलित वापर आवश्यक आहे. स्थानिक भाषा, संस्कृती जपणारी, वास्तववादी माध्यमे विकसित करणे गरजेचे आहे. माध्यम साक्षरता, नियंत्रण आणि जबाबदारी या त्रिसूत्रीवर भर द्यावा.

**निष्कर्ष:** ग्रामीण समाजावर माध्यमांचा प्रभाव सर्वांगीण आणि दीर्घकालीन आहे. माध्यमे ही परिवर्तनाची शक्ती असून योग्य वापर केल्यास ग्रामीण विकासाचा पाया मजबूत करू शकतात. शिक्षण, समाज, संस्कृती, अर्थकारण, राजकारण आणि मानसिकता या सर्व स्तरांवर माध्यमांनी ग्रामीण समाजाला नवी दिशा दिली आहे. मात्र नकारात्मक परिणाम टाळण्यासाठी विवेकपूर्ण आणि जबाबदार माध्यम वापर आवश्यक आहे.संतुलित दृष्टिकोनातून माध्यमांचा स्वीकार केल्यास ग्रामीण समाज सक्षम, सशक्त आणि प्रगत होऊ शकतो.

**संदर्भ ग्रंथ:**

१. डॉ.प्रदीप आगलावे – सामाजिक संशोधन पद्धती.साईनाथ प्रकाशन,नागपूर
२. संचार माध्यमो से बदलता ग्रामीण जीवन.(shabd-braham,2016)
३. सिंह,ओ.पी. संचार माध्यमो का प्रभाव.(क्लासिकल पब्लिशिंग कंपनी,नई दिल्ली).
४. ग्रामीण समाजशास्त्र – डॉ.ए.आर.देसाई.रावत पब्लीकेशन,जयपूर

# डिजिटल माध्यमे, विकास आणि बदलते ग्रामीण लँडस्केप : एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रियांका तानाजी हावाळे** सेंट मीराज मुलींचे महाविद्यालय, पुणे.

**सारांश:** अलीकडच्या काही दशकांत भारतातील ग्रामीण समाजात लक्षणीय बदल घडून आले आहेत, विशेषतः जनमाध्यमे आणि डिजिटल माध्यमांच्या वेगवान विस्तारानंतर. माध्यमे ही शहरी आणि ग्रामीण भागाना जोडणारी महत्त्वाची कडी ठरली आहेत. माध्यमांमुळे माहिती, प्रशासन, शिक्षण, आरोग्य व विकास योजनांपर्यंत ग्रामीण लोकांचा सहज प्रवेश शक्य झाला आहे. तथापि, माध्यमांनी शहरी-केंद्रित प्रगती, उपभोगप्रधान जीवनशैली आणि आधुनिकतेच्या प्रतिमा गावांमध्ये पोहोचवल्या आहेत, ज्यामुळे ग्रामीण जीवनशैली, पारंपरिक घररचना, शेतीचा वापर, सार्वजनिक जागा आणि पर्यावरणीय समतोल बदलत आहेत.

हा संशोधन लेख माध्यमांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या विकास संकल्पनांचा अभ्यास करतो व सांस्कृतिक वर्चस्व (cultural hegemony) कसे निर्माण होते, हे मांडतो. महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर आणि वंदना शिवा यांच्या विचारांच्या आधारे, आत्मनिर्भरता, सांस्कृतिक प्रतिष्ठा आणि पर्यावरणीय शाश्वतता यांवर आधारित पर्यायी विकासदृष्टी मांडली आहे. तसेच, हिवरे बाजार, राळेगण सिद्धी आणि पुंसरी या गावांचे विश्लेषण करून हे स्पष्ट केले आहे की विकास आणि शहरीकरण समानार्थी प्रक्रिया नाहीत. स्थानिक सहभाग, पर्यावरणीय समतोल आणि सांस्कृतिक जतन यांना प्राधान्य दिल्यास शाश्वत ग्रामीण विकास साध्य होऊ शकतो.

**कीवर्ड्स:** डिजिटल माध्यमे; ग्रामीण विकास; बदलते ग्रामीण लँडस्केप; सांस्कृतिक वर्चस्व; शाश्वत ग्रामीण विकास; ग्रामीण भारत

---

**प्रस्तावना:** भारताने स्वातंत्र्याच्या एकोणऐंशी वर्षांचा टप्पा पूर्ण केला असून, आज जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून सातत्याने विकसित होत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात विकास धोरणांचा मुख्य भर आर्थिक वाढ, पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानावर राहिला. यामुळे शिक्षण, आरोग्य, वाहतूक, आणि दळणवळणाच्या क्षेत्रात प्रगती झाली आहे. तथापि, ग्रामीण भारतात या विकासाचा परिणाम सर्वसमान नाही. ऐतिहासिकदृष्ट्या भारतीय ग्रामीण भाग ही आत्मनिर्भर सामाजिक-आर्थिक एकक होती. शेती ग्रामीण उपजीविकेचा मुख्य आधार होती आणि स्थानिक बाजारपेठा, सामूहिक संसाधने व सामाजिक नाती यांवर ग्रामीण जीवन चालत असे. गावांचे भौतिक स्वरूप पर्यावरण, हवामान आणि सांस्कृतिक परंपरांनुसार घडलेले होते. अलीकडच्या काळात मात्र ग्रामीण भागात सामाजिक आणि भौगोलिक पातळीवर झपाट्याने बदल होत आहेत. टेलीविजन, मोबाईल फोन, सामाजिक माध्यमे आणि स्वस्त इंटरनेटमुळे शहरी व ग्रामीण भागातील अंतर कमी झाले आहे. माध्यमांमुळे शासन योजना, रोजगार, शिक्षण आणि जागतिक घडामोडी यांची माहिती गावकऱ्यांपर्यंत पोहोचली आहे. परंतु त्याच वेळी शहरी जीवनशैली, उपभोगप्रधान संस्कृती आणि आधुनिकतेच्या प्रतिमा यशाचे प्रतीक म्हणून प्रसारित झाल्याने ग्रामीण आकांक्षा शहरी मूल्यांशी संलग्न होत आहेत. परिणामी पारंपरिक घरांची जागा सिमेंटच्या इमारती घेत आहेत, शेतीजमिनी विकासासाठी वापरल्या जात आहेत आणि सार्वजनिक जागा कमी होत आहेत. या पार्श्वभूमीवर हा लेख माध्यमांची भूमिका, सांस्कृतिक वर्चस्व, आणि ग्रामीण विकासाच्या पर्यायी संकल्पनांचा समाजशास्त्रीय अभ्यास करतो.

**संशोधन उद्दिष्टे:** १. डिजिटल व जनमाध्यमे ग्रामीण विकासाच्या संकल्पना कशा प्रकारे घडवतात आणि ग्रामीण लँडस्केपमध्ये बदल घडवून आणतात, याचा अभ्यास करणे. २. शाश्वतता, स्थानिक सहभाग आणि सांस्कृतिक जतन यांवर आधारित ग्रामीण विकासाच्या पर्यायी मॉडेल्सचे विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती:** हा अभ्यास गुणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीवर आधारित आहे. मुख्यतः दुय्यम माहितीचा वापर केला आहे. शैक्षणिक ग्रंथ, संशोधन लेख, धोरणात्मक कागदपत्रे, आणि विश्वासार्ह ऑनलाइन स्रोतांचा अभ्यास करून माध्यमे, विकास व सांस्कृतिक वर्चस्व यांच्यातील संबंध समजून घेण्यात आले. केस स्टडी पद्धत वापरून हिवरे बाजार, राळेगण सिद्धी आणि पुंसरी या गावांचा अभ्यास केला गेला, ज्यातून ग्रामीण विकासातील शाश्वतता, स्थानिक सहभाग, पर्यावरणीय संरक्षण, आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर कसा केला जातो, हे स्पष्ट झाले.

**तथ्यांचे विश्लेषण:**

**शहरी आणि ग्रामीण भारताला जोडणारे माध्यम:** २०१६-१७ नंतर स्वस्त इंटरनेट उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल माध्यमांचा ग्रामीण जीवनावर मोठा प्रभाव पडला आहे. माध्यमे शहरी व ग्रामीण अवकाशाला जोडणारी प्रभावी कडी ठरली आहेत. दूरदर्शन कार्यक्रम, जाहिराती, आणि सामाजिक माध्यमांवरील मजकूर शहरी जीवनशैलीला प्रगत व आकर्षक म्हणून सादर करतो (Research Publish, n.d.). या सततच्या संपर्कामुळे ग्रामीण युवकांच्या आकांक्षा, उपभोग पद्धती, व जीवनशैलीत बदल झाले आहेत. परिणामी विकासाची व्याख्या शहरी संदर्भात केली जाऊ लागली आहे.

**बदलते ग्रामीण लँडस्केप:** माध्यमांद्वारे पसरवलेल्या विकास संकल्पनांचा परिणाम ग्रामीण लँडस्केपमध्ये दिसतो. माती, दगड, लाकूड यांपासून बांधलेल्या पारंपरिक घरांची जागा सिमेंटच्या इमारतींनी घेतली आहे. शेतीजमिनी रस्ते, कारखाने, आणि व्यापारी वापरासाठी वळवल्या जात आहेत. गावातील कुरणे, पाणवठे, आणि सार्वजनिक चौक कमी होत आहेत. त्यामुळे पर्यावरणीय ताण वाढतो व सामाजिक संवाद कमी होतो.

**सांस्कृतिक वर्चस्व आणि ग्रामीण परिवर्तन:** सांस्कृतिक वर्चस्व (Cultural Hegemony) ही संकल्पना ग्रामीण परिवर्तन समजून घेण्यासाठी महत्त्वाची आहे. माध्यमे शहरी-औद्योगिक विकासाचाच मार्ग प्रगतीचा म्हणून सादर करतात. त्यामुळे स्थानिक ज्ञान, पारंपरिक पद्धती आणि शाश्वत जीवनशैली मागासलेली समजली जातात. यामुळे ग्रामीण भागात एकसारखेपणा (homogenization) निर्माण होतो आणि ग्रामीण ओळख धोक्यात येते.

**महात्मा गांधींची ग्रामीण विकासदृष्टी:** महात्मा गांधी केंद्रीकृत औद्योगिकीकरणाच्या विरोधात होते. त्यांनी ग्रामस्वराज्य या संकल्पनेवर भर दिला. आत्मनिर्भरता, स्थानिक उद्योग, विकेंद्रीकरण, आणि पर्यावरणपूरक शेती हे गांधींच्या विकासदृष्टीचे आधार होते (Global Gandhi, n.d.). आजच्या माध्यम-प्रेरित विकास मॉडेल्सच्या पार्श्वभूमीवर गांधींचे विचार अधिक सुसंगत वाटतात.

**वंदना शिवा यांचा पर्यावरणीय दृष्टिकोन:** वंदना शिवा शहरी-औद्योगिक विकासामुळे होणाऱ्या पर्यावरणीय विनाशावर टीका करतात. त्या जैवविविधता, स्थानिक परिसंस्था, आणि ग्रामीण शाश्वततेचा पुरस्कार करतात. माध्यमांद्वारे ग्रामीण भागात शहरी उपभोग संस्कृतीचा प्रसार झाल्याने पर्यावरणीय समतोल धोक्यात येतो (Shiva, 2022).

**रवींद्रनाथ टागोर आणि ग्रामीण पुनर्रचना:** टागोर आधुनिकतेच्या विरोधात नव्हते; मात्र अंध शहरी अनुकरणावर त्यांनी टीका केली. त्यांनी ग्रामीण भागासाठी शिक्षण, संस्कृती, आणि आत्मसन्मानावर आधारित विकासदृष्टी मांडली. ग्रामीण पुनर्रचनेची संकल्पना मानवी मूल्यांवर आधारित होती.

**केस स्टडीज: हिवरे बाजार, राळेगण सिद्धी, पुंसरी:** ही गावे दाखवतात की विकास म्हणजे शहरीकरणच नाही. ग्रामसभा-आधारित निर्णयप्रक्रिया, जलसंधारण, वृक्षलागवड, नवीकरणीय ऊर्जा, आणि मर्यादित तंत्रज्ञानाचा वापर यांद्वारे शाश्वत विकास साधला आहे.

**शिफारसी:** **१.** ग्रामीण विकास धोरणांनी शाश्वतता, स्थानिक सहभाग, आणि सांस्कृतिक जतन यांना प्राधान्य दिले पाहिजे. **२२.** माध्यमांनी ग्रामीण यशकथा अधोरेखित कराव्यात व अति शहरीकेंद्रित मॉडेलचा प्रसार टाळावा. **३.** स्थानिक संसाधने व पारंपरिक ज्ञान यांचा समावेश करून आधुनिक तंत्रज्ञानाचा मर्यादित व प्रभावी वापर करावा.

**निष्कर्ष:** माध्यमांनी ग्रामीण भारताला जगाशी जोडले असले, तरी त्यांनी सांस्कृतिक वर्चस्व निर्माण करून ग्रामीण लँडस्केपमध्ये बदल घडवले आहेत. पारंपरिक घररचना, शेती, सार्वजनिक जागा, आणि पर्यावरणीय समतोल बदलत आहेत. या बदलामुळे ग्रामीण ओळख धोक्यात आली आहे, आणि जीवनशैली शहरी मूल्यांशी संलग्न झाली आहे. तथापि, गांधी, टागोर आणि वंदना शिवा यांच्या विचारांवर आधारित पर्यायी विकास मॉडेल्स हे दाखवतात की शाश्वत ग्रामीण विकास शक्य आहे.

हिवरे बाजार, राळेगण सिद्धी, आणि पुंसरी या गावांच्या केस स्टडीजमधून स्पष्ट होते की विकासासाठी आवश्यक नाही की गावांचे रूप शहरीकडे वळावे. स्थानिक सहभाग, पर्यावरणीय संवर्धन, आणि सांस्कृतिक जतन यांवर आधारित नियोजन ग्रामीण जीवनाचे शाश्वत रूप सुनिश्चित करते. माध्यमे योग्य प्रकारे वापरली तर ग्रामीण लोकांना माहिती, शिक्षण आणि रोजगार मिळवून देणारी महत्त्वाची कडी ठरू शकतात, पण ती शहरी जीवनशैलीची अंध नक्कल म्हणून कार्य करू नये. शेवटी, खेडी ही शहरीकरणाच्या प्रतीक्षेत असलेली जागा नसून, स्वतंत्र सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेसह, स्वायत्ततेसह विकसित होणारी प्रणाली मानली पाहिजे. यामुळे ग्रामीण जीवनाचे सांस्कृतिक, सामाजिक, आणि पर्यावरणीय मूल्य जतन करता येते.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1. Wagh, A. (2023). Rural development and media. *International Research Journal of Humanities and Interdisciplinary Studies (IRJHIS), 4*(8), 106–109. ISSN 2582-8568.
2. Singh, P. (2024). ग्रामीण भारत में डिजिटल मीडिया का प्रभाव: एक समाजशास्त्रीय अध्ययन. *International Journal of Science and Social Research.*
3. Research Publish. (n.d.). *Impact of the media in rural development.* Retrieved from https://www.researchpublish.com/
4. Global Gandhi. (n.d.). *Gandhi's thoughts on rural development.* Retrieved from https://globalgandhi.com/
5. Shiva, V. (2022). *Earth Democracy: Justice, Sustainability, and Peace.* South End Press

# ग्रामीण भागातील परिवर्तन आणि माध्यमांची भुमिका

**डॉ. गजानन सोनुने / डॉ. जयसिंग सिंगल** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** प्रसार माध्यमांना हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. वर्तमानातील वास्ताविक घडामोडी, समस्या, घटना, प्रश्न, विकास, आणि शासन, त्याचबारोबर सरकारी धोरणांबद्दलची महत्त्वाची माहिती नागरीकांपर्यंत मांडण्यासाठी माध्यमांची भुमिका महत्वाची आणि प्रभावी आहे. ही माध्यमे नागरीकांच्या बाजूने उभे राहून सत्तेत असलेल्यांना व प्रशाकीय आधिकाऱ्यांना महत्त्वाचे प्रश्न मांडतात. आणि चालू असलेल्या अन्याय, अत्याचार, घटना आणि समस्यांचे वृत्तांकन करतात. न्याय मिळून देण्यासाठी माध्यमे सहकार्याची भुमिका करीत असतात. शासन, सरकार यांच्या विकासांची कार्य, सहभाग आणि प्रशाकीय कार्यक्षमता मजबूत करण्यासाठी माध्यमांची भूमिकाचा प्रभाव पडत असतो. प्रसार माध्यमांचे माहिती आणि संकटाच्या काळात सूचनांबद्दल त्वरित माहिती देण्यासाठी वापर केला जातो. दुरदर्शन, वर्तमानपत्रे, रेडिओ आणि सामाजिक माध्यमे इत्यादी विविध प्रकारची माध्यमे ग्रामीण भागापर्यंत महत्त्वाची माहिती देतात व पोहवचत असून माध्यमांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. सरकारच्या विविध विषयावर, त्यांच्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. समस्या, प्रश्न, घटना, गुन्हेगार, भ्रष्टाचार, अन्यायला वाच्या फोडतात. तसेच प्रसार माध्यमे नागरीकांच्या हक्क व अधिकारांची जाणीव करून देतात. ग्रामीण भागात बदल व परिवर्तन होत असून सामाजिक अन्याय दूर

करण्यासाठी माध्यमे एक मागदर्शकांची भूमिका बजावतात. माहिती तंत्रज्ञान, प्रसार माध्यमांचा वाढता वापर यामुळे शेती, शिक्षण, आरोग्य आणि संस्कृती या सर्वच क्षेत्रात ग्रामीण भागाचा कायापालट झाला.

**कीवर्ड शब्द:** ग्रामीण समाज, प्रसार माध्यमांची भूमिका, सामाजिक परिवर्तन इ.

**प्रस्तावना:** भारत हा खेडयांचा देश आहे. आज ही भारतात एकूण लोकसंख्याच्या दोन तृतीयाश लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील परिवर्तन आणि माध्यमांची भूमिका हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. गेल्या काही दशकांत तंत्रज्ञान आणि माहितीच्या प्रसारकांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जीवन बदलत आहे. खेड्यांकडे चला हा संदेश महात्मा गांधींनी दशकांपूर्वी दिला होता. परंतु आजची ग्रामीण भागातील परिस्थितीत बदल झाला आहे. एकेकाळी दुर्लक्षित, मागास समजला जाणारा ग्रामीण भाग आज प्रगतीच्या व विकासाच्या दिशेने वटचाल करीत असून नव- नवीन शिखरे गाढीत आहे. ग्रामीण भगातील परिवर्तन केवळ रस्ते किंवा वीज येण्यापुरते मर्यादित नसून ते ग्रामीण भगातील व्यक्तींच्या विचार, ज्ञान, सकारात्मक आणि विज्ञानिक दृष्टिकोन, जीवन पद्धती, राहणीमान, बोलीभाषा, पेहराव, इत्यादीमध्ये बदल जाणवितो. त्याचप्रमाणे अनेक सामाजिक चळवळी, संघर्ष, आदोंलने, उपोषण, धरणे, निषेध यासंबधी विविध प्रसार माध्यमांच्या माध्यमातून वाच्या फोडण्याचे कार्यामुळे संबधी समस्या, प्रश्न, मागण्या, घटना, राजकारण, समाजकारण इत्यादी विषयी प्रसार माध्यमांची भूमिका सतत कार्यरहत राहिली. आता स्मार्टफोन आणि इंटरनेटमुळे ग्रामीण भागातील सामान्य व्यकती ही जागतिक घडामोडींशी जोडला गेला आहे. वृत्तपत्रे आणि न्यूज पोर्टलमुळे ग्रामीण भागातील समस्या उदा. रस्ते, आरोग्य, शिक्षण, पाणी, विद्युत संविधा, इत्यादी विषयी प्रशासनापर्यंत समस्या मांडणे सोपे झाले आहे.

**संशोधन साहित्याचा आढावा:** सोनम चैरसिया आणि दीप्ति सुनेजा यांनी ग्रामीण सामाजिक जनसंचार माध्यमांची भूमिकाचा अभ्यास करताना त्यांनी सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, शिक्षण, धार्मिक, गुन्हेगार इत्यादी घटकासंबधी अभ्यास केला असल्याचे दिसून येते. राहूल बी. सोनवणे यांनी भारतीय निवडणूकीमधील प्रसार माध्यमांची भूमिका यामध्ये त्यांनी वतर्मानपत्रे, रेडिओ, दुरदर्शन, मासिके, ग्रंथ इत्यादींचा प्रसार माध्यमांची भुमिका निवडणूक प्रक्रियेत कशाप्रकारे भुमिका असते याविषयी विवेचन केले आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:** 1. ग्रामीण भागातील परिवर्तन आणि माध्यमांची भुमिका जाणून घेणे. 2. ग्रामीण भागातील परिवर्तन आणि प्रसार माध्यमांचा संहसबध विषयी चर्चा करणे.

**संशोधनाची गृहितके:** 1. ग्रामीण भागातील परिवर्तन होण्यामागे प्रसार माध्यमांची भूमिका महत्वाची आहे. 2. प्रसार माध्यमांमुळे ग्रामीण समाज व्यवस्थेत परिवर्तन होत आहे.

**संशोधन पद्धती** : संशोधनात्मक निबंध लिहिताना मुख्यत्वे दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आलेला आहे, संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेटवरील स्त्रोताचा आधार घेता असून हा संशोधन निबंध गुणात्मक, विश्लेषणात्मक आणि परिणामात्मक पद्धतीवर आधारित आहे.

**ग्रामीण भागातील परिवर्तन आणि माध्यमांची भुमिका विषयी विश्लेषण:**

**प्रसार माध्यमाचा अर्थ:** माध्यम ही प्राप्तकर्त्यांना माहितीचे चित्रण, प्रसारण करण्यासाठी कोणत्याही संप्रेषण माध्यमाचा संदर्भ जो जुन्या काळातील वर्तमानपत्रे, बातमी, नियतकालिकांपासून ते आधुनिक डिजिटल माध्यमांपर्यंत विविध प्रकारचे मास मीडिया आहेत. ही माध्यमे शिक्षण, आरोग्यसेवा, जागतिक आणि राष्ट्रीय बातम्यांसारख्या विविध क्षेत्रांमधील माहितीची विस्तृत स्वरूपात दाखवतात. सामान्य माध्यम प्रकार म्हणजे टेलिव्हिजन, फोन, रेडिओ आणि इंटरनेट. सद्यस्थितीत सोशल मीडियासारखे डिजिटल मीडिया प्रकार प्रामुख्याने उपलब्ध आहेत. ज्याचप्रमाणे इलेक्ट्रॉनिक उपकरणे जागतिक स्तरावर फायबर-ऑप्टिक केबल्स आणि संगणक नेटवर्कद्वारे माहितीचे प्रसारित करीत असून यामध्ये ट्विटर, फेसबुक, लिंक्डइन, यूट्यूब आणि इंस्टाग्राम सारखे डिजिटल मीडिया प्लॅटफॉर्म.

**ग्रामीण भागातील परिवर्तन आणि माध्यमांची भुमिका:** ग्रामीण भागाध्ये वर्तमानपत्राची भूमिका अनेक वर्तमानपत्राच्या माध्यमातून नागरीकांचे हक्क, कर्तव्य, सत्य परिस्थिती नागरिकासमोर आणण्याचे कार्य वर्तमानपत्रांच्या माध्यमातून केले जाते. वर्तमानपत्रे जसे केसरी, प्रबुध्द भारत, द हिंदू, लोकमत टाईम्स, दैनिक सामना, दै. लोकमत, दिव्य मराठी, सकाळ, तरूण भारत, दै. भास्कर, दै. जागरण अशा अनेक दैनिक वर्तमानपत्रांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील आणि समाजव्यवस्थेतील विविध समस्या व विकास याबाबत नेहमीच समोर आणण्याचा प्रयत्न केला. रेडिओ हे ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरीकांपर्यंत संगीत, मनोंरजन, कला, ज्ञान, आणि विचार सहज उपलब्ध होणारे साधन होते व आज सुध्दा आहेत. रेडिओ वरील प्रसारीत होणाऱ्या आकाशवाणी केंद्राचे ब्रिदवाक्य बहुजन हिताय बहुजन सुखाय यांचा अर्थ असा तळागळातील गरीबांपर्यंत पोहोजली पाहिजे. तसेच ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरीकांना रेडिओ वरील कार्यक्रम ऐकता येईल. प्रादेशिक बातम्या, विविध कार्यक्रम घरी बसल्या बसल्या अगदी ग्रामीण भागात ही ऐकता येते. आज मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी याची मन की बात रेडिओच्या माध्यमातून त्यांचे विचार नागरीकांनापर्यंत पोहजतात. दुरदर्शन (T.V) आणि विविध चॅन्लसच्या माध्यमातून ग्रामीण भगात विविध प्रसारक न्युज व कला, राजकारण, संगीत, मालिका, चित्रपट इत्यादी विविध सादरीकरण पाहता व ऐकता येत आहे. यामुळे या सर्वांचा अप्रत्यक्षपणे प्रभाव पडत असतो. विचार, ज्ञान, कला यांचामुळे ग्रामीण भागातील नागरीकांच्या आचार- विचार मध्ये परिवर्तन होत असते. पुस्तके, मासिके आणि साप्ताहीके या माध्यमातून ग्रामीण जीवन पध्दती, समाजव्यवस्था, सामाजिक बांधलकी, शिक्षण, आरोग्य, समाज परिवर्तन, चळवळी, संघर्ष, इतिहास इत्यादीचा वाचन ग्रामीण भागातील नागरीकांना ऑनलाईन उपलब्ध होत आहे. युट्युब, वॉटस्अप व फेसबुक सद्यस्थितीत काही सेकंदामध्ये नागरीकांपर्यंत माहिती पोहचविण्याचा सरळ व सोपा मार्गानी विविध माहिती एकमेंकाना देता व घेता येवू लागल्यामुळे ग्रामीण भागात प्रसार माध्यमांचे महत्व वाढत आहे.

ग्रामीण भागातील परिवर्तन हा विषय केवळ संशोधनापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो समाजवास्तवाशी संबंधित असल्यामुळे त्यावर सखोल विचार करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात दळणवळणाची साधने अपुरी होती, शेती हीच मुख्य उपजीविका होती. शिक्षण, आरोग्य या गोष्टी दुय्यम मानल्या जात होत्या. पण आज ग्रामीण भागातील चेहरामोहरा पूर्णतः बदललेला दिसतो. मोबाईल, इंटरनेट आणि डिजिटल बँकिंग या गोष्टी आता गावपातळीवर पोहोचल्या आहेत. स्वयंपूर्णतेच्या दिशेने चाललेली ही वाटचाल म्हणजेच ग्रामीण भागातील खरा बदल आहे.

**शहरी, ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रात माध्यमांचा संबध:** शहरी, ग्रामीण आणि आदिवसी भागाचे अंतर भौगोलिकदृष्ट्या कायम असले तरी माहिती तंत्रज्ञान आणि प्रसार माध्यमांचा वाढते कल यामुळे शहरी, ग्रामीण आणि आदिवासी जीवन शैलीचे अंतर कमी झाले. विविध तंत्रज्ञान, आधंनिक मोटार, यंत्र, डिजीटल साधनानी घेतले. दळणवळणाधील विकास झाल्यामुळे दळणवळाची वाहतूक वाढली व प्रसार माध्यूमांचा वावर शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागात वाढला. नव-नवीन मोटार गाडयाचा वाढते प्रमाण, प्रसार माध्यमं, मोबाईल, इंटरनेट, फेबुक, वार्टसाफ, ई-मेल इत्यादी मुळे एखदी माहिती कळवायाची झाल्यास काही वेळात पाठवून देता येते व त्यासंबधी आदान व प्रदान सुध्दा करता येवू लागले. यामुळे शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागातील अंतर कमी होवून एकमेकांना जोडले गेले. जागतिक प्रवाहात आण्याकरिता तिथल्या सामान्य व्यक्तींना सक्षम करण्यासाठी माध्यमांनी एक प्रकारे परिवर्तनाचे व माहितीचे कार्य करीत असल्याचे दिसते. सोशल मीडियामुळे आता शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागातील व्यकती एकमेकांना संवाद साधू लागले आहे.शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागातील लोक आणि तरुण वर्ग प्रेक्षक राहिलेले नाहीत, तर ते स्वतःविविध माध्यमातून माहिती प्रसारित करीत आहे. कला, संस्कृती, खाद्यसंस्कृती, उद्योग, व्यवसाय, आणि शेतीचे प्रयोग जगासमोर येत आहेत

**शेती आणि माध्यमांची भूमिका:** ग्रामीण भागातील परिवर्तन ही शेती, अर्थव्यवस्था आणि सामाजिक संरचनेतील एक व्यापक प्रक्रिया आहे. प्रसारमाध्यमांद्वारे माहिती तंत्रज्ञानाचा वापरामुळे आधुनिक शेती, बिगर-कृषी रोजगार आणि महिला स्वयंसहायता गटांमुळे ग्रामीण भागात आर्थिक सक्षमतेचा नवा चेहरा निर्माण झाला असून, हे बदल शाश्वत विकासासाठी महत्त्वाचे ठरत आहेत. शेतीचे नवनवीन प्रयोग, अंदाज, बाजारभाव आणि रसायनिक खतांचा वापर, कृषी मार्गदर्शन, यंत्र आणि तंत्रज्ञान यामुळे शेती संबधी विविध माध्यमां मार्फत जाहिरीती व माहिती यामुळे ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रातील विविध व्यवसाय व उद्योग, शेती करण्याची पध्दत, लागवड, पेरणी, बि.बियाणे, खते, औषधी यांचा अनेक माध्यमातून प्रचार व प्रसार आणि माहिती मिळू लागली. उदा. सागायाचे झाल्यास आमची माती आमची माणसं ही कृषी संबधी प्रसारण करण्यात आलेल्या कार्यक्रमातून अनेक माहिती ग्रामीण भागातील लोंकाना मिळाली. कृषीदर्शन विविध कार्यक्रमासंबधी प्रसारित झाल्यामुळे ग्रामीण भागातील लोक जागृत होत आहे.

**समाज आणि माध्यमांचा प्रभाव:** विकास पत्रकारिता ग्रामीण आरोग्य, स्वच्छता आणि शिक्षण यासारख्या मुद्द्यांवर प्रकाश टाकते. जेव्हा एखादे स्थानिक वृत्तपत्र हुंडाविरोधी मोहीम चालवते किंवा गावात मुलींच्या शिक्षणाचा पुरस्कार करते. तेव्हा ते प्रसार माध्यमे अशी चर्चा सुरू करते ज्यामुळे पिढी जात बदल होऊ शकतो. शहरीकरणामुळे ग्रामीण भागात होणारे सामाजिक परिवर्तन बहु आयामी आहेत. हे बदल पारंपारिक रूढी आणि कुटुंब संरचनांपासून ते जातीच्या गतिशीलतेपर्यंत आणि व्यावसायिक भूमिकांपर्यंत सर्व गोष्टींवर परिणाम करतात. काही परिवर्तने फायदेशीर ठरू शकतात, तर काही दीर्घकालीन सामाजिक व्यवस्था विस्कळीत करू शकतात, ज्यामुळे तणाव आणि असमानतेचे नवीन प्रकार निर्माण होऊ शकतात.परंतु अशा प्रसार माध्यमांच्या प्रसारणावर निंबध लावण्यात येते. व त्यांना सामाजिक सलोखा विस्कळीत होणार नाही. याची काळची विविध प्रसार माध्यमे व सामाजिक माध्यमां पाळावे लागते. काही अनुचित प्रकार घटला जर संबधितांवर कायदेशीर मार्गाने कारवाई केले जाते.

**प्रसार माध्यमांमुळे ग्रामीण संस्कृती आणि लोककलाचा प्रचार-प्रसार :** ग्रामीण समाजव्यवस्थेतील अनेक संस्कृतिक पंरपरा, रूढी, चालीरिती, सण - उत्सव, गाणी, म्हणी, वाक्यप्रचार, कीर्तन, भारूड, तमाशा, यांत्रा व जत्रा इत्यादी विषयी प्रसारमाध्यमाद्वारे संस्कृतीचे आणि लोककलाचा विविध प्रसारमाध्यमांनी आणि सामाजिक मिडीया यांच्या माध्यमातून अधिक- अधिक लोकापर्यंत जात असल्याचे दिसते. म्हणून यामुळे प्रसार माध्यमांमुळे एक प्रकारे ग्रामीण समाजव्यवस्थेतील संस्कृतीचे जतन आणि लोककलेला वाव मिळत आहे.

**माध्यमांचा प्रभावामुळे ग्रामीण भागात आधुनिकीरणला चालना:** ग्रामीण समाजाचे आरसा सारखी म्हटले तरी ते गैर होणार नाही. वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, मोबाईल, इंटरनेट व सामाजिक माध्यमांच्या प्रभावाने ग्रामीण समाजातील व्यक्तींच्या विचार, दृष्टिकोन, ज्ञान आणि विज्ञान याविचार सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारला जात असून त्यामुळे जुनी पंरपरागत सामाजिक व्यवस्थेत बदल होत असून सामाजिक व्यवस्थाची चौकटीत बदलत असल्याचे दिसते. पूर्वी ग्रामीण समाज तुलनेने बंदिस्त व परंपराभिमुख होता परंतु आजचे वास्ताविक जीवन माध्यमांनी अधिक खुलापणाचे व आधुनिकतेकडे घेवून जात आहे.

**ग्रामीण विकास आणि प्रसार माध्ययमांचा प्रभाव:** ग्रामीण भागात बेरोजगारी, व्यसनाधीनता, कर्जबाजारीपणा, दारिद्रय, मागासलेपण, जातीय विषमता, श्रीमंत आणि गरीब इत्यादी समस्या आहेत. त्याच बरोबर सुविधांची अधिक कमरता दिसून येते. ज्यामध्ये रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, विद्युत सुविधा या महत्वाच्या गरजा मिळण्यासाठी विविध माध्यमांनी वेळोवेळी शासनापर्यंत समस्या विषयी आवाज पोहचविला. त्यामुळे ग्रामीण भागातील वास्ताविक परिस्थिती मांडल्याने बहुतांश ग्रामीण भागात शासनाने समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला; कारण प्रसार माध्यमांच्या आधारे बऱ्याच समस्या जनतेसमोर आणि प्रशासनासमोर येते. त्यामुळे शासन आणि शासकिय यंत्रानावर एक प्रकारे तबाव निर्माण होतो. या दबावामुळे लोक संघटित होऊन आपली मागणी शासन दरबारी लावून ठेवल्याने बऱ्याच प्रमाणात शासकिय पातळीवरून सोडल्या जात असल्याचे चित्र व परिस्थिती दिसते.

**शासकीय योजना आणि माध्यमे :** केंद्र किंवा राज्य सरकारच्या विविध योजना विषयी माहिती विविध प्रसार माध्यामातून प्रसारित केली जाते. त्यामुळे सर्वसामान्यालोकांपर्यंत माहिती पोवचू लागली. विविध प्रचार व प्रसार यामुळे ग्रामीण भागातील लोकांना विविध योजना, धोरणे, राजकारण, समाजसेवा, आरोग्य, शिक्षण इत्यादी. अनेक वर्तमानातील घडामोडी माध्यमांच्या मार्फत मिळत आहे. योजना, नव-नवीन अनुदान, कायदे, अर्ज, कागदपत्रे, योजना, विमा, स्वच्छता अभियान, बचत गट, बँक, रोजगार, विकासासंबधी माहिती विविध माध्यमातून ग्रामीण भागात पोवचू लागली. ग्रामीण मालकी हक्क, प्रशासकीय दिरंगाई किंवा समस्या रस्ते, पाणी, वीज त्यांना स्थानिक काम आणि वृत्तान्त करतात. माध्यमांमुळे प्रशासनावर दबाव निर्माण होतो आणि विकास कामांना गती येते.

**शिक्षण, व्यवसाय आणि माध्यमे:** ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार वाढल्यामुळे तरुण पिढी आता अधिक आत्मविश्वासाने जगाशी संवाद साधू लागली. गावातील मुला-मुलीं शहरातील विद्यार्थ्यांच्या बरोबरीने स्पर्धा करू लागली. डिजिटल शिक्षणामुळे त्यांना शहरासारखेच ज्ञान उपलब्ध होऊ लागले आहे. जुन्या लोककला, जत्रा, परंपरागत शेती पद्धती या गोष्टी मागे पडत आहेत. जेव्हा शहरातील लोकांनी पुन्हा आपल्या गावांकडे धाव घेतली, तेव्हा खेड्यांचे महत्त्व नव्याने जाणवले. घरून काम करण्याच्या नव्या संकल्पनांमुळे आता अनेक युवक आपल्या गावातूनच डिजिटल कामं करू लागले आहेत. यामुळे ग्रामीण भागातही अर्थव्यवस्था निर्माण होऊ लागली आहे. यातून एक वेगळा ग्रामीण भारत आकार घेत आहे, जो तंत्रज्ञानाचा वापर करतानाही आपल्या मुळांशी जोडलेला आहे. या सगळ्या बदलांची बातमी माध्यमांमधून प्रसारित होते, पण आजही खऱ्या ग्रामीण भागातील जीवन कॅमेऱ्यापुढे फारसे दिसत नाहीत.

**समारोप:** ग्रामीण भागातील जीवन शैली आज मोठया प्रमाणात बदली आहे. अनेक बदलत्या काळानुसार अनेक परिवर्तने झाली यातून ग्रामीण भागात परिवर्तन झाले. ग्रामीण भागात बदल, श्रम व्यवस्था, संस्कृती, चालीरिती, सण- संभारभ, रुढी- परंपरा, यामध्ये बऱ्याच प्रमाणात काही अंश:तह आधुनिक पध्दतीच्या नव-नवीन स्वरुप पाहायाला मिळत आहे. मात्र गेल्या काही अनेक दशकात अनेक बदल व परिवर्तने झाली, विशेषतः डिजिटल युग सुरू झाल्यापासून या ग्रामीण भागात अभूतपूर्व बदल घडत आहेत. ग्रामीण भागात ही मोठया झपाडयाने आधुनिक व तंत्रज्ञान माहितीच्या सांधनाचा वापर वाढ आहे. आज अनेक रेडिओ, दूरदर्शन, इंटरनेट, वृत्तपत्रे, मासिके, सोशल मीडिया, इत्यादी साधनांचा समावेश होतो. ही साधने माहिती पोहोचवणे, लोकजागृती आणि मतपरिवर्तन घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. प्रसार माध्यमांची साधने म्हणजे माहिती, शिक्षण आणि मनोरंजन दूरवर पोहोचवणारे व्यासपीठ म्हणता येईल. प्रसार माध्यमे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाच्या माध्यमातून दुवा म्हणून कार्य करते. त्यामुळे ग्रामीण भागात परिवर्तन होत आहे.

**शिफारसी:** 1.ग्रामीण भागातील प्रसार माध्यमांच्या माध्यमातून समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे. उदा. पाणी, आरोग्य, शिक्षण, रस्ते, स्वच्छाता, रोजगार यावर अधिक भर द्यावा. 2. प्रसार माध्यमांनी शेती संबधी आणि ग्रामीण भागातील रोजगारमुख कार्यक्रम अधिक प्रसारित करण्याचे कार्‍य केले पाहिजे. 3. ग्रामीण भागातील परिवर्तनाला चालना देणारे दीर्घकालीन माध्यम धोरण आखणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची:**

१. राणे ए. आर., केतन चौधरी , निलेश जोशी, संदिप केदार (२०२०) शिक्षण आणि प्रसार माध्यमे, धुळे : अर्थव पब्लिकेशन्स.
२. भारत (२००१) जनसंवाद, प्रकाशन विभाग, माहिती आणि ब्रॉडकास्टिंग मंत्रालय, भारत सरकार. नवी दिल्ली :पटियाला हाऊस.
३. चैरसिया, सोनम आणि सुनेजा, दीप्ति. (२०२१) ग्रामीण सामाजिक जनसंचार माध्यमांची भूमिका, International Journal of Advances in Social Sciences, Volume ९, Issue १.
४. सोनवणे, राहूल बी. (२०१९) भारतीय निवडणूकीमधील प्रसार माध्यमांची भूमिका, Historicity Research Journal, July.Vol. ५ (११).
५. कंटेंट क्रिएटर म्हणजे काय आणि कंटेंट क्रिएटर कसे व्हावे https://acadium.com.
६. माध्यमांची भूमिका https://unacademy.com.

# ग्रामीण समाजावर सामाजिक माध्यमांचा पडलेला प्रभाव: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**रेखा गौतम साळवे** संशोधक विद्यार्थिनी, समाजशास्त्र विभाग, वसंतदादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा बीड

**गोषवारा:** डिजिटल क्रांती नंतर सामाजिक माध्यमांनी मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मूलभूत परिवर्तन घडवून आणले आहे भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये ग्रामीण समाज हा पूर्वी माहिती व संवादाच्या दृष्टीने मर्यादित होता मात्र स्मार्टफोन, स्वस्त इंटरनेट,व डिजिटल इंडिया उपक्रमामुळे सामाजिक माध्यमांचा ग्रामीण भागातील प्रसार झपाट्याने वाढला आहे. प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये ग्रामीण समाजावर सामाजिक माध्यमांचा सामाजिक, शैक्षणिक,आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय स्तरावर झालेला प्रभाव अभ्यासण्यात आला आहे. या अभ्यासातून सामाजिक माध्यमांचे सकारात्मक योगदान तसेच उद्‌भवणाऱ्या समस्यांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे.

**मुख्य शब्द:** ग्रामीण समाज, सामाजिक माध्यमे, डिजिटल साक्षरता, ग्रामीण विकास, सामाजिक परिवर्तन

**प्रस्तावना:** परंपरागत काळात ग्रामीण समाज हा मौखिक संवाद, ग्रामसभा, लोकसंस्कृती व छापील माध्यमावर अवलंबून होता. २१ व्या शतकात माहिती व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सामाजिक माध्यमांनी संवादाची व्याख्याच बदलून टाकली फेसबुक, व्हॉट्सॲप, युट्यूब , इंस्टाग्राम , टेलिग्राम तसेच ट्विटर यासारख्या माध्यमांचा प्रभाव ग्रामीण समाजातही खोलवर रुजलेला दिसून येतो. या

माध्यमामुळे ग्रामीण जीवनशैली विचारसरणी व सामाजिक रचना यामध्ये लक्षणीय बदल घडून आले आहेत. प्रस्तुत शोधलेखाचा उद्देश ग्रामीण समाजावर सामाजिक माध्यमांचा सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक व राजकीय स्तरावर होणारा प्रभाव समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासणे हा आहे. या संशोधनासाठी वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून दुय्यम माहितीच्या आधारावर समाजशास्त्रीय ग्रंथ, संशोधन लेख, नियतकालिके व शासकीय अहवालातून माहिती संकलित करण्यात आली आहे. अभ्यासातून असे आढळून येते की सामाजिक माध्यमांमुळे ग्रामीण समाजातील समाजप्रक्रिया गतिमान झाली असून शिक्षणाच्या संधी, शेती विषयक माहिती, रोजगार व स्वयंरोजगाराच्या शक्यता वाढल्या आहेत. त्याचबरोबर लोकशाही सहभाग, सामाजिक जागरूकता व स्थानिक प्रश्नावरील चर्चेला चालना मिळाली आहे.

तथापि या माध्यमांचा अतिरेकी व अयोग्य वापर ग्रामीण तरुणांमध्ये व्यसनाधीनता, अफवा, दिशाभूल करणारी माहिती व सांस्कृतिक मूल्यावरील ताण निर्माण करीत आहे, त्यामुळे सामाजिक माध्यमांचा सकारात्मक उपयोग ग्रामीण विकासासाठी होण्यासाठी डिजिटल साक्षरता माध्यम साक्षरता व मूल्य दृष्टीत वापर यावर भर देणे आवश्यक असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**पूर्व संशोधन साहित्याचा आढावा: बॉईड अँड एल्लिसन (२००७)** यांनी सामाजिक माध्यमांना आधुनिक समाजातील संवादाचे प्रभावी साधन मानले आहे प्रस्तु संशोधन हे या अभ्यासांना ग्रामीण भारतीय संदर्भात पुढे नेण्याचा प्रयत्न करते. **देशपांडे, अ (२०१९)** यांनी ग्रामीण समाजातील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करताना माध्यमांची भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद केले आहे. **पाटील,स.(२०२१)** यांच्या अभ्यासानुसार सामाजिक माध्यमांमुळे ग्रामीण तरुणांमध्ये नव्या संधी निर्माण झाल्या असल्या तरी मूल्य संघर्ष वाढला आहे.

**संशोधनाची गरज:** ग्रामीण समाज हा भारतीय समाज रचनेचा कणा आहे. सामाजिक माध्यमांचा वाढता प्रभाव ग्रामीण समाजाच्या मूल्यवस्थेवर परंपरावर व तरुण पिढीच्या मानसिकतेवर परिणाम करीत आहे. त्यामुळे या प्रभावाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे ही काळाची गरज बनली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १. ग्रामीण समाजात सामाजिक माध्यमांचे वापराचे स्वरूप अभ्यासणे. २. सामाजिक माध्यमांचा सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर होणारा प्रभाव विश्लेषित करणे. ३. शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रातील बदलांचा अभ्यास करणे. ४. सामाजिक माध्यमांमुळे उद्भवणाऱ्या समस्यांचा शोध घेणे. ५. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने सामाजिक माध्यमांची भूमिका स्पष्ट करणे

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे ज्यात पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके शासकीय अहवाल व विश्वासार्ह ऑनलाइन स्त्रोतामधून घेण्यात आली आहे.

**ग्रामीण समाजावर सामाजिक माध्यमांचा पडलेला प्रभाव:**

**ग्रामीण समाज:** ग्रामीण समाज म्हणजे कृषीप्रधान, परंपरागत जीवनशैली असलेला व सामूहिक तेवर आधारित समाज होय. औद्योगीकरण, शहरीकरण, शिक्षणाचा प्रसार आणि माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे ग्रामीण समाजात लक्षनीय बद्दल घडून येत आहेत. माहिती व संप्रेषण माध्यमातून ग्रामीण शैली व सामाजिक व्यवहार बदलत आहे त्यामुळे पारंपारिक ग्रामीण समाज हळूहळू संक्रमण अवस्थेतील समाज म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. ग्रामीण समाजाचा अभ्यास केल्याने सामाजिक विषमता, विकास प्रक्रिया, माध्यमांचा प्रभाव सांस्कृतिक बदल व ग्रामीण विकासाच्या समस्या स्पष्टपणे समजून घेता येतात त्यामुळे समाजशास्त्रीय संशोधनात ग्रामीण समाजाला केंद्रस्थानी ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**ग्रामीण समाजाची व्याख्या: देसाई ए.आर.** ग्रामीण समाज म्हणजे असा समाज की, ज्यामध्ये लोकसंख्या विस्तीर्ण क्षेत्रातील कोरलेली असते. लोक प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असतात आणि परंपरागत सामाजिक संस्थांच्या आधारे सामाजिक जीवन चालते. ग्रामीण समाज आणि माध्यमे यांचा परस्पर संबंध हा सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक आहे. ग्रामीण समाज हा परंपरागत कृषीप्रधान समुदाय भावनेवर आधारित आणि निकट सामाजिक संबंधाने युक्त असा समाज असतो. तर माध्यम ही माहिती, ज्ञान, विचार व मूल्य प्रसारित करणारी प्रभावी सामाजिक संस्था आहे. या दोघांच्या परस्पर संवादातून ग्रामीण समाजाच्या जीवनशैलीत विचारसरणीत व सामाजिक रचनेत परिवर्तन घडवून येते. ग्रामीण समाजात माध्यमे (उदा. वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन व सामाजिक माध्यमे) ही माहितीचा प्रसार, सामाजिक जागरूकता, शैक्षणिक विकास, आर्थिक संधी व राजकीय सहभाग वाढविण्याचे कार्य करतात. त्याचबरोबर माध्यमाद्वारे ग्रामीण समाजाचा संपर्क शहरी व जागतिक समाजाची प्रस्थापित होतो. परिणामी ग्रामीण समाज पारंपारिकतेकडून आधुनिकतेकडे संक्रमणाच्या अवस्थेत प्रवेश करतो. तथापि माध्यमांचा अतिरेकी किंवा असंतुलित वापर ग्रामीण समाजात सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास, सामाजिक तणाव, व्यसनाधीनता व दिशाभुल यासारख्या समस्या निर्माण करतो म्हणूनच ग्रामीण समाज आणि माध्यमे यांचा संबंध हा केवळ विकासात्मक नसून तो द्वीमुखी (सकारात्मक व नकारात्मक) स्वरूपाचा आहे.

**सामाजिक प्रभाव:** सामाजिक माध्यमांमुळे ग्रामीण भागातील लोकांमध्ये संवाद अधिक वेगवान व सुलभ झाला आहे. स्थलांतरित कुटुंबीयांशी संपर्क कायम राहतो. सामाजिक प्रश्न, आरोग्य स्वच्छता व महिलांचे प्रश्न याबाबत जागरूकता वाढली आहे. समाज माध्यमांमुळे सामाजिक कार्यासाठी लागणाराअतिरेकी खर्च कमी झाला असून वेळेची बचत होत आहे.

**शैक्षणिक प्रभाव:** समाज माध्यमांच्या वाढत्या प्रसारामध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन शिक्षण ई- लर्निंग प्लॅटफॉर्म,शैक्षणिक व्हिडिओ, स्पर्धा परीक्षांची माहिती सहज उपलब्ध झाली आहे यामुळे शिक्षणातील दरी काही प्रमाणात कमी होत आहे.

**आर्थिक प्रभाव:** शेती विषयक तंत्रज्ञान, हवामान अंदाज,बाजार भाव,सरकारी योजना यांची माहिती सामाजिक माध्यमाद्वारे मिळते स्वयंरोजगार, ऑनलाईन व्यवसाय व डिजिटल मार्केटिंग मुळे ग्रामीण युवकांना नवीन संधी उपलब्ध होत आहेत.

**ग्रामीण स्त्रियावरील प्रभाव:** समाज माध्यमांमुळे स्त्रियांच्या विचारसरणीत बदल होऊन त्या स्वयंप्रेरित होत आहेत व त्या माध्यमातून बँका बचत गट इत्यादी द्वारे त्यांचे देवाण-घेवाण वाढले असून हा समाज माध्यमांचा प्रभाव त्यांच्या सक्षमतेवर दिसून येतो.

**सांस्कृतिक प्रभाव:** लोककला, सण उत्सव व ग्रामीण परंपरांचे प्रसारण सामाजिक माध्यमांमुळे शक्य झाले आहे. समाज माध्यमांमुळे ग्रामीण लोकांच्या जीवनात देखील अस्पृश्यता, पारंपारिकता या विषयात बदल घडवून येत आहेत. मात्र पाश्चात संस्कृतीचा प्रभाव वाढत असून स्थानिक संस्कृती समोर आव्हाने निर्माण झाली आहेत.

**राजकीय प्रभाव:** राजकीय जागरूकता वाढली असून ग्रामपंचायत शासकीय योजना व मतदान प्रक्रिये बाबत माहिती मिळते मात्र राजकीय प्रचार व दिशाभूल करणारी माहिती गंभीर समस्या ठरत आहे.

**सामाजिक माध्यमांचे नकारात्मक परिणाम:** १. अफवा व खोटी माहितीचा वेगवान प्रसार, २. तरुण पिढीत मोबाईल व सोशल मीडियाचे व्यसन, ३. प्रत्यक्ष सामाजिक संवादात घट, ४. गोपनीयतेचे प्रश्न व सायबर गुन्हे, ५. सांस्कृतिक मूल्यावर होणारा विपरीत परिणाम. सामाजिक माध्यमे ही ग्रामीण विकासासाठी प्रभावी साध्य ठरू शकतात मात्र त्यांचा योग्य वापर सामाजिक समस्यांना जन्म देतो त्यामुळे डिजिटल साक्षरता व मूल्यदिष्टीत वापर यावर भर देणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:** ग्रामीण समाजावर सामाजिक माध्यमांचा प्रभाव व्यापक व बहुआयामी आहे योग्य नियोजन प्रशिक्षण व जागरूकतेद्वारे सामाजिक माध्यमांचा सकारात्मक वापर ग्रामीण विकासासाठी निश्चितच उपयुक्त ठरू शकतो.

**शिफारशी:** १. ग्रामीण भागात डिजिटल साक्षरता कार्यक्रम राबवावीत. २. सामाजिक माध्यमांचे वापरासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत. ३. स्थानिक भाषेतील दर्जेदार डिजिटल सामग्री विकसित करावी.

**संदर्भसूची:**

१. देसाई ए. आर (२०१९). रुरल सोशॉलॉजी इन इंडिया, ५ वी आवृत्ती. सागे प्रकाशन पी. एल
२. देशपांडे, अ.(२०१९). ग्रामीण समाजशास्त्र: विद्या प्रकाशन पुणे
३. पाटील, स. (२०२१). सामाजिक माध्यमे आणि समाज: शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४. डिजिटल इंडिया अहवाल (भारत सरकार)
५. एल्लीसन बी. अँड बॉईड, एम. (२००७) 'द ऑक्सफर्ड हँडबुक ऑफ इंटरनेट स्टडीज' विल्यम एच. डटन २०१७ प्रकाशित

# शेतकरी कुटुंबावर दूरदर्शन कार्यक्रमांचा परिणाम: एक समाजशास्त्रीय अभ्यास -विशेष संदर्भ बुलढाणा जिल्हा

**युवराज तेजराव वाघ** संशोधक विद्यार्थी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
**प्रा. डॉ. मधुकर हरी चाटसे** राजश्री शाहू महाविद्यालय, वाळूज, छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील 68% लोक आज ही ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण भागातील व्यक्तींचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. शेती ही सर्व उद्योगाची जननी आहे. मानवाचे पालन पोषण करणारी आहे. भारतीय राष्ट्रीय उत्पन्नाचा आधार सुद्धा शेती हाच आहे. अन्न वस्त्र निवारा या मानवाच्या तीन मूलभूत गरजा असून यातील अन्नाची गरज भागविण्याचे काम शेतकरी कुटुंब करीत असतो. शेतकरी हा ग्रामीण समाज व्यवस्थेचा आणि कृषी समाज रचनेचा कणा आहे. जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याला अन्नधान्य पिकवताना फार कष्ट करावे लागते. भारतीय शेतकऱ्यांनी आपल्या शेतात अन्नधान्य पिकवून देशाला स्वयंपूर्ण बनवले आहे. हे काम करत असताना त्याला कधी ओला दुष्काळ, कधी कोरडा दुष्काळ, बाजारपेठेतील भावात होणारी घसरण, हवामानात होणाऱ्या बदलामुळे पिकाची होणारे नुकसान, त्यामुळे उत्पन्नात होणारी घट आणि पिकवलेल्या मालाला योग्य भाव मिळत नाही. शेती उत्पन्नाला मिळत असलेले भाव पाहता शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले. शेतकऱ्यांसमोर हमीभावाची समस्या ही मोठी आहे. त्यामुळे शेती करणे शेतकऱ्यांसाठी जिकरीचे होत चालले आहे. शेतकऱ्यांना कुटुंबाचा सांभाळ करून आपल्या मुळाबाळांना कसं शिकवावं त्याच पालन पोषण कसं करावं याचं गणितच लागत नाही आहे. शेतकरी हा कर्जाच्या बोजाखाली दिवसेंदिवस दबल्या जात आहे. शेतकऱ्यांनी जगायचं तरी कसा हा प्रश्न निर्माण होत आहे. यातूनच शेतकरी आत्महत्या वाढत चालल्या आहेत. इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर देशतील नागरीकांना शिक्षण आणि कृषी संबंधीची माहिती पोहोचविण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारने विदेशी कंपनीच्या मदतीने प्रायोगिक तत्त्वावर दुरचित्रवाणी आजचे दूरदर्शन ही वाहिनी सुरू केली. दूरदर्शन हे दृकश्राव्य माध्यम असल्यामुळे त्याचा परिणाम श्रोत्यांवर मोठ्या प्रमाणात होत असे, एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे, दुसऱ्या व्यक्तीकडून समूहाकडे ,एका समूहातून दुसऱ्या समूहाकडे , आणि संपूर्ण समाजात माहिती, ज्ञान, विचार, मते, भावना, इत्यादींचा प्रसार करण्यासाठी हे माध्यम प्रभावी ठरले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबाला सुद्धा या माध्यमाचा फायदा मनोरंजना सोबतच नवनवीन तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण देश विदेशातील माहितीचे ज्ञान मिळवण्यासाठी महत्वपूर्ण ठरले आहे. 21 व्या शतकात खाजगी वाहिन्या सुध्दा देशांतर्गत सुरू झाल्यात. त्यामुळे दूरदर्शन आणि खाजगी वाहिनीमध्ये स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेत खाजगी वाहिनीच्या तुलनेत दूरदर्शन थोडे मागे पडले. परंतु सत्यता आणि विश्वासार्हता आजही दूरदर्शनने जपली आहे. दूरदर्शनवरून प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांचा सकारात्मक परिणाम शेतकरी कुटुंबावर झाल्याचे दिसून आले आहे.

**प्रस्तावना:** शेतकरी हा ग्रामीण समाज व्यवस्थेचा आणि कृषी समाज रचनेचा कणा आहे. शेतकऱ्यांनी अन्नधान्य उत्पादनात वाढ करून देशाला स्वयंपूर्ण बनविले आहे. जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकरी कुटुंबांना खूप कष्ट करावे लागतात. दुकानात किंवा

बाजारात गेल्यानंतर आपल्याला हिऱ्या मोत्यासारखी उत्तम दर्जाचे मौल्यवान असे धान्य दिसतात पण त्यामागे शेतकरी कुटुंबाला करावे लागणारी काबाडकष्ट दिसत नाही. रात्रंदिवस काबाडकष्ट करून हाडाची काड करणारा शेतकरी दिवसभर शेतात कामे करून थकून जातो. पण मानसिक थकव्यावर मात करण्यासाठी करमणुकीचं (मनोरंजनाचं ) दृकश्राव्य माध्यम भारतात सर्वप्रथम दूरदर्शन या शासकीय वाहिनीच्या माध्यमातून उपलब्ध झाले.टीव्ही एंटीनाच्या माध्यमातून शहरापासून ते ग्रामीण भागातील वाडी,वस्ती,तांडा, आदिवासी पाड्यातील आणि शेतकरी कुटुंबापर्यंत दूरदर्शनचे टीव्ही संच पोचले आहे. त्यामुळे अल्पकाळातच ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबीयांच्या जीवनाचा एक भाग दूरदर्शन बनला आहे. मानवाने विज्ञानाच्या साह्याने शोधाद्वारे चमत्कारावर चमत्कार घडवून आणत आहेत. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही शास्त्रज्ञांनी विविध क्षेत्रात शोध लावून जगाला आश्चर्यचकित केले आहेत. त्याचबरोबर करमणूक मनोरंजनाची अद्वितीय साधने उपलब्ध करून दिली आहेत. या यंत्र युगाच्या अविष्कारातून निर्माण झालेले दूरदर्शन हे दृकश्राव्य माध्यम मानव समाजाला प्रगतीच्या मार्गावर नेण्याचे काम करत आहे ज्या गोष्टी मानवाच्या बौद्धिक कक्षेच्या बाहेर होत्या त्या मानवाच्या हाती आणून देण्याचं काम या प्रसार माध्यमाने केलं आहे.भारतात 15 सप्टेंबर 1959 रोजी दूरदर्शनच पहिलं प्रसारण दिल्ली दूरदर्शन केंद्रावरून सुरू झालं. दूरदर्शनचे पहिले संचालक म्हणून काम करण्याची संधी मराठी माणूस पु. ल.देशपांडे यांना मिळाली. त्यांनी भारतात सुरू झालेल्या टेलिव्हिजनला दूरदर्शन हे नाव सुचविले.दिल्लीच्या एकमेव केंद्रावरून सुरू झालेला दूरदर्शनचा व्याप संपूर्ण देशभर पसरला आहे. देशातील 85 लोकांपर्यंत दूरदर्शनचे कार्यक्रम पोहोचतात. दूरदर्शने भाषिक रचनेनुसार स्वतंत्र प्रादेशिक वाहिनी ही सुरू केली आहे. 1972 ला मराठी भाषिकांसाठी मुंबई दूरदर्शन केंद्र सुरू झाले. 1982 पर्यंत दूरदर्शनवरून प्रसारित होणारे कार्यक्रम हे ब्लॅक अँड व्हाईट स्वरूपात पहावे लागत होते. भारतात सुद्धा दूरदर्शनचे प्रसारण रंगीत असावे असे केंद्र सरकारला वाटले आणि तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्या दिशेने पाऊल उचलले.1982 मध्ये झालेल्या आशिया क्रीडा स्पर्धा या भारतात रंगीत टिव्हीवर दिसू लागल्यात. त्यानंतर लोकांचे टीव्ही प्रेम झपाट्याने वाढत गेले. "हम लोग " ही भारतातील दूरदर्शन वरून प्रक्षेपित झालेली पहिली हिंदी मालिका आहे. रामायण , महाभारत या मालिकेने तर भारतीय जन माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवले. रविवारी सकाळी टीव्हीवर हया मालिका सुरू झाल्या की जणू संचारबंदी लागण्याची परिस्थिती रस्त्यांवर दिसून येत होती. तर covid-19 च्या संकट काळात संपूर्ण देश लॉकडाऊन करून संचारबंदी लागू करण्यात आली होती. त्यावेळी घरी बसलेल्या भारतीयांसाठी पुन्हा रामायण , महाभारत या मालिका सुरू करण्यात आल्या होत्या. दूरदर्शन हे घराघरापर्यंत पोचले हे. खेड्यापाड्यातल शेतकरी कुटुंबाच्या घरी सुद्धा दूरदर्शनचा संच दिसून येतो.दूरदर्शनचा कार्यक्रम पाहण्यासाठी व्यक्ती ही शिक्षित असल्याची गरज नाही. कोणताही व्यक्ती या माध्यमांचा उपयोग करू शकतो. उपग्रहाद्वारे आधुनिक तंत्रज्ञानातून सामाजिक शिक्षण देण्याचा पहिला प्रयोग भारतात केला गेला. मुंबई दूरदर्शनने ग्रामीण व्यक्तीला केंद्रबिंदू मानून विविध कार्यक्रमांची निर्मिती केल्या जात आहे. सुरुवातीला दूरदर्शनवरील मालिकाच्या चर्चा घरोघरी रंगू लागल्या. चिमणराव आणि गुंड्याभाऊ, चाल नावाची वाचाळ वस्ती, गोट्या ,बंदिनी, एक शून्य शून्य, सर्जा राजा, प्रतिभा आणि प्रतिमा ज्ञानदीप, या मालिकेच्या माध्यमातून ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाचं ही काम केल्या जात होत. तर आमची माती आमची माणसं, कृषिदर्शन, कृषी समृद्धीची गुरुकिल्ली, या शेतीविषयक कार्यक्रमातून शेतकरी कुटुंबांना पीक लागवड, जल व्यवस्थापन, पशुसंवर्धन, रेशीम शेती, मधुमक्खीपालन, कुक्कुटपालन, शेळीपालन, गांडूळ शेती, यासारख्या शेती उद्योगाशी निगडित व्यवसायाची माहिती या कार्यक्रमाच्या माध्यमातून दिली जाते याशिवाय कृषी विद्यापीठातील तज्ञांच्या मुलाखती चर्चासत्रांचे आयोजन करून शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यावरील उपाय सोबतच नवनवीन तंत्रज्ञान, बी, बियाणे खते, कीड,व्यवस्थापन, पिकांना देण्यात येणाऱ्या खतांच्या मात्रा ,कृषी मालाचे बाजार भाव, हवामानाचा अंदाज या विषयाची माहिती ही दूरदर्शनवरून दिल्या जाते. महिलांसाठी हॅलो सखी, आरोग्य संपदा प्रतिभा आणि प्रतिमा या कार्यक्रमाच्या माध्यमातून चर्चात्मक माहिती देऊन आरोग्य विषयी ज्ञान देण्याचं काम दूरदर्शनच्या माध्यमातून केल्या जातो. शाळकरी विद्यार्थ्यांना घरबसल्या शिक्षणाची धडे, युवक युवतीना खेळाची माहिती, रोजगाराच्या संधी आणि बातम्यांच्या माध्यमातून देश विदेशातील घडामोडींची माहिती घरबसल्या शेतकरी कुटुंबाला मिळू लागली आहे. शिवाय मनोरंजनाच्या माध्यमातून विविध चित्रपट , मालीका चित्रहार दूरदर्शन वरून नियमित प्रसारित केल्या जातात. या कार्यक्रमांचा प्रभाव शेतकरी कुटुंबावर कसा पडला हे शोधण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

**संशोधन साहित्याचा आढावा:** संशोधन साहित्याचा आढावा घेणे ही संशोधन विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची पायरी आहे संदर्भ साहित्याचा आढावा घेतल्यामुळे योग्य कार्यपद्धतीची आखणी करण्यास मदत होते. सोबतच अंर्तदृष्टी विकसित होऊन पुढे भविष्यातील तपासणीसाठी आधार मिळतो. आपण संशोधनकरीत असलेल्या विषयावर कोणी संशोधन केले आहे का ? या संदर्भातील माहिती संशोधकाला मिळते. गुणात्मक संशोधन करताना साहित्याच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे गरजेचे असते. संशोधनपर विषयात तत्कालीन आणि समकालीन परिस्थितीनुसार काय घडत आहेत यासंदर्भाची माहिती संशोधकाच्या लक्षात येते. संशोधन साहित्याचा आढावा घेताना उपलब्ध साहित्याचा आवाका दृष्टीक्षेपकास येऊन विश्लेषणातील माहितीचा अंदाज येतो. त्यामुळे संशोधनाला नवी उंची गाठण्यास मदत होते.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने निवडलेला विषय "शेतकरी कुटुंबावर दूरदर्शन कार्यक्रमांचा परिणाम एक समाज शास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ बुलढाणा जिल्हा " हा आहे. शेतकरी कुटुंब आणि दूरदर्शन कार्यक्रमांचा परिणाम हा सकारात्मक आणि नकारात्मक सुद्धा असू शकतो. या घटकांच्या संदर्भात संशोधन साहित्याचा आढावा घेणे आवश्यक आहे तो आढावा पुढीलप्रमाणे 1) "दूरदर्शनचा कुटुंबातील सर्वच माणसावर कोणता परिणाम होतो " या विषयावर मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात ए. नारायण यांनी संशोधन केले. त्यांनी सुरुवातीला मुंबई दूरदर्शनचा अभ्यास केला. दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहण्यामुळे मुलांच्या अभ्यासावर परिणाम होतो. यासाठी 271 कुटुंबप्रमुखाची निवड केली यातील 159 कुटुंबप्रमुखांनी सांगितले की मुलांमध्ये व्दिधा

अवस्था निर्माण होते. विद्यार्थ्यांनी काय करावे हे निश्चित सांगता येत नाही. दूरदर्शनवरील चांगला कार्यक्रम पहावा की अभ्यास करावा. उर्वरित 112 कुटुंबप्रमुखांनी सांगितले की दूरदर्शन वरील कार्यक्रम हे विद्यार्थ्यांचे अभ्यासातील लक्ष विचलित करणारे ठरले आहे. या संशोधनावरून असं सिद्ध झाले की दूरदर्शनचे कार्यक्रम पाहण्यासाठी मुलं घाईघाईने त्यांचा अभ्यास पूर्ण करून घेतात. 2) "भारतीय समाज विकासात प्रसार माध्यमांची भूमिका " चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुका अंतर्गत येणाऱ्या तळोधी येथील वाय.पी. आर्ट्स कॉलेजचे प्रा. संजय चव्हाण यांनी समाज विकासात माध्यमांची भूमिका मांडणे ,प्रसार माध्यमांच्या स्वरूपाचे विविध दृष्टिकोनावर चर्चा करणे, आधुनिक समाजातील प्रसार माध्यमांची वैशिष्ट्ये व बदलते मूल्ये यावर चर्चा करणे , समकालीन भारतीय समाजातील प्रसार माध्यमांच्या भूमिकेचे विश्लेषण करणे आणि भारतीय समाज विकासात माध्यमांच्या योगदानाची मूल्यमापन करणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून भारतीय समाज विकासात प्रसार माध्यमांची भूमिका विशद करत असताना प्रसार माध्यमातून अचूक माहिती मिळाल्याने भ्रष्टाचार खोटेपणा कमी होतो. असा निष्कर्ष काढलाय. विकास हेच कोणत्याही संस्कृती व संज्ञापनाचे अंतिम उद्दिष्ट असते. मात्र विकासाची एकच अशी संकल्पना असत नाही स्थळ काळानुसार ती बदलत असते विकास ही एक सांस्कृतिक प्रक्रिया आहे. त्यासाठी लोकसहभाग आवश्यक असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलाय प्रसारमाध्यमे हे विकासाची साधन बनवून पाहत आहेत. या समाज विकास प्रक्रियेमध्ये आधुनिक प्रसार माध्यमांना फार महत्त्व देण्यात आले हे विकास प्रक्रियेत हातभार लावणे हे कोणत्याही प्रसार माध्यमांचे लोकशाहीतील कर्तव्यच असते कारण लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून प्रसार माध्यमांना संबोधले जाते. शिवाय भारतीय समाज विकास प्रक्रियेत कोणत्याही प्रसार माध्यमांना दुर्लक्षित करता येणार नाही असं मत त्यांनी व्यक्त केलं आहे. 3) "दूरदर्शन हिंसा आणि मुलांची वर्तणूक" या संशोधन प्रबंधात डॅनियल चॉनसलर यांनी दूरदर्शन वरून प्रसारित होणाऱ्या हिंसात्मक कार्यक्रमांचा मुलांच्या वर्तुळणुकीवर कसा परिणाम होतो याचा अभ्यास केला आहे. या अभ्यासात त्यांनी 14 वर्षावरील मुलांवर दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहिल्यामुळे त्यांच्या वर्तणुकीत होणारा परिणामाचा अभ्यास केला आहे. यामध्ये अमेरिकेतील मुलांचा कल हा गुन्हेगारी कार्यक्रम पाहण्याकडे जास्त असल्याचं निदर्शनास आल आहे. त्यामुळे अमेरिकेतील 14 वर्षावरील मुलांचा कल गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळत असल्याचं निदर्शनास आलं अमेरिकेतील मुलांमधील प्रेम ,जिव्हाळा ,माणुसकी कमी झाली आहे , अमेरिकेत गुन्हेगारी स्वरूपाचे कार्यक्रम पाहल्यामुळे मुलांच्या वर्तनुकीत बिघाड होऊन त्याचा परिणाम त्यांच्या भावी जीवनावर झाल्याचे दिसून येते. 4) "प्रसार माध्यमे आणि बदलते जीवन प्रवाह " या शोध प्रबंधात सहाय्यक प्राध्यापक राजू बुरीले यांनी प्रसार माध्यमांमुळे सर्व जग एकत्र आल्याचे सांगत या माध्यमांचा सामाजिक जीवनाच्या विचारावर, व्यक्तिमत्ववर, सांस्कृतिकवर आणि राजकीय विचारांवर परिणाम पडत असल्याचे म्हटले आहे. सामाजिक परिवर्तन करण्यासाठी प्रसारमाध्यमे ही महत्त्वाची साधने असल्याचे म्हटले आहे. प्रसार माध्यमांमुळे होणारे फायदे आणि तोटेही सांगून प्रसार माध्यमांमुळे व्यक्तींच्या सर्वांगीण विकासामध्ये भर घातल्या गेल्याचा , माध्यमांचा योग्य वापर केल्यास व्यक्ती कुटुंब आणि समाज आणि पर्यायाने राष्ट्राची ही प्रगती होण्यास मदत झाल्याचा आणि व्यक्तीपासून राष्ट्रापर्यंत विकासाची दशा आणि दिशा ठरविण्यात माध्यमांची भूमिका महत्त्वाची असल्याचा निष्कर्ष त्यांनी आपल्या शोध प्रबंधात मांडला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**प्रस्तुत विषयाचे अध्ययन सर्वव्यापी व सर्वस्पर्शी होऊन संशोधनाला निश्चित दिशा देण्यासाठी काही उद्दिष्टे गृहीत धरून प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी करण्यात आली आहे. 1. शेतकरी कुटुंब आणि दूरदर्शन कार्यक्रमांचे महत्त्व स्पष्ट करून त्यांच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे. 2. शेतकरी कुटुंबाला दूरदर्शनवरून मिळत असलेल्या कृषी विषयक माहितीचा अभ्यास करणे. 3. शेतकरी कुटुंबाच्या विकासात दूरदर्शन कार्यक्रमांच्या योगदानाचे मूल्यमापन करणे. 4. शेतकऱ्यांच्या पारंपरिक पीक पद्धतीत बदल घडविण्यात दूरदर्शन कार्यक्रमांची भूमिका व महत्त्व अभ्यासणे

**संशोधनाची गृहितके:** शेतकरी कुटुंबातील व्यक्तीमध्ये ज्ञानाचे व माहितीचे आदान प्रदान दूरदर्शन कार्यक्रमातून झाल्याने त्यांच्या वर्तनात व राहणीमानात बदल झाला आहे. 1. शेतकरी कुटुंबाला नवनवीन बी, बियाणे, खते विषयक माहिती, जोडधंदयाची प्रेरणा दूरदर्शन कार्यक्रमातून मिळाली आहे. 2. शेतकरी कुटुंबावर दूरदर्शन कार्यक्रमांचा अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम झाला आहे. 3.फेसबुक व्हाट्सअप यूट्यूब यासारख्या समाज माध्यमातुन मिळणाऱ्या कृषीविषयक माहितीमुळे शेतकऱ्यांची नवीन पिढी दूरदर्शन ऐवजी या समाज माध्यमांकडे जास्त आकर्षित झाली आहे

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली आहे. तथ्य सामुग्रीच्या संकलनासाठी प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ, शोध पत्रिका, नियतकालिके वृत्तपत्रे, आणि प्रकाशित अप्रकाशित लेख, अहवाल व इंटरनेट वेबसाईटचा आधार घेण्यात आला आहे.

**तथ्याचे विश्लेषण:** भारत हा कृषिप्रधान देश आहे भारतातील 131 कोटी लोकसंख्येपैकी जवळपास 68 टक्के लोक हे ग्रामीण भागात राहतात ग्रामीण भागातील व्यक्तींचा प्रमुख व्यवसाय आजही शेती हा आहे शेती ही सर्व उद्योगाची जननी असून मानवाचे पालन पोषण करणारी आहे भारतीय राष्ट्रीय उत्पन्नाचा आधार सुद्धा शेती हाच आहे स्वातंत्र्यापूर्वी भारतातील शेतकरी हा पारंपारिक पीक पद्धतीचा अवलंब करत होता औद्योगिक व कृषी क्रांती नंतर शेती व्यवसायात अमुलाग्रह बदल होऊ लागले बैलजोडीच्या साह्याने नांगरणी वखरणी पेरणी करणारा शेतकरी आता ट्रॅक्टरच्या साह्याने कमी वेळेत कमी खर्चात जास्त कामे करू लागला नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग शेतीमध्ये होऊ लागला या नवनवीन तंत्रज्ञानाचा मार्गदर्शन शेतकरी कुटुंबापर्यंत पोचवण्याचं काम भारतात सर्वप्रथम दूरचित्रवाणी थोत दूरदर्शनच्या माध्यमातून संपूर्ण भारतभर झालं 1ऑगस्ट 1975 साली सॅटेलाइट इंटरनॅशनल टेलिव्हिजन ( SITE) द्वारा दूरदर्शन वरून जे कार्यक्रम प्रसारित झाले त्याचा मुख्य उद्देश हा सामाजिक बदल घडवून आणणे हा होता यामध्ये शेतकऱ्यांसाठी विशेष कार्यक्रम आखण्यात आले होते शेतकरी कुटुंबांना शेतीबाबत ज्ञान करून देणे पिकांची माहिती करून देणे शेती व्यवसायासंबंधी इतर पूरक व्यवसाय संदर्भात जनजागृती करणे पिकांवर पडणारे रोग या रोगांवर प्रतिबंधक इलाज यासंबंधी

माहिती देणे हवामानाचा अंदाज घेणे याशिवाय समाजामध्ये जनजागृती करणे कुटुंबकल्याण साक्षरता शासकीय योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून कार्यक्रम सादर केला जात होते. शेतकरी कुटुंबीयांना नवी दिशा मिळावी विकास प्रक्रियेत त्यांना येता यावे या उद्देशाने दूरदर्शन वरून आमची माती आमची माणसं कृषिदर्शन कृषी समृद्धीची गुरुकिल्ली यासारख्या कार्यक्रमातून शेतकरी बांधवांना शेतीविषयक मार्गदर्शन करण्याचं काम दूरदर्शनच्या माध्यमातून केल्या जात आहे याशिवाय सुंदर माझं घर चित्रपट गीतांचा कार्यक्रम चित्रहार मराठी हिंदी चित्रपट मालिकांच्या माध्यमातून मनोरंजन चे अनेक कार्यक्रम दूरदर्शनच्या माध्यमातून दररोज दाखवल्या जातात या कार्यक्रमाचा शेतकरी कुटुंबावर परिणाम झालाय शेतकरी कुटुंबाला मिळालेल्या ज्ञानाचा फायदा घेऊन त्यांनी पारंपारिक पीक पद्धती सोबतच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने शेतीची कास धरली, नवीन बी बियाणाचा वापर करून उत्पन्नात वाढ केली. ठिबक सिंचनाचा वापर करून शेती बागायती करण्याचा प्रयत्न केला. शेतकरी कुटुंबीयांनी सर्व तंत्रज्ञान अंगीकृत करून त्याचा उपयोग शेतीमध्ये केलाय. त्यामुळे उत्पन्नात वाढ झाली पण उत्पादन खर्चही वाढला. त्यामुळे शेतात उत्पादित होणारा शेतमाल त्यासाठी लागणारा खर्च आणि शेतमालाला मिळणारा बाजार भाव यामध्ये मेळ बसत नसल्याने शेतकरी कुटुंब आर्थिक अडचणीत आहे.

**निष्कर्ष :** 1. दूरदर्शनला कृषी ,स्वयंरोजगार , शिक्षण, मानवाच्या विकासात्मक दृष्टिकोनातून उत्तम आणि दर्जेदार कार्यक्रम सादर करून समाजहीत जोपासावे लागेल. 2. सामाजीक परिस्थितीच भान ठेवून दूरदर्शनला कार्यक्रम धोरण निश्चीत कराव लागेल.

**शिफारशी :** 1. दूरदर्शनला आधुनिक आणि प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग करून उच्च दर्जाची सेवा प्रेक्षकांना देणे गरजे आहे. 2. खाजगी मराठी वाहिन्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे वाहिन्यांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धेत टिकण्यासाठी दूरदर्शनला प्रेक्षक, श्रोत्यांच्या पसंतीला उतरणे गरजेचे आहे. 3. ग्रामीण भागातील प्रेक्षकांसाठी दूरदर्शन ने ग्रामीण विकासात्मक आणि सामाजिक कार्यक्रमांना नव्याने गती देणे गरजेचे आहे

**संदर्भसूची :**

1) आगलावे प्रदीप,समाजशास्त्रीय संकल्पना आणि सिद्धांत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर 1998
2) लांजेवार नरेंद्र,शेतकऱ्यांची आत्महत्या चिंतन आणि उपाय, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली 2007
3) आत्रे त्रिंबक नारायण,शताब्दी आवृत्ती,राजहंस प्रकाशन
4) गायकवाड मुकुंदराव ,भारताची कृषी अर्थशास्त्र, कॉन्टिनेन्ट प्रकाशन पुणे ,आवृत्ती 2008
5) पाटील कृष्णकुमार,सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, समाजशास्त्र पुस्तक इयत्ता बारावी,आवृत्ती 2018
6) लोटे रा.ज. समाजशास्त्रीय परिचय पिंपळापुरे अँड पब्लिकेशन नागपुर 2010
7) जोशी उ.मा. मास कम्युनिकेशन अँड मिडिया अनमोल पब्लिकेशन, नवी दिल्ली (2009)
8) गायकवाड शेखर, प्रशासनाच्या नव्यावाटा श्री शिवदत्त, टोपीवाला लेन, स्टेशन रोड, गोरेगाव मुंबई. 2020
9) धारूरकर वि. ल. दूरदर्शन: लोक संस्कृती आणि ग्रामीण विकास चैतन्य प्रकाशन,औरंगाबाद 1990
10) महानोर ना. धो , शेती आत्मनाश आणि नवसंजीवनी , मधुराज प्रिटर्स प्रा.लि.पुणे.2018
11) पारसणीस न. रा ,शिक्षणाची तात्विक आणि सामाजिक भूमिका ,नूतन प्रकाशन पुणे. 1994
12) मोहन. डॉ हरी ,रेडिओ और दूरदर्शन पत्रकारिता तक्षशिला प्रकाशन , नवी दिल्ली 2008.
13) https://prasarbharati.gov.in/dd-sahyadri-homepage
14) https://en.wikipedia.org/wiki
15) https://marathivishwakosh.org/

# ग्रामीण भागातील सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक बदलांवर समाज माध्यमांचा प्रभाव-एक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. रमेश धोंडीराम राठोड** समाजशास्त्र विभाग प्रमुख,वैद्यनाथ कॉलेज, परळी वैजनाथ, जि. बीड

**सारांश:** प्रस्तुत संशोधनलेखात ग्रामीण भागातील समाज माध्यमांच्या वापराचा सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक जीवनावर होणारा प्रभाव समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासण्यात आला आहे. कारण अलीकडच्या काळात समाज माध्यमांनी ग्रामीण समाजात माहितीप्रवाह, जागरूकता व संधी वाढवल्या असल्या तरी त्याचबरोबर मूल्यसंघर्ष, सांस्कृतिक बदल आणि डिजिटल दरीसारखी आव्हानेही निर्माण केली आहेत. त्याचा आढावा यात घेण्यात आला आहे. आज माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे समाज माध्यमे आधुनिक समाजजीवनाचा अविभाज्य घटक बनली आहेत. पूर्वी शहरी भागापुरते मर्यादित असलेले समाज माध्यमांचे प्रभावक्षेत्र आज ग्रामीण भागातही झपाट्याने विस्तारत आहे. समाज माध्यमांमुळे ग्रामीण समाजातील सामाजिक संबंध, सांस्कृतिक मूल्ये आणि शैक्षणिक प्रक्रिया यामध्ये लक्षणीय बदल घडून येत आहेत. अशा मुलभूत परिवर्तनाचा अभ्यास यात करण्यात आला आहे.

***कीवर्ड्स :*** *समाज माध्यमे, ग्रामीण समाज, सामाजिक बदल, सांस्कृतिक परिवर्तन, शैक्षणिक प्रभाव*

**प्रस्तावना:** ग्रामीण समाज हा भारतीय समाजरचनेचा कणा मानला जातो. परंपरा, सामाजिक नातेवाईक संबंध, सांस्कृतिक मूल्ये आणि स्थानिक शिक्षणपद्धती यांवर आधारित ग्रामीण जीवनशैली दीर्घकाळ टिकून राहिली आहे. मात्र गेल्या काही वर्षांत मोबाईल फोन, इंटरनेट आणि समाज माध्यमांच्या प्रसारामुळे ग्रामीण समाजात वेगवान बदल घडून येत आहेत. फेसबुक, व्हॉट्सअॅप, यूट्यूब,

इन्स्टाग्राम यांसारख्या समाज माध्यमांचा वापर ग्रामीण युवक, महिला आणि विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसून येतो. या माध्यमांमुळे ग्रामीण समाजाचा बाह्य जगाशी संपर्क वाढला असून त्याचे विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक परिणाम दिसून येतात. ही समाज माध्यमे आधुनिक सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. पूर्वी शहरी समाजापुरते मर्यादित असलेले समाज माध्यमांचे प्रभावक्षेत्र आज ग्रामीण भागातही वेगाने विस्तारत आहे. मोबाईल फोन, इंटरनेट आणि विविध डिजिटल मंचांच्या माध्यमातून ग्रामीण समाजाचा थेट संपर्क राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील घडामोडींशी प्रस्थापित झाला आहे. या बदलामुळे ग्रामीण समाजातील सामाजिक रचना, सांस्कृतिक मूल्ये आणि शैक्षणिक प्रक्रिया यांमध्ये लक्षणीय परिवर्तन घडून येत आहे. समाज माध्यमांमुळे माहितीप्राप्ती, सामाजिक जागरूकता आणि शिक्षणाच्या संधी वाढल्या असल्या तरी त्याचबरोबर परंपरागत मूल्यांवर परिणाम, सांस्कृतिक संघर्ष आणि डिजिटल दरीसारखी आव्हानेही निर्माण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक बदलांवर समाज माध्यमांचा प्रभाव समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासणे आवश्यक ठरते.

**संशोधन उद्दिष्टे:** ग्रामीण भागातील समाज माध्यमांच्या वापराचे स्वरूप व व्याप्ती अभ्यासणे. समाज माध्यमांचा ग्रामीण समाजातील सामाजिक संबंधांवर होणारा प्रभाव विश्लेषित करणे. ग्रामीण संस्कृती, मूल्ये व जीवनशैलीतील बदलांवर समाज माध्यमांचा प्रभाव अभ्यासणे. समाज माध्यमांचा ग्रामीण भागातील शिक्षणप्रक्रिया व शैक्षणिक संधींवर होणारा परिणाम समजून घेणे. समाज माध्यमांच्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक व शैक्षणिक आव्हानांचा अभ्यास करणे.

**गृहीतके: १)** ग्रामीण भागात समाज माध्यमांचा वापर लक्षणीय प्रमाणात वाढलेला आहे. २) समाज माध्यमांमुळे ग्रामीण समाजातील सामाजिक संवादाचे स्वरूप बदलले आहे. ३) समाज माध्यमांचा ग्रामीण संस्कृतीवर शहरी व जागतिक प्रभाव वाढविण्यात महत्त्वाचा वाटा आहे.

**संशोधन पद्धती:** कोणत्याही विषयाचे किवा घटनेचे अध्ययन करीत असताना ते वैज्ञानिक पद्धतीने होणे आवश्यक असते. या दृष्टीने प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. सामाजिक संशोधन पद्धतीत सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे तथ्य संकलन करणे होय. प्रस्तूत संशोधनात द्वितीयक स्त्रोतांद्वारे तथ्य संकलन करण्यात आले आहे. अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोतांचा जसे ग्रंथ, संशोधन लेख, जर्नल्स, अहवाल, भाषणे आणि अधिकृत प्रकाशने, शासकीय प्रकाशने व इंटरनेट स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. द्वितीयक तथ्य संकलनासोबतच विशेषतः प्राथमिक तथ्य संकलन आणि निरीक्षण पद्धतीवर अधिक भर देण्यात आला आहे.

**समाज माध्यमे : संकल्पना व स्वरूप -** जागतिकीकरणानंतर सर्वार्थाने माध्यम क्षेत्रात आमूलाग्र क्रांती झाली. त्यात भर घातली, ती माहिती- तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांतीने. त्याचेच नवीन रूप किंवा अपत्य म्हणजे सोशल मीडिया. जगातील अविकसित-विकसनशील राष्ट्रांमध्ये सोशल मीडिया विषयीची उत्सुकता आता प्रत्यक्ष वापरामध्ये बदलली आहे. समाज माध्यमे म्हणजे इंटरनेट व डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित अशी संवादात्मक माध्यमे होत, ज्यांच्या साहाय्याने व्यक्ती, समूह किंवा संस्था परस्परांशी थेट संपर्क साधू शकतात. फेसबुक, व्हॉट्सॲप, यूट्यूब, इंस्टाग्राम, ट्विटर (एक्स) इत्यादी समाज माध्यमांद्वारे माहिती, विचार, अनुभव, भावना, छायाचित्रे व व्हिडिओ यांचे जलद व सुलभ आदान-प्रदान केले जाते. समाज माध्यमांचे प्रमुख स्वरूप म्हणजे द्विमार्गी संवाद, तात्काळ प्रतिसाद, व्यापक पोहोच आणि सक्रिय लोकसहभाग. पारंपरिक माध्यमांपेक्षा समाज माध्यमे अधिक लोकशाही स्वरूपाची असून सामान्य व्यक्तीलाही अभिव्यक्तीचे व्यासपीठ उपलब्ध करून देतात. ग्रामीण भागात मोबाईल फोन व इंटरनेटच्या वाढत्या उपलब्धतेमुळे समाज माध्यमांचा वापर लक्षणीयरीत्या वाढलेला दिसून येतो. ग्रामीण लोक समाज माध्यमांचा उपयोग प्रामुख्याने सामाजिक संवाद, मनोरंजन, शेतीविषयक माहिती, शैक्षणिक मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती तसेच रोजगार व व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी करीत आहेत.

**ग्रामीण भागातील सामाजिक बदलांवर समाज माध्यमांचा प्रभाव:** समाज माध्यमांमुळे ग्रामीण समाजातील सामाजिक बदलांचा वेग लक्षणीयरीत्या वाढलेला दिसून येतो. पारंपरिक काळात प्रत्यक्ष भेटी, गावसभा व सामूहिक उपक्रमांवर आधारित असलेले सामाजिक संबंध आता मोठ्या प्रमाणावर डिजिटल संवादाकडे वळत आहेत. व्हॉट्सॲप, फेसबुक यांसारख्या माध्यमांमुळे नातेवाईक, मित्रमंडळी आणि विविध सामाजिक गट यांच्यातील संपर्क अधिक सुलभ, जलद आणि व्यापक झाला आहे. समाज माध्यमांद्वारे ग्रामीण भागात राजकीय आणि सामाजिक जागृती वाढली आहे. शेतकरी, शेतमजूर, आणि महिलांना आपल्या हक्कांची माहिती मिळत आहे. एकत्र कुटुंब पद्धतीकडून विभक्त कुटुंबाकडे जाण्याचा कल वाढला आहे, तसेच परस्परावलंबित्व कमी होऊन वैयक्तिकत्व वाढत आहे. समाज माध्यमांमुळे जातीविषयक कडक निर्बंध कमी होत असून सामाजिक गतिशीलतेमध्ये बदल होत आहे. सोशल मीडियाने वेगवेगळ्या अशा समुदायात संवादाचे एक सशक्त माध्यम उपलब्ध करून दिले आहे आणि ज्यामुळे भौगोलिकदृष्ट्या विभागणी असलेले लोक एकत्र येतात. अर्थात, त्यामुळे आधीपासून असलेली वेगवेगळी जाती-प्रथा आणखी जास्त सशक्त होते, असेसुद्धा आपण म्हणू शकतो. पूर्वी लग्नासाठी हे लोक ओळखीमध्ये, नात्यागोत्यांमध्ये किंवा मित्रांना सांगून नाती आणली जायची आणि त्यामुळे त्या नात्याला एक विशिष्ट मर्यादा होती आणि आंतरजातीय विवाहसुद्धा मोठ्या प्रमाणावर होत होते. समाज माध्यमांद्वारे शासकीय योजना, आरोग्यविषयक माहिती, कृषी मार्गदर्शन तसेच सामाजिक प्रश्नांवरील चर्चा ग्रामीण भागात पोहोचत असून सामाजिक जागरूकतेत वाढ होत आहे. अनेक सामाजिक उपक्रम, जनआंदोलने आणि समस्या यांना समाज माध्यमांमुळे व्यासपीठ मिळाले आहे. तथापि, या सकारात्मक बदलांसोबतच अफवा, चुकीची माहिती, सायबर गुन्हे, गोपनीयतेचा भंग आणि तरुणांमधील समाज माध्यमांचे व्यसन यांसारख्या सामाजिक समस्या देखील उद्भवत आहेत. त्यामुळे समाज माध्यमांचा वापर सजग आणि जबाबदारीने करणे आवश्यक ठरते.

**सांस्कृतिक बदलांवर समाज माध्यमांचा प्रभाव:** ग्रामीण संस्कृती ही परंपरा, सण-उत्सव, लोककला, लोकसाहित्य आणि सामूहिक मूल्यांवर आधारलेली असते. मात्र समाज माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे ग्रामीण भागात शहरी व जागतिक संस्कृतीचा प्रभाव झपाट्याने वाढताना दिसतो. समाज माध्यमांवरील चित्रफीत, जाहिराती आणि सेलिब्रिटी संस्कृतीमुळे ग्रामीण युवकांच्या पोशाखात, भाषाशैलीत आणि जीवनशैलीत बदल होत आहेत. उदाहरणार्थ, पारंपरिक ग्रामीण पोशाखाऐवजी जीन्स-टीशर्टचा वापर वाढलेला दिसतो तसेच मराठी बोलीभाषेत इंग्रजी शब्दांचा वापर वाढत आहे. मनोरंजनाच्या बाबतीत लोकनृत्ये व लोकगीते यांऐवजी ऑनलाइन व्हिडिओ आणि वेब सिरीज लोकप्रिय होत आहेत. समाज माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे पाश्चात्य पोशाख, चायनीज पदार्थ, आणि पॉप संगीत ग्रामीण जीवनशैलीत मिसळले आहेत. ग्रामीण कलाकार (उदा. लोककला) आपले कलाप्रकार द्वारे जागतिक स्तरावर पोहोचवत आहेत, मात्र पारंपरिक लोकसंस्कृती कमी होण्याची भीतीही आहे. तथापि, समाज माध्यमांचा उपयोग काही ठिकाणी स्थानिक संस्कृतीच्या संवर्धनासाठीही केला जात आहे. उदाहरणार्थ, गावातील यात्रा, कीर्तन, लोककला यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून त्यांची ओळख व्यापक स्तरावर करून दिली जाते. तरीही पाश्चात्त्य संस्कृतीचा अतिरेक पारंपरिक सांस्कृतिक मूल्यांसमोर आव्हान निर्माण करीत आहे.

**शैक्षणिक बदलांवर समाज माध्यमांचा प्रभाव:** समाज माध्यमांनी ग्रामीण भागातील शिक्षणक्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत. समाज माध्यमांनी ग्रामीण भागातील शिक्षणक्षेत्रात नवे पर्याय खुले केले आहेत. ऑनलाइन शिक्षण, शैक्षणिक व्हिडिओ, स्पर्धा परीक्षांची माहिती आणि डिजिटल अभ्यास साहित्य सहज उपलब्ध झाले आहे. विद्यार्थ्यांची माहितीप्राप्ती क्षमता वाढली आहे. पूर्वी मर्यादित साधनांवर अवलंबून असलेले ग्रामीण शिक्षण आज ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून अधिक व्यापक झाले आहे. यूट्यूब, टेलिग्राम, व्हॉट्सअ‍ॅप आणि विविध शैक्षणिक अ‍ॅप्सद्वारे अभ्यासक्रमाशी संबंधित व्हिडिओ, नोट्स आणि मार्गदर्शन सहज उपलब्ध होत आहे. उदाहरणार्थ, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे ग्रामीण विद्यार्थी यूट्यूबवरील मोफत मार्गदर्शन व्हिडिओ आणि ऑनलाइन टेस्ट्सचा लाभ घेत आहेत. तसेच कोविड-१९ काळात ऑनलाइन वर्गांमुळे शिक्षणाची सातत्यता टिकून राहिली. तथापि, इंटरनेट सुविधा नसणे, स्मार्टफोनची अनुपलब्धता आणि डिजिटल साक्षरतेचा अभाव यांमुळे सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळत नाहीत. याशिवाय समाज माध्यमांवरील मनोरंजनात्मक सामग्रीमुळे विद्यार्थ्यांचे लक्ष अभ्यासापासून विचलित होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे समाज माध्यमांचा शैक्षणिक उपयोग नियंत्रित आणि मार्गदर्शित पद्धतीने करणे आवश्यक ठरते.

**समाज माध्यमांमुळे निर्माण झालेली आव्हाने:** समाज माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे ग्रामीण भागात अनेक सामाजिक व सांस्कृतिक आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यापैकी महत्त्वाचे आव्हान म्हणजे सोशल मीडियावरून चुकीची माहिती किंवा अफवा पसरल्याने सामाजिक शांतता धोक्यात येण्याची शक्यता असते. लहान मुले आणि तरुणांमध्ये मोबाईलचे व्यसन वाढत आहे. आणखी एक महत्त्वाचे आव्हान म्हणजे डिजिटल दरी जिथे इंटरनेट, स्मार्टफोन किंवा डिजिटल कौशल्यांचा अभाव असलेल्या घटकांना समाज माध्यमांचे फायदे मिळत नाहीत. यामुळे शिक्षण व माहितीप्राप्तीत असमानता वाढते. तसेच समाज माध्यमांमुळे पिढीतील संघर्ष वाढताना दिसतो; उदाहरणार्थ, तरुण पिढी आधुनिक विचारसरणी स्वीकारत असताना ज्येष्ठ पिढी पारंपरिक मूल्यांवर ठाम राहते. चुकीची माहिती व अफवा समाज माध्यमांद्वारे वेगाने पसरतात, ज्यामुळे सामाजिक तणाव निर्माण होतो. काही गावांत अफवांमुळे गैरसमज व वाद निर्माण झाल्याची उदाहरणे आढळतात. याशिवाय गोपनीयतेचा प्रश्न गंभीर ठरत असून वैयक्तिक माहितीचा गैरवापर होत आहे. विशेषतः ग्रामीण युवकांमध्ये समाज माध्यमांचे व्यसन लागणे, वेळेचा अपव्यय आणि अभ्यास व कामाकडे दुर्लक्ष होणे ही चिंताजनक बाब ठरत आहे.

**उपाययोजना व सूचना:** ग्रामीण भागात समाज माध्यमांचा सकारात्मक व उपयुक्त वापर वाढवण्यासाठी सर्वप्रथम डिजिटल साक्षरता कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत, शाळा आणि महाविद्यालयांच्या माध्यमातून इंटरनेट वापर, सायबर सुरक्षितता आणि माहितीची सत्यता तपासण्याचे प्रशिक्षण दिल्यास समाज माध्यमांचा गैरवापर टाळता येईल. उदाहरणार्थ, काही जिल्ह्यांत राबविण्यात येणाऱ्या डिजिटल ग्राम उपक्रमांमुळे ग्रामीण नागरिकांमध्ये ऑनलाइन व्यवहार आणि माहिती वापराची जाणीव वाढली आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी समाज माध्यमांचा शैक्षणिक उपयोग वाढविण्यासाठी शैक्षणिक व्हॉट्सअ‍ॅप गट, यूट्यूब चॅनेल आणि ऑनलाइन अभ्यासक्रम प्रभावी ठरू शकतात. समाज माध्यमांचा वापर सामाजिक विकास, कृषी माहिती, आरोग्यजागरूकता आणि शासकीय योजनांची माहिती प्रसारित करण्यासाठी केला पाहिजे. याशिवाय स्थानिक सण, लोककला व परंपरा यांचे डिजिटल दस्तऐवजीकरण करून सांस्कृतिक संवर्धन साधता येईल. या दृष्टीने शासन, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक समाज यांनी संयुक्तपणे पुढाकार घेणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष:** समाज माध्यमांनी ग्रामीण भागातील सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक जीवनावर खोलवर परिणाम घडवून आणला आहे. सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही बाजू लक्षात घेता, समाज माध्यमे ही ग्रामीण परिवर्तनाची प्रभावी साधने ठरली आहेत. सामाजिक संवाद अधिक व्यापक व वेगवान झाला असून जनजागृती, माहितीप्रसार आणि सामाजिक सहभागात वाढ झाली आहे. सांस्कृतिक स्तरावर ग्रामीण समाज अधिक खुला झाला असला तरी परंपरागत मूल्ये आणि आधुनिक संस्कृती यांच्यात संघर्ष निर्माण होत आहे. शैक्षणिक क्षेत्रात समाज माध्यमांनी ज्ञानसंपादनाच्या नव्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत; मात्र डिजिटल साक्षरतेचा अभाव आणि गैरवापरामुळे काही अडचणीही समोर आल्या आहेत. त्यामुळे समाज माध्यमांचा प्रभाव पूर्णतः सकारात्मक किंवा नकारात्मक असा एकांगी नाही. योग्य मार्गदर्शन, जागरूकता आणि संतुलित वापर केल्यास समाज माध्यमे ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी साधन ठरू शकतात. म्हणूनच समाज माध्यमांचा सकारात्मक उपयोग वाढविणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ सूची :**


1. मुकुंद भालेराव –सामाजिक माध्यमे महत्व व उपयोग, 17 जुले 2020.
2. अनिलकुमार उपाध्याय –मास मिडिया एवं विकास के आयाम.
3. अरविंद मोहन – मिडिया, समाज और बाजार
4. अनिमेष, शर्मा. - सोशल मीडिया प्लेटफॉर्म का उपयोग
5. शाम चरण दुबे –विकासाचे समाजशास्त्र
6. जनसंदेश टाइम्स, 5 जनवरी 2024
7. लोकराज्य विशेषांक, डिसेंबर 2023


# प्रसार माध्यमे आणि ग्रामीण समाज: एक सामाजिक व विकासात्मक अभ्यास


**शुभांगी गोविंदराव चौधरी** संशोधक संशोधन केंद्र : डॉ.बाबासाहेब आंबेडकर आर्ट, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, ब्रम्हपुरी

**डॉ. स्निग्धा आर. कांबळे** मार्गदर्शक डॉ.बाबासाहेब आंबेडकर आर्ट, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, ब्रम्हपुर



**गोषवारा:** प्रसार माध्यमे आधुनिक समाजरचनेचा एक अत्यंत महत्त्वाचा व अविभाज्य घटक बनली आहेत. माहिती प्रसार, शिक्षण, मनोरंजन, जनजागृती आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात प्रसार माध्यमांची भूमिका दिवसेंदिवस अधिक प्रभावी होत आहे. भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण समाज हा लोकसंख्येचा मोठा भाग असल्यामुळे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत प्रसार माध्यमांचे स्थान विशेष महत्त्वाचे ठरते. रेडिओ, दूरदर्शन, वृत्तपत्रे, मोबाईल फोन, इंटरनेट व सोशल मीडिया यांसारख्या माध्यमांनी ग्रामीण समाजाच्या जीवनशैलीत लक्षणीय बदल घडवून आणले आहेत. ग्रामीण भागातील लोकांच्या विचारप्रणाली, सामाजिक जाणीवा, कृषी तंत्रज्ञान, आरोग्यविषयक सवयी, शिक्षणाविषयीची दृष्टी तसेच शासकीय योजना व धोरणांची माहिती पोहोचविण्यात प्रसार माध्यमांनी मोलाची भूमिका बजावली आहे. विशेषतः कृषी कार्यक्रम, आरोग्य जनजागृती मोहिमा, महिला सक्षमीकरण, बालकल्याण आणि शिक्षणविषयक उपक्रम यांमुळे ग्रामीण समाजात सकारात्मक परिवर्तन दिसून येते. मोबाईल व इंटरनेटमुळे ग्रामीण भाग जागतिक माहितीप्रवाहाशी जोडला गेला असून ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या आहेत.

या संशोधन निबंधाचा मुख्य उद्देश ग्रामीण समाजावर प्रसार माध्यमांचा होणारा सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक परिणाम अभ्यासणे हा आहे. सदर अभ्यास वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीवर आधारित असून विविध दुय्यम माहिती स्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. अभ्यासातून असे निदर्शनास येते की योग्य नियोजन, स्थानिक भाषा व संस्कृतीचा विचार, तसेच माध्यम साक्षरतेचा विकास केल्यास प्रसार माध्यमे ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी साधन ठरू शकतात. मात्र, चुकीची माहिती, सांस्कृतिक मूल्यांतील बदल, अतिरेकी माध्यम वापर व व्यसनाधीनता यांसारख्या नकारात्मक परिणामांकडेही गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.


**कीवर्ड्स:** प्रसार माध्यमे, ग्रामीण समाज, विकास, संप्रेषण

**प्रस्तावना:** भारतीय समाजरचनेत ग्रामीण समाजाला अनन्यसाधारण, मूलभूत व केंद्रस्थानी असलेले महत्त्व आहे. भारत हा ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या “खेड्यांचा देश” म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्यानंतर अनेक दशके लोटली असली तरी आजही भारतातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. त्यामुळे ग्रामीण समाज हा भारतीय समाजव्यवस्थेचा कणा मानला जातो. ग्रामीण समाजाची जीवनपद्धती ही परंपरा, रूढी-परंपरा, सामाजिक मूल्ये, धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक वारसा आणि सामूहिक सहजीवन या घटकांवर आधारित आहे. कुटुंबव्यवस्था, जातीय रचना, परस्परावलंबन, सहकार्य आणि सामाजिक नातेसंबंध हे ग्रामीण जीवनाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहेत.

कृषी हा ग्रामीण समाजाचा मुख्य व्यवसाय असून निसर्गाशी असलेली घनिष्ठ नाळ ग्रामीण जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये दिसून येते. पर्जन्यमान, हवामान, जमीन, पिकपद्धती आणि पशुपालन यांचा ग्रामीण समाजाच्या आर्थिक व सामाजिक रचनेवर खोलवर परिणाम होत असतो. यासोबतच स्थानिक सण-उत्सव, लोककला, लोकसाहित्य आणि परंपरागत ज्ञानप्रणाली ग्रामीण संस्कृतीचे जतन करतात. त्यामुळे ग्रामीण समाज हा केवळ उत्पादन करणारा घटक नसून तो भारतीय संस्कृतीचा आत्मा आणि परंपरेचा वाहक मानला जातो. तथापि, औद्योगिकीकरण, शहरीकरण, जागतिकीकरण आणि विज्ञान-तंत्रज्ञानातील झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे ग्रामीण समाजातही व्यापक, बहुआयामी आणि वेगवान परिवर्तन घडताना दिसून येते. पारंपरिक ग्रामीण जीवनशैलीत आधुनिकतेचा प्रभाव वाढत असून शिक्षण, आरोग्यसेवा, रोजगाराच्या संधी, कृषी तंत्रज्ञान, वाहतूक व दळणवळण, तसेच माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये लक्षणीय बदल घडून आले आहेत. ग्रामीण समाज हळूहळू पारंपरिकतेतून आधुनिकतेकडे वाटचाल करत आहे. या परिवर्तन प्रक्रियेमुळे ग्रामीण समाजासमोर नव्या संधींसोबतच नवी आव्हानेही उभी राहिली आहेत. या सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत प्रसार माध्यमांनी अत्यंत महत्त्वाची, प्रभावी आणि मार्गदर्शक भूमिका बजावलेली आहे. प्रसार माध्यमे म्हणजे माहिती, विचार, ज्ञान, मूल्ये, दृष्टिकोन आणि संदेश यांचा व्यापक प्रमाणात समाजात प्रसार करणारी साधने होय. रेडिओ, दूरदर्शन, वृत्तपत्रे आणि मासिके ही पारंपरिक माध्यमे ग्रामीण समाजात दीर्घकाळ प्रभावी राहिली आहेत. विशेषतः

रेडिओ आणि दूरदर्शनने शिक्षण, कृषीविषयक माहिती, आरोग्य जनजागृती आणि शासकीय योजना ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे.

अलीकडील काळात मोबाईल फोन, इंटरनेट, सोशल मीडिया आणि विविध डिजिटल प्लॅटफॉर्म्स यांच्या प्रसारामुळे ग्रामीण समाजाची माहितीपर दुनिया अधिक व्यापक झाली आहे. ई-गव्हर्नन्स, डिजिटल बँकिंग, ऑनलाइन शिक्षण, कृषी सल्ला, आरोग्य सेवा आणि रोजगारविषयक माहिती ग्रामीण भागापर्यंत पोहोचू लागली आहे. परिणामी ग्रामीण समाजाचा संपर्क स्थानिक मर्यादांपलीकडे जाऊन राष्ट्रीय व जागतिक पातळीवर प्रस्थापित होत आहे. शिक्षणाचा प्रसार, महिला सक्षमीकरण, सामाजिक सुधारणा, युवकांचा सहभाग आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्यात प्रसार माध्यमांचा प्रभाव लक्षणीय स्वरूपाचा आहे.

स्क्रॅम ( 1964) यांच्या मते प्रसार माध्यमे ही विकास प्रक्रियेला गती देणारी एक महत्त्वपूर्ण सामाजिक यंत्रणा असून ती सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरतात. माध्यमांद्वारे ज्ञानाचा प्रसार होतो, नवकल्पनांचा स्वीकार सुलभ होतो, वृत्ती व वर्तनात बदल घडतो आणि विकास प्रक्रियेत लोकांचा सहभाग वाढतो. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने प्रसार माध्यमांचा सखोल, समग्र आणि समीक्षात्मक अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

सदर अभ्यास ग्रामीण समाज आणि प्रसार माध्यमांमधील परस्परसंबंध समजून घेण्याचा, माध्यमांचा ग्रामीण जीवनावर होणारा प्रभाव विश्लेषित करण्याचा तसेच ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत प्रसार माध्यमांची भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** प्रसारमाध्यमे आणि समाज यांमधील परस्परसंबंध हा सामाजिक शास्त्रातील अभ्यासाचा एक महत्त्वाचा विषय राहिला आहे. विविध अभ्यासकांनी माध्यमांचा समाजावर होणारा प्रभाव, त्याची दिशा आणि मर्यादा यांचा सखोल अभ्यास केला आहे. प्रारंभीच्या संशोधनांमध्ये माध्यमांचा प्रभाव थेट व सर्वसमावेशक असल्याचे मानले जात होते; परंतु नंतरच्या अभ्यासांनी या दृष्टिकोनाला आव्हान दिले. लेझर्सफेल्ड (Lazarsfeld) यांच्या मर्यादित प्रभाव सिद्धांतानुसार प्रसार माध्यमांचा प्रभाव थेट न होता तो कुटुंब, मित्र, स्थानिक नेतृत्व, सामाजिक संस्था आणि सांस्कृतिक घटकांद्वारे घडतो. त्यामुळे ग्रामीण समाजातील माध्यम प्रभाव समजून घेताना सामाजिक संरचनेचा विचार करणे आवश्यक ठरते. विकसनशील देशांच्या संदर्भात स्क्रॅम (1964) यांनी प्रसार माध्यमांना विकास प्रक्रियेतील एक प्रभावी साधन म्हणून अधोरेखित केले आहे. त्यांच्या मते माध्यमे शिक्षणाचा प्रसार, नवकल्पनांचा स्वीकार, आधुनिक मूल्यांची निर्मिती आणि सामाजिक सहभाग वाढविण्यास मदत करतात. विशेषतः ग्रामीण भागात शिक्षण, कृषी तंत्रज्ञान, आरोग्य आणि लोकशाही प्रक्रियांमध्ये माध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.

भारतीय संदर्भात देसाई (2005) यांनी ग्रामीण समाजरचनेचा सखोल अभ्यास करून ग्रामीण जीवनातील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक घटक स्पष्ट केले आहेत. त्यांच्या अभ्यासातून असे दिसून येते की ग्रामीण समाजातील परंपरा आणि आधुनिकतेतील संघर्षात प्रसार माध्यमे मध्यस्थाची भूमिका बजावतात. कुमार (1999) यांच्या मते भारतात प्रसार माध्यमांनी ग्रामीण भागात माहितीप्रवेश वाढवून ज्ञानातील दरी कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. रेडिओ व दूरदर्शनसारख्या माध्यमांनी शासकीय योजना, कृषी माहिती आणि सामाजिक संदेश ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचविले आहेत. सिंघल आणि रोगर्स ( 2001) यांनी संप्रेषण क्रांती या संकल्पनेद्वारे ग्रामीण भारतात घडून आलेल्या सामाजिक बदलांचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या अभ्यासानुसार नवमाध्यमांमुळे सामाजिक संवाद वाढला असून विकास प्रक्रियेत लोकांचा सक्रिय सहभाग वाढला आहे. तथापि, काही संशोधनांमध्ये प्रसार माध्यमांमुळे सांस्कृतिक प्रदूषण, पाश्चात्त्य संस्कृतीचा अतिरेकी प्रभाव, तसेच चुकीची व अप्रामाणिक माहिती प्रसारित होण्याचे दुष्परिणामही अधोरेखित केले आहेत (यादव, 2010). वरील सर्व अभ्यासांचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की प्रसार माध्यमे ग्रामीण समाजाच्या विकासासाठी प्रभावी साधन असली तरी त्यांचा प्रभाव सामाजिक परिस्थिती, सांस्कृतिक संदर्भ आणि माध्यम साक्षरतेवर अवलंबून असतो. ग्रामीण समाजाच्या संदर्भात माध्यमांचा संतुलित व संदर्भानुरूप अभ्यास करणे अत्यावश्यक आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टे:** ग्रामीण समाजाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास प्रक्रियेत प्रसार माध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. माहितीचा प्रसार, जनजागृती, शिक्षण तसेच सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात माध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेता, ग्रामीण समाजावर त्यांचा नेमका कसा आणि किती परिणाम होतो याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. प्रसार माध्यमे ग्रामीण विकासासाठी एक प्रभावी साधन ठरू शकतात; परंतु त्याचबरोबर काही नकारात्मक परिणामही उद्‌भवू शकतात. या पार्श्वभूमीवर सदर अध्ययनात प्रसार माध्यमांचा ग्रामीण समाजावर होणारा प्रभाव समजून घेण्याचा व त्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**सदर अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :** 1) ग्रामीण समाजावर प्रसार माध्यमांचा होणारा प्रभाव अभ्यासणे. 2) ग्रामीण विकास प्रक्रियेत प्रसार माध्यमांची भूमिका विश्लेषित करणे

**गृहितके:** कोणत्याही सामाजिक संशोधनामध्ये गृहितके ही अभ्यासाची दिशा निश्चित करणारी एक अत्यंत महत्त्वाची संकल्पना असते. गृहितकांच्या माध्यमातून संशोधक संशोधनाच्या केंद्रबिंदूवर असलेल्या समस्येकडे विशिष्ट दृष्टीकोनातून पाहण्याचा प्रयत्न करतो. प्रत्यक्ष माहिती संकलन करण्यापूर्वी अभ्यासक उपलब्ध साहित्याचा सखोल अभ्यास करतो, संबंधित सैद्धांतिक चौकटींचा विचार करतो तसेच विद्यमान सामाजिक वास्तवाचे विश्लेषण करून काही तर्काधारित व परीक्षणयोग्य विधानांची मांडणी करतो. ही गृहितके संशोधन प्रक्रियेला शिस्तबद्ध स्वरूप देतात आणि अभ्यासकाला अनावश्यक माहितीपासून दूर ठेवण्यास मदत करतात.

संशोधन प्रक्रियेत गृहितकांचे महत्त्व केवळ दिशादर्शक एवढेच मर्यादित नसून ती माहिती संकलन, वर्गीकरण, विश्लेषण आणि निष्कर्ष मांडणी या सर्व टप्प्यांमध्ये प्रभावी भूमिका बजावतात. संकलित माहिती गृहितकांच्या कसोटीवर तपासली जाते आणि त्या आधारे संशोधनातील तर्कसंगती, सत्यता व विश्वसनीयता अधोरेखित केली जाते. त्यामुळे गृहितके ही संशोधन प्रक्रियेची बौद्धिक

चौकट म्हणून कार्य करतात. ग्रामीण समाज आणि प्रसार माध्यमे यांमधील परस्परसंबंधांचा अभ्यास करताना माध्यमांचा प्रभाव हा एकांगी, सरळ किंवा सर्वसमावेशक नसून तो बहुआयामी, संदर्भनिष्ठ आणि कालानुसार बदलणारा असतो. सामाजिक रचना, सांस्कृतिक पार्श्वभूमी, शिक्षणाची पातळी, आर्थिक स्थिती, तांत्रिक उपलब्धता आणि माध्यम साक्षरता यांसारख्या घटकांवर माध्यमांचा प्रभाव अवलंबून असतो. त्यामुळे प्रसार माध्यमे ग्रामीण समाजावर सकारात्मक परिणाम घडवून आणू शकतात तसेच काही प्रसंगी नकारात्मक सामाजिक परिणामही निर्माण करू शकतात.

या पार्श्वभूमीवर सदर संशोधनामध्ये ग्रामीण समाज आणि प्रसार माध्यमे यांमधील संबंधांचे वस्तुनिष्ठ व संतुलित विश्लेषण करण्याच्या दृष्टीने ही गृहितके मांडण्यात आली आहेत. ही गृहितके ग्रामीण विकासात माध्यमांची भूमिका समजून घेण्यास, त्यांच्या प्रभावाचे स्वरूप स्पष्ट करण्यास आणि संशोधनातून प्राप्त निष्कर्षांना शास्त्रीय अधिष्ठान देण्यास उपयुक्त ठरतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येतो.

**सदर अध्ययनासाठी मांडण्यात आलेली गृहितके पुढीलप्रमाणे आहेत:** 1. प्रसार माध्यमांचा ग्रामीण समाजाच्या विकासावर सकारात्मक प्रभाव पडतो. 2. माध्यम साक्षरतेअभावी प्रसार माध्यमांचे काही नकारात्मक परिणाम ग्रामीण समाजात दिसून येतात.

**अध्ययन पद्धती** - सदर संशोधनामध्ये ग्रामीण समाजावर प्रसार माध्यमांचा होणारा सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक प्रभाव समजून घेण्यासाठी वर्णनात्मक (Descriptive) तसेच विश्लेषणात्मक (Analytical) संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. वर्णनात्मक पद्धतीच्या सहाय्याने ग्रामीण समाजातील प्रसार माध्यमांची भूमिका, स्वरूप आणि उपयोग यांचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे, तर विश्लेषणात्मक पद्धतीद्वारे माध्यमांच्या प्रभावाचे विविध पैलू तपासून त्यांचे अर्थपूर्ण विश्लेषण करण्यात आले आहे. या अभ्यासासाठी प्रामुख्याने दुय्यम माहिती स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. दुय्यम माहिती संकलनासाठी पुस्तके, संशोधन निबंध, शोधनियतकालिके, संदर्भ ग्रंथ, सरकारी अहवाल, जनगणना अहवाल, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांचे प्रकाशन तसेच विश्वसनीय ई-स्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. विशेषतः ग्रामीण विकास, संप्रेषण अभ्यास, समाजशास्त्र आणि माध्यम अभ्यासाशी संबंधित साहित्याचा अभ्यास करून आवश्यक माहिती संकलित करण्यात आली आहे.

संकलित माहितीचे प्रथम टप्प्यात वर्गीकरण व संहिताकरण (Classification and Coding) करण्यात आले आहे. त्यानंतर प्राप्त माहितीचे तर्कसंगत, तुलनात्मक आणि समीक्षात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. विविध अभ्यासकांच्या मतांची तुलना करून प्रसार माध्यमांचा ग्रामीण समाजावर होणारा सकारात्मक व नकारात्मक परिणाम स्पष्ट करण्यात आला आहे.

तसेच, अभ्यासात उपलब्ध साहित्याच्या आधारे निष्कर्ष काढून त्यावर आधारित सूचनांची व शिफारसींची मांडणी करण्यात आली आहे. सदर संशोधन पद्धतीमुळे प्रसार माध्यमे आणि ग्रामीण समाज यांमधील परस्परसंबंध अधिक स्पष्टपणे समजून घेण्यास मदत झाली असून ग्रामीण विकासाच्या दृष्टीने माध्यमांच्या उपयोगाबाबत दिशादर्शक निष्कर्ष प्राप्त झाले आहेत.

**तथ्यांचे विश्लेषण:** सदर अभ्यासात ग्रामीण समाजात वापरल्या जाणाऱ्या विविध प्रसार माध्यमांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक पातळीवर होणारा प्रभाव अभ्यासण्यात आला आहे. या विश्लेषणाचा आधार अभ्यासाची उद्दिष्टे व मांडलेली गृहितके ही आहेत. ग्रामीण समाजात पारंपरिक तसेच आधुनिक अशा दोन्ही प्रकारच्या प्रसार माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणावर होताना दिसून येतो. ग्रामीण भागात रेडिओ हे सर्वात जुने, सुलभ व प्रभावी माध्यम मानले जाते. कृषीविषयक माहिती, हवामान अंदाज, शासकीय योजना, पीक सल्ला आणि जनजागृतीपर कार्यक्रम रेडिओद्वारे ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवले जातात. यामुळे शेतकऱ्यांना निर्णय घेण्यास मदत होते आणि कृषी उत्पादनक्षमतेत सुधारणा घडून येते. हे निरीक्षण "प्रसार माध्यमांचा ग्रामीण समाजाच्या विकासावर सकारात्मक प्रभाव पडतो" या पहिल्या गृहितकाला पुष्टी देणारे आहे. दूरदर्शनमुळे दृश्य माध्यमाच्या साहाय्याने शिक्षण, आरोग्य, सामाजिक प्रश्न, महिला सक्षमीकरण आणि सरकारी योजनांची माहिती प्रभावीपणे ग्रामीण भागात पोहोचली आहे. शैक्षणिक कार्यक्रम, माहितीपट आणि सामाजिक संदेशांमुळे ग्रामीण लोकांमध्ये शिक्षणाची जाणीव, आरोग्यविषयक जागरूकता व सामाजिक संवेदनशीलता वाढल्याचे दिसून येते. हे माध्यम ग्रामीण विकास प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे स्पष्ट होते, जे अभ्यासाच्या दुसऱ्या उद्दिष्टाशी सुसंगत आहे. वृत्तपत्रांमुळे ग्रामीण समाजात वाचनाची सवय, सामाजिक जाणीव व राजकीय जागरूकता वाढली आहे. स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींची माहिती मिळाल्यामुळे ग्रामीण नागरिक अधिक सजग आणि माहितीपूर्ण बनले आहेत. यामुळे लोकशाही प्रक्रियेत ग्रामीण जनतेचा सहभाग वाढत असल्याचेही लक्षात येते.

अलीकडील काळात मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडिया यांमुळे ग्रामीण तरुणांमध्ये माहितीप्रवेश लक्षणीयरीत्या वाढला आहे. शिक्षण, रोजगार संधी, बाजारभाव, शासकीय योजना आणि तांत्रिक माहिती यांचा वेगवान प्रसार होत आहे. सिंघल आणि रोगर्स (2001) यांच्या मते, या आधुनिक माध्यमांमुळे ग्रामीण समाज जागतिक समाजाशी जोडला गेला असून माहितीचा प्रवाह अधिक सुलभ झाला आहे. हे निरीक्षण ग्रामीण विकासात माध्यमांची सकारात्मक भूमिका अधोरेखित करते. तथापि, या विश्लेषणातून दुसऱ्या गृहितकासही दुजोरा मिळतो. माध्यम साक्षरतेअभावी प्रसार माध्यमांचे काही नकारात्मक परिणाम ग्रामीण समाजात दिसून येत आहेत. चुकीची माहिती, अफवा, अपप्रचार आणि भ्रामक संदेश सोशल मीडियाद्वारे वेगाने पसरताना आढळतात. यादव (2010) यांच्या अभ्यासानुसार अशा माहितीमुळे सामाजिक गैरसमज, भीती आणि तणाव निर्माण होऊ शकतो. याशिवाय मोबाईल, इंटरनेट आणि मनोरंजनप्रधान माध्यमांचा अतिरेकी वापर ग्रामीण तरुणांमध्ये व्यसनाधीनता, वेळेचा अपव्यय, शैक्षणिक दुर्लक्ष आणि पारंपरिक सांस्कृतिक मूल्यांपासून दूर जाणे यांसारख्या समस्या निर्माण करीत आहे. यामुळे सामाजिक नातेसंबंध आणि सामूहिक जीवनपद्धतीवरही नकारात्मक परिणाम होत असल्याचे दिसून येते.

एकूणच तथ्यांच्या विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की प्रसार माध्यमांचा ग्रामीण समाजावर प्रभाव दुहेरी स्वरूपाचा आहे. योग्य वापर आणि माध्यम साक्षरतेच्या आधारे प्रसार माध्यमे ग्रामीण विकासाला चालना देणारे प्रभावी साधन ठरतात, तर अयोग्य

वापरामुळे काही सामाजिक व सांस्कृतिक समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे दोन्ही गृहितके या अभ्यासातील तथ्यांच्या विश्लेषणातून योग्य प्रकारे अधोरेखित होतात.

**निष्कर्ष:** सदर अभ्यासातून असे स्पष्ट होते की प्रसार माध्यमे ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत प्रभावी, गतिमान आणि परिवर्तनकारी साधन म्हणून कार्य करतात. ग्रामीण समाजात माहितीचा अभाव, शिक्षणाची मर्यादा आणि विकास प्रक्रियेत सहभागी होण्यातील अडथळे दूर करण्यासाठी माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात. कृषी, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, बालकल्याण, सामाजिक जागरूकता तसेच लोकशाही प्रक्रियांमध्ये ग्रामीण जनतेचा सहभाग वाढविण्यात प्रसार माध्यमांचे योगदान लक्षणीय आहे. योग्य नियोजन, स्थानिक गरजांचा विचार, स्थानिक भाषेचा वापर आणि विश्वासार्ह व उपयुक्त माहिती दिल्यास प्रसार माध्यमे ग्रामीण जीवनमान उंचावण्यास मदत करतात. रेडिओ व दूरदर्शनसारख्या पारंपरिक माध्यमांपासून ते मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडिया यांसारख्या आधुनिक माध्यमांपर्यंत सर्वच साधनांचा संतुलित वापर ग्रामीण समाजाच्या विकासासाठी परिणामकारक ठरू शकतो. विशेषत: डिजिटल माध्यमांमुळे ग्रामीण भाग जागतिक ज्ञानप्रवाहाशी जोडला गेला असून माहितीपर असमतोल कमी होण्यास हातभार लागला आहे. तथापि, अभ्यासातून हेही निदर्शनास येते की माध्यम साक्षरतेअभावी प्रसार माध्यमांचे काही नकारात्मक परिणाम उद्‌भवू शकतात. चुकीची माहिती, अफवा, सांस्कृतिक मूल्यांतील अतिरेकी बदल, माध्यम व्यसनाधीनता आणि वेळेचा अपव्यय या समस्या ग्रामीण समाजासमोर आव्हान म्हणून उभ्या राहतात. त्यामुळे प्रसार माध्यमांचा अंधानुकरणात्मक किंवा अतिरेकी वापर टाळणे आवश्यक आहे.

एकूणच, प्रसार माध्यमांचा ग्रामीण समाजावर होणारा प्रभाव हा एकांगी नसून तो बहुआयामी स्वरूपाचा आहे. माध्यमांचा संतुलित, विवेकपूर्ण आणि जबाबदार वापर, तसेच माध्यम साक्षरतेचा प्रसार केल्यास प्रसार माध्यमे ग्रामीण समाजाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी प्रभावी साधन ठरू शकतात, असा निष्कर्ष या अभ्यासातून काढता येतो.

**शिफारसी:** ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रसार माध्यमांचा प्रभावी, संतुलित आणि जबाबदार वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. अभ्यासातून स्पष्ट होते की योग्य दिशा, नियोजन आणि मार्गदर्शन मिळाल्यास प्रसार माध्यमे ग्रामीण जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाचे साधन ठरू शकतात. मात्र, माध्यमांचा अयोग्य वापर टाळण्यासाठी तसेच त्यांचे सकारात्मक परिणाम अधिक वाढविण्यासाठी काही ठोस व व्यवहार्य शिफारसींची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर सदर अभ्यासाच्या आधारे पुढील शिफारसी मांडण्यात येत आहेत. प्रथम, ग्रामीण भागाच्या गरजा, भाषा, संस्कृती आणि सामाजिक वास्तव लक्षात घेऊन स्थानिक भाषेत विकासाभिमुख कार्यक्रमांची निर्मिती करणे आवश्यक आहे. कृषी, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, स्वच्छता आणि रोजगार यांसारख्या विषयांवर आधारित कार्यक्रम अधिक प्रमाणात तयार केल्यास ग्रामीण जनतेचा सहभाग वाढेल.

दुसरे म्हणजे, ग्रामीण जनतेमध्ये माध्यम साक्षरता वाढविण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. माध्यमांमधील माहितीचे सत्यापन कसे करावे, योग्य व अयोग्य माहिती ओळखण्याची क्षमता कशी विकसित करावी आणि माध्यमांचा विवेकपूर्ण वापर कसा करावा याबाबत जनजागृती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तिसरे, चुकीची माहिती, अफवा आणि दिशाभूल करणाऱ्या संदेशांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी व पारदर्शक यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी शासन, माध्यम संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी समन्वयाने कार्य करणे गरजेचे आहे. शेवटी, ग्रामीण समाजाच्या गरजांना पूरक अशी शैक्षणिक, कृषी व आरोग्यविषयक सामग्री माध्यमांमध्ये अधिक प्रमाणात समाविष्ट करावी. वैज्ञानिक, उपयुक्त आणि व्यवहार्य माहिती उपलब्ध झाल्यास ग्रामीण विकासाची प्रक्रिया अधिक वेगवान व परिणामकारक ठरू शकते. ग्रामीण भागासाठी स्थानिक भाषेत विकासाभिमुख कार्यक्रम तयार करावेत. माध्यम साक्षरता कार्यक्रम राबवावे. चुकीच्या माहितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करावी. शैक्षणिक, कृषी व आरोग्यविषयक सामग्री वाढवावी.

**References -**

1) Desai, A. R. (2005). Rural sociology in India (6th ed.). Mumbai, India: Popular Prakashan. Government of India. (2018). Rural development annual report. New Delhi, India: Ministry of Rural Development.
2) Kumar, K. J. (1999). Mass communication in India. New Delhi, India: Jaico Publishing House. Schramm, W. (1964). Mass media and national development: The role of information in the developing countries. Stanford, CA: Stanford University Press.
3) Singhal, A., & Rogers, E. M. (2001). India's communication revolution: From bullock carts to cyber marts. New Delhi, India: Sage Publications.
4) Yadav, C. P. (2010). Role of mass media in rural development. Indian Journal of Social Research, 51(2), 235–248.

# नाशिक जिल्हयातील ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य, शासकीय योजना व उपाय योजना: एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. दिपक हरिभाऊ शिंदे** सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख,समाजशास्त्र विभाग, के.टी,एच.एम. कॉलेज नाशिक

**गोषवारा:** ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य म्हणजेच सक्षम कुटुंब, सशक्त समाज आणि समृद्ध राष्ट्र होय. प्रत्यक्षात कष्टप्रद जीवनशैलीत स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा जिल्हा असून येथे आदिवासी, डोंगराळ, दुष्काळग्रस्त तसेच शेतीप्रधान ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणावर आहे. या भागातील ग्रामीण स्त्रिया शेती, मजुरी, घरकाम, पशुपालन अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळत असतात. मात्र या कष्टप्रद जीवनशैलीत स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होणे हे एक सामान्य वास्तव आहे.कुपोषण, अपुरी आरोग्यसेवा, सामाजिक बंधने व आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी प्रभावी धोरणे, जनजागृती आणि स्त्री सक्षमीकरण आवश्यक आहे. निरोगी ग्रामीण स्त्री ही विकासाची खरी शक्ती आहे.म्हणून तिच्या आरोग्याकडे कल्याणकारी नव्हे, तर विकासात्मक दृष्टीने पाहणे काळाची गरज आहे.

**प्रस्तावना:** कोणत्याही समाजाची वास्तविक परीस्थिती जाणून घ्यावयाची असेल तर त्यासठी सर्वोत्तम उपाय म्हणजे स्त्रियांचे आरोग्यस्थिती समजावून घेणे होय. जगभरात आर्धी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. तसे पहिले तर आरोग्यदायी जीवन प्राप्त करून देणे हे प्रत्येक राज्याचे कर्तव्य आहे. चांगले आरोग्य मिळविणे हा प्रत्येक नागरिकांचा हक्क आहे. आरोग्य हा मानवी विकासाचा मूलभूत घटक आहे. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी स्त्रियांचे आरोग्य सक्षम असणे अत्यावश्यक आहे. भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य अनेक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक घटकांवर अवलंबून आहे. नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा जिल्हा असून येथे आदिवासी, डोंगराळ, दुष्काळग्रस्त तसेच शेतीप्रधान ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणावर आहे. या भागातील ग्रामीण स्त्रिया शेती, मजुरी, घरकाम, पशुपालन अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळत असतात. मात्र या कष्टप्रद जीवनशैलीत स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होणे हे एक सामान्य वास्तव आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्याची सद्यस्थिती, त्यांच्यापुढील समस्या, कारणे आणि उपाय योजनांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यस्थितीचा अभ्यास करणे. २) ग्रामीण स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख आरोग्य समस्यांची ओळख पटवणे. ३) आरोग्य समस्यांमागील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक कारणांचा अभ्यास करणे. ४) शासनाच्या आरोग्यविषयक योजना व त्यांची प्रभावी अंमलबजावणी यांचे विश्लेषण करणे. ५) ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य सुधारण्यासाठी उपाय योजना सुचवणे.

**गृहीतकृत्ये:** ग्रामीण स्त्रियांच्या जीवनात अतिश्रम व अपुरा आहार मिळतो. अशिक्षितपणामुळे ग्रामीण स्त्रियांमध्ये आरोग्य योजनांची जनजागृती कमी आहे. महिलांना त्यांच्या हक्कांची आणि योजनांची माहिती नसते. ग्रामीण आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक सुविधा, औषधे आणि प्रशिक्षित कर्मचारी कमी आहे. वरील सर्व घटकांचा सर्वाधिक प्रभाव स्रीयांच्या आरोग्यावर होतो.

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत अध्ययनाचा मुख्य हेतू नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख आरोग्य समस्यांचा अभ्यास करणे, स्त्रियांमधील कुपोषण समस्या, बालविवाह समस्या अभ्यास करणे हा आहे. तसेच या ग्रामीण स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख आरोग्य समस्यांचा, शासनाच्या आरोग्यविषयक योजनांची चिकित्सक समाजस्थितीचा अभ्यास तृणमूल पातळीवर केला आहे. या अभ्यासात संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही अभ्यास पद्धतींचा वापर केला आहे. तसेच सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला. प्राथमिक माहिती निरीक्षण व उपलब्ध अहवालांच्या आधारे घेतली असून दुय्यम माहिती शासकीय अहवाल, जनगणना, संशोधन लेख, पुस्तके व नियतकालिकांमधून संकलित करण्यात आली आहे. अभ्यास क्षेत्र म्हणून नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भाग निवडण्यात आला आहे.

**संशोधनाची तंत्रे:** प्रस्तुत अध्ययनात अनुसूची (Interview schedule ) अनौपचारिक मुलाखती (Informal Interview ) व्यष्टी अध्ययन (Case Study) तंत्रे वापरली आहेत. तसेच द्वितीय स्रोतांचा वापर केला आहे.

**नाशिक जिल्ह्याची सामाजिक व ग्रामीण पार्श्वभूमी:** नाशिक जिल्हा भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असून येथे ग्रामीण लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे. दिंडोरी, कळवण, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, पेठ, सुरगाणा यांसारख्या तालुक्यांमध्ये दुर्गम व आदिवासी भाग आढळतो. ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. पावसावर आधारित शेती, अपुरा रोजगार, स्थलांतर आणि गरिबी या घटकांचा ग्रामीण जीवनावर प्रभाव आहे. या परिस्थितीचा थेट परिणाम ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यावर होताना दिसतो. नाशिक जिल्ह्यात ग्रामीण भागात ५७.४७% लोक राहतात. तर शहरी भागात ४२.५३% लोक राहतात.

**संशोधनाची व्याप्ती:** प्रस्तुत संशोधनात स्त्रियांचे विविध आजार जाणून घेण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील पेठ ,इगतपुरी, त्र्यंबकेश्वर या तालुक्यांची निवड करण्यात आली असून या प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातील 10 गावे निवडण्यात आले असून त्यातील ते तालुक्यातील 45 अंगणवाडी सेविका व प्राथमिक आरोग्य केंद्रातील महिला कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली. एकूण नमुना 135 स्त्रियांचा निवडण्यात आला. प्रस्तुत संशोधनात प्राथमिक आरोग्य केंद्रातील सेविका तसेच अंगणवाडी सेविका यांच्याकडून मुलाखत अनुसूची द्वारे सामग्री प्राप्त करण्यात आली.

**सन २०२३ - २०२४ या वर्षातील तालुकानिहाय स्त्रियांचे आजार व प्रमाण**

| अ.क्र. | आरोग्य समस्या / आजार | तालुकानिहाय बाधित स्त्रियांचे प्रमाण (टक्केवारीमध्ये) | | |
|---|---|---|---|---|
| | | पेठ | त्र्यंबकेश्वर | इगतपुरी |
| १ | रक्तक्षय (ॲनिमिया) | १४ | २२ | १२ |
| २ | कुपोषण | ३७ | २१ | २७ |
| ३ | अतिसार | २७ | १७ | २४ |
| ४ | टायफॉईड | १५ | १५ | १५ |
| ५ | पोटाचे विकार | २८ | २३ | २२ |
| ६ | अनियमित मासिक पाळी | २२ | २४ | २९ |
| ७ | जंतुसंसर्ग | १३ | १४ | ११ |
| ८ | पांढरा पडणे | १४ | १३ | १२ |

**ग्रामीण स्त्रियांचे प्रमुख आरोग्य समस्या:** भारत हा कृषिप्रधान देश असून आजही मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. ग्रामीण समाजरचनेत स्त्रीला कुटुंबाचा केंद्रबिंदू मानले जाते. शेती, घरकाम, मुलांचे संगोपन, वृद्धांची सेवा अशा अनेक जबाबदाऱ्या ग्रामीण स्त्रिया अविरतपणे पार पाडत असतात. मात्र या सर्व जबाबदाऱ्यांमध्ये स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होणे ही ग्रामीण स्त्रियांची मोठी समस्या आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कारणांमुळे ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्याशी संबंधित अनेक गंभीर समस्या निर्माण झालेल्या दिसतात.

**कुपोषण आणि अन्नसुरक्षेची समस्या:** ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्य समस्यांमध्ये कुपोषण ही सर्वात गंभीर समस्या आहे. घरातील पुरुष आणि मुलांनंतर शेवटी स्त्री अन्न घेते, अशी पद्धत अनेक ठिकाणी आजही आढळते. परिणामी स्त्रीला पुरेसे पोषणमूल्य मिळत नाही. लोह, कॅल्शियम, प्रथिने, जीवनसत्त्वे यांचा अभाव स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. यामुळे अशक्तपणा, थकवा, प्रतिकारशक्ती कमी होणे, आजारपणाचे प्रमाण वाढणे अशा समस्या निर्माण होतात. गर्भवती आणि स्तनदा मातांमध्ये कुपोषणाचे परिणाम अधिक गंभीर स्वरूपाचे असतात.

**रक्तक्षय (ॲनिमिया):** ग्रामीण स्त्रियांमध्ये रक्तक्षयाची समस्या फार मोठ्या प्रमाणावर आढळते. मासिक पाळी, अपुरे पोषण, वारंवार होणारी प्रसूती आणि आरोग्य सेवांचा अभाव यामुळे रक्तक्षय वाढतो. रक्तक्षयामुळे चक्कर येणे, श्वास घेण्यास त्रास, कामात उत्साह नसणे, डोकेदुखी यांसारखी लक्षणे दिसतात. दीर्घकाळ उपचार न झाल्यास गर्भधारणेदरम्यान धोका वाढतो आणि मातामृत्यूचे प्रमाणही वाढू शकते.

**मातृआरोग्याशी संबंधित समस्या:** ग्रामीण भागात आजही सुरक्षित प्रसूती सुविधा अनेक ठिकाणी अपुऱ्या आहेत. गर्भधारणेदरम्यान नियमित तपासणी न होणे, पोषण आहाराचा अभाव, प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता यामुळे मातृआरोग्य धोक्यात येते. घरगुती प्रसूती, अस्वच्छ वातावरण आणि अज्ञानामुळे आई व बाळ दोघांच्याही जीवाला धोका निर्माण होतो. प्रसूतीनंतर होणारे संसर्ग, रक्तस्राव, मानसिक ताण या समस्या ग्रामीण स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसतात.

**मासिक पाळीविषयक समस्या:** ग्रामीण भागात मासिक पाळीबाबत अजूनही अनेक अंधश्रद्धा आणि गैरसमज आहेत. स्वच्छतेच्या साधनांचा अभाव, सॅनिटरी पॅड्सची अनुपलब्धता किंवा त्यांचा वापर करण्याबाबत संकोच यामुळे स्त्रियांना अनेक संसर्गजन्य आजार होतात. मासिक पाळीदरम्यान वेदना, अनियमित पाळी, जंतुसंसर्ग, पांढरा पडणे अशा समस्या दुर्लक्षित केल्या जातात. योग्य मार्गदर्शन व उपचार न मिळाल्याने या समस्या गंभीर स्वरूप धारण करतात.

**प्रजनन आरोग्य समस्या**: ग्रामीण स्त्रियांमध्ये लवकर लग्न आणि लवकर मातृत्व ही एक सामान्य बाब आहे. वारंवार गर्भधारणा, गर्भनिरोधक साधनांची माहिती नसणे किंवा त्यांचा वापर न करणे यामुळे स्त्रीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. गर्भाशयाचे आजार, योनीसंसर्ग, गर्भाशय खाली येणे (प्रोलॅप्स) अशा समस्या मोठ्या प्रमाणावर आढळतात. सामाजिक लाज आणि संकोचामुळे स्त्रिया डॉक्टरांकडे जाणे टाळतात.

**मानसिक आरोग्य समस्या:** ग्रामीण स्त्रियांच्या मानसिक आरोग्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. सततचे कष्टाचे काम, आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, पतीचे व्यसन, कौटुंबिक हिंसा, निर्णयस्वातंत्र्याचा अभाव यामुळे स्त्रियांमध्ये नैराश्य, तणाव, चिंता यासारख्या मानसिक समस्या वाढतात. मात्र मानसिक आजारांना समाजात आजही कलंक मानले जाते, त्यामुळे उपचार घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

**आरोग्यसेवांपर्यंत मर्यादित पोहोचतात:** ग्रामीण भागात आरोग्य केंद्रांची संख्या कमी असणे, तज्ज्ञ डॉक्टरांची अनुपलब्धता, वाहतुकीची अडचण आणि आर्थिक मर्यादा यामुळे स्त्रियांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. अनेकदा आजार गंभीर झाल्यावरच उपचार घेतले जातात. सरकारी योजनांची माहिती नसणे किंवा त्यांचा लाभ न मिळणे हीदेखील एक मोठी समस्या आहे.

**कामाचे ओझे आणि शारीरिक आजार:** ग्रामीण स्त्रिया घरकामासोबत शेतीकाम, पशुपालन, मजुरी अशी अनेक कामे करतात. सततचे श्रम, विश्रांतीचा अभाव आणि अपुरा आहार यामुळे पाठदुखी, सांधेदुखी, कंबरदुखी यांसारखे आजार होतात. वय वाढल्यावरही काम थांबत नाही, त्यामुळे दीर्घकालीन आजारांचे प्रमाण वाढते.

**स्वच्छता आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित समस्या:** ग्रामीण भागात स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहे यांचा अभाव अनेक ठिकाणी आढळतो. महिलांना लांब अंतरावरून पाणी आणावे लागते, यामुळे शारीरिक थकवा वाढतो. अस्वच्छ पाण्यामुळे अतिसार, टायफॉईड, पोटाचे विकार यांसारखे आजार होतात. उघड्यावर शौचास जाण्याची समस्या स्त्रियांसाठी विशेषतः धोकादायक असून त्यामुळे संसर्ग आणि सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण होतात.

**शिक्षणाचा अभाव आणि जागरूकतेची कमतरता:** ग्रामीण स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण तुलनेने कमी असल्याने आरोग्यविषयक माहिती आणि जागरूकता कमी असते. आजारांची लक्षणे ओळखणे, योग्य उपचार घेणे, पोषणाचे महत्त्व समजणे याबाबत माहिती नसते. अंधश्रद्धा, पारंपरिक उपचारांवर अतीविश्वास यामुळे वैज्ञानिक उपचारांकडे दुर्लक्ष होते.

**ग्रामीण स्त्रियांसाठी शासनाच्या आरोग्यविषयक योजना व त्यांची प्रभावी अंमलबजावणी: एक विश्लेषण** भारत हा खेड्यापाड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. आजही देशातील मोठा लोकसंख्या वर्ग ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. ग्रामीण समाजव्यवस्थेत स्त्रीला अत्यंत महत्त्वाचे स्थान असून ती कुटुंब, शेती, पशुपालन, घरगुती उद्योग आणि सामाजिक जीवनाचा कणा मानली जाते. मात्र एवढ्या मोठ्या योगदानाच्या तुलनेत ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्याकडे दीर्घकाळ दुर्लक्ष झालेले दिसते. कुपोषण, मातृमृत्यू, बालमृत्यू, रक्तक्षय, संसर्गजन्य आजार, मानसिक तणाव अशा विविध आरोग्य समस्यांनी ग्रामीण स्त्रिया ग्रस्त आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाने ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्य सुधारण्यासाठी विविध आरोग्यविषयक योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा उद्देश, स्वरूप, अंमलबजावणी आणि परिणाम यांचे विश्लेषण करणे अत्यंत आवश्यक आहे.

**ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्याची पार्श्वभूमी:** ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य अनेक घटकांवर अवलंबून असते. लवकर लग्न, वारंवार गर्भधारणा, अपुरा पोषण आहार, शिक्षणाचा अभाव, आरोग्य सेवांची मर्यादित उपलब्धता आणि सामाजिक रूढी-परंपरा यांचा स्त्रियांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होतो. यामुळे मातृमृत्यूचे प्रमाण ग्रामीण भागात तुलनेने अधिक दिसते. ही परिस्थिती सुधारण्यासाठी शासनाने विविध धोरणात्मक उपाययोजना आखल्या आहेत.

**१राष्ट्रीय आरोग्य अभियान:** ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान ही एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात आरोग्य सेवा बळकट करण्यावर भर देण्यात आला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि सामुदायिक आरोग्य केंद्रे यांच्या माध्यमातून गर्भवती महिला, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य सेवा पुरवली जाते. मातृ व बाल आरोग्य, कुटुंब नियोजन, लसीकरण, पोषण यावर या अभियानाचा विशेष भर आहे.

**जननी सुरक्षा योजना:** जननी सुरक्षा योजना ही ग्रामीण स्त्रियांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. सुरक्षित प्रसूतीला प्रोत्साहन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. गर्भवती महिलांना संस्थात्मक प्रसूतीसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. त्यामुळे ग्रामीण भागात घरगुती प्रसूतीचे प्रमाण कमी होऊन रुग्णालयातील प्रसूतीचे प्रमाण वाढले आहे. यामुळे मातृमृत्यू आणि नवजात बालमृत्यूच्या प्रमाणात काही प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते.

**जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम:** या कार्यक्रमांतर्गत गर्भवती महिला आणि नवजात बाळांना मोफत आरोग्य सेवा देण्याची तरतूद आहे. मोफत तपासणी, औषधे, प्रसूती सेवा, रुग्णालयात राहण्याची सुविधा आणि वाहतूक खर्च शासनाकडून दिला जातो. ग्रामीण स्त्रियांसाठी ही योजना आर्थिकदृष्ट्या अत्यंत लाभदायक ठरली आहे. आर्थिक अडचणीमुळे उपचार टाळण्याचे प्रमाण या योजनेमुळे कमी झाले आहे.

**प्रधानमंत्री मातृ वंदना योजना:** ही योजना गर्भवती आणि स्तनदा मातांसाठी राबवली जाते. पहिल्या गर्भधारणेदरम्यान महिलेला टप्प्याटप्प्याने आर्थिक मदत दिली जाते. या योजनेचा उद्देश गर्भवती महिलांचे पोषण सुधारणे आणि त्यांना आरोग्य तपासणीसाठी प्रोत्साहित करणे हा आहे. ग्रामीण भागात पोषणाचा अभाव लक्षात घेता ही योजना अत्यंत उपयुक्त आहे. मात्र माहितीच्या अभावामुळे अनेक पात्र महिलांना या योजनेचा लाभ मिळत नाही.

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना:** अंगणवाडीच्या माध्यमातून राबवली जाणारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यात महत्त्वाची भूमिका बजावते. गर्भवती व स्तनदा महिलांना पूरक आहार, पोषण सल्ला, आरोग्य तपासणी व लसीकरण यांचा लाभ दिला जातो. अंगणवाडी सेविका ग्रामीण भागात आरोग्य जनजागृतीचे महत्त्वाचे कार्य करतात. मात्र अपुरा निधी, साधनसामग्रीचा अभाव आणि कामाचा ताण यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीत मर्यादा दिसून येतात.

**राष्ट्रीय पोषण अभियान:** ग्रामीण स्त्रियांमधील कुपोषण दूर करण्यासाठी राष्ट्रीय पोषण अभियान राबवले जाते. गर्भवती महिला, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुली हे या योजनेचे प्रमुख लाभार्थी आहेत. पोषणविषयक माहिती, संतुलित आहाराचे महत्त्व आणि पोषण स्थितीचे परीक्षण या बाबींवर भर देण्यात येतो. ही योजना योग्य पद्धतीने राबवली गेल्यास ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यात लक्षणीय सुधारणा होऊ शकते.

**राष्ट्रीय किशोरवयीन आरोग्य कार्यक्रम:** ग्रामीण किशोरवयीन मुलींच्या आरोग्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे. मासिक पाळी स्वच्छता, पोषण, मानसिक आरोग्य, लैंगिक व प्रजनन आरोग्य याबाबत मार्गदर्शन केले जाते. किशोरवयात योग्य आरोग्य सवयी लागल्यास भविष्यातील मातृआरोग्य सुधारण्यास मदत होते. मात्र सामाजिक संकोच आणि अंधश्रद्धांमुळे या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी अनेक ठिकाणी अडथळ्यांना सामोरी जाते.

**आशा सेविकांची भूमिका:** आशा सेविका ग्रामीण आरोग्य यंत्रणेचा कणा मानल्या जातात. त्या गावपातळीवर गर्भवती महिलांची नोंदणी, आरोग्य तपासणीसाठी प्रोत्साहन, लसीकरण, प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतरची काळजी याबाबत महत्त्वाचे कार्य करतात. शासनाच्या विविध योजनांचा लाभ ग्रामीण स्त्रियांपर्यंत पोहोचवण्यात आशा सेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र मानधन कमी असणे आणि कामाचा ताण अधिक असणे ही मोठी अडचण आहे.

**योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी:** नाशिक जिल्हा हा विस्तृत भूभाग असलेला जिल्हा असून, ग्रामीण , आदिवासी, भूभागाने व्यापलेला आहे. दुर्गम आदिवासी भागातील आरोग्य सेवा या पुर्षा नाहीत. तसे पहिले तर शासनाने अनेक योजना सुरू केल्या असल्या तरी त्यांची अंमलबजावणी सर्वत्र प्रभावी झालेली नाही. माहितीचा अभाव, प्रशासकीय अडथळे, भ्रष्टाचार, अपुरी आरोग्य यंत्रणा, तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आणि रस्त्यांची दुरवस्था, बर्याच ठिकाणी नदीवर पूल नाहीत, सरकारी व सार्वजनिक

वाहतुकीची समस्या यामुळे योजनांचा अपेक्षित लाभ ग्रामीण स्त्रियांपर्यंत पोहोचत नाही. अनेकदा कागदपत्रांच्या अडचणींमुळे महिलांना योजनांपासून वंचित राहावे लागते. पितृसत्ताक कुटुंबात सर्व निर्णय हे पती, किंवा पुरुष घेतात. त्यात पती व्यसनी असेल तर तो स्त्रीयांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो.

**निष्कर्ष:**१.नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य हे अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. कुपोषण, अपुरी आरोग्यसेवा, सामाजिक बंधने आणि आर्थिक अडचणी यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. २. योग्य धोरणे, प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती आणि स्त्री सक्षमीकरणाच्या माध्यमातून या समस्यांवर मात करता येऊ शकते. ग्रामीण स्त्री निरोगी असेल तर कुटुंब, समाज आणि राष्ट्राचा विकास अधिक सक्षम होईल. त्यामुळे ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्याकडे केवळ कल्याणकारी नव्हे तर विकासात्मक दृष्टीने पाहणे अत्यंत आवश्यक आहे. ३. अल्पशिक्षित किंवा अशिक्षित स्त्रियांना आरोग्यविषयक माहिती कमी असते. गरिबीमुळे पोषक आहार व वैद्यकीय उपचार परवडत नाहीत. आरोग्य केंद्रे दूर असणे, वाहतुकीचा अभाव आणि खर्चाची भीती यामुळे स्त्रिया उपचार टाळतात. ४. सामाजिक रूढी व परंपरा स्त्रियांच्या आरोग्यावर मर्यादा आणतात. स्त्रियांनी वेदना सहन कराव्यात, आजार लपवून ठेवावेत अशी मानसिकता आजही काही भागांत दिसते. निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग कमी असल्याने आरोग्यविषयक निर्णय स्वतः घेता येत नाहीत.

**उपाय योजना व शिफारसी:** १. ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य सुधारण्यासाठी सर्वांगीण उपायांची आवश्यकता आहे. सर्वप्रथम पोषण सुधारणा महत्त्वाची आहे. पूरक आहार योजना प्रभावीपणे राबवणे, स्थानिक पातळीवर पोषण बागा विकसित करणे आणि संतुलित आहाराबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. २. प्रजनन व मातृत्व आरोग्यासाठी संस्थात्मक प्रसूतीला प्रोत्साहन देणे, नियमित तपासण्या आणि प्रसूतीनंतरची काळजी घेणे आवश्यक आहे. मासिक पाळी स्वच्छतेबाबत शाळा व ग्रामस्तरावर प्रबोधन करणे गरजेचे आहे. ३. प्राथमिक आरोग्य केंद्रे सक्षम करणे, मोबाईल आरोग्य सेवा सुरू करणे आणि दुर्गम भागांसाठी विशेष आरोग्य पथके नेमणे आवश्यक आहे. आरोग्य विमा योजनांची माहिती देऊन स्त्रियांना उपचारासाठी प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. ४. मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन केंद्रे, महिला बचत गट आणि स्वयं सहायता गटांचा वापर करून आधार व्यवस्था निर्माण करता येईल. शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबनामुळे स्त्रिया आरोग्याबाबत अधिक जागरूक होतील. ५. ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्य समस्या सोडवण्यासाठी सर्वांगीण प्रयत्नांची गरज आहे. महिलांचे शिक्षण वाढवणे, पोषण आहार योजना प्रभावीपणे राबवणे, प्राथमिक आरोग्य केंद्रे सक्षम करणे, मातृ व बाल आरोग्य सेवांचा विस्तार करणे आवश्यक आहे. मासिक पाळी स्वच्छतेबाबत जनजागृती, गर्भनिरोधकांची उपलब्धता, मानसिक आरोग्याविषयी समुपदेशन या उपाययोजना महत्त्वाच्या ठरतात. स्वयं-सहायता गट, आशा सेविका आणि अंगणवाडी सेविका यांची भूमिका अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. ६. ग्रामीण स्त्री ही कुटुंबाची आणि समाजाची आधारस्तंभ आहे. तिचे आरोग्य सुदृढ असेल तरच कुटुंब आणि समाजाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. त्यामुळे ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्य समस्यांकडे गांभीर्याने पाहून योग्य उपाययोजना राबवणे ही काळाची गरज आहे. स्त्री निरोगी असेल तरच निरोगी समाजाची निर्मिती होऊ शकते. ७. ग्रामीण स्त्रियांसाठी आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वप्रथम जनजागृती वाढवणे आवश्यक आहे. महिलांना त्यांच्या हक्कांची आणि योजनांची माहिती मिळणे गरजेचे आहे. आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक सुविधा, औषधे आणि प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आशा व अंगणवाडी सेविकांचे मानधन वाढवून त्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि महिला बचत गटांचा सहभाग वाढवल्यास योजनांची परिणामकारकता वाढू शकते. ८. ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यासाठी शासनाने राबवलेल्या योजना या अत्यंत महत्त्वाच्या आणि आवश्यक आहेत. मात्र केवळ योजना अस्तित्वात असणे पुरेसे नाही, तर त्यांची प्रभावी आणि ९. पारदर्शक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. ग्रामीण स्त्री निरोगी असेल तरच कुटुंब, समाज आणि देशाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. त्यामुळे शासन, समाज आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करून ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यात सकारात्मक बदल घडवून आणणे ही काळाची गरज आहे.

## संदर्भसूची


१) Dwivedi Purnima 2008, Problem of Women Health and Malnutrition in Indian Social Perspective

२) Viswanathan Brinda, Agnihotri Archana, Double Burden of Malnutrition in India: Decadal changes among Adult men and Women. Madras School of Economics Aug. 2020.

३) Manjunatha, L.B., Rao DUM, Hajory Dipika, Roy. R, Burman Singh Rashmi, Social Beliefs, Customs and Superstitions Associated with care of mother and New Born Baby: A case study from Bundelkhand Region in Central India. Indian Res. J. Ext. Edu. 17 (1); January, 2017.

४) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नाशिक जिल्हा, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, २०१२, पृ क्र १ ते १२.

५) पवार, पंडितराव, वसंत पवार (संपा ) (२००५), 'जनस्थान' ७८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नाशिक स्वागत समिती, नाशिक, लेखाचे नाव - कृषीक्षेत्रात अग्रगण्य नाशिक जिल्हा, लेखक, प्रा डॉ. सतीश श्रीवास्तव, पृ क्र ९९.

६) http://hdl.handle.net/10603/231004

७) http://www.who.int/

८) अनौपचारिक मुलाखती

# महात्मा गांधींच्या ग्रामनीतीची उपेक्षा आणि ग्रामीण बेरोजगारांची समस्या एक अध्ययन

**प्रा. डॉ. मारोती बामणे** समाजशास्त्र विभाग प्रमुख, वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर

**प्रस्तावना:** "खेड्याकडे जा" (महात्मा गांधी) महात्मा गांधींच्या वरील संदेशात, भारत देशाच्या संदर्भात विकासाभिमुख नीती समावली आहे. कारण भारत एकूण सात ते सात लाख खेड्यांचा हा १९०० मैल लांब आणि १५०० मैल रुंदीचा देश बनला आहे. याचा मुख्य व्यवसाय शेती आहे. आजही ६५ ते ७० टक्के लोक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहेत. म्हणजे भारताच्या अर्थव्यवस्थेत फार मोठा भाग शेतीचा राहिला आहे. "जिथे जगातील एकूण जमिनीपैकी केवळ ११ टक्के जमीन शेतीसाठी उपयुक्त आहे. त्या तुलनेत भारतातील एकूण जमिनीपैकी ५२ टक्के जमीन शेतीसाठी उपयुक्त आहे. तसेच जगात आढळणारे सर्व १५ जलवायू भारतात सुद्धा उपलब्ध आहेत व जगात आढळणारी ६० प्रकारच्या मृदा पैकी जवळपास ४६ प्रकारची मृदा भारतात आहेत. अशा गुणवत्ता व क्षमतेने भारतीय जमीन समृद्ध आहे. (देशमुख/येळणे) मेरे देश की धरती सोना उगले, उगले हीरे मोती 'जय जवान जय किसान' असे भारताच्या शेतीच्या संदर्भात स्तुती केली आहे. निसर्गाने भारताला भरभरून दिलेले आहे. भारताच्या तीनही बाजूने असलेले विशाल समुद्र, हिमालयासारखे निसर्ग दत्त पर्वत, गंगा, कावेरी, यमुना, गोदावरी यासारख्या नद्या, मातीतून सोने पिकवणारी सुपीक जमीन, विशाल जंगले, निरनिराळ्या खनिज खाणी, हजारो प्रकारची फळे, फुले, प्रचंड वनौषधीचे भांडार, हजारो प्रकारचे प्राणी, पक्षी तसेच समुद्राच्या रूपाने जलसंपत्ती निसर्गाने भारताला बाहाल केलेली आहे.(शेट्टे जगदीश) एवढी अफाट साधन संपत्ती असताना शेतकरी कर्जबाजारी बनून आत्महत्येचा मार्ग स्विकारीत आहे. तर शेतकऱ्याच्या मुलांच्या बेरोजगारी व विवाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच ग्रामीण कामगारांचे मोठ्या प्रमाणात नगरामध्ये स्थलांतर होत आहे. महात्मा गांधींनी हा धोका ओळखून, आजची शहर केंद्रीत विकास आणि उद्योगनीती सर्वांना सामावून घेऊ शकत नाही. कारण शेती आणि खेड्यांच्या शोषणावरच शहरी जीवन आधारित आहे. ही गांधींची स्पष्ट भूमिका होती म्हणूनच खेड्याकडे जा असा संदेश देतात. व त्यांच्या ग्राम व कृषीनीतीवर ग्रामीण पुनर्रचना करण्याचा आग्रह धरतात. (यशवंत सुमंत) म्हणून महात्मा गांधींची ग्रामनीती काय होती; ग्रामनीतीच्या उपेक्षेतून बेरोजगारांची समस्या निर्माण झाली का? हाताला काम नसल्यामुळे ग्रामीण कामगार नगराकडे स्थलांतर का होत आहेत? शेतकरी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या का करीत आहेत? इत्यादी प्रश्नांची उकल करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत विषयाची संशोधन लेखासाठी निवड करण्यात आली आहे.

**संशोधनाचा उद्देश:** १) महात्मा गांधींच्या ग्रामनीतीचे अध्ययन करणे. २) महात्मा गांधींच्या ग्रामनीतीची उपेक्षा झाली का? याचा शोध घेणे. ३) ग्रामनीतीच्या उपेक्षेतून ग्रामीण बेरोजगाराची समस्या निर्माण झाली का? त्याचा आढावा घेणे.

**संशोधनातील गृहीतकृत्ये:** १) स्वातंत्र्यानंतर ग्राम व कृषीच्या विरोधात सरकारचे धोरणे गेल्याचे दिसून येते. २) महात्मा गांधींच्या ग्रामनीतीची उपेक्षा झाल्याचे निदर्शनास येते. 3. गांधीजींच्या ग्रामनीतीच्या उपेक्षेतून ग्रामीण बेरोजगाराची समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत विषयाच्या संदर्भात माहिती प्राप्त करण्यासाठी, तथ्य संकलनाचे प्राथमिक व द्वितीय साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे. प्राथमिक साधना अंतर्गत मुलाखतीचा उपयोग करून प्रस्तुत विषयाच्या संदर्भात माहिती संपादन करण्यात आलेली असून दुय्यम साधनांतर्गत विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिकेचा अभ्यास करून, तथ्यांचे संकलन करण्यात आलेले आहे.

**तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन:** प्रस्तुत विषयाच्या संदर्भातील प्राप्त तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करण्यात आलेले आहे.

**महात्मा गांधीजींची ग्रामनीती:** भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजही ७० टक्के जनता प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेती व ग्राम सुधारले तर भारत सुधारेल, भारत आपल्या काही मोजक्या शहरातून नव्हे, तर सात लाख खेड्यातून वसलेला आहे. या गोष्टीची मी अनेक वेळा पुनरावृत्ती केली असल्याची मला खात्री आहे; परंतु आम्हा शहरातील लोकांना वाटते की, भारत शहरातून वसलेला असून शहरांच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठीच खेड्यांची स्थापना झाली आहे. त्या गरिबांना पोटापुरते अन्न व शरीराचे संरक्षण करण्यापुरते तरी वस्त्र मिळते किंवा नाही. तसेच ऊन-पावसापासून संरक्षण करण्याकरता आश्रय आहे किंवा नाही याचा विचार करण्याचा आम्ही प्रयत्न करीत नाही. (महात्मा गांधी) या शोषणयुक्त विषमतेला शरद जोशी यांनी इंडिया आणि भारत असे नाव दिलेले असून, शासनाचे सर्व विकासाभिमुख धोरणे इंडियाच्या बाजूने गेलेले आहेत. त्यामुळे नगररूपी इंडियाचा फार जलद गतीने विकास झालेला आहे, ग्रामरूपी भारतात स्वतःचे मूलभूत गरजा सुद्धा पूर्ण करण्याची परिस्थिती नसल्यामुळे, शेतकरी कर्जबाजारीतून आत्महत्या करीत आहे. तर ग्रामीण कामगार हाताला काम नसल्यामुळे खेड्यातून नगरात मोठ्या प्रमाणात स्थलांतर करीत आहे. म्हणून महात्मा गांधींच्या विचारातील स्वयंपूर्ण ग्रामराज्याचे संघराज्य स्थापन करण्यासाठी आपल्या ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमात जमिनीवर आधारित, उत्पादन संबंधाची पुनर्रचना ग्रामीण उद्योग व ग्रामीण रोजगार, ग्रामीण आरोग्य, शेतीनिष्ठ अर्थकारण, श्रमप्रधान उत्पादन या सर्वांचा विचार आहे. या ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमाद्वारे दारिद्र्य व बेरोजगाराची समस्या बऱ्याच प्रमाणात सुटू शकेल, असा त्यांचा विश्वास होता. (सुमंत यशवंत)

सत्तेचे व पैशाचे विकेंद्रीकरण योग्य पद्धतीने न झाल्यामुळे ते एकाच ठिकाणी केंद्रित झाल्यामुळे आर्थिक, राजकीय विषमता निर्माण झाली. म्हणून महात्मा गांधींना त्यांच्या स्वप्नातील स्वयंपूर्ण ग्रामराज्याचे संघराज्य व्यवस्था हवी होती. त्यांना सत्ता केंद्राकडून खेड्याकडे यायला नको होती, तर खेड्याकडून केंद्राकडे जाणारी हवी होती. प्रत्येक खेडे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक

दृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे, कर बसविण्याचे सर्व अधिकार खेड्याच्या पंचायतींना असावे. त्यांनी त्यातून आपला विकास व अन्य खर्च करावा. गांधीजींच्या खेड्यात त्यांना अद्यावत नाट्यगृह उभे राहावे असे वाटत होते. ग्रामपंचायतीच्या उर्वरित पैशातून पंचायत समिती त्यांचे काम चालावे पंचायत समितीच्या पैशातून जिल्हा परिषदा व पुढे अशीच राज्य सरकारेही चालावी. कराचा पैसा राज्यांनी केंद्राला द्यावा. त्यामुळे राज्य केंद्रावलंबी न राहता केंद्र राज्यावलंबी राहील. राज्य जिल्ह्यावर व पुढे हे अवलंबन खेड्यापर्यंत जाईल. गांधीजींच्या स्वप्नातील विकेंद्रीकरण असे होते. त्यातून केंद्र राज्यावर किंवा राज्य खेड्यावर अधिकार गाजवू शकणार नव्हती. उलट गाव खेड्यातील लोक मताचे वजन राज्यावर व केंद्रावर राहिले असते. नेमकी हीच बाब आर्थिक क्षेत्रातही झाली असती. खेड्यातून कच्चामाल शहराकडे जाण्याऐवजी खेड्याच्या गरजा पूर्ण झाल्यानंतर उर्वरित पक्का माल शहरात आला असता. त्यामुळे खेडी उत्पादक व शहरे ग्राहक बनले असते. त्यासाठीच लघुउद्योग व गृहउद्योगावर गांधीजींचा भर होता, त्यात मालक व मजूर हा भेद संपणार होता. शोषण राहणार नव्हते आणि विषमता ही उरली नसती (समाजवाद-सुरेश द्वादशीवार) महात्मा गांधीजींची ही ग्रामनीती सत्य नैसर्गिक न्यायावर आधारित होती. कारण शेतामध्येच एका दाण्याचे हजार दाणे तयार होतात कारण शेती हा व्यवसाय असा आहे की तो गुणाकाराने संपत्ती तयार करतो. कोणत्याही कारखान्यात एक किलो लोखंड घातले तर त्याचे सव्वा किलो किंवा दीड किलो लोखंडाची वस्तू तयार होत नाही उलट त्यामध्ये घटत होते गुणाकार रूपे संपत्ती तयार करणाऱ्या शेती याला महात्मा गांधींच्या ग्रामनीतीची जर जोड दिली असती, तर आज भारताचे विकसनशील राष्ट्राचे विकसित राष्ट्रात रूपांतर झाले असते. सुशिक्षित, असुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न सुटला असता कारण सर्वांना काम देण्याची क्षमता फक्त शेती या उद्योगातच आहे हे समजले असते.

**सरकारचे धोरण व महात्मा गांधीजींच्या ग्रामनितीची उपेक्षा:** खऱ्या अर्थाने एकादाण्याचे हजार दाने देणारी शेती व तयार करणारा शेतकरी आणि दुसरीकडे 100 किलो लोखंड टाकल्यावर कारखान्यातून 90 ते 95 किलो ची वस्तु निर्माण करणारा कारखानदार खऱ्या अर्थाने सुखी व श्रीमंत कोण असायला पाहिजे होता? या प्रश्नाचे सैद्धांतिकदृष्ट्या उत्तर शेतकरी असायला पाहिजे होता. पण वास्तवात कारखानदार/उद्योगपती श्रीमंत झाले आणि शेतकऱ्याला कर्जबाजारी बनवून आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. ग्रामीण लोकांच्या हाताला काम नसल्यामुळे ते मोठ्या प्रमाणात नगरामध्ये स्थलांतर करीत आहेत. यांचे महत्त्वाचे कारण स्वातंत्र्यानंतर गांधीजींच्या ग्रामनिधीची उपेक्षा झाली, गांधीजींच्या मते अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे, नेहरूनी सांगितल सगळ्या अर्थव्यवस्थेचा कणा जड उद्योगधंदे, लोखंडाचे, सिमेंटचे कारखाने आहेत. गांधीजींनी म्हटलं खेडे हा हिंदुस्थानचा आत्मा आहे. नेहरूनी सांगितलं की शहरांचा विकास पाहिजे. गांधींनी सांगितलं होतं की व्यक्तीने प्रगती करायची आहे. सरकार नको एवढेच नव्हे तर ते म्हणाले होते, माझा मुळी शासन या संस्थेलाच विरोध आहे. सगळ्या जगामधून सरकार नावाची गोष्ट नष्ट होऊन जावी अशी माझी इच्छा आहे. पुढे गांधी म्हणतात, स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय लोक निघून जाणे नव्हे, स्वातंत्र्य म्हणजे देशातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या मनाप्रमाणे आपल्या भवितव्याला आकार देण्याची मुभा मिळणे होय. (शरद जोशी) सत्तेचे केंद्रीकरण झाले की, पैशाचे केंद्रीकरण होते हे शासन संस्थेत घडत असते. व्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने येतात. असा धोका टाळण्यासाठीच महात्मा गांधींनी शासनसंस्थेला विरोध केला.

स्वातंत्र्यानंतर देशाच्या विकासात शेतीचे आणि खेड्यांचे स्थान काय आहे आणि शहराचे स्थान काय या प्रश्नावर महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांच्यामध्ये फार प्रचंड मतभेद होते. महात्मा गांधींनी याबद्दल स्पष्ट म्हटलं होतं की, जवाहरलाल याविषयी तुमची जी काही मत आहे. त्याविरुद्ध तुमच्याशी मला लढणं भाग पडेल. पण तरीही महात्मा गांधींना अशा जवाहरलाल नेहरूनाच आपल्या राजकीय वारसदार नेमांव लागल आणि स्वातंत्र्य आल्यानंतर अंगावर पंचा नेसून हिंदुस्थानातील दरिद्रीनारायणाची बाजू मांडणाऱ्या महात्मा गांधींच छोट्या उद्योगधंद्याच्या साहाय्याने खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजेत, देशातील सर्वात जास्त खंगलेल्या, लुटल्या गेलेल्या माणसाच्या दृष्टीकोनातून आर्थिक नियोजन झालं पाहिजे अस मानणार स्वातंत्र्य लढ्यातील तत्त्वज्ञान फेकून दिलं गेलं आणि सहा महिन्याच्या आत गांधीवादाचा पराभव होऊन, नेहरू वादाचा जय झाला. (शरद जोशी) स्वातंत्र्यानंतर आत्तापर्यंत आलेल्या सरकारने उद्योग व नगरविकासाच्या नीतीला महत्त्व देऊन आपले धोरण राबविलेले असल्यामुळे महात्मा गांधींच्या ग्राम व कृषीनीतीची उपेक्षा केलेली आहे.

**निष्कर्ष:** महात्मा गांधीजींच्या ग्रामनीतीची उपेक्षा झालेली आहे.या उपेक्षेतून खालील प्रश्न निर्माण झालेले आहेत. बेरोजगाराची समस्या निर्माण झालेली दिसून येते. शेतकऱ्यात कर्जबाजारीपणा निर्माण झाल्याचे निदर्शनास येते. शेतकरी आत्महत्येची समस्या निर्माण झालेली आहे. सत्तेचे केंद्रीकरण झालेले असल्याचे निदर्शनास येते. पैशाचे केंद्रीकरण झाले, श्रीमंत श्रीमंत झाला गरीब गरीब झाला. ग्रामीण समुदायात आरोग्याची समस्या निर्माण झाली आहे. ग्रामीण समुदायात शिक्षणाची, विवाहाची समस्या निर्माण झालेली आहे. अंधश्रद्धेची समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास येते. ग्रामीण समुदायात व्यसनाधिनतेची समस्या दिसून येते.

**संदर्भसूची:**

१. सुमंत यशवंत(२०१९), "महात्मा गांधींची विचारसृष्टी काही अलक्षित पैलू" साधना प्रकाशन पुणे- पृष्ठ क्र.१०८
२. देशमुख/खेळणे, "(जानेवारी २०११ अं. क्रं. ६)योजना लेख-जागतीकरण कृषी क्षेत्रातील बदल व शेतकऱ्यांच्या आत्महत्या पृ. क्र.३९
३. शेट्टे जगदीश (२०११), "जागतिक उदारीकरण शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि उत्पादन मूल्य" प्रकाशक गरज मूल्य प्रकाशन औरंगाबाद- पृ. क्र.१५
४.सुमंत यशवंत (२०१७), "महात्मा गांधींची विचारसृष्टी काही अलक्षक पैलू" साधना प्रकाशन पुणे पृ. क्र.१०८
५. घाटोळ रा.ना.(२०१०), "समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती" प्रकाशक मंगेश प्रकाशन नागपूर पृ. क्र. ६९
६. गांधी महात्मा (ऑगस्ट२०१६), "विचार संग्रह" प्रकाशक रिया पब्लिकेशन कोल्हापूर पृ. क्र.२२४
७.द्वादशीवार सुरेश(२ ऑक्टोबर२०११), "समाजवाद आजची मरगळ, उद्याचे उद्यान" प्रकाशक मीडिया वॉच पब्लिकेशन अमरावती पृ. क्र.६०-६१
८. जोशी शरद (नोव्हेंबर २०१०), "पोशिंद्याची लोकशाही" प्रकाशाक जनशक्ती वाचक चळवळ औरंगाबाद पृ. क्र. २२३
९. जोशी शरद(२०१२), "बळीचे राज्य येणार आहे" प्रकाशक जनशक्ती वाचक चळवळ औरंगाबाद पृ. क्र.१४

# नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढता प्रभाव

**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर काशिनाथ भामरे** प्रोफेसर व समाजशास्त्र विभागप्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगांव, धुळे

**गोषवारा:** भारतीय समाजरचनेचा विचार करतांना ग्रामीण व नागरी समाजाला प्राधान्य देणे महत्वाचे आहे. कारण ग्रामीण व नागरी समाजातील लोकांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, त्यांची जीवन जगण्याची पध्दती ही एकमेकांपासून पुर्णत: वेगळ्या स्वरुपाची आहे. ग्रामीण आणि नागरी समाजाची वैशिष्ट्ये वेगवेगळी असुन या समाजातील लोकांचे राहणीमान, संस्कृती आणि आचार-विचार वेगवेगळे आहेत. एवढेच नाही तर या दोन्ही समाजाच्या समस्यासुध्दा वेगळ्या आहेत. म्हणुन भारतीय समाजाचा अभ्यास करीत असतांना ग्रामीण समाज आणि नागरी समाज यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे असे संशोधकास वाटते. नागरी जीवनाचा ग्रामीण जीवनावर फार मोठा प्रभाव पडून परिणाम होतो. नागरी जीवनाचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती ग्रामीण लोकांत असते. त्यामुळे साहजिकच ग्रामीण जीवनाचे मुळ स्वरुप बदलत जाते. पण ते पुर्णपणे नगरीय बनत नाही. ग्रामीण जनता शहराकडे स्थलांतरित होत असल्यामुळे ग्रामीण रचनेमध्ये विविध स्थित्यंतरे घडतांना संशोधकास दिसुन येते. नागरी जीवनाच्या भौतिकवाद, विलासी प्रवृत्ती, पोषाख, खान-पान, मनोरंजनासाठी साधने, व्यसने यांच्या प्रभावामुळे ग्रामीण जीवन प्रभावित होते. ह्या प्रभावाचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधातून मांडण्याचा संशोधकाचा प्रयत्न आहे. ग्रामीण समाजजीवन हे नागरी समाज जीवनापेक्षा वेगळ्या प्रकारचे आहे. शेती व्यवसाय, जातीव्यवस्था, बलुतेदारी पध्दती या घटकांमुळे ग्रामीण जीवनाला एक वेगळेपणा प्राप्त झालेला आहे. शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्याने सर्वांचे कार्यक्षेत्र एका सरळ दिशेने निश्चित झालेले असते. गुंतागुंतीच्या व न सोडविता येणाऱ्या प्रश्नांना येथे फारसे स्थान नसते. जीवन अत्यंत साधे नि सोपे असल्याने ग्रामीण समाज जीवनाशी निगडीत सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन केले जाते. अधिक लोकसंख्या व विस्तारलेले क्षेत्रफळ हे नागरी समाजाचे प्रमुख लक्षण आहे. नागरी समाजात औद्योगिकीकरणाची गती वाढल्यामुळे कारखानदारी निर्माण झाली. कारखान्यात काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर ग्रामीण समाजातुन नागरी समाजाकडे लोकांचे स्थलांतर घडले. ही स्थलांतराची प्रक्रिया आजही सुरु आहे. प्रत्येक शहराला आजुबाजूची किमान शंभर तरी खेडी निर्वाहाच्या दृष्टीने जोडलेली असतात. परिणामी त्या खेड्यांतील लोकांची सगळी वर्दळ नागरी समाजात आपोआप वाढते. लोक निर्वाहासाठी दिवसभर शहरात येतात व रात्री खेड्यात परत जातात. पण ही खेडी भौगोलिकदृष्ट्या जरी वेगळी असली तरी ती सगळ्याच बाबतीत नागरी समाजावर अवलंबुन असतात. अर्थातच नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढता प्रभाव संशोधकाच्या निदर्शनास येतो. प्रस्तुत शोधनिबंध 'नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढता प्रभाव' यामध्ये नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढता प्रभावाचे अध्ययन करण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

**प्रस्तावना व अभ्यासाचे महत्व:** कोणताही समाज नेहमी स्थिर असत नाही. मानव समाजाचा इतिहास हे स्पष्ट करतो की, मानवी समाज हा बदलत असतो. नित्य परिवर्तन हा मानवी समाजाचा जणु स्थायीभाव आहे. समाजाचे स्वरुप व रचना काळाच्या ओघात नवीन रुप धारण करीत असते. ग्रामीण समाज रचनेतदेखील अनेक परिवर्तन होत आहे. कारण नागरी समाजाचा ग्रामीण समाजावर प्रभाव पडत आहे. जसजसा ग्रामीण समाजाचा नागरी समाजाशी संपर्क वाढत आहे, तसतसा नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढता प्रभाव संशोधकाच्या निदर्शनास येतो. ब्रिटीशांच्या राजवटीत नागरी समाजशी ग्रामीण समाजाचा संपर्क वाढला. रस्ते, वाहतुकीची साधने, पोस्ट, तारायंत्रे इ. घटकांमुळे ग्रामीण समाज व नागरी समाज यांचा संपर्क वाढू लागला. त्यामुळे साहजिकच नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील प्रभाव वाढु लागल्याचे संशोधकास दिसून येते. नागरी जीवनाचा ग्रामीण जीवनावर फार मोठा प्रभाव पडून परिणाम होतो. नागरी जीवनाचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती ग्रामीण समाजातील लोकांमध्ये दिसुन येते. त्यामुळे साहजिकच ग्रामीण जीवनाचे मुळ स्वरुप बदलत जाते. ग्रामीण जनता शहराकडे स्थलांतरित होत असल्यामुळे ग्रामीण रचनेमध्ये विविध स्थित्यंतरे घडतांना संशोधकास आढळुन येते. नागरी जीवनाच्या भौतिकवाद, विलासी प्रवृत्ती, पोषाख, खान-पान, मनोरंजनाची साधने, व्यसने यांच्या प्रभावामुळे ग्रामीण जीवन साहजिकच प्रभावित होते. त्यामुळे प्रस्तुत 'नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढता प्रभाव' या शोधनिबंधात नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढता प्रभावाचे अध्ययन संशोधकाने केले आहे.

**पुर्व साहित्याचा अभ्यास:** प्रस्तुत शोधनिबंधाशी संबंधीत व विषयाशी निगडीत पैलुचा अभ्यास, संशोधने, अभ्यासकांनी अभ्यासलेले विषय, वेगवेगळे प्रोजेक्ट, मासिके, वर्तमानपत्रातील लेख इ. अशा विविध स्तरावर नागरी समाज आणि ग्रामीण समाजाशी निगडीत पुर्व अभ्यास झालेले आहेत. संशोधन क्षेत्रात आजपर्यंत झालेल्या संशोधनाच्या आढाव्यावरुन नागरी समाज आणि ग्रामीण समाजावर फारसे संशोधन झालेले नाही. काही संशोधकांनी नागरी समाज आणि ग्रामीण समाजावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला, परंतु तो पुरेसा दिसत नाही, म्हणुन नागरी समाज आणि ग्रामीण समाजाशी संबंधीत अशा प्रकारचे संशोधन हाती घेण्याची गरज आहे. प्रस्तुत शोधनिबंध नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढत्या प्रभावावर प्रकाश टाकणारा असुन समाज व्यवस्थेतील या दुर्लक्षित विषयात नवीन ज्ञानाची निर्मिती करणे आणि होऊन गेलेल्या थोड्याबहुत अभ्यासाचे परिक्षण करणे हाही शोधनिबंधाचा उद्देश आहे. याविषयी संशोधकाने शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करुन शोध निबंधाशी संबंधीत महत्वपूर्ण तथ्ये संकलीत केलेली आहेत. संशोधकाची भुमिका साहित्याच्या पुनरावलोकनामध्ये फारच महत्वाची असते. कारण संशोधकाला संशोधन विषयाच्या स्पष्टीकरणासाठी भरपुर वाचन करुन माहिती मिळवावी लागते. संशोधकाने शोधनिबंधाच्या संशोधन विषयाशी संबंधीत विविध संदर्भ ग्रंथ, संशोधन पेपर्स, विविध जर्नल्स, विविध लेख, अहवाल, संशोधनपर अप्रकाशित प्रबंध इ. चा शोध घेतलेला आहे. संशोधकाने निवडलेल्या शोधनिबंधाशी संबंधीत अनेक उपघटकासंदर्भात झालेल्या शोधांचा या घटकांतील बदलांसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा आढावा घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे. नागरी समाज आणि ग्रामीण समाजाशी संबंधीत झालेले शोधात्मक अभ्यास

चर्चासत्रे, परिसंवाद, परिषदा इ. मध्ये उमटलेला सुर आणि संशोधन विषयाच्या शोधनिबंधाशी संबंधीत असलेले साहित्य या सर्वांचा आढावा संशोधकाने घेतलेला आहे. प्रस्तुत शोधनिबंध नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढत्या प्रभावावर समाजशास्त्रीय दृष्ट्या प्रकाश टाकणारा आहे.

**अध्ययनाचे उद्देश:** नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढत्या प्रभावाचा अभ्यास करणे.

**अध्ययनाचे गृहितकृत्ये:** नागरी समाजाचा ग्रामीण समाजावर प्रभाव पडतो.

**अध्ययन पध्दती:** प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संशोधकाने विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला असुन या विषयाशी निगडीत शोधनिबंधातील विवेचन दुय्यम स्त्रोतांवर अवलंबुन आहे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, माहिती पुस्तिका इत्यादींचा आधार घेतला आहे.

**तथ्यांचे विश्लेषण:** कोणत्याही समाजाचे स्वरुप स्थीर नाही. तर त्यात नेहमी परिवर्तन होत असते. समाजाचे स्वरुप व रचना काळाच्या ओघात नवीन रुप धारण करीत असते. नागरी समाजाचा प्रभाव पडून ग्रामीण समाजरचनेत देखील अनेक बदल होत आहेत. या बदलास पोषक परिस्थिती प्रामुख्याने ब्रिटीश राजवटीपासून गती मिळाली. ब्रिटीशांच्या राजवटीत प्रगत समाजाशी अर्थात नागरी समाजाशी संपर्क वाढला. रस्ते, वाहतुकीची साधने, पोस्ट, तारायंत्रे इ. घटकांमुळे ग्रामीण समाज व नागरी समाज यांचा संपर्क वाढू लागला. त्यामुळे प्रादेशिक अलगता हे वैशिष्ट्ये वेगाने संपुष्टात येऊ लागले. ब्रिटीशांनी औद्योगिकरणाला चालना दिल्यामुळे नागरीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला. औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमुळे परंपरागत ग्रामीण समाजावर प्रभाव पडून फार मोठा आघात झाला. त्यातूनच ग्रामीण समाजव्यवस्थेतील बलुतेदारी व्यवस्था मोडकळीस आली आणि त्यामुळे त्यात कार्यरत असलेले कुशल-अकुशल कारागीर बेकार झाले. तर त्यांना नागरी समाजातील औद्योगिक क्षेत्रात किंवा कारखान्यात रोजगाराची संधी उपलब्ध झाली. नागरीकरणाची प्रक्रिया कार्यरत होऊन असंख्य ग्रामीण समाजातील व्यक्ती स्थलांतरीत होऊ लागल्या. याचा परिणाम ग्रामीण समाजात होऊन परिवर्तनशिलता वाढीस लागली. हा फार मोठा प्रभाव नागरी समाजाचा ग्रामीण समाजावर वाढलेला संशोधकास दिसुन येतो. त्याचप्रमाणे ब्रिटीशांच्या राजवटीत पाश्चात्य विचारसरणीचा प्रभाव, विज्ञान व तंत्रज्ञानाची ओळख, भौतिक शिक्षण, धर्म निरपेक्षता, नवशिक्षित तरुण त्यांचे धर्म व समाजसुधारणाविषयक कार्य आणि त्यांनी दाखविलेले दोष इत्यादीचाही परिणाम ग्रामीण समाजातील बदलास पोषक ठरल्याचे संशोधकाच्या निदर्शनास येते. स्वातंत्र्योत्तर काळात तर ग्रामीण समाजात फार मोठा बदल घडून आला. ग्रामीण समाजाच्या कल्याणातच देशाचे कल्याण आहे म्हणून अज्ञान, अंधश्रध्दा, आर्थिक मिळवणुक, परंपरागता इ. चे ग्रामीण समाजातून उच्चाटन करण्यासाठी शासकीय व अशासकीय स्तरावर प्रयत्न झाले असे संशोधकाचे मत आहे. शहरी जीवनाचा ग्रामीण जीवनावर फार मोठा परिणाम होतो. नगरीय जीवनाचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती ग्रामीण लोकात असते. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे मुळ स्वरुप बदलत जाते. पण ते पुर्णपणे नगरीय बनत नाही. ग्रामीण जनता शहराकडे स्थलांतरीत होत असल्यामुळे ग्रामीण रचनेमध्ये विविध स्थित्यंतरे घडतांना संशोधकास दिसतात. नागरी जीवनाच्या भौतिकवाद, विलासी प्रवृत्ती, पोशाख, खान-पान, मनोरंजनासाठी साधने, व्यसने यांच्या प्रभावामुळे ग्रामीण जीवन प्रभावित होते असे संशोधनकाचे स्पष्ट मत आहे. ग्रामीण समाजातील लोकांचे जीवन पुर्णत: निसर्गावर अवलंबुन असते. त्यांचे जीवन निव्वळ शेतीशी संबंधीत असल्याने निसर्ग ठेवील तसे त्याला टिकुन राहावे लागते. भौतिक पर्यावरणाच्याबाबतीत ग्रामीण जीवनात नैसर्गिकता दिसून येते. मात्र नागरी जीवनात पर्यावरणात कृत्रिमता दिसून येते. औद्योगिकरणाची प्रक्रिया जसजशी वाढू लागली. त्या प्रमाणात कारखान्यांत कामगारांची आवश्यकता भासू लागली. संपुर्णत: निसर्गावर अवलंबुन असलेला ग्रामीण माणुस आकर्षक व अनाकर्षक घटकांमुळे शहराकडे धाव घेऊ लागला. स्थलांतरित होणाऱ्यांची संख्या सतत वाढत असल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. विविध प्रकारच्या सुखसोयी, रोजगार मिळण्याची हमी, व्यक्तीविकासास वाव इ. घटकांच्या प्रभावामुळे शहरांकडे ग्रामीण लोक स्थलांतरीत होऊ लागले असे संशोधकाचे ठाम मत आहे.

नागरी समाजाच्या संपर्कात ग्रामीण समाज आल्यामुळे ग्रामीण समाजातील लोकांच्या मानसिक व ध्येयवादी जीवनात बदल झाले आहे. अंधश्रध्दा, दैववाद, मागासलेपणा, भोळ्या समजुती, अडाणीपणा यासारख्या विकासाला बाधक ठरणाऱ्या बाबींना आळा बसलेला दिसतो. शहरी समाजाच्या प्रभावामुळे आधुनिक प्रगतशील विचारांचे वारे ग्रामीण समाजात वाहत आहेत. आपल्या राहणीमानात, जीवनमानात बदल घडवुन आणण्याची गरज आज ग्रामीण लोकांना जाणवु लागली आहे असे संशोधकास दिसुन येते.

नागरीकरणाची प्रक्रिया विकसित झाली आणि उद्योगधंद्याच्या प्रक्रियेमुळे नवी शहरे अस्तित्वात आली. ग्रामीण भागातुन शहराकडे लोक धाव घेऊ लागले. शहरात विविध जाती, धर्म, वंश व संस्कृतीचे लोक एकत्र राहत असल्याने त्यांच्यातील परस्पर संबंध वाढले. नागरी समुदायात विविध समुहाचे विविध व्यवसायाचे लोक एकत्र राहतात. विभिन्न जातीच्या लोकांचे एकत्र बसून खाणे-पिणे सुरु झाल्याने पुर्वीचे सामाजिक अंतर नष्ट झाले. वाहतुकीच्या व दळणवळणाच्या साधनांचा विकास झाल्यामुळे ग्रामीण भाग आणि नागरी भाग यातील अंतर कमी झाले. म्हणजेच अलिप्तता कमी झाली. देशातील भिन्न भागाशी दळणवळण प्रस्थापित करण्यासाठी रस्ते, लोहमार्ग, सागरी व हवाई वाहतुक तयार झाली. रेल्वे, बसच्या प्रवासात विविध जातीचे लोक एकत्र प्रवास करु लागले. यामुळे सामाजिक संपर्काबद्दलच्या कडक नियमांचे पालन करणे कठीण झाले. संपर्क साधनांमुळे अनेक जातींचा परस्परांशी संपर्क येऊ लागला. त्यामुळे दृष्टी व विचारात व्यापकता आली. पर्यायाने जातीभावना संपुष्टात येऊ लागली. हा नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढता प्रभाव आहे असे संशोधकाचे ठाम मत आहे.

**निष्कर्ष:** नागरी समाज हा ग्रामीण समाजातुनच विकसित झालेला असल्याने नागरी जीवनपध्दती ही ग्रामीण व नागरी अशी संमिश्र स्वरुपाची, गुंतागुंतीची बनत जाते. शहरांमध्ये उद्योग-व्यवसायाची अधिक संधी, दर्जेदार उच्च शिक्षण, प्रशिक्षणाची संधी, उच्च प्रतीचे जीवन, कलागुणांना वाव मिळण्याची शक्यता ह्यामुळे ग्रामीण समाजातील व्यक्ती शहरी समाजाकडे आकर्षित होऊन स्थलांतरीत

झाल्या. याचा परिणाम ग्रामीण समाजात होऊन परिवर्तनशीलता वाढीस लागते आणि त्याच प्रभावामुळे ग्रामीण जीवन प्रभावीत होते असे स्पष्टपणे संशोधकाच्या निदर्शनास येते.

**शिफारशी:** नागरी समाजाबरोबरच ग्रामीण समाजात औद्योगिक व्यवसाय किंवा कारखानदारी सुरु करावी. नागरी समाजाप्रमाणेच ग्रामीण समाजातदेखील उच्च शिक्षण, विविध मनोरंजनाची साधने, इ. उपलब्ध करुन द्यावी.

**संदर्भसूची :**

1. नाडगोंडे, गुरुनाथ – (1997) ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
2. सौ. अहिरे प्रतिभा / सौ. सावरगांवकर (पाटील), अरुणा-(2003) – ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
3. आगलावे, प्रदिप – (2003) – भारतीय समाज संरचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
4. मायी, सुनिल – (2013) – शहरी समाजशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
5. काचोळे, दा. धो. – (2014) – ग्रामीण नागरी प्रश्न आणि समस्या, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद
6. वाघ, रविंद्र / जाधव, सुधाकर / पगारे चुडामण –(2015)-भारतीय समाज संरचना व बदल, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव
7. खंडागळे, चंद्रकांत रघुनाथ (2021)- भारतीय ग्रामीण समाजशास्त्र, श्री. प्रसाद ग्राफिक्स, सांगली.

# नागरीकरणाचा ग्रामीण जीवनावरील परिणाम: मुर्शिदाबादवाडी गावाचे व्यष्ठी अध्ययन

**डॉ. मंजुषा मोतीराम नळगीरकर** समाजशास्त्र विभागप्रमुख, श्री. संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** नागरीकरण ही आधुनिक समाजातील एक महत्त्वाची सामाजिक-आर्थिक प्रक्रिया असून तिचा ग्रामीण जीवनावर व्यापक व खोलवर परिणाम होत आहे. औद्योगिकीकरण, शिक्षण, रोजगाराच्या संधी तसेच वाहतूक व दळणवळणाच्या विकासामुळे ग्रामीण भागातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात शहरी भागाकडे स्थलांतरित होत आहे. या प्रक्रियेचा ग्रामीण समाजरचना, अर्थव्यवस्था, संस्कृती व जीवनशैलीवर लक्षणीय प्रभाव दिसून येतो. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यात वसलेल्या मुर्शिदाबादवाडी गावावर नागरीकरणामुळे झालेले सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बदल अभ्यासणे हा आहे. या संशोधनासाठी अन्वेषणात्मक व्यष्टी अध्ययन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून १५० कुटुंबांकडून प्रत्यक्ष गावभेट, मुलाखत अनुसूची व सहभागी निरीक्षणाच्या साहाय्याने प्राथमिक माहिती संकलित करण्यात आली आहे. अभ्यासातून असे आढळून आले की, गावात मोठ्या प्रमाणात ग्रामीण-शहरी स्थलांतर झाले असून विशेषतः तरुण पिढी शिक्षण व रोजगारासाठी शहरांकडे वळलेली आहे. यामुळे संयुक्त कुटुंबपद्धतीऐवजी विभक्त कुटुंबपद्धतीचा प्रसार झाला आहे. नागरीकरणाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम झाला असून शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढलेला आहे आणि नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढलेला दिसतो. तथापि, ग्रामीण संस्कृतीचे क्षरण, सामाजिक संस्थांचे दुर्बलीकरण आणि पायाभूत सुविधांची कमतरता या समस्या देखील स्पष्टपणे दिसून येतात. त्यामुळे समतोल व शाश्वत ग्रामीण-शहरी विकास धोरणांची आवश्यकता अधोरेखित होते.

**प्रस्तावना:**नागरीकरण ही आधुनिक समाजातील एक महत्त्वाची सामाजिक-आर्थिक प्रक्रिया असून औद्योगिकीकरण, तांत्रिक प्रगती, लोकसंख्यावाढ व रोजगाराच्या संधी यांमुळे ती वेगाने घडून येत आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणारे स्थलांतर, शहरी क्षेत्रांचा विस्तार आणि शहरी जीवनशैलीचा ग्रामीण भागावर होणारा प्रभाव ही नागरीकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात. या प्रक्रियेचा ग्रामीण जीवनावर खोलवर आणि व्यापक परिणाम झालेला दिसून येतो. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या (68%) आजही ग्रामीण भागात वास्तव्यास असली तरी नागरीकरणाचा प्रभाव ग्रामीण समाजरचना, अर्थव्यवस्था, संस्कृती आणि जीवनशैलीवर स्पष्टपणे जाणवतो. ग्रामीण भागातील शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत बदल होत असून नगदी पिके, लघुउद्योग, सेवा क्षेत्र आणि बाजाराभिमुख उत्पादन पद्धतीचा प्रसार होत आहे. त्याचबरोबर ग्रामीण-शहरी स्थलांतरामुळे ग्रामीण भागातील तरुण व कार्यक्षम मनुष्यबळ कमी होत असल्याचे चित्र दिसून येते. नागरीकरणामुळे ग्रामीण समाजातील पारंपरिक संयुक्त कुटुंबपद्धतीत बदल होऊन विभक्त कुटुंबपद्धतीचा प्रसार झाला आहे. जातीय संबंध, सामाजिक नियंत्रण आणि परंपरागत मूल्यव्यवस्था यांवरही नागरीकरणाचा प्रभाव पडत असून शिक्षण, माध्यमे व तंत्रज्ञानामुळे ग्रामीण जीवनशैली अधिक आधुनिक व शहरी स्वरूपाची होत चालली आहे. तथापि, या प्रक्रियेचे काही नकारात्मक परिणामही दिसून येतात, जसे की ग्रामीण संस्कृतीचे क्षरण, सामाजिक असमतोल, बेरोजगारी आणि ग्रामीण भागातील विकासातील असमानता. “नागरीकरणाचा ग्रामीण जीवनावरील परिणाम: मुर्शिदाबाद वाडी गावाचे व्यष्ठी अध्ययन” या अभ्यासातून ग्रामीण समाजातील बदलांची दिशा, स्वरूप आणि त्याचे सकारात्मक-नकारात्मक परिणाम समजून घेता येऊ शकतात. म्हणूनच नागरीकरणाचा ग्रामीण जीवनावरील परिणाम समग्रपणे अभ्यासणे आवश्यक ठरते.

**पूर्व साहित्याचा आढावा:** भारतासारख्या विकसनशील देशात नागरीकरणाचा ग्रामीण जीवनावर होणारा प्रभाव अभ्यासकांनी विविध दृष्टिकोनांतून मांडला आहे. लेविस (१९५४) [1] व टोडॅरो (१९६९) यांनी स्थलांतराच्या सिद्धांतातून नागरीकरणाचे ग्रामीण भागावर होणारे परिणाम स्पष्ट केले आहेत. ग्रामीण भागातील अल्प रोजगार संधी, कमी उत्पन्न व शेतीवरील अनिश्चितता यामुळे ग्रामीण लोकसंख्या शहरांकडे स्थलांतर करते.[2] देसाई (१९६६) यांच्या मते, यामुळे ग्रामीण भागातील तरुण व कार्यक्षम मनुष्यबळ कमी होऊन शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होतो.[3] दुबे (१९५८) यांनी नागरीकरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत परिवर्तन होत असल्याचे नमूद केले आहे. शहरी बाजारपेठांच्या जवळ असलेल्या ग्रामीण भागात नगदी पिके, दुग्धव्यवसाय व लघुउद्योगांचा विकास झाल्याचे आढळते.[4] मात्र, काही अभ्यासकांच्या मते (सिंग, १९९९) जमीन तुकडीकरण, मजुरांची कमतरता व उत्पादन खर्च वाढणे या

समस्या अधिक तीव्र झाल्या आहेत.[5] श्रीनिवास (१९६२) यांनी ग्रामीण समाजातील बदलांचा अभ्यास करताना नागरीकरणामुळे संयुक्त कुटुंबपद्धतीचे विघटन व विभक्त कुटुंबपद्धतीचा प्रसार होत असल्याचे नमूद केले आहे. जातीय संबंध, सामाजिक नियंत्रण व परंपरागत संस्था यांमध्ये बदल होत असून शहरी मूल्ये ग्रामीण समाजात झिरपत असल्याचे त्यांच्या "संस्कृतिकरण" संकल्पनेतून स्पष्ट होते.[6] पूर्व साहित्यामध्ये नागरीकरणामुळे ग्रामीण संस्कृतीवर शहरी संस्कृतीचा प्रभाव वाढल्याचे दिसून येते. रेडफील्ड (१९५६) यांच्या मते, लोकसंस्कृतीचे स्वरूप बदलत असून पारंपरिक रूढी, सण-उत्सव व जीवनपद्धती आधुनिकतेकडे झुकत आहेत. माध्यमे, शिक्षण व तंत्रज्ञानामुळे ग्रामीण जीवनशैली अधिक शहरी होत चालली आहे.[7] नियोजन मंडळ व विविध सामाजिक अभ्यासांनुसार नागरीकरणामुळे ग्रामीण भागात रस्ते, वीज, शिक्षण व आरोग्य सुविधा काही प्रमाणात वाढल्या आहेत. मात्र, ही प्रगती असमान असून शहरी व ग्रामीण भागातील दरी कायम असल्याचे अनेक अभ्यासकांनी अधोरेखित केले आहे. पूर्व साहित्याच्या अभ्यासातून असे निष्पन्न होते की नागरीकरणाचा ग्रामीण जीवनावर सकारात्मक व नकारात्मक दोन्ही प्रकारचा परिणाम झाला आहे. आर्थिक संधी व सुविधा वाढल्या असल्या तरी स्थलांतर, सांस्कृतिक बदल व सामाजिक असमतोल या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे समतोल व शाश्वत ग्रामीण-शहरी विकास धोरणांची आवश्यकता असल्याचे अभ्यासकांनी स्पष्ट केले आहे.

**अध्ययनाचे उद्देश: १.** नागरीकरणामुळे मुर्शिदाबादवाडी गावात झालेले ग्रामीण शहरी स्थलांतर अभ्यासणे. २. नागरीकरणाचा मुर्शिदाबादवाडी गावातील अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासणे. ३. नागरीकरणामुळे मुर्शिदाबादवाडी गावातील समाज रचना व कुटुंब पद्धतीवरील झालेला परिणाम अभ्यासणे. ४. नागरीकरणामुळे मुर्शिदाबादवाडी गावातील संस्कृती व जीवनशैलीवर झालेला परिणाम अभ्यासणे. ५. मुर्शिदाबादवाडी गावातील पायाभूत सुविधांमध्ये झालेल्या सुधारणांचा आढावा घेणे.

**अध्ययन पद्धती:** प्रस्तुत विषयावरील व्यष्टी अध्ययन करण्यासाठी अन्वेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. तथ्य संकलनासाठी प्रत्यक्ष गावभेट, मुलाखत व सहभागी निरीक्षण या तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे.

**तथ्याचे विश्लेषण:** मुर्शिदाबादवाडी हे गाव छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यात वसलेले आहे. छत्रपती संभाजीनगर पासून १६ किलोमीटर अंतरावर मुर्शिदाबादवाडी हे गाव आहे.गावाचे एकूण क्षेत्रफळ ३७५. ८१ हेक्टर एवढे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार गावाची एकूण लोकसंख्या ११८० एवढी होती ती आता जवळपास १६०० एवढी झाली आहे. हे गाव एकूण २०६ कुटुंबासह सहा वस्त्यांमध्ये विभागले गेले आहे. मुख्य गावात एकूण ४० घरे आहेत. बाकीची घरे मोरे वस्ती, विटेकर वाडी, जामकूट, विठ्ठलवाडी व नवीन मळा या पाच वस्त्यांमध्ये आहेत. गावातील एकूण २०६ कुटुंबापैकी १५० कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले. ज्यात प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी मुलाखत अनुसूची या तंत्राचा अवलंब करण्यात आला. मुलाखत अनुसूचित द्वारे संकलित केलेल्या तथ्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे आहे. प्रस्तुत संशोधनातील १५० कुटुंबांमध्ये साक्षरतेचे प्रमाण ९० टक्के आढळून आले. कुटुंबप्रमुखाचे शिक्षण अभ्यासले असता ७५ म्हणजेच ५०% कुटुंब प्रमुख हे प्राथमिक शिक्षण घेतलेले आहेत. तर ३४% कुटुंबप्रमुख माध्यमिक शिक्षण घेतलेले आहेत. उर्वरित अत्यंत अल्प २४ म्हणजेच १६% कुटुंब प्रमुख उच्च शिक्षण घेतलेले आहेत. गावात सर्वच कुटुंबे हिंदू धर्माची आहेत. गावाचे नाव जरी मुर्शिदाबाद असले तरी तिथे एकही मुस्लिम घर नाही. आता आपण उत्तरदात्याचा जातसंवर्ग पाहू.

गावातील व्यक्तींचा जात संवर्ग अभ्यासला असता एकूण १५० उत्तरदात्यांपैकी १३९ म्हणजेच ९२.६७% उत्तरदाते खुल्या जातसंवर्गातील आहेत. हे सगळेच उत्तरदाते मराठा जातीचे आहेत. उर्वरित ११ म्हणजेच ७.३३% उत्तरदाते इतर जाती संवर्गाचे आहेत. गावात ८ कुटुंबे अनुसूचित जमाती (भिल्ल) संवर्गाची आहेत आणि २ कुटुंबे अनुसूचित जाती (चांभार) संवर्गाचे आहेत. गावात केवळ १ कुटुंब इतर मागास जात (न्हावी) संवर्गाचे आहे.यावरून असे म्हणता येईल की गावात बारा बलुतेदारी व्यवस्था नाही.

**स्थलांतर:** नागरीकरणाचा सर्वात मोठा प्रभाव हा स्थलांतरावर होत असतो. मुर्शिदाबादवाडी हे गाव छत्रपती संभाजीनगर पासून केवळ १६ किलोमीटर अंतरावर आहे. म्हणून मुर्शिदाबाद वाडी गावामध्ये तीन प्रकारचे स्थलांतर पाहायला मिळाले. गावातील २५% व्यक्ती या शहरांमध्ये रोजगार व शिक्षणासाठी स्थायिक झालेल्या आहेत. त्यांची गावातील घरे ही कुलूप बंद असतात. गावातील प्रथम नागरिक असलेले सरपंच व उपसरपंच देखील गावात राहत नाहीत. ते छत्रपती संभाजीनगर ते मुर्शिदाबादवाडी असे येणे जाणे करतात. आपल्या कुटुंबातील तरुण मुले काय करतात असे विचारले असता पुढील माहिती मिळाली,

**तक्ता-1 - गावातील तरुण मुलांच्या वेळेची गुंतवणूक**

| अ.क्र | वेळेची गुंतवणूक | वारंवारिता |
|---|---|---|
| १ | उच्च शिक्षण घेतात | ६७ (४४.६७%) |
| २ | कंपनीत कामाला जातात | ३५ (२३.३३%) |
| ३ | शेतात काम करतात | ३३ (२२.००%) |
| ४ | व्यवसाय करतात | १५ (१०.००%) |
| | **एकूण** | **१५० (१००%)** |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की एकूण दीडशे कुटुंबांपैकी ६७ म्हणजेच ४४.६७% कुटुंबातील व्यक्तींनी त्यांच्या कुटुंबातील तरुण मुले शहरात उच्च शिक्षण घेत आहेत असे सांगितले. त्या खालोखाल ३५ म्हणजेच २३.३३% कुटुंबातील व्यक्तींनी तरुण मुले शहरात कंपनीत कामाला जातात असे सांगितले आहे. ३३ म्हणजेच २२% कुटुंबीयांनी आमची तरुण मुले शेतात काम करतात असे सांगितले. उर्वरित १५ म्हणजेच १०% कुटुंबीयांनी त्यांची तरुण मुले शहरात व्यवसाय करतात असे सांगितले आहे. यावरून हे स्पष्ट होते की, गावातील १७१ म्हणजेच ७८% कुटुंबातील तरुण मुले हे शिक्षणासाठी अथवा कामासाठी छत्रपती संभाजीनगर शहराकडे जात आहेत. म्हणून गावातील ग्रामीण शहरी स्थलांतर हे स्थायी व अस्थायी अशा दोन प्रकारचे आहे.

तिसरे स्थलांतर म्हणजे गाव ते शेतवस्तीवरील स्थायी स्वरूपाचे स्थलांतर होय. गावातील ५०% व्यक्तींकडे गावात व शेत वस्तीवर अशी दोन घरे होती. गावातील घरांमध्ये त्यांचे म्हातारे आई वडील राहतात व ते स्वतः शेत वस्तीवरील घरात राहत होते.

**सामाजिक रचना व कुटुंबपद्धतीवरील परिणाम:** मुर्शिदाबादवाडी गावामध्ये जातीनिहाय सामाजिक रचना पाहायला मिळते. यापूर्वी सांगितल्याप्रमाणे गावात मराठा जात सोडून बाकीच्या केवळ तीनच जातीची कुटुंबे आहेत. पण या तिन्ही जातीची कुटुंबे ही गाव कुसा बाहेर पाहायला मिळतात, त्यांचे वेगळे अस्तित्व त्या ठिकाणी दिसते. गावातील महत्त्वाची पदे असो अथवा राजकारण असो त्या ठिकाणी प्रबळ जातीचा प्रभाव अधिक दिसतो. मुर्शिदाबादवाडी गावातील जातीय संबंध फारसे सलोख्याचे आढळलेले नाही. हे गाव एका प्रमुख जातीचेच असल्यामुळे जो सलोखा व एकी असायला हवी होती ती दिसली नाही. मागास जातींची मोजकी घरे होती. जरी आज गावामध्ये स्पृश्य अस्पृश्यता पाळली जात नसली तरीही ग्रामीण मानसिकतेमध्ये जातीय भेदभावाची वर्तणूक पाहायला मिळते. गावामध्ये आजही अनौपचारिक सामाजिक नियंत्रण विशेषतः जात पंचायतीच्या मार्फत केलेले नियंत्रण पाहायला मिळते. नागरीकरणाचा प्रभाव गावातील जातीय संरचनेवर तसेच जातीय प्रभुत्वावर दिसून आला नाही. मात्र परंपरागत सामाजिक संस्था ज्यात कुटुंब संस्था, विवाह संस्था, शिक्षण संस्था,अर्थसंस्था यामध्ये बदल होत असून शहरी संस्कृती व शहरी मूल्य त्यात रुजत असलेली दिसतात. प्रस्तुत संशोधनातील १५० उत्तरदात्यांपैकी १२० म्हणजेच ८० % उत्तरदात्यांची कुटुंब पद्धती विभक्त स्वरूपाची दिसून आली. ज्यात सरासरी १ ते ४ सदस्य संख्या होती. केवळ ३० म्हणजेच २०% उत्तरदात्यांची कुटुंब पद्धती संयुक्त स्वरूपाची दिसून आली. गावाची पाहणी करताना प्रत्यक्ष निरीक्षणात एक बाब प्रकर्षाने निदर्शनास आली की, गावातील ५०% व्यक्तींकडे गावात व शेत वस्तीवर अशी दोन घरे होती. गावातील घरांमध्ये त्यांचे म्हातारे आई वडील राहत असत व ते स्वतः शेत वस्तीवरील घरात राहत होते. त्यांना केवळ दोन वेळचा जेवणाचा डबा पुरविला जात होता.

शहरी संस्कृतीत घडणारे आंतरजातीय व प्रेम विवाह असे प्रकार गावात घडत नाहीत. मात्र पारंपारिक ग्रामीण विवाह संस्कृती ऐवजी शहरी संस्कृती प्रमाणे प्री-वेडिंग शूटिंग, डेस्टिनेशन वेडिंग, डीजे व थाटमाट यावर भरमसाठ पैसा खर्च केला जातोय. पारंपारिक ग्रामीण विवाह पंधरा दिवस चालायचे. आज विवाहाचा कालावधी कमी झाला आहे. मुर्शिदाबादवाडी गावामध्ये एका दिवसात साखरपुडा व विवाह अशी पद्धती देखील पाहायला मिळाली. गावातील अनेक व्यक्तींशी चर्चा करताना विवाहाच्या संदर्भात एक मोठी समस्या समोर आली. मुर्शिदाबादवाडी गावात आज जवळपास १०० तरुण असे आहेत की, ज्यांचे विवाह होत नाहीत. त्यांना लग्नासाठी मुलगी मिळत नाहीये. या मागचे कारण जाणून घेतले असता, दोन कारणे समोर आली. पहिले कारण म्हणजे गावातील बहुतांश कुटुंबे ही सधन आहेत आणि ह्या कुटुंबातील मुलांमध्ये दारूचे आणि गुटक्याचे व्यसन मोठ्या प्रमाणात आहे. तसेच मुलांची वर्तणूक देखील चांगली नसल्यामुळे त्यांना कुणीही मुलगी द्यायला तयार होत नाही. दुसरे कारण म्हणजे मुलीची व तिच्या आई-वडिलांची शेती वाला मुलगा पाहिजे परंतु तो शहरात नोकरी करणारा व स्थायिक पाहिजे, मुलगी शेतात काम करणार नाही अशी असलेली अपेक्षा होय. वधू मुली व तिच्या पालकांमध्ये शहरी संस्कृतीचे असलेले आकर्षण प्रकर्षाने जाणवले. गावातील मुलींचे विवाह कधी केले जातात याविषयी विचारले असता, पुढील माहिती मिळाली

**मुलींचा विवाह करण्याचा शैक्षणिक कालावधी:** असे निदर्शनास येते की, प्रस्तुत संशोधनातील १५० उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ८३ म्हणजेच ५५.३३% उत्तरदात्यांनी बारावी झाल्यावर मुलींचे विवाह केले जातात असे सांगितले. त्या खालोखाल ४५ म्हणजेच ३०% उत्तरदात्यांनी पदवी शिक्षण झाल्यावर मुलींची विवाह केले जातात असे सांगितले. तर मुलगी आत्मनिर्भर झाल्यावर तिला नोकरी लागल्यावर लग्न केले जाते असे १५ म्हणजेच १०% उत्तरदात्यांनी सांगितले. तर अतिशय अल्प ७ म्हणजेच ४.६७% उत्तरदात्यांनी दहावी झाल्यावर मुलींचे विवाह केले जातात असे सांगितले. यावरून हे स्पष्ट होते की गावातील बहुतांश मुलींचे विवाह सरासरी १७ ते १८ वयाच्या दरम्यान केले जातात. असे असले तरी मागील काही वर्षांमध्ये ग्रामीण भागात बालविवाहाचे प्रमाण (१८ वर्षाच्या आत मुलीचे विवाह) वाढले आहे.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणाम:** गावात बहुतांश कुटुंबे ही मराठा जातीचे आहेत आणि या जातीचा पारंपारिक व्यवसाय हा शेती असल्यामुळे गावातील १३८ म्हणजेच ९२ टक्के व्यक्तींचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. केवळ १२ म्हणजेच ८% व्यक्ती इतर व्यवसाय ( दुकान व मजुरी) करतात. शेती व्यवसाय करणाऱ्या सर्वच १३८ उत्तरदात्यांकडे स्वतःची शेती आहे. शेतीचे क्षेत्रफळ विचारले असता पुढील माहिती मिळाली. ज्यांच्याकडे शेती आहे अशा १३८ उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ८३ म्हणजेच ६०.१५% उत्तरदात्यांकडे १ ते ५ एकर एवढे शेतीचे क्षेत्र आहे. त्या खालोखाल ३७ म्हणजेच २६.८१% उत्तरदात्यांकडे १ एकर पेक्षाही कमी शेतीचे क्षेत्र आहे. सर्वात अल्प १८ म्हणजेच १३.०४% उत्तरदात्यांकडे ५ एकर पेक्षा अधिक शेतीचे क्षेत्र आहे. बहुतांश उत्तरदात्यांकडे शेतीचे क्षेत्र कमी आढळले याचे प्रमुख कारण म्हणजे पिढीनिहाय होत असलेले शेतीचे विभाजन होय.

**शेतीत घेतली जाणारी पिके:** शेतकरी उत्तरदात्यांना शेतात घेतल्या जाणाऱ्या प्रमुख पिका विषयीची माहिती विचारली असता, पुढील माहिती मिळाली.

**तक्ता-२ शेतकरी उत्तरदात्यांच्या शेतीत घेतली जाणारी प्रमुख पिके**

| अ.क्र | प्रमुख पिके | वारंवारिता |
|---|---|---|
| १ | भाजीपाला | ६७ (४८.५५%) |
| २ | मका | ४५ (३२.६०%) |
| ३ | कापूस | १५ (१०.८७%) |
| ४ | वरील सर्व | ११ (७.९८%) |
| | **एकूण** | **१३८ ००%)** |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, एकूण १३८ उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ६७ म्हणजेच ४८.५५% उत्तरदात्यांनी भाजीपाला हे पीक घेतले जाते असे सांगितले. त्या खालोखाल ४५ म्हणजेच ३२.६०% उत्तरदात्यांनी मका हे पीक घेतले जाते, १५ म्हणजेच १०.८७% उत्तरदात्यांनी कापूस हे पीक घेतले जाते व सर्वात कमी ११ म्हणजे ७.९८% उत्तरदात्यांनी वरील सर्व पीक आम्ही शेतात घेतो असे सांगितले. यावरून हे स्पष्ट होते की नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल अधिक आहे. गावापासून छत्रपती संभाजीनगरचे अंतर कमी असल्यामुळे तसेच भाजीपाल्याची मागणी अधिक असल्यामुळे प्रामुख्याने भाजीपाला पीक या गावात घेतले जाते.

**शेतीलापूरक जोडधंदा**: एकूण १३८ शेतकरी उत्तरदात्यांपैकी केवळ ४२ म्हणजेच ३०.४३% उत्तरदाते शेतीला पूरक जोडधंदा करतात. ज्यामध्ये सर्वाधिक शेतकरी ३१ म्हणजे ७३.८०% शेतकरी दुग्ध व्यवसाय करतात व उर्वरित ११ म्हणजेच २६.२०% उत्तरदाते शेळी पालन व्यवसाय करतात.

**कुटुंबाचे मासिक उत्पन्न:** संशोधनातील सर्वच उत्तरदात्यांना कुटुंबाचे मासिक उत्पन्न विचारले असता पुढील माहिती मिळाली. एकूण १५० उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ६९ म्हणजेच ४६ टक्के उत्तरदात्यांनी आपले मासिक उत्पन्न २० हजारापेक्षा अधिक असल्याचे सांगितले. त्या खालोखाल ५४ म्हणजेच ३६ टक्के उत्तरदात्यांनी आपले मासिक उत्पन्न १० हजारापेक्षा कमी असल्याचे सांगितले. सर्वात कमी २७ म्हणजेच १८% उत्तरदात्यांनी आपले मासिक उत्पन्न १० ते २० हजारा दरम्यान असल्याचे सांगितले. प्रत्यक्ष दर्शनी उत्तरदात्यांची घरे, घरातील भौतिक सोयी सुविधा व त्यांच्याकडे असलेली वाहने यावरून त्यांचे आर्थिक उत्पन्न हे अधिक असल्याचे जाणवत होते. बहुतांश उत्तरदात्यांनी आपले मासिक उत्पन्न कमीत कमी सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. गावातील बहुतांश शेतकरी उत्तरदाते सकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत शेती कामात व्यस्त असतात. पारंपारिक पद्धती ऐवजी आधुनिक पद्धतीने शेती केली जाते. रासायनिक खते व कीटकनाशके, संकरित बियाणे, ट्रॅक्टर, ठिबक सिंचन, कापणी यंत्र व मळणी यंत्र अशा आधुनिक पद्धतीचा वापर केला जातो. म्हणून मुर्शिदाबादवाडी गावातील अर्थव्यवस्थेवर नागरीकरणाचा सकारात्मक परिणाम होऊन कृषी अर्थव्यवस्थेला अधिक चालना मिळाली आहे.

**ग्रामीण संस्कृती व जीवनशैलीवरील परिणाम:** मुर्शिदाबादवाडी गावात आजही काही प्रमाणात ग्रामीण संस्कृतीचे दर्शन होते. गावात धार्मिक कार्यक्रम जसे की मंदिरामध्ये सकाळ संध्याकाळ आरती व भजन होतात. गावात सप्ताह भरतो. विविध सण उत्सव पारंपारिक पद्धतीने साजरे केले जातात. ग्रामीण संस्कृतीमध्ये कुटुंब पद्धती विशेषता संयुक्त कुटुंब पद्धती, वडील वडीलधाऱ्या व्यक्तींविषयी आदर आणि प्रत्येक नातेसंबंधाला दिले गेलेले महत्त्व आज नागरीकरणामुळे कमी होत असलेले दिसते. कुटुंबातील वयस्कर व्यक्तींना जो मान होता व कुटुंबातील सर्व निर्णय घेण्याचे अधिकार होते ते आता दिसत नाहीत. शहरी संस्कृती प्रमाणे व्यक्ती स्वातंत्र्य व भौतिक गोष्टींना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शेतीसाठी भावाभावांमध्ये, भाऊ बहिणी मध्ये व वडील मुलांमध्ये वाद निर्माण होत आहेत.गावाची जीवनशैली ही आधुनिक बनली आहे. शहरी संस्कृती सारखे खानपान, पोशाख, भाषा व भौतिक सोयी सुविधांचा अवलंब केला जात आहे.

**पायाभूत सुविधा व जीवनमान:** मुर्शिदाबादवाडी हे गाव जळगाव महामार्गापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असून देखील गावात पायाभूत सुविधा दिसल्या नाहीत. गावात अंतर्गत कच्चे रस्ते आहेत, गावात केवळ एकच छोटेसे दुकान आहे. गावात कापड दुकान, किराणा दुकान,भांड्याचे दुकान व प्राथमिक आरोग्य केंद्र अशा सुविधा नाहीत.

गावात शिक्षणासाठी केवळ एक जिल्हा परिषद शाळा आहे.जी शाळा केवळ सातव्या वर्गापर्यंत आहे. सध्या या शाळेमध्ये केवळ ४२ विद्यार्थी आहेत. पुढचे शिक्षण घेण्यासाठी मुलांना बाहेरगावी जावे लागते. गावातील सधन कुटुंबातील बहुतांश मुले बाजार सावंगी येथील इंग्रजी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. बाकीची मुले चौका येथील शाळेत शिक्षण घेतात.

गावात पारंपारिक पद्धतीची जुनी घरे फारशी पाहायला मिळत नाहीत. प्रस्तुत संशोधनातील १५० उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ८५ उत्तरदात्यांकडे स्लॅब चे घर आहे. त्या खालोखाल ६० उत्तरदात्यांकडे पत्राचे घर आहे व केवळ ५ उत्तरदात्यांकडे मातीची जुनी घरे आहेत. घरातील मातीच्या भांड्यांन ऐवजी स्टीलची भांडी आली आहेत. चुलीचा वापर जवळपास ७० टक्के कमी झाला आहे. बहुतांश घरी लाईटची सुविधा, शौचालय व स्नानगृह याची व्यवस्था आहे. गावकऱ्यांना पिण्याचा पाण्याचा मुख्य स्रोत कोणता आहे हे विचारले असता, एकूण दीडशे उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ९९ म्हणजेच ६६% उत्तरदात्यांनी विहीर हे स्त्रोत सांगितले. तर ४५ म्हणजेच ३० टक्के उत्तरदात्यांनी नळ हे स्त्रोत सांगितले. तर सर्वात कमी ६ म्हणजे ४ टक्के उत्तरदात्यांनी हातपंप हे स्त्रोत सांगितले. गावात राहणाऱ्या उत्तरदात्यांना नळाची सुविधा मिळालेली आहे. परंतु शेत वस्तीवर राहणारे उत्तरदाते हे विहिरीच्या पाण्यावर व हातपंपावर अवलंबून आहेत. बहुतांश उत्तरदात्यांकडे स्वतःची वाहने आहेत. ज्यात दुचाकी वाहने असणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक ९० टक्के आहे. तर चार चाकी वाहन असणाऱ्यांचे प्रमाण १० टक्के आहे.

**निष्कर्ष: १.** मुर्शिदाबादवाडी गावात मोठ्या प्रमाणात ग्रामीण शहरी स्थलांतर झाले आहे. २. मुर्शिदाबादवाडी गावातील अर्थव्यवस्थेवर नागरीकरणाचा सकारात्मक परिणाम होऊन कृषी अर्थव्यवस्थेला अधिक चालना मिळाली आहे. ३. नागरीकरणाचा प्रभाव गावातील जातीय संरचनेवर तसेच जातीय प्रभुत्वावर दिसून आला नाही. मात्र परंपरागत सामाजिक संस्था ज्यात कुटुंब संस्था, विवाह संस्था, शिक्षण संस्था,अर्थसंस्था यामध्ये बदल होत असून शहरी संस्कृती व शहरी मूल्य त्यात रुजत असलेली दिसतात. ४. मुर्शिदाबादवाडी गावातील ग्रामीण संस्कृती व जीवनशैलीमध्ये बदल घडून येत आहेत. गावाची जीवनशैली ही आधुनिक बनली आहे. शहरी संस्कृती सारखे खानपान, पोशाख, भाषा व भौतिक सोयी सुविधांचा अवलंब केला जात आहे. ५. मुर्शिदाबादवाडी गावातील पायाभूत सुविधांमध्ये फारशा सुधारणा झालेल्या दिसत नाहीत

**शिफारशी:** **१.** गावात शेतीपूरक उद्योग, प्रक्रिया उद्योग व लघुउद्योग सुरू करण्यासाठी विशेष शासकीय योजना राबवाव्यात. २. ग्रामीण तरुणांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन स्थानिक रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात. ३. पीकविविधीकरण, सेंद्रिय व कमी खर्चिक शेती पद्धतींचा प्रसार करावा. ४. शेतकऱ्यांना थेट बाजारपेठेशी जोडण्यासाठी FPO किंवा सहकारी संस्था स्थापन कराव्यात. ५. दुग्धव्यवसाय, शेळीपालन व कुक्कुटपालन यांसारखे शेतीपूरक जोडधंदे प्रोत्साहित करावेत. ६. गावातील शैक्षणिक सुविधा सुधारून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय करावी. ७. मुलींच्या उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देऊन लवकर विवाह रोखण्यासाठी जनजागृती करावी. ८. जातीय सलोखा वाढवण्यासाठी सामाजिक एकोपा व सहभागात्मक उपक्रम राबवावेत. ९. पाणी, रस्ते, वीज व आरोग्य सुविधा सुधारून गाव-केंद्रित विकासावर भर द्यावा.

**संदर्भसूची:**

१) लेविस. डब्ल्यू. १९५४. "इकॉनोमिक डेव्हलपमेंट विथ अनलिमिटेड सप्लाईज ऑफ लेबर". द मंचेस्टर स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड सोशल स्टडीज. पृ. १३९—१६५

२) टोडॅरो. एम. पी. १९६९. "मोडेल ऑफ लेबर मायग्रेशन अँड अर्बन एम्प्लॉयमेंट". अमेरिकन इकॉनोमिक रिव्ह्यू. पृ. १३८—१४८

३) देसाई. ए. आर. १९६६. रुरल सोशॉलॉजी इन इंडिया. बॉम्बे. पॉप्युलर प्रकाशन. पृ. ६७—८५

४) दुबे. एस. सी. १९५८. इंडियाज चेंजिंग व्हिलेज. लंडन. रूट लेज अँड केगन ऑल बॉल. पृ. ९२—११८

५) सिंग. के. १९९९. रुरल डेव्हलपमेंट प्रिन्सिपल पॉलिसीज अँड मॅनेजमेंट. न्यू दिल्ली. सागे पब्लिकेशन. पृ. १२१—१४०

६) श्रीनिवास. एम. एन. १९६२. सोशल चेंज इन मॉडर्न इंडिया. ब्रेकली युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस. पृ. ४२—५७

७) रेडफील्ड. आर. १९५६. सोसायटी अँड कल्चर. शिकागो युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रेस. पृ. २३—४०.

# नागरीकरण, ग्रामीण शिक्षण व शासकीय धोरणे: समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. संदीप पालवे** समाजशास्त्र विभाग,श्री. आबासाहेब काकडे महाविद्यालय, बोधेगाव, ता-शेवगाव जि. अहिल्यानगर

**सारांश:** प्रस्तुत संशोधन लेखात नागरीकरणाची प्रक्रिया, ग्रामीण शिक्षणव्यवस्था आणि शासकीय धोरणे यांमधील परस्परसंबंधाचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले आहे. भारतातील सामाजिक रचना ही जात, वर्ग व लिंगाधारित विषमतेने प्रभावित असल्यामुळे नागरीकरणाचा प्रभाव शिक्षणाच्या उपलब्धता, गुणवत्ता व समावेशनावर असमतोल स्वरूपात पडतो. ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेवर नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या संधी व आव्हानांचा अभ्यास करताना सामाजिक समावेशन, आंतरछेदात्मकता आणि सांस्कृतिक पुनरुत्पादन या संकल्पनांचा आधार घेण्यात आला आहे. शिक्षणाचा हक्क कायदा, समग्र शिक्षा अभियान यांसारख्या शासकीय धोरणांची भूमिका आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांचेही परीक्षण करण्यात आले आहे. लेखाचा निष्कर्ष असा की, नागरीकरणाच्या युगात ग्रामीण शिक्षण केवळ पायाभूत सुविधांपुरते मर्यादित न राहता, सामाजिक न्याय व समतेचे साधन ठरवायचे असल्यास धोरणात्मक सुधारणा, समावेशक दृष्टिकोन आणि सामाजिक संवेदनशीलता आवश्यक आहे.

**Keywords:** नागरीकरण, ग्रामीण शिक्षण, सामाजिक समावेशन, जात-वर्ग-लिंग, शासकीय धोरणे

**प्रस्तावना:** नागरीकरण (Urbanization) ही केवळ लोकसंख्येच्या स्थलांतराशी किंवा भौगोलिक विस्ताराशी निगडित प्रक्रिया नसून, ती समाजाच्या एकूण रचनेत मूलगामी परिवर्तन घडवून आणणारी एक व्यापक सामाजिक प्रक्रिया आहे. औद्योगिकीकरण, भांडवली अर्थव्यवस्था, तंत्रज्ञानाचा विस्तार, सेवा क्षेत्राचा विकास आणि रोजगाराच्या नव्या संधी यांमुळे नागरीकरणाला वेग आला आहे. या प्रक्रियेमुळे जीवनशैली, मूल्यव्यवस्था, सामाजिक संबंध, संस्थात्मक रचना तसेच सत्तासंबंध यांमध्ये लक्षणीय बदल होताना दिसून येतात. विशेषतः भारतासारख्या परंपरागत, बहुस्तरीय आणि जात, वर्ग व लिंगाधारित विषमता असलेल्या समाजात नागरीकरणाचा प्रभाव अत्यंत गुंतागुंतीचा आणि विरोधाभासी स्वरूपाचा आहे. भारतीय समाजरचनेत ग्रामीण आणि नागरी भागांमधील असमतोल विकास ही दीर्घकालीन समस्या राहिली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे व सामाजिक समावेशनाचे (Social Inclusion) प्रभावी साधन मानले गेले. शिक्षणामुळे व्यक्तीच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन समान संधी उपलब्ध होतील, असा व्यापक विश्वास होता. तथापि, नागरीकरणाच्या वेगवान प्रक्रियेमुळे निर्माण झालेल्या असमतोल विकासाने ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेवर अनेक मर्यादा व आव्हाने लादली आहेत. शहरी भागात शैक्षणिक सुविधा, दर्जेदार संस्था, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि तांत्रिक साधनसंपत्ती उपलब्ध असताना ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था तुलनेने दुर्लक्षित, अपुरी आणि कमी दर्जाची राहिल्याचे स्पष्टपणे दिसून येते. नागरीकरणामुळे ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर, विशेषतः तरुण आणि कार्यक्षम लोकसंख्येचे शहरी भागांकडे वळणे, याचा ग्रामीण शाळांवर आणि शिक्षणाच्या सातत्यावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. अनेक ग्रामीण शाळांमध्ये विद्यार्थीसंख्या घटणे, शिक्षकांची कमतरता, पायाभूत सुविधांचा अभाव आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत आहे. याशिवाय, जातीय भेदभाव, आर्थिक दारिद्र्य, लैंगिक विषमता आणि डिजिटल दरी (Digital Divide) यांसारख्या सामाजिक घटकांमुळे ग्रामीण शिक्षणातील विषमता अधिक तीव्र होत आहे. विशेषतः अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, अल्पसंख्याक आणि ग्रामीण महिला या घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यात अजूनही अनेक अडचणी येत आहेत. दुसरीकडे, नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या नव्या गरजांमुळे शिक्षणाचे स्वरूपही बदलत आहे. बाजाराभिमुख शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि स्पर्धात्मक मूल्यव्यवस्था यांचा प्रभाव ग्रामीण शिक्षणावरही पडत आहे. परंतु आवश्यक संसाधनांच्या अभावामुळे ग्रामीण विद्यार्थी या नव्या शैक्षणिक मागण्यांना तोंड देण्यास असमर्थ ठरत आहेत. परिणामी,

शिक्षण हे सामाजिक समावेशनाचे साधन न राहता, काही वेळा सामाजिक बहिष्करणाचे (Social Exclusion) माध्यम बनत असल्याचे चित्र दिसून येते. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारांनी सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान, समग्र शिक्षा अभियान, डिजिटल इंडिया, ई-लर्निंग उपक्रम, तसेच ग्रामीण भागातील शाळांसाठी विशेष योजना राबविल्या आहेत. तथापि, या धोरणांची अंमलबजावणी, त्यांचा प्रत्यक्ष परिणाम आणि सामाजिक विषमता कमी करण्यातील त्यांची भूमिका यांचे चिकित्सक मूल्यमापन करणे आवश्यक ठरते. म्हणूनच प्रस्तुत लेखात नागरीकरणाचा ग्रामीण शिक्षणव्यवस्थेवर होणारा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रभाव, तसेच सामाजिक समावेशनाच्या दृष्टीने राबविल्या जाणाऱ्या शासकीय धोरणांचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यामधून नागरीकरण आणि शिक्षण यांमधील परस्परसंबंध, तसेच ग्रामीण विकासाच्या संदर्भातील शिक्षणाची बदलती भूमिका स्पष्ट करण्याचा हेतू आहे.

**सामाजिक समावेशन आणि शिक्षण:** सामाजिक समावेशन (Social Inclusion) ही संकल्पना केवळ कल्याणकारी किंवा नैतिक मूल्यांपुरती मर्यादित नसून, ती सत्तासंबंध, संसाधनांचे वितरण आणि सामाजिक सहभाग यांच्याशी निगडित असलेली एक गतिशील सामाजिक प्रक्रिया आहे. समाजातील वंचित, उपेक्षित व दुर्बल घटकांना—जसे की अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, अल्पसंख्याक, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग—समान संधी, संसाधनांपर्यंत प्रभावी प्रवेश आणि सन्मानपूर्ण सामाजिक सहभाग मिळवून देणे, हे सामाजिक समावेशनाचे मूलभूत उद्दिष्ट आहे. भारतासारख्या ऐतिहासिकदृष्ट्या विषमतेवर आधारित समाजात ही प्रक्रिया विशेषतः गुंतागुंतीची व संघर्षपूर्ण स्वरूपाची आहे. भारतीय समाजात जातीय विषमता, आर्थिक दारिद्र्य आणि लैंगिक भेदभाव या घटकांमुळे सामाजिक बहिष्करणाची एक दीर्घकालीन आणि संस्थात्मक रचना निर्माण झाली आहे. जातव्यवस्थेने शिक्षण, ज्ञान आणि सत्तेवर काही विशिष्ट समूहांचे वर्चस्व प्रस्थापित केले, तर इतर घटकांना पद्धतशीरपणे वंचित ठेवले. या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर शिक्षणाला सामाजिक गतिशीलतेचे साधन आणि 'महान समतोलक' (Great Equalizer) म्हणून पाहिले गेले. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीला सामाजिक स्थित्यंतर, आर्थिक उन्नती आणि राजकीय जागरूकता प्राप्त होईल, अशी अपेक्षा समाजशास्त्रीय व धोरणात्मक स्तरावर व्यक्त केली गेली आहे. तथापि, आधुनिक समाजशास्त्रीय विचारवंत, विशेषतः पिअर बॉर्द्यू (Pierre Bourdieu), या आशावादी दृष्टिकोनाला चिकित्सक प्रश्न उपस्थित करतात. बॉर्द्यू यांच्या मते शिक्षणसंस्था केवळ समान संधी उपलब्ध करून देत नाहीत, तर त्या अनेकदा विद्यमान सामाजिक-सांस्कृतिक भांडवलाचे (Cultural Capital), प्रतीकात्मक भांडवलाचे (Symbolic Capital) आणि सत्तासंबंधांचे पुनरुत्पादन करतात. उच्च वर्ग आणि सत्ताधारी समूहांकडे असलेली भाषा, अभिरुची, मूल्यव्यवस्था आणि शैक्षणिक सवयी या शिक्षणसंस्थांमध्ये 'मानक' (normative) म्हणून स्वीकारल्या जातात. परिणामी, वंचित सामाजिक घटकांचे ज्ञान, अनुभव आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी दुय्यम ठरते किंवा अदृश्य होते. या संदर्भात शिक्षणसंस्थांमधील समावेशन हे केवळ प्रवेश (Access) आणि नावनोंदणी (Enrollment) यापुरते मर्यादित राहिल्यास ते अपूर्ण ठरते. अभ्यासक्रमाची रचना, अध्यापन- अभ्यास पद्धती, मूल्यमापन प्रणाली आणि संस्थात्मक संस्कृती या सर्व पातळ्यांवर सामाजिक समावेशनाची प्रक्रिया प्रभावीपणे राबविणे आवश्यक ठरते. उदाहरणार्थ, अभ्यासक्रमात प्रबळ वर्गांच्या अनुभवांवर आधारित ज्ञानाला प्राधान्य दिले गेले, तर वंचित घटकांचा ऐतिहासिक अनुभव, संघर्ष आणि ज्ञानपरंपरा उपेक्षित राहतात. त्यामुळे शिक्षण हे मुक्तीचे साधन न राहता, सामाजिक असमानतेच्या पुनरुत्पादनाचे माध्यम बनण्याचा धोका निर्माण होतो. शिक्षणाच्या समावेशक स्वरूपाचे संशोधन करताना हे तपासणे आवश्यक ठरते की शाळा व उच्च शिक्षणसंस्था सामाजिक विषमता कमी करतात की ती अधिक दृढ करतात. ग्रामीण-नागरी दरी, डिजिटल असमानता, खासगीकरणाचा वाढता प्रभाव आणि बाजाराभिमुख शिक्षणप्रणाली या घटकांमुळे सामाजिक समावेशनाच्या उद्दिष्टांवर मर्यादा येत आहेत. विशेषतः वंचित सामाजिक घटकांसाठी शिक्षणातील टिकाव (Retention), शैक्षणिक यश (Achievement) आणि आत्मसन्मानपूर्ण सहभाग (Dignified Participation) हे मुद्दे गंभीर संशोधनाचा विषय बनले आहेत. म्हणूनच, सामाजिक समावेशनाच्या दृष्टीने शिक्षणाचा अभ्यास करताना केवळ धोरणात्मक घोषणांवर न थांबता, प्रत्यक्ष शैक्षणिक व्यवहार, सत्तासंबंध आणि सांस्कृतिक वर्चस्व यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण करणे आवश्यक आहे. बॉर्द्यू यांच्या सैद्धांतिक चौकटीच्या आधारे शिक्षण आणि सामाजिक समावेशन यांमधील परस्परसंबंधांचा अभ्यास केल्यास, शिक्षणसंस्थांची खरी समावेशक क्षमता आणि त्यातील अंतर्निहित विरोधाभास स्पष्टपणे समोर येऊ शकतात. अशा प्रकारे शिक्षणाला सामाजिक न्याय आणि समावेशनाचे प्रभावी साधन बनविण्यासाठी संरचनात्मक आणि सांस्कृतिक पातळीवर मूलभूत बदलांची गरज अधोरेखित होते.

**नागरीकरणाची प्रक्रिया आणि ग्रामीण समाज:** स्वातंत्र्योत्तर भारतात नियोजित विकासाच्या धोरणांमुळे औद्योगिकीकरण, सेवा क्षेत्राचा विस्तार, पायाभूत सुविधांचा विकास आणि शहरी रोजगाराच्या संधी यांना प्राधान्य देण्यात आले. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून कारखाने, विशेष आर्थिक क्षेत्रे, शहरी पायाभूत सुविधा, शिक्षणसंस्था आणि प्रशासकीय केंद्रे यांचे केंद्रीकरण प्रामुख्याने शहरांमध्ये झाले. या विकास मॉडेलमुळे नागरीकरणाला गती मिळाली आणि ग्रामीण भागातून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरात सातत्याने वाढ झाली. ही स्थलांतर प्रक्रिया केवळ आर्थिक कारणांपुरती मर्यादित न राहता, शिक्षण, सामाजिक गतिशीलता आणि सन्मानपूर्ण जीवनाच्या आकांक्षांशी जोडली गेली. नागरीकरणामुळे ग्रामीण भागातील कुटुंबरचनेत आणि समाजरचनेत लक्षणीय बदल घडून आले. ग्रामीण कुटुंबांमधील तरुण, शिक्षित व कार्यक्षम पिढी शिक्षण आणि रोजगाराच्या संधींच्या शोधात शहरांकडे वळू लागली. परिणामी ग्रामीण समाजात वयोवृद्ध, महिला आणि लहान मुले यांचे प्रमाण वाढले, ज्याचा परिणाम सामाजिक सहभाग, उत्पादनक्षमता आणि स्थानिक नेतृत्वावर झाला. परंपरागत संयुक्त कुटुंबपद्धतीवर ताण येऊन विभक्त कुटुंबपद्धतीचे प्रमाण वाढले, तसेच शेती व पारंपरिक व्यवसायांतील मनुष्यबळाची कमतरता जाणवू लागली. या स्थलांतर प्रक्रियेचा ग्रामीण शिक्षणव्यवस्थेवरही थेट आणि अप्रत्यक्ष परिणाम झाला. ग्रामीण भागातील शाळांमध्ये विद्यार्थीसंख्या घटणे, शिक्षकांची कमतरता, शैक्षणिक दर्जात

तफावत आणि पायाभूत सुविधांचा अभाव ही समस्या अधिक तीव्र झाली. अनेक ठिकाणी शाळा बंद होणे किंवा एकत्रित करणे (school merging) यासारखे धोरणात्मक निर्णय घेण्यात आले, ज्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शिक्षणापर्यंत पोहोच अधिक कठीण बनली. याउलट, शहरी शिक्षणसंस्था अधिक संसाधनसमृद्ध, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि स्पर्धात्मक बनत गेल्या. या असमतोलामुळे ग्रामीण-नागरी शैक्षणिक दरी अधिक रुंदावत असल्याचे आढळून येते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, नागरीकरण ही केवळ भौगोलिक स्थलांतराची प्रक्रिया नसून, ती सामाजिक संबंध, मूल्यव्यवस्था आणि सत्तासंरचनेत परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया आहे. ग्रामीण समाजात शिक्षण हे परंपरागतरीत्या मर्यादित सामाजिक घटकांपुरते केंद्रित राहिले होते. मात्र नागरीकरणामुळे शिक्षणाचे महत्त्व वाढले असले, तरी त्याचा लाभ सर्व सामाजिक घटकांपर्यंत समान रीतीने पोहोचलेला नाही. जातीय विषमता, आर्थिक दारिद्र्य आणि लैंगिक भेदभाव यांमुळे ग्रामीण भागातील वंचित समूह शिक्षणाच्या संधींपासून तुलनेने अधिक वंचित राहिले आहेत. याशिवाय, नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या 'आकांक्षात्मक दरी' (Aspirational Gap) या संकल्पनेचा ग्रामीण समाजावर खोलवर परिणाम झाला आहे. शहरी जीवनशैली, शिक्षणपद्धती आणि रोजगार संधींच्या तुलनेत ग्रामीण शिक्षण अपुरे आणि अप्रासंगिक वाटू लागले आहे. परिणामी ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक निराशा, गळती (dropout) आणि स्थलांतराची प्रवृत्ती वाढताना दिसून येते. डिजिटल तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे ही दरी अधिक ठळक झाली असून, डिजिटल साधनसामग्री व इंटरनेटच्या अभावामुळे ग्रामीण विद्यार्थी शैक्षणिक स्पर्धेत मागे पडत आहेत.

संशोधनीय दृष्टीने पाहता, नागरीकरण आणि ग्रामीण समाज यांमधील परस्परसंबंधांचे विश्लेषण करताना काही महत्त्वाचे प्रश्न समोर येतात: नागरीकरणामुळे ग्रामीण समाजातील सामाजिक ऐक्य आणि पारंपरिक संस्थांवर कोणते परिणाम झाले आहेत? ग्रामीण शिक्षणव्यवस्थेतील असमतोल हा स्थलांतराचा कारण आहे की परिणाम? शासकीय शैक्षणिक धोरणे ग्रामीण- नागरी दरी कमी करण्यात कितपत यशस्वी ठरली आहेत? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी परिमाणात्मक (quantitative) आणि गुणात्मक (qualitative) संशोधन पद्धतींचा वापर करून ग्रामीण समाजातील बदलांचे सखोल समाजशास्त्रीय अध्ययन करणे आवश्यक ठरते. अशा प्रकारे नागरीकरणाची प्रक्रिया ग्रामीण समाजासाठी संधी आणि आव्हाने दोन्ही घेऊन येते. जरी ती सामाजिक गतिशीलतेचे मार्ग खुले करते, तरी असमतोल विकासामुळे ग्रामीण समाजरचना, शिक्षणव्यवस्था आणि सामाजिक समावेशनावर मर्यादा निर्माण करते. त्यामुळे नागरीकरणाच्या प्रभावाचे मूल्यांकन करताना केवळ आर्थिक निर्देशांकांवर न थांबता, ग्रामीण समाजातील शिक्षण, सामाजिक न्याय आणि समावेशन यांच्या दृष्टीने समग्र समाजशास्त्रीय विश्लेषण करणे अत्यावश्यक ठरते.

**नागरीकरण आणि ग्रामीण शिक्षणावर होणारे परिणाम :**

**समाजशास्त्रीय विश्लेषण:** नागरीकरणाची प्रक्रिया ग्रामीण आणि शहरी समाजांमधील केवळ भौगोलिक अंतरच वाढवत नाही, तर ती शैक्षणिक संधी, संसाधने आणि शैक्षणिक गुणवत्तेतील असमानताही अधिक तीव्र करते. शिक्षण हे सामाजिक गतिशीलता आणि समावेशनाचे प्रभावी साधन मानले जात असले, तरी नागरीकरणाच्या असमतोल स्वरूपामुळे ग्रामीण शिक्षणव्यवस्थेवर बहुआयामी आणि दीर्घकालीन परिणाम झालेले दिसून येतात. हे परिणाम प्रामुख्याने शैक्षणिक असमानता, स्थलांतरामुळे निर्माण होणारी अस्थिरता आणि वाढती डिजिटल दरी या स्वरूपात प्रकर्षाने जाणवतात.

**शैक्षणिक असमानता:** नागरीकरणामुळे शहरी आणि ग्रामीण शिक्षणसंस्थांमधील गुणवत्तेची दरी लक्षणीयरीत्या वाढलेली आहे. शहरी भागात खासगी, इंग्रजी माध्यमाच्या, तंत्रज्ञानसज्ज आणि बाजाराभिमुख शाळा-महाविद्यालयांचा वेगाने विस्तार झाला आहे. या संस्थांमध्ये प्रशिक्षित शिक्षक, आधुनिक अध्यापन पद्धती, डिजिटल साधने, सह-अभ्यासक्रम उपक्रम आणि स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध असते. याउलट ग्रामीण भागातील बहुतांश शासकीय शाळा अपुऱ्या भौतिक सुविधांमुळे, वर्गखोल्यांची कमतरता, ग्रंथालय व प्रयोगशाळांचा अभाव आणि शिक्षकांच्या रिक्त जागांमुळे अडचणीत सापडलेल्या आहेत. या शैक्षणिक असमानतेचा सामाजिक परिणाम केवळ शैक्षणिक यशापुरता मर्यादित राहत नाही, तर तो आत्मविश्वास, भाषा कौशल्ये आणि रोजगाराच्या संधींवरही प्रभाव टाकतो. इंग्रजी माध्यम आणि डिजिटल साक्षरतेचा अभाव ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व शहरी रोजगाराच्या स्पर्धेत मागे टाकतो. परिणामी शिक्षण हे समान संधी निर्माण करण्याऐवजी सामाजिक विषमतेचे पुनरुत्पादन करणारे माध्यम बनत असल्याचे समाजशास्त्रीय विश्लेषणातून स्पष्ट होते.

**स्थलांतराचा परिणाम:** नागरीकरणामुळे ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर हे ग्रामीण शिक्षणव्यवस्थेवर परिणाम करणारे एक महत्त्वाचे कारण आहे. रोजगाराच्या अस्थिर संधी, शेतीतील संकटे आणि शहरी जीवनाच्या आकांक्षा यांमुळे ग्रामीण कुटुंबे स्थलांतर करतात. या स्थलांतरामुळे मुलांच्या शिक्षणातील सातत्य खंडित होते. अनेक स्थलांतरित कुटुंबांतील मुले शाळा बदलण्यास भाग पडतात किंवा दीर्घकाळ शाळाबाह्य राहतात. विशेषतः अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जमाती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील मुलांना स्थलांतराचे दुष्परिणाम अधिक तीव्रतेने सहन करावे लागतात. शहरी भागात प्रवेश घेतलेल्या शाळांमध्ये भाषा, अभ्यासक्रम, सामाजिक वातावरण आणि खर्च यांमुळे ही मुले समायोजन करण्यात अपयशी ठरतात. परिणामी शाळा सोडण्याचे प्रमाण (dropout rate) वाढते आणि बालमजुरी किंवा असंघटित क्षेत्रातील कामांकडे वळण्याची शक्यता वाढते. या प्रक्रियेमुळे शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक समावेशन साध्य होण्याऐवजी सामाजिक बहिष्करण अधिक दृढ होत असल्याचे दिसते.

**डिजिटल दरी:** नागरीकरणाच्या सध्याच्या टप्प्यात शिक्षण अधिकाधिक डिजिटल आणि तंत्रज्ञानाधारित होत आहे. ऑनलाईन शिक्षण, डिजिटल प्लॅटफॉर्म, ई-सामग्री आणि तंत्रज्ञानावर आधारित मूल्यमापन प्रणाली यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. तथापि, ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटी, संगणक, स्मार्टफोन, वीजपुरवठा आणि डिजिटल साक्षरता यांचा अभाव असल्याने डिजिटल दरी (Digital Divide) अधिक तीव्र झाली आहे. ही डिजिटल दरी केवळ तांत्रिक प्रश्न नसून, ती सामाजिक समावेशनाच्या उद्दिष्टाला गंभीर आव्हान ठरते. डिजिटल शिक्षणाच्या सुविधांपासून वंचित राहिल्यामुळे ग्रामीण विद्यार्थी आधुनिक शैक्षणिक संधींपासून दूर

राहतात. कोविड-१९ काळात ही असमानता अधिक स्पष्टपणे समोर आली, जिथे शहरी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिक्षणाचा लाभ घेतला, तर ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षणप्रक्रियेबाहेर फेकले गेले. त्यामुळे डिजिटल दरी ही शैक्षणिक विषमतेला अधिक दृढ करणारी एक संरचनात्मक समस्या बनली आहे. एकूणच पाहता, नागरीकरणामुळे ग्रामीण शिक्षणव्यवस्थेवर होणारे परिणाम हे बहुआयामी, परस्परसंबंधित आणि दीर्घकालीन स्वरूपाचे आहेत. शैक्षणिक असमानता, स्थलांतरामुळे निर्माण होणारी अस्थिरता आणि डिजिटल दरी या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आणि सामाजिक समावेशनावर गंभीर मर्यादा आणतो. त्यामुळे नागरीकरणाच्या धोरणांचा अभ्यास करताना ग्रामीण शिक्षणाच्या प्रश्नांकडे केवळ पूरक विषय म्हणून न पाहता, सामाजिक न्याय आणि समावेशनाच्या केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक ठरते.

**जात, वर्ग व लिंग: ग्रामीण शिक्षणातील आंतरछेदात्मक विश्लेषण:** ग्रामीण शिक्षणव्यवस्थेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करताना जात (Caste), वर्ग (Class) आणि लिंग (Gender) हे घटक स्वतंत्रपणे न पाहता, ते परस्परांशी गुंतलेले आणि एकमेकांना बळकटी देणारे सामाजिक संरचनात्मक घटक म्हणून समजून घेणे आवश्यक ठरते. ग्रामीण समाजात ही तिन्ही परिमाणे ऐतिहासिकदृष्ट्या विषम सत्तासंबंधांमध्ये रुजलेली असून, शिक्षणापर्यंतचा प्रवेश, शैक्षणिक अनुभव आणि शैक्षणिक यश या सर्वांवर त्यांचा एकत्रित परिणाम होताना दिसून येतो. त्यामुळे ग्रामीण शिक्षणातील विषमता ही केवळ आर्थिक किंवा भौगोलिक मर्यादांचा परिणाम नसून, ती बहुपदरी सामाजिक वंचनेचे प्रतिबिंब आहे. या संदर्भात गरीब ग्रामीण पार्श्वभूमीतील दलित स्त्रीचे उदाहरण हे ग्रामीण शिक्षणातील आंतरछेदात्मक विषमतेचे अत्यंत स्पष्ट आणि ठळक स्वरूप दर्शवते. जातीय भेदभावामुळे सामाजिक बहिष्करण, आर्थिक वर्गस्थितीमुळे संसाधनांचा अभाव आणि लिंगाधारित पितृसत्ताक मूल्यव्यवस्थेमुळे शैक्षणिक संधींवर निर्बंध—या तिन्ही पातळ्यांवरील वंचना एकाच वेळी तिच्या जीवनावर प्रभाव टाकतात. परिणामी, शिक्षण हे सशक्तीकरणाचे साधन ठरण्याऐवजी अनेकदा तिच्यासाठी संघर्षाचे आणि बहिष्करणाचे क्षेत्र बनते. अमेरिकन कायदेपंडित किम्बर्ले क्रेन्शॉ (Kimberlé Crenshaw) यांनी मांडलेली आंतरछेदात्मकता (Intersectionality) ही संकल्पना अशा बहुपदरी विषमतेचे विश्लेषण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. क्रेन्शॉ यांच्या मते, जात, वर्ग, लिंग, वंश किंवा इतर ओळखी या स्वतंत्रपणे कार्य करत नाहीत; तर त्या एकत्र येऊन विशिष्ट सामाजिक अनुभव आणि सत्तासंबंध निर्माण करतात. ग्रामीण शिक्षणाच्या संदर्भात ही संकल्पना वापरल्यास, केवळ 'मुलींचे शिक्षण' किंवा 'दलितांचे शिक्षण' यासारख्या एकरेषीय (single-axis) दृष्टिकोनांच्या मर्यादा स्पष्टपणे समोर येतात.

ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणावर पितृसत्ताक सामाजिक रचना खोलवर प्रभाव टाकते. घरगुती जबाबदाऱ्या, भावंडांची काळजी, शेतीकाम, पाणी-इंधन गोळा करणे यांसारखी अप्रत्यक्ष श्रमाची कामे मुलींवर लहान वयापासून लादली जातात. याशिवाय शाळेपर्यंतचा अंतर, वाहतुकीचा अभाव, लैंगिक छळाची भीती आणि सामाजिक 'सन्मान' (honor) यांसारखे घटक मुलींच्या शैक्षणिक उपस्थितीवर मर्यादा आणतात. अनेक ग्रामीण भागात लवकर विवाह ही प्रथा अजूनही प्रभावी असून, ती मुलींच्या शिक्षणातील सातत्य खंडित करणारा एक प्रमुख घटक ठरते. जातीय स्तरावर पाहता, दलित व आदिवासी मुलींना शिक्षणसंस्थांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष भेदभावाचा सामना करावा लागतो. वर्गखोलीतील दुर्लक्ष, शिक्षकांची कमी अपेक्षा, अभ्यासक्रमात त्यांच्या इतिहास व अनुभवांचे प्रतिनिधित्व नसणे आणि सहाध्यायांकडून होणारा सामाजिक अपमान—या सर्व बाबी शैक्षणिक आत्मसन्मानावर प्रतिकूल परिणाम करतात. आर्थिक वर्गस्थितीमुळे शिक्षणाचा खर्च, डिजिटल साधनांची अनुपलब्धता आणि खासगी शिकवणीसारख्या पूरक सुविधांचा अभाव या अडचणी अधिक तीव्र होतात. संशोधनीय दृष्टिकोनातून पाहता, ग्रामीण शिक्षणातील आंतरछेदात्मक विषमता ही केवळ प्रवेश किंवा नावनोंदणीच्या आकडेवारीतून समजू शकत नाही. टिकाव (retention), शैक्षणिक कामगिरी, शाळेतील अनुभव, आत्मविश्वास आणि भविष्यातील आकांक्षा या गुणात्मक पैलूंचे विश्लेषण करणे तितकेच महत्त्वाचे ठरते. आंतरछेदात्मक दृष्टिकोन स्वीकारल्यास धोरणे व योजना कितपत सर्वाधिक वंचित घटकांपर्यंत पोहोचतात, हेही तपासता येते. म्हणूनच ग्रामीण शिक्षणाच्या संदर्भात जात, वर्ग व लिंग यांचा आंतरछेदात्मक अभ्यास केल्याशिवाय सामाजिक समावेशनाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकत नाही. क्रेन्शॉ यांच्या संकल्पनेच्या आधारे केलेले विश्लेषण ग्रामीण शिक्षणातील अदृश्य व बहुपदरी अडथळे उघड करते आणि शिक्षण धोरणे अधिक संवेदनशील, समावेशक आणि न्यायाभिमुख बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण दिशादर्शन करते.

**शासकीय धोरणांची भूमिका :**

**नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण शिक्षण:** नागरीकरणामुळे निर्माण झालेली शैक्षणिक विषमता, ग्रामीण—नागरी दरी आणि सामाजिक बहिष्करणाची आव्हाने यांना उत्तर देण्यासाठी भारत सरकारने विविध शैक्षणिक धोरणे व कार्यक्रम राबविले आहेत. शिक्षण हे सामाजिक समावेशनाचे मूलभूत साधन मानून, या धोरणांचा उद्देश शिक्षणापर्यंत सार्वत्रिक प्रवेश, शैक्षणिक गुणवत्ता सुधारणा आणि वंचित सामाजिक घटकांचा समावेश सुनिश्चित करणे हा आहे. तथापि, धोरणांची रचना, अंमलबजावणी आणि प्रत्यक्ष परिणाम यांमध्ये असलेली दरी ही एक महत्त्वाची समाजशास्त्रीय समस्या म्हणून पुढे येते.

**शिक्षणाचा हक्क कायदा, २००९:** शिक्षणाचा हक्क कायदा, २००९ हा भारतीय शिक्षणव्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो. या कायद्याद्वारे ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची घटनात्मक हमी देण्यात आली आहे. ग्रामीण भागातील शैक्षणिक मागासलेपणा लक्षात घेता, शाळांची भौगोलिक उपलब्धता, शिक्षक नियुक्ती, विद्यार्थी—शिक्षक प्रमाण, शालेय पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक वातावरण यांवर विशेष भर देण्यात आला आहे. ग्रामीण भागात शाळा नसलेल्या किंवा दूर असलेल्या वस्तींसाठी नवीन शाळांची स्थापना, एकशिक्षकी व अपूर्ण शाळांचे सुधारणा आणि मूलभूत सुविधांचा (पाणी, स्वच्छतागृहे, वीज) विकास हा या कायद्याचा महत्त्वाचा भाग आहे. तथापि, समाजशास्त्रीय विश्लेषणातून असे दिसून येते की RTE कायद्याचा लाभ सर्व सामाजिक घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नाही. शिक्षकांची रिक्त पदे, बहुवर्गीय अध्यापन

(multigrade teaching), प्रशासकीय भार आणि स्थानिक पातळीवरील उदासीनता यांमुळे ग्रामीण भागात या कायद्याची अंमलबजावणी अनेक ठिकाणी अपुरी राहिली आहे.

**समग्र शिक्षा अभियान:** समग्र शिक्षा अभियान हे पूर्व-प्राथमिक ते माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाचा एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारणारे धोरण आहे. या अभियानाचा उद्देश ग्रामीण व शहरी शिक्षणसंस्थांमधील दरी कमी करणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे आणि शिक्षणव्यवस्थेला अधिक समावेशक बनवणे हा आहे. ग्रामीण भागात शाळा बांधकाम, अतिरिक्त वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि डिजिटल साधनसामग्री उपलब्ध करून देणे, यासोबतच शिक्षक प्रशिक्षण आणि शैक्षणिक नवोपक्रमांवर भर देण्यात आला आहे. विशेषतः डिजिटल शिक्षणाच्या संदर्भात, स्मार्ट क्लासरूम्स, ई-सामग्री आणि ऑनलाईन शिक्षण प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच मुलींसाठी सायकल योजना, वसतिगृहे, शौचालयांची उपलब्धता आणि पोषण योजना (मध्यान्ह भोजन) यांद्वारे शाळेत टिकाव वाढवण्यावर भर दिला जात आहे. तथापि, ग्रामीण भागातील डिजिटल पायाभूत सुविधांचा अभाव, शिक्षकांची डिजिटल साक्षरता आणि विद्यार्थ्यांच्या सामाजिक-आर्थिक मर्यादा यांमुळे या उपक्रमांचा अपेक्षित परिणाम सर्वत्र साध्य झालेला नाही.

**समावेशक शिक्षण धोरणे:** नागरीकरणाच्या प्रक्रियेत वंचित राहणाऱ्या सामाजिक घटकांसाठी समावेशक शिक्षण धोरणे राबविणे ही शासनाची एक महत्त्वाची जबाबदारी आहे. दिव्यांग विद्यार्थी, अनुसूचित जाती- जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, अल्पसंख्याक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना, वसतिगृहे, निवासी शाळा, मोफत शैक्षणिक साहित्य आणि सहाय्यक साधने उपलब्ध करून दिली जात आहेत. या योजनांचा उद्देश केवळ शाळेत प्रवेश मिळवून देणे नसून, शैक्षणिक सातत्य आणि आत्मसन्मानपूर्ण सहभाग सुनिश्चित करणे हा आहे. तथापि, धोरणात्मक पातळीवरील उद्दिष्टे आणि स्थानिक पातळीवरील प्रत्यक्ष अनुभव यांमध्ये तफावत दिसून येते. अनेक ठिकाणी लाभार्थ्यांची योग्य ओळख, माहितीचा अभाव, प्रशासकीय विलंब आणि स्थानिक समाजातील भेदभावपूर्ण वृत्ती यांमुळे समावेशक शिक्षण धोरणांचा प्रभाव मर्यादित राहतो. शिवाय, धोरणांची अंमलबजावणी करताना जात, वर्ग व लिंग यांचा आंतरछेदात्मक विचार पुरेशा प्रमाणात केला जात नसल्यामुळे सर्वाधिक वंचित घटक धोरणांच्या कक्षेबाहेर राहण्याची शक्यता वाढते. एकूणच पाहता, नागरीकरणामुळे निर्माण झालेल्या शैक्षणिक विषमतेला उत्तर देण्यासाठी शासकीय धोरणांची भूमिका महत्त्वाची असली, तरी ती पुरेशी ठरतेच असे नाही. धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षक, पालक आणि समुदाय यांचा सक्रिय सहभाग, तसेच सामाजिक संवेदनशीलता आणि उत्तरदायित्व वाढवणे आवश्यक आहे. त्यामुळेच शिक्षण हे सामाजिक समावेशनाचे खरे साधन बनू शकेल आणि नागरीकरणाच्या प्रक्रियेत ग्रामीण समाज मागे पडणार नाही

**निष्कर्ष:** नागरीकरणाची प्रक्रिया ग्रामीण शिक्षणासाठी संधी आणि आव्हाने दोन्ही घेऊन आली आहे. शहरीकरणामुळे संसाधनांचा असमतोल, डिजिटल दरी आणि सामाजिक विषमता अधिक ठळक झाली असली, तरी योग्य शासकीय धोरणे, समावेशक शिक्षणदृष्टी आणि समाजशास्त्रीय जाणीव यांच्या माध्यमातून शिक्षणाला सामाजिक समावेशनाचे प्रभावी साधन बनविता येऊ शकते. ग्रामीण शिक्षण सुधारणा केवळ भौतिक सुविधांपुरती मर्यादित न राहता, जात, वर्ग व लिंगाधारित संरचनात्मक विषमतांना आव्हान देणारी असली पाहिजे. तेव्हाच नागरीकरणाच्या युगात शिक्षण सामाजिक न्याय व समतेचे माध्यम ठरू शकेल.

**संदर्भ**


१) बॉर्द्यू, पिअर. (१९७३). Cultural Reproduction and Social Reproduction, Word Press
२) फ्रेरे, पाउलो. (१९७०). Pedagogy of the Oppressed, Continuum, New York.
३) भारत सरकार. (२००९). शिक्षणाचा हक्क कायदा.
४) थोरात, सुखदेव व न्यूमन, कॅथरीन. (२०१०). Blocked by Caste, Oxford University Press.
५) सेन, अमर्त्य. (१९९९). Development as Freedom, Oxford University Press.
६) क्रेन्शॉ, किम्बर्ले. (१९९१). Intersectionality, The New Press, New York
७) UNESCO. (२०२३). Global Education Monitoring.


# नागरीकरणाचा ग्रामीण उद्योगावरील प्रभाव: एक संशोधनात्मक अभ्यास

**डॉ. शीला महादेव रामपुरे** समाजशास्त्र विभाग,संगमेश्वर कॉलेज, सोलापूर.

**गोषवारा:** नागरिकरण ही एक महत्त्वाची सामाजिक आर्थिक प्रक्रिया असून, तिचा ग्रामीण उद्योगाच्या विकासावर खोलवर परिणाम झालेला आहे. प्रस्तुत संशोधनात्मक अभ्यासचा उद्देश, नागरिकरणामुळे ग्रामीण उद्योगावर होणारे सकारात्मक व नकारात्मक परिणाम समजून घेणे हा आहे. अभ्यासात दुय्यम माहितीच्या आधारे ग्रामीण उद्योगाची स्थिती ,रोजगार निर्मिती, उत्पादन पद्धती, बाजारपेठ व कामगार स्थलांतर याचा आढावा घेण्यात आला आहे. अभ्यासातून असे दिसून येते की, नागरिकरणामुळे ग्रामीण उद्योगांना विस्तारित बाजारपेठ, सुधारित वाहतूक दळणवळण सुविधा, तंत्रज्ञानाचा प्रसार व गुंतवणुकीच्या संधी उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे काही ग्रामीण उद्योगांचा विकास होऊन उत्पन्न वाढ व रोजगार निर्मितीस चालना मिळाली आहे. तथापि, नागरिकरणामुळे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे कामगारांचे स्थलांतर वाढले असून, त्याचा परिणाम ग्रामीण उद्योगातील मनुष्यबळावर झाला आहे. तसेच मोठ्या शहरी उद्योगाच्या स्पर्धेमुळे पारंपरिक कुटीर व हस्तकला उद्योगांचा ऱ्हास होताना दिसतो. अभ्यासाच्या निष्कर्षानुसार, संतुलित व

नियोजनबद्ध नागरीकरण, योग्य शासकीय धोरणे, कौशल्य विकास व बाजारपेठेची जोडणी केल्यास ग्रामीण उद्योगांचा शाश्वत विकास साधता येऊ शकतो.

**प्रस्तावना:** नागरीकरण (Urbanization) म्हणजे लोकसंख्या, आर्थिक क्रियाकलाप आणि संसाधनांचा केंद्र केलेला विकास, ज्यामध्ये ग्रामीण भागातील लोकांचे शहरांमध्ये स्थलांतर वाढणे, शहरांचे विस्तारीकरण आणि त्या संबंधित सामाजिक—आर्थिक संरचनांची बदलती स्थिती समाविष्ट आहे. ग्रामीण जीवन हे परंपरागत, कृषीप्रधान आणि सामूहिक सांस्कृतिक मूल्यांनी बांधलेले आहे. परंतु आधुनिक नागरीकरणामुळे हे मूल्य, सामाजिक रचना, आर्थिक व्यवहार, पर्यावरणीय स्थिती आणि जीवनमान यांवर महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत.भारतात विशेषतः आर्थिक उदारीकरणानंतर (1991 नंतर) नागरीकरणाची गती अधिक वाढली असून त्याचे परिणाम केवळ शहरांपुरते मर्यादित नाही तर ग्रामीण भागांवरही खोलवर प्रभाव पाडत आहेत. नागरीकरण म्हणजे लोकसंख्या शहरी भागाकडे स्थलांतर आणि शहर वाढणे.भारतात गत काही दशके उच्च आर्थिक विकास, औद्योगीकरण, सेवा क्षेत्रातील वाढ आणि रोजगाराच्या संधीमुळे नागरिकरणाचे प्रमाण जलद वाढत आहे. या प्रक्रियेमुळे ग्रामीण भागावर व्यापक सामाजिक, आर्थिक, परिणाम झाले आहेत. ग्रामीण उद्योग हे भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे पाया असून हजारो कुटुंब यावर अवलंबून आहेत. नागरीकरणाचा हा बदल ग्रामीण उद्योगावर कसा परिणाम करत आहे हे समजून घेणे या ठिकाणी आवश्यक आहे.

**उददेश: १.** नागरीकरण समजुन घेणे. २. नागरीकरणाची मुख्य कारणे अभ्यासणे. ३. नागरीकरणाचे ग्रामीण उद्योगावरील सकारात्मक व नकारात्मक प्रभाव समजुन घेणे. ४. नागरीकरणामुळे ग्रामीण उद्योगांवर होणाऱ्या नकारात्मक परिणामावरील उपाययोजना अभ्यासणे.

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी व्दितीयक स्त्रोताचा तथ्यसंकलनासाठी आधार घेतलेला आहे. त्यासाठी पुस्तके,संदर्भ ग्रंथ,मासिके वर्तमानपत्राचा वापर केलेला आहे.

**नागरीकरणाचे स्वरूप आणि कारणे:** नागरीकरण ही सामाजिक आर्थिक प्रक्रिया आहे. ज्यात लोक शहरी भागात स्थलांतर करतात. रोजगार शोधतात,आपली जीवनशैली बदलतात,आणि शहरी वातावरणात मिसळतात. भारतात या प्रक्रियेला औद्योगीकरण, माहिती तंत्रज्ञान, सेवा क्षेत्रात वाढ, शिक्षणाच्या संधी व शेतातील रोजगाराच्या अभावामुळे चालना मिळाली आहे.

नागरीकरणाची मुख्य कारणे: १. रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात शहरी भागात: औद्योगिक व सेवा क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्यामुळे रोजगार उपलब्ध करतात. २. शेतीतील समस्यामुळे स्थलांतर: कमी उत्पादन, सतत हवामान बदल, नैसर्गिक आपत्ति,पाण्याचा तुटवडा यामुळे लोकांना शहराकडे वळण्यास भाग पाडले आहे. ३. शिक्षण व वैद्यकीय सुविधा: उच्च दर्जाचे शैक्षणिक संस्था व आरोग्यसेवा मुख्यतः शहरांमध्ये उपलब्ध या कारणामुळे मोठ्या प्रमाणामध्ये ग्रामीण भागातील लोक शहरी भागाकडे वळत असताना दिसतात. ४. जीवनशैली व सुविधांची आवड: शहरांमध्ये अधिक सुविधा, वाहतुक व दळण वळण सुविधा-रस्ते, बस, रेल्वे विमानसेवा इ. इंटरनेट, मनोरंजन आणि आधुनिक जीवनशैली मिळण्यामुळे युवा वर्ग आकर्षित होतो. ५. प्रशासकीय केंद्रे: शासकीय कार्यालये व प्रशासकीय सेवा शहरामध्ये केंद्रित असतात.

**नागरीकरणाचे ग्रामीण उद्योगावर सकारात्मक प्रभाव: १.** वाढलेली मागणी आणि बाजारपेठ: शहरी लोकसंख्येतील वाढ आणि खर्च,या क्षमतेमुळे ग्रामीण उत्पादनाची मागणी वाढली आहे. हातमाग उद्योग कृषी प्रक्रिया उद्योगांना आता शहरांमध्ये मोठे ग्राहक उपलब्ध झाले आहेत. २. तंत्रज्ञानाची उपलब्धता: शहरातील तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, लॉजिस्टिक सुविधा ग्रामीण भागातही पोहोचत आहेत. त्यामुळे उत्पादन कार्यक्षमता वाढली आहे. ३. सुधारित संपर्क आणि वाहतूक: नागरीकरणामुळे रस्ते, रेल्वे, विमान,वाहतूक सुविधा वाढल्या आहेत. ज्यामुळे ग्रामीण उत्पादने शहरांमध्ये नीट पोहोचू शकतात त्यामुळे विक्री व विपणन सुलभ झाले आहे. ४. महिला आणि युवकांना नवे रोजगार: शहरातील शिक्षण उद्योग प्रशिक्षणामुळे ग्रामीण महिला व युवकांना नवीन कौशल्य प्राप्त होत आहेत. याचा उपयोग ते आपल्या परिसरात छोटे व्यवसाय उघडण्यासाठी करतात.

**नागरीकरणाचे ग्रामीण उद्योगावर नकारात्मक प्रभाव: १.** कच्चामाल व कामगाराचा तुटवडा: शहराकडे स्थलांतरामुळे ग्रामीण भागातील कार्यक्षम युवक व कामगार कमी झाले आहेत. परिणामी ग्रामीण उद्योगांना कुशल मनुष्याचे कमतरता जाणून उत्पादन कमी होत असल्याचे दिसते. कमी झाले आहे. २. परंपरागत कौशल्यांचा नाश: नागरीकरणामुळे परंपरागत कला, हस्तकला व कौशल्यांना प्रतिसाद कमी मिळतो आहे. युवा वर्ग शहरी जीवनाकडे आकर्षित झाल्यामुळे पारंपरिक कौशल्य विसरली जात आहेत. ३. स्पर्धा व बाजारपेठेचा दबाव: शहरातील मोठे- मोठे कारखाने व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ब्रँड्स, ग्रामीण उद्योगावर स्पर्धात्मक दबाव वाढत आहे. परिणामी किमती व गुणवत्ता यांच्यात संघर्ष निर्माण झाला आहे. ४.भांडवल वित्तीय समस्या: शहरातील बँका व वित्तीय संस्था ग्रामीण उद्योजकांना पुरेसा कर्ज व संधी देत असले तरीही, ग्रामीण भागातील उद्योजकांना उच्च व्याजदर कागदपत्रांची अडचण व आर्थिक साक्षरतेचा अभाव यामुळे कर्ज मिळणे कठीण आहे.

**सामाजिक आर्थिक परिणाम: १.** पर्यटन आणि स्थानिक संस्कृती: नागरीकरणाने काही ग्रामीण भागांना पर्यटनाच्या रूपात फायदे दिले आहेत. ज्यामुळे स्थानिक हस्तकला खाद्यसंस्कृती व उत्सवांना वाढ मिळाली आहे. २. शहरी ग्रामीण आर्थिक असमानता:शहरे व ग्रामीण भाग यांच्यात आर्थिक असमानता वाढली आहे. शहरे वेगाने विकसित होत असताना ग्रामीण भाग मागे पडत असल्याची अनुभूती समाजात वाढत आहे. ३. कौशल्याच्या पुनरुज्जीवनाची आवश्यकता: परंपरागत कौशल्याने जतन करण्यासाठी प्रशिक्षण केंद्र सहकार संघ महिला स्वयंसेवी संस्था मोठी भूमिका बजावू शकतात या माध्यमातून रोजगार निर्मिती देखील होतो.

**उपाय:** १. सरकारची धोरणे: ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन देणारे धोरण, अनुदान व कर सवलतीची योजनांची अंमलबजावणी लघु उद्योगासाठी सुलभ कर्ज आणि वित्तीय साक्षरता कार्यक्रम. २. प्रशिक्षण व कौशल्य विकास: स्थानिक कलावंत व कार्यकर्त्यांसाठी

कौशल्य प्रशिक्षण केंद्र.शहरी तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानाची प्रशिक्षण सुविधा ग्रामीण भागात उपलब्ध करुन देणे. ३. बाजार व विपणन सुविधा: ऑनलाइन प्लॅटफॉर्म सह ग्रामीण उद्योगांचा डिजिटल विपणन. ४. देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रदर्शन: यामध्ये सहभागी करून देणे. ५. सहकार आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग: सहकारी संस्था स्थापन करून साधनसामग्री व विक्री सुलभ करणे स्वयंसेवी संघटनाद्वारे उद्योजकांना मार्गदर्शन. नागरीकरणाचा ग्रामीण उद्योगावर दुहेरी परिणाम झालेला आहे. एकीकडे बाजारपेठ तंत्रज्ञान व गुंतवणूक त्यामुळे ग्रामीण उद्योगांना चालना मिळते, तर दुसरीकडे स्थलांतर स्पर्धा व पारंपरिक उद्योगाचा रास यामुळे अडचणी निर्माण होतात. यामुळेच ग्रामीण उद्योगाच्या विकासासाठी सरकारी धोरणे, प्रशिक्षण, तंत्रज्ञान सहाय्य, बाजारपेठाचे जोड देणे आवश्यक आहे. असं झाल्यास नागरिकरण आणि ग्रामीण उद्योग यांचा संतुलित विकास पाहता येईल.

**नागरीकरणामुळे ग्रामीण उद्योगांवर होणाऱ्या नकारात्मक परिणामावरील उपाययोजना:** नागरीकरणामुळे ग्रामीण उद्योगांना अनेक अडचणी निर्माण होतात. त्या अडचणी कमी करून ग्रामीण उद्योगांचा शाश्वत विकास साधण्यासाठी काही उपाययोजना आवश्यक आहेत. 1. ग्रामीण उद्योगाचा आधुनिकीकरण: उत्पादनाची गुणवत्ता, त्याचा वेग व प्रमाण वाढवणे. पारंपरिक उद्योगांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री वापरणे. हस्तकला व हातमाग उद्योगांना, डिझाईन व नवकल्पनांचं प्रशिक्षण देणं आवश्यक आहे. 2. वित्त पुरवठा व कर्ज सुविधा: ग्रामीण उद्योगासाठी स्वस्त व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणे. तसेच बँका, सहकारी संस्था, स्वयंसहायता गट (SHG) यांचा विस्तार करणे. सरकारी अनुदान व आर्थिक सवलती देणे आवश्यक आहे. 3. रोजगार आणि स्थलांतर रोखणे: ग्रामीण भागात स्थानिक रोजगार निर्मिती करणे अतिशय महत्त्वाचा आहे. स्वयंरोजगार योजना, स्टार्टअप्स,व सूक्ष्म उद्योगांना प्रोत्साहन देणे. युवकांसाठी कौशल्य विकास व प्रशिक्षण केंद्र सुरू करणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. 4. बाजारपेठ व विपणन सुविधा:ग्रामीण उत्पादनासाठी थेट शहर बाजारपेठाशी जोडणे.ई मार्केटिंग,ई-कॉमर्स,डिजिटल वापर करणे, प्रदर्शन मेळावे व एक जिल्हा, एक उत्पादन सारख्या योजना राबवणे. महत्त्वाचे आहे. 5. पायाभूत सुविधांचा विकास: ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये रस्ते, वीज, पाणी ,गोदामे वाहतूक सुविधा सुधारणे.हे अतिशय महत्वाचा आहे. औद्योगिक वसाहती व क्लस्टर विकसित करणे. 6. पारंपरिक उद्योगांचे संरक्षण: हस्तकला व पारंपारिक उद्योगांना फायदेशीर संरक्षण व ब्रांडी करणं त्याचबरोबर GI टॅग भौगोलिक निर्देशांक देणे, कारागीराना सामाजिक सुरक्षा व विमा योजना देणे. अतिशय महत्त्वाचे आहे. 7. सरकारी धोरणे व अंमलबजावणी: ग्रामीण उद्योगासाठी स्वतंत्र व दीर्घकालीन धोरणे आखणे. त्याचबरोबर योजना योग्य प्रकारे राबवण्यासाठी देखरेख व मूल्यमापन करणे.तसेच, खाजगी क्षेत्र आणि सहकारी संस्थांचा सहभाग याच्यामध्ये अतिशय महत्त्वाचा आहे. नागरीकरणाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी ग्रामीण उद्योगांचा सर्वांगीण विकास त्या ठिकाणी आवश्यक आहे. तंत्रज्ञान प्रशिक्षण,बाजारपेठ,भांडवल, यांची योग्य सांगड घातल्यास ग्रामीण उद्योग सक्षम होतील. स्थलांतर कमी होईल आणि ग्रामीण शहरी विकासामध्ये संतुलन साधता येईल.

**निष्कर्ष:** नागरीकरणामुळे ग्रामीण उद्योगावर विविध सकारात्मक व नकारात्मक परिणाम दिसून येतात. सकारात्मक परिणाम म्हणजे बाजारपेठेची वाढ, तंत्रज्ञानाची उपलब्धता आणि नव्या संधी. परंतु नकारात्मक परिणाम म्हणजे कामगारांची टंचाई, परंपरागत कौशल्यांचा विसर, स्पर्धात्मक दबाव आणि आर्थिक समस्यांमध्ये वाढ. ग्रामीण उद्योग हे देशाच्या समग्र विकासाचे महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळे सरकार स्थानिक संस्थांचा सहभाग बाजार व तंत्रज्ञानाचे संतुलन यामुळे नागरीकरण्याच्या प्रक्रियेतून येणाऱ्या आव्हानांना सामना करून ग्रामीण उद्योजकतेला प्रोत्साहन दिले पाहिजे. ग्रामीण आणि शहरी भाग यांच्यात संतुलन राखण्यासाठी योग्य धोरण आखणे, ग्रामीण भागातील संसाधने संरक्षित करणे आणि यांतील समुदायांना समर्पक पद्धतीने प्रोत्साहन देणे हे महत्त्वाचे आहे. नागरीकरणाला पूर्णपणे विरोध करता येणे शक्य नाही, परंतु ग्रामीण जीवनाच्या गरजा, संस्कृती आणि सामाजिक संरचना जपून सकारात्मक दिशेने बदल घडवून आणणे ही आपल्या सर्वांची गरज आणि जबाबदारी आहे.

**संदर्भ-**


1. देशपांडे,न. (2018). ग्रामीण समाजशास्त्र. पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस.
2. पाटील,स. (2019).भारतीय ग्रामीण समाज.कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
3. जाधव, प.(2016). ग्रामीण उद्योग व रोजगार निर्मिती पुणे:कान्तीनेन्तल प्रकाशन.
4. जाधव, प.(2015).ग्रामीण समाजशास्त्राची मूलतत्त्वे औरंगाबाद:प्रकाशन विद्या प्रकाशन.
5. पवार, स.(2013). ग्रामीण विकास व समाजशास्त्र,नाशिक, यशवंतराव चव्हाण प्रकाशन.
6. बोराडे, व.(2010). ग्रामीण समाजातील समस्या, औरंगाबाद: साईनाथ प्रकाशन.
7. मोरे, क. (2014). भारतातील कुटीर व हस्तकला उद्योग, मुंबई: ग्रंथाली प्रकाशन.
8. देशपांडे, नो (2013). ग्रामीण विकासाचे सामाजिक आयाम, पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस.
9. पाटील, ज. अ.( 2010). ग्रामीण भारतातील सामाजिक आर्थिक बदल, सांगली: लोकभारती प्रकाशन.
10. देशमुख, रा, (2009), ग्रामीण उद्योगाचा विकास. नागपूर: विदर्भ साहित्य ग्रंथ.

# ग्रामीण महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांचा अभ्यास

**डॉ. सुषमा जालिंदरराव तांगडे** संशोधक विद्यार्थिनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** भारतामध्ये आरोग्यसेवा व्यवस्थेची सुरुवात अठराव्या शतकाच्या मध्यकाळात झाल्याचे दिसून येते. भारतीय तत्त्वज्ञानानुसार, विशेषतः हिंदू धर्मात मानवी जीवनाचे चार प्रमुख पुरुषार्थ सांगितले आहेत, धर्म (न्याय), अर्थ (समृद्धी), काम (इच्छा) आणि मोक्ष (मुक्ती). या सर्व पुरुषार्थांच्या पूर्ततेसाठी उत्तम आरोग्य हा मूलभूत पाया आहे. वैदिक काळात आरोग्याला अत्यंत महत्त्व दिले गेले होते. सूर्योपासना ही आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक मानली जात होती. प्राचीन काळात निरोगी आयुष्य म्हणजे शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त, रोगमुक्त, सशक्त व दीर्घायुष्य लाभलेले जीवन असे समजले जात होते. सामर्थ्य, ऊर्जा, धैर्य व यशाने परिपूर्ण व्यक्तीचे जीवन सुखी व कल्याणकारी मानले जात होते. महिलांच्या आरोग्याच्या संदर्भात पाहता, कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या महिलाच अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. घरगुती जबाबदाऱ्या, मुलांचे संगोपन व शिक्षण, नोकरी, वृद्धांची काळजी तसेच कुटुंबातील आजारी व्यक्तींची सेवा करताना महिलांना स्वतःसाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे महिलांना असह्य परिस्थिती निर्माण झाल्यानंतरच वैद्यकीय सल्ला घ्यावा लागतो. कुटुंबाचे आरोग्य सांभाळताना महिलांचे स्वतःचे आरोग्य दुर्लक्षित राहते. महिलांचे आरोग्य जपण्यासाठी संतुलित आहार, योग्य जीवनशैली व वेळेवर वैद्यकीय सल्ला या तीन बाबी अत्यंत आवश्यक आहेत. मात्र अपुरा आहार, सामाजिक रूढी-परंपरा, अंधश्रद्धा, आरोग्याविषयी असलेली अनभिज्ञता आणि वैद्यकीय सुविधांचा अभाव यांमुळे महिलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होताना दिसते. त्यामुळे महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे व समाजामध्ये संवेदनशीलता वाढविणे ही काळाची गरज आहे.

**कीवर्ड्स:** महिला, आरोग्य, समस्या, उपाय.

**प्रस्तावना:** भारतीय समाजात स्त्रियांचे स्वरुप किंवा स्थिती समुदाय निहाय भिन्न दिसून येते शहरी भागातील स्त्री शैक्षणिक, आर्थिकदृष्ट्या सुधारलेली आहे. परंतु आरोग्याच्या दृष्टिने सुस्थितीत असेल अशी शाश्वती देता येत नाही. तर ग्रामीण भागातील स्त्री ही शहरी भागातील स्त्रीपेक्षा आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेली आहे. ग्रामीण भागातील स्त्रीचे आरोग्य सुद्धा सुदृढ विकसीत स्थितीत आहे असेही म्हणता येत नाही. ग्रामीण भागातील स्त्रियांना अनेक सोयी सुविधांचा अभाव, दैनंदिन जीवन जगण्याचा प्रश्न, वैद्यकीय सोयी सुविधांचा अभाव, पोषक आहार उपलब्धतेचा अभाव यामुळे रक्ताची कमी व कुपोषित स्थितीत जगत आहे. तेव्हा देशातील दुर्बल घटकांतील स्त्री यांचे आरोग्याचे प्रश्न गंभीर होतांना दिसत आहे. तसेच भारतातील स्त्रियांचे आरोग्यविषयक स्थिती किंवा समस्या चिंताजनक आहे. (काचोळे दा. धो., २००८: १६८) संपुर्ण राष्ट्रीय आरोग्याचा विचार करता महिलांच्या आरोग्य या घटकाला त्यामध्ये अनन्य महत्त्व आहे, हे नाकारुन चालणार नाही महिलांचे आरोग्य चांगले राहिले तर निश्चितपणे देशाचा सर्वांगिण विकास होऊ शकेल आज आपल्या देशातील महिलांची ही चितेची बाब बनली आहे. महिलांचा विकास व्हावा हे जसे वाटते तसे तिच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची जपवणूक होणेही तितकेच आवश्यक आहे. भारतातल्या दर दोन महिलांमागे एक महिला कोणत्या ना कोणत्या आरोग्याच्या समस्येने ग्रासलेली आहे ३५ टक्के महिला गंभीर स्वरुपाच्या आजारांनी ग्रस्त आहे तर १५ टक्के महिलांना सर्वसाधारण स्वरुपाच्या आजाराचा त्रास आहे. महिलांसाठी पुरेशा वैद्यकीय सोयी-सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये ही समस्या निर्माण झाली असल्याचे मत काही महिला डॉक्टरांनी व्यक्त केले आहे. महिलांच्या जीवनात आरोग्य हा शेवटचा प्राधान्याचा विषय असुन लहान मोठ्या आजारांसाठी महिला डॉक्टरकडे जाण्याची शक्यता नसते असे मानले जाते. त्यामुळे त्यांचेही लहान मोठे आजार बघता-बघता गंभीर स्वरुप धारण करत आहे. (कुलकर्णी पी. के.,२००८:१७३)

**आरोग्याबाबत वैद्यकीय समाजशास्त्राच्या काही व्याख्या: १. विलियम सी. कॉकरहॅम** "आरोग्य आणि आजारपण यांची सामाजिक कारणे आणि परिणाम यांच्याशी वैद्यकीय समाजशास्त्र संबंधीत आहे." **२. डेव्हिड मेकॅनिक,** "वैद्यकीय समाजशास्त्र म्हणजे रोग त्याची कारणे आणि व त्यावर उपाय शोधणारे शास्त्र होय." ( काचोळे दा. धो., २००८)

**संशोधनाची उद्दिष्टे:** 1.स्त्री आरोग्याचा अर्थ जाणून घेणे. 2. ग्रामीण स्त्रियांचे आरोग्याच्या समस्या जाणून घेणे, 3.ग्रामीण स्त्रियांचे आरोग्याच्या उपाययोजना सूचवणे.

**संशोधन पद्धती:** वास्तव सत्यापर्यंत पोहोचण्यासाठी वस्तुनिष्ठ अध्ययण करण्यासाठी संशोधन पद्धतीची आवश्यकता आहे. प्रस्तुत संशोधनाच्या माहिती संकलनासाठी द्वितीय स्त्रोतांचा किवा दुय्यम माहितीतर्गत विविध संकेतस्थळे, मासिक, वृत्तपत्रे, पीएच.डी. प्रबंध, एम.फिल लघुशोध प्रबंध, संदर्भग्रंच, इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. प्रामुख्याने संशोधन निबंध वर्णनात्मक व विश्लेषणात्मक आहे. या आधारे अहवाल (निबंध) लिहिण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. (भिताडे,२०१८)

**संशोधन साहित्याचा आढावा:** 1. **हेनरी ऑफरी दुआ (२०१७) :**यांच्या अभ्यासातून दिसून येते की, महिलांचे व त्यांच्या मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे सामाजिक दृष्टिकोणातून धोकादायक आहे. सुमारे ७५% माता महिलांनी आरोग्यविषयक काळजी घेतल्याचा दावा केला आहे. विवाहातील असमानता दूर करण्यासाठी स्त्रियांना त्यांच्या आरोग्यविषयक नियंत्रणाचे निर्णय घेण्यासाठी सशक्त करण्याची गरज आहे. तसेच अधिकांश घरामध्ये लैंगिक असमानता दिसून आली. 2. **रोजा तोशोम कस्सा (२०१९):**

जागतिक स्तरावर, गर्भाशयाच्या ग्रीवेचा कर्करोग हा महिलांमध्ये तिसरा सर्वात सामान्य कर्करोग आहे. जवळजवळ अर्ध्या प्रतिसादकांना मानेच्या कर्करोगाविषयी चांगले ज्ञान होते. बहुतेक प्रतिसादकांकडे सकारात्मक दृष्टीकोन होता परंतु त्यापैकी फारच

कमी प्रतिसादकांनी गर्भाशयाच्या ग्रीवेची तपासणी केली. गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कर्करोगाच्या तपासणी पद्धती संबंधी ज्ञान, दृष्टिकोन आणि सराव यांच्या संबंधित घटक म्हणजे शैक्षणिक स्थिती आणि ग्रीवाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास होय.

**स्त्रियांचे आरोग्य आणि मासिक पाळी**: स्त्रियांची प्रजनन संस्था (Female Reproductive System) ही पुरुषांच्या प्रजनन संस्थेपेक्षा अधिकच क्लिष्ट असते. अर्थातच, त्यामुळे स्त्रियांच्या आरोग्याची गुंतागुंत जास्त असते. प्रजनन संस्थेच्या कार्यामध्ये होणारे त्रास ही अनेक महिलांच्या समस्या आहे. कित्येक वर्ष स्त्रीया या त्रासासह जगत आहेत. तसेच मासिक पाळीची सुरुवात लहान वयात म्हणजे बारा-तेराव्या वर्षापासून होते. जेव्हा मासिक पाळी पहिल्यांदा सुरु होते, तेव्हा सर्वात आधी आपल्या मुलीशी या विषयावर मोकळेपणाने बोला. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे द्या आणि मासिक पाळी हे मोठे गुपित असल्यासारखे आहे. असा त्याचा बाऊ होऊ देऊ नका, लाज वाटणे, चुकीच्या संकल्पना किवा अंधश्रद्धांना बळी पडू नका. अशाने काही त्रास होत असल्यास मुली मोकळेपणाने मदत मागणार नाही. मासिक पाळी ही एक अत्यंत नैसर्गिक प्रक्रिया आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मुलीना लहान वयात भरपूर खेळू द्या. नको तिथे मुलगा-मुलगी असा भेदभाव करु नका, त्यांची भावनिक कुचंबना होऊ देऊ नका आणि तिसरी महत्त्वाची गोष्ट मुलींना पोषक आहार द्या. मासिक पाळीची अनियमितता हॉर्मोन्सवर अवलंबून असते. आणि हॉर्मोन्सचे संतुलन हे मनाच्या अवस्थेवर अवलंबुन असते. त्यामुळे मनाची शांतता हे हॉर्मोन्स आणि पाळीच्या आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे. भोती, ताणतणाव, भावनिक ओढताण हे मासिक पाळीमध्ये बाधा निर्माण करतात. लहान मुलींमध्ये पाळी वेळेवर न येणे, लवकर येणे, अतिरक्तस्त्राव, खुप अतिवेदना हे संकेत आहेत की, त्यांच्या शारीरिक मानसिक आरोग्याची कुठेतरी हेळसांड होत आहे. वेदना आणि अस्वस्थता हे शरीरिक ताण व मानसिक-भावनिक प्रतिकार दर्शवतात. त्यामुळे ज्या स्त्रिया कायम तणावाखाली असतात. त्यांना प्रत्येक महिन्यात पाळीच्या वेळेस त्रास होतो. याउलट ज्या स्त्रिया शांत शक्तीचा -हास न होऊ देणाऱ्या असतात त्यांना पाळीचा त्रास होत नाही. हा त्रास कमी करण्यासाठी गोळ्या घेणे हा सर्वात सोपा आणि तेवढ्यापुरता उपयोगी असा उपाय असला, तरी पुढे जाऊन त्रासदायक ठरु शकतो. आणि अनेक वैद्यकीय समस्या निर्माण होऊ शकतात. अनेक स्त्रिया गोळ्या न घेता जीवनशैलीतून याचे उत्तर शोधण्याच्या दिशेने जात आहे.

**मासिक पाळीच्या समस्या**:पाळी येणे म्हणजे नेमके काय होते हे आपण पूर्वी पाहिले आहे. पाळी ही जरी सामान्य शारीरिक घटना असली तरी पाळीच्या संबंधात अनेक तक्रारी असतात. त्यासाठी कधीकधी सल्ल्याची व उपचाराची गरज असते. पाळीच्या संबंधीच्या तक्रारीचे खालीलप्रमाणे प्रकार आहे. पहिली पाळी लवकर किंवा उशिरा येणे, पाळी लवकर लवकर येणे किंवा कमी अंतराने येणे, पाळी जास्त अंतराने येणे किवा न येणे. पाळीच्या आधी किंवा मध्ये पोटात दुखणे, रक्तस्त्राव कमी जाणे किंवा कमी दिवस जाणे, रक्तस्त्राव जास्त जाणे किंवा जास्त दिवस जाणे,पाळी थांबताना होणारा त्रास (दै. सकाळ 20 एप्रिल 2020 :०६)

**लिंग विषमतेचा अर्थ**: ग्रामीण भागात लिंगाच्या आधारावर स्त्रि-पुरूष विषमता पाळली जाते. लिंगानुसारर स्त्रियाचा दर्जा कनिष्ट तर पुरुषांचा दर्जा श्रेष्ट मानला जातो, अशा प्रकारची स्त्री आणि पुरुषांमध्ये असलेली विषमता म्हणजे लिंग विषमता होय. याच लिंगविषमतेमुळे ग्रामीण भागात स्त्रियांच्या आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे-

**रक्तअल्पता**: ग्रामीण महिलामध्ये ग्रामीण रक्तक्षयाची समस्सा आहे. यावरून सकस आहाराच्या अभावी ग्रामीण महिलामध्ये रक्तक्षयाच्या समस्सेत मोठी वाढ झालेली दिसते. वैदिकशास्त्रानुसार हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते ज्यास रक्तक्षय म्हणतात सकस आहारा अभावी हा रोग होताना दिसून येतो.

**कुपोषण**: महिलाच्या परंपरेनुसार पुरुषांचे जेवण झाल्यानंतर शेवटी जेवण करतात. त्या वेळी बऱ्याचदा त्याना खाण्यासाठी काही शिल्लक राहत नाही. किंवा उरलेले शिळे अन्न त्या ग्रहण करतात, त्यामुळे त्या कुपोषणाला बळी पडतात. तसेच आहाराच्या तुलनेत अतिश्रम केल्याने त्यांच्या व आहार आवश्यक न घेतल्याने कुपोषणात वाढ होते.

**भ्रूणहत्या:** भारतात २०११ च्या जनगणने नुसार एकूण लोकसंख्या १, २१०.१९३.४२२. एवढी आहे, त्यात पुरुषांची संख्या ६२३,७२४,२४८, एवढी आहे. तसेच त्यात १००० पुरुषा माघे ७४० स्त्रियां हे प्रमाण आहे. ही लोक संख्येची विषमता कन्याभ्रून हत्यामुळे झाली आहे. या वारंवार गर्भपातामुळे स्त्रियांना अनेक शारीरिक दोष ही निर्माण झालेले आढळतात.

**उपाययोजना:** चांगली हवा, व्यायाम, योग्य आहार, फळे, पाणी, विश्रांती आणि कमीत कमी ताण तणाव, वेदनारहित मासिक पाळी, वरील सर्व पैलूंवर लक्ष दिल्यास मुलीच्या किशोरावस्थेत पाळी पहिल्यांदा सुरु झाल्यापासून मोनोपॉजपर्यंत तिच्या प्रजनन संस्थेचे आरोग्य उत्तम राहील. तसेच महिला आरोग्याबापत शासन स्तरावरुन सार्वजनिक कार्यक्रम राबविण्यात येतात. तरीही पाहिजे त्या प्रमाणात या आरोग्य सुविधा महिलांपर्यंत पोहोचत नसल्याचे दिसून येते. यामध्ये मृत अवस्थेत जन्माला येणाऱ्यांचे प्रमाण, प्रसूती दरम्यान मातांच्या मृत्यूचे प्रमाण, वैद्यकीय कारणामुळे होणारे बालकाचे मृत्यू बात शासकीय यंत्रणा कमी पडल्याचे उपलब्ध माहिती वरून दिसून येते. भारतात २०१९ मध्ये प्रती महिला प्रजनन दर २.२ जन्म इतका होता. जी की २०१९ या वयाच्या तुलनेत ०.९ टक्के कमी होता. २०१९ मध्ये प्रती महिला प्रजनन दर २.२२ जन्म इतका होता. हा जन्म दर २०१८ च्या तुलनेत प्रती महिला ०.८९ इतका कमी होता. या वरून असे स्पष्ट होते कि, मागील तीन वर्षामध्ये जन्म दर घटत असल्याचे दिसून येते. गरोदर महिलांच्या आरोग्याची अधिक काळनी घेणे गरजेचे असते. प्रसूती दरम्यान होणाऱ्या माताचे मृत्यू प्रमाण अगदी चिंताजनक आहे. २०१७ च्या जागतिक आकडेवारी नुसार १,००,००० महिला मागे २११ महिला या प्रसूती दरम्यान मृत्यू पावतात. या पैकी ४५ टक्के मृत्यू हे प्रसूतीपूर्व सुरवातीच्या २४ तासामध्ये उपचारा अभावी होतात. या वरून गरोदर महिलांच्या आरोग्य विषयक समस्याचे महत्व अधोरेखित होते.

**निष्कर्ष:** 1. ग्रामीण महिलांच्या लोकसंख्येमध्ये पुरुषप्रधान मानसिकतेतुन भ्रूणहत्या घडवून आणली जाते. त्यामुळे दर हजारी स्त्रियांचे प्रमाण पुरूशा पेक्षा कमी आढळते. 2. ग्रामीण महिलांच्या आहाराकडे कुटुंबात लक्ष्य न दिल्यामुळे रक्त क्षय, आडे ठिसूळ होणे, नैत्रदोश असे आजार वाढतांना दिसतात. 3. मुली आजारी पडल्या नतर डॉक्टरकडे न जाता घरगुती उपचारावर भर दिला जातो,

म्हणून त्यांची प्रकृती अधिक खालावते. 4. ग्रामीण भागात शिक्षणाचे अल्प प्रमाण असल्यामुळे बाल विवाह घडुन येतात त्यामुळे बालक माता मृत्युचे प्रमाण शहराच्या तुलनेत अधिक आढळते. 5. सकस आहार न मिळाल्यामुळे, स्वच्छतेचा अभाव असल्यामुळे कुपोषण होतांना दिसतात. 6. पिण्याचे शुध्द पाणी मिळत नसल्यामुळे पोटाचे अनेक आजार होत असल्याचे दिसुन येतात.

**संदर्भ सूची:**

१) आगलावे प्रदीप, (2003)भारतीय समाज संरचना आणि समस्सा' साईनाथ प्रकाशन, २००३
२) काचोळे दा. धो. (२००८) वैद्यकीय समाजशास्त्र, कैलाश पब्लिकेशन छ. संभाजीनगर तृतीय आवृत्ती पृ. क्र. १६८
३) कुलकर्णी वि. सु. दै. सकाळ लेख सोमवार, २० एप्रिल २०२०, पृ. क्र. ६
४)कुलकर्णी पी. के. (२००८) आरोग्य आणि समाज, डायमंड पब्लिकेशन पुणे, पृ. क्र. १७३
५) दै. सकाळ औरंगाबाद, मंगळवार, २७ ओक्टोंबर २०२०. पृ. क्र. ६
६) भिंताडे वि. रा. (2018), "शैक्षणिक संशोधन पद्धती", डायमंड पब्लिकेशन, पुणे, दुसरी आवृत्ती.
७) Henry Ofori Dauh (2017), "Determinants of Health Care decision making autonomy among mothers of children under five year in Ghana: analysis of 2014 Ghana demographic and health Survey". Research Journal of Women Health, ISSN-2054-9865, Volume 4, Article 5.
८) Roza Teshome Kassa (2019), "Cervical Cancer and Screening method: Knowledge, Attitude and Practice among women living Adama Town", Journal of Womens Health Care, ISSN-2167- 0420, Vol. 8, ISSUE 2

# भारतातील ग्रामीण-शहरी स्थलांतर आणि आव्हाने

**रेखा चांदू गवलवाड** संशोधक विद्यार्थीनी,समाजशास्त्र विभाग,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर

**गोषवारा:** मानवाचे पृथ्वी तलावावर अस्तित्व असल्या पासून तो आपल्या गरजांचे निराकरण व सुरक्षित निवारा शोधण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत राहिला. मानवाची विकसित अवस्था म्हणजे भटके जीवन सोडून त्याने स्थिर जीवन जगण्यास प्रारंभ केला. परिणामी सुरक्षा व सत्ता आकर्षणामुळे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर होत असे. गावातून मोठ्या गावाकडे व लहान ठिकाणाहून मोठ्या ठिकाणाकडे अधिक सोई आणि सुविधा, रोजगार, दळणवळणाच्या सोई उपलब्ध आहे अशा ठिकाणी स्थलांतर घडून आले. हॉले (Hawley) यांच्या मतानुसार, सुसंस्कृत व प्रगत लोकच अधिक प्रमाणात स्थलांतर करू शकतात स्थलांतर हे अल्पकालीन, दीर्घकालीन. तात्पुरते किंवा कायमस्वरूपाचे असते. थोडक्यात, स्थलांतर प्रक्रियेमध्ये मुख्यत्वे आपल्या मूळ वास्तव्य ठिकाणापासून अनेक कारणासाठी दुसऱ्या ठिकाणी जावून वास्तव्य करतात. पूर्वी लोक भूक भागवण्यासाठी भटकंती करण्यातून स्थलांतर होत होते, आज शिक्षण, आरोग्याच्या सोई, रोजगार, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी स्थलांतरीत होतात. भारतातील ग्रामीण स्थलांतर हे विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे असले तरी या स्थलांतराचे भारतासमोर अनेक आव्हाने देखील आहेत.

**मुख्य शब्द:** स्थलांतर, ग्रामीण-शहरी, सामाजिक सुरक्षा, रोजगार, विकास

**संशोधन उदिष्टे:** १. स्तलांतराची संकल्पना काय आहे हे समजून घेऊन स्थलांतराची कारणे शोधता येईल. २. अंतर्गत व बहिर्गत स्थलांतर म्हणजे काय हे समजून घेता येईल. ३. ग्रामीण स्थलांतराचे परिणाम व त्यावरील उपाय समजून घेता येईल ४. स्थलांतर आणि विकासाची आव्हाने समजून घेता येईल.

**प्रस्तावना:** ग्रामीण स्थलांतर हे ग्रामीण भागातून शहरी भागात लोकांच्या प्रवाहाचे वर्णन करते. बहुसंख्य स्थलांतरितांकडे शहरांमध्ये चांगल्या नोकऱ्या मिळविण्यासाठी आवश्यक भारतासारख्या देशामध्ये स्थलांतर व त्याची कारणे ही काळानुरूप बदलत गेली आहेत. स्थलांतराची प्रक्रिया ही सातत्याने घडणारी गोष्ट आहे. स्थलांतर एक नैसर्गिक प्रक्रिया असून ती सतत चालू राहते. स्थलांतराचा नियम म्हणून किंवा ती एक स्वाभाविक प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये स्थलांतर करणारे सुरूवातीला आपल्या गावाहून / मूळ वस्तीस्थाना पासून जवळच्या छोट्या शहरांकडे व नंतर तिथून मोठ्या शहरांकडे स्थलांतर करतात. असलेले शिक्षण किंवा कौशल्ये नसतात, त्यामुळे त्यांना कमी पगाराच्या, असुरक्षित रोजगारासाठी भाग पाडले जाते. ग्रामीण स्थलांतरितांच्या स्थिर प्रवाहामुळे, बेरोजगारी आणि बेरोजगारी वाढली आहे. ग्रामीण स्थलांतरितांना त्यांच्या कामगार हक्कांबद्दल माहिती नसलेल्यांना नियोक्ते सहसा कमी वेतन आणि खराब कामाची परिस्थिती देतात. हे स्थलांतरित लोकही गरीब परिस्थितीत राहतात. या घटकांचा परिणाम म्हणून शहरी भागात राहणीमानाचा दर्जा आणि आर्थिक सुरक्षितता अधिक चांगली मिळू शकते, म्हणून लोक ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतर करतात, ज्याला ग्रामीण स्थलांतर असेही म्हणतात. मानवी उत्पत्तीपासून स्थलांतराची प्रक्रिया अव्याहतपणे सुरू आहे. स्थलांतराची प्रक्रिया ही नेहमीच उद्योग, व्यापार व शिक्षण असलेल्या मोठ्या शहरांच्याकडेच होताना दिसते. स्थलांतरामध्ये मुख्यत्वे आर्थिक उद्देश हा महत्त्वाचा भाग असलेला दिसतो. वरील कारणाप्रमाणेच निर्सगातील विविध कारणे स्थलांतराला कारणीभूत आहेत. स्थलांतराची तिव्रता आणि तिची व्याप्ती ही त्या त्या परिवेषातील राजकीय, सामाजिक, भौगोलिक प्रक्रियेशी मोठ्या प्रमाणात निगडीत असते.

**स्थलांतराची संकल्पना:** स्थलांतराची प्रक्रिया ही प्राचीन काळापासून चालू आहे. ही प्रक्रिया निरंतर चालू राहणारी सामाजिक प्रक्रिया आहे. प्राचीन काळात निसर्गातील अनाकालीन घटना, आकस्मित बद्दल, भूकंप, पाऊस, वादळ, महापूर या पर्यावरणातील घटकाशी समायोजन साधून आपली उपजिवीका भागवण्याच्या उद्देशाने एका ठिकाणाहून जेथे पर्यावरण मानवी जीवनाचे अस्तित्व टिकवण्यास अनुकूल आहे अशा ठिकाणी ते नव्याने राहत असे. याचे मुख्य कारण नैसर्गिक साधन संपत्तीत असमानता असल्याने व दुसऱ्या

प्रदेशात अधिक नैसर्गिक संपत्ती उपलब्ध असल्यास स्थलांतर घडून येते. भारताच्या संदर्भात स्थलांतराची प्रक्रिया ही १९ व्या शतकाच्या पुर्वार्धानंतर मोठ्या प्रमाणात जाणवू लागली. औद्योगिक व शहरीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर ग्रामीण भागाकडून शहरी भागांच्याकडे स्थलांतराच्या प्रक्रियेने वेग घेतला. शहरीकरणानंतर सुरू झालेल्या स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागाकडून शहरांकडे, तसेच एका शहराकडून दुसऱ्या शहरांकडे स्थलांतर होवू लागले.

**व्याख्या:** हॉले यांच्या मते, "लोक एका ठिकाणावरून दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी जाऊन अल्पकाळ, दिर्घकाळ व कायमचे वास्तव करतात त्यास स्थलांतर म्हणावे."

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधन लेखात दुय्यम स्रोत पद्धतीचा वापर केला आहे ज्यात प्रकाशित, अप्रकाशित लेख तसेच संकेतस्थळ यांचा वापर करण्यात आला असून संकलित माहितीच्या आधारावर प्रस्तुत योग्य मांडणी केली आहे.

**भारतातील ग्रामीण-शहरी स्थलांतर:** सध्याच्या आधुनिक जगामध्ये मानवी स्थलांतर है खेडयातन शहराकडे होत असताना दिसते. अर्थातच ही नवीन अशी घटना नाही. अनेक देशात धडून आलेल्या औद्योगिक क्रांतिमुळे स्थलांतराचा पूर्वीच्या रचनेचा अनुमानबदलून टाकलेला आहे व आधुनिक स्थलांतर है प्रामुख्याने औद्योगिक केंद्राकडे होऊ लागले आहे. अशाप्रकारचे स्थलांतर दोन विभागात आढळते. काही लोक अल्पकाळा-साठी व काही नेहमीसाठी स्थलांतरीत झालेले असतात. जे अल्पकाळासाठी स्थलांतरीत झालेले असतात ते पुन्हा आपल्या खेड्याकडे परतत असतात. अशा प्रकारे जे तात्पुरते स्थलांतरीत असतात त्याची खेडयातुन शहराकडे व शहरातुन खेडयाकडे सतत ये-जा सुरू असते कारण ते एक तर खेडयाशी असलेले संबंध तोडू शकत नाहीत व दुसरे म्हणजे त्यांना शहरी जीवनाचे आकर्षण असते. परंत शहरी जीवनातील अस्थिरता, तात्पुरता रोजगार, रहात्या घराची समस्या यामुळेच ते रोजगारीच्या ठिकाणी आपले कुटुंब करू शकत नाहीत. त्याचे कर्तृब खेड्यामध्येच ठेवावे लागते त्यामुळे त्याची खेडे ते शहर व शहर ते खेडे अशी सतत ये-जा सुरू असते. त्याचप्रमाणे तात्पुरत्या स्थलांतराचे महत्वाचे कारण म्हणजे दुष्काळ होय. दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण ग्रामीण भागातील लोक औद्योगिक शहराकडे धाव घेतात व दुष्काळ संपल्यावर पुन्हा ते खेडयाकडे परतत असतात. ग्रामीण ते शहरी स्थलांतर हा ऐतिहासिकदृष्ट्या मानवी स्थलांतराचा सर्वात उत्कृष्ट नमुना आहे. स्थलांतराचा हा प्रकार औद्योगिकपूर्व काळात सुरू झाला आणि २००० च्या दशकाच्या मध्यापर्यंत कायम राहिला. असे असले तरी, शहरी भागात लोकांची ये-जा सुरू असूनही, गेल्या अनेक दशकांपासून याला ठराविक अपवाद आहेत. स्थलांतराची प्रक्रिया ही वय, लिंग, शिक्षण या प्रमुख गोष्टीवर अवलंबून असते. शक्यतो ग्रामीण भागातील युवक शहरांकडे नोकरी-धंद्याच्या शोधात स्थलांतर करत असतात. कांही तरूण मात्र शहराकडे चंगळवादी दृष्टीने आकर्षित होवून स्थलांतर करत असतात. स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेने कमी असलेले दिसून येते. शैक्षणिक दृष्ट्या प्रगतीपथावर असणाऱ्या शहरांमध्ये युवकांची शिक्षण घेण्यासाठी स्थलांतर होताना दिसते. तर दुसऱ्या बाजूला खेळ, मैदानी स्पर्धा व सांस्कृतिक दृष्ट्या विकसित झालेल्या शहरांमध्ये त्या दृष्टिची आवड असणारे लोक स्थलांतरित होताना दिसतात. व्यापार व उद्योगाच्या दृष्टिने विकसित झालेल्या शहरांमध्येही नोकरी धंद्याच्या शोधात असणारा युवकवर्ग मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होत असतो. अलिकडे ग्रामीण-शहरी स्थलांतरामुळे शहरीकरण वाढत असताना, आर्थिक कारणांसाठी होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाणही वाढणारच. आपल्या देशात विकास आणि स्थलांतराचे प्रश्न एकमेकांशी थेट संबंधित असल्याचे अनेकदा दिसले आहे, म्हणूनच व्यक्तीचा देशात कोठेही व्यवसाय करण्याचा हक्क अबाधित ठेवून विकासाभिमुख धोरणे आखल्यास देशांतर्गत स्थलांतराचे तोटे कमी होतील

**स्थलांतराचे प्रकार:** स्थलांतर हे अनादिकालापासून सुरू असलेले दिसून येते. प्राचीन कालखंडामध्ये स्थलांतर हे मर्यादित प्रमाणात होत होते. स्थलांतराची प्रक्रिया कांही अंतरापर्यंत होत होती. हे स्थलांतर घोडे, उंट, बैलगाडी, पायी अशा वेगवेगळ्या बार्गांनी केले जात होते. स्थलांतर हे हंगामी, कायम स्वरूपाचे, देशांन्तर्गत, आंतरराष्ट्रीय एका ग्रामीण भागातून दुसऱ्या ग्रामीण भागाकडे किंवा नगराकडे अगर नगराकडून ग्रामीण भागाकडे होत असते. स्थलांतर हे उदरनिर्वाह, व्यवसाय, नोकरी, युद्धजन्य परिस्थिती, फाळणी, अशा वेगवेगळ्या कारणांनी होत होते. थोडक्यात स्थालांतरामागे नैसर्गिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय घटक कारणीभूत असलेले दिसून येते. यावरूनच स्थलांतराचे दोन प्रमुख प्रकार पडतात ते खालीलप्रमाणे

**अंतर्गत स्थलांतर:** देशाच्या सीमेअंतर्गत होणाऱ्या स्थलांतरास अंतर्गत किंवा देशांतर्गत स्थलांतर असे म्हणतात. यामध्ये प्रत्येक राज्याच्या अंतर्गत भागात आणि राज्याबाहेर परंतु देशाच्या सीमेअंतर्गत होणाऱ्या स्थलांतराचा समावेश होतो. अंतर्गत स्थलांतराचे वेगवेगळ्या आधारावर त्याचे कांही प्रकार पडतात ते खालीलप्रमाणे

**तात्पुरते स्थलांतर:** हे स्थलांतर कांही तासांपासून एकदिवस, एक महिना, एक वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त असू शकते. या प्रकारचे स्थलांतर एका राज्यातून दुसऱ्या राज्यात व राज्यातून देशात होताना दिसून येते. उदा. नोकरी, व्यवसाय इ. १) दैनिक स्थलांतर (Daily Migration): या प्रकारच्या स्थलांतरात लोक आपल्या नोकरी, व्यवसाय, व्यापार व शिक्षणाच्या निमित्ताने सकाळी जाऊन संध्याकाळी परत येत असतात. अशा प्रकारच्या स्थलांतरात अंतर हे कमी प्रमाणात असते. २) निम्न स्थायी स्थलांतर (Semi-Permanent Migration): या स्थलांतरामध्ये लोक नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने दुसऱ्या ठिकाणी जात असतात. परंतु ते आपले मूळ ठिकाण किंवा घर यांच्याशी संबंध ठेवून असतात. त्याचबरोबर कालांतराने ते आपल्या मूळ गावी वास्तव्यास येतात. अशा स्थलांतरास निम्न स्थायी स्थलांतर म्हटले जाते. ३) हंगामी किंवा ऋतुनुसार होणारे स्थलांतर (Seasonal Migration): या प्रकारच्या स्थलांतरामध्ये लोक विशिष्ठ हंगामात आपले गांव किंवा प्रदेश सोडून दुसरीकडे स्थलांतर करतात. यामध्ये प्रामुख्याने शिकार, मासेमारी, पशुपालन, कृषिक्षेत्रात राहणाऱ्या लोकांचा समावेश होतो.

**प्रदेशाच्या आधारावर होणारे स्थलांतर:** या प्रकारचे स्थलांतर हे प्रामुख्याने खालील दोन प्रकारामध्ये मोडते. १) एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात २) एका राज्यातून दुसऱ्या राज्यात.

**सामाजिक व शैक्षणिक घटकांच्या आधारावर होणारे स्थलांतर:** या प्रकारचे स्थलांतर हे प्रामुख्याने दोन प्रकारामध्ये मोडते ते खालीलप्रमाणे- १) विवाहानिमित्ताने होणारे स्थलांतर: महाराष्ट्र व भारतात होणारे स्थलांतर या प्रकारचे सर्वत्र दिसून येते. असे स्थलांतर हे कायमस्वरूपी असते. पितृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये मुलगी ही मुलाच्या घरी कायम वास्तव्यास येत असते. तर याउलट मातृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये मुलगा हा मुलीच्या घरी कायम वास्तव्यास जात असतो. २) शैक्षणिक उद्देशाने होणारे स्थलांतर (Education Migration): या प्रकारच्या स्थलांतरामध्ये उच्च शिक्षणाच्या निमित्ताने लोक खेड्यामधून शहराकडे स्थलांतर करत असतात. यामध्ये लोक एका राज्यातून दुसऱ्या राज्यात, देशातून परदेशात स्थलांतर करत असतात.

**बहिर्गत स्थलांतर:** या स्थलांतर्गत देशावरील स्थलांतर येते.

**भारतातील ग्रामीण ते शहरी स्थलांतराची कारणे:**

**ग्रामीण भागातील धक्कादायक घटक:** रोजगाराच्या मर्यादित संधी, गरिबी, पायाभूत सुविधांचा अभाव आणि नैसर्गिक आपत्ती, शेतीचे यांत्रिकीकरण (स्थलांतराचा स्ट्रक्चरल सिद्धांत) लोकांना ग्रामीण भागाबाहेर ढकलत आहे.

**शहरी भागात खेचण्याचे घटक:** नोकरीच्या चांगल्या संधी, उच्च वेतन, शिक्षण आणि आरोग्यसेवा आणि सुधारित राहणीमान स्थलांतरितांना शहरांकडे आकर्षित करतात.

**आर्थिक घटक:** भारतातील ग्रामीण भागात पुरेशा रोजगाराच्या संधी नाहीत आणि शहरी भागाच्या तुलनेत कमी वेतन मिळते. निओक्लासिकल सिद्धांत असे सुचवितो की स्थलांतर हे प्रामुख्याने वेतनाच्या फरकाने चालते, ज्यात लोक ग्रामीण भागातून कमी वेतनासह शहरी भागात स्थलांतर करतात. प्रामुख्याने वेतनाच्या फरकाने चालते, ज्यात लोक ग्रामीण भागातून कमी वेतनासह शहरी भागात स्थलांतर करतात आणि त्यांना अधिक कमाईच्या संधी उपलब्ध होतात.उदाहरणार्थ, १९६० च्या दशकातील हरित क्रांतीमुळे ग्रामीण-ते-शहरी स्थलांतर महत्त्वपूर्ण झाले कारण यांत्रिकीकरणामुळे ग्रामीण भागातील शेतमजुरांची गरज कमी झाली.

**पायाभूत सुविधांचा विकास:** शहरी विकासाचा परिणाम शहरी भागात रस्ते, बंदरे आणि औद्योगिक क्षेत्र यासारख्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीमध्ये होतो. यामुळे ग्रामीण रहिवाशांना रोजगाराच्या संधींच्या शोधात शहरांमध्ये स्थलांतरित होण्यास प्रोत्साहन मिळते.उदाहरणार्थ, दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर (DMIC) सारख्या उपक्रमांमुळे जवळपासच्या ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले आहे.

**सामाजिक घटक:** शिक्षण, आरोग्यसेवा, ग्रामीण भागातील कठोर जातिव्यवस्था आणि सामाजिक गतिशीलता ग्रामीण-ते- शहरी स्थलांतरामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. स्थलांतरित स्वत:साठी आणि त्यांच्या मुलांसाठी चांगल्या शैक्षणिक संधी तसेच सुधारित आरोग्य सेवा सुविधा मिळवण्यासाठी शहरांमध्ये जातात.उदाहरणार्थ, शालेय शिक्षणाच्या चांगल्या संधींसाठी ग्रामीण बिहारमधून कुटुंबांचे दिल्लीसारख्या शहरात स्थलांतर ही एक सामान्य घटना आहे.

**भारतातील ग्रामीण-ते-शहरी स्थलांतराचे परिणाम:**

**अति शहरीकरण:** जलद ग्रामीण-ते-शहरी स्थलांतरामुळे शहरी पसरते, पायाभूत सुविधा आणि संसाधनांवर ताण येतो. उदाहरणार्थ, दिल्लीच्या लोकसंख्येच्या वाढीमध्ये २०५० पर्यंत ४०० दशलक्ष शहरी रहिवासी जोडण्याचा अंदाज आहे, जे त्या कालावधीसाठी जगातील सर्वात मोठे शहरी स्थलांतर आहे. या विस्तारामुळे केवळ पायाभूत सुविधांवर ताण पडत नाही तर शहरी उष्णता बेटाचा प्रभाव देखील वाढतो, जिथे मानवनिर्मित संरचना उष्णता शोषून घेतात आणि ती परत पसरवतात, ज्यामुळे स्थानिक तापमानात लक्षणीय वाढ होते.

**सामाजिक बदल:** स्थलांतर पारंपारिक कौटुंबिक संरचनांना व्यत्यय आणते आणि ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात सामाजिक आव्हाने निर्माण करते, जसे की तणावग्रस्त वडील, अपूर्ण कुटुंबे आणि विभक्त कुटुंब संरचना.

**आर्थिक वाढ:** स्थलांतर शहरी आर्थिक वाढीस हातभार लावते आणि कार्यबल प्रदान करते आणि वापर वाढवते. ग्रामीण भागात परत पाठवलेल्या रेमिटन्समुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

**पर्यावरणीय प्रभाव:** शहरी भागात लोकसंख्या आणि आर्थिक क्रियाकलापांचे केंद्रीकरण प्रदूषण, जंगलतोड आणि नैसर्गिक संसाधनांचा हास यासारख्या पर्यावरणीय समस्यांना वाढवते.शाश्वत विकासासाठी शहरीकरणाच्या पर्यावरणीय प्रभावाचे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे ठरते.

**ग्रामीण-शहरी स्थलांतराची आव्हाने:** १) नैसर्गिक आपत्ती, वांशिक हिंसाचार किंवा रोजगारामुळे वाढणारे स्थलांतर २) सोशल मीडियामुळे स्थलांतरितांविरुद्धच्या हिंसाचारात वाढ होत आहे ३) भारतात मोठ्या प्रमाणात ग्रामीण ते ग्रामीण स्थलांतर आहे. यातील एक मोठा भाग म्हणजे विवाहानंतर महिलांचे स्थलांतर. ४) ग्रामीण-ते-शहरी स्थलांतरितांची संख्या सुमारे १४ कोटी आहे, परंतु अनौपचारिक आकडेवारी त्यापेक्षा जास्त आहे. २०१७ च्या आर्थिक सर्वेक्षणातही असे दिसून आले आहे की देशात स्थलांतरित लोकसंख्या १३९ दशलक्ष आहे. ५) पूर, दुष्काळ, चक्रीवादळ इत्यादी नैसर्गिक आपत्तींची वाढती तीव्रता आणि ग्रामीण कृषी संकटामुळे होणारे त्रासदायक स्थलांतर यामुळे भारतातील स्थलांतरितांची संख्याही वाढली आहे. ६) त्रासदायक स्थलांतर आणि शहरी झोपडपट्ट्यांमध्ये स्थलांतराच्या बाबतीत, संभाव्य नियोक्त्यांसोबत वाटाघाटी करण्याची शक्ती नसणे, सामाजिक भांडवल नसणे किंवा राजकीय संघटना आणि दबदबा नसणे यामुळे स्थलांतरित अधिक असुरक्षित होतात. ७) शहरी भागात, स्थलांतरितांना शुद्ध पिण्याचे पाणी, वीज, सुरक्षित घरे इत्यादी सुविधा नसलेल्या वस्तीमध्ये राहण्यास भाग पाडले जाते. ८) जरी त्स्थलांतरितांना दिलेले स्वस्त श्रम वस्तू आणि सेवांच्या किमती कमी ठेवतात, तरीही त्यांना अनेकदा समाजकंटक म्हणून चित्रित केले जाते आणि समाजाच्या इतर घटकांकडून लक्षणीय भेदभावाचा सामना करावा लागतो. झोपडपट्ट्या / वस्ती जेथे त्यांना राहण्यास भाग पाडले जाते ते नियमितपणे "गुन्हेग्रस्त" म्हणून चित्रित केले जाते आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून त्यांचा छळ

केला जातो. ९) ग्रामीण स्थलांतरांना त्यांच्या नोकऱ्या आणि निवासस्थानाच्या अस्थिर स्वरूपामुळे, त्यांना वारंवार बेकायदेशीर रहिवासी घोषित केले जाते आणि त्यांना बेदखल केले जाते किंवा अटक केली जाते.

**ग्रामीण शहरी स्थलांतरावरील उपाय:** ग्रामीण स्थलांतर रोखण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जाऊ शकतात. सर्वात महत्त्वाचा उपाय म्हणजे ग्रामीण भागात सामाजिक सुविधा देणे. यामुळे अनेक लोकांना शहरी भागात स्थलांतर करण्यापासून परावृत्त केले जाईल. दुसरा उपाय म्हणजे ग्रामीण भागात उद्योगांची स्थापना करणे ज्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि रोजगाराच्या संधींच्या शोधात ग्रामीण भागातून शहरी केंद्रांकडे स्थलांतरित होण्यापासून लोकांना परावृत्त केले जाईल. शैक्षणिक सुधारणा देखील ग्रामीण-शहरी स्थलांतर कमी करण्यास मदत करू शकतात. मायक्रोफायनान्स विकसित करणे आणि रस्ते पायाभूत सुविधा सुधारणे हे इतर उपाय आहेत जे ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे जीवनमान सुधारून ग्रामीण-शहरी स्थलांतर कमी करू शकतात. ग्रामीण भागात आणि लहान शहरांमध्ये उपजीविकेसाठी वैद्यकीय, शैक्षणिक संसाधने यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्याने मोठ्या शहरांमध्ये होणारे स्थलांतर कमी होऊ शकते.

**समारोप:** भारतातील ग्रामीण शहरी स्थलांतर प्रवृत्ती अथवा प्रवाह यासंदर्भातील वरील सर्व निष्कर्ष वास्तव असले तरी समाजशास्त्रीय दृष्ट्या ते फारसे योग्य नाहीत. अशी मते, अनेक विचारवंतांनी मांडली. असे असले तरी खेड्यापेक्षा शहरामध्ये रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने आज देखील भारताच्या विविध खेड्यातील व्यक्तींच्यामध्ये खेड्यातून जवळच्या शहराकडे स्थलांतर करण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे दिसून येते. हीच स्थलांतर प्रवृत्तीच्या संदर्भातील वास्तवता आहे असे म्हणता येईल. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये बहुसंख्य व्यक्ती खेड्यात राहतात. जिथे असंख्य सुख सुविधांचा अभाव जाणवतो. तसेच रूढीपरंपरांचा अधिक पगडा जाणवतो. याचा परिणाम म्हणजे अशा खेड्यातील व्यक्तींचे जीवन चाकोरीबद्ध बनते. प्रगतीला अडथळा निर्माण होतो. म्हणून स्थलांतर प्रक्रियेचे योग्य नियोजन करावयाचे असेल तर व्यक्तीनी खेड्यातून उद्योग, व्यापाराच्या दृष्टीने तसेच व्यावसायिक शिक्षणासाठी ग्राम नगर स्थलांतर प्रवृत्ती स्वीकारली पाहिजे. शहरामध्ये सर्वप्रकारच्या सुखसुविधा उपलब्ध असतात. व्यवसाय स्वातंत्र्य असते. जाती व्यवस्थेची बंधने शिथील झालेली असतात. त्यामुळे नियोजन करताना ग्रामीण भागातील विकास हा झपाट्याने व आधुनिक पद्धतीने करावयास हवे नाहीतर ग्रामीण भागातील स्थलांतर हे असेच झपाट्याने सुरू राहील यात शंका नाही.

**संदर्भ:**

१) Cherunilam, Francis. 1987: Migration Causes, Correlates, Consequences. Trends and Policies, Bombay. Himalaya Publishing.
२) Datta, Amal, 2003. Human Migraton: A Social Phenomenon. New Delhi. Mitta Publications.
३) Sekhar T.V.: Migration and Social Change.
४) भांडारकर पु. (१९८५) "सामाजिक संशोधन पद्धती" नागपूर, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ
५) https://www.msswjournal.in
६) https://unacademy.com
७) https://gramvikas.org
८) https://www.loksatta.com स्थलांतर आणि विकास, मे २०१२.

# नागरीकरण आणि ग्रामीण कुटुंबाचा बदलता कल एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. डॉ. साळुंके जयसिंग ज्ञानदेव** समाजशास्त्र विभाग,आझाद महाविदयालय, औसा.

**गोषवारा:** नागरीकरणाच्या सहवासामुळे ग्रामीण कुटुंब संस्थेत रचनात्मक घटक आणि कार्यात्मक घटकात अमुलाग्रह बदल झालेला दिसून येतो. काळाच्या ओघात वैचारिक मतभेदातून कुटुंब संस्थेच्या स्वरूपात आमुलाग्र बदल पहावयास मिळतो. यासाठी कुटुंबाची रचना विचारात घेणे आवश्यक ठरते. ग्रामीण कुटुंब संस्थेमध्ये संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होत आहे, विभक्त कुटुंब पद्धती चा विस्तार मोठ्या प्रमाणावर होत आहे. कुटुंब संस्थेतील रचनात्मक घटक देखील बदल होत आहे त्यामध्ये कुटुंबाचा आकार, व्यक्तिवादी यात दृष्टिकोन, कुटुंबाचे स्वरूप,विवाह व लैंगिक संबंधातील परिवर्तन, स्त्रियांचे बदलते कार्यक्षेत्र झपाट्याने बदल होत आहे. त्याचबरोबर कुटुंब संस्थेतील कार्यात्मक घटकात देखील बदल झालेला दिसून येतो. त्यामध्ये मुलांच्या पालन पोषणासाठी संस्थात्मक पर्याय, कुटुंब उपभोग व वितरण केंद्र, सामाजिक नियंत्रणाचा अभाव, शिक्षण व मनोरंजनाचे कार्यात बदल,सामाजिक सर्वेक्षण यामध्ये अमुलाग्र बदल होत आहे सदरील शोधनिबंधामध्ये याच बदलाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**प्रस्तावना:** परिवर्तन किंवा बदल हा निसर्गाचा नियम आहे समाजात देखील सतत बदल होत असतात. परंतु कोणतेही बदल हे आपोआप घडून येत नाहीत तर विशिष्ट कारणामुळे बदल घडून येतात. मानव समाजात विविध प्रकारचे बदल घडून आले आहेत. समाजामधील विविध संस्थांमध्ये सुद्धा परिवर्तन झालेले आढळून येते.कुटुंब संस्था प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे याचा अर्थ पूर्वी जशी कुटुंब संस्था होती तशीच आज आहे असे नाही काळाच्या प्रवाह नुसार काही परिवर्तन कुटुंब संस्थेत घडून आले आहेत. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. आई-वडील त्यांची मुले व नातेसंवंधी यांना मिळून जो समूह बनतो त्यास कुटुंब असे म्हणतात. तसेच जन्म व मृत्यु असे हे चक्र या कुटुंबात सुरू राहते. एका कुटुंबाचा आर्थिक संबंध दुस-या कुटुंबाशी येतो आणि सहाकार्यांची एक साखळी बनते त्यातून शेजारधर्म व कुटुंब विकास होतो. व एका समाज जीवनाची सुरुवात होते. प्रजोत्पादन, बालसंगोपन, एकमेकांच्या गरजांची सहकार्याने पुर्तता करणे हे कुटुंब संस्थेचे कार्य आहे. कुटुंबाच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी व्यवस्थापन

व नियोजन हे कुटुंब संस्थेचे महत्वाचे कार्य आहे. काळाच्या ओघात व वैचारीक मतभेदातून कुटुंबसंस्थेचे स्वरुप बदलत आहे. यासाठी कुटुंबसंस्थेची रचना विचारात घेणे आवश्यक ठरते. प्रथम आई-वडील मुलांचे संगोपन करतात. त्याच्या मुलांच्या आयुष्याला आकार देतात. दरम्यान आई-वडील वयोमानानुसार थकतात व वृद्धावस्थेमध्ये त्यांचा सांभाळ नंतर मुलांना करावा लागतो. अशा प्रकारचे कुटुंबाचे निरंतर कार्य सुरू असते. पण या सर्व प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल व्हायला सुरुवात झाली आहे त्याचा परामर्श आपण सदरील संशोधनात केला आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** नागरीकरणामुळे कुटुंबात होणाऱ्या बदलांवर आधारित पूर्व साहित्याचा अभ्यास करताना, विभक्त कुटुंब पद्धतीची वाढ, कौटुंबिक नात्यांमधील बदल (उदा. विस्तारित कुटुंबातून केंद्र कुटुंबाकडे), स्त्रियांची भूमिका व हक्क, ग्रामीण-नागरी संबंधांचा प्रभाव, आणि यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या (उदा. व्यसने, नैतिक अधःपतन) यांसारख्या प्रमुख मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करावे लागते.यासाठी समाजशास्त्र, लोकसंख्याशास्त्र आणि ग्रामीण-नागरी संबंधांवरील संशोधन पेपर्स व पुस्तके तपासणे महत्त्वाचे ठरते.एम.एस.गोरे यांनी 'Urbanization and Family Change in India': या ग्रंथात भारतातील शहरीकरणामुळे कुटुंबात झालेल्या बदलांचा अभ्यास केलेला आहे. अनेक समाजशास्त्रज्ञांनी नागरीकरण आणि कौटुंबिक संरचना यातील संबंधांवर संशोधन केले आहे, ज्यात पाश्चात्य देशांमधील विभक्त कुटुंबांकडे झालेले संक्रमण महत्त्वाचे मानले जाते.

**संशोधनाचे उद्देश:** १. ग्रामीण आणि नागरी कुटुंब पद्धतीतील नविन बदलाचा अभ्यास करणे. २. अधिकार क्षेत्राचा अभ्यास करणे. ३. कुटूंबाच्या रचनात्मक व कार्यात्मक बदलांचा अभ्यास करणे.

**गृहीतकृत्ये:** १. पती-पत्नीच्या अर्थाजनाचा मुलांच्या पालनपोषणावर परिणाम होताना दिसून येतो. २. कुटूंबाच्या रचनात्मक व कार्यात्मक घटकात आमुलाग्र बदल होत आहे. ३. नागरीकरणामुळे पारंपारिक रीतिरिवाज आणि संस्कृतीवर प्रभाव पडतो.

**अध्ययन पदधती:** प्रस्तूत संशोधनासाठी द्वितीय स्त्रोताचा वापर करण्यात येत आहे.

**तथ्याचे विश्लेषण :**

**कुटुंब प्रकारातील बदलता प्रवाह :एकत्र कुटुंब पदधती:** अगदी प्राचीन काळापासून चालत आलेली व आधुनिक काळात नामशेष होत चाललेलो पद्धत आहे. यालाच जॉईंट फैमिली असे म्हणतात.हि आदर्श कुटुंब प्रणाली होती. यात आई-वडील, मुले. सुना, नातवंडे, नोकर-चाकर असे मोठा पसारा असायचा. कलह देखील होत. तथापि शिस्त, नियमीतपणा, भावनिक ऐक्य, टिकवण्यासाठी कुटुंब प्रमुखाचा शब्द प्रमाण मानाला जात असे. अजूनही ग्रामीण भागात हे दृश्य पहायला मिळते.

**विभक्त कुटुंबपदधती:** जस जशी लोकसंख्या वाढत गेली, तसतशी रोजगाराच्या दृष्टीने स्पर्धा वाढत गेली. कृषीप्रधान आणि ग्रामोदयोगो समाज औदयोगिक जगात येऊ लागला. स्त्रियांना हक्क मिळू लागले. वडीलोपार्जित संपत्तीचे वाटप समानतेने करणे कायदेशीर मानले जाऊ लागले. कालांतराने १९ व्या शतकात एकत्र कुटुंबपद्धती मागे पडत गेली. नगरामध्ये कारखानदारी सुरू होवून लोक गाव सोडून कामानिमीत्ताने परगावी जाऊ लागले. परिणामी मुळ कुटुंबाचा नि त्याचा संपर्क कमी झाला. ग्रामीण लोक शहराकडे आली, व्यवसाय बदलले, परिणामी एका कुटुंबातील पुरुष वर्ग वेगवेगळ्या गावी स्थिरावला, त्याची घरे वेगळी झाली. आई-वडील व मुले असा छोटा पसारा असणारी पदधती अस्तित्वात दिसून येऊ लागली.स्त्री देखील नौकरी करु लागल्याने ती दृढ झाली, नियंत्रण सोपे झाले पण मानवी प्रव्रत्ती बदलल्या गेली.

**विभक्त व एकत्र नियंत्रण पदधती:** ग्रामीण भागातील लोक कारखानदारी किंवा शिक्षण चळवळीतून शहराकडे आली. त्यांनी आपला संबंध मुळ कुटुंबाशी व रक्ताच्या नात्याशी ठेवलेला दिसतो. मुलगा शहरात संसार थाटून असतो. तथापि त्याचे इतर धार्मिक य समाजाशी व्यवहार मुळ ग्रामीण वडीलधा-या माणसाच्या कुटुंबाशी निगडीत असतात व त्यांचे त्यांच्या संसारावर नियंत्रण असते. घराकडून धान्य त्या मुलांना मिळते, त्याचा भाऊ वा वडील ग्रामीण भागात शेती व्यवसाय सांभाळत असतात. मुळ कुटुंबाची शिस्त पाळली जात असते. अशी ती मिश्र कुटुंब पदधती आज मोठ्या प्रमाणावर समाजात दिसून येत आहे.

**कुटुंब संस्थेतील रचनात्मक घटकातील बदलांचा कल:**

**सामाहिक अधिकाराचे महत्व:** पारंपारीक कुटूंबात सर्व सत्ता पतीच्या किंवा पित्याच्या हाती एकवटलेली असते. संपत्तीचे सर्व अधिकार पित्याला होते.स्त्रीला संपत्तीत वाटा नव्हता. कोणत्याही कार्यात स्त्रीचे मत विचारात घेतले जात नव्हते. आज मात्र कुटुंब जरी पित्रसत्ताक असले तरी नविन कायद्याने स्त्रियांना अनेक अधिकार मिळाले असल्याने स्त्रीयांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीने आला. शिक्षण, अर्थाजन, ई. क्षेत्रात स्त्रीचा पुरुषाशी बरोबरीने वावरत आहे. त्यामुळे पतीच्या मताईतकेच पत्नीचे मत देखील विचारात घेतले जाते.

**कुटूंबाच्या आकारात बदल:** आज उदयोगप्रधान अर्थव्यवस्थेमूळे लहान कुटूंब सोईस्कर ठरत आहे. आज संयूक्त कुटुंबाची जागा विभक्त कुटुंबे घेत आहेत. भारतातही संतती नियमाचा स्विकार होवू लागल्याने कुटुंबाचा आकार दिवसेंदिवस लहान होत आहे.

**व्यक्तीवादी दृष्टीकोनाला चालना:** पारंपारीक कुटूंबात सामूहिक हितापूढे व्यक्तीगत हित महत्वाचे मानले जात नव्हते. आज व्यक्तीची प्रतीष्ठा यश कतृत्वावर अवलंबून असल्याने व्यक्ती स्वतःचा अधिक विचार करतात. भारतात हा बदल मोठ्या प्रमाणावर दिसून येत नाही. पण त्याची तिव्रता वाढत आहे.

**कुटुंबाचे अस्थिर स्वरुप:** आज कुटूंबात अस्थिरतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. व्यवसायाच्या निमित्ताने कुटुंब एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी जाताना दिसत आहेत. त्यात घटस्फोटाचे प्रमाणही वाढलेले आहे.

**विवाहीत स्त्रीयांचे बदलते कार्यक्षेत्र:** घरगुती कामातही यंत्राचा वापर होवू लागला. त्यामुळे स्त्रियांना मोकळा वेळ मिळू लागला. औद्योगिकरण, स्त्रि-शिक्षण, व्यक्ती स्वातंत्र्याच्या संकल्पना,वाढलेल्या गरजा यामुळे स्त्रीया आज अर्थजनासाठी घराबाहेर पडू लागल्या आहेत. स्त्रिया बराच काळ घराबाहेर असल्याने मुलाकडे व घराकडे त्यांना पुरेसे लक्ष देता येत नाही. पती-पत्नीचे परस्परावरचे व मुलावरचे नियंत्रण कमी होत आहे.

**विवाह व लैंगिक संबंधातील परीवर्तन:** शिक्षणामुळे विवाहाच्या वयात वाढ झाली आहे. तसेच अंतरजातीय विवाह व प्रेमविवाह यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. जोडीदार निवडीबाबत वधु-वरांची सहमती घेतली जात आहे. विवाह हा संस्कार नाही तर सामाजिक करार म्हणून पाहिला जात आहे. कुटूंबातील पती-पत्नीतील व्यवहार अधिक मनमोकळेपणाने होवू लागले आहेत.

**कुटुंब संस्थेतील कार्यात्मक बदलांचा कल :**

**मुलांच्या पालनपोषणासाठी संस्थात्मक पर्याय:** स्त्रीयांच्या अर्थाजनामुळे आपल्या अपत्याच्या पोषणासाठी पूर्ण वेळ देता येत नाही. या कार्यासाठी आज पाळणावर, बालकमंदीरे, यासारख्या संस्था स्थापन झाल्या आहेत. या गोष्टीमूळेच आई-वडील व त्यांची मुले यांची भेट बहुदा रात्रीच होते. मुलांच्या पालनपोषणाचे कार्य संस्थाकडून होत असले तरी कुटूंबाइतके ते प्रभाविपणे पार पाडले जात नाही.

**कुटूंबः उपभोग व वितरण केंद्र:** पुर्वी कुटुंबात सर्व प्रकारची आर्थिक कार्य होत असत. प्राथमीक गरजा कुटूंबात भागविल्या जात असत. पण आज कुटुंबाचे हे कार्य कुटुंबा बाहेर गेलेले दिसून येते.

**सामाजिक नियंत्रणाचा अभाव:** आज समाजाचे स्वरुप विशाल व क्लीष्ट झाल्याने नियंत्रणाच्या बाबतीत हि संस्था कमी पडत आहे. व्यक्तीचा कुटुंबाशी येणारा संबंध दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामूळे व्यक्तीवरील कुटूंबाचे नियंत्रण कमी झाले आहे. सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टीने कायदयाचा प्रभाव आज अधिक वाढत आहे.

**शिक्षण व मनोरंजनाचे कार्यात बदल:** आज व्यावसायिक शिक्षण देणा-या शिक्षण संस्था निर्माण झाल्या आहेत. पण संस्कृतीचे शिक्षण देणाऱ्या संस्था म्हणाव्यात अशा निर्माण झाल्या नाहीत.आपल्या संस्कृतीचे शिक्षण आजही मुलांना कुटूंबातुनच मिळते. उदा रुढी, परंपरा, सणसमारंभ, वृतवैकल्य ई. पूर्वी मनोरंजनाचे कार्य हे कुटुंबात पार पाडले जायचे पण आज मनोरंजन कार्यात बदल झाला आहे.आज नाटक, सिनेमा, संगीत मंडळ, क्लब ई. द्वारे पार पाडले जात आहे. दुरदर्शन वरील विविध वाहिन्याद्वारे प्रसारित होत असलेले अनेक कार्यक्रम मनोरंजनाचे कार्य करत असतात. परिणामी मनोरंजन साधनात बदल झाला.

**सामाजिक संरक्षण:** पुर्वी व्यक्तीच्या सर्व गरजा कुटुंबातच भागवल्या जात. व्यक्तीला
कुटूंबातच आर्थिक, सामाजिक, मानसिक संरक्षण मिळत होते. आज राज्याने सुरु केलेल्या जीवनविमा, प्रॉविडंट फंड, निव्रत्तीवेतन, इं. सारख्या योजना कुटूंब संस्थेचे वरील कार्य पार पाडतात. आज मोठ्या प्रमाणावर वृदधाश्रम, अनाथाश्रम, विधवाश्रम, ई. तून आज वृद्ध , विधवा आणि अनाथ यांना संरक्षण मिळत आहे.

**निष्कर्ष:** नागरी कुटुंबाच्या संरचनेत आणि कार्यात बरेच परिवर्तन झाले आहे ही गोष्ट नाकारता येत नाही.कुटुंबाच्या संरचना आणि कार्यातील परिवर्तनाचा परिणाम कुटुंब व्यवस्थेवर पडला आहे त्यामुळे कुटुंब संस्थेचे महत्त्व कमी झाले आहे. आज ग्रामीण भागाकडून शहराकडे धावणाऱ्या ग्रामीण लोकांमध्ये संयुक्त व विभक्त कुटुंबाचे एक मिश्रण आढळते ते आजच्या काळात दिसून येत आहे. कुटुंबाच्या काही दुय्यम कार्याचे इतर संस्थांकडे हस्तांतरण झाले आहे परंतु कुटुंबाची प्राथमिक कार्य इतर संस्थाकडे हस्तांतरित करणे शक्य नाही. कुटुंब संस्थेत परिवर्तन झाले तरी कुटुंब संस्था नष्ट होणार नाही. कुटुंबाचे कामवासनापूर्ती,प्रजोत्पादन, पालन पोषण ,सामाजीकरण इत्यादी कार्य महत्त्वाचे आहेत म्हणून कुटुंब संस्थेत बदलत्या परिस्थितीनुसार परिवर्तन झाले तरी कुटुंब संस्था ही अबाधित राहणार आहे. मुले, वृदध, व विधवा यांच्या पालन-पोषणासाठी इतर सामाजिक संस्थात्मक पर्यायाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. महिलांच्या शिक्षण व नोकरीच्या संधीमूळे तिच्या कार्यक्षेत्रात बदल होत आहे.

**शिफारसी:** ग्रामीण भागात उद्योग आणि कौशल्य विकास कार्यक्रम वाढवणे. ग्रामीण शिक्षण सुधारून जागतिक संपर्क साधण्यासाठी सुविधा वाढवणे. पारंपारिक संस्कृती आणि रीतिरिवाजांचे संवर्धन करणे. जमिनीचे विभाजन रोखणे, बेरोजगारी कमी करणे, आणि मानसिक ताण कमी करण्यासाठी कार्यक्रम तयार करणे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. दुबे, एस. सी. (२०१२). नागरीकरण आणि कुटुंब. मुंबई: हिमालय पब्लिशिंग हाऊस.
२. ओमन, टी. के. (२०१०). कुटुंब आणि समाज. दिल्ली: सेज पब्लिकेशन्स.
३. रामनाथ शर्मा, आर. एस. (२०१८). समाजशास्त्रीय अध्ययन. दिल्ली: अटलांटिक पब्लिशर्स.
४. श्रीनिवास, एम. एन. (२०१६). कुटुंब समाजशास्त्र. मुंबई: हिमालय पब्लिशिंग हाऊस.
५. अटल, य. (२०१५). आंदोलन आणि परिवर्तन. दिल्ली: राष्ट्रीय पुस्तक न्यास.


# ग्रामीण व नागरी भागातील बालकामगारांच्या समस्या व उपाय

**धर्मा हिम्मत कोळी,** संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र,एम. जे. महाविद्यालय, जळगाव

**गोषवारा:** ग्रामीण बालकामकार वाढण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, वंचित समुहाच्या वाढत्या स्थलांतरामुळे ग्रामीण भागात शेती कामाला मजूर मिळणे कमी झाले आहे. त्यामुळे ती गरज पूर्ण करण्यासाठी मजूरी करणाऱ्यांचे वय कमी झाले आहे. त्यातच चौदा वर्षाखालील बालकांना सुद्धा काम करण्यास ग्रामीण भागात मोठी मागणी आहे असे आपणांस सांगता येते. बालकामगार ही एक जागतिक समस्या आहे जी प्रामुख्याने ज्या देशांमध्ये सामाजिक आणि आर्थिक स्थिती आणि आर्थिक संसाधने कमी आढळतात, त्या देशात बालकामगार मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती, कौटुंबिक गरीबी, कुटुंबाची वाढती सदस्य संख्या त्याच बरोबर पालकांचे कमी उत्पन्न, अज्ञानता (अशिक्षितता), आजारपण, सामाजिक सुरक्षा, संरक्षणाचा अभाव आणि

शिक्षणाच्या मूल्याबद्दल अज्ञानता. यामुळे बालकामगारांमध्ये असंख्य वाढ झालेली आहे असे आपणांस सांगता येते. जागतिकीकरणामुळे भारतीय समाजात मोठ्या प्रमाणावर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात झपाट्याने बदल होताना दिसून येत आहेत. मानवी समाज हा भौतिक सुखाच्या मागे जात असताना मानव-मानवापासून मोठ्या प्रमाणावर अलिप्त होताना आपणांस दिसून येत आहे आणि याच भौतिक बदलामुळे मानवापुढे मोठ्या प्रमाणावर समस्या निर्माण झाल्या आहेत. उदा. दारिद्र्य, कुपोषण, स्त्रियांचे अधिकार, दहशतवाद, पर्यावरणीय समस्या, आरोग्याचे प्रश्न याच बरोबर बालकामगार ही सुद्धा अतिशय मोठ्या प्रमाणावर निर्माण झोलेली समस्या आहे असे आपणास सांगता येते. 'बालकामगार' ही अतिशय गंभीर समस्या आजच्या युगात मोठ्या प्रमाणावर समाजामध्ये अतित्वात आहे. यामुळेच बालकांचे मानवी हक्क डावलले जात आहेत. दारिद्र्याच्या मुख्य कारणांमुळे मुलांना नैसर्गिक जीवन जगण्याच्या हक्कांपासून वंचित ठेवले आहे असे आपणास सांगता येते. भारतीय समाजात असलेल्या दारिद्र्याच्या समस्येचा मोठा प्रभाव हा बालकांच्या शैक्षणिक, मानसिक, भावनिकतेचा ऱ्हास होताना आपणांस दिसून येतो. प्रस्तुत शोधनिबंधात बाल कामगार ही एक मोटी समस्या असून बालकांच्या हक्काची पायमल्ली होताना दिसून येत आहे.

**बीज शब्द:** बालकामगार, शोषण, शिक्षण, बेरोजगारी, जबाबदारी, भारतीय संविधान

---

**प्रस्तावना:** १२ जून हा दिवस बालकामगार विरोधी दिन म्हणून शासनामार्फत जाहीर केलेला असूनसुद्धा भारतीय ग्रामीण समाजात आजसुद्धा मोठ्या प्रमाणावर बालकामगार आपणांस दिसून येतात. भारतीय समाज व्यवस्थेत अनेक प्रकारच्या समस्या असून बालकामगार ही सुद्धा गंभीर समस्या आपणांस ग्रामीण समुदायात मोठ्या प्रमाणात दिसून येते. आपण ज्या निरागस बालकांना राष्ट्रीय संपत्ती म्हणून संबोधतो, त्यांनाच त्यांच्या कौटुंबिक, आर्थिक अडचणींना सामोरे जाऊन आपल्या कुटुंबाचा आर्थिक भार कमी करण्यासाठी स्वत:ला मिळेल ते काम, मिळेल त्या मोबदल्यावर करून कौटुंबिक, आर्थिक मदत म्हणून बालकामगार हे काम करताना दिसून येतात. आज या विषयावर चर्चा करताना आपल्या नैतिक जबाबदाऱ्या समजून घेण्याची वेळ आली आहे. बालकामगार समस्या पूर्णपणे समाजातून नष्ट करणे आजच्या स्थितीत अवघड झाले आहे कारण मुलांचे पालकच त्यांना कामाला लावू लागले आहेत. त्याचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव हा ग्रामीण भागात पहावयास मिळतो. शेतमजूरी, पशूपालन, शिकार, मासेमारी, डिंक गोळा करणे, शेळ्या-मेंढ्या सांभाळणे त्याचबरोबर घरगुती कामात सुद्धा ग्रामीण भागात बालक (मुलं व मुली) आजही मोठ्या प्रमाणावर बालकामगार म्हणून आपणांस दिसून येतात कारण शैक्षणिक स्तरावर बालकांच्या हक्कांची काटेकोरपणे अंमलबजावणी न होता त्यांना मिळणाऱ्या विविध शासकीय शैक्षणिक योजनांचा लाभापासून ते वंचित राहतात. बालकामगार समस्येचे मूळ कारण दारिद्र्यात असल्याचे आपणांस दिसून येते. सामाजिक दृष्ट्या वंचित व गरीब कुटुंबातील मुलांचे बालमजूरीकडे संक्रमण हे माठ्या प्रमाणावर होताना आपणांस दिसून येते. भारतीय समाज हा मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात वास्तव्यास असून आजही शेती प्रधान समाजात आपणास बालकामगार हे मोठ्या संख्येने आढळून येतात. उदा. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शेतीप्रधान समाज हा मोठ्या प्रमाणावर स्थिरावलेला असल्याने ग्रामीण भागात हा फायदा घेण्याचा मोठ्या प्रमाणावर जमीनदार वर्गाचा हेतू असतो. सामान्य उत्पादकतेवर मालकांचे समाधान होत नाही त्यामुळे आपणांस मोठ्या प्रमाणावर बालकामगार हे आजच्या समाजात मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असल्याचे आपणांस सांगता येते. औद्योगिक क्षेत्रात देखील मोठ्या प्रमाणात बालकामगारांचा वापर केला जातो.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनेचा मसुदा लिहीत असताना त्यांना 'बालकामगार' या समस्येविषयी जाणीव होती म्हणून त्यांनी भारतीय संविधानामध्ये बालकांच्या समस्येला आळा बसावा व बालकामगारांना संरक्षण द्यावे यासाठी घटनेमध्ये तरतूदी नमूद केल्या आहेत. भारतीय राज्यघटनेच्या भाग ३ मध्ये बालकामगारांच्या मुलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे. भारतीय संविधानाच्या कलम क्र. २४ मध्ये १४ वर्षाच्या आतील मुंलांना कामावर ठेवण्यास बंदी करण्यात आली आहे. तसेच संविधानाच्या कलम क्र. २३ मध्ये बालकांची पिळवणूक होऊ नये यासाठी तरतूद करण्यात आली आहे. बालकामगार म्हणजे अशी मुले जी त्यांच्या वयापेक्षा मोठी, धोकादायक किंवा त्यांच्या शिक्षणात अडथळा आणणारी कामे करतात, ज्यामुळे त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि विकास खुंटतो. अशा प्रकारात व्यस्त असणाऱ्या बालकांना बालकामगार असे म्हणतात. १४ वर्षापेक्षा कमी वयाची मुले जी आपला उदरनिर्वाह किंवा कुटुंबासाठी मोलमजूरी करतात. त्यांना बालकामगार असे म्हणतात.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:** 1.समाजातील बालकामगारांच्या समस्यांचा आढावा घेणे. 2. बालकामगारांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे. 3. बालकामगार समस्येचे निर्मूलन करण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

**गृहीतके:** 1 बालकामगारांच्या मोठ्या प्रमाणात सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक समस्या आढळून येतात. 2. बालकामगारांच्या समस्येचे निर्मूलन शासकीय स्तरावर होत आहेत. 3. बालकामगारांच्या संदर्भात घटनेतील कलमांचा व कागदपत्रांचा म्हणावा तसा परिणाम दिसून येत नाही.

**भारतातील बालमजुरीची तथ्ये व आकडेवारी:** भारतातील ०६ ते १४ वर्षाआतील बालकामगारांची संख्या ही १५२ दशलक्ष असून ८८ दशलक्ष मुलं व ६४ दशलक्ष मुली असा बालकामगारांचा समावेश आहे. दरवर्षी १२ जून हा दिवस बालकामगार विरोधी दिन म्हणून साजरा करतात. भारतातील एकूण बालसंख्या (५-१४ वर्षे): २५९.६ दशलक्ष (जनगणना २०११). १) भारतातील काम करणारी मुले: १.०१ कोटी (एकूण बाल लोकसंख्येच्या ३.९%) "मुख्य कामगार" किंवा "सीमांत कामगार" म्हणून. २) भारतातील शाळाबाह्य मुले: ४२.७ दशलक्षाहून अधिक. ३) २००१ ते २०११ दरम्यान भारतात बालमजुरी २.६ दशलक्षांनी कमी झाली. ४) ग्रामीण भागात ही घट अधिक दिसून येते, तर शहरी भागात बालकामगारांची संख्या वाढली आहे, ज्यामुळे किरकोळ कामांमध्ये बालकामगारांची वाढती मागणी दिसून येते. बालकामगार प्रामुख्याने ग्रामीण भागात (७०%) आणि अनौपचारिक शहरी क्षेत्रात (२६%) आढळतात. लोकप्रिय

समजुतीच्या विरुद्ध, बहुतेक बालमजूर उत्पादन किंवा औपचारिक अर्थव्यवस्थेऐवजी त्यांच्या पालकांकडून कामावर घेतले जातात. जी मुले पगारासाठी किंवा कोणत्याही प्रकारची भरपाईसाठी काम करतात ती सहसा शहरी केंद्रांऐवजी ग्रामीण भागात आढळतात.

**संशोधन पद्धती:** संघर्ष सिद्धांत—समाजशास्त्रीय दृष्टीकोन आहे, जो मानतो की समाज हा सलोख्याऐवजी मर्यादित संसाधने (संपत्ती, सत्ता, प्रतिष्ठा) मिळवण्यासाठी चालणाऱ्या संघर्षामुळे आणि असमानतेत आकारास येतो. समाजातील वर्गभेद, शोषण आणि सत्तेच्या संघर्षातून सामाजिक रचना आणि परिवर्तना याचा अभ्यास करतो. बालकामगारांचे हक्क हिरावून घेतले जातात म्हणून हक्कांसाठी त्यांना संघर्ष करावा लागत असल्याने आपणांस यामध्ये संघर्ष सिद्धांताचा उल्लेख करावा लागतो.

**संशोधन आराखडा:** वर्णनात्मक संशोधनाचा उद्देश लोकसंख्या, परिस्थिती किंवा घटनेचे अचूक आणि पद्धतशीर वर्णन करणे आहे. ते काय, कुठे, केव्हा आणि कसे या प्रश्नांची उत्तरे देऊ शकते, परंतु का या प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाही. वर्णनात्मक संशोधन डिझाइनमध्ये एक किंवा अधिक चलांचा शोध घेण्यासाठी विविध संशोधन पद्धतींचा वापर केला जाऊ शकतो. प्रायोगिक संशोधनाप्रमाणे, संशोधक कोणत्याही चलांवर नियंत्रण किंवा फेरफार करत नाही, तर फक्त त्यांचे निरीक्षण करतो आणि त्यांचे मोजमाप करतो.

**तथ्य संकलन:** संदर्भ ग्रंथ, पुस्तके, शोधनिबंध, वर्तमानपत्रे, संकेतस्थळ इ. दुय्यम स्रोतांचा वापर सदर संशोधनासाठी केला आहे.

**बालकामगार समस्येचे विविध दुष्परिणाम:** वर्तमान काळात बालकामगारांची वाढती संख्या संपूर्ण जगामध्ये मोठी समस्या बनली आहे. बालकामगार राष्ट्रीय विकासाला घातक व संपूर्ण मानवजातीला व समाजाला एका प्रकारे शापच आहे. त्यासाठी समाजाच्या सर्व स्तरातून तसेच उच्च पदस्थ अधिकाऱ्यांपासून सर्वसामान्य माणसापर्यंत बाल कामगारांचे दुष्परिणाम व बालकांच्या शिक्षणाचे महत्व या बाबतीत जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या बालमजूरीचे दुष्परीणाम समाजाबरोबर राष्ट्रालाही भोगावे लागत आहेत.

**कौटुंबिक परिणाम**: बालकामगार या समस्येचा सर्वाधिक परिणाम हा ग्रामीण भागातील बालकामगरांच्या कुटुंबावर होतो. घरातील प्रमुख व्यक्ती ज्यावेळेस अर्थार्जन करण्यास असमर्थ होतो त्यावेळी पर्यायी हेच बालकामगार या प्रकारे आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहास मदत म्हणून काम करतात.

**शैक्षणिक परिणाम**: भारतीय राज्यघटनेनुसार १४ वर्षाखालील मुला-मुर्लीना मोफत व सक्तीचे शिक्षण द्यावे अशी तरतूद आहे. परंतू मुले त्यांच्या या अधिकारापासून वंचित आहेत कारण शिक्षण घेणे हा त्यांचा हक्क असून त्यांना काही कारणांमुळे काम करावे लागते. कामामुळे त्यांचा बौद्धिक विकास होत नाही. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे व मानवाच्या सर्वांगीण् विकासाचे एक महत्त्वाचे साधन आहे. बालवयात शिक्षण न घेतल्यामुळे ही बालके उज्वल भविष्यासाठी आवश्यक अशा विकासाच्या संधींपासून वंचित राहतात.

**वैयक्तिक परिणाम**: बालवयात कौटुंबिक जबाबदारीची जाणीव असल्याने बालकांचा वैयक्तिक विकास हा आजही समाजात होत नाही कारण त्यांच्या समोर कौटुंबिक जबाबदारी तसेच आर्थिक उणीव मोठ्या प्रमाणावर दिसून येते. त्यांना विचार, आचार, संचार याचे अजिबातच ज्ञान नसते. जीवन म्हणजे काय? ते कसे जगावे? याचाही विचार करण्याची त्यांची मानसकिता नसते. आपण फक्त काम करणे व आर्थिक गरज पूर्ण करणे व त्यातून कौटुंबिक, आर्थिक मदत मिळवणे हाच त्यांचा उद्देश असतो. याप्रमाणे बालक त्याचे बालपण व वैयक्तिक स्वातंत्र्य हरवून बसतो.

**आरोग्य विषयक परिणाम**: 'बालकामगार' वयाच्या ५ ते १४ या कोवळ्या वयोगटातील असतो. त्यांना अधिक तास काम करावे लागते. तसेच त्यांना सकस आहाराची कमी असल्याने ते शारीरिक दृष्ट्या सुदृढ नसतात. त्यांच्या नाजूक वयात त्यांचे शिक्षणाबरोबर खेळण्याचे वय असते. मात्र या वयात यांना निरंतर कामास सामोरे जावे लागते त्यामुळे त्यांची शारीरिक वाढ होत नाही. विविध आरोग्यविषयक आजारांचा सामना त्यांना करावा लागतो. त्यांचे शारीरिक, मानसिक, भावनिक शोषण होऊन शिक्षणापासून वंचित रहावे लागते.

**सामाजिक परिणाम**: 'बालकामगार' ही समस्या अनेक वर्षापासून चालत आलेली आहे. ते एकाच प्रयत्नात नष्ट होणे शक्य नाही. बालकामगार समस्येमुळे समाजाची मोठ्या प्रमाणावर हानी होताना आपणास दिसून येत आहे. राष्ट्रीय बळे बालमजूरीमध्ये व्यस्त असल्याने समाजाचा शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास होऊ शकत नाही. सामाजिक भावना व सामाजिक बांधिलकी या बालकामगार समस्येमुळे संपुष्टात येत आहे.

**उपाययोजना:** पुनर्वसन आणि शिक्षण, बालकल्याण समिती मार्फत सरकारद्वारा छापे टाकून मुलांची सुटका करणे. मुलं ही राष्ट्रीय संपत्ती असते आणि या संपत्तीकडे दुर्लक्ष करून कोणत्याही राष्ट्राला स्वत:चा भविष्यातील विकास होणे शक्य नाही परंतु प्राचीन काळापासून मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे आवश्यक तेवढे लक्ष दिले गेले नाही. बालकामगारांच्या विकासावर परिणाम करणारे अनेक घटक आहेत. समाजाच्या दृष्टीने बालक हा भविष्यातील राष्ट्रीय संपत्ती आहे. तरीसुद्धा समाजाने या बालकांवर कामाचे ओझे लादले व त्यामुळे बालकांवर शारीरिक व मानसिक दुष्परिणाम झाले. बाल कामगार ही फक्त केवळ भारताशीच संबंधित नसून ती एक जागतिक समस्या निर्माण झालेली आहे.

**शासकीय मदत:** बालकामगार समस्या नियंत्रित करण्यासाठी childlaborcellmaharashtra@yahoo.com या संकेतस्थळावर संपर्क करणे.

**मोफत शिक्षण:** बालकामगारांना कामापासून दूर करायचे असेल, तर त्यांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणले पाहिजे. यासाठी त्यांना प्राथमिक शिक्षण मोफत द्यावे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ मध्ये १४ वर्षांखालील मुलां-मुलींसाठी मोफत आणि आवश्यक शिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. त्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी व्हायला हवी. तसेच मुलांना शिक्षणाबरोबरच व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण द्यायला हवे. कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकार, सेवायोजक आणि सामाजिक

संस्था यांनी सर्व स्तरावर मोफत शिक्षण आणि अन्य आवश्यक त्या गरजांची पूर्तता करायला हवी. १ एप्रिल, २०१० पासून सक्तीचे व मोफत शिक्षणाचा कायदा करण्यात आला आहे. त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षण हे ऐच्छिक किंवा लोकांच्या मर्जीनुसार ठेवायला नको. प्रत्येकासाठी शिक्षण हे सक्तीचे करायला हवे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. म्हणजेच आजच्या "सर्व शिक्षण अभियान", "सक्तीचे व मोफत शिक्षण", "अल्पसंख्यांकाचे शिक्षण" या सर्व उपक्रमांच्या विचारांचा पाया डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक विचारात दिसून येतो.

**दारिद्य निर्मूलन / कुटुंबाचे उत्पन्न वाढवणे:** ग्रामीण कुटुंबाचे उत्पन्न वाढविणे, बालकामगार प्रतिबंधक कायद्यांची अंमलबजावणी करणे आणि ग्रामीण भागात स्वयंसहाय्यता गटाद्वारे जनजागृती करणे. भारतासारख्या विकसनशिल देशामध्ये बालकामगारांची समस्या मग, ती ग्रामीण भागात असो, किंवा शहरी भागात असो, तिचे प्रमुख कारण म्हणजे दारिद्र्य होय. दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी सरकारच्या विविध योजना आहेत. परंतु भ्रष्टाचार, व्यावसायिक कौशल्यांचा अभाव, उदासीनता, उद्योजकतेचा अभाव यामुळे अनेक कार्यक्रम प्रत्यक्षामध्ये न येता कागदावरच राहतात. या योजना गरीब लोकांपर्यंत पोहचत नसल्यामुळे मंजूर झालेल्या पैशाचा मोठ्या प्रमाणामध्ये दुरुपयोग होतो. बालकामगार समस्या नष्ट करण्यासाठी दारिद्र्य निर्मूलन करणे आवश्यके आहे व यासाठी विविध योजना गरिबांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांची योग्य अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

**प्राथमिक आणि प्रौढ शिक्षण:** अधिकतर बालकामगारांचे आई-वडील हे अशिक्षित असतात, त्यांचा शिक्षणाविषयी नकारात्मक दृष्टीकोण असतो, म्हणून ते मुलांना शाळेमध्ये न पाठवता कामाला पाठवतात. अशा प्रकारच्या अशिक्षित आई-वडिलांना सर्वप्रथम साक्षर करण्याची गरज आहे. याचा परिणाम असा होईल की, प्रत्येक कुटुंबप्रमुख आपल्या मुलांच्या भविष्याबाबत सकारात्मक दृष्टीने विचार करू लागतील व मुलांना शाळेमध्ये पाठवतील, त्यामुळे प्राथमिक शाळांमधील मुलांच्या गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. मुलांमध्ये शाळेविषयी आवड निर्माण झाली की, ते कामाला न जाता शाळेमध्ये जातील.

**सामाजिक जागरुकता:** लहानवयामध्ये काम केल्याने मुलांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतात. बालवयात रोजगारात राहून संपूर्ण आयुष्याचे नुकसान न करता या वयात त्यांना शिक्षण देऊन बौद्धिक आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम झाल्यानंतर भविष्यामध्ये तो (अधिक उत्पन्न मिळवेल असे मुलांच्या पालकांना पटवून दिले पाहिजे. बालकामगार हे विविध प्रकारच्या क्षेत्रांमध्ये काम करताना दिसतात, या कामादरम्यान त्यांचे आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषण केल्या जाते. या शोषणाविषयी समाजामध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. तसेच बालकामगारांच्या भविष्याचा विचार करून सरकार आणि सेवायोजक यांनी देखिल शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन आपले सामाजिक दायित्व पूर्ण करायला हवे. अशा प्रकारच्या प्रयत्नामुळे बालकामगारांची समस्या नष्ट करण्यासाठी पालकामध्ये आणि समाजामध्ये सामाजिक जागरूकता निर्माण करायला हवी.

**प्रसारमाध्यमांचा उपयोग:** बालमजुरीची समस्या ही खुप पूर्वीपासून चालत आलेली प्रथा आहे. ती नष्ट करण्यासाठी निरंतर प्रयत्नाची गरज आहे. समाजामध्ये हे पटवून दिले पाहिजे की, ही वाईट प्रथा असून, यामुळे मुलांचे खूप मोठे नुकसान होते. बालकामगारांच्या समस्यांकडे लोकांचे लक्ष केंद्रित करण्यासाठी सर्व प्रचार आणि प्रसारमाध्यमांचा प्रभावीपणे उपयोग केला पाहिजे. यासाठी नाटके, भजने, पथनाट्ये, भाषणे, पोवाडे, कीर्तने, चित्रकला, लोकगीते, चित्रपट आणि वर्तमानपत्रे इत्यादी माध्यमांचा सातत्याने उपयोग करून समाजामध्ये या समस्येविषयी जागरूकता निर्माण केली पाहिजे. वर्तमान काळामध्ये जगातील देश जागतिकीकरणाने प्रभावित झाले असून सुद्धा अनेक समस्यांचा विचार आजही केला जात नाही. बालकामगारांच्या समस्येची तीव्रता कमी करण्यासाठी गरीब कुटुंबातील मुलां-मुलींना नियमितपणे शाळेत पाठवावे. यासाठी प्रभावीपणे योजना राबविण्याची गरज आहे. बालकामगारांवर पूर्णपणे बंदी घालणे तत्वतः योग्य वाटत असले, तरी ते व्यवहारिक दृष्टीकोणातून साध्य करण्यासाठी प्रयत्नाची आवश्यकता आहे. घरची आर्थिक परिस्थिती खालावलेली असल्यामुळे मुलांना कामावर पाठविणाऱ्या पालकांना असे पटवून दिले पाहिजे की, मुलांना कामापेक्षा शिक्षणाची अधिक गरज आहे.

**रोजगाराच्या संधीत वाढ:** दारिद्र्य, बेरोजगारी या समस्यांप्रमाणेच भारतामध्ये बालकामगार ही एक समस्या आहे. या समस्येचे समूळ उच्चाटण करण्यासाठी बालकामगारांच्या आई-वडिलांना रोजगार उपलब्ध करून द्यावा व लहान मुलांना शिक्षणाबरोबरच रोजगार प्राप्तीच्या संधी उपलब्ध करून देणारे शिक्षण दिले पाहिजे. गरीब मुलांसाठी "कमवा आणि शिका" यासारख्या योजना राबवायला हव्यात, या सर्वांचा परिणाम असा होईल की, लहान मुलांना स्वतःच्या विकासाबरोबरच देशाच्या आणि सामाजिक विकासात योगदान देता येईल.

**कुटुंबाचा आकार कमी ठेवणे:** भारतामध्ये वेगवेगळ्या अभ्यासाच्या निरीक्षणावरुन असे दिसून येते की, गरीब आणि अशिक्षित कुटुंबाचा आकार मोठा असतो. अशा कुटुंबातील कुटुंबप्रमुखाची अशी धारणा असते की, "जास्त मुले म्हणजे जास्त उत्पन्न् होय." कारण अशी मुले थोडी मोठी होताच आधार बनतात. अशावेळी कुटुंबप्रमुखाला योग्य मार्गदर्शन करून लहानवयात काम केल्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामाविषयी माहिती द्यावी व कुटुंबाचा आकार नियंत्रणात ठेवण्याचे कायदे सांगावे समाजामध्ये या समस्येविषयी जनजागृती करणे शासकीय स्तरावर अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे.

**निष्कर्ष:** मुलांच्या कल्याणासाठी, समाजाच्या प्रगतीसाठी आणि राष्ट्राच्या शाश्वत विकासासाठी बालमजुरीचे निराकरण करणे आणि त्याचे उच्चाटन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुलांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न, व्यापक धोरणे आणि विविध भागधारकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. भारतात विद्यमान बालसंरक्षण कायद्याची कडक अंमलबजावणी केली. तर राष्ट्रीय स्तरावर बालकामगार समस्या कमी होण्यास मदत होईल. मुलांचा विकास आणि शिक्षण हे किती महत्वाचे आहे हे प्रत्येकाने ओळखले पाहीजे कारण तेच बालक देशाचे भविष्य घडवतील. १९८६ च्या बालकामगार प्रतिबंध आणि नियमन कायद्याने १४ वर्षाखालील मुलांना काही धोकादायक नोकऱ्या आणि प्रक्रियांमध्ये वापरणे बेकायदेशीर ठरवले आहे. २०१६

मध्ये सरकारने बालकामगार प्रतिबंध कायदा आणि नियमन सुधारणा कायदा संमत केला. जो १४ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना कोणत्याही नोकऱ्या किंवा प्रक्रियेत ठेवण्यास मनाई करतो जेणेकरून जो बालकामगार या संकटात समाविष्ठ आहे तो भविष्यात देशाचा एक जबाबदार नागरिक बनू शकतो. प्रत्यक्षात मात्र बहुसंख्य मुंलाना कमीत कमी चांगले अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आरोग्य अथवा त्याच्या वाढीस अत्यावश्यक असलेली संधी मुळात उपलब्ध होऊ शकत नाही. वाढत्या औद्योगिकरणाबरोबरच निर्माण होत असलेल्या अनेक प्रश्नामध्ये बालकामगाराचा प्रश्न प्राधान्याने निगडीत होऊ शकतो. विशेष म्हणजे समाजातील एक जागरूक नागरिक म्हणून आपण सर्वांनीच बालकामगार प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी सामुहिक प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. प्रत्येक कळीचे फुलामध्ये रूपांतर होणे हा निसर्गाचा नियम आहे. समाजातील एक जबाबदारी नागरिक म्हणून या निसर्ग नियमांचे पालन करण्यास हातभार लावणे हे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे. बालकामगार प्रथा नष्ट करून बालकांना फुलांप्रमाणे उमलू देण्यास समाजाने हातभार लावणे हे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे. ही समस्या केवळ मुलांचे बालपणच लुटत नाही तर त्यांचा सर्वांगीण विकासात अडथळा आणते आणि गरीबीचे चक्र कायम ठेवते. केवळ हातमिळवणी करून आणि प्रभावी उपाययोजना अंमलात आणूनच आपण असे जग निर्माण करू शकतो. जिथे प्रत्येक बालक शोषणापासून मुक्त असेल आणि त्यांचे मुलभूत हक्क उपभोगत असेल.

**संदर्भ सूची :**

१) सिंह शिवचरण पिंपिल (२०१२), "आधुनिक भारत मे बालश्रमिक" तरूनम पब्लिकेशन, नोएडा, पृ.क्र. ०७
२) मुजूमदार प्रमोद (२००२). "अस्तित्वांचे प्रश्न" अक्षर प्रकाशन, मुंबई, पृ.क्र.७२
३) पटेकर रवी (२०१२). "भंडारा जिल्ह्यातील बालकामगारांचा आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास' पीएच.डी. शोध प्रबंध, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, पृ.क्र. १७-१८
४) Varandani G. (1994). Child Labour and Women Worker, Ashish Publication House, New Delhi, pg. 55.
५) पाण्डेय मंजू (१९९८). "भारत में बालश्रमिक" मानक पब्लिकेशन्स प्रा.लि., नई दिल्ली.
६) शेख आर. के. (२०१४) "बालकामगार समस्या, समाधान", प्रशांत पब्लीकेशन.
७) मोरे सोनल एम. (१ डिसें २०२४). भारतातील बालकामगार समस्या व उपाययोजना, उत्कर्ष प्रकाशन.
८) www.wikipedia.com
९) informarathi07 "Child Labour Information in Marathi" dtd. 04/08/2025.
१०) आव्हान ग्रामीण मजूरीचे (संपा.) लेख., लोकसत्ता दि. ०८/०६/२०१३

# नागरीकरणाचा ग्रामीण शिक्षणावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

**नम्रता पंडितराव म्हस्के** संशोधक विद्यार्थीनी,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** नागरीकरण ही एक प्रक्रिया आहे. शहरात लोकसंख्येत वाढ होत असुन नागरीकरण वाढत आहे. ग्रामीण भागातून शहरीभागामध्ये स्थलांतर वाढत आहे. यामुळे ग्रामीण भागातील लोकसंख्येवर परिणाम दिसून येतो. तसेच ग्रामीण भागातून रोजगार निमित्त शहरात स्थलांतर होत असतांना सद्यास्थितीमध्ये शिक्षणासाठी सुद्धा नागरीकरणात वाढ होत असल्याचे दिसते. नागरीकरणामुळे ग्रामीण शिक्षणावर अनेक परिणाम होत आहे. तसेच आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक बदल होत आहे. नागरीकरणामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या विचारसरणीत बदल झाला आहे, आणि शिक्षणाविषयी सुद्धा तत्परता आणि जागृती निर्माण झाली आहे. पण यामुळे ग्रामीण भागाची जी ओळख आहे ती कोठे तरी हरपत आहे. परंपरा सांस्कृतिक मुल्ये, भाषा जपणुकीला ग्रामीण भागातील लोक कमी पडत आहे. कारण रोजगारासाठी, शिक्षणासाठी शहरात अधिक स्थलांतर होत आहे. पूर्णपणे शहरी संस्कृतीचा अवलंब होत आहे.

**प्रस्तावना:** शहर किंवा नगर ही संकल्पना भारतासाठी नवीन नाही, कारण अगदी प्राचीन कालखंडापासुन भारतात नागरी संस्कृतीची सुरुवात झाली असून यावरुनच हे समजते की, भारतीय समाजाला नागरी संस्कृतीचे आकर्षण सुरुवातीपासूनच असलेले दिसून येते. तसेच शहरातील विविध सुख सोयीकडे ग्रामीण जनतेने आकर्षित होणे हे साहजिकच आहे. नागरीकरणाला जगात खऱ्या अर्थाने गती मिळाली ती औद्योगिक क्रांतीनंतरच. नागरीकरणाचे वाढते स्वरुप लक्षात येते. इ. स. १९५० मध्ये एकुण जगाच्या लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या शहरात राहणारी होती. वर्तमान स्थितीत जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या ही शहरवासी बनले आहे. ऑस्ट्रेलिया आणि न्युझीलंड हे जगात सर्वात जास्त नागरीकरण झालेली राष्ट्रे आहेत. तसेच इ. स. २०११ जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटी पेक्षाही अधिक आहे. एकुण लोकसंख्येपैकी ३१.१६ टक्के लोकसंख्या आहे.

**नागरी लोकसंख्येची स्थिती:** अशा प्रकारे लोकसंख्येच्यानुसार नागरीकरणाचे प्रमाण दिसून येते. नागरीकरणामुळे ग्रामीण भागावर परिणाम झालेला दिसून येतो, तो म्हणजे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विविध स्वरुपामध्ये बदल घडुन आलेला आहे. ग्रामीण शिक्षणाचा विचार केला असता ग्रामीण जीवनाशी आणि त्यांच्या परिसराशी अनुरुप असे शिक्षण म्हणजे ग्रामीण शिक्षण असते. ग्रामीण व नागरी जीवनामध्ये फार मोठे अंतर आहे. शहरांपेक्षा ग्रामीण भागामध्ये अनेक गैरसोयी आहेत, अशा गैरसोयी व जगापासुन अलगपणा यामुळे ग्रामीण शिक्षणावर फार मोठा परिणाम होत आहे. या परिणामामुळे आज ग्रामीण भागातील शिक्षण घेण्याच्या पद्धती बदल होत आहे. नागरीभागासारखे ग्रामीण भागात पाहिजे तेवढी सुधारणा आजही झालेली नाही, पण लोकांचे विचार बदलत चाललेले दिसून येते. शिक्षणविषयी जागृती निर्माण होत आहे. याबरोबर संस्कृती बदल घडत असल्याचे दिसून येते.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** जोंधळे मिलिंद शिवाजी (२०२२) वाढत्या शहरीकरणाचे ग्रामीण भागावर होणाऱ्या आर्थिक परिणामाचा चिकित्सक अभ्यास या विषयावर शोध प्रबंध असुन शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील समाजास शैक्षणिक जागरुकता निर्माण झाली. तसेच साक्षरतेच्या प्रमाणात झपाट्याने वाढ झाली. शहरात विविध शिक्षणाच्या आधुनिक पद्धती व सुविधा सहजपणे उपलब्ध होत असून थोडक्यात शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील व शहरातील माणसाच्या अंतर्गत व बाह्य व्यक्तीत्त्वाचा विकास होण्यास मदत झाली आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजु लागले. तसेच आधुनिक विचारसरणी व दृष्टिकोनामुळे भाषा, आचार, विचार, पद्धती, संस्कृती यामध्ये आमुलाग्र बदल झाले आहे.

**ऐथल जान्हवी ए. आर. शरथ (२०१३):** ग्रामीण ते शहरी सिंधानुरचा शहरीकरणाचा प्रवास या शोध निबंधामध्ये जागतिक घटनेबाबत येणाऱ्या बहुआयामी गतिमानतेवर प्रकाश टाकला आहे. तसेच सामाजिक, आर्थिक विश्लेषण ऐतिहासिक दृष्टिकोन वापर केला. सिंधानुरच्या ग्रामीण वस्तीपासून वाढत्या शहरी केंद्रात झालेल्या परिवर्तनाचा सुक्ष्म दृष्टिकोन प्रदान करतो. वाढत्या रोजगारच्या संधी , वाढत्या उद्योग आणि आरोग्यसेवा आणि शिक्षणाची वाढलेली उपलब्धता, आर्थिक फायदे बारकाईने तपासले. तसेच शहरी स्थानिक भुदृश्यावर आणि पारंपारिक ग्रामीण उपजीविकेवर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रभावावर लक्ष केंद्रित करतो.

**उद्दिष्टे: १.** नागरीकरण आणि ग्रामीण शिक्षणाचा अभ्यास करणे. २. नागरीकरणामुळे ग्रामीण शिक्षणावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे. ३. नागरीकरणामुळे ग्रामीण शिक्षणावर झालेला बदल जाणून घेणे.

**गृहितके: १.** नागरीकरणात वाढ होत आहे. २. नागरीकरणामुळे ग्रामीण शिक्षणावर अनेक परिणाम झालेले दिसुन येत आहे. ३. नागरीकरणामुळे ग्रामीण भागात सांस्कृतिक बदल होत असुन पारंपारिक मुल्ये आणि पद्धती मागे पडत असल्याचे दिसुन येते.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनाच्या आशयाच्या स्वरुपाचे आकलन होण्यासाठी संशोधनात शास्त्रीय पद्धतीचा वापर करणे आवश्यक असते, म्हणून या शोध निबंधामध्ये संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.

**तथ्य संकलन:** सामाजिक संशोधनात तथ्य संकलन ही अतिशय महत्त्वाची पायरी आहे. प्रस्तुत संशोधनात द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा म्हणजेच संदर्भग्रंथ, मासिका, वृत्तपत्रे, शोधप्रबंध, आंतरराष्ट्रीय शोधनिबंध, इंटरनेट, इत्यादीचा उपयोग सदरील शोध निबंधामध्ये करण्यात आलेला आहे.

**नागरीकरण आणि ग्रामीण शिक्षण:** नागरीकरण ही प्रक्रिया आहे, ज्यामुळे ग्रामीण भागातील लोक शहरी क्षेत्रात स्थलांतरीत होत आहेत. ज्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बदल झालाच पण शैक्षणिक बदल ही झाला आहे. नागरीकरणामुळे ग्रामीण साक्षरतेमध्ये वाढ झाली आहे. पण शैक्षणिक तुलना जर शहरीभागाशी केली तर ग्रामीण भाग शहरीभागापेक्षा मागासलेला आहे. कारण ज्याप्रमाणात शहरात सुविधा उपलब्ध आहे, त्याप्रमाणात ग्रामीण भागात सुविधा मिळत नाही. त्यामुळे ग्रामीण भागामधील लोक शहरात स्थलांतर करत आहे. त्याचे कारण की आपल्या पाल्याला उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी, पालक शहर जात आहे. यावरुन नागरीभागाचे आकर्षण दिसून येते. त्याचबरोबर नागरीभागातील शिक्षणाचा प्रभाव पडत आहे असे दिसते. ग्रामीण भागातील लोकांना इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे आकर्षण वाढत आहे. या शाळांसाठी ते नागरीभागात जात असल्याचे दिसते. कारण ग्रामीण भागामध्ये त्या दर्जाचे शिक्षण आणि शाळांचा अभाव असल्याचे दिसते. ग्रामीण भागामध्ये इंग्रजी शाळेत वाढत होत आहे आणि मराठी शाळा ह्या बंद पडण्याच्या मार्ग आहे. काही समयोजित होत आहे. यामुळे ग्रामीण मराठी शाळांचा समस्या अधिकच वाढल्या आहे. या शाळांच्या असुविधेमुळे या शाळांना पालकांनी दुर्लक्षित केले आहे.

**नागरीकरणामुळे ग्रामीण शिक्षणावर झालेला परिणाम:** नागरीकरण एक जटिल प्रक्रिया झाली आहे. नागरीकरणाचे फायदे व तोटे दोन्ही आहेत. तसेच नागरीकरणामुळे ग्रामीण शिक्षणावर अनेक परिणाम होत आहे. यामुळे ग्रामीण भागात शिक्षणाची गुणवत्ता वाढत आहे, पण त्याप्रमाणात नाही त्याचबरोबर काही नवीन आव्हाने ही निर्माण होत आहेत. म्हणजेच नागरीकरणामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील असमानता वाढत आहे. ज्याप्रमाणात शहरी भागातील विद्यार्थ्यांना अधिक संसाधने आणि सुविधा मिळतात, तर तेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळत नाही. तसेच नागरीकरणामुळे ग्रामीण भागातील सांस्कृतिक बदल होत आहे. त्यामध्ये पारंपारिक मुल्ये आणि पद्धती मागे पडत आहेत. त्याच नागरीकरणामुळे ग्रामीण भागातील पालकांवर आर्थिक ओझे वाढत आहे. कारण शहरी भागातील शिक्षण पद्धती आणि संसाधनांचा खर्च खुप जास्त आहे. त्यांना परवडणारा नाही, त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती आणखी खालावत आहे. कारण नागरीकरणाच्या शिक्षण पद्धतीमध्ये इंग्रजी माध्यमाला प्राधान्य अधिक असल्यामुळे त्यांचे अनुकरण म्हणून ग्रामीण भागातील पालक सुद्धा इंग्रजी माध्यमाला प्राधान्य देत आहे. यामुळे त्याचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक समस्या वाढत आहे. ग्रामीण भागामध्ये नागरी शाळेप्रमाणे सुविधा नाही. त्यासारखे सुविधा आणि शिक्षण मिळविण्यासाठी आजचे पालक धडपड करत आहेत. यामुळे ग्रामीण भागातील पालकांच्या विविध बाबींवर परिणाम होत असल्याचे दिसून येते

**निष्कर्ष:** 1.नागरीकरणाचा ग्रामीण शिक्षणावर परिणाम जटिल झाला आहे. 2. नागरीकरणामुळे असमानता आणि सांस्कृतिक बदल झाला आहे. 3. नागरीकरणामुळे ग्रामीण पालकांचे आर्थिक ओझे वाढले आहे. 4. नागरीकरणामुळे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक समस्या वाढत आहे.

**शिफारशी:** 1. नागरीकरणाचा ग्रामीण शिक्षणावर झालेला परिणामाचा शोध घेणे. 2. नागरीकरणामुळे सांस्कृतिकता अबाधीत ठेवण्यासाठी सर्वसामान्यपासून ते सरकारने प्रयत्न केले पाहिजे. 3. नागरीकरणाचे आकर्षण विषय लक्षात घेऊन ग्रामीण भागातील सुविधा आणि इतर सुविधेत वाढ केली पाहिजे.

**संदर्भ सूची :**

१) मित्रा ए., (२०१९), ग्रामीण ते शहरी स्थलांतर आणि शहरी
२) हेडर सन जे. व्ही. आणि वांग एच. जी., (२००७), शहरीकरण आणि वाढ संस्थाची भुमिका.
३) फे. एम, आणि ओपल सी., (२०००), वाढी शिवाय शहरीकरण, एक असामान्य घटना नाही.

४) mr.wikipedia.org
५) http://vishwakosh.marathi.gov.in
६) अहलुवालिया आयजे (२०१९) भारतातील शहरी प्रशासन (जनरल)
७) राठोड बी. सी. (२०१४), पंचायती राज आणि नागरी प्रशासन
८) जोधळे मिलिंद शिवाजी (२०२२), वाढत्या शहरीकरणाचे ग्रामीण भागावर होणाऱ्या आर्थिक परिणामाचा चिकित्सक अभ्यास.
९) ऐथल जान्हवी व्ही. ए. आर. शरथ (२०१३), ग्रामीण ते शहरी सिंधानुराचा शहरीकरणाचा प्रवास.

# मराठवाड्यातील नागरी विकास: समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. साहेब विरभद्रराव पडलवार** समाजशास्त्र विभाग,ज.जि.म.वि.प्र.सह. समाजाचे,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव.

**गोषवारा:** हा संशोधनात्मक लेख मराठवाडा प्रदेशातील नागरी विकासाची सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय पार्श्वभूमी समजून घेण्याचा प्रयत्न करतो. ऐतिहासिकदृष्ट्या नागरी परंपरा लाभलेल्या मराठवाड्यात आज नागरीकरणाचा वेग असमान आणि असंतुलित स्वरूपाचा दिसून येतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील अवलंबित्व, पर्यावरणीय मर्यादा, स्थलांतर, अपुरी पायाभूत सुविधा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे मर्यादित सक्षमीकरण ही मराठवाड्याच्या नागरी विकासातील प्रमुख अडथळे ठरले आहेत. लेखात शाश्वत नागरी विकासाची गरज अधोरेखित करत, स्थानिक स्तरावरील नियोजन, लोकसहभाग आणि संस्थात्मक सक्षमीकरण या बाबींवर भर देण्यात आला आहे.

**प्रस्तावना:** नागरीकरण ही आधुनिक समाजाची एक अपरिहार्य प्रक्रिया आहे. औद्योगिकीकरण, तांत्रिक प्रगती आणि आर्थिक बदल यांमुळे मानवसमाज ग्रामीण जीवनातून नागरी जीवनाकडे संक्रमण करत आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, नगरे ही केवळ लोकवस्तीची केंद्रे नसून ती आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाची प्रमुख साधने आहेत. मराठवाडा हा प्रदेश ऐतिहासिकदृष्ट्या नागरी परंपरा असलेला असूनही समकालीन काळात तो तुलनेने मागास मानला जातो. मलिक अंबर, बौद्ध काळातील व्यापारी शहरे आणि औरंगाबादसारख्या शहरांची परंपरा असूनही आज मराठवाड्यात नागरी विकास असंतुलित आणि अपुरा राहिलेला दिसतो. त्यामुळे मराठवाड्यातील नागरी विकासाचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**अभ्यासाची उद्दिष्टे:** या संशोधनात्मक लेखाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत. १. मराठवाड्यातील नागरी विकासाची ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमी समजून घेणे. २. मराठवाड्यातील नागरीकरणाच्या मर्यादा आणि अडचणींचे विश्लेषण करणे. ३. शाश्वत नागरी विकासाच्या संकल्पनेच्या आधारे मराठवाड्यासाठी संभाव्य दिशा सुचवणे.

**संशोधन पध्दती:**या अभ्यासासाठी द्वितीयक माहितीचा (Secondary Data) वापर करण्यात आला आहे. यामध्ये जनगणनेचे आकडे (१९७१ व २००१), पंचवार्षिक योजना अहवाल, महाराष्ट्रातील निवडक शहरांवरील अब्यास अहवाल, समाजशास्त्रीय आणि नगरनियोजन विषयकचे साहित्य यांचा आधार घेतला आहे. तसेच माहितीचे विश्लेषण वर्णनात्मक (Descriptive) आणि विश्लेषणात्मक (Analytical) पद्धतीने करण्यात आले आहे.

**तथ्य विश्लेषण:**

**मराठवाड्यातील नागरीकरणाची स्थिती:** मराठवाडा हा १९६० साली महाराष्ट्रात समाविष्ट झाला. त्याआधी तो हैदराबाद संस्थानाचा भाग होता आणि त्यामुळे आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्टिकोनातून तो मागास राहिला. १९७१ साली मराठवाड्यातील नागरी लोकसंख्या केवळ १४.६३ टक्के होती, तर महाराष्ट्राची सरासरी ३१.२० टक्के होती. ही तफावत आजही मोठ्या प्रमाणात टिकून आहे. मराठवाड्यातील नागरीकरण मुख्यतः औरंगाबाद, नांदेड आणि लातूर सारख्या शहरांभोवती केंद्रित आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, औरंगाबादची लोकसंख्या ११,७५,११६ आहे, ज्यात दशकवार वाढ ४१.१७% आहे. हे वाढ मुख्यतः ग्रामीण भागातून स्थलांतरामुळे आहे, ज्यात दुष्काळ हा प्रमुख घटक आहे. १९७१-१९७३ च्या दुष्काळामुळे मराठवाड्यातील ग्रामीण भागातून शहरांकडे मोठे स्थलांतर झाले, ज्यामुळे शहरी लोकसंख्या वाढली. मराठवाड्यातील शहरीकरणाचे प्रमाण महाराष्ट्राच्या सरासरीपेक्षा कमी आहे (४५.२३%), परंतु वाढते आहे. जिल्हानिहाय, औरंगाबादमध्ये ४३.७७% शहरी लोकसंख्या आहे, तर बीड आणि उस्मानाबादमध्ये २०% पेक्षा कमी. औद्योगिक क्षेत्रे जसे शेंद्रा आणि वालूज यांनी ग्रामीण गावांना शहरी प्रभावाखाली आणले आहे, ज्यात कंपन्या जसे बजाज आणि व्हिडीओकॉन यांचा समावेश आहे. हे विस्तार ग्रामीण समाजाच्या संरचनेवर प्रभाव टाकतात.

**ग्रामीण अर्थव्यवस्था आणि स्थलांतर:** मराठवाड्यातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून असल्यामुळे दुष्काळ, उत्पन्नाची अस्थिरता आणि बेरोजगारी या समस्या तीव्र स्वरूपाच्या आहेत. परिणामी ग्रामीण भागातून शहरांकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होते. परंतु मराठवाड्यातील शहरांकडे रोजगारनिर्मितीची क्षमता मर्यादित असल्यामुळे स्थलांतर प्रामुख्याने मुंबई आणि इतर महानगरांकडे होते.

**नगरनियोजनातील अपयश:** महाराष्ट्रात १९६६ साली नगरनियोजन कायदा लागू झाला असला तरी प्रत्यक्षात नियोजन हे केवळ भौतिक स्वरूपाचे राहिले. लोकसंख्या, रोजगार, पर्यावरण आणि सामाजिक गरजा यांचा समग्र विचार झाला नाही. त्यामुळे शहरांचा विकास अनियंत्रित झाला आणि झोपडपट्ट्या, वाहतूक कोंडी, पाण्याची टंचाई, सांडपाणी समस्या वाढल्या.

**शाश्वत नागरी विकासाची गरज:** शाश्वत विकासाच्या संकल्पनेनुसार आर्थिक विकास, सामाजिक न्याय, पर्यावरणसंरक्षण आणि संस्थात्मक सक्षमीकरण यांचा एकत्रित विचार केला जातो. मराठवाड्यासारख्या पर्यावरणीय मर्यादा असलेल्या प्रदेशात शाश्वत नागरी नियोजनाशिवाय दीर्घकालीन विकास शक्य नाही.

**निष्कर्ष:**या अभ्यासातून पुढील प्रमुख निष्कर्ष पुढे येतात . १. मराठवाड्यातील नागरी विकास ऐतिहासिकदृष्ट्या समृद्ध असला तरी आधुनिक काळात तो मागास राहिला आहे. २. ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील अवलंबित्व आणि अपुरी औद्योगिक वाढ ही नागरी विकासातील मुख्य अडथळे आहेत. ३. नगरनियोजन हे केवळ भौतिक सुविधांपुरते मर्यादित राहिल्यामुळे सामाजिक समस्या तीव्र झाल्या आहेत. ४. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण न झाल्यामुळे नागरी विकासावर राज्य आणि केंद्र सरकारचेच वर्चस्व राहिले आहे.

**सारांश:** मराठवाड्याचा नागरी विकास हा केवळ पायाभूत सुविधांचा प्रश्न नसून तो सामाजिक रचना, नेतृत्व, प्रशासन आणि लोकसहभाग यांचा एकत्रित परिणाम आहे. शहरे ही विकासाची इंजिने असल्यामुळे मराठवाड्याच्या प्रगतीसाठी शहरांना केंद्रस्थानी ठेवून नियोजन करणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांप्रमाणे नागरीकरणाला विरोध न करता, त्याला समजून घेऊन शाश्वत आणि लोकाभिमुख नगरनियोजन राबविले तरच मराठवाड्याचा समग्र सामाजिक व आर्थिक विकास शक्य होईल.

## संदर्भसूची

१) Government of India, *Tenth Five Year Plan Report (2002—2007).*
२) Census of India, 1971, 2011.
३) महाराष्ट्र शासन, *नगरनियोजन अधिनियम, 1966.*
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, *लेखन व भाषणे.*
५) UN-Habitat Reports on Urban Development.

# औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगार: कौशल्ये आणि प्रशिक्षणाचे महत्व: एक सामाजिक अभ्यास

**प्रियदर्शन देवानंद ताजणे** संशोधक विद्यार्थी, विवेकानंद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना:** औद्योगिक क्षेत्र हे प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेचा महत्वाचा पाया आहे. यामध्ये उत्पादन, सेवा, तंत्रज्ञान, कारखाने, कंत्राटी कामगार व अन्य क्षेत्रांचा समावेश होतो. या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींची कौशल्ये आणि प्रशिक्षण त्यांच्या कार्यक्षमतेसाठी अत्यंत आवश्यक आहेत. विशेषत: महिला कामगारांसाठी कौशल्य आणि प्रशिक्षणाचे महत्त्व खूप जास्त आहे. कारण औद्योगिक क्षेत्रातील कामकाज हे प्रामुख्याने शारीरिक मेहनत, तांत्रिक ज्ञान आणि वेळेचे पालन यावर अवलंबून असते. पूर्वीच्या काळात औद्योगिक कामामध्ये महिला सहभाग कमी होता, परंतु सध्याच्या आधुनिक युगात महिलांचा सहभाग वाढत आहे. महिलांच्या कामामुळे उद् द्योगक्षेत्रात उत्पादनक्षमता वाढते, नवकल्पना येतात आणि सामाजिक व आर्थिक विकासाला चालना मिळते. कौशल्य आणि प्रशिक्षणामुळे महिला कामगार केवळ कामात प्रावीण्य मिळवत नाहीत, तर त्यांच्या मध्ये आत्मविश्वास, सामाजिक मान्यता आणि आर्थिक स्वावलंबनामध्येही वाढ होते. औद्योगिकीकरणामुळे महिला कामगारांना नवीन रोजगार, कौशल्याची जोपासना आणि आर्थिक स्वावलंबनाची संधी मिळत आहेत. औद्योगिक क्षेत्र फक्त उत्पादन आणि सेवा देण्यापुरते मर्यादित नसून ते समाजातील लैंगिक समानता, सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक विकासाचे गंभीर घटक देखील आहे. एका बाजूने असे म्हणावे लागेल महिलांची कौशल्ये आणि प्रशिक्षणाचा दर्जा त्यांच्या कार्यक्षमता, रोजगाराचा दर्जा व आर्थिक संरक्षणावर प्रत्यक्ष परिणाम करतो. महिला कामगारांना कौशल्य आणि प्रशिक्षण मिळाले तर त्याच्या सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक सहभागात लक्षणीय वाढ होते. तसेच औद्योगिक क्षेत्राच्या वृद्धीमध्येही कौशल्य महत्वाची भूमिका बजावतात. महिलांना समाजातील आपले स्थान बळकट करण्याचा हा एक रास्त मार्ग आहे. पूर्वी औद्योगिक क्षेत्र है पुरुषप्रधान मानले जात होते. जड यंत्रसामग्री, कठीण कामाचे तास आणि सुरक्षिततेच्या मर्यादा यांमुळे महिलांचा सहभाग मर्यादित होता. मात्र तंत्रज्ञानातील प्रगती, स्वयंचलन, संगणकीकरण आणि सेवा-आधारित उ द्योगांच्या वाढीमुळे महिलांसाठी अनेक नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. वस्त्रोद्योग, अन्नप्रक्रिया, औषधनिर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स, आयटी, बीपीओ, तसेच लघु व मध्यम उद्योगामध्ये महिला कामगार महत्वाची भूमिका बजावत आहेत. औद्योगिक क्षेत्रात काम करताना केवळ शारीरिक श्रम पुरेसे नसतात, तर विशिष्ट कौशल्यांची गरज असते. यंत्रसंचालन, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादन नियोजन, संगणक वापर, डेटा व्यवस्थापन, तसेच समस्या सोडवण्याची क्षमता ही कौशल्ये अत्यावश्यक ठरतात. महिलांमध्ये नैसर्गिकरित्या असलेली निरीक्षणशक्ती, बारकाई, शिस्त आणि संयम यांचा उद्योगांना मोठा फायदा होतो. मात्र या गुणांना योग्य कौशल्यांची जोड मिळाल्यासच त्यांचा पूर्ण उपयोग होऊ शकतो.

**संशोधनाचे उद्देश:** प्रस्तुत विषय "औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगार कौशल्ये आणि प्रशिक्षणाचे महत्व: एक समाजशास्त्रीय अभ्यास संदर्भाने संशोधन करत असताना संशोधकाने शोधनिबंधास शास्त्रीय बैठक यावी म्हणून काही उद्दिष्टे समोर ठेवून, गृहितकृत्यांच्या आधारे संशोधन करण्याचे योजले आहे. १. महिला कामगारांना देण्यात येणाऱ्या कौशल्य व प्रशिक्षणाचे स्वरूप आणि प्रकार समजून घेणे. २. औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांच्या कार्यक्षमतेवर प्रशिक्षणाचा परिणाम विश्लेषित करणे.

**गृहितके:** १. कौशल्य, प्रशिक्षण नसल्यास महिला कामगारांच्या औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराची गुणवत्ता कमी रहातात. २. प्रशिक्षणामुळे महिला कामगारांसाठी अधिक उत्पन्न, स्थिर नोकरीची संधी सामाजिक प्रतिष्ठा, आर्थिक स्वावलंबन यावर सकारात्मक प्रभाव पडतो.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनास शास्त्रीय बैठक यावी म्हणून संशोधकाने दुय्यम पद्धतीचा अवलंब करून, त्यामध्ये वृत्तपत्रे, मासिके, संदर्भ पुस्तके आणि ऑनलाईन संकेतस्थळांच्या माध्यमातून विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक मांडणी केली आहे.

**संशोधन विषयाचे महत्व:** औद्योगिक क्षेत्रातील महिलांचा वाढता सहभाग यांच्या सामाजातील वाढत्या समावेशाचे चित्र दाखवतो. समाजातील हा वाढता सहभाग त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देणार आहे. अवजड आणि अवघड अशा समजल्या जाणाऱ्या औद्योगिक क्षेत्रात महिलांच्या वाढत्या सहभागामुळे त्यांच्या परिस्थिती बदलाला, विकासाला हातभार लागला आहे. या प्रक्रियेमध्ये सहजता आणि सुलभता तेव्हाच शक्य होईल जेव्हा त्यांच्या कामाला प्रशिक्षणाची योग्य जोड मिळालेली असेल. प्रशिक्षणामुळे महिलांना स्वावलंबी बनण्याची संधी मिळते. कौशल्ये असल्यास महिलांना कामाच्या योग्य संधी मिळतात आणि त्यांचे कौटुंबिक जीवनही स्थिर राहते. कौशल्य असलेल्या महिला कामगारांच्या सहभागामुळे उत्पादनक्षमतेत वाढ करता येते. उद्द्योगाची कार्यक्षमता सुधारते, प्रशिक्षित महिला कामगारांना उच्च पगार मिळण्याची शक्यता वाढते. आर्थिक परिस्थितीत सुधारणा होताना दिसून येते. उ द्योगाला कुशल कामगारांची उपलब्धता सुनिश्चित होते, कामगाराच्या नोकरीच्या गुणवत्तेत वाढ होते. औद्योगिक कामामध्ये आधुनिक यंत्रसामग्री वापरण्यासाठी विशेष कौशल्य आवश्यक असतात. या गोष्टीची पूर्तता योग्य प्रशिक्षणामुळे सहज शक्य आहे. महिला कामगार सुरक्षिततेचे नियम समजू शकतात, ज्याचा परिणाम अपघातांचे प्रमाण कमी होते. कौशल्य असलेल्या महिला कामगाराचे सामूहिक काम अधिक परिणामकारक होते, त्यातून उद्योगाची उत्पादकता वाढते. प्रशिक्षणाने महिलांमध्ये स्व-विश्वास वाढतो आणि निर्णयक्षमता सुधारते. औद्योगिक क्षेत्रात सतत नवनवीन तंत्रज्ञान येत आहे, त्यासाठी कौशल्य असणे ही काळाची गरज बनली आहे. प्रशिक्षणाने महिला कामगार तंत्रज्ञानाशी जुळवून घेऊ शकतात ही बाब उद्योगाच्या स्पर्धात्मकतेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

**औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगार कौशल्ये आणि प्रशिक्षणाचे महत्व: एक समाजशास्त्रीय अभ्यास:** औद्योगिक क्षेत्र म्हणजे उत्पादनाचे विविध प्रक्रियात्मक स्वरूप, मशीन व तंत्रज्ञानाद्वारे वस्तू तयार करण्याची, सेवा पुरवण्याची आणि आर्थिक यंत्रणेतील योगदान देण्याची एक विस्तृत पद्धत आहे. औद्योगिक कारखाने, उत्पादन केंद्रे, लघु-मध्यम उद्योग, टेक्निकल व सेवा क्षेत्र या सर्वांचा समावेश येथे होतो. औद्योगिकीकरण हा कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा कणा मानला जातो. औद्योगिक क्षेत्र वाढल्याने रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. शेतीप्रधान अर्थव्यवस्थेकडून औद्योगिक अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करताना मनुष्यबळाचे महत्व प्रचंड वाढते आहे. या मनुष्यबळात महिलांचा सहभाग वाढवणे आणि त्यांना सक्षम बनवणे ही काळाची गरज आहे. आज औद्योगिक क्षेत्रात महिला कामगार मोठ्या संख्येने कार्यरत असल्या तरी त्यांचा सहभाग अधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण आणि नेतृत्वक्षम होण्यासाठी कौशल्ये आणि प्रशिक्षण यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**कौशल्य:** कौशल्य म्हणजे एखादे विशिष्ट कार्य प्रभावी व निरोगी पद्धतीने पार पाडण्याची क्षमता, कौशल्ये तांत्रिक, व्यावसायिक तसेच सॉफ्ट स्किल्स (जसे सवाद, वेळ व्यवस्थापन) यांचा समावेश या मध्ये करतात ज्यामुळे कामाची गुणवत्ता वाढते व रोजगाराच्या संधी सुधारतात.

**प्रशिक्षण:** प्रशिक्षण म्हणजे कामगाराला आवश्यक ज्ञान, तंत्रे आणि अनुभव देऊन त्याच्या दक्षता वाढविण्याची प्रक्रिया. हे औपचारिक (संस्थानांतर्गत कोर्सेस) किंवा अनौपचारिक (कार्यशाळा, ऑन-द-जॉब ट्रेनिंग) स्वरूपात असू शकते.

**प्रशिक्षण प्रकार:**

**तांत्रिक प्रशिक्षण:** मशीन ऑपरेशन, उत्पादन प्रक्रियेसंबंधी प्रशिक्षण जसे स्पॉट वेल्डिंग, मशीन टूल ऑपरेटिंग इ.

**व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण:** फॅब्रिकेशन, टेक्सटाईल व इतर उत्पादन कौशल्ये

**सुरक्षा प्रशिक्षण:** औद्योगिक सुरक्षा व आपत्कालीन प्रतिसाद

**कौशल्य प्रशिक्षणाचे महत्त्व :**

**गुणवतेतील सुधारणा:** कौशल्यपूर्ण कामगार कार्य अधिक अचूक व जलद करतात, त्यामुळे उत्पादनाची गुणवत्ता वाढते. प्रशिक्षित महिला कामगार उत्पादनात त्रुटी कमी करतात, ज्यातून औद्योगिक प्रतिष्ठा व नफा सुधारतो.

**आत्मविश्वास आणि क्षमता विकास:** प्रशिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना त्यांच्या सुप्त गुणाची जाणीव होते, ज्यामुळे त्या अधिक सक्षम बनतात.

**सुरक्षितता व आरोग्य:** औद्योगिक क्षेत्रात रसायने, मशीन व पर्यावरणातील धोके असतात. योग्य प्रशिक्षणामुळे महिलांना योग्य सुरक्षा नियम व टाळण्याच्या पद्धती समजतात, ज्यामुळे अपघात व आरोग्य जोखीम कमी होते.

**रोजगाराची गुणवत्ता व वेतन:** प्रशिक्षणामुळे महिलांना उच्च कौशल्याच्या रोजगारांसाठी पात्रता मिळते. ज्यामुळे त्यांना चांगल्या वेतन आणि स्थिर नोकरीची संधी वाढते. कौशल्यागत शिक्षणामुळे महिलांना सामान्य नोकरीपेक्षा उत्तम रोजगार मिळतो आणि आर्थिक स्थिती सुधारते.

**सामाजिक प्रतिष्ठा आणि सक्षमीकरण:** महिला जेव्हा कौशल्य व आत्मनिर्भरतेसह काम करतात, तेव्हा त्यांच्या कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत स्थान सुधारते आणि सामाजिक दृष्टिकोनातून सन्मान वाढतो. कौशल्ये आणि प्रशिक्षणामुळे महिलांना शेती किंवा शेतमजुरीपलीकडे उत्पन्नाचे पर्यायी मार्ग मिळतात, ज्यामुळे त्यांचे आर्थिक जीवन सुधारते. कौशल्य विकासाने महिलांना केवळ कामगार म्हणून नव्हे, तर उद्योजक म्हणूनही पुढे आणले आहे. ज्यामुळे आर्थिक आणि सामाजिक विषमता कमी होण्यास मदत होते.

**समस्या:** औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांना प्रशिक्षण मिळविण्याच्या अनेक अडचणी आहेत.

**लैंगिक भेदभाव आणि सामाजिक रूढी:** आदर्श समाजात महिलाना पारंपरिक भूमिका देण्याची मानसिकता आहे, ज्यामुळे तांत्रिक आणि भविष्यातील नोकऱ्यांसाठी प्रशिक्षणात प्रवेश कमी होतो. हे चित्र समोर येते.

**संसाधनांचा अभाव:** ग्रामीण भागात महिलांना कौशल्य विकास केंद्रे व प्रशिक्षण सुविधा कमी उपलब्ध आहेत, ज्यामुळे ते औद्योगिक कौशल्यांसाठी पुढे येऊ शकत नाहीत.

**कुटुंबीय आणि जबाबदारी:** महिला अनेकदा घरकाम व बाल संगोपन यांसारख्या जबाबदाऱ्या सांभाळताना प्रशिक्षणास वेळ देऊ शकत नाहीत.

**उपाय योजना :**

**सरकारी आणि खाजगी प्रशिक्षण संस्था:** महिला कामगारांसाठी विशेष तांत्रिक आणि व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम चालवणे. उदा: "Skill India Mission" किंवा "Deen Dayal Upadhyaya Grameen Kaushalya Yojana (DDU-GKY)"

**समान वेतन आणि सुरक्षित कार्यक्षेत्र:** महिलांना पुरुषांसारखे वेतन आणि सुरक्षित कार्यस्थळ उपलब्ध करून देणे.

**सामाजिक समर्थन:** कुटुंब आणि समाजातून महिलांना प्रोत्साहन देणे, ज्यामुळे त्याना कौशल्य शिकण्याची आणि काम करण्याची संधी मिळते.

**तंत्रज्ञानाचा लाभ:** डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कौशल्य प्रशिक्षण देणे, ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम चालवणे.

**सतत शिक्षण:** औद्योगिक क्षेत्रातील तंत्रज्ञान सतत बदलत असल्यामुळे महिला कामगारांसाठी सतत प्रशिक्षणाची व्यवस्था असावी. कौशल्यविकासामुळे महिलाना केवळ रोजगार मिळत नाही, तर त्यांची उत्पादकता वाढते. कुशल महिला कामगार चुका कमी करतात, कामाची गुणवत्ता सुधारतात आणि वेळेचे योग्य नियोजन करतात. याचा थेट परिणाम उद्योगाच्या नफ्यावर आणि स्पर्धात्मकतेवर होतो. तसेच कौशल्यामुळे महिलांना उच्च वेतन, पदोन्नती आणि निर्णयप्रक्रियेत सहभागाची संधी मिळते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्या स्वतःला उद्योगातील एक महत्त्वाचा घटक मानू लागतात. प्रशिक्षण हे कौशल्यविकासाचे मुख्य साधन आहे. औद्योगिक क्षेत्रातील बदलती तंत्रज्ञान व्यवस्था लक्षात घेता सातत्यपूर्ण प्रशिक्षण आवश्यक आहे, नवीन यंत्रे, सॉफ्टवेअर, उत्पादन पद्धती आणि गुणवता मानके यांचे प्रशिक्षण महिलांना दिल्यास त्या उद्योगाशी सुसंगत राहतात. तांत्रिक प्रशिक्षणासोबतच संवाद कौशल्ये, संघकार्य, नेतृत्वगुण, वेळ व्यवस्थापन आणि तणाव व्यवस्थापन यांसारख्या 'सॉफ्ट स्किल्सचे प्रशिक्षणही तितकेच महत्त्वाचे आहे. महिला कामगारांसाठी सुरक्षितता आणि आरोग्य प्रशिक्षण देखील अत्यावश्यक आहे. औद्योगिक अपघात टाळण्यासाठी सुरक्षा नियमाचे ज्ञान, संरक्षक साधनांचा वापर आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद देण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे. यामुळे महिलांचे आरोग्य सुरक्षित राहते आणि उद्योगांनाही अपघातामुळे होणारे नुकसान टाळता येते. पूर्वीच्या काळात औद्योगिक कामामध्ये महिला सहभाग कमी होता, परंतु सध्याच्या आधुनिक युगात महिलांचा सहभाग वाढत आहे. महिलांच्या कामामुळे उद्द्योगक्षेत्रात उत्पादनक्षमता वाढते, नवकल्पना येतात आणि सामाजिक व आर्थिक विकासाला चालना मिळते. कौशल्य आणि प्रशिक्षणामुळे महिला कामगार केवळ कामात प्रावीण्य मिळवत नाहीत, तर त्यांच्या आत्मविश्वास, सामाजिक मान्यता आणि आर्थिक स्वावलंबनामध्येही वाढ होते. औद्योगिकीकरणामुळे महिला कामगारांना नवीन रोजगार, कौशल्याची जोपासना आणि आर्थिक स्वावलंबनाची संधी मिळत आहे. औद्योगिक क्षेत्र फक्त उत्पादन आणि सेवा देण्यापुरते मयादित नसून ते समाजातील लैंगिक समानता, सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक विकासाचे गंभीर घटक देखील आहे. एका बाजूने असे म्हणावे लागेल महिलांची कौशल्ये आणि प्रशिक्षणाचा दर्जा त्यांच्या कार्यक्षमता, रोजगाराचा दर्जा व आर्थिक संरक्षणावर कौशल्ये आणि प्रशिक्षणाचे महत्व केवळ आर्थिक स्तरापुरपरे मर्यादित नाही. प्रशिक्षित महिला कामगार कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करतात त्याच्या उत्पन्नामुळे मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि जीवनमान उंचावते यामुळे महिलांचे सामाजिक स्थान बळकट होते आणि त्या निर्णयप्रक्रियेत अधिक सक्रिय होतात परिणामी महिला सक्षमीकरणाला चालना मिळते, जे कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. परिणाम स्वरूप समाज प्रगतीचा वाटचाली मध्ये भर पडलेली दिसते. औद्योगिक क्षेत्रातील महिलांना कौशल्ये आणि प्रशिक्षण मिळण्यात अनेक अडथळे येतात. कौटुंबिक जबाबदाऱ्या, वेळेची मर्यादा, सामाजिक बंधने, सुरक्षिततेची चिंता आणि प्रशिक्षण केंद्रांची उपलब्धता या प्रमुख अडचणी आहेत. ग्रामीण व मागास भागातील महिलांना या समस्या अधिक तीव्रतेने भेडसावतात. त्यामुळे अनेक महिलांची क्षमता असूनही त्या औद्योगिक क्षेत्रात पुढे जाऊ शकत नाहीत औद्योगिक महिला कामगारांसाठी कौशल्य आणि प्रशिक्षण महत्वाचे आहे कारण ते त्यांना आर्थिक स्वातंत्र्य देते, रोजगाराच्या नवीन संधी उघडते, आत्मविश्वास वाढवते आणि त्याना आधुनिक अर्थव्यवस्थेच्या भांडवल-तंत्रज्ञान-ज्ञान-आधारित जगात सक्षम बनवते, ज्यामुळे त्या उद्योजक बनू शकतात आणि देशाच्या आर्थिक विकासात योगदान देऊ शकतात पारंपरिक सीमा ओलांडून. प्रशिक्षणामुळे महिलांना शिस्तबद्ध कौशल्ये मिळतात, जसे की शिवणकाम, नक्षीकाम किंवा औद्योगिक प्रक्रिया, ज्यामुळे त्या स्वावलंबी होतात आणि कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालतात. एकंदरीत, औद्योगिक महिला कामगारांसाठी कौशल्य आणि प्रशिक्षण हे केवळ आर्थिक उन्नतीचे साधन नसून, त्यांच्या सक्षमीकरणाचा आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे.

**समारोप:** औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांसाठी कौशल्य आणि प्रशिक्षण हे फक्त रोजगाराचे साधन नाही, तर आर्थिक सक्षमीकरण, सामाजिक प्रतिष्ठा आणि उद्योजकतेचा पाया आहे. कौशल्य प्रशिक्षणामुळे उत्पादन क्षमता, सुरक्षितता, रोजगार गुणवता आणि आर्थिक स्थितीमध्ये स्पष्ट सुधारणा दिसून येते. त्यामुळे शासन, उद्योग संघटना आणि समाज यानी एकत्रित पद्धतीने महिना कामगारांसाठी लिंग-संवेदनशील, उपलब्ध, तांत्रिक आणि सॉफ्ट कौशल्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे अत्यावश्यक आहे. औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांचे कौशल्य आणि प्रशिक्षण हा फक्त त्यांचा व्यक्तिगत लाभ नाही, तर समाज, उद्योग आणि

देशाच्या आर्थिक विकासाचा महत्त्वाचा घटक आहे. प्रशिक्षित महिला कामगार उद्योगाच्या गुणवत्तेत वाढ करतात, नवकल्पना आणतात, कुटुंबाचे आर्थिक स्वरूप सुधारतात आणि समाजात स्त्री शक्तीला उंच स्थान मिळते. सरकार, उद्योगसंस्था आणि समाजाने महिला कामगारांसाठी योग्य प्रशिक्षण सुविधा, सुरक्षित कार्यस्थळ, समान वेतन आणि प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. केवळ अशा उपाययोजना केल्यास औद्योगिक क्षेत्रात महिलांचे कौशल्य आणि योगदान पूर्णपणे वाव मिळवू शकते. शेवटी, कौशल्य आणि प्रशिक्षण हे औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांसाठी फक्त साधन नाही, तर त्याचा आत्मविश्वास, सामाजिक प्रतिष्ठा आणि आर्थिक स्वावलंबन याचा पाया आहे. महिला कामगारांची कौशल्ये आणि प्रशिक्षण यावर भर दिल्यास औद्योगिक क्षेत्राची उत्पादकता, महिलांची सामाजिक प्रतिष्ठा, आर्थिक स्वावलंबन आणि देशाच्या विकासाचा वेग या सर्वांमध्ये सुधारणा होते. कौशल्यसंपन्न महिला कामगार उद्योगात जास्त स्थिरता, गुणवत्तापूर्ण उत्पादन आणि नवकल्पनाशीलता आणतात.

**संदर्भ :**

१) पाटिल सुनिता (२०१८), महिला कामगार आणि समाज, पुणे महाराष्ट्र प्रकाशन 2018.
२) देशमुख माधुरी (२०२०), उद्योगक्षेत्रातील महिला, मुंबई: संस्कार प्रकाशन 2020.
३) बोरकर कमल, आर्थिक विकास आणि महिला

# ग्रामीण भागातील नवीन रोजगाराच्या संधी

**प्रा. रोहिणी मारुती शेलार** ब्रह्मा व्हॅली कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तपोवन, नाशिक

**गोषवारा:** मानवाच्या जगण्याची त्रीसूत्री म्हणजे अन्न, वस्त्र आणि निवारा. वस्त्रा शिवाय आणि निवाऱ्या शिवाय माणूस जगू शकतो परंतु अन्ना शिवाय नाही.हे अन्न आपल्याला शेती मधून उपलब्ध होते खरतर माणूस हा सुद्धा इतर प्राण्यासारखाच प्राणी आहे परंतु आपल्या बुद्धीच्या जोरावर, त्याला निर्सगाने दिलेल्या देणगी वर तो सर्व काही साध्य करू शकतो. ते म्हणतात ना "माणसाचे पोट इतभर आणि त्याची धावपळ कोसभर". आपले पोट दोन वेळा व्यवस्थित भरावे म्हणून तो काबाडकष्ट करत असतो. मग तो कोणत्याही क्षेत्रातला असो. डॉक्टर, वकिल,व्यावसायिक, कारपोरेट क्षेत्र, (अगदी पंतप्रधान, राष्ट्रपती सुद्धा) आणि या सर्वांचा पोशिंदा असतो तो आमचा "बळीराजा" आमचा शेतकरी बंधू, अगदी हालाकीच्या परिस्थितीत शेती करत असतो. धान्य पिकवत असतो आणि ते तो बाजारात आणत असतो. भारतातील शेती ही प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे बरेचदा अनेक वेग-वेगळ्या प्रसंगाना त्यांना तोंड द्यावे लागते. त्यातही जिरायती आणि बागायती आशा दोन प्रकारची शेती आपला शेतकरी करत असतो. ७०% शेती ही जिरायती आहे. तर ३०% ही बागायती आहे. कधी ओला दुष्काळ तर कधी सुखा दुष्काळ हे ठरलेल गणित आहे. वडिलोपार्जित जमीनीचे वाटप लहान लहान तुकड्यांमध्ये झालेले असल्याकारणाने या तुकड्यानच्या शेतीत तो फक्त स्वतः साठी कमावू शकतो. त्याला ना नफा ना तोटा हे सूत्र अवलंबिवावे लागते, पारंपारिक शेती करत असताना त्याच्याकडे सुविधांचा अभाव असतो. त्याला योग्य असे मार्गदर्शन नसते. शेती विषयक सखोल ज्ञान नसते. त्यामुळे कोणत्या वेळी कोणते पीक घ्यावे हे त्यांना माहीत नसते. कोणत्या पिकात कोणते आंतरपीक घ्यावे याची कल्पना नसते. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढत नाही. पर्यायी त्यांना कर्ज काढावे लागते. त्याच्या वर वाढणारा कर्जाचा डोंगर, शेतीविषयक अपूर्ण ज्ञान, वाढती महागाई, कर्जाचा बोजा, सरकारी अनास्था, बी.बियाने, खते यांच्या गगनाला भिडलेल्या किंमती, त्यामुळे ग्रामीण भागातील तरुण वर्ग शहराकडे वळू लागला आहे. रोजगाराच्या नव्या संधी शोधू लागला आहे.अशा तरुणांचा योग्य तो उपयोग सरकारने करून घेतला पाहिजे.शेतकऱ्याला बारा महिने काम नसते.फेबुवारी ते जून या तीन महिन्यात सरकारने शिक्षित शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे प्रशिक्षण दिले पाहिजे . वेग वेगळ्या प्रकारचे आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली पाहिजे. जेणे करून तरुण स्थलांतर करण्या ऐवजी शेतीच करेल.

**परवलीचे शब्द**: जागतिकीकरण, नागरी समाजातील स्थलांतर व रोजगार, ग्रामीण शेती, ग्रामीण शिक्षण, ग्रामीण भागातील रोजगार

**प्रस्तावना:** जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये शेतकरी सुद्धा अडकला गेला आहे. तरुणाईला भुरळ घालणारा चंगळवाद ग्रामीण भागापर्यन्त पोहचला आहे. ग्रामीण भागातल्या गरजा कमी जरी असल्या तरी त्यांची उत्पादनाची साधने मर्यादित आहे. फक्त शेतीवर आधारित, आणि पारंपारिक शेती ही पावसावर आधारित आहे. त्यामुळे शेती सोबतच अनेक नवनवीन व्यवसायाची निकड भासू लागली. शेतीला जोड व्यवसाय म्हणजे दुग्धोपादन आणि विक्री, कुक्कुटपालन, शेळीपालन, रेशीम उद्योग, आळिंबीची शेती असे व्यावसाय केले जातात. हे व्यवसाय सुद्धा पारंपारिक पद्धतीने केले जातात. काही काही सुशिक्षित तरुण वर्ग हल्लीच्या काळात वेगवेगळ्या प्रशिक्षण वर्गाच्या माध्यमातून स्वयं रोजगारा कडे वळत आहेत. आणि आपल्या उद्योगाला एक लघु उद्योगाची जोड देत आहे. तरुण शिक्षित मुली महिला या अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शिवनकाम, बेकरी उत्पादन, लोणचे, कुरडई, पापड बनवून विकणे, गोधड्या शिवणे, बचतगटच्या माध्यमातून मशिनरी घेऊन पेपरप्लेट बनविणे, ग्लास बनविणे, प्लास्टिकच्या पिशव्या बनविणे, मिरची मसाला कुटण्याची कांडप मशिन, मंडप, लाईट, साउंड इत्यादि वस्तू घेऊन ठेवणे त्याचा सिझनल व्यवसाय करणे.काही शेतकर्यांनी आपल्या शेतीला पर्यटनाचे स्थळ करून तेथे हॉटेल स्थापन केले आहे आणि मोठ्याप्रमाणात नफा कमावत आहे.उदा.नाशिक जिल्हातील मामाचा मळा, पेरूची वाडी, द्राक्षाची बाग इत्यादी

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** पूर्व साहित्याचा अभ्यास करताना प्रामुख्याने १. मेखला कृष्वमूर्ती यांचे कृषी बाजारपेठेवरील संशोधन हे मुख्यत्वे भारतीय कृषी बाजारपेठेतील बदल यावर आहे. (१९८०-२०१०) या काळात कृषी उत्पादन आणि विपणन धोरणांचा बाजारपेठ

आणि त्यातील सामाजिक संबंधावर कसा परिणाम झाला, याचा अभ्यास केला आहे. त्यात प्रामुख्याने बदलत्या राजकीय परिस्थिती तंत्रज्ञान आणि भांडवलाच्या अभावाचा अभ्यास केला आहे . या संशोधनात त्यांनी बाजारपेठेतील कमकुवत स्थिती, नियमन, स्पर्धा आणि मक्तेदारी यांच्या गुंतागुंतीचे विश्लेषण केले आहे. शेतकयांच्या आंदोलनाची, कारणे आणि त्या मागील राजकीय अर्थ याचा देखिल अभ्यास केला आहे. २. विलासराव साळुंखे याच्या सारखा संशोधकांनी डाळींब आणि उसाच्या उत्पादन घटण्यावर जास्तीत जास्त भर दिला आहे. नैसर्गिक आपत्ती, हवामानातील बदल, आणि जलव्यवस्थापन या सारख्या घटकांमुळे डाळिंब उत्पादनात घट येत असल्याचे दिसून येते. (आणि त्य मुळे दर वाढले असल्याचे दिसून येते) ३. संजय अनंत पाटिल (पद्मश्री पुरस्कार विजेते.) यांनी देशी गाईच्या शेण-मूत्रापासून तयार जीवामृत वापरुन रासायनिक खतांशिवाय नैसगिक शेती कशी करावी हे दाखवून दिले. रेनवॉटर हार्वेस्टिंग, (पावसाचे पाणी साठवणे) आणि शून्य उर्जा सिंचन प्राणली वापरून पाणी कसे वाचवावे ते दाखवले. तसेच नावीन्य पूर्ण असे प्रयोग केले. उदा. गाईच्या जीवामृतावर १० एकर शेती केली केली. तसेच स्वयंचलित जीवामृत निर्मिती यंत्र बनवले. ४. डॉ. संजय डी.पाटिल (कोल्हापूर). यांनी महाराष्ट्राती पहिले खाजगी कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी अभियांत्रिकी सुरु कले. याचा उद्देश हा होता कि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण देण्यासाठी परदेशातील संस्थांशी संलग्नता आणि आधुनिक अत्याधुनिक तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचविणे. त्यांनी शेती ही कसणे नसून (mind) मने घडविणे आणि समुदायांना सक्षम करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ये असल्याचे म्हटले आहे.

**अध्ययनाचा उद्देश:** ग्रामीण भागातील जीवन बदलत चालले आहे. शेती हाच प्रमुख व्यवसाय असताना त्यात येणारे चढ-उत्तार नैसर्गिक आपत्ती (पूर, दुष्काळ) बाजारभाव, महागाई, शिक्षण, कौटुंबिक परिस्थिती त्याच बरोबर वाढणारे नागरिकिकरण हे होय, आणि त्यामुळे ग्रामीण भागातून स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होत आहे. तरुण वर्ग नोकरीच्या निमित्ताने शहराकडे जात आहेत.तर दुसरीकडे त्याचे वृधात्वाला लागलेले त्याचे आई वडील एकटे पडत चालले आहेत. त्यामुळे वृद्धांच्या समस्या निर्माण होत आहे.सुशिक्षित तरुण बेरोजगार, त्यांच्या विवाहात येणाऱ्या अडचणी येत आहेत .ग्रामीण भगत कोणी मुली द्यायला तयार नाही. मुलीनही शहरातील मोठ्या पकेजवाला नवरा पाहिजे. शहरात तुटपुंजा पगारावर नोकरी करून उदरनिर्वाह करणारा तरुण वर्ग, विधवा, परितक्त्या स्त्रियांच्या समस्या, त्यांना शेतात काम करणे आवडत नाही. शेतातील काम हे अंग मेहनतीचे सरांस वाटते .शहराकडे रहाण्याचा ओढ असते. हल्ली अनैतिक संबंध हे सुद्धा होताना दिसतात. सद्य परिस्थितीत ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे. पुरुष व्यसनाधिन असल्यास कौटुंबिक हानी होत असते. जमीनीच्या तुकड्यासाठी भावाभावात वैर निर्माण होत आहे. पर्यायी हाणामारी आणि खूनापर्यन्त मजल जाते. नाते संबंधामध्ये वितुष्टता निर्माण होत आहे. या सर्वांचा अभ्यास हा त्या शोधनिबंधा द्वारे होऊ शकतो.

**गृहीतकृत्ये:** "शेतीवरील अवलंबित्व कमी होणे, यासाठी निरिक्षण शोधनिबंधासाठी मुख्यत्वे पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. त्याकरिता निवडलेले अभ्यासक्षेत्र (चांदवड तालुक्यातील शिरूर तागडी) हे ग्रामीण परिस्थितत्तीचे योग्य ते प्रतिनिधित्व करते. आभ्यासाच्या कालावधीत हवामानात व नैसगिक परिस्थितीत बदल झालेला आहे असे नाही. येथे पावसाचे प्रमाण कमी आहे. कोरडवाहू शेती असल्याकारणाने ठराविकच पिके घेतली जातात.संपूर्ण परिसरात पाण्याचा इतर स्त्रोत नाही. फक्त पावसावरच्या पाण्यावर आधारित शेती आहे. शेती उत्पादनावर परिणाम करणारे घटक उदा. पाणी, बियाणे, खत, तंत्रज्ञान हे स्थिर आहेत असे गृहीत धरले आहे. शेतकर्यांची आर्थिक स्थिती ही केलेल्या निरिक्षणा वरून स्पष्ट होते असे गृहीत धरले आहे. शेतीबाह्य रोजगारांच्या नवनवीन संधी ग्रामीण भागात उपलब्ध झालेल्या आहेत आणि त्याची क्षमता वाढण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातील युवक शेतीव्यतिरिक्त इतर रोजगार स्विकारण्यास मानसिक दुष्या तयार झालेला आहे. या ठिकाणी स्वंयरोजगार, वडिलोपार्जित (न्हावी, शिंपी, कुंभार इत्यादी.) व्यवसाय, लघुउद्योग हे ग्रामीण रोजगार निर्मितीत महत्वाची भूमिका बजावत असल्या कारणाने रोजगार निर्माण होण्यास मदत होत आहे. किमान कौशल्य प्रशिक्षण मिळाल्यास ग्रामीण युवकांना रोजगार मिळू शकतो.

**अध्ययन पद्धती**: या विषयासाठी मुख्यत्वे निरिक्षण (OBSERVATION ) पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. या पद्धती मध्ये या गावातील काही तरुण स्त्री पुरुषाचे निरिक्षण करण्यात आले. त्यांनी कशा प्रकारे शेतीवर अवलंबून न रहाता अन्य रोजगारा कडे वळाले आहेत आणि स्वतःचा उदरनिर्वाह व्यवस्थित पणे चालू ठेवला हे त्यातून सिद्ध होते. त्याची काही उदा. **व्यक्ती क्र. १**. पुरुष वय वर्षे ३५, व्यवसाय शेती व्यतिरिक ट्रक्टर चालवणे, जमीन सपाटीकरण करणे, कांद्याचे मार्केटिंग करणे. **व्यक्ती क्र. २**. पुरुष वय वर्ष ४५, मुख्य व्यवसाय शेती व्यतिरिक सेंटररिंगचा व्यवसाय, दार, खिडक्या बसवणे. **व्यक्ती क्र.३.** पुरुष वय वर्षे ४३, मुख्य व्यवसाय शेती जरी असला तरी सकाळी 3 तास घंटागाडीवरड्रायकर म्हणून काम करणे. **व्यक्ती क्र. ४**. पुरुष वय वर्षे ४१, मुख्य शेती, व्यतिरिक्त दुकान टाकणे, कॅमेरा, CCTV कैमेरा वजनकाटा विकणे. **व्यक्ती क्र. ५**. महिला वय वर्षे ३८, मुख्य व्यवसाय शेती असल्या तरी सोबतच आंगणवाडी सेविका चे काम करते. **व्यक्ती क्र.६** महिला,वय वर्षे ३५, आशा वर्कर म्हणून काम. **व्यक्ती क्र.७**. महिला, वय वर्षे ४७ शिवण काम करणे, जेणे करून कुटुंबाला हातभार लागेल. **व्यक्ती क्र.८**: पुरुष, वय वर्षे २७, मुख्य व्यवसाय शेती, पुरक व्यवसाय दुकान होलसेल, ग्रामीण भागातील लोकांना शेतीसाठी लागणारी अवजारे यांची विक्री करणे. **व्यक्ती क्र.९**. पुरुष, वय वर्ष २५,उत्पादन करणे, प्लास्टिक चे ग्लास, पेपर प्लेट, पिशव्या बनवणे नि त्याची विक्री करणे जेणे करून कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारेल. **व्यक्ती क्र.१०.** स्त्री, वय वर्ष ४०, सरकारी दवाखान्यात (लालुक्याच्या ठिकाणी कामाला जाणे.) **व्यक्ती क्र. ११**. पुरुष वय वर्षे ६०, शेळी पालन **व्यक्ती क्र.१२**. स्त्री वय वर्ष ५५, मुख्य व्यवसाय शेती परंतु पतिच्या शेळी पालन व्यवसायात मदत करणे. या शोध निबंधासाठी निरिक्षण पद्धतीचा वापर योग्य वाटला, तसेच दुय्यम माहिति पध्दती आवलंबली गेली. त्यामध्ये संशोधन निबंध, पुस्तकं, मासिके, वेबसाईट्स,ऑनलाइन डेटाबेस, इ. चा उपयोग करण्यात आला आहे.

**तथ्यांचे विश्लेषण:** ग्रामीण भागातील या शोधनिबंधा साठी निरिक्षणाद्वारे माहिति गोळा करण्यात आली होती.

**आर्थिक तथ्य:** मुख्यत्व पावसावर अवलंबून असणाऱ्या या गावात एका बाजूने डोंगर आहे. शेती कोरडवाहू असल्यामुळे शेतीवर अवलबून रहाणे परवडत नाही, कारण की वाढती महागाई आणि शेतीसाठी लागणार भांडवल हे सुद्धा कधी कधी त्यात निघत नाही, त्यातच मुलांच शिक्षण, लग्नकार्य, पाहुन्यांचे येणे,जाणे, सण समारंभ,इत्यादी साठी पैसा पुरत नाही शेतकऱ्याचे महिन्याचे आणि वार्षिक नियोजन कोलमडून जाते. पर्यायी शेतकऱ्याना कर्ज काढावे लागते.

**सामाजिक तथ्य:** ग्रामीण भागात लोकांच्या जीवनपद्धती मध्ये रहाणीमाना मध्ये लाक्षणिक बदल घडला आहे. हल्लीच्या काळात संयुक्त कुटुंब पद्धती जाऊन विभक्त कुटुंब पध्दतीची पध्दत वाढत आहे. शेती च्या वाटपवरून भावाभावत भांडण होतात. पर्यायी मारामारी आणि खून करण्या पर्यन्त मजल जाते. जेणे करून कुटुंब उधव्यस्त होत आहेत. शहराकडे गेलेला तरुण वर्ग आपल्या आई वडिलाना सांभाळण्यास असमर्थ आहे. तुटपुंज्या पगारात त्यांना घर चालवणे परवडत नाही. त्यामुळे त्यांची आर्थिक खालावली जाते.

**शैक्षणिक तथ्य:** ग्रामीण भागात साक्षरता वाढली आहे, तरुण वर्ग जो थोडाफार दहावी बारावी पर्यन्त शिक्षण घेतलेला आहे. तो शेती व्यतिरिक्तही दुसर काही तरी करण्याच्या प्रयत्नात आहे. तो नोकरी किंवा व्यवसाय करतो. स्पर्धा परिक्षा देऊन चांगल्या हुद्यावर पोहचण्याचा प्रयत्न करतो, पोलिस, भरती, तलाठी, ग्रामसेवक इ.बनण्याचा प्रयल करत आहे. त्यामुळे रोजगाराच्या शोधात शहराकडे स्थळांतर वाढले आहे. शिक्षणाचे महत्व ग्रामीण पालकांना समजले आहे. त्यामुळे ते आपल्या मुलांना उच्च आणि चांगल्या दर्जाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न करत आहेत. ग्रामीण भागातील महिला या बचतगटा च्या माध्यमातून, स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्वतःला सक्षम् करत आहेत. काही शासकीय योजनांमुळे सुद्धा रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत . शाळा-महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण, व्यवसायीक प्रशिक्षण कौशल्य विकास इ. महाविद्यालये वाढले आहे. आय.टी.आय, पोलिटेक्नीक त्यांची कॉलेजेस सुध्दा वाढले आहे. त्यामुळे रोजगार उच्च शिक्षण आणि मुलींच्या शिक्षणात हि वाढ झाली. उच्च शिक्षण घेतलेला मणूस पुन्हा गावाकडे यायला तयार होत नाही .

**निष्कर्ष:** या संशोधनातून असे आढळून येते की ग्रामीण भागातील युवक - तरुण वर्ग, महिला वर्ग हा फक्त शेती-वरच अवलंबून राहू इच्छित नाही. तो उपजिवीकेची साधने शोधून काढत आहे. आणि ती पूर्णत्वास हि नेत आहे .करण कि फक्त शेतीवर (बे भरवशाच्या ) अवलंबून राहिल्यास, तो कर्जबाजारी झाल्या शिवाय रहाणार नाही. त्याची आर्थिक, सामाजिक, आणि शैक्षणिक प्रगती होणार नाही. त्यामुळे शेतीवरील अवलंबित्व कमी होणे ही सकारात्मक बाब आहे. ज्या मुळे ग्रामीण जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे. त्यामुळे ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था सुधारेल व 'लोकाचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

**शिफारशी:** १) सरकारने ग्रामीण भागात योग्य प्रकारे जनजागृती करणे गरजेचे आहे . त्याच बरोबर विविध सामाजिक संस्थाना हाताशी घेऊन किमान कौशल्य विकास कार्यक्रम राबवावेत. २) ग्रामीण भागातील उपलब्ध संसाधनाचा योग्य तो वापर करून काही मार्गदर्शक तत्वे निर्माण करावी. जेणे करून भविष्यात त्याचा उपयोग होईल. ३) ग्रामीण भागातील युवकांना ३६५ दिवस काम नसते. उन्हाळ्याचे ३ महिने ते बिनकामाचे असतात त्या काळात जिल्हानिहाय तांत्रिक शिक्षण दिले गेले पाहिजे. ४) चीन, जपान या ठिकाणी मजल्याची शेती सरास केली जाते.अशी कल्पना घेऊन ती भारतात राबवावी,जेणे करून कमीत कमी क्षेत्रफळ असलेल्या ठिकाणी जास्तीत जास्त पिकांचे उत्पन येईल.आणि नफा सुद्धा जास्त होईल. ५) ग्रामीण भागात जागोजागी टिबक सिंचन लावावे,ग्रीन हाऊस उभे करावे. ६) शेतीमालाला योग्य हमीभाव द्यावा .शेतकऱ्यांची पिळवणूक करू नये. शेतीचा विमा उतरावावा. जेणे करून दुष्काळात तो कामास येईल.

## संदर्भ सूची:


१) देशमुख प्रभाकर (२०१२), भारताची अर्थ व्यवस्था, नागपूर, पिंपाळपुरे अँड कंपनी पब्लिशर

२) कविमंडळ विजय (२०१२), कृषि अर्थशास्त्र, नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.

३) पंडित शांता आणि पाटील लीला (१९९२), कृषि अर्थशास्त्राची मूलतत्वे, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

४) गाढे नारायण नामदेव "मका उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन:विशेष संदर्भ नाशिक जिल्हा. (Ph.D. Thesis २०१४ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)

५) ग्रामीण विकास, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळ

६) कृषि विद्यापीठातील निर्णय प्रक्रिया, पुस्तक क्र. ७, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक


# नागरी समाज आणि परिवर्तन

**प्रा.डॉ.विनोद काळू निरभवणे** प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग प्रमुख,नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय,नाशिक रोड, नाशिक

**गोषवारा:** नाशिक शहराच्या जवळ १५ ते २० किलोमीटरच्या परिसरात असणारी गावे म्हणजे चांदगिरी, कोटमगाव व जाखोरी या गावांमध्ये शेती, कुटीर उद्योग, सामाजिक सांस्कृतिक सुधारणा, स्वच्छता, महिला व मुलांचे शिक्षण, राजकीय, धार्मिक कार्य, जातीय सलोखा तरुण मुलांचे शिक्षण व्यवसाय नोकरी या आधारावर मागील पंधरा वर्षात झालेल्या बदलांचा अभ्यास केला आहे.

**मुख्य शब्द** - हागणदारी मुक्त गाव, शेतीची कामे, शेतीचे तुकडीकरण, मुलांच्या विवाहाची समस्या, शहरांची वाढ.

**प्रस्तावना:** नाशिक तालुक्यातील व शहराच्या जवळ असणाऱ्या चांदगिरी, कोटमगाव व जाखोरी या गावांचा सातत्याने पंधरा वर्ष राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अभ्यास केला आहे. शासन व विद्यापीठाकडून ठरवून दिलेल्या हागणदारी मुक्त गाव या अनुषंगाने इतर विविध योजनांची अंमलबजावणी प्रत्यक्ष स्वरुपात करण्यात येवून तिचे परिणाम व महत्व अभ्यासण्यात आले आहे. प्रत्येक

गावातील संपूर्ण आणि सर्व कुटुंबांचा अभ्यास केला आहे. व या योजनांमध्ये स्वच्छतेचे महत्व पटवून देणे, स्वच्छतेअभावी होणाऱ्या आजारांची माहिती देणे, स्वच्छता गृहांचा वापर करणे बाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. यात स्त्रीयांसाठी स्वच्छता गृहांची आवश्यकता स्त्रिया व कुटुंबातील पुरुष सदस्यांना पटवून देणे, स्वच्छता गृह घराजवळ बांधण्याबाबत तसेच नवीन घर बांधतांना त्यात स्वच्छता गृह असले पाहिजे याबाबत जाणीव जागृती करण्यात आली. यात दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय हिवाळी शिबिरातून या गावांमध्ये राहून स्वच्छता या विषयावर काम केले आहे. यात पन्नास विध्यार्थीनी व पाच प्राध्यापक यांचे लहान गट करून गावातील प्रत्येक कुटुंबात जावून स्वच्छतागृह आहे कि नाही व ते बांधणे आणि वापरणे आरोग्यासाठी किती महत्वाचे आहे यावर भर देण्यात आला. उघड्यावर शौचास बसल्यामुळे आजारांचे प्रमाण वाढते, गावात रस्त्यांच्या कडेला दुर्गंधी पसरते व यात थंडी ताप खोकला सर्दी यासारखे आजार पसरतात. गावात आरोग्याबाबत सर्व रोग निदान शिबीर आयोजित करणे या सारखे उपक्रम राबविले आहेत.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:** १. नाशिक तालुक्यातील नाशिक शहराच्या जवळील गावांमध्ये झालेल्या सामाजिक, आर्थिक राजकीय शैक्षणिक आरोग्य यामध्ये झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे. २. रस्ते, पाणी, विज्ञान तंत्रज्ञान, वाहतूक व्यवस्था, शहरीकरण यामध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनात शेतकऱ्यांची व त्यांच्या कुटुंबाची समाजिक,शैक्षणिक, आर्थिक व आरोग्य विषयक झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करण्यासाठी सहभागी व असहभागी संशोधन पद्धती वापरली आहे. प्रत्यक्ष मुलाखती व कुटुंबांचा सर्व्हे केला आहे तसेच गावातील विविध पैलूवर तज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आलीत. चर्चा सत्र घेणे, समूह चर्चा, या अभ्यासात प्रायोगिक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. सदर संशोधन पेपर मध्ये प्राथमिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे व दुय्यम साहित्याचादेखील उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधन साहित्याचा आढावा:** उदारीकरणानंतरचा महाराष्ट्र बदलती ग्रामीण राजकीय अर्थव्यवस्था या युनिक अकॅडेमी ने प्रकाशित केलेल्या पुस्तकात संपूर्ण महाराष्ट्रातील प्रातानिधिक स्वरुपातील गावांचा अभ्यास केला आहे. शेतीचे तुकडीकरण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळेही शेतीचे प्रमाण प्रत्येक कुटुंबासाठी कमी झाले आहे यातच प्रत्येक पिढीमध्ये शेतीचे वाटप कुटुंबांमध्ये होत असल्यामुळे शेतीसाठी लागणारे भांडवल, साहित्य हे अधिक महागडे व परवडणारे नसते आणि म्हणून घरातील पुरुषांना व मुलांना शेती व्यतिरिक्त इतर कामांचा शोध घ्यावा लागतो. मुलांचे शिक्षण, कामाची क्षमता, तसेच शेती व घराच्या जवळचे कामाचे ठिकाण, कामाची उपलब्धता बघून थोड्याफार पगारात, मजुरीत तसेच कंत्राटी स्वरूपात काम मिळवले जाते. यातून शेतीचा खर्च व दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या वस्तूंवर पैसे खर्च होतात. यामध्ये मुलांचे शिक्षण व आरोग्य यांचाही समावेश होतो. विविध कार्यक्रम, सण उत्सव साजरे करणे यासाठीही पैशांची आवश्यकता असते. दुधाचा व्यवसाय जास्त सोयीस्कर या कुटुंबांना ठरला आहे. दूध गावातल्या डेअरीमध्ये विकले जाते त्याबरोबर शहरांमध्येही येथील दुधाचा पुरवठा केला जातो. घरोघरी जाऊन दूध वाटले जाते कारण दुधाचा व्यवसाय हा शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर ठरलेला आहे कारण थोड्याफार शेतीतून गाय, म्हैस यासाठी लागणारे वैरण पिकवले जाते आणि त्यावर होणारा खर्च कमी होतो. काही शेतकऱ्यांनी आपल्या मुलांना तांत्रिक शिक्षण दिले आहे. त्याबरोबर शिक्षण संस्था, बँका, कंपनी, सरकारी कार्यालये यामध्ये मुलांना तात्कालीक तसेच कायमस्वरूपी नोकरी काही मुलांना मिळालेल्या आहेत. नोकऱ्या मिळवणारी मुले शहरात येऊन वास्तव्य करतात त्याबरोबर आपली शेती ही सांभाळतात. काही कुटुंबातील मुले ही उद्योग व्यवसाय तसेच नोकऱ्यांमध्ये स्थिरावली आहेत. त्याबरोबर काही प्रमाणात मुलांनी पोलीस, सैन्य भरती तसेच इतर शासकीय नोकऱ्यांमध्ये प्रवेश मिळवला आहे.

**शिक्षण आणि परिवर्तन:** नाशिक रोड आणि नाशिक शहराच्या जवळ असल्यामुळे मुलं येथील शाळेत महाविद्यालयात येत असतात आणि दररोजच्या दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या वस्तूंसाठी नाशिक रोड मध्ये या गावातील लोकांचा वावर असतो. शेतीसाठी लागणारे साहित्य, घरातील वस्तूंची खरेदी इत्यादी कारणांसाठी आणि मुलांच्या शिक्षणासाठी येथे शेतकरी कुटुंबांनी वास्तव्य केलेले आहे या गावांची ऐतिहासिक पार्श्वभूमी बघता पंधरा वर्षांपूर्वीची परिस्थिती ही स्वच्छतेबाबत फारशी चांगली नव्हती. पण महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत स्वच्छता मोहिमेचे कार्यक्रम राबविले त्याबाबत जनजागृती केली आणि ही गावे जवळपास ९०% हागणदारी मुक्त झालेली आहेत. गावामध्ये पर्यावरणाबाबतही जाणीव जागृती करण्यात आली. व्यसन आणि शिक्षणाबाबतही प्रसिद्धी करण्यात आली त्याचबरोबर राजकीय सलोखा निर्माण करण्यासाठी महाविद्यालयाकडून प्रयत्न करण्यात आले. पंचायत समिती, जिल्हा परिषद येथील अधिकाऱ्यांसमवेत या गावांचा, ग्रामपंचायतींचा संपर्क आला आणि त्यांचा सहभाग वाढला यामुळे काही तरुण मुलांनी ग्रामपंचायतीच्या मार्फत सहभाग घेऊन गावाच्या विकासासाठी प्रयत्न केलेत. पाण्यासाठीचा प्रश्न सोडवणे, विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय उभे करणे, शासकीय पातळीवर ग्रामीण भागासाठी आवश्यक असणाऱ्या योजना राबविणे त्यांचा निधी मिळविणे, वेळोवेळी लोकांना विविध ग्रामपंचायतचे कर भरण्याबाबत जागृत करणे, गावात सामाजिक व राजकीय सामाजिक सलोखा राखणे यावर लक्ष दिले आणि त्यातून मोठा बदल घडून आला.

**औद्योगिकरण आणि परिवर्तन:** नाशिक शहराच्या जवळ सिन्नर, सातपूर, अंबड, दिंडोरी, गोंदे दुमाला इत्यादी ठिकाणी औद्योगिक वसाहती उभारलेल्या आहेत या उद्योगांसाठी लागणारे मनुष्यबळ हे बाहेरून येत असले तरी स्थानिक शेतकरी कुटुंबातील मुलांची संख्या देखील या कामांमध्ये जास्त आहे तसेच काही शेतकरी कुटुंबांनी कंपन्यांसाठी जागा भाड्याने दिल्या आहेत तर काही शेतकरी मुलांनी आपले छोटे उद्योग स्थापन केले आहेत. नाशिक येथील सह्याद्री कंपनी शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे दिंडोरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी कंपनीच्या देखरेखीखाली पिकवलेली द्राक्ष ही आंतरराष्ट्रीय बाजारात पाठविले जातात तसेच भाजीपाला देखील पाठविला जातो. यामुळे येथील शेतकऱ्यांना यातून चांगले उत्पन्न मिळवता येते. सह्याद्री कंपनीत येथील शेतकऱ्यांचे शेअर्स

आहेत तसेच कंपनीत शेतकऱ्यांच्या मुलांना तसेच स्त्रियांना येथे नोकरी मिळते. शेतीच्या जोडीला कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, हॉटेल, किराणा दुकान तसेच उद्योगांना सेवा देणारे छोटे उद्योग चालविले जातात यातून नाशिक तालुक्यातील या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या विकासाला चालना मिळाली आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीत मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. विविध गावांमध्ये चालणाऱ्या छोट्या उद्योगांमध्ये बाहेरच्या राज्यातील मजूर काम करतात आणि नाशिक शहराच्या जवळपासच्या तालुक्यांमध्ये चांगल्या प्रकारे औद्योगिक वसाहती स्थापन झाल्या आहेत. काही शेतकरी कुटुंबे विवाहासाठी उद्योगधंद्यासाठी घर बांधण्यासाठी जमिनीचा तुकडा विकतात व त्यातून येणारा पैसा हा आपल्या स्वतःच्या गरजा भागविण्याबरोबर उद्योगधंद्यासाठी, व्यवसायासाठी भांडवल तयार केले जाते. त्यातून मुलांचे शिक्षण, आरोग्य तसेच चांगल्या स्थितीत जीवन जगण्यासाठी या पैशांचा वापर केला जातो.

**शेतीची विक्री:** शेतीचे तुकडीकरण, अधिकचा पाऊस, शेतीमालाला भाव नसणे, शेतीसाठी लागणारे अधिक भांडवल व त्यातून होणारे कर्ज यामुळे बऱ्याच प्रमाणात जास्तीच्या भावाने बांधकाम व्यवसाय व व्यापारी यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी गुंठ्या स्वरूपात, एकरी स्वरूपात विकत घेतलेल्या आहेत. शेतीचे बिगर शेती क्षेत्र म्हणून आणि त्याचे प्लॉट करून या जमिनीवर इमारती उभ्या केल्या आहेत. काही गावे ही नाशिक महानगरपालिकेत समाविष्ट झाली आहेत यात काही शेतकरी वर्गाने रस्त्याच्या कडेला, हायवेला असणारी जमीन येथे हॉटेल, छोटे व्यवसाय, उद्योग यांच्यासाठी जमीन जागा कराराने भाडे तत्वावर दिली आहेत. जमिन विकून आलेल्या पैशांमधून मुलांचे शिक्षण, आरोग्य विवाह व कुटुंबाचा खर्च भागवला जात असतो त्यातून काही कुटुंबांनी उद्योग व्यवसाय उभे केले आहेत. महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या परिषदांमध्ये ग्रामपंचायतीच्या सहभाग वाढवणे यामुळे शेतीच्या विकासासाठी व गावाच्या विकासासाठी विविध योजनांचा निधी योग्य प्रकारे वापरण्याची काळजी घेण्यात आली. राजकीय व्यक्तींशी संपर्क करून त्यांच्याकडूनही काही निधी मंजूर करून घेण्याचे काम येथील ग्रामपंचायतच्या माध्यमातून करण्यात आले. या गावांना स्वच्छतेबाबतचे पुरस्कार तसेच पर्यावरणाबाबतचे पुरस्कार मिळविण्यात आले. जाखोरी या गावाला वर्तमानपत्र व टीव्ही चॅनेलवर चांगली प्रसिद्धी मिळाली. येथील तरुण नेतृत्वाने याबाबत चांगला सहभाग घेऊन गावात विविध सोयी सुविधा निर्माण करणे व बिनविरोध राजकीय निवडणुका करणे यामुळे संपूर्ण गावाचा यात सहभाग राहिला आहे.

**पिण्याचे पाणी आणि आरोग्य:** जाखोरी व चांदगिरी या गावांमध्ये पाण्याचा पुरवठा चांगला आहे तर कोटमगाव या गावामध्ये एकलहरे विज निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या कोळशाची राख येथील टेकड्यांवर पसरवण्यात आली आहे व ती राख पाण्यामध्ये उतरली असून ती विहिरींमध्ये तसेच पिण्याच्या पाण्यात व शेतीमध्येही पसरली आहे आणि म्हणून हे पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही. या गावाला नाशिक रोड व इतर ठिकाणाहून पिण्याच्या पाण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. चांदगिरी आणि जाखोरी या गावांच्या जवळून दारणा नदी असल्यामुळे त्यांना शेतीसाठी व पिण्यासाठी बारमाही पाण्याची उपलब्धता आहे. शेतीमध्ये भाजीपाला पिकवणे व इतर अन्नधान्य पिकवली जातात आणि ती नाशिक शहरातील भाजी मार्केट तसेच आठवडे बाजारात किरकोळ स्वरूपात विक्री केले जातात. त्याबरोबर दुधाचा व्यवसाय आणि इतर व्यवसाय किरकोळ स्वरूपात केला जातो. बेन्जॉय देसाई फाउंडेशन अंतर्गत येथील गावांनी दहा लाखांचे स्वच्छ पिण्याच्या पाण्याचे प्युरिफायर बसविले आहे व ग्रामपंचायतच्या मार्फत अतिशय अल्प दरात गावाला पिण्याचे पाणी दिले जाते यामुळे मोठ्या प्रमाणात आरोग्याचा प्रश्न सुटला आहे. गावामध्ये स्वच्छतागृह उभारणे, शाळा उभारणे, अंगणवाडी सुधारणे रस्ते बांधणे, गावात स्वच्छता राखणे, ग्रामपंचायत कार्यालय तसेच तलाठी, शासकीय अधिकारी, ग्रामसेवक यांच्याशी संपर्क करून गावातील व्यक्तींसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, दाखले उपलब्ध करून देणे व पंचायत समिती ग्रामपंचायत जिल्हा परिषद यांच्या अधिकाऱ्यांमार्फत तसेच स्वतः संपर्क करून विविध योजना राबवण्यासाठी प्रयत्न केले आहेत व ते यशस्वी झाले आहेत.

**गावातील सुविधा:** गावासाठी विविध कार्यक्रम घेण्यासाठी हॉल बांधणे, गावातून वर्गणी गोळा करून मंदिरांची उभारणी करणे, त्याबरोबर गावात चांगले वातावरण राहावे यासाठी भजनी मंडळ तयार करणे, नवीन मुलांवरती शिक्षणाबरोबर चांगले संस्कार करण्यासाठी त्यांना भजन कीर्तन तसेच शारीरिक व्यायाम, विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणे, मुलांना मुलींना शारीरिक क्षमता वाढविणे खेळांचे आयोजन करणे यासाठी कुटुंबातून प्रयत्न केले आहेत. मुलांना शासकीय नोकरी मिळवणे, स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होणे, मुलांच्या क्षमतानुसार त्यांच्यात तशी जागृतता निर्माण केली आहे. गावात उभ्या केलेल्या संसाधनांची नासधूस होणार नाही त्याचा योग्य वापर होईल यासाठी सातत्याने लक्ष दिले जाते. मुले ही व्यसनाकडे जाणार नाहीत तसेच कोणत्याही कुटुंबांमध्ये मोठ्या प्रमाणात वादविवाद होणार नाहीत सलोख्याने हे सर्व प्रश्न सुटतील याकडे लक्ष दिले जाते. एक प्रकारे सामाजिक शैक्षणिक आर्थिक विकासासाठी जागृतता येथील गावांमध्ये पाहायला मिळते. मुले शाळा महाविद्यालय तसेच इतर ठिकाणी तसेच घरच्या शेतीतील कामांमध्ये हातभार लावत असतात.

**शेतीची कामे:** नाशिक तालुक्यातील शहराच्या जवळील असणारे गावे म्हणजे गिरणारे, आडगाव, मखमलाबाद, चांदसी, सय्यद पिंपरी, सामनगाव, शिंदे, पळसे, चांदगिरी जाखोरी, कोटमगाव इत्यादी गावांमध्ये शेती ही घरातील स्त्रियांवरच अधिक प्रमाणात अवलंबून आहे. शेतीची निगराणी करणे, भाजीपाला पिकवणे, इतर नगदी पिके घेणे, कांदे लावणे, गुरांचा सांभाळ करणे, घराचा सांभाळ करणे, त्याबरोबर शेतीसाठी लागणारे मजूर सांभाळणे त्यांची देखभाल करणे ही कामे स्त्रियांना अधिक प्रमाणात करावी लागतात. शहराचा होणारा विस्तार आणि जमिनीचे होणारे तुकडीकरण त्यातून जाणारे रस्ते यामुळे येथील कुटुंबांना आपल्या शेती क्षेत्राचे मोठे नुकसान सोसावे लागले आहे आणि इतर व्यवसाय नोकरी करण्यासाठी प्रयत्न करावे लागले. शेतीमालाच्या वाहतुकीसाठी काही मुलांनी गाड्या घेणे आणि त्याची भाडेतत्त्वावर वाहतूक करणे शेतीबरोबर मुलांना शाळेत सोडवण्यासाठी रिक्षा चालवणे, बस घेणे, हॉटेल व्यवसाय करणे, किराणा दुकान सुरू करणे, कम्प्युटरवर येणारी सरकारी कामे करणे, याबरोबर इतरही

अनेक व्यवसाय या नवीन तरुण पिढीने केले आहेत व त्यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. कुटुंब सांभाळून आपली पत राखून तरुण मुले वर्तन करतात.

**मुलांच्या विवाहाची समस्या:** शेतकरी कुटुंबातील जी मुले फक्त शेती करतात त्यांच्या विवाहाचा प्रश्न तयार झाला आहे आणि म्हणून मुलांना शेतीबरोबर काही नोकरी करणे, व्यवसाय करणे भाग पडते आहे आणि यामध्ये मुलींचे प्रमाण कमी झाल्यामुळे इतर दूरच्या गावांमधून, नातेसंबंधातून मुली शोधल्या जातात व मुलांचे विवाह केले जातात म्हणजेच यामुळे शेती क्षेत्राचे महत्त्व हे दुय्यम समजले जाते आणि उद्योग व्यवसायासाठी आणि स्थिर जीवनासाठी शिक्षणाला व नोकरी व्यवसायाला अधिक महत्त्व दिले आहे.

**शहरांची वाढ:** शहरीकरणाच्या वाढीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनी विकल्या जात आहेत व त्यांना जमिनी विकण्यास भाग पाडले जाते. यामध्ये अधिक जमीन त्यांनी विकावी म्हणून ज्यादा स्वरूपात पैसे दिले जातात या जमिनी बिगर कृषी क्षेत्र म्हणून एखादा प्लॉट विकला जातो व त्या ठिकाणी बिल्डिंग उभी केली जाते त्याचा परिणाम इतर जमिनीवर होतो आणि ती जमीन पाहिजे त्या प्रमाणात पीक देत नाही किंवा घेता येत नाही आणि त्या इतर प्लॉटही जमिनीचे विकण्यास भाग पाडले जाते. नाशिक शहराच्या जवळचे तालुके म्हणजे सिन्नर, दिंडोरी, निफाड, त्रंबकेश्वर ही आहेत या तालुक्यांमधील व गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनीचा वापर कंपन्या, उद्योगधंदे उभारण्यासाठी, शाळा,महाविद्यालये, दवाखाने व रहिवासी स्वरूपातील इमारती बांधण्यासाठी करण्यात आला आहे. एमआयडीसी असलेल्या ठिकाणांवरती असलेल्या जमिनी या शासनाने घेतलेल्या आहेत परिणामी येथील कुटुंबांना तेथून बाहेर जावे लागले आहे.

**भूमिहीन शेतकरी:** नाशिक शहराच्या आजूबाजूच्या गावांमध्ये असणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या जमिनी विकाव्या लागल्या आहेत. त्यामुळे शेती व्यतिरिक्त इतर व्यवसाय, नोकरी करणे या कुटुंबांना भाग पडले आहे आणि हे शेतकरी भूमिहीन झाले आहेत अशा कुटुंबातील स्त्रियांना मुलांना स्वतःचा छोटा व्यवसाय उभारणे किंवा इतर ठिकाणी नोकरी करणे भाग पडले आहे यात चांगले शिक्षण असणाऱ्या स्त्रिया व मुलांना चांगल्या पगाराची नोकरी कंपनी, शाळा महाविद्यालय इत्यादी ठिकाणी मिळते तर शिक्षणाचा दर्जा कमी असणाऱ्या स्त्रिया व मुलांना कमी पगाराची नोकरी मिळाली आहे शेतकरी कुटुंबांनी आपल्या जागेत घरे बांधून ती भाड्याने दिली आहेत यातूनही चांगले उत्पन्न या कुटुंबांना मिळते शिक्षणासाठी येणाऱ्या मुलांना डबे देणे त्यांच्या राहण्याची व्यवस्था करणे त्याबरोबर मेडिकल कॉलेज इंजिनिअरिंग कॉलेज महाविद्यालय ही नाशिक शहरात व शहराच्या आजूबाजूला चांगल्या प्रमाणात उभारली गेली आहेत आणि म्हणून या कुटुंबांना रोज व्यवसायासाठी चांगली जागा निर्माण झाली आहे रोजगाराची उपलब्धता यातून शेतकरी कुटुंबांना झाली आहे तसेच शाळा महाविद्यालयात शिक्षक, क्लर्क, प्रोफेसर, ड्रायव्हर, शिपाई अशा नोकऱ्या उपलब्ध आहेत तसेच कंपनीत देखील शेतकरी कुटुंबातील व्यक्तींना चांगल्या नोकऱ्यांची उपलब्धता झाली आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबाचे जीवनमान या शेतकरी कुटुंबांना उंचावता आले आहे.

**जमिनीचा शासकीय मोबदला:** शासनाकडून रस्ते महामार्ग तसेच इतर प्रकल्पांसाठी जमीन घेतल्यानंतर शासनावर दबाव टाकून एकत्रित येऊन शासकीय यंत्रणेला कायदेशीर व स्वतःच्या जीवाची पर्वा न करता विरोध केला आहे त्यामुळे शासनाकडून चांगला मोबदला मिळविण्यात शेतकरी कुटुंबे यशस्वी ठरली आहेत. या माध्यमातून शेतकरी कुटुंबांना पैसे मिळाल्यामुळे त्याचा उपयोग शेतीच्या भांडवलासाठी व त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती व जीवनमान सुधारण्यासाठी झाला आहे. समृद्धी महामार्गासाठी शासनाने ज्या जमिनी घेतल्या त्या कुटुंबांना चांगल्या प्रकारे पैसे मिळवता आले आहेत. काही कुटुंबांनी यातून नवीन उद्योग व्यवसाय उभारले तर काही कुटुंबांचे जीवन जगण्याचे साधन हिरावले गेले आहे.

**शेतकरी कुटुंबातील मुले शासकीय नोकरीत:** सिन्नर तालुक्यात शेतकरी कुटुंबातील मुलांनी पोलीस सैन्य तसेच शासकीय नोकऱ्यांना अधिक प्रमाणात प्राधान्य दिले आहे आणि म्हणून सिन्नर तालुक्यात खूप मोठ्या प्रमाणात मुलांना प्रशिक्षण देणाऱ्या स्वयंसेवी संस्था आहेत. तसेच नाशिक शहर व इतर जवळपासच्या ठिकाणांवरही या प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. या प्रशिक्षण संस्थांमुळे शेतकरी कुटुंबातील मुलांना प्रशिक्षण देऊन सैन्यात, पोलीस व इतर शासकीय नोकऱ्यांमध्ये प्रवेश करता येतो त्यामुळे ही मुले शासकीय नोकऱ्यांमध्ये स्थिरावली जातात व मोठ्या पदांवर देखील या मुलांना प्रवेश करता येतो व स्थिर जीवन जगण्याचा मार्ग निवडता येतो यामुळे काही शेतकरी कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळाले आणि आपल्या गावाचा व तालुक्याचा विकास करता आला आहे. सिन्नर मधील माळेगाव, मुसळगाव येथे एकूण 1000 पेक्षा अधिक कंपन्या आहेत मोठ्या प्रमाणात या तालुक्यातील मुले या कंपन्यांमध्ये छोटी मोठी कामे करतात. त्याबरोबर उद्योग देखील स्वतःचा काही मुलांनी उभा केला आहे आयटीआयचे प्रशिक्षण देणाऱ्या शासकीय व स्वयंसेवी संस्था या सिन्नर मध्ये आहेत. येथील मुले आयटीआयचे शिक्षण घेतल्यानंतर या कंपन्यांमध्ये पंधरा ते वीस हजार रुपये पगाराच्या नोकऱ्या करत आहेत. शाळा महाविद्यालयांचे प्रमाण देखील सिन्नर तालुक्यामध्ये वाढले आहे.

**सेवा व्यवसायात वाढ:** सिन्नर येथे कंपन्या असल्यामुळे बाहेरून कामासाठी येणाऱ्या मजूर व कामगारांना, नोकरदारांना घरे व इतर सुविधा पुरविण्याचे काम देखील येथील शेतकरी कुटुंबे करतात. आर्थिक स्तर येथील शेतकरी कुटुंबांचा वाढलेला आहे तालुक्यांचे ठिकाण हे बाजाराचे ठिकाण असल्यामुळे अनेक छोटे-मोठे उद्योग व्यवसाय काही शेतकरी कुटुंबातील मुलांनी उभारले आहेत किमान शेतकरी कुटुंबातील मुलांचे दहावी ते बारावी पर्यंत शिक्षण होत असते काही मुलांनी आणि मुलींनी उच्च शिक्षण देखील घेतले आहे मोठ्या प्रमाणात ही कुटुंबे शहरात स्थायिक झाली आहेत.

**गावांचे परिवर्तन:** राजकीय घटकांचा प्रभाव देखील शेतकरी कुटुंबांवर झालेला आहे आपल्या भागातील गावातील ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद यामध्ये काही शेतकरी कुटुंबांचे त्यांच्या नातलगांचे वर्चस्व राहिले आहे त्याचाही फायदा शेतकरी कुटुंबांना छोटे-मोठे उद्योग उभारणे, नोकरी व व्यवसाय मिळविण्यामध्ये होत असतो म्हणजेच बँकांमधून कर्ज घेणे आणि नवीन उद्योग उभारणे त्यासाठी लागणारे भांडवल व प्राथमिक सोयी सुविधा मिळवता येतात.

म्हणजेच शेतकरी कुटुंबांना आपल्या जमीन मालकी बरोबर राजकीय सत्ता देखील मिळवता आली आहे. आजही अल्प भूधारक शेतकरी असला तरी काही प्रमाणात त्याने आपली जागा जमीन ही उद्योग व्यवसायासाठी टिकवून ठेवली आहे. निवडणुकीच्या माध्यमातून काही कुटुंबांना राजकीय फायदा झाला आहे. त्यातून अधिक प्रमाणात पैसा मिळवणे, मुलांचे शिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षण, डॉक्टर वकील इंजिनियर उद्योगपती बांधकाम व्यवसाय अशा व्यवसायांमध्ये शेतकरी कुटुंबातील मुले स्थिरावली आहेत तसेच राजकीय पक्षांवर आपले वर्चस्व टिकवून ठेवले आहे.

**रस्त्यांची सुविधा:** समृद्धी महामार्ग, नाशिक मुंबई हायवे नाशिक पुणे हायवे, नाशिक दिल्ली, नाशिक सुरत आहे यामुळे नाशिक शहराच्या जवळपासच्या गावांमधील व व व आजूबाजूच्या गावांना देखील रोजगार व्यवसाय नोकऱ्या उपलब्ध झाल्या आहेत वाहतुकीची साधने सुविधा उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांना आपला महाल भाजीपाला उत्पादने ही शहराच्या ठिकाणी नेता येतात व आपल्या शेतीमालाला जास्त किमान भाव मिळवता येतो असे असले तरी भाजीपाला साठवून ठेवण्यासाठी ही अजून गोदामे मोठ्या प्रमाणात निर्माण झाली नाहीत नाशिक शहराजवळील ओझर पिंपळगाव तसेच दिंडोरी तालुक्यातील जानोरी लखमापूर येथे शेतकऱ्यांनी आपले शेतीपूरक उद्योग उभारले आहेत तसेच नाशिक शहराच्या जवळपासची गावे ही गावांमध्येही शेतीपूरक उद्योग चालवले जातात तसेच द्राक्ष कांदा व भाजीपाला शेतकरी कुटुंबातून या तालुक्यांमधून चांगल्या प्रमाणे पिकवला जातो व निर्यातीबरोबर भारतीय बाजारपेठात बेटांमध्येही पाठवला जातो सर नाशिक शहराच्या जवळ असणारे मुंबई सुरत येथे भाजीपाला पाठवला जातो तसेच कांदा द्राक्ष ही भारतभर व भारताच्या बाहेरही पाठवली जातात एकूण नाशिक जिल्ह्यातील वरील तालुक्यांमध्ये ग्रामीण भागातील बदलाचे स्वरूप हे विकासाकडे जाणारे आहे.

**शेती व्यवसाय व विविध उद्योगधंदे:** यामुळे नाशिक शहराच्या जवळच्या तालुक्यांमधील शेतकरी कुटुंबांची आर्थिक सामाजिक शैक्षणिक व आरोग्य विषयक स्थिती सुधारलेली आहे नाशिक शहरातील महिंद्रा मायको यासारख्या कंपन्या मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण केला आहे त्यामुळे शहराच्या विकासाबरोबर ग्रामीण भागाचाही विकास झाला आहे त्याबरोबर शासकीय योजनांचे फायदे देखील शेतकरी कुटुंबांना मिळवता आले आहे यामध्ये शासकीय स्वरूपाची कंत्राटे मिळवणे शासकीय नोकऱ्या मिळविणे कंपन्यांची कंत्राटी मिळवणे शेतीतून होणारी नुकसान भरपाई मिळवणे घरकुल योजना अशा योजनांचाही फायदा अधून मधून या अल्पभूधारक शेतकऱ्यांना होत असतो मागील वर्षापासून सुरू झालेली लाडकी बहीण योजना योजनेचा फायदा शेतकरी कुटुंबांना चांगल्या प्रमाणात झाला आहे यातून बऱ्याच प्रमाणात स्त्रियांना आपले आरोग्य आपले जीवनमान व कुटुंबाची आर्थिक परिस्थिती ही सुधारण्यासाठी उपयोग झाला आहे यातून काही स्त्रियांनी स्वतःचे उद्योग छोटे व्यवसाय सुरू केले आहेत व आपसात होणारी भांडणे ही काही प्रमाणात कमी झाली आहेत एका घरात जर चार स्त्रिया असतील तर त्याचा एकत्रित हिशोब करून सण उत्सव साजरा करणे मुलांच्या मुलींच्या गरजा भागविण्यासाठी स्वतःचा मानसन्मान स्त्रियांना स्वतःचा मानसन्मान मिळवण्यासाठी या योजनेचा फायदा झाला आहे स्वतःच्या हक्काचे पैसे म्हणून देखील त्याकडे पाहिले गेल्यामुळे कुटुंबामध्ये एक प्रकारे स्त्रियांना बऱ्यापैकी मानाचे स्थान प्राप्त झाले आहेत कारण घरातली कामे शेतीची कामे यासाठी कोणत्याही स्वरूपाचं वेतन किंवा रोजगार किंवा पैसा मिळत नाही

**निष्कर्ष:** १. नाशिक शहराच्या जवळपास असणाऱ्या तालुक्यातील शेतकरी कुटुंबांचे जीवनमान राहणीमान आर्थिक दर्जा आरोग्यविषयक दर्जा हा उंचावला आहे. २. शहरीकरणाच्या विस्तारीकरणामुळे गावांचे रूपांतर हे शहरांमध्ये झाले आहे. म्हणून काही शेतकरी कुटुंबे आपल्या मूळ गावातून शहरात स्थलांतरित झाली आहेत. शेती क्षेत्राशी काही कुटुंबांचा संपर्क राहिलेला नाही शहरीकरणात ग्रामीण भागातील गावे सामावली गेली आहेत. नाशिक शहरात ही गावे आली आहेत व तसेच नाशिक शहरातील आजूबाजूच्या गावातील लोकांच्या विरोधामुळे तेथे काही ठिकाणी ग्रामपंचायत ही कायम राहिली आहे पण ते गाव शहरात सामावले गेले आहे.

**संदर्भ-**


१) प्राथमिक स्रोत – राष्ट्रीय सेवा योजना अहवाल २०१० ते २०१८ व २०२१ ते २०२५ महिला महा. नाशिक रोड

२) मुक्ता कुलकर्णी आणि विवेक घोटाळे, २०२५, उदारीकरणानंतरचा महाराष्ट्र बदलती - ग्रामीण राजकीय अर्थव्यवस्था, द युनिक फाउंडेशन, पुणे

३) रमेश पाध्ये आणि अमित नारकर, २०१८ महाराष्ट्रातील पाण्याचा प्रश्न, युनिक फाउंडेशन प्रकाशन, पुणे

४) प्रदीप पुरंदरे, २०२२, महाराष्ट्रातील कालवा सिंचन, युनिक फाउंडेशन, प्रकाशन पुणे

५) डॉ. दि.मा. मोरे, २०२५ दुष्काळाची दहा हक्क युनिक फाउंडेशन प्रकाशन पुणे

६) योगेश बिडवाई २०२१, कांद्याची रडकता द युनिक अकॅडमी पब्लिकेशन, पुणे

७) ग्रामीण आणि कृषी प्रधान भारत स्थिती अहवाल २०२० प्रथम आवृत्ती २०२३, द युनिक अकॅडमी पब्लिकेशन, पुणे

८) मुक्ता कुलकर्णी आणि केदार देशमुख २०२०, पंतप्रधान पिक विमा योजना महाराष्ट्र- एक मूल्यमापन द युनिक अकॅडमी पब्लिकेशन, पुणे

९) डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी २०२५ मी विकास यात्री, युनिक फाउंडेशन प्रकाशन पुणे

# नागरी समाजातील महिला सक्षमीकरणावर प्रभाव करणाऱ्या मुलभूत घटकांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा.डॉ. वाल्मिक धुडकु इंदासे** क्रां. वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नाशिक

**प्रस्तावना:** स्त्री स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता, महिला सक्षमीकरण, लिंग समानता व संवेदिकरण (Gender Equality and Sensitization) या संकल्पना आज आपल्याला नवीन नाहीत. या संकल्पना आज ब-या प्रमाणात रुजलेल्या दिसून येतात. सर्वसामान्यांच्या भावविश्वात, अनुभवविश्वात या संकल्पना कितपत रुजलेल्या आहेत? त्यांची स्थिती व गती कोणत्या स्तरावर पोहोचलेली आहे? यांसारख्या प्रश्नांची उत्तरे जरी नि:संदिग्धपणे देणे सोपे नसले तरीही महिला संघटना, महिला आघाडी, स्त्री आधार केंद्र, स्त्री मुक्तीची चळवळ, महिलांच्या स्वयंसेवी संस्था, महिला आरक्षण हे विषय सर्वसामान्यांना चांगलेच परिचयाचे झाले आहेत. आज सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय अशा प्रत्येक क्षेत्रात जात, वर्ग, समुदाय, लिंगभाव अधिष्ठित असलेल्या समाजरचनेवर नेमका कोणता परिणाम होत आहे किंवा परिणाम होणे अपेक्षित आहे हे तपासून बघितल्याशिवाय कोणतीही धोरणात्मक चर्चा पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे स्त्री स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता, महिला सक्षमीकरण, लिंग समानता व संवेदिकरण या संकल्पनांचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसून येत आहे. या अनुषंगाने परिवर्तनवादी विचारात व पर्यायाने धोरणात्मक विकासात दलित, आदिवासी महिला सक्षमीकरण ही संकल्पना महत्वाची ठरतांना दिसून येत आहे. आणि म्हणूनच स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाच्या कालखंडात विकास धोरणाच्या माध्यमातून नागरी समाजातील महिलांच्या सक्षमीकरणाची स्थिती व त्याची वास्तवता समजून घेणे महत्वाचे ठरत आहे.

**अभ्यास विषयाची उद्दिष्टे: १.** नागरी समाजातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे. **२.** नागरी समाजातील महिलांचे शैक्षणिक जीवन समजून घेणे. **३.** विकास धोरणातील नागरी समाजातील महिलांच्या साक्षामिकारानातील उणीवा शोधणे व त्यावर उपाययोजना सुचविणे.

**महिला सक्षमीकरणाची संकल्पना:** महिला सक्षमीकरण योग्य पध्दतीने घडून येण्यासाठी पुढील काही घटक महत्वाची भूमिका पार पाडत असतात.[१]

| महिला सक्षमीकरणाचे घटक | | | |
|---|---|---|---|
| **व्यक्तिविकास (स्वत:साठी)** | **व्यक्तिविकास (समाजाभिमुख)** | | |
| | **जाणिव व जागृती** | **नेतृत्व विकास** | **संघटन** |
| सुदृढ आरोग्य | कर्तव्यांची जाणीव | निर्णयक्षमता वृध्दी | संघटन कौशल्य |
| शिक्षण | अधिकारांची जाणीव | संपत्ती ठेवा | संघटन वृत्ती |
| आर्थिक स्वावलंबन | कायदयांची जाणीव | गुणकौशल्यांची वृध्दी | |

महिला सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी प्रामुख्याने महिलांच्या व्यक्तिगत पातळीवर व समाजाभिमुख पातळीवर व्यक्तिमत्व विकास घडवून आणणे गरजेचे आहे. त्यासाठी पुरुषांसोबतच महिलांनी देखील प्रयत्न करणे गरजेचे आहे. किंबहुना, महिलांना जोपर्यंत आपल्या व्यक्तिविकासाची जाणीव होत नाही तो पर्यंत खरं म्हणजे महिला सक्षमीकरण घडून येणे कदापिही शक्य नाही. अधिक ठळकपणे सांगावयाचे झाल्यास आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय अशा जीवनातील सर्वच क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्राप्त होणे, विकासाची संधी प्राप्त होणे तसेच मानसिक व लैगिंक दृष्टिकोनातून महिला व पुरुषांमधील विचारांमध्ये समानता निर्माण करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. महिला सक्षमीकरणात स्वत:साठीच्या व्यक्तिविकासात सुद्दढ आरोग्य, शिक्षण व आर्थिक स्वावलंबन योग्य पध्दतीने घडून येणे आवश्यक आहे. ब-याचदा महिला स्वत:च्या आहाराबाबत व आरोग्याबाबत जागृत नसलेल्या दिसून येतात. वास्तविकत: आहारावरच व्यक्तिचे शारिरीक व मानसिक आरोग्य अवलंबून असते. यासाठी महिलांचे शिक्षण योग्य पध्दतीने होणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण शिक्षणामुळे आहार व आरोग्याची जाणीव, व्याहारिक कौशल्ये, उद्योजगता, सुसंवाद, सामाजिक जडण-घडण, निर्णयक्षमता असे विविध गुण विकसित होत असतात. आधुनिक जगाची गरज पाहता मूलभूत शिक्षणासोबतच महिलांना उच्च शिक्षण, तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण मिळाल्यास ते रोजगाराभिमुख होऊन आर्थिकदृष्टया सक्षम होतील पर्यायाने महिला सक्षमकरणाची संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकते. महिला सक्षमीकरणात समाजाभिमुख व्यक्तिविकासाचे महत्व हे खूप आहे. समाजाभिमुख व्यक्तिविकासात जाणीव-जागृती, नेतृत्व विकास व संघटन हे गुण विकसित होणे आवश्यक आहे. घर, समाज व कामाच्या ठिकाणी वावरत असतांना महिलांमध्ये आपल्या कर्तव्याची, अधिकारांची जाणीव होणे गरजेचे आहे. तसेच त्यांचे कर्तव्य, अधिकार, नेतृत्व, अंगी असलेले गुण कौशल्य यांचा आदर करणे आवश्यक आहे. त्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायदयांची माहिती महिलांना मिळणे आवश्यक आहे. यांसोबतच प्रचलित कायदयांचा गैरवापर हा पुरुष व महिला या दोघांकडूनही कोणत्याही स्वरुपात होता कामा नये यासाठी त्यांच्यात जाणीव-जागृती, त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. आणि हे सर्व व्यवस्थितरित्या व्हावे यासाठी महिलांचे संघटन होऊन त्याला समाजाकडून आदर व मान्यता मिळणे महत्वाचे असते. महिला सक्षमीकरणाचे उपरोक्त घटक आत्मसात करण्यासाठी धोरणात्मक नियोजनाच्या माध्यमातून महिला व पुरुषांमध्ये उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण, जबाबदारीची जाणीव, संघर्षाचे सामर्थ्य अशा टप्प्यांतून संयमाने व निर्धाराने पूर्ण होणे गरजेचे आहे. असे झाले तरच महिला सक्षमीकरण हे योग्य पध्दतीने घडून येऊ शकते.

**धोरणात्मक नियोजन व महिला सक्षमीकरणाची उद्दिष्टे:** स्वातंत्र्यानंतर देशात विकास धोरणाची आखणी करतांना समाजाचा एक मुख्य घटक म्हणून महिलांच्या सक्षमीकरणासाठी धोरण तयार करण्यात आले. आतापर्यंत १९९४, २००१ व २०१३ असे तीन राष्ट्रीय महिला धोरण तयार करण्यात आलेले आहेत. या तीनही महिला धोरणातून महिलांचे सक्षमीकरण कशा पध्दतीचे करता येईल, त्यासाठी कोणत्या विकास धोरणांचा व योजनांचा अंतर्भाव करता येईल यांवर भर दिलेला आहे. राष्ट्रीय महिला धोरणांची प्रामुख्याने जी उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.[2] १. विविध महिला मंडळाची स्थापना करुन महिला कल्याणकारी योजनांची आखणी करणे. २. महिला सक्षमीकरणासाठी विस्तृत प्रमाणावर कृषी विकासावर भर देणे. ३. महिलांना शैक्षणिक सुविधांची उपलब्धता देवून त्यांच्या विकासावर लक्ष केंद्रित करणे व त्यात निरंतरता ठेवणे. ४. महिला संरक्षण व हितसंवर्धनासाठी महिला कल्याण आणि विकास प्राधिकरणाची स्थापना करणे. ५. आरोग्य, शिक्षण, रोजगार यांवर भर देवून महिलांचा विकास साध्य करणे. ६. औद्योगिकीकरण व जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या रोजगारासाठी आवश्यक असणारी कौशल्य, प्रशिक्षणावर भर देणे. ७. कुटुंब, समाज व कामाच्या ठिकाणी स्त्री-पुरुष समानता, लैंगिक समानता व संवेदिकरण या तत्वांना कायदयाचे बळ उपलब्ध करुन देणे. ८. २००१ हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष साजरे करुन महिला आरक्षण धोरण अंमलात आणणे. ९. स्त्री-भ्रुण हत्या, लिंग निदान चाचाणी यासंदर्भातील कायदयांची कठोरपणे अंमलबजावणी करणे. १०. ग्रामीण व दुर्गम क्षेत्रातील महिलांना रोजगार प्राप्त होण्यासाठी २०११ मध्ये राष्ट्रीय उपजिविका अभियान सुरु करुन त्यासाठी विशेष अनुदानाची तरतूद करण्यात आलेली आहे. थोडक्यात, स्वतंत्र भारताने विकास धोरणाअंतर्गत महिलांना समाजात स्वाभिमानाने वावरण्यासाठी संविधानातील तरतूदींच्या आधारे पावले उचललेली दिसून येतात. त्यामुळे महिलांना कौटुंबिक सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच स्तरावर सक्षमीकरणाची संधी मिळालेली आहे.

**धोरणात्मक नियोजन व संविधानातील महिला सक्षमीकरणाच्या तरतुदी:** स्वातंत्र्यानंतर देशात विकास धोरणाची आखणी करतांना समाजाचा एक मुख्य घटक म्हणून महिलांच्या सक्षमीकरणासाठी धोरण तयार करण्यात आले. आतापर्यंत १९९४, २००१ व २०१३ असे तीन राष्ट्रीय महिला धोरण तयार करण्यात आलेले आहेत. या तीनही महिला धोरणातून महिलांचे सक्षमीकरण कशा पध्दतीचे करता येईल, त्यासाठी कोणत्या विकास धोरणांचा व योजनांचा अंतर्भाव करता येईल यांवर भर दिलेला आहे. “२० जुलै १९४२ च्या नागपूर येथील परिषदेत भाषण करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील दलित, आदिवासी यांसारख्या वंचित समुदायातील महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल मत मांडतांना त्यांनी भारतीय समाजरचनेत बदल करण्याचे सुचविलेले आहे.”[3] आपल्या भाषणात ते पुढे मत मांडतात की, भारतातील वंचित घटकातील महिलांना सक्षम बनवायचे असेल तर सुरुवातीला भारतीय समाजातील जातीच्या आधारे जी भेदभावाची रचना तयार झालेली आहे ती अगोदर नष्ट करणे गरजेचे आहे. यांसाठी त्यांनी पाच सुत्रांचा उल्लेख केलेला आहे ज्यात स्त्री-पुरुष समानता, ज्ञाननिर्मिती (Creation of Knowledge), संपत्ती व संसाधनांचे समान व न्याय वाटप, जातीय मानसिकता बदलणे व भारतीय व्यवस्थेचे परखडपणे चिकित्सक परिक्षण करणे या पाच तत्वांचा उल्लेख केला आहे. त्यांच्या मते, विकास धोरणातून महिलांचे बळकटीकरण करायचे असेल तर ही पाच सुत्रे विकास धोरणात स्विकारणे गरजेचे आहे. पुढे संविधान लिहितांना त्यांनी याच पाच सुत्रांना कायदयाचा आधार देवून संविधानातील मूलभुत हक्क आणि मार्गदर्शक तत्वांच्या आधारे महिलांना हक्क व अधिकार दिलेले आहेत. संविधातील महिला सक्षमीकरणासाठीच्या काही महत्वाच्या तरतूदी पुढीलप्रमाणे सांगता येतील.[4]

१. कलम १४ प्रमाणे महिला व पुरुष यांना राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात अधिकार व संधी यांची हमी दिलेली आहे.
२. कलम १५ हे कोणत्याही नागरिकांबाबत धर्म, वंश, जात, लिंग इत्यादीमुळे भेदभाव न करण्यासाठी आहे.
३. कलम १५ (अ) नुसार महिलांची अप्रतिष्ठा होईल असे कोणतेही कृत्य होऊ न देण्याची प्रत्येक नागरिकाचे मूलभुत कर्तव्य ठरविलेले आहे.
४. कलम ३९ (ड) नुसार महिलांसाठी समान काम समान वेतन याची तरतूद केलेली आहे.
५. कलम ४२ नुसार मुलींना १४ वर्षे पूर्ण होईपर्यंत नि:शुल्क व अनिवार्य शिक्षणाची तरतूद केलेली आहे.
६. कलम ३२५ नुसार महिलांना पुरुषांबरोबर महिलांनाही निवडणुक लढविण्याचा अधिकार दिलेला आहे.
७. कलम ३२६ नुसार प्रौढ मतदानाचा अधिकार महिलांनाही देण्यात आलेला आहे.
८. १९९३ सालच्या महाराष्ट्र कायदाच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे.
९. कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या पुरुष व महिलांसाठी १९४८ मध्ये किमान वेतन मजुरी अधिनियम करण्यात आलेला आहे.
१०. कामाच्या ठिकाणी महिलांना लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३
११. कारखाना कायदा, १९४८ मधील कलम १ (ब) नुसार कामाच्या ठिकाणी महिलांना मुलभूत सुविधा पुरविणे आवश्यक आहे.
१२. कारखाना कायदा, १९४८ मधील कलम ४८ नुसार कामाच्या ठिकाणी शिशुगृह असणे आवश्यक आहे. उपरोक्त तरतुदींच्या आधारे भारतातील महिलांचे सक्षमीकरण योग्य पध्दतीने व्हावे या अनुषंगाने महिलांसाठी काही विकास योजना राबविण्यात येत आहेत. या विकासयोजनांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण योग्य पध्दतीने होत आहे की नाही यांवर लक्ष ठेवण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ व राज्य महिला आयोग यांची स्थापना करण्यात आलेली आहे. “महिलांविषयकच्या कायद्यांबद्दल प्रबोधन करणे व त्यांची अंमलबजावणी व्हावे या उद्देशाने महाराष्ट्य् राज्य महिला आयोग कार्यरत आहे. तर महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्य् राज्य ग्रामीण जीवन उन्नती अभियानाच्या माध्यमातून महिलांना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.”[5] तसेच शासकीय पातळीवर स्वयं:सहायता समूह (बचत गट) स्थापन करण्यात आलेले आहेत. या बचत गटांच्या महिला सदस्यांची संख्या जवळपास ९,०६,०१० इतकी झालेली आहे. सामाजिक न्याय प्रस्थापित

करणे हे भारतीय संविधानाचे एक महत्वाचे उद्दिष्टय आहे, या अनुषंगानेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधानाचे लिखाण करतांना मत मांडतात की, मानवी अधिकारांचे, स्वातंत्र्याचे असमान वितरण हे माणसाला विकासापासुन वंचित ठेवत असते. म्हणजेच मानवी हक्क, मानवी अधिकार व मानवी स्वातंत्र्य यांच्याभोवती विकासाची संकल्पना फिरतांना दिसून येते. आपल्या या विचारांचे भान ठेवुन घटनाकारांनी कायदयाच्या माध्यमातून माणूस म्हणून जगण्याच्या अधिकारांपासुन हजारो वर्ष वंचित असलेल्या महिलांना हे सर्व अधिकार प्राप्त करुन देऊन भारतातील विकासाला एक निश्चित दिशा देण्याचे काम केले आहे.

**समारोप:** एकुणच समाजात असलेल्या प्रत्येक संसाधनाचे आणि संधीचे प्रत्यक्षात पुरुष व महिलांमध्ये समान पातळीवर वाटप करणे आणि त्याला समाजानेही मान्यता देणे हे महिला सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्वाचे आहे. यासाठी विविध स्तरावरील, जातीतील, समुदायातील महिला आपल्या अस्तित्वाचा आणि कर्तुत्वाचा अर्थ कसा लावतात हे अतिशय महत्वाचे ठरत असते. नागरी समाजातील महिलांना सामाजिक-सांस्कृतिक व आर्थिक स्तरावर आपल्या कर्तुत्वाचे, आपल्या अस्तित्वाचे महत्व कळाले आहे तसेच त्यास सकल समाजाने देखील मान्यता दिलेली दिसून येते. परंतु सक्षमीकरणात महत्वाची भुमिका पार पाडणा-या शैक्षणिक स्तरावर मात्र महिलांना अजुनही खुप प्रयत्न करावे लागणार आहे, हे सत्य नाकारता येणार नाही. आधुनिक मूल्य, शिक्षण यांच्या संपर्कातुन महिला बाहय समाजाच्या संपर्कात येत गेली आणि तिची सक्षमीकरणाची संकल्पना बदलत गेली. आंतरिक सक्षमीकरणा ऐवजी तिलाही बाहय सक्षमीकरणाची ओढ वाटु लागली. तिच्या या विचारांना खतपाणी देण्याचे काम केले औद्योगिकीकरणाच्या जागतिकीकरण या प्रगत अवस्थेने विकसित केलेल्या रोजगार संधीने, जागतिक बाजारपेठे समृध्द करणा-या आधुनिक मूल्यांनी, वस्तुकरणाला महत्व देणा-या राहणीमानाने. साहजिकच महिलांच्या सक्षमीकरणाच्या संकल्पनेत बरीच स्थित्यंतरे होत जातांना दिसून येतो. मग यांत शिक्षण, तंत्रप्रशिक्षण, नोकरी, स्थलांतर, कामाची निरंतरता, कामाच्या ठिकाणावरील शोषण, स्त्री कडे बघण्याचा सामाजिक पूर्वग्रह, सामाजिक-सांस्कृतिक सुरक्षितता, कौटुंबिक अडचणी त्यातुन निर्माण होणारे ताणतणाव अशा कितीतरी समस्यांना हाताळत भारतातील महिला सक्षमीकरणावर नव्याने विचार करणे गरजेचे ठरत आहे. त्यांना नव्याने स्वत:च्या अस्तित्वासाठी लढण्याची अवस्था निर्माण होतांना दिसून येत आहे.

## संदर्भ साहित्य


१. नाईक शोभा (२०००), भारतीय संदर्भातुन स्त्रीवाद, लोकवाड्मय गृह प्रकाशन, मुंबई.

२. कसबे रावसाहेब (२००३), डॉ. आंबेडकर आणि राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पुणे.

३. कुलकर्णी हेरंब (२०१५), अमच्या शिक्षणाचं काय?, मनोविकास प्रकाशन, पुणे.

४. कवी माधवी (१९९९), महिला कल्याण आणि विकास, विद्या प्रकाशन, नागपुर.

५. दाथी प्रमिला (२००९), आधुनिक समाज में कार्यशिल महिलाएँ, रावत पब्लिकेशन्स, जयपूर.

६. Das & Banarji (1964), Impact of Industrization on the Life of Tribal, Research Paper, West Bengal Cultural Research Institute, Calcutta.

# ग्रामीण कृषि व्यवस्थेमध्ये महिलांचा दर्जा व भूमिका

**डॉ. एच. यू. पेटकर** प्राध्यापक व विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा जी. अमरावती

**सारांश:** भारत हा कृषिप्रधान देश असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेतीवर आधारित आहे. या कृषी व्यवस्थेमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असले तरी त्यांच्या श्रमाचे, निर्णय क्षमतेचे व अधिकारांचे पुरेसे मूल्यमापन होताना दिसत नाही. पेरणी,लागवड, तण नियंत्रण, कापणी, पशुपालन दुग्ध व्यवसाय, शेतमाल प्रक्रिया, साठवणूक आणि घरगुती अर्थव्यवस्थेपर्यंत महिलांचा सहभाग सर्वांगीण स्वरूपाचा आहे, तरीही जमीन मालकी, आर्थिक निर्णय, तांत्रिक प्रशिक्षण व सरकारी योजनेमध्ये महिलांचा सहभाग हा मर्यादित असलेला आपणास दिसून येतो, या संशोधन निबंधाचा उद्देश ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये महिलांची भूमिका, त्यांचा सामाजिक, आर्थिक दर्जा त्यांच्या समोरील अडचणी व सक्षमीकरणाची संधी यांचा अभ्यास करणे आहे. दुय्यम माहितीच्या आधारे हे संशोधन करण्यात आले आहे. अभ्यासातून असे आढळले की, महिलांचे योगदान मोठे असले तरी त्यांचा दर्जा कामाच्या तुलनेने कमी आहे. योग्य धोरणात्मक हस्तक्षेप, शिक्षण तांत्रिक प्रशिक्षण, जमीन हक्क व आर्थिक स्वावलंबन याद्वारे ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये महिलाचे सक्षमीकरण साध्य होऊ शकते.

**प्रस्तावना:** भारतीय ग्रामीण समाजाची रचना प्रामुख्याने कृषीवर आधारित आहे शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून सामाजिक,सांस्कृतिक व आर्थिक जीवनाचा केंद्रबिंदू आहे या कृषी व्यवस्थेमध्ये महिलांचा सहभाग ऐतिहासिक काळापासून दिसून येतो. प्राचीन भारतातील महिलांनी शेती, पशुपालन व अन्नप्रक्रियेमध्ये सक्रिय भूमिका बजावल्याच्या उल्लेख आढळतो.

आजच्या काळातही ग्रामीण महिलांचे श्रम शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर दिसून येतात तथापि पुरुषप्रधान सामाजिक रचनेमुळे महिलांच्या श्रमाला सहाय्यक म्हणून दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचा कामाचा दिवस पुरुषांपेक्षा अधिक असतानाही त्यांना निर्णय प्रक्रियेत कमी स्थान मिळते. ग्रामीण कृषि व्यवस्थेमध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची, व्यापक व बहुआयामी स्वरूपाची आहे भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर शेती व शेती पूरक व्यवसायावर अवलंबून असून या संपूर्ण व्यवस्थेचा कणा म्हणून महिला कार्यरत आहेत प्रत्यक्ष शेती कामापासून ते पशुपालन, शेतमाल प्रक्रिया आणि कौटुंबिक अर्थव्यवस्थेपर्यंत महिलांचे योगदान सर्व स्तरातून दिसून येते. मात्र त्यांच्या या महत्त्वपूर्ण भूमिकेला अपेक्षित सामाजिक, आर्थिक व संस्थात्मक मान्यता मिळताना दिसत नाही.

जागतिक पातळीवर एफ.ए.ओ. च्या अहवालानुसार कृषी क्षेत्रातील सुमारे ४० ते ४५% श्रम महिलांकडून केले जाते भारतातही प्रमाण राज्यांमध्ये ५०% पेक्षा जास्त आहे असे असूनही महिलांचा आर्थिक, सामाजिक दर्जा कामाच्या तुलनेने कमी आहे त्यामुळे ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये महिलांचा दर्जा व भूमिका यांचा अभ्यास करणे हे अत्यंत आवश्यक ठरते.

**साहित्याचे पुनरावलोकन: बोस (२०१२),** यांच्या अभ्यासानुसार ग्रामीण महिलांचे कृषीतील योगदान मोठे असले तरी जमीन मालकी व तांत्रिक ज्ञानाच्या अभावामुळे त्यांचा दर्जा कमी असतो. **FAO (२०१६),** च्या अहवालात नमूद आहे की जर महिलांना पुरुषा इतकीच संसाधने उपलब्ध झाली तर कृषी उत्पादनात 20 ते 30 टक्के वाढ होऊ शकते. **देशमुख (२०१८),** यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण महिलांवर केलेल्या अभ्यासात असे आढळले विश्लेषणात्मक पद्धतीने हे संशोधन करण्यात आले. **कुलकर्णी (२०१२)** यांच्या संशोधनानुसार स्वयं-सहाय्यता गटमुळे ग्रामीण महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणास चालना मिळाली आहे.

**शोधनाची उद्दिष्टे**: १) ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये महिलांची भूमिका अभ्यासणे. २) ग्रामीण महिलांचा सामाजिक व आर्थिक दर्जा समजून घेणे. ३) कृषी क्षेत्रात महिलांना भेडसावणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे. ४) महिलांच्या सक्षमीकरणासाठी असलेल्या योजना व उपक्रमांचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहितके:** १) ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर आहे. २) ग्रामीण कृषि क्षेत्रामध्ये महिलांचे योगदान जास्त असूनही त्यांचा सामाजिक,आर्थिक दर्जा कमी आहे. ३) शिक्षन, जमीन हक्क व आर्थिक स्वावलंबन यांचा महिलांच्या दर्जावर सकारात्मक परिणाम होतो. ४) सरकारी योजना व स्वयंसहायता गट महिलांच्या सक्षमीकरणात महत्त्वाची भूमिका बजावतात.

**संशोधन पद्धती:** संशोधनकर्ता मुळातच ग्रामीण भागातून येत असल्यामुळे त्यांनी ग्रामीण महिलांची स्थिती अगदी जवळून बघितलेली आहे म्हणूनच त्यांनी संशोधनाकरिता या विषयाची निवड केलेली आहे. या संशोधनासाठी दुय्यम पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने पुस्तके,संशोधन लेख,शासकीय अहवाल, इतर संस्थांचे वेगवेगळे अहवाल, संकेतस्थळे, जर्नल, वर्तमानपत्रातील लेख यातून मिळालेल्या माहितीच्या आधारावर वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने हे अध्ययन केलेले आहे.

**ग्रामीण कृषि व्यवस्थेमध्ये महिलांची भूमिका**

**शेतीतील प्रत्यक्ष काम:** ग्रामीण भागातील महिलांचा शेतीतील प्रत्यक्ष सहभाग अत्यंत मोठ्या प्रमाणात आढळतो. पेरणीपूर्व तयारीपासून ते कापणी व मळणी पर्यंतच्या सर्व टप्प्यांमध्ये महिलांचे श्रम निर्णायक ठरतात. बीज प्रक्रिया, रोपांची लागवड, तन काढणे, खत व कीटकनाशकांचा वापर, पिकांची निगा राखणे तसेच कापणी व मळणी ही श्रमप्रधान कामे प्रामुख्याने महिलांकडून केली जातात. विशेषतः भात, कापूस,ऊस, डाळी व भाजीपाला पिकांमध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलांचा कामाचा कालावधी अधिक असूनही त्यांचे श्रम अनेकदा सहाय्यक म्हणून दुर्लक्षित केले जातात. एवढेच नाही तर

कुटुंबातील सर्व सदस्यांची काळजी घेणे, घरकाम करणे ही सर्व प्रकारची कामे करून उर्वरित दिवसभर शेतात राबते. तरी देखील तिच्या श्रमाचे मूल्य नसते तर मदत म्हणून तिच्या श्रमाकडे बघितले जाते.

**पशुपालन व दुग्ध व्यवसाय:** ग्रामीण कृषि व्यवस्थेतील आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे पशुपालन व दुग्ध व्यवसाय असून यामध्ये महिलांची भूमिका अत्यंत केंद्रस्थानी आहे गाय, म्हैस, शेळी इत्यादी जनावरांची दैनिक देखभाल चारा गोळा करणे जनावरांना खाऊ घालणे, स्वच्छता राखणे, दूध काढणे, दुधापासून वेगवेगळे पदार्थ तयार करणे, उदा. दही, लोणी, तूप इत्यादी व त्यांची विक्री करणे ही सर्व कामे प्रामुख्याने महिलांकडून केली जातात. दुग्ध व्यवसायातून मिळणारे उत्पन्न हे अनेक कुटुंबीयांसाठी नियमित व स्थिर उत्पन्नाचे साधन असते. या माध्यमातून महिलांचा घरगुती अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा असतो. तथापि दुग्ध व्यवसायाशी संबंधित निर्णय, कर्ज किंवा बाजारपेठातील व्यवहारांमध्ये महिलांचा सहभाग तुलनेने हा कमी असतो तर पुरुषांचा सहभाग हा अधिक असतो.

**शेतमाल प्रक्रिया:** ग्रामीण भागात शेतमाल प्रक्रिया व साठवणूक या क्षेत्रात महिलांचा मोठा सहभाग दिसून येतो. धान्य साठवणूक, कडधान्य निवड व प्रक्रिया भाजीपाला व फळे सुकवणे, लोणची, पापड, सांडगे या सारख्या घरगुती अन्नप्रक्रिया उद्योगांमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. या प्रक्रिया केवळ कुटुंबाच्या अन्नसुरक्षिततेसाठी नव्हे तर अतिरिक्त उत्पन्नाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात. स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिलांनी अन्नप्रक्रिया उद्योगात संघटितपणे सहभाग घेऊन आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल सुरू केली आहे.

**कौटुंबिक अर्थव्यवस्था:** ग्रामीण कृषि व्यवस्थेत महिलांची भूमिका केवळ उत्पादनापूर्ती मर्यादित नसून कौटुंबिक अर्थव्यवस्थेच्या व्यवस्थापनातही ती महत्त्वाची आहे. घर खर्चाचे नियोजन, दैनंदिन खर्च नियंत्रण, बचत करणे, लहान आर्थिक निर्णय घेणे ही जबाबदारी महिलांकडे असते शेती व शेतीपूरक व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा योग्य वापर करून कुटुंबाची आर्थिक शिस्त टिकवण्यात महिलांचा मोठा वाटा असतो. स्वयंसहायता गट व सूक्ष्म वित्त नियोजनामुळे महिलांची आर्थिक निर्णय क्षमता वाढत असून त्यांच्या सामाजिक दर्जातही हळूहळू सुधारणा होत आहे. सामाजिक कार्यक्रमांमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे अनेक कार्यक्रमाचे आयोजन/ नियोजनामध्ये त्यांचा प्रत्यक्ष सहभाग असलेला आपल्याला दिसून येतो.

एकूणच ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये महिलांची भूमिका सर्वांगीण, श्रमप्रधान व अत्यावश्यक असूनही ती अनेकदा दुर्लक्षित राहते त्यामुळे त्यांनी अनेक बाबींमधून आपली सिद्धता दाखवून समाजामध्ये स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करावीत. संधी मागल्याने मिळत नसते तर ती स्वतःहून घ्यावी लागते हे महिलांनी समजून घेतले पाहिजे. त्यांच्या योगदानाची योग्य दखल घेऊन त्यांना समान संधी व अधिकार देणे ही काळाची गरज आहे.

**ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये महिलांचा दर्जा:** ग्रामीण कृषि व्यवस्थेमध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असूनही त्यांचा सामाजिक आर्थिक व संस्थात्मक दर्जा तुलनेने कमी असल्याचे दिसून येते. शेती व शेतीपूरक व्यवसायामध्ये महिला प्रत्यक्ष श्रम करतात उत्पादन प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतात तथापि निर्णय प्रक्रिया मालकी हक्क व संसाधनावरील नियंत्रण यामध्ये त्यांचे स्थान दुय्यम राहते ग्रामीण समाजातील पुरुषप्रधान रचना सामाजिक रूढी व संस्थात्मक मर्यादा यामुळे महिलांचा दर्जा अनेक अडचणीग्रस्त आहेत महिलांचे पुरुषांच्या तुलनेने कामाचे तास जास्त असले तरी त्यांच्या कामाची योग्य पद्धतीने मूल्यमापन केले जात नाही त्यामुळे पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये त्यांना दुय्यम स्थानी बघितल्या जाते.

**जमिनीची मालकी व दर्जा:** ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये महिलांच्या दर्जावर परिणाम करणारा सर्वात महत्त्वाचा घटक मध्ये जमीन मालकीचा अभाव भारतात बहुसंख्य ग्रामीण महिलांकडे स्वतःच्या नावावर शेती जमीन नाही जमीन ही केवळ उत्पादनाची साधन नसून सामाजिक प्रतिष्ठा आर्थिक सुरक्षितता व निर्णय क्षमतेचा आधार आहे जमीन मालकीण असल्यामुळे महिलांना कृषी कर्ज शासकीय अनुदान विमा योजना व आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यात अडचणी येतात परिणामी महिलांचे श्रम मोठे असले तरी त्यांना त्यांचा प्रत्यक्ष आर्थिक फायदा मर्यादित प्रमाणात मिळतो संसाधनावर मालकी नसल्यामुळे त्यांना दुय्यम लेखले जाते.

**निर्णय प्रक्रिया व दर्जा:** आर्थिक निर्णयांमध्ये कमी सहभाग ही महिलांच्या दर्जाशी संबंधित आणखी एक महत्त्वाची समस्या आहे पिकांची निवड विक्री कर्ज घेणे खर्चाचे नियोजन यासारख्या महत्त्वाच्या आर्थिक निर्णयांमध्ये पुरुषांचा प्रभाव अधिक असतो महिलांचे योगदान प्रत्यक्ष कामापुरते मर्यादित राहते त्यामुळे महिलांची निर्णय क्षमता विकसित होत नाही व त्यांचा आत्मविश्वास ही कमी राहतो स्वयंसहायता गटामुळे काही प्रमाणात महिलांचा आर्थिक सहभाग वाढत असला तरी तो अजूनही अपुरा आहे खरंतर कुटुंबात योग्य पद्धतीने नियोजन ही स्त्री करीत असते परंतु पुरुषप्रधानतेला आपलं स्थान सोडायचं नसतं त्यामुळे स्त्रीला दुय्यमत्त्वाची वागणूक दिली जाते.

**शिक्षण व दर्जा:** ग्रामीण महिलांच्या दर्जावर शिक्षण व तांत्रिक प्रशिक्षणाचा अभावाचा मोठा परिणाम होतो ग्रामीण भागातील महिलांचे शिक्षणाचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेने कमी आहे आधुनिक कृषी तंत्रज्ञान यांत्रिकीकरण बाजारपेठेची माहिती व शासकीय योजनांचे ज्ञान यांचा अभाव महिलांच्या प्रगतीस अडथळा ठरतो शिक्षणाच्या अभावामुळे महिलांना स्वतःच्या हक्काची व संधी विषयी पुरेशी जाणीव होत नाही ज्याचा परिणाम त्यांच्या दर्जावर होतो.

**सामाजिक प्रथा व दर्जा:** सामाजिक रूढी परंपरा व लिंगभेद हे ग्रामीण महिलांच्या दर्जाला मर्यादा घालणारे महत्त्वाची घटक आहे स्त्रियांना घरगुती जबाबदाऱ्या मुलांची काळजी व कौटुंबिक कामे या पुरतेच मर्यादित ठेवण्याची मानसिकता अजूनही अनेक ग्रामीण भागात दिसून येते. महिलांची श्रम नैसर्गिक व अपेक्षित मानले जात असल्याने त्याला आर्थिक मूल्य दिल्या जात नाही या रूढी परंपरेमुळे महिलांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग हा मर्यादित असतो.

**आरोग्य, पोषण व दर्जा:** याशिवाय आरोग्य व पोषण समस्या यादेखील कृषी व्यवस्थेमध्ये महिलांच्या दर्जावर नकारात्मक परिणाम करतात जास्त श्रम अपुरा आहार आरोग्य सेवेचा अभाव व मातृत्वाशी संबंधित समस्या यामुळे महिलांचे शारीरिक व मानसिक

आरोग्य प्रभावित होते याचा परिणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर व जीवन मानावर होतो अनेक महिला शारीरिक व मानसिक समस्यांमुळे अशोक अशक्त असतात त्यामुळे त्यांचे जीवन हे पुरुष केंद्रीत झालेले दिसून येते. एकूणच ग्रामीण कृषि व्यवस्थेमध्ये महिलांचा दर्जा अनेक संरचनात्मक अडचणींनी ग्रस्त आहे महिलांचा सहभाग मोठा असला तरी त्यांना समान अधिकार संसाधने व संधी मिळाल्याशिवाय त्यांचा दर्जा उंचावणे शक्य नाही महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण जमीन हक्क आरोग्य सुविधा व सामाजिक परिवर्तन यावर भर देणे अत्यंत आवश्यक आहे.

**तथ्यांचे विश्लेषण:** ग्रामीण कृषि व्यवस्थेमध्ये महिलांच्या भूमिकेचा व दर्जाचा अभ्यास करताना उपलब्ध आकडेवारी अत्यंत महत्त्वाची ठरते. विविध शासकीय व अशासकीय अहवाला मधून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे ग्रामीण महिलांचे प्रत्यक्ष योगदान व त्यांचे उपलब्ध असलेल्या संसाधनावरील तफावत स्पष्टपणे दिसून येते. या आकडेवारीचे विश्लेषण केल्यास ग्रामीण कृषी व्यवस्थेतील लिंग भेदाचे वास्तव अधोरेखित होते. उपलब्ध आकडेवारीनुसार भारतामध्ये सुमारे ७५ टक्के ग्रामीण महिला कृषीशी संबंधित कामात गुंतलेले आहेत. यामध्ये प्रत्यक्ष शेती काम पशुपालन दुग्ध व्यवसाय शेतमाल प्रक्रिया तसेच शेतीपूरक उद्योगांचा समावेश होतो. अनेक राज्यांमध्ये हे प्रमाण आणखी जास्त असून काही भागात महिलाच शेती व्यवसायचा प्रमुख आधार आहे. पुरुषांची स्थलांतरण, रोजगाराच्या शोधात शहराकडे होणारी वाटचाल यामुळे शेतीची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर महिलांवर येत आहे त्यामुळे ग्रामीण कृषी व्यवस्थेचे महिलाकरण होत असल्याचे चित्र आपणास दिसून येते. तथापि इतक्या मोठ्या प्रमाणावर सहभाग असूनही केवळ १३ ते १५ टक्के महिलांच्या नावावर जमीन असल्याचे वास्तव हा गंभीर चिंतेचा विषय आहे. जमीन मालकीही कृषी व्यवस्थेतील अधिकार निर्णय क्षमता व आर्थिक सुरक्षिते मुख्य साधन मांनली जाते. जमीन नसल्यामुळे महिलांना कृषी कर्ज, शासकीय अनुदाने, पीक विमा, आधुनिक तंत्रज्ञान व बाजारपेठेतील संधी यांचा लाभ मर्यादित प्रमाणात मिळतो परिणामी महिलांचे श्रम मोठ्या प्रमाणावर असले तरी त्यावर त्यांचे नियंत्रण, अधिकार नसतो ही तफावत ग्रामीण कृषी व्यवस्थेतील महिलांच्या दुय्यम दर्जाचे स्पष्ट निर्देशक आहे.

तथ्याचे विश्लेषणातून असे दिसून येते की, स्वयंसहाय्यता गटाची जोडलेल्या महिलाची उत्पन्न व निर्णय क्षमता तुलनेने वाढलेली आहे. स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिलांना बचत कर्ज, सूक्ष्म उद्योग, अन्नप्रक्रिया दुग्ध व्यवसाय व इतर शेतीपूरक उपक्रमामध्ये सहभागी होण्याची संधी मिळते यामुळे महिलांचे आर्थिक स्वावलंबन वाढते तसेच घरगुती व सामाजिक निर्णयांमध्ये त्याचा आत्मविश्वास वाढलेला दिसून येतो. अनेक अभ्यासामधून असे स्पष्ट झाले की, स्वयंसहाय्यता बचत गटाशी जोडलेल्या महिलांचा मुलांच्या शिक्षणावर आरोग्यावर व कुटुंबाच्या एकूण विकासावर सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो.

उपलब्ध आकडेवारीचे एकत्रित विश्लेषण केल्यास असे लक्षात येते की, ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असले तरी संसाधनाचे असमान वितरण विशेषतः जमीन मालक तिचा अभाव ही त्याची मुख्य अडचण आहे .दुसरीकडे स्वयंसहाय्यता गटासारख्या संस्थात्मक उपायामुळे महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा होऊ शकते हे तितकेच स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे भविष्यातील धोरणात्मक निर्णयामध्ये महिलांना जमीन हक्क, आर्थिक साधने व संघटित सहभाग या सोबतच त्यांच्या आरोग्य शिक्षण, प्रशिक्षण यावर भर देणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष:** प्रस्तुत संशोधनातून ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये महिलांची भूमिका व त्यांचा सामाजिक आर्थिक दर्जा याबाबत अनेक महत्त्वाचे निष्कर्ष स्पष्टपणे समोर येतात. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी क्षेत्रामध्ये महिलांचे योगदान अत्यंत व्यापक सातत्यपूर्ण आणि श्रमप्रधान स्वरूपाचे आहे. पेरणी पासून कापणी पर्यंत पशुपालन दुग्ध व्यवसाय, शेतमाल प्रक्रिया तसेच कौटुंबिक अर्थव्यवस्थेपर्यंत महिलांची भूमिका अनिवार्य आहे त्यामुळे ग्रामीण कृषी व्यवस्थेचे सुचारू संचलन मोठ्या प्रमाणात महिलांच्या श्रमावर अवलंबून असते. तथापि या महत्वपूर्ण योगदानाच्या तुलनेत महिलांना मिळणारी सामाजिक आर्थिक व संस्थात्मक मान्यता अत्यंत मर्यादित असते. महिलांचे श्रम मोठ्या प्रमाणावर असले तरी त्यांना निर्णय प्रक्रियेत समान सहभाग, जमीन मालकी हक्क, आर्थिक स्वायत्तता व धोरणात्मक पाठबळ मिळत नाही परिणामी महिलांचा दर्जा कृषी व्यवस्थेमध्ये दुय्यम स्वरूपाचा राहतो हे वास्तव ग्रामीण समाजातील लिंगभेद सामाजिक रूढी परंपरा आणि संसाधनाच्या असमान वितरणाचे धोतकं आहे.

संशोधनातून असे स्पष्ट होते की, शिक्षण,प्रशिक्षण व आर्थिक स्वावलंबन हे महिलांच्या दर्जात सुधारणा घडवून आणणारे अत्यंत प्रभावी घटक आहे. शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो, तांत्रिक ज्ञान प्राप्त होते आणि त्यांच्या हक्काविषयी जागरूकता निर्माण होते. कृषी विषयक प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व बाजारपेठेची ओळख यामुळे महिलांची उत्पादकता आणि निर्णयक्षमता वाढू शकते तसेच आर्थिक स्वावलंबनामुळेनामुळे महिलांना कुटुंबातील व सामाजिक स्तरावर अधिक सन्मान व महत्त्व प्राप्त होते. या संशोधनातील आणखी एक महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे स्वयंसहायता गट व सरकारी योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रभावी साधने ठरत आहे स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिलांना बचत कर्ज सूक्ष्म उद्योग व शेतीपूरक व्यवसायाच्या संधी उपलब्ध होत आहेत त्यामुळे त्यांच्या उत्पादनात वाढ होत असून आर्थिक निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग वाढलेला दिसून येतो त्याचप्रमाणे विविध शासकीय योजना तसेच जसे की, महिला कृषकांसाठी प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य व सामाजिक सुरक्षा योजना महिलांच्या सर्वांगीण विकासाला चालना देत आहेत. एकूणच या संशोधनातून असा निष्कर्ष निघतो की, ग्रामीण कृषी व्यवस्थांमध्ये महिलांचे योगदान अपरिहार्य असून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी संरचनात्मक बदलांची आवश्यकता आहे महिलांना समान संधी, संसाधने व अधिकार उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये शाश्वत्व समावेशक विकास साध्य होऊ शकतो.

**शिफारशी:** १) महिलांना जमीन हक्क देण्यासाठी धोरणात्मक सुधारणा कराव्यात. २) कृषी तांत्रिक प्रशिक्षणामध्ये महिलांचा सहभाग वाढवावा. ३) महिलांसाठी स्वतंत्र कृषी कर्ज व विमा योजना प्रभावीपणे राबवाव्या. ४) स्वयंसहाय्यता गट व महिला उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहन द्यावे. ५) ग्रामीण भागात महिलांच्या शिक्षण व आरोग्यावर विशेष भर द्यावा.

**संदर्भसूची :**

१. कराडे बी.एम. (२०११) ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, महाल, नागपुर
२. देशमुख गणेश(२०१८) ग्रामीण समाज जीवन व साहित्य, स्वरूप प्रकाशन सिडको औरंगाबाद.
३. साळुंखे दत्ताजीराव, पवार जगन्नाथराव (१९८९) महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
४. कवीमंडन विजय (१८८९) कृषी अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
५. मेघे ज्ञानेश्वर (१९७६) कृषी समस्या आणि विकास, पडगिलवार प्रकाशन, नागपूर
६. कुलकर्णी पी. (२०२०) ग्रामीण महिला सक्षमीकरण .
७. भारत सरकार कृषी मंत्रालय अहवाल
८. महिला व बाल विकास मंत्रालय भारत सरकार

# ग्रामीण कोरकू आदिवासी माता व बाल आरोग्यातील असमानता
## (लैंगिक भूमिका, संस्कृती आणि स्व-काळजी यांचा परस्परसंबंध)

**सुरज जगदीश पवार** संशोधक विद्यार्थी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती

**सारांश:** ग्रामीण भारतातील आदिवासी समुदायांमध्ये माता व बाल आरोग्याशी संबंधित परिणाम हे अद्यापही एक गंभीर सार्वजनिक आरोग्य आव्हान म्हणून कायम आहेत. संस्थात्मक आरोग्यसेवांचा विस्तार झाला असला तरी, मेळघाटातील कोरकू आदिवासी समुदायामध्ये गरोदर व स्तनदा मातांचे, बालकांमधील कुपोषण तसेच मानसिक आरोग्याच्या अपूर्ण गरजा यांचे प्रमाण तुलनेने अधिक आढळते. या लेखामध्ये लिंगाधारित दृष्टिकोनाचा अवलंब करून कोरकू आदिवासी समुदायातील माता व बाल आरोग्यसेवेचे विश्लेषण करण्यात आले आहे. यामध्ये आरोग्यसेवा घेण्याच्या वर्तनावर आणि काळजीच्या पद्धतींवर परिणाम करणाऱ्या सामाजिक-सांस्कृतिक घटकांवर, पोषणस्थितीवर आणि मानसिक आरोग्याशी संबंधित बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे. केवळ आरोग्यसेवांच्या उपलब्धतेवर लक्ष केंद्रित न करता, लैंगिक भुमिका, सांस्कृतिक रूढी आणि संरचनात्मक उपेक्षा यांचा परस्परसंबंध कसा माता व बाल आरोग्य परिणामांवर प्रभाव टाकतो, हे या अभ्यासातून अधोरेखित करण्यात आले आहे. मेळघाटातील आरोग्यविषयक असमानता दूर करण्यासाठी अधिक समन्वित व सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील अशा चौकटीची गरज असल्याचे या लेखात मांडण्यात आले आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण—५ (NFHS-5) नुसार अमरावती जिल्ह्यातील पोषण निर्देशांक गंभीर स्थिती दर्शवतात. पाच वर्षांखालील २९% मुले उंचीने कमी (Stunted) असून २६.२% मुले कमी वजनाची (Wasted) आहेत, तर १५—४९ वयोगटातील ५८.८% महिला ॲनिमियाग्रस्त आहेत. आदिवासी समुदायांमध्ये आरोग्य सेवा व पोषण साधनांपर्यंत मर्यादित पोहोच असल्याने ही परिस्थिती अधिक तीव्र स्वरूप धारण करते.

**प्रस्तावना:** भारतामध्ये माता व बाल आरोग्यसेवा ही सार्वजनिक आरोग्य धोरणाची एक महत्त्वाची बाब आहे; तथापि, सामाजिक व भौगोलिक संदर्भांनुसार या क्षेत्रात लक्षणीय असमानता आजही आढळून येते. विशेषतः महाराष्ट्रातील मेळघाटसारख्या आदिवासी व ग्रामीण भागांमध्ये ॲनिमिया, जन्मतः कमी वजन, बालकांमधील कुपोषण तसेच मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. मेळघाटातील प्रमुख आदिवासी समुदायांपैकी एक असलेल्या कोरकू जमातीसमोर दारिद्र्य, आरोग्या सुविधा, संसाधनांपर्यंत मर्यादित पोहोच आणि खोलवर रुजलेल्या सामाजिक-सांस्कृतिक प्रथा यांमुळे अनेक पातळ्यांवर असुरक्षितता असल्याचे दिसून येते.विद्यमान संशोधनामध्ये आदिवासी माता व बाल आरोग्याच्या आव्हानांकडे प्रामुख्याने वैद्यकीय किंवा सेवांची पूर्तता केंद्रित दृष्टिकोनातून पाहिले जाते; मात्र महिलांच्या आरोग्य अनुभवांना आकार देणाऱ्या लिंगाधारित वास्तवांकडे तुलनेने कमी लक्ष दिले गेले आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी, या लेखामध्ये कोरकू आदिवासी समुदायातील माता व बाल आरोग्यसेवेचे लिंगाधारित दृष्टिकोनातून विश्लेषण करण्यात आले असून, आरोग्य परिणामांना व्यापक सामाजिक-सांस्कृतिक, पोषणविषयक आणि मानसिक आरोग्याच्या संदर्भात समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संकल्पनात्मक रचना: आदिवासी संदर्भातील लिंगाधारित दृष्टिकोन:** लिंगाधारित दृष्टिकोनानुसार आरोग्य ही केवळ जैविक अवस्था नसून ती सत्तासंबंध, सामाजिक भूमिका आणि संसाधनांपर्यंत असलेल्या पोहोचेमुळे घडून येते. ग्रामीण आदिवासी समाजांमध्ये गर्भधारणा, प्रसूती, पोषण आणि बालसंगोपनाशी संबंधित निर्णयप्रक्रियेवर लैंगिक भूमिकेचा मोठा प्रभाव असतो. कोरकू आदिवासी समुदायामध्ये महिलांवर प्रजननाशी संबंधित जबाबदाऱ्या आणि उपजीविकेसाठीचे श्रम यांचा दुहेरी भार असतो, मात्र आरोग्याशी संबंधित निर्णयांमध्ये त्यांचे स्वायत्तत्व मर्यादित असते.हा दृष्टिकोन माता व बाल आरोग्यसेवा कशा प्रकारे श्रमविभागणी, अन्न व आर्थिक संसाधनांवरील नियंत्रण तसेच मातृत्वाशी निगडित अपेक्षांद्वारे प्रभावित होते, हे समजून घेण्यास मदत करतो. या परिमाणांचा अभ्यास करून हा संशोधन वैयक्तिक वर्तनाच्या पलीकडे जाऊन आरोग्यावर परिणाम करणाऱ्या संरचनात्मक व सांस्कृतिक निर्धारकांचा शोध घेतो.

**गृहीतकृत्ये:** **१)** कुटुंबातील, पोषणविषयक आणि आरोग्यसेवा निर्णयांमध्ये कोरकू महिलांचे मर्यादित स्वायत्त्य हे माता आरोग्यसेवा वापरण्यात विलंब व माता आरोग्य परिणामांवर नकारात्मक परिणामांसह संबंधित आहे. **२)** गर्भधारणा, प्रसुती आणि

बालसंगोपनाशी संबंधित सामाजिक-सांस्कृतिक रूढी आणि पारंपरिक विश्वास कोरकू जमातीतील माता व बाल आरोग्याच्या प्रथांवर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकतात, संस्थात्मक आरोग्यसेवा उपलब्ध असतानाही. **३)** घरातील लिंगाधारित खाद्य / अन्न वाटप आणि सततची अन्न असुरक्षितता माता कुपोषणास कारणीभूत ठरतात, जे थेट जन्मतः कमी वजन आणि बालकांमधील कुपोषणाचा धोका वाढवतात. ४) गर्भधारणा आणि प्रसूतीनंतरच्या काळातील ओळख न झालेली आणि वेळेवर आरोग्य मदत न मिळाल्यास मातेला तणाव, मानसिक आणि सामाजिक ताण यामुळे परिणाम बाल संगोपन क्षमतेवर आणि लहान मुलांच्या आरोग्य व विकासाच्या परिणामांवर नकारात्मकरित्या पडतो.

**मेळघाटातील कोरकू जमातीचा सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ:** कोरकू जमाती मेळघाटच्या डोंगराळ प्रदेशात वसलेली आहे, जिथे भौगोलिक विलगता आणि अपर्याप्त पायाभूत सुविधा आरोग्यसेवांपर्यंत पोहोचण्यास प्रभावित करतात. गर्भधारणा, प्रसूती आणि बाल संगोपनाशी संबंधित पारंपरिक विश्वास अजूनही माता व बाल आरोग्य प्रथांवर प्रभाव टाकतात. घरगुती प्रसूती, प्रसूतीपूर्व काळजीतील विलंब, तसेच पारंपरिक वैद्य (भुमका) अवलंबित्व ही प्रथा ग्रामीण, दुर्गम गावांमध्ये आढळते.

जमातीतील लिंगभुमिका महिलांच्या संगोपन जबाबदाऱ्यांना प्राधान्य देतात आणि गर्भधारणा दरम्यान शारीरिक कष्टांना सामान्य मानले जाते. बाल विवाह, गर्भधारणे बद्दल अपुरी माहिती, आणि अन्य प्रश्न हे माता आरोग्यावरील धोके अधिक वाढवतात. या सामाजिक-सांस्कृतिक वास्तवाला आधुनिक आरोग्यसेवांवरील विरोध म्हणून न समजता, दीर्घकालीन उपेक्षा आणि जगण्याच्या रणनीतींनी आकारलेले जुळवून घेतलेले प्रथात्मक उपाय म्हणून पाहणे आवश्यक आहे.

**माता व बाल आरोग्यावर पोषणाचे परिमाण:** मेळघाटमध्ये माता व बाल आरोग्य परिणामांवर पोषणाचे महत्त्वपूर्ण प्रभाव आहे. कोरकू जमातीमध्ये अन्न असुरक्षितता हंगामी स्थलांतर, वनउपज आणि पारंपरिक अन्न व्यवस्थेपर्यंत मर्यादित संपर्क यांशी जोडलेली आहे. घरातील अन्नवाटपातील लिंगभुमिका महिलांवर आणि लहान मुलांवर पोषणाचा धोका अधिक टाकते, ज्यामुळे ते सर्वाधिक असुरक्षित घटक ठरतात. माता कुपोषणामुळे उच्च प्रमाणातील ॲनिमिया, जन्मतः कमी वजन आणि बालकांमध्ये उंची कमी होणे (stunting) यांचा धोका वाढतो. सरकारच्या पोषण योजनांचे अस्तित्व असले तरी, अंमलबजावणीतील तफावत आणि सांस्कृतिक स्वीकार्यता या बाबी कायम आहेत. लिंगाधारित दृष्टिकोनातून पाहता, महिलांची पोषण आवश्यकता विशेषतः गर्भधारणा आणि स्तनपान काळात तुलनेने दुर्लक्षित केली जाते, ज्यामुळे पीढ्यानपिढ्या कुपोषणाची साखळी टिकून राहते.

**मानसिक आरोग्य: दुर्लक्षित परिमाण:** मानसिक आरोग्य आदिवासी व ग्रामीण संदर्भातील माता व बाल आरोग्यसेवेचा तुलनेने दुर्लक्षित घटक आहे. कोरकू महिलांना दारिद्र्य, अन्न असुरक्षितता, घरगुती जबाबदाऱ्या आणि मर्यादित सामाजिक आधार यांशी संबंधित मानसिक ताणाचा अनुभव येतो. गर्भधारणा आणि प्रसूतिनंतरचा काळ भावनिक असुरक्षिततेशी जुळतो, तरीही मानसिक आरोग्याच्या समस्या ओळखल्या जात नाहीत किंवा योग्य ती मदत केल्या जात नाहीत. भावनिक तणावाबाबत सांस्कृतिक निस्तब्धता आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांवर मानसिक आरोग्य सेवा प्रभावी नसल्यामुळे आदिवासी महिलांमध्ये उपचार न मिळण्याचा तणाव, नैराश्य आणि मानसिक-सामाजिक ताण यांचा अनुभव राहतो. हे मानसिक आरोग्याचे आव्हान थेट संगोपन क्षमतेवर आणि बालकांच्या विकासावर परिणाम करते, ज्यामुळे एकात्मिक काळजी देणाऱ्या दृष्टिकोनाची गरज अधोरेखित होते.

**समग्र आणि लैंगिक-संवेदनशील काळजीकडे वाटचाल:** अभ्यासातील निष्कर्ष मेळघाटमधील माता व बाल आरोग्य हस्तक्षेपांना लिंग-संवेदनशील आणि सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील दृष्टिकोनातून पुन्हा आकार देण्याची गरज अधोरेखित करतात. कोरकू जमातीमधील आरोग्य संदर्भातील असमानता दूर करण्यासाठी खंडित कार्यक्रमात्मक पद्धतींपलीकडे जाऊन समग्र मॉडेल्स अंगीकारणे आवश्यक आहे, जे सामाजिक-सांस्कृतिक रूढी, पोषण सुरक्षा आणि मानसिक आरोग्य या सर्व बाबींवर एकत्रितपणे लक्ष देतो. समुदाय आधारित आरोग्य कामगार, महिला समूह आणि सांस्कृतिकदृष्ट्या आधारभूत सल्लागार हस्तक्षेप औपचारिक आरोग्य प्रणाली आणि आदिवासी समुदायांमधील अंतर कमी करण्यात परिवर्तनकारी भूमिका बजावू शकतात. आदिवासी महिलांना निष्क्रिय लाभार्थी म्हणून नव्हे, तर सक्रिय हस्तक्षेपकर्ते म्हणून ओळखणे सक्षम बदलासाठी अत्यावश्यक आहे.

**तथ्यांचे विश्लेषण:**

**"तुमची दैनंदिन दिनचर्या सकाळपासून रात्रीपर्यंत कशी असते?"**



उपरोक्त सारणी वरून असे स्पष्ट होते कि एकूण ४० उत्तरदात्यांपैकी स्वयंपाक व घरकाम करणाऱ्या उत्तरदात्यांचा शेकडा प्रमाण ७० %, व शेतीतील कामे करणाऱ्या मतांचा शेकडा प्रमाण ७ % असून बालक व वृद्धांची काळजी करणाऱ्या उत्तरदात्यांचा शेकडा प्रमाण १२.५% आहे.

**गर्भावस्था व प्रसव नंतर कामाचा भार यात काही फरक आहे का?** - असे स्पष्ट होते कि एकूण ४० उत्तरदात्यांपैकी थोडा आराम करायला मिळतो असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचा शेकडा प्रमाण ७२.५ %, व काही बदल नाही असे सउत्तर देणाऱ्याचा शेकडा प्रमाण २० % असून कामाचा प्रमाण थोडा कमी होतो असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांचा शेकडा प्रमाण ७.५% आहे.

**गर्भावस्थे दरम्यान किंवा स्तनपान काळात तुमच्या दैनंदिन कामात कसा बदल होतो?**




उपरोक्त सारणी वरून असे स्पष्ट होते कि एकूण ४० उत्तरदात्यांपैकी कुटुंबांकडून थोडीफार मदत आणि कामात सातत्य असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचा शेकडा प्रमाण ७७.५ %, व काहीच मदत नाही असे उत्तर देणाऱ्याचा शेकडा प्रमाण १२.५ % असून कुटुंबा कडून मदत आणि आराम करण्यास मिळते असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांचा शेकडा प्रमाण १० % आहे.

**जेव्हा तुम्हाला आणि तुमच्या बाळाला आरोग्य सेवा घेण्या करिता कुणाची परवानगी मिळने आवश्यक असते ?**




उपरोक्त सारणी वरून असे लक्षात येते कि एकूण ४० उत्तरदात्यांपैकी घरातील मोठे व्यक्ती असे उत्तर देणारे उत्तरदाते यांचा शेकडा प्रमाण ८० % आहे, व पती असे उत्तर देणारे उत्तरदात्यांचा शेकडा प्रमाण १२.५%, आणि सासू सासरे म्हणणाऱ्याचा शेकडा प्रमाण ७.५% असे आहे.

**गर्भावस्थेत आणि प्रसव नंतर तुमचे आहार कसे असावे हे कोण निश्चित करते ?**




उपरोक्त सारणी वरून असे लक्षात येते कि एकूण ४० उत्तरदात्यांपैकी नियमित घर जे बनवल्या जाते तेच खातो असे उत्तर देणारे उत्तरदाते यांचा शेकडा प्रमाण ८७.५ % आहे, व , सासू ठरवते असे उत्तर देणारे उत्तरदात्यांचा शेकडा प्रमाण ७.५%, आणि स्वतः ठरवतो म्हणणाऱ्याचा शेकडा प्रमाण ५% असे आहे.

**साधारणत: कोणत्या प्रकारचे जेवण बनवल्या जाते?** प्राप्त माहितीवरून असे निदर्शनात येते कि एकूण ४० उत्तरदात्यांपैकी रोज घरी जे बनते ते (उपलब्धते नुसार) असे उत्तर देणारे उत्तरदाते यांचा शेकडा प्रमाण ८५ % आहे, व , भात, चपाती दाळ असे उत्तर देणारे उत्तरदात्यांचा शेकडा प्रमाण १२.५%, आणि सब्जी, भात चपाती म्हणणाऱ्याचा शेकडा प्रमाण २.५% असे आहे.

**निष्कर्ष:**

१. ग्रामीण भागातील महिलांच्या जीवनात गर्भावस्था आणि स्तनदा असतांना सुद्धा ठरलेली घरकामे व स्वयंपाक करावाच लागतो.
२. गर्भावस्था आणि स्तनदा घरातील आणि बाहेरील काम करावेच लागतात थोडा फार काळ विश्रांती करिता मिळतो.
३. माता व बालक साठी आरोग्य संदर्भातील उपचार किंवा लाभ करिता घरच्या वडीलधार्या सदस्यांची परवानगी किंवा सहमती आवश्यक असते.
४. गर्भधारणा आणि प्रसूती पश्चात आहार हे नियमित घरी जे बनवल्या जाते तोच आहार असतो
५. साधारणत: उपलब्धते नुसार घरी स्वयंपाक किंवा जेवण बनत असतो.

**शिफारशी:** लिंगभेद या विषयला धरून कुटुंब सदस्यांसोबत चर्चा व्हायला पाहिजे. निर्णय व्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढवणे गरजेचे आहे करिता महिलांना सक्षमीकरणाकडे विविध माध्यमाने जोडण्याची गरज आहे. आरोग्य आणि पोषण शिक्षणाची गरज माता सोबत कुटुंब सदस्यांना पण देण्याची गरज आहे. पोषणाचा स्तर वाढवायचा असेल तर पोषणबाग / परसबाग घर असणे आवश्यक आहे. खाद्य विविधता गरजेची आहे जेणे करून शरीरात लोह आणि अन्य सूक्ष्म पोषकतत्व हव्या त्या प्रमाणत मिळतील.

**संदर्भ सूची:**


Article, Petkar H.U. (2025). “Samajshashtra Sanshodhan Patrika” लिंगभाव आणि ग्रामीण कौटुंबिक संरचना.

Agarwal, B. (1997). *“Bargaining” and gender relations: Within and beyond the household*. Feminist Economics, 3(1), 1–51.

Bourdieu, P. (1986). The forms of capital. In J. Richardson (Ed.), *Handbook of Theory and Research for the Sociology of Education* (pp. 241–258). Greenwood Press.

Government of India. (2021). *National Family Health Survey (NFHS-5), 2019–21: Maharashtra*. Ministry of Health and Family Welfare.

Kabeer, N. (1999). Resources, agency, achievements: Reflections on the measurement of women’s empowerment. *Development and Change*, 30(3), 435–464.

Kumar, S., & Mohanty, S. K. (2011). Intra-household wealth and child health in India. *Journal of Biosocial Science*, 43(5), 615–635.

Menon, N. (2012). *Seeing like a feminist*. Zubaan Publishers.


# ऊस उत्पादन, दर (FRP) आणि शेतकरी आर्थिक सुरक्षितता: एक सूक्ष्म अभ्यास


**ऋतुराज गायकवाड** संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**डॉ. साहेबराव हिवाळे** प्रोफेसर, समाजशास्त्र विभाग, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापुर, छत्रपती संभाजीनगर.



**गोषवारा:** प्रस्तुत संशोधन ऊस उत्पादक शेतकरी आणि त्यांना मिळणाऱ्या रास्त व किफायतशीर भाव आणि त्यात होणाऱ्या विलंब यांशी निगडीत आहे. FRP ही संकल्पना शेतकऱ्यांना हमीभव मिळण्यासाठी अस्तित्वात आलेली आहे. साखर कारखाने हे ग्रामीण भागात सहकार चळवळीचे मुख्य केंद्र आहेत आणि त्यामार्फत FRP ऊस पुरवठादार/ उत्पादकांना दिला जातो. कृषि मूल्य आयोगाच्या शिफारशीनूसार FRPप्रत्येक साखर हंगामाच्या सुरुवातीस निश्चित केला जातो. FRP संदर्भात तास कायदा देखील अस्तित्वात आहे आणि त्यात असे नमूद केलेले आहे की FRP हे 14 दिवसाच्या आत शेतकऱ्यांना दिल पाहिजे. परंतु तसे न होता FRP देण्यान विलंब होताना दिसते आणि 14 दिवसाची अट ओलांडताना आपल्याला दिसून येते. ह्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज घ्यावे लागते आणि FRP कहा मूल हेतुच गायब होतो. ह्या समस्येचे अभ्यास ह्या संशोधनात करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये 50 शेतकाऱ्यांकडून प्राथमिक माहिती गोळा करून संख्यात्मक आणि विश्लेषणात्मक परीक्षण केलेले आहे.

**प्रमुख शब्द:** FRP, शेतकरी, साखर कारखाने.


**प्रस्तावना:** भारतातील कृषि अर्थव्यवस्थामध्ये ऊस हे महत्वाचे नगदी पीक आहे. या पिकाकडे अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून पहिले जाते, विशेषत: उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्रामध्ये. हे पीक उत्पादनपूर्ती मर्यादित नसून ते सहकार चळवळ, ग्रामीण भागातील रोजगार, स्थानिक राजकीय स्वरूप आणि एकंदरीत विकास यांच्याशी संबंधित आहे. हे पीक रोजगार निर्मिती आणि अर्थ व्यवस्था विशेष करून ग्रामीण अर्थव्यवस्था यास चालना देते. साखर कारखाने हे, एक प्रकारे उद्योग आणि कृषि यांना जोडण्याचे ठिकाण. याच कारणांमुळे ऊस हे पीक उत्पादनपूर्ते मर्यादित नसून, साखर कारखाने, सहकारी संस्था, राजकीय व्यवस्था, ग्रामीण आर्थिक व्यवहार आणि स्थानिक संत संरचना यासोबत घट्ट जोडलेलें आहे. साखर उद्योग यावर ऊस उत्पादक शेतकरी आणि ग्रामीण मजूर यांचे जीवनमान अवलंबून आहे. या वरुन हे स्पष्ट होते की ऊस दर निर्धारण आर्थिक प्रक्रिया तर आहेच परंतु ती एक व्यापक सामाजिक, राजकीय आणि संस्थात्मक प्रक्रिया आहे.

तसे बघितले तर ऊस उत्पादन हे खर्चीक तर आहेच आणि दीर्घकालीन सुद्धा आहे. पानी, बियाणे, मजूर, नंतर खत, कंपनी आणि माल वाहतूक यावर्ति खूप खर्च असतो. त्यामुळेच शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य ऊस दारावर अवलंबून असते. भारतात केंद्र सरकार योग्य व लाभदायक दर (Fair and remuneration price) निश्चित करते आणि ही अधिकृत चौकट मानून ऊस दर निर्धारण केले जाते. Sugarcane (control) order, 1966 नुसार सखार कारखान्यांनी ऊस पुरवठ्यानंतर 14 दिवसाच्या आत शेतकऱ्यांना

देयक देणे बंधनकारक आहे. प्रत्यक्ष मात्र अनेकांना 14 दिवसांच्या आत FRP मिळत नसल्याचे आढळते आणि कायद्याची अंबलबाजवणी होत नसल्याचे आढळते. अनेक राज्यांमध्ये विशेषकरून महाराष्ट्रात ऊस दर थकबाकीची संरचनात्मक समस्या निर्माण झाली आहे. या सोबतच उत्पादन खर्च यात वाढ, साखर कारखान्याची आर्थिक कणकण, संकरेचा विक्री दर आणि त्याची स्थिरता या सगळयांमुळे ऊस दर थकबाकी ची समस्या वारंवार निर्माण होते. निर्यात धोरणे, एथेनऑल मिश्रण धोरण, सहकारी आणि खासगी कारखाने यांचे व्यवस्थापन यांचा परिणाम ऊस दर याद करण्याच्या क्षमतेवर होत असून शेतकऱ्यांच्या आर्थिक व्यवहारावरसुद्धा होतो.

सामाजिक दरुस्तीने जर पहिले तर ऊस निर्धारण आणि FRP देण्यात जो विलंब होतो त्यात अल्पभूधारक शेतकरी अडचणीत सापडतो. ऊस पीक घेण्यासाठी लागवडीपासून ते कापणीपर्यंत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक शेतकऱ्यांना करावी लागते. वेळेत ऊसाची देयक रक्कम न मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांची रोख प्रवाह व्यवस्था कोलमडते आणि त्यांना परिणामी कर्ज घ्यावे लागते. नातेवाईक, सावकार, बँक, सहकारी संस्था, मायक्रो फायनॅन्स संस्था यांकडून घरगुती व पुढच्या हंगामसाठी कर्ज घ्यावे लागते. या संगल्यामुळे सामाजिक आणि आर्थिक संकटच एक प्रकारे उभे राहते. या वरुन दर थकबाकी शेतकार्याच्या कर्जबाजारीपणाला चालना देते असे म्हणत येईल. ह्या सगळ्या प्रकारात लक्ष्य घातल्यास असे दिसते की कायदा असताना त्याचे पालन न होणे किंवा अंबलबाजावणी न होणे यामुळेच शेतकऱ्यांपूढे असुरक्षितता निर्माण होते. याचे विश्लेषण करताना संस्थात्मक अर्थशास्त्र याची चौकट महत्वाची ठरते, फक्त बाजार अर्थशास्त्र अपुरे ठरेल. **डग्लस नॉर्थ** यांच्या मते संस्था त्यातील कायदे आणि नियम हे आर्थिक वर्तन ठरवतात, जर ते व्यवस्थित अमलात नाही आणले तर आर्थिक असुरक्षितता वधू शकते. ऊस दर देयकामधील विलंब हे टेक दर्शवीत आहे, FRP कागदावर तर हमी देत आहे परंतु शेतकरी त्याचे लाभार्थी ठरत नाहीत. हे संस्थात्मक अपयश आहे असेच म्हणावे लागेल आणि यामुळे शेतकरी आर्थिक दुर्बल बनतो हेही लक्षात येते.

महाराष्ट्रामध्ये सहकारी साखर कारखाने सामाजिक गतिशीलतेचे प्रतीक मानले गेले आहेत. त्यांच्याशी शेतकऱ्यांचे सशक्तीकरण आणि ग्रामीण विकासदेखील संलगन्न आहे. यशवंतरओ चव्हाण आणि वसंत्रओ नाईक यांसारख्या नेत्यांनी सहकारी साखर कारखाने यांना ग्रामीण विकासाचे साधन म्हणून बघितले आणि तसे घडविले. हे बघता अलीकडच्या काळात साखर कारखान्याचे खांजगिरकण, अपारदर्शक व्यवस्थापन, राजकीय हस्तक्षेप आणि आर्थिक डोलामडोल या सर्वामुळे सहकार मॉडेलच धोक्यात आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. हे संस्थात्मक संकट असून ऊस दर थकबाकी त्यातील एक महत्वाचे लक्षण आहे.

साखर कारखाने आणि शेतकरी यांच्यातील जे नाते आहे ते केवळ आर्थिक नसुन एक विश्वासाचे सुद्धा आहे. समजशास्त्रीया दृष्टीतून जर बघितले तर ऊस दर देयक यात जो विलंब होतो त्यातून शेतकऱ्यांमध्ये तणाव व असुरक्षितता निर्माण करते. यातून सामाजिक असंतोष तर निर्माण होतोच त्याचबरोबर संस्थेवरील विश्वास जो असतो त्याचंदेखील ह्रास होतो. यामुळे संस्थांचा सामाजिक पाया कमकुवत होण्याची शक्यता वाढते. या सर्वांचा परिणाम एकंदरीत कृषि चळवळीवर आणि ग्रामीण सामाजिक रचनेवर होतो. कारखाणींमध्ये राजकीय प्रभाव अधिक आहे. संचालक मंडल, स्थानिकचे राजकारण आणि धोरण निर्मिती यांचे अतूट नाते आहे. यामुळेच ऊस दर निर्धारण करण्याचा प्रश हा राजकीय सुद्धा आहे. राजकीय अर्थशासहटर चौकटीतून जर अभ्यासिले तर ऊस दर निर्धारण प्रक्रियेमध्ये सत्ता आणि त्यांचे संबंध यांचे प्रतिबिंब दिसतेच. यामुळेच अनेकदा असे दिसते की थकबाकी ही आर्थिक अडचणीपेक्षा व्यवस्थापणामधील प्रधान्यांमुळे आणि धोरणात्मक निर्णयामुळे वाढते. ऊस दर निर्धारण करताना जी समस्या येते ती केवळ बाजारातील चढ उतार यावर अवलंबून नसून ती एक सामाजिक आर्थिक संस्थात्मक समस्या आहे. ऊस दर देयक यात जो विलंब होतो तो थेट शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर, आणि उपजीविकेच्या सुरक्षिततेवर परिणाम करतो. ही पार्श्वभूमी बघता सदर संशोधन शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अनुभव्यवर आधारित आहे. कृषि विकासाच्या मर्यादा आणि संस्थात्मक अपयश यातून ऊस दर निर्ढाणातील समस्या आणि त्याचा शेतकऱ्यांवर विपरीत परिणाम कसा होतो हे समजून घेण्याचा प्रयत्न या संशोधनात आहे.

**संशोधनाची उद्धीष्टे:** 1. ऊस दर देयकातील विलंबाचे स्वरूप आणि कालावधी समजून घेणे 2. थकबाकीमुळे शेतकऱ्यांना कर्ज घेण्याची गरज भासते का याचा अभ्यास करणे

**संशोधनाची गृहितके:** 1. बहुसंख्य शेतकऱ्यांना ऊसाची रक्कम 14 दिवसाच्या आत मिळत नाही. 2. थकबाकीमुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपान वाढतो. 3. FRP देण्यास विलंब झाल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यवर परिणाम होतो.

**संशोधन पद्धती:** या संशोधनाचे उद्देश ऊस दर निर्धारणात जी समस्या येते आणि त्याचा शेतकऱ्यांवर त्यांच्या अर्थकारणावर कसा परिणाम होतो हा आहे. ह्यामुळे हे संशोधन मुळात शेतकरी केंद्रित आहे. ऊस दर देण्याकरिता संस्था, कायदे, नियम अस्तित्वात आहेत पण तरीही अंमलबजावणी व्यवस्थित होत नसून शेतकऱ्यांच्या जीवनात यांचा विपरीत परिणाम कक्ष होतो, हे संशोधनाचे केंद्र आहे. सादर संशोधनाची रचना ही **संख्यात्मक** (quantitative), **वर्णनात्मक** (descriptive) आणि **विश्लेषणात्मक** (analytical) आहे. ऊस दर देयक 14 दिवसाच्या आत प्राप्त होते काय आणि विलंब असेल तर त्याचे स्वरूप जाणून घेण्यासाठी वर्णनात्मक पद्धती उपयोगिले आहे. तसेच, थकबाकीचा आणि शेतकाऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचे नाते उलगडण्यासाठी विश्लेषणात्मक पद्धती वापरली आहे. संशोधनासाठी प्राथमिक माहिती ही **प्रश्नावली** (questionnaire) पद्धतीने गोळा करण्यात आलेली आहे. प्रश्नावालि ही गूगल फॉर्म द्वारे बनवण्यात आलेली आहे. प्रश्नावली मध्ये शेतकऱ्यांच्या अनुभवानुसार प्रश्न समाविष्ट आहेत, जसे की FRP 14 दिवसाच्या आत मिळते का, आणि जर विलंब झाल्यास कर्ज घ्यावे लागते का. याद्वारे शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष अनुभव समोर येते. शेतकाऱ्यांनाच प्राथमिक माहितीचे स्रोत या संशोधनात मानले आहे. धोरणनिर्मिती आणि संस्थात्मक दृष्टीकोनाऐवजी शेतकऱ्यांचे अनुभव हे खरे वास्तव मांडण्यास मदत करतील. यावरुण **परिणामधिष्ठिट विश्लेषण** (outcome based) करता येईल. प्राथमिक

स्रोतबरोबरच दुय्यम स्रोतदेखील उपयउक ठरलेले आहेत. त्यात प्रकाशित संदर्भ पुस्तके, सप्ताहिके, अहवाल, लेख यांचा आधार घेतला आहे. सदर संशोधनासाठी **कृषि समाजशास्त्र** (sociology of agriculture) या सैद्धांतिक चौकटीचा आधार घेतला आहे. संस्था साठीचे नियम असताना देखील FRP देण्यामुळे जो विलंब होतो आणि त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक असुरक्षितता वाढते. त्यातून सामाजिक असंतोष जो निर्माण होतो ते समजण्यासाठी समाजशास्त्रिय संशोधनाची चौकट अतिशय उपयुक्त ठरते.

एकूण, प्रश्नावली आधारित, शेतकरी केंद्रित आणि समाजशास्त्राच्या चो◌ौकटीत बसून हे संशोधन ऊस दर देताना जो विलंब होऊन शेतकऱ्यांच्या अर्थकार्णावर होणार परिणाम समजून घेण्यासाठी उपयोगी ठरेल.

**नमूना निवड:** सादर संशोधनासाठी शेतकरी हा अभ्यासाचा मुख्य घटक घेण्यात आलेला आहे. संशोधनासाठी महाराष्ट्रातील **बीड** जिल्ह्यातील **गेवराई** तालुक्यातील **चकलंबा** गावातून 50 ऊस उत्पादक शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे. नमूना निवडण्याकरीता **साधी याद्रुच्छिक नमूनानिवड** (simple random sampling) पद्धत वापरण्यात आलेली आहे. या पद्धती मुळे निवडताना पक्ष पंत होण्याची शक्यता कमी असते. थकबाकीचा अनुभव हा भिन्न भिन्न असू शकतो, जसे की लघु, मोठे शेतकरी, कारखाना सहकारी की खाजगी, अश्या प्रकारांचे प्रतिनिधित्व घेण्यासाठी simple random sampling पद्धत योग्य ठरते. या अभ्यासाचे उद्धीष्ठ राज्य पातळीवर निष्कर्षाचे समण्याकरण करणे नाही तर दर देण्यात जो विलंब होतो त्यातून सामाजिक जीवनात काय परिणाम होतात याचे आकलन करणे आहे. याच कारणांमुळे मर्यादित आणि प्रातिनिधिक नमुने संशोधनाची उदधीष्टे सध्या करण्यात पूरक ठरतात. गेवराई तालुक्यातील **चकलंबा** गावाची निवड ही उद्देशपूर्ण (purposive) आहे. त्याचे कारण असे की त्या ठिकाणी ऊस उत्पादन मोठ्या प्रमाणात होते आणि साखर कारखान्यात ऊस पुरवीला जातो. या प्रकारे शेतकऱ्यांचा FRP शी थेट संबंध येतो. अशाप्रकारे निवडलेल्या क्षेत्राचा संशोधनाच्या विषयाशी प्रत्यक्ष संबंध येतो. संशोधनासाठी शेतकऱ्यांची निवडीसाठी सामाजिक वा आर्थिक आधारे वर्गीकरण केलेले नाही. त्याचे कारण असे की ऊस दर थकबाकीची समस्या सर्वच स्तरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर परिणाम करते. याच कारणामुळे simple random sampling पद्धतीने विविध स्तरातील शेतकऱ्यांचे अनुभव नमूद करण्यास उपयुक्त ठरते.

**माहितीचे विश्लेषण:** सादर संशोधनासाठी गेवराई तालुक्यातील **चकलंबा** गावातील 50 ऊस उत्पादक शेतकऱ्यांना निवडण्यात आले आहे. त्यांच्याकडून google फॉर्म द्वारे प्रश्नावली भरून घेण्यात आलेली आहे. या संकलित माहिती वरुन वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीने परीक्षण केले आहे.

संकलित माहिती वरुन असे आढळते की बहुसंख्य शेतकरी वर्ग सहकारी साखर कारखाना यांना उस पुरवठा करतो. यावरुण ही स्पष्ट होते की या परिसरात सहकारी चळवळ अद्यापही आपले अस्तित्व टिकवून आहे. अभ्यासतील बहुतांश शेतकरी हे मध्यम भूधारक आहेत. 48% शेतकऱ्यांना 5 एकर पेक्षा जास्त शेती असल्याचे समजते. तसेच 32% शेतकऱ्यांना 2-5 एकर शेती आहे, 14% यांना 1- 2 एकर शेती आहे, आणि 6% यांना 1 एकर पेक्षा कमी शेती आहे. निवडलेल्या अनेक शेतकऱ्यांचे ऊस हे प्रमुख नगदी पीक असून वार्षिक उत्पन्नाचा मुख्य आधार आहे.







विश्लेषणातून असे स्पष्ट होते की बहुसंख्य शेतकऱ्यांना 14 दिवसाच्या आत देयक मिळत नाही. कमी शेतकऱ्यांना वेळेत ती रक्कम मिळते. ही परिस्थिति अपुरी अंमलबजावणी आणि संस्थात्मक अपयश आहे. 83.7% शेतकरी असे म्हणतात की त्यांना 14 दिवसाच्या आत FRP मिळत नाही आणि 16.3% यांनाच ती रक्कम नियोजित वेळेत प्राप्त होते. ज्यांना FRP मिळण्यात विलंब होतो त्यांच्यात 4.4% म्हणतात की त्यांना 1 महिन्यापेक्षा कमी कालावधीत मिळतो, 40% म्हणतात त्यांना 1- 3 महिन्यात मिळतो, 33.3% म्हणतात त्यांना 3- 6 महिन्यात मिळतो आणि 22.2% म्हणतात त्यांना 6 महिन्यापेक्षा जास्त कालावधीत लागतो.

विलंब झाल्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना कर्ज घ्यावे लागते. 52% शेतकरी म्हणतात की त्यांना कर्ज घेण्याची परिस्थिति निर्माण होते आणि ते कर्जबाजारी होतात. तसेच यांचे मुख्य कारण असे आहे की गेल्या वर्षीच्या तुलनेत शेतकाऱ्यांना मजूरी, खाते, पानी, वीज, वाहतूक आणि तोंडणी साठी कहा खर्च वाढलेला असतो. यात नाहुसंख्या शेतकाऱ्यांना 54% यांना खाते यासाठी जास्त खर्च येतो. 26% शेतकऱ्यांना किटाकणशके साठी जास्त खर्च येतो. उर्वरित शेतकऱ्यांना मजुरी, डिजेल, वीज, वाहतूक यात खर्च वाढ अधिक असल्याचे नमूद केले.







36% शेतकऱ्यांना असे वाटते की तोंडणीच्या वेळेबाबत आणि दराबाबत सौदशक्ती काही प्रमाणात त्यांच्याकडे आहे असे वाटते. 36% शेतकाऱ्यांना असे वाटते की ते कारखान्यावर अवलंबून आहेत. 10% शेतकऱ्यांना वाटते की त्यांच्याकडे सौदशक्ती नाही.

**निष्कर्ष:** या संशोधानातून असे दिसून येते की ऊस दर निर्धारणाची जी यंत्रणा आहे त्यात देयक देण्यात विलंब होतो. या FRP च्या विलंबामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यवर परिणाम होतांना स्पष्ट दिसते. अभ्यासकक्षेत्रातील बहुसंख्य शेतकऱ्यांना वेळेत FRP मिळत नसल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे तात्पुरत्या गरजांसाठी त्यांना कर्ज हे घ्यावे लागते. ही स्थिति कायदेशीर जय तरतुदी आहेत त्यांची अपुरी अंमलबजावणीचे द्योतक आणि संस्थात्मक अपयश दाखवते. देयकयातील विलंब हा संरचनात्मक स्वरूपाचा प्रश्न आहे असे दिसते. 5 एकर पेक्षा कमी क्षेत्र असेले शेतकरी जास्त आढळून आल्याने, या विलंबच फटका अति तीव्रतेने त्यांना बसतो. उत्पादन खर्च प्रत्येक वर्षी वाढतो आणि पेमेंट मध्ये विलंब असल्याने शेतकऱ्यांचे नगदी प्रवाह (cash flow) विस्कळीत होते असे निदर्शनास येते. थकबाकी व कर्जबाजारीपणाचा थेट समबंध आढळतो. वाढता खर्च आणि उशिरा FRP मिळत असल्याने खर्च दर दडपणाची परिस्थिति निर्माण होते. या मुळे शेती ही जोखमीची व्यवस्था बनल्याचे चित्र आपल्याला दिसते. सहकारी कारखाना ही संकल्पना मुळात शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी आहे. असे असले तरी करखान्याकडून देयक देतांना विलंब झाल्यामुळे सहकारी मॉडेलची विश्वासार्हता वर प्रश्न निर्माण होतो. शेतकऱ्यांची सौदशक्ती सुद्धा एकंदरीत संस्थात्मक, राजकीय आणि सामाजिक परिस्थिति बघता मर्यादित आहे. त्यांचा सहभाग नगण्य असल्याचे दिसते. समाजशासत्रीय दृष्टीने जर पहिले, तर संस्थात्मक अपयश दिसून येते. यामुळे, सामाजिक- आर्थिक समतोल बिघडलेले सुद्धा दिसून येते.

**संदर्भसुची:**


१. Bhargava, V. (1997). Report of the Sugar Industry Enquiry Commission. Government of India.
२. Godbole, M. (1999, March). Report of the Committee on Co-operative Sugar Factories in Maharashtra. Maharashtra State Government.
३. Government of Maharashtra. Fair and Remunerative Price (FRP) definition and policy. https://www.mahasugar.in/frp.php
४. Jacob, T. (2013, July). Report of the Working Group on Sugarcane Productivity and Sugar Recovery in the Country. Ministry of Consumer Affairs, Food and Public Distribution. Government of India.
५. NITI Aayog. (2020). Report of the Task Force on Sugarcane and Sugar Industry. Government of India.
६. North, D. C. (1990). Institutions, institutional change and economic performance (pp. 3- 35). Cambridge University Press.
७. Patil, S. (2009, May). Report of the High-Powered Committee on Cooperatives. Ministry of Agriculture. Government of India.
८. Press Information Bureau. (2023). Status of cane price payment (State/ Year-wise). https://www.pib.gov.in/PressReleseDetailm.aspx?PRID=1941390&utm
९. Rangarajan committee. (2012). Report on the Regulation of Sugar Sector in India: The Way Forward. Government of India.
१०. Sugar Commissionerate, Government of Maharashtra. (2023, November 15). Sugarcane Price Arrears Fortnightly Report- Season 2022-23.
११. Thorat, Y. S. P. (2009, April). Report of the Group of Experts on Sugar: Roadmap for Indian sugar sector. Department of Food and Public distribution. Government of India.
१२. Tuteja. (2004, December). Report of the Committee on Revitalization of Sugar Industry. Ministry of Consumer Affairs, Food and Public Distribution. Government of India.
१३. https://www.gleaf.in/news/28-maharashtra-sugar-mills-face-action-for-non-payment-of-dues-to-farmers
१४. https://timesofindia.indiatimes.com/city/kolhapur/fair-price-for-sugar-cane-farmers-to-be-based-on-seasons-sugar-recovery-rate-decides-panel-led-by-ajit-pawar/amp_articleshow/123837910.cms

१५. https://plantix.net/en/blog/fair-and-remunerative-price-sugarcane/
१६. https://economictimes.indiatimes.com/news/economy/agriculture/increase-in-frp-to-moderate-profitability-of-sugar-mills-from-maharashtra-karnataka-says-icra/articleshow/107921203.cms

# ग्रामीण भागातील कृषी व्यवस्थेमध्ये काम करणाऱ्या शेतमजूर महिलाच्या समस्या- एक समाजशास्त्रीय अभ्यास

**सिमा मुकुंद कांबळे** संशोधक विद्यार्थी समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** प्रस्तुत शोध निबंधामध्ये ग्रामीण भागातील कृषी व्यवस्थेमध्ये काम करणाऱ्या शेतमजूर महिलाच्या समस्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. कृषीव्यवस्थेत महिला शेतमजूर सर्वाधिक असल्याचे दिसते. ग्रामीण भागात जवळजवळ सर्व महिला शेतात काम करतात. शेतीतील कामामध्ये 80 टक्के काम महिला शेतमजूर करतात. शेती मानवी इतिहासातील सर्वात जुनी आणि महत्त्वाची आहे. शेती ही मानवी जीवनाचा कणा आहे. जो मानवी जीवनाचा उदरनिर्वाह आणि देशाच्या आर्थिक विकासाचा महत्त्वाचा पाया आहे. शेती ही जगाचा पोशिंदा आहे. कारण शेतीमध्ये जे पिकते ते मानवाच्या जगण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. मानवी जीवनात शेतीला अधिक महत्त्व आहे. तसेच जागतिक विकासामध्ये उत्पादन वाढवणे आणि रोजगारामध्ये कृषीचा भरदस्त वाटा आहे.

अनेक वर्षापासून मानव आपल्या उदरनिर्वाहाची गरज भागवण्यासाठी शेती करताना दिसतो. प्राचीन काळात शेती ही पारंपारिक साधनाव्दारे व पूर्णता निसर्गाच्या आधारावर केली जायची मात्र कालांतराने तंत्रज्ञान व साधनाच्या आधारावर कृषी क्षेत्राचा विस्तार व विकास होत गेला. पूर्वी केवळ उदरनिर्वासाठी मर्यादित असणारी शेती आज नगदी पीक घेऊन तिचे एक व्यावसायिक रूप पूढे आले आहे. आज कृषीक्षेत्राकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून पाहिले जात असून प्रगतशील शेती करून तिच्यात मोठे ती स्थित्यंतर झाले आहेत. तसेच शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतमजूर समाजावर कृषीक्षेत्रात झालेल्या बदलाचा मोठा व्यापक प्रभाव पडलेला आहे. एका बाजूला नव-नवीन तंत्रज्ञान, आधुनिक साधने, तंत्रज्ञान खते बियाने यामुळे शेतकऱ्याच्या स्थितीत सुधारणा होऊन त्यांची आर्थिक प्रगती झाली आहे. मात्र शेतीक्षेत्रात कबाडकष्ट करणाऱ्या शेतमजूराच्या स्थितीत अध्यापही सुधारणा झालेली नाही. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संशोधिकेने ग्रामीण भागातील कृषिव्यवसस्थेमध्ये काम करणाऱ्या शेतमजूर महिलाच्या समस्या एक समाजशास्त्रीय अभ्यास या विषयावर शोधनिबंध लिहिला आहे.

**प्रस्तावना:** भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील जवळपास ७० टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. या देशातील कष्टकरी, मजूरदार या वर्गाच्या रोजगाराची साधने ही शेती व्यवसायाशी संबंधीत आहेत. भारतीय लोकसंख्येतील ६४ टक्के लोकसंख्या कृषिक्षेत्रावार अवलंबून आहे. आणि त्यातही ७० टक्के शेतकरी हे अल्पभूधारक आहेत. प्राचीन काळापासून महिलांचा कृषी व्यवसायात सहभाग महत्त्वाचा असून ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. शेतीचा शोध स्त्रीयानी लावला असून पूर्वीपासून शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या अधिक असून त्या शेतकरी व शेतमजूर म्हणून काम करताना दिसतात. घरातील कामे करून त्या शेतीतील काम करतात. ग्रामीण भागातील बहुतांश स्त्रिया शेतातील राबतात. पुन्हा घरातील कामाची संपूर्ण जबाबदारी संपूर्णपणे त्याचीच असते. घरातील जबाबदारी सांभाळून या पुरूषांना अन्य कामात मदत करतात. या महिला शेतीमध्ये पेरणी, कापणी, मळणी इत्यादी कामे करतात. कृषी क्षेत्रात महिला कामगारांपैकी शेतमजूर महिलांचे प्रमाण अधिक आहे. कृषीव्यवसायात कामाचे स्वरूप पाहता महिलाचा शेती कामात अधिक सहभाग असतो. घरातील गोठा साफ करणे, दुध काढणे, जनावरांना चारा घालणे, खुरपणी, लावीण, पेरणी, कटाई, बेचाई यासारख्या सर्व कामे महिला करत असतात. तसेच ग्रामीण लघु उद्योगात देखील महिला मोठ्या प्रमाणात सहभागी असून शारीरिक श्रम करताना दिसून येतात. कृषीव्यवसाय हा महिलांवर आधारित व्यवसाय आहे. कृषीव्यावसायात महिलांचे योगदान मोठे असून अन्नधान्य उत्पादनात जवळपास ५० टक्के महिलाचा सहभाग हा कृषीव्यवस्थेत आहे.

ग्रामीण भागात शेतमजूर महिलाची संख्या जास्त प्रमाणात आढळते. शेतीक्षेत्रात शेतमजूराच्या वाटा हा मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. आणि शेतमजूरांची संख्या जास्त असल्यामुळे त्याच्यातही स्पर्धा वाढते. आणि त्याचे शोषण मोठ्या प्रमाणात होत असते. शेतमजूर महिलाचे जीवन हे अतिशय निकृष्ठ दर्जाचे दिसून येते. विकसनशील देशामध्ये शेती क्षेत्राला नेहमीच अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. भारत हा विकसनशील देश असल्याने भारतात शेतीला जास्त महत्त्व दिले गेले असूनही भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के लोक हे भारतातील ग्रामीण भागात वास्तव्य करतात. तसेच ग्रामीण भागातील भूमिहीन लोकांसाठी शेतमजूरी हे देखील रोजगाराचे मुख्य साधन आहे. तसेच शेतीक्षेत्राचा विकास होण्यासाठी शेतमजूर तितकेच महत्त्वाचे आहे, कारण शेतमजूरा शिवाय शेतीचा विकास होणे शक्य नाही. विशेष म्हणजे शेतीव्यवसायात शेतमजूर महिलाचा वाटा सर्वाधिक जास्त महत्त्वाचा असल्याचे आढळते. शेतमजूर महिला पुरूषांच्या खांद्याला-खांद्या लावून कष्टाची कामे करीत आहेत. ग्रामीण समाजातील कृषी क्षेत्रात शेतमजूर महिलांचा दर्जा अत्यंत महत्त्वाच्या असूनही त्यांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. भारतीय शेतीची 'अन्नपूर्णा' आणि 'कणा' म्हणूनच ओळखल्या जाणाऱ्या महिला शेतमजूर शेती उत्पादनात निम्म्याहून अधिक वाटा उचलतात, परंतू त्यांना अनेक समस्याना तोंड द्यावे लागते. शेतमजूर महिलांना जमिनीची तयारी करण्यापासून ते बि-बियाणे पेरणी अशा सर्व

श्रमसाहृय कामामध्ये सक्रिय असतात. म्हणूनच या शोधनिबंधामध्ये ग्रामीण भागातील महिला शेतमजूरांच्या वेगवेगळ्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**पूर्व साहित्याचा आढावा:**

त्रिपाठी, रेणु आणि त्रिपाठी अपर्णा (२०११): यांनी "Working women the Real Status" या पुस्तकात प्रकरण ६ मध्ये शेतीतील काम करणाऱ्या महिला शेतमजूराच्या समस्या मांडल्या आहेत. शेतीक्षेत्रातील शेतमजूरांची आर्थिक स्थिती खालावल्यामुळे महिला शेतमजुरांना शेतात कामे करण्यासाठी जावे लागते. कामाच्या ठिकाणी स्त्रियांना शेतमालकाकडून समानतेची वागणुक मिळत नसल्याचे ह्या अभ्यासातून दिसून येते. तसेच त्यांना मिळणारे वेतन व त्यात होणारी भिन्नता कामाचे स्वरूप, त्याना दिला जाणारा आरामाच्या वेळेमध्ये भेदभाव होताना दिसल्याने आढळून आले. २० राज्यातील एक दिवसाच्या मजूरीच्या अहवालावरून शेतीत पेरणी करण्यासाठी पुरूषाला ७२ रू. मजूरी दिली जात असल्याचे आढळून आले तर महिला शेतमजूरांना ५०.७५ रू मजूरी दिली जात असल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच स्त्री-पुरूष च्या मजूरी दरात भिन्नता दिसून येते. तसेच महिला शेतमजूर ह्या निरक्षर असल्याने कामाच्या ठिकाणी त्याचे शारिरीक शोषण तसेच सामाजिक सुरक्षेचा अभाव, त्याचे दारिद्रय गरिबी, व अल्प मजुरी दर आणि त्यासाठी सरकारी योजनाचा अभाव अशा वेगवेगळ्या समस्यांना त्यांना सामोरे जावे लागत असल्याचे या अभ्यासातुन निर्देशनास येते.

**ढोबळे गोविंद नागनाथ (फेब्रुवारी २०२०)** "ग्रामीण महिला शेतमजूर समस्या व उपाय" या शेतीव्यवसायातील ग्रामीण शेतमजूर महिलाच्या समस्या आणि उपाय यावर प्रकाश टाकल्याचे आढळून येते. कृषीक्षेत्रात भुमिहीन महिला शेतमजूराचे स्थान, ग्रामीण समुदयातील लिंगभेदामुळे महिला शेतमजूर व पुरूष शेतमजूर याचे दोन भाग पाडले असून, यामध्ये जमीन नांगरणे, झाडे तोडणे, बंधारे घालणे असे सक्तीचे कामे पुरूष शेतमजूराकडे असतात. तर कापसाची वेचणी करणे, फळे तोडणे, निंदणे, खुरपणे, फुले तोडणे, खत देणे, पाणी आणणे, पेरणी करणे इ. काम महिला शेतमजूर करतात. तसेच शेती ही अधिक प्रमाणात निसर्गावर अवलंबून असल्यामुळे चार ते पाच महिने शेतीवर काम मिळताना दिसून येते. तर इतर वेळी कुटुंबाच्या जाबबदाऱ्या सांभाळून शेतमजुर महिला ह्या कोणतेही काम करण्यास तयार होतात असे आढळले असता. गुरे ढोरे सांभाळणे, लहान मुलाचा सांभाळ करणे इ. कामे करताना दिसून आल्या. तसेच ग्रामीण शेतमजूर महिला अल्प मोबदल्यावर काम करताना या शोधातून दिसुन आल्या अशा समस्यावर ढोबळे गोविंद यांनी प्रकाश टाकलेला दिसुन येत आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:** ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांना मिळणाऱ्या मजूरीचा अभ्यास करणे. ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे. ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांच्या समस्या जाणून घेणे.

**गृहितके:** ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांना मिळणाऱ्या मजूरीचा मोबदला अल्प मिळतो. ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांची आर्थिक तसेच सामाजिक स्थिती खालावलेली आहे. ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांना अनेक समस्याना तोंड द्यावे लागते.

**संशोधन पध्दती:** संशोधनाचे स्वरूप व आशयाचे आकलन होण्यासाठी संशोधनात शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असल्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला आहे.

**तथ्य संकलन:** प्रस्तुत शोधनिबंधात तथ्यांच्या संकलनासाठी दुय्यम तथ्य संकलन तंत्राचा वापर करण्यात आला आहे. तथ्य सामग्रीच्या उपलब्धतेसाठी लिखित ग्रंथ दैनिक वृत्तपत्रे, मासिके, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट, संशोधन पत्रिका इत्यादी साहित्याचा उपयोग सदरील शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**ग्रामीण भागातील शेतमजूर महिलाच्या समस्या:** शेतमजूराचे वर्गीकरण केले तरी शेतमजूर पुरूष व स्त्रिया असे विभाजन करता येते. यात परूष शेतमजूर यापेक्षा स्त्री शेतमजूरांना घरची व बाहेरच्या अशी दोन्ही परिस्थिती सांभाळावी लागते. त्यांना त्यांच्या कुटुंबाकडे लक्ष द्यावे लागते. घरात बऱ्याच वेळा अनेक समस्या असतात. त्या सर्व समस्या त्यांना भेळसावत असतात. त्या सर्व समस्यांना तोंड देवून त्यांना त्यांचा संसार सांभाळावा लागतो. अनेक शेतमजूर स्त्रियांच्या पतीचे निधन झालेले असते. अशा वेळेस त्यांना सर्व कुटुंबाला सोबत घेवून जगावे लागते. तसेच कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या, आरोग्याच्या शैक्षणिक अशा अनेक समस्या असतात. त्या सर्व समस्यांना एकट्या स्त्रीला सामोरे जावे लागते. ग्रामीण भागात उदरनिर्वाहाचे साधन शेती असते. पण बऱ्याच कुटुंबाकडे आवश्यक तेवढी शेती नसते. त्यामुळे दुसऱ्यांच्या शेतात जावून शेतमजूरी करावी लागते. पुरूषांनी कमावून आणलेले उत्पन्न पूर्ण कुटुंबासाठी पर्याप्त नसते. ग्रामीण भागात स्त्रिया शेतमजूर होण्याची कारणे तसेच त्यांना येणाऱ्या समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

**कौटुंबिक समस्या:** प्राचीन काळापासून समाजात एकत्र कुटुंब असो किंवा विभक्त कुटुंब असो प्रत्येक कुटुंबात केंद्र स्थानी पुरूष असल्याचे दिसून येते. कुटुंबातील प्रत्येक महत्त्वाचे निर्णय हे कुटुंबातील पुरूषच घेताना दिसून येतात. स्त्रियांनी फक्त घरातील कामे करायची इतर कुठल्याही गोष्टीमध्ये स्त्रियांना बोलण्याचा अधिकार नव्हता अलीकडे या मध्ये थोडी सुधारणा झाल्याचे दिसून येते. परंतू ते फक्त शहरी भागात ग्रामीण भागात अजूनही ही स्थिती तशीच दिसून येते ग्रामीण भागात अजुनही महिलाना कुठल्याही प्रकारचे निर्णय घेण्याचे अधिकार नसल्याचे दिसून येते.

**श्रमाचे विभाजन:** महिला व पुरूषाच्या श्रमाच्या विचार करता महिला शेतमजूर पुरूष शेतमजूरापेक्षा कमी कष्टाची कामे करतात. त्यामुळे त्यांना पुरूषाच्या तुलनेत मजुरी ही कमी दिली जाते. म्हणजेच महिला पुरूषाप्रमाणे मेहनतीची कामे करू शकत नाही. कारण त्या शारिरीक व मानसिक दृष्ट्या दुर्बल असतात. त्यामुळे त्याच्या कामाला मर्यादा येतात. त्यामुळे त्यांना मोबदला हा कमी मिळतो.

**मालकी हक्काचा अभाव:** बऱ्याच कुटुंबात संपत्ती ही घरातील पुरूषांच्या नावे असल्याचे दिसून येते. महिला ह्या लग्नाअधी परक्याचे धन आहे असे समजले जाते. तसेच लग्न झाल्यानंतर तिला सासरी परक्याची लेक आहे असे समजून महिलांना कुटुंबात

परक्यासारखे रहावे लागते. शेतमजूर महिला या फक्त शेतमजूर म्हणून घरच्या अथवा बाहेरील शेतीत कष्ट करतात. परंतु त्यातून मिळणाऱ्या मजूरीवर मात्र त्याचा हक्क किंवा अधिकार नसतो. स्वत: मजूरी करून कमावलेला पैसा खर्च करण्याचा अधिकार मात्र त्यांना नसतो. त्याचबरोबर कुटुंबाच्या कुठल्याही संपत्ती वर त्याचा अधिकार नसतो.

**शिक्षण व साक्षरतेचा अभाव:** ग्रामीण भागातील महिला अशिक्षित असल्याने प्रमाण हे जास्त असल्याचे दिसून येते. बहुतांश शेतमजूर महिला अशिक्षित असल्याने त्यांना नवीन तंत्रज्ञान समजण्यास अडचणी येतात. कुटुंबाची परिस्थिती हलाकीची असल्या कारणाने महिलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. त्याचप्रमाणे गरिबीमुळे त्यांना शेतीतील कामाला जावे लागते. ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी शहरात जावे लागते. त्यामुळे घरापासून लांब जाण्यास कुटुंबातील वडिल मुलींना बाहेर पाठविण्यास तयार होत नाही. अशा अनेक कारणास्तव शेतमजूर महिला अशिक्षित राहतात. त्यामुळे ह्या महिलांना इतर उद्योग व्यवसायात काम करता येत नाही. शिक्षणाच्या अभावामुळे त्यांना अंगमेहनतीचे काम केल्याशिवाय पर्याय नसतो.

**आरोग्याच्या समस्या:** ग्रामीण भागात आज ही बऱ्याच ठिकाणी आरोग्याच्या सुख सुविधाचा अभाव दिसून येतो. शेतमजूर महिलांना शेतीतील कष्टाची कामे करावी लागतात. लहान वयात असतानापासून त्यांना कष्टाची कामे करावी लागतात. त्यामुळे त्याच्यात कुपोषण अस्वच्छता, शिक्षणााचा अभाव, राहणीमानाचा दर्जा, आरोग्य विषयक सुविधांचा अभाव तसेच मानसिक ताण या कारणामुळे त्यांना अनेक आजारांना बळी पडतात. अति दुर्गम भागात आरोग्याच्या सुविधा त्याना उपलब्ध नसतात. अशावेळी कमी वयात लग्न झाल्यामुळे काही महिलांचा प्रस्तुतीच्या वेळी उपचारा अभावी त्याचा मृत्यु हातो.

**निकृष्ट दर्जा:** ग्रामीण भागातील शेतमजूर महिलांचा राहणीमानाचा दर्जा हा अतिशय खालावलेला दिसून येतो. कारण या महिलांच्या कुटुंबाची परिस्थिती ही हालाकीची असते. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी ही शेतमजूर महिलेवर असते. त्यामुळे कुटुंबाच्या मुलभूत गरजा ह्या देखील त्यांना मिळणाऱ्या मजुरीवर पूर्ण होत नाहीत त्यामुळे त्याचा परिणाम हा त्याच्या राहणीमानांवर पडतो. शेतमजूरीतून मिळणारे अल्प वेतनामुळे शेतमजूर महिलाचे राहणीमान हे निकृष्ट दर्जाचे असते. रोज दुसऱ्याच्या शेतीतील कामे करून त्या महिलांना स्वत:कडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही. अशा अनेक कारणामुळे शेतमजूर महिलांच्याा राहणीमानाचा दर्जात सुधारणा होत नाही.

**जातीयता:** आजही ग्रामीण भागात जातीयता असल्याचे दिसून येते. शेतमजूर महिला ह्या बहुतांश दलित, गरीब वर्गातील असल्याने समाजाचा त्याच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन हा वेगळा असल्याचे दिसून येते. इतर जातीतील महिला शेतमजूरांना चांगल्या प्रतीचे काम दिले जाते. या उलट जर शेतमजूर महिला खालच्या वर्गातील असेल तर त्यांना मात्र हीन वागणूक दिली जाते. त्याचबरोबर त्यांना निकृष्ट असे काम दिले जाते. तसेच मजूरी चा मोबदला ही कमी दिला जातो.

**पुरूषाची व्यसनाधीनता:** ग्रामीण भागात आज ही अनेक पुरूष हे कर्जबाजारी आहेत. गरिबीला कंटाळून किंवा इतर काही कारणास्तव पुरूष हा व्यसनाच्या आहारी जातात. ग्रामीण भागात पुरूष शेतमजूर हे दिवसभर काम करता आणि रात्री मात्र दारू पिऊन महिलांना मारहण करतात. ह्या परिणामी महिलाना पुरूषाच्या व्यसनाअहारी त्रास सहन करावा लागतो.

**समाजात दुय्यम दर्जाची वागणूक:** ग्रामीण भागात आज ही शेतमजूर महिलांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. म्हणजे सामाजिक निर्णयात कुठल्याही प्रकारच्या निर्णय घेण्याचा अधिकार हा फक्त पुरूषांना दिला जातो. समाजात अनेक निर्णय प्रक्रियेत शेतमजूर महिलाना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते.

**कर्जबाजारीणा:** शेतमजूर महिला ह्या कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी पार पाडत असताना त्यांना अनेक आर्थिक अडचणीना सामोरे जावे लागते. शेतमजूरीतुन मिळणारा अल्प मोबदला त्यातुन मुलाचा सांभाळ व कुटुंबातील वेगवेगळ्या गरजा पूर्ण होत नसल्या कारणाने त्याना सावकार किंवा बँका कृषी संकटाच्या काळात शेतमजूर महिलांवर कुटुंबाची सर्व जबाबदारी येते, त्यामुळे त्या कर्जबाजारी होतात.

**संघटनेचा अभाव:** ग्रामीण भागातील शेतमजूर हे असंघटीत असल्या कारणाने त्याच्या कुठल्याही मागण्या ह्या पूर्ण होत नाहीत. त्या उलट शहरी भागातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला ह्या संघटीत असल्याने त्याच्या मागण्या पूर्ण केल्या जातात. इतर क्षेत्राच्या तुलनेत शेतीतील कबाडकष्ट करून ही त्याचे शोषण होताना दिसुन येते. त्याच्याकडून शेतीतील प्रमाणापेक्षा जास्त काय करून घेतले जाते. आणि त्याचा मोबदला मात्र कमी दिला जातो. जमीनदार स्वताचा फायदा करून गरिब शेतमजूर महिलाचे शोषण करत असतो.

**सारांश:** ग्रामीण भागातील शेतमजूर महिलांच्या संबंधीत अनेक समस्या आहेत. शेतमजूर महिलांचा विकास घडवून आणायचा असेल तर महिलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यावे लागेल. ग्रामीण भागात वेगवेगळ्या प्रकारे महिलाना प्रशिक्षण देऊन नव-नवीन उद्योगाची उभारणी करणे महत्त्वाचे आहे. तसेच शेतमजूर महिलासाठी असणाऱ्या योजनाची माहिती त्याच्या पर्यंत पोहचवणे गरजेचे आहे. अनेक सरकारी योजनाची माहिती त्याना नाही. तसेच त्याना संघटीत करणे महत्त्वाचे आहे. या सर्व बाबीची जाणीव करून देणे महत्त्वाचे ठरेल.

**निष्कर्ष:** ग्रामीण भागातील शेतमजूर महिलांचे जगणे शेतीवर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील शेतमजूर महिलाना शेतीत अधिक कष्ट करूनही त्यांना त्याचा मोबदला हा अल्प मिळतो. तसेच त्याना कोणतीही कौटुंबिक संपत्ती त्याच्या नावावर नसल्याचे त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जाते. ग्रामीण भागातील शेतमजूर महिलाना दिल्या जाणाऱ्या मजुरीचे प्रमाण हे महागाईच्या तुलनेत बरेच कमी आहे. त्यामुळे शेतमजूर महिलाच्या आर्थिक गरजा पूर्ण होऊ शकत नाही. घरातील आर्थिक व्यवहार हा बऱ्याच कुटुंबात घरातील पती म्हणजेच पुरूषांकडे असल्याने सर्व आर्थिक अधिकार पर्यायाने सर्व बाबींवर त्यांच्या ताब्यात असल्याने या शेतमजूर स्त्रियांना घरातील पुरूषांप्रमाणे त्याना वागावे लागते. बहुतांश शेतमजूर महिलाच्या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र नाही आहे. त्यामुळे

आरोग्य विषयक समस्या निर्माण झाल्यास या शेतमजूर महिलाना तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. पण तिथे जाण्यासाठी पैसे उपलब्ध नसतात. त्यामुळे बऱ्याच वेळा या महिलांना दुखणे अंगावर काढावे लागते. शेतमजूर महिलाना व्यावसायिक प्रशिक्षण घेतले नसल्याने त्यांना केवळ शेतमजूरीच्या उत्पन्नावर अवलंबुन राहवे लागते.

**शिफारशी:** ग्रामीण भागातील शेतीव्यावसायामध्ये कष्ट करणाऱ्या शेतमजूर महिलांना योग्य वेतन देणे. ग्रामीण भागात महिलासाठी सरकारी योजनामध्ये वाढ करावी. शेतीकाम करणाऱ्या महिलाना शासनाने अनुदान द्यावे. शेतीपुरक व्यवसायाची उभारणी करावी व त्याचे प्रशिक्षण गरजु शेतमजूर महिलाना देण्यात यावे.

**संदर्भ:**


१. ग्रामीण महिलांच्या मुलभुत समस्या आणि उपाय www.maracmaharashtra.com
२. मिश्र जय प्रकाश कृषी अर्थशास्त्र साहित्य भवन पब्लिकेशन, २०२३, पृ. क्र. १५६
३. विजय कविमंडन कृषी अर्थशास्त्र मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८, पृ. क्र. २५३
४. त्रिपाटी, रेणु आणि त्रिपाठी अपर्णा (२०११) "Working women the Real Status" प्रकरण ६
५. ढोबळे गोविंद नागनाथ (२०२०) "ग्रामीण महिला शेतमजूर समस्या व उपाय"
६. देशमुख प्रभाकर, "श्रमाचे अर्थशास्त्र" विद्या प्रकाशन, नागपूर, जानेवारी १९८७, पृ.क्र. ३१८.
७. गायकवाड नीता, "महिला शेतकरी सन्मान वर्ष व महिला सक्षमीकरण" शेतीभाती जानेवारी २०२३, पृ.क्र. १-२
८. पुरोहित वसुद्या: कृषी अर्थशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
९. घोबडे प्रकाश: भारतीय समाजरचना: पारंपारिक व आधुनिक, विद्या प्रकाशन, नागपूर, १९८४.


# भारतीय कृषी आणि आधुनिकीकरणाचा सहसंबंध

**डॉ. सुनील प्रल्हाद गायगोल** प्राध्यापक व विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्याल अकोला

**सारांश:** कृषी सर्व उद्योगाची जननी असून मानवाचे पालन-पोषण करणारी, प्रगतीचे सूचक आणि संपन्नतेचे प्रतीक मानली जाते. मानवाच्या जीवनशैलीत शेतीने महत्वाचे बदल घडून आणलेत. हजारो वर्ष जो व्यक्ती भ्रमंती अवस्थेत जगत होता, त्याला स्थायी रुप देण्याचे कार्य शेतीने केले आहे. अविकसीत आणि विकसनशिल देशांचा कृषी हा प्रमुख व्यवसाय असल्याने राष्ट्रीय उत्पनाचा प्रमुख स्त्रोत आहे. याला अपवाद भारत देशही नाही म्हणूनच, शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. शेती व्यवसायाच्या प्रगतीवरच देशाची एकूण आर्थिक प्रगती अवलंबूण आहे. भारतात शेती व्यवसायाचे योगदान महत्वाचे असले तरी शेती व्यवसायाची म्हणावी तितकी प्रगती झालेली नाही. भारतीय कृषी आणि आधुनिकीकरण यांचा परस्परसंबंध हा स्वातंत्र्योत्तर भारताच्या आर्थिक-सामाजिक इतिहासातील एक निर्णायक घटक आहे. हा संबंध केवळ तांत्रिक बदलांचा नसून, सामाजिक संरचना, पर्यावरणीय शाश्वतता आणि आर्थिक विषमता यांवर होणाऱ्या प्रभावांचा गुंतागुंतीचा इतिहास आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून कृषी क्षेत्राकडे पाहिले जाते. स्वातंत्र्यानंतर भारताने औद्योगिकीकरण, शहरीकरण व जागतिकीकरणासोबतच आधुनिकीकरणाची प्रक्रिया स्वीकारली. कृषी क्षेत्रही या प्रक्रियेपासून अलिप्त राहिले नाही. पारंपरिक शेती पद्धतींपासून आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शेतीकडे भारताची वाटचाल सुरू झाली. यांत्रिकीकरण, सुधारित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, सिंचन प्रकल्प, कृषी संशोधन, माहिती-तंत्रज्ञान इत्यादी घटकांमुळे भारतीय कृषी व्यवस्थेत मोठे बदल घडून आले. जगातील सर्वात प्राचीन शेती पद्धतींपैकी एक म्हणजे भारतीय शेती. परंपरागत पद्धती, नैसर्गिक संसाधने आणि ऋतूचक्राशी समरस होऊन केलेली शेती हा भारतीय शेतीचा मूळ स्वरूप होता. परंतु, स्वातंत्र्योत्तर काळात, विशेषतः १९६० नंतर, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने भारतीय कृषी व्यवस्थेमध्ये मूलभूत बदल घडवून आणले. या आधुनिकीकरणामध्ये यंत्रसामुग्रीचा वापर, रासायनिक खते व कीटकनाशके, उन्नत बियाणे, सिंचन सुविधा, तंत्रज्ञानाचा वापर आणि व्यावसायिक दृष्टिकोन यांचा समावेश होता. या प्रक्रियेचे भारतीय शेतीवर सकारात्मक आणि नकारात्मक असे दुहेरी परिणाम झाले आहेत.

**मुख्य शब्द** - कृषी, आधुनिकीकरण, अर्थव्यवस्था, ग्राम, शेतकरी, जागतिकीकरण

**प्रस्तावना** - भारत कृषीप्रधान देश असून याठिकाणी इ.स. पूर्व कालखंडापासून कृषी हा व्यवसाय उदरनिर्वाहाचा महत्वाचा व्यवसाय होता व आहे. आजही भारताच्या एकूण अर्थव्यवस्थेत आणि एकूण लोकसंख्येच्या जवळपास 52 टक्के व्यक्ती प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कृषी क्षेत्रावर अवलंबून असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे भारताला कृषीप्रधान आणि गावांचा देश असे संबोधले जाते. कृषी व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. शेती व्यवसायाच्या प्रगतीवरच देशाची एकूण आर्थिक प्रगती अवलंबूण आहे. भारतात कृषी व्यवसायाचे योगदान महत्वाचे असले तरी या व्यवसायाची म्हणावी तितकी प्रगती झालेली नाही. स्वातंत्र्यानंतर देशासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे वाढत्या लोकसंख्येसाठी अन्नधान्य उपलब्ध करून देणे, तर दुसरीकडे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया म्हणून कृषी क्षेत्राचा आधुनिकीकरणाच्या प्रवाहात समावेश करून त्याची उत्पादकता व आर्थिक सामर्थ्य वाढवणे होते. स्वातंत्र्यानंतर भारतीय कृषी व्यवस्थेत अनेक बदल घडून आले, ज्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक संशोधन, यांत्रिकीकरण, सिंचन सुविधा, रासायनिक खते, सुधारित बियाणे आणि बाजारव्यवस्था यांचा समावेश होतो. या बदलांमुळे भारतीय कृषी अधिक कार्यक्षम व उत्पादनक्षम बनली; मात्र त्याचबरोबर काही सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानेही निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर भारतीय कृषी आणि आधुनिकीकरण यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. भारतीय कृषी

आणि आधुनिकीकरण यांच्यातील संबंध एक अत्यंत गुंतागुंतीचा, बहुपैलू आणि विरोधाभासांनी नटलेला इतिहास निर्माण झाला आहे. हा संबंध केवळ तंत्रज्ञानाचा नसून, तो सामाजिक रचना, आर्थिक न्याय, पर्यावरणीय शाश्वतता आणि सांस्कृतिक ओळख या गहन प्रश्नांशी गुंफलेला आहे.

भारतीय कृषी आणि आधुनिकीकरण यांचा सहसंबंध ही एक गतिशील, बहुआयामी आणि ऐतिहासिक प्रक्रिया आहे. स्वातंत्र्योत्तर काळात अन्नधान्याच्या गंभीर टंचाईतून देशाला बाहेर काढण्यासाठी केलेली हरित क्रांती ही या सहसंबंधाची प्रथम आणि सर्वात ठळक अभिव्यक्ती होती. उच्च उत्पादनक्षम बियाणे, रासायनिक खते, सुधारित सिंचन तंत्रज्ञान आणि यंत्रीकरण यांनी केलेले हे आधुनिकीकरण भारतीय शेतीच्या चेहरामोहर्यातील मोलाचे वळण ठरले. त्यामुळे उत्पादनात झपाट्याने वाढ झाली आणि देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाला. पण हे आधुनिकीकरण एकतर्फी आणि अपूर्ण होते. त्याने केवळ उत्पादनवाढीवर भर दिला, तर शाश्वततेवर, समावेशकतेवर आणि सामाजिक न्यायावर दुर्लक्ष केले. परिणामी, पंजाब-हरियाणा सारख्या सिंचित भागातील मोठ्या शेतकऱ्यांना त्याचा प्रचंड फायदा झाला, तर दुष्काळग्रस्त भागातील लहान आणि सीमांत शेतकरी वंचित राहिले. रासायनिक खतांमुळे जमिनीची सुपीकता नष्ट झाली, भूजल पातळी खोल गेली आणि पर्यावरण प्रदूषित झाले. शेती खूप भांडवल-केंद्रीत झाल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी बनले आणि शेतमजुरांची रोजगार हानी झाली.

**संशोधनाची उदिश्ष्ट्ये:** 1. भारतातील कृषीचा इतिहास जाणून घेणे. 2. भारतीय समाज व्यवस्थेत कृषीचे महत्व स्पष्ट करणे. 3. आधुनिकीकरणाची संकल्पना स्पष्ट करणे. 4. भारतीय कृषी आणि आधुनिकीकरणाचा सहसंबंध शोधने. 5. कृषी क्षेत्रावर आधुनिकीकरणामुळे झालेले सकारात्मक परिणाम जाणून घेणे. 6. आधुनिकीकरणामुळे भारतीय कृषीवर झालेल्या नकारात्मक प्रभावाचे अध्ययन करणे. 7. भारतीय कृषी क्षेत्राच्या विकासाकरिता उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये** - 1. कृषी हा भारताचा प्रमुख व्यवसाय असुन समाजव्यवस्थेचा प्रमुख आधारस्तंभ होय. 2. भारतीय कृषी व्यवस्थेत अनेक प्रकारचे बदल प्राचीन काळापासून झालेले आहेत. 3. भारतीय अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कृषी क्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे. 4. आधुनिकीकरण ही एक सार्वत्रिक प्रक्रिया असुन त्याचा प्रभाव भारतीय कृषीवर झालेला आहे. 5. भारतीय कृषी क्षेत्रावर आधुनिकीकरणाचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम झालेले आहेत.

**संशोधन पध्दतीशास्त्र** - ”भारतीय कृषी आणि आधुनिकीकरणाचा सहसंबंध“ या प्रस्तुत शोध कार्यासाठी वर्णनात्मक आराखड्याचा वापर करण्यात आला आहे. संशेधनकत्र्याने तथ्य संकलनाच्या व्दितीयक स्त्रोताच्या माध्यमातुन भारतीय कृषी आणि आधुनिकीकरणाचा सहसंबंध शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतीय कृषीचा इतिहास, भारतीय कृषीची आकडेवारी, भारतीय समाज व्यवस्थेत कृषीचे महत्व, आधुनिकीकरणाची भारतातील सुरुवात आणि महत्व तसेच भारतीय कृषी आणि आधुनिकीकरणाचा सहसंबंध तसेच आधुनिकीकरणाचे भारतीय कृषी क्षेत्रावर झालेले सकारात्मक व नकारात्मक प्रभावाचे अध्ययन करण्याकरिता संषोधकाने प्रस्तुत शोध विषयाची निवड करुन विविध संदर्भित पुस्तके, जर्नल्स, वृत्तपत्रातील लेख, शोधप्रबंध व इंटरनेट इत्यांदीचा आधार घेऊन प्रस्तुत शोध कार्य करण्यात आले आहे.

**भारतातील आधुनिकीकरणाची संकल्पना:** आधुनिकीकरण ही एक सामाजिक, आर्थिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक बदलांची सर्वसमावेशक प्रक्रिया आहे. या बदलांच्या प्रक्रियेत आधुनिकीकरण ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. पारंपरिक, रूढीप्रधान समाजातून आधुनिक, वैज्ञानिक, तंत्रज्ञानाधारित आणि तर्कसंगत समाजाकडे होणाऱ्या संक्रमणाला आधुनिकीकरण म्हणतात. ही प्रक्रिया केवळ आर्थिक बदलांपुरती मर्यादित नसून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व मानसिक बदलांचा समावेश करणारी आहे. यातून समाज जुन्या परंपरागत रूढी, विचारसरणी आणि पद्धती सोडून नवीन, वैज्ञानिकदृष्ट्या प्रगत, कार्यक्षम आणि बदलत्या काळाशी सुसंगत असलेल्या पद्धती आणि मूल्यांचा स्वीकार करतो. साध्या भाषेत, ही प्रक्रिया केवळ आर्थिक बदलांपुरती मर्यादित नसून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व मानसिक बदलांचा समावेश करणारी आहे.

डॅनियल लर्नर यांच्या मते, "आधुनिकीकरण ही एक प्रक्रिया आहे, ज्यात समाज परंपरागत जीवनपद्धती सोडून नवीन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सुविधांकडे वळतो." एम.एन. श्रीनिवास यांच्या मते, "आधुनिकीकरण म्हणजे परकीय तंत्रज्ञान आणि संस्थांचा स्वीकार करणे आणि त्यासोबत येणाऱ्या कल्पना आणि मूल्यांचाही स्वीकार." भारतातील आधुनिकीकरण ही एक जटिल, बहुआयामी आणि ऐतिहासिक दृष्ट्या विशिष्ट प्रक्रिया आहे. औपनिवेशिक काळात सर्वप्रथम ब्रिटिशांनी आणलेल्या आधुनिकीकरणाने शेतीवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम केले. जमीन महसूल पद्धतीत बदल करून रयतवारी, महालवारी या नव्या पद्धतींनी जमीन ही मालमत्ता बनवली, तसेच निर्यातीसाठी नगदी पिके (कापूस, ऊस, निळ) लावण्यास प्रोत्साहन दिले ज्यामुळे अन्नधान्याची उत्पादनात घट आणि दुष्काळाची तीव्रता वाढली. ब्रिटिशांनी पायाभूत सुविधा जसे रेल्वेच्या आगमनाने बाजारपेठ विस्तारली आणि व्यपारीकरण सुरु झाले. भारतीय स्वातंत्र्योत्तर काळ आधुनिकीकरण आणि शेतीच्या सहसंबंधाचा सुवर्णकाळ मानला जातो. भारतातील हरित क्रांतीने उच्च उत्पादनक्षम बियाणे, रासायनिक खते, सिंचनावर भर, यंत्रसामग्रीचा वापर यांद्वारे उत्पादनवाढ झाली, हे तांत्रिक आधुनिकीकरण होते. परिणाम: फक्त सिंचित भागात अन्नसुरक्षा प्राप्ती झाली. याच काळात संस्थात्मक आधुनिकीकरण होऊन सहकारी संस्था, भूदान चळवळ, राज्यातील विपणन समित्या (मंडी), कृषी विद्यापीठे, ICAR ची स्थापना ही शेतीकरिता पूरक ठरले. भारतात १९९१ नंतर जागतिकीकरण व उदारीकरण यामुळे WTO करार, आयात-निर्यात धोरणांमध्ये बदल होऊन शेती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडली गेली. कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग, एग्रीबिझनेस, खाद्य प्रक्रिया उद्योगाचा वाढता प्रभाव यामुळे शेतीत आमूलाग्र बदल झाले. डिजिटल आधुनिकीकरणमुळे मोबाइल तंत्रज्ञान, ड्रोन्स, सटेलाइट डेटाचा शेतीसाठी उपयोग होऊन शेतीत सकारात्मस व नकारात्मक बदल झालेले दिसतात.

**भारतीय कृषी आणि आधुनिकीकरणाचा सहसंबंध:** भारतीय कृषी आणि आधुनिकीकरण यांचा परस्परावलंबी सहसंबंध केवळ आर्थिक वा तांत्रिक दृष्टिकोनावर मर्यादित नाही. सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय घटकही या सहसंबंधाचा भाग आहेत. आधुनिकीकरणामुळे कृषी उत्पादन व उपजीविकेत सुधारणा झाली असली, तरी त्याच्या व्यवस्थापकीय व पर्यावरणीय परिणामांचा विचार न करता शाश्वत विकास साधणे अशक्य ठरते. भारतीय कृषी क्षेत्र पारंपरिक स्वरूपात पावसावर अवलंबून, मानवी श्रमप्रधान आणि स्थानिक ज्ञानावर आधारित होती. शेतकरी बहुतेक वेळा अनेक पिके मिश्रित पद्धतीने घेत असे. मात्र आधुनिक काळात कृषी क्षेत्रात हरित क्रांती, यांत्रिकीकरण, नवीन बियाणे व खत तंत्र, सिंचन सुविधा, कृषी संशोधन संस्था आणि माहिती-तंत्रज्ञान यांचा समावेश झाला. परिणामी उत्पादन क्षमता वाढली, अन्नसुरक्षा मजबूत झाली आणि कृषी क्षेत्र जागतिक बाजाराशी जोडले गेले. हे सर्व बदल आधुनिकीकरणाचे सकारात्मक परिणाम मानले जातात. तथापि, आधुनिकीकरणामुळे काही नकारात्मक परिणामही दिसून आले आहेत. आधुनिक कृषी भांडवलप्रधान बनली, उत्पादन खर्च वाढला, कर्जावर अवलंबित्व वाढले आणि लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा दर्जा कमी झाला. यांत्रिकीकरणामुळे मानवी श्रमाची गरज कमी झाली, परिणामी ग्रामीण बेरोजगारी व शहरी स्थलांतर वाढले. तसेच रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे मातीची सुपीकता कमी होणे, जलप्रदूषण, भूजल पातळी घटणे आणि जैवविविधतेचा ऱ्हास या पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या.

भारतातील आधुनिकीकरण आणि शेती यांचा परस्परसंबंध अतिशय गुंतागुंतीचा, बहुआयामी आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा आणि समाजरचनेचा पाया असल्याने, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने या पायावर सर्वात मोठा आणि सर्वात जटिल प्रभाव टाकला आहे. हा सहसंबंध केवळ तंत्रज्ञानाचा नव्हे, तर सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक बदलांचाही आहे. या आधुनिकीकरणाचे परिणाम सकारात्मक तसेच नकारात्मक स्वरूपात भारतीय कृषी व्यवस्थेवर पुढील प्रमाणे दिसून येतात -

**आधुनिकीकरणाचा भारतीय कृषी व्यवस्थेवरील सकारात्मक परिणाम:**

**१) तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतीतील परिवर्तन** - आधुनिकीकरणामुळे भारतीय शेतीत यांत्रिकीकरण झाले. ट्रॅक्टर, पेरणी यंत्रे, हार्वेस्टर, ड्रिप इरिगेशन, स्प्रिंकलर यांसारख्या आधुनिक यंत्रसामग्रीमुळे शेतीची कार्यक्षमता आणि उत्पादनक्षमता वाढली. श्रम आणि वेळेची बचत झाली. मोबाइल फोन, इंटरनेट, ड्रोन तंत्रज्ञान, व्हेदर फोरकास्टिंग, सॉइल हेल्थ कार्ड यांमुळे शेतकऱ्यांना माहिती आणि निर्णय घेण्यासाठीची साधने मिळाली. ई-नाम, किसान क्रेडिट कार्ड सारख्या डिजिटल योजनांमुळे बाजारपेठ आणि ऋणसुविधांपर्यंत प्रवेश सुलभ झाला. हा तांत्रिक बदल आधुनिकीकरणाचा थेट परिणाम आहे.

**२) शेतीचे व्यावसायीकरण आणि नगदी पिकांचा विकास** - पारंपरिक शेतीकेवळ निर्वाहासाठी होती. आधुनिकीकरणामुळे शेती हा एक व्यवसाय म्हणून विकसित झाला. शेतकऱ्यांनी फळे, भाज्या, फुले, डेअरी, मासेमारी, पक्षीपालन यांसारख्या क्षेत्रांकडे लक्ष दिले. यामुळे शेतीतील नफा वाढला आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगसारख्या नवीन मॉडेल्सचा उदय झाला. आधुनिक शेतीमुळे शेतकऱ्यांचा कल नगदी पिकांकडे वाढला. ऊस, कापूस, सोयाबीन, फळे व भाजीपाला उत्पादन वाढले. बाजाराभिमुख शेतीला चालना मिळाली आणि कृषी-आधारित उद्योगांचा विकास झाला. सरकारी खरेदी (MSP) यंत्रणेमुळे शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत मिळू लागली.

**३) वैज्ञानिक दृष्टिकोन आणि पीक पद्धती** - आधुनिकीकरणाने वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवला. माती परीक्षण, सुधारित बियाणे, खत व्यवस्थापन, कीडनियंत्रण यांचा वापर वाढला. पारंपरिक मिश्र पीक पद्धतीऐवजी एकपीक शेती व नगदी पिकांचा प्रसार झाला.

**४) ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना** - कृषी उत्पादनवाढीमुळे वाहतूक, साठवणूक, प्रक्रिया उद्योग, खते व यंत्रनिर्मिती उद्योग विकसित झाले. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आणि एकूण आर्थिक विकासाला गती मिळाली.

**५) सिंचन व पायाभूत सुविधा** - धरणे, कालवे, विहिरी, बोअरवेल, वीजपुरवठा, रस्ते व बाजारपेठा या पायाभूत सुविधा आधुनिकीकरणाचा भाग आहेत. त्यामुळे शेती पावसावर कमी अवलंबून राहिली आणि दुबार—तिबार पिके शक्य झाली. सिंचन विस्तारामुळे शेती स्थिर झाली; मात्र भूजलाचा अति उपसा आणि पाण्याचे असमान वितरण ही गंभीर समस्या निर्माण झाली.

**६) बाजारव्यवस्था आणि व्यापारीकरण** - आधुनिकीकरणामुळे शेती बाजाराभिमुख बनली. नगदी पिके, शेतमाल प्रक्रिया, साठवणूक, निर्यात यांचा विकास झाला. शेतकरी बाजारभाव, मागणी—पुरवठा आणि जागतिक बाजाराशी जोडला गेला. उत्पन्नाच्या संधी वाढल्या; परंतु किंमत चढउतारांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अनिश्चित झाले.

**७) सामाजिक रचना व श्रम संरचनेतील बदल** - यांत्रिकीकरणामुळे शेतीतील मानवी श्रमांची गरज कमी झाली. ग्रामीण बेरोजगारी वाढली आणि शहरी स्थलांतराला चालना मिळाली. पारंपरिक शेतमजूर—मालक संबंध बदलले. कार्यक्षमता वाढली; पण ग्रामीण सामाजिक समस्या तीव्र झाल्या.

**८) उत्पादनात भरगच्च वाढ आणि अन्नसुरक्षा** - आधुनिकीकरणाचा सर्वात मोठा सकारात्मक परिणाम म्हणजे शेती उत्पादनात झालेली विलक्षण वाढ. उत्पादन वाढीमुळे देशाची अन्नसुरक्षा सुरक्षित झाली. जनसंख्या वाढीच्या तुलनेत अन्नधान्य उत्पादनात वाढ झाल्याने मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याची आयात करावी लागण्याची शक्यता कमी झाली. हरित क्रांतीमुळे गहू, भात या मुख्य धान्यपिकांचे उत्पादन अभूतपूर्व प्रमाणात वाढले. हे उत्पादन वाढीमुळे भारत केवळ स्वावलंबी झाला नाही तर आज अन्नधान्य निर्यातदारही बनला आहे.**) कृषी ज्ञान, संशोधन व माहिती तंत्रज्ञान** - कृषी शिक्षण, संशोधन, मोबाईल ॲप्स, हवामान अंदाज, ई-नाम यांमुळे शेती ज्ञानाधारित बनली. निर्णयक्षमता वाढली. कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था, विस्तार सेवा, मोबाईल ॲप्स, हवामान अंदाज, ई-नाम यांमुळे शेतकऱ्यांना आधुनिक ज्ञान उपलब्ध झाले. वैज्ञानिक शेती पद्धतींचा प्रसार झाला आणि निर्णयक्षमता सुधारली.

**१०) आर्थिक परिणाम आणि कर्जव्यवस्था** - आधुनिक शेती भांडवलप्रधान बनली. खते, बियाणे, औषधे, यंत्रसामग्री यासाठी कर्जाची गरज वाढली. बँका, सहकारी संस्था, खाजगी सावकार यांचे महत्त्व वाढले. कर्जामुळे उत्पादन शक्य झाले; परंतु कर्जफेडीचा ताण वाढून कर्जबाजारीपणा निर्माण झाला.

**११) राज्य धोरणे आणि आधुनिकीकरण** - हरित क्रांती, पंचवार्षिक योजना, किमान आधारभूत किंमत (MSP), कृषी संशोधन संस्था, विस्तार सेवा ही आधुनिकीकरणाची साधने आहेत. राज्याने शेतीच्या आधुनिकीकरणात महत्त्वाची भूमिका बजावली. राज्य हस्तक्षेपामुळे अन्नसुरक्षा मिळाली; मात्र धोरणांचा लाभ सर्व भागांना समान मिळाला नाही.

**१२) संशोधन आणि बौद्धिक विकास** - आधुनिकीकरणामुळेकृषी संशोधनाला चालना मिळाली. ICAR (भारतीय कृषी संशोधन परिषद), अनेक कृषी विद्यापीठे आणि संस्थांनी विविध पिकांच्या उन्नत जाती, पिकसंरक्षण तंत्रे, शेती यंत्रसामग्री यांचा विकास केला. शेतकऱ्यांमध्ये नवीन ज्ञान आत्मसात करण्याची तयारी निर्माण झाली. कृषी शिक्षण व प्रसार सेवांमुळे शेतकरी आधुनिक पद्धतींशी परिचित झाले.

**आधुनिकीकरणाचा भारतीय कृषी व्यवस्थेवरील नकारात्मक परिणाम -**

**१) कृषी उत्पादन खर्चात वाढ व कर्जबाजारीपणा** - आधुनिक शेतीसाठी लागणारी बियाणे, खते, औषधे, यंत्रसामग्री, वीज व डिझेल महाग असल्याने उत्पादन खर्च वाढला. त्यामुळे शेतकरी कर्जावर अधिक अवलंबून राहू लागले. कर्जफेडीचा ताण वाढून अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले.

**२) आर्थिक विषमता आणि आत्महत्या** - आधुनिक शेतीही भांडवल-केंद्रीत झाल्यामुळे मोठ्या शेतकऱ्यांचा फायदा झाला तर लहान व सीमांत शेतकरी मागे पडले. महागडी यंत्रसामग्री, बियाणे, खते खरेदी करण्याची सवय शेतकऱ्यांना कर्जबाजारी बनवते. ही आर्थिक अडचण शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या मागचे प्रमुख कारण आहे. आधुनिकीकरणाचा लाभ मुख्यतः मोठ्या व मध्यम शेतकऱ्यांना झाला. लहान व अल्पभूधारक शेतकरी तसेच भूमिहीन शेतमजूर यांना अपेक्षित लाभ मिळाला नाही. ग्रामीण समाजातील आर्थिक विषमता वाढली आणि वर्गीय दरी रुंदावली.

**३) पर्यावरणीय ऱ्हास आणि नैसर्गिक स्त्रोतांचा क्षय** - आधुनिक शेतीचा सर्वात विनाशकारी परिणाम पर्यावरणावर झाला आहे. रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अमर्याद वापरामुळे जमिनीची सुपीकता नष्ट झाली आहे. मृदेची सेंद्रिय वस्तुमात्रा कमी होत जाऊन ती कठीण आणि नापीक बनली आहे. जमिनीतून पाण्याची पातळी अतोनात खाली सरकली आहे. चराईच्या जमिनी, जंगले कमी झाली आहेत. सर्वसाधारणपणे, शेतीचा पर्यावरणावरचा दबाव अभूतपर्व वाढला आहे. मातीची गुणवत्ता घसरली, जलप्रदूषण वाढले आणि पर्यावरणीय असंतुलन निर्माण झाले. अल्पकालीन उत्पादनवाढ झाली; दीर्घकालीन शाश्वततेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले. जलप्रदूषण, मृदा क्षारयुक्तता, जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या समस्या निर्माण झाल्या. भूजलाचा अति उपसा झाल्याने पाण्याची टंचाई वाढली.

**४) बेरोजगारी व स्थलांतर** - यांत्रिकीकरणामुळे मानवी श्रमांची गरज कमी झाली. परिणामी ग्रामीण भागात बेरोजगारी वाढली. अनेक शेतमजूर रोजगाराच्या शोधात शहरी भागाकडे स्थलांतरित झाले. यंत्रीकरणामुळे शेतमजुरांना कामाची उपलब्धता कमी झाली आहे. विशेषतः स्त्रिया शेतमजुरांवर याचा विपरीत परिणाम झाला आहे. ग्रामीण भागातून तरुण पिढी शिक्षण आणि नोकरीच्या शोधात शहरांकडे पलायन करत आहे, ज्यामुळे शेतीकामासाठी मनुष्यबलाची कमतरता निर्माण होत आहे. शिवाय, बँकांकडून कर्ज न मिळाल्यास शेतकरी जमीन गहाण ठेवतात आणि अखेरीस ती गमावतात, ज्यामुळे भूमिहीन श्रमिकांची संख्या वाढते.

**५) आरोग्यावरील धोके** - रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे उत्पादित अन्नधान्यात विषारी अंश राहतो. हे रासायनिक अन्नाद्वारे मानवी शरीरात प्रवेश करून कॅन्सर, लिव्हरचे विकार, हार्मोनल असंतुलन इत्यादी आजार निर्माण करतात. शिवाय, शेतकरी आणि शेतमजूर थेट या रसायनांच्या संपर्कात येतात, ज्यामुळे त्वचारोग, श्वसनाचे विकार इत्यादी समस्या उद्‌भवतात. शेतकरी आणि शेतमजूर यांच्यावरही या रसायनांचा सरळ परिणाम होतो.

**६) बाजारपेठेवर वाढलेले अवलंबित्व** - आधुनिक शेतीमुळे शेतकरी बाजारपेठेवर अधिक अवलंबून झाला. शेतमालाच्या किमतीतील चढउतार, दलालांचा प्रभाव आणि जागतिक बाजारातील बदल यांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अनिश्चित झाले.

**७) शाश्वततेचा अभाव आणि भविष्याची चिंता** - आधुनिक शेतीपद्धती शाश्वत नाहीत. त्या जमिनीची, पाण्याची आणि पर्यावरणाची पातळी त कमी करतात. भविष्यातील पिढ्यांसाठी ही संसाधने टिकवून ठेवण्याची चिंता या पद्धतींत दिसत नाही. उच्च उत्पादनक्षम बियाण्यांसाठी अधिक पाणी आणि रासायनिक खते लागतात, जी एक दुष्टचक्र निर्माण करतात. शिवाय, जागतिकीकरणामुळे बाजारपेठेतील चढ-उतारांचा धोका शेतकऱ्यांवर पडतो.

**८) सांस्कृतिक व सामाजिक बदल** - आधुनिकीकरणामुळे पारंपरिक शेतीशी निगडित मूल्ये, सहकार भावना व ग्रामीण जीवनशैलीत बदल झाले. स्पर्धा, व्यक्तिवाद आणि भांडवली दृष्टिकोन वाढला, ज्याचा ग्रामीण सामाजिक रचनेवर परिणाम झाला. शहरीकरणास गती मिळाल्याने तरुण पिढी शेतीकडे दुर्लक्ष करू लागली आहे.

**निष्कर्ष** - आधुनिकीकरणाने ग्रामीण भारताला विरोधाभासी संक्रमणाच्या काळात ढकलले आहे. एकीकडे भौतिक सुविधा, तंत्रज्ञान आणि बाजाराची पोहोच वाढली तर दुसरीकडे सामाजिक एकात्मता, पर्यावरणीय शाश्वतता आणि आर्थिक समता यात मोठे ढिसूळपणा निर्माण झाला आहे. आधुनिकीकरणामुळे कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान व ज्ञानाचा प्रसार झाला. शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती, बाजारभाव, हवामान अंदाज, कृषी सूचना आणि डिजिटल माहिती मिळू लागली. या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांच्या निर्णयक्षमतेत व उत्पादन कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ झाली. तसेच ग्रामीण समाजातील शिक्षण, जाणीव, स्त्री-सशक्तीकरण व सामाजिक गतिशीलता यांमध्ये सुधारणाही दिसून आली. ग्रामीण समाज अधिक खुला, लोकशाही मूल्ये स्वीकारणारा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ

घेणारा बनला. परंतु, या आधुनिकीकरण प्रक्रियेमुळे काही नकारात्मक परिणामही स्पष्ट झाले आहेत. आधुनिक कृषी भांडवलप्रधान बनली, उत्पादन खर्च व कर्जावर अवलंबित्व वाढले, परिणामी लहान शेतकरी व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा दर्जा कमी झाला. यांत्रिकीकरणामुळे मानवी श्रमांची गरज कमी झाली आणि ग्रामीण बेरोजगारी व शहरी स्थलांतर वाढले. बाजाराभिमुख कृषीमुळे किंमत चढ उतार, दलालांचा प्रभाव आणि जागतिक बाजारातील बदल यांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अनिश्चित झाले. पर्यावरणीय दृष्टिकोनातून, रासायनिक खते व कीटकनाशकांचा अतिवापर, भूजलाचा अति उपसा, मातीची सुपीकता कमी होणे आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्यांमुळे दीर्घकालीन शाश्वततेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. यामुळे लक्षात येते की, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना शाश्वत कृषी प्रथांचा अवलंब करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


१. घोश संदीप व प्रकाश सुरज (२००९). कृषि कारोबार और निर्यात, दिल्ली: मेघा बुक्स.

२. गायकवाड डॉ. मुकुंद (२००३). शेतीचा विकास: काल-आज-उद्या, पुणे: कान्टिनेन्टल प्रकाशन.. हुसैन माजिद (२००९). कृषि भूगोल, जयपुरः रावत पब्लिकेशन्स.

३. कविमंडन विजय (२००२). कृषि अर्थशास्त्र, नागपूर: श्री मंगेश प्रकाशन.

४. कोतवाल गौतम (२०१०). कृषि आयडॉल्स, पुणेः गीन वर्ल्ड.

५. मोहिते डॉ. शेषराव (२००९). शेती व्यवसायावरील अरिष्ट, औरंगाबाद.

६. शिंदे अरुण (२०१२). सत्यशोधकांचे शेतकरीविषयक विचार, पुणेः दर्या प्रकाशन.

७. *http://agriculture.gov.in*

८. http://www.krishi.maharashtra.gov.in


# भारतीय कृषीतील संरचनात्मक परिवर्तन आणि शेतमजुरांचे सीमांतीकरण


**डॉ. नागेश त्रींबक शेळके** न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर

**प्रा. रोहोकले मयुर सूर्यभान** न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर



**गोषवारा:** सदर शोध निबंधात भारतीय कृषी क्षेत्रातील संरचनात्मक परिवर्तन आणि त्याचा शेतमजुरांच्या जीवनावर झालेला परिणाम यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील हरितक्रांतीपासून ते १९९१ नंतरच्या नवीन आर्थिक धोरणांपर्यंत आणि कृषी कायदे २०२० पर्यंतच्या धोरणात्मक बदलांचा अभ्यास या निबंधात करण्यात आला आहे. हरितक्रांतीमुळे कृषी उत्पादनात वाढ झाली असली, तरी त्यातून ग्रामीण समाजातील वर्गीय विषमता अधिक तीव्र झाली, असा युक्तिवाद या अभ्यासात मांडण्यात आला आहे. विशेषतः भूमिहीन शेतमजूर, लहान शेतकरी, महिला आणि स्थलांतरित मजूर यांचे सामाजिक व आर्थिक असुरक्षितीकरण वाढले असल्याचे स्पष्ट होते. नवीन तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण आणि बाजारप्रधान धोरणांमुळे शेतीतील रोजगार हंगामी, कंत्राटी आणि अस्थिर स्वरूपाचा झाला आहे. या प्रक्रियेतून मोठ्या प्रमाणावर ग्रामीण–शहरी आणि आंतरराज्य स्थलांतर घडून आले. जन ब्रेमन यांच्या 'Footloose Labour' संकल्पनेच्या आधारे स्थलांतरित शेतमजुरांची अस्थिरता आणि शोषणाचे स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे. नव्या आर्थिक धोरणांमुळे कृषी क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक कमी होऊन खाजगी भांडवलाचा प्रभाव वाढल्याने शेतमजुरांचे जीवन अधिक असुरक्षित झाले आहे. अलीकडील कृषी कायदे २०२० हे नवउदारमतवादी धोरणांचा भाग असून, त्यांनी शेतकरी आणि शेतमजुरांच्या संरक्षणात्मक चौकटी कमकुवत केल्याचे अनेक अभ्यासकांचे मत आहे. आयरिस यंग यांच्या 'सीमांतीकरण' संकल्पनेच्या आधारे या प्रक्रियेला सामाजिक वंचिततेचा भाग म्हणून समजावून घेतले आहे. हा शोध निबंध राजकीय अर्थशास्त्र, श्रम अभ्यास आणि समाजशास्त्रीय चौकटींच्या आधारे कृषी विकासाच्या प्रचलित संकल्पनांचे पुनर्मूल्यांकन करतो. एकूणच, भारतीय कृषीतील विकास प्रक्रिया ही समावेशक न ठरता शेतमजुरांच्या सीमांतीकरणाला कारणीभूत ठरत असल्याचा निष्कर्ष या अभ्यासातून मांडण्यात आला आहे.


**प्रस्तावना:** भारतीय समाजात शेती ही केवळ उत्पादनाची प्रक्रिया नसून, ती सामाजिक संबंध, वर्गरचना, सत्तासंबंध आणि ग्रामीण जीवनपद्धती घडवणारी एक महत्त्वाची संस्था आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्याने शेतीकडे प्रामुख्याने अन्नउत्पादन वाढ आणि अन्नसुरक्षा या उद्देशाने पाहिले. या धोरणांतून हरितक्रांती, १९९१ नंतरचे नवीन आर्थिक धोरण, नवउदारमतवादी कृषी सुधारणा आणि अलीकडील कृषी कायदे २०२० अशी टप्प्याटप्प्याने कृषी क्षेत्राची पुनर्रचना झाली. मात्र या सर्व बदलांचा सर्वाधिक परिणाम भूमिहीन शेतमजूर, सीमांत शेतकरी, स्थलांतरित मजूर आणि महिला कृषी कामगारांवर झाल्याचे दिसून येते. हरितक्रांतीमुळे शेती उत्पादनात वाढ झाली, नवीन तंत्रज्ञान आले आणि सिंचन सुविधा विस्तारल्या. तथापि, ही प्रक्रिया सामाजिक समतेच्या दृष्टीने अपुरी ठरली. उलट, हरितक्रांतीमुळे ग्रामीण समाजात श्रीमंत शेतकरी आणि भूमिहीन शेतमजूर यांच्यातील दरी अधिक वाढली. याबाबत समाजशास्त्रज्ञ जन ब्रेमन स्पष्टपणे नमूद करतात की, हरितक्रांतीने असमानता नष्ट केली नाही, तर तिला नव्या स्वरूपात अधिक मजबूत केले (Breman, 1996). हरितक्रांतीनंतर शेतीत यांत्रिकीकरण वाढले, मजुरांची गरज कमी झाली आणि रोजगार हंगामी व अस्थिर बनला. परिणामी अनेक शेतमजूर रोजगाराच्या शोधात सतत स्थलांतर करू लागले. या परिस्थितीतून निर्माण झालेल्या अस्थिर आणि विस्थापित श्रमवर्गाला जन ब्रेमन यांनी 'फुटलूज लेबर' (Footloose Labour) असे संबोधले आहे. त्यांच्या मते, जमीन आणि स्थिर रोजगारापासून तुटलेला मजूर कायमस्वरूपी असुरक्षित आणि शोषणास बळी पडतो (Breman, 2013). १९९१ नंतर

स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणांमुळे कृषी क्षेत्रात बाजारव्यवस्थेचा प्रभाव वाढला. सार्वजनिक गुंतवणूक कमी झाली आणि खाजगी भांडवलाचा हस्तक्षेप वाढला. याचा थेट परिणाम शेतकरी आणि शेतमजुरांच्या जीवनावर झाला. अर्थशास्त्रज्ञ आर. रमाकुमार यांच्या मते, आर्थिक सुधारणांमुळे शेतीतील अस्थैर्य वाढले असून शेतकरी आणि शेतमजूर अनिश्चिततेच्या गर्तेत सापडले आहेत (Ramakumar, 2002).

या पार्श्वभूमीवर पी. साईनाथ ग्रामीण भारतातील कृषी संकटाकडे लक्ष वेधताना सांगतात की, हे संकट शेतकऱ्यांच्या अपयशामुळे नसून, चुकीच्या धोरणांमुळे निर्माण झाले आहे (Sainath, 2014). शेती क्षेत्रातील संकटाचा फटका शेतमजुरांना अधिक तीव्रपणे बसत असल्याचे त्यांच्या लेखनातून स्पष्ट होते. नवउदारमतवादी धोरणांमुळे शेतमजुरांचा रोजगार अधिक असंघटित, कंत्राटी आणि असुरक्षित बनला आहे. स्थलांतरित शेतमजूर, विशेषतः दलित, आदिवासी आणि महिला मजूर, सामाजिक व आर्थिक दोन्ही पातळ्यांवर शोषणाला सामोरे जात आहेत. जागतिक श्रम अभ्यासक बेव्हर्ली सिल्वर यांच्या मते, भांडवल नेहमीच स्वस्त आणि लवचिक श्रमांच्या शोधात असते आणि शेती हे त्यासाठी महत्त्वाचे क्षेत्र ठरते (Silver, 2003). अलीकडील कृषी कायदे २०२० हे नवउदारमतवादी धोरणांचा पुढचा टप्पा मानले जातात. बाजारस्वातंत्र्याच्या नावाखाली या कायद्यांमुळे शेतकरी आणि शेतमजुरांचे संरक्षण कमी झाले आहे, असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. आयरिस यंग यांच्या 'सीमांतीकरण' या संकल्पनेनुसार, सीमांतीकरण ही शोषणाची अत्यंत धोकादायक प्रक्रिया आहे, कारण ती समाजातील विशिष्ट गटांना सामाजिक सहभागापासून दूर ढकलते (Young, 2000). या अर्थाने भारतीय कृषीतील संरचनात्मक बदल ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून, ती शेतमजुरांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वंचिततेची प्रक्रिया आहे. सदर शोध निबंधात हरितक्रांतीपासून कृषी कायदे २०२० पर्यंतच्या धोरणांचा शेतमजुरांच्या जीवनावर झालेला परिणाम, स्थलांतर, रोजगारातील अस्थैर्य आणि सीमांतीकरण या प्रक्रियांचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले आहे. हा अभ्यास राजकीय अर्थशास्त्र, श्रम अभ्यास आणि समाजशास्त्रीय सैद्धांतिक चौकटींच्या आधारे भारतीय कृषी व्यवस्थेचे चिकित्सक परीक्षण करण्याचा प्रयत्न करतो.

**हरितक्रांती आणि शेतमजूर:** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताला विकसित करण्यासाठी तत्कालीन पंतप्रधानांनी काही विकासात्मक योजना आखल्या होत्या. ज्यातून भारताला आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत प्रवेश करता येईल अमेरिका पुरस्कृत तंत्रज्ञानाला वापरून शेती विकसित केली. यालाच हरितक्रांती संबोधले गेले या विकासामध्ये उच्च उत्पादनक्षम बियाणे (HYV- High Yielding Varieties) रासायनिक खते आणि यांत्रिक शेती याचा मोठ्या प्रमाणावर वापर करून शेतीतील पारंपारिक उत्पादनाच्या कितीतरी पट जास्त उत्पादन घेण्यात आले. कृषी व्यवस्थेतील बदलामुळे शेती अर्थव्यवस्थेत लक्षणीय बदल झाला जमिनीची उपयोगिता पिकांच्या पद्धती उत्पादित संस्था शेतमजुरांचे स्थलांतर यांचेही यांचेही स्वरूप बदलले.(मोहन्ती :2012) हरित क्रांतीच्या पहिल्या टप्प्याला कृषक उत्पादन वाढीचे युग म्हटले गेले. डॉक्टर नॉर्मन बोरलॉग यांचे संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे भारतीय कृषी व्यवस्थेत अमुलाग्र बदल झाला. या पहिल्या टप्प्यात गहू तांदूळ सारख्या पिकांसाठी सुधारित बियाण्यांचा प्रसार झाला. तसेच उत्पादन वाढीसाठी खताचा वापर प्रभावी सुरू झाला अनेक राज्यांनी या कामाला विकसित करण्यासाठी सिंचन यंत्रणेचा विकास केला.

हरित क्रांतीमुळे भारतीय शेती मोठ्या प्रमाणावर बदलली. हरित क्रांतीमुळे भारतीय शेतीत उत्पादनवाढ, तांत्रिक सुधारणा आणि सिंचनाच्या सुविधांमुळे मोठा बदल झाला असला, तरी याचे परिणाम शेतमजुरांच्या रोजगारावर संमिश्र स्वरूपाचे होते. सुरुवातीला उत्पादनक्षमता वाढल्यामुळे लागवड, कापणी, मळणी यासारख्या प्रक्रियांसाठी शेतमजुरांना अधिक संधी उपलब्ध झाल्या, आणि काही प्रमाणात कुशल मजुरांना प्रशिक्षणासह रोजगार मिळाला. मात्र, या परिवर्तनाचा टिकात्मक दृष्टिकोनातून विचार करता हे स्पष्ट होते की, हरित क्रांतीतून लाभलेले रोजगार प्रामुख्याने सिंचन सुविधा आणि भांडवलात गुंतवणूक करू शकणाऱ्या शेतकऱ्यांपुरते मर्यादित राहिले. लहान व भूमिहीन शेतकरी, स्थलांतरित मजूर, व महिला कामगार यांना दीर्घकालीन स्थैर्य किंवा सामाजिक सुरक्षितता याचा लाभ झाला नाही. आधुनिक यंत्रसामुग्रीमुळे अनेक पारंपरिक रोजगाराचे प्रकार लुप्त झाले. (उदा. ओढा नांगर, बैलजोडी, हाताने पेरणी), त्यामुळे काही शेतमजुरांचे काम बंद झाले किंवा अनौपचारिक व अस्थिर स्वरूपाचे राहिले. यामुळे हरित क्रांतीने उत्पादन वाढवले असले तरी, शेतमजुरांचे आर्थिक-सामाजिक सशक्तीकरण सर्वसामान्यपणे झाले नाही, आणि कृषी क्षेत्रातील विषमता वाढीस लागली. परिणामी, रोजगार निर्मितीची जी अपेक्षा होती ती संपूर्णतः शाश्वत व सर्वसमावेशक ठरली नाही, यामुळे 1960 नंतर मोठ्या प्रमाणावर सामाजिक अभ्यासकांचे लक्ष कृषी क्षेत्राकडे आकर्षित झाले. हरितक्रांतीमुळे भारतीय शेती अर्थव्यवस्थेबरोबरच सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेमध्ये ही आमुलाग्र बदल घडून आला. या बदलावर सामाजिक शास्त्रज्ञांनी जे अभ्यास केला. ते पुढील प्रवाहाच्या माध्यमातून अधिक स्पष्ट होतात.

**हरित क्रांती: व्यवस्थात्मक व रचनात्मक बदल:** स्वातंत्र्यानंतर भारताच्या विकासासाठी अनेक विकासात्मक योजना आखल्या गेल्या. त्यात हरित क्रांती ही सर्वात जास्त लोकप्रिय आणि योजना ठरली. हरित क्रांतीमुळे भारतातील शेती क्षेत्रामध्ये बदल झाला हा बदल एका बाजूला तांत्रिक स्वरूपाचा होता तर दुसऱ्या बाजूला व्यवस्थात्मक स्तरावर ही क्रांतिकारक बदल घडून आणले. अन्नधान्य उत्पादन वाढवण्यासाठी फक्त बियाणे आणि तंत्रज्ञान पुरेशे नव्हते. व्यवस्थात्मक पातळीवर धोरणे आणि रचनात्मक बदल गरजेचे होते. यामुळे कृषी क्षेत्राच्या संरचनेत सुधारणा झाली आणि उत्पादन क्षमतेत वाढ झाली. संयुक्त राष्ट्राने भारतातील हरितक्रांतीची संकल्पना विकसित करण्यात व ती कार्यान्वित करण्यात महत्त्वाची भूमिका साकारली. यावर अनेक अभ्यासकानी एक महत्त्वपूर्ण चर्चा केली. ती अशी की संयुक्त राष्ट्राच्या तिसऱ्या जगामध्ये असलेल्या गर्भित राजकीय हेतू हा बदल करण्यासाठी कारणीभूत आहे. (जोधका:2008) सरकारने कृषी धोरणात मोठ्या प्रमाणावर सुधारणा केल्या. ज्यात उत्पादनक्षम बियाणे, रासायनिक खते आणि सिंचन यंत्रणेच्या वापराला चालना देण्यात आली. तसेच यांची व्यापकता वाढवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न झाले तसेच

आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न झाले. जसे की जागतिक स्तरावर तांत्रिक मदत जसे की गव्हाच्या सुधारित जाती ( मेक्सिकन गहू ) आणि तांदळाच्या IR 8 जाती भारतात आणण्यात आल्या ज्यामुळे भारतातील शेतीची उत्पादकता व सुपीकता वाढली.

**हरित क्रांती आणि नवीन मजूर वर्ग निर्मिती:** विसाव्या शतकाच्या मध्यात सुरू झालेल्या हरितक्रांतीने उच्च आणि उत्पादन देणारे वाण (HYV) बियाणे रासायनिक खते आणि प्रगत सिंचन तंत्रे आणली ज्यामुळे कृषी उत्पादन पद्धतीमध्ये अमूलाग्र बदल झाला. या तांत्रिक प्रगतीचा उद्देश उपासमारीची भरपाई करण्यासाठी आणि आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी अन्न उत्पादन वाढवणे हा होता. परिणामी या नवकल्पनेचा अवलंब करणाऱ्या शेतकऱ्यांना अनेकदा उच्च उत्पादकता आणि कार्यक्षमता अनुभवायला मिळाली. ज्यामुळे हे तंत्रज्ञान परवडणारे आणि स्वीकारणारे, न स्वीकारणे यांच्यात फरक निर्माण करण्यास मदत झाली. नवीन तंत्रज्ञानासाठी मोठ्या प्रमाणात सुरुवातीच्या भांडवली गुंतवणुकीची आवश्यकता असल्याने कृषी क्षेत्र वेगवेगळ्या वर्गामध्ये विभागले जाऊ लागले. ज्या शेतकऱ्यानी प्रगत शेती तंत्राचा वापर केल्याने नवीन शेतकरी वर्ग निर्माण झाला. ज्यामध्ये आधुनिक शेती साधने आणि तंत्रे प्रभावीपणे वापरू शकणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश होता. या विभाजनामुळे केवळ उत्पादकताच वाढली नाही तर उत्पादनाच्या पातळीवर ही परिणाम झाला. ज्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली की श्रीमंत शेतकरी सदन झाले तर गरीब शेतकरी ज्यांना आवश्यक संसाधनाची उपलब्धता नव्हती ते आर्थिक दृष्ट्या मागास बनले. (K. Yasuhobu:2000) परिणामी ग्रामीण समुदाय मधील सामाजिक, आर्थिक दरी वाढत गेली. ज्यामुळे शेतीमधील कामगार संवाद पुन्हा परिभाषित झाला.(A. D'Agostino:2016) हरितक्रांती होण्यापूर्वी शेतमजूर म्हणून काम करणारा वर्ग हरितक्रांती झाल्यानंतर व्यवसायिक शेतकरी बनला तसेच त्यातील काही शेतमजूर आधुनिकीकरणाच्या लोभापायी शहराकडे स्थलांतरित झाले. परिणामी स्थलांतरित शेतमजुरांचे श्रम बाजारातही मोठा बदल झाला. हरित क्रांती पूर्वी समाजातील कनिष्ठ वर्गाला ज्याला शेतमजूर म्हणून कामावर ठेवले जात नव्हते त्या वर्गातील जातीतील लोकांना शेतमजूर म्हणून कामावर ठेवण्यात आले. मजुरांना सेवक बंद गुलाम म्हणून वागवले जात होते ते आता शेतमजूर म्हणून काम करण्यास सुरुवात केली. हा हरित क्रांतीचा परिणाम आहे की ज्यामुळे नवीन शेतमजूर वर्ग निर्माण केला गेला याचे विश्लेषण करणे देखील गरजेचे आहे. हरित क्रांतीमुळे शेतकऱ्यांची स्तरीकरण छोट्या शेतकरी व मोठा शेतकरी या अर्थाने अभ्यासकांनी पाहिले. परंतु शेतमजुरांच्या नवीन स्तरीकरणावरती चर्चा झालेली दिसत नाही. कारण कुशल शेतमजूर व कुशल शेतमजूर अशी विभाजन तयार झाले. त्यामुळे कुशल शेतमजुरांची आर्थिक स्थिती (ट्रॅक्टर ड्रायव्हर) व अकुशल शेतमंजूरांची आर्थिक स्थिती भिन्न असल्याची दिसते. प्रभावी जातीमध्ये जे गरीब शेतकरी होते त्यांना या कृषीतील परिवर्तनाचा उपयोग करून घेता आला नाही किंवा तशी संधी प्राप्त करून देण्यात आली नाही. तर दुसऱ्या बाजूला श्रीमंत शेतकरी राजकीय दृष्ट्या गतिशील बनले यातून ज्या शेतकरी व शेतमजूर चळवळी निर्माण झाल्या त्याचे नेतृत्व या श्रीमंत शेतकरी वर्गाने केल्याचे दिसून येते. तसेच त्यांनी या आंदोलनाचा त्यांच्या राजकीय फायद्यासाठी उपयोग करून घेतला त्यामुळे ते कधी तळागाळातील शेतकरी व शेतमजुरांचे आवाज बनले नाही यावरती अभ्यास झालेले दिसत नाहीत.

**हरित क्रांती आणि शेतमजुरांच्या बाबत मागण्या आणि भूमिका:** हरित क्रांतीमुळे कृषी उत्पादकतेत विशेषता गहू आणि तांदूळ यासारख्या मुख्य पिकांमध्ये मोठी वाढ झाली. या नवउपक्रमामुळे कृषी क्षेत्रातील श्रम बाजारात देखील मोठा बदल झाला. शेती पद्धती विकसित होत होत्या, पारंपरिक शेतीकडे दुर्लक्षित केले गेल्याने छोटी शेती किंवा गरीब शेतकरी वर्ग शेतमजूर म्हणून काम करण्यास सुरुवात केली. पण आधुनिक शेती कसण्यासाठी शेतमजुराला आधुनिक कला कौशल्य असणे गरजेचे बनले. त्याला आधुनिक पीक पद्धती, रासायनिक खताचा वापर, सिंचन पद्धतीचा योग्य वापर यासारख्या नवीन तंत्राबद्दल जाणून घेणे आणि त्याचा अवलंब करणे आवश्यक बनले होते. ज्या शेतमजुरांना हे कौशल्य अवगत करता आले नाही त्यांना बेरोजगारीचा प्रश्नांना सामोरे जावे लागले. ज्या मजुरांकडे हे आधुनिक ज्ञान व कौशल्य होते त्यांची मागणी वाढली. हरितक्रांतीने कृषी उत्पादनात लक्षणीय वाढ केली, परंतु त्याचे कामगार गतिशीलतेवरही नकारात्मक परिणाम झाले. एक पीक घेण्याच्या प्रवृत्तीमुळे विशेषतः गहू आणि तांदूळ यामुळे लागवड केलेल्या पिकांची विविधता कमी झाली. ज्यामुळे जमिनीची कस कमी होत गेला आणि कृषी शाश्वत्तेशी संबंधित संभाव्य दीर्घकालीन समस्या निर्माण झाल्या. या बदलत्या कृषी व्यवस्थेमुळे शेती कौशल्याच्या विविधत घट झाली यातून पारंपारिक व जैविक शेतीचा ऱ्हास झाला. हरित क्रांतीमुळे शेतमजुरांना बसलेल्या फटक्याबाबत अभ्यास तुलनेने कमी झाला याचे मुख्य कारण म्हणजे हरित क्रांतीचे यश उत्पादनवाढ, अन्नसुरक्षा आणि आर्थिक विकासाच्या चौकटीत मांडले गेले. त्यामुळे बहुतेक अभ्यासांनी भूस्वामी शेतकऱ्यांच्या लाभावर लक्ष केंद्रित केले आणि शेतमजुरांचे प्रश्न दुर्लक्षित राहिले. शेतमजूर हे असंघटित, दलित, भूमिहीन आणि बहुतेकदा महिला असतात, त्यांचा सार्वजनिक चर्चेत फारसा आवाज नसतो. त्यामुळे त्यांच्या रोजगारावरील परिणाम, मजुरीतील अस्थिरता, आणि सामाजिक शोषण या बाबतीत फारसे संशोधन झाले नाही. याशिवाय कृषी विकास मोजताना केवळ उत्पादन, सिंचन सुविधा आणि तांत्रिक प्रगती यांवर भर दिला गेला, तर श्रमविभाजनात झालेले बदल, रोजगाराची अनियमितता आणि शेतमजुरांचे स्थलांतर हे घटक संख्याशास्त्रीय विश्लेषणात दिसतच नाहीत. परिणामी, हरित क्रांतीचा परिणाम समजून घेण्यासाठी समाजशास्त्रीय चौकट आवश्यक असली, तरी त्या दृष्टिकोनातून अभ्यास फार कमी झाले. त्यामुळे शेतमजुरांच्या दृष्टीकोनातून हरित क्रांतीचे प्रभावी पुनर्मूल्यांकन करण्याची आवश्यकता आहे.

**हरितक्रांती आणि विस्थापित शेतमजूर:** भारतात झालेल्या हरितक्रांतीचे विकासात्मक प्रारूप म्हणून महत्त्व आहे. पण दुसऱ्या बाजूने हरितक्रांतीच्या तांत्रिक अयोग्यतेमुळे असंख्य लहान उत्पादकांना त्यांच्या जमिनीवरून आणि उत्पादक म्हणून त्यांच्या पूर्वीच्या सामाजिक स्थानावरून विस्थापित केले गेले. नवनवीन तंत्रज्ञानामुळे शेतजमीन कसणे महाग झाले ज्या छोट्या शेतकऱ्यांना जमीन करण्यासाठी पैशाची गरज भासली त्यांना सावकाराकडून व्याजाने पैसे घेतले व शेती केली. व्याजाचा परतवा असमर्थता असल्याने असे शेतकरी गाव सोडून शहराकडे विस्थापित झाले. तसेच मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी जमीन आणि पशुधन यासारख्या

मालमत्तेची विक्री करून उदरनिर्वाह केला जात होता. "अल्वारेस" यांनी नमूद केल्याप्रमाणे हरितक्रांती नंतरच्या काळात सामाजिक असमानता वाढली. जमिनीची मालकी असणाऱ्या शेतकऱ्यांचा एक नवीन उच्चभ्रू वर्ग निर्माण झाला आणि भूमिहीन छोटे शेत जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचा एक वर्ग निर्माण झाला. जे श्रीमंत शेतकरी होते त्यांच्याकडून लहान शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर शेती जमिनी देऊ केल्या जात असे, यातून ही शेतकरी सीमांत बनले. याचा परिणाम म्हणून त्यांना आपली राहती जागा सोडून विस्थापन करावे लागले. हरितक्रांतीने त्यांना प्रभावीपणे कर्जबाजारी केले. (अल्वारेस 1994:44) जैव तंत्रज्ञानामुळे कृषी क्षेत्रात रोजगाराची निर्मिती जरी झाली होती तरी या सीमांत शेतकरी व शेतमजुरांना या रोजगार निर्मितीमध्ये सामावून घेण्यात आले नाही.

हरित क्रांतीमुळे नवीन संकरित बी-बियाणे, रासायनिक खते, यंत्र वापरून शेती केल्याने शेतीतील उत्पादन वाढले. पण त्या पटीने शेतीमाल उभा करण्यासाठी खर्चही लागू लागला, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी नफा मिळू लागला. जमिनीला महत्त्व आल्याने जमिनीचे तुकडे करण मोठ्या प्रमाणात झाले. त्यातून छोटे शेतकरी वर्ग निर्माण होऊन त्यांचा उत्पादनात घट झाली. ( बी.पी. सिंग :1988:21) पीक पद्धतीमध्ये झालेल्या बदलामुळे स्थानिक पातळीवर काम न मिळाल्याने हंगामी शेतमजुरांची निर्मिती झाली त्यातून स्थलांतराची प्रक्रियेला वेग आला. हरित क्रांतीच्या संदर्भात अभ्यासकांनी कृषी क्षेत्रातील विस्थापनाचा मुद्द्यांचे विश्लेषण केल्याचे दिसत नाही. शेतमजुरांच्या विस्थापनामुळे त्यांचे जीवन असुरक्षित बनले तसेच त्यांना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक असुरक्षितेचा सामना करावा लागतो. विकासाच्या चर्चेत हरीतक्रांतीला महत्त्वाचे स्थान आहे. कृषी उत्पादनातील असमानता इतकी वाढली की गरीब शेतकऱ्यांमध्ये गरिबी, उपासमार आणि ग्रामीण ती शहरी स्थलांतर वाढले याचे विश्लेषण होणे गरजेचे आहे.

**नवीन आर्थिक धोरणे आणि शेतकरी/ शेतमजूर चळवळी:** स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडात शेतकरी व शेतमजूर चळवळीच्या अभ्यासात सुरुवात झाली. परंतु हा कल 1990 नंतर मात्र संपुष्टात आला. राष्ट्रीय शेतमजूर संघ व अखिल भारतीय किसान मजूर सभा यांनी ग्रामीण भागातील बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, भूमिहीन मजुरांसाठी जमीन वाटप, किसान वेतन, स्थलांतरित शेतमजुरांच्या समस्या, रोजगार हमी योजना, सामाजिक सुरक्षा इत्यादीच्या मागण्या केल्या. यामुळे समाज शास्त्रज्ञांना या चळवळीचा अभ्यासासाठी चालना मिळाली. 1990 नंतर कृषक समाजातील संबंधांमध्ये सामाजिक संरचनेमध्ये कमालीचा बदल झाला. जमीनमालक, कृषक आणि शेतमजूर यांच्यातील संबंध व्यावसायिक बनले. तसेच ते जास्त काळ बांधून राहणारे राहिले नाहीत. त्यांच्या मते, व्यवहाराला फायदा तोट्याचे महत्त्व आले. (भल्ला :1976) यामुळे शेतमजूर जमिनीवर आधारित असणारा परंतु जमिनीचा मालक नसलेले लोक असुरक्षित बनले. यान ब्रेमन यांच्या मते, जमिनीचे मालक आणि शेतमजूर यांच्यातील नाते पारंपारिक पद्धत संपुष्टात आल्यानंतर अधिक काळजीवाहक बनले. कारण कामगाराकडे जमीन मालक पारंपारिक संबंधात पितृत्वाच्या नात्याने पाहत होते. परंतु व्यावसायिक नात्यामुळे पितृत्वाचे नाते बंद झाले यातून मजूर अधिक असुरक्षित बनले.(ब्रेमन :1994) शेतकरी/शेतमजूर चळवळीच्या या अभ्यासातून वसाहत काळापासून ते भारतातील नवीन आर्थिक धोरणाच्या ( 1990 पर्यंतच्या ) काळापर्यंत भारतातील शेतमजूर चळवळीचे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विश्लेषण झालेले दिसते हे विश्लेषण करताना प्रामुख्याने शेतमजूर चळवळीच्या वर्ग निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीच्या प्रक्रियेत व वंचित समूहाच्या मूलभूत हक्कासाठी च्या प्रक्रियेमध्ये अतिशय महत्त्वाचे योगदान देतात. हे योगदान सार्वजनिक क्षेत्रात खूप महत्त्वाचे ठरले असेही मानले गेले. कृषक चळवळीच्या अभ्यास क्षेत्रातून भरी योगदान मिळालेले दिसते परंतु ज्या प्रमाणात शेतकरी चळवळीचा अभ्यास झाला त्या तुलनेत शेतमजूर चळवळीचा अभ्यास कमी प्रमाणात झालेला आहे तसेच शेतमालक व शेतमजुरांचे संबंध व्यावसायिक कसे बनले व त्याचा जीवनशैलीवर काय परिणाम झाला याचे विश्लेषण करणे महत्त्वाचे ठरेल.

**नवीन आर्थिक धोरण आणि शेतमजुरांचे प्रश्न:** नवीन आर्थिक धोरणाचे उद्दिष्टे भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक बाजारपेठेत एकत्रित करण्याचे होते. (झा :1997) या अंतर्गत उदारीकरण खाजगीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रीवर भर देण्यात आला. यापूर्वी भारताची अर्थव्यवस्था मुख्यतः संरक्षणात्मक धोरणावर आधारित होती. ज्यामुळे परदेशी गुंतवणूक व्यापार आणि तंत्रज्ञानाचा प्रवेश मर्यादित होता. परंतु 1991 मध्ये आर्थिक संकटामुळे सरकारला आर्थिक सुधारणा कराव्या लागल्या. या धोरणामुळे परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळाले, निर्यात आयात धोरणे सुलभ झाली सरकारी नियंत्रण कमी करण्यात आले. त्यामुळे भारतीय कंपन्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची संधी मिळाली आणि अर्थव्यवस्थेचा विकास जलद गतीने होऊ लागला. 90 च्या दशकात समाजशास्त्र आणि सामाजिक शास्त्राने कृषी क्षेत्राचा व संबंधित क्षेत्राच्या अभ्यासाकडे आपला कल वळवला. या अभ्यासात जागतिकीकरणाचा शेतीवरील परिणाम, कृषी अरिष्टे, शेतमजुरांची परिस्थिती, हंगामी आणि कामगार स्थलांतर, ग्रामीण ते शहरी स्थलांतर या विषयांचा समावेश होता. 90 च्या दशकात नवीन आर्थिक धोरणामुळे कृषी क्षेत्रात लक्षणीय बदल झाले. ज्यात वाढलेली गुंतवणूक आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारतीय कृषी क्षेत्र झालेला प्रवेश याचाही समावेश होता. मानवी समाजाच्या एक मूलभूत क्षेत्र असलेल्या शेतीमध्ये नवीन आर्थिक धोरणामुळे लक्षणीय बदल झाले आहेत. नियंत्रण मुक्ती खाजगीकरण आणि बाजार उदारीकरण यासारख्या नवीन आर्थिक धोरण आणि कृषी उत्पादन वितरण आणि व्यापाराचे आकार बदललेले आहेत. या सर्व गोष्टींचा फायदा हरित क्रांतीमुळे श्रीमंत बनलेल्या शेतकरी वर्गाचा झाला. त्यांनी नियंत्रण मुक्त आणि अमेरिकन भांडवली कंपन्यांचा भारतातील शेतीतील घुसखोरीचा त्यांच्या फायद्यासाठी उपयोग केला. याउलट येथील छोट्या शेतकरी आणि शेतमजुरांची परिस्थिती बिकट झाली. येथील लहान शेतकऱ्यांना शेतीवरील खर्च परवडत नसल्याने त्यांना मोठ्या शेतकऱ्याकडे मजुरी केल्याशिवाय पर्याय राहिला नाही. नवीन आर्थिक धोरणामुळे लवचिक मजूर श्रम बाजाराला प्रोत्साहित करत असतो. ज्यामुळे शेतीमध्ये आकस्मित आणि हंगामी रोजगाराचा प्रसार मोठ्या प्रमाणात होतो. यासाठी या मजुरांना स्थलांतर करावे लागत असे व त्या प्रकारची व्यवस्था निर्माण होते. नवीन आर्थिक धोरणानंतर भारतीय शेतीमध्ये लवचिक (flexible) श्रमबाजाराला चालना मिळाली, ज्यामुळे शेतमजुरांचा रोजगार आकस्मिक, हंगामी आणि असुरक्षित स्वरूपाचा झाला. यामुळे मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील भूमिहीन, लहान शेतकरी, दलित

व आदिवासी मजुरांना हंगामी रोजगारासाठी स्थलांतर करावे लागले. हे स्थलांतर प्रामुख्याने आंध्रप्रदेश, उडिशा, झारखंड, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र यांसारख्या राज्यांमधून पंजाब, हरियाणा, कर्नाटक, गुजरात, तेलंगणा याठिकाणी ऊसतोड, भात लावणी, कापूस कापणी, मिरची तोडणी अशा श्रमप्रधान शेतीकामांसाठी होते. स्थलांतर बहुधा दलाल, ठेकेदार यांच्या माध्यमातून होते आणि कामाच्या ठिकाणी अत्यंत निकृष्ट स्वरूपाची वसतिसंस्था, आरोग्यसेवा व मजुरी असते. महिलांना दुहेरी शोषणाला सामोरे जावे लागते, तर सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभही त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. या प्रक्रियेतून निर्माण होणारी अस्थायी रोजगार व्यवस्था ही शेतमजुरांच्या जीवनातील अस्थैर्य अधिक तीव्र करत गेली आहे. या प्रक्रियेवर जन ब्रेमन (1996, 2013) यांनी 'Footloose Labour' संकल्पनेच्या माध्यमातून गुजरातमधील स्थलांतरित मजुरांचे व्यापक विश्लेषण केले असून, चिन्मय टुंबे (2018) यांनी भारताच्या स्थलांतर इतिहासात या हंगामी स्थलांतराचे परिणाम अधोरेखित केले आहेत. महाराष्ट्रातील ऊसतोड मजुरांवर ए. के. शर्मा (1997) यांचा अभ्यास, तर उदारीकरणानंतरच्या कृषी क्षेत्रातील रोजगारावर आर. रमाकुमार (2002, 2012) व श्यामसुंदर (2010) यांचे विश्लेषण महत्त्वाचे आहे. या सर्व अभ्यासातून हे स्पष्ट होते की, नवीन आर्थिक धोरणानंतर शेतीतील रोजगाराचे स्वरूप अधिक अनियमित, असंघटित व शोषणात्मक झाले असून, स्थलांतरित मजूर या प्रक्रियेचे सर्वात मोठे बळी ठरले आहेत.

**नवउदारमतवादी धोरण आणि कृषी अभ्यास:** हरितक्रांतीच्या यशाचे उदात्तीकरण केलेल्या अभ्यासाकांवर 90 च्या दशकानंतर टीका होऊ लागली. कारण त्यांनी उत्पादन वाढ ही विकासाचे धोतक मानले होते तर त्यांनी शाश्वत अन्न स्रोत म्हणून शेतीचा विचार केला नाही. याचाच परिपाक म्हणून कृषी क्षेत्रात अलीकडेच करण्यात आलेल्या नवउदारमतवादी सुधारण्याचा परिणाम झालेला दिसतो. हरित क्रांतीच्या वारसा मुळे तयार झालेले धोरणात्मक चौकटीत या सुधारण्याचा समावेश होत आहे. यामुळे ग्रामीण भागातील गरीब लोक हे शेतकरीच आहेत. National Food and Security Act (NFSA) अंतर्गत लाभ घेणाऱ्या बहुतेक व्यक्ती शेतकरी किंवा शेतकरी कुटुंबातील आहेत. नव-उदारमतवादी कृषी सुधारणा शेतीच्या खाजगीकरणाला चालना देणारे आहेत. (zainb Lokhandwala) त्यामुळे मोठा कंपन्या आणि कॉर्पोरेटसने कृषी क्षेत्रावर अधिक वर्चस्व मिळवले. ज्यामुळे ग्रामीण भागातील लहान शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. 1991 नंतरच्या नवउदारमतवादी आर्थिक धोरणांमुळे सरकारी गुंतवणूक कृषी क्षेत्रात घटली. पी. साईनाथ यांच्या मते, याचा सर्वात मोठा फटका **शेतमजुरांना** बसला आहे. रोजगार हमी योजना, कामाच्या संधीतील घट, आणि कंत्राटी कामगिरी यामुळे मजुरांचे जीवन अधिक अस्थिर झाले. पी. साईनाथ यांच्या निरीक्षणानुसार, ग्रामीण शेतमजूर हे मोठ्या प्रमाणावर **असुरक्षित आणि असंघटित क्षेत्रात** काम करतात. त्यांना कोणतीही सामाजिक सुरक्षा, आरोग्यसेवा किंवा नियमित रोजगार उपलब्ध नसतो. हे निरीक्षण **Jan Breman** यांच्या 'footloose labour' संकल्पनेशी सुसंगत आहे, जिथे स्थलांतरित मजुरांचा वापर ही एक लवचिक व शोषणात्मक बाजारू यंत्रणा ठरते.

नवउदारमतवादी धोरणामुळे भारतीय कृषि व श्रम बाजारात मोठा बदल झालेला दिसून येतो. शेतकऱ्यांसाठी शेती एक फायदेशीर व्यवसाय राहिलेला नाही. सरकारकडून मिळणाऱ्या सवलती व अनुदानात घट झाल्यामुळे उत्पादनाचा खर्च वाढला, परंतु उत्पादनासाठी हमीभाव व बाजारपेठेतील किमती अनिश्चित राहिल्या. यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या अस्थिर झाले. दुसरीकडे, शेतमजूर वर्गाला आधीपेक्षा कमी काम व कमी मजुरी मिळू लागली. कामाचे स्वरूप हंगामी झाले, आणि कंत्राटी पद्धतीने काम घेण्याची प्रवृत्ती वाढली. शेतीवर आधारित रोजगार संधी कमी झाल्यामुळे अनेक शेतमजूर शहरांकडे स्थलांतर करू लागले. शहरातही त्यांना असंघटित क्षेत्रात अस्थायी, कमी वेतनाचे काम मिळते. या स्थलांतरामुळे कुटुंब विखुरली जातात, आणि सामाजिक सुरक्षितता नष्ट होते. शहरी भागात त्यांच्या मुलांना शिक्षण, आरोग्य आणि आधार यांचा अभाव जाणवतो. शेतीमालाच्या अनिश्चित बाजारपेठा, उत्पादन खर्चातील वाढ आणि उत्पन्नातील घट यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाले. बऱ्याच वेळा त्यांना बँकांऐवजी खासगी सावकारांकडून उच्च व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. कर्जफेड न झाल्यास अपमान, ताण आणि नैराश्य वाढते. त्यामुळे महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, पंजाब, तेलंगणा अशा राज्यांमध्ये शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. शेतमजुरांचाही मानसिक व आर्थिक ताण सतत वाढत आहे. नवउदारमतवादी धोरणांचा परिणाम समाजातील सत्ताहीन गटांवर अधिक खोलवर झाला आहे. दलित, आदिवासी आणि महिला शेतमजुरांना दुहेरी व तिहेरी भेदभावाला सामोरे जावे लागते. महिलांना पुरुषांपेक्षा कमी मजुरी मिळते, कामाचे स्वरूप अधिक कष्टाचे असते, आणि त्यांना सामाजिक संरक्षणाची अत्यंत मर्यादित मिळकत असते. शेतीमध्ये सातत्याने अपयश, कर्जाचा ताण, शासनाकडून दुर्लक्ष आणि सामाजिक असुरक्षितता यामुळे शेतकरी व शेतमजुरांमध्ये नैराश्य, आत्मसन्मानाची हानी आणि असहायतेची भावना वाढीस लागली आहे. पी. साईनाथ यांच्या लेखनात याचा स्पष्ट उल्लेख आढळतो, की "शेतकऱ्यांना एकमेकांपेक्षा स्पर्धा नको असते, त्यांना आधार हवा असतो — जो शासनाने हिरावून घेतला आहे."

**भारतीय कृषी कायदा २०२० आणि शेतकरी:** भारतीय सरकारने 2020 मध्ये लागू केलेले तीन कृषी कायदे हे केवळ आर्थिक सुधारणांचे दस्तऐवज नव्हते, तर त्यांनी ग्रामीण भारताच्या सामाजिक रचनेवर खोल परिणाम घडवून आणले. हे कायदे पुढे मागे घेतले गेले असले तरी, त्यांच्या अनुषंगाने झालेला अभ्यास शेतकऱ्यांच्या जीवनातील सामाजिक, सांस्कृतिक, वर्गीय आणि लिंगाधारित मुद्द्यांवर प्रकाश टाकतो. सामाजिक शास्त्रज्ञांनी या कायद्यांचे विश्लेषण केवळ बाजाराच्या चौकटीत न करता, ग्रामीण समाजाच्या सत्तासंबंध, विरोध आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने केले. सामाजिक शास्त्रज्ञांनी या कायद्यांना नवउदारवादी धोरणांचा भाग मानले. प्रो. जे. देविका (2021) यांच्या मते हे कायदे बाजार उघडून शेतकऱ्यांना 'स्वातंत्र्य' देतात असा दावा करत असले तरी, प्रत्यक्षात ते खासगी कंपन्यांसाठी प्रवेशद्वार उघडतात. शेतकऱ्यांचे सामर्थ्य नसताना बाजारमुक्तता म्हणजे असुरक्षिततेची प्रक्रिया ठरते. भारतीय कृषीव्यवस्था ही दीर्घकाळ *परंपरागत उत्पादन संबंधांवर* आधारित होती. पारंपरिक व्यवस्थेत शेतकरी वर्ग हा उत्पादनाच्या साधनांचा (जमीन, पाणी, श्रम) नियंत्रणकर्ता होता, जरी त्याचे आर्थिक स्थान कमकुवत असले तरी. ही व्यवस्था *अर्ध-स्वायत्त उत्पादन संबंधांवर* आधारलेली होती जिथे शेतकरी स्वतःच्या निर्णयांवर आधारित शेती करत होता. परंतु नवउदारमतवादी धोरणांमुळे हे उत्पादन संबंध

मूलतः बदलत होईल. त्यामुळे ग्रामीण भागातील पीक पद्धतीमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता आहे. तसेच शेतकऱ्यांची दैनंदिन कृषी व्यवहारात बदल होतील ज्यामुळे येथील लहान शेतकरी व शेतमजूर यांचे जीवन कष्टमय होईल. या भांडवली व्यवस्थामुळे शेतकऱ्यांनी पीक घेतल्यापासून ते पीक बाजारात नेण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेत भांडवलदार सहभागी होतील. त्यामुळे जमीन जरी शेतकऱ्यांची असली तरी त्यातून मिळणारे उत्पादन हे भांडवलदारांचे असेल आणि यातून शेतकरी असुरक्षित होतील. जिथे शेतकरी हा स्वतःचा उत्पादक न राहता, एक प्रकारचा कंत्राटी कामगार बनतो. यातून *वर्ग संरचनेत बदल* घडतो — शेतकरी वर्गाचे *कृषी भांडवलदारांशी असमान उत्पादन संबंध* निर्माण होतात. उत्पादनाचे मालक भांडवलदार असतील, तर शेतकरी केवळ त्या प्रक्रियेतील एक उपयुक्त श्रम घटक ठरेल. पारंपरिक कृषी संस्कृतीत शेतकऱ्यांना त्यांच्या स्थानिक ज्ञानावर, पीक निवडीतल्या स्वातंत्र्यावर आणि सामाजिक जीवनशैलीवर एकप्रकारचा सांस्कृतिक अधिकार होता. पण नवउदार धोरणातून भांडवली हितसंबंध 'सामर्थ्याच्या नव्या रूपात' ग्रामीण जीवनात रूजतात. यामुळे जुनी मूल्यव्यवस्था विस्थापित होऊन नव्या अर्थनीतीची *सांस्कृतिक प्रभुत्व* तयार होते. शेतकऱ्यांवर थेट दडपशाही नसली तरी "मुक्त बाजारपेठ", "विकास", "उत्पादकता वाढ" अशा भाषेतून त्यांच्यावर एक प्रकारचा वैचारिक दबाव टाकला जातो. या प्रक्रियेत शेतकऱ्यांचे पारंपरिक ज्ञान, स्वातंत्र्य आणि सुरक्षितता यांचा अपहास होतो.

जागतिक भांडवल शोषणक्षम श्रम शोधत सतत हालचाल करत असते. कृषी क्षेत्रात याचे प्रकटीकरण म्हणून शेतकऱ्यांची उत्पादक साखळीतील जागा 'सस्त्या श्रम पुरवठादार' म्हणून ठरते. त्यामुळे ग्रामीण समाजाची *श्रमशक्तीची मालकी* नव्या स्वरूपात भांडवली यंत्रणेत गुंतवली जाते. *(बेव्हरली सिल्वर,*2003) एकंदरीत, या नव्या कायद्यांतून भारतीय कृषीव्यवस्था *भांडवली पुनर्रचना* (Capitalist restructuring) अनुभवते आहे. यातून *शेतकरी वर्गाच्या सीमांतीकरणाची* (Marginalization — Iris Young, 2000) प्रक्रिया अधिक तीव्र होते. ही फक्त आर्थिक नव्हे तर सामाजिक आणि सांस्कृतिक वंचिततेची प्रक्रिया देखील ठरते.

प्रो. अचिन वान्या (2021) यांनी या कायद्यांच्या विरोधात झालेल्या आंदोलनांचे वर्गीय विश्लेषण केले. पंजाब-हरियाणातील मध्यम शेतकऱ्यांचा सहभाग आंदोलनात लक्षणीय होता, पण सीमांत शेतकरी, दलित व भूमिहीन मजुरांचे मुद्दे बाजूला पडले होते. आंदोलनांतील बहुसंख्य दलित मजूर शेतकऱ्यांशी एकरूप झाले नाहीत, कारण कायद्यांविषयीची भीती त्यांना उपजीविकेच्या दृष्टीने होती, पण आंदोलनाची भाषा व नेतृत्व हे त्यांच्या दृष्टिकोनाशी सुसंगत नव्हते (Vanya, EPW, 2021). प्रो. सवितीबेन मेहता (JNU, 2021) व अन्य स्त्री अभ्यासकांनी कायद्यांचा स्त्रियांच्या संदर्भातील परिणाम तपासला. महिला शेतकरी (ज्यांच्या नावे बहुतांश वेळा जमीन नाही) कायद्यांत पूर्णपणे अदृश्य आहेत. आंदोलने मात्र ग्रामीण स्त्रियांच्या प्रबळ सहभागाने गाजली — पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेशातील महिलांनी मैदान गाजवले (Kaur, 2021; Menon, EPW, 2021). या विरोधाभासाचे विश्लेषण करताना सामाजिक शास्त्रज्ञ म्हणतात की स्त्रिया केवळ समर्थनार्थ नव्हे तर 'राजकीय कृतीच्या हक्काने' आंदोलनात सहभागी झाल्या. प्रो. अमिता बाविस्कर (2021) यांनी कायद्यांविषयी नागरी समाजाच्या भूमिकेचे विश्लेषण केले. त्यांच्या मते राज्य आणि खासगी क्षेत्र यांचे संगनमत शेतकऱ्यांच्या विरोधात आहे. कायद्यांची रचना पारदर्शक नव्हती, आणि ती 'जन-संवादाविना' लागू करण्यात आली (Baviskar, EPW, 2021). या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे आंदोलन हे लोकशाही प्रक्रियेच्या पुनर्रचनेचे प्रतिक होते. आंदोलकांनी संसदेपलीकडील राजकारणाचा आधार घेतला (Chatterjee, 2021). नवीन कृषी कायदे हे केवळ आर्थिक सुधारणांचे पाऊल नव्हते, तर त्यांनी सामाजिक न्याय, नागरी सहभाग, ग्रामीण सत्ता-संरचना यावर गंभीर परिणाम करणारे होते. सामाजिक शास्त्रातील अभ्यासकांनी या कायद्यांचे विश्लेषण केवळ नियम-कायद्यांच्या चौकटीत न करता, सामाजिक आणि राजकीय प्रभावांच्या माध्यमातून केलेले दिसते. त्यामुळे हे कायदे कोणाच्या फायद्याचे आणि कोणाच्या तोट्याचे, हे समजून घेण्यासाठी समाजशास्त्रीय दृष्टी अत्यावश्यक ठरते.

या अभ्यासांमधून स्पष्ट होते की शेतकऱ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी केवळ कायद्यांचे नव्हे, तर सामाजिक संरचनांचेही समावेशक पुनर्रचना करणे आवश्यक आहे. या कायद्यांचे स्वरूप हे "एक राष्ट्र, एक बाजार" यासाठी प्रयत्न करणारे होते, मात्र त्यांची अंमलबजावणी ही सामाजिक, आर्थिक व संघीय संधारणशास्त्राच्या निकषांवर अपुरी ठरली. बहुतेक अभ्यासकांनी हे अधोरेखित केले की शेतकरी हा केवळ "उत्पादक" नाही, तर तो सामाजिक, सांस्कृतिक, आणि पारंपरिक संबंधांमध्ये गुंतलेला "वैयक्तिक आणि सामूहिक घटक" आहे. अशा व्यक्तींवर नव्या आर्थिक संबंधांची रचना लादताना, कायदेशीर सुसंगती आणि संस्थात्मक मदतीशिवाय, तो अधिक असुरक्षित होतो (Khera 2021; CES 2021; Narayan and Manohar 2021).

शेवटी, अभ्यासकांनी सुचवले की सुधारणांची गरज नाकारता येत नाही, परंतु अशा सुधारणांची प्रक्रिया ही संपूर्ण समावेशात्मक, सामाजिक न्यायाभिमुख, आणि सांविधानिक संस्थांच्या संवादातून घडवली गेली पाहिजे, अन्यथा सुधारणा नव्हे तर अस्थैर्य जन्माला येईल (Drèze and Khera 2021; PUCL 2021).

## संदर्भ सूची


Baviskar, A. (2021). Farm laws and the crisis of democracy. *Economic and Political Weekly, 56*(7), 12–15.
Bhalla, G. S. (1976). *Agrarian structure and economic development in India*. Oxford University Press.
Breman, J. (1996). *Footloose labour: Working in India's informal economy*. Cambridge University Press.
Breman, J. (2013). *At work in the informal economy of India: A perspective from the bottom up*. Oxford University Press.
Devika, J. (2021). Farm laws and the idea of freedom. *Economic and Political Weekly, 56*(6), 18–21.
Jodhka, S. S. (2008). *Agrarian change in India*. Sage Publications.
Mohanty, B. B. (2012). *Labour and agrarian change in India*. Sage Publications.
Ramakumar, R. (2002). Agriculture and the new economic policies. *Social Scientist, 30*(7–8), 3–20.
Ramakumar, R. (2012). Reforming Indian agriculture. *Economic and Political Weekly, 47*(26–27), 53–63.
Sainath, P. (2014). *Everybody loves a good drought*. Penguin Books.
Silver, B. J. (2003). *Forces of labor: Workers' movements and globalization since 1870*. Cambridge University Press.
Tumbe, C. (2018). *India moving: A history of migration*. Penguin Random House.
Young, I. M. (2000). *Inclusion and democracy*. Oxford University Press.

साईनाथ, पी. (2014). *ग्रामीण भारतातील संकट.* पेंग्विन इंडिया.
टुंबे, चि. (2018). *फिरस्ता भारत: स्थलांतराचा ऐतिहासिक मागोवा* (देवयानी देशपांडे, अनुवाद). पेंग्विन.
शर्मा, ए. के. (1997). *महाराष्ट्रातील ऊसतोड मजूर.* पॉप्युलर प्रकाशन.
झा, प्र. (1997). *नवीन आर्थिक धोरण आणि भारत.* वाणी प्रकाशन.
मोहनती, बी. बी. (2012). *भारतातील कृषी बदल आणि श्रम.* सेज प्रकाशन.
भल्ला, जी. एस. (1976). *भारतीय कृषी अर्थव्यवस्था आणि वर्गरचना.* ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

# ग्रामीण समाज व एकल शेतकरी महिलांसमोरील आव्हाने

**साईनाथ साटवजी कुंभारे** संशोधक विदयार्थी समाजशास्त्र विभाग, स्कूल ऑफ सोशल सायन्स, SRTM नांदेड
**डॉ. ए. टी. शिंदे** प्राचार्य राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड जी. नांदेड

**गोषवारा:** नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण समाजातील एकल शेतकरी महिला हे शेतीत व घरगुती व्यवस्थापनात महत्त्वाचे योगदान देतात, तरीही त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. या संशोधनात नांदेड जिल्ह्याच्या पाच तालुक्यातील 150 एकल शेतकरी महिलांवर अभ्यास करून त्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य संबंधी अडचणींचा शोध घेण्यात आला. अभ्यासातून आढळले की, बहुतेक महिलांना पिकांसाठी कर्ज घेणे आवश्यक असते, परंतु नियमित उत्पन्न नसल्यामुळे कर्ज फेडण्यात अडचणी येतात. जमीन मालकीचा अभाव आणि सामाजिक मर्यादा महिलांच्या निर्णयक्षमतेवर मर्यादित परिणाम करतात. शैक्षणिकदृष्ट्या, बहुतेक महिलांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण नसल्यामुळे सरकारी योजना आणि प्रशिक्षणाचा लाभ कमी मिळतो. आरोग्य आणि पोषणाच्या बाबतीत देखील महिला अनेक मर्यादांना सामोरे जात आहेत. या समस्यांवर मात करण्यासाठी स्थानिक प्रशिक्षण केंद्रे, महिला-केंद्रित कृषी सहकारी संस्था, आरोग्य सुविधा, कर्ज आणि जमीन हक्कास सुलभता तसेच स्वयं सहाय्यता गटांचा सशक्तीकरण यासारख्या उपाययोजना आवश्यक आहेत. योग्य धोरण, सामाजिक सशक्तीकरण आणि प्रशिक्षणाद्वारे नांदेड जिल्ह्यातील एकल शेतकरी महिलांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा करता येऊ शकते.
**महत्वाचे शब्द:** एकल शेतकरी महिला, ग्रामीण समाज, नांदेड जिल्हा, आर्थिक आव्हाने, सामाजिक मर्यादा, शैक्षणिक दुर्बलता, आरोग्य व पोषण, महिला स्वयं सहाय्यता गट, कृषी धोरणे, जमीन हक्क कौशल्य विकास, सामाजिक सशक्तीकरण.

**प्रस्तावना:** भारतीय ग्रामीण समाजाची रचना ही प्रामुख्याने शेतीवर आधारित आहे. ग्रामीण जीवनातील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक व्यवहारांचा केंद्रबिंदू शेती असून ग्रामीण कुटुंबांची उपजीविका बहुतांश प्रमाणात कृषी व्यवसायावर अवलंबून असते. या व्यवस्थेत महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. शेतीतील प्रत्यक्ष श्रमापासून ते कुटुंब व्यवस्थापन, पशुपालन, पिकांची निगा राखणे, बाजारपेठेपर्यंत पोहोचणे अशा विविध स्तरांवर ग्रामीण महिला सक्रिय भूमिका बजावत असतात. तथापि, या योगदानाला अपेक्षित सामाजिक व आर्थिक मान्यता फारशी मिळताना दिसत नाही. ग्रामीण समाजात अलिकडच्या काळात सामाजिक-आर्थिक बदलांमुळे एकल कुटुंबप्रणाली वाढत आहे. स्थलांतर, शेतकरी आत्महत्या, आजारपण, घटस्फोट, विभक्त जीवनशैली यामुळे अनेक महिला एकल शेतकरी म्हणून कुटुंबाची व शेतीची संपूर्ण जबाबदारी सांभाळत आहेत. 'एकल शेतकरी महिला' म्हणजे अशा महिला ज्या पतीच्या अनुपस्थितीत किंवा अक्षमतेमुळे शेती, उत्पन्न, कुटुंबाचे पालनपोषण व सामाजिक जबाबदाऱ्या स्वतः पार पाडतात. ग्रामीण भागात अशा महिलांचे जीवन अधिक संघर्षमय बनलेले आहे.

महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील नांदेड जिल्हा हा कृषीप्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो. येथे बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण असून शेतीवर आधारित आहे. पर्जन्यमानावर अवलंबून शेती, सिंचनाच्या मर्यादा, वाढता उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि सामाजिक रचना यांचा परिणाम थेट शेतकरी महिलांवर होतो. विशेषतः एकल शेतकरी महिलांना शेतीसह घरगुती जबाबदाऱ्या, मुलांचे शिक्षण, आरोग्य, आर्थिक नियोजन आणि सामाजिक प्रतिष्ठा जपण्याचे आव्हान पेलावे लागते. एकल शेतकरी महिलांसमोरील समस्या बहुआयामी स्वरूपाच्या आहेत. आर्थिकदृष्ट्या त्यांना कर्ज, जमीन मालकी, पीक विमा, सरकारी योजनांचा लाभ मिळविताना अडचणी येतात. सामाजिक पातळीवर निर्णय प्रक्रियेत मर्यादित सहभाग, असुरक्षितता आणि दुय्यम स्थान यांचा सामना करावा लागतो. शैक्षणिकदृष्ट्या कमी साक्षरतेमुळे कृषी तंत्रज्ञान, बाजारव्यवस्था व डिजिटल सुविधा यांचा पुरेसा लाभ घेता येत नाही. आरोग्याच्या बाबतीत पोषण, स्वच्छता, मातृत्व सेवा आणि मानसिक आरोग्य या क्षेत्रातही मर्यादा आढळतात. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण समाजात एकल शेतकरी महिलांचे जीवन हे केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक व मानसिक संघर्षांनीही व्यापलेले आहे. बदलते हवामान, अनिश्चित उत्पादन, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक अपेक्षा या सर्व घटकांचा त्यांच्या जीवनमानावर परिणाम होत आहे. त्यामुळे या महिलांच्या समस्या, भूमिका आणि विकासाच्या संधींचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

**साहित्य समीक्षा:** ग्रामीण समाज व महिलांच्या स्थितीवर समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि ग्रामीण विकास क्षेत्रात अनेक विद्वानांनी अभ्यास केला आहे. ग्रामीण महिलांचे श्रम, त्यांचे सामाजिक स्थान, आर्थिक सहभाग आणि सशक्तीकरण या विषयांवर भारतीय तसेच पाश्चिमात्य विचारवंतांनी विविध दृष्टीकोनातून मते मांडली आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध साहित्याचा आढावा घेणे आवश्यक ठरते.

**१) भारतीय विचारवंतांचे मत**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनी महिलांच्या सामाजिक सशक्तीकरणावर भर दिला आहे. त्यांच्या मते, "महिलांना समान हक्क व संधी मिळाल्याशिवाय समाजाचा खरा विकास शक्य नाही." ग्रामीण समाजात विशेषतः महिलांना जमीन, शिक्षण आणि आर्थिक स्वातंत्र्य आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**महात्मा गांधी** यांनी ग्रामीण भारताला राष्ट्राचा कणा मानले. त्यांच्या विचारानुसार ग्रामीण महिलांचा विकास हा स्वावलंबी ग्रामव्यवस्थेचा पाया आहे. महिलांना शेती व ग्रामउद्योगात सहभागी करून आत्मनिर्भर करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

**पंडित जवाहरलाल नेहरू** यांनी महिला विकासाला राष्ट्रीय विकासाशी जोडले. त्यांच्या मते, ग्रामीण महिलांचे शिक्षण व आरोग्य सुधारल्याशिवाय कृषी क्षेत्रात प्रगती होणे शक्य नाही.

**इरावती कर्वे** यांनी भारतीय समाजरचनेचा अभ्यास करताना स्त्रीची भूमिका कुटुंब व उत्पादन व्यवस्थेत महत्त्वाची असल्याचे सांगितले. ग्रामीण समाजात महिलांवर घर आणि शेती अशी दुहेरी जबाबदारी असते.

**डॉ. विनयकुमार देशपांडे** व इतर ग्रामीण समाजशास्त्रज्ञांनी आपल्या अभ्यासात असे नमूद केले की ग्रामीण महिलांना श्रम असूनही मालकी, निर्णय व उत्पन्नावर नियंत्रण नसते, त्यामुळे त्यांचे शोषण वाढते.

**२) पाश्चिमात्य विचारवंतांचे मत:**

**कार्ल मार्क्स** यांनी उत्पादन साधनांच्या मालकीचा मुद्दा मांडला. त्यांच्या मते, ज्यांच्याकडे साधनांची मालकी नाही ते शोषित राहतात. हे तत्व ग्रामीण महिलांच्या बाबतीत लागू होते, कारण जमीन व भांडवलावर त्यांचा अधिकार नसतो.

**मॅक्स वेबर** यांनी सामाजिक स्तररचना आणि अधिकारसत्ता यावर भर दिला. त्यांच्या मते, ग्रामीण समाजातील स्त्रियांना आर्थिक व सामाजिक अधिकार नसल्यामुळे निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित राहतो.

**एमिल दुर्खीम** यांनी सामाजिक विभागणी आणि श्रमविभाग यावर प्रकाश टाकला. त्यांच्या मते, महिलांचे श्रम सामाजिकदृष्ट्या कमी मूल्यांकन केले जातात, ज्याचा परिणाम त्यांच्या स्थानावर होतो.

**एस्थर बोसरप (Ester Boserup)** यांनी "Women's Role in Economic Development" या ग्रंथात महिलांचे कृषी क्षेत्रातील योगदान स्पष्ट केले. त्यांच्या मते, महिलांचे श्रम अदृश्य मानले जातात आणि विकास धोरणांमध्ये त्यांचा पुरेसा विचार होत नाही.

**सिल्व्हिया वॉल्बी (Sylvia Walby)** यांनी पितृसत्ताक व्यवस्थेचा अभ्यास करताना सांगितले की सामाजिक रचना महिलांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुय्यम ठेवते, त्यामुळे ग्रामीण महिलांचे सशक्तीकरण कठीण होते.

**संशोधनाची गरज:** नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागांमध्ये शेतकरी महिलांचे योगदान मोठे असूनही त्यांच्या समस्या अद्याप पुरेसे अधोरेखित झालेल्या नाहीत. विशेषतः एकल शेतकरी महिलांचे सामाजिक व आर्थिक शोषण, आरोग्याची मर्यादा, पिकांच्या धोकादायक परिस्थिती आणि सरकारी योजना यांचा फायदा घेण्यात येणाऱ्या अडचणी संशोधनासाठी महत्त्वाच्या आहेत.

**उद्दिष्टे:** १. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण समाजातील एकल शेतकरी महिलांच्या जीवन स्थितीचे अभ्यास करणे. २. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व आरोग्य संबंधी आव्हाने ओळखणे. ३. शेतकरी महिलांच्या जीवनात सरकारी योजना व धोरणांचा प्रभाव तपासणे. ४. स्थानिक प्रशासन व सामाजिक संस्थांसाठी सुधारणा शिफारशी मांडणे.

**संशोधन गृहीतके:** १. नांदेड जिल्ह्यातील एकल शेतकरी महिलांची **आर्थिक स्थिती अस्थिर** आहे. २. जमीन मालकीचा अभाव हा एकल शेतकरी महिलांच्या **सरकारी योजना व कर्ज मिळविण्यातील प्रमुख अडथळा** आहे. ३. एकल शेतकरी महिलांना ग्रामीण समाजात **निर्णय प्रक्रियेत मर्यादित सहभाग** मिळतो. ४. कमी शैक्षणिक स्तरामुळे एकल शेतकरी महिलांना **कृषी तंत्रज्ञान व बाजारपेठेचा लाभ कमी प्रमाणात** मिळतो.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण समाजातील एकल शेतकरी महिलांसमोरील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक आव्हानांचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी **महाराष्ट्रातील नांदेड जिल्हा** निवडण्यात आला आहे.

**नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एकल महिला शेतकऱ्यांच्या सद्यस्थितीचा आढावा:** नांदेड जिल्हा महाराष्ट्राच्या मराठवाडा विभागात येतो आणि येथे शेती हा प्राथमिक आर्थिक उपक्रम आहे. या जिल्ह्यातील **लक्षेच्या आसपासचा हिस्सा लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे,** जिथे अनेक कुटुंबे पर्जन्यमानावर आधारित शेती करतात. अशा परिस्थितीत, शेतकऱ्यांवर हवामानातील अनिश्चितता, पाण्याची टंचाई आणि वाढता उत्पादन खर्च यांचा दबाव वाढत आहे, ज्याचा परिणाम अनेकदा आर्थिक संकट आणि तणावासारख्या समस्या म्हणून दिसतो.

**१) आर्थिक संकट आणि कर्जबाजारीपणा :** नांदेड जिल्ह्यातील शेतकरी संकटाचे परिणाम अनेक स्तरांवर दिसून येतात. २०१४ ते २०२४ पर्यंत नांदेडमध्ये एकूण **१,५४६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली**, यातील अनेक प्रकरणे कर्जाच्या ताणामुळे झाली आहेत. २०२४ मध्येच **१३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली,** ज्यात अनेक कुटुंबे पूर्ण आर्थिक जबाबदारी महिलांवर ठेवून राहू लागली आहेत. या आर्थिक संकटामुळे एकल स्त्रियांच्या परिस्थितीतील ताण वाढला आहे. पतीच्या मृत्यू किंवा गरिबीमुळे कुटुंबाची जबाबदारी सांभाळण्याची गरज ओढवणाऱ्या महिला आता शेतीशी संबंधित आर्थिक निर्णय, कर्ज फेडणी आणि गुंतवणूक यांचा ताण सहन करीत आहेत. बँका वा कोल्हापूर सोसायट्यांसारख्या वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळत असले तरी, त्यांचा व्याजबोझ आणि परतफेडीचे बोजा अनेकदा घरगुती उत्पन्न आणि शेती उत्पन्न यापेक्षा जास्त असतो.

**२) हवामान आणि उत्पादन अस्थिरता :** नांदेड जिल्हा पर्जन्यमानावर अवलंबून असलेला कृषी प्रदेश आहे. वर्ष २०२३ मध्ये मराठवाड्यात **पावसातील २०.७ % कमतरता** नोंदवली गेली, ज्याचा नांदेडमध्ये शेतकऱ्यांवर गंभीर परिणाम झाला. या समस्येचा थेट परिणाम शेती उत्पादनावर, उत्पन्नावर आणि कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेवर दिसतो.

**३) सामाजिक परिस्थिती आणि एकल महिला शेतकरी :** शेतकरी आत्महत्यांचा भार वाढल्यामुळे, विशेषतः एकल महिला शेतकरी कुटुंब प्रमुख म्हणून उभ्या राहतात. अशा महिलांचे उत्पन्न स्थिर नसल्यामुळे रोजच्या गरजा, मुलांचे शिक्षण व आरोग्य खर्च यांची जबाबदारी एकट्याने पार पाडावी लागते. उदाहरणार्थ, पिंपळढव गावातील सरुबाई पोगरे यांचा अनुभव दर्शवितो की पतीच्या आत्महत्येनंतर तीन लाख रुपयांचा कर्जाचा बोजा, अनुदानाचा अभाव आणि घराचे खर्च सांभाळणे ही सर्व जबाबदारी तिला यशस्वीपणे पार पाडावी लागली आहे; तरीही सरकारी योजनांचा लाभ घेण्यात आव्हाने भेडसावतात.

**४) शेतीतून स्त्रियांचे प्रत्यक्ष योगदान :** नांदेडमधील सग्रोळीत एक गृहविज्ञान अभ्यासानुसार महिलांपैकी **९८ % महिलाच शेतीशी संबंधित कार्यात व्यस्त आहेत**, आणि जवळपास **४८ % महिलांमध्ये रक्तक्षयाचे लक्षण दिसले**, जे पोषण आणि आरोग्य स्थितीवर प्रश्न उपस्थित करतात. याचा अर्थ असा की सामाजिक व आर्थिक संघर्षासोबतच महिलांना त्यांच्या स्वास्थ्य आणि पोषण बाबतीतही गंभीर आव्हाने भेडसावत आहेत.

**५) स्वयं सहाय्यता गट व सामूहिक सशक्तीकरण :** शास्त्रीय अभ्यास आणि क्रियाशील उदाहरणे सूचित करतात की नांदेड जिल्ह्यातील काही भागात स्वयं सहाय्यता गटांची (SHG) उभारणी झाली आहे. सग्रोळी (बिलोळी) गावात **५०० हून अधिक महिला स्वयं सहाय्यता गटांना जोडले गेले**, ज्यातून महिलांना आर्थिक व कौशल्य प्रशिक्षण मिळत आहे. हे गट महिलांना व्यवसाय सुरू करणे, पैशाची बचत ठेवणे आणि शेती व्यतिरिक्त उत्पन्नाचे स्रोत निर्माण करण्यास मदत करतात.

**६) सामाजिक सुरक्षा व योजनांचा वापर:** जिल्ह्याच्या प्रशासनाद्वारे शेतकऱ्यांसाठी विविध सरकारी योजना उपलब्ध आहेत, जसे की **किसान क्रेडिट कार्ड** योजना जेणेकरून खेळते भांडवल व व्याज सवलत मिळेल. तथापि, या योजनांचा पुरेसा वापर एकल महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही, कारण माहितीचा अभाव, कागदपत्रांची तयारी आणि सामाजिक सीमारेषा या कारणांमुळे त्यांचा लाभ कमी पडतो.

**७) मानसिक तसेच सामाजिक दडपण:** एकल महिला शेतकऱ्यांना केवळ आर्थिक अवकाशच नव्हे तर सामाजिक दडपणही सहन करावे लागते. शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर, कुटुंबातील आर्थिक आणि सामाजिक जबाबदाऱ्यांची वाढ, कर्जदात्यांचा दबाव आणि विकेंद्रीकृत समर्थन सेवांचा अभाव या सर्व घटकांचा त्यांच्या मनोवैज्ञानिक आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होतो. मल्टिपल अहवालांनुसार या परिस्थितीमुळे महिला शेतकऱ्यांच्या मानसिक तणावाचे प्रमाण वाढते आणि सामाजिक सुरक्षा जास्तच कमी होते.

**ग्रामीण समाजातील एकल महिला शेतकरी समोरील आव्हाने:** ग्रामीण समाजाची रचना परंपरा, शेती, कुटुंब व्यवस्था आणि सामाजिक संबंधांवर आधारलेली आहे. या व्यवस्थेत महिलांचे स्थान महत्त्वाचे असले तरी प्रत्यक्षात त्यांना अनेक स्तरांवर मर्यादा भोगाव्या लागतात. विशेषतः एकल शेतकरी महिलांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व मानसिक अशा बहुआयामी आव्हानांना सामोरे जावे लागते. पतीच्या अनुपस्थितीत किंवा अक्षमतेमुळे संपूर्ण शेती व कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्या जीवनात संघर्ष वाढतो.

**१) आर्थिक आव्हाने:** एकल शेतकरी महिलांसाठी सर्वात मोठे आव्हान म्हणजे आर्थिक असुरक्षितता. बहुतांश महिलांकडे जमीन त्यांच्या नावावर नसते. त्यामुळे बँक कर्ज, पीक विमा, अनुदान योजना यांचा लाभ मिळविताना अडचणी येतात. शेतीसाठी भांडवल उभारणे कठीण होते आणि सावकारांकडून जास्त व्याजाने कर्ज घ्यावे लागते. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारभाव अनिश्चित असल्यामुळे उत्पन्न स्थिर राहत नाही. परिणामी कर्जबाजारीपणा वाढतो आणि आर्थिक ताण निर्माण होतो.

**२) सामाजिक आव्हाने:** ग्रामीण महिलांचे स्थान असुरक्षित राहिलेले दिसते. विशेषतः **एकल शेतकरी महिला** म्हणजे ज्या महिला पतीच्या मृत्यू, विभक्तपणा, आजारपण किंवा स्थलांतरामुळे शेती व कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी स्वतः सांभाळतात, त्यांच्यासमोरील समस्या अधिक गंभीर आहेत. ग्रामीण भारतात अंदाजे **१२ ते १५ टक्के कुटुंबे महिला-प्रधान आहेत**, आणि मराठवाड्यासारख्या भागात हा वाटा काही ठिकाणी **१८ टक्क्यांपर्यंत** आढळतो.

**३) शैक्षणिक व माहितीचा अभाव:** बहुसंख्य ग्रामीण महिलांचे शिक्षण प्राथमिक स्तरापर्यंत मर्यादित असते. त्यामुळे नवीन कृषी तंत्रज्ञान, डिजिटल सेवा, बाजारभाव, सरकारी योजना यांची माहिती मिळविणे कठीण जाते. कृषी प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये महिलांचा सहभाग कमी असतो. परिणामी शेती उत्पादन वाढविण्याच्या संधी त्यांना पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत.

**४) आरोग्य व पोषण विषयक समस्या:** आरोग्याच्या बाबतीत एकल शेतकरी महिलांची स्थिती चिंताजनक आहे. ग्रामीण भागातील अभ्यासांनुसार सुमारे **५० ते ५५ टक्के महिला रक्तक्षय (ॲनिमिया)** समस्येने ग्रस्त आहेत. तसेच कुपोषण, थकवा, पाठदुखी, मानसिक तणाव या समस्या मोठ्या प्रमाणात आढळतात. ग्रामीण आरोग्य केंद्रांपर्यंत पोहोचण्याच्या सुविधा मर्यादित असल्यामुळे नियमित तपासणी होत नाही. शेतीतील कठोर श्रम आणि घरगुती जबाबदाऱ्या यांचा आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. एकल जीवनशैलीमुळे अनेक महिलांना एकाकीपणा, भीती, असुरक्षितता आणि आत्मविश्वासाचा अभाव जाणवतो. आर्थिक दडपण, समाजाचा बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन आणि कुटुंबाची जबाबदारी यामुळे मानसिक ताण वाढतो.

**५) दुहेरी जबाबदारीचा ताण:** एकल शेतकरी महिलांना शेतीची तसेच घरगुती जबाबदारी एकट्याने पार पाडावी लागते. पिकांची लागवड, कापणी, पशुपालन यासोबतच मुलांचे संगोपन, शिक्षण, घरखर्च यांची जबाबदारी त्यांच्यावर असते. वेळेचे व्यवस्थापन

करणे कठीण होते. ग्रामीण महिलांचा रोजचा कामाचा वेळ पुरुषांच्या तुलनेत सरासरी **२ ते ३ तासांनी अधिक** असतो यामुळे मानसिक तणाव वाढतो.

६) **संसाधनांवर मर्यादित अधिकार:** पाणी, जमीन, बी-बियाणे, यंत्रसामग्री यांसारख्या संसाधनांवर महिलांचा अधिकार कमी असतो. निर्णय बहुतेक वेळा पुरुष नातेवाईक घेतात. त्यामुळे महिलांच्या गरजा व अनुभव धोरणांमध्ये प्रतिबिंबित होत नाहीत. यामुळे त्यांची उत्पादकता मर्यादित राहते. सामाजिक दृष्टिकोनातून ग्रामीण समाज अजूनही मोठ्या प्रमाणात पितृसत्ताक आहे. अनेक ठिकाणी एकल महिलांना जमीन व्यवहार, पीक निवड, आर्थिक निर्णय व बाजारपेठ संपर्क यामध्ये दुय्यम स्थान दिले जाते. सर्वेक्षणांनुसार ग्रामीण महिलांपैकी फक्त **३० ते ३५ टक्के महिलाच कुटुंबातील आर्थिक निर्णयात सक्रिय सहभाग घेतात**. उर्वरित महिलांचे निर्णय बहुतेक वेळा पुरुष नातेवाईक ठरवतात. त्यामुळे एकल महिलांचा आत्मविश्वास व सामाजिक सुरक्षितता कमी होते.

**७) बाजारपेठेतील अडचणी:** बाजारपेठेच्या दृष्टीनेही अडचणी आहेत. ग्रामीण महिलांपैकी फक्त **२५ ते ३० टक्के महिला स्वतः उत्पादन विक्रीसाठी बाजारात जातात.** उर्वरित महिलांना दलालांवर अवलंबून राहावे लागते. यामुळे योग्य दर मिळत नाही आणि त्यांच्या श्रमाचे मूल्य कमी होते व फसवणुकीचे प्रमाण वाढत.

**निष्कर्ष:** नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एकल महिला शेतकरी कुटुंब व शेतीची जबाबदारी एकट्याने सांभाळत आहेत. मात्र कर्जबाजारीपणा, पर्जन्यमानातील अनिश्चितता, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारभावातील अस्थिरता यामुळे त्यांचे उत्पन्न असुरक्षित आहे. शासनाच्या योजनांचा लाभ सर्व महिलांपर्यंत पोहोचत नसल्याने आर्थिक अडचणी वाढतात. सामाजिक स्तरावर निर्णयप्रक्रियेत मर्यादा, जमीनहक्काच्या समस्या, आरोग्य व मानसिक तणाव यांचा त्यांच्या जीवनमानावर परिणाम होतो. स्वयं सहाय्यता गट व प्रशिक्षणामुळे काही प्रमाणात सशक्तीकरण होत असले तरी ते अपुरे आहे. म्हणून एकल महिला शेतकऱ्यांसाठी सुलभ कर्ज, जमीनहक्क, आरोग्य सुविधा, प्रशिक्षण व बाजारपेठेपर्यंत थेट प्रवेश देणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांचे जीवनमान सुधारून ग्रामीण विकासाला चालना मिळू शकेल.

**शिफारशी:** एकल महिला शेतकऱ्यांच्या नावावर जमीन नोंदणी सुलभ करणे, कमी व्याजदराने सुलभ कर्जपुरवठा उपलब्ध करणे. प्रशिक्षण आधुनिक शेती तंत्रज्ञानावर नियमित प्रशिक्षण देणे. बाजारव्यवस्था थेट बाजारपेठ व ई-मार्केटशी जोड निर्माण करणे. स्वयं सहाय्यता गट बचत गटांना आर्थिक व तांत्रिक बळकटी देणे. आरोग्य तपासणी व मानसिक समुपदेशन सुविधा वाढवणे. माहिती सेवा तालुका स्तरावर कृषी मार्गदर्शन केंद्र सुरू करणे. विमा सुरक्षा पीकविमा व आरोग्य विमा प्रभावी राबवणे. ग्रामपातळीवर महिला नेतृत्व सहभाग वाढवणे. एकल महिला शेतकऱ्यांचा स्वतंत्र डेटाबेस तयार करणे.

**संदर्भ सूची:**

१. भारत सरकार (२०२१), **जनगणना अहवाल २०११ – महाराष्ट्र राज्य**, नवी दिल्ली: भारत सरकार प्रकाशन विभाग.
२. महाराष्ट्र शासन (२०२३), **महाराष्ट्र आर्थिक सर्वेक्षण अहवाल**, मुंबई: अर्थ व सांख्यिकी संचालनालय.
३. कृषि विभाग, महाराष्ट्र शासन (२०२२), **नांदेड जिल्हा कृषी सांख्यिकी अहवाल**, नांदेड.
४. देशमुख, बी. जी. (२०१९), **ग्रामीण समाजशास्त्र**, पुणे: विद्या प्रकाशन.
५. पाटील, आर. टी. (२०२०), **भारतातील महिला व कृषी विकास**, औरंगाबाद: साकेत प्रकाशन.
६. National Sample Survey Office (NSSO) (२०१९), **Situation Assessment of Agricultural Households in India**, New Delhi: Government of India.
७. FAO (२०२१), **The Role of Women in Agriculture**, Rome: Food and Agriculture Organization.
८. Government of India (२०२२), **Agricultural Statistics at a Glance**, New Delhi: Ministry of Agriculture.
९. शिंदे, एस. के. (२०१८), **ग्रामीण महिलांचे सशक्तीकरण**, मुंबई: हिमालय पब्लिकेशन.
१०. नांदेड जिल्हा प्रशासन (२०२३), **जिल्हा सामाजिक-आर्थिक अहवाल**, नांदेड

# झिरो बजेट नैसर्गिक शेती व ग्रामीण कृषिव्यवस्था: एक शाश्वत विकासाचा उपाय

**डॉ. सुजाता सुरेश पाटील** समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

**गोषवारा:** ग्रामीण कृषिव्यवस्था ही केवळ अन्नउत्पादनापुरती मर्यादित नसून ती ग्रामीण समाजाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा कणा आहे. ग्रामीण भागातील शेती, पशुपालन, मजुरी, पारंपरिक ज्ञान व नैसर्गिक संसाधनांवर आधारित उपजीविका या सर्व घटकांचा ग्रामीण कृषिव्यवस्थेत समावेश होतो. सध्याच्या काळात वाढता उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती आणि ग्रामीण-शहरी स्थलांतर यामुळे ग्रामीण कृषिव्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत झिरो बजेट नैसर्गिक शेती ही ग्रामीण कृषिव्यवस्थेला बळकटी देणारी, कमी खर्चात टिकाऊ उत्पादन देणारी व ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणारी प्रभावी पद्धत ठरू शकते. झिरो बजेट शेतीची संकल्पना मांडणारे सुभाष पाळेकर यांच्या झिरो बजेट नैसगिक शेती: एक उपाय यावर सविस्तर प्रकाश टाकला असता. असे दिसून आले कि, पारंपारीक शेती पद्धती, संद्रिय शेतीपध्दती, करार शेती, तांत्रिक शेती अशा शेतीपध्दती बऱ्याच कालखंडापासून देशामध्ये प्रचलित आहेत. पण या शेतीपध्दती शेतकऱ्यांच्या वेगवेगळया समस्या सोडऊ शकल्या नाहीत. त्या सोडविण्यासाठी शेतकऱ्यांना कमी उत्पादन खर्च, उत्पादनात वाढ, पौष्टिक अन्नधान्य, शेतमालाला योग्य भाव, शेतमालाला चांगली मागणी व कमी पाण्यावर येणारी पिके व शहरी भागाकडे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी या सर्व घटकासाठी झिरो बजेट शेती काळाची गरज आहे.

**किवर्डस्:** झिरो बजेट, नैसर्गिक शेती

आजही भारतातील ७० लोक शेतीवर अवलंबून आाहेत. नॅशनलसॅम्पल सर्व्हेच्या माहितीनूसार देशात जवळपास 70 टक्के शेतकरी कुटूंब शेतीवर त्याच्या कमाईपेक्षा जास्त खर्च करतात तरी पण अर्ध्याहून अधिक शेतकरी कर्जबाजारी आहेत कारण भारतीय शेतीही निसर्गांवर अवलंबून आहे निसर्गाच्या लहरीपणामूळे ग्रमीण भागामध्ये कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ निर्माण होतो. यामुळे शेती व्यावसाय सातत्याने तोटयाचा ठरु लागला आहे शेतकऱ्यांना अनेक अर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती परवडनाशी झाली आहे. कारण रासायनिक खते, भरमसाठ सिंचन यांचा द्वारे चालू केलेल्या हरितक्रांतीच्या प्रयोगात जमीनीचा स्वतः चा कस निर्माण करण्याची क्षमता नष्ट होते. खताच्या आणि बियांणाच्या सतत वाढत जाणाऱ्या किंमती यामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजरीपणा व आत्महत्या यांचे प्रमाण चिंताजनक झाले आहे. त्यामूळे केंद्र सरकार २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पत्न दुप्पट करण्याचे आश्ववासन देत आहे. त्या आश्वासनाची पूर्ती करण्यासाठी त्यातूनच झिरो बजेट शेतीची संकल्पना सुभाष पाळेकर यांनी संशोधना अंतर्गत १९९० च्या दशकात विकसित केली. झिरो बजेट शेतीमध्ये जंगलात विविध प्रकारच्या वनस्पती कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय चांगल्या प्रकारे वाढतात त्यांच्यात कोणत्याही अन्नद्रव्याची कमतरता दिसून येत नाही. मात्र जेव्हा आपण रासायनिक पध्दतीने शेती करतो, तेव्हा अनेक प्रकारच्या कमतरता, रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. असे का व्हावे याचा विचार आपण सातत्याने करीत होतो. अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी मानवाने शेतीचे रासायनिक घटकांचा वापर सुरु केला त्यामुळे शेतीचे चक्र बिगडले. माती आणि इतर सर्व संसाधनाकडून अधिक उत्पन्नाच्या लालसेपोटी जे साध्य करायचे ते झालेच नाही. निसर्गांचे मात्र शोषण झाले. यावर उपाय म्हणून झिरो बजेट शेती हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे. मुख्य पिकांचा उत्पादन खर्च आंतरपिकाच्या उत्पन्नातून भरुन काढणे आणि मुख्य पीक बोनस म्हणून घेणे म्हणजे झिरो बजेट शेती असे आहे.

**झिरो बजेट शेती म्हणजे काय?** आत बट्टयाच्या शेतीमूळे कर्जबाजारी होऊन शेतकरी एकीकडे आत्महत्या करीत असताना, शून्य उत्पादन खर्चावर भरपूर पिक काढायचे हे स्वप्नरंजनच वाटत. या शेतीसाठी खरच काहीही खर्च येत नाही का? बाहेरुन काहीही विकत आणायचे नाही. आपल्याजवळ आहे तेच शेतीत टाकायचे आणि त्यातून उत्पादन घ्यायचे. हेच तर शेतीचे वैशिष्ट्य आहे. या शेतीसाठी रासायनिक सेंद्रिय -गांडूळ खत, कीटकनाशक, शेणखत अशा कोणत्याही रानविष्टा विकत आणाव्या आणि शेतात टाकाव्या लागत नाहीत. शिवाय नेहमीच्या शेतीच्या तुलनेत या शेतीला केवळ दहा टक्के पाणी आणि दहा टक्के वीज लागते. म्हणजेच पाणी आणि विजेची ९० टक्के बचत होते. भरून उत्पन्नाची, दर्जेदार मालाची, शुन्य खर्चाची, कर्जमुक्ती, चिंतामुक्त, विषमुक्त, कष्टमुक्त, आत्महत्यामुक्त, रोग-किडीमुक्त, दुष्काळमुक्त, अवकाळीसंकटमूक्त अशीही शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने सुखी समृध्द, स्वावलंबी बनवणारी निसर्ग, ज्ञान विज्ञान व अध्यात्मावर आधारित नवीन कृषी पध्दती आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे : १)** झिरो बजेट नैसर्गिक शेतीची संकल्पना व वैशिष्ट्ये अभ्यासणे. २) ग्रामीण कृषिव्यवस्थेची सद्यस्थिती व समस्या समजून घेणे. ३) झिरो बजेट शेतीचा शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके: १)** झिरो बजेट नैसर्गिक शेतीमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च लक्षणीयरीत्या कमी होतो. २) झिरो बजेट शेतीचा अवलंब केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते. ३) झिरो बजेट शेती ग्रामीण कृषिव्यवस्थेला अधिक स्वावलंबी व टिकाऊ बनवते.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. माहितीचे स्रोत: प्राथमिक माहितीसाठी शेतकरी, कृषी तज्ज्ञ व संबंधित व्यक्तींशी चर्चा तसेच द्वितीयक स्रोतमध्ये पुस्तके, संशोधन लेख, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, मासिके, संकेतस्थळे व इंटरनेट इ. वापर करण्यात आला आहे नमुना निवड: ग्रामीण भागातील निवडक शेतकऱ्यांचा हेतुपूर्वक नमुना (Purposive Sampling) वापरण्यात आला आहे. माहिती विश्लेषण: संकलित माहितीचे वर्णनात्मक व तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.

**झिरो बजेट शेती केवळ शेती नव्हे तर जन आंदोलन.** शेतीचे तंत्र देणे हे शेतीचे शास्त्र आहे. पण त्यासोबतच नैसर्गिक जीवन शैली देणे हे जन आंदोलन आहे. विषमुक्त अन्न, प्रदुषण मुक्त हवा, पाणी देऊन माणसाला वाचवणे हे जन आंदोलन आहे रस्त्यावर येऊन गाडया जाळणे; दगडफ़ेक करणे, मोर्चे, घेराव म्हणजे जन आंदोलन नाही. अहिंसक मार्गाने नवनिर्माणाची चळवळ म्हणजे जनआंदोलन. या मार्गाने लाखो शेतकरी एकमेकांशी जोडले जाताहेत, सातत्याने चर्चा, बैठका आणि संविधानिक मार्गाचा अवलंब हा जन आंदोलनाचाच भाग असतो. एखादी व्यवस्था आपण नाकारतो, तेव्हा तिला पर्यांय देण्याची जबाबदारीही आपलीच असली पाहीजे. झिरो बजेट शेतीची चळवळ केवळ उपदेश करीत नाहीतर प्रयोगसिध्द पर्याय ही देते.

**झिरो बजेट शेतीचे तीन अस्त्र:**

**१) अग्निअस्त्र:** एका मोठ्या भांडयात देशी गायीचे विस लिटर मुत्र घ्यायचे. एक किलो तंबाखू अर्धा किलो हिरवी मिरची, अर्धा किलो गावठी लसूण आणि पाच किलो कडुनिंबाची पान वाटून त्याचा लगदा त्यात मिसळायचा. या साऱ्या मिश्रणाला पाच वेळा उकळी द्यायची. २४ तासानंतर हे सारे मिश्रण फडक्याने गाळायचे आणि शंभर लिटर पाण्यात तीन ते पाच लिटर अग्निअस्त्र मिसळून त्याची पिकांवर फवारणी करायची.

**२) ब्रम्हास्त्र:** देशी गायीचे वीस लिटर मुत्र घ्यायचे, कडुनिंबाच्या पानांचा तीन किलो सीताफळ-पपई-पेरु आणि मिळाल्यास घाणोरी व पांढरा धोतरा यांच्या पानांचा प्रत्येकी दोनदोन किलो वाटलेला लगदा त्यात टाकायचा. या मिश्रणाला पाच वेळा उकळी घ्यायचीः फडक्याने गाळून चोवीस तासाने त्याची झाडावर फवारणी करता येते.

**३) निमास्त्र:** शंभर लिटर पाण्यात देशी गायीचे पाच लिटर मुत्र टाकायचे, देशी गायीचे पाच किलो शेण, कडुनिंबांच्या पाच किलो पानांचा वाटलेला लगदा या मिश्रणात टाकायचा. २४ तास हे मिश्रण तसेच राहू द्यायचे आणि एखादी काठी घेऊन हे मिश्रण दिवसातून दोन वेळा चांगले ढवळायचे आणि पिकांवर त्याची फवारणी करायची.

**झिरो बजेट शेतीची चतू:सुत्री :**

**१) बीजामृत:** बियाणांवर प्रकिया करण्यासाठी त्यांनी बिजामृत नावाचे मिश्रण बनवले आहे. त्यामध्ये देशी गाईंचे शेण, गोमुत्र कडुलिंबांची पाने, तंबाखू, हिरव्या मिरच्या, चुना किंवा चुनखडी पासून बीजामृत तयार होते या सर्वांचा सरसरीत लगदा करुन ते बियाणांना लावायचा यामुळे रोग व बुरशी नियंत्रणासाठी बीजामृताचा उपयोग होतो.

**२) जिवामृत:** यामध्ये व्यापारी तत्वावर तयार केलेल्या रासायनिक खतांना त्यांनी संपूर्ण स्वदेशी, घरच्या घरी तयार करता येईल असा पर्याय तयार केला. देशी गाईचे शेण, गोमुत्र, गुळाचा वापर, डाळीचे पीठ, पाणी आणि रासायनीक खताचा स्पर्श न झालेली माती पाणी-जीवनमृदा यांचे फर्मंटेड म्हणजे आंबवलेले मिश्रण करुन जिवामृत तयार केले जाते. पिकांच्या वाढीसाठी जिवामृत अत्यंत उपयुक्त ठरते. जिवामृत हे खरंतर खत नसून विरजण आहे. त्यामुळे रासायनिक आणि सेंद्रिय खतांना पुर्णपणे सोडचिठी दिली जाते. मात्र विदेशी किंवा जर्सी गायीचे शेण, गोमूत्र यासाठी अजिबात उपयुक्त नाही.

**३) आच्छादन:** मृदा आच्छादन - नांगरणीसारखी जमिनीची मशागत. काष्ठा आच्छादन शेतातल्या पिकांचे जे अवशेष जमिनीवर पडतात, त्याचे जमिनीवर पाघरुण. सजीव आच्छादन- मुख्य पिंकांमधलीअंतर पिक आाणि मिश्र पिक. वरील आच्छादनामुळे ओलावा जास्त काळ टिकून राहतो तसेच पाण्याची काही टक्के बचत होऊन जमीन सुपीक होते. तसेच माती कस होते. तिचा अगदी वरचा पापूंद्रयासारखा भरही सकस होतो. तसेच पुष्कळ पाणी, खोल नांगर यांची गरज असत नाही.

**4) वापसा:** जमिनीत पाणी हवा याचे मिश्रण ५०-५० टक्के असायला हवे पाणी केव्हा द्यायचे त्याचं ही एक साधं, सोपं टेक्नीक आहे. शेत जमिनीतली माती हातात घेऊन मूठीने दाबून त्याचा गोळा बनवायचा आपल्या छाती इतक्या उंचीवरुन तो खाली सोडायला. गोळा जर पुर्णपणे फुटलातर जमिनीला पाण्याची गरज आहे. नाही फुटलातर जमिनीला पाणी देण्याला अजून अवकाश आहे असे समजायचे.

**झिरो बजेट शेतीचे फायदे :** झिरो बजेट शेतीमध्ये उत्पादन खर्च शुन्य असतो. उत्पादनातही वाढ. शेतमालाचा उत्तम दर्जा. अन्न, धान्य पूर्णतः पौष्टीक, दर्जेदार, स्वादिष्ट आणि विषमुक्त अन्न असते. शेतकऱ्यांची आत्महत्या रोखण्यासाठी मदत. झिरो बजेट शेतीमुळे नैसर्गिक संसाधनांची शाश्वतता वाढते. शेती मालाला चांगली मागणी शेतमालाला योग्य भाव. पाण्याची मोठया प्रमाणावर बचत. झिरो बजेट शेतीमुळे शेतकऱ्यांना खते, बियाणे, किटकनाशके वगेरे विकत घेण्यासाठी कर्जावर अवलंबून राहवे लागते. ते कमी होत जाईल.

**सारांश:** झिरो बजेट शेतीची संकल्पना मांडणारे सुभाष पाळेकर यांच्या झिरो बजेट नैसर्गिक शेती एक उपाय यावर सविस्तर प्रकाश टाकला असता. असे दिसून आले की, पारंपारीक शेती पध्दती, सेंद्रीय शेतीपध्दती, करार शेती, तांत्रिक शेती अशा शेतीपध्दती बऱ्याच कालखंडापासून देशामध्ये प्रचलित आहेत. पण या शेतीपध्दती शेतकऱ्यांच्या वेगवेगळया समस्या सोडऊ शकल्या नाहीत. त्या सोडविण्यासाठी शेतकऱ्यांना कमी उत्पादन खर्च उत्पादनात वाढ, पौष्टिक अन्नधान्य, शेतमालाला योग्य भाव, शेतमालाला चांगली मागणी व कमी पाण्यावर येणारी पिके व शहरी भागाकडे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी या सर्व घटकांसाठी झिरो बजेट शेती काळाची गरज आहे.

**निष्कर्ष:** वरील अभ्यासातून असे दिसून येते की, पारंपरिक व रासायनिक शेतीपद्धतींमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढून ते कर्जबाजारी झाले आहेत. याचा थेट परिणाम ग्रामीण कृषिव्यवस्थेवर झाला असून स्थलांतर, बेरोजगारी व सामाजिक अस्थैर्य यांसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर झिरो बजेट नैसर्गिक शेती ही कमी खर्चात, पर्यावरणपूरक व शाश्वत शेतीपद्धत म्हणून पुढे येत आहे. झिरो बजेट शेतीमुळे उत्पादन खर्चात लक्षणीय घट होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते, तसेच मातीची सुपीकता, पाण्याची बचत व विषमुक्त अन्ननिर्मिती शक्य होते. यामुळे ग्रामीण कृषिव्यवस्था अधिक सक्षम, स्वावलंबी व टिकाऊ बनण्यास मदत होते. त्यामुळे शेतकरी, समाज व पर्यावरण यांच्या समन्वयातून ग्रामीण विकास साधण्यासाठी झिरो बजेट नैसर्गिक शेती ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. Raghavan R. 'what is Zero budget farming' IBP company limited. Oct.9 2016

२. Patil M.S. 'Zero budget sheti', Part-one. 20 dec.2016.

३. Sharma Prasada. 'Campaign to reduce use of chemical Fertilizers pesticides, The Hindu', 28 may 2016.

४. Palekarsubhash. 'Zero Budget.Agriculure' 2o des.2016

५. TripatiSaurabh, Tausefshahidi, Shnuti, Nagbhushan and Niti Gupta.2018..'Zero Budget Natural foming for the sustainable development goals.' Pub. Agroicology Knowledge Hub.

६. Samstha, R.S. 2019 'zero Budget Natural Faming as natre-based solution for climate action'.Wedacs.Unep.org.

७. दैनिक लोकसत्ता, झिरो बजेट शेतीचा संकल्प 28 मार्च 2016.

८. उमाटे गजानन आणि धुळप प्राजक्ता एकही पैंसा खर्च न करता अशी करा झिरो बजेट शेती बी.बी.सी. मराठी 23 डिसेंबर 2017. दैनिंक सामना झिरो बजेट शेती एक उपाय.

# ग्रामीण महिलांच्या आरोग्य विकासामध्ये महिला परिचरिकांची भूमिका: विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा

**प्रज्ञा सुभाषराव आझादे** संशोधक विदयार्थीनी (Ph.d. Student)
**प्रा. डॉ. आर. एस. गोरे** श्री. योगानंद स्वामी महाविद्यालय बसमत जि. हिंगोली

**गोषवारा:** ग्रामीण महिलांचे आरोग्य हे सामाजिक विकासाचे एक महत्त्वाचे अंग आहे. ग्रामीण भागात महिलांना आरोग्य सेवांचा अभाव, अज्ञान, आर्थिक मर्यादा व सामाजिक बंधने यांचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत महिला परिचारिका या ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा कणा म्हणून कार्य करतात. प्रस्तुत संशोधनात **हिंगोली जिल्ह्याच्या विशेष संदर्भात ग्रामीण महिलांच्या आरोग्य विकासात महिला परिचारिकांची भूमिका** अभ्यासण्यात आली आहे. या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. महिला परिचारिकांच्या कार्यक्षेत्रात मातृ-बाल आरोग्य सेवा, लसीकरण, पोषण मार्गदर्शन, आरोग्य शिक्षण, रोग प्रतिबंध व कर्करोग स्क्रीनिंग यांचा समावेश होतो. हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण महिलांमध्ये जागरूकता निर्माण करणे, प्राथमिक उपचार उपलब्ध करून देणे व आरोग्य सेवांशी जोडणे यामध्ये परिचारिकांचे योगदान महत्त्वाचे ठरत आहे. अभ्यासातून असे दिसून येते की महिला परिचारिकांमुळे ग्रामीण महिलांच्या आरोग्य स्थितीत सकारात्मक बदल होत आहेत. मात्र मनुष्यबळाची कमतरता, साधनसामग्रीचा अभाव व प्रशिक्षणाची गरज ही प्रमुख आव्हाने आहेत. योग्य धोरणात्मक पाठबळ, सतत प्रशिक्षण व संसाधनांची उपलब्धता दिल्यास महिला परिचारिका ग्रामीण महिला आरोग्य विकासात अधिक प्रभावी भूमिका बजावू शकतात, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

**महत्त्वाचे शब्द:** ग्रामीण महिला, महिला परिचारिका, आरोग्य विकास, मातृ-बाल आरोग्य, हिंगोली जिल्हा, प्राथमिक आरोग्य सेवा, जनजागृती, रोग प्रतिबंध, लसीकरण.

**प्रस्तावना:** ग्रामीण भागातील आरोग्य स्थिती हे भारताच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील एक अत्यंत संवेदनशील आणि गुंतागुंतीचा विषय आहे. हिंगोली जिल्हा, मराठवाड्यातील ग्रामीण आणि कृषिप्रधान भाग असून येथे सामाजिक-आर्थिक मागासपणा, आरोग्य सेवांचा स्वरूप, जागरूकतेचा अभाव आणि आरोग्य संकेतांमध्ये लक्षणीय फरक दिसून येतो. हिंगोलीच्या महिला आरोग्य परिस्थितीबद्दल उपलब्ध डेटा दर्शवितो की प्राथमिक आरोग्य संकेत अनेक बाबतीत राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहेत, ज्यामुळे *महिला आरोग्य विकासासाठी प्राथमिक आरोग्य कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत निर्णायक* ठरते.

उदाहरणार्थ, हिंगोलीमध्ये गर्भवती महिलांपैकी *केवळ सुमारे 55.6% महिलांनी पहिल्या तिमाहीत गर्भ निरोपण सेवांसाठी नोंदणी* केली आहे तर राज्य सरासरी 67.9% आहे. याशिवाय, तिघांपेक्षा जास्त प्रसूतीपूर्व तपासण्या केल्या त्या महिलांची टक्केवारी हिंगोलीमध्ये सुमारे 66.8% आहे, जी राज्य सरासरी 77.9% पेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे. याचप्रमाणे, लसीकरणातील सहभागीता आणि मुलांच्या संपूर्ण लसीकरणातही हा फरक स्पष्ट दिसतो . हिंगोलीमध्ये *लसीकरण पूर्ण झालेल्या मुलांची टक्केवारी 58.1%* इतकी आहे, ज्यात मुलांचे टीकाकरण राज्याच्या सरासरी 66.2% पेक्षा कमी आहे. या आकडेवारीतून स्पष्ट होते की, ग्रामीण महिलांच्या आरोग्य सुधारणा करण्याची प्रबल आवश्यकता आहे. हिंगोलीमध्ये **संजिवनी अभियानाअंतर्गत सुमारे 2,92,996 ग्रामीण महिलांची आरोग्य स्क्रीनिंग** करण्यात आली होती. या व्यापक मोहिमेत *14,542 हून अधिक महिलांमध्ये कर्करोगासारखी लक्षणे* नोंदवण्यात आली आहेत, आणि पुढे तपासणीसाठी त्यांना संदर्भित करण्यात आले आहे. या आकड्याचा अर्थ असा की ग्रामीण भागात वेळेवर आरोग्य तपासणी आणि आरोग्य शिक्षणाचा अभाव गंभीर आरोग्य धोके वाढवू शकतो. या पार्श्वभूमीवर, **महिला परिचारिका** हे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील *पहिले संपर्क बिंदू* आहेत. त्यांचे कार्य हे फक्त तात्काळ वैद्यकीय सेवा पुरवण्यापुरते मर्यादित नाही, तर *महिला आरोग्य शिक्षण, पोषण, गर्भ निरोपण सेवा, लसीकरण, रोग प्रतिबंध आणि तपासणी* या संपूर्ण आरोग्य चक्राचा समन्वय साधण्याचे आहे. ग्रामीण महिलांसमोर येणाऱ्या *लिंग-आधारित सामाजिक अडथळे, शिक्षण आणि जागरूकतेचा अभाव,* तसेच *आरोग्य सेवांपर्यंत सहज पोहोच नसणे* ही समस्या सोडवण्यासाठी परिचारिकांचे कार्य निर्णायक आहे.

या संशोधनात हिंगोली जिल्ह्याच्या ग्रामीण महिलांच्या आरोग्य क्षेत्रातील संकेत, परिचारिकांची भूमिका व त्यांच्या योगदानाचा थेट परिणाम यांचा सखोल अभ्यास केला आहे. हा अभ्यास ग्रामीण आरोग्य स्थितीतील फरक आणि त्यामागील कारणे उलगडण्यास मदत करतो तसेच आरोग्य धोरणे अधिक प्रभावी बनवण्यासाठी मार्गदर्शक म्हणून महत्त्वाचे आहे. **साहित्य समीक्षा:**

ग्रामीण महिलांचे आरोग्य हे केवळ वैद्यकीय प्रश्न नसून ते सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय घटकांशी निगडित आहे. विविध भारतीय आणि पाश्चिमात्य विचारवंतांनी ग्रामीण महिला आरोग्यावर आपापल्या संशोधनातून सखोल विचार मांडले आहेत. त्यांच्या मतांचा अभ्यास केल्यास ग्रामीण महिलांच्या आरोग्य समस्यांचे स्वरूप व त्यावरील उपाय अधिक स्पष्टपणे समजतात.

**पाश्चिमात्य विचारवंत:** फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांनी आरोग्याचा पर्यावरणीय सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, *स्वच्छता, हवा, पाणी, प्रकाश, पोषण आणि शांत वातावरण* हे आरोग्याचे मूलभूत घटक आहेत. ग्रामीण महिलांच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या अस्वच्छता, दूषित पाणी, अपुरा आहार व अपुरी स्वच्छता या समस्यांवर परिचारिकांनी विशेष लक्ष द्यावे, असे त्यांनी नमूद केले. ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी केवळ औषधोपचार नव्हे तर जीवनशैली सुधारणा गरजेची आहे, असे त्यांचे मत होते. ओरेम यांनी *Self-Care Deficit Theory* मांडली. त्यांच्या मते, व्यक्ती स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊ शकली पाहिजे. ग्रामीण महिलांमध्ये

आरोग्यविषयक ज्ञानाचा अभाव असल्याने त्या स्वतःची काळजी घेऊ शकत नाहीत. म्हणून परिचारिकांनी ग्रामीण महिलांना *स्वच्छता, पोषण, गर्भनिरोध, लसीकरण आणि आजार प्रतिबंध* याचे शिक्षण देऊन आत्मनिर्भर करणे आवश्यक आहे, असे ओरेम यांचे मत आहे. न्यूमन यांनी आरोग्याला "Health as Expanding Consciousness" म्हणून पाहिले. त्यांच्या मते, आरोग्य म्हणजे केवळ रोग नसणे नव्हे तर *जाणीव, समज आणि निर्णयक्षमता विकसित होणे* होय. ग्रामीण महिलांना आरोग्यविषयक निर्णय घेण्याची क्षमता नसल्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे परिचारिकांनी केवळ उपचार न करता महिलांमध्ये आत्मजाणीव व आरोग्यविषयक समज वाढवावी, असे न्यूमन यांनी मांडले

**भारतीय विचारवंत:** डॉ. रामलिंगस्वामी यांनी भारतातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा अभ्यास करताना असे नमूद केले की, ग्रामीण महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी प्राथमिक आरोग्य सेवा मजबूत करणे आवश्यक आहे. त्यांच्या मते, *आरोग्य सेवा गावपातळीवर उपलब्ध नसतील तर महिलांपर्यंत त्या पोहोचणार नाहीत.* म्हणून ANM व महिला परिचारिकांच्या भूमिकेला त्यांनी विशेष महत्त्व दिले. डॉ. लीला विश्वनाथन यांनी मातृ-बाल आरोग्यावर संशोधन केले. त्यांच्या मते, ग्रामीण महिलांमध्ये आरोग्यविषयक अज्ञान मोठ्या प्रमाणावर आहे. *गर्भावस्था, प्रसूती व प्रसूतीनंतरची काळजी* योग्य न घेतल्यामुळे मृत्यू व आजार वाढतात. त्यामुळे परिचारिकांनी समुपदेशन, जनजागृती व नियमित तपासणीवर भर द्यावा, असे त्यांनी नमूद केले. नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांनी आरोग्याला मानवी क्षमतेशी (Capability Approach) जोडले आहे. त्यांच्या मते, आरोग्य म्हणजे व्यक्तीला आपले जीवन योग्य पद्धतीने जगण्याची क्षमता मिळणे. ग्रामीण महिलांचे आरोग्य खराब असेल तर त्यांची सामाजिक व आर्थिक प्रगती थांबते. म्हणून आरोग्य सेवा म्हणजे महिला सक्षमीकरणाचा पाया आहे, असे सेन यांचे मत आहे

**निष्कर्षात्मक मत:** वरील विचारवंतांच्या मतांवरून असे स्पष्ट होते की ग्रामीण महिला आरोग्य हे बहुआयामी आहे. पाश्चिमात्य विचारवंतांनी आत्मनिर्भरता, पर्यावरण व जाणीव यावर भर दिला आहे, तर भारतीय विचारवंतांनी सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी महत्त्वाची मानली आहे. या दोन्ही दृष्टिकोनांचा समन्वय करूनच ग्रामीण महिलांच्या आरोग्य विकासासाठी प्रभावी धोरण आखता येईल.

**संशोधनाची उद्दिष्टे:** या संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण महिलांच्या आरोग्य विकासामध्ये महिला परिचारिकांची भूमिका अभ्यासणे हे आहे. त्यासाठी पुढील विशिष्ट उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत: १. हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण महिलांच्या आरोग्य स्थितीचा अभ्यास करणे. २. महिला परिचारिकांच्या कार्यक्षेत्र व जबाबदाऱ्या समजून घेणे. ३. ग्रामीण महिलांच्या आरोग्यावर परिचारिकांच्या कार्याचा परिणाम तपासणे. ४. आरोग्य शिक्षण, लसीकरण, मातृ-बाल सेवा व जनजागृतीमधील परिचारिकांचे योगदान विश्लेषित करणे. ५. महिला परिचारिकांना भेडसावणाऱ्या अडचणी व मर्यादा ओळखणे. ६. ग्रामीण महिला आरोग्य विकासासाठी सुधारात्मक उपाय सुचविणे.

**संशोधन गृहितके:** या संशोधनासाठी खालील गृहितके मांडण्यात आली आहेत: हिंगोली जिल्ह्यात ग्रामीण महिलांच्या आरोग्य विकासामध्ये महिला परिचारिकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. महिला परिचारिकांच्या आरोग्य शिक्षणामुळे ग्रामीण महिलांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढते. लसीकरण व मातृ-बाल सेवांमध्ये परिचारिकांच्या सहभागामुळे आजारांचे प्रमाण कमी होते. महिला परिचारिकांच्या नियमित संपर्कामुळे ग्रामीण महिलांच्या आरोग्यवर्तनात सकारात्मक बदल होतो. संसाधनांचा अभाव व मनुष्यबळाची कमतरता परिचारिकांच्या कार्यक्षमतेवर परिणाम करते.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधन *"ग्रामीण महिलांच्या आरोग्य विकासामध्ये महिला परिचारिकांची भूमिका: विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा"* या विषयावर आधारित असून या अभ्यासासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे. या संशोधनासाठी **महाराष्ट्र राज्यातील हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण भाग** निवडण्यात आला आहे. हिंगोली जिल्हा कृषिप्रधान, सामाजिक-आर्थिक दृष्ट्या मागास आणि आरोग्य सेवांमध्ये मर्यादा असलेला भाग असल्यामुळे या विषयासाठी योग्य अभ्यास क्षेत्र ठरतो.

**हिंगोली जिल्ह्याची सामाजिक व आरोग्य पार्श्वभूमी:**

**भौगोलिक रचना:** हिंगोली जिल्हा महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात स्थित असून तो प्रामुख्याने ग्रामीण व कृषिप्रधान स्वरूपाचा आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ सुमारे ४,५२६ चौ.कि.मी. असून येथील बहुतांश लोकसंख्या शेती व शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून आहे. अनिश्चित पर्जन्यमान, मर्यादित सिंचन सुविधा आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे ग्रामीण जीवनमानावर मोठा परिणाम होतो. विशेषतः महिलांना शेतमजुरी, पशुपालन, घरकाम आणि कुटुंब जबाबदाऱ्या एकाच वेळी पार पाडाव्या लागतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही आणि पोषण व विश्रांतीचा अभाव निर्माण होतो.

**लिंग गुणोत्तर:** २०११ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या सुमारे ११.७७ लाख आहे. यामध्ये पुरुषांची संख्या सुमारे ६.०६ लाख तर महिलांची संख्या सुमारे ५.७१ लाख आहे. जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर ९४२ महिला प्रति १००० पुरुष असे असून बाल लिंग गुणोत्तर सुमारे ८८३ आहे. ही आकडेवारी सामाजिक दृष्ट्या चिंताजनक मानली जाते. विशेष म्हणजे जिल्ह्यातील सुमारे ८५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. त्यामुळे आरोग्य सेवा, पोषण आणि मातृ-बाल आरोग्य कार्यक्रमांचा मुख्य भार ग्रामीण आरोग्य व्यवस्थेवर पडतो.

**साक्षरता दर:** शिक्षणाच्या दृष्टीने पाहिले असता हिंगोली जिल्ह्याचा साक्षरता दर सुमारे ७८ टक्के आहे. पुरुष साक्षरता सुमारे ८७ टक्के असून महिला साक्षरता केवळ ६९ टक्क्यांच्या आसपास आहे. महिला साक्षरतेतील ही तफावत ग्रामीण महिलांच्या आरोग्य जागरूकतेवर थेट परिणाम करते. अनेक महिलांना पोषण, गर्भनोंदणी, लसीकरण, कुटुंबनियोजन आणि आजार प्रतिबंध याबाबत

योग्य माहिती नसते. परिणामी त्या पारंपरिक समजुतींवर अधिक अवलंबून राहतात आणि आरोग्य सेवांचा उपयोग मर्यादित प्रमाणात होतो.

**सामाजीक रचना:** हिंगोली जिल्ह्याची सामाजिक रचना पाहता सुमारे १५ टक्के लोकसंख्या अनुसूचित जातीची तर सुमारे ९ टक्के लोकसंख्या अनुसूचित जमातीची आहे. हे समुदाय बहुतांश वेळा आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्यामुळे त्यांच्या महिलांमध्ये कुपोषण, रक्तक्षय, मातृ आरोग्य समस्या आणि उपचारांपर्यंत पोहोचण्यातील अडथळे जास्त प्रमाणात दिसून येतात. या पार्श्वभूमीवर ग्रामीण महिला आरोग्य विकासासाठी प्राथमिक आरोग्य सेवांची आणि महिला परिचारिकांच्या कार्याची आवश्यकता अधिक वाढते.

**पोषण आहार व रक्तक्षय:** पोषण आणि रक्तक्षय ही हिंगोली जिल्ह्यातील महिलांसाठी गंभीर समस्या आहे. ग्रामीण महाराष्ट्रात महिलांमध्ये रक्तक्षयाचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे विविध अहवाल दर्शवितात. हिंगोलीसारख्या जिल्ह्यात महिलांचे अन्न प्रामुख्याने धान्याधारित असल्यामुळे लोह, प्रथिने, कॅल्शियम व जीवनसत्त्वांची कमतरता राहते. त्यामुळे अशक्तपणा, थकवा, गर्भधारणेतील गुंतागुंत आणि प्रसूतीदरम्यान धोका वाढतो. अनेक महिला स्वतःच्या आरोग्यापेक्षा कुटुंबाच्या गरजांना प्राधान्य देतात, त्यामुळे आरोग्य दुर्लक्षित राहते.

**माता व बाल आरोग्य:** मातृ-बाल आरोग्याच्या दृष्टीनेही अनेक अडचणी दिसतात. ग्रामीण भागात गर्भनोंदणी उशिरा होते, आवश्यक तपासण्या कमी केल्या जातात आणि प्रसूतीनंतरची काळजी पुरेशी घेतली जात नाही. अनेक वेळा महिलांना आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचणे कठीण जाते. यामुळे माता व बाल मृत्यूचे धोके वाढतात. अशा परिस्थितीत महिला परिचारिका घरभेटी, तपासणी, लसीकरण, पोषण सल्ला आणि संदर्भ सेवा देऊन महिलांना आरोग्य व्यवस्थेशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात.

**आरोग्य विभाग:** हिंगोली जिल्ह्यात आरोग्य सेवांसाठी जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे तसेच आशा व ANM कार्यकर्त्या कार्यरत आहेत. या संपूर्ण यंत्रणेत महिला परिचारिका हा मुख्य आधारस्तंभ आहे. त्या केवळ उपचार देत नाहीत तर आरोग्य शिक्षण, जनजागृती, समुपदेशन आणि विश्वास निर्माण करण्याचे काम करतात. ग्रामीण महिलांना आरोग्य केंद्रापर्यंत आणणे, तपासणीस प्रवृत्त करणे आणि आजार प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन करणे ही त्यांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

**संजीवनी अभियान:** अलीकडील 'संजीवनी अभियान' अंतर्गत हिंगोली जिल्ह्यात सुमारे तीन लाख महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली होती. त्यामध्ये सुमारे चौदा हजार महिलांमध्ये कर्करोगासारखी लक्षणे आढळली. ही बाब ग्रामीण महिलांमध्ये तपासणीचा अभाव, लक्षणांकडे दुर्लक्ष आणि उशिरा उपचार घेण्याची प्रवृत्ती दर्शवते. त्यामुळे वेळेवर स्क्रीनिंग आणि आरोग्य शिक्षण अत्यंत आवश्यक ठरते.

| तालुका | एकूण लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या (%) | महिला लोकसंख्या | लिंग गुणोत्तर | महिला साक्षरता (%) | प्रमुख आरोग्य समस्या | महिला परिचारिकांची भूमिका |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हिंगोली | ३,४०,००० | ७८ | १,६३,५०० | ९४० | ७० | रक्तक्षय, कुपोषण, मधुमेह, उच्च रक्तदाब | घरभेटी, लसीकरण, गर्भनोंदणी, आरोग्य शिक्षण |
| कळमनुरी | २,१०,००० | ९० | १,०२,००० | ९३५ | ६५ | कुपोषण, गर्भधारणेतील गुंतागुंत, लसीकरण कमी | जनजागृती, फॉलो-अप, पोषण समुपदेशन |
| सेनगाव | २,५०,००० | ९२ | १,२१,५०० | ९३० | ६३ | अशक्तपणा, मातृ मृत्यू धोका, रक्तक्षय | तपासणी, फॉलो-अप, आरोग्य सेवा पोहचवणे |
| औंढा नागनाथ | १,५०,००० | ८८ | ७२,००० | ९४५ | ६८ | स्थलांतरित कामगार महिलांमध्ये सेवा अपुरी, पोषण समस्या | लसीकरण, समुपदेशन, विश्वास निर्माण |
| वसमत | १,२७,३४५ | ८० | ६३,०५१ | ९५० | ७२ | मधुमेह, उच्च रक्तदाब, कुपोषण | आरोग्य शिक्षण, जनजागृती, तपासणी |

स्रोत: NFHS व Census Reports 2011

एकूणच पाहता हिंगोली जिल्ह्याची सामाजिक व आरोग्य पार्श्वभूमी ग्रामीणता, अल्प शिक्षण, आर्थिक मर्यादा, पोषणाचा अभाव आणि सेवा उपलब्धतेतील अडचणींनी प्रभावित आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण महिलांच्या आरोग्य विकासासाठी महिला परिचारिका या केवळ आरोग्य कर्मचारी नसून त्या *मार्गदर्शक, समुपदेशक, शिक्षिका आणि विश्वासाचा आधार* म्हणून कार्य करतात. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील महिला आरोग्य सुधारण्यासाठी त्यांच्या भूमिकेला विशेष महत्त्व प्राप्त होते.

**ग्रामीण महिला आरोग्य विकासात महिला परिचारिकांचे योगदान:** ग्रामीण भारतातील आरोग्य सेवा व्यवस्था महिला परिचारिकांच्या कार्यावर प्रामुख्याने अवलंबून आहे. विशेषतः हिंगोलीसारख्या ग्रामीण जिल्ह्यांमध्ये जिथे शहरी आरोग्य सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध आहेत, तिथे महिला परिचारिका प्राथमिक आरोग्य सेवा पोहोचविण्यात मुख्य भूमिका बजावतात. त्या केवळ औषधोपचार किंवा तपासणीपुरती मर्यादित नसून, त्या सामाजिक समुपदेशन, पोषण, जनजागृती, लसीकरण आणि मातृ-बाल आरोग्य सेवांचा केंद्रबिंदू आहेत. महिला परिचारिका नियमित घरभेटी करून गर्भवती महिलांचे ANC (Antenatal Care) तपासणी, रक्त तपासणी, पोषण स्थिती, लसीकरण आणि बाल आरोग्य सेवांचे फॉलो-अप करतात. अशा भेटींमुळे गर्भधारणेतील गुंतागुंत कमी होते, कुपोषण रोखले जाते, रक्तक्षय टाळला जातो आणि महिलांना आवश्यक उपचार व मार्गदर्शन वेळेत मिळते. याशिवाय महिला परिचारिका ग्रामीण महिलांमध्ये आरोग्यविषयक सामाजिक जाणीव निर्माण करतात. त्या कुटुंब नियोजन, मातृ मृत्यू प्रतिबंध, बाल मृत्यू कमी करणे, स्वच्छता आणि संसर्गजन्य आजार प्रतिबंध यासारख्या बाबतीत मार्गदर्शन करतात. ग्रामीण भागात शिक्षण कमी असल्यामुळे महिलांना आरोग्य सेवांचा लाभ घेण्यासाठी योग्य माहिती नसते; या जागरूकतेत महिला परिचारिकांचा मोठा वाटा आहे.

तसेच महिला परिचारिका सर्वसामान्य लोकांशी विश्वासाचा संबंध निर्माण करतात, ज्यामुळे आरोग्य केंद्र आणि शासकीय योजना ग्रामीण महिलांपर्यंत प्रभावीपणे पोहोचतात. अनेक वेळा सामाजिक संकोच, पारंपरिक समजुती आणि आर्थिक अडचणींमुळे महिलांना आरोग्य सेवा घेणे कठीण जाते; महिला परिचारिका या अडचणी दूर करण्यासाठी कार्य करतात. नविन आरोग्य योजना आणि अभियानात महिला परिचारिकांचा सहभाग हे ग्रामीण आरोग्य संकेत सुधारण्यास महत्त्वाचे ठरते. उदा., हिंगोली जिल्ह्यातील 'संजीवनी अभियान' अंतर्गत हजारो महिलांची तपासणी करण्यात आली, आणि कर्करोगसदृश लक्षणे असलेल्या महिलांवर त्वरित फॉलो-अप सेवा उपलब्ध करून दिल्या गेल्या. अशा प्रकारे महिला परिचारिका हे ग्रामीण महिला आरोग्य विकासाचे मुख्य स्तंभ आहेत.

**निष्कर्ष:** हिंगोलीसारख्या ग्रामीण जिल्ह्यात महिला परिचारिका ग्रामीण आरोग्य विकासाचे मुख्य आधार आहेत. त्या घरभेटी, लसीकरण, गर्भधारणेतील तपासण्या, पोषण समुपदेशन आणि बाल आरोग्य सेवांमध्ये सक्रिय आहेत. शिक्षणाचा अभाव, सामाजिक संकोच आणि आर्थिक मर्यादा यामुळे अनेक महिलांना आरोग्य सेवा मिळण्यास अडचणी येतात; या अडचणी दूर करण्यास महिला परिचारिकांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण महिलांचे आरोग्य सुधारते, जागरूकता वाढते आणि मातृ-बाल आरोग्याचे संकेत सुधारतात. त्यामुळे ग्रामीण आरोग्य धोरणांत महिला परिचारिकांच्या भूमिकेला अधिक प्राधान्य देणे आवश्यक आहे.

**शिफारशी:** १) महिला परिचारिकांच्या संख्येत वाढ करणे. २) प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित करणे. ३) ग्रामीण महिलांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती वाढवण्यासाठी शाळा, स्वयंसेवी संस्था आणि नियमित शिबिरे व कार्यशाळा आयोजित कराव्यात. ४) आरोग्य सेवा घेताना महिलांचा सामाजिक संकोच दूर करण्यासाठी गोपनीयता सुनिश्चित करणाऱ्या धोरणांची अंमलबजावणी करावी. ५) समन्वय व सल्लागार भूमिका बजावणे.

**संदर्भ सूची:**


१. Amartya Sen. (1999). *Development as Freedom*. Oxford University Press, New York.
२. World Health Organization (WHO). (2016). *Global strategic directions for strengthening nursing and midwifery 2016–2020*. WHO Press, Geneva.
३. World Health Organization (WHO). (2018). *Primary Health Care: Transforming Vision into Action*. Geneva.
४. Nightingale, F. (1969). *Notes on Nursing: What It Is and What It Is Not*. Dover Publications, New York.
५. Orem, D. E. (2001). *Nursing: Concepts of Practice* (6th ed.). Mosby, St. Louis.
६. Newman, M. A. (1994). *Health as Expanding Consciousness*. National League for Nursing Press, New York.
७. Indian Council of Medical Research (ICMR). (2021). *Guidelines for Maternal and Women's Health in India*. New Delhi.
८. Ministry of Health and Family Welfare, Government of India. (2022). *National Health Mission: Framework for Implementation*. New Delhi.
९. National Family Health Survey (NFHS-5). (2021). *India Report on Women's Health*. International Institute for Population Sciences (IIPS), Mumbai.
१०. Ramalingaswami, V. (2001). *Health System in India: Issues and Challenges*. Oxford University Press, New Delhi.
११. Sarkar, B. K. (2015). *Social Structure and Health in India*. Orient Blackswan, Hyderabad.
१२. Vishwanathan, L. (2017). *Maternal and Child Health in Rural India*. Sage Publications, New Delhi.
१३. Park, K. (2021). *Textbook of Preventive and Social Medicine* (26th ed.). Banarsidas Bhanot, Jabalpur.
१४. Government of Maharashtra. (2023). *District Health Profile: Hingoli*. Public Health Department, Mumbai.
१५. National Rural Health Mission (NRHM). (2020). *Role of ANM and Staff Nurses in Rural Health Services*. Ministry of Health, New Delhi.
१६. Sujata Kelkar. (2018). *Women's Health in Rural Maharashtra*. Himalaya Publishing House, Mumbai.
१७. UNICEF. (2019). *State of the World's Children: Women and Health*. New York.
१८. WHO & UNICEF. (2020). *Strengthening Community Health through Nursing Services*. Genev


# ग्रामीण समाजातील कृषी व्यवस्थेमधील ऊस तोड कामगार महिलांचा दर्जा व भूमिका


**गोरखनाथ बळीराम वगवाड** संशोधक विद्यार्थी

**प्रो. डॉ. माधव मोरे** समाजशास्त्र विभाग, एन. डब्लू. महाविद्यालय, आखाडा बाळापूर, ता. कळमनुरी, जि. हिंगोली.



**गोषवारा:** ग्रामीण समाजातील कृषी व्यवस्था ही श्रमप्रधान असून त्यामध्ये ऊस हे महत्त्वाचे नगदी पीक मानले जाते. ऊस उत्पादन प्रक्रियेत विशेषतः तोडणीच्या टप्प्यावर महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आढळतो. आर्थिक गरज, बेरोजगारी आणि ग्रामीण दारिद्र्यामुळे नांदेड जिल्ह्यातील अनेक महिला ऊस तोड कामगार म्हणून काम करतात. मात्र, त्यांच्या श्रमाचे सामाजिक व आर्थिक मूल्य अपेक्षेप्रमाणे भेटत नाही. या संशोधनाचा मुख्य उद्देश नांदेड जिल्ह्यातील ऊस तोड कामगार महिलांचा सामाजिक दर्जा, आर्थिक स्थिती, कामाची परिस्थिती, आरोग्यविषयक समस्या आणि त्यांच्या भूमिकेचा अभ्यास करणे हा आहे. अभ्यासातून असे दिसून येते की महिलांना कमी मजुरी, असुरक्षित कामाचे स्वरूप, आरोग्य सुविधांचा अभाव, सामाजिक संरक्षणाची कमतरता आणि कुटुंबीय जबाबदाऱ्यांचा अतिरिक्त ताण सहन करावा लागतो. ऊस तोड काम करताना त्यांना शारीरिक व मानसिक अडचणींचा सामना करावा लागतो. या संशोधनातून स्पष्ट होते की ग्रामीण कृषी व्यवस्थेमध्ये महिलांचे योगदान महत्त्वाचे असले तरी त्यांचा दर्जा दुर्लक्षित राहिला आहे. त्यामुळे महिला ऊस तोड कामगारांसाठी किमान वेतन, आरोग्य सुविधा, सामाजिक सुरक्षा योजना, संघटनात्मक पाठबळ आणि जनजागृती कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. यामुळे त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडून येऊ शकते.

**महत्त्वाचे शब्द:** ग्रामीण समाज, कृषी व्यवस्था, ऊस तोड कामगार महिला, सामाजिक दर्जा, आर्थिक स्थिती, नांदेड जिल्हा, आरोग्य समस्या, महिला कामगार, स्थलांतर, ग्रामीण विकास.

**प्रस्तावना:** भारतीय ग्रामीण समाजाची आर्थिक रचना मुख्यत्वे कृषी व्यवस्थेवर आधारित आहे. भारतातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास असून त्यातील जवळपास ५४ टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय शेती व संलग्न क्षेत्रे आहेत. शेती ही केवळ अन्ननिर्मितीपुरती मर्यादित नसून ग्रामीण रोजगाराची प्रमुख साधनसंपत्ती आहे. या व्यवस्थेमध्ये ऊस हे एक महत्त्वाचे नगदी पीक मानले जाते. भारतात ऊस लागवड क्षेत्र सुमारे ५० लाख हेक्टरपेक्षा अधिक असून वार्षिक उत्पादन अंदाजे ४०० दशलक्ष टनांपेक्षा जास्त आहे. ऊस उत्पादनामध्ये भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. ऊस पिकासाठी लागवड, देखभाल आणि तोडणी या सर्व टप्प्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मानवी श्रमाची आवश्यकता असते. विशेषतः ऊस तोडणी ही अत्यंत श्रमप्रधान प्रक्रिया असून त्यामध्ये महिला कामगारांचा सहभाग लक्षणीय आहे. राष्ट्रीय स्तरावर अंदाजे ३५ ते ४० टक्के ऊस तोड मजूर महिला आहेत. महाराष्ट्र राज्यात ऊसतोड हंगामात दरवर्षी सुमारे १० ते १२ लाख स्थलांतरित मजूर काम करतात, त्यापैकी जवळपास ४५ टक्के महिला असतात. या महिलांचा सहभाग प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत महत्त्वाचा असतानाही त्यांचा सामाजिक व आर्थिक दर्जा तुलनेने दुर्लक्षित राहतो.

महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील नांदेड जिल्हा हा कृषीप्रधान जिल्हा आहे. जिल्ह्यातील सुमारे ७० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शेती व मजुरीवर अवलंबून आहे. नांदेडमध्ये ऊस लागवड क्षेत्रात सातत्याने वाढ होत आहे. आर्थिक गरजेमुळे ग्रामीण भागातील अनेक महिला ऊस तोड कामासाठी स्थलांतर करतात. काही अहवालांनुसार नांदेड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांपैकी सुमारे ४० टक्के महिला आहेत. ऊस तोड कामगार महिलांवर दुहेरी जबाबदारी असते. एकीकडे कठोर शारीरिक श्रम आणि दुसरीकडे घरगुती कामे, मुलांचे संगोपन, कुटुंबाची जबाबदारी पार पाडावी लागते. कामाच्या ठिकाणी त्यांना योग्य निवास, पाणी, स्वच्छता व आरोग्य सुविधा पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. परिणामी त्यांच्या आरोग्यावर आणि सामाजिक जीवनावर विपरीत परिणाम होतो. महिलांचे श्रम कृषी व्यवस्थेचा कणा असतानाही त्यांचे योगदान अनेकदा अदृश्य राहते. मजुरीतील असमानता, सामाजिक सुरक्षा योजनांचा अभाव, आरोग्य समस्या आणि शिक्षणापासून वंचित राहणे या अडचणी ऊस तोड कामगार महिलांच्या जीवनमानावर परिणाम करतात. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील ऊस तोड कामगार महिलांचा दर्जा व भूमिका यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

**भारतीय व पाश्चिमात्य विचारवंतांची साहित्य समीक्षा:** संशोधन कार्यामध्ये साहित्याचा आढावा हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. यामुळे संशोधन विषयाशी संबंधित पूर्वी झालेल्या अभ्यासांची दिशा, निष्कर्ष, मर्यादा आणि संशोधनातील पोकळी स्पष्ट होते. ग्रामीण समाज, कृषी व्यवस्था, महिला श्रम, स्थलांतरित कामगार आणि सामाजिक दर्जा या विषयांवर भारतीय तसेच पाश्चिमात्य विचारवंतांनी विविध दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे.

**१. भारतीय विचारवंतांचा आढावा:** भारतीय समाजरचनेचा अभ्यास करताना अनेक समाजशास्त्रज्ञांनी ग्रामीण जीवन, श्रमसंस्था आणि महिलांची भूमिका यावर संशोधन केले आहे. महात्मा गांधी यांनी "ग्रामस्वराज्य" संकल्पनेवर भर दिला. त्यांच्या मते ग्रामीण विकासात महिलांचा सहभाग केंद्रस्थानी असला पाहिजे. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा देण्याची संकल्पना मांडली. महिलांचे आर्थिक स्वावलंबन हे सामाजिक परिवर्तनाचे साधन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. आंबेडकरांनी "सामाजिक न्याय व स्त्रीहक्क" यावर मूलभूत विचार मांडले. महिलांना समान वेतन, शिक्षण व कामगार हक्क मिळाले पाहिजेत असे त्यांनी अधोरेखित केले. ग्रामीण भागातील स्त्रिया शोषित वर्गात मोडतात असे त्यांचे मत होते. इरावती कर्वे यांनी "भारतीय समाजरचना व कुटुंबसंस्था" यांचा अभ्यास केला. ग्रामीण महिलांची भूमिका केवळ घरापुरती मर्यादित नसून उत्पादन प्रक्रियेतही महत्त्वाची आहे, हे त्यांनी मांडले. पाश्चिमात्य समाजशास्त्रज्ञांनी श्रम, वर्गसंघर्ष, लिंगभेद आणि सामाजिक रचना यावर व्यापक विचार मांडले आहेत. मार्क्स यांनी "श्रम आणि भांडवल" यांचा संबंध स्पष्ट केला. त्यांच्या मते श्रमिकांचे शोषण आर्थिक रचनेमुळे होते. महिला कामगार दुहेरी शोषणाला बळी पडतात — वर्गीय आणि लैंगिक अशा दोन्ही स्तरांवर. वेबर यांनी "सामाजिक कृती आणि अधिकार" संरचना मांडली. कामगारांचे सामाजिक स्थान केवळ उत्पन्नावर नव्हे तर प्रतिष्ठा आणि सत्तेवर अवलंबून असते, असे त्यांनी सांगितले. दुर्खाइम यांनी "श्रमविभागणी" सिद्धांत मांडला. ग्रामीण समाजातील महिलांची भूमिका ही सामाजिक ऐक्य टिकविण्यात महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**संदर्भ साहित्याचे निरीक्षण:** भारतीय व पाश्चिमात्य विचारवंतांनी ग्रामीण समाज, श्रम आणि महिलांच्या भूमिकेवर सखोल विचार मांडले आहेत. मात्र नांदेड जिल्ह्यातील ऊस तोड कामगार महिलांवर विशेष केंद्रित अभ्यास मर्यादित आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन त्या पोकळीची भर घालण्याचा प्रयत्न करीत आहे.

**उद्दिष्टे:** प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश नांदेड जिल्ह्यातील ऊस तोड कामगार महिलांचा सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक दर्जा आणि कृषी व्यवस्थेमधील त्यांची भूमिका समजून घेणे हा आहे. त्यानुसार खालील विशिष्ट उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत: १. नांदेड जिल्ह्यातील ऊस तोड कामगार महिलांची सामाजिक स्थिती अभ्यासणे. २. त्यांच्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करणे. २. ऊस तोड प्रक्रियेमधील महिलांच्या भूमिकेचे स्वरूप समजून घेणे. ३. कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणी व समस्या शोधणे. ४. महिलांच्या आरोग्य व सुरक्षिततेशी संबंधित बाबींचा अभ्यास करणे. ५. ऊस तोड कामाचा कुटुंबजीवनावर होणारा परिणाम जाणून

घेणे. ६. महिलांना उपलब्ध असलेल्या शासकीय योजना व त्यांचा लाभ कितपत मिळतो हे तपासणे. ७. ऊस तोड कामगार महिलांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी उपाय सुचविणे.

**गृहितके:** संशोधन अधिक शास्त्रीय पद्धतीने करण्यासाठी पुढील गृहितके मांडण्यात आलेली आहेत: १. नांदेड जिल्ह्यातील ऊस तोड कामगार महिलांचा सामाजिक दर्जा समाधानकारक नाही. २. ऊस तोड कामगार महिलांना पुरुषांच्या तुलनेत कमी आर्थिक मोबदला मिळतो. ३. ऊस तोड कामामुळे महिलांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. ४. स्थलांतरित ऊस तोड कामामुळे महिलांच्या कुटुंबजीवनावर परिणाम होतो.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण समाजातील ऊस तोड कामगार महिलांचा दर्जा व भूमिका यांचा अभ्यास करण्यासाठी करण्यात आले आहे. या संशोधनात **वर्णनात्मक** व **विश्लेषणात्मक** पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी **महाराष्ट्रातील नांदेड जिल्हा** निवडण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात ऊस लागवड व तोडणी मोठ्या प्रमाणात होते. अनेक महिला मजूर ऊस तोड कामासाठी स्थलांतर करतात. त्यामुळे सामाजिक-आर्थिक अभ्यासासाठी नांदेड जिल्हा योग्य संशोधन क्षेत्र ठरतो.

**भारतातील ग्रामीण समाजातील ऊसतोड कामगार महिलांच्या भूमिका व दर्जा:** भारतातील कृषी व्यवस्था पुरुषप्रधान असली तरी ऊसतोड कामगार महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. ऊस हे नगदी पीक असून त्याच्या लागवडीपासून तोडणीपर्यंत सर्व टप्प्यात मानवी श्रम आवश्यक असतो. अंदाजे **40—50 टक्के ऊसतोड कामगार महिला** असून त्या प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. भारतातील ग्रामीण भागातील या महिलांचा रोजगार हंगामी स्वरूपाचा असून नोव्हेंबर ते एप्रिल या कालावधीत काम सुरू राहते. त्यांना कापलेला ऊस एकत्र करणे, गट्ठे बांधणे, ट्रॉली किंवा ट्रकवर ऊस रचणे आणि पुरुष कामगारांना मदत करणे या सर्व कामे करावी लागतात. दिवसाला सुमारे **8—10 तास मेहनत** करताना त्यांना थकवा, उष्णता व अपघातांचा धोका सहन करावा लागतो.

**आर्थिक भूमिका:** महिला ऊसतोड कामगारांचा आर्थिक सहभाग कुटुंबाच्या उपजीविकेत महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या मजुरीमुळे घरखर्च, अन्नधान्य, मुलांचे शिक्षण आणि आरोग्य खर्च भागतो. अनेक कुटुंबे महिलांच्या उत्पन्नावर पूर्णपणे अवलंबून असतात, त्यामुळे त्यांच्या श्रमाचे आर्थिक मूल्य मोठे आहे. मात्र, सामाजिक स्तरावर त्यांच्या कामाचे महत्त्व कमी मानले जाते. समान काम करूनही पुरुषांच्या तुलनेत अनेक ठिकाणी त्यांना कमी मजुरी मिळते. त्यामुळे आर्थिक आणि सामाजिक असमानता स्पष्टपणे दिसून येते.

**आरोग्य भूमिका:** आरोग्याच्या दृष्टीनेही या महिलांना अनेक समस्या भेडसावतात. सतत वाकून काम करणे, वजनदार ऊस उचलणे, उष्णतेत काम करणे यामुळे पाठदुखी, सांधेदुखी, मानदुखी, थकवा व अशक्तपणा यांसारखे त्रास निर्माण होतात. स्थलांतरित महिलांना कामाच्या ठिकाणी स्वच्छ पाणी, शौचालय आणि आरोग्य सुविधा मिळत नसल्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका अधिक असतो. गर्भधारणेच्या किंवा स्त्री आरोग्याशी संबंधित समस्या असतानाही महिलांना काम सोडावे लागत नाही, कारण उत्पन्नावर कुटुंब अवलंबून असते.

**सामाजिक दर्जा:** सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले तर, ऊसतोड कामगार महिलांचे स्थान अजूनही दुय्यम आहे. घरगुती जबाबदाऱ्या आणि बाह्य मजुरी या दुहेरी ओझ्याखाली त्यांची प्रतिष्ठा कमी मोजली जाते. निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित आहे आणि समाजात त्यांची ओळख प्रामुख्याने आर्थिक योगदानापुरती मर्यादित आहे. तथापि, भारतीय ऊसतोड कामगार महिलांचे योगदान उत्पादन प्रक्रियेत, कुटुंबाच्या उपजीविकेत आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण ठरते. त्यांच्या श्रमाला योग्य मान्यता, आर्थिक मोबदला, सुरक्षितता आणि सामाजिक सन्मान दिल्यास ग्रामीण विकासाला मोठा फायदा होईल आणि महिला सक्षमीकरणाला गती मिळेल

**नांदेड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांची भूमिका व दर्जा:** नांदेड जिल्हा हा मराठवाडा विभागातील कृषीप्रधान जिल्हा असून येथील मोठा लोकसमूह शेती व शेतीमजुरीवर अवलंबून आहे. ऊस हे नगदी पीक असल्यामुळे त्याची लागवड व तोडणी मोठ्या प्रमाणावर केली जाते आणि या प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील बेरोजगारी, अल्पभूधारक शेतकऱ्यांची आर्थिक अडचण आणि कुटुंबाच्या उपजीविकेची गरज यामुळे नांदेड जिल्ह्यातील अनेक महिला ऊसतोड कामगार म्हणून हंगामी स्थलांतर करतात. या महिला केवळ पूरक कामगार नसून कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ म्हणून कार्य करतात

**नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण ऊसतोड कामगार महिलांची संख्या:** नांदेड जिल्हा हा मराठवाडा विभागातील कृषीप्रधान जिल्हा असून येथे ऊस हे मुख्य नगदी पीक आहे. जिल्ह्यातील अनेक तालुका आणि गावांमध्ये हंगामी रोजगाराची संधी मर्यादित असल्यामुळे महिलांना ऊसतोडीच्या हंगामात स्थलांतर करावे लागते. नांदेड जिल्ह्यातील १६,०००—१८,००० हंगामी महिला ऊसतोड कामगार काम करतात, ज्या तालुका आणि गावांच्या परिस्थितीनुसार विभागल्या जातात. जिल्ह्याच्या मुख्य तालुक्यातील (नांदेड मुख्य) सुमारे ३,५०० महिला प्रत्यक्ष ऊसतोडीमध्ये सहभागी असतात, तर भोकर / उमरी तालुक्यात अंदाजे ३,०००—३,२०० महिला, देगलुर मध्ये ३,२००—३,५०० महिला, आणि धर्माबाद तालुक्यात २,५००—२,८०० महिला काम करतात. कंधार तालुक्यात सुमारे १,८००—२,५०० महिला, तर बिलोली / अर्धापुर तालुक्यात १,५००—२,००० महिला काम करतात.

| अनु. क्र. | गावांची नावे | महिला ऊसतोड कामगार संख्या | अनु. क्र. | गावांची नावे | महिला ऊसतोड कामगार संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | नांदेड (मुख्य) | ३,५०० | २. | कंधार | २,००० |
| ३. | भोकर / उमरी | ३,००० | ४. | हिम्मतनगर | १,८०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | देगलूर | ३,२०० | ६. | बिलोली / अर्धापुर | १,५०० – २,००० प्रत्येक |
| ७. | धर्माबाद | २,५०० | | | |

**(स्रोत: नांदेड जिल्हा कृषी विभाग अहवाल- https://zpnanded.maharashtra.gov.in)**

या आकडेवारीवरून दिसून येते की नांदेड जिल्ह्यातील ऊस उद्योगात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर आहे. स्त्रियांचे हे योगदान केवळ श्रमिक म्हणून मर्यादित नसून कुटुंबाच्या उत्पन्नाला आधार देणारे असून ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. तालुका निहाय वाटा पाहता, मुख्यतः ऊस उत्पादनाच्या जास्त क्षेत्रांमध्ये महिला कामगारांची संख्या जास्त आहे, तर काही तालुक्यात स्थलांतरित मजूरांच्या कुटुंबावर अवलंबून संख्या कमी दिसते. या महिलांमुळे हंगामी रोजगार, कुटुंबाचे आर्थिक स्थैर्य, तसेच सामाजिक उपजीविका टिकून राहते. तथापि, त्यांच्या कामाला मिळणारा सन्मान, आर्थिक मोबदला व सामाजिक सुरक्षा अपेक्षेइतका नाही. त्यामुळे, नांदेड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांची संख्या केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नसून, त्यांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणारा एक महत्त्वाचा पैलू आहे.

**आर्थिक स्थिती:** नांदेड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांची आर्थिक स्थिती अत्यंत अस्थिर आणि मर्यादित स्वरूपाची आहे. बहुतेक महिला अल्पभूधारक किंवा भूमिहीन कुटुंबातून येतात आणि कुटुंबाच्या उपजीविकेसाठी ऊसतोडीवर अवलंबून राहतात. ऊसतोडीचे काम हे हंगामी असल्यामुळे महिलांना वर्षभर नियमित उत्पन्न मिळत नाही. हंगामात मिळणारी मजुरी घरखर्च, अन्नधान्य, मुलांचे शिक्षण आणि आरोग्य यासाठी खर्च होते, त्यामुळे बचत करण्याची संधी फार कमी मिळते. अनेक वेळा मजुरी थेट महिलांच्या हातात न येता 'कोयता' पद्धतीने पुरुषांच्या नावावर दिली जाते, त्यामुळे महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य मर्यादित राहते. स्थलांतर, राहणीमान, औषधोपचार आणि कर्जफेड यावर मोठा खर्च होतो. त्यामुळे आर्थिक असुरक्षितता कायम राहते आणि अनेक महिला सावकार किंवा ठेकेदारांच्या कर्जात अडकतात. परिणामी नांदेड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांची आर्थिक स्थिती समाधानकारक नसून त्या सतत संघर्षाच्या अवस्थेत जीवन जगताना दिसतात.

**सामाजिक दर्जा:** नांदेड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांचा सामाजिक दर्जा ग्रामीण समाजात तुलनेने कमी मानला जातो. त्या मुख्यतः मजूर वर्गातील असल्यामुळे त्यांना निर्णयप्रक्रियेत फारसा सहभाग मिळत नाही. समाजात त्यांच्या श्रमाला पुरेसे महत्त्व दिले जात नाही आणि त्यांची ओळख अनेकदा फक्त "मजूर महिला" इतकीच मर्यादित राहते. स्थलांतरित जीवनामुळे महिलांचे गावाशी सामाजिक नाते कमकुवत होते आणि सार्वजनिक जीवनातील सहभाग कमी होतो. घरगुती जबाबदाऱ्या आणि बाह्य श्रम दोन्ही सांभाळताना महिलांवर मानसिक ताण येतो. तरीसुद्धा त्यांच्या योगदानाचा सन्मान समाजाकडून अपेक्षित पातळीवर होत नाही. अनेक ठिकाणी समान काम असूनही महिलांना कमी मोबदला दिला जातो, ज्यामुळे लिंगभेद स्पष्ट होतो. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांचा सामाजिक दर्जा अजूनही दुर्लक्षित व असुरक्षित स्वरूपाचा आहे.

**आरोग्य समस्या:** नांदेड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांना अनेक शारीरिक व मानसिक आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते. ऊसतोडीचे काम अत्यंत कष्टाचे असल्यामुळे सतत वाकून काम करणे, वजन उचलणे आणि दीर्घ वेळ श्रम करणे यामुळे पाठदुखी, सांधेदुखी, थकवा आणि अशक्तपणा वाढतो. कामाच्या ठिकाणी स्वच्छ पाणी, निवास व्यवस्था, शौचालय आणि प्राथमिक आरोग्य सुविधा नसल्यामुळे महिलांचे आरोग्य अधिक धोक्यात येते. स्थलांतराच्या काळात पोषणयुक्त आहार न मिळाल्याने महिलांमध्ये रक्तक्षय आणि इतर आजार दिसून येतात. तसेच अपघातांचा धोका कायम असतो. मानसिकदृष्ट्याही कुटुंबापासून दूर राहणे, आर्थिक ताण आणि कामाचा दबाव यामुळे महिलांवर तणाव निर्माण होतो. परिणामी ऊसतोड कामगार महिलांचे आरोग्य हे नांदेड जिल्ह्यातील एक गंभीर सामाजिक प्रश्न बनले आहे.

**निष्कर्ष:** नांदेड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांचा सहभाग ग्रामीण अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्त्वाचा आहे. अंदाजे 16,000–18,000 महिला हंगामी स्वरूपात ऊसतोडीमध्ये सहभागी असून त्यांच्या श्रमामुळे कुटुंबाच्या उत्पन्नाला स्थैर्य मिळते, घरखर्च, मुलांचे शिक्षण आणि आरोग्य खर्च भागतो. तालुका निहाय आकडेवारीनुसार, मुख्य ऊस उत्पादन क्षेत्रांमध्ये महिलांची संख्या जास्त असून ग्रामीण व कमी उत्पादन असलेल्या तालुक्यांमध्ये तुलनेने कमी आहे. या महिलांचे कार्य फक्त मजुरीपुरते मर्यादित नसून घरगुती जबाबदारी, बाल संगोपन आणि आर्थिक व्यवस्थापन यासुद्धा त्यात समाविष्ट आहे. तरीही त्यांना समान कामासाठी अपेक्षित वेतन, सामाजिक सन्मान आणि सुरक्षितता मिळत नाही. सतत शारीरिक श्रम, दुहेरी जबाबदारी आणि आरोग्यविषयक समस्या यामुळे त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर नकारात्मक परिणाम होतो. या अभ्यासातून स्पष्ट होते की, नांदेड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांचे योगदान ग्रामीण अर्थव्यवस्थेत अविभाज्य आहे. त्यांना योग्य मान्यता, आर्थिक मोबदला, सुरक्षित कामाचे वातावरण आणि सामाजिक सन्मान मिळाल्यास महिला सक्षमीकरणास चालना मिळेल, आणि ग्रामीण उत्पादनक्षमता व जीवनमान सुधारेल.

**संदर्भ सूची:**


1. Ministry of Statistics and Programme Implementation, Government of India. *Periodic Labour Force Survey (PLFS) 2022–23.* New Delhi: Government of India.
2. Directorate of Sugarcane Development, Maharashtra State. *Annual Report 2021–22.* Mumbai: Government of Maharashtra.
3. Deshpande, R. (2020). *Women Labour in Sugarcane Industry: Maharashtra Context.* Indian Journal of Rural Studies, 15(2), 45–58.
4. Indian Express. (2022). *Marathwada Farmers and Seasonal Sugarcane Labour Migration.* Mumbai: Indian Express Publications.
5. Mongabay India. (2022). *Drought Conditions Force Marathwada Farmers to Migrate for Work as Sugarcane Cutters.*
6. Census of India. (2011). *Workforce Participation by Gender and Sector.* New Delhi: Office of the Registrar General & Census Commissioner.
7. Kumbhare, S. (2025). *Field Survey of Nanded District Sugarcane Women Labourers.* (Unpublished Primary Data).
8. Government of Maharashtra, Labour Department. (2020). *Report on Unorganized Sector Workers in Maharashtra.* Mumbai: Labour Department, Govt. of Maharashtra.
9. FAO & ILO Reports on Seasonal Agricultural Labour in India. (2019).
10. Research Studies on Rural Women Labourers. (2018–2022). Maharashtra State Agricultural Universities.

# भारतीय ग्रामीण समाज आणि महिला

**प्रा. हर्षला दौलस सूर्यवंशी** समाजशास्त्र विभाग कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नाशिक.

ग्रामीण समाज भारतीय समाज रचनेचा पाया मानला जातो. या समाजात महिलांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. घरगुती जबाबदाऱ्या शेती, पशुपालन ,कुटुंब संस्कार तसेच सामाजिक परंपरांची जतनीय सर्व बाबींमध्ये ग्रामीण महिलांचा मोठा सहभाग असतो. तरी ही सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक पातळीवर त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

ग्रामीण महिलांची भूमिका बहुआयामी आहे. त्या गृहिणी, शेतमजूर, माता, संस्कार करत्या व कधी कधी उत्पादनाचे साधन असलेल्या कामगार ही असतात. शेतीतीलकाम, पाणी आणणे, इंधन गोळा करणे जनावरांची देखभाल करणे, घर सांभाले ही सर्व कामे महिला करतात. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यांच्या मोलाचा वाटा आहे. परंपरागत ग्रामीण समाजात महिलांचे स्थान दुय्यम मानले गेले आहे. बालविवाह, हुंडा पद्धत स्त्री पुरुष असमानता निर्णय प्रक्रिया सहभागाचा अभाव अशा समस्या आज ही काही प्रमाणात आढळतात, मात्र शिक्षण व सामाजिक जाणीव वाढल्याने बदल घडताना दिसून येत आहे. ग्रामीण महिलांच्या विकासासाठी शिक्षण हा कळीचा घटक आहे., शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो, आरोग्य विषयी जागरूकता निर्माण होते .आणि आर्थिक स्वावलंबनाची संधी मिळते मुलींच्या शिक्षणासाठी शासनाने विविध योजना राबवल्या आहेत. तरीही अजूनही काही भागात शिक्षणातील गळती आढळते. स्वयंसहायता गट, बचत गट ,महिला मंडळी यांच्या माध्यमातून ग्रामीण महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम होत आहेत. लघुउद्योग क्षेत्र पूरक व्यवसाय हस्तकला दुग्ध व्यवसाय यात महिलांचा सहभाग वाढत आहे. यामुळे त्यांचे सामाजिक स्थान हे उंचावत आहे. भारतीय समाज रचनेत ग्रामीण समाजाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. देशातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य असून या समाजाच्या सर्वांगीण विकासात महिलांचा मोलाचा वाटा आहे. ग्रामीण महिला केवळ गृहिणी म्हणूनच नव्हे तर शेती, पशुपालन, कुटीर उद्योग, सामाजिक व सांस्कृतिक परंपरा जपणारी महत्त्वाची घटक म्हणून कार्य करतात. तथापि परंपरागत रुढी, अशिक्षित ,दरिद्री ,स्त्री- पुरुष समानता व मर्यादित संधी यामुळे ग्रामीण महिलांची सामाजिक आर्थिक व शैक्षणिक स्थिती अपेक्षित पातळीवर पोचवलेली नाही. अलीकडील काळात शिक्षण स्वयंसहाय्यता गट शासकीय योजना व सामाजिक जागृतीमुळे ग्रामीण महिलांच्या विकासात बदल घडवून येत आहे. या संशोधन पेपर मध्ये ग्रामीण समाजातील महिलांची स्थिती भूमिका व त्यांच्याशी संबंधित समस्या यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

भारत हा खेड्यांचा देश आहे. बहुसंख्य लोक ग्रामीणच म्हणून भारतातील बहुसंख्य समस्या ही ग्रामीण क्षेत्राशी संबंधित अशाच आहेत. भारताचा औद्योगिक विकास व व्यापार याची आर्थिक व सामाजिक प्रगती ही सुद्धा ग्रामीण व्यवस्थेवर सवलंबून आहे. ग्रामीण क्षेत्रातील भिन्न भिन्न प्रकारच्या व्यवहारांचा आपत्तींचा संस्कृतीचा परिणाम संपूर्ण भारताच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनावर होतो. हे.ही स्पष्ट होते. ग्रामीण समाज व्यवस्थेचे महत्त्व स्वतः भारताला कळून आले आहे. म्हणून ग्रामीण समाजाचा खरा अभ्यास स्वातंत्र्यानंतरच सुरू झाला आहे. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने सरकारच्या समूह विकास योजना, बिन सरकारी भूदान योजना सरकारी आंदोलने, नवीन पंचायत व्यवस्था, नवीन निवडणूक पद्धती, शिक्षण पद्धती, इत्यादी प्रयोग सुरू आहेत. व यात त्याला काही प्रमाणात यश ही येत आहे. या सर्व प्रयोगात ग्राम अवस्था ग्रामीण जीवन हाच केंद्रबिंदू आहे. ग्रामीण जीवनाचा त्याच्या गरजांचा समस्यांचा त्याचप्रमाणे ग्रामीण संस्था ग्रामीण संघटना यांचा ही अभ्यास ग्रामीण समाजशास्त्रात होत आहे.

**उद्दिष्टे :** १.ग्रामीण समाजातील महिलांची सामाजिक व कौटुंबिक भूमिका अभ्यासणे. २.ग्रामीण महिलांची शैक्षणिक व आर्थिक स्थिती समजून घेणे. ३.ग्रामीण समाजाच्या विकासात महिलांच्या योगदानाचे विश्लेषण करणे.

**संशोधनाचे गृहीतकृत्य:** १.ग्रामीण समाजाच्या विकासात महिलांच्या सहभाग महत्त्वाचा आहे. २.शिक्षणाच्या अभावामुळे ग्रामीण महिलांच्या प्रगतीवर मर्यादा येतात. ३.आर्थिक स्वावलंबनामुळे ग्रामीण महिलांचे सामाजिक स्थान उंचावते.

**भारतीय ग्रामीण समाज व्याख्या:** "भारतीय ग्रामीण समाज म्हणजे भारतातील खेडेगावात राहणाऱ्या लोकांचा असा समाज की जो मुख्यतः कृषी, पशुपालन व ग्रामीण उद्योगांवर आधारित परंपरा रुढी, लोक संस्कृती, सामूहिक जीवन पद्धती आणि सामाजिक परस्पर संबंधांवर उभा आहे. या समाजात कुटुंबच, धर्म, परंपरा आणि स्थानिक संस्था यांना विशेष महत्त्व आहे.

**भारतीय ग्रामीण महिला व्याख्या:** "भारतीय ग्रामीण महिला म्हणजे भारतातील ग्रामीण भागात राहणारी अशी स्त्री की जी कुटुंब,शेती, पशुपालन, घरगुती व सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळत ग्रामीण समाजाच्या आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक, विकासात सक्रिय भूमिका बजावते. ती परंपरा आणि आधुनिकतेच्या संयोगातून आपले जीवन घडवत असून ग्रामीण समाजाच्या स्थैर्याचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. भारतीय ग्रामीण समाज आणि महिलांची स्थिती हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि परिवर्तनाचा विषय आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील समाज हा कृषीप्रधान आहे. आणि तिथे महिलांना सहभाग किंवा कौटुंबिक नसून आर्थिक दृष्ट्या ही मोठा आहे.

**ग्रामीण अर्थव्यवस्था महिलांचे योगदान:-** ग्रामीण भागात महिलांना कणा मानले जाते. शेतीची बहुतांश कामे (पेरणी ,कापणी, मळणी) महिलाच करतात. घरी जनावरे सांभाळणे आणि दुग्ध विक्रीतून कुटुंबाला हातभार लावणे मजुरी अनेक महिला मजूर म्हणून काम करतात. बचत गट, स्वयंसहायता, बचत गटामुळे ग्रामीण महिलांमध्ये आर्थिक साक्षरता आणि स्वावलंबन वाढले आहे.

**सामाजिक स्थिती आणि आव्हाने:** परंपरेने ग्रामीण समाज पुरुष प्रधान राहिला आहे. ज्यामुळे काही आव्हाने आज ही दिसून येतात. शिक्षण प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. उच्च शिक्षणासाठी आज ही मुलींना शहराकडे धाव घ्यावी लागते. शिक्षण अर्धवट सोडावे लागते.

**आरोग्य:** कुपोषण लोहाची कमतरता आणि कामाच्या अतिताना मुळे आरोग्याच्या समस्या जाणवतात. निर्णय प्रक्रिया घरातील महत्त्वाच्या निर्णयामध्ये महिलांचा सहभाग पूर्वी कमी होता. परंतु आता तो हळूहळू वाढत आहे. राजकीय सहभाग आणि सक्षमीकरण भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या दुरुस्तीमुळे ग्रामीण महिलांच्या आयुष्यात क्रांती झाली आहे. पंचायत राज ग्रामपंचायत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण मिळाल्यामुळे सरपंच पदावर महिला विराजमान झाले आहे.

**नेतृत्व:**- यामुळे महिलांमध्ये धाडस प्रशासकीय कौशल्य आणि सामाजिक प्रश्नांची जाण निर्माण झाली आहे बदलणारे वारे आजचा ग्रामीण समाज जुन्या चौकटी मोडून पुढे जात आहे.

डिजिटल साक्षरता मोबाईल आणि इंटरनेटमुळे:- सरकारी योजनांची माहिती महिलांपर्यंत पोहोचत आहे व्यवसाय शेतीपूरक उद्योगांस सोबतच गृह उद्योगाच्या माध्यमातून ग्रामीण महिला आता जागतिक बाजाराशी जोडल्या जात आहे. "यंत्र नार्यस्तु पूजन्ते रमन्ते तत्र देवता"जेथे स्त्रियांना सन्मानाने वागवले जाते. तेथे देवतांच्या वास असतो. स्त्रीचे वास्तव्य असलेले  कुटुंब व समाज सुखी संपन्न व समाधानी असतो. ही गोष्ट त्यावरून लक्षात येते. स्त्रियांबद्दल इतका आदर दाखवूनही स्त्रियांना विवाहपूर्वी पित्याने, विवाह नंतर पतीने व वृद्धपकाळात पुत्राने ताब्यात ठेवावे स्त्रियांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य देऊ नये असे म्हटले.  सर्वसाधारण समाजात स्त्री आणि पुरुष असे दोन भिन्न घटक निर्माण करून स्त्रियांना वेगळे नियम आणि पुरुषांना वेगळे नियम लावून त्यांच्यात भेद केलेला दिसतो. ग्रामीण महिला ची स्थिती गेल्या काही दशकात राबविण्यात आलेल्या विविध विकास धोरणे योजना आणि कार्यक्रमांमुळे महिलांच्या सामाजिक आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झाल्या आहेत परंतु निरक्षरता अज्ञान भेदभाव आणि हिंसाचाराच्या समस्या कायम आहेत हे समजून घेण्यासाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण साक्षरता आणि शिक्षण काम आणि रोजगार निर्णय घेणे आणि राजकीय सहभाग या सारख्या निवडक क्षेत्रांमधील कामगिरीच्या आढावा घेऊन संख्यात्मक आणि गुणात्मक निदर्शकांचा वापर आपल्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात ग्रामीण महिलांची स्थिती समजून घेण्या साठी मदत होते. ग्रामीण समाजात कुटुंब संस्थेला फार महत्त्वाचे स्थान आहे .कुटुंब हा एक मूलभूत व प्राथमिक स्वरूपाच्या समूह असून मानवाला माणूस म्हणून जगण्यासाठी ही संस्था कारणीभूत आहे. एरव्ही तो माणुसकी विसरून ' पशु ' बनला असता कुटुंबाचे अस्तित्व मानवाच्या सर्व अवस्थात व सर्व समाजात आढळून येते. कुटुंबामुळेच मानवी समाजातील साहस व स्थैर्य टिकून राहिले आहे. सामाजिकतेचे धडे शिकविणारी कुटुंबसंस्था ही एक पाठशाळा आहे . माणसाचे शील व चारित्र्य घडविण्याचे कार्य कुटुंब संस्था करते.  ग्रामीण कुटुंब असो अथवा नगरी कुटुंब असो त्याची मूळ वैशिष्ट्ये समानच असतात. सामान्य निवास भावनात्मक एक्य कुटुंबाची रचना त्याची समाजातील केंद्रीय स्थान त्याची सामाजिक करण्याची व नियंत्रणाचे कार्य इत्यादी तरी ही ग्रामीण कुटुंब व शहरी कुटुंब ह्यात काही ठळक भेद आहे. शहरी कुटुंबापेक्षा ग्रामीण कुटुंबाची वेगळी वैशिष्ट्ये आहे. त्याची कार्यही वेगळे आहेत. ग्रामीण कुटुंबांना काही बाबतीत स्वत:चे महत्वपूर्ण वैशिष्ट्ये आहे.

**संयुक्त कुटुंब** :- ग्रामीण कुटुंब हे संयुक्त कुटुंब असते. त्याचा आकार मोठा असून त्यात आई बाबा, आजी बाबा, भाऊ बहीण व इतर आप्त यांचा समावेश असतो.

**ग्रामीण क्षेत्रात शिक्षणाची आवश्यकता :**

आर्थिक विकासासाठी शिक्षण: - विज्ञानाच्या प्रगतीमुळे भारताच्या आर्थिक व्यवहार सर्व जगाशी सुरू असतो भारताचे उत्पादन अन्य देशात पाठविण्यात येते व अन्य देशातील उत्पादन भारतात आयात केले जाते उत्पादनाच्या किमतीत नेहमी सुरू असतात त्याचा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो म्हणून जागतिक बाजारपेठेचे ज्ञान किमतीचे चढउतार होण्याची कारणे हे समजून घेण्यासाठी खेड्यातील माणसांनाही आर्थिक शिक्षण असणे आवश्यक आहे. शिवाय आजचा प्रचंड तांत्रिक प्रगतीमुळे व्यावसायिक ज्ञान व त्याचे क्षेत्र सतत वाढत आहे त्यांचीही माहिती असणे आवश्यक आहे आजचे विज्ञाननिष्ठता व्यावसायिक तंत्र ही माहिती पाहिजे शेतकऱ्यांनी आपले उत्पादन वाढविण्यासाठी नवीन कृषी पद्धती व यंत्राचा वापर ह्याचेही ज्ञान करून घेतले पाहिजे उदाहरणार्थ संकरित बी बियाणे आधुनिक यांत्रिक उपकरणे रासायनिक खते शेतीला सहाय्यक असे लहान घरगुती उद्योग याचे ज्ञान नसल्यामुळे भारतातील शेतकरी मागासलेला व दारिद्र्य आहे म्हणून त्यांच्या आर्थिक विकासासाठी आधुनिक शास्त्रज्ञानाची गरज आहे.

राजकीय क्षेत्र :-विज्ञानाच्या प्रगतीमुळे दळणवळणाची साधने वाढली दूरध्वनीमुळे संपर्क वाढला जणू सर्व विश्व हे एक घर बनले आहे त्यामुळे जगात कुठेही राजकीय हालचाल झाली तरी त्याचा सर्व जगावर परिणाम होतो म्हणून अशा जगाचे व त्यातील राजकीय उलाढालींची माहिती खेड्यातील नागरिकांपर्यंत पोहोचली पाहिजे या दृष्टीने राजकीय क्षेत्रातही शिक्षणाची गरज आहे.

सामाजिक क्षेत्र :- आपल्या देशात ग्रामीण जनतेत अनेक अंधश्रद्धा व आजच्या काळात निरुपयोगी ठरलेल्या रूढी व परंपरा आहेत ग्रामीण लोकांचे विचार व दृष्टिकोन रूढी वादी व पारंपारिक असतो हा दृष्टिकोन विशाल भावा त्यांनी आज प्रचलित असलेली नवे विचार नवे मूल्य व नवे तंत्र समजून घेऊन आपला वैचारिक दृष्टिकोन व्यापक बनवावा काळानुरूप नव्या परिवर्तनाचा स्वीकार करावा नवे शिक्षण व नवे विज्ञान पाडावे धर्मभाषा जात व राज्य ह्या विषयाचा दुराभिमान सोडून देऊन राष्ट्रीय हिताची व्यापक दृष्टी स्वीकारावी सामाजिक व जातीय संघर्ष टाळून राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव निर्माण व्हावी म्हणून सामाजिक शिक्षणाची किंवा प्रबोधनाची गरज आहे.

**नवीन नैतिक मूल्य** :- आजचे युग हे विज्ञान युग आहे विज्ञानाने यंत्र निर्माण केले व यंत्रामुळे मोठमोठे उद्योग व औद्योगिकनगरे उत्पादन झाली जाती व धर्माचे नियम पाळणे अशक्य झाले सामाजिक नैतिक मूल्य बदलली धर्म धर्म निर्मितीत वर्ण व जाती यांची चौकट ढिली झाली शिवाय पाश्चात्य शिक्षणाने स्वातंत्र्य समता व बंधुता ही नवी मूल्य निर्माण केली धार्मिक नियंत्रणे नष्ट होऊन त्या ऐवजी व्यक्ती स्वातंत्र्य व समानता ह्या तत्त्वावर आधारलेले विचार व मूल्य उत्पन्न झाली परिस्थितीने निर्माण केले त्या ह्या नवीन मूल्यांचे आकलन होण्यासाठी शिक्षणाची गरज आहे.

सांस्कृतिक विकासासाठी शिक्षण :- विज्ञानाने दिलेल्या नव्या दृष्टिकोन याचा फार मोठा परिणाम लोकांच्या जीवनपद्धतीवर आचार वर्तनावर व जुन्या मूल्यावर झाला. ही नव्या युगाला अनुरूप अशी जीवनपद्धती रीती रिवाज व मूल्य ग्रामीण जनतेच्या स्वभावात रुजावी म्हणूनही शिक्षणाची गरज आहे.

**महिलांसाठी विविध सरकारी योजना**

१) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना:-(MGNREGA) ग्रामीण भागातील बेरोजगारांना किमान शंभर दिवसांचा रोजगार उपलब्ध करून देण्याची योजना असून महिलांचा मोठा प्रभाव प्रमाणावर सहभाग आहे. आर्थिक, सुरक्षितता, मिळवून देण्यात ही योजना उपयुक्त ठरते.

२) राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान आजीविका योजना:- (NRLM) स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी ही योजना राबवली जाते बचत, कर्ज व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होतात

३) प्रधानमंत्री उज्वला योजना:- ग्रामीण व गरीब महिलांना मोफत एलपीजी गॅस कनेक्शन देऊन स्वयंपाकाच्या पारंपारिक अडचणी कमी करण्याचा उद्देश आहे. महिलांच्या आरोग्य संरक्षणासाठी ही योजना महत्त्वाची आहे.

४) प्रधानमंत्री आवास योजना:- ग्रामीण भागातील गरिबांना पक्की घरे उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना राबवली जाते. घरात मालक महिलांचे नाव समाविष्ट करण्यास प्राधान्य दिले जाते.

५) सुकन्या समृद्धी योजना:- ग्रामीण व शहरी भागातील मुलींच्या शिक्षण व भविष्यकाळ सुरक्षितते साठी बचत योजना असून महिलांच्या सक्षमीकरणास हातभार लावते.

६) बेटी बचाव बेटी पढाव योजना:- मुलींचे संरक्षण शिक्षण आणि सन्मान वाढविण्यासाठी राबवली जाणारी ही योजना ग्रामीण भागात सामाजिक परिवर्तन घडवतील

७) राष्ट्रीय आरोग्य अभियान(NHM):- ग्रामीण महिलांचे मातृ व बाल आरोग्य सुधारण्यासाठी आरोग्य सेवा लसीकरण व पोषण यावर भर देण्यात येतो

८) प्रधानमंत्री मुद्रा योजना:- ग्रामीण महिला उद्योगांना स्वयंरोजगारासाठी कर्ज सुविधा उपलब्ध करून देणारी योजना आहे.

या योजनेमुळे ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरण आरोग्य सुधारणा शिक्षण व सामाजिक दर्जा उंचावण्यास मदत होत असून ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते

**निष्कर्ष:** भारतीय ग्रामीण समाज आता केवळ परंपरांमध्ये अडकलेला नाही, तर महिलांच्या सक्रिय सहभागामुळे तो प्रगत होत आहे. शिक्षण आणि तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास ग्रामीण महिला देशाच्या विकासात मोठी भूमिका बजावू शकतात. भारतीय ग्रामीण समाजाच्या सामाजि,क आर्थिक व सांस्कृतिक रचनेत महिलांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असून त्या समाजाच्या कणा आहेत. ग्रामीण महिला शेती, पशुपालन, घरगुती उद्योग, कुटुंब व्यवस्थापन्यात मोलाची योगदान देत असून त्याचे कार्य अनेकदा अदृश्य राहते. शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या मर्यादित संधीमुळे ग्रामीण महिलांच्या सर्वांगीण विकासावर अडथळे निर्माण होतात. शासकीय योजना स्वयंसहायता गट व महिला सक्षमीकरण कार्यक्रमा मुळे ग्रामीण महिलांमध्ये आत्मनिर्भरतेची जाणीव वाढताना दिसते. ग्रामीण समाजाच्या शाश्वत विकासासाठी महिलांना समान संधी, निर्णय प्रक्रिये सहभाग व सामाजिक समान सन्मान देणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) भारतीय ग्रामीण समाजलेखक:- डॉ. एम एन श्रीनिवाप्रकाशन :-ओरिएंटल ब्लॅक स्वान नवी दिल्ली प्रकाशन वर्ष :-२००४
२) ग्रामीण समाज लेखक:- शरच्चंद्र पवा प्रकाशन:- विद्या प्रकाशन नागपूर प्रकाशन वर्ष २०१२
३) भारतीय ग्रामीण समाज लेखक:- डॉ. राम आहूजा प्रकाशन:- रावत पब्लिकेशन जयपुर प्रकाशन वर्ष २०१०
४) भारतीय समाजातील स्त्री लेखिका:- डॉ. इरावती कर्वेप्रकाशन:- मौज प्रकाशन गृह पुणे प्रकाशन वर्ष१९९८
५) ग्रामीण विकास आणि महिल लेखिका:- डॉ.संगीता देशमुख प्रकाशन:- प्रशांत प्रकाशन औरंगाबा प्रकाशन वर्ष २०१५
६) ग्रामीण समाज: रचना व परिवर्तन लेखक: डॉ. प्रदीप आगलावे प्रकाशन: प्रशांत प्रकाशन, जळगाव प्रकाशन वर्ष: २०११
७) भारतीय समाजशास्त्र: संकल्पना व वास्तव लेखक: डॉ. प्रदीप आगलावे प्रकाशन: विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद प्रकाशन वर्ष: २०१३
८) ग्रामीण विकास आणि सामाजिक बदल लेखक: डॉ. प्रदीप आगलावे प्रकाशन: साई प्रकाशन, पुण प्रकाशन वर्ष: २०१५
९) भारतीय ग्रामीण समाज: समस्या व उपाय लेखक: डॉ. प्रदीप आगलावे प्रकाशन: निराली प्रकाशन, पुणे प्रकाशन वर्ष: २०१७
१०) समाजशास्त्रीय संशोधन पद्धती लेखक: डॉ. प्रदीप आगलावे प्रकाशन: अथर्व प्रकाशन, नाशिक प्रकाशन वर्ष: 20

# भारतातील ग्रामीण महिलांचे ग्रामीण विकासातील योगदान - एक अध्ययन

**डॉ. बळीराम परशराम अवचार** सह. प्राध्यापक, श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला.

**सारांश:** भारत हा विविधतेने नटलेला, कृषीप्रधान आणि प्रामुख्याने ग्रामीण स्वरूपाचा देश आहे. भारताच्या सामाजिक-आर्थिक रचनेचा पाया ग्रामीण भागात असून देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास 65—70 टक्के लोक ग्रामीण क्षेत्रात वास्तव्यास आहेत. ग्रामीण लोकसंख्येच्या या प्रचंड समूहामध्ये महिलांचे प्रमाण जवळपास निम्मे असून ग्रामीण कुटुंबाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय जीवनमान सांभाळण्याची प्रमुख जबाबदारी प्रामुख्याने महिलांवर असते. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या कोणत्याही आराखड्यात महिलांचा सहभाग हा आकडेवारीपुरता मर्यादित नसून प्रत्यक्ष कार्यात अत्यंत प्रभावी ठरतो. ग्रामीण महिला ही आपल्या कुटुंबाची केवळ पोशिंदा नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेची सक्रिय घटक आहे. विशेषतः कृषी क्षेत्रात निंदणी, कापणी, बियाणे निवड, प्रक्रिया, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इत्यादी कामांमध्ये ग्रामीण महिलांचा सहभाग सतत आणि निर्विवाद दिसून येतो. अनेक ग्रामीण

भागात पुरुष शहरांकडे स्थलांतरित झाल्याने शेतीची संपूर्ण जबाबदारी महिलांवर येते आणि यामुळे "कृषीचे स्त्रीकरण (Feminization of Agriculture)" ही संकल्पना अधिक बळकट होते. पारंपरिक भूमिकांबरोबरच आजच्या आधुनिक ग्रामीण विकास प्रक्रियेत महिलांनी स्वतःला सक्षम सिद्ध केले आहे. स्वयं-साहाय्य गट (SHG), National Rural Livelihood Mission (NRLM), महिला बचत गट, महिला कृषी उत्पादक कंपन्या (FPOs), मायक्रोफायनान्स, ग्रामीण उद्योग, ग्रामपंचायत नेतृत्व, विविध सरकारी योजना यांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांनी आर्थिक स्वावलंबन, निर्णयक्षमता, नेतृत्व आणि उद्योजकता यांची नवी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या सहभागामुळे ग्रामीण विकासाची दिशा आणि गती दोन्ही बदलत आहेत. या पार्श्वभूमीवर "**भारतातील ग्रामीण महिलांचे ग्रामीण विकासातील योगदान – एक अध्ययन**" हा संशोधन विषय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. ग्रामीण महिलांच्या विविध क्षेत्रांतील भूमिकांचा अभ्यास केल्याने ग्रामीण विकासाचे वास्तव स्वरूप स्पष्ट होते आणि भविष्यातील धोरणे अधिक परिणामकारक पद्धतीने तयार करता येतात. ग्रामीण महिला या विकासाच्या केवळ लाभार्थी नसून त्या विकास प्रक्रियेच्या प्रमुख निर्माती आहेत—हे या अभ्यासातून अधोरेखित करणे हा या प्रस्तावनेचा मुख्य हेतू आहे.

---

**प्रस्तावना:** भारतातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे 65-70% लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे आणि ग्रामीण महिलांचे प्रमाण जवळपास 48% आहे. ग्रामीण जीवनमान, आर्थिक आधार आणि सामाजिक संरचनेतील प्रत्येक घटकावर महिलांची भूमिका ठळकपणे आढळते. कृषी हे ग्रामीण भारताचे मुख्य अधिष्ठान असून कृषी क्षेत्रातील सुमारे 70% कामकाज थेट किंवा अप्रत्यक्षपणे महिलांच्या सहभागावर आधारित आहे. ग्रामीण महिला शेतीसोबतच घरगुती कामे, पाण्याची उपलब्धता, ऊर्जा व्यवस्थापन, मुलांचे संगोपन, वृद्धांची काळजी, घरगुती हस्तकला, पूरक रोजगार, SHG-आधारित आर्थिक क्रियाकलाप यामध्ये सक्रिय भूमिका बजावतात. त्यामुळे "ग्रामीण विकास" या संकल्पनेस महिलांचे योगदान विचारात घेतल्याशिवाय ती अपूर्ण राहते.

**अभ्यासाचा उद्देश व महत्त्व:** भारताचा ग्रामीण विकास हा केवळ भौतिक सुविधा वाढवण्याचा किंवा आर्थिक प्रगती साधण्याचा विषय नसून, तो मानवी विकासाच्या संकल्पनेशी थेट जोडलेला आहे. ग्रामीण समाजाची लोकसंख्या, श्रमशक्ती, संस्कृती आणि स्थानिक परंपरा या सर्वांमध्ये महिलांचे स्थान अत्यंत केंद्रस्थानी आहे. ग्रामीण महिलांचे श्रम, ज्ञान, अनुभव आणि कौशल्ये ही ग्रामीण अर्थव्यवस्थेची अनिवार्य शक्ती आहे. पण त्यांच्या या योगदानाचे औपचारिक मोजमाप, संशोधन आणि दस्तावेजीकरण फारच कमी प्रमाणात दिसून येते. त्यामुळे ग्रामीण महिलांच्या विविध क्षेत्रातील सहभागाचे प्रत्यक्ष मूल्यांकन करण्याची आवश्यकता निर्माण होते.

प्रस्तुत अध्ययनाचे उद्देश आणि महत्त्व पुढीलप्रमाणे विस्तृतपणे मांडता येतात: ग्रामीण महिलांचे ग्रामीण विकासातील प्रत्यक्ष योगदान ओळखणे. कृषी, अर्थव्यवस्था, SHG, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, स्थानिक प्रशासन या क्षेत्रांतील भूमिकेचे विश्लेषण. महिलांना भेडसावणारी सामाजिक-आर्थिक आव्हाने अभ्यासणे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक धोरणात्मक उपाययोजना सुचवणे. ग्रामीण विकास मॉडेलमध्ये महिलांचा सहभाग कसा वाढवता येईल याचा अभ्यास करणे. अध्ययनाचे महत्त्व असे की, ग्रामीण महिलांच्या सहभागाशिवाय शाश्वत विकास शक्य नाही. महिलांचे योगदान मोजमापात आणल्यास विकास धोरण अधिक परिणामकारक होऊ शकते.

**संशोधनाची पद्धती:** या अध्ययनाचा उद्देश भारतातील ग्रामीण महिलांचे ग्रामीण विकासातील वास्तविक योगदान, त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती, तसेच विकास प्रक्रियेत असणारी आव्हाने ओळखणे हा आहे. या संशोधनात प्रामुख्याने द्वितीयक माहिती, वर्णनात्मक व गुणात्मक विश्लेषण यांच्या आधारे ग्रामीण महिलांच्या विविध भूमिकांचा अभ्यास करण्यात आला आहे. हे अध्ययन द्वितीयक माहिती (Secondary Data) आधारित असून खालील स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे:

**संशोधनाचा प्रकार:** वर्णनात्मक (Descriptive), विश्लेषणात्मक (Analytical), गुणात्मक (Qualitative)

**माहितीचे स्त्रोत : द्वितीयक डेटा:** Census of India, NITI Aayog, NABARD, सरकारी अहवाल, प्रकल्प अहवाल, संशोधन पेपर, पुस्तके, जर्नल्स, NGOs व SHG संस्था अहवाल

**अभ्यासाची व्याप्ती:** ग्रामीण महिलांचा कृषी, SHG, आरोग्य, शिक्षण, उद्योजकता, ग्रामपंचायत आदी क्षेत्रातील सहभाग, ग्रामीण विकास प्रक्रियेतील बहुआयामी भूमिका

**अध्ययनाच्या मर्यादा:** प्राथमिक सर्वेक्षणाचा अभाव, विविध राज्यांचे असमान डेटा, अदृश्य श्रमाचे मोजमाप कठीण

**ग्रामीण महिलांचे विविध क्षेत्रातील योगदान:** भारताच्या ग्रामीण समाजव्यवस्थेत महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आणि बहुआयामी आहे. घरगुती जबाबदाऱ्या, कृषी उत्पादन, पशुपालन, लघुउद्योग, स्वयं-सहाय्यता गट, पर्यावरण संरक्षण, ग्रामपंचायत नेतृत्व, आरोग्य व शिक्षण यापर्यंत प्रत्येक क्षेत्रात ग्रामीण महिलांचे योगदान उल्लेखनीय आहे. अनेकदा त्यांचे श्रम अदृश्य राहतात, परंतु ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया महिलांच्या कार्यक्षमतेवर आणि त्यांच्या सततच्या श्रमावर उभा आहे. ग्रामीण विकासाची प्रगती, जीवनमान उन्नती आणि सामाजिक परिवर्तन या सर्व प्रक्रियांमध्ये ग्रामीण महिलांची भूमिका केवळ सहाय्यक नसून **निर्मितीशील आणि निर्णायक** आहे. त्यामुळे ग्रामीण महिलांचे विविध क्षेत्रातील योगदान अभ्यासणे हे ग्रामीण विकासाची खरी दिशा समजून घेण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**कृषी व संलग्न क्षेत्रातील योगदान:** भारताची कृषीव्यवस्था पारंपरिकरीत्या ग्रामीण महिलांच्या श्रमावर आधारित आहे. बियाणे निवड, पेरणी, निंदणी, कापणी, प्रक्रिया, साठवण, पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय या सर्व क्रियांमध्ये ग्रामीण महिलांचा सहभाग सातत्यपूर्ण आणि अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अनेक ग्रामीण भागात पुरुषांचे शहरांकडे स्थलांतर वाढल्याने शेतीची जबाबदारी मोठ्या प्रमाणात महिलांवर येत आहे, ज्यामुळे "कृषीचे स्त्रीकरण" ही संकल्पना अधिक दृढ होते. महिलांचे स्थानिक ज्ञान,

परंपरागत शेतीकौशल्य, संसाधन व्यवस्थापन क्षमता आणि कठोर परिश्रम यांच्या आधारावर कृषी व संलग्न क्षेत्राचे उत्पादन तसेच शाश्वतता टिकून राहते. त्यामुळे ग्रामीण विकास प्रक्रियेतील हा घटक अभ्यासणे अत्यंत आवश्यक ठरते.

**स्वयं-सहायता गट (Self Help Groups — SHGs) आणि ग्रामीण अर्थव्यवस्था:** ग्रामीण भागातील आर्थिक सबलीकरणासाठी स्वयं-सहायता गट (SHGs) हा प्रभावी व सशक्त मार्ग मानला जातो. बचत, कर्जसुविधा, परस्पर सहकार्य आणि समूहशक्तीच्या आधारावर उभे राहिलेले हे गट ग्रामीण महिलांना स्वावलंबनाची नवी दारे उघडून देतात. SHG माध्यमातून गृहउद्योग, सूक्ष्म उद्योजकता, शेती-पूरक व्यवसाय यांना चालना मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेत उत्पादन, उत्पन्न आणि रोजगार या तिन्ही घटकांमध्ये लक्षणीय वाढ होते. आर्थिक साक्षरता, निर्णयक्षमता आणि सामाजिक सहभाग वाढवून SHGs हे ग्रामीण विकासाचे महत्त्वपूर्ण साधन म्हणून उदयास आले आहेत. SHG चळवळ भारतातील ग्रामीण महिलांचे सर्वात मोठे आर्थिक सक्षमीकरण आंदोलन ठरले आहे.NABARD व NRLM च्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या FPOs ची संख्या वाढत असून त्यातून शेतीउत्पादनाची प्रक्रिया, विपणन, मूल्यवर्धन यात महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आहे.

**आरोग्य व पोषण व्यवस्थापनातील योगदान:** ग्रामीण महिलांचे आरोग्य व पोषण व्यवस्थापनातील योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. घरातील अन्नधान्याची निवड, साठवण, स्वयंपाकपद्धती, स्वच्छतेच्या सवयी आणि कुटुंबातील सर्व सदस्यांच्या पोषणाच्या गरजांची पूर्तता हे अनेक निर्णय महिलाच घेतात. स्थानिक पातळीवरील उपलब्ध अन्नसाधनांचा योग्य वापर, पारंपरिक पोषक आहारांचे जतन आणि मुलांच्या तसेच गर्भवती—स्तनदा महिलांच्या पोषणाकडे विशेष लक्ष देणे या माध्यमातून त्या कुटुंबाच्या आरोग्य संरक्षणात मोठी भूमिका बजावतात. आरोग्यविषयक जनजागृती, घरगुती उपचार, स्वच्छता व स्वच्छ पिण्याच्या पाण्याच्या सवयी रुजविणे या कृतींमुळे ग्रामीण महिलांचे आरोग्य व पोषण व्यवस्थापनातील योगदान ग्रामीण समाजाच्या एकूण आरोग्य-वाढीस अत्यंत प्रभावी ठरते. ग्रामीण घरातील आरोग्य व्यवस्थापनाची जबाबदारी प्रामुख्याने महिलांवर असते.

**ग्रामीण शिक्षणातील महिलांची भूमिका:** ग्रामीण शिक्षणाच्या उन्नतीत महिलांची भूमिका केंद्रस्थानी आहे. घरात मुलांचे प्राथमिक शिक्षण, शिस्त, अध्ययनाची सवय आणि मूल्यशिक्षण घडविण्याची जबाबदारी अनेकदा महिलाच पार पाडतात. मातांच्या साक्षरतेचा थेट परिणाम मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर दिसून येतो. शिक्षणाबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे, मुलींना शाळेत पाठविण्याचा आग्रह धरणे, शाळेतील नियमितता राखणे, अँगनवाडी—शाळांशी समन्वय ठेवणे तसेच शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी स्थानिक शैक्षणिक उपक्रमांना सहकार्य करणे अशा विविध माध्यमातून ग्रामीण महिला शिक्षणाच्या प्रसारात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या पुढाकारामुळे ग्रामीण समुदायात शिक्षणाबद्दल जागरूकता वाढते आणि शैक्षणिक संधी सर्वांसाठी उपलब्ध करण्याची चळवळ अधिक बळकट होते.

**स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचे नेतृत्व:** भारतामधील पंचायत राज व्यवस्थेतील महिलांचे नेतृत्व हे ग्रामीण विकासातील क्रांतिकारी पाऊल मानले जाते. 73व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी राखीव जागा उपलब्ध झाल्यानंतर मोठ्या संख्येने महिला निर्णयप्रक्रियेत सहभागी होऊ लागल्या. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेतील प्रतिनिधी म्हणून महिलांनी विकासकामे, सामाजिक न्याय, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि महिला-बालकल्याणाशी संबंधित उपक्रमांमध्ये उल्लेखनीय पुढाकार घेतला आहे. महिलांच्या नेतृत्वामुळे ग्रामशासनात **पारदर्शकता, संवेदनशीलता आणि तळागाळातील विकासाच्या गरजांची अचूक ओळख** यांना प्राधान्य मिळते. विविध सरकारी योजना, स्वयं-सहायता गट आणि समुदाय संघटनांशी प्रभावी समन्वय साधून त्या ग्रामीण विकासाला नवी दिशा देतात. या सहभागामुळे महिलांचे राजकीय सक्षमीकरण बळकट होत असून ग्रामीण समाजात स्त्री-पुरुष समानतेची मूल्येही दृढ होत आहेत.

**पर्यावरण संवर्धन व नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन:** ग्रामीण महिलांचे पर्यावरण संवर्धन आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनातील योगदान अत्यंत मोलाचे आहे. दैनंदिन आयुष्यात पाणी, इंधन, जंगलातील उत्पादने, पशुखाद्य, अन्नधान्य आणि जमीन यांसारख्या संसाधनांवर त्यांचा थेट संपर्क असतो. त्यामुळे पर्यावरणीय बदलांची जाणीव सर्वप्रथम महिलांनाच होते. पाण्याचे जतन, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, जैवविविधतेचे संरक्षण, वृक्षारोपण, सेंद्रिय शेती, कंपोस्ट निर्मिती आणि ऊर्जा बचत अशा विविध पातळ्यांवर ग्रामीण महिला सक्रिय भूमिका बजावतात. महिलांच्या उपक्रमामुळे घरगुती तसेच सामुदायिक पातळीवरील पर्यावरणीय शाश्वतता वाढते. नैसर्गिक संसाधनांचा समतोल राखून पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरण निर्माण करण्यात ग्रामीण महिलांची भूमिका केवळ पूरक नसून *अत्यावश्यक* ठरते. त्यांच्या अनुभवाधारित ज्ञानामुळे ग्रामीण पर्यावरण व्यवस्थापनाला स्थानिक, व्यवहार्य आणि टिकाऊ दिशा मिळते.

**ग्रामीण महिलांसमोरील प्रमुख आव्हाने:** ग्रामीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावताना ग्रामीण महिलांना अनेक सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि संरचनात्मक आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यांच्या क्षमतेनुसार त्या काम करू शकतात, नेतृत्व करू शकतात, उद्योजक बनू शकतात; परंतु उपलब्ध संसाधने, संधी आणि सामाजिक वातावरण अनेकदा त्यांच्या प्रगतीला अडथळा आणतात. खालीलप्रमाणे प्रमुख आव्हाने दिसून येतात:

**शैक्षणिक मर्यादा:** अनेक महिलांचे शिक्षण अपुरे असल्यामुळे रोजगार, कौशल्यविकास आणि नेतृत्व संधी कमी मिळतात.

**आर्थिक अवलंबित्व:** कुटुंबाच्या आर्थिक व्यवहारांवर पुरुषांचे नियंत्रण असल्याने महिलांना आर्थिक निर्णयक्षमता आणि स्वातंत्र्य कमी मिळते.

**सामाजिक बंधने व पितृसत्ताक विचारसरणी:** लिंगभेद, परंपरागत भूमिका आणि महिलांना घरगुती चौकटीत मर्यादित ठेवणारी सामाजिक रचना त्यांच्या सहभागाला अडथळा ठरते.

**आरोग्य व पोषणाच्या समस्या:** कुपोषण, प्रसुतिसंबंधित अडचणी, आरोग्य सुविधा कमी उपलब्ध असणे, शारीरिक श्रमाचे ओझे वाढणे ही प्रमुख संकटे आहेत.

**कौशल्यविकास आणि प्रशिक्षणाचा अभाव:** आधुनिक तंत्रज्ञान, बाजारज्ञान, उद्योजकता प्रशिक्षण यांचा अभाव त्यांच्या आर्थिक प्रगतीला मर्यादा घालतो.

**पाणी, इंधन आणि वेळेची कमतरता:** पाणी आणणे, इंधन गोळा करणे, पशुपालन, घरकाम या दैनंदिन कामांमध्ये खूप वेळ जातो, ज्यामुळे रोजगार किंवा शिक्षणासाठी वेळ मिळत नाही.

**स्थलांतर व पर्यावरणीय समस्या:** दुष्काळ, अनियमित पर्जन्य, पर्यावरणीय हानी याचा थेट परिणाम महिलांच्या आयुष्यावर होतो आणि त्यांचे श्रम अधिक वाढतात.

**राजकीय सहभागातील अडथळे:** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जागा मिळूनही अनेकदा राजकीय दबाव, अनुभवाचा अभाव आणि कुटुंबीयांचा हस्तक्षेप दिसून येतो.

**ग्रामीण विकासासाठी महिलांना सक्षम करण्याच्या उपाययोजना:** ग्रामीण महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक पायाभूत सुविधा मजबूत करणे आवश्यक आहे. महिलांची क्षमता, श्रम आणि नेतृत्व कौशल्य ग्रामीण विकासाची महत्त्वाची शक्ती आहे; परंतु त्यांच्या प्रगतीतील अडथळे दूर करून योग्य वातावरण निर्माण केल्यास हा विकास अधिक शाश्वत आणि गतिमान होऊ शकतो. खालीलप्रमाणे प्रभावी उपाययोजना सुचविता येतील:

**१. शिक्षण व साक्षरतेची वाढ:** स्त्री साक्षरता अभियान, प्रौढ शिक्षण, डिजिटल साक्षरता यांना प्रोत्साहन.मुलींच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, वाहतूक सुविधा आणि सुरक्षित शाळा वातावरण.माध्यमिक व उच्चशिक्षणामध्ये ग्रामीण मुलींचा प्रवेश वाढविण्यासाठी विशेष योजना.

**२. कौशल्यविकास व रोजगारसंधी :** महिलांसाठी स्थानिक उद्योग, कृषी-आधारित व्यवसाय, हस्तकला व खाद्यप्रक्रिया क्षेत्रात कौशल्य प्रशिक्षण. ग्रामीण भागात महिला उद्योजकता प्रोत्साहन; कच्चा माल, यंत्रसामग्री आणि बाजारपेठ उपलब्धता. डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे ई-कॉमर्स, ऑनलाईन विक्री आणि वित्तीय व्यवस्थापन प्रशिक्षण.

**३. आर्थिक सक्षमीकरण:** स्वयं-सहायता गट (SHGs) मजबूत करणे; बँक लिंकेज कार्यक्रम आणि कमी व्याजदरावरील कर्जसुविधा. महिलांसाठी स्वतंत्र बचतखाती, विमा व सामाजिक सुरक्षा योजना उपलब्ध करून देणे. महिलांच्या नावाने जमीन, घर किंवा व्यवसाय नोंदणीस प्रोत्साहन.

**४. आरोग्य, पोषण आणि स्वच्छता सुविधा सुधारणा:** मातृ-आरोग्य तपासणी, पोषण कार्यक्रम, लोह-फोलेट टॅब्लेट्स व पूरक पोषण सेवा. स्वच्छ पिण्याचे पाणी, पक्के शौचालय आणि सुरक्षित इंधनाची (LPG/बायोगॅस) उपलब्धता. आरोग्य जनजागृती, कुटुंबनियोजन आणि मानसिक आरोग्य मार्गदर्शन.

५. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचे नेतृत्व बळकटीकरण महिला जनप्रतिनिधींना नेतृत्व प्रशिक्षण, कायदे-धोरणे समजावून घेण्यासाठी कार्यशाळा. ग्रामसभा, विकास योजना आणि निधी वाटप प्रक्रियेत सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे. 'महिला ग्रामसभा' सारखे स्वतंत्र प्लॅटफॉर्म सक्षम करणे.

६. सामाजिक बदल व जागृती पितृसत्ताक मानसिकतेत बदल घडविण्यासाठी ग्रामस्तरीय जनजागृती अभियान. बालविवाह, हुंडा, लैंगिक हिंसा, भेदभाव यावर कठोर कारवाई आणि जागरूकता. मुलगा—मुलगी समानता, महिलांचा आदर आणि सुरक्षित वातावरणासाठी सामाजिक चळवळी.

**७. तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे** मोबाईल इंटरनेट, डिजिटल पेमेंट, कृषी-तंत्रज्ञान साधनांचे प्रशिक्षण. महिलांसाठी डिजिटल सेवा केंद्र, ई-शिक्षण आणि ऑनलाइन कौशल्य कार्यक्रम. स्मार्ट शेती, हवामान माहिती आणि बाजारभाव डिजिटल पद्धतीने उपलब्ध करणे.

**८. पर्यावरण संवर्धनात महिलांचा सहभाग** पाणीसंधारण, वृक्षारोपण, सेंद्रिय शेती, कचरा व्यवस्थापन प्रकल्पांमध्ये महिलांची सहभागिता वाढवणे. जैवविविधता संरक्षण व स्थानिक पर्यावरण समित्यांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व.

**९. महिला सुरक्षा आणि कायदेशीर संरक्षण** वन-स्टॉप सेंटर, 181 महिला हेल्पलाईन आणि कायदेशीर मदत केंद्रांची माहिती सर्वपर्यंत पोहोचवणे. कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंधक यंत्रणा (POSH) ग्रामीण स्तरावर मजबूत करणे.
सामुदायिक सुरक्षा गटांमध्ये महिलांचा सहभाग.

**१०. सरकारी योजनांचा प्रभावी उपयोग:** PMKVY, NRLM, Ujjwala, Poshan Abhiyaan, Jal Jeevan Mission, PMAY इत्यादी योजनेतील लाभ महिलांपर्यंत पोहोचवणे.

SHGs द्वारे सरकारी योजनांचे सर्वेक्षण, मागणी आणि अंमलबजावणी सुधारणा. ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण हे केवळ सामाजिक न्यायाचे नव्हे तर ग्रामीण विकासाच्या वेगवर्धनाचे साधन आहे. शिक्षण, कौशल्य, आरोग्य, नेतृत्व आणि आर्थिक स्वावलंबन या पाच स्तंभांवर ग्रामीण महिला सक्षम झाल्यास संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत, आत्मनिर्भर आणि शाश्वत होईल.

**निष्कर्ष:** भारताच्या ग्रामीण विकास प्रक्रियेत महिलांचे योगदान अत्यंत भक्कम, सातत्यपूर्ण आणि निर्णायक आहे. शेतीपासून स्थानिक प्रशासनापर्यंत, आरोग्यापासून अर्थव्यवस्थेपर्यंत प्रत्येक घटकात ग्रामीण महिलांनी मजबूत भूमिका निभावली आहे. तथापि, त्यांच्या क्षमतांचा संपूर्ण उपयोग करण्यासाठी सामाजिक-आर्थिक अडथळे दूर करणे आवश्यक आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, तंत्रज्ञानाचा वापर, सशक्त SHG नेटवर्क, आरोग्य सुविधा व निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढल्यास ग्रामीण महिला "विकासाच्या

लाभार्थी” नव्हे तर “विकासाच्या निर्मांती” म्हणून उभ्या राहतील. ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण झाले म्हणजे ग्रामीण भारताचे सर्वांगीण आणि शाश्वत विकास घडेल—हा या अभ्यासाचा मुख्य निष्कर्ष आहे.

**संदर्भ :**


1. **Singh, K.** (2019). *Rural Development: Principles, Policies and Management.* New Delhi: Sage Publications.
2. **UN Women** (2021). Women's Empowerment in Rural Communities: Global Report. United Nations Publications.
3. डॉ. सुनीता शर्मा (2018). ग्रामीण महिला एवं सामाजिक परिवर्तन. नई दिल्ली: राजकमल प्रकाशन.
4. डॉ. राकेश तिवारी (2020). स्वयं सहायता समूह और ग्रामीण विकास. लखनऊ: अवध प्रकाशन.
5. डॉ. सुषमा कदम (2017). ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण – संकल्पना व वास्तव. पुणे: Diamond Publications.
6. डॉ. प्रफुल्ल बापट (2016). ग्रामीण विकास: सिद्धांत व व्यवहार. मुंबई: महाराष्ट्र विद्या प्रकाशन.
7. डॉ. उषा भालेराव (2019). महाराष्ट्रातील स्वयंसहायता चळवळ आणि महिला विकास. नागपूर: विदर्भ बुक हाऊस.
8. डॉ. शरद पाटील (2020). समाजकार्य संशोधन पद्धती (Social Work Research Methodology). पुणे: विश्वकर्मा प्रकाशन.
9. डॉ. भारती कुलकर्णी (2018). महिला आरोग्य, पोषण व ग्रामीण समाज. औरंगाबाद: शुभम् प्रकाशन.
10. महाराष्ट्र शासन (2022). महिला व बालविकास विभाग – वार्षिक अहवाल. मुंबई: शासन मुद्रणालय.


# मेळघाटमधील ग्रामीण कोरकू आदिवासींच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनावर समाज माध्यमांचा प्रभाव


**लालचंद्र मिरसु सावलकर** संशोधक विद्यार्थी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा जि. अमरावती

**डॉ. एच. यु. पेटकर** प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा जि. अमरावती



**सारांश:** आजच्या डिजिटल युगात समाजमाध्यमे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. मोबाईल फोन व इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे समाजमाध्यमांचा प्रभाव ग्रामीण व आदिवासी भागांपर्यंत पोहोचला आहे. मेळघाटमधील आदिवासी समाज हा परंपरागत जीवनशैली, सामूहिक सामाजिक रचना व समृद्ध लोकसंस्कृतीसाठी ओळखला जातो. मात्र अलीकडील काळात समाजमाध्यमांच्या प्रवेशामुळे या समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात बदल घडून येत आहेत. प्रस्तुत लेखामध्ये मेळघाटमधील आदिवासींच्या सामाजिक संबंधांवर, सांस्कृतिक परंपरांवर, तरुण पिढीच्या विचारांवर तसेच दैनंदिन जीवनावर समाजमाध्यमांचा होणारा परिणाम सविस्तरपणे मांडण्यात आला आहे. समाजमाध्यमांमुळे शिक्षण, माहितीप्राप्ती व जागरूकता वाढत असली, तरी त्याचबरोबर पारंपरिक संस्कृतीपासून दुरावा, मूल्यसंघर्ष व मानसिक समस्या निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.


**प्रस्तावना:** मानवी समाजाच्या इतिहासात तंत्रज्ञानाने नेहमीच सामाजिक बदलांना गती दिली आहे. औद्योगिक क्रांती, दूरसंचार व्यवस्था यांप्रमाणेच आजच्या काळात माहिती व संवाद तंत्रज्ञानाने समाजरचनेत मूलभूत परिवर्तन घडवून आणले आहे. विशेषतः इंटरनेट व समाजमाध्यमांच्या (Social Media) उदयामुळे मानवी संवाद, सामाजिक संबंध, सांस्कृतिक मूल्ये आणि जीवनशैली यामध्ये व्यापक बदल घडून येत आहेत. समाजमाध्यमे ही केवळ माहितीच्या देवाणघेवाणीची साधने न राहता सामाजिक विचारसरणी घडविणारा, मतप्रवाह निर्माण करणारी आणि सांस्कृतिक प्रवाहांना दिशा देणारी प्रभावी शक्ती बनली आहेत. पूर्वी समाजमाध्यमांचा प्रभाव प्रामुख्याने शहरी व शिक्षित वर्गापुरता मर्यादित होता. मात्र, स्मार्टफोनची वाढती उपलब्धता, स्वस्त इंटरनेट सेवा आणि शासकीय डिजिटल धोरणांमुळे ग्रामीण व आदिवासी भागही हळूहळू डिजिटल विश्वाशी जोडले जात आहेत. भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशात आदिवासी समाज हा सामाजिकदृष्ट्या संवेदनशील व वैशिष्ट्यपूर्ण घटक असून त्यांचे जीवन पारंपरिक मूल्ये, निसर्गाशी घनिष्ठ संबंध, सामूहिकता आणि मौखिक परंपरेवर आधारित आहे. अशा समाजावर आधुनिक समाजमाध्यमांचा होणारा प्रभाव अभ्यासणे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे ठरते.

महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा भाग भौगोलिकदृष्ट्या दुर्गम, वनक्षेत्राने व्यापलेला व आदिवासीबहुल आहे. येथील कोरकू, गोंड, निहाल इत्यादी आदिवासी जमाती परंपरागत शेती, वनउपजीविका व मजुरीवर अवलंबून आहेत. सामाजिक जीवनात जमात, कुटुंब व परंपरांना अनन्यसाधारण महत्त्व असून सांस्कृतिक जीवनात सण-उत्सव, लोककला, लोकनृत्ये, लोकगीते व निसर्गपूजा यांचा विशेष सहभाग आहे. मात्र, शिक्षण, स्थलांतर, बाजारव्यवस्था व आधुनिक तंत्रज्ञानाच्या संपर्कामुळे या पारंपरिक जीवनशैलीत हळूहळू बदल घडू लागले आहेत. समाजमाध्यमांचा प्रवेश मेळघाटातील आदिवासी समाजात तुलनेने अलीकडचा असला तरी त्याचे परिणाम वेगाने जाणवू लागले आहेत. व्हॉट्सॲप, फेसबुक व यूट्यूबसारख्या माध्यमांमुळे संवादाची पद्धत बदलत असून बाह्य जगाशी संपर्क वाढत आहे. शासकीय योजना, आरोग्य, शिक्षण, रोजगार यांविषयी माहिती मिळण्याचे नवे मार्ग उपलब्ध झाले आहेत. त्याच वेळी शहरी व पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव, व जीवनशैलीतील बदल यामुळे पारंपरिक सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांपुढे आव्हाने उभी राहिली आहेत. आदिवासी समाजातील तरुण पिढी समाजमाध्यमांच्या प्रभावाखाली अधिक प्रमाणात येताना दिसत आहे. त्यांच्या इच्छा, दृष्टिकोन, भाषा, वेशभूषा व सामाजिक वर्तनात बदल होत असून यामुळे पिढ्यांमधील सांस्कृतिक दरी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही ठिकाणी पारंपरिक सण-उत्सव व लोककला दुय्यम ठरत असून डिजिटल मनोरंजनाला प्राधान्य दिले जात आहे. दुसरीकडे, समाजमाध्यमांचा उपयोग आदिवासी संस्कृतीच्या जतन, दस्तऐवजीकरण व प्रसारासाठीही केला जाऊ शकतो, ही बाब लक्षात घेणे तितकेच आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर

मेळघाटमधील आदिवासींच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर समाजमाध्यमांचा होणारा प्रभाव हा अभ्यासाचा महत्त्वाचा विषय ठरतो. या अभ्यासाच्या माध्यमातून समाजमाध्यमे आदिवासी समाजात कोणत्या स्वरूपाचे सामाजिक व सांस्कृतिक बदल घडवून आणत आहेत, त्यांचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम कोणते आहेत, तसेच या माध्यमांचा संतुलित व संस्कृतीपूरक वापर कसा करता येईल, याचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**समाज माध्यमे संकल्पना व स्वरूप:** समाजमाध्यमे (Social Media) ही माहिती व संवाद तंत्रज्ञानाच्या विकासातून उदयास आलेली एक महत्त्वाची सामाजिक संकल्पना आहे. पारंपरिक माध्यमे जसे की वृत्तपत्रे, रेडिओ व दूरदर्शन ही एकमार्गी (One-way) संवादाची साधने होती, तर समाजमाध्यमे ही द्विमार्गी व बहुमार्गी (Interactive and Multi-directional) संवाद साधण्याची साधने आहेत. समाजमाध्यमांच्या माध्यमातून व्यक्ती केवळ माहिती स्वीकारत नाही, तर ती निर्माण करणे, शेअर करणे व त्यावर प्रतिक्रिया देणे ही भूमिका देखील बजावते. त्यामुळे सामान्य व्यक्तीही 'माहिती निर्माता' (Content Creator) बनलेली दिसते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता समाजमाध्यमे ही एक सामाजिक व्यासपीठे (Social Platforms) आहेत, जिथे व्यक्ती, समूह व समुदाय आपले विचार, भावना, अनुभव, मूल्ये व सांस्कृतिक अभिव्यक्ती सार्वजनिक स्वरूपात मांडू शकतात. या माध्यमांमुळे सामाजिक संवादाची व्याप्ती स्थानिक मर्यादांपलीकडे जाऊन जागतिक स्तरावर विस्तारली आहे. परिणामी सामाजिक संबंधांचे स्वरूप, सामाजिक ओळख व सामूहिक चेतना यामध्ये बदल घडून येत आहेत.

**समाजमाध्यमांची मुख्य वैशिष्ट्ये:** परस्परसंवाद :- समाजमाध्यमांवर वापरकर्ते थेट संवाद साधू शकतात. प्रतिक्रिया (Comments), पसंती (Likes), शेअरिंग (Sharing) यांद्वारे विचारांची देवाणघेवाण सातत्याने घडते. वापरकर्ता-केंद्रित स्वरूप :- समाजमाध्यमांवरील मजकूर, छायाचित्रे, व्हिडिओ इत्यादी बहुतेक वेळा वापरकर्त्यांकडूनच निर्माण केले जातात. त्यामुळे माध्यमांवर कोणता मजकूर प्रसारित होईल हे ठरविण्याची शक्ती वापरकर्त्यांकडे असते. वेगवान माहिती प्रसार :- समाजमाध्यमांद्वारे माहिती अल्प वेळेत मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचते. हीच बाब समाजमाध्यमांना प्रभावी व कधी कधी धोकादायकही बनवते. जागतिक पोहोच :- भौगोलिक अंतर नष्ट करून समाजमाध्यमे जगभरातील लोकांना जोडतात. त्यामुळे स्थानिक संस्कृती जागतिक पातळीवर पोहोचू शकते.

आभासी समुदायांची निर्मिती :- समान आवडी, विचार व ओळखी असलेले लोक आभासी समूह तयार करतात. हे समूह सामाजिक चळवळी, सांस्कृतिक जतन किंवा मतप्रवाह निर्मितीसाठी महत्त्वाचे ठरतात.

**समाजमाध्यमांचे प्रकार:**

सामाजिक जाळी (Social Networking Sites) - उदा. फेसबुक, इन्स्टाग्राम ही माध्यमे वैयक्तिक ओळख, सामाजिक संबंध व नेटवर्किंगसाठी वापरली जातात.

त्वरित संदेश सेवा (Instant Messaging Platforms) - उदा. व्हॉट्सअॅप, टेलिग्राम या माध्यमांमुळे वैयक्तिक व समूह संवाद सुलभ झाला आहे.

व्हिडिओ शेअरिंग माध्यमे (Video Sharing Platforms) - उदा. यूट्यूब शैक्षणिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक व्हिडिओंच्या माध्यमातून ज्ञानाचा प्रसार होतो.

सूक्ष्म ब्लॉगिंग (Microblogging) - उदा. ट्विटर (X) अल्प शब्दांत विचार मांडण्याचे व्यासपीठ म्हणून याचा वापर होतो.

चर्चा मंच व ब्लॉग्स (Blogs and Forums) - या माध्यमांवर सखोल विचारमंथन व अनुभवांची देवाणघेवाण केली जाते.

आदिवासी समाजाच्या संदर्भात पाहता, समाजमाध्यमे ही त्यांच्या आवाजाला मुख्य प्रवाहात आणणारी साधने ठरू शकतात.

मेळघाटमधील आदिवासी समाज: सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी

**मेळघाट प्रदेशाचा भौगोलिक व सामाजिक संदर्भ:** मेळघाट म्हणजेच घाटाच्या मेल अर्थात मेळघाट हा महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील सातपुडा पर्वतरांगांमध्ये वसलेला वनप्रधान व दुर्गम प्रदेश आहे. घनदाट अरण्य, डोंगराळ भूभाग, मर्यादित दळणवळणाची सुविधा आणि अपुरी पायाभूत संरचना ही या प्रदेशाची वैशिष्ट्ये आहेत. या भौगोलिक परिस्थितीमुळे येथील आदिवासी समाज दीर्घकाळ मुख्य प्रवाहापासून अलिप्त राहिला. परिणामी, त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर बाह्य संस्कृतींचा प्रभाव तुलनेने कमी पडला आणि पारंपरिक मूल्ये टिकून राहिली. मेळघाट क्षेत्रामध्ये मुख्यतः कोरकू, गोंड, निहाल तसेच काही प्रमाणात भारिया इत्यादी आदिवासी जमाती आढळतात. यांपैकी कोरकू ही सर्वाधिक लोकसंख्येची जमात असून त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्व या भागात दिसून येते.

**सामाजिक रचना व कुटुंब व्यवस्था:** मेळघाटमधील आदिवासी समाजाची सामाजिक रचना जमात, कुळ आणि कुटुंब यांवर आधारित आहे. प्रत्येक व्यक्ती विशिष्ट कुळाशी संबंधित असून विवाह संबंध हे बहुधा कुळाबाहेर केले जातात. कुटुंब ही समाजाची मूलभूत घटक एकक असून आजही मेळघाटमध्ये बहुतांश ठिकाणी संयुक्त कुटुंबपद्धती आढळते. कुटुंबातील संबंध परस्पर सहकार्य, श्रमविभागणी आणि सामूहिक जबाबदाऱ्यांवर आधारित असते. वृद्ध व्यक्तींना आदराचे स्थान दिले जाते आणि सामाजिक निर्णयांमध्ये त्यांचा प्रभाव मोठा असतो. आदिवासी समाजात पारंपरिक सामाजिक नियंत्रणाची स्वतंत्र व्यवस्था आहे. गावपातळीवर गावपंच, जातपंचायत किंवा जमातीचे प्रमुख सामाजिक वाद सोडविण्याचे काम करतात. ही व्यवस्था कोरकू व गोंड जमातीमध्ये अधिक प्रभावी मानली जाते.

**आर्थिक जीवन व उपजीविका** मेळघाटमधील आदिवासी समाजाचे आर्थिक जीवन प्रामुख्याने — पारंपरिक शेती, वनउपज संकलन (मध,, तेंदूपत्ता, मोहफुले), मजुरी व स्थलांतर यांवर आधारित आहे. आर्थिक मर्यादा असूनही सामूहिक श्रम, परस्पर मदत व स्वयंपूर्णतेची भावना त्यांच्या जीवनात दिसून येते.

**सांस्कृतिक जीवनाची वैशिष्ट्ये:** धर्म, श्रद्धा व निसर्गपूजा - मेळघाटमधील आदिवासी समाजाचा धर्म बहुदेववादी असून निसर्गपूजा ही त्यांच्या धार्मिक श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. डोंगर, नद्या, झाडे, प्राणी व पूर्वज यांना दैवी महत्त्व दिले जाते. पारंपरिक देव-देवता व ग्रामदेवता यांची पूजा केली जाते. सण-उत्सव व विधी - सण-उत्सव हे आदिवासी सांस्कृतिक जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे.
शेतीशी संबंधित सण,निसर्गाशी निगडित उत्सव, विवाह, जन्म व मृत्यू विधी हे सर्व सण सामूहिक सहभागातून साजरे केले जातात, ज्यामुळे सामाजिक ऐक्य मजबूत होते.

**लोककला, लोकनृत्य व लोकगीते:** लोकनृत्ये, ढोल-ताशे, पारंपरिक वाद्ये आणि लोकगीते ही आदिवासी संस्कृतीची ओळख आहेत. ही कला केवळ मनोरंजनाचे साधन ही या पारंपरिक संरचनेत नव्याने प्रवेश करणारी शक्ती असून ती सामाजिक संबंध, मूल्ये व सांस्कृतिक ओळख यांवर परिणाम घडवून आणत आहे नसून सामाजिक मूल्ये व इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे माध्यम आहे.

भाषा व बोलीभाषा - मेळघाटमधील आदिवासी समाज विविध बोलीभाषांचा वापर करतो. कोरकू भाषा ही येथील प्रमुख भाषा असून ती मौखिक परंपरेवर आधारित आहे. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून सांस्कृतिक ओळखीचा महत्त्वाचा घटक आहे.

सामाजिक मूल्ये व जीवनदृष्टी - आदिवासी समाजाची जीवनदृष्टी सामूहिकता, निसर्गस्नेह, समता व परस्पर आदर यांवर आधारित आहे. मालकीपेक्षा सहभागाला अधिक महत्त्व दिले जाते. जीवनातील सुख-दुःख सामूहिकरीत्या स्वीकारले जाते.

बदल व संक्रमण - शिक्षण, स्थलांतर, शासन धोरणे, बाजारव्यवस्था आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे मेळघाटमधील आदिवासी समाज संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. पारंपरिक सामाजिक रचना व आधुनिक बदल यांच्यात समन्वय साधण्याचे आव्हान या समाजासमोर उभे आहे.

**समाजमाध्यमांच्या अभ्यासासाठी पार्श्वभूमी:** ही सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी समजून घेतल्याशिवाय समाजमाध्यमांचा प्रभाव योग्यरीत्या अभ्यासता येत नाही. कारण समाजमाध्यमे व आदिवासी समाज आदिवासी समाजासाठी समाजमाध्यमे ही संधी आणि आव्हान दोन्ही आहेत. एकीकडे शिक्षण, माहिती व जागरूकता वाढते; तर दुसरीकडे पारंपरिक मूल्ये व संस्कृतीवर दबाव निर्माण होतो. त्यामुळे समाजमाध्यमांचा अभ्यास केवळ तांत्रिक दृष्टिकोनातून न करता सामाजिक व सांस्कृतिक संदर्भात करणे आवश्यक ठरते.

**समाजमाध्यमांचा सामाजिक जीवनावर प्रभाव:** समाजमाध्यमे ही आधुनिक समाजरचनेतील एक प्रभावी सामाजिक संस्था म्हणून उदयास आली आहेत. ती केवळ संवादाची साधने न राहता सामाजिक संबंध, सामाजिक रचना, सामाजिक मूल्ये आणि सामाजिक वर्तन यांवर खोलवर परिणाम घडवून आणत आहेत. मेळघाटमधील आदिवासी समाजाच्या संदर्भात पाहता, समाजमाध्यमांचा प्रभाव तुलनेने अलीकडचा असला तरी त्याचे परिणाम वेगाने आणि बहुआयामी स्वरूपात दिसून येत आहेत. पारंपरिक आदिवासी समाजात संवाद प्रत्यक्ष भेटी, सामूहिक कामे, सण-उत्सव व गावसभा यांच्या माध्यमातून घडत असे. समाजमाध्यमांच्या आगमनानंतर संवादाचे स्वरूप बदलले आहे. व्हॉट्सअॅप व मोबाईल कॉल्समुळे दूरवर असलेल्या नातेवाईकांशी नियमित संपर्क शक्य झाला आहे. स्थलांतरित मजूर आपल्या कुटुंबाशी सातत्याने जोडले राहू लागले आहेत. गावपातळीवरील माहिती (सभा, योजना, कार्यक्रम) जलद पसरू लागली आहे. तथापि, प्रत्यक्ष संवाद कमी होऊन आभासी संवाद वाढत असल्यामुळे सामाजिक आत्मीयता व सामूहिक सहभाग कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. समाजमाध्यमांमुळे सामाजिक संबंधांची व्याप्ती वाढली आहे. नवीन मित्रपरिवार व आभासी ओळखी निर्माण होत आहेत. विवाह, नातेसंबंध व सामाजिक संपर्कांची निवड अधिक वैयक्तिक होत आहे. परंतु यामुळे पारंपरिक सामाजिक नियंत्रण, कुटुंबाचा हस्तक्षेप आणि सामूहिक निर्णयप्रक्रियेवर मर्यादा येत आहेत. कुटुंब ही आदिवासी समाजातील मूलभूत सामाजिक संस्था आहे. समाजमाध्यमांचा कुटुंबसंस्थेवर प्रभाव दिसतो. तरुण पिढीचा मोबाईलवर अधिक वेळ खर्च, पालक व मुले यांच्यात संवादातील दरी, कौटुंबिक चर्चा व सामूहिक वेळेत घट, त्याच वेळी आपत्कालीन परिस्थितीत संपर्क सुलभ होणे हा एक सकारात्मक बदलही आहे. समाजमाध्यमांचा सर्वाधिक प्रभाव आदिवासी तरुणांवर दिसून येतो. शहरी जीवनशैलीचे आकर्षण भाषेतील बदल, वेशभूषा व आचार-विचारात परिवर्तन यामुळे सामाजिक वर्तनात आधुनिकतेकडे झुकाव वाढत असला तरी पारंपरिक मूल्यांशी संघर्ष निर्माण होत आहे. समाजमाध्यमांनी सामाजिक जाणीव वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आदिवासी हक्कांबाबत माहिती, शासकीय योजना व कायदे, सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज, आदिवासी समाजाला स्वतःच्या प्रश्नांना मांडण्यासाठी एक नवे व्यासपीठ मिळाले आहे. पारंपरिक आदिवासी समाजात सामाजिक नियंत्रण हे रूढी, परंपरा व पंचव्यवस्थेद्वारे केले जात असे. समाजमाध्यमांच्या प्रभावामुळे पारंपरिक सामाजिक नियंत्रण कमकुवत होत आहे, वैयक्तिक स्वातंत्र्य वाढत आहे, मूल्यसंघर्ष निर्माण होत आहे, यामुळे समाजात संक्रमणाची अवस्था निर्माण झाली आहे. समाजमाध्यमांमुळे रोजगार व शहरी जीवनाबाबत माहिती मिळत असल्याने स्थलांतराची प्रवृत्ती वाढत आहे. गावातील युवक शहरांकडे आकर्षित, गावातील लोकसंख्यात्मक रचनेत बदल, कुटुंबीय संरचनेवर परिणामहोत आहे.

**सकारात्मक व नकारात्मक प्रभाव :** सकारात्मक - संवाद सुलभता, सामाजिक जाणीव, बाह्य जगाशी संपर्क, माहितीची उपलब्धता ई. नकारात्मक - सामाजिक एकात्मतेत घट, पारंपरिक मूल्यांचा ऱ्हास, व्यसनाधीनतेचा धोका, अफवा व चुकीची माहिती ई.मेळघाटमधील आदिवासी समाजासाठी समाजमाध्यमे ही सामाजिक परिवर्तनाची गती वाढविणारी शक्ती ठरत आहेत. मात्र, हा बदल नैसर्गिक व संतुलित न राहता झपाट्याने घडत असल्यामुळे सामाजिक विस्कळीतपणाची शक्यता नाकारता येत नाही. समाजमाध्यमांचा सामाजिक जीवनावर प्रभाव हा बहुआयामी आहे. योग्य मार्गदर्शन, सामाजिक भान आणि सांस्कृतिक जाणिवेसह समाजमाध्यमांचा वापर केल्यास ते आदिवासी समाजाच्या सशक्तीकरणाचे साधन ठरू शकतात. अन्यथा, पारंपरिक सामाजिक रचना व मूल्यप्रणालीवर त्याचे नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.

**समाजमाध्यमांचा सांस्कृतिक जीवनावर प्रभाव:** संस्कृती ही कोणत्याही समाजाची ओळख, आत्मा व सातत्य दर्शविणारा मूलभूत घटक आहे. जीवनपद्धती, परंपरा, श्रद्धा, सण-उत्सव, कला, भाषा, मूल्ये व सामाजिक संकेत यांच्या एकत्रित परिणामातून संस्कृती घडत असते. मेळघाटमधील आदिवासी समाजाची संस्कृती ही निसर्गकेंद्री, सामूहिक व मौखिक परंपरेवर आधारित आहे. मात्र, समाजमाध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे या सांस्कृतिक जीवनात परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने घडत आहे.

पारंपरिक सांस्कृतिक परंपरांवरील प्रभाव - समाजमाध्यमांच्या माध्यमातून शहरी, औद्योगिक व पाश्चिमात्य संस्कृतीचा थेट संपर्क आदिवासी समाजाशी येत आहे. पारंपरिक सण-उत्सवांचे स्वरूप बदलत आहे. सामूहिक सणांपेक्षा वैयक्तिक मनोरंजनाला प्राधान्य दिले जात आहे. काही पारंपरिक विधी व रूढी दुय्यम ठरत आहेत. यामुळे सांस्कृतिक सातत्यावर परिणाम होत आहे.

लोककला, लोकनृत्य व लोकगीते - लोककला ही आदिवासी संस्कृतीची आत्मा मानली जाते.

नकारात्मक - तरुण पिढीचा लोककलेपेक्षा डिजिटल मनोरंजनाकडे ओढा, पारंपरिक कलाकारांची संख्या घटत आहे

सकारात्मक - यूट्यूब व सोशल मीडियावर लोककलेचे व्हिडिओ, आदिवासी लोकनृत्यांना व्यापक ओळख, समाजमाध्यमे लोककलेच्या जतनाचे साधनही ठरू शकतात.

भाषा व सांस्कृतिक अभिव्यक्ती - भाषा ही संस्कृतीची वाहक आहे. बोलीभाषांच्या वापरात घट, मराठी, हिंदी व इंग्रजी शब्दांचा वाढता वापर

डिजिटल संवादात भाषिक बदल, परंतु काही ठिकाणी आदिवासी भाषा डिजिटल माध्यमांतून जतन करण्याचे प्रयत्नही सुरू आहेत.

वेशभूषा, आहार व जीवनशैली - समाजमाध्यमांवरील दृश्य प्रभावामुळे पारंपरिक वेशभूषेपेक्षा आधुनिक कपड्यांना पसंती, आहारपद्धतीत बदल,उपभोगवादी जीवनशैलीचा प्रभाव यामुळे सांस्कृतिक भिन्नता कमी होत असल्याचे दिसते.

धार्मिक श्रद्धा व निसर्गपूजा - आदिवासी संस्कृतीत निसर्गपूजा केंद्रस्थानी आहे. पारंपरिक श्रद्धांवर आधुनिक विचारांचा प्रभाव, धार्मिक विधींच्या स्वरूपात बदल, काही श्रद्धांचे दुर्लक्षण, तथापि, समाजमाध्यमांच्या माध्यमातून आदिवासी धार्मिक परंपरांचे दस्तऐवजीकरण शक्य झाले आहे.

सांस्कृतिक ओळख व अस्मिता - समाजमाध्यमांनी आदिवासी अस्मितेला नवे व्यासपीठ दिले आहे. आदिवासी हक्क चळवळी, सांस्कृतिक अभिमानाची अभिव्यक्ती, डिजिटल माध्यमांतून ओळख निर्मिती, यामुळे सांस्कृतिक आत्मभान वाढण्यास मदत झाली आहे.

तरुण पिढी व सांस्कृतिक संक्रमण - तरुण पिढी ही सांस्कृतिक बदलांची प्रमुख वाहक आहे. परंपरा व आधुनिकता यांतील संघर्ष, सांस्कृतिक मूल्यांबाबत द्वंद्व नवीन सांस्कृतिक ओळखींची निर्मिती ही अवस्था सांस्कृतिक संक्रमणाची दर्शक आहे.

सांस्कृतिक एकसुरीपणा व जागतिकीकरण - समाजमाध्यमांमुळे जागतिक संस्कृतीचा प्रभाव वाढत आहे. स्थानिक वैशिष्ट्यांचा ऱ्हास, जागतिक सांस्कृतिक प्रवाहांचे वर्चस्व, सांस्कृतिक एकसुरीपणाची शक्यता, हा बदल आदिवासी संस्कृतीसाठी चिंताजनक ठरू शकतो.

**तरुण पिढीवर समाजमाध्यमांचा प्रभाव:** तरुण पिढी ही कोणत्याही समाजातील बदलांची प्रमुख वाहक मानली जाते. शिक्षण, रोजगार, तंत्रज्ञान व सांस्कृतिक प्रवाह यांशी सर्वाधिक संपर्कात असलेला घटक म्हणजे तरुण वर्ग होय. मेळघाटमधील आदिवासी समाजाच्या संदर्भात पाहता, समाजमाध्यमांचा प्रभाव सर्वाधिक आणि वेगाने तरुण पिढीवर पडताना दिसून येतो. हा प्रभाव सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, मानसिक व वर्तनात्मक अशा अनेक स्तरांवर जाणवतो. शिक्षण व ज्ञानप्राप्तीवर परिणाम - समाजमाध्यमांनी तरुणांच्या शिक्षणाच्या संधी विस्तारल्या आहेत. यूट्यूब, ऑनलाइन वर्ग व शैक्षणिक ॲप्समुळे स्वयंअध्ययनाची सवय, स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती व प्रवेश प्रक्रियेची माहिती डिजिटल साक्षरतेत वाढ परंतु मार्गदर्शनाअभावी चुकीची माहिती आत्मसात होण्याचा धोका देखील आहे. समाजमाध्यमांवरील शहरी व आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव तरुणांच्या आकांक्षांवर पडतो. पारंपरिक उपजीविकेपेक्षा शहरी रोजगाराकडे कल,भौतिक यशाला अधिक महत्त्व, व्यक्तिगत स्वातंत्र्याचा आग्रह, यामुळे पारंपरिक मूल्ये व आधुनिक दृष्टिकोन यांमध्ये संघर्ष निर्माण होतो. बोलीभाषेऐवजी प्रचलित भाषा, पारंपरिक वेशभूषेपेक्षा आधुनिक कपडे, लोकसंस्कृतीपेक्षा डिजिटल संस्कृती, तरुण पिढीच्या सांस्कृतिक वर्तनात बदल दिसून येतात. यामुळे सांस्कृतिक सातत्य धोक्यात येण्याची शक्यता आहे.समाजमाध्यमांनी तरुणांच्या सामाजिक ओळखीच्या प्रक्रियेला नवे वळण दिले आहे. आभासी मित्रपरिवार, सामाजिक मान्यता (Likes, Followers) यांवर आधारित आत्ममूल्य, वैयक्तिक ओळखीची पुनर्रचना यामुळे आत्मविश्वास वाढू शकतो, पण आत्मकेंद्रीपणाही वाढू शकतो. व्यसनाधीनतेची शक्यता, ताणतणाव व असमाधान, तुलनात्मक न्यूनगंड, समाजमाध्यमांचा अति वापर मानसिक पातळीवर परिणाम करतो. दुर्गम भागात समुपदेशन सुविधा मर्यादित असल्याने हा मुद्दा अधिक गंभीर ठरतो. स्थलांतराची प्रेरणा, कौशल्य विकासाबाबत जागरूकता, पारंपरिक व्यवसायांपासून दुरावणे समाजमाध्यमांमुळे रोजगार व शहरी जीवनाबाबत माहिती मिळते. यामुळे गावातील सामाजिक संरचनेवरही परिणाम होतो. आदिवासी हक्क चळवळी, सामाजिक प्रश्नांवर आवाज, डिजिटल माध्यमांतून संघटन समाजमाध्यमांनी काही तरुणांना नेतृत्वाची संधी दिली आहे. यामुळे सामाजिक सहभाग वाढत आहे.

मेळघाटमधील आदिवासी तरुण समाजमाध्यमांच्या प्रभावाखाली "संक्रमण अवस्थेत" आहे. ते परंपरा व आधुनिकता यांमध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरुण पिढीवर समाजमाध्यमांचा प्रभाव हा ना पूर्णतः नकारात्मक आहे, ना पूर्णतः सकारात्मक. योग्य डिजिटल साक्षरता, सांस्कृतिक भान आणि मार्गदर्शन मिळाल्यास समाजमाध्यमे तरुण पिढीसाठी विकासाचे साधन ठरू शकतात. अन्यथा, सामाजिक व सांस्कृतिक विस्थापनाचा धोका निर्माण होऊ शकतो. समाजमाध्यमे ही आधुनिक समाजातील एक प्रभावी सामाजिक शक्ती आहे. मेळघाटमधील आदिवासी समाजाच्या संदर्भात पाहता, समाजमाध्यमांचा प्रभाव हा एकसंध नसून

द्वैध स्वरूपाचा आहे. एकीकडे ही माध्यमे सामाजिक सशक्तीकरण, माहितीप्रसार व विकासाची संधी देतात; तर दुसरीकडे ती सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांसमोर गंभीर आव्हाने निर्माण करतात. त्यामुळे समाजमाध्यमांचे परिणाम सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही अंगांनी अभ्यासणे आवश्यक ठरते.

**निष्कर्ष:** सध्याच्या डिजिटल युगात समाजमाध्यमे ही सामाजिक परिवर्तनाची एक महत्त्वाची शक्ती म्हणून उदयास आली आहेत. मेळघाटमधील आदिवासी समाज हा पारंपरिक सामाजिक व सांस्कृतिक संरचना जपणारा समाज असून, समाजमाध्यमांच्या प्रवेशामुळे आदिवासी समाजाच्या जीवनपद्धतीत हळूहळू पण खोलवर बदल घडून येत आहेत. प्रस्तुत समाजशास्त्रीय अध्ययनातून समाजमाध्यमांचा मेळघाटमधील आदिवासींच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर झालेला प्रभाव बहुआयामी, द्विमुखी आणि संक्रमणात्मक स्वरूपाचा असल्याचे स्पष्ट होते.

समाजमाध्यमांमुळे आदिवासी समाजात माहिती व ज्ञानप्राप्तीच्या संधी वाढल्या आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगार, शासकीय योजना, हक्क व कायदे यांविषयी जागरूकता निर्माण झाली आहे. विशेषतः तरुण पिढीमध्ये डिजिटल साक्षरतेत वाढ होत असून, आत्मअभिव्यक्ती, सामाजिक सहभाग व नेतृत्वगुण विकसित होण्यास समाजमाध्यमे उपयुक्त ठरत आहेत. आदिवासी प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळणे, सांस्कृतिक वारशाचे डिजिटल दस्तऐवजीकरण होणे आणि स्थानिक कला-कौशल्यांना बाजारपेठ मिळण्याची शक्यता निर्माण होणे हे समाजमाध्यमांचे महत्त्वाचे सकारात्मक परिणाम मानता येतात. तथापि, समाजमाध्यमांचा प्रभाव केवळ सकारात्मक मर्यादित नाही. आधुनिक व शहरी जीवनशैलीच्या प्रभावामुळे पारंपरिक मूल्ये, रूढी-परंपरा, सामूहिकता आणि सामाजिक बंधनांवर ताण येत आहे. भाषिक बदल, वेशभूषेतील परिवर्तन, सण-उत्सवांच्या स्वरूपातील बदल आणि लोकसंस्कृतीपासून दुरावणे हे सांस्कृतिक विस्थापनाचे संकेत आहेत. समाजमाध्यमांच्या अति वापरामुळे तरुणांमध्ये व्यसनाधीनता, मानसिक ताणतणाव, तुलनात्मक न्यूनगंड आणि सामाजिक अलगाव वाढण्याची शक्यता दिसून येते. यामधून असेही स्पष्ट होते की समाजमाध्यमांचा परिणाम आदिवासी समाजावर एकसमान नसून तो वय, लिंग, शिक्षण, आर्थिक स्थिती व भौगोलिक उपलब्धता यांवर अवलंबून आहे. विशेषतः तरुण पिढी ही परंपरा व आधुनिकता यांच्यातील "संक्रमण अवस्थेत" असून, ती दोन्हींचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करत आहे. योग्य मार्गदर्शन व सांस्कृतिक भान नसल्यास ही प्रक्रिया विस्कळीत सामाजिक बदलाकडे नेण्याचा धोका निर्माण करू शकते. समाजमाध्यमे ही स्वतःहून ना घातक आहेत, ना उपयुक्त; त्यांचा उपयोग कसा केला जातो यावर त्यांचे परिणाम अवलंबून आहेत. डिजिटल साक्षरता, कुटुंब व समाजाचे मार्गदर्शन, शैक्षणिक उपयोगाला प्रोत्साहन आणि सांस्कृतिक संवर्धनाचा दृष्टिकोन स्वीकारल्यास समाजमाध्यमे मेळघाटमधील आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन ठरू शकतात. अन्यथा, सामाजिक असमतोल, सांस्कृतिक दुरावा आणि ओळखीचे संकट निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या अध्ययनातून असा निष्कर्ष काढता येतो की मेळघाटमधील आदिवासी समाजासाठी समाजमाध्यमांचा प्रभाव हा आव्हानात्मक असला तरी संधींनी भरलेला आहे. परंपरा जपत आधुनिक तंत्रज्ञानाचा समतोल स्वीकार केल्यास, समाजमाध्यमे आदिवासी समाजाच्या सशक्तीकरण, आत्मसन्मान आणि शाश्वत विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात.

**संदर्भ :**


1. देसाई, ए. आर. (2010). भारतीय समाजरचना. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन.
2. Government of Maharashtra. (2018). Tribal Development Report. मुंबई.
3. Kothari, R. (2012). Rethinking Development.
4. New Delhi: Orient Blackswan.
5. घुर्ये, गो. स.: भारतीय समाजरचना, पॉप्युलर प्रकाशन, पुणे.
6. राऊत, एस. बी. (2019). आदिवासी समाज आणि बदल. नागपूर: विदर्भ साहित्य संघ.
7. UNDP. (2020). Digital Inclusion and Tribal Communities.
8. देसाई, ए. आर.: Rural Sociology in India, Popular Prakashan.
9. महाराष्ट्र शासन: आदिवासी विकास अहवाल.
10. विविध सामाजिक संशोधन लेख व नियतकालिके


# ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप व कृषीव्यवस्था

**प्रा. डॉ. संजय भगत** समाजशास्त्र विभाग प्रमुख महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती

**प्रस्तावना:** भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतीय समाज हा शेतीप्रधान आहे. ग्रामालाच 'गाव किंवा खेडे' असे म्हटले जाते. प्राचीन काळापासूनच खेडे हे भारतीय समाजजीवनाचे केंद्र राहीले आहे. राजकारणातील प्रमुख घटक म्हणून सांस्कृतिक जीवनाचे प्रमुख केंद्र म्हणून व सामाजिक जीवनातील प्रमुख आधार म्हणून खेड्यांचे विशेष महत्तव आहे. ग्राम हे अशाप्रकारचे स्थान आहे की, जेथे मानवाने आपले अस्थायी जीवन स्थायी स्वरुपात व्यक्तीत करण्यास सुरुवात केली. खेड्यामुळे भटक्या अवस्थेत राहणारा माणूस स्थायी झाला. खेड्यामध्ये स्थायीरुपाने निवास करण्याचे एकमेव साधन म्हणजे शेती व्यवसाय होय. त्यामुळे भारतीय समाजात ग्राम हे अतीप्राचीन वस्तीस्थान आहे. ग्रामीण समुदाय असा व्यक्तीचा समुह आहे की, जो परस्पर सहकार्याने आपले जीवन व्यतीत करतो व एका भूभागावर वास्ताव्य करुन औपचारिक, साध्या परंपरावादी संबंधाव्दारे आपल्या प्राथमिक गरजांची पुर्तता करतो. ग्रामीण समुदायामध्ये नैसर्गिक वातावरण असते. ग्रामीण लोकांचे संपूर्ण जीवन शेतीवर अवलंबून असते. गावातील संपूरण बहुतांश उद्योगधंदे शेतीवर व शेतीतून मिळणाऱ्या कच्च्या मालावर अवलंबून असते. गावामध्ये राहतो तो व त्याचे शेजारी हे उद्देशात्मक सीमा व

विषयात्मक विचार ठेवतात था अभ्यासावरुन हे स्पष्ट होते की, गाव शब्दाची सुरुवात ही कृषीच्या प्रारंभापासुन झाली नाही तर कृषीसाठी भूमीचे वितरण आणि अन्य विभीन्नतेमुळे गाव किंवा खेडे या शब्दाचा उपयोग केला गेला आहे.

शेती व्यवसाय आणि शेतकरी जीवन बदललेते स्वातंत्र्यानंतर गेल्या ६०-६५ वर्षात अनेक गोष्टीत बदल झाला उत्क्रांती झाली. ७०-८० वर्षपूर्वी वाडवडील, आजोबा -पणजोबा शेती करीत होते ती फक्त पावसाच्या जीवावर. पण त्या वेळी हुकुमी पाउस पडत होता. त्या मुले शेती उत्पादने हुकुमी मिळत होती. त्यावेळी फक्त पावसाळ्यातली शेती केली जात होती. उन्हाळ्यातली शेती नव्हती. पण पुढे थोड्याफार प्रमाणात भूपृष्टातल्या पाण्याचा विहिरीच्या माध्यमातून पिके पिकविण्यासाठी वापर होऊ लागला. मोटे वरच्या बागायातीनंतर इंजिनावर बागायती शेती करू लागले. अलीकडेसरास इलेक्ट्रिकच्या (विजेचा) वापरावरच शेती व्यवसाय अवलंबून आहे. लाकडी अवजारावरून लोखंडी अवजार आणि आता सध्या 'कृषी यांत्रिकीकरणामुळे आधुनिक औजारांच्या सहाय्याने शेती करू लागले. पारंपारिक जून्या स्थानिक वाणांच्या बियाण्याऐवजी निवड पद्धतीच्या वाणांचा वापर वाढू लागला.

१९६७ च्या आसपास संकरित बियाणांची हरितक्रांती घडवून आणली., त्यामुळे खात धान्य आणि इतर उत्पादनांची आयात थांबली. (मिलोसारख्या धान्याची चव आताच्या बुजुर्गाना चांगलीच माहित आहे) संकरीत अन्नधान्याचे उत्पादन प्रचंड वाढवण्यासाठी रासायनिक खतांचा वापर वाढला. पाण्याची सुविधा वाढली. त्यामुळे खऱ्या अर्थाने हरितक्रांती यशस्वी होवून देशातल्या जनतेची भूकामारी संपून देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला.

**ग्रामीण समुदायाची व्याख्या:** बोगार्डस (Bogardus) यांच्या मते, 'समुदाय हा असा एक सामाजिक समूह आहे ज्यामध्ये काही प्रमाणात 'आम्हीं'पणाची भावना (We-feeling) असते आणि जो एका निश्चित क्षेत्रात राहतो." सँडरसन (Sanderson) "ग्रामीण समुदाय हा अशा लोकांचा समूह आहेजे विखुरलेल्या शेतांवर किंवा लहान वस्त्यांमध्ये राहतात आणि त्यांच्या सर्व सामान्य क्रियांचे केंद्र हे त्यांचे गाव असते"

**संशोधनाचे उददेश:** ग्रामीण समाजाच्या बदलत्या स्वरुपाचा अभ्यास करणे. कृषी व्यवस्थेचा अभ्यास करणे.

**गृहितकृत्य :** आधुनिक काळात ग्रामीण समुदायात बदल होत आहे. कृषी व्यवस्थेमध्ये बदल होत आहे.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत शोध अध्ययनाकरीता दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. विषयाशी संबंधित प्रकाशित शोधसाहित्य, मासिके, संकेतस्थळे इ. चा वापर करण्यात आला.

**ग्रामीण समुदायाचे बदलते स्वरुप:** ग्रामीण समुदायातील बदल शहरी समुदाच्या तुलनेन भेद असले तरीही त्यात विविध प्रकारचे बदल सतत होत असल्याचे दिसुन येते. हे बदल ग्रामीण समुदायाच्या संरचनेत तसेच ग्रामीण संस्कृतीमध्ये होत आहेत.

**कौंटूबिक जीवनातील बदल :-** ग्रामीण समुदायाच्या कौंटुबिक जीवनात आधुनिक काळात महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. पूर्वीच्या संयुक्त कुटुंब पद्धतीची जागा आज विभक्त कुटुंब पध्दतीने घेतली आहे. औद्योगिकरण आणि नागरीकरणामुळे एका कुटुंबाची अनेक कुटुंबे तयार झाली आहेत. त्यामुळे पुर्वीइतके कुटुंबाला महत्व राहिले नाही. पुर्वी कुटुंबात वृध्द व्यक्तीला मान होता. त्यांचे मार्गदर्शन महत्वाचे होते. आज वृध्दांना कुटुंबाचा भार समजले जाते. कुटुंबामध्ये व्यक्तीवादी दृष्टीकोन आला आहे मी, माझी बायको आणि माझी मुले यांचाच विचार कुटुंबप्रमुख करतो. त्यामुळे व्यक्ती स्वार्थी बनला आहे. वडीलोपार्जीत संपत्तीसंबंधीच्या भांडणांमुळे मुळ कुटुंब आणि विभक्त कुटुंब यांच्यातीठ मानसिक दुराना वाढत चालला आहे.

**विवाहसंस्थेमध्ये बदल :-** आधुनिक काळामध्ये विवाह संस्थेमध्ये अनेक बदल झाले आहे. पूर्वी अस्तित्वात असलेली बालविवाराची प्रथा आज नष्ट होत आहे. पूर्वी विवाह करतांना आईवडीलांच्या निवडीला विशेष महत्व होते, आज ते राहीले नाही. आज अनेक तरुण मुले-मुली स्वत:च स्वत:चा जोडीदार निवडतात. त्यामुळे नोदणी विवाह, आंतरजातीय विवाह, प्रेमविवाहाचे प्रमाण वाढले आहे पूर्वी विधवांना पुनर्विवाह करता येत नव्हता आता विधवा पुनर्विवाह करु लागल्या आहेत. तरुण मुले विधवांशी विवाह करतांना दिसत आहे. कायद्याने तशी मान्यता दिली आहे. ग्रामीण समुदायामध्ये सामाजिक जीवनात विवाहविषयक अनेक बदल घडून आले आहे.

**राजकीय जीवनातील बदल :-** पूर्वी ग्रामीण भागातील सर्व राजकीय सत्ता गावातील श्रेष्ठ जातींकडेच एकवटलेली होती. पाटील, पटवारी, ग्रामपंचायतीचे सदस्य प्रबळ जातीकडे झुकलेले असत. एकंदरीत पूर्वी ग्रामीण समुदायात राजकीय सत्ता श्रेष्ठ जाती व धनिकांकडेच राहत होती. परंतु आधुनिक काळात लोकशाही शासनपद्धतीमुळे ग्रामीण भागात राजकीय सत्ता सर्वसामान्य लोकांकडेही जात आहे. मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही राजकीय आरक्षण प्राप्त असल्याने मागासवर्गीयांकडेही ग्रामीण भागात राजकीय सत्ता येत आहे तसेच पूर्वी राजकीय सत्तेपासून स्त्रियांना पूर्णपणे वंचित केलेले होते. परंतु आधुनिक काळात अनेक ठिकाणी महिलासुद्धा राजकीय क्षेत्रात आघाडीवर आहेत.

**धार्मिक जीवनातील बदल :-** औद्योगिक प्रगती व विज्ञानाच्या प्रसारामुळे ग्रामीण जीवनावरील धर्माचा प्रभाव दिवसेंदिवस कमी होत असल्याचे दिसून येते. अंधविश्वास व रूढीप्रियताही काही प्रमाणात कमी होत असतांना दिसते.

**आर्थिक जीवनातील बदल :-** ग्रामीण समुदायात पूर्वी शेती ही विशेषत: निसर्गावर अवलंवून होती. त्यामुळे ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, महापूर इत्यादीमुळे शेतीपासून मिळणारे उत्पन्न वेभरवशाचे होते. परंतु आधुनिक काळात ओलीताच्या सोयी, पाटबंधारे व कालव्याच्या निर्मातीमुळे शेतीचे भरघोस वाढ झालेली आहे. सोबतच कृषी विषयक नवे ज्ञान, ज्ञान नविन बि-बियाणे, नविन यंत्रे इत्यादीमुळे शेतीचे उत्पादन वाढून त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक स्थिती बऱ्याच प्रमाणात सुधारली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात बदल झाला आहे. पूर्वीचे निकृष्ट जीवनमान बदलून आधूनिक काळातील अनेक आधुनिक गोष्टींना ग्रामीण समुदायातील लोकांच्या जीवनात प्रवेश केला आहे. तसेच शहराच्या वाढत्या संपर्कामुळे त्यांच्या जीवनात महत्वपूर्ण बदल घडून आले

आहेत. आज तर ग्रामीण समुदायातील लोकही महागडे कपडे, मोटारगाड्या, टि.व्ही, फ्रीज यासारख्या आधुनिक चैनीच्या वस्तु वापरत आहेत. ग्रामीण समुदायातील लोकांच्या जीवनमानात बदल घडून आला आहे.

**स्त्री शिक्षण आणि सबलीकरण :-** ग्रामीण समुदायात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले असून स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिला आर्थिकदृष्टया सक्षम होत आहेत. शेतीमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे. जातीव्यवस्थेमध्ये परिवर्तन होवून पुर्वीच्या तुलनेत जातीवर आधारित कामाची बंधने कमी झाली असून सामाजिक आंतरक्रिया वाढली आहे.

**ग्रामीण लोकांच्या जीवनशैलीत बदल :-** पूर्वी ग्रामीण भागातील लोक साधे जीवन जगत असत. आता आधुनिक जगाच्या संपर्कात येवून ग्रामीण युवकाच्या पेहरावात खाण्यापिण्याच्या सवयी आणि मनोरंजनाच्या साधनामध्ये बदल झालेला आहे. पारंपारिक जत्रा आणि खेळाची जागा आता सोशल मिडीया आणि टि.व्ही. वरील कार्यक्रमाचे घेतली आहे.

**सारांश:** आधुनिक काळातील ग्रामीण समुदायात अनेक महत्वपूर्ण बदल घडून येत आहेत. आधुनिक काळात परिवर्तन चक्रात ग्रामीण समुदायातील परिवर्तन स्वागतार्ह असले तरी हे परिवर्तन (बदल) चांगल्या दिशेने होणे आज आवश्यक झाले आहे. कारण परिवर्तनाच्या नावाखाली आजपर्यंत शहारातील विकृत संस्कृती आज खेड्यात पोहचत आहे त्यामुळे पूर्वीचे खेड्यामधील साधे, सरळ जीवन परिवर्तीत होऊन आज खेड्यात मद्यपान, जुगार, वेश्यावृत्ती, गुन्हेगारी, चोरी, फसवणूक इत्यादी वाईट प्रकार घडून येत आहे. ग्रामीण समुदायाची प्रगती घडवून आणण्यासाठी ज्या वाईट प्रथा आहेत त्या कायमचे बंद होणे गरजेचे आहेत

**सदर्भ ग्रंथ**


1. लोटे रा. ज., भारतीय सामाजिक संरचना आणि समस्या, पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स नागपूर
2. नाडगोडे गुरुनाथ, ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
3. आगलावे प्रदीप, ग्रामीण अणि समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
4. कऱ्हाडे बी.एम., ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स नागपूर
5. https// agriculture. vikaspedia.in


# आधुनिकीकरणामुळे कृषीव्यवस्थे समोरील आव्हाने

**प्रा. आनंद गो. मनवर** समाजशास्त्र विभाग युवा शक्ती कला व विज्ञान महाविद्यालय अमरावती

**प्रस्तावना:** आधुनिकीकरण ही व्यापक व सार्वत्रिक संकल्पना आहे. ऐतिहासिकदृष्टया आधुनिकीकरणाची सुरवात ग्रेट ब्रिटनमये झाली त्यानंतर फ्रान्स जर्मनी, अमेरिका इत्यादी देशात सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भातील एक व्यापक प्रक्रिया म्हणून तिचा स्वीकार करण्यात आला. पारंपारिक समाजाकडून पुरोगामी, विज्ञाननिष्ठ, विवेकपूर्ण समाजाकडे होणारी विशिष्ट दिशेने वाटचाल म्हणजे म्हणजे आधुनिकीकरण होय. आधुनिकीकरणामुळे समानतेच्या सर्व पैलूमध्ये म्हणजे मूल्य, श्रध्दा, सिध्दांत, सामाजिक संस्था नित्य व्यवहारातील कार्य परंपरागत चाकोरीबध्द जिवन, श्रम विभाजन, कृषी व्यवसाय या सर्व बाबीवर आधुनिकीकरणाचा साधक बाधक प्रभाव पडलेला दिसतो.

आधुनिकीकरण ही व्यापक तार्कीक मूल्यनिरपेक्ष संकल्पना आहे. नविन हितकारक व स्थायी स्वरुपाचे परिवर्तन याद्वारे स्पष्ट होते. कोणत्याही समाजाच्या आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, कृषीक्षेत्रात अपेक्षित परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया असली तरी सर्वच क्षेत्रामध्ये त्याचा साधक बाधक परिणाम होण्याची शकयता नाकारता येत नाही. भारत हा कृषीप्रधान व खेडयाचा देश आहे. आजही भारतातील बहुसंख्य लोक हे खेडयामध्ये वास्तव्य करतात. २००१ च्या जनगणनेनुसार खेडयात राहणाऱ्या लोकांची संख्या ७२.२% आहे. स्थायी स्वरुपात निवास करण्याचे एकमेव कारण म्हणजे कृषी व कृषीशी संबंधित लघु उद्योग व पारंपारिक जाती निर्धारित व्यवसाय होय. आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही सर्वव्यापक स्वरुपाची असल्याने एकही क्षेत्र त्यापासून अलिप्त राहु शकत नाही. भारतासारख्या कृषी प्रधान देशामध्ये आधुनिकीकरणामुळे उत्पादनात मोठी वाढ, यांत्रिकीकरण, सिंचन सुविधामध्ये सुधारणा, व्यावसायिक शेतीकडे वाटचाल झाली असल्याने प्रारंभीक काळात उत्पादनात मोठया प्रमाणात वाढ झाली असली तरी महागडे नवनवीन बि-बियाणे, खते यांचा अतिवापरामुळे ते सर्व कृषीधारकांना शक्य व परवडणारे नव्हते. यांत्रिक व तांत्रिक साधनामध्ये मोठया प्रमाणात बदल झाला असला तरी जलसिंचनाची साधने व स्त्रोत आजही अपुरी असून जास्तीत जास्त शेती निसर्गावर अवलंबून आहे. नवीन खत बि-बियाणे यांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत व पाण्याची पातळी कमी होत आहे. त्याप्रमाणे उत्पादीत झालेल्या मालाला खर्च जास्त व उत्पादन कमी अशी अवस्था असल्याने त्यामध्ये सरकारचे उदासिन धोरण कृषी व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने निर्माण झालेली आपणास पहावयास मिळतात.

**आधुनिकीकरण:** आधुनिकीकरण ही मानवी जिवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारी प्रक्रिया आहे. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत सामाजिक, आर्थिक, राजकीय, कृषीविषयक सर्वच बदल अपेक्षित असतात. **रॉजर्स्व व स्वनिंग -** आधुनिकीकरण ही अशी प्रक्रिया आहे की, जिव्या आधारे व्यक्ती पारंपारिक जिवन प्रणालीचा त्याग करुन अधिक गुंतागुंतीच्या तांत्रिकदृष्टया प्रगत व गतिमान जिवन प्रणालीचा स्वीकार करीत असते.

**कृषक समाज:** शेती हा प्रधान धंदा असणारा नांगर व इतर अवजारांद्वारे शेती उत्पादन वाढविणारा शेतीला पूरक असे इतरही अनेक व्यवसाय करणारा स्थिर व संघटीत जिवन जगणारा न्यूनतम श्रमविभाजन असणारा स्वयंपूर्ण समाज कृषक समाज होय. **सिम्स :-** खेडे असे नाव आहे कि, जे प्राचीन कृषकाच्या वास्तव्यास दर्शविते.

**संशोधनाची उद्दीष्टे:** १)आधुनिकीकरणाची संकल्पना समजुन घेते. २)आधुनिकीकरणामुळे कृषीमध्ये कोणते आव्हाने निर्माण झाली.

**संशोधनाचे गृहीत कृत्ये:** १)आधुनिकीकरण हे सर्वव्यापी प्रक्रिया आहे. २) आजच्या काळात कृषी आव्हानांना तोंड दयावे लागते.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोध अध्ययनाकरिता दुय्यम स्तोत्रांचा अवलंब करण्यात आला आहे. विषयाशी संबंधित प्रकाशित शोध साहित्ये, मासिके, संकेतस्थळे, वृत्तपत्र इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**कृषी व्यवस्थेसमोरील आव्हाने :**आधुनिकीकरणामुळे कृषी व्यवस्थेमधील अनेक तंत्रज्ञानाचा व नवनवीन बि-बियाणे, रासायनिक खते, फवारणी इत्यादी उत्पादन वाढीकरीता अतिवापराने त्याचा कृषीवर परिणामामुळे कृषी व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. ते पुढीलप्रमाणे पाहता येईल. रासायनिक खते आणि किटकनाशकांच्या अतिवापरामुळे जमिनीचा कस कमी होत असुन ती नापिक होत आहे. सिंचनाच्या आधुनिक पध्दती उपलब्ध असल्या तरी भुगर्भातील पाण्याचा उपसा वाढल्याने पाण्याची पातळी खालावली आहे व निसर्गातील पावसाची अनियमितता असल्याने कुठे जास्त तर कुठे कमी ऋतूमानामध्ये बदल झाला आहे. आधुनिकीकरणामुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे हवामानात अनपेक्षित बदल होत आहे. ज्यामुळे कृषी मधील पिकांचे वेळापत्रक बदलले आहे. नविन तंत्रज्ञान बि-बियाणे आणि यंत्रसामुग्री खरेदी करण्याकरीता शेतकऱ्यांना मोठया भांडवलाची गरज लागते व उत्पादन पाहिजे त्या प्रमाणात होत नसल्याने कर्जाख्या बोजा वाढतच जातो त्यामुळे अनेक आव्हानांना तोंड दयावे लागते. आधुनिकतेच्या नादात जमिनीशी संबंधित पिढयान पिढया चालत आलेले पारंपारिक आणि शाश्वत कृषी ज्ञान मागे पडले आहे. ज्यामुळे उत्पादनखर्चामध्ये भरमसाठ वाढ झाली आहे. यांत्रिकीकरणामुळे आणि शहराकडे जाणाऱ्या ओघामुळे शेती कामासाठी लागणारे मजूर व त्याची भरमसाठ असलेली मजूरी व कृषीमधून निघणारे उत्पादन यामध्ये आपणाला तफावत जाणवते.

**सारांश:** आधुनिकीकरण सार्वत्रिक संकल्पना असल्याने त्यामधून एकही क्षेत्र अलिप्त राहू शकले नाही. त्याचा परिणाम कृषी व्यवस्थेवर सुध्दा मोठया प्रमाणात झाला. नवनविन तंत्रज्ञान व बि-बियाणे, रासायनिक खते वापराने उत्पादनात वाढ झाली असली तरी कालांतराने जमिनीचा पोत, हवामानात बदल, पाण्याची टंचाई, मजूरांची कमतरता व आजही जास्तीत जास्त कृषी निसर्गावर अवलंबून आहे. आधुनिकीकरणामुळे औद्योगिक क्षेत्राजवळीत कृषीमध्ये प्लॉटस पाडून वस्त्या निर्माण होतांना दिसून येतात. त्यामुळे कृषीचे असलेले क्षेत्र कमी होतांना दिसत आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. डॉ. आगलावे प्रदिप, भारतीय समाज संरचना आणि समस्या, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
2. प्रा. डोईफोडे ज्योती, समाजशास्त्राची रुपरेषा, शशिकांत पिंपळापूरे पब्लिशर्स औरंगाबाद.
3. डॉ. कविमंडल विजय, कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर
4. करोडे बी.एम. समाजशास्त्रीय संशोधन पिंपळापूरे प्रकाशन अॅन्ड पब्लीशर्स, नागपूर.
5. https:vishwakosh.marathi.gov.in/21527/krush.vibhag.buogspot.com

# भारतातील ग्रामीण कृषी व्यवस्था आणि सुशिक्षित बेरोजगारांची सद्यस्थिती: एक समाजशास्त्रीय अध्ययन

**दिलीप दामु कुमरे** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, सीतबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.

**सारांश:** भारतीय समाजरचनेत ग्रामीण कृषी व्यवस्था ही अर्थव्यवस्थेचा कणा मानली जाते. तथापि, आधूनिक शिक्षणप्रणाली, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि नोकरी केंद्रीत अपेक्षा यामुळे सुशिक्षित तरुण वर्गाचा कृषीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चाललेला दिसतो. प्रस्तुत शोध निबंधात ग्रामीण कृषी व्यवस्थेकडे सुशिक्षित बेरोजगारांचा बघण्याचा दृष्टिकोन, त्यामागील सामाजिक-आर्थिक कारणे, मानसिकता व भविष्यातील शक्यता यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**प्रस्तावना:** भारत हा कृषीप्रधान देश असून आजही सुमारे 60 टक्क्याहून अधिक लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. मात्र शिक्षणाचा विस्तार होत असताना शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदल चाललेला आहे. विशेषतः सुशिक्षित बेरोजगार तरुणांमध्ये शेतीविषयी उदासीनता, अनास्था किंवा नकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाल्याचे दिसून येते. हा बदल केवळ आर्थिक नसून सामाजिक प्रतिष्ठा, सुरक्षितता व भविष्यातील स्थैर्याशी संबंधित आहे.

भारतीय समाजव्यवस्थेचा ऐतिहासिक पाया ग्रामीण जीवनपध्दती व कृषी व्यवस्थेवर आधारित आहे. भारताची अर्थव्यवस्था कृषीप्रधान म्हणून ओळखली जात असली, तरी स्वातंत्र्योत्तर काळात घडून आलेल्या औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणविस्तार व जागतिकीकरणाच्या प्रक्रियांनी ग्रामीण समाजरचनेत मूलभूत परितर्वन घडवून आणले आहे. या परिवर्तनाचा सर्वाधिक परिणाम ग्रामीण तरुणांवर, विशेषतः सुशिक्षित बेरोजगारांवर झालेला दिसून येतो. शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे साधन मानले जात असले तरी शिक्षण आणि रोजगार यातील विसंगतीमुळे ग्रामीण भागात सुशिक्षित बेरोजगारी ही समस्या तीव्र स्वरुपात उद्भवली आहे. शिक्षणामुळे ग्रामीण तरुणांच्या अपेक्षा बदलल्या, मात्र त्या अपेक्षा पूर्ण करण्याइतक्या रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या नाहीत. परिणामी ग्रामीण कृषी व्यवस्थेकडे पाहण्याचा तरुणांचा दृष्टिकोन नकारात्मक बनत गेला. ही बदलती मानसिकता केवळ वैयक्तिक नसून सामाजिक, आर्थिक व संरचनात्मक घटकांशी निगडीत आहे.

**मुख्य संकल्पना:** ग्रामीण कृषी व्यवस्था, सुशिक्षित बेरोजगार, कृषी विषयक दृष्टिकोन

**संशोधनाची पार्श्वभूमी :** पारंपारिक भारतीय ग्रामीण समाजात शेती ही केवळ उपजीवीकेचे साधन नसून सामाजिक संबंध, संस्कृती व मूल्यव्यवस्थेचा केंद्रबिंदू होती. संयुक्त कुटूंब पध्दती, श्रम विभाजन, परंपरागत कृषी तंत्रज्ञान व नैसर्गिक संसाधनांवर आधारित उत्पादन व्यवस्था हे ग्रामीण कृषी व्यवस्थेचे प्रमूख घटक होते. हरितक्रांतीनंतर कृषी उत्पादनात वाढ झाली असली, तरी कृषी क्षेत्रातील

संरचनात्मक विषमता, लघू व अल्पभूधारणा, कर्जबाजारीपणा, बाजारातील अस्थिरता आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेती अधिक जोखमीची बनली. त्याचकाळात शिक्षणाचा विस्तार झाल्याने ग्रामीण तरुणांचा कल शहरी, पांढरपेशा नोकÚयांकडे वाढला. या प्रक्रियेमुळे कृषी क्षेत्र व सुशिक्षित तरुण यांच्यात दुरावा निर्माण झाला.

**संशोधनाचे महत्व:** सदर संशोधन पुढील कारणांमुळे महत्वाचे ठरते. ग्रामीण भागातील वाढती सुशिक्षित बेरोजगारी समजून घेणे. कृषी क्षेत्रापासून तरुणांचा वाढता दुरावा विश्लेषित करणे. कृषी विकासात मानवी संसाधनांच्या अभावाचे परिणाम समजून घेणे. ग्रामीण-शहरी स्थलांतराच्या सामाजिक परिणामाचा अभ्यास करणे. कृषी धोरणे व शिक्षणप्रणाली यांचा तरुणांच्या दृष्टिकोनावर होणारा परिणाम शोधणे.

**संशोधनाची उद्दीष्टे:** १. ग्रामीण कृषी व्यवस्थेकडे सुशिक्षित बेरोजगारांचा बघण्याचा दृष्टिकोन अभ्यासणे. 2. त्या दृष्टिकोनामागील सामाजिक, आर्थिक व मानसिक घटकांचा शोध घेणे. 3. कृषी क्षेत्रातील रोजगार व उद्योजकतेच्या संधीबाबत तरुणांची जाणीव तपासणे. 4. कृषी व्यवस्थेतील संरचनात्मक अडचणींचे विश्लेषण करणे 5. कृषी विकासात सुशिक्षित तरुणांचा सहभाग वाढविण्याच्या शक्यता अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके:** सुशिक्षित बेरोजगारांचा कृषी व्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन प्रामुख्याने नकारात्मक आहे. आर्थिक अस्थिरता व सामजिक प्रतिष्ठेचा अभाव हे या दृष्टिकोनामागील प्रमूख घटक आहेत. कृषी शिक्षण व कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या अभावामुळे तरुण शेतीपासून दूर जात आहेत. योग्य धोरणात्मक हस्तक्षेप झाल्यास कृषी क्षेत्राकडे तरुणांचा दृष्टिकोन सकारात्मक होऊ शकतो.

**ग्रामीण कृषी व्यवस्थेचे स्वरुप:** ग्रामीण कृषी व्यवस्था ही पारंपरिक ज्ञान, कुटूंबाधारित श्रम, नैसर्गिक संसाधने आणि स्थानिक बाजारव्यवस्थेवर आधारित आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मर्यादित प्रमाणत होत असून उत्पन्नातील अनिश्चितता ही या व्यवस्थेची प्रमूख समस्या आहे.

**ग्रामीण कृषी व्यवस्थेचे संरचनात्मक स्वरुप:** भारतीय ग्रामीण कृषी व्यवस्था मुख्यतः अल्पभूधारणा, पावसावर अवलंबित्व व कुटूंब केंद्रित श्रमांवर आधारित आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा असमतोल वापर, सिंचन सुविधांचा अभाव आणि बाजारव्यवस्थेतील दलालशाही यामुळे शेतीतील उत्पन्न अस्थिर राहते. यामुळे कृषी व्यवसायात जोखीम वाढते, तो तरुणांसाठी आकर्षक राहत नाही.

**सुशिक्षित बेरोजगारांची सामाजिक व मानसिक अवस्था:** सुशिक्षित बेरोजगार तरुण सामाजिक दबाव, आत्मगौरवाचा —हास, नैराश्य व असुरक्षिततेला सामोरे जातात. शिक्षणानंतरही रोजगार न मिळाल्याने शेतीकडे वळणे हे अनेकांना सामाजिक अपयशासारखे वाटते. ग्रामीण समाजात पांढरपेशा नोकरीला दिलेले प्राधान्य या मानसिकतेला अधिक बळ देते.

**कृषी व्यवस्थेकडे नकारात्मक दृष्टिकोनामागील कारणे: आर्थिक कारणे** - उत्पन्नातील अनिश्चितता, उत्पादन खर्चातील वाढ, कर्जबाजारीपणा, बाजारातील अस्थिरता. **सामाजिक कारणे** - शेती व्यवसायाला कमी सामाजिक प्रतिष्ठा, शहरी जीवनशैलीचे आकर्षण, स्थलांतराची प्रवृत्ती. **शैक्षणिक कारणे** - कृषी शिक्षणाचा अभाव, रोजगार केंद्रीत शिक्षणप्रणाली, कौशल्य प्रशिक्षणाची कमतरता. **मानसिक कारणे** - जोखीम स्वीकारण्याची भीती, अपयशाची भिती, भविष्यातील अस्थैर्य.

**सरकारी धोरणे व कृषी क्षेत्र:** भारत सरकारने विविध कृषी योजना सुरु केल्या असल्या तरी त्यांची अंमलबजावणी मर्यादित राहिली आहे. सुशिक्षित तरुणांपर्यंत योजनांची प्रभावी माहिती न पोहोचल्यामुळे कृषी क्षेत्राबाबतचा नकारात्मक दृष्टिकोन कायम आहे.

**बदलता दृष्टिकोन: नव्या शक्यता :** अलीकडच्या काळात काही सुशिक्षित तरुण कृषीकडे उद्योजकतेच्या दृष्टीने पाहू लागले आहेत. सेंद्रीय शेती, कृषी स्टार्टअप्स, कृषी प्रक्रिया उद्योग आणि अॅग्री-टेक या क्षेत्रांतून कृषी व्यवस्थेला नवे परिमाण मिळत आहे.

**समाजशास्त्रीय विश्लेषण:** मार्क्सवादी दृष्टिकोनानुसार कृषी क्षेत्रातील आर्थिक शोषण व बाजारव्यवस्थेतील विषमता ही तरुणांच्या दुराव्याची प्रमुख कारणे आहेत. कार्यात्मक दृष्टिकोनातून पाहता कृषी व्यवस्था, शिक्षणप्रणाली व रोजगार व्यवस्था यांच्यातील समन्वयाचा अभाव ही मुख्य समस्या आहे.

**निष्कर्ष:** ग्रामीण कृषी व्यवस्थेकडे सुशिक्षित बेरोजगारांचा बघण्याचा दृष्टिकोन सध्या प्रामुख्याने नकारात्मक असला तरी तो अपरिवर्तनीय नाही. योग्य धोरणे, आर्थिक सुरक्षितता, सामाजिक मान्यता व आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहायाने कृषी क्षेत्र तरुणांसाठी आकर्षक बनवता येऊ शकते. कृषी क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी सुशिक्षित तरुणांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. त्यासाठी कृषी शिक्षणाचे आधुनिकीकरण, ग्रामीण तरुणांसाठी कृषी उद्योजकता प्रशिक्षण, कृषी क्षेत्रासाठी आर्थिक संरक्षण योजना, शेती व्यवसायाला सामाजिक प्रतिष्ठा आणि कृषी संशोधनाला प्रोत्साहन दिल्यास कृषी क्षेत्रात तरुणांचा सहभाग वाढविणे सहज शक्य आहे.

**संदर्भसूची**


१. क—हाडे, बी.एम. (२००५) ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, पिंपळापुरे अॅण्ड कंपनी पब्लिशअर्स, नागपूर. पृ.क्र.२१५, २३६.
२. कानेटकर, मेधा, रुईकर, वैशाली (२०१५) सहकार आणि ग्रामीण विकास, साईनाथ प्रकाशन नागपूर, पृ.क्र.३३, १५८.
३. टाले, रविंद्र (२००९) डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषीविषयक आर्थिक विचार, नभ प्रकाशन अमरावती पृ.क्र.१६३.
४. लोटे, रा.ज.(२००५) ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, पिंपळापुरे अॅण्ड कंपनी पब्लिशअर्स, नागपूर. पृ.क्र.१२०, १४९.
५. युनूस, महंमद (अनुवाद- गोडबोले, गोविंद) (२००९) बचत गटांच्या माध्यमातून गरीबीमुक्त विश्वाची निर्मिती; साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ.क्र.५९.
६. गांगणे, वर्षा (२०१५) आदिवासी स्त्रीयांच्या आर्थिक व सामाजिक समस्या, ऋचा प्रकाशन, नागपूर पृ.क्र.१९०
७. देशमुख, वाय (२०१८) ग्रामीण समाजशास्त्र, पुणे.
८. जाधव, एस.(२०२०) कृषी विकास आणि तरुण, औरंगाबाद.
९. भारत सरकार - कृषी मंत्रालय अहवाल - २०२३.

# आधुनिकीकरणाचा ग्रामीण कृषी विकासावर झालेला परिणाम

**भागवत मंचक मोरे** संशोधक विद्यार्थी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
**डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण** समाजशास्त्र विभागप्रमुख, शारदा महाविद्यालय, परभणी

**गोषवारा:** ग्रामीण कृषी क्षेत्रातील आधुनिकीकरण हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे महत्वाचे पाऊल मानले जाते. पारंपारिक शेती पध्दतीवर अवलंबून असलेले ग्रामीण जीवन आज विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रभावाखाली झपाट्याने बदलत आहे. सुधारित बियाणे, यांत्रिकीकरण, रासायनिक खते, किटकनाशक, आधुनिक सिंचन पध्दती, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान यांच्या वापरामुळे कृषी उत्पादन क्षमता, उत्पन्न आणि कार्यक्षमता वाढल्याचे आढळून आले. तसेच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी पालन, मधमाशी पालन, फळ व फुलशेती व कृषीप्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून शेतीपूरक व्यवसायांना चालना मिळाली आहे.
**मुख्य शब्द:** आधुनिकीकरण, कृषी तंत्रज्ञान, ग्राम विकास

**प्रस्तावना:** भारतातील शेतीचा इतिहास हा हजारो वर्षाच्या अनुभवाचा, नाविन्यपूर्णतेचा आणि सामाजिक, आर्थिक बदलांचा साक्षीदार आहे. प्राचीन काळातील परंपरेपासून ते आधुनिक तंत्रज्ञांनापर्यंत शेती हा भारतीय संस्कृतीचा आणि अर्थव्यवस्थेचा कणा राहिला आहे. प्रत्येक देशाचा विकास हा त्या देशातील ग्रामीण जनतेच्या, ग्रामीण भागाच्या विकासावर अवलंबून असतो. भारत हा कृषी प्रधान देश आहे. आजही भारतातील जवळपास 65% लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या कृषी क्षेत्राशी निगडीत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत म्हणजेच राष्ट्रीय उत्पादनात कृषी क्षेत्राचा 17%. ते 18%. हिस्सा आहे. शेती हा नेहमीच भारतीय संस्कृतीचा आधारस्तंभ राहिला आहे, जी अन्न, आर्थिक स्थैर्य आणि ग्रामीण रोजगार उपलब्ध करून देते. परंतु वाढत्या जागतिक लोकसंख्येमुळे शेतीवर उत्पादकता, शाश्वतता आणि कार्यक्षमता याबाबतचे दडपण वाढले आहे. आधुनिक शेती, तंत्रज्ञानातील प्रगती, वैज्ञानिक संशोधन आणि नवीन पध्दती याव्दारे विकसित होत आहे जे या आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करित आहे.

**आधुनिकीकरणाची संकल्पना:** आधुनिकीकरण म्हणजे पारंपारिक पद्धतीऐवजी आधुनिक तंत्रज्ञान, नवीन विचारसरणी, वैज्ञानिक पध्दती आणि यांत्रिक साधनांचा वापर करणे. कृषी क्षेत्रात यामध्ये सुधारित बियाणे, रासायनिक व सेंद्रिय खते, कीटकनाशके, सिंचन प्रकल्प, यांत्रिक अवजारे, माहिती-तंत्रज्ञान व डिजिटल सेवा यांचा समावेश होतो,

**संशोधनाचे उद्देश :** आधुनिकीकरणामुळे कृषी उत्पादन आणि उत्पन्नावरती झालेल्या परिणामांचा शोध घेणे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या स्वीकारामुळे ग्रामीण, सामाजिक, आर्थिक स्थितीत झालेल्या बदलांचा शोध घेणे

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत शोध निबंध हा प्रामुख्याने व्दितिय साधन सामुग्रीचा वापर करण्यात आलेला असून यामध्ये अभ्यासासंबंधित साप्ताहिके, मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेटवरील अद्ययावत माहिती व शासकीय योजना इत्यादींचा समावेश करून वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**ग्रामीण कृषी क्षेत्रातील आधुनिकीकरणाचे स्वरूप:** प्राचीन काळात पारंपारिक शेती पद्धती अस्तित्वात होती. पारंपारिक शेती ही स्थानिक ज्ञान, अनुभव आणि निसर्गावर आधारित होती. बैल जोडी, नांगर यासारखी साधी अवजारे, पावसावर अवलंबून सिंचन व्यवस्था, स्थानिक बियाणांचा वापर, कमी उत्पन्न ही पारंपारिक शेतीची वैशिष्ट्ये होती. वाढत्या लोकसंख्यामुळे शेतीवर उत्पादकता, शाश्वतता आणि कार्यक्षमता याबाबतचे दडपण वाढले आहे. पारंपारिक शेती पध्दतीवर अवलंबून असलेले ग्रामीण जीवन आज विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रभावाखाली झपाट्याने बदलत आहे. सुधारित बियाणे, रासायनिक व सेंद्रिय खते, आधुनिक कृषी अवजारे, सिंचनाच्या नव्या पध्दती, माहिती तंत्रज्ञान व यांत्रिकीकरण यामुळे शेती अधिक उत्पादनक्षम, खर्च किफायतशीर आणि बाजाराभिमुख होत आहे.

इ.स. 1960 च्या दशकात भारतात हरितक्रांती झाली. याच कालखंडात जास्त उत्पन्न देणारे बी-बियाणे यांचा विकास, सिंचनाच्या पध्दतीचा विस्तार, व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण, संकरित बियाणाचे कृत्रिम खतांचे व कीटकनाशकांचे वितरण इत्यादी भागावर भर देण्यात आला. भारतीय कृषी क्षेत्रात यांत्रिकीकरणाची सुरुवात हरितक्रांतीनंतर वेगाने झाली. ट्रॅक्टरसारख्या साधनांचा प्रवेश सुरु झाला. ज्यामुळे मानवी आणि प्राण्यांच्या श्रमाची जागा यंत्रानी घ्यायला सुरुवात केली. शेतीची कामे जलद आणि कार्यक्षमतेने करण्यासाठी ट्रॅक्टर आणि इतर अवजारे शेतक-यांपर्यंत पोहोचली, त्यामध्ये आज हार्वेस्टर, ड्रोन या आधुनिक यंत्राचा समावेश झाला. आधुनिकीकरणामुळे ग्रामिण कृषी विकासात उत्पादकता, उत्पन्न आणि कार्यक्षमता वाढते. आधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती अधिक स्मार्ट होते. सिंचन व्यवस्थेत सुधारणा करून आज ठिबक, तुषार सिंचन, सौर कृषी पंप यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. शेतीमध्ये GPS, सेन्सर, ड्रोन वापरून जमीनीच्या गरजेनुसार पाणी, खत, औषध अचूक प्रमाणात दिले जाते. ज्यामुळे पिकांच्या मुळांना योग्य ओलावा मिळतों व पाण्याची बचत होते. आज शेतीच्या बाबतीत आधुनिकीकरणाचा वेग प्रचंड वाढला आहे. मोबाईल इंटरनेट, कृषी ॲप्सच्या माध्यमातून शेतक-यांना शेतीच्या संदर्भात योग्य वेळी माहिती उपलब्ध होत आहे.

**आधुनिकीकरणामुळे ग्रामीण कृषी विकासावर झालेला परिणाम:** ग्रामीण कृषी क्षेत्रातील आधुनिकीकरण हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे महत्वाचे पाऊल मानले जाते. पारंपारिक शेती पध्दतीवर अवलंबून असलेले ग्रामीण जीवन आज विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रभावाखाली झपाट्याने बदलत आहे. सुधारित बियाणे, रासायनिक व सेंद्रिय खते, आधुनिक कृषी अवजारे, सिंचनाच्या नव्या पध्दती, माहिती तंत्रज्ञान व यांत्रिकीकरण यामुळे शेती अधिक उत्पादनक्षम, खर्च किफायतशीर आणि बाजाराभिमुख होत आहे.

आधुनिकीकरणामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, उत्पन्नातील अनिश्चितता कमी करणे आणि ग्रामीण भागातील जीवनमान उंचावणे हे उद्दिष्टे साध्य होत आहे. तसेच कृषी प्रक्रिया उद्योग, साठवणूक, वाहतूक व विपणन यामध्येही आधुनिकतेचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे ग्रामीण कृषी क्षेत्रातील आधुनिकीकरण हे केवळ शेतीपुरते मर्यादित न राहता संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे फळबाग यामध्ये आंबा, डाळींब, द्राक्षे, संत्री, केळी, ड्रॅगन फ्रूट व फुलशेती ही केवळ उपजीविकेची साधन न राहता उच्च उत्पन्न देणारी उद्योगात्मक शेती बनत आहे. त्याचबरोबर कमी क्षेत्रात रेशीम शेती कमी भांडवलामध्ये चांगला नफा देणारी आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी पालन, मधमाशी पालन हे कृषी पुरक व्यवसाय ग्रामिण विकासाचे मजबूत साधन बनले आहेत. महिला बचत गट हे ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि कृषी विकासाचे प्रभावी साधन ठरले आहे. महिला बचतगटामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्व आणि महिलांचे सक्षमीकरण झाले आहे.

**निष्कर्ष:** आधुनिकीकरण प्रक्रियेचा ग्रामीण कृषी विकासावर संरचनात्मक व व्यापक प्रभाव पडलेला आहे. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर, कृषी यांत्रिकीकरण, रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा शास्त्रीय वापर, सुधारित सिंचन व्यवस्था तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे कृषी उत्पादनक्षमता, कार्यक्षमता व आर्थिक उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. परिणामी ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळून शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल घडून आला आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१. आगलावे प्रदीप (2016) सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
२. कविमंडल विजय (2012) कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर
३. जैन प्रकाश चन्द्र (2021) ग्रामीण समाजशास्त्रः भारतीय परिप्रेक्ष्य, रावत पब्लिकेशन्स, जयपुर
४. पगार अमोल अरुण (2025) कृषी अर्थशास्त्र, प्रभाकर पब्लिकेशन, लातूर
५. बास्टेवाड तुळशीदास (2024) आधुनिक कृषी अवजारे व यंत्रे, सकाळ प्रकाशन, पुणे
६. लोकराज्य योजना मासिक, महाराष्ट्र राज्य, जून 2021
७. लोकराज्य योजना मासिक, महाराष्ट्र राज्य, एप्रिल-में 2023
८. www.wikipedia.org


# आधुनिकीकरणाचा ग्रामीण कृषी विकासावर झालेला परिणाम

**सविता भगवान बडे** संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, छ.संभाजीनगर

**गोषवारा:** भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून कृषी क्षेत्राकडे पाहिले जाते. पारंपरिक शेती पद्धतींमधून आधुनिक शेतीकडे होणारा प्रवास म्हणजेच कृषी आधुनिकीकरण होय. प्रत्येक देशाचा विकास हा त्या देशातील ग्रामीण जनतेच्या, ग्रामीण भागाच्या विकासावरच अवलंबून असतो. त्यातल्या त्यात भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला तुलनेने जरा जास्तच महत्त्व असल्याचे दिसून येते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे ग्रामीण विकासाला गती तर आलीच आहे, त्याचबरोबर ग्रामीण, दुर्गम भागातील जनतेचे जीवनमानही उंचावले असे म्हटले जाते. सदर तंत्रज्ञानाचा ग्रामीण समाज जीवनावर नेमका काय परिणाम झाला आहे व ग्राम विकासासाठी कृषी तंत्रज्ञानाची कशी मदत झाली आहे याचा सखोल अभ्यास संदर संशोधन निबंधात करण्यात आला आहे. यांत्रिकीकरण, जैवतंत्रज्ञान, माहिती-तंत्रज्ञान, डिजिटल बाजारव्यवस्था, सूक्ष्म सिंचन व्यवस्था, सुधारित बियाणे व खतांचा वापर यामुळे ग्रामीण कृषी उत्पादन, उत्पन्न, रोजगार व जीवनमानात लक्षणीय बदल झाले आहेत. प्रस्तुत संशोधन लेखात कृषी आधुनिकीकरणाची संकल्पना, ग्रामीण कृषी विकासावर झालेले सकारात्मक व नकारात्मक परिणाम, सामाजिक-आर्थिक व पर्यावरणीय परिणाम, तसेच वर्तमान व भविष्यातील आव्हाने यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. शेवटी शाश्वत ग्रामीण कृषी विकासासाठी धोरणात्मक सूचना मांडण्यात आल्या आहेत.

**प्रस्तावना:** भारत हा कृषीप्रधान देश असून आजही सुमारे 60% लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. बहुतांशी शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. कधी अतिवृष्टी तर अनावृष्टीमुळे शेतीचे नुकसान होते, तर कधी चांगला पाऊस झाला आणि पीक चांगले आले तर कीड, रोग इत्यादींमुळे शेतकऱ्यांचे पीक वाया जाते. यासारख्या नैसर्गिक कारणांमुळे तसेच जमिनीच्या होत चाललेल्या विभाजनामुळे कृषीक्षेत्राखालील क्षेत्र घटत चालले आहे. या सर्व परिस्थितीमुळे कृषी उत्पादनात घट होत आहे. कृषी क्षेत्रातील उत्पादन तसेच उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसामुग्रीचा तसेच पाण्याचा योग्य वापर करून उत्पादन वाढविणे गरजेचे आहे. स्पर्धेच्या युगात कृषी क्षेत्रातही प्रगत तंत्रज्ञानाचा वापर होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट आणि मजबूत होण्यास मदत होईल. कृषी विद्यापीठे, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, राज्यशासनाचा कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व गत्स्य व शासनाचे विविध विभाग, अशासकीय संस्था, कृषी व संलग्न क्षेत्रातील उत्पादक, विक्रेते, वितरक, कृषी मालाचे निर्यातदार व आयातदार, लघुउद्योजक, प्रक्रिया उद्योजक, शेतकरी, स्वयंसहायता गट यांच्या समन्वयाने कृषी क्षेत्राचा विकास होत असतो. जागतिकीकरणानंतरच्या गेल्या १५ वर्षांत कृषी क्षेत्र वगळता जीवनातील सर्वच क्षेत्रांत तंत्रज्ञानाने प्रचंड मुसंडी मारली आहे. सेवा क्षेत्र, बांधकाम व्यवसाय, वाहतूक, वैद्यकीय व्यवसाय,

सरकारी कार्यालये आदींसह अनेक क्षेत्रांत हा बदल दिसू लागला. शेतकऱ्यांच्याही हाती मोबाईल आले, सधन असतील तर घरीच संगणक व इंटरनेटही विजेच्या वेळापत्रकानुसार हळूहळू चालू लागले; पण शेतीतील तांत्रिक प्रगतीचे काय झाले ? नेमक्या याच काळात भारतातील कृषी संशोधनाच्या प्रगतीचा वेग मंदावला, की हे संशोधन आणि प्रगत तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेनासे झाले ? भारतीय शेतीच्याप्रगतीचा वेग मंद आहे, याचे कारण शेतकरी पारंपरिक पद्धतीला प्राधान्य देतो, असे म्हणण्यात अर्थ नाही. भारतात नांगरणीसाठी बैल-नांगराचा फाळ यांचा वापर पिढ्यान्पिढ्या होत असताना ट्रॅक्टर आला, ट्रॅक्टरचा नांगर आला आणि गेल्या ५० वर्षांत ट्रॅक्टरच्या साध्या नांगरापासून पलटीचा नांगर, एवढाच बदल झाला. त्यानंतर रोटोरोव्हर फाळ आले आणि पुढे प्रगती बंद. जे तंत्रज्ञान लोकाभिमुख असते, सर्वांना वापरावयास सोपे जाते, तेच भारतीय वा महाराष्ट्रीय शेतकरी अधिक पसंत करणार, हे उघड आहे. ग्रामीण भागातील शेती परंपरागत अवजारे, नैसर्गिक पावसावर अवलंबून सिंचन आणि कौटुंबिक श्रमांवर आधारित होती. परंतु लोकसंख्या वाढ, अन्नसुरक्षेची गरज, जागतिकीकरण, बाजारव्यवस्थेतील स्पर्धा आणि तांत्रिक प्रगती यामुळे शेतीत आधुनिकीकरण अपरिहार्य ठरले आहे.

हरित क्रांतीनंतर कृषी यांत्रिकीकरण, रासायनिक खते, सुधारित बियाणे, कीटकनाशके, कृषी संशोधन संस्था आणि विस्तार सेवा यांचा प्रभाव ग्रामीण शेतीवर वाढत गेला. आधुनिक काळात डिजिटल शेती, अचूक शेती, हवामान आधारित सल्ला, कृषी-स्टार्टअप्स आणि ई-नाम यांसारख्या उपक्रमांनी ग्रामीण कृषी विकासाला नवे आयाम प्राप्त झाले आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे** १. आधुनिकीकरणाचा ग्रामीण कृषी उत्पादनावर झालेला परिणाम अभ्यासणे. २. ग्रामीण समाजाच्या सामाजिक-आर्थिक जीवनावर होणारे परिणाम विश्लेषित करणे.

**गृहितके** १. कृषी आधुनिकीकरणामुळे ग्रामीण कृषी उत्पादन व उत्पादकता वाढली आहे. २. आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न व जीवनमान सुधारले आहे. ३. आधुनिकीकरणामुळे ग्रामीण कृषीत सामाजिक-आर्थिक विषमता वाढण्याची शक्यता आहे.

**आधुनिकीकरणाची संकल्पना:** आधुनिकीकरण म्हणजे पारंपरिक पद्धतींच्या जागी वैज्ञानिक, तांत्रिक व नवोन्मेषी पद्धतींचा स्वीकार होय. कृषी क्षेत्रात आधुनिकीकरणाचा अर्थ पुढील घटकांशी संबंधित आहे — यांत्रिकीकरण, जैवतंत्रज्ञान व सुधारित बियाणे, रासायनिक व सेंद्रिय खतांचा वैज्ञानिक वापर, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT)

**बाजाराभिमुख शेती**

**आधुनिकीकरण व ग्रामीण शेती**

**कृषी क्षेत्रात यांत्रिकीकरण:** शेतीतील कामे वेळेवर, कमी कष्टात व विनाणे, खते, रसायने इ. निविष्ठांचा नोग्य व कार्यक्षम वापर करण्याच्या उद्देशाने अवजारे व मंत्राचा वापर म्हणजेच कृषी यांत्रिकीकरणं होय. नामुळे उत्पादन खर्चात १० ते ४० टक्के बचत होते. तर वेळच्या वेळी कामे झाल्यामुळे उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ होते. ट्रॅक्टर, पावर टिलर, हार्वेस्टर, ड्रिप-स्प्रिंकलर मंत्रणांमुळे लागवड, कापणीव सिंचन सुलभ झाले. वेळ, श्रम व खर्च वाचून उत्पादनात वाढ झाली. मात्र लहान शेतकऱ्यांना आर्थिक गुंतवणुकीचा कचाट्यात सापडल्याचे दिसून येत आहे.

**सुधारित बियाणे व तंत्रज्ञान :** उज्जु उत्पादनक्षम (HYV) व रोगप्रतिकारक विनाण्यांमुळे अन्नधान्य उत्पादनात वाढ झाली. कापूस, ऊस, भात, गहू या पिकांमध्ये मोठा बदल दिसून नेतो. सततचे पडणारे दुष्काळ आणि नापिकीच्या पार्श्वभूमीवर एकाधिकार योजना, सार्वजनिक वितरण प्रणाली आणि अत्यावश्यक वस्तु कामासारखे कानदे राजवण्यात आले. एका वान्ला ही परिस्थिती तर दुसरा वाला साठच्या दशकात देशपातळीवर आणि सत्तरच्या दशकात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात हरित क्रांती योजना राबवण्यात आल्या. कृषी विद्यापीठांची स्थापना, आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास विभाण्यांचा विकास आणि बारासायनिक खतांचा वापर कीटकनाशक इत्यादींचा वापर बाढवत कृषी उत्पादन आणि उत्पादकतानात प्रचंड प्रमाणात वाढ झाली.

**डिजिटल व माहिती तंत्रज्ञानाचा वापर :** शेती उत्पादकता वाढविण्यात तंत्रज्ञानाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. उदाहरणार्थ, यांत्रिकीकरणाच्या वापरामुळे अंगमेहनतीची गरज कमी झाली आहे, त्यामुळे कार्यक्षमता आणि उत्पादनात वाढ झाली आहे. सिंचन प्रणालींच्या वापरामुळे उत्पादन वाढण्यास मदत झाली आहे, ज्यामुळे कोरड्या भागात पिके घेणे शक्य झाले आहे. याव्यतिरिक्त, आधुनिक तंत्रज्ञानामुळे कीटक आणि रोगांना प्रतिरोधक असलेल्या उच्च-उत्पादन देणाऱ्या पिकांच्या जाती विकसित करणे शक्य झाले आहे. शेतीमध्ये तंत्रज्ञानाच्या वापराचा अन्न सुरक्षेवरही सकारात्मक परिणाम झाला आहे. उत्पादन वाढल्याने अधिकाधिक लोकांना पौष्टिक आणि परवडणारे अन्न उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. शेतीमधील आधुनिक तंत्रज्ञानामुळे उत्पादन आणि उत्पादकता वाढली आहे. यामुळे शेतकऱ्यांसाठी अन्न सुरक्षा आणि उत्पन्न सुधारले आहे. याव्यतिरिक्त, यामुळे नवीन रोजगार निर्माण करण्यास आणि ग्रामीण समुदायांसाठी जीवनमान सुधारण्यास मदत झाली आहे. मोबाइल ॲप्स, कृषी पोर्टल्स, हवामान अंदाज, ऑनलाइन सल्ला, ई-NAM यांमुळे शेतकऱ्यांना बाजारभाव, हवामान व सरकारी योजनांची माहिती वेळेवर मिळते.

**कीटक व रोग नियंत्रण :** जर्मन-आधारित टेक स्टार्ट-अप पीईएटीने प्लँटिक्स नावाचा एआय-आधारित ॲप विकसित केला आहे ज्यामुळे वनस्पतींमध्ये कीटक आणि रोगांचा समावेश असलेल्या मातीतील पोषक तत्वांची कमतरता ओळखता येते ज्यायोगे शेतकर्‍यांना यांना खताचा वापर करण्याची कल्पना देखील येते ज्यामुळे कापणीची गुणवत्ता सुधारण्यास मदत होते. हे ॲप प्रतिमा ओळख-आधारित तंत्रज्ञान वापरते. शेतकरी स्मार्टफोन वापरुन वनस्पतींच्या छायाचित्र टिपू शकतो. आम्ही या अनुप्रयोगावरील छोट्या व्हिडिओंद्वारे टिपा आणि इतर निराकरणासह माती पुनर्संचयित तंत्रदेखील पाहू शकतो.

**६.४ बाजाराभिमुख शेती व ग्रामीण अर्थव्यवस्था** आधुनिकीकरणामुळे नगदी पिके, करार शेती, प्रक्रिया उद्योग व कृषी-आधारित MSME विकसित झाले. यामुळे ग्रामीण रोजगार निर्मिती झाली आहे.

**सामाजिक-आर्थिक परिणाम**

**सकारात्मक परिणाम** कृषी उत्पादन व उत्पन्नात वाढ, ग्रामीण दारिद्र्य कमी होण्यास मदत होऊ शकते. रोजगाराच्या नवीन संधी तंत्रज्ञानामुळे कृषी क्षेत्रात नवीन रोजगार निर्माण होण्यास मदत होऊ शकते. उदाहरणार्थ, मोबाईल फोन आणि इतर डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांना बाजारपेठांशी जोडण्यासाठी आणि त्यांची उत्पादने थेट ग्राहकांना विकण्यासाठी नवीन संधी उपलब्ध करून देत आहे. याशिवाय, कृषी-पर्यटन सारख्या मूल्यवर्धित सेवांचा विकास ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करत आहे.

**पर्यावरणीय परिणाम** आज महाराष्ट्रातील ६५ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३.०८ लाख चौ.कि.मी. असून, त्यापैकी लागवडीखालील क्षेत्र ४३.४ टक्के म्हणजे १.६७लाख चौ.कि.मी. इतकेच आहे. महाराष्ट्रातील कृषि लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाण देशपातळीवरील सरासरी प्रमाणापेक्षा तुलनेने जास्त असले तरी महाराष्ट्रातील शेती देशपातळीवरील शेतीइतकी उत्पादक नाही. देशपातळीवरील

कृषीची सिंचन क्षमता ३८ टक्के असून, राज्यातील फक्त १६ टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे. राज्यातील सरासरी हेक्टरी उत्पादन हे राष्ट्रीय स्तरापेक्षा कमी आहे. राज्यात १९६१-६२ मध्ये निव्वळ उत्पादन उत्पादनात शेतीचा वाटा ४० टक्के होता, तो आता कमी होत ११ टक्क्यांवर आला आहे. अति रासायनिक खतांचा वापर, भूजलाचा अतिवापर, जमिनीची सुपीकता कमी होणे, जैवविविधतेचा ह्रास या समस्या वाढत आहेत. त्यामुळे सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती आणि शाश्वत कृषी पद्धतींची गरज निर्माण झाली आहे.

**९. निष्कर्ष** : आधुनिकीकरणाने ग्रामीण कृषी विकासाला नवे स्वरूप दिले आहे. उत्पादन, उत्पन्न व ग्रामीण जीवनमानात सकारात्मक बदल झाले असले तरी पर्यावरणीय समस्या व सामाजिक विषमता यासारखी आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळे शाश्वत, सर्वसमावेशक व मानवकेंद्रित कृषी आधुनिकीकरण ही काळाची गरज आहे. योग्य धोरणे, प्रशिक्षण, तंत्रज्ञानाचा समतोल वापर आणि शेतकरी हितैषी उपाययोजना केल्यास ग्रामीण कृषी विकास अधिक सक्षम होऊ शकतो.आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतीची उत्पादकता अनेक पटींनी वाढली आहे. खरं तर, हे अशा काही क्षेत्रांपैकी एक आहे जिथे कामगार-बचत करणारी उपकरणे पूर्णपणे वापरली गेली आहेत. आज शेतकरी यंत्रांच्या मदतीने अनेक पुरुष आणि महिलांचे काम करू शकतो. यामुळे केवळ वेळ वाचत नाही तर खर्चही कमी होतो आणि उत्पादनही वाढते. अन्न व खताची अनुदाने घटवून त्यामधून जो निधी वाचेल, तो शेती संशोधन, कृषी विस्तार सेवा, शेतीतील नवे प्रयोग, पाणलोट क्षेत्र विकास यावर मोठ्या प्रमाणात खर्च करणे आवश्यक आहे. मुळात कुक्कुट, मत्स्य, दुग्धजन्य उत्पादने, फळे, भाज्या अशा जास्त लाभ मिळवून देणाऱ्या शेतीकडे अधिक प्रमाणात वळले पाहिजे. तसेच शेती क्षेत्रात लागवडीपासून बाजारापर्यंत अशी एक मूल्य साखळी तयार करण्याची गरज आहे. डिजिटल कॉमर्स, कंत्राटी शेती हे प्रयोग अधिक प्रमाणात राबवायला हवेत. भारतातील शेतकरी आता जागा झाला आहे. त्याला बदलत्या जगाचे भान येऊ लागले आहे. आता वेळ आहे ती या बळीराजाला स्वतःच्या पायावर उभा करण्याची; कारण 'विकसित भारता'च्या प्रवाहात त्याला सहभागी करून घेतल्याशिवाय पुढे जाता येणार नाही.

**शिफारसी** : आधुनिक कृषी तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्रामीण उद्योग धंद्यावर सकारात्मक परिणाम झाले आहेत. तसेच गावात झालेले बदलही सकारात्मक आहेत, त्यामुळे अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शेतकरी व सर्वांनाच प्रोत्साहन दिले पाहिजे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे उत्पादन क्षमतेमध्येही पूर्वीच्या तुलनेत वाढ झाली आहे. त्यामुळे अशा प्रकारे उत्पादन वाढविणाऱ्या तंत्रज्ञान विषयक माहितीचे सर्व दूरं प्रसार करणे आवश्यक आहे. आधुनिक कृषी तंत्रज्ञान वापरताना त्याचा होणारा दुरुपयोग यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. एकीकडे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा शेतकरी जीवनाचा अविभाज्य घटक झाला असला तरी त्याबरोबरच गावातील गावपण तसेच एकी टिकून राहून आर्थिक विषमता दूर करणे गरजेचे राहील.

**संदर्भ :**


1. Kumar, K. (2020). *Impact of modernization on agriculture in India.* International Journal of Rural Studies, 27(1),
2. Reddy, A. A., & Reddy, G. P. (2018). *Agricultural modernization and rural development*. New Delhi: Oxford University Press.
4. Singh, R. (2019). *Sustainable agriculture and modernization.* Journal of Rural Development, 38(2), 201-218.
5. Todaro, M. P., & Smith, S. C. (2015). *Economic development* (12th ed.). Pearson Education.
6. https://www.mahamttb.com/Encyc/2020/8/14


---

# ग्रामीण विकासामध्ये महिलांचे योगदान

**डॉ. आल्टे शशिकांत मुकुंदराव** समाजशास्त्र विभागप्रमुख शरदचंद्र महाविद्यालय, शिरढोण ता. कळंब जि धाराशिव

---

**प्रस्तावना:** १९ व्या शतकाच्या मध्यापासून ग्रामीण समाजासंबंधी व्यवस्थित आणि सूत्रबद्ध पद्धतीने अभ्यास करण्यास प्रारंभ झाला. हा कालखंड भांडवलशाही साम्राज्याचा कालखंड मानला जातो. ग्रामीण समाजरचना आणि अर्थव्यवस्थेवर भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा व्यापक प्रभाव होता. ग्रामीण जीवनावर त्याचे दूरगामी परिणाम झाले होते. २० व्या शतकाची सुरुवात ग्रामीण जिवनाबाबतीत निराशाजनक होती. एकूणच ग्रामीण समाज दैन्य अवस्थेत वास्तव्य करत होता. जीवन अतिशय कष्टमय आणि हालाकीचे होऊन बसले होते. अशा परस्थितीत ग्रामीण समाजाचा मानवतावादी दृष्टीकोनातून विचार करणे गरजेचे होते. अनेक समाजसुधारक, सामाजिक विचारवंत यांचे ग्रामीण जीवनाकडे लक्ष वेधले गेले. माऊरर, मेटलँड, मेटझॉन, मेन, ओलूफसेन, गॅरेक, एल्टेन, इ. विचारवंताने ग्रामीण समाजाचा वेगवेळ्या दृष्टीकोनातून अभ्यास करन्यास सुरुवात केली. ग्रामीण समाजशात्र आणि

ग्रामीण विकास याला चालना देण्याचे महावपूर्ण कार्य सर्वप्रथम कन्ट्री लाइफ कमिशन यांनी केले. अमेरिकन अध्यक्ष थिओडोर रुझवेल्ट यांनी इ. स. १९०७ मध्ये या आयोगाची स्थापना केली. या आयोगाचे डिनबेली हे अध्यक्ष होते.

भारतीय ग्रामीण समाज प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात राजकीय व आर्थिकदृष्ट्या स्वायत्त स्वतंत्र व स्वयंपूर्ण होता. जात, वर्ण, धार्मिक निती, आचार-विचार, कुटुंब, आर्थिक क्रिया, सांस्कृतिक जीवन यातील सातत्य टिकवून होता. या काळात समूह हिताला महत्व दिले जात होते. ब्रिटिश आगमनानंतर ग्रामीण समाजाची दुरावस्था झालेलि दिसून येते. ग्रामीण जीवन पद्धतीला आणि स्वतंत्र. स्वायत्त व स्वयंपूर्ण समाज व्यवस्थेला तडा गेला होता. ब्रिटिशांच्या राजकीय व आर्थिक धोरणामुळे सामाजिक संरचना विस्कळीत झाली होती. व्यक्ती आत्मकेंद्री बनत चालला होता. जाती-धर्माची नियमने शिथिल झाली होती. नवीन ज्ञान ध्येय संकल्पना उदयास येऊ लागल्या होत्या. परंपरागत व्यवसाय नष्ट होऊ लागले. जात पंचायत ग्रामपंचायत तसेच कौटुंबिक जीवन विघटित होऊ लागले होते. या कारणास्तव ग्रामीण समाज अविकसितच राहिला. दारिद्र्य, बेकारी, रोगराई, अस्वच्छता, उपासमार, शिक्षणाचा अभाव, अज्ञान अंधश्रद्धा परंपरा रुढीप्रियता इत्यादी समस्या ग्रामीण समाजात निर्माण झाल्या. औद्योगिक क्रांती आणि ब्रिटिश राजवट या कालखंडात ग्रामीण समाज अधोगतीकडे ओढला गेला होता. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र ग्रामीण जीवन बदलण्यास सुरुवात झाली. भारतातील 80% समाज हा ग्रामीण भागात वास्तव्य करतो. त्यामुळे ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ग्रामीण विकास झाला तरच, खऱ्या अर्थाने देशाचा विकास करणे शक्य आहे. ग्रामीण भाग हा भारतीय समाजाचा आत्मा आहे. त्यामुळे ग्रामीण समाजातील दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता, बेकारी यासारख्या समस्यांचे निराकरण झाल्याशिवाय समाजाचा किंवा देशाचा विकास होणे शक्य नाही. ग्रामीण समाजाचा विकास करण्यासाठी भारत सरकारने 2 ऑक्टोबर 1952 रोजी "समाज विकास योजना" या कार्यक्रमाला सुरुवात केली. समाज विकास योजना ही ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासंदर्भातील योजना आहे. शेती, दळणवळण, गृह उद्योग, शिक्षण, आरोग्य, समुदाय भावना, गृह बांधणी, सहकारी जीवन, आर्थिक विकास, करमणूक, दारिद्र्य निर्मूलन, कर्जमुक्तता करणे, इत्यादी ग्रामीण विकास योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे:** ग्रामीण समुदायाचा अर्थ समजून घेणे. ग्रामीण विकास संकल्पना समजून घेणे. ग्रामीण विकासामध्ये महिलांचे योगदान समजून घेणे.

**संशोधनाची गृहीतके :** ग्रामीण विकासातील दारिद्र्य हा प्रमुख अडथळा आहे. ग्रामीण विकासातील महिलांचे योगदान नगण्य आहे. ग्रामीण विकासापुढे अनेक अडथळे आहेत.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंधाच्या तथ्य संकलनासाठी व्दितीय साधनाचा उपयोग केला आहे. पुस्तके, मासिके, वृत्तपत्र, इंटरनेट इत्यादीचा आधार घेतला आहे.

**विकासामध्ये महिलांचे योगदान:** प्राचीन काळातील स्त्रिया अनेक क्षेत्रात अग्रेसर होत्या. त्या काळातील स्त्रिया शेती विणकाम भरतकाम करत होत्या. सुशिक्षित विद्वान स्त्रिया शिकवण्याचे काम करत होत्या. तसेच विद्वत्ता व वक्तृत्व यामध्ये स्त्रिया पारंगत होत्या. मध्ययुगात अनेक स्त्रिया संस्कृत कवयित्री सुद्धा होत्या. त्या इंद्रलेखा, सुभद्रा, शिवा होत तर, मराठी काव्यात महदंबा, जनाबाई या कवयित्री झाल्या. सृष्टीतील निसर्गचक्र हे सर्वप्रथम स्त्रियांच्या निर्मिती क्षमतेनेच ओळखले जाते. आणि सर्वप्रथम शेतीचा शोध स्त्रियांनीच लावला, हे सिद्ध झाले आहे. स्त्रीच्या या ऐतिहासिक योगदानामुळेच समाजाचे स्थित्यंतर शेती सारख्या प्रगत व सृजक उत्पादन पद्धतीकडे होऊ लागले. याचाच परिणाम म्हणून प्राथमिक टप्प्यातील मानवाचे भटके जीवन स्थिर होण्यास मदत झाली. अपत्यप्राप्ती किंवा मातृत्व या गोष्टी निसर्गानेच स्त्रियांना दिलेल्या आहेत. त्याच पद्धतीने भूमितीचा शोध ही स्त्रियांनीच लावलेला आहे. आदिम समाजात यज्ञाची चौकट बांधणे, विटा रचने, इत्यादी कामे स्त्रियाच करत असत. इतकेच नव्हे तर, रणभूमीच्या वाटपाचे अधिकार देखील स्त्रियाकडेच होते. या सर्व संदर्भावरून स्त्रियांचे योगदान विकासात्मक दृष्टिकोनातून मोलाचे होते हे स्पष्ट होते.

**ग्रामीण विकासातील महिलांचे योगदान:** ग्रामीण विकासामध्ये महिलांचे योगदान महत्वपूर्ण आहे. शेती, कुटुंब, अर्थव्यवस्था यामध्ये महिला महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहेत. महिलांचे बचत गटाद्वारे आर्थिक सक्षमीकरण करणे तसेच सामाजिक बदलामध्ये महत्वपूर्ण योगदान आहे. अन्न उत्पादन, लघुउद्योग, कौशल्य विकास आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचा सक्रिय सहभाग आहे. एकूणच महिलांच्या या सहभागामुळे समाजाचा सर्वांगीण विकास होत आहे.

**कृषी क्षेत्र:** शेती क्षेत्रात महिलांचे योगदान मुख्य स्वरूपाचे आहे. एकूणच अन्न उत्पादन प्रक्रियेत महिला सक्रिय असतात. 60 ते 80 टक्के उत्पादन प्रक्रिया केवळ महिलांच्या योगदानामुळेच शक्य होते. शेतीचे उत्तम व्यवस्थापन करण्यात महिला अग्रेसर आहेत. पुरुष असो किंवा नसो महिला शेती व्यवस्थापन उत्तम पद्धतीने करू शकतात. शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय, कुकुटपालन आणि हस्तकला यासारख्या लघु उद्योगांमध्येही महिलांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

**आर्थिक सक्षमीकरण:** महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी स्वयंसहायता गट सक्षम ठरतात. महिलांना उद्योजक बनवण्यास योग्य ती मदत करतात. लघु उद्योगाच्या माध्यमातून खाद्य प्रक्रिया. शिवणकाम. कुटुंबाला आर्थिक स्थिरता देतात महिला प्रशिक्षण कार्यामुळे नवीन कौशल्य मिळू लागले आहे. परिणाम रोजगाराच्या संधी दिवसेंदिवस वाढत आहेत.

**सामाजिक आणि सामुदायिक विकास:** महिला समाजाच्या तसेच कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी झाल्या आहेत. त्यामुळे विकासाला गती मिळत आहे. आरोग्य शिक्षण अशा मूलभूत गरजांची काळजी महिलावर्ग घेत आहे. अशा महिलांच्या महत्वपूर्ण योगदानामुळे प्रगतीचे चक्र अतिशय गतिमान पद्धतीने फिरण्यास सुरुवात झाली आहे.

**शाश्वत विकासामध्ये उत प्रेरक:** महिला स्थानिक समुदायांमध्ये नाविन्यपूर्ण कार्य करतात. आणि त्याचबरोबर नवीन संधी निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडतात. महिला हवामानाचाही अचूक अंदाज बांधू शकतात. येणाऱ्या अनेक संकटांचा समर्थपणे सामना करण्यास त्या तयार असतात. त्यामुळे महिलांचे हे योगदान शाश्वत उपाय योजना साठी महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे.

**निष्कर्ष:** मानव निर्मितीचा इतिहास पाहिला तर स्त्रियांचे योगदान हे अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. प्राचीन समाजात स्त्री ही मुक्त होती. कृषी संस्कृतीमुळे स्त्रिला आदराचे स्थान होते. खरे पाहता स्त्रिया या समाज रुपी जिवनातील अर्धा वाटा असलेल्या हकदार आहेत. कोणत्याही कालखंडातील सामाजिक विकासाचा व प्रगतीचा विचार करायचा झाला तर त्या कालखंडातील स्त्री जीवनाचा विचार करावाच लागतो. मानवाच्या उत्पत्ती पासूनच सातत्याने वेगवेगळ्या स्वरूपात स्त्रियांचे योगदान महत्वपूर्ण आहे. यात ग्रामीण क्षेत्रातील महिलाही मागे राहिल्या नाहीत. थोडक्यात ग्रामीण महिला केवळ श्रमशक्तीच नाही तर, त्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. आणि विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर उत्प्रेरक म्हणून काम करत आहेत. महिलांच्या योगदानाशिवाय कोणताही समाज, राष्ट्र विकास करू शकत नाही, हे सत्य आपणास नाकारता येत नाही.

**संदर्भसूची:**

1. डॉ.प्रतिभा आहिरे - ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र.
2. डॉ. दिलीप खैरनार - भारतीय ग्रामीण समाजशास्त्र.
3. डॉ. गुरुनाथ नाडगोंडे - भारतीय समाज रचना. .
4. डॉ. नागोराव कुंभार - ग्रामीण विकास.
5. डॉ. वसुधा पुरोहित - कृषी अर्थशास्त्र.

# ग्रामीण भागातील गायरानधारक शेतकऱ्यांचे प्रश्न

**संदीप कारभारी कापडणे** संशोधक, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर.
**डॉ. मधुकर हरी चाटसे** राजश्री शाहू महाविद्यालय वाळूज छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** भारतीय ग्रामीण लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. भारतीय समाजात जातीचा आणि जमिनीचा अत्यंत दृढ संबंध आहेत, ज्या जाती धर्म आणि जाती व्यवस्थेतील उच्च दर्जाच्या आहेत, तिकडे मोठया प्रमाणात जमिनीची मालकी आढळते. जमिनीच्या मालकीबाबत इतिहासात अनेक स्थित्यंतरे आढळतात परंतु जमीनीची मालकी मात्र या ना त्या उच्चजातीयाकडे जाते ती दलित किंवा मागास जाती कडे गेलेली दिसत नाही.समाजामध्ये उच्चनीचतेच्या धारणा आहे त्या धारणा जमिनीची मालकी उच्चवर्णीयाकडे राहण्यास कारणीभूत आहे. कारण दलितांना किंवा अस्पृश्यांना संपत्ती मिळविण्याचा अधिकार जातीव्यवस्थेत नाकारलेला आहे जातीचे स्वतःचे एक अर्थशास्त्र आहे. प्रत्येक जातीला स्वतःचा व्यवसाय आहे उदाहरणार्थ सुतार या जातीमध्ये शेतीला लागणारी अवजारे बनविण्याचे काम होते तर लोहाराकडे लोखंडी वस्तू बनविण्याचे काम होते पूर्वी जातीला तिचा व्यवसाय बदलण्याची संधी उपलब्ध नव्हती. राज्यघटना अस्तित्वात आल्यानंतर जातीच्या व्यवसाय बाबत साधारण राज्यघटनेने बदलल्या हे जरी सत्य असले तरी मागास व्यक्तीला उच्च व्यवसाय उभा करण्यास अनेक अडथळे येतात याची कारणेही जात आहे. सद्यस्थितीत मागास जातींना आधुनिक पद्धतीने जात जखडलेली दिसते उदाहरणार्थ धंद्यासाठी लागणारे भांडवल खालच्या जातीला उभा करता येत नाही कारण त्यांना व्यवसायासाठी वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांचे सहकार्य मिळत नाही.भारतीय संविधानाच्या ३४१ व ३४२ या अनुच्छेदांनुसार मागासलेले म्हणून जे वर्ग राष्ट्रपतींद्वारा जाहीर केले जातात, त्यांपैकी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती ह्या संख्येच्या व त्यांच्या समस्यांच्या व्यापकतेच्या दृष्टीने अधिक महत्त्वाच्या गणल्या जातात. या व्यतिरिक्त इतर कोणते वर्ग मागासलेले म्हणून स्वीकारावेत, याचा निर्णय राज्य सरकारवरसोपविला आहे; याशिवाय महाराष्ट्र शासनाने आणखी दोन वर्गांना मागासलेले म्हणून मान्यता दिलेली आहे. यांत विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि नवदीक्षित बौद्ध व आर्थिक दृष्ट्या मागासलेले यांचा समावेश होतो. अनुसूचित जाती ही संज्ञा प्रथम सायमन कमिशनने वापरली व तीच पुढे १९३५च्या कायद्यात अंतर्भूत करण्यात आली. सामान्यतः अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींचा समावेश अनुसूचित जातीत होतो. १९३५च्या कायद्याच्या परिशिष्टात अशा अनुसूचित जातींची पहिली अधिकृत यादी प्रकाशित करण्यात आली. अनुसूचित जातींची संख्या १९६१ सालच्या जनगणनेप्रमाणे अंदाजे १,००० असून त्यांची लोकसंख्या ६,४५,११,३१३ आहे. म्हणजेच भारताच्या एकूण लोकसंख्येच्या १४-६४ टक्के आहे. महाराष्ट्रातील अनुसूचित जातींची संख्या सु. ७७ असून त्यांची एकूण लोकसंख्या ६०,७२,५३६ आहे. त्यांपैकी चांभार, महार, मांग व तत्सम जातींची एकूण लोकसंख्या १६ लाखांच्या वर आहे. ही महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या १८ टक्के आहे.

**मुख्य शब्द:** गायरान जमीन सरकारी योजना, शेती उत्पादन, शेती तंत्रज्ञान, शेती विपणन, उत्पादन.

**प्रस्तावना:** प्राचीन काळा पासुन समाज व्यवस्थेमध्ये जात आणि जमीन हे दोन महत्वपूर्ण घटक आहेत असे जाणवते आणि यांचा थेट कुटुंबाच्या प्रतिष्ठेशी संबंध येतो. शेती कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवण्यासाठी महत्वाची असते. शेती हा भारतातील लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. या व्यवसायात अनुसूचित जातीतील कुटुंबांचा समावेश कमी प्रमाणात आढळतो. या घटकांतील लोकांना जाती व्यवस्थेमध्ये कसल्याही प्रकारची स्थावर व जंगम मालमत्ता बाळगण्यास बंदी घालण्यात आली होती. याचा परिणाम म्हणून अनुसूचित जातीतील कुटुंबांना पिढ्यान् पिढ्या गरिबीचा सामना करावा लागला. २० व्या शतकाच्या पूर्वार्धमध्ये झालेल्या सामाजिक बदला मुळे अनुसूचित जातीतील कुटुंबांचा सामाजिक स्तर सुधारला असल्याचे आपणास जाणवते. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने या समुहाला नेतृत्व मिळाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक विषमतेवर प्रखर हल्ला चढवला व सामाजिक न्यायाची मागणी केली. हे करत असतांनाच अनुसूचित जातीच्या लोकांचे जीवनमान उंचवावे व आर्थिक उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सातत्याने प्रयत्न केलेले दिसून येतात. अनुसूचित जातीतील भूमिहीन कुटुंबीयांना शासकीय पडीत जमीनी व

वनजमिनीवर शेती व्यवसाय करावा हा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. शेतमजुरी करणाऱ्या वर्गालाजमीनीचा मालक बनण्याचा म्हणजेच वर उल्लेख केल्याप्रमाणे आर्थिक प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या शेती व्यवसाय स्विकार करण्याची भूमिका त्यांनी मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही भूमिका घेवून पुढे महाराष्ट्रात भूमिहिनांची वेगवेगळी आंदोलने झाली. औरंगाबाद जिल्हामध्ये मोठ्या प्रमाणात शासनाच्या मालकीची जमीन प्रत्येक गावागावामध्ये आहे. त्या जमिनीस गायरान जमीन म्हणून ओळखण्यात येते. ही जमीन अनुसूचित जातीतील कुटुंबांना मिळावी म्हणून विविध संघटनांनी प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नांनाच गायरान जमीनचळवळ म्हणून ओळखले जाते. पुढे हा जमिनीचा प्रश्न अनुसूचित जातीतील कुटुंबीयांना जमीन मिळावी या उद्देशाने स्थापन केलेल्या चळवळीने मोठ्या शिताफीने हाताळला. त्यानंतर मानवी हक्क अभियान जन विकास संस्था, जमीन अधिकार आंदोलन यासारख्या संघटनांनी ही चळवळ पुढे नेली ती आजतागायत चालू आहे. ही चळवळ चालवत असतांना बैठका, सभा, मोर्चे, उपोषण, रास्तारोको, अधिकाऱ्यांना निवेदने न्यायालयीन लढाई इ. व्यूहरचनेचा वापर करण्यात आला. या चळवळीचा परिणाम अनुसूचित जातीच्या कुटुंबियांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीवर झालेला आढळून येतो. "अनुसूचित जातीतील गायरानधारक कुटुंबियांची स्थिती व समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यासः- विशेष संदर्भाने औरंगाबाद जिल्हा" या संशोधनातून गायरान जमीन चळवळ त्यामागील प्रेरक घटक आणि जमीनीच्या संबंधातून निर्माण झालेला सामाजिक संघर्ष गायरान जमीन चळवळीचा अनुसूचित जातीच्या कुटुंबावर झालेला प्रभाव आणि गायरान जमीन चळवळीच्या फलनिष्पत्तीचा तथा अनुसूचित जाती तील कुटुंबीयांच्या स्थिती व समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. गायरान जमीन चळवळीवर जाती व्यवस्थेचा प्रभाव आढळतो.औरंगाबादजिल्हामध्ये गायरान जमीन चळवळ चालवणाऱ्यांमध्ये अनुसूचित जातीच्या मोठा सहभाग आढळतो हा सहभाग जाती व्यवस्थेला आव्हान देणारा ठरला यामुळे ठिकठिकाणी उच्च जातीयांनी गायरान जमीन चळवळीला विरोध केला असल्याचे उदाहरणे आहेत. गायरान जमीन कसणाऱ्यांना मारहान करणे बहिष्कार टाकणे त्यांची घरे जाळणे, सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ करणे असे त्याचे स्वरूप होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने भारावलेल्या तरुणांचा या चळवळीमध्ये मोठा सहभाग होता या तरूणांच्या संघटित शक्तीमुळे गावरान जमीनी मिळण्यास मोठ्या प्रमाणात यश आलेले दिसून येते. आर्थिकदृष्टया मागास अनुसूचित जातीतील कुटुंबांना गायरान जमीन उत्पन्नाचे शाश्वत स्रोत ठरले असल्याचे आपणास दिसून येत आहे. त्यांचा सामाजिक दर्जा (स्थिती) उंचावण्यामध्ये गायरान जमीन चळवळीची मोठी भूमिका आहे. गायरान जमीन चळवळीमुळे अनुसूचित जाती (समुहा) मध्ये ऐक्य निर्माण झाले व अन्याय अत्याचाराच्या विरूद्ध सामुहिक प्रतिकार करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली ते आपल्या हक्काविषयी जागृत झाले जमिनीचे भारतीय समाजव्यवस्थेत मोठे महत्व आहे. अनुसूचित जातीतील कुटूंबियांना गायरान जमीनमिळाल्याने त्यांची सामाजिक स्थिती उंचावली आहे. जीवन जगण्याचे परावलंबीत्व संपले असून गायरान जमीन मिळाल्याने आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत वाढून अनुसूचित जातीच्या कुटुंबाचा शैक्षणिक स्तरही उंचावला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) अनुसूचित जातीतील लोकांची पार्श्वभूमी जाणून घेणे व त्याचा अभ्यास करणे. २) अनुसूचित जातीतील लोकांचे हक्क व अधिकार याविषयी अभ्यास करणे. ३) अनुसूचित जातीतील लोकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेणे, ४) अनुसूचित जातीतील लोकांना गायरान जमीन मिळाल्यामुळे त्यांच्या झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे, ५) गायरान जमीन धारकाच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचवणे

**संशोधनाची गृहितके:** १) अनुसूचित जातीतील लोकांची स्थिती खालवलेली आहे. २) अनुसूचित जातीतील लोकांमध्ये हक्क व अधिकार अधिकारांची जाणीव झालेली आहे. ३) अनुसूचित जातीतील लोकांची सामाजिक व आर्थिक स्थिती परिवर्तनीय आहे. ४) अनुसूचित जातीतील लोकांना गायरान जमीन मिळाल्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. ५) गायरान जमीन धारकांच्या समस्यांच्या बाबतीत शासनव प्रशासन भूमिका उदासीन आहे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी शास्त्रीय संशोधनातील नियमाप्रमाणे तथ्य संकलन करताना दुय्यम तर त्यांचा आधार घेण्यात आलेला आहे यासाठी विषयाशी संबंधीत संदर्भ ग्रंथ मासिक इंटरनेट व वर्तमानपत्रातील बातम्या तसेच लेख इत्यादीचा आधार घेऊन संशोधन विषयाचे विश्लेषण केले आहे.

**संशोधन विषयाची आवश्यकता व महत्त्व:** सदरील विषयाचा अभ्यास करताना प्रामुख्याने गायरान चळवळीची सुरूवात कशी झाली, चळवळ सुरू होण्यामागे प्रेरक घटक कोणते आहेत? या प्रेरक घटकांची गायरान चळवळीमधील अनुसूचित जाती कुटुंबीयांचीदूमिका कशी होती ? व ती कार्यान्वित कशी झाली याचा अभ्यास करणे महत्वाचे होते. अनुसूचित जातीतील कुटुंबीयांचा आणि आणि गायरान जमिनीचा सहसंबंध कोणता ? अनुसूचित जातीचा गायरान जमिनीच्या मालकीशी संबंध काय ? गायरान जमीन चळवळीमुळे निर्माण झालेला संघर्ष आणि त्याचे स्वरूप काय होते ? याचा अभ्यास करणे महत्वाचे होते. या चळवळीमध्ये तरूणांचा मोठा सहभाग आहे. अनुसूचित जातीतील तरूणांनी एकत्रित येवून कृती केली व आपला जमिनीवरचा हक्क मिळविला. या सामाजिक कृतीचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे गरजेचे होते कारण या चळवळीमुळे औरंगाबाद जिल्हातील अनुसूचित जातीतील कुटुंबीयांच्या सामाजिक स्थितीमध्ये महत्वपूर्ण बदल होणे गरजेचे होते परंतु ते आपणास झालेली दिसत नाहीत, त्यानुषंगाने संशोधक "अनुसूचित जातीतील गायरानधारक कुटुंबियांची स्थिती व समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यासः विशेष संदर्भान औरंगाबाद जिल्हा विषयाकडे वळला आहे आहे. औरंगाबाद जिल्हातील अनुसूचित जातीतील गायरान धारक कुटुंबियांच्या स्थिती व समस्या नक्की काय आहे, धोरणात्मक पावले, प्रत्यक्ष परिस्थितीमुळे होणारे गुंते काय आहेत. याचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे. त्याचबरोबर जमीन धारक कुटुंबीयांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दर्जा तसेच गावकीच्या कारभारात हस्तक्षेप आणि शेती हा व्यवसाय कसा चालतो यावरही या संशोधनातून प्रकाश टाकण्यात येणार आसल्या कारणाने संबंधित संशोधनाला महत्व आहे.

**शेती आणि शेतकरी:** शेतीवर जगणारा देश म्हणजे भारत अशी आपली वास्तव स्थिती आहे. शेती असणारे शेतकरी, शेती नसणारे कारागीर, शेती नसणारे शेतमजूर, मागत्यासह सारे भारतीय जनसमूह शेतीवरच जगतात. छोटी मोठी शहरे जो व्यवहार करतात, तोही शेतीमालाच्या व्यवहारावरच करतात. असे असले तरी शेती आणि शेतकरी शतकानुशतकांपासून विवंचनेत जीवन जगत आला आहे. इतिहास त्या सा-याचा साक्षीदार आहे. त्याच्या सहनक्षमतेचा अंत झाल्याने तो आत्महत्या करतो आहे. हे त्याचे वर्तमान आहे. मोठेपणाच्या भ्रामक कल्पनांमध्ये शेतीच्या प्रश्नांतील आणि शेतीवर अवलंबून असणा-यांच्या प्रश्नांतील गुंतागुंत नित्य वाढतच गेली. शेतीचे प्रश्न समजून घेण्यात आणि त्याची उत्तरे शोधण्यात गफलत झाली. या गफलतीमुळे विलक्षण विचित्र स्थिती निर्माण झाली. शेतक-यांच्याच नव्हे, तर देशाच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती हेच आहे, हे भान आम्हाला आता उरलेले नाही. शेती, शेतकरी आणि त्यावर अवलंबून असणारे सारे जनसमूह विचारात घेऊनच भारतीय समाजाचा विचार करणे शक्य आहे. असा विचार करणारेच महापुरुष या देशाचे भाग्यविधाते ठरतात. अन्य महापुरुष प्रस्थापित व्यवस्थेने आमच्या माथी महापुरुष म्हणून मारले आहेत. या देशात शेती, शेतकरी आणि शेतीशी संबंधित समूहाचा गंभीरपणे विचार छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच केला आणि त्यांनी उभारलेल्या चळवळींनीच केला. त्यासंबंधीचा विचार करणे आणि त्यानुसार कार्य करणे महत्त्वाचे असते. ते या महापुरुषांनी केले. याचा अर्थ असा आहे की, या देशातील शेतीवर अवलंबून असणा-या ७० टक्केपेक्षा अधिक लोकांचा विचार आणि या लोकांसाठी कार्य या महापुरुषांनी केले आहे. या देशातील शेतीचे वास्तव महाभयंकर आहे आणि पूर्वीही होते. सतत दुष्काळ आणि शासनाचा पूर्वापार मनमानी कारभार यामुळे शेती व शेतकरी दैन्यावस्थेत असतात. आर्थिक स्थिती वाईट असल्याने शेतकरी आपल्या जमिनी सावकाराच्या ताब्यात देतात. सावकार शेती करीत नसल्याने देशाचे उत्पन्न बुडते आणि शेतकरीही सावकारी कर्जात बुडतो. दुष्काळातून आणि सावकारी पाशातून शेतकरी मुक्त होत नाही म्हणूनत्याची अवस्था कमालीची वाईट झाली आहे. सावकार, प्रस्थापित व्यवस्था, सरकार, सरकारी यंत्रणा शेतक-यांना जगू देत नाही. चहूबाजूंनी घेरलेल्या शेतक-यांच्या स्थितीचे विश्लेषण करून महात्मा जोतीराव फुले यांनी शेतक-यांच्या उत्थापनाचे मार्ग सुचविले, त्यानुसार चळवळी केल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीच्या आणि शेतक-यांच्या प्रश्नांचा आयुष्यभर विचार केला.त्यासाठी त्यांनी भूमिका घेतल्या, चळवळी केल्या. त्यांच्या चळवळीचे, भूमिकांचे आणि विचार-तत्वज्ञानाचे केंद्र छोटे शेतकरी राहिले आहेत.शेतक-यांकडून वसूल केला जाणारा शेतसारा, शेतीचे धारणक्षेत्र, शेतीचाउद्योग म्हणून विचार करण्याची गरज, शेती व्यवसायातील पारंपरिकता, लोकसंख्या वाढीमुळे शेतीवर वाढणारा बोजा, शेती व्यवसायातील श्रम आणि भांडवलाचे नियोजन, सामुदायिक नव्हे तर सहकार तत्त्वावर शेती, शेतीसाठीच्या पाटबंधा-याची आधुनिक काळातील गरज, शेतीसाठीची भांडवली गुंतवणूक, शेतीसाठी लागणा-या आधुनिक सुविधांची उपलब्धता आदींच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या आयुष्यात अनेक चळवळी उभारल्या, त्यात आपली भूमिका घेतली. देशातील शेती आणि शेतकरी या विषयाकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सरकार आणि सावकार यांच्यामुळे शेतक-यांची अवस्था भूदासासारखी झाली आहे.

**जात आणि जमिनीचा सहसंबंध:** भारतीय समाजव्यवस्थेत जात आणि जमीनचा अत्यंत निकटचा संबंध आहे. ज्ञान, सत्ता, संपत्ती आणि श्रेष्ठत्व या चार गुणाशी जात बाधली आहे. ज्या जातीकडे श्रेष्ठत्व त्या जातीकडे ज्ञान मिळवण्याचा अधिकार संपत्ती आणि सत्ता या सामाजिक उच्चतेकडे नेणाऱ्या बाबी आपोआप जुळून येतात जात आणि जमीन संबंधीत काही धारणा समाजात निर्माण झाल्या आहेत. समाजात प्रतिष्ठा मिळण्यासाठी या दोन बाबी महत्वपूर्ण आहेत. ज्याच्याकडे उच्च जात आणि जमीन आहे त्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होते जमिनीचे मोजमाप हे संपत्तीत होते. ग्रामीण भागात जमीन मालकी यांचे अन्न उत्पादक, रोजगार, शिक्षण व आरोग्य सेवा यांचे पाया म्हणून महत्व आहे. बाखरी भारतासारख्या कृषी प्रधान अर्थव्यवस्था असलेल्या देशात जमिनीची आणि जमिनीशी संबंधीत इतर सामग्रीचे मालकी हो व्यक्तिीपत आणि प्रतिष्ठा याच्याशी संबंधीत आहे.

**गायरान जमीन चळवळ:** हैदराबाद निजाम सरकारच्या अधिपत्याखाली होते निजाम सरकारचे औरंगाबाद जिल्ह्यातील दलितांना पडीत गायरान जमिनीचे पट्टे दिलेल्या नोंदी अस्तित्वात आहेत. अनेक तालुक्यामध्ये गायरान जमीन मोठ्या प्रमाणात वाटली जाते. आजही अनेक तालुक्यांमध्ये गायरान जमिनी नावे करून देण्यासाठी संघर्ष सुरू आहे. १९५३ साली या गायरान जमिनी लढ्याचे नेतृत्व विजय यांनी केले. (मुलाखत जोगदंड १५.१०.२०१७) या सत्याग्रहात जे आरक यांना तीन महिन्याचा कारावास झाला त्यांना औरंगाबाद येथील कारागृहात ठेवण्यात आले होते. यांच्यासोबत अंबाजोगाई येथील १६७ लोकांना या आंदोलनामध्ये अटक झाल्याच्या नोंदी आहेत. अंबाजोगाई, परळी, माजलगाव या तालुक्यांमध्ये गायरान जमीन चळवळ मोठया प्रमाणात केली होती. त्यानंतर दलित युवकांनी स्थापन केलेल्या दलित युवक आघाडी, भारतीय रिपब्लिकन पक्ष, मानवी हक्क अभियान या पक्ष संघटनांनी गायरान जमीन चळवळी नेतृत्व केले. दलित युवक आघाडी ची स्थापना १९७१ मध्ये औरंगाबाद येथे झाली या संघटनेची स्थापना करण्यासाठी प्राध्यापक माधव मोरे प्राध्यापक एस के जोगदंड प्राध्यापक अविनाश डोळस, मधुकर इंगोले यांनी पुढाकार घेतला या संघटनेच्या माध्यमातून सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक चळवळ दलित बहुजनांच्या प्रश्नावर चर्चा केली ग्रामीण भागात दलितांना रोजगार व इतर समस्यांना सामोरे जावे लागत होते. दलितांना या स्थितीतून बाहेर काढण्यासंदर्भात दलित युवक आघाडीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली व दलितांना रोजगार मिळवून देण्यासाठी पर्याय शोधण्यात आले. या बैठकीत दलितांना उत्पन्नाचे स्त्रोत मिळावे म्हणून गायरान जमीन चळवळ उभारण्याचा निर्णय झाला व ती कारणे राबविण्यात आली १९७७ ते १९९० या काळामध्ये दलित युवक आघाडीचा पुढाकाराने २७६० एकर गायरान जमिनीवर अतिक्रमण झाल्याची नोंद शासन दरबारी आहे.

**गायरान जमीन आणि शासनाचे धोरण:** स्वातंत्र्यपूर्व काळापासून जमीन मालकी बाबत कमालीची विसंगती आढळून येते १९७६ मध्ये झालेल्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र मध्ये २६ टक्के शेतकऱ्या जवळ स्वतःच्या मालकीची जमीन २.५ एकर पेक्षा कमी होती. त्यानंतर गायरान धारक जमिनीसंदर्भात शासनाची सुरुवातीपासूनच उदासीन भूमिका होती. निजाम सरकारने आपल्या संस्थानात

दलितांना जमिनी देण्याबाबतचे फर्मान काढले व गावोगावी दलितांना जमिनीचे पट्टे दिले त्याच २०५४ फसली चा आदेश म्हटले जाते. निजामाने आपले संस्थान भारतात विलीन करताना संस्थानांमध्ये केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी केली असल्याने ते रद्द करू नये.असा करार केला. हा करार केलेला असतानासुद्धा हैदराबादच्या तत्कालीन श्री राम कृष्णराव या मुख्यमंत्र्यांनी महसूल खात्यामार्फत दलितांना निजाम सरकारने बहाल केलेल्या जमीनी काढून घेतल्या व तो करार मोडला. जमिनीचे मालक झालेले दलित पुन्हा भूमिहीन झाले त्या वेळी शासनाने त्यांच्यावर एक प्रकारचा अत्याचार केला असे म्हणावे लागेल. पुढे भाषावर प्रांतरचनेत मराठवाडयाचा काही भाग कर्नाटकामध्ये समाविष्ट झाला. कर्नाटक राज्याने मात्र निजाम सरकारच्या या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी केली आणि भूमिहीन दलितांना बहाल केलेल्या जमिनी बळकावल्या होत्या त्यासाठी विशेष कायदा केला परंतु महाराष्ट्र शासनाने याबाबत उदासीनतेचे धोरण स्वीकारले.दादासाहेब गायकवाड यांनी १९५९ मध्ये भूमिहीनांच्या प्रश्नावर भारतभर आंदोलन उभे केले. आंदोलनापुढे सरकार झुकले १९६१ मध्ये केंद्र सरकारने एक लाख ४५ हजार एकर जमीन भूमिहीनांना वाटली यापैकी ७० हजार एकर जमीन दलितांना मिळाली. परंतु यासाठी भूमिहीनांना दोन वर्ष सतत लढा द्यावा लागला होता. गायरान जमिनीचे आंदोलन पुढे चालूच राहिले महाराष्ट्र मध्ये आंदोलन चालू असताना गाव पातळीवर दलितांना वेगवेगळ्या अत्याचाराला सामोरे जावे लागले. १९७८ मध्ये महाराष्ट्र सरकारने आदेश काढून १९७८ पर्यंतचा गायरान जमिनीवरील अतिक्रमण करण्यात यावी असे म्हटले परंतु या जमीन अतिक्रमण त्यांचे वार्षिक उत्पन्न तीन हजार पेक्षा जास्त असू नये अशी अट घातली. शासनाने ज्या ज्या वेळी चळवळीच्या रेट्यामुळे गायरान जमिनीवर अतिक्रमणे कायम करण्याचे आदेश काढले त्यात त्रुटी किंवा जास्त चुका काढल्या जेणेकरून लाभार्थ्यांना जमीन मिळवण्याकरिता अडथळा निर्माण होईल असे सामाजिक कार्यकर्त्याने म्हटले आहे.महाराष्ट्र मध्ये १९९० च्या दशकामध्ये गायरान जमिनीचा प्रश्न पुन्हा तीव्र झाला महाराष्ट्रात ठिकठिकाणी मोर्चे, आंदोलने झाली या लढ्याचे नेतृत्व माननीय प्रकाश आंबेडकर यांनी केले. या लढयाचा परिणाम म्हणून महाराष्ट्र शासनाने १९९१ मध्ये प्रकाश आंबेडकर यांच्या नावानिशी शासन आदेश काढला व १९७८ ते १४ एप्रिल १९९० या कालावधीत व १४ एप्रिल १९९० मध्ये अस्तित्वात आलेली गायरान जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात यावेत असे आदेश दिले.

**जमीन अधिकार आंदोलन:** गायरान जमीन चळवळीमध्ये काम करणारे संघटनांचे संघर्ष निर्माण होऊन दादासाहेब गायकवाड यांचे जन्मशताब्दी वर्ष २००१ मध्ये जमीन अधिकार आंदोलनाची स्थापना करण्यात आली जमीन अधिकार आंदोलनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे निश्चित करण्यात आली होती. प्रत्येक भूमिहीन कुटुंबांना जगण्यासाठी किमान पाच एकर जमीन मिळवून देण्याचा प्रयत्न करणे ज्यामुळे रोजगारासाठी त्यांचे होणारे कायमचे आणि हंगामी स्थलांतर थांबेल. महाराष्ट्र सरकारच्या निर्णयानुसार जमिनीचा सातबारा स्त्री आणि पुरुषांच्या नावावर करणे. दलित भूमिहीन आदिवासींच्या वहिती कब्जात असणारी जमीन त्यांच्या नावावर करून घेणे. दलित भूमिहीन आदिवासी महिला आणि मुलांवर होणारे अत्याचार थांबवण्यासाठी मोक्का सारख्या तरतुदीची मागणी करणे.

गायरान जमिनीचा विकास करणे. गाव पातळीवर कायमस्वरूपी रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे. दलित भूमिहीन भटके आदिवासी यांच्या मुलांसाठी सक्तीचे मोफत आणि गुणवत्तापूर्वक शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे त्याच्या अंमलबजावणीचा आग्रह धरणे. गायरान उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे. नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीचा सामना करण्यासाठी सज्ज राहणे. शासन संस्थेच्या विविध स्तरावरील रचनेत दलित आदिवासी भूमिहीन महिला व वंचित घटकांचे न्याय प्रतिनिधित्व व सक्रिय सहभागासाठी प्रयत्न करणे.

**निष्कर्ष:** गायरान जमीन करतांना येणाऱ्या अडचणींमध्ये जमीन मालकी नसल्यामुळे शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही, आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे आधुनिक शेती करता येत नाही, सिंचनाची कायमची सुविधा नाही, प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे शासकीय योजनाचा लाभ मिळत नाही व जमीन कमी असल्यामुळे उत्पन्नाचे प्रमाण कमी आहे असे दिसून आले. गायरान जमीन धारकांच्या शेतकऱ्यांकडून अपेक्षा सरकारी योजनांचा लाभ मिळावा, विहीर, शेततळे, पाण्याचे स्रोत उपलब्ध करून द्यावे व शासकीय योजनांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने करावी.

**शिफारशी:** गायरान जमीन धारकांच्या नावावर जमीन करण्यासाठी शासनाने विशेष मोहीम राबवून ज्यांच्या ताब्यात गायरान जमिनी आहेत त्यांच्या नावावर करून द्याव्यात. जमिनी नावावर नसल्यामुळे शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे शासनाने गायरान जमीन धारकांना शासकीय योजनाचा लाभ घेता येईल अशी व्यवस्था निर्माण करावी. गायरान जमीन धारकांचे मालकीहक्कासाठी लागणारे प्रस्ताव शासनाकडे दाखल करण्यात आलेले आहेत. शासनाने विशेष मोहिम हाती घेवून गायरान अतिक्रमण धारकांना जमिनीचा मालकी हक्क देण्याची कार्यवाही करावी. गायरान जमीन धारकांना जमिनीचा आकार कमी असल्याने जमीन कसण्याची साधने घेणे शक्य होत नाही. त्यामुळे गायरान धारकांना जमीन कसताना अडचणी निर्माण होवून शेतीच्या उत्पन्नात घट होते. यासाठी शासनाने गायरान जमीन असलेल्या प्रत्येक गावामध्ये गायरान जमीन धारकांना सामुहिक शेती कसण्याची साधने उपलब्ध करून द्यावीत.

## संदर्भ सूची


१) देवगावकर (२००९) सामाजिक चळवळी, परंपरागत आणि नवीन साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२) घाटोळे रा. ना. (२००२) 'भारतीय समाज व्यवस्था, मंगेश प्रकाशन, नागपूर.

३) दलितेतरांसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर, अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, डॉ प्रल्हाद लुलेकर, सायन पब्लिकेशन,

४) आगलावे प्रदीप (१९९९) समाजशास्त्रीय सिद्धांत आणि संकल्पना साईनाथ प्रकाशन, नागपूर.

५) जमीन अधिकार आंदोलन, महाराष्ट्र घटना व नियमावली.

६) भुस्कुटे. रा. वी. दलितांचे अधिकार भाग 2, महाराष्ट्र सरकारने केलेले कायदे, मुबई, हुमन, राईट्स लॉ नेटवर्क.

७) महाराष्ट्र शासन (२००५) डॉबाबासाहेब आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे, भाग 2.

८) फुलझेले अविनाश, (२०१२) आंबेडकर चळवळीतील दादासाहेब गायकवाड यांचे योगदान लोकवांगमय गृह मुंबई.

९) देशपांडे स. ह (१९८८), महाराष्ट्रतील जाती संस्थात्मक विचार, पुणे, प्रतिमा प्रकाश.
१०) पानसरे गाविंद (२००२) दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तुत्व मुंबई, महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्रातील कृषी पर्यटन: विकासाच्या संधी आणि आव्हाने

**प्रा. डॉ. नवनाथ श्रीरंग शिंदे** विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जालना

**गोषवारा:** महाराष्ट्राची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. मात्र, अनिश्चित हवामान आणि शेतीमालाच्या भावातील चढ-उतार यामुळे शेती व्यवसाय आर्थिकदृष्ट्या अस्थिर झाला आहे. या पार्श्वभूमीवर 'कृषी पर्यटन' (Agro-Tourism) हा एक पूरक व्यवसाय म्हणून पुढे येत आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाच्या सद्यस्थितीचे, त्यातील संधींचे आणि आव्हानांचे सांख्यिकी विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

या अभ्यासात प्राथमिक आणि दुय्यम माहितीच्या आधारे असे दिसून येते की, महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण पट्ट्यात कृषी पर्यटनाचा विकास वेगाने होत आहे. शहरीकरणाचा वाढता वेग आणि निसर्गाकडे परतण्याची ओढ यामुळे कृषी पर्यटनाला मोठी बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. सांख्यिकी माहितीनुसार, योग्य व्यवस्थापन असल्यास शेतीच्या निव्वळ उत्पन्नात २५% ते ३०% वाढ होऊ शकते. मात्र, भांडवलाचा अभाव, कुशल मनुष्यबळाची कमतरता आणि पायाभूत सुविधांची वानवा ही मोठी आव्हाने आहेत. या शोधनिबंधामध्ये कृषी पर्यटनाच्या शाश्वत विकासासाठी काही महत्त्वपूर्ण शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

**प्रस्तावना:** ग्रामीण अर्थव्यवस्था ही शेती व्यवसायावर अवलंबून आहे आणि शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून आहे. कधी मोठ्या प्रमाणावर पाऊस त्यामुळे ओला दुष्काळ तर कधी कमी पाऊस पडल्यामुळे कोरडा दुष्काळ हे चक्र सातत्याने चालू आहे. शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात अन्नधान्यांचे उत्पादन झाले तरी शेतकऱ्यांना बाजारात योग्य बाजार भाव मिळत नाही. सरकारची धोरण आणि निसर्ग यांच्या चक्रामुळे शेतकरी सातत्याने अडचणीत येताना दिसून येतो त्यामुळे शेती व्यवसायाला पूरक व्यवसायाची गरज असते त्यामध्ये पशुपालन ,दुग्ध व्यवसाय इत्यादी व्यवसाय मदत करीत आहेत त्याबरोबरच आता कृषी पर्यटन (Agro-tourism) हे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करणारे, शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळवून देणारे आणि शहरी लोकांना निसर्गाच्या सानिध्यात निखळ आनंद देणारे एक शाश्वत माध्यम म्हणून विकसित होत आहे. हे शेती आणि पर्यटनाचा संगम आहे, ज्यामुळे ग्रामीण संस्कृती, वारसा आणि पर्यावरण जतन करण्याबरोबरच अर्थव्यवस्थेला हातभार लावत आहे. सदरील शोधनिबंधातून कृषी पर्यटनाचे फायदे तसेच त्याच्यासमोर असणारी आव्हाने यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** कृषी पर्यटनाच्या संदर्भामध्ये आणि विचारवंत, लेखक, संशोधकांनी अभ्यासपूर्ण संशोधन करून विविध विद्यापीठाला शोध प्रबंध सादर केले आहे. त्याचा अभ्यास करण्यात आला आहे.त्यामध्ये डॉ. वैशाली एम. धनवडे: यांनी 'महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाच्या समस्या आणि संधी' या विषयावर अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. तसेच प्रा. मनीषा ठोंबरे यांनी 'कृषी पर्यटनातील महिलांचा सहभाग आणि त्यातून होणारा आर्थिक बदल' यावर विविध जर्नल्समध्ये लेख लिहिले आहेत. प्रा. डॉ. धनश्री निगडे व प्रा. डॉ. राजू साठे यांनी 'कृषी पर्यटन उत्तम व्यवसाय' या विषयावर दिनांक. १६ मे २०२३ रोजीच्या अॅग्रोवन मध्ये सविस्तर मांडणी केली आहे. असे अनेक विविध संदर्भ साहित्य कृषी पर्यटनाचा अभ्यास करताना मार्गदर्शक ठरतात.

**अध्ययनाचे उद्देश:** १. महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे. २. या क्षेत्रातील उपलब्ध आर्थिक संधींचा शोध घेणे. ३. कृषी पर्यटन केंद्रांसमोरील प्रमुख समस्या व आव्हानांचे विश्लेषण करणे.

**गृहीतकृत्ये:** १. कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्तरात लक्षणीय सुधारणा होते. २. पायाभूत सुविधांचा अभाव हा महाराष्ट्रातील कृषी पर्यटन विकासातील मुख्य अडथळा आहे.

**अध्ययन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंध हा वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा आधार घेण्यात आलेला आहे. प्राथमिक स्रोत म्हणून प्रत्यक्ष कृषी पर्यटनांना भेट देऊन माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.तर दुय्यम स्रोत म्हणून महाराष्ट्र शासन, कृषी विभाग आणि पर्यटन विभागाचे अहवाल, विविध शोधनिबंध, आणि सांख्यिकी नियतकालिके यातून माहिती संकलित केली आहे.

**तथ्यांचे विश्लेषण:** महाराष्ट्रात कृषी पर्यटन (Agro-Tourism) हे केवळ पर्यटनाचे साधन न राहता ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारे एक मोठा आर्थिक आधार बनला आहे. राज्याच्या कृषी पर्यटन धोरणामुळे या क्षेत्रातील आर्थिक उलाढाल वेगाने वाढत आहे. महाराष्ट्र शासनाने ६ सप्टेंबर २०२० रोजी राज्याचे अधिकृत 'कृषी पर्यटन धोरण' जाहीर केले. या धोरणामुळे महाराष्ट्रात शेतीला पर्यटनाची जोड देणाऱ्या केंद्रांना अधिकृत दर्जा आणि विविध सवलती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. या धोरणाची काही मुख्य उद्दिष्टे (Objectives) आहेत.त्यामध्ये १. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास साधणे. २. शेतकऱ्यांना शेतीला पूरक असा खात्रीशीर व्यवसाय उपलब्ध करून देणे. ३.शेती उत्पादनांना (उदा. फळे, भाजीपाला, प्रक्रिया केलेले पदार्थ) थेट ग्राहकांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे.४.ग्रामीण भागातील महिला आणि तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.५. ग्रामीण संस्कृती, लोककला आणि परंपरांचे दर्शन शहरी पर्यटकांना घडवणे.त्यामुळे महाराष्ट्रातील कृषी पर्यटन क्षेत्र दरवर्षी साधारणपणे २०% ते २५% दराने वाढत आहे. एका यशस्वी कृषी पर्यटन केंद्राची वार्षिक उलाढाल ही १५ लाख ते ७० लाख

रुपयांपर्यंत असू शकते. काही प्रगत केंद्रांनी १ कोटी रुपयांचा टप्पाही पार केला आहे. कृषी पर्यटन विकास महामंडळाच्या (ATDC) जुन्या आकडेवारीनुसार, नोंदणीकृत केंद्रांनी शेतकऱ्यांच्या कुटुंबांना कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळवून दिला आहे. सध्या राज्यात ६०० हून अधिक अधिकृत केंद्रे कार्यरत आहेत. पर्यटकांकडून राहण्यासाठी आणि जेवणासाठी घेतले जाणारे शुल्क,पर्यटक थेट शेतातून ताज्या भाज्या, फळे, धान्य, आणि प्रक्रिया केलेले पदार्थ (उदा. लोणचे, पापड, तूप) खरेदी करतात. यामुळे मध्यस्थांशिवाय शेतकऱ्याला १००% नफा मिळतो. ग्रामीण कारागिरांनी बनवलेल्या वस्तूंच्या विक्रीतून अतिरिक्त उत्पन्न मिळते. महाराष्ट्र सरकारने ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी कृषी पर्यटन केंद्रांना भेट देणे अनिवार्य केल्यामुळे एक मोठा हक्काचा ग्राहक वर्ग तयार झाला आहे. एका कृषी पर्यटन केंद्रामुळे किमान ६ ते १० स्थानिक तरुणांना आणि महिलांना थेट रोजगार मिळतो (स्वयंपाकी, मार्गदर्शक, व्यवस्थापक इत्यादी). ५०% उत्पन्न हे निवासातून, ३०% भोजनातून आणि २०% शेतीमाल विक्रीतून मिळते.

महाराष्ट्रात पुणे विभाग आघाडीवर आहे. पुणे विभागात सर्वाधिक १२४ हून अधिक सक्रिय केंद्रे आहेत तर कोकण विभाग कृषी पर्यटनात दुसऱ्या क्रमांकावर असून समुद्रकिनारा आणि आंबा-काजू बागांमुळे येथे मोठी आर्थिक उलाढाल होते. तसेच नाशिक व छत्रपती संभाजीनगर या विभागांमध्येही द्राक्ष आणि फळबागांच्या माध्यमातून कृषी पर्यटन क्षेत्र विस्तारत आहे.

**संधी आणि फायदे (Opportunities)**

१.अतिरिक्त उत्पन्न व रोजगाराची संधी: शेतकऱ्यांना शेतीसोबतच पर्यटनातून उत्पन्नाचा शाश्वत पर्याय मिळत आहे. यातून ग्रामीण भागात नवीन रोजगार निर्माण होऊन शहराकडे होणारे स्थलांतर थांबण्यास मदत होते.

२. ग्रामीण संस्कृती व निसर्गाशी नाते: शहरी धकाधकीच्या आयुष्यातून सुटका मिळवून, कृषी पर्यटन केंद्रांवर लोकांना मातीचा सुगंध, पारंपरिक जेवण, बैलगाडी सफारी अशा ग्रामीण जीवनाचा अनुभव घेता येतो. हुरडा पार्टी, आणि लोककला (भारुड, लावणी) हे पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहेत.

३. शैक्षणिक व सांस्कृतिक महत्त्व: शालेय विद्यार्थी आणि पर्यटकांना शेती, पिके, पशुपालन आणि ग्रामीण संस्कृतीबद्दल माहिती मिळते. यामुळे अन्न कोठून येते, याचे महत्त्व कळते.

४. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना: कृषी पर्यटन केंद्रांमुळे स्थानिक उत्पादनांना (उदा. फळे, भाज्या, हस्तकला) थेट बाजारपेठ मिळते, ज्यामुळे स्थानिक व्यवसायिकांना फायदा होतो.

५. पर्यावरण जतन: अनेक कृषी पर्यटन केंद्रे ही सेंद्रिय शेती (Organic Farming) आणि शाश्वत पद्धतींचा वापर करतात, ज्यामुळे निसर्गाचे संतुलन राखले जाते. सेंद्रिय उत्पादनांची थेट विक्री (Farm to Table) करण्याची मोठी संधी आहे.

**आव्हाने (Challenges)**

१. विपणनाचा अभाव (Marketing): अनेक शेतकऱ्यांना आपल्या केंद्राची जाहिरात डिजिटल प्लॅटफॉर्मवर कशी करावी, याचे ज्ञान नाही.

२. पायाभूत सुविधा: मोठ्या प्रमाणातील ग्रामीण भागातील खराब रस्ते आणि भारनियमनामुळे पर्यटकांचा ओघ कमी होतो. अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

३ कौशल्याची कमतरता: पर्यटकांचे योग्य आदरतिथ्य करणे आणि त्यांच्याशी योग्य प्रकारे संवाद साधने आवश्यक असते. कोणत्याही व्यवसायामध्ये हे महत्त्वाचे असते.आदरातिथ्य (Hospitality) आणि संवाद कौशल्यात ग्रामीण युवक मागे पडतात.

४. हवामान बदल: अवेळी पाऊस आणि दुष्काळामुळे शेतीचे निसर्गसौंदर्य टिकवणे कठीण होते.

**निष्कर्ष:** महाराष्ट्रात कृषी पर्यटन (Agro-Tourism) हे केवळ पर्यटनाचे साधन न राहता ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारे एक मोठा आर्थिक आधार बनला आहे. महाराष्ट्रात कृषी पर्यटनाला सुवर्णकाळ येण्याची शक्यता आहे. सांख्यिकी विश्लेषणावरून असे सिद्ध होते की, ज्या शेतकऱ्यांनी नाविन्यपूर्ण संकल्पना राबवल्या आहेत, त्यांच्या उत्पन्नात सरासरी ४०% वाढ झाली आहे. गृहीतकृत्ये तपासली असता, पायाभूत सुविधांचा अभाव हे खरेच मोठे आव्हान असल्याचे स्पष्ट झाले आहे. योग्य शासकीय पाठबळ मिळाल्यास हे क्षेत्र ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलू शकते.

**शिफारशी:** १. शासनाने कृषी पर्यटनासाठी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून द्यावे. २. पर्यटन केंद्रांना 'डिजिटल मार्केटिंग'चे प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळा आयोजित कराव्यात. ३. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा वाढविल्या पाहिजेत त्यामध्ये चांगले रस्ते झाले पाहिजेत. ४. स्थानिक बचत गटांना या व्यवसायात सक्रिय सहभागी करून घ्यावे.

**संदर्भ सूची:**

1. डॉ. प्रज्ञा प्र. केळकर, आधुनिक शेतीपूरक व्यवसाय कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे
2. डॉ. वैशाली धनवडे, महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाचा विकास (संशोधन निबंध) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर (Journal)
3 .डॉ. ज्योती मुळीक, ग्रामीण पर्यटन आणि शाश्वत विकास, राजहंस प्रकाशन
4. Deshmukh, P. R. (2019). Agri-Tourism: A New Potential for Rural Development in Maharashtra. Journal of Rural Studies, 12(3), 45-58.
5. Maharashtra Tourism Development Corporation. (2022). Annual Report on Tourism Statistics. Retrieved from [MTDC Website].
6. Patil, S. S., & Kulkarni, A. V. (2021). Challenges in Sustainable Agri-Tourism: A Case Study of Western Maharashtra. International Journal of Agriculture Extension, 9(2), 112-125.
7. Shinde, K. A. (2018). Rural Tourism in India: Emerging Facets. New Delhi: Himalaya Publishing House.

# सेंद्रिय शेती आणि हवामान बदलाचे ग्रामीण शेतीवरील परिणाम

**मोनाली देशमुख** नाशिक

**गोषवारा:** भारतातील शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया आहे. ग्रामीण भारतात सुमारे 70% लोक शेती व त्याच्याशी संबंधित व्यवसायांत जीवन व्यतीत करतात. पारंपारिक रासायनिक पद्धतींचा वापर उत्पादन वाढीस मदत करत असला तरी, त्यामुळे मातीची उत्पादन क्षमता कमी होते, पर्यावरण प्रदूषित होते आणि कृषी-आधारित जीवनातील समस्या वाढतात. दुसरीकडे, **हवामान बदल** हा जागतिक स्तरावर गंभीर समस्या बनली आहे. वाढत्या तापमानामुळे पावसातील अनिश्चितता, अतिवृष्टी, दुष्काळ, हवामानातील अनियमितता इत्यादी वाढत आहेत, ज्यामुळे शेती उत्पादन व शेतकऱ्यांचे उत्पन्न धोक्यात येते. या पार्श्वभूमीवर सेंद्रिय शेती हा एक पर्यायी व टिकाऊ पर्याय म्हणून उदयास आला. सेंद्रिय शेतीमध्ये रासायनिक खत, कीटकनाशकांचा वापर टाळून नैसर्गिक खत, जैविक कीटक नियंत्रण, परस्पर फायद्याच्या पद्धतींचा वापर केला जातो. यामुळे पर्यावरण संवर्धन, मातीची गुणवत्ता सुधारणा व दीर्घकालीन उत्पादनक्षमता टिकवून ठेवणे शक्य होते.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानली जाणारी शेती ही केवळ उत्पादनाची पद्धती नसून ग्रामीण समाजजीवन, संस्कृती, रोजगार आणि अन्नसुरक्षा यांचा आधारस्तंभ आहे. देशातील मोठा लोकवर्ग आजही शेती व शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. परंतु गेल्या काही दशकांत शेतीपद्धतीत मोठे बदल झाले. हरितक्रांतीनंतर रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा, संकरित बियाण्यांचा आणि यांत्रिकीकरणाचा वापर वाढला. यामुळे उत्पादनात अल्पकालीन वाढ झाली; मात्र दीर्घकालीन दृष्टीने मातीची उगवण क्षमता घटणे, भूजल प्रदूषण, जैवविविधतेत घट, उत्पादन खर्चात वाढ आणि शेतकऱ्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम असे गंभीर प्रश्न निर्माण झाले. याच काळात जगभरात **हवामान बदल** ही समस्या तीव्र होत गेली. औद्योगिकीकरण, वनतोड, जीवाश्म इंधनांचा वाढता वापर आणि अनियंत्रित विकास यांमुळे वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले. त्याचा परिणाम म्हणून तापमानवाढ, पर्जन्यमानातील अनिश्चितता, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, उष्णतेच्या लाटा, नव्या किडी व रोगांचा प्रादुर्भाव असे परिणाम अधिक प्रकर्षाने जाणवू लागले. ग्रामीण शेती ही थेट नैसर्गिक घटकांवर अवलंबून असल्याने हवामानातील या बदलांचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसू लागला. पावसाच्या वेळापत्रकातील बदलामुळे पेरणी बिघडणे, वाढत्या तापमानामुळे पिकांची वाढ खुंटणे, अनियमित पर्जन्यामुळे मातीतील पोषकतत्वांचे धूप होणे, तसेच उत्पादनात चढ-उतार निर्माण होणे ही वास्तव स्थिती आहे. या पार्श्वभूमीवर **सेंद्रिय शेती** ही पर्यावरणपूरक व टिकाऊ पर्याय म्हणून पुढे येत आहे. सेंद्रिय शेतीमध्ये रासायनिक खत व कीटकनाशकांचा वापर टाळून शेणखत, गांडूळखत, हिरवळीची खते, जैविक कीटकनाशके, पीक फेरपालट, मिश्रपीक पद्धती यांचा वापर केला जातो. या पद्धतीमुळे मातीतील सेंद्रिय पदार्थ वाढतात, जलधारण क्षमता सुधारते, सूक्ष्मजीवांची वाढ होते आणि पिकांची नैसर्गिक प्रतिकारशक्ती वाढते. परिणामी, हवामानातील अनियमिततेला पिके अधिक चांगल्या प्रकारे तोंड देऊ शकतात.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी सेंद्रिय शेती ही केवळ पर्यावरणीय नाही तर आर्थिकदृष्ट्याही महत्त्वाची ठरू शकते. रासायनिक बाबींवरील खर्च कमी होणे, स्थानिक संसाधनांचा वापर, बाजारात सेंद्रिय उत्पादनांना वाढती मागणी आणि आरोग्यदायी अन्नाची जाणीव या कारणांनी सेंद्रिय शेतीकडे कल वाढत आहे. विशेषतः अनिश्चित हवामानाच्या पार्श्वभूमीवर मातीची गुणवत्ता टिकवून ठेवणारी, पाण्याची बचत करणारी आणि जैवविविधता जपणारी शेतीपद्धती म्हणून सेंद्रिय शेतीकडे पाहिले जाते. तथापि, सेंद्रिय शेती ही सर्व समस्यांचे तात्काळ समाधान नाही. सुरुवातीच्या काळात उत्पादनात घट, अधिक श्रमांची गरज, प्रमाणित बाजारपेठेचा अभाव, प्रशिक्षणाची कमतरता आणि शेतकऱ्यांमध्ये असलेली अनिश्चितता ही काही प्रमुख आव्हाने आहेत. तसेच हवामान बदलाची तीव्रता वाढत असताना कोणती शेतीपद्धती अधिक परिणामकारक आहे, याचे वैज्ञानिक विश्लेषण आवश्यक ठरते. यामुळेच सेंद्रिय शेती आणि हवामान बदल या दोन परस्पर संबंधित घटकांचा ग्रामीण शेतीवर होणारा परिणाम अभ्यासणे अत्यंत गरजेचे आहे. या संशोधनाच्या माध्यमातून सेंद्रिय शेती हवामान बदलाच्या परिणामांना कितपत कमी करू शकते, माती व पाण्याचे संवर्धन कसे घडवते, शेतकऱ्यांचे उत्पन्न व उत्पादनात स्थैर्य कसे आणते आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला कसा आधार देते, याचा सखोल अभ्यास करण्यात येतो. सेंद्रिय शेतीचे तत्त्वज्ञान, हवामान बदलाची गंभीरता आणि ग्रामीण शेतीची वास्तव स्थिती यांचा परस्परसंबंध स्पष्ट करणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे. या संशोधनात सेंद्रिय शेती व हवामान बदल यांचे ग्रामीण शेतीवरील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम यांचा अभ्यास केला आहे. भारतातील ग्रामीण भागातील शेतकरी सेंद्रिय शेतीकडे का व कसे वळत आहेत, सेंद्रिय शेतीमुळे उत्पादन, उत्पन्न, मातीची गुणवत्ता, जल-धारणा क्षमता, हवामान बदलाच्या संदर्भात कसे फायदे/आव्हाने मिळत आहेत हे अभ्यासले आहे. हवामान बदलामुळे पर्जन्य, तापमान, वायू प्रदूषण इत्यादी बदल शेतीवर कसे परिणाम करतात आणि सेंद्रिय शेती या बदलांना सामना देण्यास कितपत सक्षम आहे, हे विविध प्राथमिक व माध्यमिक माहितीच्या आधारे समजून घेतले आहे.

**प्रस्तावना:** भारत हा कृषिप्रधान देश असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे. देशातील बहुतांश लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. मात्र गेल्या काही दशकांत हवामान बदल हा जागतिक स्तरावरील गंभीर प्रश्न बनला आहे. तापमानवाढ, पर्जन्यमानातील अनियमितता, दुष्काळ, पूर, गारपीट, उष्णतेच्या लाटा यांसारख्या घटनांची वारंवारता वाढली आहे. या बदलांचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना बसत आहे, कारण त्यांची शेती पूर्णपणे नैसर्गिक घटकांवर अवलंबून असते. परंपरागत रासायनिक शेतीमुळे जमिनीची सुपीकता कमी होणे, पाण्याचे प्रदूषण, जैवविविधतेचा ऱ्हास, मातीची धूप आणि

आरोग्यविषयक समस्या वाढत चालल्या आहेत. रासायनिक खते, कीटकनाशके आणि तणनाशकांचा अतिरेकामुळे मातीतील सेंद्रिय अंश कमी होत असून मातीची जलधारण क्षमता घटत आहे. परिणामी, हवामानातील बदलांचा शेतीवर अधिक विपरीत परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर सेंद्रिय शेती ही पर्यावरणपूरक, शाश्वत आणि हवामान बदलाशी लढा देणारी प्रभावी पद्धत म्हणून उदयास आली आहे. सेंद्रिय शेतीत नैसर्गिक खतांचा वापर, पिकांची फेरपालट, मिश्रपीक पद्धती, जैविक कीटकनाशके, हरित खतांचा वापर यामुळे मातीची सुपीकता वाढते, जैवविविधता टिकून राहते आणि पर्यावरणाचा समतोल राखला जातो. सेंद्रिय शेतीमुळे मातीतील कार्बन संचयन वाढते, ज्यामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. त्यामुळे हवामान बदलाचा वेग कमी करण्यास सेंद्रिय शेती हातभार लावते.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी सेंद्रिय शेती ही केवळ पर्यावरणपूरक पद्धत नसून आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरू शकते. सेंद्रिय उत्पादनांना बाजारात अधिक किंमत मिळते, उत्पादन खर्च कमी होतो आणि दीर्घकालीन शेती टिकाऊ बनते. हवामानातील अनिश्चिततेतही सेंद्रिय शेतीतील मातीची सुधारलेली गुणवत्ता पिकांच्या टिकावू क्षमतेत वाढ करते. म्हणूनच सेंद्रिय शेती आणि हवामान बदल यांचा परस्परसंबंध आणि त्याचे ग्रामीण शेतीवरील परिणाम यांचा सखोल अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. या संशोधनाद्वारे सेंद्रिय शेती हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण शेतीला कशी मदत करू शकते, याचा वैज्ञानिक आणि व्यवहार्य दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या अनुभवांवर आधारित प्रत्यक्ष निरीक्षणे, माहिती संकलन आणि विश्लेषण करून या विषयाची वास्तवस्थिती स्पष्ट करण्यात येईल. हे संशोधन ग्रामीण शेतीच्या शाश्वत विकासासाठी आणि हवामान बदलाच्या परिणामांवर मात करण्यासाठी सेंद्रिय शेतीचे महत्त्व अधोरेखित करेल. तसेच धोरणकर्ते, कृषी तज्ञ आणि शेतकरी यांना भविष्यातील शेती व्यवस्थापनासाठी मार्गदर्शन मिळेल.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** सेंद्रिय शेती ही संकल्पना 20व्या शतकाच्या सुरुवातीस पाश्चिमात्य देशांत विकसित झाली. Sir Albert Howard, F.H. King आणि Rudolf Steiner यांनी नैसर्गिक शेती पद्धतींचे महत्त्व मांडले. त्यांच्या संशोधनानुसार माती ही जिवंत घटक आहे आणि तिची उत्पादकता टिकवून ठेवण्यासाठी रासायनिक गोष्टींऐवजी जैविक घटकांचा वापर करणे आवश्यक आहे. अनेक संशोधनांनी दाखवून दिले आहे की सेंद्रिय शेतीमुळे मातीतील **सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण** वाढते. यामुळे मातीची जलधारण क्षमता, वायू वहन, आणि सूक्ष्मजीवांची क्रिया सुधारते. FAO आणि IFOAM (International Federation of Organic Agriculture Movements) यांच्या अहवालानुसार सेंद्रिय शेतीमुळे **जैवविविधतेत वाढ** होते आणि मातीचे दीर्घकालीन आरोग्य टिकून राहते. भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) आणि विविध कृषी विद्यापीठांनी केलेल्या अभ्यासांत असे आढळले की सेंद्रिय शेतीमुळे दीर्घकालीन उत्पादन स्थिर राहते आणि उत्पादन खर्च कमी होतो. तथापि, काही संशोधनांनी सेंद्रिय शेतीच्या मर्यादाही नमूद केल्या आहेत: प्रारंभीच्या 2—3 वर्षांत उत्पादन घटण्याची शक्यता, अधिक श्रम व व्यवस्थापनाची गरज, सेंद्रिय उत्पादनांसाठी योग्य बाजारपेठेचा अभाव

IPCC (Intergovernmental Panel on Climate Change) च्या विविध अहवालांत स्पष्ट केले आहे की शेती हा हवामान बदलामुळे सर्वाधिक प्रभावित होणारा क्षेत्र आहे. तापमानवाढीमुळे पिकांची वाढीची कालमर्यादा कमी होते. पर्जन्यमानातील अनिश्चिततेमुळे पेरणीचे वेळापत्रक बिघडते. दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट यांचे प्रमाण वाढल्याने उत्पादनात अस्थिरता निर्माण होते. वाढत्या तापमानामुळे किडी व रोगांचा प्रसार वाढतो. भारतातील कृषी हवामानावर आधारित संशोधनात (IARI, IMD) असे आढळले आहे की मागील काही दशकांत पावसाचे स्वरूप बदलले असून, मान्सून उशिरा येणे व लवकर जाणे, अतिवृष्टीचे प्रमाण वाढणे, आणि कोरड्या कालावधीचे प्रमाण वाढणे ही प्रमुख लक्षणे आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असतात. त्यांच्या शेती पद्धती, जमीन धारणा, पाणी उपलब्धता, आर्थिक स्थिती या सर्व गोष्टी हवामान बदलामुळे प्रभावित होतात. NABARD आणि कृषी मंत्रालयाच्या अहवालांनुसार ग्रामीण भागात जलसंकट, मातीची धूप, आणि उत्पादनातील घट ही प्रमुख समस्या आहेत. अनेक स्वयंसेवी संस्था व कृषी विद्यापीठांनी केलेल्या अभ्यासांत सेंद्रिय शेतीमुळे ग्रामीण भागातील शाश्वत शेतीला चालना मिळत असल्याचे दिसून आले. ग्रामीण शेतकरी स्थानिक संसाधनांचा वापर करून सेंद्रिय शेती अवलंबतात, ज्यामुळे खर्च कमी होतो आणि पर्यावरणीय संतुलन राखले जाते.

**४. उद्देश** या संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहेत: सेंद्रिय शेती व रासायनिक शेतीतील फरक समजून घेणे. हवामान बदलामुळे ग्रामीण शेतीवर होणारे परिणाम अभ्यासणे. सेंद्रिय शेती हवामान बदलाच्या संदर्भात कितपत टिकाऊ पर्याय आहे याचे परीक्षण करणे. शेतकऱ्यांच्या अनुभवांवर आधारित शिफारसी अभ्यासणे.

**५. गृहितके** सेंद्रिय शेतीमुळे मातीची गुणवत्ता वाढते आणि उत्पादकता वाढते. हवामान बदलामुळे रासायनिक शेती पद्धतींचे परिणाम अधिक घातक आहेत. सेंद्रिय शेती हवामान बदलाच्या प्रभावांना अधिक चांगल्या प्रकारे तोंड देऊ शकते.

**६. अध्ययन पद्धती:** या अभ्यासासाठी **मिश्र पद्धती** वापरली गेली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद, प्रश्नावली, निरीक्षण इत्यादींचा वापर करून प्राथमिक माहिती संकलित केली आहे. तसेच आधी केलेले अभ्यासलेखन, शासकीय अहवाल, कृषी संशोधन संस्था यांच्याही माहितीचा उपयोग सदर संशोधनासाठी झालं आहे.

**नमुना व सर्वेक्षण** ग्रामीण भागातील विविध शेती पद्धती अवलंबणाऱ्या शेतकऱ्यांमधून नियोजित नमुना घेतला गेला. सेंद्रिय शेती करणारे: 100 पारंपारिक रासायनिक शेती करणारे: 100 कुल 200 शेतकरी.

**माहिती संकलन साधने : प्रश्नावली** — उत्पादन, उत्पन्न, पर्जन्य पातळी, हवामानातील बदलांच्या अनुभवांची माहिती. **फोकस ग्रुप चर्चा** — शेतकऱ्यांचे अनुभव, समस्या, उपाय. **माती व पाण्याचे नमुने** — सेंद्रिय व पारंपारिक दोन्ही शेतींच्या जमिनीचे रासायनिक व जैविक विश्लेषण.

**७. तथ्यांचे विश्लेषण:** हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण शेतीसमोरील आव्हाने अधिक तीव्र झाली आहेत. पावसाचे अनियमित व असमान वितरण, सरासरी तापमानात वाढ, दुष्काळ, पूर आणि गारपीट यांसारख्या टोकाच्या घटनांची वारंवारता वाढल्याने पिकांच्या वाढीच्या कालावधीत बदल दिसून येतो. रासायनिक शेतीत मातीतील सेंद्रिय अंश कमी झाल्यामुळे जलधारण क्षमता घटते आणि अशा परिस्थितीत कमी पावसात पिके लवकर करपतात, तर अतिवृष्टीत मातीची धूप वाढते. त्यामुळे हवामानातील अनिश्चिततेचा परिणाम रासायनिक शेतीत अधिक तीव्रतेने जाणवतो. सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतांमध्ये माती भुसभुशीत, सजीव आणि सुपीक आढळते. गांडुळे व सूक्ष्मजीवांची संख्या अधिक असल्यामुळे मातीची रचना सुधारते. शेणखत, कंपोस्ट, हिरवळीचे खत आणि जैविक घटकांच्या वापरामुळे मातीतील कार्बन साठा वाढतो. ही सुधारलेली माती हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या ताणांना अधिक सक्षमपणे तोंड देते. परिणामी पिकांची वाढ संतुलित राहते आणि उत्पादनाची गुणवत्ता सुधारते. सेंद्रिय शेतीत मातीतील सेंद्रिय पदार्थ वाढल्याने पाण्याचे शोषण व साठवण क्षमता वाढते. त्यामुळे सिंचनाची गरज तुलनेने कमी भासते आणि पावसाचे पाणी अधिक काळ मातीमध्ये साठून राहते. दुष्काळी परिस्थितीत सेंद्रिय शेतीतील पिके जास्त काळ तग धरू शकतात. याचा सकारात्मक परिणाम भूजल पातळीवरही दिसून येतो, ज्यामुळे जलस्रोतांचा शाश्वत वापर शक्य होतो.

पिकांची टिकावू क्षमता ही सेंद्रिय शेतीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहे. मिश्रपीक पद्धती, पिकांची फेरपालट आणि जैवविविधतेचा वापर यामुळे किड व रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या नवीन किड रोगांपासून संरक्षण मिळते आणि पिकांची नैसर्गिक प्रतिकारशक्ती वाढते. परिसंस्थेचा समतोल राखल्यामुळे उत्पादनातील जोखीम कमी होते. आर्थिक दृष्टिकोनातून पाहता, रासायनिक शेतीत खत, कीटकनाशके आणि तणनाशकांवर मोठा खर्च करावा लागतो, तर सेंद्रिय शेतीत हा खर्च लक्षणीयरीत्या कमी असतो. जरी सुरुवातीला उत्पादन किंचित कमी असले तरी सेंद्रिय उत्पादनांना बाजारात अधिक दर मिळत असल्याने निव्वळ नफा समाधानकारक राहतो. दीर्घकालीन दृष्टीने सेंद्रिय शेती अधिक स्थिर आणि शाश्वत उत्पन्न देणारी ठरते. हवामान बदलाच्या दृष्टीनेही सेंद्रिय शेती महत्त्वाची भूमिका बजावते. रासायनिक खतांच्या वापरामुळे हरितगृह वायूंचे उत्सर्जन वाढते, तर सेंद्रिय शेतीत कार्बन मातीमध्ये साठवला जातो. या प्रक्रियेमुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. त्यामुळे सेंद्रिय शेती ही हवामान बदलाचा वेग कमी करणारी प्रभावी पद्धत ठरते.

शेतकऱ्यांच्या अनुभवांवरूनही हे स्पष्ट होते, की सेंद्रिय शेतीतील पिके हवामानातील बदलांना अधिक तग धरतात, मातीची गुणवत्ता वर्षानुवर्षे सुधारते आणि आरोग्यदायी अन्नामुळे बाजारातील मागणी वाढते. एकत्रितपणे पाहता हवामान बदलाचा नकारात्मक परिणाम रासायनिक शेतीवर अधिक होत असताना सेंद्रिय शेती ही हवामान बदलाशी जुळवून घेणारी, पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पद्धत असल्याचे तथ्यात्मक विश्लेषणातून स्पष्ट होते.

**मातीची गुणवत्ता:** मातीतील सेंद्रिय पदार्थ व जैविक क्रिया सेंद्रिय शेतीत अधिक आढळल्या. मातीची जलधारण क्षमता सुद्धा चांगली होती.

**उत्पादन व उत्पन्न:** प्रथम दोन वर्षांमध्ये, सेंद्रिय शेतीतील उत्पादन पारंपारिक शेतीपेक्षा 15% कमी असल्याचे दिसले. परंतु 3-4 वर्षानंतर सेंद्रिय शेतीतील उत्पादन सतत वाढले व 5 वर्षानंतर दोन्ही पद्धतीत साधारण समान उत्पादन मिळाले.

**हवामान बदलाचे परिणाम** शेतकऱ्यांच्या अनुभवावरून: हवामान घटक व परिणाम, अनियमित पाऊस - पर्जन्यावर अवलंबून शेतीमध्ये अनिश्चितता वाढते तापमान - संवेदनशील पिकांचे नुकसान, अतिवृष्टी / दुष्काळ - उत्पन्नात चढ-उतार.

**सेंद्रिय शेती व हवामान बदल:** शोधलेले काही मुख्य निष्कर्ष: सेंद्रिय मातीची जलधारण क्षमता जास्त असल्यामुळे दुष्काळी परिस्थितीत उत्पादन अधिक टिकले. वाढत्या तापमानात मातीतील सेंद्रिय पदार्थामुळे मातीची उष्णता समतोल ठेवण्यास मदत मिळाली. रासायनिक खतांच्या तुलनेत सेंद्रिय खतांतून मातीतील जैविक जीवन वाढले ज्यामुळे पिकांचे प्रतिकारशक्ति वाढली.

**शेतकऱ्यांचे अनुभव:** शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर म्हणणे होते, की सेंद्रिय शेतीमध्ये मेहनत जास्त लागते, पण दीर्घकालीन फायदे अधिक आहेत. पिकांचे स्वाद, अन्नमूल्य व बाजार भाव सुद्धा आवश्यक तेवढे चांगले असल्याचे नोंद झाले.

**निष्कर्ष :** या अभ्यासातून पुढील प्रमुख निष्कर्ष प्राप्त झाले:

**सेंद्रिय शेतीचे पर्यावरणीय फायदे खूप महत्त्वाचे आहेत:** मातीची गुणवत्ता सुधारली, जलधारण क्षमता वाढली आणि जैविक विविधता वाढली.

**उत्पादन व उत्पन्न:** सुरुवातीला उत्पादन कमी असले तरी मध्य-दीर्घकालात उत्पन्नाचे प्रमाण संतुलित व फायदेशीर झाले.

**शेतकऱ्यांची दृष्टिकोन:** सेंद्रिय शेती अधिक स्थिर, आरोग्यदायी व आर्थिक दृष्ट्या टिकाऊ पर्याय ठरू शकते.

**शिफारसी:** या अभ्यासावरून खालील शिफारसी करण्यात आल्या आहेत - केंद्र व राज्य शासनांनी सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी अधिक लाभप्रद योजना आणाव्यात. सेंद्रिय खत व जैविक नियंत्रण यंत्रणेस सवलत दिली जावी. सेंद्रिय उत्पादनांची बाजारपेठ व प्रमाणित प्रणाली मजबूत करावी. शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीसंबंधी प्रशिक्षण उपलब्ध करावे. शेतकऱ्यांना पिक निवडीचे प्रशिक्षण द्यावे. पर्जन्य पूर्तता व पाणसाठा व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्र अवलंबावे. स्थानिक हवामान परिस्थितीशी सुसंगत सेंद्रिय पिकांची शोध व प्रयोग करावेत. सेंद्रिय शेतीतील उत्पादन वाढीसंबंधी संशोधनाला प्रोत्साहन.

**संदर्भ सूची**

1. भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) अहवाल
2. FAO (Food and Agriculture Organization) — Organic Farming Reports
3. IPCC Climate Change Assessment Reports
4. शेतकरी प्रश्नोत्तरे व अनुभव सादर केलेले प्राथमिक डेटा

# एलिनॉर ऑस्ट्रॉम यांची डिझाइन प्रिन्सिपल्स व गडचिरोली जिल्ह्यातील शंकरपूर गाव : एक समाजशास्त्रीय अध्ययन

**पुरुषोत्तम चांदेकर** पीएच.डी .विद्यार्थी ,समाजशास्त्र विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रस्तावना:** एलिनॉर ऑस्ट्रॉम (Elinor Ostrom) यांनी जगभरातील अशा समुदायांचा अभ्यास केला, जे आपल्या उपजीविकेसाठी थेट एखाद्या पर्यावरणीय संसाधनावर अवलंबून होते. त्यांच्या क्षेत्रीय अभ्यासामध्ये जपान आणि स्वित्झर्लंडमधील कुरणभूमी (pasturelands), स्पेन आणि फिलीपिन्समधील सिंचन कालवा प्रणाली, नेपाळ आणि भारतातील सामुदायिक वनव्यवस्था, तसेच कॅनडा आणि श्रीलंकेतील सामुदायिक मत्स्यव्यवसाय (fisheries) यांचा समावेश होता. या सर्व ठिकाणी समुदायांनी त्यांच्या संसाधनांचे शासन (governance) करण्यासाठी काही विशिष्ट नियम आणि रणनीती विकसित केलेल्या होत्या. मात्र, संसाधनांचे संरक्षण आणि दीर्घकालीन टिकाव साधण्यात काही शासन प्रणाली इतरांपेक्षा अधिक यशस्वी ठरल्या. ऑस्ट्रॉम यांनी अभ्यासातून असे आढळून आले की, ज्या शासन प्रणाली अधिक यशस्वी ठरल्या, त्यांच्यामध्ये काही समान तत्त्वे आढळतात. या तत्त्वांना त्यांनी “डिझाइन प्रिन्सिपल्स” (Design Principles) असे नाव दिले. ऑस्ट्रॉम यांच्या मते, एखादी संसाधन-शासन प्रणाली यशस्वी मानली जाते, जर - ती प्रणाली अत्यंत दीर्घकाळापासून कार्यरत असेल (उदा. अनेक पिढ्यांपासून), समुदायातील लोक त्या संपूर्ण काळात प्रत्यक्षात त्या नियमांचे पालन करत असतील, आणि लोकांना ती शासन प्रणाली इतकी योग्य व उपयुक्त वाटत असेल की, गरज पडल्यास ते तिच्या देखभालीसाठी शारीरिक श्रमदान किंवा आर्थिक योगदान देण्यासही तयार असतील. (ऑस्ट्रॉम १९९०)

एलिनॉर ऑस्ट्रॉम यांनी केलेल्या व्यष्टी अध्ययनाचा विचार केले असता आपल्याला असे दिसून येते की, एखादी स्थानिक सामायिक मालमत्ता व तेथील स्थानिक सर्वसामान्य व्यक्ती त्या मालमत्तेचे यशस्वीरीत्या आर्थिक शासनाद्वारे व्यवस्थापन करू शकतात हे अनेक उदाहरणांवरून सिद्ध केले. जगातील अनेक देशांमधील उदाहरणांवरून त्या असा दाखला देतात की, सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन सामायिक उपभोक्ते त्यांच्या सामायिक संसाधनांचे यशस्वी व्यवस्थापन करतात. त्याही पुढे जाऊन विशिष्ट नियमांच्या आधारे व सरकारी हस्तक्षेपाशिवाय या संसाधनांच्या शाश्वत विकासाचे उद्दिष्टही ते गाठतात. या बाबींचा विचार केले असता गडचिरोली जिल्ह्यातील वडसा तालुक्यातील शंकरपूर या गावाचे विचार करावे लागेल जे याच पद्धतीने सदर गावाने आपला विकास करून घेतलेला आहे.

विशेषत: एखादा समुदाय आपली संसाधने यशस्वीरित्या व्यवस्थापित करण्यास सक्षम आहे की नाही हे ते कोणत्या प्रकारचे नियम तयार करतात यावर अवलंबून आहे. म्हणूनच नियमांची आखणी करताना काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. नियम जे एका ठिकाणी काम करतात ते दुसऱ्या ठिकाणीही करतील असे नाही, म्हणून नियम तयार करण्यापूर्वी संदर्भ काळजीपूर्वक समजून घेणे आवश्यक आहे. सदर शंकरपूर गावात एनजीओ व तसेच बाहेरील नेतृत्वाद्वारे तसेच गावकरी या सर्वांद्वारे गावांनी आपला विकास करून घेतलेला आहे. विविध परिस्थितींमध्ये कोणत्या प्रकारचे नियम आणि व्यूहनिती कार्य करते. ज्यामुळे समुदायांना त्यांचे संसाधने यशस्वीरित्या व्यवस्थापित करता येतात. त्यांनी ८ सामान्य तत्त्वांची यादी ('डिझाइन प्रिन्सिपल्स') आणली ज्याचा समुदायाने सराव केला होता. सामान्यतः हे तत्व एकत्रित सामायिक संसाधनांच्या यशस्वी कारभाराकडे नेतात. सदर व्यष्टी अध्ययनामध्ये त्या ८ तत्वांची तुलना शंकरपूर या गावाशी केलेली आहे.

**संशोधन उद्दिष्ट:** शंकरपूर गावात एलिनॉर ऑस्ट्रॉम यांच्या डिझाइन प्रिन्सिपल्स हे तत्वे कितपत लागू होतात ते अभ्यासणे. सदर शोधनिबंधाची तीन भागात विभागणी केलेली आहे. पहिल्या भागात संकल्पना व पद्धतीशास्त्र स्पष्ट केले असून दुसऱ्या भागात गडचिरोली जिल्ह्यातील वडसा तालुक्यातील शंकरपूर या गावाच्या व्यष्टीचे विश्लेषण केलेले आहे. तिसऱ्या भागात निष्कर्ष व समारोप प्रस्तुत केला आहे.

**भाग १ : सैद्धांतिक मांडणी आणि पद्धतीशास्त्र:** पर्यावरणीय संसाधनांचे व्यवस्थापन करण्यात काही समुदाय इतरांपेक्षा अधिक यशस्वी ठरण्याचे मुख्य कारण म्हणजे काही ठरावीक तत्त्वे. अशी एकूण आठ डिझाइन प्रिन्सिपल्स आहेत, जी सर्वसाधारणपणे समुदायांना त्यांच्या पर्यावरणीय संसाधनांचे प्रभावी आणि शाश्वत व्यवस्थापन करण्यात मदत करतात.

**तत्त्व १ : स्पष्टपणे निश्चित केलेल्या सीमा:** जेव्हा संसाधनाचा भौगोलिक परिसर, तो कोण वापरू शकतो आणि किती प्रमाणात वापरू शकतो हे स्पष्टपणे निश्चित केलेले असते, तेव्हा समुदायाला आपण नेमके काय व्यवस्थापित करत आहोत आणि कोणासाठी करत आहोत हे समजणे सोपे जाते. स्पष्ट सीमा असल्यामुळे कोण प्रणालीच्या आत आहे आणि कोण बाहेर आहे हे ठरते. त्यामुळे कोणाला संसाधनाच्या देखभालीसाठी योगदान द्यावे लागेल आणि कोणाला त्यातून लाभ घेण्यापासून वगळले जाईल, हेही स्पष्ट होते. सदर गावाला सामुदायिक वनदावा मिळालेला आहे. जवळपास ६०० हेक्टर एवढ्या क्षेत्रात गावकऱ्यांचा हक्क असल्यामुळे त्याचा वापर ते करू शकतात. गावातील लोकांच्या विकासासाठी ह्या वनक्षेत्रातून मिळणारा गौण वनोपजचा वापर सदर गाव करते. म्हणून सदर तत्वापेक्षा अधिक व्यापक पद्धतीने सदर गावात अधिक समावेशक अशी रचना असलेली दिसून येते.

**तत्त्व २ : खर्च व लाभ यातील प्रमाणबद्ध समतोल:** या तत्त्वानुसार, ज्या व्यक्ती किंवा गटाला संसाधन प्रणालीतून सर्वाधिक लाभ मिळतो, त्यांनी त्या प्रणालीच्या देखभाल व टिकावासाठी लागणाऱ्या खर्चाचा सर्वाधिक वाटाही उचलला पाहिजे. यात श्रमदान, बांधकामासाठी लागणारे साहित्य, आर्थिक योगदान किंवा देखरेखीचा खर्च यांचा समावेश होतो. उदा., जर समुदायातील एखाद्या व्यक्तीकडे अधिक चांगली साधने किंवा तंत्रज्ञान असेल आणि त्यामुळे ती व्यक्ती संसाधनाचा अधिक उपसा करू शकत असेल, तर

दीर्घकालीन शाश्वततेसाठी तिने इतरांपेक्षा अधिक योगदान देणे अपेक्षित आहे. यामुळे संपूर्ण प्रणाली सर्वांसाठी न्याय्य राहते. सदर गावातील लोकांना संसाधन वापरण्याचा समान हक्क असल्यामुळे कोणतेही खर्चाचा अधिक वाटा उचलण्याची आवश्यकता असलेली दिसून येत नाही. तसेच वन व्यवस्थापन करण्याची पद्धती स्वीकारावी लागल्यामुळे संसाधनाचे नाश ही होत नाही.

**तत्त्व ०३: सहभाग:** हे तत्त्व सुनिश्चित करते की संसाधन व्यवस्थापनाशी संबंधित नियमांचा ज्यांच्यावर परिणाम होतो, त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी केले जाते. जे लोक थेट संसाधनाशी आणि इतर वापरकर्त्यांशी संपर्कात असतात, ते आपल्या अनुभवाच्या आधारे स्वतःसाठी परिणामकारक ठरणाऱ्या रणनीती अधिक चांगल्या प्रकारे आखू शकतात. सदर गावातील जवळपास सर्वच व्यक्ती हे संसाधन व्यवस्थापनाशी जोडलेले आहेत. तसेच संसाधनाचा योग्य वापर करण्याचे समज सर्वांना असल्यामुळे ते अधिक सजगपणे संसाधनाचा न्याय्य वापर करतात.

**तत्त्व ०४: क्रियाकलापांचे निरीक्षण:** सामूहिक संसाधनांचे व्यवस्थापन तेव्हा सोपे होते, जेव्हा संसाधनाची भौतिक स्थिती, तसेच व्यक्तींच्या क्रिया आणि नियमबाह्य वर्तन याबाबत सतत व अचूक माहिती उपलब्ध असते. मात्र हेही महत्त्वाचे आहे की निरीक्षण करणारे लोक संसाधन वापरकर्त्यांपुढे उत्तरदायी असावेत किंवा ते स्वतःही त्या प्रणालीचे वापरकर्ते असावेत. अगदी ह्याच प्रकारे गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील गावांचा रचना असलेली दिसून येते. गावमध्ये अगदी त्याचप्रकारे क्रियाकलाप करत असताना दिसून येतात.

**तत्त्व ०५: क्रमाक्रमाने वाढणाऱ्या शिक्षा (Graduated Sanctions):** हे तत्त्व 'फ्री-रायडर्स' म्हणजेच संसाधनाचा गैरवापर करणारे किंवा सहकार्य न करणारे लोक यांच्याशी कसे वागायचे, याबाबत आहे. ऑस्ट्रॉम यांच्या अभ्यासानुसार अनेक समुदाय 'क्रमिक शिक्षा' (graduated sanctions) ही रणनीती वापरतात. ज्या व्यक्ती अपेक्षेपेक्षा जास्त संसाधन वापरतात किंवा देखभालीसाठी योगदान देत नाहीत, त्यांना त्यांच्या गुन्ह्याच्या तीव्रतेनुसार दंड किंवा शिक्षा दिली जाते. पहिल्या चुकांसाठी शिक्षा सौम्य ठेवली जाते आणि पुन्हा पुन्हा नियमभंग झाल्यास ती हळूहळू वाढवली जाते. तसेच शिक्षा ठरवणारे लोकही समुदायाचा भाग असावेत आणि वापरकर्त्यांपुढे उत्तरदायी असणे महत्त्वाचे आहे. अगदी ह्याचप्रकारची परिस्थिती असलेली दिसून येते.

**तत्त्व ०६: संघर्ष निवारण (Conflict Resolution):** अनेक यशस्वी समुदायांमध्ये संसाधन वापरकर्त्यांमधील किंवा वापरकर्ते व अधिकारी यांच्यातील संघर्ष सोडवण्यासाठी सुलभ, कमी खर्चाची आणि स्थानिक पातळीवरील यंत्रणा उपलब्ध असते. अशा यंत्रणांमुळे कोणते नियम आहेत, काय परवानगीयोग्य आहे आणि काय नाही, याबाबत चर्चा व स्पष्टता साधता येते. तसेच प्रामाणिक चुकांमुळे नियमभंग करणाऱ्या व्यक्तींना न्याय्य आणि स्वीकारार्ह पद्धतीने आपली चूक सुधारण्याची संधी मिळते.

१० वर्षांपूर्वी हे अगदी व्यापक पद्धतीने होत असताना दिसून येत होता. आताही गावाच्या विकासासाठी सर्व एकजुटीने निर्णय घेतात. गावात निवडणुकीच्या बाबतीत दोन गट असले तरी गावाच्या विकासासाठी लोक एकत्र येऊन चर्चा करतात.

**तत्त्व ०७: अधिकारांची मान्यता (Recognition of Rights):** जेव्हा समुदायांना स्वतःचे संघटन करण्याचे आणि स्वतःसाठी नियम बनवण्याचे अधिकार राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय सरकारांसारख्या बाह्य संस्थांकडून मान्य केले जातात आणि औपचारिक न्यायालयांद्वारे संरक्षित केले जातात, तेव्हा समुदाय संसाधने अधिक यशस्वीपणे व्यवस्थापित करू शकतात.

समुदायाचे अधिकार मान्य नसतील, तर बाहेरील लोकांना संसाधनांमध्ये हस्तक्षेप करणे, त्यांचा उपसा करणे किंवा प्रदूषण करणे सोपे होते. तसेच समुदायातील सदस्य किंवा अधिकारी यांच्या कृतींसाठी जबाबदारी निश्चित करणे कठीण बनते. काही गावात हस्तक्षेप हे मोठ्या प्रमाणात असलेली दिसून येते पण शंकरपूर गावाचा विचार केला तर १० वर्षांपूर्वी रासायनिक कारखान्याच्या विरोधात लढा उभारून आपले हक्क मिळवल्याचे दिसून येते तसेच दुसऱ्या गावात उभारलेला कारखान्याला बंद करण्यासाठी त्या गावातील लोक उभे राहिले ते शंकरपूर या गावामुळे ते शक्य झाल्याचे ते स्पष्ट होते.

**तत्त्व ०८: अंतर्भूत संस्था (Nested Enterprises):** हे तत्त्व मान्य करते की दीर्घकाळ टिकणाऱ्या गुंतागुंतीच्या संसाधन प्रणाली अनेक स्तरांवरील, एकमेकांत अंतर्भूत असलेल्या संस्थांच्या माध्यमातून कार्य करतात. या संस्था मिळून संसाधनांचे वितरण, निरीक्षण, अंमलबजावणी, संघर्ष निवारण आणि शासनाची कामे करतात. अशा प्रकारे विविध पातळ्यांवरील संस्थांचा लाभ घेऊन संसाधनांचे अधिक प्रभावी शासन करता येते. म्हणूनच, समुदाय पातळीवर पर्यावरणाचे संरक्षण आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करायचे असल्यास, त्या समुदायात कार्यरत असलेले नियम समजून घेणे अत्यावश्यक आहे. काही नियम औपचारिक स्वरूपात—दस्तऐवजांमध्ये किंवा कायद्यात - स्पष्टपणे दिसतात, तर काही नियम सामाजिक व सांस्कृतिक प्रथांमधून अनौपचारिकरीत्या निर्माण होतात. असे नियम केवळ समुदायाचे सूक्ष्म निरीक्षण केल्यावरच समजू शकतात.

याशिवाय संसाधन प्रणाली आणि समुदाय हे काळानुसार बदलत राहतात. सामाजिक दबाव, पर्यावरणीय बदल आणि तांत्रिक घडामोडी यांमुळे त्यांना आपले नियम सतत अद्ययावत करावे लागतात किंवा नवे नियम तयार करावे लागतात. नियमांतील हा सातत्यपूर्ण बदलच पर्यावरणीय धोरणनिर्मिती ही प्रक्रिया गुंतागुंतीची बनवतो, कारण कोणत्याही परिस्थितीत 'परिपूर्ण नियम' आधीच ठरवता येत नाही. त्यामुळे विविध उपाययोजना वापरून पाहणे, काय यशस्वी ठरते आणि काय ठरत नाही हे तपासणे, आणि त्या अनुभवाच्या आधारे पुन्हा नवे प्रयोग करणे आवश्यक ठरते. अशा प्रक्रियेसाठी सहभागी व्यक्तींच्या वर्तनावर वेगवेगळ्या नियमांचा होणारा परिणाम आणि त्यातून मिळणारे निष्कर्ष समजून घेण्यासाठी वेळ, संसाधने आणि शिकण्यामध्ये मोठी गुंतवणूक करावी लागते. १० वर्षांपूर्वीच्या अध्ययनात ते अधिक प्रकर्षाने असल्याचे आपल्याला स्पष्ट होते. आताही त्याचे अवशेष असलेले दिसून येते.

**पद्धतीशास्त्र - व्यष्टी अध्ययन:** व्यष्टी अध्ययन (Case study) म्हणजे एखाद्या व्यक्ती, गट, संस्था, घटना किंवा समाजाच्या विस्तृत आणि सखोल अभ्यास करणे होय. यात त्या विशिष्ट घटनेचा किंवा विषयाचा त्याच्या नैसर्गिक संदर्भात तपशीलवार

विश्लेषण केले जाते. हे अभ्यास पद्धतीने एखाद्या विषयाची सखोल समज मिळविण्याचा उद्देश असतो, ज्यामुळे त्या विषयातील गुंतागुंतीच्या घटकांचा आणि त्यांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास होतो.

**आशय विश्लेषण:** लिखित वा प्रकाशित स्रोतांच्या आशयाची चिकित्सा व विश्लेषण म्हणजेच आशय विश्लेषण तंत्र होय. सदर अध्ययनात शंकरपूर या गावाच्या संदर्भात प्रकाशित झालेल्या साहित्याचा सूत्रबद्ध पद्धतीने विश्लेषण केलेले आहे .

**भाग २ : शंकरपूर या व्यष्टीचे विश्लेषण:** शंकरपूर हे गाव गडचिरोली जिल्ह्यातील वडसा तालुक्यातील एक गाव आहे. गावाने आपलं विकास सामुहिक पद्धतीने करून घेतलेला आहे. गावाने अनेक एनजीओ तसेच गावातील पुढारी लोकांमुळे आपला विकास करून घेतलेला आहे. शंकरपूर हे 'सृष्टी' संस्थेच्या कार्यक्षेत्रातील गाव आहे. शंकरपूरची लोकसंख्या १२७३ एवढी आहे. सदर गाव अल्पभूधारक शेतकऱ्यांचे गाव आहे. शेतीत भागत नसल्याने इथले कष्टकरी दरवर्षी रोजगाराकरता स्थलांतर करीत परंतु या गावामध्ये 'बांधकाम व लाकूड कामगार संघटने'च्या माध्यमातून उत्तम जाणीव जागृती झाली आणि गावाने रोजगार हमी कायदा प्रभावीरीत्या राबवला. नंतर 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' व 'सृष्टी' या संस्थांनीही ही प्रक्रिया जारी ठेवली. 'मनरेगा' अंतर्गत या गावानेही आपला सर्वंकष कृती आराखडा बनवून सुमारे अडीच कोटी रुपयांच्या कामाचे नियोजन केलेले आहे. ही कामे गावात सतत निघत असतात. त्यामुळे आता कोणालाही स्थलांतर करावे लागत नाही. शंकरपूर गावाने वनाधिकार कायद्यान्वये सुमारे हे ५९८.९२ हेक्टर वनावरचा अधिकार मिळवलेला आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या वनांवर या गावांचे निस्तार हक्क नव्हते. त्यामुळे हे हक्क सहजगत्या मिळाले नाहीत तर या गावांनी भोवतालच्या वनांवर आपली वहिवाट व अवलंबन आहे आणि आपण त्याच्या रक्षण-संवर्धनाच्या कार्यात सहभागी असतो हे पुराव्यांनिशी सिद्ध केले. शंकरपूर गावाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे या गावाने जैविक विविधता कायदा, २००२ अन्वये आपली नोंदणी करून गावाचे जैव विविधता रजिस्टर तयार केले आहे. या संदर्भात केलेल्या कार्यामुळे गावाला २०१२ साली राष्ट्रीय पातळीवरचा 'इंडिया बायोडायव्हर्सिटी अॅवार्ड' हा प्रतिष्ठेचा पुरस्कारही मिळाला. गावाचा ६०० हेक्टर जलसिंचन क्षमता असलेला जलाशय असून त्याच्यावरचे पाणी वाटप शास्त्रीय पद्धतीने केले जाते. गावात मच्छीमार तलावही असून गावातील 'धीवर' समाजाच्या लोकांना आणि स्थानिक मच्छीमार सोसायटीला लाभ व्हावा या पद्धतीने त्याचे व्यवस्थापन केले जाते. गावाने आपले ६५ हेक्टरवरचे रोपवन तयार केलेले आहे. तसेच स्वतःच्या बळावर आपली स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजना राबवून गावातील पाणी टंचाईची समस्या कायमची निकालात काढली आहे.

शंकरपूर गावाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ग्रामपंचायतीच्या हद्दीत परवानगी न घेता निघालेला एक रासायनिक कारखाना गावकऱ्यांनी एकजुटीने बंद पाडला. शेजारच्या कळम या गावात हा कारखाना निघाला आणि सुरुवातीपासूनच त्याने मोठ्या प्रमाणावर प्रदूषण करण्यास सुरुवात केली. गावकऱ्यांनी त्याला हरकत घेतली परंतु गावकऱ्यांना न जुमानता, तालुक्यातल्या मोठ्या पुढाऱ्यांच्या आणि भ्रष्ट नोकरशहांच्या आशीर्वादाने हा कारखाना सुरूच राहिला. तेव्हा गावाने तीव्र आंदोलन केले, मंत्र्यांचा रस्ता रोखून धरला आणि शेवटी तो कारखाना बंद करण्यात यश मिळवले.

अशा रीतीने मोठे गाव असले आणि गट ग्रामपंचायतीचे ठिकाण असले तरी शंकरपूर गावाने ग्रामस्वराज्य कशा रीतीने राबवता येते याचा आदर्श घालून दिलेला आहे. एरवी ग्रामस्वराज्याची कल्पना ही लहान आणि एकजिनसी गावात यशस्वी होताना दिसते परंतु शंकरपूर या गावात वीस-बावीस जातींचे आणि चार धर्मांचे लोक राहतात. गावात दोन तट होते परंतु गावाच्या विकासामध्ये ते अडथळा ठरले नाहीत. गाव आपला कारभार चालवण्यासाठी विविध समित्या नेमते. शंकरपूर गावात अशा आठ कार्यकारी समित्या आहेत. गावामध्ये मतदानाचे तीन वॉर्ड आहेत. त्यांना गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांची नावे दिलेली आहेत. हे गाव मोठे असल्याने मोहल्ला ग्रामसभा किंवा प्रभाग स्तरावरच्या ग्रामसभा घेणे जास्त उपयुक्त ठरेल. अशा ग्रामसभा सध्या घेतल्या जातात पण त्यांना विधिमान्यता नसल्याने त्यांचे अभिलेख हे पंचायतीच्या सेवकांकडून विधिवत लिहिले जात नाहीत. शंकरपूर सारख्या उदाहरणांवरून हे दिसते की गाव-सक्षमतेची आणि जाणीव जागृतीची प्रक्रिया ही दीर्घकाळ चालवायला पाहिजे. या परिसरात गेली सुमारे पन्नास वर्षे तळमळीच्या कार्यकर्त्यांकडून ही प्रक्रिया चालवलेली आहे. तसे केल्याची चांगली फळे आज दिसू लागली आहेत. घटना दुरुस्ती, वन अधिकार कायदा व रोजगार हमी कायदा या पुरोगामी कायदेशीर चौकटी गावकऱ्यांना उपयुक्त ठरल्या, मात्र त्यांचा उपयोग करून घेण्यासाठी जी जागृती हवी ती सामाजिक संघटनांच्या कामामुळेच आली.(बोकील २०१४ : ३९-४०). जुन्या अध्ययनात अस दिसून येत असलं तरी प्रत्यक्षात मात्र काही प्रमाणात एकजुटीमध्ये काही समस्या असलेले दिसून येत आहे. कार्यक्रम व इतर श्रमदानाचा काम असेल तर लोकांचा सहयोग हा कमी असलेला दिसून येतो आहे. पैसा हा केंद्रस्थानी झालेला आहे. त्यामुळे श्रमदान व एकजूटीमध्ये अडचणी निर्माण झालेला आहे.

**भाग ३ : समारोप आणि निष्कर्ष:** पहिल्या तत्वाचा विचार केला तर सदर गावाला सामुदायिक वनदावा मिळालेला आहे. जवळपास ६०० हेक्टर एवढ्या क्षेत्रात गावकऱ्यांचा हक्क असल्यामुळे त्याचा वापर ते करू शकतात. गावातील लोकांच्या विकासासाठी ह्या वनक्षेत्रातून मिळणारा गौण वनोपजचा वापर सदर गाव करते. म्हणून एलिनॉर ऑस्ट्रॉमच्या तत्वापेक्षा अधिक व्यापक पद्धतीने सदर गावात अधिक समावेशक अशी रचना असलेली दिसून येते. सदर गावातील लोकांना संसाधन वापरण्याचा समान हक्क असल्यामुळे कोणतेही खर्चाचा अधिक वाटा उचलण्याची आवश्यकता असलेली दिसून येत नाही. तसेच वन व्यवस्थापन करण्याची पद्धती स्वीकारावी लागल्यामुळे संसाधनाचे नाश ही होत नाही. सदर गावातील जवळपास सर्वच व्यक्ती हे संसाधन व्यवस्थापनाशी जोडलेले आहेत. तसेच संसाधनाचा योग्य वापर करण्याचे समज सर्वांना असल्यामुळे ते अधिक सजगपणे संसाधनाचा न्याय्य वापर करतात. सामूहिक संसाधनांचे व्यवस्थापन तेव्हा सोपे होते, जेव्हा संसाधनाची भौतिक स्थिती, तसेच व्यक्तींच्या क्रिया आणि नियमबाह्य वर्तन याबाबत सतत व अचूक माहिती उपलब्ध असते. गावमध्ये अगदी त्याचप्रकारे क्रियाकलाप करत असताना दिसून येतात. संघर्ष निवारण्यासाठी १० वर्षापूर्वी अगदी व्यापक पद्धतीने काम होत असताना दिसून येत होता. आताही

गावाच्या विकासासाठी सर्व एकजुटीने निर्णय घेतात. गावात निवडणुकीच्या बाबतीत दोन गट असले तरी गावाच्या विकासासाठी लोक एकत्र येऊन चर्चा करतात.

समुदायाचे अधिकार मान्य नसतील, तर बाहेरील लोकांना संसाधनांमध्ये हस्तक्षेप करणे, त्यांचा उपसा करणे किंवा प्रदूषण करणे सोपे होते. काही गावात हस्तक्षेप हे मोठ्या प्रमाणात असलेली दिसून येते पण शंकरपूर गावाचा विचार केला तर १० वर्षांपूर्वी रासायनिक कारखान्याच्या विरोधात लढा उभारून आपले हक्क मिळवल्याचे दिसून येते तसेच दुसऱ्या गावात उभारलेला कारखान्याला बंद करण्यासाठी त्या गावातील लोक उभे राहिले ते शंकरपूर या गावामुळे ते शक्य झाल्याचे ते स्पष्ट होते. कोणत्याही गोष्टीच्या विकासासाठी विविध उपाययोजना वापरून पाहणे, काय यशस्वी ठरते आणि काय ठरत नाही हे तपासणे, आणि त्या अनुभवाच्या आधारे पुन्हा नवे प्रयोग करणे आवश्यक ठरते. गावात मतभिन्नता, गटबाजी असले तरी गावाचा विकास करायचा असताना सर्व एकत्र येऊन आपला विकास करून घेतानाचा चित्र अगदी स्पष्ट होतो.

**संदर्भ सूची :**


१) Ostrom, E. (1990). *Governing the commons: The evolution of institutions for collective action*. Cambridge university press.
२) Dietz, T., Ostrom, E., & Stern, P. C. (2003). The struggle to govern the commons. *science*, *302*(5652), 1907-1912.
३) Block, W. E. (2011). Review of Ostrom's governing the commons. *Libertarian papers*, *3*, 1.
४) McGinnis, M., & Ostrom, E. (1996). Design principles for local and global commons. *The international political economy and international institutions*, *2*, 465-493.
५) मोहन.वृक्षमित्र : गडचिरोली / चंद्रपूर .सर्वसहमतीची निर्णय प्रक्रिया.(२००५).हि.हि,
६) बोकील .?खरे स्वशासन कसे येईल .(२०१२) .मि ,*परिवर्तनाचा वाटसरू*.५२-३३ ,
७) हेस – बिबर.सेझ पब्लिकेशन्स : नवी दिल्ली .गुणात्मक संशोधनाची कार्यपद्धती .(२०१७).नॅ.शा ,
८) Ghate, R. (2004). *Uncommons in the commons: community initiated forest resource management*. Concept Publishing Company.
९) Ghate, R., Jodha, N., & Mukhopadhyay, P. (Eds.). (2008). *Promise, trust and evolution: managing the commons of South Asia*. Oxford University Press.


# सांगलीच्या हळदीची कथा : एक सामाजशास्त्रीय अभ्यास

**दिपाली विशाल गडदे** समाजशास्त्र विभाग, श्रीमती. कस्तुरबाई वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड सायन्स्, सांगली.

**गोषवारा**: भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे योगदान आपण सर्वजण जाणून आहोतच. २०२५ मध्ये भारतातील कृषी क्षेत्राचे जी.डी.पी. मधील योगदान सुमारे १६-१७ टक्के होते आणि या क्षेत्राने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये सुमारे ३.८ टक्के ची वाढ दर्शविली आहे. ज्यामुळे देशाच्या आर्थिक स्थिरतेला आणि अन्न सुरक्षेला आधार मिळाला. तसेच जवळपास ४६ टक्के लोकसंख्या या क्षेत्रावर अवलंबून आहे. असे अनेक आर्थिक अहवाल आणि सर्वेक्षण दर्शवितात. याचाच अर्थ आज भारत देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे होऊनसुध्दा भारतात बहुसंख्य किंबहुना निम्म्या लोकसंख्येच्या जवळपास असणाऱ्या लोकसंख्येच्या पालनपोषणाची जबाबदारी कृषी क्षेत्रावर अवलंबुन आहे. म्हणजेच भारतातील ग्रामीण व्यवस्थाच आजही भारतीय अर्थव्यवस्थेला आधारभूत आहे असे म्हणावे लागेल. भारताच्या काही भागात घेतली जाणारी पिके अशी आहे की ज्यांनी भारताला जागतिक पातळीवर वेगळी ओळख निर्माण करून दिली आहे.

'मखाना' - भारत जगातील एकुण मखाना उत्पादनापैकी सुमारे ८० ते ९० टक्के मागणी पुर्ण करतो. या एकुण उत्पादनापैकी ९० टक्के वाटा एकट्या बिहार राज्याचा आहे. 'तांदूळ'- भारत हा जगातील सर्वात मोठा तांदूळ उत्पादक आणि निर्यातदार देश आहे. जागतिक बाजारपेठेत बासमती आणि बिगर बासमती तांदळाची मागणी आहे. मसाले, चहा, गहु, तीळ, शेंगदाणे, डाळी, वनस्पती तेल, तृणधान्य इ. चाही भारत देश प्रमुख उत्पादक आणि निर्यातदार देश आहे. या सर्व पिकांमध्ये 'हळद' उत्पादनांमध्ये भारत हा जागतिक स्तरावर प्रमुख देश आहे. जगातील सर्वात मोठा हळद उत्पादक देश भारत आहे. जो जागतिक उत्पादनामध्ये सुमारे ८२ टक्के योगदान देतो आणि हळदीचा सर्वात मोठा ग्राहक आणि निर्यातदार देश आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागात घेतल्या जाणाऱ्या हळदीच्या पिकांचा इतिहास, जी.आय. मानांकन, जागतिक पातळीवर सांगलीला 'यलो सिटी' किंवा 'पिवळे शहर' म्हणून मिळालेली ओळख याशिवाय महापुरासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे हळद साठवणुकीच्या 'पेवां' सारख्या परंपरांगत पध्दतींवर आलेल्या मर्यादा इत्यादींचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधन पध्दती**: सदरच्या शोध निबंधासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. 'हळदीच्या पेवांचे गाव' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'हरीपूर' या गावी जावून प्रत्यक्ष पाहणी, शेतकऱ्यांशी चर्चा करून त्याचा इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिवाय, 'कसबे डिग्रज' येथील कृषी संशोधन केंद्रातील अधिकारी व 'मौजे डिग्रज' या गावातील हळद उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा करून हळद पिकाची सद्यस्थिती, बाजारपेठ, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या व भविष्यातील या पिकांसंबंधीची आव्हाने या विषयी चर्चा करून या पेपरमध्ये मांडणी करण्यात आलेली आहे.

**प्रस्तावना:** निसर्गात होत असलेले बदल, वातावरणातील बदल कधी-कधी मानवाला होऊ घालणाऱ्या नैसर्गिक आपत्तीबद्दल आगाऊ सुचना देत असतात. काही वेळा आपण त्या जाणून त्यावर उपाययोजना करत असतो. पण काही नैसर्गिक प्रलय, आपत्ती अशा असतात की ज्यापुढे मनुष्य हतबल असतो. अशा कित्येक प्रलयांचा अनुभव आपण अनेकदा घेतलेला आहे. दि. ३० सप्टेंबर १९९३ साली लातुर जिल्ह्यातील किल्लारी गावातील भुकंप, केरळ राज्यात सन २००४ साली आलेली त्सुनामी, नंतर झालेले

भुस्खलन, महाराष्ट्रातील माळीण गाव दुर्घटना ही काही प्रातिनिधिक उदाहरणे सांगता येतील. २००५ आणि २०१९ मध्ये सांगली ज्या नदीच्या काठावर वसली आहेत त्या 'कृष्णा' नदीला आलेला महापूर असाच भयानक होता. या महापूराने सांगलीचे अपरिमित नुकसान केले. कित्येक व्यापाऱ्यांचे व्यापार संपले, शेतकऱ्यांची शेती वाहून गेली, कित्येकांचे संसार पाण्याखाली गेले पण या सर्वांबरोबरच सांगलीची आणखीन एक ओळख या पूरामुळे कायमस्वरूपी पुसली गेली आणि ती म्हणजे 'हळद साठवणुकीची पेवं' इतिहास जमा झाली. २००५ च्या महापुरानंतर पेवांमध्ये हळद साठविणे बंदच झाले होते पण हरीपूर या गावी काही पेवांचे किमान अवशेष शिल्लक होते ते २०१९ च्या महापूरानंतर पूर्णत: जमीनदोस्त झाले.

या पेपरमधील याच पेवांचा इतिहास, त्यांची रचना, त्यांच्यामुळे या गावाचा झालेला सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक विकास शिवाय सांगली जिल्ह्यातील हळदीला जगभरामध्ये मागणी का आहे? तिचे वैशिष्ट्ये काय आहे? सांगलीची हळद बाजारपेठ व हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या व त्यांची खंत इत्यादीं विषयी चर्चा करण्यात आलेली आहे.

**हळदींच्या पेवांचा इतिहास**: साधारण ७५०० ते ८००० लोकसंख्या असलेले हरीपूर हे गाव. हळदीसाठी सांगली प्रसिध्द तर हळकुंड साठविण्यासाठीची 'पेवं' ही हरीपूरची ओळख. सांगलीच्या हळदीचा इतिहास सुमारे १५० वर्षांहुन अधिक जुना असून, 'राजापुरी हळद' म्हणून जगभर प्रसिध्द आहे. सांगलीची हळद तिच्या औषधी गुणधर्मांसाठी आणि उच्च दर्जासाठी ओळखली जाते. तसेच तिची बाजारपेठ ही आशियातील सर्वांत मोठी बाजारपेठ आहे. सांगलीच्या हळदीचा इतिहास समृध्द असून १९१० मध्ये सुरू झालेल्या वायदे बाजाराने तिला जागतिक ओळख मिळवून दिली. ज्यामुळे सांगली हळदीचे शहर म्हणून प्रसिध्द झाले. सांगलीत हळदीचा व्यापार वाढला तसं शेजारच्या हरीपूर गावात पेवांच पेवं फुटलं. पेवांनी हरीपूरला वेगळी ओळख दिली, पैसा दिला, 'पेवं म्हणजे समृध्दी' हे सुत्र बनले. कृष्णा काठच्या मातीचे वैशिष्ट्यपुर्ण थर, सांगलीचा शेजार यामुळे ही पेवं वाढली. या पेवांची अधिक माहिती या गावाचे रहिवासी असलेले वयोवृध्द श्री. शंकर सोमाण्णा कोळी यांचेकडून मिळाली. हरीपूर गावचे शंकराचे मंदिर पुरातन, या मंदिराबाहेरच पुजा साहित्य विक्रीचे त्यांचे दुकान, पेवांच्या कथा सांगताना ते पेवांच्या आठवणीत रमून जातात. त्यांच्या म्हणण्यानुसार या गावात गावभर मैदानंच मैदानं, पेवांसाठी मुद्दाम राखलेली. या पेवांचा काळ नेमका किती मागं जातो हे अधिकारवाणीने कोणी सांगू शकलेले नाही. एका पेवांना साधारण २-३ हजार भाडं मिळायचं, त्यामुळे जास्त जमीन असणाऱ्यांना चांगले आर्थिक उत्पन्न मिळायचे. २००५ च्या पूरात हरीपूरातील निम्मी पेवं गेली, उरली सुरली २०१९ च्या पूरातही गेली. नंतरच्या काळात पडझड झालेल्या या पेवांना मुजवून जागा समतल करून घेतली. अशा कित्येक पेवांवर आज हरीपूरात बंगले उभे आहेत. आज तिथे पाहायलाही एकही पेव शिल्लक राहिलेले नाही. पुरामुळे पेवं पाण्याखाली गेली, पाणी आत शिरल्याने स्फोट झाल्यासारखी पेवं उडाली, पेवं अशी फुटायची तेंव्हा मोठा स्फोट झाल्यासारखा आवाज व्हायचा असे श्री. कोळी सांगतात. कदाचित आत साठून राहण्याऱ्या कार्बन डायऑक्साईड वायुचा तो परिणाम असावा.

**हळदीची पेवं हरीपुरातच का?**: हळदीच्या पेवांबद्दल इतकी रंजक माहिती मिळत असताना ती हरीपुरातच का हा प्रश्न पडणे साहजिकच आहे! त्याचे उत्तर या गावचे शेतकरी श्री. सचिन दत्तात्रय यादव यांचेकडून मिळाले. या पेवांचा इथल्या मातीच्या थरांशी संबंध असल्याचे त्यांनी सांगितले. या मातीत पेवं व्यवस्थित कोरता यायची. पेवं कोरल्यावर ती ढासळायची नाहीत कारण त्यासाठी माती तितकी तग धरून ठेवणारी असे. त्यात ठेवलेली हळद टिकून राहत असे. त्यात पाणी झिरपून ओल यायची नाही हे वैशिष्ट्य.

**हरीपुरच्या मातीचे थर**: सर्वात वरती साधारणत: ५ ते ७ फुट जाडीचा काळ्या मातीचा थर. त्याच्या खाली सुमारे ३० ते ७० फुटांपर्यंत माण माती, चिकनी व चिकण माती, लाल माती यांचा थर. याच्या खाली वाळुचा थर व सर्वात शेवटी खाली काळा खडक.

**पेवांची रचना**: पेवांची रचना पुर्वी पाणी साठविण्यासाठी जी 'रांजण' असायची त्याच्याशी साम्य दाखविणारी. सर्वात वरती ४-६ फुटांच्या थरात पेवांच तोंड असतं. सरळ उभट तोंड. ते सर्व बाजूंनी विटांनी बांधून घेतलंल असतं. त्याच्या खाली या तोंडापेक्षा थोडा कमी व्यासाचा मार्ग असतो. तिथं अढी बांधतात. या ठिकाणी पेवांच झाकण असतं. अढी म्हणजे खाली थोडसं विटांचं बांधकाम, त्याच्यावर लोखंडी पट्या, त्या पट्यांवर पेवांचं झाकण बसविलं जायचं. झाकण असतं आयताकृती शहाबादी फरशीचं. ती बसविली की वर माती टाकून तोंड बुजवून टाकायचे. पेवांचा व्यास १०-१२ फुटांच्या आसपास असायचा. दोन पेवांमध्ये साधारणत: ३ ते ४ फुटांचं अंतर असायचं. पेवांचं तोंड भरून घेतल्यानंतर ते कुठं आहेत? हे ओळखु यावं म्हणून वर मातीचा ढिगारा करत. त्या ढिगाऱ्यावर बँकेची प्लेट रोवलेली असते. ज्या बँकेने पेवं तारण ठेवून कर्ज दिलेलं असतं त्या बँकेची ती प्लेट.

**पेवांत हळद भरायची पध्दत**: पेवं ही एक स्वतंत्र संस्कृती होती. पेवं भरणं हे कौशल्याचं काम होत. सर्वांत खाली तळाशी शेणकुटं टाकली जायची, त्यावर शिंदीच्या पानांपासून तयार केलेल्या चटया अंथरल्या जायच्या. पेवांत कडेला ऊसाच्या वाड्याच्या वाळलेल्या पेंड्या लावल्या जायच्या. मग मधल्या भागात हळदीची पोती ठेवली जायची. पोती ठेवत-ठेवत कडेला ऊसाच्या पेंड्याचां थर वाढवत न्यायचे. पेवांच्या झाकणापासून खाली पाच फुटांचा थर मोकळा ठेवला जायचा. त्याच्या खालीपर्यंत हळदीची पोती ठेवली जायची. एका नियमित आकाराच्या पेवांत साधारणत: १५० ते २०० क्विंटल इतकी हळद मावायची.

**पेवांत हळद साठविण्याचे फायदे**: हळद पेवांतच का साठवायची? याचीही कारणे आहेत. त्याच्यामुळे हळदीचे सरंक्षण तर होतचं शिवाय तिचा दर्जाही सुधारतो असं हरीपूरच्या लोकांनी सांगितले. वयोवृध्द श्री. शंकर कोळी सांगतात की, हळदीच्या पेवांमधून हळद काढण्यापुर्वी ती एक दिवस फक्त उघडुन ठेवली जायची. कारण, आत ऑक्सिजन नसायचा त्यात हवा खेळण्यासाठी सुमारे १६-१८ तास लागायचे. पेवांमध्ये पुरेसा ऑक्सिजन जमा झाल्याचं कसं कळायचं? तर त्यासाठी पेवांमध्ये राहाटाच्या सहाय्याने कंदिल सोडला जायचा. त्याची ज्योत टिकली तरच मग माणसं आत उतरायची. या पेवांमध्ये हळद काढताना अशी खूप माणसे ऑक्सिजन अभावी मृत्यु पावल्याचेही ते सांगतात. गावात हळदीचा वास पसरला की लोक समजुन जायचे की कोणाचे तरी पेवं उघडले आहेत. इतक्या उच्च प्रतीच्या हळदीचे सांगलीच्या आसपास उत्पादन व्हायचे. किंबहुना पेवांमध्ये साठविल्यामुळे हळदीची गुणवत्ता इतकी वाढायची.

तिचा रंग जास्त सुधारायचा. तो अधिक पिवळा धमक व्हायचा. हळदीचे वजन वाढायचं. पेवांतील उष्णतेमुळे हळद फुगायची व तिचे वजन वाढायचं. तर अशी ही हरीपुरच्या हळदीच्या पेवांची रंजक कहानी जिने सांगलीला एक वेगळी ओळख निर्माण करून दिली आणि एक ऐतिहासिक वारसा मिळवून दिला.

**सांगलीतील हळद बाजारपेठेची सद्यस्थिती:** सद्यस्थितीतील सांगलीतील हळद पिकाची स्थिती जाणून घेण्यासाठी सांगली जवळच असणाऱ्या 'कसबे डिग्रज' या गावी असणाऱ्या कृषी संशोधन केंद्रातील 'हळद संशोधन योजना' केंद्राला भेट दिली. तेथील श्री. प्रा. मनोज दिलीप माळी (प्रभारी अधिकारी, हळद संशोधन योजना) यांनी हळद पिकाच्या सांगली जिल्ह्यातील पलुस, मिरज, वाळवा, कडेगाव इ. तालुक्यात घेतल्या जाणाऱ्या हळद पिकाच्या वेगवेगळ्या जाती, लागवड पध्दत एकुण उत्पादन प्रक्रिया व नंतर सांगली मार्केट यार्डमध्ये होणारे हळदीचे सौदे यांबद्दल सविस्तर माहिती दिली. सांगलीच्या मार्केट यार्डमध्ये होणारे हळदीचे सौदे दोन सत्रात होतात. सकाळ व संध्याकाळ. सकाळी होणारे सौदे हे स्थानिक व्यापाऱ्यांसाठी असतात तर संध्याकाळी होणारे सौदे हे परराज्यातील व्यापाऱ्यांसाठी असतात. सांगली जिल्ह्यातील जवळच असणाऱ्या 'मौजे डिग्रज' या गावीही हळदीचे विक्रमी उत्पादन घेतले जाते. सध्याच्या तेथील कृषी अधिकारी श्रीमती. गितांजली चव्हाण यांच्या मार्गदर्शनाने काही शेतकऱ्यांची प्रत्यक्ष त्यांच्या शेतावर जाऊन भेट घेण्यात आली. श्री. वसंत तोडकर, श्री. शरद पाटील हे गेल्या ६-७ वर्षांपासून हळदीचे पिक घेतात. त्यांचे १३-१४ एकर क्षेत्र हळदीचे आहे. हे एकुण ९ महिन्याचे पिक असून एकरी १.५०-१.६० लाख उत्पादन खर्च असल्याचे ते सांगतात. तर २५ ते ३० क्विंटल प्रती एकरी पिकाचे उत्पादन मिळते असा त्यांचा अनुभव आहे. साधारणत: १४५००/- ते १७०००/- प्रती क्विंटल भाव मिळत असल्याचे ते सांगतात.

**शेतकऱ्यांची खंत**: या शोध निबंधाच्या निमित्ताने सांगलीच्या हरीपूर, कसबे डिग्रज, मौजे डिग्रज या भागातील शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांच्या सोबत चर्चा करताना एक बाब निदर्शनास प्रकर्षाने जाणविली आणि ती म्हणजे कृषी व्यवसायामध्ये होत असलेला अत्यंतिक राजकारणाचा प्रवेश. जो सांगलीच्या हळद बाजारपेठेला नक्कीच मारक आहे. याबद्दल श्री. शरद पाटील हे हळद उत्पादक शेतकरी अत्यंत तळमळीने बोलताना दिसतात. एक शेतकरी म्हणून हळदी पिकाच्या लागवडीपासून ते विक्री पर्यंतची इंत्यभूत माहिती तर त्यांना आहेच पण त्याही पलीकडे जाऊन सांगलीत घेतल्या जाणाऱ्या हळदीच्या वाणांमध्ये कर्क्युमीन, ऑलीओ रेझीन, ऑईल इत्यादींचे प्रमाण इतर ठिकाणी घेतल्या जाणाऱ्या हळदींच्या पिकांपेक्षा जास्त असल्याचे ते सांगतात. शिवाय हळद ही औषधी आहे असे केवळ न सांगता कॅन्सर सारख्या आजारांमध्ये हळद कशी उपयोगी आहे?, त्यासाठी हळदीमधील कर्क्युमीनचे प्रमाण जास्त असणे का गरजेचे आहे?, आणि ते मानवी शरीरांमध्ये कॅन्सर पेशंटसाठी डायरेक्ट इंजेक्टेबल म्हणजेच इंजेक्शनद्वारे देण्यात येणारे का नाही?, याचीही सविस्तर माहिती देतात आणि यावर अजून संशोधनास भरपूर वाव असल्याचे मान्य करतात. कारण सांगली जवळच असणाऱ्या मिरजेला, 'आरोग्य पंढरी' म्हणून ओळखले जाते. इथे असणाऱ्या अनेक तज्ञ डॉक्टर्स, मोठंमोठे हॉस्पिटल त्या अनुषंगाने विकास पावलेली सांगली, मिरज ही शहरे त्यांचा झालेला विस्तार यांचा संबंधही ते शेतीशी जोडतात. सांगली, मिरजेत उपचारासाठी येणाऱ्या अनेक रुग्णांपैकी कॅन्सर असणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे. हळदीचा कॅन्सरवरील उपयोगी औषध म्हणून इथे संशोधन केंद्र झाल्यास त्याचा सर्वांनाच फायदा होईल असा विचार ते मांडतात.

सांगलीत होणारे हळदीचे विक्रमी उत्पन्न, इथल्या हळदीला २०१८ साली मिळालेले जी.आय. मानांकन, इथे उपलब्ध असणारे पोषक वातावरण, मोठी बाजारपेठ, हळदीमुळे इथल्या सामाजाला मिळालेली एक वेगळी सामाजिक, सांस्कृतिक ओळख इ. बद्दल हे शेतकरी तळमळीने बोलतात. सांगलीत जवळच असणाऱ्या कवठेमहांकाळ तालुक्यात असणाऱ्या 'रांजणी' या गावात 'ड्रायपोर्ट' उभारण्याची मागणी आता अखेर गती घेत आहे. त्यामुळे हळदीसोबत इतर कृषी मालांची वाहतुक करणारे कंटेनर यांची वाहतुक, स्टोअरेज, कस्टम क्लिअरन्स, पॅकिंग आणि ट्रान्सशिपमेंट यांसारख्या सुविधा उपलब्ध होत असतानाही सांगलीमध्ये 'हळद क्लस्टर' का नाही? असा प्रश्न ते उपस्थित करतात. कारण, हळदीने सांगलीला 'पिवळे शहर' म्हणून ओळख मिळवून दिलेली आहे. इथल्या शेतकऱ्यांना या पिकाने समृध्द तर केलेच आहे. शिवाय 'हळद क्लस्टर' झाले असते तर सांगलीतील कृषी वर्गाला आणखीन चालना मिळाली असती, रोजगार वाढला असता, कृषी क्षेत्राबरोबर आरोग्य संशोधनात चालना मिळाली असती पण दुर्देवाने तसे होऊ शकले नाही. यासाठी काही शेतकऱ्यांनी 'शेतकरी संघटनेमार्फत' राज्यकर्त्यांच्या, प्रशासनाच्या दरबारी अनेक पत्रव्यवहार, भेटी घेणे, निवेदने दिल्याचेही ते सांगतात पण, केवळ राजकीय इच्छाशक्ती नसल्यामुळे किंवा राजकीय पाठबळ न मिळाल्यामुळे सांगलीत हळद क्लस्टर होवू न शकल्याची खंत त्यांना आहे.

**समारोप**: आज भारताचे आणि त्यातही विशेषत: महाराष्ट्राचे राजकारण बघता, राजकारणाने प्रवेश केलेला नाही असे एकही क्षेत्र नाही असेच म्हणावे लागेल. मग ते सांस्कृतिक-साहित्यीक क्षेत्र असो, समाजमाध्यमे असो किंवा कृषी क्षेत्र असो सर्वच क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप पाहावयास मिळत आहे. सांगलीची २०१८ साली जी.आय. मानांकन मिळालेली हळद, आशिया खंडातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेली हळद, उत्तम गुणवत्ता असलेली हळद, सांगलीच्या हरीपुरमधल्या हळदीच्या पेवांमुळे निर्माण झालेली वेगळी सांस्कृतिक ओळख, सांगलीला 'पिवळे शहर' म्हणून ओळख मिळवून देणारी हळद किंबहुना या सर्वांमुळे सांगलीला एक समृध्द सामाजिक वारसा लाभला. पण या वर नमुद केलेल्या सर्व घटकांबरोबरच सांगलीला उत्तम राजकीय वारसा असूनही त्याचा फायदा कृषी क्षेत्रासाठी, इथल्या सामाजाच्या एकंदर प्रगतीसाठी इथल्या राजकर्त्यांनी घेतला नसल्याची खंत सांगलीतील हळद उत्पादक शेतकरी, व्यापारी व्यक्त करतात. त्यासाठी क्षेत्र कोणतेही असो, एक समाज म्हणून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्या-त्या क्षेत्रातले तज्ञ व त्यांची मदत घेवून प्रशासनाच्या सहाय्याने जनतेने निवडून दिलेल्या राज्यकर्त्यांनी प्रयत्न करणे अपेक्षित असते. सांगलीला एक समाज म्हणून असे प्रश्न सतावत आहेतच पण, या शोध निबंधापुरता विचार करायचा झाल्यास सांगलीतील हळदीला

राज्यकर्त्यांकडून न्याय मिळणे अपेक्षीत आहे आणि त्यासाठी सांगलीच्या आसपासच्या ग्रामीण भागातील हळद उत्पादक शेतकरी त्यांच्याकडे मोठ्या आशेने आणि अपेक्षेने पाहतो आहे हे मात्र नक्की.

**संदर्भसूची:**

१. abhijitghorpade.wordpress.com
२. जितेंद्र कदम, रघुनाथ वाघमोडे, प्रतापसिंह पाटील आणि दिलीप कठमाळे (२०१३), हळद : आधुनिक लागवड पध्दती व प्रक्रिया, प्रकाशक- विस्तार प्रकाशन.
३. Maharashtra Maja : Rajdeep Sardesai Explores Sangli's Termeric and Sugar Politics : India Today (13 November 2024)
४.शेखर जोशी, (२ जानेवारी २०२४) हिरक महोत्सवी, सांगली : सहा दशकांचा इतिहास, प्रकाशन - सकाळ.
५. Wikipedia-Sangli Termeric

# ग्रामीण समाजातील जात वास्तव : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. किरण सुरवसे** समाजशास्त्र, विभाग प्रमुख,श्री सिद्धीविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर, पुणे – ५२

**सारांश:** प्रस्तुत शोध निबंध 'ग्रामीण समाजातील जात वास्तव : एक समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयावर आधारित असून, या शोध निबंधात ग्रामीण समाजातील जातीय संरचनेचे स्वरूप, त्यातून निर्माण होणारे सामाजिक संबंध, असमानता आणि बदलत्या प्रवाहांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. भारतीय ग्रामीण समाजात जातीव्यवस्था ही केवळ सामाजिक वर्गीकरणाची पद्धत नसून ती सामाजिक नियंत्रण, सत्ता, प्रतिष्ठा आणि संसाधनांच्या वितरणाचे प्रमुख साधन म्हणून कार्य करत आहे. विशेषतः भारतीय ग्रामीण समाजात जातीय रचना सामाजिक जीवनाच्या प्रत्येक स्तरावर प्रभाव टाकते. या अभ्यासाचा मुख्य उद्देश ग्रामीण समाजातील जातीय व्यवहारांचे वास्तव समजून घेणे आणि त्याचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक परिणाम विश्लेषित करणे हा आहे. यामध्ये एम. एन. श्रीनिवास यांच्या संस्कृतीकरण, प्रभावी जात आणि पाश्चिमात्यीकरण या संकल्पनांचा वापर करून ग्रामीण समाजातील बदलत्या जातीय प्रवाहांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्याय, समता आणि मानवी हक्कांवरील विचारांच्या आधारे जात व्यवस्थेवरील परिवर्तनवादी दृष्टिकोन समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**बीजसंज्ञा:** भारतीय समाज, जाती व्यवस्था, ग्रामीण समाज, विषमता, प्रभावी जात इत्यादी

**प्रस्तावना:** भारतीय समाजव्यवस्था ही मूळातच जातीव्यवस्थेवर आधारित असून हजारो वर्षांपासून भारतीय समाजात व्यक्तीचा सामाजिक दर्जा हा व्यवसाय, विवाह, सामाजिक संबंध आणि सत्तासंबंध या निकषांच्या आधारे जन्मानुसार ठरत आलेला आहे. जात ही केवळ सामाजिक ओळख नसून ती व्यक्तीच्या जीवनातील संधी, मर्यादा, प्रतिष्ठा, व्यवसाय, विवाह आणि सामाजिक संबंध निश्चित करणारी एक प्रभावी सामाजिक संस्था आहे. विशेषतः ग्रामीण समाजात जाती व्यवस्था अधिक ठळकपणे दिसून येते. ग्रामीण समाजाची जीवनपद्धती परंपरावादी असल्यामुळे येथे सामाजिक संबंध वैयक्तिक न राहता सामूहिक व जातीय स्वरूपाचे असलेले दिसून येतात. ग्रामीण समाजात व्यक्तीपेक्षा तिची जात अधिक महत्त्वाची ठरते. त्यामुळे ग्रामीण समाजात जात ही केवळ सांस्कृतिक ओळख नसून ती व्यक्तीचे सामाजिक जीवन नियंत्रित करणारी प्रमुख संस्था आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेने समानता, सामाजिक न्याय आणि बंधुता हे मूल्य स्वीकारले. अस्पृश्यता रद्द करण्यात आली, आरक्षण धोरण लागू करण्यात आले, शिक्षणाचा प्रसार झाला. तरीसुद्धा ग्रामीण समाजातील जातीव्यवस्था पूर्णतः नष्ट झालेली दिसून येत नाही. तर ती विषमता, भेदभाव आणि सांस्कृतिक वर्चस्व अशा विविध स्वरूपात आजही टिकून आहे. प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश ग्रामीण समाजातील जातीव्यवस्थेचे वास्तव समजून घेऊन तिचा ग्रामीण समाजावर सामाजिक, आर्थिक व राजकीय परिणाम अभ्यासणे आणि एम. एन. श्रीनिवास व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टिकोनातून तिचे विश्लेषण करणे हा आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:** प्रस्तुत शोध निबंधाचा मुख्य उद्देश ग्रामीण समाजातील जातीव्यवस्थेचे वास्तव समजून घेणे व तिचा सामाजिक जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. या संशोधनामागील प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत : १) ग्रामीण समाजातील जात व्यवस्थेची रचना व स्वरूप समजून घेणे. २) ग्रामीण समाजात जातीनुसार निर्माण होणाऱ्या सामाजिक भेदभावाचा अभ्यास करणे. ३) एम. एन. श्रीनिवास यांच्या संकल्पनांच्या आधारे ग्रामीण समाजातील जातीय बदलांचे विश्लेषण करणे. ४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या आधारे जात व्यवस्थेवरील परिवर्तनवादी दृष्टिकोन समजून घेणे.

**तथ्य संकलन पद्धती:** 'ग्रामीण समाजातील जात वास्तव : एक समाजशास्त्रीय अभ्यास' या प्रस्तुत विषयावर शोध निबंध लिहण्यासाठी माहिती संकलनाच्या दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. यामध्ये वर्तमान पत्रे, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित लेख, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करून माहितीचे संकलन केले आहे.

**जात व्यवस्थेची संकल्पना:** 'जात' म्हणजे जन्मावर आधारित सामाजिक गट ज्यामध्ये व्यक्तीचा सामाजिक दर्जा जन्माने ठरतो आणि त्यातून बाहेर पडणे अत्यंत कठीण असते. लुई ड्युमाँ यांच्या मते जातीव्यवस्था ही शुद्ध-अशुद्धतेच्या तत्त्वावर आधारित श्रेणीबद्ध रचना आहे. उच्च जाती स्वतःला शुद्ध मानतात तर निम्न जातींना अशुद्ध समजले जाते.

**ग्रामीण समाजाच्या संदर्भात जातीची वैशिष्ट्ये:** जातीव्यवस्था ही भारतीय समाजाची एक प्रमुख सामाजिक संस्था असून, ती व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रभाव टाकते. जात ही केवळ सामाजिक ओळख नसून ती सामाजिक

संबंध, आर्थिक संधी, धार्मिक व्यवहार आणि सत्तासंबंध ठरवणारी एक श्रेणीबद्ध व्यवस्था आहे. भारतीय समाजात विशेषतः ग्रामीण भागात जातीव्यवस्था अधिक मजबूत स्वरूपात अस्तित्वात आहे.

**१) जन्मावर आधारित सदस्यत्व:** व्यक्ती कोणत्या जातीत जन्माला येते यावर तिचा संपूर्ण सामाजिक दर्जा ठरतो. व्यक्तीला आपली जात बदलता येत नाही. त्यामुळे जात ही स्वेच्छेने निवडलेली ओळख नसून व्यक्तीला जन्मत: मिळालेली सामाजिक ओळख आहे. यामुळे व्यक्तीच्या जीवनातील संधी जन्मापासूनच मर्यादित किंवा विस्तृत ठरतात. उदाहरणार्थ, एखाद्या गावात दलित कुटुंबात जन्मलेले मूल बहुतेक वेळा शेतमजूर, सफाई कामगार किंवा असंघटित मजुरीकडेच वळते. त्याउलट जमीनधारक उच्च जातीत जन्मलेले मूल शिक्षण, व्यवसाय किंवा राजकारणाकडे सहज जाते.

**२) सामाजिक श्रेणीबद्धता:** जातीव्यवस्थेत सर्व जाती समान नसून त्यांच्यात उच्च-नीच किंवा श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद दिसून येतो. उच्च जातींना सामाजिक प्रतिष्ठा, सन्मान आणि सत्ता मिळते, तर खालच्या जातींना दुय्यम वागणूक दिली जाते. ग्रामीण समाजात हा भेद मंदिर प्रवेश, सामाजिक समारंभ, पाणवठे आणि निवास व्यवस्थेत स्पष्ट आढळून येतो.

**३) आंतरजातीय विवाहावर बंदी:** प्रत्येक जातीत विवाह फक्त स्व जातीतच करण्याचे अलिखित सामाजिक नियम आहेत. आजही आंतरजातीय विवाहांना समाजातून विरोध केला जातो. आंतरजातीय विवाहाच्या अटींमुळे ग्रामीण समाजात सामाजिक बहिष्कार, कुटुंब तोडणे किंवा हिंसा घडून येते. यामुळे जातीव्यवस्था पिढ्यानपिढ्या टिकून राहते.

**४) व्यवसाय निवडीवर बंधने:** पारंपरिक भारतीय समाजात जातीव्यवस्थेच्या जाचक बंधनामुळे विशिष्ट जातींवर विशिष्ट प्रकारची कामे लादण्यात आली. उदाहरणार्थ - सफाई काम, मृत जनावरांची विल्हेवाट, चामड्याचे काम ही कामे दलित जातींनाच दिली जातात. उदाहरणार्थ, गावातील कचरा उचलण्याचे काम अजूनही एकाच विशिष्ट जातीकडे असते. आजही ग्रामीण समाजात हा संबंध मोठ्या प्रमाणात टिकून आहे. त्यामुळे व्यक्तीचे कौशल्य नव्हे तर जन्म महत्त्वाचा ठरतो.

**५) शुद्ध-अशुद्धतेची संकल्पना:** भारतीय समाजव्यवस्थेत काही जातींना शुद्ध तर काहींना अशुद्ध मानले जाते. खालच्या जातींचा स्पर्श, सावली, अन्न किंवा पाणी अपवित्र समजले जाते. याच संकल्पनेतून अस्पृश्यतेचा उगम झाला. कायद्याने अस्पृश्यता रद्द झाली असली तरी ग्रामीण समाजात ही मानसिकता अजूनही आढळते. ग्रामीण भागात सार्वजनिक विहिरीतून दलितांनी पाणी घेतले म्हणून भांडणे, मारहाण किंवा भांडे फेकण्याची उदाहरणे आजही आढळतात. काही गावांत दलितांना वेगळ्या ग्लासमध्ये चहा दिला जातो. हे शुद्ध-अशुद्धतेचे प्रत्यक्ष उदाहरण आहे.

**६) सामाजिक बहिष्कार आणि नियंत्रण:** जातीव्यवस्थेचे नियम मोडणाऱ्यांना समाजातून बहिष्कृत केले जाते. आंतरजातीय विवाह, परंपरा न पाळणे, उच्च जातींचे अनुकरण करणे यामुळे व्यक्तीला सामाजिक शिक्षा दिली जाते. त्यामुळे समाजातील नियंत्रण यंत्रणा अधिक मजबूत होते. ग्रामीण समाजात जातीय नियम मोडल्यास व्यक्तीला सामाजिक बहिष्कार दिला जातो. उदाहरणार्थ, आंतरजातीय विवाह केल्यास त्या कुटुंबाशी कोणी व्यवहार करत नाही, दुकानातून सामान देत नाही, सामाजिक कार्यक्रमांत बोलावत नाही. ही बहिष्काराची पद्धत कायद्यापेक्षा समाजाच्या नियंत्रणाला अधिक प्रभावी ठरते. एकूणच जातीव्यवस्थेची वैशिष्ट्ये पाहता असे स्पष्ट होते की जात म्हणजे केवळ सामाजिक गट नसून ती व्यक्तीच्या संपूर्ण जीवनावर नियंत्रण ठेवणारी एक प्रभावी सामाजिक संस्था आहे. आधुनिकतेमुळे काही बदल झाले असले तरी ग्रामीण समाजात जातव्यवस्थेची मूलभूत वैशिष्ट्ये आजही मोठ्या प्रमाणात टिकून आहेत.

**ग्रामीण समाजावर जातीव्यवस्थेचे परिणाम:** भारतीय ग्रामीण समाजाची रचना ही प्रामुख्याने जातीव्यवस्थेवर आधारित आहे. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या प्रत्येक पैलूंवर जातीव्यवस्थेचा खोलवर परिणाम दिसून येतो.

**१) सामाजिक परिणाम:** ग्रामीण समाजात जातीव्यवस्थेचा सर्वात मोठा परिणाम सामाजिक जीवनावर दिसून येतो. उच्च आणि नीच जातींमध्ये सामाजिक अंतर राखले जाते. खालच्या जातींना अनेकदा मंदिर प्रवेश, सामाजिक समारंभ, अंत्यसंस्कार, उत्सव, पाणवठे यामध्ये समान सहभाग दिला जात नाही. यामुळे सामाजिक बहिष्काराची प्रक्रिया निर्माण होते. आंतरजातीय विवाह हा आजही ग्रामीण समाजात मोठा सामाजिक अपराध मानला जातो. अशा विवाह करणाऱ्या व्यक्तींना गावातून बहिष्कृत केले जाते, त्यांच्याशी व्यवहार बंद केला जातो, सामाजिक कार्यक्रमांमध्ये आमंत्रण दिले जात नाही. यामुळे व्यक्तीचे मानसिक आरोग्य बिघडते, आत्मसन्मान दुखावला जातो आणि सामाजिक अलगावाची भावना निर्माण होते. अनेक वेळा लोक भीतीपोटी अन्याय सहन करतात आणि आवाज उठवत नाहीत.

**२) आर्थिक परिणाम:** जातीव्यवस्थेचा ग्रामीण समाजातील आर्थिक रचनेवरही मोठा प्रभाव दिसून येतो. बहुतेक गावांमध्ये जमीनधारणा काही विशिष्ट उच्च किंवा प्रभावी जातींकडे केंद्रित असते. खालच्या जाती बहुतेक वेळा भूमिहीन शेतमजूर, मजुरी करणारे, सफाई कामगार किंवा असंघटित क्षेत्रातील कामगार असतात. यामुळे उत्पन्नात व आर्थिक स्थितीत मोठी विषमता आढळते. उच्च जाती आर्थिकदृष्ट्या सक्षम असतात, तर दलित, आदिवासी आणि मागास वर्ग दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेले आढळतात. शिक्षण, आरोग्य, पोषण यांसारख्या मूलभूत सुविधांमध्येही त्यांना मर्यादा येतात. अनेक ग्रामीण भागात आजही खालच्या जातींना कमी मजुरी दिली जाते, वेळेवर वेतन मिळत नाही आणि कामाच्या ठिकाणी अपमानास्पद वागणूक दिली जाते. त्यामुळे आर्थिक शोषण हे जात व्यवस्थेचे स्थायी स्वरूप बनले आहे.

**३) राजकीय परिणाम:** ग्रामीण समाजातील राजकारणातही जातीव्यवस्थेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. पंचायत राज संस्थांमध्ये कोणत्या जातीचे लोक निवडून येतील हे अनेकदा जातीय समीकरणांवर अवलंबून असते. प्रभावी जाती (Dominant Castes) गावाच्या निर्णय प्रक्रियेवर वर्चस्व ठेवतात. मतदानाच्या वेळी संपूर्ण जाती एकत्र मतदान करतात. त्यामुळे लोकशाही निर्णय वैयक्तिक

मतांऐवजी जातीय गटांवर आधारित होतात. अनेक वेळा खालच्या जातींचे प्रतिनिधी निवडून आले तरी प्रत्यक्ष सत्ता उच्च जातींकडेच राहते. यामुळे खऱ्या अर्थाने लोकशाही सहभाग मर्यादित होतो आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला धक्का बसतो.

**४) शैक्षणिक परिणाम:** जातीव्यवस्थेमुळे ग्रामीण समाजात शैक्षणिक विषमताही मोठ्या प्रमाणात आढळून येते. उच्च जातीतील मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन, संसाधने आणि मार्गदर्शन मिळते, तर खालच्या जातींतील मुलांना घरकाम, मजुरी किंवा भेदभावामुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागते. शाळांमध्येही कधी कधी सूक्ष्म स्वरूपाचा भेदभाव अनुभवास येतो. उदाहरणार्थ — बसण्याची व्यवस्था, शिक्षकांचा दृष्टिकोन, अपमान. त्यामुळे दलित व आदिवासी मुलांमध्ये शिक्षणातील गळतीचे प्रमाण अधिक दिसून येते.

**५) सांस्कृतिक परिणाम:** जातीव्यवस्थेचा ग्रामीण समाजाच्या सांस्कृतिक जीवनावरही परिणाम होतो. सण, उत्सव, जत्रा, धार्मिक विधी यामध्ये सहभाग जातीनुसार ठरतो. काही जातींना मुख्य कार्यक्रमांमध्ये प्रवेश नाकारला जातो, तर काहीवेळा केवळ पूरक भूमिका दिल्या जातात. सांस्कृतिक भांडवल काही विशिष्ट जातींकडेच केंद्रित राहते. यामुळे सांस्कृतिक समानतेऐवजी वर्चस्वाची संस्कृती निर्माण होते.

**६) मानसिक व नैतिक परिणाम:** जातीय भेदभावाचा सर्वात गंभीर परिणाम मानसिक स्थितीवर होतो. कनिष्ठ जातीतील व्यक्तींमध्ये न्यूनगंड, भीती, चिंता, असुरक्षितता आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होतो. तर उच्च जातींमध्ये श्रेष्ठत्वाची भावना तयार होते. ही मानसिकता समाजात नैतिक अधोगती घडवते. कारण अन्याय सहन करणे आणि अन्याय करणे दोन्ही सामाजिकदृष्ट्या स्वीकारले जातात. थोडक्यात, ग्रामीण समाजावर जातीव्यवस्थेचे परिणाम बहुआयामी आहेत. जातीव्यवस्था ही केवळ सामाजिक ओळख नसून ती संपूर्ण जीवनशैली नियंत्रित करणारी शक्ती आहे. कायदे, आरक्षण, शिक्षण आणि शहरीकरणामुळे काही बदल घडत असले तरी ग्रामीण समाजात जातीव्यवस्थेचा प्रभाव अजूनही खोलवर रुजला आहे. म्हणून ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जात व्यवस्थेचा चिकित्सक पुनर्विचार करणे आणि सामाजिक समतेवर आधारित नवे मूल्यप्रणाली निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या आधारे जात व्यवस्थेवरील परिवर्तनवादी दृष्टिकोन:** भारतीय समाजातील जातीव्यवस्थेवर मूलगामी आणि परिवर्तनवादी दृष्टिकोन मांडणारे सर्वात प्रभावी विचारवंत म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांनी जातीव्यवस्थेकडे केवळ सामाजिक रचना म्हणून नव्हे तर व्यक्ती स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेला अडथळा आणणारी अन्यायकारी व्यवस्था म्हणून पाहिले. आंबेडकरांच्या मते जात ही जन्मावर आधारित असमानता निर्माण करणारी व्यवस्था असून ती लोकशाही मूल्यांशी विसंगत आहे. म्हणूनच त्यांनी जात व्यवस्थेच्या सुधारणेऐवजी तिच्या संपूर्ण उच्चाटनाची भूमिका घेतली. जात व्यवस्थेमुळे दलित आणि वंचित वर्गाला शिक्षण, रोजगार, सार्वजनिक सुविधा आणि सामाजिक सन्मानापासून दूर ठेवले गेले आहे. त्यामुळे त्यांनी शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीचा मार्ग दाखवला. शिक्षणाद्वारे बौद्धिक मुक्तता, संघटनाद्वारे सामूहिक शक्ती आणि संघर्षाद्वारे सामाजिक परिवर्तन साधता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीव्यवस्थेचा धार्मिक आधारही तीव्रपणे नाकारला. त्यांच्या मते जोपर्यंत धर्म आणि परंपरा जातीय असमानतेला समर्थन देतात, तोपर्यंत सामाजिक समता शक्य नाही. म्हणूनच त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून समता, करुणा आणि विवेकावर आधारित जीवनमूल्यांचा पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा परिवर्तनवादी दृष्टिकोन कायद्याच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन या संकल्पनेवर आधारित होता. भारतीय संविधानाच्या निर्मितीत त्यांनी समानता, मूलभूत हक्क, अस्पृश्यता निर्मूलन आणि सामाजिक न्याय यांना केंद्रस्थानी ठेवले. अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षण, समान नागरी हक्क, शिक्षण आणि रोजगारातील संधी यांद्वारे जातीय विषमता कमी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. यामुळे दलित वर्गाला सार्वजनिक जीवनात प्रवेश मिळाला आणि सामाजिक सहभाग वाढला.

एकंदरीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन केवळ सुधारणावादी नसून क्रांतिकारी स्वरूपाचा होता. त्यांनी जातीव्यवस्थेला स्वीकारण्याऐवजी तिच्या मुळावर घाव घालण्याची भूमिका घेतली. त्यांच्या विचारांमुळे भारतीय समाजात सामाजिक न्याय, मानवी अधिकार आणि समतेची जाणीव निर्माण झाली. आजही भारतीय ग्रामीण आणि शहरी समाजात जातीय भेदभाव टिकून असला तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार समाजाला परंपरेतून आधुनिकतेकडे आणि विषमतेतून समतेकडे नेणारे मार्गदर्शक तत्त्व म्हणून अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

**एम. एन. श्रीनिवास यांच्या संकल्पनांच्या आधारे ग्रामीण समाजातील जातीय बदलांचे विश्लेषण:** भारतीय ग्रामीण समाजातील जातीव्यवस्थेचा अभ्यास करताना सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यांनी भारतीय समाजातील बदल समजून घेण्यासाठी संस्कृतीकरण, पाश्चिमात्यीकरण, प्रभावी जात अशा मूलभूत संकल्पना मांडल्या आहेत. या संकल्पनांच्या आधारे ग्रामीण समाजातील जातीय संरचनेत होणारे बदल अधिक स्पष्टपणे समजतात. एम. एन. श्रीनिवास यांच्या मते, संस्कृतीकरण ही प्रक्रिया आहे म्हणजे खालच्या जातींनी उच्च जातींच्या जीवनशैली, मूल्ये, आचार-विचार, धार्मिक प्रथा आणि सामाजिक सवयी स्वीकारणे. ग्रामीण भागात अनेक दलित व ओबीसी गटांनी शाकाहार, धार्मिक विधी, शिक्षण आणि स्वच्छता यासारख्या सवयी स्वीकारून स्वतःचा सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे जातीव्यवस्थेत काही प्रमाणात गतिशीलता दिसून येते, परंतु मूळ सामाजिक असमानता पूर्णपणे नाहीशी झालेली नाही.

दुसरी महत्त्वाची संकल्पना म्हणजे प्रभावी जात. श्रीनिवास यांच्या मते, एखादी जात संख्येने अधिक, आर्थिकदृष्ट्या मजबूत आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी असेल तर ती गावात प्रभावी ठरते. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मराठा समाज हा अनेक ठिकाणी प्रभावी जात म्हणून दिसून येतो. ग्रामपंचायत, सहकारी संस्था, शिक्षण संस्था आणि स्थानिक राजकारणात अशा जातींचा मोठा प्रभाव दिसतो. त्यामुळे सामाजिक निर्णय आणि संसाधनांचे वाटप अनेकदा या जातींच्या हितानुसार घडते. पाश्चिमात्यीकरण या संकल्पनेद्वारे एम. एन. श्रीनिवास यांनी आधुनिक शिक्षण, विज्ञान, कायदे, प्रशासन आणि लोकशाही मूल्यांचा ग्रामीण समाजावर होणारा प्रभाव

स्पष्ट केला. शिक्षण, माध्यमे, स्थलांतर आणि शासकीय योजना यामुळे ग्रामीण समाजात परंपरागत जातीय बंधने काही प्रमाणात सैल होत आहेत. आंतरजातीय संवाद वाढत आहे आणि काही भागांत आंतरजातीय विवाहही स्वीकारले जात आहेत.

एकंदरीत एम. एन. श्रीनिवास यांच्या संकल्पनांमुळे ग्रामीण समाजातील जातीय बदल स्थिर नसून गतिशील असल्याचे दिसून येते. परंपरा आणि आधुनिकता, धार्मिकता आणि कायदे, सामाजिक नियंत्रण आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांच्यातील संघर्षातून ग्रामीण समाजात हळूहळू परिवर्तन होत आहे. तथापि, हे परिवर्तन संथ गतीने होत असून जातीय विषमता आणि मानसिकता अजूनही मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. त्यामुळे एम. एन. श्रीनिवास यांचे विश्लेषण ग्रामीण समाजातील परिवर्तन आणि सातत्य दोन्ही समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

**निष्कर्ष:** ग्रामीण समाजात जातीव्यवस्था अजूनही सामाजिक व्यवहार नियंत्रित करणारी एक प्रभावी रचना असल्याचे स्पष्ट होते. विवाह, धार्मिक विधी, सार्वजनिक जीवन आणि स्थानिक राजकारण यामध्ये जातीय ओळख निर्णायक भूमिका बजावते. उच्च आणि कनिष्ठ जातींमधील आर्थिक व शैक्षणिक तफावत अजूनही मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. सामाजिक बहिष्कार, अपमान आणि भेदभाव या समस्या केवळ सामाजिक नव्हे तर मानसिक आणि सांस्कृतिक स्वरूपाच्या आहेत. तथापि, शिक्षणाचा विस्तार, शहरीकरण, माध्यमांचा प्रभाव, कायदे आणि सामाजिक चळवळी यांमुळे ग्रामीण समाजात हळूहळू बदल होत आहेत. अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, आरक्षण धोरणे, महिला सक्षमीकरण योजना आणि सामाजिक न्यायाच्या कार्यक्रमांमुळे वंचित घटकांना संरक्षण आणि संधी मिळत आहेत. तरीही, कायदेशीर बदल आणि सामाजिक मानसिकतेतील बदल यामध्ये स्पष्ट अंतर आढळते. ग्रामीण समाजातील जातीव्यवस्था ही बदलाच्या प्रक्रियेत असली तरी तिचे मूलभूत स्वरूप अजूनही टिकून आहे.

**संदर्भ:**

१) आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. (१९३६). जातिव्यवस्थेचे निर्मुलन, मुंबई.
२) आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. (१९४८). The Untouchables: Who Were They and Why They Became Untouchables. नवी दिल्ली: अमृत प्रकाशन.
३) श्रीनिवास, एम. एन. (१९६२). Caste in Modern India and Other Essays. मुंबई: एशिया पब्लिशिंग हाऊस.
४) नाडगोंडे गुरुनाथ (१९८६), ग्रामीण समाजशास्त्र, पुणे, कॉंटिनेन्टल प्रकाशन,
५) देसाई, ए. आर. (२००५). Rural Sociology in India. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन.
६) शाह, घनश्याम. (२००४). भारतामधील सामाजिक चळवळी. नवी दिल्ली: सेज प्रकाशन.

# लिंग असमानता आणि ग्रामीण शिक्षण

**प्रा. किशन काशिनाथ घोगरे** लोकमान्य टिळक महाविद्यालय,वणी जि. यवतमाळ.

**गोषवारा:** भारतातील ग्रामीण भागातील शिक्षणात लिंग असमानता ही एक गंभीर आव्हान आहे, जिथे खोलवर रुजलेले पितृसत्ताक नियम, आर्थिक अडचणी व सुरक्षिततेच्या चिंता मुलींना शिक्षणापर्यंत पोहोचण्यास लक्षणीयरीत्या मर्यादित करतात. काही वर्षात साक्षरतेचे प्रमाण वाढत असूनही, ग्रामीण भागात पुरुष व महिलांच्या शैक्षणिक स्थितीत मोठा फरक कायम आहे. अभ्यास/क्षेत्र पारंपारिक लिंग भूमिका जसे की मुलाला प्राधान्य देणे, बाल विवाह करणे व कौटुंबिक जबाबदाऱ्या ग्रामीण मुलींचे उच्च गळतीचे प्रमाण व कमी शिक्षणाच्या संधी कशा निर्माण करतात याचे परीक्षण करतो. शिक्षणाच्या दुहेरी भूमिकेचा शोध घेते, जे आर्थिक सक्षमीकरणाचे साधन म्हणून काम करते व महिलांसाठी कौटुंबिक भूमिका गतिशीलता बदलते, त्याच वेळी लिंग अपेक्षां विरुद्ध संघर्षाचे ठिकाण आहे. निष्कर्षांवरून असे दिसून येते की महिला शिक्षणात सुधारणा राहणीमानावर लक्षणीय परिणाम करते, कारण शिक्षित महिला त्यांच्या मुलांच्या आरोग्य व शिक्षणात गुंतवणूक करण्याची अधिक शक्यता आहे. समानता वाढवण्यासाठी प्रमुख शिफारसींमध्ये हे समाविष्ट आहे. केंद्रित धोरणात्मक हस्तक्षेप: मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी कायदे व प्रोत्साहन-आधारित कार्यक्रमांची कठोर अंमलबजावणी सामुदायिक जबाबदारी ग्रामीण महिलांच्या क्षमतांबद्दलच्या धारणा बदलण्यासाठी. पायाभूत सुविधांचे सक्षम करणे आणि टिकवून ठेवण्यासाठी शाळा सुरक्षितता व सुविधा वाढवणे. अभ्यासात असा निष्कर्ष काढला आहे, की ग्रामीण शिक्षणात लैंगिक समानता वाढवणे हे शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे, कारण ते केवळ महिलांना सक्षम बनवत नाही, तर आर्थिक वाढ व सामाजिक आणि राजकीय विकासात देखील योगदान देतील.

**प्रस्तावना:** भारतातील मुलींच्या शिक्षणाचा मार्ग सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय शक्तींच्या गुंतागुंतीच्या परस्परसंवादाचे प्रतिबिंबित करतो, जो प्राचीन काळा पासुन ते वसाहतवादी हस्तक्षेप व स्वातंत्र्यप्राप्ती नंतर सुधारणांपर्यंत विकसित होत आहे. वैदिक काळात इस. पुर्व १५०० ऋग्वेदासारख्या ग्रंथांनी महिलांच्या बौद्धिक योगदानाचे गौरव केले असल्याचे आढळून येते, गार्गी व मैत्रेयी सारख्या स्त्रिया पुरुषां सोबत तात्त्विक वादविवादात सहभागी होत असत, शिक्षणात सापेक्ष लिंग समानतेच्या युगावर प्रकाश टाकला. तरीपण, मध्ययुगीन काळात पितृसत्ताक कुटुंब पद्धती, पडदा पद्धतीची व्यवस्था व सामंती समाजसंरचनेचा प्रभाव होता. ज्या महिलांना कौटुंबिक भुमिकांपुरते मर्यादित केले जात होते, ज्यामुळे औपचारिक शिक्षणाची उपलब्धता मोठ्या प्रमाणात कमी झाली. लिंग पक्षपात म्हणजेच लिंग विषमता होय. लिंगाच्या आधारावर मानवी समाजाचा विचार केला जातो. सर्वच मानवी समाजात स्त्री व पुरुष या आधारावर विभाजन कुटुंबाच्या स्थापनेसाठी स्त्री व पुरुष हे दोघेही महत्त्वाचे आहेत. स्त्री पुरुषांच्या संयोगातून नवीन जीव जन्माला येतो. म्हणूनच मानवी समाजाचे सातत्य टिकून आहे. लिंगाच्या आधारावर स्त्री व पुरुष असा भेद केला जातो. स्त्री-पुरुष हा भेद स्त्री किंवा पुरुष दोघेही मानव आहेत. त्या दोघांनाही सारखेच मानवी हक्क असावेत मानवी हक्काच्या स्त्री-पुरुष असा भेद करणे उचित नाही. जेव्हा लिंगाच्या आधारावर भेद केला जातो व महिलांच्या विरुद्ध पाळली जाते, तेव्हा त्यास लिंग विषमता असे म्हणतात.

लोकांची अशी समजूत आहे, की पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे. या समजुतीमुळे तो स्त्रीला कनिष्ठ मानतो तिच्या अनेक बाबतीत भेद करतो. तेव्हा त्यास लिंगभेद असे म्हणतात. लिंगानुसार स्त्री-पुरुषांचा सामाजिक दर्जा निश्चित केला जातो. इलियट आणि मेरिल म्हणतात की, 'व्यक्तीला समूहाअंतर्गत लिंगाच्या आधारावर जे स्थान दिले जाते ते दर्जा म्हणजेच त्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा होय. लिंगाच्या आधारावर स्त्री किवा पुरुषांना एक विशिष्ठ सामाजिक दर्जा प्राप्त होतो. लिंगानुसार पुरुषांना श्रेष्ठ स्थान तर स्त्रिला कनिष्ठ स्थान प्राप्त होते. भारतात स्त्रीपेक्षा पुरुषांना श्रेष्ठ मानून त्यानुसार त्याच्या भूमिका समाजाने निर्धारित केल्या आहेत, लिंग विषमता निर्माण झाली आहे. लिंग विषमता ही सामाजिक विषमता आहे. अशा प्रकारच्या विषमतेस सामाजिक रूढी, परंपरा, मूल्य व प्रमाणकांद्वारे मान्यता देण्यात आली आहे. समाजात लिंग विषमता असल्यामुळे लिंगाच्या आधारावर पक्षपात केला जातो. भारतातील लिंग पक्षपात प्राचीन काळापासून भारतीय समाजात लिंग विषमता पाळली जाते. हिंदु धर्मात स्त्रीची देवी, लक्ष्मी मानून पूजा केली जाते. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता।' असा एक श्लोक आहे. याचा अर्थ जेथे स्त्रीची पूजा केली जाते, तेथे देवता राहतात. स्त्रीची पुजा केली जात असली तरीही तिला पुरुषांपेक्षा कनिष्ठ मानले होते. प्राचीन काळापासून स्त्रीला गौण मानण्यात आले होते. इतकेच नव्हे तर स्त्रीला स्वातंत्र्य असते ही गोष्ट नाकारण्यांत आली होती. 'चूल आणि मूल' हेच तिचे कार्यक्षेत्र मानण्यात आले होते. 'न स्त्री स्वातंत्र मर्हति' असे स्त्रीच्या संदर्भात प्राचीन काळी नमूद करण्यात आले होते. म्हणजे स्त्रीला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नसते. तिला एक उपभोगाची वस्तू मानण्यात आले होते. भारतीय समाजात प्राचीन काळापासूनच स्त्रीचा सामाजिक दर्जा कनिष्ठ आहे. मुलगा जन्माला आल्यास आई-वडिलांना आणि त्यांच्या नातेवाईकांना विशेष आनंद होतो. याउलट वसाहतवादी राजवटीने महत्त्वाचे बदल घडवून आणले, सन १८५४ च्या वुड्स डिस्पॅच ने स्पष्टपणे स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला, संस्थात्मक सुधारणांसाठी शिक्षणाचा पाया घातला, तर सावित्रीबाई फुलेसारख्या स्त्रियांनी सन १८४८ मध्ये पुण्यात भारतातील पहिली मुलींची शाळा स्थापन केली, विधवा पुनर्विवाह व जातिविरोधी शिक्षणाला सामाजिक प्रतिसाद न देता स्त्री पुरुष समानता व सर्व जाती समानतेला अधिक महत्त्व दिले व स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कलम ४५ अंतर्गत १४ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचे उद्दिष्ट असलेल्या संवैधानिक आदेशांचा शेवट २००९ च्या शिक्षण हक्क कायद्यात (RTE) झाला, ज्यामध्ये परिसरातील शाळा आणि शून्य-अस्वीकरण धोरणे अनिवार्य करण्यात आले. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० मध्ये २०३० पर्यंत दर्जेदार शिक्षणाची सार्वत्रिक उपलब्धता गृहीत धरण्यात आली आहे. ज्यामध्ये मूलभूत साक्षरता, समानता-केंद्रित अभ्यासक्रम व व्यावसायिक मार्गांद्वारे लिंग समानतेवर भर देण्यात आला आहे. तरीही, असमानतेचा ऐतिहासिक वारसा कायम आहे. जो नोंदणीतील तफावत, शाळा सोडण्याचे प्रमाण व पायाभूत सुविधांमधील तूट यामध्ये दिसुन येतो. महाराष्ट्रातील स्त्री-पुरुष साक्षरता प्रमाण विविध सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक घटकांच्या आधारे बदलत आहे. महाराष्ट्र हा भारतातील एक प्रगत राज्य आहे साक्षरतेच्या बाबतीत काही सकारात्मक बदल दिसून येत आहेत.

**उद्दिष्टे:** १) भारतातील वाढती लिंग असमानता आणि शिक्षण या सामाजिक समस्येचा परिणाम जाणून घेणे. २) भारतातील लिंग असमानता संबंधित असणाऱ्या कारणांची माहिती घेणे.

**संशोधनाची गृहीत कृत्ये:** १) लिंग असमानता आणि ग्रामीण शिक्षण ही आधुनिक समाजातील व्यापक व गंभीर सामाजिक समस्या निर्माण झाली. २) भारताती लिंग असमानता व ग्रामीण समाजात शिक्षणासाठी कारणीभूत असणाऱ्या कारणांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोध निबंधाचा विषय लिंग असमानताआणि ग्रामीण शिक्षण ही सामाजिक समस्या हा आहे शोधनिबंधाचा उद्देश लिंग असमानता आणि ग्रामीण शिक्षण हा विषय घेतला आहे. संशोधन निबंधसाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक या दोन्ही अभ्यास पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. शोधनिबंध हा प्रमुख ग्रंथ पुस्तके लेख इंटरनेट यांचा उपयोग शोधनिबंधासाठी करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय स्तरावरील विश्लेषण:** राष्ट्रीय पातळीवर, भारताची शालेय शिक्षण प्रणाली पूर्व-प्राथमिक ते उच्च माध्यमिक पर्यंतच्या २४.६९ कोटी विद्यार्थ्यांना सेवा देते, ज्यामध्ये मुलींची संख्या ११.९३ कोटी (४८.३%) आहे. ही एक सामान्य सुधारणा आहे, जी प्रवेशातील लिंग असमानता कमी करण्याचे संकेत देत आहे. एकत्रित केलेल्या माहितीवरून शैक्षणिक टप्प्यांमध्ये सातत्याने फरक दिसून येतआहे. पूर्व-प्राथमिक नोंदणी १.४० कोटी आहे, मुलींची संख्या ६५.१ लाख (४६.४%) आहे. तर मुले ७५.३ लाख (५३.६%) आहेत. ही सुरुवातीची विसंगती, बहुतेकदा मुलांना पसंती देणाऱ्या कौटुंबिक प्राधान्यांशी जोडलेली आहे, ती टिकवून ठेवण्याच्या आव्हानांना सूचित करते. मुलींचा ASER किंचित जास्त आहे ६-१० वयोगटातील ८५.४% विरुद्ध ८३.२%, जे मुलींना समाविष्ट करण्याच्या प्रयत्नांना प्रतिबिंबित करते, गरीबी, बालविवाह किंवा प्रवेशाचा अभाव यासारख्या पद्धतशीर समस्यांकडे लक्ष केंद्रित करतो. उच्च-कार्यक्षमता असलेले प्रदेश दिल्ली, गोवा, मणिपूर, मेघालय, मिझोराम आणि त्रिपुरा सारखी राज्ये ०६-१० आणि १४-१५ वयोगटातील मुलींसाठी १००% ASER साध्य करतात. भारतातील लिंग समानतेच्या आधारावर शैक्षणिक स्थिती विविध राज्यांमध्ये वेगवेगळी आहे. शैक्षणिक क्षेत्रात लिंग समानतेसाठी अनेक योजना व धोरणे राबवली जात आहेत, तरीही काही आव्हाने अद्याप कायम आहेत. खालील मुद्द्यांमध्ये भारतातील लिंग समानतेच्या आधारावर शैक्षणिक स्थितीचा माहिती घेतली आहे.

मुलीला कुटुंबावरील भार समजला जातो. मुलाला महत्वाचे मानले जाते. पुत्रप्राप्तीसाठी 'पुत्र कामेष्टी' हा यज्ञ केला जायचा. लिंगाबाबत पक्षपाती परक्याचे धन आहे असे मानले जाते. हिंदू धर्मात पितुऋण फेडण्यासाठी मुलगा जन्माला येणे असल्यामुळे मुलास प्राधान्य दिले जाते. काही समाजात मुलीचा जन्म झाल्याबरोबर मुलींना मारून टाकले जाते. आजही अशा प्रकारच्या घटना सर्वत्र आढळतात. सुशिक्षित समाजात देखील मुलाला विशेष प्राधान्य दिले जाते. आधुनिक काळात सुशिक्षित लोक लिंग परीक्षण करून गर्भाचे लिंग माहित करून घेतात. स्त्री लिंग असलेला गर्भ पाडला जातो. त्यामुळे भारतात दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण हे कमी आहे. २००१ च्या जनगणनेनुसार एक हजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या ९३३ इतकी होती. तर २०११ मध्ये स्त्रियांची संख्या ९४३ होती.

२०११ च्या जनगणनेनुसार पुरुषांची संख्या ६२ कोटी ३७ लाख २४ हजार २४८ होती; तर स्त्रियांची संख्या ५८ कोटी ६४ लाख ६९ हजार १७४ होती. याचाच अर्थ २०११ मध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या ३ कोटी ७२ लाख ५५ हजार ७४ इतकी कमी होती. मुलीचे योग्य संगोपन न करणे, तिच्या संगोपनाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, मुलगी गर्भात असतांनाच मारून टाकणे व मुलीचा जन्म झाल्यानंतर तिला मारणे या कारणांमुळे आपल्या देशात मुलांपेक्षा मुलींच्या मृत्युचे प्रमाण जास्त आहे. आपल्या देशात स्त्रियांची संख्या कमी आहे. कुटुंबात मुलं-मुली असतील तर मुलाला चांगले खाऊ-पिऊ घालतात. त्याचे विशेष कौतुक केले जाते. त्याचा प्रत्येक हट्ट पूर्ण केला जातो. याउलट मुलीचे संगोपन योग्य प्रकारे केले जात नाही. मुलींच्या संदर्भात पक्षपात केला जातो. मुलीच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करून मुलाच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविले जाते. मुलगा आपला वंश टिकवून ठेवतो. तो खरा कुटुंबाचा वारस आहे. तो शिकून मोठा झाला तर आपल्या कुटुंबाचे नाव मोठे करील अशी आई-वडिलांची समजूत असते. त्यामुळे मुलीपेक्षा मुलांना विशेष महत्त्व दिले जाते. म्हणून भारतीय समाजात लिंग पक्षपात मोठ्या प्रमाणात आढळून येतो.

**भारतीय शिक्षणातील लिंग असमानतेचा स्त्री शिक्षणात अडथळे:** भारतीय समाजात स्त्री-पुरुषांच्या संदर्भात विषमतावादी प्रवृत्ती आहे. भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष या दोघांनाही समान अधिकार दिले असले, तरी देखील आजही लिंगाच्या आधारावर पक्षपात केला जातो. त्याचा फार मोठा प्रतिकूल परिणाम भारतातील स्त्री शिक्षणावर झाला आहे. भारतामधील शिक्षणात लिंग पक्षपात कशा प्रकारचा आहे.

**मुली शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित:** आधुनिक काळात सर्वांना शिक्षण घेण्याचा अधिकार आहे, तरी देखील लिंग पक्षपातामुळे मुली शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित आहेत. प्रत्येक मुलीला शाळेत टाकले पाहिजे. तिचा विकास होण्यासाठी तिला शिकण्याची संधी मिळाली पाहिजे. परंतु पालक मुलींना शाळेतच पाठवीत नाहीत कुटुंबात मुलं-मुली असल्यास मुलाला शाळेत पाठवितात. परंतु मुलीला घरीच ठेवतात. तिला शिकवून काय करायचे? लग्नानंतर तर तिला घरातच राहायचे आहे. असा विचार करणारे असंख्य पालक आहेत. म्हणून लाखो मुली शिक्षणाच्या अधिकारापासून राहतात. मुलींना शिक्षण न देणे म्हणजे मानवी अधिकाराचे उल्लंघन होय.

**मुलींच्या गळतीचे प्रमाण अधिक:** पालक मुलींना शाळेत पाठवित नाही. समजा शाळेत पाठविले तरी तिला जास्त दिले जात नाही. लहान भावंडांना सांभाळायचे असेल, घरातील कामे करायची असतील शेतीची कामे असतील तर अशावेळी मुलींचे मध्येच शिक्षण बंद करून तिला ती कामे करायल लावले जाते. एका शासकीय अहवालानुसार १ला वर्ग ते १०व्या वर्गापर्यंत मुलीचे मध्येच सोडून देण्याचे प्रमाण ८०% आहे. मुलीचे १ल्या वर्गात नांव टाकण्यात आलेल्या १०० मुि फक्त ४२ मुली ५व्या वर्गापर्यंत जातात. यावरून प्राथमिक शिक्षणातच मुलींचे गळतीचे (शा सोडण्याचे) प्रमाण सर्वाधिक आहे. २००६ ते २०१० मध्ये माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या मुलाच प्रमाण ५०.४% आहे. तर मुलीचे प्रमाण मात्र २६.६% इतके कमी आहे. यावरून हे स्पष्ट होते की लिंग पक्षपातामुळे मुलीचे गळतीचे प्रमाण हे मुलांपेक्षा खूप जास्त आहे.

**शाळांमध्ये मुलींकरिता आवश्यक सोयींचा अभाव:** शाळांमध्ये मुलां-मुलींकरिता आवश्यक सोयी उपलब्ध असल्या पाहिजेत. विशेषत मुलींकरिता आवश्यक सोयी महत्त्वाच्या असतात. अमेरिकेच्या कॉमर्स विभागाच्या १९९८च्या अहवालानुसार भारतातील शाळांमध्ये मुलींकरिता महत्त्वाच्या असलेल्या सोयी नाहीत. उदा.-शाळांमध्ये मुलींकरिता शौचालयाची सोय नाही, स्त्री शिक्षिकांची कमतरता इत्यादी. मुलीकरिता आवश्यक सोयी शाळांमध्ये उपलब्ध नसल्यामुळे अनेक मुली मध्येच शाळा सोडतात.

**मुलीना जुजबी शिक्षण:** लिंग पक्षपातामुळे मुलींना शिक्षण देण्याची आवश्यकता नाही, असे पालकांचे मत असते. समजा शिक्षण द्यायचे असेल तर थोडेफार द्यावे असा विचार करून पालक मुलींना चांगल्या दर्जेदार शाळांमध्ये प्रवेश देत नाही. ते सरकारी शाळांमध्ये मुलींना शिक्षण देतात. मुलाला मात्र चांगल्या दर्जेदार शाळांमध्ये प्रवेश देतात. मुलीला नोकरी करायची नाही मग तिला चांगले शिक्षण कशाला द्यायचे? असा विचार करून ते मुलींना कामचलाऊ अर्थात जुजबी शिक्षण देतात.

**स्त्री-पुरुषांच्या साक्षरतेमध्ये फरक:** भारतातील स्त्री-पुरुषामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता आढळते. स्त्री-पुरुषांच्या साक्षरतेमध्ये कशी विषमता आहे हे जनगणनेच्या २००१ आणि २०११ च्या स्त्री-पुरुष साक्षरतेच्या प्रमाणावरून अधिक स्पष्ट होते. भारतात २००१ च्या जनगणनेनुसार ६५.३८% साक्षरता होती. तर २०११ मध्ये साक्षरतेचे प्रमाण ७४.०४१४ पर्यंत वाढले. यावरून हे लक्षात येते की देशात साक्षरतेचे आहे. परंतु स्त्री आणि पुरुष यांच्यातील साक्षरतेमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता २००१ मध्ये पुरुषांमध्ये साक्षरतेचे प्रमाण ७५.८५% तर स्त्रियांमध्ये ५४.१६% साक्षरता तर २०११ मध्ये पुरुषांची साक्षरता ८२.१४ आणि स्त्रियांची साक्षरता ६५.४६% होती. इन हे सिद्ध होते की, देशातील स्त्री-पुरुषांच्या साक्षरतेमध्ये विषमता असण्याचे एकमेव कारण म्हणजे लिंग पक्षपात होय.

**मुलीच्या शिक्षणावर कमी खर्च:** मुलांच्या शिक्षणाच्या तुलनेत मुलींच्या शिक्षणावर पालक फारच कमी खर्च करतात. ही परक्याचे धन आहे. तिला शिकविल्यास आपल्याला काहीच फायदा नाही. अशी मानसिकता अनेक लोकांची आहे. त्यामुळे ते मुलींच्या शिक्षणावर अधिक पैसा खर्च करीत नाही. त्यामुळे मुलींचे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. पालक आपल्या मुलींचे सरकारी शाळेत टाकतात. परंतु त्याचवेळी ते आपल्या मुलांचे नांव चांगल्या आणि महागड्या शाळांमध्ये टाकतात. विशेष म्हणजे पालक मुलीच्या शिक्षणावर फारच कमी खर्च करतात. यावरून पालकांचा मुलीविषयीचा पक्षपात स्पष्ट होतो.

**मुलींना व्यावसायिक शिक्षण न देणे:** मुलांना अभियांत्रिकी, वैद्यकीय इत्यादी प्रकारचे व्यावसायिक शिक्षण देतात. परंतु मुलींना नरात्र व्यावसायिक शिक्षण देण्याचा पालक विचार करीत नाही. त्यापेक्षा ते मुलीचा विवाह करून देणे अधिक पसंत करतात. २०-२५ वर्षाआधी मुलींना व्यावसायिक शिक्षण घेण्यास पालक प्रोत्साहन देत नव्हते. व्यावसायिक शिक्षण घेऊन मुली काय करणार? तिला नोकरी करायची नाही. असा विचार करणारे पालक आपल्या मुलींना व्यावसायिक शिक्षण देत नाही.

**उच्च शिक्षणात मुलींचे अत्यल्प प्रमाण:** मुलांना उच्च्च शिक्षण देण्याकडे पालकांचा विशेष कल असतो. परंतु मुलींना मात्र उच्च शिक्षण देत नाहीत. म्हणून देशात उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण अतिशय कमी आहे. उच्च शिक्षणाची सोय जवळपास नसल्यामुळे पालक मुलींना बाहेरगावी पाठविण्याचा विचार करीत नाही. उलट शिक्षण बंद करून मुलींचा विवाह करून देतात. उच्च शिक्षण घेतल्यामुळे मुली बिघडतात. मग त्यांना उच्च शिक्षण द्यायचेच कशाला? असा विचार करणारे असंख्य पालक आहेत. त्यामुळे उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण अत्यल्प आहे.

**ग्रामीण भागात मुलींचे कमी शिक्षण**: शहरांपेक्षा ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षणाचे प्रमाण फारच कमी आहे. शहरी भागात लिंग पक्षपात आहे. असे असले तरी आधुनिक विचारांच्या प्रभावामुळे ते मुलींना शिक्षण देतात. ग्रामीण भागातील लोकांमध्ये शिक्षणाचा अभाव आणि परंपरा, रूढी इत्यादींचा अधिक प्रभाव असल्यामुळे त्यांच्यात लिंग पक्षपाताचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे ग्रामीण लोक मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. परिणामतः ग्रामीण भागात मुलीच्या शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, लिंग पक्षपाताचा प्रभाव भारतातील स्त्री शिक्षणावर झालेला दिसुन येतो. शिक्षणावर पडला आहे. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले जात नाही. त्यामुळे लिंग महिलांच्या शिक्षणामध्ये एक फार मोठा अडथळा ठरला आहे.

**शिक्षणातील लिंग असमानता दूर करण्यासाठी केलेले उपाय:** भारतातील शिक्षणातील पक्षपात दूर करण्याचा प्रयत्न शासन व अनेक संस्था करीत आहेत. मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याकरिता शासनाने अनेक योजना सुरू केल्या आहेत. ग्रामीण भागातील मुलींनी प्राथमिक शाळेत रोज जावे, याकरिता त्यांनी आहार देण्याची योजना शासनाने सुरू केली. योजनेचे प्राथमिक शाळेत देणारा पौष्टिक आहाराचा राष्ट्रीय कार्यक्रम (National of Nutritional Support Primary Education) असे नाव आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक स्तरावरील मुलीच्या शिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम (National Programme for Education of Gr Elementary Level), बालिका समृद्धी योजना, लाडली लक्ष्मी योजना इत्यादी योजना शासनाने कार्यान्वित केल्या आहेत. या योजनांमुळे मुलींना शिक्षण घेण्यास प्रो मिळत आहे. अशाप्रकारच्या विविध योजना शासनाने सुरू करून मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे लोकांची लिंग समानता निर्माण करण्यासाठी मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. आजही अशिक्षितच नव्हे तर सुशिक्षित देखील लिंग पक्षपाताची भावना तीव्र असल्याचे दिसून येते. लिंग पक्षपाताच्या प्रवृत्तीमुळे शिक्षणात मोठा अडथळा निर्माण झाला. ही गोष्ट सिद्ध झाली आहे. म्हणून लोकांच्या पक्षपाताच्या प्रवृत्तीमध्ये परिवर्तन होणे ही काळाची गरज आहे. भारत सरकारने विविध योजनांची घोषणा केली आहे ज्या मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देतात, जसे की "सुकन्या समृद्धि योजना", "महिला सशक्तीकरण योजना" राज्य सरकारनेही विविध उपक्रम राबवले जात आहेत, जसे की शिष्यवृत्ती योजना, विशेष शाळा आणि प्रशिक्षण केंद्र.. राज्याच्या विविध भागांतील साक्षरता करण्यासाठी विविध योजना निर्माण केल्या आहेत."बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ" योजना महाराष्ट्र सरकारने महिला शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबवल्या आहेत, जसे की "सुकन्या समृद्धि योजना", "बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ" शिष्यवृत्ती योजना विशेष शाळा आणि महिलांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम हे देखील महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील स्त्री-पुरुष साक्षरता प्रमाण वाढवण्यासाठी अधिक जागरूकता, शैक्षणिक संधी आणि संसाधने उपलब्ध करणे आवश्यक आहे. स्थानिक समुदाय, शाळा, सरकारी यंत्रणा आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे.

**निष्कर्ष:** महाराष्ट्रातील स्त्री-पुरुष साक्षरता प्रमाणात सुधारणा होत असली तरीही लिंग समानतेसाठी अजूनही मोठा मार्ग आहे. महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवणे आवश्यक आहे, जेणेकरून सर्व स्तरांवर समान संधी उपलब्ध होऊ शकतील. भारतातील लिंग समानतेच्या आधारावर शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी अनेक उपाययोजना आवश्यक आहेत. सरकार, शैक्षणिक संस्था, स्थानिक समुदाय आणि कुटुंबांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे जेणेकरून मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळेल आणि लिंग समानतेचा आदर्श स्थापित होईल. राज्ये केरळ, तामिळनाडू व गोवा यांची शिक्षण क्षेत्रात लिंग समानतेसाठी चांगले परिणाम दिसून येतात. केरळमध्ये मुलींच्या शिक्षणाची टक्केवारी उच्च असून, तेथे महिलांचे साक्षरता दरही चांगले आहेत.

**संदर्भ ग्रंथ:**

१. प्रदीप आगलावे (२०२३), "भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि समस्या", साईनाथ प्रकाशन भगवाघर कॉम्प्लेक्स धरमपेठ नागपूर.
२. चंद्रिमा चक्रवर्ती आणि दीप्यमान पाल (२०२३) "लिंग समानता आणि शिक्षण आणि त्याचे आरोग्यावरील परिणाम".
३. नंदिनी मांजरेकर, "भारतातील लिंग आणि शिक्षण: एक वाचक"*
४. वर्तमानपत्र, साप्ताहिके
५. प्रसारमाध्यमे, इंटरनेट

# भारतातील ग्रामीण बेरोजगारीचे स्वरूप आणि प्रमाण: विशेष संदर्भ छत्रपती संभाजीनगर जिल्हा

**नलिनी जाधव** संशोधक विद्यार्थिनी, संशोधन केंद्र, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

**सारांश:** भारतातील ग्रामीण बेरोजगारी ही एक गंभीर सामाजिक-आर्थिक समस्या असून ती ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत मोठा अडथळा ठरते. कृषीवर आधारित अर्थव्यवस्था, अल्पभूधारणा, हंगामी शेती, तंत्रज्ञानाचा अभाव, लोकसंख्येचा दबाव व औद्योगिकीकरणाचा असमतोल विकास ही ग्रामीण बेरोजगारीची प्रमुख कारणे आहेत. या संशोधन पेपरमध्ये भारतातील ग्रामीण बेरोजगारीचे स्वरूप व प्रमाण यांचा अभ्यास करण्यात आला असून विशेषतः छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा संदर्भ घेण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा प्रामुख्याने कोरडवाहू शेतीवर अवलंबून असल्यामुळे येथे हंगामी, अर्धबेरोजगारी व प्रच्छन्न बेरोजगारीचे प्रमाण अधिक आढळते. पावसावर अवलंबून शेती, मर्यादित सिंचन सुविधा, औद्योगिक संधींचा अभाव आणि कौशल्यविकासाचा कमी प्रसार यामुळे ग्रामीण युवक मोठ्या प्रमाणावर बेरोजगार राहतात किंवा स्थलांतरास प्रवृत्त होतात. शासकीय रोजगार योजना, विशेषतः महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA), काही प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देत असल्या तरी त्या पुरेशा ठरत नाहीत. या संशोधनातून असे दिसून येते की ग्रामीण बेरोजगारीवर मात करण्यासाठी कृषीपूरक उद्योग, कौशल्याधारित प्रशिक्षण, ग्रामीण औद्योगिकीकरण आणि प्रभावी अंमलबजावणीची आवश्यकता आहे. ग्रामीण बेरोजगारी कमी झाल्यास ग्रामीण जीवनमान उंचावण्यास व संतुलित आर्थिक विकासास चालना मिळू शकते.

**मुख्य शब्द :** बेरोजगारी, जीवनमान, औद्योगिकीकरण, शेती, विकसनशील, ग्रामीण, उद्योग

**प्रस्तावना:** ग्रामीण बेरोजगारी ही भारतातील एक गंभीर सामाजिक-आर्थिक समस्या आहे. भारतातील लोकसंख्येतील सुमारे ७०% लोक ग्रामीण भागात राहतात आणि त्यांच्या उत्पन्नाची प्रमुख आवक शेती, हस्तकला, घरगुती उद्योग आणि अवैध अस्थायी रोजगारावर अवलंबून आहे. कृषी हे मुख्यतः सिझनल आणि अस्थिर क्षेत्र असल्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारीचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे ग्रामीण बेरोजगारीचा अभ्यास सद्याच्या काळात अत्यंत आवश्यक ठरतो. या संशोधनाचा उद्देश भारतातील ग्रामीण बेरोजगारीचे स्वरूप, विस्तार आणि परिणाम समजून घेणे आहे. त्याचबरोबर छत्रपती संभाजीनगर जिल्हा (पूर्वीचे औरंगाबाद) यामध्ये ग्रामीण बेरोजगारीची स्थिती, त्याची कारणे, परिणाम आणि सुधारणा उपाय यांचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

बेरोजगारी ही एक मोठी सामाजिक समस्या आहे. ही समस्या फक्त भारतासमोरच आहे असे नव्हे तर संपूर्ण जगातील अर्थव्यवस्थांना भेडसावणारी समस्या आहे. आर्थिक दृष्टया मागासलेलया तसेच विकसनशील देशामधील ही गंभीर व मुलभूत समस्या आहे. ही समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर होत आहे. जसजशी लोकसंख्या वाढते. तसतशी बेरोजगारांच्या संख्येत वाढ होत आहे. बेरोजगारी ही विशेषतः अविकसित देशातील एक महत्त्वाची समस्या बनली आहे. भारतासारख्या विकसनशील देशालासुद्धा हया समस्येच्या घोर चिंतेने झपाटलेले आहे. एकीकडे शैक्षणिक सुविधा वाढत आहेत तर दुसरीकडे सुशिक्षित बेकारांची संख्यासुद्धा झपाट्याने वाढत आहे. वास्तविक राष्ट्रात प्रचंड संख्येने निराश युवक असणे ही सर्वात क्लेशदायक व दुर्दैवी बाब आहे. पदवीचे भेंडोळं हातात घेऊन नोकरीच्या शोधार्थ युवकांची भटकंती सुरू होते तेव्हा त्यांच्या असं लक्षात येतं की नोकरीच्या शोधार्थ निघालेल्यांची बाजारपेठेत एकच भाऊगर्दी झालेली आहे.[१] मागणीपेक्षा, अशी ही परिस्थिती, वारंवार एखादया उमेदवाराला नकारच मिळत राहिला तर त्याची स्वतःवरील श्रद्धा उडते. तो आत्मविश्वास गमावतो. ते एक विपन्नावस्थेचं मूर्तीमंत चित्र बनते.

**संशोधनाचे उद्दिष्टे:** या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे ग्रामीण बेरोजगारीचा स्वरूप, प्रमाण व त्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे - विशेषतः छत्रपती संभाजीनगर जिल्हा या संदर्भात.

**प्राथमिक उद्दिष्टे:** १. ग्रामीण बेरोजगारीचे स्वरूप ओळखणे - रोजगाराची उपलब्धता, सिझनल व अस्थिर रोजगाराचे स्वरूप, नोकरीच्या प्रकारांचे वर्गीकरण. २. ग्रामीण बेरोजगारीचे प्रमाण मोजणे - बेरोजगारी दर, कार्यबलातील सहभाग, लैंगिक आणि वयोगटानुसार बेरोजगारी विश्लेषण. ३. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील बेरोजगारीची विशिष्ट स्थिती तपासणे - जिल्ह्याची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन बेरोजगारीचे स्वरूप.

**दुय्यम उद्दिष्टे:** १. बेरोजगारीवर परिणाम करणाऱ्या घटकांची ओळख— कृषी परिस्थिती, कौशल्य अभाव, औद्योगिक संधी, शासन योजना इ. २. समस्यांचे विश्लेषण व उपाय-सुझाव- उत्पादक उपाय, धोरणात्मक सुचना.

**संशोधनाची गृहितके:** गृहितके म्हणजे संशोधनात तपासण्यासाठी ठरवलेली अपेक्षित सत्ये किंवा सिद्धांत: मुख्य गृहितके १. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ग्रामीण बेरोजगारीचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. २. कृषीच्या अस्थिरतेमुळे ग्रामीण बेरोजगारी वाढली आहे. ३. कौशल्य विकासाची कमतरता बेरोजगारीला महत्त्वपूर्णपणे प्रभावित करते. ४. MGNREGA व इतर रोजगार योजना ग्रामीण बेरोजगारी कमी करण्यात प्रभावी ठरत नाहीत.

**संशोधन पद्धती:**

**संशोधनाचा प्रकार** *मिश्र पद्धती (Mixed Method)*: संख्यात्मक (Quantitative) + गुणात्मक (Qualitative) पद्धतींचा उपयोग.

**प्राथमिक व दुय्यम डेटा:** प्राथमिक माहिती - Focus Group Discussion (ग्रामीण युवक-महिला), दुय्यम माहिती - PLFS, NSSO Reports, जिल्हा प्रमुख कार्यालय अहवाल, सरकारी वेबसाइट व योजना दस्तऐवज, पूर्वी प्रकाशित संशोधन लेख

**भारतातील ग्रामीण बेरोजगारी: एक व्यापक दृश्य**

**बेरोजगारीची व्याख्या:** बेरोजगारी म्हणजे ती स्थिती जिथे इच्छुक आणि सक्षम व्यक्ती काम शोधत असताना तरीही त्यांना रोजगार उपलब्ध होत नाही. ग्रामीण बेरोजगारी दैनंदिन मजुरी, कृषी क्षेत्रातील भांडवलाचे अभाव, कौशल्याचा अभाव, उद्योगांची कमी उपस्थिती यामुळे वाढलेली आहे. बेरोजगारी म्हणजे प्रचलित वेतनावर जेव्हा एखादया व्यक्तिची काम करण्याची इच्छा व क्षमता असूनही अशा व्यक्तिला काम मिळत नसेल तर त्याला बेरोजगार असे म्हणतात. भारतातील बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड आहे व ते सतत वाढत आहे. भारतात सन १९०१ मध्ये बेरोजगारांची संख्या काम मागणाऱ्यापैकी ७१ लाख होती. सन २०२३ मध्ये बेरोजगारांची संख्या ३.६२ कोटी इतकी वाढली. या ३२.३३ वर्षात ही बेरोजगारी ५०० टक्क्यांनी वाढलेली होती. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार भारतील बेरोजगारांची संख्या १० कोटी पेक्षा अधिक झालेली आहे.[२] भारतातील बेरोजगारीचे स्वरूप- बेरोजगारी किंवा बेकारी या समस्येचे स्वरूप काळानुसार बदलणारे आहे. भारतासारख्या विकसनशील देशात उपलब्ध असणाऱ्या साधनसामग्रीचा पर्याप्त वापर केला न गेल्यामुळे बेरोजगारी निर्माण होते. बेरोजगारीची अवस्था म्हणजे देशातील लोकांना आपल्या मुलभूत गरजा पूर्ण न करता येणारी अवस्था असते. केन्सच्या मते बेरोजगारीचे मुळ कारण म्हणजे प्रभावी मागणीची कमतरता असणे होय व त्यामुळे श्रमिकांची मागणी कमी होते. कारण मागणीची कमतरता असणे होय व त्यामुळे श्रमिकांची मागणी कमी होते. कारण मागणीच्या अभावामुळे उत्पादनात घट होते व परिणामतः बेकारी वाढते.

**भारताचा बेरोजगारी दर:** अन्य संशोधनानुसार भारतातील बेरोजगारीचा दर ग्रामीण आणि Urban मध्ये फरक असतो. **२०२३ च्या आकडेवारीनुसार, भारतात Rural बेरोजगारी Urban पेक्षा कमी आहे** परंतु हे देखील लक्षात घ्यायला हवे की ग्रामीण बेरोजगारीचा स्वरूप नैसर्गिक परिस्थिती आणि मानसशास्त्राच्या बदलांमुळे वेगळा असतो.[३]

**महाराष्ट्रातील बेरोजगारीचा स्थिती:** महाराष्ट्र हा भारतातील एक विकासाधारित राज्य आहे; तरीही बेरोजगारीचे प्रश्न ग्रामीण भागात कायम आहेत. **PLFS डेटा नुसार, महाराष्ट्राचे बेरोजगारी दरास ३.३% वर आहे, जे राष्ट्रीय सरासरीपेक्षा थोडे अधिक आहे.** ग्रामीण भागातील बेरोजगारीचा दर पुरुषांसाठी २.८% आणि स्त्रियांसाठी १.१% आहे, ज्यामुळे ग्रामीण रोजगार उपलब्धतेमध्ये काही सुधारणा दिसते.[४]

**छत्रपती संभाजीनगर जिल्हा: सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी:** छत्रपती संभाजीनगर जिल्हा (पूर्वीचे औरंगाबाद) हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा जिल्हा आहे ज्यामध्ये शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात विविध प्रश्न उपस्थित झाले आहेत. जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुमारे ८६७ ग्रामपंचायती आहेत आणि लोकसंख्या सुमारे ३७,०१,२८२ इतकी नोंदवली गेली आहे. साक्षरता दर ७९.०२% आहे, पण तरीही ग्रामीण बेरोजगारीचा प्रश्न गंभीर स्थितीत आहे.[५]

**ग्रामीण बेरोजगारीचे स्वरूप:** ग्रामीण बेरोजगारीचा स्वरूप ही स्थिर नोकरीपेक्षा अनियमित रोजगार, नोकरीची अनुपलब्धता, सीझनल कृषी रोजगारातील बदल, कौशल्याचा अभाव आणि नव्या उद्योगांची कमतरता असते.

**१) कृषी क्षेत्रातील प्रभाव:** ग्रामीण भारतातील बेरोजगारीचा मुख्य भाग कृषीशी संलग्न आहे. शेतकरी विविध नैसर्गिक समस्यांमुळे शेतीतील उत्पन्न कमी झाल्यास ते बेरोजगार बनतात. छत्रपती संभाजीनगरमध्येही या समस्यांचा परिणाम दिसतो-सतत पावसाळी अवकासीमुळे शेती व्यवसाय प्रभावित झाली आहे आणि संबंधित रोजगार अनुपलब्ध झाले आहेत.[६] सरकारने शेतकऱ्यांसाठी Agree-Stack मध्ये रेजिस्ट्रेशन मोहिम चालवली आहे ज्यामुळे शेती सहाय्यता मिळते, परंतु बेरोजगारीची समस्या कायम आहे.

**२) अस्थायी योजना व रोजगार:** MGNREGA यांसारख्या कामगार हमी योजनांमुळे ग्रामीण बेरोजगारांना काही प्रमाणात फायदा होत असला तरीही काही भागात ते पुरेसे नाहीत. Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act खाली प्रत्येक कुटुंबाला किमान १०० दिवस आगाऊ काम मिळू शकेल, पण याची पूर्तता सर्वत्र होत नाही.[७]

**छत्रपती संभाजीनगरमध्ये बेरोजगारीची स्थिती: समस्या आणि आकर्षणे:**

**१) POCRA प्रकल्पाच्या बंदीमुळे बेरोजगारी:** छत्रपती संभाजीनगरमध्ये **POCRA** 1 प्रकल्पाच्या बंदीमुळे सुमारे साडेपाचशे कर्मचाऱ्यांची सेवा संपुष्टात आली आहे, ज्यामुळे या लोकांना रोजगाराच्या संकटाचा सामना करावा लागला आहे. या प्रकल्पातून झालेला रोजगार संपल्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत नकारात्मक परिणाम झाला आहे.[८]

**२) कौशल्याचा अभाव:** ग्रामीण भागातील युवकांमध्ये प्रगत कौशल्य प्रशिक्षणाची कमतरता आहे, ज्यामुळे ते बाजारातील उद्योग, माहिती तंत्रज्ञान, उत्पादन यांसारख्या क्षेत्रात स्पर्धात्मक रोजगार मिळवू शकत नाहीत.

**३) लहान उद्योगांची कमतरता:** छत्रपती संभाजीनगरमध्ये मध्यम-लहान उद्योगांचा अभाव असल्यामुळे ग्रामीण भागातील रोजगाराची संधी मर्यादित आहे. या भागात मोठ्या औद्योगिक पार्क, तंत्रज्ञान कंपन्या आणि उच्च पातळीच्या सेवा क्षेत्राची उपस्थिती कमी आहे.

**ग्रामीण बेरोजगारीचे परिणाम**

**१) सामाजिक परिणाम:** ग्रामीण युवा कामासाठी शहरांकडे पलायन करतात. कौटुंबिक तणाव आणि आर्थिक दडपण वाढते. शिक्षणाचे प्रमाण वाढले तरी पुढे रोजगार न मिळाल्यामुळे निराशा वाढते.

**२) आर्थिक परिणाम:** घरगुती उत्पन्न कमी होते. खाशी खर्चांची गरज भागत नाही. कर्जाची आवक वाढते.

**उपाय आणि सुधारणा :** सरकार आणि जिल्हास्तरीय प्रशासनाने ग्रामीण तरुणांसाठी कौशल्य विकास केंद्र (Skill Development Centers) उभारणे आवश्यक आहे, ज्यामुळे ते स्पर्धात्मक रोजगारासाठी सज्ज होतील. ग्रामीण भागात लघुउद्योग, FPO (Farmer Producer Organizations) आणि स्वरोजगार योजना यांना प्रोत्साहन देऊन रोजगार निर्मिती वाढवायला हवी -त्यामुळे महिलांसहित सर्व वर्गांना रोजगाराची संधी मिळेल. FPOs च्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्थिरता मिळाल्याचेही उदाहरणे आहेत.[९] सिंचन सुविधा, कृषी यंत्रसामग्री, बाजारपेठेचा सहज प्रवेश यांसारख्या सुधारणांनी शेती अधिक फायदेशीर बनविली पाहिजे, ज्यामुळे ग्रामीण

रोजगार अधिक टिकाऊ होईल. MGNREGA, MSRLM, R-SETI सारख्या योजनांचा कार्यान्वयन अधिक पारदर्शक आणि प्रभावी करून रोजगार संधींमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.[१०]

**निष्कर्ष:** ग्रामीण बेरोजगारी ही एक बहुआयामी समस्या आहे ज्यावर राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हास्तरीय उपाय आवश्यक आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील बेरोजगारीचा स्वरूप आणि विस्तार भारतातील एक सामान्य परंतु गंभीर सामाजिक-आर्थिक प्रश्न दर्शवितो. यासाठी कौशल्य विकास, उद्योग निर्मिती, कृषी सुधारणा आणि रोजगार हमी योजनांचे प्रभावी राबवणूक यांवर भर देणे गरजेचे आहे. या संशोधनातून स्पष्ट होते की ग्रामीण बेरोजगारीवर परिणामकारक धोरणे, स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आणि सामूहिक प्रयत्न हाच भविष्यातील अत्यंत प्रभावी उपाय ठरू शकतात.

**संदर्भसूची:**


१. लक्ष्मण एन. गायकवाड, भारतीय बेरोजगारी एक सामाजिक समस्या, रिव्ह्यू ऑफ रिसर्च, व्हॅल्यूम ६, मार्च २०१७

२. उपरोक्त.

३. International Journal of Advanced Research in Science, Multidisciplinary, Online Journal Volume 4, Issue, 2, March 2024 https://timesofindia.indiatimes.com/city

४. The Times of India 09 November 2025 https://chhatrapatisambhajinagarzp.maharashtra.gov.in/en/mregs-department/?utm

५. https://www.lokmat.com/ शेतकऱ्यांसाठी चा पोखरा १ प्रकल्प संपला सुमारे साडेपाचशे कर्मचाऱ्यांवर बेकारीची कुऱ्हाड, २२ डिसेंबर २०२५

६. Business Standard, FPOs empower women in Chhatrapati Sambhajinagar, boost financial stability, 28 December 2025 h

७. ttps://chhatrapatisambhajinagarzp.maharashtra.gov.in/ उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना.


# ग्रामीण भागातील शिक्षण


**साहेब बाबुराव लहाडे** पीएच. डी. संशोधक विद्यार्थी समाजशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**डॉ. एम. के. सवई** दगडोजीराव देशमुख महाविद्यालय वाळूज, छत्रपती संभाजीनगर.



**गोषवारा:** ग्रामीण भागातील शिक्षण हे देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. ग्रामीण समाजात अजूनही निरक्षरता, आर्थिक अडचणी, शैक्षणिक सुविधा अभाव, शिक्षकांची कमतरता, तांत्रिक साधनांची अनुपलब्धता अशा समस्या दिसून येतात. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक स्तर शहरी विद्यार्थ्यांपेक्षा तुलनेने कमी आढळते. सरकारने सर्व शिक्षा अभियान, मध्याह्न भोजन योजना, मुलींच्या शिक्षणासाठी योजना, डिजिटल शिक्षण अशा विविध उपक्रमांद्वारे ग्रामीण शिक्षण सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षणामुळे ग्रामीण भागात जागृती, रोजगाराच्या संधी, आरोग्यविषयक सुधारणा व सामाजिक परिवर्तन घडून येत आहे. तथापि, शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक, आधुनिक अध्यापन पद्धती, पालकांची सहभागिता व स्थानिक गरजांनुसार अभ्यासक्रम आवश्यक आहे. योग्य नियोजन व प्रभावी अंमलबजावणी केल्यास ग्रामीण शिक्षण ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देऊ शकते.


**प्रस्तावना:** मानवाकडून प्राचिन काळापासुन ज्ञानाचे संचय केले जाते. प्रत्येक नविन पिढी ही जुन्या काही सामाजिक ठेवा प्राप्त होतो आणि काही वेळा ते स्वत:हा प्राप्त करुन घेत असतात. मानवाच्या प्रत्येक पिढीकडून काही तरी टिकण्याची प्रक्रिया पुढच्या पिढीला प्राप्त होत असते. ज्ञानाची परम्परा हि सतत शिक्षण आणि ज्ञानावर आधारित आहे. मानसिक आणि अध्यात्मिक प्रगती आहे. शिक्षणामुळेच मानवाची मान ताठ असते. शिक्षण ही अशी गोष्ट आहे की ती मानवाचे कल्याण तर करतेच पण देशविदेशात त्यांचा डंका घुमू लागतो. त्यामुळेच तेथील शिक्षित आणि अशिक्षीत मानसाचे तेथील प्रगती ी ही शिक्षणावर अवलंबून असते. त्यावेळी ते राष्ट्र देश विकसीत होत असतात. दुर्खीम यांच्या मते, "शिक्षण अधिक वयाच्या मानवामध्ये सामाजिक जिवनात प्रवेश करण्यासाठी योग्य नाही. त्याचा उद्देश मुलांमध्ये भौतिक, बौद्धीक आणि नैतीक विशेषता यांचा विकास करण्यासाठी संपूर्ण समाज पर्यावरण हे अनुकूल करण्यासाठी आवश्यक असते."

**ग्रामीण शिक्षण:** ग्रामीण जीवनाशी व परिसराशी अनुरूप असे शिक्षण म्हणजे ग्रामीण शिक्षण होय. ग्रामीण जीवन आणि नागरी जीवन यांत फार मोठे अंतर असते. राहण्याची घरे, आरोग्यविषयक सोयी, रस्ते व वाहतूकव्यवस्था, चरितार्थाची व करमणुकीची साधने आणि सार्वजनिक जीवन यांसारख्या बाबतींत शहरांपेक्षा खेडेगावांत अनेक गैरसोयी असतात. अशा गैरसोयी व जगापासून अलगपणा यांमुळे ग्रामीण शिक्षणावर फार मोठा परिणाम होतो. विद्यार्थी, पालक, शिक्षण, शिक्षणाधिकारी, अभ्यासक्रम, शैक्षणिक प्रशासन आणि शिक्षणखर्च या सर्वांचा विचार करताना खेड्यातील वस्तुस्थितीचा विचार करणे भाग असते. ग्रामीण शिक्षणाच्या विचाराने स्थूलमानाने चार घटक आहेत. देशात प्रचलित असलेल्या शिक्षण पद्धतीचा ग्रामीण भागात प्रसार आणि तो करण्यातील अडचणी यांत पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, औद्योगिक, महाविद्यालयीन आणि प्रौढांच्या अशा सर्व शैक्षणिक टप्प्यांचा समावेश होतो. दुसरा विचार शैक्षणिक तसेच शिक्षणोपयोगी अशा तंत्रांसंबंधी आहे. खेड्यातील शिक्षणविषयक अडचणी दूर करून तेथील जनतेला अधिकाधिक चांगले शिक्षण मिळण्याकरिता निरनिराळ्या तंत्रांचा कसा उपयोग करता येईल ते पहावे. तिसरा भाग म्हणजे, ग्रामीण जनतेकरिता नागरी शिक्षणपद्धतीपेक्षा निराळी अशी शिक्षणपद्धती असावी की काय हा होय. चौथा विचार म्हणजे व्यापक ग्रामोद्धाराच्या दृष्टीने प्रौढ शिक्षणाचा उपयोग कसा करून घेता येईल, यासंबंधी आहे. शिक्षण हि काळाची गरज आहे. आज कित्येक बालक या शिक्षणापासून वंचित आहेत, शिक्षणाच्या वयात हाताला लागलेले काम, घरातील अपेक्षेचे ओझे, चिमुकल्या वयात मुले या

अपेक्षेच्या ओझ्याने पार कोसाडून जातात आज कित्येक मुल शिक्षणापासून वंचित आहेत. ग्रामीण भागातील परिस्थिती एवढी विपरीत आहे कि शिक्षण नावाचे अक्षरही त्या आईवडिलांना माहित नसते, अडाणी आई वडिलांना शिक्षणाचे महत्व माहित नसल्याने त्यांच्या मुलांना देणे हि त्यांना आवश्यक नाही वाटत आणि ज्याना शिक्षणाचे मोल आहे त्या पालकांचे शिक्षणाच्या अवास्तव खर्चापायी मुलांना शिकवायचे स्वप्न स्वप्नच राहून जातात.

ग्रामीण भागातील युवा शेतकऱ्याला आधुनिकतेचा वापर करून शेतीला प्रगत केले पाहिजे भारत हा कृषी प्रधान देश आहे मग सर्वात आधी शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारायला हवी जेव्हा आपला शेतकरी शेतीच्या कर्जापासून कायमचा मुक्त होईल जेव्हा त्याचे मुले अल्प वयात शिक्षण न सोडता शिक्षण घेऊन त्याच्या शिक्षणाचा वापर शेतीच्या प्रगतीसाठी करतील तेव्हा खर्या अर्थाने आपण प्रगती केली असे म्हणू शकणार शिक्षणाचा खरा हेतू हा पैसा कमावून बंगला गाडी घेऊन एका माणसाने दुसर्या माणसाला कमी लेखण्यासाठी मुळात नसावे तर शिक्षण हे उद्याचा उज्ज्वल समाज घडवणारे असावे, ज्या मध्ये गरीब श्रीमंतीची दरी नसेल. एक व्यक्ती दुसर्या व्यक्तीला कमी लेखण्याचे काम न करता केवळ समाजासाठी काम करेल. ग्रामीण जीवनाशी व परिसराशी अनुरूप असे शिक्षण म्हणजे ग्रामीण शिक्षण होय. ग्रामीण जीवन आणि नागरी जीवन यात फार मोठे अंतर असते. राहण्याची घ्ररे, आरोग्य विषय सोयी, रस्ते व वाहतूक व्यवस्था, चिरतार्थाची व करमणूकीची साधने आणि सार्वजनिक जीवन यासारख्या बाबतीत शहरपेक्षा चखेडगांत अनेक गैरसोयी असतात. अशा गैरसोयी व जगापासून लगलपण यामुळे ग्रामीण शिक्षणावर फार मोठा परिणाम हातो. विद्यार्थी, पालक, शिक्षण, शिक्षणाधिकारी अभ्यासक्रम शैक्षणिक प्रशासन आणि शिक्षण खर्च या सर्वांचा विचार करताना खेडयातील वस्तुस्थितीचा विचार करणे भाग असते.

ग्रामीण शिक्षणाच्या विचाराने स्थूलमानाने चार घटक आहेत. देशात प्रचलित असलेल्या शिक्षण पद्धतीचा ग्रामीण भागात प्रसार आणि तो करण्यातील अडचणी यात पूर्व प्राथमिक, माध्यमिक, औद्योगिक महाविद्यलीन आणि प्रौढांच्या सर्व शैक्षणिक तथ्यांचा समावेश होतो. ग्रामीण जनतेकरिता नागरी शिक्षण पद्धतीपेक्षा निराळे अशी शिक्षण पद्धती असावी की काय ? हाच चौथा विचार म्हणजे व्यापक ग्रामोधाराच्या दृष्टीने पौढ शिक्षणाचा उपयोग कसा करून घेता येईल यासंबंधी आहे.

**प्राथमिक शिक्षणावरील अभ्यास:** अनेक संशोधनामध्ये ग्रामीण प्राथमिक शाळांमधीली पायाभूत सुविधा, वर्गसंख्या, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण आणि अध्यापन पद्धती यांचा अभ्यास करण्यात आला आहे. काही अभ्यासकांच्या मते शाळांची संख्या वाढली असली तरी प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता आणि बहुवर्गीय अध्यापन ही प्रमुख अडचण आहे.

**माध्यमिक शिक्षणावरील संशोधन:** ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणात गळतीचे प्रमाण जास्त असल्याचे अनेक अभ्यास दर्शवितात. आर्थिक अडचणी, स्थलांतर, बालमजुरी तसेच मुलींच्या शिक्षणाबाबत सामाजिक दृष्टिकोन हे घटक महत्त्वाचे ठरतात.

**शिक्षकांशी संबंधित अभ्यास:** पूर्वसाहित्यामध्ये शिक्षक प्रशिक्षण, नियुक्ती, बदली प्रक्रिया आणि प्रेरणा या बाबींचा सविस्तर विचार करण्यात आला आहे. ग्रामीण भागात काम करणाऱ्या शिक्षकांना सुविधा व व्यवसायिक विकासाच्या संधी कमी मिळतात.

**ग्रामीण भागातील शिक्षण पूर्वसाहित्याचा आढावा:** ग्रामीण भागातील शिक्षण हा भारतातील शैक्षणिक संशोधनाचा एक महत्त्वाचा विषय राहिला आहे. सामजिक आर्थिक विषमता, पायाभूत सुविधांची कमतरता, शिक्षकांची उपलब्धता, नावनोंदणी व गळतीचे प्रमाण, तसेच गुणवत्तेचे प्रश्न या संदर्भात अनेक अभ्यास झालेले आहेत. यापूर्व साहित्याच्या आढाव्यात राष्ट्रीय व राज्यस्तरीय अहवाल, शैक्षणिक संशोधन लेख, आयोगांचे निष्कर्ष आणि विविध अभ्यासकांचे निरीक्षणे समाविष्ट करण्यात आली आहेत.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी:** स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण शिक्षणाचा विस्तार हा सरकारचा प्रमुख अजेंडा राहिला. प्राथमिक श्ज्ञिक्षण सार्वत्रिकीकरणासाठी विविध योजना राबिविण्यात आल्या. या काकलखंडातील अभ्यासांचवनी शाळांची उपलब्धता वाढली असली तरी गुणवत्तेत असमतोल अस्लयाचे निदर्शनास आणले.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :** १) समाज व जिवनोपयोगी शिक्षण : शती, आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, कौशल्य आधारित शिक्षण देणे. २) आर्थिक व सामाजिक विकास : शिक्षणातून रोजगार व गावाचा सर्वांगीण विकास साधणे. ३) सार्वजनिक विकास : ग्रामीण भागातील प्रत्येक मुला-मुलीला शिक्षणाची संधी मिळावी. ४) शिक्षणातील समानता : शहरी व ग्रामीण शिक्षणातील दरी कमी करणे. ५) गुणवत्तापुर्ण शिक्षण : केवळ शाळेत दाखल करणे नाही तर समजून शिकणे (Qulity Education) घडवते.

**शिक्षणाची व्याख्या:** 1) "शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी दिली जाणारी अशी प्रक्रिया की, ज्यामुळे तिच्या बौद्धिक, शारीरीक, मानसिक, सामाजिक, नैतिक व भावनीक क्षमतांचा विकास होतो. आणि ती समाजाचा जबाबदार नागरीक बनते."

ग्रामीण भागातील शिक्षणाचे ग्राहीत घटक

**गृहितके:** १) विद्यार्थी ग्रामीण भागातील मुले-मुली हे शिक्षणाचे मुख्य ग्राहीत घटक आहेत. २) पालक मुलांच्या शिक्षणातून कुटुंबाचा सामाजिक व आर्थिक स्तर सुधारतो. ३) शिक्षक ग्रामीण शिक्षणातून शिक्षकांना रोजगार, अनुभव व सामाजिक प्रतिष्ठा मिळते. ४) ग्रामीण समाज शिक्षणामुळे समाजात जागृती, आरोग्य सुधारणा व सामाजिक बदल घडतो. ५) शेतकरी व कामगार वर्ग शिक्षणातून आधुनिक शेती, तंत्रज्ञान व कौशल्यांची माहिती मिळते. ६) महिला व मुली मुलींच्या शिक्षणामुळे स्त्री-सक्षमीकरण होते. ७) स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, पंचायत समिती) शिक्षणामुळे गावाचा सर्वांग विकास साधता येतो.

**संशोधन पद्धती:**

**१) सर्वेक्षण पद्धती:** ग्रामीण, शाळा, शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्याकडून माहिती गोळा केली जाते.

**२) केस स्टडी:** एखाद्या शाळा विद्यार्थी शिक्षक, किंवा गाव याचा सखोल अभ्यास केला जातो. उदा. एका ग्रामीण शाळेचा अभ्यास .

**ग्रामीण भागातील शिक्षणाचे निष्कर्ष:** ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्था ही समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. सध्या ग्रामीण शिक्षणात शाळांची उपलब्धता वाढली असली, तरीही गुणवत्तेचा अभाव, शिक्षकांची कमतरता, भौतिक सुविधांची अपुरी व्यवस्था, आणि डिजिटल साधनांचा मर्यादित वापर अशा अनेक अडचणी दिसून येतात. आर्थिक अडचणी, पालकांची कमी शैक्षणिक जाणीव, तसेच बालमजुरी व स्थलांतर यांमुळे विद्यार्थ्यांची गळती (dropout) अजूनही मोठ्या प्रमाणात आढळते. तरीसुद्धा शासकीय योजना, मध्यान्ह भोजन, मोफत पाठ्यपुस्तके, शिष्यवृत्ती, आणि डिजिटल शिक्षण उपक्रम यांमुळे ग्रामीण शिक्षणाह हळूहळू सकारात्मक बदल होत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षक पालक आणि समाज यांचा सक्रिय सहभाग वाढविल्यास ग्रामीण भागातील शिक्षणाची गुणवत्ता निश्चितच सुधारु शकते. एकूण निष्कर्ष असा की, योग्य धोरणे, पुरेशा सुविधा, प्रशिक्षित शिक्षक वर्ग आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास ग्रामीण भागातील शिक्षण शहरी शिक्षणाच्या बरोबरीने उभे राहू शकते आणि देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

**ग्रामीण भागातील शिक्षणासाठी शिफारशी :** ग्रामीण शाळांमध्ये प्रशिक्षित व पुरेशा शिक्षकांची भरती करावी आणि नियमित प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत. शाळांमध्ये भौतिक सुविधा (वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, वीज) सुधाराव्यात. डिजिटल शिक्षण साधने (स्मार्ट बोर्ड, इंटरनेट, टॅब/ कॉम्प्युटर) उपलब्ध करून द्यावीत. विद्यार्थ्यांची गळती कमी करण्यासाठी पालक-जागृती कार्यक्रम व समुपदेशन वाढवावे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व शैक्षणिक मदत अधिक प्रभावीपणे राबवावी.
मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रोत्साहन योजना राबवाव्यात. शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी नियमित मूल्यांकन व देखरेख करावी.

**संदर्भ सूची:**

१. T.B. Botomore, Sociology, P.N. 275
२. अॅड. विशाखा समाधान बोरकर, (marathishruti.com)
३. Vishwakosh.marathi.gov.in

# महाराष्ट्रातील नैसर्गिक आपत्तींचे गावगाड्यावर होत असलेले परिणाम: समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. डॉ. संपत काळे** टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूर परिसर, तुळजापूर, धाराशिव

**गोषवारा:** आपल्या राज्याने अनेक पातळ्यावर मोठी भरारी मारली आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील विषमतेची दरी कमी करण्यासाठी आर्थिक गुंतवणूक वाढवली जात आहे. शहरीकरणाचा वेग इतका प्रचंड आहे की ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होते आहे. नैसर्गिक आपत्ती शाश्वत विकासामध्ये अडसर निर्माण करत आहेत. सतत पडणारा दुष्काळ, पाणी आणि चारा टंचाई, कुठे अतिवृष्टी, अचानक येणारे महापूर तर काही भागात गरपीट, कोकणालातील चक्रीवादळे, विदर्भातील कृषी संकट आणि त्यामुळे होणाऱ्या आत्महत्या रोखणे कठीण होत आहे. नैसर्गिक संकटे, हवामान बदल, या सर्वांचे परिणाम ग्रामीण समाजावर जबर पद्धतीने होताना दिसत आहेत. समाजातील शेतकरी, गरीब भूमिहीन, दलित आणि आदिवासी व भटक्या समाजावर स्थलांतर करण्याची वेळ सातत्याने येत आहे. अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे अनेक समूह गाव सोडून शहरात आश्रय घेत आहेत. रोजगारासाठी आणि कुटुंबाची उपजीविका भगविण्यासाठी हंगामी स्थलांतर करीत आहते. या सर्वाचे परिणाम कुटुंब, विवाह, नातेसंबंध, गावातील सत्ता संबंधावर आणि पर्यायाने विषमतेत वाढ होऊन शिक्षण, आरोग्य, निवारा आणि जगण्यासाठी करावी लागणारी कसरतही प्रचंड प्रमाणात वाढत असल्याचे आपल्याला दिसत आहे.

प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे ७० टक्के ग्रामीण लोकांची उपजीविका शेती, पाणी, जंगल आणि पशुधनावर अवलंबून आहे. आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी पुढील अनेक दशके काम करावे लेगेल. पायाभूत सुविधा तसेच जीवनमान उंचावण्यासाठी आरोग्य, शिक्षण, उपजीविका आणि ग्रामीण व शहरी भागातील विषमता निर्मूलनाचे कार्यक्रम हाती घ्यावे लागतील. विक्रम साराभाई म्हणतात, 'जमिनीवरील प्रश्न अवकशातूनही सोडवले जाऊ शकतात'. ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच सर्व सामान्य शेतकऱ्याला परवडेल अशा योजना आखून दुष्काळ निर्मूलन करणे गरजेचे आहे. प्रस्तुत शोधनिबंध हा प्राथमिक आणि दुय्यम तथ्यावर आधारित आहे. संख्यात्मक आणि गुणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला. मागील वर्षी राज्यावर आलेले अतिवृष्टीचे संकट कसे भयानक होते ते प्रत्यक्ष लोकांशी भेटून समजून घेऊन इथे मांडले आहे.

**प्रस्तावना:** राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्य सरकार बरेच प्रयत्न करीत आहे. विदर्भ आणि मराठवाडा या भागात गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. विदर्भ आणि मराठवाडा येथील पीक पद्धती जरी वेगवेगळी असली तरी शेतकरी त्रस्त होण्याची कारणे व परिणाम निरनिराळे आहेत. फक्त नापिकी किंवा कर्जबाजरीपणा हेच त्यामागील कारण नसून अनेक समाजशास्त्रीय कारणे आपल्याला दिसून येतात. समाजातील, कुटुंबातील वीण विस्कटणे, संयुक्त कुटुंबाचे विभक्त कुटुंबात परिवर्तन होणे, नातेवाईकांचे गरजेच्या वेळी सहकार्य न लाभणे तसेच आजारपणामुळे येणारे वैफल्य अशा अनेका कारणांतून शेतकरी आत्महत्या होत आहेत. गावगाड्यावर आणि शेतीत मराठा कुटुंबाचे वर्चस्व असले तरी सर्वाधिक शेतकरी आत्महत्या मराठा कुटुंबातील झाल्याचे दिसून येत आहे. तरुणांच्या विवाहाच्या वयात देखील प्रचंड वाढ झाली आहे. व्यसनाधीनता, बेरोजगारी, कौटुंबिक कलह आणि सर्वात महत्वाचे म्हणजे निसर्गाचा लहरीपणा जबरदस्त वाढल्यामुळे मानसिक धक्का, वैफल्य, उपजीविका धोक्यात येणे, उपचारावरचा प्रचंड खर्च, हतबलता आणि त्रस्तपणा वाढला आहे.

शेतकरी आत्महत्या शून्य टक्क्यावर आणण्यासाठी सरकार कोटी कोटी रुपये खर्च करीत आहे पण त्याचे हवे तसे परिणाम दिसून येत नाहीत. बळीराजा चेतना अभियान गावोगावी खऱ्या अर्थाने जर पोहोचले असते तर किमान जाणीव जागृती व शेतकऱ्यांचा आत्मविश्वास तरी वाढेल व कदाचित शेतकरी आत्महत्या काही प्रमाणात थांबू शकतील. पण त्यासाठी निरंतर प्रयत्न हवेत. बळीराजा चेतना अभियानाची आर्थिक मदत योग्य लाभार्थी निवड करून तसेच निवडीचे निकष किंवा निर्देशांक ठरवून देणे खूप महत्वाचे आहे. त्यासाठी संशोधन, जणीवजागृती, मोहीम किंवा अभियान योग्य पद्धतीने राबविणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या समस्या दूर करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करणे, पाणी वापर संस्था तयार करणे, शेतकरी गटांची निर्मिती करण्यासाठी बिनव्याजी कर्जाची व्यवस्था करणे खूप महत्वाचे आहे. आरोग्य सेवांचे होणारे खासगीकरण थांबवून सरकारी आरोग्य व्यवस्था बळकट करण्याकडे कल वाढवला पाहिजे.

**संशोधन पद्धती:** या अभ्यासासाठी संख्यात्मक आणि गुणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला. यामध्ये प्रथम सहभागी सिंचन व्यवस्थापनासंबंधी स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक अनुभवांचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर राज्यव्यापी सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये पाणी वापर संस्था, जलसंपदा विभाग कर्मचारी, विशेष गटचर्चा, केस स्टडीज आणि लाभधारक शेतकऱ्यांचा समावेश होता. सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, संशोधन संस्था, लाभ धारक शेतकरी महिला, आदिवासी समुदायातील सभासद, जन संघटना, आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांशी सखोल संवाद व चर्चा आयोजित करण्यात आल्या. सदर अभ्यासासाठी गव्हर्निंग द कॉमन ही एलेनोर ऑस्ट्रॉम यांनी वापरलेली जगप्रसिद्ध संकल्पना (१९९०) वापरण्यात आली आहे. रॉबर्ट चेंबर्स यांची सहभागी शिक्षण पद्धतीही वापरण्यात आली आहे. सामूहिक प्रक्रियातून आपले ध्येयं साध्य करण्यासाठी लोक सहभागी होतात, तसेच सहभागी शिक्षणातून परिवर्तन आणि लोकसहभागातून शाश्वत विकासाची चौकट वापरण्यात आली आहे. यामधून सामूहिक साधन संपत्तीचे सहभागी पद्धतीने कसे जतन करावे, सामूहिक निर्णय प्रक्रिया कशी राबवावी आणि लाभच्या प्रक्रियेत अतिमागास, दुर्बल घटक, शेतकरी, दलित-आदिवासी व महिलांचा सक्रिय सहभाग घेतला जावा या महत्त्वाच्या घटकांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**अतिवृष्टी आणि महापूर याचे मराठवाड्यातल्या गावांवर आणि गावगाड्यावर काय परिणाम झाले त्याचं एक प्रातिनिधीक चित्र:** दुष्काळ पाचवीला पुजलेल्या मराठवाड्यामध्ये या वर्षी प्रचंड पाऊस झाला आहे. पिकं आणि पशुधन, प्रपंच आणि उपजीविका कोलमडून पडण्याच्या वाटेवर आहे. "एका रातीत ढगफुटी झाली आणि समदंच वाहून गेलं... बघा बघा. सगळंच वाहून गेलं. घर गेलं. जनावरं गेली चार. समदंच वाहून गेलं. कंबरेपर्यंत पाणी होतं. आमच्या पोरानं आमाला उठविलं म्हणून आम्ही वाचलो. पाणीच असलं होतं." श्रीकवल भारत मोरे, चिंचपूर ढगे, ता. भूम २१ सप्टेंबर २०२६ धाराशिव जिल्ह्याच्या (पूर्वीचा उस्मानाबाद) भूम तालुक्यातलं चिंचपूर ढगे हे २४०५ लोकसंख्येचं गाव. बाणगंगा नदीच्या काठी वसलेल्या चिंचपूर ढगे गावात २१ आणि २२ सप्टेंबर दोन्ही दिवस रात्रभर मुसळधार पाऊस झाला. बाणगंगा नदीला पूर आला आणि 'आयुष्यभरात पाहिलं नाही' असं पाणी गावात शिरलं.

तिशी पार केलेले सूर्यकांत चंद्रकांत मोरे नदीपात्र दाखवतात आणि म्हणतात, "बाणगंगा नदीकाठची सगळी शेतं वाहून गेलीयेत. एक एकराच्या दोन द्राक्ष बागा पूर्णपणे वाहून गेल्या. जनावरं थोडक्यात वाचली. त्यांच्याही नरड्यापर्यंत पाणी आलं होतं. पण तेवढ्यात सोडली म्हणून कशी बशी वाचली. पण शेतातल्या शेडमध्ये काढून ठेवलेलं धान्य, शेंगा, जवारी, मूग, उडीद सगळं भिजलं. कडबा वाहून गेला. मोरेंचं कांद्याचं रान पूर्ण खरवडून गेलं. एकर-दीड एकर. रान खरवडून गेलं म्हणजे तिथे आता मातीच राहिलेली नाही. फक्त दगड, मुरुम दिसतोय. वरचा सुपीक मातीचा थरच निघून गेलाय. २१ आणि २२ सप्टेंबरच्या रात्री या परिसरात अतिवृष्टी झाली. "रात्री ८ वाजता जो पाऊस सुरू झाला तो दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता थांबला," (नाव मिळेल) सांगतात. "लेकरं काढू का जनावरं असली अवस्था झाली आमची. चार जनावरं गेली. दोन म्हशी आणि दोन जर्सी गायी. दुधाच्या. रात्री १.३० वाजता गावातून फोन आला म्हणून आम्ही उठलो."

गावाला जाणारा रस्ता आणि त्यावरचा पूल अर्धा खचलेला असल्याने वाहतूक दोन दिवस पूर्ण बंद होती. गावातले मोबाइल टॉवर पाण्याच्या प्रवाहाने बंद पडले आणि बाहेरच्या जगाशी संपर्कच तुटला. वीज बंद झाली. २०२५ साली एरवी दुष्काळग्रस्त अशी ओळख असलेल्या मराठवाड्याला पावसाने अक्षरशः झोडपून काढलं. मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांची पावसाची आकडेवारी थक्क करणारी आहे. दर वर्षी ६७९.५ मिमि इतका 'नॉर्मल' पाऊस पडणाऱ्या मराठवाड्यामध्ये या वर्षी जून महिन्यापासून ९४९.३ मिमी इतका पाऊस पडला. आणि खरं तर १५ मे पासूनच पाऊस सुरू झालाय पण त्याची आकडेवारी 'पावसाळ्यात' धरली जात नसल्याने ती संकेतस्थळावर उपलब्ध नाही. धाराशिव जिल्ह्यात एरवी जून महिन्यापासून ६०३ मिमि इतका पाऊस अपेक्षित असतो. २०२५ साली हाच आकडा ९७४.७ मिमि इतका नोंदवला गेला आहे. म्हणजे सरासरीच्या १६१.६ %. त्यातही सप्टेंबर महिन्यात सर्वात जास्त पावसाची नोंद झाली आहे.

चिंचपूर ढगे भूम तालुक्यात आहे. या तालुक्याची आकडेवारी तोंडात बोटं घालायला लावणारी आहे. या तालुक्यात एरवी सप्टेंबर महिन्यात १९०.९ मिमी पाऊस होत असल्याची नोंद आहे. २०२४ साली इथे केवळ १६१.९ मिमि पाऊस झाला होता. या वर्षी हाच आकडा ५१४.४ मिमि इतका आहे. सरासरीच्या ३२०.८ टक्के. "रेकॉर्ड ठेवायला एक रजिस्टर राहिलेलं नाही. लेकरांचे डबे, वाट्या, ताटल्या सगळंच वाहून गेलंय." अंगणवाडी ताई

अंगणवाडीच्या भिंतीवर ११ ते १२ फुटावर पाण्याची खूण दिसत होती. अंगणवाडी बंद असल्याने आत शिरलेल्या पाण्याने किती आणि काय नुकसान केलंय हे समजू शकलं नाही. नंतर फोनवर अंगणवाडी ताईंशी संपर्क साधला तेव्हा आतलं सगळंच वाहून गेल्याचं त्यांनी फोनवर सांगितलं जीविता ताई सांगतात. "मीठ-मिरचीचा डबासुद्धा गेला वाहून." कस्तुराबाईंच्या चेहऱ्यावर फक्त धक्का आणि रिकामपण. "कपडे गेले, भांडी-कुंडी गेली, पैसे गेले. संसारच वाहून गेला. ३ ग्रॅम सोनं गेलं, चार चांदीची जोडवी होती

ठेवलेली. तीसुद्धा पाण्यात वाहून गेली." कस्तुराबाई चव्हाण आणि त्यांचे पती एकनाथ चव्हाण लोहारकाम करून पोट भरतात. त्यांच्या पत्र्याच्या खोपटात काही म्हणजे काहीही राहिलं नाही.

२२ सप्टेंबरच्या रात्री नेमकी एक महिला बाळंतपणासाठी गावातल्या उपकेंद्रात आली. आणि सिस्टरला फोन केला. पाहतात तर काय, "दवाखान्यात जाताच आलं नाही. समोरचा रस्ताच वाहून गेलाय," चिंचपूरच्या उपकेंद्राच्या आरोग्य सेविका ए बी थिटे सांगतात. "रात्रीच डिलिव्हरीसाठी एक बाई आली ३ वाजता, तिला तेवढ्या पावसात दुसरीकडे न्यावं लागलं." पुराच्या पाण्याने दवाखान्यासमोर पाच सहा फुटाचं भगदाड पडलं होतं. जायला दुसरा कोणताच रस्ता नसल्याने दवाखाना उघडता आलाच नव्हता. समोरचा डांबरी रस्ताही कडेने वाहून गेला होता. चिंचपूर ढगे आणि आसपासच्या सात गावातून मोठ्या प्रमाणावर दूध संकलित केलं जातं. "गेले दोन दिवस गावातून भूमला दूध जाऊ शकलेलं नाही," बाबासाहेब कातुरे सांगतात. "दिवसाला ५ ते ६ हजार लिटर दूध भूमला जातं. गावात सहा डेअऱ्या आहेत. आजूबाजूच्या गावातून दूध या गावात येतं. पुराच्या पाण्याने रस्ताच खचलाय त्यामुळे गाड्या गावातून जाऊच शकत नाहीयेत," कातुरे सांगतात. भूम तालुका 'खवा क्लस्टर' म्हणून प्रसिद्ध आहे. अनेक शेतकरी आणि छोटे गट दुधापासून खवा करण्याचा जोड-व्यवसाय करतात. अनेक तरुण शेतकरी शेतीसोबत जोडधंदा म्हणून दुधाकडे वळलेत. "माझ्या सहा गायी, एक म्हैस आणि एक वासरू वाहून गेलंय. जनावरं तर गेलीच पण त्यासोबत २००० कडबं, ४०-४५ हजारांची कडबा कुट्टी मशीन आणि दूध काढण्याचं मशीनसुद्धा वाहून गेलंय. बाणगंगा नदीतीरावर अनेकांनी कष्टाने, कर्ज काढून द्राक्षाच्या आणि पेरूच्या बागा उभारल्या होत्या. श्रीराम ढगेंचा "१५ एकर द्राक्षाचा बाग पूर्ण वाहून गेला आहे. फाउंडेशन सुद्धा राहिलेलं नाही." सुहास गणेश ढगे आणि त्याचा भाऊ केशव या दोघांनी देखील वडलांनंतर शेती करत असताना एक हेक्टर कलमी पेरूची बाग लावली होती. एक हजार रोपं होती. पुढच्या सात दिवसात बाजारात पेरू जाणार होता... आज सगळी बाग पाण्यात आडवी झाली आहे. सोबत दोन एकर सोयाबीन, डाळिंबाचा बाग आडवा झालाय. इतकंच नाही, शेतातला ट्रॅक्टरदेखील वाहत जाऊन पुढे अडकून पडलेला दिसला. नदीकाठची शेती तर वाहून गेलीच पण सोबत जवळपास १०० सौर पंपसुद्धा पुरात वाहून गेले आहेत, असं सूरज ढगे सांगतो. सौर पॅनल आणि पंपाचा सगळा संच वाहून गेलाय. तुषार सिंचन आणि ठिबक आणि पाइपलाइन वाहत जाऊन दूर अडकलेले दिसतात. गाळाने आणि वाहत आलेल्या झाड-झाडोऱ्याने सगळ्या विहिरी बुजून गेल्या. पण पूर फक्त या अतिवृष्टीमुळे आला नाहीये. बाणगंगा नदीच्या उत्तरेला असलेले तीन पाझर तलाव फुटले आणि नदीला पूर आला असं सगळ्याच गावकऱ्यांचं म्हणणं आहे. "वारे वडगाव, साबळेवाडी आणि बुरुडवाडी इथले तीन पाझर तलाव फुटले आणि ते सगळं पाणी नदीत आलं. त्यात पाऊस झाला," असं सूरज दत्तात्रय ढगे सांगतो. "२१ सप्टेंबरला रात्री पाणी चढलं ते २३ तारखेला सकाळी ओसरलं. गावात जाणाऱ्या रस्त्याशेजारीत जुना कोल्हापूर पद्धतीचा बंधारा आहे. पण त्याचे दरवाजेच उघडलेले नव्हते. पाण्याबरोबर वाहत आलेला झाडोरा त्यात अडकला आणि पाण्याने शेजारच्या शेतांमधून वाट काढली." नदीने पात्र बदललं. नैसर्गिक प्रवाह सोडून सुमारे ५०० मीटर अलिकडे नदी वळली आणि चिंचपूर ढगे गावात आणि शिवारात शिरली. या नुकसानीची कारणं गावातले लोक आपापल्या पद्धतीने शोधून काढतातच.

५० वर्षांपूर्वीपर्यंत नदीच्या काठावर पूर्वी रानं पडक होती. जनावरं चारण्यासाठी रिकामी जागा होती. त्या सगळ्या जमिनी आता वाहितीखाली आल्या आहेत. एवढंच नाही तर काही ठिकाणी नदीपात्रावर अतिक्रमणं देखील झाली आहेत असं सूर्यकांत मोरेंचे बंधू सांगतात. ३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, धाराशिव जिल्ह्यातल्या सगळ्या ४२ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली. त्यामध्ये सुमारे ४,४९.६८९ हेक्टर शेतीचं नुकसान झालं असून ८,००० हेक्टर शेती पूर्णपणे खरवडून गेली आहे. २२१ रस्ते, १४६ पाझर तलाव आणि १९ साठवण तलावांचं नुकसान झालं असून ७०-८० टक्के सरकारी शाळांचं पूर आणि पावसात नुकसान झालं आहे.

**समारोप:** मराठवाड्यामध्ये सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टी आणि महापूर यांनी हाहाकार केला. महापुराने शेते उभ्या पिकांसह खरवडून निघाली. गावेच्या गावे पाण्याखाली गेल्यामुळे मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान झाले. महाराष्ट्रातून स्वयंसेवी संस्था-संघटना आणि नागरिकांकडून मदतीचा ओघ सुरू झाला असला तरी ती तात्कालिक स्वरूपाची आणि जीवनावश्यक वस्तूरुपातील आहे. मात्र गावे पुन्हा नांदती करणे आणि शेती पुन्हा पिकती करणे यासाठी सरकारची तत्काळची व दीर्घकालीन मदत तातडीने आवश्यक होती. महापूरग्रस्त शेतकरी आणि गावे शासनाच्या मदतीची वाट बघत असताना, उशिरा का होईना, ३१६२८ कोटींचे भरपाई पॅकेज शासनाने जाहीर केले आणि मदत केली.

अतिवृष्टी आणि पुरामुळे महाराष्ट्राच्या २९ जिल्ह्यांतील २५३ तालुके प्रभावित झाले असून सुमारे ६८ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यापैकी मातीचा थर वाहून गेल्याने ६० हजार हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे, असे सरकारी आकडेवारीच सांगते. राज्यातील ८५ टक्क्यांपेक्षा जास्त शेतकरी हे अल्पभूधारक आहेत. त्यांची जमीन हेक्टरमध्ये नाही तर गुंठ्यामध्ये आहे. या सर्व पूरग्रस्त क्षेत्रातील लोकसंख्येपैकी २० टक्के लोकसंख्या ही भूधारकांची आहे तर ८० ते ८५ टक्के लोकसंख्या ही त्या शेतीवर काम करणाऱ्या तसेच शेती आधारित सेवा देणाऱ्या भूमिहीनांची आहे. म्हणजे त्यांच्या हातात शेतजमीन नसली तरी शेती हाच त्यांचा जीवनाधार आहे. महापुराच्या कारणांचा अभ्यास करून, त्याला जबाबदार कोण आहे याची खातरजमा करून, पुढील काळात निसर्गाचा असा प्रकोप झाला तरी अशा प्रकारची हानी होणार नाही यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे. महापूर, आपत्ती व्यवस्थापन, खरंच निसर्ग निर्मित की काही प्रमाणात मानव निर्मित होते तेही समजले आहे. विविध समाज घटकावर झालेले परिणाम त्यांच्याच भाषेत टिपले आहेत.

**संदर्भ:**

१. Ostrom, E. (1990). Governing the commons: The evolution of institutions for collective action: Cambridge university press.

२. Shaban Abdul, (February 2018) Farmers' Distress and Impacts of Baliraja Chetana Abhiyan, Osmanabad District of Maharashtra, Tata Institute of Social Sciences, Tuljapur Campus.
३. Kale Sampat, (December 2021). Maharashtratil Sahabhagi Sinchanache Punurtjeevan, a Sociological analysis, Marathi Samajshtra Sanshodhan Patrika, Maharashtra.
४. https://ruralindiaonline.org/article/in-chinchpur-dhage-the-river-took-it-all-mr Accessed on February 4, 2026.

# कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंगलज तालुक्यातील बिगर शासकीय संघटनांचे ग्रामीण शाश्वत विकासातील पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रातील योगदान

**डॉ. सतिश नामदेव धनवडे** सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,एस. एम. आर. के. बी. के. ए. के. महिला महाविद्यालय, नाशिक.

**गोषवारा:** ग्रामीण भागामध्ये अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहेत. पर्यावरणीय समस्यासंबंधी लोकामध्ये जाणीव जागृती व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविण्यामध्ये बिगर शासकीय संघटना अत्यंत महत्वाची भूमिका बजावत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंगलज तालुक्यात हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ, मराठी विज्ञान परिषद, अंधश्रद्धा निर्मुलन समिती, गार्डन्स ग्रुप ऑफ गडहिंगलज, या संघटना पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रामध्ये काम करून ग्रामीण शाश्वत विकासात महत्वाची भूमिका बजावत आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण विकासाचा विचार करताना ग्रामीण भागातही शाश्वत विकास घडून आला पाहिजे. असा विकास घडून येण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेच्या आर्थिक आणि सामजिक विकासाबरोबरच ग्रामीण पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे याकडेही जाणीवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे यासाठी शासकीय प्रयत्नाबरोबरच बिगर शासकीय संघटनांची भूमिका देखील महत्वाची आहे. या संदर्भात प्रस्तुत शोधनिबंधात कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंगलज तालुक्यातील हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ, मराठी विज्ञान परिषद, अंधश्रद्धा निर्मुलन समिती, गार्डन्स ग्रुप ऑफ गडहिंगलज, या बिगर शासकीय संघटनांच्या ग्रामीण शाश्वत विकासातील पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रामधील योगदानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**प्रस्तावना:** विकासाची संकल्पना अलीकडच्या काळात बदलत गेली आहे. सुरवातीच्या काळात आर्थिक वाढ म्हणजे विकास अशी विकासाची संकल्पना केली गेली. परंतु आर्थिक वाढ किंवा दरडोई उत्पन्नात वाढ झाली म्हणजे त्याचा लाभ समाजातील निम्न जातींना किंवा वर्गांना होऊन सर्वांचाच विकास होतो असे नाही, हे स्पष्ट झाल्यावर विकासाच्या संकल्पनेत लाभाच्या वितरणातील न्याय, साक्षरता आणि शिक्षणाच्या प्रमाणातील वाढ, आरोग्याच्या स्थितीतील सुधारणा इत्यादींचाही समावेश होणे आवश्यक आहे असे मत अनेक विचारवंतानी मांडले आहे. सन १९८७ साली World Commission on Environment and Development (WCED) या आयोगाने 'Our Common Future' हा अहवाल प्रसिध्द केल्यावर शाश्वत विकास हि संकल्पना जगप्रसिध्द झाली. या संकल्पनेत विकास म्हणजे आर्थिक वाढ, सामाजिक विकास तसेच पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन अशा तिन्ही बाबींचा समावेश केला गेला आहे. आर्थिक विकास, सामजिक न्याय याबरोबरच पर्यावरणाच्या संरक्षणावर विकास प्रक्रियेत भर दिला जाणे अभिप्रेत आहे. "विद्यमान पिढीच्या गरजा भागविल्या जातील पण याबरोबरच भविष्यातील मानवी पिढ्यांना त्यांच्या गरजा भागविताना कोणत्याही तडजोडी कराव्या लागणार नाहीत असा विकास म्हणजे शास्वत विकास होय." अशी व्याख्या 'Our Common Future' या अहवालात देण्यात आली आहे (Salunkhe, S. A. 2003. pp. 67-80).

ग्रामीण भागामध्ये अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहेत. पर्यावरणीय समस्यासंबंधी लोकामध्ये जाणीव जागृती व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविण्यामध्ये बिगर शासकीय संघटना अत्यंत महत्वाची भूमिका बजावत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंगलज तालुक्यात हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ, मराठी विज्ञान परिषद, अंधश्रद्धा निर्मुलन समिती, गार्डन्स ग्रुप ऑफ गडहिंगलज, या संघटना पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रामध्ये काम करून ग्रामीण शाश्वत विकासात महत्वाची भूमिका बजावत आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण विकासाचा विचार करताना ग्रामीण भागातही शाश्वत विकास घडून आला पाहिजे. असा विकास घडून येण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेच्या आर्थिक आणि सामजिक विकासाबरोबरच ग्रामीण पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे याकडेही जाणीवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे यासाठी शासकीय प्रयत्नाबरोबरच बिगर शासकीय संघटनांची भूमिका देखील महत्वाची आहे. या संदर्भात प्रस्तुत शोधनिबंधात कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंगलज तालुक्यातील बिगर शासकीय संघटनांच्या ग्रामीण शाश्वत विकासातील योगदानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**अभ्यास पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंध हा प्राथमिक माहिती स्त्रोतावर आधारीत असून त्यामध्ये गडहिंगलज तालुक्यातील हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ, मराठी विज्ञान परिषद, अंधश्रद्धा निर्मुलन समिती, गार्डन्स ग्रुप ऑफ गडहिंगलज, या संघटनांच्या ग्रामीण शाश्वत विकासातील पर्यावरण संरक्षण व संवर्धन क्षेत्रातील कार्याचा आढावा घेणे हे अभ्यासाचे प्रमुख उद्दिस्ट आहे. सदरच्या संस्थांची निवड ही हेतुपूर्वक नमुना निवड पद्धतीने केली आहे. माहितीचे संकलन प्रश्नावली तंत्राच्या साह्याने तसेच संघटनेतील पदाधिकारी यांच्या मुलाखती घेऊन करण्यात आले आहे.

**हिरण्यकेशी पर्यावरण मंडळाचे ग्रामीण शाश्वत विकासातील पर्यावरण क्षेत्रातील योगदान:** हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ हि अनोदणीकृत बिगर शासकीय संस्था सन १९८७ पासून गडहिंगलज मधील लोकांमध्ये पर्यावरणविषयक जाणीवजागृती व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबऊन पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रामध्ये अत्यंत मोलाचे काम करीत आहे. पर्यावरणीय विषयावर काम

करताना संस्थेने अनेक मार्गांचा अबलंब केला आहे त्यामध्ये जाहीर सभांचे आयोजन करणे, लोकांना संघटीत करून पर्यावरण जाणीव जागृती करणे, पर्यावरण प्रश्नासंबंधी वर्तमानपत्रातून लेख लिहणे इत्यादी अनेक मार्गांचा अवलंब संस्थेद्वारे केला जातो.

गडहिंगलज मधील हिरण्यकेशी नदीचे पाणी सुरक्षित व प्रदूषण मुक्त ठेवण्यासाठी संघटनेद्वारे काहिली मध्ये गणेश मूर्तीचे विसर्जन, घरीच बादली मध्ये गणेश मूर्ती विसर्जन, कृत्रिम तलावाची निर्मिती करून त्यामध्ये गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी लोकामध्ये जाणीव जागृती वाढविण्यासाठी प्रबोधन केले जात आहे. तसेच निर्माल्य संकलन करून त्यापासून गांडूळ खताची निर्मिती केली जाते. संघटनेद्वारे सुरु केलेल्या या उपक्रमामध्ये भागातील लोक मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहेत. संस्था यासाठी मराठी विज्ञान परिषद, शिवराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना मध्ये सहभाग असणारे विद्यार्थी तसेच विविध तरुण मंडळातील युवकांचे सहकार्य घेऊन उत्सव काळामध्ये माहिती पत्रके वाटणे, स्थानिक केबल वाहिनीवर प्रदूषण टाळण्यासाठीचे आवाहन तसेच विविध शाळा महावीद्यालयामध्ये व्याख्यानांचे आयोजन करून संस्था जाणीव जागृती कार्यक्रम राबविते.

परंपरेने चालत आलेलेल्या होळी सणाला शास्त्रीय दृष्टीकोन देऊन नव्याने पण वेगळ्या पद्धतीने पर्यावरण दृष्टीकोन ठेऊन होळी लहान – पोळी दान हा उपक्रम संस्थेद्वारे राबविला जात आहे. होळीच्या दिवशी शाळा, वसतीगृह परिसरात स्वच्छता मोहीम राबविणे व कचरा एकत्र करून कंपोष्ट खड्यात टाकणे, थोडासा कचरा वापरून मानवी राक्षस बनविणे व या राक्षसास भ्रष्टाचार, व्यसनाधीनता, दारू, गुटखा, गुंडागर्दी, व्यभिचार, एड्स, लाचखोरी इत्यादी लेबल लाऊन त्याची प्रतीकात्मक होळी करणे. गावागावात पेटविल्या जाणाऱ्या होळ्या कमी करण्यासाठी संस्थेद्वारे शेणी दान हा महत्वपूर्ण उपक्रम राबविला जातो. गोळा झालेल्या शेणी स्मशानभूमीला दान केल्या जातात. होळीला फ़क़्त नैवैध दाखऊन पुरणपोळ्या एकत्र करून त्या झोपडपटी, उसतोड कामगार व इतर गरीब लोकांना वाटल्या जातात. यातून होळीतून वाया जाणाऱ्या इंधनाची बचत, अन्नाची बचत करून तापमानवाढ कमी करणे, पर्यावरण रक्षण इत्यादी उद्देश संस्थेद्वारे साध्य केले जातात. दररोजच्या नागरी जीवनात विविध प्रकारच्या प्रदुषणाच्या समस्या भेडसावत आहेत. त्यामध्ये आवाजाचे व हवेचे प्रदूषण गंभीर रूप धारण करीत आहे. त्यासाठी हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ लोक्जाग्रुतीचे काम करीत आहे. यासाठी मुख्यता गणेश उत्सवापासूनच व्याख्याने व माहिती पत्रके वाटणे असे उपक्रम राबविले जातात कारण गणेश उत्सव, दसरा, दीपावली या सणांना मोठ्या प्रमाणात फटाके उडऊन आवाज व हवेचे प्रदूषण केले जाते. या प्रदूषणाचे परिणाम मुलांना व्याख्यानातून पटवून दिले जातात व पर्यावरण पूरक सण साजरे करण्याची शपथ दिली जाते. फटाक्याच्या वाचलेल्या पैशातून पुस्तक खरेदी करून गरीब वर्गमित्राना आर्थिक मदत करणे, वृक्षारोपण करणे इत्यादी उपक्रम राबविले जातात.

सर्प मानवाचा मित्र उपक्रमाअंतर्गत परिसरात सापडणारे विविध प्रकारचे जिवंत साप यांचे प्रदर्शन व सचित्र व्याख्यानाचे आयोजन आजरा, चंदगड व गडहिंगलज तालुक्यातील शाळा, महाविद्यालये यामध्ये संस्थेद्वारे केले जाते. नागपंचमी निमित्त सरकारी दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामपंचायती, शाळा, महावीद्यालये, इत्यादी मध्ये सर्पदंशावरील उपचार व ओळख याविषयी माहिती देणारे फलक लावण्यात येतात. वन विभागाचे वनरक्षक, अग्निशामन दल, पोलीस विभाग, या शासकीय विभागातील कर्मचार्याना आपत्तीच्या काळामध्ये नागरी वस्तीमध्ये सर्प आल्यास त्यास पकडणे, ओळखणे याची शास्त्रीय माहिती देण्यात येते. संस्थेद्वारे आतापर्यंत २००० पेक्षा ज्यास्त सर्प बाबतच्या छोट्या माहिती पुस्तिकेचे वाटप करण्यात आले आहे.

दरवर्षी ०१ ते ०७ ऑक्टोबर वन्यजीव सप्ताह प्राथमिक, माध्यमिक व जुनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यासाठी संस्थेद्वारे साजरा केला जातो. यामध्ये मुलांच्यासाठी विविध वयोगटात विविध विषय देऊन चित्रकला, रांगोळी, रंगभरण स्पर्धा तालुक्यातील विविध ठिकाणी घेतले जातात. याच कालावधीत विद्यार्थी व शिक्षक, नागरिक यांच्यासाठी ‘पक्षी निरीक्षण व जंगल वाचन’ असा कार्यक्रम संस्थेद्वारे घेतला जातो. परिसरातील विविध पक्षी ओळखणे, त्यांची नोंद करणे, त्यांची घरटी, त्यांचे अन्न यांचा अभ्यास केला जातो. तसेच पर्यावरणातील पक्षांचे व वृक्षांचे महत्व विद्यार्थी यांना पटवून दिले जाते. गडहिंगलज जवळील शेंद्री तलावावर येणाऱ्या परदेशी पक्षांचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी दरवर्षी संस्थेद्वारे घेतल्या जातात.

संस्थेद्वारे पर्यावरण जाणीव जागृती व प्रबोधन अंतर्गत विविध मान्यवर व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली जातात. दरवर्षी पर्यावरण व वनमंत्रालय, राजीव गांधी तंत्रशिक्षण प्रचार व प्रसार परिषद यांचेमार्फत जाहीर केल्या जाणाऱ्या एकाद्या विषयावर पर्यावरण जाणीव जागृती अभियान राबविला जातो. आतापर्यंत संस्थेने औषधी वनस्पती ओळख, लागवड व संवर्धन, पाणी जल जीवन अमृत, थेंबागणिक अधिक पीक संतुलित पाणी वापर, जैवविविधता ओळख व संवर्धन अभियान या विषयावर राबविले आहेत. याविषयास अनुसरून पोस्टर प्रदर्शन व्याख्याने, चर्चासत्रे, निबंध स्पर्धा इत्यादी उपक्रम संस्थेद्वारे राबविले जातात. सदरचे उपक्रम राबविण्यासाठी बाएफ, शिवराज महाविद्यालय, मराठी विज्ञान परिषद, गडहिंगलज नगरपरिषद, दुधसाखर महाविद्यालय, बिद्री, डॉ. घाली कॉलेज, आजरा महाविद्यालय आजरा, यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी, चंदगड कॉलेज, याच्याद्वारे व्याख्यानाचे आयोजन करण्यामध्ये संस्थेस सहकार्य लाभते. आपल्या संपन्न जैव विविधतेचे दर्शन व्हावे म्हणून परिसरात सापडणाऱ्या विविध वनस्पती यांचे प्रदर्शन विविध ठिकाणी भरवून त्यांचे महत्व लोकांना पटवून देण्यात येते. तसेच विविध रोगावरील औषधी वनस्पतीचे महत्व लोकांना सांगण्यात येते. औषधी वनस्पतीची लागवड, संवर्धन कसे करावे याची माहिती दिली जाते.

**मराठी विज्ञान परिषद, संघटनेचे ग्रामीण शाश्वत विकासातील पर्यावरण क्षेत्रातील योगदान:** सन १९८६ साली मराठी विज्ञान परिषदेची स्थापना करण्यात आली. सदरची संस्था हि तालुका पातळीवर काम करणारी संस्था आहे. संस्थेने पर्यावरण संरक्षण व संवर्धन क्षेत्रामध्ये लोकांमध्ये जाणीव जागृती निर्माण व्हावी या विशिष्ठ हेतूने विविध कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यामध्ये संस्थेने गणेश मूर्ती दान व निर्माल्य संकलन कार्यक्रम हाती घेतला आहे. जागतिक तापमान वाढीसंदर्भात विविध व्याख्यानांचे आयोजन केले जाते. बालविज्ञान संमेलने आयोजित केली जातात. निसर्गवाचन पक्षी निरीक्षण यासारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. गडहिंगलज तालुक्यातील उत्तम शेतकरी यांना शेतकरी पुरस्कार देऊन त्यांना सेंद्रिय शेती करण्यासाठी प्रेरित केले जाते. शालेय

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानवाद रुजण्यासाठी विविध विज्ञान प्रदर्शने व व्याख्यानांचे आयोजन केले जाते. वनसंरक्षण आणि संवर्धन साठी संस्था तालुक्यामध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेते. नद्या, तलावामधील पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी तसेच शुद्ध पाणी नागरिकांना उपलब्ध व्हावे यासाठी व पाण्याचा काटकसरीने वापर याबाबत शाळा महाविद्यालये येथील विद्यार्थ्यांसाठी तज्ञांच्या व्याखानांचे आयोजन केले जाते. सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्याबाबतच्या जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. संस्थेद्वारे लोकांच्यामध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीच्या ऱ्हासाला विरोध करून समानगड येथे नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर या विषयावरील एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. संस्थेद्वारे पर्यावरण संदर्भातील साहित्य प्रकाशित केले जाते. सुयोग्य तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यावरण संरक्षणावर भर देणे तसेच सौरउर्जेच्या वापराबाबत कार्यशाळेचे आयोजन केले जाते. प्राणी पक्षी यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी प्रबोधन केले जाते. पक्षी निरीक्षण कार्यक्रम हाती घेतले जातात. वन्यजीव सप्ताहानिमित्त चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले जाते. जखमी प्राणी पक्षी यांच्यावर उपचार करून त्यांचे योग्य पुनर्वसन केले जाते. संस्थेद्वारे उत्सवाच्या वेळी होणाऱ्या प्रदुषणाला विरोध केला जातो. विविध सण समारंभाच्या वेळी वाजविण्यात येणाऱ्या तीव्र आवाजाच्या फटाक्यांचे दुष्परिणाम पटवून देण्यासाठी विविध व्याख्यानांचे आयोजन केले जाते. गणेश उत्सव काळात मूर्तीदान, निर्माल्य दान कार्यक्रम राबवून नदी तलाव प्रदूषण रोखण्यासाठी मदत केली जाते. संस्थेद्वारे विविध पर्यावरण विषायावर काम करण्यासाठी जाहिर सभांचे आयोजन केले जाते. दरवर्षी विज्ञानमित्र वर्गाचे आयोजन करण्यात येते. आण्विक उर्जा व शेती या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन केले जाते.

इंच-इंच पिकवू जमीन, शेतकऱ्यांसाठी जीमिनीतील तण वापरून शेती, मातीतून सोने या विषयावरील विविध व्याख्यानांचे आयोजन केले जाते. रासायनिक खते न वापरता चांगली पिके काढणाऱ्या स्थानिक स्तरावरील शेतकऱ्यास पारितोषिक दिले जाते. गांडूळ खत निर्मितीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. बालविज्ञान संमेलनाचे आयोजन करून त्यामध्ये सौर ऊर्जेवरील चुलींचे प्रात्यक्षिक दाखवून सौर चुलींचा वापर वाढविण्यावर भर दिला जातो. पर्यावरण रक्षण काळाची गरज इ. पर्यावरण विषयावरती तज्ञ मार्गदर्शकांच्या व्याख्यानांचे आयोजन केले जाते. पाणी अडवा पाणी जिरवा याबाबत प्रत्यक्ष कृती कार्यक्रम हाती घेतला जातो. युवा पिढीचे निसर्गाबरोबरील नाते दृढ होण्यासाठी निसर्गभ्रमण सहलींचे आयोजन केले जाते. यामध्ये राष्ट्रीय वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करून पक्षी निरीक्षण, निसर्ग चित्रकला स्पर्धा तसेच वन्य जिवावरील विविध व्याख्यानांचे आयोजन केले जाते. संघटनेद्वारे भारतातील विविध सण-उत्सव संस्कृतीचे संवर्धन केले जाते. परंतु विविध सणांमध्ये होणाऱ्या प्रदुषणाबाबतची जनजागृती केली जाते. गणेश उत्सवामध्ये गणेश मूर्तीस अनैसर्गिक रंग देऊ नये, निर्माल्य नदीत टाकून नदीचे पाणी प्रदूषित करू नये याबाबतची जनजागृतीपर पत्रके वाटली जातात तसेच विविध व्याख्यानांचे आयोजन केले जाते. विसर्जित केलेली गणेश मूर्ती दान करा उपक्रम राबविला जातो. संघटनेच्या द्वारे निर्धूर चुली तयार करून त्याचे वाटप केले जाते. Think Globally and Act Locally या उक्ती प्रमाणे मराठी विज्ञान परिषद संघटनेतील सभासदांनी १४५ किलोमीटर लांबीच्या हिरण्यकेशी नदीच्या परिसरात भू-गर्भ शास्त्र, भूगोल, वनस्पती, प्राणी, मृदा, इ. विषयावर विविध कार्यक्रम राबवले आहेत.

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे ग्रामीण शाश्वत विकासातील पर्यावरण क्षेत्रातील योगदान:** सन १९९० साली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीची स्थापना करण्यात आली. अंधश्रद्धा निर्मुलन आणि लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोण विकसित करणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. याबरोबरच संस्था पर्यावरण क्षेत्रामध्ये देखील काम करते. नदी, तलाव, विहीर पाणी प्रदूषण रोखण्यासाठी गणेश मूर्ती व निर्माल्य संकलन केले जाते. त्यासाठी माहिती पत्रकांचे वाटप, दैनिक वर्तमानपत्रातून आवाहन केले जाते. निर्माल्यापासून गांडूळ खत बनविण्याचे प्रशिक्षण दिले जाते. संस्थेतर्फे होळी लहान पोळी दान हा उपक्रम राबविला जातो. होळीच्या दिवशी होळीत टाकल्या जाणाऱ्या पोळ्या होळीत न टाकता त्या एकत्रित करून गरिबांना वाटल्या जातात. प्लास्टिक पिशवीचा वापर टाळावा यासाठी शाळा महाविद्यालयामध्ये व्याख्यानांचे आयोजन केले जाते. प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम लोकांना पटवून देऊन त्यांना कागदी पिशव्या कापडी पिशव्या वापराबाबत प्रेरित केले जाते. गडहिंगलज नगरपालिकेतर्फे आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये संस्थेतील सर्व सदस्यांचा सक्रीय सहभाग असतो. जंगल भ्रमंती आयोजित करून परिसरातील पक्षी निरीक्षण, विषारी बिन विषारी साप याबाबत लोकांच्यामध्ये जनजागृती केली जाते. निसर्गातील शुध्द पाण्याचे साठे प्रदूषणमुक्त राहावे यासाठी जनजागृती केली जाते.

**गार्डन्स ग्रुप ऑफ गडहिंगलज संघटनेचे ग्रामीण शाश्वत विकासातील पर्यावरण क्षेत्रातील योगदान:** एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असताना काळाची गरज ओळखून गडहिंगलज मधील युवकांनी एकत्रित येऊन १५ ऑगस्ट १९९९ साली गार्डन्स ग्रुप ऑफ गडहिंगलज संघटनेची स्थापना केली. पर्यावरण जनजागृती करणे, बागबगीचा विषयी नागरिकांना माहिती देणे व विविध स्पर्धांचे आयोजन करणे, वृक्षारोपण करणे ही संस्थेची प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत. संस्थेतर्फे दरवर्षी वृक्षारोपण, विविध प्रदर्शने, स्पर्धा, कार्यशाळा, व्याख्याने, निसर्गसहली असे विविध उपक्रम राबविले जातात. या सर्वांची महाराष्ट्र शासनाच्या जलसंधारण, सामाजिक वनीकरण विभाग यांनी संस्थेच्या कार्याची नोंद घेऊन महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार संस्थेला देऊन गौरविण्यात आले. वृक्ष दिंडीचे आयोजन करून नागरीकांच्यामध्ये वृक्ष संवर्धन बाबतची जागृती केली जाते. पर्यावरण जागृतीसाठी पुष्प प्रदर्शन बाग बगीचा स्पर्धांचे आयोजन केले जाते. दरवर्षी पावसाळ्यामध्ये एक वर्ष वाढ झालेल्या किमान ५ ते ६ फुट उंचीच्या झाडांचे रोपण करून शाळेतील मुलांना दत्तक देऊन त्यांना त्याचे संगोपन करण्यास प्रवृत्त केले जाते. त्याबरोबरच रस्त्याच्या दुतर्फा झाडे लाऊन त्याच्या संगोपनाची जबाबदारी मुख्य रस्त्यावरील दुकानदरांना दिली जाते. संस्थेतर्फे विविध प्रकारची शोभिवंत रोपे, फळझाडे, फुलझाडे, मसाल्याची रोपे, सावली देणारे वृक्ष तसेच विविध आकारातील कुंड्या यांचे प्रदर्शन भरविले जाते व सवलतीच्या दरामध्ये त्याची विक्री केली जाते. संस्थेतर्फे दरवर्षी बाग बगीचा स्पर्धेचे आयोजन करून विजेत्या संस्था व वैयक्तिक लोकांना गार्डन ऑफ दि इयर पुरस्कार दिला जातो.

संस्थेमार्फत मागील अनेक वर्षांपासून अखंडपणे भव्य पुष्प प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. या स्पर्धांमध्ये कोल्हापूर, सांगली, बेळगाव, सिंधुदुर्ग, गोवा अशा विविध ठिकाणाहून या प्रदर्शनामध्ये स्पर्धक भाग घेतात. सदरच्या स्पर्धेमध्ये गुलाब, बोनसाय, रांगोळी स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन करून स्पर्धकांना बक्षीसे आणि प्रमाणपत्र दिली जातात. विविध प्रकारची पाने, फुले, फळे इत्यादीचा वापर करून वेशभूषा यासारख्या विविध गुणदर्शन स्पर्धा शालेय मुलांसाठी आयोजित करून त्यांना बक्षीसे दिले जातात. बागेची निगा कशी राखली जावी रोपांची निवड कशी करावी कोणत्या खतांचा वापर करायचा पाण्याचे नियोजन कसे करायचे किडीचा प्रादुर्भाव व त्यावरील उपाय याबाबत प्रात्याक्षिके व कार्यशाळेचे आयोजन केले जाते. घरातून निघणारा घनकचरा वापरून घरच्या घरी उत्तम सेंद्रिय खत तयार करण्यासंदर्भात विविध व्याख्यानांचे आयोजन करून पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा उपक्रम राबविला जातो. तज्ञ मार्गदर्शक यांचे द्वारे दुर्मिळ वनस्पतींच्या स्लाईड शो चे आयोजन करून दुर्मिळ वनस्पतींची माहिती लोकांपर्यंत पोहचवली जाते. तसेच औषधी वनस्पतींची ओळख व त्याचा वापर यावर विविध चर्चासत्रांचे आयोजन केले जाते. महिला वर्गामध्ये पर्यावरणाची जागृती व्हावी म्हणून पंचायत समिती व संस्थेच्या वतीने गडहिंगलज तालुक्यातील बचत गटाच्या महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात येतो व महिलांना तुलसीची रोपे भेट दिली जातात. वटपोर्णिमा सणाच्या वेळी महिलांच्या हस्ते ऑक्सिजन निर्मितीत आघाडीवर असलेल्या वडाच्या झाडाचे रोपण केले जाते. संस्थेच्या सभासदासाठी व शहरातील विविध कार्यालयातील कर्मचारी यांना पर्यावरण, झाडे, फुले, फळे, प्राणी यांची जवळून माहिती व्हावी, त्याविषयी प्रेम निर्माण व्हावे यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा येथील निसर्गरम्य ठिकाणी प्रतीवर्षी निसर्ग सहलींचे आयोजन केले जाते.

**समारोप:** ग्रामीण विकासाचा विचार करताना ग्रामीण भागातही शाश्वत विकास घडून आला पाहिजे. असा विकास घडून येण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेच्या आर्थिक आणि सामजिक विकासाबरोबरच ग्रामीण पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे याकडेही जाणीवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. पर्यावरणीय समस्यासंबंधी लोकामध्ये जाणीव जागृती व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविण्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंगलज तालुक्यातील हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ, मराठी विज्ञान परिषद, अंधश्रद्धा निर्मुलन समिती, गार्डन्स ग्रुप ऑफ गडहिंगलज, या संघटना पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रामध्ये काम करून ग्रामीण शाश्वत विकासात महत्वाची भूमिका बजावत आहेत.

**संदर्भ:**

Salunkhe, S. A. 2003. “The Concept of Sustainable Development: Root, Connotations and Critical Evaluation”, Social Change, Vol. 33, No. 1, pp. 67-80.

---

# ग्रामीण लोकांचे प्रश्न आणि विकासाचे धोरण

**प्रा. डॉ. दिवाकर एच. उराडे** समाजशास्त्र विभाग प्रमुख,आर एम जी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय सावली जिल्हा चंद्रपूर

**प्रस्तावना:** जागतिक लोक्संखेचा विचार केल्यास तीन चतुर्थांश ( ७५ % ) लोकसंख्या अधापही ग्रामीण भागात राहते. भारतात जवळपास ७० ते ७२ % लोक या भागात राहत असल्याचे दिसते. भारतातील ग्रामीण जनतेचा इतिहास हा ५००० अशा प्रदीर्घ कालखंड लाभलेला आहे. ग्राम या शब्दापेक्षा खेडेगाव हा दैनंदिन व्यवहारात जास्त प्रसिध्द आहे. “ खेळणे म्हणजे जमीन कसने व खेडूत म्हणजे जमीन कसणारा. तेव्हा खेदुतांची जी वस्ती त्यास खेडे असे म्हणतात. ज्यामध्ये प्रधान व्यवसाय शेती व ज्यामध्ये प्रमुख वस्ती शेत्कायांची असते त्या गावाला लोक खेडे किवा ग्राम म्हणतात.” अशी व्याख्या त्री ना अत्रेंनी केली आहे. भारत देश ग्रामीण नागरी आदिवासी समुदाय अशा तीन भागात रचना केलेली आहे. मुळातच ग्रामीण आदिवासी नागरी श्केत्रातील अनुसूचित जाती जमाती भटक्या जमाती व इतर मागास वर्ग हे समूह मूलनिवासी आदिवासीच आहेत. आधुनिकीकरणामुळे ते शहरी भगत कामधंदे नोकरी करण्यासाठी ते गाव सोडून शहराकडे राहावयास गेलेले आहेत. सन १९२१ मध्ये जनगणनने नुसार देशाची एकून लोकसंख्या ८८.०८ % ग्रामीण व ११.०२ % नागरी भागात राहत होती. प्रा डेविस च्या मते, “ग्रामीण समुदाय हा सर्वात लहान असा स्थानिक समूह आहे कि ज्यामध्ये सामाजिक जीवनाचे पैलू दिसून येतात”.

**पूर्व इतिहास:** ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला तर भारताचा विकास म्हणजे ग्रामीण लोकांच्या सामाजिक उत्क्रांतीचा इतिहास आहे. ब्रिटीश काळात औधोगिकारणाने ग्रामीण उद्योग कुटीर व लघु उद्योगात बदल घडून आले. भारत स्वातंत्र्यानंतर ग्रामीण आदिवासी व शहरी समुदाय अशी विभागणी करण्यात आली. त्यांचे परस्पर सबंध हे जवळचे आहेत. भारतातील मुख्य व्यवसाय शेती व शेतीशी सबंधित असल्यामुळे लोक अजूनही ग्रामीण आदिवासी भगत राहतात. ग्रामीण जीवनमान सुधारण्यासाठी स्वातंत्र्पूर्व व स्वातंत्र्यानंतर असे अनेक विकासाचे प्रयत्न करण्यात आले. पण भारतीय लोकसंख्या व दारिद्र्याचे प्रमाण हे जास्त असल्यामुळे ग्रामीण लोकांचे प्रश्न कायम टिकून आहेत उद्योगाचे केंद्रीकरण शहरातच होत असल्याने ग्रामीण आदिवासी समुदायाचे प्रश्न जास्त प्रमाणात चीगाडले आहेत. त्यांच्या प्रश्नाचे स्वरूप गंभीर असून पंचवार्षिक योजना गेल्या ७५ वार्ष्यापासून चालू असून त्या मार्फतीने ग्रामीण क्षेत्राचा विकास करण्याचा प्रयत्न होत आहे. ग्रामीण समाजाचे दोन भगत विभाजन करण्यात येते. १ स्वातंत्रपूर्व काळ १६८९ ते १९५० पर्यंत २ स्वातंत्रोत्तर काळ १९५० ते २०२६ आजपर्यंत असे भाग करण्यात येते. १९५० ते १९९५ पर्यंत मिश्र समाजवादी अर्थव्यवस्था होती त्यामुळे काही प्रमाणात विकास झाला. पण १९९५ नंतर मुक्त आर्थिक धोरणामुळे ( एल पी जी धोरण ) ग्रामीण समाजाचे विभिन्न प्रश्न समोर येत आहेत. विकास पाहिजे त्या प्रमाणात दिसत नाही पूर्वी ग्रामीण क्षेत्राचा राष्ट्रीय विकासात उत्पन्नाचा वाट ५२ % पर्यंत होता. मात्र आज १६ % पर्यंत खाली आलेला आहे. ग्रामीण क्षेत्र हे मागासलेले आहे. औधोगिकरन विज्ञान तंत्रज्ञान कृषी तंत्रज्ञान अजूनपर्यंत

विशेशप्रमानात पोहोचले नाही .सन १९७१ मध्ये ८० % लोकसंख्या ५६६८७८ ग्रामीण खेडे मध्ये राहत होती. तर १९९१मध्ये ७३.८७ % लोकसंख्या ग्रामीण होती. प्राचीन भारतात लोक अधिक होती असे नाही तर खेड्यांचा स्तर उच्च प्रतीचा होता.

**गृहीतकृत्ये:** १) ग्रामीण समाज देशाचा सामाजिक सांस्कृतिक आर्थिक विकासाचा मुलभूत आधार आहे. २) ग्रामीण गरिबी बेकारी अशिक्षितपणा जातीय संघर्ष कर्जबाजारीपणा व्यसनाधीनता हे प्रश्न परस्परसबंधी आहेत. ३) ग्रामीण विकासासाठी केवळ सरकारी योजना पुरेशा नसून लोकसहभागाची गरज आहे. ४) राष्ट्रीय विकासात ग्रामीण लोकांचा सहभाग कमी होत आहे. ५) ग्रामीण जीवनावर जागतिकीकरण औधोगिकारण परिणाम होत आहे. त्याचा अभ्यास करणे .

**उद्देश:** १) ग्रामीण समाजातील सामाजिक आर्थिक शैक्षणिक सांस्कृतिक प्रश्न समजून घेणे. २) ग्रामीण समाजाच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनाचा अभ्यास करणे. ३) ग्रामीण लोकसंख्या जास्त असून त्यांचे विविध प्रश्न कोणते ते शोधून त्यांचा अभ्यास करणे. ४) ग्रामीण लोकजीवनावर २००० नंतर एल पी जी धोरणाचा परिणाम होत आहे का हे शोधून त्यांचे प्रश्न समजून घेणे ग्रामीण क्षेत्रात गरिबी शिक्षण व आरोग्य विषयक प्रश्न बेकारी स्थलांतराची कारणे व सामाजिक सांस्कृतिक जीवनमान कसे आहे त्यांचा अभ्यास करणे. ५) ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी उपाययोजना ठरविणे. ६) राष्ट्रीय विकासात ग्रामीण क्षेत्राचा वाट कमी होत असून त्यांचे विविध प्रश्न शोधून काढणे व विकासाचे धोरण कार्यक्रम बघणे. ७) ग्रामीण महिला सक्षमीकरण शिक्षण व आरोग्य सुविधा यांची स्थिती जाणून घेणे.

**अध्ययन पद्धती:** क्षेत्र, कार्य पद्धती, सर्वेक्षण, निरीक्षण, ऐतिहासिक, तुलनात्मक, सरचानात्मक, बृहत व सूक्ष्म अध्ययन पद्धतीचा वापर करण्यात आला. याद्वारे संशोधन पूर्ण करण्यात आला.

**तथ्यांचे विश्लेषण:** ग्रामीण जनतेचे विविध प्रश्न व विकास धोरणाचा अभ्यास करताना उपलब्ध तथ्यांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. यातून ग्रामीण वास्तव्य प्रश्नांची तीव्रता व विकासाची दिशा दिसून येईल.

**लोकसंख्या व व्यवसाय रचना:** भारत कृषी व ग्रामप्रधान देश आहे हे खालील सारनिवरून दिसून येते

| वर्ष | ग्रामीण | नागरी | १० वर्षातील वृद्धी दर | | वर्ष | ग्रामीण | नागरी | १० वर्षातील वृद्धी दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०१ | ९०.०० | १०.०० | + ०.०६ | | १९६१ | ८२.०० | १८.०० | + ०.०७ |
| १९११ | ९०.०६ | ९.०४ | + ०.०६ | | १९७१ | ८०.०१ | १९.०९ | + १.०६ |
| १९२१ | ८८.०८ | ११.०२ | + १.०८ | | १९८१ | ७८.०० | २२.०० | - |
| १९३१ | ८७.०९ | १२.०१ | + ०.०८ | | १९९१ | ७४.३८ | २५.६२ | - |
| १९४१ | ८६.०१ | १३.०९ | + १.०८ | | २००१ | ७२.०० | २८.०० | - |
| १९५१ | ८२.०७ | १७.०३ | + ३.०४ | | | | | |

वरील सारनिवरून ग्रामीण लोकसंख्या कमी होऊन शहरी लोक वाढत आहेत. १९९१ च्या जनगणनेनुसार ७४.३८ टक्के लोक ग्रामीण भगत ५७६००० लोक खेड्यात राहतात हे दिसून येते. अशाप्रकारे ग्रामीण समाजाचा पूर्व इतिहास बघितल्यास त्यांचे प्रश्न व विकास हे काळानुसार बदलत गेले असे दिसते. या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आभ्यास केल्यास आजच्या ग्रामीण विकासाच्या धोरणाची गरज व दिशा जाणवते. ग्रामीण बहुसंख्य लोक शेती व शेतीसबंधी व्यवसायावर जवळपास ९६ ते ९८ टक्के अवलंबून आहेत. उद्योग व सेवा क्षेत्राच्या मर्यादामुळे रोजगाराचे पर्याय कमी असून त्यातून बेकारी व अर्ध बेकारी वाढलेली दिसते.

**आर्थिक परिस्थिती:** तथ्यावरून ग्रामीण भागात उत्पन्नाचे प्रमाण शहरी भागाच्या तुलनेत कमी दिसते. लहान व अल्प भूदारक शेतकरी जास्त असून कर्जबाजारीपना अस्थिर उत्पन्न व गरिबी दिसून येते.

**देशातील दारिद्र्यरेषेखाली जगणारे लोक ( शेकडा दर )**

| वर्ष | शहरी | ग्रामीण | एकूण | | वर्ष | शहरी | ग्रामीण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७३ - ७४ | ४९.०० | ५६.०४ | ५४.०९ | | १९९३ - ९४ | ३२.०४ | ३७.०३ | ३६.०० |
| १९७७ - ७८ | ४५.०२ | ५३.०१ | ५१.०३ | | १९९९ - २००० | २३.०६ | २७.०१ | २६.०१ |
| १९८२ - ८३ | ४०.८० | ४५.०७ | ४४.०५ | | २००७ - २००८ | १५.०१ | २१.०१ | १९.०३ |
| १९८७ - ८८ | ३८.०२ | ३९.०१ | ३८.०९ | | | | | |

देशातील दारिद्र्य रेषेखाली जगणारी लोकसंख्या १९७३ - ७४ मध्ये ५४.०९ टक्के १९८३ मध्ये ४४.०७ १९९३ -९४ मध्ये ३६ १९९९ - २००० मध्ये २६.१०, २००६ - ०७ मध्ये २२.०१ कोटी दिसून येते. ग्रामीण २७.०१ व शहरी २३.०६ तसेच NSSO द्वारे सर्वेक्षन दिसून येते, तर जागतिक विकास रेपोर्ट २००४ नुसार भारतातील प्रती व्यक्ती उत्पन्न ४८० डॉलर दिसते. राष्ट्रीय उत्पन्न शेतीमधून जीडीपी २२.०१ टक्के मिळते. २००३ ते ०४ मध्ये बेकारी हि ४११ कोटी होती. भांडवल वादाचा विकास होणे जीवनमान काही प्रमाणात वाढ झालेली दिसते. महागाई व बेकारी मध्ये वाढ होणे कृषी तंत्रज्ञान वापर होणे, शेती कसण्यासाठी ट्रक्टर चालविण्यासाठी बारावी पास व्यक्ती लागतो. तेव्हाच परवाना मिळते. अशाप्रकारे तथ्यावरून ग्रामीण भागातउत्पन्नाचे प्रमाण शहरी भागाच्या तुलनेत कमी दिसते. लहान व अल्प भूदारक शेतकरी जास्त असून कर्जबजारीपणा कमी उत्पन्न व गरिबी दिसून येते. निसर्गावर शेती अवलंबून असल्यामुळे हवामानाचा लहरीपणा दिसतो. कधी जास्त पिक तर कधी कमी पिक येते.

**पाया व सुविधा:** अनेक ग्रामीण भगत रस्ते पिण्याचे पाणी वीज स्वच्छता व डिजिटल सुविधा अपुऱ्या आहेत .याचा परिणाम शिक्षण आरोग्य व रोजगार यावर होतो. धरणे व बारमाही सिंचन व्यवस्था नाही पर्यावरणाचा प्रश्नही आहे. उन्हाळ्यामध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर दिसतो तसेच अवेळी पाणी पडणे.

**आरोग्य व पोषण:** तथ्याचे विश्लेषण करता ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र अपुरे दिसते. कुपोषण माता व बालमृत्युचे प्रमान स्वच्छतेचे अभाव. वैद्यकीय अधिकारीच अभाव व आशा सेविका रोजंदारी आरोग्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करताना दिसते.

**शिक्षणाची स्थिती:** ग्रामीण भागातील साक्षरतेचे प्रमाण वाढत असून त्यात गुणवत्ता गळतीचे प्रमाण व उच्च शिक्षणाच्या संधी यावर मर्यादा आहेत. मुलींच्या शिक्षणात अजूनही सामाजिक सांस्कृतिक आर्थिक अडथळे दिसतात. अलीकडे अनेक जिल्हा परिषद सहकारी शाळा मोठ्या प्रमाणात बंद होताना दिसतात.

**ग्रामीण परिस्थिती आणि सामाजिक सांस्कृतिक जीवनमान व सामाजिक समस्या:** जातीय विषमता, अंधश्रद्धा, महिलांची दुय्यम भूमिका, सामाजिक असमानता, व्यसनाधीनता ,बाजारपेठेचा अभाव, जमीनदारी पद्धती या तथ्यावर आधारित ग्रामीण वास्तव्य आहे. ग्रामीण समूह निसर्गावर अवलंबून असणे यामुळे विकास प्रक्रियेत अडथळे होतात सामाजिक सबंधामध्ये घानिस्थता व लहान आकार निसर्गावर अवलंबून असणे या तीन आधारावर हा समुदाय आहे. शेती मुख्य व्यवसाय एकरूपता, मर्यादित आकार कुटुंबावर आधारित आर्थिक स्वयंपूर्णता, पर्यावरणाशी संबंध जातीप्रथा स्वायत्तता गतीशिल्तेचा अभाव लोकमताचा प्रभाव साधे व निर्मल जीवन शिक्षण तंत्रज्ञानाचा अभाव रूढी परंपरा व धर्माचा प्रभाव महिलांची कमजोर स्थिती असे विविध विशेष सांगता येईल. निरक्षरता गरिबी बेकारी आरोग्याचे प्रश्न जातीयवाद स्पृश्य दलित वाद शिक्षण व राजकीय धार्मिक मानसिक प्रश्न शेतीविषयक प्रश्न भूमिहीनता कर्जबाजारीपणा दळणवळण वीज व बारमाही पाण्याचा प्रश्न शेतमालाला योग्य भाव य मिळणे घर व जागेचा प्रश्न हे प्रामुख्याने दिसून येतात. मजूर न मिळणे जमीनदार पद्धती प्रबळ जातीचे नेतृत्व यांत्रिकीकरण होणे ट्रक्टर शेती अवजारे स्थलांतर व रोजगाराचे प्रश्न लोक्संख्यामुळे गरिबी व शेती क्षेत्र कमी होणे सामाजिक सांस्कृतिक धार्मिक कानिस्थ असणे शहराकडे स्थलांतर जंगल तोड मुळे मानव व वन्यजीव प्राणी संघर्ष जंगल जमीन पाणी आरोग्य शिक्षण ग्यासचा प्रश्न तंत्रज्ञान व विज्ञानवादी शिक्षणाचा अभाव लघु कुटीर उद्योगाचा ऱ्हास होणे बेकारी मुळे गरिबी चिंता व तणाव यातून मानसिक आरोग्य बिघडणे जागतिकीकरणाने आर्थिक स्वय्पुर्नता नास्थ होणे कल्याणकारी राज्य धोरण बंद करून खाजगीकरण करणे आरक्षणाची अंमलबजावणी न करणे, महिला व बालकांना काम करावे लागणे, अर्धवट शिक्षण सोडून देणे, शेतीमधील उत्पादन वस्तूला योग्य भाव न मिळणे, कर्जमाफी व कमी दराने भांडवल उपलब्ध करून देणे, उध्योग्पातीना जमीन वीज पाणी कमी दराने भांडवल व कर्जमाफी सरकार देते पण ग्रामीण शेतकरी शेत मजुरांना जमीन कसण्यासाठी व पैसा देत नाही,रासायनिक खतांच्या अति वापराने जमीन व आरोग्याचा प्रश्न असे अनेक प्रश्न या क्षेत्रात दिसतात. जवळपास ९६ ते ९८ टक्के शेती व शेतीविषयक व्यवसाय या भगत होतात. वाढत्या शहरीकरणाने अकुशल कामगार म्हणून खान उद्योगात काम करावे लागते. नक्षलवादी जंगल विभागात राहत असल्यामुळे त्यांच्यापासूनही त्रास होतो. पोलीस विभाग व सरकार पासून पाहिजे त्या प्रमाणात सहकार्य मिळत नाही सूक्ष्म निरीक्षण केल्याने अनेक प्रश्न लक्षात येतात. आदिवासी विभागात अनुसूचित जाती जमाती विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्ग यांचे प्रश्न अधिकच बिकट दिसते. वनाधिकार व पेस कायदा व आरक्षण धोरणाची योग्य अंमलबजावणी दिसून येत नाही. साधारणपणे वार्षिक उत्पन्न २४००० ते १ लाखापर्यंत दिसून येते. ज्यांच्याकडे शेती जास्त व पाण्याची बारमाही व्यवस्था आहे त्यांचे उत्पन्न बरे दिसते. खाजगी व शासकीय कर्मचारी योग्य काम न करणे भ्रष्टाचार व सहकार्याचा अभाव दिसून येतो.

**शासकीय योजना व विकास:** ग्रामीण विकासासठी विविध शासकीय योजना राब्विल्या जात असल्या तरी अंमलबजावणीतील तृटी माहितीचा अभाव व लोकसहभागाची कमतरता यामुळे अपेक्षित परिणाम पूर्णपणे साध्य होत नाही. प्रधानमंत्री रोजगार योजना MPRY १९९३ अधिक उत्पादन देणारे वान HYVP १९६५, राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजना, NSP १९९५ इंदिरा महिला योजना, IMY १९९५ महिला समृद्धी योजना १९९५, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना, अंत्योदय अन्न योजना २००१, दलित वस्ती योजना, संपूर्ण ग्रामीण योजना, जवाहर ग्राम समृद्धी योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, श्रावणबाळ योजना, शहरी व ग्रामीण गरिबी निर्मुलन योजना १९९५, राष्ट्रीय जननी सुरक्षा योजना २००४, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, प्रधानमंत्री ग्रामोद्योग योजना, कृषी श्रमिक सामाजिक सुरक्षा योजना, रमाई घरकुल योजना, असंघटीत बांधकाम कामगार विकास योजना, भारत सरकारची मात्रीकोत्तर अनुसूचित जाती जमाती ओबीसी विधार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, आशावर्कर अंगणवाडी व बालवाडी सेविका नेमणूक योजना अशा विविध योजना ग्रामीण विकासासाठी आहेत.

**कुशल मनुष्यबळाचा अभाव:** ग्रामीण लोक बहुतांशपणे अकुशल काम करतात. जे विज्ञान तंत्रज्ञान घेतात ते गाव सोडून शहराकडे जातात. कुशल मनुष्यबळ अभावी नेतृत्व शेतीसुधारणा कुटीर व लघु उद्योग व जुने व्यवसाय विकसित न करणे, कामगाराची कमतरता, कामाचा मोबदला योग्य न मिळणे जातीय पुंजीवाद व व्यवसाय वाढीस चालना न मिळणे, शासनाचे शेती विरोधी धोरण, कमाल जमीन कायदा, सिलिंग कायदा अजूनही ७५ वर्ष होवूनही चालू असणे, योग्य पुनर्वसन न होणे, कृषी आयोगाची निर्मिती व तांदूळ निर्यात परवानगी न मिळणे, या गोष्टी प्रामुख्याने ग्रामीण भगात दिसतात.

**निष्कर्ष:** ग्रामीण प्रश्न बहुआयामी असून एक्मेकांशी जोडलेले आहेत. प्रभावी नियोजन लोकसहभाग योग्य अंमलबजावणी सातत्य पूर्ण धोरण जातीय पुंजीवाद लिंगभेद नष्ट करणे उद्योग वाढीस लावणे उच्च व्यावसायिक शिक्षण देणे बेसिक उत्पन्न प्रणाली लागू करणे दळणवळणाची साधने विकसित करणे शेत मालास योग्य भाव रानटी प्राण्यापासून शेती व मानवाचे संरक्षण करणे विज्ञान व तंत्रज्ञान वापरून ग्रामीण समाजाचा सर्वांगीण व शाश्वत विकास करता येईल. जागतिकीकरण खाजगीकरण उदारीकरण यामुळे या लोकांचे प्रश्न वाढलेले आहे. उत्पन्नात वाढ होऊनही आरोग्य शिक्षण बेकारी व महागाईवर नियंत्रण ठेवणे कुटीर व लघु उधोगाची वाढ करून सामाजिक सांस्कृतिक मागासलेपणा जातीय व धार्मिक भेद बंद करणे व रोजगार वाढविणे आवश्यक असल्याचे दिसते. बारमाही सिंचनाची बाजारपेठ विकसित करणे उच्च व व्यावसायिक शिक्षणाचे सरकारीकरण करणे, दळणवळणाची साधने रेल्वे वीज धरणे बाधने विविध सरकारी योजनांची योग्य अंमलबजावणी करणे भ्रस्थाचार कमी करणे आवश्यक वाटते सामाजिक व सांस्कृतिक

मागासलेपणा हे परिकल्पना पूर्ण खरी असून ग्रामीण जीवनावर जागतिकीकरणाचा प्रभाव पडलेला दिसतो. ग्रामीण लोकांचे विविध प्रश्न आहेत हे गृहीततत्वे खरे ठरले आहे. ग्रामीण भागातील गरिबी बेकारी अशिक्षितपणा जातीय संघर्ष कर्जबाजारीपणा व्यसनाधीनता हे प्रश्न परस्पर सबंधित असल्याचे दिसून येते त्याचप्रमाणे राष्ट्रीय उत्पन्नात ग्रामीण क्षेत्राचा वाट कमी होत असल्याचे आढळून येते. या अध्यानात बलुतेदारी पद्धती जातीनिस्थ समाज व्यवस्था पारंपारिक ग्राम व्यवस्था संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास खेड्यांची भौतिक रचना व ग्रामीण समाजाच्या सांस्कृतिक आर्थिक सामाजिक धार्मिक राजकीय शैक्षणिक व आरोग्यविषयक घटक वगेरे प्रश्न प्रामुख्याने आहेत.

**शिफारशी / उपाययोजना:** शेतीचा विकास करून शेतीला पूरक उद्योगधंदे चालविणे, स्वतंत्र कृषी आयोगाची नेमणूक करून शेतमालास योग्य भाव कृषी उत्पन्न बाजारपेठेस संरक्षण देणे, कृषी उच्च व व्यावसायी वैधाकीय महाविद्यालय स्थापन करून शिक्षनावर ७ टक्के खर्च निधी करणे, बारमाही सिंचनाची व्यवस्था करणे शेती तंत्रज्ञान सुधारित बी बियाणे सेंद्रिय शेती करणे, सत्तेचे विकेंद्रीकरण करून सरकारी उद्योग व कृषीचे राष्ट्रीयीकरण करणे, खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करून गुणवत्ता पूर्ण शाळा व शिक्षकाची भारती करणे मुला मुलींसाठी वसतिगृहे निर्माण करणे. ग्रामपंचायत विकसित करुन् आरोग्य केंद्र बळकट करणे रस्ते वीज पिण्याचे पाणी दळणवळण सुधारणे इंटरनेट व डिजिटल सेवा देऊन महिलांना सक्षमीकरण करणे अंधाश्राधा दूर करणे व लोकसहभाग वाढविणे शेती व प्राथमिक क्षेत्रात काम करणारे लोक कमी करून युवकांसाठी कौशल्ये विकास कार्यक्रम आखणे. पंचायत राज संस्थाना अधिकार व निधी देणे भ्रष्टाचार व कला पैसा रोखणे व योग्य अंमलबजावणी योजनांची करणे. शेतीवर आयकर लावून भूमिहीन शेतमजूर अल्पभूदाराकाना जमीन देणे. जमीनदाराकडील जमीन भूमिहीनांना देऊन भांडवलदार व श्रीमंतावर कर लावणे. जीवनाव्यषक वस्तूवर कर कमी लाऊन परदेशी जात असलेला पैसा भारतात थांबविणे व उद्योगांचे बळकटीकरण करणे. जातीभेद लिंगभेद कायदा करून नास्थ करणे धार्मिक सलोखा राखणे. जातीय पुंजीवाद धोरण बंद करून ग्रामीण नेतृत्व विकसित करण्यासाठी सरकारी निधी निवडणूक खर्चावर करणे. जिल्हा परिषद शाळेचे बळकटीकरण करणे इंग्रजी भाषा विकसित करण्यासाठी निधी देणे, खाजगीकरण करणे, सरकारी शाळा व उद्योगाचे बंद करावे ज्यामुळे समतोल विकास होईल. शहरी क्षेत्रातच उद्योगाचे केंद्रीकरण न करता ग्रामीण क्षेत्रातही विकसित करावे.

**संदर्भ सूची:**

१ ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, ले. डॉ बी एम कऱ्हाडे, प्रकाशक पिम्पलापुरे एड पब्लिशर्स नागपूर, जून २०११
२ भारतीय समाज संरचनात्मक समस्या ले. डॉ बी एम कऱ्हाडे, प्रकाशक पिम्पलापुरे एड पब्लिशर्स नागपूर, नोव्हेंबर २०२१
३ ग्रामीण समाजशास्त्र, ले डॉ घनश्याम शह
४ भारतीय समाज रचना ले डॉ इरावती कर्वे
५ भारत सरकार ग्रामीण विकास मंत्रालयाचे अहवाल
६ समाजशास्त्र लेख व विविध संशोधक नियतकालिके व देशोन्नती संपादिक लेख २०२५
७ महाराष्ट्र शासन आर्थिक सर्वेक्षण अहवाल
८ युनोस्को ग्रामीण विकास विषयक अहवाल
९ भारतीय समस्या आणि संरचना ले डॉ बी एम कऱ्हाडे

# ग्रामीण समाजातील लोकांचे प्रश्न आणि विकासाचे धोरण : एक अभ्यास

**प्रा. डॉ. जाधव विजय** आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, अहिल्यानगर

**सारांश:** भारत हा कृषिप्रधान देश असून आजही सुमारे ६५-७० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. ग्रामीण समाज हा भारतीय समाजव्यवस्थेचा कणा मानला जातो. मात्र ग्रामीण भागातील लोकांना दारिद्र्य, बेरोजगारी, शिक्षणाचा अभाव, आरोग्य सुविधांची कमतरता, शेतीतील अनिश्चितता, सामाजिक विषमता, स्थलांतर यांसारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्यांचा थेट परिणाम ग्रामीण विकासाच्या गतीवर होतो. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये ग्रामीण समाजाची संकल्पना, ग्रामीण समाजातील प्रमुख प्रश्न, त्यामागील कारणे आणि त्या समस्यांवर मात करण्यासाठी आवश्यक असलेली विकासात्मक धोरणे यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. तसेच शाश्वत आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी शासन, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक समुदाय यांची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे.

**कीवर्ड्स:** ग्रामीण समाज, ग्रामीण समस्या, ग्रामीण विकास, विकास धोरणे, शाश्वत विकास

**प्रस्तावना:** ग्रामीण समाज हा भारतीय समाजव्यवस्थेचा मूलभूत घटक आहे. भारतीय संस्कृती, परंपरा, मूल्ये आणि अर्थव्यवस्था यांचा उगम मोठ्या प्रमाणात ग्रामीण जीवनाशी निगडित आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या दिशेने वाटचाल केली असली तरी ग्रामीण भागाचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट ग्रामीण विकासाशिवाय राष्ट्रीय विकास अपूर्ण राहतो हे वास्तव आज अधिक स्पष्ट झाले आहे. ग्रामीण समाज हा मुख्यतः कृषी आणि शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून असतो. नैसर्गिक संसाधनांवर आधारित जीवनशैली, संयुक्त कुटुंबपद्धती, सामाजिक परंपरा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालणारी व्यवस्था ही ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये आहेत. तथापि, बदलत्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे ग्रामीण समाज अनेक समस्यांना तोंड देत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण समाजातील प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर योग्य विकास धोरणे आखणे ही काळाची गरज आहे.

**ग्रामीण समाजाची संकल्पना व वैशिष्ट्ये:** ग्रामीण समाज म्हणजे असा समाज जो प्रामुख्याने खेडेगावात राहतो आणि ज्याचे जीवन शेती, पशुपालन, जंगलावर आधारित व्यवसाय यांवर अवलंबून असते. कृषीप्रधान अर्थव्यवस्था - बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून, कमी लोकसंख्येची घनता, साधी जीवनशैली व परंपरावादी दृष्टिकोन, संयुक्त कुटुंब पद्धतीचे प्राबल्य, सामाजिक संबंधांचे निकटत्व, शिक्षण व आरोग्य सुविधांचा अभाव, ही वैशिष्ट्ये ग्रामीण समाजाला वेगळेपण देतात; मात्र याच वैशिष्ट्यांमधून अनेक समस्या निर्माण होतात.

**ग्रामीण समाजातील प्रमुख प्रश्न:**

**दारिद्य, बेरोजगारी व अल्परोजगारी:** ग्रामीण समाजातील सर्वात गंभीर समस्या म्हणजे दारिद्र्य. अल्प उत्पन्न, शेतीवर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था, नैसर्गिक आपत्ती आणि कर्जबाजारीपणा यांमुळे ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे. दारिद्र्यामुळे शिक्षण, आरोग्य, पोषण आणि जीवनमान यावर विपरीत परिणाम होतो. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत. शेती हंगामी स्वरूपाची असल्यामुळे वर्षभर रोजगार उपलब्ध होत नाही. अल्परोजगारी आणि छुपी बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आढळते.

**शिक्षणाचा अभाव:** ग्रामीण भागातील शाळांची अपुरी संख्या, शिक्षकांची कमतरता, गळतीचे प्रमाण आणि आर्थिक अडचणी यांमुळे शिक्षणाचा दर्जा खालावतो. विशेषतः मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते.

**आरोग्यविषयक समस्या:** ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या अपुरी असून डॉक्टर, औषधे व आधुनिक सुविधा उपलब्ध नसतात. कुपोषण, माता व बालमृत्यू दर जास्त असणे ही गंभीर समस्या आहे.

**शेतीतील समस्या:** पावसावर अवलंबून असलेली शेती, लहान व तुकड्यांत विभागलेली जमीन, सिंचन सुविधांचा अभाव, उत्पादन खर्च वाढणे आणि शेतीमालाला योग्य भाव न मिळणे या प्रमुख समस्या आहेत.

**सामाजिक विषमता:** जातीय भेदभाव, लिंगभेद, अंधश्रद्धा आणि परंपरावादी विचारसरणी यांमुळे सामाजिक विषमता टिकून आहे. दलित, आदिवासी व महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

**स्थलांतर:** ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात शहरांकडे स्थलांतर होते. यामुळे ग्रामीण भाग रिकामा होत जातो आणि शहरी भागावर अतिरिक्त ताण येतो.

**ग्रामीण समस्यांची कारणे:** ग्रामीण समाजातील समस्यांची मुळे अनेक घटकांमध्ये दडलेली आहेत: आर्थिक संसाधनांची कमतरता, पारंपरिक शेती पद्धती, लोकसंख्येची वाढ, शिक्षणाचा अभाव, प्रशासनातील त्रुटी, नैसर्गिक आपत्ती व हवामान बदल.

**ग्रामीण विकासाची संकल्पना:** ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण लोकांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनमानात सर्वांगीण सुधारणा घडवून आणण्याची प्रक्रिया होय. केवळ उत्पन्नवाढ नव्हे तर मानवी विकास, सामाजिक न्याय आणि शाश्वतता हे ग्रामीण विकासाचे प्रमुख उद्दिष्टे आहेत.

**ग्रामीण विकासाची धोरणे: कृषी विकास धोरण** - आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सिंचन सुविधांचा विस्तार, जैविक शेतीला प्रोत्साहन, शेतीमालाला योग्य बाजारभाव. **रोजगारनिर्मिती धोरण** - मनरेगा सारख्या योजना, ग्रामीण उद्योग व कुटीर उद्योगांचा विकास, कौशल्य विकास कार्यक्रम. **शिक्षण विकास धोरण** - दर्जेदार प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, डिजिटल शिक्षणाचा प्रसार, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन. **आरोग्य विकास धोरण** - प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बळकटीकरण, माता व बाल आरोग्य योजना, स्वच्छता व पोषण अभियान. **सामाजिक न्याय व सक्षमीकरण** - महिला स्व-सहायता गट, दलित व आदिवासी विकास योजना, पंचायत राज संस्थांचे सशक्तीकरण.

शाश्वत ग्रामीण विकास म्हणजे आजच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न होऊ देणे. पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचा सुयोग्य वापर आणि स्थानिक लोकसहभाग हे शाश्वत विकासाचे आधारस्तंभ आहेत. ग्रामीण विकासासाठी केवळ शासन पुरेसे नाही. स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था आणि स्थानिक लोकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. ग्रामसभा, पंचायत आणि महिला बचत गटांद्वारे लोकसहभाग वाढवता येतो.

**निष्कर्ष:** ग्रामीण समाजातील समस्या या बहुआयामी असून त्यांचे निराकरण करण्यासाठी समन्वित आणि दीर्घकालीन धोरणांची आवश्यकता आहे. कृषी, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक न्याय या सर्व क्षेत्रांत एकाच वेळी काम केल्यासच ग्रामीण विकास शक्य आहे. ग्रामीण विकास हा केवळ आर्थिक प्रश्न नसून तो सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. सर्वसमावेशक, लोकाभिमुख आणि शाश्वत धोरणांद्वारेच ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास साधता येईल.

**संदर्भ सूची**

१) देशपांडे, एन. (ग्रामीण समाजशास्त्र)
२) भारत सरकार- ग्रामीण विकास मंत्रालय अहवाल
३) समाजशास्त्राचे मूलतत्त्वे – मराठी ग्रंथ
४) योजना व विकास विषयक मासिके

# पर्यावरण चळवळी व महिला : ग्रामीण समाजातील उपजीविका, लिंग आणि संघर्ष

**डॉ.वर्षा भूषण कांबळे** श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

**गोषवारा:** भारतीय ग्रामीण समाजाची सामाजिक व आर्थिक रचना निसर्गसंपत्तीवर अवलंबून आहे, आणि या व्यवस्थेचे मुख्य वहनकर्ते म्हणून महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. स्वातंत्र्योत्तर काळात स्वीकारलेल्या विकास धोरणांमुळे औद्योगिकीकरण, धरणबांधणी, खाणकाम व व्यापारी शेतीचा विस्तार झाला. परिणामी पर्यावरणीय ऱ्हास वाढला आणि त्याचा सर्वाधिक परिणाम ग्रामीण महिलांच्या उपजीविकेवर व दैनंदिन जीवनावर झाला. ग्रामीण महिलांनी विविध पर्यावरणीय संकटांना तोंड देताना स्थानिक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेतला आणि पारंपरिक ज्ञानाचा उपयोग करून सर्जनशील उपाययोजना राबवल्या. या अभ्यासाचे उद्दिष्ट ग्रामीण महिलांच्या सहभागाचे स्वरूप, संघर्षाची कारणे, ऐतिहासिक व सामाजिक विश्लेषण करणे, तसेच प्राचीन काळापासून सुरु झालेल्या महिला सहभागाचे विश्लेषण करणे आहे. संशोधनातून दिसून आले की ग्रामीण महिलांचे पर्यावरणीय ज्ञान, अनुभव आणि सक्रिय सहभाग पर्यावरण टिकवण्याच्या प्रक्रियेत अपरिहार्य घटक ठरतो.

**कूट शब्द :** पर्यावरण चळवळी, ग्रामीण महिला, उपजीविका, लिंग, सामाजिक संघर्ष, महिला नेतृत्व, पारंपरिक ज्ञान

**प्रस्तावना:** पर्यावरण आणि समाज यांचे नाते परस्परावलंबी आहे. ग्रामीण महिलांचे योगदान प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दोन्ही प्रकारे दिसते, जसे की पाणी आणणे, इंधन गोळा करणे, शेतातील कामे, बी-बियाण्यांचे जतन, अन्न प्रक्रिया आणि घरगुती व्यवस्थापन. प्राचीन काळापासून महिलांनी शेतीची पद्धत, पाण्याचे व्यवस्थापन, जमिनीसाठीची प्रक्रिया आणि जंगल संरक्षण यामध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामुळे पर्यावरणीय बदलांचा प्रभाव महिलांच्या दैनंदिन जीवनावर थेट पडतो. सध्याच्या काळात पर्यावरणाची स्थिती गंभीर बनली आहे. हवामान बदल, अनियमित पर्जन्यमान, वाढती तापमानवाढ, पाणीटंचाई, जैवविविधतेचा ऱ्हास, जमिनीचा कस कमी होणे आणि नैसर्गिक संसाधनांचे व्यापारीकरण ही संकटे जागतिक स्तरावर दिसून येतात. भारतासारख्या कृषीप्रधान देशात या संकटांचा परिणाम ग्रामीण समाजावर विशेषतः ग्रामीण महिलांवर अधिक तीव्रतेने होतो. पाणी मिळवण्यासाठी वाढलेला वेळ, इंधनासाठी जंगलावर वाढलेला ताण, शेतीवरील अनिश्चितता आणि अन्नसुरक्षेचा प्रश्न हे सर्व पर्यावरणीय संकटांचे सामाजिक परिणाम आहेत. या संकटांमुळे महिलांचे श्रम वाढले असून त्यांची उपजीविका आणि सामाजिक सुरक्षितता धोक्यात आली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिकीकरण, धरणबांधणी, खाणकाम आणि व्यापारी शेती यांच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या समस्यांना ग्रामीण महिलांनी प्रत्यक्ष सामोरे जात विविध पर्यावरणीय चळवळी राबवल्या. या चळवळींमध्ये महिलांनी पारंपरिक ज्ञान, सामाजिक संघटन, सामूहिक क्रियाशीलता आणि अनुभव यांचा समन्वय साधला. प्राचीन काळापासून सुरु झालेल्या या योगदानाने महिलांच्या नेतृत्वाचे सामाजिक-सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. ग्रामीण महिलांच्या सहभागामुळे फक्त पर्यावरण टिकले नाही तर स्थानिक समाजातील सामाजिक समन्वय, निर्णय प्रक्रियेतील सहभाग, व स्थानिक प्रशासनास बदल घडवण्याची क्षमता यांवर परिणाम झाला. या संदर्भात “लिंग” ही संकल्पना केवळ जैविक भेद दर्शवत नाही, तर पर्यावरणाशी संबंधित कामांची सामाजिक विभागणी, संसाधनांवरील नियंत्रण, निर्णयप्रक्रियेतील स्थान आणि अनुभवातील असमानता अधोरेखित करते. ग्रामीण समाजात पर्यावरणीय ऱ्हासाचा भार मुख्यतः महिलांवर पडतो, कारण पाणी, इंधन, अन्नसुरक्षा व उपजीविकेशी निगडित जबाबदाऱ्या सामाजिकरीत्या महिलांवरच टाकल्या जातात. त्यामुळे पर्यावरण चळवळींमधील महिलांचा सहभाग हा केवळ पर्यावरण संरक्षणाचा नव्हे, तर लिंगाधारित सामाजिक अन्यायाविरुद्धचा संघर्ष म्हणूनही समजून घ्यावा लागतो.

**साहित्य समीक्षा:** पर्यावरण, ग्रामीण समाज आणि महिला यांचा परस्परसंबंध समजून घेण्यासाठी विविध समाजशास्त्रज्ञ, पर्यावरणतज्ज्ञ व स्त्रीवादी विचारवंतांनी महत्त्वपूर्ण मांडणी केली आहे. या अभ्यासकांच्या विचारांमधून पर्यावरणीय प्रश्न हा केवळ नैसर्गिक किंवा वैज्ञानिक प्रश्न नसून तो सामाजिक, आर्थिक व लिंगाधारित (gender-based) प्रश्न असल्याचे स्पष्ट होते. वंदना शिवा यांनी आपल्या ‘Staying Alive: Women, Ecology and Development’ (1988) या ग्रंथात महिलांचे पर्यावरणाशी असलेले जैविक व सांस्कृतिक नाते स्पष्ट केले आहे. आधुनिक विकास प्रक्रियेमुळे निसर्ग आणि स्त्री या दोघांचेही शोषण झाले असून, महिलांचे पारंपरिक ज्ञान, शेती, बियाणे संवर्धन व जैवविविधतेचे रक्षण या प्रक्रियेतून दुर्लक्षित झाले आहे, असा त्यांचा युक्तिवाद आहे. महिलांनी पर्यावरणाचे संरक्षण हे केवळ चळवळीपुरते मर्यादित न ठेवता दैनंदिन जीवनाचा भाग म्हणून केले आहे, हे शिवा यांनी अधोरेखित केले आहे (Shiva, 1988). बिना अग्रवाल यांनी ‘The Gender and Environment Debate: Lessons from India’ (1992) या लेखात लिंग व पर्यावरण यांचा संबंध मालकी हक्क, संसाधनांवरील नियंत्रण आणि निर्णय प्रक्रियेशी जोडलेला असल्याचे स्पष्ट केले आहे. ग्रामीण महिलांना जमीन, जंगल आणि पाण्यावर अधिकार नसल्यामुळे पर्यावरणीय ऱ्हासाचा सर्वाधिक फटका महिलांनाच बसतो, असे त्या नमूद करतात. पर्यावरण संरक्षणासाठी महिलांचा सहभाग वाढवायचा असेल तर संरचनात्मक बदल आवश्यक आहेत, असे अग्रवाल यांचे मत आहे (Agarwal, 1992). रामचंद्र गुहा यांनी ‘The Unquiet Woods’ (1989) या ग्रंथात भारतीय पर्यावरण चळवळींचा सविस्तर इतिहास मांडला आहे. चिपको आंदोलनाचे विश्लेषण करताना त्यांनी ग्रामीण महिलांच्या सहभागाला भावनिक कृती न मानता तो उपजीविकेचा आणि अस्तित्वाचा संघर्ष असल्याचे स्पष्ट केले आहे. जंगल, पाणी व जमीन ही ग्रामीण समाजाची जीवनाधारे असून महिलांचे जीवन या संसाधनांशी थेट जोडलेले आहे, हे गुहा यांच्या अभ्यासातून स्पष्ट होते (Guha, 1989). अमिता बाविस्कर यांनी ‘In the Belly of the River’ (1995) या पुस्तकात नर्मदा बचाव आंदोलनाच्या संदर्भात

विकास, विस्थापन व पर्यावरणीय संघर्षाचे विश्लेषण केले आहे. मोठ्या विकास प्रकल्पांमुळे आदिवासी व ग्रामीण महिलांचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवन कसे विस्कळीत झाले, हे त्यांनी दाखवून दिले आहे. महिलांनी या आंदोलनात केवळ सहभागी म्हणून नव्हे तर सक्रिय संघर्षकर्त्या म्हणून भूमिका बजावली, असे बाविस्कर स्पष्ट करतात (Baviskar, 1995). मारिया मीज व वंदना शिवा यांनी 'Ecofeminism' (1993) या ग्रंथात इको-फेमिनिझमची सैद्धांतिक मांडणी केली आहे. भांडवली विकास व्यवस्था, पितृसत्ताक रचना आणि पर्यावरणीय ऱ्हास यांचा परस्पर संबंध त्यांनी स्पष्ट केला आहे. महिलांचे पर्यावरणीय संघर्ष हे स्थानिक पातळीपुरते मर्यादित नसून ते जागतिक स्वरूपाचे आहेत, असे त्यांचे मत आहे (Mies & Shiva, 1993). वरील सर्व अभ्यासकांच्या मांडणीतून असे स्पष्ट होते की पर्यावरणीय प्रश्नांचा अभ्यास करताना ग्रामीण समाज, महिलांची भूमिका, उपजीविका आणि लिंगाधारित असमानता या घटकांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. सद्य अभ्यास या वैचारिक पार्श्वभूमीवर आधारित असून ग्रामीण पर्यावरण चळवळींमधील महिलांच्या भूमिकेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो.

**संशोधनाची उद्दिष्टे**: १) ग्रामीण महिलांचे पर्यावरणीय चळवळीतले सहभागाचे स्वरूप समजून घेणे आणि प्राचीन काळापासून आजपर्यंतचा विकास अभ्यासणे. २) महिलांनी पारंपरिक ज्ञानाचा वापर करून पर्यावरण टिकविण्यात कसे योगदान दिले, हे ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून विश्लेषित करणे. ३) पर्यावरणीय संकटांमुळे उद्भवलेल्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा महिलांवर होणारा परिणाम अभ्यासणे. ४) महिला नेतृत्व व सामूहिक क्रियाशीलतेच्या सामाजिक-सांस्कृतिक पैलूंचा अभ्यास करणे. ५) ग्रामीण महिलांचे अनुभव व संघर्ष ऐतिहासिक व सामाजिक दृष्टिकोनातून दस्तऐवजीकरण करणे. ६) वर्तमान आणि भविष्यकालीन संदर्भात महिलांच्या सहभागाचे शाश्वत योगदान विश्लेषित करणे.

**संशोधनाची गृहीतके:** १) ग्रामीण महिलांचा सहभाग पर्यावरणीय टिकावासाठी अपरिहार्य आहे. २) महिलांच्या पारंपरिक ज्ञानाचा उपयोग पर्यावरणीय व्यवस्थापनात निर्णायक ठरतो. ३) औद्योगिकीकरण, धरणबांधणी आणि जमिनीच्या बदलांमुळे महिलांवर थेट परिणाम होतो. ४) महिला नेतृत्व हे स्थानिक आणि सामाजिक स्तरावर पर्यावरणीय चळवळींना बळकटी देते. ५) ग्रामीण महिलांचा अनुभव आणि सामूहिक क्रियाशीलता भविष्यातील पर्यावरणीय धोरणांमध्ये मार्गदर्शक ठरू शकतात. संशोधन पद्धती या अभ्यासासाठी गुणात्मक संशोधन पद्धती वापरण्यात आली. प्राथमिक माहिती संग्रहासाठी मुलाखती, फोकस ग्रुप चर्चा आणि प्रेक्षणे केली गेली. स्थानिक गावातील महिला कार्यकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या अनुभवाचे दस्तऐवजीकरण केले. दुय्यम माहिती मिळवण्यासाठी साहित्य समीक्षा, आधीच्या संशोधन पेपर, सरकारी अहवाल आणि पुरातन दस्तऐवज वापरण्यात आले. यामुळे ग्रामीण महिलांच्या पर्यावरणीय सहभागाचे ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पैलू सखोल समजून घेता आले. ग्रामीण महिलांच्या पर्यावरण चळवळी : ग्रामीण महिलांनी प्राचीन काळापासून पर्यावरणीय उपाययोजना, शाश्वत शेती, जलसंधारण आणि जंगल संरक्षण या क्षेत्रात सक्रिय सहभाग घेतला. विशिष्ट उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत: 1. बिश्नोई समुदायातील जंगल संरक्षण (१७८०-१७९०, राजस्थान, जोधपूर, किलाडा गाव) अमृता देवी यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी जंगल आणि पाण्याचे संरक्षण सुनिश्चित केले. त्यांनी सामूहिक निर्णय प्रक्रिया वापरून झाडे व पाण्याचे स्रोत वाचवले. या चळवळीमुळे स्थानिक परिसंस्था शाश्वत राहिली, पारंपरिक ज्ञानाला समाजात मान्यता मिळाली, आणि सामाजिक समन्वय बळकट झाला. 2. चिपको चळवळ (१९७३, उत्तराखंड, गढ़वाल जिल्हा, रामगढ व रुरुंग गाव) गौरा देवी यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी झाडांना मिठी मारण्याची पद्धत राबवली. यामुळे जंगलतोड रोखली गेली आणि स्थानिक पर्यावरण टिकले. चळवळीच्या परिणामस्वरूप स्थानिक प्रशासनाने पर्यावरणीय धोरणात बदल केले आणि महिलांच्या सहभागास अधिक मान्यता मिळाली. ३) नर्मदा बचाव आंदोलन (१९८५-२०००, मध्यप्रदेश व गुजरात) मेधा पाटकर यांनी नेतृत्व केलेल्या चळवळीने धरण प्रकल्पांमुळे विस्थापन टाळण्यासाठी मोर्चे, सामाजिक जागृती आणि समुदाय संलग्नता राबवली. महिलांनी स्थानिक समुदायाच्या सहभागास प्रोत्साहन दिले आणि पर्यावरणीय संरक्षणाच्या उपाययोजनांना चालना दिली. चळवळीमुळे पुनर्वसन धोरणात सुधारणा झाली. ४) जंगल हक्क आंदोलन (१९८०-१९९५, महाराष्ट्र व छत्तीसगढ, आदिवासी गाव) स्थानिक आदिवासी महिला कार्यकर्त्यांनी पारंपरिक वनहक्क टिकवण्यासाठी सामूहिक उपाययोजना राबवल्या. महिलांच्या सहभागामुळे वन संपत्तीचा स्थानिक वापर कायम राहिला, निसर्ग संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन सुनिश्चित झाले, आणि स्थानिक समाजामध्ये महिलांचे सक्षमीकरण वाढले. ५) जलसंधारण व इंधन व्यवस्थापन (२०००-२०२०, राजस्थान व मध्यभारत) स्थानिक स्वयंसेवी महिला संघटनांनी जलसंधारण प्रकल्प राबवले आणि शाश्वत शेतीसाठी उपाययोजना केल्या. महिलांच्या नेतृत्वामुळे पाण्याचे वितरण व जमिनीचा उपयोग सुधारला. प्रकल्पांचा परिणाम म्हणजे शेतकरी समुदाय अधिक सक्षमीकरणाने जलव्यवस्थापन करू शकले, पारंपरिक ज्ञानाला आधुनिक धोरणांसह एकत्रित केले गेले. या सर्व चळवळींनंतर स्थानिक समाज, प्रशासन आणि धोरणांवर सकारात्मक परिणाम झाले. महिलांच्या सहभागामुळे पारंपरिक ज्ञानाचे महत्त्व वाढले, स्थानिक निर्णय प्रक्रियेत महिलांचा समावेश झाला, आणि पर्यावरणीय टिकावाची प्रक्रिया सुसंगत व प्रभावी ठरली. भविष्यातील पर्यावरणीय धोरणांमध्ये महिलांचे नेतृत्व आणि सहभाग अधिक महत्त्वाचे ठरेल.

**शिफारशी:** ग्रामीण महिलांचा सक्रिय आणि बंधनकारक सहभाग पर्यावरणीय निर्णय प्रक्रियेत सुनिश्चित करणे. महिलांकडे असलेल्या पारंपरिक पर्यावरणीय ज्ञानाचे संरक्षण आणि संस्थात्मक वापर करणे. ३) महिला सहभागाला कायदेशीर, आर्थिक व प्रशासकीय पाठबळ देणे. ४) संघर्षाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या दडपशाहीवर लक्ष देणे व संरक्षणात्मक धोरणे आखणे. ५) शैक्षणिक अभ्यासक्रमात महिला - पर्यावरण या विषयांचा समावेश करणे आणि प्राचीन योगदान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे. ६) भविष्यातील पर्यावरणीय संकटांवर मात करण्यासाठी महिला सहभाग अपरिहार्य घटक म्हणून मान्य करणे. ७) स्थानिक महिला कार्यकर्त्यांचे अनुभव दस्तऐवज करून स्थानिक इतिहास व पर्यावरणीय योगदान जतन करणे. निष्कर्ष पर्यावरण चळवळी आणि महिला यांचा संबंध संरचनात्मक, ऐतिहासिक आणि अपरिहार्य आहे. ग्रामीण महिलांची उपजीविका, सामाजिक अस्तित्व आणि

पर्यावरणीय शाश्वतता यांचे नाते अतूट आहे. प्राचीन काळापासून सुरु झालेल्या महिलांच्या योगदानाने शेतीच्या शोधापासून ते आजच्या पर्यावरणीय चळवळींपर्यंत अखंड धारा तयार केली आहे. महिला सहभाग, ज्ञान आणि अनुभव हे पर्यावरण टिकविण्यासाठी अपरिहार्य घटक आहेत. भविष्यातील पर्यावरणीय संकटांमध्ये महिलांचे नेतृत्व आणि सक्रिय सहभाग अधिक महत्त्वाचे ठरेल.

**संदर्भसूची**

Agarwal, B. (1992). The gender and environment debate: Lessons from India. Feminist Studies, 18(1), 119–158.
Agarwal, B. (2010). Gender and green governance: The political economy of women’s presence within and beyond community forestry. Oxford: Oxford University Press.
Baviskar, A. (1995). In the belly of the river: Tribal conflicts over development in the Narmada Valley. New Delhi: Oxford University Press.
Gadgil, M., & Guha, R. (1995). Ecology and equity: The use and abuse of nature in contemporary India. New Delhi: Penguin.
Guha, R. (1989). The unquiet woods: Ecological change and peasant resistance in the Himalaya. New Delhi: Oxford University Press.
Guha, R. (2000). Environmentalism: A global history. Delhi: Permanent Black.
Guha, R. (2000). Environmentalism: A global history. New York: Longman.
Mies, M., & Shiva, V. (1993). Ecofeminism. London: Zed Books.
Omvedt, G. (1993). Reinventing revolution: New social movements and the socialist tradition in India. New Delhi: M.E. Sharpe.
Patkar, M. (2004). Development, displacement and resistance: The Narmada case. New Delhi: Oxford University Press.
Shiva, V. (1988). Staying alive: Women, ecology and development. New Delhi: Kali for Women.
Shiva, V. (1988). Staying alive: Women, ecology and development. New Delhi: Zed Books.
Shiva, V. (2002). Water wars: Privatization, pollution, and profit. Boston: South End Press.
Baviskar, A. (2005). In the belly of the river: Tribal politics and environmental activism revisited. Economic & Political Weekly, 40(32), 3545-3553.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण लोकांचे प्रश्न आणि विकासाचे धोरण: एक अभ्यास

**इप्तीसाम नूरमहम्मद पठाण** कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बुऱ्हाणनगर अहिल्यानगर
**डॉ. जाधव मनिषा विजय** संत दासगणू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोलनेर, अहिल्यानगर

**सारांश:** अहिल्यानगर जिल्हा हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा कृषीप्रधान जिल्हा असून येथे मोठ्या प्रमाणात ग्रामीण लोकसंख्या वास्तव्यास आहे. या ग्रामीण समाजाला शेती, पाणीटंचाई, रोजगार, शिक्षण, आरोग्य, स्थलांतर, दारिद्र्य, सामाजिक विषमता अशा विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्यांचा थेट परिणाम ग्रामीण विकासाच्या गतीवर होत आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण समाजाची संकल्पना, त्याची वैशिष्ट्ये, प्रमुख समस्या, समस्यांची कारणे तसेच ग्रामीण विकासाच्या संकल्पना, धोरणे आणि शाश्वत विकासाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. यासोबतच शासन, स्वयंसेवी संस्था आणि लोकसहभाग यांची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वयात्मक आणि शाश्वत धोरणांची गरज असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**महत्त्वाची शब्दे:** ग्रामीण समाज, अहिल्यानगर, ग्रामीण समस्या, ग्रामीण विकास, शाश्वत विकास, लोकसहभाग

**प्रस्तावना:** महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा व भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण जिल्हा म्हणून अहिल्यानगर जिल्ह्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या या जिल्ह्याचा मोठा भाग ग्रामीण स्वरूपाचा आहे. जिल्ह्यातील सुमारे ७० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. ग्रामीण समाज हा कृषी, पशुपालन, ऊसतोड, दुग्धव्यवसाय व लघुउद्योगांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. मात्र नैसर्गिक, आर्थिक व प्रशासकीय अडचणींमुळे ग्रामीण भागात अनेक प्रश्न निर्माण झाले असून त्यांचा थेट परिणाम विकास प्रक्रियेवर होताना दिसतो. हा अभ्यास अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकांचे प्रमुख प्रश्न, त्यामागील कारणे आणि त्यावर राबविण्यात येणाऱ्या विकास धोरणांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो.

**अभ्यासाची उद्दिष्टे:** १. अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक व भौतिक प्रश्नांचा अभ्यास करणे. २. ग्रामीण लोकांच्या जीवनमानावर परिणाम करणाऱ्या घटकांचे विश्लेषण करणे. ३. शासनाच्या विविध ग्रामीण विकास योजनांचे मूल्यमापन करणे. ४. ग्रामीण विकासासाठी प्रभावी धोरणात्मक उपाय सुचविणे.

**अभ्यास पद्धती:** या संशोधनासाठी द्वितीयक माहिती संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये शासकीय अहवाल, ग्रामीण विकासविषयक पुस्तके, संशोधन निबंध, वर्तमानपत्रे व नियतकालिकांचा आधार घेण्यात आला आहे. अभ्यास वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे.

अहिल्यानगर जिल्हा महाराष्ट्राच्या पश्चिम-मध्य भागात स्थित असून येथे सह्याद्री पर्वतरांगा, दुष्काळी पठार व नदीखोरे असे भौगोलिक वैविध्य आढळते. गोदावरी, प्रवरा, मुळा, भिमा या नद्यांचा जिल्ह्यातून प्रवाह आहे. मात्र पर्जन्यमान असमान असल्याने अनेक तालुके कायमस्वरूपी दुष्काळग्रस्त आहेत. सामाजिकदृष्ट्या जिल्ह्यात मराठा, माळी, धनगर, आदिवासी, दलित व मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणावर आहे. ग्रामीण समाजाची रचना पारंपरिक असून शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत.
अहिल्यानगर जिल्ह्यात ग्रामीण आरोग्य सेवा खालील पातळ्यांवर कार्यरत आहेत : उपकेंद्रे (Sub-Centers),प्राथमिक आरोग्य केंद्रे (PHC),ग्रामीण रुग्णालये (Rural Hospitals),जिल्हा सामान्य रुग्णालय (District Hospital)या संरचनेचा उद्देश “तळागाळातील व्यक्तीपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवणे” हा आहे.

**ग्रामीण भागातील प्रमुख प्रश्न**

**१. पाणीटंचाई व दुष्काळ:** अहिल्यानगर जिल्ह्याचा सर्वात गंभीर प्रश्न म्हणजे पाणीटंचाई. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते. शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून असल्याने पिकांचे नुकसान होते. पाण्याअभावी स्थलांतराचे प्रमाण वाढते. कृषी क्षेत्रातील अडचणीअल्पभूधारक शेतकऱ्यांचे वाढते कर्जउत्पादन खर्चात वाढबाजारभावाची अनिश्चितताआधुनिक तंत्रज्ञानाचा अभावसिंचन सुविधांची कमतरता या कारणांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर राहत नाही. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणही चिंताजनक आहे. बेरोजगारी व स्थलांतर ग्रामीण भागात शेतीव्यतिरिक्त रोजगाराच्या संधी अत्यल्प आहेत. त्यामुळे युवक शहरांकडे स्थलांतर करतात. ऊसतोड कामगार, मजूर म्हणून काम करण्याची वेळ येते. यामुळे ग्रामीण कुटुंबांची सामाजिक व शैक्षणिक स्थिती खालावते. शिक्षणाची समस्या ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता अपुरी शैक्षणिक साधने गळतीचे प्रमाण उच्च शिक्षणासाठी सुविधा नसणे या समस्या प्रकर्षाने जाणवतात. मुलींच्या शिक्षणात सामाजिक अडथळे अजूनही आहेत.

**ग्रामीण भागातील उपलब्ध आरोग्य सुविधा**

१. प्राथमिक आरोग्य केंद्रे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा कणा मानली जातात. येथे प्राथमिक उपचार लसीकरण, माता व बाल आरोग्य सेवा, कुटुंब नियोजन, संसर्गजन्य आजारांचे नियंत्रणया सुविधा दिल्या जातात. मात्र अनेक PHC मध्ये डॉक्टरांची व परिचारिकांची कमतरता आहे.

२. अंगणवाडी केंद्रे, आशा सेविका,लसीकरण मोहीम,यांच्या माध्यमातून गर्भवती महिला व बालकांसाठी सेवा दिली जाते. संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढले असले तरी अजूनही दुर्गम भागात महिलांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळत नाही.

३. राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM)या योजनेअंतर्गत मोफत औषधे,तपासण्या,आरोग्य शिबिरे राबविली जातात. मात्र या सुविधांची माहिती अनेक ग्रामीण नागरिकांपर्यंत पोहोचत नाही.

४. टीबी, मलेरिया, डेंग्यू, कोविडसारख्या आजारांवर नियंत्रणासाठी मोहिमा राबविण्यात आल्या. लसीकरणाचे प्रमाण वाढले असले तरी आरोग्य साक्षरतेचा अभाव ही मोठी समस्या आहे.तसेच ग्रामीण रुग्णालयांमध्ये,तज्ञ डॉक्टरांचा अभाव,औषधांची कमतरता, अपुऱ्या तपासणी सुविधा यामुळे गंभीर आजारांसाठी शहरांवर अवलंबून राहावे लागते.

६. सामाजिक समस्या: दारिद्र्य, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, जातीय व सामाजिक विषमताया समस्या ग्रामीण विकासात अडथळा निर्माण करतात.

**ग्रामीण विकासासाठी शासनाची धोरणे व योजना:** जलयुक्त शिवार अभियान,पाझर तलाव, बंधारे,ठिबक व तुषार सिंचन योजनाया योजनांमुळे काही प्रमाणात पाणी उपलब्धता वाढली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना,मृद परीक्षण योजना,शेतकरी उत्पादक कंपन्या या योजनांचा फायदा मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांना अधिक झाला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना,कौशल्य विकास कार्यक्रम अश्या वेगवेगळ्या योजनांमुळे हंगामी रोजगार उपलब्ध झाला आहे. समग्र शिक्षा अभियान,राष्ट्रीय आरोग्य अभियान,आशा व अंगणवाडी सेविकायामुळे प्राथमिक सेवा काही प्रमाणात सुधारल्या आहेत.

**उपाययोजना व शिफारसी:** १. जलव्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण करणे, २. शेतीपूरक उद्योगांना प्रोत्साहन देणे, ३. ग्रामीण युवकांसाठी कौशल्याधारित शिक्षण, ४. आरोग्य व शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर, ५. महिला स्वयंसहायता गटांचे बळकटीकरण.

**निष्कर्ष:** अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भाग अनेक समस्यांनी ग्रस्त असला तरी योग्य धोरणे, लोकसहभाग व प्रभावी अंमलबजावणीच्या माध्यमातून शाश्वत विकास साध्य होऊ शकतो. ग्रामीण लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सर्वांगीण व समन्वयित विकासाची गरज आहे. ग्रामीण विकास हा केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचा मार्ग ठरू शकतो. हिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण विकासातील प्रश्न गंभीर असले तरी ते अशक्य नाहीत. स्थानिक गरजांनुसार उपाययोजना, लोकसहभाग, प्रभावी प्रशासन व सातत्यपूर्ण धोरणे राबविल्यास ग्रामीण भागातील जीवनमान निश्चितच उंचावू शकते. शाश्वत विकासासाठी दीर्घकालीन व व्यावहारिक दृष्टिकोन आवश्यक आहे.

**संदर्भ सूची:**

१) देशमुख, अ. (२०१९) - ग्रामीण समाजशास्त्र, पुणे
२) सावंत, रा. (२०२०) - ग्रामीण विकासाचे अर्थशास्त्र, मुंबई
३) महाराष्ट्र शासन - आर्थिक सर्वेक्षण अहिल्यानगर जिल्हा
४) Planning Commission of India – Rural Development Reports
५) UNDP - Sustainable Rural Development

# ग्रामीण समाजातील सामाजिक परिवर्तन : कुटुंब, विवाह व लिंगभूमिकांतील बदल

**भुरेलाल सुरजबन्सी** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, मिलिंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
**डॉ. जयसिंग सिंगल** समाजशास्त्र विभाग, डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना:** ग्रामीण समाजांची ओळख परंपरेने कुटुंबरचना, विवाहप्रथा आणि लिंगभूमिका यांद्वारे ठरवली गेली आहे. या सर्व बाबी दीर्घकालीन परंपरांवर आधारलेल्या असून आधुनिकतेपूर्व ग्रामीण जीवनाच्या संकल्पनेत खोलवर रुजलेल्या आहेत. तथापि, आधुनिकतेच्या प्रवासातही ग्रामीण समाज स्थिर राहिलेले नाहीत; उलट आर्थिक बदल, स्थलांतर आणि नव्या व प्रगत सामाजिक मान्यतांचा उदय या तीन प्रमुख घटकांमुळे त्यांचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. ग्रामीण अमेरिकन कुटुंबांच्या रचनांमध्ये बदल झाले आहेतच, पण त्यांच्या कार्यांमध्येही असे बदल घडले आहेत की ज्यांचे आकलन आपण अजून सुरुवातीच्या टप्प्यात करत आहोत. विविध प्रकारच्या नव्या कुटुंबरचनांमुळे कार्यपद्धती कशा प्रकारे बदलतात आणि या कार्यपद्धती स्वतः नव्या कुटुंबरचनांना कसे घडवतात, याबाबत आजही समाधानकारक उत्तरे कमी आहेत. त्याच वेळी, ग्रामीण अमेरिकन कुटुंबांवर परिणाम करणाऱ्या विवाहविषयक कायदे आणि प्रथा यांतील उत्क्रांती एकच गोष्ट स्पष्टपणे दर्शवते—अमेरिकेच्या ग्रामीण भागात मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन घडत आहे. यामुळे हेही स्पष्ट होते की ग्रामीण सामाजिक जीवनातील विवाहसंस्थेची भूमिका पूर्वीपेक्षा भिन्न स्वरूप धारण करत आहे. जरी विवाहविषयक कायदे अधिक सुसंगतपणे लागू केले जात असले, तरी ग्रामीण लोकांना विवाहाच्या निवडींबाबत अधिक स्वातंत्र्य आणि विविध प्रकारच्या विवाहांचे पर्याय उपलब्ध होत आहेत (Nelson, 2017).

या बदलांसोबतच ऐतिहासिकदृष्ट्या असमान असलेल्या लिंगभूमिकांपासून अधिक समतावादी रचनेकडे वाटचाल होत आहे. पुरुष कुटुंबाचा मुख्य उदरनिर्वाह करणारा आणि स्त्री घरगुती कामांपुरती मर्यादित अशी पारंपरिक कामांची विभागणी आता हळूहळू बदलत असून, पुरुष व स्त्रिया दोघेही या भूमिका समान क्षमतेने पार पाडू शकतील अशी समतोल रचना विकसित होत आहे. विशेषतः ज्या कुटुंबांमध्ये दोन्ही जोडीदार शिक्षित आहेत, तेथे हे अधिक ठळकपणे दिसून येते. याचा अर्थ असा नाही की स्त्रिया घरकाम कमी करत आहेत; तर पुरुष घरकामात अधिक सहभागी होत आहेत. आजही स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक घरकाम करतात, मात्र ही तफावत कमी होत आहे. शिवाय, महिलांचा मोठ्या प्रमाणावर वेतनाधारित रोजगार क्षेत्रात प्रवेश झाल्यामुळे ही पारंपरिक, मर्यादांनी युक्त स्थिती पुढे आणखी बदलण्याची शक्यता आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** या अभ्यासाचा मुख्य उद्देश ग्रामीण समाजातील सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया समजून घेणे हा आहे. विशेषतः कुटुंबरचना, विवाहसंस्था आणि लिंगभूमिका यांमध्ये झालेल्या बदलांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे हे या संशोधनाचे केंद्रबिंदू आहेत. परंपरागत आणि आधुनिक सामाजिक मान्यतांमधील संघर्ष व समन्वय कसा घडून येतो, हे विश्लेषित करणे हे या अभ्यासाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. तसेच आर्थिक बदल, रोजगाराच्या नव्या संधी, स्थलांतर आणि उत्पन्नाच्या विविध स्रोतांचा ग्रामीण कुटुंबजीवनावर होणारा परिणाम समजून घेणे, हेही या संशोधनामागील महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण समाजातील विवाहप्रथा व विवाहाविषयीच्या अपेक्षांमध्ये झालेल्या बदलांचे स्वरूप स्पष्ट करणे, तसेच स्त्रियांचा शिक्षण व रोजगारातील वाढता सहभाग लिंगभूमिकांमध्ये कोणते परिवर्तन घडवून आणतो, याचा अभ्यास करणे हे या संशोधनाचे उद्दिष्ट आहे. याशिवाय, तंत्रज्ञान व शिक्षण यांची ग्रामीण नातेसंबंध, सामाजिक मान्यता आणि समतेच्या प्रक्रियेत असलेली भूमिका समजून घेणे आणि भविष्यातील ग्रामीण सामाजिक आव्हाने ओळखणे हेही या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे.

**संशोधन पद्धती:** सदर अभ्यासासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या संशोधनात प्रामुख्याने दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला असून पुस्तके, संशोधन लेख, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्स, सरकारी अहवाल तसेच विविध संशोधन संस्थांचे प्रकाशित साहित्य यांचा आधार घेण्यात आला आहे. अभ्यासाच्या सैद्धांतिक चौकटीत सामाजिक परिवर्तन सिद्धांत, लिंग-अभ्यास आणि आधुनिकीकरण सिद्धांतांचा वापर करून ग्रामीण समाजातील बदलांचे विश्लेषण करण्यात आले आहे. परंपरागत आणि आधुनिक सामाजिक संरचनांची तुलनात्मक मांडणी तसेच विषयवस्तू विश्लेषणाच्या माध्यमातून कुटुंब, विवाह आणि लिंगभूमिकांमधील परिवर्तनांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनात ग्रामीण समाजाचा व्यापक संदर्भ घेतला असून जागतिक दक्षिणेकडील देशांचा तसेच ग्रामीण अमेरिकेचा तुलनात्मक दृष्टिकोनातून विचार करण्यात आला आहे.

**अभ्यासाचे महत्त्व:** हा अभ्यास ग्रामीण समाजातील बदलते सामाजिक वास्तव समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कुटुंब, विवाह आणि लिंगभूमिका या समाजाच्या मूलभूत संस्थांमध्ये होत असलेले परिवर्तन स्पष्ट करून तो ग्रामीण जीवनाच्या बदलत्या स्वरूपावर प्रकाश टाकतो. विशेषतः ग्रामीण समाजातील स्त्रियांची बदलती भूमिका, त्यांचे सक्षमीकरण आणि समतेकडे वाटचाल यांचे समाजशास्त्रीय आकलन या अभ्यासातून प्राप्त होते. तसेच शिक्षण, तंत्रज्ञान आणि आर्थिक बदल यांचा ग्रामीण कुटुंब व नातेसंबंधांवर होणारा एकत्रित प्रभाव स्पष्ट होतो. धोरणनिर्माते, समाजकार्यकर्ते आणि ग्रामीण विकासाशी संबंधित संस्थांना हा अभ्यास ग्रामीण समाजाच्या वास्तव गरजा ओळखण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. याशिवाय, परंपरा आणि आधुनिकता यांमधील संतुलन ग्रामीण समाज कसा साधत आहे, हे समजून घेण्यासाठी हा अभ्यास मार्गदर्शक ठरतो आणि समाजशास्त्र, ग्रामीण अभ्यास व लिंग-अभ्यास क्षेत्रातील संशोधन साहित्याला महत्त्वपूर्ण भर घालतो.

**ग्रामीण भागातील कुटुंबरचनेचा उत्क्रांतीशील प्रवास:** गेल्या काही दशकांमध्ये ग्रामीण भागातील कुटुंबरचनांमध्ये लक्षणीय बदल झाले असून हे बदल समाजातील व्यापक आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनांचे प्रतिबिंब आहेत. परंपरेने ग्रामीण कुटुंबे प्रामुख्याने संयुक्त कुटुंब किंवा लहान (न्यूक्लिअर) कुटुंबांच्या स्वरूपात अस्तित्वात होती आणि कुटुंबातील प्रत्येक सदस्याची भूमिका स्पष्टपणे निश्चित केलेली होती. पुरुष हे कुटुंबाचे मुख्य उदरनिर्वाहकर्ते मानले जात, तर स्त्रिया गृहिणी म्हणून घरगुती जबाबदाऱ्या सांभाळत. शेतीप्रधान जीवनशैलीमुळे या कुटुंबांचे अस्तित्व प्रत्येक सदस्याच्या तसेच विस्तारित कुटुंबाच्या शारीरिक श्रमांवर अवलंबून होते. जीवनावश्यक साधने - मुख्यतः अन्न - निर्माण करण्यासाठी सर्वांचे योगदान आवश्यक होते. बहुतांश कुटुंबे स्वयंपूर्ण होती आणि मुलांसह प्रत्येक सदस्याची भूमिका ठरलेली होती.

ग्रामीण अमेरिकेचे वैशिष्ट्य असलेली पारंपरिक संयुक्त कुटुंबपद्धती बराच काळापासून हळूहळू ऱ्हास पावत आहे. मात्र अलीकडच्या काळात या संक्रमण प्रक्रियेला वेग आला असून ग्रामीण कुटुंबे आता विविध नव्या स्वरूपांत दिसून येत आहेत. दीर्घकालीन संबंध आणि कामाविषयीच्या बदलत्या सामाजिक मान्यतांमुळे या नव्या व अधिक वैविध्यपूर्ण कुटुंबरचना उदयास आल्या आहेत. परिणामी, एकल पालकांवर आधारित कुटुंबांची संख्या वाढत असून ग्रामीण अमेरिकेत सहजीवन करणाऱ्या (लग्नाशिवाय एकत्र राहणाऱ्या) जोडप्यांचे प्रमाणही वाढताना दिसते. त्याच वेळी, पारंपरिक दीर्घकालीन संबंध असलेली कुटुंबे अजूनही संख्येने अधिक असली, तरी त्यामध्येही सहजीवन करणाऱ्या जोडप्यांचा सहभाग वाढत आहे. आज ग्रामीण कुटुंबांचे स्वरूप वेगळे दिसण्यामागे आर्थिक बदल हा एक महत्त्वाचा घटक आहे. शेती व पशुपालनावर आधारित उपजीविकेपासून ग्रामीण अर्थव्यवस्था दूर जाऊ लागल्याने त्या प्रकारची कुटुंबे मोठ्या प्रमाणात नाहीशी झाली आहेत. त्यांच्या जागी विविध उत्पन्न स्रोतांवर अवलंबून असलेली कुटुंबे निर्माण झाली आहेत. काही कुटुंबे जवळच्या शहरात किंवा गावात कामासाठी रोज ये-जा करणाऱ्या सदस्यांवर अवलंबून असतात, तर काही कुटुंबे शेती, बांधकाम, कारखाने किंवा औद्योगिक प्रकल्पांमधील विविध नोकऱ्यांच्या संयोगावर आपला उदरनिर्वाह करतात. काही कुटुंबांसाठी तर वेगवेगळ्या प्रकारच्या नोकऱ्यांचे मिश्रणच ग्रामीण भागात राहणे शक्य करून देते—अशा नोकऱ्या ज्या कधी कधी लांब अंतरावर प्रवास करण्याची गरज निर्माण करतात.

सांस्कृतिक घटकही ग्रामीण कुटुंबजीवनातील बदलांना गती देत आहेत. गेल्या पन्नास वर्षांत ग्रामीण भागात शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. आजच्या तरुण पिढीकडे केवळ माध्यमिक शिक्षणापेक्षा अधिक शैक्षणिक पात्रता असण्याची शक्यता त्यांच्या पालकांपेक्षा व आजी-आजोबांपेक्षा जास्त आहे. परिणामी, तरुण ग्रामीण लोक विवाह आणि कुटुंबनिर्मिती उशिरा करीत असून द्वि-उत्पन्न (दोन्ही जोडीदार कमावणारे) कुटुंबांमध्ये राहण्याची प्रवृत्ती वाढत आहे. समतावादाची संकल्पनाही ग्रामीण कुटुंबांमध्ये हळूहळू प्रवेश करत असून, पूर्वीच्या श्रेणीबद्ध व पितृसत्ताक कुटुंबरचनांपासून दूर जाऊन सत्ता व अधिकारांचे वाटप आणि वैयक्तिक स्वायत्ततेची जाणीव अधिक बळकट होत आहे. तथापि, हे सर्व परिवर्तन असूनही ग्रामीण समाजांमध्ये अजूनही अशा मान्यतात्मक चौकटी अस्तित्वात आहेत ज्या वैयक्तिक हितापेक्षा सामूहिक हिताला प्राधान्य देतात. हे बहुतेक ग्रामीण समाजांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे, जरी ग्रामीण भागातील कुटुंबे दिसायला शहरी कुटुंबांसारखी वाटू लागली असली, तरी अनेक बाबतीत ती अजूनही वेगळी आहेत. ही उत्क्रांती घडत आहे आणि पुढेही घडत राहील कारण ग्रामीण कुटुंबे परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील कठीण समतोल साधण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहेत.

**विवाहप्रथा व अपेक्षांतील बदल:** ग्रामीण समाजातील विवाहसंस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडून आले असून हे बदल समाज, अर्थव्यवस्था आणि संस्कृतीतील व्यापक परिवर्तनांचे प्रतिबिंब आहेत. परंपरेने ग्रामीण भागात विवाह ही प्रामुख्याने कुटुंबाने ठरविण्याची बाब मानली जात असे. विशेषतः ग्रामीण समाजात पालक आपल्या मुला-मुलींचे विवाह ठरवत आणि तरुण पिढीकडून त्यास संमती अपेक्षित असे. काही प्रसंगी कुटुंबाने मुलांना स्वतः जोडीदार निवडण्याची मुभा दिली, तरी अंतिम निर्णय घेण्याचा (नकाराधिकाराचा) हक्क कुटुंबाकडेच असे. पाश्चिमात्य देशांतील रोमँटिक कल्पनांप्रमाणे ही प्रक्रिया नसली, तरी येथे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की प्रेमविवाहाची संकल्पनाच तुलनेने अलीकडील आहे. (Baker) अनेक ग्रामीण संदर्भांमध्ये आज व्यक्ती अधिक उशिरा विवाह करताना दिसतात. हा बदल संबंधांमध्ये वाढणाऱ्या वैयक्तिकीकरणाचा सूचक मानला जातो. यामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे औपचारिक शिक्षणासाठी दिला जाणारा वाढलेला कालावधी, विशेषतः महिलांच्या बाबतीत. अर्धशतकापूर्वी आफ्रिकेतील बहुतेक स्त्रिया किशोरवयात किंवा त्यानंतर लगेच विवाह करत असत. मात्र आज त्या खंडातील महिलांमधील वाढती शैक्षणिक प्राप्ती केवळ विवाहाचे वय वाढवित नाही, तर विवाहासाठी जोडीदार निवडताना महिलांना अधिक निर्णयस्वातंत्र्य आणि अधिकारही प्रदान करते. (Boumall, 2024)

विवाहाकडून असलेल्या अपेक्षाही बदलत आहेत. लिंगभूमिकांमधील बदलांमुळे पूर्वी साधी वाटणारी कामांची विभागणी - पुरुष उदरनिर्वाह करणारा आणि स्त्री गृहिणी - आता आर्थिक योगदान व घरगुती जबाबदाऱ्या या दोन्ही बाबतीत जवळपास समसमान वाटपाच्या (५०-५०) दिशेने झुकताना दिसते (Boumall, 2024). सामायिक उदरनिर्वाह ही संकल्पना आता समतावादी आदर्श म्हणून पुढे येत असून, पुरुष व स्त्रिया दोघेही कुटुंबाच्या आधारासाठी समानरीत्या योगदान देत आहेत. या बदलांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांची उपस्थिती वाढली असून, जी पूर्वी प्रामुख्याने पुरुषप्रधान होती आणि काही अंशी आजही आहे. तथापि, या सर्व परिवर्तनांनंतरही अनेक ग्रामीण समुदाय अजूनही पारंपरिक मूल्ये व प्रथा घट्टपणे जपताना दिसतात. या परंपरा लवकर विवाहास प्रोत्साहन देतात आणि स्त्रिया व मुलींना मर्यादित अधिकार व स्वातंत्र्य देतात. परिणामी, काही ठिकाणी नवी मूल्ये स्वीकारली जात असली, तरी जुन्या प्रथाही तितक्याच टिकून आहेत. त्यामुळे समाजाचा एक भाग अधिक समतावादी व लोकशाही मूल्यांनुसार तुलनेने 'सामान्य' जीवन जगताना दिसतो, तर दुसरा भाग तसे करू शकत नाही. बदल आणि सातत्य यांची ही संमिश्र, कधी कधी निराशाजनक तर कधी प्रेरणादायी ठरणारी कथा आजच्या समकालीन जगाचे वास्तव प्रतिबिंब आहे.

एकूणच पाहता, ग्रामीण समुदायांमधील विवाहप्रथा आणि त्यासंबंधीच्या अपेक्षांमध्ये होत असलेले बदल हे परंपरागत मूल्ये आणि आधुनिक विचारधारा यांच्यात सुरू असलेल्या सातत्यपूर्ण संवादाचे द्योतक आहेत. आजच्या समाजात समतावाद आणि वैयक्तिक अधिकारांना अधिकाधिक महत्त्व दिले जात असले, तरी ग्रामीण समुदायांमधील परंपरावादी सामूहिक मूल्ये अजूनही मोठ्या प्रमाणावर प्रभावी आहेत. अशा समाजांमध्ये विवाह ही अजूनही मुख्यतः सामूहिक बाब मानली जाते आणि त्यामध्ये समाजातील जुनी तसेच नवी दोन्ही प्रकारची मूल्ये व मान्यतांचा समावेश असतो.

**लिंगभूमिका : परंपरेपासून आधुनिकतेकडे:** ग्रामीण समाजांमध्ये परंपरेने लिंगभूमिका स्पष्टपणे निश्चित केलेल्या आहेत. पुरुष प्रामुख्याने घराबाहेरील कामकाजासाठी जबाबदार असतात, तर स्त्रिया घरकाम तसेच मुलांचे व वृद्धांचे संगोपन करतात. या भूमिका केवळ भिन्न नाहीत, तर त्यांना दिलेले सामाजिक मूल्यही असमान आहे; पुरुषांची भूमिका अधिक महत्त्वाची आणि दृश्यमान मानली जाते. गरीब व श्रमिक वर्गातील कुटुंबांना या द्वैताच्या मर्यादा अनेकदा ओलांडाव्या लागत असल्या, तरी प्रचलित मान्यता स्पष्ट आहे - पुरुष बाहेर काम करतात आणि स्त्रिया घरात राहून बालसंगोपन, स्वयंपाक, स्वच्छता आणि धुणीभांडी यांसारखी दुसरी कामे करतात.

या लिंगभूमिकांशी संबंधित मान्यता ग्रामीण समाजात नेहमीच अस्तित्वात होत्या; परंतु गेल्या काही दशकांत त्यामध्ये क्रांतिकारक स्वरूपाचे बदल घडून आले आहेत. महिलांचा कामगार वर्गात वाढता सहभाग आणि पुरुषांचा घरगुती कामांमधील सहभाग यामुळे पारंपरिक पितृसत्ताक कामविभागणीला आव्हान मिळाले आहे. या बदलांचे अचूक प्रमाण मोजणे कठीण असले, तरी त्यांचा परिणाम मोठा आहे. जर आपण 1960 च्या दशकातील एखाद्या ग्रामीण कुटुंबाकडे आणि आजच्या ग्रामीण कुटुंबाकडे पाहिले, तर कुटुंबरचना आणि कामांची विभागणी यांमध्ये लक्षणीय फरक दिसून येतो. स्त्रिया आता त्यांच्या वाढत्या शैक्षणिक पात्रतेचा उपयोग करून केवळ उदरनिर्वाहापुरत्या किंवा अनौपचारिक कामांपुरत्या मर्यादित न राहता अधिक स्थिर आणि सन्मानजनक रोजगाराच्या संधी मिळवत आहेत, ज्यामुळे त्या आपल्या मुलांच्या आयुष्यात फक्त दुहेरी पालकत्व म्हणून न राहता स्वतंत्र भूमिका निभावू शकतात. त्यांच्या माता आणि आजींच्या तुलनेत आजच्या तरुण स्त्रिया लक्षणीयरीत्या वेगळ्या आहेत.

तथापि, स्त्रियांचा शिक्षण व रोजगारातील सहभाग आणि पुरुषांचा घरगुती कामांतील सहभाग हे बदल सर्व कुटुंबांमध्ये समान रीतीने घडलेले नाहीत. "विकास, लिंग आणि कुटुंब" या अभ्यासांमध्ये असे सूचित करण्यात आले आहे की जगातील अनेक समुदायांमध्ये कुटुंबांतर्गत नातेसंबंधांचे पुनर्वाटाघाटीकरण सुरू आहे, जरी हे संबंध अद्याप पूर्णपणे रूपांतरित झालेले नसले तरी. गेल्या काही दशकांत ग्रामीण समाजातील स्त्रियांना नवी आशा मिळाली आहे. शिक्षणाचा हक्क आणि सन्मानपूर्ण जीवनाचा अधिकार अधोरेखित करणाऱ्या नव-पारंपरिक चळवळींमुळे त्या घराबाहेर पडू लागल्या आहेत. उच्च शिक्षण संस्थांमध्ये त्यांना मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध झाल्या असून त्या संधींचा प्रभावीपणे उपयोग करत आहेत. आज तरुणी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये केवळ उपस्थित नाहीत, तर अनेकदा तरुण पुरुषांपेक्षा चांगली कामगिरीही करत आहेत. दरम्यान, आर्थिक ताणतणाव आणि कुटुंबात दोन कमावत्या व्यक्तींची गरज यामुळे अधिकाधिक स्त्रिया रोजगार क्षेत्रात प्रवेश करत आहेत. आज स्त्रिया कामगारवर्गाच्या पन्नास टक्क्यांहून अधिक हिस्सा आहेत. विशेष म्हणजे, एकेकाळी पूर्णपणे पुरुषप्रधान मानल्या जाणाऱ्या कारखान्यांमध्ये आणि औद्योगिक क्षेत्रात आता स्त्रिया पुरुषांसोबत काम करत आहेत. त्यामुळे देशाच्या आर्थिक परिवर्तनामुळे कामगार क्षेत्रातील पारंपरिक पुरुष—स्त्री द्वैताला तडा गेला आहे.

एकूणच, ग्रामीण समाज पारंपरिक 'पुरुष उदरनिर्वाहकर्ता - स्त्री गृहिणी या मॉडेलपासून अधिक समतावादी भागीदारीकडे सरकत आहे. हा बदल नव्या आर्थिक दबावांचे प्रतिबिंब आहे आणि तो ग्रामीण कुटुंबांची कार्यपद्धती, विवाह व भागीदारीचे स्वरूप तसेच सामाजिक परस्परसंवाद यांवर प्रभाव टाकत आहे. मुळात, गेल्या काही दशकांत उदयास आलेल्या नव्या आर्थिक वास्तवामुळे हे परिवर्तन घडून येत आहे. अनेक ग्रामीण कुटुंबांसाठी आज परंपरागत पद्धतीने कुटुंब चालवणे आर्थिकदृष्ट्या शक्य राहिलेले नाही—किमान मोठ्या प्रमाणावर कर्ज न घेता तरी नाही.

**ग्रामीण नातेसंबंधांवर तंत्रज्ञानाचा परिणाम:** तंत्रज्ञानामुळे ग्रामीण भागातील नातेसंबंधांमध्ये लक्षणीय बदल झाले असून कुटुंबे आणि समुदाय एकमेकांशी कसे संवाद साधतात यावर त्याचा मोठा प्रभाव पडला आहे. विशेषतः मोबाईल फोन आणि सामाजिक माध्यमांमुळे निर्माण झालेल्या डिजिटल जोडणीमुळे रोजगार किंवा इतर कारणांमुळे स्थलांतरित झालेल्या कुटुंबीयांमध्ये दूर अंतर असूनही सहज संवाद शक्य झाला आहे. त्यामुळे कुटुंबांना एकत्र ठेवणारे भावनिक बंध टिकून राहतात आणि कुटुंबजीवनाच्या नियम व भूमिका अधिक परिणामकारकरित्या ठरवता येतात. काही सदस्य गावातच राहून शेती करतात, तर काही देशातील किंवा परदेशातील इतर भागांत शेती अथवा इतर कामांसाठी जातात. अशा परिस्थितीत तंत्रज्ञान कुटुंबजीवनाचा एक अत्यावश्यक घटक ठरला आहे.

याशिवाय, ग्रामीण भागातील प्रेमसंबंध आणि जोडीदार निवडीच्या पद्धतींमध्येही तंत्रज्ञानामुळे बदल झाले आहेत. ऑनलाइन प्लॅटफॉर्ममुळे लोकांना एकमेकांना भेटण्याचे नवे मार्ग उपलब्ध झाले असून हे मार्ग अनेक ठिकाणी अजूनही प्रचलित असलेल्या ठरवून लावल्या जाणाऱ्या विवाहांवर कमी अवलंबून आहेत. मात्र, या प्लॅटफॉर्ममुळे ग्रामीण प्रेमसंबंधांमध्ये एक नवा घटकही प्रवेश करतो. वैयक्तिक आणि खाजगी निवडीच्या संधी, ज्या समुदायातील ज्येष्ठांना अनेकदा धोकादायक वाटतात. तरुणांना जोडीदार निवडताना वैयक्तिक स्वायत्तता मिळत असली, तरी यामुळे प्रामुख्याने रूढीवादी सामाजिक वातावरणात विश्वास टिकवून ठेवण्यास नवी आव्हाने निर्माण होत आहेत. तथापि, ग्रामीण भागात तंत्रज्ञानाचा प्रसार सर्वांसाठी समान लाभदायक ठरलेला नाही. अनेकदा ते कुटुंबांमधील आधीपासून अस्तित्वात असलेल्या विषमतांनाच बळकटी देते. उदा. स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत इंटरनेटचा कमी वापर करता येणे. २०१२ मध्ये नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ अर्बन अफेअर्सने भारतातील स्त्रिया इंटरनेट का वापरत नाहीत याचा अभ्यास केला असता, इंटरनेटसाठी आवश्यक उपकरणांपर्यंत प्रत्यक्ष पोहोच नसणे हे एक प्रमुख कारण असल्याचे आढळले.

कुटुंबांमध्ये संगणक किंवा मोबाईल फोन मालकीने पुरुषांकडेच अधिक प्रमाणात असल्याचे दिसून आले. तसेच, स्त्रियांकडे उपकरणे उपलब्ध असली तरी त्यांचा वापर कसा करायचा याचे ज्ञान अनेकदा पुरुषांपेक्षा कमी असल्याचे आढळले. तंत्रज्ञानाच्या वापराबाबत लिंगाधारित ही सत्ता-असमानता जगातील अनेक भागांत आढळून येते.

एकूणच, तंत्रज्ञान ग्रामीण नातेसंबंधांमध्ये एकीकडे आधुनिकीकरणाची प्रक्रिया गतीमान करणारे साधन ठरत आहे, तर दुसरीकडे नवे तणाव निर्माण करणारा घटकही ठरत आहे. उदाहरणार्थ, ग्रामीण भारतात माहिती व संवाद तंत्रज्ञानाचा प्रसार झाल्यामुळे गावांतील नातेसंबंध काही प्रमाणात आधुनिक होण्याची शक्यता आहे. कदाचित सकारात्मक पद्धतीने परंतु त्याचबरोबर उदयास येणाऱ्या नव्या सामाजिक रचनांमुळे जीवनपद्धती वेगळ्या प्रकारे घडू लागल्याने काही प्रमाणात 'मूल्यसंघर्ष' (value friction) देखील अनुभवास येण्याची शक्यता आहे.

**आर्थिक बदल आणि कुटुंबीय गतीशीलता:** ग्रामीण समाजांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक बदल अनुभवले असून त्याचा कुटुंबजीवन व कुटुंबरचनेवर खोलवर परिणाम झाला आहे. दीर्घकाळ, म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत किंवा विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत, बहुतेक ग्रामीण कुटुंबांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून होता. मात्र आज ग्रामीण भागातील कुटुंबांचे उत्पन्न विविध स्रोतांतून येत आहे. ज्यामध्ये वेतनाधारित कामे, लहान उद्योगधंदे यांचा समावेश आहे. याशिवाय, ग्रामीण कुटुंबे वाढत्या प्रमाणात 'आधुनिक कुटुंबशेती'वर अवलंबून होत आहेत.अशा जीवनपद्धतीत शेतीतून मिळणारे उत्पन्न कुटुंबाच्या एकूण उत्पन्नाचा तुलनेने लहान भाग असतो आणि पुरुष व स्त्रिया, विशेषतः स्त्रिया, इतर मार्गांनी कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अशा परिस्थितीत कुटुंबशेती अनेकदा प्रतीकात्मक मूल्यासाठी टिकवून ठेवली जाते. ती कुटुंबाला एकत्र बांधून ठेवण्याचे कारण देते आणि वर्षातून काही आठवडे किंवा महिने का होईना, घरी परत येण्याचे कारण ठरते. पिढ्यान्‌पिढ्या कुटुंबाच्या आठवणी निर्माण करण्यासाठी आणि जतन करण्यासाठी ती एक महत्त्वाचा आधारबिंदू ठरते.

आर्थिक बदलांचा कुटुंबांवर मोठा परिणाम होतो आणि ग्रामीण कुटुंबेही याला अपवाद नाहीत. कामाच्या नव्या पद्धती आणि स्त्रियांना आर्थिक स्वावलंबन देणाऱ्या नव्या संधींमुळे काही वेळा कुटुंबात दुसऱ्या कमावत्या सदस्याची गरज उरत नाही. तरीही, जेव्हा दोन्ही जोडीदार काम करत असतात, तेव्हा आज स्त्रिया पूर्वीपेक्षा अधिक आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झालेल्या आहेत. यामागे अनेक कारणे आहेत. गेल्या काही दशकांत पुरुषांचे वेतन स्थिर राहिले आहे, तर स्त्रियांचे वेतन तसे राहिलेले नाही. तसेच, पुरुषांमधील बेरोजगारीचा दर स्त्रियांपेक्षा अधिक राहिला आहे. थोडक्यात सांगायचे तर, आज काम करणाऱ्या स्त्रिया अपवाद न राहता सर्वसाधारण बाब बनल्या आहेत. काम करणाऱ्या कुटुंबांमध्ये दुसरा कमावता सदस्य ही गरज ठरली असून, दोन उत्पन्नांमुळे कुटुंबावर वाढत्या कर्जाचा ताण कमी होण्यास मदत होते. या नव्या कामकाज पद्धतींचा परिणाम असा होतो की स्त्रियांना कुटुंबातील आर्थिक निर्णयांमध्ये अधिक सहभाग मिळतो. अनेकदा त्या पुरुषांइतकेच, कधी कधी त्याहून अधिक उत्पन्न आणत असतात. आर्थिक तणाव कुटुंबांना तुटवू शकतो. कुटुंबातील विसंवाद आणि बिघाडाच्या प्रमुख कारणांमध्ये आर्थिक समस्या अग्रस्थानी असतात, हे लक्षात घेतल्यास याचे कारण सहज समजते. उत्पन्न गमावणे किंवा अचानक मोठे आर्थिक लाभ, बेरोजगारी किंवा अस्थिर रोजगार, घर जप्ती किंवा इतर मोठे नुकसान - हे सर्व सामान्य आर्थिक ताणाचे स्रोत आहेत. या सर्व परिस्थितींच्या मुळाशी अभाव आणि असुरक्षितता ही दोन प्रमुख कारणे असतात. आणि जे लोक आधीच अडचणीत असतात, त्यांच्यावर वाईट घटना घडण्याची शक्यता अधिक असल्याने अनेक कुटुंबे सतत संकटाच्या अवस्थेत जीवन जगत असतात. याशिवाय, कुटुंबातील सदस्यांच्या उपजीविकेच्या स्वरूपातील बदलांचा त्यांच्या राहणीमानावर आणि एकत्र राहण्याच्या पद्धतीवरही परिणाम होतो. आज अनेक कुटुंबे स्वतःची पुनर्रचना करताना एकोणिसाव्या शतकातील कादंबऱ्यांमधील कुटुंबांप्रमाणेच 'एकत्र राहणे' आणि 'वेगळे राहणे' या दोन्हींचे मिश्र स्वरूप स्वीकारत आहेत.

आज ग्रामीण समाजांमध्ये उदयास येत असलेल्या नव्या सामाजिक मान्यतांचे आकलन करण्यासाठी बदलती अर्थव्यवस्था आणि कुटुंबजीवन यांतील गुंतागुंतीच्या परस्परसंबंधांचा विचार करणे आवश्यक आहे. प्रश्न केवळ भौतिक आर्थिक बदलांचा नाही, तर 'अर्थव्यवस्था' आणि 'कुटुंब' हीदेखील वाटाघाटी व भागीदारीची नवी क्षेत्रे बनत आहेत. जी पूर्वीच्या तुलनेत पूर्णपणे वेगळी दिसतात. हा एक मूलभूत परिवर्तनाचा काळ आहे. अगदी अलीकडच्या काळातही ज्या प्रकारची ग्रामीण कुटुंबे होती, ती आज तशी राहिलेली नाहीत, कारण त्यांचे 'काम आणि कुटुंब' यांचे नाते पूर्वीसारखे राहिलेले नाही. आणि काही अंशी, एक दुहेरी आदर्श पुन्हा समोर येत आहे. दोन पालक, दोघेही काम करणारे, आणि मुले मात्र १९५० च्या दशकातील (किंवा त्यापूर्वीच्या) आठवणींनी भारलेल्या, काहीशा 'रोमँटिक' कुटुंबीय वातावरणात मोठी होत असलेली.

**लिंगमान्यतांच्या घडणीत शिक्षणाची भूमिका:** ग्रामीण समुदायांमध्ये लिंगमान्यतांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण दीर्घकाळापासून चालत आलेल्या पारंपरिक भूमिका आव्हानित करते आणि पूर्वीपेक्षा अधिक समतावादी दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. या समुदायांमध्ये आढळणाऱ्या लिंगमान्यता अत्यंत पारंपरिक स्वरूपाच्या असल्या, तरी त्या बदलण्याची शिक्षणाची क्षमता कमी लेखता येणार नाही (Boumalli, 2024). विशेषतः मुलींच्या शिक्षणामुळे लिंगमान्यतांमध्ये होणारा बदल ही केवळ सैद्धांतिक कल्पना नसून सध्या प्रत्यक्षात अनुभवली जात आहे. उदाहरणार्थ, ग्रामीण भागातील अधिकाधिक स्त्रिया उच्च शिक्षण घेत असताना त्यांना समाजाने आखून दिलेल्या मार्गावर प्रश्न उपस्थित करण्याची चिकित्सक जाणीव प्राप्त होत आहे.

शाळा या केवळ औपचारिक शिक्षण देणाऱ्या संस्था नाहीत, तर त्या सामाजिक शिक्षणाचीही केंद्रे आहेत. विद्यार्थ्यांना परस्पर संवादातून तसेच शिक्षकांकडून सामाजिक मान्यता, मूल्ये आणि नियम यांची माहिती मिळते. त्याचबरोबर, या मान्यता व मूल्यांवर प्रश्न विचारण्याची आणि त्यांचे पुनर्रचन करण्याची साधनेही विद्यार्थ्यांना शाळेतच प्राप्त होतात. सर्व मानव समान आहेत या

संकल्पनेभोवती फिरणाऱ्या नव्या विचारांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिल्यास, ते स्वतःच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या जीवनाविषयी आवश्यक प्रश्न उपस्थित करू शकतात. हे विशेषतः मुली आणि तरुण स्त्रियांच्या बाबतीत अधिक प्रभावी ठरते, कारण दीर्घकाळापासून त्यांना समाजाच्या मूलभूत घटक असलेल्या कुटुंबामध्ये पारंपरिक भूमिका स्वीकारण्यासाठी मौनाने समाजीकरण केले गेले आहे. शिक्षित सदस्य गावात परत येतात किंवा तिथेच राहतात, तेव्हा समुदायातील मान्यतांच्या व्याख्यांमध्ये बदल होऊ लागतो. लिंगभूमिकांबाबतचे त्यांचे बदललेले दृष्टिकोन कुटुंबे आणि व्यापक सामाजिक जाळ्यांवर परिणाम करतात, ज्यामुळे मुलींच्या शिक्षणाबाबतची दृष्टी आणि पारंपरिक नसलेल्या लिंगभूमिकांची स्वीकारार्हता वाढते (Silverman et al., n.d.). तसेच, जेव्हा मुलगे समतावादी मूल्ये प्रोत्साहन देणाऱ्या शैक्षणिक वातावरणात शिक्षित होतात, तेव्हा तेही या परिवर्तन प्रक्रियेचा भाग बनतात आणि स्त्रियांपेक्षा पुरुषांच्या निर्णयांना अधिक महत्त्व देणाऱ्या पितृसत्ताक गृहितकांना आव्हान देतात.

तथापि, ग्रामीण भागातील अनेक मुलींना अजूनही लवकर विवाहाचे गंभीर आव्हान सामोरे जावे लागते. विविध कारणांमुळे - जसे की सामाजिक-आर्थिक दबाव किंवा सरळसोट लिंगभेद - त्या शाळा लवकर सोडतात आणि विवाहबद्ध होतात. परिणामी, त्या केवळ शाळा सोडलेल्या मुली राहत नाहीत, तर अशा समाजांतील तरुण स्त्रिया बनतात जिथे त्यांना पतींच्या अधीन राहण्याची किंवा किमान त्यांची सेवा करण्याची अपेक्षा असते (Baker et al., n.d.). म्हणूनच, विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाबद्दल बोलताना आपण प्रत्यक्षात समाजपरिवर्तनाविषयी बोलत असतो. शिक्षणाद्वारे मुलींना (आणि वाढत्या प्रमाणात मुलांनाही) जगाकडे पाहण्यासाठी नवे दृष्टिचष्मे देण्याचा हा प्रयत्न आहे.

**निष्कर्ष:** ग्रामीण समाजांमध्ये कुटुंबरचनांमध्ये मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन घडून येत असून हे परिवर्तन व्यापक सामाजिक मान्यतांच्या पुनर्रचनेचे प्रतिबिंब आहे. आर्थिक, तांत्रिक आणि शैक्षणिक पातळीवर हे समाज अभूतपूर्व वेगाने विकसित होत आहेत आणि या परिवर्तनाची ही कथा प्रामुख्याने जागतिक दक्षिणेकडील (Global South) देशांमध्ये घडताना दिसते. एकाच छताखाली किंवा जवळच्या परिसरात अनेक पिढ्या एकत्र राहणाऱ्या पारंपरिक संयुक्त कुटुंबपद्धतीची जागा आता लहान (न्यूक्लिअर) कुटुंबे आणि वाढत्या प्रमाणात एकल पालक कुटुंबे घेत आहेत. त्यामुळे या समाजांतील कुटुंबजीवनाची कहाणी काही अंशी अमेरिकन किंवा पाश्चिमात्य युरोपीय अनुभवाशी अधिक साम्य दर्शवू लागली आहे (Dankovich, 2013).

या परिवर्तन प्रक्रियेत स्त्रिया अधिकाधिक सक्रियपणे सहभागी होत आहेत. त्यांचा कामगार क्षेत्रातील वाढता सहभाग, शिक्षणाच्या पातळीत होणारी वाढ आणि कुटुंबातील त्यांच्या भूमिकांमध्ये होत असलेले बदल—या सर्व घटकांमुळे तथाकथित 'लिंगक्रांती'त (*Gender Revolution) (World Bank Group, 2012)* तसेच समतेच्या पुनःप्राप्ती व प्रस्थापनेत महत्त्वपूर्ण फरक पडत आहे. ही प्रक्रिया केवळ जागतिक उत्तर भागापुरती मर्यादित नसून जागतिक दक्षिणेकडील देशांमध्येही तितक्याच प्रभावीपणे घडत आहे. परिणामी, कुटुंबरचनेचे स्वरूपच बदलत आहे. मात्र कुटुंबरचनांमध्ये होत असलेल्या या बदलांचे सर्वात ठळक वैशिष्ट्य म्हणजे ते अत्यंत वेगाने घडून येत आहेत.

**संदर्भसूची**


BoumalI, R. (2024). The new gender roles: Social and family implications. Psychology and Education, 61(2). Retrieved from http://psychologyandeducation.net

Baker, H. (2026). Associations between village-level norms on marital age and marriage-related outcomes. SSM – Population Health.

Shakya, J. (2026). The development of gender roles: From two-parent family structures to modern patterns. Open Journal of Social Sciences.

Silverman, R., & Diego, U. O. C. S. (2026). Understanding changing social norms and practices. Overseas Development Institute (ODI). Retrieved from https://media.odi.org/documents/9572.pdf

Pessin L. Changing Gender Norms and Marriage Dynamics in the United States. J Marriage Fam. 2018 Feb;80(1):25-41. doi: 10.1111/jomf.12444. Epub 2017 Oct 5.

Nabirye, Kato & University V, Kampala International. (2025). The Dynamics of Family Structures in Modern Society. 7. 21-27.

Marphatia AA, Wells JCK, Reid AM, Poullas M, Bhalerao A, Yajnik P, Yajnik CS. Generational trends in education and marriage norms in rural India: evidence from the Pune Maternal Nutrition Study. Front Reprod Health. 2025 Jan 20;6:1329806.

Sri Gauri Shankar. (2023). The changing dynamics of family structures: A comparative study of family patterns in modern society. The Progress Journals, 1(2), 1–XX.

Clark, S., Harper, S., & Weber, B. (2022). Growing up in rural America. RSF: The Russell Sage Foundation Journal of the Social Sciences, 8(4), 1–47.


# सामाजिक चळवळी आणि परिवर्तन : समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास

**विजय किसन शेळके** ( प्रा. पद. शिक्षक ) जि. प. प्राथमिक शाळा, गोपाळपूर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना:** भारतीय समाज अनेक प्रकारच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि आर्थिक परिवर्तनांच्या प्रक्रियेतून गेल्याने आजच्या आधुनिक भारताची रचना झाली आहे. या परिवर्तनामागे विविध सामाजिक चळवळींचा मोठा वाटा आहे. शिक्षण चळवळ, अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री-शिक्षण, दलित चळवळी, शेतकरी आंदोलन, पर्यावरण चळवळ, ओबीसी आरक्षण चळवळ, अण्णा आंदोलन इत्यादी चळवळींनी भारतीय समाजाला नव्या दिशेने विचार करायला भाग पाडले.मानवी समाजाची निर्मिती ही स्थैर्य, सातत्य आणि परिवर्तन यांच्या परस्परसंवादातून घडत आलेली प्रक्रिया आहे. समाजाची संरचना कितीही दृढ असली तरी असमानता, विषमता, सामाजिक अन्याय, शोषण, वर्चस्ववाद किंवा सांस्कृतिक संघर्ष यांसारख्या विसंगतीमुळे सामाजिक असंतोष निर्माण होतो आणि हा असंतोष संघटित रूप धारण करून जेव्हा व्यापक लोकसहभागासह उभा राहतो, तेव्हा सामाजिक चळवळींचा उदय होतो. त्यामुळे सामाजिक चळवळ ही केवळ उद्वेगाची क्षणिक अभिव्यक्ति नसून ती समाजव्यवस्थेच्या बदलासाठी, पुनर्रचनेसाठी आणि मूल्यव्यवस्थेच्या

पुनर्स्थापनेसाठी कार्य करणारी दीर्घकालीन, संघटित आणि वैचारिक प्रक्रिया आहे.त्यात सामाजिक चळवळ ही केवळ असंतोषाची अभिव्यक्ती नसून ती संघटित कृती, सामूहिक ओळख, सामाजिक बांधिलकी आणि वैकल्पिक मूल्यप्रणाली यांवर आधारित दीर्घकालीन प्रक्रियेची उभारणी असते. ब्लूमर, स्मेल्सर, टिली, टुरेन, रूडॉल्फ, रामआहोळ, जोतीराम फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक चळवळींचा उदय, प्रवास, संघर्ष आणि परिवर्तन यांचा सखोल अभ्यास करून चळवळींच्या विकासाला सिद्धांतिक अधिष्ठान दिले आहे. त्यांच्या अध्ययनातून हे स्पष्ट होते की प्रत्येक चळवळ ही सामाजिक समतावादी मूल्यांचे पुनर्स्थापन, वंचित-शोषित गटांचे सबलीकरण आणि समाजरचनेचे मानवीकरण यासाठी कार्यरत एक सजीव प्रक्रिया आहे.

इतिहासात पाहिल्यास, दास्यप्रथा निर्मूलन चळवळ, स्त्रीवादी चळवळी, नागरी हक्क आंदोलन, पर्यावरण चळवळी, सत्यशोधक चळवळ, भारतीय राष्ट्रवादी चळवळ, दलित आंदोलन, आदिवासी व शेतकरी चळवळी अशा अनेक सामाजिक चळवळींनी केवळ सत्ताकेंद्रांचे परिवर्तन केले नाहीत, तर समाजातील मूल्यव्यवस्था, सांस्कृतिक संकल्पना, सामाजिक नाती आणि अधिकारसंबंध यांनाही नव्याने परिभाषित केले. त्यामुळे सामाजिक चळवळी या समाजातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय पातळीवर परिवर्तन घडवणारे गतिशील शक्तिकेंद्र म्हणून अभ्यासल्या जातात.जागतिक स्तरावर गुलाममुक्ती चळवळ, स्त्रीवादी चळवळी, नागरी हक्क चळवळी, पर्यावरण चळवळी आणि भारतातील सत्यशोधक चळवळ, राष्ट्रवादी चळवळ, दलित आंदोलन, महिला चळवळी, शेतकरी-विद्यार्थी आंदोलन, पर्यावरण व आदिवासी हक्क चळवळी यांसारख्या चळवळींनी समाजरचनेत खोलवर बदल घडवून आणले आहेत. आधुनिक कालखंडात जागतिकीकरण, डिजिटल तंत्रज्ञान, सोशल मीडिया व नागरी समाज संघटनांनी सामाजिक चळवळींच्या स्वरूपात गुणात्मक बदल घडवून आणले असून 'नेटवर्क मूव्हमेंट्स', 'सायबर प्रोटेस्ट', 'डिजिटल ऍक्टिविझम' ही नवी परिमाणे निर्माण केली आहेत."सामाजिक चळवळी आणि परिवर्तन" हा विषय याच संदर्भात महत्त्वाचा ठरतो. चळवळींच्या उदयाची कारणे, संघटनात्मक रचना, नेतृत्व, विचारसरणी, संघर्ष-रणनीती, लोकसहभाग, संसाधन संचयन, राजकीय प्रतिसाद, संस्थात्मक बदल आणि अखेरीस चळवळींचा वास्तविक सामाजिक परिणाम यांचा अभ्यास हे सामाजिक परिवर्तन समजण्यासाठी अपरिहार्य आहे. चळवळींची क्षमता केवळ विद्यमान सामाजिक संरचना बदलण्यापुरती मर्यादित नसून त्या नवीन सामाजिक ओळखी, मूल्याधिष्ठाने, अधिकार संरचना आणि सांस्कृतिक भानाच्या निर्मितीतही महत्त्वाची भूमिका बजावतात.

या पार्श्वभूमीवर हा सादर केला जाणारा संशोधन निबंध "सामाजिक चळवळी आणि परिवर्तन" या विषयाचा सखोल, तुलनात्मक आणि बहुवैज्ञानिक दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो. या संशोधनात सामाजिक चळवळींची उत्पत्ती, त्यांचे स्वरूप, त्यांची परिवर्तनकारी क्षमता, त्यांची मर्यादा तसेच त्यांनी घडवून आणलेले किंवा घडविण्यास प्रवृत्त केलेले परिवर्तन यांचे सखोल समाजशास्त्रीय परीक्षण करण्यात येणार आहे. समाजरचनेतील सातत्य आणि परिवर्तन यांच्या गतिशील नात्याचा उलगडा करणेही हा या अभ्यासाचा महत्त्वाचा हेतू आहे.एकंदरीत, सामाजिक चळवळी या सामाजिक परिवर्तनाचा आत्मा आहेत. त्या समाजाच्या अनुभवांना, संघर्षांना व स्वप्नांना सार्वजनिक रूप देतात आणि समाजाला अधिक समतोल, न्याय्य आणि मानवकेंद्री मूल्यांच्या दिशेने प्रवृत्त करतात. त्यामुळे या विषयावरचे शास्त्रीय संशोधन हे केवळ शैक्षणिक प्रयोजनापुरते मर्यादित नसून समाजाच्या भविष्यातील दिशा निर्धारणासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे.मानवी इतिहासाच्या प्रवाहात सामाजिक परिवर्तनाचे जे विविध प्रवाह दिसतात, त्यामध्ये सामाजिक चळवळी हे अत्यंत गतिशील, परिवर्तनकेंद्रित आणि समाज-संरचनेचे पुनर्रचनाकार म्हणून विशेषत्वाने अधोरेखित होतात. समाजातील असमानता, शोषण, अन्याय, सत्ता, सांस्कृतिक विरोधाभास, लैंगिक व जातीधारित विभाजन,आर्थिक विषमता, पर्यावरणीय संकटे अशा विविध संरचनात्मक विसंगतींच्या पार्श्व वभूमीवर सामाजिक चळवळी उदयाला येतात. या चळवळी केवळ विरोधाचे साधन नसून, लोकशाहीचे सशक्तिकरण, सामाजिक न्यायाची उभारणी आणि सामूहिक चेतनेचा विकास यासाठी केंद्रस्थानी कार्य करतात.

जागतिक स्तरावर गुलाममुक्ती चळवळ, स्त्रीवादी चळवळी, नागरी हक्क चळवळी, पर्यावरण चळवळी आणि भारतातील सत्यशोधक चळवळ, राष्ट्रवादी चळवळ, दलित आंदोलन, महिला चळवळी, शेतकरी-विद्यार्थी आंदोलन, पर्यावरण व आदिवासी हक्क चळवळी यांसारख्या चळवळींनी समाजरचनेत खोलवर बदल घडवून आणले आहेत. आधुनिक कालखंडात जागतिकीकरण, डिजिटल तंत्रज्ञान, सोशल मीडिया व नागरी समाज संघटनांनी सामाजिक चळवळींच्या स्वरूपात गुणात्मक बदल घडवून आणले असून 'नेटवर्क मूव्हमेंट्स', 'सायबर प्रोटेस्ट', 'डिजिटल ऍक्टिविझम' ही नवी परिमाणे निर्माण केली आहेत.समकालीन भारतीय समाजात जातन्याय, आर्थिक असमानता, लैंगिक अधिकार, पर्यावरणीय संकट, कामगार व शेतकरी प्रश्न, आदिवासी अस्तित्व, मानवाधिकार हनन आणि सांस्कृतिक राष्ट्रवाद यांसारख्या ज्वलंत प्रश्नांनी सामाजिक चळवळींचे स्वरूप अधिक वैविध्यपूर्ण आणि संघर्षशील बनवले आहे. त्यामुळे सामाजिक चळवळींचा अभ्यास हा केवळ ऐतिहासिक किंवा वर्णनात्मक न राहता बहुविद्याशाखीय आणि समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेचा विश्लेषणात्मक अभ्यास म्हणून महत्त्वाचा ठरतो.

एकूणच, सामाजिक चळवळी या समाजरचनेतील जडत्व तोडून नवी मूल्यव्यवस्था, नवी सामाजिक ओळख आणि नवे सामूहिक स्वप्न यांची निर्मिती करणारी परिवर्तनशील शक्ती आहेत. त्यामुळे त्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास आजच्या काळात अत्यावश्यक ठरतो. प्रस्तुत संशोधन याच व्यापक व बहुआयामी संदर्भातून सामाजिक चळवळींचा समग्र आणि विवेकी अभ्यास करण्याचा प्रयत्न आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) भारतातील प्रमुख सामाजिक चळवळींचा ऐतिहासिक अभ्यास करणे. २) सामाजिक चळवळींचे कारणमीमांसा, स्वरूप आणि उद्दिष्टे समजून घेणे. ३) सामाजिक परिवर्तनावर या चळवळींचा प्रभाव विशद करणे. ४) समाजशास्त्रीय सिद्धांतांच्या आधारे चळवळींचे विश्लेषण करणे. ५) आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाची दिशा आणि भविष्यातील शक्यता शोधणे.

**संशोधनाचे गृहितके:** १) सामाजिक चळवळी या समाजातील विसंगती, असमानता आणि संघर्षांमधून उद्भवतात. २) सामाजिक चळवळी समाजातील परिवर्तन प्रक्रियेचा मुख्य प्रेरक घटक असतात. ३) शिक्षण, तंत्रज्ञान आणि संवाद माध्यमे आधुनिक सामाजिक चळवळींना अधिक शक्तिशाली बनवतात. ४) सामाजिक चळवळींचा प्रभाव हा दीर्घकालीन आणि बहुआयामी असतो.

**संशोधन पद्धती:** संशोधन पद्धती आपणास खालीलप्रमाणे मांडता येईल. १) दुय्यम माहिती आधारित पद्धत: अ) ऐतिहासिक ग्रंथ ब) सरकारी अहवाल क) समाजशास्त्रीय संशोधन पेपर ड) वृत्तपत्रे आणि मासिके इ) विविध चळवळीवरील संशोधन लेख. २) गुणात्मक विश्लेषण: अ) चळवळींच्या स्वरूपाचे विश्लेषण ब) चळवळींच्या मागील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय कारणांचा अभ्यास क) परिवर्तन प्रक्रियेचे तुलनात्मक विश्लेषण.

**सामाजिक चळवळींचा समाजशास्त्रीय दृष्टीकोन:** (१) समतोल दृष्टीकोन: अ) समाजातील तणाव, विसंगती आणि असमानतेमुळे चळवळी निर्माण होतात. ब) चळवळ ही समाजातील व्यत्यय असली तरी दीर्घकाळात ती समाजाला संतुलन आणि स्थिरता प्रदान करते. (२) संघर्ष सिद्धांत: अ) कार्ल मार्क्सच्या मते सामाजिक चळवळी ही वर्गसंघर्षाची परिणती असते. ब) अन्याय, शोषण, वर्चस्व आणि विषमता ही चळवळींची मुख्य कारणे. क) परिवर्तन ही संघर्षाची नैसर्गिक परिणती. (३) प्रतीकात्मक संवाद: अ)चळवळीची भाषा, प्रतीक, घोषवाक्ये आणि सामूहिक ओळख निर्माण करण्याची प्रक्रिया. ब) व्यक्ती आणि समूह यांच्यातील संवादातून सामूहिक कृती घडते.

**भारतातील प्रमुख सामाजिक चळवळी:**

**१) राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथा रद्द, स्त्री-शिक्षण** समाजसुधारक चळवळी (१९ वे शतक): हा सामाजिक पगडा दूर करण्यासाठी सर्वप्रथम धार्मिक ग्रंथांचा अभ्यास केला,आणि त्यातून त्यांना अपेक्षित असलेला समाज त्यांनी परिवर्तन करण्यासाठी आपल्या आपले आयुष्य पणाला लावले.त्यांनी वेद, उपनिषद, स्मृतीग्रंथ यांचा सखोल अभ्यास करून सिद्ध केले की, सती प्रथा ही हिंदू धर्मातील अनिवार्य विधी नसून समाजातील चुकीच्या प्रथांचा परिणाम आहे.त्यांनी **जनजागृती मोहिम** राबवून त्यांनी लोकांमध्ये सती प्रथेचे दुष्परिणाम समजावून सांगण्यासाठी प्रकटीकरण चळवळ, भाषणे, सभा आणि लेखन यांचा वापर केला. वृत्तपत्रे, पुस्तिकांद्वारे त्यांनी प्रबोधन घडवले. **विधवा बचाव प्रकरणे** त्यांनी अनेक वेळा प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन विधवांना सती करण्यातून वाचवले. त्यामुळे समाजात धैर्य निर्माण झाले. तसेच **ब्रिटिश सरकारवर दबाव** आणून यांनी गव्हर्नर-जनरल लॉर्ड विल्यम बेंटिंक यांच्याशी सतत संवाद साधून सती प्रथा बंद करण्यासाठी कायदा करण्याची मागणी केली.

**सती प्रथा रद्द:** त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे ४ डिसेंबर १८२९ रोजी लॉर्ड बेंटिंक यांच्या कार्यकाळात "बंगाल सती रेग्युलेशन अॅक्ट" जाहीर झाला आणि सती प्रथा अधिकृतपणे कायद्यानं बंद झाली. ही भारतातील सर्वात महत्त्वाची सामाजिक सुधारणा ठरली. **स्त्री शिक्षणासाठी योगदान:** राजा राममोहन रॉय मानत होते की, समाजाचा विकास स्त्रियांच्या शिक्षणाशिवाय अशक्य आहे. त्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे पाप मानले जात होते. विद्वान, समाज आणि धर्मगुरूंच्या विरोधाला तोंड देत त्यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार केला.त्यांनी स्त्री शिक्षणासाठी महत्वाची कामे खालील प्रमाणे: **मुलींसाठी शाळा स्थापन** त्यांनी वाचक समाज आणि इंग्रजी शिक्षणाच्या चळवळीच्या माध्यमातून मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या. या शाळांमध्ये गणित, विज्ञान, भाषा यांसारख्या आधुनिक विषयांचा समावेश होता. **विधवांसाठी शिक्षण** विधवांच्या दयनीय स्थिती लक्षात घेऊन त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी शिक्षण गरजेचे असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. **समाजातील विरोध मोडून काढला** स्त्री शिक्षणाला जोरदार विरोध असताना त्यांनी लेखन, भाषणे व विचारप्रसाराद्वारे त्यांनी समाजाचे गैरसमज दूर केले. **वृत्तपत्रे व लेखन** 'संबाद कौमुदी' सारख्या वृत्तपत्रातून त्यांनी शिक्षण, बालविवाह, स्त्रियांचे हक्क या विषयांवर प्रभावी विचार मांडले. **आधुनिक शिक्षणाचा पाया** त्यांनी पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीचा आधार घेत इंग्रजी, गणित व विज्ञान यांना महत्त्व दिले. त्यामुळे पुढील काळात स्त्री शिक्षणाच्या व्यापक चळवळीला गती मिळाली. अशाप्रकारे राजाराम मोहन रॉय यांनी भारतातील स्त्री शिक्षणाचा पाया रचला.

२) **महात्मा ज्योतिराव फुले:** महात्मा ज्योतीराव फुले हे भारतातील महान समाजसुधारक,शिक्षन्तज्ञ,विचारवंत आणि स्त्री-दलित मुक्तीचे जनक मानले जातात. जातीभेद, अंधश्रद्धा, स्त्री शोषण, बालविवाह, विडंबना आणि धार्मिक रुढी तसेच विषमता यांना त्यांनी आयुष्यभर विरोध केल त्यातून समाजोपयोगी परिवर्तन घडवून आणले.

**१) स्त्री शिक्षण, सत्यशोधक समाज:** महात्मा फुले आणि स्त्री शिक्षण देण्याच्या भ्रामक प्रथा उदयास आलेल्या होत्या,त्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे पाप, सामाजिक अपराध आणि परंपरेविरुद्ध मानले जात होते. जोतिबांनी हा भ्रम मोडून काढून स्त्री शिक्षणाची दारे प्रथमच खुली केली. (१) **भारतातील पहिली मुलींची शाळा** (१८४८) पुण्यातील भिडे वाड्यात सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने त्यांनी भारतातील पहिली कन्या शाळा सुरू केली.हे पाऊल अत्यंत क्रांतिकारी होते, कारण त्या काळी मुलींना शिक्षण देणे वर्ज्य मानले जात असे.(२) **सावित्रीबाई फुले - पहिली शिक्षिका** सावित्रीबाई यांना जोतिबांनी स्वतः शिक्षण दिले व पुढे त्या भारताच्या पहिल्या प्रशिक्षित शिक्षिका बनल्या. त्यांनी मुलींसाठी स्वतः वर खूप अन्याय सहन करून त्यांनी शाळा शिक्षिका म्हणून सर्वोत्कृष्ट परिवर्तन घडवून आणले.शाळेत जाताना त्यांच्या वर समाजाकडून दगड, चिखल फेकला जाई, परंतु धैर्याने त्यांनी शिक्षणाची जबाबदारी निभावली.(३) **विधवांसाठी शाळा आणि निवारा** विधवांच्या पुनर्विवाहाला समाजात विरोध होता. त्यामुळे गर्भवती विधवांची दयनीय अवस्था होती.त्यांच्या संरक्षणासाठी फुलेंनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले हे भारतातील पहिले गृह मानले जाते. (४) **दलित, बहुजन आणि वंचितांसाठी शिक्षण** ब्राह्मणेतर समाजाला शाळेत प्रवेश नाकारला जात असताना फुलेंनी त्यांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या. त्या काळात दलितांना पाणी देणेही निषिद्ध असताना त्यांनी शाळेजवळ सार्वजनिक टाकी उभारली. (५) **शिक्षणाचे तत्त्वज्ञान महात्मा फुले** म्हणत: "शिक्षण हीच खरी मुक्ती." शिक्षणातूनच समाजातील विषमता, अन्याय आणि शोषण नष्ट होईल, असा त्यांचा विश्वास होता.

**२) सत्यशोधक समाज (१८७३):** महात्मा फुलेंनी समाजातील जातीव्यवस्था, पुराणमतवाद, अंधश्रद्धा आणि धार्मिक अत्याचारांचा मुकाबला करण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाज स्थापन केला. सत्यशोधक समाजाची **उद्दिष्टे:** (१) सत्याचा शोध आणि तर्कशीलता,धार्मिक कर्मकांडांमागील सत्य तपासणे. देवपूजेच्या नावाखालील शोषण, ब्राह्मणांनी लादलेली मक्तेदारी मोडणे. (२) जातिव्यवस्थेचा विरोध "मनुष्य जन्मतः समान आहे" हा संदेश पसरवणे. उच्च-नीचतेच्या पायावर उभ्या असलेल्या सामाजिक रचनेला नष्ट करणे. (३) स्त्री-पुरुष समानता स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह, कन्या विक्रीचा निषेध. स्त्रियांच्या सर्वांगीण हक्कांसाठी लढा देताना त्यांनी (४) शोषित-वंचितांचे संघटन शेतकरी, अस्पृश्य, कामगार, कष्टकरी वर्गाला एकत्र आणून अन्यायाविरुद्ध उभे करणे.आर्थिक, सामाजिक आणि राजकीय हक्कांची जाणीव करणे.(५) साधा, सोपा विवाह सत्यशोधक विवाह: ब्राह्मण पुजाऱ्यांवर अवलंबून न राहता वाचाबद्ध विवाहपद्धती सुरू केली.हुंडा, लग्नातील दिखावूपणा यांना विरोध. ४. फुलेंचे प्रमुख ग्रंथ व विचार : गुलामगिरी,जातिव्यवस्था व ब्राह्मणशाहीवरील तिखट भाष्य. शेतकऱ्यांचा असूड – शेतकऱ्यांच्या शोषणावर प्रकाश टाकणारे परिवर्तनवादी पुस्तक,तसेच त्रुटी परीक्षा, सत्सार, इशारा, किसानकन्या इत्यादी ग्रंथांत त्यांनी समाजपरिवर्तनाचे विचार मांडले. त्यांनी समाजाला अत्यंत महत्वाचे संदेश दिलेले आहेत ते- शिक्षण, समानता, न्याय,स्त्री व दलित मुक्ती,तर्कवाद व समाजशीलता हे आहेत.सर्वात परिवर्तनवादी नेतेम्हणून ते गणले गेले आहेत त्यांनी सामाजिक न्याय ,समानता आणि मानवाधिकार यांचे दिश्दर्शक म्हणून गणले जातात.

**३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर:** यांनी भारतातील सर्व जनतेचा अभ्यास करून त्यांनी दलित चळवळ अस्पृश्यता विरोधी आंदोलन आणि सामाजिक न्याय, शिक्षण, समान हक्क, जातविरोधी चळवळ मोठ्या प्रमाणात राबविली आणि त्यातून मोठे परिवर्तन घडून आले.ते सामाजिक अन्याय आणि जातीय अत्याचारांविरोधात आयुष्यभर लढले.त्यांच्या मते- "सामाजिक न्यायाशिवाय लोकशाही अपूर्ण आहे." हे त्यांचे ठाम मत होते. (१) अस्पृश्यता निर्मूलनाचा लढा लढताना त्यांनी दलिताना पिण्याच्या पाण्याचा आणि सामाजिक अस्मितेचा लढा लढला. त्यांनी महाडचा चवदार तळे सत्याग्रह (१९२७) केला, ज्यात तत्कालीन दलितांना सार्वजनिक पाणी मिळण्याचा हक्क मिळवून दिला.काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन (२९ सप्टेंबर १९३०) माध्यमातून मंदिरात प्रवेश हा मानवी अधिकार असल्याचे सिद्ध केले. (२) कायदेशीर न्यायव्यवस्थेत बदल करण्यात ते कमी पडले नाही. संविधानामध्ये त्यांनी खालील तत्वांचा समावेश केल्याचे आपण बघत आहोत. समान नागरिकत्व,कायद्यापुढे सर्व समान,अस्पृश्यता प्रतिबंधक कायदा,आरक्षण द्वारे सर्वांना समान संधी देण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला आहे.(३) आर्थिक न्यायाचे तत्त्वज्ञान मांडताना राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील कामगारांचे हक्क, किमान वेतन, सामाजिक सुरक्षा यांची गरज त्यांनी स्पष्ट केली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण:** हि परिवर्तानाची भूमिका समजून सांगताना "शिक्षण हेच शोषितांचे शस्त्र आहे." आणि "शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, जो प्राशेल तू गुरगुरल्याशिवाय राहणार नाही." हा परिवर्तनवादी मोलाचा उपदेश त्यांनी दिला आहे.त्याना स्वतःच्या शिक्षणासाठी मोठी संघर्षगाथा सहन करावी लागली, तरी त्यांनी ते न सोडता गरीबी, जातीय अपमान, सामाजिक अडथळे असूनही ते कोलंबिया विद्यापीठ व लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे दुहेरी डॉक्टरेट प्राप्त करणारे पहिले भारतीय ठरले. आपले बहुजन शिकावे यासाठी शिक्षणाचा संदेश देताना ते म्हणाले:"Educate, Agitate, Organize (शिका, संघटित व्हा, संघर्ष करा) या संवादाने शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटविली आणि सर्वत्र क्रांती दिसून आली. त्यांनी विविध **शैक्षणिक संस्थांची स्थापना** करून मोलाचा वाटा आणि दिशादर्शक मानून देशहित जपले.त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी (१९४५), सिद्धार्थ महाविद्यालय (मुंबई), मिलिंद महाविद्यालय (छत्रपती संभाजीनगर), अशा काढलेल्या संस्थांमुळे गरीब, बहुजन, दलित विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळाली. आणि महात्मा फुले यांच्या पावलावर पावूल टाकून त्यांनी स्त्री शिक्षणावर भर दिला.स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाला सर्वोच्च स्थान दिले. संविधानातही स्त्रीसमानतेची हमी त्यांनी दिली.तसेच समान हक्कांसाठी संघर्ष सुद्धा मोठा परिवर्तनाचा भाग होता.आंबेडकरांनी दलित, आदिवासी, महिलांसह सर्वांसाठी समान हक्कांचे आंदोलन केले.

**मूलभूत तत्त्वे:** समान संधी,वर्ग, जात, धर्मभेदापासून मुक्त नागरिकत्व,सन्मानाने जगण्याचा अधिकार,राजकीय, सामाजिक, आर्थिक समता मिळावी यासाठी निर्णायक भूमिका मांडल्या गेल्या. पूना करार (१९३२) रोजी गांधीजींच्या दलित राजकीय आरक्षण धोरणा विरोधात आवाज उठविला..जातीय-विरोधी चळवळ: डॉ. आंबेडकर हे भारतातील सर्वात प्रभावी जातीय-विरोधी क्रांतिकारक होते.त्यांनी समाजातील हि अनिष्ट प्रथा दूर व्हावी यासाठी संघार्षाची पारीसिमा गाठून दलिताना बंधमुक्त कण्यात यशस्वी लढा दिला.जातव्यवस्थेवर कठोर टीका करताना त्यांनी त्यांच्या ***'Annihilation of Caste'*** (जातिनाश) या ग्रंथात त्यांनी जातव्यवस्थेचे वैज्ञानिक, सामाजिक आणि नैतिक विश्लेषण करून तिचा संपूर्ण नाश करण्याचा विचार मांडला. **बौद्ध धर्म स्वीकार (१९५६)** करताना त्यांनी "मी हिंदू म्हणून जन्मलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही." १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांसह त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. हे भारतातील सर्वात मोठे सामाजिक पुनर्जागरण ठरले.मानवी स्वातंत्र्य आणि बंधुत्व,बौद्ध तत्त्वांवर आधारित माणूसपण, करुणा, समता यांचा त्यांनी प्रसार केला.

**डॉ. आंबेडकर आणि भारतीय संविधान** भारताला देवून सर्व भारतीयांचे हक्क अधिकार मोकलाले करून मोठे योगदान आणि उपकार केलेले आहेत.मूलभूत हक्क आणि संविधानातील सामाजिक न्यायाची चौकट,दलित-बहुजनांसाठी आरक्षण,श्रमकायदे, महिला संरक्षण कायदे,धर्मनिरपेक्षता, न्यायपालिका, संसद,भारतीय लोकशाहीची पायाभरणी त्यांच्या विचारांवर आधारित आहे.आजही आपण त्याच्या वाटेवरून मार्गक्रमण करीत आहोत.त्यातून समाजहित जपताना आंबेडकर कुठेही कमी पडले नाहीत हे त्रिकालबाधित सत्य आहे. तसेच भारतातील आणखी प्रमुख **परिवर्तनवादी सामाजिक चळवळी** खालीप्रमाणे.

**१) संत चळवळी (भक्ती आंदोलन):** जातिव्यवस्था, कर्मकांड, अस्पृश्यता यांच्याविरुद्ध सामाजिक समानतेचा संदेशप्रमुख संत: संत कबीर, संत रविदास, नामदेव, एकनाथ, तुकाराम इ. २) प्रार्थना समाज (आत्माराम पांडुरंग आणि गोपाळ हरी देशमुख) अस्पृश्यता

निवारण, विधवा विवाह, मुलींचे शिक्षण धर्मात विवेकवाद आणि सुधारणा. ३) आर्य समाज (स्वामी दयानंद सरस्वती) वेदांकडे परतण्याचा आग्रह,सामाजिक समता, स्त्रीशिक्षण, स्वावलंबन मांडण्याचा प्रयत्न. ४) स्त्री-पुरुष समानता आंदोलन (फेमिनिस्ट मूव्हमेंट) स्त्री शिक्षण, हक्क, सुरक्षा, समान वेतन, पितृसत्ताक व्यवस्थेविरोधात आवाज उठविला. ५) स्वातंत्र्य चळवळ ब्रिटिश सत्तेपासून पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्यासाठी गांधी, नेहरू, सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली यशवी लढा उभाकार्ण्यात आला. ६) शेतकरी चळवळी जमीन हक्क, कर्जमाफी, शेतमालाचा योग्य दर टिळकांचे 'कृषी कायदे', सहकारी शेतकी, शेतकरी संघटना हे आंदोलन महत्वाचे ठरले. ७) कामगार चळवळी कामगारांचे वेतन, कामाचे तास, सुरक्षा,उद्योग क्षेत्रातील शोषणाविरुद्ध आंदोलन. ८) पर्यावरण चळवळी,चिपको आंदोलन, नर्मदा बचाव, जल-जंगल-जमीन चळवळ,निसर्ग रक्षण आणि शाश्वत विकासासाठीचे प्रयत्न करण्यात आले. ९) लोकशाही व मानवाधिकार चळवळी,नागरिकांचे हक्क, स्वातंत्र्य, भ्रष्टाचारविरोध,जेपी आंदोलन, आर टी आय चळवळ,अशा चळवळीतून सामाजिक हेतू लक्षात घेवून चळवळी यशस्वी करण्यात क्रांतिकारकांनी शर्थीचे प्रयत्न केलेलं आहेत.

**निष्कर्ष:** सामाजिक परिवर्तन- अस्पृश्यता, भेदभाव, सामाजिक बहिष्कार याविरुद्ध जागृती निर्माण झाली.दलित, वंचित समुदायात आत्मसन्मान, स्वाभिमान, हक्कांची जाण वाढली.माणूसपणाची आणि समानतेची भावना दृढ झाली.२) शैक्षणिक परिवर्तन-"शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" या विचाराने शिक्षणाला अत्यंत महत्व प्राप्त झाले व गती मिळाली.दलित व दुर्बल घटकांचे उच्च शिक्षणात प्रमाण वाढले.वसतिगृहे, शिष्यवृत्ती, शैक्षणिक संस्था यांची उभारणी. ३) राजकीय परिवर्तन- कमकुवत घटकांना राजकीय प्रतिनिधित्व मिळाले.अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षण व्यवस्था लागू झाली.संविधानात समानता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांची पायाभरणी. ४) कायदे आणि हक्कांचे संरक्षण-अस्पृश्यता प्रतिबंधक कायदा (१९५५), अत्याचार प्रतिबंध कायदा (१९८९) यांसारखे संरक्षणात्मक कायदे अस्तित्वात आले.सर्व नागरिकांना कायद्यापुढे समान हक्क प्राप्त झाले. ५) सामाजिक समानता,शैक्षणिक प्रगती,राजकीय सक्षमीकरण,कायदेशीर संरक्षण,सांस्कृतिक परिवर्तन या क्षेत्रांत मूलभूत बदल घडले. ६) धार्मिक-सांस्कृतिक परिवर्तन- १९५६ मध्ये धम्म-दीक्षा आंदोलनातून लाखो अनुयायांनी बौद्ध धर्म स्वीकारल्याने सामाजिक क्रांती घडून आली..तसेच जातीय रूढी, अंधश्रद्धा, कर्मकांडाविरुद्ध विचारप्रवाह निर्माण झाला.

**संदर्भ सूची:**

१) Raja Rammohan Roy: A Critical Biography — Amiya P. Sen Published Oct.2012
२) Raja Rammohan Roy and the Process of Modernisation in India — V.C.Joshi 1975 Published Vikas Publishing House New Delhi.
३) "गुलामगिरी" ज्योतीराव गोविंदराव फुले प्रकाशक सरिता प्रदीप गायकवाड समता प्रकाशन डॉ.बाबासाहेब आंबेडकर उड्डाण पूल,लष्कारीबाग,नागपूर-१७
४) शेतकऱ्यांचा आसूड ज्योतीराव गोविंदराव फुले प्रकाशक शब्दालय प्रकाशन ISBN:९७८- ८१९४४१७६२०
५) जाती संस्थेचे उच्चाटन डॉ.भीमराव रामजी आंबेडकर प्रकाशक आनंद प्रकाशन २०१३ जयसिंगपुरा औरंगाबाद ४३१००४
६) The RTI Story : power of people लेखक अरुणा रॉय प्रकाशक रोली बुक्स,२७/३/२०१८ ISBN ९७८८१९३६२६०४७
७) जे.पी. आंदोलन (परिवर्तनवादी लोकतांत्रिक चळवळ) The JP Movement: Emergency and India's Democracy — Bimal Prasad Publicing Manohar Publishers and distributors (2000)

# मराठा आरक्षण आणि युवकांची स्थिती: (विशेष संदर्भ - मराठवाडा )

**डॉ. सुनील व्यंकटेश सामग** सहाय्यक प्राध्यापक आणि समाजशास्त्र विभागप्रमुख, संत रामदास महाविद्यालय घनसावंगी जि.जालना

**सारांश:** महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय भूदृश्यावर मराठा आरक्षणाचा प्रश्न एक गंभीर आणि ज्वलंत मुद्दा बनून उभा आहे. ऐतिहासिकपणे शक्तिसंपन्न समजल्या गेलेल्या या समुदायाच्या मोठ्या एका घटकाला आज आर्थिक मागासलेपणा, शैक्षणिक प्रतिगामित्व आणि सार्वजनिक क्षेत्रातील प्रतिनिधित्वाची उणीव यांचा सामना करावा लागत आहे. मराठवाडा हा प्रदेश, जो आर्थिक दुर्बलता, दुष्काळाची पुनरावृत्ती आणि औद्योगिक पिछाडीपणाच्या समस्यांनी ग्रस्त आहे, तो या संघर्षाचे प्रबळ केंद्र बनला आहे. येथील मराठा युवकांमध्ये निराशा, बेरोजगारी आणि सामाजिक न्यायासाठीची तीव्र इच्छा एकवटली आहे. हा शोध निबंध या प्रादेशिक संदर्भात, मराठा आरक्षणाच्या मागणीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, कायदेशीर व राजकीय प्रवास, तसेच त्याचा मराठवाड्यातील युवकांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि मानसिक स्थितीवर होणारा प्रभाव यांचे सखोल विश्लेषण करतो. लेखातून असे दिसून येते की आरक्षण ही मागणी केवळ नोकरीची हमी नसून, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय हक्क आणि आर्थिक सुरक्षिततेच्या भावनेशी निगडित आहे. परंतु, केवळ आरक्षण हा एकटा रामबाण उपाय नसून, मराठवाड्यासारख्या प्रदेशासाठी सर्वंकष विकास, शेतीवरील अवलंबन कमी करणे, उद्योजकता आणि कौशल्यविकासाला चालना देणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सुलभता निर्माण करणे हीच शाश्वत उपाययोजना आहेत, असा निष्कर्ष या लेखात मांडला आहे.

**बीजशब्द:** मराठा आरक्षण, मराठवाडा, युवक, सामाजिक-आर्थिक मागास वर्ग (SEBC), शैक्षणिक मागासलेपणा, बेरोजगारी, सामाजिक न्याय, राजकीय चळवळ, कायदेशीर खटला, सामाजिक समावेशन, आर्थिक विकास, शेती संकट.

**प्रस्तावना:** महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय इतिहासात मराठा समाजाचा वारसा अभिमानास्पद आणि प्रभावशाली राहिला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समरसतेच्या तत्त्वज्ञानापासून ते सामाजिक सुधारणांच्या चळवळीपर्यंत या समाजाने महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र, स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक सुधारणा, शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि आरक्षणाच्या धोरणांमुळे निर्माण झालेल्या नव्या सामाजिक शक्तिसंतुलनामध्ये समाजाच्या एका मोठ्या घटकाला स्वतःला मागासलेले आणि वगळले गेलेले वाटू

लागले. 1990 नंतर जागतिकीकरणाने शेतीक्षेत्रावर दबाव निर्माण केला, त्यातच पाऊसअभाव, पाण्याची टंचाई आणि शेतीमालाला भाव न मिळणे यामुळे मराठवाड्यासारख्या शेतीप्रधान प्रदेशातील मराठा कुटुंबांचे आर्थिक पाया कोसळू लागले. शिक्षण खर्च वाढला, परंतु सार्वजनिक शिक्षणाची गुणवत्ता झपाट्याने घसरली. सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण कमी झाले तर खासगी क्षेत्रात जातीय नेटवर्किंगचा प्रभाव वाढला अशा परिस्थितीत, शैक्षणिकदृष्ट्या सक्षम असूनही मराठा युवकांना रोजगाराच्या संधी मिळणे कठीण झाले.

या सर्व पार्श्वभूमीवर, आरक्षण हे एकमेव राजकीय व सामाजिक औषध म्हणून पुढे आले. 1997 मध्ये पहिल्यांदा मागणी उमटली, 2014 च्या मुक्कामाच्या आंदोलनाने ती जोर धरला, 2016-18 मध्ये स्वरूपाच्या मोर्च्यांनी राज्य थैमान घातले आणि 2024 मध्ये श्री मनोज जरांगे पाटील यांच्या सक्रिय आंदोलनाने हा प्रश्न पुन्हा एकदा तीव्र झाला. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद), बीड, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद ही जिल्हे या आंदोलनाची तीव्र केंद्रे बनली. या निबंधाचे मुख्य लक्ष येथील युवकांच्या मानसिक जगात आरक्षणाच्या या भूकंपाने निर्माण केलेल्या बदलांचे आणि त्यांच्या वास्तविक जीवनावरील परिणामांचे निरीक्षण करणे आहे.

**विषयाचे महत्त्व:**

**राज्याची सामाजिक शांतता:** महाराष्ट्राची सुमारे 32-33% लोकसंख्या असलेला मराठा समाज जर स्वतःला वंचित समजू लागला, तर राज्याच्या सामाजिक सौहार्दावर व राजकीय स्थैर्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात.

**युवाशक्तीचे अपव्यय:** मराठवाड्यातील हजारो पदवीधर युवक बेरोजगारीच्या चक्रव्यूहात सापडले आहेत. त्यांची ऊर्जा, प्रतिभा आणि वेळ याचा अपव्यय रोखणे हे राष्ट्रीय हिताचे ठरते.

**प्रादेशिक असमानतेचे प्रतीक:** मराठवाडा विरुद्ध पश्चिम महाराष्ट्र या असमानतेच्या चर्चेतील मुख्य मुद्दा आरक्षण आहे. या विषयाचा अभ्यास प्रादेशिक विकासाच्या धोरणांची पुनर्मांडणीसाठी आवश्यक आहे.

**आरक्षणाच्या कल्पनेतील बदल:** आरक्षण हे केवळ अनुसूचित जाती-जमातींसाठी आहे या कल्पनेत बदल होऊन, ते आर्थिक व सामाजिक मागासलेपण्याच्या व्यापक निकषांवर आधारित असावे या चर्चेला हा प्रश्न बळ देते.

**लोकशाही आणि आंदोलनशास्त्र:** सोशल मीडिया, रस्त्यांचे आंदोलन, राजकीय दबाव यांचा वापर करून युवक कसे प्रभावीपणे लोकशाही प्रक्रियेवर दबाव आणू शकतात, याचे हे एक उदाहरण आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे** 1.मराठवाड्यातील मराठा युवकांच्या सध्याच्या शैक्षणिक प्रगती, बेरोजगारीच्या दर आणि आर्थिक आव्हानांचे आकलन करणे. 2.मराठा आरक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, कायदेशीर लढा (इंद्रा साहनी गृहस्थाने, एम.सी.आय.आय. व अन्य निकाल) आणि राजकीय पटावर झालेले बदल यांचे मूल्यांकन करणे. 3.आरक्षणाच्या चळवळीने मराठवाड्यातील युवकांच्या सामाजिक संबंधांवर (इतर मागास वर्ग, दलित समुदाय यांच्याशी), त्यांच्या राजकीिक विचारसरणीवर आणि भविष्याच्या अपेक्षांवर केलेला परिणाम शोधणे. 4.मराठा समाजासाठी 'सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग' (SEBC) हा दर्जा मिळण्याच्या प्रक्रियेतील सामाजिक-राजकीय चर्चेचे विश्लेषण करणे. 5.आरक्षणाव्यतिरिक्त, मराठवाड्यातील युवकांसाठी शाश्वत आर्थिक संधी निर्माण करण्याच्या संभाव्य उपाययोजनांचा शोध घेणे.

**गृहीतके:** "मराठवाड्यातील मराठा युवकांची आरक्षणाची मागणी ही केवळ नोकरीची गरज नसून, एक सामूहिक सामाजिक - मानसिक प्रतिक्रिया आहे, जी प्रदीर्घ आर्थिक असुरक्षा, शैक्षणिक निकषांवरील अविश्वास, राजकीय अप्रतिनिधित्व आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या ह्रासाच्या भावनेतून निर्माण झाली आहे. तथापि, आरक्षणाचा लाभ मराठवाड्यातील गरिबी रेषेखालील व सीमांत शेतकरी कुटुंबातील युवकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी पारदर्शक निकष, व्यापक आर्थिक पुनर्वसन धोरणे व प्रादेशिक विकासाच्या कार्यक्रमांची अत्यावश्यकता आहे. केवळ टक्केवारीचे राजकारण या समस्येचे स्थायी निराकरण करू शकणार नाही."

**पद्धतीशास्त्र:** हा शोध निबंध मुख्यतः विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक (Analytical and Descriptive) पद्धतीवर आधारित आहे. संशोधनासाठी खालील पद्धती व स्रोत वापरण्यात आले.

**दुय्यम स्त्रोतांचे संशोधन:** पुस्तके आणि प्रबंध: मराठा समाज, आरक्षण धोरण, मराठवाड्याच्या अर्थव्यवस्थेसंबंधीचे शैक्षणिक ग्रंथ. नियतकालिके व संशोधन लेख:'इकोनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली', 'सोशियोलॉजिकल बुलेटिन', 'महाराष्ट्र सार्वजनिक विचार' यांसारख्या नियतकालिकांमधील लेख. वृत्तपत्रे:'लोकमत', 'सकाळ', 'महाराष्ट्र टाइम्स', 'इंडियन एक्सप्रेस' यांमधील संबंधित बातम्यांचे संकलन व विश्लेषण (2014 ते 2024). ई-संसाधने:सरकारी वेबसाइट्स, RBI संकेतस्थळ, NSSO डेटाबेस, विद्यापीठांचे अहवाल.

**सरकारी व कायदेशीर दस्तऐवज:** महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग(MSBC) चा अहवाल (2018). संपर्क समितीचाअहवाल (2016). महाराष्ट्र सरकारचेSEBC कायदे (2018, 2024) आणि सर्वोच्च न्यायालयातील त्यांवरील युक्तिवाद. भारत निर्वाचन आयोगाच्या माहितीनुसार मराठवाड्यातील विधानसभा निवडणुकांचे निकाल व विश्लेषण.

**सांख्यिकीय विश्लेषण:** जनगणना2011 मधील मराठवाड्याची सामाजिक-आर्थिक माहिती. NSSO च्या75व्या फेऱ्यातील (2017-18) बेरोजगारी आकडेवारी. महाराष्ट्र शासनाच्या'मराठवाडा विभागाचा आर्थिक सर्वेक्षण'. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील प्रवेश व नोकरी नियुक्तीचे आकडे.

**व्यष्टी अध्ययन (Case Study ) व सामग्री विश्लेषण (Content Analysis):** मराठवाड्यातील आरक्षण आंदोलनातील प्रमुख घटनांचे(जसे की, कोरेगाव पार्क सत्याग्रह, जळगाव येथील प्रदर्शन) विश्लेषण. आंदोलन नेतृत्वकर्त्यांचे भाषणे, माध्यमांतील मुलाखती, सोशल मीडिया पोस्ट्स यांचे विषय आणि भावनिक स्वरूप यांचे परीक्षण.

**तुलनात्मक पद्धत:** गुजरातमधील पटेल आंदोलन,हरियाणामधील जाट आंदोलन यांच्याशी मराठा आंदोलनाची तुलना. महाराष्ट्रातील इतर विभागांच्यातुलनेत मराठवाड्याच्या आर्थिक निर्देशकांचे परीक्षण.

**चर्चा आणि विश्लेषण:**

1. मराठवाड्यातील मराठा युवकांची आर्थिक स्थिती: शेतीवरील अवलंबित्व, कर्जबाजारीपणा, भूमिहीन शेतमजूर म्हणून काम, अल्पभूधारकांची स्थिती, शहरांमध्ये रहायला जाणाऱ्या युवकांचे अर्धवट रोजगार यांचे विश्लेषण.

2.शैक्षणिक परिस्थिती: उच्च माध्यमिक नंतरचा मोठा दर, खासगी महाविद्यालयांवरील अवलंबन, अभियांत्रिकी-वैद्यकीय शिक्षणाचा जबरदस्त खर्च, प्रवेशापेक्षा पदवीचे मूल्यह्रास, बेरोजगार पदवीधर युवकांची वाढती संख्या.

3.आरक्षणाचा राजकीय प्रवास: 1997 चा पहिला आंदोलन, 2014 चे मुक्काम, 2016-18 चे मोर्चे, 2024 चे पुनरुत्थान. प्रत्येक टप्प्यावरची राजकीय प्रतिक्रिया, सत्ताधारी व विरोधी पक्षांची भूमिका.

4.कायदेशीर आव्हाने: इंद्रा साहनी खटल्यातील 50% ची मर्यादा, 'अतिशय मागासलेपणा'चे निकष, आरक्षणाची पुरेशा प्रमाणात माहिती नसणे, राज्य आयोगाच्या शिफारशींवरील सवाल. 2024 मधील कायदा व सर्वोच्च न्यायालयातील त्याचे भवितव्य.

5.सामाजिक परिणाम: मराठा आणि OBC यांच्यातील तणाव, मराठा आणि दलित यांच्यातील संघर्षाची शक्यता, समाजातील एकात्मतेवर परिणाम. आरक्षण मिळालेल्या मराठा युवकांच्या अनुभवांचा (जर असतील तर) अभ्यास.

6.मानसिक आरोग्यावर परिणाम: निराशा, आत्महत्येचे प्रमाण (जरुंजे, पाटील प्रकरणे), कुटुंबांवरील ताण, भविष्याबद्दलची चिंता, सामाजिक दबाव.

7.आरक्षणापेक्षा विकल्प: एम.एस.एम.ई. क्षेत्राला चालना, कृषि-उद्योग, पर्यटन विकास (अजिंठा-वेरूळ, नलदुर्ग), कौशल्यविकास मिशन, स्टार्ट-अप धोरणे, शेतीतून दूर होण्यासाठी पुनर्वसन.

**निष्कर्ष (Conclusion):** मराठवाडाहा प्रदेश मराठा आरक्षणाच्या संघर्षाचे केवळ एक नाट्यक्षेत्र नसून, एक सक्रिय साक्षीदार आणि एक भोक्ता देखील आहे. येथील युवकांच्या चेहऱ्यावरील निराशा, त्यांच्या आवाजातला आक्रोश आणि त्यांच्या कृतीतील हताशा ही केवळ एका जातीची नव्हे, तर एका संपूर्ण प्रदेशाच्या आर्थिक अपंगतेची निदर्शक आहे. आरक्षण हा त्यांच्या दृष्टीने एक सोपा, ठोस आणि तत्काळ मिळण्याजोगा उपाय वाटतो, जो त्यांना शासनाच्या व्यवस्थेतील भागिदारीची भावना देतो. मात्र, या संशोधनानुसार हे स्पष्ट झाले आहे की, आरक्षण हे लक्षणाचे उपचार आहे, रोगमूळचे नव्हे. मराठवाड्याच्या मुळातील समस्या म्हणजे शेतीचे संकट, औद्योगिक पिछाडीपणा, गुंतवणुकीचा अभाव आणि दर्जेदार शिक्षणाची तूट. जोपर्यंत हे मूलभूत प्रश्न सोडविले जात नाहीत, तोपर्यंत आरक्षणाने मिळालेली नोकरी देखील पुरेशी समाधानकारक ठरू शकत नाही, कारण ती व्यक्तीचा विकास करू शकेल, पण प्रदेशाचा नाही. त्यामुळे, एका बाजूला आरक्षणाच्या कायदेशीर प्रक्रियेला पूर्ण बळ द्यायचे, तर दुसऱ्या बाजूला 'मराठवाडा आर्थिक पुनरुज्जीवन आराखडा' सारख्या विशेष धोरणाची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. युवकांना शेतीपेक्षा वेगळे पर्याय द्यावे लागतील. कौशल्यविकास आणि उद्योजकता हे नवे मंत्र ठरू शकतात. शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे, तंत्रज्ञानाचा प्रसार करणे आणि स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण करणारे उद्योग आणणे हे दीर्घकालीन उपाय आहेत. शेवटी, मराठा आरक्षणाचा प्रश्न केवळ एका समाजाचा नसून, संपूर्ण महाराष्ट्राच्या सामाजिक न्याय, आर्थिक वाटचाल आणि राजकीय भवितव्याचा प्रश्न आहे. मराठवाड्याची दुःखे दूर करणे, म्हणजे महाराष्ट्राच्या एका मोठ्या भागाची दुःखे दूर करणे आहे. आरक्षणाच्या बाबतीत समतोल साधताना, युवकांच्या ऊर्जेला सकारात्मक दिशा देणारी विकासाची योजना हाच खरा मार्ग आहे, हे या शोध निबंधाचे चे अंतिम सार आहे.

**संदर्भ (References):**

1.गाडगीळ, द.रा. (2020). महाराष्ट्रातील समाजरचना आणि बदल. पुणे: देशमुख आणि कंपनी.
2.पाटील, शरद. (2019). मराठवाडा: आर्थिक मागासलेपण्याची मुळे. औरंगाबाद: मराठवाडा साहित्य परिषद.
3.महाराष्ट्र राज्य मागास वर्ग आयोगाचा अहवाल (2018). मुंबई: महाराष्ट्र शासन.
4.जाधव, भास्कर. (2021). "मराठा आरक्षण: सामाजिक न्यायाचा नवा प्रयोग", सामाजिक विज्ञान दर्पण, खंड 28, क्रमांक 3, pp. 45-62.
5.देशपांडे, राजेश्वरी. (2017). युवा आणि बेरोजगारी: महाराष्ट्राचा अनुभव. नाशिक: कॉन्सेप्ट पब्लिशिंग.
6.संपर्क समितीचा अहवाल: मराठा समाजाची सामाजिक-आर्थिक स्थिती (2016). मुंबई: महाराष्ट्र शासन.
7.लेले, जयंत. (2015). आरक्षण आणि राजकारण. दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
8.भोसले, महेंद्र. (2023). "मराठवाड्यातील शैक्षणिक संक्रमण आणि युवा आकांक्षा", शिक्षण आणि संशोधन, खंड 19, क्रमांक 2, pp. 101-115.
9.शिंदे, अशोक. (2022). मराठा चळवळ: स्वरूप आणि दिशा. कोल्हापूर: राजहंस प्रकाशन.
10.भारतीय सर्वोच्च न्यायालयाचा निकाल: जनहित याचिका क्र. 123/2018 (महाराष्ट्र SEBC कायदा).

# पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दुष्काळ निर्मुलन ते सम न्यायी पाणी वाटप चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास (सांगली जिल्हा विशेष)

**डॉ. संजय शामराव कांबळे** सहय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग शिक्षणमहर्षी डॉ. बापुजी साळुंखे महाविद्यालय, मिरज

**गोषवारा:** प्रस्तुत शोध निबंध हा पश्चिक महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दुष्काळ निर्मुलन ते सामान्य पाणी वाटपाची चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात येणार आहे. या शोध निबंधातग ग्रामीण भागातील जनतेने दुष्काळ निर्मुलन पासून ते पाण्याचे सम न्यायी लोकसहभागातून चळवळ सांगली जिल्ह्यात उभारण्यात आली. हि चळवळ ग्रामीण भागात पाण्याच्या व्यवस्थापन करिता पर्यायी विकारास आधारित पर्यावरण पूरक चिरंगीवी विकास सोबत समन्यायी पाणी वाटपाची नवीन चळवळीच्या सैद्धांतिक चौकटी मधून सादरीकर केले आहे. सदरच्या शोध निबंध हा गुणात्मक पद्धती आधारे या चळवळीचे ऐतिहासिक वर्णनात्मक आणि विशालेशात्मक पद्धती उपयोग करून करण्यात आला आहे. याचबरोबर व्यष्ठी अध्ययन पद्धतीचा वापर करून सांगली जिल्ह्यातील दुष्काळ निर्मुलन ते समन्यायी पाणी वाटप चळवळीचा अभ्यास करण्यात आला आहे. या शोध निबंधात सांगली जिल्ह्यातील ग्रामीण दुष्काळ भागातील जनतेने दुष्काळ निर्मुलन, बळीराजा धरण बांधणी, पर्यावरण बचावाकरिता वाळू चोरीसं विरोध, पर्यायी विकास धोरण, पाणी संघर्ष चळवळ आणि समन्यायी पाणी वाटप कडे वाटचाल याविषयी सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. या चळवळीची पार्श्वभूमी, प्रश्न, विचारसरणी, नेतृत्व आणि सरकारी धोरण मधील परिवर्तन आणि याचा ग्रामीण भागातील जनतेच्या विकासावरील झालेल्या परिणामा यांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

**मुख्य शब्द** – ग्रामीण सामाजिक चळवळ, दुष्काळ, विकास, पाणी, समन्याय

**प्रस्तावना:** ग्रामीण भागातील लोक चळवळीचा विशेषतः शेतकरी चळवळीचा अभ्यास करण्यात अनेक समाजशास्त्राच्या अभ्यासकाने लक्ष केंद्रित केले आहे. त्यांनी साम्राज्यवाद, वसाहतकालीन, भांडवलशाही आणि समकालीन समाजव्यवस्था यांचा ऐतिहासिकदृष्ट्या व्यापक स्तरावर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि सामुदाईक अस्मितेच्या आधारे संसाधनाच्या वाटपा बाबत देशातर्गत संघर्चाचे विश्लेषण केले आहे. असे जरी असले तरी नैसर्गिक संसाधांची कमतरता आणि पर्यावरणाचा असमतोल याची व्यापक मानवी जाणीव हि संसाधन आधारित जीवनमान व्यावहारिक स्तरावर्ती अवलंबित आहे. ग्रामीण भागात पर्यावरणाच्या असमतोलाच परिणाम संसाधनाच्या वापरकर्ता समूहातील समाजिक संघर्षात रूपांतरित होते. हा संघर्ष सामुदायिक संसाधनाच्या वापराशी संबंधित स्थानिक, श्रीमंत शेतकरी आणि गरीब शेतकरी, शेतमजूर, दलित, आदिवासी, भटके विमुक्त सामुदायी, भूमिहीन आणि स्त्रिया यांच्यातील जात,वर्ग, लिंगभाव यासामाजिक संबंध आधारित आणि पर्यावरणाच्या समतोलच्या पातळीवरती अधिक अधोरेखित होताना दिसून येतो. या चळवळीने प्रादेशिकतेच्या पातळीवर पलीकडे जाऊन देशातील ग्रामीण सामाजिक चळवळीच्या व्यापक स्त्रावर्ती दिशादर्शक महत्वपूर्ण भूमिका नवीन चळवळ म्हुणुन समोर येतात.

ग्रामीण चळवळी म्हणून शेतकरी चळवळ म्हणून ओळखली म्हणून समाजिक शास्त्रात लेखन समोर येताना पाहण्यास मिळते. अस जरी असले तरी ग्रामीण भागात दुष्काळ निर्मुलन पासून पर्यायी विकास समन्यी वाटपाच्या पायाभूत प्रश्ना आधारित सामाजिक संघर्ष लक्षकेन्द्री स्थानिक स्तरावरील अनेक  नवीन ग्रामीण चळवळी दृष्ट्रीषेप टाकणे महत्वाचे आहे. प्रस्तुत संशोधन निबंधात सन १९८० महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दुष्काळ निर्मुलन कडून समन्यायी वाटपाच्या चळवळीचा अभ्यास करण्यात आला आहे. दुष्काळी भागातील जनतेचा दुष्काळ निर्मुलन पासून नैसर्गिक संसाधन म्हून पाण्याच्या समन्यायी वाटपाच्या मुद्द्यावार्तील चळवळ उभारण्यात आली यासाठी दुष्काळ निर्मुलन करिता बळीराजा धारण बांधणी, वाळू चोरी वरील नियत्रण, कृष्णा खोरे अंतर्गत पाणी योजनाच्या समन्यायी वाटपाच्या सामुहिक लोक चळवळ उभारण्यात आली. यामध्ये दुष्काळ निर्मुलन, बळीराजा धरणाची बांधणी हि पर्यावरण संतुलित शेती, पर्यायी विकास धोरण आणि समन्यायी पाणी वाटप यां प्रश्नाची सामूहिक जन आंदोलने, सरकार धोरणाची पुर्ननिमिती आणि अंमलबजावणीचा समन्यायी आणि चिरंजीवी विकासाचा सामाजिक पर्यावरणीय आणि विचारसारणी पैलू आधारित वाटचालीच्या परिणाम दृष्ट्रीषेप टाकण्यात आला आहे.

**संशोधनाचा उद्देश :** प्रस्तुत संशोधनचा उद्देश हा पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दुष्काळ निर्मुलन ते समन्यायी पाणी वाटप चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे हा आहे याचा खालील उद्देश ठरविण्यात आले आहे. १. भारतातील ग्रामीण चळवळ समजून घेणे. २. भारतातील ग्रामीण चळवळीच्या विकासाचा आढावा घेणे ३. पश्चिम महाराष्टातील सांगली जिल्यातील दुष्काळ निर्मुलन ते समन्यायी पाणी वाटप चळवळीचे समजशास्त्रीय सविस्तर विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धतीशास्त्र:** प्रस्तुत शोध निबंधाकरिता गुणात्मक पद्धतीचा वापर करून वर्णनात्मक पद्धती आणि चिकित्सक पद्धतीचा वापर करून प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोताचा वापर केला आहे या मध्ये कार्यकर्त्यांच्या चर्चा आणि मुलाखती, सहभागी निरीक्षण, पद्धतीचा वापर करून समाजशास्त्रीय विश्लेषण केले आहे पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील दुष्काळ निर्मुलन ते समन्यायी पाणी वाटप चळवळीचा सूक्ष्म अभ्यास पद्धतीचा वापर करून विश्लेषण केले आहे या साठी दुय्यम सामग्री म्हणून वृतपत्र, मासिके, शोध पत्रिका पुस्तके आणि इंटरनेट वेबसाईट यांचा वापर करून लेखन संदर्भ म्हणून वापर केले आहे

**भारतातील ग्रामीण सामाजिक चळवळीचा अभ्यास: सैद्धांतिक समाज:** भारतात ग्रामीण सामिजिक चळवळीचा अभ्यास हा सामाजिक परिवर्तन, असमानता, आणि शोशांच्या प्रश्नांना ग्रामीण जनतेने सामुदाईक आंदोलनाचे समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र या अभ्यास शाखात महत्व पूर्ण केला जातो. हि चळवळ वसाहतीक पूर्व आणि उत्तर शेतकरी चळवळ अशा दोन भागत विभागणी करण्यात आली आहे. ग्रामीण चळवळीच्या अभ्यासात मध्ये समाज शास्त्रज्ञ प्रा ऐ. आर देसाई आणि प्रा डी. एन धनागरे यी शेतीचे संबंध आणि वर्ग संघर्ष या मुख्य मुद्यावार्ते लक्ष केंद्रित केले आहे त्यांनी ग्रामीण भागातील जमिनीच्या मालकी हक्का पासून ते संसाधनाच्या वापरा पर्यंतच्या संघर्षावर आधारित चळवळीचा अभ्यास केला आहे. तसेच ग्रामीण चळवळीच्या अभ्यासात जात आणि असमानता या मुद्द्यावर्ती लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. या चळवळी जाती श्रेणीरचनेच्या आधारे होणाऱ्या होणर्या शोषणाच्या विरोधात समान संधी आणि हक्क बाबात संघर्ष उभारताना दिसून येतात. या चळवळी मध्ये आधुनिक काळातील शेतकरी चावालिनी आर्थिक प्रश्न म्हणून उत्पादन आधारित हमिभाव, कर्ज माफी, शेतकरी आत्महत्या आणि चांगल्या व्यापार पेठाची उपलब्धत याविषयी आंदोलन करताना दिसतात. तसेच या चळवळीनी पर्यावरणाच्या रास, विकास प्रकल्प पासून विस्थान आणि नैसर्गिक संसाधांवरील पारंपारिक हक्क कारीतीअचे आंदोलन इत्यादीचा (चिपको आंदोलन आणि नर्मदा बचाव)प्रश्नावरती उभारताना दिसून येते. या बरोबर ग्रामीण भागात राजकीय प्रशानावर्ती भारतीय किसान युनियन यांनी राजकीय परिवर्तन करिता राज्य योजनामध्ये परिवर्तन उभारण्यात आली.

**ग्रामीन सामजिक चळवळीलींचा ऐतिहासिक आढावा:** ग्रामीण चळवळीचा अभ्यस १९७४ पासून समाजशास्त्रज्ञ यांनी ग्रामीण जनतेच्या चळवळीचा अभ्यास एकत्रितरित्या करण्यात आला. ( घनश्याम शहा २००४) यामध्ये सुनील सेन (१९८२) यांनी एकोणीसाव्या शतकाच्या मध्यादरम्याण आणि २० व्या शतका दरम्यान ग्रामीण भागात उदयास आलेल्या चळवळीचा करण्यावर्ती लक्ष केंद्रित केले. या अभ्यासात प्रा. ए आर देसाई (१९७९, १९८६) स्वातंत्र पूर्व व काळातील ग्रामीण जनतेची चळवळ असे म्हणतात तर स्वातंत्र उत्तर काळातील चळवळीना शेतकरी चळवळ असे म्हणतात. प्रा. धनागरे आणि एरिक स्ट्रोक (१९७८) यांनी स्वातंत्र पूर्व काळातील शेतकरी चळवळीचा अभ्यास भोतिक स्त्रावर्ती केला प्रा. धनागरे (१९७९, १९८६) प्रथम पासून ग्रामीण चळवळीच्या उभारणीचा अभ्यास करताना त्या चळवळीचा ऐतिहासिक संदर्भ जाणून घेणे महत्वाचे आहे बालगोपाल (१९८८) यांनी स्वातंत्र उत्तर काळातील ग्रामीण जन आंदोलनाचे विश्लेषण करताना त्यातील वस्तुनिष्ठ परिस्थिती वरती अधिक भर दिला आहे. ग्रामीण चळवळी सुरवातीचा अभ्यास हा वसाहतीक पूर्व (१९४७ पूर्व) हि हिंसक आणि सविनय पद्धतीने प्रतिरोधात्मक आंदोलन म्हणून नील अनोद्लन १८५९-६० आणि चम्पा अरण्य सत्याग्रह १९१७ आणि जमीनदार आणि सावकार यांच्या विराधातील आंदोलन उभारण्यात आली. स्वतंत्र उत्तर कळतात (१९४७-१९६०) या शेतकरी आंदोलन हि समुदाय विकास करिता जमीन सुधारणा आणि भूदान चळवळी स्वयम सेवी चळवळी उभारण्यात आल्या. प्रा. ए आर देसाईच्या (१९७९) निरीक्षणानुसार ब्रिटीश काळातील त्यानंतर भारतातील ग्रामीण जनता संघर्ष करीत, उठाव करीत, तर कधी सशस्त्र उठाव करत होती त्यातून ग्रामीण चळवळीची निर्मितीला गती प्राप्त झाली. त्यांच्या मते ब्रिटीश काळातील चळवळीला ग्रामीण जनतेची चळवळ म्हणून सुरु झाली. हरित क्रांती उत्तर काळात (१९६० नंतर ) भारतातील ग्रामीण चळवळना १९७४-७५ नंतर प्रसिद्धी मिळाली. रणजीत गुहा (१९८३) यांच्या मते, ब्रिटीश सत्ताधीशानुसार सुमार पहिल्या पाऊणशे वर्षात ग्रामीण चळवळी त्या भागां पुरत्या मर्यादित किवा ठराविक वर्गापुरत्या मर्यादित तीव्र उभारण्यात आला. ग्रामीण चळवळ हि बंडखोर वृत्ती विचारसरणी मधून उभारण्यात आली. ग्रामीण चळवळीने हरित क्रांती चा परिणम असमंत विषयी आंदोलने उभारताना दिसतात उदा नक्षलवादी चळवळ सोबतचे १९७० मध्ये नवीन शेतकरी चळवळ उदयास येताना दिसते या चळवळीने विशिष्ठ आर्थिक मागणी सोबते मध्यम आणि श्रीमंत शेतकरी जमीन हक्का बाबतची चळवळ उभारण्यात आली. हरित क्रांती नंतरच्या काळात ग्रामीण जनतेने चळवळ शेतीविषयक प्रश्नांच्या आधारे शेतीमालाला किफाईतशीर भाव, प्रादेशिक असमानता वीजदर, पाणीदर याविषयी सह्याची मागणी करण्यात आली ( गेल ओम्वेत १९९३, ब्रास १९९४, गुप्ता १९९७, लिंडबर्ग १९९७). मीण चळवळीच्या विविध मुद्यावर सुनील सेन (१९७२), चौधरी (१९७३) एन जी रंग आणि एस सरस्वती (१९७९) आंध्रप्रदेशवर तर नंबुद्रीपाद (१९४३) टी के ओम्मेण (१९८५) केरळ, पिटर कस्तर (१९८७), सेनगुप्ता (१९८६), राजेंद्र (१९९२), पार्थ चटर्जी (१९९८२, १९८३, १९८६) आणि दीपंकर गुप्ता यांनी ग्रामीण जनतेच्या चळवळीचा अभ्यास केला, समकालीन काळात २०२०-२०२१ या काळात जागतिकीकरण अरिष्ठ विरोधी आंदोलने, विकास प्रकल्प आणि विस्थापन विरोधी चळवळी, शेकार्यानी नवीन शेतकीविषयककायद्याच्या विरोधात आंदोलन, शेतकरी कर्ज मुक्ती आणि आत्महत्या विषयी आंदोलन करण्यात आले. या करितात आधुनिक पद्धती आणि सामाजिक माध्यमाचा वापर करून यशस्वी आंदोलन करण्यात आली. प्रस्तुत शोध निबंध हा पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण सामाजिक चळवळीचा दुष्काळ निर्मुलन ते समन्यायी पाणी वाटप चळवळ याचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्यात येणार आहे.

**भारतातील ग्रामीण सामाजिक चळवळीची सैद्धांतिक समाज:** ग्रामीण सामाजिक चळवळीचा सैद्धांतिक विश्लेषण अभ्यासकांनी विविध दृष्ट्रीकोनातून केला आहे यामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक, संरचनात्मक —कार्यावादी, संघर्ष दृष्ट्रीकोनातून चळवळीचे विविध पैलू, नेतृत्व आणि भारतीय समाज आणि राजकार्नावर्ती अपेक्षित परिणामाचे विश्लेषण केले आहे.भारतातील ग्रामीण सामाजिक चळवळीचे सैद्धांतिक चौकट अभ्यासताना अभिजात सिद्धांतामध्ये संसाधन गतिशीलता वंचित बरोबर जाती, शेती समस्या आणि अस्मिता यांच्या विशिष्ठ संदर्भात अभ्यास केला जातो. तर संरचनात्मक तणाव सिधात्न्त हा शेतकऱ्यांचे शोषण आणि असमानता याविषयी विश्लेषण करते. तर सांस्कृतिक आणि राजकीय गतीशिल्तेत भूदान आणि दलित चळवळीचा नवीन पर्यावरणीय चळवळ या बरोबरच प्रतीकात्मक आंतर्क्रिया दृष्ट्रीकोनात व्यवस्था परिवर्तनाच्या पैलूचा, सामुदाईक वर्तन जाती अस्मिता आणि संघर्षाचा नेतृत्व, ग्रामीण सत्ता पाळूच्या परिवर्तांच्या समज अभ्यास केला जातो .. नवीन सामाजिक चळवळ सिद्धांत हा संस्कृती, अस्मिता

राजकारण आणि नवीन जीवनपद्धती हि आदिवासी जमीन हक्क किवा पर्यावरणीय चळवळी ह्या आधुनिक विकासाला आव्हान देताना दिसतात. ग्रामीण चळवळीचे सैद्धांतिक विश्लेषण करत असताना मार्क्सवादी आणि गैर मार्क्सवादी असे वर्गीकरण करण्यात आले आहे. बिगर मार्क्सवादी विचारवंताच्या मते माक्र्सवादी विचारवंताचे प्रतिक्रियावादी, तांत्रिक आणि अतिचिकित्सक असतात. मार्क्सवादी अभ्यासक यांनी ग्रामीण चळवळीचा वर्गीयीय जाणीवेच्या आधारे वरिष्ठ, मध्यमवर्ग आणि कनिष्ठ वर्ग असे करण्यात आले आहे. यामध्ये गुहा (१९८३) चटर्जी (१९८३, १९८५), हर्दिमन (१९८७) यांचा योगदान पाहण्यात मिळतात. मार्क्सवादी विचाराचा पाया हा आर्थिक विषयाशी सबंधित असले तरी अनेक मार्क्सवादी विचाराचा पाया असणाऱ्या संशोधकांनी परंपरावादी, धार्मिक आणि सांस्कृतिक कारणाचा अभ्यस करण्यात आला. (शहा २००४). असे जरी ग्रामीण सामाजिक चळवळीचे सैद्धांतिक विश्लेषण तरी, प्रस्तुत शोध निबंधात नवीन सामाजीक चळवळीच्या सैद्धांतिक विश्लेषणकरिता वापर करण्यात येणार आहे हि चळवळ नैसर्गिक संधानाच्या समान वाटप विषयीच्या सोबत सामाजिक न्याय, पर्यायी व चिरंजीवी विकास, पर्यावरणाचा समतोल ठेवणे आणि शाशकीय योजना मध्ये धोरणात्मक परिवर्तनशी संबंधित अविस्तर चर्चा केला आहे.

**दुष्काळ निर्मुलन चळवळ:** पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्हा हा काही प्रमाणात दुष्काळाच्या संकटाला समोर जात आहे. हा दुष्काळ या भागातील जनतेच्या जीवन जाण्याचा प्रश्न म्हणून समोर येतो आहे म्हणून दुष्काळ कायमस्वरूपी संपवण्याची दिशा घेऊन दुष्काळातही , त्यातल्या त्यात बग्रा परिस्थितीत, जगण्याची चळवळ सुद्धा करणे गरजेचे होते. पण त्यासाठी दुष्काळ कायमस्वरूपी संपवण्यासाठी काय करावे याचा शोध घेऊन आराखडा तयार करणेही निकडीचे होते. त्यासाठीचा शोध आणि अभ्यास सुद्धा समांतर पद्धतीने सुरू झाला.या अभ्यासाच्या आधारावर शास्त्रज्ञ , तंत्रज्ञांच्या सहभागाने आणि गावागावातल्या जनतेच्या बळावर संपूर्ण खानापूर तालुक्यात विज्ञान यात्रा संघटित केल्या गेल्या. यामधून निर्माण झालेल्या जागृतीच्या पायावर संपूर्ण खानापूर तालुक...विज्ञान यात्रा संघटित केल्या गेल्या. यामधून निर्माण झालेल्या जागृतीच्या पायावर संपूर्ण खानापूर तालुक्यात गाव शिवारांच्या परिसरात पायी फिरून स्थानिक पाणी अडवण्या-मुरवण्याचा संपूर्ण आराखडा तयार केला गेला.या आराखड्याची अंमलबजावणी करून घेण्यासाठी आंदोलन केले गेले. शेतीवर प्रयोग करून, किमान सुखाचे जीवन जगण्यासाठी खात्रीचे पाणी किती लागते याचा अभ्यास केला गेला. खानापूर तालुक्यात पडणारे पावसाचे पाणी संपूर्ण अडविले तरीही ते या उद्देशासाठी पुरेसे होऊ शकत नाही असे या संपूर्ण अभ्यासातून सिद्ध झाले. आणि असे हक्काचे आणि खात्रीचे पाणी कोयना धरणातून देणाग्रा ताकारी योजनेचे काम पूर्ण होण्यासाठी,"ताकारी योजना समान पाणी वाटप कृती समिती"ची स्थापना झाली. दुष्काळ कायमस्वरूपी संपवण्यासाठीच्या पुढच्या टप्प्याच्या चळवळीची सुरुवात झाली.

याची सुरुवात, चिंचणी (मंगरुळ)या चळवळीच्या गावात," समान पाणी वाटप लढा परिषद" संघटित करून केली गेली.समतेच्या चळवळीतल्या जेष्ठ नेतृत्वापैकी प्रमुख पाहुणे निमंत्रित केले गेले.नवे रणशिंग फुंकले गेले. 'दुष्काळ तर सर्वच गावांमध्ये आणि सर्वच कुटुंबांना आहे मग किमान सुखाचे जीवन जगण्यासाठी खात्रीचे पाणी सर्वच गावांमध्ये आणि सर्वच कुटुंबांना, शेती उत्पादन करुन, मिळाले पाहिजे. अभ्यासाच्या आधारावर सिद्ध झाल्याप्रमाणे माणशी एक हजार घनमीटर पाणी सर्वांना मिळाले पाहिजे.अशी भूमिका या परिषदेत पक्की झाली आणि नंतर तालुकाव्यापी लढा उभारण्यासाठी मोहीम आखली गेली.या मोहिमेचा भाग म्हणूनच, ब्रिटिश काळापासून रखडलेले हिंगणगाव (बु.)धरण ताबडतोब बांधून झाले पाहिजे यासाठी चळवळ सुरू झाली. धरण बांधण्याचे काम सुरू होईपर्यंत ही चळवळ थांबली नाही. यादरम्यान दुसऱ्या बाजूला जनतेने बांधायला सुरुवात केलेल्या, आणि नदीत पाणी मुरवून भूगर्भातील पाण्याची पातळी कायम ठेवण्याचे काम करणाऱ्या वाळू सारख्या नैसर्गिक संपत्तीचे रक्षण करण्यासाठी उपाय करणाग्रा,"बळीराजा स्मृती धरण"बांधण्याची चळवळ सुरू झाली. या चळवळीने दोन मुद्यांचा आवाज संपूर्ण महाराष्ट्रात बुलंद केला. एक म्हणजे'सरकारकडे जर दुष्काळ कायमस्वरूपी संपवण्यासाठी उपाय नसेल, आराखडा नसेल तर तो जनतेने तयार केला पाहिजे'. दुसरा मुद्दा म्हणजे,' या आराखड्याची अंमलबजावणी सरकार करीत नसेल तर जनतेने ती करायला लावली पाहिजे'."बळीराजा स्मृती धरण" स्त्री-पुरुष जनतेने उभारले या संपूर्ण इतिहासाच्या पार्श्वभूमीवर, समन्यायी पाणी वाटपाची पुढची चळवळ आटपाडी आणि त्या पाठोपाठ सांगोला, तासगाव अशा तालुक्यांमध्ये वादळासारखी उभी राहिली.

याची सुरुवात , चिंचणी (मंगरुळ)या चळवळीच्या गावात," समान पाणी वाटप लढा परिषद" संघटित करून केली गेली.समतेच्या चळवळीतल्या जेष्ठ नेतृत्वापैकी प्रमुख पाहुणे निमंत्रित केले गेले.नवे रणशिंग फुंकले गेले. 'दुष्काळ तर सर्वच गावांमध्ये आणि सर्वच कुटुंबांना आहे मग किमान सुखाचे जीवन जगण्यासाठी खात्रीचे पाणी सर्वच गावांमध्ये आणि सर्वच कुटुंबांना, शेती उत्पादन करुन, मिळाले पाहिजे. अभ्यासाच्या आधारावर सिद्ध झाल्याप्रमाणे माणशी एक हजार घनमीटर पाणी सर्वांना मिळाले पाहिजे.अशी भूमिका या परिषदेत पक्की झाली आणि नंतर तालुकाव्यापी लढा उभारण्यासाठी मोहीम आखली गेली.या मोहिमेचा भाग म्हणूनच, ब्रिटिश काळापासून रखडलेले हिंगणगाव (बु.)धरण ताबडतोब बांधून झाले पाहिजे यासाठी चळवळ सुरू झाली. धरण बांधण्याचे काम सुरू होईपर्यंत ही चळवळ थांबली नाही.

यादरम्यान दुसऱ्या बाजूला जनतेने बांधायला सुरुवात केलेल्या, आणि नदीत पाणी मुरवून भूगर्भातील पाण्याची पातळी कायम ठेवण्याचे काम करणाऱ्या वाळू सारख्या नैसर्गिक संपत्तीचे रक्षण करण्यासाठी उपाय करणाग्रा,"बळीराजा स्मृती धरण"बांधण्याची चळवळ सुरू झाली. या चळवळीने दोन मुद्यांचा आवाज संपूर्ण महाराष्ट्रात बुलंद केला. एक म्हणजे'सरकारकडे जर दुष्काळ कायमस्वरूपी संपवण्यासाठी उपाय नसेल, आराखडा नसेल तर तो जनतेने तयार केला पाहिजे'. दुसरा मुद्दा म्हणजे,' या आराखड्याची अंमलबजावणी सरकार करीत नसेल तर जनतेने ती करायला लावली पाहिजे'."बळीराजा स्मृती धरण" स्त्री-पुरुष जनतेने उभारले. या संपूर्ण इतिहासाच्या पार्श्वभूमीवर, समन्यायी पाणी वाटपाची पुढची चळवळ आटपाडी आणि त्या पाठोपाठ सांगोला, तासगाव अशा तालुक्यांमध्ये वादळासारखी उभी राहिली.

**पाणी संघर्ष चळवळ ते समन्यायी पाणी वाटप चळवळ:** सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागात सातत्याने पडणार्या दुष्काळाच्या पार्श्वभूमी वरती १९९१-९२या दोन वर्षांच्या काळात सांगली जिल्ह्यातील इतर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते समान पाणी वाटपाच्या मुद्यांवर त्यांच्या तालुक्यात निमंत्रित करु लागले. कारण त्यांना असे वाटत होते की जर खानापूर तालुक्यातील सर्व गावांमधल्या सर्व कुटुंबांना किमान सुखाचे जीवन जगण्याची सोय करणे शक्य करण्याएवढे पाणी मिळू शकत असेल तर त्यांच्या तालुक्यात सुद्धा तसेच होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. असा एक मेळावा कवठेमहांकाळ तालुक्यात आयोजित झाला. तिथे चळवळींमध्ये काम करणाऱ्या भल्या भल्या कार्यकर्त्यांनी समान पाणी वाटप संकल्पनेची टिंगल केली. पण तिथे जमलेल्या जनतेला ही संकल्पना मान्य झाली. असाच एक मेळावा आटपाडी तालुक्यातील काही पत्रकारांनी आटपाडीला संघटित केला. सादिक खाटिक हे पत्रकार त्यावेळी त्यांनी यात पुढाकार घेतला होता. या तालुक्यातील प्रमुख आणि ज्येष्ठ कार्यकर्ते जमले होते. यांच्या सोबत , पाण्याच्या उपलब्धते विषयीचा, गैरसमज माझ्या मांडणीतून दूर केला.त्यांना समजावून दीले की ते भीमा उप खोर्यातले असले तरी भीमा नदी हीच कृष्णा खोर्यातच आहे. त्यामुळे त्यांना कृष्णा खोऱ्यातील पाण्याच...खोऱ्यातील पाण्याचा समान वाटा प्रत्येक कुटुंबाला मिळण्याचा हक्क आहे. यामुळे एक नवा आत्मविश्वास त्या सर्वांच्या मनात रूजला. नव्या चळवळीच्या प्रक्रियेची सुरुवात झाली. यानंतर आयु. विलास खरात यांनी आणखी एक व्यापक बैठक आटपाडी ग्रामपंचायतीच्या सभागृहात आयोजित केली. या चळवळीची प्रक्रीया पुढे सरकली. या दरम्यान ६ डिसेंबर १९९२रोजी जातीयवादी धर्मांध शक्तींनी कट कारस्थान करून बाबरी मशिद उध्वस्त केली.क्रांतिवीर नागनाथअण्णा आणि माझ्यासह इतर प्रमुख कार्यकर्ते (ॲड.धैर्यशील पाटील,कॉ.नाना शेटे इत्यादी) यांनी एकत्र येऊन जातीयवादी-धर्मांध शक्तींचा बिमोड दिवस म्हणून ६डिसेंबर१९९३ रोजी दक्षिण महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील जनता कोल्हापूर मध्ये हजारोंच्या संख्येने जमवण्यासाठी मोहीम राबवत होतो. दौर्याच्या दरम्यान, ख्यातनाम कवी ग.दी. माडगूळकर यांच्या स्मरणार्थ होणा-या कार्यक्रमासाठी आम्ही आटपाडी तालुक्यात गेलो होतो. तिथे विलास खरात यांनी डॉ. भारत पाटणकर आणि नागनाथअण्णा यांना मिळून दुष्काळ निर्मूलन मेळाव्यासाठी निमंत्रित केले.आम्ही दोघांनी जायचे ठरविले. तिथूनच आम्ही आटपाडी तालुक्यात समान पाणी वाटप चळवळ करण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावून काम करायचे ठरवले.

**पाणी संघर्ष चळवळ:** ११जुलै १९९३ रोजी आटपाडी तालुक्यातील सुमारे ३५००० स्त्री-पुरुष जनतेची प्रचंड परिषद भवानी हायस्कूल मैदानात यशस्वी झाली. समन्यायी पाणीवाटप चळवळीचे एक नवे पर्व इथूनच सुरू झाले.या सर्व प्रक्रियेत आटपाडीत उभारल्या गेलेल्या तंबूत कायम मुक्काम करून जनतेच्या मनाची मशागत करून संगठन कौशल्य पणाला लावणाऱ्या कॉ. जयंत निकम यांच्या योगदानाचा उल्लेख आहे. ही परिषद होण्यासाठी एक झंझावाती दौरा केला गेला होता. या दौऱ्यात ते सर्वात जास्त वेळ सहभाग करणारे होते. सर्व गावे आणि सर्व वाड्या वस्त्यांमध्ये या सभा झाल्या. स्त्रियांच्या सभा घेण्यासाठी क्रातिवीरांगना इंदुमती पाटणकर आणि श्रीमती कुसूमताई नायकवडी यांनी नेहमीच खास योगदान दिले. परिषदेपूर्वीच, आटपाडी तालुक्यातील प्रत्येक कुटुंबाला किमान सुखाचे जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे पाणी देणे असे शक्य आहे याचा अभ्यास करून मांडणी करण्यात आली. त्या अभ्यासात कृष्णा खोऱ्यातील पाण्याचा अभ्यास पायाभूत होता. या चळवळीने खानापूर तालुक्यातील समान पाणी वाटपासाठी केलेल्या अभ्यासाची याला पार्श्वभूमी होती.म्हणूनच पहिल्याच परिषदेत"पाण्याचे समान वाटप झालेच पाहिजे","शेतात पाणी बघणार, मगच चळवळ थांबणार", " पाणी संघर्ष चळवळीचा विजय असो" अशा घोषणा जनता देत होती. यापरिषदेत स्त्रियांची संख्या लक्षणीय होती. परिषदेनंतर अठरा वर्षांवरच्या सर्व स्त्रि-पुरूषांच्या, मुला-मुलींच्या सह्या अंगठ्यांची मोहीम घेतली गेली. शंभर टक्के जनतेने ही मोहीम यशस्वी केली. या पाठोपाठ शंभर टक्के ग्रामपंचायती, सहकारी संस्था,शिक्षण संस्थांचे ठराव घेतले गेले.ही सर्व कागदपत्रे सरकारला पाठवली गेली.सरकारवर प्रचंड दबाव निर्माण झाला. पक्षीय भेद बाजूला ठेवून हे घडल्यामुळे जास्तच दबाव आला. या पाठोपाठ संपूर्ण आटपाडी तालुक्यातील सर्व रस्त्यांवर आणि उप रस्त्यांवर हाताला हात धरून एक प्रचंड मानवी साखळी यशस्वी केली गेली. याचाही दबाव सरकारवर आला.तोपर्यंत सरकार नवीन आले होते. तरीही चळवळ चालूच होती.

यावेळी असणाऱ्या युती सरकारने २० ऑगस्ट १९९६ ला पत्र दिले की आटपाडी तालुक्याला टेंबू योजनेतून १६०००हेटर्ससाठी पाणी दिले जाईल!या पत्रापर्यंत आटपाडी तालुक्याला कोणत्याही बाहेरच्या , खात्रीच्या योजनेचे पाणी देण्याचे कसलेही नियोजन नव्हते!!पण यानंतर झालेल्या परिषदेमध्ये कोणत्याही प्रकारे आनंद व्यक्त केला गेला नाही...कारण तालुक्यातील सर्व गावांमधल्या सर्व कुटुंबांना किमान सुखाने जगण्यासाठी खात्रीचे आवश्यक पाणी मिळण्याची मागणी होती. त्या पद्धतीने एक लाख एकरां पेक्षा जास्त क्षेत्र सिंचनाखाली येणार असे गणित होते! लढा चालूच राहिला!! एकदा राज्यपालांचा दौरा आटपाडी तालुक्यातील दुष्काळाची पाहणी करण्यासाठी आटपाडी तालुक्यात येणार होते. त्यांच्या भेटीच्या तोंडावर जनतेने आटपाडी तालुक्यात शंभर टक्के बंद यशस्वी केला.

**समन्यायी पाणी वाटपाची चळवळ :** इथून पुढे, एका बाजूला मुख्य कालव्याने पाणी तालुक्यात येण्यासाठी निधी मिळवण्यासाठी चळवळ सुरू राहिली आणि दुसरीकडे समान पाणी वाटपाच्या आराखड्याला मंजुरी मिळण्यासाठी चळवळ चालू राहिली. पण समान पाणी वाटपाचा फेर आराखडा मंजूर होण्यासाठी आवश्यक चळवळ करण्याकडे अनेक कारणांमुळे दुर्लक्ष होऊ लागले होते. श्रमिक मुक्ती दल-पाणी संघर्ष चळवळ अशा संयुक्त प्रयत्नातून चळवळ करण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले. या प्रक्रियेतील पहिला संघर्ष २००३ साली सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू करून झाला. तासगाव तालुक्यांतील स्त्री-पुरुष जनतेने हा ऐतिहासिक वादळी संघर्ष केला.तत्कालीन पाटबंधारे मंत्री ना.अजित पवार यांनी सर्व कार्यक्रम रद्द करून सातारा रेस्ट हाऊसवर सविस्तर बैठक घेतली.समन्यायी पाणी वाटप पर्यायाला मंत्रालय पातळीवरील पहिली तत्वतः मंजुरी या बैठकीत मिळाली! या लढ्यात मुख्य योगदान दिवंगत सहकारी दिनकरदादा पाटील आणि सहकारी यांनी दिले.२००५ साली मुंबईच्या आझाद मैदानावर साडेपाच ते सहा हजार स्त्रि-पुरुषांनी बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले.फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हे आंदोलन सुरू

झाले. आंदोलन थांबत नाही असे पाहिल्यावर, युती सरकारच्या काळात चळवळीत सहभागी होणारे आर.आर.पाटील यांनी उपमुख्यमंत्री म्हणून मंत्रालयात बैठक आयोजित केली.चळवळीचा आराखडा सिद्ध झाला तर आटपाडी-तासगाव आणि सांगोला या तालुक्यांमध्ये समन्यायी पाणी वाटपाचा पथदर्शक प्रकल्प मंजूर करण्यात आला. देशातला आणि जगातला हा पहिला ऐतिहासिक प्रकल्प मंजूर झाला होता.त्याचबरोबर टेंबू योजनेच्या कामासाठी २२२कोटी रूपये सुद्धा मंजूर झाले.

यानंतर दहा वर्षे फेर आराखडा तयार करण्यासाठी अभ्यास, मंत्रालयातील प्रश्नांची उत्तरे देणे यामध्ये जावी लागली. लाभ-व्यय प्रमाणात फेर आराखडा कसा बसतो हे सिद्ध करण्यासाठी काही महिने गेले.तोपर्यंत पाण्याचा तालुक्यात प्रवेश होण्यासाठी निधी मिळवण्यासाठी चळवळ झाली. निधी मिळवून माहुली पंप हाऊस उभारणीसाठी निधी मिळवण्यासाठी चळवळ उभी राहिली.२०१३ साली पाणी तालुक्यात आणण्यात चळवळीला यश मिळाले.जनतेने उत्सव साजरे केले! तोपर्यंत चळवळीचा समन्यायी पाणी वाटपाचा फेर आराखडा सिद्ध झाला.यानंतर अंतिम मंजुरी आणि नवा आराखडा राबवण्यासाठी निधीची उपलब्धता होण्यासाठी आझाद मैदानावर पुन्हा बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले.यावेळी पुन्हा नवीन सरकार आले होते. तत्कालीन मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक झाली.या बैठकीत दोन्ही मुद्यांसाठी अंतिम मंजुरीसाठी निर्देश देण्यात आले.२२/६/२०१६ , ७/९/२०१६आणि २०/३/२०१९ अशा तीन बैठका प्रधान सचिव पातळीवरील बैठका होऊन , समन्यायी पाणी वाटपाचा फेर आराखडा आणि निधी अशी सर्वांगिण मंजुरी मिळाली! डॉ.भारत पाटणकर यांच्या बरोबर कोऑर्डिनेशन करून योजना राबविण्यात यावी असे निर्देश सुद्धा झाले पण यात भर टाकण्यासाठी आणखी एक नवीन निर्देश झाला. संपूर्ण योजना सार्वत्रिक बंद पाईप आणि सूक्ष्म सिंचन सार्वत्रिक पद्धतीने राबविण्याचे सुद्धा निर्देश झाले हे सर्वच जगात ,देशात आणि महाराष्ट्रात प्रथमच घडत आहे!!!! या सर्व प्रक्रियेत कुठेही न डगमगता आणि न थकता आमचे आटपाडी तालुक्यातील प्रमुख कार्यकर्ते-नेते आनंदराव (बापू) पाटील आणि इतर प्रमुख कार्यकर्ते यांनी न थकता काम केले.त्यांच्या योगदानाचा सन्मान केला पाहिजे. आता आटपाडी तालुक्यातील ८० टक्के काम पूर्ण होत आहे.तासगाव आणि सांगोला तालुक्यातील फेर आराखडे अंतिम होत आले आहेत.आटपाडी पॅटर्न प्रथम महाराष्ट्रातील सर्व दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये सार्वत्रिक करण्याची चर्चा राज्य सरकार यांच्याबरोबर सकारात्मक पद्धतीने झाली आहे. त्याचबरोबर त्यांच्यासह राज्याच्या जलसंपदा मंत्र्यांच्या सहभागाने दुसरी बैठक झाली आहे. आटपाडी तालुक्यातील ज्या बारा गावांना मूळ आराखड्यात पाण्यापासून पूर्ण वगळले होते, त्यांना समन्यायी पद्धतीने पाणी देण्याचे योजनाची अंमलबजावणी प्रभावीरीत्या सुरु झाली आहे.

**निष्कर्ष** : प्रस्तुत संशोधन निबंधातून असे स्पष्ट होते की, पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त ग्रामीण भागात उभी राहिलेली दुष्काळ निर्मूलन ते समन्यायी पाणी वाटपाची चळवळ ही केवळ शेतकरी चळवळ म्हणून मर्यादित राहिलेली नसून, ती एक व्यापक ग्रामीण सामाजिक चळवळ म्हणून विकसित झाली आहे. या चळवळीने नैसर्गिक संसाधनांच्या असमान वाटपामुळे निर्माण होणारे सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय संघर्ष उघडपणे समोर आणले आहेत. पाणी हे नैसर्गिक संसाधन मानून त्याचा हक्काधिष्ठित व समन्यायी वाटपाचा आग्रह धरणे, हा या चळवळीचा मूलभूत गाभा राहिला आहे. दुष्काळ ही नैसर्गिक आपत्ती असली तरी ती केवळ निसर्गनिर्मित नसून, शासनाच्या धोरणात्मक अपयशाशी व संसाधनांच्या असमान वितरणाशी निगडित आहे, हे या चळवळीने अधोरेखित केले. स्थानिक पातळीवर वैज्ञानिक अभ्यास, लोकसहभाग, स्वयंश्रम, आणि जनआंदोलन यांच्या आधारे दुष्काळ निर्मूलनाचे पर्यायी मॉडेल उभारण्यात आले. बळीराजा स्मृती धरणाची उभारणी, वाळू चोरीविरोधी संघर्ष, स्थानिक जलसंधारण आणि कृष्णा खोऱ्यातील पाण्याच्या समन्यायी फेरआराखड्यासाठी उभारलेली चळवळ यांमुळे पर्यावरण-संतुलित शेती व चिरंजीवी विकासाची दिशा स्पष्ट झाली. या चळवळीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, तिने जात, वर्ग, लिंगभाव, भूमिहीन शेतमजूर, स्त्रिया, दलित, आदिवासी व गरीब शेतकरी यांना एकत्र आणून सामूहिक संघर्षाची व्यापक पायाभरणी केली. विशेषतः स्त्रियांचा सक्रिय सहभाग, मानवी साखळ्या, ठिय्या आंदोलने, लोकपरिषदांचा वापर आणि पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन उभारलेला दबाव यामुळे शासनाला धोरणात्मक बदल करणे भाग पडले. आटपाडी पॅटर्नच्या माध्यमातून समन्यायी पाणी वाटपाचा पथदर्शक प्रकल्प मंजूर होणे, सार्वत्रिक बंद पाइप व सूक्ष्म सिंचनाचा स्वीकार होणे, ही या चळवळीची ठळक यशस्वी फलश्रुती ठरते. या चळवळी कडे सैद्धांतिकदृष्ट्या पाहता, ही चळवळ नवीन सामाजिक चळवळीच्या चौकटीत बसणारी असून, ती केवळ आर्थिक मागण्यांपुरती मर्यादित न राहता सामाजिक न्याय, पर्यावरणीय समतोल, सहभागाधिष्ठित लोकशाही आणि शाश्वत विकास यांचा समन्वय साधते. त्यामुळे ग्रामीण भारतातील दुष्काळग्रस्त भागांसाठी ही चळवळ एक पर्यायी विकास मॉडेल म्हणून पुढे येते. थोडक्यात, सांगली जिल्ह्यातील दुष्काळ निर्मूलन ते समन्यायी पाणी वाटपाची चळवळ ही ग्रामीण समाजातील संसाधनाधारित संघर्षांना नवी दिशा देणारी, लोकसहभागावर आधारित आणि धोरणात्मक परिवर्तन घडवून आणणारी एक महत्त्वपूर्ण ग्रामीण सामाजिक चळवळ आहे. आटपाडी पॅटर्नचे इतर दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये सार्वत्रिकीकरण केल्यास ग्रामीण भारतातील दुष्काळ, स्थलांतर, गरिबी आणि असमानता कमी करण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होऊ शकते, असा निष्कर्ष या अभ्यासातून पुढे येतो.

## संदर्भ ग्रंथ

Omvedt Gail, 1993, Reinventing Revolution New Social Movement and Socialistic Tradition in India, New York, An East Gate Book.
Phadke, Anant. 1994, “Anti-Drought Movement in Sangli District”, Economic and Political Weekly, 29(48), pp. 3024-3025.
Phadke, Anant. 2000, “Dame-Oustees Movement in South Maharashtra: Innovative struggle”, Economic and Political Weekly, 35( 47), pp. 4084-4086.
Phadke, Ananat. 2004, “Thiyya Andolan in Krishna Valley”, Economic and Political Weekly, 39(8), pp. 775-777.
Phadke, Ananat and Patankar, Bharat. (2006), “Asserting the Rights of the Toiling Peasantry for Water Use: The Movement of the Dame Outstees and the Drought Affected Toilers in South Maharashtra”, in Mollinga, Petter P and Dixist Ajay (edit) Integrated Water Resources Management, New Delhi, Sage Publicat.
शहा, घनशाम २००४, भारतातील सामाजिक चळवळी (अनुवाद प्राची चिवटे) पुणे,डायमंड प्रकाशन
डॉ. भारत पाटणकर, “समन्यायी पाणी वाटपाचा दिशा दर्शक पॅटर्न”, लोकमत, २०२३
डॉ. भारत पाटणकर मुलाखत कासेगाव दि २२ डिसेंबर २०२५
श्री जयंत निकम मुलाखत कासेगाव दि २४ डिसेंबर २०२५
श्री आनंदराव पाटील मुलाखत आटपाडी २८ डिसेंबर २०२५

# ग्रामीण विकासाची आव्हाने: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**जयश्री सुखदेव बोराडे** संशोधक विद्यार्थीनी, विवेकानंद कला, एस. डी. वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** भारतात ग्रामीण विकासाला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण जवळजवळ ६५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. यापैकी बरेच जण त्यांच्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. जलद शहरीकरण असूनही ग्रामीण अर्थव्यवस्था देशाचा कणा राहिली आहे. जी अन्यधान्यात महत्वपूर्ण योगदान देत आहे. गेल्या काही वर्षात ग्रामीण विकासात लक्षणीय प्रगती झाली असली तरी भारताच्या ग्रामीण भागांना अजूनही अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. जी एकूण विकास आणि समृध्दीला अडथळा आणतो. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना उपजीविका मिळवण्यासाठी कठोर परिणाम करावे लागतात. ग्रामीण विकासाचे आव्हाने विश्लेषण तसेच त्यावर मात करण्याचे मार्ग हे या पेपरचे प्राथमिक ध्येय आहे. 'देशाचा विकास म्हणजे खेड्यांचा विकास' असेच मानले जाते. आज ग्रामीण विकास हे या देशाचे एक महत्वाचे राष्ट्रीय ध्येय बनलेले आहे. थोडक्यात जगात सर्वत्रच कमी जास्त प्रमाणात ग्रामीण विकासाचे कार्यक्रम राबविले जात आहे. ग्रामीण लोकांतील शक्तीचा व क्षमतांचा विकास करून त्यांच्या सहभागाव्दारे त्यांच्या जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्व पैलुचा समतोल विकास साधून त्याच्या जीवनाचा दर्जा उंचावणे हे ग्रामीण विकासातील मध्यवर्ती उद्दिष्ट आहे.

**प्रस्तावना:** ग्रामीण भाग म्हटलं की आपल्याला आठवतात त्या सुंदर बैलगाड्या नदी, नाले, विहिरी सगळीकडे हिरवेगार आसे शेत चहुकडे हिरवळ गाई, म्हशी असे विविध पाळीव प्राणी आपल्याला गावात पहायला मिळतात. आपण सर्वच जण अभिमानाने सांगतो कि "भारत माझा खेड्यांचा देश आहे." महात्मा गांधीजीने खेड्याकडे चला असा संदेश दिला होता. त्यापैकी काही ध्येयनिष्ठ तरूण खेड्याकडे वळलेही पण स्वातंत्र्यानंतरची पन्नास वर्ष उलटुन गेल्यावर भारतीय खेड्याचे रूप कसे आहे ? दिवसें दिवस खेड्याकडुन शहरांकडे माणसाचा ओघ वाढत चालला आहे. शहरे लोकसंख्येने अवास्तव विस्तारत आहेत आणि खेडी ओस पडत आहेत ती अधिकाधिक दरिद्री बनत चालली आहेत असे का अशा कोणत्या समस्या आहेत ग्रामीण जीवनाच्या. आजच्या या एकविसाव्या शतकातही आपल्या देशापुढे अनेक समस्या आहेत. आपल्या देशातील खेड्यातील अवस्था ही आजही दयनीय आहे. गावातील कुटुंबाच्या कुटुंबे शहरात स्थलांतर करत आहेत याचे प्रमुख कारण म्हणजे ग्रामीण भागातील अनेक समस्या जसे कि पावसाअभावी शेतीचे नुकसान पिकाला योग्य तो भाव नाही. रोजगाराच्या संधी नाही. दैनंदिन जीवनातील काही संधी सुविधा नाहीत, त्यामुळे खेड्यातील अनेक कुटुंबे शहरात वास्तवासाठी येतात. पूर्वीची त्या बलुतेदारी नष्ट झाली, पण त्याला पर्यायी उद्योग उभे राहिले नाहीत. एखद्या छोट्याशा शेतकऱ्याने कष्टाने एखादे पीक काढले तर त्याला गावात योग्य भाव मिळत नाही. ग्रामीण भागात आवश्यक सुधारणा पोहचु शकल्या नाहीत प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण विकासाचे आव्हानेचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधासाठी पुढीप्रमाणे उदिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहे. १) ग्रामीण विकासाचा अर्थ समजणे २) ग्रामीण विकासातील आव्हानांचा शोध घेणे

**गृहितके :** १) ग्रामीण विकासात विविध अडथळे निर्माण होतात. २) ग्रामीण विकास हा मंदगतीने होतो. प्रस्तुत शोधनिबंधासाठी गृहितके निश्चित करून संशोधन पध्दती प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. संदर्भ साहित्याचा आधार होऊन प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे.

**ग्रामीण विकास:** सर्व जगभर शहरांचा सतत विकास होत असुनसुध्दा जागतिक लोकसंख्यापैकी ग्रामीण भागात राहण्यांचे प्रमाण १९५० मध्ये ७९ टक्के पेक्षा थोडे अधिकच होते. भारतात १९६१ मध्ये प्रमाण ८० टक्के होते. साहजिकच आर्थिक नियोजनव्दारा राष्ट्रीय विकास साधण्यासाठी ग्रामीण विकास अत्यंत आवश्यक ठरते आणि म्हणुनच ग्रामीण समास्यांचे स्वरूप नीटपणे समजावून घेऊन त्या सोडविण्याचे कसोशीने प्रयत्न करावे लागतात. कामगिरी बजावीत असतो अन्नधान्ये व इतर कच्चा माल यांचे उत्पादन ग्रामीण भागातच होत असते आणि त्या बाबतीतील शहराची गरज ग्रामीण उत्पादनातूनच भागविले जाते. शिवाय शहरांतील औद्योगिक व्यवसायांना श्रमिक पूरविण्याची जबाबदारी ही ग्रामीण भागातच पार पडतात राष्ट्राची नैसर्गिक साधनसंपत्ती बऱ्हंशी ग्रामीण प्रदेशातच उपलब्ध होते आणि बहुसंख्या लोकांची वस्तीही तेथे असते. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांना तर ग्रामीण विकासाची गरज फारच तीव्रतेने भासते परंपराप्रिय ग्रामीण जनतेला आधुनिक शास्त्रीय दृष्टीकोन पटवून घेऊन तिला आर्थिक विकासाच्या मार्गावर शक्य तितक्या लवकर आणण्याचे प्रयत्न शासनाला करावे लागतात शहरी व ग्रामीण लोकसंख्येची स्थुल मानाने तुलना केली तर असे दिसून येते की, ग्रामीण लोकसंख्येचे सरासरी उत्पन्न कमी आहे. शैक्षणिक वा अन्य बाबीतही मागासलेपणा आहे. १९७२-७३ साली महाराष्ट्र राज्यात सरासरी दरडोई मासिक खर्च शहरात रू ६६.२९ होते. १९७१ मध्ये महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण ३९.२ टक्के होते. आरोग्याची सोयही खेड्यात कमी आहे. तसेच वाहतुक व दळणवळणाच्या सोयी फारच अपुऱ्या आहेत.

**ग्रामीण समस्येची जाणीव:** कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचे मुख्य लक्षण म्हणजे बहुसंख्या लोकांचे उत्पन्न हे खुप कमी असते की ज्यामध्ये त्याचा जीवन निर्वाह सुध्दा केला जाऊ शकत नाही. आज ही ६५ टक्के लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर अवलंबुन आहे कृषी क्षेत्रातील झालेल्या उत्पादनाचे किंवा शेतमालाचे विक्री करणे गंभीर समस्या आज दिसून येत आहे. अन्नधान्य तांदुळ गहु यांच्या आधारभुत किंमती सरकार ठरवते. ज्या उत्पादन खर्चापेक्षा खुप कमी असतात. शेतमाल उत्पादनावर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. सरकार

निर्यातीवर मोठ्या प्रमाणात कर आकारत असते ही समस्या दुर करण्यासाठी शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य बाजारपेठ योग्य वाजवी किंमत संग्रहणाच्या सोयी तसेच वित्त पुरवठा मोठ्या प्रमाणात व्हायला पाहिजे.

**ग्रामीण विकासाचे क्षेत्र :**

**१) कृषी क्षेत्र:** भारतातील ग्रामीण लोकसंख्येचे कृषी क्षेत्रात विभाजन होते. शेती आणि संबंधीत क्षेत्र उदा. वृक्षारोपन वनीकरन, मस्त्यव्यवस्थापन, दुग्धव्यवसाय, बगायती शेती यांचा समावेश होतो.

**२) औद्योगिक क्षेत्रे:** ग्रामीण भागातुन उत्पादन केलेल्या कच्च्या मालांवर प्रक्रिया करून औद्योगिक क्षेत्र निर्माण होत असतात. यामध्ये लघुउद्योग कुटीरउद्योग ग्रामीण विकासात या उद्योगांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

**३) सेवा क्षेत्र:** या क्षेत्रामध्ये व्यापार व अंतिम ग्राहकसेवांचा समावेश होता उदाहरणार्थ व्यापार सेवा उपहारगृह पर्यटन आणि मनोरंजन इतर असे ग्रामीण विकासाचे क्षेत्र आहेत.

**ग्रामीण विकासातील आव्हाने :** ग्रामीण भागात बेरोजगारी कर्जबाजारी शिक्षणाचा अभाव आणि मुलभूत सुविधांची कमतरता आहे. दारिद्रय व्यसनाधिनता यासारख्या समस्या जाणवतात.

**बेरोजगारी:** जर एखाद्या व्यक्तिला काम नसेल किंवा कामात रस नसलेला लोकांचे वर्णन करण्यासाठी वापरला जातो. ग्रामीण भागातील व्यक्तींना बेरोजगारीसारख्या गंभीर आव्हानाचा सामना करावा लागतो. ग्रामीण उद्योगाचा ऱ्हास शेतीच्या अल्प भुखंडी करणामुळे अपूरा रोजगार, अपुरे जलसिंचन भांडवलाचा अभावा आणि गतिहिनता या समस्येवर उपाय म्हणून श्रमप्रधान तंत्राचा अवलंब जलसिंचनाचा विकास ग्रामीण कुटीर उद्योगांना प्रोत्साहन व्यावसायिक शिक्षण पध्दतीचा अवलंब आणि विविध सरकारी योजनांची अंमलबजावणी हे उपाय सूचविले आहेत.

**कर्जबाजारी:**महाराष्ट्रात शेतकरी कर्जबाजारी पणाच्या मोठ्या समस्येला समोरे जात आहे. कर्जबाजारीपणा म्हणजे डोक्यावर कर्जाचा डोंगर असलेले स्थिती चालून बाहेर पडण्यासाठी योग्य नियोजन आवश्यक आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणामध्ये कर्ज काढून सण-उत्सव, लग्न समारंभ तेरवी यांसारखे कार्यक्रम साजरे करतांना दिसून येतात. यातून लोक कर्जबाजारी होऊन या समस्येमध्ये अडकतात. शेती हेच उत्पादनांचे साधन असल्यामुळे तिच्या उत्पादनाची निश्चितता असत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये कर्ज फेडण्यास विलंब लागतो.

**शिक्षणाचा अभाव:** शिक्षणाचा अभाव ही सामाजिक आणि आर्थिक विकासातील एक मोठी अडचण आहे. गुणवत्ता शिक्षणाच्या कमतरतेमुळे व्यक्ती आणि समाजाचा विकास खुंटतो आणि त्यांचे जीवनमान खालावते त्यामुळे गरिबी बेरोजगारी आरोग्य आणि सामाजिक मागासलेपणा येतो. शिक्षणाच्या अभावामुळे व्यक्तीला स्वत:च्या हक्कांची जाणीव नसते. त्यामुळे प्रगत समाजाच्या उभारणीत अडचणी येतात.

**मुलभूत सुविधांचा अभाव:** ग्रामीण भागात पाणी वीज रस्ते आरोग्य शिक्षण यासारख्या अत्यावश्यक सोयीसुविधांची कमतरता दिसून येते. विशेषत: ग्रामीण किंवा मागासलेल्या भागात जिथे लोकांना दैनंदिन जीवनाचे आवश्यक असलेल्या गोष्टी मिळत नाही. यामुळे विकास खुटतो.

**दारिद्र्यता:** दारिद्रय म्हणजे गरीबी किंवा निर्धनता ज्यात व्यक्तीला अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मुलभूत गरजा पुर्ण करता येत नाही. भारतात दारिद्र्यरेषेची संकल्पना सर्वप्रथम दादाभाई नौरोजी यांनी पॉव्हर्टी अँण्ड ब्रिटीश रूल इन इंडिया या पुस्तकात मांडली होती. या पुस्तकात दारिद्र्याचे दरडोई खर्चाच्या आधारावर निकष ठरवुन दिली आहे. त्यानुसार भारतातील ४० टक्के लोक दारिद्री आहे. हे देशाच्या विकासासाठी अतिशय गंभीर बाब आहे.

**व्यसनाधिनता:** ग्रामीण भागामध्ये आज मोठ्या प्रमाणामध्ये व्यासनाधिनता आढळुन येत आहे. वाईट बाबीचे अनुकरण करून दारू बीडी, सिगारेट, जुगार यासारख्या व्यसनामध्ये वाढ होताना दिसून येते. अज्ञानाने हे व्यसनाधीनांचे मुख्य कारण मानले जाते. याचा परिणाम विकासावर होताना दिसतो.

**निष्कर्ष:** १) ग्रामीण समाज विविध समस्याने ग्रासलेला दिसून येतो. २) ग्रामीण विकास मंदगतीने होतो.

**शिफारशी:** १) ग्रामीण विकासात ग्रामीण भागातील विषमता दूर करणे. २) रोजगार निर्मिती करणे. ३) शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे.

**सारांश:** ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान आणि आर्थिक स्थिती सुधारणे ज्यामध्ये शेती पायाभुत सुविधा शिक्षण आरोग्य रोजगार निर्मिती आणि सामाजिक कल्याण यासारख्या अनेक बाबीचा समावेश होतो. भारत सरकारने मनरेगा प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) यासारख्या अनेक योजनाव्दारे या दिशेने काम केले आहे. यात केवळ शेतीवर लक्ष केंद्रीत न करता उद्योजकता डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि स्थानिक पातळीवर आधारित विकास धोरणे राबवणे महत्त्वाचे आहे. जेणेकरून ग्रामीण समुदायांचा सर्वांगीण विकास होईल. थोडक्यात ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व घटकांचा एकात्मिक पध्दतीने विकास करणे.

**संदर्भ ग्रंथ :**


1) Rural development. (२०२५). In Wikipedia. https://en.wikipedia.org/wiki/Rural_development

2) Statista. (n.d.). Statistics and market data platform. https://www.statista.com/statistics

3) National Council of Educational Research and Training. (n.d.). NCERT. https://ncert.nic.in

4) Singh, K. (n.d.). Gramin vikas evam Panchayati Raj [Rural development and Panchayati Raj]

5) Review of Research Journal. https://oldror.lbp.world

# ग्रामीण समाज: बालकांचे हक्क आणि वास्तव: एक अध्ययन

**डॉ. जयमाला पुंडलिकराव लाडे** मिलिंद महाविद्यालय, मुळावा

**सारांश:** बालकांचे हक्क आणि वास्तव हा एक अत्यंत महत्वाचा सामाजिक विषय आहे. १८ वर्षाखालील प्रत्येक बालकाला स्वच्छंदपणे जगण्याचा, संरक्षणाचा, विकासाचा पूर्ण अधिकार आहे. मात्र कायदे आणि वास्तव यात प्रत्यक्षात मोठी दरी आहे. बालकांचे हक्क म्हणजे १८ वर्षाखालील मुलांसाठी संरक्षण आणि विकास सुनिश्चित करणारे मूलभूत अधिकार होय.

ग्रामीण समाज हा भारतीय समाजाचा प्रमुख अंग आहे. ग्रामीण समाजाशिवाय भारतीय समाजाची ओळखच होत नाही. वैश्विकीकरणामुळे जे परिणाम भारतीय समाजावर झाले त्यामुळे भारतीय ग्रामीण समाजाचे सुद्धा स्वरूप बदलले. त्यामुळे त्याचा परिणाम ग्रामीण जीवन, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक म्हणजेच जीवनाच्या प्रत्येक घटकावर परिणाम झाला. ह्या सर्वांचा राजकीय क्षेत्रावर परिणाम होऊन राजकीय धोरणे, शासकीय धोरणे, घटनात्मक तरतुदी ह्यामुळे मानवाचे जीवन प्रभावीत झाले. जसे की सर्वांना शिक्षण घेण्याचा अधिकार हा घटनेमुळे मूलभूत अधिकार आहे. सर्व लोकांना (लिंग, जात, वंश, धर्म) भेद न करता जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. मागील सात दशकापासून शासनाच्या योजना, कल्याणकारी कार्यक्रम, विविध कायदे, आणि प्रशासकीय योजना असतांना सुद्धा संपूर्ण भारतात असंख्य बालक-बालीका दु:खी आणि कष्टमय जीवन जगत आहेत. असंख्य कुटुंबात आई-वडिल/पालक मुलांचे उपहास करतात. अनेक कुटुंबात मुलांना मारहाण-अपमान सहन करावे लागते. काही ठिकाणी तर त्यांच्या सोबत लैंगिक दुर्व्यवहार केले जाते. अनेक मुले शिक्षणापासून वंचित आहेत, गुन्हेगारीच्या विळख्यात अडकले जात आहे. तसेच ड्रग्ज व इतर अनेक व्यसनाच्या आहारी जात आहेत. मानवी तस्करी करणाऱ्यांच्या जाळ्यात अडकून भिक्षावृत्ती, गुन्हेगारी कडे त्यांना वळविल्या जात आहे. मागील काही वर्षापासून समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, मानवाधिकार कार्यकर्ते, एन. जी. ओ. बालकांच्या अधिकार / हक्कांबाबत अभ्यास करीत आहेत मात्र सरकार आणि सामान्य जनता या गंभीरतेपासून मात्र दूर असल्याचे जाणवते आहे. ह्या निबंधात बालकांचे अधिकार / हक्क कोणते, त्यांचे प्रश्न / समस्या आणि समाजातील खरे वास्तव समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

दरवर्षी जगभरात लाखो मुले अत्याचार, गुन्हेगारी, अपहरण, हिंसक हल्ले, शोषण, बालमजुरी इत्यादींना बळी पडतात. भारतातील शहरीकरणाचा ग्रामीण समाजावर परिणाम झालेला आहे. त्यामुळे आपल्या समाजात मुलांविरुद्ध अनेक समस्या निर्माण होतात. ज्यात प्रामुख्याने कुपोषण, बालमृत्यू, भ्रूणहत्या, बालविवाह, शिक्षणापासून वंचित, बालमजुरी, बालकांचे वाढणारे आजार, गुन्हेगारी ह्यांचा समावेश होतो. ग्रामीण भागात राहणाऱ्या मुलांना आरोग्यसेवा, शिक्षण आणि संरक्षणाची मर्यादित उपलब्धता आहे. आपल्या भारतीय सरकारने मुलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी अनेक संरक्षण उपाय तयार केले आहेत. मात्र भारतातील संस्कृती आणि असमानतेची विविधता ही बालहक्कांचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याच्या ध्येयासाठी एकत्रितपणे काम करण्यात सर्वात अडथळा आहे. परंतु उपलब्ध अहवालामध्ये मुलांविरुद्ध सतत होत असलेल्या उल्लंघनामुळे हे सिद्ध झाले आहे की, भारतात जागरूकता नसल्यामुळे आणि कायदेशीर संरक्षण यंत्रणेतील त्रुटींमुळे मुलांविरुद्धच्या या सर्व संरक्षणाची योग्य अंमलबजावणी होत नाही. भारतीय समाजात चिंताजनक असणाऱ्या मुलांचे शोषण, बालतस्करी, पोर्नोग्राफी, अल्पवयीन वेश्याव्यवसाय, ऑनर किलिंग, बालविवाह, लिंगभेद, दुर्लक्षित तरुण हे सर्व अंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा चिंतेचे मुद्दे झाले आहे. त्यातून बालकांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि मानसिक पुनर्वसना करिता विचार, उपाययोजना पुढे येत आहेत. त्यातून बालकांचे कल्याण आणि संरक्षण सुनिश्चित होऊ शकते.

**मुख्य शब्द:** बालकांचे हक्क, सामाजिक स्थिति, शैक्षणिक वास्तव, मानसिक व भावनिक वास्तव, बालविवाह, बालमजुरी, पोक्सो कायदा, न्युवेनाइल जस्टीस, ऑनलाइन बेटिंग, सुरक्षितता, कौटुंबिक भावना, अंधश्रद्धा, कायदेशीर उपाययोजना, संविधानिक तरतुदी.

**प्रस्तावना:** भारतीय समाजातील ग्रामीण व नागरी समाजाचा अभ्यास करणे हे समाजशास्त्राचा प्रमुख अभ्यास विषय आहे. प्रस्तुत निबंधात ग्रामीण समाजात झालेल्या परिवर्तनातून बालकांचे हक्क, त्यांचे प्रश्न आणि ग्रामीण स्तरावर त्यांचे वास्तव काय आहे हे अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण समाजाचा अभ्यास करण्यासाठी ग्रामीण समाजशास्त्र शाखेचा विस्तार झालेला आहे. त्यात प्रामुख्याने ग्रामीण लोकांचे जीवन, त्यांचे परस्पर संबंध, त्यांच्या संस्था, संघटना समूह तसेच सामाजिक समस्या, बदलते स्वरूप ह्याचा शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास केले जाते. भारत हा खेड्यांचा देश म्हणून परिचित आहे. आजही सुमारे ६५ टक्के टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. (ग्रामीण लोकसंख्या कमी होत आहे.) ग्रामीण समाजाचा पाया म्हणजे कुटुंब, शेती आणि परंपरा. या व्यवस्थेचा सर्वात संवेदनशील घटक म्हणजे बालक. देशाचे भविष्य घडवणारी ही पिढी अनेक सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक अडचणींना सामोरी जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील बालकांचे वास्तव समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

**पूर्व अभ्यास:** ग्रामीण भागातील बालकांचा त्यांच्या सामाजिक वास्तवांचा आणि बालकांच्या हक्कांचा त्यांच्या समस्यांचा यासंबंधी विविध समाजशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ आणि विविध संस्थांनी अभ्यास केला आहे. ह्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे पाहता येईल.

१) राम आहुजा ह्यांनी 'सामाजिक समस्याएँ' ह्या ग्रंथात सामाजिक समस्या आणि बालकांच्या बाल दुर्व्यवहार आणि बालकामगार ह्याबाबत अध्ययन केले आहे. बालकांवर होत असलेल्या अनेक दुर्व्यवहार /अत्याचारांचे विविध प्रकार, कारणे, त्यांचा बालकांवर होणारा परिणाम, भारतातील बाल कामगारांची व्यापकता ह्यावर अभ्यास आढळून येतो.

२) **डॉ. ए. आर. देसाई यांचा ग्रामीण समजावरील अभ्यास** - डॉ. ए. आर. देसाई ह्यांनी ग्रामीण समाज संरचनेचा अभ्यास करतांना असे नमूद केले की, ग्रामीण भागातील गरीबी व आर्थिक अस्थिरता याचा थेट परिणाम बालकांच्या शिक्षण व आरोग्यावर होतो. बालमजुरी व शाळा सोडण्याचे प्रमाण हे ग्रामीण भागात अधिक आढळते.

३) **युनिसेफच्या अहवालानुसार** - २०२४-२५ नुसार जगात ४० कोटी मुले मूलभूत गरजांपासून वंचित आहेत. जागतिक प्रगती झाली असली तरी करोडो मुलांना अजूनही जगण्याचे, संरक्षणाचे आणि सहभागाचे मूलभूत अधिकार नाहीत. अनेक मुलांना हिंसाचार, शोषण (तस्करी, लैंगिक, बालमजुर) तोंड द्यावे लागते. लाखो मुले शिक्षणापासून वंचित आहेत त्याचप्रमाणे बालमृत्यू, अपुरे व अस्वच्छ पाणी, अस्वच्छता हयसारख्या समस्यांना सुद्धा तोंड द्यावे लागते आहे. 'द स्टेट ऑफ द वर्ल्ड्स चिल्ड्रन' २०२५ मधील अहवालानुसार ही माहिती उपलब्ध झाली आहे.

४) **सी. आर. सी. च्या अहवालानुसार** — शिक्षण धोरणांची (एन. ई. पी. २०२०) अंमलबजावणी, बालमजुरी रोखणे, असुरक्षित गटांचे संरक्षण करणे (ट्रान्सजेंडर/तुरुंगात असलेली मुले) डिजीटल धोक्यांपासून संरक्षण करणे, पोक्सो (२०१२) जेजे ॲक्ट २०१५ अधिक मजबूत करणे आणि चाइल्ड सेक्सुअल अब्युज मटेरिअल (सी. एस. ए. एम.) करिता AI सारखे तंत्रज्ञान वापरणे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:** १) ग्रामीण भागातील बालकांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती समजून घेणे. २) ग्रामीण बालकांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करणे. ३) ग्रामीण बालकाची आरोग्य व पोषण स्थिती जाणून घेणे. ४) ग्रामीण बालकांच्या मानसिक व भावनिक समस्यांचे विश्लेषण करणे. ५) ग्रामीण बालकांच्या विकासासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पद्धती:** या शोधनिबंधासाठी दुय्यम माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आला. जसे - पुस्तके, मासिके-वृत्तपत्रे, संकेत स्थळे.

**बालकांचे हक्क** : संयुक्त राष्ट्र बालहक्क करारानुसार १८ वर्षाखालील प्रत्येक व्यक्ती म्हणजे बालक होय. बालकांचे हक्क म्हणजे ० ते १८ वयोगटातील मुलांना मिळणारे मूलभूत अधिकार, ज्यात जगणे, सरंक्षण, विकास आणि सहभाग ह्या प्रमुख घटकांचा समावेश होतो. त्यामुळे शासन विवीध संघटना बालकांना सरंक्षण, शिक्षण, आरोग्य, सुरक्षित वातावरण आणि शोषणापासून सरंक्षण देतात. उदा. भारतात स्ते ०६ ते १४ वयोगटातील बालकांना मोफत शिक्षणाचा अधिकार आहे. भारतीय ग्रामीण समाजात पुढीलप्रमाणे प्रमुख पैलूंशी संबंधित आहेत. जे मुलांच्या योग्य विकास आणि सरंक्षण सुनिश्चीत करतात जसे;

**भेदभावरहित जीवन** - जाती-स्पृश्य, अस्पृश्यता, धर्म, गरीब-श्रीमंत भेदभाव न करता त्यांना समानता प्राप्त होणे महत्वाचे आहे.

**शिक्षण आणि विकासाचा हक्क** - ग्रामीण समाजात असलेल्या जात, धर्म, लिंग, जमीनदार -मजूर ह्यामध्ये भेद न करता बालकांना शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.

**शोषणापासून संरक्षण**- ग्रामीण समाजात बालमजुरी आढळुन येते. उदा. शेती, विटभट्टी, ऊस तोडणीच्या ठिकाणी, हॉटेल ह्याठिकाणे बालके मजुरी करतात. त्यामुळे ह्या सर्वांतून मुक्त करून त्यांचे संरक्षण करणे हा मुलांचा मुलभूत अधिकार आहे.

**अन्न आणि आरोग्य सुविधा**- बालकांना पोषक असे आहार तसेच आरोग्य सुविधा आणि उपचार प्राप्त होण्याचा अधिकार आहे.

**मताचा आदर**- बालकांच्या मनाविरुद्ध त्यांच्यावर निर्णय लादले जाऊ नयेत. त्यांचा मतांचा सन्मान केला जाणे हा त्यांचा नैसर्गिक अधिकार आहे.

**कौटुंबिक संरक्षण**- बालकाला त्याच्या पालकांपासून किंवा कुटुंबापासून त्यांच्या इच्छेविरुद्ध वेगळे केले जाऊ नये. जर अशी परिस्थीती असेल तर त्यांना विशेष संरक्षण मिळण्याचा हक्क आहे.

**जगण्याचा अधिकार** - प्रत्येक बालकाला सन्मानाने जीवन जगण्याचा, पोषक अन्नाचा, सुदृढ आरोग्य सेवेचा आणि स्वच्छ वातावरणाचा अधिकार आहे.

**विकास**- शिक्षण, खेळ, विश्रांती, सांस्कृतिक उपक्रम आणि समग्र विकास (मानसिक, शारिरिक व भावनिक) चा अधिकार बालकाच्या व्यक्तिमत्व विकासासाठी गरजेचे आहे.

बालकांचे हक्क संरक्षीत करण्याकरीता बाल हक्क सरंक्षण आयोग स्थापीत करण्यात आले आहे. या आयोगाची जुलै २००७ मध्ये स्वायत्त मंडळ म्हणून बाल हक्क सरंक्षण कायदा २००५ अन्वये राज्यातील बालकांच्या हक्कांचे संरक्षण, प्रचलन आणि रक्षण करण्यासाठी स्थापना करण्यात आली. यामध्ये बालकांच्या संरक्षणासाठी प्रमाणित मानांकन ठरविले आहेत. जसे- बालकांना सर्व प्रकारच्या जातीपाती, रंग, लिंग, भाषा, धर्म, राजकीय किंवा इतर मते, राष्ट्रीय परंपरा, संपत्ती, व्यंग किंवा इतर दर्जा याच्या भेदभावापासून संरक्षण करणे. बालकाच्या सर्वोत्तम हिताला, स्वतःची ओळख, नाव आणि राष्ट्रीयत्वाचा हक्क याला सर्वाधिक प्राथमिकता दिली पाहिजे. प्रत्येक बालकाला आराम करण्याचा आणि विश्रांती घेण्याचा तसेच खेळणे आणि मनोरंजनात्मक कृती मध्ये रमण्याचा तसेच स्वत:च्या आवडीचा खेळ खेळण्याचा अधिकार आहे. प्रत्येक बालकाला जन्मजात जीवन जगण्याचा, विकासाचा, व्याक्तिमत्व विकासाचा, बुद्धिमता आणि शारिरीक क्षमता विकास करण्याचा अधिकार आहे.कोणत्याही बालकाला त्याच्या मनाविरुध्द त्याच्या पालकांपासून विभक्त करु नये. फक्त अपवादात्मक परिस्थीतीतच बालकाच्या उत्तम हितासाठी आवश्यक असते. कोणत्याही बालकाला बेकायदेशीर हस्तांतरण, अपहरण, विक्री कोणत्याही हेतूने हानी होता कामा नये. कौटुंबिक वातावरणापासून वंचित असलेल्या बालकाला राज्याकडून विशेष सरंक्षण आणि मदत मिळण्याचा हक्क असतो. मानसिक किंवा शारिरीक दृष्ट्या विकलांग असलेल्या मुलंना त्यांचा सन्मान राखणाऱ्या परिस्थीती, स्वावलंबत्वाचा पुरस्कार आणि समाजामध्ये सक्रिय सहभागाने आयुष्याचा संपूर्ण आनंद घेता यावा आणि चांगले जीवन जगता यावे. प्रत्येक बालके सर्व प्रकारच्या लैंगिक शोषण आणि लैंगिक गैरवर्तनापासून संरक्षण प्राप्त झाला पाहिजे तसेच आर्थिक शोषणापासुन संरक्षित असले पाहिजे. आरोप असलेले किंवा कायद्याचे उल्लंघन करतांना आढळलेल्या मुलांना योग्य त्या सन्मानाने आणि न्यायाने बर्तणूक मिळण्याचा अधिकार आहे.

**ग्रामीण बालकांची सामाजिक स्थिती:**

**१) गरीब कुटुंब आणि उपजिवीकेची अडचण** - खेड्यात अजूनही विकसीत भारतात असंख्य कुटुंबे दारिद्रय रेषेखाली जीवन जगतात. त्यामुळे बालकांना लहान वयातच कामाला लावले जाते. शिक्षणापेक्षा मजुरीला प्राधान्य देणारे कुटुंब आहेत कारण पोट भरणे ही सर्वात अधिक मानवाची गरज आहे. अनेक कुटुंबात तर बालकांवर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी दिसून येते. आई-वडिल यांपैकी कुणि आजारी असेल किंवा वडिलांना दारुचे व्यसन असेल किंवा यापैकी एकाचे किंवा दोघांचेही मृत्यू झाले असेल तर छोटे मुले (मुले/मुली) घराची पालनपोषणाची जबाबदारी सांभाळतात हे भारतातील अत्यंत विदारक चित्र आहे असे म्हणता येईल. नैसर्गिक जिवन जगण्याचा अधिकार सुद्धा मुलांना उपभोगता येत नाही.

**२) बालमजुरी** - ग्रामीण भागात शेती, विटभट्टी, हॉटेल, घरकाम यामध्ये अनेक बालके गुंतलेली आहेत. शिक्षण अर्धवट सोडून ही मुले बालमजुरी करतात.

**३) कौटुंबिक जबाबदाऱ्या** - आई-वडिल शेतावर शेतमजुरीला किंवा इतरत्र कामाला गेले असता मोठ्या भावंडाला लहान भावंडाची जबाबदारी येते. त्यामुळे शाळेत नियमित हजेरी शक्य होत नाही. छोट्या मुली घरातील धुणी-भांडी करतात. ओढ्यावरून कपडे धुऊन आणतात. पाणि भरतात तसेच जवळपास जंगल असेल किंवा गावाच्या दुरवरुन लाकडे गोळा करतात. ही सर्व कामे करतांना मुलंना असुरक्षिततेला सुद्धा तोंड द्यावे लागते. अनेकदा आपल्याला दिसून आले आहे कि - आई-वडिल घरी नसतांना मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या घटना घडतांना आपण पाहतच आहोत.

**शैक्षणिक वास्तव:**

**शाळा सोडण्याचे प्रमाण** - गरीबी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, स्थलांतर, अपुरी शैक्षणीक सुविधा यामुळे अनेक बालके शाळा अर्धवट सोडतात.

**शाळांची अपुरी साधने** - अनेक ग्रामीण शाळांमध्ये इमारत, वर्गखोल्या, प्रयोगशांळा, ग्रंथालय, डिजीटल साधनांचा अभाव विशेषत: स्वच्छता गृहाचा अभाव (मुलींच्या शाळेत येण्याचे प्रमाण कमी) शिक्षकांचा अभाव ह्या व इतर अनेक कारणाने बालकांचे शाळेत येण्याचे प्रमाण कमी असते.

ताजी परिस्थीती सांगताना तर असे म्हणता येईल की, महाराष्ट्र सरकारनी प्रवास कमी दरात (५० टक्के टक्के सवलत) केले असल्यामुळे विशेषतः यात्रा, धार्मिक कारणे, कौटुंबिक कारणे ह्यामुळे महिलांचा प्रवास करण्याचे प्रमाण वाढले आणि विशेष म्हणजे ही शाळेत येणारी बालके आईसोबत गेल्याने बालकांची शाळेत अनुपस्थिती राहते आणि अनुपस्थिती मुळे मुलांचा शिक्षणाकडे कल कमी होऊ शकते. हे ग्राऊंड स्तरावरील वास्तव आहे.

शाळांची अपुरी साधने पाहत असतांना असे दिसून येते की एकतर काही ठिकाणी गावात शाळा नसतात तसेच शाळा काही कि. मी. वर दूर असतात. शाळेत जाण्यासाठी साधनांचा अभाव ह्यातूनच मुलींसाठी विशेष बसेसची सुविधा आहे. शाळेत/महाविद्यालयात जाण्यासाठी साधनांचा अभाव असल्यामुळे विद्यार्थ्यांची शाळेत अनुपस्थिती असते.

**शिक्षकांची कमतरता** - ग्रामीण विभागातील हे वास्तव आहे. गुणवत्ता धारक शिक्षकांचा अभाव असतो. शिक्षकांची भरती होत नसल्याने शिक्षकांची कमतरता ह्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे.

**पालकांची अल्प शैक्षणिक जाणिव** – पालकांमध्ये शिक्षणाबद्दल असलेली उदासिनता हे मुलांना शाळेत पाठविण्यात कमी पडतात. कारण ह्यांच्यापुढे पोट भरणे हीच प्राथमिक गरज असते.

**आरोग्य व पोषण:**

**कुपोषण** - भारतात/महाराष्ट्रात महिला व बाल कल्याण मंत्रालयाद्वारे – एकात्मिक बाल विकास योजना द्वारे गरोदर माता, स्तनदा माता, अंगणवाडीत (बालवाडी) जाणा-या बालकांना पोषक आहार योजना शासनाव्दारे उपलब्ध असतांना सुद्धा ग्रामीण असो की शहरी भागात कुपोषणाची समस्या अद्यापही चालु काळात आहे. अपुरी व असंतुलित आहार पध्दतीमुळे ग्रामीण बालकांमध्ये अशक्तपणा, कमी वजन, उंची कमी असणे यांसारख्या समस्या आढळतात.

**आरोग्य सेवेचा अभाव** – ग्रामीण भागात अजूनही आरोग्य सेवेचा अभाव दिसून येतो. एकतर गावात आरोग्य केंद्राचा, वैद्यकिय अधिकाऱ्यांचा, औषधांचा तसेच आरोग्यविषयक साधनांचा अभाव असतो.

**स्वच्छतेचा अभाव** - ग्रामीण भागात आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्यास ग्रामीण समुदायात असलेल्या स्वच्छतेचा अभाव, राहणीमान बाबत सुद्धा स्वच्छतेची विशेष काळजी घेतल्या जात नाही. स्वच्छ पाण्याच्या साधनांचा अभाव.

**मानसिक व भावनिक वास्तव:**

**१) तणावग्रस्त बालपण** - गरिबी, कौटुंबिक संघर्ष, अपयशाची भीती यामुळे बालके मानसिक तणावात जगतात. वडिलांना असलेले ह्यामुळे घरात भीतीचे वातावरण असते.

**२) बालविवाहाचा धोका** - बालविवाह हा मुलींकरिता मोकळेपणाने जगण्याची संधी नाकारणारी ही क्रूर रूढी आहे. शिक्षणाच्या साधनांचा अभाव, अपुरे शिक्षण, अज्ञान, हुंडा पध्दती, स्त्रियांचा दुय्यम स्थान ह्या अनेक कारणामुळे ग्रामीण विभागात व शहरात सुद्धा बालविवाहाची समस्या आहे. भारतात दरवर्षी लाखो बालविवाह होतात त्यामुळे माता मृत्यूदराचे प्रमाण अधिक आहे.

**३) अपेक्षा/स्वप्नांना मर्यादा** - साधनांच्या अभावामुळे ग्रामीण बालकांची स्वप्ने मर्यादित राहतात. अपूर्ण राहतात. उदा. विज्ञान शाखेचा अभाव, स्पोर्टस् क्लब चा अभाव, विविध कौशल्ये विकास केंद्राचा अभ्यास ह्या अनेक कारणामुळे ग्रामीण विभागात बालकांचा विकास अपूर्ण राहतो. वरिलप्रमाणे ग्रामीण भागातील बालकांची स्थिती प्रत्यक्षात दिसून येते. वास्तविकतः बालकांचे हक्क अबाधित राखण्यासाठी भारतीय संविधानात बालकांचे हक्क सुरक्षित ठेवलेले आहेत जसे - कलम २१ अ नुसार ६ ते १४ वयोगटातील मोफत व सक्तीचे शिक्षण, कलम २४ नुसार बालमजुरीवर बंदी, कलम ३९ (इ.फ) - बालकांच्या आरोग्य व नैतिक

विकासाचे सरंक्षण, कलम ४५ नुसार बालसंगोपन व शिक्षणाचा अधिकार आहे, कलम १४ नुसार प्रौढांप्रमाणे कोणताही भेदभाव न राखता कायदापुढे समानतेचा अधिकार आहे, कलम २१ नुसार बालकांना सुरक्षित सन्मानपूर्ण व आरोग्यदायी जीवन जगण्याचा मूलभूत हक्क आहे. म्हणजे या कलमानुसार सन्मानपूर्वक जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क आहे, कलम २३ नुसार मानवी तस्करी व सक्तीच्या मजुरीवर बंदी - बालकांची विक्री, तस्करी, सक्तीची मजुरी व गुलामगिरीवर बंदी घालण्यात आलेली आहे, कलम ४७ नुसार - पोषण व आरोग्य बालकांचे पोषण व आरोग्य सुधारण्याची जबाबदारी राज्यावर आहे. ह्यातूनच मिड-डे-मील ही संकल्पना राज्यात राबविली जाते.

अशाप्रकारे भारतीय संविधान बालकांना शिक्षण सरंक्षण, समानता, शोषणापासून मुक्ती, सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. हे मूलभूत हक्क भारतातील प्रत्येक बालकाला प्राप्त झालेले आहे. त्यामुळे बालकांचा सर्वांगिण विकास भविष्यात सुरक्षितला प्राप्त व्हावी हे संविधानाचे प्रमुख उद्दिष्ठ आहे. राज्यघटनेत/कागदोपत्री सर्वच बालकांचे हक्क सुरक्षित असले तरी ग्रामीण भागात गरीबीमुळे शिक्षण न घेणारे बालके, बालमजुरी, कुपोषण, सामाजिक असमानता मोठ्या प्रमाणात दिसून येते. लहान बालडेके शाळा सोडून गुरांना चारायला नेणे, गुरांसाठी चारा आणणे, लाकडे (जळतंण) आणणे, लहान भावडांना सांभाळणे, धुणी-भांडी, नळाचे पाणी भरणे ह्यासारख्या कामात गुंतलेले दिसून येतात. बालकांचे हक्क ही केवळ कायदेशीर संकल्पना नसून सामाजिक जबाबदारी आहे. बालक सुरक्षित, शिक्षीत व संक्षम असलाच पाहिजे हे राष्ट्राच्या भवितव्यासाठी खूप गरजेचे आहे. पण प्रत्यक्षात असे दिसून येते की, ग्रामीण विभागात सुध्दा व्यसन, ड्रग्ज सेवन सोबत (सिगारेट, गुटखा) चे लोण मोठ्या प्रमाणात पसरले आहे. मोबाईल व तंत्रज्ञानाचा प्रसार झपाट्याने होत आहे. ह्यापासून ग्रामीण विभाग अपवाद कसा राहील? मोबाइल चे दुष्परिणाम बालकांवर सुद्धा होत आहेत. रिल्स पाहणे, रिल्स बनविणे, ऑनलाइन गेमिंग, ऑनलाईन बेंटिंग, अनेक ऑनलाइन ॲपच्या माध्यमातून मुले इंटरनेट व मोबाईलच्या आहारी गेलेले आहेत हे फारच गंभीर वास्तविकता आहे. मोबाईलवर लुडो, पबजी सारखे गेम खेळून मुले मानसिक आजारी होत आहेत.

**बालकांच्या हक्कांच्या संदर्भातील भारतातील काही महत्वपूर्ण खटले :**

**१) एम. सी. मेहता विरुद्ध तामिळनाडू राज्य (१९९६)** धोकादायक क्षेत्रात (फटाके - रासायनिक पदार्थ) बालकामगारांना बंदी घातली आणि १४ वर्षाखालील मुलांसाठी मोफत शिक्षणाच्या अधिकाराची पुष्टी केली.

**२) उन्नी कृष्णन, जे.पी. विरुद्ध आंध्रप्रदेश राज्य (१९९३)** शिक्षणाचा अधिकार (कलम २१ अ) हा एक मूलभूत अधिकार आहे. जो राज्याविरुध्द लागू केला जाऊ शकतो हे अंमलात आले.

**३) शीला बरसे विरुद्ध भारतीय संघ (२००४)** हा एक महत्वाचा खटला जिथे सर्वोच्च न्यायालयाने भारतीय दंड संहिता कलम ३७५ अंतर्गत 'लैंगिक संभोग' ची व्याख्या व्यापक करण्यात येऊन त्यात विविध भेदभावपूर्ण कृत्ये समाविष्ट केली, ज्यामुळे बाल लैंगिक शोषण कायदे मजबूत झाले.

४) **बचपन बचाओ आंदोलन (विवीध प्रकरणे)** - २०१४ मध्ये नोबेल शांतता पुरस्कार प्राप्त कैलाश सत्यार्थी यांच्या संघटनेने दाखल केलेल्या जनहित याचिका ज्यामुळे बालमजुरी, तस्करी आणि बालकांचा मोफत आणि सक्तीचा शिक्षण हक्क कायदा, २००९ लागू करण्यासाठी न्यायालयाचे निर्देश मिळाले.

**५)** महाराष्ट्रातील ११ वर्षाचा मुलगा एका ग्रामीण भागातील होता. कुटुंबाच्या हलाखीच्या परिस्थीतीमुळे त्याला शाळा सोडून एका हॉटेलमध्ये काम करावे लागत असे. परतु १०-१२ तास काम, अल्प मजुरी त्यामुळे त्याचे शारिरिक-मानसिक शोषण होत होते. त्याला कमी वयात काम करावे लागत असल्यामुळे तो बालकामगार, शिक्षणापासून वंचित, सुरक्षित सन्मानपूर्वक जीवनाचा अभाव अनुक्रमे कलम २४, कलम २१ (अ) आणि कलम २१ चे उल्लंघन झाले. एका स्वयंसेवी संस्थेनी हस्तक्षेप केल्यामुळे त्या बालकाची हॉटेलमधुन सुटका झाली. बालकामगार प्रतिबंधक कायद्यानुसार मालकावर कारवाई झाली, त्या बालकाला शासकीय निवासी शाळेत प्रवेश, कुटुंबाला सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ झाला. त्या मुलाच्या शारिरीक व मानसिक आरोग्यात सुधारणा झाली आणि महत्वाचे म्हणजे बालकांचे शिक्षण व संरक्षण हे राज्याचे कर्तव्य असल्याची अंमलबजावणी झाली.

ह्या सर्व महत्वपूर्ण खटल्यांवरून असे म्हणता येईल कि गरीबी ही बालहक्कांच्या उल्लंघनाची प्रमूख कारणीभूत बाब आहे. संविधानातील तरतुदी केवळ कायद्यात नसून प्रत्यक्ष अंमलबजावणीची गरज आहे. राज्य, समाज व स्वयंसेवी संस्था यांचा समन्वय महत्वाचा आहे. हे सर्व खटले एकत्रितपणे बाल हक्क न्यायशास्त्राचा कणा बनवतात जे भारतातील सर्व मुलांसाठी शिक्षण, शोषणापासून सरंक्षण आणि कल्याण यावर भर देतात.

**बालकांचे हक्कांची सुशक्षितता /उपाययोजना:** प्रत्येक देशाचा बालक ह्या त्या देशाचा आधारस्तंभ असतो कारण तो उदयाचा समाज/राष्ट्र सांभाळण्याची जबाबदारी ही त्यांच्या खांद्यावर येणार असते. म्हणून बालकाला शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक सुदृढ राहणे गरजेचे आहे. त्यासाठी त्याला सुदृढ असे स्वस्थ व पोषक असे वातावरण भेटले पाहिजे.

परंतु एकंदरीत ग्राऊंड स्तरावर असे दिसून येते कि, असंख्य मुले शिक्षणापासून वंचित राहतात्, लहानपणातच त्यांना कामावर जावे लगते, शैक्षणिक साधने प्राप्त होत नाही. विटभट्टीवर काम करणारे कुटुंब, ऊस तोडणी कामगाराचे मुले ह्यांचे अर्धवट शिक्षण होते. फिरते जमातीचे कुटुंब हे तर अनेक गोष्टीपासून वंचित आहेत तर त्यांची मुले शिक्षणापासून कोसो दूर आहेत. उदा. मातीतील लोह चाळून घेण्याचे काम तासनतास करतात. मुलींचे विवाह खूप कमी वयात होतात. अनेक मुले तर दिवसभर भटकत राहतात. घरातील गुरे-ढोरांना चारा आणणे, जंगलातून किंवा गावाच्या आजूबाजूच्या परिसरातून जळतण जमा करणे, लहान भावंडाचा सांभाळ करणे, घरातील धुणी-भांडी प्रसंगी स्वयंपाक अशी अनेक कामे मुले करतात त्यांना स्वच्छंदीपणे जगता येत नाही. ह्यातूनच काही मुले व्यसनांच्या आहारी गेले, गुन्हेगारीकडे वळतात. तसेच अनेक बालके लैंगिक अत्याचाराचे बळी पडतात.

बालविवाह म्हणजे तर मुलींना शिक्षणाच्या व सक्षमीकरणापासून दूर ठेवणे होय. आजही भारतात लाखो बालविवाह होतात म्हणून आज २०२६ मध्ये सुध्दा 'बालविवाह मुक्त भारत' कार्यक्रम राबविणे शासनाला गरजेचे वाटते आहे आणि त्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. ह्या सर्वांपासुन मुलांना सुरक्षित ठेवणे काळाची गरज आहे त्यासाठी महत्वाच्या उपाययोजनांचा विचार करणे गरजेचे आहे.

**युनिसेफ नी सांगितल्या नुसार बालकांच्या हक्कांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना**

- जीवन व विकासाचा हक्क
- शोषण व हिंसापासून सरंक्षण
- बालकांचे संरक्षण
- शिक्षण व जागरूकता
- डिजीटल व सायबर सुरक्षा
- समानता
- आपत्कालीन परिस्थीतीत बालकांचे विशेष सरंक्षण
- दिव्यांग, आदिवासी, गरीब, स्थालांतरीत सर्व बालकांना समान संधी
- सुरक्षित बालक म्हणजे सशक्त व जबाबदार भविष्यातील नागरिक आहेत.

**२) कौटुंबिक पातळीवरील उपाययोजना -** पालकांनी आपल्या पाल्यांना वेळ देऊन मोकळा संवाद साधने महत्वाचे आहे. त्यामुळे भावनात्मक संबंध तयार होऊन एक-मेकांना समजून घेऊन मुलांना असलेल्या प्रश्नाचे मोकळेपणाने संवाद साधता येऊ शकते. पालकांनी योग्यरित्या मुलांचे पालनपोषण केले पाहिजे. मुलांना स्वसंरक्षण, स्वजबाबदारी शिकविली पाहिजे. पालकांनी मुलांच्या ऑनलाइन वापरावर देखरेख ठेवली पाहिजे. कुटुंब ही प्राथमिक शाळा आहे.

**३) शालेय स्तरावरील उपाययोजना -** ज्याप्रमाणे कुटुंबात पाल्य आणि पालकांचे ज्याप्रमाणे भावनिक संबंध असतात त्याचप्रमाणे शाळेत शिक्षक आणि विद्यार्थी ह्यांचे नाते सुध्दा पारदर्शक व मोकळे असले पाहिजे. शिक्षक हे संवेदनशील असले पाहिजे. शाळांमध्ये बालकांचे सरंक्षण धोरण असले पाहिजे. तक्रार निवारण यंत्रणा व समुपदेशन केंद्रे तसेच शाळेत पायाभूत सुविधा (इमारत, क्रिडांगण, वाचनालय, स्वयंपाकगृह, स्वच्छ स्वच्छता गृह, स्वच्छ पिण्याचे पाणी, प्रयोगशाळा, डिजीटल कक्ष) असल्या पाहिजेत. शाळेतील वातावरण असे असायाला हवे की, विद्यार्थी आपल्या शिक्षकांसोबत मुक्तपणे व भयमुक्त संवाद साधता आले पाहिजे आणि आपल्या मनातले प्रश्न मांडता आले पाहिजे, मोकळेपणाने जगता आले पाहिजे. शाळा हे व्यक्ति विकासाचे प्रमुख/प्राथमिक साधन आहे.

**४) समाज पातळी वरील उपाययोजना -** बालके ज्या समाजात राहतात त्या समाजात त्यांना सुरक्षितता मिळाली पाहिजे. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न होता सर्वांना समान संधी मिळालीच पाहिजे. त्यासाठी समाजात बालसरंक्षण समित्या सक्रिय असल्या पाहिजेत. त्याकरिता स्वयंसेवी संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थाचा सहभाग असला पाहिजे. समाजातून हिंसा व भेदभाव वृत्तीला विरोध केला पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक गावातील लोकांनी बालमजुरी आणि बालविवाह ह्याला प्रखर विरोध केला पाहिजे. समाजात असलेली बालमजुरी आणि बालविवाह हे बालकांच्या मूलभूत अधिकारांचा हनन करते. समाजात असलेल्या अंधश्रध्देतून बालकांना होणाऱ्या असुरक्षिततेपासून सरंक्षण करणे. (उदा. नरबळी)

१) **कायदेशीर आणि शासनपातळीवरील उपाययोजना:** बालहक्क सरंक्षण आयोग, पोक्सो कायदा - २०१२, ज्युवेनाइल जस्टीस ॲक्ट - २०१५, बालमजुरी प्रतिबंधक कायदा - १९८६ सुधारीत २०१६, १०९८ चाइल्ड हेल्पलाईन सुविधा, गुन्हेगारांवर उठगेर कार्रवाई त्याचप्रमाणे शासन पातळीवर समग्र बाल सरंक्षण योजना, शिक्षण, पोषक आहार व आरोग्य योजना, दुर्बल व वंचित बालकांसाठी विशेष योजना, आणि सायबर सुरक्षिततेसाठी धोरण बालकांच्या सुराक्षिततेसाठी शासन, कायदे, समाज प्रयत्नशिल तर आहेच यात शंका नाही परंतु अजूनही लाखो मुले समाजाच्या असमाजिक विळख्यात अडकलेले आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान हा मानवाच्या विकासासाठी आहे परंतु ह्याचे अधिक दुष्परिणाम समाजातील बालकांवर झालेला आहे. ऑनलाइन गेमिंग, बेटिंग, चाटिंग, रिल्स, पोर्नोग्राफी व्हिडीओ ह्यात ग्रामीण विभागात सुध्दा मुले अडकली आहेत. म्हणून कुटुंबातूनच सर्वात जास्ती सुरक्षा-वेळ-भावनात्मक आधार मिळणे अपेक्षित आहे. पालकांनी मुलांना वेळ दिला पाहिजे. बालविवाह रोखले पाहिजे. कुटुंबानंतर सर्वात प्रभावी साधन असते ते म्हणजे शाळा. शाळेत मूल्यात्मक शिक्षण, कौशल्य शिक्षण, स्पर्धात्मक परिक्षेची ओळख, खेळांवर भर देऊन मुलांना सुरक्षितता प्रदान करता येवू शकते.

त्याहीपेक्षा ज्या कारणांमुळे मुलांचे अधिकार त्यांना मिळत नाही त्या कारणांचा म्हणजे - गरीबी निर्मुलन, भेदभाव विरहीत समाज, अज्ञानता व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी चळवळी, उद्‌बोधन परिषदा, शाळेत समुपदेशन (मुलांचे व पालकांचे) मुलभूत सुविधा शासनाकडून सर्व सुविधांचा पुरवठा झाला पाहिजे त्याकरिता स्थानिक प्रतिनीधी, संबधित शासकीय विभाग, विवीध अधिकारी, शासकीय प्रतिनीधी, आमदार, खासदार ह्या सर्वांनी सामुहिक जबाबदारी स्विकारुन कृतिशील आराखडा तयार करून विकास करावा. जेणेकरुन भारतीय बालके सुरक्षित असेल तर उद्याचा भारत नक्कीच सुरक्षित असेल. रिमोट एरिया पर्यंत सर्व सोयी-सुविधा उपलब्ध झाल्यात पाहिजेत.

**निष्कर्ष:** बाल हक्क कायदा २००५ नुसार बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणे ही सरकार आणि समाजाची संयुक्त जबाबदारी आहे. कायदे असून सुध्दा प्रत्यक्षात बालकांचा सर्वांगिण विकासासाठी सामाजिक मानसिकता बदलणे आणि कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. आज भारताच्या विकास प्रक्रियेमध्ये ग्रामीण समाजाचे स्वरूप बदलत आहेत. परंतु अजूनही ग्रामीण भागात रुढीवादी-परंपरावादी विचार रूढ आहेत. त्यामुळे मुला-मुलींमध्ये भेद करुन अनेक बालके मुलभूत सुविधांपासून वंचित आहेत. उदा. बालविवाह प्रथा ज्यामुळे विशेषकरुन मुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. पौळावर, तांड्यावर, फिरस्ती समुह, स्थलांतरीत, वितभट्टीवर काम करणारे कुटुंब, उस तोडणी करणारे कुटुंब ह्यांची मुले शिक्षणापासुन आणि ईतर अनेक हक्कांपासून वंचित आहेत हे वास्तव आहे. महाराष्ट्रात १२.६ टक्के मुले आणि १०.३ टक्के मुली ह्यांनी जे २०२४-२५ मध्ये नववी-दहावीत प्रवेशीत होते. त्यांनी शिक्षण सोडले. सरासरी सुमारे ११.५ टक्के विद्यार्थ्यांनी शाळा सोडली आहे.

२०२५-२६ मध्ये महाराष्ट्रात एकूण ३०,७१४ विद्यार्थी शाळा बाह्य आहेत. तर १५,३५७ मुली आहेत ज्या शाळा बाह्य आहेत. राज्यात ३९४ शाळांमध्ये एकही विद्यार्थी नाहीत. बालविवाहाचे प्रमाण अधिक आहे. भारतात २३.३ टक्के टक्के बालविवाह होतांना दिसून येतात. बाल लैंगिक हिंसाचारचे प्रकरणे सुध्दा असंख्य आहेत. लैंगिक अत्याचाराबरोबरच मानवी तस्करी सुद्धा होतांना दिसून येते. त्याचप्रमाणे अनेक बालके गुन्हेगारीत अडकले आहेत. कौटुंबिक तणाव, हिंसा, शिक्षणाचा अभाव ह्या कारणांमुळे अनेकदा मुले गुन्हेगारीत अडकलेले आहेत. ग्रामीण समाजात मुलांमध्ये व्यसनाचे प्रमाण मग ते दारु-तंबाखू-गुटखा, सिगारेट, गांजा ह्या वस्तूंचे सेवन करण्याचे प्रमाण वाढलेले आहे. इंटरनेट व मोबाईलचे सुद्धा व्यसन मुलांना लागलेले आहे. ग्रामीण भागात बालमजुरी सुद्धा अधिक आहे. ह्यासर्वांसाठी कायदे अस्तित्वात आहेत. पण प्रत्यक्षात परिस्थीती/वास्तव फार गंभीर आहे. मुलांना पोषण, सुरक्षितता शिक्षण व सहभागाचे मिळणे आवश्यक आहे. परंतु गरीबी, जागरुकतेचा अभाव, पारंपारिक रूढी आणि अंमलबजावणीतील कमतरता यामुळे हक्कांचे संरक्षण होतांना आढळुन येत नाही. ग्रामीण भागात बालकांसाठी विशेष धोरणे व कार्यक्रम राबविणे अत्यंत आवश्यक आहे ज्यामध्ये शिक्षणाची व्यापकता वाढविणे, आहार-पोषणाच्या योजना, लैंगिक हिंसा विरुद्ध सुरक्षा आणि सामाजिक जागरुकता मोहिमांचा समावेश असावा. ग्रामीण विभागात असलेले कुपोषित बालके ह्यावर उपाययोजना असून सुद्धा ही आरोग्यविषयक समस्या अजूनही आहे.

भारतीय संविधानातील कलम २१(अ), २३ आणि कलम २४ यानुसार बालकांच्या हक्कांचे सरंक्षण करण्यासाठी अत्यंत्य प्रभावी आहेत. मात्र प्रामाणिकपणे योग्य अंमलबजावणी झाल्यास बालकांचे अधिकार सुरक्षित राहू शकतात. एवढे मात्र खरे की, बालकांची सुरक्षितता ही फक्त शासनाची जबाबदारी नसून कुटुंब, शाळा व समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. बालकांच्या विकासासाठी एकात्मक बाल विकास सेवा आयुक्तालय, केंद्रीय समाजकल्याण बोर्ड, महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, महिला आर्थिक विकास महामंडळ, राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य आणि पोषण मिशन, महिला व बाल विकास आयुक्तालय कार्यरत आहेत. प्रभावी उपाययोजना राबविल्यास बालकांचा सुरक्षित, सशक्त व सन्मानजनक विकास शक्य होईल.

**संदर्भसूची:**

१) आहुजा राम (२०१६) सामाजिक समस्याएँ, रावत पब्लिकेशन, जयपूर
२) आहुजा राम (२०१७) भारतीय सामाजिक व्यवस्था, रावत पब्लिकेशन, जयपूर
३) जैन, प्रकाश चन्द्र (२०२१) ग्रामीण समाजशास्त्र भारतीय परिप्रेक्ष्य, रावत पब्लिकेशन, जयपूर
४) https://egov.co.in
५) https://marathivishwakosh.org
६) https:// www.researchgate.net

---

# ग्रामीण समाजातील लिंगभाव आणि कुटुंब व्यवस्था

**डॉ. माधुरी झाडे** सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा

**सारांश:** लिंगभाव ही संकल्पना सामाजिक आहे. लिंगाच्या आधारावर कुटुंब व्यवस्थेमध्ये वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात एवढेच नाही तर अगदी जन्मापासून लिंगाच्या आधारावर राहणीमान, वेशभूषा,केशभूषा,कार्याची विभागणी देखील होते. अशा प्रकारच सामाजिकरण कुटुंबातून होत असते. कुटुंबातील सदस्य त्यांना सतत त्यांच्या भूमिकांची जाणीव कुटुंब करून देत असते. ग्रामीण कुटुंब संस्था लिंगाच्या आधारावर स्थापित झालेली असते. ग्रामीण कुटुंब व्यवस्थेमध्ये पितृसत्ता प्रणालीचे प्राधान्य असते. या लघुशोध प्रबंधामध्ये ग्रामीण कौटुंबिक व्यवस्थेत लिंगावर आधारित भूमिकेचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. तसेच पती-पत्नीच्या भूमिका, घरातील निर्णय प्रक्रिया, मुलांच्या संगोपणातील जबाबदारी आणि कुटुंबाच्या आर्थिक व्यवस्थापनात लिंगावर आधारित कुटुंबामध्ये स्थान व त्याचा प्रभाव या सर्वांचा विचार करण्यात आलेला आहे. तसेच या संशोधनाद्वारे ग्रामीण कौटुंबिक निर्णय व निर्णय प्रक्रियेतील सहभाग याचाही आढावा घेण्यात आलेला आहे.

---

**प्रस्तावना:** मानवी जीवनाचा सामाजिक इतिहास म्हणजे कुटुंबाचाच इतिहास आहे. मानवी जीवनाच्या आरंभापासून टोळी म्हणजेच कुटुंब होत. त्यानंतर स्वतंत्र कुटुंब व्यवस्था अस्तित्वात आली. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सांस्कृतिक विकासाच्या सर्वच स्तरामध्ये कुटुंब संरचना दिसून येते. कुटुंब समाजातील एक मूलभूत अणि प्राथमिक स्वरूपाचा सामाजिक समुह आहे. तसेच कुटुंब हा सामाजिक जीवनाचा प्राथमिक एकक आहे, पहिली अवस्था आहे. .चार्लस कुले यांनी कुटुंबाला असा एक प्राथमिक समुह मानले आहे की, ज्यामध्ये आपत्याचे समाजिकरण केले जाते. ग्रामीण कुटुंब व्यवस्था पारंपारिक सामाजिक मूल्यांवर आधारित आहे. जिथे पुरुषांना कुटुंबप्रमुख मानले जाते आणि महिलांवर घरगुती कामाची जबाबदारी टाकली जाते. पितृसत्ताक व्यवस्था ग्रामीण भागातील कौटुंबिक जीवनाचा गाभा असून ती कुटुंबातील स्त्री पुरुषांच्या अधिकार आणि जबाबदारी यांच्यावर थेट परिणाम करते. लिंगभाव ही संकल्पना सामाजिक आहे. लिंगाच्या आधारावर कुटुंब व्यवस्थेमध्ये वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात एवढेच नाही तर अगदी जन्मापासून लिंगाच्या आधारावर राहणीमान केसभूषा, वेशभूषा तसेच कार्याची विभागणी होत असते. अशा प्रकारे त्यांच सामाजीकरण कुटुंबातून घडत असते. कुटुंबातील सदस्यांना त्यांच्या भूमिकेची जाणीव कुटुंब करून देत असते. ग्रामीण कौटुंबिक संरचनेमध्ये महिलांना अनेकदा घरगुती व मुलांच्या संगोपनाच्या जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात. तर पुरुष शेती

व्यवसाय आणि कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये मुख्य भूमिका बजावतात. या पारंपारिक व्यवस्थेमुळे महिलांचे शैक्षणिक आर्थिक व सामाजिक प्रगतीचे स्वातंत्र्य मर्यादित राहते. बदलत्या काळानुसार काही ठिकाणी या भूमिका बदलत असल्या तरी ग्रामीण भागातील महिलांना अजूनही अनेक अडथळयांना समोरे जावे लागते. उदाहरणार्थ शिक्षणाविषयी निर्णय घेत असताना मुलगा व मुलगी यामध्ये भेद करण्यात येतो. मुलांच्या शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येतो तर मुलीच्या शिक्षणावर अत्यल्प खर्च करण्यात येतो. घरातील कोणत्याही निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान असते. ग्रामीण कुटुंबातील घराची संरचना बदलली असली तरी आजही अनेक पारंपरिक मूल्य व पितृसत्ताक व्यवस्थेचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात दिसून येते. निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांचा अत्यल्प सहभाग असलेला आपल्याला दिसून येतो. आजही ग्रामीण स्त्रिया या चूल आणि मुल इथपर्यंत सीमित असलेल्या दिसून येतात. आजही घरातली कामे ही स्त्रियांचीच आहे असा समज ग्रामीण पुरुषांचा आहे. ग्रामीण कुटुंब व्यवस्था लिंगाच्या आधारावर व्यवस्थापित झालेली असते. जिथे पितृसत्ता प्रणालीचे प्राबल्य आहे. या संशोधन प्रबंधामध्ये ग्रामीण कौटुंबिक संरचनेत लिंगावर आधारित भूमिकेचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. पती-पत्नीच्या भूमिका, घरातील निर्णय प्रक्रिया, मुलांच्या संगोपनातील जबाबदाऱ्या आणि कुटुंबाच्या आर्थिक व्यवस्थापनात लिंगावर आधारित कौटुंबिक स्थान व त्याचा प्रभाव या सर्वांचा विचार करण्यात आलेला आहे तसेच या संशोधनाद्वारे ग्रामीण कौटुंबिक निर्णय व इतर निर्णय प्रक्रियेत सहभाग याचाही आढावा घेण्यात आलेला आहे.

**साहित्याचे पुनरावलोकन:** अग्रवाल,(1994), यांच्या संशोधनानुसार ग्रामीण भागातील कुटुंबीय संरचना पितृसत्ताक व्यवस्थेवर आधारित आहे जिथे स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. महिलांच्या निर्णय प्रक्रियेमध्ये सहभाग कमी असून त्यांच्या आर्थिक स्वायत्तेवर अनेक बंधने असतात. कबिअर,(1999), यांच्या मते,ग्रामीण भागातील महिलांना संपत्ती जमीन आणि संसाधनावरील हक्क फारच कमी प्रमाणात मिळतात. कुटुंबातील आर्थिक संसाधनावर पुरुषांचे नियंत्रण असल्यामुळे महिलांना आर्थिक निर्णयांमध्ये समाविष्ट केले जात नाही. ड्रेझ आणि सेन, (2013), यांच्या संशोधनातून असे दिसून आले की,ग्रामीण भागातील महिलांना शिक्षण आणि आरोग्यसेवाचा मर्यादित लाभ होतो. घरगुती जबाबदाऱ्या आणि संसाधनाच्या अभावामुळे त्यांच्या आरोग्याला दुय्यम महत्त्व दिले जाते. वरील साहित्याचा आढावा घेऊन तसेच वर्धा जिल्ह्यातील वर्धा तालुक्यातील ग्रामीण भागातील महिला व पुरुषांच्या मुलाखती घेऊन अभ्यास करण्यात आलेला आहे..

**अध्ययन पद्धती:** प्रस्तुत अध्ययन करताना संशोधनकर्तिने वर्णनात्मक संशोधन आराखडा घेऊन संशोधन केले आहे. ग्रामीण भागातील कुटुंबरचना, लिंगभाव या आधारे समाजशास्त्रीय दृष्टीकोणाचा आधार घेऊन, वर्णन करून संशोधनकार्य पूर्ण केले आहे.

**अध्ययन क्षेत्र आणि नमूना निवड** - प्रस्तुत संशोधनात्मक अध्ययनाकरीता वर्धा जिल्ह्यातील, वर्धा तालुक्यातील जवळच्या पाच गावांची निवड केली. येळाकेळी, पांढरकवडा, उमरी, कुरझडी, रोठा या पाचही गावातून प्रत्येकी पाच पुरुष व पाच महिला अशी ५० उत्तरदात्यांची निवड गैरसंभाव्यता नमूना निवड पद्धतितील सहेतूक, उद्देशपूर्ण नमूना निवड पद्धतीचा वापर करून करण्यात आली आहे.

**तथ्य संकलन** - प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक स्त्रोतमध्ये मुक्त व बंदिस्त अशा संरचित मुलाखत अनुसुचीचा वापर करून प्रत्यक्ष मुलाखत घेऊन तसेच मुलाखत घेताना सहभागी निरीक्षण पद्धतीचा वापर केला आहे. दुय्यम स्त्रोताद्वारे विषयाशी संबंधित प्रकाशित ग्रंथ, संशोधन साहित्य.संशोधन अहवाल, संशोधन निबंध, वर्तमानपत्रातील विविध लेख, दिवाळी अंक, मासिक, इन्टरनेट या सर्व माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आला.

**संशोधनाची उद्दिष्टे** - १) ग्रामीण कुटुंब व्यवस्थेतील लिंगभावविषयक भूमिका जाणून घेणे. २) ग्रामीण कुटुंब व्यवस्थेतील घरगुती कामाविषयीची स्त्री व पुरुषांची भूमिका जाणून घेणे. ३) ग्रामीण भागातील पितृसत्ताक व्यवस्थेमुळे स्त्रियांवर होणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि मानसिक परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके** - १) ग्रामीण कुटुंब व्यवस्था आजही लिंगाधारीत असून पितृसत्ताक मूल्यावर आधारित आहे. २) ग्रामीण भागातील महिलांवर आजही घरातील संपूर्ण काम करण्याची जबाबदारी असते. ३) ग्रामीण कुटुंब व्यवस्थामध्ये प्रत्येक निर्णय हे पुरुष स्त्रियांना गृहीत धरून घेतात. ४) ग्रामीण भागातील महिलांचा आर्थिक निर्णय प्रक्रियेमध्ये अत्यल्प सहभाग असतो.

ग्रामीण समाजातील लिंगभावाच्या आधारावर कुटुंबातील झालेले कामाचे विभाजन जाणून घेण्याकरिता खालील सारणीचा समावेश करण्यात आला आहे.

**कौटुंबिक जबाबदारी व निर्णय दर्शक सारणी**

| अ. क्र. | | स्त्री | | | | पुरुष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री | पुरुष | दोघांचीही | एकूण | स्त्री | पुरुष | दोघांचीही | एकूण |
| १ | स्वयंपाक | २१ (८४) | ०० (००) | ०४ (१६) | २५ (१००) | २३ (९२) | ०० (००) | ०२ (०८) | २५ (१००) |
| २ | धुनी भांडी | २२ (८८) | ०० (००) | ०३ (१२) | २५ (१००) | २३ (९२) | ०० (००) | ०२ (०८) | २५ (१००) |
| ३ | झाडू पोछा | २१ (८४) | ०० (००) | ०४ (१६) | २५ (१००) | २१ (८४) | ०० (००) | ०४ (१६) | २५ (१००) |
| ४ | मुलाचे संगोपन | १५ (६०) | ०३ (१२) | ०७ (२८) | २५ (१००) | १५ (६०) | ०३ (१२) | ०७ (२८) | २५ (१००) |
| ५ | आई वडिलाची सेवा | १५ (६०) | ०३ (१२) | ०७ (२८) | २५ (१००) | १५ (६०) | ०३ (१२) | ०७ (२८) | २५ (१००) |
| ६ | आर्थिक निर्णय | ०० (००) | २१ (८४) | ०४ (१६) | २५ (१००) | ०० (००) | २२ (८८) | ०३ (१२) | २५ (१००) |
| ७ | इतर निर्णय | ०६ (२४) | १२ (४८) | ०७ (२८) | २५ (१००) | ०२ (०८) | १६ (६४) | ०७ (२८) | २५ (१००) |

**टिप:**- वरील सारणी मधील कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, कौटुंबिक जबाबदारी विषयी निर्णय घेत असताना उत्तरदात्यांना विविध प्रश्न विचारण्यात आले. त्यांचा आढावा सारणी मध्ये घेण्यात आला. त्याचे सविस्तर विश्लेषण हे पुढील प्रमाणे आहे.

कौटुंबिक जबाबदारी मध्ये स्वयंपाक करण्याची जबाबदारी ही स्त्रियांची आहे. असे २१ म्हणजे ८४ टक्के महिलांना वाटते. तर स्वयंपाक करण्याची जबाबदारी ही स्त्रियांचीच आहे असे २३ म्हणजे ९२ टक्के पुरुषांना वाटते स्वयंपाकाची जबाबदारी ही दोघांची आहे असे चार म्हणजे १६ टक्के स्त्रियांना वाटते. तर स्वयंपाक करण्याची जबाबदारी दोघांची असे दोन म्हणजे ०८ टक्के पुरुषांना देखील वाटते. यावरून स्वयंपाकाची जबाबदारी ही पारंपारिक पद्धतीने स्त्रियांकडे आहे असे दिसून येते- परंतु यामध्ये १६ टक्के महिला व ०८ टक्के पुरुषांना स्वयंपाकाची जबाबदारी दोघांची असे वाटते यावरून पारंपारिक पद्धतीला थोड्याफार प्रमाणात तडा जातो आहे असेही आपणास दिसून येते. धुनी भांडी करण्याची जबाबदारी ही २२ म्हणजे ८८ टक्के महिलांना स्त्रियांची आहे असे वाटते तर २३ म्हणजे ९२ टक्के पुरुषांना देखील धुनी भांडी करण्याची जबाबदारी स्त्रियांची आहे असे वाटते असे असले तरी अत्यल्प म्हणजे तीन म्हणजे १२ टक्के महिलांना व ०२ म्हणजे ०८ टक्के पुरुषांना धुनी भांडी करण्याची जबाबदारी ही दोघांची आहे असे वाटते यावरून पारंपारिक पद्धतीमध्ये थोड्याफार प्रमाणात बदल होताना दिसून येतो. झाडू पोछा करण्याची जबाबदारी २१ म्हणजे ८४ टक्के महिलांना तसेच याच प्रमाणात पुरुषांनाही ही जबाबदारी महिलांचीच आहे असे वाटते परंतु यामध्ये देखील चार म्हणजे १६ टक्के पुरुष व १६ टक्के महिलांना ही जबाबदारी दोघांचीही आहे असे वाटते. यामध्ये देखील थोड्याफार प्रमाणात का होईना या पारंपारिक कामाला पुरुष व स्त्रिया नाकारताना दिसतात. मुलाचे संगोपन व तयारी तसेच म्हातारे आई-वडिलांची सेवा करण्याची जबाबदारी ही स्त्रियांची आहे असे मत व्यक्त करण्यामध्ये स्त्री व पुरूषांचे प्रमाण सारखेच म्हणजे १५असून त्यांची टक्केवारी ६० आहे. महिलांना व पुरुषांनाही ही जबाबदारी पुरुषांची आहे असे वाटते. मुलाचे संगोपन व तयारी तसेच म्हातारे आई-वडिलांची सेवा करण्याची जबाबदारी ही दोघांचिही आहे असे २८ टक्के स्त्रियांना तर २८ टक्के पुरुषांना देखील वाटते.यावरून आपल्या असे निदर्शनास येते की, मुलांची तसेच म्हाताऱ्या आई-वडिलांची सेवा करण्याची जबाबदारी ही ६० टक्के स्त्रियांना व ६० टक्के पुरुषांना वाटत असली तरी मात्र २८ टक्के स्त्रियांना व २८ टक्के पुरुषांनाही जबाबदारी दोघांची आहे असे वाटते. यावरून सांगोपणाच्या विचार वेगवेगळ्या पद्धतीने होऊ लागला आहे असे आपल्याला दिसून येते. कुटुंबातील आर्थिक निर्णय घेण्याची जबाबदारी पुरुषांची आहे असे २१ म्हणजे ८४ टक्के स्त्रियांना वाटते. तर ०४ म्हणजे १६ टक्के स्त्रियांना आर्थिक निर्णय घेण्याची जबाबदारी ही दोघांची आहे असे वाटते. २२ म्हणजे ८८ टक्के पुरुषांना कुटुंबातील आर्थिक निर्णय घेण्याची जबाबदारी ही पुरुषांचीच असते असे सांगितले, तर ०३ म्हणजे १२ टक्के पुरुषांनी कुटुंबातील आर्थिक निर्णय घेण्याची जबाबदारी ही दोघांचीही आहे असे मत व्यक्त केले. यावरून असे दिसून येते की,अजूनही खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक निर्णय हे पुरुषच घेत आहेत. इतर निर्णय घेण्याची जबाबदारी यामध्ये विशेषत: वैवाहिक, शैक्षणिक, आरोग्य विषय निर्णय घेण्याची जबाबदारी पुरुषांचीच आहे असे १२ म्हणजे ४८ टक्के स्त्रियांना वाटते. ०६ म्हणजे २४ टक्के स्त्रियांना इतर निर्णय घेण्याची जबाबदारी स्त्रियांची असते असे वाटते तर ०७ म्हणजे २८ टक्के स्त्रियांनी इतर निर्णय घेण्याची जबाबदारी ही दोघांची आहे असे मत व्यक्त केले. १६ म्हणजेच ६४ टक्के पुरुषांना इतर निर्णय घेण्याची जबाबदारी ही पुरुषांचीच असते असे वाटते, ०२ म्हणजे ०८ टक्के पुरुषांना इतर निर्णयची जबाबदारी ही स्त्रियांची असते असे वाटते तर ०७ म्हणजे २८ टक्के पुरुषांनी इतर निर्णय हे दोघांनी मिळून घेतले पाहिजे असे मत व्यक्त केले. यावरून असे निदर्शनास येते की, इतर निर्णय घेताना अधिकांश प्रमाणात म्हणजे ४८ टक्के स्त्रियांना व ६४ टक्के पुरुषांना हे निर्णय पुरुष घेतात असे वाटते परंतु असे असले तरी हे निर्णय दोघेही घेतात असे मत व्यक्त करणाऱ्यां स्त्रियांची संख्या ४८ टक्के व पुरुषांची २८ टक्के आहे हे मात्र लक्षात घेण्यासारखे आहे असे दिसून येते.

**निष्कर्ष:** १) ग्रामीण कुटुंब व्यवस्था आणि लिंगभाव यांचे नाते आजही पितृसत्ताक व्यवस्थेवर आधारलेले दिसून येते. २) आजही कुटुंबातील प्रमुख जबाबदाऱ्या उदाहरणात स्वयंपाक धुनी भांडी, झाडू पोछा करण्याची जबाबदारी ही स्त्रियांवर आहे असे असले तरी अत्यल्प प्रमाणात का होईना ही जबाबदारी दोघांची आहे, असे काही प्रमात स्त्री व पुरुषांना वाटायला लागले आहे. ३) आजही आर्थिक निर्णय प्रक्रियेमध्ये पुरुषांचेच वर्चस्व मोठ्या प्रमाणात दिसून येते. स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही मतप्रदर्शनावरून असे लक्षात येते. ४) महिलांना इतर निर्णयांमध्ये उदाहरणार्थ विवाह,आरोग्य, शिक्षण इत्यादी अधिकार मर्यादित का असेना परंतु स्त्री आणि पुरुषांना मिळतात असे दोघांनाही वाटते.

**शिफारसी:** १) मुलाचे संगोपन करतानाच कार्याच्या विभाजना संदर्भात लिंगाच्या आधारावर भेदभाव करू नये. २) मुला-मुलींना प्राथमिक शाळेमध्ये स्त्री-पुरुष समता या मूल्याचे धडे देण्यात यावे. ३) शाळा कॉलेजमध्ये कोणत्याही कार्याची विभागणी करताना लिंगाच्या आधारावर करू नये. ४) कुटुंबामध्ये निर्णय प्रक्रियेत कुटुंबातील सर्व सदस्यांचा सहभाग असावा. ५) लिंगभाव विचार, कृतीत रुजावा याकरिता कुटुंब, समाज यात जागरूकता येण्याकरिता शासहकीय पातळीवरून अंमलबजावणी व्हायला हवी.

**संदर्भसूची**


१) प्रदीप आगलावे , (२००८), संशोधन पद्धतीशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२) कऱ्हाडे बी.एम.,(२०११), ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, महाल नागपूर ४४००३२.
३) भासीन कमला आणि तांबे श्रुती, (२०१०), लिंगभाव समजून घेताना, लोकवाड्मय गृह प्रकाशन, मुंबई
४) देशमुख गणेश,(२००८), ग्रामीण समाज,जीवन व साहित्य स्वरूप,प्रकाशन सिडको, औरंगाबाद, ४३१००३.
५) जोशी पुरणचंद्र,(१९९६), भारतीय ग्राम स्थानीक परिवर्तन आणि आर्थिक विकास, राजकमल प्रकाशन दिल्ली.
६) मदन जी.आर., (१९९८), भारत का ग्रामीण पुनरनिर्माण, विवेक प्रकाशन जवाहर नगर दिल्ली .
७) डॉ. सुजाता कराडे, (२०२३), लिंगभाव संवेदना आणि सामाजिक वास्तव, समाजशास्त्र संशोधन पत्रिका.
८) Sheikh Akbar Iqbal, (2005), Welfare of women and the disadvantaged group.sublime publication 28 Jain bhavan Shanti Nagar Jaipur 302 006.
९) Gupta Shakuntala, (2005), Development in India. Anmol publication private limited Ansariroad daryaganj, New Delhi 2327800

# ग्रामीण विकासाची आव्हाने

**डॉ. मोनाली यशवंत बहादुरे,** सहाय्यक प्राध्यापक, (समाजशास्त्र विभाग), नूतन आदर्श कला वाणिज्य आणि श्रीमती म.ह.वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड

**गोषवारा:** भारतातील ग्रामीण विकास हा एक महत्त्वपूर्ण विषय आहे. आजही बहुसंख्य लोक ग्रामीण भागातच राहतात. भारताच्या सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक विकासासाठी ग्रामीण विकास आवश्यक आहे.ग्रामीण विकास हा भारताचा समग्र विकासाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास केल्याशिवाय देशाच्या एकूण प्रगतीची कल्पनाही अशक्य आहे. ग्रामीण भागात मुख्यतः कृषी, अन्नधान्य, उत्पादन, पशुपालन आणि लघु उद्योगांवर आधारित अर्थव्यवस्था असते. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला केवळ अर्थव्यवस्थेचाच नाही तर सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय दृष्टीनेही महत्त्वाचे आहे. ग्रामीण विकाससमोर गरिबी, बेरोजगारी अपुऱ्या पायाभूत सुविधा, शिक्षणाचा अभाव आणि आरोग्य सेवांची कमतरता ही मुख्य आव्हाने आहेत. या सोबतच शेतीवर अवलंबून राहणे, पाण्याचे दुर्भिक्ष्य, तंत्रज्ञानाचा अभाव आणि शहरांकडे होणारे स्थलांतर यामुळे ग्रामीण विकासाचा वेग मंदावला आहे. सामाजिक मागासलेपणा आणि प्रशासकीय त्रुटी हे देखील मोठे अडथळे ठरत आहे. प्रगत तंत्रशास्त्र व त्याबरोबर येणारी संस्कृती यांचेकडून होणारे आक्रमण या ग्रामीण विकासाच्या संकल्पनेस विघातक ठरेल. ग्रामीण विकास हा एकूण सामाजिक विकासाचा मूलाधार आहे. ग्रामीण भारताचे व्यक्तिमत्व उंचावल्याशिवाय भारताचे व्यक्तिमत्व उंचावले जाणार नाही म्हणून सध्या भारताचा विकास घडवून आणताना आपला रोख मुख्यतः ग्रामीण भागावरच असला पाहिजे.
**बिजशब्द:** ग्रामीण, समाज, विकास, आव्हाने, प्रगत.

**प्रस्तावना:** ग्रामीण विकास ही संकल्पना ग्रामीण आणि विकास या दोन संज्ञांच्या एकत्रीकरणातून बनलेली आहे. भारतीय समाज हा प्रधान्येकरून ग्रामीण समाज आहे. तरीही पंचवीस-तीस वर्षांपूर्वी शतकानुशतकांच्या वासाहतिक साम्राज्याच्या मगरमिठीतून मुक्तता करून राजकीय दृष्ट्या स्वतंत्र राष्ट्र म्हणून भारत उदयास आला तेव्हापासून आपण आपल्या विकासाचा जो ढाचा ठरवून घेतला आहे, तो मात्र ग्रामीण विकासाला अगदी विरोधी नसला तरी त्याबाबत उदासीन असा आहे. ग्रामीण विकास हा एक व्यापक दृष्टीकोन आहे जो ग्रामीण नागरिकांचे जीवनमान आणि आर्थिक स्तर उंचावण्यासाठी आहे. या विकास प्रक्रीयेच्या संदर्भात अनेक कार्यक्रम राबविण्यात आले आहेत जे या प्रदेशांना भेडसावणाऱ्या विशिष्ट समस्यांना तोंड देण्यासाठी वापरले जातात, ज्यामध्ये गरिबी, खराब पायाभूत सुविधा, अपुरी आरोग्य सेवा आणि पुरेसे शिक्षणाचा अभाव यांचा समावेश आहे. ग्रामीण विकास म्हणजे स्थापित संरचनात्मक सुविधा म्हणजे स्वच्छ पाणी, वीज आणि स्वच्छता यासारख्या प्रमुख सुविधांमध्ये प्रवेश मिळवून ग्रामीण लोकसंख्येला निरोगी आणि अधिक उत्पादक जीवन प्रदान करण्याचा प्रयत्न. याशिवाय, चांगल्या आरोग्य सेवा आणि शैक्षणिक सुविधांना प्रोत्साहन देणे. अनेकदा अशा उपक्रमांमध्ये प्रादेशिक उद्योगाची वाढ, वाहतूक सुधारणा आणि शाश्वत कृषी पद्धतीचा प्रचार यांचा समावेश असतो. याव्यतिरिक्त ग्रामीण विकास म्हणजे समुदायांना त्यांचा स्वतःचा विस्तार आणि विकास व्यवस्थापित करण्यासाठी आवश्यक असलेली साधने देणे. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सहभाग वाढवून, ते ग्रामीण समुदायांच्या गरजा आणि मते ऐकली जातील याची हमी देते. शाश्वता, समावेशकता आणि दीर्घकालीन नियोजनावर भर देऊन, ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट गतिमान, लवचिक समुदाय तयार करणे आहे जे उदयोन्मुख विकासाच्या शक्यतांचा फायदा घेऊ शकतात आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेऊ शकतात. ग्रामीण समाजाचा विकास अर्थ स्प्ट करताना असे म्हटले जाते की, ग्रामीण जनतेच्या समस्यांचे निराकरण करून ग्रामीण समाजाची सर्वांगीण प्रगती घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय. यावरून ग्रामीण विकासाचे आव्हान किती मोठे आहे याची कल्पना येते.

**ग्रामीण विकास - व्याख्या:** ग्रामीण विकास म्हणजे त्या क्षेत्रांचा सामाजिक आणि आर्थिक दृष्टीकोनातून सर्वांगीण विकास करणे जेथे लोकांची जीवनशैली सुधारली जाऊ शकते. यामध्ये कृषी, रोजगार, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, इन्फ्रास्ट्रक्चर( सडक, वीज इत्यादी), सामजिक सुरक्षा, पर्यावरणीय संरक्षण आणि ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण यासारख्या अनेक बाबींचा समावेश होतो. **जी पार्थसारथी-** ग्रामीण भागातील गरीब लोकांना त्यांच्या भौतिक आणि मानवी साधनसंपत्तीचा अधिक चांगला उपयोग करण्याच्या संधी देऊन त्यांचे जीवनमान उंचावणे हे ग्रामीण विकासातील निर्णायक घटकत्व आहे. याशिवाय ग्रामीण साधनसंपत्तीचा उपयोगास कार्यात्मक महत्व असत नाही. **जेम्स एच. कॉप्प** - ग्रामीण विकास ही सामूहिक प्रयत्नांची अशी प्रक्रिया आहे की जिच्याद्वारे नागरी यंत्राबाहेर राहणाऱ्या लोकांच्या कल्याणात आणि आत्मसाक्षात्कारात सुधारणा करण्याचे ध्येय बाळगले जाते. **जागतिक बँक ग्रामीण विकास क्षेत्रीय धोरण प्रबंध** - विशिष्ट लोकसमुहाच्या ग्रामीण भागातील गरीब लोकांच्या-आर्थिक सामाजिक जीवनात सुधारणा करण्यासाठी तयार केलेली व्यूहरचना म्हणजे ग्रामीण विकास होय. ग्रामीण भागात उपजीविकेची साधने मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या लोकांमध्ये जे सर्वात अधिक गरीब आहेत त्यांच्यापर्यंत विकासाची व्यूहरचनेत समावेश होतो.अशा समूहामध्ये लहान शेतकरी, कुळे व भूमिहीन लोकांचा समावेश आहे.

**ग्रामीण विकासाची वैशिष्ट्ये:**

**कृषी विकास व रोजगार निर्मित:** ग्रामीण विकासाच्या केंद्रबिंदू कृषी विकास आहे. यामध्ये शेती उत्पादन वाढवणे, नवीन तंत्रज्ञान वापरणे आणि सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करणे यावर लक्ष केंद्रित केले जाते. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे महत्वाचे आहे. यासाठी लघु उद्योग हस्तकला आणि इतर ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन दिले जाते.

**पायाभूत सुविधा:** ग्रामीण भागात रस्ते, वीज, पाणी, शाळा, आणि आरोग्य सेवा यांसारख्या पायाभूत सुविधांचा विकास करणे आवश्यक आहे.

**शिक्षण आणि आरोग्य:** ग्रामीण भागातील लोकांमध्ये शिक्षण आणि आरोग्याबद्दल जागरूकता वाढवणे आणि त्यांना चांगली व आरोग्य सेवा उपलब्ध करणे.

**गरिबी निर्मुलन:** ग्रामीण भागातील गरिबी कमी करणे हे ग्रामीण विकासाचे महत्त्वाचे उद्धिष्ट आहे.

**सामाजिक विकास:** ग्रामीण भागातील सामाजिक संबंध सुधारणे, जातीय भेद आणि इतर सामाजिक समस्या कमी करणे.

**पर्यावरण संरक्षण:** ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधानाचे संरक्षण करणे आणि पर्यावरण पूरक विकास करणे.

**ग्रामीण विकासाचे महत्व:** संपूर्ण देशाचा विकास संतुलित आणि समतोल पद्धतीने होण्यासाठी, ग्रामीण विकास आवश्यक आहे. तो ग्रामीण आणि शहरी वातावरणातील फरकांना तोंड देतो, जो संधी, संसाधने आणि राहणीमानाच्या बाबतीत वारंवार दिसून येत. ग्रामीण विकासासाठीचे उपक्रम ग्रामीण लोकांना भेडसावणाऱ्या विशिष्ट अडचणींवर लक्ष केंद्रित करून या क्षेत्रे आणि महानगरीय केंद्रामधील दरी कमी करण्यास मदत करतात, जसे की गरीब उत्पन्न पातळी, पायाभूत सुविधांचा अभाव आणि आरोग्यासेवा आणि शिक्षणाची मर्यादित उपलब्धता. अशा प्रकारे, गरिबी कमी होते, अन्न सुरक्षा सुधारते आणि सामाजिक समावेशनाला प्रोत्साहन दिले जाते. कारण ते लघु व्ययवसाय, शेती आणि इतर स्थानिक क्षेत्रांना बळकटी देऊन अर्थव्यवस्थेत विविधता आणते, एक सुविकसित ग्रामीण क्षेत्र शहरी अर्थव्यवस्थांवरील अति अवलंबित्व कमी करून अधिक शाश्वत आर्थिक वाढीस हातभार लावू शकते.

**सामाजिक समावेशान आणि सक्षमीकरण:** ग्रामीण विकासाचा एक महत्वाचा घटक म्हणजे सामाजिक समावेश आणि सक्षमीकरण, जे वंचित आणि उपेक्षित व्यक्तींना मुख्य प्रवाहातील सामाजिक-आर्थिक रचनेत समाकलित करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करते. या प्रयत्नानुसार लिंग, वय, वंश किंवा सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी काहीही असो सर्व लोकांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची आणि त्यातून फायदा मिळवण्याची समान संधी मिळाली पाहिजे.

**गरिबी आणि असमानता कमी करणे:** ग्रामीण भागातील सर्वात दुर्लक्षित समुदायांवर लक्ष केंद्रित करणारा ग्रामीण विकास हा गरिबी आणि असमानता कमी करण्यासाठी आवश्यक आहे. आर्थिक संसाधने, शिक्षण आणि व्यवसायिक प्रशिक्षण यासह विवध धोरणामुळे हे प्रकल्प आर्थिक संधी वाढवण्याचे उद्धिष्ट ठेवतात. ग्रामीण विकासासाठीचे कार्यक्रम लोकांना गरीबीचे चक्र तोडण्यास आणि कौशल्ये सुधारून आणि कामाच्या शक्यता निर्माण करून चांगली आर्थिक स्थिरता प्राप्त करण्यास मदत करतात. ग्रामीण विकासामुळे सामाजिक समानता वाढते. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी करून ही केंद्रित रणनीती अर्थिक प्रगतीचे फायदे अधिक निष्पक्षपणे वाटले जातात याची खात्री करते.

**सुधारित पायाभूत सुविधा:** ग्रामीण भागात दीर्घकालीन आर्थिक विकास आणि राहणीमान सुधारण्यासाठी पायाभूत सुविधांमध्ये वाढ हा ग्रामीण विकासाचा एक महत्वाचा घटक आहे. ग्रामीण शहरे मोठ्या आर्थिक केंद्राशी जोडण्यासाठी, रस्ते, पूल आणि सार्वजनिकवाहतूक यासारख्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे अत्यंत महत्वाचे आहे. या मुळे शेतकरी आणि लघु उद्योगांसाठी मोठ्या बाजारपेठांमध्ये वाढलेली प्रवेशक्षमता आर्थिक क्रियाकलापांन चालना देते.आणि उत्पन्नाची पातळी वाढवते. यामुळे वस्तू आणि सेवांची वाहतूक करणे देखील सोपे होते.

**आर्थिक विविधीकरण:** ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या आर्थिक शक्यता आणि उपक्रमांची व्याप्ती वाढवण्याच्या दृष्टीकोनाला ग्रामीण विकासात आर्थिक विविधीकरण असे म्हणतात. हंगामी चढउतार आणि शेतीच्या किमतीमध्ये बदल झाल्यामुळे, ऐतिहासिकदृष्ट्या शेतीवर अवलंबून असलेल्या अनेक ग्रामीण जिल्ह्यांना अडचणी येतात. ग्रामीण विकास आर्थिक विविधीकरणाला चालना देऊन या आव्हानांना तोंड देऊ शकतील असे विविध रोजगार आणि उत्पन्नाचे स्रोत निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

**पर्यावरणीय शाश्वता:** पर्यावरणीय शाश्वत पद्धतीमध्ये अशा पद्धतीचा समावेश आहे ज्या अक्षय उर्जा उपक्रमांना समर्थन देतात, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देतात आणि जमीन आणि जलसंपत्तीचा वापर करण्यास प्रोत्साहन देतात. उदा.पाणी व्यवस्थापन योजना आणि मृदा संवर्धन पद्धती प्रत्यक्षात आणल्याने धूप थांबण्यास मदत होते आणि भविष्यातील पिढ्यांसाठी पाणी असेल्याची हमी मिळते. पुनर्वनीकरण आणि वनीकरण उपक्रम जैवविविधता देखील सुधारतात आणि जंगलतोडीला रोखतात.ग्रामीण विकासात पर्यावरणीय बाबींचा समवेश करून समुदाय विस्तार आणि संवर्धन यांच्यात निरोगी संतुलन निर्माण करू शकतात. यामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी नैसर्गिक संसाधने उपलब्ध असतील आणि त्याचबरोबर सध्याच्या गरजा पूर्ण होऊ होतील याची खात्री होईल. ही रणनीती ग्रामीण समुदायांना पर्यावरणीय समस्या आणि हवामान बदलांशी अधिक लवचिक आणि जुळवून घेण्यास मदत करते.

**ग्रामीण विकासाचे आव्हाने:** ग्रामीण सामुदायाचाविकास घडवून आणण्या संदर्भात सरकारने राबविलेल्या अनेक विकास कार्यक्रमाच्य विचार केला आहे. स्वातंत्र्यानंतर सरकारने ग्रामीण विकासाकडे आपण लक्ष केंद्रित केले होते. स्वतंत्र मिळून ७० वर्षे जास्ती झाली परंतु आपल्या देशातील ग्रामीण विकास अपेक्षेप्रमाणे घडून आला नाही. सरकारने अनेक विकासाच्या योजना राबविल्या, त्यावर प्रचंड पैसा खर्चकेला परंतु ग्रामीण विकास घडून आला नाही ही वास्तविकता आहे. ग्रामीण विकासाची आव्हाने खालीलप्रमाणे

**मागासलेली शेती:** ग्रामीण समुदायातील लोकांचा शेती हा महत्वाचा व्यावसाय आहे. शेतीवरच ग्रामीण लोकांची उपजीविका चालत असते. ग्रामीण लोक परंपरेने शेतीचा व्यवसाय करीत आहेत. ग्रामीण लोकसंख्या सतत वाढत आहे.त्यामुळे वाढलेल्या लोकसंख्येच्या ताण शेतीवर पडतो परंतु शेतीची पाहिजे त्या प्रमाणात प्रगती झालेली नाही. आजही बहुसंख्या शेती ही पावसांवर अवलंबून आहे. पाउस कमी पडला तरी ओला दुष्काळ पडण्याची शक्यता असते. ग्रामीण भागात सिंचनाच्या पुरेशा सोयी नाहीत.आज जगात कृषी

नव्या तंत्राचा व यंत्राचा उपयोग केला जातो. भारतात कृषी क्षेत्राचा विकास व्हावा म्हणून अनेक योजना आणि कार्यक्रम राबविण्यात आले परंतु शेती व्यवसायात अमुलाग्र परिवर्तन झाले नाही. आजही शेती मागासलेली आहे त्यामुळे कृषी उत्पन्न कमी आहे. उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांचे वार्षिक उत्पन्न कमी राहते म्हणून त्यांची आर्थिक परीस्थिती अत्यंत हलाखीची आहे. म्हणून जोपर्यंत शेतीचा विकास होत नही तोपर्यंत ग्रामीण विकास होणार नाही.

**ग्रामीण कुटिरोद्योगाचा ऱ्हास:** पूर्वी खेडे आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होते. ग्रामीण लोकांना आवश्यक असणाऱ्या अनेक गोष्टी खेड्यामध्येच तयार केल्या जात असते त्यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कुटिरोद्योग असायचा. कुटिरोद्योगासाठी विशेष भांडवलाची आवश्यकता नसायची आणि कच्चा माल खेड्यामध्येच उपलब्ध व्हायचा. औद्योगीकरण आणि नागरीकरणाच्या प्रभावामुळे खेड्यातील कुटिरोद्योग नष्ट झाले. परिणामत: ग्रामीण लोकांचे उत्पन्न कमी झाले. ग्रामीण कुटिरोद्योगाचे पुनरुज्जीवन केल्याशिवाय ग्रामीण विकास साधता येणार नाही.

**दारिद्य:** ग्रामीण लोकांचे उत्पन्न हे अत्यल्प असते. त्याच्या उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे. शेतीचा विकास झाला नाही म्हणून त्यांना शेतीतून कमी उत्पन्न प्राप्त होते. कमी उत्पन्नातून ग्रामीण लोक आपल्या अवश्य गरजा भागवू शकत नाही. खेड्यातील त्याचे घर राहण्यासाठी अनुकूल नसते. एकंदरीत ग्रामीण लोकांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे कारण त्यांचे उत्पन्न कमी आहे. त्यामुळे संपूर्ण आयुष्य ते दरिद्रीच राहतात. भारतात बहुसंख्याक  ग्रामीण लोक हे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगात आहेत हा सुद्धा एक प्रकारे ग्रामीण विकासाला आव्हान देत असल्याचे दिसून येते.

**शेती क्षेत्रातील अनिश्चितता:** भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था अजूनही मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून आहे. पावसाची अनिश्चितता आणि अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्याच्या तुकडीकरण झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण करणे कठीण आहे.

**पायाभूत सुविधांचा अभाव:** भारतात अनेक ग्रामीण भागात विकासाच्या प्रयत्नांना अडथळा आणणारी एक प्रमुख समस्या म्हणजे कमकुवत पायाभूत सोयीसुविधांची कमतरता आहे. रस्त्यांच्या अपुऱ्या जोडणीमुळे शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन बाजारपेठेत पोहोचवण्याची क्षमता कमी पडते, ज्यामुळे त्यांच्या उत्पन्नावर आणि प्रदेशाच्या एकूण आर्थिक क्रियाकलापांवर परिणाम होतो. विजेच्या समस्या शिक्षण आणि शेतीवर अनेक उद्योगांमध्ये विकास आणि प्रगतीच्या शक्यता मर्यादित करतात. स्वच्छताविषयक सुविधा आणि स्वच्छ पाण्याची उपलब्धता अपुरी आहे, ज्यामुळे आरोग्य समस्या वाढून आणि जीवनमान कमी करून प्रगतीला आणखी अडथळा येतो. या पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे स्थिरतेचे एक दुष्टचक्र निर्माण होते, जे केवळ दैनंदिन  जीवनालाच बिघडवत नाही तर ग्रामीण भागातील गुंतवणूक आणि विकासालाही निराश करते.

**आरोग्य सेवा आणि शिक्षणाची मर्यादित उपलब्धता:** ग्रामीण विकासासाठी वैद्यकीय सेवा आणि शिक्षणाची अपुरी उपलब्धता ही एक गंभीर समस्या आहे. भारतातील ग्रामीण भागात आरोग्य सुविधा कमी आहेत, निधीची कमतरता आहे आणि अनेकदा त्या समुदायापासुन दूर आहेत ज्यामुळे स्थानिकांना आवश्यक वैद्यकीय सेवा मिळणे आव्हानात्मक बनते. उच्च मृत्यूदर, उपचार न केलेले आजार आणि सामान्य आरोग्याचे  वाईट परिणाम या उपलब्धतेच्या अभावामुळे होऊ शकतात. त्याचप्रमाणे ग्रामीण शाळांमध्ये पुरेशी संसाधने, पायाभूत सुविधा आणि कुशल शिक्षकांची कमतरता असण्याची शक्यता आहे. साक्षरतेचा कमी दर, शैक्षणिक प्राप्तीचे कमी स्तर आणि कौशल्य विकासाच्या कमी शक्यता हे याचे परिणाम आहेत.

**मोठ्या प्रमाणावरील स्थलांतर:** गावामध्ये रोजगाराच्या संधी मर्यादित असल्याने तरूण पिढी शहरांकडे धाव घेत आहे.

**डिजिटल साक्षरता :** जरी इंटरनेट स्वस्त झाले असले, तरी ग्रामीण भागात त्याचे शैक्षणिक आणि व्यावसायिक उपयोग अजुनही मर्यादित आहेत. ई-कॉमर्स, ऑनलाईन बँकिंग आणि सरकारी पोर्टलचा वापर करण्याबाबत अजूनही ग्रामीण भागात भीती आणि अज्ञान आहे.

**सामाजिक आव्हाने:**

**(i) रूढी आणि परंपरा:** जुन्या रूढी, परंपरा आणि विचारसरणीमुळे महिलांचे शिक्षण आणि रोजगार, तसेच जातीभेदासारख्या समस्या विकासाच्या आड येतात.

**(ii) कौशल्याचा अभाव:** ग्रामीण युवकांकडे पदव्या आहेत, पण उद्योगांना लागणारे तांत्रिक कौशल्य नसल्याने बेरोजगारी वाढते.

**ग्रामीण विकासाला चालना:** खेडी स्वयंपूर्ण नव्हे तर डिजिटल करण्यासाठी गेल्या १० वर्षांमध्ये नियोजनबद्ध प्रयत्न झाले, पण आजही गावांना सरकारी मदतीची गरज आहे, अशा परिस्थितीत अर्थसंकल्पात ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी वित्तमंत्र्यांच्या पोतडीतून काय मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिलेले असतात.ग्रामीण अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कृषिप्रधान आहे.त्यामुळे कृषी क्षेत्राच्या विकासाचा अप्रत्यक्ष परिणाम ग्रामीण विकासावर होतो. रस्ते, सिंचन सुविधा आणि साठवण सुविधा यासारख्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्याने पुरवठा साखळीची कार्यक्षमता सुधारू शकते. यामुळे शेतकऱ्यांचे काढणीनंतरचे नुकसान कमी होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणखी चालना मिळू शकते. केंद्रीय वित्तमंत्र्यांनी प्रधानमंत्री धन ध्यान कृषी योजना अर्थसंकल्पात जाहीर केली आहे. कमी उत्पादन,आधुनिक कृषी उपकरणांचा अभाव आणि सरासरीपेक्षा कमी कर्ज सुविधा यासाखी आव्हाने असणार्या देशातील १०० जिल्ह्यांमध्ये फळे आणि भाजीपाल्याचे उत्पादन वाढवण्यासाठी राज्य सरकारच्या सहकार्याने नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येणार आहेत. या योजनेचा फायदा १.७ कोटी शेतकऱ्यांना होणार आहेत. किसान क्रेडीट कार्ड कर्ज मर्यादा वाढवण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून सातत्याने होत होती कारण लागवडीच्या खर्चात लक्षणीय वाढ होऊनही अनेक वर्षांपासून या मर्यादित सुधारणा झालेली नव्हती. परंतु अर्थसंकल्पात याची दाखल घेऊन ही मर्यादा ५ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. शेतकऱ्यांसाठी ही एक मोठी दिलासादायक तरतूद म्हणावी लागेल.

**निष्कर्ष:** ग्रामीण विकास ही एक गुंगागुंतीची प्रक्रिया आहे जी ग्रामीण भागातील राहणीमान सुधारण्यासाठी आवश्यक आहे त्यात सामाजिक असमानता दूर करणे, आर्थिक विस्तार करणे आणि पायाभूत सुविधा वाढवणे समाविष्ट आहे. प्रभावी ग्रामीण विकासाचे फायदे वैयक्तिक समुदायांच्या विकासाच्या पलीकडे जातात आणि संपूर्ण देशाच्या स्थिरतेला आणि प्रगतीला हातभार लावतात. ग्रामीण भागात गरिबी, कमकुवत पायाभूत सुविधा आणि पर्यावरणीय समस्या यासारख्या विशिष्ट समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याने लक्ष्यित युक्त्या नवोपक्रम महत्वाचे आहे तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण, शाश्वत पद्धती आणि समावेशक धोरणांवर भर देऊन आपण अधिक न्याय आणि समतापूर्ण समाजात योगदान देणारे लवचिक आणि समृद्ध ग्रामीण समुदाय निर्माण करू शकतो.

**संदर्भ सूची**

१.आगलावे डॉ. प्रदीप “ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र” श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर सप्टेंबर २००२ .
२.https://icecd.org
३.https://visheakosh.marathi.gov.in
४.https://mr.wikipedia.org
५.https://smmcollege.in

# ग्रामीण समाजातील जात आणि धर्मविषयक आव्हाने

**डॉ. पांडूरंग रा. मुट्टे** समाजशास्त्र विभाग प्रमुख शिवनेरी महाविद्यालय शिरूर अनंतपाळ, जिल्हा लातूर
**प्रा. बी. पी. पवार** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

मानवाचे जीवन हे साधारणतः दोन प्रकारच्या पर्यावरणात व्यतीत होत असते. एकतर गावामध्ये किंवा शहरात. शहराची निर्मिती अलिकडची आहे; परंतु गावांची निर्मिती ही फार प्राचीन आहे जेव्हा मानवाची भटकंती अवस्था संपुष्टात येऊन मानवाच्या स्थिर व स्थायिक जीवनाला सुरुवात झाली तेव्हा गाव किंवा ग्रामीण समुदायाचा प्रारंभ झाला असे म्हटले जाते. शेती मुळे मानवी जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले. अशा पार्श्वभूमीवरच ग्रामीण समुदाय उदयास आला.

**संशोधनाचे उद्दिष्ट:** १) भारतीय ग्रामीण समाजातील जाती विषयक आव्हाने जाणून घेणे. २) ग्रामीण समुदायातील धर्मविषयक आव्हानांना जाणून घेणे. ३) जात आणि धर्माचा अर्थ समजून घेणे.

**ग्रामीण समुदायाचा अर्थ :**ग्रामीण समुदाय हा गावात किंवा खेड्यात राहणाऱ्या व्यक्तींचा एक समूह आहे. ‘ग्रामीण’ ही संज्ञा खेड्यात किंवा ग्रामीण पर्यावरणात जीवन व्यतीत करणाऱ्या व्यक्तींना संबोधण्यासाठी उपयोगात आणली जाते. हे जरी खरे असले तरी त्या शब्दाची निश्चित परिभाषा करणे कठीण आहे. कारण काही अभ्यासक ‘अल्प लोकसंख्येचा समूह’ या अर्थाने व्याख्या करतात, काही अभ्यासक कृषी व्यवसायावर अवलंबून असणारा समुदाय या अर्थाने व्याख्या करतात, तर काही अभ्यासक ग्रामीण म्हणजे ‘सामाजिक व आर्थिक मागासलेपण’ या अर्थाने अर्थ स्पष्ट करतात. म्हणजेच ग्रामीण या संज्ञेत अनेक अर्थ समाविष्ट आहेत. त्यामुळे या संज्ञेच्या अर्थाबाबत अभ्यासकांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही.

तरीही ग्रामीण या संज्ञेमध्ये ग्रामीण पर्यावरणावर अथवा निसर्गावर अवलंबून असणे, सामाजिक संबंधांमध्ये घनिष्ठता असणे व लहान अथवा मध्यम आकार असणे या तीन महत्त्वाच्या आधारावर ग्रामीण या शब्दाचा अर्थ लक्षात येतो. एकंदरीत ग्रामीण समुदाय हा व्यक्तीचा असा समूह आहे की जो एका निश्चित क्षेत्रामध्ये आपल्या विविध उद्देशांच्या पूर्ततेसाठी सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक स्वरूपात असा प्रकारचे संबंध ठेवतो की, ज्यामुळे तो इतर दुसऱ्या समुदायापासून वेगळा असल्याचे दिसून येते व त्यांचा मुख्य व्यवसाय शेतीशी संबंधित असतो.

**जातीचा अर्थ:** ‘जात’ हा शब्द ‘जन्म’ या अर्थाच्या ‘जन’ या संस्कृत शब्दापासून आला आहे. जन्म या धातूचा अर्थ ‘जन्म’ असा होतो. एक व्यक्ती कोणत्या जातीत जन्म घेते त्यामुळे त्याची जात ठरते. जातीत जन्मामुळे ‘Caste’ हा शब्द वापरला जातो. ‘Caste’ हा शब्द पोर्तुगीज भाषेतील ‘Castas’ या शब्दापासून आला आहे. ‘Castas’ या शब्दाचा अर्थ वंशाची शुद्धता असा आहे. ‘Caste’ हा शब्द पोर्तुगीजांनी भारतात आणला. १५६५ मध्ये गोवा प्रदेशाच्या संदर्भात प्रथम वापरला. पण जात ही वंशपरंपरेशी निगडित नाही तर जातीचा व धार्मिक समूहाचा कोणताही संबंध नाही. सामाजिक स्तरिकरणाचा एक प्रकार या दृष्टिकोनातून समाजशास्त्रज्ञांनी जातीची व्याख्या केली आहे. त्या पुढीलप्रमाणे **डॉ. बी. आर. आंबेडकर** : “आंतरजातीय विवाह बंदिस्त करणे म्हणजेच जात होय. जात हा एक बंद वर्ग होय.” **चार्ल्स कूले :** “जेव्हा वर्ग अनुवांशिकतेच्या तत्त्वावर आधारित असतो तेव्हा आपण त्याला जात म्हणू शकतो.

**१) ग्रामीण समाजातील जातीविषयक आव्हाने:**ग्रामीण समुदायामध्ये प्राचीन काळापासून ते आजपर्यंत जात भेद असल्याचे पहावयास मिळते अलीकडील काळामध्ये या जातीविषयक आव्हानांचा सामना सर्व स्तरातील लोकांना करावा लागत आहे. ग्रामीण समाजातील असलेल्याजात विषयक प्रमुख आव्हानांमध्ये खोलवर रुजलेली अस्पृश्यता, जातीय पदानुक्रम_, आणि प्रबळ जातीचे वर्चस्व अशा विविध बाबींचा यांचा समावेश होतो. यामुळे ग्रामीण समुदायामध्ये सामाजिक भेदभाव, शिक्षण आणि रोजगारातील असमानता, आंतरजातीय विवाहांना विरोध, आणि स्थानिक सत्तेत उपेक्षितांना दुय्यम स्थान मिळणे, यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होतात, ज्यामुळे ग्रामीण विकासात अडथळे येतात.

ग्रामीण समाजातील जात विषयक आव्हानांचे सविस्तर अध्ययन पुढील काही मुद्द्याद्वारे स्पष्ट होऊ शकते.

**१) जातीय पदानुक्रम व भेदभाव:**ग्रामीण समाजामध्ये जे विविध आव्हाने भारतीय समाजापुढे दिसून येतात त्यामधील प्रमुख आव्हान म्हणजे ग्रामीण समाजामध्ये असलेले जातीय भेदभाव हा प्रामुख्याने पाहूयास मिळतो आजही ग्रामीण भागात जन्माच्याच आधारावर आधारित सामाजिक रचना टिकून आहे, जिथे उच्च-नीच भावनेमुळे दलितांना आणि इतर उपेक्षित जातींना अनेकदा कनिष्ठ मानले जाते. त्यांचा विविध मार्गाने तिरस्कार केला जातो आजही आधुनिक काळामध्ये अशा दलित व इतर मागासवर्गीय लोकांना ग्रामीण समाजामध्ये उच्च व मानाचे स्थान प्राप्त करण्यामध्ये अडथळे निर्माण होत आहेत.

**२) प्रबळ जातींचे वर्चस्व :** श्रेष्ठ जातीचे लोक कनिष्ठ जातीच्या लोकांची सतत अवहेलना करतात त्यामुळे श्रेष्ठ जाती विषयी कनिष्ठ जातीच्या लोकांमध्ये द्वेष निर्माण होतो त्यातून जाती-जातीतील संघर्ष निर्माण होत आहेत.ग्रामीण समाजामध्ये प्रामुख्याने कृषी व कृषीवर आधारित अर्थव्यवस्था असल्याचे पहावयास मिळते आणि या कृषी आधारित अर्थव्यवस्थेवर प्रामुख्याने प्रबळ जातीचेच वर्चस्व प्राचीन काळापासून आजपर्यंत असल्याचे पहावयास मिळते.ग्रामीण अर्थव्यवस्थेत आणि जमिनीच्या मालकीवर अनेकदा काही ठराविक 'प्रबळ' जातींचे वर्चस्व असते ज्यामुळे इतर समाजातील लोकांकडे शेतीचे प्रमाण हे अल्प आहे त्यामुळेच ग्रामीण समाजातील बहुतांश लोकांना आर्थिकदृष्ट्या अवलंबून रहावे लागते.

**३) अस्पृश्यतेचे अस्तित्त्व:**अस्पृश्यतेसारखी वाईट प्रथा ही जातीव्यवस्थेतूनच निर्माण झाली आहे वरची जात खालच्या जातीला कनिष्ठ मानते जातीव्यवस्थेतील सर्वात खालच्या जाती म्हणजे अस्पृश्य जाती होय अस्पृश्य जातींना सामाजिक आणि धार्मिक हक्कापासून वंचित ठेवण्यात येत असे इतकेच नाही तर या लोकांना स्पर्श करणे पाप मानले जाते. ग्रामीण समुदायांमध्ये अस्पृश्य लोकांची परिस्थिती अतिशय वाईट आहे त्यामुळे विविध समस्या निर्माण झाल्यात.ग्रामीण समाजामध्ये अस्पृश्यता ही जगजाहीर आहे आजही ग्रामीण समाजामध्ये सवर्ण जातील आपल्यापेक्षा कनिष्ठ जातींना तुच्छ नजरेने पाहत असल्याचे अनेक ठिकाणी पाहवयास मिळते. अस्पृश्यता निर्मूलनासाठी भारतामध्ये वेगवेगळे कायदे झाले पण कायदा करून अस्पृश्यता नष्ट केली असली तरी, वास्तविक स्थिती मात्र वेगळी आहे प्रत्यक्षात आजही अनेक गावांमध्ये सार्वजनिक संसाधने जसे की पाणी मंदिर प्रवेश वापरण्यावर बंदी असल्याचे अनेक ठिकाणी दिसूनयेते.अस्पृश्य जातीतील लोकांना अपमान जनक वागणूक दिल्याच्या घटनाही घडून येत असल्याचे पहावयास मिळते त्यांना त्यांच्या हक्क व अधिकारापासून वंचित ठेवण्याचे प्रकार पाहावयास मिळतात किंवा सामाजिक सार्वजनिक सन समारंभामध्ये देखील जातीवर आधारित भेदभावाचे प्रकार सर्रास पणानेआढळून येतात. जोपर्यंत ग्रामीण भागातील अस्पृश्यतेची भावना दूर होणार नाही तोपर्यंत ग्रामीण भागामध्ये सामाजिक समानता प्रस्थापित होणे अशक्य आहे

**४) शिक्षण आणि रोजगारातील अडथळे:** ग्रामीण समाज हा मुळातच शिक्षण आणि रोजगार पासून वंचित असल्याचे दिसून येते. अलीकडील काळातील शिक्षण पद्धती पूर्णपणे खाजगीकरणाच्या ताब्यात गेल्यामुळे ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचा प्रसार झालेला नसल्याचे पाहुयास मिळते महागडे शिक्षण हे ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व जमातीतील मुलांना घेणे त्यांच्या आवाक्याच्या बाहेरचे आहे.ग्रामीण समाजामध्ये असलेले दारिद्र्य यामुळे अनुसूचित जाती व जमातीतील मुले जमातीतील मुले शिक्षणापासून दूर जात आहेत ग्रामीण भागामध्ये असलेल्या शिक्षणाच्या असुविधा आणि त्यातच असलेली जातीव्यवस्था यामुळे अनुसूचित जाती जमातीतील मुले शिक्षण घेण्याऐवजी व्यसनाधीन्तेकडे वळत आहेत शहरी भागामध्ये असलेले व्यसनाची साधने आज सर्रासपणे ग्रामीण भागामध्ये विकली जात आहेत ज्यामुळे ग्रामीण भागातील तरुण मुले अशा या व्यसनाच्या आहारी जात आहेत.अनुसूचित जाती आणि जमातींना अजूनही चांगल्या शैक्षणिक सुविधा आणि रोजगाराच्या संधी मिळण्यात जातीय पूर्वग्रहांमुळे अडथळे येतात. प्रत्येक जातीचा व्यवसाय हा परंपरेनुसार निश्चित केला जातो जातीव्यवस्थेत व्यक्तीला आपल्या जातीचाच व्यवसाय करावा लागतो त्यामुळे रोजगाराच्या आणि व्यवसायाच्या अडचणी निर्माण होतात.

**५) राजकीय आणि सामाजिक असमानता :** ग्रामीण समाजामध्ये राजकीय आणि सामाजिक असमानता देखील खूप मोठ्या प्रमाणात पहावयास मिळते राजकारणामध्ये जरी आरक्षण पद्धतीने ग्रामीण भागामध्ये अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना आरक्षण दिले असले तरी खऱ्या अर्थाने या आरक्षणाचा उपयोग ग्रामीण भागामध्ये प्रत्यक्ष अनुसूचित जाती जमातीतील लोकांना होत नाही तसेच काही अशिक्षित लोकसत्ता राजकारणामध्ये निवडून येतात पण त्यांना सुद्धा आपले हक्क व अधिकार गाजवता येत नसल्याचे पहावयास मिळते. ग्रामीण भागामध्ये ग्रामपंचायतीची निर्मिती झाली.ग्रामपंचायतींमध्ये लोकशाही असली, तरी .प्रत्यक्ष सत्ते मध्ये किंवा गावाच्या हिताच्या निर्णय प्रक्रियेमध्ये उपेक्षित जातींच्या प्रतिनिधींना प्रबळ जातींकडून अनेकदा दुय्यम वागणूक दिली जाते. अशा अपेक्षित जातींना त्यांच्या राजकीय हक्कापासून वंचित ठेवले जाते. तसेच ग्रामीण समुदायांमध्ये सामाजिक असमानता देखील प्रकर्षाने दिसून येते लोकशाहीमध्ये सर्वांना समान हक्क व समान अधिकार दिले असले तरी सामाजिक असमानता ग्रामीण समुदायांमध्ये पहावयास मिळते

**६) आंतरजातीय विवाहांना विरोध:** ग्रामीण समुदाय हा शहरी समुदायापेक्षा भिन्न आहे आजही ग्रामीण समुदायांमध्ये विविध रूढी प्रथा परंपरा यांचे पालन काटेकोरपणाने केले जाते विभाच्या बाबतीमध्ये सुद्धा विविध प्रकारची बंधन पाळली जातात आधुनिक युगामध्ये आंतरजातीय विवाहाला सर्व जगाने मान्यता दिली असली तरी ग्रामीण भागामध्ये जातीच्या बाहेर लग्न करणे हे ग्रामीण संस्कृतीत अजूनही निषिद्ध मानले जाते. जर कोणाचा आंतरजातीय विवाह झाला तर अशा जोडप्यांची क्रूरपणे हत्यासुद्धा होत असल्याचे पहावयास मिळतात आणि अनेकदा यावरून हिंसाचारही घडतो.

**७) जातपंचायती:**पारंपारिक समाजातील न्याय निवाड्याची निर्माण केलेली एक व्यवस्था होती तिला जात पंचायत असे म्हटले जात होते. पण या जातपंचायती तटस्थपणे आपापल्या समुदायातील न्यायनिवाडे करण्यास असक्षम होत्या कोणत्याही तार्किक पद्धतीचा विचार न करता न्यायदान होत असे आज सुद्धा त्याच जातपंचायती कार्यरत आहेत आपापल्या समुदायातील भांडण तंटे विशिष्ट ठिकाणी सोडवत असतात पण या जातपंचायती पक्षपातीपणाने न्यायनिवाडे करून ग्रामीण समाजामध्ये शोषणाचे केंद्रबिंदू बनले

आहेत या जातपंचायतीमुळे अनेक व्यक्तींना त्याचा गुन्हा असो अथवा नसो याची कोणतेही शहानिशा न करता त्यांना समाजातून बहिष्कृत करण्याचे काम किंवा अत्यंत क्रूर स्वरूपाच्या शिक्षा सुद्धा या जात पंचायतीच्या माध्यमातून द्वारे दिल्या जातात जे की लोकशाहीला आणि ग्रामीण समाजातील व्यक्तींना अत्यंत घातक मानले जाते आणि अशा एका जातपंचायतीचे बळी ग्रामीण समाजातील अनेक निष्पाप व्यक्ती पडले आहेत ग्रामीण समुदायासमोरील ग्रामीण समाजातील जातपंचायती हा सुद्धा खूप मोठा अडथळा ग्रामीण विकासामध्ये निर्माण झाला आहे. अशा प्रकारची जातीविषयक विविधआव्हाने ग्रामीण भागातील मानसिक दृष्ट्या समानता आणि सामाजिक विकासामध्ये मोठी अडथळा निर्माण करतात.

**२) ग्रामीण समाजातील धर्मविषयक आव्हाने:**भारतीय समाजातील मानवी जीवनावर धर्माचा विशेष असा प्रभाव पडला आहे. धर्माचा प्रभाव हा समाजामध्ये असलेल्या विवाह कुटुंब अर्थ राज्य शिक्षण यासारख्या संस्था वरील पडलेला आढळून येतो. धर्म हा मानवी समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. भारतीय समाजातील जीवन हे धार्मिकतेशी संबंधित आहे. धार्मिक विश्वास श्रद्धा परंपरा यांचा प्रभाव समाज जीवनावर पडलेला दिसून येतो.

धर्माची सर्वसामान्य व्याख्या करणे कठीण आहे. तरीही धर्माचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी काही व्याख्या आपण लक्षात घेऊ. **एडवर्ड टायलर** - “दिव्य प्राण्यातील विश्वास म्हणजे धर्म होय.” **जेम्स फ्रेझर** - “मानवी जीवन आणि निसर्गक्रम यांचे नियंत्रण आणि त्यावर नियंत्रण ठेवू शकतात अशी श्रद्धा असलेल्या आणि मानवापेक्षा श्रेष्ठ असलेल्या शक्तीशी मिळते-जुळते घेणे किंवा त्यांची आराधना वा प्रार्थना करणे म्हणजे धर्म होय असे मी मानतो.”

थोडक्यात वरील व्याख्यावरून असे लक्षात येते की, मानवापेक्षा श्रेष्ठ अशी कोणती तरी अलौकिक शक्ती असून ती मानवी जीवन नियंत्रित करीत असते.अशी लोकांची श्रद्धा असते. त्या श्रद्धेशी संबंधित असे वर्तन, व्यवहार आणि कर्मकांड म्हणजेच धर्म होय. धर्माशी निगडित असणाऱ्या गोष्टी पवित्र मानल्या जातात. यावरून धर्माचे स्वरूप लक्षात येते.

धर्माच्या उद्देशाबाबत विवेचन करताना भारतातील सुप्रसिद्ध विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्म (Religion) आणि धम्म (Dhamma) यामध्ये फरक केला आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, “धर्माचा उद्देश जगाच्या उत्पत्तीचे स्पष्टीकरण करणे हा आहे, परंतु धम्माचा उद्देश मात्र जगाचे पुनर्निर्माण करणे हा आहे.” डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माला ‘धम्म’ असे म्हटले आहे. धम्मात कोणत्याही अलौकिक शक्तींवर विश्वास ठेवला जात नाही. धम्मात मात्र अलौकिक शक्तींवर विश्वास ठेवला जातो. ग्रामीण समाजातील धर्मविषयक प्रमुख आव्हानांमध्ये अंधश्रद्धा, जादू-टोना, आणि अनिष्ट प्रथा यांचा समावेश होतो, ज्या भय व अनिश्चिततेमुळे टिकून आहेत.याव्यतिरिक्त, स्थलांतरामुळे लोकसंख्या कमी होणे आर्थिक मर्यादेमुळे धार्मिक संस्थांचे कामकाज कठीण होणे आणि आधुनिकता व परंपरेतील संघर्ष, ही मोठी आव्हाने समोर येत आहेत.

**ग्रामीण समाजातील धर्मविषयक प्रमुख आव्हाने:**

**१) अंधश्रद्धा आणि अनिष्ट प्रथा:** ग्रामीण भागामध्ये अंधश्रद्धा आणि समाजामध्ये असलेल्या अनिष्ट प्रथा यामुळे अनेकांची जेवण उद्ध्वस्त झालेले आहे आधुनिक काळामध्ये अनेक समाजसुधारकांनी या अंधश्रद्धा आणि अनिष्ट प्रथा दूर करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले असले तरी आजही ग्रामीण समाजातील लोकांमध्ये असलेल्या अंधश्रद्धा दूर होत नाहीत.अनेक ग्रामीण भागात अद्यापही जादू-टोना, भूत-प्रेत यावर विश्वास ठेवला जातो आहे. संकटे प्रत्येकांना असतात पण संकटाच्या वेळी पशुबळी किंवा नरबळी देण्यासारख्या चुकीच्या प्रथांचा अवलंब केला जातो, ज्या धार्मिक निषेध असूनही सुरू आहेत.

**२) स्थलांतर आणि जनसांख्यिकीय बदल:** अनेक ग्रामीण समुदायांमध्ये असे दिसून येते की ग्रामीण भागातील लोक उदरनिर्वाह आणि रोजगाराच्या साठी शहरी भागामध्ये स्थलांतर करत आहेत त्यामुळे ग्रामीण भागातील धर्म व्यवस्थेवर सुद्धा परिणाम होत आहेत.तरुण पिढी शहराकडे स्थलांतर करत असल्याने ग्रामीण धार्मिक संस्थांमध्ये (उदा. मंदिर/चर्च) पुजारी किंवा सेवकांची कमतरता भासत आहे.

**३) आर्थिक मर्यादा:** ग्रामीण भागामध्ये एकतर आर्थिक दारिद्र्य बेरोजगारी असल्यामुळे ग्रामीण भागामध्ये असलेले धार्मिक स्थळे यासारख्या त्या विकासासाठी जो आर्थिक मदत लागते ती आर्थिक मदत ग्रामीण भागामध्ये प्राप्त करणे शक्य होत नसल्यामुळे अनेक मंदिरांची दुरावस्था झाल्याची पहावयास मिळते सद्यस्थितीमध्ये मंदिराची स्वच्छता मंदिराची देखभाल सुद्धा होत नाही.ग्रामीण भागातील उत्पन्न कमी असल्याने, धार्मिक स्थळांची देखभाल आणि धार्मिक उपक्रम राबवण्यासाठी आर्थिक चणचण भासते.

**४) आधुनिकता विरुद्ध परंपरा:** विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे आणि नवीन पिढीच्या आधुनिक विचारसरणीमुळे परंपरांकडे पाहण्याचा आधुनिक पिढीचा दृष्टिकोन खूप बदललेला आहे जुने ते सोनं म्हणण्याची वृत्ती आज त्या पिढीमध्ये राहिलेली नाही आजची पिढी ही विवेकी व स्वतंत्र बुद्धीची आणि स्वतंत्रपणे विचार करणारी असल्यामुळे जुन्या काळातील ज्या रुढी प्रथा परंपरा आहेत त्याकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहत आहे त्यामुळेच परंपरांमध्ये असलेल्या ज्या काही अविवेकी बाबी आहेत त्याकडे आजची तरुण पिढी वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहत आहे आणि जे योग्य आहे त्याचा स्वीकार आजची पिढी करत असल्याचे पहावयास मिळते त्यातच पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे जुन्या धार्मिक परंपरा आणि रीति-रिवाजांकडे बघण्याचा तरुणांचा दृष्टिकोन बदलत आहे, ज्यामुळे सामाजिक संघर्षाची स्थिती निर्माण होते.

**५) संसाधनांचा अभाव:** खेडेगावातील लोकसंख्या ही शरीर भागाच्या तुलनेने कमी असल्यामुळे त्या गावातील धार्मिक स्थळांची देखरेख तसेच त्या धार्मिक स्थळांमध्ये पायाभूत सुविधा पुरवणे हे आर्थिक दृष्ट्या शक्य नाही कारण ग्रामीण भागामध्ये हवा तेवढा निधी प्राप्त होत नाही त्यामुळे धार्मिक स्थळांची योग्य ती काळजी घेतली जात नाही अनेक धार्मिक स्थळे हे जुनाट अवस्थेत असल्याचे पहावयास मिळते कमी लोकसंख्येमुळे ग्रामीण धार्मिक संस्थांना पायाभूत सुविधा पुरवणे कठीण जाते.

**६) धार्मिक कट्टरता:** अलीकडील काळामध्ये धर्माच्या बाबतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे विचार प्रवाह निर्माण होत आहेत त्यातच अतिरेकी धार्मिकता हा सुद्धा ग्रामीण भागातील धर्म व्यवस्थेवर खूप मोठा आघात आहे कधी नव्हे ती अधिकाधिक धार्मिक कट्टरता ग्रामीण भागामध्ये सुद्धा फोफावत आहे एकेकाळी ग्रामीण भागामध्ये सर्व धर्मामध्ये सलोख्याचे आपुलकीचे सामंजस्याचेवातावरण होते पण ते आज राहिलेले नाही प्रत्येक धर्मातील व्यक्ती आपल्या धर्माला श्रेष्ठ मानत चालला आहे आपल्या धर्मापेक्षा कुठलाही धर्म श्रेष्ठ नाही ही वृत्ती आधुनिक काळामध्ये ग्रामीण भागामध्ये सुद्धा वाढत चालली आहे ज्यामुळे सर्व धरणांमध्ये असलेली धार्मिक कट्टरता हीच खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्षतेला धोका आहे ज्यामुळे प्रत्येक धर्मातील व्यक्ती हा दुसरा धर्माकडे शत्रूप्रमाणे पाहत आहे ज्यामुळेच आज शहरी भागामध्ये सुद्धा धर्मा धर्मामध्ये संघर्ष होत असल्याचे पहावयास मिळते.काही वेळा चुकीच्या समजुतींमुळे धर्माच्या नावाखाली कट्टरता वाढीस लागते.

वरील प्रकारच्या विविध आव्हानांमुळे ग्रामीण समाजाच्या सामाजिक रचनेवर आणि धार्मिक जडणघडणीवर विपरीत परिणाम होत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) डॉ. ए. आर. देसाई- भारतीय ग्रामीण समाजशास्त्र -रावत पब्लिकेशन नवीन दिल्ली
२) डॉ.पुरण चंद्र जोशी- भारतीय ग्राम स्थानिक परिवर्तन आणि आर्थिक विकास- राजकमल प्रकाशन दिल्ली
३) आर. एन .मुखर्जी- भारतीय ग्रामीण समाजशास्त्र -प्रकाश बुक डेपो, बरेली
४) डॉ. प्रदीप आगलावे -ग्रामीण आणि शहरी समाजशास्त्र
५) डॉ. बी.एम.कऱ्हाडे- ग्रामीण व नागरी समाजशास्त्र
६) रा.ना.घाटोळे - सामाजिक संशोधनाची तंत्र
७) डॉ. सुधीर बोधनकर -सामाजिक संशोधन पद्धती

# ग्रामीण विकासाची आव्हाने, खाटिक समाज आणि आर्थिक व सामाजिक विकास : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**राजू दिपक खराटे** मु. पो. शेलूद ता. भोकरदन जि. जालना

**गोषवारा:** आपला भारत देश हा कृषिप्रधान व ग्रामीणप्रधान देश आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी दोन तृतीयाश लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असून त्यांचे जीवनमान, उत्पन्न, शिक्षण व आरोग्य या घटकांवरच राष्ट्रीय विकासाची दिशा अवलंबून आहे. ग्रामीण विकास ही केवळ आर्थिक वृद्धीची प्रक्रिया नसून ती सामाजिक न्याय, समानता, सक्षमीकरण व मानवी विकासाशी निगडित आहे. ग्रामीण समाजरचनेत जातिव्यवस्थेचा प्रभाव खोलवर दिसून येतो. आणि खाटिक समाज हा परंपरागत व्यवसायावर आधारित, सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागासलेला समाज असून त्यांना दीर्घकाळ सामाजिक भेदभाव व दुय्यमत्वाचा सामना करावा लागत आहे. प्रस्तुत शोध निबंधात ग्रामीण विकासाची संकल्पना, त्यासमोरील आव्हाने, खाटिक समाजाची सामाजिक व आर्थिक स्थिती आणि त्यांच्या विकासाच्या शक्यता यांचा सविस्तर समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात आला आहे. दुय्यम माहितीच्या आधारे केलेल्या विश्लेषणातून असे स्पष्ट होते की शिक्षण, कौशल्यविकास, सामाजिक सक्षमीकरण आणि प्रभावी शासकीय धोरणे या घटकांद्वारे खाटिक समाजाचा सर्वांगीण विकास साधता येऊ शकतो. समावेशक ग्रामीण विकासासाठी मागास समाजघटकांचा विशेष विचार करणे अत्यावश्यक आहे. असे आपणास दिसून येते.

**बीज शब्द:** ग्रामीण विकास, खाटिक समाज, सामाजीक विषमता, आर्थिक सशक्तीकरण समावेशक विकास

**प्रस्तावना:** ग्रामीण विकास हा भारताच्या विकास प्रक्रियेतील एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला प्राधान्य दिले आहे. कृषी विकास, सिंचन, ग्रामीण रोजगार योजना, शिक्षण व आरोग्य सुविधा यांद्वारे ग्रामीण जीवनमान उंचावण्याचे प्रयत्न झाले आहेत. तथापि, सामाजिक विषमता, जातीय भेदभाव, दारिद्र्य व बेरोजगारी यांमुळे ग्रामीण विकासाची गती असमान राहिलेली आपणास दिसून येते.

ग्रामीण समाजात जातिव्यवस्था ही केवळ सामाजिक रचना नसून ती आर्थिक व सांस्कृतिक संधी ठरविणारी व्यवस्था आहे. खाटिक समाज हा प्रामुख्याने मांस व्यवसाय, कातडी प्रक्रिया व संबंधित कामांशी जोडलेला असून या व्यवसायांमुळे त्यांना सामाजिक हीनतेचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण भागात आजही खाटिक समाजाला शिक्षण, रोजगार, सामाजिक प्रतिष्ठा व राजकीय सहभाग यामध्ये मर्यादा जाणवतात. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या अभ्यासात खाटिक समाजाचा सामाजिक-आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** ग्रामीण विकास व अनुसूचित जातींवरील अनेक अभ्यासकांनी संशोधन केले आहे. **डॉ. बी. आर. आंबेडकर** यांनी १९३६ मध्ये जातिव्यवस्थेमुळे अनुसूचित जातींच्या सामाजिक व आर्थिक अधःपतनावर प्रकाश टाकला. **एम.एन. श्रीनिवास** यांनी १९५२ मध्ये ग्रामीण समाजातील सामाजिक बदल आणि संस्कृतीकरणाची प्रक्रिया स्पष्ट केली. विविध शासकीय अहवालांमध्ये खाटिक समाजाच्या शिक्षण, रोजगार व आरोग्याच्या समस्यांचा उल्लेख आढळतो. तथापि,

खाटिक समाज व ग्रामीण विकास या विषयाचा एकत्रित समाजशास्त्रीय अभ्यास तुलनेने मर्यादित आहे. ग्रामीण विकास व समाजरचना यावर अनेक समाजशास्त्रज्ञांनी अभ्यास केला आहे. ए. आर. देसाई यांनी १९७९ साली ग्रामीण समाजातील वर्गसंघर्ष व आर्थिक विषमता यांचा सखोल अभ्यास केला. एम. एन. श्रीनिवास यांनी 'संस्कृतीकरण' व 'पश्चिमीकरण' या संकल्पनांच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन स्पष्ट केले. डी. एन. धनागरे व योगेंद्रसिंह यांनी ग्रामीण विकास व आधुनिकरणाच्या प्रक्रियेचे विश्लेषण केले आहे. शासकीय व अर्धशासकीय अहवालांमध्ये ग्रामीण दारिद्र्य, बेरोजगारी, शिक्षणाचा अभाव व आरोग्य समस्या या प्रमुख अडचणी म्हणून नमूद केल्या आहेत. मात्र खाटिक समाजासारख्या विशिष्ट सामाजिक घटकावर केंद्रित संशोधन तुलनेने कमी आढळते. उपलब्ध साहित्यामध्ये खाटिक समाजाचा उल्लेख प्रामुख्याने अनुसूचित जाती व इतर मागास वर्गांच्या संदर्भात येतो. त्यामुळे या समाजाच्या स्वतंत्र सामाजिक-आर्थिक अभ्यासाची गरज अधोरेखित होते.

**अध्ययनाचे उद्देश:** १) ग्रामीण विकासाची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करणे. २) ग्रामीण विकाससमोरील आर्थिक, सामाजिक व प्रशासकीय आव्हानांचा अभ्यास करणे.

**गृहीतकृत्य (Hypotheses):** १) ग्रामीण भागातील दारिद्र्य व बेरोजगारीचा खाटिक समाजाच्या विकासावर नकारात्मक परिणाम होतो. २) शिक्षणाचा अभाव हा खाटिक समाजाच्या सामाजिक व आर्थिक मागासलेपणाचे प्रमुख कारण आहे.

**अध्ययन पद्धती:** शोध निबंधासाठी दुय्यम माहिती संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये भारत सरकारचे जनगणना अहवाल, ग्रामीण विकासाशी संबंधित शासकीय प्रकाशने, समाजशास्त्रीय पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके व विश्वसनीय इंटरनेट स्रोतांचा समावेश करण्यात आलेला आहे. संकलित माहितीचे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने परीक्षण करण्यात आले आहे. समाजशास्त्रीय सिद्धांतांच्या आधारे तथ्यांचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

**तथ्याचे विश्लेषण:** सदरील अभ्यासातून असे दिसून येते की, ग्रामीण विकासाची प्रक्रिया अनेक अडथळयांनी ग्रस्त आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषीवर अवलंबून असून अल्पभूधारणा, नैसर्गिक आपत्ती, सिंचनाचा अभाव व बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे उत्पन्न अस्थिर राहते. शिक्षण व आरोग्य सुविधा अपुऱ्या असल्यामुळे मानवी विकास मर्यादित राहतो.

खाटिक समाजाच्या बाबतीत ही परिस्थिती अधिक गंभीर स्वरूपाची आहे. परंपरागत व्यवसायांवर अवलंबित्व, आधुनिक कौशल्यांचा अभाव व सामाजिक भेदभाव यामुळे रोजगाराच्या संधी कमी आहेत. ग्रामीण भागात खाटिक समाजाला सामाजिक अंतर, अस्पृश्यता व प्रतिष्ठेच्या समस्यांना सामोरे जावे लागते. शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे पिढ्यान्-पिढ्या दारिद्र्य टिकून राहते. शासकीय योजनांच्या माध्यमातून शिक्षणवृत्ती, आरक्षण, स्वयंरोजगार योजना उपलब्ध असल्या तरी माहितीचा अभाव, प्रशासकीय अडचणी व प्रभावी मार्गदर्शनाच्या कमतरतेमुळे त्यांचा अपेक्षित लाभ मिळत नाही. परिणामी खाटिक समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास मंदावतो.

**ग्रामीण विकासाची संकल्पना:** ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्याची प्रक्रिया होय. संयुक्त राष्ट्र संघटनेनुसार, "ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण लोकांच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीसाठी केलेली एकात्मिक कृती." समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ग्रामीण विकासात पुढील घटकांचा समावेश होतो : उत्पन्न व रोजगारवाढ, शिक्षण व साक्षरतेचा प्रसार, आरोग्य व पोषण सुधारणा, सामाजिक समानता व न्याय, लोकसहभाग व सक्षमीकरण

**ग्रामीण विकासाची आव्हाने:**

**दारिद्य व बेरोजगारी:** ग्रामीण भागात जास्त प्रमाणावर दारिद्र्य व अर्धबेरोजगारीआपणास दिसून येते. शेतीवर अवलंबित्व, लहान भूधारणा व हवामानावर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था यामुळे ग्रामीण उत्पन्न मर्यादित राहते. दारिद्र्य व बेरोजगारी या ग्रामीण व वंचित समाजाच्या विकासातील प्रमुख समस्या आहेत. ग्रामीण भागात विशेषतः अनुसूचित जाती, भटक्या-विमुक्त जमाती आणि मागास समाजघटकांमध्ये या समस्या अधिक तीव्र स्वरूपात दिसून येतात. दारिद्र्यामुळे व्यक्तीच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत, तर बेरोजगारीमुळे आर्थिक अस्थिरता, सामाजिक असमानता आणि मानसिक ताण निर्माण होतो. त्यामुळे दारिद्र्य व बेरोजगारी या ग्रामीण विकासातील प्रमुख अडथळे मानले जातात.

**शिक्षणाचा अभाव:** ग्रामीण भागात शाळांची संख्या, गुणवत्तापूर्ण शिक्षण, उच्च शिक्षणाच्या संधी यांचा अभाव आहे. परिणामी सामाजिक गतिशीलता कमी होते. शिक्षण हे सामाजिक परिवर्तन व आर्थिक विकासाचे प्रभावी साधन मानले जाते. कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण अनिवार्य आहे. परंतु ग्रामीण भागातील वंचित समाजघटकांमध्ये शिक्षणाचा अभाव ही एक गंभीर समस्या आहे. शिक्षणाच्या कमतरतेमुळे दारिद्र्य, बेरोजगारी, सामाजिक मागासलेपणा व विकासातील असमानता वाढते. त्यामुळे शिक्षणाचा अभाव हा ग्रामीण विकासातील प्रमुख अडथळा मानला जातो.

**आरोग्य सुविधा:** ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रांची कमतरता, डॉक्टरांची अनुपस्थिती व आरोग्याविषयी जागरूकतेचा अभाव दिसून येतो. आरोग्य हे मानवी विकासाचे मूलभूत अंग आहे. आरोग्य सुविधा म्हणजे व्यक्तीला निरोगी जीवनासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय सेवा, उपचार, प्रतिबंधात्मक उपाय व आरोग्यविषयक जागरूकता होय. ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत आरोग्य सुविधा महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतु ग्रामीण व वंचित समाजघटकांमध्ये आरोग्य सुविधांचा अभाव ही गंभीर समस्या असून त्यामुळे सामाजिक व आर्थिक विकासावर नकारात्मक परिणाम होतो.

**सामाजिक असमानता व जातीय भेदभाव:** जातिव्यवस्थेमुळे अनुसूचित जाती व इतर वंचित घटकांना सामाजिक बहिष्कार, भेदभाव व संधींची असमानता सहन करावी लागते. भारतीय समाजरचना ही ऐतिहासिकदृष्ट्या जातिव्यवस्थेवर आधारित आहे. या व्यवस्थेमुळे समाजात सामाजिक असमानता निर्माण झाली असून विशिष्ट जातींना विशेषाधिकार तर काहींना वंचितत्व सहन करावे लागले. सामाजिक असमानता व जातीय भेदभाव या समस्या ग्रामीण विकासाच्या मार्गातील मोठे अडथळे ठरतात. अनुसूचित जाती व वंचित समाजघटकांमध्ये या समस्यांचा परिणाम अधिक तीव्र स्वरूपात दिसून येतो.

**खाटिक समाज : ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी:** खाटिक समाजाचा उल्लेख प्राचीन भारतीय समाजरचनेत आढळतो. हा समाज प्रामुख्याने मांसविक्री व संबंधित व्यवसायांशी निगडित असल्याने त्याला जातिव्यवस्थेत खालचे स्थान देण्यात आले. ग्रामीण भागात खाटिक समाजाला सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव, स्पृश्य-अस्पृश्यतेची भावना व आर्थिक मर्यादा यांचा सामना करावा लागला.

**खाटिक समाजाची सामाजिक स्थिती:**

**शिक्षण:** खाटिक समाजातील साक्षरतेचे प्रमाण तुलनेने कमी आहे. आर्थिक दुर्बलता, पालकांची शैक्षणिक पार्श्वभूमी नसणे व बालमजुरी यामुळे शिक्षणात कमी प्रमाणावर दिसून येते. शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन असले तरी खाटिक समाज हा शिक्षण पासून वंचित आहे. व्यक्तीच्या बौद्धिक, नैतिक, सामाजिक व आर्थिक क्षमतांचा विकास घडवून आणण्याचे कार्य शिक्षण करते. कोणत्याही समाजात सामाजिक समानता, आर्थिक प्रगती व लोकशाही मूल्यांची रुजवण करण्यासाठी शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवले जाते. ग्रामीण व वंचित समाजघटकांच्या विकासासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे.

**सामाजिक प्रतिष्ठा:** पारंपरिक व्यवसायांमुळे खाटिक समाजाला सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव सहन करावा लागतो. यामुळे सामाजिक एकात्मता व सहभाग मर्यादित राहतो. सामाजिक प्रतिष्ठा म्हणजे समाजात व्यक्ती किंवा गटाला मिळणारा सन्मान, मान्यता व दर्जा होय. समाजातील व्यक्तींच्या स्थाननिर्धारणात सामाजिक प्रतिष्ठा महत्त्वाची भूमिका बजावते. ग्रामीण समाजात जात, व्यवसाय, शिक्षण व आर्थिक स्थिती यांच्या आधारे सामाजिक प्रतिष्ठा ठरवली जाते. सामाजिक प्रतिष्ठेतील असमानता ही सामाजिक भेदभाव व वंचितत्वाचे प्रमुख कारण आहे.

**बदल व संक्रमण:** शहरीकरण व आधुनिक अर्थव्यवस्थेमुळे पारंपरिक व्यवसाय टिकविणे कठीण झाले आहे. परिणामी सामाजिक व सांस्कृतिक संक्रमणाचा ताण खाटिक समाजावर पडतो. समाज हा स्थिर नसून तो सतत बदलत असतो. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व तांत्रिक घटकांमुळे समाजात बदल घडून येतात. "बदल" म्हणजे सामाजिक रचनेत, मूल्यांत व संस्थांमध्ये होणारे परिवर्तन, तर "संक्रमण" म्हणजे पारंपरिक व्यवस्थेकडून आधुनिक व्यवस्थेकडे जाण्याची प्रक्रिया होय. ग्रामीण समाजात हे बदल व संक्रमण अधिक गुंतागुंतीचे स्वरूप धारण करतात.

**खाटिक समाजाची आर्थिक स्थिती:** खाटिक समाजातील बहुतेक कुटुंबे अल्प उत्पन्न गटात येतात. नियमित रोजगाराचा अभाव, कौशल्य विकासाच्या संधींची कमतरता व भांडवलाची टंचाई यामुळे आर्थिक प्रगती मर्यादित राहते. ग्रामीण भागात स्थलांतर, असंघटित क्षेत्रातील कामे व अस्थिर उत्पन्न ही सामान्य वैशिष्ट्ये दिसतात. भारतीय समाजरचनेत खाटिक समाज हा अनुसूचित जातींमध्ये मोडणारा एक महत्त्वाचा समाजघटक आहे. पारंपरिक व्यवसाय, सामाजिक भेदभाव व ऐतिहासिक वंचितत्व यांमुळे खाटिक समाजाची आर्थिक स्थिती मंदावलेली आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या खाटिक समाजाला बदलत्या अर्थव्यवस्थेत अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे खाटिक समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे समाजशास्त्रीयदृष्ट्या आवश्यक आहे. पारंपरिक व्यवसाय व आर्थिक आधार खाटिक समाज प्रामुख्याने खालील पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून राहिला आहे. १) मांसविक्री व पशुकत्तल २) कातडी प्रक्रिया ३) संबंधित मजुरी व किरकोळ व्यवसाय हे व्यवसाय सामाजिक दृष्ट्या कमी प्रतिष्ठेचे मानले जातात. त्यातून मिळणारे उत्पन्न मर्यादित व अस्थिर आहे. आधुनिक अर्थव्यवस्थेत या व्यवसायांना पुरेशा संधी उपलब्ध नसल्याने आर्थिक संकट अधिक तीव्र झाले आहे.

**उत्पन्नाचे स्वरूप व रोजगाराची स्थिती:**

**अल्प व अस्थिर उत्पन्न:** खाटिक समाजातील बहुसंख्य कुटुंबांचे उत्पन्न कमी व अनियमित असते. हंगामी काम, असंघटित क्षेत्रातील मजुरी हे प्रमुख उत्पन्नाचे स्रोत आहेत.

**बेरोजगारी व अर्धबेरोजगारी:** ग्रामीण भागात लपलेली बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते. पारंपरिक व्यवसायाला मर्यादा असल्याने तरुण पिढी बेरोजगार राहते किंवा कमी मजुरीच्या कामात गुंतते.

**दारिद्र्य व आर्थिक असुरक्षितता:** खाटिक समाजातील अनेक कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतात. किमान जीवनमान राखण्यासाठी आवश्यक संसाधनांची कमतरता, उत्पन्न, रोजगार, शिक्षण व आरोग्याच्या संधी मर्यादित

**आर्थिक असुरक्षितता:** नोकरी तात्पुरती/अनिश्चित असणे, आजार, आपत्ती, महागाई, कर्ज यामुळे अचानक उत्पन्न घटण्याची भीती, बचत व सामाजिक संरक्षणाचा अभाव.

**प्रमुख कारणे:** बेरोजगारी/अल्परोजगार, कमी शिक्षण व कौशल्ये, महागाई व कमी मजुरी, सामाजिक विषमता, स्थलांतर, आजारपण, नैसर्गिक आपत्ती.

**परिणाम:** कुपोषण व आरोग्य समस्या, शिक्षणातून गळती, कर्जबाजारीपणा, मानसिक ताणतणाव, पिढ्यान्पिढ्या दारिद्र्याचा चक्रव्यूह.

**उपाय (धोरणात्मक व वैयक्तिक):** गुणवत्तापूर्ण शिक्षण व कौशल्यविकास, स्थिर रोजगारनिर्मिती, किमान वेतन

**सामाजिक सुरक्षा योजना:** आरोग्य विमा, पेन्शन, सूक्ष्मवित्त व बचत सवयी, महिला व दुर्बल घटकांचे सक्षमीकरण

**निष्कर्ष:** ग्रामीण विकासाची आव्हाने आणि खाटिक समाजाची सामाजिक-आर्थिक स्थिती यांचा घनिष्ठ संबंध आढळतो. शिक्षण, आरोग्य, रोजगार, आर्थिक व सामाजिक सन्मान या सर्वच क्षेत्रांत खाटिक समाज मागासलेला आहे. ग्रामीण विकास ही प्रक्रिया समावेशक नसेल तर सामाजिक विषमता अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे खाटिक समाजासारख्या मागास घटकांचा विशेष विचार केल्याशिवाय ग्रामीण विकास पूर्णत्वास जाऊ शकणार नाही.

**शिफारशी:** १) कौशल्यविकास, व्यवसाय प्रशिक्षण व स्वयंरोजगार योजना राबवाव्या. २) खाटिक समाजाच्या मुला-मुलींसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण प्रभावीपणे राबवावे. ३) सामाजिक भेदभाव निर्मूलनासाठी प्रबोधन व कायदेशीर उपाय करावे. ४) उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व वसतिगृह सुविधा वाढवाव्यात. ५) जिल्हा उद्योग केंद्र कडून भांडवला साठी कर्ज योजना आखाव्या.

## संदर्भ सूची


1. देशमुख, ए. आर. (२०१५). *ग्रामीण समाजशास्त्र.* पुणे: विद्या प्रकाशन.
2. गायकवाड, बी. डी. (२०१८). *भारतातील ग्रामीण विकास.* औरंगाबाद: कैलास प्रकाशन.
3. धनागरे, डी. एन. (२००३). *Themes and Perspectives in Indian Sociology.* Jaipur: Rawat Publications.
4. Desai, A. R. (२००५). *Rural Sociology in India.* Mumbai: Popular Prakashan.
5. Srinivas, M. N. (१९९६). *Social Change in Modern India.* New Delhi: Orient Longman.
6. प्रा. डॉ. आर. बी. शेटे जून २०२१ भारतातील ग्रामीण विकासातील समस्या Knowledge Resonance


# ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने


**प्रा. स्मिता अशोक पाटील** संशोधक विद्यार्थी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**डॉ. रामचंद्र भिसे** संशोधन मार्गदर्शक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.



**सारांश:** ग्रामीण समाजाचे स्वरूप आज झपाट्याने बदलत असून हे बदल सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक घटकांशी निगडित आहेत. शिक्षणाचा वाढता प्रसार, कृषी क्षेत्रातील आधुनिकीकरण, माहिती-तंत्रज्ञानाचा वापर, तसेच शहरीकरणामुळे होणारे स्थलांतर यांमुळे ग्रामीण जीवनपद्धतीत लक्षणीय परिवर्तन घडून येत आहे. संयुक्त कुटुंबव्यवस्थेचे रूपांतर अणुकुटुंबात होत असून पारंपरिक मूल्ये आणि सामाजिक संबंधांमध्येही बदल दिसून येतो. महिलांची शैक्षणिक व आर्थिक सहभागिता वाढत असली तरी लैंगिक असमानता आणि रोजगाराच्या संधींची मर्यादा ही आव्हाने अद्याप कायम आहेत.

या बदलांच्या प्रक्रियेत ग्रामीण समाजासमोर विविध आव्हाने उभी राहिली आहेत. आर्थिक असमानता, शेतीतील अनिश्चितता, बेरोजगारी, पायाभूत सुविधांचा अभाव, शिक्षण व आरोग्यसेवांतील तफावत, तसेच पर्यावरणीय समस्या यांचा ग्रामीण जीवनावर मोठा परिणाम होत आहे. याशिवाय सांस्कृतिक ओळखीचा ऱ्हास आणि सामाजिक ऐक्याला ताण येण्याची शक्यता देखील दिसून येते. या पार्श्वभूमीवर ग्रामीण विकासासाठी संतुलित धोरणे, स्थानिक सहभाग, शाश्वत विकास आणि सामाजिक न्याय यांवर आधारित नियोजनाची आवश्यकता अधोरेखित होते.



**कीवर्ड** - ग्रामीण समाज, बदलते स्वरूप, आव्हाने, समाजशास्त्र इत्यादी


**प्रस्तावना:** ग्रामीण समाज हा भारतीय संस्कृतीचा एक महत्त्वाचा व मूलभूत घटक आहे. भारतातील सुमारे ६० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास असल्याने ग्रामीण समाजाचे स्वरूप, रचना आणि त्यामधील बदल यांचा देशाच्या सामाजिक, आर्थिक तसेच सांस्कृतिक विकासावर थेट व दूरगामी प्रभाव पडतो. पारंपरिक मूल्ये, सामाजिक संबंधांची घट्ट वीण, शेतीप्रधान अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक परंपरा ही ग्रामीण समाजाची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात. मात्र, काळानुरूप या समाजरचनेत लक्षणीय बदल घडून येत आहेत.स्वातंत्र्यानंतर झालेले औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणाचा प्रसार, विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती तसेच दळणवळण व माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे ग्रामीण जीवनशैलीत परिवर्तन घडून आले आहे. संयुक्त कुटुंब पद्धतीऐवजी अणुकुटुंब पद्धतीकडे झुकाव वाढत असून सामाजिक नातेसंबंधांचे स्वरूपही बदलत आहे. शेतीव्यवसायासमोर वाढती खर्चिकता, नैसर्गिक आपत्ती, पाण्याची टंचाई आणि बाजारपेठेतील अस्थिरता यांसारखी आर्थिक आव्हाने उभी राहिली आहेत. याशिवाय, ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर, रोजगाराच्या मर्यादित संधी, शिक्षण व आरोग्य सुविधांचा अपुरा विकास, महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती, आणि पारंपरिक संस्कृतीवर होत असलेला आधुनिकतेचा प्रभाव ही ग्रामीण समाजासमोरील महत्त्वाची आव्हाने ठरत आहेत. शासनाच्या विविध विकास योजना व उपक्रमांमुळे ग्रामीण विकासाला चालना मिळत असली, तरी त्यांच्या अंमलबजावणीत अनेक अडचणी जाणवतात. या संशोधनात ग्रामीण समाजाच्या बदलत्या स्वरूपाचा सखोल अभ्यास करून सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पातळीवरील परिवर्तनांचे विश्लेषण केले जाईल. तसेच ग्रामीण समाजासमोर असलेल्या प्रमुख समस्यांचा आणि आव्हानांचा चिकित्सक दृष्टिकोनातून विचार करून, संतुलित व शाश्वत ग्रामीण विकासासाठी आवश्यक उपाययोजनांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**उद्दिष्टे:** १) ग्रामीण समाजातील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बदलांचे स्वरूप अभ्यासणे. २) शहरीकरण, औद्योगिकीकरण व जागतिकीकरणाचा ग्रामीण जीवनावर होणारा परिणाम समजून घेणे. ३) ग्रामीण भागातील बदलांमुळे निर्माण होणाऱ्या प्रमुख समस्या

व आव्हानांचे विश्लेषण करणे. ४) ग्रामीण समाजातील कुटुंबरचना, मूल्यव्यवस्था व सामाजिक संबंधांतील बदलांचा अभ्यास करणे. ५) ग्रामीण विकास कार्यक्रम व धोरणांची प्रभावीता तपासणे. ६) शाश्वत व समावेशक ग्रामीण विकासासाठी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून शिफारसी सुचवणे.

**संशोधनाची गरज:** ग्रामीण समाज हा भारतीय समाजव्यवस्थेचा कणा असून आज तो संक्रमणावस्थेत आहे. पारंपरिक शेतीप्रधान व्यवस्था आधुनिक व बाजाराभिमुख व्यवस्थेकडे झुकत आहे. या परिवर्तनामुळे रोजगार, स्थलांतर, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण व सामाजिक एकात्मता यासंबंधी अनेक प्रश्न उद्‌भवत आहेत. ग्रामीण भागातील वाढती असमानता, युवकांचे शहरी स्थलांतर, शेतीतील अनिश्चितता आणि सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास यांचा शास्त्रीय अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यामुळे या संशोधनाच्या माध्यमातून ग्रामीण समाजातील वास्तव परिस्थिती समजून घेऊन योग्य धोरणात्मक व सामाजिक हस्तक्षेपासाठी दिशा मिळू शकते.

**समाजशास्त्रीय महत्त्व:** १) ग्रामीण समाजातील सामाजिक बदलांच्या प्रक्रियांचे सैद्धांतिक व व्यावहारिक आकलन मिळते.२) परंपरा व आधुनिकता यांतील संघर्ष समाजशास्त्रीय दृष्टीने स्पष्ट होतो. ३) ग्रामीण विषमता, जात, वर्ग व लिंग आधारित समस्या समजून घेण्यास मदत होते. ४) सामाजिक नियंत्रण, सामूहिकता व ग्रामीण ऐक्य यांतील बदलांचा अभ्यास करता येतो. ५) समाजकल्याण व ग्रामीण विकास योजनांसाठी उपयुक्त समाजशास्त्रीय माहिती उपलब्ध होते. ६) ग्रामीण समाजाच्या पुनर्रचनेसाठी धोरणनिर्मितीस शास्त्रीय आधार मिळतो.

**संशोधन पद्धती:** या अभ्यासासाठी **वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा** अवलंब करण्यात आला आहे.

**माहिती संकलनाचे स्रोत:** प्राथमिक स्रोत : मुलाखती, प्रश्नावली, प्रत्यक्ष निरीक्षण.

दुय्यम स्रोत : पुस्तके, संशोधन निबंध, शासकीय अहवाल, जनगणना, जर्नल्स व संकेतस्थळे.

**माहिती विश्लेषण :** गुणात्मक व परिमाणात्मक पद्धतींचा वापर करून माहितीचे विश्लेषण.

**विषय विवेचन:** ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप हे एकीकडे विकासाचे आणि प्रगतीचे द्योतक मानले जात असले, तरी त्याचबरोबर अनेक गंभीर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक आव्हाने निर्माण करत आहे. आधुनिकतेचा प्रभाव, तंत्रज्ञानाचा प्रसार, शासनाच्या विविध विकास योजना, शिक्षणाचा वाढता स्तर आणि दळणवळणाच्या साधनांमधील सुधारणा यांमुळे ग्रामीण समाजात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडून आले आहे. परंतु या परिवर्तनाची गती सर्व स्तरांवर समान नसल्यामुळे ग्रामीण समाजात असमानता अधिक ठळकपणे दिसून येते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत ग्रामीण समाजात उत्पन्नातील तफावत वाढताना दिसते. काही घटक आधुनिक शेती, उद्योगधंदे, रोजगाराच्या संधी यांचा लाभ घेत प्रगती करत आहेत, तर मोठा वर्ग अजूनही पारंपरिक शेती, मजुरी आणि अस्थिर रोजगारावर अवलंबून आहे. भूमिहीन शेतमजूर, लहान व सीमांत शेतकरी यांची परिस्थिती अजूनही चिंताजनक आहे. वाढती महागाई, उत्पादन खर्चात होणारी वाढ आणि बाजारातील अनिश्चितता यांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था अस्थिर होत आहे. याचा थेट परिणाम ग्रामीण कुटुंबांच्या जीवनमानावर होत असून कर्जबाजारीपणा, दारिद्र्य आणि आर्थिक असुरक्षितता या समस्या तीव्र होत आहेत.

शहरीकरणामुळे होणारे स्थलांतर हे ग्रामीण समाजातील एक महत्त्वाचे बदलते अंग आहे. रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि चांगल्या जीवनशैलीच्या शोधात मोठ्या प्रमाणावर तरुण पिढी ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर करत आहे. या स्थलांतरामुळे ग्रामीण भागात कामगारांची कमतरता निर्माण होत आहे आणि शेतीसारख्या पारंपरिक व्यवसायांवर त्याचा नकारात्मक परिणाम होत आहे. तसेच कुटुंब व्यवस्थेत बदल घडून येत असून संयुक्त कुटुंब पद्धतीऐवजी विभक्त कुटुंब पद्धती वाढीस लागली आहे. वृद्ध, महिला आणि लहान मुले ग्रामीण भागात मागे राहिल्याने सामाजिक व मानसिक समस्या उद्‌भवत आहेत. ग्रामीण समाजाच्या सामाजिक रचनेतही लक्षणीय बदल दिसून येतात. जातव्यवस्था, परंपरा, रूढी आणि मूल्ये यांचा प्रभाव काही प्रमाणात कमी होत असला तरी तो पूर्णपणे नष्ट झालेला नाही. आधुनिक शिक्षणामुळे आणि प्रसारमाध्यमांमुळे सामाजिक जाणीवा वाढत आहेत, परंतु त्याचबरोबर सामाजिक संघर्ष, जातीगत भेदभाव आणि असमानतेचे स्वरूप अजूनही टिकून आहे. स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढत असले तरी ग्रामीण महिलांना अजूनही अनेक सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक बंधनांना सामोरे जावे लागते. रोजगाराच्या मर्यादित संधी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक अपेक्षा यांमुळे महिलांचा विकास अनेकदा रोखला जातो. पर्यावरणीय समस्या हा ग्रामीण समाजासमोरील एक गंभीर मुद्दा बनत चालला आहे. अनियमित पर्जन्यवृष्टी, दुष्काळ, पूर, जमिनीची सुपीकता कमी होणे, पाण्याची टंचाई आणि रासायनिक खतांचा अतिरेक यांमुळे ग्रामीण जीवनावर मोठा परिणाम होत आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या समाजासाठी या समस्या अधिक गंभीर ठरत आहेत. हवामान बदलाचा थेट फटका ग्रामीण भागाला बसत असून त्यामुळे उत्पादन घट, अन्नसुरक्षेचा प्रश्न आणि ग्रामीण लोकांचे स्थलांतर वाढत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास हा ग्रामीण समाजाच्या दीर्घकालीन टिकावासाठी मोठे आव्हान ठरत आहे.

तंत्रज्ञानाचा प्रसार हा ग्रामीण समाजासाठी संधी आणि आव्हान दोन्ही ठरत आहे. मोबाईल, इंटरनेट, डिजिटल सेवा आणि सोशल मीडियामुळे माहितीची उपलब्धता वाढली आहे. कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, ई-मार्केट, डिजिटल व्यवहार यांचा वापर वाढत आहे. मात्र डिजिटल दरीमुळे सर्वच ग्रामीण लोकांना या तंत्रज्ञानाचा लाभ मिळतो असे नाही. शिक्षणाचा अभाव, आर्थिक मर्यादा आणि तांत्रिक ज्ञानाचा अभाव यामुळे अनेक लोक या बदलांपासून वंचित राहतात. शासनाच्या विविध योजना आणि धोरणांमुळे ग्रामीण विकासाला चालना मिळाली आहे. रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत अभियान, डिजिटल इंडिया, ग्रामीण आरोग्य योजना आणि स्वयं-सहायता गट यांमुळे ग्रामीण समाजात सकारात्मक बदल दिसून येतात. तथापि, या योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता, प्रभावी व्यवस्थापन आणि स्थानिक गरजांनुसार सुधारणा होणे आवश्यक आहे. अन्यथा अपेक्षित परिणाम साध्य होत नाहीत.

एकूणच ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप हे बहुआयामी आहे. या बदलांमुळे जीवनमान उंचावण्याच्या संधी निर्माण होत असल्या तरी त्याचबरोबर असमानता, स्थलांतर, सामाजिक ताणतणाव आणि पर्यावरणीय संकटे यांसारखी आव्हानेही वाढत आहेत. ग्रामीण समाजाचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधण्यासाठी आर्थिक समता, सामाजिक न्याय, पर्यावरणीय संरक्षण आणि स्थानिक सहभाग या घटकांना प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. अशा संतुलित दृष्टिकोनातूनच ग्रामीण समाजाचे भविष्य अधिक सशक्त आणि स्थिर घडवता येईल.

**परिणाम:** या संशोधनाच्या परिणामस्वरूप ग्रामीण समाजातील बदलत्या स्वरूपाचे तीन प्रमुख पैलू स्पष्टपणे समोर आले आहेत. या बदलांचा ग्रामीण जीवनावर बहुआयामी प्रभाव पडत असून ते सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक संरचनेत लक्षणीय परिवर्तन घडवून आणत आहेत.

**१. आर्थिक बदल:**ग्रामीण अर्थव्यवस्थेत लक्षणीय सुधारणा झाल्याचे दिसून येते. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर, सुधारित बियाणे, यांत्रिकीकरण, ठिबक व तुषार सिंचन पद्धतींमुळे शेतीची उत्पादकता वाढली आहे. यामुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली असून शेतीकडे व्यावसायिक दृष्टिकोन विकसित होत आहे. तसेच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, व लघुउद्योग यांसारख्या पूरक व्यवसायांमुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. स्वयं-सहायता गट, सूक्ष्म वित्तपुरवठा आणि शासकीय योजनांच्या माध्यमातून ग्रामीण उद्योजकतेला चालना मिळत असल्याचेही अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.

**२. सामाजिक बदल:** ग्रामीण समाजातील सामाजिक रचनेत हळूहळू पण ठळक स्वरूपाचे परिवर्तन होत असल्याचे या संशोधनातून स्पष्ट झाले आहे. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे व्यक्तींची विचारसरणी अधिक वैज्ञानिक, विवेकी व आधुनिक बनत असून परंपरागत जातीय भेदभाव, अंधश्रद्धा व रूढीपरंपरांचा प्रभाव काही प्रमाणात कमी होत आहे. सामाजिक समता, मानवाधिकार आणि सामाजिक न्याय याविषयी ग्रामीण समाजात जागरूकता वाढत असल्याचे दिसून येते.

महिलांच्या सामाजिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झालेली आहे. महिलांचे शालेय व उच्च शिक्षणातील प्रमाण वाढणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे, स्वयं-सहायता गटांमधील आर्थिक स्वावलंबन आणि ग्रामपंचायतीसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणामुळे महिलांचे नेतृत्वगुण विकसित होत आहेत. यामुळे निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढून त्यांच्या आत्मविश्वासात व सामाजिक प्रतिष्ठेत भर पडली आहे. आरोग्य, पोषण, स्वच्छता आणि कुटुंब नियोजनाबाबत शासकीय योजना, आरोग्य केंद्रे आणि जनजागृती कार्यक्रमांमुळे ग्रामीण जनतेची जाणीव वाढली आहे. लसीकरण, मातृत्व आरोग्य सेवा आणि स्वच्छ भारत अभियानासारख्या उपक्रमांचा ग्रामीण जीवनमानावर सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो. यामुळे बालमृत्यू व मातृमृत्यू दरात घट होऊन एकूणच जीवनमान सुधारले आहे. याशिवाय, संयुक्त कुटुंब पद्धतीऐवजी अणुकुटुंब पद्धतीकडे होणारा कल हा सामाजिक बदलाचा महत्त्वाचा पैलू ठरतो. रोजगार, शिक्षण व स्थलांतर यांमुळे कुटुंब संरचनेत बदल होत असून व्यक्तिस्वातंत्र्य, आर्थिक स्वायत्तता आणि वैयक्तिक निर्णयक्षमतेला महत्त्व दिले जात आहे. तथापि, या बदलांमुळे पारंपरिक सामाजिक आधारव्यवस्थेवर काही प्रमाणात परिणाम होत असल्याचेही आढळून येते.

एकूणच, ग्रामीण समाजातील सामाजिक बदल हे शिक्षण, जागरूकता व आधुनिकतेच्या प्रभावातून घडून येत असून ते सामाजिक प्रगतीसाठी उपयुक्त असले, तरी त्यासोबत काही नव्या सामाजिक आव्हानांची निर्मितीही होत आहे.

**३. संस्कृतीतील बदल:** ग्रामीण संस्कृतीत परंपरा आणि आधुनिकता यांचे मिश्र स्वरूप विकसित होत आहे. परंपरागत मूल्ये, रूढी-परंपरा आणि लोकसंस्कृती काही प्रमाणात टिकून असल्या, तरी आधुनिक विचारसरणी, माध्यमांचा प्रभाव आणि शहरी जीवनशैलीचा प्रभाव वाढत आहे. सण-उत्सव साजरे करण्याच्या पद्धती, विवाहसंस्कार आणि सामाजिक समारंभांमध्ये बदल दिसून येतात. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजनाची साधने आणि डिजिटल माध्यमांचा वापर वाढल्याने ग्रामीण संस्कृती अधिक बहुरंगी आणि गतिमान होत आहे. एकूणच, या संशोधनातून असे निष्कर्ष निघतात की ग्रामीण समाज स्थिर न राहता परिवर्तनशील आहे. हे बदल सकारात्मक तसेच आव्हानात्मक स्वरूपाचे असून, त्यांचे संतुलित व्यवस्थापन केल्यास ग्रामीण विकास अधिक समतोल व शाश्वत होऊ शकतो.

**निष्कर्ष:** ग्रामीण समाजातील बदल हे अपरिहार्य असून ते काळाच्या गरजेनुसार योग्य दिशेने होत असल्याचे दिसून येते. तंत्रज्ञानाचा वाढता वापर, शिक्षणाचा प्रसार, कृषी क्षेत्रातील आधुनिकीकरण, तसेच दळणवळण व संपर्क साधनांची उपलब्धता यामुळे ग्रामीण जीवनमानात लक्षणीय सुधारणा झाली आहे. मात्र, या बदलांसोबत काही गंभीर आव्हाने देखील निर्माण झाली आहेत, ज्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

ग्रामीण समाजाच्या विकास प्रक्रियेत आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय या सर्व पैलूंचा समन्वयाने विचार करणे आवश्यक आहे. जैविक संतुलन राखत पर्यावरणपूरक विकास साधणे हे आजच्या काळातील मोठे आव्हान आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि बदलत्या उपजीविकेमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीवर वाढणारा ताण ग्रामीण जीवनावर प्रतिकूल परिणाम घडवू शकतो. त्यामुळे विकासाबरोबरच पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करणे गरजेचे आहे. तसेच पारंपरिक मूल्ये, रूढी-परंपरा, लोककला, सण-उत्सव, आणि सहजीवनाची भावना ही ग्रामीण समाजाची खरी ओळख आहे. बदल स्वीकारताना या सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्यथा सांस्कृतिक विस्थापन आणि सामाजिक तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आर्थिक आत्मनिर्भरता साधण्यासाठी कृषीपूरक उद्योग, स्वयंरोजगार, महिला बचत गट, ग्रामउद्योग आणि कौशल्याधारित प्रशिक्षण यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. यामुळे रोजगारनिर्मिती होऊन ग्रामीण भागातील स्थलांतर कमी होण्यास मदत होईल. तसेच सामाजिक सामंजस्य, समतोल विकास आणि लोकसहभागाच्या माध्यमातून ग्रामीण लोकशाही अधिक बळकट करता येईल.

एकूणच, आर्थिक आत्मनिर्भरता, सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक संरक्षण या तीन प्रमुख अक्षांवर आधारित दूरदर्शी व समावेशक धोरणात्मक विचारांद्वारे ग्रामीण समाजाच्या भविष्यास एक शाश्वत व समृद्ध दिशा देता येईल. योग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि स्थानिक गरजांचा विचार केल्यास ग्रामीण समाज हे देशाच्या सर्वांगीण विकासाचे मजबूत आधारस्तंभ ठरू शकतो.

**उपाययोजना / शिफारसी:** ग्रामीण समाजाच्या बदलत्या स्वरूपामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सर्वसमावेशक, शाश्वत आणि लोककेंद्रीत उपाययोजना आवश्यक आहेत. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय व प्रशासकीय या सर्व स्तरांवर योग्य धोरणांची अंमलबजावणी केल्यास ग्रामीण समाजाचा समतोल विकास साधता येऊ शकतो. पुढील उपाययोजना व शिफारसी महत्त्वाच्या ठरतात.

**१) आर्थिक विकासासाठी उपाययोजना:** ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी शेतीपूरक उद्योगांना प्रोत्साहन देणे अत्यावश्यक आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, मधमाशी पालन, प्रक्रिया उद्योग आणि ग्रामउद्योग यांना आर्थिक व तांत्रिक मदत दिल्यास स्थानिक रोजगारनिर्मिती होऊ शकते. लहान व सीमांत शेतकऱ्यांसाठी कमी व्याजदरात कर्ज, पीक विमा योजना आणि बाजारभाव हमी यंत्रणा अधिक प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. स्वयं-सहायता गट आणि सहकारी संस्थांच्या माध्यमातून महिलांना व युवकांना आर्थिक स्वावलंबन मिळवून देता येईल.

**२) शेती सुधारणा व आधुनिकरण:** शाश्वत शेती पद्धती स्वीकारण्यावर भर देणे आवश्यक आहे. सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती, पाण्याचा कार्यक्षम वापर (ठिबक, तुषार सिंचन), मृदासंवर्धन आणि पीक विविधीकरण यांना प्रोत्साहन द्यावे. हवामान बदलाचा परिणाम कमी करण्यासाठी हवामान-संवेदनशील शेती पद्धती आणि शेतकऱ्यांना वेळेवर कृषी सल्ला उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. कृषी प्रशिक्षण केंद्रे आणि विस्तार सेवा अधिक सक्षम करणे गरजेचे आहे.

**३) रोजगारनिर्मिती व स्थलांतर रोखणे:** ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण केल्यास अनावश्यक शहरी स्थलांतर कमी होऊ शकते. कौशल्य विकास कार्यक्रम, ग्रामीण औद्योगिक वसाहती, हस्तकला व पारंपरिक कलांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे ही महत्त्वाची पावले ठरू शकतात. मनरेगा आणि तत्सम योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून नियमित व सन्मानजनक रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**४) शिक्षण व कौशल्य विकास:** ग्रामीण शिक्षण व्यवस्था दर्जेदार व सर्वसमावेशक करणे अत्यंत आवश्यक आहे. शाळांमध्ये पायाभूत सुविधा सुधारणे, डिजिटल शिक्षण साधनांचा वापर, शिक्षक प्रशिक्षण आणि गळती रोखणे यावर लक्ष द्यावे. उच्च शिक्षण, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण ग्रामीण युवकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष योजना राबवाव्यात. महिलांचे शिक्षण आणि प्रौढ साक्षरता कार्यक्रम अधिक प्रभावी करणे गरजेचे आहे.

**५) आरोग्य व सामाजिक सुरक्षा:** ग्रामीण आरोग्य सेवांचा विस्तार आणि दर्जा सुधारण्यावर भर देणे आवश्यक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे सक्षम करणे, तज्ज्ञ सेवा, माता-बाल आरोग्य, पोषण कार्यक्रम आणि मानसिक आरोग्य सेवा ग्रामीण भागात उपलब्ध करून द्याव्यात. स्वच्छ पाणी, स्वच्छता आणि कुपोषण निर्मूलनासाठी एकात्मिक दृष्टिकोन आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिक, अपंग आणि दुर्बल घटकांसाठी सामाजिक सुरक्षा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी.

**६) महिला सक्षमीकरण:** महिलांचा सामाजिक व आर्थिक सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न आवश्यक आहेत. स्वयं-सहायता गट, उद्योजकता प्रशिक्षण, कर्जसुविधा आणि बाजारपेठेपर्यंत प्रवेश दिल्यास महिलांचे सक्षमीकरण होऊ शकते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग वाढविणे, त्यांच्यासाठी नेतृत्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे.

**७) पर्यावरण संरक्षण:** ग्रामीण विकासात पर्यावरणीय समतोल राखणे अनिवार्य आहे. जलसंधारण, वृक्षारोपण, नवीनीकरणीय ऊर्जा (सौर, बायोगॅस), कचरा व्यवस्थापन आणि जैवविविधता संवर्धन यांना प्राधान्य द्यावे. पर्यावरण विषयक जनजागृती कार्यक्रमांद्वारे स्थानिक समुदायाचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

**८) डिजिटल समावेशन:** डिजिटल दरी कमी करण्यासाठी ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा, डिजिटल साक्षरता आणि ई-शासन सेवा मजबूत कराव्यात. शेतकरी, विद्यार्थी आणि उद्योजकांसाठी डिजिटल प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. यामुळे माहिती, सेवा आणि बाजारपेठांपर्यंत सहज प्रवेश मिळू शकतो.

**९) प्रशासन व स्थानिक सहभाग:** ग्रामपंचायती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार व साधने देणे आवश्यक आहे. निर्णय प्रक्रियेत ग्रामसभेचा सक्रिय सहभाग वाढवून विकास योजना स्थानिक गरजांनुसार राबवाव्यात. पारदर्शकता, जबाबदारी आणि जनसहभाग या तत्त्वांवर आधारित प्रशासन ग्रामीण विकासासाठी उपयुक्त ठरू शकते.

**१०) समन्वित व शाश्वत दृष्टिकोन:** ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अल्पकालीन लाभांपेक्षा दीर्घकालीन शाश्वत विकासावर भर देणे आवश्यक आहे. आर्थिक प्रगतीबरोबरच सामाजिक न्याय, सांस्कृतिक जतन आणि पर्यावरणीय संरक्षण यांचा समतोल राखल्यास ग्रामीण समाज सशक्त आणि समृद्ध होऊ शकतो.

**संदर्भसूची:**


1. देशमुख, श. द. (२०१२), *ग्रामीण समाजशास्त्र*, पुणे : विद्या प्रकाशन.
2. गायकवाड, भा. रा. (२०१५), *भारतीय ग्रामीण समाज : रचना आणि परिवर्तन,* औरंगाबाद : साक्षी प्रकाशन.
3. पाटील, रा. वि. (२०१४), *ग्रामीण विकास आणि सामाजिक बदल,* कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
4. कुंभार, अ. म. (२०१६), *ग्रामीण समाजातील सामाजिक बदल,* सांगली : लोकवाङ्मय गृह.
5. जोशी, न. म. (२०१३), *भारतीय समाज : परंपरा आणि परिवर्तन,* पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस.

6. सावरकर, द. प. (२०१७), *ग्रामीण भारत : समस्या आणि उपाय*, नाशिक : यश पब्लिकेशन.
7. देशपांडे, स. स. (२०१८), *ग्रामीण भागातील विकास प्रक्रिया*,मुंबई : हिमालय पब्लिशिंग हाऊस.
8. महाराष्ट्र शासन. (२०१९), *ग्रामीण विकास विभागाचा वार्षिक अहवाल*, मुंबई : महाराष्ट्र शासन.
9. भारत सरकार. (२०११), *भारत जनगणना अहवाल २०११*, नवी दिल्ली : भारत सरकार मुद्रणालय.
10. पवार, र. श. (२०२०), "ग्रामीण समाजातील बदल व आव्हाने." *समाजशास्त्र संशोधन पत्रिका*, ८(२), ४५–५२.


# ग्रामीण समाजातील लिंगभाव रूढी: आव्हाने आणि सक्षमीकरण

**डॉ. विनोद श्रावण शेंडे** समाजशास्त्र विभागप्रमुख, एच. बी. टी. कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**सारांश :** ग्रामीण समाजात लिंगभाव रूढीबद्धता ही पितृसत्ताक संरचनेमुळे निर्माण झालेली समस्या आहे. जी स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरणात अडथळा आणते. ग्रामीण समाज हा भारतीय समाजरचनेचा कणा मानला जातो. या समाजात रूढीपरंपरा आणि सामाजिक संकेतांना विशेष महत्त्व दिले जाते. मात्र याच परंपरांमध्ये लिंगभावावर आधारित असमानता खोलवर रुजलेली दिसून येते. स्त्रीपुरुषांमधील भूमिका, हक्क व संधी यांचे विभाजन अनेकदा रूढीबद्ध विचारांवर आधारित असते. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि निर्णयप्रक्रिया यामध्ये स्त्रियांचा सहभाग मर्यादित राहतो. अशा परिस्थितीत ग्रामीण स्त्रियांचे सक्षमीकरण हे सामाजिक न्याय, समता आणि विकासासाठी अत्यंत आवश्यक ठरते. ग्रामीण समाजातील लिंगभाव रूढी या स्त्री-पुरुषांच्या जैविक फरकांना सामाजिक अर्थ देऊन निर्माण झालेल्या असमान सत्तासंबंधाचा परिणाम आहे. पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था, धार्मिक-सांस्कृतिक वाईट प्रथा, मालमत्तेवरील स्त्रियांची मालकी नसणे आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचा कमी सहभाग यामुळे ग्रामीण भागात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. लवकर विवाह, हुंडा, घरगुती व लैंगिक हिंसा, घरकाम मुलांना प्राधान्य, यांमुळे स्त्रियांचा व्यक्तिमत्व विकास आणि सामाजिक सहभाग मर्यादित होतो. आर्थिक परावलंबन आणि संसाधनांवरील हक्कांचा अभाव हा भेदभाव अधिक घट्ट करतो, तसेच स्त्रिया स्वतःही पारंपरिक कर्तव्यधारणा स्वीकारून या लिंगभाव रूढींचे पुनरूत्पादन करतात.

या स्थितीविरूद्ध उभे राहण्याची प्रक्रिया म्हणजे लिंगसमानता आणि सक्षमीकरण होय. शिक्षण, स्व-सहायता गट, स्वयंसेवी संस्था, राज्याच्या विविध योजना, आरक्षण, कर्ज-स्वयंरोजगार कार्यक्रम आणि कायदे यांमुळे ग्रामीण स्त्रियांना आर्थिक स्वावलंबन, संघटन व नेतृत्वाची संधी मिळत आहे. लिंगदृष्टिकोन असलेली विकासधोरणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांची वाढती राजकीय सहभागिता व हक्कांविषयी असणारे जागृती अभियान यामुळे निर्णयप्रक्रियेत त्यांचा आवाज दृढ होऊ लागला आहे. तरीही रूढीवादी मानसिकता, हिंसाचार, असुरक्षितता आणि संसाधनांवरील वास्तविक नियंत्रणाचा अभाव ही मोठी आव्हाने आहेत. म्हणून कुटुंब स्तरावरूनच लिंगसमान मूल्यांचे शिक्षण, पुरुषांचा संवेदनशील सहभाग आणि कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी यांद्वारेच ग्रामीण समाजात लिंगभाव रूढींना ख-या अर्थाने आव्हान देत सर्वांगीण सक्षमीकरण साध्य होऊ शकते.

**मुख्य शब्द:** ग्रामीण समाज, लिंग असमानता, रूढी, सामाजिक संरचना, सक्षमीकरण

**प्रस्तावना:** समाजशास्त्रात ग्रामीण समाज हे अनौपचारिक संबंध, कृषिप्रधानता आणि प्राथमिक गटांवर आधारित असते, जिथे लिंगभाव रूढी स्त्रियांना गृहकेंद्रित भूमिकांत बांधून ठेवतात. रॉबर्ट रेडफील्डच्या ग्रामीण-नगरीय द्वंद्वानुसार, ग्रामीण भागात रूढीवादिता आणि सामाजिक स्तरीकरण (जाति-लिंग) यामुळे विषमता वाढते. ही रुढी सामाजिक पुनरुत्पादनाद्वारे चालू राहते, ज्यामुळे स्त्रियांची निर्णयक्षमता मर्यादित राहते. ग्रामीण समाजातील लिंगभाव असमानता ही प्रामुख्याने पारंपरिक रूढी, अंधश्रद्धा आणि पुरुषप्रधान मानसिकतेमुळे निर्माण झाली आहे. स्त्रियांना घरगुती कामांपुरते, शेती मोलमजुरीपुरते मर्यादित ठेवले जाते, ज्यामुळे त्यांचे निर्णयक्षमता आणि आर्थिक अवलंबन कमी होते. त्यांच्या शिक्षण व स्वातंत्र्यावर बंधने घातली जातात. विशेषकरून विदर्भातील स्त्रियांमध्ये शिक्षण व आरोग्याविषयीच्या समस्या असल्याचे अभ्यासात आढळून आले. बालविवाह, कमी साक्षरता दर आणि पोषणातील लिंगभेद असल्यामुळे सक्षमीकरणात अडथळा निर्माण होतात. शेती आणि मजुरीवर अवलंबून असलेल्या ग्रामीण कुटुंबांत स्त्रियांचे उत्पन्न मर्यादित राहते, ज्यामुळे सामाजिक भूमिका तथापि, शिक्षणाचा प्रसार, स्वयंसहायता गट, सरकारी योजना आणि सामाजिक जागरूकता यांमुळे स्त्रियांच्या सक्षमीकरणाची प्रक्रिया हळूहळू गती घेत आहे. आर्थिक स्वावलंबन, निर्णय क्षमतेत वाढ आणि सामाजिक सहभाग यामुळे ग्रामीण स्त्रियांचा आत्मविश्वास वाढत आहे. तरीही, खरी समानता साध्य करण्यासाठी रूढीबद्धतेला आव्हान देणे आणि लिंगसमतेचे मूल्य समाजात रुजवणे आवश्यक आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून लिंगभाव या शब्दाचा प्रयोग जेव्हा आपण करतो, तेव्हा त्याला एक विशिष्टप्रकारचा अर्थ प्राप्त होतो. या नवीन अर्थानुसार 'जेंडर' या संज्ञेचा वापर पुरुष आणि स्त्रियांची सामाजिक व सांस्कृतिक परिभाषा स्पष्ट करण्यासाठी केला जातो. ज्याला लिंगभाव असे म्हणतात. स्त्री-पुरुषांचे सामाजिक स्थान व भूमिका यांत समाजात जो फरक केला जातो, तो समजून घेण्यासाठी या संकल्पनेचा उपयोग होतो. कोनेल या विचारवंताच्या मते, समाजामध्ये स्त्रीत्वाचे सर्व प्रकार हे समाजरचित असून ते पुरुषांच्या तुलनेत दुय्यम आहे. ग्रामीण भागात लिंगानुपात १०३७:१००० असला तरी साक्षरता, पोषण आणि निर्णयक्षमतेची असमानता कायम आहे. विदर्भात शेती संकट आणि जाती आधारित विषमतेमुळे ही समस्या अधिक गंभीर आहे, ज्यामुळे सक्षमीकरणासाठी समाजशास्त्रीय दृष्टीकोन आवश्यक ठरतो. प्राचीन भारतात लिंगभूमिका तुलनात्मकदृष्ट्या संकुचित होत्या, परंतु वसाहतवादाने मालमत्ता हक्क आणि शि क्षणात भेदभाव आणला, ज्यामुळे पितृसत्ताकता वाढली. हरितक्रांतीने स्त्रियांचे कृषी काम

वाढवले तरी जमीनीचा मालकी हक्क पुरुषाकडे राहिला. २०११ च्या जनगणनेनुसार, ७० टक्के लोकसंख्या ग्रामीण असल्याने ही समस्या व्यापक आहे.

**संशोधनाचे उद्देश:** १. ग्रामीण समाजातील लिंगभाव रूढीबद्धतेचे समाजशास्त्रीय कारणे (सांस्कृतिक, आर्थिक, जाती आधारित) अभ्यासणे. २. स्त्रियांच्या सक्षमीकरणावर या रूढींचा परिणाम आणि परिवर्तनाची शक्यता तपासणे.३. सामाजिक संरचनेत लिंग समानतेसाठी धोरणात्मक उपाय सुचवणे.

**गृहितके:** ग्रामीण समाजात लिंगभाव रुढीबध्दता ही सामाजिक संरचनात्मक असून, शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबनाने ती बदलता येईल.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोध निबंधाकरीता दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग केला असून त्यामध्ये शासकीय अहवाल, जर्नल्स, इंटरनेट, शोधप्रबंध, संदर्भ ग्रंथ, इत्यादी स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. त्यानुसार वर्णनात्मक पद्धतीने तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले.

**संशोधनाचे महत्त्व:** १. अदृश्य श्रमांना ओळख मिळवून देणे: ग्रामीण स्त्रिया शेती, पशुपालन आणि घरकाम यामध्ये पुरुषांइतकेच किंवा त्यापेक्षा जास्त कष्ट करतात. परंतु, अर्थशास्त्रीय भाषेत त्यांच्या या कामाला 'उत्पादक श्रम' मानले जात नाही. संशोधनामुळे या 'अदृश्य श्रमांचे' (Invisible Labour) मूल्यमापन करता येते आणि धोरणकर्त्यांचे लक्ष याकडे वेधता येते.२. पितृसत्ताक रचनेचे विश्लेषण: लिंगभाव रुढी कशा प्रकारे पिढ्यानपिढ्या हस्तांतरित होतात, हे समजून घेण्यासाठी संशोधन महत्त्वाचे आहे. जमिनीची मालकी पुरुषांकडेच का राहते आणि त्यातून स्त्रियांचे आर्थिक अवलंबन कसे वाढते, याचे समाजशास्त्रीय विश्लेषण(Sociological Analysis) संशोधनाद्वारे शक्य होते.३.धोरण निर्मितीसाठी आधार (Policy Making): सरकार जेव्हा ग्रामीण विकासाच्या योजना आखते, तेव्हा त्यांना वस्तुनिष्ठ आकडेवारीची गरज असते. संशोधनामुळे ग्रामीण स्त्रियांच्या नेमक्या समस्या (उदा. कर्ज मिळवण्यातील अडचणी, कौशल्य विकासाचा अभाव) समोर येतात, ज्यामुळे अधिक प्रभावी योजना बनवता येतात.४.सक्षमीकरणाच्या साधनांची परिणामकारकता तपासणे बचत गट (SHGs), मनरेगा किंवा डिजिटल क्रांतीमुळे ग्रामीण स्त्रियांच्या स्थितीत खरोखर बदल झाला आहे का? की हे बदल केवळ कागदावर आहेत? हे तपासण्यासाठी क्षेत्रीय संशोधन (Field Research) अत्यंत आवश्यक आहे. ग्रामीण भागातील लिंग असमानता शिक्षण, आरोग्य, हिंसा सक्षमीकरणाला अडसर ठरते.

**लिंगभाग रूढींचे स्वरूप:** ग्रामीण भागात लिंगभाव रूढी महिलांना घरकाम बालसंगोपन आणि दुय्यम कामात मर्यादित ठेवतात, तर पुरुषांना निर्णय कर्ते मानले जाते आणि पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था, धार्मिक, वाईट रीती आणि सामाजीकरणामुळे निर्माण होतात. महाराष्ट्रसारख्या भागांत धार्मिक-सांस्कृतिक प्रभावामुळे ही रूढी पिढयानपिढया चालू राहते.

**मुख्य रूढी:** १. स्त्री भ्रूणहत्या आणि बालविवाहः मुलगा वंश चालवेल या धारणेमुळे गर्भलिंग निदान आणि १८ वर्षापूर्वी लग्न अश्या प्रकारच्या २० टक्के केसेस आढळून आल्या. २. शिक्षणात दुर्लक्षः ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी पूर्ण शिक्षण करता शाळा, महाविद्यालये सोडतात त्यामध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे. त्याचे कारण उच्च शिक्षणासाठी सुविधांचा अभाव आणि ज्याकाही तुटपुंज्या सुविधा मिळतात त्या फक्त मुलांनाकुटुंबातून दिल्या जातात. ३. कौंटुबिक हिंसा आणि हुंडाः ३३टक्के महिलांना हिंसा, हुंडामुळे आर्थिक त्रास, महिलांना संपत्ती हक्क नाकारला जातो.

**ग्रामीण समाजातील लिंगभाव आव्हाने १.** ग्रामीण भागात लिंगभाव(Gender) केवळ जैविक फरक नसून ती एक सामाजिक रचना आहे. पितृसत्ताक पद्धतीमुळे मालमत्तेचे अधिकार, निर्णय प्रक्रिया आणि वंशवेल यांवर पुरुषांचे वर्चस्व अधिक असते. यामुळे स्त्रियांना दुय्यम स्थान मिळते. श्रमविभाजनामुळे स्त्रियांनी घरातील कामे (Unpaid care work) करावीत आणि पुरुषांनी बाहेरची कामे करावीत, हा अलिखित नियम आहे. स्त्रियांच्या शेतातील कष्टाला अनेकदा 'मदत' मानले जाते, 'काम' नाही. तसेच शिक्षणाचा अभाव असल्यामुळे आजही अनेक ग्रामीण भागांत मुलींच्या शिक्षणापेक्षा लग्नाला प्राधान्य दिले जाते, ज्यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकत नाहीत. २. आर्थिक अवलंबन:समाजशास्त्रात कार्ल मार्क्स आणि एंगल्स यांच्या सिद्धांतानुसार, ज्याच्या हातात 'उत्पादनाची साधने' (जमीन, पैसा) असतात, तोच सत्तेत असतो. मालमत्तेच्या अधिकाराचा अभाव असल्यामुळे ग्रामीण भारतात जमिनीची मालकी बहुतांश पुरुषांकडे असते. जमीन नसल्यामुळे स्त्रियांना बँकेकडून कर्ज मिळवण्यात अडचणी येतात. शेतमजुरीत आजही स्त्री आणि पुरुषांच्या मजुरीच्या दरात मोठी वेतन तफावत दिसून येते. सारख्याच कष्टासाठी स्त्रियांना कमी मोबदला मिळतो. स्वतः कमावलेले पैसे कुठे खर्च करायचे, याचे स्वातंत्र्य अनेकदा ग्रामीण स्त्रियांना नसते. हे 'आर्थिक परावलंबित्व' त्यांना घरगुती हिंसाचार सहन करण्यास भाग पाडते. ३. सक्षमीकरणाचे मार्ग (Empowerment Strategies)आर्थिक अवलंबन संपवण्यासाठी खालील बदल होणे गरजेचे आहे: अ. बचत गट (Self-Help Groups-SHGs)बचत गटांमुळे ग्रामीण स्त्रियांमध्ये बचतीची सवय लागली असून त्यांना छोट्या व्यवसायांसाठी भांडवल उपलब्ध झाले आहे. हे केवळ आर्थिक माध्यम नसून सामाजिक एकत्रिकरणाचे साधन बनले आहे. ब. डिजिटल साक्षरता: २०२६ च्या काळात तंत्रज्ञानाचा वापर वाढल्याने ग्रामीण स्त्रिया 'ई-कॉमर्स' आणि 'सोशल मीडिया'च्या माध्यमातून आपले उत्पादन थेट बाजारात विकू शकतात. क. सरकारी योजना आणि कायदेशीर अधिकार: मनरेगा (MGNREGA) यात स्त्रियांना कामाची समान संधी आणि समान वेतन मिळते. वारसा हक्क: वडिलांच्या किंवा पतीच्या मालमत्तेत स्त्रियांना असलेल्या हक्काबाबत जनजागृती करणे.

ग्रामीण महिलांना तिहेरी कामाचा बोजा घर, शेत, कुटुंब सहन करावा लागतो, ज्यामुळे आरोग्य खराब होते आणि कुपोषण वाढते. आर्थिक अवलंबित्वामुळे भेदभाव वाढतो, महिलांचा साक्षरता दर ६५ टक्के असून पुरुषांकडे ८२ टक्के. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सामाजिक रूढींमुळे निर्णयप्रक्रियेत महिलांना दुय्यम स्थान मिळते.

**निष्कर्ष:** ग्रामीण भागातील लिंगभाव रुढी तोडण्यासाठी केवळ कायदे असून चालणार नाही, तर समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. जेव्हा एखादी स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होते, तेव्हा ती केवळ स्वतःचा विकास करत नाही, तर संपूर्ण कुटुंबाचा आणि पर्यायाने समाजाचा सामाजिक स्तर उंचावते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून, लिंगभाव रूढीबद्धता ही ग्रामीण समाजाची संरचनात्मक समस्या असून, सक्षमीकरनासाठी एकात्मिक सामाजिक परिवर्तन आवश्यक आहे. शिक्षण कायद्याची कठोर अंमलबजावणी आणि लिंगसंवेदनशी ल धोरणे यांद्वारे दीर्घकालीन बदल साध्य होईल विदर्भात स्थानिक संदर्भ जोडून हे सक्षमीकरण अधिक प्रभावी ठरेल.

**संदर्भ सूची:**


१. कमला भसीन (२०१०): लिंगभाव समजून घेतांना, प्रकाशक, लोकवाङ्मय गृह, मुंबई
२. श्याम पाखरे (२०२२): लोकशाही समजून घेतांना, पुरुषी मानसिकता आणि लोकशाही' मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई
३. रॉबर्ट रेडफिल्डः ग्रामिण समाज सिद्धांत
४. प्रकाश चंद्र जैन(२०२१): ग्रामिण समाजशास्त्र भारतीय परिप्रेक्ष्यः रावत पब्लिकेषन्स
५. मराठी विश्वकोश 'लिंगभाव' महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मित मंडळ
६. Ahuja Mukesh (२०१७): Gender Roles and Woman's Empowerments in Rural India
७. www.socialsciencejournals.net
८. https://marathivishwakosh.org
९. amoghvarta.com
१०. amoghvarta-com
११. pib.gov.in


# ग्रामीण समुदायातील शिक्षण आणि विकास: एक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. सीमा विनायक पाटील** सहाय्यक प्राध्यापक, मनोहरराव कामडी महाविद्यालय, नागपूर

**गोषवारा:** आजही भारताची ६० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. कोणत्याही राष्ट्राचा विकास हा त्या देशातील मानवी संसाधनांच्या विकासावर अवलंबून असतो आणि शिक्षण हे या विकासाचे सर्वात शक्तिशाली साधन आहे. ग्रामीण भागात अजूनही जातीय उतरंड कायम आहे, ज्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम दलित आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासावर आणि संधींवर होतो. मुलींच्या शिक्षणापेक्षा त्यांच्या विवाहावर अधिक भर दिला जातो. घरकाम आणि भावंडांची काळजी घेण्याच्या जबाबदारीमुळे मुलींच्या शिक्षणात खंड पडतो. पियरे बोरद्यू यांच्या सिद्धांतानुसार, ग्रामीण विद्यार्थ्यांकडे शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत 'सांस्कृतिक भांडवल' (उदा. इंग्रजी भाषेचे ज्ञान, तांत्रिक साक्षरता) कमी असते, ज्यामुळे ते स्पर्धेत मागे पडतात. बहुतांश कुटुंबे शेतीवर अवलंबून असल्याने, पीक पेरणी किंवा कापणीच्या हंगामात विद्यार्थ्यांना शाळेऐवजी शेतात काम करावे लागते. गरीबीचे दुष्टचक्र: उच्च शिक्षणासाठी लागणारा खर्च पेलण्याची क्षमता नसल्यामुळे अनेक हुशार विद्यार्थी प्राथमिक किंवा माध्यमिक शिक्षणानंतर शिक्षण सोडून देतात. इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अभाव आणि स्मार्टफोनची अनुपलब्धता यामुळे ग्रामीण विद्यार्थी आधुनिक ज्ञानस्रोतांपासून वंचित राहतात. अनेक गावांमध्ये माध्यमिक शाळा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना मैलोन्मैल पायपीट करावी लागते, ज्याचा परिणाम त्यांच्या उपस्थितीवर होतो. पालक रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतर करतात, तेव्हा मुलांचे शिक्षण विस्कळीत होते. हंगामी स्थलांतरामुळे 'शाळाबाह्य' मुलांची संख्या ग्रामीण भागात वाढताना दिसते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हे केवळ ज्ञानार्जनाचे माध्यम नसून ते दारिद्र्य, सामाजिक विषमता आणि रूढी-परंपरांच्या बेड्या तोडण्याचे एक महत्त्वाचे शस्त्र आहे.

**विषयाची पार्श्वभूमी:** ऐतिहासिकदृष्ट्या, ग्रामीण भारतातील शिक्षण पद्धती ही अनौपचारिक आणि कौशल्यावर आधारित होती. मात्र, आधुनिक काळात औपचारिक शिक्षणामुळे ग्रामीण समाजव्यवस्थेत मोठे बदल घडून येत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने विविध शैक्षणिक धोरणांच्या माध्यमातून ग्रामीण भागापर्यंत शाळा आणि महाविद्यालये पोहोचवली. परंतु, केवळ इमारती आणि शिक्षक उपलब्ध करून दिल्याने शिक्षण प्रक्रिया पूर्ण होत नाही. ग्रामीण विद्यार्थ्याला शिक्षण घेताना ज्या सामाजिक पर्यावरणाशी सामना करावा लागतो, तो शहरापेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने विचार करता, ग्रामीण विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती ही केवळ त्याच्या बुद्धिमत्तेवर नाही, तर त्याच्या 'सामाजिक पार्श्वभूमीवर' (Social Background) अवलंबून असते. फ्रेंच समाजशास्त्रज्ञ पियरे बोर्दियु यांच्या मते, ज्या विद्यार्थ्यांकडे 'सांस्कृतिक भांडवल' (Cultural Capital) असते, त्यांना शिक्षण पद्धतीत अधिक यश मिळते. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या बाबतीत हेच भांडवल-म्हणजेच घरातील शैक्षणिक वातावरण, प्रमाण भाषेचा वापर आणि मार्गदर्शकांचे जाळे-कमी पडताना दिसते. यामुळे ग्रामीण विद्यार्थी प्रतिभावान असूनही स्पर्धेच्या युगात मागे पडतो.

२१ व्या शतकात आपण 'डिजिटल इंडिया' आणि 'जागतिकीकरणाच्या' गप्पा मारत आहोत. इंटरनेटमुळे माहितीचे दरवाजे उघडले असले तरी, ग्रामीण भागात आजही वीज, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि तांत्रिक साक्षरतेचा अभाव आहे. यामुळे एक नवी 'डिजिटल दरी' (Digital Divide) निर्माण झाली आहे. एकीकडे शहरातील विद्यार्थी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि कोडिंग शिकत आहेत, तर दुसरीकडे ग्रामीण विद्यार्थ्याला साध्या ऑनलाईन अर्जासाठी किंवा अभ्यासासाठी रेंज शोधत डोंगरावर किंवा शेतात जावे लागत आहे. हे केवळ तांत्रिक आव्हान नसून ते एक गंभीर सामाजिक आव्हान आहे. ग्रामीण समाजाची रचना आजही जाती आणि

वर्गावर आधारित आहे. शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी आणि उपेक्षित घटकांतील मुलांसाठी शिक्षण घेणे म्हणजे एक 'लढा' असतो. घरातील आर्थिक ओढाताण, शेतीतील कामे आणि पालकांचे अज्ञान यामुळे अनेक विद्यार्थी मध्येच शिक्षण सोडून देतात (Dropout). विशेषतः मुलींच्या बाबतीत, शिक्षण हे विवाहापर्यंतचा 'वेळ काढू पर्याय' म्हणून पाहिले जाते. मुलींचे शिक्षण आणि त्यांचे सामाजिक सक्षमीकरण हा या अध्ययनाचा एक अविभाज्य भाग आहे.

**अध्ययनाचे उद्देश:** ग्रामीण समुदायातील शिक्षणाची सद्यस्थिती अभ्यासणे, ग्रामीण भागातील शैक्षणिक अडचणी व समस्या ओळखणे, शिक्षण व विकास यांच्यातील परस्परसंबंधाचे विश्लेषण करणे.

**अध्ययनाची गृहीतके:** ग्रामीण विकासात शिक्षणाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. ग्रामीण भागातील कमी शैक्षणिक सुविधा विकासास अडथळा ठरतात.

**अध्ययनाची गरज:** आजचा ग्रामीण तरुण हा महत्त्वाकांक्षी आहे. त्याला प्रशासकीय सेवा, तंत्रज्ञान आणि उद्योजकतेमध्ये रस आहे. परंतु, ग्रामीण सामाजिक संरचनेतील अडथळे त्याच्या स्वप्नांना मर्यादा घालतात. हा प्रबंध ग्रामीण विद्यार्थ्यांच्या मार्गातील हेच अदृश्य सामाजिक अडथळे शोधण्याचा प्रयत्न करतो. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या समस्यांचे मूळ केवळ गरिबीत नसून ते सामाजिक विचारसरणी, संस्थात्मक भेदभाव आणि संधींच्या विषम वाटपात आहे, हे स्पष्ट करणे हा या अभ्यासाचा मुख्य हेतू आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** पूर्व साहित्याचा अभ्यास म्हणजे केवळ पुस्तकांची यादी नव्हे, तर पूर्वीच्या संशोधकांनी ग्रामीण शिक्षण आणि सामाजिक बदलांविषयी जे सिद्धांत मांडले आहेत, त्यांचे चिकित्सक विश्लेषण होय.

**अ) भारतीय ग्रामीण समाजशास्त्रातील योगदान:** भारतीय समाजशास्त्राचे जनक मानले जाणारे एम. एन. श्रीनिवास (M.N. Srinivas) यांनी त्यांच्या 'Social Change in Modern India' या पुस्तकात 'संस्कृतीकरण' (Sanskritization) आणि 'पाश्चात्यीकरण' (Westernization) या संकल्पना मांडल्या. ग्रामीण विद्यार्थी जेव्हा शिक्षण घेतो, तेव्हा तो केवळ पदवी मिळवत नाही, तर तो उच्च वर्गीय किंवा पाश्चात्य जीवनशैलीचा अंगीकार करण्याचा प्रयत्न करतो. हा बदल ग्रामीण सामाजिक रचनेत कसे स्थित्यंतर घडवून आणतो, याचा पाया श्रीनिवास यांच्या साहित्यात आढळतो.

**ब) शैक्षणिक संधी आणि सामाजिक विषमता:** डॉ. ए. आर. देसाई (A.R. Desai) यांनी त्यांच्या लेखनात ग्रामीण भागातील वर्गसंघर्ष आणि शिक्षणाचे वास्तव मांडले आहे. त्यांच्या मते, शिक्षणाच्या सोयी खेड्यापाड्यात पोहोचल्या असल्या तरी, त्याचा खरा फायदा ग्रामीण भागातील 'धनिक शेतकरी' वर्गालाच झाला आहे. गरीब आणि भूमिहीन मजुरांच्या मुलांसाठी शिक्षण आजही एक दुर्गम स्वप्न आहे. हा अभ्यास ग्रामीण विद्यार्थ्यांमधील 'वर्गाधारित दरी' समजून घेण्यास मदत करतो.

**क) जागतिक समाजशास्त्रीय दृष्टिकोन (पियरे बोर्दियु):** फ्रेंच समाजशास्त्रज्ञ पियरे बोर्दियु (Pierre Bourdieu) यांचा 'सांस्कृतिक भांडवल' (Cultural Capital) हा सिद्धांत ग्रामीण विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी अत्यंत कळीचा ठरतो. बोर्दियु यांच्या मते, शाळा ही संस्था 'शहरी आणि उच्चभ्रू' संस्कृतीला झुकते माप देते. ग्रामीण विद्यार्थ्याची भाषा, त्याचे राहणीमान आणि त्याची ग्रामीण पार्श्वभूमी यामुळे त्याला शैक्षणिक संस्थांमध्ये 'परकेपणा' जाणवतो. अनेक पाश्चात्य आणि भारतीय संशोधकांनी बोर्दियु यांचा आधार घेऊन ग्रामीण विद्यार्थ्यांच्या न्यूनगंडाचे विश्लेषण केले आहे.

**ड) आधुनिक अहवाल आणि सर्वेक्षणे (ASER Report):** 'प्रथम' या संस्थेद्वारे दरवर्षी प्रकाशित होणारा 'एसर' (ASER - Annual Status of Education Report) हा ग्रामीण शिक्षणातील आव्हानांचा आरसा आहे. या अहवालातील साहित्याचा अभ्यास केल्यास असे दिसते की, ग्रामीण विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढली असली तरी, 'गुणवत्तापूर्ण शिक्षण' आणि 'वाचन-लेखन कौशल्य' यामध्ये मोठी तफावत आहे. तसेच, कोविड-१९ नंतर ग्रामीण भागातील 'डिजिटल डिव्हाइड' (Digital Divide) मुळे विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान यावरही अनेक समाजशास्त्रीय लेख प्रसिद्ध झाले आहेत.

**इ) महिला शिक्षण आणि ग्रामीण समाज:** सावित्रीबाई फुले यांच्यापासून सुरू झालेल्या स्त्री-शिक्षणाच्या चळवळीवर आधारित अनेक साहित्याचा अभ्यास करताना असे जाणवते की, ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे, पण त्यांच्या 'एजन्सी'वर (स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता) अजूनही मर्यादा आहेत. शर्मिला रेगे यांच्यासारख्या अभ्यासकांनी दलित आणि ग्रामीण स्त्रियांच्या शिक्षणातील 'जाती आणि लिंगभाव' या दुहेरी संघर्षावर प्रकाश टाकला आहे.

वरील साहित्याच्या अभ्यासावरून असे स्पष्ट होते की, ग्रामीण विद्यार्थ्यांच्या समस्या केवळ पायाभूत सुविधांपुरत्या मर्यादित नाहीत. त्या सामाजिक स्तरीकरण, भाषिक अडसर आणि सांस्कृतिक विषमतेशी जोडलेल्या आहेत. पूर्वीच्या संशोधनात प्रामुख्याने शाळांच्या स्थितीवर भर दिला होता, मात्र प्रस्तुत अभ्यास हा 'डिजिटल युगातील बदलत्या आव्हानांवर' लक्ष केंद्रित करणार आहे.

**समाजशास्त्रीय दृष्टिकोन:**

**संरचनात्मक-कार्यात्मक दृष्टिकोन:** हा दृष्टिकोन समाजाला एका 'यंत्रणे'सारखे पाहतो, जिथे शिक्षण हे समाजाचे संतुलन राखण्याचे काम करते. या सिद्धांतानुसार, ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक जगासाठी तयार करणे हे शिक्षण व्यवस्थेचे 'कार्य' आहे. जर ग्रामीण शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता असेल किंवा पायाभूत सुविधा नसतील, तर त्याला 'Dysfunction' (कार्यहीनता) मानले जाते. यामुळे समाजाचे संतुलन बिघडते आणि ग्रामीण तरुण बेरोजगार राहतात.

**संघर्षवादी दृष्टिकोन:** कार्ल मार्क्सच्या विचारांवर आधारित हा दृष्टिकोन मानतो की, शिक्षण व्यवस्था ही श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कायम ठेवण्याचे काम करते. ग्रामीण विद्यार्थ्यांकडे आर्थिक संसाधने कमी असल्याने त्यांना नामांकित संस्थांमध्ये प्रवेश मिळत नाही. शहरांमधील महागडे कोचिंग क्लासेस आणि ग्रामीण भागातील अपुऱ्या सोयी यामुळे 'वर्ग संघर्ष' (Class Conflict) निर्माण होतो. येथे शिक्षण हे समता प्रस्थापित करण्याऐवजी विषमता वाढवण्याचे साधन ठरते.

**सांस्कृतिक पुनरुत्पादन सिद्धांत:** हा ग्रामीण विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी सर्वात उपयुक्त सिद्धांत आहे. सांस्कृतिक भांडवल (Cultural Capital): ग्रामीण विद्यार्थ्यांकडे शेतीचे ज्ञान असते, पण शाळेला 'शहरी' भाषा आणि शिष्टाचार हवे असतात. ग्रामीण विद्यार्थ्यांची भाषा (बोलीभाषा) आणि पुस्तकी भाषा (प्रमाणभाषा) यात संघर्ष असतो. यामुळे हुशार असूनही तो स्वतःला कमी लेखतो. शिक्षण व्यवस्था नकळतपणे शहरी संस्कृतीला 'श्रेष्ठ' ठरवते, ज्याला बोर्दियु 'Symbolic Violence' (प्रतीकात्मक हिंसा) म्हणतात.

**प्रतीकात्मक आंतरक्रियावाद (Symbolic Interactionism):** हा दृष्टिकोन वर्गातील विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील प्रत्यक्ष संबंधांवर लक्ष केंद्रित करतो. शिक्षक ग्रामीण विद्यार्थ्यांकडे कोणत्या नजरेने पाहतात? जर शिक्षकाचा दृष्टिकोन असा असेल की "ग्रामीण मुले इंग्रजीत कच्चेच असतात", तर विद्यार्थी खरोखरच मागे पडतो. Labeling Theory: विद्यार्थ्याला 'ढ' किंवा 'मागासलेला' असे संबोधल्याने त्याच्या आत्मप्रतिमेवर (Self-image) होणारा परिणाम या दृष्टिकोनातून अभ्यासला जातो.

**तथ्यांचे विश्लेषण:**

अ) शैक्षणिक पार्श्वभूमी आणि आर्थिक स्तर: विश्लेषणातून असे दिसून येते की, ६० टक्के हून अधिक ग्रामीण विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी आहेत. यामुळे 'आर्थिक असुरक्षितता' हा शिक्षणातील सर्वात मोठा अडथळा ठरतो. पालकांच्या शिक्षणाचा अभाव असल्याने घरी अभ्यासाचे वातावरण मिळत नाही.

ब) डिजिटल क्रांतीचा प्रभाव: जवळपास ९० टक्के विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन आहे, परंतु त्याचा वापर अभ्यासापेक्षा मनोरंजनासाठी अधिक होतो. येथे 'डिजिटल साक्षरतेचा' (Digital Literacy) अभाव दिसून येतो. तंत्रज्ञान असूनही त्याचा करिअरसाठी वापर कसा करावा, याचे मार्गदर्शन ग्रामीण भागात कमी पडते.

क) भाषिक संघर्ष आणि न्यूनगंड: माहिती विश्लेषणावरून असे आढळले की, ग्रामीण विद्यार्थी प्रादेशिक भाषेत (मराठी) हुशार असूनही, इंग्रजीच्या भीतीमुळे ते विज्ञान किंवा व्यवस्थापन (Management) यांसारख्या क्षेत्रांत जाण्यास घाबरतात. हा 'भाषिक अडसर' त्यांच्या सामाजिक गतिशीलतेत (Social Mobility) मोठी भिंत उभी करतो.

ड) लिंगभाव आणि ग्रामीण शिक्षण (Gender Perspective): मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी, त्यांच्यावर घरातील कामांचा भार अधिक असतो. तसेच, उच्च शिक्षणासाठी मुलींना शहरात पाठवण्याबाबत पालकांमध्ये आजही 'सुरक्षेची' आणि 'सामाजिक प्रतिष्ठेची' चिंता दिसून येते.

**निष्कर्ष:** प्रस्तुत अध्ययनाअंती खालील निष्कर्ष काढण्यात आले आहेत: ग्रामीण तरुणांच्या आकांक्षा उच्च आहेत, पण त्यांच्याकडे लागणारे 'मृदू कौशल्य' (Soft Skills) नाही. शिष्यवृत्ती योजनांची माहिती अनेक विद्यार्थ्यांना वेळेवर मिळत नाही. पदवी घेतल्यानंतर ९० टक्के विद्यार्थ्यांना रोजगारासाठी गाव सोडून शहरात जावे लागते, ज्यामुळे गावातील बुद्धिमत्ता गावासाठी उपयोगात येत नाही.

1. संधिप्रकाशातील पिढी: आजचा ग्रामीण विद्यार्थी एका 'संक्रमण काळात' (Transition Period) आहे. तो पारंपारिक ग्रामीण मूल्ये आणि आधुनिक जागतिक आकांक्षा यांच्या केंद्रस्थानी उभा आहे.
2. सांस्कृतिक अडथळा: ग्रामीण विद्यार्थ्यांच्या अपयशाचे कारण केवळ बुद्धिमत्तेचा अभाव नसून, त्यांना मिळणारे 'सांस्कृतिक भांडवल' (Cultural Capital) कमी आहे. शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत त्यांना मिळणारे मार्गदर्शन आणि 'सॉफ्ट स्किल्स'चे वातावरण अत्यंत मर्यादित आहे.
3. डिजिटल दरीचे वास्तव: स्मार्टफोनने माहिती तर पोहोचवली, पण ज्ञानाचे रूपांतर कौशल्यात करण्यासाठी लागणारी साधने (उदा. लॅपटॉप, हाय-स्पीड इंटरनेट, तज्ज्ञ मार्गदर्शक) ग्रामीण भागात अजूनही दुर्मिळ आहेत.
4. लिंगभाव आणि शिक्षण: ग्रामीण विद्यार्थिनींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी, त्यांच्या करिअरचे निर्णय आजही कुटुंबाच्या सामाजिक प्रतिष्ठेशी (Social Status) आणि विवाहाशी जोडलेले आहेत.
5. न्यूनगंड आणि भाषा: इंग्रजी भाषेचा न्यूनगंड हा ग्रामीण बुद्धिमत्तेच्या मार्गातील सर्वात मोठा 'मानसिक अडसर' असल्याचे दिसून येते.

**शिफारशी :** प्रस्तुत अध्ययनातून समोर आलेल्या समस्यांवर मात करण्यासाठी खालील उपाययोजना सुचवण्यात येत आहेत:

1. ग्रामपातळीवर करिअर समुपदेशन: प्रत्येक मोठ्या गावात किंवा शाळांच्या समूहात 'करिअर मार्गदर्शन केंद्र' असावे, जे विद्यार्थ्यांना केवळ नोकरीच नाही तर बदलत्या व्यावसायिक क्षेत्रांची माहिती देईल.
2. डिजिटल लायब्ररीची स्थापना: केवळ इंटरनेट नाही, तर शैक्षणिक सॉफ्टवेअर्स आणि ई-बुक्स उपलब्ध करून देणारी केंद्रं उभारणे आवश्यक आहे.
3. भाषिक सक्षमीकरण: ग्रामीण शाळांमध्ये इंग्रजी भाषेची भीती घालवण्यासाठी 'संवादात्मक इंग्रजी' (Spoken English) वर भर द्यावा, जेणेकरून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल.
4. पालकांचे प्रबोधन: केवळ विद्यार्थ्यांचे नाही, तर पालकांचेही समुपदेशन होणे गरजेचे आहे, जेणेकरून ते मुलींच्या शिक्षणाकडे 'गुंतवणूक' म्हणून पाहतील, 'ओझे' म्हणून नाही.
5. स्थानिक रोजगाराभिमुख शिक्षण: ग्रामीण भागातील शेती आणि प्रक्रिया उद्योगांशी निगडित व्यावसायिक अभ्यासक्रम स्थानिक महाविद्यालयांमध्ये सुरू करावेत.

**संदर्भ सूची:**


1. Bourdieu, Pierre(१९७७): Reproduction in Education, Society and Culture, Sage Publications
2. Srinivas, m n.(१९६६):Social Change in Modern India, Orient Blackswan.
3. Annual Status of Education Report (ASER)- २०२३-२४, प्रथम फाउंडेशन.

4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२०, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार.
5. जनगणना संचालनालय (Census of India)
6. www.censusindia.gov.in
7. युनेस्को शैक्षणिक अहवाल
8. www.unesco.org
9. Halsey, A.H. & Halsey, A.H.: Education: Culture, Economy, and Society, Oxford University Press.
10. महाराष्ट्र शासन: आर्थिक पाहणी अहवाल (Economic Survey of Maharashtra), शिक्षण आणि ग्रामीण विकास विभाग.

# ग्रामीण विकासातील नागरिकांची कर्तव्ये: सामाजिक, आर्थिक आणि लिंगदृष्टिकोन

**कु. साक्षी सतीश देसाई** पीएच.डी. संशोधक, समाजशास्त्र विभाग, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई

**गोषवारा:** ग्रामीण विकास हा केवळ शासकीय धोरणांवर अवलंबून नसून नागरिकांच्या सक्रिय सहभागावर आधारित एक समग्र प्रक्रिया आहे. प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण विकासातील नागरिकांच्या सामाजिक, आर्थिक आणि लिंगाधारित कर्तव्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. ग्रामीण नागरिक उद्योजकता, विविधीकरण, लघुउद्योग आणि कृषी उपक्रमांच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देतात. समुदाय सहभागामुळे संसाधनांचे योग्य व्यवस्थापन, सामाजिक ऐक्य आणि लोकशाही मूल्यांची जपणूक शक्य होते. ग्रामीण विकासात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून स्वयं-सहायता गट, सहकारी संस्था आणि कौशल्यविकास कार्यक्रमांमुळे त्यांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण होत आहे. शिक्षण आणि कौशल्य विकासामुळे ग्रामीण नागरिक बदलत्या आर्थिक परिस्थितींशी जुळवून घेऊ शकतात. तसेच पर्यावरण संरक्षण, शाश्वत शेती पद्धती आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन ही नागरिकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग, लिंगसमानता, शिक्षण आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन यांद्वारे समावेशक आणि शाश्वत ग्रामीण विकास साध्य होऊ शकतो. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी नागरिकांची भूमिका परिवर्तनकारी आणि अत्यावश्यक ठरते.

**महत्त्वाचे शब्द:** ग्रामीण विकास, नागरिकांची कर्तव्ये, समुदाय सहभाग, लिंगसमानता, आर्थिक सक्षमीकरण, सामाजिक जबाबदारी, कौशल्य विकास, शाश्वत विकास, ग्रामीण अर्थव्यवस्था, महिला सक्षमीकरण

**प्रस्तावना:** शाश्वत ग्रामीण विकासाला प्रोत्साहन देणे आणि त्याला पाठबळ देणे ही नागरिकांची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. ग्रामीण रहिवासी उद्योजकता, विविधीकरण आणि नवकल्पनांच्या माध्यमातून आर्थिक योगदान देतात. शासन आणि विकासाच्या सर्व स्तरांवर शेतीतून होणारे लाभ मिळवण्यासाठी समुदायाचा सक्रिय सहभाग आवश्यक असतो. त्याचबरोबर, सर्व नागरिकांनी नैसर्गिक संसाधनांचे संवर्धनकर्ते म्हणून जबाबदारीने वागणे आवश्यक आहे, जेणेकरून भविष्यातील हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देता येईल. विकासाच्या या विविध घटकांमधील परस्परावलंबित्व लक्षात घेतल्यास ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी आणि संरचनात्मक असमानता कमी करून समतोल वाढ साधण्यासाठी नागरिकांची बहुआयामी जबाबदारी स्पष्ट होते. नागरिक हे जागतिक स्तरावर ग्रामीण समुदायांमध्ये परिवर्तन घडवणारे प्रमुख घटक आहेत. यामुळे विकास प्रक्रियेत मालकीची भावना निर्माण होते आणि नागरिक जबाबदार बनतात. काही ग्रामीण भागांमध्ये स्वच्छ पाणी आणि स्थानिक बाजारपेठांपर्यंत पोहोच यांसारख्या समस्यांवर विविध सामाजिक गटांनी एकत्रितपणे उपाय शोधल्याची उदाहरणे दिसून येतात. तसेच नागरिक स्थानिक प्रशासनाला सार्वजनिक सेवा आणि सुविधा न्याय्य पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी जबाबदार धरू शकतात.

**उद्दिष्टे:** **१)** ग्रामीण विकासातील नागरिकांची सामाजिक, आर्थिक आणि लिंगाधारित कर्तव्ये समजून घेणे. २) समुदाय सहभागाचा ग्रामीण विकास प्रक्रियेवर होणारा परिणाम अभ्यासणे. ३) ग्रामीण अर्थव्यवस्थेत नागरिकांचे योगदान आणि उद्योजकतेची भूमिका स्पष्ट करणे. ४) ग्रामीण विकासात महिलांच्या सहभागाचे महत्त्व आणि लिंगसमानतेची गरज अधोरेखित करणे. ५) शिक्षण, कौशल्यविकास आणि शाश्वत पर्यावरणीय पद्धतींचा ग्रामीण विकासाशी असलेला संबंध अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. अभ्यासासाठी प्रामुख्याने दुय्यम माहिती स्रोतांचा वापर करण्यात आला असून विविध संशोधन लेख, शासकीय अहवाल, आंतरराष्ट्रीय संस्थांचे दस्तऐवज, जर्नल्स आणि संदर्भग्रंथांचा अभ्यास करण्यात आला आहे. उपलब्ध साहित्याच्या आधारे ग्रामीण विकासातील नागरिकांच्या सामाजिक, आर्थिक आणि लिंगाधारित भूमिकेचे विश्लेषण करण्यात आले आहे.

या पद्धतीद्वारे नागरिकांच्या सहभागाचे विविध पैलू समजून घेऊन शाश्वत आणि समावेशक ग्रामीण विकासासाठी आवश्यक असलेल्या घटकांची मांडणी करण्यात आली आहे.

**समुदाय सहभागाचे महत्त्व:** शाश्वत ग्रामीण विकासासाठी समुदायाचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. विकासाच्या विविध स्तरांवर नागरिकांचा सहभाग असल्यास त्यातून मिळणारे फायदे अधिक परिणामकारक ठरतात. यामुळे नागरिकांमध्ये मालकीची भावना निर्माण होते आणि ते विकास प्रक्रियेत उत्तरदायी बनतात. ग्रामीण भागात लोकांनी परस्पर सहकार्याने सामूहिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी संघटनात्मक प्रयत्न केलेले दिसून येतात. स्वच्छ पाणी, बाजारपेठेपर्यंत पोहोच, स्थानिक संसाधनांचे व्यवस्थापन यांसारख्या मुद्द्यांवर नागरिकांनी एकत्रित कृती केली आहे. अशा प्रकारचा सहभाग सामाजिक ऐक्य वाढवतो आणि विकास प्रक्रियेला गती देतो.

**ग्रामीण नागरिकांचे आर्थिक योगदान:** ग्रामीण लोकसंख्या ही त्यांच्या समुदायाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. उद्योजकता, लघुउद्योग, पर्यटन, हस्तकला आणि इतर उत्पन्ननिर्मिती उपक्रमांद्वारे ग्रामीण नागरिक आर्थिक विकासात योगदान देतात. अनेक ग्रामीण नागरिक शेतीबाह्य उपजीविकेच्या संधींकडे वळत आहेत, ज्यामुळे अर्थव्यवस्थेत विविधता येत आहे.

महिलांचा सहकारी संस्था आणि सूक्ष्म उद्योगांमधील सहभाग सामूहिक आर्थिक सक्षमीकरणाला चालना देतो. महिलांच्या हाती वाढलेले उत्पन्न संपूर्ण समुदायाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवते. अशा उपक्रमांमुळे युवकांना स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात आणि त्यांचे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होऊ शकते.

**ग्रामीण विकासातील लिंगभूमिका:** समुदायाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात दोन्ही लिंगांना समान सहभागाची संधी मिळणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात महिलांचे योगदान मोठ्या प्रमाणात असले तरी त्यांना जमीन, कर्ज, शिक्षण आणि निर्णयप्रक्रियेत मर्यादित प्रवेश मिळतो. त्यामुळे या असमानतेचे निराकरण करणे आवश्यक आहे.

स्वयं-सहायता गट (SHGs) हे महिलांच्या सामूहिक सक्षमीकरणाचे प्रभावी साधन ठरले आहेत. सरकारी संस्था, स्वयंसेवी संस्था आणि आर्थिक संस्थांच्या मदतीने महिलांनी एकत्र येऊन आपली सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न केले आहेत. ग्रामसभांमध्ये सहभाग घेऊन ग्रामीण नागरिक स्थानिक धोरणे आणि कार्यक्रम घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

लिंगसमानतेसाठी कायदे, धोरणे आणि कौशल्यविकास कार्यक्रम आवश्यक आहेत. महिलांच्या नेतृत्वक्षमतेचा विकास झाल्यास त्या ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत अधिक प्रभावी भूमिका बजावू शकतात.

**सामाजिक जबाबदाऱ्या आणि नागरी सहभाग:** नागरी सहभाग म्हणजे केवळ स्थानिक प्रकल्पांमध्ये सहभागी होणे नव्हे, तर त्यासाठी वकिली करणे आणि प्रादेशिक किंवा आंतरराष्ट्रीय संस्थांशी संवाद साधणेही होय. नागरिकांचा सहभाग हा प्रभावी आणि समतोल ग्रामीण विकासाचा आधारस्तंभ आहे. ग्रामसभा, स्थानिक प्रशासन आणि विकास कार्यक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढल्यास संसाधनांचे न्याय्य वितरण, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढते. लोकशाहीसाठी सुशिक्षित आणि बांधिल नागरिक आवश्यक असतात, तसेच ग्रामीण विकासासाठी सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिकांची गरज असते.

**शिक्षण आणि कौशल्य विकास उपक्रम:** ग्रामीण विकासासाठी शिक्षण आणि कौशल्यविकास अत्यंत महत्त्वाचे आहेत. अनौपचारिक शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण नागरिकांना बदलत्या आर्थिक परिस्थितींशी जुळवून घेण्यासाठी मदत करते. पारंपरिक उद्योग कमी होत असताना नव्या कौशल्यांची गरज वाढत आहे.

सरकारने ग्रामीण शाळा, महाविद्यालये, प्रौढ साक्षरता कार्यक्रम आणि कौशल्य प्रशिक्षण केंद्रांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सहकारी शिक्षण पद्धतींमुळे भौगोलिक अडथळे दूर होऊन शिक्षणाची उपलब्धता वाढू शकते.

**शाश्वत ग्रामीण विकासासाठी पद्धती:** पर्यावरणाचे संरक्षण करणे ही देखील नागरिकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. शाश्वत ग्रामीण विकासासाठी स्थानिक परिसंस्थेचे संतुलन राखणे आवश्यक आहे. जमिनीचा शाश्वत वापर, पीक पद्धतींचे विविधीकरण, कृषिवनशेती आणि मृदसंवर्धन तंत्रांचा अवलंब करून जैवविविधता वाढवता येते.

वनसंवर्धन, पाणीस्रोतांचे संरक्षण आणि पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब केल्यास अन्नसुरक्षा आणि दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य सुनिश्चित करता येते. महिलांचा पर्यावरण व्यवस्थापनात मोठा वाटा असून त्यांच्या अनुभवांचा उपयोग शाश्वत विकासासाठी महत्त्वाचा ठरतो.

**निष्कर्ष:** शाश्वत ग्रामीण विकासासाठी नागरिकांचा सहभाग आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि लिंगदृष्ट्या अत्यंत आवश्यक आहे. समुदाय सहभागामुळे स्थानिक पातळीवरील समस्यांवर परिणामकारक उपाययोजना करता येतात. ग्रामीण नागरिक हे प्रादेशिक विकासाचे प्रमुख घटक आहेत. लिंगसमानता महिलांचा सहभाग वाढवते, शिक्षण मानवी भांडवल वाढवते आणि नवकल्पनांना चालना देते. नागरिकांची सामाजिक जबाबदारी म्हणजे नागरी सहभाग वाढवणे आणि नेतृत्वाला उत्तरदायी ठेवणे होय. तसेच ग्रामीण नागरिकांनी पर्यावरणाचे संवर्धनकर्ते म्हणून शाश्वत पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. या सर्व जबाबदाऱ्यांमुळे ग्रामीण विकासात नागरिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. योग्य सहभाग आणि समन्वयातून ग्रामीण समाज आपली पूर्ण क्षमता साध्य करून राष्ट्राच्या सर्वांगीण विकासात योगदान देऊ शकतो.

## संदर्भ सूची


१) Guerrero-Villalba, M. A. (2021). *Rural development from a gender perspective: The case of women. Land, 10(1), 75. https://doi.org/10.3390/land10010075*

२) Danforth, A. (2023). *The equity of economic opportunity in rural America*. Center on Rural Innovation. https://ruralinnovation.us/blog/equity-economic-opportunity-rural-america/

३) UN Women. (2013). *The role of women in rural development, food production and poverty eradication*. https://www.unwomen.org/en/news/in-focus/rural-women-day/2013

४) Agriculture Institute. (2023). *Addressing gender issues in people's participation in rural development*. https://agriculture.institute/cooperative-and-farmers-organizations/gender-issues-rural-development-participation/

५) European Institute for Gender Equality. (2026). *Agriculture and rural development*. https://eige.europa.eu/gender-mainstreaming/policy-areas/agriculture-and-rural-development

# ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप व आव्हाने: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. सलीम अहेमद शेख** यशवंतराव चव्हाण महाविद्यालय पाचवड

**गोषवारा:** ग्रामीण समाज पारंपरिक शेतीप्रधान जीवनशैलीतून आधुनिकतेकडे वाटचाल करत आहे. शिक्षणाचा विस्तार, तंत्रज्ञानाचा वापर, दळणवळण ची साधने, माध्यामाचा प्रभाव आणि शहरीकरण यामुळे ग्रामीण समाजच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक रचनेत मोठे बदल घडून येत आहेत. संयुक्त कुटुंब पद्धती ऐवजी विभक्त कुटुंब पद्धती, शेती व्यवसाया ऐवजी इतर व्यवसायाकडे कल तसेच तरुणाचे शहराकडे होणारे स्थलांतर, नगदी पिक घेण्यावर जास्त भर, शहरातील लोकाचे जीवनशैली चे अनुकरण थोडक्यात ग्रामीण समाजच्या मुलभूत संस्थेत म्हणजे कुटुंब संस्था, विवाह संस्था, धर्म संस्था, जाती संस्था, अर्थ संस्था आणि राज्य संस्था यावर दूरगामी परिणाम होवून ग्रामीण समाज सद्या परिवर्तनाच्या संक्रमणातून जात आहे.

या परिवर्नाच्या प्रक्रीये बरोबर काही आव्हाने उभी राहिले आहेत. हवामान बदल शेतीचे अत्यल्प उत्पन्न, बेरोजगारी, शिक्षण व आरोग्याच्या सुविधांचा अभाव, इंटरनेट व डिजिटल साधनांचा अभाव तसेच डिजिटल निरक्षरता, शहराकडे होणारे स्थलांतर, सामाजिक असमानता आणि सामाजिक बदलांमुळे निर्माण होणारा ताण ही प्रमुख आव्हाने आहेत. त्यामुळे ग्रामीण विकासासाठी शाश्वत शेती, दर्जेदार शिक्षण, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे बळकटीकरण आवश्यक ठरते. तसेच महिला व युवकांचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. डिजिटल साधनाविषयी जनजागृती करणे आवश्यक आहे, तसेच शासनाच्या विविध योजनाची प्रभावीपणे अंमलबजावणी करून योग्य लाभार्त्यांना त्याचा लाभ मिळाला पाहिजे. ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी बदल स्वीकारत असतना येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाणे काळाची गरज आहे.

**की-वर्डस:** ग्रामीण समाज, ग्रामीण परिवर्तन, ग्रामीण संरचना

---

**प्रस्तावना:** व्यक्तीची वेशभूषा राहणीमान परंपरा कामाचे स्वरूप इ. विचार केला असता ढोबळमानाने समाजाचे तीन प्रकार पडतात. आदिवासी समाज, ग्रामीण समाज व नागरी समाज प्रत्येक समाजाची स्वतंत्र अशी विशिष्ट्यापूर्ण जीवनपद्धती आहे. सदर संशोधनात आपण ग्रामीण समाजाविषयी व निर्माण होणाऱ्या आव्हाना विषयी माहिती करून घेणार आहोत. भारतीय समाजाचा कणा म्हणून ओळखला जाणारा ग्रामीण समाज हा दीर्घकाळ परंपरा, शेतीप्रधान अर्थव्यवस्था आणि सामुहिक जीवनशैलीवर आधारलेला होता. जिथे लोक्संख्ये चे प्रमाण शहरापेक्षा कमी होते त्याचे सर्व जीवन शेती व शेतीशी निगडीत असलेल्या व्यवसायावर अवलंबून होते, कच्चे रस्ते शिक्षणाचा अभाव आरोग्यासोई सुविधेचा अभाव तरीही आनंदी व आरोग्यपूर्ण जीवन जगणारा समाज म्हणजे ग्रामीण समाज. सर्व गरजा स्वयंपूर्ण करणारा समाज हा ग्रामीण समाज म्हणून ओळखला जात होता, संयुक्त कुटुंब पद्धती, प्राथमिक स्वरूपाचे अनौपचारिक संबध, प्रेमाचे, आपुलकीचे, सहकार्य ची भावना, प्रथा परंपरा रूढी यांना महत्व देणारा समाज म्हणजे ग्रामीण समाज होय. जातीचा व धर्माचा पगडा पाहायला मिळतो. थोडक्यात ग्रामीण समाज हा अनौपचारिक संबंधावर आधारलेला व शेतीशी समरूप झालेला धर्माचे व जातीचा पगडा असलेला पण प्रेम आपुलकी सहकार्य असणारा समाज म्हणजे ग्रामीण समाज होय.

भारत देश हा कृषिप्रधान आहे. देशातील २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्ये पैकी ६८.८४% एवढी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. २०२४ नुसार अंदाजे ६३.१३ % आजही ग्रामीण भागात वास्तव करते. दिवसेंदिवस हे प्रमाण कमी होत चालले आहे. तरी सुधा या लोकांना शेती व शेती आधारित व्यवसायावर अवलंबून राहावे लागते. ग्रामीण समाज हा परंपरा रीतीरिवाज शेती कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक नातेसंबंधावर आधारित आहे. मात्र आधुनिकीकरण, औद्योगीकीरणामुळे व जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाजात बऱ्याच प्रमाणात बदल व नवीन आव्हाने निर्माण झालेली दिसून येत आहेत. ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर, संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास, नवीन तंत्रज्ञान वापरण्यास अक्षम, नवीन शिक्षणाचा अभाव, ग्रामीण समाजातील विविध संस्थेत झालेला बदल, पर्यावरणीय समस्या, रोजगाराची समस्या सायबर गुन्हेगारीच्या जाळ्यात अडकणे, शेतीवरील अचानक येणारी संकटे, शेतीमालाला रास्त भाव न मिळणे, शासनाची उदासीनता अश्या अनेक आव्हानंना आज ग्रामीण समाज तोंड देत आहे. म्हणून ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि त्या समोरील आव्हाने यांचा अभ्यास करणे आजच्या काळाची गरज ठरली आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** ग्रामीण समाजाचा अनेक समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ विविध संशोधकांनी आपल्या लेखनातून समजून घेणाचा प्रयत्न केलेला दिसून येतो. डॉ.एम एन श्रीनिवास यांनी रामपुरा खेड्याचा अभ्यास करून ग्रामीण भागातील होणारे सामाजिक परिवर्तन हे संस्कृतीकरण आधुनीकरण जातीचा प्रभाव या विविध संकल्पनेतून मांडण्यचा प्रयत्न केला. त्यांच्या अभ्यासातून ग्रामीण समाजातील जातीव्यवस्था व सामाजिक गतिशीलतेतील बदल स्पष्ट होत्तात. डॉ गोविंद सदाशिव घुर्ये विविध खेड्या चा अभ्यास करून जातीची वैशिष्ट्ये सांगितले आहे. या तून ग्रामीण समाजाचे स्वरूप लक्षात येते. डॅनियल थॉरनर आणि ए. आर. देसाई यांनी ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतीतील वर्गरचना आणि शेतकरी व त्यांच्या समस्या यांचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांच्या लेखनात औद्योगीकीरणामुळे व भांडवलशाहीच्या प्रभावामुळे ग्रामीण समाजात निर्माण होणाऱ्या आर्थिक विषमतेचा उल्लेख आठळतो. इरावती कर्वे आणि योगेंद्र सिंह यांनी ग्रामीण कुटुंब व्यवस्था, सामाजिक मुल्ये आणि परंपरा यातील बदलांचे विश्लेषण केले आहे. तसेच विविध संशोधन, शासकीय अहवाल जनगणना माहिती विविध नासिके वृतपत्रे या तून ग्रामीण समाजात झालेला बदल त्याची प्रक्रिया समजून येते. या बदलाच्या प्रक्रियेतून अनेक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक आव्हाने निर्माण होत असल्याचे स्पष्ट होते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:** १) ग्रामीण समाजाचे पारंपरिक व आधुनिक स्वरूपाचा अभ्यास करणे, २) ग्रामीण समाजातील झालेला बदलाचा अभ्यास करणे, 3) ग्रामीण समाजातील नवीन निर्माण होणाऱ्या आव्हानाचा अभ्यास करणे. 4) ग्रामीण विकासासाठी आव्याश्यक उपाययोजना व धोरणाचा अभ्यास करणे, 5) ग्रामीण समाजात निर्माण होणाऱ्या आव्हानांना उपाय सुचविणे.

**संशोधनाचे गृहीतकृत्य:** १) औद्योगीकीरणामुळे व शहरीकरणामुळे ग्रामीण समाजाच्या पारंपरिक रचनेत लक्षणीय बदल झाले आहेत. २) ग्रामीण समजात कितीही आव्हाने निर्माण झाले तरी ग्रामीण समाजचे महत्व आजही टिकून आहे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोध निबंधासाठी प्रामुख्याने द्वितीय साधनाच वापर केला असून ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप व आव्हाने या विशायचे संशोधन करताना विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके व इंटरनेट चा आढावा घेवून विविध संदर्भाचा वापर करून संशोधन अध्ययान पूर्ण केले आहे.

**तथ्यां चे विश्लेषण:**

**पारंपरिक ग्रामीण समाजाचे स्वरूप:** भारत हा खेड्यांचा देश असून आजही भारतातील ६३.१३% लोकसंख्या खेड्यात वास्तव करते त्यामुळे भारतीय जीवनाचे खेडे हे प्रमुख केंद्र बिंदू बनले आहेत. भारताचा आत्मा राहतो असे यथार्थ वर्णन म.गांधीजी केले होते. देशाचा विकास हा पूर्णतः खेड्याच्या विकासावर अवलंबून आहे ही वस्तूस्थिती नाकारता येत नाही. म्हणून खेड्याची वैशिष्ट्ये व व्याख्या पाहणे गरजेचे ठरते. "खेडणे म्हणजे जमीन कसणे व खेडूत म्हणजे जमीन कसणारा तेव्हा खेडूतांची जी वस्ती ते खेडे. ज्या मध्ये प्रधान धंदा शेती व ज्या मध्ये भरण्याची वस्ती शेतकऱ्यांची असते त्या गावाला लोक खेडे किंवा गावढे म्हणतात आणि त्या व्यतिरिक्त गावांना शहर म्हणतात". त्रि.ना.अत्रे "एका कुटुंबापेक्षा मोठा असा परस्परसंबंधी अथवा ससंबंधित अश्या व्यक्तींचा समूह ग्रामसमुदायात अंतर्भूत असतो. हा समुदाय एका मोठ्या घरात अथवा सर्व सामान्यपणे जवळजवळ राहतो. अगदी सुरवातीला समान असलेल्या अशा कृषियोग्य जमिनीची मशागत करतो व उपलब्ध कुरणाची विभागणी करून सभोतालच्या पडीक जमिनीवर गुरे चारतो. शेजारच्या समुदायांच्या सीमेपर्यंत पसरलेली कृषि योग्य जमीन, पडिक जमीन व कुरण यावर हा समुदाय आपला हक्क सांगतो." - श्री. हॅरॉल्ड पीक

वरील व्याख्यावरून आपल्याला पारंपरिक समाजाचे स्वरूप लक्षात येईल. पारंपरिक समाज हा कृषिप्रधान होता. भारतीय खेडी ही विखुरलेले आहेत म्हणजेच भारतीय खेडी हि बाह्य जगापासून अलिप्त असलेली दिसून येतात. थोडक्यात दोन खेड्यांमधील अंतर सुद्धा बरेच असायचे, वाहतुकीची सोय नव्हती म्हणून शक्यतो सहसा कोणी बाहेर गावी जात नसत. दुष्काळ रोगराई सण, उत्सव, यात्रा, लग्न यासारख्या कार्यक्रमासाठीच ते घराबाहेर, पर्यायाने खेड्याबाहेर पडत होती. परिणामी ही खेडे आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनली. त्यांच्या गरजा ते स्वतः भागवत असत. त्यामुळे त्यांचा राज्यकारभार करण्यासाठी त्यांनी स्वंतंत्र अशी यंत्रणा उभी केली त्याला पंचायत पद्धती असे म्हणतात. पैशाच्या व्यवहारापेक्षा वस्तू विनिमय पद्धती प्रचलित होती. अठरा आलुतेदार व बारा बलुतदार यांच्या सहाय्याने शेतीची कामे पूर्ण केली जात होती, पैसा हा क्वचितच आढळत होता. संयुक्त कुटुंब पद्धती ही ग्रामीण समुदायाचे प्रमुख लक्षण होते. चार ते पाच पिढ्याचे लोक एकत्र राहत होते. त्यामुळे शेतीला आवश्यक लागणारा मजूर वर्ग सहज उपलब्ध होत होता. शेतीचे विभागणी करण्याची गरज भासली नाही. ग्रामीण समाजात गतीशिलतेचा अभाव होता. कारण व्यक्तीचा सामाजिक दर्जा/स्तर हा जन्माने प्राप्त होत होता तो स्वकृतत्वाने बदलता येत नसे. तसेच जातीचा आणि धर्माचा पगडा ग्रामीण समुदायावर होताच.

**ग्रामीण समाजाचे बदलते म्हणजेच (आधुनिक) स्वरूप:** ब्रिटीशांच्या आगमनापासून ग्रामीण समाजात बरेच बदल होत गेले. आर्थिक व्यवहारात जवळजवळ मोडकळीस आली आहे. आज ग्रामीण समाजाच्या परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये प्रत्येक समुदाय वेगवेगळ्या व्यवसायात कामधंद्यात नौकरी आणि व्यवसायात आपली भूमिका पार पाडत आहेत. पारंपरिक बलुतेदारी व्यवस्था आज मोडत चालेली आहे. भारत स्वंतंत्र झाल्याने त्याची स्वतःची शासन पद्धती आहे त्यामुळे खेडेगावात सुद्धा निवडणुका होवू लागल्या. गावाचा कारभार हा लोकशाही पद्धतीने होवू लागला. कारखानदारी वाढ झाल्याने शेतीवर अवलंबून असणारा समाज आता शहराकडे धाव घेवू लागला. स्थलांतर करण्याचे प्रमाण वाढले. खेडी ओस पडू लागली. खेड्यातील लघुउद्योग बंद पडू लागले. संयुक्त कुटुंब पद्धतीची जागा आता केंद्र कुटुंब घेवू लागली. प्रेम आपुलकी सहकार्य ची भावना लोप पावत चालली आहे. आर्थिक दृष्टीकोनातून पाहता शेती हे मुख्य उपजीविकेचे साधन असले तरी त्यावरचे अवलंबित्व हळूहळू कमी होत चालले आहे. अल्पभूधारक शेतकरी, वाढता उत्पादन खर्च, अनिश्चित हवामान आणि बाजारातील अस्थिरता यामुळे शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळणे कठीण झाले. परिणामी ग्रामीण भागात मजुरी व्यवसाय व नौकरीसाठी शहराकडे स्थलांतर करत आहे. शिक्षणाचा प्रचार, स्त्री-पुरुष समानतेची जागरुकता आणि आधुनिक विचारसरणी मुळे सामाजिक संबधात बदल होत गेले. अनौपचारिक संबंधाची जागा औपचारिक संबंधाने घेतली तथापि, जातीय विषमता व सामाजिक भेदभाव थोडा फार कमी झालेला दिसून येतो. तांत्रिक व सांस्कृतिक बाबीमध्ये मोबाइल, इंटरनेट व डिजिटल सेवांचा वापर वाढला असून ग्रामीण जीवनशैलीत शहरी संस्कृतीचा प्रभाव जाणवतो.

थोडक्यात पारंपरिक ग्रामीण समाज स्थिर, परंपरानिष्ठ आणि सामुहिक होता. तर आधुनिक ग्रामीण समाज गतिमान, शिक्षणाभिमुख व बदल स्वीकारणारा आहे. पारंपरिक शेतीऐवजी यांत्रिकीकरण, नगदी पिकांना जास्त महत्व सेंद्रिय शेतीकडे झुकाव वाढत चालेला आहे. शहरांच्या वाढत्या संपर्कामुळे ग्रामीण समाजाच्या जीवनशैली त बदल होत आहे. राहणीमान वेशभूषा खानपान घरांची रचना सुद्धा बदलत चालली आहे. जातीय बंधने सैल होत असली तरी पूर्णतः नाहीशी झालेली नाहीत. या सर्व बदलांमुळे ग्रामीण समाजाला नवीन आव्हानंना तोंड द्यावे लागत आहे.

**ग्रामीण समाजापुढील आव्हाने:** ग्रामीण समाजात शेतीविषयक समस्या, पर्याबर्णीय समस्या, रोजगारच्या समस्या, सामाजिक संस्थेचे बदलले स्वरूप, दारिद्र्य, आरोग्याच्या समस्या, जातीय भेदभाव, रस्त्यांची दुरवस्था, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, स्वच्छ पाण्याची

कमतरता, डीजीटल निरक्षरता अश्या अनेक समस्या किंवा आव्हानंना तोड देत आहे. काळाच्या ओघात समाजव्यवस्था मुल्ये बदलली आणि त्यांना आज नवीन आव्हानांना तोड द्यावे लागत आहे ते खालील प्रमाणे,

१. वाढते शहरीकरण: शहरात असणाऱ्यां सुखसुविधा, नौकरी च्या शोधात अश्या अनेक कारणामुळे ग्रामीण समाजातून शहराकडे स्थलांतर होताना दिसत आहे. हे स्थलांतर ग्रामीण व शहरी समाजाला डोक्दुखी ठरत आहे. कारण शहरात लोकसंख्या वाढत आहे त्यामुळे तेथील पायाभूत सुविधेवर तान निर्माण होत आहे. या उलट गावे ओस पडत आहेत. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी खूप कमी असल्या कारणे तसेच शेतीतील येणारे उत्पन्न खूप कमी असल्यामुळे युवक वर्ग शहराकडे धाव घेत आहेत.

२. पर्यावरणाचा ऱ्हास: हवामान जागतिक तापमान वाढीमुळे, जंगल तोड, दुष्काळ व जमिनीची होणारी धूप या सारख्या कारणामुळे हवामान सारखे बदलत आहे. त्याचा परिणाम शेतीवर होत आहे. रासायनिक खताचा वापर वाढल्याने शेतजमीन नापीक होत आहे. रासायनिक खते वापरल्यामुळे मानवच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.

३. आर्थिक असमानता: संपती वाटपामुळे जमिनीचे तुकडे होत आहेत. त्यामुळे शेती करण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहेत. पर्यायी लोक शहराकडे वळत आहेत.

४. डिजिटल निरक्षरता: हे सर्वात मोठे आव्हान ग्रामीण समाजात आज पाहायला मिळत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सेवा ग्रामीण भागात कमतरता जाणवत आहे. तंत्रज्ञान असले तरी त्याचे परिपूर्ण ज्ञान नसल्यामुळे त्याचा वापर खूप कमी होत आहे.

५. सरकारी योजनंची अंमलबजावणी: सरकार शेतकऱ्यांच्या साठी अनेक कल्याणकारी योजना तयार आहेत पण त्याचा लाभ योग्य व्यक्तीला मिळत नाही. त्यासाठी योजनानाची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

६. सामाजिक संस्थेच्या रचनेत बदल: कोणताही समाजाचे आत्मा म्हणजे सामाजिक संस्था होय. आज ग्रामीण समाजातील कुटुंब, विवाह, जाती, अर्थ व राज्य अश्या सर्व संस्थांमध्ये अमुलाग्र बदल झालेले आहेत. त्यामुळे ग्रामीण समाजाला विविध आव्हानंना तोंड द्यावे लागत आहे.

**शिफारशी:** ग्रामीण उद्योगांचा विकास करणे, कुटिरोद्योग सहज कर्ज उपलब्ध करून देणे, बाजारपेठ व वाहतुकीच्या सुविधेत वाढ करणे, अन्नप्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. शाश्वत विकासाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. आधुनिक शेतीचा वापर करताना पर्यावरणाची हानी होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात व्यावसायिक शिक्षण व डिजिटल शिक्षण साक्षरता कार्यक्रम राबवणे खूप गरजेचे आहे. आरोग्यसेवा बळकट करणे ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे अद्यावत करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात युवकांना रोजगार निर्मिती करणे. महिला व युवकांचे सक्षमीकरण करणे. बचत गट स्वयं- सहायता गट व स्टार्टअप ना पाठबळ देणे. ग्रामीण भागातून शहराकडे होणारे स्थलांतर कमी करण्यसाठी प्रयत्न करणे. इंटरनेट, ई- सेवा प्रभावीपणे राबवणे

**निष्कर्ष:** भारत हा कृषिप्रधान देश असून देशातील ६३.१३ % लोक्संख्या ग्रामीण समाजात राहते. ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना असे आढळून आले आहे की, ग्रामीण समाज हा रीतीरिवाज, परंपरा, शेती व्यवस्था व नातेसंबंधावर आधारलेला आहे. मात्र आधुनिकतेमुळे ग्रामीण भागात व शेतीविषयक अनेक आव्हाने उभी राहत आहेत. पण या आव्हाना सोबत ग्रामीण भागात नवनवीन असे अनेक बदल घडून येत आहेत. म्हणजे ग्रामीण समाज आज संक्रमणाच्या टप्प्यातून जात आहे. पारंपरिक मुल्ये आणि आधुनिकतेचा प्रभाव यांचा संगम ग्रामीण जीवनात स्पष्ट दिसत आहे. शिक्षण, तंत्रज्ञान, वाहतूक व संपर्क साधनाच्या वाढीमुळे ग्रामीण समाज अधिक जागरूक आणि गतिमान झाला आहे. मात्र याचबरोबर बेरोजगारी, स्थलांतर, कृषि संकटे, सामाजिक विषमता आणि मुलभूत सुविधांचा अभाव ही गंभीर आव्हाने कायम आहेत. ग्रामीण विकासासाठी केवळ आर्थिक प्रगती पुरेशी नसून सामाजिक न्याय, पर्यावरण संतुलन आणि सर्वसमावेशक विकास आवश्यक आहे. सरकारी योजना, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संघटना आणि आणि गावातील लोकांचा सक्रीय सहभाग यांच्या माध्यमातून ग्रामीण समाजाचा शाश्वत विकास आणि समतोल विकास साध्य होवू शकतो. वरील नवीन आव्हानांना तोंड देवून ग्रामीण समाज स्वयंपूर्ण करू शकतो. सक्षम, आत्मनिर्भर आणि सुसंस्कृत ग्रामीण समाज हा देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा मजबूत पाया ठरू शकतो.

**संदर्भ सूची:**

१. डॉ. बापट गंगाधर (२०१०)– ग्रामीण समाजशास्त्र, पुणे भारत: श्री विद्या प्रकाशन.
२. Karve I.(1961).Hindu society:an interpretation. Pune, India: Deccan College.
३. कुलकर्णी र.के. (२०१२). भारतीय ग्रामीण समाज. मुंबई, भारत हिमालय प्रकाशन हाऊस.
४. योजना मासिक (२०२१), ग्रामीण विकासातील अडथळे.

# सोशल मिडिया आणि डिजिटल पेमेंट प्रणाली: वाढत्या सायबर गुन्ह्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. गोपाल एम. गांगर्डे** सहयोगी प्राध्यापक, विवेकानंद कला, स. द. वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** डिजिटल युगात सोशल मिडिया व डिजिटल पेमेंट प्रणालींनी मानवी जीवन अधिक सुलभ, गतिमान आणि कनेक्टेड केले आहे. मात्र या तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रसारासोबतच सायबर गुन्ह्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढलेले दिसून येते. फसवणूक, ओळख चोरी, आर्थिक अपहार, सायबर बुलिंग, फिशिंग, हॅकिंग तसेच बनावट प्रोफाइल्स यांसारखे गुन्हे सामाजिक सुरक्षिततेस गंभीर आव्हान निर्माण करीत आहेत. या संशोधनाचा उद्देश सोशल मिडिया व डिजिटल पेमेंट प्रणालींच्या वापरामुळे उद्भवणाऱ्या सायबर गुन्ह्यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे हा आहे. सामाजिक बदल, डिजिटल साक्षरतेचा अभाव, आर्थिक असमानता, तांत्रिक अवलंबित्व आणि नियंत्रण यंत्रणांची मर्यादा या घटकांचा सायबर गुन्ह्यांच्या वाढीशी असलेला संबंध या अभ्यासात विश्लेषित करण्यात आला आहे. दुय्यम माहिती, अहवाल, संशोधन लेख आणि सांख्यिकीय आकडेवारीच्या आधारे हे संशोधन करण्यात आले असून, सायबर गुन्ह्यांचे सामाजिक, आर्थिक व मानसिक परिणाम व प्रतिबंधात्मक उपायांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**की-वर्ड्स:** सोशल मिडिया, डिजिटल पेमेंट प्रणाली, सायबर गुन्हे, सायबर फसवणूक, डिजिटल साक्षरता, तंत्रज्ञान व समाज, ऑनलाइन सुरक्षितता.

**प्रस्तावना-** २१व्या शतकातील डिजिटल तंत्रज्ञानाने मानवी समाजाची रचना, कार्यप्रणाली आणि जीवनशैली यामध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणले आहेत. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे समाज अधिक जोडलेला, वेगवान आणि जागतिक स्वरूपाचा झाला आहे. सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्स - फेसबुक, व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम, यूट्यूब, एक्स (ट्विटर)-यांनी व्यक्तींच्या सामाजिक संवादाच्या पद्धती बदलून टाकल्या आहेत. त्याचप्रमाणे, डिजिटल पेमेंट प्रणाली - UPI, नेट बँकिंग, ई-वॉलेट्स, मोबाईल बँकिंग - यांनी आर्थिक व्यवहार सुलभ व कॅशलेस केले आहेत. मात्र, या तांत्रिक प्रगतीसोबतच तंत्रज्ञानाच्या दुरुपयोगातून सायबर गुन्हेगारी ही एक गंभीर सामाजिक समस्या उदयास आली आहे. संगणक, इंटरनेट व डिजिटल माध्यमांचा गैरवापर करून केले जाणारे सायबर गुन्हे केवळ तांत्रिक गुन्हेगारांपुरते मर्यादित न राहता सर्वसामान्य नागरिकांनाही बळी पाडत आहेत.[1] त्यामुळे सायबर गुन्हेगारी ही केवळ तांत्रिक समस्या न राहता एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान हे जागतिक बदलाचे प्रमुख साधन बनले असले, तरी त्याच्या दुरुपयोगामुळे निर्माण झालेली सायबर गुन्हेगारी सामाजिक सुरक्षिततेस मोठे आव्हान निर्माण करत आहे.[2] भारतात 'डिजिटल इंडिया' उपक्रमानंतर इंटरनेट, स्मार्टफोन, सोशल मिडिया आणि डिजिटल पेमेंट्सचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. या डिजिटल विस्तारामुळे संवाद व आर्थिक व्यवहार सुलभ झाले असले तरी सायबर स्पेसमधील जोखीमही अधिक वाढल्या आहेत. NCRB च्या आकडेवारीनुसार २०१९ ते २०२२ या कालावधीत सायबर गुन्ह्यांमध्ये सुमारे ४७ टक्के वाढ झाली आहे.[3] तसेच I4C नुसार २०२३ मध्ये १५.५६ लाख सायबर तक्रारी नोंदवण्यात आल्या असून, २०२४ च्या पहिल्या चार महिन्यांतच मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.[4] ही आकडेवारी भारतातील सायबर गुन्हेगारीची वाढती तीव्रता आणि गंभीर स्वरूप स्पष्टपणे अधोरेखित करते.

आज सायबर गुन्हेगारी केवळ आर्थिक फसवणुकीपुरती मर्यादित न राहता OTP व UPI फसवणूक, सोशल मिडिया स्कॅम्स, ऑनलाइन ब्लॅकमेलिंग व डेटा हॅकिंगसारख्या बहुआयामी स्वरूपात वाढत आहे. डिजिटल साक्षरतेचा अभाव, सायबर सुरक्षेबाबत अपुरी माहिती आणि जनजागृतीचा अभाव ही या समस्येची प्रमुख कारणे आहेत.[5] या पार्श्वभूमीवर, सोशल मिडिया आणि डिजिटल पेमेंट प्रणालीमुळे वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी प्रस्तूत शोध कार्य हाती घेतले असून सायबर गुन्ह्यांचे सामाजिक, आर्थिक व मानसिक परिणाम अभ्यासून त्यावर उपाय योजना सूचविणे हा सदर शोध निबंधाचा मुख्य हेतू आहे.

**उद्दिष्टे-** १. भारतातील सायबर गुन्ह्यांचे स्वरूप समजून घेणे. २. सोशल मिडिया व डिजिटल पेमेंट प्रणालींचा सायबर गुन्ह्यांशी असलेला संबंध अभ्यासणे. ३. सायबर गुन्ह्यांचे सामाजिक, आर्थिक व मानसिक परिणामांचे विश्लेषण करणे. ४. सायबर गुन्ह्यांच्या प्रतिबंधासाठी उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तूत शोध निबंध पूर्णतः द्वितीयक तथ्यांवर आधारित आहे. माहिती संकलनासाठी विविध मासिकांमध्ये प्रकाशित शोधनिबंध, संदर्भग्रंथ, अहवाल, शासकीय दस्तऐवज, शैक्षणिक संकेतस्थळे, ऑनलाइन माहिती व लेख यांचा वापर केलेला आहे. प्राप्त माहितीचे वर्णनात्मक पध्दतीने विश्लेषण प्रस्तूत केलेले आहे.

**भारतातील सायबर गुन्ह्यांची स्थिती:** २१व्या शतकात भारतात डिजिटल तंत्रज्ञानाचा झपाट्याने प्रसार झाल्यामुळे सायबर गुन्हेगारीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. इंटरनेटचा वाढता वापर, ऑनलाइन व्यवहार आणि माहितीच्या सहज उपलब्धतेमुळे फसवणूक, फिशिंग, हॅकिंग, डेटा चोरी, अश्लीलता प्रसार, सोशल मिडिया गुन्हे आणि सायबर दहशतवाद यासारखे विविध सायबर गुन्हे वाढलेले दिसून येतात.[6] भारतात ज्या राज्यात लोकसंख्या अधिक आहे अशा राज्यात सायबर गुन्ह्यांची संख्या अधिक दिसते.

भारतामध्ये २०१८ ते २०२२ या काळात सायबर गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली दिसून येते. NCRB च्या Crime in India अहवालानुसार २०१८ मधील २७,२४८ सायबर गुन्हे २०२२ मध्ये वाढून ६५,८९३ झाले असून, चार वर्षांत दुपटीहून अधिक वाढ

नोंदवली गेली आहे.[7] कोविड-१९ कालावधीत ऑनलाइन व्यवहार, सोशल मीडिया वापर आणि डिजिटल सेवांवरील अवलंबित्व वाढल्यामुळे ही वाढ अधिक तीव्र झाली.

राज्यनिहाय पाहता कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये सायबर गुन्ह्यांचे प्रमाण जास्त आढळते. आयटी क्षेत्राचा विस्तार, शहरीकरण आणि डिजिटल पेमेंटचा मोठ्या प्रमाणावर वापर ही यामागील प्रमुख कारणे आहेत. केंद्रशासित प्रदेशांमध्ये दिल्लीमध्ये तुलनेने अधिक सायबर गुन्हे नोंदवले गेलेले दिसतात. एकूणच डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे सायबर गुन्हे अधिक व्यापक व गुंतागुंतीचे बनत असून, सायबर कायदे, डिजिटल साक्षरता आणि सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज अधोरेखित होते.[8] थोडक्यात, भारतात सायबर गुन्ह्यांच्या नोंदीत सातत्याने वाढ होत असून विशेषतः डिजिटल आर्थिक फसवणूक, ऑनलाइन स्कॅम्स, सोशल मिडिया फ्रॉड्स यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. डिजिटल पेमेंटमुळे व्यवहार जलद झाले असले तरी सुरक्षा त्रुटी आणि वापरकर्त्यांचे अज्ञान यामुळे गुन्हेगारांना संधी मिळत आहे.

**सोशल मिडिया आणि सायबर गुन्हे:** सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्स हे सायबर गुन्ह्यांचे महत्त्वाचे माध्यम बनले आहेत. आज जवळपास 86% लोक दिवसातून एकदा सोशल मीडिया वापरतात. समाजमाध्यमे ही समाजात प्रभावी भूमिका बजावतात कारण ते लोकांना शिक्षित करतात, त्यांना नोकरीच्या संधी देतात, ते व्यवसाय वाढवतात, लोकांना राजकारणाबद्दल जाणून घेण्यास मदत करतात. समाज माध्यमांचे काही सकारात्मक परिणाम असले तरी त्याचे सायबर बुलिंग, गोपनीयतेचा धोका, हॅकिंग यासारखे काही नकारात्मक परिणामही आपणास दिसतात. आज बनावट प्रोफाइल्स तयार करून लोकांचा विश्वास संपादन करणे, फसव्या लिंक्स पाठविणे, बनावट जाहिरातीद्वारे आर्थिक फसवणूक करणे हे सर्वसामान्य झाले आहे.

**डिजिटल पेमेंट प्रणाली आणि आर्थिक फसवणूक-** डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे भारतात UPI, मोबाईल बँकिंग, ई-वॉलेट्स आणि ऑनलाइन व्यवहारांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) च्या नोंदीनुसार भारत हा डिजिटल पेमेंट प्रणालींमध्ये जगात सर्वाधिक पेमेंट करणारा देश म्हणून उदयास आला आहे. युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (UPI) प्रणालीद्वारे भारतात जून २०२५ मध्ये सुमारे १८.३९ अब्ज व्यवहारांद्वारे अंदाजे २४ लाख कोटी रुपयांची उलाढाल करण्यात आली. आजघडीला भारतातील एकूण डिजिटल पेमेंट्सपैकी सुमारे ८५ टक्के व्यवहार UPI द्वारे होत असून, जागतिक स्तरावरही जवळपास ५० टक्के जलद डिजिटल व्यवहारांमध्ये UPI चा वाटा आहे. दररोज सुमारे ६४० दशलक्षांहून अधिक व्यवहार हे UPI प्रणालीद्वारे होत असून ते व्हिसा (Visa) यासारख्या आंतरराष्ट्रीय पेमेंट नेटवर्कपेक्षाही आघाडीवर असल्याचे दिसते.[9]

डिजिटल पेमेंट प्रणालींमुळे आर्थिक व्यवहार जलद, सुलभ आणि कॅशलेस झाले असले, तरी त्याचबरोबर आर्थिक फसवणुकीचे धोकेही वाढले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोच्या Crime in India अहवालानुसार, सायबर गुन्ह्यांतील फसवणूक या प्रकारातील प्रकरणे २०१८ मध्ये ३, ३५३ इतकी होती, ती २०२२ मध्ये वाढून १७, ४७० इतकी झाली आहेत. त्याचप्रमाणे फसवणूक (चिटिंग) या प्रकारातील गुन्हे २०१८ मधील २, ०५१ वरून २०२२ मध्ये १०, ५०९ इतके वाढलेले आढळतात.[10] ही वाढ UPI, मोबाईल बँकिंग, ई-वॉलेट्स, ऑनलाइन शॉपिंग आणि इतर डिजिटल आर्थिक व्यवहारांच्या वाढत्या वापराशी थेट संबंधित आहे. QR कोड स्कॅम्स, फिशिंग कॉल्स, बनावट कस्टमर केअर कॉल्स यासारख्या गुन्ह्यांनी नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. डिजिटल व्यवहारात पारदर्शकता असूनही वापरकर्त्यांची डिजिटल साक्षरता कमी असल्यामुळे ते या सायबर गुन्ह्यांना बळी पडतात.

**सायबर गुन्ह्यांचे सामाजिक परिणाम** सायबर गुन्ह्यांचे परिणाम केवळ आर्थिक नसून ते बहुआयामी आणि दीर्घकालीन असतात. सायबर गुन्ह्यांचे सामाजिक व मानसिक परिणामही दिसतात. सायबर गुन्ह्यांमुळे व्यक्तीला प्रचंड आर्थिक नुकसान सहन करावे लागते. सायबर गुन्हेगारीमुळे समाजातील विश्वास कमी होतो. लोक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यास घाबरू लागतात, ज्यामुळे डिजिटल अर्थव्यवस्थेला धक्का बसतो. सामाजिक संबंधांवर परिणाम होतो आणि एकूणच समाजाची शांतता आणि सुरक्षितता भंग होते. त्याचबरोबर सायबर गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्ती हे ताणतणाव, चिंता, नैराश्य, भावनिक आघात, आत्मविश्वास कमी होणे आणि सामाजिक अलगत्व यासारख्या मानसिक त्रासांना सामोरे जातात.[11]

**प्रतिबंधात्मक उपाय व धोरणात्मक सूचना-** सोशल मिडिया आणि डिजिटल पेमेंट प्रणालींच्या वाढीसोबत सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याने यावर बहुआयामी प्रतिबंधात्मक धोरणांची गरज आहे.

१. डिजिटल साक्षरता मोहीम अधिक व्यापक करणे- ग्रामीण भाग, महिला, जेष्ठ नागरिक व विद्यार्थी यांना सुरक्षित इंटरनेट वापर, OTP/UPI फसवणूक, फिशिंग लिंक व बनावट कॉल्सपासून संरक्षण याबाबत सातत्यपूर्ण जनजागृती करणे गरजेचे आहे. सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्सवर कडक नियंत्रण- बनावट प्रोफाइल्स, फेक न्यूज, ऑनलाइन फसवणूक व ब्लॅकमेलिंगवर त्वरित कारवाईसाठी प्लॅटफॉर्म्सना अधिक जबाबदार बनवणे गरजेचे आहे.

२. डिजिटल पेमेंटसाठी बहुस्तरीय सुरक्षा- डिजिटल पेमेंटसाठी बहुस्तरीय सुरक्षा जसे की दोन-स्तरीय प्रमाणीकरण, बायोमेट्रिक सुरक्षा, व्यवहार मर्यादा आणि रिअल-टाइम अलर्ट्स—अनिवार्य करणे महत्त्वाचे ठरते.

३. सायबर कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी- सायबर कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करून दोषींना जलद शिक्षा देणे आणि बदलत्या तंत्रज्ञानानुसार कायद्यांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

४. पोलीस व प्रशासनाची तांत्रिक क्षमता वाढविणे- सायबर गुन्ह्यांच्या तात्काळ सोडवणूकीसाठी सायबर फॉरेन्सिक सुविधा, विशेष प्रशिक्षण व तज्ज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करून देणे अत्यावश्यक ठरते.

या सर्व उपायांच्या एकत्रित अंमलबजावणीमुळे सायबर गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल.

**सारांश:** डिजिटल तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या विस्तारामुळे समाजजीवनात मूलभूत बदल घडून आले आहेत. सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्स आणि डिजिटल पेमेंट प्रणालींनी दैनंदिन जीवन सुलभ केले असले, तरी त्याचबरोबर सायबर गुन्ह्यांचे प्रमाण

लक्षणीयरीत्या वाढले आहे. फसवणूक, ओळख चोरी, ऑनलाइन आर्थिक घोटाळे, सोशल इंजिनिअरिंग, बनावट प्रोफाइल्स यांसारख्या गुन्ह्यांनी सामान्य नागरिकांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षिततेला धोका निर्माण केला आहे. सायबर गुन्हे हे केवळ तांत्रिक समस्या नसून ती एक सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक समस्या म्हणून पुढे आली आहे. त्यामुळे या गुन्ह्यांवर मात करण्यासाठी तांत्रिक उपायांसोबतच समाजशास्त्रीय समज, डिजिटल साक्षरता आणि प्रभावी धोरणांची आवश्यकता आहे.

**संदर्भसूची:**


1. Osman, Goni. (2022). Cyber Crime and Its Classification. International Journal of Electronics Engineering and Applications, 10(1), 01–17.
2. Enebeli, J. (2024). Information and Communication Technology (Ict), Globalization and Impending Challenges. Global Journal of Pure and Applied Sciences, (30), 95-100.
3. NCRB. (2018-2022). Crime in India. National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs. https://ncrb.gov.in/en/crime-india
4. Indian Cybercrime Coordination Centre. (2023). About I4C. Ministry of Home Affairs, Government of India. Retrieved July 11, 2025, from https://i4c.mha.gov.in/
5. Mujrai, Prasanta. (2022). Nature, Scope of Cybercrime and Its Classification. In International chapter book on Cyber Crime and Cyber Laws in India (pp. 28-32). Redshine Publication
6. Tripathy, Sudhanshu Sekhar. (2024). A comprehensive survey of cybercrimes in India over the last decade. International Journal of Science and Research Archive. 13(01), 2360–2374, Retrieved July 3, 2025, from https://mail.ijsra.net/sites/default/files/IJSRA-2024-1919.pdf
7. NCRB. (2018-2022). Crime in India. National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs. https://ncrb.gov.in/en/crime-india
8. NCRB. (2018-2022). Crime in India. National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs. https://ncrb.gov.in/en/crime-india
9. Press Information Bureau. (2025, July 20). India's UPI revolution: Over 18 billion transactions every month, a global leader in fast payments. Government of India.
10. NCRB. (2018-2022). Crime in India. National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs. https://ncrb.gov.in/en/crime-india
11. Nixon, C. L. (2014). Current perspectives: The impact of cyberbullying on adolescent health. Adolescent Health, Medicine and Therapeutics, 5, 143–158


# ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप व आव्हाने

**प्रा. डॉ. व्ही. जी. चव्हाण** सहयोगी प्राध्यपक, समाजशास्त्र विभाग प्रमुख, आदर्श महाविदयालय, देसाईगंज जि. गडचिरोली

**सारांश:** अलीकडे ग्रामीण समाजाचे स्वरूप बदलत आहे. शेतीवर आधारित अर्थव्यवस्था आता उद्योगाकडे वळत आहे. शहरीकरण स्थलांतरण शिक्षण आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत आहे.ज्यामुळे सामाजिक संबंधात बदल होत आहे. लोकांमधील सामाजिक संबंध एका दृष्टिकोनात बदलत आहे. याचबरोबर बेरोजगारी, नैसर्गिक संसाधनांचास, हवामान बदल, आरोग्य आणि शिक्षणातील विषमता यासारख्या नवीन आव्हानाना ग्रामीण समोरे जात आहे.

**मुख्य शब्द** - ग्रामीण अर्थव्यवस्था, नागरीकरण, स्थलांतरण, शिक्षण, तंत्रज्ञानाचा प्रभाव

**प्रस्तावना:** ग्रामीण समाजातील विकास हा मानवाच्या प्रगतीतील अतिशय महत्त्वाचा टप्पा मानला जातो. ग्रामीण समाजातील विकासात प्राचीन काळापासून इतिहास लाभलेला आहे. काळजसजसा बदलत गेला तसतसा ग्रामीण समाजाचा विकासासोबत नवीन समस्या निर्माण झाल्या. भारत हा शेतीप्रधान देश असून २०११ च्या जनगणना नुसार भारतातील १.२१ कोटी लोकसंख्या पैकी जवळपास ६८% लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करून आपला उदरनिर्वाह करीत होते. ग्रामीण समाजाचा प्रत्यक्ष व प्रत्यक्ष व्यवसाय हा शेतीचा आहे, त्यामुळे भारताला खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो.

राष्ट्रीय कृषी आयोग २००६ च्या अंतिम अहवालानुसार, भारतात ग्रामीण समाजातील शेतकरी या शब्दांतर्गत भूमिहीन, कृषी मजूर, बटाईदार, कास्तकार, अत्यल्प, अल्प, मध्यम, व मोठे शेती करणारे, कुक्कट पालन, पशुपालन करणारे, शेतीवर आधारित व्यवसाय करणारे अशा वेगवेगळ्या शब्दांचे उपयोग करतात. भारतात कृषी व्यवसायावर अवलंबून असणाऱ् शेतकरी व शेती शेतमजुरांची संख्या ग्रामीण समाजात सर्वाधिक आहे. त्यामुळे असे म्हटले जाते की, फार पूर्वीपासून ग्रामीण समाज आणि शेतीने भारतीय अर्थव्यवस्थेला स्थिरित्व देण्याचेच कार्य केलेला आहे. भारतीय ग्रामीण समाजव्यवस्था व ग्रामीण अर्थव्यवस्था यांचा फार जवळचा संबंध आहे. अलीकडे ग्रामीण समाजाशी संबंधित समस्या दिवसेंदिवस वाढत असताना दिसून येतात. स्वातंत्र्यपूर्व काळात शेतकरी वर्गाला निरीक्षरता, दैववाद, नापिकी, साथीचे रोग, अंधश्रद्धा, वेठबिगारी, जातीभेद यासारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आजही दारिद्र्य, सावकारी प्रथा, उपासमासमारीगरिबी, शेतीमालाला हमीभाव न मिळणे, कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती, सिंचनाचा अभाव यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहेत. त्यामुळे ग्रामीण समाजातील लोकांची अवस्था फार दैनीय असल्याची दिसून येते. त्यामुळे आजही ग्रामीण समाजात आत्महत्येची प्रमाण वाढलेले आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १. ग्रामीण समाजाच्या बदलत्या स्वरूपाचे अध्ययन करणे. २. ग्रामीण समाजातील समस्यांचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती:** दुय्यम साधनांमध्ये संदर्भ पुस्तके, नियतकालिके, साप्ताहिके, इंटरनेट, विषयाशी संबंधित ग्रंथ वापरण्यात आले आहेत.

**ग्रामीण समाजाचे स्वरूप:**

**सामाजिक आंतरक्रिया:** ग्रामीण जीवनाशी संबंधित बाबींना अनुसरून आंतरक्रिया घडवून येत असतात. विविध सामाजिक संघटना आणि सामाजिक संबंधांचे अंतरसंबंध निर्माण झालेले असतात. हे सर्व संबंध कसे निर्माण होतात, हे सर्व आप्तसंबंधावर आधारित असतात. भौतिक पर्यावरण व ग्रामीण समाज जीवन निवळ निसर्गावर अवलंबून असते. या समाजाचा संबंध शेती व जंगलाशी संबंधित असल्याने निसर्ग ठेवेल, तसे त्यांना राहावे लागते. खेड्यातील लोक पारंपरिक पद्धतीने जीवन जगतात.

**सामाजिक संस्था:** ग्रामीण समाज नागरी समाजापेक्षा वेगळा नसला तरी त्यांच्यात फरक आहे. ग्रामीण समाजातील सण उत्सव, आचार विचार, राहणीमान, रूढी परंपरा, विवाह पद्धती इत्यादी मध्ये फरक दिसून येतो.

**सामाजिक संबंध:** ग्रामीण समाज अत्यंत साधा सरळ असून या समाजातील लोकांची जीवन निवळ शेती आणि शेतीशी संबंधित व्यवसायावर अवलंबून असते. खेड्याचा आकार लहान असल्यामुळे तेथील लोकांचे आपसातील संबंध अतिशय कनिष्ठ आणि जवळचे असतात.

**सामाजिक जीवन:** ग्रामीण समाजातील लोकांचे सामाजिक जीवन माणसाच्या माणुसकीवर आधारित असते. सहकार्याच्या भावनेने प्रेरित होऊन एक दुसऱ्यांना ते मदत करतात.

**सामाजिक बदल:** इतर समाजाप्रमाणे ग्रामीण समाज सुद्धा परिवर्तनशील आहे. परिवर्तनाची प्रक्रिया ही निरंतर सुरू असते, या परिवर्तनानुसार नवनवीन तंत्रज्ञान, आधुनिक बी बियाणे, रासायनिक खते, दळणवळणाच्या साधनात वाढ वर्तमानपत्रे, दूरदर्शन, भ्रमणध्वनी यासारख्या प्रसार माध्यमाच्या साधनांमुळे ग्रामीण समाजातील जीवनमान आज बदलत आहे.

**सामाजिक नियंत्रण:** ग्रामीण समाजात सामाजिक नियंत्रणाला विशेष महत्त्व असते वडीलधारी माणसे कुटुंब रूढी परंपरा नैतिक मूल्य आचार विचार या गोष्टींचा व्यक्तींच्या जीवनावर प्रत्यक्षपणे प्रभाव पडते.

**स्थलांतर:** जेव्हापासून औद्योगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली, आणि कारखान्यात कामगारांची आवश्यकता भासू लागली, तेव्हापासून ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतरणाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. सध्या स्थितीत स्थलांतरणाची प्रक्रिया सर्वांना भेडसावत आहे. ग्रामीण समाजात स्थलांतरणामुळे ग्रामीण समाज हा आस पडत आहे, आणि त्यामुळे स्थलांतरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

**शिक्षण:** ग्रामीण लोकांचे जीवन शेतीशी संबंधित असल्यामुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले होते.जर मानवी समाजाचा सर्वांगीण विकास साठी शिक्षण आवश्यक आहे. याची जाणीव ग्रामीण भागातील लोकांना होत असल्यामुळे आज या भागातील लोक शिक्षणाकडे मोठ्या प्रमाणात वळलेले दिसतात.

**मनोरंजन:** ग्रामीण ग्रामीण समाजाची जीवन जगण्याची एक पद्धत आहे. संस्कृती म्हणजे जीवन जगण्याची एक विशिष्ट पद्धत असते. याप्रमाणे भौगोलिक परिस्थिति किंवा सभोवतांचे वातावरण यांच्या संस्कृतीमध्ये सहभाग असतो. ग्रामीण भागात भजन, कीर्तन एकदुसयाशी विचारपूस करणे, ग्रामीण खेळ, पािरिवारिकता गोष्टी, जत्रा आठवडीबाजार यासारख्या मनोरंजनांच्या बाबी आजही आढळतात.

**सामाजिक समस्या:** सामाजिक समस्यांमुळे व्यक्तीमत्व विकासात अडचण निर्माण होत असते. ग्रामीण भागात दारिद्र्य, गरीबी, उपासमारी, रूढीप्रियता, शैक्षणिक मागासलेपणा यासारख्या बाबीमुळे ग्रामीण समाजात अनेक समस्या निर्माण झालेले आहेत.

ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप:

**शेतीमध्ये बदल:** आज ग्रामीण समाजात शेती व्यवसाय हा मुख्य व्यवसाय असून बदलत्या परिस्थितीनुसार पारंपरिक पीके घेण्याऐवजी नगदी पिकांकडे जास्त प्रमाण दिसून येते. कारण शेती उत्पादनाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे आधुनिक समाजातील कृषी व्यावसायिक नगदी पिके घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात वळत आहेत.

**रोजगार:** अलीकडे ग्रामीण भागात स्वयंरोजगाराच्या संधी कमी कमी होत आहे त्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारी ही प्रामुख्याने दिसून येते.ग्रामीण समाजातील बरेच बेरोजगार बांधकाम आणि इतर क्षेत्रात रोजगार मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. आज ग्रामीण भागातील बहुतांश महिला शहरांच्या ठिकाणी जाऊन पेट्रोल पंप किंवा इतर ठिकाणी कामे करतांना दिसून येतात.

**अर्थव्यवस्थेचे विविधकरण:** शेती व्यवसाय सोबत इतर व्यवसायाकडे लोकांचा जास्त कल वाढत आहे. शिक्षणाचा प्रसार आज ग्रामीण भागातच नव्हे तर तांड्या वस्ती वाड्यात अशा सर्व ठिकाणी शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात प्रसार व्हावा या उद्देशाने राज्य शासनाच्या वतीने व स्वयंसेवी संस्थेच्या वतीने शिक्षणाची गंगा घरी घरोघरी पोहोचविण्याची प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे इकडे शिक्षणाचे महत्त्व वाढलेले आहेत.त्यामुळे जातिव्यवस्थेची महत्त्व किंवा प्रभाव कमी होताना दिसतात.

प्रसार माध्यमांचा प्रभाव: वाढत्या प्रसार माध्यमामुळे ग्रामीण समाज आधुनिक जगाशी जोडला जात आहे.

**कौटुंबिक रचना:** पारंपरिक कौटुंबिक रचना व संबंधांमध्ये बदल होत आहे पूर्वी ग्रामीण भागात संयुक्त कुटुंबाचे प्रमाण अधिक होते परंतु अलीकडे संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन विभक्त कुटुंब पद्धती मोठ्या प्रमाणात दिसून येते.

सामाजिक गतिशीलता: प्रत्येक समाज हा गतिशील असतो. प्रत्येक समाजात गतिसीलतेची प्रक्रिया ही निरंतर सुरू असते. गतीसिल समाजामुळे सामाजिक स्तर दर्जा भूमिका यामध्ये बदल होत आहे.

लोकशाहीचा प्रभाव: भारतीय संविधान आणि लोकशाहीमुळे सर्व जाती धर्माच्या लोकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त झालेली आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्था:** ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामीण समाजातील कारभारात लोकांचा सहभाग वाढलेला दिसून येतो. ग्रामीण विकासाकरिता सहभागी होतात. पायाभूत सोयी सुविधा आणि शहरीकरण ग्रामीण समाजात रस्ता वीज पाणी आरोग्य केंद्र शिक्षण यासारख्या सोयी सुविधा पोहोचल्या जात आहे.

**शहरीकरणाचा प्रभाव:** आधुनिक समाजाच्या प्रभावामुळे शहराकडे होणारे स्थलांतरण आणि शहरांमधील लोकांचा ग्रामीण भागात वाढलेला प्रभाव यामुळे ग्रामीण समाजातील संस्कृतीवर मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे.

थोडक्यात ग्रामीण समाज अलीकडे केवळ शेतीवर अवलंबून न राहता शिक्षण तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणामुळे अधिक गतिमान वैशिष्ट्यपूर्ण आणि शहरीकरणाच्या प्रभावाखाली येत आहे.

**ग्रामीण समाजापुढील आव्हाने:** ग्रामीण समाजात रोजगारांच्या संधी कमी असल्याने आणि शेती व्यवसायावर जास्त प्रमाणात अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारांची समस्या निर्माण झालेली दिसून येते. आज भारत देशाला स्वातंत्र्य प्राप्त होऊन ७५ वर्षे पूर्ण झाले असले तरी अति दुर्गम भागातील खेड्यांमध्ये तांडा, वाडी वस्तीमध्ये स्वच्छ पाणी, वीज, चांगले आरोग्य केंद्र, शिक्षण आणि आधुनिक रस्ते यासारख्या सोयी सुविधांची कमतरता दिसून येते. कमी साक्षरतेचा दर सोयीसुविधीचा भाव आणि आरोग्य सेवा ची अपुरी उपलब्ध यामुळे ग्रामीण समाजाचा विकास खुंटत आहे. हवामानातील बदल सिंचनाचा भाव आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा भाव किंवा कमी वापर असल्यामुळे उत्पादकता कमी होत आहे. ग्रामीण समाजात जाती आधारित भेदभाव महिलांवरील अत्याचार, बालविवाह आणि समान संधीचा अभाव यासारख्या सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीवर जास्त अवलंबून असल्याने आर्थिक चढउताराच्या मोठा फटका शेतकरी वर्गाला बसतो तसेच ग्रामीण भागातील लोक शहराशी संपर्क कमी केले असल्याने विकासात अडथळा निर्माण होतो. ग्रामीण भागातील महिलांना शिक्षण आरोग्य आणि समान कामाच्या संधीमध्ये अनेक अडचणीच्या सामना करावा लागतो.

ग्रामीण समाजाला विकासाच्या प्रक्रियेत आणण्यासाठी पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे. पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे रस्ते वीज आणि पाणीपुरवठांमध्ये सुधारणा करणे. कौशल विकास ग्रामीण समाजातील तरुणांसाठी रोजगार अधिक प्रशिक्षण देणे. कृषी आधुनिकीकरण आधुनिक शेती पद्धतीचा मोठ्या प्रमाणात अवलंबन करणे. विविध आर्थिक स्त्रोतांना चालना देणे शेती व्यवसायासोबत इतर उद्योगांना प्रोत्साहन देणे. शिक्षण आणि आरोग्य सेवेचा विस्तार करणे ग्रामीण भागात शाळा, दवाखाने उघडणे, जमीन सुधारणा करणे व जल जलसिंचन प्रकल्पना गती देणे आवश्यक आहे.

**संदभ ग्रंथ:**

१. कऱ्हाडे बी. एम. ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, पिम्प्लापुरे प्रकाशन, नागपूर.
२. आगलावे प्रदीप सामाजिक संशोधन पधदती़शास्त्र व तंत्रे, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
३. काचोळे दा.धो. ग्रामीण समाजशास्त्र, केलास पब्लीकेशन, औरंगाबाद.
४. देसाई ए.आर. भारतीय ग्रामीण समाजशास्त्र, रावत पब्लीकेशन, जयपूर.
५. शर्मा ओमप्रकाश ग्रामीण समाजमेंनियोजीत सामाजिक परिवर्तन, रावत पब्लीकेशन, जयपूर.
६. बोधनकर सुधीर सामाजिक संशोधन पधदती़शास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
७. लोटे रा.ज. भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
८. घाटोळे रा. ना. ग्रामीण समाजशास्त्र व सामुदाईक विकास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
९. आगलावे प्रदीप ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
१०. कराळे गंगाधार ग्रामीण विकासचा एकात्मिक दृष्टीकोन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

# भारतीय समाजातील महिला गुन्हेगारीचे पारंपरिक आणि आधुनिक स्वरूप: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**मनिषा आनंद भाकरे** समाजशास्त्र विभाग, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** भारतीय समाजात महिलांची सामाजिक भूमिका पारंपरिकरीत्या कुटुंब केंद्रित, नैतिकता व संस्कृतीशी निगडित मानली गेली आहे. त्यामुळे गुन्हेगारी ही संकल्पना प्रामुख्याने पुरुषांशी संबंधित मानली जात होती. तथापि, सामाजिक परिवर्तन, शहरीकरण, औद्योगिकीकरण, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, तसेच माहिती व तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे महिलांच्या गुन्हेगारी स्वरूपात लक्षणीय बदल घडून आले आहेत. पारंपरिक महिला गुन्हेगारीमध्ये प्रामुख्याने कौटुंबिक स्वरूपाचे गुन्हे - जसे की बालहत्या, आत्महत्येस प्रवृत्त करणे, कौटुंबिक वादातून घडणारे हिंसाचार, तसेच सामाजिक दबावातून उद्भवलेले गुन्हे आढळतात. याउलट आधुनिक काळात महिलांचा सहभाग आर्थिक गुन्हे, सायबर गुन्हे, फसवणूक, मानवी तस्करी, ड्रग्स व्यवहार तसेच संघटित गुन्हेगारीतही वाढताना दिसून येतो. हा अभ्यास महिला गुन्हेगारीच्या पारंपरिक व आधुनिक स्वरूपाचे समाजशास्त्रीय विश्लेषण करतो. यामध्ये सामाजिक-आर्थिक घटक, कुटुंबसंस्था, पितृसत्ताक व्यवस्था, लिंगभेद, कायदेशीर रचना आणि बदलती सामाजिक मूल्ये या घटकांचा महिला गुन्हेगारीवर होणारा परिणाम अभ्यासण्यात आला आहे. तसेच राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभाग (NCRB) च्या आकडेवारीच्या आधारे महिला गुन्हेगारीतील बदलते प्रवाह समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**कीवर्ड्स:** महिला गुन्हेगारी, पारंपरिक गुन्हे, आधुनिक गुन्हेगारी, भारतीय समाज, लिंगभेद, पितृसत्ताक व्यवस्था, सामाजिक परिवर्तन, सायबर गुन्हे इत्यादी.

**प्रस्तावना:** भारतीय समाजात महिलांचे स्थान कालानुरूप बदलत आलेले आहे. परंपरागत पितृसत्ताक सामाजिक रचनेत महिलांचे स्थान मुख्यतः कुटुंबकेंद्रित असून रूढी-परंपरा, धार्मिक संकेत, कौटुंबिक मूल्ये व लैंगिक भेदभावामुळे त्यांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग मर्यादित राहिला. परिणामी महिलांचे सामाजिक व आर्थिक जीवन मोठ्या प्रमाणावर नियंत्रित होते.[1] मात्र स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा विस्तार, औद्योगिकीकरण, शहरीकरण, स्त्रीहक्कांविषयी जागरूकता, संविधानिक समान अधिकार आणि माध्यमांचा प्रभाव यामुळे महिलांच्या सामाजिक स्थानात लक्षणीय परिवर्तन झाले. आधुनिक भारतात महिलांचा शिक्षण, रोजगार, प्रशासन, राजकारण व सेवा क्षेत्रातील सहभाग वाढला असून त्यांच्या जीवनमान व आकांक्षांमध्ये बदल घडून आला आहे.

तथापि, या सकारात्मक बदलांसोबतच स्पर्धात्मक जीवनशैली, बेरोजगारी, आर्थिक असुरक्षितता, कुटुंबसंस्थेतील बदल, वैवाहिक तणाव, शहरी एकाकीपणा आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर यांसारख्या नव्या समस्या उद्‌भवल्या आहेत. परिणामी, पूर्वी मर्यादित व कुटुंबकेंद्रित असलेली महिला गुन्हेगारी आज आर्थिक गुन्हे, सायबर गुन्हेगारी, तस्करी, अमली पदार्थांचे व्यवहार व संघटित गुन्हेगारी अशा आधुनिक स्वरूपांत दिसून येत आहे.[2] या पार्श्वभूमीवर महिला गुन्हेगारीतील हे परिवर्तन, त्यामागील सामाजिक-आर्थिक व सांस्कृतिक घटक आणि त्याचे समाजावर होणारे परिणाम यांचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणूनच प्रस्तुत संशोधनात द्वितीयक माहितीच्या आधारे भारतीय समाजातील महिला गुन्हेगारीचे पारंपरिक व आधुनिक स्वरूप विश्लेषित करण्यात आले आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टये:** १) भारतीय समाजातील महिला गुन्हेगारीचे पारंपरिक स्वरूप अभ्यासणे. २) आधुनिक काळातील महिला गुन्हेगारीच्या बदलत्या स्वरूपांचे विश्लेषण करणे. ३) महिला गुन्हेगारीतील परिवर्तनास कारणीभूत सामाजिक व आर्थिक घटकांचा अभ्यास करणे. ४) पारंपरिक व आधुनिक महिला गुन्हेगारीतील स्वरूपात्मक फरक समजून घेणे. ५) महिला गुन्हेगारीचा समाजावर व महिलांच्या सामाजिक प्रतिमेवर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पध्दती:** प्रस्तूत संशोधन हे पूर्णत: दुय्यम तथ्यांवर आधारित आहे. महिला गुन्हेगारीचे पारंपरिक व आधुनिक स्वरूप स्पष्ट करण्यासाठी संशोधकाने विविध संदर्भग्रंथ, मासिकात प्रकाशित लेख व ऑनलाईन आकडेवारीचा तथ्यांचा स्त्रोत म्हणून उपयोग केला आहे. प्राप्त माहितीचे चिकित्सक विश्लेषण प्रस्तूत केले आहे.

**पारंपरिक महिला गुन्हेगारी**: पारंपरिक भारतीय समाजात महिलांचे जीवन मुख्यतः कुटुंब, घर आणि नातेसंबंधांच्या चौकटीत मर्यादित होते. त्यामुळे याकाळात महिलांकडून होणाऱ्या गुन्ह्यांचे स्वरूपही प्रामुख्याने घरगुती व कौटुंबिक पातळीवर केंद्रित होते. पारंपरिक काळातील महिला गुन्हेगारी बहुतेक वेळा गरज, सामाजिक दबाव, दारिद्रय, कौटुंबिक तणाव, मानसिक छळ आणि असुरक्षिततेतून उद्‌भवलेली होती. महिलांकडे स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नसल्याने व निर्णयप्रक्रियेत मर्यादित सहभाग असल्याने काही वेळा परिस्थितीजन्य स्वरूपात गुन्हे घडत. हे गुन्हे प्रामुख्याने असंघटित, अल्प प्रमाणात आणि वैयक्तिक पातळीवर घडणारे होते.[3]

पारंपरिक महिला गुन्हेगारीत चोरी, घरगुती मालमत्तेचा अपहार, लहान स्वरूपाची फसवणूक, कौटुंबिक वादातून होणारी हिंसा, शाब्दिक किंवा शारीरिक प्रतिकार, तसेच भावनिक दबावातून घडलेली कृत्ये यांचा समावेश होतो. अनेकदा हे गुन्हे सामाजिक प्रतिष्ठेच्या भीतीने किंवा कौटुंबिक सन्मान राखण्यासाठी नोंदवले जात नसत, त्यामुळे महिला गुन्हेगारीचे प्रमाण कमी असल्याचे भासत होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, पारंपरिक महिला गुन्हेगारी ही महिलांच्या स्वतंत्र गुन्हेप्रवृत्तीपेक्षा सामाजिक रचनेतून निर्माण झालेल्या मर्यादा, दडपण आणि असमानतेचा परिणाम होती. दारिद्रय, शिक्षणाचा अभाव, पितृसत्ताक नियंत्रण आणि सामाजिक असुरक्षितता या घटकांमुळे महिला गुन्हेगारीकडे वळल्या असे म्हणता येते.

**आधुनिक महिला गुन्हेगारी**: आधुनिक काळात भारतीय समाजातील आर्थिक, सामाजिक, तांत्रिक व सांस्कृतिक बदलांचा थेट परिणाम महिला गुन्हेगारीच्या स्वरूपावर झालेला दिसून येतो. शिक्षण, रोजगार, शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे महिलांचा सार्वजनिक व आर्थिक क्षेत्रातील सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र स्पर्धात्मक जीवनशैली, बेरोजगारी, आर्थिक दबाव, कुटुंबसंस्थेतील बदल, वैवाहिक तणाव आणि मानसिक अस्थैर्य यांमुळे काही महिलांचा गुन्हेगारीकडे कल वाढताना दिसतो. पूर्वी महिलांची गुन्हेगारी केवळ घरगुती किंवा किरकोळ स्वरूपाची असायची, मात्र आज महिला अमली पदार्थांची तस्करी, संघटित माफिया टोळ्या आणि सायबर गुन्ह्यांमध्ये सक्रिय आहेत.[4]

National Crime Records Bureau (NCRB) च्या अहवालानुसार २००१ मध्ये एकूण गुन्ह्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५.४% होते, जे २०११ मध्ये वाढून ६.२% झाले आहे. विशेषतः पती व नातेवाईकांकडून छळ या गुन्ह्यात महिलांचे प्रमाण २००१ मध्ये २३.७% तर २०११ मध्ये २२.९% इतके उच्च असल्याचे आढळते. तसेच हुंडा बळी या गुन्ह्यात महिलांचे प्रमाण २००१ मध्ये २१.९% असून २०११ मध्येही ते १९.४% इतके लक्षणीय आहे. याशिवाय फसवणूक, चोरी, दंगल आणि जखमी करणे यांसारख्या गुन्ह्यांमध्ये महिलांचे प्रमाण २००१ ते २०११ या कालावधीत वाढलेले दिसते. उदाहरणार्थ, फसवणूक प्रकरणांत महिलांचे प्रमाण ३.५% वरून ५.१% झाले आहे, तर चोरीमध्ये ते २.६% वरून ३.३% पर्यंत वाढले आहे.[5] ही आकडेवारी आधुनिक काळात महिलांचा सार्वजनिक, आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील सहभाग वाढल्याने गुन्हेगारीतील त्यांचा सहभागही हळूहळू वाढत असल्याचे सूचित करते. एकूणच, भारतीय समाजात महिला गुन्हेगारीचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी असले तरी त्यातील वाढती प्रवृत्ती सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण द्योतक मानता येते.

आर्थिक स्वावलंबनामुळे महिलांचा बँकिंग, कर्जव्यवहार, ऑनलाइन व्यवहार आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवरील सहभाग वाढला आहे. परिणामी विमा फसवणूक, ऑनलाइन गुंतवणूक ठगी, MLM घोटाळे, चेक बाऊन्स आणि इतर आर्थिक अपराधांमध्ये महिलांचा सहभाग वाढताना दिसतो.[6] डिजिटल क्रांतीनंतर सायबर गुन्हेगारी हे आधुनिक महिला गुन्हेगारीचे महत्त्वाचे स्वरूप ठरले आहे. फेक सोशल मीडिया प्रोफाइल, ऑनलाइन फसवणूक, ओटीपी फ्रॉड, डिजिटल ब्लॅकमेलिंग आणि क्रेडिट कार्ड घोटाळे यामध्ये महिलांचा सहभाग वाढलेला आढळतो. विशेषतः शहरी व अर्धशहरी भागात तांत्रिक कौशल्य असलेल्या महिलांकडून नियोजनबद्ध सायबर गुन्हे केल्याची प्रकरणे वाढत आहेत.[7] याशिवाय, अमली पदार्थांची तस्करी, मानव तस्करी आणि संघटित गुन्हेगारीमध्ये महिलांचा वापर वाहक, मध्यस्थ किंवा समन्वयक म्हणून केला जात असल्याचे आढळते. काही प्रकरणांमध्ये महिला नेतृत्वाची भूमिकाही बजावताना दिसतात, कारण त्यांच्यावर संशय तुलनेने कमी घेतला जातो. एकूणच, आधुनिक महिला गुन्हेगारी ही वैयक्तिक न राहता सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि तांत्रिक बदलांची परिणती म्हणून समोर येते. त्यामुळे तिचा अभ्यास केवळ कायदेशीर नव्हे, तर समाजशास्त्रीय आणि संरचनात्मक दृष्टिकोनातून करणे आवश्यक ठरते.

**महिला गुन्हेगारीची कारणे व परिणाम:** महिला गुन्हेगारी ही केवळ वैयक्तिक कारणांमुळे घडत नसून ती समाजरचनेतील असमानता, भेदभाव, संधींचा अभाव आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीशी निगडित आहे. भारतीय समाजातील पारंपरिक मूल्यव्यवस्था, आर्थिक विषमता, शैक्षणिक संधीतील तफावत आणि तांत्रिक परिवर्तन या सर्व घटकांचा महिला गुन्हेगारीवर थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम होताना दिसून येतो.

**१. सामाजिक असमानता व लैंगिक भेदभाव:** भारतीय समाजाची सामाजिक रचना प्रामुख्याने पुरुषप्रधान स्वरूपाची आहे. या व्यवस्थेमध्ये महिलांना सामाजिक, आर्थिक आणि निर्णयप्रक्रियेत दुय्यम स्थान दिले जाते. स्त्री-पुरुषांमधील असमानता, लैंगिक भेदभाव, परंपरागत भूमिका आणि सामाजिक नियंत्रण यामुळे महिलांच्या जीवनातील संधी मर्यादित राहतात. विशेषतः वंचित व दुर्बल घटकांतील महिलांना आर्थिक अस्थिरता, अल्प उत्पन्न, बेरोजगारी, असुरक्षित रोजगार, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक दबावांचा सामना करावा लागतो. पतीचे व्यसनाधीन असणे, कुटुंबातील हिंसा, घटस्फोट, एकल मातृत्व किंवा पतीचा मृत्यू यासारख्या कारणांमुळे महिला उपजीविकेसाठी चोरी, फसवणूक, बेकायदेशीर व्यवहार किंवा तस्करीसारख्या गुन्ह्यांकडे वळतात.

**२. शिक्षण व रोजगाराचा अभाव:** शिक्षण हा सामाजिक बदलाचा महत्त्वाचा घटक असला तरी भारतीय समाजात महिलांच्या शिक्षणात आजही सामाजिक विषमता आढळते. ग्रामीण भागातील, आदिवासी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अनेक महिलांना दर्जेदार शिक्षण व कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होत नाहीत. शिक्षणाच्या अभावामुळे रोजगाराच्या संधी मर्यादित राहतात आणि महिलांना असंघटित, अस्थिर व कमी उत्पन्नाच्या कामावर अवलंबून राहावे लागते. अशा परिस्थितीत आर्थिक गरजा भागवण्यासाठी काही महिला परंपरागत स्वरूपातील गुन्हेगारी, जसे की लहान चोरी, घरगुती फसवणूक किंवा बेकायदेशीर श्रम याकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**३. डिजिटल माध्यमांचा प्रभाव:** माहिती व तंत्रज्ञान क्रांतीनंतर भारतीय समाजात स्मार्टफोन, इंटरनेट, सोशल मीडिया आणि ऑनलाइन व्यवहार यांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला आहे. या तंत्रज्ञानामुळे महिलांना माहिती, संवाद, रोजगार आणि व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत; मात्र त्याचबरोबर सायबर गुन्हेगारीच्या संधी व जोखमीही वाढल्या आहेत. आज महिलांचा सहभाग सायबर फसवणूक, ऑनलाइन ठगी, बनावट प्रोफाइल तयार करणे, आर्थिक स्कॅम, डिजिटल ब्लॅकमेलिंग अशा गुन्ह्यांमध्ये वाढताना दिसतो. अनेक वेळा आर्थिक अडचणी, डिजिटल साक्षरतेचा अभाव, गुन्हेगारी नेटवर्कचा प्रभाव किंवा सहज पैसे कमावण्याचा मोह महिलांना अशा गुन्ह्यांकडे आकर्षित करतो.[४] सामाजिक असमानता, शिक्षण-रोजगारातील तफावत आणि डिजिटल तंत्रज्ञानातील बदल हे महिला गुन्हेगारीचे स्वतंत्र घटक नसून ते परस्परांशी जोडलेले आहेत. त्यामुळे महिला गुन्हेगारी समजून घेताना व्यक्तीऐवजी सामाजिक रचना, संधी व दबावांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**महिला गुन्हेगारीचे सामाजिक परिणाम:** महिला गुन्हेगारीचा परिणाम केवळ संबंधित व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचे कुटुंब, समाज, सामाजिक संस्था आणि व्यापक सामाजिक मूल्यव्यवस्थेवर खोलवर परिणाम दिसून येतात. भारतीय समाज हा मूलतः कुटुंबकेंद्रित व मूल्याधिष्ठित असल्यामुळे महिला गुन्हेगारीचे परिणाम अधिक तीव्र स्वरूपात जाणवतात.

**१. कौटुंबिक व सामाजिक प्रतिष्ठेचे नुकसान:** भारतीय समाजात महिलेला कुटुंबाच्या प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे एखादी महिला गुन्हेगारी प्रकरणात अडकली, दोषी ठरली किंवा केवळ संशयित म्हणून ओळखली गेली तरी तिच्या संपूर्ण कुटुंबावर त्याचा सामाजिक परिणाम होतो. कुटुंबाची सामाजिक प्रतिमा, सन्मान व विश्वासार्हता कमी होते. नातेवाईक, शेजारी व समाजाकडून टीका, बहिष्कार किंवा दुर्लक्षाचा सामना करावा लागतो. काही वेळा विवाहसंबंध तुटणे, सामाजिक कार्यक्रमांतून दूर ठेवणे किंवा मुलांच्या शिक्षणावरही नकारात्मक परिणाम होतो. विशेषतः ग्रामीण व अर्धशहरी भागात ही सामाजिक निंदा अधिक तीव्र स्वरूपाची असते.

**२. महिलांच्या पुढील शिक्षण व रोजगाराच्या संधींवर परिणाम** महिला गुन्हेगारीचा थेट परिणाम तिच्या भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक संधींवर होतो. गुन्हेगारी प्रकरणात नाव आल्यामुळे शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश, शिष्यवृत्ती, किंवा उच्च शिक्षणाच्या संधी मर्यादित होतात. रोजगाराच्या क्षेत्रातही महिला गुन्हेगारांविषयी अविश्वास, नकारात्मक सामाजिक धारणा व कायदेशीर अडथळे निर्माण होतात. विशेषतः खाजगी क्षेत्रात चारित्र्य प्रमाणपत्र, पोलिस पडताळणी यामुळे रोजगार मिळवणे कठीण होते. परिणामी अनेक महिला पुन्हा समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाजूला पडतात, ज्यामुळे त्यांची सामाजिक पुनर्वसन प्रक्रिया अधिक कठीण बनते.

**३. आर्थिक व मानसिक आरोग्य समस्या:** महिला गुन्हेगारीमुळे संबंधित महिला तसेच तिच्या कुटुंबावर आर्थिक आणि मानसिक ताणतणाव निर्माण होतो. कायदेशीर प्रक्रिया, वकील खर्च, न्यायालयीन खटले, तुरुंगवास किंवा दंड यामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती ढासळते. अनेक वेळा महिलाच कुटुंबाची कमावती व्यक्ती असल्यास कुटुंब उपजीविकेच्या संकटात सापडते. मानसिक पातळीवर सामाजिक निंदा, अपराधभावना, नैराश्य, तणाव, आत्मगौरवाचा ऱ्हास आणि कधी कधी आत्महत्येचे विचारही उद्भवतात. कुटुंबातील मुले व वृद्ध सदस्यांवरही मानसिक दडपण येते, ज्याचा दीर्घकालीन परिणाम त्यांच्या सामाजिक व मानसिक विकासावर होऊ शकतो.

**४. समाजातील लैंगिक समता व विश्वासावर नकारात्मक प्रभाव:** महिला गुन्हेगारी वाढल्यास समाजात स्त्रीविषयी असलेल्या विश्वास, सुरक्षिततेची भावना आणि लैंगिक समतेच्या संकल्पनेवर नकारात्मक परिणाम होतो. काही वेळा समाज महिला गुन्हेगारीला कारण ठरवत महिलांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्याचा दृष्टिकोन स्वीकारतो. यामुळे स्त्रीस्वातंत्र्य, समान संधी व स्त्री-सबलीकरणाच्या प्रक्रियेला अडथळा निर्माण होतो. तसेच समाजात महिलांविषयी संशयाची भावना वाढते, ज्याचा परिणाम कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक क्षेत्रात व सामाजिक व्यवहारांमध्ये दिसून येतो. परिणामी, लैंगिक समतेऐवजी पुन्हा पारंपरिक व पुरुषप्रधान विचारसरणी बळकट होण्याची शक्यता निर्माण होते.

**निष्कर्ष:** भारतीय समाजातील महिला गुन्हेगारी ही स्थिर स्वरूपाची नसून सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनानुसार तिचे स्वरूप बदलत गेले आहे. प्रस्तूत संशोधनाचे निष्कर्ष: पारंपरिक काळात महिला गुन्हेगारी प्रामुख्याने घरगुती, कौटुंबिक व परिस्थितीजन्य स्वरूपाची होती आणि ती दारिद्र्य, अवलंबित्व व सामाजिक दडपणातून उद्भवत होती. आधुनिक काळात शिक्षण, रोजगार, शहरीकरण व डिजिटल तंत्रज्ञानामुळे महिलांचा सार्वजनिक व आर्थिक क्षेत्रातील सहभाग वाढल्याने महिला गुन्हेगारीचे स्वरूप अधिक व्यापक, संघटित व तांत्रिक झाले आहे. NCRB च्या आकडेवारीनुसार एकूण गुन्ह्यांमध्ये महिलांचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी त्यामध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे स्पष्ट होते. आर्थिक गुन्हे, सायबर गुन्हेगारी, फसवणूक व संघटित गुन्हेगारीत महिलांचा सहभाग आधुनिक महिला गुन्हेगारीचे प्रमुख वैशिष्ट्य ठरत आहे. महिला गुन्हेगारीमागे केवळ वैयक्तिक कारणे नसून सामाजिक असमानता, लैंगिक भेदभाव, शिक्षण-रोजगारातील तफावत व मानसिक तणाव हे संरचनात्मक घटक महत्त्वाचे आहेत. महिला गुन्हेगारीचा परिणाम केवळ संबंधित महिलांवरच नव्हे तर कुटुंब, सामाजिक प्रतिष्ठा, लैंगिक समता व समाजातील विश्वासव्यवस्थेवरही नकारात्मक स्वरूपात होतो.

**सूचना:** महिलांच्या दर्जेदार शिक्षणावर व कौशल्यविकासावर विशेष भर देऊन त्यांना स्थिर व सन्मानजनक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. आर्थिक दुर्बल, एकल महिला, घटस्फोटित व विधवा महिलांसाठी विशेष रोजगार योजना व सामाजिक सुरक्षा योजना प्रभावीपणे राबवाव्यात. डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी महिलांसाठी सायबर जागरूकता कार्यक्रम व प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित कराव्यात. महिला गुन्हेगारी प्रतिबंधासाठी कुटुंब व समाजस्तरावर समुपदेशन, मानसिक आरोग्य सेवा व सामाजिक समर्थन व्यवस्था बळकट करावी. महिला गुन्हेगारांसाठी सुधारगृहांमध्ये पुनर्वसन, कौशल्य प्रशिक्षण व मानसोपचार सुविधा वाढवाव्यात. माध्यमे व शैक्षणिक संस्था यांच्या माध्यमातून लैंगिक समानता, कायदेशीर जागरूकता व नैतिक मूल्यांचे संवर्धन करावे. महिला गुन्हेगारीविषयक अधिक सूक्ष्म, क्षेत्रनिहाय व गुणात्मक संशोधनाला प्रोत्साहन द्यावे. कायदा अंमलबजावणी यंत्रणांनी महिला गुन्हेगारीकडे संवेदनशील व समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहावे. एकंदरीत महिला गुन्हेगारीचे सामाजिक परिणाम हे बहुआयामी, दीर्घकालीन आणि संपूर्ण सामाजिक रचनेवर प्रभाव टाकणारे आहेत. त्यामुळे महिला गुन्हेगारीकडे केवळ कायदेशीर समस्येच्या रूपात न पाहता ती एक सामाजिक समस्या म्हणून समजून घेणे आणि तिच्या प्रतिबंधासाठी शिक्षण, सामाजिक जागृती, मानसिक आरोग्य सहाय्य आणि पुनर्वसन धोरणांची आवश्यकता आहे.

**सारांश:** पारंपरिक काळात पितृसत्ताक सामाजिक रचनेमुळे महिलांचे जीवन कुटुंबकेंद्रित होते. दारिद्र्य, अवलंबित्व, सामाजिक दडपण व कौटुंबिक तणावातून उद्भवलेली घरगुती व परिस्थितीजन्य गुन्हेगारीत ती सहभागी असलेली दिसून येते. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण, शहरीकरण, औद्योगिकीकरण, स्त्रीहक्क चळवळ आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे महिलांचा सार्वजनिक व आर्थिक क्षेत्रातील सहभाग वाढल्याने महिला गुन्हेगारीचे स्वरूप अधिक व्यापक, संघटित व तांत्रिक झाले आहे. एकूण गुन्ह्यांमध्ये महिलांचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी त्यात हळूहळू वाढ होत असल्याचे स्पष्ट होते. आर्थिक फसवणूक, सायबर गुन्हेगारी, तस्करी व संघटित गुन्हे हे आधुनिक महिला गुन्हेगारीचे प्रमुख प्रकार ठरत असून त्यामागे सामाजिक असमानता, लैंगिक भेदभाव, शिक्षण-रोजगारातील तफावत, आर्थिक असुरक्षितता व मानसिक तणाव हे संरचनात्मक घटक कार्यरत आहेत. महिला गुन्हेगारीचे परिणाम केवळ संबंधित महिलांपुरते मर्यादित न राहता कुटुंब, सामाजिक प्रतिष्ठा, लैंगिक समता यावरही नकारात्मक प्रभाव टाकतात. त्यामुळे महिला गुन्हेगारीकडे केवळ कायदेशीर प्रश्न म्हणून न पाहता ती एक व्यापक सामाजिक समस्या मानून तिच्या प्रतिबंधासाठी शिक्षण, सामाजिक जागृती, डिजिटल साक्षरता, मानसिक आरोग्य सहाय्य व पुनर्वसनात्मक धोरणांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ सूची:**


1. मुकर्जी, रवीन्द्र नाथ. (२०१०). भारतीय समाज व संस्कृति. दिल्ली: विवेक प्रकाशन, पृ. क्र.३०७
2. Mili, P. M. K., & Cherian, Neethu. Susan. (2015). Female criminality in India: Prevalence, causes and preventive measures. International Journal of Criminal Justice Sciences, Vol.10, Issue-1, Pg. 65.
3. माने, माणिक. (१९९९). गुन्हेगारीशास्त्र. कोल्हापूर: फडके प्रकाशन, पृ. क्र. १५२
4. Guerreiro, A., Gomes, S., & Sousa, P. (2022). Feminist Criminology and Women in Organized Crime: A Theoretical Exercise. ex æquo, Pg. No. 52
5. Mili, P. M. K., & Cherian, Neethu. Susan. (2015). Female criminality in India: Prevalence, causes and preventive measures. International Journal of Criminal Justice Sciences, Vol.10, Issue-1, Pg. 66.
6. Daly, Kathleen., & Chesney-Lind, Meda. (1988). Feminism and criminology. Justice Quarterly, Issue-5, Vol.4, 497—538. Kaushik, Rahul Dev. (2013). Cyber Crime in India: A Critical Study in Modern Perspective. Meerut: Doctoral dissertation, Chaudhary Charan Singh University. Pg. No. 13
7. Deshmukh, Rahul. (2024). Cyber Security Concerns for Women in the Digital Era. Conference: ITIHAS DARPAN Volume: special issue oct 2

# सायबर गुन्हेगारी ग्रामीण भागात वाढता प्रसार

**डॉ. राजू बुरीले** समाजशास्त्र विभागप्रमुख, अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर

**गोषवारा:** ग्रामीण भागातील सायबर गुन्हेगारीचे स्वरूप मुख्यत्वे जागरूकतेचा अभाव, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि सहज उपलब्ध असलेल्या ऑनलाइन साधनांचा गैरवापर यामुळे तयार होते, ज्यात फिशिंग, ऑनलाइन फसवणूक सोशल मीडियाद्वारे बदनामी आणि डेटा चोरी यांसारख्या गुन्ह्यांचा समावेश होतो, जिथे गुन्हेगार अनेकदा सोपे लक्ष्य शोधतात आणि पीडितांना सायबर सुरक्षेची मूलभूत माहिती नसते. सायबर गुन्हेगारी ही माहिती तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीमुळे उद्भवलेली एक गंभीर समस्या आहे. हॅकिंग, डेटा चोरी, ऑनलाइन फसवणूक, सायबर टेररिझम आणि रॅन्समवेअर हल्ले यांसारखे गुन्हे जागतिक स्तरावर वाढत आहेत. या संशोधनात सायबर गुन्ह्यांचे प्रकार, त्यांच्या प्रतिबंधासाठी उपलब्ध कायदे व धोरणे तसेच प्रभावी उपाययोजनांचा आढावा घेतला आहे. भारतामध्ये माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० आणि राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण (२०१३) यांसारखी धोरणे अस्तित्वात असली तरी त्यांची अंमलबजावणी अजूनही प्रभावी नाही. सायबर गुन्हेगारी प्रतिबंधासाठी तांत्रिक उपाय, कठोर कायदे, जनजागृती आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य महत्त्वाचे आहेत. सायबर सुरक्षा शिक्षण आणि डिजिटल साक्षरतेच्या प्रसारावर भर देणे आवश्यक आहे. प्रभावी सायबर सुरक्षा धोरणे केवळ तांत्रिक उपायांपुरती मर्यादित न राहता, कायदेशीर सुधारणा आणि समाजातील जागरूकता वाढविण्यावर भर देण्याची गरज आहे.

**बीज शब्द:** सायबर गुन्हेगारी, सायबर गुन्हेगारीचे स्वरूप, प्रकार, वैशिष्ठ्ये, शासकीय धोरणे, कायदे, सायबर सुरक्षा गरज, महत्व, सुरक्षेविषयी आव्हाने

**प्रस्तावना:** सायबर गुन्हेगारी नवनवीन तंत्रज्ञानामुळे सायबर गुन्हेगारी वाढत आहे. सायबर गुन्हेगारी म्हणजे संगणक, इंटरनेट किंवा डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून केले जाणारे बेकायदेशीर कृत्य. यामध्ये डेटा चोरी, आर्थिक फसवणूक, हॅकिंग फिशिंग, सायबर स्टॉकिंग, रॅन्समवेअर हल्ले, आणि सायबर टेररिझम यांचा समावेश होतो. सायबर गुन्हे हे वैयक्तिक, व्यावसायिक तसेच शासकीय पातळीवर मोठ्या प्रमाणावर होत आहेत. इलेक्ट्रॉनिक यंत्र, इंटरनेट टेक्नॉलॉजीचा वापर करून व व्यतिगत माहितीला कुणी अडथळा आणत असेल व स्वतःचा आर्थिक फायदा करून घेत असेल, यामुळे व्यक्ती व समाजाचा शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसान होत असेल तर तो सायबर गुन्हा होय. आतापर्यंत शहरी भागातील मध्यम आणि उच्च मध्यम वर्गापर्यंत मर्यादित असणाऱ्या सायबर गुनहेगारांनी आपले हातपाय आता ग्रामीण भागातही पसरले असून ऑनलाइन फसवणुकीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. या माध्यमातून सायबर गुन्हेगारांनी या वर्षात जानेवारीपासून आतापर्यंत तब्बल ९४ लाखांपेक्षा अधिक रुपयांची आर्थिक लूट केली आहे. ऑनलाइन बँकिंग, डेबिट, क्रेडिट कार्ड फसवणूक आणि अन्य माध्यमांतूनही गुन्हेगारांनी सामान्यांच्या पैशांवर डल्ला मारला आहे. एकूण रकमेपैकी १५ लाख २८ हजार रुपये ठाणे ग्रामीण पोलिसांच्या सायबर विभागाने नागरिकांना परत मिळवून दिले आहेत. मागील वर्षभरात ठाणे ग्रामीणमध्ये सायबर गुन्ह्यांच्या तक्रारींची संख्या तुलनेने कमी होती. यंदाच्या वर्षात पहिल्या सात महिन्यांतच हा आकडा गेल्या वर्षीच्या एकूण सायबर गुन्ह्यांच्या जवळ पोहोचला आहे. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाला रोखण्यासाठी लॉकडाउन जाहीर होताच सायबर गुन्हेगार मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. लॉकडाउनमुळे अनेकांनी घरातच बसून काम करण्यास प्राधान्य दिले. आजही अनेकजण वर्क फ्रॉम होम करत असून त्यामुळे ऑनलाइन व्यवहार करण्याकडे कल वाढला आहे. याच काळात जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये सायबर गुन्हेगारीचा आलेख वाढू लागला. कॅशबॅकच्या नावाखाली गुन्हेगार जेष्ठ नागरिक, महिला यांना लक्ष्य करत असून गुन्हेगारांच्या जाळ्यात तरुणवर्गही अडकत आहे. सैन्य दलात तसेच सीआयएसएफ जवान असल्याचा खोटा बनाव करत गुन्हेगार गाड्या विकण्याच्या नावाखाली जनतेकडून पैसे उकळत आहेत. केवायसी अपडेटचेही कारण पुढे करत नागरिकांच्या बँक खात्यातील रकमेवर डल्ला मारला जात आहे. ऑनलाइन बँकिंग, क्रेडिट, डेबिट कार्डद्वारे होणाऱ्या फसवणुकीचा आकडा सर्वाधिक असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे

अशाप्रकारे ठाणे ग्रामीणमध्ये चालू वर्षात जानेवारीपासून ते आतापर्यंत सायबर गुन्हेगारांनी ९४ लाख ७१ हजार ४०८ रुपयांची आर्थिक लूट केल्याची माहिती पुढे आली आहे. या रकमेपैकी १५ लाख २८ हजार ७५४ रुपये तक्रारदारांना परत मिळवून देण्यास सायबर विभागाला यश आले आहे. हीच परिस्थिति महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात दिसून येते.

**माहिती संकलन व संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम स्त्रोतांवर आधारित असून प्रकाशित पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे व वेबसाईटचा इ. स्त्रोतांच्या आधारे तथ्य संकलन केलेले आहे. यात वर्णनात्मक आराखड्याचा अवलंब केलेला असून सायबर गुन्हेगारी, सुरक्षा व समस्या याविषयी पुस्तके, संकेतस्थळे, समाजमाध्यमे, दूरसंचार साधने अशा विविध साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे उद्देश:** १) सायबर गुन्हेगारीचे स्वरूप समजून घेणे. २) सायबर गुन्हेगारीचे वैशिष्ठ्ये व प्रकार समजून घेणे. ३) सायबर सुरक्षेची गरज व महत्त्व लक्षात घेणे. ४) सायबर सुरक्षेचे कायदे आणि धोरणे याची चर्चा करणे. ५) सायबर गुन्हेगारीचवरील उपाययोजना सुचविणे.

**ग्रामीण भागातील सायबर गुन्हेगारीची प्रमुख वैशिष्ट्ये:** अनेक ग्रामीण रहिवासी सायबर गुन्ह्यांची संभाव्यता आणि ऑनलाइन सुरक्षेच्या मूलभूत तत्त्वांबाबत अनभिज्ञ असतात, ज्यामुळे ते सहज फसतात. स्मार्टफोन आणि इंटरनेटचा वापर वाढल्याने ऑनलाइन

फसवणुकीच्या संधी वाढल्या आहेत, पण त्यासोबत येणाऱ्या धोक्यांची जाणीव कमी आहे. ईमेल, मेसेज किंवा फोनद्वारे बनावट लिंक पाठवून किंवा लोभ दाखवून (उदा. लॉटरी, कर्ज) बँक खात्यांची माहिती चोरणे किंवा थेट पैसे उकळणे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बदनामी करणे, ब्लॅकमेल करणे किंवा खोट्या बातम्या पसरवणे, विशेषतः महिला आणि मुलांना लक्ष्य करणे. महत्त्वाच्या माहितीची चोरी करणे आणि त्याचा गैरवापर करणे. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरील अनामिकतेचा फायदा घेऊन गुन्हेगार आपली खरी ओळख लपवतात, ज्यामुळे त्यांना पकडणे कठीण होते. काही गुन्हे संघटितपणे चालतात, जसे की 'जामतारा' सारख्या ठिकाणांहून होणारे मोठे फिशिंग स्कॅम.

**सायबर सुरक्षेची गरज व महत्त्व:** सायबर सुरक्षेच्या अभावामुळे व्यक्ती, संस्था आणि देशाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होतो. त्यामुळे प्रभावी सायबर सुरक्षा धोरणे राबविणे अत्यंत आवश्यक आहे. व्यक्तिगत स्तरावररू डेटा संरक्षण, गोपनीयता आणि सुरक्षित व्यवहार सुनिश्चित करण्यासाठी. उद्योग क्षेत्रातः कंपन्यांच्या संवेदनशील माहितीची सुरक्षा आणि व्यवसायातील सातत्य टिकवण्यासाठी. राष्ट्रीय सुरक्षाः सायबर टेररिझम आणि हॅकिंगपासून देशाच्या महत्त्वाच्या प्रणालींचे संरक्षण करण्यासाठी सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी सरकारने कठोर कायदे लागू करणे, नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब आणि जनजागृती करणे आवश्यक आहे.

**सायबर गुन्हेगारीचे प्रकार:**

**१. डेटा चोरी व हॅकिंग:** डेटा चोरी म्हणजे कोणत्याही व्यक्ती, कंपनी किंवा संस्थेच्या गोपनीय आणि संवेदनशील माहितीची परवानगीशिवाय चोरट्या मार्गाने मिळवलेली माहिती. हॅकिंगच्या माध्यमातून सायबर गुन्हेगार संगणक प्रणालीत बेकायदेशीर प्रवेश करून डेटा चोरी करू शकतात, तो बदलू शकतात किंवा नष्ट करू शकतात. उदा. बँकिंग खात्यांची माहिती चोरून आर्थिक फसवणूक करणे. एखाद्या कंपनीच्या ग्राहक डेटाबेसमध्ये घुसखोरी करून तो चोरी करणे.

**२. फिशिंग आणि ऑनलाईन फसवणूक:** फिशिंग हा सायबर गुन्हेगारांकडून वापरण्यात येणारा एक फसवणुकीचा प्रकार आहे, ज्यामध्ये बनावट ईमेल, वेबसाइट किंवा संदेशाद्वारे वापरकर्त्यांची संवेदनशील माहिती (उदा. बँक खाते, पासवर्ड) चोरली जाते. उदा. बँकेच्या अधिकृत वेबसाइटसारखी बनावट वेबसाइट तयार करून वापरकर्त्यांची लॉगिन माहिती मिळवणे. "तुम्ही लॉटरी जिंकली आहे" अशा बनावट ई-मेलद्वारे आर्थिक फसवणूक करणे.

**३. सायबर स्टॉकिंग आणि ट्रोलिंग:** सायबर स्टॉकिंग म्हणजे एखाद्या व्यक्तीचा वारंवार ऑनलाइन पाठलाग करणे, धमक्या देणे किंवा मानसिक त्रास देणे. सायबर ट्रोलिंगमध्ये व्यक्ती किंवा संस्थेविरुद्ध खोट्या बातम्या, आक्षेपार्ह टिप्पण्या आणि धमक्या दिल्या जातात. उदा. सोशल मीडियावर कोणालाही सतत त्रास देणे, धमक्या देणे किंवा बदनामी करणे. महिलांना ऑनलाइन छेडछाड करून धमकावणे.

**४. डार्क वेब व सायबर टेररिझम:** डार्क वेब हे इंटरनेटचा एक भाग आहे जो सामान्य सर्च इंजिनमध्ये दिसत नाही आणि मुख्यतः बेकायदेशीर कामांसाठी वापरला जातो. सायबर टेररिझममध्ये दहशतवादी गट इंटरनेटचा वापर देशाविरोधात कट रचण्यासाठी करतात. उदा: डार्क वेबवर ड्रग्स, शस्त्रास्त्रे आणि खोटे ओळखपत्रे विक्रीसाठी ठेवणे. सरकारी वेबसाईट हॅक करून राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित माहिती चोरणे.

**५. रॅन्समवेअर आणि मॅलवेअर हल्ले:** रॅन्समवेअर हा एक प्रकारचा सायबर हल्ला आहे, जिथे हॅकर्स संगणकातील डेटा लॉक करून त्याच्या मोबदल्यात पैसे (रॅन्सम) मागतात. मॅलवेअर हा हानिकारक सॉफ्टवेअरचा प्रकार आहे, जो संगणक किंवा नेटवर्कला हानी पोहोचवतो. उदा. रॅन्समवेअर हल्ल्यामुळे हॉस्पिटलच्या सर्व रुग्ण डेटा लॉक करून लाच मागणे. Trojan किंवा Worm सारख्या मॅलवेअरद्वारे संगणक प्रणाली दूषित करणे.

**महिलांना सामना करावा लागत असलेले सायबर गुन्हे:** एकूण सायबर गुन्ह्यांपैकी मोठ्या संख्येने गुन्हे हे केवळ महिलांच्याच बाबतीत घडत असतात. ते पुढीलप्रमाणे:

**१. ई-मेलद्वारे होणारा छळ:** ई-मेलद्वारे ब्लॅकमेल करणे, धमकावणे, दंडेली करणे किंवा फसवणूक करणे इत्यादी प्रकारांचा या पद्धतीच्या छळवणुकीत समावेश होतो. पत्रांद्वारे एखाद्याचा छळ करण्याप्रमाणेच हे आहे. मात्र बहुतेकवेळा बनावट खात्यांवरुनच असे ईमेल पाठविले जात असल्याने ते अधिक त्रासदायक असते.

**२. सायबर स्टॉकिंग (Stalking):** आधुनिक काळातील हा सर्वाधिक चर्चित सायबर गुन्हा म्हणावा लागेल. यामध्ये सातत्याने एखाद्यावर लक्ष ठेवले जाते किंवा त्याचा पाठलाग केला जातो. एखाद्या व्यक्तीला सातत्याने मेसेजेस पाठविणे, ईमेल्स पाठविणे किंवा तो वापरत असलेल्या चॅटरुममध्ये प्रवेश करणे इत्यादी प्रकारांनी त्या व्यक्तीच्या इंटरनेटवरील सर्व हालचालींवर पाळत ठेवली जाते. यापैकी काही मेसेज धमकीचेही असतात. महिलांना पुरुषांकडून तर लहान मुलांना लैंगिक अत्याचाराची प्रवृत्ती असलेल्यांकडून अशा प्रकारच्या स्टॉकिंगला सामोरे जावे लागते. बहुतेकदा इंटरनेटच्या दुनियेत नवीन असलेल्या आणि इंटरनेट सुरक्षिततेची माहिती नसलेल्यांना याचा सामना करावा लागतो.

**३. सायबर पोर्नोग्राफी:** पोर्नोग्राफीसारखे गुन्हे इंटरनेटच्या माध्यमातून करणे अत्यंत सुलभ बनले आहे. सायबर पोर्न या नावाने ओळखला जाणारा हा गुन्हा सगळीकडेच मोठ्या प्रमाणात घडताना दिसतो. सुमारे 50 टक्के वेबसाईटसवर पोर्नोग्राफीक मजकूर रिप्रोड्युस (पुर्निमिती) करणे सहज शक्य आहे. तसेच नवीन तंत्रज्ञानामुळे केवळ मजकूर, चित्रे किंवा छायाचित्रांपुरतेच हे मर्यादीत नसून व्हिडीयो क्लिप्स आणि सिनेमेही आता सहज उपलब्ध आहेत. सहजपणे असलेली उपलब्धता आणि विशेषत: लहान मुलांना सहज झालेली उपलब्धतता हा याचा सर्वात मोठा तोटा म्हणावा लागेल. कारण घरात बसून कोणालाही न समजता वेबसाईटच्या माध्यमातून पोर्न सहजपणे बघता येऊ शकते. यासाठी त्यांना प्रत्यक्षपणे कोठे जाण्याची गरज उरलेली नाही. त्याहीपेक्षा महत्वाचा मुद्दा

म्हणजे लहान मुलांना संबंधित पोर्नोग्राफी जी जागतिक पातळीवर अयोग्य मानली जाते, अशा प्रकारची पोर्नोग्राफी पसरविणे किंवा लपवून ठेवणे हे इंटरनेटमुळे गुन्हेगारांना अगदीच सोपे झाले आहे.

**४. सायबर डीफमेशन (बदनामी):** अब्रुनुकसानी किंवा बदनामी करणे हा महिलांविरुद्ध घडणारा आणखी एक सायबर गुन्हा आहे. संगणकाच्या मदतीने किंवा इंटरनेटच्या माध्यमातून बदनामी केल्यास तो सायबर गुन्हा ठरतो. उदाहरणार्थ वेबसाईटवरुन एखाद्याबाबत बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध करणे किंवा एखाद्याबाबत बदनामी करणारी माहिती ईमेलच्या माध्यमातून त्या व्यक्तीच्या मित्रांना पाठविणे, इत्यादी.

**५. मॉर्फिंग:** मॉर्फिंग म्हणजे मूळ चित्रामध्ये बेकायदेशीरपणे केलेले बदल, संगणकाच्या माध्यमातून इंटरनेटवरील मजकूरामध्ये किंवा छायाचित्रांमध्ये फेरफार करणे होय. बनावट खातेधारक महिलांची चित्रे डाऊनलोड करुन त्यामध्ये बदल करुन ती दुसऱ्या वेबसाईटवर पुन्हा पोस्ट करतात. असे करणे हा आयटी ॲक्ट-२००० अंतर्गत गुन्हा आहे. भादंवि अन्वये गुन्हेगाराला अटक होऊ शकते.

**भारतातील सायबर सुरक्षेचे कायदे आणि धोरणे:** भारतात डिजिटल क्रांतीमुळे इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे सायबर सुरक्षेच्या गरजेची जाणीव वाढली असून, सरकारने विविध कायदे आणि धोरणे तयार केलेली आहेत.

**माहिती तंत्रज्ञान कायदा -२०००:** भारतात सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० (IT Act-२०००) लागू करण्यात आला. २००८ मध्ये यामध्ये काही महत्त्वाचे बदल करण्यात आले, जे डिजिटल व्यवहार आणि सायबर सुरक्षेशी संबंधित आहेत. कलम ४३(A) कोणत्याही व्यक्तीच्या संमतीशिवाय डेटा किंवा माहिती चोरणे किंवा त्याचा गैरवापर केल्यास दंडात्मक कारवाई. कलम ६६ संगणक प्रणालीमध्ये अनधिकृत प्रवेश केल्यास शिक्षेची तरतूद. कलम ६६C फसवणुकीच्या उद्देशाने इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी किंवा पासवर्डचा गैरवापर केल्यास तीन वर्षांची शिक्षा. कलम ६७ ऑनलाइन अश्लील साहित्य प्रसारित केल्यास शिक्षेची तरतूद. कलम ६९ राष्ट्रीय सुरक्षेसाठी सरकारला एखाद्या संगणक प्रणालीचा डेटा पाहण्याचा आणि अडवण्याचा अधिकार.

**भारतीय दंड संहिता अंतर्गत सायबर गुन्ह्यांवरील तरतुदी:** आयटी कायद्याच्या मदतीने भारतीय दंड संहिता (IPC) अंतर्गत देखील सायबर गुन्ह्यांवर कारवाई केली जाते. कलम ४१९ नुसार ऑनलाईन फसवणूक आणि बनावट ओळखपत्रे वापरण्याच्या गुन्ह्यांसाठी शिक्षा. कलम ४२० नुसार ऑनलाईन फसवणुकीद्वारे आर्थिक लाभ मिळवल्यास सात वर्षांपर्यंतची शिक्षा. कलम ४६८ नुसार आणि ४७१ नुसार बनावट डिजिटल कागदपत्रे तयार करणे किंवा त्यांचा गैरवापर करणे. कलम ५०० नुसार ऑनलाईन माध्यमातून बदनामी केल्यास शिक्षेची तरतूद.

**राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण:** भारतात सायबर सुरक्षेला बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण, २०१३ लागू करण्यात आले. या धोरणाचा उद्देश महत्त्वाच्या सरकारी आणि खाजगी क्षेत्रांच्या डिजिटल पायाभूत सुविधा सुरक्षित ठेवणे हा आहे.

**प्रमुख उद्दिष्टे:** भारतासाठी संपूर्ण सायबर सुरक्षा फ्रेमवर्क तयार करणे. सरकारी आणि खाजगी भागीदारीच्या माध्यमातून सायबर सुरक्षेच्या उपाययोजना विकसित करणे. डिजिटल गुन्ह्यांविरोधात प्रशिक्षण आणि जनजागृती कार्यक्रम राबवणे. राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण कार्यान्वित करण्यासाठी विशेष यंत्रणा स्थापन करणे.

**Cirt & In आणि अन्य संस्थांची भूमिका**: ही भारतातील सायबर सुरक्षेसाठी जबाबदार असलेली राष्ट्रीय संस्था आहे.

**भूमिका आणि जबाबदाऱ्या:** संगणक आणि नेटवर्क सुरक्षेशी संबंधित आपत्तींचा (Cyber Incidents) वेळीच सामना करणे. भारतातील सरकारी आणि खाजगी संस्थांना सायबर सुरक्षा उपाययोजना देणे. सायबर हल्ल्यांविषयी माहिती गोळा करून त्यावर कारवाई करणे. सरकारी वेबसाइट्स आणि इन्फ्रास्ट्रक्चर वरील सायबर हल्ल्यांपासून संरक्षण करणे.

**सायबर गुन्हेगारी प्रतिबंधासाठी धोरणात्मक**:

**सायबर सुरक्षा जागरूकता आणि शिक्षण:** १. इंटरनेट वापरणार्या प्रत्येक व्यक्तीने सुरक्षित पासवर्ड, OTP धोरणे, फिशिंग ई-मेल्सपासून बचाव यांसारख्या मूलभूत सायबर सुरक्षेच्या संकल्पना समजून घ्याव्यात. २. शाळा, महाविद्यालये आणि कार्यस्थळी सायबर सुरक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जावेत. ३. डिजिटल व्यवहार करताना खबरदारी कशी घ्यावी, यावर मोफत ऑनलाइन कोर्सेस आणि वेबिनार्स आयोजित करावेत. ४. कर्मचाऱ्यांसाठी नियमित सायबर सुरक्षा प्रशिक्षण बंधनकारक करावे. ५. कंपन्यांनी आपली डेटा प्रायव्हसी पॉलिसी मजबूत करावी आणि ग्राहकांची माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात.

**तंत्रज्ञान-आधारित संरक्षण:** a) संवेदनशील डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी एन्क्रिप्शन तंत्रज्ञानाचा वापर करावा. नेटवर्क सुरक्षा वाढवण्यासाठी फायरवॉल आणि VPN (Virtual Private Network) वापरणे आवश्यक आहे. b) कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि यंत्र शिक्षण (Machine Learning) AI आधारित सायबर सुरक्षा प्रणाली वापरून फिशिंग हल्ले, मालवेअर आणि रान्स्वेयर हल्ले ओळखणे शक्य होते. c) मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या सायबर हल्ल्यांचा पूर्वानुमान लावण्यासाठी यंत्र शिक्षण (Machine Learning) तंत्रज्ञानाचा उपयोग केला जाऊ शकतो. d) पारंपरिक पासवर्डऐवजी फिंगरप्रिंट, फेस-आयडी आणि आयरिस स्कॅन यांसारख्या सुरक्षित प्रमाणीकरण तंत्रांचा अवलंब करावा.

**बँकिंग आणि ई-कॉमर्स क्षेत्रातील सुरक्षाव्यवस्था:** a) 2-स्टेप व्हेरिफिकेशन आणि OTP प्रणाली बंधनकारक करावी. b) आर्थिक व्यवहारांसाठी फिशिंग हल्ल्यापासून संरक्षण करणाऱ्या AI-आधारित प्रणाली लागू कराव्यात. c) बँकांनी फ्रॉड डिटेक्शन सॉफ्टवेअर वापरून संशयास्पद व्यवहारांची माहिती ग्राहकांना त्वरीत द्यावी. d) सुरक्षित पेमेंट गेटवे वापरावे आणि ग्राहकांना SSL प्रमाणपत्र असलेल्या वेबसाइट्सचाच वापर करण्याचा सल्ला द्यावा. e) रिफंड आणि फ्रॉड प्रोटेक्शन धोरणे मजबूत कराव्यात.

**सरकारी आणि खाजगी भागीदारी:** a) सरकार आणि प्ज् कंपन्यांनी मिळून सायबर सुरक्षा संशोधन आणि विकास मध्ये गुंतवणूक करावी. मोठ्या IT तंत्रज्ञान कंपन्यांनी सरकारी यंत्रणांना सायबर गुन्ह्यांविरोधात डेटा विश्लेषण आणि सुरक्षा उपाय पुरवावे.
b) आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि माहिती शेअरिंग बुडापेस्ट कन्व्हेन्शन सारख्या आंतरराष्ट्रीय करारांमध्ये भारताने अधिक सक्रिय सहभाग घ्यावा. c) विविध देशांतील सायबर सुरक्षा संस्थांमध्ये माहिती शेअरिंग तंत्र विकसित करावे.

**कठोर कायद्यांची अंमलबजावणी आणि न्यायप्रक्रियेत सुधारणा:** a) सायबर गुन्ह्यांची सुनावणी करण्यासाठी विशेष सायबर न्यायालये आणि तज्ज्ञ न्यायाधीशांची नेमणूक करावी. b) न्यायालयीन प्रक्रियेत विलंब टाळण्यासाठी Fast Track Courts स्थापन करावेत. c) सायबर गुन्ह्यांसाठी शिक्षा अधिक कठोर करावी आणि आर्थिक फसवणुकीसाठी त्वरित भरपाई देण्याची यंत्रणा निर्माण करावी. डेटा चोरी, ऑनलाइन फसवणूक आणि सायबर स्टॉकिंगसाठी नवीन दंड संहिता तयार करावी. d) प्रत्येक राज्यात विशेष सायबर गुन्हे अन्वेषण स्थापन करावी. e) पोलिसांना सायबर सुरक्षेचे अद्ययावत प्रशिक्षण देऊन त्यांचे कौशल्य वाढवावे.

**आव्हाने आणि मर्यादा:** सायबर गुन्हेगारी प्रतिबंधित करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जात असल्या तरी, काही मोठी आव्हाने आणि मर्यादा अद्यापही कायम आहेत.

**डिजिटल साक्षरतेचा अभाव:** a) अनेक लोक सायबर गुन्ह्यांची संभाव्यता आणि सुरक्षेच्या मूलभूत तत्त्वांबाबत अनभिज्ञ असतात. b) ऑनलाईन फसवणूक, फिशिंग ई-मेल्स, पासवर्ड सुरक्षा यांसारख्या गोष्टींबाबत जागरूकता नसल्यामुळे ते सहजपणे सायबर गुन्ह्यांचे बळी ठरतात. c) लहान शहरांमध्ये आणि ग्रामीण भागात तंत्रज्ञानाचा वापर वाढत असला तरी सायबर सुरक्षिततेविषयी माहिती कमी आहे. d) भारतातील ग्रामीण आणि निमशहरी भागात सायबर सुरक्षा शिक्षण आणि प्रशिक्षणाची कमतरता आहे. e) सरकारने विविध डिजिटल शिक्षण उपक्रम राबवले असले तरी, प्रत्यक्षात याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही.

**आंतरराष्ट्रीय सहकार्याची कमतरता:** a) सायबर गुन्हेगार अनेकदा वेगवेगळ्या देशांमधून हल्ले करतात, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करणे कठीण होते. b) विविध देशांमध्ये सायबर गुन्ह्यांविरोधातील कायदे वेगवेगळे असल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य कमी असते. c) काही देश डेटा एक्सचेंज करण्यास तयार नसतात, त्यामुळे सायबर गुन्हेगारांचा मागोवा घेणे कठीण होते.
d) बुडापेस्ट कन्व्हेन्शन सारख्या आंतरराष्ट्रीय सायबर सुरक्षा करारांमध्ये भारत अद्याप पूर्णतः सहभागी झालेला नाही. 3. **गोपनीयतेचा मुद्दा आणि डेटा संरक्षण:** a) मोठ्या प्रमाणावर डेटा लीक आणि हॅकिंगचे प्रकार वाढले आहेत. b) डेटा संरक्षण आणि गोपनीयता धोरणे प्रभावीपणे राबवली जात नाहीत, त्यामुळे नागरिकांचा डेटा सुरक्षित नाही. c) मोठ्या कंपन्या वापरकर्त्यांचा डेटा मोठ्या प्रमाणावर गोळा करतात, त्यामुळे गोपनीयतेचे उल्लंघन होते. d) देशांतर्गत डेटा साठवण्याचे नियम अद्याप प्रभावीपणे राबवले जात नाहीत.

**नवीन तंत्रज्ञानामुळे वाढणारे सायबर धोके:** a) AI आधारित फसवणुकीचे तंत्र अधिक प्रगत होत आहे, ज्यामुळे चुकीची माहिती पसरवणे आणि खोटी व्हिडिओ सामग्री तयार करणे सोपे झाले आहे. b) AI आधारित स्वयंचलित हल्ले करण्याच्या शक्यता वाढल्या आहेत. c) स्मार्टफोन, स्मार्ट होम डिव्हाइसेस, आणि IoT उपकरणांवर सायबर हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. d) ब्लॉकचेन आणि क्रिप्टोकरन्सीच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे सायबर गुन्हेगारांसाठी हे नवे लक्ष्य बनले आहे. e) रॅन्समवेअर हल्ल्यांमध्ये बिटकॉइन आणि इतर क्रिप्टोकरन्सीचा वापर वाढला आहे, कारण त्याचा मागोवा घेणे अवघड असते.

**निष्कर्ष:** सायबर गुन्हेगारी ही डिजिटल युगातील एक मोठी समस्या बनली आहे. डेटा चोरी, ऑनलाईन फसवणूक, रॅन्समवेअर हल्ले, सायबर टेररिझम आणि सोशल मीडिया गैरवापर यांसारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. यामुळे सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेवर मोठा परिणाम होत आहे. प्रभावी सायबर सुरक्षा धोरणे आणि तंत्रज्ञानाच्या मदतीनेच या गुन्ह्यांना आळा घालता येऊ शकतो. सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी कठोर कायदे, आंतरराष्ट्रीय सहकार्य, डिजिटल साक्षरता, आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य आहे. सरकारने सायबर सुरक्षेसाठी धोरणात्मक सुधारणा कराव्यात आणि गुन्हेगारी विरोधी कठोर कारवाई करावी. आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य वाढवून जागतिक सायबर सुरक्षेचे नियम अधिक प्रभावी बनवावेत. सामान्य नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता वाढवणे ही प्राथमिकता असावी. सायबर गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांकडून पत्रके, व्हिडीओ क्लिप्समार्फत जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी देखील अधिक जागरुक राहणे गरजेचे आहे. सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकू नये, असे आवाहन ग्रामीण पोलिसांनी करावे. हे उपाय प्रभावीपणे राबवले, तर भविष्यात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण कमी करता येईल आणि डिजिटल युग अधिक सुरक्षित करता येईल.

**संदर्भ:**

१. Pande, Rajesh (2017), Introduction to cyber Security, Uttarakhand Univerdity, Haldwani.
२. म. टा. वृत्तसेवा, ठाणे: महाराष्ट्र टाइम्स 31 Jul 2020,
३. https://www.egovernance.vikaspedia.in/viewcontent/e-governance/907924930 accessed on 22-01-2026
४. https://www.mahamtb.com/Encyc/2018/3/9/Article-on-Cyber-Crime-by-Nitin-Sonavne.html accessed on 22-01-2026

# ग्रामीण विकासाच्या योजनांवर भ्रष्टाचाराचा परिणाम

**डॉ. राजेंद्र बगाटे** सहायक प्राध्यापक / शैक्षणिक संयोजक, बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**गोषवारा:** भारताची सामाजिक व आर्थिक रचना मुळात ग्रामीण जीवनावर आधारलेली आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येचा मोठा भाग आजही ग्रामीण भागात वास्तव्यास असून त्यांचे जीवनमान उंचावणे हे भारतीय विकास प्रक्रियेचे प्रमुख उद्दिष्ट राहिले आहे. ग्रामीण विकास ही केवळ आर्थिक प्रगतीची प्रक्रिया नसून ती सामाजिक न्याय, समता, लोकसहभाग आणि मानवी विकासाशी घट्टपणे जोडलेली संकल्पना आहे. स्वातंत्र्यानंतर केंद्र व राज्य सरकारांनी ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना, कार्यक्रम व धोरणे राबवली. या योजनांच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मूलन, रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षितता या क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि, या योजनांच्या अंमलबजावणीदरम्यान भ्रष्टाचार हा एक गंभीर आणि सातत्याने आढळणारा अडथळा ठरत असल्याचे वास्तव समोर येते. विकासासाठी मंजूर होणारा निधी प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही, कामांची गुणवत्ता खालावते, लाभार्थी निवडीत पक्षपात होतो आणि प्रशासनावरील जनतेचा विश्वास कमी होत जातो. परिणामी ग्रामीण विकासाची संकल्पना कागदावरच मर्यादित राहण्याचा धोका निर्माण होतो. प्रस्तुत शोध निबंधात ग्रामीण विकासाच्या योजनांवर भ्रष्टाचाराचा आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर होणारा परिणाम सखोलपणे अभ्यासण्यात आला आहे. दुय्यम स्रोतांवर आधारित या संशोधनात भ्रष्टाचाराची संकल्पना, त्याची कारणे, स्वरूप आणि ग्रामीण समाजावर होणारे दुष्परिणाम यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच ग्रामीण विकास प्रक्रिया अधिक पारदर्शक, लोकाभिमुख आणि परिणामकारक करण्यासाठी आवश्यक उपाययोजना व शिफारशी मांडण्यात आल्या आहेत.

**प्रमुख शब्द:** ग्रामीण विकास, भ्रष्टाचार, शासकीय योजना, प्रशासन, सामाजिक न्याय, लोकसहभाग.

**प्रस्तावना:** ग्रामीण विकास हा भारताच्या राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेचा कणा मानला जातो. भारतीय समाजरचना, संस्कृती, अर्थव्यवस्था आणि लोकजीवन यांचे मूळ ग्रामीण जीवनात आढळते. अन्ननिर्मिती, कच्च्या मालाची उपलब्धता, लोकसंस्कृतीचे जतन आणि मानवी संसाधनांचा विकास या सर्व घटकांचा थेट संबंध ग्रामीण भागाशी आहे. त्यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय देशाचा समतोल, समावेशक आणि शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही, हे वास्तव स्वातंत्र्योत्तर भारताने लवकरच ओळखले. (Ahuja, 2014; Sen, 1999) स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने नियोजनबद्ध विकासाचा मार्ग स्वीकारत ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजना राबवण्यास सुरुवात केली. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून कृषी सुधारणा, सिंचन प्रकल्प, ग्रामीण रोजगार, गृहनिर्माण, आरोग्य व शिक्षण सुविधा विस्तार यांवर भर देण्यात आला. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून विकास प्रक्रिया तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. विकेंद्रीकरणाच्या या धोरणामागील उद्देश ग्रामीण जनतेला विकास प्रक्रियेचा सक्रिय भाग बनवणे हाच होता. (Planning Commission, 2013; IGNOU, 2019) मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यावर ग्रामीण विकास प्रक्रियेला अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागला. प्रशासकीय अकार्यक्षमता, राजकीय हस्तक्षेप, अपुरी देखरेख, जनजागृतीचा अभाव आणि विशेषतः भ्रष्टाचार या समस्या ग्रामीण विकासाच्या मार्गातील प्रमुख अडसर ठरल्या. भ्रष्टाचार हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून तो विकास प्रक्रियेच्या नैतिक अधिष्ठानालाच छेद देणारा सामाजिक विकार आहे. ग्रामीण समाज तुलनेने दुर्बल, माहितीअभावी आणि प्रशासनावर अधिक अवलंबून असल्यामुळे भ्रष्टाचाराचा सर्वाधिक फटका ग्रामीण जनतेलाच बसतो. (IGNOU, 2020; Planning Commission, 2013). आज अनेक ग्रामीण विकास योजना आकडेवारीत यशस्वी वाटतात; परंतु प्रत्यक्ष वास्तव वेगळे चित्र दाखवते. निधीचा अपहार, बनावट लाभार्थी, निकृष्ट दर्जाची कामे, लाचखोरी आणि दलाली यांमुळे योजनांचा मूळ उद्देश साध्य होत नाही. परिणामी ग्रामीण जनतेमध्ये शासनाविषयी अविश्वास, असंतोष आणि उदासीनता वाढताना दिसते. या पार्श्वभूमीवर ग्रामीण विकासाच्या योजनांवर भ्रष्टाचाराचा परिणाम अभ्यासणे हे केवळ शैक्षणिक दृष्ट्या नव्हे, तर सामाजिक वास्तव समजून घेण्यासाठीही अत्यंत आवश्यक ठरते. (Rose-Ackerman & Palifka, 2016; Myrdal, 1968)

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) ग्रामीण विकास योजनांमध्ये आढळणाऱ्या भ्रष्टाचाराचे स्वरूप, प्रकार आणि कारणे स्पष्ट करणे. २) भ्रष्टाचारामुळे ग्रामीण विकास प्रक्रियेवर होणारे आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि प्रशासकीय परिणाम विश्लेषित करणे. ३) भ्रष्टाचाराचा ग्रामीण समाजातील दुर्बल घटकांवर विशेषतः महिलांवर आणि गरीबांवर होणारा परिणाम समजून घेणे. ४) ग्रामीण विकास अधिक पारदर्शक, लोकाभिमुख व परिणामकारक करण्यासाठी आवश्यक उपाययोजना व धोरणात्मक दिशा सूचित करणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोध निबंध हा पूर्णतः दुय्यम स्रोतांवर आधारित आहे. संशोधनासाठी भारत सरकारचे ग्रामीण विकास मंत्रालयाचे अहवाल, पंचवार्षिक योजना दस्तऐवज, नीति आयोगाचे प्रकाशन, आर्थिक सर्वेक्षणे, जनगणना अहवाल, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण अहवाल, नियंत्रक व महालेखा परीक्षकांचे अहवाल, तसेच विविध समाजशास्त्रीय ग्रंथ, संशोधन प्रबंध, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिके आणि विश्वसनीय वृत्तपत्रीय लेख यांचा अभ्यास करण्यात आला आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक या दोन्ही समाजशास्त्रीय पद्धतींचा वापर करण्यात आला आहे.

**ग्रामीण विकास: संकल्पना व अर्थ:** ग्रामीण विकास ही संकल्पना केवळ भौतिक सुविधा वाढवण्यापुरती मर्यादित नसून ती मानवी जीवनाच्या सर्वांगीण उन्नतीशी निगडित आहे. ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण समाजातील लोकांचे जीवनमान उंचावणे, त्यांना

आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे, सामाजिक न्याय प्रस्थापित करणे आणि लोकशाही प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे ही एक दीर्घकालीन व सातत्यपूर्ण प्रक्रिया होय. पूर्वी ग्रामीण विकासाचा अर्थ मुख्यतः कृषी उत्पादनवाढ, सिंचन सुविधा किंवा काही मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे एवढाच घेतला जात होता. मात्र कालांतराने विकासविषयक विचारसरणीत बदल होत गेला आणि ग्रामीण विकास ही बहुआयामी संकल्पना म्हणून पुढे आली. (Sen, 1999; Ahuja, 2014) समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता ग्रामीण विकास हा सामाजिक परिवर्तनाचा अविभाज्य भाग आहे. ग्रामीण समाजात दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेली जातीय विषमता, वर्गीय भेद, लैंगिक असमानता, अशिक्षण आणि दारिद्र्य यांसारख्या समस्या दूर केल्याशिवाय खरा विकास साध्य होऊ शकत नाही. त्यामुळे ग्रामीण विकास योजनांचा केंद्रबिंदू केवळ आर्थिक प्रगती न राहता मानवी विकास, सामाजिक समावेश आणि सक्षमीकरण असा असतो. अमर्त्य सेन यांच्या मते, विकास म्हणजे केवळ उत्पन्नवाढ नव्हे तर लोकांच्या क्षमतांचा विस्तार होय. या दृष्टीने ग्रामीण विकास ही स्वातंत्र्य, संधी आणि सन्मान यांची हमी देणारी प्रक्रिया ठरते. (Ahuja, 2014; Myrdal, 1968) भारतीय संदर्भात ग्रामीण विकासाला विशेष महत्त्व आहे, कारण देशाच्या सामाजिक व आर्थिक संरचनेत ग्रामीण भागाचा वाटा मोठा आहे. ग्रामीण समाजाचा विकास झाल्यासच शहरी-ग्रामीण दरी कमी होऊ शकते आणि समतोल विकास साध्य होऊ शकतो. म्हणूनच ग्रामीण विकास ही केवळ धोरणात्मक गरज नसून ती सामाजिक जबाबदारीदेखील आहे. (Planning Commission, 2013; IGNOU, 2019)

**भारतातील ग्रामीण विकास योजना: संक्षिप्त आढावा:** स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने ग्रामीण भागाच्या विकासासाठी नियोजनबद्ध प्रयत्न सुरू केले. १९५० च्या दशकात सामुदायिक विकास कार्यक्रम आणि राष्ट्रीय विस्तार सेवा या योजनांच्या माध्यमातून ग्रामीण विकासाची पायाभरणी करण्यात आली. या कार्यक्रमांचा उद्देश ग्रामीण भागात कृषी सुधारणा, शिक्षण, आरोग्य आणि सहकार यांना चालना देणे हा होता. पुढील काळात एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, रोजगार हमी योजना आणि दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम राबवण्यात आले. (Planning Commission, 2013; IGNOU, 2019) १९९० नंतरच्या काळात ग्रामीण विकास धोरणांमध्ये अधिक स्पष्टता आणि व्यापकता दिसून येते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण), स्वच्छ भारत अभियान, राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान आणि एकात्मिक बालविकास सेवा योजना यांसारख्या कार्यक्रमांनी ग्रामीण विकासाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. या योजनांचा उद्देश केवळ आर्थिक मदत देणे नसून ग्रामीण समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. (Government of India, 2020; Government of India, 2023) या सर्व योजनांची अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पंचायतराज व्यवस्थेमुळे विकेंद्रीकरणाची प्रक्रिया बळकट झाली आणि ग्रामीण जनतेला निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाली. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडचणी समोर आल्या. अपुरी प्रशासकीय क्षमता, राजकीय हस्तक्षेप आणि भ्रष्टाचार यांमुळे योजनांचे अपेक्षित उद्दिष्ट साध्य होऊ शकले नाही. (NITI Aayog, 2021; Chaudhuri, 2018)

**भ्रष्टाचार: संकल्पना, सिद्धांत व स्वरूप:** भ्रष्टाचार ही केवळ कायदेशीर किंवा आर्थिक समस्या नसून ती एक गंभीर सामाजिक समस्या आहे. भ्रष्टाचार म्हणजे सार्वजनिक अधिकारांचा खाजगी फायद्यासाठी केलेला गैरवापर होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता भ्रष्टाचार हा सत्तासंबंध, सामाजिक विषमता आणि संस्थात्मक कमकुवतपणा यांचा परिणाम आहे. जेव्हा प्रशासनातील नियम, प्रक्रिया आणि मूल्ये प्रभावीपणे कार्यरत राहत नाहीत, तेव्हा भ्रष्टाचाराला पोषक वातावरण निर्माण होते. ग्रामीण विकास योजनांमधील भ्रष्टाचार प्रामुख्याने निधीच्या गैरवापराच्या स्वरूपात दिसून येतो. लाचखोरी, अपहार, पक्षपात, बनावट लाभार्थी, निकृष्ट कामे आणि दलाली हे त्याचे प्रमुख प्रकार आहेत. अनेक वेळा विकासकामे कागदावर पूर्ण झाल्याचे दाखवले जाते, प्रत्यक्षात मात्र ती अर्धवट किंवा अस्तित्वातच नसतात. यामुळे विकास प्रक्रियेतील नैतिक अधिष्ठान कमकुवत होते. (Rose-Ackerman & Palifka, 2016) सिद्धांतात्मक पातळीवर भ्रष्टाचाराचे स्पष्टीकरण देताना काही समाजशास्त्रज्ञांनी संरचनात्मक दृष्टिकोन स्वीकारला आहे. त्यांच्या मते, भ्रष्टाचार हा वैयक्तिक अप्रामाणिकतेपेक्षा संस्थात्मक दोषांचा परिणाम असतो. ग्रामीण समाजातील निरक्षरता, माहितीचा अभाव आणि प्रशासनावर असलेली अवलंबित्वाची भावना यामुळे भ्रष्टाचाराला आव्हान देण्याची क्षमता कमी राहते. त्यामुळे ग्रामीण विकास योजनांमधील भ्रष्टाचार हा केवळ व्यक्तीगत दोष नसून तो संपूर्ण व्यवस्थेचा अपयश दर्शवतो. (Myrdal, 1968; Khan, 2006)

**ग्रामीण विकास योजनांतील भ्रष्टाचाराची कारणे:** ग्रामीण विकास योजनांमधील भ्रष्टाचारामागे केवळ एखादे एकच कारण नसून अनेक सामाजिक, प्रशासकीय, राजकीय, आर्थिक आणि संरचनात्मक घटक परस्परांशी निगडित स्वरूपात कार्यरत असतात. सर्वप्रथम ग्रामीण समाजातील माहितीचा अभाव आणि हक्कांविषयीची अनभिज्ञता हे भ्रष्टाचाराचे मूलभूत कारण मानावे लागते. ग्रामीण भागातील मोठा वर्ग अशिक्षित किंवा अल्पशिक्षित असल्यामुळे शासकीय योजना, त्यांची पात्रता अटी, अर्ज प्रक्रिया, अनुदानाची रक्कम किंवा तक्रार निवारण यंत्रणा यांविषयी पुरेशी माहिती त्यांना नसते. या माहितीच्या पोकळीचा फायदा घेत दलाल, स्थानिक नेते किंवा काही कर्मचारी लाभार्थ्यांकडून लाच घेतात किंवा योजनांचा लाभ स्वतःच्या हितासाठी वळवतात. त्यामुळे भ्रष्टाचार हा केवळ प्रशासकीय दोष न राहता तो माहिती-असमतेचा परिणाम ठरतो. (Ahuja, 2014; IGNOU, 2020) दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रशासकीय यंत्रणेतील पारदर्शकतेचा अभाव आणि अपुरी देखरेख होय. अनेक ग्रामीण विकास योजना कागदोपत्री उत्तम रचलेल्या असल्या तरी त्यांच्या अंमलबजावणीत स्पष्टता नसते. निधी मंजुरी, खर्च, कामांची गुणवत्ता आणि पूर्णता याबाबत प्रभावी तपासणी यंत्रणा कार्यरत नसल्यामुळे अपहारास वाव मिळतो. अनेक वेळा सामाजिक लेखापरीक्षण औपचारिक स्वरूपातच पार पडते किंवा स्थानिक सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली निष्प्रभ ठरते. परिणामी नियम अस्तित्वात असतानाही त्यांची अंमलबजावणी होत नाही आणि भ्रष्टाचार रुजतो. (Comptroller and Auditor General of India, Various Years) तिसरे अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे राजकीय हस्तक्षेप आणि सत्तेचा गैरवापर होय. ग्रामीण विकास योजना अनेकदा राजकीय हितसंबंधांचे साधन बनतात.

निवडणुकीच्या काळात मतदारसंघ मजबूत करण्यासाठी किंवा समर्थकांना लाभ देण्यासाठी योजनांचा वापर केला जातो. लाभार्थी निवडीत राजकीय पक्षनिष्ठा, जातीय समीकरणे किंवा व्यक्तिगत संबंध यांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे गरजू, गरीब आणि दुर्बल घटक योजनांपासून वंचित राहतात. राजकीय दबावाखाली प्रशासकीय अधिकारी नियमांकडे दुर्लक्ष करतात किंवा मौन बाळगतात, ज्यामुळे भ्रष्टाचाराला संरक्षण मिळते. (Chaudhuri, 2018; Planning Commission, 2013) याशिवाय कंत्राटी पद्धतीतील त्रुटी हा ग्रामीण विकास योजनांतील भ्रष्टाचाराचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प ठेकेदारांच्या माध्यमातून राबवले जातात. कंत्राट देताना पारदर्शक निविदा प्रक्रिया न राबवता ठराविक ठेकेदारांना प्राधान्य दिले जाते. निकृष्ट साहित्याचा वापर, कामाच्या मोजमापात फसवणूक आणि खर्च फुगवणे यांसारख्या प्रकारांतून मोठ्या प्रमाणावर अपहार होतो. या प्रक्रियेत स्थानिक अधिकारी, राजकीय नेते आणि ठेकेदार यांचे अपवित्र साटेलोटे तयार होते. (CAG, Various Years; Transparency International, 2023)

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्ताकेंद्रांचे केंद्रीकरण हे देखील भ्रष्टाचाराला कारणीभूत ठरते. ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद स्तरावर काही मोजक्या व्यक्तींकडे निर्णयप्रक्रियेचे नियंत्रण राहते. सामान्य ग्रामसभा निष्क्रिय राहते किंवा औपचारिकतेपुरती मर्यादित असते. लोकसहभागाचा अभाव असल्यामुळे निर्णयांवर जनतेचे नियंत्रण राहत नाही आणि भ्रष्ट व्यवहार सहज घडतात. विशेषतः महिला, दलित आणि आदिवासी घटक निर्णयप्रक्रियेपासून दूर ठेवले जातात. ग्रामीण विकास योजनांतील भ्रष्टाचारामागे नैतिक मूल्यांचा ऱ्हास आणि भ्रष्टाचाराचे सामाजिक स्वीकारार्हीकरण हेही एक गंभीर कारण आहे. दीर्घकाळ चालू असलेल्या लाचखोरीमुळे अनेकदा भ्रष्टाचार 'सामान्य व्यवहार' म्हणून पाहिला जातो. "काम व्हायचे असेल तर पैसे द्यावेच लागतात" अशी मानसिकता ग्रामीण समाजात रुजते. प्रामाणिकपणाला किंमत राहत नाही आणि भ्रष्ट मार्गाने काम करणाऱ्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळते. ही स्थिती भ्रष्टाचार निर्मूलनासाठी अत्यंत घातक ठरते. (Myrdal, 1968; Rose-Ackerman & Palifka, 2016) तसेच तक्रार निवारण यंत्रणेची कमकुवतता आणि संरक्षणाचा अभाव हे कारणही दुर्लक्षित करता येत नाही. भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणाऱ्या नागरिकांना अनेकदा धमक्या, सामाजिक बहिष्कार किंवा प्रशासकीय अडथळ्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे भीतीपोटी किंवा निराशेमुळे लोक तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. परिणामी भ्रष्ट अधिकारी आणि दलाल निर्भयपणे आपले गैरव्यवहार सुरू ठेवतात.

एकूणच ग्रामीण विकास योजनांतील भ्रष्टाचार ही समस्या व्यक्तीगत न राहता संरचनात्मक आणि प्रणालीगत स्वरूपाची आहे. माहितीचा अभाव, प्रशासकीय कमकुवतपणा, राजकीय हस्तक्षेप, कंत्राटी त्रुटी, लोकसहभागाचा अभाव आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास या सर्व कारणांचा परस्पर परिणाम म्हणून भ्रष्टाचार ग्रामीण विकास प्रक्रियेत खोलवर रुजलेला दिसून येतो.

**ग्रामीण विकास योजनांतील भ्रष्टाचाराचे प्रकार**: ग्रामीण विकास योजनांमध्ये आढळणारा भ्रष्टाचार हा केवळ वैयक्तिक पातळीवरील अनैतिक व्यवहार नसून तो संपूर्ण विकास व्यवस्थेला पोखरणारा एक संरचनात्मक आणि प्रणालीगत प्रश्न बनलेला आहे. निधीची मागणी, मंजुरी, वितरण, अंमलबजावणी, देखरेख आणि मूल्यांकन या प्रत्येक टप्प्यावर भ्रष्टाचाराची विविध रूपे दिसून येतात. त्यामुळे ग्रामीण विकासासाठी उपलब्ध असलेली साधनसंपत्ती प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही आणि विकास प्रक्रियेचा मूळ उद्देशच अपयशी ठरतो. ग्रामीण विकास योजनांतील भ्रष्टाचाराचा एक प्रमुख प्रकार म्हणजे निधी मंजुरी व वितरणातील भ्रष्टाचार होय. अनेक वेळा केंद्र किंवा राज्य शासनाकडून मंजूर झालेला निधी प्रत्यक्ष कामासाठी वेळेवर खाली उतरवला जात नाही. प्रशासकीय विलंब, अनावश्यक प्रक्रिया आणि लाचखोरीमुळे निधी अडकून राहतो. काही प्रकरणांत निधी विविध प्रशासकीय स्तरांवर 'कमिशन'च्या स्वरूपात कमी होत जातो. परिणामी शेवटच्या टप्प्यावर प्रत्यक्ष विकासकामांसाठी अत्यल्प निधी उरतो. (CAG, Various Years; Transparency International, 2023) दुसरा अत्यंत सामान्य आणि गंभीर प्रकार म्हणजे बनावट किंवा अपात्र लाभार्थ्यांची नोंदणी होय. ग्रामीण विकास योजनांचा उद्देश गरीब, दुर्बल आणि वंचित घटकांना मदत करणे हा असतो; मात्र प्रत्यक्षात राजकीय, सामाजिक किंवा आर्थिकदृष्ट्या प्रभावशाली व्यक्तींनाच योजनांचा लाभ मिळतो. मृत व्यक्ती, स्थलांतरित कुटुंबे किंवा अस्तित्वात नसलेली नावे लाभार्थी यादीत दाखवून त्यांच्या नावावर निधी उचलला जातो. यामुळे खऱ्या गरजू लोकांना योजनांपासून वंचित राहावे लागते आणि सामाजिक अन्याय वाढतो. कामांच्या अंदाजपत्रकात फेरफार व अपहार हा ग्रामीण विकास योजनांतील आणखी एक महत्त्वाचा भ्रष्टाचाराचा प्रकार आहे. रस्ते, पाणीपुरवठा, सिंचन, घरे, शौचालये आणि इतर पायाभूत सुविधा यांसारख्या कामांसाठी जाणीवपूर्वक खर्च फुगवून दाखवला जातो. प्रत्यक्षात कमी खर्चात किंवा निकृष्ट दर्जाचे काम करून कागदावर मात्र पूर्ण आणि दर्जेदार काम झाल्याचे दाखवले जाते. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक निधीचा अपहार होतो. (Government of India, 2023; NITI Aayog, 2021) ग्रामीण विकासातील कंत्राटी पद्धतीतील भ्रष्टाचार हा विशेषतः पायाभूत सुविधा योजनांमध्ये प्रकर्षाने दिसून येतो. निविदा प्रक्रिया पारदर्शक न ठेवता ठराविक ठेकेदारांनाच कामे दिली जातात. निविदांमध्ये संगनमत, खोटी स्पर्धा आणि राजकीय हस्तक्षेप आढळतो. कामाच्या अंमलबजावणीत निकृष्ट साहित्याचा वापर केला जातो, कामाची जाडी, लांबी किंवा प्रमाण कमी ठेवले जाते आणि उरलेला निधी अपहाराच्या स्वरूपात वाटून घेतला जातो. या प्रक्रियेत ठेकेदार, प्रशासकीय अधिकारी आणि राजकीय नेते यांचे साटेलोटे निर्माण होते.

लाचखोरी आणि 'सेवा देण्यासाठी पैसे' ही संस्कृती हा ग्रामीण विकास योजनांतील आणखी एक व्यापक प्रकार आहे. अर्ज स्वीकारणे, लाभ मंजूर करणे, बिल पास करणे किंवा प्रमाणपत्र देणे यांसारख्या कामांसाठी लाभार्थ्यांकडून थेट किंवा अप्रत्यक्ष लाच मागितली जाते. अनेक वेळा गरीब लाभार्थ्यांना मिळणाऱ्या अनुदानातूनच काही रक्कम कापून घेतली जाते. ही पद्धत विशेषतः ग्रामीण भागातील दुर्बल, अशिक्षित आणि महिलांसाठी अत्यंत शोषणात्मक ठरते. कामांच्या देखरेखीतील आणि गुणवत्ता नियंत्रणातील भ्रष्टाचार हा प्रकारही गंभीर आहे. विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी न करता केवळ कागदोपत्री तपासणी केली जाते.

अभियंते, तांत्रिक कर्मचारी किंवा निरीक्षक प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी न जाता अहवाल 'ऑफिसमध्ये बसून' तयार करतात. परिणामी निकृष्ट कामेही मंजूर होतात आणि जबाबदारी ठरवणे अशक्य होते. ग्रामीण विकास योजनांतील सामाजिक लेखापरीक्षणातील भ्रष्टाचार हा तुलनेने दुर्लक्षित पण महत्त्वाचा प्रकार आहे. सामाजिक लेखापरीक्षण दाखवण्यासाठी ग्रामसभा किंवा समित्या औपचारिक स्वरूपात घेतल्या जातात. लाभार्थी यादी, खर्च तपशील आणि कामांची माहिती जनतेसमोर मांडली जात नाही किंवा चुकीच्या स्वरूपात सादर केली जाते. स्थानिक सत्ताधारी किंवा प्रभावशाली गट सामाजिक लेखापरीक्षण प्रक्रियेला नियंत्रित करतात, त्यामुळे ती भ्रष्टाचार उघड करण्याऐवजी झाकण्याचे साधन ठरते. (CAG, Various Years; Chaudhuri, 2018) डिजिटल व्यवस्थेतील भ्रष्टाचार आणि तांत्रिक गैरवापर हा ग्रामीण विकास योजनांतील आधुनिक स्वरूपाचा भ्रष्टाचार आहे. ऑनलाइन नोंदणी, डीबीटी, आधार लिंकिंग यांसारख्या प्रणाली पारदर्शकतेसाठी आणल्या असल्या तरी तांत्रिक ज्ञानाच्या अभावामुळे ग्रामीण लाभार्थी दलालांवर अवलंबून राहतात. काही ठिकाणी बनावट खाती, चुकीची नोंदणी किंवा तांत्रिक त्रुटींचा फायदा घेऊन निधी वळवला जातो. (World Bank, 2017; NITI Aayog, 2021)

एकूणच ग्रामीण विकास योजनांतील भ्रष्टाचाराचे प्रकार केवळ लाचखोरीपुरते मर्यादित न राहता निधी अपहार, लाभार्थी फसवणूक, कंत्राटी संगनमत, प्रशासकीय उदासीनता आणि सामाजिक लेखापरीक्षणाच्या अपयशापर्यंत विस्तारित झालेले दिसून येतात. या सर्व प्रकारांचा एकत्रित परिणाम म्हणजे ग्रामीण विकासाची गती मंदावणे, सामाजिक विषमता वाढणे आणि शासनयंत्रणेवरील जनतेचा विश्वास ढासळणे.

**भ्रष्टाचाराचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम:** ग्रामीण विकास योजनांमधील भ्रष्टाचाराचा सर्वात ठळक आणि थेट परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दिसून येतो. शासन ग्रामीण विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देत असते; मात्र हा निधी अपेक्षित उद्दिष्टांसाठी पूर्णतः वापरला न गेल्यास विकासाची गती मंदावते. भ्रष्टाचारामुळे सार्वजनिक संसाधनांचा अपव्यय होतो, विकासकामांची गुणवत्ता खालावते आणि ग्रामीण भागातील आर्थिक उपक्रमांना आवश्यक ती चालना मिळत नाही. रोजगारनिर्मिती, कृषीपूरक उद्योग, सिंचन सुविधा आणि पायाभूत रचना यांमध्ये अपेक्षित सुधारणा न झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेची उत्पादकता मर्यादित राहते. विशेषतः रोजगार हमी योजना, गृहनिर्माण योजना आणि पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमांमध्ये आढळणारा भ्रष्टाचार ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम घडवून आणतो. कागदोपत्री रोजगार दाखवून प्रत्यक्ष काम टाळले जाते किंवा निकृष्ट दर्जाच्या कामातून तात्पुरता लाभ मिळतो. परिणामी दारिद्र्य निर्मूलनाचे उद्दिष्ट साध्य होत नाही. दीर्घकालीन दृष्टीने पाहता, भ्रष्टाचारामुळे ग्रामीण भागात खासगी गुंतवणूक येण्यास अडथळा निर्माण होतो आणि शाश्वत आर्थिक विकासाची प्रक्रिया खुंटते. (Banerjee & Duflo, 2011; World Bank, 2017)

**भ्रष्टाचाराचा सामाजिक परिणाम:** भ्रष्टाचाराचे सामाजिक परिणाम हे आर्थिक परिणामांपेक्षा अधिक खोलवर आणि दीर्घकालीन असतात. ग्रामीण विकास योजनांचा लाभ जर काही मोजक्या गटांपुरता मर्यादित राहिला, तर सामाजिक विषमता अधिक तीव्र होते. गरीब, दलित, आदिवासी, महिला आणि इतर वंचित घटक योजनांपासून दूर राहतात, ज्यामुळे सामाजिक न्यायाची संकल्पना दुर्बल होते. परिणामी ग्रामीण समाजात असंतोष, नैराश्य आणि सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता निर्माण होते. शिक्षण, आरोग्य आणि पोषण क्षेत्रातील भ्रष्टाचारामुळे मानवी विकासावर गंभीर परिणाम होतो. अंगणवाडी, शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील निधीचा अपहार ग्रामीण बालकांचे पोषण, शिक्षणाची गुणवत्ता आणि आरोग्यसेवा यांवर विपरीत परिणाम करतो. भ्रष्टाचारामुळे नैतिक मूल्यांचा ऱ्हास होतो आणि लाचखोरी ही सामान्य बाब मानली जाऊ लागते. हे सामाजिक अधःपतन ग्रामीण समाजाच्या सुदृढतेसाठी घातक ठरते. (Sen, 1999; Ahuja, 2014)

**भ्रष्टाचाराचा राजकीय आणि प्रशासकीय परिणाम:** ग्रामीण विकास योजनांमधील भ्रष्टाचाराचा राजकीय आणि प्रशासकीय परिणामही तितकाच गंभीर आहे. भ्रष्टाचारामुळे शासनयंत्रणेवरील जनतेचा विश्वास कमी होतो. लोकशाही संस्थांची विश्वासार्हता डळमळीत होते. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा उद्देश लोकाभिमुख विकास साधणे हा असतो; परंतु भ्रष्टाचारामुळे या संस्था निष्प्रभ ठरतात. राजकीय हस्तक्षेपामुळे अनेक वेळा योजनांचा वापर मतदारसंघ मजबूत करण्यासाठी किंवा राजकीय स्वार्थ साधण्यासाठी केला जातो. परिणामी विकास प्रक्रिया राजकीय हेतूंना बळी पडते. प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी राजकीय दबावाखाली काम करतात किंवा स्वतःच्या फायद्यासाठी अधिकारांचा गैरवापर करतात.

**ग्रामीण विकास योजनांमधील भ्रष्टाचार आणि महिला:** ग्रामीण विकास योजनांमधील भ्रष्टाचाराचा महिलांवर विशेषतः विपरीत परिणाम होतो. महिला सक्षमीकरणासाठी राबविल्या जाणाऱ्या योजना अनेक वेळा भ्रष्टाचारामुळे निष्फळ ठरतात. स्वयं-सहायता गट, पोषण योजना, मातृत्व लाभ योजना यांचा लाभ गरजू महिलांपर्यंत पोहोचत नाही. ग्रामीण महिलांचे सामाजिक स्थान आधीच दुय्यम असल्यामुळे भ्रष्ट व्यवस्थेत त्यांचा आवाज अधिक दाबला जातो. योजनांचा लाभ मिळवण्यासाठी महिलांना दलाल, स्थानिक नेते किंवा अधिकारी यांच्यावर अवलंबून राहावे लागते. परिणामी महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया मंदावते आणि लैंगिक असमानता कायम राहते. (NITI Aayog, 2021; World Bank, 2017)

**भ्रष्टाचार आणि ग्रामीण स्थलांतर आणि लोकशाही प्रक्रियेवरील परिणाम:** ग्रामीण विकास योजनांमधील भ्रष्टाचारामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होत नाहीत. त्यामुळे ग्रामीण युवक मोठ्या प्रमाणावर शहरी भागात स्थलांतर करतात. हे स्थलांतर अनेक वेळा असुरक्षित, तात्पुरते आणि शोषणात्मक स्वरूपाचे असते. ग्रामीण भागात विकास झाला असता, तर हे स्थलांतर कमी झाले असते. ग्रामीण स्थलांतरामुळे ग्रामीण समाजाची सामाजिक रचना बदलते. कुटुंबव्यवस्था कमकुवत होते, वृद्ध आणि महिलांवर अधिक भार पडतो. शहरी झोपडपट्ट्यांमध्ये लोकसंख्या वाढते आणि शहरी समस्याही तीव्र होतात. अशा प्रकारे भ्रष्टाचाराचे

दुष्परिणाम केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित राहत नाहीत. लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टीने पाहता, भ्रष्टाचारामुळे जनतेचा सहभाग कमी होतो आणि लोकशाही संस्थांवरील विश्वास ढासळतो. (World Bank, 2017; Sen, 1999)

**निष्कर्ष:** प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासातून असे स्पष्ट होते की ग्रामीण विकासाच्या योजनांवर भ्रष्टाचाराचा परिणाम अत्यंत व्यापक, खोलवर आणि दीर्घकालीन स्वरूपाचा आहे. भ्रष्टाचारामुळे ग्रामीण विकासाची संकल्पना केवळ कागदावरच मर्यादित राहते. आर्थिक संसाधनांचा अपव्यय होतो, सामाजिक विषमता वाढते, लोकशाही संस्थांची विश्वासार्हता कमी होते आणि ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास खुंटतो. भ्रष्टाचार ही केवळ प्रशासकीय किंवा आर्थिक समस्या नसून ती एक सामाजिक समस्या आहे. तिची मुळे सामाजिक रचना, सत्तासंबंध, नैतिक मूल्यांचा ऱ्हास आणि संस्थात्मक कमकुवतपणात दडलेली आहेत. त्यामुळे भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवण्यासाठी केवळ कायदेशीर उपाय पुरेसे ठरत नाहीत; सामाजिक जागरूकता, लोकसहभाग आणि मूल्याधिष्ठित प्रशासन आवश्यक आहे.

**शिफारशी:** ग्रामीण विकास योजनांमधील भ्रष्टाचार रोखण्यासाठी सर्वप्रथम पारदर्शकता वाढवणे आवश्यक आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून निधी वितरण, लाभार्थी निवड आणि कामांच्या प्रगतीची माहिती सार्वजनिक करणे गरजेचे आहे. सामाजिक लेखापरीक्षण आणि लोकसहभाग वाढविल्यास विकास प्रक्रिया अधिक उत्तरदायी होऊ शकते. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण करून त्यांच्यावर प्रभावी देखरेख यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. यासोबतच, प्रशासकीय सुधारणा करून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये नैतिकता आणि सेवाभावाची भावना बळकट करणे गरजेचे आहे. भ्रष्टाचारविरोधी कायद्यांची कठोर अंमलबजावणी, दोषींना त्वरित शिक्षा आणि तक्रारदारांचे संरक्षण या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. ग्रामीण जनतेमध्ये हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे ही दीर्घकालीन उपाययोजना ठरते.

**संदर्भ सूची:**


1. Ahuja, R. (2014). Social problems in India (2nd ed.). Rawat Publications.
2. Banerjee, A. V., & Duflo, E. (2011). Poor economics: A radical rethinking of the way to fight global poverty. Public Affairs.
3. Chaudhuri, S. (2018). Governance and corruption in rural development programmes in India. Indian Journal of Public Administration, 64(3), 421-436.
4. Comptroller and Auditor General of India. (Various years). Performance audit reports on rural development programmes. GoI.
5. Government of India. (2020). Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act (MGNREGA): Operational guidelines. Ministry of Rural Development.
6. Government of India. (2023). Annual report. Ministry of Rural Development.
7. IGNOU. (2019). MRD-101: ग्राम विकास – भारतीय संदर्भ. इग्नू ई-ज्ञानकोश.
8. IGNOU. (2020). MRD-201: ग्रामीण विकास – संकल्पना व प्रक्रिया. इग्नू ई-ज्ञानकोश.
9. Khan, M. H. (2006). Governance, economic growth and development since the 1960s. UN DESA Working Paper No. 54.
10. Myrdal, G. (1968). Asian drama: An inquiry into the poverty of nations. Pantheon Books.
11. NITI Aayog. (2021). Evaluation study on rural development schemes. Government of India.
12. Planning Commission. (2013). Twelfth five year plan (2012–2017): Faster, more inclusive and sustainable growth. Government of India.
13. Rose-Ackerman, S., & Palifka, B. J. (2016). Corruption and government: Causes, consequences, and reform (2nd ed.). Cambridge University Press.
14. Sen, A. (1999). Development as freedom. Oxford University Press.


# ग्रामीण समाजातील जातपंचायती: परंपरा आणि आधुनिकता यामधील संघर्ष

**आकांक्षा भूषण कांबळे** पीएच.डी. संशोधक विद्यार्थी, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

**गोषवारा:** ग्रामीण भारतीय समाजात आधुनिक न्यायालयीन व्यवस्था अस्तित्वात असतानाही जातपंचायती व तत्सम अनौपचारिक संस्था आजही प्रभावीपणे कार्यरत आहेत. या संस्था मुळात स्थानिक पातळीवरील वाद मिटवण्यासाठी आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी उदयास आल्या होत्या. मात्र सामाजिक परिवर्तन, शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य आणि आंतरजातीय विवाह यामुळे परंपरागत जातनियमांना आव्हान मिळाले. परिणामी अनेक ठिकाणी जातपंचायती मध्यस्थीऐवजी सामाजिक नियंत्रण व दंडात्मक यंत्रणा म्हणून कार्य करू लागल्या आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण समाजातील जातपंचायतीचे बदलते स्वरूप आणि परंपरा व आधुनिकता यामधील संघर्षाचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात आला आहे. विशेषत: जातपंचायतीद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षांमध्ये सामाजिक बहिष्कार, हिंसा आणि प्रतिष्ठेसाठी हत्या (ऑनर किलिंग) यांचा समावेश करून त्यांचे सामाजिक परिणाम विश्लेषित केले आहेत. हा अभ्यास दुय्यम स्रोतांवर आधारित असून सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्यांच्या संदर्भात या समांतर न्यायव्यवस्थेचे चिकित्सक परीक्षण करण्यात आले आहे.

**कूट शब्द:** जातपंचायती, ग्रामीण समाज, सामाजिक बहिष्कार, परंपरा आणि आधुनिकता, समांतर न्यायव्यवस्था, प्रतिष्ठेसाठी हत्या, सामाजिक नियंत्रण, संविधानिक मूल्ये

**प्रस्तावना:** भारतीय ग्रामीण समाजातील सामाजिक रचना परंपरागत आणि जातव्यवस्थेवर आधारित आहे. प्रत्येक गावामध्ये समाजाचे नियम, आचारसंहिता, विवाहपद्धती आणि व्यवसाय अस्तित्वात असली तरीही गावाच्या दैनंदिन जीवनातील वादविवाद आणि सामाजिक सलोखा राखावयाचे काम प्रामुख्याने स्थानिक पातळीवरील जातपंचायतीवर अवलंबून राहिले आहे. या अनौपचारिक संस्थांचा मुख्य उद्देश सुरुवातीला सामाजिक नियंत्रण ठेवणे, वाद मिटवणे आणि परस्पर सुसंवाद टिकवणे असा होता.

सामाजिक परिवर्तन शिक्षणाचा प्रसार, स्त्री स्वातंत्र्य, आंतरजातीय विवाह आणि संविधानिक मूल्यांच्या प्रभावामुळे या परंपरागत संस्थांवर दबाव निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी जातपंचायतीचे स्वरूप बदलून ती दंडात्मक आणि नियंत्रणकारी यंत्रणा बनली आहे. सामाजिक बहिष्कार, आर्थिक दंड, अपमान किंवा हिंसा यासारख्या शिक्षांच्या माध्यमातून लोकांचे वर्तन समाजाच्या अपेक्षांनुसार नियंत्रित केले जाते. टोकाच्या परिस्थितीत या शिक्षांमध्ये प्रतिष्ठेसाठी हत्येसारखे गंभीर प्रकरणेदेखील घडतात जे समांतर न्यायव्यवस्थेचे हिंसक रूप मानले जाते. जातपंचायतींचा ग्रामीण समाजावर असलेला प्रभाव, स्थानिक सामाजिक संरचना, परंपरा आणि आधुनिक मूल्यांमधील संघर्षाचे स्पष्ट उदाहरण आहे. या संस्थांनी स्थानिक न्यायव्यवस्थेची जागा घेतल्यामुळे व्यक्ती व समुदाय यांच्यातील सामंजस्य, सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्ये अनेकदा धोक्यात येतात. त्यामुळे या संशोधनात ग्रामीण समाजातील जातपंचायतीच्या बदलत्या स्वरूपाचा, त्यांच्या शिक्षांचा आणि परंपरा व आधुनिकतेतील संघर्षाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सखोल अभ्यास केला गेला आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** भारतीय समाजरचनेत जातिव्यवस्था ही केवळ सामाजिक स्तरविभागणी नसून ती सत्ता, नियंत्रण आणि वर्चस्व टिकवून ठेवणारी रचना आहे. या संदर्भात विविध समाजशास्त्रज्ञांनी जात, सामाजिक बहिष्कार, अनौपचारिक संस्था आणि प्रतिष्ठेसाठी होणाऱ्या हिंसाचारावर महत्त्वपूर्ण अभ्यास केलेले आहेत. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** (१९३६) यांनी 'जातिव्यवस्थेचे उच्चाटन' या ग्रंथात जात ही सामाजिक विषमता टिकवून ठेवणारी संस्था असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, जातीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर बहिष्कार, अपमान व आर्थिक-सामाजिक दंड लादून सामाजिक नियंत्रण राखले जाते. हे विचार जातपंचायतींच्या भूमिकेला वैचारिक चौकट प्रदान करतात. **एम. एन. श्रीनिवास** (१९९५) यांनी ग्रामीण समाजातील परंपरा, रूढी आणि अनौपचारिक संस्थांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. *Dominant Caste* या संकल्पनेद्वारे त्यांनी ग्रामीण समाजातील सत्ताकेंद्रे आणि स्थानिक नेतृत्व कसे कार्यरत असते हे स्पष्ट केले आहे. अनेकदा कायदेशीर यंत्रणेपेक्षा परंपरागत संस्था अधिक प्रभावी ठरतात, असे त्यांचे निरीक्षण आहे. **ए. आर. देसाई** (२००५) यांनी ग्रामीण समाजातील आर्थिक विषमता, जातीय वर्चस्व आणि सत्तासंबंध यांचा अभ्यास केला असून, ग्रामपातळीवरील निर्णयप्रक्रिया प्रामुख्याने सत्ताधारी गटांच्या हितसंबंधांना पूरक ठरते, असे नमूद केले आहे. यामध्ये दलित, स्त्रिया व दुर्बल घटकांना वगळले जाते. समकालीन अभ्यासांनुसार आंतरजातीय विवाह आणि प्रेमविवाहांना अनेक ग्रामीण भागांत सामाजिक अपराध मानले जाते. सामाजिक प्रतिष्ठा आणि 'इज्जत' जपण्यासाठी कुटुंब व समुदायाकडून हिंसाचार केला जातो. NCRB च्या अहवालांतून प्रतिष्ठेसाठी होणाऱ्या हत्यांमध्ये सामाजिक दबाव आणि स्थानिक समुदायाची भूमिका स्पष्ट होते.

वरील साहित्याच्या आढाव्यातून असे दिसून येते की जातिव्यवस्था, सामाजिक बहिष्कार आणि ऑनर किलिंग यांवर स्वतंत्र अभ्यास झालेले असले, तरी ग्रामीण महाराष्ट्राच्या संदर्भात जातपंचायती, सामाजिक बहिष्कार आणि प्रतिष्ठेसाठी होणाऱ्या हिंसाचार यांचा परस्परसंबंध अभ्यासणारे संशोधन मर्यादित आहे. त्यामुळे सदर संशोधन हा अभ्यासातील महत्त्वाचा रिकामा अवकाश भरून काढण्याचा प्रयत्न करते.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) ग्रामीण समाजातील जातपंचायतीचे बदलते स्वरूप समजून घेणे. २) जातपंचायतीद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षांचा (सामाजिक बहिष्कार, दंड, हिंसा, ऑनर किलिंग) समाजशास्त्रीय अभ्यास करणे. ३) सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्यांच्या दृष्टीने परंपरा व आधुनिकता यांमधील संघर्ष स्पष्ट करणे. ४) ग्रामीण भागातील समाजावर जातपंचायतींचा प्रभाव आणि व्यक्तींच्या जीवनातील परिणाम तपासणे. ५) सामाजिक सुधारणा, जागृती आणि राज्यव्यवस्थेच्या सशक्तीकरणासाठी उपाय सुचवणे.

**गृहितके:** १) जातपंचायती हे मुख्यत्वे सामाजिक नियंत्रण आणि परंपरागत मूल्ये टिकवण्यासाठी कार्यरत आहेत. २) जातपंचायतीद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षांमध्ये सामाजिक बहिष्कार, हिंसा आणि प्रतिष्ठेसाठी हत्यारांचा समावेश आहे. ३) परंपरा आणि आधुनिकतेमधील संघर्ष हा जातपंचायतीच्या शिक्षांच्या कठोरतेस कारणीभूत ठरतो. ४) राज्यव्यवस्था आणि न्यायालयीन प्रक्रिया उपलब्ध असूनही ग्रामीण समाजात जातपंचायतीचा प्रभाव टिकून राहतो. कारण सामाजिक दबाव आणि नैतिक व्यवहार अधिक प्रभावी ठरतात.

**संशोधन पद्धती:**

**१. संशोधनाचा प्रकार:** वर्णनात्मक (*Descriptive)* व विश्लेषणात्मक (*Analytical)* संशोधन आराखड्याचा वापर केला आहे.

**२. तथ्य संकलन:** प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम स्रोतांवर आधारित असून विषयाशी संबंधित प्रकाशित ग्रंथ, शासकीय अहवाल (*Government Reports),* न्यायालयीन निकाल, वर्तमानपत्रे, मासिके, सामाजिक विज्ञान, संशोधन लेख, क्षेत्रीय उदाहरणे (*Case Studies)* समाज माध्यमातून आलेले विशिष्ट प्रकरणे आणि आंतरजालावरील माहितीचा वापर केला आहे.

**जातपंचायतींचा ऐतिहासिक विकास व बदल:**

**जातपंचायतींचा उदय व पारंपरिक भूमिका:** भारतीय ग्रामीण समाजात जातपंचायतींचा इतिहास प्राचीन आहे. राज्यव्यवस्था अस्तित्वात नसताना गाव हे स्वायत्त सामाजिक व आर्थिक एकक मानले जात असे. या काळात वाद मिटवणे, सामाजिक सलोखा राखणे आणि संसाधनांवरील तंटे टाळणे या उद्देशासाठी जातपंचायती उदयास आल्या. प्रत्येक जातीत सदस्यांचे वर्तन आणि आचारसंहिता पाळले जात होते आणि त्याचे उल्लंघन झाल्यास पंचायतकडून मार्गदर्शन किंवा सुसंवादाद्वारे सुधारणा केली जात असे. पारंपरिक काळात जातपंचायतींचे स्वरूप मध्यस्थी आणि सल्लागार यंत्रणा म्हणून होते. या संस्थेचा उद्देश समाजातील सदस्यांमध्ये विश्वास निर्माण करणे आणि विवादाचे शांततामय निराकरण करणे असा होता. न्यायालयीन प्रक्रियेच्या तुलनेत स्थानिक न्याय जलद, सोपा व खर्च कमी होता. त्यामुळे ग्रामीण समाजाने या संस्थांना जवळचे, व्यवहार्य आणि स्वीकारार्ह न्यायव्यवस्थेचा पर्याय म्हणून मान्यता दिली.

**आधुनिक काळातील बदल:** स्वातंत्र्यानंतर सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात मोठा बदल झाला. शिक्षणाचा प्रचार, स्त्रियांचा सार्वजनिक जीवनात सहभाग, आंतरजातीय विवाह, संविधानिक मूल्ये यामुळे परंपरागत जातनियमांवर प्रश्न निर्माण झाला. या बदलांमुळे जातपंचायतींचे स्वरूप बदलले. स्थानिक न्याय देण्याऐवजी लोकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवले गेले. गावातून हद्दपार, आर्थिक व्यवहारांपासून वंचित ठेवणे, देवस्थानातून वगळणे यासारखे उपाय सुरू झाले.

**हिंसा आणि टोकाचे उपाय**: काही प्रकरणांमध्ये प्रतिष्ठेसाठी हत्या (ऑनर किलिंग) सारखे हिंसक प्रकार घडू लागले. यामुळे जातपंचायती हळूहळू समांतर न्यायव्यवस्थेचे स्वरूप धारण करू लागल्या. या जातपंचायती ग्रामीण समाजात परंपरागत मूल्ये टिकण्याचे व आधुनिक मूल्यांविरुद्ध विरोध करण्याचे कार्य सध्या करू लागल्या आहेत. याचा परिणाम असा झाला की, १) समाजातील स्त्रिया, दलित आणि विवाहविषयक निर्णय घेणारे सदस्य यावर या जातपंचायतीकडून विशेष दबाव निर्माण झाला. २) राज्यव्यवस्था व न्यायालयीन प्रक्रियेचा प्रभाव मर्यादित झाला. ३) सामाजिक न्याय, मानवाधिकार व संविधानिक मूल्यांसमोर आव्हाने निर्माण झाली.

**भारतात जातपंचायती: अस्तित्व आणि स्थानिक नावे** भारताच्या ग्रामीण भागात जातपंचायती आजही व्यापक प्रमाणात अस्तित्वात आहेत. विशेषत: उत्तर भारत, पश्चिम भारत आणि काही दक्षिण भारतातील राज्ये. या संस्थाचा मुख्य उद्देश स्थानिक स्तरावर समाजातील वाद मिटवणे, आचारसंहिता पाळणे आणि सामाजिक सलोखा राखणे असा आहे. तरीही सामाजिक बदल आणि आधुनिक मूल्यांच्या प्रभावामुळे काही ठिकाणी ही संस्था दंडात्मक व नियंत्रणकारी स्वरूपात रुपांतरित झाली आहे.

**१) उत्तर भारत**: हरियाणा, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार या राज्यातील खाप पंचायत (Khap Panchayat) हे सर्वात जास्त परिचित उदाहरण आहे. खाप पंचायती ही जाती किंवा उपजातीच्या पारंपरिक नेत्यांनी गठीत केलेली संस्था आहे. या खाप पंचायतीत विवाहविषयक निर्णय आचारसंहिता उल्लंघन, सामाजिक बहिष्कार हे मुख्य मुद्दे दिसून येतात.

**२) पश्चिम भारत (महाराष्ट्र, गुजरात)**: महाराष्ट्रातील काही गावांमध्ये ग्रामपंचायती किंवा जातपंचायती यांचे पारंपरिक स्वरूपात अस्तित्व आहे. गावातील कुटुंबीयांच्या वर्तनावर आणि विवाहविषयक निर्णयांवर नियंत्रण ठेवणे हा यांचा प्रमुख हेतू असतो. काही ठिकाणी ऑनर किलिंगच्या प्रकरणांचे संदर्भ समोर आले आहेत.

**३) दक्षिण भारत (उत्तर कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू)**: गावात जातीय नेत्यांद्वारे घेतल्या जाणाऱ्या पंचायत (Caste Panchayat). स्थानिक समाजरचना आणि परंपरेनुसार न्यायनिर्णय होतात.

**स्थानिक नावे:**

* खाप पंचायत (*Khap Panchayat)* उत्तर भारतातील प्रसिद्ध स्वरूप
* ग्रामपंचायती (*Gram Panchayat/Caste Panchayat)* महाराष्ट्र, गुजरात व काही दक्षिण राज्ये.
* जातीपंचायत (*Caste Panchayat/Samaj Panchayat)* अनेक राज्यांमध्ये स्थानिक स्वरूप
* बिरादरी पंचायत (*Biradari Panchayat)* काही उत्तर आणि पश्चिम भारतात.

विशेष बाब या सर्व संस्थांचा सामायिक गुण म्हणजे जाती किंवा उपजातीच्या स्तरावर सामाजिक नियंत्रण राखणे. विविध राज्यांमध्ये त्यांचे नाव वेगळे असले तरी कार्यपद्धती आणि उद्देश साम्यपूर्ण आहे. आधुनिक काळात या संस्थांचा प्रभाव काही ठिकाणी सामाजिक बहिष्कार, हिंसा आणि प्रतिष्ठेसाठी हत्या (ऑनर किलिंग) सारख्या घटनांमध्ये दिसून येतो.

**जातपंचायतीद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षा (सामाजिक बहिष्कार व प्रतिष्ठेसाठी होणाऱ्या हत्या):** वर्तमान काळात जातपंचायतींद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षामध्ये सामाजिक बहिष्कार आणि प्रतिष्ठेसाठी हत्या (ऑनर किलिंग) हे दोन अत्यंत गंभीर स्वरूप आढळतात. सामाजिक बहिष्काराच्या माध्यमातून व्यक्ती किंवा कुटुंबाला गावातीला धार्मिक, सामाजिक व आर्थिक व्यवहारापासून दूर ठेवले जाते. ज्यामुळे त्यांचे जीवन असह्य बनते. राजस्थान (जालोट), मध्यप्रदेश (रायसेन), उत्तर प्रदेश (बुंदेलखंड) आणि महाराष्ट्र (बीड) येथील अलीकडील घटनांमध्ये आंतरजातीय विवाह, प्रेमविवाह किंवा परंपरेच्या विरोधातील संबंध यामुळे जातपंचायतींनी आर्थिक दंड, समाजातून हद्दपारी आणि सामाजिक संबंध तोडण्याचे निर्णय घेतल्याचे दिसून येते. या सामाजिक बहिष्काराचा टोकाचा आणि हिंसक प्रकार म्हणजे प्रतिष्ठेसाठी हत्या, तमिळनाडूतील चैन्नई परिसरातील प्रकरणात आंतरजातीय विवाहामुळे दलित युवकाची हत्या झाली हे प्रतिष्ठेच्या नावाखाली दिल्या जाणाऱ्या शिक्षेचे गंभीर उदाहरण आहे. २० वर्षीय सक्षम ताटे याला त्याच्या आंतरजातीय प्रेमसंबंधामुळे नांदेड जिल्ह्यातील प्रेमिकेच्या कुटुंबीयांनी गोळी मारून टाईल्सने ठार मारले. हे प्रकरण ऑनर किलिंगचे गंभीर उदाहरण आहे. अशा हत्या बहुतेकदा जातपंचायतीच्या थेट किंवा अप्रत्यक्ष दबावातून घडतात आणि त्या कुटुंबाची व जातीची प्रतिष्ठा जपण्याच्या नावाखाली योग्य ठरवल्या जातात. देशपातळीवर उत्तर भारत व दक्षिण भारतात अशा घटनांचे प्रमाण दिसून येते. तर महाराष्ट्रातील नांदेड, बीड, अहमदनगर, सोलापूर यासारख्या जिल्ह्यांमधूनही प्रतिष्ठेसाठी हत्येची प्रकरणे समोर आली आहेत.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता सामाजिक बहिष्कार आणि ऑनर किलिंग या दोन्ही शिक्षांमुळे जातपंचायती समांतर न्यायव्यवस्थेप्रमाणे कार्य करत असल्याचे स्पष्ट होते. या शिक्षांमुळे व्यक्तिस्वातंत्र्य, मानवी हक्क आणि संविधानिक मूल्यांचे गंभीर उल्लंघन होत असून ग्रामीण समाजात भय, नियंत्रण आणि असमानता अधिक दृढ होत आहे.

**निष्कर्ष:** ग्रामीण समाजातील जातपंचायती या सुरुवातीला सलोखा राखण्यासाठी अस्तित्वात आल्या असल्या तरी कालांतराने त्या दडपशाहीच्या आणि समांतर न्यायव्यवस्थेच्या स्वरूपात विकसित झाल्या आहेत. सामाजिक बहिष्कार ही जातपंचायतीची सर्वाधिक वापरली जाणारी शिक्षा असून ती व्यक्ती व कुटुंबाच्या सामाजिक, आर्थिक व मानसिक जीवनावर गंभीर परिणाम घडवते. सामाजिक बहिष्कारातूनच अनेक वेळा प्रतिष्ठेसाठीच्या हत्या (ऑनर किलिंग) या टोकाच्या हिंसक घटना उद्भवताना दिसतात. आंतरजातीय

विवाह, प्रेमविवाह आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा निर्णय हे बहिष्कार व हिंसेची प्रमुख कारणे ठरतात. महाराष्ट्रासह भारतातील विविध राज्यातील समकालीन उदाहरणे हे दाखवलात की या प्रथा आजही ग्रामीण समाजात सक्रिय आहेत. जातपंचायतीचे निर्णय संविधानिक मूल्ये, मानवी हक्क आणि कायद्याच्या राज्याच्या संकल्पनेला थेट आव्हान देतात. या प्रक्रियेमुळे ग्रामीण समाजात भय, असमानता आणि सामाजिक नियंत्रण अधिक दृढ होते. त्यामुळे जातपंचायतीद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षांकडे केवळ परंपरा म्हणून न पाहता त्यांचा गंभीर सामाजिक प्रश्न म्हणून विचार करणे आवश्यक आहे.

**शिफारशी:** कायदेशीर अंमलबजावणी अधिक कठोर करणे, सामाजिक बहिष्कार व प्रतिष्ठेसाठी होणाऱ्या हत्या विरोधातील विद्यमान कायद्यांची (IPC, SC/ST अत्याचार प्रतिबंधक कायदा इत्यादी) प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. जातपंचायतीच्या निर्णयांना वैधता न देणे. कोणत्याही प्रकारच्या जातपंचायती किंवा समाज पंचायतीच्या निर्णयांना कायदेशीर मान्यता देऊ नये तसेच अशा निर्णयांवर त्वरीत प्रशासकीय कारवाई व्हावी. ग्रामीण भागात सामाजिक प्रबोधन - ग्रामीण समाजात संविधानिक मूल्ये, व्यक्तिस्वातंत्र्य, आंतरजातीय विवाह आणि लैंगिक असमानता याबाबत सातत्याने जनजागृती कार्यक्रम राबवावेत. पीडितांसाठी संरक्षण व पुनर्वसन व्यवस्था - सामाजिक बहिष्कार किंवा प्रतिष्ठेसाठी हत्येच्या धोक्यात असलेल्या व्यक्ती व जोडप्यांसाठी सुरक्षित निवारा, कायदेशीर मदत आणि आर्थिक पुनर्वसनाची व्यवस्था मजबूत करावी. शिक्षण व सामाजिक बदल - शिक्षण व्यवस्थेतून जातव्यवस्था, सामाजिक अन्याय आणि मानवी हक्क याविषयी चिकित्सक दृष्टिकोन विकसित करणे गरजेचे आहे. संशोधन व दस्तऐवजीकरण: सामाजिक बहिष्कार व प्रतिष्ठेसाठी हत्याच्या (ऑनर किलिंग) घटनांचे पद्धतशीर दस्तऐवजीकरण करून धोरणात्मक हस्तक्षेपासाठी संशोधनाला चालना द्यावी.

एकूणच पाहता ग्रामीण समाजातील जातपचायतींद्वारे दिल्या जाणाऱ्या सामाजिक बहिष्कार व प्रतिष्ठेसाठीच्या हिंसक शिक्षांमधून परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील तीव्र संघर्ष स्पष्ट होतो. या प्रथा लोकशाही, संविधानिक मूल्ये आणि मानवी हक्क यांना बाधा पोहोचवतात. त्यामुळे जातपंचायतीच्या कार्यपद्धतीकडे समाजशास्त्रीय आणि कायदेशीर दृष्टीने गांभीर्याने पाहणे आज अत्यावश्यक झाले आहे.

**संदर्भ ग्रंथसूची:**


१. Ambedkar, B. R. (2014). Annihilation of caste. New Delhi, India: Navayana. (मूळ लेखन 1936)
२. Desai, A. R. (2005). Rural sociology in India (6th ed.). Mumbai, India: Popular Prakashan.
३. Srinivas, M. N. (1995). Social change in modern India. New Delhi, India: Orient Longman.
४. Navbharat Times. (2024). Social boycott and fine imposed over live-in relationship in Jalore, Rajasthan. Navbharat Times. Retrieved from https://navbharattimes.indiatimes.com
५. The Print. (2024). MP man alleges social ostracism after panchayat orders boycott for eating at Dalit's house. The Print. Retrieved from https://theprint.in
६. The New Indian Express. (2025). Social boycott and Rs. 20 lakh fine imposed over inter-caste marriage in Uttar Pradesh. The New Indian Express. Retrieved from https://www.newindianexpress.com
७. Deccan Chronicle. (2024). Caste panchayat members booked for social boycott in Beed district, Maharashtra. Deccan Chronicle. Retrieved from https://www.deccanchronicle.com
८. Navbharat Times. (2024). Nanded honour killing case: Inter-caste relationship leads to murder of Saksham Tate. Navbharat Times. Retrieved from https://navbharattimes.indiatimes.com
९. The Times of India. (2025). Inter-caste couple alleges social boycott in Tamil Nadu. The Times of India. Retrieved from https://timesofindia.indiatimes.com
१०. Government of India. (1860). The Indian Penal Code. New Delhi, India: Ministry of Law and Justice.
११. Government of India. (1989). The Scheduled Castes and the Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act. New Delhi, India: Ministry of Law and Justice.
१२. National Crime Records Bureau. (2023). Crime in India 2022. New Delhi, India: Ministry of Home Affairs.
१३. Wikipedia contributors. (2024). Honor killing in India. In Wikipedia. Retrieved from https://en.wikipedia.org


# भारतातील काळा पैसा: एक समाजशास्त्रीय विश्लेषण

**प्रा. प्रकाश साहेबराव काळवणे** समाजशास्त्र विभाग, महिला कला महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर.

**गोषवारा:** काळा पैसा ही भारतातील एक गंभीर सामाजिक, आर्थिक व नैतिक समस्या असून तिचा परिणाम समाजरचना, सामाजिक न्याय, विषमता आणि प्रशासनावर मोठ्या प्रमाणात दिसून येतो. उत्पन्न लपविणे, करचुकवेगिरी, भ्रष्टाचार, राजकीय गैरव्यवहार, अनधिकृत व्यवहार व सावली अर्थव्यवस्था (*Shadow Economy*) यांच्या माध्यमातून काळ्या पैशाची निर्मिती व प्रसार होतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, काळा पैसा हा केवळ आर्थिक गुन्हा नसून तो सामाजिक मूल्यांच्या ऱ्हासाशी, सत्तेच्या गैरवापराशी, वर्गविषमतेशी आणि संस्थात्मक अपयशाशी संबंधित आहे. भारतीय समाजातील वर्गरचना, राजकारण - अर्थव्यवस्था संबंध, नोकरशाही, निवडणूक प्रक्रिया व सांस्कृतिक सहिष्णुता या घटकांमुळे काळ्या पैशाला पोषक वातावरण निर्माण झालेले आहे. या अभ्यासात काळ्या पैशाची सामाजिक कारणे, परिणाम व समाजावर होणारे दुष्परिणाम - जसे की, सामाजिक विषमता वाढ, गरीब-श्रीमंत दरी, कायद्यावरील अविश्वास आणि लोकशाही मूल्यांचा ऱ्हास - यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच, काळा पैसा

रोखण्यासाठी शासनाने राबविलेल्या उपाययोजना आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याची गरज यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे.

**कीवर्ड्स:** काळा पैसा, समाजशास्त्रीय विश्लेषण, भ्रष्टाचार, करचुकवेगिरी, सामाजिक विषमता, सावली अर्थव्यवस्था, सत्तेचा गैरवापर, राजकीय भ्रष्टाचार, सामाजिक मूल्यांचा ऱ्हास, भारतीय समाज

**प्रस्तावना:** काळा पैसा या संज्ञेची अधिकृत व्याख्या जरी कोणत्याही भारतीय कायद्यात थेट केली गेली नसली तरी ज्या पैसांवर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कर भरलेला नसतो त्या पैसाला काळा पैसा असे संबोधले जाते. काळा पैसा म्हणजे अनधिकृत मार्गाने मिळवलेली संपत्ती होय. सहसा ही संपत्ती भ्रष्टाचार, करबुडवणूक, बेकायदा व्यापार, इत्यादी मार्गांनी मिळवली जाते.काळा पैसा (*Black Money)* म्हणजे अशी बेहिशेबी मालमत्ता किंवा उत्पन्न, ज्यावर सरकारला कायदेशीर कर (*Tax*) भरलेला नसतो. हा पैसा सामान्यतः भ्रष्टाचार, करचोरी, तस्करी किंवा बेकायदेशीर व्यवहारांतून कमावला जातो. असा पैसा अधिकृत आर्थिक व्यवस्थेच्या बाहेर ठेवला जातो, ज्यामुळे सरकारला महसूल मिळत नाही आणि देशात 'समांतर अर्थव्यवस्था' निर्माण होते. काळा पैसा म्हणजे बेकायदेशीर कृत्यांमधून मिळवलेले उत्पन्न किंवा कायदेशीर उत्पन्न जे कर उद्देशांसाठी घोषित केले जात नाही. काळ्या पैशामुळे अर्थव्यवस्थेत भ्रष्टाचार वाढू शकतो आणि आर्थिक अस्थिरता निर्माण होऊ शकते कारण त्याची नोंद केली जात नाही. हे बहुतेकदा रोखीने व्यवहार केले जाते आणि त्यामुळे आर्थिक गळती होऊ शकते, ज्यामुळे सरकार सार्वजनिक सेवांसाठी आवश्यक असलेल्या कर महसुलापासून वंचित राहू शकते. जरी काळा पैसा प्रतिबंधात्मक किंवा अप्रभावी कायदेशीर व्यवस्था असलेल्या वातावरणात निर्माण होऊ शकतो, तरीही तो बेकायदेशीर राहतो आणि त्यात लक्षणीय आर्थिक, कायदेशीर आणि सामाजिक धोके असतात.

काळा पैसा बहुतेकदा मनी लाँडरिंग क्रियाकलापांशी जोडला जातो, ज्यासाठी कठोर फौजदारी दंड आणि जागतिक नियामक अंमलबजावणी आवश्यक असते. अवैधरित्या गोळा केलेला असा पैसा की, ज्याची शासनदरबारी कोणतीही नोंद नसते. भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाने २०१२ मध्ये काढलेल्या श्वेतपत्रिकेमध्ये काळ्या पैशाची व्याख्या करताना म्हटले आहे की, काळा पैसा जो धारण करण्याच्या हातात वैध नाही आणि सरकारच्या थकबाकीच्या स्वरूपात रकमेची भरपाई करण्यास अयशस्वी ठरला आहे. तसेच नॅशनल इंस्टिट्युट ऑफ सायन्स अँड पॉलिसी अनुसार, काळा पैसा अशा प्रकारचे उत्पन्न असते की, ज्यावर कर देणे आवश्यक ठरते; परंतु या उत्पन्नाची माहिती कर विभागाला दिली जात नाही. काळा पैसा हा अपहरण, तस्करी, ड्रग्ज, अवैध खाणकाम, घोटाळे, लाच देणे-घेणे इत्यादी कारणांमुळे काळा पैसा निर्माण होतो. काळ्या पैशांमध्ये जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार, सराफा व दागिन्यांचे व्यवहार, वित्तीय बाजारामधील व्यवहार, सार्वजनिक खरेदीचे व्यवहार (उदा., सार्वजनिक निविदातील व्यवहार, संरक्षण आयातीतील व्यवहार इत्यादी), गैर नफा क्षेत्रातील व्यवहार (उदा., शिक्षण संस्था, सार्वजनिक आरोग्य इत्यादी), अनौपचारिक क्षत्रातील रोख व्यवहार इत्यादींचा समावेश होतो.

**काळ्या पैशांचे प्रकार :** काळ्या पैशाचे दोन प्रकार समजले जातात. १) जो पैसा अवैधरित्या कमाविलेला आहे. उदा., खंडणी, तस्करी, भ्रष्टाचार इत्यादी मार्गाने. २) जो पैसा वैधरित्या कमाविलेला आहे; परंतु ज्यावर स्थानिक, राज्य व केंद्र सरकारला देय असणारा कर दिला गेलेला नाही. भारतात व इतर देशांतही काळ्या पैशांसंदर्भात असणाऱ्या या दोन्ही संकल्पनांची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. सरकारला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कर या काळ्या पैशांतून मिळत नाही. या पैशांची प्रत्यक्ष वास्तविक मोजमाप करणे कठीणच असते. काळा पैशांच्या संदर्भात काळा पैसा आणि काळे धन या दोन बाबी समजून घेणे आवश्यक आहे. १) काळा पैसा हा पैशाच्या स्वरूपात साठविला जातो. २) काळ्या धनाचे रूपांतर संपत्तीमध्ये केले जाते. उदा., जमीन खरेदी, सोने, दागिने खरेदी, अधिकोषामध्ये बेनामी गुंतवणूक करणे इत्यादी. हा काळा पैसा देशात व देशांबाहेरसुद्धा गुंतविला जातो आणि त्याचे रूपांतर वैध किंवा पांढऱ्या पैशांत केले जाते. काळा पैसा अवैधरित्या धारण केला जाऊन तो सरकारपासून लपविला जातो.

**संशोधनाची उद्दिष्टे**: १) काळा पैशांची व्याख्या आणि अर्थ जाणून घेणे. २) भारतातील काळ्या पैशाची मुख्य कारणे समजून घेणे. ३) काळ्या पैशावर कायदेशिर उपाययोजना सूचवीणे.

**काळ्या पैशांची आकडेवारी:** ब्रिटीश अर्थतज्ज्ञ निकोलस यांनी १९५६ मध्ये सर्वप्रथम काळा पैसा मोजण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर भारतात १९७१ मध्ये 'वांछू प्रत्यक्ष संहिता चौकशी समिती' (वांछू डायरेक्ट टॅक्स इन्क्वायरी कमिटी) नेमण्यात आली. या समितीच्या अभ्यासानुसार १९६१-६२ मध्ये ७०० कोटी, १९६५ मध्ये १, ००० कोटी इतका काळा पैसा अर्थव्यवस्थेमध्ये होता. अनुक्रमे एकूण जीडीपीच्या ३.७ टक्के आणि ३.४ टक्के काळा पैसा होता. त्यानंतर अर्थतज्ज्ञ ओ. पी. चोप्रा यांनी काळ्या पैशांसंदर्भात आकडेवारी सादर केली. नंतर १९८५ मध्ये केंद्रीय अर्थमंत्रालयाने नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ पब्लिक फायनन्स अँड पॉलिसी (एनआयपीएफपी) ही संस्था स्थापन करून अध्यक्ष शंकर आचार्य यांनी काळ्या पैशांची मोजणी केली. या अभ्यासगटाने काळा पैसा हा तस्करी, अतिक्रमण, भ्रष्टाचार, गुन्हेगारी कृत्य यांतून निर्माण होत असल्याचे सुचविले. काळा पैसा २०१४ मध्ये वाढून तब्बल ७५ टक्के झाल्याचा अंदाज व्यक्त केला. १९८० ते २०१२ या कालावधीतील काळा पैशांच्या संदर्भात अर्थतज्ज्ञ अरुण कुमार यांच्या अध्यक्षतेखाली राजकोषीय दृष्टिकोण प्रस्तुत करण्यात आला. त्यानुसार १९८० मध्ये काळ्या पैशांची अर्थव्यव्यस्था एकूण जीडीपीच्या २९ टक्के, तर २०१२ मध्ये तो वाढून ६२ टक्के झाल्याचे वर्तविण्यात आले. यावरून भारतात काळ्या पैशांची अर्थव्यवस्था वाढत असून आतरराष्ट्रीय काळ्या बाजाराच्या अर्थव्यवस्थेतदेखील भारताचा वाटा आहे. याव्यतिरिकत भारतात सार्वत्रिक निवडणुकांमध्येसुद्धा काळ्या पैशांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, असा अभ्यास सेंटर फॉर मिडिया स्टडिज या संस्थेने केला.

**भारतातील काळ्या पैशाची मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेत.**

**अवास्तव कर कायदे आणि कर फसवणूक:** कर आणि शुल्कात वाढ झाल्यामुळे काही लोकांना ते टाळण्यास भाग पाडले जाते. सध्याच्या नियमांनुसार (सप्टेंबर १९९९) आयकर आकारण्यासाठी ५०,००० रुपयांची (२०,००० रुपयांची मानक वजावट वगळून) मर्यादा मोफत उत्पन्न म्हणून निश्चित केली आहे. महागाईच्या या युगात मध्यमवर्गीय व्यक्ती या मर्यादेत जगू शकते का?
समान उत्पादनांमध्ये, उत्पादन शुल्काचे वेगवेगळे दर आहेत. उदाहरणार्थ, कापड आणि सिगारेटमध्ये, उत्पादनाचे चुकीचे वर्गीकरण करून करचोरी होते. कापडांमध्ये, वेगवेगळ्या प्रकारच्या कापडासाठी वेगवेगळे उत्पादन शुल्क आकारले जाते. उत्पादक नियमितपणे उत्पादन शुल्क कमी करण्यासाठी उत्पादनाचे मूल्य कमी करतात. केवळ यामुळेच दरवर्षी १,००० कोटी रुपयांचा काळा पैसा निर्माण होतो. स्टीलसह संपूर्ण उत्पादन क्षेत्रासाठी, उत्पादन शुल्क, सीमाशुल्क आणि विक्री करातील चोरी दरवर्षी ५०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त काळा पैसा निर्माण करते.

**नियंत्रण धोरण:** काळ्या पैशाचे आणखी एक कारण म्हणजे सरकारचे किंमत नियंत्रण धोरण. नियंत्रणासाठी वस्तूंची निवड करताना आणि त्यांच्या किमती निश्चित करताना, सरकार मागणी आणि पुरवठ्यामध्ये गुंतलेल्या लवचिकतेचा विचार करण्यात अपयशी ठरते. उदाहरणार्थ, नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च (NCAER) च्या १९८१ च्या अहवालानुसार, १९६५-६६ ते १९७४-७५ या नऊ वर्षांच्या कालावधीत सिमेंट, स्टील, कागद, वनस्पति, ऑटोमोबाईल टायर्स आणि खते या सहा वस्तूंमध्ये किंमत नियंत्रणाच्या ऑपरेशनमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत ८४० कोटी रुपयांचा काळा पैसा निर्माण झाला. परकीय चलनाच्या नियमनामुळे आयातीचे जास्त बिल आणि निर्यातीचे कमी बिल आणि चलनाचे काळाबाजार होते. अशाप्रकारे, नियंत्रणाचे उपाय जितके कठोर असतील आणि अर्थव्यवस्था जितकी नियंत्रित असेल तितके त्याचे उल्लंघन करण्याचे प्रयत्न जास्त होतील ज्यामुळे साठेबाजी, फसवणूक, कृत्रिम टंचाई आणि परिणामी काळा पैसा वाढेल.

**कोटा प्रणाली:** काळ्या पैशाचा आणखी एक स्रोत म्हणजे कोटा प्रणाली. आयात कोटा, निर्यात कोटा आणि परकीय चलन कोटा यांचा गैरवापर सामान्यतः प्रीमियमवर विकून केला जातो. अवास्तव नियंत्रणांमुळे अशी संस्कृती निर्माण होते जी कॉर्पोरेट कंपन्यांना कर कायदे, विशेषतः FERA कायदे मोडण्यास प्रोत्साहित करते. काही वर्षांपूर्वी (१९९२-९३) सरकारने निर्यातदारांना कोणतेही कस्टम ड्युटी न भरता वस्तू आयात करण्याची परवानगी देण्यासाठी एक योजना आणली तेव्हा या योजनेतून पैसे कमविण्याचे कल्पक मार्ग शोधण्यात आले, म्हणजेच ओव्हर-इनव्हॉइसिंग निर्यातीद्वारे अधिक आयात फायदे मिळविण्यासाठी तसेच निर्यातीला दिलेल्या कर सवलतीचा लाभ घेण्यासाठी. १९९२-९६ दरम्यान, महसूल गुप्तचर संचालनालय (DRI) आणि सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी अशी ६०५ प्रकरणे शोधून काढली. एका निर्यात गृहाला (गणपती एक्सपोर्ट्स) ८५ कोटी रुपयांचा फायदा झाला (इंडिया टुडे, ३० नोव्हेंबर १९९६).

**टंचाई:** टंचाई आणि सदोष सार्वजनिक वितरण व्यवस्थेमुळेही काळा पैसा निर्माण होतो. जेव्हा जीवनावश्यक वस्तूंची कमतरता भासते तेव्हा लोकांना नियंत्रित किमतीपेक्षा जास्त किंमत मोजावी लागते, ज्यामुळे काळा पैसा निर्माण होतो. स्वयंपाकाचा गॅस, सिमेंट, रॉकेल, साखर, रिफाइंड तेल इत्यादींच्या कमतरतेमुळे नेहमीच बेकायदेशीर व्यवहार आणि काळा पैसा निर्माण झाला आहे.

**महागाई:** आंतरराष्ट्रीय बाजारात पेट्रोल इत्यादी वस्तूंच्या किमतीत वाढ, सरकारने लादलेल्या शुल्क आणि करांमध्ये वाढ झाल्यामुळे वस्तूंच्या किमतीत वाढ, बेहिशेबी पैशाच्या मालकांकडून होणारा उघड उपभोग, उत्पादनातून सट्टेबाजीकडे संसाधनांचे वळण - या सर्वांमुळे महागाई होते ज्यामुळे काळा पैसा निर्माण होतो.

**लोकशाही व्यवस्थेतील निवडणुका आणि राजकीय निधी:** देशातील प्रत्येक निवडणुकीत हजारो कोटी रुपये खर्च होतात. लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी उमेदवार साधारणपणे दहा लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च करतो आणि विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी सध्याच्या काळात ५ लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च येतो. राजकारण्यांना निधी देण्यासाठी, प्रामाणिक कॉर्पोरेट घराण्यांनाही बेहिशेबी पैसे निर्माण करण्याचे मार्ग शोधण्याशिवाय पर्याय नसतो. उमेदवारासाठी कायद्याने परवानगी असलेला खर्च मर्यादित असल्याने आणि कंपन्यांना त्यांच्या नफ्यातील ५ टक्के पर्यंत निवडणुकीसाठी राजकीय पक्षांना देणग्या म्हणून देण्याची परवानगी असल्याने, निवडणुका सामान्यतः काळा पैसा बाळगणाऱ्यांकडून वित्तपुरवठा केल्या जातात. हे लोक राजकीय संरक्षण आणि आर्थिक सवलतींची अपेक्षा करतात जे सत्तेतील राजकीय उच्चभ्रूंच्या संमतीने आणि संगनमताने वस्तूंवरील कृत्रिम नियंत्रणे, वितरणाच्या साधनांमध्ये हलगर्जीपणा इत्यादी स्वरूपात मिळतात. या सर्व पद्धती काळा पैसा निर्माण करतात.

**शेती उत्पन्न:** राजकीय कारणांमुळे शेती उत्पन्नाला आयकराच्या कक्षेत आणण्यास राज्यकर्त्यांची अनिच्छा देखील काळ्या पैशाच्या निर्मितीला कारणीभूत ठरली आहे. गेल्या काही दशकांमध्ये, मोठ्या औद्योगिक घराण्यांनी मोठी शेती विकत घेऊन, शेती करून आणि काहीही उत्पादन न करून मोठ्या प्रमाणात कृषी क्षेत्रात प्रवेश केला आहे. इतर स्रोतांमधून जमा झालेला काळा पैसा कृषी उत्पन्न खात्यावर दाखवून पांढरा करण्याचा प्रयत्न केला जातो. शेती उत्पन्नावर कर लावल्याने ही घटना रोखण्यास मदत होऊ शकते.

**भारतातील काळ्या पैशाचे परिणाम:** काळ्या पैशाचे देशाच्या अर्थव्यवस्थेवर काही गंभीर परिणाम होतात. त्यापैकी काहींची चर्चा पुढीलप्रमाणे आहे. याचा परिणाम देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर होतो. केंद्रीय बँक अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा नियंत्रित करू शकत नाही, ज्यामुळे महागाई वाढते. यामुळे चलनाचे मूल्य घसरेल. काळ्या पैशाचा देशाच्या विश्वासार्हतेवर नकारात्मक परिणाम होतो. काळ्या पैशाचा वापर बहुतेकदा ड्रग्ज आणि अंमली पदार्थांचा व्यापार, दहशतवाद इत्यादी बेकायदेशीर कामांसाठी केला जातो जो देशाच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे. काळ्या पैशामुळे सरकारला करांच्या स्वरूपात मोठे नुकसान होते. काळ्या पैशामुळे देशात एक समांतर अर्थव्यवस्था निर्माण होते, जी पूर्णपणे भूमिगत असते. उदाहरणार्थ, मेक्सिकोमध्ये, ड्रग्जच्या बेकायदेशीर तस्करीमुळे एक भरभराटीला येणारी समांतर अर्थव्यवस्था आहे. यामुळे प्रशासनात समस्या निर्माण होतात. काळ्या पैशामुळे रिअल इस्टेटच्या किमती वाढू शकतात, ज्यामुळे मालमत्तेचा बुडबुडा निर्माण होऊ शकतो.

**काळ्या पैशाला आळा घालण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजना:** सरकारने काळ्या पैशाला आळा घालण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. त्यांची चर्चा पुढे केली आहे. काळ्या पैशाला विरोध करण्याच्या उद्देशाने कर सुधारणा सुरू करण्यात आल्या आहेत. कर आधार वाढविण्यात आला आहे आणि दर कमी करण्यात आले आहेत. स्रोतावरच कर कपात समाविष्ट करण्यासाठी सुधारणा केल्या जात आहेत. काळा पैसा विधेयकाद्वारे, सरकारने करचुकवेगिरीतून निर्माण झालेल्या काळ्या पैशाची माहिती दिलेल्या वेळेत देण्याची परवानगी दिली आहे. २०१६ मध्ये ५०० आणि १००० रुपयांच्या नोटाबंदीचा निर्णय काळा पैसा निरुपयोगी करण्याच्या प्राथमिक उद्देशाने घेण्यात आला. गोष्टी अधिक पारदर्शक करण्याच्या उद्देशाने सरकार कॅशलेस/डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देत आहे. भारतात निर्माण होणाऱ्या काळ्या पैशाचा मोठा भाग निवडणुकीत वापरला जातो,

कायदेशीररित्या जुन्याच्या जागी नवीन चलन प्रतिस्थापित करण्याच्या प्रक्रियेला विमुद्रिकरण असे म्हणतात. काळ्या पैशांवरील नियंत्रणासाठी विमुद्रीकरण करणे हा उपाय आवश्यक असते. जेव्हा सरकारला देशातील चलनावर अविश्वास व्यक्त होतो, देशामध्ये अतिस्फितीजन्य परिस्थिती निर्माण होते आणि भ्रष्टाचार, काळा पैसा, बनावट नोटांतून दहशतवाद इत्यादी प्रमाण वाढते, तेव्हा विमुद्रिकरण करणे अर्थव्यवस्थेच्या आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीने अनिवार्य असते. भारतात रिझर्व्ह बँकेच्या इ. स. १९३६ च्या कायद्यातील सव्वीसाव्या कलमानुसार सरकारला एका चलनाच्या जागी दुसरे वैध चलन व्यवहारात आणण्याचा आणि कोणतेही चलन कायदेशीरपणे रद्द करण्याचा अधिकार आहे. भारतात सर्वप्रथम इ. स. १९३८ मध्ये विमुद्रिकरण झाले असून नोव्हेंबर २०१६ मध्ये १००० व ५०० रुपयांच्या नोटांचे विमुद्रिकरण करण्यात येऊन नवीन ५०० व २००० रुपयांच्या नोटा चलनात आणल्या गेल्या. सध्या चलनात असलेली २००० रुपयांची नोटसुद्धा चलनातून कमी होताना दिसत आहे (२०२३).

**निष्कर्ष:** काळा पैसा म्हणजे जो बेहिशेबी, अवैध पैसा सरकार कडे उघड केला जात नाही. काळ्या पैशामध्ये बेकायदेशीर व्यवहारातून मिळवलेला पैसा येतो. कधी कधी तो आयकर चुकविण्यासाठी न दाखवलेला बेकायदेशीर पैसा सुद्धा असतो. साधारणपणे धारक तस्कर, गुन्हेगार, कर चुकविणारे आणि समाजातील इतर समाज विरोधक घटक यांच्याद्वारे जमा होतो. प्रामुख्याने सरकारकडून कायद्याचा अपमान केल्यावर कडक कारवाई होत नसल्यामुळे काळ्या पैशाची पातळी वाढत आहे. काळा पैसा म्हणजे कर आणि कायदेशीर अधिकाऱ्यांपासून लपवलेले उत्पन्न, ज्यामुळे सार्वजनिक महसूल, आर्थिक पारदर्शकता आणि आर्थिक स्थिरता कमकुवत होते. जरी पूर्वी भूमिगत अर्थव्यवस्था अस्तित्वात होत्या, तरी आता काळा पैसा प्रामुख्याने गंभीर कायदेशीर, आर्थिक आणि प्रशासन धोके आणतो. त्याचे परिणाम जाणून घेतल्याने धोरणकर्ते, व्यवसाय आणि व्यक्ती आर्थिक नियमांचे पालन करण्यास आणि औपचारिक बाजारपेठा विश्वासार्ह ठेवण्यास मदत करतात.

**संदर्भ सूची:**

१) Economic and Political Weekly, 2007; 2016
२) Frontline magazine, New Delhi, 2016.
३) Reddy, C. Rammanohar, Demonetisation and Black Money, Hydrabad, 2017.
४) Social Science Research Network, Vol. 31, 2016.

# सायबर गुन्हेगारीचा भारतात वाढता प्रसार: एक समाजशास्त्रीय अध्ययन

**भाकरे प्रिया आनंद** समाजशास्त्र विभाग, विवेकानंद महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर.

**गोषवारा:** माहिती-तंत्रज्ञानातील वेगवान प्रगती, इंटरनेट व स्मार्टफोनचा वाढता वापर आणि डिजिटल व्यवहारांचा विस्तार यामुळे भारतात सायबर गुन्हेगारीचा प्रसार लक्षणीयरीत्या वाढलेला आहे. सायबर फसवणूक, ओळख चोरी, आर्थिक घोटाळे, सोशल मीडिया गैरवापर, महिलांवरील ऑनलाइन छळ, डेटा चोरी व सायबर धमक्या हे सायबर गुन्ह्यांचे प्रमुख स्वरूप ठरत आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, सायबर गुन्हेगारी ही केवळ तांत्रिक किंवा कायदेशीर समस्या नसून ती सामाजिक बदल, मूल्यव्यवस्थेतील ऱ्हास, डिजिटल दरी, बेरोजगारी, अज्ञान आणि सत्तासंबंधांशी निगडित आहे. भारतीय समाजातील शहरीकरण, जागतिकीकरण, डिजिटल असमानता, तरुणांची वाढती ऑनलाइन उपस्थिती आणि कमजोर सायबर जागरूकता यांमुळे सायबर गुन्हेगारीस पोषक वातावरण निर्माण झाले आहे. या अध्ययनात सायबर गुन्हेगारीची सामाजिक कारणे, स्वरूप व समाजावर होणारे परिणाम - जसे की सामाजिक असुरक्षितता, आर्थिक नुकसान, मानसिक ताण, महिलांवरील हिंसा आणि कायद्यावरील अविश्वास - यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच, सायबर गुन्हेगारी नियंत्रणासाठी कायदे, प्रशासन, सामाजिक जागरूकता व मूल्यशिक्षण यांची भूमिका अधोरेखित करण्यात आली आहे.

**कीवर्ड्स:** सायबर गुन्हेगारी, समाजशास्त्रीय अध्ययन, डिजिटल माध्यमे, ऑनलाइन फसवणूक, सामाजिक असुरक्षितता, महिलांवरील सायबर हिंसा, डिजिटल दरी, माहिती-तंत्रज्ञान.

**प्रस्तावना:** सायबर गुन्हेगारी म्हणजे इंटरनेट, मोबाइल नेटवर्क आणि डिजिटल माध्यमांचा वापर करून केलेली फसवणूक, चोरी, हॅकिंग, फिशिंग, क्रेडेन्शियल चोरी, ओळख चोरी आणि आर्थिक फसवणुकीची सर्व क्रिया. डिजिटल भारताच्या वाढत्या युगात सायबर गुन्हेगारीचा प्रसार सध्याच्या समाजातील महत्त्वाचा सामाजिक प्रश्न बनला आहे. डिजिटल व्यवहार, ऑनलाइन बँकिंग, सोशल मिडिया आणि मोबाईल ॲप्समुळे लोकांचे जीवन सुलभ झाले, पण तितक्याच प्रमाणात गुन्हेगारीच्या नव्या स्वरूपांचीही वाढ झाली आहे.

एकविसाव्या शतकात माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाने मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले आहे. इंटरनेट, स्मार्टफोन, सोशल मीडिया, डिजिटल व्यवहार, ई-शासन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांमुळे भारतीय समाज अधिक वेगाने, सुलभतेने व जागतिक पातळीवर जोडला गेला आहे. मात्र, या डिजिटल क्रांतीसोबतच समाजासमोर सायबर गुन्हेगारी ही एक गंभीर व गुंतागुंतीची समस्या उभी राहिली आहे. आज सायबर गुन्हेगारी ही केवळ तांत्रिक किंवा कायदेशीर समस्या न राहता, ती सामाजिक संरचना, मूल्यव्यवस्था, सत्तासंबंध आणि सामाजिक असमानतेशी निगडित व्यापक सामाजिक प्रश्न बनली आहे. भारतात डिजिटल व्यवहारांचा झपाट्याने झालेला विस्तार, ऑनलाइन बँकिंग, *UPI*, ई-कॉमर्स, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सचा प्रचंड वापर आणि कोविड-१९ नंतर वाढलेली डिजिटल अवलंबित्वता यांमुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. ऑनलाइन फसवणूक, ओळख चोरी, आर्थिक घोटाळे, डेटा चोरी, सोशल मीडिया गैरवापर, सायबर बुलिंग, महिलांवरील ऑनलाइन छळ, डीपफेक, डिजिटल अरेस्टसारखे नव्या स्वरूपातील गुन्हे भारतीय समाजात वेगाने पसरत आहेत. या गुन्ह्यांचा परिणाम केवळ आर्थिक नुकसानापुरता मर्यादित न राहता, तो मानसिक ताण, सामाजिक असुरक्षितता, भीती, अविश्वास आणि सामाजिक नातेसंबंधांवरही खोलवर परिणाम करतो.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, सायबर गुन्हेगारी ही सामाजिक बदलांची उपज आहे. शहरीकरण, जागतिकीकरण, डिजिटल दरी, बेरोजगारी, शिक्षणातील असमानता, तरुणांमधील तांत्रिक कौशल्यांचा गैरवापर, तसेच नैतिक मूल्यांचा ऱ्हास या घटकांमुळे सायबर गुन्हेगारीस पोषक सामाजिक वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण व शहरी समाजातील डिजिटल असमानता, महिलांची ऑनलाइन असुरक्षितता, वृद्ध व अशिक्षित लोकांची फसवणूक होणे, तसेच कायदे व अंमलबजावणी यंत्रणांवरील मर्यादा या सायबर गुन्हेगारीच्या समाजशास्त्रीय अभ्यासाला अधिक महत्त्वाचे बनवतात. सायबर गुन्हेगारीमुळे सामाजिक विश्वासाचे नाते कमजोर होत असून कायदा, प्रशासन आणि डिजिटल प्रणालींबाबत सामान्य नागरिकांमध्ये अविश्वास निर्माण होत आहे. याचा थेट परिणाम लोकशाही प्रक्रिया, आर्थिक व्यवहार आणि सामाजिक स्थैर्यावर दिसून येतो. त्यामुळे सायबर गुन्हेगारीचे अध्ययन केवळ कायदेशीर चौकटीत न करता, समाजशास्त्रीय विश्लेषणाच्या माध्यमातून तिची कारणे, स्वरूप, परिणाम आणि प्रतिबंधक उपाय समजून घेणे अत्यावश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत अध्ययनात भारतातील सायबर गुन्हेगारीचा वाढता प्रसार, त्यामागील सामाजिक कारणे, विविध स्वरूपे, समाजावर होणारे परिणाम आणि सायबर गुन्हेगारी नियंत्रणासाठी शासन, समाज व व्यक्तीची भूमिका यांचे सखोल समाजशास्त्रीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्टे:** १) सायबर गुन्हेगारी च्या वाढत्या प्रसाराचे कारणे शोधणे. २) सायबर गुन्हेगारी च्या वाढत्या प्रसाराचे परिणाम शोधणे. ३) सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या आकडेवारीचा शोध घेणे.

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत संशोधन हे पूर्णत दुय्यम तथ्यांवर आधारित आहेत. सायबर गुन्हेगारीचा वाढता प्रसाराचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी संशोधकाने विविध संदर्भग्रंथ, मासिकात प्रकाशित लेख व ऑनलाईन आकडेवारीचा तथ्यांचा स्त्रोत म्हणून उपयोग केला आहे. प्राप्त माहितीचे चिकित्सक विश्लेषण प्रस्तूत केले आहेत.

**सायबर गुन्ह्यांची वाढ: आकडेवारी**

**केसेस वाढ:** २०२३ मध्ये भारतात सायबर गुन्ह्यांची संख्या ८६,४२० इतकी होती - २०२२ पर्यंत फक्त ६५,८९३ प्रकरणे होती, ज्यामुळे ३१.२% वाढ दिसली.

**दरवर्षी वाढ**: २०१८ ते २०२३ दरम्यान सायबर गुन्ह्यांची नोंद २१.७ टक्क्यांनी वाढली आहे.

**मुख्य गुन्हे प्रकार**: ६८.९% गुन्हे आर्थिक फसवणुकी संबंधित आहेत.

**राज्य व शहरांनुसार फरक**: कर्नाटक आणि तेलंगणा यांसारख्या राज्यांत सायबर गुन्हे अधिक नोंदले जातात.

**समाजशास्त्रीय कारणे- संशोधित सामाजिक रचना:** डिजिटल विभाजनाची समस्या: इंटरनेट वापरकर्त्यांमध्ये कौशल्य आणि डिजिटल सुरक्षा जागरूकतेची पातळी वेगळी आहे, ज्यामुळे कमी जागरूक लोक अधिक शिकार बनतात.

**आर्थिक आणि सामाजिक बदल** मोबाइल बँकिंग आणि UPI च्या लोकप्रियतेमुळे फसवणुकीची संधी वाढली आहे. तसेच आर्थिक गरजा आणि नोकरीच्या संधीचा ताणही सायबर गुन्ह्यांकडे लोकांना ढकलतो.

**तंत्रज्ञानाचा गैरवापर**: AI-आधारित फिशिंग, डीपफेक्स आणि लॉगिन क्रेडेन्शियल चोरी यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर गुन्हेगार करतात, ज्यामुळे गुन्हे अधिक प्रभावी झाले आहेत.

**सामाजिक परिणाम:** लोकांच्या बँक खात्यांतील पैसे चोरी होणे, निवेश फसवणूक, "डिजिटल अरेस्ट" सारखे स्कॅम्स यामुळे आर्थिक नुकसान होत आहे ज्याची किंमत करोडो रुपयांत आहे. गुन्ह्यांच्या बळी झालेल्या लोकांमध्ये आत्म-आत्मविश्वास कमी होणे, सामाजिक प्रतिष्ठेवर परिणाम आणि भय निर्माण होणे हे दिसून येते. थोड्या प्रकरणांमध्ये दोषींना शिक्षा मिळणे आणि तपासाचा कालावधी यामुळे समाजात कायदा-व्यवस्थेवरचा विश्वास कमी झालेला दिसतो.

**उपाय आणि धोरणे**: डिजिटल सुरक्षा शिक्षण, सायबर जागरूकता कार्यक्रम - शाळा आणि समुदाय यांना मदत करू शकतात. सायबर क्राईम पोलीस सेल, राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल आणि हेल्पलाइन 1930 यांसारख्या उपायांनी त्वरित तक्रारी नोंदवल्या जाऊ शकतात. सुरक्षा प्रणाल्यांमध्ये भर, अधिक गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी डिजिटल फॉरेंसिकचा वापर, आणि AI-आधारित संरक्षण प्रणालींचा विकास आवश्यक आहे.

**निष्कर्ष**: सायबर गुन्हेगारीचा वाढता प्रसार ही फक्त तंत्रज्ञानिक समस्या नाही, तर ती सामाजिक बदल, जागरूकतेचा अभाव, आर्थिक ताण आणि डिजिटल विभाजन यांसारख्या अनेक सामाजिक घटकांनी प्रभावित आहे. यावर फक्त कायदा अमलात आणूनच नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उपाययोजना करूनच नियंत्रण मिळवता येईल.

**संदर्भसूची**

१. National Crime Records Bureau (NCRB) अहवाल: 2023 मध्ये सायबर गुन्ह्यांची संख्या 86, 420 पर्यंत वाढ, जवळपास 31.2% वाढ नोंदली गेली.
२. Cybercrimes Up 217% in the past five years — भारतात 2018 ते 2023 दरम्यान 217% वाढ.
३. Key Reasons Behind the Surge in Cybercrime in India — सायबर गुन्ह्यांची वाढीची मुख्य कारणे.
४. Compiled cybercrime trends and losses including digital arrest scams
५. Shikarpur, D., & Bhagwat, V. (2015). Cyber Crimes. Vishwakarma Publications.
६. Rajput, B. (2020). Cyber Economic Crime in India: An Integrated Model for Prevention and Investigation. Springer.
७. Godbole, N., & Belapure, S. (2019). Cyber security: Understanding Cyber Crimes, Computer Forensics and Legal Perspectives. Wiley.
८. Laldingliana, J.T., Mishra, S., & Gautam, R. (2022). Cyber Crime in India with Special Reference to Women, Children and Senior Citizens. The Law Brigade Publisher.
९. Maurya, D.K. (2023). भारत में साइबर अपराध. Journal of Social Review and Development.

# तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि डिजिटल पेमेंटमुळे ग्रामीण भागात वाढणारे गुन्हे

**प्रा. चिन्मयी धर्मेंद्र मराठे** सहाय्यक प्राध्यापक, मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव
**डॉ. सागर लोकनाथ बडगे** समाजशास्त्र विभागप्रमुख, मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

**सारांश:** डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे ग्रामीण भागात सोशल मीडिया आणि डिजिटल पेमेंट प्रणालींचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. मोबाईल फोन, इंटरनेट आणि UPI व्यवहारांमुळे ग्रामीण जीवन अधिक सुलभ झाले असले तरी त्याच वेळी गुन्हेगारीचे स्वरूपही बदलले आहे. ग्रामीण समाजात डिजिटल साक्षरता, तांत्रिक ज्ञान आणि कायदेशीर जागरूकतेचा अभाव असल्यामुळे ऑनलाइन फसवणूक, UPI घोटाळे, OTP स्कॅम, बनावट सोशल मीडिया प्रोफाइल, सायबर छळ आणि आर्थिक शोषण यांसारख्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. सदर अभ्यासात ग्रामीण भागातील अशा डिजिटल गुन्ह्यांची कारणे, स्वरूप व सामाजिक परिणामांचा सविस्तर अभ्यास करून प्रतिबंधात्मक उपाय सुचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**Keywords:** तंत्रज्ञान, सोशल मीडिया, डिजिटल पेमेंट, सायबर गुन्हेगारी, OTP स्कॅम, बनावट कॉल्स, फिशिंग लिंक, QR कोड.

**प्रस्तावना:** २१व्या शतकात तंत्रज्ञानाने मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. इंटरनेट, स्मार्टफोन, सोशल मीडिया आणि डिजिटल पेमेंट प्रणालींमुळे समाज अधिक वेगवान व परस्परसंवादी झाला आहे. पूर्वी शहरांपुरता मर्यादित असलेला डिजिटल विकास आता ग्रामीण भागातही झपाट्याने पोहोचलेला दिसून येतो. शासनाच्या डिजिटल इंडिया उपक्रमामुळे ग्रामीण भागात ऑनलाइन व्यवहार, UPI पेमेंट, सोशल मीडिया वापर आणि डिजिटल सेवा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. यामुळे ग्रामीण जनतेचे दैनंदिन जीवन सुलभ झाले असले तरी त्याचबरोबर अनेक नवीन सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. डिजिटल साधने, इंटरनेट, संगणक, मोबाईल, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म किंवा डिजिटल पेमेंट प्रणालींचा वापर करून व्यक्ती, संस्था किंवा समाजाच्या आर्थिक, सामाजिक किंवा वैयक्तिक हितास हानी पोहोचवणाऱ्या बेकायदेशीर कृत्यांना डिजिटल गुन्हे असे म्हणतात.

ग्रामीण भागात डिजिटल साक्षरतेचा अभाव, तांत्रिक ज्ञानाची मर्यादा आणि कायदेशीर जागरूकतेची कमतरता असल्यामुळे लोक सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, UPI घोटाळे, OTP स्कॅम, बनावट सोशल मीडिया प्रोफाइल आणि आर्थिक शोषण यांसारख्या गुन्ह्यांना सहज बळी पडत आहेत. पारंपरिक गुन्ह्यांबरोबरच आता डिजिटल स्वरूपातील गुन्हे ग्रामीण समाजाच्या सुरक्षिततेस गंभीर आव्हान निर्माण करत आहेत. त्यामुळे तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि डिजिटल पेमेंटमुळे ग्रामीण भागात वाढणाऱ्या गुन्ह्यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते. हा अभ्यास ग्रामीण समाजातील बदलती गुन्हेगारी, त्यामागील कारणे आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय समजून घेण्यास उपयुक्त ठरेल.

**उद्दिष्टे:** १. तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि डिजिटल पेमेंट प्रणालींमुळे वाढणाऱ्या गुन्ह्यांचे स्वरूप अभ्यासणे. २. शहरी व ग्रामीण समाजात डिजिटल माध्यमांमुळे होणाऱ्या गुन्ह्यांमधील फरक अभ्यासणे. ३. डिजिटल साक्षरता, जागरूकता आणि कायदेशीर उपाययोजनांचा गुन्हे प्रतिबंधावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**गृहितके:** १. तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि डिजिटल पेमेंट्सचा वाढता वापर गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ होण्यास कारणीभूत ठरतो. २. ग्रामीण भागातील लोक डिजिटल साक्षरतेच्या अभावामुळे शहरी भागाच्या तुलनेत डिजिटल गुन्ह्यांना अधिक बळी पडतात. ३. डिजिटल साक्षरता व कायदेशीर जागरूकता वाढल्यास तंत्रज्ञानाशी संबंधित गुन्ह्यांचे प्रमाण कमी होते.

**साहित्याचा आढावा:** तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि डिजिटल पेमेंट प्रणालींशी संबंधित गुन्हेगारीवर अनेक भारतीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन झालेले आहे. विविध अभ्यासांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे गुन्हेगारीचे स्वरूप पारंपरिक पद्धतीतून सायबर स्वरूपाकडे वळल्याचे नमूद करण्यात आले आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (NCRB) च्या अहवालांनुसार सायबर गुन्हे, ऑनलाइन आर्थिक फसवणूक, UPI घोटाळे, फिशिंग आणि ओळख चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. काही संशोधकांनी सोशल मीडियावरील अनामिकता, बनावट प्रोफाइल आणि माहितीचा गैरवापर यामुळे सायबर छळ व ब्लॅकमेलिंगसारख्या गुन्ह्यांना चालना मिळते, असे स्पष्ट केले आहे. ग्रामीण भागावरील अभ्यासांमध्ये डिजिटल साक्षरतेचा अभाव, मर्यादित तांत्रिक ज्ञान, कमी शैक्षणिक पातळी आणि कायदेशीर जागरूकतेची कमतरता हे गुन्हे वाढीचे प्रमुख घटक असल्याचे आढळते. तसेच, ग्रामीण भागातील लोक नवीन तंत्रज्ञानाचा वापर करताना आवश्यक ती काळजी न घेतल्यामुळे आर्थिक

फसवणुकीला सहज बळी पडतात. तथापि, बहुतेक संशोधन शहरी भागावर केंद्रित असून ग्रामीण समाजाच्या दृष्टिकोनातून तंत्रज्ञानामुळे वाढणाऱ्या गुन्ह्यांचा सखोल समाजशास्त्रीय अभ्यास तुलनेने कमी झालेला आहे. त्यामुळे ग्रामीण भागावर केंद्रित सध्याचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

**संशोधन पद्धती:** सदर संशोधन पूर्णतः दुय्यम माहितीवर आधारित आहे. माहिती संकलनासाठी NCRB अहवाल, शासकीय प्रकाशने, संशोधन जर्नल्स, पुस्तके, वृत्तपत्रे व ऑनलाइन विश्वसनीय स्रोतांचा वापर करण्यात आला असून अभ्यास वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने करण्यात आला आहे.

**ग्रामीण भारतात तंत्रज्ञानामुळे वाढणारे गुन्हे:** ग्रामीण भारतात तंत्रज्ञानाचा वेगाने विस्तार होत असून मोबाइल फोन, इंटरनेट आणि डिजिटल सेवा ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग बनत आहेत. शासनाच्या डिजिटल इंडिया उपक्रमामुळे ऑनलाइन व्यवहार, शासकीय सेवा, बँकिंग आणि माहितीपर्यंत सहज पोहोच शक्य झाली आहे. मात्र या तंत्रज्ञानाच्या वाढीसोबतच ग्रामीण भागात गुन्हेगारीचे स्वरूपही बदलताना दिसत आहे. पारंपरिक स्वरूपातील गुन्ह्यांबरोबरच आता सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, ओळख चोरी आणि आर्थिक गैरव्यवहार यामध्ये वाढ झाली आहे.

ग्रामीण भागातील अनेक लोक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करत असले तरी त्यांना त्यासंबंधित धोके, सुरक्षितता उपाय आणि कायदेशीर बाबींची पुरेशी माहिती नसते. त्यामुळे बनावट कॉल्स, OTP स्कॅम, फिशिंग लिंक, बनावट ॲप्स आणि फसव्या ऑनलाइन योजनांना ते सहज बळी पडतात. याशिवाय सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे बनावट प्रोफाइल, चुकीची माहिती पसरवणे आणि सायबर छळ यांसारख्या गुन्ह्यांमध्येही वाढ होत आहे. मर्यादित पोलीस यंत्रणा, सायबर गुन्ह्यांबाबत अपुरी प्रशिक्षण व्यवस्था आणि जागरूकतेचा अभाव यामुळे अशा गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवणे कठीण होत आहे. त्यामुळे ग्रामीण भारतात तंत्रज्ञानामुळे वाढणाऱ्या गुन्ह्यांचा अभ्यास करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवणे अत्यंत आवश्यक ठरते.

**ग्रामीण भागात डिजिटल पेमेंटमुळे वाढणारे गुन्हे:** ग्रामीण भारतात डिजिटल पेमेंट प्रणालींचा वापर झपाट्याने वाढत आहे. UPI, मोबाइल बँकिंग, आधार-लिंक्ड पेमेंट्स आणि विविध वॉलेट ॲप्समुळे आर्थिक व्यवहार सुलभ झाले आहेत. शासकीय योजना, अनुदाने, पेन्शन आणि मजुरी थेट बँक खात्यात जमा होऊ लागल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. मात्र या डिजिटल सुविधांसोबतच ग्रामीण भागात आर्थिक स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्येही लक्षणीय वाढ दिसून येते. ग्रामीण समाजात डिजिटल साक्षरतेचा अभाव, तांत्रिक ज्ञानाची मर्यादा आणि कायदेशीर जागरूकतेची कमतरता असल्यामुळे लोक डिजिटल पेमेंटशी संबंधित गुन्ह्यांना सहज बळी पडतात. OTP स्कॅम, बनावट फोन कॉल्स, फिशिंग लिंक, QR कोड घोटाळे, बनावट कस्टमर केअर नंबर आणि खोट्या बँक ॲप्सद्वारे फसवणूक केली जाते. अनेक वेळा शेतकरी, वृद्ध व्यक्ती आणि कमी शिक्षित लोक त्यांच्या बँक तपशीलांची माहिती अनोळखी व्यक्तींना देतात, ज्यामुळे त्यांच्या खात्यातील रक्कम लंपास होते. ग्रामीण भागात सायबर गुन्ह्यांची तक्रार नोंदवण्याबाबत भीती, अज्ञान आणि पोलिस यंत्रणेपर्यंत मर्यादित पोहोच यामुळे अनेक गुन्हे नोंदले जात नाहीत. त्यामुळे डिजिटल पेमेंटचा सुरक्षित वापर, आर्थिक साक्षरता आणि जागरूकता वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच ग्रामीण पातळीवर सायबर गुन्ह्यांविरोधात प्रभावी यंत्रणा उभारणे काळाची गरज ठरते.

**NCRB डेटा:** खाली दिलेल्या तक्त्यात २०१८ ते २०२३ पर्यंत भारतात नोंदलेल्या सायबर गुन्ह्यांचे आकडे NCRB अहवालानुसार सादर केले आहेत. या आकड्यांमध्ये ऑनलाइन फसवणूक, डिजिटल पेमेंट घोटाळे, ओळख चोरी, फिशिंग आणि सोशल मीडिया संबंधित गुन्हे यांचा समावेश आहे. डेटा स्पष्ट करतो की गेल्या काही वर्षांत सायबर गुन्ह्यांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे, विशेषतः फसवणूक प्रकरणे सर्वाधिक आहेत. (~६८-७०%) या आकड्यांमुळे ग्रामीण भागात डिजिटल व्यवहारांशी संबंधित गुन्ह्यांच्या वाढत्या धोका समजून घेता येतो. टेबलमधील माहिती संशोधनाच्या पुढील विश्लेषणासाठी आधारभूत ठरते, ज्याद्वारे ग्रामीण भारतातील तंत्रज्ञानाच्या वापरामुळे होणाऱ्या गुन्ह्यांचे कारणे आणि परिणाम सविस्तर समजून घेता येतील.

| वर्ष | एकूण नोंदवलेले गुन्हे |
|---|---|
| २०१८ | २७,२४८ |
| २०१९ | ४४,७३५ |
| २०२० | ५०,०३५ |
| २०२१ | ५२,९७४ |
| २०२२ | ६५,८९३ |
| २०२३ | ८६,४२० |

*२०२३ मध्ये Fraud संबंधित केसेस - ५९,५२६ (संपूर्ण cybercrime चे ~६८.९%)

**ग्रामीण भागातील डिजिटल गुन्ह्यांची कारणे**: डिजिटल साक्षरतेचा अभाव, तांत्रिक ज्ञानाची मर्यादा, स्मार्टफोन व इंटरनेटचा अति व अयोग्य वापर, OTP, लिंक व QR कोडबाबत अज्ञान, बनावट फोन कॉल्स व संदेशांवर सहज विश्वास, सोशल मीडियावरील बनावट प्रोफाइल्सची ओळख न होणे, कायदेशीर जागरूकतेचा अभाव, सायबर गुन्ह्यांविषयी भीती व तक्रार नोंदवण्याबाबत संकोच, ग्रामीण भागात सायबर गुन्हे प्रतिबंधक यंत्रणेची कमतरता, आर्थिक गरज, गरिबी व फसव्या योजनांचे आमिष.

**ग्रामीण भागातील डिजिटल गुन्ह्यांचे परिणाम:** आर्थिक नुकसान व बचतीचा ऱ्हास, शेतकरी व गरीब कुटुंबांचे कर्जबाजारीपण वाढणे, मानसिक ताण, भीती व असुरक्षिततेची भावना, डिजिटल व्यवहारांवरील विश्वास कमी होणे, सामाजिक प्रतिष्ठेला धक्का (ब्लॅकमेलिंग, बदनामी), कौटुंबिक वाद व तणाव वाढणे, शासकीय डिजिटल योजनांपासून दूर राहण्याची प्रवृत्ती, ग्रामीण समाजात डिजिटल दरी वाढणे, कायदा व प्रशासनावरील विश्वास कमी होणे, ग्रामीण विकास प्रक्रियेला अडथळे निर्माण होणे.

**शहरी व ग्रामीण भागातील डिजिटल गुन्ह्यांचे तुलनात्मक विश्लेषण:** डिजिटल तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रसारामुळे भारतातील शहरी तसेच ग्रामीण भागात डिजिटल गुन्ह्यांचे प्रमाण वाढलेले दिसून येते. मात्र या गुन्ह्यांचे स्वरूप, कारणे, परिणाम आणि त्यावर उपाय करण्याच्या क्षमतेत शहरी व ग्रामीण समाजात लक्षणीय फरक आढळतो. शहरी भागात इंटरनेट, स्मार्टफोन, डिजिटल पेमेंट प्रणाली आणि सोशल मीडियाचा वापर तुलनेने जुना व व्यापक आहे. त्यामुळे शहरी लोक डिजिटल तंत्रज्ञानाबाबत अधिक परिचित असून काही प्रमाणात डिजिटल साक्षरही आहेत. तरीसुद्धा ऑनलाइन बँकिंग, ई-कॉमर्स, क्रेडिट कार्ड व्यवहार, डेटा चोरी, सोशल मीडिया फसवणूक आणि आर्थिक स्कॅम्स यांसारखे डिजिटल गुन्हे शहरी भागात मोठ्या प्रमाणात आढळतात. ग्रामीण भागात डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रसार तुलनेने अलीकडील काळात झालेला आहे. शासनाच्या डिजिटल इंडिया, DBT आणि UPI योजनांमुळे ग्रामीण समाज डिजिटल व्यवहारांकडे वळला आहे. मात्र डिजिटल साक्षरतेचा अभाव, तांत्रिक ज्ञानाची मर्यादा आणि कायदेशीर जागरूकतेची कमतरता यामुळे ग्रामीण लोक डिजिटल गुन्ह्यांना अधिक सहज बळी पडतात. OTP स्कॅम, बनावट कॉल्स, फिशिंग लिंक, QR कोड फसवणूक आणि खोट्या योजनांच्या माध्यमातून आर्थिक शोषण ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात घडते. शहरी भागात डिजिटल गुन्ह्यांची तक्रार नोंदवण्यासाठी सायबर पोलीस ठाणे, हेल्पलाईन आणि ऑनलाइन तक्रार प्रणाली उपलब्ध असतात, तर ग्रामीण भागात अशा सुविधा मर्यादित असल्यामुळे अनेक डिजिटल गुन्हे नोंदवले जात नाहीत. परिणामी डिजिटल गुन्ह्यांचा सामाजिक व आर्थिक परिणाम ग्रामीण समाजावर अधिक गंभीर आणि दीर्घकालीन ठरतो. त्यामुळे डिजिटल गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शहरी आणि ग्रामीण भागासाठी स्वतंत्र धोरणे व उपाययोजना राबवणे आवश्यक आहे.

**डिजिटल साक्षरता, जागरूकता आणि शासकीय कायदे-धोरणांचा डिजिटल गुन्हे प्रतिबंधावर होणारा परिणाम:** डिजिटल तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या वापरामुळे डिजिटल गुन्ह्यांचे प्रमाण वाढताना दिसते. अशा परिस्थितीत डिजिटल साक्षरता, सामाजिक जागरूकता आणि शासनाने अंमलात आणलेल्या विविध कायदे व धोरणे ही डिजिटल गुन्हे प्रतिबंधासाठी अत्यंत महत्त्वाची ठरतात. डिजिटल साक्षरता म्हणजे नागरिकांना डिजिटल साधनांचा सुरक्षित, विवेकपूर्ण आणि जबाबदार वापर करण्याचे ज्ञान देणे. शासनाच्या डिजिटल इंडिया अभियान, प्रधानमंत्री ग्रामीण डिजिटल साक्षरता अभियान (PMGDISHA) यांसारख्या योजनांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना डिजिटल व्यवहार, ऑनलाइन सुरक्षितता आणि फसवणूक ओळखण्याचे प्रशिक्षण मिळत आहे. यामुळे फिशिंग, OTP फसवणूक आणि बनावट कॉल्ससारख्या डिजिटल गुन्ह्यांपासून बचाव करणे शक्य होत आहे. डिजिटल जागरूकता वाढवण्यासाठी शासन व विविध संस्थांकडून जनजागृती मोहिमा राबविल्या जात आहेत. सायबर सुरक्षित भारत अभियान, सायबर जागरूकता कार्यक्रम, तसेच माध्यमांद्वारे दिली जाणारी माहिती नागरिकांमध्ये सतर्कता निर्माण करते. जागरूक नागरिक संशयास्पद लिंक, ॲप्स किंवा कॉल्सपासून दूर राहतात, ज्यामुळे डिजिटल गुन्ह्यांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

डिजिटल गुन्ह्यांवर कायदेशीर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने विविध कायदे व धोरणे लागू केली आहेत. माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० (IT Act) हा डिजिटल गुन्ह्यांविरोधातील प्रमुख कायदा आहे. याशिवाय डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण अधिनियम २०२३, सायबर पोलीस ठाण्यांची स्थापना, राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टल (१९३० हेल्पलाईन) यांसारख्या उपाययोजनांमुळे तक्रार नोंदविणे सुलभ झाले आहे. या कायदे व धोरणांमुळे गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती निर्माण होते. एकत्रितपणे पाहता, डिजिटल साक्षरता, जागरूकता आणि प्रभावी शासकीय कायदे-धोरणे यांचा समन्वय डिजिटल गुन्हे प्रतिबंधासाठी उपयुक्त ठरतो आणि सुरक्षित डिजिटल समाजनिर्मितीस हातभार लावतो.

**डिजिटल गुन्हे प्रतिबंधासाठी धोरणात्मक शिफारसी** - डिजिटल गुन्ह्यांचे वाढते स्वरूप लक्षात घेता, भविष्यात प्रभावी व शाश्वत प्रतिबंधासाठी समन्वयित धोरणात्मक उपायांची आवश्यकता आहे.

१. ग्रामीण भागात डिजिटल साक्षरता कार्यक्रम अधिक व्यापक व सातत्यपूर्ण स्वरूपात राबवणे गरजेचे आहे. PMGDISHAसारख्या योजनांचा व्याप वाढवून महिलांवर, वृद्धांवर व शेतकरी समुदायावर विशेष लक्ष केंद्रित करावे.
२. डिजिटल जागरूकता मोहिमा स्थानिक भाषेत व स्थानिक माध्यमांद्वारे (ग्रामसभा, स्वयं-सहायता गट, शाळा, आंगणवाडी) राबवाव्यात, जेणेकरून डिजिटल गुन्ह्यांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेल.
३. शाळा व महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात डिजिटल सुरक्षितता व डिजिटल नागरिकत्व या विषयांचा समावेश करणे आवश्यक आहे.
४. कायदेशीर पातळीवर, डिजिटल गुन्ह्यांच्या तपासासाठी विशेष प्रशिक्षित मनुष्यबळ, सायबर पोलीस ठाण्यांची संख्या वाढवणे व जलद न्यायप्रक्रिया सुनिश्चित करणे महत्त्वाचे ठरेल.
५. डिजिटल पेमेंट कंपन्या व सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर कडक नियमन आणि जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे.

शेवटी, शासन, तंत्रज्ञान कंपन्या आणि नागरिक यांच्यातील सहभागी दृष्टिकोन (multi-stakeholder approach) स्वीकारल्यास डिजिटल गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल आणि सुरक्षित डिजिटल भारताच्या दिशेने वाटचाल करता येईल.

**निष्कर्ष:** या अभ्यासाच्या निष्कर्षांवरून असे स्पष्ट होते की तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि डिजिटल पेमेंट्सचा वाढता वापर ग्रामीण भागातील गुन्ह्यांच्या स्वरूपात आणि प्रमाणात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणत आहे. डिजिटल साधनांच्या वाढत्या उपलब्धतेमुळे संवाद, व्यवहार आणि माहितीचा प्रसार सुलभ झाला असला तरी त्याचबरोबर फसवणूक, आर्थिक गुन्हे, बनावट ओळख व ऑनलाइन दिशाभूल यांसारख्या डिजिटल गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे तंत्रज्ञानाशी संबंधित गुन्हे हे आधुनिक ग्रामीण वास्तवाचा एक महत्त्वाचा घटक बनले आहेत. ग्रामीण भागातील नागरिक डिजिटल साक्षरतेच्या मर्यादांमुळे डिजिटल गुन्ह्यांना अधिक प्रमाणात सामोरे जातात. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात तांत्रिक ज्ञान, सुरक्षिततेविषयीची माहिती आणि तक्रार

निवारण व्यवस्थेचा वापर कमी असल्याने नागरिक सहजपणे फसवणुकीचे लक्ष्य ठरतात. सामाजिक विश्वास, माहितीचा अभाव आणि तंत्रज्ञानावरील अंधविश्वास हे घटक ग्रामीण भागातील डिजिटल गुन्ह्यांची तीव्रता वाढवतात.

त्याच वेळी, अभ्यासातून सकारात्मक बाबही समोर येते की ज्या ठिकाणी डिजिटल साक्षरता, कायदेशीर माहिती आणि जागरूकता उपक्रम प्रभावीपणे राबवले जातात, तेथे डिजिटल गुन्ह्यांचे प्रमाण तुलनेने कमी आढळते. शासनाच्या योजना, प्रशिक्षण कार्यक्रम, कायदेशीर उपाययोजना आणि जनजागृती मोहिमा नागरिकांना सजग बनवतात व डिजिटल व्यवहारांतील धोके ओळखण्याची क्षमता वाढवतात. यावरून असे निष्कर्ष निघतात की तंत्रज्ञानाचा वापर स्वतः गुन्हे वाढवत नसून, सुरक्षिततेच्या उपायांशिवाय होणारा वापर गुन्ह्यांना पोषक ठरतो. म्हणूनच डिजिटल साक्षरता, कायदेशीर जागरूकता आणि प्रभावी अंमलबजावणी यांच्या समन्वयातूनच ग्रामीण भागात डिजिटल गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण साध्य होऊ शकते.

**संदर्भ सूची:**


१. Government of India. (2022). National Cyber Crime Reporting Portal: Annual Report. New Delhi: Ministry of Home Affairs.
२. Government of India. (2023). Crime in India 2022. New Delhi: National Crime Records Bureau.
३. Government of India. (2023). Digital Personal Data Protection Act, 2023. New Delhi: Government of India.
४. जाधव, एम. ए. (2021). डिजिटल भारत: संधी आणि आव्हाने. कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
५. देशमुख, बी. के. (2019). सायबर समाजशास्त्र: तंत्रज्ञान आणि समाज. पुणे: विद्या प्रकाशन.
६. पाटील, एस. आर. (2020). ग्रामीण समाज आणि सामाजिक बदल. औरंगाबाद: कैलास प्रकाशन.
७. पडलवार, सा. वि., & बडगे, सा.लो. (2025). गुन्हे आणि समाज (पृ. 102—107). जळगाव: प्रशांत पब्लिकेशन.
८. खैरनार, व्ही. एन. (2018). ग्रामीण विकास आणि आधुनिक तंत्रज्ञान. नाशिक: यशवंत प्रकाशन.


# ग्रामीण हिंसेचे पारंपरिक आणि आधुनिक स्वरूप: समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. विनोद बी. खेडकर** समाजशास्त्र विभागप्रमुख, डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर.

**गोषवारा:** ग्रामीण समाज हा भारतीय सामाजिक रचनेचा कणा मानला जातो. परंपरा, रूढी, जातव्यवस्था, कुटुंबसंस्था आणि आर्थिक संबंध यांच्या प्रभावाखाली ग्रामीण जीवन घडत आले आहे. मात्र सामाजिक, आर्थिक व तांत्रिक बदलांमुळे ग्रामीण समाजातील हिंसेचे स्वरूप कालानुरूप बदललेले दिसून येते. पारंपरिक ग्रामीण हिंसा ही प्रामुख्याने जातीय संघर्ष, जमीन व पाणीवाटपावरील वाद, कुटुंबीय व सन्मानाशी संबंधित संघर्ष, तसेच अंधश्रद्धा व रूढी परंपरांमधून उद्भवत होती. आधुनिक काळात मात्र या हिंसेला नवे परिमाण प्राप्त झाले असून राजकीय हस्तक्षेप, विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेले विस्थापन, बेरोजगारी, दारिद्र्य, सामाजिक असमानता, तसेच सोशल मिडिया व डिजिटल माध्यमांच्या प्रभावामुळे हिंसेचे स्वरूप अधिक संघटित, वेगवान आणि व्यापक झाले आहे. ग्रामीण समाज हा पारंपरिक मूल्ये, सामाजिक नियंत्रण, नातेसंबंध आणि सामूहिक जीवनपद्धतीवर आधारित असतो. तथापि, सामाजिक बदल, आधुनिकीकरण, जागतिकीकरण, आर्थिक असमानता व राजकीय हस्तक्षेप यांमुळे ग्रामीण समाजात हिंसेचे स्वरूप कालानुसार बदलत गेले आहे. पूर्वी हिंसा प्रामुख्याने परंपरा, जात, सन्मान व जमिनीच्या वादांशी संबंधित होती. परंतु आज ती राजकीय, आर्थिक, डिजिटल व संघटित स्वरूपात दिसून येते. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश ग्रामीण हिंसेच्या पारंपरिक व आधुनिक स्वरूपांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे हा आहे. सामाजिक बदल, सत्तासंबंध, वर्ग व जात संघर्ष, तसेच आधुनिकरण व जागतिकीकरण यांचा ग्रामीण हिंसेवर होणारा परिणाम या अभ्यासात विश्लेषित करण्यात आला आहे. दुय्यम माहिती, अहवाल व संशोधन लेखांच्या आधारे ग्रामीण हिंसेचे पारंपरिक आणि आधुनिक स्वरूप यांचा ऊहापोह करण्यात आला आहे.

**की-वर्ड्स:** ग्रामीण समाज, ग्रामीण हिंसा, पारंपरिक हिंसा, आधुनिक हिंसा, जातीय संघर्ष, सामाजिक बदल, सत्तासंबंध इ.

**प्रस्तावना:** भारतीय समाजाची रचना मुख्यतः ग्रामीण स्वरूपाची असून ग्रामीण समाज हा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाचा मुख्य आधार मानला जातो. परंपरा, रूढी, संस्कृती, जातव्यवस्था, कुटुंबव्यवस्था आणि स्थानिक सत्तासंरचना यांच्या प्रभावाखाली ग्रामीण समाजाचे व्यवहार घडतात. ग्रामीण समाज शांतताप्रिय असल्याची प्रतिमा असली तरी प्रत्यक्षात विविध स्वरूपातील हिंसा ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग राहिलेला आहे. पारंपरिक काळात ग्रामीण हिंसा ही मुख्यतः जमीन, पाणी, जातीय व कुटुंबीय वाद, प्रतिष्ठा, सन्मान व अंधश्रद्धांशी संबंधित होती. आधुनिक काळात सामाजिक परिवर्तन, राजकीय हस्तक्षेप, विकास प्रक्रिया, औद्योगिकीकरण, जागतिकीकरण आणि तांत्रिक प्रगती यांमुळे ग्रामीण हिंसेचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे व व्यापक झाले आहे. ग्रामीण समाज हा पारंपरिक मूल्ये, सामाजिक नियंत्रण, नातेसंबंध आणि सामूहिक जीवनपद्धतीवर आधारित असतो. तथापि, सामाजिक बदल, आधुनिकीकरण, जागतिकीकरण, आर्थिक असमानता व राजकीय हस्तक्षेप यांमुळे ग्रामीण समाजात हिंसेचे स्वरूप कालानुसार बदलत गेले आहे. पूर्वी हिंसा प्रामुख्याने परंपरा, जात, सन्मान व जमिनीच्या वादांशी संबंधित होती; परंतु आज ती राजकीय, आर्थिक, डिजिटल व संघटित स्वरूपात दिसून येते. या उद्देशाने ग्रामीण हिंसेचे पारंपरिक व आधुनिक स्वरूप समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेणे महत्वाचे आहे.

भारत हा कृषिप्रधान देश असून आजही देशाच्या मोठ्या लोकसंख्येचे जीवन ग्रामीण समाजावर अवलंबून आहे. भारतीय ग्रामीण समाज हा विविधता, परंपरा, जातीय रचना, धार्मिक श्रद्धा आणि स्थानिक सत्तासंबंधांनी घडलेला आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहता, राज्यातील ग्रामीण समाज हा सहकार चळवळ, शेतकरी आंदोलन, संत परंपरा, सुधारकांची विचारधारा तसेच सामाजिक

सुधारणा चळवळींमुळे एक विशिष्ट सामाजिक-सांस्कृतिक ओळख निर्माण करतो. तथापि, या सकारात्मक परंपरांबरोबरच ग्रामीण समाजात हिंसेचे विविध स्वरूप ऐतिहासिक काळापासून अस्तित्वात असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. भारतीय समाजाची सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक रचना मुख्यतः ग्रामीण स्वरूपाची असून ग्रामीण समाज हा भारतीय संस्कृतीचा पाया मानला जातो. परंपरा, रूढी, जातव्यवस्था, कुटुंबसंस्था, धार्मिक मूल्ये आणि स्थानिक सत्तासंरचना यांच्या प्रभावाखाली ग्रामीण जीवन पिढ्यान्पिढ्या आकार घेत आले आहे. सामान्यतः ग्रामीण समाज शांतताप्रिय, सहकार्यशील आणि नैतिक मूल्यांवर आधारित असल्याची प्रतिमा समाजमनात रुजलेली आहे. तथापि, या प्रतिमेच्या आड ग्रामीण समाजात विविध स्वरूपातील हिंसा सातत्याने अस्तित्वात असल्याचे समाजशास्त्रीय अभ्यासातून स्पष्ट होते.

ग्रामीण हिंसा ही केवळ शारीरिक आक्रमणापुरती मर्यादित नसून ती सामाजिक, आर्थिक, मानसिक व संरचनात्मक स्वरूपातही प्रकट होताना दिसते. पारंपरिक ग्रामीण समाजात हिंसेची मुळे जातीय वर्चस्व, जमीनधारणा व्यवस्था, पाणीवाटपावरील संघर्ष, सन्मान (इज्जत) संकल्पना, कुटुंबीय संघर्ष, अंधश्रद्धा तसेच रूढी-परंपरांमध्ये दडलेली होती. जातपंचायती, वतनदारी, बलुतेदारी व्यवस्था आणि स्थानिक सत्ताकेंद्रे यांमुळे दुर्बल घटकांवर होणारी हिंसा सामाजिकदृष्ट्या स्वीकारली जात असल्याचे अनेक अभ्यासांतून दिसून येते. विशेषतः स्त्रिया, दलित, आदिवासी आणि भूमिहीन शेतकरी हे पारंपरिक ग्रामीण हिंसेचे प्रमुख बळी राहिले आहेत. पारंपरिक भारतीय ग्रामीण समाजात हिंसा ही मुख्यतः जातीय वर्चस्व, जमीनधारणा पद्धती, संसाधनांचे असमान वितरण, सन्मान संकल्पना, तसेच कुटुंब व वंशपरंपरांशी निगडित होती. महाराष्ट्रात जातपंचायती, वतनदारी व बलुतेदारी व्यवस्थेचे अवशेष, देवऋण-समाजऋण संकल्पना, तसेच अंधश्रद्धांमुळे निर्माण होणारी हिंसा ही पारंपरिक ग्रामीण हिंसेची ठळक उदाहरणे मानली जातात. विशेषतः दलित, आदिवासी, भटके-विमुक्त समाज, महिला व भूमिहीन शेतकरी यांच्यावर होणारी सामाजिक, आर्थिक व प्रतीकात्मक हिंसा ग्रामीण समाजात दीर्घकाळ सामाजिकदृष्ट्या "सामान्य" मानली गेली.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात ग्रामीण समाजात शिक्षण, लोकशाहीकरण, विकास योजना, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि जागतिकीकरण यांमुळे मोठ्या प्रमाणावर सामाजिक परिवर्तन घडून आले. या परिवर्तनामुळे ग्रामीण हिंसेचे स्वरूपही बदलले आहे. आधुनिक काळातील ग्रामीण हिंसा ही केवळ स्थानिक मर्यादेत न राहता ती राजकीय हस्तक्षेप, पक्षीय संघर्ष, निवडणूक हिंसा, विकास प्रकल्पांमुळे होणारे विस्थापन, संसाधनांवरील स्पर्धा, बेरोजगारी, दारिद्र्य आणि सामाजिक असमानता यांच्याशी जोडली गेली आहे. तसेच सोशल मिडिया, मोबाईल तंत्रज्ञान आणि डिजिटल संवाद माध्यमांमुळे अफवा, द्वेषपूर्ण प्रचार आणि संघटित हिंसेला अधिक वेग व व्यापकता मिळालेली आहे. महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने, कृषी बाजार समित्या, सिंचन प्रकल्प, तसेच औद्योगिक व विशेष आर्थिक क्षेत्रांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बदलली. मात्र या विकास प्रक्रियेमुळे ग्रामीण हिंसेचे स्वरूपही बदलले. आधुनिक ग्रामीण हिंसा ही राजकीय वर्चस्व, पक्षीय संघर्ष, निवडणूक हिंसा, विकास प्रकल्पांमुळे होणारे विस्थापन, शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवरील सामाजिक तणाव, तसेच पाणीवाटप व जमिनीवरील संघर्ष यांशी जोडली गेली आहे. भारत व महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अलीकडील काळात सोशल मिडिया, मोबाईल तंत्रज्ञान आणि डिजिटल संवादाच्या वाढीमुळे हिंसेचे स्वरूप अधिक संघटित व वेगवान झाले आहे. अफवा, जातीय व धार्मिक द्वेषपूर्ण संदेश, राजकीय प्रोपगंडा आणि चुकीची माहिती यांमुळे ग्रामीण समाजात सामूहिक हिंसेच्या घटना वाढताना दिसतात. तसेच आदिवासी भागात वनहक्क, खनिज संसाधने, मोठे धरण प्रकल्प आणि कॉर्पोरेट हस्तक्षेप यांमुळे निर्माण होणारी हिंसा ही आधुनिक ग्रामीण हिंसेची गंभीर रूपे ठरली आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता ग्रामीण हिंसा ही वैयक्तिक गुन्हेगारी प्रवृत्तीचा परिणाम नसून ती सामाजिक रचना, सत्तासंबंध, वर्ग व जात संघर्ष, संसाधनांचे असमान वितरण आणि नियंत्रण यंत्रणांच्या मर्यादा यांचा परिपाक आहे. मार्क्सवादी, संघर्ष सिद्धांत, संरचनात्मक कार्यात्मकता आणि सांस्कृतिक सिद्धांत यांच्या आधारे ग्रामीण हिंसेचे विश्लेषण केल्यास तिची मुळे सामाजिक व्यवस्थेतील असमानता व वर्चस्व संबंधांमध्ये दडलेली असल्याचे स्पष्ट होते.

**संशोधनाचा उद्दिष्टे:** १) ग्रामीण हिंसेची संकल्पना व पारंपरिक स्वरूपांचा अभ्यास करणे. २) सामाजिक बदलांचा ग्रामीण हिंसेवर होणारा परिणाम विश्लेषित करणे. ३) जात, वर्ग, सत्ता व राजकारण यांचा ग्रामीण हिंसेशी असलेला संबंध स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी दुय्यम माहितीचा उपयोग करण्यात आला असून सरकारी अहवाल, जनगणना, जर्नल्स, पुस्तके, वर्तमानपत्रे व ऑनलाइन स्त्रोत यांचा आधार घेतला आहे. उपलब्ध आकडेवारी व समाजशास्त्रीय सिद्धांतांच्या आधारे ग्रामीण हिंसेच्या पारंपरिक व आधुनिक स्वरूपांचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच ऐतिहासिक व सामाजिक संदर्भांचा वापर करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**ग्रामीण हिंसेची संकल्पना:** ग्रामीण हिंसा म्हणजे ग्रामीण परिसरात व्यक्ती, कुटुंब, समूह किंवा समाजाविरुद्ध शारीरिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक किंवा लैंगिक स्वरूपात होणारे दडपण, अत्याचार किंवा संघर्ष. समाजशास्त्रीय दृष्टीने हिंसा ही केवळ वैयक्तिक कृती नसून ती सामाजिक संरचना, सत्तासंबंध, विषमता व मूल्यसंघर्षांचे उत्पादन असते. ग्रामीण हिंसा म्हणजे ग्रामीण समाजात अस्तित्वात असलेल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक रचनेतून निर्माण होणाऱ्या अशा सर्व कृती, प्रक्रिया व वर्तनांचा समूह, ज्यामुळे व्यक्ती, कुटुंब, समुदाय किंवा विशिष्ट सामाजिक घटकांना शारीरिक, मानसिक, आर्थिक किंवा सामाजिक हानी पोहोचते. ग्रामीण हिंसा ही केवळ प्रत्यक्ष शारीरिक मारहाणीपुरती मर्यादित नसून ती संरचनात्मक, प्रतीकात्मक आणि संस्थात्मक स्वरूपातही प्रकट होते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ग्रामीण हिंसेची मुळे ग्रामीण सामाजिक संरचनेत दडलेली असतात. जातीय श्रेणीव्यवस्था, जमीनधारणा पद्धती, संसाधनांचे असमान वितरण, पारंपरिक सत्ताकेंद्रे, पितृसत्ताक कुटुंबसंस्था तसेच आर्थिक अवलंबित्व या

घटकांमुळे ग्रामीण समाजात दुर्बल घटकांवर हिंसा होण्याची शक्यता अधिक असते. भारत व महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दलित, आदिवासी, महिला, भटके-विमुक्त समाज, भूमिहीन शेतकरी आणि अल्पसंख्याक हे ग्रामीण हिंसेचे प्रमुख बळी ठरलेले दिसून येतात. ग्रामीण हिंसा ही बहुतेक वेळा "सामाजिकदृष्ट्या मान्य" स्वरूपात आढळते. जातीय बहिष्कार, सामाजिक बहिष्करण, कामावर बंदी, अपमान, धमकी, आर्थिक शोषण किंवा धार्मिक-सांस्कृतिक दडपशाही ही हिंसेची अप्रत्यक्ष रूपे ग्रामीण समाजात सामान्य मानली जातात. यालाच संरचनात्मक किंवा प्रतीकात्मक हिंसा असे संबोधले जाते. या स्वरूपाच्या हिंसेमुळे प्रत्यक्ष रक्तपात न होता देखील सामाजिक अन्याय व शोषण टिकून राहते.

आधुनिक काळात ग्रामीण हिंसेच्या संकल्पनेला नवे परिमाण प्राप्त झाले आहे. राजकीय हस्तक्षेप, पंचायती राज संस्थांमधील सत्तासंघर्ष, विकास प्रकल्पांमुळे होणारे विस्थापन, वनहक्क व जमीन संपादन वाद, तसेच सोशल मिडिया व डिजिटल माध्यमांद्वारे पसरवली जाणारी अफवा व द्वेष यांमुळे ग्रामीण हिंसा अधिक संघटित, व्यापक आणि तीव्र स्वरूप धारण करत आहे. त्यामुळे ग्रामीण हिंसा ही आता केवळ स्थानिक सामाजिक समस्या न राहता ती राष्ट्रीय पातळीवरील सामाजिक-राजकीय प्रश्न बनली आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास, ग्रामीण हिंसा ही ग्रामीण समाजातील असमानता, सत्तासंबंध आणि संसाधनांवरील नियंत्रण यांचा परिणाम असून ती सामाजिक रचनेतील अंतर्निहित संघर्षांचे प्रकटीकरण आहे. त्यामुळे ग्रामीण हिंसेचा अभ्यास करताना कायदेशीर किंवा गुन्हेगारी चौकटीपेक्षा समाजशास्त्रीय चौकट अधिक महत्त्वाची ठरते.

**ग्रामीण हिंसेचे पारंपरिक स्वरूप:**

**१. जातीय व सामाजिक संरचनेतून निर्माण होणारी हिंसा:** ग्रामीण समाजात जातव्यवस्था खोलवर रुजलेली असल्याने उच्च—नीचतेचे भेद, अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार व अत्याचार यांचे प्रमाण आढळते. दलित व वंचित घटकांवरील हिंसा हे पारंपरिक स्वरूपाचे प्रमुख उदाहरण आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण समाजात जातव्यवस्था अजूनही प्रभावी आहे. उच्च जातीय वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी दलित व मागासवर्गीयांवर होणारी हिंसा ही ग्रामीण हिंसेचे महत्त्वाचे स्वरूप आहे. उदा., सार्वजनिक विहिरी किंवा मंदिरे वापरण्यावरून होणारे वाद, ग्रामसभांमध्ये दलित सदस्यांना बोलू न देणे, किंवा आंतरजातीय विवाहांवरून होणारी मारहाण व बहिष्कार. अनेक ठिकाणी सामाजिक बहिष्कार (गावाबाहेर काढणे, कामावर बंदी) हा हिंसेचा "अदृश्य" पण प्रभावी प्रकार आढळतो.

२९ सप्टेंबर २००६ रोजी एका दलित कुटुंबावर असामाजिक वर्चस्व गटांनी अत्याचार केला. Surekha Bhotmange आणि तिच्या तीन मुलांना हयात मारले गेले. या घटनेत जातीय द्वेष आणि जमीन/संसाधन संघर्षांचे गंभीर स्वरूप उघड झाले. सुरवातीला प्राथमिक नुसार महिलांवर आधी बलात्कार झाला होता पण अधिकृत तपासात त्याची पुष्टी न झाली नाही. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिल्यास ही घटना ग्रामीण हिंसेतील जातीय वर्चस्व, सामाजिक बहिष्कार, आणि गैर-समान संसाधन वाटप या कारणांवर आधारित आहे. दलित समाजातील दुर्बलता आणि स्थानिक राजकीय-सामाजिक संरचनेतील असंतुलन या घटकांनी हिंसेची तीव्रता वाढवली.

**२. जमीन, पाणी व संसाधनांवरील संघर्ष:** जमिनीची मालकी, वारसा हक्क, सीमावाद यांमुळे कुटुंबांतर्गत व गावस्तरीय संघर्ष निर्माण होतात. हे वाद अनेकदा शारीरिक हिंसेत रूपांतरित होतात. भारतातील ग्रामीण समाजाचे अत्यंत मुळाशी जमिनीचा अधिकार, उपयोग आणि व्यवस्था यांचा संबंध आहे. शेतकरी कुटुंबांचे जीवन अस्तित्व जमिनीवर अवलंबून असल्यामुळे जमिनीचे वाद (land disputes) हे ग्रामीण हिंसेचे सर्वात पारंपरिक आणि दीर्घकाळ चालणारे स्वरूप आहेत. प्राचीन काळापासून आजपर्यंत सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक घटकांनी या वादांना विविध रूपे दिली आहेत. हे वाद फक्त वैयक्तिक तणावाचे कारण नसून, सामाजिक संरचना, जाती—धर्माच्या असमानतेची पुनरुत्पत्ती, संपत्तीचे वितरण व प्रशासकीय दुर्बलता यांच्या जुळवाजुळवीचे परिणाम आहेत. जमीन ही उत्पादनाची मुख्य साधन असल्याने, मोठ्या मापावर जमिनीचा संचय करणाऱ्या कुटुंबांमध्ये सत्ता, संपत्ती आणि सामाजिक प्रतिष्ठा, लहान शेतकऱ्यांच्या, बेघर कामगारांच्या, उपजत व अनुसूचित जातींमधील जमीनविरहितत्वामुळे संघर्ष व हिंसा, एकाच जमिनीवर बहुतेकदा एकाहून अधिक कुटुंब/व्यक्ती दावा, पूर्वीची परंपरागत नोंदी, अप्रमाणित दस्तऐवज, अनौपचारिक वाटप ही वादांची प्राथमिक कारणे आहेत. पारंपरिक जातीवादामुळे जमिनीचे वाटप व हक्कात भेदभाव, उच्च जातींच्या गटाला अधिक हक्क व संरक्षण मिळते, निम्न गटांना वंचिती ही हिंसात्मक संघर्षाची मूळ कारणे आहेत.

**३. सन्मानाशी संबंधित हिंसा:** सन्मानाशी संबंधित हिंसा म्हणजे कुटुंब किंवा समुदायाच्या प्रतिष्ठेला धोका वाटणाऱ्या कृतींना शिक्षा देण्यासाठी व्यक्तीवर (बहुतेकदा स्त्रियांवर) केली जाणारी शारीरिक, मानसिक किंवा सामाजिक हिंसा. भारतीय ग्रामीण समाजात सन्मान (इज्जत, प्रतिष्ठा, मानमरातब) ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची मानली जाते. कुटुंब, जात, वंश, धर्म आणि समुदाय यांची प्रतिष्ठा व्यक्तीच्या वर्तनाशी जोडली जाते. विशेषतः स्त्रियांचे वर्तन, विवाह, लैंगिक शुचिता आणि सामाजिक मर्यादा यांना कुटुंबाच्या सन्मानाशी घट्टपणे जोडले गेले आहे. या सन्मानाच्या रक्षणासाठी जेव्हा कुटुंब किंवा समुदाय हिंसक मार्ग अवलंबतो, तेव्हा त्यातून सन्मानाशी संबंधित हिंसा उद्भवते. ही हिंसा ग्रामीण भागात आजही एक पारंपरिक, पण गंभीर सामाजिक समस्या म्हणून अस्तित्वात आहे. स्त्रियांच्या वर्तनावर सामाजिक नियंत्रण ठेवण्यासाठी "कौटुंबिक सन्मान" या नावाखाली मारहाण, बहिष्कार किंवा हत्या केल्या जातात. स्वेच्छा विवाह (*Love Marriage),* आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह, घटस्फोट किंवा प्रेमसंबंध, विवाह नाकारणे, सामाजिक संकेतांचे उल्लंघन ही त्याची मुख्य कारणे आहेत.

**४. टोळीयुद्ध व गावगुंडगिरी:** टोळीयुद्ध म्हणजे गावातील दोन किंवा अधिक गटांमध्ये दीर्घकाळ चालणारा संघटित संघर्ष, जो प्रामुख्याने सत्ता, वर्चस्व, संसाधने किंवा सामाजिक प्रतिष्ठा यासाठी होतो. पारंपरिक गावपातळीवरील टोळ्या, दादा संस्कृती व वैरभावातून होणारी हिंसा हेही ग्रामीण हिंसेचे स्वरूप होते. भारतीय ग्रामीण समाजात परंपरेने सहकार्य, सामूहिक जीवन व सामाजिक नियंत्रण यांना महत्त्व दिले गेले असले, तरी त्याचबरोबर टोळीयुद्ध (Factionalism) आणि गावगुंडगिरी ही ग्रामीण हिंसेची जुनी व सातत्याने आढळणारी स्वरूपे आहेत. गावातील सत्ता, प्रतिष्ठा, जमीन, राजकीय प्रभाव, जातीय वर्चस्व आणि आर्थिक संसाधनांवर

नियंत्रण मिळवण्यासाठी विविध गटांमध्ये संघर्ष निर्माण होतो. हे संघर्ष कालांतराने संघटित टोळ्यांच्या स्वरूपात हिंसक बनतात आणि संपूर्ण गावाच्या सामाजिक जीवनावर खोल परिणाम करतात.

**ग्रामीण हिंसेचे आधुनिक स्वरूप**

**१. राजकीय व निवडणूक हिंसा:** राजकीय व निवडणूक हिंसा म्हणजे राजकीय सत्ता मिळवण्यासाठी, टिकवण्यासाठी किंवा विरोधकांना दडपण्यासाठी निवडणूक प्रक्रियेदरम्यान किंवा राजकीय संघर्षात केली जाणारी शारीरिक, मानसिक, सामाजिक व आर्थिक हिंसा. स्थानिक स्वराज्य संस्था, निवडणुका, पक्षीय संघर्ष, सत्तास्पर्धा यांमुळे धमक्या, मारहाण, खून यांसारखी हिंसा वाढताना दिसते. पंचायती राज संस्थांमधील सत्ता ही ग्रामीण महाराष्ट्रात प्रतिष्ठेचे प्रतीक मानली जाते. ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद निवडणुकांदरम्यान धमक्या, मारहाण, मतदारांवर दबाव, किंवा गटांमध्ये संघर्ष होणे ही आधुनिक ग्रामीण हिंसेची उदाहरणे आहेत. सहकारी संस्था (साखर कारखाने, दूध संघ) यांच्याशी निगडित राजकीय वर्चस्वामुळेही हिंसक संघर्ष उद्‌भवतात.

भारतीय ग्रामीण समाजात पारंपरिक हिंसेचे स्वरूप (जमिनीचे वाद, जातीय संघर्ष, टोळीयुद्ध) आजही अस्तित्वात असले, तरी बदलत्या राजकीय प्रक्रियांमुळे राजकीय व निवडणूक हिंसा हे ग्रामीण हिंसेचे एक आधुनिक, संघटित आणि प्रभावी स्वरूप म्हणून पुढे आले आहे. लोकशाही व्यवस्थेतील निवडणुका, स्थानिक स्वराज्य संस्था, राजकीय सत्तेचा विस्तार आणि विकासनिधीवरील नियंत्रण यांमुळे ग्रामीण भागात राजकीय स्पर्धा तीव्र झाली असून त्यातून हिंसक संघर्ष उद्‌भवताना दिसतात. मतदारांवर दबाव व धमक्या, बूथ कॅप्चरिंग, उमेदवारांवर हल्ले, पक्षीय कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष, मतपेट्या फोडणे, प्रचारात हिंसा, जातीय/धार्मिक तेढ निर्माण करणे इत्यादी प्रकारांचा यामध्ये समावेश होतो.

**२. विकास प्रकल्प व विस्थापनामुळे निर्माण होणारी हिंसा:** विकास प्रकल्पामुळे होणारे विस्थापन म्हणजे सार्वजनिक किंवा खासगी विकास योजनांसाठी जमीन संपादन करताना स्थानिक लोकांना त्यांच्या नैसर्गिक संसाधनांपासून, निवासस्थानांपासून आणि सामाजिक-सांस्कृतिक जीवनापासून दूर करणे. औद्योगिकीकरण, धरणे, महामार्ग, खाणकाम यांमुळे विस्थापन, उपजीविकेचा नाश व आंदोलनांवर दडपशाही ही आधुनिक ग्रामीण हिंसेची रूपे आहेत. स्वातंत्र्यानंतर भारताने औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि आर्थिक विकासाच्या मार्गावर वाटचाल केली. धरणे, महामार्ग, औद्योगिक वसाहती, विशेष आर्थिक क्षेत्रे (SEZ), खाणी, वीज प्रकल्प, स्मार्ट सिटी आणि मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे ग्रामीण भागात विकासाची प्रक्रिया वेगाने घडत आहे. मात्र, या विकास प्रक्रियेचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे विस्थापन (Displacement). विकासाच्या नावाखाली लाखो ग्रामीण लोक, विशेषतः शेतकरी, आदिवासी व पारंपरिक उपजीविकेवर अवलंबून असलेले समुदाय, त्यांच्या जमिनी, घरे आणि सांस्कृतिक ओळखीपासून दूर केले जात आहेत. याच प्रक्रियेतून विकासप्रेरित हिंसा हे ग्रामीण हिंसेचे एक आधुनिक आणि संरचनात्मक स्वरूप निर्माण झाले आहे. महाराष्ट्रातील धरणे, महामार्ग, औद्योगिक व विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) प्रकल्पांमुळे अनेक ग्रामीण व आदिवासी समुदायांचे विस्थापन झाले आहे. नर्मदा खोरे, कोकण व विदर्भातील काही प्रकल्पांमध्ये जमीन अधिग्रहण, अपुरी भरपाई आणि पुनर्वसनाच्या प्रश्नांमुळे शासन व स्थानिक लोकांमध्ये संघर्ष आणि आंदोलनात्मक हिंसा दिसून आली आहे.

**३. लैंगिक आणि कौटुंबिक हिंसा:** लैंगिक हिंसा म्हणजे व्यक्तीच्या इच्छेविरुद्ध तिच्या शरीरावर किंवा लैंगिक स्वातंत्र्यावर केलेला अत्याचार. कौटुंबिक हिंसा म्हणजे कुटुंबाच्या चौकटीत पती—पत्नी, सासर—माहेर, पालक—मुले यांच्यात होणारी शारीरिक, मानसिक, लैंगिक किंवा आर्थिक हिंसा. स्त्रियांवरील घरगुती हिंसा, लैंगिक शोषण व मानवी तस्करी ही ग्रामीण भागातही आधुनिक स्वरूपात वाढत आहे. भारतीय ग्रामीण समाजात कुटुंब ही सामाजिक व्यवस्थेची मूलभूत संस्था मानली जाते. परंपरेने कुटुंबाला सुरक्षिततेचे व आधाराचे प्रतीक मानले गेले असले, तरी बदलत्या सामाजिक—आर्थिक परिस्थितीत लैंगिक आणि कौटुंबिक हिंसा हे ग्रामीण हिंसेचे एक गंभीर व आधुनिक स्वरूप म्हणून पुढे आले आहे. पितृसत्ताक मूल्यव्यवस्था, आर्थिक अवलंबित्व, अशिक्षण, दारिद्र्य, व्यसनाधीनता आणि सामाजिक मौन (culture of silence) यांमुळे ग्रामीण भागात स्त्रिया, मुली, वृद्ध आणि कधी कधी पुरुषही कौटुंबिक व लैंगिक हिंसेचे बळी ठरत आहेत.

**४. आधुनिक तंत्रज्ञान व सोशल मिडियाचा प्रभाव:** आधुनिक तंत्रज्ञान म्हणजे डिजिटल साधने, इंटरनेट सेवा, मोबाइल ॲप्स, कृत्रिम बुद्धिमत्ता व डिजिटल व्यवहार प्रणाली आणि सोशल मिडिया म्हणजे व्यक्तींना माहिती शेअर, प्रतिक्रिया व संघटनाची सुविधा देणारे डिजिटल मंच. मोबाईल, सोशल मीडिया, अफवा, व्हिडिओ क्लिप्स यांच्या माध्यमातून बदनामी, धमकी व सामाजिक बहिष्कार घडवून आणणे हे नवे स्वरूप निर्माण झाले आहे. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे भारतीय ग्रामीण समाजात मोठ्या प्रमाणावर बदल घडून आले आहेत. स्मार्टफोन, इंटरनेट, सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्स (WhatsApp, Facebook, Instagram, YouTube इ.) यांच्या प्रसारामुळे ग्रामीण भाग जागतिक माहितीप्रवाहाशी जोडला गेला आहे. तथापि, या तंत्रज्ञानाचा वापर केवळ विकासात्मक न राहता हिंसा, द्वेष, अफवा, सायबर गुन्हे व सामाजिक संघर्ष वाढविण्यासाठीही होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान व सोशल मिडियाचा प्रभाव हा ग्रामीण हिंसेचे एक महत्त्वाचे आधुनिक स्वरूप बनत आहे.

१६ एप्रिल २०२० ला कोरोना लॉकडाऊन काळात व्हॉट्सअपवर अफवा पसरल्यामुळे काही साधूंना चोर समजून गावातील गटांनी त्यांची हत्या केली. पोलिसांना देखील मारहाण झाली. अनेक संशयितांना अटक करण्यात आली. या घटनेत सोशल मिडिया अफवा, समूहात्मक हिंसा, आणि धार्मिक समजुतींचा वापर यांचा मिसळ होऊन हिंसेचे आधुनिक स्वरूप दिसते. तंत्रज्ञानाच्या चुकीच्या वापरामुळे सामाजिक तणाव वाढला आणि हिंसा निर्माण झाली.

**निष्कर्ष:** भारतीय ग्रामीण समाज परंपरेने सहकार्य, सामंजस्य व परस्परावलंबनावर आधारित मानला जातो. मात्र गेल्या काही दशकांत सामाजिक, आर्थिक, राजकीय व तांत्रिक बदलांचा वेग प्रचंड वाढल्याने ग्रामीण समाजात तणाव, असंतोष व हिंसेची नवी

रूपे उदयास आली आहेत. आधुनिक काळातील ग्रामीण हिंसा ही केवळ वैयक्तिक आक्रमकतेचा परिणाम नसून ती संरचनात्मक असमानता, सत्तासंघर्ष व मूल्यपरिवर्तन यांचा एकत्रित परिणाम आहे.

जमिनीचे वाद हे केवळ आर्थिक किंवा कायदेशीर प्रश्न नसून भारतातील ग्रामीण समाजाची सामाजिक रचना, ऐतिहासिक असमानता, वर्ग-जातीय भेद, विकास धोरणांची अपूर्णता आणि प्रशासनातील अडचणी या सर्वांचा संगम आहे. ग्रामीण समाजातील सन्मानाशी संबंधित हिंसा ही परंपरा, पितृसत्ता, जातीय वर्चस्व आणि सामूहिक मानसिकतेची फलश्रुती आहे. ही हिंसा सामाजिक शिस्त राखण्याच्या नावाखाली मानवी स्वातंत्र्याचा गळा घोटते. टोळीयुद्ध व गावगुंडगिरी ही ग्रामीण हिंसेची संघटित, सत्ताकेंद्रित आणि संरचनात्मक समस्या आहे. ती केवळ व्यक्तीगत गुन्हेगारी नसून, ग्रामीण समाजातील जात, वर्ग, राजकारण आणि प्रशासनातील त्रुटी यांचे प्रतिबिंब आहे.

ग्रामीण राजकीय व निवडणूक हिंसा ही लोकशाही प्रक्रियेतील विकृती असून ती ग्रामीण समाजातील जातीय संरचना, सत्तासंघर्ष, गुन्हेगारीकरण आणि प्रशासनिक दुर्बलतेतून उद्भवते. विकास प्रकल्पांमुळे निर्माण होणारी ग्रामीण हिंसा ही विकास प्रक्रियेतील असमानता, अन्याय व वंचितीचे प्रतीक आहे. विकास हा जर मानवी, समावेशक व न्याय्य नसेल तर तो हिंसक विरोधाला जन्म देतो. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या दृष्टीने विकास म्हणजे विस्थापन नव्हे, तर सुरक्षितता, सन्मान आणि सहभाग असायला हवा. आधुनिक तंत्रज्ञान व सोशल मिडियामुळे ग्रामीण समाजाला नव्या संधी मिळाल्या असल्या, तरी त्याचबरोबर नव्या स्वरूपाची हिंसा, संघर्ष व अस्थिरता निर्माण झाली आहे.

**संदर्भ ग्रंथसूची:**


१. Desai, A. R. (2005). Rural sociology in India. Mumbai: Popular Prakashan.
२. Srinivas, M. N. (1996). Indian social structure. New Delhi: Oxford University Press.
३. Shah, G. (2010). Social movements in India: A review of literature. New Delhi: Sage Publications.
४. Kumar, R. (2013). Violence and social change in India. New Delhi: Oxford University Press.
५. Patel, T. (2014). Indian family in transition. New Delhi: Sage Publications.
६. National Crime Records Bureau. (2022). Crime in India. New Delhi: Ministry of Home Affairs, Government of India.
७. पवार, बी. (२०१८). भारतीय समाजातील हिंसा आणि संघर्ष. कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
८. कांबळे, एस. (२०२०). जात, सत्ता आणि ग्रामीण संघर्ष. नागपूर: साई प्रकाशन.
९. देशपांडे, एन. (२०१९). ग्रामीण परिवर्तन आणि सामाजिक समस्या. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
१०. Banerjee, S. (2018). Rural violence and social change in India. Economic and Political Weekly, 53(12).
११. Gupta, D. (2011). Caste, violence and politics in rural India. Sociological Bulletin, 60(3).
१२. Patil, V. (2020). Social transformation and rural conflicts in Maharashtra. Indian Journal of Sociology, 4(2).


# ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने

**प्रा. डॉ. मेघराज रामहरी शिंदे** श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर, जिल्हा बुलढाणा.

**गोषवारा:** ग्रामीण समाजाचे स्वरूप आज वेगाने बदलत आहे. पारंपरिक शेतीप्रधान जीवनपद्धतीत मोठे परिवर्तन घडून आले आहे. यांत्रिकीकरण, हरित क्रांती, माहिती-तंत्रज्ञान, रस्ते, वीज, इंटरनेट व मोबाईल संपर्कामुळे ग्रामीण भाग आधुनिकतेकडे झुकत आहे. शिक्षणाचा प्रसार वाढला असून आरोग्य, दळणवळण आणि बाजारपेठांशी संपर्क सुलभ झाला आहे. ग्रामीण लोकसंख्या शेतीसोबतच उद्योग, सेवा क्षेत्र, स्वयंरोजगार व स्थलांतरावर अधिक अवलंबून होत आहे. संयुक्त कुटुंब पद्धतीऐवजी विभक्त कुटुंबांचे प्रमाण वाढले आहे. सामाजिक चालीरीती, मूल्ये व जीवनशैलीतही बदल दिसून येतात.

मात्र या बदलांसोबत अनेक आव्हानेही उभी राहिली आहेत. शेतीवरील अवलंबित्व अजूनही जास्त असल्याने अनिश्चित उत्पन्न, पाण्याची टंचाई, हवामान बदल व कर्जबाजारीपणा ही गंभीर समस्या आहे. बेरोजगारी, युवकांचे शहरांकडे स्थलांतर, शिक्षण व आरोग्य सुविधांचा अभाव, दारिद्र्य आणि सामाजिक विषमता टिकून आहे. पारंपरिक ज्ञान व संस्कृती लोप पावण्याची भीतीही निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्रामीण विकासासाठी शाश्वत शेती, रोजगारनिर्मिती, दर्जेदार शिक्षण-आरोग्य सेवा आणि समावेशक धोरणांची नितांत गरज आहे.

**प्रस्तावना:** भारतीय समाजरचनेचा पाया ग्रामीण समाजावर आधारित आहे. भारतातील मोठा लोकसंख्या वर्ग आजही ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. ग्रामीण समाज हा शेतीप्रधान, परंपरानिष्ठ, सामूहिक जीवनपद्धतीवर आधारित आणि निसर्गाशी जवळीक साधणारा समाज म्हणून ओळखला जातो. परंतु औद्योगिकीकरण, शहरीकरण, जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा प्रसार, शिक्षणाचा विस्तार आणि शासनाच्या विविध विकास योजनांमुळे ग्रामीण समाजाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. या बदलांमुळे ग्रामीण जीवनात अनेक सकारात्मक परिवर्तन घडून येत असले तरी त्याचबरोबर अनेक नवीन समस्या व आव्हाने निर्माण झाली आहेत.

ग्रामीण समाज म्हणजे असा समाज जिथे लोकसंख्या तुलनेने कमी असते, मुख्य व्यवसाय शेती व संबंधित उद्योगांवर आधारित असतो, सामाजिक संबंध जवळचे व वैयक्तिक स्वरूपाचे असतात आणि परंपरा, रूढी, चालीरीती यांना विशेष महत्त्व दिले जाते. ग्रामीण समाजात कुटुंब, जात, धर्म, ग्रामपंचायत यांसारख्या संस्था सामाजिक जीवनाचे नियंत्रण करतात.

**संशोधनाचा उद्देश:** १)ग्रामीण समाजाचे स्वरूप स्पष्ट करणे २)ग्रामीण समाजाच्या बदलाचे विश्लेषण करणे ३) ग्रामीण समाजातील बदलाची कारणे विशद करणे ४) ग्रामीण समाजासमोरील आव्हाने विशद करणे

**गृहीत कृत्ये:** १) ग्रामीण समाज बदलत आहे. २) ग्रामीण समाजासमोर अनेक आव्हाने आहेत.

**संशोधन पद्धती** प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आले आहे. ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने स्पष्ट करताना दुय्यम श्रोताच्या आधारे तथ्याचे वर्णनात्मक पद्धतीने विश्लेषण करण्यात आले आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** ग्रामीण समाजाच्या स्वरूपाचा अभ्यास समाजशास्त्रात विविध अभ्यासकांनी केला आहे. पूर्व साहित्यामध्ये ग्रामीण समाज प्रामुख्याने शेतीवर आधारित, निसर्गावर अवलंबून आणि पारंपरिक सामाजिक रचनेत गुंतलेला असल्याचे आढळते. रॅडक्लिफ-ब्राऊन, रॉबर्ट रेडफिल्ड, एम. एन. श्रीनिवास, डॉ. इरावती कर्वे यांसारख्या समाजशास्त्रज्ञांनी भारतीय ग्रामीण समाजाचे सखोल विश्लेषण केले आहे. रॉबर्ट रेडफिल्ड यांनी ग्रामीण समाजाला "लोक समाज" (Folk Society) असे संबोधले असून, त्याची वैशिष्ट्ये म्हणजे साधी जीवनशैली, एकसारखी मूल्यव्यवस्था, सामूहिकता व परंपरांचे पालन. एम. एन. श्रीनिवास यांनी जातव्यवस्था, गावसंस्था, संस्कृतीकरण व पाश्चात्तीकरण या संकल्पनांच्या माध्यमातून ग्रामीण समाजाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. डॉ. इरावती कर्वे यांनी कुटुंबसंस्था, नातेसंबंध आणि स्त्री-पुरुष भूमिका यांचा अभ्यास केला आहे. पूर्व साहित्यामध्ये ग्रामीण समाज हा तुलनेने स्थिर, बदलास धीमा, परंपरावादी व नैतिक मूल्यांनी बांधलेला असल्याचे चित्र दिसते. ग्रामपंचायत, जातपंचायत, देवालये व सण-उत्सव हे सामाजिक नियंत्रणाचे प्रमुख घटक मानले गेले आहेत. अशा प्रकारे पूर्व साहित्य ग्रामीण समाजाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक रचनेचे मूलभूत स्वरूप स्पष्ट करते.

**ग्रामीण समाजाचे पारंपरिक स्वरूप:** पूर्वीचा ग्रामीण समाज तुलनेने स्थिर स्वरूपाचा होता. शेती हा प्रमुख व्यवसाय असून लोकांचे जीवन निसर्गावर अवलंबून होते. संयुक्त कुटुंबपद्धती, जातव्यवस्था, आपसी सहकार्य, परंपरागत मूल्ये आणि नैतिकतेला मोठे महत्त्व होते. सामाजिक नियंत्रण अनौपचारिक स्वरूपाचे होते. गावातील वडीलधारी मंडळी, पंचायत, धर्मगुरू यांच्या निर्णयांना मान दिला जात असे.

**ग्रामीण समाजाच्या बदलास कारणीभूत घटक:**

**औद्योगिकीकरण:** औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण भागातून शहरांकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. कारखाने, उद्योग, सेवा क्षेत्रामुळे रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या. याचा परिणाम ग्रामीण समाजाच्या पारंपरिक व्यवसायावर झाला आणि शेतीवरील अवलंबित्व कमी होऊ लागले.

**शहरीकरण:** शहरी संस्कृतीचा प्रभाव ग्रामीण भागावर वाढत आहे. शहरातील जीवनशैली, उपभोगवादी संस्कृती, आधुनिक मूल्ये ग्रामीण समाजात प्रवेश करत आहेत. यामुळे ग्रामीण समाज अधिक गतिशील आणि परिवर्तनशील बनला आहे.

**शिक्षणाचा विस्तार:** शिक्षणामुळे ग्रामीण लोकांमध्ये जागरूकता वाढली आहे. अंधश्रद्धा, रूढी-परंपरांना आव्हान दिले जात आहे. स्त्रीशिक्षण, उच्च शिक्षणामुळे सामाजिक स्थित्यंतर घडून येत आहे.

**तंत्रज्ञान आणि माध्यमे:** मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया, दूरदर्शन यांमुळे ग्रामीण समाज जगाशी जोडला गेला आहे. माहितीचा वेगवान प्रसार होत असून ग्रामीण जीवनशैलीत आधुनिकता आली आहे.

**शासनाच्या विकास योजना:**

ग्रामीण विकास योजना, रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, स्वयं-सहायता गट, पंचायती राज व्यवस्था यांमुळे ग्रामीण समाजाच्या रचनेत मोठे बदल झाले आहेत.

**ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप**

1) **व्यवसायिक बदल:** पूर्वी शेती हा एकमेव व्यवसाय होता, परंतु आता ग्रामीण भागात दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, लघुउद्योग, सेवा व्यवसाय, स्वयंरोजगार वाढत आहे. अनेक युवक शहरांमध्ये नोकरीसाठी जात आहेत.

2) **कुटुंबसंस्थेतील बदल:** संयुक्त कुटुंबपद्धतीचे स्थान विभक्त कुटुंबपद्धती घेत आहे. आर्थिक स्वावलंबनामुळे व्यक्तिवाद वाढत आहे. कुटुंबातील पारंपरिक अधिकारसंबंध बदलत आहेत.

3) **सामाजिक संबंधांतील बदल:** पूर्वीचे जिव्हाळ्याचे, प्राथमिक संबंध आता औपचारिक आणि दुय्यम स्वरूपाचे होत आहेत. जातीय बंधने काही प्रमाणात सैल झाली असली तरी पूर्णपणे नाहीशी झालेली नाहीत.

4) **स्त्रीस्थितीतील बदल:** शिक्षण, रोजगार, स्वयं-सहायता गटांमुळे ग्रामीण महिलांचे सामाजिक व आर्थिक स्थान सुधारत आहे. महिलांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढत आहे.

5) **राजकीय जागरूकता:** ग्रामीण भागात राजकीय जाणीव वाढली आहे. पंचायत राज व्यवस्थेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जनसहभाग वाढला आहे.

**ग्रामीण समाजासमोरील प्रमुख आव्हाने**

1) **बेरोजगारी आणि स्थलांतर:** ग्रामीण भागात पुरेशा रोजगार संधी नसल्याने मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे. यामुळे ग्रामीण कुटुंबे विखुरली जात आहेत.

2) **शेती संकट:** निसर्गावर अवलंबित्व, हवामान बदल, पाणीटंचाई, कर्जबाजारीपणा, बाजारातील अस्थिरता यामुळे शेती संकटात सापडली आहे. याचा थेट परिणाम ग्रामीण समाजावर होतो.

3) **दारिद्र्य:**ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणावर दारिद्र्य आहे. आर्थिक असमानता वाढत आहे.

4) **शिक्षण व आरोग्य सुविधांचा अभाव:** ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण संस्था आणि आरोग्य सेवा अपुऱ्या आहेत. यामुळे मानवी विकासावर मर्यादा येतात.

**5) सामाजिक विषमता:** जातिव्यवस्था, लैंगिक असमानता, अस्पृश्यता यांसारख्या समस्या काही प्रमाणात अजूनही अस्तित्वात आहेत.

**6) सांस्कृतिक बदलांचे दडपण:** शहरी संस्कृतीच्या प्रभावामुळे ग्रामीण परंपरा, लोककला, स्थानिक संस्कृती लोप पावत आहेत. सांस्कृतिक ओळख जपण्याचे आव्हान ग्रामीण समाजासमोर उभे आहे.

**निष्कर्ष:** ग्रामीण समाजाचे स्वरूप आज झपाट्याने बदलत आहे. हे बदल अपरिहार्य असून विकासाच्या दृष्टीने आवश्यकही आहेत. मात्र हे परिवर्तन संतुलित आणि सर्वसमावेशक असणे गरजेचे आहे. ग्रामीण समाज मजबूत झाला तरच राष्ट्रीय विकास सशक्त होऊ शकतो. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या बदलत्या स्वरूपाचा सकारात्मक उपयोग करून घेत, त्यासमोरील आव्हानांवर प्रभावी उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे.

**ग्रामीण विकासासाठी आवश्यक उपाय** १. शेती व ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन देणे. २. ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीवर भर देणे. ३. शिक्षण व आरोग्य सुविधा सुधारित करणे. ४. स्त्री सक्षमीकरण व युवक विकास कार्यक्रम राबवणे. ५. जलसंधारण व पर्यावरण संवर्धनावर भर देणे. ६. पंचायती राजसंस्थांना अधिक सक्षम करणे. ७. ग्रामीण संस्कृती व परंपरांचे संवर्धन करणे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. Desai A. R. — Rural Sociology in India (Popular Prakashan, Mumbai).
२. Shrinivas M. N. — Village, Caste, Gender and Method (Oxford University Press).
३. Shrinivas M. N. — Social Change in Modern India (Orient Longman).
४. Mujumdar D. N. — Rural Profiles (Asia Publishing House).
५. Singh Yogandra — Modernization of Indian Tradition (Thomson Press).
६. Chouhan B.R. — Rural Sociology (Rawat Publications).
७. Singh Ram Aharon— Indian Village (Pearson Publications).
८. गाडगीळ, डॉ. गंगाधर — ग्रामीण समाजशास्त्र (पॉप्युलर प्रकाशन, पुणे).
९. पाटील, डॉ. शरद — भारतीय ग्रामीण समाज (श्रीविद्या प्रकाशन).
१०. देशपांडे, डॉ. सुहास — ग्रामीण विकास आणि समाज (मेहता पब्लिशिंग हाऊस).

# बालगुन्हेगारांचे सामाजिक अध्ययन: विशेष संदर्भ संभाजीनगर जिल्हा

**प्रा. डॉ. एस. के. राठोड** समाजशास्त्र विभाग, विनायकराव पाटिल महाविद्यालय वैजापूर, छत्रपती संभाजीनगर
**अंकोश गंगाराम जाधव** संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, विनायकराव पाटिल महाविद्यालय वैजापूर

**प्रस्तावना:** सध्या विकसित आणि विकसनशील अशा दोन्हीं ही समाजामध्ये बाल गुन्हेगारीची समस्या एक आव्हान म्हणून समोर आली आहे. आज जगातील सर्व देश लहान मुलांवरील वाढत्या गुन्हेगारीमुळे हैराण आहेत. त्यामुळेच पालक, शिक्षक, समाज, कार्यकर्ते, गुन्हेतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, सरकार यांचा गांभिर्याने विचार करतांना दिसतात. किशोर वयीन मुलांमध्ये समाजविघातक आणि विकृत वर्तन वाढणे हे कोणत्याही निरोगी समाजाचे लक्षण नाही. समाजाच्या सुख, शांती आणि समृद्धिसाठी ही धोक्याची घंटा आहे. जी शेवटी देशाच्या विकासाच्या गतीला बाधा आणणारी आहे. त्यामुळे गुन्हेगारीसाठी जवाबदार घटक शोधून ते रोखण्यासाठी उपाय-योजना करणे हे समाजाचे आणि राष्ट्राचे कर्तव्य बनते. गुन्हेगारी ही प्रत्येक समाजात अपरिहार्य आणि अंगभूत घटना मानली जाते. गुन्हेगारी ही विश्वव्यापी घटना आहे. जेथे जेथे माणूस आहे, तेथे तेथे गुन्हेगारी आहे. व्यक्ती आपल्या गरजा समाजमान्य मार्गाने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्यांच्या त्या गरजा समाज मान्य मार्गाने जेव्हा पूर्ण होत नाहीत, तेव्हा तो गुन्हेगारी मार्गाने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. या मानवांच्या गुन्ह्यापासून समाजावर व समाजातील सभोतालच्या वातावरणात विघातक परिणाम होतो, त्यामुळे सामाजिक नियंत्रणाचा प्रश्न गंभीर बनतो.

**संशोधन समस्या:** भारतातील बाल निरिक्षण गृहांची स्थापना ही कायाद्याशी संघर्ष करणाऱ्या बालकांच्या संरक्षण, सुधारणा व पुर्नवसनासाठी करण्यात आली आहे. तथापी, बाल निरिक्षण गृहातील मुलांमध्ये नैतीक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक मुल्यांचा विकास अपेक्षित प्रमाणात होत आहे का? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. कौटुंबिक विघटन, दारिद्रय, शिक्षणाचा अभाव, सामाजिक कलंक, व्यसनाधिनता, गुन्हेगारी वातावरण व संस्थात्मक मर्यादा यामुळे बालनिरीक्षन गृहितील मुलांच्या मनावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसून येते. म्हणून "बाल निरिक्षण गृहातील मुलांमध्ये कोणत्या प्रकारचे मुल्य विकसित होत आहेत, त्या मुल्यांच्या निर्मितीवर कोणते समाजिक घटक प्रभाव टाकतात आणि पुनर्वसन प्रक्रियेत मुल्य शिक्षणाची भुमिका काय आहे?" ही प्रमुख संशोधन समस्या ठरते.

**संशोधनाचे उद्देश:** बाल निरीक्षण गृहातील मुलांच्या सामाजिक, आर्थिक पार्श्वभुमीचा अभ्यास. किशोर गुन्हेगाराने केलेल्या गुन्ह्यात संगणक, इंटरनेट, मिडीया, मोबाईल व दुचाकीचा वापराचा सहसंबंध शोधणे. बालनीरीक्षण गृहातील मुलांनी केलेल्या गुन्ह्याचे जाणून घेणे. बालगुन्हेगारीस जबाबदार कारणाचा शोध घेणे व विश्लेषण करणे.
बाल निरीक्षण गृहातील मुलांना भेडसावणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

**गृहितकृत्ये :** विघटनकारी सामाजिक - आर्थिक पार्श्वभुमी मुलांना बालगुन्हेगारीकडे वळणास कारणीभूत आहे. संगणक, इंटरनेट आणि मोबाईल व दुचाकी, वाढत्या प्रसारामुळे मुले गुन्हेगार बनत आहे. बाल निरीक्षणगृहामुळे गुन्हेगार मुलांचे पुर्नवसन होत आहे.

**साहित्य आणि पद्धत:** प्रस्तुत शोधनिबंध हे पुर्णत: प्राथमिक आणि दुय्यम तथ्यावर आधारित आहे. समाजमाध्यमे गुन्हेस्थितीच्या आकलनासाठी संशोधकाने विविध संदर्भग्रंथ, मासकि, प्रकाशित लेख, वृत्तपत्रातील लेख, शोधप्रबंध व ऑनलाईन आकडेवारीचा तथ्यांचा स्त्रोत म्हणून उपयोग केला आहे. प्राप्त माहितेचे व्यष्टी अध्ययन प्रस्तुत केले आहे.

**संबंधीत साहित्याचा आढावा:** पाटील आर. के. (२००३) यांनी "बाल गुन्हेगार कायदे विषयक व गुन्हेगारी विषयक परिस्थितीचा अभ्यास" करतांना बालगुन्हेगारांना योग्य ती न्यायव्यवस्था मिळणे गरजेचे आहे, आणि त्यांच्या गरजा, विकास चांगला होण्यासाठी समाजाने आवश्यक ते प्रयत्न केले पाहिजे, असे मांडले आहे. तसेच एखाद्या १६ वर्षाखालील मूलाला किंवा मुलीला बालगुन्हेगार म्हणून जर वागणूक मिळत असेल तर Uniform Age - एकसमान वयाचे वर्णन करावे असे मांडले आहे. भारताच्या राज्यघटनेच्या कलम २१ नुसार 'बालगुन्हेगार' चार महिन्याच्या आत त्यांच्या केसचे Disposal करण्यात येण्याची खात्री करणे असे त्यांनी सुचविले आह. बालगुन्हेगारीसाठी विशेष तज्ञ, प्रशिक्षित शिक्षणाची निर्मिती करणे असे मत त्यांनी मांडले आहे. **दुगावगर व्ही. (०९ फेब्रुवारी २००७)** यांनी दैनिक सकाळ औरंगाबाद या दैनिकामध्ये "बालगुन्हेगार" हे नशेत घरची गरीबी, शिक्षणाचा अभाव, आई-वडिलांकडून होणारे दुर्लक्ष, संस्कारापासून कोसो दुर असलेले शहरातील लहान मुले, लहान - मोठ्या चोऱ्या कडे वळली आहे. टपऱ्या, मेडीकल दुकाने, जनरल स्टोअर्स फोडणारे हे बालगुन्हेगार आता सिगारेट, दारु नव्हे तर चक्क व्हाईटनरच्या नशेकडे वळली आहेत, या मुलांना रस्ता कसा दाखववावा हा प्रश्न पोलिस खात्याकडे आहे. **युजीसी अनुदास आयोग (१९६७)**, स्वावलंबी शिक्षणशास्त्र महाविद्यायल वर्धा (१९६७) शहरातील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये गुन्हेगारीचा शाध घेणे यानुसार जास्तीत जास्त विद्यार्थी जे गुन्हेगार म्हणून आढळतात पण त्यांच्या स्वत:मध्ये गुन्हगारी कमी प्रमाणात आढळते. अनुवांशिक व परिस्थितीचा या दोघांचाही परिणाम होतो. तसेच घरातील वातावरण दूषित असेल तर मुले गुन्हेगारीकडे वळली जातात. घरातील दारिद्रय, बेकारी असल्यामुळे देखिल मुले गुन्हेगरीकडे वळलेली दिसून येतात. उद्धवस्त कुटूंबातील अनैतिकता या कारणामुळे मुले गुन्हेगारीकडे वळलेली दिसतात.

**अल्ववयीन मुलांकडून होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या कमी झाली आहे.** २०१३ ते २०२२ या काळात किशोरांनी केलेल्या गुन्ह्यांबद्दल एनसीआरबीच्या आकडेवारीचे विश्लेषण केल्यास एक उल्लेखनीय ट्रेंड दिसून येतो. या कालावधीत, नोंदवलेल्या गुन्ह्यांची संख्या ४३,५०६ वरुन ३०,५५५ पर्यंत कमी झाली आहे. म्हणजेच १२,९५१ गुन्ह्यांची घट झाली आहे. जी १० वर्षांत अंदाज ३०% आहे.




२०१३ पासून २०१६, २०१९ आणि २०२१ मध्ये कधीकधी अपवाद वगळता किशोरवयीन मुलाकडून केलेल्या गुन्ह्यांच्या संख्येत सामान्यत: घट दिसून आली आहे. यावर्षामध्ये मागिल वर्षाच्या तुलनेत नोंदवलेल्या गुन्ह्यांमध्ये किरकोळ वाढ झाली आहे. विशेषत: २०१६ मध्ये गुन्ह्यांची संख्या ३३,४३३ वरुन ३५,८४९, २०१९ मध्ये ३१,५९१ वरुन ३२,२३५ आणि २०२१ मध्ये २९,७६८ वरुन ३१,१७० झाली आहे. एनसीआरबी बालगुन्हेगारी गुन्ह्यांचे डेटा दोन श्रेणीमध्ये वर्गीकृत करते. भारतीय दंड संहिता (आयपीसी) चे उल्लंघन करुन केलेले आणि विशेष आणि स्थानिक कायद्याचे (एसएलएल) उल्लंघन करुन केलेले या डेटाच्या विश्लेषणातून २०१३ ते २०२२ या कालावधीत दोन्ही श्रेणीमध्ये घट दिसून येते. विशेषत: या कालावधीत आयपीसी संबंधीत गुन्ह्याची सुख्या ३८,७६५ वरुन २६,५७१ पर्यंत कमी झाली आहे. तर एसएलएलशी संबंधीत गुन्ह्यांची संख्या ४,७४१ वरुन ३,९८४ पर्यंत कमी झाली. १३ राज्यामध्ये प्रत्येकी १०,००० हून अधिक गुन्हे नोंदवले गेले आहेत. मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र १० वर्षात ५०,००० हून अधिक गुन्ह्यांसह अव्वल स्थानावर आहे.




**प्रतिबंधात्मक उपाययोजना :** आजार झाल्यावर त्यावर उपचार करीत बसण्यापेक्षा आजार होऊच नये यादृष्टीने अगोदरच काही खबरदारी (काळजी) घेणे हे अधिक योग्य ठरते. या तत्त्वापनुसार बालगुन्हेगार निर्माणच होणार नाहीत यासाठी काही उपाय करणे

योग्य ठरते. अशा उपायांनाच प्रतिबंधात्मक उपाययोजना असे म्हणतात. बालगुन्हेगारीसाठी पुढील प्रतिबंधात्मक उपाययोजना आपणास सुचविता येईल.

**१. समुपदेशन केंद्राची स्थापना :** उध्वस्त कुटूंब, अनैतिक कुटूंब, मोठ्या आकाराचे कुटूंब, एक पालक कुटूंब, सावत्र माता किंवा पिता असलेले कुटुंब इत्यादी प्रकारच्या कुटूंबातील मुलांचे संगोपन नीट होत नाही. ती कौटूंबीक प्रेमापासून वंचित राहतात. परिणामी गुन्हेगारी वर्तनाकडे वळतात. म्हणून अशा मुलांचे व त्यांच्या पालकांचे समुपदेशन करुन त्यांच्यात प्रेमाचे नाते निर्माण करण्यासाठी वैवाहिक व कौटूंबिक समुपदेशन केंद्रे स्थापन करावीत. यासाठी शासन बिनशासकीय संस्था (NGOs), सामाजिक कार्यकर्ते, समाजशास्त्रज्ञ, बालमानसशास्त्रज्ञ इत्यादींनी सामूहिकपणे प्रयत्न करावेत.

**२. दारिद्रय व बेकारीचे निर्मूलन :** पालकांचे दारिद्रय व बेकारी यामुळे अनेक बालके गुन्हेगारीकडे वळतात. म्हणून बालगुन्हेगारीस प्रतिबंध करण्यासाठी दारिद्रय व बेकारी या समस्यांचे निर्मूलन केले पाहिजे. गरिब कुटूंबांना पर्याप्त रोजगार मिळवून देणाऱ्या योजना सुरु केल्या पाहिजेत. युवकांनाही व्यावसायिक शिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करुन दिले पाहिजेत त्यामुळे ते गुन्हेगारीपासून दूर राहतील.

**३. सुधारणांची स्थापना :** अनाथ, दुर्लक्षित, आई-वडिलांनी टाकून दिलेली, घरातून पळालेली मुले गुन्हेगार होण्याची शक्यता खूप असते. त्यामूळे अशा मुलांचा शोध घेऊन त्यांना सुधारसंस्थात वेळीच भरती करावे. अशा मुलांना निपुत्रिक जोडप्यांनी दत्तक घ्यावे. त्यास सेवाभावी संस्था व व्यक्तींनी पुढाकार घ्यावा.

**४. मानसोपचार केंद्राची स्थापना :** भावनिक किंवा मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असामान्य मुलांचा शोध घेऊन त्यांच्यावर मानसोपचार करावेत. त्यासाठी अशा केंद्राची संख्या वाढवावी. या केंद्रात अशा मुलांच्या वर्तनविषयक समस्यांची सोडवणूक करावी. यासाठी मानसोपचार तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सेवाभावी संस्था, शासकीय कर्मचारी यांनी एकत्रितपणे कार्य करावे.

**५. व्यक्तिमत्व विकास :** मुलांच्या सर्वांगिण विकासाचे प्रयत्न करावेत. मुलांना गुंतवून ठेवण्यासाठी व त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम सुरु करावेत. मुलांवर सुसंस्कार करणारे साहित्य व चित्रपट प्रसारित करावे. तसेच मुलांच्या मनोरंजनासाठी विविध कला व खेळ यांच्या पर्याप्त सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

**६. शिक्षणप्रसार :** बालगुन्हेगारांपैकी बहुसंख्यांक मुले अशिक्षित असतात. त्यामुळे प्रत्येक मूल शाळेत गेलेच पाहिजे व सुशिक्षित झालेच पाहिजे. याची काळजी घ्यावी. मुलांच्या शिक्षणात मूल्यशिक्षणावर विशेष लक्ष्य द्यावे. समाजात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी सरकार शिक्षणसंस्था, पालक व शिक्षक इत्यादींनी प्रयत्न केले पाहिजे.

**७. कायद्याची कडक अंमलबजावणी :** गुन्हेगारीस व बालगुन्हेगारीस प्रतिबंध करण्यासाठी केलेल्या कायद्यांची अत्यंत कडकपणे अंमलबजावणी करावी. प्रौढ गुन्हेगार मुलांचा दुरुपयोग करणार नाहीत, त्यांना गुन्हेगारीकडे आकर्षित करणार नाहीत याची काळजी घेतली जावी. या कामी पोलीस यंत्रणेने सतत दक्ष्य राहावे. लोकांनीही याकामी पोलिसांना मदत करावी, बालकांचे शोषण होणार नाही व त्यांचे हक्क अबाधित राहावेत यासाठी सर्वांनी जागरुक राहिले पाहिजे.

**साहित्य आणि पद्धत :** संशोधनामध्ये वेगवेगळ्या घटकांच्या अभ्यासासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करावा लागतो. माहिती संकलनाच्या पद्धतीचा वापर करुन "छत्रपती संभाजीनगर बालनिरिक्षण गृहातील मुलांचे सामाजिक अध्ययन" या विषयाच्या शास्त्रीय अभ्यासाठी खालील संशोधन पद्धती अवलंबवऱ्यात आली. यामध्ये नमुना निवड छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील व्यष्टी अध्ययन बालनिरिक्षण गृहातील १० केस यासाठी व्यष्टी अध्ययन करण्यात आले. या संशोधन विषयासाठी खालील दोन स्त्रोताद्वारे तर ते संकलित करण्यात आली. एक प्राथमिक स्त्रोत संशोधन विषयाची तथ्य प्रामुख्याने या स्त्रोतावर अवलंबून आहेत. यामध्ये निरीक्षण ही संशोधनासंबंधी अद्यावत माहिती मिळवण्याच्या दृष्टिने महत्त्वाचे साधन मानले जाते.

या शोध लेखकामध्ये बालनिरीक्षणगृह छत्रपती संभाजीनगर मधील निरिक्षणगृहातील सध्यास्थितीमध्ये उपलब्ध असलेल्या मुलांची माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. या बालनिरिक्षण गृहात असलेल्या मुलांची ओळख न पटण्यासाटी त्याचे नाव, गाव, तालुका,जिल्हा, इतरही काही बाबींचा उल्लेख टाळण्यात येत आहे. मुलांकडूनही माहिती जाणुन घेण्यासाठी प्रश्नार्थक स्वरुपात प्रत्यक्ष मुलाखत घेऊन निरीक्षणाद्वारे उपलब्ध माहितीचे विश्लेषण केले आहे.

**निष्कर्ष :** बालके ही राष्ट्राची भावी मानव विकासाचे संसाधन आहेत. बालकांसंदर्भात विविध प्रश्न व समस्या समाजात आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी विविध बालकांसंदर्भात कायदे व नियम शासनाने तयार केले आहेत. परंतु सदर कायद्यांची अमलबजावणी तेवढ्याच संवेदनशिलतेने होणे गरजेचे आहे. अपरिपक्व, निराधार, उन्मार्गी किशोरवयीन मुलांनी केलेल्या गुन्ह्यासंबंधीची आधुनिकता संकल्पना २० व्या शतकात रुढ झाली. तोपर्यंत मुलांना सुधारण्याचेच प्रयत्न केले जातात. मानसशास्त्रज्ञ व शरीरशास्त्रज्ञ यांच्या मते, सात वर्षाच्या आतील वयाचे मूल कोणतेही कृत्य समजून करीत नाही. एखादे कृत्य त्याच्या हातून घडून गेले तरी ते त्याने जाणीवपूर्वक केलेले नसते. म्हणूनच बालगुन्हेगाराच्या (विधिसंघर्षग्रस्त) वयाची किमान मार्यदा सर्व देशांत (फिनलंड चा अपवाद वगहता, तेथे ही मर्यादा १६ वर्षे आहे) सात ते आठ वर्ष आहे. कमाल मर्यादा मात्र विविध देशांतच नव्हे तर एकाच देशातील विविध राज्यांतही वेगवेगळी आहे. अमेरिका युरोपमध्ये १६ ते २१, आशियामध्ये १५ ते २० अशी मर्यादा असली, तरी युरोप, आशिया व अमेरिका या देशांतील बऱ्याच राज्यांमध्ये १८ कमाल वय धरले जाते. भारतात १९९६ च्या मुलांच्या कायद्याप्रमाणे हे कमाल वय मुलांसाठी १६ व मुलींसाठी १८ आहे. १९७६ च्या सुधारित कायद्यामध्ये हे वय मुलींसाठी २० पर्यंत वाढविले आहे. गुन्हेगारीचे निराकरण करण्याच्या व तिचा प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने बालगुन्हेगारांशी संबंध येणाऱ्या पोलीस, वकील, न्यायाधीश, परिविक्षा अधिकारी आणि संस्थेतील अधिकारी व कर्मचारी या सर्वांचेच प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील विविध समाजसेवा प्रशिक्षण संस्था व समाजकल्याण विभागाच्या महात्मा गांधी ट्रेनिंग इंस्टिट्यूटमध्ये परिविक्षा अधिकारी, संस्थेतील

अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाची सोय आहे. याबरोबरच गुन्हेगारीपासून बालकांचे व पालकांचे संरक्षण करणे हे कार्य महत्त्वाचे मानून शासन व विविध समाजसेवी संस्था यांनी सामाजिक संरक्षणावर भर दिला तरच गुन्हेगारीचा प्रतिबंध करणे शक्य होईल. या संदर्भात नागरिकांनीही या समस्येबद्दल जागरूक राहणे महत्त्वाचे ठरते. गुन्हेगारीचे निराकरण होण्यासाठी एकंदर सामाजिक परिस्थितीतच परिवर्तन घडून येणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**

१) कुमार बेबी, २०१२, किशोरों में बाल अपराध, नई दिल्ली, आयुष्यमान पब्लिकेशन हाऊस.
२) कुमारी मंजू, २०००, भारत में बाल अपराध, जयपूर, प्रिन्टवेल पब्लिशर्स डिस्ट्रीब्यूटर्स.
३) क्लोवार्ड आर. अॅन्ड ओलिन एल. १९६०, ज्युविनाईल अँन्ड ओपरच्युनिटी, न्यु दिल्ली, फ्री प्रेस.
४) चंद्रा सुशिल, १९६७, सोशिओलॉजी ऑफ डेरिव्हेसन इन इंडिया, न्यु दिल्ली, एलिड पब्लिशर्स प्रा. लि.
५) भट्टाचार्य एस. के., २००४, दी ज्युविनाईल पस्टिक सिस्टम इन इंडिया फ्रॉम वेलफेयर टू राइट्स, न्यु दिल्ली, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
६) मिश्रा ममता, २००२, दी ज्युविनाईल डिलिक्केन्सी अँन्ड दी अर्बन सोसायटी, मिरत, अणू बुक्स.
७) राव वेणुगोपाल, १९६७, फॅक्ट्स ऑफ क्राईम इन इंडिया. न्यू दिल्ली , एलिड पब्लिशर्स प्रा. लि.
८) शर्मा जी. एल. २०१५, साामजिक मुद्दे जयपूर: रावत पब्लिकेशन.
९) सेठ हंसा, १९६१ ज्युविनाईल डिलिक्केन्सी इन अॅन इंडियन सेटींग्स. मुंबई : पॉप्युलय बुक डेपो.

# ग्रामीण समाजातील सामाजिक असमानता: एक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. बाबुराव जाधव** सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड

**गोषवारा:** प्रस्तुत संशोधन लेख हा दुय्यम तथ्य संकलनावर आधारित आहे. या लेखामध्ये प्रस्तुत विषयाशी संबंधित पुस्तके, मासिके, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे आणि प्रसार माध्यमाचा आधार घेतला आहे. तसेच ग्रामीण समाजातील सामाजिक असमानतेबाबत शासकीय धोरणाचा आढावा घेणे हा या प्रस्तुत संशोधनाचा उद्देश आहे. ग्रामीण समाजातील सामाजिक असमानता: एक समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी संख्यात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, अशा सर्वच क्षेत्रात निर्माण झालेल्या सामाजिक असमानतेला दूर करण्यासाठी शासकीय पातळीवर विविध धोरणे राबवली जात आहेत. परंतु सामाजिक विषमता दूर करण्यासाठी अनेक आव्हाने पुढे येत आहेत. देशांच्या आर्थिक विकासावर विषमतेचा मोठा परिणाम होतो. विषमता आर्थिक कामगिरीत अडथळा ठरू शकते. त्यामुळे धोरणकर्ते, अर्थशास्त्रज्ञ आणि राजकीय नेत्यांसाठी हा एक कळीचा मुद्दा बनतो. आर्थिक वाढ आणि विकासावर विषमतेचे होणारे नकारात्मक परिणाम पुराव्यासह सिद्ध झाले आहेत. त्याचा परिणाम शासन व्यवस्था आणि सत्ता समीकरणावर होत असतो. ज्यामुळे संभाव्य संघर्ष, राजकीय स्थिरता, आर्थिक मक्तेदारी इत्यादी समस्या उद्भवू शकतात. सामाजिक विषमता हे जगभरातील समाजासमोर असलेल्या सर्वात मोठ्या आव्हानापैकी एक आहे. कोणत्याही समाजात संसाधने, संधी, अधिकार आणि प्रतिष्ठा यांचे असमान स्वरूपात वाटप होणे म्हणजेच सामाजिक असमानता किंवा सामाजिक विषमता होय.

**मुख्य शब्द:** ग्रामीण समाज, सामाजिक असमानता, सामाजिक विषमता आणि समाज इ.

**प्रस्तावना:** सामाजिक असमानता ही समकालीन जागतिक समाजासमोरील सर्वात मोठ्या आव्हानापैकी एक आहे. त्यामुळेच विविध क्षेत्रातून याबाबत चिंता आणि चिंतन व्यक्त केले जात आहे. याचाच एक भाग म्हणून बहुतांश राष्ट्रात सामाजिक असमानता दूर करण्यासाठी शासकीय पातळीवर विविध धोरणे राबविली जात आहेत. प्रत्येक राष्ट्रातील आर्थिक विकासावर सामाजिक विषमतेचा मोठा परिणाम होतो. त्यामुळे धोरणकर्ते, अर्थशास्त्रज्ञ, अभ्यासक आणि राजकीय नेत्यांसाठी हा एक अत्यंत महत्वाचा मुद्दा बनला आहे. सामाजिक विषमतेचे नकारात्मक परिणाम शासनव्यवस्था आणि सत्ता समीकरणावर होतो. संभाव्य राजकीय स्थिरता आणि संघर्ष टाळण्यासाठी शासकीय पातळीवर सामाजिक असमानता दूर करण्यासाठी विविध धोरणांची अंमलबजावणी केली जात आहे. सामाजिक असमानता ही एक जागतिक समस्या आहे. ज्याचा परिणाम आरोग्य शिक्षण आर्थिक स्थैर्य यासह अनेक घटकावर होत असतो. म्हणूनच या संशोधनाचा उद्देश सामाजिक असमानता दूर करण्यासाठी लागू करण्यात आलेल्या शासकीय धोरणावरील साहित्याचा आढावा घेणे हा आहे. तसेच समाजशास्त्रीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न आहे. ग्रामीण समाजातील असमानता, हि जात, वर्ग, वर्ण आणि लिंग, यावर आधारित असलेली दिसून येते. कोणत्याही समाजात संसाधने, संधी, अधिकार आणि प्रतिष्ठा यांचे असमान स्वरूपात वाटप होणे म्हणजेच सामाजिक असमानता किंवा सामाजिक विषमता होय. सामाजिक असमानता विविध कारणामुळे निर्माण होत असते जसे आर्थिक स्थिती, जात आणि धर्म आधारित भेदभाव किंवा पक्षपात, पुरुष आणि स्त्री यांच्यातील संधी आणि अधिकारांमध्ये निर्माण केलेला फरक, शिक्षणाच्या संधी सर्वांना समान प्रमाणात उपलब्ध नसणे आणि आरोग्य सेवांच्या उपलब्धतेमध्ये असलेली तफावत यासारख्या घटकामुळे सामाजिक विषमतेला चालना मिळत असते. आर्थिक स्थितीचा विचार केल्यास गरीब आणि श्रीमंत अशा दोन वर्गामध्ये आर्थिक विषमता पहायला मिळते. तसेच सामाजिक घटकांचा विचार केल्यास समाजातील वर्ण, धर्म आणि जात इत्यादींच्या आधारावर जो काही जाणीवपूर्वक पक्षपात केला जातो किंवा भेदभाव केला जातो. उच्च निच्चतेची वागणूक दिली जाते. यातून श्रेष्ठ कनिष्ठतेची भावना निर्माण होत असते. जात, वर्ण किंवा धर्माच्या आधारावर एखाद्या व्यक्तीला जाणीवपूर्वक विशिष्ट अशा अधिकारापासून आणि हक्कापासून वंचित ठेवल्या जाते, तेव्हा तो व्यक्ती आपला विकास करू शकत नाही आणि त्यामुळे समाजामध्ये अशी सामाजिक असमानता निर्माण होत असते.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** ग्रामीण समाजातील सामाजिक असमानता या विषयाबाबत अनेक अभ्यासकानी व संशोधकांनी आपले विचार मांडले आहेत. प्रीती कुमारी, (२०२३), यांनी दि रोल ऑफ गव्हर्न्मेंट इन अद्रेस्सिंग इन्कम इन एक्वलीटी या शोधनिबंधामध्ये पुढील मत व्यक्त केले आहे. संधीची समानता, गरिबी निर्मूलन आणि सामाजिक प्रगती वाढवण्यासाठी कायदे करून आणि विविध उपक्रम राबवून चालणार नाही तर तपावत दूर करण्याची महत्त्वाची जबाबदारी सरकारची आहे. सामाजिक विषमता दूर करण्यासाठी अनेक आव्हाने पुढे येत आहेत. विविध सामाजिक वर्गांमधील विभागणी असे सुचित करते की उच्च शिक्षण घेतलेल्या वर्गामध्ये जातीवर आधारित विषमता अधिक प्रमाणात आहे. प्राथमिक शिक्षणाच्या तुलनेत उच्च शिक्षणातील प्रवेश यामध्ये सामाजिक विषमता जास्त दिसून येते. शैक्षणिक आणि सामाजिक विषमतेमध्ये जात आणि वर्ग यांची नेमकी भूमिका समजून घेण्यासाठी उपजातींची जाळे वैचारिक दृष्ट्या आणि अनुभवात स्थितपणे तपासण्याचे गरज आहे (मदन अमन, २०२०) . वर्मा साहिल यांच्यामते, भारत जो विशाल प्रादेशिक सामाजिक आणि आर्थिक विषमतेने व्यापलेला देश आहे तिथे या विषमतेचे निराकरण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे (वर्मा साहिल, २०२३). वर्मा साहिल, विमल किशोर साहू, नंदन घोष यांनी Unpacking Inequality: A Regression-based Decomposition Analysis of Household Consumption in India या संशोधन लेखात पुढील मत व्यक्त केले आहे, विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांच्या आर्थिक विकासावर विषमतेचा मोठा परिणाम होतो. विषमता आर्थिक कामगिरीत अडथळा

ठरू शकते. त्यामुळे धोरण करते, अर्थशास्त्रज्ञ आणि राजकीय नेत्यांसाठी हा एक कळीचा मुद्दा बनतो. आर्थिक वाढ आणि विकासावर विषमतेचे होणारे नकारात्मक परिणाम पुराव्यासह सिद्ध झाले आहेत. त्याचा परिणाम शासन व्यवस्था आणि सत्ता समीकरणावर होत असतो. ज्यामुळे संभाव्य संघर्ष, राजकीय स्थिरता, आर्थिक मक्तेदारी इत्यादी समस्या उद्भवू शकतात.

कुमार नीरज आणि माया यांनी Social Capital and Income Inequality या संशोधन लेखात पुढील मत व्यक्त केले आहे, उत्पन्नातील असमानता आणि सामाजिक भांडवल यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की औपचारिक सामाजिक भांडवल म्हणजेच उत्पन्न असमानतेच्या औपचारिक सामाजिक भांडवल निर्मितीवर प्रतिकूल परिणाम होतो. भारतामध्ये उत्पन्नाच्या वाटणीत मोठी विषमता असलेली दिसते (कुमार नीरज आणि माया, २०२५) . नायक पुलीन यांनी The Centrality of Inequality या संशोधन लेखात भारतीय उपखंडातील सामाजिक आणि आर्थिक असमानतेचा अभ्यास केला आहे. त्यांनी भारतासोबतच बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंका या देशाचा देखील तुलनात्मक अभ्यास केलेला आहे (नायक पुलीन, २०२५) . एन जयराम (१९७९) यांनी Higher Education, Inequality and Social Change in India या संशोधन लेखात भारतीय समाजातील उच्च शिक्षण आणि असमानता तसेच सामाजिक परिवर्तन याबाबत मत व्यक्त केले आहे. थप्पन मीनाक्षी, (२०२३) यांनी द स्टेट एज्युकेशन अँड एनी क्वालिटी या संशोधन लेखात पुढील मत व्यक्त केले आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश देणे इतकीच राज्याची भूमिका मर्यादित राहत नाही तर सामाजिक न्याय सुनिश्चित करणाऱ्या पद्धती आणि प्रक्रिया सक्षम करण्यासाठी संसाधने आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात देणे हि देखील राज्याची भूमिका असते. कृष्णा राज (२०२१) पब्लिक पॉलिसी इन इंडिया या ग्रंथात देशाची प्रगती ही मोठ्या प्रमाणात त्या देशातील सरकार आणि त्यांच्या विशेष संस्थाद्वारे तयार केलेल्या आणि राबवलेल्या धोरणावर अवलंबून असते. ही धोरणे नियमक आणि प्रोत्साहन पर अशा दोन्ही स्वरूपाचे असतात, असे मत व्यक्त केले आहे. थोरात सुखदेव, नरेंद्र कुमार (२००८), इन सर्च ऑफ इंक्लुसिव्ह पोलिसी: ग्राडेस इन इक्वलिटी या ग्रंथात भारतीय समाजातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, वांशिकता, धर्म, लिंगभाव इत्यादी घटकांच्या आधारे भारतीय समाजातील सामाजिक बहिष्कार या मुद्द्यांचे सविस्तर विश्लेषण केले आहे. लुकास चान्सेल, थॉमस पिकेटी आणि इमॅन्युअल फेज (२०२२), यांनी वर्ल्ड इन इक्वलिटी रिपोर्ट या ग्रंथात जगभरातील धोरणकर्ते आणि विद्वानांना असमानतेच्या प्रकाराविषयी अद्यावत माहिती देतो. जागतिक असमानता अहवाल २०२२ नुसार भारताच्या स्थितीचा आढावा घेतला आहे. भारताला या अहवालात अत्यंत असमानता असलेला देश म्हणून संबोधण्यात आले आहे. जागतिक विषमता अहवाल २०२६ नुसार भारतात उत्पन्नाचे आणि संपत्तीचे विषमता आत्तापर्यंतच्या उच्चांकी स्तरावर पोहोचली आहे. कराडे जगन आणि पाटील राजेंद्र (२०२१), यांनी इन इक्वलिटी अँड पॉवर्टी या संपादित ग्रंथात अनेक लेखाचे संकलन केले आहे. सर्व लेखकांनी प्रस्तुत संपादित पुस्तकात दुर्बल घटकांच्या विकासाच्या विविध पैलू बद्दल ज्ञान वाढवण्यासाठी आणि ते सामायिक करण्यासाठी विषमता आणि गरिबी या विषयावरील बहुआयामी शोधनिबंधाचा समावेश केला आहे. थोरात सुखदेव आणि कुमार नरेंद्र (२००८), यांनी संपादित केलेल्या इन सर्च ऑफ इन्क्लुसिव्ह पॉलिसी ऍड्रेस इन इक्वलिटी या ग्रंथामध्ये शासनाने उच्च शिक्षण संस्थांमध्ये जागा आरक्षित करण्याचे धोरण अवलंबल्याने आणि त्यानंतर संसदेत कायदा मंजूर झाल्यामुळे इतर मागासवर्गीय यांच्या प्रश्नावर तसेच आरक्षणाशी संबंधित मुद्यावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली. त्याबाबत आपले सविस्तर मत व्यक्त केले आहे.

**अध्ययनाचे उद्देश:** ग्रामीण समाजातील सामाजिक असमानता: एक समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचे प्रमुख तीन उद्देश आहेत. १) ग्रामीण समाजातील सामाजिक असमानतेचे स्वरूप जाणून घेणे. २) ग्रामीण समाजातील सामाजिक असमानतेबाबत शासकीय धोरणाचा आढावा घेणे. ३) सामाजिक असमानता बाबतच्या पूर्व साहित्याचा आढावा घेणे.

**अध्ययन पध्दती:** ग्रामीण समाजातील सामाजिक असमानता: एक समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी संख्यात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच तथ्य संकलनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर केला आहे. ज्यामध्ये प्रस्तुत विषयाशी संबंधित पुस्तके, मासिके, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे आणि प्रसार माध्यमाचा आधार घेतला आहे. प्रस्तुत संशोधन लेख हा दुय्यम तथ्य संकलनावर आधारित आहे. या लेखामध्ये प्रस्तुत विषयाशी संबंधित पुस्तके, मासिके, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे आणि प्रसार माध्यमाचा आधार घेतला आहे. तसेच ग्रामीण समाजातील सामाजिक असमानतेबाबत शासकीय धोरणाचा आढावा घेणे हा या प्रस्तुत संशोधनाचा उद्देश आहे.

**सिद्धांतिक पार्श्वभूमी:** समाजशास्त्रामध्ये सामाजिक विषमतेचा अभ्यास करण्यासाठी डेविस मूर, काल मार्क्स, मॅक्स वेबर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील आपल्या सिद्धांताची मांडणी केलीली दिसते. प्रसिद्ध समाजशास्त्रीय विचारवंत डेविस मूड यांनी १९४५ मध्ये प्रकार्यवाद सिद्धांताची मांडणी करताना असे म्हटले आहे की समाजात सामाजिक विषमता असणे ही केवळ योगायोग नसून ती समाजाच्या अस्तित्वासाठी गरजेची आहे. सामाजिक विषमता ही समाजासाठी उपयुक्त असते, कौशल्याला प्रोत्साहन मिळते तसेच कष्टाचे आणि प्रशिक्षणाचे फळ आहे, यामुळे समाजात सुव्यवस्था राहते, तर बदल करण्याची गरज नाही ही नैसर्गिक व्यवस्था आहे, असं मत त्यांनी मांडले आहे तर याउलट काल मार्क्स यांनी आपल्या संघर्ष सिद्धांतात सामाजिक विषमता ही समाजासाठी हानिकारक आहे. सत्तेचे आणि संसाधनांचे असमान वाटप केल्यामुळे सामाजिक विषमतेला चालना मिळत असते. तसेच श्रीमंतांनी गरिबांचे केलेले शोषण म्हणजेच सामाजिक विषमता होय. सामाजिक विषमतेमुळे समाजात संघर्ष निर्माण होत असतो आणि म्हणून समाजासाठी सामाजिक विषमता ही घातक आहे. त्यामुळे क्रांतीद्वारे ही व्यवस्था बदलण्याची गरज आहे. सामाजिक विषमता ही अपरिहार्य बाब नसून ती समाज निर्मित सामाजिक विषमतेचे शोषणाचे साधन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजातील विषमतेचे विश्लेषण करत असताना वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थाबाबत आपले मत व्यक्त केले. त्यांच्यामते, भारतातील विषमता ही केवळ आर्थिक किंवा राजकीय स्वरूपाचे नसून ती सामाजिक आणि धार्मिक स्वरूपाची आहे. मॅक्स वेबर यांचा थ्री आयामी सिद्धांत यामध्ये वर्ग प्रतिष्ठा म्हणजेच स्तर आणि सत्ता अशा तीन घटकाला त्यांनी महत्त्वाचे स्थान दिलेलं आहे. वर्ग

म्हणजेच आर्थिक स्थिती आणि बाजारामध्ये निर्माण असणाऱ्या संधी या आधारावर व्यक्तीचा वर्ग निश्चित होत असतो आणि समाजामध्ये मिळणारा मानसन्मान, प्रतिष्ठा, एखाद्या व्यक्तीला दिली जाणारी वागणूक या आधारावर प्रतिष्ठा किंवा सामाजिक दर्जा किंवा स्तर ठरत असतो. तर इतरांच्या इच्छेविरुद्ध आपले निर्णय लागण्याची क्षमता ज्या व्यक्तींमध्ये आहे त्याला त्यांनी सत्ता असं म्हटलेलं आहे आणि हा सत्तेचा देखील असमान वितरण झालेले आहे. म्हणजेच वर्ग प्रतिष्ठा आणि सत्ता इत्यादी घटकाचे आधारावर समाजामध्ये विषमता निर्माण झालेली आहे. सामाजिक विषमतेचे विश्लेषण करण्यासाठी स्त्रीवादी सिद्धांत देखील अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडताना दिसतो. स्त्रीवादी सिद्धांताच्या मते लिंगभेदावर आधारित स्त्री पुरुष संबंधांमध्ये जी विषमता निर्माण झालेली आहे त्याचे सर्वात मूळ कारण येथील पित्रसत्ताक व्यवस्था, सामाजिक दर्जा आणि भूमिका, सत्ता, संपत्ती आणि संसाधनांचे असमान स्वरूपात झालेले वाटप हे घटक कारणीभूत ठरलेले आहेत.

**तथ्यांचे विश्लेषण:** ग्रामीण समाजातील सामाजिक असमानता: एक समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी जात, वर्ग, लिंगभाव, वय, व्यवसाय, प्रदेश, समुदाय इत्यादी चलांचा अवलंब करून संकलीत केलेल्या तथ्यांचे विश्लेषण केले आहे. समाजातील स्त्री आणि पुरुषांचा दर्जा हा समान असायला पाहिजे परंतु केवळ लिंगभावाचा विचार करून स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रापासून वंचित ठेवणे आणि त्यांच्या अधिकाराचं हनन केल्यामुळे देखील स्त्री पुरुष संबंधात विषमता निर्माण होत असते. सामाजिक क्षेत्रामध्ये विविध धर्म आणि जातींमध्ये स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते पुरुषांच्या तुलनेमध्ये स्त्रियांचा दर्जा हा कनिष्ठ दुय्यम समजला जातो. स्त्रियांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केलं जातं आज देखील मुलांनाच वंशाचा दिवा मानला जातो आणि मुलगी हे परक्याचं धन समजून तिच्याकडे दुर्लक्ष केलं जातं. ग्रामीण समाजातील पितृसत्ताक कुटुंब व्यवस्था असल्याने अधिकार हे पुरुषांच्या हाती केंद्रित झालेले असतात आणि त्यामुळेच स्त्रियांना आपल्या अधिकारापासून आणि हक्कापासून वंचित राहावं लागतं. लिंगभाव असमानता निर्माण झाल्यामुळेच समाजामध्ये सामाजिक विषमतेला चालना मिळत आहे. स्त्री आणि पुरुषांना समान संधी आणि समान अधिकार मिळाले पाहिजेत, तरच ही असमानता कमी होऊ शकेल. लिंगभेदावर आधारित पक्षपात दूर करून समान अधिकार आणि हक्क महिलांना मिळाले पाहिजेत यासाठी शासनाने पुढाकार घेऊन महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्र संघटनाने १९७५ ते ८५ हे दशक महिलांचे दशक म्हणून घोषित केलेलं होतं तर भारत सरकारने २००१ हे वर्ष महिला सक्षमीकरणाचे वर्ष म्हणून घोषित केले आहे. तसेच अनेक धोरण राबवली आहेत. बेटी बचाव बेटी पढाव, लाडकी बहीण योजना यासारख्या योजनांच्या माध्यमातून स्त्रियांचे आर्थिक सक्षमीकरण झालं पाहिजे आणि विशेषतः मुलींसाठी दहावीपर्यंत मोफत शिक्षण हे सुद्धा मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी अशा योजना सुरू केलेल्या आहेत. महिलांचे आर्थिक स्वावलंबन वाढवण्यासाठी महिलांच्या बँक खात्यामध्ये थेट लाभ जमा केला जात आहे.

लिंगभेदावर आधारित विषमता दूर करण्यासाठी जेंडर बजेटिंग म्हणजेच भारत सरकारने २००५ ते २००६ पासून जेंडर बजेटिंग स्वीकारले आहे. ज्यामध्ये प्रत्येक सरकारी योजनेत महिलांसाठी किती निधी खर्च होतो याचे स्वतंत्र ऑडिट केले जाते. दुसरी बाब ग्रामीण भागात राहणाऱ्या जनतेसाठी घराची किंवा जमिनीची नोंदणी करत असताना जर ही नोंदणी ग्रामीण भागातील महिलांच्या नावे केल्यास मुद्रांक शुल्कात म्हणजेच स्टॅम्प ड्युटी सवलत दिली जाते. हा संपत्तीच्या वितरणातील विषमता दूर करण्याचा सरकारचा प्रयत्न असलेला दिसतो. म्हणजेच लिंगभेदावर आधारित विषमता दूर करून महिला आर्थिक बाबतीत सक्षम झाल्या पाहिजेत यासाठी सरकारने राबवलेल्या धोरणाचा हा एक भाग आहे.

ग्रामीण भागातील लिंगभेदावर आधारित विषमतेचा विचार केल्यास समाजातील स्त्री पुरुषांचा दर्जा आणि भूमिका ही समान असलेली दिसून येत नाही पुरुषांच्या तुलनेमध्ये स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जातो. त्यांना समान कामासाठी समान वेतन दिल जात नाही. आर्थिक मिळकतीची कामे हे पुरुषाने स्वतःकडे ठेवली आणि ज्या कामाचा आर्थिक मोबदला मिळत नाही असे अनार्थिक स्वरूपाची घरातले सर्व घरगुती कामे करावी लागतात. मुलांचे बालसंगोपन किंवा वर्धांची सेवा, घर आवरणे अशा कामांना वेतन दिल जात नाही आणि म्हणून स्त्रिया ह्या आर्थिक बाबतीमध्ये परावलंबी असलेल्या दिसतात. स्त्रियांचे आरोग्याकडे, शिक्षणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं जातं. स्त्री आणि पुरुषांच्या सामाजिककरण हे लिंगभेदावर आधारित केलं जातं. अशा पद्धतीने ग्रामीण समाजामध्ये लिंगभेदावर आधारित विषमता असलेली दिसून येते. ग्रामीण भागातील लिंगभेदावर आधारित विषमता ही आरोग्य, शिक्षण आणि कामाचे ठिकाण अशा घटकांमध्ये ठळकपणे पहावयास मिळते. समकालीन समाजात आजही लोकांच्या आचार आणि विचारावर लिंगभावाचा प्रभाव असलेला दिसून येतो. आरोग्याच्या विचार केल्यास स्त्रियांचे आयुर्मान हे पुरुषांच्या तुलनेत जास्त असले तरी प्रसुती काळामध्ये किंवा कुपोषण आणि मानसिक ताण-तणाव यामुळे त्यांचे आजारपणाचे प्रमाण अधिक आलेले दिसते. आज ही मुलींच्या शिक्षणापेक्षा मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते. त्यामुळे मुलांच्या तुलनेमध्ये मुलींच्या साक्षरतेचे प्रमाण हे कमी असलेले दिसते. त्याचबरोबर कामाच्या ठिकाणी सुद्धा समान कामासाठी समान वेतन दिल जात नाही आणि उच्च पदावर पोहोचण्यामध्ये स्त्रियांना अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागत असतं अशा पद्धतीने ग्रामीण समाजामध्ये लिंगभेदावर आधारित विषमता पहावयास मिळते.

शैक्षणिक घटकांमध्ये देखील शिक्षणाच्या संधी सर्वांना समान प्रमाणात उपलब्ध नसल्याने शैक्षणिक असमानता निर्माण झालेली दिसते. तसेच सर्वांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण म्हणजे शिक्षणाचा अधिकार कायदा निर्माण करून शैक्षणिक क्षेत्रामध्ये वंचित वर्गांना संधी, सोयी आणि सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच वंचित वर्गासाठी आणि मागासवर्गीयांसाठी शिष्यवृत्ती योजना, शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून देणे यासारख्या सोयी आणि सुविधा तसेच नोकरीमध्ये देखील मागासवर्गीयांसाठी काही जागा जाणीवपूर्वक राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच शैक्षणिक विषमता दूर करण्यासाठी एन. इ. पी. २०-२० नुसार

मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर दिला जात आहे. जेणेकरून भाषेमुळे निर्माण होणारी दरी कमी होईल आणि ग्रामीण भागातील मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मातृभाषेतूनच शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होईल.

आरोग्य सेवांच्या उपलब्धतेतील विषमता ही प्रामुख्याने ग्रामीण शहरी भागातील तफावत दर्शवणारी दिसते. ग्रामीण भागातील लोकांना उपचारांसाठी शहराकडे जावं लागतं. श्रीमंत वर्गांना आरोग्य सेवांच्या उपलब्धता असतात परंतु गरीब आणि दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या कुटुंबातील व्यक्तींना मूलभूत आरोग्यविषयक सुविधा मिळत नाहीत. सार्वजनिक आरोग्य सेवा पुरविण्याची योजना तयार करून विमा योजना उदाहरणांमध्ये गोरगरीब व्यक्तीसाठी आयुष्यमान भारत आणि मोफत औषधे पुरविणे यासार योजना सरकारच्या मार्फत राबवल्या जात आहेत याचा फायदा निश्चितच समाजातील मागासवर्गीयांना आणि गरजूंना होत आहे.

कोणत्याही समाजात सामाजिक विषमता टिकून ठेवण्यासाठी समाजातील संपत्तीचे असमान वितरण हा घटक देखील कारणीभूत ठरतो. कारण ज्यांची संपत्ती ही जास्त आहे अशा लोकांकडे समाजातील कमी संपत्ती असणाऱ्या लोकांच्या तुलनेत अधिक संसाधने मिळवण्याचे क्षमता जास्त असते आणि विशेषतः समाजातील मर्यादित संसाधनावर अशा व्यक्तींचा ताबा असतो आणि त्यामुळेच कमी संपत्ती किंवा गरीब असणाऱ्या व्यक्ती अशा श्रीमंत व्यक्तीशी स्पर्धा करू शकत नाहीत. उत्पन्नातील विषमता या घटकामुळे देखील सामाजिक विषमतेला चालना मिळत असते. समाजातील सेवा आणि सुविधामधील विषमता विविध स्तरातून आपणास आढळून येते ज्यामध्ये विशेषतः ग्रामीण आणि शहरी भागात मधील सेवा सुविधा मधील विषमता दिसते तसेच गरीब आणि श्रीमंत वर्ग यांच्यात मध्ये देखील सेवा सुविधा मधील तफावत किंवा विषमता आढळून येते. शैक्षणिक क्षेत्रामध्ये सुद्धा गरीब आणि श्रीमंत अशा दोन वर्गाच्या आधारावर शैक्षणिक विषमता असलेली दिसून येते. श्रीमंत वर्गात शिक्षणाचे प्रमाण हे अधिक असलेले दिसते तर गरीब वर्गामध्ये संपत्तीच्या अभावामुळे शिक्षणाचे प्रमाण हे कमी असले दिसते. गरिबांच्या तुलनेत श्रीमंताचे मुले ही इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये शिकत असलेली दिसतात. तसेच उच्च शिक्षणामध्ये देखील असमानता असलेले दिसते.

सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सरकारची भूमिका आणि धोरणे अत्यंत महत्वाची ठरतात. धोरणात्मक आणि कायदेशीर हस्तक्षेप, आर्थिक पुनर्वितरण, सामाजिक सुरक्षा, प्रगतिशील कर प्रणाली, सार्वजनिक सेवांमध्ये गुंतवणूक करणे या बाबीचा वापर करून सामाजिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केले जात आहेत. सामाजिक विषमता कमी करण्यासाठी आणि सामाजिक न्यायची प्रस्थापना करण्यासाठी शासन विविध पातळीवर विविध धोरणे आणि कार्यक्रम राबवत आहे. या धोरणाचा परिणाम म्हणून समाजातील दुर्लक्षित वंचित आणि दुबळ्या समूहांना मुख्य प्रवाहात येण्यासाठी संधी निर्माण झाली आहे. शासनाच्या या धोरणामध्ये आरक्षण विषयक धोरण, कल्याणकारी योजना, शिक्षण विषयक धोरण, आरोग्य विषयक धोरण, समान कायदे निर्मितीचे धोरण आणि घटनात्मक विविध तरतुदी इत्यादी कायदेशीर उपाय योजना यासारख्या बाबींचा समावेश होतो. आरक्षण धोरणाचा परिणाम म्हणून शिक्षण संस्था आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये अनुसूचित जाती जमाती इतर मागासवर्गीयांना आणि समाजातील अल्पसंख्याक वर्गांना तसेच महिलांना विशेष संधीची समानता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे अशा वंचित वर्गांना आरक्षण देऊन त्यांना विकसित समाजाच्या बरोबरीला येण्यासाठी एक विशेष संधी उपलब्ध करून दिली जात आहे. त्यामुळे देखील समाजातील वंचित समूहाच्या विकासाला चालना मिळत आहे. तसेच कल्याणकारी योजना राबवून सामाजिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. गरिबी निर्मूलनासाठी अन्नसुरक्षा योजना, घरकुल योजना आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यासारख्या योजना राबवून समाजातील बेरोजगारी दूर करून लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सरकारच्या मार्फत केला जात आहे. सरकारच्या माध्यमातून स्वस्त दरात धान्य किंवा रेशन दिल्या जातात. गॅस आणि वीज उपलब्ध करून दिले जाते. अनुदान दिले जातात. तसेच पेन्शन योजना देऊन वृद्ध, विधवा आणि दिव्यांगासाठी आर्थिक मदत करण्याचं काम सरकारच्या माध्यमातून केलं जात आहे.

सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सरकारने अनेक धोरणे राबवणे सुरू केले असले तरीही अनेक आव्हाने सरकार समोर उभी असलेली दिसतात. शासकीय धोरणे कागदावर उत्तम दिसत असली तरीही अंमलबजावणीत मात्र अनेक अडथळे समोर येताना दिसतात. शासनाच्या अनेक पुरोगामी योजना सामाजिक विषमता दूर करण्यासाठी राबवल्या जात आहेत परंतु या योजनांची अंमलबजावणी करत असताना नोकरशाही आणि भ्रष्टाचारामुळे या योजना शेवटच्या घटकापर्यंत म्हणजेच गरजू लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कायदे कितीही बदलले तरी समाजाची पारंपारिक आणि जातीयवादी किंवा पितृसत्ताक मानसिकता बदलण्यास वेळ लागत असलेला दिसतो. थोडक्यात, सामाजिक विषमता ही केवळ कायदे निर्माण करून संपुष्टात येणारी बाब दिसून येत नाही तर त्यासाठी शासकीय धोरणाबरोबरच समाजामधून सामाजिक प्रबोधनाची अत्यंत आवश्यकता असलेली दिसते. सामाजिक विषमता आणि शासकीय धोरणे यांच्यातील संबंध व्यापक असलेला दिसून येतो. म्हणजे संरचनात्मक आणि प्रक्रियात्मक अशा दोन्ही पैलूंचा विचार करावा लागणार आहे. केवळ कायदे करून विषमता संपवता येत नसून तर त्यासाठी विविध संसाधनांचे फेरवाटप कसे होते हे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे.

सामाजिक विषमता दूर करण्यासाठी शासकीय धोरणे केवळ सर्वांना समान वागणूक देत नाहीत तर ज्यांना गरज आहे त्यांना विशेष संधी दिली जात आहे. सकारात्मक भेदभाव ज्याला पॉझिटिव्ह डिस्क्रिमिनेशन असं म्हटलं आहे. भारतीय संविधानानुसार समाजातील जे घटक ऐतिहासिक दृष्ट्या वंचित उपेक्षित आणि मागास राहिले आहेत अशा सर्व वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकारद्वारे विशेष सोयी आणि सवलती दिल्या जातात त्याचाच एक भाग म्हणून अशा वर्गांना आरक्षण देऊन विकासाची विशेष संधी उपलब्ध करून दिली जात आहे. तसेच सर्व समावेशक विकास, इंक्लुसिव्ह ग्रोथ, सबका साथ सबका विकास हे धोरण केवळ आर्थिक वृद्धीवर भर देत नसून समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचविण्याचा उद्देश असतो. म्हणजे सामाजिक

स्तरानुसार सखोल धोरणात्मक योजना देखील राबवल्या जात आहेत. म्हणजेच सरकार केवळ कायदे करत नाही तर सामाजिक विषमता दूर करण्यासाठी आर्थिक नियोजनामध्ये देखील बदल करताना दिसून येते.

विषमतेचे बळी हे केवळ व्यक्तीच असतात असे नाही तर प्रादेशिक आधारावर देखील एका प्रदेशाचा विकास झालेला दिसतो तर दुसरा प्रदेश हा विकासापासून वंचित असलेला दिसतो. म्हणजे जेव्हा काही विशेष भूभागामध्येच मूलभूत सोयी आणि सुविधा राबवल्या जातात आणि या उलट एखाद्या भागामध्ये अशा संसाधनांचा अभाव असलेला दिसतो. यामधून देखील सामाजिक विषमतेला चालना मिळाली दिसते. ग्रामीण भागामध्ये दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्या व्यक्तींना घरांच्या उपलब्धतेच्या समस्याला सामोरे जावं लागतं.

भौगोलिक घटकाच्या आधारवर देखील समाजामध्ये सामाजिक विषमता निर्माण झालेली दिसते. म्हणजेच एका समाजात एकाच देशांतर्गत उदाहरणांमध्ये ग्रामीण व शहरी विभागाचा विचार केलास तसेच विचार केल्यास ग्रामीण भागाच्या तुलनेमध्ये शहरी भागाचा विकास झालेला दिसून येतो. समाजातील सत्ता आणि प्रतिष्ठा यामधील विषमता समाजामध्ये काही प्रभावशाली व्यक्ती असतात त्यांच्या हातामध्ये किंवा काही प्रभावी जाती असतात अशा जातीतील व्यक्तींच्या हातामध्ये ग्रामीण भागातील सत्ता आणि अशा जातीत लोकांना प्रतिष्ठा दिली जात असते आणि त्यामुळे संधी मध्ये असमानता असते दिसून येते. सामाजिक श्रेणी रचनेमध्ये काही लोकांना विशेष अधिकार प्राप्त झालेले असतात तर या उलट जाते व्यवस्थेच्या सरणी रचनेमध्ये ज्या जातीला निम्न दर्जा देण्यात आलेला आहे अशा जातीतील व्यक्तींचा सामाजिक दर्जा हा दुय्य मांडण्यात आलेला आहे

एल. जी. बी. टी. या घटकाच्या आधारावर सुद्धा समाजामध्ये तृतीय पंथीयांना सामाजिक विषमतेचा किंवा सामाजिक भेदभावाचा सामना करावा लागत असतो. अशा वर्गामध्ये मोडणाऱ्या व्यक्तींना कुटुंब, शेजार आणि समाजाकडून टीकेला सामोरे जावा लागत असतं अशा व्यक्तींना समाजाकडून दुय्यमस्वरूपाची वागणूक दिली जाते. तसेच समाजातील मूलभूत सोयी आणि सुविधाचा देखील उपभोग असे व्यक्ती घेऊ शकत नाहीत, सन्मानाने जीवन जगू शकत नाहीत. समाज अशा व्यक्तीकडे हीन नजरेतून पाहत असतो. समाजाचा एक महत्वाचा घटक असून देखील त्यांना सामाजिक विषमतेचा सामना करावा लागतो. भारत सरकारने अशा व्यक्तींसाठी २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने कलम ३७७ अंशतः रद्द केले. त्यामुळे दोन सज्ञान व्यक्तींनी सहमतीने ठेवलेले लैगिंक संबंध गुन्हा मानला जाणार नाही. २०१९ मध्ये तृतीय पंथीयांना हक्काचे संरक्षण कायदा करून त्यांना ओळखपत्र, शिक्षण, रोजगार, आणि आरोग्य सेवेत समानतेचा अधिकार प्रदान करतो.

**निष्कर्ष:** सामाजिक समानता हे न्याय आणि निष्पक्ष समाजाचे मूलभूत तत्व आहे जिथे व्यक्तींची पार्श्वभूमी लिंग, जात किंवा आर्थिक स्थिती काहीही असली तरी प्रत्येकाला समान संधी आणि अधिकार मिळतात. हे अशा जगाची कल्पना करते जिथे सर्व लोकांना संसाधने, शिक्षण, आरोग्यसेवा आणि राजकीय सहभागाची समान संधी उपलब्ध असते. सामाजिक विषमता दूर करण्यासाठी अनेक आव्हाने पुढे येत आहेत. सामाजिक आणि आर्थिक असमानता ही जगभरात चिंतेची बाब आहे. जी समाजातील विविध गटांमध्ये उत्पन्न, संपत्ती, शैक्षणिक संधी, आरोग्य सेवेची उपलब्धता आणि इतर मूलभूत अधिकारांच्या असमान वाटपाचा संदर्भ देते. सामाजिक आणि आर्थिक असमानता म्हणजे समाजातील संसाधने संधी अधिकार आणि प्रभावाचे असमान वितरण होय सामाजिक असमानता म्हणजे सामाजिक वर्ग लिंग वार्षिकता आणि भौगोलिक स्थान यासारख्या घटकावर आधारित विशिष्ट व्यक्ती किंवा घटना शिक्षण आरोग्य रोजगार आणि मूलभूत अधिकारांसारख्या सार्वजनिक सेवा मिळवण्यात फरक होईल आर्थिक आसमान हे उत्पन्न संपत्ती आरोग्य रोजगाराच्या संधी आणि राहणीमानातील तफावतेशी संबंधित आहे त्यामुळे समाजातील विविध गटांच्या जीवनमानांच्या दर्जास लक्षणे फरक पडू शकतो. सामाजिक विषमता हे जगभरातील समाजासमोर असलेल्या सर्वात मोठ्या आव्हानापैकी एक आहे. कोणत्याही समाजात संसाधने, संधी, अधिकार आणि प्रतिष्ठा यांचे असमान स्वरूपात वाटप होणे म्हणजेच सामाजिक असमानता किंवा सामाजिक विषमता होय. सामाजिक असमानता विविध कारणामुळे निर्माण होत असते जसे आर्थिक स्थिती, जात, वर्ण, धर्म आणि लिंगावर आधारित भेदभाव किंवा पक्षपात, संधी आणि अधिकारांमध्ये निर्माण केलेला फरक, शिक्षणाच्या संधी सर्वांना समान प्रमाणात उपलब्ध नसणे आणि आरोग्य सेवांच्या उपलब्धतेमध्ये असलेली तफावत यासारख्या घटकामुळे सामाजिक विषमतेला चालना मिळत असते. सामाजिक आणि आर्थिक असमानता ही एक जागतिक समस्या आहे त्याचा आरोग्य शिक्षण आणि आर्थिक स्थैर्य या सह जीवनाच्या अनेक पैलू वर महत्वपूर्ण परिणाम होतो. देशाची प्रगती ही मोठ्या प्रमाणात त्या देशातील सरकार आणि त्यांच्या विशेष संस्थाद्वारे तयार केलेल्या आणि राबवलेल्या धोरणावर अवलंबून असते. ही धोरणे नियमक आणि प्रोत्साहन पर अशा दोन्ही स्वरूपाचे असतात. भारत सरकारने ग्रामीण समाजातील सामाजिक आणि आर्थिक असमानता दूर करण्याच्या उद्देशाने असंख्य धोरणे राबवली जातात. सार्वजनिक धोरणाचे क्षेत्र हे अत्यंत व्यापक असल्याने यामध्ये शेती, औद्योगिक घटक, आंतरराष्ट्रीय व्यापार, विकासाचे मार्ग, प्रादेशिक विकास, गरिबी निर्मूलन, किमान आधारभूत उत्पन्न, पर्यावरण, लैंगिक समानता इत्यादी क्षेत्रातील धोरणांच्या पैलू वर लक्ष केंद्रित केले आहे.

**शिफारशी:** सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सरकारने अनेक धोरणे राबवणे सुरू केले असले तरीही अनेक आव्हाने सरकार समोर उभी असलेली दिसतात. शासकीय धोरणे कागदावर उत्तम दिसत असली तरीही अंमलबजावणीत मात्र अनेक अडथळे समोर येताना दिसतात. शासनाच्या अनेक पुरोगामी योजना सामाजिक विषमता दूर करण्यासाठी राबवल्या जात आहेत परंतु या योजनांची अंमलबजावणी करत असताना नोकरशाही आणि भ्रष्टाचारामुळे या योजना शेवटच्या घटकापर्यंत म्हणजेच गरजू लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कायदे कितीही बदलले तरी समाजाची पारंपारिक आणि जातीयवादी किंवा पितृसत्ताक मानसिकता बदलण्यास वेळ लागत असलेला दिसतो. थोडक्यात, सामाजिक विषमता ही केवळ कायदे निर्माण करून संपुष्टात येणारी बाब दिसून येत नाही तर त्यासाठी शासकीय धोरणाबरोबरच समाजामधून सामाजिक प्रबोधनाची अत्यंत आवश्यकता

असलेली दिसते. सामाजिक विषमता आणि शासकीय धोरणे यांच्यातील संबंध व्यापक असलेला दिसून येतो. म्हणजे संरचनात्मक आणि प्रक्रियात्मक अशा दोन्ही पैलूंचा विचार करावा लागणार आहे. केवळ कायदे करून विषमता संपवता येत नसून तर त्यासाठी विविध संसाधनांचे फेरवाटप होणे तसेच संविधानाचे व कायद्याचे काटेकोरपणे पालन होणे हे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथसूची:**


1. Karade jagan and Patil Rajendra (२०२१), Inequality and Poverty, Rawat Publication, Jaipur.
2. Krishna Raj (२०२१), Public Policy in India. Rawat Publication, Jaipur.
3. Kumar Neeraj, Maya K, (१९ Jul, २०२५) Social Capital and Income Inequality. Vol No. ६० Issue No. २९, Economic Political Weekely.
4. kumari Priti (२०२३, ०१) the role of Government in addressing income inequality, International journal for research publications and seminars. (Vol No. १४, Issue No. १, January to March २०२३)
5. Lucas Chancel, (२०२२), Unsustainable Inequalities: Social Juistice and the Environment, Belknap Press.
6. Lucas Chancel, Thomas Piketty, Emmanual Saez and Gabriel Zucman, (२०२२), World Inequality Report, Harvard University Press.
7. Madan Amman (२५ July, २०२०) Vol No. ५५ Issue No. ३०, Caste and Class in Higher Education Enrolments, Challenges in Conceptualising Social Inequality. Economic Political Weekely
8. N. Jayaram, (१९७९, ०१), Higher Education, Inequality and Social Change in India. Vol No. २८ Issue No. १, Sociological Bulletin.
9. Nayak Pulin, (२४ May, २०२५) The Centrality of Inequality. Vol No. ६० Issue No. २१, Economic Political Weekely.
10. Thapan Meenakshi, (२०२३, ०१), The State, Education and Inequality in Contemporary India. Vol No. २७ Issue No. ४, Sociological Bulletin.
11. Thorat Sukhdev and Kumar Narender (Eds. ), (२००८), In Search of Inclusive Policy: Addressing Graded Inequality, Rawat Publication, Jaipur.
12. Verma Sahil, Bimal Kishor Sahoo, Sunandan Ghosh, (११ Nov, २०२३) Vol No. ५८ Issue No. ४५, Unpacking Inequality: A Regression-based Decomposition Analysis of Household Consumption in India. Economic Political Weekely.


# ग्रामीण भागातील जातीवाद आणि दलित अत्याचार: एक समाजशास्त्रीय अभ्यास


**पूजा कैलास पगारे** संशोधिका समाजशास्त्र विभाग, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

**डॉ. एल. एच. साळोक** प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.



**गोषवारा:** भारताच्या सामाजिक रचनेत जात हा घटक हजारो वर्षापासून ठसलेला आहे. संविधानाने सर्व नागरिकांना समानतेचा हक्क दिला पण सामाजिक वास्तव आजही वेगळे चित्र दाखवते. स्वातंत्र्यानंतरच्या काळातही दलितांविरुद्ध हिंसाचार बहिष्कार बलात्कार जमिनीवरून हाकलून देणे आणि सार्वजनिक सुविधांपासून वंचित ठेवणे यासारख्या गुन्हे सुरूच आहे या पार्श्वभूमीवर १८८९ मध्ये केंद्र सरकारने Scheduled Castes The Scheduled Tribes Act लागू केला. या कायद्याच्या उद्देश दलित आणि पीडितांना त्वरित न्याय व संरक्षण देणे हा होता पण कायद्याचे अस्तित्व पुरेसी नाही त्याची प्रभावी अंमलबजावणी आणि सामाजिक मानसिकता बदलणे ही खरी लढाई आहे. ग्रामीण भागातील जातीवाद हा आजही दलित अत्याचाराचे मूळ आहे. ज्यामुळे दलितांना सामाजिक बहिष्कार, मालमत्तेपासून वंचित ठेवणे (उदा. स्मशानभूमी नाकारणे), मूलभूत सेवा नाकारणे (आरोग्य सेवा), आणि लैंगिक हिंसाचारासारख्या अनेक अत्याचारांना सामोरे जावे लागते. ज्यात पोलीस आणि प्रशासकीय व्यवस्थेचा उदासीनतेमुळे न्याय मिळण्यात अडथळे येतात. असे विविध अहवाल आणि घटनांमधून समोर येते. कायद्याने समता स्वीकारून आणि अस्पृश्यता नाकारून ७५ वर्षं होऊन गेली तरी भारतीयांच्या वर्तनातून ती समूळ नष्ट व्हायला तयार नाही. बरं त्याचं प्रमाण हळूहळू कमी होतंय म्हणावं तर तेही नाही. उलट ते वाढतच चाललं आहे. देशभरातील विविध घटना आणि आकडेवारी बघता भारतातला जातीयवाद हा केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित नसून, तो शहरांमध्येही आहे, एवढंच कशाला मोठमोठ्या संविधानिक पदांपर्यंत पोहोचलेली माणसंही अपवाद नाहीत, असंच लक्षात येतं.



**मुख्य शब्द:** सामाजिक बहिष्कार, हिंसाचार, लैंगिक अत्याचार, शोषण, शैक्षणिक आणि आरोग्य सेवांमध्ये अडथळे


**प्रस्तावना:** अस्पृश्यता हा राष्ट्राला लागलेला कलंक आहे. समाज क्रांती शिवाय देशाला पर्याय नाही त्यातच स्वहित आणि राष्ट्रहित आहे. अशी भूमिका अविरतपणे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली यांनी भारतातील जातीभेद, जातिवाद नवे तर जाती व्यवस्थाच नष्ट करण्यावर भर दिला आहे. जात हा एक बंदिस्त समाज असल्याचे दिसून येते. जातीवादी एक मानवी अवस्था आहे. ही जातीभेद, जातीवाद पाळणे हे केवळ बुद्धीशून्य तेचे लक्षण नव्हे तर अधर्मपारायणतेचे हेच कारण आहे. धर्म ही बाब व्यक्तीस तुरुंगात अडकून ठेवते दलिता सोबत होणारे जातीवाद दलित शेतमजूर व कामगारावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराबद्दल साधा निषेधही व्यक्त न करण्याचे विचित्र दृश्य समाजात पहावयास मिळते. तर दलितांच्या प्रश्नावर प्रामुख्याने वर्णव्यवस्थेविरुद्ध लढण्यास दलिते तर घटक सिद्ध होतील याची शाश्वती नाही. दलित व दलिते तर घटकात ग्रामीण भागात सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक दृष्ट्या वेगवेगळ्या प्रवृत्ती बळकट होतात. एकजीन्सिपणा आणि एक वाक्यता येण्यासही अनेक अडचणी येतात दलित जातीचे स्वरूप मर्यादित म्हणून लक्षात घ्यावे लागते. अनेक काळापासून शोषित समाज म्हणूनच दलितांना स्थान दिले गेले आहे. ग्रामीण भागातील दलित जीवन जसे शोषित पीडित आहे. तसेच दलित समाजातील वेगवेगळ्या स्तरातील घटक देखील शोषित आहेत. आजही ग्रामीण भागात जातिवाद

अनेक पद्धती होताना दिसून येतो. दलित जातीबद्दल तुच्छता आणि तिरस्कार, स्वजातीयता त्याबद्दल प्रेम आणि अहंकार हे त्या मानसिकतेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. दुसऱ्या जातीचा माणूस वरचढ झाला तर त्याच्याबद्दल वैरभाव आणि स्वजातीय व्यक्ती पुढे गेला तर त्याच्याबद्दल प्रेम भावना अशा प्रकारची जातीयवाद सतत भेडसावत असतात. त्यामुळे अस्पृश्य, दलित, आदिवासी इतर मागासलेल्या जाती, जमाती आणि श्रमिक वर्ग वेगवेगळ्या संघटनात विखुरलेल्या आहेत. सामाजिक दृष्ट्या दलित असलेला समाज तर भाषा, आचार, विचार, लोक व्यवहार, सणवार इत्यादीमध्ये वर्णव्यवस्थेच्या देखील खालच्या पातळीवर दिसून येतो. देशभरात खेड्या खेड्यात मता मतात हे लोकशाही विरोधाचे म्हणजे दलित आदिवासी अस्पृश्य जनतेच्या विरोधचे युद्ध चालूच आहे. एका पानवाट्यावर पाणी भरले म्हणून, देवळात प्रवेश केला म्हणून, शाळेत मास्तर हेडमास्तर होऊन आला म्हणून, मुलांना कॉलेजात पाठवतो म्हणून, माडीचे घर बांधतो म्हणून, मोटरसायकल वापरतो म्हणून, सहकारी शेती करतो म्हणून, पदवीधर झालं म्हणून आणि कॉलेजात टाय लावून पोरांना शिकवतो म्हणून, विधानसभेचे झेड पी चे इलेक्शन लढतो म्हणून, अशा अनेक कारणामुळे भारतातील अनेक ग्रामीण भागात खेड्यांन खेडे खदखदते आहे. आणि मग कोणतेही निमित्त मिळाले की वर्णवादी लोक एकतर्फी युद्ध सुरू करतात. आंबेडकर पूर्व काळात जसे अस्पृश्य होते त्या दिनदरिद्री अवस्थेत सुधारलेल्या अस्पृश्यांना दलितांना आदळून देतात. समाजात ब्राह्मण क्षत्रिय सदैव वर राहिलेले आहेत आणि श्रमिक दलित शूद्र सदैवखाली दैन्य दुःख आणि दारिद्र्यात कितपत पडलेले आहेत. समाजात प्रत्येक श्रेष्ठ जातीचा स्वतंत्र व्यवसाय आहे व खालच्या जातीला शुद्रांना फक्त श्रेष्ठा ची चाकरी करावी. जातीवादाची कारणे पारलौकिक, पवित्र, अपवित्र या धार्मिक कल्पनेत नाही तर ब्राह्मण-क्षत्रिय आणि शूद्र अति शूद्र हा भेद श्रीमंत-गरीब, शोषक-शोषित शासक-शशित, सुखी-दुखी, स्वाधीन-गुलाम अशी ही वर्गीय विभागणी आहे. आणि वेदापासून ते पोथीपुराणा पर्यंतच्या सर्व ग्रंथांनी, देवांनी, राजाने आणि स्मृतीकारांनी विचारवंत यांनी वेगवेगळ्या कारणावरून पक्की केली आहे. जाती व्यवस्थेमुळे आणि अस्पृश्यतेमुळे संपत्तीचा वेग ब्राह्मण क्षत्रियांकडेच वाहतो आणि अस्पृश्य जातीवर दरिद्रता कोंडून टाकलेली आहे. जातीय अत्याचारामुळे स्त्रियांवर गुलामीची अनेक बंधने आली आणि तिची स्थिती पशुवत होत गेली. जात जेवढी उंच असते तेवढे त्या व्यक्तीला उच्च स्थान असते आणि जात जेवढी तुच्छ तेवढेच खालचे स्थान त्या व्यक्तीस असते. आजही भारतात जातीच्या आधारावर कधी हिंसा तर कधी भेदभाव पाहत आहोत या कारणामुळेच अनेक लोकांचे जीवन खूप अवघड आहे. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या अहवालानुसार भारतामध्ये मागील चार वर्षांमध्ये तथाकथित उच्च जातीच्या लोकांद्वारे दलितांवरील निश्चित केलेल्या अपराधाचीची संख्या सुमारे ४७००० आहे. आपण २०२४-२५ सोडून २६ मध्ये आलो आहोत. देशाला आजाद झालेले अनेक वर्षे पूर्ण झाले पण आजही समाजामध्ये जातिगत भेदभाव रुढीवादी ब्राह्मणवादी मुळे समाप्त होत नाहीत. या कारणामुळे आजही दलित समुदायाचे लोक संविधानिक तरतुदी असूनही त्यावर योग्य ती प्रतिक्रिया देऊ शकत नाही. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या अहवालानुसार दिवसेंदिवस दलित अत्याचाराची संख्या वाढत जात असल्याची दिसून येते आहे. आजही मोठ्या संख्येने दलितांवरील होणाऱ्या अत्याचार समोर येत नाहीत पोलीस कारवाई न करण्यासाठी त्यांना दहशत दिली जाते. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया च्या रिपोर्ट नुसार २०२० ते २१ मध्ये ११. ९१७, २०२१ ते २२ मध्ये १३. ९६४, २०२२ ते २३ मध्ये १२. ४०२ आणि २०२३ ते २४ मध्ये ९५० पेक्षा जास्त दलित अत्याचाराच्या घटना समोर आल्या असल्याचे दिसून येते. उच्चवर्णीयांना वाटते की, दलितांनी दलित म्हणूनच आपल्या पायाखाली राहायला पाहिजे. आर्थिक बरोबरीही त्यांनी करू नये. इतकेच काय, या सर्व सवर्णांनी दलित हा माणूस नाही अशीच खूणगाठ आपल्या मनात पक्की केली आहे. गावातील चहाटळ माणसेच जातीच्या नावाने इतर गरिबांना या दलितांविरुद्ध तयार करतात. महाराष्ट्रातील बहुतेक ग्रामीण भागातून बहुसंख्येने असणारा इतर वर्गच दलितांना बरोबरीच्या नात्याने प्रतिष्ठा मिळू देत नाही. या सर्व दलित जातींतही परस्परांत अस्पृश्यता पाळली जाते. त्यांच्यात एकी असत नाही. त्यामुळे वेगवेगळ्या जातींना चोपून काढणे दलितेतरांना शक्य होते. सर्वांत दुःखाची गोष्ट म्हणजे, दलित माणसेही लाचारीने फितुर होतात आणि आपल्या समदुःखी बांधवांवर अन्याय होत असताना डोळे झाकून बसतात. समाजातील जाणत्या आणि सुशिक्षित स्तरातून दलितांवरील अन्यायाबाबत कोणतीच प्रतिक्रिया येत नाही. कुठल्याही अन्यायावर संवेदनाशून्य असा हा वर्ग आहे. गावची पाटील, सरपंच आदी नेतेमंडळी इतर जातीय असतात. त्यामुळे हे पोलीस दल दलितांना संरक्षण व न्याय देण्याबाबत निरुपयोगी ठरते. त्यामुळे कायद्यांची अंमलबजावणी होत नाही. त्यांची भीती कुणाला वाटत नाही. दलितांवर अत्याचार केला म्हणून, अस्पृश्यता पाळली म्हणून कुणाला भीती वाटेल अशा जबर शिक्षेचे एकही उदाहरण आज देता येणार नाही. पोलिसांना असे पक्षपातीपणामुळे वागावे लागते याचे कारण महाराष्ट्रातील राज्यकर्ते बहुसंख्येने दलितेतर आहेत. ते सर्व आपापल्या समाजाच्या चुका सावरण्याचा, त्यावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न करतात. खरे पाहता, दलितांना मतदानाचा हक्क सोडून दुसरे कोणतेच हक्क नाहीत. त्यांचे प्रतिनिधित्वही नगण्यच असते. त्यांचा राजकारणावरचा प्रभाव शून्यच असतो. सामाजिक बहिष्कार आणि उच्चवर्णीयांच्या एकीतून निर्माण झालेली दहशत तर या दलितांना नाक मुठीत धरून शरण आणायला भाग पाडते. परंतु दलितांतील फुटीर वृत्ती, परस्परांबद्दलची अनास्था त्यांची शक्ती खच्ची करते. या दलितांत आता एक नवा सुशिक्षित वर्ग निर्माण होत आहे. पण तो बाबू प्रवृत्तीचा बनत आहे. आपल्या दलित बांधवांच्या दुःखांची त्याला आठवणही नाही. इतकेच काय, दलित वर्गातून आलेले शिक्षित अधिकारी, त्यांच्या वस्तीत राहायला मागत नाहीत. त्यात त्यांना कमीपणा वाटतो. दलित कार्यकर्त्यांची आणखी वेगळीच कहाणी आहे. त्यांतील बहुसंख्य मंडळी सत्ताधारी पक्षांचे दलाल आहेत. सत्ताधारी पक्षाचा दलाल अन्यायाविरुद्ध उठाव करू शकत नाही. तो लांगूलचालनाचा आणि लाचारीचा मार्ग पत्करतो.

**अध्ययनाचे उद्दिष्ट्ये:** १) ग्रामीण भागातील दलित कुटुंबाच्या दर्जा व स्थानाचा अभ्यास करणे. २) ग्रामीण भागातील दलित अत्याचाराची कारणे शोधणे. ३) ग्रामीण भागातील दलितांची सद्यस्थिती अभ्यासणे. ४) ग्रामीण भागातील जातिवादाने दलित अत्याचारांचे विश्लेषण करणे आणि त्यामागील कारणे शोधणे. ५) ग्रामीण भागातील दलित अत्याचारांच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

**अध्ययनाचे गृहीतकृत्ये:** १) ग्रामीण दलितांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. २) ग्रामीण भागातील दलित लोकांच्या समस्यांवर ज्या उपाययोजना सरकारने ठरवल्या त्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचत नाहीत. ३) ग्रामीण भागातील दलित समुदाय सामाजिक आर्थिक आणि राजकीय दृष्ट पिछाडलेले आहेत. ४) ग्रामीण भागातील दलित अत्याचारांच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सामाजिक जागरूकता, शिक्षणाचा प्रसार आणि आर्थिक विकास आणि कायदा आणि सुव्यवस्था महत्त्वाचे आहे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोध निबंधासाठी शास्त्रीय संशोधनातील नियमाप्रमाणे तथ्य संकलन करताना दुय्यम तथ्यांचा आधार घेण्यात आलेला आहे. यासाठी विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ, मासिक, इंटरनेट व वर्तमानपत्रातील बातम्या तसेच लेख इत्यादीचा आधार घेऊन संशोधन विषयाचे विश्लेषण केले आहे.

**अध्ययनाचे महत्त्व:** दलितांना अनेक शतकापासून जातिव्यवस्थेच्या उतरंडीत खालच्या तळात ठेवण्यात आलेला वंचित गट आहे. ग्रामीण दलितांना जातिभेदाला तोंड द्यावे लागते उच्च जातीतील लोक दलितांचे शोषण करतात. अती गरीबी आणि मागासलेपणा मध्ये दलित जाती आजही जीवन जगताना दिसून येतात. दलित मजूर हे शेतमजूर, नोकर, सफाई कामगार, अंकुशल कामगार, अस्वच्छता क्षेत्रातील कामे करतात. हे अडाणी —निरक्षर आहेत. यामुळे त्यांना घटनात्मक तरतुदी नाहीत परंतु सद्यस्थितीमध्ये अनेक गैर सरकारी स्वयंसेवी संस्था, विविध शासकीय योजना मार्फत देखील शासनाकडून दलितांच्या उत्थानासाठी कार्य करत आहेत. याचा उपयोग सर्वसामान्य अभ्यासक शासन यांना होऊ शकेल म्हणून हा विषय महत्त्वाचा आहे.

**दलितांच्या वरील अत्याचाराचे मूळ:** खेड्यात चातुर्वर्ण्यप्रणित विषमतेवर आधारलेल्या समाजरचनेचे अस्तित्व आहे. आणि त्यामुळेच दलित समाजावर खेडोपाडी छळांचे, अन्यायांचे, अत्याचारांचे अखंड सत्रच चालू असल्याचे दिसते. बौद्ध, दलित, आणि अस्पृश्य समाजांवर आजकाल भयंकर स्वरूपाचे, क्रूर, निर्दय प्रकाराचे अत्याचार उच्चवर्णीय हिंदू समाजाकडून कोणत्या ना कोणत्या गावी केले जात आहेत. या भयानक स्वरूपाच्या अन्याय, अत्याचार, व छळाला आता सीमाच राहिलेली नाही.

**विषम जातिव्यवस्था:** ग्रामीण भागात दलितांच्यावर जे सतत अत्याचार केले जातात त्याचे मूळ हिंदू समाजाच्या चातुर्वर्ण्यपद्धती व त्या पद्धतीवर आधारलेल्या विषम जातीय व्यवस्थेत आहे. ही समाजरचनाच मुळी उच्च-नीच अशा श्रेणीवर आधारलेली आहे. जात ही माणसाच्या- व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनावर बंधन ठेवते. या व्यवस्थेत माणसाच्या गुणाला किंमत नाही. समता, बंधुता, स्वतंत्रता, व न्याय अशा अमोल तत्त्वांना- मूल्यांना मुळीच स्थान नाही. सर्व हक्क व अधिकार फक्त वरच्याच जातीच्या हातात आहेत; आणि खालच्या जातींनी मात्र परंपरागत रूढिबद्ध, गुलामी पद्धतीच्या कामांची ओझी उचलावीत असे आहे. अशा प्रकारच्या चातुर्वर्ण्यप्रणित विषम समाजरचनेमुळेच उच्चवर्णीय समाज अस्पृश्य, दलितावर अत्याचार करत आहे.

**ग्रामीण भागातील दलितांचे आर्थिक दारिद्र्य:** ग्रामिन भागातील दलित समाज दलित समाज आर्थिकदृष्ट्या अत्यंत दरिद्री आहे. खेड्यात त्यांना रोजच्या चरितार्थाचे म्हणावे तसे चांगले साधन नाही. त्यांच्या हातांत उत्पादनाची साधने नाहीत. हा समाज प्रामुख्याने भूमिहीन मजूर आहे. ते गावातल्या सवर्ण स्पृश्य समाजाच्या शेतीवरच शेत-मजूर म्हणून कामे करतात. काही काही खेडेगावात अशा दलित मजुराला जेव्हा स्पृश्य काम देतो, तेव्हा त्या स्पृश्य माणसात त्या दलिताच्यावर एक प्रकारचा उपकार केल्याची भावना जाणीव निर्माण होते. 'याला आपण कामास लावले, याला आपण यापोटी अन्न-धान्य दिले' अशाच प्रकारची भावना मालकाच्या मनात निर्माण होते. त्या काम देणाऱ्या मालकात आधुनिक दृष्टी नसते. काही खेड्यांत अशा काम करण्याच्या पद्धतीत अजूनही 'मालक-गुलाम' अशी भावना असते. अशा प्रतिगामी स्वरूपाच्या मालकीपद्धतीत आधुनिक युगाच्या मजूर शास्त्रातील पगार (वेजेस) किंवा कॉन्ट्रैक्ट ॲक्ट पद्धतीची जाणीवच नसते. अशा परंपरागत मालकी पद्धतीच्या शेतात वा कामात रोजंदारीने काम करणाऱ्या बौद्ध व दलित मजुराला काम देणाऱ्या स्पृश्य मालकाविरुद्ध एक तर कुठल्याच मुद्द्यावर खरे पण विरोधी मत प्रकट करता येत नाही, आणि विरोध करणे दूरच राहील. दलित मजुरांनी खरे- प्रामाणिक मतविरोधाला न जुमानता प्रकट केले तर संघर्षाला सुरुवात होते. त्यातूनच दलितांच्यावरील अन्यायाला, छळाला सुरुवात होते.

**खेडेगावातील जातवारी:** खेडेगावातच अस्पृश्यतेचा जन्म होतो; तिची वाढ होते; तेथेच अस्पृश्यतेचे संरक्षणही होते. भारतीय खेड्यात उच्च-नीच अशा जातवार पद्धतीवर आधारलेली समाजरचना, जातीजातींची वसतिस्थाने, गल्ल्या आहेत. उच्च-नीच श्रेणीवर आधारलेले खेडेगावच्या नदी-ओढ्यावर प्रत्येक जातीचे वेगवेगळे पाणवठे आहेत. वेगवेगळ्या जातीच्या वेगवेगळ्या अशा स्मशान भूमी-मसणवटे आहेत. खेडेगावात आजही काही प्रमाणात अस्तित्वात असलेले जात-जन्मावर आधारलेले परंपरागत धंदे आहेत, आणि त्यावर आधारलेले बलुता पद्धतीने अर्थशास्त्रही आहे. ही खेडी जातीयतेची माहेरघरेच आहेत. अशा चौकटीत, अशा कोंडीत व अशा तटबंदी किल्ल्यात गाव वेशीच्या आत, गाव तटाच्या आत सवर्ण हिंदूची वस्ती असते; आणि गाववेशीच्या तटाच्या बाहेर लांब अंतरावर गावच्या अस्पृश्य, दलितांची वस्ती असते. त्यामुळेच एका खेड्यात दोन खेडी दिसतात! एक खेडे स्पृश्य हिंदूचे, व दुसरे दलितांचे. आता हे गावच्या दोन वस्त्यांतले अंतर कसे नष्ट करावयाचे? गावचे स्पृश्यहिंदू लोक हे मधले तटाचे अंतर- तटाची भिंत तशीच कायम ठेवण्याच्या प्रवृत्तीचे आहेत. आणि गावच्या बौद्ध व दलितांना हे दोन वस्त्यांतले अंतर तोडावयाचे आहे. मोडावयाचे आहे. बौद्ध व दलितांना ही गावातील अस्पृश्यतेची स्मारके असलेल्या आपल्या वस्त्या मोडून गाव-वेशीच्या स्पृश्यांच्या वस्तीत घरे करून राहण्याची इच्छा आहे. पण त्यांची इच्छा, त्यांची मागणी गावातील स्पृश्य मंडळीना मुळीच मान्य होत नाही. व पसंतही पडत नाही. अशा प्रश्नातूनही या दोन समाजांत संघर्षाला सुरुवात होते. गावचे स्पृश्य हिंदू दलितांच्यावर अत्याचाराला सुरुवात करतात.

**दलित अत्याचाराबाबत असंवेदनशीलता:** पुरोगामी महाराष्ट्रात घडत असलेल्या दलित अत्याचाराच्या अनेक घटना अस्वस्थ करणाऱ्या आहेत. भारतीय समाजात विषमतामूलक जातिव्यवस्था अनेक शतके तग धरून राहिलेली आहे. भारतरत्न डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या भारतीय संविधानाने या जातीय विषमतेला पूर्णत: नाकारून एक प्रकारे सुरुंग लावला. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, राष्ट्राची एकता आणि एकात्मता या उदात्त सांविधानिक मूल्यांच्या आधाराने आपला देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल

करत आहे. मात्र तरीही समाजात अजूनही काही प्रमाणात जातीय, संकुचित, भेदभावपूर्ण मानसिकतेतून जातीय अत्याचाराच्या दुर्दैवी घटना घडतात. सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठेच्या विकृत कल्पना, जातीय राजकारण, प्रबोधनाचा, समन्वयाचा अभाव, तपासात आणि न्यायव्यवस्थेत होणारे भ्रष्ट हस्तक्षेप अशी अनेक कारणे यामागे आहे. **National Geographic News च्या अहवालानुसार,** प्रत्येक तासाला २ दलितांवर हल्ला होतो, प्रत्येक दिवशी ३ दलित महिलांवर बलात्कार होतात, प्रत्येक दिवशी २ दलितांची हत्या करण्यात येते आणि २ दलितांची घरे जाळण्यात येतात. **POA Act - १८८९ नुसार पुढील प्रकारचे गुन्हे अत्याचार म्हणून ओळखले जातात.** जातीय अपमान किंवा तुच्छ शब्द वापरणे, दलितांना सार्वजनिक ठिकाणी प्रवेश रोखणे, जमीन बळकावणे किंवा तोडफोड करणे, दलित महिलांवर लैंगिक अत्याचार करणे, सामूहिक हल्ले किंवा सामाजिक बहिष्कार करणे. शारीरिक आणि लैंगिक हिंसा दलितांनवर विशेषतः महिलांवर शारीरिक हल्ले आणि लैंगिक अत्याचार होतात ते जे थांबवण्यासाठी अजूनही कायदा कमी पडतो. दलित स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना उच्चवर्णीयाकडून विरोध होणे इ.

**उपाय:** सामाजिक जागरूकता निर्माण करणे महत्त्वाचे आहे, शिक्षणाचा प्रसार होणे महत्त्वाचे आहे, आर्थिक विकास होणे आणि कायदा सुव्यवस्था मजबूत करणे.

**निष्कर्ष:** ग्रामीण भागातील जातिवाद आणि दलित अत्याचार ही गंभीर सामाजिक समस्या ऐवजी कायद्याची अंमलबजावणी आणि सामाजिक जागृती शिवाय संपणार नाही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे जागी होते एक कठोर सामाजिक आर्थिक विषमता निर्माण करणारे प्रणाली आहे यावर मात करणे आवश्यक आहे. दलित अत्याचाराचा प्रश्न हा फक्त गुन्हेगारी नाही तो सामाजिक न्यायालयाचा आरसा आहे. भारताने संविधानात समानतेची वचने दिले आहेत पण त्या वचनांना प्रत्यक्षात आणण्यासाठी आपल्याला कायद्याची अंमलबजावणी, सामाजिक पुनर्बांधणी आणि राजकीय इच्छाशक्ती या गोष्टींची गरज आहे. प्रत्येक दलित नागरिकाला भीतीविना जगण्याचा आत्मविश्वास निर्माण होणे आवश्यक आहे.

**शिफारशी:** दलित अत्याचार निवारण अधिनियमन मजबूत करणे महत्त्वाचे आहे या अधिनियमात दलित अत्याचाराच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर नियम असणे आवश्यक आहे. दलित समुदायाच्या विकासासाठी योजना बनवणे महत्त्वाचे या योजनेत दलित समुदायाच्या विकासासाठी शिक्षण, स्वास्थ्य आणि आर्थिक विकासासाठी विशेष प्राधान्य असणे आवश्यक आहे. दलित अत्याचाराच्या घटनांची नोंदणी करणे महत्त्वाचे आहे या नोंदणी दलित अत्याचाराच्या घटनांचे विवरण आरोपीचे नाव आणि घटनेचे परिणाम असणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील दलितांच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी समिती बनवणे महत्त्वाचे आहे. या समितीत दलित समुदायाचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि सरकारी अधिकारी असणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :**

1) डॉ गंगाधर पानतावणे (१९९८), डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
2) हरीश खडेराव (१९९३), आंबेडकरवादी साहित्य दृष्टिकोन आणि दायित्व, प्रज्ञा प्रकाशन, नवी दिल्ली.
3) बाबुराव बागुल (१९८१) दलित साहित्य आजचे क्रांती विज्ञान, दिशा प्रकाशन, नाशिक.
4) Hindi Feminism In India. Com ११ December २०२४
5) mr. quora. com
6) divyamarathi-bhaskar. com
7) www. evivek. com ३० डिसेंबर २०२१
8) National Geographic Magazine On Untouchables
9) Scheduled Castes and Scheduled Tribes Act १९८९ आणि २०१५–२०१८ दुरुस्ती.

# बालविवाह एक सामाजिक समस्या: समाजशास्त्रीय विश्लेषण

**डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे** प्रभारी प्राचार्य तथा प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ.

**गोषवारा:** भारतीय समाज पितृसत्ताक कुटुंब पद्धती, सांस्कृतिक विविधता आणि लिंगभाव लक्षात घेता स्त्रियांचे स्थान, जीवन प्रश्न समजून घेणे. बालविवाहांची पार्श्वभूमी व स्वरूप आकलन करणे. बालविवाहाची कारणमीमांसा करणे. परिणामांचा वेध घेणे. समाजात बालविवाह प्रतिबंधात्मक प्रयत्नादी संस्था व शासकीय प्रयत्नांचा आढावा घेऊन बालविवाह प्रतिबंध, निर्मूलनास उपाय सुचविणे. या हेतूने प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत अध्ययनाकरिता प्राथमिक तथ्य संकलन तथा प्रत्यक्ष तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. त्या अंतर्गत व्यष्टी अध्ययनतंत्राचा अवलंब केला आहे. त्याद्वारे तथ्य संकलित करण्यात आली आहेत. तसेच द्वितीय तथ्यांचा आधार घेताना संबंधित ग्रंथ, वृत्तपत्र, अहवाल आदी बाबींचा देखील आधार घेण्यात आला आहे. प्रस्तुत अध्ययनासाठी महाराष्ट्रातील नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील बालविवाह झालेल्या, व बालविवाहाला विरोध केलेला अशा एकूण १० स्त्रिया एकक म्हणून या क्षेत्रातून निवडण्यात आले आहे. प्रस्तुत अध्ययनासाठी निवडण्यात आलेल्या एककाच्या मुलाखतीद्वारे तथ्य प्राप्त करण्यात आले आहेत. त्यांचा अन्वयार्थ लावून आशय विश्लेषण करण्यात आले आहे.

**मुख्य शब्द:** बालविवाह, पितृसत्ता, लिंगभाव आणि समाज

**प्रास्ताविक:** बालविवाह प्रतिबंधक कायद्याने घालून दिलेली वयोमर्यादा न पाळता त्याआधी म्हणजे मुलीचे वय १८ आणि मुलाचे वय २१ याचे पालन न करता या नेमून दिलेल्या वयाच्या आत होणारा मुलाचा किंवा मुलीचा विवाह म्हणजे बालविवाह होय. ही एक गंभीर

समस्या बनत असून तिचे स्वरूप वरचेवर वाढत आहे. देशात साधारणत:२३ टक्के तर महाराष्ट्रात २२ टक्के बालविवाह होतात. तर उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान यासारख्या राज्यांमध्ये बालविवाहाचे प्रचलन अधिक आहे. [१] (UNICEF Report) करोना सारख्या महामारीच्या काळात कमी पैशात, कमी खर्चात, कमी माणसात होणारे विवाह हे सोयीचे समजून अनेक पालकांनी आपल्या मुलींची लग्न आटोपली. या दरम्यान अनेक बालविवाह घडले असेही निदर्शनास येते. बालविवाह या समस्येचे स्वरूप सार्वत्रिक आहे. जात, जमात, प्रदेश, वर्ग, धर्म यानुसार त्याचे प्रमाण कमी अधिक असेल. परंतु सर्वत्र बालविवाह घडून येत आहेत. अनेक बालविवाह शासकीय यंत्रणेकडून रोखण्याचे वृत्त देखील प्रसिद्ध झाल्याचे वाचनात येते. नाथपंथी गोसावी या जमातीत तर बालविवाह मोठ्या प्रमाणात होतात. त्यांच्यावर परंपरागत जीवन पद्धतीचा पगडा असल्याचे प्रथम दर्शनी लक्षात येते. या साऱ्यामध्ये वाताहात होते ती बालवधूची. बालवयात कुटुंबाची, मुलांची जबाबदारी, शरीराचे खंगने पोटा-पाण्यासाठी होणारी भटकंती, कुटुंबातील कलह हे सारे स्त्री अस्तित्वाच्या दुय्यमत्वाला अधिक गडद करते. इतकेच नाही तर विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि स्त्री प्रश्नांची तीव्रता याचा जवळचा संबंध असल्याचेही स्पष्ट होते. याबाबतचे अनेक लेखी दाखले उपेक्षितांवरील साहित्यात अधोरेखित होतात. जसे: अशोक पवारांचे आत्मचरित्र **'भंगार'** किंवा शरदकुमार निंबाळे यांचे **अक्करमाशी** आदि.

भारतीय समाज पितृसत्ताक कुटुंब पद्धती, सांस्कृतिक विविधता आणि लिंगभाव लक्षात घेता स्त्रियांचे स्थान, जीवन प्रश्न समजून घेणे. बालविवाहांची पार्श्वभूमी व स्वरूप आकलन करणे. बालविवाहाचीकारणमीमांसा करणे. परिणामांचा वेध घेणे. समाजात बालविवाह प्रतिबंधात्मक प्रयत्नादी संस्था व शासकीय प्रयत्नांचा आढावा घेऊन बालविवाह प्रतिबंध, निर्मूलनास उपाय सुचविणे. या हेतूने प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

**अध्ययनाचे उद्देश:** बाल विवाहाची पार्श्वभूमी व स्वरूप समजून घेणे. बालविवाहाची कारणमीमांसा करणे. बालविवाहाचे दुष्परिणाम विश्लेषीत करणे. बालविवाह थांबविण्यासाठी कार्यरत यंत्रणा व प्रयत्नांचा आढावा घेणे. बालविवाह प्रतिबंधात्मक करिता उपाय सुचविणे.

**संशोधन प्रश्न:** प्रस्तुत अध्ययन संबंधित काही संशोधन प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. वेगवेगळ्या समाज घटकांमध्ये बालविवाहाची स्थिती कशी आहे? त्याची नेमकी करणे काय आहेत? त्याचा परिणाम स्त्रियांच्या जीवनावर कसं होतो? बालविवाह रोखण्यासाठी यंत्रणा काय प्रयत्न करतात. आदी.

**अध्ययन पद्धती:** प्रस्तुत अध्ययनाकरिता प्राथमिक तथ्य संकलन तथा प्रत्यक्ष तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. त्या अंतर्गत **व्यष्टी अध्ययनतंत्राचा अवलंब** केला आहे. त्याद्वारे तथ्य संकलित करण्यात आली आहेत. तसेच द्वितीय तथ्यांचा आधार घेताना संबंधित ग्रंथ, वृत्तपत्र, अहवाल आदी बार्बीचा देखील आधार घेण्यात आला आहे.

**अध्ययन क्षेत्र:** प्रस्तुत अध्ययनासाठी महाराष्ट्रातील नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील बालविवाह झालेल्या, व बालविवाहाला विरोध केलेला अशा एकूण १० स्त्रिया एकक म्हणून या क्षेत्रातून निवडण्यात आले आहे.

**नमुना निवड**:प्रस्तुतअध्ययनासाठी **'व्यक्ती व्यष्टी अधयन'** करण्यात आले. करिता बालविवाह या सामाजिक घटनेशी संबंधित व्यक्तींची (एकक) निवड गैरसंभाव्यता नमुना निवडीतील **सहेतुक** या पद्धतीचा अवलंब करण्यात आला. त्यांच्या मुलाखती घेऊन तथ्य संकलित करण्यात आले. जसे: बालवधू, बालवधू होऊ घातलेली स्त्री, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, सखी वन्स स्टॉप सेंटर, महिला व बाल सहायता कक्ष कर्मचारी इत्यादी.

| अ. क्र. | एककाचे बदललेले नाव | वय-वर्ष | शिक्षण | जात | प्रवर्ग | वर्ग | विवाह झाले त्यावेळी वयवर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | साक्षी | २२ | ६ वी | कोलाम | Pvtgs | अति निम्न | १७ |
| २ | गंगासागर | ८० | २ री | वाणी | OBC | उच्च मध्यम | १४ |
| ३ | सुभद्रा | ४५ | १० वी | वाणी | OBC | मध्यम | १७ |
| ४ | हर्षा | २९ | पदवी | चांभार | SC | अति निम्न | १९ |
| ५ | अनामिक | ४५ | पदव्युत्तर | - | - | उच्च मध्यम | २३ |
| ६ | कल्पना | ३७ | १० | वडार | VJ | निम्न | १६ |
| ७ | मैत्रिणी | ३७ | १० | बौध्द | SC | निम्न | १७ |
| ८ | लता | ४६ | ७ | न्हावी | SC | निम्न | १७ |
| ९ | काशी | २३ | ३ री | नाथपंथी गोसावी | N. T. -B | निम्न | १७ |
| १० | श्रेया | १८ | ७ वी | भोई | N. T-C | निम्न | १७ |
| ११ | मेळघाट भागातील कोरकू जमातीच्या महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या तरुणी | २० | पदवी | कोरकू | S. T. | निम्न | - |

**तथ्य संकलन पद्धती**: प्रस्तुत अध्ययनासाठी निवडण्यात आलेल्या एककाच्या मुलाखतीद्वारे तथ्य प्राप्त करण्यात आले आहेत. त्यांचा अन्वयार्थ लावून आशय विश्लेषण करण्यात आले आहे.

**तथ्यांचा अन्वयार्थ किंवा आशय विश्लेषण:**

**बाल विवाहाची पार्श्वभूमी व स्वरूप:** बालविवाह ही गंभीर समस्या असून तिचे स्वरूप विस्तारित असल्याचे अनेक दाखले प्रत्यक्ष तथ्याधारित संशोधन ग्रंथ **'बालविवाह'**यामध्ये श्री. हेरंबकुलकर्णी मांडतात. तर बालकांच्या हक्कांचे जतन करणाऱ्या जागतिक पातळीवरील संस्था **युनिसेफचे अनेक अहवालही** यास पुष्टी देतात. बालविवाह प्रतिबंधाचे वृत्त पुन: पुन्हा वाचनास येते. **बुलढाणा जिल्ह्यात २८७ बालविवाह रोखले. दिनांक ३१/१२/२०२५ चे दै. खबरे शामतकचे वृत्त. <u>यातील आकडा नेमका किती ही</u>**

**बाब दुर्लक्षित केली तरी** बालविवाह समस्येचे स्वरूप व गांभीर्य अधोरेखित करतात. तसेच डॉ. रखमाबाई राऊत यांचे बंड, फुलमनीमृत्यू केस (प. बंगाल) याही घटना बालविवाहाचे जाचक रूप दर्शवतात. **काकस्पर्श, डॉ. आनंदी गोपाळ..** . अशा चित्रपटातून हा प्रश्न सचेत नजरेस येतो. बालिकावधू सारख्या मालिकांमधून बालविवाहाची चर्चा, आणि आदर्श बालवधूची व्यक्तिरेखा रंजित केली जाते. महाराष्ट्रात तर हिंदू विवाहानंतर वधू पहिल्यांदा गृहप्रवेश करते. तेंव्हा घरभरणी हा विधी पार पडला जातो. त्यादरम्यान नवरदेवाची बहिण माजघराच्या दारात मुसळ आडवे हातात धरून नवरी नवरदेवाची वाट अडवते. (हा सारा पारंपारिक गंमती-जंमातीचा प्रकार) नवरदेव विचारतो, कुणी रस्ता अडवला, बहीण सासरचे आडनाव सांगते.. . . यांनी अडवला. काय मागणे आहे अशी विचारणा केल्यावर ती **भाऊ-भावजयीला होणारी मुलगी, सून म्हणून द्यावी असा हट्ट करते**. तो आपल्या पत्नीला विचारतो ताई, मुलगी मागतेय, तेव्हा ती उत्तरते, **'झाली आपल्याला तर देऊ त्यांना'** हे **वचन** दिल्यानंतरच बहिण त्यांचा रस्ता सोडते. या घटनेची चिकित्सा केली तर असे लक्षात येते, की जी मुलगी जन्मलीच नाही तिच्या जन्माच्या आधी तिचे लग्न जोडणे, घरातील खांबाला कुंकू लावणे, आत्तोघरी भाची देणे या लोकरीती बालविवाहाला अनुकुलता निर्माण करतात.

**बालविवाहाची कारणमीमांसा, दुष्परिणाम विश्लेषण:** १) **मी साक्षी** कोलाम जमातीची (Pvtgs) . शिक्षणाची फारशी गोडी नव्हती किंवा आश्रम शाळेत चांगले गुणवत्तापूर्ण शिकवल्या जात नाही म्हणून मला पुढील वर्गाचा अभ्यास अवघड वाटत होता. अभ्यासात मन लागत नसे. कसेतरी दहावीची परीक्षा दिली पण दोन विषय राहिल्यामुळे नापास झाली. पुन्हा परीक्षा देल्ली नाही. आश्रम शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण नसल्यामुळे मी घरी राहू लागली. आमचं पोड कळंब तालुक्यात आहे. दोन वर्षानं म्हणजे सतराव्या वर्षी बाबांना लग्न यवतमाळ तालुक्यातील इचोरी गावाशेजारील पोडातील मुलाशी लावून दिलं. आता माझं वय २२ आहे. तीन मुलं आहेत. त्यातले एक लेकरू सारखं बिमार असतं. मलाही टायफाईड झाला होता. सारखी हाडीताप येते-जाते. आम्ही सासू-सासऱ्यापासून वेगळे राहतो. नवरा एकटाच कमावतो. तो फारसं लक्ष देत नाही. माहेरी दोन महिने राहून आली. आई-बाबांनी आता आणून सोडलं. आता मनात विचार येते, की या जिंदगीत वेगळं काय आहे? ही विवंचना परावलंबी असलेल्या साक्षीला हताश करून सोडते. पोटापाण्यासाठी जगाव यापलीकडे महत्वाकांक्षा नाहीत.

**कोलाम ही आदिम जमात. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्या कमालीची अविकसित, धार्मिकता, पारंपरिकता, अंधश्रद्धेचा मोठा पगडा, मुलींचे शिक्षणाचे प्रमाण कमी. त्यामुळे शिक्षणापासून परावृत्त झालेल्या मुलींचे लग्न लावून दिले जाते तथा व्यक्ती स्वातंत्र्याला वाव असल्यामुळे प्रेमात गुंतलेल्या मुलींचा प्रियकराशी विवाह लावून दिलं जातो. तो अनेकदा बाल विवाह असू शकतो.**

**२) गंगासागर:** वय वर्ष ८०. ह्या तत्कालीन मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगी. पाच बहिणीत एक भाऊ. त्या काळात एक भाऊ म्हणजे अत्यंत जीवश्च. त्यामुळे सारं जीवनच भाऊकेन्द्री. माझा१४ व्या वर्षी जरठकुमारी विवाह झाला. मला दोन मुले, एक मुलगी झाली. लहान बाळ सहा महिन्याचे असताना पती वारले. मी बालवधू, बालमाता आणि तरुण विधवा झाले. बाईला काही कळत नाही म्हणून चुलत सासरे सर्व शेती आणि व्यवहार पाहत. आम्हाला लागणारा किराणा उचलून आणून देत. मी लेकरांना नातेवाईकांकडे ठेवून शिकविले. पण हालअपेष्टा होत्याच. अवघ्या बाविसाव्या वर्षापासून विधवापण काढणं, निराधार जगणं किती कठीण असते हे मलाच माहीत. त्यातही जावांचा जाच वेगळाच. मग मी देवाचा मार्ग धरला आणि जीवन कंठले. माझ्या जीवनातील चढ-उतार, विवंचना, आव्हानांचा वेध घेतला तर एक स्वतंत्र पुस्तक तयार होईल असे त्या व्यथित होऊन सांगत होत्या.

**गंगासागर एका मध्यम वर्गीय कुटुंबातील, काळ पारतंत्र्यातला, मराठवाड्यात निजामशाही मुळे स्त्रीनिर्बंध अधिक, पडदा पद्धतीचे प्रचलन. मुलगी उपवर झाली की लग्न होत, तेव्हाच्या वयोमर्यादेनुसार बाल विवाह नसला तरी आजच्या तुलनेत आहे. ४ बहिणी, त्यामुळे मुली ह्या दुय्यम. लग्न लावून दिले की जबाबदारी संपली ही भावना आणि मुलगी वडिलाघरी उपवर होवून अधिक दिवस राहू नये हा मानस, त्यामुळे बालविवाह होत असत. पुत्र प्राप्तीला महत्व असल्यामुळे कुटुंबात लिंगभेदाची वागणूक नकळत वाट्याला येत असे. त्याकाळी चूल आणि मुल इतपतच स्त्रियांचे जीवन मर्यादित केले जात असल्यामुळे गंगा यांना व्यवहार हाताळू दिले गेले नाही. त्यांच्या जीवनात पितृसत्ता व पुरुषप्रधानता आढळते.**

**३) सुभद्रा :** माझा जन्म १९८१ सालचा. शेतकरी व हॉटेलचा व्यवसाय असलेल्या ग्रामीण कुटुंबातील मी. आमचे गाव दोन-तीन हजार लोकसंख्या असलेले. मी सातवीपर्यंत कन्या शाळेत शिकले. वर्गातील हुशार मुलींपैकी मी एक. माझे संयुक्तकुटुंब. सातवी नंतर मी हायस्कूलमध्ये मैत्रिणींसोबत जाऊ लागले. कुटुंबातील जबाबदाऱ्यांमुळे अनेकदा शाळा बुडवावी लागे. मी वयाच्या मानाने फार उंच दिसत होते. आमच्या आईचा आग्रह असा की कुटुंबसंयुक्त असेपर्यंत पोरीचे लग्न पार पडले पाहिजे म्हणजे एकत्रित असताना जबाबदारी निभावते. नाहीतर वेगळं निघाल्यावर आपल्याला पोरीचे लग्न करणे जड जाईल. जेमतेम मी दहावीची परीक्षा दिली, की माझे हात पिवळे केले. मी १६-१७ वर्षाची होते. सासरच्या शेतकरी कुटुंबात मागच्या २८ वर्षापासून **'रांधा वाढा, उष्टे काढा'** करीत तीन लेकरांची आई आहे. माझे वय आता ४५ आहे. माझ्या मैत्रिणी मोठ्या पदांवर आहेत. मला त्यांना पाहून मनात त्रागा येतो. म्हणून मी त्यांना भेटतच नाही. अशी कुटुंब व्यवस्थेच्या अधिकारशाहीमुळे हताश झालेली सुभद्रा बोलते. माझ्या शिक्षणाचा, आकांक्षांचा या व्यवस्थेने विचार केला नाही. मला काय अपेक्षित याचा वेध घेतला नाही. आज मी संसारात मुलांमध्ये रमते. पण माझे बालपण, शिक्षण आणि करियर हिरावले असल्याचे मला पुन्हा पुन्हा वाटते.

**सुभद्रा ह्या निममध्यम वर्ग व वाणी या जातीतील मुलगी, संयुक्त कुटुंबाचे वर्चस्व आणि मुलगी म्हणून वाट्याला आलेलं दुय्यमत्व. त्यामध्ये शिक्षण थांबले, कमी वयात वैवाहिक जबाबदारी पडली. स्वविकासाची इतर मैत्रिणी अथवा तिच्या भावाप्रमाणे समान संधी मिळाली नाही. मर्यादित जीवनाचा वेळोवेळी प्रत्यय. हक्क अधिकारापासून वंचित**

**राहिल्याची भावना. समाजाचा पुरुषा इतकाच स्त्री घटक आर्थिक व शैक्षणिक उन्नतीपासून वंचित. मुलीच्या लग्नाची जबाबदारी संयुक्त कुटुंबात पार पडावी हा आईचाच आग्रह, अशा निम्ममध्यम वर्गात, इ. मा. प्र. मध्ये अनेक स्त्रियांचे जीवन उपेक्षित राहते.**

**४) हर्षा:**माझे वडील मद्यपी. आई घरकाम करते. आम्ही एस. सी. प्रवर्गात येतो. मला तीन बहिणी आहेत. वडील घरामध्ये कमाईतील एक रुपयाही देत नाहीत. उलट त्यांचाच त्रास आहेआम्हाला. दारू पिऊन आल्यावर आईशी झगडा करतात. तिला मारतात. हे सारं आम्हाला अनेकदा नित्याचं बनतं. मी मेहंदी, रांगोळी, पार्लरच्या ऑर्डर घेते आणि त्यातून काही कमावते. आईची कमाई आणि आजोबांचे पेन्शन यावर आमचं घर चालतं. आईची अगतिकता, बेजबाबदार बाप आणि आजोबांवर निर्भर असल्यामुळे आमच्या मजबुरीचा फायदा घेत आजोबा माझ्याकडे शरीर सुखाची मागणी करतो. रात्री उठवतो पण मी कसातरी माझा बचाव करते. आजोबांनी लग्नासाठी एक स्थळ आणले आणि माझे त्यांच्याशी लग्न जुळवत होते. मी तेव्हा १७ वर्षाची त्यामुळे तो बालविवाह होता. मी ठाम नकार दिला. माझ्या कॉलेजातल्या मॅडम आणि सरयांचा आधार घेतला. माझे एका मुलावर प्रेम होते. पुढे मी त्याच्याशी विवाह केला. पण त्या दरम्यान मला कॉलेजातून घरी जाण्याची इच्छा होत नसे. भीती वाटत असे. पण माझ्या धैर्याने मी तरले.. . . . . . एवढेच!

**अनु. जाती मध्ये जगण्याचे प्रश्न तीव्र आहेत. उत्पादनाच्या निश्चित साधनांचा अभाव असतो. आर्थिक परिस्थिती कमकुवत, पुरुषांमध्ये मद्यपानाची सवय त्यामुळे स्त्रीजीवन उपेक्षित. शिक्षण विषयक जागृतीचा अभाव, निराधार स्त्रीचे यक्षप्रश्न, हातावरच पोट असलेला समूह, आर्थिक स्थिती आणि स्त्री जीवन अवहेलना सहसंबंध.. . . . . याबाबी आढळतात. परंतु जो कुणी शिक्षणाच्या प्रवाहात येतो, तो परिवर्तन व जागरूकता याबाबत दक्ष राहतो. शिक्षण हे शक्तीशाली असल्यामुळे शिक्षणाच्या प्रवाहात असलेली हर्षा अन्यायाला विरोध करू शकली.**

**५) एक शैक्षणिक प्रवासातील वाटसरू** सांगू लागली. माझी जात व धर्माचे नाव सांगणार नाही. ती तुम्ही लिहू नये. परंतु आमच्या मध्ये लहान मुलींच्या योनी शुचितेच्या कल्पनेतून तिच्या जननेंद्रियाला टाके (Stitches) दिले जातात. केवळ लघवी होऊ शकेल एवढीच जागा मोकळी ठेवली जाते. जेव्हा आमचे लग्न होते. तेव्हा ते टाके काढले जातात. बालविवाह होतात पण प्रमाण कमी आहे.

**प्रस्तुत तथ्यातून हे अधोरेखित होते की स्त्री सुरक्षा ही व्यवस्था नियंत्रित करते. काही घटकात स्त्री शुचीतता फार केंद्रवर्ती ठेवली जाते. त्यात स्त्रियांचे हक्काचे हनन होऊ शकते.**

**६) कल्पनाताई:** दारव्हा तालुक्यातील महागाव या गावातील कल्पनाताई. लघु उद्योगासाठी धडपड करणारी स्त्री. ती सांगते तिची एक मैत्रीण. तिच्या आईचा बालविवाह झाला. एक मुलगा एक मुलगी होती. त्यांना कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागत होते. तो इतका जाचक होता, की त्यामध्ये तिच्या आईला घरामध्ये रॉकेल टाकून जाळले. दोन्ही दारे, खिडक्या लावून घेतल्या. हा सर्व प्रकार त्यांच्या मैत्रिणीने व कल्पनाताईंनी फटीतून पाहिला. आजही तो प्रकार जेव्हा नजरेस येतो, तेव्हा स्तब्ध व्हायला होते असे त्या सांगतात. त्या मैत्रिणीच्या वडिलांनी सहा महिन्यात दुसरे लग्न केले. माझी मैत्रीण सावत्र आईच्या सानिध्यात आणि खुनी बाबा व आजोबाच्या सोबत सगळ्या भावना मारून जगते. आता तिचेही लग्न साडे सतरा वर्षाची असताना करून दिले. ती आर्वीला राहते. तिच्या मनात तिच्या आईला मारून टाकल्याची घटना सतत तेवत असते. परंतु त्याला वाचा फोडता येत नाही. अशी ही माझ्या मैत्रिणीची कहाणी.

**कल्पनाताई वडार जातीच्या (VJ) असून त्यांची मैत्रीण नवबौद्ध होती. दोघींचे बालविवाह झाले. मैत्रिणीची आई वारली, सावत्र आई, वडिलांनी लवकरच जबाबदारी मोकळी केली. पितृसत्ताक निर्णय होता तो. तर कल्पनाताईचे वडील कर्करोग सारख्या दुर्धर आजाराने ग्रस्त होते. त्यांची इच्छा माझ्या नजरेसमोर माझ्या मुलांचे लग्न व्हावे. म्हणून अवघ्या १६ व्या वर्षी कल्पनाचे लग्न लावून दिले त्यामुळे शिक्षण सुटले. शिवण कामाची कला सुटली. खटल्याच्या घरात पडल्यामुळे दिवसरात्र काम म्हटल्याप्रमाणे जीवन झालं. बाबाच्या भावनिकतेमुळे संपूर्ण जीवनच प्रभावित झाले, तर त्यांच्या मैत्रिणीला मनातील भावना किंवा जे सत्य घडले त्याचा उलगडा करण्याची एक संधी सुद्धा दिली जात नाही.**

**७) लता**: एका छोट्या वाडीमध्ये राहणारी मुलगी. तिच्या सोबतच्या मैत्रिणी शिकत असत. लता ही शेतमजूर कुटुंबातील. तिची मैत्रीण जिद्दीने पुढे शिकत होती. लता शिकण्याचा प्रयत्न करत होती. पण आध्ये-मध्ये तिला रोज मजुरीला जावे लागत होते. जेमतेम पाळी आल्यानंतर तीन वर्षानंतर तिचे एका शेतकरी कुटुंबातील मुलाशी लग्न ठरले. तेव्हा लता सतरा वर्षाची होती. आता तिला दोन मुली एक मुलगा आहे. लताच्या मुलीचे लग्न झाले आहे. मुलगा लग्नाला आला आहे. तिची मैत्रीण शिक्षण पूर्ण करून एका मोठ्या पदावर काम करते. मैत्रीण कारमधून माहेरी येते आणि लता ऑटो तर कधी पायदळ. एकेकाळी एकत्र शाळेला जाणाऱ्या मैत्रिणी बालविवाहामुळे, शिक्षणाच्या हिरावून घेतलेल्या संधीमुळे, स्वतःला सिद्ध करण्याच्या अवकाशाच्या अभावामुळे आज लता सारखी हुशार होतकरू, केवळ जबाबदारी आणि पारंपरिक कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये दडपली गेली आहे.

**आपण शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी साधन मानतो. परंतु ग्रामीण भागातील, कमकुवत आर्थिक स्थिती असलेल्या वर्गातील, स्त्री म्हणून शिक्षणाचा, नोकरी व्यवसाय करण्याचा, स्वतःला सिद्ध करण्याचा अवकाश मिळत नसल्यामुळे, स्त्रीला पारंपारिकतेच्या गर्तेत गुरफटावे लागते. ही बाब चिंतनीय आहे.**

**८) काशी**, नाथपंथी गोसावी भटक्या जमातीतील मुलगी, आता दोन मुलांची आई वय २३ वर्ष. महागाव तालुक्यात राहते. बालविवाह झाला. नवरा व्यवस्थित वागवत नाही. दोन वेळा गर्भपात झाला. ती दोन मुले जन्मली असती तर आता ४ मुलांची आई राहिली असती. नवऱ्याने सोडून दिले. आई लहानपणी वारली. वडिलांकडे मुलांना घेऊन राहते. तब्येत साथ देत नाही. खूप लाल पदर जातो. गर्भपिशवी काढायला डॉक्टरने सांगितली. खचित मनाने काशी आपली जीवन व्यथा मांडते.

एकूणच भटक्या, उपेक्षित, वंचीत घटकातील जीवन प्रश्न, स्त्रीजीवन याबाबी अध्ययनात्मक आहेत. त्यावर भर देणे गरजेचे आहे. बालविवाह सारख्या घटनेने स्त्रियांचे जीवन अधिक उपेक्षित बनते. सततची भटकंती, कुटुंबाची असुरक्षितता, मुलींची सुरक्षा यामुळे बालविवाह लपवले जातात. पारंपरिकतेचा मोठा पगडा असतो. मुलांची सुध्दा कमी वयात लग्न होतात. ही प्रथा सामुहिक आढळते. त्याचाही सर्वोतोपरी विचार व कृतीची आवश्यकता आहे.

**९) श्रेया** ही दिग्रस तालुक्यातील खेडे गावातील मुलगी, तिचे वय केवळ १७ वर्ष. गावातील मुलासोबत तिचे मागील ८ वर्षापासून प्रेमसंबंध. त्यातून श्रेया गर्भार राहिली. श्रेयाची प्रेग्नसी समजल्यावर घरचे थोडे ओरडले. मोठ्या बहिणीचे लग्न जुळले. मग त्यातच घरच्यांनी त्याच प्रियकराशी लग्न लावून दिले. तो २० वर्षाचाआहे. कमाई काही नाही. लग्न झाल्यावर सातव्या महिन्यात त्यांना मुलगा झाला. ते दोघे फारसे शिकले नाहीत. आई वडिलांपासून वेगळे राहतात. जगण्याचे अन्य साधन नाही. कसे जगावे प्रश्नच आहे? तिचा पती खर्रा खातो, दारू पितो आणि प्रेमही करतो. हेच आमच जीवन. हे लाजून सांगणारी बालिका वधू आणि बालमाता नजरेत नजर टाकून बोलू शकत नव्हती. यातूनच लक्षात येते, की काहीतरी चुकीचे झाले हे तिला जाणवते.

**प्रेमप्रकरणाला पूरक मोबाईल व इतर स्थिती यामुळे बालविवाहाचे प्रचलन आढळत आहेत असे प्रत्यक्ष बालविवाह प्रतिबंध यंत्रणेतील शासकीय पदावरील अधिकारी स्थानिक वास्तव परिस्थितीवरून नमूद करीत होते. अशीच अन्य काही उदाहरणे बोलकी आहेत. बालविवाह ही समस्या जात, वर्ग, प्रदेश.. . याने प्रभावित असून त्याची अनेक कारणे कारणीभूत आहेत. लिंगभेद, पुत्रप्राप्तीचा आग्रह, मुलींचा तिरस्कार, नकोशी म्हणून अवहेलना, प्रेमप्रकरणे, जगण्याचे तीव्र प्रश्न आणि उपेक्षित जगणं, कमी वयात पाळी येणे त्यामुळे मुलींच्या आईवडिलांना तिच्या सुरक्षिततेची चिंता, जबाबदारीतून मुक्त होण्याची घाई, (जसे: उसतोड कामगार), अंधश्रध्दा अशा कारणांन्वे बालविवाह घडून येत आहेत. त्याचे दूरगामी विपरीत परिणाम होतात.**

एवढेच नाही तर BSW पदवी शिक्षण घेणाऱ्या मेळघाट भागातील कोरकू आदिवासी विद्यार्थिनी **बालविवाह** बाबत बोलतांना म्हणतात, आमच्याकडे सर्रास बालविवाह होतात. जी मुलगी शिक्षणापासून तुटली तिचे लग्न लावून दिले जाते. मग तिचे १५ असो वा १६. आमच्यामध्ये मुलाकडील लोक पैसे म्हणजे देज देतात. अशीच एक प्रथम वर्षाला शिकत असलेली आणि प्रथम सत्राचे दोन विषय मागे राहिले म्हणू परीक्षा फॉर्म न भरलेल्या प्रीतीचे लग्न झाले. अशी कोरकू या आदिवासी जमातीमध्ये स्थिती आहे. **यावरून हे निर्दशित होते, की कमकुवत आर्थिकस्थिती, शिक्षणाचा अभाव, अंधश्रद्धा, सांस्कृतिक स्वयंकेंद्री विचारसरणी यामुळे कोरकू जमातीत बालविवाह प्रथा प्रचलित आहे.**

**बालविवाह थांबविण्यासाठी प्रयत्नांचा व कार्यरत यंत्रणा आढावा**

भारतामध्ये बालविवाह प्रतिबंध व निर्मुलनासाठी राजा राममोहन राय, ईश्वरचंद विद्यासागर, महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक समाज सुधारक प्रग्ण व कार्य केले. शारदा कायदा, संमती वयाचा कायदा (१८९१), बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ अस्तित्वात आला. तर राजस्थानातील साथीन म्हणून ग्रामस्तरावर काम करणाऱ्या भंवरी देवी यांनी गुज्जर या प्रबळ जात समुदायातील बालविवाह रोकण्याचा केलेला प्रयत्न, त्यातून त्यांना झालेला जीवघेणा त्रास, सामुहिक बलात्कार, न्यायाची लढाई आणि न्यायिक बाजूने लागलेला निकाल व विशाखा समिती गठीत करण्याचे आदेश, पुढे दिल्ली निर्भया हत्याकांड २०१२ नंतर कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ प्रतिबंध, निवारण व संरक्षण अधिनियम २०१३ आदी बाबी बालविवाह, स्त्री प्रश्न व सुरक्षा याचे गांभीर्य दर्शवितात. सोबतच महिला जीवन संरक्षण व समस्या निरसनाचे कार्य करतात.

बाल सुरक्षा व विकास याद्दष्टीने कार्यरत अनेक स्वयंसेवी संस्था व शासकीय यंत्रणा काम करीत आहेत. त्यामुळेच राष्ट्रीय कुटुंब अहवालानुसार २०१५-२०१६ ला देशात २७% बालविवाह घडून येत होते. ते २०१९-२०२० मध्ये कमी होऊन २३% इतके झाले आहे. हा दर कमी झाला तरी देशाच्या महिला व बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी बालविवाह मुक्त अभियान सुरु केले. त्यांनी घोषित केल्याप्रमाणे भारत देश बालविवाह मुक्त होण्याची आवश्यकता आहे. कारण त्याचे गंभीर परिणाम स्त्री जीवनावर होतात. जन्माला येणाऱ्या अपत्यांवर होतात. कुटुंब आणि सामाजिक स्वास्थ्य ही धोक्यात येते. तेव्हा बालविवाह मुक्त समाज हाच हितावह ठरतो.

स्त्री, बालक सुरक्षा याद्दष्टीने शासन वNGOसारख्या यंत्रणांची भूमिका महत्वपूर्ण आहे. बालविवाह थांबवणे हात्याचाच भाग. महिला व बाल विकास कार्यालय, मिशन वात्सल्य योजने अंतर्गत**'बाल संरक्षण अधिकारी' नेमणूक, कर्तव्य व जबाबदारी**, महिला व बाल सहाय्यता कक्ष, कायदा, पोलीस यंत्रणा, न्याययंत्रणा. बाल संरक्षण समिती, सखी वनस्टॉपसेंटर, या साऱ्याच शासकीय यंत्रणा. तर युनिसेफ, UNOह्या जागतिक स्तरावरील संस्था. SDG मध्ये बालविवाह मुक्तीचे उद्दिष्टे, सोबतच वेगवेगळ्या भागात कार्यरत NGO, ह्या देखील प्रभावीपणे काम करीत आहेत. जसे, मासूम संस्था, पुरंदर जि. पुणे. मनीषाताई गुप्ते. स्पार्क संस्था-अकोले, अहिल्यानगर. आदी. यांचे कार्य बाल विवाह रोखणे. बालिकांचे सक्षमीकरण करणे. पुनर्वसन करणे. अशी उपयुक्त कामे केली जातात. हे वाखाणण्याजोगे आहे.

बालविवाह रोखण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक कायदा – २००६ कार्यरत आहे. त्यानुसार २ वर्ष तुरुंगवास आणि १ लाख रुपये दंड अशी शिक्षा केली जाते. तर १०९८, १०९१ हे हेल्पलाईन नंबर कार्यरत आहेत. युनिसेफ सारखी संस्था जागतिक पातळीवर तत्परतेने कार्यप्रवण आहे. तसेच महिला व बाल विकास विभाग, बाल संरक्षण अधिकारी, गाव पातळीवर ग्रामसेवकास '**बालविवाह प्रतिबंधक अधिकारी**' म्हणून नेमले आहे.

**निष्कर्ष:**

- बालविवाहास कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक बाबी कारणीभूत आहेत. लिंगभेद, स्त्री दुय्यम स्थान, प्रेमसंबंध, अंधश्रद्धा, स्त्री सुरक्षा प्रश्न, कमकुवत आर्थिक स्थिती आणि बालविवाह यांचा जवळचा संबंध आहे.

- भटक्या जमाती, विमुक्त जाती, अनुसूचित जमाती सारख्या उपेक्षित, वंचित घटकांमध्ये बालविवाह घडून येतात. जसे: कोरकू, कोलाम, नाथपंथी जमाती.
- ग्रामीण भाग, कनिष्ठ वर्ग यांच्यामध्ये जगण्याचे प्रश्न तीव्र असतात. शिक्षणाची गळती, आर्थिक कमकुवत स्थितीव पारंपरिकतेचा पगडा यामुळे बालविवाहाचे प्रचलन आढळते.
- बालविवाहास मुलींची सुरक्षिततेचा प्रश्न देखील कारणीभूत आहे.
- वाढते प्रेमसंबंध व जातीचे निर्बंध देखील बालविवाहास पूरक ठरत आहेत.
- बालविवाहाचे स्वरूप सार्वत्रिक असून त्याचे प्रमाण कमी-अधिक आढळते. बालविवाहास कायद्यात्मक प्रतिबंध असला तरी लोकमान्यताआढळते.
- बालविवाह स्त्री जीवनावर विपरीत परिणाम पडतात. ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे.
- पितृसत्ताकता व स्त्रियांचे दुय्यमत्व स्त्री प्रश्नांना दृढ ठेवतात. मुलींचा विवाह ही आर्थिक दृष्ट्या जबाबदारी आहे. हुंडापद्धती हे एक आव्हान आहे. ज्यामुळे स्त्रियांचे वैवाहिक जीवन बाधित होते.
- बालविवाहाचा स्त्री आरोग्य, बाल आरोग्य यावरही परिणाम होतो.
- बालविवाह रोखण्यासाठी शासकीय यंत्रणा, NGOद्वारा प्रयत्न केले जात आहेत. परंतु बालविवाह लोकमान्यतेने घडून येत आहेत.

**सूचना:** लिंगसमभाव संवेदनशीलता विकसित झाली पाहिजे. स्त्री घटकाकडे पाहण्याच्या सकारात्मक दृष्टीकोन विकसित झाला पाहिजे. मुलींच्या मानवी हक्क व मुलभूत हक्कांचे तत्परतेने जतन झाले पाहिजे. स्त्री शिक्षण व सक्षमीकरण, कौशल्य विकास व क्षमता बांधणी होणे गरजेचे आहे. जेणेकरून तरुणी स्वावलंबी बनतील. बालविवाह रोखण्यास शासकीय व निमशासकीय यंत्रणा तत्पर करावी. त्यांच्यात संवेदना विकसित करणे. बालविवाहास समाजमान्यता असल्यामुळे त्या मुलभूत बाबीवर लक्ष केंद्रीत करून जनप्रबोधन करावे. अनेक भटके, विमुक्त, आदिवासी, उपेक्षित, वंचित घटकांमध्ये बालविवाह होतात, परंतु कायद्याच्या धाकाने ते लपविले जातात. मुळात त्यांच्या जगण्याचे प्रश्न तीव्र असतात. अंधश्रध्दाचा पगडा असतो. म्हणून त्यांचे मागासलेपण व स्त्री प्रश्न अधिक आहेत. अशा जाती-जमातींचा शोध घेऊन त्यांचे सर्व्हेक्षण करणे, प्राप्त तथ्यांवर उपाय अंमलात आणणे. समाजकार्याच्या अभ्यासक्रमात त्याचा समावेश केल्यास क्षेत्रकार्याच्या माध्यमातून ठराविक समुदाय जनजागृती साध्य होऊ शकते. तसेच ICSSR सारख्या संस्थांनी बालविवाह सारखे कळीचे प्रश्न सोडविण्यासाठी या विषयावरील प्रकल्प मान्यता व अर्थ सहाय्य द्यावे. बालविवाह मुक्त समाज बनण्यासाठी शासन, अधिकारी-पदाधिकारी, राज्यकर्ते, सामान्य नागरिक या सर्वांच्या सहकार्य व सहयोगाने प्रयत्न व्हावेत.

**१) ग्रामस्तर प्रतिबंध यंत्रणा सक्षम करणे:** प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर गाव बाल संरक्षण समिती (सरपंच, अंगणवाडी सेविका, ASHA, शाळा शिक्षक, पोलीस पाटील, स्वयंसेवक) सक्रीय करून संभाव्य बालविवाहांची पूर्वसूचना यंत्रणा बळकट करणे गरजेचे आहे. तसेच नियमित गाव, तालुका पातळीवरील समिती सक्षम होणे आवश्यक आहे.

**२) अंगणवाडी, शाळा व आश्रमशाळा आधारित सतर्कता:** १५-१८ वयोगटातील मुलींची नियमित नोंदठेवून शाळा सोडणाऱ्या (Dropout) मुलींवर विशेष लक्ष द्यावे. शाळा सोडणे हे संभाव्य बालविवाहाचे प्रमुख संकेत मानून तात्काळ समुपदेशन करावे. शिक्षण विभागाने अशाधोक्यात येऊ शकणाऱ्या मुली शोधून महिला व बालविकास विभाग यांच्या समन्वयाने प्रतिबंध घालणे गरजेचे आहे.

**३) बालविवाह प्रतिबंध कायद्याची प्रभावी अंमलबजावणी:** बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अंतर्गत दोषींवर कठोर कारवाई केली जावी, याकरिता बालविवाह प्रतिबंधक अधिकारी (ग्रामसेवक) यांचा सहभाग वाढवणे व प्रशिक्षण देण्यात यावे.

**४) पोलीस व महसूल विभागाशी समन्वय:** लग्नसराईच्या काळात (अक्षय तृतीया, दिवाळी, उन्हाळी सुट्ट्या) विशेष पथके (Flying Squads) स्थापन करून संभाव्य बालविवाह स्थळांवर छापे टाकावेत. जिल्हा बाल संरक्षण समिती व बालविवाह करीता स्वतंत्र कृती दलस्थापन करून कार्यवाही आवश्यक आहे.

- केवळ बालविवाह रोखणे नव्हे तर आयोजक, पालक, लग्न लावणारे भटजी-जंगम-महाराज, वधू-वर पक्षातील जबाबदार व्यक्तींवरही गुन्हे नोंदवावेत. अशा नोंदविलेल्या गुन्ह्याची व्यापक प्रसार प्रसिद्धी करणे आवश्यक आहे जेणेकरून परत कुणी तसे गुन्हे करणार नाही.

**५) समुपदेशन व कुटुंब हस्तक्षेप:** केवळ कायदेशीर कारवाई न करता पालकांचे सामाजिक व मानसशास्त्रीयसमुपदेशन करावे. आर्थिक भीती, सुरक्षिततेची चिंता, परंपरा यावर आधारित गैरसमज दूर करण्यासाठी संवाद साधावा. गुन्हा दाखल करणे पेक्षा लग्न होण्यापूर्वीच समुपदेशन करणे गरजेचे आहे.

**६) बालिकांचे शिक्षण व सक्षमीकरण :** मुलींना शिक्षणाशी जोडून ठेवण्यासाठी शिष्यवृत्ती, सायकल योजना, वसतिगृह सुविधा, कौशल्य विकास कार्यक्रम यांची माहिती व लाभ प्रत्यक्ष मिळवून द्यावा. जेणेकरून शिक्षणाविषयी गोडी निर्माण होईल, तसेच शिक्षणामुळे उच्च पदावर गेलेल्या महिला अधिकारी यांच्या द्वारे मार्गदर्शन व्हावे.

**७) सखी वन स्टॉप सेंटर व चाइल्डलाईन १०९८ चा प्रभावी वापर** संकटग्रस्त बालिकांना तात्काळ निवारा, वैद्यकीय मदत, कायदेशीर सहाय्य व पुनर्वसन सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. याबाबत व्यापक प्रसार प्रसिद्धी करणे गरजेचे आहे.

**८) धर्मगुरू, समाजप्रमुख व जातपंचायतींचा सहभाग:** समाजमान्यता बदलण्यासाठी धार्मिक व सामाजिक नेतृत्वाला विश्वासात घेऊन बालविवाह विरोधी भूमिका सार्वजनिकपणे मांडण्यास प्रवृत्त करावे. बालविवाह लावणे व लावण्यास विरोध करणे गट समाजात तयार झाले पाहिजे.

**९) विशेष लक्ष गट** (विमुक्त जाती, भटक्या जमाती व अतिसंवेदनशील गट) आदिवासी, कोलाम, नाथपंथी गोसावी, विमुक्त व भटक्या जमातींमध्ये विशेष मोहिमा राबवून परंपरागत प्रथा व स्त्री आरोग्यावरील दुष्परिणाम याबाबत जनजागृती करावी.

**१०) माध्यमे व लोकसहभागाचा वापर :** स्थानिक वृत्तपत्रे, केबल नेटवर्क, सोशल मीडिया, पथनाट्य, भित्तीपत्रके यांच्या माध्यमातून बालविवाहाचे दुष्परिणाम व कायदेशीर शिक्षा यांची सातत्याने माहिती द्यावी.

**संदर्भग्रंथ सूची**


१. अत्रे त्रिं. ना. (२०१५), '*गावगाडा*', पुणे: राजहंस प्रकाशन.
२. आगलावे प्र. (२०१०), '*सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे*', नागपूर: श्री. साईनाथ प्रकाशन.
३. कुलकर्णी हे. (२०२५), '*बालविवाह*', पुणे: मधुश्री प्रकाशन.
४. काचोळे दा., देवकर क., (२००२), '*नातेसंबंध आणि सामाजिक संस्था*', छ. संभाजीनगर: कैलाश पब्लिकेशन,
५. म्हैसकर, विदुला, &म्हैसकर, प्रदीप. (२०१७) . *विवाह विधीचा इतिहास*. पुणे: सह्याद्री प्रकाशन.
६. मेश्राम सु. (२०००), '*प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन*' नागपूर
७. राजवाडे, वि. का. (१९९८), '*भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास*'. पुणे: राजहंस प्रकाशन.
८. राऊत कि. (संपा. ), (२०२६), 'भारतीय महिलांच्या समस्या', अमरावती: ज्ञानपथ पब्लिकेशन, भारत.
९. क्षीरसागर श्री. के. (१९९२), '*स्त्रीजीवन आणि विवाह विषयक*' लेखसंग्रह, मुंबई: महा. राज्य सा. आणि संस्कृती मंडळ,
१०. साळुंखे स., (२००३), '*समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना*', पुणे:नरेंद्र प्रकाशन.
११. Jejeebhoy, Shireen J., and Shiva S. Halli. "*Marriage Patterns in Rural India: Influence of Sociocultural Context.* " The Changing Transitions to Adulthood in Developing Countries, २००५.
१२. Singh, Mohan. "*Changes in Age at Marriage of Women in Rural North India.* " Journal of Biosocial Science, १९९२.
१३. https://indis. unicef. org (Ending child marriage: A profile progress २०१९, २०२३)
१४. www. womenchild. maharashtra. gov. in
१५. https://wcd. gov. in


# आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात बचत गटाची भूमिका

(माविम अंतर्गत महिला बचत गटाच्या विशेष संदर्भात)


**डॉ. श्रीनिवास एन. पिलगुलवार** समाजशास्त्र विभागप्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा

**प्रा. प्रवीण दिगांबर मुधोळकर** संशोधक अध्येता, गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली



**गोषवारा:** प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने आदिवासी महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय सक्षमीकरणाच्या प्रक्रीयेमध्ये स्वयंसहायता बचत गटाची भूमिका याबाबत अध्ययन केलेले आहे. स्वयंसहायता बचत गट संस्कृतीमुळे कुटूंब आणि समाजात लींगभावनेत परिवर्तन होत असून महिलांचा कौटुंबिक निर्णयप्रक्रीयेत सहभाग कसा वाढत आहे आणि समुदायाला पुढे नेण्यासाठी त्या कशाप्रकारे भागीदारी देत आहेत याबाबत विलेषण केल्या गेले आहे. केवळ संसाधनांवर नियंत्रण असल्याने महिला सक्षमीकरण होणार नाही तर त्या संसाधनांचा प्रभावी उपयोग करता येणे आवश्यक आहे. स्वयंसहायता बचत गटांतील सहभागामुळे गरीब वर्गातील महिलांना बँक, स्वयंसेवी संस्था आणि इतर संस्थांसोबत संपर्क स्थापन करण्याची संधी प्राप्त झाली. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य हे त्यांच्या सामाजिक उत्थानासाठी आणि त्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी सहायक ठरत आहे. गटातील सहभागामुळे मैत्रीचा विकास, इतरांच्या समस्यांमध्ये जुळणे, प्राकृतिक नेतृत्वगुणांची निर्मिती आणि सदस्यांच्या क्षमतांमध्ये विकास कशाप्रकारे झाला यावर प्रकाश टाकल्या गेला आहे. महिलांचे अनेक प्रश्न आहेत. त्यातही आदिवासी महिलांचे समाजातील दुय्यम दर्जा, त्यांचे क्षमतेपलीकडचे श्रम, कुटूंबात होणारा अन्याय असे अनेक प्रकारचे विशेष प्रश्न त्यांच्या जीवनात आहेत. बचत गट चळवळीव्दारे महिला गरीबी निर्मुलन, महिला सक्षमीकरण, पीण्याचे पाणी, ग्रामीण भागातील स्वच्छता, सामाजिक वनीकरण तसेच शेतीसाठी जलसिंचन योजना या क्षेत्रात काम करीत आहेत. स्वयंसहायता बचत गट संस्कृतीमुळे कुटूंब आणि समाजातील लींगभावनेत परिवर्तन होत असून महिलांचा कौटुंबिक निर्णयप्रक्रीयेत सहभाग आणि समुदायाला पुढे नेण्यासाठी महिलांना भागीदारी देत आहेत. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य हे त्यांच्या सामाजिक उत्थानासाठी आणि त्यांचा आत्मविश्वास मजबुत करण्यासाठी सहायक ठरत आहे. स्वयंसहायता बचत गटातील सहभागामुळे आदिवासी महिलांच्या जीवनावर झालेला परिणाम व त्यांचे सक्षमीकरण यावर हे अध्ययन केंद्रित आहे.


**प्रस्तावना:** जगातील प्रत्येक समाजात महिलांचे स्थान दुय्यम स्वरूपाचे राहीले आहे. मानवी समाजाचा अर्धा भाग असलेला महिलांचा वर्ग हा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातून बहिष्कृत केल्या गेल्या. जगातील वेगवेगळया देशांमध्ये महिलांची स्थिती ही तेथील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थितीप्रमाणे वेगवेगळया स्वरूपाची होती. औद्योगिक क्रांती, प्रथम आणि व्दितिय महायुध्द आणि नवीन अर्थव्यवस्थेचा उदय हे महिलांच्या दर्जावर परिणाम करणारे महत्वाचे घटक होते. जगातील सर्वच महिलांच्या दुय्यम दर्जाचा अभ्यास करून संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घेऊन महिलांच्या समस्यांवर अध्ययन केले. या विषयावर मंथन करण्यासाठी १९७५ ते १९८५ हे महिला दशक म्हणून घोषित करण्यात आले आणि या काळात मेक्सिको, कोपनहेगन, नैरोबी आणि बिजींग या ठीकाणी महिलांच्या प्रश्नांवर महत्वपुर्ण जागतिक परिषदा घेण्यात आल्या. त्यामध्ये त्यांचे कल्याण, विकास आणि त्यांचे सक्षमीकरण याबाबत टप्प्याटप्प्याने विचार करण्यात आला. हा विचार करतांना स्त्रीवादी दृष्टीकोणाचा वापर करण्यात आला. त्यामुळे महिलांच्या प्रश्नांची चिकित्सक मांडणी करण्यात मदत झाली. आणि त्यानूसार महिलांच्या विकासासाठी कालमानानूसार टप्पे

निर्धारित करण्यात आले. यामध्ये त्यांचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरण करण्यासाठी प्रयत्नांची दीशा ठरवील्या गेली. महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी संसाधनावर नियंत्रण करणे आवश्यक आहे. या विचाराला अनूसरून महिलांना आर्थिक प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. त्याच प्रयत्नांचा भाग म्हणून सुक्ष्म वित्तीय चळवळ सुरू करण्यात आली आणि त्यामध्ये महिलांना मोठया प्रमाणात सहभाग देण्यात आला. वेगवेगळया स्तरावर महिलाचे स्वयंसहायता गट बनविण्यात येऊन त्यांना बँकांव्दारे कर्ज वाटप करण्यासाठी पतपुरवठा करण्यात आला. त्यामुळे महिला आर्थिकदृष्टया साक्षर आणि सक्षम होतांना दीसत आहे. याच प्रयत्नांचा एक भाग असलेले १९७५ साली स्थापन झालेले महिला आर्थिक विकास महामंडळ हे महिलांसाठी आर्थिक विकासाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करते. महिला सक्षमीकरणाची प्रक्रीया ही जागतिक पातळीवर सुरू आहे. पण महिलांच्या या असहाय स्थितीसाठी पीतृसत्ताक समाजव्यवस्था कारणीभूत आहे असे लक्षात येते. वर्तमान काळातील भारतातील महिलांचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय या विविध क्षेत्रातील दुय्यम दर्जा हा पुर्वापार चालत आलेल्या विविध काळांतील समाजव्यवस्था आणि परंपरांचा परिणाम होय असे लक्षात येते. मानवी समाजात प्राचिन काळात महिलांना सन्मानजनक दर्जा असून समाजावर मातृसत्ताक व्यवस्थेचा प्रभाव होता. परंतू विविध कारणांनी महिलांच्या दर्जात घसरण होत आली असून आजही महिलांचा दुय्यम दर्जा कायम आहे. महिलांना समाजाचा महत्वपूर्ण घटक म्हणून ओळख देण्यासाठी आणि त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी अनेक पातळयांवर प्रयत्न केल्या जात आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळ हा त्याच प्रयत्नांचा भाग होता. त्याव्दारे महिला सक्षमिकरणासाठी कोणते प्रयत्न केले जात आहेत. याबाबतचे विश्लेषण प्रस्तूत संशोधन विषयाव्दारे करण्यात आले आहे.

**प्रमुख उद्दीष्टे:**

१) आदिवासी महिलांच्या चिरंतन विकास प्रक्रीयेत बचत गटांची भूमिका जाणून घेणे.

२) आदिवासी महिलांच्या सामाजिक व आर्थिक दर्जाबाबत अध्ययन करणे.

३) सक्षमिकरण संकल्पनेचे विश्लेषण आणि स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून आदिवासी महिलांना सक्षम बनविण्यासाठी माविमतर्फे केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

**गृहितकृत्य:** १) आधुनिक काळात स्वयंसहायता बचत गट हे आदिवासी महिलांच्या सक्षमिकरणात निर्णायक भूमिका पार पाडत आहेत. २) आदिवासी महिलांच्या सामाजिक व आर्थिक विकासात बचत गट सकारात्मक भूमिका पार पाडत आहे. ३) माविम व्दारे संचालित बचत गट आदिवासी महिलांच्या सक्षमिकरणाची प्रक्रिया प्रत्यक्षात साकारत आहे.

**अध्ययन पध्दती:** प्रस्तुत संशोधन विषयामध्ये व्दितीयक साहित्य सामुग्रीचा वापर केला असून त्यामध्ये पुस्तके ग्रंथ, इंटरनेट, नियतकालिके यांचा वापर करण्यात आलेला आहे.

**अध्ययन साहित्याची पडताळणी: डॉ. थील्गराज** या संशोधनातून असे निष्कर्ष काढलेले आहेत की आर्थिक, सामाजिकदृष्टया मागास महिलांच्या जीवनात स्वयंसहायता बचत गटांमुळे सुधारणा झाली आहे. **श्रीनिधी व्ही. एस.** व **डॉ. थिमय्या** यांचा अभ्यासानुसार गावातील वातावरण बदलण्यास मदत झाली आहे. आर्थिकदृष्टया मागास आदिवासी महिला ज्या सुरक्षा अनामत देण्यास पात्र नव्हत्या त्यांना स्वयंसहायता बचत गटांमुळे विशेष मदत झाली आहे. गटाच्या सदस्य झाल्यानंतर त्यांना सोयीस्कर व्याजदराने आणि मुदतीने कर्ज मीळण्याची सुविधा प्राप्त झाली. वित्तीय संस्थांकडून मिळणारी आर्थिक मदत ही सहज आणि पारदर्शी प्रक्रीया आहे. अभ्यास क्षेत्रात आदिवासी महिलांकडून आठवडी बचत करण्याच्या सवयीत वाढ झाल्याचे आढळून आलेले आहे. आदिवासी महिलांचा निर्णयप्रक्रीयेतील सहभाग वाढला असून स्वयंसहायता बचत गटांमुळे आदिवासी ग्रामीण भागांतील सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना मिळत आहे. सशोधकांनी गटाच्या प्रगतीसाठी काही सूचना केल्या त्यामध्ये गटांना नियमित भेटी देणे, कर्जवसुलीची पध्दत बदलवून आदिवासी महिलांना कर्जफेडीसाठी उचित कालावधी देवून कर्जवसुलीची कडक कार्यवाही टाळली पाहिजे. तसेच आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणासाठी साक्षरतेला अनिवार्यतेने प्रोत्साहन दिल्या गेले पाहिजे. **डॉ. डी. सुरेश** त्यांच्यानूसार महिला बचत गट असलेल्या ठीकाणी महिला शिक्षण विषेशतः मुलींचे शिक्षणाला जास्त संधी आहेत. आणि यादृष्टीने त्यासाठी अधिक प्रयत्न व्हायला हवेत. आदिवासी महिलांना राजकीय क्षेत्रात येण्यासाठी त्यांचे गटातील परस्पर सामंजस्य महत्वपूर्ण आहे. महिलांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करणे, त्यांना त्यांचे हक्क समजावून सांगणे या बाबी महत्वपूर्ण आहेत. सुक्ष्मवित्त व्यवस्थापन हे महिला सक्षमीकरणासाठी उपयुक्त असून त्यामुळे दारीद्रय निर्मुलनाला गती प्राप्त होत आहे. महिलांना त्यांच्या विचारांची देवाण घेवाण करण्यास जास्तीत जास्त सभांचे आयोजन व्हावे, तसेच महिलांना जास्त प्रभावीपणे काम करण्यासाठी षिक्षणाची गरज असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. **डी. एन. गायत्री** यांनी संशोधन अध्ययनातून काही महत्वपुर्ण निष्कर्ष काढलेले आहेत. बचत गटांमुळे आदिवासी महिलांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन आलेले असून प्राप्त तथ्य हे दर्शवीतात की आदिवासी महिला हया स्वतःहून गटाच्या कार्यात सहभागी होतात. तसेच त्या आळीपाळीने गटाच्या जबाबदाऱ्या स्वतःकडे घेत असतात. बहुतेक महिला हया स्वयंसहायता गटात सहभागी झाल्यापासून नियमीतपणे बचत करीत आहेत. अनेक महिलांनी स्वयंसहायता गटातील कर्जाचा उपयोग हा अनुत्पादक स्वरूपाच्या कामासाठी जसे की घर बांधणी व घरदुरूस्ती, वैद्यकीय खर्च आणि मुलांचे शिक्षण यावर खर्चासाठी केला आहे. स्वयंसहायता गटात सहभागी झाल्यामुळे महिलांचा व्यक्तीमत्व विकास झाला असून त्यांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाल्याचे सांगतात. अध्ययनातून असे स्पष्ट झाले की आदिवासी महिलांची राजकीय जाणिव आणि राजकीय सहभाग हा सामान्य महिलांच्या तुलनेत कमी आहे. यासाठी साक्षरता पातळीतील कमतरता, संधींचा अभाव आणि परंपरागत बंधने हे घटक कारणीभूत आहेत.

**माहितीचे विश्लेषण:**

**आदिवासी समुदाय:** ''समान बोलीभाषा बोलणाया, एकाच भूभागात राहणाऱ्यासुरूवातीला अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेला पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाही नसलेला व समान नाव धारण करणाऱ्या कुटूंबाच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात. ''- इंपिरियल गॅझेटर

**आदिवासी स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक दर्जा:** आदिवासी समाज हा शक्यतो जंगली व ग्रामीण क्षेत्रात वास्तव्य करणारा, इतर विकसित समुदायापासून काहिसा विभक्त, वेगळा पडलेला व आपल्या रूढी परंपरा व धार्मिक संकेताचे पालन करण्यात गुंतलेला दैवाधीन, निसर्गाधीन व श्रध्दाळू स्वभाव असलेला असा समुदाय आहे. या समुदायात स्त्रीयांचे स्थान समानतेचे असले तरी अनेक ठीकाणी दुय्यम भावना दीसून येते. स्त्री स्वतः मिळवती असूनही पैशाचे व्यवहार पुरूषांकडेच असतात. या जमातीत स्त्रीच्या शिक्षणाबाबतही उदासिनता दिसून येते. कुटूंबाच्या दैनंदिन उपजिवीकेची जबाबदारी स्त्रीवर असते. शेती उत्पादनाबरोबरच जंगलातून गोळा केलेली कंदमुळे, फळे, भाज्या इत्यादींच्या सहाय्याने ही जबाबदारी पार पाडतात. आजही आदिवासी स्त्रीकडून हीच अपेक्षा असते. बरेच आदिवासी पुरूष रोजंदारीवर काम करतात. त्यांची बरीचशी मिळकत व्यसने व दारू यावरच खर्च होते. किंवा काही प्रासंगिक खर्चासाठी वापरली जाते. ज्यांच्या जवळ जमीन आहे अशा आदिवासी कुटूंबाची शेतीची बरीचशी कामे स्त्रियाच करतात. पुरूष फक्त नांगरणी व झोडपणी करतात. मात्र जमिनीची अधिकृत मालकी स्त्रियांकडे नसून पुरूषांकडे असते. पुरूष दगावला तर मुले मोठी होईपर्यंत जमीन स्त्रीकडे असते. मुलगा नसल्यास नवऱ्याचे नातेवाईक ती ताब्यात घेतात. मात्र स्त्रियांकडे जमिनीची मालकी असू नये असा कायदा आदिवासींमध्ये कुठेही आढळत नाही. समाजात चांगले वजन असणारी महिला मजुरांच्या सहाय्याने अथवा घरजावई मिळवून जमीन कसते. अर्थोत्पादनामध्ये आदिवासी 'वर्ग' म्हणून वेगळा पडतो. त्यातून उदभवणाऱ्या सर्व समस्यांना पुरूषांपेक्षा स्त्रियांना अधिक तीव्रतेने तोंड द्यावे लागते. कमी मजुरी, स्त्री म्हणून होणारे अत्याचार, अन्याय या त्यांच्या समस्या आहेत. आदिवासी समाजांतर्गत स्त्रियांना पक्षपाती वागणूक देण्यात येते. कुटूंबांतर्गत असमानता असतेच. कुटूंबाच्या पालणपोषणाची जबाबदारी असूनही नवऱ्याचा छळ त्यांना सहन करावा लागतो. पुरूषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाखाली त्या निष्प्रभ ठरतात. घरात एकच खाट असल्यास पुरूष खाटेवर व स्त्री जमीनीवर खाली झोपणे हे तिच्या कनिष्ठ स्थानाची झळक दर्शविणारे उदाहरण आहे. वरली, कोकणा व ठाकूर जमातीतील स्त्रिया हया सकाळी सर्वप्रथम उठणे, घरची सर्व कामे करून शेतावर जाणे तसेच सायंकाळी उशिरापर्यंत घरगुती कामे आटोपून सर्वात शेवटी झोपतात. एकुणच सर्वच समुदायांप्रमाणे आदिवासी समुदायात देखील स्त्रीयांचे स्थान दुय्यम आहे असे लक्षात येते.

सन १९७१ मध्ये श्रीमती इंदीरा गांधीच्या शासन काळात प्रथमच स्टेटस् ऑफ वुमेन कमीटीने भारतीय महिलांच्या स्थितीचे सर्वेक्षणातून सादर केलेल्या अहवालानूसार स्त्रियांच्या विकासात सर्वात बाधक आमच्या रूढीगत परंपरा व रितीरिवाज आहेत. घराच्या बाहेर न निघणारी, स्वतःसाठी काही न मागणारी व आपले जीवन दुसऱ्यासाठी समर्पित करणारी स्त्री समाजात आदर्श मानली जाते. सामाजिक मान्यतेमध्ये महिलांचे आदर्श प्रतिमान (रोल मॉडेल), ज्यामध्ये आर्थिक व सामाजिक असमानता गृहित आहे. आणि यांचा प्रभाव महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजनितीक परिवर्तन आणि स्थीतीवर पडतो. आदिवासी महिलांच्या बाबतीत या अहवालातील सर्वच निष्कर्ष सुक्ष्मतेने लागू होतात असे लक्षात येते.

**महिला सक्षमीकरणाची संकल्पना:** स्त्रीवादी दृष्टीकोणातून महिला सक्षमीकरणासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांमध्ये समाजातील लिंगभावना दूर करून महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महिलांचा आत्मविश्वास वाढवून त्याचे रूपांतर सामुदायीक प्रतिकार शक्ती वाढवून महिलांना कमजोर करणाऱ्या प्रस्थापित परंपरागत सुनियोजीत शक्तीची दिशा बदलवीणे होय. सक्षमीकरणाचे चार परिमाण आहेत.

१. पॉवरविदीनः- वैयक्तीक आत्मविश्वास आणि जाणिव यामध्ये परिवर्तन.
२. पॉवर टूः-कौशल्य, क्षमता उत्पन्नात वाढ, बाजारपेठ आणि समाजसमुहापर्यंत पोहोच.
३. पॉवर ओव्हरः- घरगुती, समुदायातील तसेच व्यापक स्वरूपाच्या सत्तासंबंधांमध्ये परिवर्तन.
४. पॉवर वीथः-दुर्बल घटकांच्या वैयक्तीक क्षमतांचे संवर्धन करण्यासाठी त्यांना संघटीत करणे.

अशाप्रकारे व्यक्तीपासून सुरू होणारी आणि महिलांना सामुदायीकरीत्या सक्षम करणारी महिला सक्षमीकरणाची प्रक्रीया होय. शक्तीच्या अथवा त्यांच्या कारणांना शोधण्याचा आणि त्यावर मात करण्याची अशा कोणत्याही रणनीतीचा अंर्तभाव महिला सक्षमीकरण या संकल्पनेत होतो. महिला सक्षमीकरणाची संकल्पना ही आधुनीक काळाच्या संदर्भात १९७० च्या काळात तिसऱ्या जागतिक स्त्रीवादी आणि महिला संघटनांकडून जास्त चर्चिल्या गेली. महिला सक्षमीकरणाची संकल्पना महिलांच्या अवलंबित्वावर परिणाम करण्यासाठी सैध्दांतिक चैकट निर्माण करते. स्त्रीवादी अध्ययनांनी जगातील विभिन्न देशांतील स्त्रीयांच्या समस्यांचे वेगवेगळया दृष्टीकोनातून अध्ययन करून नवे सिध्दांत निर्माण केले. जगातील अनेक देशांतील अनेक प्रथा परंपरा त्यामूळे स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचारांचे विभिन्न प्रकार व त्यांची गुंतागुंत याची सोडवणुक करण्यासाठी स्त्रीविषयक अध्ययनाची मोलाची मदत मिळाली. सन १८०० मध्ये अमेरिका आणि युरोपात स्त्रीयांनी मानवाधिकारासाठी चळवळ सुरू केली. १९ व्या शतकात स्त्रीयांनी जागतिक पातळीवर आपला आवाज बुलंद करण्याच्या भुमिकेतून संघटनात्मक परिघ वाढवीण्याचा प्रयत्न केला. १९६० नंतर जगभरात स्त्रीमुक्ती आंदोलन चळवळ उभी राहिली. १९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला वर्षामुळे स्त्रीविषयक प्रश्नांची गुंतागुंत सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्नांना सुरूवात झाली. युनोव्दारे लिंगभाव आणि विकास ही संकल्पना, त्यासंदर्भातील विभीन्न दृष्टीकोण आणि अंमलात आणलेल्या रणनीती याव्दारे जगातील वेगवेगळया देशांतील स्त्रीयांच्या समस्यांवर प्रकाश टाकल्या गेला. शेकडो वर्षांपासून विकासप्रक्रीयेत अदृष्य अथवा दुर्लक्षीत असलेले श्रम आणि सहभाग यांना स्वीकृती देण्यासाठी टप्प्याटप्प्याने अनेक

दृष्टीकोन मांडण्यात आले. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून महिलांच्या आर्थिक विकासासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ या उपक्रमाची सुरूवात १९७५ साली करण्यात आली.

**महिला आर्थिक विकास महामंडळ:** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असून आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने २४ फेब्रुवारी १९७५ साली महामंडळाची स्थापना झाली. महिलांच्या सर्वांगिण विकासाचे महत्व व महामंडळाची या कामातील तज्ञता लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. माविम-२००१/प्र. क्र. १० दिनांक २० जानेवारी, २००३ नुसार महामंडळाला महिला विकासाची राज्यस्तरीय शिखरसंस्था म्हणून घोषित केले आहे. केंद्र व राज्य सरकारच्या स्वयंसहाय बचत गटावर आधारित विविध ग्रामीण व शहरी योजनांची अंमलबजावणी माविम करीत आहे. चिरंतर विकास प्रक्रीयेतून महिलांसाठी सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय प्रस्थापित करणे हे माविमचे ध्येय आहे. ग्रामीण भागातील महिलांचे संघटन करणे, महिलांच्या क्षमता विकसित करणे, महिलांमध्ये आत्मविश्वास वाढविणे, उद्योजकीय विकास घडवून आणणे, रोजगारांच्या संधी व बाजारपेठ यांची सांगड घालणे, स्थायी विकासासाठी स्वयंसहाय बचत गटांना संस्थात्मक स्वरूप देऊन बळकट करणे या उद्देशाने माविम कार्य करीत आहे.

**माविमच्या कार्यप्रणालीचे स्वरूप:** १. केंद्र व राज्य शासनपुरस्कृत महिलांसाठीच्या विविध विकासात्मक योजनांकरीता राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून कार्य करणे. २. स्वयंसहाय बचत गट, वित्तीय संस्था, स्वयंसेवी संस्था व शासनाचे संबंधित विभाग यांच्यामध्ये समन्वयक संस्था या नात्याने राज्यस्तरावर कार्य करणे.

**स्वयं सहाय गटाची संकल्पना:** समता, लोकशाही, पादर्शकता, एकता, विश्वास, सहभागीता या वैशिष्टयांवर आधारीत असलेल्या गटामध्ये १० ते २० महिला बचतीच्या माध्यमातून एकत्र येतात, विचारांची देवाण घेवाण करतात, महिलांच्या आर्थिक व सामाजिक अडचणी सोडवितात व महिलांचा सर्वांगीण विकास करण्याच्या प्रक्रीयेला स्वयंसहाय गट म्हणतात. महिला सक्षमीकरणाचा वास्तविक अर्थ हा कुटूंब, समुदाय, जात, धर्म आणि परंपरागत सत्ता, शासकीय विभागातील पैतृक सत्ता आणि पुर्वग्रह यांच्या विरोधात संघर्ष करणे होय. त्याचा हा अपरिहार्य संघर्ष सामाजिक आणि राष्ट्रीय विकासाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये पुर्ण सहभाग निश्चित करते. महिलांचा हा सहभाग महिलांची उत्पादन पातळी वाढविण्यास आवश्यक असतो. महिला सक्षमीकरणामुळे महिलांचे वैयक्तिक आणि सामुदायीक स्वरूपातील योगदान वाढण्यास मदत होते. विकास कार्यक्रमाच्या नुसार महिला सक्षमीकरणाचा अर्थ निर्णय प्रक्रीयेत सहभागी होणे, उत्पादन संसाधनांवरील नियंत्रण वाढवीणे, तसेच निवडीचे विकल्प, अधिकार आणि तीच्या शरीर आणि जीवनावरील नियंत्रणाच्या अधिकारांमध्ये वाढ यांचा समावेश आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) महिलांना गटांच्या रूपात संघटीत करून महिला सक्षमीकरणाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवीत आहे.

**माविम आणि आदिवासी महिलांचे सक्षमीकरण:** आदिवासी महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय सक्षमीकरणाच्या प्रक्रीयेमध्ये स्वयंसहायता बचत गटांचे महत्व आहे. त्यांना सामुहिक निर्णय घेण्यास आणि त्यांचा आत्मविश्वास आणि क्षमता वाढविण्यास स्वयंसहायता बचत गट मदत करतात. महिला विकासाच्या संदर्भात सामाजिक जबाबदाऱ्या घेणे तसेच महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सहभागी दृष्टीकोणातून बचत गट हे प्रभावी साधन ठरत आहेत. स्वयंसहायता बचत गट संस्कृतीमुळे कुटूंब आणि समाजातील लींगभावनेत परिवर्तन होत असून महिलांचा कौटुंबिक निर्णयप्रक्रीयेत सहभाग आणि समुदायाला पुढे नेण्यासाठी महिलांना भागीदारी देत आहेत. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य हे त्यांच्या सामाजिक उत्थानासाठी आणि त्यांचा आत्मविश्वास मजबुत करण्यासाठी सहायक ठरत आहे. स्वयंसहायता बचत गटांनी आदिवासी महिला सक्षमीकरणामध्ये प्रभावी भूमिका बजावली आहे. त्यामुळे गरीब वर्गातील महिलांना बँक, स्वयंसेवी संस्था आणि इतर संस्थांशी संपर्क स्थापन करण्याची संधी प्राप्त झाली. गटातील सहभागामुळे मैत्रीचा विकास, इतर सदस्यांच्या समस्यांमध्ये सहभागी होणे, स्वाभाविक स्वरूपाचे नेतृत्व आणि सदस्यांच्या क्षमतांमध्ये विकास करणे या गोष्टींना चालना मीळते. चांगल्या प्रस्थापित गटांमध्ये गटातील कर्जाचा उपयोग हा मुलांच्या शिक्षण, आरोग्यविषयक गरजा, विवाह किंवा घर बांधण्यासाठी करतात. स्वयंसहायता बचत गटांमुळे गरीब महिलांना उत्पादनशील क्रीयाकलापांमध्ये सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली. त्यामुळे महिलांना निर्णय प्रक्रीयेत स्थान मिळाले. महिलांना मीळालेल्या या संधीमुळे समाजात समानता व समानतेने विचार करण्याची प्रवृत्ती निर्माण होण्यास मदत झाली आहे.

स्वयंसहायता बचत गटांमुळे आदिवासी महिलांचा सामाजिक आणि आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत झाली आहे. तसेच गावातील वातावरण बदलण्यास मदत झाली आहे. आर्थिकदृष्टया मागास आदिवासी महिला ज्या सुरक्षा अनामत देण्यास पात्र नव्हत्या त्यांना स्वयंसहायता बचत गटांमुळे विशेष मदत झाली आहे. गटाच्या सदस्य झाल्यानंतर त्यांना सोयीस्कर व्याज दराने आणि मुदतीने कर्ज मीळण्याची सुविधा प्राप्त झाली. वित्तीय संस्थांकडून मिळणारी आर्थिक मदत ही सहज आणि पारदर्शी प्रक्रीया आहे. अभ्यास क्षेत्रात आदिवासी महिलांकडून आठवडी बचत करण्याच्या सवयीत वाढ झाल्याचे आढळून आलेले आहे. आदिवासी महिलांचा निर्णयप्रक्रीयेतील सहभाग वाढला असून स्वयंसहायता बचत गटांमुळे आदिवासी ग्रामीण भागांतील सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना मिळत आहे.

**गृहितकृत्यांचे सत्यापन:** स्वयंसहायता बचत गट हे आदिवासी महिलांच्या सक्षमिकरणात निर्णायक भूमिका पार पाडत आहेत. प्रस्तूत संशोधनातील विश्लेषण हे स्पष्ट करते की, स्वयंसहायता बचत गट संस्कृतीमुळे कुटूंब आणि समाजातील लींगभावनेत परिवर्तन होत असून महिलांचा कौटुंबिक निर्णयप्रक्रीयेत सहभाग आणि समुदायाला पुढे नेण्यासाठी महिलांना भागीदारी देत आहेत. त्यामुळे हे गृहितकृत्य वरील विश्लेषणावरून सत्य ठरते. आदिवासी महिलांच्या सामाजिक व आर्थिक विकासात बचत गट सकारात्मक भूमिका पार पाडत आहे. आदिवासी महिलांचा निर्णयप्रक्रीयेतील सहभाग वाढला असून स्वयंसहायता बचत गटांमुळे आदिवासी ग्रामीण भागांतील सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना मिळत आहे. वरील विश्लेषणावरून या गृहितकृत्याची

सत्यता लक्षात येते. माविम व्दारे संचालित बचत गट प्रक्रीयेमुळे आदिवासी महिलांच्या सक्षमिकरणाची प्रक्रिया प्रत्यक्षात येत आहे. आदिवासी महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय सक्षमीकरणाच्या प्रक्रीयेमध्ये स्वयंसहायता बचत गटांचे महत्व आहे. त्यांना सामुहिक निर्णय घेण्यास आणि त्यांचा आत्मविश्वास आणि क्षमता वाढविण्यास स्वयंसहायता बचत गट मदत करतात. महिला विकासाच्या संदर्भात सामाजिक जबाबदाऱ्या घेणे तसेच महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सहभागी दृष्टीकोणातून बचत गट हे प्रभावी साधन ठरत आहेत. त्यामुळे हे गृहितकृत्य सत्य ठरते.

**निष्कर्ष:** आदिवासींसारख्या वंचित वर्गातील महिलांना बँक, स्वयंसेवी संस्था आणि इतर संस्थाशी संपर्क स्थापन करण्याची संधी प्राप्त झाली. गटातील सहभागामुळे मैत्रीचा विकास, इतर सदस्यांच्या समस्यांमध्ये सहभागी होणे, स्वाभाविक स्वरूपाचे नेतृत्व आणि सदस्यांच्या क्षमतांमध्ये विकास करणे या गोष्टींना चालना मिळाली. त्यामुळे स्वयंसहायता बचत गट हे आदिवासी महिलांच्या सक्षमिकरणात निर्णायक भूमिका पार पाडत आहेत. बचत गटांनी ग्रामीण महिलांचा सामाजिक आणि आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत केली आहे. स्वयंसहायता बचत गट गरीब महिलांशी संबंधीत असून त्यांच्या नाविन्यपुर्ण पध्दती, विकासप्रक्रीयेत लोकांचा सहभाग प्राप्त करणे तसेच भागधारकांमध्ये विविध पातळयांवर विश्वासाची निर्मिती करणे यामुळे स्वयंसहायता बचत गट ही संकल्पना यशस्वी ठरली आहे. अशा प्रकारे आदिवासी महिलांच्या सामाजिक व आर्थिक विकासात बचत गट सकारात्मक भूमिका पार पाडत आहे. आर्थिक नियंत्रणातून आपल्या जीवनात परिवर्तन आणण्याची क्षमता ही प्रथमतः महिलेच्या स्वतःच्या दर्जावर आणि नंतर तीच्या गटातील दर्जावर अवलंबून असते. बचत गटांच्या माध्यमातून महिला हया गरीबी निर्मुलनासहित महिला सक्षमीकरण, पीण्याचे पाणी, ग्रामीण भागातील स्वच्छता, सामाजिक वनीकरण तसेच शेतीसाठी जलसिंचन योजना या क्षेत्रात काम करीत आहेत. अशा प्रकारे माविम व्दारे संचालित बचत गट प्रक्रियेमुळे आदिवासी महिलांच्या सक्षमिकरणाची प्रक्रिया प्रत्यक्षात साकारत आहे.

**संदर्भ सूचीः-**


१. सिंह, आर. (२००६) . प्राचिन भारत (प्रागैतिहासिक से सामंतवाद तक) . नई दिल्ली, डार्लिंग किंडरस्ले.
२. मेहेत्रे, एस. (२०११) . भारतीय स्त्री आणि मानवाधिकार. नागपूर, साईनाथ प्रकाशन.
३. डांगे, एस. (१९८०) . बौध्द धर्म आणि तत्वज्ञान. पुणे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ आणि कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
४. सरोज, आर. (२००६) . हिंदू वर्णव्यवस्था पुनर्विचार और विश्लेषण. इलाहाबाद, राका प्रकाशन.
५. सामंत, एम. (२०००) . स्त्री-पर्व. पुणे, सुगावा प्रकाशन.
६. आठल्येकर, एम. (२००९) . महापुरूषांच्या नजरेतून स्त्री. पुणे, मेनका प्रकाशन.
७. कुमार, वी. (२००९) . वैश्वीकरण एवं महिला सशक्तीकरण (विविध आयाम) .
८. कवि, एम. (१९९९) . महिला कल्याण आणि विकास. नागपुर, विद्या प्रकाशन.
९. घडियाली, आर. (२००८) . समकालीन भारतातील नागरी स्त्रिया. पुणे, डायमंड प्रकाशन.
१०. जाधव, एन. (२०१५) . भारतीय स्त्रीप्रश्नःआकलनाच्या दिशेने. औरंगाबाद, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र.
११. महाकरकार, एस. (२००६) . आदिवासी स्त्री व राजकारण. चामोर्शी, श्री दत्त मुद्रण.
१२. गारे, जी. (संपा. ) . (१९८८) . महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती समस्या व विकास. पुणे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था.
१३. सोनवणे, व्ही. (२०१४) . महिला आणि मानवी हक्क, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
१४. भागवत, व्ही. (२००४) . स्त्री प्रश्नांची वाटचाल. पुणे, प्रतिमा प्रकाशन.
१५. गमरे, एम. (२०१८) स्वयंसहाय्य बचत गट संकल्पना ओळख मार्गदर्शिका. मुंबई, महिला आर्थिक विकास महामंडळ.
१६. ठाकुर, व्ही. लिंगभाव प्रशिक्षण पुस्तिका. मुबई, महिला आर्थिक विकास महामंडळ.
१७. काळे, ए. जनतेचे धन जनतेला अर्पण अर्थात.. . . लोकसंचालित साधन केंद्र पुस्तिका. चंद्रपूर, महिला आर्थिक विकास महामंडळ.
१८. देवगांवकर, एस., देवगांवकर, एस. जी. (२०१५) . आदिवासी विश्व. नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.
१९. संगवे, व्ही. (१९७२) . आदिवासींचे सामाजिक जीवन, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन.
२०. वाघमारे, एम. (२०११) . पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ आणि आदिवासींचा विकास, पुणे, समर्थ ऑफसेट.


# महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती-जमातीची सद्यस्थिती एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. चव्हाण सुखदेव गोविंदराव** समाजशास्त्र अभ्यास मंडळ सदस्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड
तथा समाजशास्त्र विभाग माधवराव पाटील महाविद्यालय, पालम

**सारांश:** महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जातीची सद्यस्थितीत जर समकालीन परिस्थिती अभ्यासली तर या समाजातील जाती व उपजातीत परिवर्तन होत असलेला दिसून येईल परंतु या समाजाच्या अनेक समस्या आहेत. या सर्व जाती समुदायाच्या प्रश्नाची चर्चा महाराष्ट्रात सतत चालू असलेली दिसून येते. वेगवेगळ्या माध्यमातून त्यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले जात आहे. सभा, संमेलने, मोर्चेआणि शोधयात्रा यातून भटक्या विमुक्तांचं दुखणं प्रस्थापित समाजापर्यंत आणि शासनकर्त्यापर्यंत पोहोचवण्याचे काम या समाजातील कार्यकर्ते करीत आहे. परंतु अजूनही हवं तसं यश त्यांना मिळालेलं नाही. आज समकालीन युगात या समाजाची परिवर्तनाची तयारी असताना शासन आणि राज्यकर्ते या समाजाकडे दुर्लक्ष करीत असलेला दिसून येतो. कारण की या समाजात पाहिजे त्या प्रमाणात विकासात्मक स्थितींतरे झालेली दिसून येत नाही. म्हणून महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त जाती-जमाती विकासात्मक आव्हाने स्वीकारून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**मुख्य शब्द:** भटक्या, विमुक्त, जाती-जमाती, सद्यस्थिती आणि सामाजिक, परिवर्तन

**प्रस्तावना:** संपूर्ण भारत देशात भटक्या विमुक्त जाती-जमाती वास्तव्य करीत असलेली दिसून येते. महाराष्ट्रात ज्या जाती-जमाती आहेत. तसेच अन्य राज्यात देखील दिसून येतात. त्यांच्या सर्व सांस्कृतिक, सामाजिक, लोकजीवन पद्धतीचा अभ्यास केल्यास त्यांच्यामध्ये सर्वच बाबतीत सारखेपणा दिसून येते. तरी देखील त्यांच्यात आरक्षण, शिक्षण, सामाजिक दर्जा तसेच अन्य बाबतीत वेगवेगळ्या राज्यात विषमता दिसून येते. जोपर्यंत भटक्या विमुक्त जाती जमातीला महाराष्ट्रात आणि देशात सर्वच प्रकारच्या संधी मिळणार नाही तोपर्यंत हा संपूर्ण भटका समाज विकसित होणार नाही म्हणून तसे प्रयत्न शासन व सरकारच्या माध्यमातून होणे गरजेचे आहे. २१ व्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव तसेच जागतिकीकरणाचा स्वीकार करून देखील भटके विमुक्त आजही भटकंती करीत असलेला दिसून येत आहे. सद्यस्थितीत सर्व जाती जमातीत आर्थिक विवेचनेतून अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत त्यामुळे आज महाराष्ट्रातील प्रत्येक गाव, वाडी, वस्ती व तांड्यातून ६० ते ७० टक्के लोक ऊसतोड कामगार व इतर कामासाठी वेगवेगळ्या ठिकाणी कामगार म्हणून स्थलांतरित झाले. तसेच काही लोक उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने हे जनसमूह भीक मागू लागले आहेत. थोडक्यात सांगायचे झाले तर भटक्या विमुक्त जाती जमातीत संपूर्णतः प्रगती झालेली दिसून येत नाही. कारण या देशात आणि वेगवेगळ्या राज्यात प्रभुत्वशाली जाती समुदायाकडे सत्तेचे केंद्रे असून सत्तेचा वापर आपल्या समुदायाच्या विकासासाठी करीत असलेला दिसून येतो. सामान्य जाती-जमातीचे शोषण याच वर्गातील लोक सरकार आणि शासनाच्या दरबारात काम करणाऱ्या लोकांकडून होत असलेला दिसून येतो. सत्ताधीश आणि उच्चभ्रू समाजातील लोकांचे दृष्टिकोन बदलणे व परिघाच्या बाहेर असलेल्या या भटक्या विमुक्त जाती जमातीला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे फार आवश्यक आहे.

**प्रस्तुत शोधनिबंधाचे उद्दिष्टे:** १) महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती जमातीच्या लोकजीवन पद्धतीचा अभ्यास करणे. २) महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती जमातीची सद्यस्थिती जाणून घेणे. ३) महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती जमातीचे प्रवर्गनिहाय आरक्षणाचे अध्ययन करणे.

**प्रस्तुत शोधनिबंधाचे गृहितके:** १) महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती जमातीची सामाजिक व आर्थिक स्थिती अंशतः बदललेली आहे. २) महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती जमातीची शैक्षणिक स्थितीत अंशतः परिवर्तन झालेली दिसून येते.

**संशोधन पद्धती:** शोधनिबंध हा संशोधनाचा एक भाग असतो ज्याप्रमाणे संशोधनातून संशोधक हा एखाद्या समस्येचे सूत्रन करतो आणि निष्कर्षाप्रत पोहोचतो. त्याचप्रमाणे शोधनिबंधात देखील एखादी समस्या निश्चित करून त्या समस्येची कारणमीमांसा केली जाते. त्याचप्रमाणे प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून माहितीचे स्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ, मासिकेआणि वृत्तपत्राचा वापर करण्यात आला आहे.

**तथ्याचे विश्लेषण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.**

**महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती जमाती व त्यांची सद्यस्थिती:** भटके याचा अर्थ शोषित भटकणारे मानवी समूह म्हणजे भटके होय. **मोतीराज राठोड यांच्या मते** "ज्याला गाव शिवार नाही जो कायम पोटासाठी गावोगाव भटकतो तो भटका." **कांही अभ्यासकाच्या मते:-** "नाव सांगायला स्वतःचे गाव नाही राहायला घर नाही जमिनीसारखे कायमस्वरूपाचे उत्पन्नाचे साधन नाही उपेक्षित जगणे नशिबी असल्यामुळे पोट भरण्यासाठी कामाच्या निमित्ताने सतत गावोगाव भटकत असलेला आणि भिक्षेवर जगणारा अथवा परंपरेने चालत आलेल्या कलेच्या आधाराने स्वतःची उपयोजिका करणारा लोकसमूह अनेक वर्षापासून महाराष्ट्रात वेगवेगळ्या जाती जमातीच्या नावाने जीवन जगताना आढळतो अशा या लोकसमूहाला भटके असे म्हणतात"

भटक्या विमुक्त म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात संबोधित केलेल्या जमाती या देशातील आदिम जमाती व मूळ भूमिपुत्र आहेत. आर्याच्या अमानुष हल्ल्यामुळे त्यांना स्वतः निर्माण केलेले वैभव मनावर दगड ठेवून केवळ जीव वाचवण्यासाठी त्याग करावा लागला. व जंगलाचा आधार घ्यावा लागला काळाच्या ओघात वेगवेगळ्या कारणामुळे भटक्या अवस्थेकडे ते वळले व भटकंती हेच त्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान ठरले. या जमातीला कोणी त्यांना अभिमानाने लोकसंस्कृतीचे उपासक असेही म्हटले. भटकती करणे हे इथल्या मनुवादी समाज व्यवस्थेने त्यांच्यावर जबरदस्तीने ती लादलेली आहे. भटक्यांना आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक सत्तेपासून दूर कसे ठेवता येईल याची सतत काळजी इथल्या व्यवस्थेने घेतलेली दिसते. म्हणूनच आज या जाती जमातीचा विकास झालेला दिसून येत नाही.

**महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती जमातीचे प्रवर्गनिहाय आरक्षण:** महाराष्ट्रात संपूर्ण वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये साधारणपणे भटक्या विमुक्त जाती जमातीचे लोक राहतात. महाराष्ट्रात भटक्या-मुक्तांच्या ४२ जाती जमाती आढळतात त्यातील १४विमुक्त व २८भटके आहेत पुढे त्यात धनगर व वंजारी या जातीचा ही समावेश करण्यात आलेला आहे. आरक्षण धोरणानुसार या जातींचा समावेश वेगवेगळ्या वर्गात समावेश केला गेलेला आहे. ते खालील प्रमाणे आहेत.

**१) विमुक्त जाती-अ आरक्षण ३ टक्के:** विमुक्त जाती अ या प्रवर्गात एकूण १४प्रमुख जातीचा समावेश झालेला आहे त्यामध्ये प्रामुख्याने कैकाडी, राज पारधी, रामोशी, वडार, बेरड, बेस्तर, कंजारभाट, छप्परबंद, वाघरी, बंजारा, कटाबू, राजपूत या सर्व जातींना विमुक्त जातीचा दर्जा महाराष्ट्रात मिळालेला आहे तसेच या १४ जातींना ३ टक्के आरक्षण देण्यात आलेला आहे.

**२) भटक्या जमाती-ब आरक्षण २.५ टक्के:** भटक्या जमाती ब या प्रवर्गात समाविष्ट असलेल्या जमाती बेलदार, भराडी, गोसावी, जोशी, गोला, हेळवे, गोंधळी, गोपाळ, लोहार, घुले, गारुडी, चित्रकथी, रावळ, नंदीवाले, शिकलगार, पांचोळ, मसनजोगी, मेरा, कोल्हाटी, काशी कापडी, भाई, वासुदेव, वैदू, वगळले, ओतारी, खिलारी, कडकलक्ष्मी वाले, गहिरा, गोसाई, मुस्लिम मदारी, गारुडी, सापवाले व जादूरण, भारतीय इराणी, गवळी इत्यादी या सर्व जमातीचा भटक्या जमाती ब मध्ये समावेश होत असलेला दिसून येतो.

**३) भटक्या जमाती-क आरक्षण ३.५ टक्के:** भटक्या जमाती क या प्रवर्गात प्रामुख्याने धनगर या जमातीचा समावेश होतो या जमातीत वेगवेगळ्या उपजाती असून या सर्व उपजाती धनगर या प्रमुख जातीमध्ये समावेश झालेला आहे.

**भटक्या जमाती ड आरक्षण २ टक्के:** भटक्या जमाती ड या प्रवर्गात प्रामुख्याने वंजारी या जमातीचा समावेश होतो या जमातीत उपजाती म्हणून बंजारा आणि वंजारा याचा समावेश झालेला आहे.

महाराष्ट्रात वेगवेगळ्या आरक्षण धोरणानुसार आज या चारही प्रवर्गातील जाती जमातीला आरक्षण देण्यात आलेले आहे. परंतु या आरक्षणाच्या आधारे किंवा विशेष सुविधा दिल्यानंतर या जाती जमातीचा विकास झालेला आहे का? असे प्रश्न उपस्थित झाले. आपणास स्पष्टपणे सांगता येईल की, आजही मोठ्या प्रमाणात या जाती जमाती विकासापासून वंचित असलेल्या दिसून येते. या जमातीतील महिला आणखीन पूर्णतः असुरक्षितच असल्याचे दिसून येते. महिलांना त्या त्या समाजात बंदिस्त जीवन जगावे लागते आणि बाहेरील विश्वात देखील त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी शोषणाला बळी पडावे लागते. कारण की नेतृत्व करण्याची, लढण्याची तसेच समाजाची असलेली भीती फार प्रमाणात असल्यामुळे महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणून या जाती-जमातीतील महिलांसाठी व सर्व पुरुष वर्गासाठी विकासात्मक कार्य होणे गरजेचे आहे.

भारतीय समाज व्यवस्थेत जातीविषयक विषमता फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. त्यामध्ये भटके विमुक्तांना केंद्रस्थानी येण्याची संधी प्राप्त करू दिली नाही. तसेच तशी संधी देण्यात आलेली नाही. जाती संस्थेने अनेक जन समूहास उत्पन्नाचे, पोट भरण्याचे साधन नाकारल्याने काही समूह पोटाची खळगी भरण्यासाठी भटकू लागली. उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने हे जनसमूह भीक मागू लागले. भटकेपणाची दोन ढोबळ कारणे सांगता येतील आर्थिक असुरक्षितता, स्थिरकायम उत्पन्नाचे साधन नसणे. मानवी जीवनातील सर्वच गोष्टी अर्थकारणाच्या भोवती फिरत असतात. अर्थकारणाच्या हितसंबंधाभोवती राजकारण फिरत असते. अर्थकारणाच्या हितसंबंधातून उच्च जातवर्गाने कनिष्ठ जात वर्ग निर्माण केला म्हणूनच तर भारतातील सर्व राज्यात विविध जाती जमाती निर्माण झाल्या आहेत. उच्च जात वर्गाने स्वतःच्या हितसंबंधापोटीच या जाती बंदिस्त ठेवल्या हा उच्च जात वर्गाची नीती खालच्या जातींना व भटक्यांना ओळखता आली नाही. म्हणून तर ही जात संस्था तोडण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या चळवळींना प्रबोधनकारी संस्थांना उच्च वर्गीय लोकांनी नेहमीच विरोध केला आहे. महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती-जमातीचा सद्यस्थितीचा आढावा घेतल्यास असे निदर्शनास येते की साधारणपणे चार ते पाच वर्षात या समुदायाला नोकरी क्षेत्रातील संधी मिळून देण्याचे प्रयत्न शासन आणि सरकार करीत असलेला दिसून येते. कारण की आरक्षण धोरणातील बदल हे भटक्या विमुक्तांचे शोषणाचे कुटीत कारस्थान असल्याचे दिसते. संपूर्ण देशात शिक्षण क्षेत्रातील नोकरीच्या बाबतीत असे दिसून येते की खुल्या प्रवर्गासाठी सर्वात जास्त जागा रिक्त असलेल्या निदर्शनास आलेले आहे. परंतु या यामध्ये विमुक्त जाती जमातीचे रिक्त जागेचा उल्लेख कुठेच दिसून येत नाही. म्हणजेच जाती आधारित समाज रचनेची पुन्हा सुरुवात झालेली आहेकी लोकशाहीचा विपर्यास होत असून प्रभुत्वशाली गटाचे हे कुटील कारस्थान आहे असे असताना देखील विमुक्त जाती भटक्या जमाती मधील जनसमुदाय स्वतःमध्ये परिवर्तन व विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करीत आहे. राजकीय क्षेत्रात पाहिजे त्या प्रमाणात संधी दिली जात नाही तसेच दिशाभूल करून या समाजावर आपले वर्चस्व अबाधित राखण्यासाठी उच्चभ्रू वर्गातील लोक सतत प्रयत्न करीत असतात. म्हणून या समाजात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक तसेच इतर बाबतीत जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे. तेव्हा या समाजात बदल झालेला दिसून येईल.

**प्रस्तुत शोधनिबंधाचे निष्कर्ष:** महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या सद्यस्थितीच्या समस्या लक्षात घेतल्यानंतर असे म्हणता येते की, वेगवेगळ्या समस्यांना या जाती-जमातीच्या महिला व पुरुषांना दैनंदिन जीवनामध्ये तोंड द्यावे लागते. पारंपारिक ते आधुनिक समाजात देखील जाती संस्थेच्या माध्यमातून शोषण होत असलेले दिसून येते. समकालीन परिस्थितीत तर अन्याय अत्याचार तसेच जातीय दंगली घडून आपापसात द्वेष निर्माण करून सत्तेपासून वंचित ठेवण्याचे प्रयत्न प्रभुत्वशाली जाते गट करीत असलेले दिसून येते. सध्यकालीन परिस्थितीत राजकीय समीकरण बदलले आहे. लोकशाही व्यवस्थेला बाजूला करून मूठभर लोकांच्या हातात सत्ता केंद्रीत असल्यामुळे दमनकारी व्यवस्था महाराष्ट्र आणि भारतात देखील अस्तित्वात असलेली दिसून येते. या विषमतावादी समाज व्यवस्थेला छेद देण्यासाठी कार्ल मार्क्सला अभिप्रेत असलेला संघर्ष होणे गरजेचे आहे. तेव्हा मात्र समतावादी, समाजवादी, साम्यवादी समाज अस्तित्वात येऊ शकेल. त्यासाठी अन्यायग्रस्त जनसमुदायांनी एकत्र येऊन परिवर्तनाचा लढा उभारणे गरजेचे आहे. त्या संघर्षातून परिवर्तनाकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरणा मिळू शकते. तेव्हा मात्र आपणास या भटके विमुक्त जाती जमातीची प्रगती झालेली दिसून येईल.

**संदर्भग्रंथ सूची:**

१) राठोड अमर, (२००८), आरक्षण : विमुक्त भटक्यांचे साप्ताहिक बंजारा पुकार, नांदेड.
२) पवार, अशोक, (२०१३), भारतीय भटक्यांचा विमुक्तनामा : रेणके आयोग, वस्तुस्थिती व विपर्यास लोकपाल पब्लिकेशन, औरंगाबाद.
३) राठोड मोतीराज, (२०१५), नोटिफाईड्स ट्राइब्स, नोमॅडीक ट्राइब्स, निर्माण संस्था पुणे.
४) चव्हाण रामनाथ, (१९८९), भटक्या विमुक्तांचे अंतरंग, सुगावा प्रकाशन पुणे
५) भोसले नारायण, (२००८), भटक्यांची पितृसत्ताक जातपंचायत : परंपरा आणि संघर्ष द ताईची प्रकाशन, पुणे.
६) जाधव रमेश, (२०१३), भटक्या विमुक्तांचे परिप्रेक्ष हरणाई प्रकाशन, नांदेड.
७) कांबळे उत्तम, (२०१३), भटक्यांचे लग्न, मनोविकास प्रकाशन, पुणे.
८) पवार अशोक, (२०१३), भटका समाज : लोकसंख्या आणि दारिद्र्य, लोकपाल पब्लिकेशन, औरंगाबाद.

# नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण आदिवासी समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने

**प्रा. विनायक संजय लाडे** सहाय्यक प्राध्यापक (समाजशास्त्र विभाग) मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मवीर रावसाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वणी जि. नाशिक

**गोषवारा:** आजही भारत देशाला कृषी प्रधान म्हणून ओळखले जाते. भारतामध्ये विविध संस्कृती परंपरा व विविध प्राचीन समुदाय बघायला मिळतात. आपण या प्राचीन समुदायाला आदिम किंवा आदिवासी समुदाय म्हणून ओळखत आलो आहोत. त्याचप्रमाणे भारताचे मूळ निवासी म्हणून या आदिवासी समूह ओळखला जातो. त्यांच्या काही महत्त्वपूर्ण संस्कृती किंवा परंपरा आहेत ते जोपासणे किंवा संगोपन करणे आपल्या मानवी समुदायाचे एक महत्त्वाचे मूल्य आहेत. भारतासारख्या महान देशांमध्ये आदिवासींचे वास्तव्य फार पूर्वीपासून दिसून येते त्यांचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण ठरते महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून अभ्यास करताना एक ठराविक विभागाचा विचार केला आहे. म्हणूनच नाशिक जिल्ह्यातील नाशिक जिल्हा हा आदिवासी समाजाचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य दिसून येतात. म्हणून संशोधन पेपरचा अभ्यास करताना नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण आदिवासी समाजाचे बदलते स्वरूपाचे आव्हाने या विषयाचा अभ्यास करताना ग्रामीण समुदायाची वर्णनात्मक अभ्यास केले आहेत. यामध्ये ग्रामीण आदिवासी समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने यांचा तुलनात्मक अभ्यास या संशोधन पेपर मध्ये केला आहे. या अभ्यासामध्ये ग्रामीण आदिवासी समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने या विषयाचा सविस्तर वर्णन केले आहेत तरी ग्रामीण भागातील आदिवासींची जीवनशैली, परंपरा, राहणीमान, संस्कृती, वेशभूषा या सर्व गोष्टींचा अभ्यास केला गेला आहेत. अभ्यास करताना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक दृष्ट्या वर्णनात्मक व तुलनात्मक दृष्टिकोनातून विचार केला गेला आहे. अशी अपेक्षा करतो की या अभ्यासाचा नक्कीच समाजाला फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

**प्रस्तावना:** नाशिक जिल्हा हा आदिवासी समुदायाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामध्ये काही तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आदिवासी समुदायाचे वास्तव्य दिसून येते त्यामध्ये दिंडोरी, पेठ, सुरगाणा, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, इत्यादी तालुके हे आदिवासी तालुके म्हणून ओळखले जाते या तालुक्यांमध्ये कातकरी, वारली, कोकणी, कोळी, महादेव कोळी, भिल्ल, ठाकूर अशा विविध आदिवासी समाजाचे वास्तव्य दिसून येतात. निसर्ग संपन्न डोंगरांमध्ये जंगलांमध्ये राहताना दिसतात. त्याचे कारण म्हणजे शेतीवर आधारित जीवनशैली किंवा निसर्गप्रेमी जगणाऱ्या या समाजाचे स्वरूप आता बदलत्या सामाजिक, आर्थिक प्रक्रियेमुळे झपाट्याने बदलताना दिसतात. नैसर्गिक पद्धतीने शेती करणे, शिकार करणे, गौरी गोळा करणे, तसेच पावसाळी पिकांवर अवलंबून असतात त्यांच्या लोककलेचा विचार केला तर वारली चित्रकला, लोक नृत्य, सण समारंभ, देवतांची पूजा, ग्रामदेवत, परंपरा, निसर्गाची पूजा, डोंगरी देव उत्सव इत्यादी परंपरा आपल्याला आदिवासी समाजामध्ये दिसून येतात त्याचप्रमाणे खेड्या गावात जंगलात राहत असल्यामुळे आरोग्याच्या सुविधा उपलब्ध होत नाही. त्यामुळे आदिवासी समाजामध्ये त्यांची स्वतःची एक आरोग्य निवारण म्हणजे औषधी वनस्पतीचे कौशल्य चिकित्सा आहे त्यातून ते विविध रोगांवर उपचार करतात. यातूनच आदिवासी समाजाचे निसर्गावर अवलंबून राहण्याचे स्वरूप आपल्याला दिसून येते.

वाढत्या जंगल तोडीमुळे जंगलांचे अस्तित्व धोक्यात येताना आपल्याला दिसून येत आहे. त्याचप्रमाणे जंगलात राहणारी आदिवासींचे जीवन जगण्याचे स्वरूप कठीण होताना दिसते. यातूनच असे लक्षात येते की महाराष्ट्रा मध्ये किंवा भारतामध्ये सर्व जंगल किंवा अति घनदाट जंगलांमध्ये राहणाऱ्या समुदायाचे अस्तित्व हे जंगलतोडीमुळे प्रमाण कमी कमी होताना दिसते. तसेच वाढत्या औद्योगीकरणामुळे जंगलांची मोठ्या प्रमाणावर तोडणे चालू आपल्याला दिसून येते. वरील स्पष्टीकरणातून असे लक्षात येते की जंगलांचे राहणे मानवाला किती महत्त्वाचे आहे. औद्योगिक दृष्ट्या विचार केला असता वाढत्या औद्योगीकरणाचा प्रसार, सरकार धोरणे राबवताना आपल्याला दिसून येतात. पण जंगलात राहणारे आदिवासी समाजाचे जगणे धोक्यात येताना दिसतात. त्यांची जीवन जगण्याची पद्धत व्यवसाय, परंपरा, सण, उत्सव, देवी-देवता इत्यादी सांस्कृतिक दृष्ट्या विचार केला असता आदिवासी समाजाचे मोठी समस्या आपल्याला जगासमोर निर्माण होताना दिसून येतात. त्या समस्येचे आदिवासी समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल दिसतात. याच बदलांचा आणि आव्हानांचा अभ्यास आपण या संशोधन अभ्यासामध्ये करणार आहोत.

सरकारने केलेल्या योजना किंवा उपाय योजना त्या समाजापर्यंत कितपत पोहचतात हाच एक प्रश्न आहे. तसेच पेसा कायदा आणि आदिवासी उपयोजना व वन हक्क कायदा इत्यादी अनेक शासकीय धोरणे व योजना असल्या तरी त्यांची अंमलबजावणी पूर्णपणे दुर्गम भागात होताना दिसत नाही. अंमलबजावणीतील त्रुटी, जागरूकतेचा अभाव आणि प्रशासनातील मर्यादा यामुळे अपेक्षित परिणाम सध्या होताना दिसत नाही. त्यामुळे आदिवासी समाजाचा विकास केवळ आर्थिक किंवा भौगोलिक स्तरावर मोजण्यापेक्षा सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य, शिक्षण पर्यावरणीय हक्क आणि मानवी सन्मान या सर्व बाजूने विचार करून समग्र अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

**आदिवासी समाजासमोरील आव्हाने:** संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होताना दिसून येतात जंगल तोड, वाढते आधुनिकीकरण, वाढते जागतिकीकरण यातूनच आदिम समाजापुढील पारंपारिक कला, भाषा, रुढी नष्ट होण्याचा धोका निर्माण होताना दिसून येतो. त्याचप्रमाणे आधुनिक काळात जगत असताना सर्वात मोठी अडचण निर्माण होते ती म्हणजे शैक्षणिक समस्या होय यामध्ये शैक्षणिक व्यवसाय दळणवळण सुविधा नसणे शिक्षकांची कमतरता भाषिक अडथळे निर्माण होताना दिसतात.

वरील सर्व गोष्टींचा विचार केला असता आरोग्याच्या समस्या तितक्याच महत्त्वाची आहे आरोग्याच्या समस्यांमध्ये कुपोषणाची समस्या माता मृत्यू, बालमृत्यू, आरोग्य सेवा नसणे इत्यादी सर्व गोष्टींचा आदिवासी समाजात त आव्हाने निर्माण होताना दिसते.

या अभ्यासक्रमाचा उद्देश नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजावर घडत असलेल्या बदलांचे स्वरूप त्या बदलांना कारणीभूत असलेले घटक तसेच या आव्हानांनी त्यांना सखोल अभ्यास करणे. हा आहे. या अभ्यासातून नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजाची वर्तमान स्थिती व बदलांचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम तसेच भविष्यकालीन विकासासाठी आवश्यक उपाययोजना याविषयी वैज्ञानिक व वास्तव माहिती मिळेल अशी अपेक्षा या अभ्यासातून करतो.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** *"Tribal Health in India: A Study of Tribal Health in India"* – या पुस्तकात भारतातील आदिवासी समुदायांच्या आरोग्यविषयक समस्यांचा अभ्यास केला आहे, ज्यात कुपोषणाचाही समावेश आहे. *"Nutrition and Health of Indigenous Peoples"* – हे पुस्तक आदिवासी समुदायांमध्ये पोषणाच्या बाबतीत असलेली आव्हाने आणि त्यावरील उपाय यांचा अभ्यास करतो. *"Tribal Development and Health Issues"* – या पुस्तकात आदिवासी विकासाच्या संदर्भात आरोग्य, कुपोषण आणि जीवनमानावर चर्चा केली आहे. *"The Tribal Health and Nutrition in India"* – हे पुस्तक भारतीय आदिवासी समुदायांच्या पोषण आणि आरोग्य समस्या यावर सखोल विश्लेषण करते. पुस्तक - गोविंदा गारे. - आदिवासी समाज : समस्या *"Nutrition and Health of Indigenous Peoples"* — हे पुस्तक आदिवासी समुदायांमध्ये पोषणाच्या बाबतीत असलेली आव्हाने आणि त्यावरील उपाय यांचा अभ्यास करतो.

वरील अभ्यासात नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या सामाजिक आर्थिक पैलूतील भौगोलिक विविधता स्पष्ट केले आहे जसे की कमी विकसित तालुक्यामध्ये दिंडोरी, इगतपुरी, पेठ, सुरगाणा, त्रंबकेश्वर इत्यादी तालुक्यांच्या तुलनेने निफाड, सटाणा, सिन्नर इत्यादी तालुके हे विकसित होताना दिसून येतात. त्यामध्ये सरकारचे काही धोरणांचा दुय्यम भूमिका ग्रामीण आदिवासी भागात दिसून येतात तसेच आदिवासी पाड्यावर विविध भागात वस्ती मोड, विद्या शिक्षण, घर, वीज, राहणीमान यांच्यामध्ये भिन्नता आढळते, या भिन्नतेमुळे काही भागांमध्ये सामाजिक आर्थिक विकास मंदवताना दिसतो. त्यामुळे सामाजिक बदलांचे मार्गही भिन्न होताना दिसतात. तसेच संपूर्ण जिल्ह्यात अनेक तालुक्यांमध्ये आदिवासी भागात पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, रस्ते इत्यादी सुविधांचा अभाव आपल्याला दिसून येतो. आणि कुपोषणाचे प्रमाण उच्च आहे. या गोष्टीचा विचार केला असता इतर समाजापेक्षा आदिवासी पाड्यांवर समस्यांचे स्वरूप हे मोठ्या प्रमाणावर दिसून येतात या सर्व गोष्टींचा विचार करणार आदिवासी समाजा आंदोलनांची भूमिका बजावतो पण पाहिजेल तेवढा सरकार लक्ष केंद्रित होताना दिसत नाही.

**उद्देश:** नाशिक जिल्ह्यात प्रमुख आदिवासी समाजाची सामाजिक रचना अभ्यासणे. आदिवासी दुर्गम (खेडोपाडी) भागात शिक्षण, आरोग्य, अर्थव्यवस्था व रोजगारात झालेले बदल अभ्यासणे. वरील बदलांना कारणीभूत असलेले घटक अभ्यासणे. आदिम समाजाचे बदलते स्वरूप जाणून घेणे. आदिम समाजासमोरील प्रमुख आव्हाने जाणून घेणे. वआव्हानांवर धोरणात्मक उपाययोजना सुचवणे.

**गृहीतकृत्य:** आदिम समाजामध्ये शासकीय योजनांची अंमलबजावणी ही अपेक्षित प्रमाणात होत नाही, असे गृहीत धरता येते. आदिवासी भागात आरोग्य सुविधांचा अभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. आदिवासी भागात त्यांची स्वतःची एक पारंपारिक उपचार पद्धती दिसून येते. उच्च शिक्षणात गळतीचे प्रमाण आदिवासी खेड्यांवर जास्त दिसतात. महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण कमी दिसतात. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण आदिवासी भागात हा परंपरेपासून आधुनिकतेकडे जाण्याच्या मार्गावर दिसते. स्थलांतरामुळे ग्रामीण आदिवासी कुटुंबाची सामाजिक रचना बदलत आहे. जंगलांवर आधारित उपजीविकेचा साधनावर मर्यादा वाढतं दिसतात. भूमिहीनता हे आदिवासी समाजासमोरील प्रमुख समस्या किंवा आव्हान निर्माण होताना दिसतात.

**अध्ययन पद्धती:** या विषयाचा अभ्यास करताना ग्रामीण आदिवासी समुदायाच्या अभ्यासामध्ये परंपरा संस्कृती यांच्या अभ्यासामध्ये आदिवासी समाजाचे बदलते स्वरूप व आव्हानांचा वर्णनात्मक स्पष्टीकरण करणार आहोत. त्यामध्ये राजकीय धोरणे व बदलत्या आधुनिकीकरणांमध्ये जो नवीन सामाजिक बदल होताना दिसतात त्यांचा तुलनात्मक अध्ययन या अभ्यास पेपर मध्ये केला आहे तसेच नाशिक जिल्ह्यांमध्ये ठराविक भौगोलिक क्षेत्रांमध्येच म्हणजे पेठ सुरगाणा त्रंबकेश्वर दिंडोरी इगतपुरी इत्यादी तालुक्यांचा या अध्ययन पद्धतीमध्ये नमुना म्हणून विचार केला आहे त्यामध्ये या तालुक्यांमध्ये जास्त घनदाट जंगलातील खेडोपाडी भौगोलिक क्षेत्राचा विचार केला आहे. यामध्ये प्रश्नावली तयार करून मुलाखतीच्या माध्यमातून माहिती जमा केले आहेत त्यामध्ये प्रत्येक तालुक्यामधील अति घंटात जंगलात खेडोपाडी राहणारे गावांपैकी प्रत्येक तालुक्यातील दोन गावांचा समावेश केला आहे त्यामध्ये गावातील प्रत्येकी दहा हजारांचा समावेश या अध्ययनात केला गेला आहे तसेच मिळालेले माहितीचे विश्लेषण करून व तुलनात्मक वर्णन या अभ्यासामध्ये केले व निष्कर्ष तयार केले आहे.

**तथ्यांचे विश्लेषण:** या अध्यानामध्ये तथ्यांचे विश्लेषण करताना सामाजिक आर्थिक राजकीय कौटुंबिक बाजूंचाही विचार केला आहे यामध्ये सामाजिक राजकीय बदलांमध्ये आदिवासी समाज हा सामाजिक राजकीय अधिकारांसाठी सक्रिय झाला आहे आरक्षणाच्या मुद्द्यावर मोठ्या प्रमाणावर आंदोलन आणि रास्ता रोको सारखे आंदोलन झाले आहेत तसेच कौटुंबिक विचार केला असता यामध्ये जीवनमान आरोग्य स्थिती अत्यंत हालकीची दिसून येते आदिवासी जंगलात राहणाऱ्या लोकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त प्रमाणात दिसून येतात त्यामध्ये अभ्यासातून असे लक्षात येते की या दुर्गम भागात खेडोपाडी ४०० पेक्षा अधिक बालके जास्त प्रमाणात कुपोषित आहे तर ३००० बालके मध्यम कुपोषित आहेत त्यामुळे कुटुंबातील आरोग्याची किंवा जीवनमान स्थिती स्पष्ट होताना दिसते.

तसेच आर्थिक स्थितीचा विचार केला असता ग्रामीण भागात जे खेडे अति घनदाट जंगलात राहतात त्यांना रोजगारची संधी कमी आहेत त्यामुळे स्थलांतराचे प्रमाण वाढताना दिसते शैक्षणिक क्षेत्रासाठी दळण वळणाच्या सोई उपलब्ध नाहीत त्यामुळे

शिक्षणाची गुणवत्ता व साक्षरता दर कमी दिसतो सरकारी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रयत्न आहेत परंतु निधी व सेवा पोहोचण्यासाठी अडचण येत आहे त्यामुळे असे लक्षात येते की आदिवासी समाजाचे साक्षरता आरोग्य रोजगार पाणी व सुविधा डिजिटल सेवा आणि सामाजिक राजकीय अधिकार यांच्या बाबतीत सुधारणा करण्याची अत्यंत गरजेचे आहे.

**निष्कर्ष:** या संशोधनातून नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण आदिवासी समाजाचे बदलते स्वरूप व त्यासमोरील आव्हाने स्पष्टपणे समोर आली आहेत. जिल्ह्यात भिल्ल, कोळी, वारली, कोकणी, महादेव कोळी, ठाकूर, कातकरी इत्यादी प्रमुख आदिवासी समाजांची सामाजिक रचना पारंपरिक असून कुटुंबकेंद्रित, समुदायप्रधान व परंपरानिष्ठ स्वरूपाची आहे. तथापि, आधुनिकीकरण, शिक्षणाचा प्रसार, स्थलांतर व शासनाच्या विविध योजनांमुळे या सामाजिक रचनेत हळूहळू बदल घडतांना दिसतात.

दुर्गम आदिवासी भागांमध्ये शिक्षणाच्या सुविधांमध्ये काही प्रमाणात वाढ झालेली दिसते. आश्रमशाळा, निवासी शाळा व शिष्यवृत्ती योजनांमुळे शालेय नोंदणी वाढली असली तरी गळतीचे प्रमाण आणि दर्जेदार शिक्षणाचा अभाव व उच्च शिक्षणातील मर्यादा ही गंभीर समस्या अद्याप कायम दिसते. आरोग्याच्या बाबतीत प्राथमिक आरोग्य केंद्रे व सरकारी योजनांमुळे सुविधा वाढल्या असल्या, तरी दुर्गमता, अपुरी साधनसामग्री व आरोग्य जागृतीचा अभाव यामुळे आदिवासी समाजाला अजूनही अनेक अडचणींचा सामना करतांना दिसत आहे. आर्थिक व रोजगाराच्या क्षेत्रात पारंपरिक उपजीविकेपासून मजुरी, शेतीपूरक कामे, शहरांकडे होणारे स्थलांतर अशा बदलत्या प्रवाहांचा अभ्यासातून उलगडा झाला आहे. जंगलाधारित अर्थव्यवस्था कमकुवत होत चालली आहे. स्थिर रोजगाराच्या संधींचा अभाव ही एक मोठी समस्या ठरतांना दिसते. या बदलांना भौगोलिक दुर्गमता, शिक्षणाचा अभाव, औद्योगिकीकरण, शासकीय धोरणे व बाजारव्यवस्थेचा प्रभाव ही कारणे महत्त्वाची ठरतांना दिसतात. एकूणच, आदिवासी समाज पारंपरिकतेतून आधुनिकतेकडे वाटचाल करत असला तरी ही प्रक्रिया असमतोल व आव्हानात्मक होत आहे. सांस्कृतिक ओळखीचा ऱ्हास, आर्थिक असुरक्षितता, शैक्षणिक मागासलेपणा व आरोग्यविषयक समस्या ही प्रमुख आव्हाने समोर येतांना दिसते. त्यामुळे आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक गरजांनुसार धोरणात्मक उपाययोजना, प्रभावी अंमलबजावणी, शिक्षण व कौशल्यविकासावर भर, तसेच त्यांच्या सांस्कृतिक अस्मितेचे जतन करणे अत्यावश्यक महत्वाचे आहे. अशा समन्वित प्रयत्नांतूनच नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण आदिवासी समाजाचा शाश्वत व समतोल विकास साधता येईल, असा निष्कर्ष या संशोधनातून निघत आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१. पाटील. भा. रा. (२०१२) ग्रामीण विकासात अशासकीय संस्थांची भूमिका, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर.
२. देशपांडे स. म. (२०११) सामाजिक कार्य आणि ग्रामीण विकास, प्रशांत प्रकाशन नाशिक.
३. आदिवासी पोषण कार्यक्रम – ग्रामीण विकास मंत्रालय.
४. भारतीय आरोग्य आणि पोषण सर्वेक्षण – भारतीय संस्थांचे अहवाल.
५. "Health, Nutrition and Development among Tribal Communities in India" - आदिवासीसमुदायांमध्येकुपोषण, आरोग्य आणि विकास यावर चर्चा करणारे एक पुस्तक.

# मराठवाड्यातील ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने

**ज्ञानेश्वर शिवाजी आकृपे** समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** भारतातील सामाजिक व आर्थिक विकासात उच्च शिक्षणाची भूमीका अत्यंत महत्त्वाची आहे. तसेच देशाच्या जडणघडणीमध्ये शिक्षणाला महत्त्वाचा दर्जा राहिलेला आहे. विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण हे सामाजिक व उन्नती रोजगाराच्या संधी व जीवनमान उंचावण्यासाठी प्रभावी व महत्त्वाचे साधन ठरते तथापि मराठवाडा विभागातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागत असते. ग्रामीण भागातील आर्थिक मागासलेपणा, शेतीवर अवलंबून असलेली अस्थीर अशी अर्थव्यवस्था व वारंवार येणारे नैसर्गिक संकटे दुष्काळ आणि अपुरी शैक्षणिक पायाभूत संसाधने व मर्यादीत असलेल्या औद्यागिकीरण यांचा थेट परिणाम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी, वाहतूक व निवास इत्यादी सुविधांचा अभाव आणि इंग्रजी भाषेतील अडथळे डिजिटल साधनांचा अभाव तसेच अपुरे मार्गदर्शन व समुपदेशनाच्या अभावाचा परिणाम शैक्षणिक प्रगतीत होतो. या व्यतिरिक्त सामाजिक व सांस्कृतिक घटक विशेषत: पालकांची मर्यादीत शैक्षणिक जाणीव किंवा अशिक्षितपणा आणि मुलींच्या शिक्षणाबद्दल रूढी व पारंपरिक सामाजिक मानसिकता हे देखील ग्रामीण भागातील शिक्षणातील मोठे आव्हाने ठरतात. प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश मराठवाडा विभागातील ग्रामीण विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाशी संबंधीत आहे. विद्यार्थ्यांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व तांत्रिक आव्हानांचा सखोल अभ्यास करणे हा आहे. या अभ्यासाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या समस्यांचे स्वरूप स्पष्ट होऊन त्यांच्या विकासासाठी प्रभावी उपाययोजना व धोरणे सुचवता येतील. ज्यामुळे मराठवाडा विभागातील ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी मदत होईल.

**मुख्य शब्द:** ग्रामीण विद्यार्थी, उच्च शिक्षण, शैक्षणिक आव्हाने, आर्थिक अडचणी, डिजिटल दरी, सामाजिक घटक

**प्रस्तावना:** भारतामध्ये उच्च शिक्षण हे सामाजिक व आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाचे एक प्रभावी व महत्त्वाचे साधन मानले जाते. देशाच्या जडणघडणीमध्ये शिक्षणाला महत्त्वाचा दर्जा राहिलेला आहे. शिक्षणाच्या माध्यमातूनच सामाजिक व आर्थिक आणि

राजकीय विकास होतो. प्रत्येक देशाचा विकास हा तेथील शिक्षण व्यवस्थेवर अवलंबून असतो. शिक्षण व्यवस्थेनुसार त्या देशातील नागरीकांचे व्यक्तीमत्व विकास राहणीमानात व्यवसाय ठरत असतो. शिक्षणाचा दर्जा उच्च असेल तर त्य देशाचा विकास जलद होत असतो. शिक्षणाला प्राचीन काळापासून महत्त्व राहिले आहे. शिक्षणामुळे व्यक्तीच्या जीवनमानात सुधारणा होऊन समाजाच्या सर्वांगिण प्रगतीला चालना मिळते. विशेषत: ग्रामीण भागातील युवक-युवतींसाठी उच्च शिक्षण हे दारिद्र्य बेरोजगारी, सामाजिक विषमता आणि मागसलेपणा यावर मात करण्याचे एक अत्यंत महत्त्वाचे माध्यम ठरते. मात्र प्रत्यक्षात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवासात विविध अडचणी व आव्हानांना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर मराठवाडा विभागातील ग्रामीण भागात उच्च शिक्षण घेण्याचा विद्यार्थ्यांसमोर असलेल्या आव्हानांचा किंवा समस्या व अडथळयांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे. मराठवाडा हा महाराष्ट्रातील ऐतिहासिक भौगोलिक व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा विभाग असून देखील आजही शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मुलतेने मागासलेला असल्याचे मानले जाते. या विभागातील बहुतांश लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असल्याने मोठ्या प्रमाणात शेती व शेतीपूरक व्यवसायांवरच त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. वारंवार येणारे नैसर्गिक संकट, दुष्काळ, अतिवृष्टी व अपुरी सिंचन व्यवस्था व मर्यादीत औद्योगिकरण आणि आर्थिक अस्थितरता यांचा परिणाम थेट ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नावर होतो. याचा परिणाम या ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेण्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनावर होत असतांना दिसून येतो. त्यामुळे अनेकदा आर्थिक व शैक्षणिक व सामाजिक संसाधने अपुरी पडतात.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महाविद्यालये व विद्यापीठापर्यंत पोहचण्यासाठी अंतराचा प्रश्न व अपुरी वाहतूक व्यवस्था निवासासाठी वसतीगृहांची कमतरता तसेच अभ्यास करण्यासाठी अनुकूल वातारणाचा अभाव अशा विविध अडचणींना सामोरे जावे लागते. या शिवाय ग्रामीण भागातील शिक्षण हे मोठ्याप्रमाणात मातृभाषेत असल्यामुळे इंग्रजी भाषेचे मर्यादीत ज्ञान व अद्यायावत तंत्रज्ञान यांचा अभाव, डिजिटल साधनांपर्यंत कमी पोहच व मार्गदर्शन व समुदपदेशनाच्य सुविधांची कमतरता यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर मोठ्या प्रमाणावर प्रतिकुल परिणाम होतो. अनेक वेळा कुटुंबाची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने विद्यार्थ्यांना अधवेळ काम करावे लागते किंवा शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागते. सामाजिक व सांस्कृतीक घटकही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणावर प्रभाव टाळतात. पालकांमधील शिक्षणाविषयी मर्यादित जाणीव, पारंपरिक दृष्टीकोन, विशेषत: मुलींच्या शिक्षणापासून असलेली उदासिनता व मुलींच्या लवकर विवाहाच्या प्रमाण तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्या यांमुळे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. यासोबतच स्पर्धात्मक परिक्षा, शिष्यवृत्ती योजना व शासकीय सवलतींबाबत पुरेशी माहिती नसणे हे देखील एक गंभीर समस्या ठरते. या सर्व पार्श्वभूमीवर मराठवाडा विभागातील ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर असलेल्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व भौगोलिक आव्हानांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते.

भारतात शिक्षणाचा विकास हा स्वातंत्र्यापूर्वी फार कमी होता. महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मोलाचे योगदान दिले. भारतात शिक्षणाचे प्रमाण स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात वाढले. भारतात एकूण ३ वेगवेगळे शैक्षणिक धोरण राबवण्यात आले पाहिजे. शैक्षणिक धोरण १९६८ मध्ये राबविण्यात आले हे कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार राबवण्यात आले. दुसरे शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये राबविण्यात आले. तिसरे शैक्षणिक धोरण २०२० मध्ये राबविण्यात आले होते. भारतीय संविधानात २००२ मध्ये ८६ वी घटनादुरूस्ती करण्यात आली होती. त्यामध्ये शिक्षणाला मुलभूत हक्काचा दर्जात देण्यात आला. भारतीय संविधानात कलम २ (A) समाविष्ट करण्यात आले. त्यामध्ये ६-१४ वर्ष वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचे ठरवण्यात आले. कलम ५१ (A) (K) समाविष्ट करण्यात आले. त्यामध्ये आपल्या पालकांनी आपल्या पाल्यांना ६-१४ वर्ष वयोगटातील मुलांना शिक्षण देणे हे कर्मच टाकण्यात आले.

मराठवाड्यामध्ये दोन विद्यापीठे अस्तित्वात आहेत. त्यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर विद्यापीठाची स्थापना २३ ऑगस्ट १९५८ रोजी करण्यात आली होती हे मराठवाड्यातील पहिले विद्यापीठ होते. उच्च शिक्षणाचा पाया घालणारे मराठवाड्यातील हे पहिले केंद्रबिंदू म्हणून या विद्यापीठाकडे पाहिले जाते. यामध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव या जिल्ह्यांचा समावेश होतो. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठाची स्थापना १७ सप्टेंबर १९९४ रोजी झाली. यामध्ये लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली या चार जिल्ह्यांचा समावेश होतो. मराठवाड्यामध्ये ग्रामीण व शहरी भागामध्ये कृषी व अकृषी महाविद्यालयांची स्थापना झालेली आहे. तसेच हे महाविद्यालये आणि ग्रामीण व शहरी भागामध्ये मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील तंत्रज्ञान क्षेत्रात शिक्षण धोरणाचा विद्यार्थ्यांमध्ये शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत फारच कमी प्रमाण आहे. तसेच ग्रामीण भागात शैक्षणिक पायाभूत सुविधांची कमतरता आहे. त्यामुळे मराठवाड्यातील ग्रामीण भागात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणा समोरील आव्हाने**

**१. आर्थिक अडचणी:** मराठवाड्यातील ग्रामीण भागात कुटुंबे हे मोठ्या प्रमाणात अल्पभुधारक शेतकरी, शेतमजूर अथवा असंघटीत कामगार आहेत व त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादित आणि अनिश्चित असल्याकारणाने त्यांना शिक्षणावरील खर्च झेपणे कठीन होते. प्रवेश शुल्क, वसतीगृह खर्च, प्रवास व पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य याचा आर्थिक भार विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोठ्या प्रमाणात अडथळा ठरतो.

**२. दुष्काळ व पर्यावरणीय समस्या:** मराठवाडा हा वांरवार दुष्काळग्रस्त भाग म्हणून ओळखला जातो. पाणी टंचाई व अपुरा पाऊस आणि शेतीवर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था यामुळे कुटुंबांची आर्थिक स्थिती कमकुवत होतो. अशा परिस्थितीमुळे अनेक उच्च शिक्षण घेणचा विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते. किंवा कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी काम करावे लागते. दुष्काळाच्या काळात स्थलांतर वाढते आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडतो.

**३. भौगोलिक अडचणी व वाहतूक समस्या:** मराठवाड्यातील महाविद्यालये तसेच विद्यापीठ तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन झालेले असतात. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते. यामुळे त्यांचे शिक्षण हे प्रवासामुळे वेळखाऊ व खर्चीक बनते. त्यांना प्रवासामध्ये अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ग्रामीण भागातील मुलींना वळवळणाच्या विकासाच्या अभाव तसेच मुलींच्या सुरक्षिततेचा अभाव यामुळे त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो.

**४. शैक्षणिक पायाभुत सुविधांचा अभाव:** मराठवाड्यातील ग्रामीण भागात स्थापन झालेल्या महाविद्यालयाचे प्रयोगशाळा, संगणक कक्ष, इंटरनेट सुविधा ग्रंथालय इत्यादी गोष्टींचा अभाव आहे. बऱ्याच ठिकाणी प्रशिक्षित व योग्य मार्गदर्शकांचा व शिक्षकांचा अभाव या सर्व गोष्टींचा प्रभाव हा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर पडत असतो. या सर्व गोष्टींचा परिणाम शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण व भागातील विद्यार्थी हे स्पर्धेमध्ये मागे पडत असतात.

**५. शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शनाचा अभाव:** उच्च शिक्षण घेत असताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शनाचा अभाव असल्याचे दिसून येते. त्यांना उच्च शिक्षण घेत असताना करिअरच्या कोणकोणत्या संधी आहेत. त्यांना मिळत असलेल्या शासकीय योजनांबद्दल माहितीचा अभाव संशोधन मिळणाऱ्या संधी याविषयी पुरेशी माहिती मिळत नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना योग्य मार्गदर्शनाचा अभाव दिसून येतो. यामुळे त्यांच्या क्षमतेनुसार योग्य अभ्यासक्रम निवडण्यास अडथळे निर्माण होतात.

**६. सामाजिक व सांस्कृतिक अडथळे:** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आजही शिक्षण घेत असताना समाजातील पारंपरिक रूढी ग्रामीण भेदभाव लैंगिक असमानता अशा समस्यांना सामोरे जावे लागते. तसेच ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण घेत असताना बालविवाह सारख्या समस्यांना सामोरे जावे लागले. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलीला उच्च शिक्षणापासून दूर राहावे लागते.

**संशोधन साहित्याचा आढावा: शिक्षण आयोग (१९६४-६६)** कोठारी शिक्षण आयोगात शिक्षणात असलेली प्रादेशिक असमानता व ग्रामीण भागातील शैक्षणिक सोयी सुविधा यांचा अभाव याकडे वेधले गेलेले दिसून येते. कोठारी आयोगाच्या मते ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणापर्यंत समान संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. **डॉ. एस. एन. पाटील (२०१२)** यांनी केलेल्या अभ्यासात ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांमध्ये मोठ्याप्रमाणात तफावत असल्याचे आढळून आली आहे. यांच्या संशोधन अभ्यासातून आर्थिक परिस्थिती योग्य मार्गदर्शनाचा अभाव तसेच मातृभाषेतील शिक्षणाचा परिणाम यामुळे इंग्रजी भाषेतील अडचणी या ग्रामीण विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणातील प्रमुख समस्या आहेत. **नारायण तुकाराम कांबळे (२०१३)** उच्च शिक्षणापुढील आव्हाने या पुस्तकामध्ये उच्च शिक्षणासंबंधी समस्या मांडलेल्या आहेत. तसेच २१ व्या शतकातील उच्च शिक्षणाचे उत्तरदायित्व स्पष्ट केले ओह. उच्च शिक्षणाचे बदलते प्रवाह मराठवाड्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील विकास या संबंधीची माहिती स्पष्ट केले आहे. तसेच मराठवाड्यातील उच्च शिक्षणासाठी महाविद्यापयीन शिक्षकांची भूमिका स्पष्ट केली आहे. **डॉ. बी. टी. पवार (२०१५)** यांनी मराठवाडा विभागातील उच्च शिक्षणाचा अभ्यास करताना असे निदर्शनास आणले की, मराठवाडा विभाग ही आर्थिक मागासलेपणा व दुष्काळी भाग असून या भागातील कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कमकुवत असते त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनावर होतो अनेक विद्यार्थ्यी या काळाने शिक्षण अर्धवट सोडताना दिसून येतात. **डॉ. शिंदे (२०१८)** यांनी ग्रामीण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समस्या या संशोधन अभ्यासात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव असल्याचे स्पष्ट केले आहे. यात वाहतुकीच्या सुविधा, वसतीगृह व निवासाचा मोठ्या प्रमाणात अभाव असल्याचे स्पष्ट केले. तसेच डिजिटल माध्यमांचा अभाव इत्यादी प्रकारच्या समस्या नमुद केल्या आहेत.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:** मराठवाड्यातील ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने याचा अभ्यास करणे. मराठवाड्यातील ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या समस्यांचा आढावा घेणे. मराठवाड्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोरील आव्हानांची कारणे आणि परिणामांचो विश्लेषण करणे.

**संशोधनाची गृहितके:** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण घेत असताना पारंपरिक रूढी या समस्यांना सामोरे जावे लागते. मराठवाडा विभागातील ग्रामीण विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणावर आर्थिक स्थितीचा प्रभाव दिसून येतो. ग्रामीण व शहरी भागातील उच्च शिक्षणाच्या सुविधांचे लक्षणीय संस्थात्मक असमानता आढळून येते. मराठवाड्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणावर संरचनात्मक विषमतेचा मोठ्या प्रमाणात परिणाम दिसून येतो. ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणावर लिंगभेद व पारंपरिक समाजरचना हा प्रमुख अडथळा ठरतो.

**संशोधन पद्धती:** कोणत्याही संशोधनात अध्ययन करीत असताना ते वैज्ञानिक पद्धतीने होणे खूप महत्त्वाचे ठरते. त्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन हे दुय्यम स्त्रोतांवर आधारित असून प्रकाशित, अप्रकाशित आणि अप्रकाशित ग्रंथ, पुस्तके, मासिके, नियतकालिके व शासकीय अहवाल व इंटरनेट संकेतस्थळांचा वापर प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात आला आहे.

**निष्कर्ष:** मराठवाड्यातील ग्रामीण भागामध्ये शिक्षणसंस्थाची मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासमोरील आव्हाने कमी झाले. तसेच ग्रामीण भागातील तरूणांमध्ये उच्च शिक्षणात प्रमाण वाढल्यामुळे त्यांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीमध्ये मोठा बदल झालेला दिसून येतो. ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे त्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी विविध अडथळे निर्माण होत असल्याचे दिसून येतील. ग्रामीण भागामध्ये योग्य प्राध्यापकांची कमतरता असल्यामुळे शिक्षणात अडथळे येतात. तसेच योग्य मार्गदर्शक व मार्गदर्शनाचा अभाव असल्या कारणाने ग्रामीण विद्यार्थ्यासमोर उच्च शिक्षणासंदर्भात आव्हाने निर्माण होतात.

**संदर्भ सूची**

१. धनागरे द. ना. २०१०. उच्च शिक्षण ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे, प्रभादेवी प्रकाशन, मुंबई.
२. घाटोळे रा. ना. १९९४. ग्रामणी समाजशास्त्र व समुदाय विकास, अथर्व पब्लिकेशन, जळगाव.
३. पारसनीस न. रा. २०२२. शिक्षणची तात्वीक व समाजशास्त्रीय भूमिका, नुतन प्रकाशन पुणे.
४. नारायण तु. कांबळे, २०१३. उच्च शिक्षणापुढील आव्हाने, चिन्मय प्रकाशन (औरंगाबाद) छत्रपती संभाजीनगर.
५. कायत वसुधा, १९९३. भारतीय शिक्षण, नुतन प्रकाशन पुणे.

# भिल्ल जमातीच्या विवाहाचे बदलते स्वरूप - एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. सुनिल अजाबराव पाटील** समाजशास्त्र विभाग उत्तमराव पाटील कला, विज्ञान महाविद्यालय, दहिवेल. ता. साक्री जि. धुळे.
**प्रा. गावित हरिदास जकु** समाजशास्त्र विभाग, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर.

**गोषवारा:** भिल्ल समाज हा महाराष्ट्रातील एक प्राचीन, आदिवासी संस्कृतीने समृद्ध जमात आहे. कुटुंब व विवाह व्यवस्था या त्यांच्या जीवनातील मुख्य सामाजिक संस्था आहेत. परंपरेपासून आजपर्यंत बदलत्या सामाजिक-आर्थिक, शैक्षणिक व संपर्क वाढीमुळे भिल्ल विवाह पद्धतीत लक्षणीय बदल दिसून येत आहेत. नंदुरबार जिल्हा हा महाराष्ट्रातील भिल्ल लोकसंख्येचा महत्त्वाचा घटक असलेल्या भागांपैकी एक आहे. प्रस्तुत अभ्यासात भिल्ल जमातीच्या पारंपरिक विवाह पद्धती, त्यामध्ये झालेले बदल, त्यामागील कारणे व परिणाम यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनातून असे निष्पन्न झाले की शिक्षण, शहरीकरण, आर्थिक स्वावलंबन आणि बाह्य सामाजिक संपर्क यांमुळे विवाहाच्या स्वरूपात लक्षणीय बदल घडून येत आहेत. असे असले तरी परंपरा अजूनही मोठ्या प्रमाणावर जपल्या जात आहेत.

**प्रस्तावना:** भारतीय समाज हा विविध जाती, जमाती, भाषा आणि संस्कृतींनी नटलेला आहे. या समाजरचनेत आदिवासी समाजाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भिल्ल जमात ही भारतातील सर्वात प्राचीन आदिवासी जमातींपैकी एक असून महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान व मध्यप्रदेशात ती आढळते. महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्हा हा भिल्ल समाजाचा प्रमुख केंद्रबिंदू मानला जातो.

विवाहावरचा अभ्यास म्हटले की समाजशास्त्र व सामाजिक-मानवशास्त्र या ज्ञानशाखांनी हा विषय अभ्यासतांना कुटुंबातील सत्तासंबंध त्यामधले अर्थकारण, विवाहातील स्थित्यंतर, विवाह व्यवहारात होणारे परिवर्तन या घटकांना किती प्रमाणावर चर्चेमध्ये आणले हे पाहणे आवश्यक वाटते. कारण विवाह अभ्यासाचा जर विचार केला तर स्वातंत्र्योत्तर भारतातील समाजशास्त्रात ब्रिटीशांनी आखून दिलेल्या मार्गाचा वापर करून व मानवशास्त्राचा सामाजिक व सांस्कृतिक सूत्रांना घेउन विशेषतः बी. मॅलीनॉस्कीच्या उपयुक्तवादातील सांस्कृतिक वैशिष्टयांना आत्मसात करून विवाहाचा अभ्यास झाल्याचे दिसते. (भागवत रेगे: १९९३) त्यामुळे या अभ्यासात प्रस्थापित जात, वर्ग समूहाचा इतिहास प्रामुख्याने पुढे आला. यामध्ये आदिवासी समूहाच्या विवाह व्यवहारांना, त्यांच्या कुटुंबातील सत्तासंबधाना प्रामुख्याने दुर्लक्षित केलेले दिसते. मानवशास्त्रामध्ये आदिवासी जमातीच्या सांस्कृतिक व्यवहारांचे वर्णन मोठ्या प्रमाणावर केले आहे, परंतु या सांस्कृतिक व्यवहारांचे समाजशास्त्रीय विश्लेषण मात्र पुरेसे झाले नाही. तसेच आदिवासी कुंटुंबप्रमुख नावाच्या पडदयाआड दुर्लक्षीत राहिलेल्या स्त्रिया व त्यांचे दैनंदिन जीवनातले अनुभव यांचा वेध घेणे आवश्यक वाटते. १९७० नंतर स्त्रीवादी समाजशास्त्राने विवाहातील 'हुंडा' या व्यवहारावर अधिक लक्ष केंद्रित करून त्याचा स्त्रीजीवनावर पडणारा प्रभाव दाखवून दिला त्यामूळे समाजशास्त्र व मानवशास्त्रासारख्या 'विशेष' ज्ञानशाखांचा व स्त्रीवादी ज्ञानक्षेत्राचा समन्वय साधून आदिवासी समाजातील भिल्ल जमातीच्या विवाहनिगडीत व्यवहारांचे लिंगभावाच्या गुंतागुंतीतून स्थित्यंतर पाहण्याच्या उद्देशाने शोध निबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे. भिल्ल समाजातील विवाह व्यवस्था ही केवळ दोन व्यक्तींमधील नातेसंबंध नसून ती संपूर्ण समाजाच्या सांस्कृतिक परंपरांचे प्रतीक आहे. पूर्वी विवाह हे समाजनियम, परंपरा आणि कुटुंबीयांच्या संमतीने ठरवले जात असत. परंतु आजच्या बदलत्या काळात शिक्षण, रोजगार, स्थलांतर आणि आधुनिक विचारसरणीमुळे विवाह पद्धतीत बदल होत आहेत. त्यामुळे या बदलांचा अभ्यास करणे समाजशास्त्रीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत संशोधन हे नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल जमातीच्या विवाहासंबंधित आहे. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल आदिवासी जमाती पुरतेच मर्यादित आहे.

**पूर्व साहित्य आढावा:** प्रस्तुत शोध प्रबंधासाठी विविध साहित्यांचा विशेष आढावा घेण्यात आला आहे. गारे गोविंद- "सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा" सदर ग्रंथात लेखकाने सातपुड्याच्या पायथ्याशी राहणाऱ्या आदिवासी भिल्लांचे सविस्तर विश्लेषण केले आहे. त्यांचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, अशा बाबतीत विवेचन करण्यात आलेले आहे. त्यातून सदर संशोधन लेखास उपयुक्त संदर्भ मिळालेला आहे. नाडगोडे गुरुनाथ - "भारतीय आदिवासी" या ग्रंथात लेखकाने आदिवासी कोणाला म्हणावे? प्रमुख जमाती, आदिवासी सामाजिक संस्था, रुढी परंपरा, अर्थव्यवस्था इ. विविध बाबींचा अभ्यास करून आदिवासी जमातींबाबत योग्य ती माहिती दिलेली आहे. कोठावदे सुधीर - "मावची बोली, समाज संस्कृती" या ग्रंथात महाराष्ट्रातील भिल्ल, गोंड, कोरकू, महादेव कोळी, कातकरी, वारली ठाकर इ. विविध जमातींचा परिचय करून दिल्याने संशोधनाला उपयुक्त संदर्भ म्हणून उपयोग झाला. वसावे अ. ध. - "आदिवासी माणसाची कहाणी" सदर ग्रंथ हा आत्मचरित्रपर असल्याने स्वत: लेखक भिल्ल जमातीचे असल्यामुळे अतिशय मौलिक आणि विषयाला अनुसरून संदर्भ म्हणून संशोधनाची गती आणि विस्तार करण्यासाठी मदत झाली. पावरा के. ए. - "सातपुड्यातील आदिवासी संस्कृती" या ग्रंथामध्ये आदिवासी विवाह पध्द्ती, विवाहाचे प्रकार, चालीरिती, कौटुंबीक जीवन इ. बाबतीत योग्यते मार्गदर्शन केलेले आहे त्यामुळे सदर संशोधन लेखास उपयुक्त संदर्भ मिळालेला आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टे:** भिल्ल जमातीतील पारंपरिक विवाह पद्धतींचा अभ्यास करणे, विवाह व्यवस्थेत झालेल्या सामाजिक बदलांचे विश्लेषण करणे, शिक्षण व आर्थिक स्थितीचा विवाहावर होणारा प्रभाव समजून घेणे, नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल समाजाच्या विवाहातील बदलांचा अभ्यास करणे, अशा प्रकारे विविध अध्ययनाचे उद्देश डोळ्यासमोर ठेऊन संशोधन प्रबंधाचे लिखाण केले आहे.

**गृहितके:** कोणत्याही संशोधनातील अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे गृहीतके होय. या गृहितकांमुळे संशोधनाला गती आणि दिशा प्राप्त होण्यास मदत होते. प्रस्तुत संशोधनात खालीलप्रमाणे काही गृहितके घेऊन अध्ययन करण्यात आले आहे.

१) भिल्ल समाजातील विवाह पद्धतीत आधुनिकतेमुळे बदल होत आहेत.

२) शिक्षणाचा स्तर वाढल्याने विवाह निर्णयात युवक-युवतींचा सहभाग वाढला आहे.

३) आर्थिक परिस्थितीचा विवाहाच्या स्वरूपावर परिणाम होतो.

४) नंदुरबार जिल्ह्यात परंपरा व आधुनिकता यांचा संमिश्र प्रभाव दिसून येतो.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधन क्षेत्र हे आदिवासी बहुल भाग असल्याकारणाने लिखित साहित्याचा अभाव आहे त्यामुळे मौखिक इतिहास, सहभागी निरीक्षण, मुलाखत अनुसूची, लोकलेखा पद्धत इत्यादी पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**भिल्ल जमातीतील पारंपरिक विवाह पद्धती:** नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी भिल्ल जमातीमध्ये अनेक कुळे आहेत. नाईक, पाडवी, वळवी, गावित, कोकणी, मावची, कुवर, कोटवाल, राऊत, देसाई, पावरा, वसावे इत्यादी कुळांची आडनावे आहेत, या सर्व कुळांमध्ये मुला मुलींचे विवाह होतात. भिल्ल जमाती मध्ये मामाच्या मुलीशी लग्न करण्याची पद्धत आहे. परंतु मावस बहिणीशी लग्न करण्यास मनाई आहे. बोलणी करून लग्न जुळणे, वराला दत्तक घेऊन किंवा घरी सेवा देऊन लग्न करणे म्हणजेच घर जावई पद्धत, दोघांच्या होकारातून पळून जाऊन विवाह करणे आणि एखाद्यावेळेस जर मुलगी पसंत पडली पण त्यांच्या घरून किंवा मुलीने नकार दिल्यावर बाजारातून, होळीच्या सणाला, यात्रेतून किंवा इतरांच्या लग्न समारंभातून जबरदस्तीने घेऊन जाणे अशा विविध प्रकारे विवाह जुळविले जातात.

भिल्ल जमातीचे विवाह म्हणजे आजूबाजूच्या सर्व गाव, पाड्यांचा मोठा उत्सवच असतो. निमंत्रण दिले असले - नसले, नातेवाईक असो- नसो सर्वच लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात लग्न सोहळ्याचे चार दिवस महत्त्वाचे असतात. लग्नात दिला जाणारा हुंडा म्हणजेच देज / दहेज हा वर पक्षाकडून वधूपित्याला देण्याची प्रथा आहे. ही रक्कम अगोदर रु. २५१ ते रु. ५५१ पर्यंत होती आज साधारण पणे रु. १००५१ते रु. २००५१ पर्यंत दिली जाते. लग्नासाठी कोणतेही मुहूर्त पाहिले जात नाही शनिवार किंवा अमावस्या असेल तर त्यादिवशी लग्न लावले जात नाही. लग्नविधीसाठी स्वतंत्र व्यक्ती असते त्याच्याकडून लग्न पुजा केली जाते. या संपूर्ण लग्नविधी मध्ये निसर्ग पूजेला अधिक महत्त्व दिले जाते. प्रत्येक विधीमध्ये दारूचा उपयोग केला जातो. आदिवासी भिल्ल जमातीच्या चालीरीतीनुसार त्यांच्यात एक पत्नीत्वाची व प्रौढ विवाहाची पद्धती रूढ आहे. वधू-वरांचे विवाह वडीलधाऱ्या मंडळींच्या संमतीने होतात विवाहाच्या वेळी पारंपारिक नृत्य गायनाचा आनंदोत्सव साजरा केला जातो. त्यांच्यात विधवा विवाहालाही मान्यता आहे. नवरा बायको एकत्र नांदण्यास राजी नसतील तर काडीमोड म्हणजेच घटस्फोट घेण्याची मोकळीक असते पत्नीच्या मृत्यूनंतर भिल्ल पुरुष त्याच्या पत्नीच्या लहान बहिणीशी लग्न करू शकतो परंतु ते ऐच्छिक असते.

भिल्ल लोकांमध्ये एक पत्नीत्व व बहुपत्नीत्व या पारंपारिक प्रथा प्रचलित असल्या तरी बायकांना अनेक पुरुषांशी विवाह करण्यास मनाई आहे. नंदुरबार जिल्ह्यातील भिल्लांची पारंपारिक लग्न पद्धती अतिशय मनोरंजक अशी आहेत. प्रेम विवाह फार पूर्वीपासून प्रचलित आहे जर वधू वर दोघांचे नातेवाईक, आई-वडील हे लग्नाला नकार देत असतील तर दुसऱ्या गावी आपल्या नातेवाईकांकडे पळून जाऊन विवाह करण्याची प्रथा भिल्ल समाजात आहेत. अशी प्रकरणे झगडा पद्धतीने मिटवली जातात यालाच 'झगडा मोडणे 'असे म्हणतात. अशा प्रकरणांमध्ये गावाच्या परंपरेनुसार ठरलेली रक्कम पाच पंचांसमोर मुलाच्या वडिलांना द्यावी लागते. ही रक्कम संमतीने होणाऱ्या विवाहापेक्षा अधिक घेतली जाते. याबाबतीतील संपूर्ण नोंदी गावाचा प्रमुख पाटील असतो त्याच्या दप्तरात केल्या जातात. भिल्ल जमातीचे विवाह म्हणजे आजूबाजूच्या सर्व गाव-पाड्यांचा मोठा उत्सवच असतो. लग्न सोहळ्याचे चार दिवस खूप आनंदाचे असतात. ज्या घरी विवाह असतो, त्यांना शेजारी, नातेवाईक, गावकरी सामुहिकपणे लग्न सोहळा पार पाडण्यासाठी सहकार्य करीत असतात. महिला अंगभर चांदीचे दागिने घालून मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. भिल्ल विवाहात सूर्य, पृथ्वी, वृक्ष इ. म्हणजेच निसर्ग पूजेला अधिक महत्त्व दिले जाते.

**आधुनिकतेमुळे भिल्ल विवाह पद्धतीत होणारे बदल:** परंपरागत भिल्ल समाजात विवाह हे कुटुंबीय व समाजाच्या संमतीने ठरविले जात असत. बालविवाह, वधूमूल्याची प्रथा, साधे विवाहसोहळे आणि पारंपरिक विधी यांना विशेष महत्त्व होते. मात्र आधुनिकतेच्या प्रभावामुळे बालविवाहाचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. विवाहाचे वय वाढले असून कायदेशीर नियमांचे पालन होत आहे. विवाह समारंभात आधुनिक साधनसामग्री, संगीत, सजावट यांचा समावेश वाढला आहे. काही ठिकाणी नोंदणी विवाह देखील स्वीकारले जात आहेत. यावरून असे स्पष्ट होते की आधुनिकतेमुळे भिल्ल विवाह संस्थेचे स्वरूप हळूहळू बदलत आहे.

**शिक्षणामध्ये युवक-युवतींचा सहभाग वाढला:** शिक्षणाच्या प्रसारामुळे भिल्ल समाजात सामाजिक जाणीव निर्माण झाली आहे. शिक्षणाचा थेट परिणाम विवाह निर्णय प्रक्रियेवर दिसून येतो. २०११ च्या आकडेवारीनुसार नंदुरबार जिल्ह्याची एकूण साक्षरता दर ५५. ८% आहे. शासनाच्या विविध योजनांमुळे उदा. शासकीय आश्रम शाळा, शिष्यवृत्ती योजना, मोफत बस प्रवास, सक्तीचे आणि मोफत शिक्षण इत्यादी सुविधांमुळे आदिवासी क्षेत्रात शिक्षणाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. त्यामुळे युवक-युवती स्वतःच्या विवाहाविषयी मत मांडू लागले आहेत. प्रेमविवाह किंवा परस्पर संमतीने विवाहाचे प्रमाण वाढत आहे. मुलींच्या शिक्षणामुळे विवाहाचे वय पुढे ढकलले जात आहे. विवाहात समानता, समजूतदारपणा व वैयक्तिक पसंतीला महत्त्व दिले जात आहे. शिक्षणामुळे विवाह हा केवळ सामाजिक बंधन न राहता वैयक्तिक निर्णयाचा भाग बनत आहे.

**आर्थिक परिस्थितीचा विवाहाच्या स्वरूपावर परिणाम:** नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल समाजाची आर्थिक परिस्थिती प्रामुख्याने शेती, मजुरी व स्थलांतरावर अवलंबून आहे. आर्थिक परिस्थितीनुसार विवाहाच्या स्वरूपात फरक दिसून येतो. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये आजही साधे व कमी खर्चाचे विवाह केले जातात. आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबांमध्ये खर्चिक विवाह समारंभाचे प्रमाण वाढत आहे. शहरांशी संपर्क आल्याने विवाहात शहरी संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. वधूमूल्याची प्रथा काही ठिकाणी कमी होत चालली आहे, तर काही गावांमध्ये चालुच आहे. त्यामुळे आर्थिक घटक हा विवाह संस्थेतील बदलाचा महत्त्वाचा घटक ठरतो.

**परंपरा व आधुनिकता यांचा संमिश्र प्रभाव:** नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल समाजात आज विवाहसंस्थेवर परंपरा आणि आधुनिकता या दोन्हींचा प्रभाव दिसून येतो. पारंपरिक विधी, लोकदेवता, लोकसंगीत व नृत्य यांचे महत्त्व आजही टिकून आहे. त्याचबरोबर आधुनिक पोशाख, कायदेशीर नोंदणी, शिक्षणाचा प्रभाव स्वीकारला जात आहे. यामुळे विवाहसंस्थेत संमिश्र स्वरूप निर्माण झाले असून समाज बदल स्वीकारत असतानाच आपल्या सांस्कृतिक मुळांशी नाते टिकवून आहे. शिक्षण, कायदे आणि सरकारी हस्तक्षेपामुळे बालविवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले आहे. विशेषतः मुलींच्या बाबतीत विवाहाचे वय वाढले आहे. पूर्वी काही भागांत बहुपत्नी विवाह आढळत होते. आधुनिक कायदे, आर्थिक दबाव आणि सामाजिक बदलामुळे एकपत्नी प्रथा अधिक स्वीकारली जात आहे. पारंपरिक काळात वधूमूल्य प्रथा होती. आधुनिकीकरणामुळे काही ठिकाणी हुंडा किंवा खर्चिक विवाह समारंभाचा प्रभाव वाढलेला दिसतो, जो भिल्ल समाजाच्या मूळ परंपरा विरोधी आहे. शिक्षण व रोजगाराच्या संधींमुळे स्त्रियांचे निर्णयस्वातंत्र्य वाढले आहे. जरी सर्वत्र समान स्थिती नसली तरी विवाह निवडीमध्ये त्यांचा आवाज आता अधिक ऐकला जातो.

**निष्कर्ष:** सदर अभ्यासातून असे निष्पन्न होते की नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल समाजातील विवाहसंस्था ही बदलाच्या प्रक्रियेत आहे. आधुनिकता, शिक्षण आणि आर्थिक परिस्थिती यांमुळे विवाहाच्या स्वरूपात लक्षणीय बदल झाले आहेत. तथापि, परंपरागत मूल्ये व सांस्कृतिक ओळख पूर्णतः नष्ट न होता त्या आधुनिकतेशी समन्वय साधताना दिसतात. त्यामुळे भिल्ल समाजातील विवाहसंस्था ही परंपरा व आधुनिकता यांचा संतुलित संगम दर्शविते.

**संदर्भ सूची:**

नाडगोंडे, गु. (२०१२) . भारतीय आदिवासी. पुणे.
फडके, सु. (१९६३) . महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न. पुणे.
पाटील, भि. ना. (n.d.) . खानदेश मधील समाजप्रबोधनाची चळवळ (१९००—१९५०) .
कुलकर्णी, शौ. (२०११) . महाराष्ट्रातील आदिवासी. पुणे.
कोठावदे, सु. (२०००) . मावची बोली समाज आणि संस्कृती.
देवगावकर, शै. (२००१) . आदिवासी विश्व.
गारे, गो. (२०००) . महाराष्ट्रातील आदिवासी जमाती. पुणे.
देवगावकर, शै. (१९९३) . महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य.
गारे, गो. (n.d.) . सातपुड्यातील भिल्ल: ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा. पुणे.
वर्मा, आ. सी. (२००१) . भारतीय समाज: काल, आज आणि उद्या.
वसावे, अ. ध. (२०१९) . आदिवासी माणसाची कहाणी. अथर्व पब्लिकेशन.
पावरा, के. ए. (२०२४) . सातपुड्यातील आदिवासी संस्कृती. अथर्व पब्लिकेशन.
म्हैसेकर, प्र. (२०१७) . विवाह विधीचा इतिहास. चिन्मय प्रकाशन.

# मराठवाड्यातील वैदू जमात एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा)

**प्रो. डॉ. दिगंबर एम. तंगलवाड** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा, महाराष्ट्र

**शोध सारांश:** भारतीय समाज हा विविध जातीमध्ये विभागलेला समाज असून भारतात ६००० पेक्षा जास्त जाती उपजाती आहेत. भारतात सर्वत्र अनेक जाती प्रमाणेच भटक्या जमातीची संख्या देखील आहे. महाराष्ट्रातील वैदू समाज हा पारंपारिक औषधी वनस्पती कंदमुळे आणि जंगली झाडपाल्यापासून उपचार करणारा भटक्या जमातीमध्ये मोडणारा समाज आहे. हा समाज जंगलातील दुर्मिळ वनस्पती गोळा करून गावोगावी जाऊन विविध आजारावर ते देशी औषधी उपाय करतात. जुन्याकाळी वैदू समाज डोंगर कपाऱ्यातून औषधी मुळे, नाग मुळे, मध आणि इतर नैसर्गिक औषधे गोळा करून त्याच्यावर प्रक्रिया करून उपचार करत असत. हा समाज महाराष्ट्रामध्ये नोमेडीक ट्राईब म्हणून ओळखला जातो. हे लोक आर्थिक दृष्ट्या अतिशय मागासलेले असून औषधी विकून आपला उदरनिर्वाह करतात. पूर्वी ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत असतात परंतु आता ते स्थायी होत असून काही ठिकाणी ते स्थिरावलेले दिसून येतात. या समाजाची स्वतंत्र जात पंचायत असते जुन्याकाळी सामाजिक नियमांचे पालन करण्यासाठी ही जातपंचायत अतिशय महत्त्वाची होती. हा समाज महाराष्ट्रभर विखुरलेला असून प्रामुख्याने ग्रामीण भागात व शहरांच्या वेशीवर यांची वस्ती असल्याचे दिसते. प्रस्तुत अध्ययन हे वैदू समाजाशी संबंधित असून नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर. कंधार व निवघा बाजार या ठिकाणी ही जमात जास्त प्रमाणात असल्याने या जमातीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यासाठी वैदू समाजाचे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक जीवन तसेच त्यांचे मागासले पण या संदर्भातील अध्ययन प्रस्तुत संशोधनामध्ये करण्यात आलेले आहे.

**संकल्पनात्मक शब्द:** वैदू जमात, मागासलेपण, सामाजिक परिवर्तन, खाजगीकरण, जागतिकीकरण

**प्रस्तावना:** भारतीय समाज हा विविध जाती जमातीमध्ये विभाजित झालेला आहे. भारतात ६००० पेक्षा अधिक जाती आणि उपजाती आहेत. भारतात सर्वत्र अनेक जातीप्रमाणेच भटक्या जमातीची संख्या देखील मोठ्या प्रमाणात आहे महाराष्ट्रातील मराठवाडा विभागामध्ये देखील भटक्या विमुक्त जमाती बहुसंख्येने आढळतात ज्याचा उल्लेख “Nomedic tribes" (N.T. ) असा केला जातो. भटक्या जमातीमध्ये अनेक जमाती आहेत त्यापैकीच वैदू ही एक देखील मराठवाड्यातील भटकी जमात आहे. तेव्हा भटक्या जमातीचे आकलन करण्यासाठी वैदू ही भटकी जमात नेमकी कोण आहे? त्यांच्या प्रथा, परंपरा, व्यवसाय, संस्कृतीचे अध्ययन करण्याच्या हेतूने संशोधनासाठी प्रस्तुत विषय निवडलेला आहे.

वैदू या जमातीला 'तेलगू मंदूवाले' किंवा 'रामकुंडली' असे म्हणतात हे मूळचे आंध्र प्रदेशातील असून आपले पारंपरिक व्यवसाय करीत ते महाराष्ट्रामध्ये स्थायिक झालेले आहेत. ही जमात मराठवाड्यातील नांदेड हिंगोली परभणी, बीड लातूर व विदर्भातील अमरावती या जिल्ह्यात ही मोठ्या प्रमाणामध्ये आढळून येते. तसेच विदर्भ व खानदेशातही ही जमात दिसून येते. नांदेड जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने हादगाव तालुक्यातील निवघा बाजार अर्धापूर व कंधार येथे ही भटकी जमात आढळून येते. त्यांची मूळ भाषा तेलुगु असून ते व्यवसायाच्या निमित्त विविध ठिकाणी विखुरलेले आहेत त्यांची बोली संमिश्र स्वरूपाची बनली आहे, वैदू ही एक भटकी जमात असून भटक्या जमातीची अ, ब, क असे तीन प्रवर्गात विभाजन झालेले आहे त्यापैकी 'क' वंजारी व तत्सम या प्रवर्गामध्ये वैदू ही भटकी जमात मोडली जाते म्हणून या जमातीच्या प्रवर्गाचा उल्लेख एन टी - ३ असाही करतात. १९९० च्या अध्यादेशाप्रमाणे एन टी - ३ या भटक्या जमातीच्या प्रवर्गाला महाराष्ट्रात दोन टक्के आरक्षण जाहीर करण्यात आलेले आहे.

**संशोधनाचे उद्देश:** १) वैदु जमातीचा शिक्षण विषयक दृष्टिकोन जाणून घेणे, २) वैदू जमातीच्या आर्थिक जीवनाचा अध्ययन करणे, ३) वैदू जमातीच्या राजकीय क्षेत्रातील सहभागाचे अध्ययन करणे, ४) वैदु जमातीचा, धर्म, विवाह पद्धती व जातपंचायतीचे स्वरुपाचे अध्ययन करणे, ५) जागतिकीकरण व खाजगीकरणाचा वैदू जमातीच्या व्यावसायिक व शैक्षणिक जीवनावर पडलेल्या प्रभावाचे अध्ययन करणे.

**अभ्यासाची गृहीतके:** १) वैदू जमातीचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन उदासीन आहे. २) वैदू जमातीचे आर्थिक जीवनमान कनिष्ठ प्रतीचे आहे. ३) वैदू जमात राजकीय क्षेत्रातील सहभागा विषयी उदासीन आहे. ४) वैदू जमातीमध्ये अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर असून विवाह व धार्मिक कार्यावर जातपंचायतीचा प्रभाव आहे. ५) जागतिकीकरणाच्या व खाजगीकरणाच्या स्पर्धेत वैदू जमात व्यावसायिक व शैक्षणिक क्षेत्रात आपले अस्तित्व टिकवू शकणार नाही. ६) वैदू जमातीच्या व्यावसायिक, शैक्षणिक आणि राजकीय उन्नतीला खीळ बसत आहे.

**अभ्यासाचे महत्त्व: “मराठवाड्यातील वैदू जमात एक समाजशास्त्रीय अध्ययन विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”** हा विषय निवडण्याचे कारण म्हणजे मराठवाड्यामध्ये ही जमात सर्व ठिकाणी आढळून येते तसेच नांदेड जिल्ह्यामध्ये ही जमात दिसून येते संख्येने कमी असणारी ही जमात स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतर सुद्धा समाजाच्या मुख्य प्रवाहात आलेली नाही. अंधश्रद्धेचा पगडा अस्थिर व भटके जीवन व्यावसायिक व सामाजिक असुरक्षितता, व्यसनाधीनता, शिक्षणाचा अभाव, राजकीय निष्क्रियता यामुळे या भटक्या जमातीत सर्वच क्षेत्रात मागासले पण दिसून येते. शासन दरबारी भटक्या जमातीच्या आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी अनेक योजना राबविण्यात येतात परंतु त्यांच्यात दोषपूर्ण अंमलबजावणी असल्यामुळे वैदू जमात आजही विकासापासून व सामाजिक परिवर्तनापासून दूर आहे. त्यांच्या अनेक समस्या आहेत, तेव्हा वैदू जमातीच्या मागासलेपणाचा अभ्यास होणे ही काळाची गरज आहे. वैदू जमातीच्या मागासलेपणाची कारणे व समस्या जाणून घेऊन त्या समस्यांची सोडवणूक करण्याच्या हेतूने निश्चितच प्रयत्न केल्यास त्यांच्या जीवनमानात सुधारणा होऊ शकते. या दृष्टिकोनातून प्रस्तुत संशोधनाचा विषय हा अभ्यासासाठी निवडण्यात आलेला आहे.

**संशोधन आराखडा:** प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन आराखड्याच्या प्रकारापैकी अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आलेला आहे अन्वेषणात्मक संशोधन आराखड्यासंबंधी विद्वान डी. कॉटझ म्हणतात की, अन्वेषणात्मक अध्ययनाने शास्त्राच्या प्राथमिक स्थितीचे प्रतिनिधित्व करता येते, हे अध्ययन संशोधन समस्येच्या स्वरुपीकरणासाठी आवश्यक असणारे आहे. त्यामुळे संशोधकास ज्ञान प्राप्त होऊ शकते, असे ज्ञान पुढे ज्याची चाचणी घेण्यासाठी संशोधन कार्य करावयाचे आहे. अशा गृहीतकर्त्याच्या निर्मितीसाठी अत्यंत उपयोगाचे ठरते.

**अभ्यासाचे क्षेत्र:** प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्हा हे अभ्यासाचे क्षेत्र म्हणून निवडलेले आहे. सद्यस्थितीत नांदेड जिल्ह्यात १६ तालुके व १३५६ ग्रामपंचायती आहेत. नांदेड जिल्ह्यातील सोळा तालुक्यांपैकी निवघा बाजार तालुका हदगाव, कंधार व अर्धापूर येथेच वैदू जमाती वास्तव्यास आहे म्हणून प्रस्तुत संशोधनात वर उल्लेखित तालुक्यातील निवघा बाजार तालुका हदगाव, तालुका कंधार, व अर्धापूर तालुका येथील वैदू जमातीच्या जीवनपद्धतीचा अभ्यासासाठी निवड करण्यात आलेली आहे.

**नमुना निवड:** प्रस्तुत संशोधनात गैरसमभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक तथा उद्देश पूर्ण नमुना पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. जेव्हा संशोधक विशिष्ट उद्देश समोर ठेवून जाणीवपूर्वक समग्रातील काही एककांची निवड करतो तेव्हा त्यास सहेतुक किंवा उद्देश पूर्ण नमुना असे म्हणतात सहेतुक नमुनाच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यातील वैदू जमातीची बहुलक लोकसंख्या असणाऱ्या

हदगाव तालुक्यातील निवघा बाजार, कंधार तालुक्यातील कंलबर आणि अर्धापूर तालुक्यातील अर्धापूर अशी तीन गावांची निवड करून एकूण शंभर उत्तरदात्याची नमुना निवडून अभ्यास करण्यात आलेला आहे.

**अध्ययन पद्धती:** प्रस्तुत विषयावरील संशोधनासाठी गुणात्मक आणि संख्यात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे या पद्धतीच्या सहाय्याने अमूर्त तथ्याचे आकलन केले जाते. समाजशास्त्रात अमूर्त विचार विश्वास वर्तन सामाजिक मूल्य व व्यावहारिक समस्या इत्यादी अध्ययनासाठी गुणात्मक पद्धतीचा उपयोग केला जातो. प्रस्तुत संशोधनात गुणात्मक अध्ययन पद्धतीच्या माध्यमातून सूक्ष्म तथ्यांची व सामुदायिक तथ्यांची जमवाजमव करण्यात आलेली आहे. तसेच संख्यात्मक पद्धतीचा वापर करून १०० लोकांकडून माहिती प्राप्त करण्यात आलेली आहे.

**तथ्याचे संकलन:** अन्य शास्त्रप्रमाणे समाजशास्त्रात सुद्धा ज्ञानेंद्रियाच्या आधारे होणाऱ्या स्थितीचा व निरीक्षणाचा बोध घेऊन तथ्य प्राप्तीचा आधार घेतला जातो. आपल्या ज्ञानेंद्रियावर आघात करणाऱ्या गोष्टीमुळे आपणास झालेल्या संवेदनाची नोंद म्हणजे तथ्य आहे. प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी तथ्य संकलना करिता निरीक्षण व मुलाखत अनुसूची या प्राथमिक तंत्रातील उपयोग करण्यात आला. दुय्यम तथ्य संकलनासाठी वैदू जमातीशी संबंधित लिखित साहित्य शासकीय दस्तऐवज वर्तमानपत्रे मासिके ग्रंथ इत्यादीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**माहितीचे विश्लेषण:**

**१) वैदू जमातीचे सामाजिक व धार्मिक जीवन:** वैदू जमातीची जीवन पद्धती अतिशय साधी व पारंपारिक स्वरूपाची आहे. पुरुष गळ्यात निरनिराळ्या रंगाच्या मन्याची माळ व रुद्राक्षाची माळ घालून कानात मोठ्या आकाराची रिंग अशी वेशभूषा करतात. तर स्त्रिया नववारी पातळ व ब्लाऊज, नाकात मोठी नथनी व इतर दागिने घालतात या जमातीची अनेक कुलदैवते आहेत. प्रामुख्याने तुळजाभवानी, मरीमाय, बालाजी, श्रीकृष्ण, महिशासुर, शिवशंकर या देवी देवतांची ते पूजा करतात, परंतु दसरा या सणाला ते अधिक महत्त्वाचे स्थान देतात.

**२) वैदू जमातीचे वैवाहिक जीवन व जातीपंचायतीचे महत्त्व:** विवाहाच्या बाबतीत आजही पारंपारिक पद्धतीनेच वैदू जमातीचे लोक विवाह करतात. बालविवाहाचे प्रचलन या समाजामध्ये अजूनही आहे, गरोदर स्त्रियांच्या बेंबीला कुंकू लावूनच लग्न ठरविले जातात वैदू जमातीत. जातपंचायतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वैवाहिक समस्या, आर्थिक समस्या जाती-पंचायतीच्या माध्यमातूनच सोडविल्या जातात म्हणून या जमातीत जातपंचायतीला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कारण वैवाहिक समस्यांची सोडवणूक ते जातीपंचायतीच्या माध्यमातूनच करतात. त्याच्यामुळे जाती पचायती आणि त्यांचा विवाह आणि एकूणच जीवन जाती-पंचायतीशी संबंधित असलेले दिसून येते.

**३) वैदू जमातीचे आर्थिक जीवन:** वैदू जमातीचा मुख्य व्यवसाय जंगलातील जडीबुटी कंदमुळे यापासून औषधी तयार करून त्याची विक्री करणे व आपला उदरनिर्वाह चालविणे हा आहे. स्त्रिया जडीबुटी काढून औषधाची बुकटी तयार करण्यासाठी मदत करतात परंतु औषधी विकण्याचे काम हे केवळ पुरुष मंडळी करीत असतात. त्यासाठी ते गावोगाव फिरून औषधाची विक्री करतात हे लोक अत्यंत स्वाभिमानी असून कोणत्याही परिस्थितीत भिक मागत नाहीत. आयुर्वेद शास्त्राचा उपयोग करून हे लोक औषधी तयार करतात पूर्वीच्या काळी रोग निदान करून समाजामध्ये स्वास्थ रक्षण करण्याची जबाबदारी देखील वैदु समाजाने स्वीकारलेली होती. जडीबुटीचे औषध विकण्यासाठी ठिकठिकाणी भटकंती करीत असलेले अनेक वैदू आजही पहावयास मिळतात. वैदू जमातीचा पारंपरिक व्यवसाय औषधी विक्रीचा असल्यामुळे त्यांचे जीवन अस्थिर स्वरूपाचे आहे. सतत भटकंती करूनच ते आपल्या व्यवसायाला आधार समजून आपल्या उदरनिर्वाहा भागवायचा प्रयत्न करीत असतात. सततच्या भटकंतीमुळे ते एका ठिकाणी कुठेही स्थिर होऊ शकले नाहीत. परिणामी ते आपल्या मुलाबाळांना योग्यरीत्या शिक्षण देऊ शकत नाहीत. त्यामुळे हा समाज अज्ञानी राहिला या समाजाची प्रगती होऊ शकली नाही. आज औषधी शास्त्राने बरीच मोठी प्रगती केलेली असल्यामुळे वैदू समाजाचा औषधी विकण्याचा पारंपारिक व्यवसाय नव्या मेडिकलच्या काळामध्ये डबघाईस आलेला आहे परिणामी वैदू समाजाला आपला उदरनिर्वाह चालण्यासाठी पर्यायी व्यवसाय म्हणून चाळण्या, डब्बे तयार करणे, विकणे व स्त्रियांना सुया, बुगड्या विकण्याचा व्यवसाय खेडोपाडी जाऊन करावा लागत आहे. यासारख्या व्यवसायामुळे वैदू समाजाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला असून त्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट आहे.

**४) वैदु जमातीची शैक्षणिक स्थिती:** वैदु जमातीचा शिक्षण विषयक दृष्टिकोन अत्यंत उदासीनतेचा आहे, कारण हा समाज शिक्षणापासून वंचित व दूर राहिलेला असल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व या समाजातील लोकांना माहित नाही. याशिवाय आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आणि जिकरीची असल्यामुळे ते आपल्या मुलांना योग्यरीत्या शिक्षण देऊ शकत नाहीत. याशिवाय ते एका गावातून दुसऱ्या गावात सातत्याने भटकंती करत असतात ते स्थिर नसल्यामुळे सुद्धा मुलांना शिक्षण देऊ शकत नाहीत. त्यामुळे वैदू जमातीतील लोकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प असून शासनाच्या शैक्षणिक योजनांचा सुद्धा ते योग्यरीत्या फायदा घेऊ शकत नाहीत त्यामुळे हा समाज शिक्षणापासून वंचित आहे.

**५) वैदू जमातीचे राजकीय जीवन:** वैदू या भटक्या जमातीमध्ये अंधश्रद्धा, भटके जीवनमान, निरक्षरता आणि आर्थिक टंचाई या कारणामुळे हा समाज राजकारणापासून अत्यंत दूर आहे, त्यामुळे हा समाज आपली उन्नती करू शकला नाही. आज वैदू समाज

हळूहळू स्थिर होण्याचा प्रयत्न करत असला तरीही विभिन्न व्यवसाय करून त्यांना आपला उदरनिर्वाह करावा लागत आहे. हा समाज गावातील राजकारणातही पडताना दिसून येत नाही. आजच्या जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या स्पर्धेमध्ये वैदू जमातीचा विकास जेवढा होणे आवश्यक होता तेवढा झालेला दिसून येत नाही. शिक्षणाचे अत्यंत अल्प प्रमाण आणि परंपरागत व्यवसाय मुळे हे लोक मागासलेले असल्यामुळे राजकारणामध्ये आपले अस्तित्व टिकवू शकत नाही. त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

**अभ्यासाचे निष्कर्ष:** १) वैदु जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. २) वैदू जमातीत अंधश्रद्धा व अज्ञान जास्त प्रमाणात दिसून येते. ३) वैदू जमातीचे राहणीपण अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. ४) वैदू समाजामध्ये राजकारणाबद्दल अत्यंत उदासीनता दिसून येते. ५) वैदू जमातीच्या आर्थिक व व्यावसायिक तसेच धार्मिक व वैवाहिक जीवनावर जातपंचायतीचा प्रभाव दिसून येतो. ६) जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या युगात या जमातीला अस्तित्व टिकवणे कठीण बनले आहे. ७) वैदू जमात हळूहळू स्थिर होण्याचा प्रयत्न करीत आहे.

**संदर्भग्रंथ सूची**


१) रामनाथ चव्हाण, *"भटक्या विमुक्तांची जातपंचायत"* सुगावा प्रकाशन, पुणे.

२) रामनाथ चव्हाण, *"भटक्या विमुक्तांचे अंतरंग"* ,सुगावा प्रकाशन, पुणे.

३) त्री. ना.अत्रे, *"गुन्हेगार जाती"* आर्यभूषण छापखाना, पुणे.

४) नारायण भोगले, *"भटक्यांची पितृसत्ताक जात पंचायत परंपरा आणि संघर्ष"*, पुणे.

५) Rajendra Pande,( 1986), "*The caste status in India myth and reality*" criterion publication New Delhi.

६) Chitrasen pasyat, (1998), "*Tribes , caste and folk culture"*, Rawat publication, Jaipur and New Delhi.

७) Crook W., (1975), "*Tribes and cast North Western India"*, Cosmo publication, Delhi.

८) Russell R.V. and Hiralal Rai Bahadur, (1975), *"Tribes and cast of Central province of India",* volume number I, II, III. IV, Rajdhani book center, Delhi.


# सिमांतिक समूहातील वैदू भटक्या जमातीचा पारंपरिक व्यवसायातील बदलते स्वरूप व आव्हाने

**अशोक भीमराव वाघमोडे** संशोधक विद्यार्थी, वसंतदादा पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालय, पाटोदा. जि. बीड.

**गोषवारा:** प्रस्तुत संशोधनिबंधात सीमांतिक समूहामध्ये समाविष्ट असलेल्या वैदू भटक्या जमातीची ओळख प्रामुख्याने त्यांच्या पारंपरिक वनौषधी व्यवसायामुळे निर्माण झाली आहे. जडीबुटी, वनौषधी, तुंबडी काढणे, नैसर्गिक उपचार पद्धती आणि अनुभवाधिष्टित ज्ञान यांच्या आधारे वैदू जमात पिढ्यानपिढ्या या गावातून त्या गावात समाजातील विविध लोकांना आरोग्य सेवा पूरवत आली आहे. मात्र बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रवाहांमुळे या पारंपारिक व्यवसायाच्या स्वरूपात मोठे परिवर्तन घडवून आलेले दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सीमांतिक समूहातील वैदू भटक्या जमातीच्या पारंपारिक व्यवसायातील बदलते स्वरूप आणि त्यांना सामोरे जावे लागणारे आव्हाने यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. औद्योगीकरण, शहरीकरण, आधुनिक वैद्यकीय व्यवस्थेचा वाढता प्रभाव, ॲलोपॅथिक औषधांचा सहज उपलब्धता, तसेच वन धोरणातील बदल यांचा वैदू जमातीच्या पारंपारिक उपजीविकेवर प्रतिकूल परिणाम झालेला आहे. वनक्षेत्रांवर लादण्यात आलेल्या निर्बंधामुळे औषधी वनस्पती मिळवणे कठीण झाले असून पारंपारिक ज्ञानाचा वापर आणि सामाजिक मान्यता दोन्ही घटक कमी होत चाललेला आहे. परिणामी अनेक वैदू कुटुंबांना आपल्या पारंपारिक व्यवसाय सोडून केसावर भांडी विकणे, भंगार विकत घेणे, बोल मजुरी करणे अशा कामांकडे वळावे लागले आहे. या व्यावसायिक बदलांचा वैदू जमातीच्या आर्थिक स्थैर्यावर, सामाजिक संरचनेवर आणि सांस्कृतिक ओळखीवर परिणाम होत आहे. उत्पन्नातील अस्थिरता, शिक्षणाचा अभाव, आरोग्यविषयक समस्या आणि सामाजिक उपेक्षा ही या वैदू जमातीसमोर प्रमुख आव्हाने ठरत आहेत.

**बीज शब्द:** सीमांतिक समूह, वैदू भटक्या जमाती, पारंपारिक ज्ञान, व्यावसायिक बदल.

**प्रस्तावना:** भारतीय समाजव्यवस्थेत विविध सामाजिक घटकांचा समावेश असला तरी सीमांतिक समूहांचे स्थान दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या दिसून येते. सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले हे समूह मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेले असून त्यामध्ये भटक्या व विमुक्त जमातींचा महत्वाचा समावेश होतो. या जमातींचे जीवनमान, उपजीविकेची साधने आणि सामाजिक स्थान हे ऐतिहासिक अन्याय व उपेक्षेमुळे अस्थिर राहिलेले आहे. भटक्या व विमुक्त जमातींमधील वैदू भटक्या जमाती ही विशेषत: पारंपारिक लोकवैद्य, वनौषधी संकलन आणि पारंपारिक उपचार पद्धतींवर आधारित व्यवसाय करणारे जमात म्हणून ओळखली जाते. ग्रामीण सामाजिक संरचनेत वैदू जमातीचे योगदान आरोग्य सेवेची निगडित आहे. पूर्वी आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसताना खोकला, दमा, वाई, वात, सर्दी, इसबगोल, जळवात, गजकर्ण, पोटदुखी, मुतखडा, ताप, त्वचारोग यांसारख्या आजारांवर उपचार करण्यासाठी ग्रामीण समाजातील लोक मोठ्या प्रमाणावर वैदू वैद्यांवर अवलंबून होती. पिढ्यानपिढ्या मौखिक परंपरेने चालत आलेले हे वैद्यकीय ज्ञान त्यांच्या सांस्कृतिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे. परंतु कालांतराने सामाजिक परिवर्तन, औद्योगीकरण, शहरीकरण आणि आधुनिक वैद्यकीय व्यवसायाचा विस्तार यामुळे या पारंपारिक व्यवसायाचे स्वरूप बदलू लागले. याचबरोबर वन कायदे पर्यावरणीय नियम आणि आर्थिक दबाव यामुळे औषधी वनस्पतींचा संकलनावर मर्यादा आल्या, ज्यांचा थेट परिणाम वैदू जमातीच्या

उपजीविकेवर झाला. परिणामी अनेक वैदू पारंपारिक व्यवसाय सोडून इतर कामांकडे वळावे लागले. या बदलांचा त्यांच्या आर्थिक स्थितीवरच नव्हे तर सामाजिक आर्थिक, आत्मसन्मान आणि सांस्कृतिक वारसावरही खोलवर परिणाम झालेले दिसून येते. या पार्श्वभूमीवर वैदू भटक्या जमातीच्या पारंपारिक व्यवसायातील बदलते स्वरूप आणि आव्हाने यांचा अभ्यास करण्यात आला आहे

**संशोधनाची उद्दिष्टे:** सीमांतिक समूहातील वैदू भटक्या जमातीचा पारंपारिक व्यवसायातील बदलते स्वरूप आणि आव्हाने यांचा अभ्यास करताना खालील उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत.

१) सीमांतिक समूहातील विविध भटक्या जमातीचा पारंपारिक व्यवसायाचे स्वरूप जाणूनघेणे.

२) वैदू भटक्या जमातीच्या पारंपारिक व्यवसायात कालांतराने झालेले बदलांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतकृत्य:** १) सीमांतिक समुहातील वैदू भटक्या जमातीचा पारंपारिक व्यवसाय कालांतराने लक्षणीय प्रमाणात बदललेला आहे. २) आधुनिक वैद्यकीय व्यवस्थेच्या वाढत्या प्रभावामुळे वैदू भटक्या जमातीच्या पारंपारिक व्यवसायाची सामाजिक मागणी कमी झाली आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास: १) प्रवीण अधाना (२०२२) यांनी "घुमंत जनजातीयॉ समाज का उपेक्षित वर्ग"** या प्रस्तुत ग्रंथांमध्ये लेखकांनी वैदू जमाती विषय लिहितात की, या भटक्या जमाती पारंपरिक व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करतो, या जमातीमध्ये वैदू पुरुष व काही महिला जंगली वनौषधी विकण्याचा व्यवसाय करतात. व नाडी तपासणी करून उपचार केल्यामुळे ते त्यांना 'वैद्य' म्हणून ओळखली जाऊ लागले. **२) सूर्यकांत भिसे (२०१६) 'भटक्यांची भटकंती'**त्यात सांगतात की, पूर्वी डॉक्टर नव्हते, त्यामुळे गावोगावी फिरून वनौषधी देण्याचे काम वैदू जमात करीत होता. महाराष्ट्रातील दऱ्याखोऱ्यात, जंगल भागात हा समाज विखुरला गेला आहे. महाराष्ट्रातील जंगलातून: महाबळेश्वर, महाड, रत्नागिरी, पन्हाळा, गगनबावडा, आणि सिंधुदुर्ग आदी भागातून जंगलात फिरून हा जमाती वनौषधी गोळा करतो व महाराष्ट्रभर फिरून खोकला, दमा वाई, वात, सर्दी, इसबगोल, जळवात आधी आजारांवर औषध देतात. तसेच लेखक सांगतात की, आजच्या वैदू समाजाच्या वनौषधीची किंमत ही इतर औषधांच्या तुलनेत कमी आहे. परंतु अलीकडील लोकांचा आमच्यावर विश्वास राहिला नसल्यामुळे वैदू जमातीचा व्यवसाय चालत नाही. परंतु अलीकडे वैदूचा व्यवसाय जंगलतोड व गावोगाव डॉक्टर झाल्याने जवळपास बंद पडत चाललेला आहे. **३) मांडे प्रभाकर (१९८३) 'गावगाड्याबाहेर'** या प्रस्तुत ग्रंथात लेखकाने वैदू या भटक्या जमातीच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचे वर्णन केले आहे. गावगाड्यातील लोकांना गावगाड्याबाहेर राहून देखील कशा प्रकारचे मदत करतात याचा आढावा प्रस्तु ग्रंथ घेतला आहे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी दुय्यम संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. व तथ्य संकलनासाठी प्रस्तुत विषयाशी संबंधित विभिन्न संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, आणि संकेतस्थळांचा वापर

**सैद्धांतिक दृष्टिकोन:** प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासासाठी 'सामाजिक परिवर्तन सिद्धांत' स्वीकारण्यात आलेला आहे. हा सिद्धांत समाजातील रचना, मूल्ये, संस्था आणि व्यवसाय पद्धतीत काळानुसार कसा बदलतात, यांचे स्पष्टीकरण देतो. औद्योगीकरण, शहरीकरण, आधुनिकरण, आणि बाजार व्यवस्थेचा विस्तार यांमुळे पारंपरिक जीवन पद्धती व व्यवसायांमध्ये परिवर्तन घडूनयेते. वैदू भटक्या जमातीचा पारंपरिक व्यवसाय लोक वैद्य, औषधी वनस्पती संकलन आणि फिरत्या आरोग्यसेवेवर आधारित होता. पारंपरिक ग्रामीण समाजरचनेत या व्यवसायाला सामाजिक मान्यता व उपयुक्तता होती. परंतु सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळे आधुनिक वैद्यकीय व्यवस्था, शासकीय आरोग्य संस्था आणि औषध बाजार याचा प्रभाव वाढलापरिणामी पारंपरिक वैद्यकाचा वापर कमी होऊन वैदू जमातीच्या व्यवसायाचे स्वरूप बदलू लागले. सामाजिक परिवर्तन सिद्धांताच्या दृष्टीने पाहता, वनकायदे, पर्यावरणीय नियम आणि आर्थिक दबाव हे बाह्य संरचनात्मक घटक वैदू जमातीच्या उपजीविकेवर परिणाम करणारे ठरतात. या बदलांमुळे वैदू जमातीला पारंपरिक व्यवसाय सोडून मजुरी वइतर कामांकडे वळावे लागले. यामुळे त्यांच्या सामाजिक ओळखीमध्येही परिवर्तन झाले असून लोकवैद्य ही ओळख हळूहळू कमी होत चालली आहे. सिद्धांताच्या आधारे हे स्पष्ट होते की, वैदू भटक्या जमातीसमोरील आर्थिक अस्थिरता, सामाजिक बहिष्कार आणि पारंपरिक ज्ञानाचा लोप हे नैसर्गिक किंवा वैयक्तिक अपयशाचे परिणाम नसून व्यापक सामाजिक परिवर्तन प्रक्रियेचे परिणाम आहेत.

**वैदू भटक्या जमातीचे पारंपरिक व्यवसाय:**

**१) लोकवैद्य व आयुर्वेदिक उपचार:** वैदू भटक्या जमातीचा प्रमुख पारंपरिक व्यवसाय वनौषधी व जडीबुटी देणार आहे. आधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध होण्यापूर्वी ग्रामीण व दुर्गम भागामध्ये वैदू 'वैद्य' हेच प्राथमिक आरोग्य सेवक म्हणून कार्य करत असे. ते रुग्णांची नाडी परीक्षण करून उपचार ठरवत. औषधासोबतच आहार दिनचर्या आणि विश्रांती याविषयी सल्ला दिला जात असे.

**२) औषधी वनस्पतीची संकलन:** वनौषधी संकलन हा वैदू जमातीच्या उपजीविकेचा अत्यंत महत्त्वाचा आधार आहे. जंगल, डोंगर, नदीकाठ आणि माळरान परिसरात आढळणाऱ्या वनस्पतीचा अचूक ज्ञान त्यांना आहे. कोणत्या मोसमात कोणती वनस्पती उपयुक्त ठरते, तिचा कोणता भाग औषधासाठी वापरायचा आणि किती प्रमाणात वापरायचा याचे ज्ञान अनुभवावर आधारित होते.

**३) पारंपरिक औषधनिर्मिती:** संकलित वनस्पतींच्या आधारे वैदू जमात पारंपरिक औषधनिर्मिती करत असे. काढे, लेप, पूड, चूर्ण, तेल, अशा विविध स्वरूपातील औषधे घरगुती पातळीवर तयार केली जात. कोणते औषध किती प्रमाणात घ्यावे, किती दिवस वापरावे आणि कोणत्या परिस्थितीत थांबवावे, याचे मार्गदर्शन वैदू वैद्य करत. ही औषधे स्वस्त, सहज उपलब्ध आणि दुष्परिणाम कमी असलेली असल्याने ग्रामीण समाजात त्यांना मोठी मागणी होती.

**४) ग्रामीण भागात फिरती वैद्यकीय सेवा:** वैदू जमातीची फिरती वैद्यकीय सेवा ही त्यांच्या व्यवसायाची वैशिष्ट्यपूर्ण ओळख होती. एका गावापुरते मर्यादित न राहता ते गावोगावी, वस्तीवस्तीवर जाऊन उपचार करत असत. यामुळे दुर्गम व दुर्लक्षित भागांतील

लोकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचत होती. ही सेवा सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दिली जात असल्याने वैदू वैद्यांना समाजात आदराचे स्थान प्राप्त झाले होते.

**५) जळवा लावणे किंवा तुंबड्या लावणे:** औषधी देण्याबरोबरच वैदू जळवा लावून किंवा तुमच्या लावून जखमेतील बेंड्यातील किंवा खरूज, नायटा, इसबगोल या कातडीच्या रोगातील अशुद्ध रक्त काढण्याचे काम करतात. ते लहान-मोठ्या शस्त्रक्रियाही करतात. जळू हा रक्त शोषून घेणार आहे किडा आहे. जखमेवर किंवा जेथे अशुद्ध रक्त साचले असेल तेथे आपली सोंड खूपसून तो रक्त शोषून घेतो. या प्रकारे शस्त्रक्रिया न करता अगदी सोप्या पद्धतीने अशुद्ध रक्त वैदू काढतात. तुंबडी हे नळीच्या आकाराचे एक लहान यंत्र असते. त्याची एक बाजू उघडी असून दुसरीकडे बारीक छिद्र असते. कातडीवर लहानशी जखम करून त्यावर ते यंत्र ठेवण्यात येते. मोकळी बाजू कातडीवर लावून छिद्राची बाजूवर ठेवतात. छिद्रातून तोंडाने वायू काढून घेऊन छिद्र बंद करतात. त्यायोगे अशुद्ध रक्त आणि त्याचबरोबर जिवाणही खेचले जातात. वैदु लोक या कामात फारच वाकबगार असतात. त्यामुळेच खेड्यातील लोक दवाखान्यात जाऊन औषधोपचार करण्याऐवजी आणि शस्त्रक्रिया करण्याऐवजी परंपरेने चालत आलेल्या याच मार्गाचा अवलंब करताना आढळतात.

**६) मौखिक परंपरेवर आधारित ज्ञान:** वैदू जमातीचे संपूर्ण वैद्यकीय ज्ञान मौखिक परंपरेवर आधारितआहे. वडीलधारी व्यक्ती प्रत्यक्ष अनुभव, सराव आणि निरीक्षणाच्या माध्यमातून पुढील पिढीला हे ज्ञान शिकवत. कोणतेही लिखित दस्तऐवजीकरण नसल्यामुळे हे ज्ञान विशिष्ट कुटुंबापुरते किंवा व्यक्तीपुरते मर्यादित राहिले. बदलत्या सामाजिक परिस्थितीत ही मौखिक परंपरा खंडित होत चालली असून, त्यामुळे हे अमूल्य ज्ञान लोप पावण्याच्या मार्गावर आहे.

**वैदू भटक्या जमातीच्या व्यवसायातील बदलते स्वरूप:**

**१) पारंपरिक वैद्यकाचा वापर कमी होणे:** कालांतराने वैदू भटक्या जमातीच्या पारंपरिक वैद्यकाचा वापर लक्षणीयरीत्या कमी झालेला दिसून येतो. पूर्वी ग्रामीण व दुर्गम भागात आजारपणात वैदू वैद्यांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहिले जात असे. मात्र आधुनिक वैद्यकीय सुविधा, सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि खाजगी दवाखान्यांची संख्या वाढल्यामुळे लोकांचा कल पारंपरिक उपचारांपेक्षा आधुनिक उपचारांकडे वळला आहे. त्वरित आराम देणारी औषधे आणि तपासणी सुविधांमुळे पारंपरिक वैद्यक दुय्यम ठरू लागले असून याचा थेट परिणाम वैदू जमातीच्या उपजीविकेवर झाला आहे.

**२) आधुनिक औषधोपचारांकडे लोकांचा कल वाढणे:** आधुनिक औषधोपचार पद्धतींमध्ये वैज्ञानिक तपासणी, निदान आणि प्रमाणित औषधे यांचा समावेश असल्याने लोकांचा त्यावर अधिक विश्वास निर्माण झाला आहे. शासनाकडून मिळणाऱ्या मोफत किंवा कमी खर्चाच्या आरोग्य योजना, लसीकरण कार्यक्रम आणि आरोग्य शिबिरे यांमुळेही आधुनिक वैद्यकीय व्यवस्था अधिक प्रभावी ठरली आहे. परिणामी वैदू जमातीच्या पारंपरिक उपचारांची गरज कमी भासू लागली असून त्यांचे सामाजिक स्थान हळूहळू बदलत आहे.

**३) वनक्षेत्रांवरील निर्बंधांमुळे औषधी वनस्पती मिळवण्यात अडचणी:** वैदू जमातीचा पारंपरिक व्यवसाय औषधी वनस्पतींवर आधारित असल्यामुळे वनक्षेत्रांवरील कायदेशीर निर्बंधांचा त्यांच्यावर मोठा परिणाम झाला आहे. वनकायदे, पर्यावरणीय नियम आणि परवानग्यांची अडचण यांमुळे औषधी वनस्पती संकलन करणे कठीण झाले आहे. यामुळे पारंपरिक औषधनिर्मितीचा पाया कमकुवत झाला असून व्यवसाय टिकवणे अवघड बनले आहे.

**४) मजुरी व इतरव्यवसायांकडे वळणारी कुटुंबे:** पारंपरिक व्यवसायातून पुरेसे उत्पन्न न मिळाल्याने अनेक वैदू कुटुंबांनी मजुरी, केसावर भांडी विकणे, भंगार विकत घेणे, अशा व्यवसाय स्वीकारले आहेत. हे व्यवसाय तात्पुरते व अस्थिर उत्पन्न देणारे असल्यामुळे आर्थिक असुरक्षितता वाढलेली दिसून येते. परिणामी पिढ्यानपिढ्या चालत आलेली व्यावसायिक ओळख बदलत चालली आहे.

**वैदू भटक्या जमातीसमोरील प्रमुखआव्हाने:**

**१) आर्थिक अस्थिरता:** वैदू भटक्या जमातीसमोरील सर्वात गंभीर आव्हान म्हणजे आर्थिक अस्थिरता होय. पारंपरिक लोकवैद्यक व औषधी वनस्पतींवर आधारित व्यवसायातून पूर्वी तुलनेने स्थिर उत्पन्न मिळत असे. मात्र बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत या व्यवसायाची मागणी कमी झाल्यामुळे नियमित उत्पन्नाचा स्रोत राहिलेला नाही. परिणामी दारिद्र्याची समस्या अधिक तीव्र झाली असून अनेक कुटुंबांना दैनंदिन गरजा भागवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. उत्पन्नातील अनिश्चिततेमुळे बचत, आरोग्यसेवा आणि मुलांचे शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता वाढली आहे.

**२) शैक्षणिक मागासलेपणा:** शिक्षणाचा अभाव हे वैदू भटक्या जमातीच्या विकासातील मोठे अडथळे आहे. पारंपरिक भटक्या जीवनशैली, आर्थिक अडचणी आणि सामाजिक दुर्लक्ष यांमुळे मुलांचे शालेय शिक्षण सातत्याने पूर्ण होत नाही. शिक्षणाच्या अभावामुळे आधुनिक कौशल्ये विकसित होत नाहीत आणि परिणामी स्थिर व सुरक्षित रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. यामुळे पिढ्यानपिढ्या मागासलेपणा टिकून राहण्याची शक्यता वाढते.

**३) सामाजिक बहिष्कार:** भटक्या जमाती म्हणून वैदू जमाती अजूनही सामाजिक संशय आणि भेदभावाला सामोरे जावे लागते. अनेक ठिकाणी त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट केले जात नाही. सामाजिक स्वीकाराच्या अभावामुळे त्यांचा आत्मसन्मान कमी होतो आणि सामाजिक सहभाग मर्यादित राहतो. हा बहिष्कार रोजगार, शिक्षण आणि आरोग्यसेवा यांसारख्या क्षेत्रांमध्येही अडथळे निर्माण करतो.

**४) कायदेशीर अडथळे:** वनकायदे, पर्यावरणीय नियम आणि औषध विक्रीसंबंधी कायदेशीर तरतुदी या वैदू जमातीच्या पारंपरिक व्यवसायासाठी मोठे अडथळे ठरतात. औषधी वनस्पती संकलनासाठी आवश्यक परवानग्या, नोंदणी प्रक्रिया आणि नियमांची गुंतागुंत

यांमुळे पारंपरिक व्यवसाय टिकवणे कठीण झाले आहे. लिखित दस्तऐवजीकरण आणि कायदेशीर मान्यता नसल्यामुळे अनेक वेळा त्यांना कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागते.

**५) पारंपरिक ज्ञानाचा लोप:** वैदू जमातीचे पारंपरिक वैद्यकीय ज्ञान मौखिक परंपरेवर आधारित असल्यामुळे ते अत्यंत असुरक्षित आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे आणि आर्थिक गरजांमुळे नवीन पिढी या व्यवसायाकडे पाठ फिरवत आहे. परिणामी पिढ्यानपिढ्या जपलेले अमूल्य ज्ञान लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. हा लोप केवळ वैदू जमातीसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या सांस्कृतिक वारशासाठीही गंभीर धोका निर्माणकरतो.

**निष्कर्ष:** प्रस्तुत शोध निबंधामध्ये सिमांतिक समूहातील वैदू भटक्या जमातीच्या पारंपरिक व्यवसायातील बदलते स्वरूप आणि त्यांना भेडसावणारी आव्हाने यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यासातून असे स्पष्ट होते की वैदू जमातीचा पारंपरिक वैद्यकीय व्यवसाय हा केवळ उपजीविकेचा स्रोत नसून त्यांच्या सामाजिक ओळखीचा आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. मात्र बदलत्या सामाजिक, आर्थिक व धोरणात्मक परिस्थितीमुळे या व्यवसायावर मर्यादा येत गेल्या आहेत. आधुनिक वैद्यकीय व्यवस्थेचा वाढता प्रभाव, शहरीकरण, वनधोरणांमधील बदल, आर्थिक अस्थिरता आणि सामाजिक उपेक्षा या घटकांमुळे वैदू जमातीचा पारंपरिक व्यवसाय संकटात सापडलेला आहे. परिणामी अनेक वैदू कुटुंबांना असंघटित क्षेत्रातील कामांकडे वळावे लागले असून त्याचा त्यांच्या आर्थिक स्थितीवर, सामाजिक प्रतिष्ठेवर आणि सांस्कृतिक सातत्यावर प्रतिकूल परिणाम झालेला आहे. शिक्षणाचा अभाव, स्थिर निवासाची समस्या आणि शासकीय योजनांची अपुरी अंमलबजावणी ही आव्हाने आजही कायम आहेत.

**संदर्भ ग्रंथ:**

१. भिसे सूर्यकांत (२०१६), 'भटक्यांची भटकंती' आनंदमूर्ती प्रिंटर्स अँड पब्लिकेशन, सोलापूर.
२. पाटील विलास (२०२१), 'भटके लोक' सौरव प्रकाशन, औरंगाबाद.
३. प्रवीण अधाना (२०२२), 'घुमंत जनजातीयों समाज का उपेक्षित वर्ग' राज्यस्थानी ग्रन्थागार, जोधपुर.
४. मांडे प्रभाकर (१९८३), 'गावगाड्याबाहेर' परिमल प्रकाशन, औरंगाबाद.

# परधान आदिवासी जमात: जातीय स्मृती, मौखिक परंपरा आणि सांस्कृतिक ओळखीचे बदलते स्वरूप

**संजिवनी श्रीकांत जाधव** संशोधनार्थी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
**डॉ. संदिप गोरे** संशोधन विद्यार्थिनी व प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख, श्री योगानंद स्वामी महाविद्यालय, वसमत जि. हिंगोली.

**सारांश:** भारताच्या आदिवासी समाजरचनेत गोंड समाजाचा इतिहास, संस्कृती आणि ओळख मुख्यतः मौखिक परंपरेच्या माध्यमातून जतन झालेली आढळते. या मौखिक परंपरेचे संरक्षण व प्रसारण करण्यामध्ये परधान आदिवासी जमातीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये परधान जमातीच्या माध्यमातून गोंड समाजातील सामूहिक स्मृती, वंशगाथा आणि सांस्कृतिक ओळख यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला आहे. हे संशोधन गुणात्मक पद्धतीवर आधारित असून, क्षेत्रीय अभ्यास, सखोल मुलाखती, सहभागी निरीक्षण आणि मौखिक इतिहास नोंदी या तंत्रांचा वापर करण्यात आला आहे. परधानांकडून गायल्या जाणाऱ्या वंशगाथा, कथा व लोकगीतांचे विश्लेषण करून त्यामधील सामाजिक रचना, धार्मिक श्रद्धा, ऐतिहासिक जाणीव आणि सांस्कृतिक मूल्ये उलगडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मॉरिस हाल्बवॅक्स यांची सामूहिक स्मृती संकल्पना, यान अस्मान यांची सांस्कृतिक स्मृती संकल्पना आणि पॉल थॉम्पसन यांचा मौखिक इतिहास सिद्धांत या सैद्धांतिक चौकटींचा आधार या अभ्यासात घेण्यात आला आहे. अभ्यासातून असे स्पष्ट होते की परधान आदिवासी केवळ लोकगायक नसून, ते गोंड समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीचे संरक्षक आणि लोकइतिहासाचे संवाहक आहेत. परधान—गोंड संबंध हा सामाजिक व सांस्कृतिक परस्परसंबंधांवर आधारित असून, त्यातून गोंड समाजाची सांस्कृतिक ओळख दृढ होते. हे संशोधन आदिवासी समाजाच्या इतिहासलेखनामध्ये मौखिक स्रोतांचे महत्त्व अधोरेखित करते आणि लोकइतिहासाच्या अभ्यासासाठी नवीन दृष्टीकोन प्रदान करते. भारतीय आदिवासी समाजाची ओळख त्यांच्या समृद्ध परंपरा, ऐतिहासिक स्मृती आणि मौखिक वारशामध्ये दडलेली आहे. परधान आदिवासी जमात ही मध्य भारतातील गोंड समाजाशी निकट संबंध असलेली, सांस्कृतिक वारशाची वाहक जमात म्हणून ओळखली जाते. त्यांच्या जातीय स्मृती, मौखिक परंपरा आणि सांस्कृतिक ओळख यांमध्ये काळानुसार लक्षणीय बदल घडून आले आहेत.

**मुख्य शब्द:** परधान आदिवासी, गोंड समाज, जातीय स्मृती, मौखिक परंपरा, वंशावळी, सांस्कृतिक ओळख, लोक इतिहास

**प्रस्तावना:** भारतीय समाजाची खरी ताकद त्याच्या वैविध्यपूर्ण आणि बहुसांस्कृतिक स्वरूपात दडलेली आहे. येथे प्रत्येक जात, समुदाय आणि आदिवासी समूह आपल्या परंपरा, चाली-रीती आणि मौखिक वारशाच्या माध्यमातून स्वतःची स्वतंत्र ओळख टिकवून आहे. ही विविधता केवळ भौगोलिक किंवा भाषिक पातळीपुरती मर्यादित नसून समाजाच्या सांस्कृतिक स्मृती आणि सामूहिक चेतनेचा आधार आहे. लिखित इतिहास सर्वसामान्य होण्यापूर्वी समाजाने आपल्या भूतकाळाचे, वंशाचे, पूर्वजांचे आणि गौरवगाथांचे संरक्षण **मौखिक परंपरेद्वारे** (*Oral Tradition)* केले. पुढे या मौखिक परंपरांचे रूपांतर लोकगीते, गाथा, आख्यायिका आणि वंशावळीत झाले. भारतातील विविध प्रदेशांमध्ये अनेक समुदाय या परंपरांचे संवाहक ठरले. त्यांपैकी एक महत्त्वाचा समुदाय म्हणजे **परधान आदिवासी जमात**होय. परधान समाज विशेषतः **गोंड आदिवासी समाजाशी** निगडित आहे. गोंडांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांमध्ये परधानांची भूमिका केवळ गायकापुरती मर्यादित नसून ते समाजाचे इतिहासकार, वंशगायक आणि स्मृतीसंरक्षक

म्हणून कार्य करतात. विवाह, सण-उत्सव, मृत्यू व इतर सामाजिक प्रसंगी ते *बाना*या वाद्याच्या साहाय्याने गोंड कुलांची वंशावळी सादर करतात. अशा प्रकारे ते पूर्वजांची स्मृती जिवंत ठेवून समाजाची सांस्कृतिक ओळख दृढ करतात. समाजशास्त्रीय दृष्टीने परधानांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पहिले, ते **जातीय स्मृतीचे** (*Ethnic Memory)* संवाहक आहेत, कारण त्यांच्या गाथा पिढ्यान्-पिढ्या भूतकाळाला वर्तमानाशी जोडतात. दुसरे, ते **सांस्कृतिक ओळख** (*Cultural Identity)* बळकट करतात, कारण वंशावळ्या समाजाला त्याच्या वैशिष्ट्यांची जाणीव करून देतात. तिसरे, ते सामाजिक संघटनाचा अविभाज्य भाग आहेत, कारण परधानांशिवाय गोंड समाजाचे धार्मिक आणि सांस्कृतिक विधी अपूर्ण मानले जातात. मात्र आधुनिक काळात ही परंपरा अनेक आव्हानांना सामोरी जात आहे. नगरीकरण आणि जागतिकीकरणामुळे आदिवासी समाज मुख्य प्रवाहात सामील झाला असला, तरी त्यांच्या मौखिक परंपरा आणि वंशगाथा दुय्यम ठरत आहेत. नवीन पिढी या गाथांकडे पूर्वीइतके गांभीर्याने पाहत नाही. या पार्श्वभूमीवर हा संशोधन-लेख परधान आदिवासी जमातीची परंपरा, मौखिक वंशावळीची प्रणाली, समाजशास्त्रीय भूमिका तसेच आधुनिक संदर्भातील आव्हाने आणि शक्यता यांचा अभ्यास करतो. परधानांची परंपरा केवळ "लोकगीत" किंवा "मनोरंजन" म्हणून न पाहता, ती **सामूहिक स्मृती आणि सांस्कृतिक ओळखीचा जिवंत दस्तऐवज** म्हणून समजून घेणे हा या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे. भारतीय आदिवासी समाजाची ओळख त्यांच्या समृद्ध परंपरा, ऐतिहासिक स्मृती आणि मौखिक वारशामध्ये दडलेली आहे. परधान आदिवासी जमात ही मध्य भारतातील गोंड समाजाशी निकट संबंध असलेली, सांस्कृतिक वारशाची वाहक जमात म्हणून ओळखली जाते. त्यांच्या जातीय स्मृती, मौखिक परंपरा आणि सांस्कृतिक ओळख यांमध्ये काळानुसार लक्षणीय बदल घडून आले आहेत.

**पूर्व संशोधन साहित्याचा आढावा:** आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक परंपरा, जातीय स्मृती आणि मौखिक वारसा यांचा अभ्यास मानववंशशास्त्र, समाजशास्त्र आणि सांस्कृतिक अध्ययनाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. विशेषतः परधान आदिवासी जमात ही गोंड समाजाशी संबंधित असून, मौखिक परंपरा, संगीत, आख्यायिका आणि सांस्कृतिक स्मृती यांची वाहक म्हणून ओळखली जाते. विविध अभ्यासकांनी आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक ओळखीतील बदल, मौखिक परंपरेचे महत्त्व आणि आधुनिकतेचा प्रभाव यावर संशोधन केले आहे. **वर्मा (२००४)** यांनी आदिवासी समाजातील जातीय स्मृती ही त्यांच्या सामाजिक ओळखीची मुख्य आधारशिला असल्याचे नमूद केले आहे. जातीय स्मृती पिढ्यान्-पिढ्या मौखिक कथन, लोकगीते, सण-उत्सव आणि धार्मिक परंपरांद्वारे जतन केली जाते. **देशमुख (२०१०)** यांच्या अभ्यासानुसार, आदिवासी जमातींमधील ऐतिहासिक आठवणी व सामूहिक स्मृती समाजाच्या एकात्मतेस चालना देतात. **रॉय (१९९९)** यांनी मौखिक परंपरेला "सांस्कृतिक ज्ञानाचे जिवंत संग्रहालय" असे संबोधले आहे. आदिवासी समाजात लिखित इतिहासाऐवजी मौखिक परंपरेतून इतिहास जतन केला जातो. **पाटील (२०१५)** यांनी नमूद केले की लोककथा, गीते, आख्यायिका आणि पारंपरिक कथन हे आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे मुख्य घटक आहेत. परधान समाजातील ढोलवादन, वीरगाथा, देवकथा आणि लोकगीते या परंपरेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. **शर्मा (२००७)** यांच्या संशोधनानुसार परधान जमात ही गोंड राजवंशाच्या इतिहासाची मौखिक स्मृती जतन करणारी जमात आहे. **जाधव (२०१८)** यांनी परधान जमातीच्या सांस्कृतिक ओळखीचा अभ्यास करताना त्यांच्या संगीत, कथा परंपरा आणि धार्मिक विधी समाजाच्या ऐतिहासिक स्मृतीचे माध्यम असल्याचे नमूद केले. **गुप्ता (२०१२)** यांनी नमूद केले की जागतिकीकरण, शहरीकरण आणि माध्यमांचा प्रभाव आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक ओळखीत लक्षणीय बदल घडवत आहे. **सिंह (२०१६)** यांच्या अभ्यासानुसार, आधुनिक शिक्षण व रोजगाराच्या संधींमुळे तरुण पिढी पारंपरिक व्यवसाय व परंपरांपासून दूर जात आहे. महाराष्ट्रातील आदिवासी समाजावर केलेल्या संशोधनात **मोरे (२०१९)** सांस्कृतिक संक्रमण आणि परंपरेतील घट यावर भर देण्यात आला आहे. साहित्याच्या पुनरावलोकनातून असे दिसून येते की आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक वारशात जातीय स्मृती व मौखिक परंपरेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. तथापि, आधुनिक सामाजिक बदलांमुळे या परंपरांवर परिणाम होत असून, परधान समाजाच्या सांस्कृतिक ओळखीमध्ये परिवर्तन घडून येत आहे. त्यामुळे या विषयावर अधिक सखोल, क्षेत्राधारित व समकालीन संशोधनाची गरज आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश परधान आदिवासी जमातीच्या सामाजिक-सांस्कृतिक भूमिकेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करणे हा आहे. विशेषतः गोंड समाजातील सामूहिक स्मृती, मौखिक परंपरा आणि सांस्कृतिक ओळख जतन करण्यामध्ये परधान जमातीची भूमिका अभ्यासाच्या केंद्रस्थानी आहे. या संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

१. परधान आदिवासी जमातीच्या ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
२. गोंड समाजातील सामूहिक स्मृतीच्या जतनामध्ये परधानांच्या मौखिक परंपरेची भूमिका समजून घेणे.
३. परधानांकडून गायल्या जाणाऱ्या वंशगाथा, कथा व लोकगीते यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण करणे.
४. मौखिक परंपरेच्या माध्यमातून सांस्कृतिक ओळख कशी निर्माण व संरक्षित केली जाते, याचा अभ्यास करणे.
५. परधान—गोंड संबंधांचे स्वरूप (सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक) स्पष्ट करणे.
६. लोकइतिहास (*Folk History)* या संकल्पनेच्या संदर्भात परधान परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणे.
७. आदिवासी समाजाच्या इतिहासलेखनामध्ये मौखिक स्रोतांचे स्थान व उपयुक्तता यांचे बदलते स्वरूप अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनामध्ये परधान आदिवासी जमातीची सामाजिक-सांस्कृतिक भूमिका समजून घेण्यासाठी **गुणात्मक संशोधन पद्धतीचा** (*Qualitative Research Method)* अवलंब करण्यात आला आहे. आदिवासी समाजातील सामूहिक स्मृती, मौखिक परंपरा आणि सांस्कृतिक ओळख यांचा अभ्यास करण्यासाठी गुणात्मक पद्धत अधिक उपयुक्त ठरते, कारण ती अनुभव, कथन, स्मृती आणि प्रतीकात्मक अर्थ यांचे सखोल विश्लेषण करण्यास मदत करते. या संशोधनासाठी **क्षेत्रीय अभ्यास** (*Field Study)* हा प्रमुख आधार आहे. महाराष्ट्रातील गोंड बहुल वस्ती असलेल्या निवडक भागांमध्ये परधान आदिवासी कुटुंबांशी थेट संवाद

साधण्यात आला. माहिती संकलनासाठी **सखोल मुलाखती** (*In-depth Interviews,* **मौखिक इतिहास नोंदी** (*Oral History Narratives)* आणि **निरीक्षण पद्धती** (*Participant Observation)* यांचा वापर करण्यात आला. विशेषतः परधानांकडून गायल्या जाणाऱ्या वंशगाथा, कथा आणि लोकगीते यांचे ध्वनिमुद्रण करून त्यांचे आशयविश्लेषण करण्यातआले.

**दुय्यम स्त्रोत** (*Secondary Sources)* म्हणून समाजशास्त्रीय ग्रंथ, संशोधन निबंध, जर्नल्स, शासकीय अहवाल आणि आदिवासी समाजावरील मानवशास्त्रीय अभ्यासांचा उपयोग करण्यात आला आहे. माहितीच्या विश्लेषणासाठी **वर्णनात्मक व आशय विश्लेषण पद्धती** (*Descriptive and Content Analysis)* वापरण्यात आल्या. या प्रक्रियेमुळे परधान परंपरेतील सांस्कृतिक प्रतीक, सामाजिक मूल्ये आणि स्मृतीसंरचना स्पष्टपणे समजून घेता आल्या. अशा प्रकारे, प्राथमिक व दुय्यम स्रोतांच्या साहाय्याने संकलित केलेल्या माहितीचे समाजशास्त्रीय विश्लेषण करून परधान आदिवासी जमातीच्या सांस्कृतिक भूमिकेचे समग्र चित्र उभे करण्याचा प्रयत्न या संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

**परधान समाजाचा परिचय:** भारतीय आदिवासी समाजांच्या सांस्कृतिक वैविध्यात परधान समाजाचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. परधानांना गोंड समाजाचे पारंपरिक गायक, पुरोहित आणि वंशगाथा सांगणारे म्हणूनओळखले जाते. ते गोंड समाजाच्या धार्मिक परंपरांशीच नव्हे तर त्यांच्या इतिहास, संस्कृती आणि जातीय स्मृतीशीही घट्ट जोडलेले आहेत.

**१. भौगोलिक वितरण:** परधान समाज प्रामुख्याने पुढील भागांत आढळतो - मध्यप्रदेश : मंडला, डिंडोरी, बालाघाट, सिवनी, महाराष्ट्र : गोंडवाना प्रदेश - गडचिरोली, गोंदिया, छत्तीसगड : बस्तर, रायगड परिसर या भागांमध्ये परधान गोंड समाजासोबत राहून त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात सक्रिय सहभाग घेतात.

**२. सामाजिक व सांस्कृतिक स्थान:** परधान परंपरेने **वंशावळी गायक** (*Genealogists)* मानले जातात. ते***बाना*** या वाद्याच्या साहाय्याने पूर्वजांच्या गाथा सादर करतात. गोंड समाजात त्यांना मानाचे स्थान असून ते कुलस्मृती जपणारे मानले जातात. धार्मिक विधी आणि सामाजिक प्रसंगी त्यांची उपस्थिती अनिवार्य मानली जाते.

**३. आजीविका आणि पारंपरिक भूमिका:** परंपरेने परधानांची उपजीविका गोंड समाजावर अवलंबून होती. विवाह, मृत्यू, सण आणि गोत्रविधींच्या वेळी गाथा सादर करून त्यांना धान्य, अन्न, वस्त्र व दान मिळत असे. ते केवळ कलाकार नव्हते, तर गोंड समाजाच्या आध्यात्मिक जीवनाचा अविभाज्य भाग होते.

**४. परधान आणि गोंड यांचे नाते:** परधान आणि गोंड यांचे नाते **संरक्षक-संरक्षित** (*Patron–Client Relationship)* स्वरूपाचे होते. गोंडसमाजाची सांस्कृतिक स्मृती जपणे हे परधानांचे कर्तव्य होते, तर बदल्यात गोंड समाज त्यांना आजीविका व सामाजिक सन्मान देत असे.

**५. वैशिष्ट्य:** परधान समाजाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे **मौखिक परंपरेचे जतन**. त्यांच्या गाथांमध्ये केवळ नावे नसून पूर्वजांची शौर्यगाथा, संघर्ष, धार्मिक आस्था आणि सांस्कृतिक वारसा यांचे वर्णन आढळते.

**सैद्धांतिक परिप्रेक्ष्य : सामूहिक स्मृती आणि मौखिक इतिहास:** समाजशास्त्रीय अभ्यासामध्येसामूहिक स्मृती *(Collective Memory)* ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची मानली जाते. फ्रेंच समाजशास्त्रज्ञ **मॉरिस हाल्बवॅक्स** (*Maurice Halbwachs)* यांच्या मते, स्मृती ही केवळ वैयक्तिक नसून ती सामाजिक चौकटीत (*Social Frameworks)* घडत असते. कोणताही समुदाय आपल्या भूतकाळाचे स्मरण स्वतंत्रपणे करत नाही, तर तो स्मरणप्रक्रिया सामाजिक परंपरा, विधी, कथा, गीते आणि सांस्कृतिक प्रतीकांच्या माध्यमातून सामूहिक स्वरूपात जपतो. आदिवासी समाजांमध्ये, विशेषतः गोंड समाजात, ही सामूहिक स्मृती लिखित इतिहासाऐवजी मौखिक परंपरेद्वारे जतन केली जाते. **यान अस्मान (Jan Assmann)** यांनी मांडलेली*सांस्कृतिक स्मृती (Cultural Memory)* ही संकल्पना या अभ्यासासाठी विशेष उपयुक्त ठरते. अस्मान यांच्या मते, सांस्कृतिक स्मृती ही दीर्घकालीन स्वरूपाची असते आणि ती मिथके, वंशगाथा, धार्मिक विधी व परंपरांच्या माध्यमातून पिढ्यान्-पिढ्या संक्रमित होत राहते. परधान आदिवासी जमात गोंड समाजासाठी हीच भूमिका बजावताना दिसते. परधानांकडून गायल्या जाणाऱ्या वंशगाथा केवळ पूर्वजांची नावे सांगत नाहीत, तर त्या गोंड समाजाच्या सांस्कृतिक आत्मचरित्राचे (CulturalAutobiography) कार्य करतात. त्यामुळे परधान हे गोंड समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीचे प्रमुख संवाहक ठरतात. यासोबतच **पॉल थॉम्पसन** (*Paul Thompson)* यांच्यामौखिकइतिहाससिद्धांत *(Oral History Theory)* च्या आधारे परधानांच्या गाथांचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. मौखिक इतिहास हा 'लिखित इतिहासाच्या अभावातील इतिहास' नसून, तो सामान्य आणि वंचित समुदायांचा दृष्टिकोन मांडणारा पर्यायी इतिहास आहे. परधानांची वंशगाथा ही गोंड समाजाचा लोकइतिहास असून, ती त्यांच्या सामाजिक रचनेला, धार्मिक श्रद्धांना आणि सांस्कृतिक मूल्यांना अर्थ देते. या संदर्भात परधान—गोंड संबंधाला मानवशास्त्रीय दृष्टिकोनातून*संरक्षक—संरक्षित नातेसंबंध (Patron–Client Relationship)* म्हणूनही समजता येते, ज्यामध्ये परधान स्मृतीचे संरक्षण करतात आणि गोंड समाज त्यांना सामाजिक मान्यता व आधार देतो. अशा प्रकारे, सामूहिक स्मृती, सांस्कृतिक स्मृती आणि मौखिक इतिहास या सैद्धांतिक चौकटी परधान आदिवासी जमातीच्या भूमिकेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी मजबूत आधार प्रदान करतात. या चौकटीच्या साहाय्याने परधानांना केवळ लोकगायक न मानता, **सांस्कृतिक स्मृतीचे संरक्षक आणि लोक इतिहासकार** म्हणून समजून घेता येते.

**जातीय स्मृतीचे स्वरूप:** जातीय स्मृती म्हणजे समाजाने पिढ्यान्-पिढ्या जपलेली ऐतिहासिक आठवण, परंपरा व सांस्कृतिक अनुभव. परधान जमातीत जातीय स्मृती पुढील माध्यमांतून जतन केली जाते: गोंड राजवंशांची ऐतिहासिक गाथा, देवदेवता, निसर्गपूजा व पूर्वजपूजा, पारंपरिक कथा, गीत व पुराणकथा या स्मृती परधान समाजाला त्यांच्या मूळ ओळखीशी जोडून ठेवतात आणि सामूहिक ऐक्य बळकट करतात. **मौखिक परंपरा : सांस्कृतिक वारशाचा आधार:** परधान जमातीचे सांस्कृतिक जीवन मौखिक परंपरेवर आधारित आहे. लिखित परंपरेपेक्षा मौखिक कथनाला अधिक महत्त्व आहे.

**मौखिक परंपरेचे प्रमुख घटक: गाणी व आख्यायिका** - गोंड वीरगाथा व पौराणिक कथा, **ढोल व वाद्य परंपरा** - धार्मिक व सामाजिक समारंभात वापर, **लोककथा व पुराणकथा** - सामाजिक मूल्यांचे संवर्धन या परंपरांमुळे समाजाचा इतिहास, मूल्ये व सांस्कृतिक स्मृती जिवंत राहतात.

**सांस्कृतिक ओळख : परंपरा आणि आधुनिकतेतील संघर्ष:** आधुनिक शिक्षण, शहरीकरण, आर्थिक बदल आणि माध्यमांचा प्रभाव यामुळे परधान समाजाच्या सांस्कृतिक ओळखीत बदल होत आहेत.

**बदलते स्वरूप :** पारंपरिक व्यवसाय (कथाकथन, संगीत, पूजा) कमी होत आहेत. युवकांमध्ये आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव वाढतो आहे. भाषिक परंपरा व लोकगीतांचा वापर घटतो आहे. धार्मिक व सामाजिक विधींमध्ये परिवर्तन होत आहे. यामुळे पारंपरिक सांस्कृतिक ओळख टिकवण्याचे आव्हान वाढले आहे.

**बदलामागील प्रमुख कारणे:** शिक्षण व औपचारिक रोजगाराची वाढ, माध्यमे व डिजिटल संस्कृतीचा प्रभाव, स्थलांतर व नागरीकरण, शासकीय धोरणे व सामाजिक मुख्यप्रवाहाशी एकात्मता, हे घटक परधान समाजाच्या परंपरागत जीवनपद्धतीत परिवर्तन घडवतात. परधान समाजाच्या जातीय स्मृती आणि मौखिक परंपरा जतन करणे अत्यावश्यक आहे.

**संवर्धनासाठी उपाय:** लोककथा, गाणी व परंपरांचे दस्तऐवजीकरण, आदिवासी भाषा व संस्कृतीचे शैक्षणिक समावेशन, सांस्कृतिक महोत्सव व संशोधन प्रोत्साहन, युवकांमध्ये सांस्कृतिक जाणीव निर्माण करणे.

**निष्कर्ष व सूचना:** प्रस्तुत संशोधनातून असे स्पष्ट होते की परधान आदिवासी जमात ही गोंड समाजाच्या सांस्कृतिक परंपरेची केवळ वाहक नसून, ती सामूहिक स्मृती, मौखिक इतिहास आणि सांस्कृतिक ओळख यांची सक्रिय संरक्षक आहे. परधानांकडून गायल्या जाणाऱ्या वंशगाथा, कथा व लोकगीते या गोंड समाजाच्या ऐतिहासिक जाणीवेचा आणि सांस्कृतिक सातत्याचा मूलभूत आधार ठरतात. लिखित इतिहासाच्या अभावात, या मौखिक परंपरांनीच गोंड समाजाची सामाजिक रचना, धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक मूल्ये पिढ्यान्-पिढ्या जपली आहेत. अभ्यासातून हेही अधोरेखित होते की परधान—गोंड संबंध हा केवळ उपजीविकेवर आधारित नसून, तो परस्परावलंबन, सामाजिक मान्यता आणि सांस्कृतिक उत्तरदायित्वावर आधारित आहे. आधुनिकतेचा प्रभाव, शिक्षणव्यवस्था आणि माध्यमांचे वाढते प्राबल्य यांमुळे परधानांची पारंपरिक भूमिका हळूहळू दुर्बल होत असल्याचेही आढळते. यामुळे मौखिक परंपरेचे जतन आणि सांस्कृतिक स्मृतीची सलगता धोक्यात येण्याची शक्यता आहे. परधान आदिवासी जमातीची जातीय स्मृती, मौखिक परंपरा आणि सांस्कृतिक ओळख ही त्यांच्या सामाजिक अस्तित्वाची मूलभूत आधारशिला आहे. आधुनिकतेमुळे बदल होत असले तरी, या सांस्कृतिक वारशाचे संवर्धन केल्यास परधान समाजाची ऐतिहासिक व सांस्कृतिक ओळख भविष्यात टिकून राहू शकते. या पार्श्वभूमीवर पुढील **सूचना** मांडल्या आहेत.

परधान आदिवासी जमातीच्या मौखिक परंपरेचे ध्वनिमुद्रण, दृश्य-श्राव्य नोंदी आणि डिजिटल संग्रहण तातडीने करणे आवश्यक आहे. आदिवासी अभ्यासक्रमामध्ये परधानांच्या वंशगाथा व लोकइतिहासाचा समावेश करावा. सांस्कृतिक संस्था व विद्यापीठांनी परधान लोककलाकारांना संशोधन व प्रशिक्षण प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे. आदिवासी समाजाच्या इतिहासलेखनामध्ये मौखिक स्रोतांना अधिकृत व शास्त्रीय मान्यता देण्यात यावी. भविष्यातील संशोधनात परधान जमातीची बदलती सामाजिक भूमिका आणि नव्या पिढीची सांस्कृतिक जाणीव यांचा तुलनात्मक अभ्यास करावा. अशा प्रकारे, प्रस्तुत संशोधन आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक अभ्यासाला नवा समाजशास्त्रीय दृष्टीकोन प्रदान करते आणि परधान आदिवासी जमातीच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक योगदानाचे महत्त्व अधोरेखित करते.

## संदर्भसूची


१. शिंदे, बी. टी. (२०१०) . *भारतीय आदिवासी जीवन.* मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
२. देशमुख, ना. ग. (२००८) . *आदिवासी समाज आणि संस्कृती.* पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.
३. देशपांडे, आर. म. (२०१४) . *गोंड आदिवासी समाज : इतिहास आणि संस्कृती.* नागपूर : विदर्भ साहित्य संघ.
४. पवार, के. बी. (२०१६) . *गोंडवाना संस्कृती आणि परंपरा.* चंद्रपूर : लोकायत प्रकाशन.
५. मोरे, ए. एस. (२०१८) . *परधान समाज : मौखिक परंपरा आणि वंशावळी.* नांदेड : प्रतिभा प्रकाशन.
६. खैरनार, सु. रा. (२०१५) . *लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरा.* औरंगाबाद : साकेत प्रकाशन.
७. देशमुख, म. रा. (२००९) . *लोकसाहित्य : स्वरूप आणि परंपरा.* पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन.
८. पाटील, श. रा. (२०१३) . *मौखिक इतिहास आणि समाज.* कोल्हापूर : शिवराज प्रकाशन.
९. देशपांडे, स. म. (२०१७) . *सामूहिक स्मृती आणि समाज.* पुणे : साधना प्रकाशन.
१०. कुलकर्णी, अ. ग. (२०११) . *संस्कृती, ओळख आणि समाज.* मुंबई : ग्रंथाली.
११. जाधव, वि. स. (२०१९) . *जातीय स्मृती आणि सामाजिक ओळख.* औरंगाबाद : यशवंत प्रकाशन.
१२. साळुंके, द. रा. (२०१६) . *गुणात्मक संशोधन पद्धती.* नाशिक : स्नेहवर्धन प्रकाशन.
१३. बोरसे, प्र. रा. (२०१४) . *समाजशास्त्रीय संशोधन पद्धती.* पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस.
१४. वर्मा, आर. (२००४) . *आदिवासी समाजातील जातीय स्मृती आणि सामाजिक ओळख.* नवी दिल्ली : ओरिएंट ब्लॅकस्वान.
१५. सिंह, एस. (२०१६) . *आदिवासी समाजातील सांस्कृतिक परिवर्तन आणि तरुण पिढी.* नवी दिल्ली : सेज पब्लिकेशन्स.
१६. गुप्ता, आर. (२०१२) . जागतिकीकरणाचा आदिवासी संस्कृतीवर परिणाम. नवी दिल्ली : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
१७. Assmann, J. (२०११) *Cultural memory and early civilization: Writing, remembrance, and political imagination.* Cambridge University Press.
१८. Elwin, V. (१९४९) . *The Gond and the Bhumia of Eastern Mandla.* Oxford University Press.
१९. Halbwachs, M. (१९९२). *On collective memory.* University of Chicago Press. (Original work published १९५०)
२०. Xaxa, V. (२०१४) . *State, society, and tribes: Issues in post-colonial India.* Pearson India.
२१. Burke, P. (१९८९) . *Popular culture in early modern Europe.* Harper & Row.
२२. Oral History Association of India. (२०१०) . *Proceedings of Oral History Association of India.* OHAI.

# ग्रामीण भागातील आदिवासी मुलांच्या शिक्षणातील बदलते स्वरूप आणि आव्हाने -विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

**प्रा. महेश शंकरराव हंबर्डे** संशोधक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**सारांश**: शिक्षण हे सामाजिक परिवर्तन आणि समावेशक विकासाचे प्रभावी साधन मानले जाते. भारतातील आदिवासी समाज, विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागात वास्तव्यास असलेले आदिवासी, ऐतिहासिकदृष्ट्या शैक्षणिकदृष्ट्या वंचित राहिले आहेत. गेल्या काही दशकांत केंद्र व राज्य शासनाने आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी विविध घटनात्मक तरतुदी, धोरणे व योजना राबविल्या आहेत. यामुळे शालेय नावनोंदणी व शैक्षणिक पायाभूत सुविधा वाढल्या असल्या, तरी गुणवत्तापूर्ण शिक्षण, शाळेत टिकाव (Retention) आणि सांस्कृतिक सुसंगतता यासंबंधी अनेक आव्हाने अद्याप कायम आहेत. प्रस्तुत संशोधन लेखात ग्रामीण भागातील आदिवासी मुलांच्या शिक्षणातील बदलते स्वरूप आणि त्यांच्यासमोरील प्रमुख सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व संस्थात्मक आव्हानांचा अभ्यास करण्यात आला आहे. हा अभ्यास दुय्यम माहितीवर आधारित असून शासकीय अहवाल, जनगणना, शैक्षणिक सर्वेक्षणे आणि संशोधन साहित्याचा आधार घेतला आहे. अभ्यासातून असे स्पष्ट होते, की शिक्षणाच्या प्रमाणात्मक विस्ताराबरोबरच गुणात्मक सुधारणा व सांस्कृतिकदृष्ट्या सुसंगत शिक्षण व्यवस्था अद्याप अपुरी आहे.

**मुख्य शब्द**: आदिवासी शिक्षण, ग्रामीण शिक्षण, अनुसूचित जमाती, शैक्षणिक आव्हाने, भारत, एकलव्य मॉडेल निवासी शाळा

**प्रस्तावना**: भारत हा बहुसांस्कृतिक, बहुभाषिक आणि विविध सामाजिक रचनेने युक्त असा देश आहे. या सामाजिक रचनेत आदिवासी समाजाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीय संविधानाने अनुसूचित जमातींना *(Scheduled Tribes)* सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास घटक म्हणून ओळख देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष तरतुदी केल्या आहेत. तथापि, ऐतिहासिक व संरचनात्मक कारणांमुळे आदिवासी समाज शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून बराच काळ दूर राहिला आहे. विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागात वास्तव्यास असलेल्या आदिवासी मुलांच्या शिक्षणास अनेक अडथळे राहिले आहेत. महाराष्ट्र हे आदिवासी लोकसंख्येच्या दृष्टीने भारतातील एक महत्त्वाचे राज्य आहे. २०११ च्या जनगणनेनुसारदेशातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या सुमारे ८. ६टक्केअसून, महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या सुमारे ९. ४ टक्के आहे. आदिवासी लोक प्रामुख्याने नाशिक, नंदुरबार, धुळे, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये केंद्रित आहे. मराठवाडा विभागातील नांदेड जिल्ह्यात गोंड, परधान, कोलाम, आंध, मन्नेरवारलू अशा विविध आदिवासी जमाती आढळतात. भौगोलिक दुर्गमता, आर्थिक दुर्बलता आणि सामाजिक वंचितता यांचा थेट परिणाम नांदेड जिल्ह्यातील आदिवासी मुलांच्या शिक्षणावर दिसून येतो. स्वातंत्र्योत्तर काळापासून आदिवासी शिक्षणाच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध धोरणे व योजना राबविल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत आश्रमशाळा, शासकीय व अनुदानित शाळा, वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना तसेच केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अभियान व एकलव्य मॉडेल निवासी शाळा (EMRS) या योजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. शिक्षणाचा मूलभूत अधिकार कायदा (२००९) लागू झाल्यानंतर आदिवासी मुलांच्या शालेय नावनोंदणीत लक्षणीय वाढ झाली आहे. तरीही, नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण आदिवासी मुलांच्या शिक्षणात गुणवत्ता, सातत्य आणि शिकण्याच्या पातळीशी संबंधित आव्हाने आजही कायम आहेत. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समाजाची उपजीविका मुख्यतः शेती, मजुरी, वनउपज संकलन आणि हंगामी स्थलांतरावर अवलंबून आहे. दारिद्र्य, अशिक्षितपणा, आरोग्य समस्या आणि सामाजिक वंचितता यांचा थेट परिणाम आदिवासी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर दिसून येतो. अनेक कुटुंबांमध्ये शिक्षणापेक्षा उपजीविकेला अधिक प्राधान्य दिले जाते. परिणामी, बालमजुरी, शाळेतील अनियमित उपस्थिती आणि गळतीचे प्रमाण वाढते. तथापि, केवळ शाळेत प्रवेश वाढणे म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षण सुनिश्चित होणे असे नाही. आजही नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण आदिवासी मुलांच्या शिक्षणात भाषिक अडथळे, अपुरी शैक्षणिक पायाभूत सुविधा, शिक्षकांची कमतरता, स्थलांतर, डिजिटल दरी आणि अभ्यासक्रमाची सांस्कृतिक विसंगती अशी अनेक आव्हाने कायम आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण आदिवासी मुलांच्या शिक्षणातील बदलते स्वरूप समजून घेणे आणि त्यांच्यासमोरील वास्तववादी आव्हानांचे सखोल विश्लेषण करणे अत्यंत आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधन लेखात महाराष्ट्र विशेषतः नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आदिवासी मुलांच्या शिक्षणातील बदलते स्वरूप, शासकीय उपक्रमांचा प्रभाव आणि शिक्षणासमोरील प्रमुख अडचणी यांचा अभ्यास करण्यात आला आहे. हा अभ्यास आदिवासी शिक्षण धोरणे अधिक परिणामकारक करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरेल.

**पूर्व संशोधन साहित्याचा आढावा**: साहित्याचाआढावाम्हणजे संशोधन विषयाशी संबंधित यापूर्वी प्रकाशित झालेल्या अभ्यास, अहवाल, पुस्तके, संशोधन लेख आणि धोरणात्मक दस्तऐवज यांचा सखोल आढावा. यामुळे विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट होते, संशोधनातील महत्त्वाचे निष्कर्ष समजतात आणि विद्यमान संशोधनातील उणिवा (Research Gap) ओळखता येतात. ग्रामीण भागातील आदिवासी मुलांच्या शिक्षणावर राष्ट्रीय, राज्यस्तरीय व प्रादेशिक स्तरावर अनेक अभ्यास झाले आहेत. **देवन (२०१४)** यांनी त्यांच्या अभ्यासात असे मत मांडले की, सध्याचा अभ्यासक्रम आदिवासींच्या सामाजिक-आर्थिक आणि संस्कृतीशी संबंधित असावा. अभ्यासात असे सुचवण्यात आले आहे की, चांगल्या संप्रेषण सुविधा, स्वच्छता कार्यक्रम, शिक्षण साहित्य आणि पद्धती प्रदान करून सरकार आदिवासी लोकसंख्येमध्ये शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल घडवून आणण्याची अपेक्षा करू शकते.

**कुमारी (२०१४)** यांनी नमूद केले की प्राथमिक स्तरावर शिक्षण घेत असताना मुले आणि मुली दोघांनाही काही प्रकारच्या अडथळ्यांना तोंड द्यावे लागले. प्राथमिक स्तरावर आदिवासी मुलांमध्ये शाळा सोडण्याची मुख्य कारणे म्हणजे शाळांचे स्थान, भाषा आणि अभ्यासक्रम, योग्य सुविधांचा अभाव, पालकांचे दुर्लक्ष आणि सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक पद्धती. **पाधी (२०१४)** यांनी प्रेरणा, जागरूकता, पालकांची आर्थिक परिस्थिती, प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव, वाचन साहित्य, कमकुवत पायाभूत सुविधा आणि सुविधांचा अभाव यांचे विश्लेषण केले. शिवाय, आदिवासी विद्यार्थ्यांची हंगामी अनुपस्थिती किंवा अनुपस्थिती आणि अनुसूचित जमातींसाठी सुनियोजित शिक्षण प्रणालीचा अभाव ही अनुसूचित जमातीच्या मुलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असण्यामागील कारणे आहेत. **शर्मा (२०१४)** यांनी त्यांच्या 'जम्मू आणि काश्मीरमधील गुज्जर, बकरवाल आणि गद्दींमध्ये शिक्षण आणि महिला सक्षमीकरण' या लेखात महिला शिक्षणाचा विकास खूपच मंद आहे आणि यामुळे महिलांमध्ये निरक्षरता, मागासलेपणा आणि शोषण होते यावर प्रकाश टाकला आहे. मोठ्या संख्येने आदिवासी महिला वेगवेगळ्या टप्प्यांवर शिक्षणापासून वंचित राहिल्या आहेत आणि त्यांना सक्षम करण्यासाठी आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक परिवर्तनासाठी नेतृत्वगुण आत्मसात करण्यासाठी संधी उपलब्ध करून देण्याची खूप गरज आहे. **रामचंद्रन आणि दीपन (२०१७)** यांनी भारतातील अनुसूचित जमातींची शैक्षणिक स्थिती शोधण्यासाठी एक अभ्यास केला. अभ्यासाच्या निष्कर्षांवरून असे दिसून आले की आदिवासी लोकांमध्ये व्यापक गरिबी, निरक्षरता आणि मागासलेपणा आहे, त्यानंतर कमकुवत पायाभूत सुविधा तसेच कमी प्रेरणा असलेले शिक्षक आहेत. शिवाय, आदिवासी समुदायामध्ये जागरूकतेचा अभाव आहे ज्यामुळे शाळा सोडण्याचे प्रमाण वाढले आणि त्यांच्या एकूण शैक्षणिक स्थितीवर थेट परिणाम झाला. **गिलानी (२०१६)** यांनी काश्मीर विभागातील शोपियान जिल्ह्यात राहणाऱ्या जमातींवर एक अनुभवजन्य अभ्यास केला आहे. त्यांनी दूरवरच्या आणि कठीण पर्वतशिखरांवर राहणाऱ्या जमातींच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचा शोध घेतला आहे. अभ्यास क्षेत्रातून गोळा केलेल्या डेटाचे स्पष्टीकरण आणि विश्लेषण केल्यानंतर, लेखकाने असा **निष्कर्ष** काढला आहे कीशोपियान जिल्ह्याचा साक्षरता दर फक्त ६२.४९ % आहे. जो राज्य साक्षरता दरापेक्षा (६७.१६ %) ०४.६७ % कमी आहे आणि राष्ट्रीय साक्षरता दरापेक्षा (७४.०४%) ११.५५% कमी आहे. तसेच ८३.२६% आदिवासी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जगत आहे. त्याच बरोबर शाळेत जाणाऱ्या मुलांचे ९०% पालक निरक्षर आहेत. तसेच शोपियान जिल्ह्यात आदिवासी लोक राहत असलेल्या सर्व भागात कोणतीही गैर-सरकारी शैक्षणिक संस्था नाही. त्याच बरोबर शाळांमध्ये शिक्षण सुविधांचा अभाव आहे. शोपियान जिल्ह्यातील सर्व आदिवासी मुलांना अत्यंत शैक्षणिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अभ्यासाधीन भागातील भौगोलिक आणि हवामान परिस्थिती कठोर आहे आणि त्यामुळे अधिकाऱ्यांना दैनंदिन शाळेच्या वेळा आणि वार्षिक शैक्षणिक दिनदर्शिका कमी करण्यास भाग पाडले जात आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:** प्रस्तुत अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत. ग्रामीण आदिवासी मुलांच्या शिक्षणातील बदलते स्वरूप अभ्यासणे. आदिवासी शिक्षणासमोरील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक आव्हानांचे विश्लेषण करणे. आदिवासी शिक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांचा आढावा घेणे. ग्रामीण आदिवासी मुलांच्या शिक्षणाच्या गुणवत्तावृद्धीसाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पद्धती:** हा अभ्यास **दुय्यम माहितीवर आधारित** आहे. त्यात **गुणात्मक संशोधन पद्धतीचा** वापर करण्यात आला आहे. यासाठी भारताची जनगणना, शिक्षण मंत्रालयाचे अहवाल, आदिवासी कार्य मंत्रालयाचे दस्तऐवज, UDISE+, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (NSS), राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS) तसेच विविध संशोधन लेख, पुस्तके व प्रबंधांचा आधार घेण्यात आला आहे. अभ्यासाची पद्धत वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाची आहे.

**संकल्पनात्मक चौकट - आदिवासी शिक्षण:** आदिवासी शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता प्राप्त करणे नव्हे, तर आदिवासी समाजाचे सक्षमीकरण, सांस्कृतिक जतन आणि सामाजिक-आर्थिक विकास साधणे होय. परंतु प्रचलित मुख्य प्रवाहातील शिक्षण पद्धती आदिवासींच्या स्थानिक ज्ञानव्यवस्था, भाषा आणि जीवनशैलीकडे दुर्लक्ष करतात. यामुळे आदिवासी मुलांमध्ये शाळेबाबत परकेपणाची भावना निर्माण होते.

**आदिवासी मुलांच्या शिक्षणातील बदलते स्वरूप : नांदेड जिल्हा**

**शैक्षणिक प्रवेशात वाढ:** महाराष्ट्रात शिक्षणाचा मूलभूत अधिकार कायदा (२००९) लागू झाल्यानंतर आदिवासी बहुल ग्रामीण भागात प्राथमिक शाळांचे जाळे विस्तारले आहे. नांदेड जिल्ह्यातील किनवट, हदगाव, भोकर व धर्माबाद तालुक्यांमध्ये आदिवासी मुलांची शाळेत नावनोंदणी वाढलेली दिसून येते. मोफत शिक्षण, पाठ्यपुस्तके, गणवेश व मध्यान्ह भोजन योजनेमुळे उपस्थितीत सुधारणा झाली आहे.

**आश्रमशाळांचा प्रभाव:** नांदेड जिल्ह्यातील आदिवासी शिक्षणात आश्रमशाळांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. दुर्गम गावांतील मुलांसाठी निवासी शिक्षण उपलब्ध करून देण्यात आश्रमशाळा उपयुक्त ठरल्या आहेत. विशेषतः आदिवासी मुलींच्या माध्यमिक शिक्षणात या शाळांनी सकारात्मक भूमिका बजावली आहे.

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक धोरणे:** महाराष्ट्र शासनाने आदिवासी शिक्षणासाठी स्वतंत्र आदिवासी विकास विभाग स्थापन केला असून आश्रमशाळा सुधार योजना, गुणवत्तावृद्धी कार्यक्रम आणि शिक्षक प्रशिक्षण उपक्रम राबविले आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने मातृभाषा आधारित शिक्षणाच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे.

**डिजिटल व पर्यायी शिक्षण:** कोविड-१९ नंतर नांदेड जिल्ह्यातील काही आदिवासी भागांत दूरदर्शन, व्हॉट्सअ‍ॅप-आधारित शिक्षण व ऑफलाइन शैक्षणिक साहित्याचा वापर करण्यात आला. तथापि, डिजिटल सुविधांचा अभाव ही मोठी मर्यादा आहे.

**आदिवासी शिक्षणातील आव्हाने : नांदेड जिल्हा**

**आर्थिक व स्थलांतर समस्या:** नांदेड जिल्ह्यातील अनेक आदिवासी कुटुंबे हंगामीमजुरीसाठी स्थलांतर करतात. यामुळे मुलांच्या शिक्षणात खंड पडतो आणि गळतीचे प्रमाण वाढते. हंगामी रोजगाराच्या शोधात नांदेड जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबे ऊसतोड, वीटभट्टी, बांधकाम, कापूस वेचणी यांसारख्या कामांसाठी जिल्ह्याबाहेर स्थलांतर करतात. या स्थलांतराच्या काळात मुले पालकांसोबत स्थलांतरित होतात किंवा गावात देखरेखीअभावी राहतात. दोन्ही परिस्थितींमध्ये मुलांच्या शालेय उपस्थितीत खंड पडतो, अभ्यासात पिछाडी निर्माण होते आणि अनेकदा शाळा सोडण्याची (Dropout) शक्यता वाढते. आर्थिक अडचणींमुळे काही आदिवासी मुले बालमजुरीकडे वळतात किंवा कुटुंबाच्या उपजीविकेत हातभार लावण्यासाठी शिक्षण अर्धवट सोडतात. मुलींवर घरकाम, लहान भावंडांची जबाबदारी आणि लवकर विवाहाचा दबाव येतो, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या शैक्षणिक सातत्यावर होतो. यामुळे माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर आदिवासी मुलींचे गळतीचे प्रमाण तुलनेने अधिक आढळते. शासनाच्या मध्यान्ह भोजन योजना, शिष्यवृत्ती, मोफत गणवेश व पाठ्यपुस्तके यांसारख्या उपाययोजनांमुळे काही प्रमाणात आर्थिक अडथळे कमी झाले असले, तरी स्थलांतरित कुटुंबांच्या मुलांसाठी लवचिक व सातत्यपूर्ण शैक्षणिक व्यवस्था अद्याप अपुरी आहे. त्यामुळे आर्थिक व स्थलांतर समस्या या ग्रामीण आदिवासी शिक्षणातील संरचनात्मक आव्हाने म्हणून पुढे येतात.

**भाषिक अडथळे:** प्राथमिक स्तरावर मातृभाषेऐवजी अपरिचित भाषेतून शिक्षण दिले जात असल्यामुळे अनेक आदिवासी मुलांना वाचन, लेखन आणि संकल्पना समजून घेण्यात अडथळे येतात. शिक्षकांचे म्हणणे समजत नसल्याने मुले वर्गात निष्क्रिय राहतात, आत्मविश्वास गमावतात आणि शिकण्याविषयी नकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो. परिणामी, शालेय उपस्थिती कमी होते आणि हळूहळू गळतीचे प्रमाण वाढते. गोंडी, कोलामी, आंधी अशा स्थानिक भाषांतून बोलणाऱ्या मुलांसाठी मराठी माध्यमातील शिक्षण समजणे अवघड ठरते, विशेषतः प्राथमिक स्तरावर. भाषिक अडथळ्यांचा परिणाम केवळ शैक्षणिक प्रगतीपुरता मर्यादित नसून तो मुलांच्या मानसिक व भावनिक विकासावरही होतो. स्वतःची भाषा आणि संस्कृती शाळेत मान्यता न मिळाल्यामुळे आदिवासी मुलांमध्ये परकेपणाची भावना निर्माण होते. काही वेळा त्यांच्या भाषेची किंवा उच्चारांची खिल्ली उडवली जाते, ज्यामुळे न्यूनगंड, संकोच आणि आत्मसन्मानाला धक्का बसतो. त्यामुळे भाषिक अडथळे हे ग्रामीण आदिवासी शिक्षणातील दीर्घकालीन आणि संरचनात्मक आव्हान म्हणून पुढे येतात.

**पायाभूत सुविधा व शिक्षकांची कमतरता:** ग्रामीण आदिवासी मुलांच्या शिक्षणावर परिणाम करणारा आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता होय. नांदेड जिल्ह्यातील अनेक आदिवासी बहुल गावांमध्ये शाळांची इमारत जीर्ण अवस्थेत असून वर्गखोल्यांची संख्या अपुरी आहे. काही ठिकाणी स्वतंत्र वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय आणि वीजपुरवठा यांचा अभाव आढळतो. विशेषतः मुलींसाठी स्वतंत्र व सुरक्षित स्वच्छतागृहांची कमतरता ही त्यांच्या शाळेत टिकावावर विपरीत परिणाम करणारी बाब ठरते. तसेच शिक्षकांची कमतरता ही आदिवासी शिक्षणातील एक गंभीर समस्या आहे.

**गळती व शिकण्याची पातळी:** प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक स्तरावर गळतीचे प्रमाण नांदेड जिल्ह्यात तुलनेने अधिक आहे. अभ्यासातील अपयश आणि आर्थिक गरजांमुळे अनेक मुले शिक्षण सोडतात.

**डिजिटल दरी:** कोविड-१९ नंतर नांदेड जिल्ह्यातील काही आदिवासी भागांत दूरदर्शन, व्हॉट्सॲप-आधारित शिक्षण व ऑफलाइन शैक्षणिक साहित्याचा वापर करण्यात आला. तथापि, डिजिटल सुविधांचा अभाव ही मोठी मर्यादा आहे. इंटरनेट व वीजपुरवठ्याच्या मर्यादांमुळे डिजिटल शिक्षणाचा लाभ मर्यादित राहतो.

**आदिवासी शिक्षणासाठी शासकीय उपक्रम:** केंद्र व राज्य शासनाने आदिवासी शिक्षणासाठी एकलव्य मॉडेल निवासी शाळा (EMRS), शिष्यवृत्ती योजना, वसतिगृहे, मोफत शिक्षण योजना अशा विविध योजना राबविल्या आहेत. तथापि, या योजनांच्या अंमलबजावणीत गुणवत्ता व देखरेखीचा अभाव दिसून येतो.

**निष्कर्ष:** अभ्यासातून असे दिसून येते की, आदिवासी शिक्षणात धोरणात्मक पातळीवर सकारात्मक बदल झाले आहेत. मात्र सामाजिक विषमता, सांस्कृतिक विसंगती आणि गुणवत्तेचा अभाव यामुळे अपेक्षित परिणाम साध्य होत नाहीत. ग्रामीण आदिवासी मुलांच्या शिक्षणात संख्यात्मक प्रगती झाली असली, तरी गुणात्मक सुधारणा अजूनही अपुरी आहे. सांस्कृतिकदृष्ट्या सुसंगत, समावेशक आणि समुदाय-आधारित शिक्षण व्यवस्था विकसित केल्यास आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण प्रभावी साधन ठरू शकते.

**उपाययोजना व शिफारसी:** प्राथमिक स्तरावर मातृभाषा-आधारित बहुभाषिक शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी करावी. स्थानिक आदिवासी समाजातील शिक्षकांची भरती व प्रशिक्षण देणे. श्रमशाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, सुरक्षितता व समुपदेशन व्यवस्था मजबूत करणे. शाळा व्यवस्थापनात पालक व समुदायाचा सहभाग वाढविणे. दुर्गम भागांसाठी ऑफलाइन व कमी खर्चिक डिजिटल शिक्षण साधने विकसित करणे.

**संदर्भ:**


१. भारत सरकार (२०२०) . राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०.

२. आदिवासी कार्य मंत्रालय, भारत सरकार – विविध अहवाल.

३. भारताची जनगणना (२०११) .

४. भारत सरकार (२०११) . भारताची जनगणना २०११ : अनुसूचित जमाती लोकसंख्या. नवी दिल्ली : भारत सरकार.

५. भारत सरकार (२००९) . शिक्षणाचा मूलभूत अधिकार कायदा, २००९. नवी दिल्ली : भारत सरकार.

६. भारत सरकार (२०२०) . राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०. नवी दिल्ली : शिक्षण मंत्रालय.

७. आदिवासी कार्य मंत्रालय, भारत सरकार. आदिवासी शिक्षणावरील वार्षिक अहवाल. नवी दिल्ली.

८. महाराष्ट्र शासन (विविध वर्षे) . आदिवासी विकास विभाग – वार्षिक अहवाल. मुंबई : महाराष्ट्र शासन.

९. महाराष्ट्र शासन (२०२२) . आश्रमशाळा व्यवस्थापन व गुणवत्तावृद्धी अहवाल. मुंबई.

१०. UDISE+ (विविध वर्षे) . School Education Statistics. शिक्षण मंत्रालय, भारत सरकार.

११. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय (NSSO) . शिक्षणावरील अहवाल. नवी दिल्ली.

१२. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS-५) . India Fact Sheet. मुंबई : IIPS.

१३. नाम्बिस्सन, जी. बी. (२०१२) . Sociology of Education in India.

१४. झाक्सा, व्ही. (२०१४) . State, Society and Tribes in India.

१५. चव्हाण, के. बी. (२०१८) . आदिवासी समाज आणि शिक्षण. पुणे : विद्या प्रकाशन.

१६. पाटील, आर. बी. (२०१६) . महाराष्ट्रातील आदिवासी विकास. औरंगाबाद : साई प्रकाशन.

१७. शिंदे, एस. एन. (२०२०) . "महाराष्ट्रातील आदिवासी शिक्षणाची सद्यस्थिती. " *शोध समीक्षा*, ५(२) .

१८. सोनवणे, व्ही. डी. (२०१७) . आदिवासी समाज : समस्या व आव्हाने. नाशिक : प्रशांतप्रकाशन.

१९. Tilak, J. B. G. (२००७) . Educational Inequality in India. New Delhi: Macmillan.

२०. UNESCO (२०१७) . Education for Indigenous Peoples. *Paris: UNESCO.*

२१. Xaxa, V. (२०१४) . State, Society and Tribes: Issues in Post-Colonial India. New Delhi:Pearson.

२२. Nambissan, G. B. (२०१२) . Sociology of Education in India. New Delhi: OxfordUniversity Press.

२३. Béteille, A. (१९९८) . The Idea of Indigenous People. New Delhi: Oxford University Press.

२४. Thapar, R. (२०१५) . Cultural Pasts. New Delhi: Oxford University Press.

२५. Desai, G., & Kulkarni, S. (२०१९) . "Tribal Education and Social Exclusion in India. " Economic and Political Weekly, ५४(१२) .

२६. Devan, Dr. K. (२०१४) . Strategies for Promotion Of Education Among The Scheduled Tribes. In Dhananjay Lokhande and Puvvada Viswanadha Gupta (Eds. ) . Perspectives of Tribal Education. New Delhi: Discovery Publishing House Pvt. Ltd. Pp. २२१-२२८

२७. Kumari, N., K. (२०१४) . Barriers of Tribal Students in Pursuing Primary Education. In Dhananjay Lokhande and Puvvada Viswanadha Gupta (Eds. ) . Perspectives of Tribal Education. New Delhi: Discovery Publishing House Pvt. Ltd. Pp. ८७-९९

२८. Padhi, Dr. S., K. (२०१४) . Elementary Education of Tribal Children in Government And Private Schools-Question Of Accessibility, Affordability And Acceptability. In Dhananjay Lokhande and Puvvada Viswanadha Gupta (Eds. ) . Perspectives of Tribal Education. New Delhi: Discovery Publishing House Pvt. Ltd. Pp. १४७-१६०

२९. Sharma, V. (२०१४) . Education and Women Empowerment among Gujjars, Bakerwals and Gaddis in Jammu Region of Jammu and Kashmir. International Journal of Research *(IJR)* १(४), ४५२-४६७

३०. Ramachandran, R. and Deepan, V. (२०१७) . Educational Status of Scheduled Tribes In India. International Journal of Technical Research & Science, २(X), ६३२-६३६

३१. Geelani, Dr. S. Z. A. (२०१६) . Educationally Backward Tribes Of Jammu and Kashmir A Case Study Of District Shopian. The Communications, २४(१), ६३-७२


# ग्रामीण समाजातील जातिवाद व दलित महिलांवरील अत्याचार: एक समाजशास्त्रीय अभ्यास


**प्रणाली अशोक धनेधर** संशोधक विद्यार्थीनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर.

**डॉ. मधुकर हरी चाटसे** राजश्री शाहू महाविद्यालय वाळूज छत्रपती संभाजीनगर



**सारांश:** भारतीय ग्रामीण समाज ही पारंपरिक जातिव्यवस्था, पितृसत्ताक मूल्ये आणि आर्थिक विषमतेवर आधारित असल्याने दलित महिलांना जात, लिंग आणि वर्ग यांच्या तिन्ही स्तरांवर सतत भेदभाव आणि अत्याचाराचा सामना करावा लागतो. या संशोधनाचा उद्देश ग्रामीण दलित महिलांवरील जातिवाद आणि अत्याचारांचे समाजशास्त्रीय विश्लेषण करणे आहे. या अभ्यासात महाराष्ट्रातील ग्रामीण दलित महिलांवरील सामाजिक, आर्थिक, लैंगिक व शारीरिक अत्याचार, अस्पृश्यता, जमीन व पाणी हक्क नाकारले जाणे आणि शिक्षण व रोजगारात भेदभाव यांचा समग्र अभ्यास केला आहे. अभ्यास दर्शवितो की अत्याचार हे वैयक्तिक रागाचा नव्हे, तर जातीय वर्चस्व टिकवण्यासाठी वापरले जाणारे सामाजिक नियंत्रणाचे साधन आहेत, ज्यामुळे दलित महिलांचा आत्मसन्मान, मानसिक आरोग्य, सामाजिक सहभाग आणि आर्थिक स्थिती प्रभावित होते. SC/ST अत्याचार प्रतिबंध कायदा, POSH कायदा, घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायदा आणि महिला आयोगासारख्या संरक्षण यंत्रणा असूनही ग्रामीण भागात अंमलबजावणी कमी असल्यामुळे न्याय मिळणे कठीण आहे. त्यामुळे सामाजिक न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी, सामाजिक जागृती, शिक्षण, आर्थिक सक्षमीकरण आणि महिला संघटना व NGO चा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे.



**मुख्य शब्द:** ग्रामीण समाज, जातिवाद, दलित महिला अत्याचार


**प्रस्तावना:** भारतीय ग्रामीण समाज ही एक बहुस्तरीय आणि जटिल सामाजिक रचना असून तिचा पाया पारंपरिक जातिव्यवस्था, पितृसत्ताक मूल्ये आणि आर्थिक विषमता यांवर आधारित आहे. षांपासून जात ही केवळ सामाजिक ओळख न राहता सत्ता, संसाधने आणि मानवी प्रतिष्ठा नियंत्रित करणारी व्यवस्था बनली आहे. ग्रामीण भागात या व्यवस्थेचा प्रभाव अधिक तीव्र स्वरूपात जाणवतो, कारण येथील अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेती, मजुरी आणि पारंपरिक सामाजिक संबंधांवर अवलंबून आहे. या सामाजिक संरचनेत दलित समाजाला पदानुक्रमाच्या खालच्या स्तरावर ठेवले गेले असून जमीन, पाणी, शिक्षण, रोजगार आणि सार्वजनिक संसाधनांमध्ये त्यांना सातत्याने भेदभावाचा सामना करावा लागतो. दलित महिला या व्यवस्थेतील सर्वाधिक वंचित आणि असुरक्षित घटक ठरतात. त्यांच्यावर होणारे शोषण केवळ जातीय नसून त्यात लैंगिक आणि आर्थिक शोषणाचीही भर असते. त्यामुळे दलित महिला जात (caste), लिंग (gender) आणि वर्ग (class) या तिन्ही स्तरांवर दडपल्या जातात. ग्रामीण महाराष्ट्रात काही प्रमाणात शिक्षण, शहरीकरण आणि शासकीय योजनांमुळे बदल दिसत असले तरी जातिवाद पूर्णपणे नष्ट झालेला नाही. अनेक गावांमध्ये अजूनही अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार, आर्थिक शोषण आणि हिंसा ही दैनंदिन वास्तवाचा भाग आहेत. अत्याचारांच्या अनेक घटना पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचत नाहीत किंवा सामाजिक दबावामुळे माघारी घेतल्या जातात. त्यामुळे नोंदवलेल्या आकडेवारीपेक्षा वास्तविक परिस्थिती अधिक गंभीर असण्याची शक्यता आहे. ग्रामीण दलित महिलांवरील अत्याचार हे वैयक्तिक राग किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीचे

परिणाम नसून जातीय वर्चस्व टिकवण्यासाठी वापरले जाणारे सामाजिक नियंत्रणाचे साधन आहेत. दलित महिलांनी शिक्षण घेणे, जमीन हक्क मागणे, पंचायत निवडणुकीत सहभागी होणे किंवा अन्यायाविरोधात आवाज उठवणे याला अनेकदा हिंसक प्रतिक्रिया दिली जाते. या पार्श्वभूमीवर ग्रामीण दलित महिलांवरील जातिवाद आणि अत्याचारांचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**संशोधन उद्देश:** ग्रामीण दलित महिलांवरील जातिवाद आणि अत्याचारांचे समाजशास्त्रीय विश्लेषण करणे.

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत शोध निबंध पूर्णतः द्वितीयक तथ्य सामग्रीवर आधारित असून त्यामध्ये विविध संदर्भग्रंथ, शोधपत्र, शासकीय व अशासकीय अहवाल, आकडेवारी, संकेतस्थळे, मासिके व वृत्तपत्रे यांचा समावेश केला आहे. माहिती संकलीत करून तथ्यांचे विश्लेषण वर्णनात्मक संशोधन पद्धतीने केले गेले आहे.

**पूर्व साहित्याचा आढावा:** जातिवाद आणि महिलांचे शोषण यांचा अभ्यास प्राचीन ग्रंथांपासून (जसे मनुस्मृती) सुरू होतो, ज्यात दलित महिलांना 'अस्पृश्य' आणि अधीन मानले जाते. उमा चक्रवर्ती आणि शर्मिला रेगे यांनी 'ब्राह्मणिकल पितृसत्ता' ही संकल्पना मांडली, जी दाखवते की जात आणि लिंग कसे एकत्र येऊन दलित महिलांचे शरीर नियंत्रित करतात. विद्यमान अभ्यासांमध्ये शीतल कांबळे यांचा *"eCast-Based Violence Against Women: Case Studies of Dalit Women of Rural Maharashtra"* हा अभ्यास महत्वाचा आहे, जो ग्रामीण महाराष्ट्रातील दलित महिलांवरील हिंसेच्या प्रकरणांचा अभ्यास करतो. निधी सदाना सबरवाल आणि वंदना सोनलकर यांनी दलित महिलांना जात, वर्ग आणि लिंगाच्या क्रॉसरोड्सवर दाखवले. *'Reading Dalit Women: Memories of Rural Lives in Maharashtra'* या जर्नलमध्ये ग्रामीण जीवनातील दलित महिलांच्या स्मृतींचा अभ्यास केला आहे. महाराष्ट्रातील अभ्यास दर्शवतात की दलित महिलांना पाणी, शिक्षण आणि रोजगार नाकारले जाते, आणि अत्याचार हे दलित समाजाला 'धडा' शिकविण्यासाठी केले जातात. दलित फेमिनिझमच्या दृष्टिकोनातून हे अभ्यास दाखवतात की दलित महिलांच्या संघर्ष (जसे जमीन हक्क चळवळी) जातिवादाला आव्हान देतात.

**ग्रामीण समाजातील जातिवाद:** ग्रामीण भागातील जातिवाद आजही भारतात (विशेषतः महाराष्ट्रात) गंभीर समस्या आहे. शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागात जातीय भेदभाव खोलवर रुजलेला आणि उघडपणे दिसतो. याचे कारण पारंपरिक सामाजिक रचना, आर्थिक अवलंबित्व, कमी शिक्षण आणि जागरूकतेचा अभाव आहे. ग्रामीण समाजात जातिवाद संरचनात्मक आणि दैनंदिन आहे — दलितांना पाण्याच्या विहिरी, मंदिर प्रवेश, सार्वजनिक जागा आणि समान मजुरी नाकारली जाते. मराठवाडा (जालना, बीड, परभणी जिल्हे) हा भाग याचे प्रमुख उदाहरण आहे, जेथे जमीन वाद, सामाजिक बहिष्कार आणि 'परंपरा' च्या नावाखाली जातीय पदानुक्रम टिकून आहे. दलितांच्या प्रगती (शिक्षण, पंचायत निवडणुकीत भाग, जमीन हक्क) ला 'उत्तर' म्हणून हिंसा मिळते — हे प्रगती/विरोधावर होणारी हिंसा आहे, जी पदानुक्रम टिकवण्यासाठी केली जाते

**जातिवादाचे प्रकार:**

**सामाजिक:** अस्पृश्यतेची वागणूक, शिवीगाळ, सामाजिक बहिष्कार

**आर्थिक:** कमी वेतन, जमीन हक्क नाकारणे

**लैंगिक व शारीरिक:** लैंगिक छळ, बलात्कार

**शैक्षणिक:** शाळेत भेदभाव

**संस्थात्मक:** पोलिस आणि न्यायप्रक्रियेत पक्षपात

**सांस्कृतिक:** पारंपरिक शोषक प्रथा

**ग्रामीण दलित महिलांची स्थिती:** ग्रामीण दलित महिला प्रामुख्याने शेतमजूर, घरकामगार, सफाई कामगार किंवा असंघटित क्षेत्रात कार्यरत असतात. शिक्षणाचा अभाव, जमीन मालकी नसणे, आर्थिक अस्थिरता आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्या कायम असुरक्षित स्थितीत राहतात. त्यांच्या श्रमांचे शोषण केले जाते आणि मानवी प्रतिष्ठा नाकारली जाते. ग्रामीण दलित महिला मुख्यतः शेती मजुरी करतात, ज्यात कमी मजुरी, जबरदस्तीची मजुरी आणि लैंगिक शोषण असते. उच्च जातींच्या शेतात काम करावे लागते, पण समान हक्क नाहीत.

**ग्रामीण दलित महिलांवरील अत्याचार:** महाराष्ट्रातील ग्रामीण भागात दलित महिलांवरील अत्याचार गंभीर व सातत्याने वाढणारी समस्या आहे. जात, लिंग आणि वर्ग यांमुळे त्यांच्यावर लैंगिक, शारीरिक, सामाजिक व आर्थिक अत्याचार होतात. खैरलांजी (२००६) पासून सोलापूर, अहमदनगर, बीड, उस्मानाबाद व मराठवाडा भागातील अलीकडील घटनांपर्यंत हिंसा कायम आहे. NCRB (२०२२—२३) नुसार महाराष्ट्रात SC/ST अत्याचारांच्या २, ७००+ प्रकरणे नोंदवली गेली, मात्र ग्रामीण भागातील ७०—८०% घटना भीती व सामाजिक दबावामुळे नोंदविल्या जात नाहीत.

**अत्याचाराचे प्रमुख प्रकार: सामाजिक:** अस्पृश्यता, बहिष्कार **आर्थिक:** भेदभावपूर्ण मजुरी **लैंगिक व शारीरिक:** बलात्कार, घरगुती हिंसा **संस्थात्मक:** कायद्याची कमकुवत अंमलबजावणी **सांस्कृतिक:** देवदासी प्रथा

**अत्याचारांचे बहुआयामी परिणाम:** सामाजिक, आर्थिक व लैंगिक अत्याचारांचा त्यांच्या आत्मसन्मान, मानसिक आरोग्य, सामाजिक सहभाग आणि आर्थिक स्थितीवर दीर्घकालीन परिणाम होतो. सततचा भेदभाव व हिंसा यामुळे भीती, असुरक्षितता व मानसिक तणाव निर्माण होतो, ज्यामुळे शिक्षण, रोजगार व सार्वजनिक जीवनातील सहभाग मर्यादित राहतो. परिणामी दारिद्र्याचे दुष्चक्र कायम राहते आणि पुढील पिढ्यांच्या सामाजिक व शैक्षणिक प्रगतीवरही त्याचे परिणाम दिसतात.

**कायदे आणि संरक्षण यंत्रणा:** भारतीय संविधानातील कलम १४, १५, १७ आणि ४६ तसेच SC/ST अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९, घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायदा २००५, POSH कायदा २०१३ लागू आहेत. संरक्षण यंत्रणांमध्ये विशेष न्यायालये, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग (NCSC), राष्ट्रीय महिला आयोग (NCW), *One Stop Centres* आणि हेल्पलाइन १८१ यांचा समावेश आहे. तरीही ग्रामीण भागात अंमलबजावणी कमी असल्यामुळे न्याय मिळणे कठीण आहे.

**निष्कर्ष:** ग्रामीण दलित महिलांवरील अत्याचार भारतीय ग्रामीण समाजातील जातीय, पितृसत्ताक आणि आर्थिक विषमतेचे स्पष्ट प्रतिबिंब आहेत. सामाजिक न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी, सामाजिक जागृती, शिक्षण आणि आर्थिक सक्षमीकरण आवश्यक आहे.

**शिफारशी:** १. कायद्याची कठोर अंमलबजावणी (SC/ST PoA Act), २. शिक्षण आणि जागृती मोहीम, ३. आर्थिक सक्षमीकरण योजना (जमीन हक्क, रोजगार), ४. महिला संघटना आणि NGO ची मजबुती, ५. पोलिस आणि न्यायव्यवस्थेत जातीय पूर्वग्रह कमी करणे, ६. ग्रामीण भागात हेल्पलाइन आणि संरक्षण केंद्रे.

**संदर्भ:**

१. NCRB. (२०२३) . Crime in India २०२३. National Crime Records Bureau.
२. IDSN/AIDMAM. (२०२४) . Factsheet on Dalit Women. India Dalit & Minority Rights Network.
३. CJP Reports, Frontline/The Hindu, Article-१४. (२०२३) . Dalit Women Violence Reports
४. Chatterjee, U. (२०१०) . Brahminical Patriarchy. Pune: SamajshastraPrakashan.
५. Rege, S. (२००६) . दलित फेमिनिझम: समाजशास्त्रीय अभ्यास. Mumbai: SamajikAbhyasPrakashan.
६. Kambale, S. (२०१८). Cast-Based Violence against Women: Case Studies of Dalit Women of Rural Maharashtra. Pune: Social Justice Studies.
७. Sabharwal, N., &Sonalkar, V. (२०१९) . Dalit Women at the Crossroads of Caste, Class, and Gender. Pune: Mahila Adhikar Prakashan.
८. Reading Dalit Women: Memories of Rural Lives in Maharashtra. (२०२०) . Pune: Rural Studies Journal.
९. Sharma, P. (२०२१) . ग्रामीण महाराष्ट्रातील दलित महिलांचे शोषण आणि संघर्ष. Pune: LokshikshanPrakashan.

# छत्रपती संभाजीनगर शहरातील अनुसूचित जातीतील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा अभ्यास

**शुन्यता मधुकर सावंत** पी. एचडी. संशोधक, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** या संशोधनामध्ये छत्रपती संभाजीनगर शहरातील अनुसूचित जातीतील दारिद्र्याचा अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये दारिद्र्याची कारणे, स्वस्त धान्य दुकानातुन अन्नधान्याचा पुरवठा, पोषण आहार, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना मिळणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ, दारिद्र्य निर्मुलनासाठीच्या उपाययोजना इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनासाठी छत्रपती संभाजीनगर शहरातील एकुण ५० अनुसूचित जातीतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांकडून प्रश्नावलीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करण्यात आले. या माहितीच्या आधारे तथ्याचे विश्लेषण करण्यात आले. या विश्लेषणावरुन लक्षात येते की, छत्रपती संभाजीनगर शहरातील अनुसूचित जातीमध्ये मोठ्या प्रमाणात दारिद्र्य असल्याचे दिसुन येते. अनुसूचित जातीमध्ये शिक्षणाचा अभाव असणे हे दारिद्र्य असण्याची प्रमुख कारण आहे. तसेच नैसर्गिक आपत्ती, जमीन विकल्यामुळे तसेच मागील पिढींच्या दारिद्र्यामुळेही दारिद्र्य असल्याचे दिसुन येते. छत्रपती संभाजीनगर शहरातील अनुसूचित जातीतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना स्वस्त धान्य दुकानातुन मिळणारा हा अपुरा असल्याचे दिसुन येते. जवळपास ८० टक्के कुटुंबांना पोषण आहार मिळत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे स्वस्त धान्य दुकानातुन मिळणाऱ्या अन्नधान्याचे प्रमाण वाढवणे गरजेचे आहे. तसेच जवळपास ६४ टक्के कुटुंबांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळाला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अनुसूचित जातीतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होणे गरजेचे आहे. या अनुसूचित जातीतील कुटुंबांच्या दारिद्र्य निर्मुलनासाठी शिक्षणाचे प्रमाण वाढवणे, रोजगार उपलब्ध करुन द्यावे तसेच त्यांना व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करुन द्यावे असे सुचविले. सदरील संशोधन दारिद्र्याचा अभ्यास करण्यासाठी, शहरी दारिद्र्य तसेच अनुसूचित जातीतील दारिद्र्य इत्यादी बाबींच्या संशोधनासाठी उपयुक्त ठरेल.

**प्रस्तावना:** भारतामध्ये प्राचीन काळापासुन संपत्तीचे केंद्रीकरण झाल्याचे आढळुन येते. वर्ग आणि जातव्यवस्थेच्या माध्यमातुन समाजातील एका मोठ्या वर्गाला संपत्ती व साधनसंपत्तीपासुन वंचित ठेवले गेले. त्यामुळे अनुसूचित जातीमध्ये सद्यपरिस्थितीलाही इतर वर्गाच्या तुलनेत दारिद्र्याचे प्रमाण जास्त असल्याचे दिसुन येते. भारतीय राज्यघटनेमध्ये संपत्ती व व्यवसाय करण्याचा मुलभूत हक्क दिला गेला. स्वातंत्र्योत्तर काळात अस्पृश्य गणल्या गेलेल्या जातींना विविध योजनांच्या माध्यमातून सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात जातव्यवस्था बळकट असल्या कारणाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शहराकडे स्थायिक होण्याचा संदेश दिला. त्यामुळे अनुसूचित जातीतील लोकांचे रोजगार व शिक्षण तसेच इतर कारणांसाठी शहराकडे स्थलांतर घडुन आले. परंतू शहरातही मोठ्या प्रमाणात दारिद्र्यात जीवन जगावे लागत असल्याचे दिसुन येते. त्यांच्या राहणीमान पातळीत अपेक्षित सुधारणा झाल्या नसल्याचे आढळून येते. १९५१ पासून देशाने नियोजनाचा अवलंब केला. यातुनही देशातील मुलभूत आर्थिक प्रश्नांची सोडवणूक झाली नसल्याचे दिसून येते. भारतातील विविध मुलभूत आर्थिक प्रश्नांचे मुळ दारिद्र्यात असल्याचे दिसून येते. नियोजन आयोगाच्या आकडेवारीनुसार देशात ४५.६० कोटी जनता दारिद्र्यात जीवन जगत आहे. जगातील २०११ च्या आकडेवारीनुसार १२१.८ कोटी लोकसंख्येपैकी २९.८ टक्के लोकसंख्या दारिद्र्यात जीवन जगत आहे. जगाच्या एकूण दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या एकूण लोकसंख्येपैकी ३६ टक्के भारतात आहे. देशाच्या विकासातील दारिद्र्य हा प्रमुख अडथळा आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण १०.६ लाख नागरी गरिब लोकसंख्या (२७ टक्के नागरी लोकसंख्या) जी भारतात सर्वाधिक आहे जी देशाच्या

एकूण लोकसंख्येच्या १ टक्के बरोबर आहे. दारिद्र्य मोजमापाच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. सध्या नियोजन आयोगानुसवार ग्रामीण भागात २४०० कॅलरी व शहरी भागात किमान २१०० कॅलरीज उपभोग धेण्यासाठी आवश्यक उत्पन्न मिळणे हा मापदंड मानला गेला.

**पुर्वसाहित्याचा आढावा:** चंचल (२०२५), उपलब्ध साहित्य भारतातील शहरी गरिबी ही वेगवान शहरीकरणातून उद्भवलेली बहुआयामी समस्या असल्याचे स्पष्ट करते. पायाभूत सुविधांची कमतरता, सुरक्षित निवासाचा अभाव, झोपडपट्ट्यांचा विस्तार, अनौपचारिक रोजगार, उपजीविकेची अस्थिरता व सामाजिक सुरक्षा यंत्रणेचे अपुरेपण ही प्रमुख वैशिष्ट्ये म्हणून नोंदली गेली आहेत. गरिबीचे मोजमाप केवळ उत्पन्नावर आधारित न ठेवता मूलभूत सेवांपर्यंत पोहोच या घटकांचा समावेश आवश्यक असल्याचे संशोधन दर्शवते. शासकीय कार्यक्रम राबविण्यात आले असले तरी अंमलबजावणीतील त्रुटी व मर्यादित कव्हरेजमुळे परिणाम अपुरे राहिले आहेत. त्यामुळे भविष्यात समावेशक, शाश्वत व गरिबाभिमुख शहरी धोरणांची आवश्यकता ठळकपणे पुढे येते. निती आयोग (२०२४), दारिद्र्य मोजमापाबाबत साहित्य पारंपरिक उत्पन्न-आधारित मोजमाप अपुरे असल्याची टीका करते आणि बहुआयामी दृष्टिकोनाला मान्यता देते. अल्कायर-फॉस्टर पद्धतीवर आधारित राष्ट्रीय MPI मध्ये आरोग्य, शिक्षण व जीवनमान या तीन परिमाणांतील १२ निर्देशांकांचा वापर करण्यात आला आहे. NFHS आकडेवारीनुसार भारतात बहुआयामी दारिद्र्य दरात लक्षणीय घट दिसून येते; २००५-०६ मधील ५५% दर २०१९-२१ मध्ये १४.९६% झाला. राज्यांमधील अंतरही कमी झाले असून विविध शासकीय योजनांच्या हस्तक्षेपामुळे स्वच्छता, निवास, आरोग्य व वित्तीय समावेशनात सुधारणा झाल्याचे संशोधनावरून दिसते. एकूणच, साहित्य भारताने SDG-१.२ साध्य करण्याच्या दिशेने प्रगती दर्शवते. सिंग (२०२५), उपलब्ध साहित्य भारतातील नागरी दारिद्र्य हे स्थलांतर, लोकसंख्या वाढ व झोपडपट्ट्यांचा विस्तार यामुळे वाढलेले बहुआयामी सामाजिक-आर्थिक प्रश्न असल्याचे दर्शवते. सिंह यांच्या अभ्यासात दारिद्र्याची स्वरूप, मोजमाप, कारणे व असुरक्षित घटकांचा सखोल आढावा घेतला असून कॅलरी व उपभोग खर्चावर आधारित पारंपरिक मोजमाप पद्धती शहरांच्या उच्च खर्च संरचनेला अपुरी ठरतात, अशी टीका केली आहे. असंघटित क्षेत्रातील मजूर, स्थलांतरित व अल्पसंख्याकांचे जीवन अधिक असुरक्षित असल्याचे नमूद केले आहे. शासकीय योजनांमध्ये निधीअभाव व संस्थात्मक दुर्बलतेमुळे मर्यादित परिणाम आढळतात. त्यामुळे रोजगार, कौशल्य, सामाजिक सुरक्षा व समुदाय नियोजनाचा समन्वित दृष्टिकोन आवश्यक असल्याचे साहित्य सूचित करते.

**संशोधनाची उद्दीष्टे :** छत्रपती संभाजीनगर शहरातील अनुसूचित जातीतील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची वैयक्तिक, कौटुंबिक स्थितीचा आढावा घेणे. छत्रपती संभाजीनगर शहरातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या आर्थिक स्थिती, दारिद्र्याची कारणे व उपाययोजनांचा आढावा घेणे. छत्रपती संभाजीनगर शहरातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना मिळणाऱ्या शासकीय योजना व अंमलबजावणीच्या अभावामुळे निर्माण होणाऱ्या दारिद्र्याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:** सदरील संशोधनासाठी छत्रपती संभाजीनगर शहरातील रमानगर या अनुसूचित जाती बहुल भागाची निवड करण्यात आली आहे. या भागातील दारिद्र्यरेषेखालील ५० अनुसूचित जातीतील कुटुंबांची संशोधनासाठी निवड करयण्यात आली आहे. या कुटुंबांकडून प्रश्नावलीच्या सहाय्याने तथ्य संकलन करुन त्यांच्याकडून प्राप्त माहितीचे विश्लेषणा करण्यात आले आहे.

**तथ्याचे विश्लेषण:** छत्रपती संभाजीनगर शहरातील अनुसूचित जातीतील शहरी दारिद्र्याचा अभ्यास करण्यासाठी एकूण ५० कुटुंबांकडून प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती जमा करण्यात आली. या संशोधनामध्ये दारिद्र्याची कारण, दारिद्र्याची जाणीव होण्याची कारणे, स्वस्त धान्य दुकानातुन अन्नधान्याचा होणारा पुरवठा, पोषण आहारविषयक स्थिती, शासकीय योजनांचा लाभ व दारिद्र्य निर्मुलनासाठीच्या उपाययोजना याविषयी विश्लेषण स्पष्ट केले आहे. प्रश्नावलीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करुन पुढीलप्रमाणे तथ्यांची मांडणी करता येते.

**दारिद्याची कारणे:**

**तक्ता क्र. ०१: दारिद्याशी झुंजत असण्याची कारणे**

| क्र. | दारिद्रयाशी झुजत असण्याची कारणे | उत्तरदात्याची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | जमीन विकल्यामुळे | ०९ | १८ |
| २ | नैसर्गिक आपत्तीमुळे | १२ | २४ |
| ३ | मागीलपिढीच्या दारिद्र्यामुळे | ०९ | १८ |
| ४ | शिक्षणाच्या अभावामुळे | २२ | ४४ |
| | एकुण | ५० | १०० |

वरील तक्त्यावरुन लक्षात येते की, दारिद्र्याची कारणे कोणती आहेत. छत्रपती संभाजीनगर शहरातील एकूण ५० उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसुचिद्वारे दारिद्र्याच्या कारणाविषयी प्रश्न विचारला असता दारिद्र्याची कारणे वरीलप्रमाणे सांगितली आहेत. एकूण ५० उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक म्हणजे २२ (४४%) उत्तरदात्यांनी शिक्षणाच्या अभावामुळे दारिद्र्य असल्याचे नमुद केले. तर त्यानंतर अनुक्रमे १२ (२४%) उत्तरदात्यांनी नैसर्गिक आपत्तीमुळे तर ०९ (१८%) उत्तरदात्यांनी जमीन विकल्यामुळेव मागच्या पिढीच्या दारिद्र्यामुळे सध्या दारिद्र्य असल्याचे नमुद केले.

**दारिद्याची जाणीव होण्याची कारणे:** दारिद्र्याची जाणी कोणत्या कारणामुळे होते असा प्रश्न उत्तरदात्यांना विचारला असता एकूण ५० उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक म्हणजे २४ (४८%) उत्तरदात्यांनी अपुऱ्या अन्नपुरवठ्यामुळे दारिद्र्याची जाणीव होते असे नमुद केले. तर त्याखालोखाल अनुक्रमे १२ (२४%) उत्तरदात्यांनी शिक्षण व आरोग्य सुविधांच्या अभावामुळे, ८ (१६%) उत्तरदात्यांनी पुरेशा घराचा अभाव तर ६ (१२%) उत्तरदात्यांनी कपड्याच्या अभावामुळे दारिद्र्याची जाणीव होत असल्याचे नमुद केले.

**स्वस्त धान्य दुकानातुन होणाऱ्या अन्नपुरवठा विषयक स्थिती:** संकलित माहितीवरून असे दिसून येते की, सार्वजनिक वितरण प्रणातीद्वारे प्रतिव्यक्ती मिळणारा ५ किलो शिधा पुरेसा नसल्याचे दिसुन येते. शिधापत्रिकेवर पुरेसा अन्नपुरवठा होतो का असा प्रश्न विचारला असता, पुरेसा अन्नपुरवठा होतो असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण केवळ २ (४%) असल्याचे दिसून येते. तर ४८ (९६%) उत्तरदात्यांनी अन्नपुरवठा पुरेसा नसल्याचे मत व्यक्त केले.

**कुटुंबांची पोषण आहार विषयक स्थिती:** संकलित माहितीवरून असे दिसून येते की, दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या छत्रपती संभाजीनगर शहरातील एकूण ५० उत्तरदात्यांपैकी ४० (८०%) उत्तरदात्यांनी पोषक आहार मिळत नसल्याचे नमुद केले तर ८(१६%) व २(४%) उत्तरदात्यानीं अनुक्रमे काही प्रमाणात मिळतो व पोषण आहार मिळत असल्याचे नमुद केले. यावरुन लक्षात येते की दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या शहरातील एकूण कुटुंबांपैकी ८०% पेक्षा अधिक कुटुंबांना पोषण आहार मिळत नसल्याचे दिसून येते.

**दारिद्य निर्मुलनासाठीचे उपाय:** संकलित माहितीवरून असे दिसून येते की, दारिद्र्याच्या निर्मुलनासाठी कोणते उपाययोजना कराव्यात असा प्रश्न विचारला असता छत्रपती संभाजीनगर शहरातील एकूण ५० उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक म्हणजे २१ (४२%) कुटुंबांनी व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करुन द्यावेत असे सुचविले. तर त्यापाठोपाठ १८ (३६%) कुटुंबांनी रोजगार उपलब्ध करुन द्यावे असे सुचविले. तर उर्वरीत ११ (२२%) कुटुंबांनी शिक्षणाचे प्रमाण वाढवावे असे सुचविले.

**शासकीय योजनांचा लाभ:** संकलित माहितीवरून असे दिसून येते की, छत्रपती संभाजीनगर शहरातील एकूण ५० कुटुंबांपैकी एकूण ३२ (६४%) कुटुंबांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही. तर १२ (२४%) कुटुंबांना एका शासकीय योजनेचा लाभ मिळालेला असल्याचे नमुद केले तर केवळ ६ (१२%) कुटुंबांना दोन शासकीय योजनांचा लाभ मिळाला असल्याचे नमुद केले.

**निष्कर्ष व शिफारशी :** छत्रपती संभाजीनगर शहरातील अनुसूचित जातीतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांमध्ये जमीन विकल्यामुळे, नैसर्गिक आपत्तीमुळे, मागील पिढींच्या दारिद्र्य इत्यादी कारणामुळे दारिद्र्यात जीवन जगत आहेत. यामध्ये शिक्षणाचा अभाव हे प्रमुख कारण असल्याचे दिसून येते. त्यामुळे या कुटुंबांना शिक्षणासाठीच्या उपाययोजना करण्याची गरज आहे. तसेच त्यांना विविध शैक्षणिक योजनांचा लाभ देण्याची गरज आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातील अनुसूचित जातीतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना शासनाकडून मिळणाऱ्या स्वस्त धान्य दुकानातून अन्नधान्याचा पुरेसा पुरवठा होत नसल्याचे दिसून येते. ५० कुटुंबांपैकी ४८ (९६%) कुटुंबांनी शासनाकडून पुरेसा अन्नधान्याचा पुरवठा होत नसल्याचे मत व्यक्त केले. शासनाकडून प्रती व्यक्ती ५ कि. ग्रॅ एवढा अपुरा अन्नधान्याचा पुरवठा होता. त्यामुळे अशा कुटुंबांना प्रती व्यक्ती अन्नधान्याचा पुरवठा वाढवावा. अनुसूचित जातीतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना पोषक आहार मिळत नसल्याचे दिसून येते. ५० कुटुंबांपैकी ४० (८०%) कुटुंबांनी पोषक आहार मिळत नसल्याचे मत व्यक्त केले. तसेच ८ (१६%) कुटुंबांनी काही प्रमाणात पोषक आहार मिळत असल्याचे तर २ (४%) कुटुंबांनी पोषक आहार मिळत असल्याचे मत व्यक्त केले. त्यामुळे या कुटुंबांना पोषक व सकस आहार मिळेल अशी व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातील अनुसूचित जातीतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या दारिद्र्याच्या निर्मुलनासाठी सर्वाधिक म्हणजे २१ (४२%) कुटुंबांनी व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करुन द्यावे असे मत व्यक्त केले. तर १८ (३६%) कुटुंबांनी रोजगार उपलब्ध करुन द्यावे तसेच ११ (२२%) कुटुंबांनी शिक्षणाचे प्रमाण वाढवण्याचे मत व्यक्त केले. अशा विविध उपाययोजना केल्यास दारिद्र्य निर्मुलनासाठी सहाय्यभूत ठरेल. छत्रपती संभाजीनगर शहरातील अनुसूचित जातीतील दारिद्र्य रेषेखालील ३२ (६४%) कुटुंबांला एकाही शासकीय योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे दिसुन येते. तर १२ (२४%) कुटुंबांना एका तर ६ (१२%) कुटुंबांना दोन शासकीय योजनांचा लाभ मिळाला असल्याचे मत व्यक्त केले. यातुन शहरात शासकीय योजनांची सुयोग्य अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत. त्यामुळे अशा कुटुंबांसाठी शासकीय योजनाची आखणी करुन त्याचा लाभ जास्तीत जास्त अनुसूचित जातीतील कुटुंबांना मिळवून देण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची :**

१. अमर चंचल (२०२५) . 'Urban poor in India: Addressing the challlenges'. Centre for Budeget and Governance Accountability.
२. नीती आयोग (२०२४) . 'Multidimensional Poverty in India Since २००५-०६'. NITI Aayog.
३. अवधेश कुमार सिंग (२०२५) . 'Urban Poverty in India: Incidence and Extent'. Lucknow: Assistant Director, RCUES.

# आदिवासी समाजाचे बदलते स्वरुप

**कौशल्या चांगुजी खिल्लारे** संशोधक विद्यार्थीनी, समाजशास्त्र विभाग, विवेकानंद कला स. द. वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**सारांश:** आदिवासी हे भारताचे मूळचे रहिवासी आहेत. आदिवासी हा समाज जंगल, दऱ्याखोऱ्यात राहत असल्यामुळे, अलिप्त राहत असल्यामुळे ते प्रगत समाजाच्या प्रवाहात येवू शकला नाही. परंतू स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आदिवासींमध्ये मूलभूत स्वरुपाचे बदल होत आहेत. हा समाज आज पूर्वीच्या अवस्थेत राहिला नाही. स्वातंत्र्योत्तर कालखंडात आदिवासींच्या कल्याणांसाठी स्वतंत्र आदिवासी कल्याण मंत्रालय स्थापन करण्यात आले. स्वयंसेवी संस्थेचे प्रयत्न, केंद्र - राज्य सरकारचे प्रयत्न विशेषत: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काही घटनात्मक तरतुदी, काही घटनात्मक संरक्षण आदिवासींना दिले. या एकूणच प्रयत्नामुळे आदिवासींच्या जीवनामध्ये बदल घडून येत आहेत. भारतीय राज्यघटनेने आदिवासींना विशेष आरक्षण, कित्येक सोयी - सवलती प्राप्त करुन दिल्या. या सर्व प्रयत्नांमुळे, कायद्यांमुळे, घटनात्मक तरतुदीमुळे आदिवासींच्या जीवनात बदल घडून येत आहेत. परंतु असे असले तरीही ते आधुनिक जीवन जगत आहेत किंवा पाहिजे त्या प्रमाणात बदल झाला असे म्हणता येणार नाही. परंतु जो काही मंद स्वरुपाचा बदल त्यांच्या जीवनात होत असल्यामुळे हळूहळू का होईना आधुनिक युगाशी समरस होऊ लागले आहेत.

**मुख्य शब्द:** आदिवासी समाज, सामाजिक, परिवर्तन

**प्रस्तावना:** परिवर्तन किंवा बदल हा निसर्गाचा व मानवाचा स्थायीभाव मानला जातो. काल असलेली परिस्थिती आज दिसणार नाहीव आजची परिस्थिती उद्या असणार नाही. बदलाचा हा नियम जगभरातील सर्व मानवी व्यवस्थांना लागू होत असल्यामुळे आदिवासी समाजही या नियमाला अपवाद नाही. आदिवासी समाजालाही या बदलाला समोरे जावे लागते. म्हणूनच एकोणिसाव्या शतकातील आदिवासींची जीवन पद्धती आणि विसाव्या शतकातील आदिवासी समाज संरचना यात कमालीचा फरक आढळून येतो. अर्थात भारतातील समस्त आदिवासी जमातीमधील बदलास एकच कारण जबाबदार नसुन तो अनेक कारकांचा परिणाम आहे. शिवाय आदिवासी समाजातील हा बदल सर्व राज्यात एकसमान नसून प्रदेशानुसार त्यात तफावत आढळून येते. आदिवासी समाजातील परिवर्तनाचा वेग हा जरी कमी-जास्त असला तरी परिवर्तनाची दिशा मात्र प्रगतीकडे नेणारीच आढळून येते. "

आदिवासी समाजात शिक्षण तंत्रज्ञान सरकारी योजना, आणि शहरीकरणामुळे सकारात्मक व संरचनात्मक बदल होत आहेत. निसर्गसंवर्धनाशी एकरूप असलेल्या या समाजात आता पारंपारिक शेतीकडून रोखीची पिके, विभक्त कुटुंब पध्दती, आधुनिक पोशाख यामध्ये बदल होताना दिसत आहे. तसेच शिक्षणामुळे राजकीय जागरूकता आणि हक्कांबाद्दलची जाणीव वाढली आहे.

**उद्देश:** आदिवासींच्या धार्मीक, कौटुंबिक जीवनात झालेले बदल जाणून घेणे. आदिवासींच्या शैक्षणिक, राजकीय जीवनात झालेले बदल जाणून घेणे.

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने व्दितीय स्त्रोतांचा उपयोग करण्यात आलेला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, लेख, पुस्तके, संशोधन पत्रिका यांचा आधार घेण्यात आला आहे.

**आदिवासी समाजामध्ये झालेल्या काही बदलांचा आढावा पुढीलप्रमाणे आहे:**

**कुटुंब संस्थेतील बदल:** आदिवासी समाजामध्ये संयुक्त कुटुंब व्यवस्था ही अत्यंत महत्तवाची होती. परंतु आज आधुनिक समाजाच्या संपर्कामुळे विभक्त कुटुंबाकडे वाटचाल होताना दिसून येते. प्रगत समाजाशी संपर्क, कामासाठी दुसऱ्या प्रदेशात स्थलांतरण यामुळे कटुंबाच्या आकारामध्ये घट झालेली दिसून येते. आदिवासी शहरामध्ये राहायला सुरूवात झाली. अनेक आदिवासी जमातीमध्ये मातृसत्ताक कुटुंब पध्दती होती. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन होवून पितृसत्ताक कुटुंब पध्दती वाढत असलेली दिसून येते. आधुनिक कालखंडामध्ये नवीन प्रवाहाचा प्रभाव होवून आदिवासी समाजाच्या अनेक जुन्या, प्रथा, परंपरा, कुटुंब व्यवस्थेमध्ये बदल होताना दिसून येतात.

**विवाहविषयक बदल:** आधुनिक काळात आदिवासी समाजातील विवाह संस्थेत कमालीचा बदल झालेला दिसून येतो. इतर संस्कृतीचा प्रभाव आणि आदिवासी तुरूणांचे वाढलेल्या शिक्षणामुळे आदिवासी समाजात 'वरमूल्य' (हुंडा) घेण्याची प्रथा रूढ होत आहे. तसेच आदिवासींनी अनेक नवीन विधिंचा विवाहामध्ये स्वीकार केलेला आहे. सर्वात महत्वपूर्ण बदल म्हणजे आदिवासी समाजात एकविवाहाचे प्रचलन वाढले असून घटस्फोटाचे प्रमाण कमी होत आहे.

**धर्म संस्थेतील बदल:** निसर्गपूजक आदिवासी हा बहुदेववाद व सर्वात्मवादाने प्रभावित झालेला असल्यामुळे आदिवासींच्या धार्मीक आचरणात अनेक देव-देवता व पूजा विधींना स्थान होते. आदिवासींची संस्कृती वैविध्यपूर्ण असलेली दिसून येते. परंतू देशांमध्ये धर्मप्रसाराला आलेल्या अनेक विदेशी प्रसारकांनी आदिवासी भागांमध्ये धर्मप्रसाराचे कार्य केलेले दिसून येते. ख्रिश्चन मिशनरीज भारतात आल्यानंतर त्यांनी आदिवासी भागांमध्ये शिक्षण प्रसाराला सुरूवात केली व त्यातूनच आदिवासीमध्ये धर्मपरिवर्तन घडवून आणलेले दिसून येते. नवीन धर्माच्या संपर्कात येवून नवीन विचार शिकायला सुरूवात झाली आणि आदिवासींच्या मूळ संस्कृतीचा मात्र काही प्रमाणात लोप व्हायला सुरूवात झाली.

**शैक्षणिक बदल:** पारंपरिक भारतीय समाजात आदिवासी समाज आणि औपचारिक शिक्षण या दोन घटकांत जवळपास सहसंबंध नसल्याचे आढळून येत होते. आधुनिक काळात दळण-वळणाच्या साधनांचा विकास, प्रसारमाध्यमांचा प्रभाव, शहरी समाजाशी वाढलेला संपर्क आणि आदिवासी व्यक्तीच्या कल्याणासाठी शासनस्तरावर होणाऱ्या प्रयत्नामुळे या समाजात औपचारिक शिक्षणास

सुरुवात झाली. आरक्षण, घटनात्मक तरतुदींच्या आधारे आदिवासीचा विकास घडून आलेला दिसून येतो. आदिवासी मुलांसाठीची शिष्यवृत्ती योजना व निवासी आश्रमशाळेमुळे आदिवासी मुले महाविद्यालयीन व व्यावसायिक शिक्षणात आपले प्राविण्य दाखवू लागली आहेत. शिक्षणामुळे या समाजात जागृती आली आणि एक सुशिक्षित आदिवासी वर्ग समाजामध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडवून आणताना दिसून येत आहे.

**राजकीय बदल:** आदिवासी समाजामध्ये सुरुवातीपासूनच स्वत:चे काही नियम होते. त्यानुसार ते आपले राजकीय कार्य करत असत. परंतु आधुनिक समाजातील पंचायत राजव्यवस्थेचा त्यांच्यावर परिणाम झालेला दिसून येतो. तरीपण अजुनही काही आदिवासी भागात जात पंचायत करत असतांना आपल्याला दिसून येते. न्यायव्यवस्था, आरक्षित जागावरील प्रतिनिधित्व इत्यादी गोष्टी आदिवासींना माहिती होत आहेत. लोकशाही व्यवस्थेची माहिती व सहभाग आदिवासींचा होत असलेला दिसून येतो.

**सांस्कृतिक परिवर्तन:** समाजाचा एक घटक या नात्याने व्यक्तीने संपादन केलेले ज्ञान, श्रद्धा, मुल्ये, विश्वास व भौतिक गोष्टींचा समुच्चय म्हणजे संस्कृती होय, असे टायलर मानतात. सांस्कृतिक अंगाने आदिवासी समाज हा प्रगत समाजाच्या तुलनेने खुपच प्रारंभिक अवस्थेत आढळून येत होता. आदिवासी समाजातील कला, नीतितत्वे व भौतिक गोष्टी ह्या त्या समाजापर्यंतच मर्यादित होत्या. आधुनिक काळात मात्र आदिवासी समाजात शास्त्रीय ज्ञानाचा स्वीकार होवू लागला. भौतिक सांस्कृतीचा एक भाग म्हणून आदिवासी समाजात यंत्र तंत्रे व आधुनिक सर्वच गोष्टींचा वापर होऊ लागला आहे. बहुतेक आदिवासींनी आपल्या परंपरागत वेशूषाऐवजी आधुनिक वेशभूषा स्वीकारली आहे.

**निष्कर्ष:** आदिवासी समाजात शिक्षण, तंत्रज्ञान, शहरीकरण आणि शासकीय योजनांमुळे पारंपारिक जीवनशैलीत आमूलाग्र बदल होत आहेत. आदिवासी समाज संक्रमण अवस्थेत आहे. एका बाजूला विकास आणि आधुनिककीकरणाचे फायदे (शिक्षण, आरोग्य, सुविधा) मिळत असताना, दुसऱ्या बाजूला त्यांची स्वतंत्र सांस्कृतिक ओळख, पारंपारीक ज्ञान आणि नैसर्गीक संसाधनांवरील हक्क धोक्यात आले आहेत. विकास प्रक्रीयेत आदिवासींचा सहभाग आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे हे मोठे आव्हान आहे.

**संदर्भ :**


१. डॉ. जाधव सुधाकर, (२०१२). भारतातील आदिवासी समाज, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
२. लोटे रा. ज., (२००४) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
३. डॉ. आकरे बी. एन., (२०१४). आदिवासींची ओळख, पिंपळापुरे बुक्स डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.
४. https://www.jetir.org.


# अनुसूचित जमातीच्या घटनात्मक हक्कांची लुट: प्रति-संस्कृतीकरण आणि छद्म-संस्कृतीकरणाचा एक चिकित्सक अभ्यास


**अनिस शरीफ तडवी** संशोधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**डॉ. सादिक बागवान** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर



**सारांश:** प्रस्तुत चिकित्सक अभ्यास स्पष्ट करतो की 'प्रति-संस्कृतीकरण' (उच्च जातीच्या व्यक्तींनी फायद्यासाठी कायदेशीरदृष्ट्या खालचा दर्जा मिळवण्याचा प्रयत्न) आणि 'छद्म-संस्कृतीकरण' (बनावट कागदपत्रांद्वारे केलेली ओळख चोरी) या दोन प्रक्रियांमुळे भारतीय संविधानाने अनुसूचित जमातींना (STs) दिलेल्या सामाजिक न्यायाच्या आणि संरक्षणाच्या मूळ तत्त्वावर एक पद्धतशीर हल्ला होत आहे. एम. एन. श्रीनिवास यांच्या 'संस्कृतीकरण' या मूळ संकल्पनेच्या (जिथे सामाजिक प्रतिष्ठेसाठी प्रयत्न होता) हे पूर्णपणे विरुद्ध असून, इथे केवळ आरक्षणासारखे घटनात्मक लाभ मिळवण्यासाठी आदिवासी ओळखीचा गैरवापर केला जातो. या ओळख चोरीमुळे खरे आदिवासी उमेदवार केवळ शिक्षण, रोजगार आणि राजकीय संधींपासून वंचित राहत नाहीत, तर त्यांच्या सांस्कृतिक अस्मितेचे अवमूल्यन होऊन व्यवस्थेवरील त्यांचा विश्वास उडतो. सर्वोच्च न्यायालयाने 'कुमारी माधुरी पाटील' आणि 'मिलिंद' यांसारख्या निवाड्यांमधून पडताळणीसाठी कठोर चौकट (Affinity Test) निर्माण केली असली तरी, प्रशासकीय त्रुटींमुळे तिची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. म्हणून, या समस्येवर मात करण्यासाठी कायदे कडक करण्यासोबतच पडताळणी प्रक्रिया अधिक मजबूत करणे, गुन्हेगारांना कठोर शिक्षा देणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्थानिक आदिवासी समाजाला (उदा. मूळ अनुसूचित जमातींना व्यक्तींना) ओळख पडताळणीच्या प्रक्रियेत सामील करून त्यांच्या घटनात्मक हक्कांचे आणि अस्मितेचे संरक्षण करणे आवश्यक आहे.



**मुख्यशब्द :** अनुसूचित जमाती, प्रति-संस्कृतीकरण, छद्म संस्कृतीकरण, घटनात्मक अधिकार, ओळखीचा अपहार / ओळख विनियोग / ओळख हस्तगत करणे, आरक्षण फसवणूक, सामाजिक न्याय.


**प्रस्तावना : आदिवासी ओळखीसमोरील नवे आव्हान:** भारतीय संविधानाने ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या आणि विशिष्ट सांस्कृतिक ओळख जपणाऱ्या अनुसूचित जमातींच्या (STs) संरक्षणासाठी एक मजबूत आणि सर्वसमावेशक चौकट तयार केली आहे. सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर आधारित ही चौकट, या समुदायांना शिक्षण, रोजगार आणि राजकारणात विशेष संधी देऊन त्यांना राष्ट्रीय विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करते. संविधानाच्या कलम ३४२ नुसार, राष्ट्रपतींना विशिष्ट राज्यांमध्ये

अनुसूचित जमातींची यादी अधिसूचित करण्याचा अधिकार आहे, ज्यामुळे या संरक्षणात्मक उपाययोजनांना कायदेशीर आधार मिळतो. या तरतुदींमागील उद्देश केवळ आर्थिक किंवा सामाजिक मागासलेपणा दूर करणे नाही, तर या जमातींच्या अद्वितीय सांस्कृतिक वारशाचे जतन करणे आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा हक्क देणे हा आहे.

परंतु, गेल्या काही दशकांमध्ये या घटनात्मक संरक्षणाला एक नवीन आणि अत्यंत घातक आव्हान उभे राहिले आहे. हे आव्हान थेट अत्याचाराच्या किंवा भेदभावाच्या स्वरूपात नाही, तर ते अधिक सूक्ष्म, कपटी आणि प्रशासकीय स्वरूपाचे आहे. 'प्रति-संस्कृतीकरण' (Reverse Sanskritization) आणि 'छद्म-संस्कृतीकरण' (Pseudo-Sanskritization) या दोन प्रक्रियांमधून हे आव्हान उभे राहिले आहे. या प्रक्रियांमध्ये, जे लोक वास्तविक अनुसूचित जमातीचे नाहीत, ते केवळ आरक्षणाचे फायदे मिळवण्यासाठी आदिवासी असल्याचा खोटा दावा करतात. ही केवळ फसवणूक नाही, तर खऱ्या आदिवासींच्या घटनात्मक हक्कांवर टाकलेला दरोडा आहे. या प्रक्रियांमुळे आदिवासी ओळखीचे एका वस्तूमध्ये रूपांतर झाले आहे, जिचा वापर केवळ आर्थिक आणि कायदेशीर फायद्यांसाठी केला जात आहे. पूर्वी आदिवासी समाजाला सामाजिक बहिष्काराचा आणि सांस्कृतिक वर्चस्वाचा सामना करावा लागत होता. मात्र, आता धोका बदलला आहे. आता त्यांच्या संस्कृतीवर हल्ला करण्याऐवजी, त्यांची ओळखच चोरण्याचा प्रयत्न होत आहे. हा धोका अधिक गंभीर आहे कारण तो थेट त्या संसाधनांवर हल्ला करतो, जी संसाधने (नोकरी, शिक्षण, राजकीय पदे) त्यांच्या विकासासाठी घटनात्मकदृष्ट्या राखीव ठेवलेली आहेत. प्रस्थापित आणि उच्च सामाजिक गटातील व्यक्ती, ज्यांनी ऐतिहासिकदृष्ट्या आदिवासी समाजाचे शोषण केले, तेच आता त्यांची ओळख चोरून त्यांच्या हक्कांवर गदा आणत आहेत. हा एका नव्या प्रकारचा छुपा हल्ला आहे, जो केवळ कायद्याचे उल्लंघन करत नाही, तर सामाजिक न्यायाच्या मूळ भावनेलाच नष्ट करतो.

हा चिकित्सक अभ्यास 'प्रति-संस्कृतीकरण' आणि 'छद्म-संस्कृतीकरण' या दोन संकल्पनांचे सखोल विश्लेषण करेल. या प्रक्रियांमुळे खऱ्या अनुसूचित जमातींच्या घटनात्मक हक्कांचे कसे पद्धतशीरपणे हनन होत आहे, याचा आढावा घेतला जाईल. तसेच, या फसवणुकीमुळे आदिवासी समाजावर होणारे सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक परिणाम आणि या समस्येवर मात करण्यासाठी आवश्यक असलेल्या कायदेशीर आणि प्रशासकीय उपाययोजनांवरही या अहवालात प्रकाश टाकला जाईल.

**संस्कृतीकरण: एक समाजशास्त्रीय संकल्पना:** 'प्रति-संस्कृतीकरण' आणि 'छद्म-संस्कृतीकरण' या आधुनिक आणि कपटी प्रक्रिया समजून घेण्यासाठी, त्यांच्या मूळ समाजशास्त्रीय संकल्पनेला, म्हणजेच 'संस्कृतीकरण' (Sanskritization) याला समजून घेणे आवश्यक आहे. संस्कृतीकरण ही एक ऐतिहासिक सामाजिक प्रक्रिया आहे, जिचा उद्देश सामाजिक सन्मान मिळवणे हा होता, तर प्रति-संस्कृतीकरण आणि छद्म-संस्कृतीकरण या प्रक्रिया केवळ कायदेशीर फायदे मिळवण्यासाठी केलेल्या संधीसाधू कृती आहेत. प्रसिद्ध भारतीय समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास (M.N. Srinivas) यांनी त्यांच्या 'रिलीजन अँड सोसायटी अमंग द कुर्ग्स ऑफ साऊथ इंडिया' या पुस्तकात 'संस्कृतीकरण' ही संकल्पना मांडली. श्रीनिवास यांच्या मते, "संस्कृतीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे एखादी 'कनिष्ठ' मानली जाणारी हिंदू जात किंवा एखादी जमात किंवा इतर कोणताही गट, उच्च आणि विशेषतः 'द्विज' जातींच्या चालीरिती, कर्मकांड, विचारप्रणाली आणि जीवनशैलीचा स्वीकार करतो". या प्रक्रियेमागील मुख्य प्रेरणा जातीय उतरंडीमध्ये आपला सामाजिक दर्जा उंचावणे ही होती. श्रीनिवास यांनी सुरुवातीला या प्रक्रियेसाठी 'ब्राह्मणीकरण' (Brahminization) हा शब्द वापरला होता, कारण अनेक ठिकाणी कनिष्ठ गट ब्राह्मणांचे अनुकरण करत होते. परंतु नंतर त्यांनी हा शब्द बदलून 'संस्कृतीकरण' असा केला, कारण अनुकरण केवळ ब्राह्मणांचेच नव्हे, तर स्थानिक पातळीवरील इतर प्रबळ जातींचे (उदा. क्षत्रिय, वैश्य) सुद्धा केले जात होते. संस्कृतीकरणाची काही प्रमुख वैशिष्ट्ये होती. ही एक दीर्घकालीन आणि अनेक पिढ्या चालणारी प्रक्रिया होती. यामध्ये शाकाहार स्वीकारणे, विशिष्ट प्रकारचे कपडे घालणे, उच्च जातींचे धार्मिक विधी आणि सण साजरे करणे, तसेच स्वतःच्या काही पारंपरिक प्रथा, ज्यांना उच्च जाती 'अशुद्ध' मानत होत्या, त्या सोडून देणे अशा गोष्टींचा समावेश होता. ही एक 'अंतर्गत' (endogenous) सामाजिक बदलाची प्रक्रिया होती, जी समाजाच्या आतून, सामाजिक प्रतिष्ठेच्या आकांक्षेतून जन्माला आली होती. मात्र, ही प्रक्रिया आदिवासी समाजांमध्ये फारशी यशस्वी किंवा लोकप्रिय झाली नाही. याचे मुख्य कारण म्हणजे आदिवासी समाज आणि जाती-आधारित हिंदू समाज यांच्यात असलेले मोठे सांस्कृतिक, भाषिक आणि धार्मिक अंतर. आदिवासींचे स्वतःचे देव, स्वतःच्या प्रथा, परंपरा आणि सामाजिक रचना होती, जी हिंदूंच्या जातिव्यवस्थेपेक्षा पूर्णपणे वेगळी होती. त्यामुळे, सांस्कृतिक आत्मसात करण्याची ही प्रक्रिया आदिवासी संदर्भात मर्यादित राहिली.

संस्कृतीकरण आणि आजच्या 'प्रति-संस्कृतीकरण' यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. संस्कृतीकरण ही एक 'खालून वर' (bottom-up) जाणारी प्रक्रिया होती, जिचा उद्देश सामाजिक सन्मान मिळवणे हा होता. याउलट, प्रति-संस्कृतीकरण ही एक 'वरून खाली' (top-down) येण्याचा कायदेशीर देखावा करणारी प्रक्रिया आहे, जिचा उद्देश कायदेशीर आणि आर्थिक फायदे मिळवणे आहे. संस्कृतीकरणात कनिष्ठ गट उच्च गटाच्या संस्कृतीची आकांक्षा धरत होता, तर प्रति-संस्कृतीकरणात उच्च गट कनिष्ठ गटाच्या कायदेशीर श्रेणीची नक्कल करत आहे. यातून हे स्पष्ट होते की, सामाजिक बदलाची एक नैसर्गिक प्रक्रिया आज कशी कायदेशीर-प्रशासकीय फसवणुकीच्या साधनात बदलली आहे. या नव्या प्रक्रियेतून 'संस्कृती' हा मूळ आत्माच काढून टाकला गेला आहे आणि केवळ फायद्यासाठी केलेले 'करण' (process) शिल्लक राहिले आहे.

**प्रति-संस्कृतीकरण (Reverse Sanskritization): फायद्यासाठी सामाजिक अधोगतीचा मार्ग** - 'प्रति-संस्कृतीकरण' ही एक आधुनिक आणि अत्यंत चिंताजनक सामाजिक-कायदेशीर प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया संस्कृतीकरणाच्या अगदी उलट दिशेने काम करते. संस्कृतीकरणात जिथे कनिष्ठ गट सामाजिक प्रतिष्ठा मिळवण्यासाठी उच्च गटाचे अनुकरण करतो, तिथे प्रति-संस्कृतीकरणात उच्च किंवा प्रबळ जाती-समुदायातील व्यक्ती घटनात्मक लाभांसाठी (विशेषतः आरक्षणासाठी) स्वतःला कायदेशीरदृष्ट्या 'खालच्या'

सामाजिक गटात, म्हणजेच अनुसूचित जाती किंवा जमातींमध्ये, समाविष्ट करण्याचा प्रयत्न करतात. ही एक जाणीवपूर्वक आणि धोरणात्मक कृती आहे, जिचा उद्देश सामाजिक सुधारणा नसून केवळ वैयक्तिक लाभ मिळवणे हा आहे.

या प्रक्रियेची मुख्य वैशिष्ट्ये तिची कपटी आणि संधीसाधू वृत्ती दर्शवतात. यात खरी सांस्कृतिक स्वीकृती किंवा सामाजिक बदल घडत नाही. उलट, खोटी वंशावळ तयार करणे, जुन्या कागदपत्रांमध्ये फेरफार करणे किंवा राजकीय दबाव वापरून स्वतःला एखाद्या आदिवासी जमातीशी जोडण्याचा प्रयत्न केला जातो. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात, काही प्रबळ जातींमधील व्यक्तींनी धनवार, धनगड, मन्नेवार, राज, कोलाम-मन्नेरवारलु, कोळी ढोर, टोकरे कोळी, कोळी महादेव, कोळी मल्हार, नाईकडा, ठाकूर-ठाकर, गौंड, हलबा-हलबी, तडवी, धोबा, छत्री, पारधी, राजगोंड, टाकणकार, तडवी भिल यांसारख्या आदिवासी जमातींशी आपले वंशज संबंध असल्याचे खोटे दावे केले आहेत. या व्यक्तींना त्या जमातीची भाषा, चालीरिती, सामाजिक रचना किंवा सामूहिक जीवन यापैकी कशाचीही माहिती नसते, तरीही केवळ सरकारी फायदे मिळवण्यासाठी ते आदिवासी असल्याचा दावा करतात. यातून हेच दिसून येते की 'मागासलेपण' ही आता एक सामाजिक किंवा आर्थिक वास्तविकता न राहता, एक राजकीय आणि आर्थिक फायद्याची वस्तू बनली आहे.

प्रति-संस्कृतीकरण आणि 'वि-संस्कृतीकरण' (De-Sanskritization) या दोन संकल्पनांमध्ये फरक करणे महत्त्वाचे आहे. वि-संस्कृतीकरण म्हणजे जेव्हा उच्च जातीतील व्यक्ती प्रस्थापित सामाजिक नियमांना आणि मूल्यांना नाकारण्यासाठी जाणीवपूर्वक कनिष्ठ जातींच्या प्रथा आणि जीवनशैलीचा स्वीकार करतात. हा अनेकदा एक राजकीय किंवा वैचारिक विरोध असतो. याउलट, प्रति-संस्कृतीकरणात स्वतःच्या संस्कृतीला नाकारण्याचा कोणताही हेतू नसतो. इथे उद्देश फक्त कायदेशीर प्रणालीचा गैरवापर करून आरक्षणासारखे फायदे मिळवणे हा असतो. या प्रक्रियेतील सर्वात मोठा विरोधाभास म्हणजे 'जबाबदारीशिवाय फायदा' (Benefit without Burden) मिळवण्याचा प्रयत्न. प्रति-संस्कृतीकरणाचा दावा करणाऱ्या व्यक्तींना संरक्षित श्रेणीचे सर्व लाभ हवे असतात, परंतु त्या ओळखीशी संबंधित ऐतिहासिक आणि वर्तमानातील अन्याय, दुःख आणि सामाजिक गैरसोय त्यांना नको असते. त्यांना आरक्षणाचा कोटा हवा असतो, पण त्या कोट्याची निर्मिती ज्या सामाजिक कलंक, आर्थिक वंचितता आणि भेदभावामुळे झाली, तो अनुभव त्यांना नको असतो. अशी व्यक्ती कायदेशीर कागदपत्रांवर स्वतःला 'आदिवासी' म्हणून दाखवते, परंतु सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या ती आपल्या प्रबळ समाजातच वावरत राहते. यामुळे दुहेरी नुकसान होते. एकीकडे, एका खऱ्या गरजू आदिवासी व्यक्तीची जागा हिसकावून घेतली जाते आणि दुसरीकडे, सामाजिक न्यायाच्या मूळ तत्त्वाचीच थट्टा केली जाते. कारण सामाजिक न्यायाचा आधार हा खऱ्या आणि अनुभवलेल्या विषमतेवर उपाययोजना करणे हा आहे, बनावट ओळखींना पुरस्कृत करणे नाही.

**छद्म-संस्कृतीकरण (*Pseudo-Sanskritization*) : ओळखीचा बनावट देखावा -** जर प्रति-संस्कृतीकरण हे कायदेशीर प्रणालीचा गैरवापर करण्याचे एक धूर्त स्वरूप असेल, तर 'छद्म-संस्कृतीकरण' किंवा 'छद्म-आदिवासीवाद' (Pseudo-tribalism) हे ओळख चोरीचे सर्वात निर्लज्ज आणि उघड स्वरूप आहे. ही प्रक्रिया म्हणजे निव्वळ फसवणूक आहे, जिथे तात्काळ भौतिक लाभासाठी पूर्णपणे बनावट कागदपत्रांच्या आधारे आणि 'आदिवासी' असण्याचा वरवरचा देखावा करून ओळख हडप केली जाते. यात कोणत्याही प्रकारच्या सांस्कृतिक बदलाचा किंवा आत्मसात करण्याचा प्रयत्नही नसतो; हा निव्वळ गुन्हेगारी स्वरूपाचा व्यवहार असतो. छद्म-संस्कृतीकरणाची वैशिष्ट्ये तिची बनावट आणि संधीसाधू प्रवृत्ती स्पष्ट करतात. यातील सर्वात प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पूर्णपणे बनावट किंवा खोट्या आदिवासी/जाती प्रमाणपत्रांचा वापर करणे. अनेकदा, केवळ आदिवासी वाटणारी आडनावे लावणे किंवा आदिवासी संस्कृतीतील काही प्रतीकांचा (उदा. विशिष्ट पोशाख) तात्पुरता वापर करणे, यापलीकडे काहीही केले जात नाही. या लोकांना त्या जमातीची भाषा, सण, विधी, सामाजिक नियम किंवा इतिहासाची अजिबात माहिती नसते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ज्या आदिवासी समाजाचे सदस्य असल्याचा दावा केला जातो, त्या समाजात त्यांना कोणतीही स्वीकृती नसते. तो समाज त्यांना बाहेरचा आणि फसवणूक करणारा म्हणूनच ओळखतो. ही फसवणूक मोठ्या प्रमाणावर यशस्वी होण्यामागे शासकीय प्रशासकीय यंत्रणेतील त्रुटी आणि कमकुवतपणा कारणीभूत आहेत. महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी सुरू केलेल्या ऑनलाइन अर्ज प्रणालीचा उद्देश नागरिकांची सोय करणे हा आहे. अर्जदार 'आपले सरकार' यांसारख्या पोर्टलवरून आवश्यक कागदपत्रे जोडून अर्ज करू शकतात. मात्र, जर कागदपत्रांची पडताळणी करणारी यंत्रणा (verification backend) मजबूत नसेल, तर बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रमाणपत्र मिळवणे सोपे होते. अर्ज कसा करावा, कोणती कागदपत्रे जोडावीत, याबद्दलची माहिती ऑनलाइन उपलब्ध आहे , आणि याच प्रक्रियेचा गैरवापर करून फसवणूक करणारे लोक प्रशासकीय यंत्रणेला चकमा देतात.

छद्म-संस्कृतीकरणाचा सर्वात मोठा आणि दूरगामी परिणाम म्हणजे राज्याच्या आणि प्रशासकीय यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर होणारा हल्ला. जेव्हा बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे नोकऱ्या आणि शैक्षणिक प्रवेश मिळवले जातात, तेव्हा खऱ्या आदिवासींचा व्यवस्थेवरील विश्वास उडतो. त्यांना असे वाटू लागते की सरकार त्यांचे हक्क आणि ओळख यांचे संरक्षण करण्यास असमर्थ किंवा अनिच्छुक आहे. ज्या व्यवस्थेची निर्मिती न्यायासाठी झाली होती, तीच व्यवस्था फसवणुकीचे व्यासपीठ बनते. यामुळे आदिवासी समाजात असलेली परकेपणाची आणि उपेक्षेची भावना अधिक तीव्र होते - हीच ती भावना आहे जी दूर करण्यासाठी संविधानाने विशेष संरक्षणाची तरतूद केली होती. जेव्हा एखादी बनावट व्यक्ती आरक्षित जागेवर नोकरी मिळवते, तेव्हा एका खऱ्या हक्कदारावर अन्याय होतो आणि यातून समाजात असंतोष आणि निराशा वाढते. हे केवळ एका व्यक्तीचे नुकसान नसते, तर ते संपूर्ण व्यवस्थेच्या अपयशाचे प्रतीक ठरते. खालील तक्ता स्पष्ट करतो की, प्रति-संस्कृतीकरण ही एक अधिक धूर्त आणि दीर्घकालीन योजना आहे, जिथे कायदेशीर आणि ऐतिहासिक नोंदींमध्ये फेरफार करून दावा सादर केला जातो. यात एक प्रकारची कायदेशीर लढाई लढण्याची तयारी असते. याउलट, छद्म-संस्कृतीकरण ही एक थेट आणि उघड फसवणूक आहे, जी प्रशासकीय यंत्रणेतील त्रुटींचा फायदा घेऊन तात्काळ लाभ मिळवण्यासाठी केली जाते.

**तुलनात्मक विश्लेषण : प्रती-संस्कृतीकरण विरुद्ध छद्म-संस्कृतीकरण**

| अ. क्र. | घटक (Factor) | प्रती-संस्कृतीकरण (Reverse-Sanskritization) | छद्म-संस्कृतीकरण (Pseudo- Sanskritization) |
|---|---|---|---|
| १ | प्रेरणा (Motivation) | कायदेशीर फायदे (आरक्षण, नोकरी, शिक्षण, राजकीय पद) मिळवण्यासाठी. | प्रामुख्याने तात्काळ प्रशासकीय किंवा भौतिक लाभ (उदा. बनावट प्रमाणपत्रावर नोकरी मिळवणे). |
| २ | दिशा (Diretion) | कायदेशीरदृष्ट्या उच्च सामाजिक स्तरातून खालच्या स्तरात येण्याचा दावा करणे. | कोणताही खरा सामाजिक बदल नाही, केवळ ओळखीचा बनाव करणे. |
| ३ | पद्धत (Method) | वंशपरंपरागत संबंध जोडण्याचा प्रयत्न, ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये फेरफार, राजकीय दबाव. | पूर्णपणे बनावट कागदपत्रे, खोटे नाव लावणे, वरवरचे अनुकरण करणे. |
| ४ | कालावधी (Time Frame) | दावा सिद्ध करण्यासाठी अनेकदा पिढ्यांपिढ्याचा खोटा इतिहास रचला जातो (दीर्घकालीन). | बहुधा अल्पकालीन आणि संधिसाधू: तात्काळ फायद्यासाठी केले जाते. |
| ५ | सामाजिक स्वीकृती (Social Acceptance) | संबंधित आदिवासी समुदायाकडून जवळजवळ कधीही स्वीकारले जात नाही. | संबंधित आदिवासी समुदायाकडून पूर्णपणे नाकारले जाते आणि याला फसवणूक मानली जाते. |

या दोन्ही प्रक्रिया जरी वेगवेगळ्या मार्गांनी काम करत असल्या तरी, त्यांचा परिणाम एकच आहे: खऱ्या अनुसूचित जमातींच्या हक्कांचे हनन. प्रति-संस्कृतीकरण व्यवस्थेला आतून पोखरते, तर छद्म-संस्कृतीकरण व्यवस्थेवर थेट हल्ला करते. या दोन्ही धोक्यांना तोंड देण्यासाठी वेगवेगळ्या पण एकत्रित उपाययोजनांची गरज आहे. एकासाठी कायदेशीर आणि न्यायालयीन यंत्रणा अधिक मजबूत करावी लागेल, तर दुसऱ्यासाठी प्रशासकीय पडताळणी प्रक्रिया अधिक कडक आणि अचूक बनवावी लागेल. या दोन्ही धोक्यांची तीव्रता समजून घेणे हे त्यांच्या विरोधात प्रभावी धोरणे आखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**घटनात्मक आणि कायदेशीर चौकट: तत्वे आणि न्यायालयीन निवाडे:** भारतातील अनुसूचित जमातींची ओळख आणि त्यांचे हक्क यांचे संरक्षण करण्यासाठी घटना आणि न्यायव्यवस्थेने एक मजबूत कायदेशीर कवच तयार केले आहे. विशेषतः, सर्वोच्च न्यायालयाने बनावट दाव्यांना रोखण्यासाठी आणि आदिवासी ओळखीची पवित्रता जपण्यासाठी वेळोवेळी महत्त्वपूर्ण निवाडे दिले आहेत. या निवाड्यांनी काही स्पष्ट आणि न बदलता येणारी तत्त्वे स्थापित केली आहेत, जी प्रति-संस्कृतीकरण आणि छद्म-संस्कृतीकरणासारख्या फसवणुकीच्या विरोधात एक मोठी कायदेशीर भिंत म्हणून उभी आहेत.

**घटनात्मक संरक्षण** : अनुसूचित जमातींच्या संरक्षणाचा मूळ आधार भारतीय संविधानात आहे. **कलम ३४२ आणि ३६६(२५)** या कलमांनुसार, कोणत्याही राज्यासाठी अनुसूचित जमातींची यादी अधिसूचित करण्याचा अधिकार केवळ भारताच्या राष्ट्रपतींना आहे. एकदा ही यादी अधिसूचित झाल्यावर, त्यात कोणताही बदल करण्याचा किंवा नवीन जमातीचा समावेश करण्याचा अधिकार केवळ भारतीय संसदेला कायद्याद्वारे आहे. याचा अर्थ असा की, ही यादी अंतिम आणि पवित्र आहे आणि त्यात न्यायालय, सरकार किंवा इतर कोणतीही संस्था बदल करू शकत नाही. हे तत्त्व आदिवासी ओळखीला कायदेशीर निश्चितता आणि संरक्षण देते.

**कुमारी माधुरी पाटील विरुद्ध अतिरिक्त आयुक्त (१९९४) खटला - पडताळणीची प्रक्रिया** - हा खटला बनावट जात/जमात प्रमाणपत्रांच्या समस्येवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला एक ऐतिहासिक निवाडा मानला जातो. या खटल्याने प्रमाणपत्र पडताळणीसाठी एक निश्चित आणि कठोर प्रक्रिया घालून दिली.

**खटल्याची पार्श्वभूमी:** या प्रकरणात, 'हिंदू कोळी' (इतर मागासवर्गीय) समाजातील दोन बहिणींनी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी 'महादेव कोळी' (अनुसूचित जमात) असल्याचे प्रमाणपत्र मिळवले होते. सर्वोच्च न्यायालयाने त्यांचा दावा अवैध ठरवला.

**स्थापित झालेली प्रमुख तत्वे:**

**पडताळणी समित्यांची स्थापना (Scrutiny Committees):** सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक राज्यात जात/जमात प्रमाणपत्रांची सत्यता तपासण्यासाठी तज्ज्ञ पडताळणी समित्या स्थापन करण्याचे निर्देश दिले. या समित्यांमध्ये समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञांचा समावेश असावा, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. यामुळे तहसीलदारांसारख्या कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया अधिक जबाबदार बनली.

**सांस्कृतिक आत्मीयता चाचणी: (Affinity Test):** न्यायालयाने स्पष्ट केले की, केवळ कागदपत्रांच्या आधारे नव्हे, तर दावा करणाऱ्या व्यक्तीची त्या जमातीच्या चालीरिती, परंपरा, देव-देवता आणि सामाजिक रचनेशी खरी 'सांस्कृतिक जवळीक' आहे का, हे तपासले पाहिजे. जर एखादी व्यक्ती त्या जमातीच्या सांस्कृतिक जीवनापासून पूर्णपणे अनभिज्ञ असेल, तर तिचा दावा खोटा मानला जाईल.

**ओळख जन्माने मिळते:** आदिवासी ओळख ही जन्माने मिळते, ती दत्तक घेऊन, विवाह करून किंवा स्वतःच्या इच्छेने स्वीकारता येत नाही, हे तत्त्व या खटल्याने पुन्हा एकदा अधोरेखित केले.

**महाराष्ट्र राज्य विरुद्ध मिलिंद (२०००) खटला - यादीची अंतिम निश्चिती:** या खटल्याने राष्ट्रपतींनी अधिसूचित केलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीच्या अंतिम स्वरूपावर शिक्कामोर्तब केले आणि त्यात कोणताही बदल करण्याच्या प्रयत्नांना पूर्णपणे नाकारले.

**खटल्याची पार्श्वभूमी:** या प्रकरणात, 'कोष्टी' (विणकर समाज) जातीच्या एका व्यक्तीने 'हलबा-कोष्टी' हे 'हलबा/हलबी' (अनुसूचित जमात) या जमातीचेच उप-गट असल्याचा दावा करून वैद्यकीय प्रवेश मिळवला होता.

**स्थापित झालेली प्रमुख तत्वे:**

१. **न्यायालयीन हस्तक्षेपाला मनाई:** सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले कि, राष्ट्रपतींच्या अधिसूचनेत नमूद नसलेल्या कोणत्याही जातीला किंवा गटाला त्या जमातीचा भाग किंवा समानार्थी मानले जाऊ शकत नाही. न्यायालय किंवा इतर कोणतीही संस्था यादीत स्वतःच्या मर्जीने बदल किंवा त्याचा अर्थ लावू शकत नाही.

२. **संसदेचा एकमेव अधिकार:** अनुसूचित जमातींच्या यादीत बदल करण्याचा एकमेव अधिकार फक्त भारतीय संसदेला आहे. या निर्णयाने पूर्वीचे काही लवचिक निवाडे रद्द केले आणि एक कठोर नियम प्रस्थापित केला.

३. **भूतकाळातील प्रकरणांना संरक्षण:** हा कठोर नियम लागू करताना, न्यायालयाने एक व्यावहारिक भूमिका घेतली. मिलिंद यांचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाले असल्याने आणि त्यावर बराच काळ लोटल्याने, न्यायालयाने त्यांचे शिक्षण आणि पदवी रद्द केली नाही. मात्र, भविष्यात त्यांना अनुसूचित जमातीचा दर्जा वापरता येणार नाही, असे स्पष्ट केले.

**रमेशभाई डाभाई नाईका विरुद्ध गुजरात राज्य (२०१२) खटला – जगलेल्या वास्तवाचा अपवाद:** या खटल्याने आंतरजातीय विवाहांमधून जन्मलेल्या मुलांच्या जातीच्या प्रश्नावर एक महत्त्वपूर्ण आणि संतुलित दृष्टिकोन दिला. हे प्रकरण एका अशा व्यक्तीचे होते, ज्याची आई आदिवासी होती आणि वडील उच्च जातीचे (गैर-आदिवासी) होते. त्याची जात कोणती मानावी, हा प्रश्न होता. मुलाला वडिलांचीच जात मिळते, हा नियम अंतिम आणि अपरिवर्तनीय नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने सांगितले की, जर मुलाचे संगोपन पूर्णपणे आईच्या आदिवासी समाजात झाले असेल आणि त्याला त्या समाजाला सामोरे जावे लागणाऱ्या सर्व सामाजिक अडचणी, भेदभाव आणि विषमतेचा सामना करावा लागला असेल, तर त्याला आईच्या जमातीचा दर्जा दिला जाऊ शकतो. येथे केवळ वंश महत्त्वाचा नाही, तर 'जगलेले वास्तव' (lived reality) आणि अनुभवलेली सामाजिक वंचितता महत्त्वाची आहे. या तीन खटल्यांमधून सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेतील एक उत्क्रांती दिसून येते. माधुरी पाटील खटल्यात न्यायालयाने फसवणूक रोखण्यासाठी एक प्रक्रियात्मक उपाय (पडताळणी समिती) दिला. मिलिंद खटल्यात न्यायालयाने एक तात्त्विक आणि कठोर नियम (यादी अंतिम आहे) घालून दिला. तर रमेशभाई नाईका खटल्यात न्यायालयाने कठोर नियमामुळे होणारा अन्याय टाळण्यासाठी एक मानवतेवर आधारित आणि व्यावहारिक अपवाद (जगलेले वास्तव) तयार केला. ही उत्क्रांती दर्शवते की न्यायव्यवस्था फसवणूक रोखण्याच्या गरजेसोबतच, खऱ्या वंचितांचे संरक्षण करण्याच्या घटनात्मक उद्दिष्टालाही महत्त्व देते. हीच कायदेशीर चौकट आज बनावट दाव्यांविरुद्ध सर्वात मोठे शस्त्र आहे.

**खऱ्या अनुसूचित जमातींवरील सामाजिक-सांस्कृतिक परिणाम:** प्रति-संस्कृतीकरण आणि छद्म-संस्कृतीकरण यांसारख्या ओळख चोरीच्या घटनांचा परिणाम केवळ एका नोकरीच्या किंवा शैक्षणिक जागेच्या नुकसानीपुरता मर्यादित नसतो. या घटना आधीच असुरक्षित असलेल्या आदिवासी समाजावर खोलवर आर्थिक, सांस्कृतिक आणि मानसिक जखमा करतात, ज्यामुळे त्यांची पिढ्यानपिढ्या चालत आलेली वंचितता अधिकच गडद होते.

**हक्कांचे आणि संधींचे नुकसान:** या फसवणुकीचा सर्वात थेट आणि दृश्य परिणाम म्हणजे खऱ्या आदिवासी उमेदवारांच्या हक्कांवर येणारी गदा. माधुरी पाटील आणि मिलिंद यांसारख्या प्रकरणांमध्ये जसे दिसून आले, बनावट प्रमाणपत्रधारकांमुळे शिक्षण, सरकारी नोकऱ्या आणि राजकीय पदांसाठी राखीव असलेल्या जागांवर अतिक्रमण होते. ही एक अशी स्पर्धा आहे जिथे प्रत्येक बनावट व्यक्तीच्या प्रवेशामुळे एक पात्र आणि गरजू आदिवासी उमेदवार बाहेर फेकला जातो. यामुळे केवळ एका व्यक्तीचे नुकसान होत नाही, तर त्या संपूर्ण समाजाच्या विकासाची संधी हिरावली जाते.

**सांस्कृतिक अवमूल्यन आणि घुसळण:** जेव्हा बाहेरचे लोक, ज्यांचा आदिवासी संस्कृतीशी कोणताही संबंध नसतो, ते आदिवासी असल्याचा दावा करतात, तेव्हा ते त्या ओळखीचे महत्त्व कमी करतात. आदिवासी समाजाची पवित्र मानली जाणारी प्रतीके, नावे, चालीरिती आणि परंपरा या केवळ फसवणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तू बनतात. ही एक प्रकारची सांस्कृतिक चोरी आहे, जी त्या समाजाच्या अस्मितेवर हल्ला करते. यामुळे आदिवासी संस्कृतीची मूळ ओळख पुसट होऊ लागते आणि तिचे बाजारीकरण होते.
मानसिक आणि भावनिक खच्चीकरण: खऱ्या आदिवासी व्यक्तींना जेव्हा त्यांची ओळख इतरांकडून चोरली जात असल्याचे दिसते, तेव्हा त्यांना प्रचंड मानसिक धक्का बसतो. त्यांना आपल्याच हक्काच्या जागांवर परकेपणा आणि असहाय्यता अनुभवावी लागते. अनेकदा त्यांना स्वतःची ओळख सिद्ध करण्यासाठी संघर्ष करावा लागतो, तर दुसरीकडे बनावट लोक सहजपणे फायदे उपभोगत असतात. या प्रक्रियेमुळे त्यांच्या मनात व्यवस्थेबद्दल अविश्वास आणि चीड निर्माण होते.

**व्यवस्थेवरील अविश्वास:** जेव्हा बनावट प्रमाणपत्रे सहज मिळतात आणि वापरली जातात, तेव्हा आदिवासी समाजाचा सरकारी पडताळणी यंत्रणेवरील आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडतो. त्यांना असे वाटते की, ज्या व्यवस्थेने त्यांचे संरक्षण करायला हवे, तीच व्यवस्था भ्रष्ट किंवा अकार्यक्षम आहे. हा अविश्वास त्यांना व्यवस्थेपासून आणखी दूर लोटतो. डॉ. आंबेडकर आणि महात्मा फुले यांनी ज्याप्रमाणे दलित आणि आदिवासी समाजाच्या व्यवस्थेविरुद्धच्या संघर्षावर प्रकाश टाकला होता, त्याचप्रमाणे हा आधुनिक काळातील विश्वासघात त्या ऐतिहासिक संघर्षाची आठवण करून देतो.

ही ओळख चोरीची कृती केवळ एक गुन्हा नाही, तर ती एक प्रकारची हिंसा आहे. ही एक 'ज्ञानात्मक हिंसा' (epistemic violence) आहे, कारण ती एका समाजाच्या ज्ञानाच्या आणि अनुभवाच्या व्यवस्थेवर हल्ला करते. ती समाजाच्या इतिहासाला, भाषेला आणि सामूहिक अनुभवाला नाकारून, त्याच्या ओळखीला केवळ एका कागदाच्या तुकड्यात बंद करते. त्याचबरोबर, ही एक

'संरचनात्मक हिंसा' (structural violence) आहे, कारण ती ज्या आरक्षणाच्या संरचनेची निर्मिती वंचितांच्या संरक्षणासाठी झाली होती, त्याच संरचनेचा वापर त्यांच्या विरोधात एक शस्त्र म्हणून करते. यामुळे केवळ हक्कांचीच नव्हे, तर आदिवासी समाजाच्या सन्मानाची, अस्मितेची आणि सामाजिक न्यायाच्या मूळ भावनेचीही लूट होते.

**शिफारशी आणि उपाययोजना: संरक्षण यंत्रणा मजबूत करणे** - प्रति-संस्कृतीकरण आणि छद्म-संस्कृतीकरण यांसारख्या गुंतागुंतीच्या आणि बहुआयामी समस्येचा सामना करण्यासाठी एक सर्वसमावेशक आणि बहुस्तरीय रणनीती आवश्यक आहे. यामध्ये केवळ कायदे कडक करणे पुरेसे नाही, तर प्रशासकीय यंत्रणा अधिक कार्यक्षम बनवणे, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आदिवासी समाजालाच आपल्या ओळखीचे रक्षण करण्यासाठी सक्षम करणे आवश्यक आहे. खालील उपाययोजना या दिशेने महत्त्वपूर्ण ठरू शकतात:

**पडताळणी यंत्रणा अधिक मजबूत करणे:** सर्वोच्च न्यायालयाने कुमारी माधुरी पाटील खटल्यात दिलेल्या निर्देशांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. जात/जमात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांमध्ये केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांऐवजी मानववंशशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञांचा सक्रिय सहभाग अनिवार्य करावा. या समित्यांनी केवळ कागदपत्रांची तपासणी न करता, 'सांस्कृतिक जवळीक चाचणी' (Affinity Test) गांभीर्याने घेतली पाहिजे, ज्यात दावा करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनशैलीची, परंपरांच्या ज्ञानाची आणि सामाजिक सहभागाची सखोल चौकशी होईल.

**स्थानिक समाजाला प्रक्रियेत सामील करणे:** आदिवासी ओळखीचे सर्वात मोठे संरक्षक स्वतः आदिवासी समाजच असू शकतो. त्यामुळे, प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत ग्रामसभा किंवा पारंपरिक आदिवासी पंचायतींना कायदेशीर अधिकार द्यावेत. कोणत्याही व्यक्तीला प्रमाणपत्र देण्यापूर्वी, त्या व्यक्तीला स्थानिक समाज आपला सदस्य मानतो की नाही, याबाबत ग्रामसभेचे किंवा पंचायतीचे मत विचारात घेणे बंधनकारक करावे. यामुळे फसवणुकीला स्थानिक पातळीवरच आळा बसेल आणि समाज आपल्या ओळखीच्या रक्षणासाठी अधिक जागरूक होईल. व्यवस्थेच्या दुरुस्तीसाठी हा सर्वात प्रभावी उपाय ठरू शकतो, कारण प्रशासकीय यंत्रणा कागदपत्रांमुळे फसू शकते, पण स्थानिक समाज सहजासहजी फसत नाही.

**कठोर कायदेशीर कारवाई आणि शिक्षा:** बनावट प्रमाणपत्र तयार करणाऱ्या आणि त्याचा वापर करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय दंड संहितेच्या (IPC) कलम ४२० (फसवणूक) आणि ४६८ (बनावट दस्तऐवज तयार करणे) अंतर्गत कठोर कारवाई करावी. तसेच, या फसवणुकीत सामील असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित करून त्यांना शिक्षा झाली पाहिजे. याशिवाय, अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्याच्या (SC/ST Act) तरतुदींचा वापर अशा प्रकरणांमध्ये करता येतो का, याचीही कायदेशीर तपासणी व्हायला हवी.

**जागरूकता मोहीम:** समाजात, विशेषतः विद्यार्थी आणि सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये, आदिवासी ओळखीच्या महत्त्वाविषयी आणि बनावट प्रमाणपत्रांमुळे होणाऱ्या गंभीर नुकसानीबद्दल जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. ही केवळ एक प्रशासकीय चूक नसून, एका संपूर्ण समाजावर होणारा अन्याय आहे, ही भावना समाजात रुजवली पाहिजे.

**डिजिटल आणि बायोमेट्रिक नोंदणी:** खऱ्या अनुसूचित जमातीच्या सर्व व्यक्तींची एक राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय डिजिटल नोंदणी (Digital Registry) तयार करावी. ही नोंदणी आधार कार्ड आणि बायोमेट्रिक माहितीशी जोडलेली असावी. यामुळे एकाच व्यक्तीच्या नावे अनेक बनावट प्रमाणपत्रे तयार करण्याला आळा बसेल आणि पडताळणीसाठी एक विश्वसनीय आणि सुरक्षित डेटाबेस उपलब्ध होईल. तंत्रज्ञानाचा हा वापर प्रशासकीय प्रक्रियेला अधिक पारदर्शक आणि सुरक्षित बनवू शकतो.

या सर्व उपाययोजना एकत्रितपणे राबवल्यास, आदिवासींच्या हक्कांचे संरक्षण करणारी भिंत अधिक मजबूत होऊ शकते. या प्रक्रियेत केवळ सरकारचीच नव्हे, तर समाजाची आणि स्वतः आदिवासी समुदायांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

**निष्कर्ष: अस्सल ओळखीचे जतन करण्याचे आव्हान** - या सविस्तर विश्लेषणातून हे स्पष्ट होते की, 'प्रति-संस्कृतीकरण' आणि 'छद्म-संस्कृतीकरण' या केवळ किरकोळ फसवणुकीच्या घटना नाहीत, तर त्या भारतीय संविधानाने अनुसूचित जमातींना दिलेल्या सामाजिक न्यायाच्या वचनावर केलेला एक पद्धतशीर आणि गंभीर हल्ला आहेत. या प्रक्रिया आरक्षणाच्या मूळ उद्देशालाच सुरुंग लावतात आणि सक्षमीकरणासाठी तयार केलेल्या साधनांना शोषणाच्या हत्यारांमध्ये बदलतात. ज्या प्रबळ गटांनी ऐतिहासिकदृष्ट्या आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले, तेच गट आज बनावट ओळखीच्या आधारे त्यांच्या हक्कांची लूट करत आहेत, ही एक मोठी विडंबना आहे.

भारतीय न्यायव्यवस्थेने, विशेषतः सर्वोच्च न्यायालयाने, माधुरी पाटील, मिलिंद आणि रमेशभाई नाईका यांसारख्या ऐतिहासिक निवाड्यांद्वारे एक अत्यंत मजबूत कायदेशीर चौकट उभी केली आहे. या निवाड्यांनी ओळख पडताळणीची प्रक्रिया, राष्ट्रपतींच्या अधिसूचनेची अंतिम निश्चिती आणि ओळखीच्या दाव्यातील मानवी पैलू यावर स्पष्ट तत्त्वे घालून दिली आहेत. तथापि, या कायदेशीर चौकटीची प्रभावी अंमलबजावणी करणे हे आज सर्वात मोठे आव्हान आहे. कायदे कितीही चांगले असले, तरी प्रशासकीय यंत्रणेतील त्रुटी, भ्रष्टाचार आणि राजकीय उदासीनता यांमुळे त्यांची अंमलबजावणी कमकुवत राहते. या समस्येवर मात करण्यासाठी एकात्मिक प्रयत्नांची गरज आहे. यात कठोर कायदेशीर अंमलबजावणी, तंत्रज्ञानाने सुसज्ज आणि सतर्क प्रशासन, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आपल्या ओळखीचे रक्षण करण्यासाठी सक्षम झालेला आदिवासी समाज यांचा समावेश असावा. जोपर्यंत स्थानिक समाजाला या प्रक्रियेत भागीदार बनवले जात नाही, तोपर्यंत केवळ वरच्या पातळीवरील उपाययोजना अपुऱ्या पडतील.

शेवटी, अनुसूचित जमातींच्या हक्कांचे संरक्षण करणे म्हणजे केवळ त्यांना काही फायदे किंवा सवलती देणे नव्हे, तर त्यांच्या अस्सल आणि समृद्ध सांस्कृतिक ओळखीचे जतन करणे होय. भारतासारख्या वैविध्यपूर्ण देशाची खरी ताकद त्याच्या

सर्वसमावेशकतेत आणि प्रत्येक समाजाच्या अद्वितीय ओळखीचा आदर करण्यात आहे. या नव्या युगातील लुटीपासून देशातील सर्वात असुरक्षित आणि सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न असलेल्या समाजांचे संरक्षण करणे, हे केवळ त्यांचेच नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राचे कर्तव्य आहे. हे आव्हान पेलण्यातच भारताच्या घटनात्मक मूल्यांचे आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे यश सामावलेले आहे.

**संदर्भ :**

१) मँडेलबॉम, डी. जी. (१९७०). सोसायटी इन इंडिया (खंड १-२). युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस.
२) सहारे, पी. एन. (२०१५) भारतीय समाजविषयक दृष्टीकोन, विद्या बुक्स, औरंगाबाद,
३) सिंग, वाय. (१९७३). मॉडर्नायझेशन ऑफ इंडियन ट्रॅडिशन. थॉमसन प्रेस.
४) श्रीनिवास, एम. एन. (१९५२). रिलीजन अँड सोसायटी अमंग द कुर्ग्स ऑफ साऊथ इंडिया. क्लेरंडन प्रेस.
५) श्रीनिवास, एम. एन. (१९६२). कास्ट इन मॉडर्न इंडिया अँड अदर एसेज. एशिया पब्लिशिंग हाऊस.
६) श्रीनिवास, एम. एन. (१९६६). सोशल चेंज इन मॉडर्न इंडिया. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस.
७) श्रीनिवास, एम. एन. (१९८९). द कोहेसिव्ह रोल ऑफ संस्कृतायझेशन अँड अदर एसेज. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
८) कुमारी माधुरी पाटील आणि इतर विरुद्ध अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास आणि इतर, (१९९४) ६ एस.सी.सी. २४१.
९) रमेशभाई दाभाई नाईका विरुद्ध गुजरात राज्य आणि इतर, (२०१२) ३ एस.सी.सी. ४००.
१०) महाराष्ट्र राज्य विरुद्ध मिलिंद आणि इतर, (२००१) १ एस.सी.सी. ४.

# ग्रामीण भागातील महिलांचे बदलते स्वरूप: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**उषा मनोहर काटे** संशोधक विद्यार्थी, सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.

**गोषवारा:** आता चूल आणि मूल या पारंपारिक भूमिकेतून बाहेर पडून शिक्षण रोजगार आणि सार्वजनिक जीवनात सक्रिय होत आहेत ज्यामुळे त्यांचे सक्षमीकरण होत आहे, परंतु तरीही शिक्षण आरोग्य आरोग्याच्या पुढे आर्थिक असमानता आणि रुढीवादी विचार विचारसरणी त्यांच्या सारख्या समस्यांचा सामना करावा लागतो आहे ग्रामीण भागातील महिलांमध्ये शिक्षण रोजगार आणि नेतृत्वाच्या संधीमुळे संधीमुळे मोठे बदल होत आहे त्यात आता केवळ घरकाम न करता शेती व्यवसाय बचत गट आणि ग्रामीण महिलांना त्यांचे मूळ ज्ञान कौशल्य आणि लघु व्यवसाय निर्मितीसाठी सक्षम का सूक्ष्म सक्षम बनवणे आवश्यक आहे ग्रामीण भागातील महिलांना छोटे छोटे उद्योग सुरू करून त्या उद्योगांचे रूपांतर मोठ्या उद्योगांमध्ये झालेले अनेक उदाहरणे आहेत

**बीज शब्द:** ग्रामीण, महिला, समाज, परिवर्तन

**प्रस्तावना:** ग्रामीण महिलांचे कौटुंबिक आणि समाजातील योगदानामध्ये सिंहाचा वाटा आहे परंतु असे असले तरी त्यांना विकासाच्या संधीमध्ये अतिशय अल्पवाटा मिळतो बहुतेक वेळा त्यांना शिक्षणाचा त्यांना शिक्षण चांगल्या नोकऱ्या राजकीय व्यवस्थेत सहभाग आणि चांगले आरोग्यसेवा निर्णय घेण्यापासून वेगळे वेगळे केले जाते शिवाय त्यांना शारीरिक मानसिक सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळ्यांचा सामना करावा लागतो ही कीजे त्यांच्या सक्षमीकरण कर्त्यांनी स्त्री व पुरुष यांच्यामध्ये यांच्यामध्ये दरीमध्ये कमी करण्याचा दरी कमी करण्याकरता रणनीती ठरवते १९५० मध्ये या कार्यक्रमाचा दृष्टिकोन कल्याण हा होता तर १९७० च्या सुमारास विकास हा झाला व १९८० पासून सबलीकरण सबलीकरण हा दृष्टिकोन विकसित झाला. आरोग्य सुविधांचे कमतरता आणि पारंपारिक सामाजिक अडथळे यांच्यासारख्या समस्या अजूनही त्यांना भेडसावत आहेत ज्यामुळे त्यांचे सक्षमीकरण हे काळाची गरज बनलेली आहे असे युनेस्को वुमन न्यूक्रीयन वर्थ यांच्यासारखा श्रोताकडून दिसत आहे. आता चूल आणि मूल या पारंपारिक भूमिकेतून बाहेर पडून शिक्षण रोजगार आणि सार्वजनिक जीवनात सक्रिय होत आहेत ज्यामुळे त्यांचे सक्षमीकरण होत आहे, परंतु तरीही शिक्षण, आरोग्य, आरोग्याच्या पुढे आर्थिक असमानता आणि रुढीवादी विचारसरणी त्यांच्या सारख्या समस्यांचा सामना करावा लागतो आहे ग्रामीण भागातील महिलांमध्ये शिक्षण रोजगार आणि नेतृत्वाच्या संधीमुळे मोठे बदल होत आहे त्यात आता केवळ घरकाम न करता शेती व्यवसाय, बचत गट, आणि ग्रामीण महिलांना त्यांचे मूळ ज्ञान कौशल्य आणि लघु व्यवसाय निर्मितीसाठी सक्षम बनवणे आवश्यक आहे ग्रामीण भागातील महिलांना छोटे छोटे उद्योग सुरू करून त्या उद्योगांचे रूपांतर मोठ्या उद्योगांमध्ये झालेले अनेक उदाहरणे आहेत.

**उद्देश:** ग्रामीण भागातील महिलांच्या शैक्षणिक, कौटुंबिक जीवनात झालेले बदल जाणून घेणे. ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक जीवनात झालेले बदल जाणून घेणे. ग्रामीण भागातील महिलांच्या सद्यस्थितीतील आव्हाने जाणून घेणे.

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने व्दितीय स्त्रोतांचा उपयोग करण्यात आलेला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, लेख, पुस्तके, संशोधन पत्रिका यांचा आधार घेण्यात आला आहे.

**बदलाचे प्रमुख क्षेत्रे:**

१) आर्थिक सक्षमीकरण: - स्वयंसहायता गट (एसएससी) शेतकरी उत्पादक कंपन्या एक FPOS आणि सूक्ष्म विद्युत पुरवठा वित्त पुरवठा मायक्रो फायनान्स कार्यक्रमामुळे महिलांना व्यवसाय सुरू करण्यात आणि उत्पन्न वाढवण्यास मदत होत आहे. त्या आता केवळ शेतीत नव्हे तर स्थानिक बाजारपेठेमध्ये मध्येही सक्रिय होत आहेत ज्यामुळे त्यांच्या आर्थिक निर्भरता कमी होत आहे.

२) शिक्षण आणि कौशल्य: शिक्षणाच्या वाढत्या संधीमुळे ग्रामीण महिलांचे ग्रामीण महिलांमध्ये जागरूकता येत आहे आणि त्या ताठ मानाने जगण्याचा प्रयत्न करत आहेत. सरकारी योजना आणि संस्थांच्या मदतीने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले जात आहे ज्यामुळे त्यांना नवीन संधी मिळत आहे

३) सामाजिक आणि राजकीय सहभाग: स्वच्छ भारत अभियानासारख्या उपक्रमामध्ये ग्रामीण महिलांना ग्रामीण महिला नेतृत्व करत आहेत. स्थानिक शासन संस्थेमध्ये उदाहरणार्थ ग्रामपंचायत त्यांचा सहभाग वाढत आहे यामुळे निर्णय प्रक्रियेत त्यांचा आवाज पोहोचवत आहेत. राजकीय नेतृत्व ग्रामपंचायत सदस्य किंवा इतर पदावर निवडून आलेल्या महिलांचा आत्मविश्वास आणि निर्णय क्षमता वाढली आहे.

४) समुदाय विकास: महिला महिला आता केवळ घर सांभाळण्यापुरत्या मर्यादित नाहीत तर त्या सामाजिक आणि सामुदायिक कामांमध्ये सक्रिय भूमिका.

**बदललेली मानसिकता:** अल्पवयीन लग्नाचे प्रमाण कमी होत आहेत आणि महिला स्वतःच्या हक्कासाठी आणि चांगल्या भविष्यासाठी जागरूक होत आहेत. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास आणि स्वाभिमान वाढत आहे वाढत आहे ज्यामुळे त्या कुटुंबात आणि समाजात अधिक सन्मानाने वावरत आहेत.

**जागरूकता आणि सक्षमीकरण:** महिला सक्षमीकरणाच्या चळवळीत अन्य उपक्रमामुळे स्त्रिया त्यांच्या हक्काबाबत जागरूक होत आहेत आणि स्वतःचा विकास साधत आहेत तसेच असे महिला महिला सक्षमीकरणामुळे ग्रामीण भागातील महिलांचे बदलणारे विश्व डीओसीएक्स या दस्तऐवजातून दिसते.

**महिलांचे आर्थिक सबलीकरण:** वेतनासंबंधी भेदभाव स्वयंरोजगार अर्थसहाय्य अर्थसाह्याचा अभाव विनावेतन काम व बेरोजगारी कुठे उद्योगात मालकी हक्क नाही असे अशा अनेक कारणामुळे कारणामुळे स्त्रियांचे आर्थिक स्थान पुरुषापेक्षा दुय्यम राहिलेले दिसले महिलांना स्वतंत्र रोजगाराच्या संधी उपलब्ध करून आर्थिक आर्थिक दृष्ट्या महिलांना सक्षमीकरण करणे हा या प्रक्रियेचा उद्देश आहे महिलांना आर्थिक अधिकार मिळवून देणे उत्पादन प्रक्रियेत सहभागी करून घेणे या गोष्टी केल्या तरच राष्ट्राचा विकास होईल. महिलांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत अनेक तरतुदी आहेत राष्ट्रीय उपजीविका कार्यक्रम म्हणजे NRLM १) ग्रामीण महिलांना आर्थिक सुरक्षा व सक्षमीकरणाचे संधी दिलेली आहे. २) राष्ट्रीय महिला कोष योजनेत गरीब महिलांना नियमित निधी दिला जातो त्यांना उद्योग व्यवसाय गटासाठी प्रोत्साहन दिले जाते. ३) महिला इहाट योजना सुरू केली असून सात महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन दिले जाते. ४) प्रधानमंत्री जनधन योजनेत नाही लाखो महिलांचे पहिले बँक खाते सुरू करण्यात आले त्यामध्ये गरीब व दारिद्र्यरेषेचे दृष्टचक्र संपण्याची अपेक्षा आहे भारतात जवळपास ४७% महिलांचे बँक खाते उपलब्ध आहेत. ५) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना दारिद्र्यातून बाहेर पडण्यासाठी रोजगार उपलब्ध करून दिले जातात त्यामध्ये महिलांना मोठ्या प्रमाणात संधी आहेत सुकन्या समृद्धी योजना बेटी बचाव बेटी पढाव अंतर्गत राबवली असून त्यात २०१९ मध्ये ८६ लाख खाते सुरू करण्यात आली ग्रामीण भागातील महिला दारिद्र्य रेषा खालील आणि आणि अत्यंत गरिबाच्या परिस्थितीत जीवन जगत असताना ग्रामीण महिलांच्या एकत्रिकरणसाठी सेवा एकत्रित करण्यासाठी त्यांच्या क्षमता वाढवण्यासाठी आवश्यक असलेल्या आधारभूत उपचारासाठी उपचारासह अनेक आर्थिक आणि सामाजिक ऑफर देऊन त्यासाठी पावले आहेत उत्पादनासाठी पतपुरवठा प्रवेश करण्यासाठी असलेल्या सूक्ष्म आणि बचत गटा सारख्या सूक्ष्म विथ संस्थांचे नवीन स्थापना केलेली आहे.

तंत्रज्ञानाचा प्रभाव:- डिजिटल साक्षरता इंटरनेट इंटरनेट आणि मोबाईल मुळे मोबाईल मुळे नवीन गोष्टी शिकायला मिळत आहेत आणि त्यांच्या व्यवसायांना प्रसिद्धी मिळत आहे जरी अजूनही ग्रामीण भागात इंटरनेटची समस्या आहे.

**सूक्ष्म वित्तीय समावेशन:** पूर्वी ग्रामीण महिलांना बँकिंग व्यवहाराविषयी फारशी माहिती नव्हती त्यांच्या नावावर बँक खाते नसल्यामुळे त्या औपचारिक वित्तीय व्यवस्थेपासून दूर राहायच्या महिला बचत गटाच्या स्थापनेनंतर त्यांना बँक खाते उघडणे ठेवी ठेवणे अन्य कर्ज घेणे त्यांचे प्रशिक्षण मिळते यामुळे महिलांना बँकिंग क्षेत्राशी थेट संपर्क वाढला बँकिंग लिंकिंग कार्यामुळे महिलांना बँकिंग व्यवहारातील सवय लागली आणि आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक झाले महिलांनी बँक पासबुक जमा उचल व्यवहार आणि लेखा परीक्षणाची जबाबदारी शिकली यामुळे त्यांच्या आर्थिक निर्णय क्षमतेत वाढ झाली आणि वित्तीय साक्षरतेचे स्तर उंचावले.

**शिक्षण साक्षरता:** SGH बैठकीतून महिलांना शिक्षणाचे आणि साक्षरतेचे महत्त्व पटवून दिले अनेक गटांनी प्रौढ साक्षरता मोहीम राबवल्या आणि निरक्षर महिलांना लेखावही हाताळण्याचे गणित मोजण्याचे प्रशिक्षण दिले.

**आरोग्य व स्वच्छता:** महिलांचे आरोग्य हेच महिलांचे अस्तित्वाचे जाणे होय म्हणून महिलांचे आरोग्य शरीर निरोगी किंवा आरोग्य संपन्न राखणे स्वतःचे अस्तित टिकवणे महत्त्वाचे आहे स्त्रियांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे महिला बचत गट आरोग्य आणि स्वच्छतेविषयी ग्रामीण समाजात प्रभावी जनजागृती करत आहेत गट सदस्याने गावामध्ये आरोग्य शिबिरे स्त्रीरोग तपासणी शिबिरे आणि पोषण मोहिमा आयोजित केल्या संपूर्ण आरोग्य ग्राम आणि ग्राम स्वच्छता अभियान अशा उपक्रमामध्ये महिला बचत गटांचा सहभाग उल्लेखनीय आहे कुटुंब नियोजन बाल आरोग्य आणि सुरक्षित मातृत्व या विषयावर त्यांनी समाजात सकारात्मक संदेश दिला.

**ग्रामीण भागातील महिलांच्या सद्यस्थितीतील आव्हाने:**

१) रुढीवादी विचार: आज हे अनेक ठिकाणी पुरुष सत्ता सत्ता क विचारसरणी पारंपारिक रूढीचा पगडा आहे ज्यामुळे स्त्रियांच्या प्रगतीला अडथळा येतो.

२) दुहेरी कामाचा ताण: घरकाम आणि शेतीतील काम किंवा इतर रोजगार असे दुहेरी कामाचे स्वरूप त्यांच्यावर असते त्यामुळे ताण आणि नैराश्य येते.

३) शिक्षणाचा अभाव आणि आरोग्याच्या समस्या

४) जड घरगुती कामे आणि वेळेची कमतरता सामाजिक रूढी आणि परंपरा ज्यामुळे करिअरच्या संधी मर्यादित होतात.

५) मालमत्ता आणि क्रेडिट मध्ये प्रवेशाचा अभाव.

**निष्कर्ष:** ग्रामीण भागातील ग्रामीण भागातील महिलांमध्ये होत असलेले बदल हे परिवर्तनाचे संकेत आहेत योग्य शिक्षण आणि संधी मिळाल्यास त्या देशाच्या विकासात मोठे योगदान देऊ शकतात शहरामधील महिला आणि ग्रामीण महिला यांच्यातील दरी कमी करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

**संदर्भ सूची**


१) काळे, संदीप बी. (संपादक) (सप्टेंबर २०२४) 'लिंगभाव आरोग्य आणि समाज' धुळे, अथर्व पब्लिकेशन, प्राथमवृत्ती.

२) कोळी, एम. एस. आणि क्षीरसागर, ए. आर. (२०२१) . मराठवाड्यातील महिला बचत गटांचा सामाजिक व आर्थिक विकासातील वाटा औरंगाबाद जर्नल ऑफ सोशल सायन्सेस.

३) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (UMED - MSRLM) जिल्हा प्रगती अहवाल लातूर, २०२३.

४) सांबरे, रूपाली वी. (फेब्रु. २०२०) यांचा स्त्रिया आणि आरोग्य वStudies in Indian Place Name - UGC- Care Journal' मधील प्रकाशित लेख.

५) अहिरे, एस. व्ही. (२०१९) . भारतातील महिला सक्षमीकरण आणि सामाजिक परिवर्तन, पुणे: प्रगती प्रकाशन.


# समाजमाध्यमे आणि येवला तालुक्यातील ग्रामीण समाजातील बदल: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**कु. स्नेहा संजय आहेर** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, एस एम आर के बी के ए के महिला महाविद्यालय, नाशिक


**गोषवारा:** ग्रामीण समाज हा पूर्वी परंपरा, रूढी, सामूहिक जीवनपद्धती व मर्यादित संवाद साधनांवर आधारित होता; मात्र माहिती-तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे, विशेषतः समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे, ग्रामीण समाजाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये येवला तालुक्यातील ग्रामीण समाजावर समाजमाध्यमांचा होणारा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व मानसिक परिणाम अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. येवला तालुक्यातील ग्रामीण भागात मोबाईल फोन, इंटरनेट व व्हॉट्सॲप, फेसबुक, युट्यूब, इन्स्टाग्राम यांसारख्या समाजमाध्यमांचा वापर लक्षणीय प्रमाणात वाढलेला दिसून येतो. यामुळे ग्रामीण लोकांच्या विचारसरणीत, जीवनशैलीत, संवाद पद्धतीत व सामाजिक नातेसंबंधांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडून येत आहेत. समाजमाध्यमांमुळे माहितीचा प्रसार अधिक जलद व सुलभ झाला असून शासकीय योजना, रोजगाराच्या संधी, शिक्षण, आरोग्य व सामाजिक जागृतीविषयक माहिती ग्रामीण समाजापर्यंत पोहोचू लागली आहे. परिणामी ग्रामीण समाज अधिक जागरूक, माहितीसमृद्ध व परिवर्तनाभिमुख होत असल्याचे दिसून येते.

समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे काही नकारात्मक परिणामही ग्रामीण समाजात दिसून येत आहेत. युवकांमध्ये मोबाईल व समाजमाध्यमांचे व्यसन, चुकीची व अप्रमाणित माहिती, सामाजिक तणाव, कौटुंबिक संवादातील घट तसेच पारंपरिक सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास या समस्या निर्माण होत आहेत. या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून प्राथमिक व दुय्यम माहितीचे संकलन व विश्लेषण करण्यात आले आहे. अभ्यासातून असे निष्पन्न होते की समाजमाध्यमे ही येवला तालुक्यातील ग्रामीण समाजाच्या परिवर्तनाची प्रभावी साधने ठरत असली तरी त्यांचा अतिरेकी वापर सामाजिक समस्यांना कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे समाजमाध्यमांचा समतोल, सुजाण व उद्देशपूर्ण वापर होणे आवश्यक आहे. योग्य मार्गदर्शन, डिजिटल साक्षरता व जनजागृतीच्या माध्यमातून समाजमाध्यमांचा सकारात्मक वापर ग्रामीण विकास, सामाजिक सक्षमीकरण व सर्वांगीण प्रगतीसाठी उपयुक्त ठरू शकतो.


**प्रस्तावना:** ग्रामीण समाज हा भारतीय समाजव्यवस्थेचा कणा मानला जातो. परंपरागत मूल्ये, सामूहिक जीवनपद्धती, आपुलकीची नातेसंबंध रचना व परस्परावलंबन यांवर आधारित ग्रामीण समाज दीर्घकाळ टिकून राहिला आहे. मात्र, बदलत्या काळानुसार आधुनिकतेचा, जागतिकीकरणाचा व माहिती-तंत्रज्ञानाचा प्रभाव ग्रामीण समाजावर मोठ्या प्रमाणात पडत आहे. या प्रक्रियेमुळे ग्रामीण समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक रचनेत लक्षणीय परिवर्तन घडून येत आहे. विशेषतः समाजमाध्यमांच्या उदयामुळे ग्रामीण भागातील माहितीचे स्वरूप, संवादाच्या पद्धती, सामाजिक संबंध तसेच व्यक्तींची विचारप्रणाली आमूलाग्रपणे बदलत असल्याचे दिसून येते.

येवला तालुका हा नाशिक जिल्ह्यातील शेतीप्रधान ग्रामीण भाग असून येथे पारंपरिक ग्रामीण जीवनशैलीचे स्पष्ट प्रतिबिंब दिसून येते. तथापि, अलीकडच्या काळात मोबाईल, इंटरनेट व विविध समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे येवला तालुक्यातील ग्रामीण समाजही परिवर्तनाच्या प्रक्रियेत सामील झाला आहे. समाजमाध्यमांमुळे ग्रामीण लोकांना माहिती, शिक्षण, रोजगार, आरोग्य व शासकीय योजनांबाबत जागरूकता मिळत असून सामाजिक संवादाचा विस्तार होत आहे. त्याचबरोबर समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापरामुळे काही सामाजिक व सांस्कृतिक समस्या निर्माण होत असल्याचेही लक्षात येते. या पार्श्वभूमीवर समाजमाध्यमे आणि येवला तालुक्यातील ग्रामीण समाजातील बदल यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक व महत्त्वाचे ठरते.

**संशोधनाचे उद्दिष्टे:** येवला तालुक्यातील ग्रामीण समाजात समाजमाध्यमांचा वापर अभ्यासणे. समाजमाध्यमांमुळे सामाजिक व सांस्कृतिक बदलांचा अभ्यास करणे. समाजमाध्यमांचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम अभ्यासणे.

**गृहितकृत्य:** येवला तालुक्यातील ग्रामीण समाजात समाजमाध्यमांचा वापर सामाजिक व सांस्कृतिक बदलांना चालना देतो. युवक वर्गावर समाजमाध्यमांचा प्रभाव वृद्ध लोकांच्या तुलनेत जास्त आहे. समाजमाध्यमांचा नियमित व अतिरेकी वापर कौटुंबिक संवाद कमी करतो आणि सामाजिक तणाव वाढवतो.

**अध्ययन पद्धती:**

**संशोधन आराखडा-** प्रस्तुत संशोधन लेखसाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला आहे. या आराखड्यानुसार येवला तालुक्यातील ग्रामीण समाजावर समाजमाध्यमांचा सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक परिणाम तपासण्याचा प्रयत्न केला गेला आहे. संशोधनाचा उद्देश प्राथमिक माहिती संकलित करून तसेच दुय्यम स्त्रोतांवर आधारित विश्लेषण करून ग्रामीण समाजातील बदलाचे स्वरूप स्पष्ट करणे आहे.

**नमुना निवड:** अभ्यासासाठी सोयीस्कर नमुना निवड पद्धती वापरण्यात आली आहे. येवला तालुक्यातील विविध गावांतील एकूण एकूण व्यक्तींचा नमुना घेतला आहे. यात युवक, युवती, महिला, शेतकरी व शिक्षक यांचा समावेश आहे, जेणेकरून समाजमाध्यमांचा विविध सामाजिक गटांवर होणारा परिणाम समजून घेता येईल.

**तथ्य संकलन: प्राथमिक माहिती :** व्यक्तीगत मुलाखत, प्रश्नावली (Questionnaire), निरीक्षण (Observation) आणि लक्षित गट चर्चा (Focus Group Discussion) या माध्यमातून संकलित केली आहे. **दुय्यम माहिती :** पूर्वी प्रकाशित संशोधन लेख, पुस्तके, शासकीय अहवाल, इंटरनेट स्त्रोत व डिजिटल माध्यमे या माध्यमातून गोळा केली आहे.

**अभ्यास क्षेत्राची निवड:** सदर संशोधनासाठी नाशिक जिल्ह्यातील येवला तालुका निवडण्यात आला आहे. हा तालुका पारंपरिक वस्त्र पैठणी साडीसाठी प्रसिद्ध आहे. येथे पारंपरिक पैठणी व्यवसाय व शेती केली जाते, अलीकडच्या काळात मोबाईल फोन, इंटरनेट सुविधा आणि समाजमाध्यमांचा प्रसार या तालुक्यात वेगाने वाढलेला आहे. व्हॉट्सॲप, फेसबुक, युट्यूब व इन्स्टाग्राम यांसारखी समाजमाध्यमे ग्रामीण युवक, महिला व शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर वापर करीत आहेत. परिणामी, सामाजिक संवाद, माहितीप्राप्ती, विचारसरणी व सांस्कृतिक व्यवहारांमध्ये बदल घडून येत आहेत. त्यामुळे समाजमाध्यमे आणि ग्रामीण समाजातील बदल यांचा अभ्यास करण्यासाठी येवला तालुका विशेषतः निवडण्यात आला आहे.

**अभ्यास क्षेत्राची ओळख:** महाराष्ट्र राज्याच्या उत्तर-पश्चिम भागात असलेला नाशिक जिल्ह्यातील येवला तालुका हा दक्षिण-पूर्व भागात स्थित असून भौगोलिक दृष्टिकोनातून दुष्काळी व अर्धदुष्काळी स्वरूपाचा आहे. या भौगोलिक परिस्थितीचा थेट परिणाम येथील ग्रामीण समाजाच्या आर्थिक, सामाजिक व स्थलांतराच्या प्रक्रियांवर झालेला दिसून येतो. हा तालुका ऐतिहासिक, सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा असून तो विशेषतः पारंपरिक **पैठणी साडी उद्योगासाठी** संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.**पैठणी विणकामाची परंपरा येथे प्राचीन काळापासून आहे**, आणि *पेशवे काळात* या विणकामाला बळकटी मिळाली. पैठणी साडीचे मूळ नाव **पैठण** या नगरावरून आले असले तरी या काळात अनेक विणकर कुटुंबे **पैठणहून येवला, निफाड, सिन्नर भागात स्थायिक** झाली. आणि येवला येथे **हातमाग विणकामाची घरगुती परंपरा** मजबूत झाली.येथील पैठणी व्यवसाय हा पिढ्यान्पिढ्या चालत आलेला पारंपरिक व्यवसाय असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधार मानला जातो. ऐतिहासिक महत्त्व प्राप्त असलेल्या या गावात १८५७ च्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सेनानी **तात्या टोपे यांचा जन्म येथे झाला आहे. व** सामाजिक बदलासाठी प्रेरक ठरलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ऐतिहासिक घोषणा १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येथे झालेल्या सभा दरम्यान त्यांनी 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' ही घोषणा करून येवला केवळ आर्थिक नव्हे तर **सामाजिक व वैचारिक क्रांतीचे केंद्र** ठरले.

पर्जन्यमान, पाण्याची टंचाई आणि शेतीवरील अवलंबित्व यामुळे येवला तालुक्यातील ग्रामीण समाजात संघर्ष, जुळवून घेण्याची क्षमता आणि पूरक व्यवसायांची निर्मिती ही वैशिष्ट्ये आढळतात. याच सामाजिक पार्श्वभूमीत पैठणी साडी उद्योग, मजुरी, लघुउद्योग व स्थलांतर यांसारख्या उपजीविकेच्या मार्गांचा विकास झालेला आहे. त्यामुळे येवला तालुक्यातील ग्रामीण समाज शेती व हस्तव्यवसायावर आधारित आहे.पारंपरिक **पैठणी साडी उद्योग** येथील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून अनेक कुटुंबांची उपजीविका त्यावर अवलंबून आहे. शेती हा दुसरा प्रमुख व्यवसाय असून कांदा, ज्वारी, बाजरी, गहू व भाजीपाला उत्पादन घेतले जाते.

विशेषतः मोबाईल फोन, इंटरनेट सुविधा व समाजमाध्यमांचा प्रसार येवला तालुक्यात वेगाने वाढलेला आहे. व्हॉट्सॲप, फेसबुक, युट्यूब व इन्स्टाग्राम यांसारखी समाजमाध्यमे ग्रामीण युवक, महिला, शेतकरी तसेच पैठणी व्यवसायाशी संबंधित कारागीर मोठ्या प्रमाणावर वापरत आहेत. यामुळे माहितीप्राप्ती, व्यवसाय प्रचार, सामाजिक संवाद व विचारसरणीत बदल होत असून पारंपरिक सांस्कृतिक मूल्ये आणि आधुनिक दृष्टिकोन यांचा संगम दिसून येतो. पारंपरिक **पैठणी साडी उद्योगाकडे लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन बदलत जात आहे, तंत्रज्ञान आणि वेगवेगळ्या यंत्रामुळे हस्तकला पैठणीचे महत्त्व दिवसेंदिवस वाढ होताना दिसत असून दुसरीकडे समाज माध्यमांमुळे त्याचे महत्त्व आणखीनच वाढत आहे.** या लोकसंख्यात्मक विविधता व सामाजिक संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर समाजमाध्यमे आणि ग्रामीण समाजातील बदल यांचा अभ्यास करण्यासाठी येवला तालुका एक महत्त्वपूर्ण व प्रतिनिधीक अभ्यास क्षेत्र ठरतो.

**तथ्यांचे विश्लेषण**

**येवला तालुक्यातील ग्रामीण समाजात समाजमाध्यमांमुळे झालेले परिवर्तन:**

**१] सामाजिक संवादातील बदल:** येवला तालुक्यातील ग्रामीण भागातील एकूण उत्तरदात्यांपैकी ४८% लोकांना समाजमाध्यमांमुळे सामाजिक संपर्कात वाढ झालेली नाही असे वाटते, तर ३७% लोकांना त्याचा सकारात्मक परिणाम जाणवला आहे. आणि १५%

लोकांचे मत आहे की काही प्रमाणात संपर्क वाढला आहे. यावरून बहुसंख्य ग्रामीण लोकांच्या दृष्टीने समाजमाध्यमांचा सामाजिक संपर्क वाढवण्याचा प्रभाव मर्यादित आहे, कारण सोशल मीडिया माहिती, मनोरंजन व व्यावसायिक संदर्भात उपयुक्त असले तरी प्रत्यक्ष सामाजिक संवादावर त्याचा परिणाम सर्वांवर सारखा दिसत नाही; काही लोकांना मात्र मिश्र अनुभव आहे, म्हणजे संवाद काही प्रमाणात वाढला पण तो पूर्णपणे सकारात्मक नाही.थोडक्यात ग्रामीण जीवनातील पारंपरिक समाजावर प्रत्यक्ष संवादावर समाजमाध्यमांचा प्रभाव सर्वत्र दिसून येत नाही. आणि अतिरेकी किंवा एकतर्फी वापर प्रत्यक्ष सामाजिक व कौटुंबिक संबंध टिकविण्यावर मर्यादित ठरतो.

**२] कौटुंबिक नातेसंबंधांवरील परिणाम:** प्रस्तुत संशोधनात एकूण उत्तरदात्यांवर आधारित उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य ६५% लोकांचा असा अनुभव आहे की समाजमाध्यमांचा वापर केल्यामुळे कुटुंबातील प्रत्यक्ष संवाद कमी झाला आहे, तर ३०% लोकांना संवादावर परिणाम झालेला नाही असे वाटते आणि ५% लोकांचा अनुभव मिश्र किंवा काही प्रमाणात बदलला आहे. समाजमाध्यमांचा अतिरेकी किंवा नियमित वापर विशेषतः युवक वर्ग आणि जास्त सोशल मीडिया वापरणाऱ्या कुटुंबांमध्ये कौटुंबिक संवादात घट निर्माण करतो; जरी ती माहिती, मनोरंजन व व्यावसायिक दृष्टिकोनातून फायदेशीर असली तरी प्रत्यक्ष कौटुंबिक संवादावर नकारात्मक परिणाम होत आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे ग्रामीण समाजातील पारंपरिक कौटुंबिक संवाद कमी होण्याचे सांस्कृतिक व सामाजिक बदलाचे लक्षण मानले जाते आणि डिजिटल माध्यमांचा संतुलित व सुजाण वापर न केल्यास पारंपरिक कौटुंबिक मूल्ये व संवाद संरचना धोक्यात येऊ शकतात.

**३] युवकांच्या विचारसरणीतील व जीवनशैलीतील बदल:** एकूण उत्तरदात्यांपैकी जवळजवळ अर्ध्या उत्तरदात्यांना ४६% असे वाटते की समाजमाध्यमांमुळे ग्रामीण युवकांच्या विचारसरणी व जीवनशैलीत बदल झाला आहे, तर ४३% लोकांना काही प्रमाणात बदल झाल्याचा अनुभव आहे आणि ११% लोकांना बदल झालेला नाही असे वाटते. वरील आकडेवारीनुसार समाजमाध्यमांचा ग्रामीण युवकांच्या मानसिकता, आवडीनिवडी, वर्तन व जीवनशैलीवर प्रभाव पडलेला आहे असे दिसून येते मात्र काही प्रमाणात बदल दर्शवणारा अनुभव सूचित करतो की परिणाम संपूर्णपणे सकारात्मक किंवा नकारात्मक नसून मिश्र आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, समाजमाध्यमांमुळे ग्रामीण युवकांचे विचार, आवडीनिवडी, पद्धती व सामाजिक व्यवहार आधुनिक डिजिटल संस्कृतीशी जुळले असून हे बदल पारंपरिक जीवनशैलीत बदल घडवून आणतात, जसे की संवादाची पद्धत, शिक्षणावरील दृष्टिकोन, व्यवसायाची आवड, सामाजिक सहभाग व सांस्कृतिक अनुभव इ. त्यामुळे समाजमाध्यमांचा संतुलित व सुजाण वापर आवश्यक आहे, जेणेकरून युवकांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल साधता येतील आणि पारंपरिक मूल्ये टिकवली जाऊ शकतील.

**४] समाजमाध्यमांमुळे रोजगार/व्यवसायाच्या संधींमधील बदल:** सदर संशोधनातून असे आढळून आले की ,एकूण उत्तरदात्यांपैकी ४३% लोकांना समाजमाध्यमांमुळे रोजगार, व्यवसाय किंवा पैठणी व्यवसाय/शेती/लघुउद्योगाच्या संधींबाबत माहिती मिळणे सोईस्कर झाले आहे, तर ३२% उत्तरदात्यांना ती थोडी उपयुक्त वाटते आणि २५% लोकांना उपयुक्त नाही असे वाटते. असे समजते की बहुसंख्य ग्रामीण लोक समाजमाध्यमांचा व्यवसाय व उपजीविकेच्या बाबत माहिती मिळवण्यासाठी काही प्रमाणात वापर करतात, परंतु पूर्ण परिणामकारकता सर्वांसाठी नाही. समाजमाध्यमांनी ग्रामीण समाजात रोजगार, व्यवसाय वाढवण्यासाठी व आर्थिक संधींबाबत जागरूकता वाढवली आहे. तसेच माहितीचे प्रमाण, डिजिटल साक्षरता आणि तंत्रज्ञानाचा समतोल वापर यावर परिणाम अवलंबून असल्याने व्यवसायाची उपयुक्तता पूर्णपणे प्रत्येकासाठी समान दिसत नाही.

**५] सांस्कृतिक मूल्ये व परंपरांवर होणारा परिणाम:** येवला तालुक्यातील ग्रामीण भागातील एकूण उत्तरदात्यांवर आधारित उत्तरदात्यांपैकी ६६% उत्तरदात्यांना समाजमाध्यमांचा कुटुंबातील पारंपरिक सांस्कृतिक मूल्ये व परंपरांवर **फार प्रमाणात परिणाम** झाल्याचे वाटते, तर सुमारे **३४%** उत्तरदात्यांना काही प्रमाणात परिणाम झाल्याचे वाटते. बहुसंख्य उत्तरदाते समाजमाध्यमांचा पारंपरिक सांस्कृतिक मूल्ये व परंपरांवर लक्षणीय प्रभाव असल्याचे मानतात, तर काहींना हा प्रभाव मध्यम स्वरूपाचा वाटतो. यावरून समजते की ग्रामीण समाजात तंत्रज्ञानामुळे सांस्कृतिक परिवर्तन घडत आहे , जिथे पारंपरिक मूल्ये आणि आधुनिक डिजिटल संस्कृती यांच्यात संघर्ष व समन्वय दोन्ही प्रक्रिया एकाच वेळी घडताना दिसत आहे.

**६] ग्रामीण महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणातील भूमिका:** येवला तालुक्यातील ग्रामीण भागातील एकूण उत्तरदात्यांपैकी सुमारे **५१% लोकांना** समाजमाध्यमांमुळे महिलांचे सक्षमीकरण वाढले असून त्यांचा सामाजिक व आर्थिक सहभाग, आत्मविश्वास, निर्णयप्रक्रियेत सहभाग तसेच बचत गट, पैठणी विणकाम, गृहउद्योग आणि आरोग्य व महिला हक्कांविषयी माहिती मिळण्यात सुधारणा झाली आहे असे वाटते. ३०% **लोकांना** याबाबत कोणताही विशेष बदल जाणवत नाही, व १९% **लोकांना** काही प्रमाणात सकारात्मक परिणाम झाला आहे असे वाटते. यावरून असे समजते की समाजमाध्यमे ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे साधन ठरत असले तरी त्याचा प्रभाव सर्व महिलांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नाही. त्यामुळे डिजिटल साक्षरता, प्रशिक्षण व योग्य मार्गदर्शनाच्या माध्यमातून समाजमाध्यमांचा अधिक प्रभावी वापर केल्यास ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण अधिक व्यापक स्वरूपात साध्य होऊ शकते.

**७] मानसिक व सामाजिक आव्हाने:** प्रस्तुत संशोधनात असे आढळून आले की **एकूण** ५२% उत्तरदात्यांना समाजमाध्यमांवर चुकीची माहिती मिळते असे वाटते , तसेच त्यांचा अतिरेकी वापर मानसिक तणाव किंवा व्यसन निर्माण करतो असे स्पष्टपणे वाटते, तर ३१% उत्तरदात्यांना असा कोणताही गंभीर परिणाम जाणवत नाही आणि १७% उत्तरदात्यांना मिश्र स्वरूपाचा फरक जाणवतो . या आकडेवारी वरुन असे दिसून येते की बहुसंख्य उत्तरदाते समाजमाध्यमांच्या नकारात्मक परिणामांविषयी जागरूक आहेत जसे , चुकीची माहिती, अफवा, मानसिक तणाव व व्यसनाधीनतेबाबत इ. समाजमाध्यमांचा अनियंत्रित व अति वापर ग्रामीण समाजातही

मानसिक आरोग्य व सामाजिक समतोलावर परिणाम करू लागला आहे; त्यामुळे समाजमाध्यमांचा वापर , माहितीची पडताळणी करण्याची सवय आणि समाजमाध्यमांचा संतुलित वापर याबाबत जनजागृती करणे अत्यंत आवश्यक ठरते.

**सकरात्मक परिणाम:** १] ग्रामीण समाजात समाजमाध्यमांमुळे माहितीचा प्रसार जलद व सुलभ झाला असून शासकीय योजना, शिक्षण, आरोग्य व रोजगाराविषयी जागरूकता वाढली आहे. २] रोजगार, व्यवसाय, शेती, पैठणी विणकाम व लघुउद्योगांच्या प्रचार-प्रसारासाठी समाजमाध्यमे उपयुक्त ठरत आहेत. ३] ग्रामीण महिलांना बचत गट, गृहउद्योग व हस्तकला उत्पादनांच्या ऑनलाईन प्रचार-विक्रीमुळे आर्थिक संधी वाढल्या आहेत. ४] ग्रामीण युवकांमध्ये आधुनिक विचारसरणी, नव्या संधींबाबतची जाणीव व जीवनशैलीत सकारात्मक बदल घडून आले आहेत. ५] ग्रामीण समाज अधिक माहितीसमृद्ध, परिवर्तनाभिमुख व आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडला जात आहे.

**नकरात्मक परिणाम:** ६] समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापरामुळे कुटुंबातील प्रत्यक्ष संवादात घट होत असल्याचे दिसून येते. ७] युवक वर्गामध्ये मोबाईल व समाजमाध्यमांचे व्यसन वाढून मानसिक तणाव निर्माण होत आहे. ८] पारंपरिक सांस्कृतिक मूल्ये व रूढी-परंपरांवर नकारात्मक परिणाम होत असल्याचे जाणवते. ९] समाजमाध्यमांचा असंतुलित वापर वेळेचा अपव्यय व कार्यक्षमतेत घट निर्माण करतो. १०] डिजिटल साक्षरतेच्या अभावामुळे अनेक ग्रामीण नागरिक समाजमाध्यमांचा योग्य व सुरक्षित वापर करू शकत नाहीत.

**निष्कर्ष:** प्रस्तुत संशोधनातून असे दिसून येते की समाजमाध्यमांमुळे येवला तालुक्यातील ग्रामीण समाजात माहिती, शिक्षण, आरोग्य तसेच शासकीय योजनांविषयीची जागरूकता लक्षणीयरीत्या वाढली असून रोजगार, शेती, पैठणी व्यवसाय व लघुउद्योगांसाठी माहिती व प्रचाराचे प्रभावी साधन म्हणून त्यांचा वापर होत आहे. समाजमाध्यमांचा ग्रामीण युवकांच्या विचारसरणी, जीवनशैली व आधुनिक दृष्टिकोनावर स्पष्ट प्रभाव दिसून येत असून ग्रामीण महिलांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणास, आत्मविश्वास वाढीस व निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढविण्यासही मदत झाली आहे. त्यामुळे ग्रामीण समाज अधिक माहितीसमृद्ध, परिवर्तनाभिमुख व तंत्रज्ञानाशी जोडला जात असल्याचे आढळते. तथापि, समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापरामुळे कुटुंबातील प्रत्यक्ष संवाद व नातेसंबंधांवर नकारात्मक परिणाम होत असून युवकांमध्ये मोबाईल व समाजमाध्यमांचे व्यसन, मानसिक तणाव व वेळेचा अपव्यय वाढत आहे. याशिवाय पारंपरिक सांस्कृतिक मूल्ये व परंपरांवर परिणाम होऊन सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली असून चुकीच्या माहितीच्या प्रसारामुळे सामाजिक गैरसमज व तणाव निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे समाजमाध्यमांचा उद्देशपूर्ण व संतुलित वापर, डिजिटल साक्षरता वाढविणे आणि जनजागृती करणे अत्यावश्यक असल्याचे निष्कर्षातून स्पष्ट होते.

**शिफारशी:** १] ग्रामीण समाजात डिजिटल साक्षरता कार्यक्रम राबवून समाजमाध्यमांचा सुरक्षित, सुजाण व उद्देशपूर्ण वापर कसा करावा याबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. २] युवकांमध्ये समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी शाळा, महाविद्यालये व ग्रामस्तरावर समुपदेशन व जनजागृती उपक्रम राबवावेत. ३] कुटुंबातील प्रत्यक्ष संवाद व नातेसंबंध टिकवण्यासाठी संतुलित डिजिटल वापराची संस्कृती निर्माण करण्यावर भर द्यावा. ४] युवक व महिलांसाठी समाजमाध्यमांद्वारे कौशल्यविकास, ऑनलाईन शिक्षण व उद्योजकतेला प्रोत्साहन देणारे उपक्रम राबवावेत. ५] समाजमाध्यमांच्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या मानसिक तणाव व व्यसनाधीनतेवर उपाय म्हणून मानसिक आरोग्य जनजागृती व समुपदेशन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. ६] ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था व शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने ग्रामीण विकासासाठी समाजमाध्यमांचा नियोजित व सकारात्मक वापर सुनिश्चित करावा.

**संदर्भसूची:**

1. Government of Maharashtra. (2020). *Rural development initiatives and digital empowerment in Maharashtra*. Mumbai: Government Press.
2. Kothari, C. R. (2014). *Research methodology: Methods and techniques* (3rd ed.). New Delhi, India: New Age International Publishers.
3. https://censusindia.gov.in
4. http://hdl.handle.net/10603/333642

# महिला शेतकऱ्यांच्या प्रगतीमध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सहभाग : समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून एक अभ्यास

**प्रा. स्वाती हरिभाऊ काटे** प्रमुख, समाजशास्त्र विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड

**प्राचार्य डॉ रामचंद्र भिसे** संशोधन मार्गदर्शक,कमलाताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

**प्रस्तावना:** भारतीय अर्थव्यवस्था ही काळानुसार बदलत आहे परंतु तरी देखील शेती हा या व्यवस्थेचा आजही कणा आहे. त्यात फारसा बदल झालेला नाही. प्राचीन काळापासून आजपर्यंत ग्रामीण अर्थव्यवस्था ही कृषी शी संबंधित आहे. यामध्ये महिलांना नेहमीच दुय्यम स्थान प्राप्त झालेले दिसते. आर्थिक दृष्ट्या बहुतांशी स्त्रीया आजही पुरुषांवर अवलंबून आहेत . कृषी व्यवस्थेमध्ये तर महिला पुरुष शेतकऱ्यांच्या बरोबरीने किंबहुना जास्त काम करत करतात परंतु त्यांचे श्रम हे प्रत्यक्ष श्रमात मोजले जाते नाही. एकीकडे पुरुषसत्ताक पद्धतीत स्त्रीचा आदर करणारे विचार प्रत्यक्ष आचरणात किती प्रमाणात आहेत हा भेडसावणारा प्रश्न आहे. एकीकडे स्त्रीला शांकभरी - धनधान्याची देवता मानले असून सर्वांचे पालन पोषण रक्षण ती करते म्हणून पुजले जाते तर दुसरीकडे प्रत्यक्ष जीवन जगताना आजही तिच्या मालकीची हक्काची संपत्ती जमीन घर मिळवण्यासाठी तिला झगडावे लागते. विविध समाज सुधारकांच्या कार्यामुळे विविध कायद्यांमुळे महिलांच्या सक्षमीकरणासाठीच्या केल्या जाणाऱ्या योजना, सामाजिक जागृती इत्यादी

उपक्रमामुळे आज महिलांच्या सामाजिक कौटुंबिक तसेच आर्थिक दर्जामध्ये सुधारणा होताना दिसत आहे. सकारात्मक दृष्टीने असलेले महत्त्वाचे पाऊल म्हणून याकडे पाहता येईल. यामध्ये व्यापक प्रमाणामध्ये जागृती होणे आवश्यक आहे. आज कृषी व्यवस्थेत कष्ट करणाऱ्या स्त्रीच्या सामाजिक दर्जात बदल होण्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्था किती प्रमाणामध्ये सहभागी आहे याचा देखील अभ्यास होणे आवश्यक आहे. प्रस्तुत शोध निबंध ' महिला शेतकऱ्यांच्या प्रगतीमध्ये ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेचा सहभाग: समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून एक अभ्यास ' यामध्ये मी ग्रामीण व्यवस्था त्यात शासकीय कृषी विभागाचा सहभाग आणि यामुळे महिला शेतकऱ्यांच्या जीवनात विशेषतः आर्थिक स्तरांमध्ये झालेल्या बदलाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी मी सहेतूक नमुना निवड पद्धतीचा वापर केला असून वर्णनात्मक संशोधन आराखड्याच्या माध्यमातून शास्त्रशुद्ध पद्धतीने विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. दुय्यम तथ्य संकलनाच्या साह्याने तथ्य संकलन केले असून सामाजिक, स्त्रीवादी विचार, ग्रामीण अर्थव्यवस्था या दृष्टिकोनांचा माझ्या शोधनिबंधासाठी मी वापर केला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी मी खालील उद्दिष्टे मांडली आहेत.

१ ग्रामीण अर्थव्यवस्था आणि लिंगभाव यांचा अभ्यास करणे.

२ ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात शासकीय कृषी विभागाचा सहभाग याचा अभ्यास करणे.

३ ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बदलामुळे झालेल्या महिला शेतकऱ्यांच्या प्रगतीचा आढावा घेणे.

**अभ्यासाची गृहीतके:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी मी खालील गृहीतके मांडली आहेत.

१. ग्रामीण कृषी अर्थव्यवस्था आजही लिंगभावावर आधारित आहे.

२. ग्रामीण अर्थव्यवस्थेवर शासकीय कृषी विभागाचा सकारात्मक परिणाम झाला आहे.

३.महिला शेतकऱ्यांच्या प्रगतीमध्ये ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेचा सहभाग आहे.

१९ व्या शतकात अन्नधान्याची जास्तीत जास्त गरज वाढत्या लोकसंख्येमुळे जाणवू लागली होती. त्यामुळे या सर्व बाबींची चर्चा करून १८८१ च्या फेमिन कमिशनने शिफारस केल्यानुसार जुलै १८८३ मध्ये कृषी खात्याची स्थापना शासनाच्या माध्यमातून करण्यात आली. शेती क्षेत्राशी निगडित सहभागांचा समावेश यामध्ये करण्यात आला. सन १९४२ मध्ये संमत झालेल्या जमीन सुधारणेचा कायदा १९४३ मध्ये अमलात आल्यापासून जमीन सुधारणांची विविध कामे कृषी विभागाच्या वतीने राबवण्यात येऊ लागली. कृषी धोरण ठरवण्यापासून पाणी सिंचनाकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात झाली. शेतकऱ्यांना शेती संदर्भाने अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीचे ज्ञान दिल्यास शेतीशी निगडित उत्पादनात वाढ होऊ शकते. शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. हे लक्षात आल्यावर शेतकऱ्यांना कृषी प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली गेली. १९८१ ते ८२ पासून प्रशिक्षण देणे, कृषी विद्यापीठांची संबंधित सुधारित तंत्रज्ञान सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे विविध प्रकारच्या कृषी विषयक प्रचार सभा घेणे शिबिरे, प्रात्यक्षिक वर्ग, चर्चासत्रे, विविध मेळावे, प्रदर्शने करण्यास प्रारंभ झाला या सर्व बाबींमुळे उत्पादन वाढले. प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचता यावे यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील राहत आहे. प्रत्येकी तीन ते चार खेड्यांसाठी एक कृषी सहाय्यकाचे पद कृषी विभागाने अमलात आणले. या कृषी सहाय्यकाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या शेतकरी कुटुंबाची सरासरी संख्या ८०० ते ९०० पर्यंत असल्यामुळे कृषी तंत्रज्ञान थेट सुलभपणे शेतकऱ्यापर्यंत पोहोचवणे सुलभ झाले.

महिला शेतकऱ्यांचा ग्रामीण भागामध्ये आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी उपलब्ध असलेल्या शेती व **शेतीशी निगडित व्यवसायांची माहिती:** प्रत्यक्ष शेतीशी निगडित व्यवसाय ज्यात भाजीपाला विक्री, ऑरगॅनिक शेती, बी बियाणे विक्री व संवर्धन, शेती अवजारे दुरुस्ती करणे, शेतीशी निगडित लघुउद्योग, नर्सरी उद्योग, शेततळ्याच्या माध्यमातून मासे उत्पादन विक्री उद्योग, कुक्कुटपालन, मेंढ्या पालन, शेळ्या पालन इत्यादींचा समावेश होतो.

**अन्नधान्य प्रक्रिया उद्योग:** अन्नधान्य प्रक्रिया उद्योगात ग्रामीण महिला शेतकरी यांनी सहभाग घ्यावा हे उद्दिष्ट ठेवून विविध व्यवसायांची निर्मिती शासनाकडून केली जाते. तसेच त्यासाठी अनुदानही दिले जाते. अन्न प्रक्रियेवर आधारित उद्योगांची माहिती खालील प्रमाणे सांगता येईल - शेती मध्ये उत्पादित मालाची विक्री करणे. कीटकनाशक खत बी बियाणे इत्यादी तयार करणे व विक्री करणे. शेतीमध्ये उत्पादित केलेल्या मालावरती प्रक्रिया करून त्याचे विविध उत्पादने तयार करणे इत्यादींचा समावेश यामध्ये होतो.

ग्रामीण भागात आवश्यक असणाऱ्या इतर सेवांवर आधारित उद्योग: यात ग्रामीण महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातात अशा प्रकारच्या उद्योगांची माहिती खालील प्रमाणे सांगता येईल संगणक शिक्षण देणे. इलेक्ट्रॉनिक वस्तूंची दुरुस्ती करणे. मोबाईल ची दुरुस्ती करणे. ब्युटी पार्लर ट्युशन्स विविध विषयांचे कोचिंग क्लासेस यावर आधारित व्यवसाय यांच्या माध्यमातून महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम होऊ शकते. छंद कला इत्यादींवर आधारित व्यवसाय देखील ग्रामीण भागामध्ये महिला सुरू करू शकतात ज्यामध्ये हस्तकला जूटच्या पिशव्या बनवणे, मेहंदी, रांगोळी, चित्र, मेणबत्ती तयार करणे, पापड उद्योग, उदबत्ती तयार करणे, पाणी शुद्धीकरण इत्यादी व्यवसायांचा समावेश यामध्ये होतो. तसेच कपड्यांचे दुकान, खाद्यपदार्थ स्टॉल, पिठाची गिरणी, महिला बचत गट, समुपदेशन केंद्र, लाकूड काम, बांबू काम, मधमाशीपालन इत्यादी व्यवसाय महिला ग्रामीण भागामध्ये सुरू करून आर्थिक दृष्ट्या सक्षम बनू शकतात. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच महिला शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवल्या जातात.

उदाहरणार्थ महिला किसान योजना, अनुदान योजना, कर्ज, पिक विमा, आधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यशाळा तसेच महिला शेतकऱ्यांस थेट लाभ देणाऱ्या विविध योजना यांचा सहभाग यात आहे काही महत्त्वाच्या कृषी विभाग योजनांचा लेखाजोखा विशेषतः महिला महिला शेतकरी यांच्यासाठी आखल्या गेलेल्या योजनांचा लेखाजोखा खालील प्रमाणे सांगता येईल.

१ आधुनिक कृषी विषयक तंत्रज्ञान व माहितीचा प्रसार महिला शेतकऱ्यांना करून देणे. २ खते बी बियाणे इत्यादींचा पुरवठा महिला शेतकऱ्यांना करण्यासाठी कार्य करणे. ३ विविध शेती विषयक कौशल्य विकसित करण्यासाठी महिला शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे. ३. कर्ज व अनुदान देणे - महिला शेतकरी शेतमजूर करणाऱ्या महिला इत्यादींना विशिष्ट नियमानुसार कर्ज व अनुदान देणे. ४. बाजारपेठ उपलब्ध करून देणे ज्यात महिला महिलांनी उत्पादित केलेल्या शेतमालास योग्य भाव मिळेल तसेच उत्पादित केलेल्या शेतमालाला ग्राहक मिळावा यासाठी विविध मेळावे घेणे इत्यादी कार्य केले जाते. ५. महिलांना विशेषता अनुसूचित जातीतील महिला शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य आणि व्यवसाय उभारणीसाठी महिला किसान योजना शासनाच्या वतीने केल्या जातात. ६. पिक विमा योजना ज्यात हवामान बदलामुळे शेतीचे शेतमालाचे नुकसान झाल्यास त्यावेळेस महिला शेतकऱ्यास पिक विमा दिला जातो. ७. सूक्ष्म सिंचन आणि यांत्रिकीकरण यासाठी विशिष्ट अनुदान उपलब्ध करून शेतीला लागणारे यंत्र हे महिलांना दिले जाते. ८. कृषी कर्ज व अनुदान योजना म्हणजे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती, पंतप्रधान रोजगार निर्मिती पी एम ई जी पी, अन्नप्रक्रिया पीएमएफ आणि महिला उद्योजकांसाठी अहिल्या देवी योजना इत्यादीमुळे महिला शेतकऱ्यांच्या आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी सहकार्य मिळालेले आहे. ९. बाजारपेठ जोडणी, निविष्ठांची सामूहिक खरेदी, शेतमालाचे मूल्यवर्धन, सामूहिक विक्रीतून उत्पादन वाढवणे, शेतीमाल निर्यात अशा व्यवसायातील संधी शासनाच्या वतीने निर्माण केल्या जात आहेत. यासोबतच पायाभूत सुविधांची उभारणी देखील होत आहे या सर्वांचा फायदा महिला शेतकऱ्यांना त्यांचा सामाजिक कौटुंबिक व आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी होत आहे.

**एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम** Integrated Rural Development Program (IRDP): केंद्र शासनाने सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये २ ऑक्टोबर १९८० या दिवशी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाची सुरुवात केली. ग्रामीण भागातील लहान आणि सीमांत शेतकरी शेतमजूर ग्रामीण कारागीर स्वयंरोजगार निर्मिती आणि दारिद्र्यरेषेखालील असणार्या व्यक्तींच्या उत्पादनात वाढ घडवून आणणे यासाठी ही योजना कार्य करताना दिसते. आय. आर. डी. पी. हे योजना पुढे एस. जी. एस.. वाय. या नावाने एक एप्रिल १९९९ या दिवसापासून सुवर्ण जयंती स्वयंरोजगार या नावाने कार्यक्रम चालू करण्यासाठी कटिबद्ध झाली. या योजनेसाठी वित्त पुरवठा केंद्र व राज्य शासन समप्रमाणात करत असतात. महाराष्ट्रात देखील ही योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची ठरली आहे. आय. आर. डी. पी. चे लाभार्थी - या संदर्भाने वेगवेगळ्या शेतीच्या धोरणांवर विविध प्रकारच्या योजना आखल्या गेल्या त्यांची माहिती खालील प्रमाणे सांगता येईल: १. अल्पभूधारक शेतकरी यात पाच एकर पेक्षा कमी जमीन असणारे तसेच पाण्याखालील जमीन हे १.२५ एकर यापेक्षा कमी असणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश होतो. २. अत्यल्प भूधारक शेतकरी यामध्ये कोरडवाहू जमीन २.५ एकर पेक्षा कमी व पाण्याखाली १.२५ एकरापेक्षा कमी जमीन असणारे शेतकरी यांचा समावेश होतो. ३. भूमिहीन शेतमजूर ज्यात ज्यांच्याकडे स्वतःची जमीन नाही परंतु ते शेतमजूर असून ज्यांच्याकडे केवळ स्वतःचे घर आहे अशा शेतकऱ्यांना तीन हजार रुपयापर्यंत लाभार्थ अर्थसाह्य शासनाच्या वतीने या योजनेच्या माध्यमातून दिला जातो. ४. अवर्षण व व प्रनव क्षेत्रातून निवडलेल्या गट यामध्ये कोरडवाहू जमीन असणारे तसेच पाण्याखालील जमीन असणारे भूमिहीन शेतमजूर त्यांच्याकडे अत्यल्प जमीन आहे साधारणतः १.५ ते ०.७५ जमीन असणारे शेतमजूर यांना ४००० रुपये पर्यंतचा लाभार्थ मिळतो.

**वैयक्तिक लाभदायक योजना**: २५ ते ३३% अर्थसाह्य अल्पभूधारक शेतकऱ्यांना यामध्ये दिले जाते ज्यात पाणी पुरवठ्याच्या लहानकामाचा शेतकऱ्यांच्या स्वतःच्या मालकीच्या विहिरी व वेळ उथळ नलिका विहीर जुन्या विहिरी दुरुस्त करणे डिझेल पंपग्रहे इत्यादी संदर्भात अर्थसाहयांचा समावेश आहे. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी पाणी न लागलेल्या विहिरींसाठी बोरवेल साठी एक हजार रुपये पर्यंत प्रत्यक्ष खर्च मदत करणे. सामूहिक पाणी पुरवठ्याची कामे मूलभूत स्वयंचा विकास शेतकेंद्रासाठी एकूण खर्च त्यापैकी ५०% किंवा दोन लाखावर दोन लाख रुपये पर्यंत अर्थसहाय्य यात केले जाते. कृत्रिम रेतन केंद्र उभारणीसाठी शंभर टक्के अनुदान दिले जाते. शेतमाल वाहतुकीसाठी वाहन खरेदीला ५०% अर्थसहाय्य दिले जाते. लाभार्थी व कारागिरांना मोफत प्रशिक्षण केंद्र जे ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र शेतकरी प्रशिक्षण केंद्र कृषी विज्ञान केंद्र या ठिकाणी दिले जाते. रासायनिक खतांच्या खरेदीसाठी एकूण खर्चाच्या २५% ते ३३ टक्के अर्थसहाय्य अल्पभूधारक शेतकऱ्यांना दिले जाते. अवजारे खरेदी करणे यासाठी एकूण खर्चाच्या २५ ते ३० टक्के अनुदान दिले जाते. शेती विषयक प्रात्यक्षिक घेण्यासाठी पाव ते दीड एकर जमीन जी या प्रात्यक्षिकांच्या कामासाठी वापरली जाते त्यासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या खतांसाठी दोनशे रुपये पर्यंतचे अर्थसहाय्य देण्यात येते. वृक्ष संवर्धनाच्या दृष्टिकोनातून जागरूकता निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांना आपल्या अल्प भूधारक जमीन असलेल्या क्षेत्रांमध्ये रोपे तयार करण्यासाठी चा १००% खर्च हा शासन देतो. भूविकास व मृत्यू संदर्भात करण्याच्या दृष्टिकोनातून या योजनेच्या माध्यमातून शासन मदत करते ज्यात सम पातळीची बांधबंधिस्ती जमिनीचे एकत्र करून सपाटीकरण पाण्याचा निचरा इत्यादी कामासाठी लागणाऱ्या एकूण खर्चाच्या २५ ते ३३ टक्के भक्कम अर्थसाह्य म्हणून अल्पभूधारक जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना दिली जाते. मेंढ्या बकऱ्या वराह पालन कोंबड्या बदके इत्यादीचे पालन व वितरण करण्यासाठी एकूण खर्चाच्या २५ ते ३० टक्के अर्थसहाय्य केले जाते. बैलगाडा फळबागा रोपे तयार करणे, शेतीचे कामे जमिनीची मशागत यासाठी लागणारे अवजारे इत्यादीसाठी येणाऱ्या खर्चासाठी अल्पभूधारक शेतकऱ्यांना एकूण खर्चाच्या २५ ते ३३% अर्थसाह्य देणे. मत्स्य व्यवसायासाठी जाळे वाढवलेले मत्स्यबीज उत्पादन या यासाठी अनुक्रमे एकूण खर्चाच्या २५% ते ३३ टक्के अनुदान शासन देते.

तुटीच्या झाडांची लागवड रेशीम उद्योग मधुमक्षिका पालन शेतकऱ्यांना विविध उद्योगाच्या संदर्भात प्रशिक्षण देणे यंत्र खरेदी करणे इत्यादीसाठी अल्पभूधारक शेतकऱ्यांना अनुक्रमे एकूण रकमेच्या २५ ते ३३% हात अर्थसहाय्यक केले जाते. पैदाशीसाठीच्या कालावधीत चौथ्या महिन्यापासून २८ महिन्यापर्यंत वैरण चाऱ्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या एकूण रकमे च्या ५०% रकमेचे अर्थसहाय्य यात केले जाते.

**कृषी क्षेत्राला अर्थसाह्य व पद पुरवठा करणाऱ्या संस्था:** स्वातंत्र्यापूर्वी सहकारी पतपेढी कायदा १९०४ सहकारी कायदा १८९९ ते १९०५ तसेच १९१२ नुसार ग्रामीण भागात पतपुरवठा करण्या संदर्भात विविध प्रकारची मदत केली गेली. ग्रामीण क्षेत्रांमध्ये विविध कारणांसाठी पत पुरवठा करणाऱ्या वेगवेगळ्या संस्था स्थापन झालेल्या दिसतात शेतकी निगम १९९८ कृषी पुर्नवित व विकास निगम जुलै १९६३ कृषी वित्त निगम १९६८ सहकारी संस्था भूविकास बँक व्यसना इत्यादी काही नावाजलेल्या पतपुरवठा करणाऱ्या संस्था ग्रामीण भागामध्ये असलेल्या दिसतात. भूविकास बँक रचना ही दोन स्तरावर काम करताना दिसते एक प्राथमिक भूविकास जात कर्ज उपलब्ध करून देणे शेतकऱ्यांची जमीन तारण ठेवून कर्ज उपलब्ध करून देणे इत्यादींचा सहभाग आहे. मध्यवर्ती भूविकास बँक सध्या अकरा राज्यात याच्या शाखा कार्यरत आहेत. ज्यामध्ये आंध्र प्रदेश, आसाम, केरळ, हरियाणा, महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, राजस्थान इत्यादी राज्यांचा समावेश होतो.

**प्राथमिक भूविकास बँक:** १९१० मध्ये स्थापन झालेल्या या बँकेला सुरुवातीला जमीन घाणी अधिकोष असे म्हटले जायचे ज्याच्या शाखा १९२५ मध्ये चेन्नई १९२९ मध्ये मुंबई येथे सुरू झाल्या प्राथमिक सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राज्य सहकारी शिखर बँक, वरील सहकारी तत्त्वावर सुरू करण्यात आलेल्या पतपुरवठा संस्थांनी ग्रामीण भागामधील शेतकऱ्यांचे जीवन सुकर करण्यासाठी मदत केली ज्याचा फायदा महिला शेतकरी महिला शेतमजूर यांनाही झालेला दिसतो

**प्रादेशिक ग्रामीण बँक आर. आर. बी. एस.** या बँकेच्या स्थापनेमध्ये आरबीआयची माझी नियंत्रक यस नरसिंह यांचा महत्त्वाचा वाटा आहे. यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट त्या काळात तयार करण्यात आला. ज्यामध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे निर्णय घेतले गेले. प्रादेशिक ग्रामीण बँक ही स्थापन केली जावी या दृष्टिकोनातून या अभ्यास गटाच्या माध्यमातून शिफारशी करण्यात आल्या २६ सप्टेंबर १९७६ रोजी या संदर्भाने अध्यादेश काढला गेला. त्यानंतर ९ फेब्रुवारी १९७६ मध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकेविषयी कायद्याच्या संदर्भाने अंमलबजावणी करण्यात आली.

ग्रामीण भागातील जनतेला वित्तपुरवठाच्या बाबतीमध्ये अधिक सुलभता मिळावी यासाठी ही बँक महत्त्वाची ठरली. तसेच पारंपारिक सावकारांना पर्याय म्हणून देखील आर. आर. बी. एस. कडे ग्रामीण भागातील जनता आशेने पाहू लागली. ग्रामीण भागाच्या विकासात शेतीला कर्ज पुरवठा करण्याच्या बाबतीत विविध सहकारी संस्था अस्तित्वात होत्याच परंतु तरी देखील वित्त प्राधिकरण म्हणून त्या दुर्बल होत्या शेतकरी, शेतमजूर, भूमीहीन, लहान कारागीर यांना पतपुरवठा करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल म्हणून या बँकेकडे पाहिले जाते.

**उमेद अभियान किंवा महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन ज्योती अभियान**: २३ एप्रिल २०२३ रोजी उमेदची स्थापना करण्यात आली. या अभियानाच्या माध्यमातून गरीब महिलांना संघटित करून त्यांना स्वयंसहायता गट एस. एच. जी. आणि प्रभाग संघाच्या माध्यमातून आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवणे, रोजगार उपलब्ध करून देणे आणि शाश्वत उपजीविकेचे स्त्रोत निर्माण करणे यासारख्या उद्दिष्टांच्या माध्यमातून विविध योजना राबवल्या जातात. हे एक राष्ट्रव्यापी अभियान आहे. ज्यातून महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी प्रयत्न केले जातात. यात महिलांना व्यवसायासाठी बिनव्याजी कर्ज उपलब्ध होऊ शकते. तसेच आर्थिक मदतीसाठी उत्पादित केलेल्या मालाला योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी देखील प्रयत्न केले जातात. साधारणता एक हजाराच्या आसपास महिला सभासद यात असून ११०० रुपये शेअर्स सभासद फी या अभियानात अभियानाची सदस्य होण्यासाठी भरली जाते. अशात याची व्यापकता वाढली आहे. आणि अलीकडील काही वर्षांमध्ये शेतीला उद्योगाचे स्वरूप देण्यासाठी कंपन्यांच्या माध्यमातून ४१० महिला शेतकरी कार्य करत आहेत. यामध्ये साधारणता ३०७ कंपन्यांची नोंदणी झाली आहे केंद्र सरकारच्या दहा हजार शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना या योजनेतून होऊन २८ जिल्ह्यात ७५ महिला कंपन्यांमध्ये ६३ हजार महिला सहभागी झाल्या आहेत. साधारणतः विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील महिलांना विशेषतः शेतकरी महिलांना एकत्र आणून उत्पादनाचे ब्रँडिंग प्रक्रिया आणि थेट निर्यात हे मुख्य उद्दिष्ट ठेवून प्रायोगिक तत्त्वावर विविध जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबवला जात आहे. बीज भांडवल पुरवठा दैनंदिन कामकाज आणि मालाच्या खरेदीसाठी आर्थिक बळ तांत्रिक प्रशिक्षण देणे इत्यादी बाबतीत सहकार्य यामधून केले जात आहे. यातील सहभागी जन्नानांमध्ये वाढ होताना दिसत आहे.

**सारांश:** स्त्रीवादाच्या विविध सामाजिक चळवळी समाज सुधारकांची कार्य तसेच शासनाच्या वतीने करण्यात येणारे वेगवेगळे कायदे स्त्री सक्षमीकरणासाठीच्या योजना आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी या सर्वांचा परिणाम म्हणजे आज महिलांच्या सामाजिक दर्जात सुधारणा झालेली आहे. ज्याला कृषी क्षेत्र अपवाद नाही. शेतीमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांना मजुरी देखील पुरुषांच्या बरोबरीने मिळत नाही या संदर्भाने ग्रामीण भागामध्ये विचारणा केल्यास जुन्या वृद्ध स्त्रियांनी तसेच पुरुषांनी सांगितलेले उत्तर आश्चर्यकारक वाटले त्यांच्या मते पुरुष हा सूर्य उगवताच शेतीमध्ये काम करण्यास येत असे तर स्त्री ही दहाला साधारणतः शेतीमध्ये काम करण्यासाठी येत असे त्यामुळे तिची मजुरी पुरुषांच्या तुलनेने कमी असेल असा अलिखित नियम ग्रामीण भागामध्ये तयार झाला. जो आजही बदललेला नाही. काही उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला शेतकरी या प्रगती करताना दिसत आहेत. त्यातील काही महिला शेतकऱ्यांना विविध पुरस्काराने सन्मानित देखील करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने जिजामाता कृषी भूषण पुरस्कार हा अशाच प्रगतिशील महिला शेतकऱ्यांना दिला जातो तसेच केंद्र शासनाच्या वतीने देखील पद्मभूषण, पद्मश्री इत्यादी सारखे सन्मान महिला शेतकऱ्यांना मिळालेले आहेत, ज्यामध्ये राहीबाई पोहोरे या बीजमाता कमला पुजारी अत्रम, पद्माबाई, त्रिनिटी साईओ इत्यादी महिलांचा समावेश यात झालेला दिसतो.

शेतीमध्ये नवीन उपक्रम राबवणे पारंपारिक सेद्रीय शेती करणे नवीन व्यवसाय तयार करणे उत्पादन वाढवणे, तसेच नाविन्य पद्धतीने शेती करणे नवीन शोध लावणे यामध्ये आज शेतकरी महिला पुढे जाताना दिसतात अशा महिलांची संख्या काही हजारांच्या वर गेलेली आहे .

**निष्कर्ष** १. ग्रामीण समाज व्यवस्थेत पुरुषसत्ताक पद्धतीच्या दृष्टिकोनामुळे अर्थव्यवस्थेत स्त्रीला दुय्यम स्थान आहे. २. महिलाच्या नावाने पुरुषांच्या तुलनेने जमीन, शेत जमीन ही कमी आहे किंबहुना नाही. त्यामुळे बहुतांशी महिला या महिला शेतकरी जरी असल्या तरी देखील त्या शेतमजूर म्हणूनच गणल्या जातात. ३. कृषी व्यवस्थेच्या संदर्भात शासकीय धोरणे, कायदे, विविध उपक्रम, योजना राबवल्या जातात. ज्याचा सकारात्मक परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्था तसेच महिला शेतकरी यांच्या सर्वांगीण प्रगतीच्या जीवनासाठी झालेला आहे. ४. महिला या कृषी व्यवसायाशी निगडित कामे करून देखील स्वतःचा कौटुंबिक सामाजिक आर्थिक दर्जा बदलू शकतात. समाजात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करू शकतात. ५. महिला शेतकरी पुरुष शेतकऱ्यांच्या तुलनेने मानसिक दृष्ट्या अधिक कणखर आहे. ६. ग्रामीण विकास करायचा असेल तर ग्रामीण महिला सक्षमीकरणया संदर्भाने व्यापक कार्य होणे आवश्यक आहे. ७. शासकीय योजनांच्या माध्यमातून महिला शेतकर्यांना मिळणारी मदत हि अत्यल्प आहे. ८. महिला शेतकरी सक्षम झाली तर देशाचे दरडोई उत्पन्न वाढू शकते. ९. शेतीच्या विविध योजनांमुळे शेतकरी कुटुंब हे उदारमतवादी स्त्रीवादी दृस्तीकोनातून जीवन जगू शकते.

**संदर्भ सूची:**

सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र - डॉक्टर प्रदीप आगलावे
शोध पद्धती रिसर्च मेथोडोलॉजी (मेथड अँड टेक्निक्स) सी.आर. कोठारी
मूलभूत समाजशास्त्रीय विचार पाश्चात्त्य आणि भारतीय - डॉक्टर प्रदीप आगलावे, साईनाथ प्रकाशन नागपुर
भारतीय अर्थव्यवस्था -सुखदेव खंदारे, एज्युकेशन पब्लिकेशन औरंगाबाद
भारतीय ग्रामीण समाजशास्त्र -प्राध्यापक चंद्रकांत रघुनाथ खंडागळे
krishi.maharastra.gov.in
https://www.umed.in
https://financialservices.gov.in

# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जननी व शिशु सुरक्षा योजनेचे कार्यान्वयन व परिणाम : एक विश्लेषणात्मक अभ्यास

**सुजाता स्वामी कनके** संशोधक विवेकानंद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
**डॉ. बाळासाहेब. ब. शेंडगे** विवेकानंद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा:** भारतामध्ये माता व बाल आरोग्य हा सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा केंद्रबिंदू मानला जातो. मातामृत्यू दर (MMR) आणि बालमृत्यू दर (IMR) कमी करणे हे राष्ट्रीय आरोग्य धोरणातील महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी भारत सरकारने २०११ मध्ये जननी व शिशु सुरक्षा योजना (JSSK) अमलात आणली. या योजनेअंतर्गत सर्व गर्भवती महिलांना आणि नवजात शिशूंना शासकीय आरोग्य संस्थांमध्ये प्रसूतीसंबंधित सर्व सेवा विनामूल्य उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात या योजनेच्या अंमलबजावणीची परिणामकारकता अभ्यासण्यात आली आहे. अभ्यासासाठी २०१५ ते २०२४ या कालावधीतील दुय्यम सांख्यिकीय माहितीचा उपयोग करण्यात आला. संस्थात्मक प्रसूतींचे प्रमाण, मातामृत्यू दर आणि बालमृत्यू दर यांमधील बदलांचे विश्लेषण करण्यात आले. आकडेवारीचे परीक्षण टक्केवारी पद्धत, सहसंबंध विश्लेषण आणि रेखीय प्रवृत्ती (Linear Trend) मॉडेल यांच्या साहाय्याने करण्यात आले. अभ्यास निष्कर्ष दर्शवितात की संस्थात्मक प्रसूतींच्या प्रमाणात सातत्याने वाढ झाली असून मातामृत्यू व बालमृत्यू दरात घट दिसून येते. संस्थात्मक प्रसूती वाढल्यास मातामृत्यू दरात घट होण्याची प्रवृत्ती स्पष्ट होते. तथापि, ग्रामीण व दुर्गम भागात माहितीचा अभाव, वैद्यकीय मनुष्यबळाची कमतरता आणि सुविधांची असमान उपलब्धता ही अंमलबजावणीतील प्रमुख अडचणी आढळतात. अभ्यासाच्या आधारे धोरणात्मक सुधारणा, जनजागृती कार्यक्रमांची वाढ आणि आरोग्य पायाभूत सुविधांची मजबुतीकरणाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.

**की-शब्द:** जननी व शिशु सुरक्षा योजना, माता आरोग्य, बाल आरोग्य, संस्थात्मक प्रसूती, सार्वजनिक आरोग्य धोरण

**प्रस्तावना:** मातृत्व हा स्त्रीच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा आहे. सुरक्षित प्रसूती व नवजात शिशूंचे आरोग्य हे राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक विकासाचे द्योतक मानले जाते. भारतामध्ये ग्रामीण व शहरी भागांमध्ये आरोग्यसेवा उपलब्धतेमध्ये मोठी तफावत आढळते. विशेषतः दुर्गम व आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागांमध्ये प्रसूतीसंबंधित जोखीम अधिक प्रमाणात दिसून येते. राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. त्यापैकी जननी व शिशु सुरक्षा योजना ही मातृ व बाल आरोग्य सुधारण्यासाठी महत्त्वाची योजना आहे. या योजनेद्वारे गर्भवती महिलांना प्रसूतीपूर्व तपासण्या, औषधोपचार, निदान चाचण्या, रुग्णालयात मोफत प्रसूती तसेच नवजात शिशूंना आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. योजनेचा उद्देश केवळ आर्थिक सहाय्य देणे नसून, संस्थात्मक प्रसूतींना प्रोत्साहन देऊन आरोग्यधोके कमी करणे हा आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा मराठवाडा विभागातील प्रमुख जिल्हा असून ग्रामीण लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे. सामाजिक-आर्थिक असमानता, शैक्षणिक पातळीतील फरक आणि आरोग्य सुविधांची मर्यादित उपलब्धता यामुळे माता व बाल आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे या योजनेच्या प्रभावाचे जिल्हास्तरीय विश्लेषण करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत अध्ययनातून या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यक्षमता, परिणामकारकता आणि उर्वरित आव्हाने यांचा शास्त्रीय आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास:** महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या वार्षिक अहवालांनुसार २०१२ नंतर राज्यामध्ये संस्थात्मक प्रसूती दरात सातत्याने वाढ होत असल्याचे निदर्शनास येते. मातृ व बाल आरोग्य सुधारण्यासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजनांचा या वाढीमध्ये महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे अहवाल सूचित करतात. जोशी (२०२१) यांनी ग्रामीण भागातील आरोग्यसेवा वापराच्या संदर्भात मोफत रुग्णवाहिका सेवेचा सकारात्मक परिणाम अधोरेखित केला असून, या सुविधेमुळे गर्भवती महिलांची शासकीय रुग्णालयांकडे जाण्याची प्रवृत्ती वाढल्याचे नमूद केले आहे.

देशमुख (२०२०) यांनी आरोग्य योजनांच्या परिणामांचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्यासाठी सांख्यिकीय प्रवृत्ती विश्लेषण (Trend Analysis) आणि सहसंबंध पद्धती प्रभावी साधने असल्याचे स्पष्ट केले आहे. उपलब्ध साहित्याचा आढावा घेतल्यास बहुतेक संशोधन राष्ट्रीय किंवा राज्य स्तरावर केंद्रित असल्याचे दिसते; मात्र जिल्हास्तरावरील सखोल विश्लेषण तुलनेने मर्यादित आहे. प्रस्तुत अध्ययन छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या संदर्भात ही संशोधन पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करतो.

**अध्ययनाचे उद्देश:** १. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जननी व शिशु सुरक्षा योजनेच्या अंमलबजावणीची स्थिती अभ्यासणे. २. संस्थात्मक प्रसूती दरातील कालानुक्रमिक बदलांचे विश्लेषण करणे. ३. मातामृत्यू दर (MMR) व बालमृत्यू दर (IMR) यांतील बदलांचे परीक्षण करणे. ४. अभ्यासाच्या आधारे धोरणात्मक शिफारसी सुचविणे.

**गृहितके:** $H_0$: संस्थात्मक प्रसूती दर व मातामृत्यू दर यांच्यात सांख्यिकीय दृष्ट्या महत्त्वपूर्ण संबंध नाही. $H_1$: संस्थात्मक प्रसूती दर वाढल्यास मातामृत्यू दरात घट होते.

**अध्ययन पद्धती:**

**संशोधन प्रकार:** प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक (Descriptive) व विश्लेषणात्मक (Analytical) स्वरूपाचे आहे.

**माहितीचे स्रोत:** अभ्यासासाठी दुय्यम स्वरूपातील माहितीचा वापर करण्यात आला आहे. माहिती पुढील स्रोतांतून संकलित करण्यात आली: जिल्हा सामान्य रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर, ग्रामीण व प्राथमिक आरोग्य केंद्रे, अधिकृत आरोग्य विभागीय अहवाल.

**कालावधी:** २०१५ ते २०२४

**सांख्यिकीय साधने:** टक्केवारी विश्लेषण, पिअर्सन सहसंबंध गुणांक, रेखीय प्रवृत्ती (Linear Trend) मॉडेल

**तथ्यांचे विश्लेषण:**

**संस्थात्मक प्रसूती दर:** २०१५ मध्ये संस्थात्मक प्रसूती दर ७२% होता, जो २०२४ पर्यंत ९३% पर्यंत वाढलेला दिसतो. या कालावधीत सरासरी वार्षिक वाढ सुमारे ४ ते ५ टक्के दरम्यान आढळली, ज्यातून योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीची दिशा स्पष्ट होते.

**मातामृत्यू दर (MMR):** २०१५ मध्ये मातामृत्यू दर १४५ होता, तर २०२४ मध्ये तो ८९ पर्यंत घटलेला आढळतो. रेखीय प्रवृत्तीचे समीकरण पुढीलप्रमाणे आहे: $\mathbf{Y = 150 - 6X}$ या समीकरणानुसार दरवर्षी सरासरी ६ अंकांनी घट होत असल्याचे सूचित होते.

**बालमृत्यू दर (IMR):** २०१५ मध्ये IMR ३२ होता, तर २०२४ मध्ये तो १८ पर्यंत कमी झालेला दिसतो. ही घट माता व बाल आरोग्य सेवांमध्ये झालेल्या सुधारणांचे द्योतक आहे.

**सहसंबंध विश्लेषण:** संस्थात्मक प्रसूती दर व मातामृत्यू दर यांच्यात $r = -0.76$ असा मजबूत नकारात्मक सहसंबंध आढळून आला. यावरून संस्थात्मक प्रसूती वाढल्यास मातामृत्यू दरात घट होण्याची प्रवृत्ती स्पष्ट होते. त्यामुळे शून्य गृहितक ($H_0$) नाकारले जाते व पर्यायी गृहितक ($H_1$) स्वीकारले जाते.

**निष्कर्ष:** १. संस्थात्मक प्रसूती दरात सातत्यपूर्ण वाढ झालेली आहे. २. मातामृत्यू व बालमृत्यू दरात लक्षणीय घट आढळली आहे. ३. जननी व शिशु सुरक्षा योजनेचा सकारात्मक परिणाम जिल्हास्तरावर दिसून येतो. ४. ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये काही संरचनात्मक व मनुष्यबळविषयक अडचणी अद्याप अस्तित्वात आहेत.

**शिफारसी:** १. दुर्गम भागांमध्ये आरोग्य पायाभूत सुविधा अधिक सक्षम कराव्यात. २. जनजागृती मोहिमा व आरोग्य शिक्षण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबवावेत. ३. तज्ञ डॉक्टर व प्रशिक्षित परिचारिका यांची उपलब्धता वाढवावी. ४. योजनांच्या अंमलबजावणीचे नियमित मूल्यांकन व डेटा-आधारित पुनरावलोकन करावे.

**संदर्भ सूची:**

महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग. (2023). *मातृ व बाल आरोग्य वार्षिक अहवाल.* मुंबई: लेखक.

राष्ट्रीय आरोग्य अभियान. (2022). *जननी व शिशु सुरक्षा योजना मार्गदर्शक पुस्तिका.* नवी दिल्ली: आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय.

जोशी, आर. (2021). *ग्रामीण आरोग्य व्यवस्थापन.* पुणे: साई प्रकाशन.

देशमुख, पी. (2020). *लोकसंख्या व आरोग्य सांख्यिकी.* नागपूर: विदर्भ प्रकाशन.

# ग्रामीण विकासामध्ये महिलांचे योगदान

**सोनाली तुकाराम गायके** (एम. ए. समाजशास्त्र)

**गोषवारा:** ग्रामीण विकास ही बहुआयामी प्रक्रिया असून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नतीसाठी स्थानिक लोकसहभाग अत्यावश्यक मानला जातो. या प्रक्रियेत ग्रामीण भागातील महिलांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. ग्रामीण भागातील महिलांचा शेती व संलग्न व्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, लघुउद्योग, हस्तकला तसेच घरगुती उत्पादन, व्यवस्थापन यामध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग असतो. त्यांच्या श्रमामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त होते. स्वयं-सहायता बचत गट, महिला मंडळे व विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबनाची जाणीव निर्माण होत आहे. परिणामी, निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नेतृत्व विकसित होत आहे. महिला आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पाणीपुरवठा, पोषण व पर्यावरण संवर्धन यांसारख्या क्षेत्रांत जनजागृती करून सामाजिक परिवर्तन घडवून आणतात. महिलांच्या सक्रिय सहभागामुळे केवळ आर्थिक विकासच नव्हे तर सामाजिक समता, कुटुंबाचे कल्याण आणि शाश्वत विकास साध्य होण्यास मदत होते. म्हणून ग्रामीण विकासाच्या कोणत्याही धोरणात महिलांना केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक ठरते. यामुळे ग्रामीण विकासामध्ये महिलांचे योगदान याविषयी प्रस्तुत संशोधन लेखामध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली आहे तसेच या विषयाच्या अनुषंगाने काही महत्त्वाचे निष्कर्ष आणि शिफारशी मांडण्यात आलेल्या आहेत.

**विशेष शब्द:** ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण, शाश्वत विकास, स्वयं सहाय्यता गट, स्थानिक स्वराज्य संस्था.

**प्रस्तावना:** भारत हा कृषिप्रधान देश असून लोकसंख्येचा मोठा भाग ग्रामीण क्षेत्रात राहतो. ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकत नाही. ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेमध्ये महिला या महत्त्वपूर्ण घटक आहेत. त्या घरगुती जबाबदाऱ्यांबरोबर शेती, पशुपालन, लघुउद्योग, बचत गट, सामाजिक उपक्रम अशा अनेक क्षेत्रांत सक्रिय भूमिका बजावतात. परंतू त्यांच्या योगदानाची दखल अनेकदा औपचारिक पातळीवर घेतली जात नाही. ग्रामीण विकास हा देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा कणा मानला जातो. ग्रामीण भागातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक स्थिती सुधारण्यासाठी विविध योजना राबवल्या जातात. या प्रक्रियेमध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शेती, पशुपालन, घरगुती उद्योग, बचत गट, स्वयंरोजगार, कुटुंब व्यवस्थापन अशा अनेक क्षेत्रांत महिला सक्रियपणे सहभाग नोंदवतात. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेला गती मिळते. महिलांच्या योगदानाचा अभ्यास केल्याने विकासाच्या दिशेचा आणि परिणामांचा योग्य आढावा घेता येतो. महिलांचे सक्षमीकरण, आर्थिक स्वावलंबन आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविणे हे ग्रामीण विकासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे ग्रामीण विकासामध्ये महिलांचे योगदान अभ्यासणे आवश्यक ठरते.

**ग्रामीण विकासाची संकल्पना:** ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे. यामध्ये उत्पन्नवाढ, रोजगारनिर्मिती, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, सामाजिक न्याय इत्यादी बाबींचा समावेश होतो. शाश्वत विकास साधण्यासाठी स्थानिक लोकांचा सहभाग आवश्यक असतो त्याचबरोबर यामध्ये ग्रामीण भागातील महिलांची भूमिका केंद्रस्थानी असते.

**अभ्यासाचे महत्त्व:** ग्रामीण विकासात महिलांचे योगदान ओळखल्याने धोरणे अधिक परिणामकारक बनवता येतात. महिलांना संसाधने, शिक्षण व संधी उपलब्ध करून दिल्यास विकासाचा वेग वाढू शकतो. ग्रामीण भागातील महिलांचे शेती व संलग्न क्षेत्रातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष योगदान स्पष्टपणे समोर येईल. महिलांचे श्रम, कौशल्य आणि जबाबदाऱ्या यामुळे कुटुंबाचे उत्पन्न, अन्नसुरक्षा आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी महत्वपूर्ण शिफारशी सुचवित येईल. तसेच महिलांचे काम अनेकदा नोंदले जात नाही किंवा त्याची दखल घेतली जात नाही, ही बाब अधोरेखित करता येईल. त्यामुळे महिलांना प्रशिक्षण, कर्जसुविधा, तंत्रज्ञान आणि निर्णय प्रक्रियेत अधिक संधी देण्याची गरज या अभ्यासातून ठळकपणे मांडली जाईल.

**संशोधनाचे उद्दिष्टे:** १) ग्रामीण विकास प्रक्रियेत महिलांची भूमिका समजून घेणे. २) शेती व संलग्न क्षेत्रातील महिलांच्या सहभागाचा अभ्यास करणे. ३) महिला बचत गट व स्वावलंबन यांचा विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे. ४) महिलांना भेडसावणाऱ्या अडचणी शोधून काढणे. ५) महिला सक्षमीकरणासाठी उपाय सुचविणे.

**संशोधनाचे गृहीतके:** १) ग्रामीण विकासात महिलांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. २) महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणामुळे कुटुंबाचे जीवनमान सुधारते. ३) स्वयं सहाय्यता गटांमुळे महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढतो. ४) योग्य प्रशिक्षण व संधी मिळाल्यास महिला विकास प्रक्रियेला अधिक गती देऊ शकतात.

**संशोधन साहित्याचा आढावा:**

ग्रामीण विकास आणि महिला सक्षमीकरण या विषयावर अनेक अभ्यासकांनी संशोधन केले आहे. विविध अहवालांमध्ये असे आढळून येते की ग्रामीण महिलांचा शेती, दुग्ध व्यवसाय, हस्तकला, घरगुती उद्योग यामध्ये मोठा वाटा आहे. स्वयं सहाय्यता गटांमुळे महिलांमध्ये बचतीची सवय वाढली, कर्ज उपलब्ध झाले आणि उद्योजकता विकसित झाली आहे. काही संशोधनांत महिलांना सामाजिक बंधने, अशिक्षण, संसाधनांची कमतरता यांसारख्या अडचणींचाही उल्लेख आहे. त्यामुळे महिलांचे योगदान वाढविण्यासाठी धोरणात्मक उपायांची गरज असल्याचे दिसून येते.

**संशोधन पद्धती:** सदरील अध्ययनासाठी वर्णनात्मक (Descriptive) संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख, शासकीय अहवाल, संकेतस्थळे यामध्यमातून माहिती संकलित केली आहे. सदरील माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष मांडले आहेत.

**महिलांची सामाजिक व आर्थिक भूमिका:** ग्रामीण महिला घरकामाबरोबरच शेतीमधील कामे, जनावरांची देखभाल, इंधन, पाणी आणणे, लघुउद्योग अश्या विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर योगदान देतात. अनेक वेळा त्यांचे काम औपचारिक अर्थव्यवस्थेत मोजले जात नाही, परंतु प्रत्यक्षात कुटुंबाच्या उत्पन्नात त्यांचा मोठा वाटा असतो. ग्रामीण महिला कुटुंब व्यवस्थापन, मुलांचे संगोपन, स्वच्छता, आरोग्य यामध्ये सुध्दा महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच ग्रामविकासाच्या विविध योजनांमध्ये सहभागी होतात. पंचायतराज व्यवस्थेत महिलांच्या वाढत्या प्रतिनिधित्वामुळे स्थानिक पातळीवर विकासाला चालना मिळत आहे.त्याचबरोबर महिलांच्या सहभागामुळे सामाजिक जागरूकता वाढत आहे, यामुळे बचतीची प्रवृत्ती निर्माण होते आणि सामूहिक कृतीला बळ मिळते. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये स्त्रियांचा वाटा पुरुषांच्या तुलनेत खूप कमी असल्याचे दिसून येते. यापूर्वी झालेल्या सामाजिक सुधारणांचे हे अपयश आहे असे म्हटले तरी योग्य ठरेल. स्त्री ही मानवी सजीव सृष्टीची जननी आहे. तसेच ती मानवाच्या उत्पत्तीची जननी सुद्धा आहे. महिलांमध्ये स्व-जाणिवांचा विकास करणे, तिच्या हक्क व अधिकारांविषयी तिला जागृत करणे, तिला निर्णय घेण्यास सक्षम बनविणे यासाठी महिला सक्षमीकरणाचे धोरण महत्वाचे आहे. कारण कोणत्याही समाजाचे सम्यक आकलन होण्यासाठी त्या समाजातील स्त्रियांच्या दर्जाचा अभ्यास होणे आवश्यक असते. समाजातील जवळपास निम्मी लोकसंख्या स्त्रियांची असून समाजाच्या जडणघडणीमध्ये त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. परंतू समाजातील पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे स्त्रीला नेहमीच दुय्यम स्थान देण्यात आले असल्याचे आढळते.

**शेती व संलग्न क्षेत्रातील योगदान:** ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेती व संलग्न क्षेत्रात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आणि बहुआयामी आहे. अनेक ठिकाणी महिला या प्रत्यक्ष शेतमजुरीपासून व्यवस्थापनापर्यंत विविध भूमिका पार पाडताना दिसतात. भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर आधारित आहे. पेरणी, खुरपणी, कापणी, मळणी, बियाणे निवड, दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन या सर्व कामांमध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. भाजीपाला व बागायती पिकांची देखभाल करणे ही कामेही त्या कुशलतेने करतात. ग्रामीण भागातील महिला शेती उत्पादनात मोठे योगदान देत असतात. त्यामुळे कुटुंबाचे उत्पन्न वाढविण्यात आणि अन्नसुरक्षेमधील महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरते. एकूण परिणाम अभ्यासल्यास महिलांच्या श्रमामुळे कुटुंबाचे उत्पन्न वाढते, अन्नसुरक्षा मजबूत होते आणि ग्रामीण विकासाला गती मिळते. त्यांचे योगदान बहुधा अदृश्य राहते, परंतु प्रत्यक्षात शेती व्यवस्थेच्या यशात त्यांचा मोठा वाटा असल्याचे आढळून येते.

**स्वयं सहाय्यता गट (Self Help Groups) आणि महिला सक्षमीकरण:** महिलांच्या बचत गटांमुळे आर्थिक स्वावलंबन वाढले आहे. बचत, कर्ज सुविधा, लघुउद्योग, उद्योजकता यामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढलेला आहे. निर्णय प्रक्रियेत त्यांचा वाढत सहभाग यामुळे ग्रामीण विकासात सकारात्मक बदल झालेला आढळत आहे. महिला सक्षमीकरणांमध्ये महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यक्रम आणि विविध योजना तयार करणे तसेच अशा कार्यक्रमांना व योजनांना गती देणे गरजेचे आहे. मात्र ग्रामीण भागातील महिला अजूनही पाहिजे तेवढ्या सक्षम झालेल्या नाहीत. यामागचे प्रमुख कारण ग्रामीण भागातील महिलांचे शिक्षणाचे प्रमाण कमी असते. महिलांप्रती होणारे दुर्व्यवहार, हिंसाचार, अत्याचार कमी करणे अथवा नष्ट करणे. महिलांना कौटुंबिक, आर्थिक निर्णय घेण्यास सक्षम बनविणे. महिलांना शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा यांची तत्परतेने पूर्तता करणे. पुरुषांप्रमाणे महिलांना सामाजिक, आर्थिक राजकीयदृष्ट्या समान अधिकार देणे. वरील सर्व बाबींवर बारकाईने विचार करून महिला सक्षमीकरणाचे धोरण ठरविले पाहिजे.

**शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील भूमिका:** कुटुंबातील मुलांचे शिक्षण, पोषण, स्वच्छता याकडे महिला विशेष लक्ष देतात. त्यामुळे पुढील पिढी अधिक सक्षम बनते. शिक्षण व आरोग्य क्षेत्रात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आणि प्रभावी आहे. कुटुंबात आई ही मुलांची पहिली शिक्षिका असते; ती मुलांच्या सवयी, संस्कार, शिस्त आणि शिक्षणाची गोडी निर्माण करते. शाळा, अंगणवाडी, स्वयंसेवी संस्था यांमधूनही महिला शिक्षिका व कार्यकर्त्या ज्ञानप्रसाराचे काम करतात. आरोग्य क्षेत्रात सुद्धा महिला कुटुंबाच्या पोषण, स्वच्छता आणि आरोग्याची मुख्य जबाबदारी सांभाळतात. आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, परिचारिका यांच्यामार्फत लसीकरण, मातृ-बाल संगोपन, आरोग्य जनजागृती अशी महत्त्वाची कामे केली जातात.यामुळे कुटुंबाचे जीवनमान उंचावते आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. आरोग्यविषयक सवयी सुधारण्यात महिलांचा वाटा अतिशय महत्त्वाचा असल्याचे आढळून येते.

**स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभाग:** ग्रामीण भागातील महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभाग हा लोकशाही बळकट करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर पंचायत राज व्यवस्थेत महिलांसाठी आरक्षण उपलब्ध झाल्यामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्तरांवर महिलांचा सहभाग वाढल्याने पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण, महिला व बालकल्याण यांसारख्या विषयांना प्राधान्य मिळू लागले आहे. तसेच ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद स्तरावर महिलांना नेतृत्वाच्या संधी मिळाल्या आहेत. महिलांच्या सहभागामुळे निर्णय प्रक्रियेत स्थानिक गरजा अधिक प्रभावीपणे मांडल्या जातात आणि विकासकामांना सामाजिक दृष्टी मिळते. यामुळे महिलांचे सक्षमीकरण वाढते, आत्मविश्वास निर्माण होतो आणि समाजात त्यांचे स्थान उंचावते मदत झाली आहे.

**शासकीय योजनेतील सहभाग:** शासकीय योजनांमध्ये ग्रामीण भागातील महिलांचा सहभाग दिवसेंदिवस वाढताना दिसतो. विविध योजना महिलांचे आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक सक्षमीकरण साध्य करण्यासाठी राबविल्या जातात. महिला सक्षमीकरणासाठी

शासनाने विविध योजना राबवल्या आहेत जसे की, राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान (NRLM), महिला बचत गट, उज्ज्वला योजना, जनधन योजना, सुकन्या समृद्धी योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मातृत्व लाभ योजना इत्यादी. या योजनांमुळे महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा होत आहे. महिला स्वयंसहाय्यता बचत गटांद्वारे कर्ज, उद्योजकता, उत्पादन व विपणन यामध्ये सहभागी होतात. अशा उपक्रमांमुळे महिलांना थेट फायदा मिळतो. अनेक महिला या योजनांची माहिती इतरांपर्यंत पोहोचवणे, अर्ज प्रक्रिया पूर्ण करणे आणि लाभ मिळवून देणे यामध्ये पुढाकार घेतात. यामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढतो, कुटुंबाचे उत्पन्न सुधारते आणि ग्रामीण विकासाला चालना मिळते.

**ग्रामीण भागातील महिलांसमोरील आव्हाने:**

ग्रामीण भागातील महिला कुटुंब, शेती आणि समाज यामध्ये मोठे योगदान देत असल्या तरी त्यांना अनेक अडचणी व मर्यादा सहन कराव्या लागतात. यामध्ये अशिक्षण, आर्थिक साधनांची कमतरता, मालमत्तेवरील हक्क कमी असणे, सामाजिक बंधने, दुहेरी कामाचा ताण इत्यादी समस्या अजूनही मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे त्यांच्या पूर्ण क्षमतेचा वापर होऊ शकत नाही. सर्वप्रथम शिक्षणाचा अभाव आणि माहितीची कमी उपलब्धता हे मोठे आव्हान आहे. त्यामुळे शासकीय योजना, नवीन तंत्रज्ञान किंवा रोजगाराच्या संधी यांचा पुरेसा लाभ त्यांना घेता येत नाही. आर्थिक अवलंबित्व हीदेखील महत्त्वाची समस्या आहे; मालमत्ता किंवा उत्पन्नावर त्यांचा स्वतंत्र हक्क अनेकदा नसतो. तसेच घरकाम व शेतीकामाचा दुहेरी ताण, आरोग्याच्या सुविधा अपुऱ्या असणे, पोषणाची कमतरता, सुरक्षिततेचे प्रश्न आणि सामाजिक रूढी-परंपरा यामुळे त्यांच्या प्रगतीवर मर्यादा येतात. निर्णय प्रक्रियेत त्यांचा आवाज कमी प्रमाणात ऐकला जातो. या आव्हानांवर मात करण्यासाठी शिक्षण, कौशल्यविकास, आर्थिक संधी, आरोग्य सेवा आणि सामाजिक जनजागृती करण्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे.

**निष्कर्ष आणि शिफारशी:** सदरील अध्यायनावरून असे निष्कर्ष निघतात की, ग्रामीण विकासामध्ये महिलांचे योगदान बहुआयामी आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात त्या केंद्रस्थानी आहेत. मात्र त्यांच्या कामाची योग्य दखल घेतली जात नाही. महिलांना संधी व साधने उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण विकास अधिक वेगाने होऊ शकतो. यासाठी महिलांमध्ये शिक्षण व कौशल्य प्रशिक्षण वाढविणे, स्वयं सहाय्यता गटांना आर्थिक मदत व मार्गदर्शन करणे, महिलांना मालमत्तेवरील हक्क व कर्ज सुविधा उपलब्ध करून देणे, निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे, आरोग्य व पोषणविषयक सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१) पाटील, र. (२०१७ ). ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण. डायमंड पब्लिकेशन्स.
२) देशमुख, स. (२०१५). ग्रामीण विकासात महिलांची भूमिका. पद्मगंधा प्रकाशन.
३) शिंदे, म. (२०१९). पंचायतराज व्यवस्थेत महिलांचा सहभाग. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान.
४)महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग. (२०२०). वार्षिक अहवाल २०१९-२०.
५) Agarwal, B. (2010). Gender and green governance. Oxford University Press.
६) Desai, N., & Patel, V. (2019). Women's participation in rural development: A sociological study. Indian Journal of Social Work.
७)NABARD.(2021). Self Help Group and Financial Inclusion Reports 2020-21.
८) Government of India, Ministry of Rural Development. (2020). Annual report 2019—20.